कविकुलगुरु - कालिदास - संस्कृत - विश्वविद्यालयः

This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

M-2714

| शिर्षक | ग्रंथकार | विषय | विस्तार (पुर्ण/ अपूर्ण) | टिकाकार | आकार | पृष्ठे | लिपी | सामग्री | Lines per page | Letters per line | Condition & age (शके/विक्रम सवंत) | Additional Particulars / Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अध्यात्म रामायण | — | पुराण | अपूर्ण | — | 6/14 | २१०० | मराठि | कागद | 18 | 45 | | |

# अध्याय २९ वा.


बद्रिकाश्रम
धूम्रपानी
तामसी
तपस्वी
ऋषी
योगी
श्रीकाशीविश्वनाथ
श्रीक्षेत्रवाराणशी
भागीरथीचा घांट

श्रीगणेशाय नमः॥ ॥ ओंनमो श्रीगुरुदयार्णव ॥ तुझे कृपेसि नाहीं थांवं[1] ॥ कृपेनें तारिसी जीव ॥ जीवभाव सांडवूनी ॥ १ ॥ सांडवूनि देहबुद्धी ॥ निरसोनि जीवोपाधी[2] ॥ भक्त तारिसी भवाब्धीं[3] ॥ कृपानिधी कृपाळुवा ॥ २ ॥ तुझें पाहतां कृपाळूपण ॥ जीवासि जीवें मारिपूर्ण ॥ नामा रूपा घालिसी शून्य ॥ जाति गोत संपूर्ण निर्दळिसी ॥ ३ ॥ निर्दळूनि आपपरां ॥ निसंतान[4] करिसी संसारा ॥ तो तूं जिवलग सोयरा ॥ कृपाळु खरा घडे केवीं ॥ ४ ॥ जेवीं आंधारीं नांदे सृष्टी ॥ भासती नक्षत्रें खद्योतकोटी ॥ ते आंधारेसीं सूर्य घोंटी ॥ तेवीं तुझी भेटी साधकां ॥ ५ ॥ तुझी जेथ साचार भेटी ॥ तुवां केलिया कृपादृष्टी ॥ संसारभेदाची त्रिकुटी ॥ त्रिगुणेंसी सृष्टी दिसेना ॥ ६ ॥ न दाखवूनि गुणादिसृष्टी ॥ दाविसी अद्वय ब्रह्म दृष्टीं ॥ त्यासि कदा नव्हे दृष्टिभेटी ॥ भेटीसि तुटी कदा नपडे ॥७॥ जो कदा न देखिजे दृष्टीं ॥ त्यासी केवीं होय भेटी ॥ भेटीसि कदां न पडे तुटी ॥ हेही गोष्टी घडे केवीं ॥ ८ ॥ जैसा गर्भ मातेच्या पोटीं ॥ असोनि माउली न देखे दृष्टीं ॥ तरी तिचे भेटीसि नव्हे तुटी ॥ तेवीं तुझे पोटीं साधक ॥ ९ ॥ माता कळवळोनि पाळी तान्हें ॥ शेखीं[5] माउलीतें तें नेणे ॥ तेवीं तुजमाजी अज्ञानें ॥ तुवां प्रतिपाळणें निजबोधें ॥ १० ॥ जन्मल्या बाळाकारणें ॥ माता वाढवी शहाणपणें ॥ तेवीं तुझेनि निजज्ञानें ॥ सज्ञान होणें साधकीं ॥ ११ ॥ साधकीं लाहतां[6] तुझें ज्ञान ॥ थितें नाठवे मीतूंपण ॥ जीव विसरला जीवपण ॥ अद्वयें पूर्ण परमात्मा ॥ १२ ॥ असो तया बहुता गोष्टी ॥ नव्हतां सद्गुरुकृपादृष्टी ॥ करितां उपायांच्या कोटी ॥ नव्हे भेटी परमार्था ॥ १३ ॥ जाहलिया सद्गुरुकृपादृष्टी ॥ साधनें उठती उठाउठी ॥ ब्रह्मानंदें कोंदे सृष्टी ॥ स्वानंदपुष्टी साधकां ॥ १४ ॥ जाहलिया गुरुकृपा प्राप्त ॥ उपनिषदांचा मथितार्थ[7] ॥ साधकांच्या चढे हात ॥ कृपा समर्थ श्रीगुरूची ॥ १५ ॥ सद्गुरुकृपा समर्थ ॥ तेणें कृपें श्रीभागवत ॥ वाखाणिलें जी प्राकृत ॥ शुद्ध मथितार्थ सोलींव ॥ १६ ॥ जनार्दनकृपादृष्टीं ॥ माझ्या मराठ्या आर्ष गोष्टी ॥ रिघाल्या एकादशाचे पोटीं ॥ स्वानंदतुष्टीं निजबोधें ॥ १७ ॥ संस्कृतप्राकृत परवडी ॥ सज्ञान सेविती स्वानंदगोडी ॥ गाय काळी आणि तांबडी ॥ परी दुधीं वांकुडी[8] चवी नाहीं ॥ १८ ॥ तेवीं संस्कृतप्राकृतभाखा ॥ ब्रह्मासि पालट नाहीं देखा ॥ उभय अभेदें वदला एका ॥ साह्य निजसखा जनार्दन ॥ १९ ॥ जनार्दनकृपेस्तव जाण ॥ अष्टाविंशाचें निरूपण ॥ गुह्यगंभीर स्वानंदघन ॥ तेंही केलें व्याख्यान अतिशुद्ध ॥ २० ॥ तेथें नानाविधा[9] उपपत्ती ॥ निजबोधें साधूनि युक्ती ॥ स्वयें बोलिला श्रीपती ॥ ब्रह्मस्थिती निष्टंक ॥ २१ ॥ ब्रह्म अद्वयत्वें परिपूर्ण ॥ तेथ हेतु मातु अनुमान ॥ न रिघे बुद्धियुक्तीसीं मन ॥ अगम्य जाण सर्वार्थीं ॥ २२ ॥ नाहीं दृश्य द्रष्टा दर्शन ॥

---

१ पार, अंत. २ माया. ३ संसारसमुद्रांत. ४ समूळ नाहींसें. ५ परंतु. ६ प्राप्त होतां. ७ सारांश अर्थ. ८ कमीजास्त. ९ अनेकप्रकारची.

नाहीं ध्येय ध्याता ध्यान ॥ कर्म कर्ता कारण ॥ मीतूंपण असेना ॥ २३ ॥ युक्तीनें सांडिला प्राण ॥ दृष्टांतीं वाहिली आण ॥ प्रमाणें जाहलीं अप्रमाण ॥ बोधेंसी क्षीण[1] विवेक जाहला ॥ २४ ॥ तेथ बोलता ना मौन ॥ आकार ना शून्य ॥ गुण आणि निर्गुण ॥ समूळ जाण असेना ॥ २५ ॥ ऐशी ब्रह्माची निजस्थिती ॥ कृष्णकृपा उद्धवासि प्राप्ती ॥ अबळांसि[2] अगम्य निश्चितीं ॥ जन कैशा रीतीं तरतील ॥ २६ ॥ ब्रह्मस्थिति अतिदुर्गम ॥ हें उद्धवासि कळलें वर्म ॥ साधकांचें साधावया काम ॥ उपावो सुगम पूसत ॥ २७ ॥ कृष्ण निजधामा जाईल आतां ॥ मग ब्रह्मप्राप्ति न ये हातां ॥ साधक गुंतती[3] सर्वथा ॥ उपाय तत्त्वतां कोण सांगे ॥ २८ ॥ एवं साधकांचिया हिता ॥ उद्धव कळवळोनि तत्त्वतां ॥ सुगमप्राप्ती ये हाता ॥ तो उपाय अच्युता[4] पूसत ॥ २९ ॥ एकुणतिसावा निरूपण ॥ ब्रह्मप्राप्तीचें सुगम समाधान[5] ॥ सप्रेम भगवद्भजन ॥ तें भक्तिलक्षण हरि सांगे ॥ ३० ॥ सुगम साधनें ब्रह्मप्राप्ती ॥ अबळांसि लाभे जैशा रीतीं ॥ साश्लोकीं[6] देवासि विनंती ॥ उद्धव तदर्थीं करितसे ॥ ३१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धव उवाच ॥ ॥ सुदुस्तरामिमां मन्ये योगचर्यामनात्मनः ॥ यथांऽजसा पुमान् सिद्ध्येत्तन्मे ब्रूह्यंजसाच्युत ॥ १ ॥ ॥टीका॥ ॥ पूर्वाध्यायीं ब्रह्मास्थिती ॥ सांगीतली जे दुर्गम गती ॥ भोळ्याभाविकां अबळांप्रती ॥ हे ब्रह्मप्राप्ती साधेना ॥ ३२ ॥ वस्तु व्यक्त ना अव्यक्त ॥ शेखीं प्रकट ना नव्हे गुप्त ॥ न कळे मूर्त कीं अमूर्त ॥ केवीं साधक तेथ प्रवेशू ॥ ३३ ॥ जें स्थूल ना सूक्ष्म होये ॥ जें आहे नाहीं शब्द न साहे ॥ जेथ पाहतें पाहणें दोनी जाये ॥ तें साधकां होये केवीं साध्य ॥ ३४ ॥ जें दिसे तें ब्रह्म ह्मणावें ॥ तंव ते माया रूपें नांवें ॥ आतां नाहींचि ह्मणोनि सांडावें ॥ तेणेंही नाडावें साधकीं ॥ ३५ ॥ जें आकार ना नव्हे शून्य ॥ जेथें न रिघे ध्येय ध्यान ॥ त्यासि लाजे ज्ञेय ज्ञान ॥ ज्यातें साधन स्पर्शेना ॥ ३६ ॥ जें न चढे शब्दाचे हात ॥ जें नातुंडे[7] मौनाच्या आंत ॥ आंत बाहेर नाहीं जेथ ॥ काय साधकीं तेथ करावें ॥ ३७ ॥ नाहीं आंतबाहेरविचारा ॥ तेथ काय धरावें निर्धारा ॥ जेथ निर्धारूही पुरा ॥ धरावया धीरा धीर नाहीं ॥ ३८ ॥ साधकीं स्थिर करावया मन ॥ कांहीं न दिसे अवलंबनें[8] ॥ तेथें अनात्मे[9] अज्ञान जन ॥ त्यांसि दुस्तर जाण हा योगू ॥ ३९ ॥ यापरी निजात्मप्राप्ती ॥ कदा न चढे[10] अबळांहातीं ॥ मज तंव मानलें निश्चितीं ॥ हे आत्मास्थिती दुस्तरू ॥ ४० ॥ ऐशिया ब्रह्माची ब्रह्मप्राप्ती ॥ अज्ञान अप्रयासें पावती ॥ तैशी सुगम साधनस्थिती ॥ सांग श्रीपती कृपाळुवा ॥ ४१ ॥ तुवां निजधामा प्रयाणें[11] ॥ मांडिलेसें अतित्वरेन ॥ एथ तरावया अज्ञान ॥ सुगम साधन

---

[1] असमर्थ. [2] इतर साधनें करण्यास असमर्थ अशांस. [3] संसारांतच राहतील. [4] कृष्णास. [5] साधन. [6] सहा श्लोकांत. [7] येत नाहीं. [8] आधार. [9] ज्यांस आत्मज्ञान नाहीं असे. [10] येणार नाहीं. [11] गमन.

सांगिजे ॥ ४२ ॥ ह्मणोनि घातलें लोटांगण ॥ धांवोनि धरिले श्रीकृष्णचरण ॥ तुज गेलिया अज्ञान जन ॥ तरावया साधन सुगम सांगे ॥ ४३ ॥ पव्हंणियांपरीस[1] पायउतरा ॥ स्त्रियां अबळां अतिसोपारा ॥ तैशिया उपायप्रकारा ॥ सारंगधरा सांगिजे ॥ ४४ ॥ तुझ्या ठायीं सद्भाव पूर्ण ॥ परी नेणती शब्दज्ञान ॥ ऐसें जें अज्ञान जन ॥ तरावया साधन सुगम सांगे ॥ ४५ ॥ मनोनिग्रहो अतिकठिण ॥ साधकां नेमवेना संपूर्ण ॥ तेचि अर्थीचें निरूपण ॥ उद्धव आपण सांगत ॥ ४६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रायशः पुंडरीकाक्ष युंजंतो योगिनो मनः ॥ विषीदंत्यसमाधानान्मनोनिग्रहकर्शिताः ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ऐके कृष्णा कमलनयना ॥ शिणतां साधक साधना ॥ कदा नाकळवे मना ॥ तेही विवंचना[2] अवधारी ॥ ४७ ॥ निग्रहावया निजमन ॥ साधक साधिती प्राणापानें[3] ॥ त्यांसीही छळोनियां मन ॥ जाय निघोन तत्काळ ॥ ४८ ॥ घालूनियां एकांतीं आसन ॥ मननिग्रहीं जे सावधान ॥ त्यांसीही ठकूनियां मन ॥ जाय निघोन चपलत्वें ॥ ४९ ॥ मननिग्रहीं अतिहटी ॥ ह्मणोनि रिघाले कपाटीं ॥ त्यांसि ठकूनि मन शेवटीं ॥ जाय उठाउठी चपलत्वें ॥ ५० ॥ एक आकळावया मन ॥ त्यजूनि बैसले अन्न ॥ तंव मनें केलें आने आन ॥ जागृतिस्वप्न अन्नमय ॥ ५१ ॥ मनोनिग्रह करितां देख ॥ मन खवळे अधिकाधिक ॥ मनोनेमी सज्ञान लोक ॥ शिणले साधक साधनीं ॥ ५२ ॥ वारा बांधवेल मोटें ॥ अग्नि प्राशवेल अवचटें[4] ॥ समुद्र घोंटवेल घोंटें ॥ मन आत्मनिष्ठे[5] तरी नये ॥ ५३ ॥ आकाश करवेल चौघडी ॥ महामेरु बांधवेल पुडीं ॥ शून्याची मुरडवेल नरडी ॥ परी या मनाच्या वोढी[6] अनिवार ॥ ५४ ॥ काळ जिंकवेल तत्त्वतां ॥ त्रिभुवनींची लाभेल सत्ता ॥ परी मनोनिग्रहाची वार्ता ॥ तुजवीण अच्युता घडे केवीं ॥ ५५ ॥ तापसां मन तत्काळ छळी ॥ नेमस्तांचा नेम टाळी ॥ मन बळियांमाजी बळी ॥ करी रांगोळी धैर्याची ॥ ५६ ॥ मन इंद्रातें तळीं पाडी ॥ मन ब्रह्म्यातें हटेंचि नाडी ॥ ऐशी मनाची वोखटी[7] खोडी ॥ आपल्या प्रौढीं नावरे ॥ ५७ ॥ साधनीं साधक शिणतां ॥ मनोजयो नयेचि हातां ॥ तुजवांचूनि अच्युता ॥ मन सर्वथा नावरे ॥ ५८ ॥ अत्यंत साधूनि निर्वडी ॥ मनोजयो आणितां जोडी ॥ तंव सिद्धींची दाटे[8] आर्डाडी ॥ तेणेंही मन नाडी साधकां ॥ ५९ ॥ तुझी कृपा नव्हतां जाण ॥ साधकां कदा नागवे मन ॥ मनोनिग्रहार्थ जाण ॥ तुझे चरणा शरण रिघावें ॥ ६० ॥ तुझी कृपा नव्हतां जाण ॥ साधकां कदा नावरे मन ॥ तूं तुष्टल्या जनार्दन ॥ मनपणा मन स्वयें विसरे ॥ ६१ ॥ सर्वभावें न रिघतां शरण ॥ साधकां कदा नावरे मन ॥ मनोनिग्रहार्थ जाण ॥ तुजला शरण रिघावें ॥ ६२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अथात आनंददुघं पदांबुजं हंसाः श्रयेरन्नरविंदलोचन ॥ सुखं नु विश्वेश्वर योगकर्मभिस्त्वन्मायया ऽमी विहता

---

[1] गोष्पपदापेक्षां. [2] विचार. [3] प्राणायाम. [4] कदाचित्. [5] स्वाधीन. [6] धांवा. [7] वाईट. [8] गर्दी.

न मानिनः ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ कमलापती कमलवदना ॥ कमलालया कमलनयना ॥ नाभिकमळीं कमलासना ॥ तुवां ब्रह्मज्ञाना अर्पिलें ॥ ६३ ॥ त्या तुझ्या चरणींचें चरणामृत ॥ तुझी कृपा ज्यास होय प्राप्त ॥ मनोजय त्याचा होय अंकित[1] ॥ तो होय विरक्त भव भवा[2] ॥ ६४ ॥ तुझ्या चरणामृताची गोडी ॥ मनोजयातें तत्काळ जोडी[3] ॥ आधिव्याधि भवपाश तोडी ॥ स्वानंदकोडी साधकां ॥ ६५ ॥ सकळ साधनांचें निज सार ॥ सांख्ययोगविवेक सधर ॥ त्या साराचेंही निजसार ॥ तुझी भक्ति साचार श्रीकृष्णा ॥ ६६ ॥ जाणोनि भक्तीचें रहस्य ॥ हृदयप्रेमा लोभलें मानस ॥ तेंचि विज्ञान राजहंस ॥ भजनसारांश सेविती ॥ ६७ ॥ काया वाचा आणि मन ॥ सद्भावें सदा संपूर्ण ॥ ऐशिया भक्तां तुझे चरण ॥ स्वानंद पूर्ण दुभती[4] ॥ ६८ ॥ धर्म अर्थ काम मोक्षांसी ॥ सांग साधनें सिद्धी त्यांसी ॥ विकळ जाहलिया साधनांसी ॥ ये साधकांसी अपावो ॥ ६९ ॥ तैशी तंव तुझी भक्ति नव्हे ॥ तुज भजतां जीवें भावें ॥ भजकां विघ्न कदा न पवे ॥ शेखीं भक्त नागवे विघ्नांशी ॥ ७० ॥ जैं सूर्य आणि खद्योतासी ॥ भेटी होय सावकाशीं ॥ तरी विघ्नें भक्तांपाशीं ॥ धीरू यावयासी न धरिती ॥ ७१ ॥ पडतां पंचानाची घाणी ॥ होय मदगजभंगाणी ॥ तेवीं तुझ्या भावार्थभजनीं ॥ होय धूळधाणी विघ्नांची ॥ ७२ ॥ येणें निश्चयें निजसंपन्न ॥ तुझ्या चरणीं अनन्यशरण ॥ त्यासि नातळे जन्ममरण ॥ मा इतर विघ्न ते कैंचे ॥ ७३ ॥ येणें भावें जे अनन्यशरण ॥ त्यांसि तुझे निजचरण ॥ स्वानंदें सदा करिती पूर्ण ॥ जेवीं कामधेनु जाण निजवत्सा ॥ ७४ ॥ भक्तिसरोवरीं निर्मळ ॥ नवविधरसें रसिक[5] जळ ॥ तेथ तुझें चरणकमळ ॥ विकाशती केवळ भावार्थसूर्यें ॥ ७५ ॥ तेथ स्वानुभवैक[6]भ्रमर ॥ झेंपावोनियां अरुवार[7] ॥ कुचंबो[8] नेदितां केसर ॥ आमोदसार सेविती ॥ ७६ ॥ तेथ विवेकी परमहंस ॥ ते सरोवरींचे राजहंस ॥ चरणकमळीं करूनि वास ॥ आमोद सुरस सेविती ॥ ७७ ॥ होकां आर्तजिज्ञासु अर्थार्थी ॥ हेही ते सरोवरीं असती ॥ परी कमळआमोद सेविती ॥ तरी ते क्रीडती कमळातळीं ॥ ७८ ॥ ऐशिया भोळ्या भक्तांसी ॥ तूं तारिसी हृषीकेशी ॥ एवं जे जे लागले भक्तीसी ॥ अपावो त्यांसी असेना ॥ ७९ ॥ भावें करितां तुझें भजन ॥ भावार्थें होशी प्रसन्न ॥ तुझे प्रसन्न ते चरण ॥ स्वानंदपूर्ण वर्षत ॥ ८० ॥ तूं विश्वमूर्ति विश्वेश्वरू ॥ तूं ब्रह्मादिकांचा ईश्वरू ॥ तुझा जाहलिया अभयकरू ॥ भक्तां भवसागरू स्पर्शेना ॥ ८१ ॥ तुझी भक्ति तें त्यांचें सत्कर्म ॥ तुझा भाव तो त्यांचा स्वधर्म ॥ तुज नैवेद्य अर्पणें उत्तम ॥ तोचि याग परम भक्तांचा ॥ ८२ ॥ नित्य स्मरणें तुझें नाम ॥ हाचि भक्तांचा जपसंभ्रम[9] ॥ तुझें कीर्तन मनोरम ॥ ते समाधि परम भक्तांची ॥ ८३ ॥ एवं भक्त करिती जें जें कर्म ॥ तें तें तूं होसी पुरुषोत्तम ॥

---

१ स्वाधीन. २ संसारांत उत्पन्न होण्याविषयीं. ३ मिळविते. ४ देतात. ५ स्वादु, गोड. ६ आत्मस्वरूपानुभव हाच भ्रमर. ७ हळूव. ८ धक्का. ९ जपाचा उत्सव.

ज्यासि तूं तुष्टसी मेघश्याम ॥ त्यासि भवभ्रम स्पर्शेना ॥ ८४ ॥ यापरी भजनसुखें ॥ भक्त तारिसी निजात्मसुखें ॥ तेणें सुखाचेनि हरिखें ॥ अतिसंतोखें डुल्लत ॥ ८५ ॥ एवं अनपेक्षित भक्तजन ॥ तूं निजसुखें करिशी पूर्ण ॥ तुज न रिघती शरण ॥ ते मायेनें जाण मोहिले ॥ ८६ ॥ जे तुझ्या चरणाशी विमुख ॥ ते स्वप्नींही न देखती सुख ॥ चढतें वाढतें भोगिती दुःख ॥ मायेनें मूर्ख ते केले ॥ ८७ ॥ त्यजूनि तुझे चरणध्यान ॥ करितां योग याग क्रिया दान ॥ तें तें साधकां होय बंधन ॥ खवळे अभिमान ज्ञातत्वें[1] ॥ ८८ ॥ पूर्वश्लोकाचा चरण ॥ त्वन्मायया़ऽमी विहता न मानिनः ॥ ॥ हाचि श्लोकींचा आंतील चरण ॥ उपक्रमोनियां आपण ॥ पंडितांचा ज्ञानाभिमान ॥ अभक्तपण प्रकाशी ॥ ८९ ॥ आह्मी ज्ञाते आह्मी योगी ॥ आह्मी प्रवर्तक कर्ममार्गीं ॥ आह्मी श्रोत्रिय पवित्र जगीं ॥ आमुची मांगी अतिशुद्ध ॥ ९० ॥ लोक केवळ अज्ञान ॥ तैसे आह्मी नव्हों आपण ॥ आमचें वचन प्रमाण ॥ सर्वार्थीं जाण सर्वांशीं ॥ ९१ ॥ आह्मी ज्ञाते हें मानूनि दृढ ॥ ज्ञानाभिमानें केले मूढ ॥ पांडित्यें होऊनि गर्वारूढ ॥ दुःख दुर्वाढ[3] भोगिती ॥ ९२ ॥ अभिमानाऐसा वैरी ॥ आन नाहीं संसारीं ॥ तो हा ज्ञानाभिमानेंकरीं ॥ घाली दुस्तरीं सज्ञान ॥ ९३ ॥ असो हे अभक्तांची कथा ॥ जे चुकले भक्तिपंथा ॥ यालागीं नाना परीची व्यथा ॥ देहअहंता सोशिती ॥ ९४ ॥ जिहीं भक्तीसि विकूनि चित्त ॥ जाहले अनन्यशरणागत ॥ त्यांसि तारिता तूं जगन्नाथ ॥ निजसुखें निजभक्त नांदविशी ॥ ९५ ॥ तुझे जे कां भक्तजन ॥ जिहीं भक्तीसि लाविला प्राणं[4] ॥ त्यांसि न मागतां ब्रह्मज्ञान ॥ सहजें जाण ठसावे ॥ ९६ ॥ तुझें करितां निजभजन ॥ भक्तांसि कदा न बाधी विघ्न ॥ सुखें होती सुखसंपन्न ॥ हेंचि नवल कोण गोविंदा ॥ ९७ ॥ जे तुज अनन्यशरण ॥ तूं सर्वदा त्यांअधीन ॥ तेचि अर्थींचें निरूपण ॥ उद्धव आपण सांगत ॥ ९८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ किं चित्रमच्युत तवैतदशेषबंधो दासेष्वनन्यशरणेषु यदात्मसात्त्वम् ॥ यो रोचयन् सहमृगैः स्वयमीश्वराणां श्रीमत्किरीटतटपीडितपादपीठः ॥ ४ ॥ ॥टीका॥ विघ्न न बाधी तुझ्या भक्तांसी ॥ हें नवल नव्हे हृषीकेशी ॥ तूं भुलोनि भक्तिप्रेमाशीं ॥ भक्ताधीन होशी सर्वदां ॥ ९९ ॥ होऊनि निजदासा अधीन ॥ मध्यरात्रीं पुरविशी अन्न ॥ शेखीं तुज न मिळे भोजन ॥ भुकेल्या पान भाजीचें ॥ १०० ॥ उभयसेनेची देव्हडी[5] ॥ शस्त्रें सुटतां अतिकडाडी ॥ तेथ सोशिसी रथाची वोढी ॥ शेखीं रथींचीं घोडीं तूं धुशी ॥ १ ॥ तुझा मुकुट नाकळे वेदासी ॥ तेथ भक्तांचा चाबूक खोंविशी ॥ देखतां[6] सकळिकां[6] रायांसी[6] ॥ रणीं घोडे धुशी निजांगें ॥ २ ॥ वाग्दोरे धरोनि दांतीं ॥ चारी घोडे चहूं हातीं ॥ धुतां न लाजसी श्रीपती ॥ भक्ताधीन निश्चितीं तूं ऐसा ॥ ३ ॥ बंदीचा सोडविला ज्यासी ॥ तो उग्रसेन स्वामी करिसी ॥ उच्छिष्टें धर्माघरींचीं

---

१ ज्ञातेपणामुळें. २ आचरण, मार्ग. ३ कधीं न संपणारें असें. ४ मन. ५ मध्य. ६ सर्व राजांसमोर.

काढिशी ॥ शेखीं गायी राखिशी नंदाच्या ॥ ४ ॥ असो ते थोरांची थोर मातं[1] ॥ तूंचि मिळोनि गोपाळांत ॥ उभउभ्यां खासी त्यांचा भात ॥ छंदें नाचत त्यांचेनी ॥५॥ ह्मणसी सोंवळें वोवळें ॥ प्रत्यक्ष केवळ गोंवळें ॥ त्यांचेनि उच्छिष्टकवळें ॥ स्वानंदमेळें डुल्लसी ॥ ६ ॥ द्रौपदीचिये अतिसांकडीं ॥ नेसतीं जाहलासि तूं लुगडीं ॥ गोपिकांचिया निजआवडीं ॥ तूं कडोविकडी नाचशी ॥७॥ पूर्णकलशं[3] नेतां पाही ॥ कांटा मोडला गोपीचे पायीं ॥ तो पाय धरूनि हातीं दोहीं ॥ तूं कांटा लवलाहीं फेडिशी[4] ॥ ८ ॥ खांदीं वाहिलें दुर्वासासी ॥ द्वारपाळ तूं बळीपाशीं ॥ ऐसा भक्ताधीन तूं होशी ॥ वचनें वर्तसी दासांच्या ॥ ९ ॥ देवा तूं ऐसें ह्मणसी ॥ गोपाळत्व सत्यत्वें मानिसी ॥ तें तुज न घडे हृषीकेशी ॥ तूं पूज्य होसी सुरनरां ॥ ११० ॥ पूर्वश्लोकींचें पद ॥ श्रीमत्किरीटतटपीडितपादपीठः ॥ ॥ इंद्र चंद्र आणि महेंद्र ॥ ब्रह्मा बृहस्पती आणि शंकर ॥ ऐसे पूज्य जे कां ईश्वर ॥ तेही तुझे किंकर श्रीकृष्णा ॥ ११ ॥ तुझे आसनाचे पादपीठीं ॥ यांच्या मुकुटमणियांच्या कोंटी[5] ॥ घर्षणीं झणत्कार उठी ॥ नमस्कारदाटी सुरवरां ॥ १२ ॥ तुझी आज्ञा न मानितां ॥ ब्रह्मादिकांचिया माथा ॥ साटूं[6] वाजेजी[7] सर्वथा ॥ मा इतरांची कथा ते कोण ॥ १३ ॥ तुझे आज्ञाभेणें जाण ॥ वायु वागवी नेमस्त प्राण ॥ सूर्य चालवी दिनमान ॥ तुझे आज्ञाभेण गोविंदा ॥ १४ ॥ तुझे आज्ञेचे भयभार्गीं ॥ समुद्र मर्यादा नुल्लंघी ॥ तुझ्या आज्ञेच्या नियोगीं ॥ वर्षिजे मेघीं जळ काळीं ॥ १५ ॥ तुझे आज्ञेची अगाध थोरीं ॥ स्वयें मृत्यु वंदी शिरीं ॥ तोही स्वकाळीं प्रळयो करी ॥ आज्ञेबाहेरी कदा न निघे ॥१६॥ आशंका ॥ ॥ मी तंव नंदाचा खिल्लारी ॥ उग्रसेनाची सेवा करीं ॥ माझी हे एवढी थोरी ॥ मिथ्या मुरारी ह्मणशील ॥ १७ ॥ तुवां पाडूनि काळाचे दांत ॥ गुरुपुत्र आणिला एथ ॥ इंद्र केला मानहत[9] ॥ गोकुळीं अद्भुत वर्षतां ॥ १८ ॥ इतरांची गोठी कायशी ॥ होऊनि वत्सें वत्सपाशीं ॥ वेड लाविलें विधात्यासी ॥ शेखीं गोंवळ होशी नंदाचा ॥ १९ ॥ बाणकैवारालागूनी ॥ शिव आला अति कोपोनी ॥ तो त्वां जिंकिला अक्षणीं[10] ॥ शार्ङ्गपाणी ईश्वरेश्वर ॥ १२० ॥ तुझी भेटी घ्यावयाकारणें ॥ उत्कंठा वाहिजे नारायणें ॥ ब्राह्मणअपत्यद्वारां तेणें ॥ तुझी भेटी वांछिणें सर्वदा ॥ २१ ॥ तूं भक्तकाजंपंचानन[11] ॥ सत्य करावया अर्जुन ॥ क्षीरसागरीं रिघोनि जाण ॥ कृष्णनारायण भेटले ॥ २२ ॥ दोहींचे भेटीची परवडी ॥ संत जाणती निज आवडीं ॥ दोघां मिठी पडली वाढी ॥ निजात्मगोडी अभिन्न ॥ २३ ॥ तेथ अर्जुनाशि जाहली व्यथा ॥ थित्या अंतरलों कृष्णनाथा ॥ तंव शेषशयनीं होय देखता ॥ नारायण श्रीकृष्णीं ॥ २४ ॥ कृष्णीं विसरला नारायण ॥ कीं नारायणामाजी श्रीकृष्ण ॥ दोघां नाहीं दोनीपण ॥ स्वरूप परिपूर्ण एकत्वें ॥ २५ ॥ तो

---

१ गोष्ट. २ उष्ट्या घांसानें. ३ पाण्यानें पूर्ण भरलेली घागर. ४ काढिशी. ५ अग्रभाग. ६ मार. ७ बैसे. ८ भीतीनें. ९ गर्वहीन. १० क्षण न लागतां. ११ भक्ताचें कार्य करण्यास सिंहच.

तूं भक्तकाजकैवारी ॥ लीलाविग्रही अवतारधारी ॥ अवतार धरिशी नानापरी ॥ दीनोद्धारी श्रीकृष्ण ॥ २६ ॥ यापरी गा हृषीकेशी ॥
अगाध महिमा तुझेपाशीं ॥ येंचि अवतारीं आह्मांसी ॥ प्रतीतीसी पैं आलें ॥ २७ ॥ अखंड ईश्वराची स्थिती ॥ अनावर्त ज्ञानस्फूर्ती ॥
अद्वयानंदा नाहीं च्युती ॥ अच्युत निश्चितीं याहेतू ॥ २८ ॥ ऐसा तूं अनंत अपरंपार ॥ नियंत्या ईश्वराचा ईश्वर ॥ तरी तूं भक्तकरुणाकर
॥ तोही प्रकार अवधारी ॥ २९ ॥ पूर्वश्लोकींचा चरण[3] ॥ यो रोचयन् सहमृगैः स्वयमीश्वराणाम् ॥ ॥ देवां दुर्लभ जो नमस्कारा ॥ तो
तूं रिसां आणि वानरां ॥ खेंवं[1] देसी रामचंद्रा ॥ लीलावताराचेनि नात्वें ॥ १३० ॥ तुवां बोलावें रुपा करूनी ॥ यालागीं वेद तिष्ठे सावधानीं
॥ तो तूं वानरांच्या कानीं ॥ गुज आलोचूनी सांगशी ॥ ३१ ॥ तुझें ज्ञान न कळे वेदशास्त्रां ॥ तो तूं विचार पुससी वानरां[2] ॥ अनुसरोनि
त्यांच्या मंत्रा ॥ उपायद्वारा वर्तसी ॥ ३२ ॥ अग्नीचीं अवदानें प्रांजळें ॥ कदा न घेसी यज्ञकाळें ॥ तो तूं वानरांचीं वनफळें ॥
खासी कृपाबळें सप्रेमें ॥ ३३ ॥ ऐसें भक्तांचें निजप्रेम ॥ तो तूं प्रतिपाळिसी मेघश्याम ॥ त्या तुजमाजी नाहीं विषम ॥ तूं आत्माराम
जगाचा ॥ ३४ ॥ ॥ एंतदशेषबंधो ॥ ॥ तूं अंतर्यामी निजसखा ॥ परमात्मा हृदयस्थ देखा ॥ तुजमाजी भूतां भौतिकां ॥ भिन्न आवां
का असेना ॥ ३५ ॥ तूं जडातें चेतविता ॥ मूढातें ज्ञानदाता ॥ सकळ जीवां आनंदविता ॥ तुझियाचि सत्तां जग नांदे ॥ ३६ ॥ माता
पित्यांचे सख्यत्व देखा ॥ तो प्रपंचयुक्त आवांका ॥ तूं हृदयस्थ निजसखा ॥ सकळ लोकां सुखदाता ॥ ३७ ॥ ऐसा तूं सर्वांचा हृदयस्थ[4] ॥
सर्वबंधत्वें अतिसमर्थ ॥ जाणसी हृदयींचा वृत्तांत ॥ स्वामी कृपावंत तूं दीनांचा ॥ ३८ ॥ यापरी गा हृषीकेशी ॥ दीनदयाळु निजभक्तांसी
॥ ऐशिया सांडूनि स्वामीशी ॥ कोण धनांधांसी[5] भजेल ॥ ३९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तं त्वाऽखिलात्मदयितेश्वरमाश्रितानां सर्वार्थदं
स्वकृतविद्विसृजेत को नु ॥ कोवा भजेत् किमपि विस्मृतयेऽनुभूत्यै किं वा भवेन्न तव पादरजोजुषां नः ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ विधाता
आणि हरिहर ॥ हे मायागुणीं गुणावतार ॥ तूं मायानियंता ईश्वर ॥ भक्तकरुणाकर सुखदाता ॥ १४० ॥ त्या तुझी करितां निजभक्ती ॥
चारी रुपुषार्थ चारी मुक्ती ॥ भक्तांसि लोटांगणीं येती ॥ एवढी अर्थप्राप्ती निजभक्तां ॥ ४१ ॥ निजभक्तांचें मनोगत[6] ॥ तूं सर्वज्ञ जाणता
भगवंत ॥ भक्तहृदयींचें हृद्गत ॥ जाणोनि सर्वार्थ तूं देशी ॥ ४२ ॥ भावार्थाचें भोक्तेपण ॥ जाणता तूं एक श्रीकृष्ण ॥ तुजवेगळें हें
लक्षण ॥ आणिकां जाण कळेना ॥ ४३ ॥ ऐसा स्वामी तूं उत्तमोत्तम ॥ तुझेनि साधकां सुख परम ॥ आणिक नाहीं तुजसम ॥ तूं पुरुषोत्तम
सर्वांचा ॥ ४४ ॥ तूं सर्वांचा स्वामी होसी ॥ तूं कृपाळु निजभक्तांसी ॥ अग्निविषादिनानाबाधेंसी ॥ तुवां प्रह्लादासी रक्षिलें ॥ ४५ ॥

---

[1] भेट. [2] हनुमान्, सुग्रीव इत्यादिकांस. [3] हें श्लोकांतील मूळपद. [4] अंतर्यामी. [5] ऐश्वर्यानें उन्मत्त झालेल्यास. [6] मनांतील इच्छा.

तुजभक्तांची कृपा प्रबळ ॥ उत्तानचरणाचें[1] तानें बाळ ॥ करोनियां वैराग्यशील ॥ ध्रुवासि अढळें[2] तुवां केलें ॥ ४६ ॥ शत्रुबंधु[3] विभीषण ॥ तुज आला अनन्यशरण ॥ त्याचे कृपेस्तव जाण ॥ सकुळीं[4] रावण उद्धरिला ॥४७॥ छळूनि बांधिलें बळीशी ॥ शेखीं कृपा उपजली कैशी ॥ त्याचे द्वारीं द्वारपाळ होशी ॥ निजलाजेसी सांडूनी ॥ ४८ ॥ ऐशी भक्तकृपा तुजपाशीं ॥ भक्तहृद्गत तूं जाणसी ॥ ऐसा सांडूनि निजस्वामीसी ॥ कोण धनांधांसी सेवील ॥ ४९ ॥ देहादि इंद्रियां जें सुख भासे ॥ तें तुझेनि सुखलेशें ॥ तो तूं सकळसुखसमावेशें ॥ प्रसन्न अनायासें निजभक्तां ॥ १५० ॥ साधु जाणती तुझा महिमा ॥ तूं ज्ञानियांचा अभेदआत्मा ॥ भक्तप्रिय पुरुषोत्तमा ॥ तुझा सुखाचा प्रेमा अप्रमेय ॥ ५१ ॥ तुझे सेवेचिया संतोखें ॥ भक्त सुखावले निजसुखें ॥ त्यांसि देहद्वंद्वजन्मदुःखें ॥ स्वप्नींही संमुखें कदा नव्हती ॥ ५२ ॥ तुझ्या भजनसुखें तुझे भक्त ॥ विषयीं होऊनि विरक्त ॥ ते राज्य समुद्रवलयांकित[5] ॥ थुंकोनि सांडित तुच्छत्वें ॥ ५३ ॥ सकळभोगवैभवेंसी ॥ स्वर्ग आलिया भक्तांपाशीं ॥ ते उपेक्षिती तयाशी ॥ जेवीं राजहंसीं थिल्लरं[6] ॥ ५४ ॥ जे विनटले भजनाच्याठायीं ॥ ते तूं सुखरूप करिशी पाही ॥ देहीं असतां विदेही ॥ सर्वांठायीं समसाम्यें ॥ ५५ ॥ ऐसा स्वामी तूं हृषीकेशी ॥ सदा संतुष्ट निजभक्तांसी ॥ कठिणत्व नाहीं सेवेसी ॥ कैसें ह्मणसी तें ऐक ॥ ५६ ॥ जाणें नलगे परदेशासी ॥ आणि अनवसरू[7] नाहीं सेवेसी ॥ भक्तांनिकट अहर्निशीं ॥ तूं हृदयनिवासी परमात्मा ॥ ५७ ॥ सेवेलागीं नलगे धन ॥ शरीरकष्ट न लगती जाण ॥ तुझ्या चरणीं ठेविल्या मन ॥ तूं स्वानंदघन तुष्टसी ॥ ५८ ॥ तूं तुष्टोनि करिशी ऐसें ॥ सांडिसी प्रपंचाचें पिसें[8] ॥ त्रिगुणेंसी त्रिपुटी नासे ॥ अनायासें मिथ्यात्वें ॥ ५९ ॥ ऐसा तूं सुसेव्य आणि कृपाळू ॥ निजस्वामी तूं दीनदयाळू ॥ तुझी सेवा सांडी[9] तो बरळू ॥ मूर्ख केवळू अतिमंद ॥ १६० ॥ निमेषोन्मेषांचे व्यापार ॥ तुझेनि चालती साचार ॥ तुझे सेवेसि विमुख नर ॥ ते पामर अभाग्य ॥ ६१ ॥ तुझी सेवा सुखरूप केवळ ॥ तीस उपेक्षूनियां बरळ ॥ विषयांचे विषयकल्लोळ[10] ॥ जे सर्वकाळ वांछिती ॥ ६२ ॥ ज्या विषयांचा विषयलेश ॥ थित्या निजसुखा करी नाश ॥ जन्ममरणांचा विलास ॥ दुःख असोस भोगवी ॥ ६३ ॥ त्या विषयाचे विषयदाते ॥ इंद्र महींद्र कृपणचित्तें ॥ त्यांसि भजती जे विषयस्वार्थें ॥ तेही निश्चितें अभाग्य ॥ ६४ ॥ तुझी कृपा तुझे भक्त ॥ सुखसंपन्न अतिसमर्थ ॥ संसारी होती अतिविरक्त ॥ हें नवल एथ नव्हे देवा ॥ ६५ ॥ तुझें चरणरज जे सेविती ॥ पृथुजनकादि नृपती ॥ त्यांसि इंद्रादिक वंदिती ॥ पायां लागती ऋद्धिसिद्धि ॥ ६६ ॥ सुगमोपायें स्वरूपप्राप्ती ॥ भाळे भोळे जन पावती ॥ तैसा उपाय श्रीपती ॥ कृपामूर्ती सांगावा ॥ ६७ ॥

---

१ उत्तानपाद राजाचें. २ कधीं ढळ न पावणारें. ३ रावणाचा बंधु. ४ कुळासकट. ५ सार्वभौम. ६ डबकें. ७ अवकाश नाहीं असें ह्मणणें. ८ वेड, गोडी. ९ सोडील. १० अनेक विषय.

आकल्प[1] करितां तपास्थिती ॥ ज्या सिद्धींची नव्हे प्राप्ती ॥ त्या सिद्धि भक्तां शरण येती ॥ ऐसी श्रेष्ठ भक्ति पैं तुझी ॥ ६८ ॥ आणिक साधनें करितां ॥ तुझे भजनीं ठेविल्या चित्ता ॥ सर्वसिद्धि येती शरणागता ॥ स्वभावतां भक्तांसी ॥ ६९ ॥ यापरी तुझे उपकार ॥ भक्तांप्रति घडले अपार ॥ त्यांसि तैं घडे प्रत्युपकार ॥ हरिचरणीं साचार जैं स्वयें विरे ॥ १७० ॥ तेंचि विरालेपण ऐसें ॥ जेवीं प्रतिबिंब बिंबीं प्रवेशे ॥ कां घटाकाशींचेनि आकाशें ॥ होइजे जैसें महदाकाश ॥ ७१ ॥ ऐसें तुजमाजी न विरतां ॥ प्रत्युपकार न ये हातां ॥ जो पुरवी सर्वस्वार्था ॥ त्यासि विसरतां अधःपातू ॥ ७२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नैवोपयंत्यपचितिं कवयस्तवेश ब्रह्मायुषापि कृतवृद्धमुदः स्मरंतः ॥ योऽतर्बहिस्तनुभृतामशुभं विधुन्वन्नाचार्यचैत्यवपुषा स्वगतिं व्यनक्ति ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ तुजमाजी न विरतां साचार ॥ ब्रह्मायु होऊनियां नर ॥ योगयागें शिणतां अपार ॥ प्रत्युपकार कदा न घडे ॥ ७३ ॥ असो ज्ञान ज्ञाते जन ॥ करितां नानाविध साधन ॥ तुझिया उपकारा उत्तीर्ण[2] ॥ अणुप्रमाण[3] कदा नव्हती ॥ ७४ ॥ तो उपकार कोण ह्मणशी ॥ निजभक्तांच्या कल्मषांसी[4] ॥ सबाह्याभ्यंतर निर्दळिसी ॥ उभयरूपेंसी कृपाळुवा ॥ ७५ ॥ अंतरीं अंतर्यामिरूपें ॥ बाह्य सद्गुरुस्वरूपें ॥ भक्तांचीं सबाह्य पापें ॥ सहित संकल्पें निर्दळिसी ॥ ७६ ॥ अंतर्यामी आणि सद्गुरू ॥ उभयरूपें तूं करुणाकरू ॥ निरसूनि भक्तभवभारू[5] ॥ निजनिर्धारू धरविशी ॥ ७७ ॥ निजनिर्धाराचें लक्षण ॥ सहजें विरे देहाभिमान ॥ सहजें हारपे मीतूंपण ॥ जन्मजरामरण मावळे ॥ ७८ ॥ गेलिया जन्मजरामरण ॥ सहजें होती आनंदघन ॥ ऐसे तुझिया कृपें जाण ॥ उपकारें पूर्ण निजभक्त ॥ ७९ ॥ ऐशिया आपुली स्वरूपास्थिती ॥ भक्तां अर्पिसी कृपामूर्ती ॥ तो तूं निजस्वामी श्रीपती ॥ पूज्य त्रिजगतीं त्रिदशांसी[6] ॥ १८० ॥ ऐसे तुझेनि निजप्रसादें ॥ भक्त सुखी जाहले स्वानंदें ॥ ते उरलेनि प्रारब्धें ॥ सदा स्वानंदबोधें वर्तती ॥ ८१ ॥ ते देही असोनि विदेही ॥ कर्म करूनि अकर्ते पाही ॥ ऐसे उपकार भक्तांच्या ठायीं ॥ कैसेनि उतरायी होतील ॥ ८२ ॥ तुज केवीं होइजे उत्तीर्ण ॥ तुझेनि मना मनपण ॥ तुझेनि बुद्धीसि निश्चयो जाण ॥ इंद्रियस्फुरण तुझेनी ॥ ८३ ॥ निमेषोन्मेषांचे व्यापार ॥ तुझेनि चालती साचार ॥ नीच नव्हे तुझे उपकार ॥ उत्तीर्ण नर कदा नव्हती ॥ ८४ ॥ जें जें करावें साधन ॥ तें सिद्धी पावे तुझे कृपेन ॥ त्या तुज उत्तीर्णपण ॥ सर्वथा जाण असेना ॥ ८५ ॥ यापरी करूनि उपकार ॥ तुवां उद्धरिले थोरथोर ॥ सुगमोपायें भवसागर ॥ तरती भोळे नर तें सांग ॥ ८६ ॥ सुगमोपायें स्वरूपप्राप्ती ॥ भाळेभोळे जन पावती ॥ तैसा उपाय श्रीपती ॥ कृपामूर्ती सांगावा ॥ ८७ ॥ तूं गेलिया निजधामा[7] ॥ दीन तरावया मेघश्यामा ॥ सुगम उपायाचा महिमा ॥ पुरुषोत्तमा मज सांग ॥ ८८ ॥ ह्मणोनि

---

[1] कल्पपर्यंत. [2] उतराई. [3] थोडेही. [4] पापांस. [5] भक्ताचें संसारओझें. [6] देवांस. [7] वैकुंठास.

घातिलें लोटांगण ॥ मस्तकीं धरिले श्रीचरण ॥ तरावया दीनजन ॥ सुगम साधन सांगिजे ॥८९॥ उद्धवें प्रार्थिला श्रीपती ॥ अबळें[1] उद्धरावया निश्चितीं ॥ त्याचेनि धर्में त्रिजती ॥ त्यासि कृपामूर्ती तुष्टला ॥ १९० ॥ उद्धवें प्रार्थिला श्रीपती ॥ तेणें सुखावला शुकही चित्तीं ॥ उल्हासोनि स्वानंदस्थितीं ॥ ह्मणे परीक्षिती सावध ॥ ९१ ॥ सुगम उपायस्थिती ॥ तारावया त्रिजगती ॥ उद्धवें विनविला[3] श्रीपती ॥ त्यासि कृपामूर्ती तुष्टला ॥ ९२ ॥ संसार[4]तरणोपायबीज ॥ ब्रह्मप्राप्तीचें ब्रह्मगुज ॥ सुगमें साधे सहज ॥ निज तें अधोक्षज सांगेल ॥ ९३ ॥ आबाळ[5]जन उद्धरावया निश्चितीं ॥ उद्धवें प्रार्थिला श्रीपती ॥ त्याचेनि धर्में त्रिजगती ॥ सुगमस्थितीं तरेल ॥ ९४ ॥ निजधामा गेलिया श्रीकृष्णनाथ ॥ दीन तरावया समस्त ॥ उद्धवें सेतु[6] बांधिला एथ ॥ ब्रह्मप्राप्त्यर्थ प्रश्नोक्ती ॥ ९५ ॥ उद्धवें प्रार्थूनि श्रीकृष्ण ॥ उद्धरावया दीनजन ॥ ब्रह्मप्राप्तीची पव्हे[7] जाण ॥ सुगम संपूर्ण घातली ॥ ९६ ॥ एवं उद्धवप्रश्नस्थितीं ॥ शुक सुखावे वचनोक्तीं ॥ तेंचि परीक्षितीप्रती ॥ सुनिश्चितीं सांगत ॥ ९७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ ॥ इत्युद्धवेनात्यनुरक्तचेतसा पृष्टो जगत्क्रीडनकः स्वशक्तिभिः ॥ गृहीतशक्तित्रय ईश्वरेश्वरो जगाद सप्रेममनोहरस्मितः ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो ज्ञानियांचा शिरोमणी ॥ जो ब्रह्मचार्यां मुकुटमणी ॥ जो योगियांमाजी अग्रगणी ॥ जो सिद्धासनीं वंदिजे ॥ ९८ ॥ जो ब्रह्मज्ञानाचा निजनिधी ॥ जो स्वानंदबोधाचा उदधी[9] ॥ जो भूतदयेचा क्षीराब्धी ॥ तो शुक स्वबोधीं बोलत ॥ ९९ ॥ पांडवकुळीं अगाध कीर्ती ॥ कौरवकुळीं तुझेनि भक्ती ॥ धर्मस्थापक त्रिजगतीं ॥ ऐके परीक्षिती सभाग्या ॥ २०० ॥ जग जें भासे विचित्रपणें ॥ तें जयाचें लीलाखेळणें ॥ खेळणेंही स्वयें होणें ॥ शेखीं अलिप्तपणें खेळवी ॥ १ ॥ विचित्र भासे जग जाण ॥ ज्याचेनि अंगें क्रीडे संपूर्ण ॥ जग ज्याचें क्रीडास्थान ॥ जगा जगपण ज्याचेनी ॥ २ ॥ ऐसा जगत्क्रीडनक श्रीकृष्ण ॥ ईश्वरांचा ईश्वर आपण ॥ मायादि तिन्ही गुण ॥ ज्याचेनि पूर्ण प्रकाशती ॥ ३ ॥ मायागुणीं गुणावतार ॥ जे उत्पत्तिस्थितिक्षयकर ॥ ब्रह्मा आणि हरिहर ॥ तेही आज्ञाधार जयाचे ॥ ४ ॥ ऐशिया कृष्णाप्रती ॥ उद्धवें सप्रेम विनंती ॥ केली अतिविनीत[10]स्थितीं ॥ तेणें श्रीपती तुष्टला ॥ ५ ॥ बहुतीं प्रार्थिला श्रीकृष्ण ॥ तो आपुल्या कार्यार्थ जाण ॥ उद्धवें केला विनीत प्रश्न ॥ जगदुद्धरण उपकारी ॥ ६ ॥ ऐकोनि उद्धवाची प्रश्नोक्ती ॥ तोषें तोषला श्रीपती ॥ सुगमोपायें ब्रह्मप्राप्ती ॥ ते साधनस्थिती सांगेल ॥ ७ ॥ भाळेभोळे सात्विक जन ॥ सवेग पावती समाधान ॥ तो उद्धवप्रश्नें श्रीकृष्ण ॥ सोपें ब्रह्मज्ञान सांगत ॥ ८ ॥ ज्ञानमार्गींचे कापडी ॥ जीवें सर्वस्वें घालूनि उडी ॥ उद्धवप्रश्नाचे आवडीं ॥ ब्रह्म जोडे जोडी सुगमत्वें ॥ ९ ॥ लेऊनियां मोहममतेची बेडी ॥ जे पडिले

---

१ अज्ञानिजनांनीं. २ तिन्ही लोक. ३ प्रार्थिला. ४ संसारांतून मुक्त होण्यास साधन. ५ बालांपासून वृद्धांपर्यंत. ६ पूल. ७ वाट. ८ ठेवा. ९ समुद्र. १० नम्रपणानें.

अभिमानबांदवडीं ॥ त्यांचीही सुटका धडफुडी ॥ उद्धवें गाढी चिंतिली ॥ २१० ॥ उद्धवाचें भाग्य थोर ॥ प्रश्न केला जगदुपकार ॥ तेणें तुष्टला सारंगधर ॥ अतिसादर बोलत ॥ ११ ॥ दीनोद्धाराचा प्रश्न ॥ उद्धवें केला अतिगहनें[1] ॥ तेणें संतोषोनि श्रीकृष्ण ॥ हास्यवदन बोलत ॥ १२ ॥ कृष्णवदन अतिसुंदर ॥ तेंही हास्ययुक्त मनोहर ॥ अतिउल्हासें शार्ङ्गधर ॥ गिरा[2] गंभीर बोलत ॥ १३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ हंत ते कथयिष्यामि मम धर्मान् सुमंगलान् ॥ यान् श्रद्धयाचरन्मर्त्यों मृत्युं जयति दुर्जयम् ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ जो प्रणवाचें सोलींव सार ॥ जो ज्ञानाचें निजजिव्हार[3] ॥ जो चैतन्याचा चमत्कार ॥ जो परात्पर परादिकां ॥ १४ ॥ तो मेघगंभीर गर्जोनी ॥ स्वानंदें बोले सारंगपाणी ॥ ह्मणे उद्धवा धन्यधन्य वाणी ॥ तुझ्या प्रश्नीं मीं निवालों[4] ॥ १५ ॥ भाळ्या भोळ्या ब्रह्मप्राप्ती ॥ पावावया सुगमस्थितीं ॥ ये अर्थी दाटुगी माझी भक्ती ॥ तिशी मी श्रीपती सदा वश्य ॥ १६ ॥ माझें करितां अनन्य भजन ॥ मी सर्वथा भक्ताधीन ॥ तेथं जाति गोत ज्ञातेपण ॥ उंच नीच वर्ण मी न ह्मणे ॥ १७ ॥ जेणें घडे भजन परम ॥ ते सांगेन भागवतधर्म ॥ जेणें निरसे[5] कर्माकर्म ॥ मरणजन्मच्छेदक ॥ १८ ॥ जे धर्म स्वयें आचरितां ॥ समूळ निर्दळी भवव्यथा[6] ॥ ज्यां धर्मा स्वभावतां ॥ सुखसंपन्नता साधकां ॥ १९ ॥ जे स्वयें धर्म आचरतां ॥ निरसी असत्य दोषकथा ॥ जे सादरें धर्म ऐकतां ॥ विषयावस्था निर्दळी ॥ २२० ॥ माझे धर्म अतिसुमंगल ॥ दोषदाहक कलिमल ॥ मगळांचेंही परम मंगळ ॥ भजन केवळ पैं माझें ॥ २१ ॥ श्रद्धेनें आचरतां माझे धर्म ॥ माझ्या निजरूपीं उपजे प्रेम ॥ तेणें हारपे भवभ्रम[7] ॥ जन्ममरण असेना ॥ २२ ॥ जो मृत्यु ब्रह्म्याचा ग्रास करी ॥ हरिहरांतें मृत्यु मारी ॥ मृत्यु दुर्जय संसारीं ॥ सुरासुरीं कांपिजे ॥ २३ ॥ त्या मृत्यूचें खणोनि खात ॥ पाडूनि कळिकाळाचे दांत ॥ अद्वयभजनें माझे भक्त ॥ सुखें नांदत संसारीं ॥ २४ ॥ जेणें निवारे दुर्जन मरण ॥ ऐसें भजन ह्मणसी कोण ॥ ऐक त्याचेंही लक्षण ॥ तुज मी संपूर्ण सांगेन ॥ २५ ॥ उद्धवा तूं माझा निजसखा ॥ यालागीं निजभजनआवांका ॥ आरंभूनि पूर्वपीठिका ॥ संक्षेपें देखा सांगेन ॥ २६ ॥ कोटिशस्त्रें रुपल्यापाहे ॥ तरी तो शूर वांचला राहे ॥ तोचि वर्मीचेंनि एके घायें ॥ मरण लाहे तत्काळ ॥ २७ ॥ तेवीं करितां नाना साधन ॥ अनिवार्य जन्ममरण ॥ त्यासि माझें संक्षेपें[8] भजन ॥ समूळ जाण निर्दळी ॥ २८ ॥ कृष्ण घनश्याम महाघन[9] ॥ उद्धवचातकालागीं[10] जाण ॥ वर्षला स्वानंदजीवन ॥ तेणें त्रिभुवन सुखी होये ॥ २९ ॥ लोटलिया वर्षाकाळ ॥ शारदींचें निर्मळ जळ ॥ तेवीं सुखाचे सुखकल्लोळ ॥ भजनें प्रबळ एकुणतिसावा ॥ २३० ॥ एकादशाचिया अंतीं ॥ सुगमत्वें ब्रह्मप्राप्ती ॥ तदर्थ उत्तमो

---

१ कठोण. २ वाणी. ३ तत्त्व. ४ संतुष्ट झालों. ५ नष्ट होई. ६ संसारसंबंधी पीडा. ७ ससाररूपी भ्रम. ८ संक्षित. ९ कृष्णरूपपर्जन्याचे मोठे ढग. १० उद्धवरूपिचातकपक्ष्यावर.

त्तम भक्ती ॥ स्वयें श्रीपती सांगत ॥ ३१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कुर्यात्सर्वाणि कर्माणि तदर्थं शनकैः स्मरन् ॥ मय्यर्पितमनश्चित्तो मद्धर्मा त्ममनोरतिः ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ देशाचारें कुलाचारें प्राप्तें ॥ वृद्धाचारादि जे एथें ॥ जे कां वेदोक्त नित्यनैमित्यें ॥ कर्में समस्तें या नांव ॥ ३२ ॥ माझेनि उद्देशें कर्म जे एथ ॥ या नांव साधारण मदर्थ ॥ कर्मासबाह्य मज देखत ॥ मुख्यत्वें मदर्थ या नांव ॥ ३३ ॥ सकळ कर्म माझेनि प्रकाशे ॥ कर्मक्रिया माझेनि भासे ॥ ऐसें समूळ कर्म जेथ दिसे ॥ तें अनायासें मदर्थ ॥ ३४ ॥ कर्माआदी मी कर्ता ॥ कर्मीं कर्मसिद्धीचा मी दाता ॥ कर्मीं कर्माचा मी फळभोक्ता ॥ या नांव कृष्णार्पणता कर्मांची ॥ ३५ ॥ सहसा ऐसें नव्हे मन ॥ तें हें शनैः शनैः अनुसंधान ॥ अखंड करितां आपण ॥ स्वरूपीं प्रवीण मन होय ॥ ३६ ॥ मनासि नावडे अनुसंधान ॥ तैं करावें माझें स्मरण ॥ माझेनि स्मरणें मन जाण ॥ धरी अनुसंधान मद्भजनीं ॥ ३७ ॥ भजनअभ्यासपरवडी ॥ मनासि लागे निजात्मगोडी ॥ तेथें मन निश्चयें दे बुडी ॥ देहअहंता सोडी अभिमान ॥ ३८ ॥ माझ्या स्वरूपावेगळें कहीं ॥ मनासि निघावया वाडी नाहीं ॥ ऐसें मन जडे माझ्या ठायीं ॥ मदर्पण पाही या नांव ॥ ३९ ॥ ऐसें मद्रूपी निमग्न[1] मन ॥ तरी आवडे माझें भजन ॥ माझिया भक्तीस्तव जाण ॥ परम पावन मद्भक्त ॥ २४० ॥ ह्मणशी विषयें[2]निष्ठ मन ॥ कदा न धरी अनुसंधान ॥ तेचि अर्थींचा उपाय पूर्ण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ४१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ देशान्पुण्यान् संश्रयेत मद्भक्तैः साधुभिः श्रितान् ॥ देवासुरमनुष्येषु मद्भक्ताचरितानि च ॥ १० ॥ ॥ टीका ॥ देश पावन कुरुक्षेत्र ॥ अयोध्या देश अतिपवित्र ॥ गंगायमुनेचें अंतर ॥ पवित्र अपार अर्बुदाचळ ॥ ४२ ॥ कलापग्राम नंदिग्राम ॥ पावन देश बदरिकाश्रम ॥ पंचवटी श्रीरामाश्रम ॥ पावन परम गौतमीतट ॥४३॥ जेथ लागे श्रीरामचरण ॥ पावन देश दंडकारण्य ॥ मथुरा गोकुळ वृंदावन ॥ परम पावन ब्रह्मगिरी ॥४४॥ पावन पांडुरंगक्षिती ॥ जे कां दक्षिणद्वारावती ॥ जेथ विराजे विठ्ठलमूर्ती ॥ नामें गर्जती पंढरी ॥ ४५ ॥ निर्दळी सकळपापांसी ॥ पंचक्रोशी जे कां काशी ॥ पुण्य देश वाराणसी ॥ साधकांसी अतिसाह्य ॥ ४६ ॥ पुण्य सरितां[3] जेथ वाहती ॥ तेही साधकां पावन क्षिती ॥ गंगा यमुना सरस्वती ॥ साबरमती वैतरणी ॥ ४७ ॥ गंडकी नर्मदा तपती ॥ गोदावरी भीमरथी ॥ कृष्णा वेण्या तुंगा गोमती ॥ पावन क्षिती श्रीशैल ॥ ४८ ॥ कावेरीचें उभय तीर ॥ पवित्र क्षिती चिदंबर ॥ सरिता प्रतीची पवित्र ॥ जिचेंनि जळें नर पावन ॥ ४९ ॥ कृतमाला पयस्विनी ॥ अतिपवित्र ॥ ताम्रपर्णी पवित्र क्षिति नैमिषारण्यीं ॥ साधकां लागोनी सुसेव्यें[4] ॥ २५० ॥ असो पवित्रतेचें महिमान ॥ पावनां पावन आहे आन ॥ जेथें वसले भक्तसज्जन ॥ तो देश पावन

---

१ मदर्पण. २ विषयांत लुब्ध झालेलें. ३ नद्या. ४ सेवन करण्याला योग्य.

सर्वार्थी ॥ ५१ ॥ जे गांवीं वसती माझे भक्त ॥ सत्संगें तो गांव पुनीत ॥ जे देशीं वसती साधुसंत॥ तो देश पुनीत त्यांचेनी॥५२॥
भक्तांचा वारा लागे जिकडे ॥ अतिपवित्रता होय तिकडे ॥ ते सत्संगती ज्यांसि घडे ॥ पवित्रता जोडे तयांसी ॥ ५३ ॥ चंदनाचे संग
तीवरी ॥ सुवास होती आरीबोरी[1] ॥ त्यांतें देवद्विज वंदिती शिरीं ॥ तेवीं साधकां करी सत्संग ॥ ५४ ॥ जें केवळ काष्ठ कोरडें ॥ संगें
मोल पावलें गाढें ॥ त्याची श्रीमंतां चाड[2] पडे ॥ मस्तकीं चढे हरिहरांच्या ॥ ५५ ॥ जैं निजभाग्याची संपत्ती ॥ तैंचि जोडे सत्संगती ॥
सत्संगें पावन होती ॥ जाण निश्चितीं साधक ॥ ५६ ॥ माझे स्वरूपीं ज्याचे चित्त ॥ अखंड जडलें भजनयुक्त ॥ त्यासीच बोलिजे म
द्भक्त ॥ तेचि संत सज्जन ॥ ५७ ॥ माझे भक्तांचें आचरित[3] ॥ सुर नर असुर वंदित ॥ साधकींही तेंचि एथ ॥ स्वयें निश्चित साधावें
॥ ५८ ॥ जे श्रेष्ठ विनटले भक्तीसी ॥ नारद प्रह्लाद अंबरीषीं[4] ॥ तेचि भक्ति अहर्निशीं॥साधकीं सद्भावेंसी साधावी ॥५९॥ ॥श्लोक॥ ॥
पृथक् सत्रेण वा मह्यं पर्वयात्रामहोत्सवान् ॥ कारयेद्गीतनृत्याद्यैर्महाराजविभूतिभिः॥ ११ ॥ ॥टीका ॥ ॥ वार्षिकी यात्रा पूर्वपूजा॥
भावें अर्पावी अधोक्षजा ॥ छत्रचामरादि वोजा ॥ गरुडध्वजांकित चिह्नीं ॥ २६० ॥ ऐशिया महाराजविभूती ॥ देवासि अर्पाव्या श्र
द्धास्थितीं ॥ भजनालागीं अहोरातीं ॥ उल्हासचित्तीं अनिवार ॥६१॥ अश्वगजादि आरोहण ॥ शेषशयन गरुडासन ॥ महामहोत्सव
नरयानं[5] ॥ रथोत्सव जाण करावा ॥ ६२ ॥ टाळ घोळ निशाण भेरी॥ शंख मृदंग मंगलतुरीं ॥ नाद नसमाय[6] अंबरीं ॥ जयजयकारीं
गर्जती ॥ ६३ ॥ तेथ गीतनृत्यपवाडे ॥ कीर्तन करावें वाडें कोडें ॥ हुंबरी आखरी बागडें ॥ देवापुढें धरावें ॥ ६४ ॥ तोंड करूनि वांकु
डें ॥ वांकुली दावावी देवाकडे ॥ वर्णावे देवाचे पवाडे[7] ॥ रंगापुढें गर्जत ॥ ६५ ॥ गोपाळकाल्याचा विन्यास[8] ॥ रासक्रीडेचा उल्हास ॥
गोपाळवेषाचा विलास ॥ मनोहर वेष दावावा ॥ ६६ ॥ दावावी मल्लखडियांची परी ॥ झोंबी घ्यावी नानाकुसरी ॥ दंडीं मुडपी उरीं
शिरीं ॥ परस्परीं हाणत ॥ ६७॥ मल्लविद्येच्या आसुडी ॥थडक हाणोनियां गाढी ॥ मल्लमर्दना परवडी ॥ रंगीं गुढी उभवावी ॥ ६८॥
कुवलयापीडें[9] उन्मत्त ॥ त्याचे उपटोनि गजदंत ॥ गोपाळवेषें डुल्लत ॥ रंगाआंत मिरवावें ॥ ६९ ॥ वानावी देवाची वाढीवें[10] ॥ करावी
देवाची भाटीवें[11] ॥ ऐसे दावूनि हावभाव ॥ महामहोत्सव करावा ॥ २७० ॥ असल्या सामर्थ्यवैभव ॥ स्वयें करावे सकळ उत्साव ॥ ना
तरी मिळोनियां सर्व॥ महामहोत्सव करावे ॥ ७१ ॥ ऐशिया अनन्यआवडीं ॥ भजन करितां चढोवढी ॥ माझिया भक्तीची लागली
गोडी ॥ जोडिलें जोडी हरिप्रेम ॥ ७२ ॥ सप्रेम भक्ति करितां जाण ॥ तेणें मी भक्तांसि तुष्टमानें[12] ॥ माझें अंतरंग[13] भजन ॥ मद्भक्त

---

[1] बाभुळी. [2] गरज. [3] आचरण. [4] आंबरीष. [5] पालखी वगैरे. [6] न मावे. [7] गुणानुवाद. [8] अनुकरण. [9] या नांवाचा हत्ती. [10] उत्कर्ष. [11] प्रार्थना. [12] प्रसन्न. [13] सर्वसाधनांत मुख्य.

आपण स्वयें लाहे ॥ ७३ ॥ अंतरंगभक्ति ह्मणसी कोण ॥ तें भक्तीचें निजलक्षण ॥ उद्धवाप्रति श्रीकृष्ण ॥ स्वमुखें आपण सांगत ॥ ७४ ॥
॥ श्लोक ॥ ॥ मामेव सर्वभूतेषु बहिरंतरपावृतम् ॥ ईक्षेतात्मनि चात्मानं यथा खममलाशयः ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ भावें करितां माझी
भक्ती ॥ शुद्ध होय चित्तवृत्ती ॥ तेणें आत्मदृष्टी स्थिती ॥ गुरुकृपा पावती मद्भक्त ॥ ७५ ॥ पाहतां निजात्मदृष्टीवरी ॥ मी सर्वभूतांच्या
अंतरीं ॥ अंतरींच हा निर्धार धरी ॥ तंव भूताबाहेरी मज देखे ॥ ७६ ॥ जो परावरादि अनंत ॥ तो मी भूतां सबाह्य भगवंत ॥
मी तोचि होय माझा भक्त ॥ मिळोनि मजआंत मद्रूपें ॥ ७७ ॥ जैसजैशी माझी व्याप्ती ॥ तैसतैशी भक्तांची स्थिती ॥ जें जें देखे भूतव्यक्ती
॥ तेथ सबाह्य प्रतीति मद्रूपें ॥ ७८ ॥ जेवीं घटामाजी घटाकाश ॥ तेचि घटासबाह्य महदाकाश ॥ तेवीं भूतांसबाह्य मी चिद्विलास[1]
॥ माझा रहिवास निजरूपें ॥ ७९ ॥ निश्चयेंसी निजप्रतीती ॥ भगवद्भाव सर्वांभूतीं ॥ तेचि भक्तांची भजती स्थिती ॥ यथानिगुती
हरि सांगे ॥ २८० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ इति सर्वाणि भूतानि मद्भावेन महाद्युते ॥ सभाजयन्मन्यमानो ज्ञानं केवलमाश्रितः ॥ १३ ॥
॥ टीका ॥ ॥ उद्धवा तुझें भाग्य अमूप[2] ॥ तूं ज्ञाननिधि कैवल्यदीप ॥ सर्वभूतीं माझें रूप ॥ चित्स्वरूप सबाह्य ॥ ८१ ॥ यापरी गा सर्वभूतीं
॥ माझ्या स्वरूपाचीं अनंतस्फूर्तीं ॥ लक्षोनि जो करी भक्ती ॥ नानाव्यक्ती समभावें ॥ ८२ ॥ भिन्न रूप भिन्न नाम ॥ भिन्न स्थिती
भिन्न कर्म ॥ जग देखतांही विषम ॥ मद्भक्तांसम मद्भावें ॥ ८३ ॥ भूतें देखतांही भिन्न ॥ भिन्नत्वा नये ज्याचें ज्ञान ॥ मद्भावें भजे
समान ॥ त्यासि सुप्रसन्न भक्ति माझी ॥ ८४ ॥ ज्यासि प्रसन्न माझी भक्ती ॥ त्याचा आज्ञाधारक मी श्रीपती ॥ जो भगवद्भावें सर्वभूतीं
॥ सुनिश्चितीं उपासक ॥ ८५ ॥ ॥ आशंका ॥ ॥ तुझी वेदाज्ञा तंव प्रमाण ॥ अतिशयें पूज्य ब्राह्मण ॥ उपेक्षावे असुरजन ॥ चांडाळ
जाण अतिनिंद्य ॥ ८६ ॥ कर्मभ्रष्ट जेजे लोक ॥ त्यांचें पाहोंनये मुख ॥ हे वेदमर्यादा देख ॥ तुवांचि निष्टंक नेमिली ॥ ८७ ॥
तेथ सर्वभूतीं समान ॥ केवीं घडे भगवद्भजन ॥ ऐसा विकल्प कल्पील मन ॥ तरी ऐक महिमान भक्तीचें ॥ ८८ ॥ जेवीं आंधाराशी
सबळ राती[4] ॥ तंवचि प्रतिष्ठा दीपस्थिती ॥ तेथें उगवल्या गभस्ती[5] ॥ दीपाची दीप्ति असतांचि[6] नाहीं ॥ ८९ ॥ जंववरी दृढ अज्ञान ॥
तंवचि वेदाज्ञा प्रमाण ॥ ज्यासि माझें अभेदभजन ॥ तयासि वेद आपण स्वयें वंदी ॥ २९० ॥ वेद बापुडा तो किती ॥ ज्यासि माझी
अभेदभक्ती ॥ त्यासि मी वंदीं श्रीपती[3] ॥ सदा वशवर्ती तयाचा ॥ ९१ ॥ अभेदभक्ति जेथ पुरी ॥ मी नाटिकारू त्याचे घरीं ॥ त्याचा
संसार माझे शिरीं ॥ योगक्षेम[7] करीं मी त्याचा ॥ ९२ ॥ अभेदभक्तीचें महिमान ॥ तिच्या पायां लागे आत्मज्ञान ॥ तेथ वंद्य निंद्य

---

[1] चैतन्यस्वरूप. [2] पुष्कळ. [3] विष्णू. [4] रात्र. [5] सूर्य. [6] असूनही, [7] अप्राप्ताची प्राप्ति व प्राप्ताचें रक्षण.

समसमान ॥ विषमींही जाण विकारेना ॥९३॥ ॥ श्लोक ॥ ॥ ब्राह्मणे पुल्कसे स्तेने ब्रह्मण्येऽर्कें स्फुलिंगके ॥ अक्रूरे क्रूरके चैव समदृक्पंडितो मतः॥ १४॥ ॥टीका॥ ॥ ज्याचें वंदितां पदरज जाण ॥ पवित्र होइजे आपण ॥ ऐसे पुण्य पूज्य जे ब्राह्मण ॥ ज्यांचे हृदयीं चरण[1] हरि वाहे ॥ ९४ ॥ ऐसे अतिवंद्य जे ब्राह्मण ॥ आणि चांडाळांमाजी निंद्य हीन ॥ तो श्वपच[2] द्विजवरांसमान ॥ हरिरूपें जाण भक्त देखे ॥९५॥ श्वपच आणि ब्राह्मण ॥ अतिभेदें विषमपण ॥ आत्मदृष्टीं पाहतां जाण ॥ दोघे समान चिद्रूप ॥ ९६ ॥ सुवर्णविष्णु[3] सुवर्णश्वान ॥ एक पूज्य एक हीन ॥ विकूं जातां मोल समान ॥ निंद्य वंद्य जाण आत्मत्वीं तैसें ॥९७॥ जेवीं डावा उजवा दोनी हात ॥ एक नरकीं एक पुण्यार्थ ॥ हा कर्माकर्मविपरीतार्थ ॥ समान निश्चित ज्याचें त्यासी ॥ ९८ ॥ जो बळेंचि ब्रह्मस्व चोरी ॥ जो ब्राह्मणा अतिउपकारी ॥ दोघे निजात्मनिर्धारीं ॥ सद्रूपेंकरी समसाम्य ॥ ९९ ॥ जो सर्वस्वें ब्राह्मणांचा दाता ॥ कां जो ब्राह्मणांचा अर्थहरिता[4] ॥ दोंहीसी कर्मांची विषमता ॥ निजात्मता समान ॥ ३०० ॥ सूर्य आणि खद्योतें[5] ॥ तेजविशेषें भेद भासत ॥ निजात्मतेजें पाहतां तेथ ॥ समसाम्य होत दोहींसी ॥ १ ॥ दावाग्नि आणि दिवा ॥ भेद भासे तेजवैभवा ॥ निजतेजें समानभावा ॥ तेजप्रभावा आत्मत्वें समान ॥ २ ॥ कर्पूराग्नि सोज्ज्वळ फुडीं ॥ राईसंगें तो तडफडी ॥ तेवीं सत्वतमपरवडी ॥ शांति आणि गाढी[6] क्रोधावस्था ॥ ३ ॥ एक सत्ववृत्ति अतिशांत ॥ कां जो क्रूर तामस क्रोधयुक्त ॥ गुणवैषम्यें भेद भासत ॥ आत्मत्वें निश्चित समसाम्य ॥ ४ ॥ एक आपत्काळीं सर्वसत्ता ॥ होय एकाचा प्राणरक्षिता ॥ एक प्राणदात्याच्या घाता ॥ प्रवर्तें क्रूरतां कृतघ्न जो ॥ ५ ॥ हे पुण्यपापविषमता जाण ॥ ऐसेही ठायीं भक्त सज्ञान ॥ वस्तु देखती समसमान ॥ उभयतां जाण निजात्मबोधें ॥ ६ ॥ वृक्षासि जो प्रतिपाळी ॥ कां जो घाव घाली मूळीं ॥ दोघांही समान पुष्पीं फळीं ॥ तेवीं आत्ममेळीं घातकअघाती ॥ ७ ॥ द्विजांचें सोंवळें धोत्र ॥ कां मद्यपियाचें मलिन वस्त्र ॥ सूत्रदृष्टीं समान सूत्र ॥ मशक सृष्टिकर आत्मत्वीं तैसे ॥ ८ ॥ मशक आणि सृष्टिकर्ता ॥ भजनीं समान मद्भक्तां ॥ हे चौथे भक्तीची अवस्था ॥ अपावो सर्वथा रिघों नशके ॥ ९ ॥ जेथूनि येवों पावे अपावो[7] ॥ तेथेंचि देखती भगवद्भावो ॥ जेव्हां अपाव तोचि उपावो ॥ मद्भक्तां पहाहो मद्भजनीं ॥ ३१० ॥ ईश्वर आणि पाषाण ॥ भजनीं मद्भक्तां समान ॥ हें भक्तीचें मुख्य लक्षण ॥ चौथी भक्ति जाण या नांव ॥ ११ ॥ स्वकर्म धर्म वर्णाचार ॥ करितांही निजव्यवहार ॥ ज्यासि सर्वभूतीं मदाकार[8] ॥ तो भक्त साचार प्रिय माझा ॥ १२ ॥ ज्यासि सर्वभूतीं बुद्धि समान ॥ तेंचि भक्ति तेंचि ज्ञान ॥ तेंचि स्वानंद समाधान ॥ सत्य सज्ञान मानिती ॥ १३ ॥ असो सज्ञानाची कथा ॥

---

१ भृगु इत्यादिकांचे पाय. २ चांडाळ. ३ सोन्याचा प्रतिमारूप विष्णु. ४ द्रव्य हरण करणारा. ५ काजवा. ६ गाढ झालेली. ७ अपाय. ८ माझें स्वरूप.

ज्यासि सर्वभूतीं समता ॥ तो मजलाही मानला तत्त्वतां ॥ मोक्ष सर्वथा वंदी त्यातें ॥ १४ ॥ योग याग ज्ञान ध्यान ॥ सकळ साधनां
माजी जाण ॥ मुख्यत्वें हेंचि साधन ॥ तेंचि निरूपण हरि सांगे ॥१५॥ ॥ श्लोक ॥ ॥ नरेष्वभीक्ष्णं मद्भावं पुंसो भावयतोऽचिरात्॥
स्पर्धाऽसूयातिरस्काराः साहंकारा वियंति हि ॥१५॥ ॥ टीका ॥ ॥ जो श्रोत्रियं[1] सदाचार उत्तम ॥ कां जो जातिस्वभावें अधमं[2] ॥ कां
अनाचारें अकर्म ॥ एथें सद्भावें सम देखे जो वस्तु ॥ १६ ॥ चराचरीं भगवद्भावो ॥ देखणें हा शुद्ध भावो ॥ तरी नराच्याचठायीं देवो ॥
साक्षेपें पहाहो कृष्ण सांगे ॥ १७ ॥ मनुष्यांच्याठायीं जाण ॥ प्रकट दिसती दोषगुण ॥ तेथ साक्षेपें आपण ॥ ब्रह्म परिपूर्ण पहावें ॥१८॥
चौऱ्याशीं लक्षयोनी अपार ॥ त्यांत ऱ्यांशीं लक्ष नव्वद सहस्र ॥ नवशेंनव्यांणव योनी साचार ॥ मुक्त निरंतर गुणदोषार्थीं ॥ १९ ॥
परी मनुष्ययोनीच्याठायीं ॥ दोष न देखे जो पाही ॥ तोचि देही तोचि विदेही ॥ अन्यथा नाहीं पदार्थ ॥ ३२० ॥ मनुष्यदेहीं ब्रह्मभावो ॥
देखे तोही सभाग्यं[3] पहाहो ॥ चहूं मुक्तींचा तोचि रावो ॥ जगीं निःसंदेहो तो एक ॥ २१ ॥ सर्वभूतीं भगवद्भजन ॥ ऐसें ज्यासि अखंड
साधन ॥ त्या नराचा देहाभिमान ॥ क्षणार्धें जाण स्वयें जाये ॥ २२ ॥ जातां देहाचा अहंकार ॥ निघे सकुटुंब सपरिवार ॥ स्पर्धा अ
सूया तिरस्कार ॥ येणेंचि सत्वर समूळ निघे ॥ २३ ॥ देहीं ममता तोचि अभिमान ॥ आपुल्या ज्ञानेंसी समान ॥ त्याचें निर्भर्त्सनें जें
ज्ञान ॥ स्पर्धा जाण या नांव ॥ २४ ॥ आपणाहूनि अधिक ज्ञान ॥ ऐसें जाणोनि आपण ॥ त्याचे गुणीं दोषारोपण ॥ करणें तें जाण
असूया ॥ २५ ॥ भाविक जे साधक जन ॥ त्यांचें सांडूनि टाकी साधन ॥ धिक्कारूनि निर्भर्त्सी पूर्ण ॥ तिरस्कार जाण या नांव ॥ २६ ॥
इत्यादि दोषसमुदावो ॥ घेऊनि पळे अहंभावो ॥ सर्वांभूतीं भगवद्भावो ॥ देखतांच पहाहो तत्काळ ॥ २७ ॥ सर्वभूतीं समत्वें[4] भजतां ॥
येणें पूर्ण ब्रह्म लाभे हातां ॥ हें श्रेष्ठ समाधान तत्त्वतां ॥ साधकावस्था नरदेहीं ॥ २८ ॥ सांडावें ममतेचें काज ॥ सांडावें योग्यतेचें
भोज ॥ सांडावी लौकिकाची लाज ॥ ब्रह्मसायुज्य तैं लाभे ॥ २९ ॥ सांडावी देहगर्वता ॥ सांडावी सन्मान अहंता ॥ सांडावी श्रेष्ठत्व
पूज्यता ॥ ब्रह्मसायुज्यता तैं लाभे ॥ ३३० ॥ तत्काळ होईजे ब्रह्म पूर्ण ॥ या प्राप्तीचें सुगम साधन ॥ कोणाही न करावें जाण ॥ लौंके
षणा[5] दारुण जनासी ॥ ३१ ॥ सांडावा वर्णाभिमान ॥ स्वयें सांडूनि जाणपण ॥ अणुरेणूंसी लोटांगण ॥ घालितां पूर्ण ब्रह्मप्राप्ती ॥ ३२ ॥
जो सांडी लोकेषणाची लाज ॥ त्याचें तत्काळ होय काज ॥ तेचि विरिंचीचें निजगुज ॥ एथें अधोक्षज सांगत ॥ ३३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विसृ
ज्य स्मयमानान् स्वान् दृशं व्रीडां च दैहिकीम् ॥ प्रणमेद्दंडवद्भूमावाश्वचांडालगोखरम् ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ सुहृदां देखतां लोटांगण ॥

---

[1] अग्निहोत्री. [2] पापी. [3] भाग्यवान्. [4] सारखेपणानें. [5] लोकलज्जा.

घालतां हांसतील संपूर्ण ॥ याळागीं विदेशीं आपण ॥ घालावें लोटांगण गोखरश्वानां ॥ ३४ ॥ ऐशी लौकिकाची लाज ॥ धरितां सिद्धी नपवे काज ॥ लोटांगणाचें निजभोज ॥ सहजीं सहज सुहृदांपाशीं ॥ ३५ ॥ सासु सासरा जांवयी ॥ इष्टमित्र व्याही भायी[1] ॥ ज्यांसि देखतांचि पाही ॥ विरजे देहीं लाजोनी ॥ ३६ ॥ त्याचि देखतां आपण ॥ लाज सांडोनियां जाण ॥ चांडाळादि हीन जन ॥ गोखरश्वान वंदावीं ॥ ३७ ॥ तेंही ऐसें गा वंदन ॥ दंडाचेपरी आपण ॥ सर्वभूतां लोटांगण ॥ समसाम्यें जाण घालावें ॥ ३८ ॥ तेथ ब्रह्म ब्राह्मण ॥ कां अंत्य[2]जादि हीन जन ॥ यांच्या ठायीं लोटांगण ॥ सारिखें जाण सद्भावें ॥ ३९ ॥ गाय गाढव सूकर श्वान ॥ यांच्याही ठायीं आपण ॥ दंडवत लोटांगण ॥ सद्भावें संपूर्ण घालावें ॥ ३४० ॥ साधावया निजकार्य पूर्ण ॥ लोकलाज सांडी खणोन ॥ माशी मुंगी मुरकूट जाण ॥ त्यांसिही लोटांगण दंडप्रा[3]य ॥ ४१ ॥ भावें वंदितां खररज ॥ प्रकटे भगवद्भजनतेज ॥ त्यजूनि स्वजनांची लाज ॥ वंदीं नि[4]जभोज लोटांगणेंसी ॥ ४२ ॥ त्यजूनि संदेह विषमता ॥ लोकलज्जे हाणोनि लाता ॥ भगवद्बुद्धीं सर्वभूतां ॥ घालावें तत्त्वतां लोटांगण ॥ ४३ ॥ ह्मणंसी ऐसें हें साधन ॥ कोठवरी करावें आपण ॥ तेंचि मर्यादानिरूपण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥४४॥ ॥ श्लोक॥ यावत्सर्वेषु भूतेषु मद्भावो नोपजायते ॥ तावदेवमुपासीत वाङ्मनःकायवृत्तिभिः ॥ १७॥ ॥ टीका ॥ ॥ आपुला देह घालोनि पुढें ॥ जें जें भूत दृष्टीं आतु[5]डे ॥ तेथ भगवद्भावें ठसा पडे ॥ वाडेंकोडें निश्चित ॥ ४५ ॥ दृष्टीं पाहतां जेंजें भासे ॥ दृष्टि नातुडतां जेंजें दिसे ॥ तें तें ज्यासि अनायासें ॥ भासे आपैसें चिद्रूप ॥ ४६ ॥ मनाचे कल्पने जें जें आलें ॥ कां कल्पनातीत जें ठेलें ॥ तें तें ज्यासि अनुभवा आलें ॥ स्वरूप आपुलें मद्रूपत्वें ॥ ४७ ॥ कायिक कर्माचार ॥ वैदिक लौकिक आचार ॥ ते ज्यासि दिसतां मदाकार ॥ चराचर मद्रूपें ॥ ४८ ॥ जागृतिस्वप्नसुषुप्तींसी ॥ देखिजे भोगिजे ज्या सुखासी ॥ तें तें मद्रूप ज्यासी ॥ निश्चयेंसी ठसावे ॥ ४९ ॥ स्वाभाविक जे व्यापार ॥ देहीं निपजती अपार ॥ ज्यासि मद्रूपें साचार ॥ निश्चयें निर्धार ढळेना ॥ ३५० ॥ ऐशी न जोड[6]तां अवस्था ॥ सर्वभूतीं भगवद्भावता ॥ भजावें गा तत्त्वतां ॥ निजस्वार्थालागूनी ॥ ५१ ॥ हे सांडूनि भजनावस्था ॥ नानासाधनीं प्रयास करितां ॥ माझ्या अनुभवाची वार्ता ॥ न चढे हाता कल्पांतीं ॥ ५२ ॥ ऐसें जाणूनियां आपण ॥ सर्वभूतीं भगवद्भजन ॥ करावें निश्चयेंसि जाण ॥ हे आज्ञा संपूर्ण पैं माझी ॥५३॥ सांडोनि युक्तीची व्युत्पत्ती ॥ धरितां भगवद्भाव सर्वभूतीं ॥ येणेंचि माझी सुगम प्राप्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥५४॥ माझिये प्राप्तीचें सुगम साधन ॥ उद्धवा तुवां पुशिलें जाण ॥ सर्वभूतीं भगवद्भजन ॥ तद[7]र्थ जाण सांगितलें ॥ ५५ ॥ हा ब्रह्मप्राप्तीचा

---

[1] बंधू. [2] महारादीकरून. [3] साष्टांग. [4] आपल्या आवडीनें. [5] पडतें. [6] न प्राप्त झाली असतां. [7] त्याकरितां.

उपाव पूर्ण ॥ माझे जिव्हारींची निजखूण ॥ सुगमप्राप्तीलागीं जाण ॥ उत्तम साधन सांगीतलें ॥ ५६ ॥ येणें सुगम ज्ञानस्थिती ॥ येणें सुगम माझी भक्ती ॥ येणें सुगम माझी प्राप्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ५७ ॥ सर्वभूतीं ब्रह्मस्थिती ॥ ज्यासि निश्चयें जाहली प्राप्ती ॥ त्यासि उपरमे भजनवृत्ती ॥ तेंचि श्रीपती सांगत ॥ ५८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सर्वं ब्रह्मात्मकं तस्य विद्ययात्ममनीषया ॥ परिपश्यन्नुपरमेत्सर्वतो मुक्तसंशयः ॥ १८ ॥ ॥टीका॥ ॥ काया वाचा आणि चित्तें ॥ सर्वभूतीं भजले मातें ॥ त्यांसि भगवद्रूप सर्वभूतें ॥ सुनिश्चितें ठसावती ॥ ५९ ॥ तेव्हां मी एक एथें ॥ भगवद्रूप पाहे सर्वभूतें ॥ हेही वृत्ति हारपे[1] तेथें ॥ देखे सभोंवतें परब्रह्म ॥ ३६० ॥ परब्रह्म देखती वृत्ती ॥ तेही विरे[2] ब्रह्माआतौती ॥ जेवीं घृतकणिका घृतीं ॥ होय सुनिश्चतीं घृतरूप ॥ ६१ ॥ तेव्हां ब्रह्मचि परिपूर्ण ॥ हेही स्फूर्ति नुरे जाण ॥ गिळूनियां[3] मीतूंपण ॥ ब्रह्मीं ब्रह्मपण अहेतुक ॥ ६२ ॥ तेथें हेतुमातुदृष्टांतू ॥ खुंटला वेदेसि शास्त्रार्थू ॥ हारपला देवभक्तू[4] ॥ अखंड वस्तू अद्वयत्वें ॥ ६३ ॥ गेलिया दोराचें सापपण ॥ दोर दोररूपें परिपूर्ण ॥ होकां भासतांही सापपण ॥ दोरीं दोरपण अनसुट[5] ॥ ६४ ॥ तेवीं प्रपंच सकारण ॥ गेलिया ब्रह्मचि परिपूर्ण ॥ कां दिसतांही प्रपंचाचें भान ॥ ब्रह्मीं ब्रह्मपण अनुच्छिष्ट ॥ ६५ ॥ याचिलागीं सर्वभूतीं ॥ करितां माझी भगवद्भक्ती ॥ एवढी साधकांसि प्राप्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ६६ ॥ तत्काळ पावावया ब्रह्म पूर्ण ॥ सांडूनियां दोषगुण ॥ सर्वभूतीं भगवद्भजन ॥ हेंचि साधन मुख्यत्वें ॥ ६७ ॥ याही साधनावरतें ॥ आणिक साधन नाहीं सरतें[6] ॥ हेंचि परमसमाधान एथें ॥ मजही निश्चितें मानलें ॥ ६८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अयं हि सर्वकल्पानां सध्रीचीनो मतो मम ॥ मद्भावः सर्वभूतेषु मनोवाक्कायवृत्तिभिः ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ ॥ सर्वभूतीं भगवदृष्टी ॥ हेंचि भांडवल माझे गांठीं ॥ येणें भांडवलें कल्पकोटी ॥ करोनि सृष्टी मी अकर्ता ॥ ६९ ॥ मज पाहतां निजात्मपुष्टी ॥ सर्वभूतीं भगवदृष्टी ॥ हेचि भक्ति माझी गोमटी ॥ ब्रह्मांडकोटी साधक ॥ ३७० ॥ हेचि भक्ति म्यां कल्पादी ॥ सर्वभूतीं भगवद्बुद्धी ॥ नाभिकमळीं त्रिशुद्धी ॥ ब्रह्मा यांविधीं[7] उपदेशिला ॥ ७१ ॥ व्रत तप करितां दान ॥ योग याग करितां ध्यान ॥ वेदशास्त्रार्थें साधितां ज्ञान ॥ माझ्या भक्तिसमान ते नव्हती ॥ ७२ ॥ नानासाधनांचिया कोटी ॥ साधकीं साधितां आटाटी ॥ माझ्या प्रेमाची नातुडे गोठी ॥ मद्भक्तगोठीवांचूनी ॥ ७३ ॥ माझिया भक्तांचिये संगतीं ॥ साधकां लाभे माझी भक्ती ॥ अभेदभजनें माझी प्राप्ती ॥ जाण, निश्चितीं उद्धवा ॥ ७४ ॥ सर्वभूतीं भगवद्भजन ॥ करी तें ऐक पां लक्षण ॥ विषमें[8] भूतें देखतां जाण ॥ मनीं भाव परिपूर्ण ब्रह्मत्वें ॥ ७५ ॥ दुष्ट दुरात्मा अनोळखें[9] ॥ नष्ट चांडाळ अनामिक[10] ॥ तेथही ब्रह्मभाव चोख ॥ हें मानसिक निजभजन ॥ ७६ ॥

---

[1] नाहींशी होते. [2] उपरम पावते. [3] नष्ट होऊन. [4] पूज्यपूजक भाव. [5] विकार रहित. [6] श्रेष्ठ. [7] याप्रमाणें. [8] उंच, नीच. [9] कृतघ्न. [10] ज्याचें नांव घेऊंनये असा.

भूतीं भगवंत परिपूर्ण ॥ ऐसें जाणोनि आपण ॥ भूतांसि लागे अतिदारुण ॥ तें कठिण[1] वचन बोलेना ॥ ७७॥ तेथें जातांही निजप्राण ॥
भूतांचे न बोलावे दोषगुण ॥ या नांव गा वाचिक भजन ॥ उद्धवा जाण निश्चित ॥ ७८॥ जेणें भूतांसि होय उपकार ॥ ते ते करी देह
व्यापार ॥ भेदितां निजजिव्हार[2] ॥ अपकारियां कर उचलीना ॥ ७९ ॥ स्वयें साहूनि अपकार ॥ जो अपकारियां करी उपकार ॥ ऐसा
ज्याचा शरीरव्यापार ॥ तें भजन साचार कायिक ॥ ३८० ॥ यापरी कायावाचामन ॥ सर्वभूतीं भगवद्भजन ॥ हेंचि मुख्यत्वें श्रेष्ठ सा
धन ॥ भक्त सज्ञान जाणती ॥ ८१ ॥ ब्रह्मप्राप्तीचें परम कारण ॥ हेंचि एक सुगम साधन ॥ मजही निश्चयें मानलें जाण ॥ देवाची आण
उद्धवा ॥ ८२ ॥ हा भजनधर्म अतिशुद्ध ॥ एथें विघ्नांचा संबंध ॥ अल्पही रिघोंनशके बाध ॥ तेंचि विशद हरि सांगे ॥ ८३ ॥ ॥ श्लोक ॥
नह्यंगोपक्रमे ध्वंसो मद्धर्मस्योद्धवाण्वपि ॥ मया व्यवसितः सम्यङ्निर्गुणत्वादनाशिषः ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ अनेक धर्म नानाशास्त्रा
र्थीं ॥ मन्वादिमुखें बोलिले बहुतीं ॥ परी सर्वभूतीं भगवद्भक्ती ॥ श्रेष्ठ सर्वार्थीं साधकां ॥ ८४ ॥ ये भक्तीचें हेंचि श्रेष्ठपण ॥ इचे पूर्वा
रंभीं जाण ॥ साधकांपाशीं अल्पही विघ्न ॥ बाधकपण धरूं नशके ॥ ८५ ॥ येभक्तीचें निज लक्षण ॥ पूर्वारंभीं हेचि निर्गुण ॥ एथ
रिघावया विघ्न ॥ दाटुगेपण[3] धरीना ॥ ८६ ॥ जेवीं गरुडाचे झडपेतळीं ॥ होती सर्पाच्या चिरफळी ॥ तेवीं ये भक्तीजवळी ॥ विघ्नांची
होळी स्वयें होये ॥ ८७ ॥ माझिया नामापुढें ॥ विघ्न राहों नशके बापुडें ॥ तें माझे भक्तीकडे ॥ कोणते तोंडें येईल ॥ ८८ ॥ यापरी हे
भक्ति सधर[4] ॥ उद्धवा तुझें भाग्य थोर ॥ म्यां फोडूनि निजजिव्हार ॥ साराचें सार सांगीतलें ॥ ८९ ॥ निष्काम जे माझी भक्ती ॥ तेथ
विघ्नांची नपडे गुंती ॥ परब्रह्माची ब्रह्मस्थिती ॥ सुलभत्वें प्राप्ती साधकां ॥ ३९० ॥ हैतुक अहैतुक कर्माचरण ॥ तेंही करी जो कृष्णार्पण ॥
ते उत्तम माझी भक्ति जाण ॥ तेंचि निरूपण हरि सांगे ॥ ९१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ योयो मयि परे धर्मः कल्पते निष्फलाय चेत् ॥ तदा
यासो निरर्थः स्याद्भयादेरिव सत्तम ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥ व्यवहारार्थ जो प्रयास केला ॥ तो नफळतां व्यर्थ गेला ॥ तोही जैं परब्रह्मीं
अर्पिला ॥ तैं मद्भजनीं लागला सद्भक्ती ॥ ९२ ॥ शिमगियाचा महासण ॥ तेथ खेळ खेळला जो आपण ॥ तोही केल्या कृष्णार्पण ॥
तेही भक्ति जाण मज अर्पें ॥ ९३ ॥ चोराभेणें पळतां वनीं ॥ निधान[5] आतुडे नयनीं ॥ तेवीं व्यर्थ कर्म मदर्पणीं ॥ तोही मद्भजनीं महा
लाभ ॥ ९४ ॥ नासलें तें सांडितां क्षितीं ॥ तेंही लागे माझे भक्तीं ॥ जरी ब्रह्मार्पण चित्तीं ॥ साधक निश्चितीं दृढ मानी ॥ ९५ ॥ कडूभों
पळ्याची खिरी ॥ उपेगा नये श्वानसूकरीं ॥ ते उल्हासें कृष्णार्पण करी ॥ तेही निर्धारीं ब्रह्मीं अर्पें ॥ ९६ ॥ जें हारपलें नदिसे ॥ जें सहजें

---

[1] मर्मभेदक. [2] आपलें मर्म. [3] धैर्य. [4] श्रेष्ठ. [5] ठेवा.

उडे काळवशें ॥ तेंही लाविल्या मदुद्देशें ॥ होय अनायासें मदर्पण ॥ ९७ ॥ सकळ सारांचें सार पूर्ण ॥ कर्ममात्र कृष्णार्पण ॥ साक्षेपें करावें अर्पण ॥ सद्बुद्धि संपूर्ण या नांव ॥ ९८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एषा बुद्धिमतां बुद्धिर्मनीषा च मनीषिणाम् ॥ यत्सत्यमनृतेनेह मर्त्येनाप्नोति मामृतम् ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥ अंतरीं विषयाची आसक्ती ॥ वरीवरी[1] ब्रह्मार्पण ह्मणती ॥ तें केलें बहुतां अर्थीं ॥ तेंचि श्रीपती सांगत ॥ ९९ ॥ एक बुद्धिमंत होती ॥ ते निजबुद्धि घेऊनि हातीं ॥ शेखीं लागले विषयस्वार्थीं ॥ ते ठकिले निश्चितीं देहममता ॥ ४०० ॥ एकाची बुद्धि अतिचोखडी ॥ वेदशास्त्रीं व्युत्पत्ति गाढी ॥ ते अभिमानें कडोविकडी ॥ ठकिले पडिपाडीं ज्ञानगर्वें ॥ १ ॥ बुद्धिमंत अभ्यासी जन ॥ अभ्यासें साधिती प्राणापान ॥ ते योगदुर्गीं रिघतां[2] जाण ॥ ठकिले पूर्ण योगसिद्धीं ॥ २ ॥ एक मानिती कर्म श्रेष्ठ ॥ वाढविती कर्मकचाट ॥ विधिनिषेधीं रोधिली वाट ॥ बुडाले कर्मठ कर्मांमाजी ॥ ३ ॥ यापरी नानाव्युत्पत्ती ॥ करितां ठकले नेणों किती ॥ तैशी नव्हे माझी भक्ती ॥ सभाग्य पावती निजभाग्यें ॥ ४ ॥ माझें सर्वभूतीं ज्यासि भजन ॥ त्याचे बुद्धीची बुद्धि मी आपण ॥ ते तूं बुद्धि ह्मणसी कोण ॥ कर्म ब्रह्मार्पण महाबुद्धि ॥ ५ ॥ सर्वभूतीं माझें भजन ॥ सर्वकर्म मदर्पण ॥ हे बुद्धीची महाबुद्धि जाण ॥ येणें ब्रह्म पूर्ण स्वयें होती ॥ ६ ॥ चतुराचें चातुर्य गहन ॥ या नांव बोलिजे गा आपण ॥ मिथ्या देह करूनि भजन ॥ ब्रह्म सनातन स्वयें होती ॥ ७ ॥ आधीचि माया तंव वावो ॥ मायाकल्पित मिथ्या देहो ॥ तें देहकर्म मज अर्पितां पहाहो ॥ ब्रह्म स्वयंमेवो[3] स्वयें होती ॥ ८ ॥ मिथ्या देहाचेनि भजने ॥ सत्य परब्रह्म स्वयें होणें ॥ जेवीं कोंडा देऊनि आपणें ॥ कण्याच्या घेणें महाराशी ॥ ९ ॥ देतां फुटकी कांचवटी ॥ चिंतामणी जडे गांठी ॥ कां इटेच्या सांटोवांटी[4] ॥ जोडे उठाउठी आव्हां[5] शंख ॥ ४१० ॥ तेवीं मिथ्यादेहींचें कर्माचरण ॥ जेणें जीवासि दृढ बंधन ॥ तें कर्म करितां मदर्पण ॥ ब्रह्म परिपूर्ण स्वयें होती ॥ ११ ॥ अनित्यदेहाचिया साठीं ॥ नित्यवस्तूशि पडे मिठी ॥ हेचि बुद्धिमंतीं बुद्धि मोठी ॥ ज्ञानाची संतुष्टी या नांव ह्मणी पैं ॥ १२ ॥ निष्टंकित[6] परमार्थ ॥ स्वमुखें बोलिला श्रीकृष्णनाथ ॥ तो कळसा[7] आणोनियां ग्रंथ ॥ उपसंहारार्थ[8] सांगतू ॥ १३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एष तेऽभिहितः कृत्स्नो ब्रह्मवादस्य संग्रहः ॥ समासव्यासविधिना देवानामपि दुर्गमः ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ संक्षेप आणि विस्तरें ॥ सांडूनि नाना मतांतरें ॥ म्यां सांगीतलें निजनिर्धारें ॥ ब्रह्मज्ञान खरें अतिशुद्ध ॥ १४ ॥ तुज सांगीतलें करून सुगम ॥ परी हें ब्रह्मादिदेवां दुर्गम ॥ जें आलोडिती आगम निगम ॥ त्यांसीहि परम दुस्तर ॥ १५ ॥ तेथें नानाशास्त्रशब्दबोध ॥ वस्तु नेणोंनि करिती विवाद ॥ जेथ ब्रह्माचा वेदवाद ॥ होय निःशब्द नेतिनेति ॥ १६ ॥ तें हें आत्मज्ञानाचें

---

[1] दांभिकपणानें. [2] चढतां. [3] आपोआप. [4] मोबदल्यांत. [5] दक्षिणावर्त. [6] शुद्ध. [7] समाप्तीस. [8] शेवटचा सारांश.

निजसार ॥ परमार्थाचें गुह्य भांडार ॥ मज परमात्म्याचें जिव्हार ॥ फोडूनि सुखसागर सांगीतलें ॥ १७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अभीक्ष्णशस्ते गदितं ज्ञानं विस्पष्टयुक्तिमत् ॥ एतद्विज्ञाय मुच्येत पुरुषो नष्टसंशयः॥ २४॥ ॥ टीका ॥ ॥ जेथ वेदशास्त्रांशि वांकुडें ॥ जें बोलीं बोलतां नातुडे ॥ तेंचि ज्ञान म्यां तुजपुढें ॥ निजनिवाडें सांगीतलें ॥ १८ ॥ जें सांगीतलें शुद्ध ज्ञान ॥ तें नानायुक्तींकरूनी जाण ॥ दृढ तेलां[1]गीं निरूपण ॥ पुनःपुनः जाण तुज म्यां केलें॥ १९ ॥ बहुत न लावितां खटपट ॥ तुज न वाटतांही कष्ट ॥ ज्ञान सांगीतलें विशिष्ट॥ जेणें होती सपा[2]ट संशय॥४२०॥हें जाणितलिया ज्ञान ॥ सर्वसंशया होय दहन ॥ साधकू होय ब्रह्मसंपन्न ॥ स्वानंदपूर्ण सर्वदा॥२१॥ म्यां सांगीतलें ब्रह्मज्ञान ॥ एकादशाचें निरूपण ॥ याचें श्रवण पठण मनन ॥ करी तो धन्य उद्धवा ॥ २२॥ ॥ श्लोक ॥ ॥ सुविविक्तं तव प्रश्नं मयैतदपि धारयेत् ॥ सनातनं ब्रह्म गुह्यं परं ब्रह्माधिगच्छति ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ ज्ञाते तरती हें नवल कोण ॥ परी भाळे भोळे जे अज्ञान ॥ त्यांसि उद्धरावया जाण ॥ उद्धवें प्रश्न पुशिले ॥ २३ ॥ त्या प्रश्नानुसारें जाण ॥ म्यां संतोषोनि आपण ॥ सांगीतलें गुह्य ज्ञान ॥ परम कारण परब्रह्म ॥ २४ ॥ जेवीं वत्साचे हुंकारें ॥ धेनु स्रवत चाले क्षीरें[3] ॥ तेवीं तुझेनि प्रश्नादरें ॥ मी स्वानंदभरें तुष्टलों ॥ २५ ॥ एथ न करितांही प्रश्न ॥ होतां तानयाचें अवलोकन ॥ कूर्मी नेत्रद्वारा आपण ॥ अमृतपान करवित ॥ २६ ॥ तेवीं उद्धवा तुझें अवलोकन ॥ होतें माझें हृदयींचें ज्ञान ॥ वोसंडलें गा परिपूर्ण ॥ तें हें निरूपण म्यां केलें ॥ २७ ॥ येणें निरूपणमिसें ॥ परमामृत सावकाशें ॥ तुज म्यां पाजिलें अनायासें ॥ स्वानंदरसें निजबोधू ॥ २८ ॥ सिंधु मेघा जळपान करवी ॥ तेणें जळें मेघ जगातें निववी ॥ तेवीं उद्धवाची ब्रह्मपदवी ॥ जडमूढजीवीं उद्धरीजे ॥ २९ ॥ जेवीं वत्साचेनि प्रेमभरें ॥ गाय दुंभे[4] तें घरासि पुरे ॥ तेवीं उद्धवप्रश्नादरें ॥ जग उद्धरे अनायासें ॥ ४३० ॥ तो हा प्रश्नोत्तरकथानुवाद ॥ माझा तुझा ब्रह्मसंवाद ॥ निरूपणीं एकादशस्कंध ॥ हा अर्थावबोध जो राखे ॥३१॥ अथवा हें निरूपण ॥ सार्थ जो करी श्रवण ॥ तैं श्रोते वक्ते उभय जाण ॥ ब्रह्म सनातन स्वयें होती॥३२॥ जगीं ब्रह्म असतां परिपूर्ण ॥ मनबुद्धिइंद्रियां न दिसे जाण ॥ जेथें वेदांसि पडिलें मौन ॥ तें हें ब्रह्मज्ञान पावती ॥ ३३ ॥ ज्ञान पावलिया पुढती ॥ कदा काळें नव्हे च्युती ॥ हा एकादशार्थ धरितां चित्तीं ॥ पदप्राप्ती अच्युत ॥ ३४ ॥ श्रोते वक्ते एकादशार्थी ॥ एवढी पदवी पावती ॥ मा मद्भक्तांसि अतिप्रीतीं ॥ जे उपदेशिती हें ज्ञान ॥ ३५ ॥ त्याच्या फळाची फलप्राप्ती ॥ ज्ञानोपदेशाची शुद्धस्थिती ॥ उद्धवालागीं अतिप्रीतीं ॥ स्वमुखें श्रीपती सांगत ॥३६॥ ॥ श्लोक ॥ ॥ य एतन्मम भक्तेषु संप्रदद्यात् सुपुष्कलम् ॥ तस्याहं ब्रह्मदायस्य

---

[1] पूर्ण ठसण्याकरितां. [2] दूर. [3] दुधानें. [4] दूध देते.

दद्याम्यात्मानमात्मना ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ॥ काया वाचा आणि चित्त ॥ गृह दारा वित्त जीवित ॥ निष्कामता मज अर्पित ॥ अनन्यभक्त ते माझे ॥ ३७ ॥ ऐशिया भक्तांच्या ठायीं जाण ॥ अवश्य उपदेशावें हें ज्ञान ॥ त्याही उपदेशाचें लक्षण ॥ पक्क परिपूर्ण तें ऐसें ॥ ३८ ॥ जेथ जाय साधकाचें मन ॥ तेथ ब्रह्म परिपूर्ण ॥ मन रिघावया तेथून ॥ रितें स्थान असेना ॥ ३९ ॥ ऐसें करितां अनुसंधानें[1] ॥ चैतन्यीं समरसे[2] मन ॥ त्यातें ह्मणिजे पुष्कळ ज्ञान ॥ उपदेश पूर्ण या नांव ॥ ४४० ॥ ऐसें समूळ ब्रह्मज्ञान ॥ मद्भक्तांसि करी जो दान ॥ त्याचा ब्रह्मऋणिया मी जाण ॥ होय संपूर्ण उद्धवा ॥ ४१ ॥ त्याचिया उत्तीर्णत्वांसी[3] ॥ मी निजरूप अर्पीं त्यासी ॥ त्यासबाह्य अहर्निशीं ॥ मी त्यापाशीं तिष्ठत ॥४२॥ जो शिष्यांसि दे ब्रह्मज्ञान ॥ मी परमात्मा त्याअधीन ॥ ब्रह्मदात्याच्या बोलां जाण ॥ स्त्रीशूद्रजन मी उद्धरीं ॥४३॥ देऊनियां परब्रह्म[4] ॥ जो भक्तांसि करी निष्कर्म ॥ त्याचा अंकित मी पुरुषोत्तम ॥ तो प्रिय परम मजलागीं ॥ ४४ ॥ जो ब्रह्मज्ञान दे मद्भक्तां ॥ तयाहूनियां परता ॥ मज आन नाहीं गा पढियंता[5] ॥ जाण तत्त्वतां उद्धवा ॥ ४५ ॥ तो आत्मा मी शरीर जाण ॥ त्याचा देह मी होय आपण ॥ त्याचें जेंजें कर्माचरण ॥ तें संपूर्ण मी होय ॥ ४६ ॥ जैसा मी अवतारधारी ॥ तैसाचि तोही अवतारी ॥ त्या आणि मजमाझारीं ॥ नाहीं तिळभरी अंतर ॥ ४७ ॥ जो या ब्रह्मज्ञानाचें करी दान ॥ त्यासि मी यापरी आपण ॥ करीं निजात्म अर्पण ॥ तरी उत्तीर्ण नव्हेंची ॥ ४८ ॥ यालागीं वर्ततांही शरीरीं ॥ मी अखंड त्याची सेवा करीं ॥ निजात्म अर्पण प्रीतीव्हारीं[6] ॥ मी त्याच्या घरीं सर्वदा ॥ ४९ ॥ त्यातें जेंजें जडभारी ॥ तेंही मी वाहें आपुलें शिरीं ॥ माझी चैतन्यसाम्राज्यश्री ॥ नांदे त्याचे घरीं सर्वदा ॥ ४५० ॥ एकादशाचें ब्रह्मज्ञान ॥ बोधूनि मद्भक्तां करी जो दान ॥ त्यासि मी यापरी जाण ॥ आत्मार्पण स्वयें करीं ॥ ५१ ॥ असोन साधावें ब्रह्मज्ञान ॥ तरी या ग्रंथाचेंचि पठण ॥ जो सर्वदा करी सावधान ॥ तो परम पावन उद्धवा ॥ ५२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ य एतत्समधीयीत पवित्रं परमं शुचि ॥ स पूयेताहरहर्[7]मां ज्ञानदीपेन दर्शयन् ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ ॥ निखळ ब्रह्मज्ञान ॥ तो हा माझा तुझा संवाद जाण ॥ जो सादरें करी पठण ॥ सावधान श्रद्धाळू ॥ ५३ ॥ चढत्या वाढत्या परवडी ॥ शुद्ध सात्विकी श्रद्धा गाढी ॥ पदोंपदीं नीचँ नवी गोडी ॥ अद्भुत आवडी पठणाची ॥ ५४ ॥ वाचेचिया टवळ्यांप्रती ॥ श्रद्धा स्नेहाची[8] संपत्ती ॥ निजजिह्वा करूनि वाती ॥ जो हे ज्ञानदीप्ती प्रकाशी ॥ ५५ ॥ एकादशाचे ज्ञानदीपीं ॥ एकादश इंद्रियांच्या वाती ॥ उजळूनि जे मज वोवाळिती ॥ ते पवित्र किती मी सांगूं ॥५६॥ यापरी जें ग्रंथपठण ॥ तें माझें ज्ञान निरंजन ॥ तेणें ज्ञानदीपें जाण ॥ माझें स्वरूप पूर्ण प्रकाशी ॥५७॥

---

१ भावना. २ तदाकार होणें. ३ उतराईकरितां. ४ ब्रह्मज्ञान. ५ आवडता. ६ प्रेमास्तव. ७ नित्य. ८ तेलाचो.

त्याचे लागले जे संगतीं ॥ त्यांतें ब्रह्मादिक वंदिती ॥ त्यांचेनि पावन त्रिजगती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ५८ ॥ असो ज्यासि न टंके[1] पठण ॥ तिहीं श्रद्धेनें करितां श्रवण ॥ त्यांसि न बाधी भवबंधन ॥ तेंही निरूपण हरि सांगे ॥ ५९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ य एतच्छ्रद्धया नित्यमव्यग्रः शृणुयान्नरः ॥ मयि भक्तिं परां कुर्वन् कर्मभिर्न स बध्यते ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ ॥ असो न करवे अध्ययन ॥ तरी श्रद्धायुक्त सावधान ॥ करितां एकादशाचें श्रवण ॥ कर्मबंधन बाधीना ॥ ४६० ॥ श्रवण केलें अतिश्रद्धेन ॥ त्याहूनि दृढ व्हावें मनन ॥ मननेंवीण तें नपुंसकें[2] जाण ॥ ब्रह्मप्राप्ति पूर्ण कळेना ॥ ६१ ॥ संपलिया कथाश्रवण ॥ मनींचें संपावेंना मनन ॥ जैसें लोभियाचें धन ॥ हृदयीं आठवण सर्वदा ॥ ६२ ॥ जैसें जैसें कीजे श्रवण ॥ तैसें तैसें लागे मनन ॥ मननानुसारें भजन ॥ परा भक्ति जाण उद्बोधें ॥ ६३ ॥ आर्त जिज्ञासु अर्थार्थी ॥ यांची सांडोनियां स्थिती ॥ उल्हासे माझी चौथी भक्ती ॥ जितें परा ह्मणती सज्ञान ॥ ६४ ॥ पराभक्तीचें माझें भजन ॥ क्रियामात्रें निजात्मदर्शन ॥ यालागीं मद्भक्तांसि जाण ॥ कर्मबंधन बाधीना ॥ ६५ ॥ हें असो अतिगुह्य बोलणें ॥ येणें एकादशाचेनि श्रवणें ॥ मी तरेन हा विश्वास जेणें ॥ अंतःकरणें दृढ केला ॥ ६६ ॥ दृढ विश्वास मानूनि पाहीं ॥ जो लोधला[3] श्रवणाविषयीं ॥ माझी भक्ति त्याच्याठायीं ॥ दवँडितां[4] पाही घर रिघे ॥ ६७ ॥ घर रिघोन भक्ति निष्काम ॥ भक्तांचें निर्दळी सकळ कर्म ॥ या नांव परा भक्ति परम ॥ विश्रामधाम परमार्थ्यां ॥ ६८ ॥ एकादशाचें श्रद्धाश्रवण ॥ करितां एवढा लाभ पूर्ण ॥ श्रवणें उपजे माझें भजन ॥ भजनें भक्तजन निर्मुक्त ॥ ६९ ॥ असो पां इतरांची वार्ता ॥ म्यां तुज निरूपिली ज्ञानकथा ॥ ते तुझिया निश्चितार्था ॥ काय तत्त्वतां प्रबोधिली ॥ ४७० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अप्युद्धव त्वया ब्रह्म सखे समवधारितम् ॥ अपि ते विगतो मोहः शोकश्चासौ मनोभवः ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ उद्धवा तुझें देखोनि प्रेम ॥ गुह्य ज्ञान अतिउत्तम ॥ तुज म्यां निरूपिलें परब्रह्म ॥ सांग सुगम अतिशुद्ध ॥ ७१ ॥ हें ज्ञानाचें सोलींव ज्ञान ॥ हें वेदाचें विसावेंतें[5] स्थान ॥ हेचि अविद्येची वोळखण ॥ समाधान जीवशिवां ॥ ७२ ॥ ऐसें हें गुह्य ज्ञान ॥ मनबुद्धिवाचे अगम्य जाण ॥ तें म्यां तुज केलें निरूपण ॥ श्रद्धा संपूर्ण देखोनी ॥ ७३ ॥ जेवीं सखा सख्यांप्रती ॥ आपुली वोपी निजसंपत्ती ॥ तेवीं म्यां हे ब्रह्मस्थिती ॥ तुझ्या हातीं वोपिलीं[6] ॥ ७४ ॥ जैसें दीधलें श्रवणाच्या हातीं तैसें प्रविष्ट जाहलें तुझिया चित्तीं ॥ कीं माझारी पडली कांहीं गुंती ॥ विकल्पवस्ती विक्षेप ॥ ७५ ॥ म्यां निरूँपिलें[7] सार परम ॥ तें तुज कळलें परब्रह्म ॥ नसेल तरी हाचि उपक्रम ॥ पुढती सुगम सांगेन ॥ ७६ ॥ चैतन्य ठसावोनि चित्तीं ॥ जेथ आकळिली ब्रह्मस्थिती ॥ तेथ मोहममतेची वस्ती ॥ समूळ

---

[1] होत नाहीं. [2] असमर्थ, कार्य न करणारें. [3] लुब्ध झाला. [4] घालवून दिली असतांही. [5] विश्रांति घेण्याचें. [6] दिली. [7] सांगितलें.

निश्चितीं नसावी ॥ ७७ ॥ आकळलें ब्रह्मज्ञान ॥ त्याची हेचि वोळखण ॥ संकल्पविकल्पविंदाण[1] ॥ पुढती जाण उपजेना ॥ ७८ ॥ उपजेना मी तूं पण ॥ उपजेना ध्येय ध्याता ध्यान ॥ नुपजे त्यासि कर्मठपण ॥ ब्रह्म परिपूर्ण जाणीतल्या ॥७९॥ जेणें जाणीतलें ब्रह्मज्ञान॥ त्यासि बाधीना कर्मबंधन ॥ कर्माचें जें कर्माचरण ॥ तें जाण आपण मायिक ॥ ४८० ॥ जेवीं छाया चळे पुरुषाचेनी ॥ परी तियेचा लोभ पुरुष न मानी ॥ तेवीं काया चाळी ब्रह्मज्ञानी ॥ देहाभिमानी तो नव्हे ॥ ८१ ॥ जेवीं सूर्यापुढें आंधार ॥ अर्धक्षण न धरी धीर ॥ तेवीं ब्रह्मज्ञानीं कर्मादर[2] ॥ अणुमात्र उरेना ॥ ८२ ॥ कर्माचें जें कर्मबंधन ॥ तो मनोजन्य संकल्प जाण ॥ जेथें मनाचें मोडे मनपण॥ तेथें कर्माचरण निर्बीज ॥ ८३ ॥ वस्तु नित्य निर्विकल्प ॥ तेथें नाहीं संकल्पविकल्प ॥ हें परब्रह्माचें निजस्वरूप ॥ हेंचि रूप स्वानुभवासी ॥ ८४ ॥ ऐसें ब्रह्म पावल्या स्वयमेवो ॥ मी एक उद्धव होतों पहाहो ॥ त्या उद्धवपणासि नाहीं ठावो ॥ मा[3] शोकमोहो तेथ कैंचा ॥ ८५ ॥ उद्धवपणाचिये वस्ती ॥ शोकमोहांची उत्पत्ती ॥ तें उद्धवपण नाठवे चित्तीं ॥ जरी ब्रह्मप्राप्ति तुज जाहली ॥ ८६ ॥ ऐसें ऐकतां देवाचें वचन ॥ उडालें उद्धवाचें उद्धवपण ॥ जाहला स्वानंदीं निमग्न ॥ बोलतेपण बुडालें ॥ ८७ ॥ पावतां आपुली निजात्मता ॥ उडाली उद्धवत्वाची अवस्था ॥ बुडाली स्वदेहअहंता ॥ निजनिमग्नता स्वानंदीं ॥ ८८ ॥ तेथें देवें पुशिला प्रश्न ॥ त्याचें कोण दे प्रतिवचन ॥ कृष्णें सहित उद्धवपण ॥ गिळोनि परिपूर्ण उद्धव जाहला ॥ ८९ ॥ देखोनि उद्धवाची अवस्था ॥ हा ब्रह्म पावला निजात्मता ॥ हें कळोंसरलें[4] कृष्णनाथा ॥ त्या हृदयस्था काय न कळे ॥४९०॥ शिष्य साचार अनुभव लाहे ॥ तेणें सद्गुरु सुखाचा मेरु होये ॥ जेवीं तानयाची धणी माये ॥ सुखावली राहे स्वानंदें ॥ ९१ ॥ सेवक विभांडितां परचक्र ॥ तेणें रायासि संतोष थोर ॥ गुढी उभारूनि साचार ॥ करी निजगजर स्वानंदें ॥ ९२ ॥ तानयाचें लळें पुरवणें ॥ हे व्याली तेचि वेदना जाणे ॥ कां शिष्यासि स्वानुभव देणें ॥ हें स्वयें जाणें सद्गुरू ॥ ९३ ॥ निजपुत्रें लाधल्या निधान ॥ पिता संतोषे आपण ॥ तेवीं उद्धवाचेनि अनुभवें जाण ॥ स्वयें श्रीकृष्ण संतोषे ॥ ९४ ॥ कृष्णसुखें सुखरूप नित्यता ॥ तोही शिष्यानुभवें सर्वथा ॥ लाहे सुखाची परमावस्था ॥ हे गुरुगम्यता अगम्य ॥ ९५ ॥ शिष्यासि उपदेश करितां ॥ गुरूसि नसती सुखावस्था ॥ तरी उपदेशपरंपरता ॥ नव्हे तत्त्वतां इयेलोकीं[5] ॥९६॥ गुरु सांगे जैं उबगलेसाठीं ॥ तैं तें शिष्यासि बोधेना गोष्टी ॥ मा निजानुभवाची भेटी ॥ केवीं निजदृष्टीं देखेल ॥ ९७ ॥ जेवीं बाळा लेणें लेवविता ॥ तें नेणे परी सुखावे माता ॥ तेवीं शिष्यासि अनुभव होतां ॥ सुखावे तत्त्वतां गुरुरावो ॥ ९८ ॥ ऐसा उद्धवाचा ब्रह्मभावो ॥ देखोनि सुखावे कृष्णदेवो ॥ माझा उद्धवो

---

१ कारण. २ कर्माचा सत्कार. ३ गग. ४ कळून आलें. ५ या लोकीं.

जाहला निःसंदेहो ॥ यासि ब्रह्मा[1]नुभवो आकळिला ॥ ९९ ॥ उद्धवाची ब्रह्मनिष्ठता ॥ अनुभवा आली निजात्मता ॥ हें कळोंसरलें श्रीकृष्णनाथा ॥ परोपदेशार्था शिकवित ॥५००॥ तूं पावल्या ब्रह्मज्ञान ॥ तेथ शिष्योपदेशलक्षण ॥ पात्रशुद्धीचें कारण ॥ तेही वोळखण हरि सांगे ॥ १ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नैतत्त्वया दांभिकाय नास्तिकाय शठाय च ॥ अशुश्रूषोरभक्ताय दुर्विनीताय दीयताम् ॥ ३० ॥ ॥ टीका ॥ ॥ शठ नास्तिक दंभयुक्त ॥ अशु[2]श्रूषु आणि अभक्त ॥ ज्यांची स्थिति दुर्वि[3]नीत ॥ ते शिष्य निश्चित त्यागावे ॥ २ ॥ जेणें लोकरूढी होय गहन ॥ तें तें बाह्य कर्माचरण ॥ विपुल धन आणि सन्मान ॥ यदर्थी जाण अतितृष्णा ॥ ३ ॥ ऐसें ज्यांचें दांभिक भजन ॥ त्यासि हें एकादशींचें ज्ञान ॥ ओसणतां गा आपण ॥ स्वप्नींही जाण नेदावें ॥ ४ ॥ मोहममतेचें आधिक्य ॥ तेणें निर्दळिलें निजआस्तिक्य ॥ वेदीं शास्त्रीं दृढ नास्तिक्य ॥ देव मुख्य नाहीं ह्मणती ॥ ५ ॥ नास्तिक्यवादाचिया बंडा ॥ या ज्ञानाचा ढोरकोंडा[4] ॥ लागोंनेदी त्यांचिया तोंडा ॥ त्यांचा भाव कोरडा नास्तिक्यें केला ॥ ६ ॥ नास्तिक्यवादापुढें ॥ ज्ञान कायसें बापुडें ॥ अनश्वराचें बंड गाढें ॥ तें त्यागावें रोकडें आस्तिक्यवादीं ॥ ७ ॥ अनन्यभावें न रिघे शरण ॥ मिथ्या लावूनि गोडपण ॥ धूर्तवादें घेवों पाहे ज्ञान ॥ तेही शठ जाण त्यागावे ॥ ८ ॥ शठाची ऐशी निजमती ॥ पुढिलांची ठकूनि घे युक्ती ॥ परी आपुली व्युत्पत्ती ॥ पुढिलांप्रती सांगेना ॥ ९ ॥ काया वाचा मन धन ॥ जो गुरूशीं करी वंचनं ॥ जो गुरूचे पाहे दोषगुण ॥ तोही शठ पूर्ण त्यागावा ॥ ५१० ॥ माझें अतिथोर महिमान ॥ गुरुसेवा केवीं करूं आपण ॥ सेवा नकरी महिमेभेणँ ॥ तोही शिष्य जाण त्यागावा ॥ ११ ॥ सद्गुरूपाशीं समर्थपण ॥ जो आपली मिरवी जाणीव जाण ॥ जो सेवा न करी गर्वें पूर्ण ॥ तो शिष्य जाण त्यागावा ॥ १२ ॥ मी धनर्दानी अति समर्थ ॥ नीचसेवेसि न लावी हात ॥ ऐसाही जो गर्वयुक्त ॥ तोही निश्चित त्यागावा ॥ १३ ॥ जो लौकिक लाजभेण ॥ गुरुसेवा न करी आपण ॥ त्यासि लौकिकाचा अतिअभिमान ॥ तोही शिष्य जाण त्यागावा ॥ १४ ॥ गुरुगृहींचें नीचकृत्य ॥ न करी मानूनि मी समर्थ ॥ तो मान्यता अभिमानयुक्त ॥ जाण निश्चित त्यागावा ॥ १५ ॥ न करी गुरुसेवा नीचवृत्तीं ॥ आह्मा अखंड ध्यान हेचि गुरुभक्ती ॥ ऐशी सेवावंचक ज्याची युक्ती ॥ तोही निश्चितीं त्यागावा ॥ १६ ॥ नीचसेवा न करी आपण ॥ ह्मणे मागाल तें देईन धन ॥ ऐसा धनगर्वी शिष्य आपण ॥ सर्वथा जाण न करावा ॥ १७ ॥ धरूनि धनाची आस ॥ गुरु शिष्यासि उपदेश ॥ तैं ब्रह्मज्ञान पडलें वोस ॥ वाढले असोसं धनलोभ ॥ १८ ॥ अथवा वेंचूनियां धन ॥ जो घेईन ह्मणे ब्रह्मज्ञान ॥ ऐसा धनाभिमानी शिष्य जाण ॥ सर्वथा आपण न करावा ॥ १९ ॥ यथाकाळें जाहली

---

१ आत्मानुभव. २ सेवा न करणारा. ३ नम्र नसणारी. ४ अंशही. ५ तत्काल. ६ ठकविणें. ७ स्वतःच्या मोठेपणाच्या भीतीनें. ८ धनदाता. ९ अतिशय.

प्राप्त ॥ गुरुसेवा जे कालोचित ॥ न करी जो अशुश्रूषु ह्मणत ॥ तोही निश्चित त्यागावा ॥ ५२० ॥ करितां सद्गुरूची भक्ती ॥ मी उद्धरेन निश्चितीं ॥ ऐसा भाव नसे ज्याचे चित्तीं ॥ तो शिष्य हातीं न धरावा ॥ २१ ॥ सद्गुरु तोचि ब्रह्ममूर्ती ॥ ऐसा भाव नाहीं ज्याच्या चित्तीं ॥ मुळींच विकल्पाची[1] स्थिती ॥ तोही शिष्य हातीं न धरावा ॥ २२ ॥ गुरूहोनि ब्रह्म भिन्न ॥ ऐसें ज्यांचें निश्चित ज्ञान ॥ ते निश्चयेंसि अभक्त जाण ॥ शिष्य आपण न करावे ॥ २३ ॥ मनुष्य मानूनि सद्गुरूशीं ॥ जो न करी गुरुवचनासी ॥ तो जाण पडला अपभ्रंशीं ॥ त्या शिष्यासी त्यागावें ॥ २४ ॥ सद्गुरूहोनि अधिकता ॥ शिष्य आपुली मानी पवित्रता ॥ तो अभक्तांमाजी पूर्ण सरतां ॥ त्यासि तत्त्वतां त्यागावें ॥ २५ ॥ गुरूच्या ठायीं ब्रह्मस्थिती ॥ ज्यासि श्रद्धा नाहीं चित्तीं ॥ याचि नांव गा अभक्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ २६ ॥ ये ग्रंथींचें ब्रह्मज्ञान ॥ ज्यासि निश्चयें नाहीं जाण ॥ त्यासि केव्हांही आपण ॥ झणें[3] विसरोन शिष्य करिसी ॥ २७ ॥ ये ग्रंथींची ब्रह्मस्थिती ॥ वक्ता जो मी ब्रह्ममूर्ती ॥ त्या माझ्याठायीं नाहीं ज्याची भक्ती ॥ तो शिष्य निश्चितीं त्यागावा ॥ २८ ॥ ये ग्रंथींचें आवडे ज्ञान ॥ गुरूच्याठायीं श्रद्धापूर्ण ॥ परी ज्याचें उद्धतं[4] वर्तन ॥ तो शिष्य जाण त्यागावा ॥ २९ ॥ माझ्या निजमूर्ति संतसज्जन ॥ माझे भक्त माझे जीवप्राण ॥ त्यांचें जो करी हेळणें[5] ॥ दुर्विनीतपण या नांव ॥ ५३० ॥ माझ्या भक्तांमाजी रंक[6] जाण ॥ त्याचे सर्वस्वें वंदावे चरण ॥ हें ज्यासि नावडे संपूर्ण ॥ दुर्विनीतपण या नांव ॥ ३१ ॥ साधुसज्जनां भेटोंजाये ॥ शठ नम्रता वंदी पाये ॥ त्याचे गिवसोनि दोषगुण पाहे ॥ दुर्विनीतता राहे तेठायीं ॥ ३२ ॥ दुष्टदुर्बुद्धि जे विनीतता ॥ ती नांव बोलिजे दुर्विनीतता ॥ ऐशी ज्या शिष्यांची अवस्था ॥ ते जाण तत्त्वतां त्यागावे ॥ ३३ ॥ ऐसें हें ऐकोनि निरूपण ॥ ह्मणसी मी शिष्य न करीं जाण ॥ जो शुद्ध उपदेशी ब्रह्मज्ञान ॥ तो आत्मा जाण पैं माझा ॥ ३४ ॥ जो उपदेशी सत्पात्र पूर्ण ॥ त्या सच्छिष्याचें लक्षण ॥ तुज मी सांगेन निरूपण ॥ ऐक सावधान उद्धवा ॥ ३५ ॥ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एतैर्दोषैर्विहीनाय ब्रह्मण्याय प्रियाय च ॥ साधवे शुचये ब्रूयाद्भक्तिः स्याच्छूद्रयोषिताम् ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ ॥ उपदेशीं मुख्य अधिकारपण ॥ धडधडीत वैराग्य पूर्ण ॥ तेंही पिशाचवैराग्य नव्हे जाण ॥ विवेकसंपन्न शास्त्रोक्त ॥ ३६ ॥ दिवसाचारीं वैराग्य केलें ॥ सवेंचि विषयार्थीं लागले ॥ तेथ जेंजें उपदेशिलें ॥ तें सर्पा पाजिलें दुग्ध जैसें ॥ ३७ ॥ जेथ वैराग्य निघोनि जाये ॥ तेथ ज्ञानाभिमान उरला राहे ॥ तेणें अभिमानेंकरी काये ॥ गुणदोष पाहे श्रेष्ठांचे ॥ ३८ ॥ नीच निंदी हेळसून ॥ श्रेष्ठांचे पाहे दोषगुण ॥ जेथ वैराग्य होय क्षीण ॥ तेथें ज्ञानाभिमान चढे ऐसा ॥ ३९ ॥ उद्धवा जगीं दोनी अवस्था ॥ वैराग्य कां विषयासक्तता[7] ॥ तिसरे अवस्थेची

---

१ कल्पनेची. २ श्रेष्ठ. ३ लवकर. ४ दांडगें. ५ निंदा. ६ दरिद्री. ७ विषयांचे ठायीं प्रीत.

कथा ॥ जाण सर्वथा असेना ॥ ५४० ॥ जेथ विवेकें विषयो होय क्षीण ॥ तेथ वैराग्य प्रबळे परिपूर्ण ॥ जेथ विवेकेंसी वैराग्य क्षीण ॥ तेथ विषयाचरण ज्ञानाभिमानें ॥ ४१ ॥ यालागीं होय जंव ब्रह्मज्ञान ॥ तंव जो वैराग्य राखे पूर्ण ॥ वैराग्यें गुरूशी अनन्यशरण ॥ तें अधिकारी रत्न उपदेशा ॥ ४२ ॥ गतश्लोकींचें दोषनिरूपण ॥ आतां बोलिलों वैराग्यार्थ जाण ॥ इहीं दोषीं ज्यां रहितपण ॥ ते अधिकारी सच्छिष्य ॥ ४३ ॥ ज्यासि ब्रह्मत्वें ब्राह्मणभक्ती ॥ अनन्यभावें भजनास्थिती ॥ त्याची आंदणी[1] भक्तिविरक्ती ॥ तो जाण निश्चितीं अधिकारी ॥ ४४ ॥ गुरूचा पढियंताही पूर्ण ॥ त्यापाशीं असल्या अभक्तपण ॥ त्यासि नव्हे ब्रह्मज्ञान ॥ अनन्य भजन जंव नकरी ॥ ४५ ॥ प्रिय आणि भजनशीळ ॥ दोषरहित निर्मळ ॥ त्यासि विरक्ति करूनि अढळ ॥ उपदेशावें तत्काळ गुह्यज्ञान ॥ ४६ ॥ स्वदारा आणि स्वधन ॥ त्यांचा लोभ ज्यासि संपूर्ण ॥ ज्यासि स्वर्ग ना मुक्तपण ॥ जन्ममरण अनिवार ॥ ४७ ॥ परदारा परधन ॥ सर्वथा नातळे ज्याचें मन ॥ ऐसें ज्यापाशीं पवित्रपण ॥ त्यासि हें ज्ञान उपदेशावें ॥ ४८ ॥ जो वैराग्याचा वोतिला ॥ विवेकें पूर्ण वोसंडला ॥ सद्गुरुसेवेशि विकला ॥ चरणीं विनटला अनन्यत्वें ॥ ४९ ॥ सांडूनि निजमहिमान ॥ गुरुसेवेलागीं आपण ॥ ज्यासि आवडे रंकपण[3] ॥ ऐसा सेवेसि पूर्ण सद्भाव ॥ ५५० ॥ अमरश्रेष्ठ जे सुरवर ॥ ते मानी सद्गुरूचे किंकर ॥ सद्गुरूहूनियां थोर ॥ हरिहर मानीना ॥ ५१ ॥ ज्यासि नाहीं गर्वमद ॥ ज्यासि नाहीं कामक्रोध ॥ ज्यासि नावडे विकल्पभेद ॥ तो शिष्य शुद्ध परमार्थी ॥ ५२ ॥ काया वाचा मन धन ॥ सांडूनि समर्थता महिमानं[4] ॥ जो सद्गुरूशी अनन्यशरण ॥ तो सच्छिष्य जाण साधुत्वें ॥ ५३ ॥ सांडूनि लज्जा लौकिक ॥ जो ब्रह्मज्ञानाचा याचक[5] ॥ सद्गुरुवचनार्थी चातक ॥ तो आवश्यक उपदेशी ॥ ५४ ॥ जे कां द्विजन्म्यांबाहेरी[6] ॥ वेदें वाळूनि सांडिलें दूरीं ॥ जे कां मंत्रार्थी आमंत्री ॥ जे अनधिकारी श्रवणासी ॥ ५५ ॥ ज्यासीं नाहीं आश्रमधर्म ॥ ज्यासि नाहीं श्रौत कर्म ॥ ज्यासि नाहीं जपहोम ॥ जो वर्णाधम अतिनीच ॥ ५६ ॥ ऐसे जे कां शूद्रजन ॥ ऐकोनि ग्रंथींचें ज्ञान ॥ निवाराया जन्ममरण ॥ उपजे दारुण विरक्ती ॥ ५७ ॥ उखितांच[7] एकसरें चित्तें ॥ मनींहूनि विटे विषयांतें ॥ मग चित्तें वित्तें जीवितें ॥ रिघे सद्गुरूतें अनन्यशरण ॥ ५८ ॥ गुरूसि पुसोंनेणे प्रश्न ॥ ह्मणे निवारी जन्ममरण ॥ भावार्थें घाली लोटांगण ॥ श्रद्धा संपूर्ण परमार्थी ॥ ५९ ॥ ते होत कां शूद्रजन ॥ त्यांसि उपदेशितां ब्रह्मज्ञान ॥ उद्धवा कदा न लागे दूषण ॥ हें सत्यवचन पैं माझें ॥ ५६० ॥ जे कां अपेक्षोनियां[8] वित्तं[9] ॥ चतुर्वर्णां उपदेशित ॥ ते धनलोभें लोलुप एथ ॥ नाहीं घेइजेत गुरुत्वें ॥ ६१ ॥ जेथ गुरूशींच सलोभता ॥ तेथ शिष्याची बुडे विरक्तता ॥ ऐशियाचा

---

१ स्वाधीन. २ शरण आला. ३ नीचपण. ४ लौकिक. ५ मागणारा. ६ ब्राह्मणादि तीन वर्णांबाहेर. ७ विरक्त होतांच. ८ घेण्याची इच्छा करून. ९ धन.

विरक्तीं उपदेश घेतां ॥ परमार्थताअपघातू ॥ ६२ ॥ निर्लोभत्व रूपेनें पूर्ण ॥ सद्गुरु उपदेशी शूद्रजन ॥ ऐसेंनि करी जो दीनोद्धरण ॥ तेथ नलगे दूषण उपदेशा ॥ ६३ ॥ जेणें तडफडूनि जाण ॥ वैराग्यासि ये मरण ॥ जेणें ज्ञात्यासि लागे दूषण ॥ तो स्त्रीसंग आपण न करावा ॥ ६४ ॥ स्त्री देखतांचि अवचितीं ॥ तत्काळ पाडी अधःपातीं ॥ तिची जाहलिया संगती ॥ कैंची धड गती सज्ञाना ॥ ६५ ॥ प्रमोदीं पाडी सर्वार्थी ॥ हे प्रमदा[3]नामाची निजख्याती ॥ तिची जाहलिया नित्य संगती ॥ केवीं परमार्थी तरतील ॥ ६६ ॥ जियेचें देखतांचि वदन ॥ कामा मोकली कटाक्षबाण ॥ तेथ कायसा उपदेश जाण ॥ आली नागवण परमार्था ॥ ६७ ॥ उद्धवा तुज मी हें सांगतों जाण ॥ नको स्त्रियांसी संभाषण ॥ नको स्त्रियांचें अवलोकन ॥ नको स्त्रीवचन कानीं घेऊं ॥ ६८ ॥ नको नको स्त्रियांसी मात ॥ नको नको स्त्रियांसी एकांत ॥ नको नको स्त्रियांशी संगत ॥ निंद्य लोकांत सर्वार्थी ॥ ६९ ॥ नको नको स्त्रियांचा अनुवाद ॥ नको नको स्त्रियांचा संवाद ॥ नको नको स्त्रियांसि करूं बोध ॥ मिथ्यापवाद अंगीं वाजे ॥ ५७० ॥ स्वभावें सात्विक वनिता[4] ॥ गोष्टि सांगों आली परमार्था ॥ तोचि विकल्प तत्त्वतां ॥ सुहृदां समस्तां परिकल्पे ॥ ७१ ॥ यालागीं प्रमदा जाण ॥ सर्वथा त्यागावी आपण ॥ प्रमदासंगतीं ब्रह्मज्ञान ॥ सर्वथा जाण वाढेना ॥ ७२ ॥ आशंका ॥ उपदेशीं त्या ज्या स्त्रिया जरी ॥ तरी मागीलीं थोरथोरीं ॥ उपदेशिल्या कैशापरी ॥ ऐक निर्धारीं सांगेन ॥ ७३ ॥ श्रेष्ठ याज्ञवल्क्य पाहो ॥ तेणें उपनिषदांच्या ठायीं ॥ उपदेशिली मैत्रेयी ॥ नानायुक्तीं पाहीं प्रबोधें ॥ ७४ ॥ स्वयें नारद महामुनी ॥ प्रह्लादाची निजजननी[5] ॥ इंद्रापासूनि सोडवूनी ॥ ब्रह्मज्ञानीं उपदेशी ॥ ७५ ॥ अवतरोनि कपिलमुनी ॥ बैसोनियां सिद्धासनीं ॥ देवहूतीलागोनी ॥ ब्रह्मज्ञानीं प्रबोधी ॥ ७६ ॥ जो योगियांचा मुकुटमणी ॥ कैलासपति शूळपाणी[6] ॥ भर्व उपदेशी भवानी[7] ॥ ब्रह्मज्ञानीं निजबोधें ॥ ७७ ॥ इतरांची गोठी कायशी ॥ तुवांचि गा हृषीकेशी ॥ उपदेशिलें यज्ञपत्न्यांसी ॥ ऐसें ह्मणसी उद्धवा ॥ ७८ ॥ असो देखोनियां सद्भावा ॥ उपदेश करूं ह्मणशी कणवा ॥ तरी तो अधिकार वोळखावा ॥ ऐक उद्धवा सांगेन ॥ ७९ ॥ स्त्रीपुरुष अवलोकन ॥ जयाचे दृष्टीं समसमान ॥ ऐसें अनुभवी जो परिपूर्ण ॥ तोचि स्त्रियांशि जाण उपदेशी ॥ ५८० ॥ तोही अधिकार न पाहतां ॥ उपदेश न करिती सर्वथा ॥ त्याही उपदेशाची कथा ॥ ऐक तत्त्वतां सांगेन ॥ ८१ ॥ म्यां ज्या कां निंदिल्या वनितां ॥ त्यांमाजी सभाग्या सात्विकता ॥ सांडूनियां विषयावस्था ॥ जे परमार्थां उद्यतें ॥ ८२ ॥ त्यजूनियां प्रपंचाची हांव ॥ नावडे विषयाचें नांव ॥ वैराग्यें उठला सद्भाव ॥ घेऊनि धांव परमार्थी ॥ ८३ ॥ जन्ममरणनिवारणीं ॥ जीवा मनाची नित्य

---

१ परमार्थाचो हानि करणारा. २ अनवधानीं. ३ स्त्रीच्या प्रमदा या नांवाची. ४ स्त्री. ५ आई कयाधू. ६ शंकर. ७ पार्वती. ८ स्त्रिया. ९ उत्कंठित.

कांचणी[1] ॥ माझे भवपाशच्छेदनी ॥ धर्मदाता कोणी मिळता कां ॥ ८४ ॥ सद्गुरुप्राप्तीची अतिआर्त ॥ काया वाचा वित्त जीवित ॥ कुरवंडी[2] करूनि सांडित ॥ परमार्थार्थ सद्भावें ॥ ८५ ॥ अतिथि आणि पतिपुत्रांसी ॥ भोजनीं समता नित्य जिशीं ॥ धनलोभ नाहीं मानसीं ॥ परमार्थी तिसी अधिकारू ॥ ८६ ॥ यापरी निजपरमार्था ॥ सद्भावें जे विनटे वनिता ॥ तिसि उद्धवा हें उपदेशितां ॥ दोष सर्वथा लागेना ॥ ८७ ॥ क्षत्रिय वैश्य स्त्री शूद्रजन ॥ यांची श्रद्धा दृढ पाहून ॥ उपदेशितां ब्रह्मज्ञान ॥ दोषनिर्दळण शिष्याचें ॥ ८८ ॥ उपदेशितां ब्रह्मज्ञान ॥ जैं गुरूसीच लागे दूषण ॥ तैं शिष्यासि उद्धरी कोण ॥ हें व्याख्यान अबद्ध ॥ ८९ ॥ पहावया पात्रशुद्धता ॥ मी बोलिलों दोषवार्ता ॥ वांचूनि ब्रह्मज्ञान उपदेशितां ॥ दोष सर्वथा असेना ॥ ५९० ॥ हें ज्ञान जाणीतल्यापाठीं ॥ जाणणेंचि सरे स्रष्टीं ॥ संसारासि पडे तुटी ॥ तेथ दोषाची गोठी असेना ॥ ९१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नैतद्विज्ञाय जिज्ञासोर्ज्ञातव्यमवशिष्यते ॥ पीत्वा पीयूषममृतं पातव्यं नावशिष्यते ॥ ३२ ॥ ॥ टीका ॥ ॥ ये ग्रंथींचें जाणीतल्या ज्ञान ॥ मुमुक्षु[3] जे साधकजन ॥ त्यांसि जाणावया आन ॥ जाणतेपण उरेना ॥ ९२ ॥ जेवीं केलिया अमृतपान ॥ पुढें प्राशनासि नुरे आन ॥ तेवीं जाणीतल्या हें ज्ञान ॥ ज्ञातव्य ज्ञाते पण समूळ नुरे ॥ ९३ ॥ ॥ आशंका ॥ ॥ धर्मार्थकाममोक्षप्रती ॥ साधनें असती नेणों किती ॥ तुवां हें एकचि श्रीपती ॥ कैशा रीतीं प्रतिपादिलें ॥ ९४ ॥ उद्धवा साधनें जीं आनान ॥ तीं अभक्त सोशिती आपण ॥ माझ्या भक्तांसि गा जाण ॥ मीच साधन सर्वार्थीं ॥ ९५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ज्ञाने कर्मणि योगे च वार्तायां दंडधारणे ॥ यावानर्थो नृणां तात तावांस्तेऽहं चतुर्विधः ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ मोक्षालागीं ज्ञान साधन ॥ धर्मालागीं स्वकर्माचरण ॥ स्वामीलागीं दंडधारण ॥ अर्थोद्यम[4] जाण जीविकावृत्ती ॥ ९६ ॥ इहामुत्र कामभोग ॥ तदर्थ करिती योग याग ॥ चहूंपुरुषार्थीं हा चांग ॥ साधनप्रयोग अभक्तां ॥ ९७ ॥ ऐसें सोशितां साधन ॥ सहसा सिद्धि न पवे जाण ॥ अनेक विकळता दूषण ॥ मांजी[5] छळी विघ्न देवांचें ॥ ९८ ॥ तैसें मद्भक्तांसि नव्हे जाण ॥ माझें करितां अनन्यभजन ॥ चारी पुरुषार्थ येती शरण ॥ पायां सुरगण लागती ॥ ९९ ॥ उद्धवा जे मज अनन्यशरण ॥ त्यांचा धर्म अर्थ मी आपण ॥ त्यांचा काम तोही मीचि जाण ॥ मोक्ष संपूर्ण मी त्यांचा ॥ ६०० ॥ अभक्तां भोगक्षयें[6] पुनरावृत्ती[7] ॥ भक्तांसि भोग भोगितां नित्यमुक्ती ॥ एवढी माझ्या भक्तीची ख्याती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ १ ॥ ऐशी ऐकतां देवाची मात ॥ उद्धव प्रेमें वोसंडला अद्भुत ॥ तेणें प्रेमें लोधला कृष्णनाथ ॥ हर्षें बोलत तेधवां ॥ २ ॥ उद्धवा तुझे चारी पुरुषार्थ ॥ तो मी प्रत्यक्ष भगवंत ॥ हर्षें बोलोनि हर्षयुक्त ॥

---

१ धाक. २ ओंवाळणी. ३ मुक्त होण्याची इच्छा करणारे. ४ द्रव्य मिळविण्याचा उद्योग. ५ मध्येंच. ६ पुण्य व पाप यांच्या फलांचा उपभोगानें क्षय झाल्यानें. ७ पुनः जन्म व मरण.

हृदया आंत आलिंगी ॥ ३ ॥ हर्षें देतां आलिंगन ॥ कृष्ण विसरला कृष्णपण ॥ उद्धव स्वानंदनिमग्न ॥ उद्धवपण विसरला ॥ ४ ॥ कैसें अभिनव आलिंगन ॥ दोघांचें गेलें दोघे[1]पण ॥ पूर्ण चैतन्यपरिपूर्ण ॥ स्वानंदघन स्वयें झाले ॥ ५ ॥ तेथ विरोनि गेला हेतू ॥ वेदेंसहित बुडाली मातू ॥ एकवटला देवीं भक्तू ॥ एकीं एकांतू एकत्वें ॥ ६ ॥ तेथ मावळले धर्माधर्म ॥ क्रियेसहित बुडालें कर्म ॥ भ्रम आणि निर्भ्रम ॥ दोहींचें नाम असेना ॥ ७ ॥ भेद घेऊनि गेला अभेदा ॥ बोध घेऊनि गेला निजबोधा ॥ आनंद लाजला आनंदा ॥ ऐशिया निजपदा उद्धव पावे ॥ ८ ॥ मी जाहलों परब्रह्म ॥ हाचि मुख्यत्वें एथ भ्रम ॥ कृष्णालिंगनाचा हा धर्म ॥ जाहला निरुपम निजवस्तू ॥ ९ ॥ यापरी कृष्ण सर्वज्ञ ॥ सोडोनि आलिंगन ॥ ऐक्यबोधें उद्धवासि जाण ॥ निजभक्तपण प्रबोधी ॥ ६१० ॥ तेव्हां उद्धव चमत्कारिला ॥ अतिशयें चा[2]काटला ॥ परमविस्मयें दाटला ॥ तटस्थ ठेला ते काळीं ॥ ११ ॥ मग ह्मणे निजात्मता ॥ स्वतःसिद्ध जवळीं असतां ॥ जनासि नकळे सर्वथा ॥ साधकांच्या हाता चढे केवीं ॥ १२ ॥ तें उद्धवाचें मनोगत ॥ जाणोनियां श्रीकृष्णनाथ ॥ तदर्थींचा सुनिश्चि[3]त ॥ असे सांगत उपाय ॥ १३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मर्त्यो यदा त्यक्तसमस्तकर्मा निवेदितात्मा विचिकीर्षितो मे ॥ तदामृतत्वं प्रतिपद्यमानो मयात्मभूयाय च कल्पते वै ॥ ३४ ॥ ॥ टीका ॥ ॥ जें बोलिलीं धर्मकाममोक्षार्थ ॥ तें सांडूनि साधनें समस्त ॥ जे अनन्य भावें मज भजत ॥ विश्वासयुक्त मज भावें ॥ १४ ॥ त्यांसि हे स्वरूपस्थिती ॥ जे त्वां भोगिली आत्मप्रतीती ॥ ते तत्काळ होय प्राप्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ १५ ॥ धर्मार्थकामवासना ॥ असोनि लागल्या मद्भजना ॥ तेही पुरवूनियां जाणा ॥ सायु[4]ज्यसदना मी आ[5]णीं ॥ १६ ॥ भक्तांसि स्वधर्मकर्मावस्था ॥ तेही लाविल्या भजनपंथा ॥ स्वधर्मकर्मीं अकर्मात्मता ॥ माझिया मद्भक्ता उद्बोधीं मी ॥ १७ ॥ भक्त वांछी भोगकाम ॥ भोग भोगोनि होय निष्काम ॥ ऐशिया निजबोधाचें वर्म ॥ मी आत्माराम [6]उद्बोधीं ॥ १८ ॥ भक्त मागे अर्थसंपन्नता ॥ त्याचे गांठीं धनसंचयतां ॥ माझी षड्गुणसमर्थता ॥ वो[7]ळंगे तत्त्वतां त्यापाशीं ॥ १९ ॥ सर्वभूतीं माझी भक्ती ॥ भक्त भजे अनन्यप्रीतीं ॥ तैं चारी मुक्ती शरण येती ॥ मद्भक्तां मुक्ती स्वतःसिद्ध ॥ ६२० ॥ वैद्य धडफुडा पंचानन ॥ रोगियांची वासना पो[8]खून ॥ मागे तें देऊनि अन्न ॥ वांचवी रसज्ञ रसप्रयोगें ॥ २१ ॥ तेवीं धर्म अर्थकामवासना ॥ भक्तांच्या पोखूनियां जाणा ॥ मी आणीं सायुज्यसदना ॥ तेही विवंचना सांगीतली ॥ २२ ॥ नाना साधनाभिमान ॥ सांडूनियां ये जो मज शरण ॥ त्यासिही स्वरूपप्राप्ति पूर्ण ॥ उद्धवा जाण सुनिश्चित ॥ २३ ॥ भक्त सकाम जरी चित्तीं ॥ तो जैं करी अनन्यभक्ती ॥ तैं काम पुरवूनि मी दे मुक्ती ॥

---

[1] सेव्यसेवकभाव. [2] चकित झाला. [3] निश्चितार्थ. [4] सायुज्यमुक्तीस. [5] नेतों. [6] उत्तम बोध करितों. [7] प्राप्त होते. [8] पोषण करून.

भक्तां अधोगती कदा नघडे ॥ २४ ॥ बाळकें थां[1]या घेऊनि कांहीं ॥ मिठी घातल्या मातेच्या पायीं ॥ धन वेंचोनि अर्पी तेंही ॥ परी जीवें कांहीं मारीना ॥ २५ ॥ तेवीं माझी करितां अनन्यभक्ती ॥ जो जो काम भक्त वांछी चित्तीं ॥ तो तो पुरवूनि दें मुक्ती ॥ भक्तां अधोगतीं पडोंनेदीं ॥ २६ ॥ देखोनि बाळकाची व्यथा ॥ जेवीं सर्वस्वीं कळवळी माता ॥ तेवीं निजभक्तांची अवस्था ॥ मजही सर्वथा सहावेना ॥ २७ ॥ काम पुरवूनि द्यावया मुक्ती ॥ काय माझे गांठीं नाहीं शक्ती ॥ मी भक्तकैवारी श्रीपती ॥ त्यासि अधोगती कदा नघडे ॥ २८ ॥ माझें नाम अवचटें आल्या अंतीं ॥ रंक लाहे सायुज्यमुक्ती ॥ मा माझी करितां अनन्यभक्ती ॥ भक्तां अवग[3]ती मग कैंची ॥ २९ ॥ माझा भक्त जयाकडे रूपें पाहे ॥ तोही माझी भक्ति लाहे ॥ मा मद्भक्ता अवगति होये ॥ हा भोग नसाहे मजलागीं ॥ ६३० ॥ सोसूनियां गर्भवासासी ॥ म्यां मुक्त केला अंबर्षी ॥ विदारूनि हिरण्यकशिपूसी ॥ प्रह्लादासी रक्षिलें ॥ ३१ ॥ चक्र घेऊनियां हातीं ॥ म्यां गर्भीं रक्षिला परीक्षिती ॥ तो मी भक्तांसि अधोगती ॥ कदा कल्पांतीं होऊंनेदीं ॥ ३२ ॥ माझिये भक्तीचेनि नांवें ॥ तृण तेंही म्यां उद्धरावें ॥ भक्तां केवीं अवगती पावे ॥ जे जीवें भा[illegible] मज भजले ॥ ३३ ॥ काया वाचा मन धन ॥ अवंचूनि अनन्य शरण ॥ त्यांचा भोग मोक्षही जाण ॥ मी श्रीकृष्ण स्वयें सोशीं ॥ ३४ ॥ असा अनन्यभक्तीचा महिमा ॥ सांगतां उत्साह पुरुषोत्तमा ॥ तेणें उद्धवासि लोटला प्रेमा ॥ स्वेद[4] रोमा रवरवित ॥ ३५ ॥ ऐकोनि भक्तीचें महिमान ॥ देखोनि उद्धवाचें प्रेम पूर्ण ॥ श्रीशुक सुखावला आपण ॥ स्वानंदें पूर्ण डोलत ॥ ३६ ॥ हरिखें ह्मणे परीक्षिती ॥ धन्य हरिभक्ति त्रिजगतीं ॥ ज्यासि सर्वार्थी मुक्ती ॥ स्वमुखें श्रीपती बोलिला ॥ ३७ ॥ जैसें भक्तीचें महिमान ॥ तैसेंचि उद्धवाचें प्रेम गहन ॥ तैसें उद्धवाचें प्रेमळपण ॥ श्रीशुक आपण सांगत ॥ ३८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ ॥ स एवमादर्शितयोगमार्गस्तदोत्तमश्लोकवचो निशम्य ॥ बद्धांजलिः प्रत्युपरुद्धकंठो न किंचिदूचेऽश्रुपरिप्लुताक्षः ॥ ३५ ॥ विष्टभ्य चित्तं प्रणयावघूर्णं धैर्येण राजन् बहु मन्यमानः ॥ कृतांजलिः प्राह यदुप्रवीरं शीर्ष्णा स्पृशंस्तच्चरणारविंदम् ॥ ३६ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो ज्ञानियांचा ज्ञाननिधी ॥ जो निजबोधाचा उद[5]धी ॥ जो आनंदाचा क्षीराब्धी ॥ तो शुक स्वानंदीं तोषला ॥ ३९ ॥ ऐक बापा परीक्षिती ॥ श्रवणसौभा[6]ग्यचक्रवर्ती ॥ ज्यातें सुर नर असुर वांनिती ॥ ज्याची कीजे स्तुती महासिद्धी ॥ ६४० ॥ ज्यातें वेद नित्य गाती ॥ योगिवंदीं वानिजे कीर्ती ॥ तेणें श्रीकृष्णें स्तविली भक्ती ॥ परम प्रीतीं अचुंबित ॥ ४१ ॥ अनन्यभक्तीपरतें सुख ॥ आन नाहींच विशे[8]ख ॥ सर्व सारांचें सार देख ॥ मद्भक्ति चोख सुरवरां ॥ ४२ ॥ भक्तियोगाचा योगमार्ग ॥

---

१ हट्ट. २ दुःख. ३ वाईट गति. ४ घाम. ५ समुद्र. ६ श्रवणरूप ऐश्वर्यानें सर्वांत श्रेष्ठ. ७ वर्णितात. ८ अधिक.

समूळ प्रेम शुद्ध सांग ॥ स्वमुखें बोलिला श्रीरंग ॥ तें उद्धवें चांग अवधारिलें ॥ ४३ ॥ ऐकतां भक्तीचें निरूपण ॥ उद्धवाचें द्रवलें मन ॥ नयनीं अश्रु आले पूर्ण ॥ स्वानंदजीवन लोटलें ॥ ४४ ॥ शरीर जाहलें रोमांचित ॥ चित्त जाहलें हर्षयुक्त ॥ तेणें कंठीं बाष्प दाटत ॥ स्वेदक[1]ण येत सर्वांगीं ॥ ४५ ॥ प्राण पांगुळला[2] जेथिचा तेथ ॥ शरीर मंदमंद कांपत ॥ नयन पुंजाळले[3] निश्चित ॥ अर्धोन्मीलित ते जाहले ॥ ४६ ॥ औत्सुक्याचे अतिप्रीतीं ॥ स्वानंदीं समरसे चित्तवृत्ती ॥ उद्धवदेहाची विरतां स्थिती ॥ प्रारब्धें निश्चितीं तें राखिलें ॥ ४७ ॥ जळीं नांव उलथतां पूर्ण ॥ जेवीं दोर राखे आवरून ॥ तेवीं मावळतां उद्धवपण ॥ प्रारब्धें जाण राखिलें ॥ ४८ ॥ धैर्याचेनि अतिसामर्थ्यें ॥ आवरूनि प्रेमाचें भरितें ॥ मी कृतकृत्य जाहलों एथें ॥ हेंही चित्तें मानिलें ॥ ४९ ॥ श्रीकृष्णें उद्धरिलें मातें ॥ ऐशिया मानूनि उपकारातें ॥ काय उतरायी होऊं मी यातें ॥ ऐसें निजचित्तें विचारी ॥ ६५० ॥ गुरूसि चिंतामणी देवो आतां ॥ तो चिंता वाढवी चिंतिलें देतां ॥ गुरूनीं दिधलें अचिंत्यार्था ॥ तेथें उत्तीर्णता कदा न घडे ॥ ५१ ॥ गुरूसि कल्पतरू देवों जातां ॥ तो कल्पना वाढवी कल्पिलें देतां ॥ गुरूनें दीधली निर्विकल्पता ॥ त्यासि उत्तीणतां तेणें नव्हीजे ॥ ५२ ॥ गुरूसि देवों स्पर्श[4]मणी ॥ तो स्पर्शें धातु करी सुवर्णी ॥ ब्रह्मत्व गुरुचरणस्पर्शनीं ॥ त्यासि नव्हे उत्तीर्णी परीसही देतां ॥ ५३ ॥ गुरूसि कामधेनु देऊं आणोनी ॥ ते कामना वाढवी अर्थ देऊनी ॥ गुरु निष्काम निर्गुणदानी ॥ त्याचे उ[5]त्तीर्णी कामधेनु नव्हे ॥ ५४ ॥ त्रिभुवनींची संपत्ति चोख ॥ गुरूसि देतां ते मायिक ॥ जेणें दीधली वस्तु अमायिक ॥ त्यासि कैसेंनि लोक उतरायी होती ॥ ५५ ॥ देहें उतरायी होऊं गुरूशी ॥ तंव नश्वरपण या देहासी ॥ [6]नश्वरें अनश्[7]वरासी ॥ उत्तीर्णत्वासी कदा न घडे ॥ ५६ ॥ जेणें आव्हा शंख दीधला आवडीं ॥ त्यासि देऊनि फुटकी कवडी ॥ उत्तीर्णत्वाची वाढवी गोडी ॥ तैशा परवडी देहभावा ॥ ५७ ॥ जीवें उतरायी होऊं गुरूशीं ॥ तंव मिथ्यात्वचि जीवित्वासी ॥ जेणें दीधलें सत्यवस्तूसी ॥ मिथ्या देतां त्यासी लाजेना ॥ ५८ ॥ जेणें दीधलें अनर्घ्य[8] रत्नासी ॥ वंध्यापुत्र देवों[9] केला त्यासी ॥ तेवीं मिथ्यात्व जीवभावासी ॥ उत्तीर्णत्वांसी कदा न घडे ॥ ५९ ॥ काया वाचा मन धन ॥ गुरूशि अर्पितां जीवप्राण ॥ कदा नव्हे जे उत्तीर्ण ॥ हें उद्धवें संपूर्ण जाणीतलें ॥ ६६० ॥ जेथें अणुमात्र नाहीं दुःख ॥ ऐसें दीधलें निजसुख ॥ त्या गुरूसि उतरायी देख ॥ न व्हावें निःशेख शिष्यांसी ॥ ६१ ॥ यालागीं मौनेंचि जाण ॥ उद्धवें घातलें लोटांगण ॥ श्रीकृष्णाचे श्रीचरण ॥ मस्तकीं संपूर्ण वंदिले ॥ ६२ ॥ मागां श्रीकृष्णें पुशिलें पहाहो ॥ उद्धवा तुझा गेला शोकमोहो ॥ तेणें उद्धवासि जाहला विस्मयो ॥ उत्तर द्यावया ठावो न घडेची ॥ ६३ ॥ आतां वंदोनि

---

[1] घामाचे बिंदु. [2] शिथिल झाला. [3] झांकले गेले. [4] परिस. [5] फेडीस. [6] अनित्यानें. [7] नित्यास. [8] ज्यास मोल नाहीं असें. [9] देऊं.

श्रीचरण ॥ कृतांजली[1] धरोनि जाण ॥ उत्तर द्यावया आपण ॥ श्रीकृष्णवदन अवलोकी ॥६४॥ जेवीं सेवितां चंद्रकर[2] ॥ चकोर तृप्तीचे दे ढेंकर ॥ तेवीं कृष्णसुखें अतिनिर्भर ॥ काय प्रत्युत्तर बोलत ॥ ६५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धव उवाच ॥ ॥ विद्रावितो मोहमहांधकारो य आश्रितो मे तव सन्निधानात् ॥ विभावसोः किन्नु समीपगस्य शीतं तमोभीः प्रभवंत्यजाद्य ॥३७॥ ॥ टीका ॥ ॥ जो सकळ देवचूडामणी ॥ जो यादवांमाजी अग्रगणी ॥ जो अविद्यारात्रीचा तरणी[3] ॥ जो शिरोमणी ब्रह्मवेत्त्यां ॥६६॥ ऐशिया श्रीकृष्णाप्रती ॥ स्वानंदाचिये निजस्फूर्ती[4] ॥ उद्धवें सागतां निजस्थिती ॥ त्यामाजी करी स्तुती आद्यत्वें हरीची ॥६७॥ मज तंव विचारितां ॥ ब्रह्मा सर्वांचा आदिकर्ता ॥ तोही नारायणनाभीं तत्त्वतां ॥ होय जन्मता अजनामें ॥ ६८ ॥ तो कमळनाभि नारायण ॥ तो मायाशबल ब्रह्म जाण ॥ ते मायेचें तूं आद्यकारण ॥ आद्यत्व पूर्ण तुज साजे ॥ ६९ ॥ अविद्येच्या महारात्रीं ॥ अडकलों मोहअंधारीं ॥ तेथूनि काढावया बाहेरीं ॥ आणिकांची थोरी चालेना ॥६७० ॥ तेथ तुझेनि वचनभास्करें[5] ॥ नासोनि शोकमोहअंधारें ॥ मज काढिलेंजी बाहेरें ॥ चमत्कारें सन्निधीं तुझ्यां ॥ ७१ ॥ तुझिये सन्निधीपाशीं ॥ ठाव नाहीं अविद्येशीं ॥ तेथ मोह ममता कैंची ग्रासी ॥ हृषीकेशी तूं असतां ॥ ७२ ॥ अंधारी राती[6] अतिगहन ॥ तेथ शीतें पीडिला जो संपूर्ण ॥ त्यासि आतुडलिया हुताशन[7] ॥ शीत तम जाण तत्काळ पळे ॥७३॥ तो अग्नि सेवितां स्वयें सदा ॥ शीततमांची[8] भयबाधा ॥ पुढती बाधों न शके कदा ॥ तेवीं गोविंदा सन्निधि तुझी ॥ ७४ ॥ तेवीं शोकमोहममतेशीं ॥ माया जन बांधे भवपाशीं[9] ॥ ते तुझिये सन्निधीपाशीं ॥ जाती आपैसी हारपोनी ॥ ७५ ॥ मरणजन्मांचे अपाये ॥ मागां अनेक सोशिले स्वयें ॥ ज्यासि तुझी सन्निधि होये ॥ त्यासि तें भये समूळ मिथ्या ॥ ७६ ॥ तुझे सन्निधीपाशीं जाण ॥ समूळ मायेचें निर्दळण ॥ तेचि अर्थींचें निरूपण ॥ उद्धव आपण सांगत ॥ ७७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रत्यर्पितो मे भवताऽनुकंपिना भृत्याय विज्ञानमयः प्रदीपः ॥ हित्वा कृतज्ञस्तव पादमूलं कोऽन्यत्समीयाच्छरणं त्वदीयम् ॥ ३८ ॥ ॥ टीका ॥ ॥ तुझी सन्निधिमात्र देख ॥ समूळ अज्ञानासि घातकें[10] ॥ हेंचि मुख्यत्वें आवश्यक ॥ भक्त सात्विक जाणती ॥ ७८ ॥ असो इतरांची गोष्टी ॥ म्यांही अनुभविलें निजदृष्टीं ॥ अविद्या निरसावया सृष्टीं ॥ सत्संगती लाठी सर्वार्थीं ॥ ७९ ॥ सत्संगाही माजी जाण ॥ तुझी संगती अतिपावन ॥ तुवां उद्धरावया दीन जन ॥ हें निजात्मज्ञान प्रकाशिलें ॥ ६८० ॥ माझें निमित्त करूनि जाण ॥ उद्धरावया दीन जन ॥ त्यांचें निरसावया अज्ञान ॥ ज्ञानदीप पूर्ण प्रज्वाळिला ॥ ८१ ॥ उपदेशार्थ श्रद्धास्थिती ॥ हेंचि टवळें पैं निश्चितीं ॥ तेथें बोधिका ज्या निजात्मयुक्ती ॥ तें टवळ्यांप्रती

---

[1] हात जोडून. [2] चंद्राचे किरण. [3] सूर्य. [4] उद्रेकांत. [5] वचनरूपसूर्यानें. [6] रात्री. [7] अग्नि. [8] थंडीची व अंधाराची. [9] संसाररूपी पाशांत. [10] नाशकारक.

स्नेह पूर्ण ॥ ८२ ॥ विवेक वैराग्य धारण ॥ हेंचि तेथील वाती जाण ॥ तेथ प्रज्वळिला ज्ञानघन ॥ तेचि प्रभा पूर्ण महादीप ॥ ८३ ॥ तो दीप कर्णद्वारीं ठेविला ॥ तंव सबाह्य प्रकाश जाहला ॥ अज्ञानअंधार निर्दाळिला ॥ स्वयें प्रबळला सद्रूपें ॥ ८४ ॥ तेणें सबाह्यप्रकाशें ॥ तुझी पदवी प्रकटली दिसे ॥ ऐसें निजरूप हृषीकेशें ॥ अनायासें मज अर्पिलें ॥ ८५ ॥ तुवां अंतर्यामित्वें आपुलें ॥ स्वरूप पूर्वींच मज दीधलें ॥ तें तुवांच माझारीं[1] आच्छादिलें ॥ भजन आपुलें प्रकटावया ॥ ८६ ॥ तुझ्या निजभजनाचें लक्षण ॥ सर्वभूतीं भगवद्भजन ॥ तेणें तूं साचार संतोषोन ॥ अर्पिसी ज्ञान अर्पिलेंचि पुढती ॥ ८७ ॥ वाढवूनि निजभजन ॥ माझें मज अर्पिशी ज्ञान ॥ या नांव प्रत्यर्पण ॥ साधु सज्ञान बोलती ॥ ८८ ॥ वाढवूनि आपुली भक्ती ॥ माझें ज्ञान दीधलें माझे हातीं ॥ दीधलें तेथ माया पुढती ॥ विकल्पवृत्ती स्पर्शेना ॥ ८९ ॥ जे दीधली स्वरूपस्थिती ॥ ते आच्छादेना कदा कल्पांतीं ॥ यापरी गा श्रीपती ॥ कृपा निश्चितीं तुवां केली ॥ ६९० ॥ यापरी तूं अतिकृपाळू ॥ निजदासालागीं मवाळू[2] ॥ त्या तुज सांडूनियां बरळू[3] ॥ आनासि गोंवळू[4] भजों धांवे ॥ ९१ ॥ त्यजूनि स्वामी हृषीकेशू ॥ आना[5] भजेल तो केवळ पशू ॥ पशूंही माजी तो रासभेशू[6] ॥ ज्यासि नाहीं विश्वासू हरिभजनीं ॥ ९२ ॥ तुवां जनासि केला उपकारू ॥ इंद्रियां पाटवें ज्ञानाधिकारू ॥ तो उपकार विसरे जो नरू ॥ तो जाण साचारू कृतघ्न ॥ ९३ ॥ जे जाणती तुझ्या उपकारातें ॥ ते काया वाचा चित्तें वित्तें ॥ कदा न भजती आनातें ॥ ते मज निश्चितें मानले ॥ ९४ ॥ मज निमित्त करूनियां जाण ॥ तें त्वां प्रकाशिलें निजात्मज्ञान ॥ तेणें जगाचें उद्धरण ॥ श्रवणमननकीर्तनें ॥ ९५ ॥ यापरी कृपाळु पूर्ण ॥ माझें छेदिलें[7] भवबंधन ॥ तेचि अर्थीचें निरूपण ॥ उद्धव आपण स्वयें सांगे ॥ ९६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ वृक्णश्च मे सुदृढः स्नेहपाशो दाशार्हवृष्ण्यंधकसात्वतेषु ॥ प्रसारितः सृष्टिविवृद्धये त्वया स्वमायया ह्यात्मसुबोधहेतिना ॥ ३९ ॥ ॥ टीका ॥ ॥ तुवां मायेनें सृजिले[8] जन ॥ ते सृष्टि व्हावया वर्धमान ॥ स्त्री पुत्र सुहृद जन ॥ हा स्नेह पूर्ण वाढविला ॥ ९७ ॥ मी जन्मलों यादवकुळांत ॥ तेथ वृष्णि अंधक सात्वत ॥ इत्यादि सुहृद समस्त ॥ अतिस्नेहयुक्त आप्तत्वें ॥ ९८ ॥ तें सुहृद स्त्री पुत्र स्नेहबंधन ॥ या स्नेहपाशाचें छेदन ॥ माझें बाळपणीं त्वां केलें जाण ॥ जैं खेळतां ध्यान मज लागलें ॥ ९९ ॥ जेवीं बोडंबरी खेळतां खेळ ॥ मोहिनी विद्या प्रेरी प्रबळ ॥ ते विद्येचें आवरावया बळ ॥ सकता केवळ खेळविता ॥ ७०० ॥ तेवीं तुझी स्वमाया जाण ॥ जे कां सदा तव अधीन ॥ तिचे स्नेहपाश दारुण ॥ तेणें बांधोनि जन अतिबद्ध केले ॥ १ ॥ ते माझे स्नेहपाश जाण ॥ त्वां पूर्वीं छेदिले आपण ॥ जैं मज होतें बाळपण ॥ तैंचि कृपा पूर्ण मज केली ॥ २ ॥ ते भव

---

[1] माझे ठायीं. [2] अत्यंत मृदु. [3] वृथा बडबड करणारे. [4] अज्ञ, गुरेराख्या. [5] दुसऱ्याला. [6] गर्दभांमध्यें मुख्य. [7] तोडून टाकिलें. [8] उत्पन्न केले.

बंधच्छेदितें जें शस्त्र ॥ तुवां निजयुक्ती फोडोनि धार ॥ सतेज करूनियां खडतर ॥ मजलागीं स्वतंत्र अर्पिलें ॥ ३॥ येणें शस्त्रबळें मी जाण ॥ छेदूं शकें जगाचें बंधन ॥ एवढी मजवरी कृपा पूर्ण ॥ केली आपण दयालुत्वें ॥ ४ ॥ संसारदुःखयुक्त जो कां एथें ॥ सुखरूप तो जाहला मातें ॥ ऐशिये कृपेचेनि हातें ॥ मज निश्चितें उद्धरिलें ॥ ५ ॥ मी कृतकृत्य जाहलों एथें ॥ परी कांहीं एक मागेन तूतें॥ ते कृपा करावी श्रीकृष्णनाथें ॥ ह्मणोनि चरणातें लागला ॥ ६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नमोऽस्तु ते महायोगिन् प्रपन्नमनुशाधि माम् ॥ यथा त्वच्चरणांभोजे रतिः स्यादनपायिनी ॥ ४० ॥ ॥ टीका ॥ ॥ नघडे तें घडवी आपण ॥ नाथिलें दावी विंदान॥ जित्या मेल्या लावूनि लग्न ॥ नांदवी संपूर्ण निजमाया ॥७॥ जे योगियांसि अतिदुस्तर ॥ जिणें नाडिलें स्रष्टा[1] शंकर ॥ ते माया तुझी किंकर ॥ तूं परात्पर महायोगी ॥ ८ ॥ त्या तुझ्या कृपेस्तव जाण ॥ मी कृतकृत्य जाहलों आपण ॥ न देखें भवभयादिभान ॥ स्वानंदनिमग्न सर्वदा ॥ ९ ॥ दृश्य द्रष्टा दर्शन ॥ नाहीं त्रिपुटी नाहीं गुण[2] ॥ हारपलें मीतूंपण ॥ स्वानंदपूर्ण निजबोधें ॥ ७१०॥ निजबोधें स्वानंदपूर्ण ॥ हेही बोल मायिक[3] जाण ॥ परादिवाचा[4] पडिलें शून्य ॥ यालागीं मौन वेदवाद ॥ ११ ॥ कार्य कारण कर्तव्यता ॥ मज उरली नाहीं सर्वथा ॥ तरी कांहीं एक श्रीकृष्णनाथा ॥ तुज मी आतां मागेन ॥१२॥ जेवीं कां बाळकाचा थाया[5] ॥ कळवळोनि पुरवी माया ॥ तेवीं माझे वचना यया॥ श्रीकृष्णराया अवधारी ॥ १३ ॥ हें अंतरींचें माझें मागतेपण ॥ देवें अवधारावें सावधान ॥ वंदूनियां श्रीकृष्णचरण ॥ अगम्य विंदान मागत ॥ १४ ॥ मज थोर श्रम होता चित्तीं ॥ गोड असेल जीवन्मुक्ती ॥ तेथ न देखें तुझी भक्ती ॥ कोरडी मुक्ती मज नलगे ॥ १५ ॥ सद्गुरुकृपावचनोक्तीं ॥ शिष्य तत्काळ लाहे मुक्ती ॥ त्या तुजसद्गुरूची लाहे भक्ती ॥ जळो ती मुक्ती मज नलगे ॥ १६ ॥ यालागीं तुज शरण ॥ मागुतेन मी आलों जाण ॥ सायुज्याहीवरी पूर्ण॥ तुझें गुरुभजन मज देई ॥ १७ ॥ मागां[6] बहुतीं केली भक्ती ॥ ह्मणशी त्यांसि म्यां दीधली मुक्ती ॥ परी मुक्तीवरती भक्ती ॥ नाहीं मजप्रती सांगीतली॥१८॥ मागां जिहीं जिहीं केली भक्ती॥ त्यांसि त्वां टाकिलें देऊनि मुक्ती॥ तें ठकडेपण[7] श्रीपती॥ नचले मजप्रती सर्वथा ॥ १९ ॥ ज्यांची अहंकारशून्य वृत्ती॥ जाहले आत्माराम सहजगती ॥ तेही अहेतुक[8] भक्ति करिती ॥ ऐशी स्वरूपस्थिती पैं तुझी ॥७२० ॥ संमतश्लोक॥ आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रंथा अप्युरुक्रमे ॥ कुर्वंत्यहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणो हरिः॥ ॥ तेथ त्यजोनियां तुझी गुरुभक्ती ॥ मुक्ति मागणें हेचि भ्रांती ॥ असो तुझी नलगे मुक्ती ॥ माझी गुरुभक्ती मज देई ॥ २१ ॥ ज्यासि आकळली निजमुक्तता ॥ ह्मणसी त्यासि भक्ति नेदेवे आतां ॥ हे मजसी बोलोंनको कथा ॥ तुझी समर्थता

---

१ ब्रह्मदेव. २ सत्वादि गुण. ३ मिथ्या. ४ परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी ह्या वाचांस. ५ हट्ट. ६ पूर्वी. ७ ठकवणी ८ कामनारहित.

मी जाणें ॥ २२ ॥ तूं न घडे तें घडविशी ॥ न चळे तें चाळविशी ॥ नव्हे तें तूं होय करिशी ॥ नाहीं सामर्थ्यासी मर्यादा ॥ २३ ॥ अगम्य
सामर्थ्याची गणना ॥ बुडत्या तारूनि पाषाणां ॥ त्यावरी तारिसी वानरसेना ॥ सेतुबंधना श्रीरामा ॥ २४ ॥ केवळ जे कां वनचर
॥ पालेखाईर वानर ॥ चारी मुक्ती त्यांच्या किंकर ॥ त्यांसि सुरवर वंदिती स्वयें ॥ २५ ॥ केवळ जे कां व्यभिचारिणी ॥ शेखीं ज्या
घुरटा गौळणी ॥ मोक्ष लागे त्यांच्या चरणीं ॥ ये ब्रह्मा लोटांगणीं चरणरजासी ॥ २६ ॥ तूं परमात्मा परमेश्वर ॥ हें नेणती गौळणी
वानर ॥ तरी तुझें भजनमात्र ॥ फळलें साचार परब्रह्मत्वें ॥ २७ ॥ ऐसें अगाध तुझें भजन ॥ अगम्य भजनाचें महिमान ॥ भक्तिअधी
न तुझें देवपण ॥ मा मोक्षासि कोण अधिकाई ॥ २८ ॥ भक्तीच्या पोटीं जन्मली मुक्ती ॥ वाढली मुक्ती भक्तीतें घांती ॥ ऐसी जे कां
मुक्ति मातृहंती ॥ तिसी मी सर्वार्थीं नातळें ॥ २९ ॥ फिटे मुक्तीचें दूषण ॥ जेणें तें होय अतिपावन ॥ ते मी सांगेन विंदान ॥ ऐक सावधान
श्रीकृष्णा ॥ ७३० ॥ जोडल्याही मुक्तपण ॥ मज द्यावें तुझें गुरुभजन ॥ तेणें मुक्तिही होय पावन ॥ ह्मणोनि लोटांगण घातलें
॥ ३१ ॥ मस्तकीं धरिले श्रीचरण ॥ उद्धव सर्वथा न सोडी जाण ॥ तेणें ठकाच जाहला श्रीकृष्ण ॥ त्यासि संपूर्ण तुष्टला ॥ ३२ ॥ जाणोनि
आपुलें मुक्तपण ॥ मी न सांडीं तुझें निजभजन ॥ ऐशी कृपा करीं पूर्ण ॥ ह्मणोनि श्रीचरण न सोडी ॥ ३३ ॥ मुक्तता मानल्या
संपूर्ण ॥ तैं राहों शके सद्गुरुभजन ॥ हेंही बाधों नशके विघ्न ॥ तैशी भक्ति निर्विघ्न मज सांग ॥ ३४ ॥ कोटीजन्में शिणतां जाण ॥ ह्मणशी
नातुडे मुक्तपण ॥ त्या मोक्षा नांव ठेविसी विघ्न ॥ मूर्ख संपूर्ण मज ह्मणती ॥ ३५ ॥ जेणें सुटे तुझें सद्गुरुभजन ॥ तें मी मानीं परम
विघ्न ॥ तुझें भक्तिवीण मुक्तपण ॥ अलवणी[2] मज जाण गोविंदा ॥ ३६ ॥ माझी न मोडे नित्यमुक्तता ॥ अहेतुक चालवी भक्तिपंथा ॥
ऐशी कृपा करी श्रीकृष्णनाथा ॥ ह्मणीं संकोचता मानिशी ॥ ३७ ॥ ह्मणसी म्यां दीधली नित्यमुक्ती ॥ ते माझी मजपाशीं सिद्ध होती ॥
दीधली ह्मणा हे मिथ्या वदंती[3] ॥ वाउगी ख्याती दातृत्वाची ॥ ३८ ॥ माझी स्वतःसिद्ध नित्यमुक्तता ॥ त्यावरी भक्ति मी मागें आतां ॥
ते देशील तरी तूं साचार दाता ॥ उदारता या नांव ॥ ३९ ॥ ते संतोषोनि भक्ति देतां ॥ उल्हास न देखों तुझ्या चित्ता ॥ थोर मांडली कृपणता
॥ कृष्णनाथा मजलागीं ॥ ७४० ॥ जे सांडवी सद्गुरुभक्ती ॥ आह्मां नलगे तुझी जीवन्मुक्ती ॥ मुक्ति ह्मणणें हेही भ्रांती ॥ ऐक श्रीपती
सांगेन ॥ ४१ ॥ मुळींच मुख्य नाहीं बद्धता ॥ तेथ कैंची काढिली मुक्तता ॥ मिथ्या मुक्ति नातळे[4] सर्वथा ॥ माझी गुरुभक्तता मज
देई ॥ ४२ ॥ मागें ज्यांसि त्वां दीधली मुक्ती ॥ ते ठकिले ठकिले याच रीतीं ॥ तैसें चाळवूं नको श्रीपती ॥ मोक्षावरील भक्ती मज देई ॥ ४३ ॥

---

१ घात करी. २ फिकें. ३ वाणी. ४ प्राप्त होत नाहीं.

ह्मणोनि घातलें लोटांगण ॥ धांवोनि धरिले दोनी चरण ॥ प्रेमें वोसंडला श्रीकृष्ण ॥ उद्धवासि संपूर्ण तुष्टला ॥ ४४ ॥ मोक्षाहीवरील गुरुभक्ती ॥ उद्धवें मागीतली नानायुक्तीं ॥ जे जे चालली उपपत्ती ॥ तेणें सुखें श्रीपती सुखावला ॥ ४५ ॥ सुखें सुखावली कृष्णमूर्ती ॥ डोलों लागला स्वानंदस्थितीं ॥ तेणें संतोषें भक्तिमुक्ती ॥ उद्धवाहातीं अर्पिली ॥ ४६ ॥ जगीं उद्धवाचें शुद्धपुण्य ॥ जगीं उद्धवाची धन्यधंन्य ॥ ज्यालागीं सर्वस्वें श्रीकृष्ण ॥ मोक्षावरील गुरुभजन स्वानंदें देत ॥ ४७ ॥ गुरुब्रह्म दोनी अभिन्न ॥ हेंही सद्गुरु प्रबोधी पूर्ण ॥ यालागीं मोक्षावरील गुरुभजन ॥ नव्हे दूषण सच्छिष्यां ॥ ४८ ॥ मागिलां निजभक्तांप्रती ॥ स्वानंदें तुष्टला श्रीपती ॥ तिहीं मागीतली निजमुक्ती ॥ त्यांसि हे स्थिती अतर्क्य ॥ ४९ ॥ उद्धवें थोर केली ख्याती ॥ मुक्तीचे माथां वाइली भक्ती ॥ अगम्य सांगीतली स्थिती ॥ हे श्रीपती अर्पित ॥ ७५० ॥ उद्धवा मुक्तीवरील जे भक्ती ॥ ते मज अवतारांची अवतारशक्ती ॥ येणें उत्पत्ति स्थिति प्रलय अंतीं ॥ करूनि श्रीपती मी अलिप्त ॥ ५१ ॥ येणेंचि बळें म्यां तत्त्वतां ॥ कर्में करूनि मी अकर्ता ॥ भोग भोगोनि अभोक्ता ॥ जाण सर्वथा येणें योगें ॥ ५२ ॥ हा योग न कळे ज्यासी ॥ दुःखरू[illegible] संसार त्यासी ॥ हा अखंड योग मजपाशीं ॥ मी संसारेंसी सुखरूप ॥ ५३ ॥ हा योग सदाशिव जाणे ॥ कां म्यां जाणिजे नारायणें ॥ इतरांचें जें जाणणें ॥ तें अगम्यपणें[3] रिघेना ॥ ५४ ॥ ऐशी श्रीकृष्ण सांगे गुह्य गोष्टी ॥ ते स्थिति बाणली उद्धवाचे पोटीं ॥ दोघे निजबोधें एकगांठी ॥ भजनकसवटी कळों सरली ॥ ५५ ॥ मुक्तीशीं भक्तीची हातवटी[4] ॥ ते उद्धवासि कळली गोष्टी ॥ तो उल्हास न माये पोटीं ॥ स्वानंदपुष्टीं कोंदला ॥ ५६ ॥ जेवीं बाळकाच्या थायांकारणें ॥ माता लेववी निजभूषणें ॥ तेवीं उद्धवालागीं श्रीकृष्णें ॥ निजस्थिति देणें निश्चित ॥ ५७ ॥ मनाचें नाइकती कान ॥ बुद्धीचें न देखती नयन ॥ शेखीं गगनातेंहो चोरून ॥ उद्धवासि श्रीकृष्ण निजस्थिति[6] अर्पी ॥ ५८ ॥ जें ब्रह्मवेत्त्यांसि नाकळे ॥ जें वेदानुवादा न कळे ॥ ते स्थिति उद्धवासि गोपाळें[7] ॥ कृपाबळें अर्पिली ॥ ५९ ॥ पूर्वीं श्रीकृष्णें पुसतां पहाहो ॥ उद्धरलों ह्मणे उद्धवो ॥ आतां मागे भजनभावो ॥ हा गूढाभिप्रावो[8] हरि जाणे ॥ ७६० ॥ मुक्तीवरील मागतां भक्ती ॥ श्रीकृष्णाची अवतारशक्ती ॥ मायानियंतृत्वाची[9] पूर्ण स्थिती ॥ उद्धवाचे हातीं स्वयें आली ॥ ६१ ॥ जाणोनि मायेचें मिथ्यात्व पूर्ण ॥ तिचें प्रेरण[10] आणि आवरण ॥ हें मायानियंतत्व पूर्णत्वलक्षण ॥ उद्धवासि श्रीकृष्ण स्वयें अर्पी ॥ ६२ ॥ जैसें बुद्धिबळाचे पोटीं ॥ पूर्व कर्म नसतां गांठीं ॥ राजा प्रधान पशु प्यादा उठी ॥ निर्धारितां दृष्टीं काष्ठ एक ॥ ६३ ॥ एकचि काष्ठ दोहीं भारीं ॥ तेथ कोण कोणाचा वैरी ॥ वैर नसतांही झुंजारीं ॥ मारामारी अचेतना ॥ ६४ ॥

---

१ वाहवा. २ निराळा. ३ अपुर्तेपणानें. ४ साम्यता. ५ हट्टास्तव. ६ स्वानुभव. ७ श्रीकृष्णानें. ८ दुर्बोध आशय. ९ मायेस स्वाधीन ठेवण्याची. १० प्रवृत्ति करणें.

ह्मणती हस्ती घोडा प्रधान मेला ॥ तेथ काय त्यांचा प्राण गेला ॥ प्यादा होता तो प्रधान जाहला ॥ तो काय पावला गजांतलक्ष्मी ॥ ६५ ॥ जीव नसतां निर्धारीं ॥ मारिलें ह्मणती निजगजरीं[1] ॥ एका जीत एका हारी ॥ तें ज्ञान सारी नेणती ॥ ६६ ॥ सारी निमाल्या पाठीं ॥ कोण धर्मात्मा चढे वैकुंठी ॥ कोण पडे नरकसंकटीं ॥ बद्धमुक्तगोठी समूळ मिथ्या ॥ ६७ ॥ एवं बुद्धिबळाची परी ॥ ज्यासि निजदृष्टि संसारीं ॥ तोचि अवतारांचा अवतारी ॥ जाण तो निर्धारीं भगवंत ॥ ६८ ॥ समूळ मिथ्या जाणे वेदोक्ती ॥ समूळ मिथ्या जाणे बंधमुक्ती ॥ हें जाणोनि आचरे जो वेदविहितीं ॥ तेचि निजभक्ती मुक्तीवरी ॥ ६९ ॥ करूनि संसारनिवृत्ती ॥ बहुत पावले नित्यमुक्ती ॥ त्यांसि हे दुर्गम भक्ती ॥ अतर्क्य स्थिती तर्केना ॥ ७७० ॥ ऐशी ज्यापाशीं माझी स्थिती ॥ तोचि मोक्षावरील करी भक्ती ॥ इतरांसि हे अतर्क्य गती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ७१ ॥ उद्धव पावला अगाध गती ॥ त्यासि सर्वज्ञ लोकोपकारार्थी ॥ वांचवावया ब्रह्मशापाहातीं[2] ॥ उपाय श्रीपती स्वयें योजी ॥ ७२ ॥ नारदासि ब्रह्मज्ञान ॥ त्यासिही दक्षशापबंधन ॥ एके ठायीं न राहे जाण ॥ करी परिभ्रमण शापार्थ ॥ ७३ ॥ ब्रह्मशाप अतिदारुण ॥ हें जाणोनियां श्रीकृष्ण ॥ उपदेशूनि ब्रह्मज्ञान ॥ उद्धवा आपण दूर दवडी ॥ ७४ ॥ उद्धव जन्मला यादववंशीं ॥ यादव निर्मती[3] ब्रह्मशापेंसी ॥ तेथ वांचवावया उद्धवासी ॥ बदरिकाश्रमासी स्वयें धाडी ॥ ७५ ॥ ब्रह्मशापाचेनि आघातें ॥ यादव निमती स्वगोत्रघातें[4] ॥ उद्धव वांचवावया तेथें ॥ बदरिकाश्रमातें हरि प्रेरी ॥ ७६ ॥ उद्धवासि जें झालें ज्ञान ॥ त्याहूनि बदरिकाश्रम पावन ॥ हें सर्वथा न घडे जाण ॥ ब्रह्मशापभेण पळवित ॥ ७७ ॥ उद्धवाऐसें अनर्घ्य रत्न ॥ ज्यासि माझी स्थिती जाहली संपूर्ण ॥ त्यासि वांचवावया श्रीकृष्ण ॥ पाठवी आपण बदरिकाश्रमा ॥ ७८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ गच्छोद्धव मयादिष्टो बदर्याख्यं ममाश्रमम् ॥ तत्र मत्पादतीर्थोदे स्नानोपस्पर्शनैः शुचिः ॥ ४१ ॥ ॥ टीका ॥ ॥ गंभीरगिरा बोले श्रीकृष्ण ॥ उद्धवा तुज जाहलें ब्रह्मज्ञान ॥ तुटलें स्नेहपाशबंधन ॥ तरी ममाज्ञा करी गमन बदरिकाश्रमा ॥ ७९ ॥ त्या बदरिकाश्रमाचें महिमान ॥ लोकसंग्रहार्थी श्रीकृष्ण ॥ तरावया जड मूढ जन ॥ स्वमुखें श्रीकृष्ण सांगत ॥ ७८० ॥ तो बदरिकाश्रम माझें स्थान ॥ तेथ नित्य माझें अनुष्ठान ॥ तया स्थानाचें दूर दर्शन ॥ करी निर्दळण कलिकल्मषा[5] ॥ ८१ ॥ ज्या पर्वताचें स्पर्शन ॥ मानवा करी परम पावन ॥ जे बदरीचें नामस्मरण ॥ विभांडी दारुण महादोषां ॥ ८२ ॥ तेथेंही माझें पादोदक ॥ अलकनंदा पवित्र देख ॥ जिचेनि स्पर्शमात्रें लोक ॥ होती अलौकिक[6] पावन ॥ ८३ ॥ जेथ श्रद्धायुक्त करितां स्नान ॥ जीवाचें तुटे भवबंधन ॥ ज्यासि घडे आचमन ॥ तो उद्धरे जाण

---

१ अज्ञानानें. २ ब्राह्मणांच्या शापापासून. ३ मरतील. ४ परस्परांच्या आघातानें. ५ कलिसंबंधिदोषांस. ६ अत्यंत.

पितरेंसी[1] ॥ ८४ ॥ ऐसें बदरिकाश्रम माझें स्थान ॥ अतिशयें परम पावन ॥ ह्मणसी कैं केलें तें त्वां स्थान ॥ ऐक तें कथन उद्धवा ॥ ८५ ॥ रजोगुणें सृजिले[2] जन ॥ ते जाहले भोगकर्मीं प्रवीण ॥ भोगासक्तीं बुडतां पूर्ण ॥ दोंरूपीं मी जाण अवतरलों ॥ ८६ ॥ तम[3] निरसी रवि चंद्र पूर्ण ॥ तैसा मी जाहलों नरनारायण ॥ बदरिकाचलामाजी जाण ॥ केला संपूर्ण नित्योदयो ॥ ८७ ॥ भज्यपूज्यत्वें मी नारायण ॥ नररूपें मीचि भक्त जाण ॥ तेथ भक्तिवैराग्य पूर्ण ॥ म्यां आचरोन प्रकाशिलें ॥ ८८ ॥ तो बदरिकाश्रम माझें स्थान ॥ तेथें सर्वदा मी आपण ॥ अद्यापि करितां अनुष्ठान ॥ भक्तिज्ञानवैराग्यें ॥ ८९ ॥ नरनारायणस्थितीं ॥ मी अवतरलों जे पर्वतीं ॥ तेथ तोडिले बोरी ऐशी मागुती ॥ माझी निजभक्ती फांपाइली[4] ॥ ७९० ॥ यालागीं बदरिकाश्रम ॥ त्या स्थळासि म्यां ठेविलें नाम ॥ तेथें फिटेल भवभ्रम ॥ यापरी परम पावन तें स्थळ ॥ ९१ ॥ त्या बदरिकाश्रमाप्रती ॥ तुवां जावें गा निश्चितीं ॥ ऐसें उद्धवा कल्पिसी चित्तीं ॥ मज काय तीर्थीं विवंचू ॥ ९२ ॥ मोक्षाहीवरील भक्ति ॥ तुवां अर्पिली माझे हातीं ॥ तेणें मी जाहलों कृतार्थी ॥ ह्मणसी मज तीर्थीं चाड[5] नाहीं ॥ ९३ ॥ तुज माझी आज्ञा प्रमाण ॥ अवश्य तेथें करावें गमन ॥ उद्धवें धरोनियां मौन ॥ मस्तकीं वचन वंदिलें ॥ ९४ ॥ सद्भावें करूनि नमन ॥ घेतां बदरिकाश्रमदर्शन ॥ तो नर होय नारायण ॥ एवढें महिमान[6] त्या स्थळाचें ॥ ९५ ॥ उद्धवा तुझ्याठायीं पूर्ण ज्ञान ॥ ज्ञान असोनि माझें भजन ॥ तुझेनि चरणस्पर्शें जाण ॥ होईल पावन बदरिकाश्रम ॥ ९६ ॥ ऐसें ऐकोनि श्रीकृष्णवचन ॥ उद्धवासि आलें रुदन[7] ॥ धांवोनि वंदिले श्रीचरण ॥ सर्वथा गमन करीन आतां ॥ ९७ ॥ ब्रह्मपाशाचें निर्दळण ॥ उद्धवाचें चुकवावया जाण ॥ श्रीकृष्णें प्रबोधोनि पूर्ण ॥ करवी गमन बदरिकाश्रमा[8] ॥ ९८ ॥ उद्धव ज्ञानियांचें ज्ञानरत्न ॥ त्यासि वांचवूनि श्रीकृष्ण ॥ विस्तारावया निजज्ञान ॥ करवी गमन बदरिकाश्रमा ॥ ९९ ॥ चुकवावया ब्रह्मशाप दारुण ॥ उद्धवासि विशाळीं गमन ॥ अन्यथा जाहलिया ब्रह्मज्ञान ॥ कृष्ण तीर्थाटन नेमिना ॥ ८०० ॥ उद्धवासि भवबंधन ॥ बाळपणींचि नाहीं जाण ॥ हें जाणोनियां श्रीकृष्ण ॥ ब्रह्मशापाभेण तीर्था धाडी ॥ १ ॥ तीर्थयात्रेचा अभिप्रावो ॥ हाचि निश्चितें निजभावो ॥ जाणोनि देवादिदेवो ॥ मोकली उद्धवो बदरिकाश्रमा ॥ २ ॥ उद्धवा तुज गेलिया तेथ ॥ थोर लोकसंग्रह होईल एथ ॥ तुझेनि धर्में निश्चित ॥ दीन समस्त उद्धरती ॥ ३ ॥ ह्मणसी पावल्या तें तीर्थ ॥ म्यां कैसें वसावें तेथ ॥ तेही अर्थी लोकहितार्थ ॥ तुज इत्यर्थ सांगेन ॥ ४ ॥ उद्धवा तुझें जें आचरण ॥ तोचि जनांसि उपदेश जाण ॥ यालागीं वैराग्य भक्ति ज्ञान ॥ स्वधर्माचरण सांडूं नको ॥ ५ ॥ त्रिभुवनामाजी सर्वथा ॥ उद्धवा मज नाहीं कर्तव्यता ॥

---

१ पितरांसुद्धां. २ उत्पन्न केले. ३ अंधार. ४ वृद्धिंगत झाली. ५ गरज. ६ माहात्म्य. ७ रडें. ८ बदरिकाश्रमास.

तोही मी लोकसंग्रहार्था ॥ होय वर्तता निजधर्मीं ॥ ६ ॥ तूं ऐसें ह्मणसी आतां ॥ त्रैलोक्य असे तुझ्या माथां ॥ यालागीं लोकसंग्रहा
र्था ॥ तूं होसी वर्तता स्वधर्मकर्मीं ॥ ७ ॥ मी निजधामा जातों आपण ॥ यालागीं माझी स्थिती पूर्ण ॥ ते पूर्णता तुज म्यां निरूपिली
जाण ॥ लोकसंग्रहार्थ पूर्ण तूं विरक्त होई ॥ ८ ॥ अभेदभक्तिवैराग्य ज्ञान ॥ स्वयें आचरोनि आपण ॥ देखीं लावावे इतर जन ॥ लोक
संग्रह जाण या नांव ॥ ९ ॥ उद्धवा माझिये ज्ञानप्राप्ती ॥ तूं वंद्य जाहलासि त्रिजगतीं ॥ तुझी जे आचरती स्थिती ॥ तेचि लोकीं स
मर्स्ती करिजेल ॥ ८१० ॥ आतां तुझेनि मिसें जाण ॥ साडेतीं श्लोकींचें निरूपण ॥ लोकसंग्रहार्थ सांगेन ॥ तैसेंचि वर्तन करावें तुवां
॥ ११ ॥ तुज पावलिया बदरिकाश्रमातें ॥ तेथ विद्यमान बहुत तीर्थें ॥ परी अलकनंदा मुख्य तेथें ॥ जे नाशी दोषांतें दर्शनमात्रें ॥ १२ ॥
॥ श्लोक ॥ ॥ ईक्षयाऽलकनंदाया विधूताशेषकल्मषः ॥ वसानो वल्कलान्यंग वन्यभुक् सुखनिस्पृहः ॥ ४२ ॥ ॥ टीका ॥ ॥ करू
नि अलकनंदेचें स्नान ॥ करावें विध्युक्त तीर्थविधान ॥ मग तेथें वसावें आपण ॥ वसतें लक्षण तें ऐक ॥ १३ ॥ त्यजूनि वस्त्रें आभरण ॥
करावीं वल्कलें परिधान ॥ करूनि वनफळें भोजन ॥ रहावें आपण अनुद्वेगें ॥ १४ ॥ आपुली पूर्ण निस्पृहता ॥ दावावी लोकसंग्रहा
र्था ॥ निजसुखें तेथें असतां ॥ द्वंद्वसहिष्णुता दावावी ॥ १५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तितिक्षुर्द्वंद्वमात्राणां सुशीलः संयतेंद्रियः ॥ शांतः समा
हितधिया ज्ञानविज्ञानसंयुतः ॥ ४३ ॥ ॥ टीका ॥ ॥ तूं ज्ञानविज्ञानसंपन्न ॥ तुज द्वंद्वबाधा न बाधे जाण ॥ तरी द्वंद्वसहिष्णुता पूर्ण ॥
दावावी आपण लोकहितार्था ॥ १६ ॥ तुज नाहीं विषयासक्तता ॥ तरी नेमावें इंद्रियार्था ॥ प्रकट करावी सुशीलता ॥ निजशांतता
दावावी ॥ १७ ॥ निजबुद्धीचें समाधान ॥ सहजें प्रकटवावें आपण ॥ मजपासूनि जें प्राप्त ज्ञान ॥ त्याचें अनुसंधान दावावें ॥ १८ ॥
॥ श्लोक ॥ ॥ मत्तोऽनुशिक्षितं यत्ते विविक्तमनुभावयन् ॥ मय्यावेशितवाक्चित्तो मद्धर्मनिरतो भव ॥ ४४ ॥ ॥ टीका ॥ ॥ या स्थितीं
तुज वसतां जाण ॥ बहुसालें तुज येतील शरण ॥ तूं पावलासि माझें ज्ञान ॥ हें सर्वही जन जाणती ॥ १९ ॥ पावोनियां ब्रह्मज्ञान ॥
स्वयें उद्धरला आपण ॥ न करी तोचि दीनोद्धारण ॥ हें भंडपण ज्ञात्याचें ॥ ८२० ॥ एक पावोनि ब्रह्मज्ञान ॥ शिष्य उपदेशी आपण ॥
बोध न करवे परिपूर्ण ॥ ते निष्ठा हीन निर्वीर्य ॥ २१ ॥ शिष्य बोधेंवीण चरफडी ॥ गुरु गुरुपणें बडबडी ॥ घरींच्या घरीं चुकामुकी
गाढी ॥ हे बोधपरवंडी अबद्ध ॥ २२ ॥ परचित्त प्रबोधवृत्ती ॥ हे सामान्य नव्हे स्थिती ॥ ब्रह्मज्ञानाची पूर्ण निष्पत्ती ॥ या नांव निश्चितीं

---

१ लोकांनीं त्याप्रमाणें आचरण करावें ह्मणून. २ पाहून आचरण करण्यास. ३ निमित्तानें. ४ असणारीं. ५ भागीरथी. ६ शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें. ७ संतोषानें. ८ उष्ण, शीत सहन करणें. ९ अनेकप्रकारचे. १० उपदेशाची धांदल.

उद्धवा ॥ २३ ॥ स्वयें तरोनि जनां तारी ॥ हे ज्ञानाची अगाध थोरी ॥ ते म्यां दीधली तुझ्या करीं ॥ जन उद्धरी उद्धवा ॥ २४ ॥ शिष्य सुक्षेत्रीं ब्रह्मज्ञान ॥ ज्याचें नव्हे वर्धमान[1] ॥ तंववरी नाहीं पूर्णपण ॥ उद्धवा जाण निश्चित ॥ २५ ॥ जेवीं पिकलिया वृक्षाप्रती ॥ पक्षी तुटले स्वयें येती ॥ तेवीं निडारली[2] ब्रह्मस्थिती ॥ तेथ शिष्य पावती स्वानंद ॥ २६ ॥ बोलें उपदेशिती ब्रह्मज्ञान ॥ बोध नव्हे ते निर्वीर्य जाण ॥ तें तूं ह्मणसी कासेनं[3] ॥ ऐक सांगेन उद्धवा ॥ २७ ॥ अनुभवा आलें ब्रह्मज्ञान ॥ तेणें अंगीं ये जाणपण ॥ तेथ संचरे ज्ञानाभिमान ॥ तेणें वीर्य क्षीण ज्ञात्याचें ॥ २८ ॥ जंव जंव ज्ञाता निरहंकार ॥ तंव तंव ज्ञानासि वीर्य थोर ॥ त्याची होतां कृपामात्र ॥ बोध साचार शिष्यासी ॥ २९ ॥ तुज पावलें माझें ज्ञान ॥ उपदेशी शिष्यजन ॥ ते तुज देतील सन्मान ॥ तरी तूं ज्ञानाभिमान धरूं नको ॥ ८३० ॥ सद्गुरुदर्शीं सर्वाभूतीं ॥ सर्वदा ब्रह्मप्रतीती ॥ तेथ शिष्यासि ये भूतव्यक्ती[4] ॥ काय ब्रह्मस्थिती पळाली ॥ ३१ ॥ यालागीं शिष्यीं नीचपण ॥ सर्वथा न देखावें आपण ॥ शिष्य देखावा ब्रह्म पूर्ण ॥ हे मुख्य लक्षण गुरूचें ॥ ३२ ॥ तेचि निरभिमान स्थिती ॥ उपदेशीं शिष्यांप्रती ॥ निरभिमानापरती ॥ दशा त्रिजगतीं असेना ॥ ३३ ॥ तेंचि उपदेशलक्षण ॥ वाचेशी माझें नामकीर्तन ॥ शरीरीं माझें नित्य भजन ॥ मद्रूपीं मननिमग्नता ॥ ३४ ॥ ज्ञानी ह्मणतां न धरी श्लाघ ॥ मूर्ख ह्मणतां नधरी राग ॥ स्वयें रहावें अनुद्वेग ॥ हे दशा चांग ज्ञात्याची ॥ ३५ ॥ शिष्य देतील सन्मान ॥ तो नेघे ह्मणतां अपक्वपण ॥ घेतां आला ज्ञानाभिमान ॥ हेंही विघ्न ज्ञात्याशी ॥ ३६ ॥ शिष्य देतील सन्मान ॥ तो अनुद्वेग घ्यावा आपण ॥ परी नधरावा मानाभिमान ॥ हें मुख्य लक्षण ज्ञात्यांचें ॥ ३७ ॥ तुज माझ्या ज्ञानाची पूर्ण प्राप्ती ॥ तेंचि एकांतीं लोकांतीं ॥ नित्य निरभिमानस्थिती ॥ स्वानंदस्फूर्ती सर्वदां ॥ ३८ ॥ तेचि निरभिमान स्थिती ॥ उपदेशी शिष्यांप्रती ॥ निरभिमानयापरती[6] ॥ दशा त्रिजगतीं असेना ॥ ३९ ॥ एवं नित्य निरभिमान ॥ भक्तियुक्त वैराग्य ज्ञान ॥ स्वयें आचरोनि आपण ॥ शिष्यसज्जन उपदेशिजे ॥ ८४० ॥ तुज जे शिष्य येती शरण ॥ ते नीच न ह्मणावे आपण ॥ हें गुरुत्वाचें पूर्णपण ॥ शिष्यही पूर्ण पूज्यत्वें देखे ॥ ४१ ॥ जेवीं तानयालागीं माता ॥ तेवीं शिष्याच्चिया निजस्वार्था ॥ गुरूसि कळवळा तत्त्वतां ॥ शुद्ध सद्गुरुता या नांव ॥ ४२ ॥ शिष्यलक्षणप्रकार ॥ मागां सांगीतला विचार ॥ तो जेथ देखसी अधिकार ॥ तेथ साचार उपदेशी ॥ ४३ ॥ तुज जें शिकविलें प्रस्तुत ॥ तें शिष्योपदेशसंग्रहार्थ ॥ तूं ठायींचा गुणातीत ॥ तुज हें समस्त स्पर्शेना ॥ ४४ ॥ ॥ श्लोक ॥ अतिव्रज्य गतीस्तिस्रो मामेष्यसि ततः परम् ॥ ४४ ॥ ॥ टीका ॥ ॥ यापरी ज्ञान उपदेशितां ॥ तुझी न मोडे गुणातीतता ॥ ज्यासि

---

१ वृद्धि पावणारें. २ पूर्णदशेस पावली. ३ कोणत्या कारणानें. ४ जीवपणा. ५ आनंद. ६ पेक्षां अधिक. ७ सांमत ज्ञान. ८ मूळचा.

उपदेशिशी तत्त्वतां ॥ तेही त्रिगुणावस्था जिंकिती ॥ ४५ ॥ पूर्वोक्तउपदेशयुक्तीं ॥ जे शिष्य सर्वदा वर्तती ॥ ते त्रिगुणांची त्रिविध वृत्ती ॥ अतिक्रमिती गुरुरूपां ॥ ४६ ॥ त्रिगुणांचें त्रिविधपण ॥ दृश्य द्रष्टा आणि दर्शन ॥ जागृति सुषुप्ति आणि स्वप्न ॥ ज्ञेय ज्ञाता ज्ञान साक्षेपें ॥ ४७ ॥ कार्य कर्म आणि कर्ता ॥ भोज्य भोजन आणि भोक्ता ॥ शत्रुमित्रउदासीनता ॥ या त्रिगुणावस्था बाधक ॥ ४८ ॥ तेथ येणें उपदेशें जाण ॥ सच्छिष्य करून माझें भजन ॥ त्रिगुणत्रिपुटी निर्दळून ॥ माझें स्वरूप पूर्ण स्वयें होती ॥ ४९ ॥ माझिया स्वरूपाप्रती ॥ नाहीं गुण नागुणवृत्ती ॥ भक्त मद्भावें गुणातीतीं ॥ सहज पावती स्वानंद ॥ ८५० ॥ ऐसा आज्ञापिला उद्धवो ॥ त्याचे अवस्थेचा अभिप्रावो ॥ परीक्षितीप्रती पहाहो ॥ स्वयें शुकदेवो सांगत ॥ ५१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ ॥ स एवमुक्तो हरिमेधसोद्धवः प्रदक्षिणं तं परिसृत्य पादयोः ॥ शिरो निधायाश्रुकलाभिरार्द्रधीर्न्यषिंचदद्वंद्वपरोप्यपक्रमे ॥ ४५ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो निज मोक्षें नित्य निष्काम ॥ जेणें अनुभविलें परब्रह्म ॥ त्या श्रीशुकासि अतिसंभ्रम[1] ॥ उद्धवाचें प्रेम वर्णावया ॥ ५२ ॥ तो शुक ह्मणे परीक्षिती ॥ उद्धव आज्ञापिला श्रीपती ॥ त्याच्या प्रेमाची अद्भुत स्थिती ॥ ते मी तुजप्रती सांगेन ॥ ५३ ॥ उद्धव जरी जाहला गुणातीत ॥ तरी गुरुचरणीं प्रेम अद्भुत ॥ ज्यासि सद्गुरु श्रीकृष्णनाथ ॥ मूर्तिमंत परब्रह्म ॥ ५४ ॥ त्यजूं न शके हरिपदा ॥ हरीचेठायीं पूर्ण श्रद्धा ॥ यालागीं जाण हरिमेधा[2] ॥ बोली प्रबुद्धा[3] उद्धवातें ॥ ५५ ॥ जो आवडीं करी हरीचें ध्यान ॥ त्याचे ध्यानेंसी हरि हरी[4] मन ॥ जो विवंची हरीचें समाधान ॥ त्याचे बुद्धीचें हरण हरि करी ॥ ५६ ॥ जो करी हरिचिंतन ॥ त्याचे चित्ताचें करी हरि हरण ॥ जो करी हरीचें स्मरण ॥ त्याचा संसार पूर्ण हरि हरी ॥ ५७ ॥ ऐशिया हरीच्याठायीं सर्वदा ॥ पावलियाही मुक्तिपदा ॥ उद्धवाची सप्रेम श्रद्धा ॥ यालागीं हरिमेधा त्यासि ह्मणती ॥ ५८ ॥ जे पावले गुणातीतीं ॥ त्यांसि आवडे ज्याची भक्ती ॥ तेणें श्रीकृष्णें उद्धवाप्रती ॥ प्रयाणें[5] निश्चितीं नेमिलें ॥ ५९ ॥ दूरी प्रयाण बदरिकाश्रम ॥ मागुता न भेटे पुरुषोत्तम ॥ तो प्रयाणकाळउपक्रम ॥ जाहला सप्रेम[6] उद्धवासी ॥ ८६० ॥ सर्वदा सुखदुःखातीत ॥ उद्धव जाहलासे निश्चित ॥ तोही प्रयाणकाळीं प्रेमयुक्त ॥ प्रदक्षिणा करीत श्रीकृष्णा ॥ ६१ ॥ चरणीं मस्तक ठेवितां जाण ॥ आनंदाश्रु लोटले नयन ॥ तेणें श्रीकृष्णाचें चरणक्षाळण ॥ जाहलें संपूर्ण पदद्वयां[7] ॥ ६२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सुदुस्त्यजस्नेहवियोगकातरो न शक्नुवंस्तं परिहातुमातुरः ॥ कृच्छ्रं ययौ मूर्धनि भर्तृपादुके बिभ्रन्नमस्कृत्य ययौ पुनःपुनः ॥ ४६ ॥ ॥ टीका ॥ ॥ आणिकांचा स्नेह अतिबाधक ॥ त्यातें सांडवी वेदविवेक ॥ तैसा कृष्णस्नेह नव्हे देख ॥ तो सुखदायक स्नेहाळू ॥ ६३ ॥

---

[1] अतिगहिंवर. [2] हरीच्याच ठिकाणीं आहे मेधा ह्मणजे बुद्धि ज्याची तो. [3] गाढ अशा. [4] हरण करितो. [5] बदरिकाश्रमास गमन. [6] गहिंवरयुक्त. [7] दोन्ही पायांस.

उद्धवासि स्वाभाविक ॥ गुरु परब्रह्म दोनी एक ॥ इतरांसि भावनात्मक[1] ॥ उद्धवासि देव स्वतःसिद्ध ॥ ६४ ॥ ऐसा श्रीकृष्णस्नेहो आवश्यक ॥ उद्धवासि सुखदायक ॥ त्या कृष्णासि सांडितां देव ॥ आत्यंतिकें विव्हळ ॥ ६५ ॥ निःशेष निमाली विषयावस्था ॥ जरी वृद्ध जाहली पतिव्रता ॥ तरी त्यागावा निजभर्ता ॥ हें तिशीं सर्वथा नावडे ॥ ६६ ॥ तेवीं अनुभवूनि परमार्था ॥ उद्धव पावला जीवन्मुक्तता ॥ श्रीगुरु श्रीकृष्ण त्यागितां ॥ अतिविव्हळता गुरुप्रेमें ॥ ६७ ॥ स्नेहें द्वेषें सकामेंसी[3] ॥ जे जे वेधले श्रीकृष्णासी ॥ तेते पावले परमानंदासी ॥ त्या श्रीकृष्णासी त्यजी कोण ॥ ६८ ॥ अविधीं रतले श्रीकृष्णासी ॥ ते वंद्य जाहले ब्रह्मादिकांसी ॥ मा उद्धव विकला गुरुप्रेमासी ॥ केवीं श्रीकृष्णासी त्यजील ॥ ६९ ॥ ज्यासि परब्रह्मत्वें गुरुभक्ती ॥ त्यासि तृणप्राय जीवन्मुक्ती ॥ जाहलीही[4] मुक्ति उपेक्षिती ॥ विकिले गुरुभक्ती अनन्यत्वें ॥ ८७० ॥ उल्लंघूं नये सद्गुरुवचन ॥ करावें बदरिकाश्रमीं गमन ॥ श्रीकृष्णप्रेमा पढियें पूर्ण ॥ तें सर्वथा जाण निघोंनेदी ॥ ७१ ॥ ऐसें उभयतां अतिसंकट ॥ उद्धवा वोडवलें दुर्घट ॥ श्रीकृष्णप्रेमें उतटे पोट ॥ न देखे वाट बदरीची ॥ ७२ ॥ त्यागोनि जावें जरी कृष्णनाथा ॥ तरी हा निजधामा जाईल आतां ॥ मग मी न देखें मागुता ॥ यालागीं अवस्था अनावर ॥ ७३ ॥ जलदनवघनतनू[6] ॥ स्याम राजीवलोचनू[7] ॥ आनंदविग्रही श्रीकृष्ण ॥ ब्रह्म परिपूर्णू पूर्णत्वें ॥ ७४ ॥ मुकुटकुंडलें मेखळा ॥ तिलक रेखिला पिंवळा ॥ पदक एकावळी गळां ॥ कंठीं तेजागळा कौस्तुभ ॥ ७५ ॥ वांकीअंदुवांचा गजर ॥ चरणीं गर्जत तोडर ॥ विद्युत्प्राय पीतांबर ॥ तेणें शारंगधर शोभत ॥ ७६ ॥ कासे विराजे[8] सोनसळा ॥ आपाद रुळे वनमाळा ॥ घवघवीत घनसांवळा ॥ देखतां डोळां मन निवे ॥ ७७ ॥ ऐसें श्रीकृष्णदर्शन ॥ पुढती न देखें मी आपण ॥ यालागीं उद्धव जाण ॥ प्रेमें संपूर्ण विव्हळ ॥ ७८ ॥ उद्धव पावला परब्रह्म पूर्ण ॥ त्यासि सगुणाची अवस्था कोण ॥ कृष्णप्रभाप्रकाशें चिद्घन ॥ आत्मवस्तु संपूर्ण श्रीकृष्ण ॥ ७९ ॥ घृत थिजलें कां विघुरलें ॥ परी घृतपणा नाहीं मुकलें ॥ तेवीं सगुण निर्गुणत्वें मुसावलें ॥ परब्रह्म संचलें श्रीकृष्ण ॥ ८८० ॥ त्याज्य सगुण पूज्य निर्गुण ॥ हेही दशा आरती जाण ॥ ज्यासि ब्रह्मरूप तृणपाषाण ॥ त्यासि त्याज्य सगुण कदा नव्हे ॥ ८१ ॥ एवं सगुण आणि निर्गुण ॥ उद्धवासि समसमान ॥ गुरुत्वीं कृष्णीं प्रेम गहन ॥ तो त्यागितां पूर्ण विव्हळता ॥ ८२ ॥ आज्ञा नुल्लंघवे सर्वथा ॥ ह्मणोनि निघावें बदरीतीर्था ॥ तंव श्रीकृष्णासि सांडूनि जातां ॥ परमावस्था उद्धवीं ॥ ८३ ॥ उद्धव प्रयाणअवसरीं[9] ॥ लोळणी घाली पायांवरी ॥ चरण आलिंगी हृदयीं धरी ॥ तरी जावया दूरी धीर नव्हे ॥ ८४ ॥ मज एथोनि गेलिया आतां ॥ मागुती नदेखे कृष्णनाथा ॥

---

१ मानल्यामुळें. २ अतिशय. ३ विषयेच्छेनें. ४ मिळाली असतांही. ५ आवरण्यास कठीण. ६ उदकानें भरलेल्या नूतन मेघांप्रमाणें श्याम तनू ज्याची. ७ कमलनेत्र. ८ शोभे. ९ समयीं.

तेणें अनिवार अवस्था ॥ पाऊल सर्वथा न घालवे ॥ ८५ ॥ मी निवालों कृष्णचरणामृतीं ॥ मज चाड नाहीं महातीर्थीं ॥ त्याहीमाजी अदृष्टगती ॥ अंतीं श्रीपती त्यागवी ॥ ८६ ॥ सप्रेम चळचळां कांपत ॥ कंठ जाहला सद्गदित ॥ बाष्पें क्षणक्षणा स्फुंदत ॥ स्वेदरोमांचित उद्धव ॥ ८७ ॥ गमनालागीं अतिउद्येत ॥ पायां लागोनि पर्‍हा जात ॥ सवेंचि येऊनि पायां लागत ॥ विगुंतलें चित्त हरिप्रेमीं ॥ ८८ ॥ पुढती नमन पुढती गमन ॥ पुढती घाली लोटांगण ॥ पुढती वंदी कृष्णचरण ॥ सर्वथा जाण निघवेना ॥ ८९ ॥ देखोनि उद्धवाचा भावो ॥ परमानंदें तुष्टला देवो ॥ यासि माझ्याठायीं अतिस्नेहो ॥ गुरुत्वें पहाहो अनन्य ॥ ८९० ॥ कृपा उपजली यदुनायका ॥ आपुले चरणींच्या पादुका ॥ उद्धवासि दीधल्या देखा ॥ तेणें निजमस्तका ठेविल्या ॥ ९१ ॥ पादुका ठेवितांचि शिरीं ॥ मी जातों कृष्णापासूनि दूरी ॥ हें नाठवे उद्धवाभीतरी ॥ ऐशियापरी प्रबोधिला ॥ ९२ ॥ पादुका ठेवितांचि माथां ॥ स्वयें उपशमे अवस्था ॥ नमस्कारोनि श्रीकृष्णनाथा ॥ होय निघता तदाज्ञा ॥ ९३ ॥ त्रिवार करोनि प्रदक्षिणा ॥ अवलोकूनि कृष्णवदना ॥ नमस्कारोनि श्रीचरणा ॥ उद्धव कृष्णाज्ञा निघाला ॥ ९४ ॥ तृतीयस्कंधींचें निरूपण ॥ उद्धवासि विदुरदर्शन ॥ दोघां पडिलें आलिंगन ॥ कुशल संपूर्ण पूशिलें ॥ ९५ ॥ तेथ सांगतां कृष्णनिधन ॥ उद्धव नव्हेचि दीनवदन ॥ तें विदुरा[illegible] कळलें चिह्न ॥ हा ब्रह्मज्ञान पावला ॥ ९६ ॥ मरता गुरु रडता चेला ॥ दोहींचा बोध वायां गेला ॥ साच मानी जो या बोला ॥ तोही ठकला निश्चित ॥ ९७ ॥ यासि तुष्टली श्रीकृष्णकृपामूर्ती ॥ निमाली मोहममतावृत्ती ॥ पावला परमानंदप्राप्ती ॥ स्वानंदस्थितीं प्लुत ॥ ९८ ॥ शब्द नातळोनि बोल बोले ॥ पृथ्वी नातळोनि सहजें चाले ॥ असोनि नामरूपमेळें ॥ नामरूपा नातळे हा एक ॥ ९९ ॥ हा रसेंवीण सुरस चाखे ॥ डोळ्यांवीण आपण पैं देखे ॥ इंद्रियांवीण सोलींव सुखें ॥ निजात्मतोखें हा भोगी ॥ ९०० ॥ निर्विकल्पनिजबोधेंसी ॥ त्यावरो भक्तिवैराग्येंसी ॥ स्थिति देखोनि उद्धवापाशीं ॥ विदुर मानसीं निवाला ॥ १ ॥ मग तो विनवी उद्धवाशी ॥ तुज तुष्टला हृषीकेशी ॥ तूं पावलासि ब्रह्मज्ञानासी ॥ तें मज उपदेशी सभाग्या ॥ २ ॥ उद्धव ह्मणे धन्यधन्य ॥ तुज अंतीं स्मरला श्रीकृष्ण ॥ तुज सांगावया ब्रह्मज्ञान ॥ मैत्रेयासि जाण आज्ञापिलें ॥ ३ ॥ कृष्ण मज जरी आज्ञा देता ॥ तरी मी तत्काळ बोध करिता ॥ तुज सद्गुरु परमार्था ॥ जाण सर्वथा मैत्रेय ॥ ४ ॥ ऐकतां उद्धवाचें वचन ॥ विदुर गहिंवरला पूर्ण ॥ काय बोलिला आपण ॥ सावधान अवधारा ॥ ५ ॥ हें तृतीयस्कंधींचें निरूपण ॥ प्रसंगें एथें आलें जाण ॥ विदुर बोलिला अतिगहन ॥ तेंचि वचन अवधारा ॥ ६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ क्काहं कीटकवत्तुच्छः क्क च कारुण्यवारिधिः ॥

---

१ दैवगति. २ तयार. ३ श्रीकृष्णास. ४ उपदेशिला. ५ शांत होई. ६ आत्मसंतोषानें. ७ सांगितलें.

तेनाहं स्मारितोस्म्यद्य मुमूर्षुः केशवं यथा ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ विदुर ह्मणे मी रंक ॥ रंकामाजी अतिरंक ॥ त्या मज स्मरे यदुनायक ॥ कृपा अलोलिक दासांची ॥ ७ ॥ नाठवीच देवकीवसुदेवांसी ॥ नाठवीच बळिभद्रपांडवांसी ॥ तो आठवी मज दासीपुत्रासी ॥ हृषीकेशी कृपाळू ॥ ८ ॥ जेवीं मरतां स्मरे नारायण ॥ तेवीं अंतीं मज स्मरला कृष्ण ॥ यापरी भक्तप्रतिपाळू जाण ॥ कृपासिंधु पूर्ण श्रीकृष्ण ॥ ९ ॥ ॥ आशंका ॥ ॥ द्वारकेसि असतां श्रीकृष्ण ॥ तैंचि उद्धवें केलें गमन ॥ त्यासि प्रभासींचें कृष्णनिधन ॥ ह्मणाल संपूर्ण अदृश्य ॥ ९१० ॥ उद्धवविदुरसंवाद खुण ॥ येचि अर्थींचें निरूपण ॥ समूळ सांगेन कथन ॥ ते सावधान अवधारी ॥ ११ ॥ उद्धव जातां मार्गीं आपण ॥ अविचिंतीं जाहली आठवण ॥ न पाहतां कृष्णनिधन ॥ मी कां गमन करितों हें ॥ १२ ॥ कृष्णचरित्र अति गोड ॥ तें सांडूनि तीर्थीं काय चाड ॥ ऐसा विचार करूनि दृढ ॥ श्रद्धेनें गूढ श्रद्धाळू ॥ १३ ॥ परतोनि कृष्णापाशीं जातां ॥ तो मज राहोंनेदी सर्वथा ॥ कृष्णामागें कळों नेदितां ॥ आला गुप्तता प्रभासेंसी ॥ १४ ॥ तेथेंही राहोनियां गुप्त ॥ पाहों लागला कृष्णचरित ॥ तंव यादवकुळाचा घात ॥ देखिला समस्त उद्धवें ॥ १५ ॥ कुळ निर्दळूनि एकला ॥ कृष्ण अश्वत्थातळीं बैसला ॥ तेथ जराव्याधें बाण विंधिला[3] ॥ चरणीं लागला मृगशंका ॥ १६ ॥ चरणीं लागतांचि घावो ॥ थोरसुखें सुखावला देवो ॥ कृतकार्य जाहलें निःसंदेहो ॥ निजधामा पहाहो जावया ॥ १७ ॥ ते संधीं मैत्रेय आला ॥ त्यासि ज्ञानोपदेश केला ॥ तेकाळीं विदुर आठवला ॥ कृपा कळवळला श्रीकृष्ण ॥ १८ ॥ बाण लागतां भलतेयासीं ॥ घायें होती कासाविशी ॥ ते दशा नाहीं श्रीकृष्णासी ॥ देहत्व त्यासी अतिमिथ्या ॥ १९ ॥ जेवीं घाय लागतां छायेसी ॥ पुरुष नव्हे कासाविशी ॥ तेवीं व्याधें विंधितां बाणेंसी ॥ ग्लांती[4] कृष्णासी असेना ॥ ९२० ॥ पावोनि कृष्णगुह्यज्ञान ॥ मैत्रेयासि परम समाधान ॥ तो ह्मणे कलियुग धन्यधन्य ॥ ब्रह्मवादी जन बहुसाल होती ॥ २१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सर्वे ब्रह्म वदिष्यंति संप्राप्ते च कलौ युगे ॥ नव तिष्ठंति मैत्रेय शिश्नोदरपरायणाः ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ॥ इया कलियुगाप्रती ॥ बहुसाल ब्रह्मविद्[5] होती ॥ परी न राहती ब्रह्मस्थितीं ॥ जाण निश्चितीं मैत्रेया ॥ २२ ॥ वदूनियां ब्रह्मज्ञान ॥ होती शिश्नोदरपरायण ॥ जिह्वाशिश्न जो आवरी जाण ॥ तया ब्रह्मज्ञान कलियुगीं ॥ २३ ॥ आजि विदुर एथें असता ॥ तरी मी ब्रह्म उपदेशिता ॥ मैत्रेया तुज सांगतों आतां ॥ त्यासि तूं तत्त्वतां उपदेशी ॥ २४ ॥ ऐकोनि मैत्रेयसंवादासी ॥ उद्धव आला श्रीकृष्णापाशीं ॥ प्रदक्षिणा करूनि त्यासी ॥ मग पायांसी लागला ॥ २५ ॥ ऐकून मैत्रेयाचें ज्ञान ॥ देखोनि कृष्णाचें निर्याण ॥ उद्धव निघाला आपण ॥ तें ऐक लक्षण परीक्षिती ॥ २६ ॥

---

१ एकाएकीं. २ प्रभासनांवाच्या क्षेत्रास. ३ सोडिला. ४ ग्लानि. ५ ब्रह्मवादी.

॥ श्लोक ॥ ॥ ततस्तमंतर्हृदि संनिवेश्य गतो महाभागवतो विशालाम् ॥ यथोपदिष्टां जगदेकबंधुना ततः समास्थाय हरेरगाद्गतिम् ॥ ४७ ॥ ॥ टीका ॥ ॥ जगाचें विश्रामधाम ॥ जो पुरुषांमाजी पुरुषोत्तम ॥ तो हृदयीं धरोनि आत्माराम ॥ उद्धव सप्रेम निघाला ॥ २७ ॥ कृष्णाची पूर्ण कृष्णास्थिती ॥ हृदयीं धरोनि सुनिश्चितीं ॥ उद्धव विशालातीर्थाप्रती ॥ स्वानंदगतीं निघाला ॥ २८ ॥ उद्धव स्वानंदस्थिति पूर्ण ॥ जेथें जेथें करी गमन ॥ तेते लोक होती पावन ॥ भक्तिज्ञानवैराग्यें ॥ २९ ॥ जैसजैसी विवेक विरक्ती[1] ॥ तैसतैशा बाधकशक्ती ॥ उपदेशित ज्ञानभक्ती ॥ चालिला त्रिजगती उद्धरितू ॥ ९३० ॥ ज्यांसी उद्धवासी जाहली भेटी ॥ त्यांसि हरिभजनीं पडे मिठी ॥ भवभय पडोंनेदी दृष्टीं ॥ बोधक जगजेठी उद्धव ॥ ३१ ॥ जेजे भगवद्भक्ति करित ॥ तेते भागवत ह्मणियत ॥ मुक्तीहीवरी भजनयुक्त ॥ महाभागवत उद्धव ॥ ३२ ॥ उद्धवें आदरिली[2] जे भक्ती ॥ तिची किंकर नित्य मुक्ती ॥ यालागीं महाभागवतस्थिती ॥ बोलिजे निश्चितीं उद्धवा ॥ ३३ ॥ निजशांतता अतिनिर्मळ ॥ आत्मानुभवें अतिप्रांजळ[3] ॥ मोक्षाहीवरी भजनशील ॥ भक्त विशाळ उद्धव ॥ ३४ ॥ ऐशी उद्धवाची विशाळता ॥ तोही पावला विशालतीर्था ॥ विशाल ह्मणावयाची कथा ॥ ऐक आतां सांगेन ॥ ३५ ॥ जेथ श्रद्धामात्रें चित्तशुद्धी ॥ स्मरणमात्रें निर्विकल्प बुद्धी ॥ नारायणनामें मोक्षसिद्धी ॥ विशाल या विधीं बदरिकाश्रम ॥ ३६ ॥ जेथ जनहिता नारायण ॥ अद्यापि करितो अनुष्ठान ॥ मोक्षमार्गाची प्राप्ति पूर्ण ॥ यापरी विशाळपण बदरिकाश्रमा ॥ ३७ ॥ जेथ अल्प तप फळें प्रबळ ॥ अल्पध्यानें आकळे सकळ ॥ अल्पविरक्तीं मोक्ष प्रबळ ॥ ऐसें फळें विशाळ बदरिकाश्रम ॥ ३८ ॥ जो अंतर्यामी गोविंदू ॥ जो जगाचा सुहृद बंधू ॥ जो आत्माराम प्रसिद्धू ॥ ज्याचेनि निजबोधू उद्धवा ॥ ३९ ॥ जैसा कृष्णें केला उपदेशू ॥ तैसा बदरिकाश्रमीं रहिवासू ॥ उद्धवें केला निवासू ॥ तोचि जनांसि विश्वासू परमार्थनिष्ठे ॥ ९४० ॥ जैसी उद्धवाची स्थिति गती ॥ जैशी उद्धवाची ज्ञानशक्ती ॥ जैशी उद्धवाची विरक्ती ॥ तोचि जनप्रती हितोपदेश ॥ ४१ ॥ जेथें गुरूसि विषयासक्ती ॥ तेथें शिष्यासि कैंची विरक्ती ॥ जेथ गुरूसि अधर्मप्रवृत्ती ॥ तेथ शिष्यासि विरक्ती कदा न घडे ॥ ४२ ॥ यालागीं उद्धवाचें आचरित ॥ तेंचि आचरती जन समस्त ॥ एवं परोपकारार्थ ॥ उद्धव विरक्त बदरिकाश्रमीं ॥ ४३ ॥ जैसें शिकवूनि गेला कृष्णनाथ ॥ तैसेंचि उद्धव आचरत ॥ त्याचेनि धर्में जन समस्त ॥ जाहले विरक्त परमार्थीं ॥ ४४ ॥ परब्रह्माची ब्रह्मप्राप्ती ॥ दृढ करूनि गेला श्रीपती ॥ तेंचि उद्धवासि ब्रह्मप्राप्ती ॥ अहोरात्रीं अखंड ॥ ४५ ॥ बैसतां घालूनि आसन ॥ कां करितां गमनागमन ॥ उद्धवाचें ब्रह्मपण ॥ सर्वथा जाण मोडेना ॥ ४६ ॥

---

१ वैराग्य. २ मानिली. ३ अति सुलभ.

विरक्ति आणि भोगासक्ती ॥ दोनी देहावरी दिसती ॥ या दोहींहूनि परती[1] ॥ परब्रह्मास्थिती उद्धवीं ॥ ४७ ॥ विरक्तीमाजी नव्हे विरक्त ॥ भोगीं नव्हे भोगासक्त ॥ या दोहींहून अतीत ॥ ब्रह्म सदोदित उद्धव ॥ ४८ ॥ तेथ प्रारब्धक्षयें जाण ॥ त्या देहासी येतां मरण ॥ उद्धव ब्रह्मीं ब्रह्म पूर्ण ॥ जन्ममरण तो नेणे ॥ ४९ ॥ देहींचा[2] देहात्म[3]भावो ॥ निर्दळूनि निःसंदेहो ॥ उद्धवासि ब्रह्मानुभवो ॥ श्रीकृष्णें पहाहो दृढ केला ॥ १५० ॥ ऐशिया उद्धवासि देहांतीं ॥ विदेहकैवल्याची प्राप्ती ॥ ह्मणणें हें परीक्षिती ॥ दृढ भ्रांती वक्त्याची ॥ ५१ ॥ घडितां मोडितां कांकण ॥ घडमोडी नेणे सु[4]वर्ण ॥ तेवीं देहासिच जन्ममरण ॥ उद्धव परिपूर्ण परब्रह्म ॥ ५२ ॥ उद्धवासि देहीं वर्ततां ॥ तो नित्य मुक्त विदेहता ॥ त्यासि देहांतीं विदेह[5]कैवल्यता ॥ हे समूळ वार्ता लौकिकी ॥ ५३ ॥ देह राहो अथवा जावो ॥ हा ज्ञात्यासि नाहीं संदेहो ॥ त्यासि निजात्मता ब्रह्मभावो ॥ अखंड पहाहो अनुस्यूत ॥ ५४ ॥ देहासि दैव वर्तती जाण ॥ देहासि दैव आणी मरण ॥ ज्ञाता ब्रह्मीं ब्रह्म पूर्ण ॥ जन्ममरण तो नेणे ॥ ५५ ॥ देह असो किंवा जावें ॥ आह्मी परब्रह्मचि आहों ॥ दोरीं सापपण वावो[7] ॥ दोरचि पहाहो जेवीं होय ॥ ५६ ॥ जेथ मृगजळ आटलें ॥ तेथें ह्मणावें कोरडें राहलें ॥ जेव्हां होतें पूर्ण भरलें ॥ तेव्हांही ओलें असेना ॥ ५७ ॥ तेवीं देहाची वर्तती स्थिती ॥ समूळ मिथ्या प्रतीती ॥ त्या देहाचे देहांतें ॥ विदेहकैवल्यप्राप्ती नवी नघडे ॥ ५८ ॥ यापरी बदरिकाश्रमाप्रती ॥ उद्धवें बहुकाळ करूनि वस्ती ॥ त्याचि निजदेहाचे अंतीं ॥ भगव[illegible] पावला ॥ ५९ ॥ पावला देही वदंती ॥ लौकिक जाण परीक्षिती ॥ तो परब्रह्मचि आद्यंतीं ॥ सहजास्थिती पावला ॥ १६० ॥ उद्धवाची भगवद्भक्ती ॥ आणि निदानींची निजस्थिती ॥ तेणें शुक संतोषला चित्तीं ॥ कृष्णकृपा निश्चितीं वर्णित ॥ ६१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ य एतदानंदसमुद्रसंभृतं ज्ञानामृतं भागवताय भाषितम् ॥ कृष्णेन योगेश्वरसेवितांघ्रिणा सच्छ्रद्धयासेव्य जगद्विमुच्यते ॥ ४८ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो योगेश्वर योगास्थिती ॥ जे पावले जीवन्मुक्ती ॥ तेही कृष्णचरण सेविती ॥ ऐशी पूज्य मूर्ती कृष्णाची ॥ ६२ ॥ पदीं रंगले सनकादिक ॥ संत सज्जन अनेक ॥ ब्रह्मादिक तेथें रंक[8] ॥ ऐसा श्रेष्ठ देख श्रीकृष्ण ॥ ६३ ॥ तेणें श्रीकृष्णें स्वानंदस्थितीं ॥ प्रकट केली निजभक्ती ॥ अतिकृपा उद्धवाप्रती ॥ स्वमुखें श्रीपती बोलिला ॥ ६४ ॥ भगवद्भक्ति तोचि महासागर ॥ तेथें निजधैर्य तोचि मंदर ॥ गुरुशिष्ययुक्ति सुरासुर[9] ॥ मथनतत्पर[10] साटोपें ॥ ६५ ॥ भाव विश्वास दोनी मांदिरीं[11] ॥ बोध रविदोर दृढ धरी ॥ प्रत्यगा[12]वृत्ति अभ्यासेंकरी ॥ मंथन निर्धारीं मांडिलें ॥ ६६ ॥ तेथ मथनीं प्रथमदृष्टीं ॥ अहंज्ञाता हें

---

१ वेगळी. २ जीवांचा. ३ देह हाच आत्मा अशी बुद्धि. ४ सोनें. ५ विदेहनांवाची मुक्ति. ६ मिथ्या. ७ अनुभव. ८ दास,नीच. ९ देव, दानव. १० मंथन करण्यास तत्पर.
११ रवि अडकविण्यास खांबास बांधलेल्या दोन दोऱ्या. १२ निवृत्तिमार्गानें.

हालाहल[1] उठी ॥ तें विवेकशिवें धरिलें कंठीं ॥ पुढती अहं नुठी गिळिलें तैसें ॥ ६७ ॥ निरभिमानें मथूनि मथित ॥ काढिलें भक्तिसारा
मृत ॥ तें उद्धवालागीं श्रीकृष्णनाथ ॥ कृपेनें निश्चित अर्पिलें ॥ ६८ ॥ धर्म अर्थ काम मुक्ती ॥ चहूं पुरुषार्थांहीवरती ॥ कृष्णें सारामृत
निजभक्ती ॥ उद्धवाहातीं अर्पिली ॥ ६९ ॥ निजबोधाचें पात्र जाण ॥ निजानुभवें आसोऊन[2] ॥ तेथें हें सारामृत भरोन ॥ करविलें
प्राशन उद्धवासी ॥ १७० ॥ तेणें उद्धव निमाला ॥ त्रिविधतापें सांडवला ॥ परमसुखें सुखावला ॥ परब्रह्मीं जडला ब्रह्मत्वें ॥ ७१ ॥
भक्तिसारामृतप्राशन ॥ उद्धवें करोनियां जाण ॥ पावला परम समाधान ॥ ऐसा कृपाळु जाण श्रीकृष्ण ॥ ७२ ॥ कृष्णउद्धवसंवाद
पूर्ण ॥ भक्तिसारामृत गुह्यज्ञान ॥ याचें जो करी सेवन ॥ श्रवणमनननिदिध्यासें ॥ ७३ ॥ ऐसें जो करी कथासेवन ॥ त्याभेणें पडे
भवबंधन ॥ स्वप्नीं न देखे जन्ममरण ॥ हाही नव्हे जाण नवलावो[3] ॥ ७४ ॥ जे लागोनि त्याचें संगतीं ॥ दृढावले ये कथेचे भक्तीं ॥
त्यांसि भवभयाची प्राप्ती ॥ न बाधी कल्पांतीं कुरुराया[4] ॥ ७५ ॥ ज्यासि या कथेची श्रद्धा पूर्ण ॥ ज्यासि या कथेचें अनुसंधान[5] ॥ ज्यासि
ये कथेचें अनुष्ठान ॥ तो उद्धरी जाण जगातें ॥ ७६ ॥ जो सूर्याचे घरीं राहिला ॥ त्यासि रात्रीचा यावा ठेला ॥ मा जो त्याचे गांवीं
च वसला ॥ तोही मुकला रात्रीशीं ॥ ७७ ॥ सूर्यासि रात्रीच नाहीं ॥ मा दिवस उगवे कहीं ॥ तेवीं स्वरूपाच्या ठायीं ॥ बंधमोक्ष पाही
असती मिथ्या ॥ ७८ ॥ तेवीं कथेचें अनुसंधान ॥ न घडोनि अर्थतें घडे श्रवण ॥ त्यासिही भवबंधन ॥ सर्वथा जाण बाधेना ॥ ७९ ॥
असो न घडे कथाश्रवण ॥ जो हें आवडीं करी पठण ॥ त्याचे संसाराचें दहन ॥ श्लोकश्लोकीं जाण होतसे ॥ १८० ॥ नव्हे श्रवण
पठणआटाटी ॥ या ग्रंथींच्या निरूपणगोष्टी ॥ जेणें बांधल्या जीवाच्या गांठीं ॥ तो वंद्य[6] सृष्टीं सुरनरां ॥ ८१ ॥ ये कथेची ज्यासि
प्रीती ॥ ये कथेची ज्यासि भक्ती ॥ त्यासि आवडे ज्याची संगती ॥ त्यातें वंदिती यम काळ ॥ ८२ ॥ जे कथेची श्रद्धा संपूर्ण ॥ तेंचि
कथेचें मुख्य सेवन ॥ जो श्रद्धेनें करी श्रवणमनन ॥ त्यापाशीं श्रीकृष्ण परता[7] नव्हे ॥ ८३ ॥ भाळ्याभोळ्या ऐकतां गोष्टी ॥ ज्यासि
या कथेची श्रद्धा उठी ॥ कृष्ण प्रकटोनि त्याच्या पोटीं ॥ छेदी उठाउठी भवपाश ॥ ८४ ॥ यापरी श्रद्धाळुवां जाण ॥ कृपाळु स्वामी
श्रीकृष्ण ॥ यालागीं श्रीशुक आपण ॥ करी मनन अतिश्रद्धा ॥ ८५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भवभयमपहंतुं ज्ञानविज्ञानसारं निगमकृदु
पजह्रे भृंगवद्वेदसारम् ॥ अमृतमुदधितश्चापाययद्भृत्यवर्गान्पुरुषमृषभमाद्यं कृष्णसंज्ञं नतोऽस्मि ॥ ४९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे
एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकोनत्रिंशोऽध्यायः ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ संसारभयें त्रासले ॥ जे कृष्णासि शरण आले ॥ त्यांचें

---

[1] या नांवाचें विष. [2] ठेऊन. [3] चमत्कार. [4] हे परीक्षिते. [5] ध्यास. [6] स्तुति करण्यास पात्र. [7] दूर.

भवभय हरावया वहिलें[1] ॥ जेणें मथन केलें वेदार्थां ॥ ८६ ॥ मथूनि उपनिषद्वार ॥ काढिलें ज्ञानविज्ञानसार ॥ ज्यालागीं शिणले ज्ञाते नर ॥ तयांसि पैल मेर ठाकेना ॥ ८७ ॥ ह्मणशी निगम मथितां ॥ वेदासि जाहली परम व्यथा ॥ कृष्ण वेदाचा आदिकर्ता ॥ तो दुःख सर्वथा होंनेदी ॥ ८८ ॥ जेवीं वांसुरा गायी दुहितां ॥ बाहला नलगे सर्वथा ॥ तेवीं श्रीकृष्ण वेद मथितां ॥ वेदासि सर्वथा बाधीना ॥ ८९ ॥ जो सर्वज्ञ हृषीकेश ॥ वेदार्थसार राजहंस ॥ तेणें नेदितां दुःखलेश ॥ वेदसारांश काढिला ॥ ९९० ॥ एवं वेदार्थ निजमथित ॥ ज्ञानविज्ञानसारामृत ॥ कृष्णें काढूनि इत्थंभूत[3] ॥ भृत्यहितार्थ[4] कृपें अर्पी ॥ ९१ ॥ जेवीं अळुवारपणें[5] षट्पद[6] ॥ काढी सुमनमकरंद[7] ॥ तेवीं मथूनियां वेद ॥ श्रीकृष्णें सार शुद्ध काढिलें ॥ ९२ ॥ यापरी श्रीकृष्णनाथ ॥ भक्तकृपाळू कृपावंत ॥ काढूनि वेदसारामृत ॥ निज भृत्या देत निर्भय ॥ ९३ ॥ ऐसें वेदसारामृत पूर्ण ॥ भृत्यासि पाजूनि श्रीकृष्ण ॥ निजभक्तांचें जन्ममरण ॥ निर्दळी संपूर्ण भवभय ॥ ९४ ॥ जगाचें माया मुख्य कारण ॥ कृष्ण मायेचें निजकारण ॥ जें स्वरूप सच्चिदानंदघन ॥ त्यासि संज्ञा श्रीकृष्णनामचि ॥ ९५ ॥ घेऊनि माया मनुष्यनट ॥ पुरुषांमाजी पुरुषश्रेष्ठ ॥ पूर्ण ज्ञानें ज्ञाननिष्ठ ॥ वंदनीं वरिष्ठ श्रीकृष्ण ॥ ९६ ॥ त्यासि काया वाचा आणि मन ॥ सर्वार्थीं अनन्यशरण ॥ यापरी श्रीशुक आपण ॥ करी [illegible]नें नमन श्रीकृष्णा ॥ ९७ ॥ ऐसें श्रीशुकें केलें नमन ॥ तेणें परीक्षितीस प्रेम पूर्ण ॥ भक्तकृपाळु एक श्रीकृष्ण ॥ दुसरा जाण असे[illegible] ॥ ९८ ॥ उद्धव पावला परम निर्वाण ॥ सरलें ज्ञानकथानिरूपण ॥ जगीं श्रेष्ठ भगवद्भजन ॥ भक्ताअधीन श्रीकृष्ण ॥ ९९ ॥ जेंजे भक्तांचें मनोगत ॥ तेंतें पुरवी श्रीकृष्णनाथ ॥ शेखीं निजपदही देत ॥ सर्वथा श्रीकृष्ण कृपा समर्थ भक्तांची ॥ १००० ॥ निजधामा निघतां श्रीकृष्ण ॥ उद्धव न करिता हे प्रश्न ॥ तरी हें परमामृतकथन ॥ सर्वथा श्रीकृष्ण न बोलता ॥ १ ॥ यालागीं उद्धवाचा महा थोर ॥ जगासि जाहला उपकार ॥ भक्तिज्ञानवैराग्यसार ॥ ज्याचेनि सारंगधर स्वयें वदला ॥ २ ॥ उद्धवाचेनि धर्में[8] जाण ॥ भवाब्धि तरे त्रिभुवन ॥ ऐसें बोलविलें ब्रह्मज्ञान ॥ जें गुह्य भजन सप्रेम ॥ ३ ॥ उपेक्षूनि चारी मुक्ती ॥ उद्धवें थोरविली[9] हरिभक्ती ॥ एवढी उद्धवें केली ख्याती ॥ त्रिजगती तरावया ॥ ४ ॥ एकादशाचेनि नांवें ॥ घातली भक्ति मुक्तींची पँव्हे[10] ॥ एवढी कीर्ति केली उद्धवें ॥ जडजीवें तरावया ॥ ५ ॥ धेनूच्या ठायीं क्षीर पूर्ण ॥ परी हातां नये वत्सेंवीण ॥ तेवीं श्रीकृष्णाचें पूर्ण ज्ञान ॥ उद्धवें जाण प्रकट केलें ॥ ६ ॥ कृष्णउद्धवसंवादकथन ॥ तें अतिशयें ज्ञानघन ॥ तेथ मी अपुरतें दीन ॥ केवीं व्याख्यान करवलें ॥ ७ ॥ कृष्णउद्धवज्ञानघन ॥ त्याचें करावया व्याख्यान ॥ साह्य जाहला जनार्दन ॥ जो सर्वज्ञ सर्वार्थीं ॥ ८ ॥ पदपदार्थ

---

१ निःसंशय. २ पापदोर. ३ या प्रकारें. ४ भक्तकल्याणाकरितां. ५ धका न लावतां. ६ भ्रमर. ७ फुलांतील मध. ८ कैवल्यज्ञान. ९ थोर केली. १० सत्रें.

संगती ॥ ज्ञानाची परिपाक[1]स्थिती ॥ वैराग्ययुक्त भक्तिमुक्ती ॥ हेही व्युत्पत्ती मी नेणें ॥ ९ ॥ माझें जें कां मीपण[2] ॥ तेंही जाहला जनार्दन ॥ तेव्हां पदपदार्थव्याख्यान ॥ कर्ता जाण तो एक ॥ १०१० ॥ तो एक एकपणाचेनि भावें ॥ ऐक्यता पावली स्वभावें ॥ एका जनार्दन या नांवें ॥ हा ग्रंथ देवें विस्तारिला ॥ ११ ॥ माझे बुद्धीचीही बुद्धी ॥ जनार्दन जाहला अर्था[3]वबोधीं ॥ कवित्वयुक्त पदबंधीं ॥ वदता त्रिशुद्धी जनार्दन ॥ १२ ॥ माझे नाम रूप कर्म गुण ॥ मुळीं पाहतां मिथ्या जाण ॥ परी तेही जाहला जनार्दन ॥ ऐसें एकपण पढियंतें ॥ १३ ॥ नांवें भावें एकपण ॥ यालागीं तुष्ट जाहला जनार्दन ॥ तेणें माझ्या नांवाऐसें जाण ॥ जगीं एकपण प्रकाशिलें ॥ १४ ॥ एका या नामाचें कौतुक ॥ जनार्दनासि आत्यंतिक ॥ तेणें तो मजशी जाहला एक ॥ मी तूं देख ह्मणतांही ॥ १५ ॥ एका या नांवाचें कौतुक ॥ जनार्दनासि ऐसें देख ॥ एकत्वें प्रकाशी अनेक ॥ अनेकीं एक अविकारी ॥ १६ ॥ नांवें एक भावें एक ॥ त्यासि देवाचें सर्वदा ऐक्य ॥ मग तो एकानेक ॥ भिन्नत्व देख असेना ॥ १७ ॥ हें एकत्व जंव न ये हाता ॥ तंव न लभे देवाची प्रसन्नता ॥ एकत्वावांचूनि सर्वथा ॥ अकर्त्तात्मता कळेना ॥ १८ ॥ जंव कर्तव्याचा अहंभावो ॥ तंव सर्वथा न लभे देवो ॥ अहंपाशीं बद्धतेशीं ठावो ॥ मुक्तता पहाहो तत्त्यागें ॥ १९ ॥ नामरूपें एकपण ॥ हेंचि माझें अनुष्ठा[illegible] तेणें तुष्टला जनार्दन ॥ माझें मीपण तो जाहला ॥ १०२० ॥ जेवीं बाहुल्याचें खेळणें ॥ तेथ रुसणें आणि संतोषणें ॥ हें खेळवि[illegible]वें करणें ॥ बाहुली नेणे तो अर्थ ॥ २१ ॥ तेवीं माझेनि नांवें कविता ॥ करूनि जनार्दन जाहला वक्ता ॥ यालागीं हें[4] ग्रंथकथा ॥ साधुसंतां पढियंती ॥ २२ ॥ देहअहंता ग्रंथ करिता ॥ एकही वोवी नये हाता ॥ एथ जनार्दन जाहला कर्ता ॥ ग्रंथ ग्रंथार्था तेणें आला [illegible] २३ ॥ देखोनि मराठी गोठीं[5] ॥ न ह्मणावी वृथा चावटी ॥ पहावी निजबोधकसवटी ॥ निजात्मदृष्टीं सज्जनीं ॥ २४ ॥ संस्कृत वंद्य प्राकृत निंद्य ॥ हे बोल काय होती शुद्ध ॥ हाही अभिमानवाद ॥ अहंता अशुद्ध परमार्थी ॥ २५ ॥ मोलें भूमि खणितां वैरागरीं ॥ अवचटें[6] अनर्घ्य[7] रत्न लाभे करीं ॥ तें रत्न सांपडल्या केरीं ॥ काय चतुरीं सांडावें ॥ २६ ॥ तेवीं संस्कृत आटाटी ॥ सहसा परमार्थी नव्हे भेटी ॥ तेचि जोडल्या मराठीसाठीं ॥ तेथ घालिती मिठी[8] सज्ञान ॥ २७ ॥ चकोरां चंद्रामृतप्राशन ॥ वायसां पडे तेथें लंघन ॥ तेवीं हा महाराष्ट्रग्रंथ जाण ॥ फळा फळपण ज्ञान अज्ञानां ॥ २८ ॥ देवासि नाहीं वाचाभिमान ॥ संस्कृत प्राकृत त्या समान ॥ ज्या वाणीं जाहलें ब्रह्मकथन ॥ त्या भाषां श्रीकृष्ण संतोषे ॥ २९ ॥ साजुक आणि सुकलीं ॥ सुवर्णसुमनीं नाहीं चाली ॥ तेवीं संस्कृतप्राकृतबोली ॥ ब्रह्मकथनें आली समत्वा ॥ १०३० ॥ संस्कृतभाषें निंदा केली ॥ तरी ते

---

१ पक्व. २ अहंपणा. ३ अर्थ जाणण्याविषयीं. ४ ही. ५ गोष्ट. ६ एकाएकीं. ७ अमूल्य. ८ उडी.

काय पावन जाहली ॥ प्राकृतभाषा हरिकथा केली ॥ ते वृथा गेली ह्मणवेना ॥ ३१ ॥ जो जो भाषाअभिमान ॥ तोतो वक्त्यासि बाधक पूर्ण ॥ ज्या भाषां केलें ब्रह्मकथन ॥ तें न होय पावन हरिचरणीं ॥ ३२ ॥ माझी मराठी भाषा चोखडी[1] ॥ परी परब्रह्में फळली गाढी ॥ संत सज्जन जाणती गोडी ॥ त्यालागीं जोडीं जोडिला ग्रंथ ॥ ३३ ॥ हे जनार्दनकविता वाडी ॥ ब्रह्मरसें रसाळ गाढी ॥ जे जनार्दनें लाविली गोडी ॥ ते चवी न सोडी ग्रंथार्थ ॥ ३४ ॥ उद्धवव्याजें[2] स्वयें श्रीकृष्ण ॥ वदला पूर्ण ब्रह्मज्ञान ॥ येणें छेदूनि भवबंधनं[3] ॥ दीनजन तरावया ॥ ३५ ॥ तो हा एकादशाचा ऐसा ग्रंथ ॥ एथ ठाकठोक परमार्थ ॥ येणें महाकवि समस्त ॥ निजहितार्थ पावले ॥ ३६ ॥ पक्कफळीं शुक झेंपांवे[4] ॥ तेथ मुंगीही रिगमूं[5] पावे ॥ तेवीं महाकवींचीं वैभवें ॥ मीही पावें प्राकृतें ॥ ३७ ॥ महारायाच्या ताटापाशीं ॥ रिगमूं[6] नाहीं समर्थांशी ॥ तेथें सुखेंसि बैसे माशी ॥ तेवीं हा आह्मांसी प्राकृत ग्रंथ ॥ ३८ ॥ भोजनीं धरोनि बापाचा हात ॥ गोड तें आधीं बालक खात ॥ तेवीं महाकवींच्या अनुभवांत ॥ प्राकृतें परमार्थ मीही लाभें ॥ ३९ ॥ मी लाभलों सद्गुरुचरण ॥ तेणें हें चालिलें निरूपण ॥ बाप कृपाळु जनार्दन ॥ ग्रंथ संपूर्ण तेणें केला ॥ १०४० ॥ ह्मणाल पूर्ण जाहला परमार्थ ॥ पुढें आहे महाअनर्थ ॥ तैसा नव्हे गुह्य ज्ञानार्थ ॥ स्वयें कृष्णनाथ दावील ॥ ४१ ॥ माता पिता स्त्री पुत्र जन ॥ जाती गोत सुहृद सज्जन ॥ सकळ कुळासि येतां मरण ॥ ममता श्रीकृष्ण कदा न धरी ॥ ४२ ॥ कृष्णआज्ञा काळ[7] [illegible] माथां ॥ एवढी हातीं असतां सत्ता ॥ तरी कुळरक्षणार्थ ममता ॥ श्रीकृष्णनाथा असेना ॥ ४३ ॥ ज्यासि देहीं निरभिमानता ॥ [illegible]ासि बाधीना कुळाची ममता ॥ ते देहींची निरहंकारता ॥ श्रीकृष्ण आतां स्वांगें दावी ॥ ४४ ॥ तें ज्ञानपरिपाक निर्वाण ॥ अतिगोडी [illegible] निरूपण ॥ पुढिले दों अध्यायीं जाण ॥ श्रीशुक आपण सांगेल ॥ ४५ ॥ ते ज्ञानगुह्य[9] निजकथा ॥ जनार्दनकृपा तत्त्वतां ॥ एकाजनार्दन वक्ता ॥ अवधान श्रोतां मज द्यावें ॥ ४६ ॥ जेथ संत अवधान देती ॥ ते कथा वोडवे परमार्थीं ॥ एकाजनार्दनीं विनंती ॥ अवधान ग्रंथार्थीं मज द्यावें ॥ ४७ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे एकाकारटीकायां परमार्थप्राप्तिसुगमोपायकथनोद्धवबदरिकाश्रमप्रवेशो नाम एकोनत्रिंशोऽध्यायः ॥ २९ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ संख्या ॥ ॥ श्लोक ॥ ४९ ॥ संमतश्लोक ॥ २ ॥ ॥ ओंव्या १०४७ एकूण १०९८ ॥ ॥ छ ॥

---

१ चोख. २ निमित्तें. ३ संसाररूपीबंधन. ४ डोले. ५ रिघूं पाहे. ६ रीघ. ७ यम. ८ निरभिमानता. ९ जीमध्यें गुह्यज्ञान आहे अशी.

# अध्याय ३० वा.


बलरा.
श्रीकृष्ण
जराव्याध
छपनकोटी यादव आपसांत लढाई करून कुलक्षय पावले. प्रभासक्षेत्र.

श्रीगणेशाय नमः॥ ॥ जयजय सद्गुरु अनादी ॥ जयजय सद्गुरु सर्वसिद्धी ॥ जयजय सद्गुरु आनंदनिधी ॥ जयजय कृपानिधी कृपाळुवा ॥ १ ॥ जयजय वेदवाचका[1] ॥ जयजय वेदार्थप्रकाशका ॥ जयजय वेदप्रतिपादका ॥ जयजय वेदात्मका वेदज्ञा ॥ २ ॥ जयजय विश्वप्रकाशका ॥ जयजय विश्वप्रतिपाळका ॥ जयजय विश्वनिवासका ॥ अकर्तात्मका अव्यया ॥ ३ ॥ तुझी अव्यय अक्षर[2] स्थिती ॥ नाहीं नाम रूप वर्ण व्यक्ती ॥ तो तूं नांदसी जाति गोतीं ॥ लोकस्थितिव्यवहारें ॥ ४ ॥ तुज जगीं नाहीं दुसरें ॥ तो तूं गृहस्थ घरदारें ॥ तूं नपुंसक साचोकारें ॥ कीं स्त्रीपुत्रें नांदसी ॥ ५ ॥ अज[3] आणि वंदिसी पिता[4] ॥ अजन्मा तो नमिसी माता ॥ जगीं तुझी सर्वसमता ॥ शेखीं अरिमित्रता चाळिसी ॥ ६ ॥ तूं जगन्नाथ जगचाळक ॥ कीं एकाचा होसी सेवक ॥ तूं परिपूर्ण पूर्णात्मक ॥ कीं मागसी भीक रंकत्वें ॥ ७ ॥ तूं नैष्ठिक ब्रह्मचारी ॥ कीं व्यभिचारें तारिसी नारी[5] ॥ तूं सर्वज्ञ गुरूच्या द्वारीं ॥ तृणकाष्ठें[6] शिरीं वाहसी ॥ ८ ॥ जो तूं कळिकाळातें ग्रासिसी ॥ तो तूं बागुलाभेणें लपसी ॥ तूं मायानियंता हृषीकेशी ॥ शेखीं माया[7] बांधीजशी उखळीं ॥ ९ ॥ तो तूं आत्माराम नित्यतृप्त ॥ शेखीं गोवळांचा खाशी भात ॥ तुझा ब्रह्मादिकां न कळे अंत ॥ तो तूं उभा रडत यशोदेपाशीं ॥ १० ॥ त्रैलोक्य दाविसी उदरीं ॥ तो तूं गोपिकांचे कडियेवरी ॥ तूं जगाचा चाळक श्रीहरी ॥ त्या तुज लेंकुरीं[8] शिकविजे चालूं[9] ॥ ११ ॥ जो तूं सर्ववंद्य सर्वेश्वर ॥ तो तूं होसी पांढरा डुकर ॥ एवं करितां तुझा निर्धार ॥ वेदांसि विचार कळेना ॥ १२ ॥ वेदीं घेतलें महामौन ॥ ज्ञाते झाले नेणे कोण ॥ योगी वळंघले रान ॥ तुझें महिमान कळेना ॥ १३ ॥ मुख्यत्वें जन्म नाहीं जाण ॥ तो कृष्ण दावी कैसें मरण ॥ तें एकावया निरूपण ॥ परीक्षिति पूर्ण श्रद्धाळू ॥ १४ ॥ प्रथमाध्यायीं वैराग्यार्थ ॥ मुसळ बोलिलें शापयुक्त ॥ तेंचि ग्रंथावसानीं एथ ॥ असे पुसत परीक्षिती ॥ १५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ राजोवाच ॥ ततो महाभागवते उद्धवे निर्गते वनम् ॥ द्वारवत्यां किमकरोद्भगवान् भूतभावनः ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो पांडवकुळीं कुळरत्न ॥ कीं कौरवकुळीं कुळभूषण ॥ जो धर्माचें निजलक्षण ॥ कलीचें निग्रहण जेणें केलें ॥ १६ ॥ ऐसा राजा परीक्षिती ॥ धैर्य वीर्य उदारकीर्ती ॥ तेणें स्वमुखें श्रीशुकाप्रती ॥ केली विनंती अतिश्रद्धा ॥ १७ ॥ उद्धव पावोनि पूर्ण ज्ञान ॥ तो बदरिकाश्रमा गेलिया जाण ॥ मागें द्वारकेसि श्रीकृष्ण ॥ काय आपण करिता झाला ॥ १८ ॥ उत्पत्ति स्थिति निधन ॥ जो इच्छामात्रें करी जाण ॥ तो स्वदेहाचें विसर्जन ॥ कैसेंनि श्रीकृष्ण करिता झाला ॥ १९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ब्रह्मशापोपसंसृष्टे स्वकुले यादवर्षभः ॥ प्रेयसीं सर्वनेत्राणां तनुं स कथमत्यजत् ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ॥ ब्रह्मशापें श्रीकृष्णनाथ ॥ निःशेष निजकुळासि घात ॥

---

१ वेद बोलणारा. २ नाशरहित. ३ जन्मरहित. ४ बापास (वसुदेवादिकांस.) ५ गोपी इत्यादिकांस. ६ गवत, लांकडें. ७ आईच्या हातानें. ८ लहान मुलांनीं. ९ चालण्यास. १० साक्षात् मूर्तीच.

कैसेंनि करविला एथ ॥ हें सुनिश्चित सांगावें ॥ २० ॥ जननयना[1] आह्लादकर[2] ॥ कृष्णतनू अतिसुंदर ॥ जीसि देखतां त्रिनेत्र[3] ॥ हर्षें
निर्भर स्वानंदें ॥ २१ ॥ ऐशी आह्लादकारक तनू ॥ कैसेंनि सांडी श्रीकृष्णू ॥ ब्रह्मशापासि भिऊनू ॥ तो कां निजतनू सांडिता झाला
॥ २२ ॥ कृष्ण परब्रह्म परिपूर्ण ॥ त्यासि बाधीना शापबंधन ॥ तोही सत्य करी ब्रह्मवचन ॥ यादववंशीं तन[4] सांडूनी ॥ २३ ॥ दृष्टीं
देखतां श्रीकृष्ण ॥ सुखें सुखावे जीवप्राण ॥ त्याच्या सौंदर्याचें निरूपण ॥ राजा आपण सांगत ॥ २४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रत्याकृष्टुं
नयनमबला यत्र लग्नं न शेकुः कर्णाविष्टं न सरति ततो यत्सतामात्मलग्नम् ॥ यच्छ्रीर्वाचां जनयति रतिं किंनु मानं कवीनां दृष्ट्वा जिष्णोर्युधि
रथगतं यच्च तत्साम्यमीयुः ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ ज्याची अकरा इंद्रियां सदा गोडी ॥ भोगिजे तंवतंव प्रीति गाढी ॥ कदा
वीट नुपजे आवडी ॥ अवीट गोडी कृष्णाची ॥ २५ ॥ बाळा प्रौढा मुग्धा प्रगल्भा व्यक्ती ॥ ऐशी चतुर्विधा[5] स्त्रियांची जाती ॥ तिहीं
देखिल्या श्रीकृष्णमूर्तीं ॥ दृष्टी मागुती[6] परतेना ॥ २६ ॥ ज्या धार्मिका धैर्यवृत्ती ॥ ज्या पतिव्रता महासती ॥ तिहीं देखिल्या कृष्णमूर्तीं ॥
दृष्टि मागुती परतेना ॥ २७ ॥ ज्या कां अबळा अभुक्तकाम ॥ ज्या अतिवृद्धा अतिनिष्काम ॥ तिहीं देखिल्या मेघश्याम ॥ नयन सकाम
हरिरूपीं ॥ २८ ॥ जेवीं लवण जळाभेटी ॥ तेवीं श्रीकृष्णीं स्त्रियांची दिठी[7] ॥ मिसळलिया उठाउठी ॥ परतोनि मिठी सुटेना ॥ २९ ॥
एवं देखिलिया श्रीकृष्णमुर्तीं ॥ स्त्रियांचिया निजात्मशक्ती ॥ दृष्टि परतेना मागुती ॥ ऐशी नयनां प्रीती हरिरूपीं ॥ ३० ॥ स्त्रिया बापुड्या
त्या किती ॥ जे संत विरक्त परमार्थी ॥ त्यांचे श्रवणीं पडतां कीर्ती ॥ चित्तीं कृष्णमूर्ती ठसावे ॥ ३१ ॥ चित्तीं ठसावोनि कृष्णमूर्तीं ॥
चित्तचि आणी कृष्णस्थितीं ॥ ऐशी कृष्णाची कृष्णकीर्ती ॥ चित्तवृत्ती आकर्षी ॥ ३२ ॥ संतांची आकर्षी चित्तवृत्ती ॥ हें नवल नव्हे
कृष्णकीर्तीं ॥ कीर्ती ऐकतां असंतीं[8] ॥ तेही होती तद्रूप ॥ ३३ ॥ लागतां चंदनाचा पवनें[9] ॥ खैर धांमोडे[10] होती चंदन ॥ तेवीं कृष्णकीर्ति
श्रवण ॥ दे समाधान समसाम्यें ॥ ३४ ॥ भावें ऐकतां कृष्णकीर्ती ॥ असंतही संतत्वा येती ॥ मग संतासंत दोनी स्थिती ॥ हारपती
समसाम्यें ॥ ३५ ॥ महाकवि वर्णितां कृष्णकीर्ती ॥ पावले परमसभाग्य स्थिती ॥ जे कृष्णकीर्तीतें वर्णिती ॥ तेही पावती अतिशोभा
॥ ३६ ॥ कवीश्वरां नवरसिकू ॥ नवरंगडा श्रीकृष्ण एकू ॥ जोजो वर्णी रसविशेखू ॥ तोतो यदुनायकू स्वयें होय ॥ ३७ ॥ महाकवि
आदिकरूनी ॥ कवीश्वरां कीर्तिजननी ॥ जे विनटले हरिकीर्तनीं ॥ वंद्य वाणी तयांची ॥ ३८ ॥ कृष्णकीर्तिपवाडें ॥ ज्याची वाणी अबद्ध[11]
पडे ॥ ते वाचा वंदिजे चंद्रचूडें[12] ॥ त्याच्या पायां पडे यम काळ ॥ ३९ ॥ जेथें कृष्णकीर्तिकीर्तन ॥ तेथें कर्माकर्मांची उजवण[13] ॥ होय

---

[1] लोकांच्या डोळ्यांस. [2] आनंद देणारी. [3] शंकर. [4] शरीर. [5] चार प्रकारची. [6] इतरविषयांकडे. [7] दृष्टि. [8] दुर्जनांनीं. [9] वारा. [10] धावडे. [11] अनन्वित. [12] शंकरानें. [13] समाप्ति.

संसाराची बोळवण ॥ जन्ममरणसमवेत ॥ ४० ॥ यापरी कीर्तीचें महिमान ॥ सर्वार्थीं अगाध जाण ॥ कृष्णकीर्तिकविता जाण ॥ परम पावन तिहीं लोकीं ॥ ४१ ॥ कवीश्वरांची कृष्णकीर्ती ॥ ऐकतां वाढे श्रद्धा प्रीती ॥ तेणें थोरावे कृष्णभक्ती ॥ हे कविताशक्ती अगाध ॥ ४२ ॥ ऐशी अगाध कृष्णकीर्ती ॥ मा त्या कृष्णाची कृष्णमूर्ती ॥ जे अखंड ध्यानीं देखती ॥ तेते होती तद्रूप ॥ ४३ ॥ ज्य सि अखंड ध्यानीं कृष्णमूर्ती ॥ तेते तद्रूपता पावती ॥ हें नवल नव्हे कृष्णस्थितीं ॥ जे द्वेषें देखती तेही मुक्त ॥ ४४ ॥ ज्याचे रथीं मेघश्याम ॥ सारथी झाला पुरुषोत्तम ॥ यालागीं पार्थाचा पराक्रम ॥ मिरवी नाम विजयत्वें[2] ॥ ४५ ॥ सदा जयनशील पूर्णू ॥ यालागीं अर्जुना[1] नाम जिष्णू ॥ ज्याचे युद्धींचा पण कठिणू ॥ सिद्धी श्रीकृष्णू पाववी ॥ ४६ ॥ तैं बैसोनि अर्जुनाचे रथीं ॥ विचरतां[3] युद्धक्षितीं[4] ॥ जेजे देखती कृष्णमूर्ती ॥ तेते कृष्णस्थिती पावले ॥ ४७ ॥ जेथ कृष्णाचा पडे पदरेणू ॥ तेथें चहूं मुक्तींसि होय सणूं[5] ॥ ऐशी पावन श्रीकृष्णतनू ॥ कैसेनि श्रीकृष्णू सांडिता झाला ॥ ४८ ॥ ह्मणाल ब्रह्मशापाभेण ॥ शरीर सांडी श्रीकृष्ण ॥ हे बोलचि अप्रमाण ॥ कृष्ण ब्रह्म पूर्ण परमात्मा ॥ ४९ ॥ हेळण छळण दुर्वचन ॥ द्विजां न करावा अपमान ॥ त्यांचा वाढवावा पूर्ण सन्मान ॥ तनुत्यागें श्रीकृष्ण द्विजशाप पाळी ॥ ५० ॥ कृष्ण परमात्मा परिपूर्ण ॥ तेणेंही निजकुळ निर्दळून ॥ सत्य करी ब्राह्मणवचन ॥ विप्रशापें आपण निजतनू त्यागी ॥ ५१ ॥ तो तनुत्यागप्रकार[6] ॥ सांग समूळ सविस्तर ॥ सांगताहे शुकयोगींद्र ॥ परिसे नरेंद्र त्यक्तोदक[7] ॥ ५२ ॥ पांडवकुळीं कुळदीपक ॥ जन्मला परीक्षितीच एक ॥ जो होऊनि त्यक्तोदक ॥ भागवतपरिपाक सेवित ॥ ५३ ॥ ब्रह्मानारदव्यासपर्यंत ॥ भागवत उपदेश गुह्य गुप्त ॥ तो परीक्षितीनें जगाआंत ॥ केला प्रकटार्थ दीनोद्धारा ॥ ५४ ॥ धर्मवंशीं अतिधार्मिक ॥ जन्मला परीक्षितीच एक ॥ भागवतरसीं अतिरसिक ॥ अति नेटक[8] श्रवणार्थी ॥ ५५ ॥ ऐसा जो कां परीक्षिती ॥ तेणें अत्यादरें केली विनंती ॥ शुक सुखावोनि चित्तीं ॥ काय त्याप्रती बोलिला ॥ ५६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ऋषिरुवाच ॥ ॥ दिवि भुव्यंतरिक्षे च महोत्पातान् समुत्थितान् ॥ दृष्ट्वाऽऽसीनान् सुधर्मायां कृष्णः प्राह यदूनिदम् ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ शुक ह्मणे परीक्षिती ॥ उद्धव गेलिया वनाप्रती ॥ मागें विघ्नभूत[9] द्वारावती ॥ त्रिविध उत्पातीं अतिव्याप्त ॥ ५७ ॥ दिवि भुवि अंतरिक्षगत ॥ उठिले गा महोत्पात ॥ दिवसा उल्का पातहोत ॥ भूतें खात अंतरिक्षीं ॥ ५८ ॥ गगनीं उगवले त्रिविधकेतू ॥ दंडकेतु धूमकेतू ॥ शिखाकेतु अतिअद्भुतू ॥ दिवसांही दिसतू सर्वांसी ॥ ५९ ॥ धरा कांपोनि अतिगजरीं ॥ भूस्फोट झाला नगरद्वारीं ॥ भूकंप तीनदिवसवरी ॥ घरोघरीं आंदोळ ॥ ६० ॥ वारा सुटला झडाडें ॥

---

१ अर्जुनाचा. २ विजय या नांवानें. ३ फिरत असतां. ४ रणभूमीवर. ५ आनंद. ६ देहत्यागाची हकीकत. ७ टाकिलें आहे उदकपान ज्यानें असा. ८ तत्पर, उत्सुक. ९ बहुतकरून विघ्नांनीं व्याप्त झालेली.

समूळ उन्मळती झाडें ॥ द्वारकेमाजी धुळी उडे ॥ डोळा नुघडे जनांचा ॥ ६१ ॥ अंतरिक्षीं नग्न भूतें ॥ धांवती खाखातें खिंखातें ॥ रुधिरवृष्टि होय तेथें ॥ अकस्मातें निरभ्रीं[1] ॥ ६२ ॥ रविचंद्रांचें मंडळ ॥ खळें करीत सर्वकाळ ॥ ग्रह भेदिती ग्रहमंडळ ॥ क्रूरग्रहमेळ शत्रुसदनीं ॥ ६३ ॥ सम्मुख आकाशाचे पोटीं ॥ दिग्दाह देखती दृष्टीं ॥ अभ्रेंवीण कडकडाटी ॥ पडती वितंडी महाविजा ॥ ६४ ॥ घारी झडपिती सत्राणें ॥ जेवितां पुढील नेती भाणें ॥ दिवसां दिवाभीतघुंगाणें ॥ राजद्वारीं श्वानें[2] सैघ[3] रडती ॥ ६५ ॥ बैसल्या सुधर्मासभेप्रती ॥ संकल्पविकल्पांची निवृत्ती ॥ ते सभेसि वीर वोसणती ॥ मारी मारी ह्मणती परस्परें ॥ ६६ ॥ तें ऐकतां उत्तर ॥ दचकती महाशूर ॥ सुधर्मासभेसि चिंतातुर ॥ यादववीर समस्त ॥ ६७ ॥ यादव बैसले सभेसी ॥ छाया देखती वीणशिसी[4] ॥ सुधर्माधर्मसभेपाशीं ॥ अरिष्टें ऐशीं उठती ॥ ६८ ॥ ऐशीं अरिष्टें अनिवार ॥ दुःखसूचकें दुस्तर ॥ देखोनि यादव थोरथोर ॥ विघ्नविचार विवंचिती[5] ॥ ६९ ॥ द्वारकेच्चें विघ्ननिर्दळण ॥ करूंठेविलेंसे सुदर्शन ॥ ते द्वारकेमाजी महाविघ्न ॥ काय कारण उठावया ॥ ७० ॥ जंव पातयापातें लवे ॥ तंव चक्र एकवीसवेढे भंवे ॥ ते द्वारकेसि विघ्नसंभवे ॥ देखोनि आघवे अतिचकित ॥ ७१ ॥ सर्वविघ्नांचें आकर्षण ॥ करी या नांव ह्मणि पैं कृष्ण ॥ तो कृष्ण एथें असतां जाण ॥ उत्पात दारुण कां उठती ॥ ७२ ॥ एवं विचारारूढयादवांसी ॥ चिंतातुर देखोनियां त्यांसी ॥ बुद्धि सांगावया त्यांपाशीं ॥ काय हृषीकेशी बोलत ॥ ७३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ एते घोरा महोत्पाता द्वार्वत्यां यमकेतवः ॥ मुहूर्तमपि न स्थेयमत्र नो यदुपुंगवाः ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो जगाचा सूत्रधारी ॥ जो मायायंत्रींचा यंत्रकारी ॥ तो यादवांप्रती श्रीहरी ॥ आलोच[6] करी विघ्नांचा ॥ ७४ ॥ यादवकुळासि आला प्रांतैं[7] ॥ हें जाणें श्रीकृष्णनाथ ॥ यांचा द्वारकेसि होऊंनये घात ॥ यालागीं समस्त प्रभासा धाडी ॥ ७५ ॥ द्वारावती सातवी पुरी ॥ येथील मरण मोक्षोपकारी[8] ॥ यादव समस्त देवाधिकारी ॥ यालागीं ते बाहेरी श्रीकृष्ण काढी ॥ ७६ ॥ कुळनाशाचें मूळ देखा ॥ प्रभासीं निघालीसे ऐरिका[9] ॥ हाचि कृष्णाचाही आवांका ॥ तो धाडी सकळिकां प्रभासासी ॥ ७७ ॥ यादवांसि ब्रह्मशाप ॥ घडलासे घोररूप ॥ यालागीं द्वारकेमाजी संताप ॥ उत्पातरूप उठती ॥ ७८ ॥ उत्पात उठले अनेक ॥ हे अनिवार अरिष्टसूचक ॥ अविलंबें तात्काळिक ॥ परमदुःख पावाल ॥ ७९ ॥ यालागीं तुह्मी आवश्यक ॥ एथें रहावें ना मुहूर्त एक ॥ स्त्रियापुत्र सुहृद लोक ॥ तात्काळिक निघावें ॥ ८० ॥ ह्मणाल यादववीर उद्भट ॥ आह्मांसि काय करील अरिष्ट ॥ येणें गर्वें अति अनिष्ट ॥ परम कष्ट पावाल ॥ ८१ ॥ ब्राह्मणाचे शापापुढें ॥ कायसें शौर्य बापुडें ॥ तुह्मीं न विचारितां मागें पुढें ॥ आतांचि

---

[1] मेघ नसतां. [2] कुत्रीं. [3] सैरावैरा. [4] शिरावांचून. [5] विचार करितात. [6] विचार. [7] नाशसमय. [8] मुक्ति देणारें. [9] लोहाळ.

रोकडें निघावें ॥ ८२ ॥ द्वारके माजी आजि कोणी ॥ सर्वथा पिऊं नये पाणी ॥ स्त्रीपुत्रसुहृद्जनीं ॥ परिवारोनी निघावें ॥ ८३ ॥ कुळासि घडला ब्रह्मशाप ॥ तेणें द्वारकेसि उठिला संताप ॥ तें फेडावया कुळाचें पाप ॥ क्षेत्र पुण्यरूप प्रभास ॥ ८४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्त्रियो बालाश्च वृद्धाश्च शंखोद्धारं व्रजंत्वितः ॥ वयं प्रभासं यास्यामो यत्र प्रत्यक्सरस्वती ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ वस्तीसि अतिगूढ शंखोद्धार ॥ तेथें ठेवावीं स्त्रीवृद्धकुमार ॥ आह्मी समस्त यादववीर ॥ निघावें सत्वर प्रभासेंसी ॥ ८५ ॥ जेथें प्राची सरस्वती ॥ मिळाली असे सागराप्रती ॥ तेथें जाऊनि समस्तीं ॥ करावें विध्युक्तीं विधिविधान ॥ ८६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तत्राभिषिच्य शुचय उपोष्य सुसमाहिताः ॥ देवताः पूजयिष्यामः स्नपनालेपनार्हणैः ॥ ७ ॥ टीका ॥ ॥ तेथें वेदोक्त विधान ॥ करावें तीर्थीं तीर्थस्नान ॥ तीर्थविध्युक्त उपोषण ॥ करावें आपण निराहार ॥ ८७ ॥ तेथ मद्रावें शुचिर्भूत ॥ राहोनियां समस्त ॥ तीर्थदेवता विध्युक्त ॥ निःशापार्थ[2] पूजावी ॥ ८८ ॥ स्नान वस्त्र अलंकार ॥ चंदनादि पूजासंभार ॥ समर्पूनि षोडशोपचार ॥ श्रद्धा हरिहर पूजावे ॥ ८९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ब्राह्मणांस्तु महाभागान् कृतस्वस्त्ययना वयम् ॥ गोभूहिरण्यवासोभिर्गजाश्वरथवेश्मभिः ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ ॥ वेदवेदांगपारंगत ॥ शमदमादितपयुक्त ॥ ब्राह्मण जे स्वधर्मनिरत ॥ विप्रशांत्यर्थ पूजावे ॥ ९० ॥ व्हावया अरिष्टनिरसन ॥ करिती शांत्यर्थ स्वस्तिवाचन ॥ त्या ब्राह्मणांसि आपण ॥ द्यावें दान श्रद्धायुक्त ॥ ९१ ॥ गोदान भूदान[3] गजदान ॥ अश्वदान सुवर्णदान ॥ तिळदान वस्त्रदान ॥ द्यावें गृहदान अतिश्रद्धा ॥ ९२ ॥ रथीं संजोगोनि[4] अश्ववर ॥ दान द्यावें रहंवर[5] ॥ द्विज सुखी होती अपार ॥ तो तो प्रकार करावा ॥ ९३ ॥ जें जें ब्राह्मणां अपेक्षित ॥ तें तें द्यावें श्रद्धायुक्त ॥ ब्राह्मण तुष्टमान[6] जेथ ॥ अरिष्ट तेथ रिघेना ॥ ९४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विधिरेष ह्यरिष्टघ्नो मंगलायनमुत्तमम् ॥ देवद्विजगवां पूजा भूतेषु परमो भवः ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ जेथ हरीचें देवतार्चन ॥ जेथ शालग्राम शिलार्चन ॥ जेथ साधुसंतां सन्मान ॥ जेथ अरिष्टनाशन महापूजा ॥ ९५ ॥ जेथ मद्रावें द्विजपूजन ॥ जेथ भावार्थें गोशुश्रूषण[7] ॥ जेथ भूतदया संपूर्ण ॥ तेथ कदा विघ्न रिघेना ॥ ९६ ॥ अंध पंगु अशक्त जन ॥ जेथ पावती अवश्य अन्न ॥ जेथ सुखी होती दीन ॥ तेथ कदा विघ्न बाधीना ॥ ९७ ॥ जे भूतदया अलोलिक ॥ ते सकळअरिष्टच्छेदक ॥ परममंगळप्रकाशक ॥ सुखदायक सर्वार्थी ॥ ९८ ॥ ॥ श्लोक ॥ इति सर्वे समाकर्ण्य यदुवृद्धा मधुद्विषः ॥ तथेति नौभिरुत्तीर्य प्रभासं प्रययू रथैः ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ जो मधुकैटभमर्दन[8] ॥ जो मुरारि मधुसूदन ॥ जो परमात्मा श्रीकृष्ण ॥ तो करी प्रेरण[9] प्रभासे ॥ ९९ ॥ यादवांमाजी वृद्ध सज्ञान ॥ पुत्र मित्र सुहृद जन ॥ तिहीं

---

१ निश्चयानें. २ शापापासून मुक्त होण्याकरितां. ३ भूमिदान. ४ जुंपून. ५ रथ. ६ संतुष्ट. ७ गायीची सेवा. ८ मधु व कैटभाचा नाश करणारा. ९ आज्ञा.

श्रीकृष्णाचें वचन ॥ बहुसन्मान वंदिलें ॥ १०० ॥ सकळ यादवसंभारा ॥ स्त्रीवृद्धादिबाळकुमरा ॥ नावा भरोनियां समग्रा ॥ शंखो
द्धारा न्या ह्मणती ॥ १ ॥ पालाणोनि[1] रथ कुंजर ॥ चतुरंग सेनासंभार ॥ कृष्णसहित यादववीर ॥ निघाले समग्र प्रभासासी ॥ २ ॥
॥ श्लोक ॥ ॥ तस्मिन् भगवतादिष्टं यदुदेवेन यादवाः ॥ चक्रुः परमया भक्त्या सर्वश्रेयोपबृंहितम् ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ यादव प्रभा
सा पावोन ॥ जैसें होतें श्रीकृष्णवचन ॥ त्याहूनि विशेषीं जाण ॥ स्नान दान तिहीं केलें ॥ ३ ॥ यादव समस्त मिळोन ॥ केलें पारणा
विधिभोजन ॥ मग महामद्य आणूनि जाण ॥ मद्यपान मांडिलें ॥ ४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ततस्तस्मिन्महापानं पपुर्मैरेयकं मधु ॥ दिष्टवि
भ्रंशितधियो यद्द्रवैर्भ्रश्यते मतिः ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ करूनियां तीर्थविधान ॥ करावें अरिष्टनिरसन ॥ बाप अरिष्टाचें विंदान[2] ॥ तेथें
मद्यपान मांडिलें ॥ ५ ॥ ज्याची गोडपणें पडे मिठी ॥ उन्मादता अतिशयें उठी ॥ तें मद्यपान उठाउठी ॥ वडिलधाकुटीं[3] मांडिलें ॥ ६ ॥
ज्याचा वास येतांचि घ्राणीं[4] ॥ उन्माद चढे तत्क्षणीं ॥ तैशिया मद्याचे मद्यपानीं ॥ वीरश्रेणी[5] बैसल्या ॥ ७ ॥ मैरेयकमद्याची थोरी ॥
मधुरता अतिशयें भारी ॥ लागतांचि जिह्वेवरी ॥ भ्रांत करी सज्ञाना ॥ ८ ॥ तें मद्यपान यादववीरीं ॥ आदरिलें स्वेच्छाचारीं[6] ॥ आ
ग्रह करूनि परस्परीं ॥ लहानथोरीं मांडिलें ॥ ९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ महापानाभिमत्तानां वीराणां दृप्तचेतसाम् ॥ कृष्णमायाविमूढानां
संघर्षः सुमहानभूत् ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ ॥ पूर्वीं अतिमित्र पोटांत ॥ ते मद्यपानें झाले मत्त ॥ वीर मातले अतिदृप्त[7] ॥ नोकूनि[8] बोलत
परस्परें ॥ ११० ॥ कृष्णमायां हरिला बोध ॥ अवघे झाले बुद्धिमंद ॥ सांडूनि सुहृदसंबंध ॥ निर्वाण युद्ध मांडिलें ॥ ११ ॥ नोकूनि
बोलतां विरुद्ध ॥ अतिशयें चढला क्रोध ॥ शस्त्रें घेऊनि सन्नद्ध[9] ॥ सुहृदीं युद्ध मांडिलें ॥ १२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ युयुधुः क्रोधसंरब्धा
वेलायामाततायिनः ॥ धनुर्भिरसिभिर्भल्लैर्गदाभिस्तोमरर्ष्टिभिः ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ क्रोधें नेत्र रक्तांबर[10] ॥ वेगें वोढूनि हातियेर ॥ समु
द्रतीरीं महावीर ॥ युद्ध घोरांदर[11] ते करिती ॥ १३ ॥ धनुष्यें वाऊनियां जाणा ॥ बाण सोडिती सणसणां ॥ खड्गें हाणिती खणखणां ॥
सुहृदांच्या प्राणां घ्यावया ॥ १४ ॥ एकीं उचलोनियां भाले ॥ परस्परें हाणिते झाले ॥ एकीं गदा उचलोनि बळें ॥ वीर करबळें पाडि
ती ॥ १५ ॥ एक तोमरें लवलाहीं ॥ रणीं खवळले भिडती पाही ॥ एक टोणप्यांच्या[12] घायीं[13] ॥ वीर ठायीं पाडिती ॥ १६ ॥ यापरी चतु
रंगसेना ॥ मिसळली रणकंदना ॥ आपुलालिया अंगवणा[14] ॥ गज रथ रणा आणितले ॥ १७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पतत्पताकै रथकुंजरा

---

[1] तयार करून. [2] निमित्त. [3] लहानमोठ्यांनीं. [4] नाकांत. [5] यादववीरांच्या पंक्ति. [6] यथेच्छ. [7] अतिगर्विष्ठ. [8] टाकून. [9] कवचें घातलेले. [10] आरक्त, लाल. [11] घोर. [12] सोंट्याच्या. [13] घावानें. [14] साहाय्यास.

द्भिः [2]खरोष्ट्रगोभिर्महिषैर्नरैरपि ॥ मिथः समेत्याश्वतरैः सुदुर्मदा न्यहन् शरैर्दद्भिरिव द्विपा वने ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ पताकेंसि रथ कुं[1]जर ॥ रणीं पाडिले अपार ॥ पाँखरांसि असिवार ॥ मारिले [2]खरोष्ट्र रणामाजी ॥ १८ ॥ ऐसे मारूनियां रणीं ॥ पाडिलिया वीरश्रेणी ॥ जैसे उन्मत्त गज वनीं ॥ दंतीं खणाणी भीडत ॥ १९ ॥ यापरी यादववीर ॥ रणीं मातले महाशूर ॥ घाय मारोनि निष्ठुर ॥ रणीं अपार पाडिले ॥ १२० ॥ कृष्णमाया केले भ्रांत ॥ युद्धीं न देखतां स्वार्थ ॥ परस्परें प्राणघात ॥ व्यर्थ करित सुहृदांचा ॥ २१ ॥ रण पडिलें अपार ॥ तंव खवळले कृष्ण[3]कुमर ॥ ज्यां ज्यांमाजी प्रीति थोर ॥ ते युद्धातुर चालिले ॥ २२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रद्युम्नसांबौ युधिरूढमत्सरावक्रूरभोजावनिरुद्धसात्यकी ॥ सुभद्रसंग्रामजितौ सुदारुणौ गदौ सुमित्रासुरथौ समीयतुः ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ ज्यां ज्यांमाजी अतिप्रीती ॥ तेते निर्वाण युद्ध करिती ॥ बाप संहारक काळगती ॥ सखे मारिती सख्यांतें ॥ २३ ॥ प्रद्युम्न सांब अतिमित्र ॥ त्यांस युद्ध मांडलें घोरांदर ॥ अक्रूर भोज दोन्ही वीर ॥ युद्धीं सत्वर मिसळले ॥ २४ ॥ अनिरुद्ध आणि सात्यकी ॥ उठावले क्रोधत[4]वर्कीं ॥ बाणीं वर्षोनि अनेकीं ॥ एकमेकी भांडती ॥ २५ ॥ सुभद्र संग्रामजित दोनी ॥ खवळले रणांगणीं ॥ वर्षोनियां तीक्ष्णबाणीं ॥ उन्मत्त रणीं मातले ॥ २६ ॥ कृष्णपुत्र कृष्णबंधू ॥ दोहींचेंही नाम गदू ॥ त्यांसि समत्सर क्रोधू ॥ युद्धसंबंधू परस्परें ॥ २७ ॥ सुमित्र आणि सुरथ ॥ या दोहींसि द्वेष अद्भुत ॥ परस्परें करावया घात ॥ युद्धाआंत मिसळले ॥ २८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अन्ये च ये वै निशठोल्मुकादयः सहस्रजिच्छतजिद्भानुमुख्याः ॥ अन्योन्यमासाद्य मदांधकारिता जघ्नुर्मुकुंदेन विमोहिता भृशम् ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ ॥ यादवकुळीं बळ अधिक ॥ निशठादि उल्मुकादिक ॥ शतजित्सहस्रजिद्भानुमुख ॥ हेही युद्धीं देख खवळले ॥ २९ ॥ मद्यपानें अतिगर्वित ॥ कृष्णमाया हरिलें चित्त ॥ महामोहें केले भ्रांत ॥ सुहृदां घात स्वयें करिती ॥ १३० ॥ ब्रह्मशापाची केवढी ख्याती ॥ बंधु बंधूतें जीव घेती ॥ कृष्णमाया पडिले भ्रांतीं ॥ युद्ध स्वयातीमाझारी ॥ ३१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ दाशार्हवृष्ण्यंधकभोजसात्वता मध्वर्बुदा माथुरशूरसेनाः ॥ विसर्जनाः कुकुराः कुंतयश्च मिथस्ततस्तेऽथ विसृज्य सौहृदम् ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ ॥ यादवांची एक जाती ॥ तेचि बारा नामीं नामांकिती ॥ त्या बाराही ज्ञाती युद्धीं भिडती ॥ ऐक परीक्षिती तीं नामें ॥ ३२ ॥ दाशार्ह सात्वत अंधक जाण ॥ अर्बुद माथुर शूरसेन ॥ कुंती कुकुर विसर्जन ॥ मधु भोज वृ[5]ष्ण्य बारा नामें ॥ ३३ ॥ पूर्वील यादवांचें सां[6]जणें ॥ ज्ञातीचें अल्पही ऐकतां उणें ॥ जीवेंसि सर्वस्व वेंचणें ॥ परी वांचवणें स्वयाती ॥ ३४ ॥ तेचि यादव पैं गा आतां ॥ सांडोनियां सुहृदता ॥ ज्याचे चरणीं ठेविजे माथा ॥

---

[1] हत्ती. [2] गाढवें, उंट. [3] कृष्णाचे पुत्र. [4] क्रोधाच्या आवेशानें. [5] वृष्णि. [6] प्रतिज्ञा, स्वभाव.

त्यांच्या जीवघाता पेटले[1] ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पुत्रा अयुध्यन्पितृभिर्भ्रातृभिश्च स्वस्रीयदौहित्रपितृव्यमातुलैः ॥ मित्राणि मित्रैः
सुहृदः सुहृद्भिर्ज्ञातींस्त्वहन् ज्ञातय एव मूढाः ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ ॥ कृष्णमाया आकळिलें चित्त ॥ अवघे परम भ्रांत ॥ न कळे आप्त
अनाप्त ॥ रणीं उन्मत्त मातले ॥ ३६ ॥ ज्याचे चरण वंदिजे भावार्थां ॥ श्रद्धा घेइजे चरणतीर्था ॥ त्या निजपित्याचिया[2] माथां[3] ॥ पुत्र
शस्त्रघाता प्रवर्तले ॥ ३७ ॥ बंधु शिरकल्या रणांगणीं ॥ बंधु बंधूतें सोडवी निर्वाणीं ॥ तेचि बंधु बंधूतें रणीं ॥ निर्वाणबाणीं खोंचिती
॥ ३८ ॥ जो लळे[4] पुरवूनि खेळविता ॥ जैसा बाप तैसा चुलता ॥ त्यासि पुतण्या प्रवर्ते घाता ॥ शस्त्रें माथां हाणोनी ॥ ३९ ॥ कन्येचा
सुत दौहित्र ॥ ज्यासि श्राद्धीं अधिकार ॥ तो अजासि करी मार ॥ घाय निष्ठुर हाणोनी ॥ १४० ॥ मामाभाचे परस्परीं ॥ प्रवर्तले महा
मारीं ॥ सुहृद सुहृदांच्या शिरीं ॥ सतेजशस्त्रीं हाणिती ॥ ४१ ॥ मित्र मित्रांच्या मित्रतां[5] ॥ वेंचिती अर्थां जीविता ॥ ते मित्र मित्रांच्या जीव
घाता ॥ सक्रोधतां ऊठिले ॥ ४२ ॥ आयुष्य सरलें निःशेख ॥ चढलें काळसर्पाचें विख ॥ अवघे होऊनियां मूर्ख ॥ ज्ञाति ज्ञाति देख
वधिते झाले ॥ ४३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शरेषु क्षीयमाणेषु भज्यमानेषु धन्वसु ॥ शस्त्रेषु क्षीयमाणेषु मुष्टिभिर्जह्रुरेरकाः ॥ २० ॥ ॥ टीका ॥
युद्ध मांडलें घोरांदर ॥ सरले भातडींचे[6] शर ॥ धनुष्यदंडें येरयेर[7] ॥ घायें निष्ठुर हाणिती ॥ ४४ ॥ घाय हाणितां अतिबळें ॥ धनुष्यें
मोडलीं तत्काळें ॥ क्षीण झालीं शस्त्रें सकळें ॥ हातियेरें बळें खुंटलीं ॥ ४५ ॥ ब्रह्मशापाची एरिका ॥ तीरीं निघाली होती देखा ॥
मुष्टीं घेऊनि क्रोधतवका ॥ एकमेकां हाणिती ॥ ४६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ता वज्रकल्पा ह्यभवन् परिघा मुष्टिना भृताः ॥ जघ्नुर्द्विषस्तैः कृ
ष्णेन वार्यमाणास्तु तं च ते ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥ ते एरिका घेतांचि हातीं ॥ झाली वज्रप्राय धगधगिती ॥ अतितीक्ष्ण परिघाकृती ॥
तेणें हाणिती परस्परें ॥ ४७ ॥ नानाशस्त्रें लागतां पाही ॥ यादव न डंडेळती[9] कहीं ॥ तेहीं एरकेच्या घायीं ॥ पडती ठायीं अचेतन ॥ ४८ ॥
एरकेच्या निजघायीं ॥ यादवांसि उरी[10] नाहीं ॥ दुधड तोडूनियां पाही ॥ पडती ठायीं परस्परें ॥ ४९ ॥ रणीं पाडूनियां इतर ॥ यादव
उरले महाशूर ॥ जे कां नेटके जुंझार[11] ॥ निधडे वीर निजयोद्धे ॥ १५० ॥ यादव उठले भद्रजाती[12] ॥ हे कोणास नाटोपती ॥ त्यां निर्दळा
वया निश्चितीं ॥ निवारणार्थीं हरि[13] धांवे ॥ ५१ ॥ तो म्हणे ब्रह्मशापाची एरका ॥ हे सर्वथा हातीं धरूं नका ॥ सांडा युद्धाचा आवांका ॥
शिकविलें ऐका तुम्ही माझें ॥ ५२ ॥ धर्मतां निवारी श्रीकृष्ण ॥ त्यासिही मारूं धांवले जाण ॥ हें कृष्णमायेचें विंदान ॥ न चुकत

---

[1] सिद्ध झाले. [2] आपल्या बापाच्या. [3] डोक्यावर. [4] लाड. [5] मित्रत्वास्तव. [6] भात्यांतील. [7] परस्परांस. [8] हातांत. [9] घाबरती. [10] अवसान. [11] चांगले योद्धे. [12] गज. [13] सिंह, (कृष्ण).

मरण पैं आलें ॥ ५३ ॥ एक ह्मणती श्रीकृष्णासी ॥ आधीं झोडोनि पाडा यासी ॥ ठकूं आला आह्मांसी ॥ ह्मणोनि एरकेसी धाविंनले ॥ ५४ ॥ एक ह्मणती धरा केशीं ॥ एक ह्मणती भीड कां याशीं ॥ एक ह्मणे मी श्रीकृष्णासी ॥ एका घायेंसी लोळवीन ॥ ५५ ॥ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रत्यनीकं मन्यमाना बलभद्रं च मोहिताः ॥ हंतुं कृतधियो राजन्नापन्ना आततायिनः ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥ पैल[1] पैल तो बळिभद्रू ॥ हाचि आमुचा मुख्य शत्रू ॥ यासि चला आधीं मारूं ॥ यादवभारू लोटला ॥ ५६ ॥ मदमोहें अतिदुर्मती ॥ वज्रप्राय एरका हातीं ॥ घेऊनि बळिभद्रावरी येती ॥ तेणें तोही निश्चितीं क्षोभला ॥ ५७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अथ तावपि संक्रुद्धावुद्यम्य कुरुनंदन ॥ एरकामुष्टिपरिघौ चरंतौ जघ्नतुर्युधि ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ शुक ह्मणे कुरुनंदना ॥ यादव टेंकले आत्ममरणा ॥ ते मारावया रामकृष्णा ॥ लोटले जाणा आततायी[2] ॥ ५८ ॥ यादव उठले हननासी ॥ देखूनि रामहृषीकेशी ॥ अतिक्रोध चढला त्यांसी ॥ तेही युद्धासि मिसळले ॥ ५९ ॥ एरका जे कां परिघाकृती[3] ॥ वज्रप्राय धगधगिती ॥ दोघींजणीं घेऊनि हातीं ॥ यादवां ख्याती लाविली ॥ १६० ॥ रामकृष्णांच्या निजख्याती ॥ यादवांची जाती व्यक्ती ॥ अवघेचि रणा येती ॥ कृष्ण काळशक्ती क्षोभला ॥ ६१ ॥ निजकुळाचें निधन ॥ देखोनियां श्रीकृष्ण ॥ कर्तव्यार्थ झाला पूर्ण ॥ ऐसें संपूर्ण मानिलें ॥ ६२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ब्रह्मशापोपसृष्टानां कृष्णमायावृतात्मनाम् ॥ स्पर्धा क्रोधः क्षयं निन्ये वैणवोऽग्निर्यथा वनम् ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ ब्रह्मशापें छळिलें विधी ॥ कृष्णमायाकुलितबुद्धीं ॥ मद्यपानउन्मादमर्दीं ॥ क्रोधें त्रिशुद्धी क्षया नेले ॥ ६३ ॥ वेळुवाच्या वेळुजाळीं ॥ जेवीं कांचणीं[4] पडे इंगळीं[5] ॥ तेणें वनाची होय होळी ॥ तेवीं यदुकुळीं कुलक्षयो ॥ ६४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवं नष्टेषु सर्वेषु लोकेषु स्वेषु केशवः ॥ अवतारितो भुवो भार इति मेनेऽवशेषितः ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्वकुळ नाशूनि श्रीधर ॥ अवशेष धराभार ॥ उतरला मानी चक्रधर ॥ तेणें सुखें थोर सुखावे ॥ ६५ ॥ जेवीं कां अलें पेरी माळी ॥ निजजीवनें प्रतिपाळी ॥ शेखीं तोचि खणे समूळीं ॥ तेवीं यदुकुळीं श्रीकृष्ण ॥ ६६ ॥ यादव निजबळें प्रतिपाळी ॥ त्यांतें स्वयें निजांगें निर्दळी ॥ हें दाखवितां वनमाळी ॥ ममतामेळीं अलिप्त ॥ ६७ ॥ कृष्ण पाळी यादवां समस्तां ॥ त्याची दाविली अतिममता ॥ शेखीं करूनि कुळाचे घाता ॥ निरभिमानता हरि दावी ॥ ६८ ॥ स्त्रीपुत्रेंसि निजजीविता ॥ सकळकुळांच्या होतां घाता ॥ ज्ञात्यासि नुपजे ममता ॥ ते नित्यमुक्तता हरि दावी ॥ ६९ ॥ ज्ञात्यासि नाहीं अहंममता ॥ तेंचि दावावया तत्त्वतां ॥ कुळेंसि होतां पुत्र घाता ॥ स्वप्नींही ज्ञाता ग्लानि नेणे ॥ १७० ॥ ब्राह्मणाचा शाप दारुण ॥ अन्यथा होंनेदी श्रीकृष्ण ॥ निजकुळ निर्दळी आपण ॥

---

१ तो दूर. २ ज्याच्या हातांत शस्त्रें आहेत असे. ३ मंडलाकार. ४ वांसण्यानें. ५ अग्नीची ठिणगी.

विप्रवचन सत्यत्वा[1] ॥ ७१ ॥ करूनि कुळक्षयाचें काम ॥ सुख मानी पुरुषोत्तम ॥ तें देखोनि ह्मणे बळराम ॥ अवतारकाम संपलें
॥ ७२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ रामः समुद्रवेलायां योगमास्थाय पौरुषम् ॥ तत्याज लोकं मानुष्यं संयोज्यात्मानमात्मनि ॥ २६ ॥ ॥ टीका ॥
मग बळिभद्रें आपण ॥ समुद्रतीरीं योगासन ॥ दृढ घालोनियां जाण ॥ निर्वाण ध्यान मांडिलें ॥ ७३ ॥ आकर्षूनि देहींचा प्राण ॥ निः
शेष सांडिला देहाभिमान ॥ मग परमपुरुषध्यान ॥ करितांचि आपण तद्रूप झाला ॥ ७४ ॥ जेवीं घटामाजील गगन ॥ सहजें महदा
काश[2] पूर्ण ॥ तेवीं सांडितां देहाभिमान ॥ झाला संकर्षण[3] बळराम ॥ ७५ ॥ होतें मनुष्यनाट्य अवलंबिलें[4] ॥ तें निःशेष देह त्यागिलें ॥
जें कां पूर्वरूप आपुलें ॥ तें होऊनि ठेलें बळिराम ॥ ७६ ॥ समुद्रतीरीं योगासन ॥ तें देह ठेविलें अचेतन ॥ हें रामनिर्याण देखोन ॥
स्वयें श्रीकृष्ण सरसावला ॥ ७७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ रामनिर्याणमालोक्य भगवान् देवकीसुतः ॥ निषसाद धरोपस्थे तूष्णीमासाद्य पिप्प
लम् ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ ॥ बळभद्र झाला देहातीत ॥ हें देखोनि देवकीसुत ॥ भगवान् श्रीकृष्णनाथ ॥ स्वयें इच्छित निजधाम ॥ ७८ ॥
तेव्हां धरातळीं धराधर ॥ मौनें अश्वत्थातळीं[5] स्थिर ॥ वीरासनीं शारंगधर ॥ श्यामसुंदर बैसला ॥ ७९ ॥ ज्याच्या स्वरूपाचे आवडीं ॥
शिवविरिंच्यादि झालीं वेडीं ॥ ज्याच्या दर्शनाची गोडी ॥ दृष्टी नोसंडी[6] क्षणार्ध ॥ १८० ॥ दृष्टीनें चवी चाखिली गाढी ॥ तंव तंव
रसना चरफडी ॥ तिणें कीर्तनरसें रसगोडी ॥ चवी चोखडी चाखिली ॥ ८१ ॥ प्राशनेंवीण कृष्णरस ॥ रसना सेवी अतिसुरस ॥ तेव्हां
विषयरस तो विरस ॥ होय निरस संसार ॥ ८२ ॥ श्रवणीं पडतां कृष्णकीर्ती ॥ त्रिविध तापा उपशांती ॥ ज्याची वर्णितां गुणनामकी
र्ती ॥ चारी मुक्ती कामांग्न्या[7] ॥ ८३ ॥ चरणकमलमकरंद ॥ तुळशीमिश्रित आमोद[8] ॥ सेवितां घ्राणीं परमानंद ॥ इतर गंध ते तुच्छ ॥ ८४ ॥
ज्याचा लागतां अंगसंग ॥ देहबुद्धीचा होय भंग ॥ स्वानंदविग्रही[9] श्रीरंग ॥ अंगप्रत्यंगसुखकारी ॥ ८५ ॥ ज्याचे आवडीं वंदितां पाये ॥
समाधि लाजिली मागें ठाये ॥ तो अश्वत्थातळीं पाहे ॥ बैसला आहे निजशोभा ॥ ८६ ॥ तें अंतकाळींचें कृष्णध्यान ॥ शुकासि आ
ठवलें संपूर्ण ॥ तोही स्वानंदें वोसंडून ॥ श्रीकृष्णध्यान वर्णित ॥ ८७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ बिभ्रच्चतुर्भुजं रूपं भ्राजिष्णु प्रभया स्वया ॥
दिशो वितिमिराः कुर्वन् विधूम इव पावकः ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रांतींचें[10] श्रीकृष्णध्यान ॥ पांचां श्लोकीं निरूपण ॥ श्रोता परीक्षिति
सावधान ॥ वक्ता ज्ञानघन शुकयोगींद्र ॥ ८८ ॥ पिंपळातळीं प्रकाशघन ॥ ते काळींची मूर्ती जाण ॥ निजतेजें देदीप्यमान[11] ॥ दिशा
परिपूर्ण तेणें तेजें ॥ ८९ ॥ ना धूम ना इंगळ ॥ आरक्ततेवीण अग्निज्वाळ ॥ तैशी कृष्णमूर्ती तेजाळ ॥ प्रकाश प्रबळ अतिदीप्त ॥ १९० ॥

---

१ खरें होण्याकरितां. २ आकाश. ३ शेषावतार. ४ स्वीकारिलें. ५ पिंपळाखालीं. ६ टाकीत नाहींत. ७ दासी. ८ सुगंध. ९ आनंदस्वरूप. १० शेवटचें. ११ प्रकाश करणारी.

कृष्णमूर्तीचे निजप्रभा ॥ लोपली रविचंद्रांची शोभा ॥ शून्यत्व ठाव नाहीं नभा ॥ सच्चिदानंदभासाकार ॥ ९१ ॥ चैतन्यतेजें तनु मुसावली ॥ शांतिरसाची वोतिली ॥ चतुर्भुजत्वें रूपा आली ॥ तेणें दिशांची गेली कालिमा ॥ ९२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीवत्सांकं घनश्यामं तप्तहाटकवर्च्चसम् ॥ कौशेयांबरयुग्मेन परिवीतं सुमंगलम् ॥ २९ ॥ सुंदरस्मितवक्त्राब्जं नीलकुंतलमंडितम् ॥ पुंडरीकाभिरामाक्षं स्फुरन्मकरकुंडलम् ॥ ३० ॥ ॥ टीका ॥ ॥ कृष्णमूर्ति स्वच्छ स्वयंभ ॥ अंगीं प्रत्यंगीं बिंबलें नभ ॥ तेणें घनश्यामता[१] शोभ ॥ अतिसप्रभ साजिरी ॥ ९३ ॥ आधींच नेटका[२] श्रीकृष्ण ॥ वरी घनश्यामता बाणली पूर्ण ॥ तेणें मुसावलें बरवेपण ॥ लागलें ध्यान नारीनरां ॥ ९४ ॥ नरनारी बापुड्या किती ॥ संन्यासी भुलोनि ठाती[३] ॥ विरक्त वेधले परमार्थीं ॥ देखोनि मूर्ती कृष्णाची ॥ ९५ ॥ देखतां श्रीकृष्णदर्शन ॥ शिवासि लागलें निजध्यान ॥ पार्वत्यांही[४] निजमन ॥ कृष्णार्पण स्वयें केलें ॥ ९६ ॥ ऐसें अंगींचें बरवेपण ॥ त्याहीवरी हास्यवदन ॥ साजिरें राजीवलोचन ॥ आकर्णपूर्ण आरक्त ॥ ९७ ॥ मस्तकींचे नीलालक[५] ॥ सुगंधसुमनीं गुंफिले चोख ॥ कृष्णीं कृष्णरूप मधुक ॥ कृष्णकेशीं देख विगुंतले ॥ ९८ ॥ स्फुरत्कुंडलें मकराकार ॥ ऐसे वर्णिती कविवर ॥ परी तीं आकारीं निर्विकार ॥ श्रवणें विकार मावळती ॥ ९९ ॥ पावलिया कृष्णश्रवण ॥ आकारविकारां बोळवण ॥ तें श्रीकृष्णश्रवणीं पूर्ण ॥ विराजमान कुंडलें ॥ २०० ॥ तप्तसुवर्णासमान[६] ॥ उभयपीतांबर जाण ॥ एक कासे विराजमान ॥ दुजा प्रावरण शोभत ॥ १ ॥ ब्रह्मण्यदेवो श्रीकृष्ण ॥ लक्ष्मी डावलूनि पूर्ण ॥ दक्षिणांगीं विप्रचरण[७] ॥ श्रीवत्सलांच्छन शोभत ॥ २ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कटिसूत्रब्रह्मसूत्रकिरीटकटकांगदैः ॥ हारनूपुरमुद्राभिः कौस्तुभेन विराजितम् ॥ ३१ ॥ वनमालापरीतांगं मूर्तिमद्भिर्निजायुधैः ॥ कृत्वोरौ दक्षिणे पादमासीनं पंकजारुणम् ॥ ३२ ॥ ॥ टीका ॥ कंठीं कौस्तुभ सोज्ज्वळा ॥ कटीं मिरवे रत्नमेखळा ॥ ब्रह्मसूत्र रुळे गळां ॥ आपाद[८] वनमाळा शोभत ॥ ३ ॥ माथा मुकुटाचें खेवणें ॥ लखलखीत अनर्घ्य[९] रत्नें ॥ कीर्तिमुखें बाहुभूषणें ॥ वीरकंकणें विचित्रें ॥ ४ ॥ यंत्रउपास्तीउपासका ॥ तैशा कराग्रीं करमुद्रिका ॥ त्रिकोण षट्कोण कर्णिका ॥ जडितमाणिका शास्त्रोक्त ॥ ५ ॥ वैजयंती सोहळा ॥ पदक एकावळी गळां ॥ नाना रत्नें हार मुक्ताफळा ॥ तुळशीमाळा सुगंधा ॥ ६ ॥ दोनीं मोतिलग पदर ॥ रत्नें जडित पीतांबर ॥ किंकिणी क्षुद्रघंटा विचित्र ॥ मनोहर शोभती ॥ ७ ॥ वांकी अंदुवांचा गजर ॥ चरणीं नूपुरांचा झणत्कार ॥ रुळे बिरुदांचा तोडर ॥ मनोहर हरिचरण ॥ ८ ॥ रातोत्पळां[१०] कठिणपण ॥ त्यांहूनि सुकुमार चरण ॥ घवघवीत श्रीकृष्ण ॥ शोभा संपूर्ण शोभत ॥ ९ ॥ शंख चक्र गदा कमळ ॥ मूर्तिमंत आयुधें सकळ ॥ आश्रूनियां पिंपळ ॥

---

[१] मेघाप्रमाणें नीलवर्ण. [२] सुंदर. [३] जागचे जागीं तटस्थ राहतात. [४] पार्वतीनेंही. [५] काळे केश. [६] तापल्या सोन्याप्रमाणें. [७] भृगुपद. [८] पायांपर्यंत. [९] अमूल्य. [१०] लालकमळांस.

बैसला केवळ वीरासनीं ॥ २१० ॥ त्या वीरासनाचें लक्षण ॥ तळीं सुनीळ दक्षिण[1] चरण ॥ त्याचे मांडीवरी जाण ॥ वाम[2]चरण आलोहित[3] ॥ ११ ॥ लाजवूनि संध्यारागासी[4] ॥ उणें आणोनि बाळसूर्यासी ॥ चरणशोभा हृषीकेशीं ॥ अतिदीप्तीसी आरक्त ॥ १२॥ ॥ श्लोक ॥ ॥ मुसलावशेषायःखंडकृतेषुर्लुब्धको जरा ॥ मृगास्याकारं तच्चरणं विव्याध मृगशंकया ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ करूनि निजकुळाची होळी ॥ सरस्वतीतीरीं वनमाळी ॥ टेंकोनि बैसला पिंपळीं ॥ चरण निर्वाळी[5] आरक्त ॥ १३ ॥ आरक्त श्रीकृष्णचरण ॥ भावूनि[6] मृग[7]मुखासमान ॥ जराव्याधें विंधिला बाण ॥ अतिसत्राण भेदिला ॥ १४ ॥ ब्रह्मशापाचें मुसल घन ॥ यादवीं पिष्ट[9] करितां जाण ॥ उरला अवशेष लोहकण ॥ तो समुद्रीं जाण टाकिला ॥ १५ ॥ तो पडतांचि समुद्रजळीं ॥ त्यातें मीन सगळेंचि गिळी ॥ त्या मीनातें जराव्याध गळीं ॥ जाळयामेळीं आकळित ॥ १६ ॥ व्याध करी मीनविदारण ॥ तंव निघाला तो लोहकण ॥ त्याचा जराव्याधें केला बाण ॥ तेणें कृष्णचरण विंधिला ॥ १७ ॥ मत्स्योदरींचा लोहघन ॥ त्याचा केलिया दृढ बाण ॥ थोर पारधी साधे संपूर्ण ॥ व्याधें जाणोनि बाण तो केला ॥ १८ ॥ भेदावया कृष्णचरण ॥ मूळीं ब्रह्मशापचि कारण ॥ यालागीं जराव्याधाचा बाण ॥ कृष्णचरणीं पूर्ण खडतरला[10] ॥ १९ ॥ व्याधें अवचितें विंधिला ॥ परी कृष्ण नाहीं दचकला ॥ बाण सत्राणें खडतरला ॥ तेणें सुखी झाला श्रीकृष्ण ॥ २२० ॥ ॥ श्लोक ॥ चतुर्भुजं तं पुरुषं दृष्ट्वा स कृतकिल्बिषः ॥ भीतः पपात शिरसा पादयोरसुरद्विषः ॥ ३४ ॥ ॥ टीका ॥ ॥ बाण श्रीकृष्णीं भेदला ॥ जराव्याधाचा हात पूर्ण निवाला ॥ ह्मणे म्यां मोठा मृग विंधिला ॥ ह्मणोनि धांवला धरावया ॥ २१ ॥ देखोनि चतुर्भुजपुरुषासी ॥ भय सुटलें जराव्याधासी ॥ मज घडल्या महापापराशी ॥ परमपुरुषासी विंधिलें ॥ २२ ॥ ह्मणे कटकट[11] रे अदृष्टा[12] ॥ आचरविलें कर्मा दुष्टा ॥ ऐशिया मज महापापिष्ठा ॥ दुःखदुर्घटा कोण वारी ॥ २३ ॥ जगाचा परमात्मा श्रीहरी ॥ तो म्यां विंधिला बाणवरीं[13] ॥ माझ्या पापास मान थोरी ॥ नाहीं संसारीं आनासीं ॥ २४ ॥ भयें सुटला थोर कंप ॥ मज घडलें हें महापाप ॥ जगाचें जें ध्येय स्वरूप ॥ त्यासि संताप म्यां दीधला ॥ २५ ॥ ज्याचे अमर[14] वंदिती चरण ॥ ज्यासि संत येती लोटांगण ॥ त्या कृष्णासि विंधिला बाण ॥ पाप संपूर्ण मज घडलें ॥ २६ ॥ अवचटें आत्महत्या घडे ॥ तें पाप कदा न झडे ॥ जगाचा आत्मा कृष्ण वाडेंकोडें ॥ ते आत्महत्या पडे मस्तकीं माझे ॥ २७ ॥ जगाचें आत्महनन ॥ कर्ता मी एक पापी पूर्ण ॥ त्या पापाचें पुरश्चरण[15] ॥ सर्वथा जाण दिसेना ॥ २८ ॥ प्रसादें

---

१ उजवा. २ डावा. ३ किंचित् लाल. ४ संध्याकाळच्या अभ्रवर्णांस. ५ अवलोकन करी. ६ समजून. ७ हरिणाच्या तोंडासारिखें. ८ मोठ्या वेगानें. ९ पीठ. १० लागला. ११ हाहारे. १२ दैवा. १३ मोठ्या बाणानें. १४ देव. १५ दूर करण्यास साधन.

ब्रह्महत्या घडे ॥ तेणें पापें तो समूळ बुडे ॥ तें पूर्ण ब्रह्म म्यां पुढें ॥ बाणें सदृढें विंधिलें ॥ २९ ॥ कर्मपापी मी व्याधरूप ॥ तेणें जोडलें पाप अमूप[1] ॥ कृष्ण परमात्मा चित्स्वरूप ॥ त्यासिही संताप दीधला म्यां ॥ २३० ॥ तेणें अनुतापें तप्त पूर्ण ॥ धांवोनि घाली लोटांगण ॥ श्रीकृष्णाचे श्रीचरण ॥ मस्तकीं जाण दृढ धरिले ॥ ३१ ॥ मर्दी दैत्यांचा अभिमान ॥ मधुद्वेष्टा मधुसूदन ॥ त्याचे दृढ धरूनि चरण ॥ करी रुदन अट्टहासें[2] ॥ ३२ ॥ चरणीं घातली परम मिठी ॥ उठवितां कदा नुठी ॥ मज क्षमा करी कृपादृष्टी ॥ कृपाळु सृष्टीं तूं एक ॥ ३३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अजानता कृतमिदं पापेन मधुसूदन ॥ क्षंतुमर्हसि पापस्य उत्तमश्लोक मेऽनघ ॥ ३५ ॥ ॥ टीका ॥ ॥ अतिभीत जराव्याध ॥ ह्मणे मी पापात्मा अतिअशुद्ध ॥ नेणतां घडला हा अपराध ॥ लिंगभेदं[3] मज घडला ॥ ३४ ॥ जो ईश्वरप्रतिमा उच्छेदी ॥ तो महापापी लिंगभेदी ॥ त्या तुज ईश्वरासि म्यां दुर्बुद्धीं ॥ अदृष्टविधीं[4] विंधिलें ॥ ३५ ॥ ऐसा मी पापी पापकर्मा ॥ महापापी जो पापात्मा ॥ माझा अपराध करावा क्षमा ॥ पुरुषोत्तमा कृपाळुवा ॥ ३६ ॥ तूं कृपाळु त्रिजगतीं ॥ गर्भीं राखिला परीक्षिती ॥ गजेंद्राचे अतिआक्रांतीं ॥ उडी कृपामूर्त्तीं घातली ॥ ३७ ॥ पांडव जळतां जोहरीं[5] ॥ तुवां काढिलें विवरद्वारीं ॥ शेखीं अर्जुनाचा कैवारी ॥ घेशी झुंझारी भीष्मासी ॥ ३८ ॥ द्रौपदीचे अतिसांकडीं[6] ॥ धांवलासि लवडसवडीं[7] ॥ तिळभरी न दिसतां उघडी ॥ नेसतीं[8] लुगडीं तूं होसी ॥ ३९ ॥ ऐशी कृपाळुत्वाची ख्याती ॥ श्रुतिपुराणें वाखाणिती ॥ तुझी उत्तमश्लोक कीर्ती ॥ ऋषि वर्णिती महासिद्ध ॥ २४० ॥ नेणतां आचरलों दुष्कर्मा ॥ तें मज करावया क्षमा ॥ तूं कृपाळु परमात्मा ॥ पुरुषोत्तमा क्षमाशीळ ॥ ४१ ॥ अजामिळ दुराचारी ॥ पुत्रलोभें नाम उच्चारी ॥ त्याचे पापाची झाली बोहरी ॥ ऐशी निष्पाप थोरी नामाची ॥ ४२ ॥ नामें निष्पाप दुर्मती ॥ नामें निष्पाप पितृघाती ॥ नामें दुराचारी तरती ॥ हे निष्पाप ख्याती नामाची ॥ ४३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यस्यानुस्मरणं नृणामज्ञानध्वांतनाशनम् ॥ वदंति तस्य ते विष्णो मयाऽसाधु कृतं प्रभो ॥ ३६ ॥ ॥ टीका ॥ ॥ ज्या विष्णूचें नामस्मरण ॥ कोटिजन्मांचें अज्ञानघन ॥ नराचें निर्दळूनि[9] पूर्ण ॥ सकळकल्याणदायक ॥ ४४ ॥ ऐसें ज्याचें नामस्मरण ॥ त्याचे स्वरूपासि म्यां जाण ॥ बळें विंधिला निर्वाण बाण ॥ अपराध पूर्ण हा माझा ॥ ४५ ॥ ज्याचें अगाधं[10] महिमान ॥ सदा वर्णिती साधु सज्जन ॥ जो सर्वरूपें सच्चिद्घन ॥ स्वामी श्रीकृष्ण जगाचा ॥ ४६ ॥ जगाचें जीवन श्रीकृष्ण ॥ त्या कृष्णासही मी आपण ॥ विंधिला निर्वाणींचा बाण ॥ हा अपराध पूर्ण पैं माझा ॥ ४७ ॥ त्रैलोक्यराजा कृष्ण समर्थ ॥ तो म्यां केला राजघात ॥ जगाचा आत्मा श्रीकृष्णनाथ ॥ तो आत्मघात[11] म्यां केला ॥ ४८ ॥ श्रीकृष्ण

---

[1] असंख्य. [2] आक्रोशानें. [3] ईश्वरप्रतिमाभेद. [4] दुर्दैवानें. [5] लाक्षागृहीं. [6] मोठ्या संकटांत. [7] लगबगीनें. [8] नेसावयाचीं. [9] नाश. [10] अनंत. [11] आत्महत्या.

जगाचा जनिता[1] ॥ त्या म्यां केलें पितृघाता ॥ जगप्रतिपाळणी श्रीकृष्णमाता ॥ त्या मातृघाता म्यां केलें ॥ ४९ ॥ श्रीकृष्ण ब्राह्मण
ब्रह्मण्यबोध ॥ तो म्यां केला ब्रह्मवध ॥ याहीहोनि अगाध ॥ जगीं अपराध असेना ॥ २५० ॥ राजघात आत्मघात ॥ मातृपितृब्रह्मघात
॥ मजचि घडला समस्त ॥ जे म्यां श्रीकृष्णनाथ विंधिला ॥ ५१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तमाशु जहि वैकुंठ पाप्मानं मृगलुब्धकम् ॥
यथा पुनरहं त्वेवं न कुर्यां सदतिक्रमम् ॥ ३७ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐशिया मज पापरूपासी ॥ कृपा करावी हृषीकेशी ॥ निष्कृति[2] होय या
पापासी ॥ त्या उपायासी करा वेगीं ॥ ५२ ॥ कोरडिये कृपेचा संबंध ॥ तेणें न फिटे दोषबाध ॥ माझा जेव्हां तूं करिसी वध ॥ तेव्हां
मी शुद्ध होईन ॥ ५३ ॥ मी लुब्धक पापबुद्धी ॥ मृगलोभी पशुपारधी[3] ॥ त्या मज तूं निजहस्तें वधी ॥ तैं मी त्रिशुद्धीं[4] उद्धरलों ॥ ५४ ॥
जेणें देहें केलें पापकर्मा ॥ तो देह निवटी[5] पुरुषोत्तमा ॥ पुढती ऐशिया असत्कर्मा ॥ न करीं अधर्मा तैसें करीं ॥ ५५ ॥ बाण विंधिला
तुझिया पायां ॥ हें अगाध पाप केलें कायां[6] ॥ तीसि शीघ्र वधावें यदुराया ॥ तैं महापापा या निस्तारू ॥ ५६ ॥ जेणें देहें केलें पापाचरण
॥ त्याचें प्रायश्चित्त हेंचि पूर्ण ॥ करी निजहस्तें देहदंडण ॥ ह्मणोनि चरण दृढ धरिले ॥ ५७ ॥ देहें केलें पापाचरण ॥ देहलोभी
तो पापी पूर्ण ॥ स्थूल लिंग[7] आणि कारण ॥ यांचें करी छेदन निजचक्रें ॥ ५८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यस्यात्मयोगरचितं न विदुर्विरिंचो
रुद्रादयोऽस्य तनयाः पतयो गिरां ये ॥ त्वन्मायया पिहितदृष्टय एतदंञ्जः किं तस्य ते वयमसद्गतयो गृणीमः ॥ ३८ ॥ ॥ टीका ॥ ॥ देहसंभवाचें
मूळ जाण ॥ स्थूळ सूक्ष्म आणि कारण ॥ यांसि नातळतां तूं श्रीकृष्ण ॥ चतुर्भुज संपूर्ण देह धरिसी ॥ ५९ ॥ स्थूळ सूक्ष्म कारणता
॥ ये तिन्हीं त्रिगुणेंसि नातळता ॥ तूं योगमायेची सत्ता ॥ नाना अवतारता देह धरिसी ॥ २६० ॥ नवल तुझा लीलाविग्रहो ॥
मत्स्य कूर्म श्वेतवराहो ॥ होतां न धरिसी संदेहो ॥ जन्मभयो तुज नाहीं ॥ ६१ ॥ वोडवल्या जन्म एक ॥ ब्रह्मादि होती रंकें[8] ॥ तो तूं
अवतार अनेक ॥ धरिसी निःशंक निजात्मता ॥ ६२ ॥ अदृष्टाचिये निजगतीं ॥ देहासि नाना भोग होती ॥ तूं अदृष्टेंवीण श्रीपती ॥
नाना भोगसंपत्ती भोगिसी ॥ ६३ ॥ आयुष्य तंव देहधारण ॥ वेदें नेमस्त केलें जाण ॥ नवल तुझें लीलाविंदान ॥ आयुष्येंवीण देह
धरिसी ॥ ६४ ॥ काळसत्ता दुर्धर पूर्ण ॥ ब्रह्मादिकां अलोट[9] मरण ॥ तुज काळ वेळ नसतां जाण ॥ स्वलीला मरण दाविसी ॥ ६५ ॥
तुझे योगमायेची योगगती ॥ लीलाविग्रहें देहस्थिती ॥ अतर्क्य सर्वांसि सर्वार्थीं ॥ तेही उपपत्ती निर्धारी ॥ ६६ ॥ ब्रह्मा जगाचा आदि
कर्ता ॥ त्यासही न कळे तुझी सत्ता ॥ तूं नाना अवतारीं देहधर्त्ता ॥ तया तुज कर्ता नव्हे ब्रह्मा ॥ ६७ ॥ तूं स्वलीला देह कैसा धरिसी ॥

---

[1] पिता. [2] प्रायश्चित्त. [3] श्वापदांचो हिंसा करणारा. [4] निश्चयानें. [5] नष्ट कर. [6] देहानें. [7] प्राणी मुक्त होईपर्यंत जो निरंतर फलभोगाकरितां असतो तो. [8] दीन. [9] निवारण न करितां येणारें.

अवतारचरित्रें कैसीं करिशी ॥ कैसेंनि देह सांडिसी ॥ हें ब्रह्मादिकांसी कळेना ॥ ६८ ॥ ज्यासि तूं मानिसी अतिसन्माननीं ॥ सदाशिव[1]
जो त्रिकाळज्ञानी ॥ त्यासिही तुझी अतर्क्य करणी ॥ शार्ङ्गपाणी श्रीकृष्णा ॥ ६९ ॥ सदाशिवाचे निजवचनीं ॥ तूं दुजेनें[2] झालासि
मोहिनी ॥ ते शिवासि न कळे करणी ॥ तत्क्षणीं तो भुलला ॥ २७० ॥ जाणोनि योग ज्ञान दोनी ॥ सनकादिक ब्रह्मज्ञानी ॥ जीहीं
मायापडळ[3] छेदूनी ॥ स्वानंदभुवनीं सुखरूप ॥ ७१ ॥ त्यांसिही तुझी स्वलीलाशक्ती ॥ सर्वथा न कळेचि श्रीपती ॥ जयविजयां[4] शाप
देती ॥ सकोपस्थिती वैकुंठीं ॥ ७२ ॥ पारंगत वेदशास्त्रार्थी ॥ बृहस्पत्यादि वाचस्पती[5] ॥ त्यांसिही लीलाविग्रहस्थिती ॥ न कळे निश्चितीं
श्रीकृष्णा ॥ ७३ ॥ सज्ञान ज्ञाते जे परमार्थी ॥ त्यांसिही तुझी अवतारशक्ती ॥ न कळे मा[6] देवांसि ते स्थिती ॥ कैशा रीतीं कळेल ॥ ७४ ॥
इंद्रादिदेवां दिविभोगनिष्ठा[7] ॥ माया आच्छादी तयांच्या दृष्टी ॥ त्यांसि तुझे लीलेची गोष्टी ॥ न कळे जगजेठी निश्चित ॥ ७५ ॥ तेथ
माया विदेहवर्ती[8] ॥ उद्बोध[9] नव्हे पैं सर्वथा ॥ तुझी लीला श्रीकृष्णनाथा ॥ अतर्क्य सर्वथा सर्वांसी ॥ ७६ ॥ सुखें होईल ब्रह्मज्ञान ॥ परी
तुझें स्वलीला देहधारण ॥ याचें नेणती पर्यवसानें[10] ॥ अतिसज्ञान साकल्यें[11] ॥ ७७ ॥ तेथ मी तंव अधम जन ॥ असद्वृत्तीचें भाजनें[12] ॥
त्या मज तुझें लीलावर्णन ॥ सर्वथा जाण अतर्क्य ॥ ७८ ॥ आतां असो हें निरूपण ॥ बहुबोलाचें काय कारण ॥ माझ्या पापाचें
पुरश्चरण[13] ॥ देहदंडण करी कृष्णा ॥ ७९ ॥ तुझेनि हस्तें देहदंडण ॥ तेणें सकळ पापां निर्दळण ॥ मज उद्धरावया जाण ॥ हे कृपा पूर्ण
करावी ॥ २८० ॥ ह्मणोनि घातलें लोटांगण ॥ धांवोनि धरिले दोनी चरण ॥ ऐकोनि व्याधाचें स्तवन ॥ कृपा श्रीकृष्ण तुष्टला ॥ ८१ ॥
॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ मा भैर्जरे त्वमुत्तिष्ठ काम एष मतो हि मे ॥ याहि त्वं मदनुज्ञातः स्वर्गं सुकृतिनां पदम् ॥ ३९ ॥
॥ टीका ॥ ॥ जो वेदार्थीचा मथित बोध ॥ जो जगदादि आनंदकंद ॥ जो स्वरूपें स्वानंद शुद्ध ॥ तो व्याधेंसि गोविंद सकृप बोले ॥ ८२ ॥
तूं जीवघातक पारधी ॥ भय मानिसी ममापराधीं ॥ तुज अभय गा त्रिशुद्धी ॥ माझी कार्यसिद्धी त्वां केली ॥ ८३ ॥ कुमारीं सांब
केला स्त्रीरूप ॥ कपटें ब्राह्मणा आला कोप ॥ कुळासि झाला ब्रह्मशाप ॥ हा त्रिविध[14] संकल्प माझाची ॥ ८४ ॥ शापावशेष लोह जाण
॥ त्याचा तुवां करोनि बाण ॥ मृगलोभें विंधिला चरण ॥ त्यासही कारण संकल्प माझा ॥ ८५ ॥ मी बुद्धीची अनादि बुद्धी ॥ मी
क्रियेची क्रिया त्रिशुद्धी ॥ तेथें अहंकर्तृत्वाचे[15] विधीं ॥ तूं वृथा अपराधी ह्मणविसी ॥ ८६ ॥ मिथ्या धरूनि देहाभिमान ॥ ह्मणसी

---

१ शंकर. २ दुसऱ्यानें. ३ मायारूप पडदा, उपाधि. ४ द्वारपालांस. ५ वाचेचे नियंते. ६ मग. ७ स्वर्गभोगांची इच्छा. ८ मुक्तांस. ९ ज्ञान. १० निश्चय. ११ सर्वप्रकारें. १२ पात्र. १३ प्रायश्चित्त. १४ कायिक, वाचिक, मानसिक. १५ मी कर्त्ता या बुद्धीनें.

घडलें पाप पूर्ण ॥ त्याही पापासि पुरश्चरण ॥ माझें दर्शन मुख्यत्वें ॥ ८७ ॥ माझिया नामा एकासाठीं ॥ जळती महापातकें कोटी ॥ त्या मज देखिलें दृष्टीं ॥ परमभाग्यें भेटी घडली तुज ॥ ८८ ॥ माझी घ्यावया क्षणार्ध भेटी ॥ एक रिघाले कडीं कपाटीं ॥ एक योगयागसंकटीं ॥ झाले महाहटी नेमस्त ॥ ८९ ॥ एवं नानानेमआटाटी ॥ शिणातांही संकल्पकोटी ॥ स्वप्नींही न लभे[1] माझी भेटी ॥ त्या मज त्वां दृष्टीं देखिलें ॥ २९० ॥ माझें होतांचि दर्शन ॥ सकळ पातकां निर्दळण ॥ तूं पुण्यात्मा परिपूर्ण ॥ पापाभिमान[2] धरूंनको ॥ ९१ ॥ तूं ऐसें मानिसी आपण ॥ परब्रह्म परमात्मा श्रीकृष्ण ॥ त्यासि विंधिला निर्वाण बाण ॥ हें पाप दारुण अनिवार ॥ ९२ ॥ लोहपरिसां आलिंगन ॥ तेणें लोह[3] होय सुवर्ण ॥ त्यासि फोडूं आल्या लोहघण ॥ आघातें सुवर्ण तो होय ॥ ९३ ॥ तेवीं भक्तीं घेतल्या माझी भेटी ॥ पातकें जाती उठाउठी ॥ कां द्वेषें देखिल्या मज दृष्टीं ॥ पातकां तुटी तत्काळ ॥ ९४ ॥ होकां इतरांच्या अपराधता ॥ प्राणी पावे अधःपाता ॥ तोचि अपराध ममागता[4] ॥ नित्यमुक्तता अपराध्यां ॥ ९५ ॥ तो ममापराधें नरक पावे ॥ तैं माझें सामर्थ्य बुडालें आघवें ॥ माझेनि अपराधें सुख पावे ॥ मुक्तवैभवें भयनिर्मुक्त ॥ ९६ ॥ विष ह्मणोनि अमृतपान ॥ केल्या अमरत्व न चुके जाण ॥ तेवीं द्वेषेंही माझें दर्शन ॥ करी पावन प्राण्यासी ॥ ९७ ॥ जाणोनि अग्नि लाविला घरीं ॥ तो जाळूनि सर्वही भस्म करी ॥ नेणतां ठेविला वळचणीवरी ॥ तोही करी तैसेंची ॥ ९८ ॥ तेवीं भावें अथवा द्वेषें पूर्ण ॥ ज्यासि घडे माझें दर्शन ॥ तो होय परम पावन ॥ हें सत्य जाण जराव्याधा ॥ ९९ ॥ मज ठाकावया[5] निजधाम ॥ त्वां सिद्ध केलें माझें काम ॥ तेणें तुष्टलों मी आत्माराम ॥ तूं पावन परम तिहीं लोकीं ॥ ३०० ॥ ज्या नांव ह्मणसी पाप पूर्ण ॥ जेणें देहें मज विंधिला बाण ॥ तेणें देहें तूं आपण ॥ होसी स्वर्गभूषण सुरवंद्य ॥ १ ॥ याग करूनि याज्ञिक ॥ पावती सुख पतनात्मक ॥ तैसें तुज न घडे देख ॥ तूं अक्षय सुख पावसी ॥ २ ॥ माझिया दर्शनाचें पुण्य ॥ दिविभोगें[6] नव्हे क्षीण ॥ यालागीं अक्षय सुख संपूर्ण ॥ तूं सर्वथा जाण पावसी ॥ ३ ॥ तूं विकल्प[7] सांडोनियां पोटीं ॥ जराव्याधा सवेग[8] उठी ॥ मिथ्या नव्हती माझ्या गोष्टी ॥ तूं अक्षय तुष्टी पावसी ॥ ४ ॥ तूं ऐसें जीवीं[9] कल्पिसी[10] ॥ आपण निघालां निजधामासी ॥ मागें म्यां अक्षयसुखासी ॥ कोणापाशीं मागावें ॥ ५ ॥ ऐसें बोलती इतर लोक ॥ ममाज्ञा तैसी नव्हे देख ॥ ठाकठोक आतांचि रोख ॥ अक्षय सुख पावसी ॥ ६ ॥ माझे आज्ञेचें लाहोनि[11] बळ ॥ ध्रुव अद्यापि झाला अढळ ॥ माझी आज्ञा वंदी काळ ॥ कोण आटोळ[12]

---

१ मिळे. २ माझ्या हातून पाप घडलें असा अभिमान. ३ लोखंड. ४ माझ्या विषयींच जर असेल. ५ जाण्यास. ६ स्वर्गभोगावें. ७ संशय. ८ लवकर. ९ मनांत. १० आणशील. ११ मिळून. १२ हयगय.

करूं शके ॥ ७ ॥ ऐसें श्रीमुखें आपण ॥ जंव बोलोंने[1] शके श्रीकृष्ण ॥ तंव घवघवीत विमान ॥ व्याधासि जाण उतरलें ॥ ८ ॥ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ इत्यादिष्टो भगवता कृष्णेनेच्छाशरीरिणा ॥ त्रिः परिक्रम्य तं नत्वा विमानेन दिवं ययौ ॥ ४० ॥ ॥ टीका ॥ ॥ जो पूजिजे सुरासुरीं ॥ जो परमात्मा चराचरीं ॥ जो लीलाविग्रहदेहधारी ॥ जो योगीश्वरीं वंदिजे ॥ ९ ॥ ऐसा अतिवरिष्ठ श्रीकृष्ण ॥ तेणें जराव्याध आज्ञापून ॥ कृष्णइच्छामात्रें विमान ॥ देदीप्यामान जें आलें ॥ ३१० ॥ व्याधें देखोनि विमाना ॥ हर्षें निर्भर झाला मनां ॥ तीन प्रदक्षिणा करूनि कृष्णा ॥ नमूनि विमानां आरूढे[2] ॥ ११ ॥ व्याध आरूढोनि विमानां ॥ क्रमूनि[3] इंद्रचंद्रग्रहगणा ॥ अक्षयी सुख स्वर्गभुवना ॥ कृष्णकृपें जाणा तो पावला ॥ १२ ॥ जेणें अपकार केला पूर्ण ॥ त्यासि उपकार करावा आपण ॥ हें निजशांतिज्ञान ॥ स्वांगें श्रीकृष्ण स्वयें दावी ॥ १३ ॥ ब्रह्मज्ञानाचे बोल[4] बोलती ॥ तैसें नाहीं कृष्णनाथीं ॥ अंगें दावूनियां स्थिती ॥ व्याध निश्चिंतीं उद्धरिला ॥ १४ ॥ सकळकुळाचें निर्दळण ॥ झाल्या मोह न धरी श्रीकृष्ण ॥ जेणें निजांगें विंधिला बाण ॥ तो व्याधही जाण सुखी केला ॥ १५ ॥ समुद्रतीरीं घेऊनि रथ ॥ दारुक[5] उभा होता तेथ ॥ तेणें न देखतां श्रीकृष्णनाथ ॥ गवेषणार्थ[6] निघाला ॥ १६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ दारुकः कृष्णपदवीमन्विच्छन्नधिगम्य ताम् ॥ वायुं तुलसिकामोदमाघ्रायाभिमुखं ययौ ॥ ४१ ॥ ॥ टीका ॥ ॥ कृष्ण न देखतां दारुक ॥ कासावीस झाला देख ॥ शोधीत श्रीकृष्णपदांक[7] ॥ पृथ्वी सम्यक[8] अवलोकी ॥ १७ ॥ तंव कृष्णकंठींच्या तुळसीमाळा ॥ त्यांचा आमोद[9] दारुका आला ॥ तेणें गंधाभिमुख निघाला ॥ तंव देखता झाला महातेज ॥ १८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तं तत्र तिग्मद्युभिरायुधैर्वृतं ह्यश्वत्थमूले कृतकेतनं पतिम् ॥ स्नेहप्लुतात्मा निपपात पादयोरथादवप्लुत्य स बाष्पलोचनः ॥ ४२ ॥ ॥ टीका ॥ ॥ तंव धगधगी तेजागळा ॥ दिव्य आयुधांचा मेळा ॥ त्यांमाजी घनसांवळा ॥ श्रीकृष्ण डोळां देखिला ॥ १९ ॥ अश्वत्थातळीं धरूनि स्थान ॥ घालूनियां वीरासन ॥ निजतेजें विराजमान ॥ दारुकें श्रीकृष्ण देखिला स्वयें ॥ ३२० ॥ कृष्ण देखतां लवडसवडीं[10] ॥ रथाखालीं घालूनि उडी ॥ पोटिंच्या सप्रेम आवडीं ॥ धरिलें तांतडी हरिचरण ॥ २१ ॥ नेत्रीं अश्रूंचिया धारा ॥ अंग कांपे थरथरा ॥ तुजवेगळें शार्ङ्गधरा ॥ अंधतम[11] नेत्रा दृढ दाटे ॥ २२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अपश्यतस्त्वच्चरणांबुजं प्रभो दृष्टिः प्रनष्टा तमसि प्रविष्टा ॥ दिशो न जाने न लभे च शांतिं यथा निशायामुडुपे प्रनष्टे ॥ ४३ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐक स्वामी श्रीकृष्णा ॥ न देखतां तुझिया श्रीचरणा ॥ जगदांध्य पडे नयना ॥ दिशांची गणना गणी कोण ॥ २३ ॥ ज्ञानेंसि मावळला विवेक ॥ अणुमात्र न लभे सुख ॥ तुज न देखतां मी देख ॥ जड मूढ मूर्ख

---

१ बोलत आहे. २ बसूं लागला. ३ उल्लंघून. ४ गोष्टी. ५ या नांवाचा सारथि. ६ शोधाकरितां. ७ कृष्णाचीं पावलें. ८ नीट. ९ सुवास. १० मोठ्या त्वरेनें. ११ अत्यंत काळोख.

होऊनि ठेलों ॥ २४ ॥ जेवीं नष्टचंद्राचिये[1] रात्रीं ॥ निबिड अंवसेचिये आंधारीं ॥ तेवीं तुजवीण श्रीहरी ॥ दृढ दाटे संसारीं अंधतम पैं गा
॥ २५ ॥ तुझे देखतांचि श्रीचरण ॥ अंधतमा निर्दळण ॥ जेवीं प्रकटतां रविकिरण ॥ अंधारेंसी जाण निशा नासे ॥ २६ ॥ ॥ श्लोक ॥
इति ब्रुवति सूते वै रथो गरुडलांछनः ॥ खमुत्पपात राजेंद्र साश्वध्वज उदीक्षतः ॥ ४४ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐसें विनवी जंव दारुक ॥ तंव
परमाश्चर्य कांहीं एक ॥ देखता झाला अलोलिक ॥ पांखेंवीण[2] देख उडाला रथू ॥ २७ ॥ चहूं वारुवांसंयुक्त[3] ॥ गरुडध्वजेंसि कृष्णरथ ॥
ऊर्ध्वगती गगनाआंत ॥ दारुकादेखत उडाला ॥ २८ ॥ शुक ह्मणे परीक्षिती ॥ निजधामा[4] जातां श्रीपती ॥ आपुली ऐश्वर्यसंपत्ती ॥
स्वेच्छा ऊर्ध्वगती स्वयें नेत ॥ २९ ॥ इह लोकीं ठेवूनि कीर्ती ॥ निजवैभवविलाससंपत्ती ॥ आवरूनियां निजशक्ती ॥ स्वयें ऊर्ध्वगती स्वसत्ता
नेत ॥ ३३० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तमन्वगच्छन् दिव्यानि विष्णुप्रहरणानि च ॥ तेनातिविस्मितात्मानं सूतमाह जनार्दनः ॥ ४५ ॥
॥ टीका ॥ ॥ रथ जातां ऊर्ध्वमंडळ ॥ शंख चक्र गदा कमळ ॥ तदनुलक्षित[5] तत्काळ ॥ दिव्यायुधें सकळ निघालीं ॥ ३१ ॥ ऊर्ध्वमंडळीं
उडाला रथ ॥ दिव्यायुधेंही समस्त ॥ तें देखोनि अतिविस्मित ॥ ठेला तटस्थ दारुक ॥ ३२ ॥ धुरें बैसोनियां नित्य ॥ मी वागवीं श्रीकृष्णरथ
॥ तो रथ ऊर्ध्वगतीं कृष्ण नेत ॥ मज कां एथ सांडिलें ॥ ३३ ॥ मज सांडूनियां गोविंदें ॥ नेलीं आपुलीं दिव्यायुधें ॥ मी अभाग्य
भाग्यमदें ॥ त्यजिलों मुकुंदें निश्चित ॥ ३४ ॥ म्यां उडी घातली रथाखालती ॥ हेचि माझी मंदमती[6] ॥ येरवी मीही जातों ऊर्ध्वगती ॥
कां श्रीपती रुसलासी ॥ ३५ ॥ जेणें चरणीं विंधिला बाण ॥ तो व्याधही उद्धरिला जाण ॥ मी भाग्यें अभाग्य पूर्ण ॥ यालागीं श्रीकृष्ण
मज त्यागी ॥ ३६ ॥ नित्य कृष्ण दृष्टीं पडे ॥ धुरें बैसोनि वागवीं घोडे ॥ तो मी कृष्णावेगळा पडें ॥ भाग्य कुंडें[7] पैं माझें ॥ ३७ ॥
मी श्रीकृष्णाचा सारथी ॥ ऐशी त्रिलोकीं झाली ख्याती ॥ तो मी वेगळा पडें अंतीं ॥ कां श्रीपती रुसलासी ॥ ३८ ॥ यावज्जन्म भोगिलें
कृष्णसुख ॥ त्या मज वोडवलें[8] वियोगदुःख ॥ कृष्णा कां झालासि विमुख ॥ मी दीन रंक पैं तुझें ॥ ३९ ॥ माझा बोल अणुभरी ॥
नाहीं अव्हेरिला हरी ॥ त्या मज आतां तूं श्रीहरी ॥ अतिदुर्धरीं[9] दुराविशीं[10] कां ॥ ३४० ॥ अपराधीं तारिलें व्याधासी ॥ अश्वध्वजेंसि
रथ नेसी ॥ तो तूं मज उद्धरावयासी ॥ कां उबगलासी गोविंदा ॥ ४१ ॥ ऐसा अवस्थाभूत पूर्ण ॥ पाहतां श्रीकृष्णाचें वदन ॥ दारुकासि
आलें रुदन ॥ आसुवीं[11] नयन लोटले ॥ ४२ ॥ दीर्घस्वरें देऊनि हांक ॥ दारुक रडे अधोमुख[12] ॥ अंतीं श्रीकृष्ण झाला विमुख ॥ हें अतिदुःख
मज माझें ॥ ४३ ॥ दुःखें चरफडीत मोठा ॥ करें पिटीत ललाटा ॥ मर मर विधातया नष्टा ॥ वोखटें अदृष्टा कां लिहिलें ॥ ४४ ॥

---

१ चंद्र नाहीं अशा. २ पक्षांवांचून. ३ घोड्यांसहित. ४ वैकुंठास. ५ त्यांमागून. ६ चूक. ७ होन. ८ प्राप्त झालें. ९ घोर संकटांत. १० दूर टाकितोस. ११ अश्रूंनीं. १२ खालीं तोंड घालून.

मग ह्मणे श्रीकृष्णनाथा ॥ तुजपुढें बापुडा विधाता ॥ तुजवेगळा मी राहतां ॥ अतिदीनता पावेन ॥ ४५ ॥ तुझेनि बळें श्रीकृष्णा ॥
म्यां कळिकाळा घातला आंकणा[1] ॥ तो मी काळाचा वोळंगणा[2] ॥ कां करिसी पोसणा जगाचा ॥ ४६ ॥ ऐसें ऐकोनियां वचन ॥ नांभी[3]
ह्मणे जनार्दन ॥ मग आश्वासून पूर्ण ॥ गुह्य आलोचन सांगत ॥ ४७॥ आजिच्या काळाचे काळगती ॥ तूं एक उरलासि निकट[4]
वर्ती ॥ तुज म्यां राखिलें निजकार्यार्थी ॥ वेगीं द्वारावतीं तूं जाईं ॥ ४८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ गच्छ द्वारवतीं सूत ज्ञातीनां निधनं
मिथः ॥ संकर्षणस्य निर्याणं बंधुभ्यो ब्रूहि मद्दशाम् ॥ ४६ ॥ द्वारकायां च न स्थेयं भवद्भिः स्वस्वबंधुभिः ॥ मया त्यक्तां यदुपुरीं
समुद्रः प्लावयिष्यति ॥ ४७ ॥ स्वं स्वं परिग्रहं सर्वे आदाय पितरौ च नः ॥ अर्जुनेनाविताः सर्व इंद्रप्रस्थं गमिष्यथ ॥ ४८ ॥
॥ टीका ॥ ॥ तुवां जाऊनियां त्यांपाशीं ॥ शीघ्र सांगावें समस्तांसी ॥ कोणी न रहावें द्वारकेसीं ॥ निघावें वेगेंसी ममाज्ञा ॥ ४९ ॥
द्वारका त्यागावयाचें कारण ॥ तुज मी सांगेन आपण ॥ दारुका तूं अतिसज्ञान ॥ विश्वास पूर्ण मज तुझा ॥ ३५० ॥ यालागीं तुज
राहवूनि एथ ॥ अंतकाळींचें गुज सांगत ॥ तुवां जाऊनि द्वारकेंत ॥ बाहेर समस्त काढावे ॥ ५१ ॥ बाहेर काढावयाचें कारण ॥ म्यां
द्वारका त्यागिल्या[5] जाण ॥ समुद्र येऊनि आपण[6] ॥ नगर संपूर्ण बुडवील ॥ ५२ ॥ ठाँव[7] मागूनि समुद्रापाशीं ॥ म्यां वसविलें द्वारकेसी ॥
मज गेलिया निजधामासी ॥ तो अवश्यतेंसी बुडवील ॥ ५३ ॥ यालागीं सत्वर गमन ॥ शीघ्र करावें आपण ॥ माझीं माता पिता समस्त
जन ॥ द्वारकेहून काढावे ॥ ५४ ॥ जंव समुद्र बुडविना तो ठावो ॥ तंववरी आपुला समुदावो ॥ घेऊनि सकळ परिग्रहो[8] ॥ शीघ्रं[9]तर
पहाहो निघावें ॥ ५५ ॥ झालिया राज्यलोट ॥ चोराकुळित होईल वाट ॥ कोणी नवजावें एकवटें[10] ॥ अवघी एक वाट करावी ॥ ५६ ॥
अर्जुनाचेनि सांगातें ॥ एकत्र मिळूनि समस्तें ॥ शीघ्र जावें इंद्रप्रस्थातें ॥ तो मार्गीं त्यांतें रक्षील ॥ ५७ ॥ ऐसें ऐकतां कृष्णवचन ॥
दारुकासि आलें रुदन ॥ न वचे सांडूंपाहे प्राण ॥ जळेंवीण मीन जैसा ॥ ५८ ॥ निजकुळासि करूनि घात ॥ गेला गेला रे श्रीकृष्ण
नाथ ॥ मी काळमुखा[11] द्वारकेआंत ॥ जावों हा वृत्तांत सांगावया ॥ ५९ ॥ गिळूंनि[12] श्रीकृष्णनिजसुखा ॥ ह्मणती हा आला काळमुखा ॥
सकळ जगाचिया दुःखा ॥ सूचंक[13] देखा मी होईन ॥ ३६० ॥ ऐकतां माझिया वचनासी ॥ प्राणांत होईल सर्वांसी ॥ एवढें द्यावया महा
दुःखासी ॥ न वचे हृषीकेशी मी तेथें ॥ ६१ ॥ ज्यांसि म्यां सांगावी हे वार्ता ॥ त्यांच्या करावें जीवघाता ॥ एवढी घोर निष्ठुरता ॥ नव्हे[14]

---

१ दाव. २ दास. ३ भिऊं नकोस. ४ जवळ. ५ सोडल्यावर. ६ आपोआप. ७ जागा. ८ बायकामुळें. ९ अतिलवकर. १० एकटें. ११ काळतोंड्या. १२ नष्ट करून. १३ स्मरण करविणारा. १४ होणार नाहीं.

कृष्णनाथा माझेनी ॥ ६२ ॥ बहुतां मुंग्यांच्या विवरासी ॥ जेवीं आगि लावावी हृषीकेशी ॥ तेवीं हे वार्ता द्वारकेसी ॥ म्यां सुहृदांपाशीं
सांगावी ॥ ६३ ॥ जेवीं फळते फुलते वनीं ॥ भडकेनि लावावा दावाग्नी ॥ तैसा भडका हा सुहृदांचे कानीं ॥ कृष्णनिधनाग्नी कोण
लावी ॥ ६४ ॥ जेवीं बुडतयाचे माथां ॥ पाषाण न देववे सर्वथा ॥ तेवीं कृष्णासहित कुळाच्या घाता ॥ मी नव्हे सांगता सुहृदांसी
॥ ६५ ॥ सुख द्यावें सुहृदांसी ॥ तें राहिलें हृषीकेशी ॥ घेऊनियां महादुःखांचिया राशी ॥ सुहृदांपाशीं मी नवचें ॥ ६६ ॥ आशं
का ॥ ह्मणसी जन्मवरी अवज्ञा[2] ॥ तुवां नाहीं केली अतिप्रज्ञा ॥ तो तूं अंतकाळींच्या वचना ॥ कां अवज्ञा करितोसी ॥ ६७ ॥ कृष्ण
अंतकाळींचें श्रीमुख ॥ पाहतां मज अत्यंत सुख ॥ तें सांडूनि जनासि दुःख ॥ द्यावया देख मी नवचें ॥ ६८ ॥ कुळनिधनाचें घोर दुःख ॥
कृष्णनिधनें संतापक ॥ माझें वचनमात्राचें विख ॥ जगासि देख न देववे मज ॥ ६९ ॥ तुझे आज्ञेकरितां देख ॥ जगासि द्यावें महा
दुःख ॥ तुझे अवज्ञेचा उल्लेख ॥ नरकदायक मज होय ॥ ३७० ॥ मा आपणचि घेऊनि विख ॥ तुजपुढें मरतां देख ॥ उत्तम गति अ
लोलिक ॥ मी निजनिःशंक पावेन ॥ ७१ ॥ ऐसें ह्मणोनि आपण ॥ दारुकें घातलें लोटांगण ॥ मस्तकीं धरिले श्रीचरण ॥ सर्वथा जाण
सोडीना ॥ ७२ ॥ देखोनि दारुकाचा भावो ॥ कृपें द्रवला देवाधिदेवो ॥ जेणें निर्दळे शोकमोहो ॥ तें वर्म[3] पहाहो सांगत ॥ ७३ ॥ ॥
॥ श्लोक ॥ ॥ त्वं तु मद्धर्ममास्थाय ज्ञाननिष्ठ उपेक्षकः ॥ मन्मायारचनामेतां विज्ञायोपशमं व्रज ॥ ४९ ॥ ॥ टीका ॥ ॥ माझ्या
धर्माचें निजलक्षण ॥ दृढ आश्रयतां आपण ॥ पावोनि माझें ज्ञानविज्ञान ॥ तूं ब्रह्मसंपन्न स्वयें होसी ॥ ७४ ॥ माझे धर्माचें निजल
क्षण ॥ तूं ह्मणसी कोण कोण ॥ ऐक दारुका सावधान ॥ मद्धर्म पूर्ण ते ऐसे ॥ ७५ ॥ हृदयीं नित्य माझें ध्यान ॥ मुखीं माझें नामकी
र्तन ॥ श्रवणीं माझें कथाश्रवण ॥ करी मदर्चन[4] सर्वदा ॥ ७६ ॥ नयनीं मम मूर्तिदर्शन ॥ चरणीं मदालयीं[5] गमन ॥ रसनें[6] मम तीर्थ
प्राशन ॥ मत्प्रसादभोजन अत्यादरें ॥ ७७ ॥ साष्टांगें मजचि नमन ॥ आल्हादें मद्भक्तां आलिंगन ॥ सप्रेम माझे सेवेवीण ॥ रितां[7]
अर्धक्षण जाऊंनेदी ॥ ७८ ॥ ऐसी सेवा करितां पहाहो ॥ सर्वभूतीं देखे सद्भावो ॥ हा सर्वधर्मांमाजी रावो ॥ तेथें अपावो कदा न
रिघे ॥ ७९ ॥ सर्वभूतीं माझें दर्शन ॥ तेव्हां वैराग्या वोसंडे पूर्ण ॥ तेथ सहजें उठे शुद्धज्ञान ॥ देहाभिमानच्छेदक ॥ ३८० ॥ देहाभि
मान होतां क्षीण ॥ अपेक्षेसि पडे शून्य ॥ तेव्हां निरपेक्षता पूर्ण ॥ सहजें जाण ठसावे ॥ ८१ ॥ निरपेक्षतेची दशा कैशी ॥ विषय भेट
लिया इंद्रियांसी ॥ उपेक्षा करी त्यांसी ॥ जेवीं मृगजळासी सज्ञान ॥ ८२ ॥ या दृष्टीं पाहतां चराचर ॥ समूळ मिथ्या व्यवहार ॥ जेवीं

---

१ जीवंत जाणार नाहीं. २ अवमान. ३ उपाय. ४ माझी पूजा. ५ देवळांत, क्षेत्रांत. ६ जिभेनें. ७ रिकामा. ८ जग. ९ लाल.

दोराचा सर्पाकार ॥ तेवीं भ्रमें संसार भासत ॥ ८३ ॥ केवळ दोराचा सर्पाकार ॥ तो श्वेत कृष्ण कीं रक्तांबर ॥ तेवीं विषयीं विषय व्यवहार ॥ मिथ्या संसार मायिक ॥ ८४ ॥ जेवीं शुक्तिकेचा[1] रजताकार[2] ॥ न घडे एकही अलंकार ॥ तेवीं हा आभासे संसार ॥ मिथ्या व्यवहार मायिक ॥ ८५ ॥ मुळीं मिथ्या भवभान ॥ त्याचें भ्रांतासि भवबंधन ॥ तेथील जें मुक्तपण ॥ हेंही जल्पन[3] मायिक ॥ ८६ ॥ संसार मायिकरचना ॥ सत्यत्वें कळलें ज्याच्या मना ॥ तें मनचि लाजे मनपणा ॥ विज्ञान जाणा त्या नांव ॥ ८७ ॥ जागृति सुषुप्ति आणि स्वप्न ॥ संसाराचें मिथ्या भान ॥ ज्यासि ठसावल्या संपूर्ण ॥ विज्ञान जाण त्या नांव ॥ ८८ ॥ आली सज्ञान पूर्ण ॥ निर्दळूनि भवबंधन ॥ दृढ साधिलें मुक्तपण ॥ हेंही जल्पन मायिक ॥ ८९ ॥ मुख्य ज्ञानाचें लक्षण ॥ साधक होय ब्रह्म पूर्ण ॥ जगीं न देखे मी तूंपण ॥ उपशम जाण या नांव ॥ ३९० ॥ ऐसा उपशम ज्यासि पूर्ण ॥ त्यासी मजसीं नाहीं भिन्नपण ॥ दारुकें ऐकतां निरूपण ॥ हृदयीं ते खूण चमत्कारली ॥ ९१ ॥ अलंकार सोनेंपणें पाहूं गेला ॥ तंव तोचि सोनें होऊनि ठेला ॥ तेवीं मी कृष्णरसें वोतला ॥ वियोग नाथिला[4] देहलोभें ॥ ९२ ॥ मी कृष्णस्वरूप आपण ॥ मज कृष्णेंसि नाहीं भिन्नपण ॥ ऐशी चमत्कारली खूण ॥ मी ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ९३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ इत्युक्तस्तं परिक्रम्य नमस्कृत्य पुनःपुनः ॥ तत्पादौ शीर्ष्ण्युपाधाय दुर्मनाः प्रययौ पुरीम् ॥ ५० ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे यदुकुलसंक्षयो नाम त्रिंशोऽध्यायः ॥ ३० ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐसें ऐकोनि कृष्णवचना ॥ शिरीं वंदूनि श्रीकृष्णाज्ञा ॥ खेद सांडोनियां मना ॥ कृष्णचरणा लागला ॥ ९४ ॥ करूनि त्रिवार प्रदक्षिणा ॥ पुनःपुनः लागोनि चरणा ॥ माथा ठेऊनि पदीं जाणा ॥ घेऊनि कृष्णाज्ञा निघाला ॥ ॥ ९५ ॥ ब्रह्म सर्वत्र परिपूर्ण ॥ त्याचा बोधक श्रीकृष्ण ॥ तो निजधामा गेला आपण ॥ तेणें दुर्मनें[5] दारुक ॥ ९६ ॥ पुढती श्रीकृष्णदर्शन ॥ सर्वथा न लाभे आपण ॥ यालागीं अतिदुर्मन ॥ करी गमन द्वारकेसी ॥ ९७ ॥ दारुक धाडिला द्वारकेसी ॥ तंव मैत्रेय आला कृष्णापाशीं ॥ तेचि काळीं हृषीकेशी ॥ ब्रह्मज्ञान त्यासी उपदेशी ॥ ९८ ॥ तो ब्रह्मज्ञानउपदेशविधी ॥ शुक बोलिला तृतीयस्कंधीं ॥ तें निरूपण ये संधीं[6] ॥ न प्रतिपादीं पुनरुक्त[7] ॥ ९९ ॥ पहावया कृष्णनिर्याण[8] ॥ उद्धव गुप्त होता आपण ॥ तेणें ऐकोनि ज्ञाननिरूपण ॥ संतोषें नमन करी कृष्णा ॥ ४०० ॥ तेचिकाळीं मैत्रेयासी ॥ स्वमुखें बोलिला हृषीकेशी ॥ विदुर येईल तुजपाशीं ॥ त्यासि तूं उपदेशी गुह्यज्ञान ॥ १ ॥ उपदेशूनि मैत्रेयासी ॥ देवें धाडिला तो स्वाश्रमासी ॥ उद्धवें नमूनि हृषीकेशी ॥ तोही बदरीसी[9] निघाला ॥ २ ॥ दारुक धाडिला द्वारकेसी ॥ मैत्रेय धाडिला स्वाश्रमासी ॥ उद्धव धाडिला बदरीसी ॥

---

१ शिंपेचा. २ रुप्यासारखा भास. ३ बडबड. ४ नसतां. ५ उदासीन. ६ एथें. ७ एकदा सांगितलें ह्मणून. ८ कृष्णाचें निजधामास जाणें. ९ बदरिकाश्रमास.

व्याधाधमासी[1] धाडी स्वर्गा॥ ३ ॥ निजरथसहित घोडे ॥ निजायुधेंसि धाडिले पुढें ॥ आतां आपणही वाडेंकोडें ॥ निजधामाकडे निघेल ॥ ४ ॥ निजधामा निघता श्रीपती ॥ समस्त देव पाहों येती ॥ ते सुरसंकथासंगती[2] ॥ पुढिले अध्यायार्थीं अतिगोड ॥ ५ ॥ अजन्मा तो जन्म मिरवी ॥ विदेहा अंगीं देहपदवी ॥ स्वयें अक्षयी तो मरण दावी ॥ अतिलाघवी श्रीकृष्ण ॥ ६ ॥ ज्याचें निजधामगमन ॥ शिवविरिंच्यादिकां अतर्क्य खूण ॥ त्याचें सांगेन उपलक्षण ॥ श्रोता अवधान[3] मज द्यावें ॥ ७॥ एकादशाचा कळस[4] जाण ॥ श्रीकृष्णाचें निजनिर्याण ॥ जेथ नाहीं देहाभिमान ॥ तें ब्रह्मपूर्ण परिपक्क ॥ ८ ॥ भय नाहीं जन्म धरितां ॥ भय नाहीं देहीं वर्तता ॥ भय नाहीं देह त्यागितां ॥ हे ब्रह्म परिपूर्णता हरि दावी ॥ ९ ॥ एका जनार्दना शरण ॥ पुढें अचुंबित[5] निरूपण ॥ संतीं मज द्यावें अवधान ॥ सांगेन व्याख्यान सद्गुरुकृपा ॥ ४१० ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे परमहंससंहितायां एकाकारटीकायां स्वकुलनिर्दळणं नाम त्रिंशत्तमोध्यायः ॥ ३० ॥ ॥ अध्याय ॥ ३० ॥ ॥ ओंव्या ॥ ४१० ॥ ॥ श्लोक ॥ ५० ॥ ॥ एवंसंख्या ॥ ४६० ॥

---

१ जराव्याधास. २ गोडकथेचा संबंध. ३ स्मरण. ४ शेवट. ५ अति अद्भुत.

# अध्याय ३१ वा.



द्वारकेतील सर्व नारीनर अर्जुनासमागमे इन्द्र प्रस्थास निघाली आहेत



इंद्रादिदेव श्रीकृष्णावर पुष्पवृष्टी करितात अष्टदिक्पाल दर्शन करितात.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ओंनमो श्रीसद्गुरु अच्युत ॥ तूं देही असोनि देहातीत ॥ गुणी निर्गुणत्वें वर्तत ॥ देहममत्व तुज नाहीं ॥ १ ॥ देहममता नाहीं निःशेख ॥ तानेपणीं प्यालासि विख[1] ॥ पूतना शोषिली प्रत्यक्ष ॥ दावाग्नि देख प्राशिला ॥ २ ॥ जो तूं वैकुंठपीठविराजमान ॥ त्या तुज नाहीं देहाभिमान ॥ होऊनि गोंवळांसमान[2] ॥ ढुंबरी घालिशी जाण स्वयें ॥ ३ ॥ तुज पावावया कर्मबळें ॥ सदा सोशिती सोंवळें ओवळें ॥ तो तूं मेळवूनि गोंवळे ॥ जेवण मेळें स्वयें करिसी ॥ ४ ॥ ज्यातें ह्मणती दुराचार ॥ तो तूं करूनि व्यभिचार ॥ केला गोपिकांचा उद्धार ॥ हें अगम्य चरित्र वेदशास्त्रीं ॥ ५ ॥ घरीं सोळासहस्र नारी ॥ नांदसी साठीसहस्र एकलक्ष कुमारीं ॥ तरी बाळब्रह्मचारी ॥ सनत्कुमारीं वंदिजे ॥ ६ ॥ तुझे ब्रह्मचर्याची थोरी ॥ शुक नारद वंदिती शिरीं ॥ हनुमंत लोळे पायांवरी ॥ तूं ब्रह्मचारी नैष्ठिकैं[3] ॥ ७ ॥ व्रतबंध नवतां आधीं ॥ तुवां भोगिलीं गौळियाच्चीं पेंदीं ॥ तो तूं ऊर्ध्वरेता त्रिशुद्धी ॥ तुज भीष्म वंदी सर्वदा ॥ ८ ॥ नवलक्ष गोकंठपाशीं[4] ॥ तुज बांधवेना हृषीकेशी ॥ तो तूं भावार्थें बांधिलासी ॥ रासक्रीडेसी गोपिकीं ॥ ९ ॥ जैसेंजैसें त्यांचे मनांत ॥ तैसतैसा तूं क्रीडा करित ॥ सहा मास रात्रि करूनि तेथ ॥ तत्प्रेमयुक्त विचरसी ॥ १० ॥ तो तूं कामासि नातळत ॥ कामिनीकाम पूर्ण करित ॥ लाजवूनि विधिवेदार्थ ॥ गोपिका समस्त तारिल्या ॥ ११ ॥ गोपिका तारिल्या प्रेमाद्भुतें ॥ गायी तारिल्या वेणुगीतें ॥ गौळियें तारिलें समस्तें ॥ श्रीकृष्णनाथें निजयोगें ॥ १२ ॥ कंस तारिला दुष्टबुद्धी ॥ व्याध तारिला अपराधी ॥ ऐसा कृपाळु तूं त्रिशुद्धी ॥ संसार अवधी श्रीकृष्णा ॥ १३ ॥ नुल्लंघवे श्रीकृष्णाच्या बोला ॥ यमें गुरुपुत्र आणूनि दीधला ॥ तो श्रीकृष्ण निजतनू त्यागिता जाहला ॥ जो नव्हे अंकिला कलिकाळा ॥ १४ ॥ भागवतीं कळसाध्यावो ॥ तेथ निजधामा जाईल देवो ॥ तो अतिगहन अभिप्रावो ॥ सांगे शुकदेवो परीक्षितीसी ॥ १५ ॥ कळसावरतें न चढे काम ॥ तेवीं देवें ठाकिलें निजधाम ॥ राहिला निरूपणाचा संभ्रम ॥ कळसोपक्रम याहेतू ॥ १६ ॥ वेदशास्त्रार्थनिजनिर्वाहो ॥ देहीं नुपजे[5] अहंभावो ॥ तो हा एकतिसावा अध्यावो ॥ जेथ निजधामा देवो स्वेच्छा निघे ॥ १७ ॥ कृष्णाचें निजधामगमन ॥ ब्रह्मादिकां अतर्क्य[6] जाण ॥ एका जनार्दनकृपा पूर्ण ॥ विशद[7] व्याख्यान सांगेल ॥ १८ ॥ दारुक[8] द्वारके प्रयाण[9] ॥ केलिया निजधामा निघे श्रीकृष्ण ॥ तें निर्याणकाळींचें दर्शन ॥ पाहों देवगण स्वयें आले ॥ १९ ॥ तेंचिअर्थीचें निरूपण ॥ श्रीशुक सांगे आपण ॥ श्रोता परीक्षिति सावधान ॥ कृष्णनिर्याणश्रवणार्थी ॥ २० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ अथ तत्रागमद्ब्रह्मा भवान्या च समं भवः ॥ महेंद्रप्रमुखा देवा मुनयः सप्रजेश्वराः ॥ १ ॥ पितरः सिद्धगंधर्वा विद्याधरमहोरगाः ॥

---

[1] विष. [2] गुराख्यांसमान. [3] निष्ठवान्. [4] गायींच्या गळ्यांतील दांव्यांनीं. [5] उपजेना. [6] विचार करण्यास कठीण. [7] सविस्तर. [8] श्रीकृष्णाच्या सारथ्यानें. [9] गमन.

चारणा यक्षरक्षांसि किन्नराप्सरसो द्विजाः ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो व्यासाचें निजजीवन ॥ जो योगियांचें चूडारत्न ॥ तो स्वयें श्रीशुक आपण ॥ श्रीकृष्णनिर्याण निरूपी ॥ २१ ॥ शुक ह्मणे परीक्षिती ॥ निजधामा निघतां श्रीपती ॥ देव दर्शनासि येती ॥ विमानपंक्तीसमवेत ॥ २२ ॥ ब्रह्मा सत्वर आला तेथ ॥ भव[1] भवानी[2]समवेत ॥ इंद्रमुख्य देव समस्त ॥ स्वगणीं युक्त ते आले ॥ २३ ॥ सनकादिक मुनिपंक्ती ॥ आले दक्षादि प्रजापती ॥ अर्यमादि पितर येती ॥ कपिलादि धांवती महासिद्ध ॥ २४ ॥ आले गंधर्व विद्याधर ॥ यक्ष चारण किन्नर ॥ विभीषणादि राक्षस थोर ॥ वेगीं श्रीधर पाहों येती ॥ २५ ॥ पहावया श्रीरंग ॥ आले पाताळींचे पन्नग[3] ॥ ज्यांतें ह्मणती महोरग ॥ तेही सवेग पैं आले ॥ २६ ॥ द्विज आले दत्तात्रेयादिक ॥ नारद पाहों आला कौतुक ॥ पक्षी गरुडप्रमुख ॥ सत्वर देख ते आले ॥ २७ ॥ रंभा उर्वशी मेनिका ॥ अप्सरा ज्या अष्टनायिका ॥ कृष्णदर्शना आवांका[4] ॥ धरोनि देखा त्या आल्या ॥ २८ ॥ कृष्णस्वरूप पहावया ॥ नयनीं थोर घातल्या थाया ॥ यालागीं देवसमुदाया ॥ येणें लवलाह्यां जाहलें एथें ॥ २९ ॥ ॥ श्लोक ॥ द्रष्टुकामा भगवतो निर्याणं परमोत्सुकाः ॥ गायंतश्च गृणंतश्च शौरेः कर्माणि जन्म च ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ कृष्ण पहावया आवडीं ॥ दृष्टी धांवे लवडसवडी ॥ होत डोळ्यां आडाडी ॥ अभिनव गोडी कृष्णाची ॥ ३० ॥ श्रीकृष्णाचें निजनिर्याण ॥ पहावया उत्साह पूर्ण ॥ सत्वर आले सुरगण[5] ॥ पुढती कृष्णदर्शन आह्मां कैंचें ॥ ३१ ॥ सौंदर्याची निजसीमा ॥ घनश्याम सुंदर प्रतिमा ॥ तो कृष्ण गेलिया निजधामा ॥ दर्शन आह्मां मग कैंचें ॥ ३२ ॥ श्रीकृष्णदर्शनाची गोडी ॥ सुरगणां लागलीसे गाढी ॥ यालागीं अतितताडीं[6] ॥ आले आवडीं दर्शनार्थ ॥ ३३ ॥ कृष्णकर्में स्वयें वर्णित ॥ कृष्णाचरित्रें गीतीं गात ॥ मिळोनि सुरवर समस्त ॥ आले दर्शनार्थ सत्वर ॥ ३४ ॥ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ववर्षुः पुष्पवर्षाणि विमानावलिभिर्नभः ॥ कुर्वंतः संकुलं राजन् भक्त्या परमया युताः ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ विमानश्रेणी आकाशीं ॥ तेथ दाटलिया चौंपाशीं[7] ॥ संमुख देखोनि हृषीकेशी ॥ जयजयकारासी तिहीं केलें ॥ ३५ ॥ देखोनि श्रीकृष्णनाथ ॥ भक्तियुक्त जाहलें चित्त ॥ दिव्यसुमनांतें वर्षत ॥ मिळूनि समस्त समकाळें ॥ ३६ ॥ दिव्यसुमनांचा रोळा[8] ॥ कृष्णा चौंपाशीं विखुरला[9] ॥ तेणें कृष्ण शोभला त्याकाळां ॥ घनश्यामलीळा साजिरी ॥ ३७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भगवान् पितामहं वीक्ष्य विभूतीरात्मनो विभुः ॥ संयोज्यात्मनि चात्मानं पद्मनेत्रे न्यमीलयत् ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ देव पावले शीघ्रगतीं ॥ ब्रह्मा देखिला संमुखस्थिती ॥ सदाशिव सम विभूती ॥ त्यातेंही श्रीपती देखता जाहला ॥ ३८ ॥ इंद्रादिक निजविभूती ॥ त्यांतें देखोनि श्रीपती ॥ स्वनेत्र पद्मदला

---

[1] शंकर. [2] पार्वतीसहित. [3] सर्प. [4] हेतू. [5] देवांचे समुदाय. [6] अतिघाईनें. [7] चोहों बाजूंनीं. [8] समुदाय. [9] पसरला.

रुती ॥ ते सहजस्थितीं झांकिले ॥ ३९ ॥ झांकिले उघडे नयन ॥ परी स्थिति नाहीं अधिक न्यून ॥ तो आत्मा आत्मत्वें परिपूर्ण ॥ तरी
कां कृष्ण नयन झांकी ॥ ४० ॥ देखोनि देवसमुदावो ॥ कांहीं न बोलतां देवो ॥ नेत्र झांकावया कोण भावो ॥ तो अभिप्रावो अवधा
रा ॥ ४१ ॥ द्वारके असतां श्रीकृष्णनाथ ॥ सुरवर प्रार्थूं आले तेथ ॥ तिहीं विनविला देवकीसुत ॥ कृष्णनाथ अत्यादरें ॥ ४२ ॥ मि
ळोनि देवांचा मेळ ॥ प्रार्थना करिती सकळ ॥ आह्मी दास केवळ ॥ आश्रम सकळ पुनीत[1] कीजे ॥ ४३ ॥ स्वर्लोकादि लोकपाळ ॥ आ
ह्मी तुझे दास सकळ ॥ निजधामा जातां एकवेळ ॥ आश्रम सकळ पुनीत कीजे ॥ ४४ ॥ त्या समस्तदेवांप्रती ॥ स्वमुखें बोलिला
श्रीपती ॥ यदुकुळक्षयाचे अंतीं ॥ येईन निश्चितीं तेणें मार्गें ॥ ४५ ॥ ऐकोनि श्रीकृष्णवदंती[2] ॥ सुरवर संतोषले चित्तीं ॥ आह्मांसि व
स्य जाहला श्रीपती ॥ वचनोक्ती नुल्लंघी ॥ ४६ ॥ ते संधीचा टाकून ठावो ॥ आला सुरवरसमुदावो ॥ त्याचा छळावया अहंभावो
निजनेत्र पहाहो हरि झांकी ॥ ४७ ॥ देवांचा बहुसमुदावो ॥ तेथ मी कोठ कोठें जावों ॥ त्यांसि ठकावया पहाहो ॥ नेत्र झांकोनि
देवो समाधि दावी ॥ ४८ ॥ नाहीं समाधि आणि व्युत्थान[3] ॥ कृष्ण परब्रह्म परिपूर्ण ॥ तोही निजनेत्र झांकून ॥ समाधिलक्षण मृषा[4]
दावी ॥ ४९ ॥ स्वच्छंदमृत्यु योगियांसी ॥ ते स्थिति नाहीं श्रीकृष्णासी ॥ अतर्क्यगति शिवादिकांशी ॥ ते परीक्षितीशीं शुक सांगे ॥
॥ ५० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ लोकाभिरामां स्वतनुं धारणाध्यानमंगलाम् ॥ योगधारणयाग्नेय्याऽदग्ध्वा धामाविशत्स्वकम् ॥ ६ ॥ ॥ टीका
॥ ॥ कळिकाळासि जिणोनि जाण ॥ स्वच्छंदमृत्यु योगिजन ॥ ते अग्निधारणा करूनि पूर्ण ॥ स्वदेह जाळुन स्वरूप होती ॥ ५१ ॥
घृत थिजलें विघुरलें ॥ तैसें सगुण निर्गुणत्वा आलें ॥ या नांव योगाग्निधारण बोले ॥ कृष्णें देह दाहिलें हें कदा नघडे ॥ ५२ ॥
कृष्णरूप परिपूर्ण ॥ तो कां करील योगाचरण ॥ त्याचा लीलाविग्रही देह जाण ॥ करावें दहन कासेनी ॥ ५३ ॥ देखतां डोळां
लागे ध्यान ॥ संपूर्ण जेथें विगुंते मन ॥ एवढें कृष्णसौंदर्य संपूर्ण ॥ निजमोहन जगाचा ॥ ५४ ॥ ज्याचें देखतां बरवेपण ॥ मदन
पोटा आला आपण ॥ लक्ष्मी भुलली चरण देखोन ॥ चैतन्यघन श्रीकृष्ण ॥ ५५ ॥ ज्याचें योगियां सदा ध्यान ॥ शिवादिकां
नित्य चिंतन ॥ सकलमंगलांचें आयतन[5] ॥ चैतन्यघन श्रीकृष्ण ॥ ५६ ॥ कृष्ण स्वयें आत्माराम ॥ यालागीं तो जगाचा आराम ॥
लीलाविग्रही घनश्याम ॥ ध्यानगम्य चिद्रूप[6] ॥ ५७ ॥ जैशी घृताची पुतळी ॥ थिजोनि जाहली एके काळीं ॥ तैसी चैतन्याची मुसाव[7]
ली ॥ स्वलीला जाहली कृष्णमूर्ती ॥ ५८ ॥ दावाग्नि प्राशिला प्रत्यक्ष ॥ न चढेचि काळियाचें विख ॥ तो देहचि नव्हे देख ॥ मा मर

---

१ पवित्र. २ वाणी. ३ समाधिन सर्णे. ४ व्यर्थ. ५ पात्र. ६ चैतन्यस्वरूप. ७ मूस झाली.

णात्मक तेथ कैंचें ॥ ५९ ॥ कृष्ण प्रकट ज्याचे हृदयीं ॥ तो देही होय विदेही ॥ मा त्या कृष्णाच्याचि ठायीं ॥ देहत्व कायी असेल ॥ ६० ॥ कृष्णदेहो नाहीं निमा[1]ला ॥ तो आभासचि सहजत्वा आला ॥ जैसा दर्पणींचा लोपला ॥ प्रतिबिंबला आपुले ठायीं ॥ ६१ ॥ ज्याचें करितां नामस्मरण ॥ भक्तांचें निरं[2]से जन्ममरण ॥ तो कृष्ण पावे जैं मरण ॥ तैं भक्तांसि कोण उद्धरी ॥ ६२ ॥ आत्ममायेचे स्वलीला ॥ कृष्णरूपें प्रकट जाहला ॥ तो लीला त्यागोनि संचला ॥ निजरूपें ठेला निजत्वें ॥ ६३ ॥ कृष्णें देहो नेला ना त्यागिला ॥ तो लीलाविग्रहें संचला ॥ भक्तध्यानीं प्रतिष्ठिला ॥ स्वयें गेला निजधामा ॥ ६४ ॥ जैसजैसा भक्तांचा भावो ॥ तैसतैसा होय देवो ॥ तो भक्तध्यानीं स्थापूनि देहो ॥ निजधामा पहाहो नवचोनि गेला ॥ ६५ ॥ होकां कृष्णमूर्ति जरी सगुण ॥ तरी देहदाह नलगे जाण ॥ कृष्णाश्रयें जग संपूर्ण ॥ तेव्हां होईल दहन जगाचें ॥ ६६ ॥ जेणें मायेसि निजपोटीं ॥ दाविल्या ब्रह्मांडांच्या कोटी ॥ त्या कृष्णदेह दाहापाठीं ॥ जगाची गांठी नुरवावी ॥ ६७ ॥ ऐशा याही युक्ति विचारितां ॥ अतिस्थूळ ते योग्यता ॥ कृष्णदेहींची विदेहता ॥ तेथ दाहकता ते कैंची ॥ ६८ ॥ कृष्णाचें असणें जाणें ॥ हें श्रीकृष्णचि स्वयें जाणे ॥ तेथ वेदांचेंही बोलणें ॥ जाणपणें स्मरेना ॥ ६९ ॥ हे कृष्णाची अगम्य गती ॥ शिवं[3]विरिंचादि नेणती ॥ त्यांची कल्पना ऐशी चित्तीं ॥ आह्मांसवें श्रीप[4]ती येईल ॥ ७० ॥ ऐसेनि अभिप्रायें पूर्ण ॥ आनंदले सुरगण ॥ अवघे होऊनि सावधान ॥ उल्हास पूर्ण मांडिला ॥ ७१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ दिवि दुंदुभयो नेदुः पेतुः सुमनसश्च खात् ॥ सत्यं धर्मो धृतिर्भूमेः कीर्तिः श्रीश्चानु तं ययुः ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ उल्हासले सुरगण ॥ दिवि दुंदुभि त्रा[5]हाटिल्या जाण ॥ दिव्य सुमनें गगनींहून ॥ वर्षले पूर्ण कृष्णावरी ॥ ७२ ॥ वैकुंठादि दिव्य संपत्ती ॥ भूलोका आणिल्या श्रीपतीं ॥ तो येतां निजधामाप्रती ॥ आमुच्या आह्मांहातीं देईल वेगीं ॥ ७३ ॥ ऐसे देव उल्हासोनी ॥ पुनः पुना वर्षती सुमनीं ॥ शिवादि पाहती सावधानीं ॥ अतर्क्यगमनीं हरि गेला ॥ ७४ ॥ आह्मी सकळ मायेचे नियंते ॥ आह्मी सर्वद्रष्टे सर्वज्ञाते ॥ ऐसा अभिमान होता देवांतें ॥ त्यांसि श्रीकृष्णनाथें लाजविलें ॥ ७५ ॥ अल[6]क्ष्य कृष्णाची निजगती ॥ शंभु स्वयंभू नेणती ॥ तेणें विस्मित होती ॥ आश्चर्य मानिती सुरवर ॥ ७६ ॥ देव परमाश्चर्य मानिती ॥ तंव सत्य धर्म धृति कीर्ती ॥ श्रीयेंतेंसमवेत निघती ॥ सांडूनि क्षिती कृष्ण लक्ष्मीं ॥ ७७ ॥ सत्य धर्म श्री धृति कीर्ती ॥ यांची कृष्णचरणीं नित्य वस्ती ॥ यालागीं कृष्णासवें निघती ॥ सांडोनि क्षिती तत्काळ ॥ ७८ ॥ तूं[7] ऐसें मानिशी परीक्षिती ॥ जे सत्य धर्म श्री धृति कीर्ती ॥ निःशेष सांडूनि गेलीं क्षिती ॥ ऐक ते अर्थीं विचार ॥ ७९ ॥ मज पाहतां श्रीकृ

---

[1] नष्ट झाला. [2] नाहींसें होतें. [3] शंकर, ब्रह्मदेव आदिकरून. [4] श्रीकृष्ण. [5] वाजविल्या. [6] लक्षांत येण्यास कठीण. [7] परीक्षिति राजा.

ष्णमूर्तीं ॥ स्थिरावली ज्याच्या चित्तीं ॥ तेथ सत्य धर्म श्री धृति कीर्तीं ॥ साम्राज्यें वसती कुरुराया[1]॥ ८० ॥ केवळ भक्तानुग्रही ॥ कृष्ण स्वयें लीलाविग्रही ॥ त्या कृष्णाची गती पाही ॥ न पडे ठायीं ब्रह्मादिकां ॥ ८१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ देवादयो ब्रह्ममुख्या न विशंतं स्वधामनि ॥ अविज्ञातगतिं कृष्णं ददृशुश्चातिविस्मिताः॥ ८ ॥ ॥ टीका ॥ ॥ इंद्र बृहस्पति मुख्यत्वें ब्रह्मा ॥ पाडूनि देवां परमभ्रमां[2] ॥ कृष्ण प्रवेशला निजधामा ॥ अतर्क्य महिमा हरीचा ॥ ८२ ॥ अतर्क्य श्रीकृष्णाची गती ॥ देवांसि लक्षेना निजशक्तीं ॥ अतिविस्मय पावोनि चित्तीं ॥ स्वधामाप्रती निघाले ॥ ८३ ॥ देव जातां स्वधामाप्रती ॥ क्षणक्षणां आश्चर्य करिती ॥ अलक्ष्य लक्षेना कृष्णगती ॥ अतर्क्यगती शिवादिकां ॥ ८४ ॥ तेचि कृष्णाची अतर्क्यगती॥ देवांसि लक्षेना दैवी शक्ती ॥ तेचि विशद दृष्टांतीं॥ परीक्षितिप्रती शुक सांगे ॥ ८५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सौदामन्या यथाकाशे यांत्या हित्वाऽभ्रमंडलम् ॥ गतिर्न लक्ष्यते मर्त्यैस्तथा कृष्णस्य दैवतैः ॥९॥ टीका ॥ वीज तळपे[3] अभ्रमंडळीं[4] ॥ ते कोठोनि आली कोठें गेली ॥ गति नरां न लक्षे[5] भूतळीं ॥ तैशी कृष्णगती जाहली दुर्गम देवां ॥ ८६ ॥ वीज सकळ मनुष्यें देखती ॥ परी नकळे येती जाती गती ॥ तेवीं कृष्णाची अवतारशक्ती ॥ नकळे निश्चितीं देवांसी ॥ ८७ ॥ तेथूनि एथ येणें ॥ कां एथूनि तेथ जाणें ॥ हें नाहीं कृष्णास करणें ॥ तो सर्वत्र पूर्णपणें परिपूर्ण सदा ॥ ८८ ॥ घ्यावया आकाशासि बिढार[6]॥ सर्वथा रितें न मिळे घर ॥ तेवीं कृष्ण परमात्मा सर्वत्र ॥ गत्यंतर त्या नाहीं ॥ ८९ ॥ कृष्ण गेला निजधामा ॥ परमाद्भुत ज्याचा महिमा ॥ अलक्ष्य लक्षेना कृष्णगरिमा ॥ जाणोनि स्वाश्रमा निघाले देव ॥ ९० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ब्रह्मरुद्रादयस्ते तु दृष्ट्वा योगगतिं हरेः॥ विस्मितास्तां प्रशंसंतः स्वं स्वं लोकं ययुस्तदा ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ आह्मी मायानियंते[7] निजशक्तीं ॥ आह्मी जाणों दुर्गमा योगगती ॥ आह्मी सर्वद्रष्टे त्रिजगतीं ॥ हा अभिमान चित्तीं देवांचे ॥ ९१ ॥ तिहीं देखोनि कृष्णगती ॥ गळाली जाणिवेची वृत्ती ॥ लाजे पळाली अभिमानस्थिती ॥ तिहीं मांडिली स्तुति कृष्णाची ॥ ९२ ॥ रुद्र पंचमुखीं करी स्तुती ॥ ब्रह्मा चहूं मुखीं वर्णी कीर्ती ॥ देव विस्मयातें पावती ॥ अगम्य गती कृष्णाची ॥९३॥ करितां श्रीकृष्णाची कृती ॥ देवांसि न बाणे तृप्ती ॥ वर्णितां श्रीकृष्णकीर्ती ॥ स्वलोकाप्रती सुर गेले ॥ ९४ ॥ पूर्वीं सांगीतली कृष्णगती ॥ तेचि सांगावया विशद स्थिती ॥ परतोनि परीक्षितिप्रती ॥ अतिप्रीतीं शुक सांगे ॥ ९५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ राजन्परस्य तनुभृज्जननाप्ययेहामायाविडंबनमवेहि यथा नटस्य ॥ सृष्ट्वात्मनेदमनुविश्य विहृत्य चांते संहृत्य चात्ममहिनोपरतः स आस्ते ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐक राया परीक्षिती ॥ सकळ कारणां कारण श्रीपती ॥ मायेचीहि चेतना शक्ती ॥ जाण

---

१ परीक्षितिराजा. २ अत्यंतभ्रमांत. ३ चकचके. ४ मेघमंडळांत. ५ न दिसे. ६ बिन्हाड. ७ मायेला जाणणारे.

निश्चितीं श्रीकृष्ण ॥९६॥ ज्यासि नाहीं व्यक्ति वर्ण ॥ ज्यासि नाहीं रूप गुण ॥ तो स्वलीला श्रीकृष्ण ॥ यदुवंशीं जाण अवतरला ॥९७॥
जो सकळवंशीं वंशज जाण ॥ जो सकळ गोत्रीं गोत्रज पूर्ण ॥ जो सकळ यातींची याती जाण ॥ स्वयें श्रीकृष्ण सर्वादी ॥ ९८ ॥
त्यासि यदुवंशीं जें जन्म ॥ गोवर्धनोद्धारणादि कर्म ॥ कुलक्षयो निधनधर्म ॥ हें स्वलीलाकर्म योगमाया ॥ ९९ ॥ योगमायेचिया
सत्ता ॥ मत्स्यकूर्मादि अवतारता ॥ शेखीं धरी श्वेतवराहता ॥ ते अतर्क्ययोगता कृष्णाची ॥ १०० ॥ श्रीकृष्ण नव्हे अवतार ॥ हा अ
वतारी चिन्मात्र ॥ त्याचें अतर्क्य चरित्र ॥ ब्रह्मादिरुद्र नेणती ॥ १ ॥ जैसें आरिसां प्रतिबिंब बिंबलें ॥ तैसें यदुवंशीं कृष्णजन्म जा
हलें ॥ आरिसां हावभाव दाविले ॥ तैसें कर्म केलें श्रीकृष्णें ॥ २ ॥ तो आरिसा हातींचा टाकितां ॥ हारपे पुढील प्रतिबिंबता ॥ त्या नांव
कृष्णनिधनता ॥ मिथ्या वार्ता मायिक ॥ ३ ॥ जैसा नट धरी नाना वेष ॥ सर्वेंचि सांडी त्या वेषांस ॥ परि नटासि नाहीं नाश ॥ तैसा
पैं हृषीकेश अवतारी ॥ ४ ॥ यदुवंशीं कृष्णनाथ ॥ सर्वकर्मीं सदा अलिप्त ॥ सृष्टिस्थित्यंतीं नित्यमुक्त ॥ त्यासि परमाद्भुत तें कायी
॥ ५ ॥ न मेळवितां साह्य संगें ॥ कृष्ण सृष्टि सृंजी निजांगें ॥ ते प्रतिपाळूनि यथाभागें ॥ संहारूनि वेगें स्वयें उरे ॥ ६ ॥ कृष्ण सृजी
पाळी संहारी ॥ हे जगीं प्रत्यक्ष दिसे थोरी ॥ कर्में करूनि अविकारी ॥ कदा विकारी नव्हे कृष्ण ॥ ७ ॥ कृष्ण अंतर्यामी सर्वभूतां ॥
जगत्कर्मांचा कृष्ण कर्ता ॥ कर्म करूनि तो अकर्ता ॥ विदेहता निजरूपें ॥ ८ ॥ ऐसा अगाध श्रीकृष्णमहिमा ॥ मर्यादा न पावे शिव
शक्रब्रह्मा ॥ याचा देह विदेहात्मा ॥ गेला निजधामा तेणें योगें ॥ ९ ॥ येचि अवतारीं कृष्णनाथें ॥ देहीं दाविलें विदेहकर्मांतें ॥ तें
मागें परिसविलें तूतें ॥ ऐक मागुतें सांगेन ॥ ११० ॥ सात दिवस गोवर्धन ॥ निजकरीं धरूनि जाण ॥ इंद्राचा हरिला मान ॥ विदेही
पूर्ण श्रीकृष्ण ॥ ११ ॥ दावाग्नि प्राशूनि आपण ॥ लाजविला हुताशन ॥ रासक्रीडा करूनि जाण ॥ हरिला मान मदनाचा ॥ १२ ॥
समुद्र सारूनि माघारां ॥ वसविलें निजनगरा ॥ निद्रा न मोडितां मथुरा ॥ द्वारकापुरा आणिली ॥ १३ ॥ सेवूनि भाजीचें पान ॥
तृप्त केले ऋषिजन ॥ कृष्ण अंतर्यामी आपण ॥ हें निजलक्षण दाविलें ॥ १४ ॥ येणेंचि देहें श्रीकृष्णनाथ ॥ जाहला वत्सें वत्सप स
मस्त ॥ ब्रह्मा लाजवूनि तेथ ॥ गर्वहत तो केला ॥ १५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मर्त्येन यो गुरुसुतं यमलोकनीतं त्वां चानयच्छरणदः पर
मास्त्रदग्धम् ॥ जिग्येंतकांतकमपीशमसावनीश किं स्वावने स्वरनयन् मृगयुं सदेहम् ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ श्रीकृष्ण येणेंचि देहेंसी ॥
जाऊनियां यमलोकासी ॥ निग्रहूनि यमकाळासी ॥ निमाल्या गुरुसुतांसी आणिलें ॥ १६ ॥ उत्तरेचिये गर्भस्थितीं ॥ न कळतां

---

१ आरशांत. २ नाहींशो होते. ३ लिप्त नाहीं ह्मणजे कर्मांहून निराळा. ४ उत्पन्न करी. ५ अग्नि. ६ वत्सें राखणारा. ७ निरभिमानी. ८शासन करून. ९ मरण पावलेल्या.

ब्रह्मास्त्रमहाशक्ती ॥ तुज राखिलें आकांतीं ॥ सचक्र श्रीपती पावोनी ॥ १७ ॥ तुज राखावया हेंचि कारण ॥ तुझी माता रिघाली शरण ॥ कृष्ण शरणागतां शरण्य ॥ संकटहरण निजभक्तां ॥ १८ ॥ यादवां देखतां द्वारकापुरी ॥ द्विजपुत्र राखितां सटीचे रात्रीं ॥ अर्जुन नेमेंसि प्रतिज्ञा करी ॥ तंव तो शरीरीं हारपला ॥ १९ ॥ ब्राह्मणें निर्भर्त्सिलें[1] त्याशी ॥ थोर लाज जाहली अर्जुनासी ॥ तेणें कळवळला हृषीकेशी ॥ भक्तसाह्यासी पावला ॥ १२० ॥ अर्जुनासहित हृषीकेशी ॥ रथेंसी निघे क्षीरसागरासी ॥ द्विजसुत होते नारायणापाशीं ॥ ते द्वारकेसी आणिले ॥ २१ ॥ एवं भक्तसंकटनिवारण ॥ निजांगे करी श्रीकृष्ण ॥ कृष्णप्रतापाचें महिमान ॥ ऐक सांगेन अलोलिक ॥ २२ ॥ बाणासुराचा कैवारू ॥ करूं आला महारुद्रू ॥ सवें नंदी भृंगी वीरभद्रू ॥ स्वामिकार्तिकेंसी हरू जिंतला कृष्णें ॥ २३ ॥ उग्रासिही अतिउग्र ॥ भयंकरासि भयंकर ॥ तो जिणोनि काळाग्निरुद्र ॥ बाणभुजाभार छेदिला ॥ २४ ॥ कृष्णवचन अति अगाध ॥ जेणें केला महापराध ॥ तो स्वदेहेंसी जराव्याध ॥ स्वर्गासी प्रसिद्ध धाडिला ॥ २५ ॥ एवढें सामर्थ्य श्रीकृष्णापाशीं ॥ तो काय राखूं न शके स्वदेहासी ॥ तेंही देहत्व नाहीं त्याशी ॥ गेला निजधामासी निजात्मता ॥ २६ ॥ एवढें सामर्थ्य श्रीकृष्णापाशीं ॥ तरी कां गेला निजधामासी ॥ या लोकीं तेणें देहेंसी ॥ राहतां त्यासी भय काय ॥ २७ ॥ ऐसा पोटींचा आवांका ॥ धरून करिशी आशंका ॥ लोकाभिमान नाहीं यदुनायका ॥ स्वेच्छा देखा स्थिति त्याची ॥ २८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तथाऽप्यशेषस्थितिसंभवाप्ययेष्वनन्यहेतुर्यदि शेषशक्तिधृक् ॥ नैच्छत्प्रणेतुं वपुरत्र शेषितं मर्त्येन किं स्वस्थगतिं प्रदर्शयन् ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ ॥ मायादि तिन्ही गुण ॥ इत्यादिकारणां कारण ॥ निजांगें श्रीकृष्ण आपण ॥ स्वयें कारण अनादित्वें ॥ २९ ॥ ब्रह्मांडें कोटी अनंत ॥ उत्पत्तिस्थितिप्रलयावर्त ॥ करूनि श्रीकृष्ण अलिप्त ॥ सामर्थ्यें अद्भुत श्रीकृष्ण ॥ १३० ॥ अशेषांही[3] परम शक्ती ॥ श्रीकृष्णलेशें सामर्थ्यवंती ॥ कृष्ण देहतो विदेहस्थिती ॥ स्वेच्छाशक्तीं स्वधामा गेला ॥ ३१ ॥ इहलोकींची आसक्ती[4] ॥ श्रीकृष्णासि नाहीं चित्तीं ॥ निजधामाची अतिप्रीती ॥ तेही निश्चितीं असेना ॥ ३२ ॥ निजदेह इहलोकीं वस्ती ॥ स्वेच्छा न मानीच श्रीपती ॥ माझ्या देहाची अगम्य गति ॥ तेणें साधकस्थिती भ्रंशेल ॥ ३३ ॥ माझा देह चैतन्यैंघन[5] ॥ तेथें बाधीना विषयसेवन ॥ हें देखोनि साधकजन ॥ देहसाधन मांडिती ॥ ३४ ॥ वायो साधूनियां पूर्ण ॥ दृढ करूनि देहधारण ॥ माझ्या ऐसें विषयसेवन ॥ कराया अभिमान वाढेल ॥ ३५ ॥ ऐसा वाढल्या देहाभिमान ॥ माझें मावळेल निजात्मज्ञान ॥ यालागीं विदेहेंसी श्रीकृष्ण ॥ गेला निघोन निजधामा ॥ ३६ ॥ माझें कळतां निजात्मज्ञान ॥ परी माझ्या ऐसें

---

१ तिरस्कारिलें. २ प्रश्न. ३ सर्व. ४ इच्छा. ५ चैतन्यानें परिपूर्ण. ६ नष्ट होईल.

विषयसेवन ॥ करूं लागती योगीजन ॥ यालागीं श्रीकृष्ण निजधामा गेला ॥ ३७॥ माझ्या देहाची स्थिति गती ॥ शंभु स्वयंभू कळा नेणती ॥ मा इतरांसि ते गती ॥ कैशा रीतीं कळेल ॥ ३८ ॥ परी माझे ऐसा देहाभिमान ॥ वाढवितील योगीजन ॥ हें जाणोनियां श्रीकृष्ण ॥ विदेह आपण निजधामा गेला ॥ ३९ ॥ ज्याचे देहाचें दर्शन ॥ देखतां सबाह्य निवे मन ॥ त्याही देहाचें मिथ्यात्व पूर्ण ॥ दावूनि कृष्ण निजधामा गेला ॥ १४० ॥ एवं त्यागावया देहाभिमान ॥ कृष्ण निजधामा करी गमन ॥ तरावया साधक जन ॥ कृपाळु पूर्ण दीक्षा दावी ॥ ४१ ॥ एथें वैराग्य निजस्थिती ॥ देहाभिमानाची विरक्ती ॥ साधावी निजात्मप्राप्ती ॥ हे दीक्षा श्रीपती दावूनि गेला ॥ ४२ ॥ जेणें देहें स्वयें[2] श्रीकृष्ण ॥ आचरला अनेक विंदान ॥ परी ज्ञात्यासि नलगे दूषण ॥ हें पूर्णत्व पूर्ण प्रकाशलें ॥ ४३ ॥ जैतं[1] अथवा आल्या हारी ॥ ज्ञान मैळेना दोहीं परी ॥ ज्यासि मिथ्या भास नर नारी ॥ तो सदा ब्रह्मचारी व्यभिचारामाजी ॥ ४४ ॥ स्त्रीपुत्रादि गृहवासी ॥ असोनि नित्य संन्यासी ॥ हेंही लक्षण हृषीकेशीं ॥ येणें अवतारेंसी दाविलें ॥ ४५ ॥ अंगीं दाविलें गोंवळेपण ॥ सर्वेचि स्वामित्व आलें पूर्ण ॥ शेखीं सेवक जाहला आपण ॥ तरी पूर्णत्वपण मैळेना ॥ ४६ ॥ एकाचे घरीं उच्छिष्टें काढी ॥ एकाचीं अंगें धूतसे घोडीं ॥ तरी पूर्णत्वाचिये जोडी ॥ उणी कवडी नव्हेची ॥ ४७ ॥ एकाचीं निमालीं आणिलीं बाळें ॥ एकाचीं समूळ निर्दाळिलीं[3] कुळें ॥ इहीं दोहीं परी ज्ञान न मैळे ॥ हेही प्रांजळें प्रकाशिलें ॥ ४८ ॥ एकाचा जाहला कैवारी ॥ एकाचा जाहला पूर्ण वैरी ॥ परी एकात्मता चराचरीं ॥ अणुभरी[4] ढळेना ॥ ४९ ॥ एकी उद्धरिली चरणीं लागतां ॥ तोही एकाचे चरणीं ठेवी माथा ॥ बाप ज्ञानाची उदारता ॥ न्यूनपूर्णता तरी न घडे ॥ १५० ॥ इतरज्ञांते[5] ज्ञानस्थिती ॥ बोल बोलोनि दाविती ॥ तैशी नव्हे ही कृष्णमूर्ती ॥ आचरोनि रीति दावी अंगें ॥ ५१ ॥ अतिगुह्य[6] ज्ञानलक्षणें ॥ आचरोनि दाविलीं श्रीकृष्णें ॥ परी अणुमात्रही उणें ॥ नेदीच पूर्णपणें अंगीं लागों ॥ ५२ ॥ एवढी ज्या देहाची ख्याती ॥ जेणें देहीं दीन उद्धरती ॥ ज्या देहातें सुर नर वंदिती ॥ ज्या देहाची कीर्ति त्रैलोक्य वर्णी ॥ ५३ ॥ त्या देहाची अहंकृती[7] ॥ निःशेष सांडूनि श्रीपती ॥ गेला निजधामाप्रती ॥ ठेऊनि निजमूर्ति स्वभक्तध्यानीं ॥ ५४ ॥ कृष्णें देह नेला ना त्यागिला ॥ तो लीलाविग्रहें संचला ॥ निजभक्तध्यानीं प्रतिष्ठिला[8] ॥ स्वयें निजधामा गेला निजात्मयोगें ॥ ५५॥ ॥ श्लोक ॥० ॥ य एतां प्रातरुत्थाय कृष्णस्य पदवीं पराम् ॥ प्रयतःकीर्तयेद्भक्त्या तामेवाप्नोत्यनुत्तमाम ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ श्रीकृष्णअवताराचे अंतीं ॥ कृष्णाचि जे परमगती ॥ अतिउत्कृष्ट योगस्थिती ॥ अतर्क्य निश्चितीं सुरश्रेष्ठां ॥ ५६ ॥

---

१ जय. २ स्वतः. ३ संहारिलीं. ४ अणुमात्र. ५ इतर शहाणे. ६ अतिगौप्य. ७ अभिमान. ८ स्थापिला.

जे गतिहूनि वरती ॥ चढेना अधिकगती ॥ तीतें परा[1]पदवी ह्मणती ॥ वेदशास्त्रोक्तीं सज्ञान ॥ ५७ ॥ हे कृष्णपरमपदवी ॥ जो कोणी भक्तियुक्त सद्भावीं ॥ नित्य नियमस्थ धरूनि जीवीं[2] ॥ पढे निजभावीं प्रातःकाळीं ॥ ५८ ॥ भक्तियुक्त सुहृदयकमळीं ॥ या चौदा श्लोकांची जपमाळी ॥ जिह्वाग्रें अनुदिनीं चाळी ॥ नित्य प्रातःकाळीं नियमस्थ ॥ ५९ ॥ केलिया या नेमासी ॥ सांडणें नाहीं प्राणांतेंसी ॥ ऐशी निष्ठा जयापाशीं ॥ उत्तमत्वासी तो पावे ॥ १६० ॥ कृष्णपदवी गातां गीतीं ॥ पायां लागती चारी मुक्ती ॥ त्यांचीही उपेक्षूनि स्थिती ॥ कृष्णपदवी निश्चितीं स्वयें पावे ॥ ६१ ॥ हे चौदा श्लोक जाण ॥ चौदा भुवनांचें निजजीवन ॥ कृष्णपदवी पाविजे पूर्ण ॥ नियमस्थ पठण केलिया ॥ ६२ ॥ हे चौदाही श्लोक जाण ॥ चौदापदें गयावर्जन ॥ पदीं पिंडा समाधान ॥ नियमस्थ पठण केलिया ॥ ६३ ॥ हे चौदाही श्लोक जाण ॥ चौदा इंद्रांच्या जीवां जीवन ॥ इंद्रांचा इंद्र होईजे आपण ॥ नियमस्थ पठण केलिया ॥ ६४ ॥ हे चौदा श्लोक जाण ॥ चौदा विद्यांचें जन्मस्थान ॥ जो प्रातःकाळीं करी पठण ॥ कृष्णपदवी पूर्ण तो पावे ॥ ६५ ॥ हे चौदाही श्लोक जाण ॥ चौदा कांडें वेद संपूर्ण ॥ वेदवादा समाधान ॥ नियमस्थ पठण केलिया ॥ ६६ ॥ हे चौदाही श्लोक जाण ॥ संसाराचें गुण कर्म वर्ण ॥ मोडूं[3]नि करी ब्रह्म पूर्ण ॥ नेमें पठण केलिया ॥ ६७ ॥ प्रातःकाळीं नेमस्त पठण ॥ करितां पाविजे ब्रह्मपूर्ण ॥ मां[4] त्रिकाळीं जो करी पठण ॥ तो स्वदेहें श्रीकृष्ण स्वयें होय ॥ ६८ ॥ एथ पढोनि जो अर्थ पाहे ॥ तो स्वयें श्रीकृष्ण होये ॥ कृष्णाची पूर्णपदवी पाहे ॥ आंदणी होये तयाची ॥ ६९ ॥ कृष्णपदवी निजनिर्वाण ॥ श्रवणें पठणें अर्थें जाण ॥ साधकां करी ब्रह्म पूर्ण ॥ हें गुह्य निरूपण परमार्थसिद्धि ॥ १७० ॥ एथ न करितां अतिसाधन ॥ अनायासें ब्रह्मज्ञान ॥ कृष्णपदवी पाविजे पूर्ण ॥ श्रद्धायुक्त पठण नेमें करितां ॥ ७१ ॥ तक्षकभयाचे निवृत्ती ॥ देहीं पावावया विदेहप्राप्ती ॥ हे सुगमो[5]पायस्थिती ॥ कृपेनें परीक्षितीप्रति शुक सांगे ॥ ७२ ॥ हे कृष्णपदवी निज निर्वाण ॥ श्रद्धायुक्त नियमस्थ पठण ॥ करितां पाविजे ब्रह्म पूर्ण ॥ हे प्रतिज्ञा पूर्ण श्रीशुकाची ॥ ७३ ॥ ऐशी हे सुगम परी ॥ असतां जो श्रद्धा न करी ॥ तो बुडाला संसारीं ॥ अविद्येघरीं घरजां[6]वयी ॥ ७४ ॥ तो अविद्येचा पोसणा ॥ विषयीं प्रतिपाळिला सुणां[7] ॥ अहंथारोळां बैसणा ॥ सर्वदा वसवसित ॥ ७५ ॥ असोत या मूढगोष्टी ॥ रचल्या सुखा पडेल तुटी ॥ या श्लोकपठणासाठीं ॥ होय भेटी परब्रह्मीं ॥ ७६ ॥ कृष्णनिजपदवीव्याख्यान ॥ करावया मी अपुरतें दीन ॥ जनार्दनें कृपा करून ॥ हें निरूपण बोलविलें ॥ ७७ ॥ एका जनार्दना शरण ॥ श्रीकृष्णपदवीनिरूपण ॥ तो हा एकादशाचा कळस पूर्ण ॥ व्यासें जाण

---

१ परमपद. २ मनांत. ३ नाश करून. ४ मग. ५ सुलभउपाय. ६ अज्ञानाचे घरचा जांवई ह्मणजे महामूर्ख. ७ कुत्रा.

निर्वाळिला[1] ॥ ७८ ॥ कृष्णपदवीपरतें ॥ निरूपण न चढे एथें ॥ तो हा एकादशकळसातें ॥ व्यासें निश्चितें निर्वाळिलें ॥ ७९ ॥ निर्वाळिलें निरूपण ॥ हे जनार्दनरुपा पूर्ण ॥ एका जनार्दना शरण ॥ यापरी श्रीकृष्ण निजधामा गेला ॥ १८० ॥ येरीकडे द्वारकेशीं ॥ दारुक[2] पावला विह्वळतेशीं[3] ॥ तेथील वर्तले कथेशीं ॥ परीक्षितीशीं शुक सांगे ॥ ८१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ दारुको द्वारकामेत्य वसुदेवोग्रसेनयोः ॥ पतित्वा चरणावस्रैर्न्यषिंचत्कृष्णविच्युतः ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ दारुक द्वारका देखत ॥ जैसें प्राणेंवीण प्रेत ॥ कां राजा जैसा दैवहत[4] ॥ तैशी दिसत कलाहीन ॥ ८२ ॥ जेवीं कां वनिता पतिवीण ॥ सर्वार्थीं दिसे अतिदीन ॥ तैशी द्वारावती जाण ॥ कलाहीन आभासे ॥ ८३ ॥ रस पिळिल्या जैसा ऊंस ॥ फळेंवीण फळकट भूस ॥ तैशी कृष्णेंवीण उदास ॥ दिसे चौपांस[5] द्वारका ॥ ८४ ॥ दारुक प्रवेशे राजभवन ॥ देखोनि वसुदेव उग्रसेन ॥ अश्रुधारा स्रवती नयन ॥ आक्रंदे चरण धरी त्याचे ॥ ८५ ॥ कृष्णवियोगें तापला पूर्ण ॥ जैसें अतिसंतप्त जीवन ॥ तैसे अश्रु स्रवती नयन ॥ तेणें पोळती चरण वसुदेवाचे ॥ ८६ ॥ उकसाबुकसीं फुंदे पोट ॥ दुःखें होऊं पाहे हृदयस्फोट ॥ जिह्वेसि बोबडी वाळले वोंठ ॥ सद्गदें कंठ दाटला ॥ ८७ ॥ बोल न बोलवे सर्वथा ॥ देखोनि दारुकाची व्यथा ॥ द्वारकेच्या जनां समस्तां ॥ अतिव्याकुलता वोडवली[6] ॥ ८८ ॥ देवकी आणि रोहिणी ॥ आल्या अत्यंत हडबडोनी[7] ॥ अतिव्याकुलता देखोनी ॥ कृष्णपत्नी तेथें आल्या ॥ ८९ ॥ राणिया साचिया नरनारी ॥ धांवल्या सभामंडपाभीतरी ॥ तंव दारुकाची अवस्था भारी ॥ देखोनि जिव्हारीं दचकल्या ॥ १९० ॥ स्फुंदतां उकसाबुकसीं ॥ श्वास परतेना दारुकासी ॥ सांगतां कृष्णवियोगासी ॥ मूर्च्छा त्यासी पैं आली ॥ ९१ ॥ तेथें वसुदेव उग्रसेन ॥ करूनि त्याचें सांतवन ॥ वृत्तांत पुसतां सावधान ॥ काय तो वचन बोलिला ॥ ९२ ॥ ॥ श्लोक ॥ कथयामास निधनं वृष्णीनां कृत्स्नशो नृप ॥ तच्छ्रुत्वोद्विग्नहृदया जनाः शोकविमूर्च्छिताः ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ दारुक ह्मणे तुह्मी समस्त ॥ पळापळा अर्जुनासमवेत[8] ॥ अर्धक्षण न रहावें एथ ॥ यादव समस्त निमाले[9] ॥ ९३ ॥ यादवीं जाऊनि प्रभासासी[10] ॥ केला तीर्थविधि विधानेंसी ॥ दानभोजनें देऊनि द्विजांसी ॥ मद्यपानासी मांडिलें ॥ ९४ ॥ चढला मद्याचा उन्मादु ॥ यादव सखे सगोत्र बंधू ॥ परस्परें युद्धसंबंधू ॥ गोत्रवधू तेथ घडला ॥ ९५ ॥ शस्त्रें करूनि स्वयमेव ॥ कोणी न मरतीच यादव ॥ तेथ घडलें एक अपूर्व ॥ ऐंरिकेनें[11] सर्व निमाले ॥ ९६ ॥ बळिभद्रें त्यागिलें देहासी ॥ श्रीकृष्ण गेला निजधामासी ॥ मज धाडिलें तुह्मांपाशीं ॥ क्षण द्वारकेसी न रहावें ॥ ९७ ॥ ऐकूनि दारुकाची गोठी ॥ द्वारकेसि एक बोंब उठी ॥ उग्रसेन कपाळ पिटी ॥ मस्तक आपटी वसुदेव ॥ ९८ ॥ हरीनें

---

[1] पूर्णतेस आणिला. [2] कृष्णाचा सारथि. [3] दुःखासी. [4] अभागी. [5] चोहोंबाजूनें. [6] प्राप्त झाली. [7] घाबरोन. [8] अर्जुनासहित. [9] मेले. [10] प्रभासनामकक्षेत्रीं. [11] लव्हाळानें.

त्यागिलें द्वारकेसी ॥ समुद्र बुडवील शीघ्रगतीशी ॥ हें कृष्णें सांगीतलें तुह्मांसी ॥ एथूनि त्वरेंसी निघावें ॥ ९९ ॥ एक कुस्करिती दोनी हात ॥ एक अत्यंत चरफडत ॥ एक आक्रोशें आक्रंदत ॥ एक मूर्छित पैं पडलीं ॥ २०० ॥ एका रडतां शोषले कंठ ॥ एकाचे दोनी फुटले ओंठ ॥ एकाचा होऊं पाहे हृदयस्फोट ॥ दुःख आचाट सर्वांशी ॥ १ ॥ एक स्फुंदती उकसाबुकशीं ॥ एक पिटिती हृदयासी ॥ एक तोडिती कानकेशीं ॥ एक दुःखें पिशीं पैं जाहलीं ॥ २ ॥ एक देती दीर्घ हाका ॥ एक पडलीं अधोमुखा ॥ एक मीनापरी देखा ॥ अत्यंतिका तळमळती ॥ ३ ॥ बोंब सुटली नरनारी ॥ शंख करिती घरोघरीं ॥ कोण कोणातें निवारी ॥ समस्तां सरी समदुःख ॥ ४ ॥ देवकी आणि रोहिणी ॥ मूर्छित पडल्या धरणीं ॥ सवेंचि उठती आक्रंदोनी ॥ दीर्घध्वनीं विलपंती ॥ ५ ॥ कृष्णा निजा[3]च्या विसाविया ॥ भेटी दे कां रे कान्हया ॥ कां रुसलासि तान्हया ॥ तुझिया पायां लागेन ॥ ६ ॥ कृष्णा तूं माझा कैवारी ॥ कृष्णा तूं माझा सहाकारी ॥ शेखीं मज सांडोनि अंधारीं ॥ तूं दूरचेदूरीं गेलास ॥ ७ ॥ जिं[4]णोनि कंसकेशियांतें ॥ बंदीं सोडविलें आमुतें ॥ शेखीं तुवां सांडिलें एथें ॥ अंतीं ठेंकिलें मातें श्रीकृष्णा ॥ ८ ॥ आणूनि निमाल्या पुत्रांतें ॥ तुवां मज सुखी केलें एथें ॥ शेखीं तुवां सांडिलें एथें ॥ निष्ठुर चित्तें जाहलासी ॥ ९ ॥ कृष्णा निरसूं[6]नि माझें दुःख ॥ तुवां दीधलें परम सुख ॥ तो तूं निष्ठुर जाहलासि देख ॥ अंतीं निःशंक सांडिलें ॥ २१० ॥ माझिया पुत्रा कृष्णराया ॥ वेगीं ये कां रे कान्हया ॥ माझ्या नाहीं प्राशिलें पान्हया ॥ ह्मणोनि तान्हया रुसलासी ॥ ११ ॥ जिचें केलें स्तनपान ॥ ते यशोदाही जाहली दीन ॥ तुझें न देखतां वदन ॥ कैसेनि प्राण राहतील ॥ १२ ॥ कृष्णा येरे येरे धांवोन ॥ चौभुजीं मज दे आलिंगन ॥ तुझें चुंबीन रे वदन ॥ मीं अतिदीन तुजलागीं ॥ १३ ॥ माझिया श्यामसुंदरा ॥ राजीवलोचना सुकुमारा ॥ चतुर्भुजा शारंगधरा ॥ ये कां रे उदारा श्रीकृष्णा ॥ १४ ॥ तुझे पद्मां[7]कित पाये ॥ मज आठवती पाहे ॥ तेणें हृदय फुटताहे ॥ करूं मीं काये श्रीकृष्णा ॥ १५ ॥ कृष्णा तुजहूनि वेगळी ॥ मी जाहलें आंधळी ॥ माझी धरावया आंगोळी ॥ धांव वनमाळी श्रीकृष्णा ॥ १६ ॥ मज आंधळ्याची कृष्ण काठी ॥ कोणें घातली वैकुंठीं ॥ आतां मी मार्ग केउंता कंठी ॥ पाव जगजेठी श्रीकृष्णा ॥ १७ ॥ पुत्र नातू वंशावळी ॥ एके वेळीं जाहली होळी ॥ कोणी नुरेचि यदुकुळीं ॥ वक्षस्थळीं पिटिती ॥ १८ ॥ यादव पडलेरे केउते ॥ तुज कोठूनि धाडिलें कृष्णनाथें ॥ वेगीं न्या रे मज तेथें ॥ पाहीन समस्तें नातुं[9]लीं ॥ १९ ॥ ऐकोनि देवकीचें वचन ॥ वसुदेवादि उग्रसेन ॥ आक्रंदोनि सकळजन ॥ प्रभासासि जाण निघाले ॥ २२० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तत्र स्म त्वरिता जग्मुः कृष्णविश्लेषविह्वलाः ॥ व्यसवः शेरते

---

१ वेडीं. २ विलाप करितो. ३ आमच्या ४ जिंकून. ५ फसविलें. ६ नाहींसें करून. ७ कमलानें चिन्हित. ८ कोणत्या रीतीनें ९ नातवंडें.

यत्र ज्ञातयोऽघ्नंत आननम् ॥ १७ ॥  ॥ टीका ॥ ॥ स्त्रिया पुत्र सुहृज्जन ॥ मिळोनि स्वगोत्रजन ॥ शीघ्र प्रभासा गमन ॥ करीत रुदन निघालीं ॥ २१ ॥ हाकाबोंबांचा बंबाळ ॥ स्त्रिया करिती कोल्हाळ ॥ कृष्णवियोगें सकळ ॥ दुःखविह्वळ निघालीं ॥ २२ ॥ रणीं पडिले यादव ॥ प्राणरहित निर्जीव ॥ तेथ पावलीं सर्व ॥ बोंबा खंती करिती ॥ २३ ॥  ॥ श्लोक ॥  ॥ देवकी रोहिणी चैव वसुदेवस्तथा सुतौ ॥ कृष्णरामावपश्यंतः शोकार्ता विजहुः स्मृतिम् ॥ १८ ॥ प्राणांश्च विजहुस्तत्र भगवद्विरहातुराः ॥ उपगुह्य पतींस्तात चितामारुरुहुः स्त्रियः ॥ १९ ॥  ॥ टीका ॥  ॥ देवकी आणि रोहिणी ॥ वसुदेव उग्रसेन दोनी ॥ यादव निमाले रणांगणीं ॥ नये स्थानीं पाहों येती ॥ २४ ॥ दीर्घ शयनें युद्धधरणीं ॥ पडिल्या यादववीर[1]श्रेणी ॥ तेथें रामकृष्ण पुत्र दोनी ॥ पाहतां नयनीं न देखती ॥ २५ ॥ कृष्णविरहें शोकाकुलित ॥ दुःख न [2]संठेचि अतिअद्भुत ॥ चौघेजणें आक्रंदत ॥ पडिलीं मूर्च्छित अतिदुःखें ॥ २६ ॥ निमाल्या रामकृष्णाचें मुख ॥ आह्मी न देखोंचि निःशेख ॥ तेणें उथळे परमदुःख ॥ दुःखां[3]सवें देख निमालीं ॥ २७ ॥ प्राणें करावें उत्क्रमण ॥ त्यांसिही कृष्णदुःखें दारुण ॥ दुःखें निमाले स्वयें प्राण ॥ वांचवी कोण तयांतें ॥ २८ ॥ न देखतां रामकृष्ण ॥ ते मूर्च्छेसवेंचि प्राण ॥ चौघीजणीं त्यजिले जाण ॥ अर्धक्षण न लागतां ॥ २९ ॥ समस्तयादवांच्या स्त्रिया ॥ आपुलाले धरूनि प्रिया ॥ अग्निप्रवेश करावया ॥ चढल्या लवला[4]ह्यां चितेमाजी ॥ २३० ॥ यादवांचिया स्त्रिया बहुतीं ॥ कोण प्रवेशल्या कैशा रीतीं ॥ ते अग्निप्रवेशाची स्थिती ॥ परीक्षितिप्रती शुक सांगे ॥ ३१ ॥  ॥ श्लोक ॥  ॥ रामपत्न्यश्च तद्देहमुपगुह्याग्निमाविशन् ॥ वसुदेवपत्न्यस्तद्गात्रं प्रद्युम्नादीन् हरेः स्नुषाः ॥ कृष्णपत्न्योऽविशन्नग्निं रुक्मिण्याद्यास्तदात्मिकाः ॥ २० ॥  ॥ टीका ॥  ॥ बळरामाचिया पत्नी ॥ रेवत्यादि मुख्यकरूनी ॥ स्वपतीचा देह धरूनी ॥ प्रवेशल्या अग्नीं तद्ध्यानयुक्त ॥ ३२ ॥ निमाल्या देवकी रोहिणी ॥ इतरा ज्या वसुदेवपत्नी ॥ त्याही प्रवेशल्या अग्नीं ॥ देह धरूनी स्वपतीचा ॥ ३३ ॥ प्रद्युम्नासवें रती ॥ प्रवेशली महासती ॥ सांबासवें रूपवती ॥ प्रवेशे निश्चितीं दुर्योधनकन्या ॥ ३४ ॥ अनिरुद्धासवें देखा ॥ प्रवेशे रोचना आणि उखा ॥ एवं कृष्णसुना सकळिका ॥ यादवनायिका प्रवेशल्या अग्नीं ॥ ३५ ॥ अग्निप्रवेश श्रीकृष्णपत्नी ॥ त्यांची आलोलिक करणी ॥ त्यांमाजी प्रवेशली रुक्मिणी ॥ सती शिरोमणी जगन्माता ॥ ३६ ॥ कृष्णनिर्याणें रुक्मिणी ॥ तद्रूप जाहली तत्क्षणीं ॥ जेवीं ज्वाळा मिळे वह्नीं ॥ तेवीं कृष्णपत्नी तदात्मिका ॥ ३७ ॥ रुक्मिणीचा देह दहन ॥ करावया नुरेचि प्रेतपण ॥ कृष्णपूर्णत्वें स्वयंभ पूर्ण ॥ गति समान दोहींची ॥ ३८ ॥ येरी पट्ट मुख्या सातजणी ॥ आणिक सोळासहस्र कामिनी ॥

---

[1] यादववीरांच्या पंक्ती. [2] न साहे. [3] दुःखाश्रूनीं. [4] लवकर.

स्वयें प्रवेशल्या अग्नीं ॥ कृष्णचरणीं तदात्मक ॥ ३९ ॥ जिहीं भोगिलें कृष्णसुरतसुख ॥ त्यांसि गति न्यूनाधिक ॥ बोलतां वाचेसि[1] लागे दोख ॥ जाहल्या चिदात्मक कृष्णांगसंगें ॥ २४० ॥ जो वाचे स्मरे कृष्णकृष्ण ॥ तो तदात्मता पावे पूर्ण ॥ मा जिहीं भोगिला श्रीकृष्ण ॥ त्यांची दशा[2] न्यून कदा नघडे ॥ ४१ ॥ ज्यासि लागे कृष्णाचा अंगसंग ॥ त्याच्या लिंगदेहा[3] होय भंग ॥ त्यासि पूर्ण पदवी अभंग ॥ भोगितां भोग तादात्म्य नित्य ॥ ४२ ॥ ज्याच्या ध्यानासि ये कृष्णमूर्ती ॥ त्यासि चारी मुक्ति वंदिती ॥ मा जिहीं स्वयें भोगिला श्रीपती ॥ त्यांसि अन्यगती असेना ॥ ४३ ॥ ज्यांसि इहलोकीं कृष्णसंगती ॥ त्यांसि परलोकीं अन्यगती ॥ बोलतां सज्ञान कोणती ॥ त्यांसि पूर्ण प्राप्ती पूर्णत्वें ॥ ४४ ॥ जो अडखळोनि गंगेसि पडे ॥ त्याचें पातक तत्काळ उंडे[4] ॥ मा ज्यासि विध्युक्तें[5] स्नान घडे ॥ त्याचें पाप न झडे मग कैसेंनी ॥ ४५ ॥ तेवीं कृष्णव्यभिचारसंगतीं ॥ गोपी उद्धरल्या नेणों किती ॥ त्याच्या निजपत्न्यांसि अन्यगती ॥ कैशा रीतीं घडेल ॥ ४६ ॥ तृण वल्ली मृग पाषाण ॥ गायी गोपिका गौळीजन ॥ कृष्णसंगें तरले पूर्ण ॥ त्याचिया स्त्रियांसि अन्य गति कैशी ॥ ४७ ॥ यालागीं कृष्णसंगती ॥ ज्यासि घडेल भलत्या रीतीं ॥ ते उद्धरले गा निश्चितीं ॥ जाण परीक्षिति कुरुराया ॥ ४८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अर्जुनः प्रेयसः सख्युः कृष्णस्य विरहातुरः ॥ आत्मानं सांत्वयामास कृष्णगीतैः सदुक्तिभिः ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥ ज्याचा रथ वागवी आपण ॥ ज्याचा सारथी श्रीकृष्ण ॥ ऐसा प्रियसखा अर्जुन ॥ कृष्णविरहें पूर्ण उद्विग्न[6] जाहला ॥ ४९ ॥ तंव कृष्णगीता सदुक्ती ॥ आठवली त्याचिये चित्तीं ॥ मग आपण आपण्याप्रती ॥ बोलिला उपपत्ती त्या ऐका ॥ ५० ॥ कृष्ण माझ्या मनाचें मन ॥ कृष्ण बुद्धीचें आयतन[7] ॥ कृष्णप्रभा हे प्रकाशे ज्ञान ॥ तेथ भिन्नपण मज कैसें ॥ ५१ ॥ कृष्णप्रभा दृष्टीं देखे ॥ कृष्णअवधानें श्रवण ऐके ॥ कृष्णानुवादें बोल बोलके ॥ तेथ मी वेगळिकें वृथा मानी ॥ ५२ ॥ कृष्ण हृदयस्थ आत्मा अव्यंग ॥ कृष्ण माझ्या अंगाचें अंग ॥ त्या कृष्णासी मज वियोग ॥ हा मिथ्या प्रयोग मायिक ॥ ५३ ॥ कृष्ण माझ्या जीवाचें जीवन ॥ कृष्ण सबाह्य परिपूर्ण ॥ कृष्णें वियोग मानिजे मीपण ॥ तेही निमग्न श्रीकृष्णीं ॥ ५४ ॥ भिन्नभिन्न भूताकृती ॥ त्यांमाजी अभिन्न कृष्णस्थिती ॥ विषमीं समान श्रीपती ॥ त्यासि वियोगप्राप्ति कदा नघडे ॥ ५५ ॥ घट मृत्तिकेसी नव्हे भिन्न ॥ पटू नव्हे तंतु त्यागून ॥ तैसा श्रीकृष्णा वेगळा अर्जुन ॥ माझें मीपण निवडेना ॥ ५६ ॥ कृष्णवियोग मी मानीं जेथ ॥ तेथही असे श्रीकृष्णनाथ ॥ वियोग मानिजे सत्य ॥ ते केवळ भ्रांत अतिमूर्ख ॥ ५७ ॥ नित्य सर्वगत परिपूर्ण ॥ कृष्ण अखंडदंडायमान ॥ त्यासी मजशीं वेगळेपण ॥ सर्वथा जाण असेना ॥ ५८ ॥ नजा

---

१ वाणीला. २ स्थिति. ३ सूक्ष्मदेहाचा. ४ नष्ट होतें. ५ विधीप्रमाणें. ६ दुःखी. ७ स्थान.

यते म्रियते हें वचन ॥ स्वमुखें बोलिला पुरुषोत्तम ॥ त्या कृष्णासि जन्ममर ॥ मूर्खजन मानिती ॥ ५९ ॥ अक्षर ब्रह्म परम ॥ स्वयें बोलिला पुरुषोत्तम ॥ त्या कृष्णासि जन्ममरण ॥ मूर्ख मनोधर्म कल्पिती ॥ २६० ॥ क्षराक्षरातीत ॥ उत्तम पुरुष श्रीकृष्णनाथ ॥ त्यासि जन्ममरणादिआँवर्त ॥ कल्पिती भ्रांत मनोधर्में ॥ ६१ ॥ त्या कृष्णासी मज वेगळेपण ॥ कल्पांतींही नाहीं जाण ॥ करितां गीतार्थाचें स्मरण ॥ आपुलें आपण पूर्णत्व देखे ॥ ६२ ॥ मी अज आद्य अचळ ॥ मी नित्य निज निर्मळ ॥ माझ्या स्वरूपा नाहीं चळ ॥ त्रैलोक्य खेळ पैं माझा ॥ ६३ ॥ जगातें नेमिता वेद ॥ तो निःश्वसित माझा बोध ॥ मी आनंदासि परमानंद ॥ स्वानंदकंद निजांगें ॥ ॥ ६४ ॥ मी आपैंरूपें आप ॥ मी प्रकृतिपुरुषांचा बाप ॥ मी अवतारी अवतरें कृष्णरूप ॥ हा सत्यसंकल्प पैं माझा ॥ ६५ ॥ धरोनि माझ्या स्वरूपाचा आधार ॥ मीचि कृष्णीं कृष्णरूप अवतार ॥ करूनि स्वलीला नानाचरित्र ॥ अंतीं सामावें साचार मजमाजी मीच ॥ ॥ ६६ ॥ माझ्या निजस्वरूपाचेंनि बळें ॥ मीच कृष्णरूपें खेळ खेळें ॥ अंतीं मजमाजी मीच मिळें ॥ निजात्ममेळें निजनिष्ठा ॥ ६७ ॥ एक नर एक नारायण ॥ परस्परें ते अभिन्न ॥ यालागीं पूर्णत्वें अर्जुन ॥ आपण्या आपण स्वयें देखे ॥६८॥ बाप कृपाळु कृपानिधि ॥ उपदेशिला युद्धसँधीं ॥ परी लाविली जे समाधी ॥ ते न मोडे त्रिशुद्धी कल्पांतकाळीं ॥ ६९ ॥ नाहीं स्थानशुद्धि चँखोट ॥ सैघ रथांचे घडघडाट ॥ सुटतां शस्त्रांचे कडकडाट ॥ लाविली निर्दुष्ट परमात्मनिष्ठा ॥ २७० ॥ कैशी लाविली समाधी ॥ जी न मोडेच महायुद्धीं ॥ शेखीं कृष्णावतारसमाधी ॥ तोचि बोध उद्धोधीं परिपूर्णत्वें ॥ ७१ ॥ ज्यासि गीता उपदेशी कृष्ण ॥ त्यासि न बाणे पूर्णपण ॥ ऐसें बोलतांचि वचन ॥ परम दूषण वाचे वी ॥ ७२ ॥ ते वाचा गलितकुष्ठीं झडे ॥ तीस विकल्पें पडती किडे ॥ ते वाचाचि समूळ झडे ॥ कृष्णोक्ति न घडे बोध ह्मणतां ॥ ७३ ॥ गीताउपदेशें पूर्णपण ॥ नव्हे ऐसें ह्मणतां जाण ॥ वाग्देवता कोपे आपण ॥ इतरांचा कोण पडिर्पाडू ॥ ७४ ॥ गीता ऐके पाहे पढे ॥ ज्यासि गीतास्मरण घडे ॥ त्यासी पूर्णत्व स्वयें जोडे ॥ मा उपदेशें नातुडें पूर्णत्व कैसें ॥ ७५ ॥ गीतार्थाचें पूर्णपण ॥ वक्ता जाणे श्रीकृष्ण ॥ कां तो जाणे अर्जुन ॥ त्यासि ते खूण बाणली ॥ ७६ ॥ मागें सांडोनि वेदार्था ॥ श्रीकृष्णें प्रकट केली गीता ॥ तेथील अभिप्राय पाहतां ॥ जोडे अक्षयता निजमोक्ष ॥ ७७ ॥ परदेशी जाहला होता वेदांत ॥ त्यासि सहाय जाहला गीतार्थ ॥ तेणें बळें मतें समस्त ॥ जिणोनि समर्थ ती जाहली ॥७८॥ कृष्णनिःश्वाँसें जन्मले वेद ॥ गीता स्वमुखें प्रकटली शुद्ध ॥ यालागीं गीतार्थ अगाध ॥ धडौते वेद तेणें जाहले ॥७९ ॥ वेदें आप्त केले तिनी वर्ण ॥ दुराविले स्त्रीशूद्रजन ॥ न शिवे

---

१ मनाचे विचार. २ रविती. ३ भोंवरा. ४ उद्कृरूपानें. ५ युद्धाचे वेळीं. ६ चांगली. ७ आठवे. ८ पाड. ९ लाधली, मिळाली. १० श्वासानें.

त्यांचे कान ॥ हें वेदांसि न्यून पैं आले ॥ २८० ॥ तें वेदाचें फेडावया उणें ॥ गीता प्रकटली श्रीकृष्णें ॥ गीतेचे श्रवणें पठणें ॥ उद्धरणें जडजीवां ॥ ८१ ॥ अर्जुनाचे प्रीतीकारणें ॥ गीतार्थ प्रकाशिला श्रीकृष्णें ॥ गीतेचेनि श्रवणें पठणें ॥ उद्धरणें जडजीवां ॥ ८२ ॥ असो अगाध गीता[1]महिमा ॥ तेणें गीतार्थें तो अर्जुन ॥ करूनि आपलें सांत्वन ॥ जाहला सावधान प्रकृतिस्थ ॥ ८३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ बंधूनां नष्टगोत्राणामर्जुनः सांपरायिकम् ॥ हतानां कारयामास यथावदनुपूर्वशः ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥ यादव निमाले कुलवंशेंसी ॥ गोत्रज नाहीं कर्मांतरासी ॥ वज्र[2] राहिला द्वारकेशीं ॥ तो विधी अर्जुनासी करणें पडला ॥ ८४ ॥ मी पावलों निष्कर्म ब्रह्म ॥ तो मी न करीं अंत्यकर्म ॥ ऐसा ज्ञानगर्वोपक्रम ॥ तोही सूक्ष्म भ्रम अर्जुनीं नाहीं ॥ ८५ ॥ कर्मण्यकर्म यः पश्येत् ॥ हा अर्जुनीं बाणला पूर्णांश ॥ तेणें तो अंत्यकर्मास ॥ स्वयें सावकाश करिता जाहला ॥ ८६ ॥ प्रथम ज्येष्ठांचें दहन ॥ पाठीं कनिष्ठांचें जाण ॥ तैसेंच करी पिंडदान ॥ तिळतर्पण सर्वांचें ॥ ८७ ॥ उत्तरक्रिया करूनि संपूर्ण ॥ द्वारकेसि आला अर्जुन ॥ तेथेंही वर्तलें आन[3] ॥ समुद्र दारुण क्षोभला ॥ ८८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ द्वारकां हरिणा त्यक्तां समुद्रोऽप्लावयत्क्षणात् ॥ वर्जयित्वा महाराज श्रीमद्भागवदालयम् ॥ २३ ॥ नित्यं सन्निहितस्तत्र भगवान् मधुसूदनः ॥ स्मृत्याऽशेषाशुभहरं सर्वमंगलमंगलम् ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ द्वारका सांडूनि गेला कृष्ण ॥ तेथ समुद्र आला आपण ॥ बुडविली न लागतां क्षण ॥ पळाले जन हाहाभूत ॥ ८९ ॥ द्वारका बुडविली पूर्ण ॥ राखिलें भगवंताचें स्थान ॥ जो आला पाताळींहून ॥ कुशनिर्दळण करावया ॥ २९० ॥ तें भगवंताचें स्थान ॥ समुद्र न करीचि निमग्न ॥ जेथ हरीचें सन्निधान ॥ नित्य नूतन स्फुरद्रूप ॥ ९१ ॥ ज्याचें करितांचि स्मरण ॥ महापातकां निर्दळण ॥ सकळमंगळांचें आयतन ॥ तें हरीचें स्थान उरलें असे ॥ ९२ ॥ द्वारकेमाजी नित्यपूजा ॥ अद्यापि होतसे गरुडध्वजां[4] ॥ ऐक परीक्षिति महाराजा ॥ तें अधोक्षजाचें स्थान ॥ ९३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्त्रीबालवृद्धानादाय हतशेषान् धनंजयः ॥ इंद्रप्रस्थं समावेश्य वज्रं तत्राभ्यषेचयत् ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ एवं द्वारका जाहलिया निमग्न ॥ उरले बाल वृद्ध स्त्रीजन ॥ त्यांसि घेऊनियां अर्जुन ॥ निघाला आपण इंद्रप्रस्था ॥ ९४ ॥ यादव प्रभासापर्यंत ॥ गेले ते निमाले समस्त ॥ उरले जे द्वारकेआंत ॥ वज्रादिकांसमवेत अर्जुन निघे ॥ ९५ ॥ एवं घेऊनियां समस्तांसी ॥ पार्थ आला इंद्रप्रस्थासी ॥ राज्य घारें[5] यादववंशीं ॥ तेथ वज्रासी अभिषेकी ॥ ९६ ॥ अनिरुद्धाचा पुत्र वज्र ॥ यादववंशीं राज्यधर ॥ अभिषेकूनि अर्जुनवीर ॥ निघे सत्वर धर्माप्रती ॥ ९७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रुत्वा सुहृद्वधं राजन्नर्जुनात्ते पितामहाः ॥ त्वां तु वंशधरं कृत्वा जग्मुः सर्वे महापथम ॥ २६ ॥

---

[1] गीतामाहात्म्य. [2] अनिरुद्धपुत्र. [3] आणखी. [4] श्रीकृष्णाची. [5] भार.

॥ टीका ॥ ॥ निजधामा गेला श्रीपती ॥ अर्जुनें सांगतां धर्माप्रती ॥ तुज राज्य देऊनि परीक्षिति ॥ लागले महापंथीं तत्काळची ॥ ९८ ॥ निजधामा गेला श्रीपती कृष्ण ॥ ऐकतां कुंत्या सांडिला प्राण ॥ द्रौपदीसहित पांचही जण ॥ महापंथीं जाण निघाले ॥ ९९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ य एतद्देवदेवस्य विष्णोः कर्माणि जन्म च ॥ कीर्तयेत् श्रद्धया मर्त्यः सर्वपापैः प्रमुच्यते ॥२७॥ ॥ टीका ॥ ॥ देवाधिदेव सर्वेश्वर ॥ त्याचे मत्स्यकूर्मादि अवतार ॥ जन्मकर्मादि नाना चरित्र ॥ गाती ते पवित्र पुण्यराशी ॥ ३०० ॥ तेंचि चरित्र तत्त्वतां ॥ श्रद्धायुक्त गीतीं गातां ॥ प्रयागादि समस्ततीर्थां ॥ होय पवित्रता त्याचेनी ॥ १ ॥ श्रद्धायुक्त हरिकीर्तन ॥ त्याचे पवित्रतेसमान ॥ आन नाहीं गा पावन ॥ तुझी आण[2] गा परीक्षिती ॥ २ ॥ ते तूं श्रद्धा कोण ह्मणशी ॥ जेवीं धनलोभी धनासी ॥ गुळीं आवडी मां[3]कोळ्यांसी ॥ तैशी कीर्तनाशी आवडी ॥ ३ ॥ जेवीं शिणतां काळें बहुतें ॥ वंध्या प्रसवे एकोलतें ॥ ते कळवळी जैशी त्यातें ॥ तेंवीं कीर्तनातें अतिप्रीती ॥ ४ ॥ जो कीर्तनाचेनि वैभवें ॥ हरिचरित्र गावया सद्भावें ॥ पतंगाच्या ऐसा वावे ॥ श्रद्धा त्या नांवें कुरुराया ॥ ५ ॥ ऐशिया श्रद्धासंपत्ती ॥ वर्णितां भगवद्गुणकीर्ती ॥ श्रद्धाळुवा परमप्राप्ती ॥ जाण निश्चितीं नृपनाथा ॥ ६ ॥ जरी आपण परमेश्वर ॥ स्वलीला धरी नानावतार ॥ तरी श्रीरामकृष्णचरित्र ॥ अतिगंभीर पावनत्वें ॥ ७ ॥ कृष्णाची चोरी गीतीं गातां ॥ सुवर्ण[4]स्तेया पावनता ॥ कृष्णव्यभिचार वर्णितां ॥ गुरुतल्पगता हरी दोष ॥ ८ ॥ पूतनापयःपानशोषण ॥ तें चरित्र करितां पठण ॥ सुरापानादि दोष दारुण ॥ हरि संपूर्ण विश्वासतां ॥ ९ ॥ राक्षसकुळींचा रावण ॥ परी तो जातीचा शुद्ध ब्राह्मण ॥ नित्य करी वेदपठण ॥ ब्रह्मयाचा जाण तो नातू ॥ ३१० ॥ त्याचें सकुळें[5] निर्दळण ॥ श्रीराम करी आपण ॥ तें चरित्र करितां पठण ॥ ब्रह्महत्या जाण नासती ॥ ११ ॥ धर्मसाह्यकारी श्रीकृष्ण ॥ केलें पांडवांचें रक्षण ॥ त्या भारताचेनि श्रवणें जाण ॥ निमाले[6] ब्राह्मण वांचविले ॥ १२ ॥ अठरा ब्रह्महत्या जन्मेजयासी ॥ अठरा पर्वें सांगोनि त्यासि ॥ निमाल्या उठविलें द्विजांसी ॥ कृष्णकीर्ति ऐसी पावन ॥ १३ ॥ ऐकतां कृष्णरामकीर्ती ॥ महापातकें बापुडीं किती ॥ पायां लागती चारी मुक्ती ॥ श्रद्धा संपत्तिकीर्ती गातां ॥ १४ ॥ श्रद्धेचिया अतिप्रीतीं ॥ आवडीं गातां कृष्णकीर्ती ॥ सहजें सायुज्यता पावती ॥ देहस्थिती असतांही ॥ १५ ॥ हरिकीर्तिकीर्तन ज्याच्या ठायीं ॥ तोही वर्ततां दिसे देहीं ॥ परी देही ना तो हरीच्या ठायीं ॥ हरि त्याचेठायीं अवघाची ॥ १६ ॥ तोही अवघा हरिभीतरीं ॥ हरि त्या सबाह्य अभ्यंतरीं ॥ परीक्षिति ऐशियापरी ॥ कीर्तिमंत संसारीं नांदती ॥ १७ ॥ यालागीं हरिकीर्तनापरतें ॥ सुगम[7] साधन नाहीं एथें ॥ जे विनटले हरिकीर्तनातें ॥ ते देहबंधनातें नाकळती ॥ १८ ॥

---

१ निर्याणीं. २ शपथ. ३ मुंगळ्यास, डोंगळ्यास. ४ सुवर्ण चोरणाऱ्या चोराला. ५ कुळासहित. ६ मेलेले. ७ सुलभ.

कृष्णकीर्तनी उजळली स्थिती ॥ ती मैळेना[1] कदा कल्पांतीं ॥ जरी ते देहकर्में करिती ॥ तरी जाहली स्थिती मैळेना ॥ १९ ॥ आकाश पर्जन्यें नव्हे वोलें ॥ कां रविबिंब थिल्लरजळें ॥ असोनियां तेणें मेळें ॥ कदाकाळें तिंबेना ॥ २० ॥ तेवीं हरिकीर्तनकल्लोळें ॥ जयांची निष्काम दशा उजळे ॥ ते वर्ततां देहकर्ममेळें ॥ देहविटाळें अलिप्त ॥ २१ ॥ निजभक्तांचें शरीरकर्म ॥ स्वयें चालवी पुरुषोत्तमें[2] ॥ यालागीं भक्तांसि कर्मभ्रम ॥ अधमोत्तम बाधीना ॥ २२ ॥ भक्तां अभक्तांची कर्मगती ॥ भगवंत चालवी निश्चितीं ॥ तेथ भक्तांची कां अलिप्तस्थिती ॥ अभक्त कां होती अतिबद्ध ॥ २३ ॥ करितां कृष्णकीर्तिकीर्तन ॥ भक्तांचा निरसे देहाभिमान ॥ यालागीं ते अलिप्त जाण ॥ अभक्तां बंधन अहंभांवें[3] ॥ २४ ॥ हे दशा मागीतल्या पावती ॥ ऐसें न घडे गा परीक्षिती ॥ आवडीं गातां कृष्णकीर्ती ॥ सहज स्थिती ठसावे ॥ २५ ॥ श्रीकृष्णकीर्तिकीर्तनें ॥ बहुतांचें संसारधरणें ॥ उठविलें स्वयें श्रीकृष्णें ॥ चरित्रपठणें तुष्टोनी ॥ २६ ॥ कृष्णकीर्तिकीर्तनगोडी ॥ अहंकाराची बांदवंडी[4] फोडी ॥ जीवाचें जीवबंधन तोडी ॥ निःसीम आवडीं कीर्ति गातां ॥ २७ ॥ एवं कृष्णकीर्तिकीर्तनें ॥ भक्तीं कृष्णपद स्वयें घेणें ॥ जग उद्धरावयाकारणें ॥ कीर्ति श्रीकृष्णें विस्तारिली ॥ २८ ॥ जन्मापासूनि अंतपर्यंत ॥ कृष्णचरित्र अत्यद्भुत ॥ तुज म्यां सांगीतलें सार्यंतें[5] ॥ परमामृत निजसार ॥ २९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ इत्थं हरेर्भगवतो रुचिरावतारवीर्याणि बालचरितानि च शंतमानि ॥ अन्यत्र चेह च श्रुतानि गृणन्मनुष्यो भक्तिं परां परमहंसगतौ लभेत ॥ २८ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे एकत्रिंशोऽध्यायः ॥ ३१ ॥ ॥ समाप्त एकादशस्कंधः ॥ ॥ टीका ॥ ॥ जन्मापासूनि ज्ञानघन ॥ श्रीकृष्णचरित्र अतिपावन ॥ ज्याचे संगतीं गोंवळें जाण ॥ भक्तिमान जन उद्धरिले ॥ ३३० ॥ ज्याचिया व्यभिचारासंगतीं ॥ गोपी उद्धरल्या नेणों किती ॥ कृष्ण श्यामसुंदरमूर्ती ॥ अभिलाषीं चित्तीं दृढ धरिला ॥ ३१ ॥ देखोनि सुंदर कृष्णमूर्ती ॥ गायी वेधल्या तटस्थ ठांती[6] ॥ पशु उद्धरले कृष्णसंगतीं ॥ मा गोपी नुद्धरती कैसेनी ॥ ३२ ॥ गायींगोपिकांचें नवल कोण ॥ वृंदावनींचे तृण पाषाण ॥ कृष्णसंगें तरले जाण ॥ ऐसा ज्ञानघन श्रीकृष्ण ॥ ३३ ॥ विषें भरोनियां निजस्तन ॥ पूतना घेऊं आली प्राण ॥ तेही कृष्णसंगें जाण ॥ त्याचक्षण उद्धरली ॥ ३४ ॥ कंसशिशुपाळादिकांसी ॥ द्वेषेंचि तारी हृषीकेशी ॥ चंदन लावितां अंगासी ॥ अंगसंगें कुब्जेसी[7] तारिलें ॥ ३५ ॥ उन्मत्त मदें अतिमूढ ॥ मारूं आला कुवलयापीड ॥ त्यासि मोक्षाचा सुरवाड ॥ उद्धरिला सदृढ कृष्णाभिघातें ॥ ३६ ॥ अरिष्ट[8] करूं आला श्रीकृष्णालागीं ॥ तो अरिष्ट तारिला धरूनि शिंगीं ॥ अघासुरें गिळितां वेगीं ॥ चिरोनि दोभागीं उद्धरी कृष्ण ॥ ३७ ॥ कृष्णलक्षें लावूनि टाळी ॥

---

१ मळेना. २ श्रीकृष्ण. ३ मीपणानें. ४ बंधारा, बांध. ५ संपूर्ण. ६ राहती. ७ कुब्जानांवाच्या दासीस. ८ अरिष्टनामक दैत्य.

बक ध्यानस्थ यमुनाजळीं ॥ तो कृष्णातें सवेग गिळी ॥ करूनि दोन फाळी तारिला ॥ ३८ ॥ उडवूं आला तृणावर्त ॥ त्यासि कृष्णें उडविला आवर्त ॥ अंगसंगें कृष्णनाथ ॥ कृपावंत वैरियां ॥ ३९ ॥ गोपाळ नेले चोरचोरूं ॥ ठकूं आला व्योमासुरू ॥ त्याचाही केला उद्धारू ॥ मोक्षें उदारू श्रीकृष्ण ॥ ३४० ॥ केशिया कंसाचा घोडा ॥ कृष्णें मारूनि तारिला पुढां ॥ मल्ल मर्दूनि मालखंडा ॥ मोक्षाचा उघडा सुकाळ केला ॥ ४१ ॥ काळिया नाथिला[3] विखारू[4] ॥ वृक्षीं उपाडिला वत्सासुरू ॥ भवाब्धीमाजी श्रीकृष्ण तारू ॥ सवेग उद्धारू जडमूढां ॥ ४२ ॥ जिहीं खेळविला चक्रपाणी ॥ ज्यांचें घरीं प्याला पाणी ॥ ज्यांचे चोरूनि खादलें लोणीं ॥ त्याही गौळणी उद्धरिल्या ॥ ४३ ॥ रुक्मिया तारिला विटंबोनी ॥ बाण तारिला भुजा छेदोनी ॥ कंस तारिला निर्दळूनी ॥ मोक्षदानी श्रीकृष्ण ॥ ४४ ॥ जेजे मीनले सोयरिकें ॥ जे कां पाहूं आले कौतुकें ॥ तेते तारियेले यदुनायकें ॥ दर्शनसुखें निववूनी ॥ ४५ ॥ पांडव तारिले पक्षपातें ॥ वैरी तारिले शस्त्रघातें ॥ यापरी श्रीकृष्णनाथें ॥ उद्धरिलीं बहुतें निजसंगें ॥ ४६ ॥ वैरी तारिले द्वेषवैभवें ॥ भक्त पावले भजनभावें ॥ गोपी तारिल्या संगानुभवें ॥ ज्या जीवें भावें अनुसरल्या ॥ ४७ ॥ गायी तारिल्या संरक्षणेंसी ॥ मयूर तारिले मोरपिशीं ॥ वृक्ष तारिले कुरंगोनि केशीं ॥ तारक हृषीकेशी पूर्णत्वें ॥ ४८ ॥ पूर्ण ब्रह्म कृष्णावतार ॥ ज्ञानप्राधान्य लीला विचित्र ॥ ब्रह्मादिकां नकळे चरित्र ॥ वंद्य सर्वत्र सज्ञाना ॥ ४९ ॥ घेऊनि षड्गुणैश्वर्यसंपत्ती ॥ अवतरली श्रीकृष्णमूर्ती ॥ यश श्री औदार्य ज्ञान शांती ॥ वैराग्यस्थिती अभंग ॥ ३५० ॥ इतर अवतारीं अवतरण ॥ तेथें गुप्त केले साही गुण ॥ कृष्णावतार ब्रह्म पूर्ण ॥ पूर्ण षड्गुण प्रकाशिले ॥ ५१ ॥ यालागीं कृष्णावतार जाण ॥ अविच्छिन्न साही गुण ॥ त्याचेनि अंगसंगें उद्धरण ॥ सर्वांसि जाण सर्वदा ॥ ५२ ॥ उद्धरले कृष्णसंगतीं ॥ अथवा कृष्णाचिया अतिप्रीतीं ॥ तरले देखतां कृष्णमूर्ती ॥ हें नवल निश्चितीं नव्हे एथें ॥ ५३ ॥ हेंचि पैं गा कृष्णकीर्ती ॥ अत्यावडीं गातां गीतीं ॥ उद्धरले नेणों किती ॥ अद्यापि उद्धरती श्रद्धाळू ॥ ५४ ॥ आवडीं गातां कृष्णकीर्ती ॥ कीर्तिमंतां लाभे परमगती[7] ॥ जीतें परा ऐसें ह्मणती ॥ ते चौथी भक्ती घरीं रिघे ॥ ५५ ॥ आर्त जिज्ञासु अर्थार्थी ॥ त्यांची सहजें राहे स्थिती ॥ अखंड प्रकटे चौथी भक्ती ॥ श्रीकृष्णकीर्ती स्वयें गातां ॥ ५६ ॥ आवडीं गातां श्रीकृष्णकीर्ती ॥ सहजें होय विषयीं विरक्ती[9] ॥ शमदमादिसंपत्ती ॥ पायां लागती सहजेंची ॥ ५७ ॥ कृष्णकीर्तीची जपमाळी ॥ जो अखंड जपे जिह्वामूळीं ॥ श्रीकृष्ण त्याजवळीं ॥ सर्वकाळीं सर्वदा ॥ ५८ ॥ आदरें जपतां श्रीकृष्णकीर्ती ॥ श्रीकृष्ण प्रकटे सर्वभूतीं ॥ सहजें ठसावे चौथी भक्ती ॥ परमात्मस्थितीसमवेत ॥ ५९ ॥ जे भक्तीमाजी जाण ॥ पूज्य[10] पूजक[11] होय श्रीकृष्ण ॥ हें चौथे भक्तीचें लक्षण ॥ आपणा आपण स्वयें भजे ॥ ३६० ॥

---

१ भाग. २ शत्रूंना. ३ दमविला. ४ विषारी. ५ पूर्ण. ६ भाविक. ७ मोक्ष. ८ केवळ अर्थाचीच इच्छा करणारा. ९ अप्रीति. १० ज्याची पूजा करावयाची तो. ११ पूजा करणारा.

चौथे भक्तीचें विंदानं[१] ॥ भोग्य भोक्ता स्वयें श्रीकृष्ण ॥ कृष्णेंसी वेगळेपण ॥ भक्तां अर्धक्षण असेना ॥ ६१ ॥ ते काळीं भक्तांसि जाण ॥ देह गेहं[२] होय श्रीकृष्ण ॥ जात गोत श्रीकृष्णचि आपण ॥ संसारही पूर्ण कृष्ण होये ॥ ६२ ॥ ऐशी लाहोनि पराभक्ती ॥ परमहंसाची कृष्ण गती ॥ ते कृष्णरूप स्वयें होती ॥ श्रीकृष्णकीर्ती वर्णितां ॥ ६३ ॥ स्वरूपीं नाहीं च्युती[३] ॥ ते कृष्णस्वरूप निश्चितीं ॥ भक्त तद्रूप स्वयें होती ॥ कृष्णकीर्ती वर्णितां ॥ ६४ ॥ कृष्णकीर्तीचें एक अक्षर ॥ चहूंवेदांचें निजजिव्हार ॥ सकळशास्त्रांचें परमसार ॥ कृष्णचरित्र कुरुराया ॥ ६५ ॥ जें वेदांचें जन्मस्थान ॥ तें षट्शास्त्रां समाधान ॥ षड्दर्शनां बुजावण ॥ तो आठवा श्रीकृष्ण पूर्णावतार ॥ ६६ ॥ अनंत अवतार झाले जाण ॥ परी कृष्णावतार ज्ञानघनं[४] ॥ त्याचें चरित्र अतिपावन ॥ भवबंधनच्छेदक ॥ ६७ ॥ त्या कृष्णाची कृष्णकीर्ती ॥ आदरें आठवितां चित्तीं ॥ भवबंधनाची समाप्ती[५] ॥ जाण निश्चितीं नृपनाथा ॥ ६८ ॥ वैभव श्रीकृष्णकीर्तीशीं ॥ वैराग्य श्रीकृष्णकीर्तीपाशीं ॥ श्रीकृष्णकीर्ति वसे ज्याचे मानसीं ॥ ते कळिकाळासी नागवती ॥ ६९ ॥ आळसें स्मरतां कृष्णमूर्ती ॥ सकळ पातकें भस्म होती ॥ जे कृष्णकीर्ति सदा गाती ॥ त्यांसि चारी मुक्ती आंदण ॥ ३७० ॥ श्रीकृष्णकीर्तीचें एकेक अक्षर ॥ निर्दळी महापातक संभारं[६] ॥ मोक्ष देऊनि अतिउदार ॥ जगदुद्धारकारक ॥ ७१ ॥ बहु अवतारीं अवतरे देवो ॥ परी ये अवतारींचा नवलावो[७] ॥ ज्ञानप्राधान्य लीला पहाहो ॥ अगम्य अभिप्रावो ब्रह्मादिदेवां ॥ ७२ ॥ जन्मापासून जो जो देहाडा ॥ तो तो नीच नवा पवाडा ॥ ब्रह्मसुखाचा उघडा ॥ केला रोकडा सुकाळ ॥ ७३ ॥ अवतारांमाजी श्रीकृष्ण ॥ निजनिष्टंक ब्रह्म पूर्ण ॥ त्याचें चरित्र ज्ञानघन ॥ पठणें पावन जन होती ॥ ७४ ॥ ऐशी पावन कृष्णकीर्ती ॥ पढतां वाचक उद्धरती ॥ श्रद्धेनें जे श्रवण करिती ॥ तेही तरती भवसिंधू ॥ ७५ ॥ कलियुगीं जन मंदमती ॥ त्यांसि तरावया सुगमस्थिती ॥ परमपावन कृष्णकीर्ती ॥ कृपेनें निश्चितीं विस्तारली ॥ ७६ ॥ ऐशी पावन भगवत्कीर्ती ॥ विस्तारली श्रीभागवतीं ॥ त्यांत दशमस्कंधाप्रती ॥ श्रीकृष्णकीर्ती अतिगोड ॥ ७७ ॥ उपजल्यादिवसापासूनी ॥ चढोवढी प्रतिदिनीं ॥ कीर्ति विस्तारी चक्रपाणी[८] ॥ दीनजनीं तरावया ॥ ७८ ॥ धरूनि नरनाट्यवेश ॥ अवतरला हृषीकेश ॥ तेथें नानाचरित्रविलास ॥ दिवसेंदिवस विस्तारी ॥ ७९ ॥ त्याहीमाजी बाळचरित्र ॥ मधुर सुंदर अतिपवित्र ॥ मालखंडें जें केलें क्षेत्र ॥ परम पवित्र पावनत्वें ३८० ॥ जरासंध पराभवून ॥ काळयवनातें निर्दाळून ॥ तें अतिविचित्र विंदान ॥ लाघवी श्रीकृष्ण स्वयें दावी ॥ ८१ ॥ रुक्मिया रणीं विटंबून ॥ शिशुपाळादि वीर रणीं गांजून ॥ कृष्ण करी भीमकीहरण ॥ ते परमपावन हरिलीला ॥ ८२ ॥ पट्टमहिषींचें[९]

---

[१] कारण. [२] घर. [३] क्षरण. [४] ज्ञानानें परिपूर्ण. [५] नाश. [६] ओझें. [७] आश्चर्य. [८] श्रीकृष्ण. [९] रुक्मिण्यादि अष्टनायिकांचें.

वरण[1] ॥ भौमासुराचें निर्दळणं[2] ॥ पारिजाताचें हरण ॥ पाणिग्रहण सोळासहस्रीं ॥ ८३ ॥ समुद्रीं वसवूनि द्वारावती ॥ निद्रा न मोडितां निश्चितीं ॥ मथुरा आणिली रातोरातीं ॥ अभिनव कीर्ती कृष्णाची ॥ ८४ ॥ वत्सें वत्सप होऊनि आपण ॥ आपुलें दावी पूर्णपण ॥ ब्रह्मादिकां न कळे जाण ॥ अवतारी कृष्ण पूर्णांशें ॥ ८५ ॥ खाऊनि भाजीचें पान ॥ तृप्त केले ऋषिजन ॥ ऐशीं चरित्रें ज्ञानप्रधान ॥ परमपावन आचरिला ॥ ८६ ॥ ऐशी कृष्णलीला परमाद्भुत ॥ पाठकां करी परमपुनीत ॥ ते दशमामाजी समस्त ॥ कथा साद्यंत सांगीतली ॥ ८७ ॥ एकादशाची नवलस्थिती ॥ मूळापासूनि परमप्राप्ती ॥ ज्ञान वैराग्य भक्ति मुक्ती ॥ स्वमुखें श्रीपती संवादला[3] ॥ ८८ ॥ प्रथमाध्यायीं वैराग्य पूर्ण ॥ मुख्य अधिकाराचें कारण ॥ नारदवसुदेवसंवाद जाण ॥ भूमिशोधन साधकां ॥ ८९ ॥ तेथ निमिजायंतसंवादन ॥ निर्भयाचें कोण स्थान ॥ उत्तम भागवत कोण ॥ मायातरण कर्मब्रह्म ॥ ३९० ॥ इत्यादि विदेहाचे नव प्रश्न ॥ नवांचीं नव उत्तरें पूर्ण ॥ तेचि नव नागर जाण ॥ क्षेत्रकर्षण अतिशुद्ध ॥ ९१ ॥ ते पांचाअध्यायांच्या अंतीं ॥ देवीं प्रार्थिला श्रीपती ॥ कृष्ण कुलक्षयाच्या प्रांतीं[4] ॥ निजधामाप्रती निघेल ॥ ९२ ॥ हें उद्धवें जाणोनि आपण ॥ निर्वेद केला जो संपूर्ण ॥ तेचि कल्पनाकाशाचें[5] निर्दळण ॥ पालव्या छेदन विकल्पांच्या ॥ ९३ ॥ कामलोभाचे गुप्त खुंट ॥ आडवूं लागले उद्भट ॥ ते समूळ केले सपाट ॥ अतिति खंट[6] अनुतापें ॥ ९४ ॥ क्रोधाचिया अति जाडी ॥ समूळ उपडिल्या महापेडी ॥ शांति निवडक चोखडी ॥ समूळ उपाडी मूळेंसी ॥९५॥ उद्धवचातक अर्तिहरण ॥ बोलिला श्रीकृष्ण कृपाघन ॥ क्षेत्र वोलावलें सबाह्य पूर्ण ॥ लागली संपूर्ण निजबोधवाफ ॥ ९६ ॥ तेथें पूर्ण ब्रह्म निजबीज ॥ चाडें गर्व सर्व परित्यज्य ॥ श्रवणनळें[9] अधोक्षजं[10] ॥ पेरिलेंचिसहज स्वयें पेरी ॥ ९७ ॥ यदुअवधूतसंवादस्थिती ॥ चालवितां ती उपपत्ती ॥ आगेंड[11] खणविला क्षेत्राप्रती ॥ वोढाळ पुढती रिघों न शके ॥ ९८ ॥ चीकभरित जाहल्या पिकातें ॥ भोरडेंया[12] वोरबडितीं तेथें ॥ ते दशमाध्यायीं श्रीअनंतें ॥ उडविलीं मतें भजनगोफणीं ॥ ९९ ॥ अकरावे अध्यायीं जाणा ॥ हुरडा ओंब्या आणि घोळाणा[13] ॥ तिळगुळेंसी चाखविलें सुजाणा ॥ मुक्तलक्षणांचेनि हातें ॥ ४०० ॥ ते श्रांवयेचे[14] भोक्ते एथ ॥ सत्संगति भगवद्भक्त ॥ तो बारावा अध्याय साद्यंत ॥ कृपायुक्त सांगीतला ॥ १ ॥ विषयांची विषयावस्था ॥ बाधक नोहे साधकांच्या चित्तां ॥ तेचि त्रयोदशीं कथा ॥ जाण निश्चितीं सांगीतली ॥ २ ॥ एवं[15] तेरांव्या अध्यायाप्रती ॥ जाहली पिकाची पूर्ण निष्पत्ती[16] ॥ तेचि हंसगीतउपपत्ती ॥

---

१ पाणिग्रहण. २ संहार. ३ बोलिला. ४ शेवटीं. ५ कल्पनारूपी आकाशाचें. ६ तोब्र. ७ शेत. ८ टाकून. ९ कान हेच कोणी कळकाचे [illegible]. १० श्रीकृष्ण. ११ खंदक, भोंवतीं खळगा. १२ या नांवाचीं पाखरें. १३ लिंबूर. १४ ऐकण्याचे. १५ या प्रमाणें. १६ उत्पत्ति.

समाधि श्रीपती सांगोनि गेला ॥ ३ ॥ समाधीं साठवलें जें पिक ॥ तें कैसेंनि पावती साधक ॥ तदर्थीं भजनपूर्वक ॥ चौदावा देख निरूपिला ॥ ४ ॥ पीक चढतचढतां हातीं ॥ माझारी सिद्धि झडपोनि नेती ॥ ते सिद्धित्यागाची उत्पत्ती ॥ पंधराव्याप्रती दाविली ॥ ५ ॥ पीक न माय त्रिजगतीं ॥ तरी त्याच्या साठवणा किती ॥ त्या षोडशाध्यायीं विभूती ॥ उद्देशें श्रीपती दावूनि गेला ॥ ६ ॥ क्षेत्र अधिकारी एथें जाण ॥ चारी आश्रम चारी वर्ण ॥ सतरा अठरा निरूपण ॥ वाढें संपूर्ण विभागिलें ॥ ७ ॥ एकुणिसाव्या अध्यायीं जाण ॥ करूनि पिकाची संवर्गण ॥ त्यालागीं फोल संपूर्ण ॥ सार निवडूनि कण घ्यावे ॥ ८ ॥ ऐसे निवडिले जे शुद्ध कण ॥ ते प्राप्यप्राप्तीचें लक्षण ॥ त्रिविधभाग निरूपण ॥ विसावा जाण निरूपिला ॥ ९ ॥ भागा आले शुद्ध कण ॥ ते राखावे आपले आपण ॥ गुणदोषांचे चोरटे जाण ॥ खळें फोडून निजकण नेती ॥ ४१० ॥ सर्वांच्या भागास येताति कण ॥ राखों न लाहती चोरट्याभेण ॥ थोरथोर नागविले जाण ॥ यालागीं संरक्षण दृढ कीजे ॥ ११ ॥ गुणदोषांची नवलकथा ॥ मिळणी मिळोनि आप्तता ॥ ठकूनि नेती सर्वस्वता ॥ दाणाही हातां नेदिती येवों ॥ १२ ॥ गुणदोष अतुर्बळी[३] ॥ सज्ञानातें तत्काळ छळी ॥ गुणदोषांतें जो निर्दळी ॥ तो महाबळी तिहींलोकीं ॥ १३ ॥ हे शिकवण उद्धवें ऐकतां ॥ तो ह्मणे चोरांचा प्रतिपालिता ॥ तुझा वेदचि गा तत्त्वतां ॥ गुणदोषप्रबळता त्याचेनि अंगें ॥ १४ ॥ मुख्य चोराचा कुरठा[४] ॥ तुझा वेद गा खोटा ॥ त्यामाजी गुणदोषांचा घरटा ॥ नाना चेष्टा तो शिकवी ॥ १५ ॥ एवं प्रतिपाळोनि गुणदोषांसी ॥ वेद नागवी समस्तांशी ॥ एवं उद्धवें वेदांच्या शिर्सीं ॥ कुडेपणासी[५] स्थापिलें ॥ १६ ॥ तो वेदानुवाद नव्हे कुडा[६] ॥ ऐसा प्रतिपदीं दीधला झाडा ॥ निरूपणीं अतिचोखडा ॥ अध्याय रोकडा एकविसावा ॥ १७ ॥ चोर कोणे मार्गीं येती ॥ पिकलें पीक ज्या वाटां नेती ॥ तो मार्ग बुजावया निश्चितीं ॥ तत्त्वसंख्याउपपत्ती बाविसावा ॥ १८ ॥ मुख्यत्वें ज्ञानाचें संरक्षण ॥ दृढ शांतीचें कारण ॥ तें भिक्षुगीतनिरूपण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगोनि गेला ॥ १९ ॥ मुख्य चोराचें चोरटेपण ॥ मनापाशीं असे जाण ॥ तें मनोजयाचें लक्षण ॥ भिक्षुगीतनिरूपण तेविसावा ॥ ४२० ॥ चोर जन्मती जिचे पोटीं ॥ ते मुख्यत्वें प्रकृति खोटी ॥ पिकल्या पिका करूनि लुटी ॥ लपती शेवटीं तीमाजी ॥ २१ ॥ आदीं निर्गुण अंतीं निर्गुण ॥ मध्यें मिथ्या प्रकृतीसि त्रिगुण ॥ हें मुख्य पिकाचें संरक्षण ॥ केलें निरूपण चोविसावा ॥ २२ ॥ मोकळें पीक असतां शेतीं ॥ पशुपक्षी चोर रिघों न शकती ॥ ते सहज संरक्षणउपपत्ती ॥ निर्गुणोक्ती पंचविसावा ॥ २३ ॥ स्त्रीकामाची धाडी जाण ॥ सकळपिकासि नागवण ॥ पुरूरवा नागवला आपण ॥ इतरांचा कोण

---

१ सोळाव्या अध्यायांत. २ कापणी. ३ अतिबळवान्. ४ राजा. ५ कपटपणा. ६ खोटा.

पडिंपाडू[1] ॥ २४ ॥ कामासक्ति करितां जाण ॥ प्रमदाबंदीं[2] पडिले पूर्ण ॥ त्यांसि अनुताप करी सोडवण ॥ हें केलें निरूपण सव्विसावा ॥ २५॥ निकोप[3] पीक लागल्या हातीं ॥ त्याची करावया नेपती[4] ॥ क्रियायोगाची निजस्थिती ॥ सत्ताविसाव्याप्रती प्रकाशिली ॥ २६॥ एवं पीक भोगिलें सकळ ॥ त्याचा परिपाक पक्वान्न सबळ ॥ अठ्ठाविसावा अमृतफळ ॥ अतिरसाळ निजगोड्या ॥ २७ ॥ मृदु मधुर अति अरुवर ॥ तेणें वासें निवे जेवणार ॥ त्याचा सेवितां ग्रासमात्र[5] ॥ सबाह्याभ्यंतर नित्यतृप्ती ॥ २८ ॥ आकांक्षेसी निवाली भूक ॥ सुखावरी लोळे तृप्तिसुख ॥ तो हा अठ्ठाविसावा देख ॥ अलोलिक निजगोड्या ॥ २९ ॥ अठ्ठाविसाव्याची निजगोडी ॥ चाखावया अति आवडीं ॥ ब्रह्मादिकां अति अवस्था गाढी ॥ चवी चोखडी अनुपम ॥ ४३० ॥ हें जिह्वेवीण जेवण ॥ रसनेवीण गोडपण ॥ अदांतां दांत पाडूनि पूर्ण ॥ आपुली आपण चवी चाखे ॥ ३१ ॥ श्रीकृष्णें परवडी ऐशी ॥ ताट केलें उद्धवाशी ॥ एका जनार्दनचरणीं माशी ॥ सुखें त्या रसाशी स्वयें सेवी ॥ ३२ ॥ जेथ रिगमू[6] नाहीं थोरथोरांशी ॥ तेथें सुखेंचि रिघे माशी ॥ एवं धाकुटे जे होती सर्वांशीं ॥ कृष्णरस त्यांशी सुसेव्य ॥ ३३ ॥ अगम्ययोगें योगभांडार ॥ गुह्यज्ञानें ज्ञान गंभीर ॥ परमसुखाचें सुखसार ॥ अतिगंभीर अठ्ठाविसावा ॥ ३४ ॥ या जेवणीं जे धाले[7] नर ॥ त्यांचे तृप्तीचे सुखोद्गार[8] ॥ तो एकुणतिसावा सधर ॥ अतिविचित्र निरूपणें ॥ ३५॥ एकुणतिसाव्याची स्थिती ॥ दृढ आकळली होय चित्तीं ॥ तैं सकळभागवताची गती ॥ ये धांवती तयापाशीं ॥ ३६ ॥ एकुणतिसावा अध्यावो ॥ साध्यसाधना एकात्मभावो ॥ निर्दळोनि अहंभावो ॥ परमानंदें पहाहो उद्गार देत ॥ ३७॥ सकळभोजनां मंडण ॥ तांदूळ आणि चंदन ॥ तो तिसावा एकतिसावा जाण ॥ कृष्णनिर्याण निजबोधू ॥ ३८ ॥ येणें भोजनें नित्य तृप्ती ॥ त्यासि ममताबंध[9] नव्हे प्राप्ती ॥ सकळ कुळ निर्दळूनि एथीं ॥ निजधामा निश्चितीं हरि गेला ॥ ३९ ॥ पूर्ण ब्रह्मानुभव ज्यासि ॥ एथवरी ममता नसावी त्यासी ॥ हें स्वांगें दावूनि हृषकेशी[10] ॥ निजधामासी स्वयें गेला ॥ ४४० ॥ श्रीभागवत महाक्षेत्र ॥ तेथें ब्रह्ममुख्य बीजधर ॥ नारद तेथ मिरासीकर[11] ॥ पेरणी विचित्र तेणें केली ॥ ४१ ॥ तेथ श्रीव्यासें अतिशुद्ध ॥ बांधारे घातले दशविध[12] ॥ पीक पिकलें अगाध ॥ स्वानंद बोध निडारे[13] ॥ ४२ ॥ तेथ शुक बैसला सोंकारें ॥ तेणें फोडिला हरिकथापागोरा ॥ पापपक्ष्यांचा थारा ॥ उडविला पुरा निःशेष ॥ ४३ ॥ त्या एकादशाची जाण ॥ उद्धवें केली संवगण ॥ काढिले निडारा[illegible]कण ॥ अतिसघन कृष्णोक्तीं ॥ ४४ ॥ तेथ नानायुक्तिपडिपाडीं ॥ उत्तमोत्तम प्रश्नपरवडी ॥ केलीं पक्वान्नें चोखडीं ॥ त्यांची नीच नवी गोडी अविनाशा ॥ ४[illegible] ॥ हे अविनाशी निजगोडी ॥ पदोपदीं

---

[1] कथा.
[2] स्त्रियांच्या बंधनांत.
[3] अपायरहित.
[4] उपभोग.
[5] एकच घांस.
[6] रिघाव, प्रवेश.
[7] तृप्त झाले.
[8] ढेंकर.
[9] मायापाश.
[10] श्रीकृष्ण.
[11] शेतकरी.
[12] दहा[illegible]चे.
[13] पूर्ण.

अतिचोखडी ॥ एकादशामाजी रोकडी ॥ उद्धवाचिये जोडी उपकार जगा ॥ ४६ ॥ त्या उद्धवाचे मागले पंक्तीं ॥ त्यक्तोदक श्रवणार्थी ॥ शुकमुखें परीक्षिती ॥ निजात्मतृप्तीं निवाला ॥ ४७ ॥ त्या समर्थांचिये पंक्तीं ॥ भावार्थदीपिका धरोनि हातीं ॥ श्रीधरें दावितां पदपदार्थी ॥ निजात्मस्थितीं निवाला ॥ ४८ ॥ जेथ दशभाषा पदपदैंसी ॥ एका जनार्दनकृपेची माशी ॥ तृप्ति होय अवघ्यांसरशी ॥ निषेध तिशीं असेना ॥ ४९ ॥ एका जनार्दनीं मांजर वेडें ॥ भावार्थदीपिकाउजियाडें ॥ हे रस देखोनि चोखडे ॥ ताटापुढें पैं आलें ॥ ४५० ॥ मीयों मीयों करितां स्मरण ॥ कृपेनें तुष्टले सज्जन ॥ शेष प्रसाद देऊनि जाण ॥ संतृप्त पूर्ण पैं केलें ॥ ५१ ॥ एका जनार्दनाचें पोसणें ॥ मीं मांजर जाहलों नीचपणें ॥ चाटितां संतांचें शेषभोणें[2] ॥ म्यां तृप्ति पावणें परिपूर्ण ॥ ५२ ॥ हो कां त्या समर्थांच्या ताटीं ॥ पूर्ण ब्रह्मरसें भरली वाटी ॥ ते मी अत्यंतप्रेमें चाटीं ॥ स्वानंदपुष्टीं संतोषें ॥ ५३ ॥ जो काया मनें आणि वाचा ॥ सद्भावें वि[3]नीत होय नीचा ॥ तो अधिकारी एकादशाचा ॥ हा जनार्दनाचा उपदेश ॥ ५४ ॥ जंव जंव देहीं ज्ञानाभिमान ॥ जंव जंव योग्यता सन्मान ॥ तंव तंव एकादशाचें ज्ञान ॥ सर्वथा जाण अनोळख[4]चि ॥ ५५ ॥ सर्वभूतीं भगवद्भजन ॥ सद्भावें जंव नुपजे पूर्ण ॥ तंववरी एकादशाचें ज्ञान ॥ सर्वथा जाण कळेना ॥५६॥ यापरी श्रीभागवतक्षेत्र[5] ॥ पीक पिकलें परम पवित्र ॥ एथ सुखी होती साधकनर ॥ ज्यांसि अत्यादर सर्वभूतीं ॥ ५७ ॥ एकादश क्षेत्र नव्हे जाण ॥ हाचि समुद्र परिपूर्ण ॥ जो जैसा एथ होय निमग्न ॥ तो तैशींच आपण रत्नें लाभे ॥ ५८ ॥ हा एकादश नव्हे निर्धारीं ॥ जीवगजेंद्राच्या उद्धारीं ॥ सवेगें पावला हरी ॥ ज्ञानचक्र करीं घेऊनी ॥ ५९ ॥ हेही नव्हे एकादशाची थोरी ॥ [6]अहंहिरण्यकशिपूविदारीं ॥ तो हा प्रकटला नरहरी ॥ भक्तकैवारी कृपापूर्ण ॥ ४६० ॥ गंगा यमुना दोनी सांग ॥ कृष्ण उद्धव उत्तम चांग ॥ गुप्त सरस्वती ज्ञानबोध ॥ त्रिवेणी प्रयाग एकादश ॥ ६१ ॥ तेथ वैराग्यमाघमासीं जाण ॥ श्रद्धाअरुणोदयीं नित्य स्नान ॥ करितां होऊनि पावन ॥ कृष्ण[7]पदवी पूर्ण पावती ॥ ६२ ॥ हेही एकादशाची नव्हे कोटी ॥ कृष्णउद्धवांची गुह्य गोठी ॥ हे बहु[8]कल्प कपिलाषष्ठी ॥ पर्वणी गोमटी निजसाधकां ॥ ६३ ॥ ते पर्वकाळीं जे निमग्न ॥ ते तत्काळ पावती कल्याण ॥ बाधूं न शके जन्ममरण ॥ ब्रह्म परिपूर्ण स्वयें होती ॥ ६४ ॥ हा एकादश नव्हे जाण ॥ एकतिसां खणांचें वृंदावन ॥ एथ नित्य वसे श्रीकृष्ण ॥ स्वानंदपूर्ण निजसत्ता ॥ ६५ ॥ एथ पंधराशतें जे श्लोक ॥ तेचि अत्यंत पानें चोख ॥ माजी ज्ञानमंजरीचे घोख ॥ अतिसुरेख शोभती ॥ ६६ ॥ तेथ जे घालिती निजजीवन ॥ ते होती परम पावन ॥ स्वयें ठाकिती कृष्णसदन ॥ ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ६७ ॥

---

१ अभिप्राय स्पष्ट दाखविणारी अशा अर्थाची टीका हाच दिवा. २ उष्टें अन्न. ३ नम्र. ४ कळणार नाहीं. ५ शेत. ६ अहंकाररूपहिरण्यकशिपु. ७ कृष्णस्थान. ८ फार दिवसानीं येणारी.

जे वंदिती मुळींचे उदका ॥ जे लाविती मूळमृत्तिका ॥ ते वंद्य होती तिर्हीं लोकां ॥ नित्य निजसखा श्रीकृष्ण जोडे ॥ ६८ ॥ जे पठण
रूपें जाणा ॥ प्रत्यगावृत्ति प्रदक्षिणा ॥ सद्भावें करितां सुजाणा ॥ श्रीकृष्णाचरणा विनटती ॥ ६९ ॥ ये कथेच्या विचित्रलीला ॥ जे
नित्य घालिती रंगमाळा गळां ॥ ते नागवती[1] कळिकाळा ॥ सदा त्यांजवळी श्रीकृष्ण ॥ ४७० ॥ हें एकादशाचें वृंदावन ॥ जो श्रवणें
करी नित्य पूजन ॥ त्यासि प्रसन्न तो श्रीकृष्ण ॥ देहाभिमान निर्दळी ॥ ७१ ॥ तेथ मनाची पुष्पांजळी ॥ जो अनुदिनीं अर्पी त्रिकाळीं ॥
तोही पावे हरिपदकमळीं ॥ निजात्ममेळीं निजनिष्ठा ॥ ७२ ॥ हें भागवत वृंदावन ॥ मेळवूनि संत सज्जन ॥ ये कथेचें व्याख्यान ॥
जो पठण करी प्रत्यक्ष ॥ ७३ ॥ हें देखूनि महापूजन ॥ संतोषे श्रीजनार्दन ॥ श्रोते वक्ते जे सावधान ॥ त्यांसि निजात्मज्ञान स्वयें देत
॥ ७४ ॥ श्रवणें पठणें मननें ॥ अर्थावबोधव्याख्यानें ॥ एकादशें समान देणें ॥ ज्ञान पावणें जाणत्या नेणत्यांहीं ॥ ७५ ॥ श्रवण
मनन नव्हे पठण ॥ तरी एकादशाचें पुस्तक जाण ॥ ब्राह्मणासि द्यावें दान ॥ विवेकज्ञान तेणें उपजे ॥ ७६ ॥ एकादश द्यावें दान ॥
करावें एकादशाचें पूजन ॥ करितां एकादशाचें स्मरण ॥ पाप संपूर्ण निर्दळे ॥ ७७ ॥ एकादशसंग्रह जो करी ॥ कृष्ण तिष्ठे त्याचे घरीं ॥
जो एकादशाची श्रद्धा धरी ॥ ज्ञान त्यामाझारी स्वयें रिघे ॥ ७८ ॥ श्लोक श्लोकार्ध पदमात्र ॥ नित्य स्मरे ज्याचें वक्रें[2] ॥ तोही होय
परम पवित्र ॥ अतिउदार एकादश ॥ ७९ ॥ अवचटें[3] कार्यांतरीं[4] ॥ दृष्टी पडे एकादशावरी ॥ तैं पातकें होती रानभरी ॥ अपधाकें[5] दूरी
तीं पळती ॥ ४८० ॥ तो एकादश ज्याचे करीं ॥ देव वंदिती त्यातें शिरीं ॥ तो निजांगें जग उद्धरी ॥ एवढी थोरी एकादशाची ॥ ८१ ॥
सकळपुराणांमाझारी ॥ हा एकादश नव[6]केसरी[7] ॥ भवगजातें[8] विदारी ॥ क्षणामाझारी श्लोकार्धें ॥ ८२ ॥ मामेकमेव शरणं ॥ याचि
श्लोकाचें करितां पठण ॥ मायेचा गळा धरोनि जाण ॥ अपधाकें पूर्ण संसार निमे ॥ ८३ ॥ निरपेक्षं मुनिं शांतं ॥ हा श्लोक चढे जैं
हात ॥ तैं सेवकां सेवी कृष्णनाथ ॥ भवभय तेथ उरे कैचें ॥ ८४ ॥ एकादशीचा एकेक श्लोक ॥ होय भवबंधच्छेदक ॥ जेथ वक्ता
यदुनायक ॥ तेथ हा विशेख[9] ह्मणोंनये ॥ ८५ ॥ श्रीभागवतामाजी जाण ॥ एकादश मोक्षाचें स्थान ॥ यालागीं श्लोकार्धमात्रेंकरून ॥
भवबंधन निर्दळी ॥ ८६ श्रीकृष्ण वेदांचें जन्मस्थान ॥ त्याचे मुखीचें हें निरूपण ॥ तैं सकळवेदार्थ जाण ॥ माहेरा आपण स्वयें येती
॥ ८७ ॥ यालागीं एकादशीं वेदार्थ ॥ माहेरीं सुखावले [illegible] ॥ ते साधकासि परमार्थ ॥ स्वानंदें देत संपूर्ण ॥ ८८ ॥ मंथोनि वेदशास्त्रार्थ ॥ व्यासें केलें महाभारत ॥ त्या भारताचा मथितार्थ[10] ॥ श्रीभागवत हरिलीला ॥ ८९ ॥ त्या भागवताचा सारांश ॥ तो हा जाण

---

१ जिंकितात. २ मुख, तोंड. ३ सहज. ४ दुसरें कार्य करित असतां. ५ भयानें. ६ तरुण. ७ सिंह. ८ संसाररूपगजास. ९ विशेष. १० सारांश.

एकादश ॥ तेथ वक्ता स्वयें हृषीकेश ॥ परब्रह्म सुरस प्रबोधी ॥ ४९० ॥ भागवतामाज ॥ कां दे वांमाजी जगन्निवास ॥ तैसा एकादश परम वंद्य ॥ ९१ ॥ पक्ष्यांमाजी राजहंस ॥ तैसा भागवतामाजी एकादश ॥ परम सुरस अतिवंद्य ॥ ९२ ॥ तीर्थ क्षेत्र वाराणसी ॥ गंगा जैशी ॥ जीवोद्धारीं एकादशी ॥ महिमा तैसा अनिर्वाच्य[3] ॥ ९३ ॥ त्या एकादशाची टीका ॥ जनार्दनकृपें करी एका[4] ॥ तो एकत्वाचा निजसखा ॥ फळे भाविका सद्भावें ॥ ९४ ॥ धरोनि बालकाचा हात ॥ बाप अक्षरें स्वयें लिहिवित ॥ तैसा एकादशाचा अर्थ ॥ बोलविला परमार्थ जनार्दनें ॥ ९५ ॥ कैसा चालवावा ग्रंथ ॥ केवीं राखावा पदपदार्थ ॥ ये व्युत्पत्तीची नेणें मी मात ॥ बोलवी समर्थ जनार्दन ॥ ९६ ॥ जनार्दनें नवल केलें ॥ मूर्खाहातीं ज्ञान बोलविलें ॥ ग्रंथीं परमार्थरूप आणिलें ॥ वाखाणविलें एकादशा ॥ ९७ ॥ एकादशाचा पदपदार्थ ॥ शास्त्रवक्त्यां अतिगूढार्थ ॥ तोही वाखाणविला पुरुषार्थ ॥ कृपाळु समर्थ जी जनार्दन ॥ ९८ ॥ जनार्दनें ऐसें केलें ॥ माझें मीपण[5] निःशेष नेलें ॥ मग परमार्था अर्थविलें ॥ बोलवूनि बोलें निजसत्ता ॥ ९९ ॥ खांबसूत्री बाहुलीं ॥ सूत्रधार नाचवी भलीं ॥ तेवीं ग्रंथार्थाची बोली ॥ बोलविली श्रीजनार्दनें ॥ ५०० ॥ अवघा जनार्दनची देखा ॥ तोचि आडनांवें जाहला एका ॥ तेणें नामें ग्रंथ नेटका ॥ अर्थीं सात्विकां तत्त्वार्थ दावी ॥ १ ॥ कवित्वीं घातलें माझें नांव ॥ शेखीं नांवाचा नुरवीच ठाव ॥ ऐसें जनार्दनवैभव ॥ अतिअभिनव अलोलिक ॥ २ ॥ ग्रंथ देखोनियां सज्ञान ॥ ह्मणती ज्ञाता एकाजनार्दन ॥ जवळीं जाहलिया अदर्शन ॥ मूर्ख संपूर्ण मानिती ॥ ३ ॥ एका जनार्दनाचा वृत्तांत ॥ एक ह्मणती भक्तियुक्त ॥ एक ह्मणती जीवन्मुक्त ॥ प्रपंचीं निश्चित मानिती एक ॥ ४ ॥ अहो हा एका जनार्दन ॥ नाहीं आसन न देखे ध्यान ॥ नेम मुद्रा माळा जाण ॥ उपासनलक्षण या नाहीं ॥ ५ ॥ कोण मंत्र असे यासी ॥ काय उपदेशी शिष्यांसी ॥ मंत्र न दे कोणासी ॥ भुलली भाविकें[6] त्यासी या भावार्थें ॥ ६ ॥ नुसत्या हरिनामाचा घोख ॥ लावूनि भुलविले येणें लोक ॥ ऐसे नानाविकल्प ॥ जनार्दन देख उपजवी स्वयें ॥ ७ ॥ मी जेथ झाडा देऊं जायें ॥ ते बोलतें जनार्दन होये ॥ युक्ति प्रयुक्तींचें पाहे ॥ मीपण न राहे मजमाजी ॥ ८ ॥ एवं माझें मीपण समूळीं ॥ जनार्दन स्वयें निर्दळी ॥ माझी जे हाले अंगुळी ॥ ते क्रिया चाळी[7] जनार्दन ॥ ९ ॥ निमेषोन्मेषांचे संचार ॥ श्वासोच्छ्वासांचें बिडार[8] ॥ इंद्रियांचा व्यापार ॥ चाळिता साचार जनार्दन ॥ ५१० ॥ जेथ मी ह्मणोंजाय कविता ॥ ते जनार्दनचि होय तत्त्वतां ॥ माझें मीपण धरावया पुरता ॥ ठाव रिता[9] नुरेची ॥ ११ ॥ माझें जें कां मीपण ॥ जनार्दन जाहला आपण ॥ एका जनार्दना शरण ॥

---

१ कुटीचक, बहूदक, हंस व परमहंस या चार संन्याशांत. २ विष्णु. ३ न सांगतां येणारा. ४ एकनाथ. ५ अहंकार. ६ भक्तिमान्. ७ करी. ८ व्यापार. ९ जनार्दनावांचून.

ग्रंथ संपूर्ण तेणें केला ॥ १२ ॥ हेही बोल बोलतां जाण ॥ खुणा वारी जनार्दन ॥ झाडा सुचित्तां संपूर्ण ॥ वेगळेपण अंगीं लागे ॥ १३ ॥ आतां वेगळा अथवा एक ॥ अवघा जनार्दन स्वयें देख ॥ तेणें ग्रंथार्थाचे लेख ॥ अत्यंत चोख विस्तारिले ॥ १४ ॥ ग्रंथ देशभाषा व्युत्पत्ती ॥ ह्मणोनि नुपेक्षावा पंडितीं ॥ अर्थ पहावा यथार्थी ॥ परमात्मस्थिती निजनिष्ठा ॥ १५ ॥ जरी संस्कृत ग्रंथ पूर्ण ॥ तरी देशभाषाव्याख्यान ॥ मा हें आयतें निरूपण ॥ साधक सज्ञान नुपेक्षिती ॥ १६ ॥ या ग्रंथा आदर करिती ॥ अथवा जे कां उपेक्षिती ॥ केवळ जे कोणी निंदिती ॥ तेही आह्मां ब्रह्ममूर्ती सद्गुरुरूपें ॥ १७ ॥ हेंही शिकविलें जनार्दनें ॥ सर्वभूतीं मजचि पाहणें ॥ प्रकृतिगुणांचीं लक्षणें ॥ सर्वथा आपणें न मानावीं ॥ १८ ॥ शिष्याचे क्षोभ न साहवती ॥ निंदकांची निंदा न जिरे चित्तीं ॥ तैं तो कोरडाचि परमार्थी ॥ क्षोभें निश्चितीं नाडविला ॥ १९ ॥ एवं पुरुषाचे प्रकृति गुण ॥ पाहतां सर्वथा क्षोभे मन ॥ ते न पहावे आपण ॥ सर्वभूतीं चैतन्य समत्वें पहावें ॥ ५२० ॥ येचि उपदेशीं अत्यादर ॥ जनार्दनें केला थोर ॥ यावेगळा भवाब्धिपार ॥ सज्ञान नर पाहों न शके ॥ २१ ॥ येणेंचि निर्धारें गुरु तो गुरू ॥ आह्मां शिष्य तोही संवादगुरू ॥ निंदक तो परमगुरू ॥ निरपराध सद्गुरु जनार्दनकृपा ॥ २२ ॥ जनार्दनकृपा एथें ॥ गुरुवेगळें नुरेचि रितें ॥ मीपणासह सकळ भूतें ॥ गुरुत्वा निश्चितें आणिलीं तेणें ॥ २३ ॥ तेणेंचि हे ग्रंथकथा ॥ सिद्धि पावविली परमार्था ॥ माझे गांठींची नव्हे योग्यता ॥ हें जाणीतलें श्रोता ग्रंथारंभीं ॥ २४ ॥ ग्रंथारंभ प्रतिष्ठानीं ॥ तेथ पंचाध्यायीं संपादूनी ॥ इतरग्रंथाची करणी ॥ आनंदवनीं विस्तारिली ॥ २५ ॥ अविमुक्त महाश्मशान ॥ वाराणसी आनंदवन ॥ एकासचि नांवें जाण ॥ ऐका लक्षण त्याचेंही ॥ २६ ॥ अतिशयें जेथ मुक्ती ॥ अधमोत्तमां एकी गती ॥ पुढती नाहीं पुनरावृत्ती ॥ अविमुक्त ह्मणती या हेतू ॥ २७ ॥ जे श्मशानीं सांडिल्या प्राण ॥ प्राणी पुनः न देखे मसण ॥ यालागीं हें महाश्मशान ॥ अंतीं ब्रह्मज्ञान शिव सांगे ॥ २८ ॥ मर्यादा सेतु वरुण अशी ॥ मध्यें नांदे पंचक्रोशी ॥ रिगम नाहीं पातकांशी ॥ यालागीं वाराणसी ह्मणे पैं ईतें ॥ २९ ॥ वरुणा पातकांतें वारी ॥ अशी महादोष संहारी ॥ मध्यें विश्वेश्वरनगरी ॥ वाराणसी खरी याहेतू ॥ ५३० ॥ जें विश्वेश्वराचें क्रीडास्थान ॥ जेथ स्वानंदें शिव क्रीडे आपण ॥ यालागीं तया आनंदवन ॥ ज्यालागीं मरण अमर वांछिती ॥ ३१ ॥ जेथें जितां सदन्नें भुक्ती ॥ मेल्यामागें अचुक मुक्ती ॥ यालागीं आनंदवन ह्मणती ॥ [illegible] सदाशिव सांगे ॥ ३२ ॥ तया वाराणसी मुक्तिक्षेत्रीं ॥ मणिकर्णिकामहातीरीं ॥ पंचमुद्रापीठामाझारी ॥ एकादशावरी टीका केली ॥ ३३ ॥ एक [illegible] ॥ स्वानंदें तुष्टला जनार्दन ॥

---

१ प्राकृतभाषेंत. २ टाकावा. ३ परमार्थास अंतरला. ४ संसारसमुद्राचें पैलतीर. ५ जाणलें. ६ काशींत. ७ पुनः. ८ [illegible] निश्चयानें.

करून ॥ हें गुह्यज्ञान बोलविलें ॥ २६ ॥ निकट असतां जनार्दन ॥ मी नेणें[1] त्याचें महिमान[2] ॥ तेणें आपली महिमा आपण ॥ मज मुखें जाण बोलविली ॥ २७ ॥ मी जें ह्मणे माझें मुख ॥ तेंही जनार्दन झाला देख ॥ तेणें मुखें निजात्मसुख ॥ बोलवी निष्टंक[3] निजात्मसत्ता ॥ २८ ॥ एवं माझेनि नांवें कविता ॥ परी जनार्दनचि झाला वक्ता ॥ तेणें वक्तेपणें तत्त्वतां ॥ रसाळ कथा चालिली ॥ २९ ॥ ब्रह्मरसें रसाळ कथा ॥ निरूपिलें श्रीभागवता ॥ त्यामाजी ब्रह्मरसतल्लीनता ॥ जाण तत्त्वतां अष्टाविंश ॥ ७३० ॥ अठ्ठाविसाव्याचें निरूपण ॥ तें तत्त्वतां ब्रह्म पूर्ण ॥ श्रद्धेनें करितां श्रवण ॥ उद्धव संपूर्ण निवाला ॥ ३१ ॥ उद्धव नेवोनियां आपण ॥ स्वयें विचारिता झाला जाण ॥ ह्मणे हें शुद्ध आत्मज्ञान ॥ परी प्राप्त कठिण अबळांसी ॥ ३२ ॥ या चित्स्वरूपाची प्राप्ती ॥ सुगम होय साधकांप्रती ॥ पुढील अध्यायाचे अर्थी ॥ उद्धव विनंती करील ॥ ३३ ॥ कडा फोडूनि मार्ग कीजे ॥ त्यापरीस आइत्या वाटें जाइजे ॥ तेवीं सुगमें निर्गुण पाविजे ॥ तो उपाव पुशिजे उद्धवें ॥ ३४ ॥ ब्रह्मप्राप्तीचा सुगम उपावो ॥ स्वयें सांगेल देवाधिदेवो ॥ तो सुरस पुढील अध्यावो ॥ साधकां पहाहो परमार्थसिद्धी ॥ ३५ ॥ पव्हणियाहूनि[4] पायउतारा ॥ अव्हळीं उतरिजे भवसागरा ॥ तैसा साधकांलागीं सोपारा ॥ उपाव हरि सांगे ॥ ३६ ॥ सीतेचेनि कृपापडिभारें ॥ सेतु बांधिजे रामचंद्रें ॥ तेथ समुद्र तरिजे वानरें ॥ जे वनचरें अतिमंदें ॥ ३७ ॥ तेवीं उद्धवप्रश्नप्रीतीसी ॥ भवाब्धिसेतु[5] हृषीकेशीं ॥ बांधिला निजभक्तिउपायेंसी ॥ तेथ तरती आपैसी[6] भाविकें अबळें ॥ ३८ ॥ कृष्णभक्तिसेतुद्वारें ॥ तरलीं जडमूढ पामरें ॥ ते भक्ति सांगिजेल यादवेंद्रें ॥ श्रोता सादरें परिसिजे ॥ ३९ ॥ एका जनार्दना शरण ॥ तेणें श्रोते सुप्रसन्न ॥ पुढील अध्यायाचें कथन ॥ तेणें साधकजन तरतील ॥ ७४० ॥ सांडूनियां एकपण ॥ एका जनार्दना शरण ॥ सुगम साचें आत्मज्ञान ॥ तें भक्तिसाधन हरि सांगे ॥ ७४१ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे परमहंससंहितायां एकाकारटीकायां परमार्थनिर्णयो नाम अष्टाविंशतितमोऽध्यायः ॥ २८ ॥ ॥ अध्याय ॥ २८ ॥ ॥ ओंव्या ॥ ७४१ ॥ ॥ श्लोक ॥ ४४ ॥ एवंसंख्या ॥ ७८५ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

---

[1] जाणत नाहीं. [2] महिमा. [3] निःशंक. [4] गोष्पदाहून. [5] संसाररूपी समुद्रावरील पूल. [6] आपोंआप.

# अध्याय २८ वा.


श्रीकृष्ण
उद्धव.
तपस्वी
षड्रिपु

श्रीगणेशाय नमः॥ ॥ ओंनमो सद्गुरु परमा[1] ॥ जयजय सद्गुरु पुरुषोत्तमा ॥ जयजय सद्गुरु परब्रह्मा ॥ ब्रह्मा ब्रह्मनाम तुझेनी ॥ १ ॥
जय सद्गुरु चिदैक्यमूर्ती ॥ जय जगद्गुरु चिदात्मज्योती ॥ जय सद्गुरु चिन्मूर्ती ॥ मूर्तामूर्तीं[2] चिद्रूप ॥ २ ॥ जयजय सद्गुरु मत्क्षेत्रा ॥ जयजय
सद्गुरु सत्पात्रा ॥ जयजय सद्गुरु सन्मात्रा ॥ सदैकाक्षरा सद्रूपा ॥ ३ ॥ जयजय सद्गुरु स्वानंदमान॥जयजय सद्गुरु स्वानंदपूर्ण॥
जयजय सद्गुरु स्वानंदघन ॥ आनंदा गोडपण तुझेनी ॥ ४ ॥ जयजय वेदभाषणी[3] ॥ जयजय वेदशिरोमणी[4] ॥ सकळ देव लागती चरणीं
॥ देवचूडामणी[5] गुरुराया ॥ ५ ॥ जयजय जीवादिजीवा ॥ जयजय देवादिदेवा ॥ जयजय जीवशिवादिशिवा ॥ जयजय अभिनवा
गुरुराया ॥ ६ ॥ जयजय सद्गुरु सुखसंपन्ना ॥ जयजय सद्गुरु सुखनिधाना[6] ॥ जयजय सद्गुरु सुखैकघना ॥ सुखा सुखपणा तुझेनी
॥ ७ ॥ तुझेनि सुखा निजसुख घडे ॥ तुझेनि बोधा निजबोध आतुडे[7] ॥ तुझेनि ब्रह्मा ब्रह्मत्व[8] जोडे ॥ तुझे पडिपाडें तूंचि एकू ॥ ८ ॥
ऐसा सद्गुरु तूं अनंत ॥ तुझ्या स्वरूपासि नाहीं अंत ॥ तो तूं होवूनि कृपायुक्त ॥ निजरूपें बोधित निजभक्तां ॥ ९ ॥ आपुलें निजरूप
बोधून ॥ नुरविशी देवभक्तपण ॥ त्याहीवरी निजभजन ॥ अद्वयें पूर्ण करविशी ॥ १० ॥ गंगा मिळालिया सागरीं[9] ॥ मीनली तळपे
तयावरी ॥ तेवीं भक्त मिळोनि तुजमाझारीं ॥ तुझें भजन करी तुझेनी ॥ ११ ॥ अद्वय[10] करितां तुझी भक्ती ॥ तूं संतोषसी यथास्थिती ॥
संतोषोनि शिष्याहातीं ॥ निजात्मसंपत्ती अर्पिशी ॥ १२ ॥ अर्पूनि निजात्मभरभारू ॥ शिष्य गुरुत्वें करिशी थोरू ॥ हा अतिलाघवी
चमत्कारू ॥ अतर्क्य विचारू तर्केना[11] ॥ १३ ॥ जें अतर्क्य वेदशास्त्रांसी ॥ ज्यालागीं वेद विवादिती[12] अहर्निशीं[13]॥ तें तूं क्षणार्द्धें बोधिसी॥
सच्छिष्यासी निजबोधें ॥ १४ ॥ तुझ्या निजबोधाची हातवटी[14] ॥ पढतां वेदवेदांतकोटी ॥ तरी अलक्ष्य[15] लक्षेना दृष्टीं ॥ सर्वार्थीं गोष्टी
अगम्य ॥ १५ ॥ बहुत कळलें कळलें ह्मणती ॥ नानापरीच्या युक्ति चाळिती ॥ परी ते नकळोनि वोसणती[16] ॥ जेवीं शुकें[17] बोलती सुभाषितें
॥ १६ ॥ यालागीं तुझी बोधकशक्ती ॥ अगम्य सर्वांशी सर्वार्थीं ॥ तुझी लाधल्या कृपाआर्ती ॥ अगम्य पावती सुगमत्वें ॥ १७॥
जें अगम्य श्रीभागवत ॥ त्याहीमाजी एकादशार्थ ॥ प्राकृत करविला यथार्थ ॥ बाप समर्थ कृपाळू ॥ १८ ॥ दधि मंथूनि समस्त ॥ जेवीं
माता काढी नवनीत[18] ॥ तें बाळकाहातीं देत ॥ तैसें केलें येथ जनार्दनें[19] ॥ १९ ॥ वेदशास्त्रांचें निजमथित ॥ व्यासें काढिलें श्रीभागवत
॥ त्या भागवताचा मथितार्थ ॥ जाण निश्चित एकादश ॥ २० ॥ त्या एकादशाचें गोडपण ॥ सर्वथा नेणें[20] मी आपण ॥ तें जना

---

१ श्रेष्ठा. २ साकार निराकार पदार्थीं. ३ वेदवेदार्थ सांगणारा. ४ वेदमुकुटा. ५ देवश्रेष्ठा. ६ सुखाचा ठेवा. ७ सांपडे. ८ ब्रह्मपणा. ९ समुद्रांत. १० अव्यभिचारिणो. ११ करवेना. १२ वाद करितात. १३ दिवसरात्र. १४ पद्धती. १५ दिसण्यास अशक्य. १६ खिन्न होती. १७ पोपट. १८ लोणी. १९ जनार्दनगुरूनें. २० नजाणें.

र्दनें करूनि मथन ॥ सारांश पूर्ण मज दीधला ॥ २१ ॥ तो स्वभावें घालितां तोंडीं ॥ लागली एकादशाची गोडी ॥ त्या गोडपणाच्या
आवडीं ॥ टीका चढोवढीं चालिली ॥ २२ ॥ यालागीं एकादशाची टीका ॥ एकला कर्ता नव्हे एका ॥ एकीं एक मिळोनि देखा ॥ ग्रंथ ने
टका निर्वाळिला ॥ २३ ॥ मागें पुढें एक एका ॥ हें एकादशाचें रूप देखा ॥ तेणें एकपणें चालिली टीका ॥ साह्य निजसखा जनार्दन
॥ २४ ॥ जनार्दनें पैं आपुलें ॥ एकीं एकपण दृढ केलें ॥ तेंचि एकादशाचे अर्था आलें ॥ एकीं मीनलें एकत्वें ॥ २५ ॥ जेवीं जेवणीं
गोड घांस ॥ तेवीं भागवतीं एकादश ॥ त्याहीमाजी अष्टाविंश ॥ अतिसुरस साजिरा ॥ २६ ॥ सर्वांगीं शिर प्रधान ॥ तैसा अठ्ठावि
सावा जाण ॥ तेथील जें कां निरूपण ॥ तो स्वानंद[3] जाण सोलींव ॥ २७ ॥ तो हा अठ्ठाविसावा अध्यावो ॥ ब्रह्मसुखाचा निजनिर्वा
हो ॥ उद्धवें न पुसतां पहाहो ॥ स्वयें देवाधिदेवो[4] सांगत ॥ २८ ॥ उद्धवें न करितां प्रश्न ॥ कां सांगताहे श्रीकृष्ण ॥ ये अर्थीचें निरूपण ॥
सावधान पॅरियेसा[5] ॥ २९ ॥ उद्धव कृष्णोक्तीं निजज्ञान ॥ पावोनि झाला ज्ञानसंपन्न ॥ तेणें येऊं पाहे ज्ञानाभिमान ॥ जाणपण[6] अ
निवार ॥ ३० ॥ जग मूर्ख मी एक ज्ञाता ॥ ऐशी चढेल जे अहंता ॥ ते गुणदोषांची कथा ॥ दावील सर्वथा सर्वत्र ॥ ३१ ॥ जेथ गुण
दोषांचें दर्शन ॥ तेथ निःशेष मावळे ज्ञान ॥ येथवरी ज्ञानाभिमान ॥ बाधक जाण साधकां ॥ ३२ ॥ अभिमान बाधी सदाशिवा ॥
तोही आणिला जीवभावा ॥ तेथ मनुष्याचा कोण केवा ॥ अहंतत्त्वें जीवा मुक्तता कैंची ॥ ३३ ॥ यापरी गुणदोषदर्शन ॥ साधका बा
धक होय पूर्ण ॥ यालागीं त्याचें निवारण ॥ न करितां प्रश्न हरि सांगे ॥ ३४ ॥ गुणदोषांचें दर्शन ॥ जैं ईश्वर देखे आपण ॥ तोही नाडूं[7]
पावे जाण ॥ इतरांचा कोण पडिपाडू ॥ ३५ ॥ बाळक नेणे निजहिता ॥ तेथ साक्षेपें प्रवर्ते माता ॥ तेवीं उद्धवाचे निजस्वार्था ॥ श्रीकृ
ष्णनाथा कळवळा ॥ ३६ ॥ ज्ञानाभिमानाचें बाधकपण ॥ सर्वथा साधकां नलगे जाण ॥ यालागीं न करितांही प्रश्न ॥ त्याचें निराक
रण हरि[9] सांगे ॥ ३७ ॥ उद्धव जन्मला यादववंशीं ॥ यादव निमती ब्रह्मशापेंसी ॥ तेथें[11] वांचवावया उद्धवासी ॥ संपूर्ण ब्रह्मज्ञानासी
हरि सांगे ॥ ३८ ॥ जेथ देहातीत आत्मज्ञान ॥ तेथ न बाधी शापबंधन ॥ हें जाणोनियां श्रीकृष्ण ॥ पूर्ण ब्रह्मज्ञान उपदेशी ॥ ३९ ॥
जेवीं साकरेवरी माशी ॥ तेवीं कृष्णमूर्तीपाशीं ॥ प्रीति जडली उद्धवासी ॥ भाव एकदेशीं दृढ झाला ॥ ४० ॥ कृष्णापासूनि उद्धव जा
तां ॥ प्राण सांडील तत्त्वतां ॥ ते मोडावया एकदेशी अवस्था ॥ ब्रह्मसमता हरि सांगे ॥ ४१ ॥ एकदेशी झाला भावो ॥ तो कृष्णा ना
वडे पहाहो ॥ यालागीं देवादिदेवो ॥ ब्रह्मसमन्वयो हरि सांगे ॥ ४२ ॥ उद्धव असतां कृष्णाजवळी ॥ ब्रह्मशापें होईल होळी ॥ यालागीं

---

१ मुख्य. २ ब्रह्मानंद. ३ निर्मळ. ४ श्रीकृष्ण. ५ ऐका. ६ ज्ञातृत्वाभिमान. ७ बाधूं पाहे. ८ कथा. ९ श्रीकृष्ण. १० मरती. ११ ब्रह्मशापापासून.

त्यासि वनमाळी[1] ॥ सर्व ब्रह्मसुकाळीं घालूं पाहे ॥ ४३ ॥ कृष्णावेगळा उद्धव जातां ॥ वियोग बाधिना त्याचिया चित्तां ॥ ऐशी पावाया सर्वगंतता[2] ॥ उद्धवा तत्त्वतां हरि बोले ॥ ४४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ परस्वभावकर्माणि न प्रशंसेन्न गर्हयेत् ॥ विश्वमेकात्मकं पश्यन्प्रकृत्या पुरुषेण च ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो निःशब्दाचा[3] सोलींव[4] शब्द ॥ ज्याचे निःश्वासें जन्मले वेद ॥ उद्धवहितार्थ गोविंद ॥ ज्ञान विशुद्ध स्वयें सांगे ॥ ४५ ॥ संसारीं मुख्य तिन्ही गुण ॥ त्रिगुणास्तव त्रिविधजन ॥ त्यांचें स्वाभाविक कर्म जाण ॥ शांत दारुण आणि मिश्र ॥ ४६ ॥ त्या कर्मांचें निंदा स्तवन ॥ सर्वथा न करावें आपण ॥ एकाचें वानितां भलेपण ॥ इतरा कुडेपण तेणेंचि बोलें ॥ ४७ ॥ पांचांमाजी[5] भलेपण[6] ॥ एकाचें वानितां आपण ॥ इतर ते चौघेजण ॥ सहजें जाण निंदिले ॥ ४८ ॥ वाम सव्य उभयभाग ॥ दों नांवीं एकचि अंग ॥ तेवीं प्रकृतिपुरुषात्मक जग ॥ चिद्र[illegible]वांग एकत्व ॥ ४९ ॥ जग ब्रह्मरूपें परिपूर्ण ॥ यालागीं निंदा आणि स्तवन ॥ भूतमात्राचें जाण ॥ कदाही आपण न करावें ॥ ५० ॥ सर्वभूतांच्या ठायीं ॥ आत्माराम असे पाही ॥ यालागीं निंदा स्तुति कांहीं ॥ प्राणांतें पाही न करावी ॥ ५१ ॥ उद्धवा निंदास्तुतींची कथा ॥ सांडी सांडी गा सर्वथा ॥ तरीच पावशी परमार्था ॥ निजस्वार्था निजबोधें ॥ ५२ ॥ सर्वभूतीं भगवद्भाव ॥ हा ब्रह्मस्थितीचा निर्वाह ॥ यासि कदा नव्हे अपाव[7] ॥ एक तो भाव उद्धवा ॥ ५३ ॥ जेथूनि येवूं रिघे अपाव ॥ तेथें दृढ वाढल्या भगवद्भाव ॥ तेव्हां अपायचि होय उर्पाव[8] ॥ विघ्नासि ठाव असेना ॥ ५४ ॥ हे स्थिति सांडूनियां दूरी ॥ मी ज्ञाता हा गर्व न धरी ॥ निंदास्तुतींच्या भरोंवरी[9] ॥ तो अनर्थांमाझारी[10] निमग्न ॥ ५५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ परस्वभावर्माणि यः प्रशंसति निंदति ॥ स आशु भ्रश्यते स्वार्थादसत्यभिनिवेशतः ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ॥ मी एक सर्वज्ञाता पूर्ण ॥ ऐसा धरोनि ज्ञानाभिमान ॥ जगाचे देखे दोषगुण ॥ निंदी ब्राह्मण मुख्यत्वें ॥ ५६ ॥ पराचें स्वाभाविक[11] कर्म ॥ स्वयें निंदणें हा अधर्म ॥ हनुमंत ज्ञाता परम ॥ त्यास वानरी[12] कर्म सोडीना ॥ ५७ ॥ नारद ज्ञातेपणें मोठा ॥ सत्य मानला श्रेष्ठश्रेष्ठां ॥ तोही कळिलावा[13] कळभटा ॥ स्वभावचेष्टा अनिवार ॥ ५८ ॥ गरुड देवाचें वाहन ॥ सदा तिष्ठे हात जोडून ॥ तोही करी सर्पभक्षण ॥ ऐसें कर्म जाण स्वाभाविक ॥ ५९ ॥ विचारितां त्रिगुण ॥ गुणानुसारें[14] कर्माचरण ॥ तेथ पाहतां दोषगुण ॥ दोषी जाण पाहे तो ॥ ६० ॥ जगीं पहावी एकात्मता[15] ॥ हे ब्रह्मस्थिति गा सर्वथा ॥ सांडूनि गुणदोष पाहतां ॥ तो निजात्मघाता[16] प्रवर्ते ॥ ६१ ॥ स्वभावें भेटल्या सज्जन[17] ॥ शोधूनि पाहे दोषगुण ॥ त्या

---

१ श्रीकृष्ण. २ सर्वांतर्यामिपणा. ३ शब्दास अगोचराचा. ४ सोज्ज्वळ. ५ पांच देवांमध्यें. ६ चांगलेंपणा. ७ अपाय. ८ उपाय. ९ भरांत. १० अनर्थांमध्यें. ११ जातिस्वभाव. १२ वानर जातीय. १३ कळी लावणारा. १४ गुणा सारखें. १५ एकरूपता. १६ स्वकीय आत्माघाताविषयीं. १७ साधु.

परी ज्ञानाभिमान ॥ निंदा स्तवन उपजवी ॥ ६२ ॥ अभिमानाची जाती कैशी ॥ अधिक खवळे सज्ञानापाशीं ॥ तो दाखवी गुणदोषांसी
॥ निंदा स्तवनांशीं उपजवी ॥ ६३ ॥ आपुले वृत्तीसी जो समान ॥ त्याचें अळुमाळ[1] करी स्तवन ॥ न मने आपणासि ज्याचा गुण
॥ त्यासि निंदी आपण यथेष्ट ॥ ६४ ॥ निंदा स्तुति उपजे जेथ ॥ भेद क्षोभला उठे तेथ ॥ निःशेष निर्दाळी परमार्थ ॥ महाअनर्थ अंगीं
वाजे ॥ ६५ ॥ निंदेपाठीं अनर्थ ॥ उधार लागों[2] नेदी तेथ ॥ रोकडा अंगीं आदळत ॥ निजस्वार्थ घातक ॥ ६६ ॥ भेद समूळ मिथ्या
येथ ॥ येचि अर्थीचा स्वप्नदृष्टांत ॥ स्वयें सांगे श्रीकृष्णनाथ ॥ दृढ परमार्थ साधावया ॥ ६७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तैजसे निद्रयापन्ने
पिंडस्थो नष्टचेतनः ॥ मायां प्राप्नोति मृत्युं वा तद्वन्नानार्थदृक् पुमान् ॥३ ॥ ॥ टीका ॥ ॥ इंद्रियें जन्मलीं रजोगुणीं ॥ तन्मात्रा विषयो
तमोगुणीं ॥ तो इंद्रियविषयसेवनीं ॥ ठेवी निद्रास्थानीं निश्चळ ॥ ६८ ॥ जागृतीं विश्व अभिमानी ॥ दोनी जाती मावळोनी ॥ तेव्हां
मिथ्या प्रपंच स्वप्नीं ॥ तैजस अभिमानी विस्तारी ॥ ६९ ॥ स्थूळ देह असे निश्चळ ॥ स्वप्नीं मनचि केवळ ॥ विस्तारी भवजाळ[3] ॥ लोक
सकळ त्रिलोकी ॥ ७० ॥ त्या स्वप्नामाजिले सृष्टीसि जाण ॥ उत्पत्ति स्थिति आणि निधन[4] ॥ स्वयें देखतांही आपण ॥ जन्म मरण तें
मिथ्या ॥ ७१ ॥ तेवीं हे अविद्या[5] दीर्घस्वप्न ॥ वृथा विस्तारी अभिमान ॥ तेथील मिथ्या जन्म मरण ॥ तूं ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ७२ ॥
तुझ्या निजरूपाच्या[6] ठायीं ॥ भेदाची वार्ताही नाहीं ॥ तेथील शुभाशुभ कांहीं ॥ तुज सर्वथा पाही स्पर्शेना ॥ ७३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ किं
भद्रं किमभद्रं वा द्वैतस्यावस्तुनः कियत् ॥ वाचोदित तदनृतं मनसा ध्यातमेव च ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ जें जन्मलेंचि नाहीं ॥ तें काळें
गोरें सांगूं कायी ॥ ग्रहणेंवीण कांहीं ॥ खग्रास पाही दिसेना ॥ ७४ ॥ उखरीं[7] भासलें मृगजळ[8] ॥ तें खोल किंवा उथळ ॥ मधुर कीं
क्षार केवळ ॥ सांगतां विकळ विवेक ॥ ७५ ॥ तेवीं मिथ्या प्रपंचाचें भान ॥ तेथील दोष आणि गुण ॥ निवडिती ते सज्ञान ॥ अज्ञान
जाण त्यामाजी ॥ ७६ ॥ जेवीं आंवसेचिये रातीं ॥ आंधारा जोखूं आंधळे येती ॥ त्यांसि जोखितां दोहीं हातीं ॥ एकही रती तुकेना[9]
॥ ७७ ॥ तेवीं प्रपंच मिथ्यापणें ॥ तेथ कानीं जें ऐकणें ॥ कां डोळां जें देखणें ॥ रसना जें चाखणें स्पर्शणें अंगें ॥ ७८ ॥ हाताचें
घेणें देणें ॥ पायांचें जें चालणें ॥ वाचें जें बोलणें ॥ कल्पणें मनें ॥ ७९ ॥ अहंकाराचा बडिवार ॥ चित्ताचा चिंतनप्रकार ॥ बुद्धीचा
विवेकविचार ॥ हा समूळ व्यवहार मिथ्या तेथ ॥ ८० ॥ चित्रीं जळ आणि हुताशन ॥ अंत्यज आणि ब्राह्मण ॥ व्याघ्र आणि
हरिण ॥ भासतांही जाण भिंतीचि भासे ॥ ८१ ॥ तेवीं प्रपंच द्वैतयुक्त ॥ भासतां भासे वस्तु अद्वैत ॥ शुभाशुभ कैंचें तेथ ॥ ब्रह्म सदोदित

---

[1] थोडकें. [2] अवकाश लावूं देत नाहीं. [3] संसारविस्तार. [4] मरण. [5] अज्ञान. [6] स्वयंप्रकाशरूपाच्या. [7] उखरभूमीवर. [8] खोटा जलभास. [9] सापडेना.

दित परिपूर्ण ॥ ८२ ॥ केळीचें ढिंड उकलितां ॥ जो जो पदर[1] तो तो रिता ॥ तेवीं देहादि प्रपंच विवंचितां ॥ मिथ्या तत्त्वतां मायिक ॥ ८३ ॥ मिथ्या प्रपंचाच्या ठायीं ॥ शुभाशुभ तें लटिकें पाही ॥ सत्यवस्तूच्या ठायीं ॥ शुभाशुभ नाहीं अणुमात्र ॥ ८४ ॥ जो शुभाशुभ ह्मणे आहे ॥ त्याची कल्पना त्यासंमुख होये ॥ निज[2]कल्पनामहाभयें ॥ जन्ममरण वाहे लटिकेंची ॥ ८५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ छाया प्रत्याह्वयाभासा ह्यसंतोऽप्यर्थकारिणः ॥ एवं देहादयो भावा यच्छंत्यामृत्युतो भयम् ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ जळीं प्रतिबिंब सा[3]च नसे ॥ जो पाहे तो बिंबला दिसे ॥ मिथ्या प्रपंचाचें रूप तैसें ॥ निज[4]कल्पनावशें भासत ॥ ८६ ॥ तें प्रतिबिंब पाहोनि डोळां ॥ मी ह्मणोनि लाविजे टिळा ॥ तेवी देहाभिमानाचा सोहळा ॥ जीवाच्या कपाळा आदळे ॥ ८७ ॥ कां आपुलींचि उत्तरें ॥ पडिसादें होतीं प्रत्युत्तरें ॥ तें मिथ्याचि परी साचोकारें ॥ श्रवणीं अक्षरें उमटती ॥ ८८ ॥ निश्चळ दो[illegible]चें निजरूप ॥ भ्रमें भासला प्रचंड सर्प ॥ तो मिथ्या परी भयकंप ॥ महाखटाटोप उपजवी ॥ ८९ ॥ यापरी अ[5]संत देहादिक ॥ देहाभिमानें जीवासि देख ॥ जन्म[6]मरणावर्त अनेक ॥ आकल्प दुःख भोगवी ॥ ९० ॥ आत्म्यापासोनि देहादिभेद ॥ उपजला हें बोले वेद ॥ वेदरूपें तूं प्रसिद्ध ॥ मिथ्या विवाद घडे केवीं ॥ ९१ ॥ ऐसा उद्धवाचा आवांका ॥ वेदवादाची आशंका ॥ समूळ कळली यदुनायका ॥ तेंचि उत्तर देखा देतसे ॥ ९२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ आत्मैव तदिदं विश्वं सृज्यते सृजति प्रभुः ॥ त्रायते त्राति विश्वात्मा ह्रियते हरतीश्वरः ॥ ६ ॥ तस्मान्नह्यात्मनोऽन्यस्मादन्यो भावो निरूपितः ॥ निरूपितेयं त्रिविधा निर्मूला भातिरात्मनि ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रपंच प्रत्यक्ष विद्यमान ॥ तेणें भेदयुक्त झाले जन ॥ तेथ बोधी माझें वेदवचन ॥ प्रपंच अभि[7]न्न निजात्मता ॥ ९३ ॥ मूळीं ऊसचि बीजीं विरूढे[8] ॥ तो ऊंस ऊंसपणें कांडा चढे ॥ तेवीं प्रपंच वस्तुयोगें वाढे ॥ वाडेंकोडें तद्रूप ॥ ९४ ॥ जैसें सोनियाचें झालें लेणें ॥ तें वर्ततां वर्त्ते सोनेपणें ॥ लेणें मोडलिया सोनें ॥ सोनेंपणें स्वतःसिद्ध ॥ ९५ ॥ तिळाची पुतळी केली ॥ ते तिळावयवें शोभे आली ॥ ते मोडितां न मोडितां भली ॥ असे सांवली तिळरूप ॥ ९६ ॥ तेवीं उत्पति स्थिति निधन ॥ प्रपंचासि होतां जाण ॥ तेथ आदि मध्य अवसान ॥ वस्तु परिपूर्ण संचली ॥ ९७ ॥ जें एथ भासलें चराचर[9] ॥ तें मीं आत्माचि सा[10]चार ॥ मजवेगळा जगासि थार ॥ अणुमात्र असेना ॥ ९८ ॥ एवं सृज्य आणि स्रजिता ॥ पाल्य आणि पाळिता ॥ संहारें[11] आणि संहर्ता ॥ मी एकात्मता भगवंत ॥ ९९ ॥ एथ उत्पति स्थिति निधन ॥ त्रिविधरूपें प्रपंच भिन्न ॥ या सर्वांसि मी अधिष्ठान ॥ मजवेगळ जाण असेना ॥ १०० ॥ प्रपंच मजवरी आभासे ॥ परी मी प्रपंचामाजी नसें ॥ जेवीं मृगजळाचेनि रसें ॥ सूर्य काळवशें

---

१ वस्त्रगुंठीत बासनासारखा प्रदेश. २ स्वतः कल्पितभयानें. ३ खरें. ४ आपल्या कल्पनेनें. ५ खोटा. ६ जन्ममरणरूप भोंवरे ७ भेदरहित. ८ उत्पन्न होई. ९ विश्व. १० संहार्य. ११ खरोखर.

भिजेना ॥ १ ॥ त्रिविध प्रपंचाचें जाण ॥ मजवरी दिसे हें निर्मळ ॥ जेवीं गगन भासे सुनीळ ॥ परी तेथ अळुमाळ[1] नीळिमा[2] नाहीं ॥
॥ २ ॥ जग प्रत्यक्ष डोळां दिसे ॥ तें तूं निर्मूळ ह्मणसी कैसें ॥ हे आशंका मानिसी मानसें ॥ ऐक अनायासें तो बोध ॥ ३ ॥ ॥ श्लोक ॥
॥ इदं गुणमयं विद्धि त्रिविधं मायया कृतम् ॥ ७ ॥ एतद्विद्वान्मदुदितं ज्ञानविज्ञाननैपुणम् ॥ न निंदति नच स्तौति लोके चरति
सूर्यवत् ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ ॥ अध्यात्म अधिदैव अधिभूत ॥ हें त्रिविध जग मायाकृत ॥ नसतें मज[3]माजी भासत ॥ जाण निश्चित त्रिगुणात्मक ॥ ४ ॥ उद्धवा मिथ्या ह्मणोनि तूं एथ ॥ ह्मणें होशी उपेक्षायुक्त ॥ येणें महावाक्यें साधुसंत ॥ ज्ञानविज्ञानार्थ पावले ॥ ५ ॥
प्रपंचाचें मिथ्या[4] भान ॥ तेंचि ज्ञानाचें मुख्य लक्षण ॥ येणें ज्ञानें जो सज्ञान ॥ तोचि समान सर्वभूतीं ॥ ६ ॥ यालागीं भूतांचे गुणागुण ॥ कदा न वदे निंदा स्तवन ॥ सूर्याचेपरी जाण ॥ विचरे आपण समसाम्यें[5] ॥ ७ ॥ बदरिकाश्रम उत्तरदेशीं ॥ सेतुबंध[6] दक्षिणेसी ॥
सूर्य संमुख सर्वांसी ॥ विमुखता त्यासी असेना ॥ ८ ॥ सूर्य संमुख पूर्वेच्यांसी ॥ तोचि विमुख पश्चिमेच्यासी ॥ मी सर्वत्र सर्वांसी ॥
विमुखता मजसी असेना ॥ ९ ॥ सामर्थ्यें तम[7] दवडूनि जाण ॥ भूतांसि[8] सूर्य भेटे आपण ॥ तेवीं जगाचे दवडूनि दोषगुण ॥ साधुसज्जन विचरती ॥ ११० ॥ जें हें बोलिलें ज्ञानलक्षण ॥ तेंचि सिद्धांताचें पूर्णपण ॥ मुमुक्षु हें अनुसंधान ॥ सावधान साधावें ॥ ११ ॥
हेंचि पाविजे निजज्ञान ॥ तेचि अर्थीचे अनुसंधान ॥ उद्धवालागीं श्रीकृष्ण ॥ स्वमुखें आपण सांगत ॥ १२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रत्यक्षेणानुमानेन निगमेनात्मसंविदा ॥ आद्यंतवदसज्ज्ञात्वा निःसंगो विचरेदिह ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ जे जन्मोनि नाशवंत ॥ ते सर्वही
जाण असंत ॥ आसक्ति सांडोनियां तेथ ॥ उदास विरक्त वर्तावें ॥ १३ ॥ सटवल्याचें बारसें ॥ कोणी न करिती उल्हासें ॥ नश्वर देह
वाढतां तैसें ॥ मूर्ख मानसें सुखावती ॥ १४ ॥ उत्पत्तिविनाशलक्षण ॥ त्याचें देव सांगतो प्रमाण ॥ नित्य भूतांचें जन्ममरण ॥ देखिलें
आपण प्रत्यक्ष ॥ १५ ॥ अनुमानपरी तो साचार ॥ जें जें देखिजे साकार ॥ मेरुपृथ्व्यादि आकार ॥ तेही नश्वर प्रळयांतीं ॥ १६ ॥ येचिअर्थीं वेदोक्ती ॥ नाशवंत अष्टधा प्रकृती ॥ जीव[9]भाव नासे प्रळयांतीं ॥ गर्जती श्रुतीं येणें अर्थें ॥ १७ ॥ एथ आपुलाही अनुभव
असे ॥ जड विकारी तें तें नासे ॥ हें कळत असे गा आंपैसें[10] ॥ जग अनायासें नश्वर[11] ॥ १८ ॥ वडील निमाले[12] देखती ॥ पुत्र पौत्र स्वयें संस्कारिती ॥ तरी स्वमृत्यूची चिंता न करिती ॥ पडली भ्रांती देहलोभें ॥ १९ ॥ पुत्र पितरां पिंडदान देती ॥ उत्तम गति त्यांची

---

१ थोडकाही. २ काळेपणा. ३ माझेठायीं. ४ खोटा असें भासणें. ५ सर्वांचे ठायीं सारखा. ६ रामेश्वर. ७ अंधकार. ८ पंचमहाभूतांना. ९ जीवपणा. १० आपोआप. ११ नाशवंत. १२ मेले.

चिंतिती ॥ आपुली गति न विचारिती ॥ नश्वर आसक्ती निजलाभें ॥१२०॥ आत्मा केवळ प्रकाशघन ॥ प्रपंच जड मूढ अज्ञान ॥ हें ऐकोनि उद्धवें आपण ॥ देवासि प्रश्न पूसतु ॥ २१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धव उवाच ॥ ॥ नैवात्मनो न देहस्य संसृतिर्द्रष्टृदृश्ययोः॥ अनात्मसदृशोरीश कस्य स्यादुपलभ्यते ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ आत्मा नित्यमुक्त चिद्घन ॥ यासि न घडे भवबंधन ॥ देह जड मूढ अज्ञान॥ त्यासि संसार जाण घडेना ॥ २२ ॥ एथ भवबंधन हृषीकेशी ॥ सांग पां बाधक कोणासी ॥ जरी तूं संसार नाहीं ह्मणसी ॥ तो प्रत्यक्ष जगासी जडलासे ॥ २३ ॥ आत्म्यासि विचारितां जाण ॥ भवबंधा न दिसे स्थान ॥ येचि अर्थीचें न घडतेंपण ॥ उद्धव आपण सांगत ॥ २४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ आत्माऽव्ययोऽगुणः शुद्धः स्वयंजोतिरनावृतः॥ अग्निवद्दारुवदचिद्देहः कस्येह संसृतिः॥ ११॥ ॥टीका॥ आत्मा चिद्रूप अविनाशी ॥ गुण निर्गुण नातळे ज्यासी ॥ कर्माकर्मपापपुण्यांसी ॥ ठाव ज्यापाशीं असेना॥ २५ ॥ परापवादाचा[1] नव्हे उच्चार ॥ यालागीं ह्मणिजे परात्पर ॥ प्रकृतिगुण[2] अनिवार ॥ प्रकृतिपर परमात्मा ॥ २६ ॥ जयाच्या स्वप्रकाशदीप्तीं ॥ रविचंद्रादि प्रकाशती ॥ प्रकाशें प्रकाशे त्रिजगती ॥ तेजोमूर्ती परमात्मा ॥ २७ ॥ ऐशिया आत्म्याच्या ठायीं॥ भवबंध[3] नलगे कांहीं ॥ सूर्य बुडे मृगजळाच्या[4] डोहीं ॥ तैं आत्म्यासि पाही भवबंध[3] ॥ २८ ॥ खद्योततेजें[5] सूर्य जळे ॥ बागुलाभेणें काळु[6] पळे ॥ मुंगीचेनि पांखबळें ॥ जैं उडे सगळें आकाश ॥ २९ ॥ वारा आडखुळिला आडीं[7] पडे ॥ जैं थिल्लरामाजी[8] मेरु[9] बुडे ॥ तरी भवबंध आत्म्याकडे ॥ सर्वथा न घडे गोविंदा ॥ १३० ॥ देहाकडे भवबंधन ॥ मूर्खही नमानिती जन ॥ देह जड मूढ अज्ञान ॥ त्यासि भवबंधन कदा न घडे ॥ ३१ ॥ जैं दगडाचें पोट दुखे ॥ कोरडें काष्ठ चरफडी भुकें ॥ तैं देहाकडे यथासुखें ॥ भवबंध हरिखें लागत ॥ ३२ ॥ जैं डोंगरासि तरळ[10] भरे ॥ मृत्तिका[11] नाहाणालागीं झुरे ॥ कोळशानें काळें होय आंधारें ॥ तैं भवबंधभारें देह दाटे ॥ ३३ ॥ ह्मणसी देहात्मसंगतीं ॥ घडे भवबंधाची प्राप्ती ॥ विचारितां तेहीअर्थीं ॥ न घडे श्रीपती तें ऐक ॥ ३४ ॥ आत्मा स्वप्रकाश महावन्ही ॥ देह तो जड मूढ काष्ठस्थानीं ॥ तो मिळतां आत्ममिळणीं ॥ सांडी जाळूनि तत्काळ ॥ ३५ ॥ जैं अग्निमाजी संवादें ॥ कापूर आठ प्रहर नांदे ॥ तैं देहात्मनिजसंबंधें ॥ देह भवबंधें नांदता ॥ ३६ ॥ ह्मणती काष्ठामाजी अग्नि असे ॥ परी तो काष्ठीं असोनि न दिसे ॥ मथूनि काढिल्या निजप्रकाशें[12] ॥ जाळी अनायासें काष्ठातें ॥ ३७ ॥ तेवीं आत्मा देहामाजी असे ॥ परी तो देहचि होऊनि नसे ॥ देहप्रकाशक चिदंशें ॥ भवबंधपिसें[13] त्या

---

[1] दुसऱ्याचा अपवादाच्या. [2] मायागुण. [3] संसारबंध. [4] खोट्या कल्पित जलाचे डोहांत. [5] काजव्याच्या तेजानें. [6] काळ. [7] आडांत. [8] साचिवलेले उदकांत. [9] मेरुपर्वत. [10] एका प्रकारचा रोग. [11] माति. [12] स्वप्रकाशेंकरून. [13] संसारबंधरूपपिशाच.

न घडे ॥ ३८ ॥ ॥ आशंका ॥ ह्मणशी आत्म्याचे निजसंगतीं ॥ जैं जळोनि जाय भूतव्यक्ती ॥ तैं भूतांची वर्तती स्थिती ॥ कैशा रीतीं तें ऐक ॥ ३९ ॥ छायामंडपीं दीप प्रकाशी ॥ नाचवी कागदांच्या बाहुल्यांसी ॥ तैच लावितां दीपासी ॥ जाळी अनायासीं त्या व्यक्ती ॥ १४० ॥ तेवीं आत्म्याचें स्वसत्ताशक्तीं ॥ भूतें दैवयोगें वर्तती ॥ स्वयंभू झाल्या आत्मस्थिती ॥ भूतव्यक्ती उरेना॥ ४१ ॥ करितां आत्म्याचें अनुसंधान ॥ संसाराचें नुरे भान ॥ तेथ भूताकृति भिन्नभिन्न ॥ कैंच्या जाण अतिबद्ध ॥ ४२ ॥ यापरी भवबंधन ॥ मज पाहतां मिथ्या जाण ॥ भवबंधनालागीं स्थान ॥ नेमस्त जाण असेना ॥ ४३ ॥ आत्म्याच्या ठायीं ना देहीं ॥ उभयसंबंधीही नाहीं ॥ भवबंध मिथ्या पाही ॥ यासि ठावो कोठेंही असेना ॥४४ ॥ कोपों नको श्रीकृष्णनाथा ॥ माझेनि निर्धारें पाहतां॥भवबंध मिथ्या तत्त्वतां॥ निश्चयें चित्ता मानलें ॥ ४५ ॥ ऐकोनि उद्धवाचें वचन ॥ हरिखें वोसंडला श्रीकृष्ण ॥ माझा उद्धव झाला सज्ञान ॥ निजात्मस्वरूप पावला ॥ ४६ ॥ सत्य मिथ्या भवबंधन ॥ ऐकोनि उद्धवाचें वचन ॥ परमानंदें डोले श्रीकृष्ण ॥ जीवें निंबलोण करूंपाहे ॥ ४७ ॥ आत्म्यास भवबंध नाहीं ॥ शेखीं नदिसे देहाच्या ठायीं ॥ हा विवेक नेणिजे जिहीं ॥ त्यांसि भवबंध पाही हरि सांगे ॥४८॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ यावद्देहेंद्रियप्राणैरात्मनः संनिकर्षणम् ॥ संसारः फलवांस्तावदपार्थोऽप्यविवेकिनः ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो वर्ण[3]आश्रमां[4]हीपरता ॥ जो बंधमोक्षां अलिप्तता ॥ जो देहद्वंद्वा[5] नातळता ॥ तो उद्धवहितार्था हरि बोले ॥ ४९ ॥ मी स्थूळ कृश गौर श्याम ॥ हे देहाचे देहधर्म ॥ मी काणा मुका बहिरा परम ॥ हे इंद्रियधर्म इंद्रियांचे ॥ १५० ॥ क्षुधातृषादि अनुक्रम ॥ हा प्राणांचा प्राणधर्म ॥ कामक्रोधलोभादिसंभ्रम ॥ हा मनोधर्म मनाचा ॥ ५१ ॥ सत्वगुणाची जागृती ॥ रजोगुणें स्वप्नस्फूर्ती ॥ तमोगुणें जाड्य सुषुप्ती ॥ जाण निश्चितीं देहयोगें ॥ ५२ ॥ देहासि येतां मरण ॥ मी मेलों ह्मणे तो आपण ॥ देहासि जन्म होतां जाण ॥ जन्मलेपण स्वयें मानी ॥ ५३ ॥ इंद्रियें विषयो सेविती ॥ ते म्यां सेविले मानी निश्चितीं ॥ स्वर्गनरकभोगप्राप्ती ॥ सत्य मानिती देहात्मता ॥ ५४ ॥ अन्न आकांक्षी प्राण[6] ॥ त्यातें भक्षी हुताशन[7] ॥ तत्साक्षी चिदात्मा आपण ॥ ह्मणे म्यां अन्न भक्षिलें ॥ ५५ ॥ हे अवघे माझे धर्म ॥ ऐसा आत्म्यासि जंव दृढ भ्रम ॥ तंव मिथ्याचि अतिदुर्गम ॥ संसार विषम भ्रमें भोगी ॥ ५६ ॥ त्या भोगाचें फळ गहन ॥ अविश्रम जन्ममरण ॥ स्वर्ग नरक पाप पुण्य ॥ भ्रमें आपण सत्य मानी ॥ ५७ ॥ संसार मूळीं निर्मूळ ॥ तोही भ्रमफळें सदाफळ ॥ जो कां अविवेक्यांप्रती प्रबळ ॥ सर्वकाळ फळलासे ॥ ५८ ॥ जेथ सत्य अर्थ नाहीं ॥ तो अनर्थ ह्मणिजे पाही ॥ त्याचा फळभोग तोही ॥ बाळ

---

१ आनंदानें. २ परिपूर्ण झाला. ३ ब्राह्मणादिवर्ण. ४ ब्रह्मचर्यादि आश्रम. ५ स्थूलसूक्ष्मदेहद्वंद्वांत. ६ प्राणवायु. ७ अग्नि.

बागुलन्यायीं भोगावा ॥ ५९ ॥ ॥ आशंका ॥ ॥ गगन कमळांची माळा ॥ जैं वंध्यापुत्र घाली गळां ॥ तैं संसारभोगाचा सोहळा ॥ आत्म्याच्या जवळां देखिजे ॥ १६० ॥ ऐसें न घडे तें केवीं घडे ॥ तेंवि अर्थींचें वाडेकोडें ॥ श्रीकृष्ण उद्धवापुढें ॥ निजनिवाडें सांगत ॥ ॥ ६१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अर्थे ह्यविद्यमानेपि संसृतिर्न निवर्तते ॥ ध्यायतो विषयानस्य स्वप्ने नर्थागमो यथा ॥१३॥ ॥ टीका ॥ ॥ सत्यार्थ नसतांही संसार ॥ निवर्तेना अतिदुर्धर ॥ याचिअर्थींचा विचार ॥ निजनिर्धार अवधारी ॥ ६२ ॥ वंध्यापुत्राचिया ऐसें ॥ संसारा अ[1]संतपण असे ॥ संत ह्मणों तरी हा नासे ॥ काळवशें सहजेंची ॥ ६३ ॥ संसार जैं संत होता ॥ तैं ब्रह्मज्ञानेंही न नासता ॥ हा संतां संत नये ह्मणतां ॥ अ[2]निर्वाच्य कथा पैं याची ॥ ६४ ॥ अविचारितां याचें कोड ॥ अविवेकें हा अतिगोड ॥ विषयध्यानें वाढे रूढ ॥ सं[3]कल्प दृढ मूळ याचें ॥ ६५ ॥ हा न[4]संतचि परी आभासे ॥ निद्रिता स्वप्नीं अनर्थपिसें ॥ तेवीं संसार मायावशें ॥ विषय आभासें भोगवी ॥६६॥ जंव जंव विषयसेवन ॥ तंव तंव वाढे विषयध्यान ॥ विषयध्यासें भव[5]बंधन ॥ सदृढ जाण उद्धवा॥६७॥विषयसेवनें भवबंधन ॥ जीवासि झालें दृढ पूर्ण ॥ तैं जीवन्मुक्त विषयीं रमण ॥ दैवयोगें जाण दिसताहे ॥ ६८ ॥ जीवन्मुक्तासि विषयप्राप्ती ॥ तेणें बुडाली त्याची मुक्ती ॥ ऐशी आशंका न धरी चित्तीं ॥ तेंचि श्रीपती वि[6]शद सांगे ॥६९॥ ॥ श्लोक॥ ॥ यथा ह्यप्रतिबुद्धस्य प्रस्वापो बव्हनर्थभृत् ॥ सएव प्रतिबुद्धस्य न वै मोहाय कल्पते॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ सज्ञान आणि अज्ञान ॥ यांसि जें विषयसेवन ॥ त्यांचा अनुभव भि[7]न्नभिन्न ॥ तेंही लक्षण अवधारी ॥ १७० ॥ जेवीं स्वप्नींची विषयप्राप्ती ॥ स्वप्नस्थ साँ[8]चचि मानिती ॥ तेचि विषय जागृती स्फूर्ती ॥ परी सत्य[9]प्रतीती त्यां नाहीं ॥ ७१ ॥ तेवीं अज्ञानें विषयमेलन ॥ तेणें विषयासक्त होय मन ॥ तेंचि मुक्तांप्रति जाण ॥ मि[10]थ्यादर्शन विषयांचें ॥ ७२ ॥ नटनव्य लोकाचारीं ॥ संपादी स्त्रीपुरुषव्यवहारीं ॥ मुक्तासि तैशी परी ॥ गृहादारीं नांदतां ॥ ७३ ॥ कां लेंकराच्या खेळाप्रती ॥ तुळसीदळ घेऊनि हातीं ॥ वडे मांडे क्षीर तूप ह्मणती ॥ एकीं कल्पिती अनेकत्व ॥ ७४ ॥ तेवीं जीवन्मुक्तासि देख ॥ जगीं विषयो अवघा एक ॥ त्यासि नानात्वें भाविती लोक ॥ परी तो अनेक देखेना ॥ ७५ ॥ दृढ धरोनि देहाभिमान ॥ मी माझें जें विषयस्फुरण ॥ तेंच भवबंधाचें कारण ॥ विशद श्रीकृष्ण सांगत ॥ ७६॥ ॥ श्लोक ॥ ॥ शोकहर्षभयक्रोधलोभमोहस्पृहादयः ॥ अहंकारस्य दृश्यंते जन्म मृत्युश्च नात्मनः ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ देहाभिमानाचे पोटीं ॥ अनेक दुःखांचिया कोटी॥ त्यांची सं[11]कळितें गुणें[12]गोठी॥ कृष्ण जगजेठी सांगत ॥ ७७ ॥ देहाभिमानाचें कार्य एथ ॥ अद्वैतीं वाढवी द्वैत ॥ इष्टानिष्टीं समस्त ॥ जग व्याप्त तेणें कीजे ॥ ७८ ॥

---

१ खोटेपणा. २ बोलण्यासही कठोण. ३ कल्पित मनोरथ. ४ नसतांच. ५ संसार बंधन. ६ स्पष्ट. ७ निरनिराळा. ८ खरी. ९ अनुभव. १० खोटें दर्शन. ११ मिश्र झालेल्या. १२ गुणकथा.

नश्वरा इष्टाचा नाश देख ॥ तेणें देहअहंता मानी दुःख ॥ यानाव गा महाशोक ॥ सकळही लोक मानिती ॥ ७९ ॥ नश्वर विषयप्राप्ती ॥ आल्हाद उपजे चित्तीं ॥ त्यानाव हर्ष ह्मणती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ १८० ॥ बळी मिळोनि समस्त ॥ आप्त विषयो विभांडुं पाहत ॥ तेणें कासावीस होय चित्त ॥ भय निश्चित यानांव ॥ ८१ ॥ आप्तकामाचें अवरोधन[1] ॥ ज्याचेनि अणुमात्र होय जाण ॥ त्याचें करूं धांवे हनन[2] ॥ क्रोध संपूर्ण त्यानांव ॥ ८२ ॥ गांठी झाल्याही धनकोडी ॥ कवडी वेंचितां प्राण सोडी ॥ यानांव लोभाची बेडी ॥ कृपण परवडी[3] पुरुषाची ॥ ८३ ॥ कर्माकर्म हिताहित ॥ इष्टानिष्ट नाठवी चित्त ॥ विवेकशून्यें स्तब्धता प्राप्त ॥ मोह निश्चित यानांव ॥ ८४ ॥ नित्य करितां विषय सेवन ॥ मनीं विषयइच्छा गहन ॥ अखंड विषयाचें ध्यान ॥ स्पृहा[4] जाण ती नांव ॥ ८५ ॥ इत्यादि हे नानागुण ॥ अथवा कां जन्ममरण ॥ आत्म्यासि संबंध नाहीं जाण ॥ हें देहाभिमान स्वयें भोगी ॥ ८६ ॥ जागृति[5] आणि देखिजे स्वप्न ॥ तेथ वसे देहाभिमान ॥ तेठायीं हे दिसती गुण ॥ सुषुप्तीस जाण गुण नाहीं ॥ ८७ ॥ तेथ वृत्ति निरभिमान ॥ तेथ जन्ममरणादि हे गुण ॥ सर्वथा नुठती[6] जाण ॥ गुणासि कारण अभिमान ॥ ८८ ॥ जळीं[7] स्थळीं वायु झगटी ॥ जळीं तरंग स्थळीं नुठी ॥ तैं तरंगता जळाचे पोटीं ॥ तेवीं शोकादिगुणगोठी अहंतेमाजी[8] ॥ ८९ ॥ बद्धता झाली अहंकारासी ॥ ह्मणसी मुक्ति व्हावी त्यासी ॥ तेवीं अहंता लागली जीवासी ॥ तेंचि हृषीकेशी सांगत ॥ १९० ॥ अंत्यजाचा विटाळ ज्यासी ॥ गंगास्नानें शुद्धत्व त्यासी ॥ तें गंगास्नान अंत्यजासी ॥ शुद्धत्वासी अनुपयोगी ॥ ९१ ॥ तेवीं अहंता जडली जीवासी ॥ ते त्यगितां मुक्तत्व त्यासी ॥ परी मुक्तत्व अहंकारासी ॥ कल्पांतिसी घडेना ॥ ९२ ॥

॥ श्लोक ॥ ॥ देहेंद्रियप्राणमनोभिमानो जीवांतरात्मा गुणकर्म मूर्तिः ॥ सूत्रं महानित्युरुधेव गीतः संसार आधावति कालतंत्रः ॥ १६ ॥

॥ टीका ॥ ॥ अनंत अपार ज्ञानघन ॥ मायातीत आत्मा पूर्ण ॥ तोचि झाला मायेचे अधीन ॥ अंतरात्मा जाण यालागीं ॥ ९३ ॥ माया व्यापूनि अपार ॥ यालागीं बोलिजे परमेश्वर ॥ मायानियंता साचार ॥ यालागीं ईश्वर ह्मणि पैं तो ॥ ९४ ॥ तोचि अविद्येमाजी प्रतिबिंबला ॥ यालागीं जीव हें नाम पावला ॥ तोचि देहाध्यासें प्रबळला ॥ अहंकार झाला याहेतू ॥ ९५ ॥ तो संकल्पविकल्पउपाधीन ॥ स्वयें होऊनि ठेला मन ॥ त्या मनासि करावया गमन ॥ दशेंद्रियें जाण तोचि झाला ॥ ९६ ॥ त्यासि इंद्रियांचा आधार ॥ सुखदुःखभोगांचा निकर[9] ॥ पापपुण्यांचा चमत्कार ॥ देहाचा आकार तोचि झाला ॥ ९७ ॥ त्या देहाचें जें कारण ॥ सत्व रज तमोगुण ॥ ते तीन्ही गुण जाण ॥ तोचि आपण स्वयें झाला ॥ ९८ ॥ गुणक्षोभाचें निजवर्म ॥ झाला पंचविषय परम ॥ विषयभोगादि क्रि

---

१ प्रतिबंधन. २ मारण. ३ गोष्ट. ४ इच्छा. ५ जागें असणें. ६ न उठतो. ७ पाण्यांत. ८ जीव. ९ समुदाय.

या कर्म ॥ स्वयें स्वधर्म होऊनि ठेला[1] ॥ ९९ ॥ तिनी गुणांचें जन्मकारण ॥ झाला महत्तत्व सूत्र प्रधान ॥ एवं संसार अवघा[2] जाण ॥
ईश्वर आपण स्वयें झाला ॥ २०० ॥ त्या संसाराची आधावती ॥ गुणसाम्यें तोचि प्रकृति ॥ तेचि उत्पत्ति स्थिती प्रळयार्थीं ॥ क्षोभि
का शक्ती काळ तो झाला ॥ १ ॥ तो काळ आपल्या सत्ताशक्तीं ॥ उपजवी पाळी संहारी अंतीं ॥ ऐशा पुनःपुनः आवृत्ती ॥ नेणों कि
ती करवीत ॥ २ ॥ एवं संसार तो ब्रह्मस्फूर्ती[3] ॥ लीलाविग्रहें साकारस्थिती ॥ मी विश्वेश्वर विश्वमूर्ती ॥ बहुधा[4] व्यक्ती[5] मी एक ॥ ३ ॥
यालागीं जो जो पदार्थ दिसे ॥ तेणें तेणें रूपें आत्मा भासे ॥ मज वेगळा पदार्थ नसे ॥ हें मानी विश्वासें तो धन्य ॥ ४ ॥ मीचि एक
बहुधा व्यक्ती ॥ वेदही साक्षी येचि अर्थीं ॥ विश्वतश्चक्षु यावेदोक्तीं ॥ श्रुति मज गाती सर्वदा ॥ ५ ॥ ऐसें असतां नवल कैसें ॥ जीव
भुलला कल्पनावशें ॥ अहंता वाढवी देहाध्यासें ॥ तो ह्मणे देव न दिसे तिहीं लोकीं ॥ ६ ॥ सत्य मानूनि भेदभान[6] ॥ जीव झाला अ
तिअज्ञान[7] ॥ भुलला आपण्या आपण ॥ देहाभिमान दृढ झाला ॥ ७ ॥ देहाभिमानाचें दृढपण ॥ तेंचि बद्धतेचें लक्षण ॥ देहाभिमाना
चें निरसन[8] ॥ मुक्तता[9] जाण तीनांव ॥ ८ ॥ समूळ मिथ्या देहाभिमान ॥ मिथ्या भेदाचें भवभान ॥ त्याचें आद्यंतनिर्दळण ॥ होतें लक्ष
ण हरि सांगे ॥ ९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अमूलमेतद्बहुरूपरूपितं मनोवचःप्राण शरीरकर्म ॥ ज्ञानासिनोपासनया शितेन छित्वा पुनर्गां वि
चरत्यतृष्णः ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ ॥ भेदें[10]रूपें भवभान[11] ॥ मनसा वाचा कर्मप्राण ॥ देहद्वयाचें स्फुरण ॥ तें निर्मूळ जाण उद्धवा ॥ २१० ॥
भेदें बहुरूप भवमंडळ ॥ विचारितां तें निर्मूळ ॥ विचित्र भासावया भवजाळ ॥ आत्म्यावेगळें स्थळ असेना ॥ ११ ॥ आत्म्याहूनि सं
सार भिन्न ॥ ह्मणती ते केवळ अज्ञान ॥ त्यांसि बहुरूप भवभान ॥ देहाभिमान वाढवी ॥ १२ ॥ त्या देहाभिमानाचे पोटीं ॥ कर्माक
र्मांची आटाटी ॥ जन्ममरणांचिया कोटी ॥ दुःख संकटीं जीव भोगी ॥ १३ ॥ ऐसा दुःखदाता देहाभिमान ॥ समूळ जाणोनियां आ
पण ॥ त्याचें करावया निर्दळण ॥ अनुतापी जो पूर्ण स्वयें होये ॥ १४ ॥ तेणें आचार्य[12] उपास्ती[13] ॥ लाहोनि ज्ञानखड्गाची प्राप्ती ॥ गुरु
वाक्य साहणेप्रती ॥ सतेजद्युती खड्ग केलें ॥ १५ ॥ भववृक्षाचा समूळ कंद ॥ देहाभिमान अतिसुबद्ध ॥ अद्वैतसाधना साधक शु
द्ध ॥ तेणें समूळ छेद करावा ॥ १६ ॥ एवं छेदूनि देहाभिमान ॥ उरलेनि आयुष्यें जाण ॥ महीं[14] विचरती सज्जन[15] ॥ निरभिमान निज
निष्ठा ॥ १७ ॥ तेथ इच्छा निंदा द्वेष तृष्णा ॥ सर्वथा नातळे पैं जाणा ॥ मनचि मुकलें मनपणा ॥ इच्छादि तृष्णा तेथ कैंची ॥ १८ ॥ ॥

---

१ राहिला. २ सगळा. ३ ब्रह्मस्वरूप स्फूर्ति. ४ पुष्कळ प्रकारचा. ५ पदार्थ. ६ द्वैत. ७ मूर्ख. ८ टाकणें. ९ मुक्ति. १० द्वैतानें. ११ संसार भासणें. १२ गुरु. १३ उपासना. १४ पृथिवीवर. १५ साधुजन.

॥ आशंका ॥ ॥ समूळ संसार निर्दळण ॥ करी ऐसें ज्ञान कोण ॥ त्या ज्ञानासि कोण साधन ॥ साधल्या ज्ञान फल काय ॥ १९ ॥
याचें समूळ श्रवण ॥ उद्धवाचें वांछी मन ॥ तें जाणोनियां श्रीकृष्ण ॥ स्वयें निरूपण सांगत ॥ २२० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ज्ञानं विवेको
निगमस्तपश्च प्रत्यक्षमैतिह्यमथानुमानम् ॥ आद्यंतयोरस्य यदेव केवलं कालश्च हेतुश्च तदेव मध्ये ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ ॥ नित्यानित्य
विवेक[1] ॥ यानांव ज्ञान चोख[2] ॥ देहद्वयाचा प्रकाशक ॥ आत्मा सम्यक जाणती ज्ञाते ॥ २१ ॥ सेवावया स्वानंदनव्हाळी[3] ॥ प्रथम उसांचीं
पानें साळी ॥ मग ऊंस तोही बळें पिळी ॥ तोही रस आळीं शर्करा[4] लाभे ॥ २२ ॥ ते शर्करा परिपाकबळें ॥ तैं साकरचि केवळें
॥ केळें आणि नारेळें ॥ करिती नानाफळें मुळींच्या गोड्या ॥ २३ ॥ तेवीं स्थूळाचें निराकरण ॥ लिंगदेहाचें उपमर्दन ॥ अहंकाराचें
निर्दळण ॥ करूनि पूर्ण ब्रह्म पावती ज्ञाते ॥ २४ ॥ तें ब्रह्म निर्गुण निराकार[5] ॥ तद्रूप[6] देखती चराचर[7] ॥ यापरी विवेकचतुर[8] ॥ वस्तूचा
निर्धार[9] जाणती ॥ २५ ॥ यापरी गा विचक्षण[10] ॥ जाणती वस्तूचें लक्षण[11] ॥ यानांव विवेकज्ञान ॥ उद्धवा जाण निश्चित ॥ २६ ॥ वस्तु
निजशब्द निर्गुण ॥ तेथ जें श्रुतीचें स्फुरण ॥ इत्थंभूत शब्दज्ञान ॥ वेद तो जाण निगम माझा ॥ २७ ॥ तो मी वेदरूप नारायण ॥ यालागीं
वेदवचन प्रमाण ॥ श्रुत्यर्थें शब्दज्ञान ॥ करी पावन[12] पाठकां ॥ २८ ॥ जाणावया निजात्मस्वरूप ॥ देहादिविषयांचा अनुताप[13] ॥
जेणें साधक होती निष्पाप ॥ यानाव तप उद्धवा ॥ २९ ॥ अनुतापें दमितां मन ॥ होय पापाचें क्षालन ॥ तेव्हां श्रुत्यर्थ आपण ॥ कल्पी
अनुमान वस्तूचें ॥ २३० ॥ देह जड मूढ अचेतन ॥ तेथ चेतनात्मक नारायण ॥ देहाचें मानूनि मिथ्यापण[14] ॥ अद्वैतीं मन मुसावे[15]
॥ ३१ ॥ तें अद्वैतप्राप्तीचें लक्षण ॥ अनन्यभावें आपण ॥ सद्गुरूसि रिघावें शरण ॥ निरभिमान भावार्थें ॥ ३२ ॥ सद्भावें अनन्यशरण
॥ तो गुरुकृपा पावे आपण ॥ पाहोनि अधिकारलक्षण ॥ गुरु गुह्यज्ञान[16] उपदेशी ॥ ३३ ॥ सर्वही निःशंक[17] परब्रह्म ॥ हें श्रुतिगुह्य
उत्तमोत्तम ॥ एथ भाग्यें जो सभाग्य परम ॥ त्यासचि सुगम ठसावे[18] ॥ ३४ ॥ गुरुवचन पडतां कानीं ॥ वृत्ति निजात्मसमाधानीं ॥
निवटोनि ठेली[19] चिद्घनीं ॥ सुखसमाधानीं स्वानंदें ॥ ३५ ॥ तयासि पुढती साधन ॥ अथवा कर्माचें कर्माचरण ॥ तेथ बोलों शके कोण
॥ वेदीं मौन घेतलें ॥ ३६ ॥ तेथ द्वंद्वांची निमाली[20] स्फूर्त्ती ॥ सकळदुःखाची समाप्ती ॥ देहीं विदेहत्वाची प्राप्ती ॥ प्रत्यक्ष[21] ह्मणती यानांव
॥ ३७ ॥ पुसूनियां विसराचा ठावो ॥ आठवेंवीण नित्य आठवो ॥ अखंड स्वरूपानुभवो ॥ प्रत्यक्ष पहाहो यानांव ॥ ३८ ॥ मी

---

[1] विचार. [2] चांगलें. [3] गोडी. [4] साखर. [5] आकारशून्य. [6] ब्रह्मरूप. [7] जगत्. [8] ज्ञानी. [9] निश्चय. [10] पंडित. [11] चिन्ह. [12] शुद्ध. [13] पश्चाताप [14] खोटेपणा. [15] मग्न होतें. [16] गुप्त ज्ञान. [17] निर्बाध ( निःसंशय ). [18] प्राप्त होई. [19] राहिली. [20] नाहींशी झाली. [21] अक्षिगोचर.

आत्मा स्वानंदकंद[1] ॥ ऐसा अखंडत्वें[2] परमानंद ॥ प्रत्यक्ष वेदाचा निजबोध ॥ हा स्वयें गोविंद[3] बोलिला ॥ ३९ ॥ हाचि बोध सभाग्या कडे ॥ श्रवणमात्रें आंतुडे[4] ॥ एका मननें जोडे ॥ एका सांपडे निदिध्यासें ॥२४०॥ एकासि गा प्रत्यगावृत्तीं ॥ हा बोध ठसावे चित्तीं ॥ एका माझिया अद्वैतभक्तीं ॥ मी सगळा श्रीपती आतुडें ॥ ४१ ॥ निजबोध साधावया पूर्ण ॥ उद्धवा हेंचि मुख्य साधन ॥ एवं साधलिया निजज्ञान ॥ फळ कोण तें ऐक ॥ ४२ ॥ जो मी सृष्टिआदि अनंतू ॥ नित्यमुक्तत्वें अहेतू ॥ तो मी भवमूळा मूळहेतू ॥ सृष्टिस्रजिता अच्युतू[3] स्वलीला ॥ ४३ ॥ तेथ रजोगुणाचिये स्थितीं ॥ स्रष्टृरूपें मीचि पुढती ॥ अद्वैतीं दावीं अनेक व्यक्ती ॥ सृष्टिउत्पत्तिकर्ता तो मी ॥ ४४ ॥ मूळेंवीण सफळ झाड ॥ वाढविलें निजांगीं गोड ॥ तेंचि सृष्टिसंरक्षणीं कोड ॥ मज निचाडा चाड प्रतिपाळनीं॥४५॥ बुद्धिबळें[5] एका काष्ठाचे पोटीं ॥ तेथ राजा प्रधान पशु प्यादा उठी ॥ त्यांसि पूर्वपुण्य नाहीं गांठीं ॥ ते निष्कर्मसृष्टिप्रकाशिता मी॥४६॥ निष्कर्म जग समस्त ॥ स्रजिता मीमांसकमत ॥ ठकोनि ठेलें निश्चित ॥ जग सदोदित निष्कर्म ब्रह्म ॥ ४७ ॥ जेवीं बुद्धिबळाचा खेळू॥ अचेतनीं युद्ध प्रबळू ॥ तेवीं लोकरक्षणीं कळवळू ॥ सृष्टिप्रतिपाळू मी कर्ता ॥ ४८ ॥ प्रकृतीच्या जडमूढ सारी ॥ पुरुषाचेनि सचेतन निर्धारी ॥ काळपाश घेऊनि करीं ॥ खेळविता चराचरीं मी विष्णू ॥ ४९ ॥ तेथ अचेतना जुंझारीं ॥ न मरत्या महामारामारी ॥ एका जीत एका हारी ॥ उभयपक्षांतरीं खेळविता मी ॥ २५० ॥ सोंगटी निमालियापाठीं ॥ कवण पुण्यात्मा चढे वैकुंठीं ॥ कोण पडले नरकसंकटीं ॥ तैसा जाण सृष्टीं बंध मोक्ष ॥ ५१ ॥ न मोडतां एकलेपण ॥ त्या खेळाच्या ऐसे जाण ॥ जगाचें करीं मी पालन ॥ दुजेपण नातळतां ॥ ५२ ॥ दोराचा सर्पाकार ॥ सबळ बळें मारी वीर ॥ तैसा सृष्टीसि संहार ॥ मी प्रळयरुद्र पैं कर्ता ॥ ५३ ॥ स्वप्नीं भासलें जग संपूर्ण ॥ तेथूनि जागा होतां आपण ॥ स्वप्न निर्दळितां कष्ट कोण ॥ तैसा मी जाण प्रळयकर्त्ता ॥ ५४ ॥ सृष्टीसि उत्पत्ति स्थिति निधन ॥ आत्मा आत्मत्वें अखंड पूर्ण ॥ तेंचि स्वरूप सज्ञान ॥ स्वानुभवें आपण होऊनि ठेले[6] ॥ ५५ ॥ तें निजरूप[7] झालों ह्मणणें ॥ हेंही बोलणें लाजिरवाणें ॥ तें स्वयंभ असतां ब्रह्मपणें ॥ होणें न होणें भ्रममात्र ॥ ५६ ॥ मिथ्या[8] दोराचा सर्पाकार ॥ भासतां तो असे दोर ॥ निवर्तल्या सर्पभरभार ॥ दोर तो दोर दोररूपें ॥ ५७ ॥ तेवीं सृष्टीसि उत्पत्ति होतां ॥ आत्मा जन्मेना तत्त्वतां[9] ॥ सृष्टीचा प्रतिपाळकर्ता ॥ आत्मा सर्वथा वाढेना ॥ ५८ ॥ सृष्टीसि महाप्रळय होतां ॥ आत्मा नायके प्रळयवार्ता ॥ उत्पत्तिस्थितिनिधनता ॥ आत्मा तत्त्वतां अविकारी[10] ॥ ५९ ॥ एवं साधनीं साधूनि ज्ञान ॥ साधक झाले सज्ञान ॥ तें अबाधित ब्रह्म पूर्ण ॥ स्वयें आपण होऊनि ठेले ॥२६०॥

---

१ स्वानंदाचा कांदा. २ परिपूर्ण. ३ श्रीकृष्ण. ४ सांपडे. ५ खेळण्याकरितां लांकडाचीं करितात तीं. ६ राहिले. ७ स्वकीय रूप. ८ खोटा. ९ खरोखर. १० विकाररहित.

अज[1] अव्यय[2] स्वानंदघन[3] ॥ साधक झाले ब्रह्म पूर्ण ॥ हें ज्ञानाचें फळ संपूर्ण ॥ उद्धवा जाण निश्चित ॥ ६१ ॥ हें ज्ञानफळ आलिया हा
ता ॥ उत्पत्ति स्थिति प्रळय होतां ॥ अखंड परिपूर्ण निजात्मता ॥ ते सदृशांता हरि सांगे ॥ ६२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यथा हिरण्यं सुकृतं
पुरस्तात्पश्चाच्च सर्वस्य हिरण्मयस्य ॥ तदेव मध्ये व्यवहार्यमाणं नानापदेशैरहमस्य तद्वत् ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ ॥ मुकुट कुंडलें करकंक
णें ॥ न घडितां सोनें सोनेंपणें ॥ त्याचीं करितां नानाभूषणें ॥ लेणेंपणें उणें नव्हेचि हेम ॥ ६३ ॥ ते न मोडतां अ[4]ळंकार ठसे ॥ सोनें
अ[5]विकार संचलें असे ॥ तेवीं उत्पत्तिप्रळयविनाशें ॥ माझें स्वरूप चिदंशें अविनाशी ॥ ६४ ॥ माझें स्वरूप शुद्ध परब्रह्म ॥ तेथ नाना
रूप नाना नाम ॥ भासतांही जग विषम ॥ ब्रह्म समसाम्य समन्वयें ॥ ६५ ॥ जेवीं सूर्याचे किरण ॥ सूर्यावेगळ नव्हती जाण ॥ तेवीं
जग मजशीं अभिन्न ॥ तेंचि निरूपण हरि सांगे ॥ ६६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विज्ञानमेतत्त्रियवस्थमंग गुणत्रयं कारणकार्यकर्तृ ॥ समन्वये
न व्यतिरेकतश्च येनैव तुर्येण तदेव सत्यम् ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ सत्वगुणें जागरण ॥ रजोगुणें दिसे स्वप्न ॥ तमोगुणें सु[6]षुप्ति जाण ॥
लागे संपूर्ण गाढ मूढ ॥ ६७ ॥ ऐसें तिहीं अवस्थायुक्त मन ॥ कार्य कर्तृत्व कारण ॥ त्रिविध जग भासे संपूर्ण ॥ ब्रह्म समन्वयें जाण
सदोदित ॥ ६८ ॥ मृत्तिकेवेगळा घट[7] न दिसे ॥ तंतूवेगळा पट[8] न प्रकाशे ॥ तेवीं मजवेगळें जग नसे ॥ जें जें भासे तें मद्रूप ॥ ६९ ॥
जो मी तिनी गुणांतें नातळता ॥ अवस्थात्रयातें नाकळता ॥ तिहीं अवस्थांतें प्रकाशिता ॥ तो मी जाण चवथा तुरीय[9] ॥ २७० ॥ ति
न्ही अवस्था तिन्ही गुण ॥ दृश्य द्रष्टा आणि दर्शन ॥ त्रिपुटीप्रकाशिता पूर्ण ॥ तो मी चवथा जाण तुरीय ॥ ७१ ॥ जो मी तुरीय स
च्चिद्घन ॥ त्या माझ्याठायीं अवस्थागुण ॥ नभीं[10] नीळिमा[11] मिथ्या भान ॥ तैसें नसतां जाण जग भासत ॥ ७२ ॥ ॥ आशंका ॥ ॥ ति
हीं अवस्थांचें ज्ञान पाही ॥ देखिजे समस्तांच्या ठायीं ॥ चवथें ज्ञान तुरीय कांहीं ॥ ऐकिलें नाहीं गोविंदा ॥ ७३ ॥ चौथें ज्ञान तुरीय
वार्ता ॥ मिथ्या ह्मणसी न विचारितां ॥ तेचिविखीं विशदार्थां[12] ॥ श्रीकृष्ण तत्त्वतां सांगत ॥ ७४ ॥ ॥ व्यतिरेकतश्च ॥ ॥ देहादिप्रपंचव्य
तिरेकता ॥ भूतीं भूतांचा लयो पाहतां ॥ लीन झालिया गुणावस्था ॥ उरे मीं चवथा तुरीयू ॥ ७५ ॥ तें एवंविध बोलों जातां ॥ वेदीं मू
ग आरोगिले सर्वथा ॥ हें अनुभवैकवेद्य तत्त्वतां ॥ शब्दप्रगल्भता सरेना ॥ ७६ ॥ एथ न चले युक्तिप्रयुक्ती ॥ नचले जाणिवेची व्यु
त्पत्ती ॥ नचले लक्ष्यलक्षणस्थिती ॥ गुरुकृपाप्राप्ती तुरीय ॥ ७७ ॥ जागृत्यादि सर्वही संता ॥ सुषुप्ति सर्वही असंता ॥ त्यासचि तुरीय
मी प्रकाशिता ॥ मजवीण सर्वथा भासती केवीं ॥ ७८ ॥ जो सुषुप्तीं साक्षित्व पावता ॥ तो मी तुरीय जाण पां चौथा ॥ त्या मज सत्य

---

१ न जाहलेला. २ नाशरहित. ३ आनंदपूर्ण. ४ दागिने. ५ विकाररहित. ६ गाढनिद्रा. ७ घागर. ८ वस्त्र. ९ समाधींत भासणारा. १० आकाशीं. ११ काळेपणा. १२ विस्तारें.

स्वरूपता ॥ केला निश्चितार्था निश्चयो वेदें ॥ ७९ ॥ या स्वरूपावेगळें एथ ॥ जें भासे तें मिथ्याभूत ॥ तेचिअर्थीं श्रीकृष्णनाथ ॥ असे सांगत निजबोधें ॥ २८० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ न यत्पुरस्तादुत यन्न पश्चान्मध्ये च तत्तद्व्यपदेशमात्रम् ॥ भूतं प्रसिद्धं च परेण यद्यत्तदेव तत्स्यादिति मे मनीषा ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥ जागृतीमाजी जेंजें दिसे ॥ तेंतें जागृतीसवें नासे ॥ स्वप्नीं जेंजें आभासे ॥ तें स्वप्नासरिसें मावळे ॥ ८१ ॥ जागृति स्वप्न निजकार्येंसी[1] ॥ दोनी हारपती[2] सुषुप्तीपार्शीं[3] ॥ सुषुप्ति हारपे जागृतीसी ॥ यापरी प्रपंचासी सत्यत्व नाहीं ॥ ८२ ॥ प्रपंच सृष्टीपूर्वीं नाहीं ॥ प्रळयानंतर नुरे[4]चि कांहीं ॥ मध्येंचि आभासे जें कांहीं ॥ तें मिथ्या पाही असंत ॥ ८३ ॥ प्रपंचाचें आडंबर ॥ नामरूपाचे उभारी भार ॥ तें प्रत्यक्ष देखोनि नश्वर ॥ गंधर्वनगर[6] तन्न्याय ॥ ८४ ॥ पित्यादेखतां पुत्र मरे ॥ पुत्रादेखतां पिता झुरे ॥ काळें काळें अवघेंचि सरे ॥ कोणी नुरे क्रियेसी ॥ ८५ ॥ सागरीं जे लहरी[5] उसासे ॥ उसासली ते स्वयेंचि नासे ॥ तेवीं नामरूपा आलें दिसे ॥ तें अनायासें नश्वर ॥ ८६ ॥ प्रपंच हें नाममात्र ॥ येरवीं परमात्मा मी स्वतंत्र ॥ एवं संसाराचें जन्मपत्र ॥ नेणोनि दुस्तर मानिती जीव ॥ ८७ ॥ प्रपंच ज्यापासूनि झाला ॥ जेणें सर्वार्थीं प्रकाशिला ॥ अंतीं ज्यामाजीं सामावला ॥ तो तद्रूप संचला निजात्मा ॥ ८८ ॥ शुक्तिकारजतन्यायें[7] जाण ॥ प्रपंच ब्रह्मेंसी अभिन्न ॥ जें प्रपंचाचें स्फुरे स्फुरण ॥ तें ब्रह्मचि पूर्ण उद्धवा ॥ ८९ ॥ त्या माझेनि सत्य श्रुति स्मृती ॥ तो मी सत्यप्रतिज्ञ श्रीपती ॥ त्रिसत्य सत्य तुजप्रती ॥ सांगीतला निश्चितीं निजभावार्थ ॥ २९० ॥ ऐकोनि देवाचें वचन ॥ उद्धव आशंकी आपण ॥ एकाचेनि मतें जाण ॥ प्रपंच भिन्न मानिती ॥ ९१ ॥ प्रपंचासि देवो कांहीं ॥ निजांगीं आतळला नाहीं ॥ ऐसें तूं कल्पिसी कांहीं ॥ ऐक तेविषयीं सांगेन ॥ ९२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अविद्यमानोऽप्यवभासते यो वैकारिको राजससर्ग एषः ॥ ब्रह्म स्वयंज्योतिरतो विभाति ब्रह्मेंद्रियार्थात्मविकारचित्रम् ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥ मुख्यत्वें विकारी मन पूर्ण ॥ त्यासि मिळूनि तिनी गुण ॥ नसताचि संसार जाण ॥ विचित्राभरण दाखवी ॥ ९३ ॥ मन बुद्धि चित्त अहंकार ॥ आणि अधिष्ठाते सुरवर ॥ हे सत्वगुणांचे विकार ॥ जाण साचार उद्धवा ॥ ९४ ॥ रजोगुणाचीं दशेंद्रिय ॥ पंचभूतें पंचविषय ॥ तमोगुणिया जन्म होय ॥ ते जनासि पाहे भुलविती ॥ ९५ ॥ जेवीं वोडंबरिया[8] खेळ ॥ नसतांचि भासे प्रबळ ॥ तेवीं त्रिगुणांचें विचित्र जाळ ॥ मिथ्या निर्मूळ आभासे ॥ ९६ ॥ ब्रह्म स्वयें अकारण ॥ स्वप्रकाशें प्रकाशमान ॥ तेंचि प्रपंचाचें महाकारण ॥ प्रकाशक जाण स्वयें झालें ॥ ९७ ॥ जेवीं छायामंडपींच्या नाना व्यक्ती ॥ तद्रूप भासे दीपदीप्ती ॥ तेवीं जगदाकारें स्वयंज्योती ॥ भासें मी चिन्मूर्ती[9] परमात्मा ॥ ९८ ॥ एवं

---

[1] आपल्या कार्यांसहित. [2] नष्ट होती. [3] गाढनिद्रेमध्यें. [4] मुळीं उरत नाहीं. [5] लोटें. [6] आकाशांत दिसणारे ढगांचें नगर. [7] शिंपीवर रुप्याचा भास. [8] डोंबाऱ्याचा. [9] चैतन्यमूर्ति.

प्रपंचाचें जें स्फुरणं[1] ॥ तें स्वप्रकाश ब्रह्म पूर्ण ॥ हें हातवसूनि ब्रह्मज्ञान ॥ विकल्पच्छेदन हरि सांगे ॥ ९९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवं स्फुटं ब्रह्म विवेकहेतुभिः परापवादेन विशारदेन ॥ छित्त्वात्मसंदेहमुपारमेत स्वानंदतुष्टोऽखिलकामुकेभ्यः ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ पूर्वीं बोलिलों यथानिगुती ॥ ब्रह्मज्ञान नानायुक्ती ॥ तें करतलामलक[2]स्थिती ॥ प्रकट प्रतीती प्रमाण ॥ ३०० ॥ वेदविवेक अनुमान ब्रह्मउपदेशाचें लक्षण ॥ ज्ञानज्ञानाचें फळ पूर्ण ॥ तुज संपूर्ण सांगितलें ॥ १ ॥ तेथे देहेंद्रियांचें मिथ्यापण ॥ देहात्मभावाचें निराकरण ॥ ब्रह्म अद्वयत्वें परिपूर्ण ॥ तेंही गुह्य[3] ज्ञान प्रकाशिलें ॥ २ ॥ म्यां प्रकाशिलें पूर्ण ज्ञान ॥ जें दुर्लभ दुर्गम दुष्प्राप जाण ॥ हेंचि सिद्धांचें समाधान ॥ तेंचि साधन साधकां ॥ ३ ॥ जें म्यां सांगीतलें ब्रह्मज्ञान ॥ हेंचि उपदेशशास्त्र[4] तीक्ष्ण ॥ साधक साधूनियां पूर्ण ॥ संशय जाण छेदिती ॥ ४ ॥ म्यां सांगीतलें ब्रह्मज्ञान ॥ तेथ संदेह मानी मन ॥ तेणें संदेहेंसि देहाभिमान ॥ येणें शस्त्रें जाण छेदिती ॥ ५ ॥ यापरी संदेहच्छेदन ॥ करूनि द्वैताची बोळवण ॥ निर्दाळूनियां मीतूंपण ॥ स्वानंदीं निमग्न साधक ॥ वर्णाश्रम कुळ जाती ॥ जीवशिवादिपदस्थिती ॥ यांची स्फुरेना अहंकृती ॥ या नांव उपरती उद्धवा ॥ ७ ॥ इहामुत्रादि फळें समस्तें ॥ कोण कामी त्या कामातें ॥ विषयो विषयीं विषयभोगातें ॥ सर्वथा तेथें असेना ॥ ८ ॥ यापरी नित्य निष्काम ॥ साधक झाले आत्माराम ॥ परमानंदीं निमग्न परम ॥ पावले उपरम येणें योगें ॥ ९ ॥ देहेंद्रियें असतां प्राण ॥ कैसेनि गेला देहाभिमान ॥ उद्धवा ऐसें कल्पील मन ॥ तेंचि निरूपण हरि सांगे ॥ ३१० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नात्मा वपुः पार्थिवमिंद्रियाणि देवा ह्यसुर्वायुजलं हुताशः ॥ मनोन्नमात्रं धिषणा च सत्वमहंकृतिः खं क्षितिरर्थसाम्यम् ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ देह आत्मा नव्हे पार्थिवपणें[5] ॥ इंद्रियें नव्हती येणें ॥ तें तंव देहाचीं उपकरणें[6] ॥ एकदेशीपणें व्यापार ॥ ११ ॥ इंद्रियअधिष्ठाते देव ॥ तेही आत्मा नव्हती सर्व ॥ त्यांसि इंद्रियांचा अभाव ॥ आत्मपदीं ठाव त्यां कैंचा ॥ १२ ॥ देहचाळिता जो प्राण ॥ तोही आत्मा नव्हे जाण ॥ प्राण केवळ अज्ञान ॥ करी गमनागमन देहवशें ॥ १३ ॥ प्राण जरी आत्मा होता ॥ तरी तो देहासवें नवचता ॥ यालागीं प्राणासि निजात्मता ॥ जाण सर्वथा घडेना ॥ १४ ॥ आत्मा पृथ्वी नव्हे जडपणें[7] ॥ जळ नव्हे द्रवत्वगुणें[8] ॥ अग्नि नव्हे दाहकपणें[9] ॥ चंचळपणें[10] नव्हे वायू ॥ १५ ॥ आत्मा नभ[11] नव्हे शून्यपणें[12] ॥ मन नव्हे संकल्पगुणें[13] ॥ अन्न नव्हे नश्वरलक्षणें ॥ चित्ता चिंतनें तो नव्हे आत्मा ॥ १६ ॥ आत्मा नव्हे अभिमान ॥ त्यांसि[14] सुखदुःखांचें बंधन ॥ बुद्धी आत्मा नव्हे जाण ॥ बोधकपण तीमाजी ॥ १७ ॥

---

[1] भासणें. [2] करतळावर आंवळा वेऊन दाखविल्यासारखें. [3] गुप्त. [4] उपदेशरूप शस्त्र. [5] पृथ्वीचे विकारामुळें. [6] साहित्य. [7] जड आहे ह्मणून. [8] द्रवगुणयुक्त आहे ह्मणून. [9] दहनकरण्याचा गुण आहे ह्मणून. [10] चंचल आहे ह्मणून. [11] आकाश. [12] शून्याकार आहे ह्मणून. [13] संकल्प करणार ह्मणून. [14] अभिमानासि.

आत्मा नव्हे तिनी गुण ॥ गुणांमाजी विकार पूर्ण ॥ महत्तत्व गुणाचें कारण ॥ तें आत्मा आपण कदा नव्हे ॥ १८ ॥ प्रकृति जे गुणसाम्यावस्था ॥ तेही आत्मा नव्हे तत्त्वतां ॥ आत्मदृष्टीं प्रकृति पाहतां ॥ मिथ्या तत्त्वतां ते होय ॥ १९ ॥ जेथ मूळप्रकृतीच वावो ॥ तेथ प्रकृतिकार्या कैंचा ठावो ॥ यापरी आत्मानुभवो ॥ निःसंदेहो भोगिती ॥ ३२० ॥ यापरी साधूनियां ज्ञान ॥ साधकीं छेदिला देहाभिमान ॥ ऐसा होऊनियां निरभिमान ॥ सदा सुखसंपन्न साधक ॥ २१ ॥ एवं जे नित्य निरभिमान ॥ त्यांसि प्रारब्धें विषयसेवन ॥ करितां न बाधी दोषगुण ॥ तेंचि निरूपण हरि सांगे ॥ २२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ समाहितैः कः करणैर्गुणात्मभिर्गुणो भवेन्मत्सुविविक्तधाम्नः ॥ विक्षिप्यमाणैरुत किंनु दूषणं घनैरुपेतैर्विगतै रवेः किम् ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ देहेंद्रियेंवेगळा पाही ॥ अपरोक्ष आत्मा जाणीतला जिहीं ॥ त्यांसि इंद्रियनेमें लाभ कायी ॥ विक्षेपें नाहीं हानि त्यांसी ॥ २३ ॥ दोराचा साप खिळोनि मंत्री ॥ मंत्रवादी निःशंक धरी ॥ न खिळितां जो धरी करीं ॥ त्यासिही न करी बाधा तो ॥ २४ ॥ जो मृगजळीं पोहोनि गेला ॥ तो दैवांच्या कडे पडिला ॥ पोहेचिना तो नाहीं बुडाला ॥ कोरडा आला ऐलतीरा[1] ॥ २५ ॥ तेवीं देहेंद्रियांचें मिथ्याभान ॥ जाणोनि झाले जे सज्ञान ॥ त्यांसि इंद्रियांचें बंधन ॥ सर्वथा जाण असेना ॥ २६ ॥ जयासि माझें अपरोक्ष[2] ज्ञान ॥ तेणें घालोनियां आसन ॥ अखंड धरितां ध्यान ॥ अधिक उपेग जाण असेना ॥ २७ ॥ जेवीं मिळाला विग्रहधारी ॥ तेवी तेंही वर्ततां शरीरीं ॥ तें इंद्रियकर्माचारीं ॥ भवसागरीं[3] न बुडती ॥ २८ ॥ अथवा तो इंद्रियसंगती ॥ दैवें अनेक विषयप्राप्ती ॥ भोगितांही अहोरातीं ॥ ब्रह्मस्थिती भंगेना ॥ २९ ॥ स्थिति भंगावया हेंचि कारण ॥ माझें स्वप्रकाश आनंदघन ॥ पावले निजधाम ब्रह्म पूर्ण ॥ तेथ विषयस्फुरण बाधीना ॥ ३३० ॥ जेवीं सूर्य उगवोनि गगनीं ॥ लोक सोडवी निद्रेपासूनी ॥ ते लोक कर्मीं प्रवर्तवोनी ॥ अलिप्त दिनमणी[4] दिनकर्मा ॥ ३१ ॥ तेवीं मी परमात्मा स्वयंज्योती ॥ प्रभा प्रकाशीं त्रिजगतीं ॥ त्या जनकर्मांच्या क्रियाशक्ती ॥ मी अलिप्त निश्चितीं निजात्मा ॥ ३२ ॥ मुक्तासि स्त्रीपुत्रदेहसंग ॥ तेणें वेष्टला देखों चांग ॥ ह्मणसी केवीं मानूं निःसंग ॥ तें सांगे श्रीरंग[5] रविदृष्टांतें ॥ ३३ ॥ घनैरुपेतैर्विगतै रवेः किम् ॥ उंच लक्ष[6] योजनें रविमंडळ ॥ बारा योजनें[7] मेघपडळ[8] ॥ तेणें झांकोळिला केवळ ॥ लोक सकळ मानिती ॥ ३४ ॥ परि सूर्य आणि आभाळासी ॥ भेटी नाहीं कल्पांतेंसी ॥ तेवीं इंद्रियकर्म[9] सज्ञानासी ॥ कदाकाळेंसी स्पर्शेना ॥ ३५ ॥ अभ्र आलियाही जगाचे डोळे ॥ ह्मणे सूर्य आच्छादिला आभाळें ॥ ऐसें विपरीत ज्ञान केवळें ॥ मायामेळें[10] भ्रांतासी ॥ ३६ ॥ तें अभ्र आल्या गेल्यापाठीं ॥ सूर्यासि न पडे आटाटी[11] ॥ तेवीं गृहदारासंगापाठीं ॥

---

[1] अलीकडील तीरास. [2] प्रत्यक्ष ज्ञान. [3] संसारसमुद्रांत. [4] सूर्य. [5] श्रीकृष्ण. [6] चार लक्ष कोस. [7] अठ्ठेचाळीस कोस. [8] मेघसमूह. [9] इंद्रियव्यापार व विषय. [10] मायेमुळें. [11] विघ्न.

न पडे संकटीं सज्ञान ॥ ३७ ॥ जेवीं सूर्यातें नातळे आभाळ ॥ तेवीं ज्ञात्यासि संग सकळ ॥ इंद्रियकर्मांचा विटाळ ॥ अळुमाळ[1] लागेना ॥ ३८ ॥ ऐक ज्ञात्याचें रूप परम ॥ तो देही असोनि परब्रह्म ॥ यालागीं त्यासि इंद्रियकर्म ॥ समविषम बाधीना ॥ ३९ ॥ ज्ञाता सर्वार्थीं अलिप्त ॥ तेंचि करावया सुनिश्चित ॥ दृष्टांतेंसि श्रीकृष्णनाथ ॥ स्वयें सांगत साक्षेपें ॥ ३४० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यथा नभो वाय्वनलांबुभूगुणैर्गतागतैर्वर्त्तुगुणैर्न सज्जते ॥ तथाक्षरं सत्वरजस्तमोमलैरहंमतेः संसृतिहेतुभिः परम् ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ॥ पृथ्वी जळ अनळ[2] अनिळ[3] ॥ त्यांसि नभ व्यापक सकळ ॥ परी पृथ्व्यादिकांचा मळ ॥ नभासि अळुमाळ लागेना ॥ ४१ ॥ नभ पृथ्वीरजें कदा काळें न मैळे ॥ धुरटिजेना धूमकल्लोळें ॥ अग्नीचेनि महाज्वाळें ॥ कदाकाळें जळेना ॥ ४२ ॥ वायूचेनि झडाडें ॥ आकाश कदाकाळें न उडे ॥ उदकाचेनि अतिचढें ॥ आकाश न बुडे सर्वथा ॥ ४३ ॥ कां सूर्याचे निदाघकिरणीं ॥ नभ घामिजेना उन्हाळेनीं ॥ अथवा हिमाचिया हिमकणीं ॥ नभ कांकडोनी हिंवेना[4] ॥ ४४ ॥ पर्जन्य वर्षतां प्रबळ ॥ नभ वोलें नव्हे अळुमाळ ॥ यापरी नभ निर्मळ ॥ लावितांही मळ लागेना ॥ ४५ ॥ त्या आकाशासि अलिप्त ॥ जें क्षराक्षरांही अतीत ॥ तें अक्षर ब्रह्म सदोदित ॥ त्रिगुणातीत चिन्मात्र ॥ ४६ ॥ जें अजरामर अविनाशी[5] ॥ जें प्रकाशमान स्वप्रकाशीं ॥ ऐशिये वस्तूची प्रतीति[6] ज्यासी ॥ अद्वयत्वेंसी पावली ॥ ४७ ॥ जें नमोडितां लागवेगें ॥ सोनटका झाला सर्वांगें ॥ तेवीं करणेंवीण येणें योगें ॥ जे झालें निजांगें परब्रह्म ॥ ४८ ॥ त्यांसि गुणांची त्रिगुणमागी ॥ लावितांही नलगे अंगीं ॥ विषयी करितां विषयभोगी ॥ ते विषयसंगीं निःसंग ॥ ४९ ॥ आकाश जाळावयालागीं ॥ घृतें पेटविली महाआगी ॥ आकाश असतां अग्निसंगीं ॥ दाहो अंगीं लागेना ॥ ३५० ॥ घटीं[7] चंद्रबिंब दिसे ॥ तें घटासि स्पर्शलें नसे ॥ ओलें नव्हे जळरसें ॥ देहीं जीव असे अलिप्त तैसा ॥ ५१ ॥ ते घटीं कालविल्या शेण ॥ बिंबप्रतिबिंबां नातळे[8] जाण ॥ तेवीं देहीचें पापाचरण ॥ जीवशिवस्थानलागेना ॥ ५२ ॥ घटीं कालविल्या कस्तूरी ॥ बिंब प्रतिबिंब सुवास न धरी ॥ तेवीं देहींच्या पुण्यापुण्यावरी ॥ जीवशिवावरी पावेना ॥ ५३ ॥ तेवीं गुणांचेनि देहसंगें ॥ योगी वर्ततां येणें योगें ॥ ते भोगितांही विषयभोगें ॥ अलिप्त सर्वांगें सर्वदा ॥ ५४ ॥ आकाश असोनि अग्निमेळें ॥ अग्निज्वाळें कदा न जळे ॥ तेवीं ज्ञाता विषयकल्लोळें ॥ कदा काळें विषयी नव्हे ॥ ५५ ॥ हे कळलें ज्या भोगवर्म ॥ तोही असोनि परब्रह्म ॥ त्याशि बाधिना भवभ्रम[9] ॥ अक्षर परम स्वयें झाला ॥ ५६ ॥ ते अक्षर झाले आतां ॥ याही बोलासि ये लघुता ॥ जन ज्ञानीं अज्ञानीं वर्ततां ॥ अक्षरता अभंग ॥ ५७ ॥ ते विसरोनि ब्रह्मस्वरूपता ॥ मी देही ह्मणवी देहहंता ॥

---

[1] अल्पही. [2] अग्नि. [3] वायु. [4] थंड होईना. [5] नाशरहित. [6] अनुभव, साक्षात्कार. [7] घागरींत. [8] नलागे. [9] संसारभ्रम.

एथें वाढली विषयावस्था ॥ दृढ बद्धता तेणें झाली ॥ ५८ ॥ ते निवारावया बद्धता ॥ त्यजावी विषयलोलुपता[1] ॥ विषयत्यागेंवीण सर्वथा ॥ नित्यमुक्तता घडेना ॥ ५९ ॥ न जोडतां नित्यमुक्तता ॥ साधक जरी झाला ज्ञाता ॥ तेणें ज्ञातेपणें सर्वथा ॥ विषयासक्तता न करावी ॥३६० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तथापि संगः परिवर्जनीयो गुणेषु मायारचितेषु तावत् ॥ मद्भक्तियोगेन दृढेन यावद्रजो निरस्येत मनःकषायः ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्वरवर्णयुक्त संपूर्ण ॥ चहूंवेदीं झाला निपुण ॥ तेणें बळें विषयाचरण ॥ करितां दारुण[2] बाधक ॥ ६१ ॥ सकळशास्त्रांचें श्रवण ॥ करतळामळक[3] झाल्या पूर्ण ॥ शब्दज्ञानाचें जें मुक्तपण ॥ तेंही विषयाचरण बाधक ॥ ६२ ॥ प्राणापानांचिया समता ॥ जरी काळवंचना[4] आली हाता ॥ तरी विषयाची विषयावस्था[5] ॥ जाण सर्वथा बाधक ॥ ६३ ॥ शापानुग्रहसमर्थ नर ॥ आह्मी ज्ञाते मानूनि थोर ॥ त्यांसही विषय साचार ॥ होय अपार बाधक ॥ ६४ ॥ आसन उडविती[6] योगबळें ॥ दाविती नानासिद्धींचे सोहळे ॥ त्यांसही विषयाचे भोगलळे[7] ॥ होती निर्जबळें बाधक ॥ ६५ ॥ मा इतरांची कोण कथा ॥ मंत्रमूर्तिं प्रसन्न असतां ॥ त्यासिही विषयावस्था ॥ जाण सर्वथा बाधक ॥ ६६ ॥ चिंतित झाल्या स्वरूपप्राप्ती[9] ॥ मी मुक्त हें स्फुरे[10] स्फूर्ती ॥ तथापि विषयाची संगती ॥ त्यासिही निश्चितीं बाधक ॥ ६७ ॥ देहाभिमानाचें निर्दळण ॥ स्वयें करूनियां आपण ॥ नित्यमुक्त ह्मणतां जाण ॥ विषयाचरण बाधक ॥ ६८ ॥ जेवीं चकमकेची आगी ॥ जाळूं न शके नाटेलागी ॥ तेवीं ब्रह्मप्राप्ति प्रथमरंगीं ॥ प्रपंचसंगीं विनाशे ॥ ६९ ॥ विषय मिथ्या मायिक ॥ ते भोगीं जंव भासे हरिख ॥ तंववरी विषय बाधक ॥ जाण निष्टंक उद्धवा ॥ ३७० ॥ तें त्यागावया विषयसेवन ॥ निर्दाळावया[11] देहाभिमान ॥ त्याचियालागीं माझें भजन ॥ साक्षेपें जाण करावें ॥ ७१ ॥ व्रत तप तीर्थ दान ॥ करितां योग याग यजनें[12] ॥ वेदशास्त्रार्थ पुराणश्रवण ॥ तेणें देहाभिमान ढळेना ॥ ७२ ॥ भावें करितां माझें भजन ॥ समूळ सुटे देहाभिमान ॥ भक्ति उत्तमोत्तम साधन ॥ भक्ताधीन परब्रह्म ॥ ७३ ॥ ज्ञान वैराग्य निवृत्ती ॥ धृति शांति ब्रह्मस्थिती ॥ त्यांची जननी माझी भक्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ७४ ॥ चहूंमुक्तींहूनि वरती ॥ उल्हासें नांदे माझी भक्ती ॥ माझे भक्तीची अनिवार[13] शक्ती ॥ तिसी निश्चितीं आकळलों[14] ॥ ७५ ॥ माझें स्वरूप अनंत अपार ॥ तो मी भक्तीनें आकळलों साचार ॥ यालागीं निजभक्ताचें द्वार ॥ मी निरंतर सेवितसे ॥ ७६ ॥ भक्तीनें आकळलों जाण ॥ यालागीं मी भक्तांअधीन ॥ माझिये भक्तीचें महिमान[15] ॥ मजही संपूर्ण कळेना ॥ ७७ ॥ बहुतीं करूनि माझी भक्ती ॥

---

१ विषयासक्ति. २ भयंकर. ३ हातावरच्या आंवळ्यासारखें प्रत्यक्ष. ४ काळास फसविणें. ५ विषयस्थिति. ६ वरतें उचलविती. ७ भोग घेण्याची लालुच. ८ स्वकीयबळानें. ९ ईश्वरस्वरूपप्राप्ति. १० देदीप्यमान दिसे. ११ नष्ट करावया. १२ पूजन. १३ दुर्घट. १४ बांधला गेलों. १५ थोरपणा.

मज ते मोक्षचि मागती ॥ उपेक्षूनि चारी मुक्ती ॥ करी मद्भक्ती तो धन्य ॥७८॥ ऐशी जेथ माझी भक्ती ॥ तेथ पायां लागती चारी मुक्ती
॥ त्यासि सर्वस्वें मी श्रीपती ॥ विकलों निश्चितीं भावार्था ॥ ७९ ॥ ते भक्तीच मुख्य ज्यास साधन ॥ यालागीं मी त्या भक्ताअधीन
॥ त्याचें कदाकाळें वचन ॥ मी अणुप्रमाण नुल्लंघीं ॥ ३८० ॥ ते मज ह्मणती होई सगुण ॥ तैं सिंह[1] सूकर[2] होय मी आपण ॥ त्यांलागीं
मी विदेही[3] जाण ॥ होय संपूर्ण देहधारी ॥ ८१ ॥ एका अंबर्षीकारणें ॥ दहा जन्म मज लागले घेणें ॥ अजत्वांचा[4] भंग साहणें॥
परी भक्तासि उणें येऊं नेदीं ॥ ८२ ॥ द्रौपदी नग्न करितां तांतडी[5] ॥ तिळभरी होंनेंदींच उघडी ॥ झालों नेसविता वस्त्रें कोडी[6]॥ भक्तसांकडीं
मीं निवारीं ॥ ८३ ॥ तो मी भक्तसाहाकारी ॥ अजन्मा त्याचेनि जन्म धरीं ॥ समर्यीं वर्तें अरिमित्रीं ॥ भक्तकैवारी होऊनियां
॥ ८४ ॥ जो माझिया भक्तां हितकारी ॥ तो मज परम मित्र संसारीं ॥ जो माझ्या भक्तांसि वैर करी ॥ तो मी नानापरी निर्दळीं॥८५॥
ऐसा मी भक्तसाध्य श्रीकृष्ण ॥ त्या माझें ज्या निजभजन ॥ न करूनियां अभाग्य जाण ॥ अधःपतन पावती ॥ ८६ ॥ ह्मणशी पाप असतां
शरीरीं ॥ तुझें भजन घडे कैशापरी ॥ सकळपापांची बोहरी ॥ माझें नाम करी निमेषार्धें ॥ ८७॥ ऐकोनि नामाचा गजर ॥ पळे
महापातकांचा भार ॥ नामापाशीं पापास थार ॥ अणुमात्र असेना ॥ ८८ ॥ माझिया नामापुढें ॥ सकळ पाप तत्काळ बुडे ॥ तें पाप
नामस्मरत्यापुढें ॥ केवीं बापुडें येऊंसके ॥ ८९ ॥ अवचटें सूर्य अंधारीं बुडे ॥ तरी पाप नये भक्तांकडे ॥ भक्तचरणरेणु[8] जेथ पडे ॥ तेथ
मूळ उडे पापाचें ॥ ३९० ॥ माझें नाम ब्रह्मास्त्र जगीं ॥ महापापातें बापुडें मुंगी॥ नामापुढें उरावयालागीं॥ कैंस त्याचे अंगीं असेना
॥ ९१ ॥ माझे नामाचा प्रताप[10] ऐसा ॥ माझे भक्तीची कोण दशा ॥ पडलिया मद्भक्तीचा ठसा॥तो नागवे[11] सहसा कळिकाळा[12]॥९२॥
यालागीं माझें भजन ॥ निर्दळी देहाभिमान ॥ माझेनि भजनेंवीण जाण ॥ देहाभिमान तुटेना ॥ ९३ ॥ जेणें तुटे देहाभिमान ॥ तें कैसें
ह्मणशी तुझें भजन ॥ अभेदभावें भक्ति पूर्ण ॥ तेणें देहाभिमान निर्दळे ॥ ९४ ॥ भगवद्भाव सर्वांभूतीं ॥ या नांव गा अभेदभक्ती ॥
हे आकळल्या भजनस्थिती ॥ अहंकृती उरेना ॥ ९५ ॥ माझें नाम ज्याचे वदनीं ॥ माझी कीर्ति ज्याचे श्रवणीं ॥ माझा भाव ज्याचे मनीं
॥ ज्याचे करादिचरणीं क्रिया माझी ॥ ९६ ॥ जो जागृतीमाजी पाहे मातें ॥ जो स्वप्नीं देखे मज एकातें ॥ जो मजवेगळें चित्त रितें
॥ न राखे निश्चितें निजनिष्ठा.॥ ९७ ॥ यापरी भजनस्थिती ॥ त्रिगुण विकार मावळती ॥ तेणें अहंकाराची निवृत्ती॥ विषयासक्ति
निर्दळे ॥ ९८ ॥ भक्तांसि विषयसेवन ॥ सर्वथा बाधक नव्हे जाण ॥ तो विषय करी मदर्पण ॥ तेणें बाधकपण नव्हे त्यासी ॥ ९९ ॥

---

१ नृसिंहवतारी. २ वराहावतारी. ३ विविधदेह धारण करणारा. ४ अजन्मत्वाचा. ५ सत्वर. ६ कोट्यवधि. ७ विघ्नें. ८ पायांची धूळ. ९ घट्टपणा. १० सामर्थ्य. ११ नागवितो. १२ कलीस.

नाना साधनें विषयो[1] त्यागिती ॥ त्यागितां परमदुःखी होती ॥ भक्त विषयो भगवंतीं अर्पिती ॥ तेणें होती नित्यमुक्त ॥ ४०० ॥ ग्रासोग्रासीं हरिस्मरण ॥ तैं अन्नचि होय ब्रह्म पूर्ण ॥ त्यासि नाहीं बाधकपण ॥ ब्रह्मार्पण सहजेंची ॥ १ ॥ भक्त माझे भजनस्थितीं ॥ विषयो मद्रूप[2] भाविती ॥ तेणें मावळे विषयस्फूर्ती ॥ नव्हती या रीतीं बाधक ॥ २ ॥ या परी माझें भजन ॥ करी मनो[3]मळक्षाळण ॥ विकारेंसि तिन्ही गुण ॥ करी निर्दळण देहाभिमान ॥ ३ ॥ ऐशी न करितां माझी भक्ती ॥ न निर्दळितां अहंकृती ॥ करणें जे विषयासक्ती ॥ ते जाण निश्चितीं बाधक ॥ ४ ॥ नातुडतां अकर्तात्मबोध ॥ आदरूंनये विषयसंबंध ॥ विषयांचा विषयउद्बोध ॥ अतिशुद्ध बाधक ॥ ५ ॥ जरी विषय मिथ्या मायिक ॥ तरी साधकां अतिबाधक ॥ येचि अर्थीं यदुनायक ॥ विशदार्थें[4] देख सांगत ॥ ६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यथामयोऽसाधुचिकित्सितो नृणां पुनःपुनः संतुदति प्ररोहान् ॥ एवं मनोऽपक्ककषायकर्म कुयोगिनं विध्यति सर्वसंगम् ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ वैद्य नेणे रोगाचें लक्षण ॥ नेणें धातुपुष्ट कीं क्षीण ॥ नेणे पथ्य ना अनुपान ॥ नाडीज्ञान कळेना ॥ ७ ॥ त्यापासाव वोखद घेतां ॥ पुनः पुनः वाढे व्यथा ॥ तेवीं अवैराग्यें त्याग करिता ॥ साधकां बाधकता अनिवार ॥ ८ ॥ हृदयीं नाहीं विषयनिवृत्ती ॥ बाह्य त्याग वाढवी विरक्ती ॥ ऐशी जे बहिर्मुद्रास्थिती ॥ ते जाण निश्चितीं कुयोगी ॥ ९ ॥ सांडोनियां भगवद्भजन ॥ वेदविधिमार्गविहीन ॥ ऐसें जें कां त्यागलक्षण ॥ कुयोग संपूर्ण त्या नांव ॥ ४१० ॥ द्रव्य दारा[5] विषयासक्ती ॥ दृढ वासना असतां चित्तीं ॥ बाह्य त्याग मिथ्या विरक्ती ॥ कुयोग निश्चितीं या नांव ॥ ११ ॥ आह्मीं राजयोगी अतिश्रेष्ठ ॥ ह्मणोनि विषय भोगी यथेष्ट ॥ वोस पडली वैराग्यपेंठ ॥ कुयोग चोखट या नांव ॥ १२ ॥ आंत चोरूनि विषयासक्ती ॥ बाह्य मिरवी मिथ्या विरक्ती ॥ हेंचि कुयोगाची स्थिती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ १३ ॥ ऐशिया कुयोगियां जाण ॥ पुढती जन्म पुढती मरण ॥ दुःखावर्तीं[6] पडिले पूर्ण ॥ सोडवी कोण तयांसी ॥ १४ ॥ परमार्थें त्यागसाधन ॥ करितां अंतराय आलें विघ्न ॥ तयासि अवगती नव्हे जाण ॥ जरी अनुताप पूर्ण स्वयें उपजे ॥ १५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कुयोगिनो ये विहितांतरायैर्मनुष्यभूतैस्त्रिदशोपसृष्टैः ॥ ते प्राक्तनाभ्यासबलेन भूयो युंजंति योगं नतु कर्मतंत्रम् ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ ब्रह्मज्ञानार्थ केला त्याग ॥ अभ्यासही मांडिला सांग ॥ मध्येंचि वोढवला[7] उपसर्ग[8] ॥ विघ्नें अनेग साधकां ॥ १६ ॥ उपजे कामाचा अतिवेग ॥ खवळे क्रोधाची लगबग ॥ शिष्यसुहृदांचे उद्वेग ॥ मनीं उबग स्वहिताचा ॥ १७ ॥ दारारूपें[9] उपसर्ग ॥ देव देती पैं अनेग ॥ ऐसा अंतरायीं[10] योगभंग ॥ होतां अनुराग उद्धरीं ॥ १८ ॥ अभ्यास करितां अतिनिगुती ॥ दैवें अंतराय[11] योगस्थिती ॥ तेथ निर्वेदें[12] उप

---

१ विषय. २ श्रीकृष्णरूप. ३ मनोवासनाक्षय. ४ स्पष्टार्थानें. ५ स्त्री. ६ दुःखरूपभोंवऱ्यांत. ७ आला. ८ बाधा. ९ भार्यारूपानें. १० विघ्नांनीं. ११ विघ्न. १२ वैराग्य.

जल्या चित्तीं ॥ तोचि अभ्यास पुढतीं करी योगी ॥ १९ ॥ निजयोगअभ्यासबळें ॥ जाळी अंतरायदोष बळें ॥ परी कर्मांची कर्मठ
जाळें ॥ योगी कदाकाळें स्पर्शेना ॥ ४२० ॥ अंतरायीं योग छळितां जाण ॥ जरी योगी पावला मरण ॥ तरी नव्हे कर्माधीन ॥ हें श्लो
कार्धेंसि श्रीकृष्ण बोलिला स्वयें ॥ २१ ॥ पूर्वीं करितां योगसाधन ॥ अदृष्टगतीं अंतराय जाण ॥ योगी पावल्याही मरण ॥ क्षति[1] कोण
तयासी ॥ २२ ॥ अंतरायपरतंत्र ॥ झाल्या योगी पावे जन्ममात्र ॥ तेथही नादरी कर्मतंत्र ॥ पूर्वाभ्यासें स्वतंत्र प्रवर्ते योगी ॥ २३ ॥
मार्गस्था मार्गीं गुंती ॥ पडोनियां लागली वस्ती ॥ तो येरें[2] दिवसीं तेचि पंथीं ॥ लागे निश्चितीं निजमार्गा ॥ २४ ॥ यापरी योगिया
आपण ॥ प्राक्तन[3]पूर्वसंस्कारें जाण ॥ योगाभ्यास करी पूर्ण ॥ परी कर्माधीन कदा नव्हे ॥ २५ ॥ साधनीं असतां माझी भक्ती ॥ अणु[4]
मात्र नपडे गुंतीं[5] ॥ मी भक्तकैवारी श्रीपती ॥ राखें अहोरातीं निजभक्तां ॥ २६ ॥ जेथ माझे भक्तीची आवडी ॥ तेथ विघ्नें केवीं रिघे[6]
ती बापुडीं ॥ महाविघ्नांचिया कोडी ॥ माझें नाम विभांडी[7] उद्धवा ॥ २७ ॥ भजनहीन योगीश्वर ॥ अंतरायें[8] पावे जन्मांतर[9] ॥ तरी तो क
र्मीं कर्मपर ॥ नव्हे साचार पूर्वसंस्कारें ॥ २८ ॥ जे पावले जीवन्मुक्ती ॥ तेही प्रारब्धकर्मैं वर्तती ॥ योगभ्रष्ट कर्म त्यागिती ॥ घडे कैशा
रीतीं ह्मणशील ॥ २९ ॥ मुक्ताचें जें मोक्षस्थान ॥ तेंचि साधकाचें मुख्य साधन ॥ यालागीं त्या दोघांही जाण ॥ कर्मबंधन बाधीना
॥ ४३० ॥ मी एक कर्मकर्ता ॥ ऐशी ज्यास नुपजे अहंता ॥ त्यासिही जाण सर्वथा ॥ कर्मबंधकता स्पर्शेना ॥ ३१ ॥ ॥ श्लोक ॥
करोति कर्म क्रियते च जंतुः केनाप्यसौ चोदित आनिपातात् ॥ न तत्र विद्वान् प्रकृतौ स्थितोऽपि निवृत्ततृष्णः स्वसुखानुभूत्या ॥ ३० ॥
॥ टीका ॥ ॥ जन्मापासूनि मरणांत ॥ प्राणी जें जें कर्म करित ॥ तेंतें कोणी एक प्राचीन[10] एथ ॥ असे वर्तवीत निजसत्तां ॥ ३२ ॥ तेथ
सज्ञान आणि अज्ञान ॥ प्राचीनकर्मैं कर्माधीन ॥ अज्ञानासि अहंकर्तेंपण ॥ ज्ञाते निरभिमान वर्तती कर्मीं ॥ ३३ ॥ ह्मणसी देहीं अस
तां प्राण ॥ केवीं नुठी[11] देहाभिमान ॥ ज्ञाता स्वसुखानुभवें पूर्ण ॥ अहंकर्तेंपण त्या स्फुरेना ॥ ३४ ॥ दोराचे सर्पाचा महाधाक ॥ दोर जा
णितल्या नुपजे देख ॥ तेवीं अनुभविल्या ब्रह्मसुख ॥ अहंता बाधक स्फुरेना ॥ ३५ ॥ ऐक योगभ्रष्टाचें लक्षण ॥ त्याचा प्राचीनसं[12]
स्कार जाण ॥ उपजोंनेदी देहाभिमान ॥ योग संपूर्ण सिद्ध्यर्थ ॥ ३६ ॥ जे देहीं नित्य निरभिमान ॥ तेचि ब्रह्मसुखें सदा संपन्न ॥ त्यां
सि देहीचें कर्माचरण ॥ सर्वथा जाण बाधीना ॥ ३७ ॥ ज्ञाता देहकर्मांसि अलिप्त ॥ हेंही अपूर्व नव्हे एथ ॥ तो देही असोनि देहातीत[13] ॥

---

१ हानि. २ दुसऱ्या दिवशीं. ३ पूर्वजन्मांत केलेल्या संस्कारानें. ४ थोडाही. ५ विघ्नांत. ६ येती. ७ नष्ट करो. ८ विघ्नानें. ९. दुसरें जन्म. १० पूर्वजन्मांतलें. ११ उठणार नाहीं. १२ पूर्वजन्मांतला भक्तिपूर्वक योगसंस्कार. १३ देहाभिमान टाकणारा.

तेंचि कृष्णनाथ स्वयें सांगे ॥ ३८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तिष्ठंतमासीनमुत व्रजंतं शयानमुक्षंतमदंतमन्नम् ॥ स्वभावमन्यत् किमपीहमानमात्मानमात्मस्थमतिर्न वेद ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ ॥ देह उभा असतां जाण ॥ ज्ञाता न देखे उभेपण ॥ मा बैसल्या बैसलेपण ॥ मानी कोण देहाचें ॥ ३९ ॥ परिपूर्ण ब्रह्माच्याठायीं ॥ उठणें बैसणें दोनी नाहीं ॥ ज्ञाता तेंचि झाला पाही ॥ ऊठ बैस कांहीं जाणेना ॥ ४४० ॥ दोराचा सर्प उपजला ॥ भोग भोगूनि स्वयें निमाला ॥ सत्यत्व नाहीं या बोला ॥ तैसा देहो झाला मुक्तासी ॥ ४१ ॥ देह दैवें असे एकदेशी ॥ ज्ञाता सर्वीं देखे आपणासी ॥ देह जातां परदेशासी ॥ ज्ञाता गमनासी देखेना ॥ ४२ ॥ वस्तु[1] वस्तुत्वें पूर्णपणें ॥ तेथ कैंचें असणें नसणें ॥ ज्ञाता सदा तद्रूपपणें ॥ राहणें जाणें स्पर्शेना ॥ ४३ ॥ ज्ञाता स्वयें रिघे शयनीं ॥ परी शेज बाज न देखे अवनी[2] ॥ निजेलों हेंही नमनी ॥ निजीं निजरूपपणीं[3] सर्वदा ॥ ४४ ॥ ज्ञाता जेवूं बैसे निजसुखें ॥ परी मी भुकेलों हें न देखे ॥ रसने[4] नेणतां[5] सर्व रस चाखे ॥ जेवीं येणें सुखें निजगोडी ॥ ४५ ॥ दिसे यावत्तृप्त जेविला ॥ परी तो धाला ना भुकेला ॥ तो उच्छिष्टही नाहीं झाला ॥ शेखीं आंचवला संसारा ॥ ४६ ॥ जरी तो स्वभावें सांगे गोष्टी ॥ तरी अबोलणें घाली शब्दापोटीं ॥ बोली अतिरसाळ गोडी उठी ॥ तरी न सुटे मिठी मौनाची ॥ ४७ ॥ मी एक चतुर बोलका ॥ हाही नुठी[6] त्या आवांका[7] ॥ बोल बोलोंनेणे फिका ॥ बोलोनि नेटका अबोलणा ॥ ४८ ॥ ज्ञाता पाहे निजात्मसुखें ॥ माझें तुझें हेंही वोळखे ॥ परी तो डोळांचि न देखे ॥ देखे आपण्यासारिखें त्रैलोक्य ॥ ४९ ॥ तो जों दृश्य पाहों बैसे ॥ तों दृश्याचा ठावोचि पुसे ॥ जें देखे तें आपण्याऐसें ॥ निजात्मसौरसें[8] जग देखे ॥ ४५० ॥ करूनि डोळ्यांचा अंत ॥ ज्ञाता देखणेपणें पाहत ॥ त्या देखण्याचा निजस्वार्थ ॥ न चढे हात वेदशास्त्रा ॥ ५१ ॥ जाणे शब्दींचें शब्दज्ञान ॥ मी श्रोता हें नुठी आठवण ॥ उपेक्षूनियां दोहींचे कान ॥ करी श्रवण सर्वांगें ॥ ५२ ॥ यापरी स्वयें सज्ञान ॥ होऊनियां सावधान ॥ सोलूनियां शब्दज्ञान ॥ करी श्रवण स्वभावें ॥ ५३ ॥ जाणे सुवास दुर्वास ॥ भोगूं न धरी नाकाची आस[9] ॥ सुमनासबाह्य जो सुवास ॥ तो भोगी सावकाश सर्वदा ॥ ५४ ॥ मृदुकठिणादि स्पर्श जाणे ॥ परी मी जाणतों हें स्फुरोंनेणे ॥ अंगा लागे तें निजांग करणें ॥ हा स्पर्श भोगणें सज्ञानीं ॥ ५५ ॥ ज्ञाता चालता दिसे चरणीं ॥ परी तो चालतां स्वयें अचरणी ॥ स्वेच्छा हिंडतांही अवनी ॥ तो ठायाहूनी ढळेना ॥ ५६ ॥ हस्तव्यापारीं देतां दान ॥ मी दाता ही नुठी आठवण ॥ देतें घेतें होय आपण ॥ यापरी सज्ञान वर्तवी कर ॥ ५७ ॥ कायिक[10] वाचिक[11] मानसिक[12] ॥ कर्म निपजत[13]

---

१ ब्रह्म. २ पृथिवीवर. ३ ब्रह्मरूप होऊन गेल्यामुळें. ४ जिव्हेला. ५ न कळणारा. ६ उठेना. ७ अभिमान. ८ ब्रह्मानंदरसानें. ९ इच्छा. १० शरीरानें केलेलें. ११ वाणीनें केलेलें. १२ मनानें केलेलें. १३ उत्पन्न होतें.

स्वाभाविक ॥ ज्ञाता ब्रह्मरूपें निर्दोख ॥ देहासि देख स्पर्शेना ॥ ५८ ॥ अकर्तात्मनिजसत्ता ॥ ज्ञाता सर्वकर्मीं वर्ततां ॥ न देखे कर्म क्रिया कर्तव्यता ॥ निजीं निजात्मता निजबोधें ॥ ५९ ॥ ज्ञाता नित्य निजात्मसुखें ॥ देहीं असोनि देह न देखे ॥ तो देहकर्मीं केवीं आडके ॥ पूर्ण परमात्मसुखें संतुष्ट ॥ ४६० ॥ जगासि लागलें कर्मबंधन ॥ तेथें खातां जेवितां सज्ञान ॥ केवीं न पवे कर्मबंधन ॥ तेंचि निरूपण हरि सांगे ॥ ६१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदि स्म पश्यत्यसदिंद्रियार्थं नानानुमानेन विरुद्धमन्यत् ॥ न मन्यते वस्तुतया मनीषी स्वाप्नं यथोत्थाय तिरोदधानम् ॥ ३२ ॥ ॥ टीका ॥ ॥ हो कां लौकिकाचेपरी ॥ ज्ञाता वर्ते लोकाचारीं ॥ तोही प्रपंचामाझारी ॥ कर्में करी लौकिकें ॥ ६२ ॥ परी कार्य कर्म कर्तव्यता ॥ हे ज्ञात्यासि नाहीं अहंता ॥ तेणें प्रपंचामाजी निजात्मता ॥ निश्चयें तत्त्वतां वश्य केली ॥ ६३ ॥ विषयादि प्रपंचभान ॥ सत्य मानिती अज्ञान ॥ तो प्रपंच देखती सज्ञान ॥ ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ६४ ॥ साकरेचा[1] इंद्रावण घडू ॥ जाणा गोड नेणा कडू ॥ तैसा प्रपंचाचा पडिपाडू[2] ॥ लाभ आणि नाडू[3] ज्ञानाज्ञानें ॥ ६५ ॥ सुवर्णाची केली खोटी ॥ मूर्ख मानिती केवळ गोठी ॥ ज्ञाते घालूनियां मिठी ॥ घेती ज्ञानदृष्टीं बहुमोलें ॥ ६६ ॥ तेवीं सांसारिक क्रिया कर्म ॥ मूर्खां मूर्खपणें भासे विषम[4] ॥ तेंचि ज्ञात्या परब्रह्म ॥ स्वानंद आत्माराम सर्वदा ॥ ६७ ॥ प्रपंच म्हणोनि सांडावा ॥ मग ब्रह्मभाव मांडावा ॥ हें नुखितांही[5] न लगे त्या सदैवा ॥ उखिंता[6] आघवा[7] परब्रह्म ॥ ६८ ॥ मिथ्या दोरांचा सर्पाकार ॥ तेथ मिळोनि अज्ञान नर ॥ नानाअनुमानीं भयंकर ॥ सत्य साचार मानिती ॥ ६९ ॥ तेवीं मिथ्या प्रपंचाचें भान[8] ॥ बाधक मानिती अज्ञान ॥ तेंचि स्वानुभवें सज्ञान ॥ जाणती पूर्ण परब्रह्म ॥ ४७० ॥ जेवीं स्वप्न साच[9] निद्रिताप्रति ॥ तेवीं प्रपंच साच निजभ्रांती[10] ॥ तो निजात्मा जागृताप्रती ॥ मिथ्या निश्चितीं निजबोधें ॥ ७१ ॥ मिथ्या[11] प्रपंचाचें भान[12] ॥ जाणोनि झाले जे सज्ञान ॥ त्यांसि सर्वकर्मीं वर्ततां जाण ॥ देहाभिमान कदा नुपजे ॥ ७२ ॥ साधकांचा साधावया स्वार्थ ॥ पूर्वीं सर्वस्वरूपें भगवंत ॥ बोलिला तेणें विकारवंत ॥ झाला निश्चित म्हणशील ॥ ७३ ॥ वस्तु नव्हे विकारवंत ॥ ते निजसाम्यें सदोदित ॥ तेचि अर्थीं श्रीकृष्णनाथ ॥ असे सांगत निजबोधें ॥ ७४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पूर्वं गृहीतं गुणकर्मचित्रमज्ञानमात्मन्यविविक्तमंग ॥ निवर्तते तत्पुनरीक्षयैव न गृह्यते नापि विसृज्य आत्मा ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ संसार तो पूर्वदशे ॥ अति अतर्क्य मायावशें ॥ शुद्ध वस्तु बहुधा भासे ॥ गुणकर्मविन्यासें बहुरूप ॥ ७५ ॥ नाम रूप व्यक्तिवर्ण ॥ कुळ गोत्र क्रियाचरण ॥ यापरी प्रपंच भिन्न ॥ सत्य अज्ञान मानिती ॥ ७६ ॥ प्रपंच वस्तूच्याठायीं अध्यस्त ॥ यालागीं वस्तु तद्रूप भासत ॥ स्फटिक नानारंगीं भासत ॥

---

[1] साकरेचें केलेलें कडुवृंदावन. [2] मोठेपणा. [3] हानि. [4] दुष्ट. [5] न जाणतां. [6] जाणलें असतां. [7] सर्व. [8] दिसणेपणा. [9] खरें. [10] स्वकीय अज्ञान. [11] खोटें. [12] दिसणें.

परी संबंधें अलिप्त तद्रूप ॥ ७७ ॥ जग पाहतां यापरी ॥ भिन्न भासे अज्ञानेंकरीं ॥ तेणें आत्मा ह्मणती विकारी ॥ नर अविचारी अज्ञानें ॥ ७८ ॥ त्या अज्ञानाची होय निवृत्ती ॥ तैं साधकां माझी सुलभ प्राप्ती ॥ यालागीं माझी निजभक्ती ॥ म्यां यथानिगुतीं प्रकाशिली ॥ ७९ ॥ साधकांचा निजस्वार्थ ॥ जेणें शीघ्र होय हस्तगत ॥ यालागीं सर्वभूतीं भगवंत ॥ हा म्यां निजगुह्यार्थ प्रबोधिला ॥ ४८० ॥ हें म्यां धरोनियां अनुसंधान ॥ भावें[1] करितां माझें भजन[2] ॥ तेथ मावळे मीतूंपण ॥ अविद्येसि अज्ञान समूळ मिथ्या ॥ ८१ ॥ तेथ दृश्य द्रष्टा दर्शन ॥ त्रिगुणेंसि कार्य कारण ॥ नुरेचि प्रपंचाचें भान ॥ ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ८२ ॥ तेथ नाम रूप गुण जाती ॥ नाहीं महाभूतें[3] भूतव्यक्ती ॥ चैतन्य पूर्ण सहजस्थिती ॥ ब्रह्मीं ब्रह्मस्फूर्ती असेना ॥ ८३ ॥ तें उंच ना ठेंगणें ॥ मोठें ना रोड होणें ॥ उजू ना वांकुडेपणें ॥ असोंनेणे विकारी ॥ ८४ ॥ तेथ शीत ना उष्ण ॥ मृदु ना कठिण ॥ कडू ना गोडपण ॥ सुखदुःखेंवीण निर्द्वंद्व ॥ ८५ ॥ तेथ भेद ना अभेद ॥ बोलतें ना निःशब्द ॥ शाहणें ना मुग्ध ॥ देखणें ना अंध चिद्रूपपणें[4] ॥ ८६ ॥ तें एथ ना तेथ ॥ येत ना जात ॥ जवळी ना परत ॥ सदोदित स्वयें सिद्ध ॥ ८७ ॥ तें खातें ना खातें ॥ घेतें ना देतें ॥ जीतें ना मरतें ॥ परादिपर तें परात्पर ॥ ८८ ॥ तें बद्ध ना मुक्त ॥ नित्य ना अनित्य ॥ क्षोभे ना प्रसन्न होत ॥ वस्तु सदोदित सद्रूपें ॥ ८९ ॥ तेथ पाप ना पुण्य ॥ आकार ना शून्य ॥ सगुण ना निर्गुण ॥ स्वानंदें पूर्ण सुखरूप ॥ ४९० ॥ सर्वभूतीं भगवद्भजन ॥ करूनि माझे भक्तजन ॥ माझें निजरूप परिपूर्ण ॥ स्वयें आपण होऊनि ठेले ॥ ९१ ॥ त्यांसि संत ह्मणोनि कांहीं घेणें ॥ अथवा असंत ह्मणोनि सांडणें ॥ हें नुरेचि त्यांसी वेगळेपणें[5] ॥ ब्रह्मीं ब्रह्मपणें परिपूर्ण ॥ ९२ ॥ बंधकाळीं बद्धता ॥ आत्मेनि घेतली नाहीं तत्त्वतां ॥ अथवा मुक्तिकाळींची मुक्तता ॥ आत्मा सर्वथा स्पर्शैना ॥ ९३ ॥ आत्मा अविकारी पाही ॥ येणें निरूपणें पडे ठायीं ॥ जरी ह्मणशी कवळलें नाहीं ॥ ऐक तेंही सांगेन ॥ ९४ ॥ आत्मा सर्वदा नित्य पाही ॥ यालागीं त्यासि उत्पत्ति नाहीं ॥ उत्पत्ति नलगे ज्याचे ठायीं ॥ तो गर्भाशि पाही स्पर्शैना ॥ ९५ ॥ गर्भ जन्म त्यासि नाहीं ॥ त्यासि देहाचा अभाव पाही ॥ देहेंवीण वृद्धि कहीं ॥ त्याचे ठायीं स्पर्शैना ॥ ९६ ॥ जो सर्वदा विदेही[6] ॥ कर्म न रिघे त्याच्याठायीं ॥ कर्मेंवीण बद्धता पाही ॥ आत्म्यासि कहीं लागेना ॥ ९७ ॥ जो निरवयव साचार ॥ त्यासि कहीं न घडे संस्कार ॥ ज्यासि नाहीं आकार ॥ त्यासि विकार[7] स्पर्शैना ॥ ९८ ॥ जो गर्भजन्माअतीत ॥ मरण रिघों नशके तेथ ॥ काळाचाही नलगे घात ॥ क्षयातीत परमात्मा ॥ ९९ ॥ नलगे जन्म कर्म मरण ॥ त्यासि विकारी करी कोण ॥ वस्तु अविकारी परिपूर्ण ॥ यापरी जाण उद्धवा ॥ ५०० ॥ निबिड दाटल्या अज्ञान ॥

---

१ भक्तीनें. २ सेवा. ३ पृथ्वी, उदक, तेज, वायु आणि आकाश. ४ स्वयंप्रकाशचैतन्यामुळें. ५ ब्रह्म व्यतिरिक्त नसल्यामुळें. ६ देहरहित. ७ जन्मादिविकार.

आत्मा नाहीं न करवे जाण ॥ प्रखर झालियाही ज्ञान ॥ आत्मा नवा जाण नुपजवे ॥ १ ॥ ज्ञानाज्ञानीं अलिप्त ॥ आत्मा निर्विकार[1]
नित्य ॥ येचिअर्थीं सदृष्टांत ॥ असे सांगत श्रीकृष्ण ॥ २ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यथा हि भानोरुदयो नृचक्षुषां तमो विहन्यान्न तु सद्विधत्ते
॥ एवं समीक्षा निपुणा सती मे हन्यात्तमिस्रं पुरुषस्य बुद्धेः ॥ ३४ ॥ ॥ टीका ॥ ॥ डोळां नांदते दृष्टीसी ॥ तम अवरोधी तियेसि ॥ सूर्य उगवूनि
तमातें[2] निरसी[3] ॥ परी नवे दृष्टीसी नुपजवी ॥ ३ ॥ तेवीं अविद्या क्षोभूनि सबळ ॥ आत्मा नाहीं न करवेच केवळ ॥ पुरुषबुद्धीस
आणोनि पडळ[4] ॥ मिथ्या द्वैतं[5]जाळ दाखवी ॥ ४ ॥ तेथ पावल्या शुद्धज्ञानाशी ॥ अविद्यामळमात्र निरसी ॥ नवें उपजवावया आत्म्यासी
॥ सामर्थ्य ज्ञानासी असेना ॥ ५ ॥ आत्मा निजप्रकाशेंसी ॥ ज्ञानाज्ञानांतें प्रकाशी ॥ तें ज्ञानाज्ञान परमात्म्याशी ॥ कदाकाळेंसी
स्पर्शेना ॥ ६ ॥ ज्ञानाज्ञानविकार ॥ अविद्यांतःपाती साचार ॥ आत्मा अविद्येहूनि पर ॥ नित्य निर्विकार[6] याहेतू ॥ ७ ॥ रात्रि नाहीं
सूर्यासी ॥ मा दिवसु काय आहे त्यासी ॥ तेवीं ज्ञानाज्ञान आत्म्यासी ॥ कदाकाळेंसी स्पर्शेना ॥ ८ ॥ आत्मा निर्विकार स्वयंज्योती[7] ॥
अलिप्त ज्ञानाज्ञानस्थिती ॥ त्या स्वरूपाची सहज प्राप्ती ॥ उद्धवाप्रती हरि सांगे ॥ ९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एष स्वयंज्योतिरजोऽप्रमेयो महानुभूतिः
सकलानुभूतिः ॥ एकोद्वितीयो वचसां विरामे येनेषिता वागसवश्चरंति ॥ ३५ ॥ ॥ टीका ॥ ॥ एवं स्वयंज्योतीचें व्याख्यान ॥ परमात्मा
स्वप्रकाशघन ॥ साधक तद्रूप आपण ॥ अभिन्नत्वें जाण सर्वदा ॥ ५१० ॥ आत्मा परिपूर्ण निजपूर्णता ॥ त्यासि वेगळीं कैंचीं
मातापिता ॥ यालागीं आत्म्यासि जन्माची कथा ॥ जाण सर्वथा असेना ॥ ११ ॥ त्रिगुणांचे त्रिविध मळ ॥ हे मिथ्या मायिक समूळ
॥ आत्म्यासि न लागती अळुमाळ[8] ॥ यालागीं निर्मळ निजात्मा ॥ १२ ॥ अप्रमेय ह्मणिजे तें ऐका ॥ ऐसा तैसा इतुका तितुका ॥
पैल तो अमका तमका ॥ ह्मणावया देखा कदा नव्हे ॥ १३ ॥ काळा गोरा सांवळा[9] ॥ निळा धवळा पिंवळा ॥ एथ तेथ दूरी जवळा ॥
या प्रमाणावेगळा परमात्मा ॥ १४ ॥ महानुभूतिपदव्याख्यान ॥ आत्मा अखंडदंडायमान ॥ निर्जीं निजरूपें समसमान ॥ स्वानंदघन
सर्वदा ॥ १५ ॥ तेथ देश काळ वर्तमान ॥ ध्येय[10] ध्याता[11] अथवा ध्यान[12] ॥ ज्ञेय ज्ञाता आणि ज्ञान ॥ हेंही जाण असेना ॥ १६ ॥ नाम
रूप जात गोत ॥ क्रियाकर्मांसि अलिप्त ॥ जन्म मरण कैंचें तेथ ॥ वस्तु सदोदित स्वानंदें ॥ १७ ॥ तेथ वृद्धि आणि ह्रास ॥ आदिमध्यांतविलास
॥ परिपाकादिविन्यास ॥ यांचाही प्रवेश असेना ॥ १८ ॥ ह्मणशी पूर्वोक्त धर्मस्थिती ॥ तेथ नरिघे कैशारीतीं ॥ सकळा

---

१ षड्विकारशून्य. २ अंधकारातें. ३ नाशी. ४ अज्ञान. ५ सुखदुःखादिद्वैत. ६ विकाररहित. ७ स्वयंप्रकाश. ८ अल्पहो. ९ सांवळ्या रंगाचा. १० ज्याचें ध्यान करितात तें. ११ ध्यान करणारा. १२ मनाचें ध्येयवस्तूचे ठायीं तदाकारचिंतन.

नुभूति त्या पदोक्तीं ॥ वस्तु सर्वार्थीं अलिप्त ॥ १९ ॥ याचा धर्म आणि अधर्म ॥ सकळभूतांचें क्रिया कर्म ॥ प्रकाशक मी आत्माराम ॥ यासि अलिप्त परम परमात्मा ॥ ५२० ॥ गंगाजळा आणि मेघासी ॥ आकाश व्याप्त असोनि त्यांसी ॥ परी तें अलिप्त दोहींसी ॥ तेवीं ज्ञानाज्ञानांसी परमात्मा ॥ २१ ॥ तेथ अज्ञानाचा अभावो ॥ तेथ कर्माकर्मा कैंचा ठावो ॥ सकळानुभूति[1] या नांव पहाहो ॥ अभेदान्वयो स्वानंदें ॥ २२ ॥ ऐसा परमात्मा परमानंद ॥ सजातीयविजातीयस्वगतभेद ॥ नसोनियां वस्तु शुद्ध ॥ जाण प्रसिद्ध निजबोधें ॥ २३ ॥ विजातीय भेद मी देह ह्मणणें ॥ सजातीय भेद मी जीवपणें ॥ स्वगत भेद मी ब्रह्म स्फुरणें ॥ हे तिनी नेणे परमात्मा ॥ २४ ॥ तेथ उणखूण लक्षण ॥ युक्ति प्रयुक्ति प्रमाण ॥ हेही सर्वथा नरिघे जाण ॥ ब्रह्म परिपूर्ण एकाकी ॥ २५ ॥ ऐसें एकाकी परब्रह्म ॥ निजगुत्याचें गुह्य उत्तम ॥ हें जाणे तो सभाग्य परम ॥ त्यासि भवभ्रम[2] न बाधी ॥ २६ ॥ तो देहीं असतांचि जाण ॥ त्यासि न बाधी देहगुण ॥ कदा न बाधी कर्माचरण ॥ जन्ममरण बाधीना ॥ २७ ॥ ऐकोनि ऐशिया ज्ञानासी ॥ तें स्वरूप स्पष्ट सांग ह्मणसी ॥ तरी तेथ रिगमू[3] नाहीं वाचेसी ॥ श्रुति शब्देंसी परतल्या ॥ २८ ॥ जेथ अतिविवेकसंपन्न ॥ बुद्धि प्रवेशेना आपण ॥ सवेगपणें नपवे[4] मन ॥ ते वस्तु वाचेअधीन सर्वथा नव्हे ॥ २९ ॥ खुटली शास्त्रांची व्युत्पत्ती ॥ दर्शनें अद्यापि विवादती ॥ श्रुति परतल्या नेतिनेती ॥ तेथ वचनोक्ती विरामू ॥ ५३० ॥ धरोनि जाणिवेची हांवें[5] ॥ शब्दज्ञानें घेतली धांव ॥ परी वस्तूचें एकही नांव ॥ घ्यावया जाणीव न सरेची ॥ ३१ ॥ एवं विचारितां संसार ॥ परादिवाचा[6] नव्हे उच्चार ॥ यालागीं वस्तु परात्पर ॥ क्षराक्षर जेथें अतीत ॥ ३२ ॥ जे सर्वावयवीं सर्वदा शून्य ॥ शेखीं[7] शून्यही नव्हे आपण ॥ शून्यप्रकाशक चिद्घन ॥ वस्तु परिपूर्ण एकत्वें ॥ ३३ ॥ तेथ रिघावया वचनोक्ती ॥ शब्दें साधिल्या नानायुक्ती ॥ त्या चिदाकाशीं मावळती ॥ जेवीं कां उगवतां गभस्ती[8] खद्योत[9] ॥ ३४ ॥ खद्योत सूर्यासि खेंव देता ॥ तैं वस्तु येती वचनाचे हाता ॥ वस्तुपाशीं शब्दाच्या कथा ॥ जाण तत्त्वतां हारपती[10] ॥ ३५ ॥ सूर्योदय झालिया पाही ॥ खद्योत शोधितां न पडे ठायीं ॥ तेवीं वस्तुप्राप्ति पाविजे जिहीं ॥ तैं मागमोस[11] नाहीं शब्दांचा ॥ ३६ ॥ हो कां आंधारिये रातीं ॥ ज्याची दीपें चाले क्रियास्थिती ॥ तेथ झालिया सूर्योदयप्राप्ती ॥ तेचि उपेक्षिती दीपातें ॥ ३७ ॥ तेवीं शाब्दिकां ज्ञानयुक्ती ॥ अनुतापें ब्रह्म विवंचिती ॥ ज्यांसि झाली ब्रह्मप्राप्ती ॥ तेचि उपेक्षिती शब्दातें ॥ ३८ ॥ जंव जंव शब्दाचा अभिमान ॥ तंव तंव दूरी ब्रह्मज्ञान ॥ येचि अर्थींचें उपलक्षण[11] ॥ ऐक निजखूण उद्धवा ॥ ३९ ॥ कन्या द्यावया वरासी ॥ माता पिता बंधु ज्योतिषी ॥ मेळवूनियां सुहृदांसी ॥ कन्या वरासी अर्पिती ॥ ५४० ॥

---

१ सर्वज्ञता. २ संसारभ्रम. ३ प्रवेश. ४ न पावे. ५ हेवा. ६ परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी. ७ परंतु. ८ सूर्य. ९ काजवा. १० नष्ट होती. ११ ठिकाणा. ११ उदाहरण.

तेथ भर्तारसंभोगसेजेपाशीं ॥ जवळी माता पिता सुहृदेंसी ॥ असणें हाचि अवरोध[1] तिसी ॥ पतिसुखासी प्रतिबंध ॥ ४१ ॥ तेवीं योग्यता
चातुर्य जाण ॥ शब्दज्ञानें ज्ञातेपण ॥ जवळी असतां ब्रह्मज्ञान ॥ सर्वथा जाण हों न शके ॥ ४२ ॥ जेवीं डोळां अल्पकण[2] न समाये[3]
॥ तेवीं ब्रह्मीं कल्पना न साहे ॥ यालागीं निर्विकल्पें पाहे ॥ ब्रह्मज्ञानें होये सुटका ॥ ४३ ॥ समस्तज्ञानांचा उपरम ॥ सकळवचनांचा
विराम ॥ तैंचि पाविजे परब्रह्म ॥ ऐसें पुरुषोत्तम बोलिला ॥ ४४ ॥ जें नाकळे बुद्धीच्या ठायीं ॥ जें मनासि नातुडे कहीं ॥ जें
वचनासि विषयो नव्हे पाही ॥ जें प्रमाणाचे ठायीं पावलें नवचे ॥ ४५ ॥ यापरी वस्तु न पडे ठायीं ॥ तरी ते वस्तूचि ह्मणशी नाहीं ॥
ऐसें उद्धवा कल्पिसी कांहीं ॥ ऐक तेविषयीं सांगेन ॥ ४६ ॥ ॥ मूळश्लोकींचें पद ॥ ॥ येनेषिता वागसवश्चरंति ॥ ॥ एथें देहेंद्रियप्राण ॥
हे जड मूढ अचेतन ॥ त्यांसि चेतवी आत्मा चिद्धन ॥ तेंही लक्षण अवधारी ॥ ४७ ॥ आत्मप्रभां[4] दृष्टि प्रकाशे ॥ परी आत्मा दृष्टीसि
न स्पर्शे ॥ आत्मा दृष्टीसबाह्य[5] असे ॥ परी दृष्टीसि न दिसे दृश्यत्वें ॥ ४८ ॥ आत्मसत्तां ऐकती श्रवण ॥ श्रवणांसि आत्मा नातळे जाण
॥ श्रवणासबाह्य असोनि पूर्ण ॥ श्रवणविषय नव्हेचि ॥ ४९ ॥ वाचा आत्मसत्तां[6] उठी ॥ आत्मा नातळे[7] वाचिका गोठी ॥ वस्तु शब्दाचे
पाठीं पोटीं ॥ तो शब्द शेवटीं नेणे वस्तू ॥ ५५० ॥ मन आत्मसत्तें चपळ ॥ मनासबाह्य आत्मा केवळ ॥ तो मनासि नातळे
अळुमाळ ॥ मनासि आकळ निजात्मा ॥ ५१ ॥ चित्त चेतवी चिद्धन ॥ चित्सत्ताचि चिंतन ॥ चित्तासबाह्य चैतन्य पूर्ण ॥
तरी चित्तासि चैतन्य कळेना ॥ ५२ ॥ आत्मसंयोगें अहं उल्हासे ॥ अहंता आत्मा कदा न स्पर्शे ॥ अहंतासबाह्य आत्मा असे
॥ परी तो आत्मा न दिसे अहंकारें ॥ ५३ ॥ आत्मप्रभाप्रकाशविषीं ॥ प्रकाशिली विवेकसिद्धी ॥ बुद्धीस आत्मा न कळे त्रिशुद्धी
॥ आत्मा बुद्धीसबाह्य ॥ ५४ ॥ आत्मप्रभां प्राण चळे ॥ परी प्राणासि आत्मा नातळे ॥ प्राणसबाह्य आत्ममेळें ॥ तरी प्राणासि
न कळे परमात्मा ॥ ५५ ॥ उद्धवा तूं यापरी पाहे ॥ जग जयाचेनि वर्तताहे ॥ तो आत्मा स्वतःसिद्ध आहे ॥ नाहीं[8] नोहे[9] कल्पांतीं ॥ ५६ ॥
यापरी आत्मा स्वतःसिद्ध ॥ भेद नांदवूनि अभेद ॥ द्वंद्वं[10] प्रकाशोनि निर्द्वंद्वं[11] ॥ हा निजात्मबोध दृढ केला ॥ ५७ ॥ एवं आत्मा निर्द्वंद्व अद्वैतें
॥ तो आहे नाहीं ह्मणावया एथें ॥ कोणी नुरेचि गा ह्मणतें ॥ आत्मा निजात्मतें परिपूर्ण ॥ ५८ ॥ आत्मा निजात्मता सदोदित ॥
संसार तेथ आरोपित ॥ येचि अर्थीं श्रीकृष्णनाथ ॥ असे सांगत श्लोकार्थें ॥ ५९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एतावानात्मसंमोहो यद्विकल्पस्तु
केवले ॥ आत्मन्नृते स्वमात्मानमवलंबो न यस्य हि ॥ ३६ ॥ ॥ टीका ॥ ॥ केवळ नित्यमुक्त ॥ त्रिगुण गुणांसि अतीत ॥ नभाहूनि

---

१ प्रतिबंध. २ परमाणु. ३ न साहे. ४ आत्मतेजानें. ५ दृष्टीच्या आंत बाहेर. ६ आत्म्याच्या सत्तेनें. ७ प्राप्त होत नाहीं. ८ न दिसे. ९ नष्ट होत नाहीं. १० सुखदुःखादि. ११ सुखदुःखातीत.

अलिप्त ॥ सदोदित पूर्णत्वें ॥ ५६० ॥ ब्रह्म अखंड दंडायमान ॥ सर्वदा स्वानंदघन ॥ असे अलिप्त प्रपंचभान ॥ मिथ्या जाण आरोप ॥ ६१ ॥ आरोपासि अधिष्ठान ॥ स्वयें परमात्मा आपण ॥ यालागीं प्रपंचाचें भान ॥ तेथेंचि जाण आभासे ॥ ६२ ॥ परमात्म्याहूनि भिन्न ॥ प्रपंचासि नाहीं स्थान ॥ यालागीं उत्पत्ति स्थिति निधन ॥ तेथेंचि जाण आभासे ॥ ६३ ॥ जेवीं दोराचा सर्प पाही ॥ दोरावेगळा न दिसे कहीं ॥ दोर सर्प झालाचि नाहीं ॥ तरी याच्याठायीं आभासे ॥ ६४ ॥ तेवीं निर्विकल्प पूर्ण ब्रह्म ॥ नातळे नाम गुण कर्म ॥ तेंही त्याच्याठायीं मनोभ्रम ॥ प्रपंच विषम परिकल्पी ॥ ६५ ॥ जेवीं दोरा भासे मिथ्यासर्प ॥ तेवीं मिथ्या ब्रह्मीं भवआरोप ॥ तेथ सुख दुःख भय कंप ॥ तोही खटाटोप मायिक ॥ ६६ ॥ एवं प्रपंचाचें मिथ्या भान ॥ वस्तु शुद्धत्वें स्वानंदघन ॥ हेंही निखिल केलें निरूपण ॥ ब्रह्म परिपूर्ण अद्वय ॥ ६७ ॥ एवं परिसूनि निश्चित ॥ ब्रह्म साधिलें अबाधित ॥ हें नमानिती जे पंडित ॥ तें मत खंडित श्रीकृष्ण ॥ ६८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यन्नामाकृतिभिर्ग्राह्यं पंचवर्णमबाधितम् ॥ व्यर्थेनाप्यर्थवादोऽयं द्वयं पंडितमानिनाम् ॥ ३७ ॥ ॥ टीका ॥ ॥ वेदवेदांतप्रतिपाद्य एथ ॥ सकळशास्त्रार्थांचें निजमथित ॥ ब्रह्म अद्वयें [1]सदोदित ॥ त्यां सुनिश्चित [2]नेमिलें ॥ ६९ ॥ तें हें माझें [3]निजमत ॥ [4]उपेक्षूनियां पंडित ॥ ज्ञातेपणें अति[5]उन्मत्त ॥ अभिमानयुक्त पांडित्यें ॥ ५७० ॥ त्या पंडितांचें पांडित्यमत ॥ प्रपंच [6]प्रत्यक्ष अनुभूत ॥ तो मिथ्या मानोनियां एथ ॥ कैंचें अद्वैत काढिलें ॥ ७१ ॥ अद्वैतासि नाहीं गांवो ॥ जेथ तेथ जरी पाहों जावों ॥ अद्वैता नाहीं नेमस्त ठावो ॥ यालागीं पहाहो तें मिथ्या ॥ ७२ ॥ रूप नाम गुण कर्म ॥ पंचभूतें भौतिकें विषम ॥ चतुर्वर्ण चारी आश्रम ॥ सत्य परम मानिती ॥ ७३ ॥ सत्य मानावया हेंचि कारण ॥ मनोभ्रमें भ्रमले जाण ॥ ज्ञानाभिमानें छळिले पूर्ण ॥ आपण्या आपण विसरले ॥ ७४ ॥ मुख्य मानिती विषयसुख ॥ विषयार्थ पूर्ण करावे चोख ॥ स्वर्ग भोगावा आवश्यक ॥ हें सत्य देख मानिती ॥ ७५ ॥ विषय सत्य मानिती परम ॥ हें देहाभिमानाचें निजवर्म ॥ तेणें सज्ञान केले अधम ॥ मरण जन्म भोगवी ॥ ७६ ॥ पुढती स्वर्ग पुढती नरक ॥ पुढती जननीजठर देख ॥ यापरी पंडितलोक ॥ केले ज्ञानमूर्ख अहंमतें ॥ ७७ ॥ त्यांचें ज्ञान तें वेदबाह्य ॥ सर्वथा नव्हे तें ग्राह्य ॥ जैसें अंत्यजाचें अन्न अग्राह्य ॥ तैसें तें होय अतित्याज्य ॥ ७८ ॥ ज्ञानाभिमानाचा विचार ॥ तें अज्ञानाचें सोलींव सार ॥ तयाचा जो निजनिर्धार ॥ तो जाण साचार महामोहो ॥ ७९ ॥ तयाचा जो निजविवेक ॥ इंद्रावणफळाऐसा देख ॥ वरी साजिरें आंत विख ॥ तैसा परिपाक ज्ञानाभिमानियांचा ॥ ५८० ॥ नामरूपात्मक प्रपंच ॥ मिथ्या मायिकत्वें आहाच ॥ ज्ञानाभिमानें मानूनि साच ॥

---

[1] निरंतर. [2] दर्शित केलें. [3] अद्वैत मत. [4] टाकून. [5] ज्ञातेपणाचे उन्मादानें उन्मत्त. [6] दृग्गोचर.

वृथा कचकच वाढविती ॥ ८१ ॥ प्रपंचरचनेची कुसरी ॥ आपण जैं मानावी खरी ॥ तैं देहबुद्धि वाजली शिरीं ॥ दुःखदरिद्रीं नि
मग्न ॥ ८२ ॥ त्यांची योग्यता पाहतां जाण ॥ गायत्रीतुल्य वेदपठण ॥ सकळ शास्त्रें जाणे पूर्ण ॥ श्रुतिपुराण इतिहास ॥ ८३ ॥ अति
निःसीम वक्तेपण ॥ समर्यींचे समर्यीं स्फुरे स्फुरण ॥ तेणें वाढला देहाभिमान ॥ पंडितमान अतिगर्वें ॥ ८४ ॥ नेणे अद्वैतसमाधान ॥
तरी योग्यता गर्व गहन ॥ निजमताचा मताभिमान ॥ प्राणांतें जाण सांडीना ॥ ८५ ॥ पंडितमान्यांचें बोलणें ॥ अवचटें नायकावें
दीनें ॥ जे नागवले देहाभिमानें ॥ त्यांचेनि सौजन्यें[1] अधःपातू ॥ ८६ ॥ विष भक्षी त्याचा पांतीकर[2] ॥ अत्याग्रहें झाला नर ॥ त्यासि अ
प्रार्थितां मरणादर ॥ अतिदुर्धर जीवीं वाजे ॥ ८७ ॥ यालागीं न धरावी ते संगती ॥ त्यांसी न करावी वदंती ॥ कदा नवचावें त्यांप्र
ती ॥ ते त्याज्य निश्चितीं जीवें भावें ॥ ८८ ॥ त्यांचे न लागावें बोलीं ॥ त्यांचे न चालावें चाली ॥ जे ज्ञानाभिमानभुली ॥ मुकले आ
पुली हितवार्ता ॥ ८९ ॥ ते नाणावे निजमंदिरा ॥ स्वयें नवजावें त्यांच्या द्वारा ॥ त्यांसि न पुसावें विचारा ॥ जे अभिमानद्वारा नाड
ले ॥ ५९० ॥ त्यांसी न व्हावी हातभेटी ॥ कदा न देखावे निजदृष्टीं ॥ ते त्याज्य गा उठाउठी ॥ जेवीं धर्मिष्ठीं परनिंदा ॥ ९१ ॥ वेद
शास्त्रांचा मथितार्थ ॥ जो कां अद्वैत परमार्थ ॥ तो ज्यांसि नावडे निजस्वार्थ ॥ विचरे अनर्थ त्यांपाशीं ॥ ९२ ॥ यालागीं त्यांची सं
गती ॥ साक्षेपें सांडावी निश्चितीं ॥ साधकाचे योगस्थिती ॥ अंतरायनिवृत्ती हरि सांगे ॥ ९३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ योगिनोऽपक्वयोगस्य
युंजतः काय उत्थितैः ॥ उपसर्गैर्विहन्येत तत्रायं विहितो विधिः ॥ ३८ ॥ ॥ टीका ॥ ॥ योगी प्रवर्तल्या योगाभ्यासीं ॥ योग संपूर्ण नव्ह
तां त्यांसी ॥ उपसर्ग[3] येती छळावयासी ॥ तेंचि हृषीकेशी सांगत ॥ ९४ ॥ शरीरीं एखादा उठे रोग ॥ खवळे विषयाची लगबग ॥ अ
थवा संभ्रमांत[4] उपसर्ग ॥ कां योगभंग विकल्पें ॥ ९५ ॥ ज्ञानाभिमान सबळ उठी ॥ तेणें गुणदोषीं बैसे दिठी ॥ परापवादाची[5] चावटी ॥
त्याची एकांतगोष्टी निजगुज ॥ ९६ ॥ देहीं शीतळता उभंडे[6] ॥ कां उष्णता अत्यंत चढे ॥ किंवा वायू अव्हाटीं पडे ॥ कां क्षुधा वाढे अ
निवार ॥ ९७ ॥ विक्षेपकषाय वोढवती ॥ परदारा परद्रव्यासक्ती ॥ द्रव्यादि उपसर्ग येती ॥ उपाय श्रीपती तदर्थ सांगे ॥ ९८ ॥ ॥
श्लोक ॥ ॥ योगधारणया कांश्चिदासनैर्धारणान्वितैः ॥ तपोमंत्रौषधैः कांश्चिदुपसर्गान्विनिर्दहेत् ॥ ३९ ॥ ॥ टीका ॥ ॥ देहीं शीतळ
ता वाढल्या जाण ॥ तीस निवारी अग्निधारण ॥ देहीं ऊष्मा चढल्या पूर्ण ॥ सोमधारण[7] उच्छेदी ॥ ९९ ॥ वायु अव्हाटल्या अवचि
तां ॥ ते देहीं वायु भरावा पुरता ॥ वायु मेळवूनि वायुआतौता ॥ आणिती निजपंथा अभ्यासबळें ॥ ६०० ॥ वायु क्षोभोनि सकोप ॥

---

१ सालसपणें. २ वांटेकरी. ३ विघ्न. ४ त्वरेमुळें. ५ दुसऱ्याचे अपवादाचो. ६ वाढे. ७ चंद्र.

जैं जठरावरी पडे झडप ॥ तैं क्षुधा खवळे अमूप ॥ तृप्तीचें रूप उठीना ॥ १ ॥ तेथ मोकळा सांडूति प्राण ॥ अपान वाढवावा आपण ॥ तो जठरा आलिया जाण ॥ तेथ क्षोभला प्राण सहजचिये ॥ २ ॥ तेथ प्राणापानऐक्यता ॥ सहजें ये साधकांच्या हाता ॥ मग षट्चक्रें भेदितां ॥ क्षणही सर्वथा लागेना ॥ ३ ॥ तेव्हां सतरावियेचें अमृतपान ॥ साधकांसि पावे संपूर्ण ॥ यापरी क्षुधानिर्दळण ॥ येणें योगें जाण साधिती ॥ ४ ॥ परदारा परद्रव्यासक्ती ॥ हे पापकर्मांची फळप्राप्ती ॥ याची करावया निवृत्ती ॥ तपश्चर्या निश्चितीं उद्धवा ॥ ५ ॥ भावें करितां मंत्रानुष्ठान ॥ तेणें वैराग्य उपजे जाण ॥ वैराग्यें विषयनिर्दळण ॥ सहजें जाण साधकां ॥ ६ ॥ शुद्धमंत्राचें पुरश्चरण ॥ करी विघ्नांचें निर्दळण ॥ तेथ पिशाचबाधासंचरण ॥ घेऊनि प्राण स्वयें पळे ॥ ७ ॥ शरीरीं संचरल्या व्याधी ॥ त्यातें निर्दळी दिव्य औषधी ॥ मनाचा छेदावया आधी ॥ योग त्रिशुद्धीं साधावा ॥ ८ ॥ तेथ साधल्या योगसिद्धी ॥ समूळ निर्दळी आधिव्याधी ॥ सकळ विघ्नांतेंही छेदी ॥ जाण त्रिशुद्धी उद्धवा ॥ ९ ॥ हें किती सांगूं भिन्नभिन्न ॥ भावें करितां माझें ध्यान ॥ सकळ उपसर्गां निर्दळण ॥ तेंचि निर्दळण हरि सांगे ॥ ६१० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कांश्चिन्ममानुध्यानेन नामसंकीर्तनादिभिः ॥ योगेश्वरानुवृत्त्या वा हन्यादशुभदान् शनैः ॥४० ॥ ॥ टीका ॥ ॥ आधिव्याधींसी[1] सकळ विघ्न ॥ विकल्पकर्म देहाभिमान ॥ ज्ञानाभिमानासि दहन ॥ करी ध्यानलक्षण उद्धवा ॥ ११ ॥ माझिया ध्यानाचे परिपाठीं ॥ उपसर्ग[2] पळती उठाउठी ॥ शोधितां विघ्न न पडे दृष्टीं ॥ निर्द्वंद्व सृष्टी साधकां ॥ १२ ॥ माझा लागल्या ध्यानभावो ॥ उपसर्गांचा नुरेचि ठावो ॥ सकळविघ्नांचा अभावो ॥ विकल्पा गांवो असेना ॥ १३ ॥ म्हणशी घालोनि आसन ॥ एकाग्र[3] करोनियां मन ॥ कैं ठसावेल तुझें ध्यान ॥ तैं साधकां विघ्न बाधीना ॥ १४ ॥ असो नटके माझें ध्यान ॥ तैं सोपा उपांव[4] आहे आन ॥ माझें करितां नामकीर्तन ॥ विघ्ननिर्दळण हरिनामें ॥ १५ ॥ जेथ नामाचा घडघडाट ॥ तेथ उपसर्गां नचले वाट ॥ महाविघ्नांचा कडकडाट ॥ करी सपाट हरिनामें ॥ १६ ॥ अखंड माझी नामकीर्ती ॥ ज्याच्या मुखास आली वस्ती ॥ त्या देखोनि विघ्नें पळती ॥ उपसर्गां शांती निःशेष ॥ १७ ॥ माझ्या नामाचा निजगजर ॥ पळवी महापापसंभार[5] ॥ उपसर्गां नुरवी[6] थार ॥ नाम सधर हरीचें ॥ १८ ॥ अवचटें घेतां माझें नाम ॥ सकळ पातकां करी भस्म ॥ जेथ अखंड माझें गुणनाम कर्म ॥ तेथ विघ्न भवभ्रम स्पर्शेना ॥ १९ ॥ माझें नामकीर्तिपवाडे ॥ ज्याची वाचा अखंड पढे ॥ विघ्नें न येती तयाकडे ॥ जेवीं सूर्यापुढें आंधार ॥ ६२० ॥ माझे नाम कीर्तीवीण एथें ॥ ज्याचें तोंड न राहे रितें ॥ तो नागवे महाविघ्नांतें ॥ जेवीं पतंगातें हुताशू[7] ॥ २१ ॥ नामकीर्ती दाटुगी होये ॥ हें विश्वासें

---

१ मानसिक व्यथा. २ उपद्रव. ३ अचंचल. ४ उपाय. ५ समुदाय. ६ उरवीत नाहीं. ७ अग्नि.

मानलें आहे ॥ तें नाम मुखीं केवीं राहे ॥ करावें काये ह्मणशी ॥ २२ ॥ मुखीं नामनिर्वाह व्हावा ॥ यालागीं करावी साधुसेवा ॥ संतसेवनीं सद्भावो जीवा ॥ तेथ नव्हे रिगावा विघ्नासी ॥२३॥ सद्भावें धरिल्या सत्संगती ॥ त्या संगाचिये निजस्थिती ॥ मुखीं ठसावे नामकीर्ती ॥ विकल्प चित्तीं स्फुरेना ॥ २४ ॥ मुखीं हरिनामाची गोडी ॥ संतसेवेची अतिआवडी ॥ तयाची गा प्रतापप्रौढी ॥ उपसर्गकोडी निर्दळी ॥ २५ ॥ साधकांसि पाठिराखा ॥ संत झालिया निजसखा ॥ तैं महाविघ्नांचिया मुखा ॥ विभांडी देखा क्षणार्द्धें ॥ २६ ॥ सेवितां साधूचें चरणोदक ॥ अतिशुद्ध होती साधक ॥ तेणें शुद्धत्वें महादोख ॥ समूळ देख निर्दळी ॥ २७ ॥ साधूच्या चरणतीर्थापाशीं ॥ सकळ तीर्थें येती शुद्धत्वासी ॥ भावें सेविती त्या तीर्थासी ॥ ते उपसर्गासी नागवती ॥ २८ ॥ वंदितां साधुचरणरज ॥ साधकांचें सिद्ध होय काज ॥ निर्दळूनि विघ्नांचें बीज ॥ स्वानंद निज स्वयें भोगिती ॥ २९ ॥ निजभाग्यगती अवचितां ॥ संतचरणरेणु पडल्या माथां ॥ तो कळिकाळातें हाणे लाथा ॥ तेथ विघ्नांची कथा ते कोण ॥ ६३० ॥ निधडा शूर निजबळेंसी ॥ धुरां निजशस्त्र देऊनि त्यासी ॥ युद्धीं थापटिलियां पाठीसी ॥ तो विभांडी परांसी तेणें उल्हासें ॥ ३१ ॥ तेवीं सद्भावें सत्संगती ॥ मुखीं अखंड नामकीर्ती ॥ भावें करितां संतांची भक्ती ॥ महाबाध निर्दळिती साधक ॥ ३२ ॥ कीर्ति भक्ति सत्संगती ॥ हे त्रिवेणी लागे ज्याप्रती ॥ त्यासि उपसर्ग नातळती ॥ पावन त्रिजगती त्याचेनी ॥ ३३ ॥ माझी भक्ति आणि नाम कीर्ती ॥ यांची जननी सत्संगती ॥ तो सत्संग जोडल्या हातीं ॥ विघ्नें न बाधिती साधकां ॥ ३४ ॥ योग याग आसन ध्यान ॥ तप मंत्र औषधी जाण ॥ साधितां न तुटे देहाभिमान ॥ तो सत्संगें जाण निर्दळी ॥ ३५ ॥ योगादि सर्व उपायीं जाण ॥ निवारिती अल्प विघ्न ॥ विघ्नांचा राजा देहाभिमान ॥ त्याचेनि जाण ढळेना ॥ ३६ ॥ दुर्धर देहाभिमान ॥ ज्ञातेपणीं अतिदारुण ॥ त्याचें समूळ निर्दळण ॥ सत्संग जाण स्वयें करी ॥ ३७ ॥ नेणपणाचा अभिमान ॥ तत्काळ जाय निघोन ॥ तैसा नव्हे ज्ञानाभिमान ॥ चाँविरा जाण जाणिवा ॥ ३८ ॥ त्याही अभिमानाचें निर्दळण ॥ सत्संग निजांगें करी आपण ॥ यालागीं सत्संगासमान ॥ आँन साधन असेना ॥ ३९ ॥ एकाचेनि निजमतें ॥ अजरामर करावें देहातें ॥ तेही योगादिसाधनांतें ॥ मूर्खमतें साधिती ॥ ६४० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ केचिद्देहमिमं धीराः सुकल्पं वयसि स्थिरम् ॥ विधाय विविधोपायैरथ युंजंति सिद्धये ॥ ४१ ॥ ॥ टीका ॥ ॥ देहो तितुका प्रारब्धाधीन ॥ त्यासि प्रारब्धें जन्ममरण ॥ त्या देहासि अजरामरण ॥ पामरजन करूंपाहती ॥ ४१ ॥ त्या प्रारब्धाचें सूत्र पूर्ण ॥ सर्वदा काळाधीन ॥ यालागीं काळकृत जन्ममरण ॥ सर्वांसि जाण सर्वदा ॥ ४२ ॥

---

१ दोष. २ दूर करितात. ३ बाधक. ४ अन्य.

चौदा कल्प आयुष्य जोडी ॥ त्या मार्कंडेयासि काळ झोडी ॥ युगा लोम झडे परवडी ॥ त्या लोमहर्षांची नरडी मुरडिजे काळें ॥ ४३ ॥ चतुर्युगसहस्र संख्येसी ॥ तो दिवस गणिजे ब्रह्मयासी ॥ जो स्रजिता[1] सकळ सृष्टीसी ॥ त्यासि काळ ग्रासी स्वबळें ॥ ४४ ॥ स्रजित्या ब्रह्म्यासि काळ पिळी ॥ पाळित्या विष्णूतें काळ गिळी ॥ प्रळयरुद्राचीही होळी ॥ काळ महाबळी स्वयें करी ॥ ४५ ॥ यापरी काळ अतिदुर्धर ॥ नेणोनि अविवेकी नर ॥ वांछिती काळजयो पामर ॥ देह अमर करावया ॥ ४६ ॥ जेंजें दिसे तेंतें नासे ॥ हे काळसत्ता जगासि भासे ॥ तरी अजरामरत्वाचें पिसें ॥ मूर्ख अतिप्रयासें वांछिती ॥ ४७ ॥ थिल्लरींचा[2] तरंग जाण ॥ वांछि अजरामरणपण ॥ तंव थिल्लरासचि ये मरण ॥ तेथ वांचवी कोण तरंगां ॥ ४८ ॥ तेवीं संसारचि नश्वर ॥ त्यांतील देह अजरामर ॥ करूं वांछिती पामर ॥ उपायीं अपार शिणोनी ॥ ४९ ॥ देह जाईल तरी जावो ॥ परी जीव चिरंजीव राहो ॥ तदर्थ कीजे उपावो ॥ तैसें अमरत्व पहाहो नरदेहा ॥ ६५० ॥ देह केवळ नश्वर ॥ त्यातें अविवेकी महाधीर ॥ करूं ह्मणती अजरामर ॥ उपायीं अपार शिणोनी ॥ ५१ ॥ केवळ काळाचें खाजें देहो ॥ तो अमर करावया पहाहो ॥ जोजो कीजे उपावो ॥ तोतो अपावो[3] साधकां ॥ ५२ ॥ एवं मूढतेचे भागी ॥ देहाच्या अमरत्वालागीं ॥ शिणोनि उपायीं अनेगीं[4] ॥ हटयोगी नागवले ॥ ५३ ॥ परकायाप्रवेशार्थ जाण ॥ शिणले साधितां प्राणधारण ॥ एवं धरितां देहाभिमान ॥ योगिजन नाडले ॥ ५४ ॥ देहाचें नश्वरपण ॥ जाणोनियां सज्ञान ॥ न धरिती ते देहाभिमान ॥ तेंचि निरूपण हरि सांगे ॥ ५५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नहि तत्कुशलादृत्यं तदायासो ह्यपार्थकः ॥ अंतवत्त्वाच्छरीरस्य फलस्येव वनस्पतेः ॥ ४२ ॥ ॥ टीका ॥ ॥ विचारितां हा संसार ॥ समूळ अवघा नश्वर ॥ तेथ देहाचा अजरामर ॥ ज्ञाते आदर न करिती ॥ ५६ ॥ देहअजरामरविधीं ॥ ज्ञाता सर्वथा न घाली बुद्धी ॥ देहीं साधिल्या ज्या सिद्धी ॥ त्या त्रिशुद्धी बाधिका ॥ ५७ ॥ देह तापल्या ज्वरादितापें ॥ तदर्थ मरणभयें कांपे ॥ तेथ शीतळ आणिल्याही साक्षेपें ॥ तेणेंही रूपें मरणची ॥ ५८ ॥ मिथ्या देहींचा देहाभिमान ॥ सदा भोगवी जन्ममरण ॥ तो अजरामर करितां जाण ॥ देहबंधन दृढ झालें ॥ ५९ ॥ साधोनियां योगसाधन ॥ दृढ केलें देहबंधन ॥ देहींच्या सिद्धि भोगितां जाण ॥ अधःपतन चुकेना ॥ ६६० ॥ हो कां ज्ञानार्थ योग साधितां ॥ प्रसंगें सिद्धि आलिया हातां ॥ त्याही त्यागाव्या तत्त्वतां ॥ निजस्वार्था लागूनी ॥ ६१ ॥ ज्याची चाल रायापाशीं ॥ लांच हाता ये तयासी ॥ तेणेंचि पावे अपमानासी ॥ तेवीं साधकासी घातका सिद्धी ॥ ६२ ॥ वृक्षासि मोडूनि आलिया फळें ॥ त्या फळासि वृक्ष नातळे ॥ तेवीं आलिया सिद्धीचे सोहळे ॥ वैराग्यबळें त्यागावे ॥ ६३ ॥ कोरडेनि वैराग्यबळें ॥

---

[1] उत्पन्न करणारा. [2] डबक्यांतील. [3] अपायकारक. [4] अनेक.

त्याग कीजे तो आडखळे ॥ त्याग विवेकवैराग्यमेळें ॥ तैं सिद्धीचे सोहळे तृणप्राय ॥ ६४ ॥ आंधळे हतरूं[1] मातलें ॥ पतन न देखे आपुलें
॥ तेवीं अविवेकें त्याग केले ॥ तेते गेले अधःपाता ॥ ६५ ॥ मुळीं देहचि नश्वर एथ ॥ तेथींच्या सिद्धि काय शाश्वत ॥ ऐसे विवेकवैराग्ययुक्त
॥ होय अलिप्त देहभोगा ॥ ६६ ॥ एथ देह तितुका अनित्य ॥ आत्मा एक नित्य सत्य ॥ हें जाणोनि विवेकयुक्त ॥ जडले
निश्चित आत्माभ्यासीं ॥ ६७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ योगं निषेवतो नित्यं कायश्चेत्कल्पतामियात् ॥ तच्छ्रद्दध्यान्न मतिमान्योगमुत्सृज्य मत्परः
॥ ४३ ॥ ॥ टीका ॥ ॥ योग साधितां परमार्था ॥ सिद्धि वश्य झालिया हाता ॥ त्या त्यागाव्या तत्त्वतां ॥ निजहितार्था[3] लागूनी
॥ ६८ ॥ सिद्धि त्यागितां न वचती ॥ भोगबळें गळां पडती ॥ तरी ते सांडूनि योगस्थिती ॥ माझे भजनपंथीं लागावें ॥ ६९ ॥ माझिये
भक्तीच्या निजमार्गीं ॥ रिगमू नाहीं विघ्नांलागीं ॥ मी भक्तांच्या प्रेमभोगीं ॥ रंगलों रंगीं श्रीरंग ॥ ६७० ॥ सद्भावें करितां माझी भक्ती ॥
भक्तांसि नव्हे विघ्नप्राप्ती ॥ भक्तसहाय मी श्रीपती ॥ अहोरात्रीं[4] संरक्षी ॥ ७१ ॥ करितां भगवद्भजन ॥ भक्तांसि बाधीना विघ्न ॥ ते भक्तीचें महिमान ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ७२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ योगचर्यामिमां योगी विचरन् मद्व्यपाश्रयः ॥ नांतरायैर्विहन्येत निस्पृहः
स्वसुखानुभूः ॥ ४४ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे अष्टाविंशोऽध्यायः ॥ २८ ॥ ॥ टीका ॥
अनन्यप्रीतीं मज शरण ॥ सर्वभूतीं मद्भावन ॥ अभेदबुद्धीं माझें भजन ॥ त्यासि सर्वथा विघ्न बाधीना ॥ ७३ ॥ माझ्या भक्ताचे उपसर्ग
॥ सकळ निर्दळी मीं श्रीरंग ॥ ज्यासि अनन्य भजनयोग ॥ त्यासि माझें निजांग वस्तीसी ॥ ७४ ॥ जेथ विघ्न धांवे भक्तांकडे ॥
तेथ माझी उडी पडे ॥ निवारीं निजभक्तांचें सांकडें ॥ तीं लडिवाडें पैं माझीं ॥ ७५ ॥ तीं लळिवाडें ह्मणशी कैसी ॥ त्यांचें सांकडें मी
सदा सोशीं ॥ राजा दंडिता प्रह्लादासी ॥ म्यां सर्वार्थें त्यासी रक्षिलें ॥ ७६ ॥ संकट मांडिलें अंबर्षीसी[5] ॥ तैं म्यां अपमानिलें दुर्वासासी
॥ दाही गर्भवास मी सोशीं ॥ उणें भक्तांसी येऊं नेदी ॥ ७७ ॥ बाधा होतां गजेंद्रासी ॥ हातीं वसवूंनि[6] सुदर्शनासी ॥ उडी घालूनि
त्यापाशीं ॥ निमिषार्द्धेंसी[7] सोडविला ॥ ७८ ॥ द्रौपदी ये अतिसांकडीं[8] ॥ सभेसि करितां ते उघडी ॥ म्यां निजांगें घालूनि उडी ॥ वस्त्रांच्या
कोडी पुरविल्या ॥ ७९ ॥ द्रौपदीचिया वस्त्रघडी ॥ नेसतां दिसेल ते उघडी ॥ यालागीं मी लवडसवडीं ॥ नेसतीं लुगडीं स्वयें
झालों ॥ ६८० ॥ दावाग्नीं पीडितां गोपाळ ॥ निजमुखीं म्यां गिळिली ज्वाळ ॥ एथवरी भक्तांची कळवळ ॥ मज सर्वकाळ उद्धवा
॥ ८१ ॥ द्रौण्यस्त्राचे बाधेहातीं ॥ म्यां गर्भीं रक्षिला परीक्षिती ॥ गोकुळ पीडितां सुरपती[9] ॥ म्यां धरिला हातीं गोवर्धन ॥ ८२ ॥

---

१ उडच्या मारण्यास. २ आत्मचिंतन करण्याविषयीं. ३ आपल्या हिताकरितां. ४ रात्रंदिवस. ५ अंबरीषावर. ६ घेऊन. ७ अर्ध्या निमिषांत. ८ संकटीं. ९ इंद्र.

वांचवावया अर्जुनासी ॥ दिवसां लपविलें सूर्यासी ॥ हार पतकरूनि रणभूमीसी ॥ सत्य भीष्मासी म्यां केलें ॥ ८३ ॥ ऐसा मी भक्त सहाकारी ॥ नित्य असतां शिरावरी ॥ भक्तासि विघ्न कोण करी ॥ मी श्रीहरी रक्षिता ॥ ८४ ॥ जे अनुसरले[1] मद्भक्तीसी ॥ मी विघ्न लागों नेदीं भक्तांसी ॥ निजांग अर्पोनियां त्यांसी ॥ निजीं निजसुखेंसी नांदवी[2] ॥ ८५ ॥ भावें करितां माझी भक्ती ॥ साधकां स्वसुखाची प्राप्ती ॥ तेथें इच्छेंसी कामभोगप्राप्ती ॥ माझी सुखस्थिती मद्भक्तां ॥ ८६ ॥ ह्मणसी भक्तांसि देहांतीं ॥ होईल निजसुखाची प्राप्ती ॥ तैशी नव्हे चौथी भक्ती ॥ देहीं वर्ते स्थिती सुखरूप ॥ ८७ ॥ देह राहो अथवा जावो ॥ परी सुखासि नाहीं अभावो ॥ यापरी मद्भक्त पहाहो ॥ सुखें सुखनिर्वाहो भोगिती ॥ ८८ ॥ भक्त वर्ततां दिसती देहीं ॥ परी ते वर्तती माझ्याठायीं[3] ॥ मी अवघाचि त्यांच्या हृदयीं ॥ सर्वदा पाही नांदत ॥ ८९ ॥ भक्त निजबोधें मजभीतरी ॥ मी निजांगें त्यां आंत बाहेरी ॥ एवं निजसुखाच्या माजघरीं ॥ परस्परीं नांदत ॥ ६९० ॥ मी देव तो एक भक्त ॥ हेही बाहेर सवडी मात ॥ विचारितां आंतवटा अर्थ ॥ मी आणि भक्त एकची ॥ ९१ ॥ तूप थिजलें विघुरलें देख ॥ तेवीं मी भक्त दोनी एक ॥ मज भक्तासि वेगळिक ॥ कल्पांतीं देख असेना ॥ ९२ ॥ मी तो एकचि एथें ॥ हेंही ह्मणावया नाहीं ह्मणतें ॥ यापरी मिळोनि मातें ॥ भक्त निजसुखातें पावले ॥ ९३ ॥ तो हा ब्रह्मज्ञानाचा कळसू[4] ॥ अध्याय जाण अठ्ठाविसू ॥ बाप विंदानी हृषीकेशू ॥ तेणें देउळासि कळसू मेळविला ॥ ९४ ॥ जेवीं अळंकारीं मुकुटमणी ॥ तेवीं अठ्ठाविसावा ब्रह्मज्ञानी ॥ श्रीकृष्ण भक्तांची निजजननी ॥ तो उद्धवालागोनि श्रृंगारी ॥ ९५ ॥ माता उत्तम अलंकारकोडीं ॥ अपत्य श्रृंगारी अति आवडीं ॥ तेवीं उत्तमोत्तम ज्ञाननिर्वंडी[5] ॥ कडोविकडीं श्रृंगारिला ॥ ९६ ॥ मातेसि आवडे निजपळणें ॥ तेवीं उद्धव वृद्धपणीचें तानें ॥ श्रीकृष्ण त्याकारणें ॥ गुह्यज्ञानें श्रृंगारी ॥ ९७ ॥ माता बाळकातें श्रृंगारी ॥ तें लेणें मागुतें उतरी ॥ उद्धव श्रृंगारिला श्रीहरी ॥ तें अंगाबाहेरी निघेना ॥ ९८ ॥ अंगीं लेणें जडलें अलोलिक ॥ तेणें उद्धव झाला अमोलिक ॥ पायां लागती तिनी लोक ॥ ब्रह्मादिक पूजिती ॥ ९९ ॥ निजात्मअळंकारें श्रीपती ॥ उद्धव श्रृंगारिला ब्रह्मस्थितीं ॥ तेणें वंद्य झाला त्रिजगतीं[6] ॥ त्यातें पुराणीं पढती महाकवी ॥ ७०० ॥ गोडीमाजी श्रेष्ठ अमृत ॥ तेंही फिकें[7] करूनि एथ ॥ उद्धवालागीं परमामृत ॥ श्रीकृष्णें निश्चित पाजिलें ॥ १ ॥ अमर अमृत पान करिती ॥ तेही मरणार्णवीं[8] बुडती ॥ उद्धव अक्षयी केला श्रीपती ॥ कथामृतीं नेवूनी ॥ २ ॥ तेणें तो सर्वांगीं निवाला ॥ परमानंदीं तृप्त झाला ॥ तेणें उद्धवत्वा विसरला ॥ डोलों लागला स्वानंदें ॥ ३ ॥ ते स्वानंदउन्मत्तता ॥ दुजें निर्दळी देखतां ॥ संसार हाणोनि लाता ॥

---

[1] करूं लागले. [2] वागवी. [3] माझे चित्तीं. [4] कळस. [5] ज्ञानाने. [6] तिन्हीं लोकांत. [7] हलकें. [8] मरणरूपीं समुद्रांत.

चढे माथां देवांच्या ॥ ४ ॥ चढोनि देवांचिया माथां ॥ शेखीं गिळी देवभक्तता ॥ मग सच्चिदानंदस्वानंदता ॥ निजात्मता स्वयें झाला ॥ ५ ॥ तेथ सच्चिद आनंद ॥ हाही नाहीं त्रिविध भेद ॥ सदोदित परमानंद ॥ स्वानंद शुद्ध कोंदला ॥ ६ ॥ नश्वर त्यागाचिये स्थिती ॥ अनश्वरातें संत ह्मणती ॥ जडांची करितां निवृत्ती ॥ चिद्रूपें ह्मणती वस्तूतें ॥ ७ ॥ जेथ दुःखाचा नाहीं बाधू ॥ त्यातें ह्मणती आनंदू ॥ एवं सच्चिदानंदशब्दू ॥ ज्ञानसंबंधू मायिक ॥ ८ ॥ वस्तु संत ना असंत ॥ चिदानंद नव्हे अचिंत ॥ ते सुखदुःखातीत ॥ जाण निश्चित सन्मात्र ॥ ९ ॥ हा अठाविशींचा निजबोध ॥ उद्धवासि तुष्टोनि गोविंद ॥ देता झाला आनंदकंद ॥ भाग्यें अगाध तो एक ॥ ७१० ॥ सांडोनि निजधामा जाणें ॥ स्वयें श्रीकृष्ण त्याकारणें ॥ देता झाला निजगुह्यठेवणें ॥ त्याचें भाग्य वानणें तें किती ॥ ११ ॥ जें नेदीच पित्या वसुदेवासी ॥ जें नेदीच बंधु बळभद्रासी ॥ जें नेदीच पुत्रा प्रद्युम्नासी ॥ तें उद्धवासी दीधलें ॥ १२ ॥ जें नेदीच देवकीमातेसी ॥ जें नेदीच कुंती आतेसी ॥ शेखीं नेदीच यशोदेसी ॥ तें उद्धवासी दीधलें ॥ १३ ॥ ह्मणाल सांगीतलें अर्जुनासी ॥ तो अत्यंत पढियंता त्यासी ॥ त्याहातीं उतरावया धराँभारासी ॥ युद्धीं त्वरेंसी उपदेशिला ॥ १४ ॥ तैसें नव्हे उद्धवाकडे ॥ सावकाश निजनिवाडें ॥ गुप्त ठेवणें फाडोवाडें ॥ अवघें त्यापुढें अर्पिलें ॥ १५ ॥ पित्याचिया निजधनासी ॥ स्वामित्व लाभे निजपुत्रासी ॥ तेवीं कृष्णाचिया गुह्यज्ञानासी ॥ झाला मिराशी उद्धव ॥ १६ ॥ पांडवांमाजी धन्य अर्जुन ॥ यादवांमाजी उद्धव धन्य ॥ या दोघांच्या भाग्यासमान ॥ न दिसे आन त्रिजगतीं ॥ १७ ॥ सकळसाराचा निजसारांश ॥ तो हा एकादशीं अठाविस ॥ जेवीं यतींमाजी परमैंहंस ॥ तेवीं अष्टाविंश भागवतीं ॥ १८ ॥ जेवीं क्षीराब्धीमाजी शेषशयन ॥ त्याहीवरी जैसा नारायण ॥ तेवीं भागवतांमाजी जाण ॥ विराजमान अष्टाविंश ॥ १९ ॥ एवढें या महत्त्वाचें वैभव ॥ कृष्णकृपेनें पावला उद्धव ॥ बाप निजभाग्याची धांव ॥ ब्रह्म स्वयमेव स्वयें झाला ॥ ७२० ॥ जेवीं वैकुंठ परम पावन ॥ त्यावरी विराजे श्रीभगवान ॥ तेवीं भागवतामाजी जाण ॥ विराजमान अष्टाविंश ॥ २१ ॥ उद्धव झाला ब्रह्मपूर्ण ॥ त्यासि कृष्णकृपा प्रमाण ॥ तें मी वाखाणीं अज्ञान ॥ देशभाषण प्राकृत ॥ २२ ॥ अंधासि सूर्य प्रसन्न ॥ झालिया देखे तो निधान ॥ तेवीं प्रकटोनि जनार्दन ॥ हें गुह्यज्ञान बोलवी ॥ २३ ॥ जनार्दन प्रकटला आतां ॥ हें बोलणें माझी मूर्खता ॥ तो स्वतः सिद्ध सदा असतां ॥ हेंही झालों मी जाणता त्याचिया कृपा ॥ २४ ॥ त्याचिया कृपें ऐसें झालें ॥ माझें मीपण निःशेष गेलें ॥ नेलें पण देखों नाहीं दीधलें ॥ जेवीं सूर्यें केलें अंधारा ॥ २५ ॥ मज कृपा करील जनार्दन ॥ हेंही नेणें मी अज्ञान ॥ तेणें दयाळुवें कृपा

---

१ अचेतनाची. २ चैतन्यरूप. ३ आवडता. ४ पृथ्वीचा भार. ५ परमहंस ह्मणजे यतीमध्यें एक भेद आहे.


अध्याय २७ वा.
श्रीकृष्ण
उद्धव:

श्रीगणेशाय नमः॥ ॥ओंनमो देव सहज निज ॥तूं विश्वात्मा चतुर्भुज ॥ अष्टभुज तूं विश्वभुज॥गुरुत्वें तुज गौरव॥ १ ॥ निजशिष्याचिया भावार्था॥तूं गुरुनामें अभयदाता ॥ अभय देऊनि तत्त्वतां ॥ भवभयव्यथा निवारिसी॥ २ ॥ निवारूनि जन्ममरण॥आपण्या भेटसी आपण॥तेव्हां गुरुशिष्यनाम संपूर्ण ॥ तुझें एकपण आभासे ॥ ३ ॥तें एकपण पाहतां दिठीं ॥एका जनार्दनीं पडे मिठी ॥ गुरुत्वें कोंदे सकळ सृष्टी॥ आनंदपुष्टीं जग नांदे ॥ ४ ॥ तो स्वानंदैकचिद्घन ॥ जगद्गुरु जनार्दन ॥ एका जनार्दना शरण ॥ एकीं एकपण दृढ केलें ॥ ५॥ दृढ केलें एकपण ॥ तेंही सद्गुरु झाला पूर्ण ॥ तेथें खुंटलें मीतूंपण ॥ एका जनार्दन एकत्वें ॥ ६॥ यापरी एकाकी एकला ॥ एका जनार्दनें कवयिता[2] केला ॥ तो एकादशाचा पावला ॥ सहजलीला एकत्वबोध ॥ ७ ॥ त्या एकत्वाची निजस्थिती ॥ पावला पुरूरवा भूपती ॥ दृढ अनुतापविरक्ती ॥ भगवद्भक्ती सत्संगें ॥ ८ ॥ हें सव्विसावे अध्यायीं जाण ॥ स्वमुखें बोलिला श्रीकृष्ण ॥ सत्संगें भगवद्भजन ॥ तेणें वैराग्य पूर्ण साधकां ॥ ९॥ न करितां भगवद्भक्ती ॥ कदा नुपजे विरक्ती ॥ विरक्तीवीण भगवत्प्राप्ती ॥ नव्हे कल्पांतीं साधकां ॥ १० ॥ ऐसें बोलिला श्रीकृष्ण ॥ तेंचि स्वयें जीवीं धरून ॥ भगवद्भक्ति पूजाविधान॥ क्रियायोग जाण पुसत ॥ ११ ॥

श्लोक ॥ ॥ उद्धव उवाच ॥ ॥ क्रियायोगं समाचक्ष्व भवदाराधनं प्रभो ॥ यस्मात्त्वां ये यथार्चंति सात्वता सात्वतर्षभ ॥१॥

॥ टीका ॥ निजभक्तें[3]अनुग्रहार्थ ॥ सत्वमूर्ती तूं अनंत ॥ तुझे निजभक्त जे सात्वत ॥ ते तुज पूजित कोणें विधीं ॥ १२ ॥ तें साधूचें आराधन ॥ तुझें क्रियायोग निजपूजन॥ कृपा करोनियां आपण ॥ मज संपूर्ण सांगावें ॥ १३ ॥ म्हणसी आणिकांतें पुसावें॥हें माझेनि सर्वथा नव्हे॥ तुज सांडूनि दूरि जावें ॥ हे लाजही जीवें साहवेना ॥ १४ ॥ मी तुझा दास जीवें भावें ॥ तुझेनि प्रभुत्वें[4]गौरवें ॥ मी कलिकाळा नागवें[5] ॥ कृपाप्रभवें तुझेनी ॥ १५ ॥ तूं कृपाळु कृपायुक्त ॥ कृपेनें होसी भक्तांचा [illegible]क ॥ त्या तुझा मी चरणांकित ॥ सलगीं[6] गुह्यार्थ स्वयें पुसें ॥ १६ ॥ इतका करूनि अत्यादर ॥ कां पुससी पूजाप्रकार ॥ हा श्रेष्ठश्रेष्ठीं केला विचार॥ तो निजनिर्धार अवधारी ॥ १७ ॥

॥ श्लोक॥ ॥ एतद्वदंति मुनयो मुहुर्निःश्रेयसं नृणाम ॥ नारदो भगवान् व्यास आचार्योंऽगिरसःसुतः ॥२॥

टीका ॥ ॥ पूर्वी वेदाचारनिष्ठ ॥ सुरवर मुनिश्रेष्ठ ॥ हेंचि अनुवादले[7] स्पष्ट ॥ अतिवरिष्ठ विवेकी ॥ १८ ॥ पूजाविधान प्रसिद्ध ॥ बोलिला देवर्षि नारद ॥ अंगिराचा पुत्र अगाध॥ देवगुरु[8] प्रबुद्ध हेंचि बोले ॥ १९ ॥ जो व्यास सत्यवतीसुत ॥ जो कां नारायण मूर्तिमंत ॥ जेणें प्रकट केला वेदार्थ॥ जो विख्यात महाकवी॥ २० ॥ पुराणकर्ता तो सांग ॥ यालागीं व्यासोच्छिष्टमिदं जग ॥ तेणेंही भगवत्पूजामार्ग ॥ हा क्रियायोग

---

१ स्वतःच. २ कविता करणारा. ३ आपल्या दासावर कृपा करावी म्हणून. ४ स्वामीच्या बळावर. ५ जिंकितों. ६ मित्रपणानें. ७ बोलले. ८ बृहस्पति.

बोलिजे ॥ २१ ॥ असो इतरांची चावटी ॥ जो पितामह[1] सकळस्रष्टी ॥ जो जन्मला विष्णूच्या पोटीं ॥ तेणेंही या गोष्टी दृढ केल्या ॥ २२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ निःसृतं ते मुखांभोजाद्यदाह भगवानजः ॥ पुत्रेभ्यो भृगुमुख्येभ्यो देव्यै च भगवान् भवः ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ तुवांचि कल्पाचिया आदीं ॥ हेचि पूजाविधानविधी ॥ उपदेशिला पुत्रबुद्धीं ॥ स्वयें त्रिशुद्धी विधातां ॥ २३ ॥ तेणेंही कल्पादीसि आपण ॥ नाभिकमळासनीं बैसोन ॥ भृगुकश्यपादिपुत्रांसि जाण ॥ हें पूजाविधान उपदेशी ॥ २४ ॥ श्रीमहादेवेंही आपण ॥ हें क्रियायोगविधिविधान ॥ भावें भवानीसि जाण ॥ केलें निरूपण एकांतीं ॥ २५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एतद्वै सर्ववर्णानामाश्रमाणां च संमतम् ॥ श्रेयसामुत्तमं मन्ये स्त्रीशूद्राणां च मानद ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ एवं श्रेष्ठपरंपरा ॥ तुवां प्रकट केली दीनोद्धारा ॥ दीनदयाळु तूं खरा ॥ याही विचारा अवधारीं ॥ २६ ॥ आश्रमधर्मविधिविधान ॥ तेथ अधिकारी द्विजन्मजन ॥ त्यांसि कर्मबाधा बाधी गहन ॥ गुंतले ब्राह्मण कर्मठत्वें ॥ २७ ॥ तैसें नव्हे तुझें भजन ॥ भजनाधिकारी सर्व वर्ण ॥ दीनोद्धारी भजन पूर्ण ॥ स्त्रिया शूद्रजन उद्धरिले ॥ २८ ॥ कर्मीं गुंतले उत्तमोत्तम ॥ भजनें उद्धरिले अधमाधम ॥ भजनें सर्वांसही सुगम ॥ भजनें स्वधर्म सार्थक ॥ २९ ॥ भजनमहिमा निःसीम ॥ अधमा पदवी उत्तमोत्तम ॥ भजनहीन जे उत्तमोत्तम ॥ ते अधमाधम स्वयें होती ॥ ३० ॥ सर्ववर्ण आणि आश्रम ॥ भगवद्भजनें गति उत्तम ॥ हें भक्तीचें निजवर्म ॥ भक्त निष्काम जाणती ॥ ३१ ॥ करूनियां भगवद्भक्ती ॥ स्वयें भगवद्रूप होती ॥ यालागीं भक्तांतें श्रीपती ॥ अतिप्रीतीं मानितू ॥ ३२ ॥ तुझें भजन पूजन करितां ॥ तूं निजभक्तांसि होसी त्राता ॥ तूंचि भक्तांसि होसी सन्मानदाता ॥ ते पूजनकथा मज सांग ॥ ३३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एतत्कमलपत्राक्ष कर्मबंधविमोचनम् ॥ भक्ताय चानुरक्ताय ब्रूहि विश्वेश्वरेश्वर ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ कमळनाभि नारायणा ॥ भक्तविश्राम कमळवदना ॥ कम[3]लालया कमलनयना ॥ विनंती श्रीकृष्णा अवधारीं ॥ ३४ ॥ तुवां पाहिल्या कृपादृष्टीं ॥ तत्काळ पैं उठाउठी ॥ सुटती कर्मबंधाच्या गांठी ॥ स्वानंद पुष्टी निजभक्तां ॥ ३५ ॥ जेवीं घृतां[4]चें कठिणपण ॥ क्षणें विरवी सूर्यकिरण ॥ तेवीं कर्मबंधा निर्दळण ॥ तुझें रूपावलोकन करी कृष्णा ॥ ३६ ॥ कां सैंधवा[5]चा महागिरी ॥ जेवीं विरे सिं[6]धुमाझारी ॥ तेवीं कर्मबंधा बो[7]हरी ॥ तुझी कृपा करी श्रीकृष्णा ॥ ३७ ॥ तुझी झालिया कृपादृष्टी ॥ कर्माकर्मांसि पडे तुटी ॥ जेवीं सूर्योदयापाठीं ॥ नातुडे भेटी खद्यो[8]तें ॥ ३८ ॥ तमीं दाटती खद्योतकोडी ॥ तेवीं अज्ञानीं कर्मांची आवडी ॥ तुझी कृपा सूर्य जोडल्या जोडी ॥ जाती बापुडीं विसरोनी ॥ ३९ ॥ ऐशिया निष्कर्मकृपायुक्त ॥ तुझेनि वृत्तीं नांदती निजभक्त ॥ जे कां विषयीं अतिविरक्त ॥ सदा अनु[10]रक्त

---

[1] ब्रह्मा. [2] ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य. [3] श्रीनिवास. [4] तुपाचें. [5] मिठाचा. [6] समुद्रामध्यें. [7] नष्ट. [8] काजवा. [9] लाभ. [10] आसक्त.

हरिचरणीं ॥ ४० ॥ तें पूर्णकृपेचें आयतन[1] ॥ तुझें भजन पूजाविधान ॥ तें मज सांग कृपा करून ॥ मी अतिदीन पैं तुझें ॥ ४१ ॥ ह्मणसी तुज अधिकार नाहीं ॥ परी मी शरण तुझ्या पायीं ॥ शरणागताची तुझ्याठायीं ॥ उपेक्षा[2] नाहीं श्रीकृष्णा ॥ ४२ ॥ तुवां उद्धरिलें पशुगीध[3]गजांसी ॥ गणिके तारिलें कुंटणीसी[4] ॥ तेंचि कृपा करीं आह्मासी ॥ हृषीकेशी कृपाळुवा ॥ ४३ ॥ ह्मणसी ब्रह्मा शिव असतां सृष्टीं ॥ मजचि पुसायाची श्रद्धा मोठी ॥ कैसेनि पां वाढली पोटीं ॥ ऐक ते गोठी सांगेन ॥ ४४ ॥ ब्रह्मा जगाचा कर्ता होये ॥ तोही विसरला निजात्मसोये॥तो तुझ्या पोटा येऊनि पाहे॥निजज्ञान लाहे तुझेनी ॥४५॥ शिव पायवणी वाहे माथां ॥तुझें नाम सदा जपतां॥तुझे कृपेस्तव तत्त्वतां ॥ तोही निजात्मता पावला ॥ ४६ ॥ यालागीं तूं ईश्वराचा ईश्वर ॥ नियंत्यां नियंता सर्वेश्वर॥ विश्वीं विश्व विश्वंभर॥ विश्वेश्वर तूं कृष्णा ॥४७॥ यापरी तूं ज्ञानविधी ॥ पूर्ण बोधाचा उदधी॥ जेणें होय निजात्मसिद्धी ॥ ते पूजाविधी मज सांग ॥४८॥ ऐसा भक्तवचनें तो संतोषला ॥ पूर्ण निजबोधें द्रवला ॥ निजात्मकृपें कळवळला ॥ काय बोलिला श्रीकृष्ण ॥ ४९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ नह्यंतोऽनंतपारस्य कर्मकांडस्य चोद्धव ॥ संक्षिप्तं वर्णयिष्यामि यथावदनुपूर्वशः ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ ज्याचें ऐकतां वचन ॥ वेदवाक्या पडे मौन ॥ ज्याची करितां आठवण ॥ मनपणा मन स्वयें मुके ॥ ५० ॥ जो वेदार्थप्रकाशक ॥ जो अर्कांचा[5] आदि अर्क[6] ॥ तो उद्धवासि यदुनायक ॥ स्वमुखें देव बोलत ॥ ५१ ॥ आगम[7]निगमोक्तप्रकार ॥ माझी पूजाविधि सविस्तर ॥ सांगतां अनंत अपार ॥ न कळे पार ब्रह्मादिकां ॥ ५२ ॥ उद्धवा ऐक पां तत्त्वतां ॥ मी देवादिदेव झालों वक्ता ॥ तरी पूजाविधानकथा ॥ समूळ सर्वथा न सांगवे ॥ ५३ ॥ जरी झाले अतिसज्ञान ॥ तरी पूजाविधिविधान ॥ सांगावया समर्थपण[8] ॥ सर्वथा जाण असेना ॥ ५४ ॥ एवं पूर्वोक्तप्रकार ॥ आगमनिगमनिजसार ॥ निवडूनि संक्षेपाकार[9] ॥ तुज मी साचार सांगेन ॥ ५५ ॥ पूजाविधि निजसार ॥ त्रिविध विधान त्रिप्रकार ॥ ऐक त्याचाही विचार ॥ विधि उपचारविभागें॥५६॥ ॥श्लोक ॥ ॥ वैदिकस्तांत्रिको मिश्र इति मे त्रिविधो मखः॥ त्रयाणामीप्सितेनैव विधिना मां समर्चयेत् ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ वेदींचे मंत्र वेदींचें अंग[10] ॥ वेदोक्त माझी पूजा सांग ॥ या नांव गा वैदिक मार्ग ॥ आगम प्रयोग तो ऐक ॥ ५७ ॥ आगममंत्र आगमचि अंग ॥ माझी आगमोक्त पूजा सांग ॥ या नांव गा तंत्रमार्ग ॥ मिश्रप्रसंग तो ऐक ॥ ५८ ॥ वेदींचे मंत्र तंत्रींचें[11] अंग ॥ एवं मिश्रित विभाग ॥ माझी पूजा निपजे सांग ॥ मिश्रमार्ग या नांव ॥५९॥

---

[1] स्थान. [2] हयगय. [3] सुग्रीवादि जटायु, संपाति, गजेंद्र यांस. [4] पिंगलेस. [5] सूर्यांचा. [6] प्रकाशक, प्रकाश देणारा. [7] वेदशास्त्रांत सांगितलेला. [8] सामर्थ्य. [9] थोडक्यांत. [10] विधि, साहित्य वगैरे. [11] आगमांतील.

हे त्रिविधविधि पूजा सांग ॥ तो जाण माझा त्रिविध याग ॥ येणें मी संतोषें श्रीरंग ॥ पा[1]र्श्वदेशीं सांग सपरिवार ॥ ६० ॥ ऐसें माझें
त्रिविध भजन ॥ जेथ ज्याची श्रद्धा पूर्ण ॥ त्याविधीं करितां पूजन ॥ मज तृप्ति समान भावा[2]र्थें ॥६१॥ भावार्थें जें माझें पूजन ॥ तेणें
मी संतृप्त जनार्दन ॥ हा आगमोक्त यज्ञ संपूर्ण ॥ त्रिविध लक्षण समसाम्यें ॥ ६२ ॥ वैदिकादि त्रिविध गती ॥ पूजितां तृप्त मी श्री
पती ॥ पूजाधिकाराची स्थिती ॥ ऐक तुजप्रती सांगेन ॥ ६३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदा स्वनिगमेनोक्तं द्विजत्वं प्राप्य पूरुषः ॥ यथा यजेत
मां भक्त्या श्रद्धया तं निबोध मे ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ द्विजन्मे जे तिन्ही व[3]र्ण ॥ त्यांचें अधिकारलक्षण ॥ गर्भाष्टमीं उपन[4]यन ॥ तें अधि
कारपूर्ण ब्राह्मण ॥ ६४ ॥ क्षत्रियांचा अधिकारशुद्ध ॥ बारावर्षां व्रतबंध ॥ सोळावर्षां प्रसिद्ध ॥ व्रतबंध वैश्यांसी ॥६५॥ गायत्रीउप
देश पावोन ॥ दुसरें जन्म उपनयन ॥ या नांव सावित्र जन्म जाण ॥ द्विजन्मे [illegible]वर्ण वेदोक्तविधी ॥ ६६ ॥ वेदोक्त अधिकारलक्षण ॥
या नांव उद्धवा जाण ॥ आतां माझें पूजाविधिवि[5]धान ॥ ऐक संपूर्ण निजभक्ता ॥६७॥ ॥ श्लोक ॥ ॥ अर्चायां स्थंडिलेऽग्नौ वा सूर्ये
वाऽप्सु हृदि द्विजे ॥ द्रव्येण भक्तियुक्तोऽर्चेत्स्वगुरुं माममायया ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ माझें पूजावया अधिष्ठान ॥ अष्टवि[6]ध पूजास्थान ॥
त्याचेंही निजलक्षण ॥ उणखूण ते ऐक ॥६८॥ प्रियप्रतिमा पूजास्थान ॥ हें माझें प्रथम अधिष्ठान ॥ कां पृथ्वीतळीं स्थंडिलीं जाण ॥
पूजास्थान दुसरें ॥ ६९ ॥ अग्नीचें तेज स्वरूप माझें ॥ तें पूजास्थान जाण तिजें ॥ सूर्यमंडळीं जे पूजा कीजे ॥ तें चवथें माझें पूजा
स्थान ॥ ७० ॥ उदकीं जें माझें पूजन ॥ तें पांचवें पूजास्थान ॥ हृदयीं जें माझें आवाहन ॥ तें पूजास्थान सहावें ॥७१॥ शालग्राम
केवळ अचेतन ॥ ब्राह्मण माझें स्वरूप सचेतन ॥ तें अखंडत्वें ब्रह्मपूर्ण ॥ पूजा सन्मान षोडशोपचार ॥ ७२ ॥ ब्राह्मणीं ज्याचा ब्रह्म[7]
भावो ॥ तो परमभाग्याचा स्वयमेवो ॥ ब्रह्मादिकां पूज्य पहाहो ॥ मी देवाधिदेवो स्वयें वंदीं ॥ ७३ ॥ सकळपूज्यांमाजी जाण ॥ मुख्य
त्वें पूज्य ब्राह्मण ॥ तें सातवें पूजास्थान ॥ उद्धवा जाण अतिश्रेष्ठ ॥ ७४ ॥ स[illegible]ळपूज्यां पूज्यत्वें पूजा ॥ जो वरिष्ठा वरिष्ठत्वें वोजा ॥
जो विनटला आत्मा माझा ॥ वंद्य गुरुराजा सर्वांसी ॥ ७५ ॥ सद्भावें ज्याचे धरितां चरण ॥ मी सुखावें ब्रह्म पूर्ण ॥ ज्याचें सद्भावें
करितां स्तवन ॥ मी परमात्मा जाण उल्हासें ॥ ७६ ॥ सद्गुरूचें नामस्मरण ॥ निर्दळी भवभ[9]यं दारुण ॥ निवारोनि जन्ममरण ॥ निववी
संपूर्ण निजबोधें ॥७७॥ तो मी परमात्मा नारायण ॥ गुरुरूपें प्रकटोनि जाण ॥ परब्रह्माचें पूर्णपण ॥ शिष्यद्वारा संपूर्ण प्रकाशक ॥७८॥
ब्रह्माचें परब्रह्म पण ॥ सद्गुरूचेनि सत्य जाण ॥ एव्हडें अगा[10]ध महिमान ॥ अतिगहन गुरूचें ॥७९॥ एवं सद्गुरु ज्ञानघन ॥ जो हरिहरां वंद्य

---

१ समीपभागीं. २ भक्तिपूर्वक. ३ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य. ४ मुंज. ५ पूजेचा प्रकार. ६ आठप्रकारचें. ७ ईश्वरबुद्धि. ८ शरण गेला असतां. ९ संसाराचें भय. १० अंत न लागणारें.

पूर्ण ॥ तो माझें सद्रूप अधिष्ठान ॥ हें पूजास्थान आठवें ॥ ८० ॥ जें आठवें पूजास्थान ॥ तें अखंड आठवे आठवण ॥ तेणें आठवें सांग संपूर्ण ॥ उद्धवा जाण मी पूजिलों ॥ ८१ ॥ एवं हीं आठ पूजास्थानें ॥ तुज सांगीतलीं सुलक्षणें ॥ तेथलीं पूजेचीं लक्षणें ॥ तेंही भिन्नपणें सांगेन ॥८२॥ सकळ अधिष्ठाना गोडपण ॥ जे पूजनीं होय संपूर्ण ॥ ते पूजेचें मुख्य लक्षण ॥ निजवर्म खूण ते ऐक ॥८३॥ सांडूनि लोकरंजनव्यापार[1] ॥ त्यजूनि दांभिक उपचार ॥ दवडूनि शठत्वाचा[2] व्यवहार ॥ भजनतत्पर सद्भावें ॥ ८४॥ हीं अष्टौ महापूजास्थान ॥ येथ मायिक जें जें भजन ॥ तेंतें अतिगोड पूजन ॥ उद्धवा जाण निश्चित ॥८५ ॥ एथ निष्कपट जेजे सेवा ॥ तेते अतिवल्लभ[3] देवाधिदेवा ॥ आतां पूजाविधि आघवा ॥ ऐक बरवा सांगेन ॥ ८६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पूर्वं स्नानं प्रकुर्वीत धौतदंतोऽगशुद्धये ॥ उभयैरपि च स्नानं मंत्रैर्मृद्ग्रहणादिभिः ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ मळत्याग दंतधावन ॥ यथाकाळीं करूनि जाण ॥ देहशुद्ध्यर्थ करूनि स्नान ॥ मृत्तिकाग्रहणपूर्वक ॥ ८७ ॥ ऐसें झालिया मळत्यागस्नान ॥ मग करावें मंत्रस्नान ॥ वैदिक तांत्रिक विधान ॥ दीक्षा ग्रहण यथाविधि ॥ ८८ ॥ जैसा सद्गुरुसंप्रदाये ॥ तैसा चालवावा आचार्यें[4] ॥ त्या विधि स्नान करूनि पाहे ॥ निर्मळ भावे धरावा ॥ ८९ ॥ ॥ श्लोक ॥ संध्यापास्त्यादिकर्माणि वेदेनाचोदितानि मे ॥ पूजां तैः कल्पयेत्सम्यक् संकल्पः कर्मपावनीम् ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ वर्णाश्रमनिजविधीसी ॥ वेदें संध्या बोलिली जैसी ॥ ते ते वर्णाश्रमीं तैसी ॥ नित्यनैमित्त्येंसी करावी ॥ ९० ॥ वेदोक्त आचरावें स्वकर्म ॥ निःशेषें[5] त्यागावें निषिद्ध काम्य ॥ या नांव शुद्ध स्वधर्म ॥ उत्तमोत्तम अधिकारू ॥ ९१ ॥ वेदोक्त सांडणें स्वधर्म ॥ हाचि मुख्यत्वें अतिअधर्म ॥ हाता अलिया परब्रह्म ॥ न त्यागितां कर्म स्वयें राहे ॥ ९२ ॥ स्वयें स्वधर्म जो सांडणें ॥ तेंचि अधर्मांचें मुख्य ठाणें ॥ स्वधर्में चित्तशुद्धि साधणें ॥ यालागीं त्यागणें अहंता ॥ ९३ ॥ तेथें स्वधर्मकर्म आचरतां ॥ ऐसा भाव उपजे चित्तां ॥ मी नव्हें एथ कर्मकर्ता ॥ फळभोक्ता मी नव्हें ॥ ९४ ॥ देह जड मूढ अचेतन ॥ त्यासि चेतवीं[6] जनीं जनार्दन ॥ तेथ माझें मी कर्तेपण ॥ सर्वथा जाण रिघेना ॥ ९५ ॥ या बुद्धीचें कर्माचरण ॥ तें भावार्थं भावी ब्रह्मार्पण ॥ यापरी निरभिमान ॥ माझें उपासन साधकां ॥ ९६ ॥ माझी प्रतिमा पूजाविधान ॥ तें प्रथम माझें स्थान ॥ तें प्रतिमाक्रियालक्षण ॥ ऐक संपूर्ण उद्धवा ॥ ९७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शैला दारुमयी लौही लेप्या लेख्या च सैकती ॥ मनोमयी मणिमयी प्रतिमाष्टविधा स्मृता ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ अष्टधा[7] प्रतिमास्थिती ॥ ज्या पूजितां सद्यः[8] श्रेयें[9] देती ॥ ऐशिया प्रतिमांची जाती ॥ ऐक तुजप्रती सांगेन ॥ ९८ ॥ गंडक्यादि[10] शिळामूर्ती ॥ कां दारु ब्रह्म काष्ठव्यक्ती ॥ अथवा सुवर्णादिधातुमूर्ती ॥

---

[1] लोकांस बरें वाटण्याकरितां उद्योग. [2] धूर्तपणाचा. [3] अतिशय आवडणारी. [4] आचार. [5] सर्व. [6] वागवितो. [7] आठप्रकारची. [8] तत्काळ. [9] उत्तम फल. [10] शाळग्राम शिळेच्या प्रतिमा.

सद्यः फळती साधकां ॥ ९९ ॥ मृत्तिका कापडकीटणमूर्ती ॥ या नांव लेप्या ह्मणिजेती ॥ कां कागदीं लिहिल्या अतिप्रीतीं ॥ त्या लेख्य
मूर्ती पूजकां ॥ १०० ॥ वाळुवेची जे केली मूर्ती ॥ ती नांव सिकतामूर्ति ह्मणती ॥ तेही पूज्य गा निश्चितीं ॥ सुवर्णव्यक्तीसमान[1] ॥ १ ॥
मूर्ती रत्नमयी कां सोज्ज्वळ ॥ हिरा मरकत[2] इंद्रनीळ ॥ पद्मराग मुक्ताफळ ॥ या मूर्ति केवळ अतिपूज्य ॥ २ ॥ मूर्तीमाजी अतिप्राधान्य[3] ॥
मनोमयी मूर्ति पावन ॥ जिचें करितां उपासन ॥ समाधान साधकां ॥ ३ ॥ तेंचि प्रतिमापूजाविधान ॥ स्थावरजंगमलक्षण ॥ तेही
अर्थीचें निरूपण ॥ विशद् श्रीकृष्ण सांगत ॥ ४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ चलाचलेति द्विविधा प्रतिष्ठा जीवमंदिरम् ॥ उद्वासावाहने नस्तः स्थिरा
यामुद्धवार्चने ॥१३॥ ॥ टीका ॥ ॥ चेतनाचेतनप्रकार ॥ जडातें जीववी साचार ॥ जीवशब्दें चिन्मात्र ॥ मुख्य परमेश्वर बोलिजे ॥ ५॥
भक्तभावार्थें साचार ॥ त्या जीवाचें निजमंदिर ॥ प्रतिमा जंगम स्थावर आगमशास्त्रसंमतें ॥ ६ ॥ तेथ स्थावरमूर्तिपूजन ॥ साधकें
करितां आपण ॥ नलगे आवाहन विसर्जन ॥ तेथ अधिष्ठान स्वयंभ ॥ ७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अस्थिरायां विकल्पः स्यात् स्थंडिले तु
भवेद्द्वयम् ॥ स्नपनं त्वविलेप्यायामन्यत्र परिमार्जनम् ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ जंगमप्रतिमांच्या ठायीं ॥ आवाहनविसर्जन पाही ॥ एकीं
आहे एकीं नाहीं ॥ ऐक तेंही विभाग ॥ ८ ॥ शालग्राममूर्तीसि जाण ॥ स्वयंभ माझें अधिष्ठान ॥ तेथ आवाहनविसर्जन ॥ सर्वथा
जाण लागेना ॥ ९ ॥ शालग्रामाचा कुटका[4] ॥ ज्याचे पूजेसि आहे फुटका ॥ तेथ परमात्मा निजसखा ॥ सर्वदा देखा नांदत ॥ ११० ॥
इतरमूर्ति जंगम जाण ॥ तेथ आवाहनविसर्जन ॥ साक्षेपें करावें आपण ॥ हें विधिविधान आगमोक्त ॥ ११ ॥ स्थंडिलीं मूर्तिआवाहन
॥ सर्वेंचि पूजांतीं विसर्जन ॥ हें उभयभावनाविधान ॥ स्थंडिलीं जाण आवश्यक ॥ १२ ॥ आपुले हृदयींचा चिद्घन[5] ॥ मूर्तीमाजी
कीजे आवाहन ॥ पूजांतीं करूनि विसर्जन ॥ देव हृदयीं जाण ठेवावा ॥ १३ ॥ एथ आपणचि ब्रह्म परिपूर्ण ॥ हेंचि व्हावया निज
स्मरण ॥ आवाहनविसर्जनें जाण ॥ निजात्मआवरण सांधकां ॥ १४ ॥ हा आगमींचा[6] निजात्मभावो ॥ आपलाची आपण देवो ॥
आपला आपण पूजक पहाहो ॥ हो निजात्म आठवो निजपूजे ॥ १५ ॥ देव होऊनि देव पूजिजे ॥ हे निजात्मपूजा गोडखाजें ॥ उपासनाकांडव्याजें ॥ उद्धवासि दीजे[7] श्रीकृष्णें ॥ १६ ॥ हे निजात्मता निजगोडी ॥ प्रतिपदीं नलभतां रोकडी ॥ उपासना तडातोडी ॥ कोण
रोकडी सोशील ॥ १७ ॥ हें आगमींचें निजगुह्य जाण ॥ प्रतिपदीं सुखसंपन्न ॥ साधक स्वयें होती चिद्घन[8] ॥ हें तेंचि उपासन उद्धवा
॥ १८ ॥ ऐसें ऐकतां वचन ॥ उद्धव स्वानंदें झाला पूर्ण ॥ धांवोनि धरिले श्रीकृष्णचरण ॥ ह्मणें समूळ निरूपण मज सांग ॥ १९ ॥

---

१ सोन्याच्या मूर्तीसारखी. २ पाच. ३ अतिश्रेष्ठ. ४ तुकडा. ५ परमात्मा. ६ शास्त्रांतील. ७ दिलें. ८ ईश्वरसरूप.

तंव देव ह्मणे स्थिर राहे ॥ जें हें आगमोक्त[1] गुह्य आहे ॥ तें माझे कृपेवीण पाहे ॥ प्राप्त नोहे साधकां ॥ १२० ॥ आगमोक्त गुह्य गह
न ॥ असों हें माझें गुप्तधन ॥ तुवां पुशिलें पूजाविधान ॥ ऐक सावधान उद्धवा ॥ २१ ॥ लेप्या लेख्या ज्या मूर्ति जाण ॥ त्यांसि कर
वेना स्नान ॥ इतरां मूर्तींसि स्नपन ॥ यथाविधान करावें ॥ २२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ द्रव्यैः प्रसिद्धैर्मद्यागःप्रतिमादिष्वमायिनः ॥ भक्तस्य
च यथालब्धैर्हृदि भावेन चैवही ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ पूजक सकाम होय चांग ॥ तैं पूजाद्रव्य व्हावें सांग ॥ पूजासाधन झालिया
व्यंग[2] ॥ फळ निर्व्यंग[3] उपजेना ॥ २३ ॥ भक्त निष्काम वाडेंकोडें ॥ तैं पूजाद्रव्याचें सांकडे[4] ॥ सर्वथा कांहीं न पडे ॥ भक्तभाव आवडे
भगवंता ॥ २४ ॥ तेथ अनायासें जें प्राप्त ॥ तेणें भगवंत होय तृप्त ॥ तोचि पूजायाग यथोक्त ॥ जाण निश्चित उद्धवा ॥ २५ ॥ निष्का
मवृत्तीं फलमूल ॥ दूर्वांकुर कां निर्मळ जळ ॥ इतकेन पूजा सांग सकळ ॥ होय अविकळ मद्भावें ॥ २६ ॥ जेथ माझा सद्भाव दृढ ॥
तेथ उपचारांचा कोण पाड ॥ भक्तांचा भावचि मज गोड ॥ सुख सुरवाड मद्भक्तीं ॥ २७ ॥ बाह्य उपचार जे कांहीं ॥ ते प्रतिमामूर्ति
पूजेंसि पाही ॥ मानसपूजेचें तंव ठायीं ॥ वाणी नाहीं उपचारा ॥ २८ ॥ तेथ मनचि होय माझी मूर्ती ॥ मनोमय उपचारसंपत्ती ॥
निर्लोभ जे मज अर्पिती ॥ तेणें मी श्रीपती संतुष्ट ॥ २९ ॥ प्रतिमादि अष्टौ पूजास्थान ॥ यथोक्त पूजेचें विधान ॥ तुज मी सांग[5] सांगेन
देईं अवधान उद्धवा ॥ १३० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्नानालंकरणं प्रेष्ठमर्चायामेव तूद्धव ॥ स्थंडिले तत्त्वविन्यासो वह्नावाज्यप्लुतं हविः ॥ १६ ॥
सूर्ये चाभ्यर्हणं प्रेष्ठं सलिले सलिलादिभिः ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रतिमामूर्ति पूजास्थान ॥ ते मूर्तींस जें महास्नपन ॥ या नांव बोलिजे स्ना
न ॥ सांग भूषण मुकुटादी ॥ ३१ ॥ जे लोकीं उत्तम प्रकार ॥ कां आपणासि जे प्रियकर ॥ जेजे अनर्घ्य अळंकार ॥ तेणें श्रद्धें[9] श्रीधर
पूजावा ॥ ३२ ॥ स्नान भोजन अलंकार ॥ सांग पूजा सपरिकर ॥ हा प्रतिमापूजाप्रकार ॥ ऐक विचार स्थंडिलाचा ॥ ३३ ॥ स्थंडिलीं
जें पूजास्थान ॥ तेथ तत्त्वांचें धरोनि ध्यान ॥ करावें तत्त्वविन्यासलेखन ॥ पूजाविधान या हेतू ॥ ३४ ॥ आत्मतत्त्वादिविवंचें[10] ॥ स्थं
डिलीं विवंचूनि साच ॥ हृदय शिर शिखा कवच ॥ नेत्र अस्त्र दिशांचें[11] निजपूजा ॥ ३५ ॥ अग्नीचे ठायीं जें पूजन ॥ तेथ माझें करूनि
ध्यान ॥ आज्यकृत हवि हवन ॥ हें पूजाविधान अग्नीचें ॥ ३६ ॥ अग्नि देवाचें वदनें[12] ॥ येणें विश्वासें संपूर्ण ॥ हविर्द्रव्य करितां हवन ॥
अग्निपूजन याहेतू ॥ ३७ ॥ सूर्याच्याठायीं प्रकाशमान ॥ मंडळात्मा सूर्यनारायण ॥ तेथ सौरमंत्रें उपस्थान[13] ॥ पूजाविधान याहेतू ॥ ३८ ॥
विचारितां श्रुतीचा अर्थ ॥ आपो नारायण साक्षात ॥ येथ पूजाविधान यथोक्त ॥ जळीं जळयुक्त तर्पण ॥ ३९ ॥ हृदयीं जें माझें पूजा

---

१ पंचरात्रांत सांगितलेलें. २ कमी. ३ सर्व. ४ संकट. ५ कथा. ६ यथास्थित. ७ लक्ष. ८ अमूल्य. ९ भक्तीनें. १० आत्मतत्त्वादिकांचा विचार. ११ दिग्बंधन. १२ तोंड. १३ स्तुति.

स्थान ॥ तेथें मनें मनाचें अर्चन ॥ मनोमय मूर्ति संपूर्ण ॥ पूजाविधान मानसिक ॥ १४० ॥ माझें मुख्यत्वें अधिष्ठान ॥ ब्रह्ममूर्ति जे
ब्राह्मण ॥ तेथील जें पूजाविधान ॥ आज्ञापालन दासत्वें ॥ ४१ ॥ ब्रह्मासि ज्याचेनि ब्रह्मपण ॥ तो सद्गुरु माझें पूजास्थान ॥ सर्वार्थी
श्रेष्ठ पावन ॥ तेथील पूजन तें ऐसें ॥ ४२ ॥ जीवें सर्वस्वेंसि आपण ॥ त्यासि रिघावें अनन्यशरण ॥ त्याच्या वचनासि प्राण ॥ निश्चयें
जाण विकावा ॥ ४३ ॥ गुरूची नीच[1] सेवा सेवन ॥ आवडीं करणें आपण ॥ हेंचि तेथील पूजाविधान ॥ येणें सुख संपूर्ण साधकां
॥ ४४ ॥ सद्गुरुसेवा करितां पाही ॥ ब्रह्मसायुज्य लागे पायीं ॥ गुरुसेवेपरतें कांहीं ॥ श्रेष्ठ नाहीं साधन ॥ ४५ ॥ सद्गुरुस्वरूप तें जाण ॥
अखंडत्वें ब्रह्म पूर्ण ॥ तेथें आवाहन विसर्जन ॥ सर्वथा आपण न करावें ॥ ४६ ॥ निष्कपटभावें संपूर्ण ॥ सद्गुरूसि जो अनन्यशरण ॥
त्याचे मीही वंदीं चरण ॥ येथवरी जाण तो धन्य ॥ ४७ ॥ निर्लोभभावें सह[illegible] ॥ पूजितां तोषे अधोक्षज ॥ त्या भावाचें निजगुज ॥
स्वयें यदुराज सांगत ॥ ४८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रद्धयोपाहृतं प्रेष्ठं भक्तेन मम वार्यपि ॥ १७ ॥ भूर्यप्यभक्तोपहृतं न मे तोषाय कल्पते ॥
गंधो धूपः सुमनसो दीपोऽन्नाद्यं च किंचन ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ ॥ माझ्याठायीं अतिप्रीतीं ॥ श्रद्धायुक्त अनन्यभक्ती ॥ भक्तभावें जळ
अर्पिती ॥ तेणें मी श्रीपती सुखावें ॥ ४९ ॥ तो जळबिंदु यथासुखें ॥ म्यां मुखीं झेलिजे आदिपुरुखें ॥ तंव भक्तिभावाचेनि हरिखें ॥
मी सुखरूप सुखें सुखावें देख ॥ १५० ॥ माझें त्रैलोक्यासि सुख ॥ ऐसा मीही सुखरूप देख ॥ त्या मज होय परम संतोख ॥ भाविकां
चें उदक सेवितां ॥ ५१ ॥ त्या जळबिंदूचिया साठीं ॥ रमा नावडे गोमटी[3] ॥ ब्रह्मा जन्मला माझे पोटीं ॥ तोही शेवटीं नावडे ॥ ५२ ॥
भाविकांचेनि उदक[4]लेखें ॥ मज वैकुंठही झालें फिंकें ॥ शेषशयनींची निद्रासुखें ॥ त्यांचींही तुकें[5] उतरलीं ॥ ५३ ॥ भाविकांच्या उदका
पुढें ॥ मज आणिक कांहीं नावडे ॥ तेथही गंधादिपूजा जोडे ॥ नैवेद्य चोखडे रसयुक्त ॥ ५४ ॥ ते पूजेचिये सुखप्राप्ती ॥ उपमा नाहीं
त्रिजगतीं ॥ ऐसा भाविकांचिये भक्तीं ॥ मी श्रीपती सुखावें ॥ ५५ ॥ भावें करितां भगवद्भक्ती ॥ मी कृतकृत्य झालों निश्चितीं ॥ ऐ
शिया निश्चयें जो भावार्थी ॥ त्याचेनि जळें संतृप्ती मज होय ॥ ५६ ॥ येर जो अभक्त दंभस्थितीं ॥ जींवीं द्रव्याशा बाह्य विरक्ती ॥
लौकिकप्रतिष्ठे पुरती ॥ माझी भक्ती जो मिरवी ॥ ५७ ॥ ऐशिया अभक्ताचिया स्थितीं ॥ छत्र चामर गजसंपत्ती ॥ मज अर्पितांही अ
भक्तीं ॥ सुखलेश चित्तीं उपजेना ॥ ५८ ॥ क्षीरनीर निवडी राजहंस ॥ तेथ निसूंदीधला कापुस ॥ तेवीं अभक्तजनीं संतोष ॥ मी हृषी
केश पावेंना ॥ ५९ ॥ कागांची[9] गायनकळा ॥ जेवीं तोषेना किंनरशाळा ॥ तेवीं अभक्ताची भजनलीला ॥ माझी चित्कळा तोषेना ॥ १६० ॥

---

१ नित्य. २ मोठ्या प्रेमानें. ३ सुंदर. ४ उदकबिंदूनें. ५ तुच्छ. ६ महत्त्वें. ७ मनांत. ८ दूध व पाणी. ९ कावळ्याची.

जेवीं रजस्वलेचें पक्वान्न ॥ उत्तम परी तें अतिहीन ॥ तेवीं अभक्तांचें भजन ॥ कदा जनार्दन स्पर्शेना ॥६१॥ ज्या भजना नातळे नारायण ॥ ऐसें जें अभक्तांचें भजन ॥ तेणें भजनें जनार्दन ॥ अणुमात्र जाण तोषेना ॥ ६२ ॥ एवं भक्ताभक्त भजनमार्ग ॥ दावूनि अधिकाराचे भाग ॥ आतां समूळ पूजामार्ग ॥ सांग श्रीकृष्ण सांगत ॥ ६३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शुचिः संभृतसंभारः प्राग्दर्भैः कल्पितासनः ॥ आसीनः प्रागुदग्वाऽर्चेदर्चायामथ संमुखः ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ ॥ करूनि मंगळ स्नान आपण ॥ वैदिक तांत्रिक मंत्रस्नान ॥ सारूनि नित्यविधान ॥ शुचित्वपण या नांव ॥ ६४ ॥ मग देवपूजासंभार ॥ शोधूनि करावे पवित्र ॥ यथास्थानीं पूजाप्रकार ॥ गंधादि उपचार ठेवावे ॥ ६५ ॥ श्वेतकंबल चैलाजिन ॥ पूर्वदर्भाग्रीं आसन ॥ पूर्वमुख बैसावें आपण ॥ अथवा जाण उदङ्मुख ॥ ६६ ॥ स्थावरमूर्ति पूजितां देख ॥ आसन करावें मूर्तिसंमुख ॥ हा आसनविधि निर्दोख ॥ पूजान्यासादिक हरि सांगे ॥ ६७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कृतन्यासः कृतन्यासां मदर्चां पाणिना मृजेत् ॥ कलशं प्रोक्षणीयं च यथावदुपसाधयेत् ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ विधियुक्त घालूनि आसन ॥ गुरूसि करावें नमन ॥ परमगुरुपरमेष्ठींसि जाण ॥ अभिवंदन अतिप्रीतीं ॥ ६८ ॥ जो मंत्र प्राप्त आपणास ॥ त्या मंत्राचे देहीं करावे न्यास ॥ मंत्रमूर्ति आणोनि ध्यानास ॥ पूजा मानसं[1] करावी ॥ ६९ ॥ जे मूर्ती आली ध्यानासी ॥ तेची आणावी या प्रतिमेसी ॥ हातीं धरोनियां अर्चेसी ॥ करावें न्यासासी प्रतिमाअंगीं ॥ १७० ॥ कलश आणि प्रोक्षणीय[2] जाण ॥ साधावीं यथाविधान ॥ जळें करोनियां पूर्ण ॥ दूर्वादिचंदन द्रव्ययुक्त ॥ ७१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तदद्भिर्देवयजनं द्रव्याण्यात्मानमेव च ॥ प्रोक्ष्य पात्राणि त्रीण्यद्भिस्तैस्तैर्द्रव्यैश्च साधयेत् ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥ तें प्रोक्षणीपात्रींचें जळ ॥ नखोदकं[3] न करितां निर्मळ ॥ तेणें पूजासंभार सकळ ॥ कुशाग्रें तत्काळ प्रोक्षावा ॥ ७२ ॥ तें प्रोक्षावें देवसदन ॥ आपणासि करावें प्रोक्षण ॥ प्रोक्षोनि देवपूजास्थान ॥ पूजा विधान मांडावें ॥ ७३ ॥ पाद्यअर्घ्य आचमनीयें ॥ तदर्थ मांडावें पात्रत्रयें[4] ॥ जळें पूर्ण करूनि पाहे ॥ भिन्न द्रव्य आहे पात्रत्रयासी ॥ ७४ ॥ श्यामाक[5] दूर्वा विष्णुक्रांता ॥ पाद्यपात्रीं हे द्रव्यशुद्धता ॥ गंध पुष्प फल अक्षता ॥ एवं कुशाग्रता अर्घ्यपात्रीं ॥ ७५ ॥ एळा वाळा जातीफळें[6] ॥ लवंग कर्पूर कंकोळ ॥ आचमनपात्रीं हा द्रव्यमेळ ॥ शुद्ध जळ समयुक्त ॥ ७६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पाद्यार्घ्याचमनीयार्थं त्रीणि पात्राणि देशिकः ॥ हृदा शीर्ष्णाऽथशिखया गायत्र्या चाभिमंत्रयेत् ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥ गुरुमंत्रदीक्षा जैसी ज्यासी ॥ तोचि निजमार्गें शिष्याशी ॥ तेणें पाद्यादि तिहीं पात्रांसी ॥ संप्रदायेंसी मांडावें ॥ ७७ ॥ पाद्य द्यावें हृदयमंत्रें ॥ अर्घ्य अर्पावें शिरोमंत्रें ॥ आचमन द्यावें शिखामंत्रें ॥

---

१ मनोमय उपचारानें. २ पात्रें. ३ नख ज्यांत घातलें असें. ४ तीन पात्रें. ५ सावे. ६ जायफळ.

गुरुसंस्कारें आगमोक्त[1] ॥ ७८ ॥ तेंचि तिनी पात्रें जाण ॥ गायत्रीमंत्रें आपण ॥ अभिमंत्रोनियां[2] पूर्ण ॥ देवार्पण करावीं ॥ ७९ ॥ गुरुसंप्रदायें नेटक ॥ यालागीं त्यातें देशिक ॥ स्वयें बोलिला यदुनायक ॥ दीक्षाविवेक निजद्रष्टा ॥ १८० ॥ आगमशास्त्रींचा निजमार्ग ॥ भूतशुद्धि प्राणप्रतिष्ठायोग ॥ तेणें अन्वयें[3] श्रीरंग ॥ श्लोकार्थें सांग सांगत ॥ ८१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पिंडे वाय्वग्निसंशुद्धे हृत्पद्मस्थां परां मम ॥ अण्वीं जीवकलां ध्यायेन्नादांते सिद्धभाविताम् ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ वायुबीजें आवाहूनी ॥ पिंगला प्राण पूरूनी[4] ॥ तोचि कुंभकें स्तंभूनी ॥ मात्रधारणीं धरावा ॥ ८२ ॥ वायु जो धारणा धरावा ॥ तो जंव फुटेना अव्हासव्हा ॥ तंवचिवरी निरोधावा ॥ मग रेचावा[5] शनैःशनैः[6] ॥ ८३ ॥ ऐसें करितां प्राणधारण ॥ स्वयें कल्पावें शरीरशोषण ॥ शरीर शोषलें मानूनि जाण ॥ देहदहन मांडावें ॥ ८४ ॥ आधारस्थित जो अग्नी ॥ तो अग्निबीजें चेतवूनी ॥ तो देह लावूनि दहनीं ॥ भस्म मानूनी निजदेह ॥ ८५ ॥ देह दहनें[7] अतिसंतप्त ॥ तेथ चंद्रबीजें चंद्रामृत ॥ आणोनि निववावे समस्त ॥ नवा देह तेथ कल्पावा ॥ ८६ ॥ देह कल्पावा जो एथ ॥ पूर्ण पाटवें[8] इंद्रियुक्त ॥ त्याच्या हृदयपद्मा आंत ॥ अण्वी जीवकळा तेथ पहावी माझी ॥ ८७ ॥ माझी जीवकळा परम ॥ सूक्ष्माहूनि अतिसूक्ष्म ॥ यालागीं अण्वी तिचें नाम ॥ विश्राम धाम जगाचें ॥ ८८ ॥ आकार उकार मकारस्थिती ॥ यांतें प्रकाशे अण्वी[9] जीव ज्योती ॥ ते तंव शब्दाहूनि परती ॥ योगी नांदती लक्षिजे ॥ ८९ ॥ ते देहीं सबाह्य परिपूर्ण ॥ असोनि सूक्ष्मत्वें अलक्ष्यं[10] जाण ॥ तीतें हृत्पद्मीं योगिजन ॥ लक्षिती आसनप्राणायामें ॥ १९० ॥ ते अण्वी जीवकळा अव्यक्त ॥ तीतें करोनियां व्यक्त ॥ योगी निजभावयुक्त ॥ हृदयीं चिंतित महामूर्ती ॥ ९१ ॥ नानाजीवसमूह जाण ॥ त्याचें जें आयतनस्थान ॥ ते महामूर्ति नारायण ॥ हृदयीं सज्जन चिंतिती ॥ ९२ ॥ ॥ श्लोक ॥ तयात्मभूतया पिंडे व्याप्ते संपूज्य तन्मयः ॥ आवाह्यार्चादिषुस्थाप्य न्यस्तांगं मां प्रपूजयेत् ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ जेवीं गृह प्रकाशी दीपस्थिती ॥ तेवीं देह प्रकाशी जीवज्योती ॥ ते सांगोपांग माझी मूर्ती ॥ हृदयीं चिंतिती साकार ॥ ९३ ॥ जेवीं तूप तूपपणें थिजलें ॥ तेंचि वर्णव्यक्ती आलें ॥ तेवीं चैतन्य माझें मुसावलें ॥ लीलाविग्रहें[10] झालें साकार ॥ ९४ ॥ ऐशी ते माझी सगुण मूर्ती ॥ चिन्मात्र ते हृदयदीप्ती ॥ तिणें व्यापूनि देहाची स्थिती ॥ चित्तीं निजभक्ती उपजवी ॥ ९५ ॥ देह जड मूढ अचेतन ॥ तेथ मूर्ति प्रकटोनि चिद्घन ॥ अचेतना करोनि सचेतन ॥ करवी निजभजन उल्हासें ॥ ९६ ॥ जेवीं हरणुलीचें सोंग जाण ॥ हरिणीरूपें नाचे आपण ॥ तेवीं भक्त

---

[1] पंचरात्रागमांत सांगितल्या प्रमाणें. [2] उदक सिंचन करून. [3] संबंधानें. [4] पूर्ण करून. [5] सोडून द्यावा. [6] हळुहळु. [7] अग्नीनें. [8] निपुणतेनें. [9] अत्यंत सूक्ष्म. [10] इंद्रियांस गोचर न होणारी. [10] लीला शरीरानें.

भावें नारायण ॥ भजनपूजन स्वयें कर्ता ॥ ९७॥ यापरी अभेदभजन ॥ मूर्ति पूजितां चिद्घन ॥ पूज्य पूजक हे आठवण ॥ सहजें जाण
मावळे ॥ ९८ ॥ मावळल्या हा भजनभेद ॥ उल्हासे भक्तीचा अभेदबोध ॥ हा गुरुमार्ग अतिशुद्ध ॥ प्रिय प्रसिद्ध मजलागीं ॥ ९९ ॥
जेथ माझी अभेदभक्ती ॥ तेथ मी सर्वस्वें श्रीपती ॥ आतुडलों[1] भक्तांच्या हातीं ॥ स्वानंदप्रीतीं उल्हासें ॥ २०० ॥ जेवीं कां अफाट मेघ
जळा ॥ धरण बांधोनि घालिजे तळां ॥ तेवीं मज अनंताचा एकवळा ॥ अभेदभजनाला आतुडे ॥ १ ॥ आवडीं वर्षलें सैरां जळ ॥
तेणें नुपजेचि उत्तमफळ ॥ तेंचि तळां भरलिया प्रबळ ॥ तेणें पिकती केवळ राजागरें[3] ॥ २ ॥ तैसें माझें स्वरूप वाडेंकोडें ॥ अभेदभक्ती
माजी आतुडे ॥ तैं ब्रह्मानंदें गोंधळ पडे ॥ शीग चढे भक्तीची ॥ ३ ॥ अभेदभक्तांच्या द्वारापाशीं ॥ तीर्थें येती पवित्र व्हावयासी ॥ सुर
नर लागती पायांसी ॥ मी हृषीकेशी त्यांमाजी ॥ ४ ॥ अभेदभक्तांपाशीं देख ॥ सकळ तीर्थें होती निर्दोख ॥ भक्तीचें माहेर तें आव
श्यक ॥ मजही सुख त्याचेनी ॥ ५ ॥ अभेद जे क्रियास्थिती ॥ या नांव माझी उत्तमभक्ती ॥ ऐसा उल्हासें श्रीपती ॥ उद्धवा प्रती बोल
त ॥ ६ ॥ अभेदभक्ती वाडेंकोडें ॥ श्रीकृष्ण सांगे उद्धवापुढें ॥ कथा राहिली येरीकडे[4] ॥ तेंही धडफुडें स्मरेना ॥७॥ देव विसरला निरूप
ण ॥ तंव उद्धवासि बाणली खूण ॥ तोही विसरला उद्धवपण ॥ कृष्णा कृपण नाठवे ॥ ८ ॥ अभेदभजनाचा हरिख ॥ देव भक्त झाले
एक ॥ दोघां पडोनि ठेले ठक ॥ परम सुख पावले ॥ ९ ॥ उद्धव निजबोधें परिपूर्ण ॥ तरी पूजाविधान प्रश्न ॥ एथ करावया काय
कारण ॥ ऐशी आशंका मन कल्पील ॥ २१० ॥ तरी उद्धवाच्या चित्तीं ॥ उगा राहतांचि श्रीपती ॥ जाईल निजधामाप्रती ॥ यालागीं
प्रश्नोक्ती तो पुसे ॥ ११ ॥ उपासनाकांडगुह्यज्ञान ॥ आगमोक्तपूजाविधान ॥ उद्धवमिषें श्रीकृष्ण ॥ वेदार्थ आपण स्वयें बोले ॥ १२ ॥
सकळ वेदार्थ शास्त्रविधी ॥ ग्रंथीं श्रीकृष्ण प्रतिपादी ॥ जैशी श्रद्धा तैशी सिद्धी ॥ व्हावया त्रिशुद्धी साधकां ॥ १३ ॥ असो हे ग्रंथ
व्युत्पत्ती ॥ ऐकतां अद्वैतभक्ती ॥ उद्धव निवाला[6] निजचित्तीं ॥ तेणें श्रीपती सुखावला ॥ १४ ॥ तेणें संतोषें ह्मणें श्रीकृष्ण ॥ उद्धवा होईं
सावधान ॥ पुढील पूजाविधान ॥ तुज मी सांगेन यथोक्त ॥ १५ ॥ पूज्यपूजक एकात्मता ध्यान ॥ करोनियां दृढ धारण ॥ तेंचि बाह्य
पूजेलागीं जाण ॥ करावें आवाहन प्रतिमेमाजी ॥ १६ ॥ प्रतिमेसंमुख आपण ॥ आवाहनमुद्रा दाखवून ॥ माझी चित्कळा संपू
र्ण ॥ प्रतिमेसि जाण भावावी ॥ १७ ॥ तेव्हां मूर्तीचें जडपण ॥ निःशेष देखावें आपण ॥ मूर्ति भावावी[7] चैतन्यघन[8] ॥ मुख्य आवाहनें[9] या
नांव ॥ १८ ॥ गुरुमंत्रें मंत्र निर्दोष ॥ तेणें मंत्रें मूर्तीसि न्यास ॥ करावे सर्वांगीं सावकाश ॥ शास्त्रविन्यास आगमोक्त ॥ १९ ॥

---

१ स्वाधीन झालों. २ सपाट्यानें. ३ राजभोग तांदूळ. ४ एकीकडे. ५ बरोबर. ६ शांत झाला. ७ ध्यावी. ८ ज्ञानस्वरूप. ९ हांक मारणें.

एवं आवाहन संस्थापन ॥ सन्निधि सन्निरोधन ॥ सुमुखीकरण स्वागतन ॥ या मुद्रा आपण दावाव्या ॥ २२० ॥ अवगुंठन संकलीकरण ॥ या अष्टौ मुद्रा दावूनि जाण ॥ मग होऊनि सावधान ॥ पूजाविधान मांडावें ॥ २१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पाद्योपस्पर्शार्हणादीनुपचारान्प्रकल्पयेत् ॥ धर्मादिभिश्च नवभिः कल्पयित्वासनं मम ॥ २५ ॥ पद्ममष्टदलं तत्र कर्णिकाकेसरोज्ज्वलम् ॥ उभाभ्यां वेदतंत्राभ्यां मह्यं तूभयसिद्धये ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्नानमंडप कल्पूनि जाण ॥ तेथ आणावा देव चिद्घन ॥ पाद्य अर्घ्य आचमन ॥ मधुपर्कविधान करावें ॥ २२ ॥ अभ्यंग अंगमर्दन ॥ पुरुषसूक्तें यथोक्त स्नान ॥ पीतांबरपरिधान ॥ स्नानमंडपीं जाण देवासी ॥ २३ ॥ इतर यथोक्त पूजन ॥ करावें सिंहासनीं संपूर्ण ॥ तें आसन पीठावरण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ २४ ॥ सिंहासनीं आवरणक्रम ॥ आधार प्रकृति कूर्म क्षेम ॥ क्षीराब्धि श्वेतद्वीप कल्पद्रुम ॥ मनोरम भावावा ॥ २५ ॥ त्यातळीं रत्नमंडप नेटक ॥ त्यामाजी विचित्र पर्यंक ॥ त्या मंचकाचा विवेकें[1] ॥ यदुनायक सांगत ॥ २६ ॥ धर्म ज्ञान वैराग्य ऐश्वर्य ॥ तेंचि माचवे अति वर्य ॥ अधर्म अज्ञान अनैश्वर्य[2] ॥ अवैराग्येंसि पाहे गातें चारी ॥ २७ ॥ ईश्वरतत्त्व निज सूत ॥ गुणागुणीं वळोनि तेथ ॥ मंचक विणिला अचुंबित[3] ॥ योगयुक्त महामुद्रा ॥ २८ ॥ त्या मंचकावरी शेषपुटी ॥ शोभे अतिशयेंसि गोमटी ॥ सहस्रफणीं मणितेज उठी ॥ छत्राकार उठी झळकत ॥ २९ ॥ शेषपुटीमाजी निर्मळ ॥ विकासलें रातोत्पळें[4] ॥ सकर्णिक अष्टदळ ॥ शोभे केवळ मनोहर ॥ २३० ॥ सत्शक्ति कमळकंदमूळ ॥ ज्ञाननाळ त्याचें सरळ ॥ प्रकृति अष्टधा जे प्रबळ ॥ तेंचि अष्टदळ कमळाचें ॥ ३१ ॥ ऐसें कमळ अतिसुंदर ॥ षड्विकार तेचि केसर ॥ वैराग्य कर्णिका सधर ॥ मघमघी थोर सुवासें ॥ ३२ ॥ पूर्वादिकमळदळीं जाणा ॥ देवतान्यासाव्यां[5] त्यात्या स्थाना ॥ विमळा उत्कर्षणी आणि ज्ञाना ॥ क्रियाशक्ति जाणा चौथी पैं ॥ ३३ ॥ योगा प्रह्वी सत्या ईशाना ॥ कर्णिका योजिजे मध्यस्थाना ॥ कल्पूनि अनुपमरचना ॥ अनुग्रहा जाणा स्थापावी ॥ ३४ ॥ आत्मा अंतरात्मा परमात्मा ॥ हा संमुखभाग देवोत्तमा ॥ सत्व रज आणि मोह तमा ॥ पुरुषोत्तमा पृष्ठिभाग ॥ ३५ ॥ ऐशापरी पीठन्यास ॥ आगमोक्त सावकाश ॥ करूनियां हृषीकेश ॥ सिंहासनास आणावा ॥ ३६ ॥ छत्र आणि युग्म[6] चामर ॥ नानावाद्यें जयजयकार ॥ दावूनि पीठ मुद्रा सधर ॥ आसनीं श्रीधर बैसवावा ॥ ३७ ॥ मज सर्वगतासि आवाहन ॥ मज अधिष्ठानासि आसन ॥ मज निराकारासि जाण ॥ दाविती आपण विकारमुद्रा ॥ ३८ ॥ मज चिद्रूपालागीं लोचनें[7] ॥ निःशब्दा कल्पिती श्रवणें[8] ॥ मज विश्वमुखासि वदन ॥ निमासुरें जाण भाविती ॥ ३९ ॥ मी विश्वांघ्री दोंपायीं चालत ॥ मज

---

[1] विचार. [2] ऐश्वर्य नसणें. [3] आश्चर्यकारक. [4] लालकमळ. [5] स्थापन कराव्या. [6] दोन. [7] डोळे. [8] कान.

विश्वबाहूसि चारी हात ॥ मज सर्वगतातें एथ ॥ स्थान भावित एकदेशीं ॥ २४० ॥ मज निर्विकारासि उपचार ॥ मज विदेहासि अळंकार ॥ मज सर्वसमान अरि मित्र ॥ भावना विचित्र भाविती ॥ ४१ ॥ मज अकर्त्या कर्मबंधन ॥ अजां[१]सि जन्म निं[२]धन ॥ नित्यतृप्तासि भोजन ॥ निर्गुणा सगुण भाविती ॥ ४२ ॥ या अवघियांचा अभिप्रावो ॥ उपासनाकांडनिर्वाहो ॥ जैसजैसा भक्तिभावो ॥ तैसा मी देवो तयासी ॥ ४३ ॥ मी अवाप्तसकळकाम ॥ परी भक्तप्रेमालागीं सकाम ॥ जैसा भक्तांचा मनोधर्म ॥ तैसा पुरुषोत्तम मी तयां ॥ ४४ ॥ भक्त जैसा भावी मातें ॥ मी तैसाचि होय त्यातें ॥ तो जें जें अर्पी भावार्थें ॥ तें अर्पे मातें सहजची ॥ ४५ ॥ मी सर्वत्र भरलों असें ॥ तेथ जो जेथ मज उद्देशें ॥ भक्त भावार्थें अर्पू बैसे ॥ तें अर्पे अनायासें सहजें मज ॥ ४६ ॥ मी सर्वत्र देवादिदेव ॥ तैसा प्राणियांचा नव्हे भाव ॥ यालागीं भक्तांचा जेथ सद्भाव[३] ॥ तो मी देव सहजेंची ॥ ४७ ॥ यालागीं वाडेंकोडें ॥ भक्त भावार्थ मज आवडे ॥ भक्तभावाहूनि पुढें ॥ वैकुंठ नावडे क्षीरा[४]ब्धीही ॥ ४८ ॥ भक्तभावार्थाचीं भूषणें ॥ अंगीं बाणावयां[५] श्रीकृष्णें ॥ म्यां निर्गुणें सगुण होणें ॥ भावार्थ[६]गुणें भक्तांच्या ॥ ४९ ॥ यालागीं मी अजन्मा जन्में ॥ अकर्माही करीं कर्में ॥ अनामाही धरी नामें ॥ भक्त मनोधर्में तरावया ॥ २५० ॥ निर्गुणीं लागल्या मन ॥ मनाचि होय चैतन्यघन ॥ सगुणीं ठसावल्या मन ॥ साधक श्रीकृष्ण स्वयें होती ॥ ५१ ॥ निर्गुणाचा बोध अटक ॥ यालागीं उपास[७]नाविवेक ॥ सगुणमूर्ति भावूनि देख ॥ तरले साधक अनायासें ॥ ५२ ॥ हे आगमोक्त उपासनाविधी ॥ येणें भोग मोक्ष उभयसिद्धी ॥ साधक पावती त्रिशुद्धीं ॥ मी कृपानिधी संतुष्टें ॥ ५३ ॥ तेंचि उपासनविधिविधान ॥ मागां सांगतां पूजन ॥ देव सिंहासनीं बैसल्या पूर्ण ॥ पुढें आवरणपूजा ऐक ॥ ५४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सुदर्शनं पांचजन्यं गदासीषुधनुर्हलान् ॥ मुसलं कौस्तुभं मालां श्रीवत्सं चानुपूजयेत् ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ ॥ अण्वी जीवकळेसि देहावरण ॥ सिंहासनीं शक्त्यावरण ॥ सुदर्शनादिआयुधावरण ॥ आपुलीं आपण हरि सांगे ॥ ५५ ॥ सतेजधार सुदर्शन ॥ शंख शोभे पांचजन्य ॥ नंदक तो खड्ग जाण ॥ गदा गहन कौमोदकी ॥ ५६ ॥ शार्ङ्गधनुष्य अतिसबळ ॥ सुवर्णपुंखें बाण सरळ ॥ हल आणि मुसळ ॥ आयुधें प्रबळ पूजावीं ॥ ५७ ॥ या आठही भुजा सायु[८]धा सरळा ॥ कंठीं कौस्तुभ वनमाळा ॥ कां[९]से कशिला पिंवळा ॥ घनश्याम सांवळा शोभत ॥ ५८ ॥ ब्रह्मण्यदेव रमानाथ ॥ ब्राह्मणाचा चरणघात ॥ हृदयीं अळंकार मिरवत ॥ शोभा अद्भुत तेणें शोभे ॥ ५९ ॥ चिद्रत्नाच्या अळंकारीं ॥ गुण काढोनियां बाहेरी ॥ वोविली वैजयंती कुसँ[१०]री ॥ ते हृदयावरी रुळत ॥ २६० ॥ यापरी साळंकार सायुध॥

---

१ जन्मरहितास. २ मरण. ३ मी आहे असा भाव. ४ क्षीरसागरही. ५ ठसण्याकरितां. ६ भक्तीस्तव. ७ उपासनेचा विचार. ८ आयुधांसह. ९ कमरेस. १० कुशलतेनें.

शंखचक्रपद्मेंसि अगाध ॥ ऐसा शोभला स्वयंबोध ॥ नारदादि संनिध तिष्ठती सदा ॥ ६१ ॥ यापरी साळंकार सायुध ॥ पूज्य पूजो
नियां गोविंद ॥ मग पूजावे पार्षद ॥ ऐक विशद सांगेन ॥ ६२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नंदं सुनंदं गरुडं प्रचंडं चंडमेव च ॥ महाबलं बलं
चैव कुमुदं कुमुदेक्षणम् ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ ॥ नंद सुनंद देवापार्शीं ॥ गरुड सदा तिष्ठे दृष्टीसी ॥ चंड प्रचंड दोहीं बाहींसी[1] ॥ अहर्निशीं
तिष्ठती[2] ॥ ६३ ॥ बळ आणि महाबळ ॥ सुमुखसंज्ञे अवधानशीळ ॥ कुमुद कुमुदाक्ष केवळ ॥ पाठीसी प्रबळ बळें उभें ॥ ६४ ॥ गरुड
दृष्टीं[3] तिष्ठे आपण ॥ येर नंदादि जे अष्टौ जन ॥ तेथ अष्टौ[4] दिशांप्रति जाण ॥ पार्षदावरण हरिनिकटीं ॥ ६५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ दुर्गां
विनायकं व्यासं विष्वक्सेनं गुरून् सुरान् ॥ स्वे स्वे स्थाने त्वभिमुखान् पूजयेत्प्रोक्षणादिभिः ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ दुर्गा विनायक
जाण ॥ व्यास आणि विष्वक्सेन ॥ चहूं कोनीं चारी स्थापून ॥ करावें पूजन देवांभिमुख[5] ॥ ६६ ॥ मूळमूर्तींसी अभिन्नाकारू ॥ गुरू
आणि परमगुरू ॥ परमेष्ठिगुरूसि एकाकारू ॥ पूजाप्रकारू करावा ॥ ६७ ॥ इंद्रादि अष्टौ लोकपाळ ॥ आह्वानूनियां सकळ ॥ स्थापूनि
अष्टौ दिशा केवळ ॥ तेही तत्काळ पूजावे ॥ ६८ ॥ गुरुदुर्गादिक लोकपाळ ॥ पूजावे सांगोपांग सकळ ॥ प्रोक्षणपाद्यादि अविकळ ॥
पूजा निश्चळ करावी ॥ ६९ ॥ तेचि पूजेचे पूजोपचार ॥ कोणकोण पैं प्रकार ॥ तो ये श्लोकीं सारंगधर ॥ संक्षेपाकार सांगत ॥ ७० ॥
॥ श्लोक ॥ ॥ चंदनोशीरकर्पूरकुंकुमागुरुवासितैः ॥ सलिलैः स्नापयेन्मंत्रैर्नित्यदा विभवे सति ॥ ३० ॥ स्वर्णघर्मानुवाकेन महापुरुषवि
द्यया ॥ पौरुषेणापि सूक्तेन सामभी राजनादिभिः ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ ॥ एळा वाळा कर्पूर ॥ चंदन कुंकुम केशर ॥ त्यांमाजी मेळवूनि
अगरू[6] ॥ धूपिलें नीर[7] स्नपनासी[8] ॥ ७१ ॥ सुवासित सपरिकर ॥ गंगाजळ अतिपवित्र ॥ शंखमुद्रापुरस्कर ॥ शंखीं तें नीर भरावें ॥ ७२ ॥
ऐसें जळ घेऊनि शुद्ध ॥ आपस्तंबशाखेचे प्रसिद्ध ॥ सुवर्णघर्मानुवाकपदें ॥ तेणें अभिषेक विशद मज करावा ॥ ७३ ॥ अथवा केवळ
पुरुषसूक्तोक्त ॥ रुद्राभिषेक विष्णुसूक्त ॥ इहीं मंत्रीं मंत्रोक्त ॥ देवासि यथोक्त स्नान द्यावें ॥ ७४ ॥ कां सामवेदींचें गायन ॥ त्यामाजी
सामनीराजन ॥ तेणेंकरूनियां जाण ॥ देवासि स्नान करावें ॥ ७५ ॥ असल्या वैभवसंपन्न ॥ नित्य द्यावें हें स्नान ॥ नातरी पूर्वविशेषें
जाण ॥ करावें आपण जयंत्यादिकीं[9] ॥ ७६ ॥ आगमोक्त सुलक्षण ॥ महापुरुषविद्या पूर्ण ॥ तेणें करूनि आपण ॥ देवासि स्नान
करावें ॥ ७७ ॥ देवासि पूर्ण झालिया स्नान ॥ करावें मंगळनीराजन[10] ॥ मग वस्त्रें अळंकार भूषण ॥ देवासि आपण अर्पावीं ॥ ७८ ॥
॥ श्लोक ॥ ॥ वस्त्रोपवीताभरणपत्रस्रग्गंधलेपनैः ॥ अलंकुर्वीत सप्रेम मद्भक्तो मां यथोचितम् ॥ ३२ ॥ ॥ टीका ॥ ॥ देवो स्वरूपें

---

१ बाजूस. २ उभे आहेत. ३ समोर. ४ आठ. ५ देवाच्या समोर. ६ कृष्णागुरुचंदन. ७ पाणी. ८ स्नानास. ९ रोहिणी नक्षत्रयुक्त श्रावणकृष्णाष्टमी वगैरे. १० मंगलारती.

घनसांवळा ॥ कांसे कसावा सोनसळा ॥ हेमसूत्रं[1] अर्पूनि गळां ॥ रत्नमेखळा[2] बाणावी ॥ ७९ ॥ वांकी अंदूवांचा गजर ॥ चरणीं नूपुरांचा झणत्कार ॥ मुकुटकुंडलें मनोहर ॥ हृदयीं गंभीर महापदक ॥ २८० ॥ जडित मोतिलग[3] पन्नवेली ॥ अतिशोभित दिसे निढळीं[4] ॥ तिलक पिंवळा तयातळीं ॥ कंठीं झळाळी कौस्तुभ ॥ ८१ ॥ बाहीं बाहुवटें वीरकंकणें ॥ करमुद्रिका रत्नखेवणें[5] ॥ पीतांबर झळके कोणें मानें ॥ रविबिंब तेणें लाजविलें ॥ ८२ ॥ सांवळे अंगीं गोमटी ॥ शुभ्र चंदनाची शोभे उटी ॥ सुमनमाळाविरगुठी ॥ होत घरटी मधुकरां ॥ ८३ ॥ वैजयंती वनमाळा ॥ आपादपर्यंत[6] रुळे गळां ॥ घवघवीत दिसे डोळां ॥ घनसांवळा शोभत ॥ ८४ ॥ एवं वस्त्रालंकारभूषणीं ॥ स्वयें पूजावा शार्ङ्गपाणी ॥ पूजेहूनियां मनीं ॥ श्रद्धा कोटिगुणीं अ[illegible] ॥ ८५ ॥ भक्त असो अतिसंपन्न ॥ अथवा हो कां अतिनिर्धन ॥ जेथ शुद्ध श्रद्धा संपूर्ण ॥ तेथ नारायण संतुष्टे ॥ ८६ ॥ सकळ पूजेचें कारण ॥ मुख्य श्रद्धाचि गा प्रमाण ॥ अत्यंत श्रद्धें जो संपन्न ॥ तो देवाचा पूर्ण पढियंता ॥ ८७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥पाद्यमाचमनीयं च गंधं सुमनसोऽक्षतान् ॥ धूपदीपोपहार्याणि दद्यान्मे श्रद्धयार्चकः ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ एवं मूर्ति श्रृंगारिल्या पूर्ण ॥ द्यावें पाद्य अर्घ्य आचमन ॥ देऊनि मधुपर्कविधान ॥ करावें पूजन श्रद्धायुक्त ॥ ८८ ॥ गंधाक्षता शुद्ध सुमनँ[7] ॥ धूप दशांग दीपदान ॥ दीपावली नीराजन ॥ श्रद्धा मदर्चनं[8] साधकां ॥ ८९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ गुडपायससर्पींषि शष्कुल्याऽपूपमोदकान् ॥ संयावदधिसूपांश्च नैवेद्यं सति कल्पयेत् ॥ ३४ ॥ ॥ टीका ॥ ॥ झाल्या धूप दीप नीराजन ॥ देवासि वोगरावें भोजन ॥ नानापरीचें पक्वान्न ॥ अन्न सदन्न रसयुक्त ॥ २९० ॥ मांडा साकरमांडा गुळवरी ॥ शष्कुल्यां[9] अमृतफळें क्षीरघारी ॥ दुधामाजी आळिली क्षीरी ॥ वाढिली परी वळिवट ॥ ९१ ॥ मधुवडा कोरवडा ॥ लाडूतिळवयांचा जोडा ॥ रुचीं आला अंबवडा ॥ ठायापुढां वाढिनला ॥ ९२ ॥ पत्रशाकांची[10] प्रभावळी ॥ भात अरुवार जिरेसाळी ॥ शुभ्र सोलींव मुगदाळी ॥ गोघृतें[11] परमळी सद्यस्तप्त[12] ॥ ९३ ॥ सांजा जडींव गुळयुक्त ॥ एळां[13] मिरें घालूनि आंत ॥ पाक केला घृतमिश्रित ॥ सेवितां मुखांत अरुवार ॥ ९४ ॥ कथिकां[14] तक्रांची[15] गोमटी ॥ आम्ररसें[16] भरली वाटी ॥ शिखरणी केळांची भरली ताटीं ॥ देखोनि लाळ घोंटी अमरेंद्र[17] ॥ ९५ ॥ दधि दुग्ध साकर ॥ नैवेद्या वाढिले परिकर ॥ देव न पाहे उपचार ॥ श्रद्धा श्रीधर तृप्त होय ॥ ९६ ॥ सामर्थ्य असलें करावयासी ॥ तरी हे परवडी[18] प्रतिदिवसीं ॥ नैवेद्य अर्पावे देवासी ॥ नातरी पर्वविशेषीं अर्पावे ॥ ९७ ॥ उपास्यमूर्ति जे साचार ॥ ते जयंतीस सविस्तर ॥ पर्वविशेषीं

---

[1] सोन्याचें यज्ञोपवीत. [2] रत्नखचित कटिदोरा. [3] मोत्याचे हार. [4] कपाळास. [5] रत्नखचित. [6] पायांपर्यंत. [7] फुलें. [8] माझ्या पूजेस. [9] करंज्या. [10] पालेभाज्यांची. [11] गायीचें तूप. [12] तुकतेंच कढविलेलें. [13] वेलदोडे. [14] कढी. [15] ताकाची. [16] आंब्याच्या रसानें. [17] इंद्र. [18] अगत्यानें.

उपचार ॥ पूजा अपार हरि सांगे ॥ ९८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अभ्यंगोन्मर्दनादर्शदंतधावाभिषेचनम् ॥ अन्नाद्यं गीतनृत्यानि पर्वणि स्युरुतान्वहम् ॥ ३५ ॥ ॥ टीका ॥ ॥ पर्वें बोलिलीं आगमोक्ती[1] ॥ अथवा वार्षिकपर्वें येती ॥ कां निजमूर्तीची जयंती ॥ ते पूजा श्रीपती स्वयें सांगे ॥ ९९ ॥ दंतधावन उद्वर्त्तन ॥ मूर्तीसि द्यावें अभ्यंजन ॥ पंचामृतें करूनि स्नान ॥ विचित्राभरण पूजावी ॥ ३०० ॥ पूजोनि साळंकृत देवासी ॥ नैवेद्य अर्पावे षड्रसीं ॥ देऊनि करोद्वर्त्तनासी ॥ मुखवासासी अर्पावें ॥ १ ॥ देव विसरला देवपणासी ॥ तें देवपण भेटे देवासी ॥ ऐशिया दाखवावें आदर्शासी[2] ॥ तेणें देवदेवासी उल्हासू ॥ २ ॥ पर्वविशेषीं जयंतीसी ॥ मेळवूनि संतवैष्णवांसी ॥ करावें गीतनृत्यकीर्तनांसी ॥ अतिप्रेमेंसी अहोरात्र ॥ ३ ॥ आगमोक्त दीक्षा हवन ॥ करितां तत्काळ देव प्रसन्न ॥ त्या होमाचें विधि विधान ॥ ऐक सावधान उद्धवा ॥ ४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विधिना विहिते कुंडे मेखलागर्तवेदिभिः ॥ अग्निमाधाय परितः समूहेत्पाणिनोदितम् ॥ ३६ ॥ परिस्तीर्याथ पर्युक्षेदन्वाधाय यथाविधि ॥ प्रोक्षण्यासाद्य द्रव्याणि प्रोक्ष्याग्नौ भावयेत माम् ॥ ३७ ॥ ॥ टीका ॥ ॥ आगमोक्त कुंडविधान ॥ लांबी रुंदी खोली कोण ॥ गणूनि उंचीचें प्रमाण ॥ कुंड संपूर्ण साधावें ॥ ५ ॥ स्वशाखा जें वेदप्रोक्त[3] ॥ मेखळायुक्त साधावी गर्त ॥ योनीसकट वेदी तेथ ॥ लक्षणोक्त साधावी ॥ ६ ॥ तेथ करूनि आवाहन ॥ प्रतिष्ठिला जो हुताशन ॥ त्यासि करूनि करस्पर्शन ॥ परिसमूहन[4] करावें ॥ ७ ॥ दर्भी[5] करावें परिस्तरण ॥ मग करावें पर्युक्षण ॥ इध्माबर्हिविसर्जन ॥ त्रिसंधान ठेवावें ॥ ८ ॥ करूनि बर्हीचें आस्तरण ॥ करावें आज्यस्थालीस्थापन ॥ याल्हर्तीं समिधाहोम जाण ॥ अन्वाधान त्यानांव ॥ ९ ॥ प्रोक्षणीपात्रीचें विधान ॥ करूनि भरावें जळ पूर्ण ॥ तेणें कुशाग्रजळें आपण ॥ होम द्रव्यें जाण प्रोक्षावीं ॥ ३१० ॥ कुंडीं प्रदीप्त हुताशन[6] ॥ तेथ करावें माझें ध्यान ॥ तें ध्यानमूर्तीचें लक्षण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ [illegible] ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तप्तजांबूनदप्रख्यं शंखचक्रगदांबुजैः ॥ लसच्चतुर्भुजं शांतं पद्मकिंजल्कवाससम् ॥ ३८ ॥ स्फुरत्किरीटकटककटिसूत्रवरांगदम् ॥ श्रीवत्सवक्षसं भ्राजत् कौस्तुभं वनमालिनम् ॥ ३९ ॥ ॥ टीका ॥ ॥ जैसी तप्तस्वर्णभा[7] ॥ तैशी मूर्तीची अंगप्रभा ॥ चतुर्भुज साजिरी शोभा ॥ चिन्मात्रगाभा साकार ॥ १२ ॥ शंखचक्रगदाकमळ ॥ कांसे पीतांबर सोज्ज्वळ ॥ लोपूनि अग्निप्रभाजाळ ॥ मूर्तिप्रभाबळ प्रकाश ॥ १३ ॥ मुकुटकुंडलें मेखळा ॥ श्रीवत्स[8] शोभे वक्षस्थळां ॥ आपाद रुळे वनमाळा ॥ झळके गळां कौस्तुभ ॥ १४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ध्यायन्नभ्यर्च्य दारूणि हविषाभिघृतानि च ॥ प्रास्याज्यभागावाघारौ दत्त्वा चाज्यप्लुतं हविः ॥ ४० ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐसें सांग माझें ध्यान ॥ अग्निमाजी भावूनि जाण ॥

---

[1] तंत्रांत सांगितलेलीं. [2] आरशास. [3] वेदांत सांगितलेलें. [4] भोंवतालीं पाणी सिंचन करणें. [5] दर्भांनीं. [6] अग्नि. [7] तापलेल्या सोन्याचें तेज. [8] भृगुपद.

करूनि आवाहन पूजन ॥ विध्युक्त हवन मांडावें ॥ १५ ॥ अग्नि विधियुक्त आह्वानूनी ॥ समिधाहोम घृतें अभिघारूनी[1] ॥ आज्यभाग दों अवदानीं ॥ प्रथमहवनीं होमावा ॥१६॥ तेथ तिळाज्य[2] हविर्द्रव्य पूर्ण ॥ घृतप्लुतें[3] अवदान ॥ आगमोक्त होमविधान ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ १७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ जुहुयान्मूलमंत्रेण षोडशर्चाऽवदानतः ॥ धर्मादिभ्यो यथान्यायं मंत्रैः स्विष्टकृतं बुधः ॥१८॥ ॥ टीका ॥ लक्षूनि मुखबोध देवाचा ॥ मूलमंत्रें होम साधकांचा ॥ कां पुरुषसूक्त सोळा ऋचा ॥ हा होमाचा विधिमार्ग ॥ १८ ॥ धर्मादिक पीठार्चन ॥ इतर देवता आवरण ॥ त्यांसिही एकएक अवदान ॥ नाममंत्रें जाण होमावें ॥ १९ ॥ मग स्विष्टकृताचें अवदान ॥ साधकें द्यावें सविधान ॥ ऐसें होमाचें निजभजन ॥ भक्त सज्ञान जाणती ॥ २० ॥ होमादि मूर्तिभजनविधी ॥ येणें तत्काळ साधकां सिद्धी ॥ भक्त पावती निजपदीं ॥ जाण त्रिशुद्धी उद्धवा ॥ २१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अभ्यर्च्याथ नमस्कृत्य पार्षदेभ्यो बलिं हरेत् ॥ मूलमंत्रं जपेद्ब्रह्म स्मरन्नारायणात्मकम् ॥ ॥ टीका ॥ ॥ यापरी होम विधियुक्त अर्चन ॥ करूनि करावें साष्टांग नमन ॥ मग देवाचे पार्षदगण ॥ त्यांसि बळिहरण कल्पावें ॥२२॥ मग बाह्यप्रतिमापूजास्थान ॥ तेथें येऊनियां आपण ॥ मूलमंत्राचें स्मरण ॥ ध्यानयुक्त जाण करावें ॥२३॥ पूज्य पूजक अभिन्न ॥ परात्पर[4] जो कां नारायण ॥ तेणें परब्रह्मीं लावूनी मन ॥ घालावें आसन सावधानवृत्तीं ॥ २४ ॥ ध्यानीं जंव स्थिरावे मन ॥ तंव स्थिर राखावें आसन ॥ तेथूनि उपरमल्यां[5] मन ॥ पुढें पूजाविधान हरि सांगे ॥ २५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ दत्त्वाचमनमुच्छेषं विष्वक्सेनाय कल्पयेत् ॥ मुखवासं सुरभिमत्तांबूलाद्यमथार्हयेत् ॥ ४३ ॥ ॥ टीका ॥ ॥ एवं विसर्जिलिया[6] ध्यान ॥ झालें देवाचें भोजन ॥ ऐसें भावूनि आपण ॥ शुद्धाचमन अर्पावें ॥ २६ ॥ अग्नीमाजील मूर्तिध्यान ॥ प्रतिमा पूजिली ते आपण ॥ दोहीं ठायीं शुद्धाचमन ॥ यथोक्त जाण करावें ॥ २७ ॥ देवाचिया भुक्तशेषांसी[7] ॥ भाग द्यावा विष्वक्सेनासी ॥ मग काढूनि उच्छिष्टासी ॥ द्यावें देवासी करोद्वर्तन ॥ २८ ॥ कापूरें घोळिवा सुपारी फोडी ॥ सुवर्णवर्णा पानांची विडी ॥ काथ सुवासिला[8] परवडी ॥ अभिनव गोडी तांबूल ॥ २९ ॥ एळा लवंगा कंकोळ ॥ अल्प अर्पिलें जातीफळें[9] ॥ सुरंग रंगलें तांबूल ॥ दिसे मुखकमळ साजिरें ॥३३०॥ चूवा कस्तूरी बुका सधर ॥ अर्पूनि पुष्पांजळीसंभार ॥ जेणें शीघ्र संतोषे श्रीधर ॥ तें प्रेम साचार हरि सांगे ॥ ३१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उपगायन्गृणन्नृत्यन्कर्माण्यभिनयन्मम ॥ मत्कथाः श्रावयन् शृण्वन् मुहूर्तं क्षणिको भवेत् ॥ ४४ ॥ ॥ टीका ॥ ॥ ज्ञान ध्यान उपासकता ॥ हे गौण जाण सर्वथा ॥ देव भावाचा भोक्ता ॥ भावें तत्त्वतां देव भेटे ॥ ३२ ॥ ध्यानीं तुटलिया[10] निजमन ॥ करावें माझें नामस्मरण ॥

---

१ सिंचन करून. २ तीळ व तूप. ३ तुपानें भिजलेलें. ४ प्रकृतीहून अन्य, श्रेष्ठ. ५ शांत झाल्यावर. ६ समाप्त झाल्यानंतर. ७ नैवेद्याचा उरलेला. ८ सुगंधित केलेला. ९ जायफळ. १० अंतरल्यास.

कां माझ्या गुणांचें श्रवण ॥ आदरें जाण करावें ॥ ३३ ॥ करितां हरिगुणांचें श्रवण ॥ तेणें सुखावे अंतःकरण ॥ सुखें सुखावोनि आपण
॥ स्वयें हरिकीर्तन करावें ॥ ३४ ॥ निर्लज्ज नटाचेपरी ॥ हरिरंगणीं नृत्य करी ॥ हावभावकटाक्षकुसरी ॥ अभिनयो धरी कर्माचा
॥ ३५॥ गोवर्धनउद्धरण ॥ अंगें दावावें आपण ॥ कां मांडूनियां दृढठाण ॥ त्र्यंबकभंजन दावावें ॥ ३६ ॥ पूतनाप्राणशोषण ॥
कुवलयाचें निर्दळण ॥ दावूनि मल्लमर्दन ॥ हरिकीर्तन करावें ॥ ३७॥ नवल प्रेमाचा उद्बोध ॥ गद्यपद्यानामप्रबंध ॥ भुजंगप्रयातादि
अगाध ॥ गाती स्वानंद स्तुतिमात्रें ॥ ३८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्तवैरुच्चावचैः स्तोत्रैः पौराणैः प्राकृतैरपि ॥ स्तुत्वा प्रसीद भगवन्निति वंदेत
दंडवत् ॥ ४५ ॥ ॥ टीका ॥ ॥ माझीं स्तुतिस्तोत्रें पुराण ॥ सादरें करावीं श्रवण ॥ श्रोता मिळालिया आपण ॥ कथानिरूपण
सांगावें ॥ ३९ ॥ शुद्ध न ये स्तोत्रपठण ॥ करितां अबद्ध गायन ॥ पाठका दोष नलगे जाण ॥ तेणें होय निर्दळण महादोषां ॥ ३४० ॥
वेदींचें उपनिषत्पठण ॥ कां ऋचामंत्रें[1] हरीचें स्तवन ॥ ये लौकिकीं उच्चावचें जाण ॥ देवासि समान निजभावें ॥ ४१ ॥ पुराणीचें श्रेष्ठ
स्तोत्र ॥ अथवा पढतां नाममात्र ॥ अर्थें भावार्थें साचार ॥ समान श्रीधर मी मानीं ॥ ४२ ॥ नेणे वेद शास्त्र पुराण ॥ केवळ भाळा
भोळा जाण ॥ तेणें करितां प्राकृत[3] स्तवन ॥ मी जनार्दन संतोषें ॥ ४३ ॥ वेदीं चुकल्या स्वरवर्ण ॥ पाठका दोष बाधी गहन ॥ प्राकृत
करितां हरीचें स्तवन ॥ दोषनिर्दळण तेणें होय ॥ ४४ ॥ शास्त्रश्रवण पुराणस्थिती ॥ पाहिजे पंचमीसप्तमीव्युत्पत्ती[4] ॥ पडतां अबद्ध
नामकीर्ती ॥ भगवत्प्राप्तिप्रापक ॥ ४५ ॥ संस्कृतवाणी देवें केली ॥ प्राकृत चोरापासून झाली ॥ असो हें पक्षाभिमानी बोली ॥ देवाची
चाली[6] निरभिमान ॥ ४६ ॥ वेदशास्त्र हो कां पुराण ॥ कां प्राकृतभाषास्तवन ॥ एथें भावचि श्रेष्ठ जाण ॥ तेणें नारायण संतोषे
॥ ४७ ॥ देवासि प्रेमाचें पढिये कोड ॥ न पाहे व्युत्पत्तीचें कबाड ॥ भाव[illegible] भाविकांचा गोड ॥ तेणें भक्तांची भीड नुल्लंघी देवो ॥ ४८ ॥
एवं भावार्थें करितां स्तवन ॥ देव होय भक्तांअधीन ॥ तेणें भावार्थें करूनि नमन ॥ हरिचरण वंदावे ॥ ४९ ॥ मुहूर्त निमेष क्षणेंक्षण ॥
हरिचरणीं सुखावल्या मन ॥ इतर व्यापार तेणें सुखें जाण ॥ सहजें आपण वोसरती ॥ ३५० ॥ जेणें तुटे माझें अनुसंधान ॥ तें कर्म
त्यागावें आपण ॥ जेणें स्वरूपनिष्ठ होय मन ॥ तें समाधान राखावें ॥ ५१ ॥ सप्रेम करितां नमन ॥ नित्य नूतन समाधान ॥ त्या नमनाचें
लक्षण ॥ लोटांगण दंडवत् ॥ ५२ ॥ सुटल्या दंड सत्राणें ॥ सुमुख विमुख पाहों नेणें ॥ तैशीं घालीं लोटांगणें ॥ देहाभिमानें
अहेतुक ॥ ५३ ॥ असतां देहाचें अनुसंधान ॥ जो परमार्थें करी नमन ॥ त्या नमस्काराचें लक्षण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ५४ ॥

---

१ ऋग्वेदमंत्रानें. २ लहान मोठीं. ३ आपल्या भाषेंत. ४ विभक्ति वगैरेचें ज्ञान. ५ पक्षपाती. ६ रीति. ७ सुटतात. ८ आत्मस्वरूपींच राहणारें. ९ साष्टांग.

॥ श्लोक ॥ ॥ शिरो मत्पादयोः कृत्वा बाहुभ्यां च परस्परम् ॥ प्रपन्नं पाहि मामीश भीतं मृत्युग्रहार्णवात् ॥ ४६ ॥ ॥ टीका ॥ ॥ मस्तक माझ्या चरणांवरी ॥ उभय बाहु परस्परीं ॥ दोनीं चरण दोहीं करीं ॥ धरी निर्धारीं भावार्थे ॥ ५५ ॥ संसारसागराच्या पोटीं ॥ मृत्युग्रहें घातली मिठी ॥ चरणीं लागलों उठाउठीं ॥ मज जगजेठी सोडवी ॥ ५६ ॥ भवभयें भ्यालों दारुण ॥ यालागीं तुज आलों शरण ॥ निवारी माझें जन्ममरण ॥ भावें श्रीचरण दृढ धरिले ॥ ५७ ॥ तूं स्वामी असतां शिरीं ॥ मज मृत्यु बापुडें केवीं मारी ॥ भावें लोटांगण चरणावरी ॥ कृपा उद्धरी कृपाळुवा ॥ ५८ ॥ देखोनि साष्टांग नमन ॥ ऐकोनि भयभीतस्तवन ॥ मज तुष्टला नारायण ॥ ऐसें आपण भावावें ॥ ५९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ इति शेषां मया दत्तां शिरस्याघ्राय सादरम् ॥ उद्वासयेचेदुद्वास्यं ज्योतिर्ज्योतिषि तत्पुनः ॥ ४७ ॥ ॥ टीका ॥ ॥ म्यां दीधला शेषप्रसाद ॥ तो शिरीं धरोनि स्वानंद ॥ स्थावर मूर्ति जेथ प्रसिद्ध ॥ तेथ उद्वाससंबंध न करावा ॥ ३६० ॥ जंगम जे प्रतिमामूर्ती ॥ तेथ आवाहिली निजात्मज्योती ॥ ते उद्वासूनियां मागुती ॥ निजात्मस्थितीं ठेवावी ॥ ६१ ॥ मूर्तिमाझारील ज्योती ॥ आणोनियां हृदयस्थितीं ॥ मग निजात्मज्योतीसि ज्योति ॥ यथास्थितीं मेळवावी ॥ ६२ ॥ विसर्जनांत पूजास्थिती ॥ ऐकोनि उद्धवाचे चित्तीं ॥ साधकां पूज्य कोण मूर्ती ॥ देव ते अर्थीं स्वयें सांगे ॥ ६३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अर्चादिषु यदा यत्र श्रद्धा मां तत्र चार्चयेत् ॥ सर्वभूतेष्वात्मनि च सर्वात्माऽहमवस्थितः ॥ ४८ ॥ ॥ टीका ॥ ॥ उद्धवा जे मूर्ति ज्या पढियंती ॥ तेचि त्यासि पूज्य मूर्ती ॥ तुवांही अणुमात्र चित्तीं ॥ संदेह ये अर्थीं न धरावा ॥ ६४ ॥ विष्णु विरिंचि सविता जाण ॥ शिव शक्ति कां गजवदन ॥ या मूर्तीमाजी मी आपण ॥ सर्वीं समान सर्वात्मा ॥ ६५ ॥ सर्वप्रतिमांचें पूजन ॥ करितां मज पूजा समान ॥ भक्तांची जेथ प्रीति गहन ॥ तियेअधीन मी परमात्मा ॥ ६६ ॥ जेवीं बाळकाचेनि मेळें ॥ माता तदनुकूल खेळे ॥ तेवीं भक्तप्रेमाचिये लीळें ॥ म्यांचि कल्लोळें क्रीडिजे ॥ ६७ ॥ या सर्वभूतांच्या ठायीं ॥ आणि अवतारादिलीलादेहीं ॥ मी सर्वांशीं समान पाही ॥ ये अर्थीं नाहीं संदेहो ॥ ६८ ॥ उद्धवा मी नाहीं ऐसें ॥ कोणीही ठिकाण रितें न दिसे ॥ परी प्राण्यांचें भाग्य कैसें ॥ त्या मज विश्वासें न भजती ॥ ६९ ॥ जो जेथ मज भजों बैसे ॥ त्या मी तेथ तैसाचि असें ॥ हें उपासनाकांड विशेषें ॥ गुप्त अनायासें प्रकाशिलें ॥ ३७० ॥ उपासनाकांडींचा निर्वाहो ॥ मी सर्वांभूतीं देवाधिदेवो ॥ हा ज्यासि नकळे मुख्य भावो ॥ त्यासि मूर्तिनिर्वाहो द्योतिला ॥ ७१ ॥ हो कां माझी प्रतिमामूर्ती ॥ तेही मी चिदात्मा

---

१ उजव्यानें उजवा, डाव्यानें डावा. २ कालरूपमगरानें. ३ विसर्जन करून. ४ प्रिय. ५ बिलकूल. ६ ब्रह्मा. ७ सूर्य. ८ गणपति. ९ स्वच्छंदानें. १० अभिप्राय. ११ मूर्तिप्रकार. १२ सांगितला.

निश्चितीं ॥ तेथ करितां भावें भक्ती ॥ भक्त उद्धरती उद्धवा ॥७२॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवं क्रियायोगपथैः पुमान्वैदिकतांत्रिकैः ॥ अर्चन्नु
भयतः सिद्धिं मत्तो विंदत्यभीप्सिताम् ॥ ४९ ॥ ॥ टीका ॥ ॥ एवं क्रियायोगलक्षण ॥ वैदिक तांत्रिक मिश्र जाण ॥ आगमनिगमीं
विस्तार गहन ॥ तो मुख्यार्थ पूर्ण सांगीतला ॥ ७३ ॥ येणें क्रियायोग भजनमार्गें ॥ भक्त जैं भोग मोक्ष मागे ॥ तैं उभयसिद्धीलागी
वेगें ॥ म्यां श्रीरंगें अर्पिजे ॥ ७४ ॥ भक्त निष्काम अनन्यभक्ती ॥ तैं भोगमोक्षादिसंपत्ती ॥ घेऊनियां श्रीपती ॥ त्यांच्या द्वाराप्रती सदा
तिष्ठे ॥७५॥ ॥ श्लोक ॥ ॥ मदर्चां संप्रतिष्ठाप्य मंदिरं कारयेद्दृढम् ॥ पुष्पोद्यानानि रम्याणि पूजायात्रोत्सवाश्रितान् ॥ ५० ॥ ॥टीका॥
सांग माझी प्रतिमामूर्ती ॥ करूनि जे प्रतिष्ठा करिती ॥ दृढ देवालय उभारिती ॥ अतिप्रीतीं मद्भावें ॥ ७६ ॥ वन उपवन उद्यान ॥ पुष्प
वाटिका लावाव्या पूर्ण ॥ नित्यपूजेचें विधान ॥ उत्साहीं जाण महापूजा ॥ ७७ ॥ यात्रा बहुजनसमाजा ॥ वार्षिक पर्व महापूजा ॥
चालावया अधोक्षजा ॥ उपाय सहजा हरिसांगे ॥ ७८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पूजादीनां प्रवाहार्थं महापर्वस्वथान्वहम् ॥ क्षेत्रापणपुरग्रा
ग्रान् दत्त्वा मत्सार्ष्टितामियात् ॥ ५१ ॥ ॥ टीका ॥ ॥ नित्यपूजा महापूजा ॥ वार्षिकपूजा चालवावया वोजा ॥ नित्यनिर्वाह करी
राजा ॥ ग्रामसमाजा अर्पूनी ॥ ७९ ॥ क्षेत्र ह्मणिजे शेत गहन ॥ हाटउत्पन्नद्रव्य आपण ॥ हाटेंवीण तो ग्राम जाण ॥ ऐक लक्षण
पुराचें ॥ ३८० ॥ हाटयुक्त तें पुर पाही ॥ जे अर्पिती देवालयीं ॥ तें माझें ऐश्वर्य पाही ॥ सर्वांठायीं पावती ॥ ८१ ॥ मूर्तिप्रतिष्ठा पूजा
विधान ॥ देवालयीं केलिया जाण ॥ कर्त्यासि फळ कोण कोण ॥ तेंही श्रीकृष्ण सांगत ॥ ८२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रतिष्ठया सार्वभौमं
दानेन भुवनत्रयम् ॥ पूजादिना ब्रह्मलोकं त्रिभिर्मत्साम्यतामियात् ॥ ५२ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो मूर्तिप्रतिष्ठा करूनि ठाये ॥ तो सार्वभौ
म राज्य लाहे ॥ जो देवालय करी स्वयें ॥ तो स्वामी होये तिहीं लोकीं ॥ [illegible] ॥ जो करी पूजाविधान ॥ तो पावे ब्रह्मसदन ॥ ये तिनी
जो करी आपण ॥ तो मजसमान ऐश्वर्य पावे ॥ ८४ ॥ ऐसे हे द्विधे साधक ॥ पोटींहूनि सकामुक ॥ कामनेसारखे लोक ॥ ते आव
श्यक पावती ॥ ८५ ॥ ज्यासि माझें निष्काम भजन ॥ त्याचे प्राप्तीचें निजलक्षण ॥ तें अत्यादरें श्रीकृष्ण ॥ स्वानंदें पूर्ण सांगत ॥८६॥
॥ श्लोक ॥ ॥ मामेव नैरपेक्ष्येण भक्तियोगेन विंदति ॥ भक्तियोगं स लभते एवं यः पूजयेत माम् ॥ ५३ ॥ ॥ टीका ॥ ॥ मज मुख्य
त्वें जीवीं धरून ॥ ज्यासि माझें निष्काम भजन ॥ निष्कामता जे अनन्य ॥ ते पुरुष जाण मीं होती ॥ ८७ ॥ तो वर्तमानदेहीं असतां ॥
माझें निरूपण होय तत्त्वतां ॥ त्या आह्मां आंतौता ॥ भेद सर्वथा असेना ॥ ८८ ॥ करितां निष्काम भजन ॥ भक्त झाला मजसमान ॥

---

१ वैदिक, तांत्रिक मिळून. २ वेदशास्त्रांत. ३ स्थापन. ४ उत्साह. ५ बाजारावांचून. ६ सत्यलोक. ७ मत्स्वरूप. ८ मध्यें.


शुक
परिक्षित

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥ श्रीदत्तात्रेयायनमः ॥ श्रीरुक्मिणीपतिपांडुरंगायनमः ॥ ॥ ॐनमो जी जनार्दना ॥ नाहीं भव[1]अभवभावना ॥ न देखोनि मीतूंपणा ॥ नमन श्रीचरणा सद्गुरुराया ॥ १ ॥ नमन श्रीएकदंता ॥ एकपणें तूंचि आतां ॥ एकीं दाखविसी अनेकता ॥ परी ऐकात्मता[2] नमोडे ॥ २ ॥ तुजमाजी वासु[3] चराचरा ॥ ह्मणोनि ह्मणिजे लंबोदरा ॥ यालागीं सकळांचा सोयरा ॥ साचोंकारा[4] तूं होसी ॥ ३ ॥ तुजदेखे जो नरू ॥ त्यासि सुखाचा संसारू ॥ यालागीं विघ्नहरू ॥ नामादरू तुज साजे ॥ ४ ॥ हर्ष तें वदन गणराजा ॥ चारी पुरुषार्थ[5] त्या चारी भुजा ॥ प्रकाशियां प्रकाशी वोजा ॥ तो झळकत तुझा एकदंतू ॥ ५ ॥ पूर्वउत्तरमीमांसा दोनी ॥ लागलिया श्रवणस्थानीं[6] ॥ निःशब्दादिवाचा वदनीं ॥ कर जोडूनी उभिया ॥ ६ ॥ एकेचि काळीं सकळ सृष्टी ॥ आपुलेपणें[7] देखत उठी ॥ तेचि तुझी देखणी दृष्टी ॥ सुखसंतुष्टी विनायका ॥ ७ ॥ सुखाचें पेललें[8] दोंद ॥ नाभीं आवर्तला आनंद ॥ बोधाची मिरवे नागबंद ॥ दिसे सन्निध साजिरें ॥ ८ ॥ प्रकृति पुरुष चरण दोनी ॥ तळीं घालिशी वोजावूनी ॥ तयावरी सहजासनीं ॥ पूर्णपणीं मिरवशी ॥ ९ ॥ तुझी अणुमात्र[9] जाहलिया भेटी ॥ शोधि[illegible] विघ्न नपडे दृष्टीं ॥ तोडिसी संसारफांसोटी ॥ तोचि तुझे मुष्टीं निजपरशू ॥ १० ॥ भावें भक्त जो आवडे ॥ त्याचें उगविसी भवसांक[illegible] ॥ वोढूनि काढिसी आपणाकडे ॥ निजनिवाडें अंकुशें ॥ ११ ॥ सांच[10] निरपेक्ष[11] जो निःशंक ॥ त्याचें तूंचि वाढविशी सुख ॥ देऊनि हर्षाचे मोदक ॥ निववविसी[12] देख निजहस्तें ॥ १२ ॥ सूक्ष्माहूनि सूक्ष्म सान[13] ॥ त्यामाजी तुझें अधिष्ठान ॥ यालागीं मूषकवाहन ॥ नामाभिधान तुज साजे ॥ १३ ॥ पाहतां नरू कुंजरू ॥ अव्यक्तव्यक्ती परू ॥ ऐसा जाणोनि निर्विकारू ॥ नमना आदरू ग्रंथार्थीं ॥ १४ ॥ ऐशिया जी गणनाथा ॥ मीपणें[14] कैंचा नमिता ॥ अकर्त्ताचि जाहला कर्त्ता ॥ ग्रंथकथा विस्तारू ॥ १५ ॥ आतां नमूं सरस्वती ॥ जे सारासारविवेकमूर्ती ॥ चेतनारूपें इंद्रियवृत्ती ॥ जे चाळिती सर्व

॥ १६ ॥ जे वाचांची वाचक[15] ॥ जे प्रकाशां प्रकाशक ॥ जे बुद्धीची घोतक[16] ॥ स्वयें देख स्वप्रभा ॥ १७ ॥ ते शिवांगीं शक्ति उठी ॥

माजी दिठी[17] ॥ कां सुरसपणें दावी पुष्टी ॥ फळपणें पोटीं फळाच्या ॥ १८ ॥ साखरेअंगीं स्वादू[18] ॥ कीं सुमनामाजी[19] भंकरं[20]

॥ अनादिसिद्धू अतर्क्य ॥ १९ ॥ जे अनिर्वाच्य निजगोडी ॥ चहूं[21]वाचांमाजी वाढी ॥ ह्मणोनि वागीश्वरी

॥ २० ॥ सारासार निवडितां जनीं ॥ त्या हंसावरी हंसवाहिनी ॥ बैससी सहजासनीं ॥ अग

---

र्म, अर्थ, काम, मोक्ष. ६ कानाच्या ठिकाणी. ७ आपल्या रूपानें. ८ वाढलें ९ थोडोही. १० सत्य. ११ इ

१७दृष्टि, बाहुली. १८ गोडपणा. १९फुलांत. २०पुष्पाचे पराग. २१ परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी,

जाणती दृढ ॥ जवळी असतां न देखता मूढ ॥ अभाग्य गूढ मतिमं
आपुलेपणें अमूप ॥ कथानुरूप बोलवी ॥ २३ ॥ हा बोलू भला जाहला ॥ह्म
वा उपजला ॥ बोलीं बोला गौरविलें ॥ २४ ॥ ते वाग्विलास परमेश्वरी ॥ सर्वांग देखणी सुं
रा ॥ ग्रंथार्थकुसरी वदवी स्वयें ॥ २५ ॥ ते सदा संतुष्ट सहज ॥ ह्मणोनि निरूपणाचें चढलें भोज ॥ परी
कुज ॥ मीपणें मज येवों नेदी ॥ २६ ॥ वाग्देवतेची स्तुती ॥ वाचाचि जाहली वदती ॥ तेथें द्वैताचिये संपत्ती ॥ उमस[3]
त्ता उमसेना ॥ २७॥ तिणें बोल बोलणें मांडिलें ॥ समूळ मौनातें तोडिलें ॥ त्यावरी निरूपण घडलें ॥ न बोलणें बोलें बोलविलें॥
॥ २८ ॥ तिसी सेवकपणें दुसरा ॥ होऊनी रिघे[4] नमस्कारा ॥ तंव मीपणेंसि परा ॥ निजनिर्धारा पौरुषें ॥ २९ ॥ जेथें मीपणाचा अ[6]
भावो ॥ तेथें तूंपणासि कैंचा ठावो[7] ॥ याहीवरी करी निर्वाहो ॥ अगम्य भावो निरूपणीं ॥ ३० ॥ जैसा सागराचिया सागरीं ॥ चाल
ती लहरियांचिया हारी ॥ तैसें शब्द स्वरूपाकारीं ॥ स्वरूपावरी शोभती ॥ ३१ ॥ जैशा साखरेचिया कणिका[8] ॥ गोडिये भिन्न नव्हती
देखा ॥ तैसें निरूपण हें रसाळ सुखा ॥ ब्रह्मरसें देखा रसवृत्ती ॥ ३२ ॥ तेथें मीपणें सरस्वती ॥ बैसविलें एकताटें रसवृत्ती ॥ तेथें अ
भिन्न शेष देऊनि तृप्ती ॥ ते हे उद्गार येती कथेचे ॥ ३३ ॥ आतां वंदूं ते सज्जन ॥ जे कां आनंदचिद्घन ॥ वर्षताती स्वानंदजीवन[9]॥ सं[10]
तप्त जन निववावया ॥ ३४ ॥ चैतन्याचे अलंकार ॥ कीं ब्रह्मविद्येचे शृंगार[11] ॥ कीं ईश्वराचें मनोहर ॥ निज मंदिर निवासा ॥ ३५ ॥
ते अधिष्ठाना अधिवासू ॥ कीं सुखासीही सुखउल्हासू ॥ विश्रांतीसी विश्वासू ॥ निजरहिवासू[12] करावया ॥ ३६ ॥ कीं ते भूतदयार्णव[13]॥
कीं माहेरा आली कणव[14] ॥ नाते निर्गुणाचे अवेव ॥ जाण ठेव निर्गुणाची ॥ ३७ ॥ ना ते डोळ्यांतील दृष्टी ॥ कीं हिताची देखणी पु
ष्टी ॥ कीं संतुष्टीसि[15] संतुष्टी ॥ चरणांगुष्ठीं जयाचें ॥ ३८ ॥ ते पहाती जयाचेकडे ॥ त्याचें उतरे भवसांकडें[16]॥ परब्रह्म डोळियांपुढें ॥नि[17]
जनिवाडें उल्हासे ॥ ३९ ॥ तेथें साधनतुष्टयसायास ॥ न पाहती शास्त्रचातुर्यविलास ॥ एक धरिला पुरे विश्वास ॥ स्वयें प्रकाश ते क
रिती ॥ ४० ॥ ते जगामाजी सदा असती ॥ जीवमात्रातें सदा दिसती ॥ परी विकल्पेंचि ठकिजेतो[18] ॥ नाहीं ह्मणती नास्तिक्यें ॥ ४१ ॥
मातियेचा द्रोण[19] केला ॥ तो कोळिका भावो फळला ॥ ह्मणोनि विश्वासेंवीण नाडला ॥ जगू ठकला विकल्पें ॥ ४२ ॥ एका एकीं वि

---

[1] बोलण्यानेंच. [2] ग्रंथाच्या अर्थाचे चातुर्य. [3] विश्रांति. [4] निघतो. [5] काठिण्य. [6] नाही. [7] ठिकाण. [8] कण. [9] ब्रह्मानंद हेच पाणि. [10] विरक्त. [11] दागिने, शिणगार.
[12] आपले राहण्याचे स्थल. [13] लोकदयेचा समुद्र. [14] कण. [15] संतोष. [16] संसाराचे संकट. [17] आपले रूपानें [18] ठकले जातात. [19] द्रोणाचार्य.

श्वासतां ॥ वाणी नाहीं निजसत्ता ॥ त्याचे चरणीं भावार्थता ॥ ठेवितां माथा विश्वासें ॥ ४३ ॥ ते नमस्कारितां आवश्यक ॥ करून
ठांकती एक ॥ परी एकपणें सेवक ॥ त्यांचाचि देख स्वयें होये ॥ ४४ ॥ त्याचिया सेवेचिये गोडी ॥ ब्रह्मसुखाची उपमा थोडी ॥ जे
भजती अनन्यआवडीं ॥ ते जाणती गोंढी निजचवी ॥ ४५ ॥ ते प्रकृतीसी पर ॥ प्रकृतिरूपीं ते अविकार ॥ आकार विकार व्यवहार॥
त्याचेनि साचार बाधीना ॥ ४६ ॥ ते भोगावरी न चढती ॥ त्यागावरी नुठती ॥ आपुलिये सहजस्थि[illegible] वर्तती सर्वदा ॥४७॥
ते ज्ञाते[3]पण न मिरविती ॥ पिसे[4]पण दाखविती ॥ स्वरूप फुंजवी स्मृती ॥ गिळूनि वर्तती निजांगें ॥ ४८ [illegible]मा अंगीं जिराला ॥ वि
स्मयो येवोंचि विसरला ॥ प्रपंच परमार्थू एक जाहला ॥ हाही ठेला विभागू ॥ ४९ ॥ स्मरण विस्मरणेसी[5] गेलें ॥ देह देहींच हरप[6]
लें ॥ आंतबाहेरपण गेलें ॥ गेलें ठरलें[7] स्मरेना ॥ ५० ॥ स्वप्न जागृती जागतां गेली ॥ सुषुप्ति साक्षित्वेंसी बुडाली ॥ उन्मनीही[8] वेडाव
ली ॥ तुर्या[9] ठेली तटस्थ ॥५१॥ दृश्य द्रष्टे[10]नशीं गेलें ॥ दर्शन एकलेपणें निमालें[11] ॥ तें निमणेंपणही विरालें॥ विरवितें नेलें विरणेनी॥५२॥
ज्ञान अज्ञानातें घेऊनि गेलें ॥ तंव ज्ञातेपणही बुडालें ॥ विज्ञान[12]ही अंगीं घडलें ॥ परी नवें जडलें हें न मानीती ॥ ५३ ॥ यापरी जे
निजसज्जन ॥ तिहीं करावें सावधान ॥ द्यावें मज अवधान ॥ हें विज्ञापन बाळत्वें ॥ ५४ ॥ सूर्य सदा प्रकाशघन ॥ अग्नि सदा दे[13]दी
प्यमान ॥ तैसे संत सदा सावधान ॥ द्यावें अवधान हें बालकत्व[14] माझें ॥ ५५ ॥ तंव संत सज्जन एकवेळा ॥ थोर करोनि सोहळा ॥
आज्ञापिलों वेळोवेळां ॥ ग्रंथकवी केला प्राकृत ॥ ५६ ॥ एकांतीं लोकांतीं ॥ थोर साक्षेप केला संतीं ॥ तरी सांगा जी मजप्रती ॥
कोणे ग्रंथीं प्रवर्त्तों ॥ ५७ ॥ पुराणीं श्रेष्ठ भागवत ॥ त्याही माजी उद्धवगीत ॥ तुवां प्रवर्तावें तेथ ॥ वदतां भगवंत तुज साह्य ॥५८॥
आह्मासि पाहिजे ज्ञानकथा ॥ वरी तुजसारिखा रसाळ वक्ता ॥ तरी स्तुति सांडोनि आतां ॥ निरूपण तत्त्वतां चालवी ॥ ५९ ॥ तुज सं
तस्तवनीं उत्सावो ॥ हा तंव कळला भावो ॥ तरी कथेचा लवलाहो ॥ निज निर्वाहो उपपादी[15] ॥ ६० ॥ या संतांचे कृपावचनें ॥ ऐंका[16]
मनें ॥ तेणें वाक्यप्रसाददानें ॥ स्वानंदघनें उल्हासे ॥ ६१ ॥ जैसे मेघाचेनि गर्जनें ॥ मयूर उपरमों पाहे गगने ॥ ना नवेनि
पनें उह्लासे ॥ ६२ ॥ कां देखोनि चंद्रकर ॥ डोलों लागले चकोर[17] ॥ तैसें संतवदनींचें उत्तर ॥ आलें थोर
ला स्वामी ॥ तुमचे पुरतें कराल तुह्मी ॥ तरी वांयांचि कां मीपणें मीं ॥ मनोधर्मीं वळंगें जो ॥६४॥

---

विसरण्यासुद्धा. ६ हरवले. ७ राहिले. ८ ब्रह्मरूप मन होणे. ९ जाग्रदादीक अवस्थेचा संधी तुर्या, तुरीया. १०
एकनाथ. १७ चक्रवाक.

र्गी संज्ञा ॥ ते करीन आज्ञा स्वामींची ॥६५॥ परी तुह्मी एक करावें ॥
॥ र्विल स्वभावें निजसिद्धी ॥ ६६ ॥ अगा तुझिया मनामाजी मन ॥ शब्दीं ठेवि
॥ चालवी जाण सवेगें ॥ ६७ ॥ आतां वंदूं कुळदेवता ॥ जे एकवीरा एकनाथा ॥ ते एकीवांचू
करू नेदी ॥ ६८ ॥ एक रूप दाविलें मनीं ॥ तंव एकचि दिसे जनीं वनीं ॥ ऐसें एकचि कानीं वदनीं ॥ एक
रा ॥ ६९ ॥ ते शिवशक्तिरूपें दोनी ॥ लेऊन मिरवे एकपणीं ॥ एकपणें जाहली गुर्विणी ॥ प्रसवे एकपणीं एकवीरा ॥ ७० ॥
त एकरूपें एकवीरा ॥ प्रसवली बोधपरशुधरा ॥ जयाचा कां दरारा ॥ महावीरा अभिमानियां ॥ ७१ ॥ तेणें उपजोनि निवटिली मा
या ॥ आज्ञा पाळूनि सुख दे पितया ॥ ह्मणवोनि तो जाहला विजया ॥ लवलाह्यां दिग्मंडळीं ॥७२॥ जो कां वासना अहंभावो ॥ तो छे
दिला सहस्रार्जुनरावो ॥ स्वराज्य करोनि पहाहो ॥ अर्पी स्वयमेवो स्वयातिया ॥७३॥ तेणें मारूनि माता जीवविली ॥ तेचि गुरुदेवता आह्मां
जाहली ॥ परी स्वनावें ख्याती केली ॥ एकात्मताबोली एकनाथा ॥ ७४ ॥ ते जैं पासोनि निवटिली ॥ तैंपासोनि प्रकृति पालटली ॥ राग त्यागे
शांतिझाली ॥ निजमाउली जगदंबा ॥ ७५ ॥ तया वोसंगा घेऊन ॥ थोर दीधलें आश्वासन ॥ विषमसंकटीं समाधान ॥ स्वनामस्मरण
केलिया ॥ ७६ ॥ ते जय जय जगदंबा ॥ उदो ह्मणों ग्रंथारंभा ॥ मतीमाजी स्वयंभा ॥ योगगर्भा प्रगटली ॥ ७७ ॥ ज्याचेन रूपाअ
पांगें ॥ देही न देखती देहांगें ॥ संसार दवाळवेगें ॥ केलें वाउगें भवस्वप्न ॥ ७८ ॥ आतां वंदूं जनार्दनू ॥ जो भवगजपंचाननू ॥ जनीं
विजनीं समानू ॥ सदा संपूर्णू समत्वें ॥ ७९ ॥ जयाचेनि कृपाकटाक्षें ॥ अलक्ष्य लक्ष्येंवीण लक्षे ॥ साक्षी विसरली साक्षे ॥ निजपक्षें
गुरुत्वें ॥ ८० ॥ तेणें जीवेंवीण जीवविले ॥ मृत्युवीण मरणचि मारिलें ॥ दृष्टि देऊनि दाखविलें ॥ देखणें केलें सर्वांग ॥ ८१ ॥ देह
देहीं विदेह केलें ॥ शेखीं विदेहपण तेंही नेलें ॥ नेलेपणही हरपलें ॥ उरी उरलें उर्वरित ॥ ८२ ॥ आभावो भावेंसि गेला ॥ संदेह निः
संदेहेंसि निमाला ॥ विस्मयो विस्मयीं बुडाला ॥ वेडावला स्वानंदू ॥ ८३ ॥ तेथें आवडी होय भक्तु ॥ [illegible]चि भक्तपणाआंतू ॥
मग भज्य भजनांचा अंतू ॥ दावी अप्रांतू स्वलीला ॥ ८४ ॥ मन मनपणेंसि नेलें ॥ नमितें नेणों काय जाहलें ॥ नम्यचि अंगीं घडलें ॥
घडलें मोडलें मोडूनी ॥ ८५ ॥ दृश्य द्रष्टया जाण ॥ दोहींस एकचि मरण ॥ दर्शनही जाहलें क्षीण ॥ देखणेंपण गिळोनी ॥ ८६ ॥ आ

---

१ सर्व. २ गरोदर. ३ भय. ४ आपणच. ५ नाहीसीकेली. ६ मांडीवर. ७ संसाररूपी गजास सिंह. ८ सारखा. ९ शेवटी. १० नमस्कार करणारे. ११ उपास्य देवता, नमनास योग्य.

तां देवोचि आंघवा ॥ तेथें भक्तू न ये भक्तभावा ॥ तंव देवही मुकला देवा ॥ देवस्वभावा विसरोनी ॥ ८७ ॥ देवो देवपणें दाटला ॥ भक्त भक्तपणें आटला ॥ दोहींचाही अंतू झाला ॥ अभेदला अनंतू ॥ ८८ ॥ अत्याग त्यागेंसि विराला ॥ अभोग भोगेंसि उडाला ॥ अयोग योगेंसि बुडाला ॥ योग्यतेचा गेला अहंभावो ॥ ८९ ॥ ऐशियाही वरी अधिक सोसू ॥ सायुज्यामाजी होतसे दासू ॥ तेथील सुखाचा सौरसू ॥ अतिअविनाशू अगोचरू ॥ ९० ॥ शिवें शिवूचि यंजिजे ॥ ऐशिये अवस्थेसि साजे ॥ येह्रवीं बोलचि बोलिजे ॥ परी नपविजे निजभजन ॥ ९१ ॥ ये अभिन्नसुखसेवेआंतू ॥ नारद आनंदें नाचत गातू ॥ शुक सनकादिक संमस्तू ॥ जाहले निजभक्तू येणेंचि सुखें ॥ ९२ ॥ सागरीं भरे भरतें ॥ तें भरतें भरे तरियांतें ॥ तैसें देवें देवपणा येथें ॥ केलें मातें निजभक्तू ॥ ९३ ॥ सागरसरिताजीवन एक ॥ परी मिळणी भजन दिसे अधिक ॥ तैसें एकपणेंचि देख ॥ भजनसुख उल्हासे ॥ ९४ ॥ वाम सव्य दोन भाग ॥ परी दोंनामीं एकचि अंग ॥ तैसा देवभक्तविभाग ॥ देवपणीं सांग आभासे ॥ ९५ ॥ तेवीं आपुलेपणाचेनि मानें ॥ भक्त केलें जनार्दनें ॥ परी कायावाचामनें ॥ वर्तविजे तेणें सर्वार्थीं ॥ ९६ ॥ तो मुखाचें जाहला निजमुख ॥ द्रष्टृत्वें देखे सन्मुख ॥ तोचि विंवेकेंकरूनि देख ॥ करवी लेख ग्रंथार्थीं ॥ ९७ ॥ परी नवल त्याचें लांघव ॥ अभंगीं घातलें माझें नाव ॥ शेखीं भावाचा निजभाव ॥ उरावया ठाव नुंरवीच ॥ ९८ ॥ यया वचनां संतोषला ॥ ह्मणें भलारे भला भला ॥ निजभाविक तूंचि संचला ॥ प्रगट केला गुह्यार्थ ॥ ९९ ॥ हे स्तुति कीं निरूपण ॥ ग्रंथपीठिका कीं ब्रह्मज्ञान ॥ साहित्य कीं समाधान ॥ सज्ञानाही जाण कळेना ॥ १०० ॥ तुझा बोलचि एक एकू ॥ सोलींव विंवेकाचा विवेकू ॥ तो संतोषासि सैंतोखू ॥ आत्यंतिकू उपजवी ॥ १ ॥ तुझेनि मुखें जें जें निघे ॥ तें संतहृदयीं सौचचि[11] लागें ॥ मुमुक्षुसारंगांचीं पालिंगें ॥ रुंजी[12] निजांगें करितील ॥ २ ॥ ग्रंथारंभ पडला चोख ॥ मुक्त मुमुक्षु इतर लोक ॥ श्रवणमात्रेंचि देख ॥ निजात्मसुख पावती ॥ ३ ॥ ॥ तेणें जीवनामृततुषारें ॥ ग्रंथभूमिका विवेकांकुरें ॥ अंकुरली एकसरें ॥ फळसंभारें[13] सफलित ॥ ४ ॥ कीं निर्जीवा जीव आला ॥ नातरी सिद्धां सिद्धिलाभू झाला ॥ कीं निजवैभवें आपुला ॥ प्रियो मीनला[14] पतिव्रते ॥ ५ ॥ तैसेनि हर्षानंदें ॥ जी जी ह्मणितलें स्वानंदें ॥ तुमचेनि पादप्रसादें ॥ करीन विनोदें ग्रंथार्थू ॥ ६ ॥ श्रीरामप्रतापदर्शीं ॥ शिळा तरती सागरापोटीं ॥ कीं वसिष्ठवचनासाठीं ॥ तपे कोटी रविमंडळीं ॥ ७ ॥ कीं याज्ञवल्क्याच्या मंत्राक्षता ॥ शुष्ककाष्ठांसि[15] पल्लवता ॥ कीं धर्में

---

१ सर्व. २ पूजिजे. ३ सर्व. ४ दोन नावांत. ५ विचारानें. ६ चातुर्य. ७ उरवीत नाही. ८ आला. ९ विचाराचा. १० संतोष. ११ खरेंच. १२ शब्द. १३ फळाच्या भारानें. १४ मिळाला. १५ वाळल्या लाकडास.

श्वानू[1] सरता केला ॥ सर्वथा स्वर्गलोकीं ॥ ८ ॥ तैसे माझेनि नावें ॥ ग्रंथ होती स्वभावें ॥ आज्ञाप्रतापगौरवें ॥ गुरुवैभवें सार्थकू ॥९॥ घटित एका आणि एकादशे ॥ राशि नक्षत्र एकचि असे ॥ त्या एकामाजी जैं पूर्ण दिसे ॥ ते दशा दशांशें चढे अधिक ॥ ११० ॥ मागां पुढां एक एक कीजे ॥ त्या नाव एकादशू ह्मणिजे ॥ तें एका एकपणेंचि सहजें ॥ आलें निजवोजें ग्रंथार्थें ॥ ११ ॥ तेथें देखतेंचि करूनि देखणें ॥ अवघेंचि निर्धारूनि मनें ॥ त्यावरी एका जनार्दनें ॥ टीका करणें सार्थक ॥ १२ ॥ पाहोनि दशमाचा[2] प्रांतू ॥ एकादशाच्या उदयांतू ॥ एकादशावरी जगन्नाथू ॥ ग्रंथार्थू आरंभी ॥ १३ ॥ ह्मणवोनि एकादशाची टीका ॥ एकादशीस करी एका ॥ ते एकपणाचिया सुखा ॥ फळेल देखा एकत्वें ॥ १४ ॥ आतां वंदूं महाकवी ॥ व्यास वाल्मीक भार्गवी ॥ जयातें उशना कवी ॥ पुराणें गौरवीं बोलती ॥ १५ ॥ तिहीं आपुलिये व्युत्पत्तीं ॥ वाढवी माझी मती ॥ हेच करीतसें विनंती ॥ ग्रंथ समाप्ती न्यावया ॥ १६ ॥ वंदूं आचार्या शंकरू ॥ जो कां ग्रंथार्थविवेकचतुरू ॥ सारूनि[3] कर्मठतेचा विचारू ॥ प्रबोधदिनकरू[4] प्रकाशला ॥ १७ ॥ इतरही टीकाकार ॥ काव्यकर्ते परम चतुर ॥ त्यांचे चरणीं नमस्कार ॥ ग्रंथीं सादर तिहीं व्हावें ॥ १८ ॥ वंदूं प्राकृतकवीश्वर ॥ निवृत्तिप्रमुख ज्ञानेश्वर ॥ नामदेव चांगदेव वटेश्वर ॥ ज्याचें भाग्य थोर गुरुकृपा ॥ १९ ॥ जयांचे ग्रंथ पाहतां ॥ ज्ञान होय प्राकृता ॥ तयांचे चरणीं माथा ॥ निजात्मता निजभावें ॥ १२० ॥ संस्कृतग्रंथकर्ते ते महाकवी ॥ मी प्राकृतीं काय उणीवी ॥ नवीं जुनीं ह्मणावीं ॥ कैसेन केवीं सुवर्णसुमनें[5] ॥ २१ ॥ कपिलेचें ह्मणावें क्षीर[6] ॥ का इतरांचें काय नीर[7] ॥ वर्णास्वादें एकचि मधुर[8] ॥ दिसे साचार सारिखें ॥ २२ ॥ जें पाविजे संस्कृतअर्थें ॥ तेंचि लाभे प्राकृतें ॥ तरी नमानावया येथें ॥ विषम चित्तें तें कायी ॥ २३ ॥ कीं निरंजनीं[9] वसला रावो[10] ॥ तरी तोचि सेवकां पावन[11] ठावो ॥ तेथें सेवेसि नवचतां[12] पहाहो ॥ दंडी रावो निजभृत्यां[13] ॥ २४ ॥ दुर्बळ आणि समर्थ ॥ दोहींस रायें घातला हात ॥ तरीं दोघांसि तेथ ॥ सहजचि होत समसाम्य ॥ २५ ॥ देशभाषावैभवें ॥ प्रपंचपदार्थीं पालटलीं नावें ॥ परी रामकृष्णादि नामा नव्हे ॥ भाषावैभवें पालटू ॥ २६ ॥ संस्कृत वाणी देवें केली ॥ प्राकृत काय चोरापासोनि झाली ॥ असो या अभिमानभुली ॥ वृथा बोली काय काज[14] ॥ २७ ॥ आतां संस्कृता किंवा प्राकृता ॥ भाषा झाली जे हरिकथा ॥ ते पावनचि[15] तत्त्वतां ॥ सत्य सर्वथा मानावी ॥ २८ ॥ वंदूं भानुदास आतां ॥ जो कां पितामहाचा पिता ॥ ज्याचेनि वंश भगवंता ॥ झाला सर्वथा प्रियंकर[16] ॥ २९ ॥ जेणें बाळपणीं आंकळिला[17] भानू ॥

---

[1] कुत्रा. [2] दशमस्कंधाचा, कृष्णाचा. [3] पूर्णकरून. [4] ज्ञानसूर्य. [5] सोन्याचीफुले. [6] दूध. [7] पाणी. [8] गोड. [9] एकांतात. [10] राजा. [11] पवित्र. [12] नजातां. [13] आपल्याचाकरास. [14] काम. [15] पवित्रच. [16] आवडता. [17] स्वाधीन केला.

स्वयें झाला चिद्धानू ॥ जिंतोनि मानाभिमानू ॥ भगवद्धानू स्वयें झाला ॥ १३० ॥ जयाची पदबंधप्राप्ती ॥ पाहों आली श्रीविठ्ठलमूर्ती ॥ कानीचें कुंडल जगा ज्योतीं ॥ क्रिरितां रातीं देखिला ॥ ३१ ॥ तया भानुदासाचा चक्रपाणी ॥ तयाचाही सुत सुलक्षणी ॥ तयासि सूर्यनाम ठेवूनी ॥ निर्जीं निज होऊनी ठेला ॥ ३२ ॥ तया सूर्यप्रभाप्रतापकिरणीं ॥ मातें प्रसवली रुक्मिणी ॥ ह्मणोनि रखुमाई जननी ॥ आह्मांलागूनी सांचची[1] ॥ ३३ ॥ हे ग्रंथारंभकळा ॥ वंदिली पूर्वजमाळा ॥ धन्य निजभाग्याची[2] लीळा ॥ आलों वैष्णवकुळा जन्मोनी ॥ ३४ ॥ वैष्णवकुळनायक ॥ नारद् प्रल्हाद सनकादिक ॥ उद्धव अक्रूर श्रीशुक ॥ वसिष्ठादिक निजभक्त ॥ ३५ ॥ ते वैष्णव सकळ ॥ ग्रंथार्थी अवधानशीळ ॥ ह्मणोनि वैष्णवकुलमाळ ॥ वंदिली सकळ ग्रंथार्थी ॥ ३६ ॥ उपजलों ज्याचिया गोत्रा ॥ नमन तया विश्वामित्रा ॥ जो कां प्रतिसृष्टीचा धात्रा ॥ गायत्रीमंत्रा महत्त्वे ॥ ३७ ॥ जो उपनिषद्विवेकी[3] ॥ तो वंदिला याज्ञवल्की ॥ जो कविकर्तव्यातें पोखी[4] ॥ कृपापीयूखीं[5] वर्षोनी ॥ ३८ ॥ नमन भूतमात्रा अशेखा[6] ॥ तेणें विश्वंभरू झाला सखा ॥ ह्मणोनि ग्रंथारंभू देखा ॥ आला नेटका[7] समत्वासी ॥ ३९ ॥ आतां नमूं दत्तात्रेया ॥ जो कां आचार्यांचा आचार्या ॥ तेणें प्रवर्त्तविलें ग्रंथकार्या ॥ अर्थवावया निजबोधू[8] ॥ १४० ॥ तो शब्दातें दावितू ॥ अर्थू अर्थें प्रकाशवितू ॥ मग वक्तेपणाची मातू[9] ॥ स्वयें वदवितू यथार्थ ॥ ४१ ॥ तो ह्मणे श्रीभागवत ॥ तें भगवंताचें हृद्गत[10] ॥ त्यासीच होय प्राप्त ॥ ज्याचें निरंतर चित्त भगवंतीं ॥ ४२ ॥ तें हें ज्ञान कल्पादीं ॥ चतुःश्लोकपदबंधीं ॥ उपदेशिला सद्बुद्धी ॥ निजात्मबोधीं विधाता[11] ॥ ४३ ॥ नवल तयाचा सद्भावो ॥ शब्दमात्रें झाला अनुभवो ॥ बाप सद्गुरुकृपा पहाहो ॥ केला निःसंदेहो[12] परमेष्ठी ॥ ४४ ॥ तो चतुःश्लोकींचा बोधू ॥ गुरुमार्गें आला शुद्धू ॥ तेणें उपदेशिला नारदू ॥ अति प्रबुद्धू भावार्थी ॥ ४५ ॥ तेणें नारदू निवाला[13] ॥ अवघा अर्थमयचि झाला ॥ पूर्णपरमानंदें धाला[14] ॥ नाचों लागला निजबोधें ॥ ४६ ॥ तो ब्रह्मविणा वाहातू ॥ ब्रह्मपदें गीत गातू ॥ तेणें ब्रह्मानंदें नाचतू ॥ विचरे[15] डुल्लतू भूमंडळीं ॥ ४७ ॥ तो आला सरस्वतीतीरा ॥ तंव देखिलें व्यासऋषीश्वरा ॥ जो संशयाच्चिया पूरा ॥ अतिदुर्धरामाजी पडिला ॥ ४८ ॥ वेदार्थ सकळ प्रमाण पुराण ॥ व्यासें केलें निर्माण ॥ परी तो न पावेचि आपण ॥ निजसमाधान स्वहिताचें ॥ ४९ ॥ तो संशयसमुद्रांतू ॥ पडोनि होता बुडतू ॥ तेथें पावला ब्रह्मसुतू[16] ॥ नाभी ह्मणतू कृपाळू ॥ १५० ॥ तेणें एकांतीं नेऊन देख ॥ व्यासास केलें एक मुख ॥ मग दाविले चारीश्लोक ॥ भवमोचक निर्दुष्ट ॥ ५१ ॥ ते शूर्यातें न

---

[1] खरीच. [2] आपल्या दैवाची. [3] उपनिषदांचा विचार करणारा. [4] वाढवितो. [5] कृपारूप अमृत. [6] सर्वांस. [7] चांगला. [8] आत्मज्ञान. [9] गोष्ट. [10] मनांतील गोष्ट. [11] ब्रह्मदेव. [12] निःसंशय. [13] शांत झाला. [14] तृप्त झाला. [15] हिंडे. [16] नारद.

दाखवूनी ॥ गगनातेंही[1] चोरूनी ॥ कानातें परते सारूनी ॥ ठेला उपदेशोनी निजबोधू[2] ॥ ५२ ॥ तें नारदाचें वचन[3] ॥ करीत संशयाचें
दहन ॥ तंव व्यासासि समाधान ॥ स्वसुखें पूर्ण होंसरलें ॥ ५३ ॥ मग श्रीव्यासें आपण ॥ भागवत दशलक्षण ॥ शुकासि उपदेशिलें
जाण ॥ निजबोधें पूर्ण सार्थकू ॥ ५४ ॥ तेणें शुकही सुखावला ॥ परमानंदें[4] निवाला[5] ॥ मग समाधिस्थ राहिला ॥ निश्चळ ठेला निजशी
तीं ॥ ५५ ॥ तेथें स्वभावेंचि जाणा ॥ समाधि आली समाधाना ॥ मग परिक्षितीचिया सदना[6] ॥ अवचटें जाणा तो आला ॥ ५६ ॥
पहावया परिक्षितीचा अधिकारू ॥ तंव कलीसि केला तेणें मारू ॥ तरी धर्माहूनि दिसे थोरू ॥ अधिकारू पैं याचा ॥ ५७ ॥ कृष्ण अ
सतां धर्म ज्याला ॥ पाठी कलिभेणें[7] तो पळाला ॥ परी हा कलि निग्रहोनि ठेला[8] ॥ धर्माहूनि भला धैर्यें अधिकू ॥ ५८ ॥ अर्जुनवीर्यपरं
परा निर्व्यंग ॥ सुभद्रा माता महीचें गर्भलिंग ॥ तो अधिकाररत्न उपलिंग ॥ ज्यासि रक्षिता श्रीरंग गर्भीं झाला ॥ ५९ ॥ गर्भींच असतां
ज्यासि जाण ॥ स्पर्शों नशके शस्त्र द्रौण्य[9] ॥ त्याचा अधिकार पूर्ण ॥ सांगावया कोण समर्थ ॥ १६० ॥ जेणें रक्षिलें[10] गर्भाप्रती ॥ तया
निरीक्षी[11] सर्वांभूतीं ॥ यालागीं नावें परिक्षिती ॥ अगाध स्थिती नामाची ॥ ६१ ॥ तो अभिमन्यूचा परिक्षिती ॥ उपजला पावन[12] क
रीत क्षिती ॥ ज्याचेनि भागवताची ख्याती ॥ घातली त्रिजगती[13] परमार्थपोहे ॥ ६२ ॥ अंगीं वैराग्यविवेकू ॥ ब्रह्मालागीं त्यक्तोदकू ॥
तया देखोनि श्रीशुकू ॥ अत्यंतिकू सुखावला ॥ ६३ ॥ बाप कोपू ब्राह्मणाचा ॥ शापें अधिकारू ब्रह्मज्ञानाचा ॥ तयाच्या चरणीं काया
वाचा ॥ निजभावाचा नमस्कारू ॥ ६४ ॥ ब्रह्माहूनि ब्राह्मण थोरू ॥ हें मीच काय फार करूं ॥ जयाचा अद्यापि श्रीधरू ॥ चरणालं
कारू मिरवितू ॥ ६५ ॥ ह्मणोनि ब्रह्माचा देव ब्राह्मणू ॥ हा सत्य सत्य माझा पणू ॥ यालागीं वेदरूपें नारायणू ॥ उदरा येऊन वाढला ॥
॥ ६६ ॥ ह्मणोनि ब्राह्मण भूदेव[14] ॥ हे ब्रह्मींचे निजावेव[15] ॥ येथें न भजती ते मंददैव ॥ अतिनिर्दैव अभाग्य ॥ ६७ ॥ ब्राह्मण प्रतापाचा न
वलावो ॥ तिहीं आज्ञाधारकू केला देवो ॥ प्रतिमा प्रतिष्ठेसि पहावो ॥ प्रगटे आविर्भावो मंत्रमात्रें ॥ ६८ ॥ तंव संत ह्मणती काय पहा
वें ॥ जे स्तवनीं रचिसी भावें ॥ तेथें प्रमेय काढिसी नीच नवें ॥ साहित्यलाघवें साचार ॥ ६९ ॥ गणेशु आणि सरस्वती ॥ बैसविलीं
एके पंक्तीं ॥ तैसीच संतस्तवनीं[16] स्तुती ॥ ऐक्यवृत्तीं वदलासी ॥ १७० ॥ पाठीं कुल आणि कुलदेवता ॥ स्तवनीं वदलास जे कथा ॥ ते ऐ
कतांचि चित्त[17] चिंता ॥ विसरे सर्वथा श्रवणेंची ॥ ७१ ॥ जो सद्भावो संतचरणीं ॥ तोचि भावो ब्राह्मणीं ॥ सुखी केलें गुरुस्तवनीं ॥ धन्य वा

---

[1] आकाशास. [2] आत्मज्ञान. [3] बोलणें. [4] ब्रह्मानंदानें. [5] सुखावला. [6] घरी. [7] कलीच्या भयानें. [8] राहिला. [9] अश्वत्थामाचे. [10] सांभाळिले. [11] पाहिले. [12] पवित्र. [13] तीन लोकांत. [14] पृथिवीचे देव. [15] ब्रह्माचे अवयव. [16] साधूचेस्तवना विषयीं. [17] मन.

णी पैं तुझी ॥ ७२ ॥ तरी तुझेनि मुखें जनार्दन ॥ स्वयें वंदताहे[1] आपण ॥ हे बोलतांचि खूण ॥ कळली संपूर्ण आह्मासीं ॥ ७३ ॥ चढतें[2]
प्रमेयाचें भरतें ॥ तें नावेंक आवरोनि चित्तें ॥ पुढील कथानिरूपणातें ॥ करी निश्चितें आरोहण[4] ॥ ७४ ॥ विसरलों होतों हा भावो ॥
परी भला दीधला आठवो ॥ याचिलागीं सद्भावो ॥ तुमचे चरणीं पहाहो ठेविला ॥ ७५ ॥ उणे देखाल जें जेथें ॥ तें हातें[3] करावें पु
रतें ॥ सज्जनांमाजी सरतें ॥ करावें मातें ग्रंथार्थसिद्धी ॥ ७६ ॥ ते ह्मणती भला भला रे नेटका ॥ बरवी आणिली आया ग्रंथपीठिका॥
आतां संस्कृतावरी टीका ॥ कविपोषका वदे वहिला ॥ ७७ ॥ याच बोलावरी माझा भावो ॥ ठेवूनि पावलों पायांचा ठावो॥ तरी आ
ज्ञेसारिखा प्रस्तावो[5] ॥ करीन पहाहो कथेचा ॥ ७८ ॥ तरी नैमिषारण्या आंतू ॥ शौनकादिकांप्रति मातू ॥ सूत असे सांगतू ॥ गत क
थार्थू अन्वयो ॥ ७९ ॥ मागां दहावे स्कंधीं जाण ॥ कथा जाहली नवलक्षण ॥ आतां मोक्षाचें उपलक्षण ॥ सांगे श्रीकृष्ण एकादशीं
॥ १८० ॥ जो चिदाकाशींचा[6] पूर्ण चंद्र ॥ जो योगज्ञाननरेंद्र ॥ तो बोलता झाला शुक योगींद्र[7] ॥ परिसता नरेंद्र परिक्षिती ॥ ८१ ॥
तंव परिक्षिती ह्मणे स्वामी ॥ याचिलागीं त्यक्तोदक[8] मी ॥ तेचि कृपा केली तुह्मी ॥ तरी धन्य आह्मी निजभाग्यें[9] ॥ ८२ ॥ अगाध[10] हे मो
क्षकथा ॥ येथें ज्यासि मुमुक्षु अवस्था ॥ तिहीं पावो देऊनि अभिमानाचे माथां ॥ रिघावें[11] सर्वथा श्रवणादरीं ॥ ८३ ॥ भीतरी[12] नेऊनि
यां कान ॥ कानीं द्यावें निज[13] मन ॥ अवधाना करोनि सावधान ॥ कथानुसंधान धरावें ॥ ८४ ॥ बहुत अवतारीं अवतरला देवो ॥
परी या अवतारींचा नवलावो[14] ॥ देवां न कळे अभिप्रावो[15] ॥ अगम्य पहाहो हरिलीला ॥ ८५ ॥ उपजतांचि माये वेगळा ॥ वाढिन्नला
स्वयें स्वलीला ॥ बाळपणीं मुक्तीचा सोहळा ॥ पूतनादिसकळा निजांगें अर्पी ॥ ८६ ॥ मायेसि दाविलें विश्वरूप[16] ॥ गोपाळां दाविलें[17] वै
कुंठद्वीप ॥ परी गोवळेपणाचें रूप ॥ नेदीच[18] अल्प पालटों ॥ ८७ ॥ बाळ बळियांतें[19] मारी ॥ अचाट कृत्यें जगा देखतां करी ॥ परी बाळप
णाची बोहरी[20] ॥ तिळभरी नव्हेची ॥ ८८ ॥ ब्रह्म आणि चोरी करी ॥ देवो आणि व्यभिचारी ॥ पुत्र कलत्र आणि ब्रह्मचारी ॥ हेही प
री दाखविली ॥ ८९ ॥ अधर्में वाढविला धर्म ॥ अकर्में तारिलें[21] कर्म ॥ अनेमें नेमिला नेम ॥ अतिनिःसीम निर्दुष्ट ॥ १९० ॥ तेणें संगेंचि
सोडिला संगू ॥ भोगें[22] वाढविला योगू ॥ त्यागेंवीण केला त्यागू ॥ अति अव्यंगू निर्दोष ॥ ९१ ॥ कर्मठां व्हावया बोधू[23] ॥ कर्मजाड्या
चे तोडिले भेदू[24] ॥ भोगामाजी मोक्षपदू ॥ दाविलें विशदू प्रकट करूनी ॥ ९२ ॥ भक्ति भुक्ति[25] मुक्ती ॥ तिहीं केली एकपंक्ती ॥ काय वानूं[26]

---

१ बोलताहे. २ चढणें. ३ हातानें. ४ आरंभ. ५ गोष्ट. ६ चैतन्यरूपआकाशांतला. ७ योगींचा स्वामी. ८ पाणि नर्पिणें. ९ आपल्या दैवानें. १० फार खोल. ११ शिरावें. १२ आंत. १३ आपलें. १४ आश्चर्य. १५ अभिप्राय. १६ महद्रूप. १७ दाखविलें. १८ नदेई. १९ पराक्रमीपुरुषास. २० कमीपणा. २१ रक्षिलें. २२ विषयभोगानें. २३ ज्ञान. २४ भेद. २५ विषयभोग. २६ वर्णू.

याची ख्याती ॥ खाऊन माती विश्वरूप दावी ॥ ९३ ॥ त्याचिया परमात्मचरित्रा ॥ तुज सांगेन परमपवित्रा ॥ परी निजबोधाचा खरा ॥ या अवतारीं पुरा पवाडू केला ॥ ९४ ॥ एकादशाच्या तात्पर्यार्थीं ॥ साक्षेपें सविस्तारें मुक्ती ॥ बोलिलीसे आद्यंतीं[2] ॥ परमात्मस्थिती निजबोधू[1] ॥ ९५ ॥ तेथें नारदें वसुदेवाप्रती ॥ संवादू निमिजायंतीं ॥ सांगीतली कथासंगती ॥ संक्षेपस्थिती यानाव ॥ ९६ ॥ तेचि उद्धवाची परमप्रीती ॥ नानादृष्टांतें उपपत्ती ॥ स्वमुखें बोलिला श्रीपती[3] ॥ ते कथा निश्चितीं सविस्तर ॥ ९७ ॥ दशमीं निरोधलक्षण ॥ मागां केलें निरूपण[4] ॥ जेथें धराभार[5] अधर्म जन ॥ निर्दाळी[6] श्रीकृष्ण नानायुक्तीं ॥ ९८ ॥ ज्याचेनि अधर्मभारें क्षिती ॥ सदा आक्रंदत होती ॥ जीचा सात्य श्रीपती ॥ पूर्ण ब्रह्मस्थिती अवतरला[7] ॥ ९९ ॥ दुष्ट दैत्य आणि दानव ॥ धराभार राजे सर्व ॥ वधिता झाला श्रीकृष्ण देव ॥ तो गतकथाभाव शुक सांगे ॥ २०० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीबादरायणिरुवाच ॥ ॥ कृत्वा दैत्यवधं कृष्णः सरामो यदुभिर्वृतः ॥ भुवोऽवतारयद्भारं जविष्ठं जनयन्कलिम् ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ पूर्ण ब्रह्म स्वयें श्रीकृष्ण ॥ बळी बळराम लोकरमण[8] ॥ निधडे यादव मेळवूनि जाण ॥ दैत्यनिर्दळण श्रीकृष्णें केलें ॥ १ ॥ जे यादवांसि नयेत वधीं ॥ तेथें श्रीकृष्ण करी बुद्धी ॥ सखे स्वजन गोत्र संबंधी ॥ कलह[9] उपपादी[10] अतिघोर ॥ २ ॥ उतरावया धराभार ॥ कलहमिसें सारंगधर ॥ मारवी कौरवभार ॥ पंडुकुमर[11] क्षोभवूनी[12] ॥ ३ ॥ ॥ श्लोक ॥ ये कोपिताः सुबहु पांडुसुताः सपत्नैर्दुर्द्यूतहेलनकचग्रहणादिभिस्तान् ॥ कृत्वा निमित्तमितरेतरतः समेतान्हत्वा नृपान्निरहरत्क्षितिभारमीशः ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ॥ दुष्ट अकर्मी अतिघोर ॥ ज्यांची सेना धराभार[13] ॥ ते वधार्थ करावया एकत्र ॥ कलहाचें सूत्र उपपादी[10] ॥ ४ ॥ येणें श्रीकृष्णसंकल्पोद्देशें ॥ हों सरले कपटफांसे ॥ तेणें कपटें बांधून कैसे ॥ वधवी अनायासें कौरवभार[14] ॥ ५ ॥ जगीं द्यूत खेळिजे दुष्टें ॥ तेंही आरंभिलें कपटें ॥ धर्मावरी फांसे खोटे ॥ घालिती हटें दुर्बुद्धी ॥ ६ ॥ भाळेभोळे अज्ञानजनीं ॥ तेही गांजिती ना धर्मपत्नी ॥ ते साचचि[15] धर्माची मानिनी ॥ आणिली बांधोनी सभेमाजी ॥ ७ ॥ दुःशासनें धरिले वेणीकच[16] ॥ तेणें वोढिली कचकच ॥ तें कर्म त्यांचें त्यांसीच ॥ भंवलें साच त्यां भोंवतें ॥ ८ ॥ वनीं कोणाही कोण नागवी ॥ तो नागोवा राजा आणवी ॥ सभेसि राजा उगाणवी ॥ ते मृत्यूची पदवी मस्तका आली ॥ ९ ॥ अन्यायेंवीण नागवी रावो[17] ॥ तैं धांवणियां धांवे देवो ॥ द्रौपदीवस्त्राहरण पहाहो ॥ मुख्य अन्यावो[18] हा कौरवांचा ॥ २१० ॥ अग्निदानें गरदानें[19] ॥ धन[20] दाराअपहारणें ॥ घाला घालोनि मारणें ॥ शस्त्रपाणी[21] होणें वधार्थ ॥ ११ ॥ अव

---

[1] आत्मज्ञानाचा. [2] आरंभीं आणि शेवटीं. [3] श्रीकृष्ण. [4] कथन. [5] पृथिवीचे वोझें. [6] नाशकरी. [7] अवतार घेतला. [8] लोकांस संतोष करणारा. [9] वैर. [10] करी. [11] पंडूचे पुत्र धर्म आदि. [12] क्षुब्धवून. [13] पृथ्वीस भार. [10] करी. [14] कौरवाचें सैन्य. [15] खरेच. [16] वेणीचे केस. [17] राजा. [18] अन्याय. [19] विष देणें. [20] द्रव्य आणि स्त्री चोरणें. [21] हातीं शस्त्रधरणें.

ज्ञा आणि हेळण ॥ दुरुक्तीं[1] जें धर्मछळण ॥ हेंचि निमित्तासि कारण ॥ केलें संपूर्ण श्रीकृष्णें ॥१२॥ पतिव्रतेचें वस्त्राहरण[2] ॥ तेणें तत्काळ पावे मरण ॥ हेंच कलहाचें कारण ॥ कुळनिर्दळण[3] येणें कर्में ॥ १३ ॥ ऐसा जो धर्माचा विरोधी ॥ त्यासि देवो अवश्य वधी[4] ॥ यालागीं पांडवांचिये बुद्धी ॥ अत्युग्र त्रिशुद्धी उपजवी कोपू[5] ॥ १४ ॥ भूभारहरणचरित्र ॥ सखे स्वजन सुहृद स्वगोत्र ॥ शास्त्रविवेकी अतिपवित्र ॥ त्यांमाजी विचित्र उपजवी[6] कलहो ॥१५॥ धराभार हरावया गोविंदू ॥ कळवळियाचे सखे बंधू ॥ करविला तेथ गोत्रवधू ॥ साध्य संबंधू राज्यभरेंसी ॥ १६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भूभारराजपृतनायदुभिर्निरस्य गुप्तैः स्वबाहुभिरचिंतयदप्रमेयः ॥ मन्येऽवनेर्ननु गतोऽप्यगतं हि भारं यद्यादवं कुलमहो ह्यविषह्यमास्ते ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐसे पक्षपाती राजे अपार[7] ॥ अमित सेना धराभार ॥ मारविले अधर्मकर ॥ निमित्तांतर कलहाचें ॥ १७ ॥ पृथ्वीचे अधर्मसेनासंभार ॥ शोधशोधूनि राजे मारिले अपार ॥ परी उतरला धराभार[8] ॥ हें सारंगधर नमनीच[9] ॥ १८ ॥ यादव करूनि अतुर्बळी ॥ नाना दुष्ट मर्दिले[10] सकळी ॥ परी यादव राहिले प्रबळी ॥ हें नमनींच केवळ श्रीकृष्ण ॥ १९ ॥ न होतां यादवांचें निर्दळण[11] ॥ नुतरे[12] धराभार[13] संपूर्ण ॥ ऐसें मानिता झाला श्रीकृष्ण ॥ कुळनिर्दळण[14] तो चिंती ॥२२०॥ अग्नि कर्पूर[15] खाऊनि वाढे ॥ कापुरांतीं[16] अग्नीही उडे ॥ तैसें यादवांचें अतिगाढें ॥ आलें रोकडें निदान[17] ॥ २१ ॥ केळी फळे तंव वाढे वाढी ॥ फळपाकें माळी झाड तोडी ॥ तैशी यादवकुळाची शींग[18] गाढी ॥ वाढली रोकडी मरणार्थ ॥ २२ ॥ फळ परिपाकें परमळी ॥ तें घेऊन जाय माळी ॥ तैशीं स्वकुळफळें वनमाळी ॥ न्यावया तत्काळीं स्वयें इच्छी ॥ २३ ॥ अनंतबाहुप्रतापें ॥ यादव वाढले श्रीकृष्णरूपें ॥ तोचि निधनाचेनि[19] संकल्पें ॥ कालरूपें क्षोभला[20] ॥ २४ ॥ अतुर्बळी अतिप्रबळ ॥ वाढलें जें यादवकुळ ॥ ते वीर देखोनि सकळ ॥ असाध्य केवळ श्रीकृष्णाची ॥ २५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नैवान्यतः परिभावोऽस्य भवेत्कथंचिन्मत्संश्रयस्य विभवोन्नहनस्य नित्यम् ॥ अंतःकलिं यदुकुलस्य विधाय वेणुस्तंबस्य वन्हिमिव शांतिमुपैमि धाम ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ मज गेलिया निजधामा[21] ॥ हेचि प्रवर्ततील अधर्मा ॥ श्रियोन्नत अतिगर्व महिमा ॥ मुख्य अकर्मा निजहेतू ॥ २६ ॥ हे मद्बळें अतिप्रबळ ॥ अतिरथी झाले सकळ ॥ यांसि अप्रतिमल्ल दिग्मंडळ ॥ यांतें दमिता केवळ मीचि एक ॥ २७ ॥ हे नाटोपती[22] इंद्रादिदेवां ॥ दैत्यराक्षसां कां दानवां ॥ शेखीं[23] निर्दाळावया यादवां ॥ मागुतें मज तेव्हां पडे येणें ॥ २८ ॥ तरी आतांचि आपुले दृष्टी ॥ कुळ बांधूं काळगांठीं[24] ॥ ऐसा विचार जगजेठी ॥ निश्चयो

---

१ वाईट बोलणें. २ वस्त्र फेडणें. ३ नाश. ४ मारी. ५ क्रोध. ६ उत्पन्न करी. ७ बहुत. ८ पृथ्वीचे वोझें. ९ मानीत नाहींच. १० नाशिले. ११ नाश. १२ उरत नाहीं. १३ पृथ्वीचा भार. १४ कुलाचा नाश. १५ कापूर. १६ कापूरजळून गेल्यावर. १७ मरण. १८ पूर्णता. १९ मरणाचे. २० रागावला. २१ स्वस्थानीं. २२ आटोपणार नाहीत. २३ शेवटी. २४ मृत्युचे पदरीं.

पोटीं[1] दृढ धरी ॥ २९ ॥ यदुवंशवंशजाळी ॥ वाढली श्रीकृष्णकृपाजळीं ॥ तेथें अवकृपेची इंगळी ॥ ऋषिशापमेळीं कपटें पडली ॥ २३० ॥ ते मुळीं पेटली श्रीकृष्णसंकल्पें ॥ धडाडली[2] ब्रह्मशापें ॥ ते स्वजनविरोधरूपें ॥ काळाग्निकोपें नाशिली ॥ ३१ ॥ ऐसें यादवकुळनिर्दळण ॥ करूनि स्वयें श्रीकृष्ण ॥ निसुर निजधामा गमन ॥ स्वलीला आपण करूं इच्छी ॥ ३२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवं व्यवसितो राजन्सत्यसंकल्प ईश्वरः ॥ शापव्याजेन विप्राणां संजऱ्हे स्वकुलं विभुः ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ यापरी आपुलें कुळ ॥ नासूं आदरिलें[3] तत्काळ ॥ हाचि विचार अढळ ॥ केला समूळ कुळक्षयार्थ[4] ॥ ३३ ॥ हेंचि कार्य होय कैसें ॥ तैं विचारिलें[5] जगदीशें ॥ ब्राह्म शापाचेनि मिसें[6] ॥ कुळ अनायासें नासेल ॥ ३४ ॥ इतुकें जंव हें सिद्धी जाय ॥ तैं सरलें अवतारकृतकार्य[7] ॥ मग स्वधामा यदुवर्य ॥ जाऊं पाहे स्वलीला ॥ ३५ ॥ लीलाविग्रही सुंदर पूर्ण ॥ गुण कर्म क्रिया अतिपावन[8] ॥ जगदुद्धार श्रीकृष्ण ॥ ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ३६ ॥ ॥ श्लोक ॥ स्वमूर्त्या लोकलावण्यनिर्मुक्त्या लोचनं नृणाम् ॥ गीर्भिस्ताः स्मरतां चित्तं पदैस्तानीक्षतां क्रियाः ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो सकळमंगळां मंगळ पूर्ण ॥ जो कां गोकुळीं कामरमण ॥ मोक्षाचें तारूं[9] स्वयें श्रीकृष्ण ॥ ज्याचें बरवेपण अलोलिक ॥ ३७ ॥ जो भक्तकामकल्पद्रुम ॥ मनोहर मेघश्याम ॥ ज्याचें त्रिलोकीं दाटुगें[10] नाम ॥ स्वयें पुरुषोत्तम शोभतू ॥ ३८ ॥ श्रीकृष्णाचिया सौंदर्यापुढें ॥ लक्ष्मी भुलोनि झाली वेडें ॥ मदन[11] पोटा आलें बापुडें ॥ तेथें कोणीकडे इंद्र चंद्र ॥ ३९ ॥ ज्याचें त्रैलोक्यपावन काम ॥ जो करी असुरांतें भस्म ॥ तो बोलिजे अवाप्तकाम ॥ भक्तां सुगम[12] सर्वदा ॥ २४० ॥ त्रिलोकींचें बरवेंपण[13] ॥ भुलोनि कृष्णापाशीं आलें जाण ॥ ना कृष्णलेशें बरवेपण ॥ शोभे संपूर्ण तिहीं लोकीं ॥ ४१ ॥ जो सकळसौंदर्याची शोभा ॥ जो लावण्याचा अतिवालभा ॥ ज्याचिया अंगसंगप्रभा ॥ आणिली शोभा जगासी ॥ ४२ ॥ जो हरिखत्वाचा[14] सोलींव हरिख ॥ कीं सुखाचें जें परमसुख ॥ ज्याचेनि विश्रांती[15] देख ॥ होय आत्यंतिक[16] विसांवा ॥ ४३ ॥ तो अमूर्ति मूर्तिधारण ॥ कीं सकळलोकलावण्य ॥ शोभा शोभवी श्रीकृष्ण ॥ सौभाग्यसंपूर्ण साजिरा ॥ ४४ ॥ घृत[17] थिजलें कीं विघुरलें[18] ॥ परी घृतपणा नाहीं मुकलें ॥ तेवीं अमूर्त मूर्त मुसावलें[19] ॥ परी तें संचलें परब्रह्म ॥ ४५ ॥ तयासि देखिलियाचि पुरे ॥ देखा देखी देखणी सरे ॥ पहाते पाहणेंसि माघारें ॥ लाजोनि वोसरे सलज्ज ॥ ४६ ॥ दृष्टी धाली दे ढेंकर ॥ आपण आपुलें शेजार ॥ होवोनियां परात्पर ॥ सुखाचें सार श्रीकृष्णरूपीं ॥ ४७ ॥ श्रीकृष्णाची चाखिल्या गोडी ॥ रसस्वादु[20] रसना न सोडी ॥ जो

---

[1] मनांत. [2] पेटली. [3] इच्छिले. [4] कुलाच्या नाशाकरितां. [5] चिंतिले. [6] निमित्तानें. [7] अवतारांत केलेलें काम. [8] अत्यंत पवित्र. [9] नांव. [10] व्याप्त. [11] काम. [12] सोपा. [13] चांगलेपण. [14] हर्षाचा. [15] विसावा. [16] अधीक. [17] तूप. [18] पातळ झाले. [19] एक झाले. [20] रसाची गोडी.

जाणे चाखणेंपणाची गोडी ॥ चाखणें दवडी[1] चाखोनी ॥ ४८ ॥ नवल तेथींचें गोडपण ॥ अमृतही फिकें[2] केलें जाण ॥ यापरी रसना आपण ॥ हरिरसीं पूर्ण सुखावे ॥ ४९ ॥ लागतां श्रीकृष्णाचा सुवावो[3] ॥ अवघा संसारचि होय वावो[4] ॥ सेवितां श्रीकृष्णसुगंध वावो ॥ घ्राणासि पहाहो आन[5] नावडे ॥ २५० ॥ वास सुवासु सुमन ॥ घ्रेय घ्राता आणि घ्राण ॥ कृष्णमकरंदें जाण ॥ विश्रमा संपूर्ण स्वयें येती ॥ ५१ ॥ ॥ जयाचेनि अंगस्पर्शें ॥ देहदेही देहपणें नासे ॥ अंगचि अंगातें कैसें ॥ विसरे आपैसें[6] देहबुद्धी ॥ ५२ ॥ कठिण कठिणपणें गेलें ॥ मृदूचें मृदुपणही नेलें ॥ कृष्णस्पर्शें ऐसें केलें ॥ स्पर्शाचें ठेलें स्पर्शत्व ॥ ५३ ॥ तयाचेनि पठणें वाचा ॥ ठावो वाच्यवाचकांचा ॥ नेतिशब्दें पुसोनि साचा ॥ करी शब्दाचा निःशब्दू ॥ ५४ ॥ बोलू बोलणेंचि ठेलें ॥ बोलतें नेणों काय झालें ॥ कृष्णशब्दें ऐसें केलें ॥ वाचेनें नेलें वाचकत्व ॥ ५५ ॥ चित्त चिंतितांच पाये[7] ॥ चित्तपणा[8] विसरोनि जाये ॥ मग निश्चिंतपणीं राहे ॥ कृष्णचरणीं निवांत ॥ ५६ ॥ चित्त चिंता चिंतन ॥ तिहींची नुरे[9] आठवण ॥ चिंतितांचि श्रीकृष्णचरण ॥ ब्रह्म परिपूर्ण निजचित्त[10] ॥ ५७ ॥ नवल तयाचा पराक्रम ॥ पाहतां पारुखें[11] कर्माकर्म ॥ मग कर्मकर्ता क्रिया भ्रम ॥ करी निर्भ्रम पदरजें ॥ ५८ ॥ पाहतां पाउलाचा माग ॥ तुटती कर्माकर्मांचे लाग[12] ॥ कर्माचें मुख्य माया अंग ॥ तिचा विभाग उरों नेदी ॥ ५९ ॥ गाईमागिलीं कृष्णपाउलें ॥ पाहतां कर्म कर्तेनसीं गेले ॥ अकर्म ह्मणणें नाहीं उरलें ॥ ऐसें कर्म केलें निष्कर्म ॥ २६० ॥ जयाचेनि कीर्तिश्रवणें[13] ॥ श्रोता नुरे श्रोतेपणें ॥ वक्ता पारुखे[14] वक्तेपणें ॥ पावन[15] श्रवणें परब्रह्म ॥ ६१ ॥

॥ श्लोक ॥ ॥ आच्छिद्य कीर्तिं सुश्लोकां वितत्य ह्यंजसा नु कौ ॥ तमोऽनया तरिष्यंतीत्यगात्स्वं पदमीश्वरः ॥ ७ ॥

॥ टीका ॥ ॥ यापरी उदारकीर्ती[16] ॥ थोर केली अवतारख्याती ॥ जेणें जड जीव उद्धरती[17] ॥ श्रवणें त्रिजगती[18] पावन होय ॥ ६२ ॥ स्वधामा गेलिया चक्रधरू[19] ॥ मागां तरावया संसारू ॥ कृष्णकीर्ति सुगम तारूं ॥ ठेवूनि श्रीधरू स्वयें गेला ॥ ६३ ॥ नवल त्या तारुवाची स्थिती ॥ बुडवूं नेणें कल्पांतीं ॥ श्रवणें तरले नेणों किती ॥ पुढेंही तरती श्रद्धाळू ॥ ६४ ॥ श्रीकृष्णकीर्तीचें तारूं ॥ घालितां आटे भवसागरू[20] ॥ तेथें कोरड्या पाउलें उतारू[21] ॥ श्रवणार्थी नरू स्वयें लाहे[22] ॥ ६५ ॥ जे कृष्णकीर्ति करिती पठण ॥ त्यांच्या संसारासि पडे शून्य ॥ कीर्तिवंत ते अतिपावन ॥ त्यांतें सुरगण[23] वंदिती ॥ ६६ ॥ आदरें पढतां श्रीकृष्णकीर्ती ॥ पायां लागती चारी[24]

---

१ टाकी. २ कमी गोड. ३ सुगावा. ४ व्यर्थ. ५ अन्य, दुसरें. ६ आपले आपण. ७ मिळतें. ८ मनपणा. ९ उरत नाही. १० आपले मन. ११ परके. १२ संबंध. १३ यश ऐकण्यानें. १४ परका. १५ पवित्र. १६ जगतास पवित्र करणारी ज्याची कीर्ति. १७ मुक्त होतात. १८ तीन लोक. १९ कृष्ण. २० संसार ह्माच समुद्र. २१ उतरून जाणारा. २२ मिळतो. २३ देवसमूह. २४ सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता.

मुक्ती ॥ त्यांचेनि पावन[१] त्रिजगती[२] ॥ परमनिवृत्ती[३] हरिनामें ॥ ६७ ॥ श्रीकृष्णकीर्तिनामाक्षरें ॥ रिघतांचि श्रवणद्वारें ॥ भीतरील[४] तम ए
कसरें ॥ निघे बाहेरें गजबजोनी ॥ ६८ ॥ तंव कृष्णकीर्तिकथागजरीं ॥ तमासि[५] ठाव नुरेचि बाहेरी ॥ धाकेंचि निमे[६] सपरिवारीं ॥ कृ
ष्णकीर्तिमाझारीं परमानंदें ॥ ६९ ॥ कृष्णकीर्तिप्रताप प्रकाशें ॥ संसार कृष्णमय दिसे ॥ कीर्ति कीर्तिमंता ऐसें ॥ तें अनायासें निजसु[७]
ख ॥ २७० ॥ जो देखिलिया देखणें सरे ॥ जो चाखिलिया चाखणें पुरे ॥ जो ऐकिलिया ऐकणें वोसरे ॥ जो चिंतिलिया मुरे[८] चित्तवृत्ती
॥ ७१ ॥ ज्यासि झालिया भेटी[९] ॥ भेटीसि न पडे तुटी ॥ ज्यासि बोलतां गोठी ॥ पडे मिठी परमार्थीं ॥ ७२ ॥ ज्यासि दीधलिया खेंव ॥ खेवाची
पुरे हांव ॥ ज्याचें घेतांचि नांव ॥ नासे सर्व महाभय[१०] ॥ ७३ ॥ तो सत्यसंकल्प ईश्वरू ॥ स्वलीला असे सर्वेश्वरू ॥ स्वपदासि सारंगध
रू ॥ अतिसत्वरू निघाला ॥ ७४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ राजोवाच ॥ ॥ ब्रह्मण्यानां वदान्यानां नित्यं वृद्धोपसेविनाम् ॥ विप्रशापः कथम
भूद्वृष्णीनां कृष्णचेतसाम् ॥ ॥ टीका ॥ ॥ आदरें पुसे परिक्षिती ॥ यादव विनीत[११] विप्रभक्ती ॥ त्यांसि शाप घडे कैशिया रीतीं ॥ तें सां
ग मजप्रती शुकयोगींद्रा ॥ ७५ ॥ यादव दानें अति उदार ॥ राजे होऊनि परम पवित्र ॥ ब्राह्मणसेवे तत्पर ॥ आज्ञाधर कृष्णाचे ॥ ७६ ॥
यादव सदा कृष्णयोगेंसी ॥ नित्यसाधु यादवांपासीं ॥ तेथेंचि वसे नारदऋषी ॥ शाप यादवांसी घडे कैसा ॥ ७७ ॥ दक्षशाप[१२] न बाधी कृ
ष्णापाशीं ॥ ह्मणोनि नारद वसे द्वारकेसी ॥ तोचि श्रीकृष्ण असतां अंगेंसी ॥ शाप यादवांसी घडे कैसा ॥ ७८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥
यन्निमित्तः स वै शापो यादृशो द्विजसत्तम ॥ कथमेकात्मनां भेद एतत्सर्वं वदस्व मे ॥ ॥ टीका ॥ ॥ शापासि मूळ मुख्य संतापू ॥ कैसेनि
ब्राह्मणा आला कोपू[१३] ॥ कोणपरीचा दीधला शापू ॥ संक्षेपरूपू सांगावा ॥ ७९ ॥ यादव समस्त सखे बंधू ॥ त्यांसि प्रतिपाळी स्वयें गोविंदू ॥
ऐकात्मता[१४] स्वगोत्रसंबंधू ॥ त्यांमाजी युद्धभेदू घडे कैसा ॥ २८० ॥ आत्मा वै पुत्रनामासी ॥ हे श्रुति प्रमाण सर्वांसी ॥ तेथें शाप बाधी कृष्णा[१५]
त्मजांसी ॥ केवीं आलें यासी सत्यत्व ॥ ८१ ॥ कृष्णसंकल्प कुळनाशन ॥ तोचि ब्रह्मशापासि[१६] कारण ॥ यालागीं बाधक[१७] जाण ॥ होय संपूर्ण
यादवा ॥ ८२ ॥ सृष्टी सृजी[१८] पाळी संहारी ॥ हें कृष्ण संकल्पमात्रें करी ॥ तो यदुकुळनिधान[१९] निर्धारी ॥ त्याची अवतारथोरी शुक सांगे ॥ ८३ ॥
श्लोक ॥ श्रीशुकउवाच ॥ ॥ बिभ्रद्वपुः सकलसुंदरसन्निवेशं कर्माचरन् भुवि सुमंगलमाप्तकामः ॥ आस्थाय धाम रममाण उदारकीर्तिः संह
र्तुमैच्छत कुलं स्थितकृत्यशेषः ॥ १० ॥ कर्माणि पुण्यनिवहानि सुमंगलानि गायज्जगत्कलिमलापहराणि कृत्वा ॥ कालात्मना निवसता

---

[१] पवित्र. [२] तीनलोक. [३] फार सुख. [४] आंतील. [५] अज्ञानास. [६] नाहीसा होतो. [७] आत्मसुख. [८] नाहोसी झाली. [९] भेट. [१०] जन्ममरणाचें भय. [११] नम्र. [१२] दक्षप्रजापतीनें दिलेला शाप. [१३] क्रोध. [१४] एकरूपता. [१५] कृष्णाच्या मुलांस. [१६] ब्राह्मणाच्या शापास. [१७] नाशक. [१८] उत्पन्न करितो. [१९] यादवांच्या कुलाचानाशक.

यदुदेवगेहे पिंडारकं समगमन् मुनयो विसृष्टाः ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ रायासि ह्मणे श्रीशुक ॥ कर्ता करविता श्रीकृष्ण एक ॥ तो शापार्थ आत्यंतिक ॥ आत्मजां[1] अविवेक उपजवी[2] स्वयें ॥ ८४ ॥ स्वयें जावया निजधामा[3] ॥ थोर आवडी पुरुषोत्तमा ॥ यालागीं अवशेष[4] कर्मा ॥ मेघश्यामा लवलाहें[5] ॥ ८५ ॥ केव्हा येईल कुलक्षयो ॥ हेंचि मनीं धरी देवो ॥ तो देवाचाचि भावो ॥ शापासि पहावो दृढमूळ ॥ ८६ ॥ जो कुलक्षयो चिंती ॥ त्या कृष्णाची सुंदरमूर्ती ॥ शुक सांगे परिक्षितीप्रती ॥ स्वानंद चित्तीं उल्हासे ॥ ८७ ॥ सकळ सौंदर्या अधिवासु ॥ धरोनि मनोहर[6] नटवेषू ॥ लावण्यकळान्यासू ॥ आणी जगदीशु[7] निजांगें ॥ ८८ ॥ नवल सौंदर्या बीक[8] उठी ॥ सर्वांगी गुंतल्या जनदिठी[9] ॥ कृष्णस्वरूपीं पडे मिठी ॥ होत घरटी[10] डोळयां ॥ ८९ ॥ जैशी गुळीं माशीवरी माशी ॥ तेवीं दिठीवरि[11] दिठी कृष्णरूपासी ॥ सर्वांगीं ओढोनि चौपासीं ॥ अहर्निशीं[12] न सांडिती ॥ २९० ॥ नयन लांचावले[13] लोभा ॥ दृष्टीसि निघालिया जिभा ॥ यापरी श्रीकृष्णशोभा ॥ स्वानंदगाभा साकार ॥ ९१ ॥ तो श्रीकृष्ण देखिला ज्या दिठीं ॥ ते परतोनि मागुती नुठी[14] ॥ अधिकाधिक घाली मिठी ॥ देखे सकळसृष्टीं श्रीकृष्ण ॥ ९२ ॥ ऐशी डोळयां आवडी ॥ ह्मणोनि कामिनी परवडी ॥ यालागीं गोपिकां गोडी ॥ अतिगाढी गोविंदीं ॥ ९३ ॥ कृष्ण अतिसुंदर मनोरम ॥ ह्मणाल असेल त्यासि विषयधर्म ॥ तरी तो अवाप्तसकळकाम ॥ आत्माराम श्रीकृष्ण ॥ ९४ ॥ कृष्ण अवाप्तसकळकाम ॥ त्या द्वारका गृहाश्रम ॥ स्त्रिया पुत्र राज्यसंभ्रम ॥ विषयकाम कां भोगी ॥ ९५ ॥ चहूं आश्रमा प्रकाशकू ॥ त्रिलोकीं कृष्ण गृहस्थ एकू ॥ तोचि ब्रह्मचारी निष्टंकू[15] ॥ अतिनेटकू संन्यासी ॥ ९६ ॥ कृष्ण देहीं नाहीं दैवबळ ॥ लीलाविग्रही चित्कल्लोळ ॥ त्याचीं सर्वकर्में पावनशीळ ॥ उद्धरी सकळ श्रवणकथनें ॥ ९७ ॥ कृष्णकर्माचें करी जो स्मरण ॥ तें कर्म तोडी कर्मबंधन ॥ ऐसें उदार कर्माचरण ॥ आचरला श्रीकृष्ण दीनोद्धरणा ॥ ९८ ॥ श्रीकृष्ण असेल सकाम ॥ ह्मणाल यालागीं आचरे कर्म ॥ ज्याचें नाम निर्दाळी सर्वकर्म ॥ तो स्वयें सकाम घडे केवीं ॥ ९९ ॥ श्रीकृष्णाचा स्मरतां काम ॥ स्वयें संन्यासी होती निष्काम ॥ सकामाचा निर्दळे काम ॥ ऐसें उदार कर्म आचरला ॥ ३०० ॥ तेणें आवाप्तसकळकामें ॥ ऐशीं आचरला[16] अगाध[17] कर्में ॥ मानव[18] तरावया मनोधर्में ॥ कीर्ति मेघश्यामें विस्तारिली[19] ॥ १ ॥ कैसें कर्म सुमंगळू ॥ कानीं पडतांचि आमूळू[20] ॥ नासोनियां कर्ममळू ॥ जाती तत्काळू श्रवणादरें ॥ २ ॥ श्रवणें[21] उपजे सद्भावो ॥ सद्भावें प्रगटे देवो ॥ तेणें निर्दळे[22] अहंभावो ॥ ऐशी उदार पहावो हरिकीर्ती ॥ ३ ॥ श्री

---

[1] पुत्रास.
[2] उत्पन्न करविला.
[3] आपल्या स्थलास.
[4] बाकी.
[5] लवकर.
[6] सुंदर.
[7] जगताचा स्वामी.
[8] बीज.
[9] लोकांच्या दृष्टी.
[10] फेरे.
[11] दृष्टीवर.
[12] रात्रंदिवस.
[13] सोकावले.
[14] उठत नाही.
[15] यावज्जीव ब्रह्मचारी.
[16] करिता झाला.
[17] गुप्ततात्पर्याची.
[18] मनुष्य.
[19] वाढविली.
[20] समूल.
[21] ऐकिल्यानें.
[22] नाहीसा होतो.

कृष्णकीर्तीचें स्मरण ॥ कां करितां श्रवण पठण ॥ मागें उद्धरले बहुसाल[1] जन ॥ पुढें भविष्यमाण उद्धरती ॥ ४ ॥ जरी केलिया होतील पुण्यराशी ॥ तरी अवधान होय हरिकथेसी ॥ येऱ्हवीं ऐकतां येरांसी ॥ लागे अनायासीं अतिनिद्रा ॥ ५ ॥ जे हरिकथेसि सादर ॥ त्यांच्या पुण्या नाहीं पार ॥ कृष्णें सुगमोपाव[2] केला थोर ॥ दीनोद्धार हरिकीर्तनें ॥ ६ ॥ कृष्णकीर्तनें गर्जतां गोठी ॥ लाजल्या प्रायश्चित्तांचिया कोटी ॥ उतरल्या तीर्थांचिया उठी ॥ नामासाठीं निजमोक्षू ॥ ७ ॥ ऐसा निजकीर्तिउदारू ॥ पूर्ण ब्रह्म सारंगधरू ॥ लीलाविग्रही श्रीधरू ॥ पूर्णावतारू यदुवंशीं[3] ॥ ८ ॥ उतरला धराभार[4] येथ ॥ सत्य नमनी[5] श्रीकृष्णनाथ ॥ यादव उरले अति अद्भुत ॥ हेही समस्त निर्दाळावे[6] ॥ ९ ॥ ये अवतारीं हृषीकेशी ॥ ह्मणे हेंच कृत्य[7] उरलें आह्मासी ॥ निर्दाळोनि निजवंशासी[8] ॥ निजधामासी निघावें ॥ ३१० ॥ तो यादवांमाजी माधव ॥ काळात्मा[9] देवाधिदेव ॥ जाणोनि भविष्याचा भाव ॥ काय अपूर्व करिता झाला ॥ ११ ॥ नारदादि मुनिगण ॥ त्यांसि पाचारोनि[10] आपण ॥ करूं सांगे शीघ्र गमन ॥ स्वयें श्रीकृष्ण साक्षेपें ॥ १२ ॥ ज्यापासूनि संत दूरी गेले ॥ तेथें अनर्थाचें[11] केलें चालें ॥ हें यादवनिधनालागीं[12] केलें ॥ लाघव वहिलें श्रीकृष्णें ॥ १३ ॥ भक्त संत साधु ज्यांपासी ॥ तेथें रिगु[13] नाहीं अनर्थासी ॥ जाणे हें स्वयें हृषीकेशी ॥ येरां[14] कोणासी कळेना ॥ १४ ॥ जेथें संतांचा संमुदावो[15] ॥ तेथें जन्ममरणांचाही अभावो ॥ हा श्रीकृष्णचि जाणे भावो ॥ तो करी उपावो ब्रह्मशापार्थ[16] ॥ १५ ॥ जेथूनि संत गेले दुरि ॥ तेथें सद्यचि अनर्थ वाजे शिरीं ॥ हें जाणोनियां श्रीहरी ॥ द्वारकेबाहेरी ऋषि घाली ॥ १६ ॥ ऋषि जातहोते आश्रमासी ॥ त्यांतें लाघवी हृषीकेशी ॥ तीर्थमिषें[17] समस्तांसी[18] ॥ पिंडारकासी[19] स्वयें धाडी ॥ १७ ॥ पिंडारका मुनिगण ॥ श्रीकृष्णें धाडिले कोण कोण ॥ ज्यांचें करितांचि स्मरण ॥ कळिकाळ आपण भयें कांपे ॥ १८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विश्वामित्रोऽसितः कण्वो दुर्वासा भृगुरंगिराः ॥ कश्यपो वामदेवोत्रिर्वसिष्ठो नारदादयः ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ जे तपतेजें देदीप्यमान[20] ॥ जे पूर्णज्ञानें ज्ञानघन[21] ॥ ज्यांतें सदा वंदी श्रीकृष्ण ॥ ते ऋषीश्वर जाण निघाले ॥ १९ ॥ जे गायत्रीमंत्रासाठीं ॥ करूं शके प्रतिसृष्टी[22] ॥ जो विश्वामित्र महाहटी ॥ तोही उठाउठीं[23] निघाला ॥ ३२० ॥ जेथें न बाधी उष्ण शीत ॥ ते आश्रमीं वसे असित ॥ ज्याचेनि नामें द्वंद्वें पळत ॥ तोही त्वरित निघाला ॥ २१ ॥ जो

---

[1] फारवेळी. [2] सोपा उपाय. [3] यादवांच्या कुळांत. [4] पृथिवीचे वोझे. [5] मानीत नाही. [6] मारावे. [7] काम. [8] आपल्या कुळास. [9] कालरूपी. [10] हाका मारून. [11] विघ्नाचे. [12] यादवांच्या मरण्या करितां. [13] रिगाव. [14] दुसऱ्यास. [15] जमाव. [16] ब्राह्मणापासून शाप होण्याकरिता. [17] तीर्थाच्या निमित्तानें. [18] सर्वांस. [19] पिंडारक नांवाच्या तीर्थास. [20] प्रकाशमान. [21] ज्ञानरूपी. [22] दुसरी प्रजा. [23] तत्काळ.

सूर्यासि रिघोनि[1] शरण ॥ अश्वाचे कर्णीं[2] बैसोन ॥ पूर्ण केलें वेदपठण ॥ तो कण्वही आपण निघाला ॥ २२ ॥ जो दुर्वासा अत्याहारी[3] ॥ आहार सेवूनि निराहारी ॥ तोही द्वारकेबाहेरी ॥ त्वरेंकरूनी निघाला ॥ २३ ॥ भृगूचा श्रीचरण ॥ हृदयीं वाहे नारायण ॥ मिरवी श्रीवत्सभूषण ॥ तो भृगुही जाण निघाला ॥ २४ ॥ अंगिरा स्वयें सद्बुद्धि स्रष्टी ॥ बृहस्पति जन्मला ज्याचे पोटीं ॥ जो परमगुरु देवांच्या मुकुटीं[4] ॥ तोही उठी गमनार्थ ॥ २५ ॥ कश्यपाची नवल गोठी ॥ सुर[5] नर किन्नर जन्मले पोटीं ॥ यालागीं हे काश्यपी स्रष्टी ॥ तोही उठाउठीं[6] निघाला ॥ २६ ॥ मुक्तांमाजीं[7] श्रेष्ठ भावो ॥ वेदीं वाखाणिला[8] वामदेवो ॥ तोही द्वारकेहोनि पहाहो ॥ स्वयमेवो[9] निघाला ॥ २७ ॥ अत्रीची नवल परी ॥ तिनी देव जन्मले उदरीं ॥ श्रीदत्त वंदिजे योगीश्वरीं ॥ हे अगाध थोरी अनसूयेची ॥ २८ ॥ तो स्वयें अत्रि ऋषीश्वर ॥ श्रीकृष्ण आज्ञातत्पर ॥ पिंडारका अति सत्वर ॥ प्रयाण शीघ्र[10] तेणें केलें ॥ २९ ॥ जो श्रीरामाचा सद्गुरू ॥ ब्रह्मज्ञानें अति उदारू ॥ ज्याचे काठीचा प्रताप थोरू ॥ लाजवी दिनकरू तपतेजें ॥ ३३० ॥ ऐसा जो वसिष्ठ महामुनी ॥ तो कृष्ण आज्ञा मानूनी ॥ निघाला द्वारकेहूनि ॥ शीघ्रपर्णीं पिंडारका ॥ ३१ ॥ आणि देवर्षि नारदू ॥ त्याचाही अगाध बोधू[11] ॥ ज्यासि सर्वदा परमानंदू ॥ अति आल्हादू[12] हरिकीर्तनीं ॥ ३२ ॥ ब्रह्मविणा अखंड वाहतू ॥ ब्रह्मपदें गीत गातू ॥ ब्रह्मानंदें नाचतू ॥ निघे डुल्लतू[13] पिंडारका ॥ ३३ ॥ इत्यादि हे मुनिवरू ॥ श्रेष्ठ श्रेष्ठ मुनीश्वरू ॥ शिष्यसमुदायें[14] सहपरिवारू ॥ मीनले[15] अपारू[16] पिंडारकीं ॥ ३४ ॥ एवं पिंडारकीं ऋषि सर्व ॥ शापानुग्रही महानुभाव ॥ बैसोनि कृष्णवैभव ॥ अति अपूर्व वर्णिती ॥ ३५ ॥ बाप लाघवी वनमाळी ॥ कुलक्षयो[17] घडावया तत्काळीं ॥ कुमरीं ऋषींश्वरांसी रांडोळी ॥ कपटमेळीं मांडिली ॥ ३६ ॥ निंदा अवज्ञा हेळण ॥ करितां ब्राह्मणांसि छळण ॥ जेथें ब्रह्मद्वेष[18] वाढे पूर्ण ॥ कुलक्षयो जाण तेठायीं ॥ ३७ ॥ ब्राह्मणांच्या कोपापुढें ॥ कुळ कायसें बापुडें ॥ महादेवाचें लिंग झडे ॥ इंद्रपदवी[19] पडे समुद्रीं ॥ ३८ ॥ तो समुद्रही केला क्षौर[20] ॥ ऐसा द्विजकोप[21] अतिदुर्धर ॥ हें एकएकाचें चरित्र ॥ ते ऋषि समग्र[22] मीनले तेथें ॥ ३९ ॥ धरातळीं[23] ब्रह्म ब्राह्मण ॥ त्यांचें वचन[24] परम प्रमाण ॥ हें सत्य करावया श्रीकृष्ण ॥ कुळनिर्दळण स्वयें दावी[25] ॥ ३४० ॥

॥ श्लोक ॥ ॥ क्रीडंतस्तानुपव्रज्य कुमारा यदुनंदनाः ॥ उपसंगृह्य पप्रच्छुरविनीता विनीतवत् ॥ १२ ॥

॥ टीका ॥ ॥ यदुनंदन समस्त ॥ क्रीडाकंदुक झेलित ॥ एकमेकांतें हाणत ॥ ठकून पळत परस्परें ॥ ४१ ॥ ऐसे नानाक्रीडा विहार ॥ करीत आले यदुकुमर ॥ अंगीं श्रीमद अपार ॥ औद्धत्यें

---

१ निघोनि. २ कानावर. ३ फार खाणारा. ४ मुकुटावर. ५ देव. ६ लवकर. ७ मोक्षास जाणारांत. ८ वर्णिला. ९ आपणच. १० लवकर. ११ ज्ञान. १२ आनंद. १३ डोलत. १४ शिष्यांचा समूह. १५ मिळाले. १६ बहुत. १७ कुलाचा नाश. १८ ब्राह्मणांचे शत्रुत्व. १९ इंद्राचें राज्य. २० खारट. २१ ब्राह्मणाचा कोध. २२ सर्व. २३ भूतळावर. २४ बोलणें. २५ दाखवितो.

थोर उन्मत्त ॥ ४२ ॥ अतीतानागतज्ञानवंत ॥ ऋषीश्वर मीनले समस्त ॥ जयांचें वचन यथार्थभूत ॥ त्यांसिही निश्चित ठेकूं आह्मीं
॥ ४३ ॥ जैं अवघड येऊनि पडे ॥ तैं यांचें वचन कैसें घडे ॥ ह्मणोनि ऋषीश्वरांपुढें ॥ मांडिलें कुंडें यदुकुमरीं ॥ ४४ ॥ श्लोक ॥
ते वेषयित्वा स्त्रीवेषैः सांबं जांबवतीसुतम् ॥ एषा पृच्छति वो विप्रा अंतर्वत्न्यसितेक्षणा ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ पहिलेंच श्रीमदें उद्ध
ट ॥ त्यावरी मांडिलें कपट ॥ सांबास वेष स्त्रीनठ ॥ अतिवरिष्ठ [3]बाणला ॥ ४५ ॥ तो श्यामसुंदर डोळसू ॥ अंगीं शोभला स्त्रीवेषू ॥ [4]प्रम
दावैभवविलासू ॥ दावी [5]विन्यासू सलज्ज ॥ ४६ ॥ नयनीं सोगयाचें काजळ ॥ व्यंकट कटाक्षु अतिचपळ ॥ सुंदर सुकुमार वेल्हाळ ॥
चाले निश्चळ हंसगती ॥ ४७ ॥ वस्त्रें बांधोनि सुंदर उदर ॥ नावेक केलें थोर ॥ तेणें ते गरोदर ॥ दिसे साचार इतरांसी ॥ ४८ ॥
हात घालूनि सखियांच्या खांदीं ॥ चालतां उदर हालोंनेदी ॥ विसांवा घेत पदोपदीं ॥ येतां [6]ऋषिवृंदीं देखिली ॥ ४९ ॥ ऐसा
स्त्रीवेष दाखवूनी ॥ नावेक अंतरें राहोनी ॥ इतरऋषींजवळी येऊनी ॥ लोटांगणी घालिती ॥ ३५० ॥ पूर्वश्लोकींचा श्लाकार्थ
तेथ ॥ व्याख्यानीं नव्हेच [7]समस्त ॥ यालागीं तेंचि येथ ॥ [8]वाखाणिजेत कथान्वयें ॥ ५१ ॥ छळाचेनि [9]मिषें जाणा ॥ ऋषींसि करिती
प्रदक्षिणा ॥ [10]अत्यादरें लागती चरणा ॥ ह्मणती दर्शना आह्मी आलों ॥ ५२ ॥ ऐसे [11]यदुकुमर समस्त ॥ [12]अविनीत परी [13]विनीतवत ॥
कर जोडोनि राहिले तेथ ॥ मृदु विनवीत मुनीश्वरां ॥ ५३ ॥ स्वमी पैल हे जे सुंदर ॥ तुमच्या [14]वचनीं भावार्थ थोर ॥ कन्या कीं पुत्र
प्रसवे गरोदर ॥ [15]स्वयें सुकुमार पुसों लाजे ॥ ५४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रष्टुं विलज्जती साक्षात्प्रब्रूतामोघदर्शनाः ॥ प्रसोष्यंती पुत्रकामा
किंस्वित्संजनयिष्यति ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्वयें येऊन तुह्मांप्रती ॥ तिचेनि न बोलवे [16]निश्चितीं ॥ यालागीं आह्माहातीं ॥ सेवेसि
विनंती करविली ॥ ५५ ॥ तुह्मी [17]सत्यदर्शी साचार ॥ [18]अमोघवीर्य तुमचें उत्तर ॥ [19]शिरीं वंदिती [20]हरिहर ॥ ज्ञानें उदार तुह्मी सर्व ॥ ५६ ॥
यालागीं हे गर्भवंती ॥ सादरें असे पुसती ॥ [21]पुत्रकाम असे वांछिती ॥ काय निश्चितीं प्रसवेल ॥ ५७ ॥ ऐसे कपटाचेनि [22]वोलंभे ॥ विन
वीत कर जोडूनि उभे ॥ तैशींच फळें भावगर्भें ॥ छलणप्रलोभें पावती ॥ ५८ ॥ कर्म जाणोनियां [23]कुडें ॥ नारदू नाचे ऋषींपुढें ॥ मुनि
ह्मणे यादवांचें गाढें ॥ मरण रोकडें [24]वोढवले ॥ ५९ ॥ जेवीं मुंगियां निघाले पांख ॥ तेंचि तयां मरण अचुक ॥ तेवीं ब्राह्मणछळणें देख ॥
आवश्यक कुळ नासे ॥ ३६० ॥ शापीत आलिया द्विजजन ॥ त्यांसि सद्भावें करावें नमन ॥ मारूं आलिया ब्राह्मण ॥ मस्तक आपण

---

१ फसवूं. २ कपट. ३ शोभला. ४ स्त्रीचा. ५ पावलें टाकणें. ६ ऋषींच्या समुदायांनीं. ७ सर्व ८ वर्णिजेत. ९ निमित्तानें. १० फार आदर दाखवून. ११ यादवांचे पुत्र. १२ उद्धट १३ नम्रपणानें. १४ बोलण्यांत. १५ स्वतः १६ निश्चयानें. १७ खरे पाहणारे. १८ सत्य. १९ डोकीनें. २० विष्णु, शिव. २१ पुत्राची कामना. २२ मिषानें. २३ कपट. २४ आले.

वोढवावें ॥ ६१ ॥ त्या ब्राह्मणासि छळण ॥ तें जाणावें विषभक्षण[1] ॥ विषें निमे भक्षिल्याचा प्राण ॥ कुळनिर्दळण द्विजच्छळणें ॥ ६२ ॥ अविद्य[2] सुविद्य[3] न ह्मणतां जाण ॥ धरातळीं ब्रह्म ब्राह्मण ॥ त्याचें करुं जातां छळण ॥ कुळनिर्दळण[4] आवश्यक ॥ ६३ ॥ ॥श्लोक॥ ॥ एवं प्रलब्धा मुनयस्तानूचुःकुपिता नृप ॥ जनयिष्यति वो मंदा मुसलं कुलनाशनम् ॥ १६ ॥ ॥टीका॥ ॥ऐके परीक्षिती नृपवरा ॥ यापरी यादवकुमारां ॥ निधनाचा[5] भरला वारा ॥ तेणें ते ऋषीश्वरां छळूं गेले ॥ ६४ ॥ कपट जाणोनियां साचार ॥ थोर कोपले ऋषीश्वर ॥ मग तिहीं काय वाग्वज्र[6] ॥ अतिअनिवार सोडिलें ॥ ६५ ॥ अरे हे प्रसवेल जें बाळ ॥ तें होय सकळकुळा काळ[7] ॥ निखळ लोहाचें मुसळ ॥ देखाल सकळ मंदभाग्य ॥ ६६ ॥ ॥श्लोक॥ ॥तच्छ्रुत्वा तेऽतिसंत्रस्ता विमुच्य सहसोदरम् ॥ सांबस्य ददृशुस्तस्मिन्मुसलं कुलनाशनम् ॥ १७ ॥ ॥टीका॥ ॥ऐकूनि शापाचें उत्तर ॥ भयभीत झाले कुमर ॥ सोडूनि सांबाचें उदर ॥ अतिसत्वर[8] पाहती ॥ ६७ ॥ तंव तें लोहमय मुसळ ॥ देखते झाले तत्काळ[9] ॥ मग भयभीत विव्हळ[10] ॥ एकाकीं सकळ दचकोनि[11] ठेले ॥ ६८ ॥ नासावें[12] यादवकुळ ॥ ऐसा श्रीकृष्णसंकल्प सबळ ॥ तोचि झाला लोहाचें मुसळ ॥ जाण तत्काळ ऋषिवाक्यें ॥ ६९ ॥ जें जें ब्राह्मणांचें वचन ॥ तें तें अन्यथा होंनेदी[13] श्रीकृष्ण ॥ ब्राह्मणाचें वेदवचन प्रमाण ॥ ह्मणोनि श्रीकृष्ण सत्यत्वा[14] आणी ॥ ३७० ॥ देखोनि ऋषीश्वरांचा कोपू ॥ ऐकोनि कुलक्षयाचा शापू ॥ यदुकुमरां[15] अति संतापू ॥ भयें कंपू[16] सूटला ॥ ७१ ॥ ॥श्लोक॥ ॥किं कृतं मंदभाग्यैर्नः किं वदिष्यंति नो जनाः ॥ इति विव्हलिता गेहानादाय मुसलं ययुः ॥ १८ ॥ ॥टीका॥ ॥ आह्मी मंदभाग्यें करंटे ॥ ऋषीश्वरु कोपविले[17] शठें ॥ निजघाता झालों पैठे[18] ॥ कुलक्षयो कपटें जोडिला ॥ ७२ ॥ काय ह्मणती नगरजन[19] ॥ कां छळू गेले हे ब्राह्मण ॥ चिंताक्रांत म्लानवदन ॥ मुसळ घेऊन घरा आले ॥ ७३ ॥ ॥श्लोक॥ ॥ तच्चोपनीय सदसि परिम्लानमुखश्रियः ॥ राज्ञ आवेदयांचक्रुः सर्वयादवसन्निधौ ॥ १९ ॥ ॥टीका॥ ॥सभेसि वसुदेव उग्रसेन ॥ बळिराम आणि अनिरुद्ध प्रद्युम्न ॥ यादव बैसले संपूर्ण ॥ एक श्रीकृष्ण तेथें नाहीं ॥ ७४ ॥ सभे सांबादि आले सकळ[20] ॥ पुढां ठेवूनि लोहमुसळ ॥ शापु सांगीतला समूळ ॥ मुखकमळ अतिम्लानें ॥ ७५ ॥ ॥श्लोक॥ ॥श्रुत्वाऽमोघं विप्रशापं दृष्ट्वा च मुसलं नृप ॥ विस्मिता भयसंत्रस्ता बभूवुर्द्वारकौकसः ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ऐकून द्विजांचा[21] परमकोपू ॥ यादवां सुटला महाकंपू ॥ मिथ्या नव्हे ब्रह्मशापू ॥ भयें संतापू सर्वांसी ॥ ७६ ॥ प्रत्यक्ष देखोनि मुसळ ॥ थोर सुटली

---

[1] विष खाणें. [2] अविद्वान्. [3] विद्वान्. [4] कुलाचा नाश. [5] नाशाचा. [6] शापरूपी वज्र. [7] मृत्यु. [8] फार लवकर. [9] तेच वेळी [10] व्याकुल. [11] दचकून. [12] नाहींसें व्हावें. [13] होऊ देत नाही. [14] खरे पणास. [15] यादवांच्या मुलास. [16] कापरा. [17] क्रोधविले. [18] तयार. [19] गावांतले लोक. [20] सर्व. [21] ऋषींचा.

खळबळ ॥ नगरीं जाहला हलकल्लोळ ॥ यादवकुळ उरे कैसेनी[1] ॥ ७७॥ ऐक राया परिक्षिती ॥ सबळ भविष्याची गती ॥ वृत्तांत[2] कळों
न[3] देती श्रीकृष्णाप्रती ॥ विचार आपमतीं[4] तिहीं केला ॥ ७८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तच्चूर्णयित्वा मुसलं यदुराजः स आहुकः ॥ समुद्रसलिले
प्रास्यल्लोहं चास्याऽवशेषितम् ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ मग तो राजा उग्रसेन ॥ तेणें लावूनि लोहघण ॥ मुसळ करोनियां चूर्ण ॥ समुद्रीं
जाण घालविलें ॥ ७९ ॥ त्या मुसळाचा मध्यकवळ[5] ॥ चूर्ण नव्हेच अतिप्रबळ ॥ उरला वज्रप्राय केवळ ॥ तो समुद्रीं तत्काळ झुगारिला[6]
॥ ३८० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कश्चिन्मत्स्योऽग्रसील्लोहं चूर्णानि तरलैस्ततः ॥ उह्यमानानि वेलायां लग्नान्यासन् किलैरकाः ॥ २२ ॥ म
त्स्योगृहीतोमत्स्यघ्नैर्जालेनान्यैः सहार्णवे ॥ तस्योदरगतं लोहं सशल्ये लुब्धकोऽकरोत् ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ समुद्रलाटांचे कल्लोळ ॥
तेणें लोहो चूर्ण सकळ ॥ प्रभासे लागोनि प्रबळ ॥ उठिले तत्काळ एकरूपें ॥ ८१ ॥ लोहकवळू मीन[7] गिळी ॥ त्या मीनातें समुद्रजळीं ॥
अन्यत्र मत्स्यसहित जाळीं ॥ मत्स्यघ्न[8] आकळी निजलाघवें ॥ ८२ ॥ तो मत्स्य मत्स्यघ्न विदारी ॥ तंव लोह निघे त्याचे उदरीं ॥ दे
खोनि हरिखला[9] तो भारी ॥ हें आतुडे[10] करीं तो सभाग्य ॥ ८३ ॥ मत्स्योदरीं लोह जाण ॥ याचें अचुक[11] संधान ॥ अगाध पारधी सा
धे पूर्ण ॥ यालागीं त्याचा बाण लुब्धकें केला ॥ ८४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भगवान् ज्ञातसर्वार्थ ईश्वरोपि तदन्यथा ॥ कर्त्तुं नैच्छद्विप्र
शापं कालरूप्यन्वमोदत ॥ २४ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे विप्रशापोनाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ॥ टीका ॥
कोणी न सांगतां हें पेखणें[12] ॥ जाणीतलें सर्वज्ञें श्रीकृष्णें ॥ परी द्विजशाप[13] अन्यथा[14] करणें ॥ हें निजमनें[15] स्पर्शेना ॥ ८५ ॥ ह्मणाल हें
नव्हेल त्यासी ॥ पालटवेना[16] द्विजशापासी ॥ जो निमाल्या[17] आणी गुरुपुत्रासी ॥ कृष्ण कळिकाळासी नियंता ॥ ८६ ॥ पाडूनि कळिका
ळाचे दांत ॥ देवकीचे गत[18] गर्भ आणित ॥ ईश्वरा ईश्वरू श्रीकृष्णनाथ ॥ जाणे सर्वार्थ निजसिद्धी ॥ ८७ ॥ निद्रा न मोडितां तिळभ
री ॥ मथुरा आणिली द्वारकेभीतरी ॥ श्रीकृष्ण काय एक नकरी ॥ तो ही ममता[19] नधरी कुळाची ॥ ८८ ॥ निजकुलक्षयो[20] जरी जाहला ॥ तरी
अन्यथा न करी ब्राह्मणबोला[21] ॥ ब्राह्मणें पापरा[22] जरीं हाणीतला ॥ तो हृदयीं धरिला पदांकू ॥ ८९ ॥ तेंचि श्रीवत्सलांछन ॥ सकळ
भूषणां भूषण[23] ॥ हृदयीं मिरवी श्रीकृष्ण ॥ यालागीं पूर्ण ब्रह्मण्यदेव ॥ ३९० ॥ श्रीकृष्ण शिरीं[24] वंदी ब्राह्मण ॥ अन्यथा न करी ब्राह्म

---

[1] कोणत्या उपायानें. [2] वर्तमान. [3] देत नाहीत. [4] दुर्बुद्धिनें. [5] मधला गाभा. [6] फेकला. [7] मासा. [8] मासे मारणारा. [9] संतोषला. [10] मिळे. [11] बरोबर. [12] साक्षित्वानें. [13] ऋषींचा शाप. [14] खोटा. [15] आपल्या मनानें. [16] खोटे करवेना. [17] मेलेल्या. [18] गेलेले. [19] माया. [20] आपल्या कुळाचा नाश. [21] ब्राह्मणाच्या बोलण्यास. [22] पायानें. [23] दागिना. [24] मस्तकानें.

# अध्याय २ रा.


वसुदेव.
नारदऋ.
उद्धव.
श्रीकृष्ण.

श्रीगणेशाय नमः॥ ॥जय जय देवाधिदेवा ॥ भोगिसी गुरुत्वें सुहावा[1] ॥ विश्वीं विश्वात्मा[2] ये सद्भावा ॥ एकपणें जेव्हां विलोकिसी[3] ॥ १ ॥ ते विश्वीं जो विश्ववासी ॥ त्यातें विश्वासी ह्मणसी ॥ तेणें विश्वासी प्रसन्न होसी ॥ तैं पायांपासीं प्रवेशु ॥ २ ॥ त्या चरणारविंदरूपादृष्टी[4] ॥ अहं सोहं सुटल्या गांठी ॥ एकसरें[5] तुझ्या पोटीं ॥ उठाउठी प्रवेशलों ॥ ३ ॥ यालागीं तूं निजात्ममाये[6] ॥ यांहतू जंव पाहों जाये ॥ तंव बापपण तुजमाजी आहे ॥ अभिनव[7] काय सांगावें ॥ ४ ॥ येथें मातापिता दोनीं ॥ वेगळालीं असती जनीं ॥ त दोनीं एक करोनी ॥ एकाजनार्दनीं निजतान्हें ॥ ५ ॥ आतां उभयस्नेहस्नेहाळा ॥ वाढविसी मज बाळा ॥ परी नित्यनवा सोहळा ॥ संभ्रमें आगळा[8] निजबोधाचा ॥ ६ ॥ शिव शक्ति गणेशु ॥ विश्व विष्णु चंडांशु ॥ ऐसा अलंकार बहुवसु ॥ निजविलासु लेवविशी ॥ ७ ॥ यापरी मज निजबाळा[9] ॥ लेणीं लेवविशी स्वलीला ॥ आणि लेइलेपणाचा सोहळा ॥ पहाशी वेळोवेळां रूपादृष्टीं ॥ ८ ॥ बालका लेवविजे लेणें[10] ॥ तयाचें सुख तें काय जाणे ॥ तो सोहळा मातेनें भोगणें ॥ तेवीं जनार्दनें भोगिजे सुख ॥ ९ ॥ आपुल्या चिद्रत्नांच्या गांठी ॥ आवडी घालिशी माझ्या कंठीं ॥ यालागीं माझ्या पाठोपाठी ॥ निजात्मदृष्टी[11] स्वयें धांवे ॥ १० ॥ समर्थ जयाचा जनकू ॥ त्यास मानिती सकळ लोकू ॥ एका जनार्दनीं एकू ॥ अमान्य अधिकू मान्य[12] कीजे ॥ ११ ॥ बाळक स्वयें बोलों नेणे[13] ॥ त्यासि माता शिकवी वचनें ॥ तैशीं ग्रंथकथाकथनें ॥ स्वयें जनार्दनें बोलविजे ॥ १२ ॥ तेणें नवल केलें येथ ॥ मूर्खाहातीं श्रीभागवत ॥ शेंखीं बोलविलें प्राकृत ॥ एकादशार्थ देशभाषा ॥ १३ ॥ परिसोनि[14] प्रथम अध्यावो ॥ उगाचि राहिला कुरुरावो ॥ पुढें कथाकथनीं ठावो ॥ कांहीं अभिप्रावो[15] दिसेना ॥ १४ ॥ आपण करावा प्रश्न ॥ तंव हा सांगेल कृष्णनिधन ॥ यालागीं राजा मौन ॥ ठेला धरोन निवांत ॥ १५ ॥ जाणोनि त्याचा अभिप्रावो ॥ बोलता जाहला शुकदेवो ॥ तो ह्मणे मोक्षाचा प्रस्तावो ॥ तोही अध्यावो परिक्षिती ॥ १६ ॥ हा एकादश अलोलिक ॥ श्लोकाहून श्लोक अधिक ॥ पदोपदीं मुक्तिसुख[16] ॥ लिगटलें देख निजसाधकां ॥ १७ ॥ ऐसें ऐकतांचि वचन ॥ राजा जाहला सावधान ॥ मुक्तिसुखीं आवडी गहन ॥ अवधानें कान सर्वांग केलें ॥ १८ ॥ ऐसें देखोन परिक्षिती ॥ शुक सुखावे अत्यंत चित्तीं ॥ तो ह्मणे अवधानमूर्ती ॥ ऐक निश्चितीं गुह्यज्ञान[17] ॥ १९ ॥ द्वितीयाध्यायीं निरूपण ॥ नारद वसुदेवसंवाद जाण ॥ निमिजायंतांचे प्रश्न ॥ मुख्य लक्षण भागवतधर्म ॥ २० ॥ ॥ श्लोक ॥ ॥श्रीशुकउवाच॥ गोविंदभुजगुप्तायां द्वारवत्यां कुरूद्वह ॥ अवात्सीन्नारदोऽभीक्ष्णं कृष्णो

---

[1] ब्रह्मसुख. [2] विश्वरूप. [3] अवलोकिसी. [4] चरणकमलाच्या रुपेनें. [5] एकदम. [6] आपल्या आत्म्याची आइ. [7] आश्चर्य. [8] अधीक. [9] आपल्या बालकास. [10] अलंकार. [11] स्वात्मदृष्टीनें. [12] पूज्य. [13] जाणत नाहीं. [14] ऐकून. [15] अभिप्राय. [16] मोक्षाचे सुख. [17] गुह्यज्ञान.

पासनलालसः ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो मुक्तांमाजी अग्रगणी[1] ॥ जो ब्रह्मचर्या शिरोमणी ॥ योगी वंदिती मुकुटस्थानीं ॥ जो भक्त
मंडणी अतिश्रेष्ठ ॥ २१ ॥ जो ब्रह्मरसाचा समुद्र ॥ जो निजबोधाचा[2] पूर्णचंद्र ॥ तो बोलताजाहला शुकयोगींद्र ॥ श्रोता नरेंद्र कुरुवं
शीचा ॥ २२ ॥ तो ह्मणे व्यासाचा निजगुरू ॥ आणि आह्माही परमगुरू ॥ नारद महामुनीश्वरू ॥ त्यासि अतिआदरू श्रीकृष्णभजनीं
॥ २३ ॥ द्वारकेहूनि स्वयें श्रीकृष्ण ॥ पिंडारका पाठवी मुनिगण ॥ तेथूनि नारद आपण ॥ द्वारकेसि जाण पुनः पुनः येतसे ॥ २४ ॥ होकां
जे द्वारकेआंत ॥ नरिघे[3] भयें काळ कृतांत[4] ॥ जेथें स्वयें श्रीकृष्णनाथ ॥ असे नांदत निजसामर्थ्यें ॥ २५ ॥ दक्षशाप नारदासि पाही ॥
मुहूर्त राहों नये एकेठायीं ॥ तो शाप हरिकीर्तनीं नाहीं ॥ यालागीं तो पाही कीर्तननिष्ठु ॥ २६ ॥ ज्याची गाइजे कीर्तनीं कीर्ती ॥ तो
द्वारकेसि वसे स्वयें श्रीपती ॥ तेथें शाप बाधेची नचले प्राप्ती ॥ यालागीं नित्यवस्ती नारदासि तेथें ॥ २७ ॥ नारदासि पूर्ण ब्रह्मज्ञान ॥
त्यासि कां कृष्णमूर्तींचें ध्यान ॥ श्रीकृष्णदेह चैतन्यघन ॥ यालागीं श्रीकृष्णभजन नारदासी पढिये ॥ २८ ॥ यापरी कृष्णभजन ॥ मुक्तां[5]
सि पढियेतें पूर्ण ॥ त्यासि नभजे अभागी[6] कोण ॥ तेंचि निरूपण शुक सांगे ॥ २९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ को नु राजन्निंद्रियवान्मुकुंद
चरणांबुजम् ॥ न भजेत्सर्वतोमृत्युरुपास्यममरोत्तमैः ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ऐके बापा नृपवर्या ॥ येऊनी उत्तमा देहा या ॥ जो नभजे श्री
कृष्णराया ॥ तो गिळिला मायाअतिदुःखें ॥ ३० ॥ ज्या भगवंतालागोनी ॥ माथां धरोनियां पायवणी[7] ॥ सदाशिव बैसला आत्मध्या
नीं ॥ महाश्मशानीं निजवस्ती ॥ ३१ ॥ पोटा आला चतुरानन[8] ॥ इतरांचा पाड तो कोण ॥ देहा येवोनि नारायण ॥ नभजे तो पूर्ण मृ[9]
त्युग्रस्त ॥ ३२ ॥ सांडोनियां श्रीकृष्णचरण ॥ इंद्रादिदेवांचें करितां भजन ॥ ते देव मृत्युग्रस्त पूर्ण ॥ नभजत्याचें[10] मरण कोण वारी ॥ ३३ ॥
असोनि इंद्रियपाटव पूर्ण ॥ जो नभजे श्रीकृष्णचरण ॥ त्यासि सर्वत्र बाधी मरण ॥ क्षणक्षण निर्दाळी ॥ ३४ ॥ तो नारद महामुनी
श्वरू ॥ मुक्त होऊनि भजनीं तत्परू ॥ द्वारके वसे निरंतरू ॥ श्रीकृष्णीं थोरू अतिप्रीती तया ॥ ३५ ॥ श्लोक ॥ ॥ तमेकदा तु देवर्षिं
वसुदेवो गृहागतम् ॥ अर्चितं सुखमासीनमभिवाद्येदमब्रवीत् ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ धन्य धन्य तो नारदू ॥ ज्यासी सर्वीं[11] सर्वत्र
गोविंदू ॥ सर्वदा हरिनामाचा छंदू ॥ तेणें परमानंदू सदोदित[12] ॥ ३६ ॥ जो श्रीकृष्णाचा आवडता ॥ ज्यासी श्रीकृष्ण आवडे सर्वथा ॥
ज्याचेनि संगें तत्वतां ॥ नित्यमुक्तता जडजीवां ॥ ३७ ॥ तो नारद एकवेळां ॥ स्वानंदाचिया स्वलीळा ॥ आला वसुदेवाचिया राउळा[13] ॥

---

१ श्रेष्ठ. २ आत्मबोधाचा. ३ जात नाही. ४ यम. ५ ज्ञानीपुरुषास. ६ दुर्दैवी. ७ चरणोदक, गंगा. ८ ब्रह्मदेव. ९ मृत्यूनें गिळिला. १० नभजणाराचे. ११ सर्वांभूतीं.
१२ निरंतर. १३ घरीं.

तेणें देखोनि डोळां हरिखला[1] ॥ ३८ ॥ केलें साष्टांग नमन ॥ बैसों घातलें वरासन ॥ ब्रह्मसद्भावें पूजन ॥ श्रद्धासंपूर्ण मांडिलें ॥ ३९ ॥ नारद तोचि नारायण ॥ येणें विश्वासेंकरूनि जाण ॥ हेमपात्रीं चरणक्षाळण ॥ मधुपर्कविधि पूर्ण पूजा केली ॥ ४० ॥ पूजा करोनि सावधानीं वसुदेव बैसोनि सुखासनीं ॥ हृदयीं अत्यंत सुखावोनी ॥ काय अल्हादोनी[2] बोलत ॥ ४१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ वसुदेवउवाच ॥ भगवन्भवतो यात्रा स्वस्तये सर्वदेहिनाम् ॥ कृपणानां यथा पित्रोरुत्तमश्लोकवर्त्मनाम् ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्वलीला कृपा केली तुह्मी ॥ तेणें सभाग्य[3] जाहलों आह्मी ॥ तुमचेनि आगमनें[4] आह्मी ॥ कृतकृत्य स्वामी सन्निधिमात्रें ॥ ४२ ॥ चुकलिया निजजननी ॥ बाळक दीन दिसे जनीं ॥ त्यासि मातेच्या आगमनीं ॥ संतोष मनीं निर्भर ॥ ४३ ॥ त्याहूनि श्रेष्ठ तुमची यात्रा ॥ नित्यसुखदात्री भूतमात्रां ॥ स्वलीला तुह्मी मही विचरा ॥ दीनोद्धारालागुनी ॥ ४४ ॥ मातेच्या आगमनीं निजबाळा ॥ दृष्टि उत्संगीं नित्यनवा सोहळा ॥ तुमची यात्रा दीनां सकळां ॥ भोगवी स्वलीला निजात्मसुख[5] ॥ ४५ ॥ माता सुख देतें नश्वर ॥ तुमच्या आगमनीं अनश्वर[6] ॥ नित्यचित्सुखचिन्मात्र ॥ परात्पर भोगावया ॥ ४६ ॥ तुह्मी भागवतधर्ममार्गगामी ॥ तैं कैसी तुमची भेटी लाहों आह्मी ॥ जैं पुण्यकोटी निष्कामी ॥ प्रयागसंगमीं केलिया ॥ ४७ ॥ नारदा तूं भगवद्रूप ॥ तुझी भेटी करी निष्पाप[7] ॥ तुवां कृपा केलिया अल्प ॥ स्वयें चित्स्वरूप ठसावे ॥ ४८ ॥ तुझेनि भक्तीसी महिमा अमूप[8] ॥ तुझेनि वाढला भक्तिप्रताप ॥ तुझेनि भक्ती भगवद्रूप ॥ तूं चित्स्वरूप निजनिष्ठा ॥ ४९ ॥ तूं भक्तिप्रकाशकू दिवटा ॥ कीं भक्तिमार्गींचा मार्गद्रष्टा[9] ॥ नारदा तुझा उपकार मोठा ॥ भक्तीच्या पेंठा वसविल्या तुवां ॥ ५० ॥ मुख्य भागवतशास्त्र पूर्ण ॥ तुवां व्यासासि उपदेशून ॥ प्रगट करविलें दशलक्षण[10] ॥ दीनजन[11] उद्धरावया ॥ ५१ ॥ नारदा तूं देवासमान[12] ॥ हेही उपमा दिसे गौण ॥ तेचिविषयीं निरूपण ॥ वसुदेव आपण निरूपी ॥ ५२ ॥ ॥ श्लोक ॥ भूतानां देवचरितं दुःखाय च सुखाय च ॥ सुखायैव हि साधूनां त्वादृशामच्युतात्मनाम् ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ देवापासोनि भूतसृष्टी ॥ सुखदुःखें शीण पोटीं ॥ अतिवृष्टी का अनावृष्टी ॥ भूतकोटी आकांतू ॥ ५३ ॥ त्यादेवापरीस साधु अधिक ॥ हें साचचि मज मानलें देख ॥ देवचरितें उठी सुखदुःख ॥ साधु निर्दोष सुखदाते[13] ॥ ५४ ॥ त्याहीमाजी तुजसारिखा ॥ जोडल्या कृपाळू निजसुखा ॥ तैं पेंठ[14] पिके परमार्थसुखा[15] ॥ हा महिमा लोकां कदा नकळेची ॥ ५५ ॥ दिधल्या सुखासी मागुती ॥ च्युती[16] होनेणे कल्पांतीं ॥ ते अच्युतात्मस्थिती[17] ॥ तुजपाशीं निश्चितीं नारदा ॥ ५६ ॥ तुझि

---

[1] संतोषला. [2] आनंद होऊन. [3] सुदैवी. [4] येण्यानें. [5] अंतरात्म्याचे सुख. [6] कधी नाहीसे नहोणारे. [7] पापावेगळे. [8] फार. [9] मार्ग दाखविणारा. [10] दहालक्षण. [11] आज्ञानी जन. [12] देवासारखा. [13] सुखदेणारे. [14] बाजार. [15] ब्रह्माचे सुख. [16] भ्रष्टता. [17] ब्रह्मपणानें असणे.

ये महिमेपासी ॥ मुदल देवोनये तुकासी ॥ तेंही सांगेन मी तुजपासीं ॥ यथार्थेंसी नारदा ॥ ५७ ॥ देवाचा अवतार होय ॥ दासां सुख दैत्यां भय ॥ तेथें ऐसें विषम आहे ॥ हें नसमाये तुजमाजी ॥ ५८ ॥ तूं देवांचा आप्त होसी ॥ दैत्यही विश्वासती तुजपासी ॥ रावणें तुज नेऊनि एकांतासी ॥ निजगुह्यार्थासी[1] सांगत ॥ ५९ ॥ देव रावणें घातलें बंदीं ॥ तो रावण तुझेचरण वंदी ॥ शेखीं रामाचा आप्त त्रिशुद्धी ॥ विषम तुजमधीं असेना ॥ ६० ॥ जरासंधू कृष्णाचा वैरी ॥ तुझी चाल त्याच्या घरीं ॥ आणि कृष्णाचे सभेमाझारी ॥ आप्तत्वें थोरी पैं तुझी ॥ ६१ ॥ नाम घेवोनेदी[2] देवांचें ॥ हें बिरुद हिरण्यकशिपूचें ॥ त्यासि कीर्तन तुझें रुचे[3] ॥ विषमत्व[4] साचें तुज नाहीं ॥ ६२ ॥ लांचुगी[5] बुद्धी सदा देवांसी ॥ तैशी नाहीं तुह्मां साधूंसी ॥ ऐक त्याही अभिप्रायासी ॥ यथार्थेंसी सांगेन ॥ ६३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भजंति ये यथा देवान् देवा अपि तथैव तान् ॥ छायेव कर्मसचिवाः साधवो दीनवत्सलाः ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ जे जैसे देवां यागीं[6] यजिती[7] ॥ तैसीं तैसीं त्यां फळें देव देती ॥ नभजत्यातें विघ्नें सुचिती ॥ ऐसी गती देवांची ॥ ६४ ॥ जैसा जैसा पुरुष वेंठे ॥ तैसी तैसी छाया नटे ॥ तेवीं भजनें देव प्रसन्न मोठे ॥ येरवीं उफराटे विघ्न करिती ॥ ६५ ॥ जंव जंव सूर्य प्रकाशतसे ॥ तंव तंव छाया सरसी दिसे ॥ निजकर्में देवही तैसे ॥ कर्मवशें प्रसन्न ॥ ६६ ॥ सूर्यअस्तमानीं छाया नसे ॥ अभजनें देव क्षोभती तैसे ॥ एवं लांचुगे देव ऐसे ॥ तूंही ऐसें जाणसी ॥ ६७ ॥ इतरदेवांची कथा कोण ॥ थोरला देव लांचुगा पूर्ण ॥ तोही न भेटे जीवे घेतल्याविण ॥ भेटल्याचे आपण गर्भवास भोगी ॥ ६८ ॥ त्याचें जीवें सर्वस्वें[8] भजन ॥ केल्या निजांग देऊनि होय प्रसन्न ॥ परी न भजत्याच्या गृहा जाण ॥ विसरोनि आपण कदा न[9] वचे ॥ ६९ ॥ तैसी तुमची नोहे बुद्धी ॥ दीनदयाळ त्रिशुद्धी ॥ तूं तंव केवळ कृपानिधी[10] ॥ ऐक तो विधी सांगेन ॥ ७० ॥ तुवां व्यासादि देखोनि सज्ञान ॥ उपदेशिलें ब्रह्मज्ञान ॥ ध्रुवबालक अज्ञान ॥ ह्मणोनि जाण नुपेक्षिसी[11] ॥ ७१ ॥ प्रल्हाद उपदेशिला जेव्हां ॥ दैत्यपुत्र न ह्मणसी तेव्हां ॥ तुझिया कृपेचा हेलावा[12] ॥ तो निजविसांवा[13] दीनासी ॥ ७२ ॥ केवळ वाटपाडा[14] देख ॥ भजनें वीण एकाएक ॥ महाकवि केला वाल्मीक ॥ अमर[15] आवश्यक वंदिती त्यासी ॥ ७३ ॥ देखोनि ज्याचिया ग्रंथासी ॥ सुख वोसंडे[16] सदाशिवासी ॥ ऐसा तूं कृपाळू होसी ॥ अनाथासी विसांवा ॥ ७४ ॥ वरिवरी दाविसी मिणधा[17] कोप ॥ कोपोनि सांडविशी त्याचें पाप ॥ शेखीं[18] सायुज्याचे दीप ॥ दाविशी सद्रूप दयाळुवा ॥ ७५ ॥ तुह्मी अच्युतात्मे निजनिर्धारी[19] ॥ ह्मणोनि देवो तुमचा आज्ञाधारी ॥ तुह्मी ह्मणा त्यातें उद्धरी ॥ येऱ्हवी हातीं न धरी ओनातें[20] ॥ ७६ ॥ ऐसा तूं

---

१ आपल्या गुप्तअर्थास. २ घेऊ देत नाही. ३ अवडते. ४ न्यूनाधिकभाव. ५ लाचखाणारी. ६ यज्ञांत. ७ पूजिति. ८ सर्वभावानें. ९ जात नाही. १० दयेची खनि. ११ उपेक्षा करीत नाहीस. १२ पूर. १३ आपली विश्रांति. १४ वाटा लुटणारा. १५ देव. १६ पावे. १७ मिथ्या. १८ शेवटी. १९ आपल्या निश्चयानें. २० अनाथास.

दीनदीक्षागुरू ॥ ब्रह्मज्ञानें अतिउदारू ॥ तरी पुसेन तो विचारू ॥ निजनिर्धारू सांगावा ॥ ७७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ब्रह्मंस्तथापि पृच्छामो धर्मान्भागवतांस्तव ॥ यान् श्रुत्वा श्रद्धया मर्त्यो मुच्यने विश्वतोभयात् ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ आदरें ह्मणे देवऋषी ॥ आजि सकळ पुण्यें आलीं फळासी ॥ मायबाप तूं घरा आलासी ॥ निजसुखासी[1] दायक ॥ ७८ ॥ कृपा केली मागील शिष्यां ॥ तेचि कृपेचा घाली ठसा ॥ मज तुझा पूर्ण भरवसा ॥ सोडवी भवपाशापासूनी[2] ॥ ७९ ॥ तुझेनि दर्शनें कृतकृत्यता[3] ॥ जरी मज जाहली तत्त्वतां ॥ तरी भागवतधर्मकथा ॥ कृपेनें तत्त्वतां सांगावी ॥ ८० ॥ ऐसे सांगावे भागवतधर्म ॥ जेणें निरसे[4] क्रिया कर्म ॥ श्रद्धेनें ऐकतांपरम ॥ जन्ममरण हारपे[4] ॥ ८१ ॥ भवभय अतिदारुण ॥ त्याचें माया निजकारण ॥ तें समूळ होय निर्दळण[5] ॥ ऐसे धर्म कृपेनें सांगावे ॥ ८२ ॥ मज नाहीं अधिकार पूर्ण ॥ ऐसें विचाराल लक्षण ॥ तेंविषयीची हे विनवण[6] ॥ सावधान अवधारी ॥ ८३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अहं किल पुराऽनंतं प्रजार्थो भुवि मुक्तिदम् ॥ अपूजयं न मोक्षाय मोहितो देवमायया ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ ॥ मज अधिकार नाहीं पूर्ण ॥ हें मी जाणतों आपण ॥ मागें म्यां केलें भगवद्भजन ॥ तें तूं कथन अवधारी ॥ ८४ ॥ म्यां पूर्वी आराधिलें[7] देवराया ॥ तें भजन मम तानें लेवाया ॥ प्रलोभविलें[8] देवमाया ॥ पुत्रस्नेहालागोनी ॥ ८५ ॥ मज देव तुष्टला[9] प्रसन्नपणें ॥ मागसी तें देईन ह्मणे ॥ तेथें मायेनें ठकिलें मजकारणें ॥ माझा पुत्र होणें मी मागें ॥ ८६ ॥ तो हा माझा पुत्र श्रीकृष्ण ॥ परी मज न सांगे ब्रह्मज्ञान ॥ तोचि वंदी माझे चरण ॥ ह्मणे बाळक पूर्ण मी तुझें ॥ ८७ ॥ यापरी श्रीकृष्णापासी ॥ ज्ञानप्राप्ति नव्हे आह्मासी ॥ कृष्ण परमात्मा हृषीकेशी ॥ हें निश्चयेंसी मी जाणें ॥ ८८ ॥ श्रीकृष्ण जन्मला माझिया कुशी ॥ ह्मणोनि श्रद्धा आहे मजपाशीं ॥ तेणेंचि तूं तुष्टलासी ॥ निजरूपेंसी[10] उद्धरी ॥ ८९ ॥ जे मायेनें ठकिलों वाडेंकोडें ॥ ते माया समूळ झडे ॥ ऐसें सांगिजे रोकडें ॥ बहु बोलोनि पुढे काय कांज[11] ॥ ९० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यथा विचित्रव्यसनाद्भवद्भिर्विश्वतोभयात् ॥ मुच्येम त्वंजसैवाद्धा तथा नः शाधि सुव्रत ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ माया[12] जलभवसागरू ॥ भरला असे अतिदुस्तरू ॥ त्याचा उतरावया पैलपारू[13] ॥ होय तूं तारू मुनिराया ॥ ९१ ॥ त्याचें सकळ जळ क्षार ॥ माजी सावजें[14] अनिवार ॥ एकएकें चराचर ॥ गिळिलें साचार निजशक्तीं[15] ॥ ९२ ॥ लाटांवरी अचाट लाटा ॥ मोहाचिया अतिदुर्घटा[16] ॥ आदळती अविवेकतटा ॥ धैर्याचिया कांठा पाडित ॥ ९३ ॥ अहंकुवावो वाजतां थोरू ॥ अवघाचि[17] खवळे सागरू ॥ मीमाझेंनि गजरें

---

१ स्वसुखास. २ संसारपाशापासून. ३ कृतकृतार्थता. ४ नाहीसे होते. ५ नाश. ६ विनंति. ७ पूजिले. ८ लोभकेला. ९ संतोषला. १० आपल्या रूपेनें. ११ काम. १२ मायारूप जलाचा संसारसमुद्र. १३ पलीकडचो कड. १४ प्राणि, वाघ आदि. १५ आपल्याशक्तीनें. १६ फार मोठाल्या. १७ सर्वच.

घोरू ॥ अतिदुर्धरू गर्जत ॥ ९४ ॥ नानावासनांचा वळसा[1] ॥ पाहेपां भोंवताहे कैसा ॥ येथें तरावया धिंवसा[2] ॥ नव्हे सहसा सुरनरां[3]
॥ ९५ ॥ क्रोधाचें प्रबळ भरतें ॥ भरे द्वेषाचिया तरियातें ॥ असूया तिरस्कारांची तेथें ॥ चिंडाणी[4] उते अनिवार ॥ ९६ ॥ कामपर्वता
चीं शिखरें ॥ विषम[5] भासती अपारें ॥ आशे इच्छेचि वरी थोरें ॥ झाडें विषयांकुरें[6] वाढलीं ॥ ९७ ॥ संकल्पविकल्पांचे मीन[7] ॥ निंदेच्या
सुसरी दारुण ॥ ब्रह्मद्वेषाचे नक्र पूर्ण ॥ सागरीं जाण तळपती[8] ॥ ९८ ॥ एवढा हा भवसागरू ॥ शोषिता अगस्ती तूं साचारू ॥
तुझेनि भवाब्धी[9] पैलपारू ॥ पावेन हा निर्धारू जाहला आह्मां ॥ ९९ ॥ याचा विश्वतोभय हेलावा ॥ तो आह्मां न बाधी तुमच्या कणवा
॥ अप्रयासें[10] नारददेवा ॥ मरणार्णवा[11] मज तारी ॥ १०० ॥ पायीं उतरून भवसागरू ॥ साक्षात पावे परपारु ॥ ऐसा भागवतधर्म
विचारू ॥ तो निजनिर्धारू प्रबोधी ॥ १ ॥ ऐकोनि वसुदेवाची उक्ती[12] ॥ नारद सुखावला ॥ चित्तीं[13] ॥ तोचि अभिप्रावो[14] परिक्षिती ॥
शुक स्वमुखें स्थिती सांगत ॥ २ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीशुकउवाच ॥ राजन्नेवं कृतप्रश्नो वसुदेवेन धीमता ॥ प्रीतस्तमाह देवर्षिर्हरेः संस्मारितो
गुणैः ॥ १० ॥ ॥ टीका ॥ सांगतां वसुदेवाचा प्रश्न ॥ श्रीशुक जाहला स्वानंदपूर्ण ॥ नारद बोलला चैतन्यघन ॥ चित्सुख
जीवन मुमुक्षां ॥ ३ ॥ श्रीशुक ह्मणे नरदेवा ॥ भावो मीनला[15] नारदाच्या भावा ॥ ऐकोनि प्रश्न[16]सुहावा ॥ तो ह्मणे वसुदेवा धन्यवाणी
॥ ४ ॥ परिसतां हा तुझा प्रश्न ॥ चित्सुखें प्रगटे नारायण ॥ ऐसें बोलतां नारद जाण ॥ स्वानंदें पूर्ण वोसंडला[17] ॥ ५ ॥ रोमांच
उचलले अंगीं ॥ स्वेद[18] दाटला सर्वांगीं ॥ आनंदाश्रु चालिले वेगीं ॥ स्वानंदरंगीं डुल्लत ॥ ६ ॥ सप्रेम मीनलिया[19] श्रोता ॥ जैं पूर्ण
सुखावेना वक्ता ॥ तैं तो जाणावा अवघा[20] रिता ॥ कथासारामृता चवी नेणे ॥ ७ ॥ ऐकतां वसुदेवाचा प्रश्न ॥ नारद सुखावे पूर्ण ॥
मग स्वानंदगिरा गर्जोन ॥ काय आपण बोलत ॥ ८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नारद उवाच ॥ ॥ सम्यगेतद्व्यवसितं भवता सात्वतर्षभ ॥ यत्पृच्छसे
भागवतान्धर्मांस्त्वं विश्वभावनान् ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ नारद ह्मणे सात्वतश्रेष्ठा ॥ वसुदेवा परमार्थनिष्ठा ॥ धन्यधन्य
तुझी उत्कंठा ॥ तूं भावार्थी मोठा भागवतधर्मीं ॥ ९ ॥ ज्याचेनि धर्मांचे प्रश्नोत्तरें ॥ हें विश्व अवघेंचि उद्धरे ॥ हें विचारिलें तुवां बरें ॥
निजनिर्धारें श्रीकृष्णजनका ॥ ११० ॥ तुझेनि प्रश्नोत्तरें जाण ॥ साधक निस्तरती संपूर्ण ॥ साधकांचें नवल कोण ॥ पापी पावन येणें होती
॥ ११ ॥ श्लोक ॥ ॥ श्रुतोऽनुपठितो ध्यात आदृतो वाऽनुमोदितः ॥ सद्यः पुनाति सद्धर्मो देवविश्वद्रुहोऽपि हि ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ भा

---

[1] भवरा. [2] उतरून नेणारा. [3] देव, मनुष्यांस. [4] चिडणारा रोग, खरूजआदि. [5] लहान, मोठी. [6] शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे कोम. [7] मासे. [8] हिंडवात. [9] जन्म मरणरूप समुद्र [10] श्रमाचा वांचून. [11] मरणसमुद्रापासून. [12] बोलणे. [13] मनांत. [14] अभिप्राय. [15] मिळाला. [16] प्रश्नाचे रहस्य. [17] भरला. [18] घाम. [19] मिळाला. असतां. [20] सगळा.

गवतधर्माचेनि गुणें ॥ एक उद्धरती श्रवणें ॥ एक तरती पठणें ॥ एक निस्तरती ध्यानें संसारयात्रा ॥ १२ ॥ एक श्रोतया वक्तयांतें ॥ देखोनि सुखावती निजचित्तें ॥ सद्भावें भले ह्मणती यातें ॥ तेही तरती येथें भागवतधर्में ॥ १३ ॥ हें नवल नव्हे भागवतधर्मा ॥ जो कां [1]देवद्रोही दुरात्मा ॥ आणि [2]विश्वद्रोही दुष्टात्मा ॥ तोही तरे हा महिमा भागवतधर्मी ॥ १४ ॥ हृदयीं धरितां भागवतधर्म ॥ अकर्म्यांचें निर्दाळी कर्म ॥ अधर्म्यांचे निर्दाळी धर्म ॥ दे उत्तमोत्तम पदप्राप्ती ॥ १५ ॥ जेथें निघाले भागवतधर्म ॥ तेथें निर्दळे कर्माकर्म ॥ निंदा द्वेष क्रोध अधर्म ॥ अविद्येचें नाम उरों नेदी ॥ १६ ॥ ते भागवतधर्मी [3]अत्यादर ॥ श्रद्धेनें केला प्रश्न तुवां थोर ॥ [4]निजभाग्यें तूं अति उदार ॥ परमपवित्र वसुदेवा ॥ १७ ॥ तुझें [5]वानूं पवित्रपण ॥ तरी पोटा आला श्रीकृष्ण ॥ जयाचेनि नामें आह्मी जाण ॥ [6]परमपावन तिहीं लोकीं ॥ १८ ॥ तो स्वयें श्रीकृष्णनाथ ॥ नित्य वसे तुझिया घरांत ॥ तुझिया ऐसा भाग्यवंत ॥ न दिसे येथ मज पाहतां ॥ १९ ॥ वसुदेवा तुझिया नामता ॥ वासुदेव ह्मणती अनंता ॥ तें वासुदेव नाम स्मरतां ॥ परमपावनता जगद्वंद्या ॥ १२० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ त्वया परमकल्याणः पुण्यश्रवणकीर्तनः ॥ स्मारितो भगवानद्य देवो नारायणो मम ॥ १३ ॥ ॥ ज्याचेनि श्रवणें वाढे पुण्य ॥ ज्याचेनि नामें [7]झडे [8]भवबंधन ॥ तो [9]सद्य स्मरविला तुवां नारायण ॥ तुझी वाचा कल्याण वसुदेवा ॥ २१ ॥ तुझा आजि ऐकतांचि प्रश्न ॥ पूर्ण प्रगटला नारायण ॥ मज तुझा हा उपकार पूर्ण ॥ तूं परमकल्याण वसुदेवा ॥ २२ ॥ आशंका ॥ ऐकोनि नारदाचें वचन झणें [10]विकल्प धरील मन ॥ यासि पूर्वी होतें विस्मरण ॥ आतां जाहलें स्मरण वसुदेवप्रश्नें ॥ २३ ॥ ज्यांची ऐसी विकल्पयुक्ती ॥ ते जाणावे [11]आत्मघाती ॥ तेही अर्थींची उपपत्ती ॥ ऐक निश्चितीं शुक सांगे ॥ २४ ॥ अग्नि कुंडामाजी [12]स्वयंभ असे ॥ तो [13]घृतावदानें अतिप्रकाशे ॥ तेवीं सप्रेमप्रश्नवशें ॥ सुख उल्लासे मुक्तांचें ॥ २५ ॥ सप्रेमभावार्थें [14]मीनला श्रोता ॥ मुक्तही [15]उल्हासे सांगे कथा ॥ तेथील सुखाची [16]सुस्वादुता ॥ जाणे जाणता [17]सवर्म ॥ २६ ॥ यालागीं मुक्त मुमुक्षु विषयीजन ॥ भागवतधर्मीं [18]निवती संपूर्ण ॥ तोचि वसुदेवें केला प्रश्न ॥ तेणें नारद पूर्ण सुखावला ॥ २७ ॥ जे कां पूर्वपरंपरागत ॥ [19]जीर्ण भागवतधर्म येथ ॥ सांगावया नारदमुनी निश्चित ॥ [20]उपपादित इतिहास ॥ २८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अत्राप्युदाहरंतीममितिहासं पुरातनम् ॥ आर्षभाणां च संवादं विदेहस्य महात्मनः ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ येच अर्थी विदेहाचा प्रश्न ॥ संवादती आर्षभ नवजण ॥ ते भागवतधर्म जीर्ण ॥ इतिहास संपूर्ण सांगेन ऐक ॥ २९ ॥ आर्षभ कोण

---

[1] देवांचा द्वेष करणारा. [2] जगतांचे वैर करणारा. [3] फार प्रेम. [4] आपल्या दैवानें. [5] वर्णू. [6] फार पवित्र. [7] नाहीसें होते. [8] संसाराचा बंध. [9] लागलीच. [10] संशय. [11] आत्म्याच्या ह्मणजे चित्ताच्या प्रविलापानें. [12] स्वयंभु. [13] तुपाच्या आहुतीनें. [14] मिळाला. [15] आनंदानें. [16] गोडी. [17] वर्मजाणणारा. [18] राहती. [19] जुना. [20] सांगत आहे.

ह्मणशील मुळीं ॥ त्यांची सांगेन वंशावळी ॥ जन्म जयांचा सुकुळीं ॥ नवां माजी जाहली ब्रह्मनिष्ठा ॥ १३० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रियव्रतो नाम सुतो मनोः स्वायंभुवस्य यः ॥ तस्याग्नीध्रस्ततो नाभिर्ऋषभस्तत्सुतः स्मृतः ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्वायंभुमनूचा सुतू ॥ जाणा नामें प्रियव्रतू ॥ त्याचा आग्नीध्र विख्यातू ॥ नाभी त्याचा सुतू सूर्यवंशी ॥ ३१ ॥ त्या नाभीपासूनि ज्ञानविलासू ॥ ऋषभ जन्मला वासुदेवांशू[१] ॥ मोक्षधर्माचा प्रकाशू[२] ॥ जगीं सावकाशू ॥ विस्तारिला[३] ॥ ३२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तमाहुर्वासुदेवांशं मोक्षधर्मविवक्षया ॥ अवतीर्णं सुतशतं तस्यासीद्वेदपारगम् ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऋषभ वासुदेवाचा अंशु ॥ येलोकीं मोक्षधर्मीं विश्वासु ॥ प्रवर्तावया जगदीशु ॥ हा अंशाशु अवतार ॥ ३३ ॥ त्याचें पंचमस्कंधीं चरित्र ॥ सांगीतलें सविस्तर ॥ त्यासि जाहले शतपुत्र[४] ॥ वेदशास्त्रसंपन्न ॥ ३४ ॥ त्यांहीमाजी ज्येष्ठपुत्र ॥ अतिशयें परमपवित्र ॥ ऐक त्याचें चरित्र ॥ अतिविचित्र सांगेन ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ तेषां वै भरतो ज्येष्ठो नारायणपरायणः ॥ विख्यातं वर्षमेतद्यन्नाम्ना भारतमद्भुतम् ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो ज्येष्ठपुत्र[५] भरत जाण ॥ तो नारायणपरायण[६] ॥ अद्यापि भरतवर्षउच्चारण ॥ त्याचेनि नावें जाण विख्यात[७] ॥ ३६ ॥ नामें ख्याती केली उदंड[८] ॥ यालागीं त्यातें ह्मणती भरतखंड ॥ आणीक ही प्रताप[९] प्रचंड ॥ त्याचा वितंड तो ऐका ॥ ३७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स भुक्तभोगां त्यक्त्वेमां निर्गतस्तपसा हरिम् ॥ उपासीनस्तत्पदवीं लेभे वै जन्मभिस्त्रिभिः ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ ॥ तेणें दिग्मंडळ जिंकिलें ॥ समुद्रवलयांकित राज्य केलें ॥ नानाविध[१०] भोग भोगिले ॥ जे नाहीं देखिले सुरवरीं[११] ॥ ३८ ॥ अनुकूल स्त्रियापुत्र ॥ अनुकूल मंत्री पवित्र ॥ अनुकूल राज्य सर्वत्र ॥ ते त्यागिले विचित्र नानाभोग ॥ ३९ ॥ ऐसे नानाभोग भोगिल्यापाठी ॥ सांडूनि वलयांकित राजसृष्टी ॥ स्वयें निघाला जगजेठी ॥ स्वहितदृष्टी हरिभजनीं ॥ १४० ॥ जे राज्यवैभव भोगिती ॥ त्यांसि कदा नव्हे गा विरक्ती[१२] ॥ भरतें केली नवलख्याती ॥ सेविला श्रीपतीभोग त्यागें ॥ ४१ ॥ तो तेणेंचि जन्में जाण ॥ व्हावा मोक्षासी आरोहण ॥ परी जाहलें जन्मांतरकारण[१३] ॥ तेंही विंदान सांगेन ॥ ४२ ॥ संनिहितप्रसूतिकाळीं ॥ मृगी[१४] जळ प्राशितां जळीं ॥ ऐकोनि पंचाननाची[१५] आरोळी ॥ उडाली तत्काळीं अतित्राणें ॥ ४३ ॥ धाकें गर्भ तिचा पडतां जळीं ॥ भरत स्नान करी तेकाळीं ॥ देखोनि कृपाळु कळवळी[१६] ॥ काढी तत्काळीं दयाळुत्वें ॥ ४४ ॥ मृगी नयेचि परतोन ॥ मातृहीन हें अतिदीन ॥ भरत पाळी भुतदयेन ॥ मृगममता[१७] पूर्ण वाढविली ॥ ४५ ॥ स्नान संध्या अनुष्ठान ॥ करितां मृग आठवे क्षणक्षण ॥ आरंभिल्या जप ध्यान ॥

---

१ कृष्णाचा अंश. २ तेज. ३ वाढला. ४ शंभरपुत्र. ५ वडीलमुलगा. ६ विष्णूची सेवा करणारा. ७ प्रसिद्ध. ८ बहुत. ९ पराक्रम. १० अनेकप्रकारचे. ११ देवांनीं. १२ वैराग्य. १३ अन्यजन्मास कारण. १४ हरिणी. १५ सिंहाचो. १६ तळमळी. १७ हरिणाची माया.

मृगमय मन भरताचें ॥ ४६ ॥ आसनीं भोजनीं शयनीं ॥ मृग आठवे क्षणक्षणीं ॥ मृग न देखतां नयनीं ॥ उठे गजबजोनी ध्यान त्यागें ॥ ४७ ॥ ममता बसली मृगापाशीं ॥ मृग वना गेला स्वइच्छेसीं ॥ त्याचा खेद करितां भरतासी ॥ काळ[1] आकर्षी देहातें॥४८॥ यालागीं साचचि[2] जाण ॥ ममतेपाशीं असे मरण ॥ जो निर्मम[3] संपूर्ण ॥ त्यासि जन्ममरण स्पर्शेना ॥ ४९ ॥ भरत तपिया थोर अंगे॥ तेथें काळ कैसेंनि रिघे ॥ ममतासंधी पाहोनि वेगें ॥ मृत्यु तद्योगें पावला ॥१५० ॥ देहासि येतां मरण ॥ भरतासि मृगाचें ध्यान ॥ तेणें मृगजन्म पावे आपण ॥ जन्मांतर[4] कारण जाहलें ऐसें ॥ ५१ ॥ कृपेनें केला जो संगु ॥ तोचि योगियां योगभंगु ॥ यालागीं जोनिःसंगु ॥ तो अभंगु साधक ॥ ५२ ॥ मृगाचेनि स्मरणें निमाला[5] ॥ यालागीं तो मृगजन्म पावला ॥ जो कृष्णस्मरणें निमाला ॥ तो कृष्णचि जाहला देहांती[6] ॥ ५३ ॥ अंतकाळीं जे मती ॥ तेचि प्राणियांसि जाण गती ॥ यालागीं श्रीकृष्ण चित्तीं ॥ अहोरात्रीं[7] स्मरावा ॥ ५४ ॥ परी मृगदेहीं जाण ॥ भरतासि श्रीकृष्णस्मरण ॥ पूर्वीं केलें जें अनुष्ठान ॥ तें अंतर जाण कदा नेदी ॥ ५५ ॥ मागुता तिसरे जन्में पाहे ॥ तो जडभरत नाम लाहे ॥ तेथें तो निर्ममत्वें राहे ॥ तेणें होय नित्यमुक्त ॥ ५६ ॥ बहुतांजन्मींची उणीवी ॥ येणें जन्में काढिली बरवी ॥ निजात्मा आकळोनि जीवीं ॥ ब्रह्मपदवी[8] पावला ॥५७॥ ऋषभपुत्रउत्पत्ती ॥ शतबंधू जाण निश्चितीं ॥ त्यांत हे ज्येष्ठाची स्थिती ॥ उरल्यांची गती ॥ ते ऐका ॥ ५८ ॥ श्लोक ॥ ॥ तेषां नवनव द्वीपपतयो ऽस्य समंततः ॥ कर्मतंत्रप्रणेतार एकाशीतिर्द्विजातयः ॥ १९ ॥ टीका ॥ ॥ नव[9] नवखंडांप्रती ॥ ते केले खंडाधिपती ॥ एक्याशींजणांची स्थिती ॥ कर्ममार्गीं होती प्रवर्तकू ॥ ५९ ॥ उरले जे नवजण ॥ सकळभाग्याचे भूषण ॥ ब्रह्मज्ञानाचें अधिष्ठान ॥ ऐक लक्षण तयांचें ॥ १६० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नवाभवन्महाभागा मुनयो ह्यर्थशंसिनः ॥ श्रमणा वातरशना आत्मविद्याविशारदाः ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ ऋषभकुळीं कुळदीप[10] ॥ स्नेहसूत्रेंवीण देदीप्य ॥ नवही जाण स्वयें तृप्त ॥ सायुज्यस्वरूपप्रकाशक ॥ ६१ ॥ आत्माभ्यासीं[11] परिश्रम ॥ करून निरसिलें[12] कर्माकर्म ॥ यालागीं ते अकृताश्रम[13] ॥ निजनिभ्रम स्वयें जाहले ॥ ६२ ॥ शब्दबोधें[14] सदोदित ॥ ब्रह्मज्ञान पारंगत ॥ शिष्यप्रबोधीं समर्थ ॥ परमाद्भुत अतिदक्ष ॥ ६३ ॥ ते ब्रह्मविद्येचें चालतें डिंबें[15] ॥ त्यांचे ते अवेव[16] ते ब्रह्मकोंब[17] ॥ ते विद्येचें पूर्णबिंब ॥ स्वयें स्वयंभ परब्रह्म ॥ ६४ ॥ दशदिशा येकूचि दोरा ॥ भरूनि पांघरुणे मुनीश्वरा ॥ वारा वळून कडदोरा ॥ बांधिला पुरा ग्रंथरूप ॥ ६५ ॥ आकाशाच्याठायीं ॥ अंबरत्वकेलें तिहीं ॥ ते चिदंबर पाही ॥

---

१ मृत्यू. २ खरेंच. ३ अहंकार विरहित. ४ दुसरेजन्मास. ५ मरण पावला. ६ देहाचे शेवटी. ७ रात्रंदिवस. ८ ब्रह्मास. ९ नउ. १० कुळदीपक. ११ अत्मा जाण्याच्या अभ्यासा विपर्यीं. १२ नाहीसे केले. १३ आश्रमरहित. १४ शब्दज्ञानानें. १५ झाडाचे बुड, खोड. १६ अवयव. १७ ब्रह्म हा अंकुर.

एकचि नवांहीं पांघरून ॥ ६६ ॥ प्राणापान वळूनि दोन्ही ही ॥ गांठी केली नाभाचाठायीं ॥ तंव जीवग्रंथी सुटलें पाही ॥ तेंचि नवांहीं ब्रह्मसूत्र ॥ ६७ ॥ ऐसें परब्रह्मवैभवें ॥ निंदारलें निजानुभवें ॥ त्यांचीं सांगेन मी नावें ॥ यथागौरवें तें ऐक ॥ ६८ ॥ ज्यांचें नाम ऐकतां ॥ कांपत काळ पळे मागुता ॥ संसार नुघवी[२] माथा ॥ नाम स्मरतां जयांचें ॥ ६९ ॥ त्यानामांची कीर्ती ॥ आईक सांगेन परिक्षिती ॥ ज्यांचेनि नामें आतुडे मुक्ती ॥ जाण निश्चितीं भाविकां ॥ १७० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कविर्हरिरंतरिक्षः प्रबुद्धः पिप्पलायनः ॥ आविर्होत्रोऽथ द्रुमिलश्चमसः करभाजनः ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥ कवि हरि अंतरिक्ष ॥ प्रबुद्ध पिप्पलायन देख ॥ आविर्होत्र द्रुमिल सुटंक ॥ चमस निर्दोष करभाजन ॥ ७१ ॥ एवं नवही नावें जाण ॥ यांचें करितां नामस्मरण ॥ सकळपापांनिर्दळण[३] ॥ हे महिमा पूर्ण तयांची ॥ ७२ ॥ यांची परमहंसस्थिती ॥ सांगेन मी तुजप्रती ॥ ज्यांचेनि पावन[४] होय क्षिती ॥ त्या नवमूर्ती पुण्यपूज्य ॥ ७३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एते वै भगवद्रूपं विश्वं सदसदात्मकम् ॥ आत्मनोऽव्यतिरेकेण पश्यंतो व्यचरन्महीम् ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥ ते वेगळे दिसती नवांक ॥ परी भगवद्रूपीं[५] अवघे एक ॥ संतासंत जन अनेक ॥ आपणासगट देख एकत्वें पाहती ॥ ७४ ॥ त्यांसी तंव असंतता ॥ उरली नाहीं सर्वथा ॥ संत ह्मणावया पुरता ॥ भेदू[६] नये हाता चिन्मयत्वें ॥ ७५ ॥ जग परिपूर्ण भगवंतें ॥ आपणावेगळा नुरे तेथें ॥ नवही भगवद्रूपसमस्तें ॥ भूताकृती ते प्रगट देखे ॥ ७६ ॥ हेही देखते देखणें ॥ तेही स्वयें आपण होणें ॥ होणे नहोणे येणें जाणें ॥ हीं गिळूनि लक्षणें विचरती महीं ॥ ७७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अव्याहतेष्टगतयः सुरसिद्धसाध्यगंधर्वयक्षनरकिंनरनागलोकान् ॥ मुक्ताश्चरंति मुनिचारणभूतनाथविद्याधरद्विजगवां भुवनानि कामम् ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ वैकुंठ कैलास सुरसिद्धस्थानें ॥ सप्तपाताळादि गमनें ॥ एवं श्लोकोक्त चवदाभुवनें[७] ॥ स्वइच्छाविचरणें[८] कामनारहित ॥ ७८ ॥ त्यांसि जीवीं नाहीं विषयासक्ती ॥ यालागीं कुंठेना त्यांची गती ॥ इच्छामात्रें गमनशक्ती ॥ सुखें विचरती निष्काम ॥ ७९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तएकदा निमेः सत्रमुपजग्मुर्यदृच्छया ॥ वितायमानमृषिभिरजनाभेर्महात्मनः ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ जेथें मनाचा प्रवेशू नाहीं ॥ त्यांची पायवाट तेठायीं ॥ ऐसे स्वइच्छा विचरतां[९] मही ॥ आले ते पाही कर्मभूमीं[१०] ॥ १८० ॥ मही विचरतां वितंड ॥ पातले[११] अजनाभखंड ॥ तंव विदेहाचा याग प्रचंड ॥ मीनले[१२] उदंड ऋषीश्वर ॥ ८१ ॥ याग वेदोक्तविधीनिका[१३] ॥ कुंडमंडपवेदिका ॥ आवो[१४] साधोनि नेटका ॥ विधानपीठिका अतिशुद्ध ॥ ८२ ॥ सुक्स्रुवा त्रिसंधानें ॥ विस्तारूनि

---

१ भरले. २ उघडीत नाही. ३ नाश. ४ पवित्र. ५ परमेश्वराचे रूपी. ६ द्वैत. ७ चवदालोक. ८ आपल्या इच्छेनें. ९ हिंडता. १० कर्मांचे भूमीवर. ११ आले. १२ मिळाले. १३ वेदोक्त विधीसह. १४ आय, दिशासाधन.

परिस्तरणें ॥ अखंड वसुधारा दंडाप्रमाणे ॥ ऋषिमंडणें होम करिती ॥ ८३ ॥ होम होतां संपूर्ण ॥ पूर्णाहुति समयीं जाण ॥ येतां देखिले नवही जण ॥ देदीप्यमान निजतेजें[1] ॥ ८४ ॥ ॥श्लोक॥ ॥तान् दृष्ट्वा सूर्यसंकाशान् महाभागवतान्नृप ॥ यजमानोऽग्नयो विप्राः सर्वएवोपतस्थिरे॥ २५॥ ॥टीका॥ ॥अमितसूर्यांचिया कोटी ॥ हारपती नखतेजांगुष्ठीं ॥ तो भगवंत जिहीं धरिला पोटीं ॥ त्यांची तेजाची गोष्टी अलोलिक ॥ ८५ ॥ त्यांचिया अंगप्रभा ॥ सूर्य लोपताहे[2] उभा ॥ जिहीं प्रभेशी आणिली शोभा ॥ चैतन्यगाभा साकार ॥ ८६ ॥ ते भगवद्भाववैभव ॥ भगवंताचें निजगौरव ॥ भक्तीचे भाग जे नव ॥ ते जाणा सर्व मूर्तिमंत ॥ ८७ ॥ नवखंडपृथ्वीचे अलंकार ॥ नवनिधींचें निजसार ॥ नवरत्नांचेंही निजभांडार ॥ तेंहे साकार नवहीजण ॥ ८८ ॥ कीं ते नवही[3] नारायण ॥ स्वयें प्रगटले आपण ॥ नवही नृसिंह जाण ॥ देदीप्यमान पैं आले ॥ ८९ ॥ आव्हानिले[4] तिन्ही अग्नी ॥ उभे ठेले त्यांतें देखोनी ॥ ते हे भागवत देखिले नयनीं[5] ॥ इतरां लागुनी दिसेना ॥ १९० ॥ येतां देखोनि तेजोमूर्ती ॥ ऋत्विज आचार्य उभे ठाकती ॥ साउमा धांवे विदेहनृपती ॥ स्वानंदवृत्ती सन्मानी ॥ ९१ ॥ सवेग घाली लोटांगण ॥ मुगुट काढोनि आपण ॥ मस्तकीं वंदोनियां चरण ॥ पूर्ण आदरें जाण आणिताजाहला ॥ ९२ ॥ ॥श्लोक॥ ॥विदेहस्तानभिप्रेत्य नारायणपरायणान् ॥ प्रीतः संपूजयांचक्र आसनस्थान् यथाऽर्हतः ॥ २६ ॥ टीका॥ ॥त्यांतें जाणोनियां भगवत्पर ॥ विदेहा आल्हाद[6] थोर ॥ त्यांचे पूजेसि अत्यादर ॥ स्वयें सादर पैं जाहला ॥ ९३ ॥ श्रद्धायुक्त चरणक्षालन ॥ धूप दीप सुमन चंदन ॥ पूजा मधुपर्क विधान ॥ केलें संपूर्ण यथायोग्य ॥ ९४ ॥ ॥श्लोक॥ तान् रोचमानान् स्वरुचा ब्रह्मपुत्रोपमान्नव ॥ पप्रच्छ परमप्रीतः प्रश्रयावनतो नृपः ॥ २७ ॥ ॥टीका॥ ॥निजांगींच्या[7] निजप्रभा[8] ॥ अंगासि आणिली शोभा ॥ काय ब्रह्मविद्येचा गाभा ॥ शोभे नवप्रभा शोभायमान ॥ ९५ ॥ निजहृदयींचें[9] ब्रह्मज्ञान ॥ परिपाकें[10] प्रकाशलें पूर्ण ॥ तेंचि निजांगमंडण[11] ॥ इतर भूषण त्यां नाहीं ॥ ९६ ॥ मुमुट कुंडलें कंकण[12] ॥ मूर्खां अंगीं बाणलीं पूर्ण ॥ ते शोभा लपोनि मूर्खपण ॥ बाहेर संपूर्ण प्रकाशे ॥ ९७ ॥ तैशे नव्हती हे ज्ञानघन ॥ ब्रह्म पूर्णत्वें विराजमान[13] ॥ तेंचि त्यांसि निजांगमंडण ॥ इतर भूषण त्यां नाहीं ॥ ९८ ॥ ब्रह्मानुभवें पूर्णत्वपण ॥ इंद्रियद्वारा विराजमान ॥ तें त्यांसि निजशांतिभूषण[14] ॥ मुगुट कुंडलें तें तुच्छ ॥ ९९ ॥ मागां वाखाणिले सनकादिक ॥ त्यां समान कीं हे अधिक ॥ ऐसा विचारितां परिपाक ॥ त्यां यां वेगळिक दिसेना ॥ २०० ॥ त्यांची यांची एकगती ॥ त्यांची यां

---

[1] आपल्या तेजानें. [2] लोपती. [3] नऊही. [4] बोलाविले. [5] डोळ्यानें. [6] आनंद. [7] आपल्या आंगाच्या. [8] आपल्या कांति. [9] आपल्या मनांतले. [10] पूर्णत्वानें. [11] आपल्याआंगाचे दागिने. [12] कडी. [13] शोभायमान. [14] ब्रह्माची शांति.

ची एकस्थिती ॥ त्यांची यांची एकशांती ॥ भेदू निश्चितीं असेना ॥ १ ॥ त्यांच्याऐसे हे सखेबंधू ॥ त्यांच्याऐसा समानबोधू ॥ त्यांच्याऐसा हा
अनुवादू ॥ सर्वथा भेदू असेना ॥ २ ॥ ते चौघे हे नवजण ॥ अवघ्यां एकचि ब्रह्मज्ञान ॥ त्यांची यांची शांति समान ॥ हें विदेहा
पूर्ण कळूं सरले ॥ ३ ॥ ऐसें परिपूर्णत्व जाणोनी ॥ राजा सुखावे स्थिति देखोनी ॥ मग अति[१]विनीत होऊनी ॥ मृदु मंजुळ वचनीं वि
नवित ॥४॥ ॥ श्लोक ॥ ॥विदेहउवाच॥ ॥ मन्ये भगवतः साक्षात् पार्षदान्वो मधुद्विषः ॥ विष्णोर्भूतानि लोकानां पावनाय चरंति हि ॥ २८ ॥
टीका ॥ ॥ सार्वभौम चक्रवर्ती ॥ देहीं असोनि विदेहस्थिती ॥ तो जनक आर्षभांप्रती ॥ अतिप्रीतीं विनवितू ॥ ५ ॥ त्यांच्या भेटी सवें[२]
उलथलें सुख ॥ विदेहासि देहेविण हरिख[३] ॥ तेणें हरिखेंकरूनियां देख ॥ प्रीतिपूर्वक विनवितू ॥ ६ ॥ तुमचें सामर्थ्य पाहतां येथ ॥ तु
ह्मी ईश्वररूप समस्त ॥ देहभावें तरी भगवद्भक्त ॥ जैसे पार्षद[४] हरीचे ॥ ७ ॥ देव आपुला आपण भक्तु ॥ ऐसा जो कां उपनिषदर्थू[५] ॥
तो साच करूनी वेदार्थू ॥ निजपरमार्थु अनुभवा ॥ ८ ॥ शिव होऊनि शिवु यजिजे ॥ हें लक्षण तुह्मांशीच साजे ॥ येरीं हे बोलचि बोलिजे ॥
परी बोलते वोजे अर्थ न लभे ॥ ९ ॥ विष्णूनें सृष्टी जें जें सृजणें[६] ॥ तें तें तुह्मीं पवित्र करणें ॥ मही विचरायाचीं[७] कारणें ॥ कृपाळूपणें दी
नोद्धारा ॥ २१० ॥ तुह्मी विचरा विश्वकणवा ॥ परी भेटी होय प्राप्त तेव्हां ॥ आजि लाधलों तुमची सेवा ॥ उद्भट दैवा आथिलों[८] मी ॥ ११ ॥
आजि माझें धन्य दैव ॥ आजि माझें धन्य वैभव ॥ आजि धन्य मी सर्वांसर्व ॥ हे चरण अपूर्व पावलों ॥ १२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ दुर्ल
भो मानुषो देहो देहिनां क्षणभंगुरः ॥ तत्राऽपि दुर्लभं मन्ये वैकुंठप्रियदर्शनम् ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ सकळ देहांमाजी पहाहो ॥ अति
दुर्लभ मनुष्यदेहो[९] ॥ त्याचिया प्राप्तीचा संभवो ॥ तो अभिप्रावो अति दुर्गम ॥ १३ ॥ सुकृतदुष्कृत[१०] समान समीं ॥ पैं पाविजे कर्म
भूमी ॥ तेचि जैं पडे विषमीं ॥ तैं स्वर्गगामी कां नरकीं ॥ १४ ॥ समानकर्मी[११] नरदेह जोडे ॥ तरी समस्तां सम बुद्धि न घडे ॥ त्या स
मांमाजी विषम[१२] गाढे ॥ जेणें पडे तें ऐका ॥ १५ ॥ पापाचा एकु महाचिरा ॥ पुण्यें जो खणी चारा चुरा ॥ समान आलिया तुळाभा
रा ॥ येणें जन्में नरा दृढ पापबुद्धी ॥ १६ ॥ वाळु आणि सुवर्ण ॥ जोखतां जाहलिया समान ॥ सोनियांलागीं वेंचिती[१३] धन ॥ वाळू
ते जाण न घेतीं फुकट ॥ १७ ॥ एकाचें पुण्य अत्यंत थोर ॥ पाप लहान सहान एकत्र ॥ करूनि जोखिती[१४] तुळाभार ॥ समान सा
चार जैं होय ॥ १८ ॥ ऐसेंनि कर्में[१५] जे जन्मती ॥ त्यांसि पुण्यावरी अतिप्रीती ॥ पुण्य पाप दोनीं झडती ॥ तैं नित्यमुक्ती पाविजे ॥ १९ ॥

---

[१] फारनम्र. [२] भेटीबरोबर. [३] आनंद. [४] दूत. [५] उपनिषदाचा अर्थ. [६] उत्पन्न करणे. [७] फिरण्याची. [८] अर्थिलो. [९] मनुष्याचे शरीर. [१०] पुण्य आणि पाप. [११] सारख्या कर्मांनीं. [१२] कमी जास्त. [१३] मिळवितात. [१४] मोजितात. [१५]

अतिसूक्ष्म ऐशा संकटीं ॥ मनुष्यदेहीं होय भेटी ॥ तेथेंही अभिमान अतिउठी ॥ धन दारा दिठी विषयाच्या ॥ २२० ॥ मनुष्यदेहींचेनि आयुष्यें ॥ विषयीं सायास[1] करिती कैसे ॥ अमृत देऊनि घे जैसें ॥ तान्हें सावकाशें मृगजळ ॥ २१ ॥ गंधर्वनगरीचीं ठाणीं ॥ घेतलीं देऊनि चिंतामणी ॥ तैशी लटिकियालागीं आटणी ॥ विषयसाधनीं नरदेहा ॥ २२ ॥ तोडूनि कल्पतरूचें उद्यान[2] ॥ सायासीं तें वाहोनि रान ॥ तेथें साक्षेपें पेरिली जाण ॥ आणूनि आपण भांग जैशी ॥ २३ ॥ तैसे नरदेहा येऊनि नरा ॥ करिताति आयुष्याचा मातेरा ॥ पूर्ण व्यवसाय[3] शिश्नोदरा ॥ उपहास निद्रा कां निंदा ॥ २४ ॥ नित्य प्रपंचाची कटकट ॥ सदा विषयांची खटपट ॥ कदां आरोळ्या चोखट ॥ स्वेच्छा सारीपाट खेळणें ॥ २५ ॥ नाना विनोद टवाळी ॥ नित्य विषयाची चाळी ॥ त्यासि जपतां रामनामावळी ॥ पडे दांतफळी असंभाव्य ॥ २६ ॥ घरा आली कामधेनू ॥ दवडिती न पोसवे[4] ह्मणूनू ॥ तेवीं श्रीरामनामउच्चारुनू ॥ नोंडला[5] जणूं नरदेहीं ॥ २७ ॥ करितां नरदेहीं अलंकार ॥ तंव तो देहचि क्षणभंगुर ॥ देहीं देहवंता भाग्य थोर ॥ जैं भगवत्पर[6] भेटती ॥ २८ ॥ ज्यांसि भगवद्भक्तीची अतिगोडी ॥ त्यांवरी भगवंताची आवडी ॥ त्यास भेटी होय रोकडी ॥ जैं पुण्याच्या कोडी तुष्टती ॥ २९ ॥ ज्याचिया आवडीच्या लोभा ॥ भगवंतू पालटें आलागर्भा ॥ दशावतारांची शोभा ॥ जाहली पद्मनाभा ज्याचेनी ॥ २३० ॥ ऐसे कृष्णकृपासमारंभें ॥ जे भगवंताचे वालभे[7] ॥ त्यांची भेटी तैंचि लाभे ॥ जैं भाग्यें सुलभें पैं होती ॥ ३१ ॥ निष्कामता निजदृष्टी[8] ॥ अनंत पुण्यें कोट्यानकोटी ॥ रोकडी लाभे पाठोपाठी ॥ तैं होय भेटी हरिप्रियांची ॥ ३२ ॥ व्याघ्रसिंहांचें दूध जोडे ॥ चंद्रामृतही हाता चढे ॥ परी हरिप्रियाची[9] भेटी नातुडे ॥ दुर्लभ भाग्य गाढें मनुष्या ॥ ३३ ॥ व्याघ्र सिंह दुधासाठीं ॥ अतिसबळता जोडे पुष्टी ॥ परी जन्ममरणांची तुंटी[10] ॥ दुधासाठीं कदा नोहे ॥ ३४ ॥ ह्मणती चंद्रामृत जो आरोगी[11] ॥ तो होय नित्य निरोगी ॥ मुख्य चंद्रचि क्षयरोगी ॥ त्याचें अमृत निरोगी करी केवीं[12] ॥ ३५ ॥ व्याघ्र सिंह दुग्धशक्ती ॥ प्राणी जैं अजरामर[13] होती ॥ तैं तेणें दुग्धें ज्यांची उत्पत्ती ॥ ते का मरती व्याघ्र सिंह ॥ ३६ ॥ जैं हरिभक्तांची भेटी घडे ॥ तैं नबाधी संसार सांकडें ॥ जन्मरण समूळ उडे ॥ त्यांची भेटी आतुडे[14] अतिभाग्यें ॥ ३७ ॥ आजि मी भाग्यें सभाग्य पूर्ण ॥ लाधलों तुमचें दरुशन ॥ तरी आत्यंतिक क्षेम कोण ॥ तें कृपाकरून मज सांगा ॥ ३८ ॥ श्लोक ॥ अत आत्यंतिकं क्षेमं पृच्छामो भवतोऽनघाः ॥ संसारेऽस्मिन् क्षणार्धोऽपि सत्संगः शेवधिर्नृणाम् ॥ ३० ॥ ॥ टीका ॥ ॥ ह्मणे तुह्मी नि

---

१ श्रम. २ बाग. ३ व्यापार. ४ खाण्या पिण्यास चालवत नाहीं. ५ अडविला गेला. ६ ईश्वरपरायण. ७ आवडते. ८ आपल्या दृष्टीनें. ९ भक्ताची. १० तूट. ११ सेवी. १२ कसें. १३ जरामरणरहित. १४ मिळते.

ष्पाप निर्मळ ॥ तुमचेनि दर्शनें तत्काळ ॥ नासती सकळ कळिमळ ॥ ऐसे निजनिर्मळ तुह्मी सर्व ॥३९॥ स्नान केलिया गंगा॥ पवित्र करी सकळ जगा ॥ ते गंगाही निजपापभंगा[1] ॥ तुमचे चरणसंगा वांछित ॥ २४० ॥ तुमचे दर्शन सद्गंगा ॥ अत्यंत दाटुगी माजी जगा ॥ दर्शनमात्रें[2] ने भव भंगा ॥ जन्ममरणपैं गा मज कैचें ॥ ४१ ॥ तेथें कायसा गंगेचा पडिपाडू[3] ॥ नाहीं तीर्थ महिमेचा पवाडू ॥ तीर्थां भवदोष[4] अवघडू ॥ त्याचा करी निवाडू दृष्टिसंगें ॥ ४२ ॥ ऐशी पवित्रता प्रबळ ॥ दृष्टि उत्संगीं वाढवा सकळ ॥ आजि जाहलों मी अतिनिर्मळ ॥ तुह्मीं दीनदयाळ मीनलेती[5] ॥ ४३ ॥ ऐशी पवित्र आणि रुपामूर्ती ॥ भाग्यें लाधलों हे संगती ॥ सत्संगाची निजख्याती ॥ सांगतां श्रुती मौनावल्या[6] ॥ ४४ ॥ ब्रह्म निर्धर्म नेणे निजधर्मा ॥ साधुमुखें ब्रह्मत्व ब्रह्मा ॥ त्या सत्संगाचा[7] महिमा ॥ अति[8] गरिमा निरुपम[9] ॥ ४५ ॥ सत्संग ह्मणों निधी समान ॥ निधी जोडल्या हारपे जाण ॥ सत्संगाचें महिमान ॥ साधक संपूर्ण सद्रूप करी ॥ ४६ ॥ निधी[10] सांपडलिया सांग ॥ अत्यंत वाढवी विषयभोग ॥ तैसा नव्हेजी सत्संग ॥ निर्विषय चांग सुखदाता ॥४७॥ इंद्रियांवीण स्वानंदू ॥ विषयावीण परमानंदू ॥ ऐसा करिती निजबोधू[11] ॥ अगाध साधू निज महिमा ॥ ४८ ॥ निमिषार्ध होतां सत्संग ॥ तेणें संगें होय भवभंग ॥ यालागीं सत्संगाचें भाग्य ॥ साधक सभाग्य जाणती ॥ ४९ ॥ संतचरणीं ज्यांचा भावो ॥ भावें तुष्टती संत स्वयमेवो ॥ संतसन्निधिमात्रें पाहाहो ॥ संसार वावो[12] स्वयें होय ॥ २५० ॥ नानाविकार विषयविधी ॥ संसार सबळत्वें बाधी ॥ त्यावरी संसाराची अवधी ॥ जाण त्रिशुद्धी सत्संग ॥ ५१ ॥ दीपाचिये संगप्राप्ती ॥ निःशेष कापुरत्वाची शांती ॥ तेवीं जाहलिया सत्संगती ॥ संसारनिवृत्ती[13] क्षणार्धें ॥ ५२ ॥ ते तुमची सत्संगती ॥ भाग्यें पावलों अवचितीं ॥ आत्यंतिक क्षेम कैशारीतीं ॥ प्राणी पावती तें सांगा ॥ ५३ ॥ आत्यंतिक क्षेमाचें वर्म ॥ जरी ह्मणाल भागवत धर्म ॥ त्या धर्मांचा अनुक्रम ॥ सांग सुगम सांगाजी ॥५४ ॥ श्लोक॥ धर्मान्भागवतान्ब्रूत यदि नः श्रुतये क्षमम् ॥ यैः प्रसन्नः प्रपन्नाय दास्यत्यात्मानमप्यजः ॥ ३१ ॥ टीका ॥ परिसावया भागवतधर्मीं ॥ श्रवणाधिकारी असों जरी आह्मी ॥ तरी कृपा करोनियां तुह्मी ॥ सांगा स्वामी सकळ धर्म ॥ ५५ ॥ नवल या धर्माची ख्याती ॥ सप्रेम आदरितां प्रीती ॥ तेणें तुष्टोनियां श्रीपती ॥ दे सेवकांहातीं आपणियां[14] ॥ ५६ ॥ अजन्मा या नामाची ख्याती ॥ वेदशास्त्रीं मिरवी श्रीपती ॥ तो भागवतधर्माचिया प्रीतीं ॥ सोशी जन्मपंक्ती भक्तांचिया ॥ ५७ ॥ एवं भागवतधर्मी जाण ॥ जो कोणी अनन्य शरण ॥

---

१ आपल्या पापाच्या नाशाकरिता. २ पाहण्यानेंच. ३ मोठेपणा. ४ जन्ममरणाचा दोष. ५ मिळालेत. ६ उगाच बसल्या. ७ साधूच्या संगतीचा. ८ फारथोरवी. ९ उपमारहित. १० पुरलेले धन. ११ आपल्या आत्म्याचे ज्ञान. १२ व्यर्थ. १३ संसाराचा नाश. १४ आपणास.

त्यासि तुष्टोनियां[1] नारायण ॥ निजात्मा पूर्ण स्वयें देत ॥ ५८ ॥ भागवतधर्मश्रवणार्थ ॥ मज अधिकार जरी नसेल येथ ॥ तरी मी अनन्य शरणागत ॥ असें निश्चित तुह्माशीं ॥ ५९ ॥ भूतदयेचेनि डांरलेपण[2] ॥ तुमच्याठायीं वोसंडे[3] पूर्ण ॥ तुह्मी दयानिधी संपूर्ण ॥ दीनोद्धारण तुमचेनी ॥ २६० ॥ जेथें तुमची कृपा पूर्ण ॥ तेथें न राहे जन्ममरण ॥ सर्वाधिकार संपूर्ण ॥ सहज आपण वोळंगे[3] ॥ ६१ ॥ तंव तुमचे कृपेपरतें[4] ॥ आन[5] सामर्थ्य नाहीं येथें ॥ ऐसें चाणोनि या निश्चितें ॥ शरण तुह्मातें मी आलों ॥ ६२ ॥ कायसी ज्ञातेपणाची लाज ॥ येथें तुमचे कृपें माझें काज ॥ ऐसे विदेहें प्रार्थूनि द्विज ॥ चरणरज[6] वंदिलें ॥ ६३ ॥ ऐकोनि विदेहाचा नम्र प्रश्न ॥ संतोषले नवहीजण ॥ तेंचि श्रीमुखें नारद आपण ॥ करी निरूपण वसुदेवा ॥ ६४ ॥ श्लोक ॥ नारदउवाच ॥ एवं ते निमिना पृष्टा वसुदेव महत्तमाः ॥ प्रतिपूज्याब्रुवन्प्रीत्या ससदस्यर्त्विजं नृपम् ॥ ३२ ॥ टीका ॥ ॥ जो जगाची स्थिति गती जाणता ॥ जो हरिहरांचा पढियंता[7] ॥ जो निजात्मज्ञानें पुरता[8] ॥ तो जाहला नारदू ॥ ६५ ॥ नारद ह्मणे वसुदेवा ॥ विदेहें प्रश्न केला बरवा ॥ तेणें परमानंदू तेव्हां ॥ त्या महानुभावा उलथला ॥ ६६ ॥ संतोषोनि नवही मूर्तीं ॥ धन्यधन्य विदेहा ह्मणती ॥ ऋत्विज तरी सादर परमार्थीं ॥ श्रवणार्थीं सदा तत्पर ॥ ६७ ॥ ऐसें देऊनि अनुमोदन ॥ बोलते जाहले नवहीजण ॥ तेंचि कथेचें निजलक्षण[9] ॥ नव प्रश्न विदेहाचे ॥ ६८ ॥ भागवतधर्म भगवद्भक्त ॥ माया कैसी असे नांदत ॥ तिचा तरणोपाय येथ ॥ केंवीं[10] पावत अज्ञानी ॥ ६९ ॥ येथें कैसें असे परब्रह्म ॥ कासया नाव ह्मणिजे कर्म ॥ अवतारचरित्रसंख्या परम ॥ अभक्तां अधमगति कैशी ॥ २७० ॥ कोणे युगीं कैसा धर्म ॥ सांगावा जी उत्तमोत्तम ॥ ऐसे नव प्रश्न परम ॥ जनकें सुवर्म पूशिले ॥ ७१ ॥ ऐसे विदेहाचे प्रश्न ॥ अनुक्रमें नवहीजण ॥ उत्तर देती आपण ॥ तयांत प्रथम प्रश्न कवि सांगे ॥ ७२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कविरुवाच ॥ ॥ मन्येऽकुतश्चिद्भयमच्युतस्य पादांबुजोपासनमत्र नित्यम् ॥ उद्विग्नबुद्धेरसदात्मभावाद्विश्वात्मना यत्र निवर्तते भीः ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ रायें पुशिलें आत्यंतिक क्षेमें[11] ॥ तदर्थीं कवि ज्ञाता परम ॥ तो आत्यंतिकक्षेमाचें वर्म ॥ भागवतधर्म प्रतिपादी[12] ॥ ७३ ॥ ऐक राया नवलपरी ॥ आपुला संकल्प आपणा वैरी ॥ देहबुद्धी वाढवूनि शरीरीं ॥ अतिदृढ करी भवभया ॥ ७४ ॥ जयापाशीं देहबुद्धी ॥ त्यासि सुख नाहीं त्रिशुद्धी ॥ ते बुडाले द्वंद्वसंधीं ॥ आधिव्याधीमहार्णवीं ॥ ७५ ॥ जे देहबुद्धीपाशीं ॥ सकळदुःखांचा राशी ॥ महाभयाचीं भूतें चौपाशीं ॥ अहर्निशीं झोंबती ॥ ७६ ॥ देहबुद्धीचिया नरा ॥ थोर चिंतेचा अडदरा ॥ संकल्पविकल्पांचा मारा ॥ ममताद्वारा[13] अनिवार ॥ ७७ ॥ देहबुद्धीमाजी सुख ॥ अणुमात्र नाहीं देख ॥ सुख मानिती ते म

---

[1] संतोष पावून. [2] वाढलेपणा. [3] मिळे. [4] वेगळे. [5] अन्य. [6] पायाचो धूळ. [7] भक्त. [8] पूर्ण. [9] कथेचे लक्षण. [10] कसे. [11] कल्याण. [12] सांगे. [13] मायेच्यामार्गानें.

हामूर्ख ॥ दुःखजनक देहबुद्धी ॥ ७८ ॥ दीपाचे मिळणीपाशीं ॥ केवळ दुःख पतंगाशी ॥ तरी आलिंगूं धांवे त्याशी ॥ तेवीं विषयांसी देहबुद्धी ॥ ७९ ॥ ऐशी असतां देहबुद्धी कुडी ॥ वाढवी विषयांची गोडी ॥ तेथें महाभयाची जोडी ॥ जन्ममरणकोडी अनिवार ॥ ॥ २८० ॥ एवढा अनिवार संताप ॥ देहबुद्धीपाशीं महापाप ॥ जाणोनि धरी जो अनुताप[1] ॥ विषयीं अल्प विगुंतेना ॥ ८१ ॥ धरितां विषयाची गोडी ॥ भोगाव्या जन्ममरणकोडी ॥ येणें भयें विषय वोसंडी[2] ॥ इंद्रियांतें कोंडी अतिनेमें ॥ ८२ ॥ इंद्रियें कोंडितां न कोंडती ॥ विषय सांडितां न सांडती ॥ पुढतपुढती बाधों येती ॥ यालागीं हरिभक्ती द्योतिली[3] वेदें ॥ ८३ ॥ इंद्रियें कोंडावीं नलगती ॥ सहज राहे विषयासक्ती ॥ एवढें सामर्थ्य हरिभक्तीं ॥ जाण निश्चितीं नृपवर्या ॥ ८४ ॥ योगी इंद्रियें कोंडिती ॥ ते भक्त लाविती भगवद्भक्ती ॥ योगी विषय जे त्यागिती ॥ ते भक्त अर्पिती भगवंतीं ॥ ८५ ॥ योगी विषय त्यागिती ॥ त्यागितां देह दुःखी होती ॥ भक्त भगवंतीं अर्पिती ॥ तेणें होती नित्यमुक्त ॥८६॥ हें नव्हे ह्मणती विकल्पीलोक ॥ याचिलागीं येथें देख ॥ काया वांचा हा श्लोक ॥ अर्पणद्योतक[4] बोलिजेला ॥ ८७ ॥ दारा[5] सुत गृह प्राण ॥ करावे भगवंतासि अर्पण ॥ हे भागवतधर्म पूर्ण ॥ मुख्यत्वें भजन या नाव ॥ ८८ ॥ अकराही इंद्रियवृत्ती ॥ कैशा लावाव्या भगवद्भक्तीं ॥ ऐक राया तुजप्रती ॥ संक्षेपस्थितीं सांगेन ॥ ८९ ॥ मनें करावें हरीचें ध्यान ॥ श्रवणें करावें कीर्तिश्रवण ॥ जिव्हेनें करावें नामस्मरण ॥ हरिकीर्तन अहर्निशीं ॥२९०॥ करीं करावें हरिपूजन ॥ चरणी देवालया गमन ॥ घ्राणीं तुलसी आमोदग्रहण[6] ॥ जिहीं हरिचरण पूजिले ॥ ९१ ॥ नित्य निर्माल्य मिरवे शिरीं ॥ चरणतीर्थें अभ्यंतरीं[7] ॥ हरिप्रसाद ज्याचे उदरीं ॥ त्या देखोनि दुरी भवभय[8] पळे ॥ ९२ ॥ वाढतेंनि सद्भावें जाण ॥ चढतेंनि प्रेमें पूर्ण ॥ अखंड त्यासी श्रीकृष्णभजन ॥ त्यासी भवबंधन असेना ॥ ९३ ॥ सकलभयांमाजी थोर ॥ भवभय अतिदुर्धर ॥ तेंही हरिभक्ती समोर ॥ बापुडें किंकर[9] केवि राहे ॥ ९४ करितां रामकृष्णस्मरण ॥ उठोनि पळे जन्म मरण ॥ तेथें भवभयाचें तोंड कोण ॥ धैर्यपण धरावया ॥९५॥ जेथें हरिचरणभजनप्रीती ॥ तेथें भवभयाची निवृत्ती ॥ परमनिर्भय भगवद्भक्ती ॥ आमची मती निजनिश्चयो ॥ ९६ ॥ कृतनिश्चयो आमुचा जाण ॥ येथें साक्षी वेद शास्त्र पुराण ॥ सर्वात्मना[10] भगवद्भजन ॥ निर्भयस्थान सर्वांशीं ॥९७॥ असो वेद शास्त्र पुराण ॥ स्वमुखें बोलिला श्रीकृष्ण ॥ मी सर्वथा भक्तिआधीन ॥ भक्तिप्रधान भगवद्वाक्य ॥ ९८ ॥ उभवूनियां[11] चारी बाह्या ॥ निजात्मप्राप्तीच्या[12]

---

१ वैराग्य. २ टाकी. ३ प्रकाशिली. ४ समर्पण सांगणारा. ५ स्त्री. ६ सुवास घेणे. ७ हृदयांत. ८ संसारभय. ९ चाकर. १० सर्वभावानें. ११ उभ्या करून. १२ आपल्या आत्म्याच्या प्राप्तीचा उपाय.

उपाया ॥ भक्त्याहमेकया ग्राह्या ॥ बोलिला लवलाह्या श्रीकृष्ण ॥ ९९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ये वै भगवता प्रोक्ता उपाया ह्यात्मलब्धये ॥ अंजः पुंसामविदुषां विद्धि भागवतान् हि तान् ॥ ३४ ॥ ॥ टीका ॥ ॥ न करितां वेदशास्त्रव्युत्पत्ती ॥ ऐशिया अज्ञाना निजात्मप्राप्ती ॥ सुगम जोडे ब्रह्मस्थिती ॥ यालागीं हरिभक्ती प्रकाशिली[1] देवें ॥ ३०० ॥ न करितां वेदशास्त्रपठण ॥ जड मूढ ह्मणाल तरले कोण ॥ उन्मत्तगजेंद्र उद्धरण ॥ गर्भसंरक्षण परिक्षितीचें ॥ १ ॥ अंबरीषगर्भनिवारण ॥ करावया भक्तीच कारण ॥ अहं भक्तपराधीन ॥ स्वमुखें[2] नारायण बोलिला ॥ २ ॥ वनचर वानर नेणों किती ॥ उद्धरले भगवद्भक्तीं ॥ अस्वलें तरावया निश्चितीं ॥ विवरीं जांबवती भक्तीस्तव वरिली ॥ ३ ॥ जाणपां अविवेकी केवळ ॥ गौळी गोधनें गोपाळ ॥ तेही उद्धरिले सकळ ॥ कृष्णसखे प्रबळ अनन्यप्रीतीं ॥ ४ ॥ शास्त्रविरुद्ध अविवेकस्थिती ॥ जारभावें श्रीकृष्णप्रीती ॥ गोपी उद्धरिल्या नेणों किती ॥ अनन्यभक्तीसख्यत्वें ॥ ५ ॥ न करितां नानाव्युत्पत्ती ॥ सुगमोपायें[3] ब्रह्मप्राप्ती ॥ अबळें तरावया निश्चितीं ॥ भगवंतें निजभक्ती प्रगट केली ॥ ६ ॥ ते हे राया भागवत जाण ॥ मुख्यत्वें भक्तिप्रमाण ॥ भावें करितां भगवद्भजन ॥ अज्ञान जन उद्धरती ॥ ७ ॥ हें भागवत नव्हे नव्हे ॥ अज्ञानालागीं निजपव्हें ॥ भवाब्धीतरावया भजनभावें ॥ महानाव देवें निर्माण केली ॥ ८ ॥ भगवंताचे महानावें ॥ जो निघाला भजनभावें ॥ त्यासि भवभयाचे हेलावे[4] ॥ भजनस्वभावें न लागती ॥ ९ ॥ स्त्रीशूद्रादि अवघे ॥ घालूनियां ये नावें ॥ एकेच खेपें स्वयें न्यावे ॥ भजनभावें परतीरा ॥ ३१० ॥ जे आवलितां भावबळें ॥ तोडी कर्माकर्मक्रूरजळें ॥ स्वबोधाचेनि पाणी ढाळे ॥ काढिती एकवेळें निजात्मतीरा ॥ ११ ॥ वैराग्याचे निजनिवाडे ॥ अढळ बसले चहूंकडे ॥ विषयाचे अदळ रोकडे ॥ चुकवूनि धडपुडे काढिती तीरा ॥ १२ ॥ संचितक्रियमाणांच्या लाटा ॥ मोडोनि लाविती नीट वाटा ॥ वेंचूनि प्रारब्धाचा सांठा ॥ निजात्मतटा काढिती ॥ १३ ॥ तेथें गुरुवचनसाचोकारें ॥ सांभाळीत उणेंपुरें ॥ भूतदयेचेनि दोरें ॥ निजनिर्धारें वोढिती ॥ १४ ॥ तंव एकाएकी एकसरीं ॥ काढिली परात्परतीरीं ॥ तंव प्रत्यावृत्ती[5] येरझारी ॥ आत्मसाक्षात्कारीं खुंटली ॥ १५ ॥ येथें धरितां पुरे भावो ॥ तैं बुडणेंचि होय वांवो[6] ॥ मग टाकावा जो ठावो ॥ तो स्वयमेवो आपण होय ॥ १६ ॥ येथें पोंहणेयावीण तरणें ॥ प्रयासेंवीण प्राप्ति घेणें ॥ सुखोपायें ब्रह्म पावणें ॥ यालागीं नारायणें प्रकाशिली भक्ती ॥ १७ ॥ भागवतधर्माची स्थिती ॥ भाळींभोळीं भवाब्धि तरती ॥ सुखोपायें ब्रह्मप्राप्ती ॥ तेचि श्लोकार्थीं विशद[7] सांगे ॥ १८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यानास्थाय नरो राजन्न प्रमाद्येत कर्हिचित् ॥ धावन्निमील्य वा नेत्रे न स्खलेन्न पतेदिह ॥ ३५ ॥ टीका ॥

---

[1] स्पष्टकेली. [2] आपल्या मुखानें. [3] सोप्याउपायानें. [4] धके. [5] परतयेणे. [6] व्यर्थ. [7] स्पष्ट.

जो श्रुतिस्मृतींनेणता ॥ भावें भजे भगवत्पथा[1] ॥ त्यासि विधिनिषेधबाधकता ॥ स्वप्नींही सर्वथा प्रमाद् न घडे ॥ १९ ॥ सद्भावेंसी स
प्रेम ॥ आचरितां भागवतधर्म ॥ बाधूं न शके कर्माकर्म ॥ भावें पुरुषोत्तम संतुष्ट सदा ॥ ३२० ॥ श्रुतिस्मृति दोनी डोळे ॥ तेणेंवीण[2]
जे आंधळे ॥ तेही हरिभजनीं धांवतां भावबळें ॥ पडेना आडखुळें सप्रेमयोगें ॥ २१ ॥ प्रेमेंवीण श्रुतिस्मृतिज्ञान ॥ प्रेमेंवीण ध्यानपू
जन ॥ प्रेमेंवीण श्रवण कीर्त्तन ॥ वृथा[3] जाण नृपनाथा ॥ २२ ॥ माता देखोनि प्रेमभावें ॥ बाळक डोळे झांकूनि धांवे ॥ स्वयें झेली
त पावे ॥ अतिसद्भावें निजमाता ॥ २३ ॥ तैसा सप्रेम जो भक्तू ॥ त्याच्या भजनासवें भगवंतू ॥ भुलला चाले स्वानंदयुक्तू ॥ स्वयें
सांव्हितू पदोदर्दीं ॥ २४ ॥ ऐसे आचरितां भागवतधर्म ॥ बाधूं न शके कदा कर्म ॥ कर्मासि ज्याची आज्ञा नेम ॥ तो पुरुषोत्तम भज
नामाजी ॥ २५ ॥ ऐसा भागवतधर्मीं गोविंदू ॥ तुष्टला चाले स्वानंदकंदू ॥ तेथें केविं रिघे विधि निषेधू ॥ भक्ता प्रमादू कदा न बाधी
॥ २६ ॥ जेवीं कां स्वामीचिया बाळा ॥ अवरोध[4] न करवे द्वारपाळा ॥ तेवीं भागवतधर्मभजनशीळा ॥ कर्मार्गळा[5] बाधूं न शके ॥ २७ ॥
ज्यास भगवद्भजनीं विश्वासू ॥ विधिनिषेध त्याचा दासू ॥ देवोनि निजभजनविलासू ॥ स्वयें जगन्निवासू सुखावे ॥ २८ ॥ भागवत
धर्में राहे कर्म ॥ तंव तंव सुखावे पुरुषोत्तम ॥ सप्रेमभक्तां बाधी कर्म ॥ हा वृथा भ्रम भ्रांतांसी ॥ २९ ॥ कर्म करूं पावे प्रमादू ॥
तंव प्रमादीं प्रगटे गोविंदू ॥ यालागीं विधिनिषेधू ॥ न शकती बाधूं हरिभक्तां ॥ ३३० ॥ अजामिळा कर्मबाध ॥ यमपाशीं बांधितां
सुबद्ध ॥ तेथें प्रगटोनि गोविंद ॥ केला अतिशुद्ध[6] नाममात्रें ॥ ३१ ॥ स्वधर्मकर्म हेच दोनी ॥ निजसत्ता भोई करूनी ॥ जो पहुडे[7] सु
खासनीं ॥ तो तैं पडे दंडणी स्वधर्मकर्मा ॥ ३२ ॥ भजनप्रताप संतलक्षणें ॥ स्वधर्मकर्मा ऐसें दंडणें ॥ वर्णाश्रमांचा ठाव पुसणें ॥ हो
ळीकरणें कर्मांची ॥ ३३ ॥ एवं भागवतधर्में जे सेवक ॥ स्वधर्मकर्म त्यांचें रंक ॥ तें राहो नसके त्यांसन्मुख ॥ मा केविं बाधक होंश
केल ॥ ३४ ॥ कैसकैसे भागवतधर्म ॥ केवीं भगवंतीं अर्पे[8] कर्म ॥ हें अतिगुह्य उत्तमोत्तम ॥ निजभजनवर्म ऐक राया ॥ ३५ ॥ श्लोक ॥
कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुद्ध्यात्मना वाऽनुसृतस्वभावात् ॥ करोति यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयेत्तत् ॥ ३६ ॥ ॥ टीका ॥
हेतुक[9] अथवा अहैतुक[10] ॥ वैदिक लोकिक स्वाभाविक ॥ भगवंतीं अर्पे सकळिक ॥ यानाव देख भागवतधर्म ॥ ३६ ॥ उदकीं तरंग अ
तिचपळ ॥ जिकडे जाय तिकडे जळ ॥ तैसें भक्ताचें कर्म सकळ ॥ अर्पे तत्काल भगवंतीं ॥ ३७ ॥ येश्लोकीचें व्याख्यान ॥ पहिलें
मानसिक अर्पण ॥ पाठी इंद्रियें बुद्धि अभिमान ॥ कायिक जाण श्लोकान्वयें ॥ ३८ ॥ भागवत धर्मांची निजास्थिती ॥ मन बुद्धि

---

१ परमेश्वराच्या भक्तिमार्गास. २ वेद शास्त्रावाचून. ३ व्यर्थ. ४ प्रतिबंध, अडथळा. ५ कर्मरूप अडसर. ६ अत्यंत पवित्र. ७ निजे. ८ अर्पण. ९ सकाम. १० निष्काम.

चित्त अहंकृती ॥ आदिकरूनि इंद्रियवृत्ती ॥ भगवंतीं अर्पिती तें ऐक ॥३९॥ बाधूं नशके स्वधर्मकर्म ॥ ऐक राया त्याचें वर्म ॥ मनीं प्रगटला पुरुषोत्तम ॥ अतिनिःसीम निजबोधें ॥ ३४० ॥ ह्मणोनि संकल्प विकल्प ॥ अवघे जाहले भगवद्रूप ॥ यालागीं भक्त नित्य निष्पाप[1] ॥ सत्यसंकल्प हरिदास ॥ ४१ ॥ जेवी बुद्धिबळाचा खेळ ॥ राजा प्रधान गजदळ[2] ॥ अवघे काष्ठचि केवळ ॥ तेवीं संकल्प सकळ भगद्रूप ॥४२॥ जोजो संकल्प कामी कामू ॥ तोतो होय आत्मारामू ॥ तेथें भजनाचा संभ्रमू ॥ अतिनिः सीमू स्वयें वाढे॥४३॥ जागृती सुषुप्ती स्वप्न ॥ तिहीं अवस्था होय भजन ॥ जेथें अखंड अनुसंधान ॥ निजबोध[3] पूर्ण ठसावे ॥ ४४ ॥ मना होतां समाधान ॥ समाधानें अधिक भजन ॥ पूर्ण बाणलें अनुसंधान ॥ ध्येय ध्याता ध्यान समरसें[4] भजे ॥ ४५ ॥ तुर्या साक्षी उन्मनी ॥ याही लाविल्या भगवद्भजनीं ॥ जंववरी अवस्था आपणीं ॥ आपआपणा मुकल्या नाहीं ॥ ४६ ॥ ऐसा भावनेवीण उपजे[5] भावो ॥ तोंतों तत्काळ होय देवो ॥ मग अर्पणाचा नवलावो[6] ॥ न अर्पितां पाहा हो स्वयें होय ॥ ४७ ॥ स्वरूपें मिथ्या केलें स्वप्न ॥ जागृती सोलूनि काढिलें ज्ञान ॥ निवडोनि सुषुप्तिसुखसमाधान ॥ तिहींतें पूर्ण एकत्र[7] केलें ॥ ४८ ॥ तये स्वरूपीं सगळें मन ॥ स्वयेंचि करी निजात्मार्पण ॥ तेथिंचें सुखसमाधान ॥ भक्त सज्ञान[8] जाणती स्वयें ॥ ४९ ॥ यापरी मानसिक जाण ॥ सहज स्वरूपीं होय अर्पण ॥ आतां इंद्रियांचें समर्पण ॥ होय तें लक्षण ऐक राया ॥ ३५० ॥ दीपू लाविजे गृहाभीतरी[9] ॥ तोचि प्रकाशे गवाक्षद्वारीं ॥ तेवीं मनीं प्रगटला श्रीहरी ॥ तोचि इंद्रियांतरीं भजनानंद ॥ ५१ ॥ तोचि इंद्रियव्यापार ॥ सांगिजेती सविस्तर[10] ॥ स्वाभाविक इंद्रियव्यवहार ॥ भजनतत्पर परब्रह्मीं ॥ ५२ ॥ जंव दृष्टि देखे दृश्यातें[11] ॥ तंव देवोचि देखे तेथें ॥ यापरी दर्शनातें ॥ अर्पी भजनसत्ते दृष्टीचा विषयो ॥ ५३ ॥ दृश्य द्रष्टा आणि दृष्टी ॥ देखतां तिन्ही एकवटी[12] ॥ सहज ब्रह्मार्पण ते दृष्टी ॥ भक्त जगजेठी यापरी अर्पी ॥ ५४ ॥ दृश्यप्रकाशी दृश्यपणें ॥ तेंचि दृष्टीमाजी होय देखणें ॥ ऐसेनि अभिन्नपणें ॥ दर्शनार्पणें भजती भक्त ॥ ५५ ॥ हे एकपणीं तीनही भाग ॥ तिनीमाजी एक अंग ॥ ऐसें जें देखणें चांग[13] ॥ त्याचि अर्पणें सांग सहजें अर्पी ॥ ५६ ॥ नानापदपदार्थ प्रांजळे ॥ नित्य नवे देखती डोळे ॥ परी अर्पणाचे सोहळे ॥ निजात्ममेळें अर्पिती स्वयें ॥ ५७ ॥ यापरी दृष्टीचें दर्शन ॥ भक्त करिती ब्रह्मार्पण ॥ आतां श्रवणाचें अर्पण ॥ अर्पी तें लक्षण ऐक राया ॥ ५८ ॥ जो बोलातें बोलविता ॥ तोचि श्रवणीं जाहला मला श्रोता ॥ तोचि अर्थावबोध जाणता ॥

---

[1] पापरहित. [2] हात्तींचे सैन्य. [3] स्वरूपाचे ज्ञान. [4] एकपणानें. [5] उत्पन्न होतो. [6] आश्चर्य. [7] येकठिकाणी. [8] ज्ञानी. [9] घरांत. [10] विस्तारानें. [11] जगातें. [12] येक होतात. [13] चांगले.

तेथें ब्रह्मार्पणता सहजेंची ॥ ५९ ॥ शब्दूशब्दत्वें जंव उठी ॥ तंव शब्दविता[1] प्रगटे पाठींपोटीं ॥ तेणें अकृत्रिम भजन उठी ॥ ब्रह्मार्पण मिठी सहजीं पडे ॥ ३६० ॥ शब्दबोलासवें अर्थवाढी ॥ तंव शब्दविता घे शब्दार्थगोडी ॥ तेणें हरिभजनीं आवडी ॥ स्वयें उठी गाढी श्रवणार्पणेंशी ॥ ६१ ॥ शब्द जंव कानीं पडे ॥ शब्दार्थी भजन वाढे ॥ बोलवित्याच्या अंगा घडे ॥ अर्पण उघडें करितांची ॥ ६२ ॥ बोलाशी जो बोलविता ॥ त्याशी दृढकेली ऐकात्मता[2] ॥ तें भजन चढे श्रवणाच्या हाता ॥ ब्रह्मार्पणता निजयोगें[3] ॥ ६३ ॥ सद्गुरुवचन पडतां कानीं ॥ मनाचें मनपण विरे मनीं ॥ तेंचि श्रवण ब्रह्मार्पणीं ॥ भगवद्भजनीं सार्थकता ॥ ६४ ॥ श्रवणेंचि यापरी श्रवण ॥ करितां उठिलें ब्रह्मार्पण ॥ हेतुरहित भगवद्भजन ॥ स्वभावें जाण स्वयें होतें ॥ ६५ ॥ भजनीं तुष्टला जगन्निवास ॥ होय वासाचा निज वास ॥ मग प्राणद्वारा परेश ॥ भोगी सुवास ब्रह्मार्पणेंसी ॥ ६६ ॥ जो सुमना[4] सुमनपण जोडी ॥ तो घ्राणाचें घ्राण होय आवडी ॥ मग नानासुवासपरवडी ॥ ब्रह्मार्पण मोडी निजभोग अर्पी ॥ ६७ ॥ नासाचा अवकाश होय आपण ॥ घ्राणीं ग्राहकपणें जाण ॥ तो भोगचि स्वयें संपूर्ण ॥ कृष्णार्पण सहज होता ॥ ६८ ॥ रसना रस घेऊं जाये ॥ तंव रसस्वादे[5] देवचि होये ॥ मग रसनेमाजी येऊन राहे ॥ ब्रह्मार्पण पाहे रसभोगवृत्ती ॥ ६९ ॥ जे जे रसना सेवी गोडी ॥ ते ते हरिरूपें रोकडी ॥ स्वादा येऊनि धडफुडी ॥ ब्रह्मार्पण परवडी निजभोग अर्पी ॥ ३७० ॥ रस रसना रसस्वादू ॥ त्रिविधभेदें निजअभेदू ॥ रससेवनीं परमानंदू ॥ स्वानंदकंदू वोसंडे ॥ ७१ ॥ कटु मधुर नानारस ॥ रसना सेवी सावकाश ॥ परी तो अवघा ब्रह्मरस ॥ स्वादीं सुरस परमानंदू ॥ ७२ ॥ यापरी रसीं रसना ॥ भोगें रतली कृष्णार्पणा ॥ आतां स्पर्शविषयरचना ॥ अर्पे ब्रह्मार्पण ऐक राया ॥ ७३ ॥ स्पर्श घेइजे निजदेहीं ॥ तंव देहींच प्रगटे विदेही ॥ मग स्पर्शी[6] जें जें काहीं ॥ तो तो भोगूं पाही ब्रह्मार्पणें उठी ॥ ७४ ॥ स्पर्शास्पर्श जें स्पर्शिजे ॥ तंव स्पर्शाविया नाडळे दुजें ॥ तेणें एकपणाचेनि व्याजें[7] ॥ कृष्णार्पणवोजें भजन प्रगटे ॥ ७५ ॥ तेथें जो जो घेइजे पदार्थ ॥ तो पदार्थ होय समर्थ ॥ तेणेंचि भजनें परमार्थ ॥ निजस्वार्थ[8] निजभक्तां ॥ ७६ ॥ द्यावया काहीं देवो जाये ॥ तंव देतां भजन कैसें पाहे ॥ देते घेते दोनी स्वयें ॥ देवोचि होये निजांगें ॥ ७७ ॥ जेउतें जेउतें चालवी पाये ॥ तों तों मार्गू देवोचि होये ॥ मग पावलां पाउली पाहे ॥ निजभजन होये ब्रह्मार्पणेशी ॥ ७८ ॥ चरणा चरणा निजगती ॥ तोचि निजांगें क्षितीची[9] क्षिती ॥ चालतां तैशिया युक्ती ॥ सहज ब्रह्मस्थिती निजकर्में अर्पी ॥ ७९ ॥ बोल बोलविती या वदने भेटी ॥ बोल न लाजे त्याचिया दृष्टी ॥ ते लाज गिळून बोलणें उठी ॥ निजभजनपुष्टी ब्र

---

१ शब्दकरणारा. २ एकरूपता. ३ आत्मयोगानें. ४ फुलास. ५ रसाची चवी. ६ मिळे. ७ मिषानें. ८ आपला अर्थ (ब्रह्मप्राप्ति.) ९ पृथिवी.

ह्मार्पणेंशी ॥ ३८० ॥ शब्द मावळे निःशब्दीं ॥ निःशब्दचि बोलिजे शब्दीं ॥ तोचि अर्पणाचा विधी ॥ जाण त्रिशुद्धी समर्पीतिशीं ॥ ८१ ॥ बोल बोलविता बोला आंतू ॥ तो बोल आपणाशीं येतू ॥ ऐसा शब्दें निजभजनार्थू[1] ॥ प्रगटे परमार्थू ब्रह्मार्पणेंशी ॥ ८२ ॥ ऐसा मनें कर्में वचनें ॥ जो दृढावला भगवद्भजनें ॥ तेंचि भजन अभिमानें ॥ निज निर्वाणें दृढ धरिलें ॥ ८३ ॥ तरंग समुद्रा आतौता ॥ ह्मणे माझेनि मेघ तत्वतां ॥ जगातें निवविता जीवविता ॥ तृषा[2] हरिता चातकांची ॥ ८४ ॥ माझेनि सस्यें पिकती ॥ माझेनि सरिता[3] उसळती ॥ मागुती मजमाजी मिळती ॥ समरसती[4] सिंधुत्वें ॥ ८५ ॥ तेवीं मुळींचें पूर्णपण ॥ पावोनि भजे अभिमान ॥ त्याचे भजनाचें लक्षण ॥ सावधान अवधारा[5] ॥ ८६ ॥ ह्मणे मी सकळ लोककर्ता ॥ कर्म करोनि अकर्ता ॥ मी सर्व भोगभोक्ता ॥ नित्य अभोक्ता मी एक ॥ ८७ ॥ सकळ लोकीं माझी सत्ता ॥ सकळीं सकळांचा नियंता[6] ॥ सकळां सकळत्व मी प्रकाशिता ॥ होय मी शास्ता[7] सकळिकांचा ॥ ८८ ॥ सकळांभूतीं मी एकू ॥ मीच व्याप्य व्यापकू ॥ जनिता जनयिता जनकू ॥ नहोनि[8] अनेकू जगद्रूप मी ॥ ८९ ॥ मी देवांचा आदिदेवो ॥ देवीं देवपण माझाचि भावो ॥ व्ययामाजी मी अज अव्ययो ॥ अक्षरीं अक्षरभावो माझेनि अंगें ॥ ३९० ॥ ईश्वरीं जे जे सत्ता ॥ ते ते माझी सामर्थ्यता ॥ भगवंतीं भगवंतता ॥ जाण तत्वतां माझेनी ॥ ९१ ॥ मी आपरूपी[9] आपरूपू ॥ मी प्रकृतिपुरुषांचा बापू ॥ सृष्टिरचनेचा संकल्पू ॥ निर्विकल्पू पैं माझेनी ॥ ९२ ॥ मी आदीची अनादिआदी ॥ मी समाधीची निजसमाधी ॥ निजसिद्धीसि माझेनि सिद्धी ॥ यापरी त्रिशुद्धी अभिमानार्पण ॥ ९३ ॥ मी अजन्मा[10] नजन्मोनि जन्में ॥ मी अकर्मा नकरोनि करीं कर्में ॥ माझेनियोगें पुरुषोत्तमें ॥ पाविजे महिमे उत्तमत्वाचें ॥ ९४ ॥ सच्छब्दें माझें अंग ॥ चिच्छब्दें मीच चांग ॥ नहोनियां तीन भाग ॥ आनंद निर्व्यंग तोचि मी ॥ ९५ ॥ माझेनि सूर्य दृष्टी डोळस ॥ मजमाजी चिदाकाश अवकाश ॥ माझेनियोगें जगन्निवास ॥ सावकाश नांदत ॥ ९६ ॥ अजाअजपणें मी अज ॥ निःशेषनिर्बीजां मी बीज ॥ माझेनि निजांगें निज ॥ निज भोज स्वयें नांदें ॥ ९७ अधिष्ठानामाजी अधिवास ॥ मी जगदीशांचा पूर्ण ईश ॥ मी परमपुरुषांचाही पुरुष ॥ परेशा परेश मीच स्वयें ॥ ९८ ॥ असंत माझेनी संत होये ॥ अचिद माझेंनि चिद्त्व लाहे ॥ निजानंदासिही पाहे ॥ आनंदू निर्वाहे[11] माझेनी ॥ ९९ ॥ मी सकळ सिद्धींची निजसिद्धी ॥ मी सर्वांग देखणी बुद्धीची बुद्धी ॥ मोक्ष ह्मणणें तोही उपाधी ॥ जाण त्रिशुद्धी माझेनी ॥ ४०० ॥ मी साचार निज धर्म ॥ मज माजी ब्रह्म विचरे कर्म ॥ ब्रह्मसमाधीचें परब्रह्म ॥ निज निःसीम मीच मी ॥ १ ॥ हरिहर ब्रह्मा निजनिर्धारीं ॥ हेही माझे

---

१ आपल्या भजनाचा अर्थ. २ तहान. ३ नद्या. ४ एक होतात. ५ ऐका. ६ नियामक. ७ दंडकरणारा. ८ नहोऊन. ९ जलरूप. १० जन्मरहित. ११ वाहतो.

अंधारी ॥ मी दशावतारांचा अवतारी ॥ माझी निजथोरी मीच नेणें ॥ २ ॥ ऐशिया नाना विंवंचना ॥ अभिमानें भजे भगवद्भजना ॥ ब्रह्माहमस्मि दृढ भावना ॥ आप आपणा पूर्णत्वें अर्पी ॥ ३ ॥ जीव घालूनि पूर्णत्वा आंतू ॥ जें जें अभिमान कल्पितू ॥ तें तें साचचि स्वयें होतू ॥ तेंही पूर्णत्व अर्पितू निजपूर्णत्वीं ॥ ४ ॥ ब्रह्माहमस्मि नुसतें वचन ॥ ये अहंते नाम भगवद्भजन ॥ महातत्वीं तँद्रूप होऊन ॥ भजे अभिमान ब्रह्मार्पणेंसी ॥ ५ ॥ सांडूनि देहबुद्धीचा केरू ॥ भजनें उठिला अहंकारू ॥ तो अपरोक्ष निज साक्षात्कारू ॥ पावूनि पूर्ण निर्धारू पूर्णत्वें वर्ते ॥ ६ ॥ ह्मणोनि मनना मीचि मनन ॥ स्मरणा मीच नित्यस्मरण ॥ चित्तासि मी निजचिंतन ॥ चिंत्यधर्मेंवीण सर्वदा ॥ ७ ॥ ज्याची सहसा प्राप्ती नव्हे ॥ तें निजचित्तेंशी चिंतावें ॥ तंव अप्राप्तीसी ते प्राप्ती पावे ॥ चित्तनिजानुभवें सहज भजतां ॥ ८ ॥ तेव्हां निश्चितें जें जें चिंतित ॥ तें तें स्वयेंचि होय समस्त ॥ या प्रतीती चित्त भजत ॥ ब्रह्मार्पणयुक्त निंजबोधें ॥ ९ ॥ नाथिलें चिंती ते अतिचिंता ॥ आथिलें चिंति तें निश्चिंतता ॥ आथीनाथी सांडूनि चित्ता ॥ सहजें नभजतां भजन होय ॥ ४१० ॥ चित्त चिंत्य आणि चिंतन ॥ या तिहीं जाहलें समाधान ॥ तें समाधानही कृष्णार्पण ॥ सहजीं संपूर्ण स्वयें होय ॥ ११ ॥ ऐसिया भगवद्भजनविधी ॥ भजनशील जाहली बुद्धी ॥ तैं सकळकर्मीं समाधी ॥ जाण त्रिशुद्धी स्वयें जाहली ॥ १२ ॥ कर्माचरणीं समाधी ॥ एक ह्मणती नघडे कधीं ॥ ते पावले नाहीं निजात्मबोधीं ॥ जाण त्रिशुद्धी विदेहा ॥ १३ ॥ ताटस्थ्यानाहीं समाधी ॥ ह्मणेल त्याची ठकली बुद्धी ॥ ते समाधी नव्हे त्रिशुद्धी ॥ जाणा नुसधी मूर्छा आली ॥ १४ ॥ ताटस्थ्यापासूनि उठिला ॥ तैं तो समाधीस मुँकला ॥ तेव्हां एकदेशी भावो आला ॥ मँद या बोला नमानिती सत्य ॥ १५ ॥ समाधी आणि एकदेशी ॥ बोलतां बोलणें ये लाजेशी ॥ सत्य मानी ते शब्दपिशी ॥ शुद्धस्वरूपाशीं अँनोळख ॥ १६ ॥ येथें प्राचीन अतिसमर्थ ॥ ते मूर्छा आणोनि करी तटस्थ ॥ वांचूनि चालते समाधिस्थ ॥ जाणपां निश्चित वसिष्ठादिक ॥ १७ ॥ पाहेपां देवर्षी नारदू ॥ विनोदें नमोडे समाधिबोधू ॥ याज्ञवल्क्याचा समाधिसंबंधू ॥ ऋषींप्रसिद्धू परिक्षा केली ॥ १८ ॥ स्वरूप देखोनि मूर्छित जाहला ॥ तो आपणियां आपण तरला ॥ स्वयें तरूनि जन उद्धरिला ॥ तो बोधें प्रकाशिला शुकवामदेवें ॥ १९ ॥ यालागीं समाधि आणि व्युँत्थान ॥ या दोनी अवस्थासहित जाण ॥ बुद्धी होय ब्रह्मार्पण ॥ अखंडत्वें पूर्ण समाधी ४२० ॥ अर्जुना देऊंनि निजसमाधी ॥ सैंवेंचि घातला निर्वाणयुद्धीं ॥ परी तो कृष्ण कृपानिधी ॥ तटस्थ तें त्रिशुद्धी नेदीच स्पर्शों ॥ २१ ॥ सकळकर्मीं समाधी ॥ हेचि सद्गुरूची बुद्धी ॥ तरी युद्धीं ही त्रिशुद्धी ॥ निजसमाधी नमोडे

---

१ समजतनाहो. २ विचारणा. ३ ब्रह्ममी. ४ तत्वरूप. ५ केर. ६ ब्रह्मबोधानें. ७ सुटला. ८ मूढ. ९ ओळख नाही. १० ज्ञान. ११ उठणे. १२ लागलीच.

॥ २२ ॥ बुद्धी आंकळलें[1] परब्रह्म ॥ तें अहेतुक[2] चाले कर्म ॥ हेंचि बुद्धीचें अर्पण परम ॥ इतर तो भ्रम अनुमानज्ञान ॥ २३ ॥ स्वरूपीं दृष्टी निरवधी ॥ अविच्छिन्न समान बुद्धी ॥ कर्माकर्मीं अज्ञान नबाधो ॥ परमसमाधी[3] तियेनाव ॥ २४ ॥ निःशेष गेलिया देहबुद्धी ॥ स्वरूपपणें फुंज नबाधी ॥ कर्माकर्मीं अज्ञान बाधी ॥ ते परमसमाधी निर्दुष्ट ॥ २५ ॥ ते स्वरूपीं निरवधी ॥ भजनशीळ जाहली बुद्धी ॥ ते सकळकर्मीं समाधी ॥ निजार्पणविधी स्वयें जाहली ॥ २६ ॥ जेथें शमली[4] मनाची आंधी[5] ॥ ते जाणावी परमसमाधी ॥ समाधी घेणें ते देहबुद्धी ॥ काष्ठ ते त्रिशुद्धी मूर्छितप्राय ॥ २७ ॥ मनासि ठाउकें नसे ॥ इंद्रियव्यापारू तरी दिसे ॥ कर्म निपजे जेंऐसें ॥ तें जाणिजे आपैसें कायिक[6] ॥ २८ ॥ श्वासोच्छ्वासाचे परिचार ॥ कां निमेषोन्मेषांचे व्यापार ॥ तेही नारायणपर केले साचार ॥ निजभावें ॥ २९ ॥ तरी देहगेहवर्णाश्रमें ॥ स्वभागा आलीं जीं जीं कर्में ॥ तीं तीं आचरोनि निजधर्में ॥ पूर्वानुक्रमें अनहंकृती[7] ॥ ४३० ॥ साकरेचें कारलें प्रौढ ॥ तें देंठूकांटेनशीं सर्व गोड ॥ तेवीं इंद्रियें कर्मगूढ ॥ स्वादिष्ठ[8] दृष्ट ब्रह्मार्पणें ब्रह्मीं ॥ ३१ ॥ कर्मकलापू आघवा ॥ आचरोनि आणी गौरवा ॥ परी कर्तेपणाचिया भावा ॥ अहंभावा स्पर्शेना ॥ ३२ ॥ मजपासून जाहलें सत्कर्म ॥ माझा आचार अतिउत्तम ॥ म्या निरसिलें[9] मरणजन्म ॥ हा स्वभावें देहधर्म उठोंचि नेणे ॥ ३३ ॥ देहसंगें तरी वर्तणें ॥ परी देहधर्म धरूं नेणे ॥ देहस्वभाव लक्षणें ॥ ब्रह्मार्पणें विचरती ॥ ३४॥ देहधर्मांचा नुठे फांटा ॥ ज्ञानगर्वाचा नचढे ताठा ॥ यालागीं सहजभजनामाजी वटा ॥ जाहला तो पैंठा अनहंकृती[10] ॥ ३५ ॥ त्यापासूनि जेंजें उपजे ॥ तेंतें देव ह्मणे आमुचें खाजें ॥ यालागीं ब्रह्मार्पणवोजें ॥ त्याचे स्वभाव सहजें नार्पितां अर्पिती ॥ ३६ ॥ परिसाचे कसवटी वऱ्हें ॥ जेंजें लागे तेंतें साडेपंधरें ॥ तेवीं निपजे जेंजें शरीरें ॥ तेंतें खरें परब्रह्म ॥ ३७॥ त्याचा खेळ तोचि महापूजन ॥ त्याची बडबड तेचि प्रियस्तवन ॥ त्याचे स्वभावें स्वानंदपूर्ण ॥ श्रीनारायण सुखावे ॥ ३८ ॥ तो जेउती वास पाहे ॥ आवडीं देव तेउंता[11] राहे ॥ मग पाहे अथवा नपाहे ॥ तरी देवोचि स्वयें स्वभावें दिसे ॥ ३९ ॥ तयांसि चालतां मार्गें ॥ तो मार्गू होइजे श्रीरंगें ॥ तो देवाचिया दोंदावरी वेगें ॥ चाले सर्वांगें डुल्लत ॥ ४५० ॥ जेंजें कर्म स्वाभाविक ॥ तेंतें ब्रह्मार्पण अहेतुक ॥ यानाव भजन निर्दोख[12] ॥ भागवतधर्म देख यानाव ॥ ४१ ॥ स्वाभाविक जें वर्तन ॥ तें सहजें होय ब्रह्मार्पण ॥ यानाव शुद्ध आराधन[13] ॥ भागवतधर्म पूर्ण जाण राया ॥ ४२ ॥ यापरी भगवद्भजनकथा ॥ भय नाहीं गा सर्वथा ॥ अभय पुशिलें नृपनाथा ॥

---

[1] घेतले. [2] निष्काम. [3] मोठा समाधी. [4] नाहीसी झाली. [5] मनाचें दुःख. [6] शरीराचे. [7] अहंकार रहित. [8] गोड. [9] नाहीसे केले. [10] अहंकार न करून. [11] तेंव्हा. [12] निर्दोष. [13] पूजन.

तें जाण तत्वतां भजनें होये ॥ ४३ ॥ येथें भयाचें कारण ॥ राया तूं ह्मणशील कोण ॥ तेंही सांगेन सावधान ॥ ऐक श्रवण सौभाग्य निधी ॥ ४४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भयं द्वितीयाभिनिवेशतः स्यादीशादपेतस्य विपर्ययोऽस्मृतिः ॥ तन्माययाऽतो बुध आभजेत्तं भक्त्यैकयेशं गुरुदेवतात्मा ॥ ३६ ॥ ॥ टीका ॥ ॥ आत्मा पूर्णत्वें [1]अवघा एक ॥ तेथें ह्मणे मी वेगळा देख ॥ तेंचि अज्ञानभयजनक ॥ दुःखदायक अतिद्वंद्वें ॥ ४५ ॥ भयाचें मूळ दृढ अज्ञान ॥ त्याचें निवर्तक ब्रह्मज्ञान ॥ तेथें कां लागलें भगवद्भजन ॥ ऐसा ज्ञानाभिमान पंडितां ॥ ४६ ॥ ऐक राया येचि अर्थी ॥ ज्ञानासि कारण मुख्य भक्ती ॥ हा कृतनिश्चयो आमुच्या मतीं ॥ तेही [2]उपपत्ती अवधारी ॥ ४७ ॥ अज्ञानाचें मूळ माया ॥ जे ब्रह्मादिकां नये आया ॥ गुणमयी लागे प्राणियां ॥ जाण ते राया अतिदुस्तर ॥ ४८ ॥ त्या मायेचें मुख्यलक्षण ॥ आत्मस्वरूपाचें [3]आवरण ॥ द्वैताचें जेंजें स्फुरे स्फुरण ॥ मूळमाया जाण तिला नाव ॥ ४९ ॥ ब्रह्म अद्वयत्वें परिपूर्ण ॥ तें स्वरूपीं स्फुरे जें मीपण ॥ तेंचि मायेचें मूळस्थान ॥ निश्चयें जाण नृपनाथा ॥ ४५० ॥ जे मायेच्या निजपोटीं ॥ भयशोकदुःखांचिया कोटी ॥ ब्रह्माशिवादींचे लागे पाठी ॥ इतरांची [4]गोठी ते कोण ॥ ५१ ॥ ते महामायेची [5]निवृत्ती ॥ करावया दाटुगी भगवद्भक्ती ॥ स्वयें श्रीकृष्ण येचि अर्थी ॥ बोलिला अर्जुनाप्रती गीतेमाजी ॥ ५२ ॥ ॥ भगवद्गीताश्लोकार्ध ॥ ॥ मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ॥ टीका ॥ माया ह्मणिजे [6]भगवत्शक्ती ॥ भगवद्भजनें तिची निवृत्ती ॥ आन उपाय तेथें नचलती ॥ भक्त सुखें तरती हरिमाया ॥ ५३ ॥ हरीची माया हरिभजनें ॥ हरिभक्तीं सुखेंचि तरणें ॥ हें [7]निजगुह्य अर्जुनाचेनि कारणें ॥ स्वयें श्रीकृष्णें सांगीतलें ॥ ५४ ॥ मायेची हेचि निजपुष्टी ॥ स्वरूपीं [8]विमुख करी दृष्टी ॥ द्वैतभावें अत्यंतलाठी ॥ भ्रमाची त्रिपुटी वाढवी सदा ॥ ५५ ॥ भयाचें जनक द्वैतभान ॥ द्वैतजनक माया जाण ॥ मायानिवर्तक ब्रह्मज्ञान ॥ हें संत सज्ञान बोलती ॥ ५६ ॥ ऐसें श्रेष्ठ जें ब्रह्मज्ञान ॥ तें भक्तीचें पोषण जाण ॥ नकरितां भगवद्भजन ॥ ब्रह्मज्ञान कदा [9]नुपजे ॥ ५७ ॥ जरी जाहले वेदशास्त्रसंपन्न ॥ तिहीं नकरितां भगवद्भजन ॥ मायानिवर्तक ब्रह्मज्ञान ॥ तयांसिही जाण कदा नुपजे ॥ ५८ ॥ शब्दज्ञानाची व्युत्पत्ती ॥ [10]दांटुगी होय लौकिकस्थिती ॥ मायानिवर्तक ज्ञानप्राप्ती ॥ नकरितां हरिभक्ती कदा नुपजे ॥ ५९ ॥ हरिगुणाची रसाळ कहाणी ॥ ते ब्रह्मज्ञानाची निजजननी ॥ हरिनामाचेनि गर्जनीं ॥ जीव घेउनी माया पळे ॥ ४६० ॥ माया पळतां पळों नलाहे ॥ हरिनामधाकें विरोनि जाये ॥ यालागीं हरिमाया पाहे ॥ बाधूं नलाहे हरिभक्तां ॥ ६१ ॥ नामाची परमदुर्धरगती ॥ माया साहों नशके निजशक्ती ॥ हरिभक्त माया सुखें तरती ॥ यालागीं श्रीपती बोलिला स्वयें ॥ ६२ ॥

---

१ सर्व. २ युक्ति. ३ झाकण. ४ गोष्ट. ५ नाश. ६ ईश्वराची शक्ति. ७ आपले गुह्य. ८ पाठमोरी. ९ उत्पन्न होत नाही. १० दांडगी.

सायुज्यादि चारमुक्ती ॥ अंकी वाढवी भगवद्भक्ती ॥ ते नकरिता अनन्यगती ॥ शास्त्रज्ञां मुक्ती नघडे कदा ॥ ६३ ॥ हरिभजनीं जे विमुख[1] ॥ त्यांसि सदा द्वैतसन्मुख ॥ महाभयेंसी दुःखदायक ॥ प्रपंच देख दृढवाढे ॥ ६४ ॥ जेवीं एकाएकीं दृग्भ्रमू पडे ॥ तो पूर्व ह्मणे पश्चिमेकडे ॥ तैसी वस्तु विमुखें वाढे ॥ अतिगाढें मिथ्याद्वैत ॥ ६५ ॥ द्वैताचिये भेदविहिरे ॥ सुटती संकल्पविकल्पांचे झरे ॥ तेथें जन्ममरणांचेनि पूरें ॥ बुडे एकसरें ब्रह्मांडगोळ ॥ ६६ ॥ जन्ममरणांचिया वोढी ॥ नानादुःखांचिया कोडी ॥ अभक्त सोशिती सांकडीं ॥ हरिभक्तांते वोढी स्वप्नींही नलगे ॥ ६७ ॥ भक्तीचें अगाध[2] महिमान ॥ तेथें रिघेना भवबंधन ॥ तें करावया भगवद्भजन ॥ सद्गुरुचरण सेवावे ॥ ६८ ॥ निजशिष्याची मरणचिंता ॥ स्वयें निवारी[3] जो वस्तुतां ॥ तोचि सद्गुरू तत्वतां ॥ येर ते गुरुता मंत्रतंत्रोपदेशें ॥ ६९ ॥ मंत्रतंत्र उपदेशिते ॥ घरोघरीं गुरु आहेत आइते ॥ जो शिष्यासि मेळवी सद्वस्तूतें ॥ सद्गुरु त्यातें श्रीकृष्ण मानी ॥ ॥ ४७० ॥ गुरु देवो गुरु माता पिता ॥ गुरु आत्मा ईश्वरु वस्तुता ॥ गुरु परमात्मा सर्वथा ॥ गुरु तत्वतां परब्रह्म ॥ ७१ ॥ गुरूचे उपमे समान ॥ पाहतां जगीं नदिसे आन[4] ॥ अगाध गुरूचें महिमान[5] ॥ तो भाग्येंवीण भेटेना ॥ ७२ ॥ निष्कामपुण्याचिया कोडी ॥ अगाध वैराग्य जोडे जोडी ॥ नित्यानित्यविवेक आवडी ॥ तैं पाविजे रोकडी सद्गुरुकृपा ॥ ७३ ॥ सद्गुरुकृपा हातीं चढे ॥ तेथें भक्तीचें भांडार[6] उघडे ॥ तेव्हां कळिकाळ पळे पुढें ॥ कायसें बापुडें भवभय ॥ ७४ ॥ गुरूतें ह्मणे मातापिता ॥ ते एकजन्मीं सर्वथा ॥ हा सनातन[7] तत्वतां ॥ जाणपां वस्तुतां मायबापू ॥ ७५ ॥ अधोद्वारें[8] उपजविता ॥ ते लौकिकीं मातापिता ॥ अधोद्वारा आतळोंनेदितां ॥ जाणपां वस्तुतां मायबाप ॥ ७६ ॥ गुरूते ह्मणों कुलदेवता ॥ तिची कुळकर्मींच पूज्यतां ॥ हा सर्वकर्मीं अकर्ता ॥ पूज्य सर्वथा सर्वार्थीं ॥ ७७ ॥ गुरु ह्मणों देवासमान ॥ तरी देवांसि याचेनि देवपण ॥ मग त्या सद्गुरूसमान ॥ देवही जाण तुकेना[9] ॥ ७८ ॥ गुरु ब्रह्म दोनी समान ॥ हेही उपमा किंचित न्यून ॥ गुरुवाक्यें ब्रह्मा ब्रह्मपण ॥ ते सद्गुरु पूर्ण अद्वयत्वें ॥ ७९ ॥ यालागीं अगाध गुरुगरिमा[10] ॥ उपमा नाही निरुपमा ॥ ब्रह्मीं ब्रह्मत्व प्रमाणप्रमा ॥ हे वाक्यमहिमा गुरूची ॥ ४८० ॥ ब्रह्म सर्वांचें प्रकाशक ॥ सद्गुरु तयाचाही प्रकाशक ॥ एवं गुरूहूनि अधिक ॥ नाहीं आणिक पूज्यत्वें ॥ ८१ ॥ यालागीं गुरूतें मनुष्यबुद्धी ॥ पाहोंनये मा त्रिशुद्धी ॥ ऐशिये भावार्थबुद्धी ॥ सहजें चित्तशुद्धी सच्छिष्यां ॥ ८२ ॥ ज्याचा गुरुचरणीं निःसीमभावो ॥ त्याचा मनोरथ पुरवी देवो ॥ गुरुआज्ञा देव पाळी पहाहो ॥ गुरु वाक्यें स्वयमेवो जडमूढ तारी ॥ ८३ ॥ ब्रह्मभावें जे गुरुसेवक ॥ देव त्यांचा आज्ञाधारक ॥ त्यांसि नित्य पुरवी निजात्मसु[11]

---

[1] पाठदाखविणारे. [2] सखोल. [3] नाहीसे करी. [4] दुसरा. [5] माहात्म्य. [6] खजिना. [7] फारजुना. [8] योनिमार्गानें. [9] तोलवत नाही. [10] गुरूचा मोठेपणा. [11] आत्मसुख.

ख ॥ हे गुरुमर्यादा देख नुल्लंघी देवो ॥ ८४ ॥ देव गुरुआज्ञा स्वयें मानी ॥ तंव गुरु देवातें पूज्यत्वा आणी ॥ एवं उभयतां [1]अभिन्नपणी ॥ भावार्थियां लागोनी तारक ॥ ८५ ॥ सद्भाव नाहीं अभ्यंतरीं ॥ बाह्य भक्ति करिती भावेंचि करीं ॥ ते भावानुसारें संसारी ॥ नानापरी स्वयें ठकती ॥ ८६ ॥ ठकले ते मनुष्यगती ॥ ठकले ते निजस्वार्थी ॥ ठकले ते ब्रह्मप्राप्ती ॥ दंभें हरिभक्ती कदा नुपजे ॥ ८७ ॥ येथें भावेंवीण तत्वतां ॥ परमार्थ नये हाता ॥ सकळसाधनांचे माथां ॥ जाण तत्वतां सद्भावो ॥ ८८ ॥ कोरडिये काष्ठीं सद्भावो ॥ तेथेंचि प्रगटे देवाधिदेवो ॥ मासद्गुरु तंव तो पहाहो ॥ स्वयें स्वयमेवो परब्रह्म ॥ ८९ ॥ यालागीं गुरुभजनापरता ॥ भजावया मार्ग नाहीं आयता ॥ ज्ञानभक्ती जे तत्वतां ॥ ते जाण सर्वथा सद्गुरुभक्ती ॥ ४९० ॥ गुरूहोनि श्रेष्ठ ब्रह्म ॥ ह्मणतां [2]गुरुत्वा आला कनिष्ठधर्म ॥ ऐसा भाव धरितां विषम ॥ ब्रह्मसाम्य शिष्यां नुपजे ॥ ९१ ॥ आह्मां सद्गुरु तोचि परब्रह्म ॥ ऐसा नित्य निजभावसप्रेम ॥ हेचि गुरुसेवा उत्तमोत्तम ॥ शिष्य परब्रह्म स्वयें होय ॥ ९२ ॥ ऐशिये गुरुसेवे आंत ॥ प्रल्हाद जाहला [3]द्वंद्वातीत ॥ नारद स्वानंदें गात नाचत ॥ ब्रह्मसाम्यें विचरत [4]सुरासुरस्थानें ॥ ९३ ॥ ऐशीचि गुरुसेवा करितां ॥ चुकली अंबरीषाची गर्भव्यथा ॥ ते गर्भचि जाहला देव साहता ॥ भक्तां [5]भवव्यथा बाधोंनेदी ॥ ९४ ॥ ऐशिया अभिन्नव भावना ॥ सुबुद्धी भजती गुरुभजना ॥ ते पढियंते जनार्दना ॥ त्यांशी भवभावना [6]शिवोंनेदी ॥ ९५ ॥ गुरु ब्रह्म दोनी एक ॥ शिष्यही असे तदात्मक ॥ जे भेदें मानिती वेगळिक ॥ तेही मायिक कवि सांगे ॥ ९६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अविद्यमानोऽप्यवभाति हि द्वयोर्ध्यातुर्धिया स्वप्नमनोरथौ यथा ॥ तत्कर्मसंकल्पविकल्पकं मनो बुधो निरुंध्यादभयं ततः स्यात् ॥ ३८ ॥ ॥ टीका ॥ ॥ पुरुषासि जो प्रपंच दिसे ॥ तो नसतांचि मिथ्या आभासे ॥ जेवीं एकला [7]निद्रावशें ॥ स्वप्नामाजी जग कल्पी ॥ ९७ ॥ असोनि निद्रावशें दिसे स्वप्न ॥ जो जागा होवोनि आपण ॥ करूं बैसे मनोरथ ध्यान ॥ नसतेंचि जन वन एकलीं देखे ॥ ९८ ॥ होकां घालोनि आसन ॥ जो करी मूर्तिचिंतन ॥ त्यासि ध्येय ध्याता उपचार ध्यान ॥ नसतेंच जाण कल्पित भासे ॥ ९९ ॥ जेवीं धनलोभ्यांचें [8]हारपे धन ॥ परी वासना नसांडी धनधान्य ॥ धनातें आठवितां मन ॥ धनलोभें पूर्ण पिसें होये ॥ ५०० ॥ मन स्वयें जरी नव्हे धन ॥ तरी धनकोश आठवी मन ॥ तंव स्मृती वळघे वन ॥ व्यामोहें पूर्ण पिसें होय ॥ १ ॥ तेवीं व्यामोहाचें पूर्णभरित ॥ मिथ्या भासे देहाद्विद्वैत ॥ तें अहंभावें मानितां आप्त ॥ भवभय निश्चित आदळे अंगीं ॥ २ ॥ भवभयाचें कारण ॥ मनकल्पना मुख्य जाण ॥ त्या मनाचें करावया [9]निरोधन ॥ सद्गुरुवचन निजनिष्ठा ॥ ३ ॥ हें जाणोनि सच्छि

---

[1] एकरूपानें. [2] मोठेपणास. [3] शीत उष्ण इत्यादि द्वैताहून वेगळा. [4] देवदैत्यांची ठिकाणें. [5] संसाराचे दुःख. [6] शिवूं देत नाही. [7] झोपेच्या योगानें. [8] हरवते. [9] संयमन.

प्य ज्ञाते ॥ गुरुवाक्यें विश्वासयुक्तें ॥ विवेकवैराग्याचेनि हातें ॥ निजमनातें आकळिती ॥ ४ ॥ तेचि आकळती हातवटी ॥ संक्षेपें राया सांगेन गोष्टी ॥ सद्गुरुवाक्यपरिपाटी ॥ जे मनातें थापटी निजबोधें[1] ॥ ५ ॥ चंचळत्वें विषयध्यान ॥ करितां देखे जेंजें मन ॥ तेंतें होय ब्रह्मार्पण ॥ सद्गुवचन निजनिष्ठा ॥ ६ ॥ धरूनियां विषयस्वार्थू ॥ मनें जोजो घेइजे अर्थू ॥ तोतो होय परमार्थू ॥ हा अनुग्रहो समर्थू गुरुकृपेचा ॥ ७ ॥ जो भुईभेणें पळों जाये ॥ तो जेथें पळे तेथें भूये ॥ मग येणें जाणें स्वयें राहे ॥ ठायीं ठाये पांगुळला ॥ ८ ॥ तैसें मनासि लाविजे वर्म ॥ जेंजें देखे तेंचि ब्रह्म ॥ जेणें करूं वसे कर्म ॥ तेथें पुरुषोत्तम स्वयें प्रगटे ॥ ९ ॥ एवं इंद्रियप्रवृत्ति उल्हाळें ॥ मोडिलें गुरुवाक्य प्रतीतिबळें ॥ निजाधिष्ठानमेळें[2] ॥ कळोंरसले एकेवेळे निजकुलुपें ॥ ५१० ॥ ऐसें नेमितां बाह्यकर्म ॥ मनाचा मोडे द्वैतभ्रम ॥ तंव बाह्यपरब्रह्म ॥ पूर्ण चिद्व्योम[3] कोंदाटे ॥ ११ ॥ ऐसें भजनें मन नेमितां स्वयें ॥ नरिघे कल्पांतकाळभये ॥ भक्त होऊनियां निर्भये ॥ विचरती स्वयें निःशंक[4] ॥ १२ ॥ हे अगाधनिष्ठा परिपूर्ण ॥ भोळ्याभाळ्या नटकेजाण ॥ यालागीं सुगमसाधन[5] ॥ सांगेन आन तें ऐक ॥ १३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शृण्वन् सुभद्राणि रथांगपाणेर्जन्मानि कर्माणि च यानि लोके ॥ गीतानि नामानि तदर्थकानि गायन्विलज्जो विचरेदसंगः ॥ ३९ ॥ ॥ टीका ॥ ॥ तरावया भाळेभोळे जन ॥ मुख्य चित्तशुद्धीच कारण ॥ जन्म कर्म हरीचे गुण ॥ करावे श्रवण अत्यादरें[6] ॥ १४ ॥ चुकल्यापुत्राची शुद्धिवार्त्ता ॥ जेणें सादरें ऐके माता ॥ तेणें सादरें हरिकथा ॥ सार्थकता परिसावी ॥ १५ ॥ हरीचीं जन्मकर्में अनंतगुण ॥ ह्मणाल त्यांचें नव्हेल श्रवण ॥ लोकप्रसिद्ध जें पुराण ॥ तें श्रद्धा संपूर्ण ऐकावें ॥ १६ ॥ बहुदेव बोलिले पुराणीं ॥ तेही लागती ज्याचे चरणीं ॥ तो समर्थ चक्रपाणी ॥ जो वेदपुराणीं वंदिजे ॥ १७ ॥ त्याचीं जीं जीं जन्में अतिअद्भुत ॥ जींजीं कर्में परमार्थयुक्त ॥ स्वमुखें बोलिला भगवंत ॥ तींतीं ज्ञानार्थ परिसावीं ॥ १८ ॥ जेंजें केलें पुराणश्रवण ॥ तेंतें व्यर्थ होय मननेविण ॥ यालागीं श्रवणाचें मनन ॥ सावधान करावें ॥ १९ ॥ मोलें घेतली जे गाये ॥ दुभतें खातांविषयहोये ॥ तेचि दान देतां लवलाहें ॥ दुभिती होय परमामृतें ॥ ५२० ॥ तेवीं केलें जें श्रवण ॥ तें मननें परमपावन ॥ तेंचि उपेक्षितां जाण ॥ परिपाकीं पूर्ण वांझ होय ॥ २१ ॥ यापरी श्रवणीं श्रद्धा ॥ मननयुक्त करितां सदा ॥ तैं विकल्प[7] बाधीना कदा ॥ वृत्ति शुद्धा स्वयें होये ॥ २२ ॥ ऐसें मननयुक्त श्रवण ॥ करितां वोसंडे[8] हर्षपूर्ण ॥ तेणें हर्षें हरिकीर्तन ॥ करी आपण स्वानंदें ॥ २३ ॥ हरिचरित्रें अगाध ॥ ज्ञानमुद्रापदबंध ॥ कीर्तनीं गातां विशद ॥ परमानंद वोसंडे ॥ २४ ॥ वानिती[9] अजन्मयाचीं जन्में ॥ वानिती अकर्मियाचीं कर्में ॥ स्मरती अनामियाचीं

---

[1] आत्मबोधानें. [2] आपल्या अधिष्ठानामुळें. [3] चैतन्यरूप आकाश. [4] निर्भय. [5] सोपे साधन. [6] फारआदरानें. [7] कल्पना. [8] मिळें. [9] वर्णिती.

नामें ॥ अतिसप्रमें डुल्लत ॥ २५ ॥ साधावया निजकाज[1] ॥ सांडूनि लौकिकलाज ॥ कीर्तनीं नाचती भोज ॥ अतिनिर्लज्ज निःशंक ॥ ॥ २६ ॥ कीर्तनें निर्दळिले[2] दोष ॥ जप तप ठेले निरास ॥ यमलोक पाडिला वोस ॥ तीर्थांची आस[3] निरास जाहली ॥ २७ ॥ यमनियमा पडती उपवास ॥ मरोटें केले योगाभ्यास ॥ कीर्तनगजरें हृषीकेश ॥ निर्दाळी दोष नाममात्रें ॥ २८ ॥ कीर्तनाचा घडघडाट ॥ आनंद कोंदला[4] उद्भट ॥ हरुषें डोले वैकुंठपीठ ॥ तेणें सुखें नीलकंठ तांडवनाचें नाचतु ॥ २९ ॥ यापरी हरिकीर्तन ॥ देत परम समाधान ॥ हा भक्तिराजमार्ग पूर्ण ॥ येमार्गीं स्वयें रक्षण चक्रपाणी कर्ता ॥ ५३० ॥ चक्र घेऊनि भक्ताचेठायीं ॥ ह्मणे तुझें कार्य कायी ॥ मज जगीं वैरीचि नाहीं ॥ भक्तद्वेषी[5] पाही निजशस्त्रें नाशीं ॥ ३१ ॥ चक्रें अभिमानाचा करी चेंदा ॥ मोह ममता छेदी गदा ॥ शंखें उद्बोधी निजबोधा[6] ॥ निजकमळें सदा निजभक्तपूजी ॥ ३२ ॥ जेथें चक्रपाणी रक्षिता ॥ तेथें नरिघे भयाची कथा ॥ वार्ता यापरी कीर्तिवंता ॥ हरी सर्वथा स्वयें रक्षी ॥ ३३ ॥ ज्यांसी नकरवे कथाश्रवण ॥ अथवा नकरवे हरिकीर्तन ॥ तिहीं करावें नामस्मरण ॥ राम कृष्ण गोविंद ॥ ३४ ॥ अच्युतनामाची निजख्याती ॥ च्यवतां कल्पांतीं नव्हे च्युती[7] ॥ यानामातें जे स्मरती ॥ ते जाण निश्चितीं अच्युतावतार ॥ ३५ ॥ रामकृष्णादिनामश्रेणी ॥ अखंड गर्जे ज्याची वाणी ॥ त्यासि तीर्थें येती लोटांगणीं ॥ सुरवर चरणीं लागती स्वयें ॥ ३६ ॥ बापनामाचें निजतेज ॥ यम वंदी चरणरज[8] ॥ नामापाशीं अधोक्षज ॥ चतुर्भुज स्वयें तिष्ठे[9] ॥ ३७ ॥ नामाचेनि पडिपाडें ॥ कायिसें भवभय बापुडें ॥ कळिकाळाचें तोंड कोणीकडे ॥ नामापुढें रिघावया ॥ ३८ ॥ जेवढी नामाची शक्ती ॥ एवढें पाप नाहीं त्रिजगतीं ॥ नामापाशीं चारी मुक्ती ॥ जाण निश्चितीं विदेहा ॥ ३९ ॥ ऐक राया सावधान ॥ नामापरतें सुगम साधन ॥ सर्वथा नाहीं नाहीं आन ॥ निश्चय जाण नेमस्त ॥ ५४० ॥ जन्मनामकर्मश्रीधर ॥ श्रवणें उद्धरती पामर ॥ यालागीं हरिलीलासुभद्र ॥ शास्त्रज्ञ नर वर्णिती ॥ ४१ ॥ ऐसा बाणल्या[10] भक्तियोग ॥ नधरी जाणपणाची फुग ॥ त्यजूनी अहंममतापांग ॥ विचरती निःसंग हरिकीर्तनीं ॥ ४२ ॥ करितां श्रवण स्मरण कीर्ती ॥ तेणें वाढे सप्रेमभक्ती ॥ भक्त विसरे देहस्फूर्ती ॥ ऐक ते स्थिती सांगेन राया ॥ ४३ ॥

॥ श्लोक ॥ ॥ एवंव्रतः स्वप्रियनामकीर्त्यां जातानुरागो द्रुतचित्त उच्चैः ॥ हसत्यथो रोदिति रौति गायत्युन्मादवन्नृत्यति लोकबाह्यः ॥ ४० ॥

॥ टीका ॥ हरिनामगुणकीर्ती ॥ अखंड आवडे जागृतीं ॥ स्वप्नींही तेचि स्थिती ॥ दृढ हरिभक्ती ठसावे ॥ ४४ ॥ ऐशियापरी भक्तियुक्त ॥ दृढतर जाहलें ज्याचें व्रत ॥ तंवतंव होय आर्द्रचित्त ॥ परमाद्भुत हरिनामकीर्ती ॥ ४५ ॥ आत्मा परमप्रिय हरी ॥ त्याचे नामकीर्तीचा हर्ष भारी ॥

---

[1] आपले काम. [2] नाहीसे केले. [3] आशा. [4] भरला. [5] भक्ताचा वैरी. [6] आत्मज्ञानास. [7] भ्रंश, पडणे. [8] पायाची धूळ. [9] राहे. [10] अनुभवास आला असता.

नित्यनवी ओवड[१] वरी ॥ सबाह्याभ्यंतरीं हरि प्रगटे ॥ ४६ ॥ चुकल्या माय पूतां संकटीं ॥ एकाकीं बहुकाळें जाहली भेटी ॥ तेणें वोरडें घालोनि मिठी ॥ चाले जेवीं पोटीं अनिवाररुदन ॥ ४७ ॥ तेवीं जीवशिवां अवचटीं ॥ भक्तीचे पेठे जाहली भेटी ॥ आत्मसाक्षात्कारें पडे मिठी ॥ ते संधीमाजी उठी अनिवाररुदन ॥ ४८ ॥ परमात्मयासि आलिंगन ॥ तेणें अनिवार स्फुंदन ॥ रोमांचितरुदन ॥ सप्रेमपूर्ण उसोसोनि[२] करी ॥ ४९ ॥ सवेंचि गद्गदोनि हांसे ॥ मानी मजमाजीच मी असें ॥ मा चुकलों भेटलों हें ऐसें ॥ देखोनि आपुलें पिसें हांसोंचि लागे ॥ ५५० ॥ मी अखंडत्वें स्वयें संचलों ॥ अभेद पूर्णत्वें अनादि रचलों ॥ तो मी अव्ययो ह्मणे जाहलों मेलों ॥ येणें आवडे डोलडोलों हांसोंचि लागे ॥ ५१ ॥ पळतां दोराच्या सर्पाभेण ॥ पडे अडखळे भयें पूर्ण ॥ तोचतो दोरा वोळखोन ॥ आपणियां आपण स्वयें हांसे ॥ ५२ ॥ तेवीं संसाराचा अभावो ॥ देहभाव समूळ वावो ॥ तेथें नाथिली[३] ममता अहंभावो ॥ मज होता पाहाहो ह्मणूनी हांसे ॥ ५३ ॥ बाप गुरुवाक्य निजनिर्वाहो ॥ देहीं असतां विदेहभावो ॥ माझे चारी देह जाहले वावो ॥ येणें अनुभवें पाहाहो गर्जों लागे ॥ ५४ ॥ ह्मणे धन्यधन्य भगवद्भक्ती ॥ जिणें मिथ्या केल्या चारी मुक्ती ॥ मी परमात्मा निजनिश्चितीं ॥ येणें उल्हासें त्रिजगती गर्जवी गजरें ॥ ५५ ॥ धन्य भगवंताचें नाम ॥ नामें केलों नित्यनिष्काम ॥ समूळ मिथ्या भवभ्रम[४] ॥ गर्जोनि निःसीम हाक फोडी ॥ ५६ ॥ आतां दुजें नाहींच त्रिलोकीं ॥ दिसे तेंतें मीच मी कीं ॥ मीच मी तो एकाकी ॥ येणें वाक्यें अलोलिकी हाक फोडी ॥ ५७ ॥ दुर्धर भवबंधन ज्याचेनी ॥ निःशेष गेलें हरपोनी[५] ॥ त्या सद्गुरूच्या निजस्तवनीं ॥ गर्जवी वाणी अलोलिक ॥ ५८ ॥ ह्मणे संसार जाहला वावो ॥ जन्ममरणांचा अभावो ॥ कळिकाळासि नाहीं ठावो ॥ ह्मणोनि पाहाहो हाक फोडी ॥ ५९ ॥ ऐशा हाकावरी हाका ॥ फोडूं लागे अलोलिका ॥ स्वयेंचि गाये[६] निजात्मसुखा ॥ स्वानंदें देखा डुल्लत ॥ ५६० ॥ परमसख्याची गोड कथा ॥ लक्ष्मी नबाणे[७] स्वयें सांगतां ॥ तेवीं निजानुभवें हरि गातां ॥ धणी[८] सर्वथा पुरेना ॥ ६१ ॥ त्याचें गाणें ऐकतां ॥ सुखरूप होय सज्ञान श्रोता ॥ मुमुक्षां होय परमावस्था ॥ जरी तो अवचिता गावों लागे ॥ ६२ ॥ गातां पदोपदीं निजसुख ॥ कोंदाटे अधिकाधिक ॥ वोसंडतां परमहरिख ॥ स्वानंदें अलोलिक नाचों लागे ॥ ६३ ॥ सारूनि दुजेपणाचें कांज[९] ॥ निरसोनि[१०] लौकिकाची लाज ॥ अहंभावेंविण सहज ॥ आनंदाचें चोज अलोलिक नाचे ॥ ६४ ॥ जो मोलें मदिरा खाये ॥ तो मदिरानंदें नाचे गाये ॥ जेणें ब्रह्मानंद सेविलाहे ॥ तो केवीं राहे आवरला ॥ ६५ ॥ यालागीं तो लोकबाह्यता ॥ स्वयें नाचे ब्रह्मउन्मादता ॥ लोक मानिती तया पिशाचता ॥ हा बो

---

[१] गोडी. [२] श्वास टाकून. [३] नसतो. [४] संसाराची भ्रांति. [५] नाहीसें होऊन. [६] गातो. [७] होत नाही. [८] आशा. [९] काम. [१०] नाहीसीकरून.

धू पंडितां सहसा नकळे ॥ ६६ ॥ त्याचिया निजबोधाची[1] कथा ॥ ऐक सांगेन नृपनाथा ॥ एकभगवंतावांचूनि सर्वथा ॥ त्यासि लौकिकता दिसेना ॥ ६७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ खं वायुमग्निं सलिलं महीं च ज्योतींषि सत्वानि दिशो द्रुमादीन् ॥ सरित्समुद्रांश्च हरेः शरीरं यत्किंचभूतं प्रणमेदनन्यः ॥ ४१ ॥ ॥ टीका ॥ ॥ ब्रह्मउन्मादपरमानंदें ॥ जंवजंव पाहे स्वानंदबोधें ॥ तंवतंव चराचर पूर्णानंदें ॥ देखे स्वानंदकंदें दुमदुमित ॥ ६८ ॥ पृथ्वी आप तेज वायु नभ ॥ देखे हरिरूप स्वयंभ ॥ भूतें महाभूतांचें डिंब ॥ नदेंखे भिन्नकोंभ अभिन्नत्वें ॥ ६९ ॥ जेवीं नमेळवितां मेळा ॥ पाहतां जैसा केळीचा कळा ॥ स्वयें विकासे फळांदळां ॥ तेवीं वस्तु हे पांचांला भूतभौतिकात्मक ॥ ५७० ॥ जेवीं कांतोनियां रंध्र सळे ॥ स्फटिकदीप गृह अंगमेळे ॥ चितारिलीं अश्वगजदळें ॥ तीं भासती सोज्वळें अतुल्यदीपें ॥ ७१ ॥ तेवीं सोमसूर्यादितेजशक्ती ॥ कांवन्हिनक्षत्रें जे लखलखिती ॥ जननयनादिनिजदीप्ती ॥ देखे आत्मज्योती सतेज ॥ ७२ ॥ युक्तीं मेळवितां द्रव्यांतर ॥ अग्निपरी भासे पुष्पाकार[2] ॥ तेवीं वस्तु स्वलीलासाचार ॥ रविचंद्राकार नानातत्वें भासे ॥ ७३ ॥ पृथ्वी गंधरूपें स्वयें असे ॥ तो गंध कस्तूर्यादिकीं भासे ॥ तेवीं भगवत्सत्ता सर्वत्र असे ॥ परी सात्विकीं दिसे अतिप्रगट ॥ ७४ ॥ यालागीं सात्विकाठायीं सत्व ॥ तेथें देखे भगवत्तत्त्व ॥ सत्वें सत्ववंतां महत्व ॥ अतिमान्यत्व हरिरूपीं ॥ ७५ ॥ पृथ्वीस जल[3] आवरण आहे ॥ तेंचि चतुःसमुद्रां नाव लाहे ॥ तैसे देवाचेचि अंगें पाहे ॥ दिशात्वें वाच्य होये दशदिशा ॥ ७६ ॥ पूर्वपश्चिमादियोग ॥ दशदिशांचे दिग्विभाग ॥ तेही देवा चेंचि अंग ॥ तद्रूप श्रीरंग स्वयें भासे ॥ ७७ ॥ तृण दूर्वा दर्भ द्रुम ॥ देखोनि ह्मणे हेही हरीचे रोम[4] ॥ अनोळखा हें अतिविषम ॥ निजांगीं सर्वसम हरिरूप पाहतां ॥ ७८ ॥ जैशा आपुल्या आंगोळिया ॥ गणितां दिसती वेगळालिया ॥ परी असती लागलिया ॥ स्वयें सगळिया अखंड अंगीं ॥ ७९ ॥ तेवीं वनवल्लीदर्भदांग ॥ देखोनि ह्मणे हें हरीचें अंग ॥ अनन्यभावें लगबग ॥ भिन्नभाग देखेना ॥ ५८० ॥ ह्मणे दूर्वा द्रुम वनवल्ली ॥ हेचि अनंतकोटी रोमावळी ॥ हरीचेनि अंगें असे वाढली ॥ त्या निजशोभा शोभली हरिरूपतत्वें ॥ ८१ ॥ जेवीं वटाच्या पारंबिया ॥ लांबोनि वाढती वेगळालिया ॥ त्याही वटरूपें संचलिया ॥ वटत्वा[5] मुकलिया ह्मणों नये ॥ ८२ तेवीं चैतन्यापासोनि वोघ ॥ निघाले सरितारूप अनेग ॥ तेही चैतन्यघन चांग ॥ चिद्रूपें सांग सदा वाहती ॥ ८३ ॥ होकां चंद्रबिंबीं अमृत जैसें ॥ बिंबीं बिंबरूप होऊनि असे ॥ तेवीं भगवंतीं सागरू[6] भासे ॥ भजनविश्वासें भगवद्रूप ॥ ८४ ॥ ऐसे वेगळेवेगळे भाग ॥ पाहतां उल्हासे जंव चांग ॥ तंव अवघें उघडें जग ॥ देवोचि सांग स्वयें जाहला ॥ ८५ ॥ यालागीं सर्वभूतांचे

---

१ आत्मज्ञानाची. २ फुलासारखा. ३ पाणि. ४ केस. ५ वडपणास. ६ समुद्र.

ठायीं ॥ अनन्यशरण देहीं विदेहीं ॥ लवण जैसें सागरा पाही ॥ ठायींठायीं जडोनि ठाके ॥ ८६ ॥ तेथें मुंगी देखोनि जाण ॥ हरिरूपीं वंदी आपण ॥ मशकासही अनन्यशरण ॥ घाली लोटांगण भगवद्रूपें ॥ ८७ ॥ गोखर[1] चांडाळ श्वान[2] ॥ अतिनिंद्य जे हीन जन ॥ ते भगवद्रूप देखोनि पूर्ण ॥ घाली लोटांगण अनन्यभावें ॥ ८८ ॥ हरिरूपें देखे पाषाण[3] ॥ भगवद्रूपें वंदी तृण[4] ॥ जंगमस्थावरादिकां शरण ॥ घाली लोटांगण चिदैक्यभावें ॥ ८९ ॥ करितां हरिनामस्मरणकीर्तीं ॥ एकाएकीं एवढी प्राप्ती ॥ झाली ह्मणशी कैं शारोतीं ॥ ऐके नृपती तो भावो ॥ ५९० ॥ करितां पूजाविधिविधान ॥ कां श्रवण स्मरण कीर्तन ॥ सर्वदा चिदैक्यभावना पूर्ण ॥ प्राप्ति जाण त्यातेंचि वरी ॥ ९१ ॥ ॥श्लोक॥ ॥भक्तिः परेशानुभवो विरक्तिरन्यत्र चैष त्रिक एककालः ॥ प्रपद्यमानस्य यथाऽश्नतः स्युस्तुष्टिः पुष्टिः क्षुदपायोऽनुघासम् ॥ ४२ ॥ ॥टीका॥ ॥ऐक विदेह चक्रवर्ती ॥ ऐशी जेथें भगवद्भक्ती ॥ तीपाशीं विषयविरक्ती ॥ ये धांवती गोवत्सन्यायें ॥ ९२ ॥ हे असो जेवीं जावळें फळें ॥ होनेणें येरयेरां वेगळें ॥ तेवीं भक्ति विरक्ती एकेकाळें ॥ भक्त तेणेंबळें बळिष्ठ होती ॥ ९३ ॥ जेथें भक्ति आणि विरक्ती ॥ नांदों लागती सहजस्थितीं ॥ तेथेंचि पूर्णप्राप्ती ॥ दासीच्या स्थितीं सर्वदा राबे ॥ ॥ ९४ ॥ यापरी भगवद्भक्ती ॥ पूर्ण दाटुगी त्रिजगतीं[5] ॥ भक्तांघरीं नांदे प्राप्ती ॥ भक्तिविरक्ती निजयोगें ॥ ९५ ॥ भक्तिविरक्ती अनुभवप्राप्ती[6] ॥ तिन्हीएकेकाळें होती ॥ ऐक राया तेही स्थिती ॥ विशदोक्ती[7] सांगेन ॥ ९६ ॥ जैशी कीजे भगवद्भक्ती ॥ तैसीच होय विषयविरक्ती[8] ॥ तदनुसारें अनुभवस्थिती ॥ ती भक्त पावती तेचि क्षणीं ॥ ९७ ॥ जेवि कां भुकेलियापाशीं ॥ ताट वाढिलें षड्रसीं ॥ तो पुष्टितुष्टिक्षुधा नाशी ॥ जेवीं ग्रासोग्रासीं स्वयेंचि पावे ॥ ९८ ॥ जितुकाजितुका घेइजे ग्रास ॥ तितुकातितुका क्षुधेचा नाश ॥ तितुकाचि पुष्टिविन्यास ॥ सुखोल्हास तितुकाची ॥ ९९ ॥ पुष्टि तुष्टि क्षुधानाशनी ॥ जेवीं एकाकाळें येती तिनी ॥ भोक्ता पावे स्वयें भोजनीं ॥ तेवीं भगवद्भजनीं भक्त्यादित्रिकू ॥ ६०० ॥सद्भावें करितां भगवद्भक्ती ॥ भक्ति विरक्ती भगवत्प्राप्ती ॥ तिनी येकेकाळें होती ॥ ऐशिया युक्तीं जाणिजे राया ॥ १ ॥ भक्ती ह्मणजे सर्वभूतीं ॥ सप्रेमभजनयुक्ती ॥ प्राप्ती ह्मणिजे अपरोक्षस्थिती[9] ॥ भगवत्स्फुर्ती अनिवार ॥ २ ॥ विरक्ती ह्मणिजे ऐशी पहाहो ॥ स्त्रीपुत्रदेहादिअहंभावो ॥ समूळ जेथें होय वावो ॥ विरक्तीनिर्वाहो यानाव राया ॥ ३ ॥ यापरी भजनाचे पोटीं ॥ भक्ति विरक्ती प्राप्ति त्रिपुटी ॥ ऐक्यभावें सद्भक्तां उठी ॥ हरिभजनदिठी एकेचि काळीं ॥ ४ ॥ यालागीं निजहितार्थीं[10] ॥ आदरें करावी हरिभक्ती ॥ तेणें अवश्य भगवत्प्राप्ती ॥ भवसंहारार्थीं कवी सांगे ॥ ५ ॥ ॥श्लोक॥ ॥ इत्यच्युताघ्रि

---

१ गाढव. २ कुत्रे. ३ दगड. ४ गवत. ५ तीनलोकांत. ६ अनुभवज्ञान. ७ स्पष्ट बोलण्यानें. ८ विषयावर वैराग्य. ९ साक्षात्कार. १० आपल्या हिताकरिता.

भजतोऽनुवृत्त्या भक्तिर्विरक्तिर्भगवत्प्रबोधः ॥ भवंति वै भागवतस्य राजंस्ततः परां शांतिमुपैति साक्षात् ॥ ४३ ॥ ॥टीका॥ यापरी अनन्यभक्ती ॥ जे सर्वदा सर्वभूतीं करिती ॥ ते भक्ति विरक्ति[1] भगवत्प्राप्ती ॥ सहज पावती अनायासें ॥६॥ राया हरिभक्ति दिव्यांजन ॥ तें लेऊनि भक्तसज्जन ॥ साधिती भगवन्निधान ॥ निजभजनमहायोगें ॥ ७ ॥ करितां ऐक्यभावें निजभक्ती ॥ उत्कृष्ट उपजे पूर्ण शांती ॥ तेणें होय असतांची निवृत्ती ॥ भक्तां पूर्णप्राप्ती परमानंदें ॥ ८ ॥ यालागीं धन्य भगवद्भक्त ॥ इंद्रियीं वर्ततां विषयीं विरक्त ॥ देहीं असोनि दे[2]हातीत ॥ नित्यमुक्त हरिभजनें ॥ ९ ॥ भावें करितां भगवद्भक्ती ॥ भुक्तिमुक्तिही नवांछिती ॥ तरी त्यांपाशीं चारी मुक्ती ॥ दास्य[3] करिती सर्वदा ॥ ६१० ॥ हा भागवंताचा निजमहिमा ॥ अनुपम नाहीं उपमा ॥ भावें भजोनि पुरुषोत्तमा ॥ परमात्मगरिमा[4] पावले ॥ ११ ॥ अगाधभगवंताची भक्ती ॥ भक्तांची उत्कृष्टप्राप्ती ॥ ऐकतां विदेहचक्रवर्ती ॥ आश्चर्यचित्तीं चमत्कारिला ॥ १२ ॥ ह्मणे धन्य धन्य भगवद्भजन ॥ हरिखें कवीस लोटांगण ॥ घालितां चालिलें स्फुंदन ॥ रोमांचितनयन अश्रुपूर्ण जाहले ॥ १३ ॥ आनंदस्वेदें[5] कांपत ॥ नावेकराहिला तटस्थ ॥ सर्वेंचि जाहला सावचित्त ॥ ह्मणे झणी महंत नपुसतां जाती ॥ १४ ॥ ऐशिया अतिकाकुलतीं ॥ नेत्र उघडोनि पाहे नृपती ॥ बैसली देखोनि पंक्ती ॥ अतिशयें चित्तीं सुखावला ॥ १५ ॥ तेणें संतोषें डोलत ॥ ह्मणे पूर्णप्राप्ती भगवद्भक्त ॥ जगीं कैसेकैसे विचरत ॥ तें चिन्ह समस्त पुसों पाहों ॥ १६ ॥ ॥श्लोक॥ राजोवाच ॥ अथ भागवतं ब्रूत यद्धर्मो यादृशो नृणाम् ॥ यथा चरति यद्ब्रूते यैर्लिंगैर्भगवत्प्रियः ॥ ४४ ॥ ॥टीका ॥ ॥ भक्तां पूर्णप्राप्ति सुगम ॥ ऐकतां राजा निवाला[6] परम ॥ तो भक्तचिन्हानुक्रम ॥ समूळ सवर्म पूसत ॥ १७ ॥ विदेह ह्मणे स्वामी मुनी ॥ पूर्णप्राप्ति आकळोनी ॥ ते भक्त कैसे वर्तती जनीं ॥ तीं लक्षणें श्रवणीं लेवाँ[7] मज ॥ १८ ॥ भक्तलक्षणभूषण ॥ तेणें मंडित करा श्रवण[8] ॥ सावध ऐकतां संपूर्ण ॥ होइजे आपण भगवत्प्रिय[9] ॥ १९ ॥ त्यांचा कोण धर्म कोण कर्म ॥ कैसे वर्तती भक्तोत्तम ॥ हृदयीं धरोनि पुरुषोत्तम ॥ त्यांचे बोलतें वर्म ते कैसे ॥ ६२० ॥ कोणपरी कैशास्थिती ॥ हरिभक्त हरीस प्रिय होती ॥ ऐशिया लक्षणांचिया पंक्ती ॥ समूळ मजप्रती सांगिजे स्वामी ॥ २१ ॥ विदेहाच्या प्रश्नावरी ॥ संतोषिजे मुनीश्वरीं ॥ कवि धाकुटा जो हरी ॥ तो बोलावया वैखरी सरसावला ॥ २२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ हरिरुवाच ॥ सर्वभूतेषु यः पश्येद्भगवद्भावमात्मनः ॥ भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः ॥ ४५ ॥ ॥ टीका ॥ ॥ हरि ह्मणे रायाप्रती ॥ अमित भक्त लक्षण स्थिती ॥ एक दिगंबरत्वें वर्तती ॥ एकस्वाश्रमस्थिती निजाचारें[10] ॥ २३ ॥ एक सदा पडले असती ॥ एकाची ते उन्मादस्थिती ॥

---

[1] वैराग्य. [2] शरीराहून वेगळे. [3] चाकरी. [4] ईश्वराप्रमाणें मोठेपणा. [5] आनंदाच्या घामानें. [6] शांत झाला. [7] घाला. [8] कान. [9] ईश्वरास आवडतें. [10] आपल्या आचरणानें.

एक सदा गाती नाचती ॥ एक ते होती अबोलणे ॥ २४ ॥ एक गर्जती हरिनामें ॥ एक निर्दाळिती निजकर्में ॥ एक भूतदयाळू दानध
र्में ॥ एक भजननेमें राहती ॥ २५ ॥ ऐशा अनेक भक्त स्थिती ॥ सांगतां सांगात्रया नकळे वृत्ती ॥ त्यांमाजी मुख्य संकळिती ॥ राया
तुजप्रती सांगेन ॥ २६ ॥ [1]पूर्णप्राप्तीचा मुख्य ठावो ॥ सर्वांभूतीं भगवद्भावो ॥ हाचि पूर्णभक्तीचा निजगौरवो ॥ तोचि अभिप्रावो
हरि सांगे ॥ २७ ॥ सर्वभूतीं मी भगवंत ॥ सर्वभूतें मजआंत ॥ भूतीं भूतात्मा मीचि समस्त ॥ मीच मी येथ परमात्मा ॥ २८ ॥ ऐसें
जें पूर्णत्वाचें मीपण ॥ तेणें वाढे आत्माभिमान ॥ सहजें निजनिरभिमान ॥ तें शुद्धलक्षण ऐक राया ॥ २९ ॥ शुद्धभक्तांचें निजल
क्षण ॥ प्रत्यगात्मयाचें जें मीपण ॥ तेंही मानूनियां गौण ॥ भावना पूर्ण त्यांची ऐसी ॥ ६३० ॥ सर्वांभूतीं भगवंत ॥ भूतें भगवंतीं
वर्तंत ॥ भूतीं भूतात्मा तोचि समस्त ॥ मी ह्मणणें तेथें मीपणा नये ॥ ३१ ॥ सर्वभूतीं भगवंत पाही ॥ भूतें भगवंताचे ठायीं ॥ हें अव
घें देखे जो [2]स्वदेहीं ॥ स्वस्वरूप पाही स्वयें होय ॥ ३२ ॥ तो भक्तांमाजी अतिश्रेष्ठ ॥ तो भागवतांमाजी वरिष्ठ ॥ त्यासि उत्तमत्वाचा
पट ॥ अवतार श्रेष्ठ मानिती ॥ ३३ ॥ तो योगियांमाजी अग्रगणी ॥ तो ज्ञानियांचा शिरोमणी ॥ तो सिद्धांत मुगुटमणी ॥ हें [3]चक्रपा
णी बोलिला ॥ ३४ ॥ जैशा घृताचिया [4]कणिका ॥ घृतेंसी नव्हेति आणिका ॥ तेवीं भूतभौतिकव्यापका ॥ भिन्न देखा कदा नव्हती ॥ ३५ ॥
हे उत्तमभक्तांची निजास्थिती ॥ राया जाणावी निश्चितीं ॥ आतां मध्यमभक्त कैसे भजती ॥ त्यांची भजनगती ऐक राया ॥ ३६ ॥
श्लोक ॥ ॥ ईश्वरे तदधीनेषु बालिशेषु द्विषत्सु च ॥ प्रेममैत्रीकृपोपेक्षा यः करोति स मध्यमः ॥ ४६ ॥ ॥ टीका ॥ ॥ ईश्वर मानी उत्त
मोत्तम ॥ तद्भक्तमानी मध्यम ॥ अज्ञान ते मानी अधम ॥ द्वेषी ते परम पापी मानी ॥ ३७ ॥ ईश्वरीं प्रेम पवित्र ॥ भक्तासी मैत्री
मात्र ॥ अज्ञानीं तो कृपापर ॥ उपेक्षा निरंतर द्वेषियांची ॥ ३८ ॥ हे मध्यमभक्तांची भक्ती ॥ राया जाण ऐशियारीतीं ॥ आता प्राकृ
तभक्तांची स्थिती ॥ तेही तुजप्रती सांगेन ॥ ३९ ॥ ॥ श्लोक ॥ अर्चायामेव हरये पूजां यः श्रद्धयेहते ॥ नतद्भक्तेषु चान्येषु स भक्तः
प्राकृतः स्मृतः ॥ ४७ ॥ ॥ टीका ॥ ॥ [6]पाषाणप्रतिमा हाचि देवो ॥ तथेंचि ज्याचा पूर्णभावो ॥ भक्तसज्जनांसि प
हाहो ॥ अणुमात्र देहो लवोंनेदी ॥ ६४० ॥ तेठायीं साधारण जन ॥ त्याची वार्ता पुसे कोण ॥ त्यासि स्वप्नींही नाहीं सन्मान ॥ या
परी भजन प्राकृताचें ॥ ४१ ॥ ऐशियास्थितीं जो जडभक्त ॥ तो जाणावा मुख्य प्राकृतू ॥ प्रतिमाभंगें अंतू ॥ मानी निश्चितू देवाचा
॥ ४२ ॥ यापरी त्रिविध भक्त ॥ सांगीतले भजनयुक्त ॥ परी उत्तमांची लक्षणें अद्भुत ॥ ते सांगावया चित्त उँदित माझें ॥ ४३ ॥

---

१ ब्रह्मामिळण्याचा. २ आपल्या शरीरांत. ३ श्रीकृष्ण. ४ कण, कण्या. ५ वेगळ्या. ६ दगडाची मूर्ति. ७ तयार.

श्लोक ॥ ॥ गृहीत्वापींद्रियैरर्थान्यो न द्वेष्टि नहृष्यति ॥ विष्णोर्मायामिदं पश्यन् स वै भागवतोत्तमः ॥ ४८ ॥ ॥ टीका ॥ ॥ इंद्रियें विषयांतें सेविती ॥ परी सुखदुःख नुमटे[1] चित्तीं ॥ विषय मिथ्यात्वें देखती ॥ ते जाण निश्चितीं उत्तम भक्त ॥ ४४ ॥ मृगजळीं जेणें केलें स्नान ॥ तो नोहतां[2] कोरडाचि जाण ॥ तेवीं भोगीं ज्यांसि अभोक्तेपण ॥ ते भक्त पूर्ण उत्तमोत्तम ॥ ४५ ॥ उत्तमभक्त विषय सेविती ॥ हा बोल रूढला प्राकृतांप्रती ॥ त्यांसि विषयीं नाहीं विषयस्फूर्ती ॥ त्यागिती भोगिती दोनी मिथ्या ॥ ४६ ॥ स्वप्नींचें केळें राय भोगें ॥ जागा होऊनि खावों मागे ॥ तेणें हात माखे ना तोंडीं लागे ॥ तेवीं विषयसंगें हरिभक्त ॥ ४७ ॥ येथवरी मिथ्या विषयभान ॥ तरी सेवावया त्यांसि काय कारण ॥ येथें प्रारब्ध बळी पूर्ण ॥ तें अवश्य जाण भोगवी ॥ ४८ ॥ परी मी एक विषयभोक्ता ॥ ही स्वप्नींही त्यास नुमटे कथा ॥ यालागीं उत्तमभागवतता ॥ त्यासीच तत्वतां बाणली[3] ॥ ४९ ॥ यापरी विषयासक्ती ॥ वर्तिजे उत्तमभक्तीं ॥ याहूनि अगाधस्थिती ॥ सांगेन तुजप्रती ते ऐक ॥ ६५० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ देहेंद्रियप्राणमनोधियां यो जन्माप्ययक्षुद्भयतर्षकृच्छ्रैः ॥ संसारधर्मैरविमुह्यमानः स्मृत्या हरेर्भागवतप्रधानः ॥ ४९ ॥ ॥ टीका ॥ ॥ देहेंद्रिय मनोबुद्धि प्राण ॥ हेंचि बंधाचें पंचायतन[4] ॥ क्षुधा तृषा भय क्लेश पूर्ण ॥ जन्ममरण इत्यादि ॥ ५१ ॥ या पांचां स्थानीं अपार श्रम ॥ यानांव ह्मणिजे संसारधर्म ॥ निजभक्तां प्रसन्न आत्माराम ॥ त्यासि भवभ्रम स्वप्नींही नाहीं ॥ ५२ ॥ क्षुधा लागलिया दारुण ॥ अन्नआकांक्षे पीडे प्राण ॥ भक्तां क्षुधेची नव्हे आठवण ॥ ऐसें अगाध स्मरण हरीचें ॥ ५३ ॥ भावें करितां भगवद्भक्ती ॥ क्षुधेतृषेची[5] नव्हे स्फूर्ती ॥ एवढी पावले अगाधप्रीती ॥ ते भवभयें निश्चितीं डळडळतीना ॥ ५४ ॥ मनामाजी भवभयभरणी ॥ तें मन रातलें[6] हरिचरणीं ॥ आतां भयातें तेथें कोण मानी ॥ मन मनपणीं असेना ॥ ५५ ॥ मनीं स्फुरे द्वैताची स्फूर्ती ॥ तेथें भवभयाची दृढस्थिती ॥ ते मनीं जाहली हरीची वस्ती ॥ यालागीं भवभयनिवृत्ती द्वैतेंसीं ॥ ५६ ॥ देहबुद्धीमाजी जाणा ॥ नानापरी उठनी तृष्णा ॥ ते बुद्धी निश्चयें हरीच्या स्मरणा ॥ करितां परिपूर्णा विनटली स्वयें ॥ ५७ ॥ जेथें जेंजें स्फुरे तृष्णास्फुरण ॥ तेथें स्वयें प्रगटे नारायण ॥ तेव्हां तृष्णा होय वितृष्ण ॥ विरे संपूर्ण पूर्णामाजी ॥ ५८ ॥ यापरी गा तृष्णारहित ॥ हरिस्मरणें भगवद्भक्त ॥ इंद्रियक्लेशां भक्त अलिप्त ॥ तोही वृत्तांत[7] ऐक राया ॥ ५९ ॥ मुख्य कष्टाचें अधिष्ठान ॥ इंद्रियकर्मीं राया जाग ॥ ते इंद्रियकर्मीं ब्रह्मस्फुरण ॥ हरिभक्तां पूर्ण हरिभजनें ॥ ६६० ॥ दृष्टीनें घेऊं जातां दर्शन ॥ दृश्यमात्रीं[8] प्रगटे नारायण ॥ श्रवणीं शब्द घेतां जाण ॥ शब्दार्थी पूर्ण विराजे वस्तु ॥ ६१ ॥ घ्राणीं घेतां नानावासु ॥ वासबोधें

---

[1] उत्पन्न होत नाहो. [2] स्नानकरीत असता. [3] आली. [4] पाच ठिकाणे. [5] भुकेतान्हेची. [6] दिले. [7] वर्तमान. [8] सर्वजगतांत.

प्रगटे परेशु[1] ॥ रसना सेवी जोजो रसु ॥ रसीं ब्रह्मरसु निजस्वादें प्रगटे ॥ ६२ ॥ देहीं लागतां शीतोष्ण ॥ अथवा कां मृदु कठिण ॥ तेणें स्पर्शज्ञानें जाण ॥ चिन्मात्र पूर्ण प्रगटे स्वयें ॥ ६३ ॥ आतां कर्मेंद्रियप्रवृत्ती ॥ तेही स्फुरे ब्रह्मस्फूर्ती ॥ घेणें देणें गमनस्थिती ॥ इंद्रियांगती आत्मारामें ॥ ६४ ॥ ऐसे करितां इंद्रियें कष्ट ॥ ते कष्टीं होय निजसुख प्रगट ॥ तेणें इंद्रियां विश्रांती चोखट ॥ पिकली स्वानंदपेंठ हरिभक्तां ॥ ६५ ॥ जेणें इंद्रियां कष्ट होती ॥ तेणेंचि इंद्रियां सुखप्राप्ती ॥ हे भगवद्भजनीं नित्ययुक्ती ॥ भोगिजे निजभजनें[2] ॥ ६६ ॥ जन्म आणि मरण ॥ हें देहाचे माथां जाण ॥ भक्त देही विदेही पूर्ण ॥ ध्यातां हरिचरण हरिरूप जाहले ॥ ६७ ॥ यालागीं देहाची अहंता ॥ कदा नुपजे भगवद्भक्तां ॥ ते भक्तपूर्णतेची कथा ॥ ऐक नृपनाथा सांगेन ॥ ६८ ॥ देह धरिला पंचाननें ॥ भक्त न[3]डंडळी जीवें प्राणें ॥ वंध्यापुत्र सुळीं देणे ॥ देहाचें मरणें तेवीं देखे ॥ ६९ ॥ छाया पालखीं बैसावी ॥ ऐसें कोणी चिंतीना जीवीं ॥ तैशी देहाची पदवी यावी ॥ हा नुठी सद्भावी लोभ भक्तां ॥ ६७० ॥ देहासि आलिया नानाविपत्ती ॥ भक्तां खेदू नुमटे चित्तीं ॥ जेवीं आकाश शस्त्रघातीं ॥ नये काकुळती तैसे ते ॥ ७१ ॥ ज[4]ननीजठरीं देहो जन्मला ॥ भक्त न ह्मणे मी जन्मा आला ॥ रवि थिल्लरीं[5] प्रतिबिंबला ॥ थिल्लर मी जाहला कदा नह्मणे ॥ ७२ ॥ सायंप्रातः सूर्य प्रकाशे ॥ नभीं गंधर्वनगर आभासे ॥ देह प्रतिपाळीं अदृष्ट तैसें ॥ म्या केलें ऐसें स्फुरेना ॥ ७३ ॥ भक्तदेहासि येतां मरण ॥ भक्तां हेतुरहित गुरूचें स्मरण ॥ यालागीं देह निमाल्या आपण ॥ नमरतां पूर्ण पूर्णत्वें उरे ॥ ७४ ॥ थिल्लरा समूळ नाश जाहला ॥ तरी रवि नह्मणे मी निमाला ॥ तेवीं देह गेलिया भक्त उरला ॥ सद्रूपें संचला हरिस्मरणें ॥ ७५ ॥ आधीं काये सर्प माराश ॥ मग दोरातें दोरू करावा ॥ तो नपालटतां निजगौरवा ॥ दोरूचि अघवा दोरूपें ॥ ७६ ॥ तेवीं हरिभक्तां देहाचा अभावो ॥ माकाळ कवणा घालील घावो ॥ आतां आह्मी ते आह्मीच आहों ॥ आह्मीपण वावो आमुचेनि आह्मा ॥ ७७ ॥ इत्यादिसंसार देहधर्म ॥ ज्यासी स्पर्शों नशके कर्माकर्म ॥ मोहो कदा नव्हेचि भवभ्रम ॥ तो भक्तोत्तम प्रधानत्वें ॥ ७८ ॥ राया आणिकही एक खूण ॥ तुज मी सांगेन संपूर्ण ॥ ज्याचा काम होय नारायण ॥ तें भक्तलक्षण अवधारी[6] ॥ ७९ ॥

श्लोक ॥ ॥ न कामकर्मबीजानां यस्य चेतसि संभवः ॥ वासुदेवैकनिलयः स वै भागवत्तोत्तमः ॥ ५० ॥ ॥ टीका ॥ ॥ हृदयीं चिंतितां आत्माराम ॥ तद्रूप जाहला हृदयींचा काम ॥ त्यासि सर्वकर्मीं पुरुषोत्तम ॥ देवदेवोत्तम तुष्टोनि प्रगटे ॥ ६८० ॥ तेथें ज्याज्या वासना हृदयवासी ॥ त्याही पडल्या हरिसुखासी ॥ एवं वासना जडल्या हरिरूपाशीं ॥ हरि आश्रयो त्यांसी दृढ जाहला ॥ ८१ ॥

---

१ परमेश्वर. २ आपल्या भजनानें. ३ डळमळत नाही. ४ आईच्या पोटांत. ५ थोड्या पाण्यांत. ६ ऐक.

तेथें जोजो भक्तांसि काम ॥ तोतो होय आत्माराम ॥ वासनेचा निजसंभ्रम ॥ आत्माराम होऊनि ठेला ॥ ८२ ॥ जगीं हरिभक्ति उत्तमोत्तम ॥ भक्तकामेंचि करी निष्काम ॥ चाळितां वासनाअनुक्रम ॥ निर्वासना ब्रह्म प्रकाशे स्वयें ॥ ८३ ॥ ग्रासोग्रासीं रामस्मरण ॥ तें अन्नचि होय पूर्णब्रह्म ॥ भक्त भोगी मुक्तपण ॥ यारीतीं जाण विदेहा ॥ ८४ ॥ ऐसा जो निष्कामनिष्ठ ॥ तोचि भागवतांमाजी श्रेष्ठ ॥ त्यासीच प्रधानत्वपट ॥ जाण तो वरिष्ठ उत्तमत्वें ॥ ८५ ॥ उत्तम भक्त कैसे विचरती[1] ॥ त्या भक्तांची विचरणस्थिती ॥ ते सांगीतली राया तुजप्रती ॥ यथानिगुती तींश्लोकीं ॥ ८६ ॥ उत्तभक्त कोणलिंगेंसी ॥ आवडते जाहले भगवंतासी ॥ तें लक्षण सांगावयासी ॥ अतिउल्हासीं[2] हरि बोले ॥ ८७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ न यस्य जन्मकर्मभ्यां न वर्णाश्रमजातिभिः ॥ सज्जतेऽस्मिन्नहंभावो देहे वै स हरेः प्रियः ॥ ५१ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्राकृतामधीं देहाभिमान ॥ तेणें गुरुकृपा करितां भजन ॥ पालटे अभिमानाचें चिन्ह ॥ अहं नारायणभावनायुक्त ॥ ८८ ॥ एवं देह हें समूळ मिथ्या ॥ अहं नारायण हें तत्वतां ॥ ऐशी भावना दृष्ट भावितां ॥ ते भावनाआतौता अभिमान विरे ॥ ८९ ॥ अभिमान हरिचरणीं लीन ॥ तेव्हां भक्त होय निरभिमान ॥ तेंचि निरहंतेचें लक्षण ॥ हरि संपूर्ण सांगत ॥ ६९० ॥ निरहंकाराचें लक्षणें ॥ तो जन्मोनि मी जन्मलों न ह्मणे ॥ सुवर्णाचीं केलीं शुनें[3] ॥ तरी सोनें श्वान होनेणे[4] तदाकारें असतां ॥ ९१ ॥ तेवीं जन्मादि अहंभावो ॥ उत्तमभक्तां नाहीं पहाहो ॥ कर्मक्रियेचा निर्वाहो ॥ अहंकर्ता स्वयमेवो मानीना[5] ॥ ९२ ॥ तो कर्म करी परी न ह्मणे मी कर्ता ॥ जेवीं गगनीं[6] असोनि सविता[7] ॥ अग्नि उपजवी सूर्यकांता ॥ तेवीं करोनि अकर्ता निजात्मदृष्टीं ॥ ९३ ॥ सूर्यें सूर्यकांतीं अग्निसंग ॥ तेणें होतु यागकां दाघ ॥ बाधूं नशके सूर्याचें अंग ॥ तेवीं हा चांग करूनि अकर्ता ॥ ९४ ॥ अचेतन[8] लोह चुंबकें चळे ॥ लोहकर्में चुंबक नमैळे ॥ तेवीं हा कर्मेंकरूनि सकळें ॥ अनहंकृतिबळें[9] अकर्ता ॥ ९५ ॥ देहींचीं कर्में अदृष्टें होती ॥ मी कर्ता ह्मणतां तीं बाधती ॥ भक्त सर्वकर्में अनहंकृती ॥ परमात्मप्रतीती[10] भजनयोगें ॥ ९६ ॥ एवं देहींचीं कर्में निपजतां ॥ पूर्ण प्रतीती भक्त अकर्ता ॥ कर्माकर्मांची अवस्था ॥ नेघे तो माथां अनहंकृती ॥ ९७ ॥ जरी जाहला उत्तमवर्ण ॥ तरी तो नह्मणे मी ब्राह्मण ॥ स्फटिक कुंकुमें दिसे रक्तवर्ण ॥ मी लोहि वा पूर्ण स्फटिक न ह्मणे ॥ ९८ ॥ ज्यासि नाहीं देहाभिमान ॥ तो हातीं नधरी देहाचा वर्ण ॥ तैसाचि आश्रमाचा अभिमान ॥ भक्त सज्ञान नधरी कदा ॥ ९९ ॥ अंगीं बाणला तो संन्यासु ॥ परी तो न ह्मणे मी परमहंसु ॥ जेवीं नटाअंगीं राजविलासु ॥ तो राजउल्हासु नट न मानी ॥ ७०० ॥ तेवीं आश्रमादिअवस्था ॥ भक्त नधरीच

---

१ हिंडतो. २ फारसंतोषानें. ३ कुत्री. ४ होऊं जाणत नाही. ५ जाणीत नाही. ६ आकाशांत. ७ सूर्य. ८ जड. ९ अहंकार नसल्यानें. १० ईश्वराचा साक्षात्कार.

सर्वथा ॥ तैशीच जातीचीहीं कथा ॥ नघे माथां भक्तोत्तम ॥ १ ॥ जाति उंच नीच असंख्य ॥ परी तो ह्मणे हे माझीचि एक ॥ जेवीं गंगातीरीं गांव अनेक ॥ परी गंगा माझा एक गांव ह्मणे ॥ २ ॥ तेवीं जन्म कर्म वर्णाश्रम जाती ॥ पूर्णभक्त हातीं नधरिती ॥ चहूंदेहांची[1] अहंकृती ॥ स्वप्नींही नधरिती हरिभक्त ॥ ३ ॥ आशंका ॥ ॥ तरी काय वर्णाश्रम जाती ॥ भक्त निःशेष सांडिती ॥ त्यांत असोनि नाहीं अहंकृती ॥ ते हे उपपत्ती[2] बोलिलों राया ॥ ४ ॥ तो जेव्हां पावे जन्मप्राप्ती ॥ तेव्हां त्यासवें नाहीं वर्णाश्रमजाती ॥ जन्मअभिमानें माथां घेती ॥ हे कुळ गोत जातीपैं माझी ॥ ५ ॥ ऐशा नाथिल्या अहंकृती ॥ ब्रह्मादिक गुंतले ठाती ॥ वाढवितां वर्णाश्रमजाती ॥ सज्ञान गुंतती निजाभिमानें ॥ ६ ॥ ऐशी अहंतेची[3] अतिदुर्धरगती ॥ ब्रह्मादिकां नव्हे निवृत्ती ॥ सोडूंनेणे गा कल्पांतीं ॥ सज्ञान ठकिजेती निजाभिमानें ॥ ७ ॥ येथें भक्तांच्या भाविकस्थिती ॥ अभिमान तुटे भगवद्भक्ती ॥ ते निरभिमान भक्तस्थिती ॥ राया तुजप्रती दाविली स्वयें ॥ ८ ॥ समूळ देहाभिमान झडे ॥ तो देहीचि देवासि आवडे ॥ ते भक्त जाण वाडेकोडे ॥ लडवाळे हरीचे ॥ ९ ॥ ते जेंजें मागती कौतुकें ॥ तो देवोचि होय तितुकें ॥ त्याचेनि परमसंतोषे ॥ देव सुखावे सुखें दोंदिल होये ॥ ७१० ॥ जो जिकडेतिकडे जाये ॥ देव निजांगे तेउताठाये ॥ भक्त जेउती वास पाये ॥ देव तेते होय पदार्थ ॥ ११ ॥ त्यासि झणी कोणाची दृष्टी लागे ॥ यालागीं देवो त्यापुढें मागें ॥ त्यासभोंवता सर्वांगें ॥ भक्तीच्या पांगें भुलला असे ॥ १२ ॥ निरभिमानाचेनि नावें ॥ देव निजांगें करी आघवें ॥ जेवि कां तान्हयाचेनि जीवें ॥ जिवें भावें निजजननी[4] ॥ १३ ॥ एवं राखतां निजभक्तांसी ॥ तरी देव धाके निजमानसीं ॥ हा जरी आला निजऐक्यासी ॥ तरी हे प्रतीती कोणासी मग करावी ॥ १४ ॥ कोणासि पाहों कृपादृष्टी ॥ कोणापें सांगों निजगोष्टी[5] ॥ कोणासि क्षेम देउं मिठी ॥ ऐशी आवडी मोठी प्रेमाची ॥ १५ ॥ याकाकुळती श्रीअनंतु ॥ ऐक्यभावें करी निजभक्तु ॥ मग देवो भक्त दोहींआंतु ॥ देवचि नांदतु स्वानंदे ॥ १६ ॥ एवं आपुली आपणभक्ती ॥ करीतसे अनन्यप्रीतीं ॥ हेंचि निरूपण वेदांतीं ॥ अद्वैतभक्ती यानाव ॥ १७ ॥ त्यासीच हों भुजीं अलिंगितां ॥ हांव नबाणेचि भगवंता ॥ मग रिघोनियां आतौता ॥ परमार्थता आलिंगी ॥ १८ ॥ ऐसें खेवाचे मीस करी ॥ तेणें भक्त आणि आपणाभीतरीं ॥ मग आपण त्यांआंतबाहेरीं ॥ अतिप्रीतिवरी कोंदाटे[6] ॥ १९ ॥ नवल आवडीचा निर्वाहो ॥ झणींयासि लागे काळाचा घावो ॥ यालागीं निजभक्तांचा[7] देहो ॥ देवाधिदेवो स्वयें होये ॥ ७२० ॥ ऐसा जो पढियंता परम ॥ तो भागवतांमाजी भक्तोत्तम ॥ यापरी भागवतधर्म ॥ पुरुषोत्तम वश्यकरी ॥ २१ ॥ ऐशिया उत्तभक्ता ॥ भेदाची समूळ नुरे[8] वार्ता ॥

---

१ स्थूल, सूक्ष्म, कारण महाकारण ( चारदेहाची. ) २ युक्ति. ३ अहंकाराची. ४ आपली आई. ५ आपली गोष्ट. ६ भरे. ७ आपल्या भक्तांचे शरीर. ८ उरत नाही.

तेचि भक्त अभेदकथा ॥ ऐक नृपनाथा सांगेन ॥ २२ ॥ ॥श्लोक॥ ॥ नयस्य स्वः परइति वित्तेष्वात्मनि वाभिदा ॥ सर्वभूतसमः शांतः स वै भागवतोत्तमः ॥ ५२ ॥ ॥ टीका ॥ ॥ अद्वैतभजनाचे वोजें ॥ मी माझें तूं आणि तुझें ॥ ज्यासि नुरेचि सहजनिजें ॥ तो भक्त मानिजे उत्तमत्वें ॥२३॥ यापरी ज्याचे चित्ताचे ठायीं ॥ भेदू निःशेष उरला नाहीं ॥ तेथें माझें तुझें हें जें कांहीं ॥ तें निंमालें पाही जेथिंच्या तेथें ॥२४ ॥ जेवीं अग्नीशीं जेंजें टेंके ॥ तेंतें अग्नीचि होऊनि ठाके ॥ तेवीं अभेदभक्त जेंजें देखे ॥ तेंतें यथासुखें स्वरूप होये ॥ २५ ॥ निंजवित्त आणिकापाशीं देतां ॥ आँवांकू निपजे त्याचिया चित्ता ॥ नदेखे पारकेपणाची वार्ता ॥ विकल्प घालितां तरी उपजेना ॥ २६ ॥ डावेहातींचें पदार्था ॥ उजवेहातीं स्वयें देतां ॥ येथें कोण देता घेता ॥ तेवीं एकात्मता सर्वभूतीं ॥२७॥ आपणा सकट सर्वदेहीं ॥ भक्तां भगवंतावांचूनि नाहीं ॥ यालागीं शांति त्याचेठायीं ॥ स्वानंदें पाही निःशंक नांदे ॥ २८ ॥ ऐशिया निजसमशांतीं ॥ भगवद्भक्त क्रीडा करिती ॥ यालागीं उत्तमत्वाची प्राप्ती ॥ सुँनिश्चितीं पावले ॥ २९ ॥ हरिभक्तांची निरपेक्षता ॥ ऐक सांगेन नृपनाथा ॥ उत्तमभक्तांची सांगतां कथा ॥ अँतिउल्हासता हरीसी ॥ ७३० ॥ निरपेक्ष तो मुख्यभक्त ॥ निरपेक्ष तो अतिविरक्त ॥ निरपेक्ष तो नित्यमुक्त ॥ सत्य भगवंत निरपेक्षी ॥ ३१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ त्रिभुवनविभवहेतवेऽप्यकुंठस्मृतिरजितात्मसुरादिभिर्विमृग्यात् ॥ न चलति भगवत्पदारविंदाल्लवनिमिषार्धमपि यः स वैष्णवाग्र्यः ॥ ५३ ॥ ॥ टीका ॥ सप्रेमभावें करितां भक्ती ॥ हरिचरणीं ठेविली चित्तवृत्ती ॥ निंजस्वार्थाचिये स्थिती ॥ अतिप्रीती निजनिष्ठा ॥ ३२ ॥ तेथें त्रिलोकीच्या सकलसंपत्ती ॥ कर जोडूनि वरू प्रार्थिती ॥ तरी क्षणार्ध नकाढी चित्तवृत्ती ॥ भक्त परमार्थीं अतिलोभी ॥ ३३ ॥ क्षणार्घ चित्तवृत्ती काढितां ॥ त्रिँभुवनविभव ये हातां ॥ एवढिया सांडूनि स्वार्था ॥ ह्मणाल हरिभक्तां लाभ कोण ॥ ३४ ॥ हरिचरणीं अपरोक्षस्थिती ॥ तेथील क्षणार्धाची जे प्राप्ती ॥ त्यापुढें त्रिभुवनविभवसंपत्ती ॥ भक्त मानिती तॄणप्राय ॥ ३५ ॥ सकळजगाचा स्रंजिता ॥ ब्रह्मा पितामहो तत्त्वतां ॥ त्रैलोक्यराज्यसमर्थता ॥ वोळंगे वस्तुतां अंगणीं ज्याचे ॥ ३६ ॥ त्रिभुवनवैभवाचे माथा ॥ ब्रह्मपदाची समर्थता ॥ तो ब्रह्माही निजस्वार्था ॥ होय गंवंसिता हरिचरण ॥ ३७ ॥ त्यागोनि ब्रह्मवैभवसंपत्ती ॥ ब्रह्मा बैंसोनि एकांतीं ॥ अहर्निशीं हरिचरण चिंतीं ॥ तरी त्याप्राप्ती सैंहसा नव्हे ॥३८॥ सहसा नैंपवे हरिचरण ॥ यालागीं ब्रह्मा साभिमान ॥ तेणें अभिमानेंचि जाण ॥ नेलीं चोरून गोपाल वत्सें ॥३९॥ तेथें नकष्टतां आपण ॥

---

१ नाहीसे झाले. २ आपले द्रव्य. ३ टेका. ४ फार निश्चयानें. ५ फार संतोष. ६ आपल्या परमार्थाची. ७ तीनलोकांचे ऐश्वर्य. ८ गवता प्रमाणें. ९ उत्पत्ति करणारा. १० आश्रय करणारा. ११ लागलीच. १२ पावत नाही.

नमोडतां कृष्णपण ॥ गोपाळ वत्सें जाहला संपूर्ण ॥ पूर्णत्वें पूर्ण स्वलीला ॥ ७४० ॥ अगाधहरिलीला पूर्ण ॥ पाहतां वेडावलें ब्रह्मपण ॥ तेव्हां सांडोनि पदाभिमान ॥ अनन्यशरण हरिचरणीं ॥ ४१ ॥ कैलासराणा शूलपाणी ॥ ब्रह्मा लागे ज्याचे चरणीं ॥ तोही निज राज्य सांडोनी ॥ महाश्मशानीं हरिचरण चिंती ॥ ४२ ॥ कौपीनभस्मजटाधारी ॥ चरणोदक धरोनि शिरीं ॥ हरिचरण हृदयामाझारी ॥ शिव निरंतरी चिंतित ॥ ४३ ॥ एवं ब्रह्मा आणि शंकर ॥ चरणाचे नपवती पार ॥ तेथें त्रैलोक्यवैभव थोर ॥ मानी तो पामर अतिमंदभाग्य ॥ ४४ ॥ हरिचरणक्षणार्धप्राप्ती ॥ त्रैलोक्यराज्यसंपत्ती ॥ भक्त ओंवाळूनि सांडिती ॥ जाण निश्चितीं निंबलोण ॥ ४५ ॥ हरिचरणसारामृतगोडी ॥ क्षणार्ध जैं जोडे जोडी ॥ तैं त्रैलोक्यवैभवाच्या कोडी ॥ करी कुरवंडी निजभक्तभावें ॥४६॥ एवं हरिचरणापरतें ॥ सारामृत नाहीं येथें ॥ यालागीं चित्तें[1] वित्तें[2] जीवितें ॥ जडले सुनिश्चितें चरणारविंदीं ॥ ४७ ॥ निमिषार्ध त्रुटि लव क्षण ॥ जे नसोडिती हरिचरण ॥ ते वैष्णवांमाजी अग्रगण ॥ राया ते जाण उत्तमभक्त ॥ ४८ ॥ जे त्रिभुवनवैभवभोग[3] भोगिती ॥ तेही पावले अनुतापवृत्ती ॥ त्यांच्या तापाची निजनिवृत्ती ॥ हरिचरणप्राप्ती तें ऐक ॥ ४९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भगवत उरुविक्रमांघ्रिशाखानखमणिचंद्रिकया निरस्ततापे ॥ हृदि कथमुपसीदतां पुनः स प्रभवति चंद्र इवोदितेऽर्कतापः ॥ ५४ ॥ ॥ टीका ॥ ॥ थोर हरीचा पराक्रम ॥ पदें त्रैलोक्या आवरी त्रिविक्रम ॥ ब्रह्मांड भेदोनि पदद्रुम[4] ॥ वाढविला परमसामर्थ्यें ॥ ७५० ॥ ते पदद्रुमींचिया दशशाखा ॥ त्यांचिया दशधा दशांगुलिका ॥ अग्रीं अग्रफळचंद्रिका ॥ नखमणी देखा लखलखित ॥ ५१ ॥ ते नखचंद्रिकेचे चंद्रकांत ॥ चरणचंद्रामृतें नित्य स्रवत ॥ भक्तचकोर ते सेवित ॥ स्वानंदतृप्त[5] सर्वदा ॥ ५२ ॥ त्यांसि कामादित्रिविधतापप्राप्ती ॥ सर्वदा बाधूं नशके पुढती ॥ जेवीं सूर्याची संतप्तदीप्ती ॥ चंद्रबिंबा आंतौती[6] कदा नरिघे ॥ ५३ ॥ जे हरिचरणचंद्रचकोर ॥ स्वप्नींही संसारताप नये त्यांसमोर ॥ ऐशी चरणमहिमा अपार ॥ हरिमुनीश्वर हर्षें वर्णी ॥ ५४ ॥ देहे वै स हरेः प्रियः ॥ येणें श्लोकें गा विदेहा ॥ दाविली भक्ति लिंगक्रिया ॥ जाण तूं राया सुनिश्चित ॥ ५० ॥ न यस्य स्वः पर इति ॥ येणें त्याची धर्मस्थिती ॥ राया सांगीतली तुजप्रती ॥ यथानिगुतीं यथार्थ ॥५६॥ यादृश ह्मणिजे कैसे असती ॥ भगवद्भजनें स्वानंदतृप्ती ॥ त्रिविधतापांची निवृत्ती[7] ॥ करोनि असती हरिभक्त ॥ ५७ ॥ आतां त्यांची बोलती परी ॥ नामें गर्जती निरंतरीं ॥ तेचि ते संक्षेपाकारीं ॥ उपसंहारीं हरि सांगे ॥ ५८ ॥ सकळलक्षणांची सारस्थिती ॥ प्रेमळाची परमप्रीती ॥ उल्लंघूं नशके श्रीपती ॥ तेही श्लोकार्थीं हरि सांगे ॥५९॥ ॥ श्लोक ॥ ॥ विसृजति हृदयं न यस्य साक्षाद्धरिरवशाभिहितोप्यघौघ

---

१ मनानें. २ धनानें. ३ तीनलोकांतल्या ऐश्वर्याचे भोग. ४ पाद हाच वृक्ष. ५ ब्रह्मानंदानें संतुष्ट. ६ आंत. ७ नाश.

नाशः ॥ प्रणयरशनया धृतांघ्रिपद्मः स भवति भागवतप्रधान उक्तः ॥ ५५ ॥ ॥ इतिश्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे नारदवसुदेवसंवादे द्वितीयोध्यायः ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ॥ [1]अवचटें तोंडा आल्या हरी ॥ सकळ पातकें संहारी ॥ तें हरिनाम निरंतरी ॥ जे निजगजरीं गर्जती ॥ ७६० ॥ ऐसें ज्यांचे जिव्हेवरी ॥ नाम नाचे निरंतरी ॥ ते धन्यधन्य संसारीं ॥ स्वानंदें हरी गर्जतु ॥ ६१ ॥ सप्रेमसद्रावें संपूर्ण ॥ नित्य करितां नामस्मरण ॥ वृत्ति पालटती आपण ॥ तेंही लक्षण ऐक राया ॥ ६२ ॥ नामासरिसाच हरी ॥ रिघे हृदयामाझारी ॥ तेणें धाकें अभ्यंतरीं ॥ होंलागे पुरी हृदयशुद्धी ॥ ६३ ॥ तेव्हां प्रचंड सांडोनि वासना ॥ जडो नठाके जनार्दना ॥ अहंकार सांडोनि अहंपणा ॥ सोहंसदनामाजि रिघे ॥ ६४ ॥ चित्त विसरोनि चित्ता ॥ जडोनि ठाके भगवंता ॥ मनाची मोडली मनोगता ॥ संकल्पविकल्पता करूं नेणे ॥ ६५ ॥ कृतनिश्चयेंसी बुद्धी ॥ होऊ नठाके समाधी ॥ ऐशी देखोनी हृदयशुद्धी ॥ तेथोनि त्रिशुद्धी ननिघे हरी ॥ ६६ ॥ हरिनामप्रेमप्रीतीवरी ॥ हृदयीं रिघाला जो हरी ॥ तो निघों विसरे बाहेरी ॥ भक्तप्रीति करी कृपाळू ॥ ६७ ॥ भक्तप्रेमप्रीतीची दोरी ॥ तेणें चरण धरोनि निर्धारीं ॥ निजहृदयीं बांधिला हरी ॥ तो कैशापरी निघेल ॥ ६८ ॥ भगवंत महाअतुबळी ॥ अदटदैत्यांतें निर्दळी ॥ तो कोंडिला हृदयकमळीं ॥ हे गोष्टी समूळीं मिथ्या ह्मणती ॥ ६९ ॥ जो शुष्ककाष्ठ[2] स्वयें कोरी ॥ तो कोंवळ्या कमळामाझारी ॥ भ्रमर गुंतला प्रीतीवरी ॥ केसरामाझारी कुचंबोंनेदी ॥ ७७० ॥ तेवीं भक्तीचिया प्रेमप्रीती ॥ हृदयीं कोंडिला श्रीपती ॥ तेथ खुंटल्या सामर्थ्यशक्ती ॥ भावार्थाप्रती बळ नचले ॥ ७१ ॥ बाळ पाँलवीं[3] घाली पिळा ॥ तेणें बाप राहे थोकला ॥ तरी काय तो निर्बळ जाहला ॥ नातोस्नेहें भुलला ढळेना ॥ ७२ ॥ तेवीं निजभक्तलळेवाड ॥ त्याचें प्रेम अत्यंत गोड ॥ निघावयाची विसरोनि चाड ॥ हृदयीं सुरवाड हरि मानी ॥ ७३ ॥ ऐसें ज्याचें अंतःकरण ॥ हरि नसांडी स्वयें आपण ॥ तैसे हरीचे श्रीचरण ॥ जो सांडीना पूर्ण प्रेमभावें ॥ ७४ ॥ हरीचेठायीं प्रीती ज्या जैशी ॥ हरीची प्रीती त्यासी तैसी ॥ जे अँनन्य[4] हरीपाशीं ॥ हरि त्यांसी अनन्य सदा ॥ ७५ ॥ ऐसे जे हरिचरणीं अनन्य ॥ तेचि भक्तांमाजी प्रँधान[5] ॥ वैष्णवांत ते अग्रगण ॥ राया ते जाण भागवतोत्तम ॥ ७६ ॥ गौण करूनि चारी मुक्ती ॥ जगीं श्रेष्ठ भगवद्भक्ती ॥ त्या उत्तमभक्तांची स्थिती ॥ संक्षेपें तुजप्रती बोलिलों ॥ ७७ ॥ पूर्णभक्तीचें निरूपण ॥ सांगतां वेदा पडलें मौन ॥ सँहस्रमुखाची[6] जिव्हा पूर्ण ॥ थकोनि जाण थोंटावे ॥ ७८ ॥ ते भक्तीची एकांशता ॥ तुज म्यां सांगीतली जी कथा ॥ यावरी परिपूर्णता ॥ राया स्वभावतां तूं जाणशी ॥ ७९ ॥ हरीसारिखा रसाळ वक्ता ॥ सांगतां उत्तमभक्तकथा ॥ त

---

१ अवचित. २ वाळलेले लाकूड. ३ पदरांस. ४ एकभक्त. ५ श्रेष्ठ. ६ शेषाची

णवचन ॥ यालागीं ब्रह्मण्यदेवो पूर्ण ॥ वेद वंदिजन[1] व[illegible]ाती ॥ ९१ ॥ ब्राह्मणरूपें स्वयें श्रीहरी ॥ यालागीं ब्राह्मणांचा कैवारी[2] ॥ कुलक्षयो जाहला जरी ॥ तरी द्विजांवरी कोपेना[3] ॥ ९२ ॥ एकोनि ब्राह्मणांचा शापू ॥ न धरी मोहाचा खटाटोपू ॥ ह्मणे सिद्धि गेला कृत[4] संकल्पू ॥ कुलक्षयानुरूपू संतोषें ॥ ९३ ॥ यापरी श्रीगोविंदू ॥ काळरूपी मानी आनंदू ॥ कुलक्षयाचा क्षितिबाधू ॥ अल्पही संबंधू धरीना ॥ ९४ ॥ पूर्ण संतोष श्रीकृष्णनाथा ॥ पुढिले अध्यायीं ज्ञानकथा ॥ अतिरसाळ स्वानंदता[5] ॥ अवधान श्रोतां मज द्यावें ॥ ९५ ॥ जेथें नारद आणि वसुदेवा ॥ संवाद होईल सुहावा[6] ॥ जनक आणि आर्षभदेवा ॥ प्रश्नोत्तरीं जीवा स्वानंदू दाटे ॥ ९६ ॥ हे रसाळ ब्रह्मज्ञानमातू[7] ॥ चाखवीन निजपरमार्थू ॥ एका जनार्दना विनवितू[8] ॥ श्रोते कृपा करितू अर्थावबोधें ॥ ३९७ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे परमहंससंहितायां एकाकारटीकायां विप्रशापो नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ॥ अध्याय ॥ १ ॥ ॥ ओंव्या ॥ ॥ ३९७ ॥ ॥ मूळ० ॥ २४ ॥ ॥ मिळूनएकंदरसंख्या ॥ ४२१ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ शुभंभवतु ॥ ॥ छ ॥

---

[1] स्तुति करणारे. [2] पक्षपाती. [3] रागावत नाहीं. [4] केलेला संकल्प. [5] ब्रह्मानंद. [6] सुखाचा. [7] ब्रह्मज्ञानाची गोष्ट. [8] विनंति करितो.

म ॥

रणं व्यधात

म. न. वि वि.

# अध्याय ३ रा.



श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ओंनमोजी श्रीगुरुराया ॥ ह्मणोनि सद्भावें लागों पायां ॥ तंव मीपण गेलें वायां ॥ घेऊनियां तूंपणा ॥१॥ नवल पायांचें कठिणपण ॥ वज्रें न तुटे लिंगदेह जाण ॥ त्याचेंही केलें चूर्ण ॥ अवचितां चरण लागतां ॥२॥ पायीं लागतांचि बळी ॥ तो त्वां घातला पाताळीं ॥ पायीं लवणासुरा रवंदळी ॥ आंतुर्बळी निर्दाळितां ॥३॥ पाय अतिशयेंसि तिखें ॥ काळियासि लागतां देख ॥ त्याचें शोषोनियां विखें ॥ केला निर्विख निःशेष ॥४॥ पाय अतिशय दारुण ॥ शकटासि लागतां जाण ॥ त्याचें तुटलें गुणबंधन ॥ गमनागमन खुंटलें ॥५॥ पायांचा धाक सकळां ॥ पायें उद्धरिली अहल्या शिळा ॥ पायमृगेंद्र देखतां डोळां ॥ थित्या मुकला संसारा ॥६॥ आवडीं पाय चिंतिती दास ॥ त्यांच्या मनुष्यपणा होय नाश ॥ पायें यमलोक पाडिला वोस ॥ पायें जीवास जीवनाश ॥७॥ पायवंणी शिरीं धरिलें शिवें ॥ तो जगातें घेतु उठिला जीवें ॥ त्यासि राख लाविली जीवें भावें ॥ शेखीं नागवा भंवे श्मशानीं ॥८॥ ऐसें पायांचें करणें ॥ शिवासि उरोंनेदी शिवपणें ॥ या जीवासि कैंचें जिवें जिणें ॥ मानितें मानणें उरोंनेदी ॥९॥ ऐसा जाणोनियां भावो ॥ एका एकपणीं ठेला ठावो ॥ तेथेंही पायांचा नवलावो ॥ केला एकपण वांवो वचनमात्रें ॥१०॥ तेथें कवणें कवणासि बाणणें ॥ कवणें कवणासि विनवणें ॥ कवणें कवणासि देणें घेणें ॥ मींतूंचे जिणें जिवें गेलें ॥११॥ तेव्हां देव आणि भक्त ॥ जाहलासि मा तूंचि तूं ॥ तेथें मीपणाची मातू ॥ कोणें कोणां तू मिरवावी ॥१२॥ ऐशिया पदीं वाऊनि तत्वतां ॥ करवितासि ग्रंथकथा ॥ तेव्हां माझें नाव कविकर्त्ता ॥ तूंचि वस्तुतां सद्गुरुराया ॥१३॥ माझें नामरूप आघवें एक ॥ तेंही जनार्दनू झाला देख ॥ ऐसें एकपणाचें कौतुक ॥ आत्यंतिक श्रीजनार्दना ॥१४॥ तेणें कौतुकेंचि आतां ॥ माझेंनि नावें कविकर्त्ता ॥ होऊनि स्वयें रची ग्रंथा ॥ यथार्थता निजबोधें ॥१५॥ तेथें द्वितीयाध्यायाचे अंतीं ॥ दुस्तर माया उत्तमभक्ती ॥ निरसोनियां भजनस्थितीं ॥ भगवत्प्राप्ती पावले ॥१६॥ कैशी दुस्तर हरीची माया ॥ पुसावया सादरता झाली राया ॥ अत्यादरें करोनियां ॥ ह्मणे मुनिवर्या अवधारी ॥१७॥ ॥ श्लोक ॥ ॥ राजोवाच ॥ ॥ परस्य विष्णोरीशस्य मायिनामपि मोहिनीम् ॥ मायां वेदितुमिच्छामो भगवंतो ब्रुवंतु नः ॥१॥ ॥ टीका ॥ ॥ तृतीयाध्यायीं निरूपण ॥ राजा करील चारी प्रश्न ॥ माया आणि तिचें तरण ॥ ब्रह्म तें कोण कर्म तें कैसें ॥ ॥१८॥ तेथें प्रथम मायेचा प्रश्न ॥ रायें पुशिला आपण ॥ तेचि अर्थीचें निरूपण ॥ मायेचें लक्षण राजा बोले ॥१९॥ सुरांमाजी

---

१ सद्भक्तीनें. २ अकस्मात. ३ नाश. ४ पराक्रमी. ५ तिखट. ६ विष. ७ गाड्यास. ८ जाणे येणे. ९ ओसाड. १० पायाचे पाणि. ११ नवल. १२ व्यर्थ. १३ प्रार्थना करणे. १४ वाचणे. १५ वावटळून. १६ खरेपणा. १७ नाहींसी करून. १८ कथन. १९ तरून जाणे.

श्रेष्ठ हृषीकेशी ॥ ब्रह्मादि शिवू वंदिती ज्यासी ॥ त्या श्रीविष्णूची मायाकैशी ॥ जे मायिकांशी व्यामोही[1] ॥ २० ॥ कैशी मायिकां[2] मा
या मोही येथें ॥ ब्रह्मा शिवू मानिती चित्तें ॥ आह्मी पूर्णमायेचे नियंते[3] ॥ शेखी माया तयांते निजमोहें[4] मोही ॥ २१ ॥ ब्रह्मा मोहिला
शिवाचे लग्नीं ॥ वीर्य द्रवे पार्वती देखोनी ॥ महादेव महाज्ञानी ॥ देखतांचि मोहिनी निजवीर्य द्रवलें ॥ २२ ॥ जे सज्ञाना छळी लव[5]
लाह्या ॥ जीतें श्रुति ह्मणती अजया[6] ॥ ते हरीची दुर्धर माया ॥ विवंचूनियां[7] मज सांगा ॥ २३ ॥ ह्मणाल दुर्धर मायेची बाधकता ॥ ते
बाधूं न शके अनन्यभक्तां ॥ तुवांही भजावें भगवंता ॥ मिथ्या मायेची कथा कां पुसशी ॥ २४ ॥ तेंचिअर्थीचें निरूपण ॥ राजा सा
क्षेपेंसि आपण ॥ मुनीचें ऐकावया गुह्य ज्ञान ॥ विदग्ध प्रश्न आदरें पुसत ॥ २५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नानुतृप्येजुषन्युष्मद्वचोहरि
कथामृतम् ॥ संसारतापनिस्तप्तो मर्त्यस्तत्तापभेषजम् ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ॥ सेवितां तुमचें वचनामृत[8] ॥ पुरे नह्मणे माझें चित्त ॥ आस्वा[9]
दितां शब्दीं शब्दार्थ ॥ श्रवण क्षुधार्त्त[10] अधिक जाहले ॥ २६ ॥ अद्भुत कथा अतिसुरस ॥ श्रवणीं[11] श्रवणा अधिक सोस ॥ रसना[12] ह्मणे
हा अतिगोड रस ॥ डोळ्यां उल्हास हें अपूर्वरूप ॥ २७ ॥ घ्राण ह्मणे हा निजगंधू ॥ सुमनीं सुमना अतिसुगंधू ॥ वाचा ह्मणे हा श
ब्दू ॥ परमानंदू अनुवादे ॥ २८ ॥ नवल निरूपणाचा मावा[13] ॥ भुजस्फुरण ये द्यावया खेवा ॥ आलिंगन जीवीच्या जीवा ॥ निजस
द्भावा होतसे ॥ २९ ॥ तुमच्या कथा सुनिश्चितीं ॥ दिव्यौषधी भवरोग[14] छेदिती ॥ त्रिविधतापांची निवृत्ती[15] ॥ जडमूढ प्राकृती ऐकतां भा
वें ॥ ३० ॥ राजा परमार्थ साकांक्ष ॥ देखोनि सार्थक कथेचें लक्ष ॥ हरिधाकुटा अंतरिक्ष ॥ निरूपणीं दक्ष बोलता झाला ॥ ३१ ॥
श्लोक ॥ ॥ अंतरिक्षउवाच ॥ एभिर्भूतानि भूतात्मा महाभूतैर्महाभुज ॥ ससर्ज्जोच्चावचान्याद्यः स्वमात्रात्मप्रसिद्धये ॥ ३ ॥ ॥ टीका ॥
अंतरिक्ष ह्मणे राया ॥ तुवां पुशिली हरीची माया ॥ तो प्रश्नचि गेला वायां ॥ बोलणें नये आंधा[16] बोलकियाचे ॥ ३२ ॥ वंध्यापुत्रा
जन्मकाल ॥ राये आणविला तत्काल ॥ राशि नक्षत्र जाति कुल ॥ सांगोजातां विकल[17] योग्यता होय ॥ ३३ ॥ मृगजळाची पोहे वर
वी ॥ गंधर्वनगरीं घालावी ॥ वारा वळूनि सूत्रस्वभावीं ॥ वाती लावावी खद्योततेजें[18] ॥ ३४ ॥ निजछायेचें शिरें[19] फोडा ॥ आकाशा
ची त्वचा[20] काढा ॥ शिंपीं आंधार खरवडा ॥ बागुलाचा रगडा[21] निजशस्त्रें कीजे ॥ ३५ ॥ वांझेचे सुने पुत्र झाला ॥ तेथें भीष्मस्त्रिये[22] पा
न्हा आला ॥ तेणें पयःपानें[23] तो मातला ॥ घरभंगु केला दिगंबराचा ॥ ३६ ॥ जातीं लहान दळावा वारा ॥ अश्वशृंगें आकाश चिरा ॥

---

१ भ्रांती करिते. २ मायावीस. ३ स्वाधीन ठेवणारे. ४ आपल्या मोहाने. ५ वेगाने. ६ दुर्जया. ७ स्पष्ट करून. ८ भाषण हेंच अमृत. ९ चवीघेता. १० भुकेलेले. ११ कानांस. १२ जीभ. १३ मिठाई. १४ जन्ममरणरूपरोग. १५ नाश. १६ जमेस. १७ व्यंग. १८ काजव्याच्या तेजानें. १९ डोकें. २० साल. २१ नाश. २२ भीष्माचार्यांच्या बायकोस. २३ दूध पिण्यानें.

नपुंसकाचीं नातोंडें घरा ॥ सूर्योदयीं अंधारा लपों आलीं ॥ ३७ ॥ गुंजेचें निजतेजें दिवी ॥ हनुमंतलग्नीं[१] लावावी ॥ या सोहळियालागीं विकावी ॥ वोसंगावीं निजछाया ॥ ३८ ॥ आकाशाचीं सुमनें[२] ॥ सुवास कीं वासहीनें ॥ विवंचिती[३] जे देखणें ॥ ते मायेचें सांगणें सांगोत सुखें ॥ ३९ ॥ एवं मायेचें जें बोलणें ॥ तें सांगतांचि लाजिरवाणें ॥ नुपजत्याचें[४] श्राद्ध करणें ॥ तैशी सांगणें महामाया ॥ ४० ॥ माया ह्मणवी येणें भावें ॥ जे मी कदा विद्यमान नव्हे ॥ यालागीं अविद्या येणें नावें ॥ वेदानुभवें गर्जती शास्त्रें ॥ ४१ ॥ भ्रम तो मायेचें निजमूळ ॥ भ्रांति हेंचि फूल सोज्वळ ॥ भुली ते इचें साजुक फळ ॥ विषय रसाळ सदा फळित ॥ ४२ हे नसतेनि[५] रूपें रूपा आली ॥ सत्यासत्यें गरोदर[६] जाहली ॥ तेथें असत्याचीं पिलीं ॥ स्वयें व्याली असंख्य ॥ ४३ ॥ वासना विषयीं गुणीं ॥ गुंफिली मिरवे वेणी ॥ मीपणाच्या तरुणपणीं ॥ मदनमोहिनी चमके ॥ ४४ ॥ मृगजळींच्या मुक्ताफळीं ॥ मस्तकीं बाणली जाळी ॥ गगनाच्या चांपेकळीं ॥ मिरवे वेल्हाळी अतिसौंदर्यें ॥ ४५ ॥ रज्जुसर्प[७] माथ्याचा मणी ॥ काढूनि लेइली ते लेणीं ॥ शुक्तिकारजत[८] पैंजणी ॥ चाले रुणझुणी खळखळत ॥ ४६ ॥ शशविषाणपादुका[९] ॥ लेऊनि ते चाले देखा ॥ तिसी तो अहंकार सखा ॥ अतिनेटका ज्येष्ठपुत्र ॥ ४७ ॥ कुळविस्तारालागीं पाही ॥ ममता व्याली ठायींठायीं ॥ मोह उपजवूनि देहीं ॥ घरजांवयी त्याकेला ॥ ४८ ॥ अहंममतायोगें ॥ जग विस्तारलें अंगें ॥ स्थूळ सबळ प्रयोगें ॥ ममता निजअंगें वाढली ॥ ४९ ॥ संकल्पविकल्पांचीं कांकणें ॥ बाणोनि मन दीधलें आंदणें ॥ घालोनि त्रिगुणाचें ठाणें ॥ माया पूर्णपणें थोरावे[१०] ॥ ५० ॥ ऐशी मिथ्या मूळमाया ॥ वाढली दिसे राया ॥ ते कैसेनि ये आया[११] ॥ सांगावया अनिरूप्य ॥ ५१ ॥ संत ह्मणों तरी ते नासे ॥ असंत ह्मणोंतरी आभासे ॥ आदि असे पाठी ना असे ॥ ऐसीहि नसे निजांगें ॥ ५२ ॥ जैसें मृगजळांचें ज्ञान ॥ दिसे तरी तें मिथ्या पूर्ण ॥ तैसें आभासे भवभान[१२] ॥ ते माया जाण नृपनाथा ॥ ५३ ॥ श्रुतिशास्त्रां मायामाग ॥ पुसतां आरोगिती[१३] मूग ॥ मायेसि साचाचें अंग ॥ पाहतां चांग[१४] दिसेना ॥ ५४ ॥ मृगजळाची महानदी ॥ कोणे गिरिवरें उद्बोधी ॥ हें सांगावया नाकळे बुद्धी ॥ तेवीं मायासिद्धी अनिर्वाच्य[१५] ॥ ५५ ॥ आरसा काय प्रतिबिंब असे ॥ जो पाहे तोचि आभासे ॥ तेवीं आपुलेनि संकल्पवशें ॥ माया उल्हासे नसतीची[१६] ॥ ५६ ॥ रज्जुसर्प जीत धरिला ॥ त्याचें कौतुक पाहों चला ॥ ऐसे बोलती जे बोला ॥ ते मायेचा सोहळा सांगोंत सुखें ॥ ५७ ॥ उडवों[१७]जातां आपुली छाया ॥ सर्वथा न उडवे ज्याची तया ॥ तेवीं

---

१ मारुतीचे लग्नांत. २ फुले. ३ फसवितात. ४ उत्पन्न न होणाराचे. ५ नसलेल्या. ६ गर्भिणी. ७ दोरीवर साप. ८ शिंपेवर रुपे. ९ सशाच्या शिंगाच्या. १० मोठेपणा मिरविते. ११ अस्तित्वांत. १२ संसाराचा भास. १३ गिळतात. १४ चांगले. १५ बोलता येत नाही. १६ नसूनही. १७ नाहीसी करू जाता.

तरतां दुस्तर माया ॥ जाण रायानिश्चित ॥ ५८ ॥ अग्निसंकल्पू सूर्या नसे ॥ शें[2]खीं सूर्यकांतींहि नदिसे ॥ तळीं धरिलेनि कापुसें ॥ अ
ग्नि प्रकाशे तं[1]द्योगें ॥ ५९ ॥ तेवीं शुद्धब्रह्मीं संकल्पु नाहीं ॥ शेखीं न दिसे केवळ देहीं ॥ माझारीं वासनेच्याठायीं ॥ देहाभिमानें पाही
संसार भासे ॥ ६० ॥ जागृतिदेहाचा विसर पडे ॥ सवेंचि स्वप्नदेह दुजें जो[3]डे ॥ तेणें मिथ्या प्रपंचु वाढे ॥ स्वप्नीं स्वप्नकुडे कदा न[4]मनें॥
॥ ६१ ॥ सुषुप्तीसि देहाचा अ[5]संभवो ॥ तेथें नाहीं भ[6]वभावो ॥ जन्म मरण तेंही वा[7]वो ॥ संसारहावो देहाभिमानें ॥ ६२ ॥ तेवीं आ
त्मत्वाचा विसरू ॥ तेणें मी देही हा अहंकारू ॥ तेणें अहंकारें संसारू ॥ अतिदुस्तरू थोरावे ॥ ६३ ॥ जेवीं मृगजळीं मिथ्या मा
से ॥ तेवीं ब्रह्मीं प्रपंच नसे ॥ तो निरसावया कैसें ॥ साधनपिसें पिशाचा ॥ ६४ ॥ दोनी अक्षरें माया ॥ जंव गेलों सांगावया ॥ तंव
श्लोकार्थ ठेला राया ॥ वाढला वायां ग्रंथ सैरा ॥ ६५ ॥ माया पाहोंजातां हर्षे ॥ सज्ञानही जाहले पिसे ॥ नावरूपांचिये भे[10]डसें ॥
कल्पनावशें माया वाढे ॥ ६६ ॥ मायेचें मुख्य लक्षण ॥ राया तुज मी सांगेन खुण ॥ आपुली कल्पना संपूर्ण ॥ ते माया जाण नृप
वर्या ॥ ६७ ॥ निजहृदयींची निज आशा ॥ तेचि माया गा मुख्य क्षितीशा ॥ जो सर्वथा नित्य निराशा ॥ तो पूज्य जगदीशा पूर्णत्वें
॥ ६८ ॥ आतां काहीं एक तुझ्या प्रश्नीं ॥ माया सांगों उपलक्षणीं ॥ सर्गस्थित्यंतकारिणी ॥ त्रि[11]विधगुणीं विभागें ॥ ६९ ॥ जेवीं सूर्या
सि संकल्प नसे ॥ तरी नसतां त्याच्याठायीं दिसे ॥ जेव्हां कां नि[12]जकारणवशें ॥ अग्नि प्रकाशे सूर्यकांतीं ॥ ७० ॥ तेवीं शुद्धस्वरूपीं पा
ही ॥ संकल्पमात्र काहीं नाहीं ॥ नसताचि दिसे तेठायीं ॥ ते जाण वि[13]देही मूळमाया ॥ ७१ ॥ स्वरूप नि[14]र्विकल्प पूर्ण ॥ तेथें मीं ह्म
णावया ह्मणतें कोण ॥ ऐसेंही ठायीं स्फुरे मीपण ॥ ते मुख्यत्वें जाण मूळमाया ॥ ७२ ॥ तया मीपणाच्या पोटीं ॥ ह्मणे मजचि म्यां
पहावें दि[15]ठीं ॥ मजसी म्यां सांगाव्या गो[16]ठी ॥ अत्यादरें भेटी माझी मज व्हावी ॥ ७३ ॥ मज माझी अतिप्रीती ॥ माझी मज हो अ
विरती ॥ माझ्याचि म्यां घेऊनि युक्ती ॥ मज माझी प्राप्ती म[17]द्बोधें ॥ ७४ ॥ ह्मणें मज म्यां आलिंगावें ॥ मज म्यांचि सं[18]भोगावें ॥ म
ज म्यांचि संयोगावें ॥ स्वा[19]मिसेवकत्वें सर्वदा ॥ ७५ ॥ ऐके आजानुबाहो नृपनाथा ॥ ऐसें आठवलें भगवंता ॥ तो आठवो झाला
सृ[20]जिता ॥ महाभूतां भौतिकां ॥ ७६ ॥ चारी वर्ण चारी खाणी ॥ चारी युगें चारी वाणी ॥ चारी पुरुषार्थ चहूं लक्षणीं ॥ मु[21]क्तीची मां

---

१ सूर्यकांताच्या योगानें. २ शेवटीं. ३ मिळतो. ४ मानीत नाहीं. ५ नाहीपणा. ६ जन्ममरणाचें अस्तित्व. ७ व्यर्थ. ८ वाढे. ९ उगाच. १० भेडीवण्यानें. ११ सत्त्व, रज, तम, तीन प्रकारच्या गुणांनीं. १२ आपल्या कारणाच्या योगानें. १३ देहरहित. १४ कल्पनारहीत. १५ दृष्टीनें. १६ गोष्टी. १७ माझ्या ज्ञानानें. १८ भोग करावा. १९ यजमान चाकरपणानें. २० उत्पन्न करितां. २१ मोक्षाची.

डणी मांडली चतुर्धा[1] ॥ ७७ ॥ उभारूनि[2] तिन्ही गुण ॥ आठवो रची त्रिभुवन[3] ॥ तेणें मांडूनि त्रिपुटी[4]विंदान ॥ कर्म[5]ही संपूर्ण त्रिधा केलें ॥ ७८ ॥ एवं एकपणीं बहुपण ॥ रूपा आणि मुळींची आठवण[6] ॥ परी बहुपणीं एकपण ॥ अखंडत्वें पूर्ण तें कदा नभंगे ॥ ७९ ॥ जीं जीं कुंभार भांडीं करी ॥ आकाश सहजेंचि त्यांभीतरी ॥ तेवीं महाभूतें भौतिकाकारीं ॥ समन्वयें हरी सर्वदा सर्वीं ॥ ८० ॥ राया जाण येचि अर्थीं ॥ बोलिलें उपनिषदांप्रती ॥ एकाकी नरमते[7] याश्रुती ॥ द्वैताची स्फूर्त्ती भगवंतीं[8] स्फुरली ॥ ८१ ॥ किंबहुना एकपणें समस्तें ॥ रूपा आली महाभूतें ॥ तीचि हरीची माया येथें ॥ जाण निश्चितें नृपनाथा ॥ ८२ ॥ भूतभौतिक स्फुरे जे स्फूर्त्ती ॥ ते प्रकाशूं[9] नशके माया स्वशक्ती ॥ मायाप्रकाशकू चिन्मूर्ती ॥ अखंडत्वें भूताकृतीं प्रवेशला भासे ॥ ८३ ॥ मुख्य मायेचें निजलक्षण ॥ प्रकाशी परमात्मा चिद्घन ॥ तोचि भूतीं भूतात्मा आपण ॥ प्रवेशलेंपण[10] नसोनि दावी ॥ ८४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवं सृष्टानि भूतानि प्रविष्टः पंचधातुभिः ॥ एकधा दशधाऽऽत्मानं विभजन् जुषते गुणान् ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐशीं सृजिलीं भूतें महाभूतें ॥ जीं जड मूढ अचेतें[11] ॥ त्यांसि वर्त्तावया व्यापारार्थीं ॥ विभागी[12] आपणातें तत्प्रवेशी[13] ॥ ८५ ॥ पंचधा पंचमहाभूतें ॥ तें कार्यक्षम व्हावया येथें ॥ पंचधा विभागें श्रीअनंतें ॥ प्रवेशिजे तें ऐक राया ॥ ८६ ॥ गंधरूपें पृथ्वीतें ॥ प्रवेशोनि श्रीअनंतें ॥ पूर्ण क्षमा आणोनि तीतें ॥ चराचरभूतें वाढवी[14] स्वयें ॥ ८७ ॥ पृथ्वीं प्रवेशला भगवंतु ॥ यालागीं आवरण जळांतु ॥ उरलीसे न विरतु ॥ जाण निश्चितु मिथिलेशा ॥ ८८ ॥ धरा[15] धरी धराधर[16] ॥ यालागीं विरवूं नशके समुद्र ॥ धराधरें पृथ्वीस धर ॥ भूतभार तेणें वाहे ॥ ८९ ॥ स्वादरूपें उदकातें ॥ प्रवेशोनि श्रीअनंतें ॥ द्रवत्वें राहोनियां तेथें ॥ जीवनभूतें जीववी सदा ॥ ९० ॥ जीवनीं प्रवेशे जगजीवन ॥ याकारणें आवरण तेंचि जाण ॥ नशोषितां[17] उरे जीवन[18] ॥ हें लाघव पूर्ण हरीचें ॥ ९१ ॥ तेजाचे ठायीं होऊनि रूप ॥ प्रवेशला हरी सद्रूप ॥ यालागीं नयनीं तेज अनूप[19] ॥ जठरीं देदीप्य जठराग्नि जाहला ॥ ९२ ॥ रूपयोगें लवलाही ॥ हरि प्रवेशे तेजाच्या ठायीं ॥ तें आवरण वायुमाजी पाही ॥ नमावळे काहीं यालागीं राया ॥ ९३ ॥ वायूमाजी स्पर्शयोगें ॥ प्रवेशु कीजे श्रीरंगें ॥ यालागीं प्राणयोगें ॥ वर्तती अंगें अनेक जीव ॥ ९४ ॥ वायूच्या ठायीं हृषीकेश ॥ स्पर्शरूपें करी प्रवेश ॥ यालागीं वायूचा ग्रास ॥ सर्वथा[20] आकाश करूं नशके ॥ ९५ ॥ शब्दगुणें हृषीकेश ॥ आकाशीं करी प्रवेश ॥ यालागीं भूतांसि अवकाश ॥ सावकाश वर्तावया ॥ ९६ ॥ शब्दगुणें गगनीं ॥ प्रवेशला चक्रपाणी ॥ यालागीं ते निज

---

[1] चारप्रकारानें. [2] उभेकरून. [3] तीन लोक. [4] ज्ञान, ज्ञाता, ज्ञेय. त्रिपुटी. तिचे कार्य. [5] कर्म, अकर्म, विकर्म. [6] स्मरण. [7] रमत नाही. [8] ईश्वराच्या ठिकाणी. [9] प्रकाश करू शकत नाही. [10] शिरलेपण. [11] अचेतन. [12] वेगळे करी. [13] ईश्वराच्या शिरण्यानें. [14] चालवी. [15] पृथिवी. [16] पर्वत. [17] न आटविता. [18] पाणि. [19] फार. [20] सर्वप्रकारें.

करणीं ॥ लीन होऊनी जाऊं नशके ॥ ९७ ॥ महाभूतीं निरंतर ॥ स्वाभाविक नित्य वैर ॥ येरातें ग्रासावया[१] येर ॥ अतितत्पर सर्वदा ॥ ॥ ९८ ॥ जळ विरवूं पाहे पृथ्वीतें ॥ तेज शोषूं पाहे जळातें ॥ वायु ग्राशूं[२] धांवे तेजातें ॥ आकाश वायूतें गिळूं पाहे ॥ ९९ ॥ तेथें प्रवेशोनि श्रीधर ॥ त्यांते करोनियां निर्वैर ॥ तेंचि थेरामाजी येर ॥ उल्हासें थोर नांदवी[३] ॥ १०० ॥ एवं पंचभूतें साकरता[४] ॥ आकारली भूताकारता ॥ तेथें जीवरूपें वर्तविता ॥ जाहला पैं तत्वतां प्रकृतियोगें[५] ॥ १ ॥ यासि ब्रह्मांडीं पुरुष हें नाव ॥ पिंडीं त्यातें ह्मणती जीव ॥ हा मायेचा निजस्वभाव !! प्रतिबिंबला देव जीवशिवरूपें ॥ २ ॥ शिवीं जे योगमाया विख्याती ॥ जीवीं तीतें अविद्या ह्मणती ॥ हेचि मायेची मुख्यत्वें भ्रांती ॥ स्वप्नस्थिती संसारू ॥ ३ ॥ ज्यातें ह्मणती दीर्घ स्वप्न ॥ तो हा मायावी संसार संपूर्ण ॥ निद्रेमाजी दिसे जें भान ॥ तें जीवाचें स्वप्न अविद्यायोगें ॥ ४ ॥ येथें जागा जाहल्या मिथ्या स्वप्न ॥ बोधें जाहलिया मिथ्या भवभान[६] ॥ हें अवघें मायेचें विंदान[७] ॥ राया तूं जाण निश्चित ॥ ५ ॥ आतां जीवाची विषयावस्था ॥ विषयरसीं विषयभोक्ता ॥ एकधा दशधा विभागता ॥ ऐक नृपनाथा सांगेन ॥ ६ ॥ एकधा भागें अंतःकरण ॥ स्वयें झाला जनार्दन ॥ मन बुद्धि चित्त अहंस्फुरण ॥ चतुर्धा जाण विभागें ॥ ७ ॥ जीव आपुल्या परिपूर्णता ॥ अहं ह्मणे निजात्मसत्ता[८] ॥ तथें मायेची अतिलाघवता ॥ ते देहात्मता[९] दृढ केली ॥ ८ ॥ अहंकार वाढतां देहात्मता ॥ विसरे आपुली चिद्रूपता ॥ तो विसरू वाढवी विषयचिंता ॥ तेंचि तत्त्वतां महामाया ॥ ९ ॥ देहअहंता अतिचपळ ॥ तीतेंच ह्मणती मन चंचळ ॥ नाना संकल्पविकल्पजाळ ॥ वाढवी प्रबळ भय शोक दुःख ॥ ११० ॥ देहअहंतेचे शाहाणपण ॥ तिये नाव गा बुद्धि जाण ॥ तेबुद्धीनें निश्चय केला पूर्ण ॥ आह्मां जन्ममरण अनिवार[१०] ॥ ११ ॥ एवं देहाभिमानाचे[११] माथां ॥ चित्तचतुष्टय[१२] अवस्था ॥ मुख्य संसाराचा कर्त्ता ॥ जाण तत्वता देहाभिमान ॥ १२ ॥ अहंकार धरी सोहंपण ॥ तैं चित्तीं प्रगटे चैतन्यघन ॥ तेव्हां मनही होय उन्मन ॥ बुद्धीचा निश्चयो पूर्ण परब्रह्मीं ॥ १३ ॥ समूळ मावळल्या[१३] अभिमान ॥ कैंची बुद्धि कैंचें मन ॥ बुडे[१४] चित्ताचें चित्तपण ॥ ब्रह्म परिपूर्ण कोंदाटे[१५] ॥ १४ ॥ एकधा[१६] विभाग अंतःकरण ॥ त्याची उण खूण निजलक्षण ॥ राया सांगीतलें संपूर्ण ॥ आतां दशधा[१७] लक्षण तें ऐक ॥ १५ ॥ दशधा इंद्रियें अचेतन[१८] ॥ तयांतें चेतविता नारायण ॥ दशधारूपें प्रवेशोन ॥ इंद्रियवर्त्तन वर्त्तवी ॥ १६ ॥ दृष्टीमाजी झाला देखणें ॥ दृश्य प्रकाशी दृश्यपणें ॥ ऐसेंनि प्रकाशकपणें ॥ दृश्याभरणें दाखवी ॥ १७ ॥

---

[१] गिळण्यास.
[२] गिळूं.
[३] वागवी.
[४] आकारास.
[५] मायेच्या योगानें.
[६] जन्ममरणाचा भास.
[७] करणी.
[८] आपल्या आत्म्याचे अस्तित्व.
[९] देहावर आत्मभावना.
[१०] अनिवार्य.
[११] देहाच्या अभिमानाचे.
[१२] मन, बुद्धि, चित्त, अहंकार.
[१३] नाहीसा झाला असतां.
[१४] नाहीसे होते.
[१५] भरे.
[१६] एक प्रकारे.
[१७] दाहा प्रकारानें.
[१८] जड.

श्रवणीं झाला तो एकपणें ॥ शब्दप्रकाशीं शब्दलक्षणें ॥ मग अर्थावबोधकपणें ॥ शब्दविदानें ऐकवी ॥ १८ ॥ रसीं रसस्वाद नारायण ॥ रसनीं तोचि रसस्वादन ॥ यापरी नानारससेवन ॥ करवी जनार्दन जनांमाजी ॥ १९ ॥ सुमनीं[1] श्रीहरी सुगंध ॥ घ्राणीं तोचि जाणे गंधावबोध[2] ॥ यापरी सुमनमकरंद[3] ॥ भोगवी गोविंद निजांगयोगें ॥ १२० ॥ शीत उष्ण मृदु कठिण ॥ स्पर्शें प्रकाशिता नारायण ॥ त्वचेमाजी तोचि स्पर्शन ॥ यापरी जगजीवन भोगवी स्पर्श ॥ २१ ॥ वाचेचा वाचकु कमळापती[4] ॥ तोचि प्रकाशी शब्दपंक्ती ॥ नानाशब्दार्थव्युत्पत्ती ॥ वदवी निश्चितीं वाचाळपणें ॥ २२ ॥ कराच्या ठायीं देती घेती ॥ अकर्तेनि कर्तव्यशक्ती ॥ चरणाचरण निगुती ॥ गमनास्थिती गोविंदें ॥ २३ ॥ उपस्थसुखाची सुखप्राप्ती ॥ तेणें सुखें सुखावे श्रीपती ॥ स्त्रीपुरुषमैथुनव्युत्पत्ती ॥ प्रकाशी अतिप्रीती पुरुषोत्तम ॥ २४ ॥ गुदाचेठायीं जें कां क्षरण[5] ॥ तें क्षरणही होय नारायण ॥ यापरी निजात्मा परिपूर्ण ॥ दशधा आपण विभागला देहीं ॥ २५ ॥ यापरीगा देहयोगें ॥ विलास विषयसंभोगें ॥ भोग्य भोक्ता उभयभागें ॥ प्रकाशूनि अंगें स्वयें भोगी ॥ २६ ॥ जेवीं साळईच्या रुखा ॥ साळईचि बीज देखा ॥ साळईचि शाखोपशाखा ॥ नविकारता असका वृक्ष होये ॥ २७ ॥ जेवि कां ऊंस बीजीं पडे ॥ तो बाहेर ऊंसपणेंचि वाढे ॥ जरी भिन्नभिन्न कांडें चढे ॥ तरी मागें पुढें रस एकू ॥ २८ ॥ तेवीं विषय आणि करणें[6] ॥ प्रकाशूनि एकपणें ॥ मग विषयरस सेवणें ॥ जीवपणें स्वयें सेवी ॥ २९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ गुणैर्गुणान् स भुंजान आत्मप्रद्योतितैः प्रभुः ॥ मन्यमान इदं सृष्टमात्मानमिह सज्जते ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ इंद्रियां आणि विषयांसी ॥ सहजें अंतर्यामी[7] प्रकाशी ॥ जीव सेवूनि त्याविषयांसी ॥ पावे आसक्तीसी[8] अहंभावें ॥ १३० ॥ ह्मणे हे विषय कैसे गोड ॥ माझ्या देहाचें पुरे कोड ॥ तंव इंद्रियांची खवळे चाड ॥ विषयवाड भोगावया ॥ ३१ ॥ इंद्रियां विषयांची आसक्ती ॥ देहाभिमानें वाढे वृत्ती ॥ मावळोनि मुळींची स्फूर्ती ॥ मोहममतास्थिती दृढ वाढे ॥ ३२ ॥ मग मी ह्मणे देहातें ॥ देहसंबंधी तें आप्तें ॥ विषयाचिये लोलुप[9] तें ॥ उसंत[10] चित्तें असेना ॥ ३३ ॥ प्रकृतिस्वभावें कर्म जाहलें ॥ तें तं ह्मणे म्यां केलें ॥ देह अहंतेचेनि नाथिलें[11] ॥ कांविरें[12] चढलें अनिवार ॥ ३४ ॥ देहअहंता अतिउद्भट ॥ तेथें मोह ममता अतिदुर्घट ॥ तेणें जन्ममरणांची वाट ॥ घडघडाट प्रवाहे[13] ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कर्माणि कर्मभिः कुर्वन् सनिमित्तानि देहभृत् ॥ तत्तत्कर्मफलं गृह्णन् भ्रमतीह सुखेतरम् ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ मनीं धरोनि विषय[14]काम ॥ कर्मेंद्रियीं क

---

१ फुलांत. २ सुगंधाचे ज्ञान. ३ फुलांचे पराग, केसर. ४ विष्णु. ५ मलादिक गळणे. ६ इंद्रिये. ७ हृदयस्थ. ८ प्रेमास. ९ लोभि. १० विसावा. ११ वरिले. १२ काहूर. १३ चालूं राहते. १४ विषयाची इच्छा.

करितां कर्म ॥ तेथें निपजती[1] धर्माधर्म ॥ बांधक[2] परम पुरुषातें ॥ ३६ ॥ कल्पिला फळभोग घडे ॥ त्यासारिखें दहधरणें पडे ॥ देहें देहाची खा
णी उघडे ॥ मरण वाढे तैसेंची ॥ ३७ ॥ फळाशा कर्म अतिदारुण ॥ अमरा आणी अमित मरण ॥ अजन्म्या अंगीं जन्म पूर्ण ॥ पु
नःपुनःजाण आंदळती[3] ॥ ३८ ॥ एवं स्वर्ग आणि संसारा ॥ जन्ममरणांच्या येरझारा[4] ॥ नानायोनी अपारा ॥ निजकर्मद्वारा[5] स्वयें भो
गी ॥ ३९ ॥ डोळे बांधोनि जुंपिला घाणा ॥ तेलियाचा ढोरूं[6] जाणा ॥ करकरीतु करी भ्रमणा ॥ अविश्रम जाणा भोंवतसे[7] ॥ १४०॥
तेवी बांधोनि ज्ञानाचे डोळे ॥ भोगूंजातां निजकर्मफळें ॥ तंव जन्ममरणांचे सोहळे ॥ भोगी आगळे[8] अनिवार ॥ ४१ ॥ उदो[9]अस्तांचें
नि प्रमाणें ॥ जैसें सूर्यासि पडे भंवणें ॥ तैशीं हीं जन्ममरणें ॥ अतिदारुणें स्वयें सोशी ॥ ४२ ॥ शिणशिणों जन्मकोटी ॥ सवेंच मरण ये त्या
पाठी ॥ जैसीं जावळफळें एकदेठीं ॥ तैशा जन्ममरणकोटी भोगी स्वयें ॥ ४३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ इत्थं कर्मगतीर्गच्छन् बव्ह भद्रवहाः पुमान् ॥
आभूतसंप्लुवात्सर्गप्रलयावश्नुतेऽवशः ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ होता पूर्णत्वें जो स्वतंत्र ॥ तो झाला कर्मपरतंत्र[10] ॥ नानाकर्मगतिपात्र[11] ॥ दुःखसुख
क्षेत्र सदा वाहे ॥ ४४ ॥ मानोनि विषयाचें सुख ॥ देखतदेखत घेतलें विखें[12] ॥ त्याचें अगणित असुख ॥ जन्मकोटी दुःख सोशितां नसरे[13] ॥ ४५ ॥
दुःखावरी दुःखांचे आवर्त्त ॥ मोहशोकांचे गर्त्तीं पडत ॥ अतियातनेमाजी बुडत ॥ सदा उकडत काळाग्नी ॥ ४६ ॥ ऐसें सोशितां दुःखशोक ॥
पुढें अवचितां[14] एकाएक ॥ महाप्रळयाचा भडका देख ॥ निकट सन्मुख अंगीं बाणे ॥ ४७ ॥ तेथें मागें नवचे[15] काढिला पावो ॥ पुढें निघा
वया नाहीं वावो[16] ॥ निजकर्मे बांधिला पहाहो ॥ प्रळयाचा घावो मस्तकीं वाजे ॥ ४८ ॥ उत्पत्तिस्थितिप्रकरण ॥ तुज सांगीतलें संपू
र्ण ॥ आतां प्रळयाचें लक्षण ॥ सावधान अवधारी ॥ ४९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ धातूपप्लव आसन्ने व्यक्तं द्रव्यगुणात्मकम् ॥ अनादिनि
धनः कालो ह्यव्यक्तायापकर्षति ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ ॥ सूर्योदयेंसि दिवसस्थिती ॥ लोटल्या अवश्य पावे राती ॥ तेवीं झालिया उत्पत्तिस्थिती ॥
प्रळयाची प्राप्ती अवश्य पावे ॥ १५० ॥ एवं पावल्या प्रळयवेळू[17] ॥ खवळे अनादिनिधन काळू ॥ तो महाभूतेंसि भूगोळू ॥ नाशार्थ प्र
बळू प्रताप मांडी ॥ ५१ ॥ तेथें जेंजें स्थूळाकारें व्यक्त ॥ तेंतें करूंलागे अव्यक्त ॥ जेवीं पेरिलें पिकोनि शेत ॥ स्वयें वाळत उष्णका
ळीं ॥ ५२ ॥ तृणादिनानाबीजें क्षितीं ॥ स्वभावें वर्षाकाळीं विरूढती[18] ॥ तेचि शारदीय नानाव्यक्ती ॥ सफळित होती सुपुष्ट ॥ ५३ ॥ ते
चि ग्रीष्माच्या अंतीं ॥ फळमूळ मोडोनि व्यक्ती ॥ बीजें लीन होती क्षितीं ॥ तैशी काळगती संसारा ॥ ५४ ॥ जेवीं वसंताऐलीकडी ॥

---

[1] उत्पन्न होतात. [2] नाशक. [3] येतात. [4] खेपा. [5] आपल्या कर्मांच्या योगानें. [6] बैल. [7] चक्राकार फिरतो. [8] आधीक. [9] उदय. [10] कर्मांच्या स्वाधीन. [11] अनेक प्रकारच्या कर्मांच्या गति भोगणारा. [12] विष. [13] सरत नाही. [14] एकदम. [15] निघत नाही. [16] अवकाश. [17] प्रळयाचा काल. [18] वाढतात.

वृक्षासि होय पानझडी[१] ॥ तेवीं ब्रह्मादिकांची परवडी ॥ काळझोडी निजसत्ता ॥ ५५ ॥ जेवींकां वाळलिया शेत ॥ कृषीवळ मळूं लागे समस्त ॥ तेवीं व्यक्ताचें अव्यक्त ॥ काळ त्वरित करूं लागे ॥ ५६ ॥ तेच अव्यक्त करिती स्थिती ॥ राया सांगेन तुजप्रती ॥ काळाची क्षोभक शक्ती ॥ प्रळयाचे प्राप्तीपूर्वीं पावे ॥ ५७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शतवर्षा ह्यनावृष्टिर्भविष्यत्युल्बणा भुवि ॥ तत्कालोपचितोष्णार्को लोकांस्त्रीन्प्रतपिष्यति ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ काळक्षोभाचिये दृष्टी ॥ शतवर्षें[२] अनावृष्टी[३] ॥ तेणें अत्युल्बणें आटे सृष्टी ॥ पृथ्वीच्या पोटीं काहीं नुरे ॥ ५८ ॥ प्राणिमात्र निमाले[४] देख ॥ वनें वाळूनि जाहली राख ॥ बिंदुमात्र[५] नमिळे उदक[६] ॥ यापरी लोक आटिले काळें ॥ ॥ ५९ ॥ तंव द्वादशादित्यमेळा[७] ॥ मंडळीं झाला एकवेळा ॥ तेथिच्या किरणीं प्रबळा ॥ त्रैलोक्या सकळा संतप्त केलें ॥ १६० ॥ येती उष्णाचिया आल्या ॥ होती पर्वताच्या लाह्या ॥ तेणें धरातळ[८] लवलाह्या ॥ भस्म झालें राया महाउष्णें ॥ ६१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पातालतलमारभ्य संकर्षणमुखानलः ॥ दहन्नूर्ध्वशिखो विष्वग्वर्धते वायुनेरितः ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ उष्णें तापलें पृथ्वीतळ ॥ पोळलें शेषफणामंडळ[९] ॥ तैं सहस्रमुखें विषानळ ॥ अग्निकल्लोळ वमता[१०] झाला ॥ ६२ ॥ पाताळतळींहोन देखा ॥ ऊर्ध्वमुखी अग्निशिखा[११] ॥ जाळीतचि तिहीं लोका ॥ उठिला भडका अनिवार ॥ ६३ ॥ क्रोधें दीधला फुफारा ॥ सहस्रमुखें[१२] सुटला वारा ॥ तो साह्य झाला त्या वैश्वानरा ॥ जाळीत दिगंतरा लागला वणवा ॥ ६४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सांवर्त्तको मेघगणो वर्षतिस्म शतंसमाः ॥ धाराभिर्हस्तिहस्ताभिर्लीयते सलिले विराट् ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्वर्ग आणि पाताळतळा ॥ कवळूनि[१३] उठिल्या अग्निज्वाळा ॥ तंव प्रळयकर्त्या मेघमाळा[१४] ॥ क्षोभल्या त्याकाळा अतिदुर्धरा ॥ ६५ ॥ ह्मणाल तेथ मोठमोठे ॥ वर्षोंलागले थेंबुटे ॥ तैसे नव्हे गा कडकडाटे ॥ एकीं धार सुटे अनिवार ॥ ६६ ॥ इतर पर्जन्याच्या धारा ॥ त्या तैशा नव्हती नृपवरा ॥ ऐक प्रमाणाच्या निर्धारा ॥ तो समयो महावीरा अतिदुस्तर[१५] ॥ ॥ ६७ ॥ जैसीकां मदगजाची[१६] सोंड ॥ तैशा धारा अतिप्रचंड ॥ शतवर्षेंवरी अखंड ॥ पर्जन्य वितंड पैं वर्षे ॥ ६८ ॥ विजू निजतेजें[१७] नभ जाळी ॥ तेणें कडकडाटे आरोळी ॥ काळाची बैसे दांतखिळी ॥ ऐसा प्रलयकाळीं मेघ खवळे ॥ ६९ ॥ उलथलें तेणें जलसैघ[१८] ॥ जेथोनि वर्षत होते मेघ ॥ त्यातेंही विरवूनि सांग ॥ जळमय चांग[१९] त्रैलोक्य झालें ॥ १७० ॥ अनिवार वर्षतां वेग ॥ जेथें मेघांचेंही विरे अंग ॥ या नाव सांवर्त्तक मेघ ॥ अति अमोघ वर्षावो[२०] ॥ ७१ ॥ तीर्थ क्षेत्र पवित्रोदक ॥ सरिता समुद्र झाले एक ॥ हरपले[२१] चंद्रसूर्या

---

[१] पानाची गळती. [२] शंभरवर्षें पर्यंत. [३] अवर्षण. [४] मेलें. [५] थेंब भरही. [६] पाणी. [७] बारा सूर्यांचा समुदाय. [८] पृथिवीचे तल. [९] शेषाच्या फणांचे समुदाय. [१०] ओकता. [११] अग्नीचा जाळ. [१२] हजार तोंडानें. [१३] लागून. [१४] मेघाच्या माला. [१५] फार कठीण. [१६] माजलेल्या हात्तीची. [१७] आपल्या तेजानें. [१८] पाण्याचे पूर. [१९] पूर्ण. [२०] पाऊस. [२१] नाहीसे झाले.

दिक ॥ तिनी लोक बुडाले ॥७२॥ ऐशिया एकार्णवाचे ठायीं ॥ विराट[1] विरालागा पाही ॥ सोकार[2] उरे ऐसें काहीं ॥ उरलें नाही नृपनाथ ॥७३॥
॥ श्लोक ॥ ॥ ततो विराजमुत्सृज्य वैराजः पुरुषो नृप ॥ अव्यक्तं विशते सूक्ष्मं निरिंधन इवानलः ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ प्रळयकाळीं अ
तिगहिसू ॥ अगाध उलथे जळोल्हासू ॥ स्थूळाचा करितां नाशू ॥ उरे निःशेषू विराट ॥ ७४ ॥ विराटाचा विराज पुरुषू ॥ तो अव्यक्तीं[3]
करी प्रवेशू ॥ जेवीं इंधननाशें[4] हुताशू[5] ॥ करी रहिवासू निजकारणीं ॥ ७५ ॥ जे ब्रह्मलोकनिवासी[6] होती ॥ त्यांसी महाप्रळयाचे अं
तीं ॥ ब्रह्म्यासवें सर्वांसि क्रमें मुक्ती ॥ ऐसें श्रुतीचें दृढ वाक्य ॥ ७६ ॥ विराजपुरुष नामवदंती ॥ हिरण्यगर्भातें ह्मणती ॥ त्यांसी प्रळ
यीं प्रवेश अव्यक्तीं ॥ तैं इतरां गती श्रुति वाक्यें कैसी ॥ ७७ ॥ विदेहें पुशिली मायेची स्थिती ॥ ते मायेची ऐशी दुर्धर[7] शक्ती ॥ जे न क
रिती भगवद्भक्ती ॥ त्यां ब्रह्म्यासवें मुक्ती घडोंनेदी ॥ ७८ ॥ झालिया ब्रह्मसदनप्राप्ती ॥ नकरितां भगवद्भक्ती ॥ अतिशयें दुर्लभ मुक्ती ॥
ते भक्तीपाशीं मुक्ती दासी जैसी ॥ ७९ ॥ नकरितां भगवद्भजन ॥ ब्रह्म्यासीही मुक्ति नव्हे जाण ॥ मा इतरांचा ज्ञानाभिमान ॥ पुसे
कोण परमार्थीं ॥ १८० ॥ ज्यासी जेथें पदाभिमान[8] ॥ त्यासी तेंचि दृढ बंधन ॥ यालागीं दुर्लभपण ॥ मोक्षा जाण तिहीं लोकीं ॥ ८१ ॥
सांडोनियां पदाभिमान ॥ अंगें सदाशिवु आपण ॥ नित्य वसवी[9] महाश्मशान ॥ भगवद्भजनें निजनिष्ठा ॥ ८२ ॥ यालागीं ज्यांसी ब्र
ह्मलोकपदप्राप्ती ॥ तेथेंही जे करिती भगवद्भक्ती ॥ त्यांसीच प्रळयाच्या अंतीं ॥ परममुक्ती[10] नृपवर्या ॥ ८३ ॥ ब्रह्मलोकीं ज्यां नाहीं हरि
भक्ती ॥ तेही पावती पुनरावृत्ती ॥ ऐशी मायेची दुर्धर शक्ती ॥ नकरितां भक्ती मुक्ति[11] कैंची ॥ ८४ ॥ येचिअर्थीं ब्रह्म्याचें वचन ॥ दों
श्लोकीं बोलिला आपण ॥ ज्ञानाभिमानिया पतन[12] ॥ भक्तां भवबंधन[13] कदा नबाधी[14] ॥ ८५ ॥ ॥ श्लोक ॥ ब्रह्मस्तुतीचे ॥ ॥ येऽन्येरविंदा
क्षविमुक्तमानिनस्त्वय्यस्तभावादविशुद्धबुद्धयः ॥ आरुह्य कृच्छ्रेण परं पदं ततः पतंत्यधोऽनादृतयुष्मदंघ्रयः ॥ १ ॥ तथा न ते माधव ता
वकाः क्वचिद्भ्रश्यंति मार्गात्त्वयि बद्धसौहृदाः ॥ त्वयाभिगुप्ता विचरंति निर्भया विनायकानीकपमूर्धसु प्रभो ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ॥ नक
रितां भगवद्भक्ती[15] ॥ सज्ञानाही[16] नातुडे[17] मुक्ती ॥ तेचिअर्थींच्या दृष्टांतीं ॥ ब्रह्म्याची उक्ती दाविली येथें ॥ ८६ ॥ जन्मां माजी ब्राह्मणप
ण ॥ तेही वेदशास्त्रसंपन्न ॥ नकरितां भगवद्भजन ॥ अचुक[18] पतन तयांसी ॥ ८७ ॥ भक्तां सर्वभूतीं भगवद्भावो ॥ तेथें विघ्नांसि नाहीं
ठावो ॥ तयां अपावचि[19] हो उपावो ॥ भावार्था देवो सदा साह्य ॥ ८८ ॥ भक्तीवीण मुक्तीचा सोसूं[20] ॥ करितां प्रयत्न पडे वोसूं[21] ॥ असो

---

१ जगद्रूप. २ आकाराचे. ३ कारणांत. ४ जळण नाहींसे झाल्यानें. ५ अग्नि. ६ ब्रह्मलोकांत राहणारे. ७ कठीण. ८ इंद्रादिपदांचा अभिमान. ९ राहविती. १० क्रममोक्ष. ११ मोक्ष. १२ जन्ममरण. १३ जन्ममरणरूप संसार. १४ बाधा करीत नाही. १५ ईश्वराचे भजन. १६ ज्ञानी पुरुषासही. १७ मिळत नाही. १८ एकदम. १९ अपायच. २० आशा. २१ व्यर्थ.

हें वैराजपुरुषू ॥ करी प्रवेशू अव्यक्तीं ॥ ८९ ॥ अव्यक्तीं वैराजा प्रवेशू ॥ होतांचि महाभूतां विलासू ॥ होंलागे[1] भूतां हा रासू ॥ तो अनुप्रवेशू ऐक राया ॥ १९० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ वायुना हृतगंधा भूः सलिलत्वाय कल्पते ॥ सलिलं तद्धृतरसं ज्योतिष्ट्वायोपकल्पते॥ १३॥ हृतरूपंतु तमसा वायौ ज्योतिः प्रलीयते ॥ हृतस्पर्शोवकाशेन वायुर्नभसि लीयते ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रळयवायूचा क्षोभक क्रोधू॥ तेणेंपृथ्वीचा हरिला गंधू ॥ तंव तेही विरोनियां प्रसिद्धू ॥ एकरूप जळ जाहलें ॥ ९१ ॥ क्षोभला वायू असमसाहस ॥ तो हेरी[2] जळाचा रस ॥ तेव्हां जळाचा होय ऱ्हास ॥ प्रळयमहातेजीं ॥ ९२ ॥ त्या तेजाचा निजसंभ्रम ॥ वायुबळें ग्रासीत तम ॥ तेव्हां प्रळयवायु परम ॥ भरोनि व्योम[3] कोंदाटें[4] ॥ ९३ ॥ त्या प्रळयवायूचा स्पर्श ॥ चपळतेसि[5] सर्व ग्रास ॥ करूनि ठाके[6] अवकाश ॥ तेव्हां वायूतें आकाश निःशेष ग्रासी॥ ९४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कालात्मना हृतगुणं नभ आत्मनि लीयते॥ इंद्रियाणि मनोबुद्धिःसहवैकारिकैर्नृप ॥ प्रविशंति ह्यहंकारं स्वगुणैरहमात्मनि ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ आकाशाचा जो शब्दगुण ॥ तो प्रळयकाळू गिळी संपूर्ण ॥ तंव शोभला तामसाभिमान ॥ तो करी प्राशन गगनाचें[7] ॥ ९५ ॥ दशइंद्रियांच्या गोंधळा ॥ राजसाभिमानी रिघाला[8] ॥ चित्तचतुष्टयाचा मेळा ॥ तोही प्रवेशला सात्विकाभिमानीं ॥ ९६ ॥ इंद्रियअधिष्ठात्रीदैवतें ॥ तींही मिळोनियां समस्तें[9] ॥ प्रवेशलीं सात्विकातें ॥ जाण निश्चितें नृपनाथा ॥ ९७ ॥ ते तिन्ही अहंकार त्रिगुणेंसी ॥ प्रवेशती महत्तत्वासी ॥ महत्तत्व मिळे मायेसी ॥ जेवीं कन्यासंतती माहेरा ये ॥ ९८ ॥ जेवीं कुक्कुटीचीं पिली ॥ कुक्कुटी पांखांतळीं[10] घाली ॥ मग ते स्वयें दिसे एकली ॥ तेंवी माया उरली कल्पांतीं[11] ॥ ९९ ॥ एवं उत्पत्ति स्थितिप्रळयांतें ॥ त्रिविध भागें दाविली येथें ॥ ते गुणमयी माया निश्चितें ॥ मिथ्याभूतें आभासे॥ २०० ॥ जेवीं लेंकुरें खेळतां खेळासी ॥ दिवसा ह्मणती जाहली निशी ॥ तेवींचि पूर्णस्वरूपाशीं ॥ देखती मायेसी त्रिविध कल्पना ॥ १ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एषा माया भगवतः सर्गस्थित्यंतकारिणी ॥ त्रिवर्णा वर्णिताऽस्माभिः किं भूयः श्रोतुमिच्छसि ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ उत्तम मध्यम अधमजन॥ तिन्ही अवस्था त्रिभुवन ॥ त्रिविध कर्म तीन गुण ॥ हें जाण विंदान[12] मायेचें ॥ २ ॥ ध्येय ध्याता आणि ध्यान ॥ पूज्य पूजक पूजन ॥ ज्ञेय ज्ञाता आणि ज्ञान॥ हेही त्रिपुटी पूर्ण मायेची ॥ ३ ॥ दृश्य द्रष्टा आणि दर्शन ॥ कर्म कर्ता क्रिया करण ॥ भोग्य भोक्ता भोजन ॥ हे त्रिपुटी जाण मायेची ॥ ४ ॥ शब्द श्रोता आणि श्रवण ॥ घ्रेय घ्राता आणि घ्राण ॥ रस रसना रसस्वादन ॥ हे त्रिपुटी जाण मायेची ॥ ५ ॥

---

[1] होऊं लागतो. [2] नाहीसा करितो. [3] आकाश. [4] भरे. [5] विजेस. [6] राहे. [7] आकाशाचे. [8] निघाला. [9] सर्व. [10] पंखाचे आंत. [11] कल्पाच्या, प्रळयाच्या शेवटीं. [12] निदान.

कर क्रिया आणि कर्ता ॥ चरण चाल चालता ॥ बोल बोलणें बोलता ॥ हे त्रिविधावस्था मायेची ॥ ६ ॥ अहं सोहं जडमूढता ॥ साधक साधन साध्यता ॥ देवी देवो परिवारदेवता ॥ हेही त्रिविधता मायेची ॥ ७ ॥ देह देही देहाभिमान ॥ भवभय भवबंधन ॥ मुक्त मुमुक्षु अज्ञान ॥ हेंही विंदान मायेचें ॥ ८ ॥ सुख दुःख जडत्व पूर्ण ॥ आधी समाधी व्युत्थान ॥ उत्पत्ति स्थिति निधन ॥ इहीं लक्षणीं संपूर्ण माया विलसे ॥ ९ ॥ नभीं नीळिमा[1] पूर्ण भासे ॥ शेखीं नीळिमेचा लेशही नसे ॥ तेवीं स्वरूपीं माया आभासे ॥ मिथ्यावेशें मायिक ॥ २१० ॥ जेवीं प्रत्यक्ष दिसे मृगजळ ॥ परी तें निदाघ[2] केवळ ॥ तेवीं स्वरूपीं माया प्रबळ ॥ मुळीं निर्मूळ आभासे ॥ ११ ॥ हे मिथ्या माया कल्पनावशें[3] ॥ प्रबळ बळें भासली दिसे ॥ नासूं जातां नाशिजे ऐसें ॥ सत्यत्वें नसे निजांगें ॥ १२ ॥ तरी नावरूपांचिया भेडसें[4] ॥ ब्रह्मादिक केले पिसे ॥ मिथ्या त्रिपुटी विन्यासें ॥ ज्या बांधिलें दिसे त्रैलोक्य ॥ १३ ॥ जेवीं दीपासवें[5] दिसे छाया ॥ नाशितां नातुडे[6] नाशावया ॥ तेवीं स्वरूपीं मिथ्या माया ॥ अतिदुर्जया देवांसी ॥ १४ ॥ जेवीं देहासवें मिथ्या छाया ॥ तेवीं ब्रह्मीं मिथ्या माया ॥ कल्पनायोगें वाढली वांयां[7] ॥ यालागीं अजया[8] वेदशास्त्रें ह्मणती ॥ १५ ॥ राया कल्पना वाढे जे ठायीं ॥ तेंचि मायेचें दृढ मूळ पाहीं ॥ जो निर्विकल्प निजदेहीं ॥ त्यासि माया नाहीं तिहीं लोकीं ॥ १६ ॥ कल्पिती कल्पना जे राया ॥ तेचि जाण मुख्य माया ॥ आणीक रूपकें सांगावया ॥ नातुडे माया निरूपणीं ॥ १७ ॥ तेचि त्रिविध मुख्यलक्षणी ॥ माया सांगीतली विवंचोनी[9] ॥ आतां कोण्या अर्थीचे[10] श्रवणीं ॥ अत्यादरू मानी वर्ते राया ॥ १८ ॥ माया दुस्तर दारुण ॥ ऐकूनि ऋत्विज ब्राह्मण ॥ थरारले सभाजन ॥ राजाही पूर्ण विस्मित जाहला ॥ १९ ॥ नवल मायेचें रूपक ॥ नाशूं नशकतीच ज्ञाते लोक ॥ जया गोंविले ब्रह्मादिक ॥ इतरांचा देख पौड[11] कोण ॥ २२० ॥ माया आक्रमूनि शिवासी ॥ तोही आणिला जीवत्वासी ॥ ते माया तरावया दीनाशी ॥ उपावो[12] यासी पुसों पां ॥ २१ ॥ सुखोपायें दीनजन ॥ दुस्तर माया तरती पूर्ण ॥ तदर्थीं[13] राजा आपण ॥ अत्यादरें प्रश्न श्रद्धेनें पुसे ॥ २२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ राजोवाच ॥ यथैतामैश्वरीं मायां दुस्तरामकृतात्मभिः ॥ तरंत्यंजः स्थूलधियो महर्ष इदमुच्यताम् ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ ॥ अतिदुस्तर[14] हरीची माया ॥ ऐकोनि हास्य आलें राया ॥ लटकीच परी देहाभिमानियां ॥ बाधावया दृढ जाहली ॥ २३ ॥ माया दुस्तर शास्त्रप्रसिद्धी ॥ तेथें भाळे भोळे स्थूळबुद्धी ॥ सुखें तरती कोणें विधी ॥ तो सांग त्रिशुद्धी उपावो ॥ २४ ॥ ज्यासी वश्य नाहीं निजमन[15] ॥ आणि भवाब्धि[16] तराव

---

[1] निळेपणा. [2] ऊन. [3] कल्पनेच्या योगानें. [4] अहंकारानें. [5] दिव्या बराबर. [6] मिळत नाही. [7] व्यर्थ. [8] दुर्जया. [9] स्पष्ट करून. [10] ज्ञानी. [11] मोठेपणा. [12] उपाय. [13] त्या विषयीं. [14] तरण्यास कठीण. [15] आपले मन. [16] संसार समुद्र.

या भाव पूर्ण ॥ ऐसें भोळे भाविक जन ॥ त्यांसि मायातरण[1] सुगम[2] सांगा ॥ २५ ॥ मागां कवी बोलिला संकलितीं[3] ॥ तन्मायया[4]ऽतो बुध आभजेति ॥ गुरु ब्रह्म अभेदस्थिती[5] ॥ करितां भक्ती माया तरिजे ॥ २६ ॥ तें भक्तीचें स्पष्ट लक्षण ॥ विशद[6] व्हावया श्रवण ॥ पुढती मायेचें तरण ॥ पुसावया कराण मुख्य हेंची ॥ २७ ॥ तो मायातरणोपायविधी ॥ सुगम सांगावया त्रिशुद्धी ॥ अंतरिक्षाधाकुटा सुबुद्धी ॥ प्रबुद्ध प्रज्ञानिधी बोलता जाहला ॥ २८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रबुद्धउवाच ॥ ॥ कर्माण्यारभमाणानां दुःखहत्यै सुखाय च ॥ पश्येत्पाकविपर्यासं मिथुनीचारिणां नृणाम् ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ ॥ मुख्य मायेचें तरण ॥ प्रबुद्धचि जाणे पूर्ण ॥ प्रबुद्ध[7] जाहलिया आपण ॥ मायेचें विंदान[8] तरते तरती ॥ २९ ॥ मनीं विषयाचा छंदू ॥ तो केवळ महाबंधू ॥ विषयत्यागी तो प्रबुद्धु ॥ तोचि विशदू भाव ऐका ॥ २३० ॥ विषयीं लोभलें अत्यंत मन ॥ तेथें नव्हता वैराग्यज्ञान ॥ कदा नव्हे मायेचें तरण ॥ वैराग्यार्थ जाण विषयनिंदी ॥ ३१ ॥ केवळ नश्वर विषय देख ॥ तेंचि मानिती परमसुख ॥ तें सुखचि दुःखदायक ॥ स्त्रीकामें मुख्य माया बांधे ॥ ३२ ॥ वेंचूनि[9] धनाची गांठी ॥ सुखार्थी स्त्री बैसविली पाठीं ॥ तेचि भोगवी दुःखें कोटी ॥ जगीं माया लाठी स्त्रीकामें ॥ ३३ ॥ स्त्रीकामें प्रपंच सबळ ॥ स्त्रीकामें दुःख प्रबळ ॥ स्त्रीकामें मायेसि बळ ॥ स्त्रीकामें सकळ मोहिलें जग ॥ ३४ ॥ आंवडी[10] स्त्री बैसवितां पाठीं ॥ ते प्रपंचाच्या वाढवी कोटी ॥ महामोहाच्या पाडूनि गांठी ॥ दुःखसागरीं[11] लोटी स्त्रीकामें ॥ ३५ ॥ जे नवमास[12] वाहे उदरांत ॥ ते माता करूनि अनाप्त ॥ स्त्रियेसि मानिती अति आप्त ॥ ऐशी माया समर्थ स्त्रीकामें ॥ ३६ ॥ जे तोंडींचें पोटींचें खौंववित[13] ॥ जे सदा सोशी नरकमूत ॥ ते मातेहूनि स्त्री आप्त ॥ जाहली जगांत मायामोहें ॥ ३७ ॥ स्त्रिया मेळवितां असंख्य मिळती ॥ परी माता न मिळे त्रिजगतीं ॥ ऐसें जे सज्ञान जाणती ॥ तेही आप्त मानिती स्त्रियेतें ॥ ३८ ॥ मातेतें भजतां भुक्तिमुक्ती ॥ स्त्रियेतें भजतां नरकप्राप्ती ॥ ऐसें जे शास्त्रज्ञ जाणती ॥ तेही माता उपेक्षिती स्त्रीकामें ॥ ३९ एवं स्त्रीकामाचिया व्याप्ती[14] ॥ माया व्यापिली त्रिजगती ॥ सज्ञानही पडले भ्रांती[15] ॥ स्त्रीकामासक्ती महामाया ॥ २४० ॥ मानूनि विषयाचें सुख ॥ काम्य कर्म करितां देख ॥ तेणें अतिदुःखी होती लोक ॥ दुःख दायक काम्य कर्म ॥ ४१ ॥ कामिनी काम गृहासक्ती ॥ प्राणी प्राणातें स्वयें शिणती ॥ त्या श्रमाची निदानस्थिती ॥ सांगेन तुजप्रती राजाधिराजा ॥ ४२ ॥ निर्मळें[16] जळें भिंती धुतां ॥ जळाची नासे निर्मळता ॥ हात माखती धुतले ह्मणतां ॥ भिंतीही तत्त्वतां निढळ केली ॥ ४३ ॥ तेवीं विषयाचें

---

१ माया तरून जाणें. २ सोपे. ३ संक्षेपानें. ४ ईश्वराच्या मायेनें. ५ एकरूप. ६ स्पष्ट. ७ ज्ञानीच. ८ निदान. ९ मिळवून. १० आवडीनें. ११ दुःखरूप समुद्रांत. १२ नऊ महिनें पर्यंत. १३ खाऊ घालते. १४ व्यापकपणानें. १५ मोहांत. १६ स्वच्छ पाण्यानें.

नि सुखें सुख ॥ नपावतीच ब्रह्मादिक ॥ विषयाचा जे मानिती हरिख[1] ॥ ते परममूर्ख पशुदेही ॥ ४४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नित्यार्त्तिदेन वित्तेन दुर्लभेनात्ममृत्युना ॥ गृहापत्याप्तपशुभिः का प्रीतिः साधितैश्चलैः ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ रातिदिवसू निजनिकटें[2] ॥ मरणेंसी घेतां झटे ॥ कवडीची प्राप्ती नभेटे ॥ प्राणांतकष्टें द्रव्य जोडे ॥ ४५ ॥ एवं कष्टें जोडलें धन ॥ तें महादुःखाचें जन्मस्थान[3] ॥ अर्थअनर्थाचें अधिष्ठान ॥ निजात्ममरण[4] निजमूळ ॥ ४६ ॥ द्रव्य नसतां उपायें शिणवी ॥ जाहल्या संरक्षणीं आंधी लावी ॥ रात्रदिवस हृद्रोग जीवीं ॥ अविश्वासें नांदवी[6] धनलोभू ॥ ४७ ॥ मायबापांशीं चोरी करवी ॥ स्त्रीपुत्रांसी कलहो लावी ॥ सुहृदांतें दूरीं दुरावी[7] ॥ हे द्रव्याची पदवी स्वाभाविक ॥ ४८ ॥ द्रव्यापाशीं आधि व्याधी ॥ द्रव्यापाशीं दुष्टबुद्धी ॥ द्रव्यापाशीं सलोभक्रोधी ॥ असती निरवधी[8] द्रव्यापाशीं ॥ ४९ ॥ द्रव्यापाशीं अतिविकल्प ॥ द्रव्यापाशीं वसे[9] पाप ॥ द्रव्यापाशीं अतिसंताप ॥ पूर्ण दुःखरूप तें द्रव्य ॥ २५० ॥ हें दानें त्यागितां फळ गोमटें[10] ॥ लोभियां नरका ने हटेतटें ॥ द्रव्याऐसेंगा वोखटें[11] ॥ आन[12] नभेटे तिहीं लोकीं ॥ ५१ ॥ नळिया चण्याचे आशा ॥ वानरें मुठी धरणें तोचि फांसा ॥ तेवीं द्रव्यदाराभिलाषा ॥ नरदेहदशा अधःपातीं ॥ ५२ ॥ द्रव्य सहसा नमिळे पाही ॥ मिळे तरी अनीतीं[13] अपायीं ॥ यालागीं द्रव्याचा ठायीं ॥ सुख नाहीं त्रिशुद्धी ॥ ५३ ॥ धन वेंचोनि फाडोवाडें ॥ घर करिती वाडेंकोडें ॥ तें अध्रुवत्वें सवेंचि पडे ॥ थितें[14] द्रव्य बुडे आयुष्येंसी ॥ ५४ ॥ करूनि आयुष्याचा मातेरा ॥ मुद्दलेंसि चणे जोडिले पुत्रा ॥ त्या पुत्राच्या मरणद्वारा ॥ दुःखदुर्धरामाजी पडती ॥ ५५ ॥ प्रपंचींचे सुहृद समस्त ॥ जंव स्वार्थ तंव होती आप्त ॥ स्वार्थविरोधें ते अनाप्त ॥ होऊनि घात सुहृदां करिती ॥ ५६ ॥ करोनियां अतिहव्यासू ॥ मेळविती नानापशू ॥ त्यांचा सवेंचि[15] होयनाशू ॥ तेणें दुःखें त्रासू गृहस्थांसी ॥ ५७ ॥ निजदेहोचि[16] नश्वर[17] येथ ॥ प्रपंच नव्हेगा शाश्वत ॥ अवघें जगचि काळग्रस्त[18] ॥ इहलोकीं समस्त ठकिलें[19] काळें ॥ ५८ ॥ मनुष्यदेहो कर्मभूमिप्राप्त ॥ तो लोक ह्मणती कर्मजित ॥ हा जैसा नश्वर[20] येथ ॥ तैसाच निश्चित नश्वर स्वर्गू ॥ ५९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवं लोकं परं विद्यान्नश्वरं कर्मनिर्मितम् ॥ सतुल्यातिशयध्वंसं यथा मंडलवर्तिनाम् ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ मनीं धरोनि विषयभोग ॥ इहलोकीं[21] करिती याग[22] ॥ पुण्य जोडोनियां सांग ॥ पावती स्वर्ग निजपुण्ययोगें ॥ २६० ॥ स्वर्गसुखा इंद्र अधिपती ॥ तोही पतनार्थ[23] धाकें चित्तीं ॥ विघ्न सुचित्त सांप्रतीं ॥ स्वर्गस्थिती अपाय ॥ ६१ ॥ यापरी निजपुण्यें स्वर्गप्राप्ती ॥ त्यालोकांतें पुण्यजित ह्मणती ॥ तेही पुण्यक्ष

---

[1] संतोष. [2] आपल्या निकडीनें. [3] उत्पत्तीचें ठिकाण. [4] आपल्या आत्म्याचे मरण. [5] मनाचे दुःख. [6] ठेवितो. [7] लावितो. [8] बहुत. [9] राहे. [10] चांगले. [11] वाईट. [12] दुसरे. [13] अन्यायानें. [14] मिळविलेले. [15] लागलीच. [16] आपले शरीर. [17] नाशशील. [18] कालानें गिळिलेले. [19] फसविले. [20] नाशशील. [21] या लोकांत. [22] यज्ञ. [23] पडण्या करितां.

यें क्षया जाती ॥ तेणें धाकें धाकती[1] स्वर्गस्थ श्रेष्ठ ॥ ६२ ॥ गांठीं पुण्य असतां चोख[2] ॥ स्वर्गभोगीं असेल सुख ॥ हेही वार्ता समूळ लटिक ॥ स्वर्गींचे दुःख ऐक राया ॥ ६३ ॥ समानपुण्यें[3] समपदप्राप्ती ॥ त्यासी स्पर्धा[4] कलहो करिती ॥ आपणाहूनि ज्यां अधिक स्थिती ॥ त्यांचा द्वेष चित्तीं अहर्निशीं ॥ ६४ ॥ जैसे राजे मंडळवर्ती ॥ राज्यलोभें कलहो करिती ॥ तैशी स्वर्गस्थां कलहस्थिती ॥ द्वेषें होती अतिदुःखी ॥ ६५ ॥ पतनभयकलहद्वेषवोढी ॥ क्षयातें पावे पुण्यजोडी ॥ अधोमुख पडती बुडीं ॥ याज्ञिकें[5] बापुडीं चरफडती ॥ ६६ ॥ एवं स्वर्गसुख उल्हासू ॥ मानिती ते केवळ पशू ॥ प्रत्यक्ष तेथ द्वेषनाशू ॥ असमसाहसू नित्य कलहो ॥ ६७ ॥ सेविलाचि विषयो नित्य सेविती ॥ परी कदा नव्हे मानसीं तृप्ती ॥ तरी मिथ्या ह्मणोनि नेणती[6] ॥ हे मोहकशक्ती मायेची ॥ ६८ ॥ जैसें वेश्येचें सुख साजणें ॥ वित्त घेऊनि वोसंडणें[7] ॥ तेवीं विषयाचा संग धरणें ॥ तंव तंव होणें अतिदुःखी ॥ ६९ ॥ यालागीं उभयभोग उपाया ॥ जेजे प्रवर्तले गा राया ॥ तेते जाण ठकिले माया ॥ थितें[8] गेलें वायां उत्तम आयुष्य ॥ २७० ॥ कर्मभूमी नरदेह प्राप्त ॥ हें पूर्ण निजभाग्याचें मथित ॥ देव नरदेह[9] वांछित ॥ ते देव केले व्यर्थ विषयार्थीं ॥ ७१ ॥ एवं विषयाची आसक्ती ॥ माया ठकिले नेणों किती ॥ यालागीं विषयाची विरक्ती ॥ करावी गुरुभक्ती तेंचि सांगें ॥ ७२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तस्माद्गुरुं प्रपद्येत जिज्ञासुः श्रेय उत्तमम् ॥ शाब्दे परे च निष्णातं ब्रह्मण्युपशमाश्रयम् ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥ जाणोनि विषयाचें नश्वरपण[10] ॥ पावावयालागीं ब्रह्म पूर्ण ॥ सद्गुरूसि अनन्यशरण ॥ रिघावें[11] संपूर्ण श्रद्धायुक्त ॥ ७३ ॥ सद्गुरु वचनमात्रें माया ॥ तरोनि हा निश्चयो राया ॥ येणें सद्भावें लागतों पायां ॥ पावावया निजस्वार्थू ॥ ७४ ॥ गुरूऐसें जें ह्मणणें ॥ तेंही आहे बहुसालपणें ॥ ऐक राया तीं लक्षणें ॥ तुजकारणें सांगेन ॥ ७५ ॥ एक वेदाध्ययन गुरू ॥ एक व्याख्यानदायी उदारू ॥ एक ज्योतिषज्ञानीं गंभीरू ॥ परी ते सद्गुरू नह्मणती ज्ञाते[12] ॥ ७६ ॥ एक आगमोक्त मंत्र उपासिती ॥ जप करावा विधानयुक्ती ॥ मग कैं होईल निजप्राप्ती ॥ हें नकळे निश्चितीं गुरुशिष्यां ॥ ७७ ॥ एक वायुधारणा[13] लाविती ॥ एक नानालक्ष्यें दाविती ॥ एक हटयोगें गोंविती ॥ एक बैसविती महासमुद्रा ॥ ७८ ॥ एक ब्रह्मानुवादें[14] चोखटू ॥ तत्त्वनिरूपणीं[15] उद्भटू[16] ॥ वैराग्य बोलिवा वरिष्ठू ॥ उपजवी विटू उभयभोगांचा ॥ ७९ ॥ कैसें निरूपिती[17] शुद्धब्रह्म ॥ ऐकोनि सात्विकां येत प्रेम ॥ परी निजहृदयींचा भ्रम ॥ निरसे[18] तें वर्म नेणतीची ॥ २८० ॥ जेवीं उसागुळाचा घाणा ॥ तोंडींचा रसु भरे भाणा[19] ॥ शब्दचोंपटें भरोनि वदना ॥ करी परि[20]

---

[1] भितात. [2] चांगले. [3] सारख्या पुण्यानें. [4] वैर. [5] यज्ञ करणारे. [6] जाणत नाही. [7] स्वाधीन होणे. [8] तितके. [9] मनुष्याचा देह. [10] नाशशीलता. [11] निघावे. [12] ज्ञानी. [13] योगमार्ग, वायु कोंडणें. [14] ब्रह्माच्या कथनानें [15] ब्रह्मरूप सांगण्याविषयीं. [16] शूर. [17] सांगतो. [18] नाहीसा होतो. [19] पात्रांत. [20] फिरणे.

भ्रमणा करकरितू ॥ ८१ ॥ ऐसा जोकां शब्दज्ञानी[1] ॥ उत्तम व्याख्याता ज्ञानगुणी ॥ तो जन रंजवी निरूपणीं ॥ स्वयें कोरडेपणीं कर
करितू ॥ ८२ ॥ योगक्षेम चाले गोमटा[2] ॥ लौकिकीं थोर प्रतिष्ठा ॥ तेथें निजप्राप्तीची उत्कंठा ॥ नवचे वरिष्ठा शिष्यांची ॥ ८३ ॥ जेवीं
अमृत ह्मणतां ॥ चवी नलभेगा[3] सर्वथा ॥ तेवीं शाब्दिकज्ञान योग्यता ॥ अनुभववार्ता स्वयें नुपजे[4] ॥ ८४ ॥ जेणें स्वयें चाखिली नाहीं
चवी ॥ तो दुजयातें गोडी केवीं लावी ॥ यालागीं जो पूर्ण अनुभवी ॥ तो तारी सद्भावें सच्छिष्यासी ॥ ८५ ॥ एवं गुरूपणाची वदंती
॥ असे बहुपणें नांदती ॥ जो करी अपरोक्ष प्राप्ती ॥ त्यातें ह्मणती सद्गुरुस्वामी ॥ ८६ ॥ ज्याचेनि वाक्यें अंसंतता ॥ निःशेष मावळे
तत्त्वतां ॥ त्यासीचि गा सद्गुरुता ॥ वेदशास्त्रार्थीं तत्त्वतां प्रतिपाद्य ॥ ८७ ॥ जे उपदेशिती मंत्रतंत्र ॥ तेही पूज्यत्वें अतिसादर ॥ जेथें
नुरे पूज्यपूजकता विकार ॥ तोचि साचार सद्गुरुस्वामी ॥ ८८ ॥ एकाचें शुद्ध ब्रह्मज्ञान ॥ वस्तु देखोनि विराले मन ॥ मावळलें द्वैताचें भान
॥ पडिलें मौन चहूंवाचा ॥ ८९ ॥ इंद्रियें ठकारिलीं[6] समस्त ॥ प्राण पांगुळला जेथिंचा तेथ ॥ वस्तु देखोनियां परमाद्भुत ॥ पडले तटस्थ
देहभावा ॥ २९० ॥ ऐसा जो आत्मानुभवी ॥ त्यातें सद्भावें शिष्य विनवी ॥ तंव तो पुसे ना समजावी ॥ ताटस्थ्य स्वभावी अबोलणा
॥ ९१ ॥ एका अनुभवा आलें ब्रह्म ॥ फिटला बाध्यबाधकतेचा भ्रम ॥ मोडलें द्वैतभावाचें कर्म ॥ जगीं विषम[7] असेना ॥ ९२ ॥
परी अचुंबित वर्तणें ॥ अघटमान कर्म करणें ॥ अत्यंत उग्रता मिरवणें ॥ दुर्धरपणें भयानकू ॥ ९३ ॥ आपण आपणियामाजी हंसत ॥
ध्वनित बोले परमार्थ ॥ तेथें बोधेना शिष्याचें चित्त ॥ पडे दुश्चित्त तेठायीं ॥ ९४ ॥ ऐसा जो वर्ते ब्रह्मज्ञानी ॥ त्याची ब्रह्मस्थिती नमने जनीं ॥
मा कोण जाईल भाव धरोनी ॥ बोधालागोनी त्यापाशीं ॥ ९५ ॥ आतां सद्गुरूचीं जीं निजलक्षणें ॥ राया सांगेन तुजकारणें ॥ जे ऐकतां
अंतःकरणें ॥ सुखी होणें सद्भावें ॥ ९६ ॥ तरी जो कायावाचामनें ॥ अतिकृपाळू दीनाकारणें[8] ॥ तोडी शिष्यांचीं भवबंधनें[9] ॥ उठवी
ठाणें अहंकाराचें ॥ ९७ ॥ जो शब्दज्ञानें पारंगतू ॥ ब्रह्मानंदें सदा डुल्लतू ॥ शिष्यप्रबोधनीं[10] समर्थू ॥ यथोचितू निजभावें ॥ ९८ ॥
ज्याचा जैसाजैसा भावो ॥ तैसातैसा करी अनुभवो ॥ तरी गुरुत्वाचा अहंभावो ॥ अणुमात्र पहाहो धरीना ॥ ९९ ॥ शिष्यापासूनि
सेवा घेणें ॥ हें स्वप्नींही नस्मरे मनें ॥ शिष्याची सेवा स्वयें करणें ॥ पूज्यत्वें पाहणें निज शिष्यां ॥ ३०० ॥ शिष्य देखावा पुत्रा
समान ॥ हें स्मृतिवाक्य अ[illegible] प्रमाण ॥ दृष्टी देखों नेणे[11] गौण ॥ शिष्या देखे पूर्ण ब्रह्मत्वें ॥ १ ॥ शिष्यसेवा करी निजभावार्थें ॥

---

१ शब्दजाणणारा. २ चांगला. ३ नमिळे. ४ उत्पन्न होत नाही. ५ खलपणा. ६ राहिली. ७ कमी जास्ती. ८ शिष्याकारणे. ९ जन्ममरणरूप पाश. १० शिष्याच्या बोधाविषयी. ११ जाणत नाही.

पशी तो सेवक नह्मणे त्यातें ॥ ज्यासी भगवद्रूप[१] सर्वभूतें ॥ शिष्य वेगळा तेथें सेवकत्वें नुरे[२] ॥ २ ॥ ऐसा मी एक महायोगी ॥ हेंही नमिरवी तो जगीं ॥ गुरुत्वाचा ताठा[३] अंगीं ॥ सर्वथा शिंगीं[४] लागों नेदी ॥ ३ ॥ आपुल्या योगक्षेमाचें सांकडें[५] ॥ स्वप्नींही नघाली शिष्याकडे ॥ शिष्यसंकटीं अतिगाढें ॥ निवारी रोकडें निजांगें जो ॥ ४ ॥ मी एक अकर्ता निजात्मयोगी ॥ ह्मणोनि विषयातें न भोगी ॥ अथवा विषयो निःशेष त्यागी ॥ हाही आग्रहो अंगीं असेना ॥ ५ ॥ तो विषयभोगी ना स्वयें त्यागी ॥ तो अदृष्टाचा निजविभागी ॥ लावूनियां देहाच्या अंगीं ॥ परब्रह्मयोगी विचरत ॥ ६ ॥ देह दैवें पालखीमाजी चढे ॥ अथवा विष्ठेमाजी पडे ॥ तें दोहींचें सुखदुःख त्याकडे ॥ मी ह्मणोनि पुढें कदा नरिघे[६] ॥ ७ ॥ देहीं असोनि नाहीं अहंकृती ॥ गेहीं असोनि नाहीं गृहासक्ती ॥ शेखीं लोकांमाजी लौकिकस्थिती ॥ सुखें वर्तती लोकांसरिखे ॥ ८ ॥ त्यासि स्त्री ह्मणें माझा भर्ता ॥ पुत्र ह्मणे माझा पिता ॥ शिष्य ह्मणती गुरु तत्त्वतां ॥ तो त्यांहूनि परता[७] त्यांमाजी वर्तें ॥ ९ ॥ ऐशिया पूर्णप्रतीती ॥ आचरोनि दावी भक्ती ॥ हरि भजावा सर्वांभूतीं[८] ॥ हेंच शिष्यांप्रती उपदेशी ॥ ३१० ॥ हीं सद्गुरूचीं निजलक्षणें ॥ पंडितां नकळती ज्ञातेपणें[९] ॥ पूर्णानुभवी जाणती खुणें ॥ इतरांचें जाणणें पांगुळे तेथें ॥ ॥ ११ ॥ त्याचे गुरुत्वाची वोळखण ॥ अंगीं निजशांति पूर्ण ॥ हेंचि सद्गुरुत्वाचें लक्षण ॥ मुख्यभूषण हेंचि राया ॥ १२ ॥ जगीं शांति जाहली परदेशी ॥ कोठेंही ठाव नमिळे तिशी ॥ ते आली सद्गुरुपायांपाशीं ॥ सुखवासासी वसावया[१०] ॥ १३ ॥ यापरी सद्गुरुपाशी शांती ॥ स्वयें आली सुखवासवस्ती ॥ जेवीं कां माहेरा आंतौती[११] ॥ स्वानंदें क्रीडती कन्या जैशी ॥ १४ ॥ जाणोनि वेदशास्त्र निश्चितीं ॥ जो नमिरवी गा व्युत्पत्ती ॥ ज्यासि अपरोक्ष पूर्ण शांती ॥ तो सद्गुरुमूर्ती निश्चयें राया ॥ १५ ॥ झणी श्रोते कोपती[१२] येथ ॥ ह्मणतील ग्रंथ वाढविला व्यर्थ ॥ निष्णात[१३] या पदाचा अर्थ ॥ काढितां येथ स्फुरलें हो ॥ १६ ॥ हे माझे गांठीची नव्हे युक्ती ॥ सद्गुरु आपण आपुली स्थिती ॥ वोलवीतसे ग्रंथार्थीं ॥ पदपदार्थीं साधूनी ॥ १७ ॥ तरीं सद्गुरूचीं लक्षणें ॥ न वर्णवती अगाधपणें ॥ वेद वेडावले मुकेपणें ॥ तेथें माझें बोलणें सरे केंवीं[१४] ॥ १८ ॥ येथ आश्चर्य कैसें देखा ॥ श्रीभागवत देशभाखा[१५] ॥ परमार्थ साधिला नेटका ॥ तुष्टला निजसखा जनार्दनस्वामी ॥ १९ ॥ एका जनार्दना शरण ॥ त्याची जैं होय कृपा परिपूर्ण ॥ त्यादेहीं असतां देहबंधन ॥ नातळे[१६] जाण गुरुभक्तां ॥ ३२० ॥ ज्याचे सेवितां निजचरण ॥ देहीं नबाधी देहबंधन ॥ त्यासि जाहलिया अनन्यशरण ॥ दे अगाध कोण

---

[१] ईश्वररूप. [२] उरत नाही. [३] अभिमान. [४] पूर्णत्वास. [५] संकट. [६] येत नाही. [७] वेगळा. [८] सर्व भूतामध्यें. [९] जाणतेपणाच्या अभिमानानें. [१०] राहावया. [११] अतोनात. [१२] रागावतील. [१३] कुशल. [१४] कसे. [१५] प्राकृत भाषा. [१६] नमिळे.

हें नकळे ॥ २१ ॥ नकरितां सद्गुरुभक्ती ॥ कदा नव्हे परमार्थप्राप्ती ॥ यालागीं सद्गुरुभक्ती ॥ बोलिली ग्रंथीं शिष्यहितार्थ ॥ २२ ॥ यालागीं पूर्ण सद्गुरूपाशीं ॥ अनन्यशरण होतां त्यासी ॥ तो सद्भावें निववी[१] शिष्यासी ॥ निजबोधेंसी यथार्थ ॥ २३ ॥ सद्गुरुस्थितीचें निरूपण ॥ राया सांगीतलें संपूर्ण ॥ अतां शिष्याचें लक्षण ॥ सावधान अवधारी[२] ॥ २४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तत्र भागवतान् धर्मान् शिक्षेद्गुर्वात्मदैवतः ॥ अमाययाऽनुवृत्त्या यैस्तुष्येदात्मात्मदो हरिः ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ वरीवरी दिसती सात्विक ॥ भीतरी विकल्पी शिष्य एक ॥ एक ते केवळ दांभिक ॥ एक ज्ञानठक अतिधूर्त ॥ २५ ॥ एक ते केवळ प्रतिष्ठाकाम[३] ॥ एकासि पूज्यतेचा संभ्रम ॥ एकासि जाणिवेचा आक्रम ॥ एकाचे पोटीं भ्रम महासिद्धीचा ॥ २६ ॥ एक वाग्वादी वाजट[४] ॥ एक अतिशयेंसी कर्मठ ॥ एक केवळ कर्मनष्ट ॥ आह्मी ब्रह्मनिष्ठ अभिमानें ॥ २७ ॥ एका आवडे वायुधारण ॥ एका आसनजयाभिमान ॥ एकाचें संशयी मन ॥ विश्वास पूर्ण दृढ नाहीं ॥ २८ ॥ एक आदरें उपदेश घेती ॥ मग होय नव्हे विकल्प चित्तीं ॥ ऐशा अनेक शिष्यपंक्ती ॥ ते जाण निश्चीतीं मायिक ॥ ॥ २९ ॥ आतां जेकां अमायिक[५] ॥ शोधितसत्वाचे सात्विक ॥ मुख्य परमार्था साधक ॥ जे अवंचक सर्वस्वें ॥ ३३० ॥ जे गुरुचरणाचे अंकिले ॥ जे गुरुवाक्या जीवें विकले ॥ सद्गुरुलागीं वहिले ॥ सर्वस्व आपुलें वोवाळिती ॥ ३१ ॥ जो सद्गुरूच्या बोलावरी ॥ जीविताची कुरवंडी[६] करी ॥ जो गुरुआज्ञेबाहेरी ॥ तिळभरी होंन[७]शके ॥ ३२ ॥ सद्गुरूतें मनुष्यबुद्धी ॥ पांहोचि नेणे त्रिशुद्धी ॥ सेवेलागीं निरवधी[८] ॥ हर्षानंदीं तत्पर ॥ ३३ ॥ निजभावार्थें[९] सादर ॥ सेवेलागीं अतितत्पर ॥ शरीर आठही प्रहर ॥ आणुमात्र वंचीना ॥ ३४ ॥ उंच अथवा नीच काम ॥ ह्मणों नेणे मनोधर्म ॥ गौण करोनि नित्यकर्म ॥ मानी उत्तमोत्तम[१०] गुरुसेवा ॥ ३५ ॥ सेवेलागीं निष्कपट ॥ नित्य निजभावें चोखट ॥ जंवजंव सेवा पडे सदट ॥ तंवतंव उद्भट उल्हासु ॥ ३६ ॥ सच्छिष्य असच्छिष्य समुदावो[११] ॥ सद्गुरूसि सारिखेचि पहाहो ॥ ज्याचे हृदयीं जैसा भावो ॥ तैसा पहाहो फळभोग ॥ ३७ ॥ भावेषु[१२] विद्यते[१३] देवो ॥ हा उपदेशी मुख्य निर्वाहो ॥ आपुला आपणिया भावो ॥ फळभोग पहाहो भोगवी ॥ ३८ ॥ चुकवावया मृत्यूचा ठावो ॥ जाणिवे आणितां निजभावो ॥ हिरण्यकशिपु नांडला[१४] पहाहो ॥ संधी साधोनि देवो निर्दाळी[१५] त्यासी ॥ ३९ ॥ तेथेंचि प्रऱ्हादाचा भावो ॥ मज रक्षिता[१६] देवाधिदेवो ॥ त्यासी साक्षेपें मारितां रावो ॥ मरणाचि वावो भावार्थें केलें ॥ ३४० ॥ परमार्थीं जें जाणपण ॥ ते जाणावी नागवण[१७] ॥ यालागीं सद्भावें

---

[१] शांतवी. [२] ऐक. [३] मोठेपणाची इच्छा करणारे. [४] वाचाळ. [५] मायारहित. [६] वोवाळणी. [७] होत नाही. [८] निःसीम. [९] आपल्या भावाच्या बळानें. [१०] चांगल्यापेक्षा चांगली. [११] समुदाय. [१२] भावामध्ये. [१३] आहे. [१४] नडीवला. [१५] नाहीसा करी. [१६] रक्षण करणारा. [१७] नाश.

जो संपूर्ण ॥ तो जन्ममरण छेदकू[1] ॥ ४१ ॥ मी शिष्यपरिक्षकू ज्ञाता ॥ हे सद्गुरूसि नाहीं अहंता ॥ तेथें जैशी त्याची भावार्थता ॥ तैशातैशा
अर्था तो पावे ॥ ४२ ॥ हें असो सच्छिष्याचा सद्भावो ॥ राया अभिनव[2] कैसा पहाहो ॥ गुरु ब्रह्म ऐक्यभावो ॥ निजनिर्वाहो
निश्टंक ॥ ४३ ॥ माझ्या इंद्रियवृत्ती चाळिता ॥ सद्गुरु निजात्मा मज आंतौता[3] ॥ बाह्य सेवेलागीं सर्वथा ॥ ब्रह्ममूर्ती तत्त्वतां सद्गुरु
मानी ॥ ४४ ॥ सद्गुरुचरणीं आपण ॥ चित्तवित्त[4]जीवितेंसि संपूर्ण ॥ करून घाली आत्मार्पण ॥ सर्वस्वें संपूर्ण सर्वभावें ॥ ४५ ॥ तेथें
संतुष्ठला स्वामी पूर्ण ॥ तोही सर्वस्वें भुलोन ॥ आवडी निजांगें आपण ॥ सेवका आधीन स्वामी होय ॥ ४६ ॥ आत्मार्पण करितां बळी
॥ द्वारीं द्वारपाळ जाहला वनमाळी ॥ ऐसी भजनभावाची नव्हाळी[5] ॥ सेवकाजवळी स्वामी तिष्ठे[6] ॥ ४७ ॥ एवढी ये अगाधप्रीती ॥
उत्तमभक्त[7] स्वयें पावती ॥ भाळ्याभोळ्यां हेचि स्थिती ॥ कैशा रीतीं आतुडे ॥ ४८ ॥ याचिलागीं सद्गुरुपाशीं ॥ शरण रिघावें सद्भावेंशी
॥ तो संतोषोनियां शिष्यासी ॥ भजनधर्मासी उपदेशी ॥ ४९ ॥ तेणें भजनें भगवंत ॥ भजोनि जाहले उत्तम भक्त ॥ ते भागवत
धर्म समस्त ॥ शिकावे निश्चित सद्भावेंसी ॥ ३५० ॥ मुख्य भागवतधर्मस्थिती ॥ अवश्य करावी सत्संगती[8] ॥ हेंचि सद्गुरु उपदेशिती
॥ असत्संगतीत्यागार्थ ॥ ५१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सर्वतो मनसोऽसंगमादौ संगं च साधुषु ॥ दयां मैत्रीं प्रश्रयं च भूतेष्वद्धा यथोचितम्
॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ सर्वांपासोनि निःसंग ॥ जरी मनीं होणें आहे चांग[9] ॥ तैं अवश्य धरावा सत्संग ॥ असत्संग[10] त्यागावा ॥
॥ ५२ ॥ मुख्य असत्संग देहसंगती ॥ त्याची समूळ करावी निवृत्ती ॥ जगीं दाटुगी सत्संगती ॥ जाण निश्चितीं नृपनाथा ॥ ५३ ॥
जेथें दया मैत्री प्रश्रयो पूर्ण ॥ मुख्यत्वें हें त्रिविध लक्षण ॥ अवश्यें सी करावें आपण ॥ सत्संग प्रमाण स्वहितासी ॥ ५४ ॥ सांडोनियां
थोरपण ॥ साधूसि लीनें[11] व्हावें संपूर्ण ॥ सांडोनिया देहाभिमान ॥ त्यासी लोटांगण घालावें ॥ ५५ ॥ साधूपरता पूज्य पहाहो ॥ जगीं
नाहीं आन[12] नदेवो ॥ संतपूजनें देवाधिदेवो ॥ स्वयमेवो संतुष्टे ॥ ५६ ॥ संतपदींचें रजःकण ॥ शिरीं वंदावे श्रद्धेनें पूर्ण ॥ संतांपुढें जाणपण[13]
॥ सर्वथा आपण नमिरवावें ॥ ५७ ॥ देखोनि संतसमुदावो ॥ अनन्यगती भगवद्भावो ॥ भगवद्भावें नम्रस्वभावो ॥ प्रश्रयो[14] पहाहो
यानाव ॥ ५८ ॥ नम्रतें सेवितां संतचरण ॥ जेथें भूतदया वाढे पूर्ण ॥ हें दयेचें निजलक्षण ॥ सावधान अवधारी ॥ ५९ ॥
भूतांसि कठिणपण ॥ देखतांचि निघोंपाहे प्राण ॥ मा स्वयें करील आपण ॥ हें सर्वथा जाण स्वप्नीं नघडे ॥ ३६० ॥ जेणें आपणासि

---

१ नाश करणारा. २ नवल. ३ आंत आंत. ४ मन, धन. ५ मासला, नवी वस्तु. ६ राहे. ७ सात्विक भक्त. ८ साधूची संगति. ९ चांगले. १० दुष्टसंगति. ११ नम्र. १२ अन्य, दुसरा. १३ ज्ञातेपण. १४ नम्रता.

होय दुःख ॥ तें भूतांसि करिना [1]निःशेख ॥ जेणें आपणासि होयसुख ॥ तें आवश्यक करी दीना ॥ ६१ ॥ सर्वभूतीं दया समान ॥ कदा नबोले कठिणपण ॥ भूतांची पीडानिवारण ॥ करोनि आपण सुखोपाय चिंती ॥ ६२ ॥ जीवमात्रीं [2]दुरुक्ती बोलतां ॥ [3]जिव्हेच्या घेवोंपाहे जीविता ॥ भूतीं दुष्टपण चाळितां ॥ समूळ [4]निजचित्ता निर्दाळूंपाहे ॥ ६३ ॥ भूतांसि जेथें पीडापावे ॥ त्यातळीं जीव घालूं धांवे ॥ जीवापरीस भूतें सर्वें ॥ दयागौरवें पढियंती ॥ ६४ ॥ ऐसें जें कारुण्य पूर्ण ॥ त्यानाव दया संपूर्ण ॥ आतां मैत्रीचें लक्षण ॥ असाधारण तें ऐका ॥ ६५ ॥ सर्वभूतांचाठायीं ॥ [5]सुहृदांवांचोनि दुजें नाहीं ॥ तरी नकरितांचि मैत्री पाही ॥ ठायींचेठायीं अलोलिक ॥ ६६ ॥ जो विषययोगें [6]नविटे ॥ नानाविकल्पीं न उठे ॥ आलिया परमसंकटें ॥ मैत्री नेटेंपाटें [7]सदा [8]ग्राह्य ॥ ६७ ॥ यानाव गा मित्रभावो ॥ प्राण गेलिया नतुटे पहाहो ॥ देखतां कल्पांतकाळघावो ॥ निजमित्रसमुदावो एकवटेकीं ॥ ६८ ॥ देशीं आचरतां निजस्थिती ॥ श्रद्धा उपजे सर्वांभूतीं ॥ त्या श्रद्धेची व्युत्पत्ती ॥ [9]यथानिगुतीं सांगेन ॥ ६९ ॥ नवल श्रद्धेचें लक्षण ॥ ब्रह्मा मुंगी समसमान ॥ तरी यथोचित विधान ॥ सर्वथा जाण चुकेना ॥ ३७० ॥ अर्घ्यपाद्यादिपूजन ॥ सकळदान आणि सन्मान ॥ हे श्रद्धा ब्राह्मणीं संपूर्ण ॥ एकासि तें जाण अन्नमात्रची ॥ ७१ ॥ एका अन्न आछादन ॥ एकासि ते कोरडे कण ॥ एका तृण आणि जीवन ॥ एका [10]पयपान यथोचितें ॥ ७२ ॥ जेणें ज्यासि सुख संपूर्ण ॥ तेंतें करी उचित श्रद्धे जाण ॥ अनुचित श्रद्धेचें विंदान ॥ दुःख करी संपूर्ण सर्वार्थीं ॥ ७३ ॥ जेवीं ब्राह्मणा वाढिलें [11]तृण ॥ गाईस वाढिलें [12]मिष्टान्न ॥ [13]श्वानासि बैसणें सिंहासन ॥ साधूसि आसन थारोळा ॥ ७४ ॥ व्याघ्रासि पडिल्या लंघन ॥ त्यासि अर्पूनये गोदान ॥ गाय गावल्या संपूर्ण ॥ तैलाभ्यंजन करूंनये ॥ ७५ ॥ होकां देह इंद्रियें जरी एकें ॥ तरी जिव्हाकर्म नव्हें नाकें ॥ तेवीं एक भूतात्मा [14]भूतवेखें उचितोन्मुखें योजावा ॥ ७६ ॥ करितां [15]यथोचित अर्पण ॥ जरी क्रिया दिसे भिन्नभिन्न ॥ तरी अंतरश्रद्धा अभिन्न ॥ हें मुख्य लक्षण भागवतधर्मीं ॥ ७७ ॥ भूतीं भूतात्मा [16]अभिन्नस्थिती ॥ दया मैत्री साधूंची भक्ती ॥ हेच [17]आतुडे कैशा रीतीं ॥ प्रबुद्ध तदर्थीं उपाव सांगे ॥ ७८ ॥ तेचि नवश्लोकीं श्लोकोक्ती ॥ समूळ भागवतधर्म स्थिती ॥ प्रबुद्ध सांगे रायाप्रती ॥ साधकां [18]निजप्राप्ती साधावया ॥ ७९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शौचं तपस्तितिक्षां च मौनं स्वाध्यायमार्जवम् ॥ ब्रह्मचर्यमहिंसां च समत्वं द्वंद्वसंज्ञयोः ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ मुख्यसाधावया [19]परमार्था ॥ अवश्य पाहिजे गा [20]शुचिता ॥ शुचि

---

१ सर्व. २ वाईट भाषण. ३ जिभेच्या. ४ आपल्या मनास. ५ आप्तावाचून. ६ विटत नाही. ७ सर्वकाल. ८ ग्रहण करण्यास. ९ यथाशास्त्र. १० दूधपिणें. ११ गवत. १२ गोड अन्न. १३ कुत्र्यास. १४ भूतांच्या वेषानें. १५ यथायोग्य. १६ एकरूपानें. १७ मिळे. १८ आत्मप्राप्ति. १९ मोक्षास. २० पवित्रता.

त्वावांचोनि तत्वतां ॥ नलभे हातां निजस्वार्थ ॥ ३८० ॥ यालागीं गा नृपनाथा ॥ शुद्ध शौचाची ऐक कथा ॥ [1]अंतर मळ [2]नक्षाळि
तां ॥ नलभे हातां [3]बाह्यशुद्धी ॥ ८१ ॥ मन मळिण वासनामळें ॥ तें नकरितां सोंविळें ॥ बाह्य पवित्रता [4]अहंबळें ॥ तें जाण आंधळें
न्याहाळी जैसें ॥ ८२ ॥ मन मळिण वासनामळें ॥ तें प्रक्षाळूनि सोंविळें ॥ करावें गा भावबळें ॥ गुरुवाक्य मेळें निजनिष्ठा ॥ ८३ ॥
सोनें जेवीं पुटीं पडे ॥ मळ तुटे वाणी चढे ॥ तेवीं गुरुसेवा जडत्व मोडे ॥ [5]चित्तशुद्धी जोडे निर्दुष्ट ॥ ८४ ॥ आरशासि सहाणीं तोडि
जे ॥ तेणें स्वमुखा शुद्धत्व जोडिजे ॥ तेवीं चित्तशुद्धी उघडिजे ॥ सहजीं सहजें निजशुद्धी ॥ ८५ ॥ लोहें परीस झांकिजे ॥ तंव [6]लोह
त्वा [7]मुंकिजे ॥ तेवीं [8]अंतर शुद्धीनें कीजे ॥ महानिर्बुजे स्थूळबुद्धी ॥ ८६ ॥ सूर्यासन्मुख सूर्यकांत ॥ झालिया शुद्धत्वें होय दीप्त ॥ ते प्र
भा बाह्य प्रकाशत ॥ अग्निहोत्रार्थ [9]महायागा ॥ ८७ ॥ तेवीं गुरुवाक्यें अंतरशुद्धता ॥ सबाह्य आली शुचिता ॥ हे नकरिती जे पवित्र
ता ॥ ते जाण तत्त्वतां [10]अतिभिंडिमा ॥ ८८ ॥ अल्पजळ शौचाप्रती ॥ तेणें हात [11]करकटले ठाती ॥ शेवटीं गिरबडे बृहती ॥ तेवीं विक
ल्पीं होती अपवित्र ॥ ८९ ॥ भरलें काळकूट जीवीं ॥ वरी टवटव अतिबरवी ॥ तें [12]इंद्रावन कोणही नसेवी ॥ अंतरस्वभावीं अतिमळि
ण ॥ ३९० ॥ तीर्थीं धुतला रजकराजु ॥ तो काय होईल शुद्ध द्विजु ॥ नटें घेतला [13]राजध्वजू ॥ तो नव्हे पूज्यू बाह्यक्रियावशें ॥ ९१ ॥
सुंदरी सुकुमार साजिरी ॥ [14]वोठीं कुष्टता तिळभरी ॥ झाल्या तीतें कोणी नवरी ॥ वरीवरी बरी दिसतांही ॥ ९२ ॥ नागवी माथां मो
त्यांची जाळी ॥ शिंबरी सुदाणी दाणा ल्याली ॥ तेवी बाह्य पवित्रता दाविली ॥ तेते केली निजभंडिमा ॥ ९३ ॥ दहें [15]मोखला [16]वाय
सू ॥ तो काय होईल राजहंसू ॥ दहीं ह्मणोनि [17]मंथितां कापुसू ॥ टसी नव्हे [18]उपहासू जगीं प्रगटे ॥ ९४ ॥ तेवीं अंतरीं विकल्पु असतां ॥
बाह्य जेजे पवित्रता ॥ तेते क्रिया नृपनाथा ॥ जाण तत्त्वतां [19]अतिभंडिमा ॥ ९५ ॥ अंतर [20]क्षाळिलें गुरुप्रतीती ॥ बाह्य क्षाळिलें शास्त्र
युक्ती ॥ ऐसें [21]शुचित्व निजनिश्चितीं ॥ अद्वैतास्थिती तेथें नांदे ॥ ९६ ॥ [22]अंतरीं शुचित्व पूर्णवसे ॥ तें बाह्यकर्मीं स्वयें प्रकाशे ॥ तें शुचि
त्वचि अनायासें ॥ परमार्थदशे प्रकाशी ॥ ९७ ॥ ईश्वरभावाचें निजवर्म ॥ त्याचे पोटीं रिघल्या सप्रेम ॥ त्याचें कर्मचि होय ब्रह्म ॥
त्या देहभ्रम बाधीना ॥ ९८ ॥ या नाम [23]शुचिष्मत्ता ॥ सत्य जाणगा नृपनाथा ॥ तयाचीही स्थिती आतां ॥ ऐक तत्त्वतां सांगेन ॥ ९९ ॥ [24]शरीर

---

१ मनांतील. २ नधुता. ३ बाहेरची पवित्रता. ४ अहंकाराच्या बळानें. ५ मनाची शुद्धि. ६ लोखंडपणास. ७ सोडिजे. ८ मन. ९ मोठ्या यज्ञास. १० अत्यंत खल. ११ मळकट. १२ कडू इंद्रावन. १३ राजाचा वेष. १४ ओठावर. १५ लागला. १६ कावळा. १७ घुसळिता. १८ थट्टा. १९ अतिथट्टा. २० धुतले. २१ पवित्रत्व. २२ मनांत. २३ पवित्रता. २४ शरीरास दुःख देणें.

शोषणा नाव तप ॥ तें प्रारब्धें भोगानुरूप ॥ हृदयीं वाहणें कृष्णस्वरूप ॥ तो शुद्ध साक्षेप तपाचा ॥ ४०० ॥ जेवीं धुरसोनि[1] दिठी[2] ॥
सैरा रणामाजी उठी ॥ तेवीं ईश्वर धरोनि पोटीं ॥ वर्ते तो स्पर्शी तपिया[3] शुद्ध ॥ १ ॥ हेंचि तपाचें निज स्वरूप ॥ याचि नाव शुद्ध तप ॥
यावरतें नचले रूप ॥ व्यर्थ वाग्जल्प[4] कां करावे ॥ २ ॥ द्वंद्वसहिष्णुता मुमुक्षा ॥ यानाव म्हणिजे तितिक्षा ॥ तेही आणावया लक्षा ॥
नृपाध्यक्षा अवधारी ॥ ३ ॥ सुखदुःख उभयभोग ॥ दोंमाजी अखंड आपुलें अंग ॥ जेवीं चित्रींची वाघीण आणि वाघ ॥ दोहीं
माजी सांग निजत्वें भिंती ॥ ४ ॥ जेवीं दावाग्नीचे उल्हाळे ॥ आकाश जैसें नपोळे ॥ असोनि त्याचेनि मेळें ॥ त्यावेगळें अलिप्त ॥ ५ ॥
शीतळ जळ कां हींव पडे ॥ पृथ्वी निजक्षमा नेंकांकुडे[5] ॥ तेवीं निजस्वरूप सुरवाडे ॥ द्वंद्वा नातुडे[6] निजसाधू ॥ ६ ॥ शरीर जरीं हिंवें
कांपे ॥ तेणें देह कांपे साधूं नकांपे ॥ शरीर अतिउष्णें तापे ॥ परी साधू नतापे देहतापामाजी ॥ ७ ॥ सुखें देखोनि दिठी ॥ ज्या गो
डिया घाली मीठी ॥ दुःखही त्याची आवडी घोंटी ॥ द्वंद्वसहिष्णुता मोठी यानाव राया ॥ ८ ॥ गोफणगुंडा सन्मुख ॥ लागतां अवश्य
उठे दुःख ॥ तोच सुवर्णाचा जाहलिया देख ॥ दुःख लोपोनि सुख अनिवार[7] वाढे ॥ ९ ॥ सुख दुःखप्रकाशक ॥ निजवस्तु असे एक ॥
त्यां एकात्मता देख ॥ द्वंद्वे साहजिक सुखें साधिती ॥ ४१० ॥ तेवीं द्वंद्वाचें जाणपण[8] ॥ जाणवीत असे जें ज्ञान ॥ तें जाणीतल्या आ
पण ॥ द्वंद्वें संपूर्ण निर्द्वंद्वें होती ॥ ११ ॥ रस उसीं कठिणपणें ॥ त्यामाजी गोडी अखंडपणें ॥ तंव द्वंद्वामाजी चिद्घनें ॥ अखंडदंडायमा
नें वस्ती कीजे ॥ १२ ॥ ऐशी हे अखंडता ॥ जंव नये साधकांचे हाता ॥ तंव द्वंद्वाची सहनता ॥ नये नृपनाथा निश्चयेंसी ॥ १३ ॥ या
नाव द्वंद्वसहन[9] ॥ निजनिश्चयें जाण पूर्ण ॥ आतां मौनाचें लक्षण ॥ सावधान अवधारी ॥ १४ ॥ वाग्वाद करावा जनीं ॥ तैं दृढ व्हावें
देहाभिमानीं ॥ सांडविला तो सद्गुरूनीं ॥ निःशेष धोउनी शब्देंसी ॥ १५ ॥ सद्गुरुवचन पडतां कानीं ॥ स्तुति निंदा गिळोनि[10] दोन्हीं ॥ बो
ल बोलते निरसुनी[11] ॥ हृदयभुवनीं परिपक्कले ॥ १६ ॥ जेव्हां ज्याचे बोलावे अवगुण ॥ तेथें तेथें दिसे आपण ॥ यालागीं बोलतां पै
शुन्य ॥ पडे मौन गुरुवाक्यें ॥ १७ ॥ गुण देखोनियां स्तवन[12] ॥ करितां पडे दृढ मौन ॥ मीचि स्तव्य स्तविता स्तवन ॥ मज म्यां वानि[13]
तां पूर्ण मूर्खत्व माझें ॥ १८ ॥ निजात्मा निःशेष नसे ॥ ऐसा रिता ठाव नदिसे ॥ तेथें जेंजें काहीं दिसे ॥ तें आत्मप्रकाशें[14] सदोदित ॥
॥ १९ ॥ ऐशी सद्गुरूनीं दाखविली युक्ती ॥ ती विश्वासें स्थिरावली[15] चित्तीं ॥ यालागीं[16] निंदा आणि स्तुती ॥ वाचेप्रती बोलेना ॥

---

[1] धुरानें भरून. [2] दृष्टि. [3] तपस्वी. [4] बडबड. [5] सोडीत नाही. [6] स्वाधीन होत नाहो. [7] अधीक. [8] ज्ञातेपण. [9] शीत व उष्ण यांचे सहन करणे. [10] खाऊन. [11] नाहीसें करून. [12] स्तुति. [13] वर्णन करितां. [14] आत्म्याच्या दर्शनानें. [15] स्थिर झाली. [16] याकरिता.

॥ ४२० ॥ संवाद करावा निजस्वार्थी ॥ तंव सद्गुरूच्या वचनोक्ती ॥ खुंटल्या वेदशास्त्रांच्या युक्ती ॥ त्यावरी स्थिती चढेना ॥ २१ ॥ एवं स्तुति निंदा वाग्वाद ॥ करितां खुंटला संवाद ॥ महामौनें अतिशुद्ध ॥ परमानंद[1] साधकां ॥ २२ ॥ ऐसें साधावया दृढ मौन ॥ सद्गुरु शिकवी वेदाध्ययन ॥ उपनिषदर्थ विवेचून[2] ॥ पढवी संपूर्ण अर्थावबोधें ॥ २३ ॥ अथवा अतिशयें दृढ मौन ॥ श्रीरामकृष्णनामस्मरण ॥ अखंड नामें गर्जतां पूर्ण ॥ वेदार्थ जाण तिष्ठती पुढें ॥ २४ ॥ नित्य रामनाम गर्जे वाणी ॥ त्या तीर्थें येती लोटांगणीं ॥ सुरवर[3] लागती चरणीं ॥ यम पायवणी[4] स्वयें वंदी ॥ २५ ॥ रामनामाचें जें स्मरण ॥ यानांव गा स्वाध्याय जाण ॥ वेदें नाम स्तविलें पूर्ण ॥ शुद्ध अध्ययन हरिनाम ॥ २६ ॥ वेदू अथवा नामस्मरण ॥ यानांव गा स्वाध्यायो जाण ॥ आतां आर्जवाचें लक्षण ॥ ऐके संपूर्ण महाराजा ॥ २७ ॥ आतां आर्जव तें ऐसें ॥ सर्वां जीवां जीवन जैसें ॥ कां तंतू जैसा निजविलासें[5] ॥ अविरोधू आभासे पटाआंतू[6] ॥ २८ ॥ साखरेचें इंद्रावण ॥ केलिया नवचे गोडपण ॥ तैसें विषमही जीवा जाण ॥ आर्जवें पूर्ण रंजवी[7] स्वभावें ॥ २९ ॥ वक्र चंद्राची चंद्रिका ॥ परी अमृत वक्र नव्हे देखा ॥ तैसें देखोनि विषमलोकां ॥ मनोवृत्ती देखा पालटेना ॥ ४३० ॥ निरपराध न देखे कोणासी ॥ जिवलग सोयरा सर्वांशीं ॥ वोळखी जीवमात्राशी ॥ जैसी तैसी जुनाट ॥ ३१ ॥ यापरी जयास आप्त सर्वदा सर्व ॥ ऐसा जो कां निजस्वभाव ॥ तया नाव गा आर्जव ॥ अति अपूर्व गुरुदीक्षा ॥ ३२ ॥ सुर असुर नर ऋषीश्वर ॥ मदनें[8] केले निजकिंकर[9] ॥ कंदर्पाचा मार थोर ॥ अतिदुर्धर अनंत ॥ ३३ ॥ अंतरीं कामाचें दृढ ठाणें ॥ वरीवरी दांत चाऊनि साहणें ॥ त्याच्या मनासि निष्काम नह्मणें ॥ चालविणें अलौकिकू ॥ ३४ ॥ तैशी नव्हे सद्गुरूची युक्ती ॥ कामाची पालटे कामवृत्ती ॥ अभंग ब्रह्मचर्यस्थिती ॥ शिष्यांप्रती उपदेशी ॥ ३५ ॥ कंदर्पराणिवे स्त्रीपुरुष ॥ तेथें गुरुदीक्षा अलोलिक ॥ मिथ्या स्त्री पुरुष मायिक ॥ विषयसुख भ्रममात्र ॥ ३६ ॥ आनंदाचें उपस्थ एकायतन ॥ हें काय मिथ्यावचन ॥ ते अर्थीं पूर्ण वेदज्ञ ॥ वेदविवंचना दाविती ऐशी ॥ ३७ ॥ पुसतां साखरेची गोडी कैशी ॥ तो स्वाद[10] नये सांगावयासी ॥ तेथें चाखों देती अणुमात्रेंशी ॥ तेचि गोडपणराशी जाणती जाण ॥ ३८ ॥ तेवीं परमानंदसुखप्राप्ती[11] ॥ उपस्थद्वारां नर चाखिती ॥ आनंद एकायतनस्थिती ॥ बोलिल्या उपस्थीं पाहे तूं वेदें ॥ ३९ ॥ त्या उपस्थसुखाची नित्यस्थिती ॥ संभोगेंवीण जे वाढविती ॥ तेथें मिथ्या स्त्रीपुरुषव्यक्ती ॥ सहजें होती सज्ञान ॥ ४४० ॥ चाखिली गोडी तेचि साखर ॥ परमानंद मैथुनमात्र ॥ मानूनियां मैथुनपर ॥ जाहले पामर[12] विषयांध ॥ ४१ ॥ उपस्थीं परमानंदगोडी ॥ यालागीं स्त्रीकामाची अतिवोढी ॥ स

---

१ ब्रह्मानंद. २ स्पष्ट करून. ३ देवश्रेष्ठ. ४ तीर्थ. ५ आपल्या विलासानें. ६ वस्त्राच्या आंत. ७ संतोषवी. ८ कामाने. ९ आपले सेवक. १० गोडी. ११ ब्रह्मानंदाचे सुख मिळणें. १२ गरीब.

दा सोशिजे महामूढीं ॥ तडातोडी जीविताच्या ॥ ४२ ॥ साखरेचें केलें नारियेळ ॥ तेथें त्वचा गर्भ[1] साखरचि केवळ ॥ तेवीं विषयद्वारा सुखकल्लोळ ॥ उठती सकळ परमानंदें[2] ॥ ४३ ॥ नाना पक्वान्नें परवडी ॥ गुळाच्या गोडीनें ते चवी गाढी ॥ तेवीं विषयाची जे जे आवडी ॥ तेते गोडी निजानंदें ॥ ४४ ॥ हे नेणोनि मुळींची निजगोडी ॥ सोशिती विषयांच्या अतिवोढी ॥ बाप सद्गुरुरुपा गाढी ॥ विषयाची आवडी एकल्या आणी ॥ ४५ ॥ यालागीं विषयाची आस्था[3] ॥ नचढे सच्छिष्याचे माथां ॥ स्त्रीभोगाची आसक्तता ॥ मिथ्या तत्त्वतां गुरुवाक्यनिष्ठा ॥ ४६ ॥ हा आत्मा हें आत्मीं पाही ॥ ऐसें मिथुन मुळीं नाहीं ॥ तें निजमूळ पाडितां ठायीं ॥ ब्रह्मचर्य पाही अभंग ॥ ४७ ॥ यानावगा निजनैष्ठिक्य[4] ॥ ब्रह्मचर्य अतिसुटंक ॥ सद्गुरूनीं बोलिलें निष्टंक ॥ अलोलिक अभंग ॥ ४८ ॥ आतां अहिंसेची स्थिती ॥ ऐक राया चक्रवर्ती ॥ भंवई उचलोनि नाहीं भूतीं ॥ स्वप्न सुषुप्ती जागतां ॥ ४९ ॥ पांवो आदळतां देख ॥ झणी पृथ्वी पावेल दुःख ॥ याकाकुलती आवश्यक ॥ पाउलें अलोलिक हळू ठेवी ॥ ४५० ॥ आकाश दचकेल[5] देख ॥ यालागीं नेदी सैरा[10] हाक ॥ वाचा परिपक्क पीयूख[6] ॥ वचनें परमसुख सर्वांसि देत ॥ ५१ ॥ त्याचा शब्दू जरी गगनीं भरे ॥ तेणें शब्दानंदचमत्कारें ॥ गगनचि निजसुखें[7] भरे ॥ येणें सुखोद्गारें वचनोक्ती ॥ ५२ ॥ जळामाजी घालितां उडी ॥ झणीं उदक दडपेल बुडीं ॥ तरंगन्यायें देणें बुडी ॥ जीवनाची दुथडी[8] नहेलावतां ॥ ५३ ॥ त्यासि जळीं होतां निमग्न ॥ जळाचा ताप शमे संपूर्ण ॥ यापरी करी स्नान ॥ जीवनीं[9] जीवन जीववित ॥ ५४ ॥ झणीं दुःख पावेल वारा ॥ ह्मणोनि श्वासु नघाली सैरां ॥ नेमूनी प्राणसंचारा ॥ निजशरीरा वागवी ॥ ५५ ॥ निजदेहा[11] करावया घातु ॥ सर्वथा जेवीं नुचले हातु ॥ तेवीं भूतांवरी निघातु ॥ ज्याच्या पोटांतु उपजेना ॥ ५६ ॥ अत्यंत न्याहारें पाहतां ॥ चवकु पडले प्राण्याच्या चित्ता ॥ यालागीं बाह्यदृष्टीं क्रूरता ॥ नपाहे भूतां भूतभावें ॥ ५७ ॥ रोम रगडतील संपूर्ण ॥ यालागीं नकरी अंगमर्दन ॥ एवं स्वदेहाचें देहपण ॥ भूतहिंसाभेण अहंत्वा[12] नाणीं ॥ ५८ ॥ भूतां देतां दुःखलेशु ॥ भूतीं दुखवेल भूतेशु ॥ ऐसा ज्याचा दृढ विश्वासु ॥ तेथ रहिवासु[13] अहिंसेचा ॥ ५९ ॥ कायिक वाचिक मानसिक ॥ भूतां उपजे त्रिविध दुःख ॥ तें जेथें निमालें निःशेख[14] ॥ अहिंसा देख तेठायीं ॥ ४६० ॥ यानांव गा शुद्ध अहिंसा ॥ सत्य जाण नृपवरेशा ॥ आतां द्वंद्वसाम्याची शाद ॥ ऐक क्षितीशा सांगेन ॥ ६१ ॥ सुख दुःख अदृष्टाधीन[15] ॥ तें अदृष्ट देहाचे माथां पूर्ण ॥ ऐसें जाणोनि आपण ॥ निर्द्वंद्व संपूर्ण सद्गुरुवाक्यें ॥ ६२ ॥ अदृष्टें देह सुखदुःख

---

[1] गाभा. [2] ब्रह्मानंदानें. [3] आशा. [4] ब्रह्मनिष्ठा. [5] डचकेल, [6] अमृत. [7] आपल्या सुखानें. [8] दोन तटाक. [9] पाण्यांत. [10] मोकळा. [11] आपल्या शरीराचा. [12] अहंपणास. [13] राहणारा. [14] सर्व. [15] दैवाच्या स्वाधीन.

भोगी ॥ मूर्ख तेथें रागी विरागी ॥ शिष्य लागोंनेदी निजांगीं ॥ गुरुवाक्यरंगीं रंगला ॥ ६३ ॥ देहींचे निजसुखें सुखावता ॥ सवेंचि दुःख चढे माथां ॥ हें गुरूनें जाणोनि तत्त्वतां ॥ देहअहंता सांडविली ॥ ६४ ॥ निरभिमान्याच्या अंगीं ॥ दुःख नुरेचि दुःखनियोगी ॥ सुख नुरेच सुखसंभोगी ॥ तो उभय भागीं अलिप्त[3] ॥ ६५ ॥ छाया उष्णामाजी तापली ॥ ते छाया छायेंचि निवाली ॥ तेवीं सुखदुःखें मिथ्या जाहलीं ॥ स्थिती सुखावली यथानुलाभें[4] ॥ ६६ ॥ अदृष्टें देहीं वर्ततां देख ॥ बाधूं न शके सुखासुख ॥ हें गुरुगम्य अलोलिक ॥ शिष्य विश्वासक पावती ॥ ६७ ॥ विश्वासेवीण सर्वथा ॥ गुरुगम्य नये हाता ॥ गुरुगम्येंवीण तत्त्वतां ॥ द्वंद्वसमता कदा नघडे ॥ ६८ ॥ देहीं दृढता जंव मीपण ॥ तंव तंव द्वंद्वबाधा दारुण ॥ जे गुरुवाक्यें निरभिमान ॥ त्यांसि द्वंद्वें जाण अतिमिथ्या ॥ ६९ ॥ स्वप्नींचें दरिद्र समर्थता ॥ जेवीं दोनी समान जागृता ॥ तेवीं द्वंद्वबाधेची वार्ता ॥ नबाधे गुरुभक्तां अपरोक्षबोधें[6] ॥ ४७० ॥ लेंकुराच्या खेळापाशीं ॥ पारणें तैशी एकादशी ॥ द्वंद्वाची दशा तैशी ॥ गुरुवाक्यासरिसी समूळ उडे ॥ ७१ ॥ जेवीं चंदनाचिया द्रुतीं ॥ आरीबोरी चंदन होती ॥ तेवीं गुरुवाक्यप्रतीती ॥ सकळ द्वंद्वें येतीं निजसाम्या ॥ ७२ ॥ चंदनासभोंवतीं झाडें ॥ तेंही रोकडीं लाकडें ॥ देवद्विजांचे मस्तकीं चढे ॥ भाग्य एवढें सत्संगीं ॥ ७३ ॥ सद्गुरु तोचि संत्सगती ॥ तत्संगें शिष्य पालटती ॥ स्वयें ब्रह्मरूप होती ॥ तेव्हां द्वंद्वें येती निर्द्वंद्वा ॥ ७४ ॥ एवं गुरुवाक्यीं विश्वासतां ॥ द्वंद्वसाम्य चढे हाता ॥ तें गुरुवाक्यही तत्त्वतां ॥ ऐक आतां सांगेन ॥ ७५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सर्वत्रात्मेश्वरान्वीक्षां कैवल्यमनिकेतताम् ॥ विविक्तचीरवसनं संतोषो येन केनचित् ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ सद्गुरुवचनविश्वासें ॥ मानी सर्वत्र परमात्मा ऐसें ॥ तेचि निजबुद्धी निश्चयो वसे ॥ निजमानसें[7] विवंची[8] ॥ ७६ ॥ मजमाजी परमात्मा वसे ॥ तेणें स्थूळदेह वर्ततसे ॥ त्याचेनि पूर्ण चित्प्रकाशें[9] ॥ जगभासे जगद्रूपें ॥ ७७ ॥ तेणें निजात्मप्रकाशें ॥ माझे दृष्टीस दृश्य दिसे ॥ दृश्यद्रष्टृदर्शनविलासें ॥ विलसतसे परमात्मा ॥ ७८ ॥ दृश्यद्रष्टृपणें जें जें उठी ॥ तें तें निजात्मता पाठीपोटीं ॥ तेणें अन्वयें देवो देखे दृष्टी ॥ आहाळबाहाळ सृष्टि दुमदुमित ॥ ७९ ॥ तेव्हां जें जें देखे भूताकृती ॥ तें तें परमात्मा ये प्रतीति ॥ मी नियंता[10] ईश्वर त्रिजगती ॥ हेही स्फूर्ती स्फुरोंलागे ॥ ४८० ॥ जग वर्ते माझिया सत्ता ॥ मी कळिकाळाचा नियंता ॥ मी उत्पत्तिस्थिति प्रलयकर्ता ॥ हे मूळ अहंता स्वभावें स्फुरे ॥ ८१ ॥ येणें पूर्वान्वयें जंव पाहे ॥ तव सर्वीं सर्व मीचि आहें ॥ तें पाहातें पाहणें पाहों ठाये ॥ तेथें अहं[11] जाय विरोनी ॥ ८२ ॥ तेथें परब्रह्मैक प्रसिद्ध ॥ कोंदला[12]

---

१ सुखावला. २ उरत नाहीं. ३ निरभिमानी. ४ जसा अनुभव असेल त्यानें. ५ शित उष्णादिकावर समत्व. ६ प्रत्यक्षज्ञानानें. ७ आपल्यामनानें. ८ विचार कर. ९ चैतन्य प्रकाशानें. १० आज्ञा करणारा. ११ मीपण. १२ भरला.

ठाके सच्चिदानंद ॥ ऐसा गुरुवाक्यें प्रबोध[1] ॥ शिष्य अतिशुद्ध पावती ॥ ८३ ॥ तेव्हां वैकुंठीं देवो आहे ॥ हें बोलणें त्या आहाचि होये ॥ क्षीरसागरीं देवो राहे ॥ हें ऐकतांचि पाहे अनिवार हांसे ॥ ८४ ॥ देवावांचोनि तत्त्वतां ॥ तिळभरी ठाव नाहीं रिता ॥ त्यातें एकदेशी नेमितां ॥ नमनें वस्तुता सच्छिष्यासी ॥ ८५ ॥ वैकुंठ आणि क्षीराब्धी ॥ ज्याचेनि प्रकाशें ज्यामधीं ॥ तो वैकुंठवासी अथवा क्षीराब्धीं ॥ हे बोल सोपाधी[2] शबलत्वाचे[3] ॥ ८६ ॥ जेथ सर्वी सर्व परमात्मा ॥ जेथें एकदेशी नसरे महिमा ॥ तो पूर्णब्रह्म अनाश्रमा ॥ वैकुंठादि आश्रमा वश नव्हे ॥ ८७ ॥ अखंडातें आवाहन ॥ अधिष्ठानातें आसन ॥ सर्वगता सिंहासन ॥ कल्पिती स्थान निजकल्पना ॥ ८८ ॥ तेही कल्पिती निजवृत्ती ॥ जे ब्रह्मरूपीं नित्य राहती ॥ त्यांची परब्रह्मस्थिती ॥ कदा कल्पांतीं भंगेना[4] ॥ ८९ ॥ ऐशी परब्रह्म अवाप्ती ॥ साधकीं पावावया निश्चितीं ॥ नित्य बसावें एकांतीं ॥ द्वैताची स्फूर्ती त्यागोनी ॥ ४९० ॥ साधितां परमार्थनिधान ॥ साधकां आडवी वस्त्र अन्न ॥ निमोली वल्कलें परिधान ॥ कांत्यागिलीं अतिजीर्ण वस्त्रें घ्यावीं ॥ ९१ ॥ शाकफलमूलकंदभोजन ॥ येणें करावें जठर तर्पण ॥ सांडूनि परमार्थसाधन ॥ जोडावया अन्न धन नवेंचावें कदा ॥ ९२ ॥ चौपालवी[5] बांधोनि करीं ॥ भीक मागावी दारोदारीं ॥ परी अन्नआच्छादनावरी[6] ॥ आयुष्य तिळभरी नवेंचावें ॥ ९३ ॥ मेळवावया अन्नआच्छादन ॥ न शिणती साधक सज्ञान ॥ देह अदृष्टाधीन ॥ तें सहजें जाण प्रतिपाळी ॥ ९४ ॥ स्वयें शिणतां अहोराती ॥ अदृष्टावेगळी अणुभरी प्राप्ती ॥ कदा नचढे कोणाचे हातीं ॥ हें साधक जाणती सज्ञान[7] ॥ ९५ ॥ यालागीं अदृष्टें जें प्राप्त ॥ तेणें निर्वाहें सदा निश्चित ॥ साधक परमार्थ साधित ॥ संतोषयुक्त गुरुवाक्यें ॥ ९६ ॥ देहअदृष्टपरवडी ॥ होती सुखदुःखघडामोडी ॥ साधकां संतोष चढोवढी ॥ गुरुवाक्यगोडी दृढ लागली ॥ ९७ ॥ जैसें देहाचें प्राक्तन ॥ तैसें होय अशनवसन[8] ॥ परी गुरुवाक्यसुख सांडून ॥ देहावरी मन ममत्वें नये ॥ ९८ ॥ याच्ञेविण यथाकाळें ॥ यदृच्छया जें जें मिळे ॥ तें तें सेवी सकळ मंगळें ॥ गुरुवाक्यमेळें स्वानंदें ॥ ९९ ॥ शरीरनिर्वाहाविखीं ॥ कोठें कांहीं नाभिलाखी[9] ॥ जें जें मिळे तेणेंचि सुखी ॥ निजात्मतोखीं संतुष्ट ॥ ५०० ॥ पारब्धें सुखदुःख भोगितां ॥ संतोष साधकांच्या चित्ता ॥ हें गुरुवाक्यविश्वासतां ॥ चढे हातां शिष्याच्या ॥ १ ॥ त्याच्या दृढ विश्वासाशीं ॥ भागवतशास्त्र गुरुपाशीं ॥ अभ्यासावें आदरेंसी ॥ दृढनिश्चयेंसी प्रबोधक ॥ २ ॥

॥ श्लोक ॥ श्रद्धां भागवते शास्त्रे निंदामन्यत्र चापिहि ॥ मनोवाक्कर्मदंडं च सत्यं शमदमावपि ॥ २६ ॥

॥ टीका ॥ सगुण अथवा निर्गुण ॥ जेथ भगवत्स्वरूप वर्णन ॥ कां भगवंत बोलिला आपण ॥ अथवा भगवद्गुणकीर्ति जेथें ॥ ३ ॥ तें तें राया

---

[1] ज्ञान. [2] उपाधीसह. [3] मायापणाचे. [4] नाहीसी होत नाहीं. [5] चारपदरी (झोळी) [6] अन्नवस्त्रा करितां. [7] ज्ञानी. [8] अन्न, वस्त्र. [9] इच्छा करीत नाहीं.

शास्त्र जाण ॥ आवडे जैसें जीवूप्राण ॥ विशेषेंसी ज्ञानकथन ॥ सप्रेमपूर्ण पढियंते ॥ ४ ॥ गुरुमुखें ज्ञानकथा गोड ॥ तेणें श्रीभागवतीं श्रद्धा दृढ ॥ श्रवणें पुरे जीवाचें कोडें[1] ॥ वोसरे[2] चाड विषयाची ॥५॥ जिवीं नाहीं विषयकौतुक ॥ तरी विषय आवश्यक ॥ साधकां होती बाधक ॥ तेणें आत्यंतिक अनुतापू[3] ॥ ६ ॥ अनिवार विषयावस्था ॥ यालागीं नवचे निजसत्ता[4] ॥ तेणें मुमुक्षूच्या चित्ता ॥ अत्यंत व्यथा अनुतापें ॥ ७ ॥ नसतां विषयाची अतिप्रीति ॥ स्वतां नव्हे विषयनिवृत्ती ॥ ऐशिया साधकांप्रती ॥ निर्णीत शास्त्रार्थीं नेमिला नेमु ॥ ८ ॥ नाहीं विषयाची आसक्ती ॥ नव्हे विषयनिवृत्ती ॥ ऐशी जेकां साधकस्थिती ॥ नेमू त्याप्रती शास्त्रें केला ॥ ९ ॥ जोकां केवळ विषयासक्त ॥ तो कदा नमानी शास्त्रार्थ ॥ कां जो जाहला जीवन्मुक्त ॥ तोही शास्त्रार्थ मानूनि नमानि ॥ ५१० ॥ जैशी मृगजळाची भासे स्थिती ॥ तैसे विषय मुक्तांप्रती ॥ त्या विषयांचिये निवृत्ती[7] ॥ कोणते शास्त्रार्थीं मानावा नेमू ॥ ११ ॥ एवं अत्यासक्त अतिविरक्त ॥ त्यासी नेमू नचले येथ ॥ मुमुक्षूसींच शास्त्रार्थ ॥ नेमी निश्चित निजनेमें ॥ १२ ॥ तेथ गुरुशिष्यसंवाद ॥ करितां ज्ञानार्थ प्रबोध ॥ ते बोधीं बाधी विषयबाध ॥ तत्त्यागीं प्रसिद्ध शास्त्रार्थनेमू ॥ १३ ॥ मनसा वाचा कर्मावरोध ॥ येणें विषयांचा त्रिविध[8] बाध ॥ त्या तिहींसही त्रिविध ॥ शास्त्रें अतिशुद्ध नेमिला नेमू ॥ १४ ॥ ॥ पूर्वश्लोकोत्तरार्धम् ॥ ॥ मनोवाक्कर्मदंडं च सत्यं शमदमावपि ॥ ॥ टीका ॥ मनासी नियम उपशमाचा[9] ॥ इंद्रियां नेम तो दमाचा ॥ सत्यें नेमिली वाचा ॥ तिहींसही तिहींचा निजनेमू ॥ १५ ॥ विषय कामगेंज[10] दारुण ॥ अहंमदें उन्मत्त पूर्ण ॥ देहतारुण्यें अतिघूर्ण ॥ तोडी बंधन विधीचें ॥ १६ ॥ खंदी सुहृद राजा गुरु ॥ सोंडें कवळी स्वर्गशिखरू ॥ नरकनदीमाजी अपारू ॥ अतिदुस्तरू बुड्या देत ॥ १७ ॥ धर्मजळें[11] क्षाळे[12] अवचिता ॥ सर्वेचि सलोभ धुळी घाली माथां ॥ घोळसी ब्रह्मादिकां समस्तां ॥ अहंममता गर्जतू ॥ १८ ॥ यासि विवेकें[13] महावत जाण ॥ माथां चढोंजाणे आपण ॥ शास्त्रविधिअंकुशें पूर्ण ॥ धरिला आवरून करकरितू ॥ १९ ॥ त्यासि उपशमाचें संरक्षण ॥ वैराग्ययुक्त ठेवूनि जाण ॥ दमाचे शृंखळीं[14] आकळून ॥ सत्याचे स्तंभीं[15] पूर्ण विवेकू बांधे ॥ ५२० ॥ मनसा वाचा कायिक कर्म ॥ येणें विषयबाधा बाधी पूर्ण ॥ त्यातिहींसी केला त्रिविध नेम ॥ त्या नेमाचें वर्म ऐक राया ॥ २१ ॥ आतां शमाची ऐशी स्थिती ॥ मनबुद्ध्यादिचित्तवृत्ती ॥ सांडवून विषयासक्ती ॥ लावी परमार्थीं प्रबोधूनी[16] ॥ २२ ॥ पूर्वें उगवतां गभस्ती[17] ॥ आंधारू सांडी त्रिजगती ॥ तेवीं गुरुवाक्यें शमाची प्राप्ती ॥ विषय निवृत्ती मानसिक ॥ २३ ॥

---

[1] कौतुक. [2] नाहींसी होते. [3] वैराग्य. [4] आत्म्याचे अस्तित्व. [5] निश्चित. [6] सुख. [7] कर्म न करणें. [8] तीन प्रकारचा. [9] शांतीचा. [10] हात्ती. [11] धर्मरूप पाण्यानें. [12] धुतो. [13] विचार हा माहुद. [14] सांखळदंडानें. [15] खांबाचें ठिकाणी. [16] उपदेश करून. [17] सूर्य.

बाह्य इंद्रियप्रवृत्ती ॥ दमें दमोनि गुरुवाक्यस्थिती ॥ मग शमाची संगती ॥ आणी निवृत्ती इंद्रियकर्में ॥ २४ ॥ कन्या प्रतिपाळूनि
जैसी ॥ दान देतां जांवयासी ॥ त्यागी बापाचे कुळगोत्रासी ॥ दमें इंद्रियें तैशीं विषयार्थां ॥ २५ ॥ झणी वाचा जाईल विकळ ॥ तिसी
सत्याचा महामोकळ ॥ देऊनि केली निखळ ॥ अति अढळ सत्यधूतवाणी ॥ २६ ॥ सत्यवादिया ब्रह्मादि वंदिती ॥ असत्या होय अधोगती ॥
ऐसें व्याख्यान जे करिती ॥ तेही वदती असत्य ॥ २७ ॥ कां रामनामाच्या आवृत्ती ॥ वाचा धूतली स्मरणोक्तीं ॥ ते असत्या
माजी पुढती ॥ कदा कल्पांतीं बुडेना ॥ २८ ॥ मंथोनि काढिलें नवनीत[1] ॥ तें पुढती नबुडे ताकांत ॥ तेवीं नामें वाचा निर्धूत ॥ असत्य
तेथें स्पर्शेना ॥ २९ ॥ जेवीं लागलेनि रविकरें[2] ॥ घृतकणिका[3] स्वयें विरे ॥ तेवीं सत्याचेनि निजनिर्धारें ॥ असत्य चमत्कारें समूळ उडे
॥ ५३० ॥ चंदनाचिया चौफेरी ॥ काष्ठत्वा मुकती खैर बोरी ॥ तेवीं नामाच्या निजगजरीं ॥ वाचेमाझारी निजसत्य प्रगटे ॥ ३१ ॥
झालेनि अर्कप्रकाशें[4] ॥ खद्योत[5] हारपती जैसे ॥ तेवीं रामनामसौरसें ॥ लोपे अनायासें असत्य ॥ ३२ ॥ अंशांशीं प्रतिपदे कुहू[6] ॥ गेलिया
बिंब सांडी राहू ॥ तेव्हां प्रकाशाचा समूहू ॥ प्रगटे बहू जगामाजी ॥ ३३ ॥ तेवीं असत्याचेनि आक्रमें[7] ॥ वाचा प्रकाशे सत्य
संभ्रमें ॥ जेवीं राजाज्ञा अनुक्रमें ॥ प्रजा स्वधर्में वर्तती ॥ ३४ ॥ सत्यापरतें नाहीं तप ॥ सत्यापरता नाहीं जप ॥ सत्यें पाविजे सद्रूप ॥
सत्यें निष्पाप साधक होती ॥ ३५ ॥ एवं काया वाचा मनें ॥ शम दमादि सत्यलक्षणें ॥ जो मिथिला त्रिविधविंदानें ॥ त्याचे विषयाचें
धरणें तत्काळ उठे ॥ ३६ ॥ ऐशा स्वार्थालागीं जीवीं ॥ भगवच्छास्त्रीं आवडी धरी ॥ परी आणिकां शास्त्रां नलावी ॥ द्वेषभावीं
निंदेचें बोट ॥ ३७ ॥ एका स्तुती एका निंदा ॥ करितां आदळे अंगीं बाधा ॥ यालागीं निंदानुवादा ॥ साधक कदा नातळती ॥ ३८ ॥
अर्धांगींची लक्ष्मी वंदावी ॥ मा चरणीची गंगा काय निंदावी ॥ निजजननी नमस्कारावी ॥ काय येरां द्यावी पांपर[8] ॥ ३९ ॥ तरी
भज्य भजावें भजनीं ॥ परी निंदास्तुती सांडूनि दोनीं ॥ जो निजसत्यें होय मौनी ॥ तैं ब्रह्मज्ञानीं अधिकारु ॥ ५४० ॥ ऐशी नकरितां
व्युत्पत्ती ॥ नसोशितां हे कष्टस्थिती ॥ भावें करितां भगवद्भक्ती ॥ फुकाची मुक्ती हरिभक्तां ॥ ४१ ॥ ते भक्तीची निजस्थिती ॥ राया
सांगेन तुजप्रती ॥ सुगमत्वें परमात्मप्राप्ती ॥ हरिभक्त पावती तें ऐक ॥ ४२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रवणं कीर्तनं ध्यानं हरेरद्भुतकर्मणः ॥
जन्मकर्मगुणानां च तदर्थेऽखिलचेष्टितम् ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ ॥ मुख्यभक्तीचें कारण ॥ हरीचे जन्मकर्मगुण ॥ पूर्णश्रद्धा करावे श्रवण
॥ हरिकीर्तन स्वानंदें ॥ ४३ ॥ हरिकीर्तनाचिया जोडी ॥ सकळ साधनें केलीं बापुडीं ॥ अद्भुतकर्में हरीचीं गाढीं ॥ गातां अति

---

[1] लोणि. [2] सूर्याचें किरण. [3] तुपाचे कण. [4] सूर्याच्या प्रकाशानें. [5] काजवे. [6] ज्या अमाबास्येचे दिवसीं चंद्राच्या कला अगदीं नाहींशा होतात तीस कुहु ह्मणतात. [7] टाकण्यानें. [8] वाहण.

आवडी उल्हासे ॥ ४४ ॥ शिळा तारिल्या सागरीं[1] ॥ गोवर्धन धरिला करीं ॥ निद्रा न मोडितां सकळ नगरी ॥ द्वारकेमाझारीं आणिली मथुरा ॥ ४५ ॥ निमाला गुरुपुत्र दे आणूनि ॥ मुखें प्राशिला[2] दावाग्नी ॥ गत गर्भ आला घेऊनी ॥ निजजननीतोषार्थ ॥ ४६ ॥ अजन्म्या जन्म नेणों किती ॥ अकर्म्याचीं कर्में गाती ॥ अगुणाचे गुण वर्णिती ॥ तेणें श्रीपती सुखावे ॥ ४७ ॥ जो सुखैकमूर्ती निजस्वभावें ॥ तोही जन्मकर्मगुणवैभवें ॥ गातां कीर्तनीं अतिसुखावे ॥ स्वानंदगौरवें डुल्लत ॥ ४८ ॥ ऐशी कीर्तनीं गातां कीर्ती ॥ निर्मळ होय चित्तवृत्ती[3] ॥ तेथें ठसावे ध्यानस्थिती ॥ ऐक तें नृपती सांगेन ॥ ४९ ॥ मुगुटकुंडलें मेखळा ॥ कांसे कशिला सोनसळा ॥ आपाद[4] रुळे वनमाळा ॥ घनसांवळा घवघवित ॥ ५५० ॥ ऐशी मूर्ती सुरेख सगुण ॥ कां निरसूनि रूप नाम गुण ॥ ध्यानीं ठसावे निज निर्गुण ॥ ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ५१ ॥ ऐसें ठसावतां ध्यान ॥ भक्तांची सबाह्य क्रिया पूर्ण ॥ ते ते होय कृष्णार्पण ॥ स्त्री पुत्रादि जाण सर्वस्वें ॥ ५२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ इष्टं दत्तं तपो जप्तं वृत्तं यच्चात्मनः प्रियम् ॥ दारान्सुतान् गृहान्प्राणान्यत्परस्मै निवेदनम् ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ ॥ अग्निहोत्रादि याग[5] होम ॥ ग्रहणादिदान अनुत्तम ॥ तप ह्मणिजे स्वधर्म ॥ जो वर्णाश्रम यथोचित ॥ ५३ ॥ आगमोक्त यथाशास्त्र ॥ आवरणविधि विधानतंत्र ॥ गुरुदीक्षा शुद्धमंत्र ॥ अथवा नाममात्र तो जपू कीजे ॥ ५४ ॥ तें यज्ञ दान क्रिया तप ॥ दीक्षा मंत्र कां नामजप ॥ तेथें न घालितां संकल्प ॥ करी निर्विकल्प कृष्णार्पण ॥ ५५ ॥ हरीशीं जाहले जे अनन्यशरण ॥ ते हरीचे लडिवाळ पूर्ण ॥ त्यांचें हरी करी प्रतिपाळण ॥ जेंवीं जननी जाण तानुलेया[6] ॥ ५६ ॥ यालागीं जें जें जीविकावर्तन ॥ तेंही करावें कृष्णार्पण ॥ हें माझें ह्मणोनि अभिमान ॥ भक्त सज्ञान नधरिती कदा ॥ ५७ ॥ ज्याची आवडी अतिशयें चित्तीं ॥ ज्याची आपणिया अतिप्रीती ॥ तें तें कृष्णार्पण करिती ॥ गुरुवाक्यस्थिती विश्वासें ॥ ५८ ॥ यालागीं आठौ प्रहर ॥ सेवेशि वेंचिती[7] निजशरीर[8] ॥ निमेषार्धही व्यापार ॥ विषयाकार करिती ना ॥ ५९ ॥ अन्नालागीं होऊनि वेडें ॥ सधनांच्या पायां नपडे ॥ आयुष्याचे तिनी कवडे ॥ विषयाचे चाडे कदा नकरी ॥ ५६० ॥ आयुष्यची अर्धघडी ॥ वेंचितां नमिळे लक्ष कोडी ॥ तेणें आयुष्यें परमार्थजोडी ॥ विषयाच्या कोडी थुंकोनि सांडी ॥ ६१ ॥ त्यागोनियां[9] राज्यसंपत्ती ॥ राजे जाऊनि वनाप्रती ॥ स्वयें परमार्थ साधिती ॥ विषयासक्ति थुंकोनी ॥ ६२ ॥ कैशी भक्तीची गोडी संपूर्ण ॥ रिता जावों नेदी अर्धक्षण ॥ अवघें जीवितचि जाण ॥ करी कृष्णार्पण सर्वस्वें ॥ ६३ ॥ आणि पुत्रदारादिक जेजे घरीं ॥ तेते भगवत्सेवेवारी ॥ स्वयें कृष्णार्पण करी ॥ माझीं ह्मणोनि नधरी ममता जीवीं ॥ ६४ ॥ दारा पुत्र देह गेह प्राण ॥ यांसि आत्मा सबाह्य

---

[1] समुद्रांत. [2] गिळिला. [3] मनाची वृत्ति. [4] पायापर्यंत. [5] यज्ञ. [6] लहान मुलास. [7] खर्चितात. [8] आपलें शरीर. [9] टाकून.

पूर्ण ॥ तेथें संकल्पेंवीण जाण ॥ ब्रह्मार्पण सहजची ॥ ६५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवंकृष्णात्मनाथेषु मनुष्येषु चसौहृदम् ॥ परिचर्यां चोभयत्र
महत्सु नृषु साधुषु ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ एवं दा[1]रा गे[2]ह देह संपदा ॥ आत्मार्पण शुद्ध श्रद्धा ॥ भजले सर्वकाळीं सर्वदा ॥ ते भक्त गोविंदा
पढियंते ॥ ६६ ॥ जो सर्वभूतीं हृदयस्थू ॥ परमात्मा श्रीकृष्णनाथू ॥ त्याचाठायीं जो भक्त ॥ साधावया नि[3]जस्वार्थू सर्वस्वें भजे ॥ ६७ ॥
त्या हृदयस्थाचाठायीं ॥ दृढदृष्टीजंव बसली नाहीं ॥ तंव सगुणमूर्ती हृदयीं ॥ भजावी पाहीं सर्वात्मभावें ॥ ६८ ॥ सगुणमूर्ती नातुडे
ध्यानीं ॥ तरी भजावें प्र[4]तिमेच्या स्थानीं ॥ तेथेंही चळाचळ दोनीं ॥ भजाव्या गुरुवचनीं समसाम्यभावें ॥ ६९ ॥ ज्यां उपासक पूजिती ॥
त्या जाणाव्या अचला मूर्ती ॥ ज्या पांडुरंगादिद्वारावती ॥ त्या स्थावरा मूर्ती पुराणोक्त ॥ ५७० ॥ त्यामूर्तिंहोनि श्रेष्ठ स्थान ॥ पूर्ण पूज्यत्वें
ब्राह्मण ॥ तेथें करावें गा भजन ॥ सर्वस्वें जाण सर्वदा ॥ ७१ ॥ त्या ब्राह्मणांमाजी अतिश्रेष्ठ ॥ श्रो[5]त्रिय सदाचारनिष्ठ ॥ त्यांतही
वेदशास्त्रार्थीं प्रविष्ट ॥ ते अतिवरिष्ठ पूज्यत्वें ॥ ७२ ॥ त्यांहीमाजी जे भागवत ॥ भागवतधर्मीं नित्यरत ॥ जे निष्कर्मैंसी भगवद्भक्त ॥
ज्यांचा भावार्थ श्रीकृष्णीं ॥ ७३ ॥ ज्यांसीं आत्मा श्रीकृष्ण हृदयस्थ ॥ ज्यांचा अनन्य स्वामी श्रीकृष्णनाथ ॥ ऐसे जे भगद्भक्त ॥ ते
पूज्य निश्चित निजभक्तां ॥ ७४ ॥ अतिमहत्वें पूज्य गहन ॥ ज्याचे सुरनरवेद बंदि[6]जन ॥ तो सद्गुरु श्रेष्ठ पूज्यस्थान ॥ शिष्यासि जाण
सर्वस्वें ॥ ७५ ॥ गुरु ब्रह्म दोनी समान ॥ हेंहो वचन दिसे गौण ॥ गुरुवाक्यें ब्रह्मा ब्रह्मपण ॥ तेथें व्हावया समान भिन्नत्व नुरे ॥ ७६ ॥
जैसा देवाचे ठायीं भावो ॥ तैसाचि गुरुचरणीं सद्भावो ॥ गुरुदेवांमाजी पहाहो ॥ भि[7]न्नाभावो असेना ॥ ७७ ॥ देवो पूजिल्या गुरु तोषे ॥
गुरु पूजिल्या देवो संतोषे ॥ दोंनांवाचेनि हरुषें ॥ स्वरुपें एकें वर्तती ॥ ७८ ॥ सुवर्ण आणि कांकण ॥ दों नावीं एक सुवर्ण ॥ तेवीं गुरु
ब्रह्मामाजी जाण ॥ भिन्नपण असेना ॥ ७९ ॥ त्या सद्गुरूचें निजभजन ॥ चित्तवित्तें अवंचन ॥ गुरुचरणीं आत्मार्पण ॥ करावें आपण
सर्वस्वेंसी ॥ ५८० ॥ तैसेचि साधुश्रोते सज्ञान ॥ तेही मानावे सद्गुरुसमान ॥ त्यांचेनि संवादें आपण ॥ श्रवण कथन करावें ॥ ८१ ॥
॥ श्लोक ॥ ॥ परस्परानुकथनं पावनं भगवद्यशः ॥ मिथोरतिर्मिथस्तुष्टिर्निवृत्तिर्मिथ आत्मनः ॥ ३० ॥ ॥ टीका ॥ ॥ तेथ करितां कथानुवादू
॥ परस्परें निजात्मबोधू ॥ करितां गुह्यज्ञान संवादू ॥ परमानंदू वो[8]संडे ॥ ८२ ॥ एवं हरिकथेच्या आवडी ॥ परस्परें श्रद्धा गां[9]ढी ॥
सुखसंवादपरवडी ॥ निजसुखगोडी चाखिती ॥ ८३ ॥ चाखतां निजसुखगोडी ॥ हा[10]रपती दुःखकोडी ॥ उभवूनि भक्तिसाम्राज्यगुढी ॥
स्वानंदजोडी जोडावी ॥ ८४ ॥ भावें करितां अभेदभजन ॥ भक्त पावती स्वानंद पूर्ण ॥ त्या स्वानंदाचें निजचिन्ह ॥ एक सांगेन नृप

---

[1] स्त्री. [2] घर. [3] परमार्थ. [4] मूर्तीच्या. [5] वेदशास्त्र पढलेले. [6] स्तुतिकरणारे. [7] एक भाव. [8] मिळे. [9] फार. [10] नाहींशा होतात.

नाथा ॥ ८५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्मरंतः स्मारयंतश्च मिथोऽघौघहरं हरिम् ॥ भक्त्या संजातया भक्त्या बिभ्रत्युत्पुलकां तनुम् ॥ ३१ ॥ क्वचिद्रुदंत्यच्युतचिंतयाक्वचिद्धसंति
नंदंति वदंत्यलौकिकाः ॥ नृत्यंति गायंत्यनुशीलयंत्यजं भवंति तूष्णीं परमेत्य निर्वृताः ॥ ३२ ॥ ॥ टीका ॥
॥ हरिकथेची महिमा कैसी ॥ आदरें पुसत्या सांगत्यासी ॥ होती पुण्याचिया राशी ॥ पाप वोखदासी मिळेना ॥ ८६ ॥ ज्याचें नामस्मरण
करी ॥ सकळ पातकातें हरि हरी ॥ तो स्वयें प्रगटला अंतरीं[1] ॥ पातका उरी उरे कैंची ॥ ८७ ॥ साधनरूपभक्तीच्या युक्ती ॥ पूर्ण सप्रेमें
उपजे भक्ती ॥ ते भक्तीची निजस्थिती ॥ एक चक्रवर्ती सज्ञाना ॥ ८८ ॥ सद्भावें निजभजनकरी ॥ हृदयीं प्रगटतां श्रीहरी ॥ तंव देहींचीं
चिन्हें बाहेरी ॥ क्षणामाझारी पालटती ॥ ८९ ॥ परस्परें निजसंवादू ॥ करिता जाहला स्वरूपावबोधू ॥ नेत्रीं जळ अंगीं स्वेदू ॥ प्राण
स्पंदू पांगुळे ॥ ५९० ॥ चित्तचैतन्यां[2] होतां भेटी ॥ हर्षें बाष्प दाटे कंठीं ॥ पुलकांकित रोमांच उठी ॥ उन्मीलितदृष्टी पुंजाळे ॥ ९१ ॥ करितां
अच्युतचिंतन ॥ सप्रेम गहिंवरे मन ॥ अट्टहासें करी रुदन[3] ॥ अनिवार स्फुंदन ऊर्ध्वश्वासें ॥ ९२ ॥ त्या रुदनासवेंचि हर्ष प्रगटे ॥
त्या हर्षाचेनि नेटेंपाटें ॥ हांसोंलागे कडकडाटें ॥ सुखोद्भटें गदगदोनी ॥ ९३ ॥ मीपणाचेनि अवरोधें[4] ॥ गिळिलों होतों मोहमदें ॥ तो
सुटलों गुरुकृपावबोधें ॥ तेणें परमानंदें डुल्लत ॥ ९४ ॥ मी माझेनि भवभानें ॥ मज मी चुकलों मीपणें ॥ मज मी भेटलों सद्गुरुवचनें ॥
आनंदें तेणें उल्हासे ॥ ९५ ॥ कैसें सद्गुरुवचन अलोलिक ॥ मीच भोगीं नित्यसुख ॥ येणें आश्चर्यें देख ॥ स्वानंदोन्मुख उल्हासे ॥ ९६ ॥
संसारबागुलाचें ॥ भय लागलें नेणों कैंचें ॥ तें गुरुवाक्यें दवडिलें साचें ॥ ह्मणोनि नाचे निर्लज्ज ॥ ९७ ॥ जेवीं माउली देखोनि डोळां ॥
बाळक नाचे नानाकळा ॥ तेवीं गुरुवाक्याचा सोहळा ॥ देखोनि स्वलीळा निजभक्त नाचे ॥ ९८ ॥ तेणें निजनित्यविनोदें[5] ॥ फावलेनि निजबोधें ॥
नानापरीचीं भगवत्पदें ॥ सुखानुवादें स्वयें गातू ॥ ९९ ॥ तेणें कीर्तन कीर्तिगजरें ॥ त्रैलोक्यसुखें सुखभरे ॥ परमानंदूहि हुंबरे ॥
सुखोद्गारें तुष्टोनी[6] ॥ ६०० ॥ तेंही सांडोनियां गाणें ॥ गर्जों लागे अतिसत्राणें ॥ दुजें नाहीं नाहीं ह्मणे ॥ गाणें ऐकणें म्यां माझें
॥ १ ॥ मीचि गाता मीचि श्रोता ॥ माझे गाणें मीचि तत्त्वतां ॥ जगीं मीचि एकुलता ॥ द्वैताची कथा असोनि नाहीं ॥ २ ॥ सद्भावें[7]
भगवत्परिचर्या[8] ॥ करितां पारुखे[9] कर्मक्रिया ॥ अहंसोहं निरसोनियां ॥ वृत्तीही लया जाय तेथें ॥ ३ ॥ एवं सप्रेमभक्तिसंभ्रमू ॥ तेणें
निरसे साधनश्रमू ॥ फिटे निःशेष भवभ्रमू ॥ वाचांसी उपरमू इंद्रियां होय ॥ ४ ॥ जेथें एक नादुसरें ॥ सन्मुख ना पाठिमोरें ॥ जेथें
सुखही निजसुखामाजी[10] विरे ॥ तें स्वरूप निर्धारें निजशिष्य होती ॥ ५ ॥ जेवीं बाळाचे लळे पाळणें ॥ हें व्यालीचि[11] वेदना जाणें ॥

---

१ हृदयांत २ मनाची व आत्म्याची. ३ रडणें. ४ नाशानें. ५ आपल्या मनाच्या विनोदानें. ६ संतोषून. ७ सद्भक्तीनें. ८ ईश्वराची पूजा. ९ परकीय होते. १० ब्रह्मसुखांत. ११ मुलांची आई.

कां शिष्यांसिं पूर्ण बोध करणें ॥ तेथील कळवळणें सद्गुरु जाणे ॥ ६ ॥ बाळका लेवविलें लेणें ॥ जेंवीं माउली निवे[1] तेणें ॥ का शिष्य सुखें सुखावणें ॥ हें सद्गुरु जाणे परिपूर्णबोधें ॥७॥ इंद्रियें नेणती ज्याचें घर ॥ जें मना वचना अगोचर ॥ बुद्धीसि नकळे ज्याची मेरें[2] ॥ ऐशी निर्विकार निजवस्तु ॥८॥ दृष्टीं दाविजे साक्षात ॥ हातीं देइजे पदार्थ ॥ तैसा नव्हे गा परमार्थ ॥ तोही सद्गुरुनाथ प्रबोधी शिष्यां ॥ ९ ॥ शिष्यासि करावया प्रबोध ॥ बोधिता सद्गुरु अगाध ॥ यालागीं शिष्यसुखें स्वानंद ॥ भोगी परमानंद गुरुरावो ॥ ६१० ॥ शिष्यासि आकळे परब्रह्म ॥ तंवतंव निरसे त्याचा भ्रम ॥ तेणें सद्गुरूसिपरम ॥ सुखसंभ्रम उल्हासू ॥ ११ ॥ सेवक परचक्र विभांडी ॥ तंव राजा उभारी यशाची गुढी ॥ शिष्य परमानंदीं दे बुडी ॥ तेणें गुरूसि गाढी सुखावस्था[3] ॥ १२ ॥ ऐशी शिष्यकृपेची कळवळ ॥ ज्या सद्गुरुमाजी प्रबल ॥ तेथें भागतधर्म हे सकळ ॥ शिकावे अविकळ अनन्यश्रद्धा ॥ १३ ॥ ॥श्लोक॥ ॥इति भागवतान् धर्मान् शिक्षन् भक्त्या तदुत्थया ॥ नारायणपरो मायामंजस्तरति दुस्तराम् ॥ ३३॥ ॥टीका॥ ॥ऐशी हे भागवतस्थिती ॥ शरण जाऊनि सद्गुरूप्रती ॥ अभ्यासावी भगवद्भक्ती ॥ तैं मायेची शक्ती बाधूं नशके ॥ १४ ॥ माया वेदशास्त्रां अनावर[4] ॥ ब्रह्मादिकां अतिदुस्तर ॥ ते सुखें तरती भगत्पर[5] ॥ हरिनाममात्रभावार्थी ॥ १५ ॥ हरिनामाच्या गजरापुढें ॥ माया पळे लवडसवडें ॥ यालागीं तरणोपावो[6] घडे ॥ सुख सुरवाडे हरिभक्तां ॥ १६ ॥ परात्परनारायणाची माया ॥ भजतां नारायणाच्या पायां ॥ सुखेंचि तरती जेगा राया ॥ त्या भजनउपाया सांगीतलें ॥ १७॥ मायातरणोपायस्थिती ॥ राया तुवां पुशिली होती ॥ तदर्थीं मुख्य भगवद्भक्ती ॥ जाण निश्चितीं नृपनाथा ॥ १८ ॥ भक्तीपाशीं नित्य तृप्ती ॥ भक्तीपाशीं नित्यमुक्ती ॥ भक्तीपाशीं भगवत्प्राप्ती ॥ मायानिवृत्ती[7] हरिभजनें ॥ १९ ॥ हरिनामभजनकल्लोळें ॥ माया जीवित्व घेऊन पळे ॥ भक्त तरती भाळे भोळे ॥ हरिभजनबळें महामाया ॥६२०॥ करितां नारायणाची भक्ती ॥ निजभक्त सुखें माया तरती ॥ ते नारायणाची मुख्य स्थिती ॥ स्वयें चक्रवर्ती पुसत ॥ २१ ॥ ॥श्लोक॥ ॥राजोवाच॥ ॥नारायणाभिधानस्य ब्रह्मणः परमात्मनः ॥ निष्ठामर्हथ नोवक्तुं यूयंहि ब्रह्मवित्तमाः ॥ ३४ ॥ ॥टीका॥ ॥सर्वांभूतीं भगवद्भावो ॥ हा मुख्यमायातरणोपावो ॥ ऐकोनि सुखावला[8] रावो ॥ तेणें आनंदें पहाहो परब्रह्म पुसे ॥ २२ ॥ करितां नारायणाची भक्ती ॥ उत्तम भक्त माया तरती ॥ ते नारायणाची निजास्थिती ॥ साक्षेपें नृपती पूसतु ॥ २३ ॥ ब्रह्म परमात्मा नारायण ॥ वस्तूसीच ह्मणणें जाण ॥ ते वस्तुनिष्ठा परिपूर्ण ॥ राजा आपण पुसत ॥ २४ ॥ सकळांमाजी अधिष्ठान ॥ सबाह्य[9] ज्याचेनि परिपूर्ण ॥ त्या स्वरूपातें नारायण ॥ स्वयें वेदज्ञ बोलती ॥ २५ ॥

---

[1] शांत होते. [2] शेवट. [3] ब्रह्मसुखाची प्राप्ति. [4] आटोपत नाहीं. [5] ईश्वराचे भक्त. [6] तरून जाण्याचा उपाय. [7] मायेचा नाश. [8] सुखी झाला. [9] आंत बाहेर.

तुह्मांऐसे ज्ञाननिधि ॥ भाग्यें जोडलेति त्रिशुद्धी ॥ तुमच्या वचनामृतबोधीं ॥ अहंबुद्धी[१] उपजेना ॥ २६ ॥ तुमचिया वचनोक्तीं ॥ वोसंडली स्वानंदस्फूर्ती ॥ लांचावली चित्तवृत्ती ॥ श्रवणें तृप्ती कदा नमनीं ॥ २७ ॥ ऐकोनियां रायाचा श्रेष्ठ प्रश्न ॥ प्रबुद्धाधाकुटा पिप्पलायन ॥ तो बोलावया आपण ॥ स्वानंदें पूर्ण सरसावला[२] ॥ २८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पिप्पलायनउवाच ॥ ॥ स्थित्युद्भवप्रलयहेतुरहेतुरस्य यत्स्वप्नजागरसुषुप्तिषु सद्बहिश्च ॥ देहेंद्रियासुहृदयानि चरंति येन संजीवितानि तदवेहि परं नरेंद्र ॥ ३५ ॥ ॥ टीका ॥ ॥ अगा ज्याचेनि उपजे उत्पत्ती ॥ ज्याचेनि अंगें स्थितीसी स्थिती ॥ ज्याचेनि प्रळया प्रळयशक्ती ॥ ऐसा जो त्रिगतीं मुख्यहेतू ॥ २९ ॥ यापरी जो जगाचा हेतू ॥ स्वयें स्वसत्ता हेतुरहितू ॥ सच्चिदानंद सदोदितू[३] ॥ तो जाण निश्चिंतू[४] नारायण ॥ ६३० ॥ जेवीं सायंप्रातर्मध्यान्ह ॥ तिहीं काळीं अलिप्त गगन[५] ॥ तेवीं उत्पत्तिस्थितिप्रळयीं जाण ॥ अलिप्त नारायण परमात्मा ॥ ३१ ॥ उत्पत्तिस्थितिप्रळयांत ॥ ह्मणसी कोण देखे येथ ॥ तेचि अर्थीचा दृष्टांत ॥ विशद अर्थ अवधारी ॥ ३२ ॥ जागृती स्वप्न आणि सुषुप्ती ॥ तिन्ही व्यापूनि समाधीही परती ॥ ज्याची साक्षित्वें स्फुरे स्फूर्ती ॥ तो जाण निश्चितीं नारायण ॥ ३३ ॥ जागृतीचें जाणपण[६] ॥ स्वप्नाचें मिथ्याभान ॥ सुषुप्तीचा साक्षी पूर्ण ॥ तो नारायण निश्चित ॥ ३४ ॥ एवं परमात्मा परंज्योति ॥ आत्मा हृदयस्थ त्रिजगतीं ॥ त्यातें नारायण ह्मणती ॥ जाण निश्चितीं नृपनाथा ॥ ३५ ॥ ऐसी सांगतां ब्रह्मस्फूर्ती ॥ अगम्य वाटेल ब्रह्मप्राप्ती ॥ सहजें ब्रह्म आतुडे हातीं ॥ ऐक ते उपपत्ती[७] सांगेन ॥ ३६ ॥ तरी परमात्मा ब्रह्म पूर्ण ॥ तुझे हृदयीं नांदे आपण ॥ ज्याचेनि मन बुद्धी प्राण ॥ इंद्रियें जाण वर्तती ॥ ३७ ॥ नयनें तेणें तेजें देखणें ॥ रसना तेणें स्वादें चाखोंजाणे ॥ श्रवण तेणें अवधानें ॥ शब्दज्ञानें प्रबोधती ॥ ३८ ॥ तेणें अहंकारें अहंभाव ॥ तेणेंचि मनासि मंतव्य ॥ तेणेंचि चित्तासि चेतव्य ॥ बुद्धि बोद्धव्य तेणें ब्रह्मावबोधें[८] ॥ ३९ ॥ तेणें जड देह सचेतन ॥ तेणेंचि कळे मृदु कठिण ॥ तेणेंचि चरणाच्या ठायीं गमन ॥ करीं कर ग्रहण त्याचिये सत्ता ॥ ६४० ॥ त्याचेनि प्राण परिचरती ॥ त्याचेनि निमेषोन्मेष स्फुरती ॥ त्याच्या आनंदलेशस्थिती ॥ आनंद उपस्थीं[९] भोगिती प्राणी ॥ ४१ ॥ एवं चाळकू जो त्रिजगतीं ॥ जो स्वानंदें नांदे हृदयस्थिती ॥ त्यातें नारायण ह्मणती ॥ तोचि निश्चितीं परमात्मा ॥ ४२ ॥ ज्याचेनि मन बुद्धि प्राण ॥ इंद्रियें विचरती[१०] संपूर्ण ॥ तो तूं ह्मणसी त्यांआधीन ॥ हें कल्पांतीं जाण घडेना ॥ ४३ ॥ तेथ जाणपणें जाणों जासी ॥ तैं जाणावें तेंचि नेणसी ॥ तेथ ज्ञातेपणें ज्ञानासी ॥ स्वरूपापाशीं रिगूं[११] नाहीं ॥ ४४ ॥ जाणीव आणि नेणीव ॥ हे सोडूनि सर्वभाव ॥ जैं उपजे सद्भाव ॥ तैं ब्रह्म स्वयमेव[१२] पाविजे ॥ ४५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नैतन्मनो

---

१ मी असी बुद्धि. २ पुढें झाला. ३ नित्यकाल. ४ निश्चयानें. ५ आकाश. ६ जाणतेपणा. ७ युक्ति. ८ ब्रह्मज्ञानानें. ९ प्रजाउत्पत्तीचें इंद्रिय. १० हिंडती. ११ रिगाव. १२ आपणच.

विशति वागुत चक्षुरात्मा प्राणेंद्रियाणि च यथाऽनलमर्चिषः स्वाः ॥ शब्दोऽपि बोधकनिषेधतयात्ममूलमर्थोक्तमाह यदृते न निषेधसिद्धिः
॥ ३६ ॥ ॥टीका॥ ॥वैकुंठ कैलास क्षीराब्धी[1] ॥ मन कल्पी कल्पनाविधी ॥ परी आत्मा कल्पावया त्रिशुद्धी ॥ मनबुद्ध्यादी सरेना
॥ ४६ ॥ स्वयें कल्पी त्रिभुवन ॥ तें स्वरूपीं रिघूं नशके[2] मन ॥ बुद्धि निश्चयात्मक पूर्ण ॥ तीसही जाण अगम्य वस्तू ॥ ४७ ॥ जें मनबुद्धि
अगोचर ॥ तें वाचेसि अतिदुस्तर ॥ वस्तु नव्हे शब्दगोचर ॥ परात्पर परब्रह्म ॥ ४८ ॥ मोटे बांधतां आकाशातें ॥ चारी पालव[3] पडती
रितें ॥ तेवीं शब्दें बोलावें वस्तूतें ॥ तंव शब्द शब्दार्थें निजधर्म ॥ ४९ ॥ प्राणाचेनि निजढाळें ॥ जेकां क्रियाशक्ती चळे ॥ ते क्रियेसि
वस्तु नातळे ॥ मा इंद्रियां आकळे कैसेनी ॥ ६५० ॥ जेवीं थिल्लराआतौता ॥ बिंबोनि वोला नव्हे सविता ॥ तेवीं मनबुद्धि इंद्रियां परता ॥
जाण तत्त्वतां परमात्मा ॥ ५१ ॥ जो मनाचें आदि मन ॥ जो बुद्धीची बुद्धि सज्ञान ॥ जो नयनाचें आदिनय[4] ॥ जो श्रवणाचें
श्रवण साधनत्वें ॥ ५२ ॥ जो घ्राणाचें निजघ्राण ॥ जो रसनेची रसना आपण ॥ जो त्वचेची निजत्वचा पूर्ण ॥ जीवाचा जो जाण
जीवू स्वयें ॥ ५३ ॥ जो इंद्रियांचा प्रकाशिता ॥ जो कर्म करोनि अकर्ता ॥ तो इंद्रियीं इंद्रियार्थां ॥ विषयीं सर्वथा होंनेणें ॥ ५४ ॥ जेथें
बुद्धीचि न वळंघे ॥ तेथें मन मनपणें केवीं रिघे ॥ मा श्रवणनयनघ्राणयोगें ॥ विषयसंयोगें केवीं भेटे ॥ ५५ ॥ जेथें प्राणशक्ती न
चढे पुढें ॥ तेथ वाचा स्वयें लाजिली मुरडे ॥ मा कर्मेंद्रियांसि कोणीकडे ॥ पवाडू पुढें जोडेल ॥ ५६ ॥ अग्नीपासूनि आल्या अनेग ॥
क्षणक्षणां निघती चांग ॥ परी आल्यामाजी अग्नीचें अंग ॥ सर्वथा सांग प्रगटेना ॥ ५७ ॥ कां सूर्यापासूनि सूर्यकांत ॥ प्रकाशती
असंख्यात ॥ परी सूर्यकांता आंत ॥ कदा भास्वत[6] प्रगटेना ॥ ५८ ॥ जेवीं सिंधूपासूनि तरंग ॥ प्रकाशती अतिअनेग ॥ परी तरंगीं
सिंधूचें अंग ॥ सर्वथा सांग प्रगटेना ॥ ५९ ॥ तेवीं ब्रह्मापासोनि करणें ॥ प्रकाशती अनेकपणें ॥ परी त्या इंद्रियां ब्रह्म जाणणें ॥ हें
जीवें प्राणें घडेना ॥ ६६० ॥ जरी केळापासूनि केळी निपजे ॥ कां साखरेपासूनि ऊंस उपजे ॥ तरी इंद्रियीं ब्रह्म जाणिजे ॥ हें नये निजवोजें
ब्रह्मादिकां ॥ ६१ ॥ ॥आशंका॥ ॥इंद्रियीं नव्हे ब्रह्मज्ञान ॥ तैं जीवाचें भवबंधन[7] ॥ कदाकाळीं नतुटे जाण ॥ जन्ममरण अनिवार
॥ ६२ ॥ शब्दादेवापरोक्षिती[8] ॥ ऐशी श्रुतिशास्त्र उत्पत्ती ॥ तेही मिथ्या वाटे वदंती ॥ ऐसें तूं निश्चितीं मानिसी राया ॥ ६३ ॥
तेही अर्थीचें निरूपण ॥ ऐक राया सावधान ॥ शब्द निर्मोनि[9] आपण ॥ दे ब्रह्मज्ञान जीवासी ॥ ६४ ॥ पूर्वील श्लोकार्ध ॥ ॥शब्दोऽपिबोधकनिषेधतयात्ममूलमर्थोक्तमाह यदृते ननिषेधसिद्धिः॥ ॥टीका॥ ॥जीवू सोडवावया होडा ॥ शब्दें सवेग उचलिला विडा ॥

---

[1] दुधाचा समुद्र. [2] शकत नाहीं. [3] पदर. [4] मूळचा डोळा. [5] माघारा फिरे. [6] सूर्य. [7] संसारबंध. [8] शब्दानेंच साक्षात्कार. [9] नाहींसा करून.

तेणें घेतां तत्त्वांचा झाडा ॥ आपणही पुढां निमाला ॥ ६५ ॥ श्रुति नेतिनेति येणें शब्दें ॥ अतद्व्यावृत्ति निःशेषबोधें ॥ परीसाक्षाद्वेदानुवादें ॥ निजवस्तु शब्दें नबोलवे ॥ ६६ ॥ शब्दासि जें वाच्य नोहे ॥ तेंचि परब्रह्म जाणावें ॥ तेथील जो खुणे पावे ॥ तो ब्रह्मसद्भावें स्वयें होय ॥ ६७ ॥ श्रुति नेतिनेति येणें वचनें ॥ शब्द निषेधूनि वस्तु दाखवणें ॥ शब्दीं निःशब्द जो लक्षूंजाणें ॥ तेणें पावणें परब्रह्म ॥ ६८ ॥ शब्द निजनिषेधें जैं बोधी ॥ तेथें समरसे ज्याची बुद्धी ॥ तेंचि परब्रह्मगा त्रिशुद्धी ॥ निषेधावधी तो ठावो ॥ ६९ ॥ शब्द निमोनि सर्वशक्ती ॥ जीवासि दे ब्रह्मप्राप्ती ॥ शब्दादेवापरोक्षिती ॥ जाण निश्चितीं यानाव ॥ ६७० ॥ वाचा निःशेष निःवर्तें ॥ मन बुद्धि नपवे जेथें ॥ तेचि अवधी निषेधातें ॥ परब्रह्म त्यातें बोलिजे ॥ ७१ ॥ जें वाचेचें वदवितें ॥ परी वाचा वदों नशके ज्यातें ॥ जें मनबुद्ध्यादिकां जाणतें ॥ परी मनबुद्धी ज्यातें नेणती ॥ ७२ ॥ जें नयनातें दाखवितें ॥ परी नयन नदेखती ज्यातें ॥ जें श्रवण घ्राणातें चेतवितें ॥ परी श्रवण घ्राण ज्यातें नेणती ॥ ७३ ॥ एवं सर्वांचें जें जाणतें ॥ परी सर्व सर्वथा नेणती ज्यातें ॥ ज्यासि जाणावयालागीं येथें ॥ आणिक जाणतें असेना ॥ ७४ ॥ ऐसें स्वसंवेद्यें निजज्ञाते ॥ ज्यासि दुजें नाहीं जाणतें ॥ शब्द रिघावया तेथें ॥ रिगमु त्यातें असेना ॥ ७५ ॥ जें कृश नापुष्कळ ॥ जें वक्र नावर्तुळ ॥ जें सूक्ष्म ना नव्हे स्थूळ ॥ वस्तु केवळ निर्विकार ॥ ७६ ॥ ज्यासि नाहीं रूप गुण ॥ ज्यासि नाहीं आश्रम वर्ण ॥ ज्यासि नाहीं मीतूंपण ॥ ज्यासि जन्ममरण असेना ॥ ७७ ॥ जें हळुवट ना गहिंस ॥ जें चिवळ ना सपोश ॥ जें वसतें नावोस ॥ जेकां निःशेष निर्धर्म ॥ ७८ ॥ जें न्हस्व नामोठें ॥ जें वडील नाधाकुटें ॥ जें विचारितां विवेकवाटें ॥ विवेकही आटे निःशेष ॥ ७९ ॥ ज्यासि आदि नाअंतू ॥ जें मध्यस्थितिरहितू ॥ जें गुण ना गुणातीतू[1] ॥ अच्युतानंतू अद्वयत्वें ॥ ६८० ॥ त्या स्वरूपाचा वचनपाठ ॥ करावया वेदें केली खटपट ॥ तेथ श्रुतीचाही बोभाट ॥ लाजिली करूनि कष्ट नेतिनेतिवादें ॥ ८१ ॥ वेदू काय नेणोनि परतला ॥ जाणोनि नबोलिवेचि बोला ॥ याचिलागीं तो मौनावला ॥ तटस्थ ठेला निःशब्दें ॥ ८२ ॥ वेदें धरितां निज मौन ॥ शास्त्रें भ्रांबावलीं[2] जाण ॥ तिहीं धरोनि मताभिमान ॥ करिती वल्गन[3] अतिवादें ॥ ८३ ॥ शब्दांतीं ब्रह्मज्ञान ॥ हे वेदें पावोनि पूर्ण खुण ॥ शब्दें शब्द निषेधून ॥ दृढ मौन तेणें धरिलें ॥ ८४ ॥ वेदरायें धरितां मौन ॥ शास्त्रें भांबावलीं जाण ॥ शोधितां शब्दांचें रान ॥ निजसमाधान नपावती ॥ ८५ ॥ ज्यासि शब्दांतीं ब्रह्मप्राप्ती ॥ त्यासि दर्शनें ऐक्या येती ॥ शास्त्रें स्वयेंचि समजती ॥ ऐक्य त्रिजगतीं आभासे ॥ ८६ ॥ ब्रह्म एकाकी अद्वयस्थिती ॥ तुवांचि दाविली उपपत्ती ॥ तेथें ऐक्यरूपें त्रिजगती ॥ ह्मणसी कवणाप्रती आ

---

१ गुणाहून वेगळे. २ भ्रांत झालीं. ३ बडबड.

भासे ॥ ८७ ॥ ज्याची तुटली वासना फांसाटी ॥ विराली अहंकाराची गांठी ॥ प्रारब्ध उतरलें देहाचे तटीं ॥ त्यासि ऐक्यस्रष्टी आभासे
॥ ८८ ॥ त्याच्या अनुभवाची गोड गोष्टी ॥ सांगावया उल्हास पोटीं ॥ पिप्पलायनु स्वानंदतुष्टी ॥ ब्रह्मैक्यें स्रष्टी वाखाणी ॥ ८९ ॥
॥ श्लोक ॥ सत्वं रजस्तम इति त्रिवृदेकमादौ सूत्रं महानहमिति प्रवदंति जीवम् ॥ ज्ञानक्रियार्थफलरूपतयोरुशक्ति ब्रह्मैव भाति सदस
च्च तयोः परं यत् ॥ ३७ ॥ ॥ टीका ॥ ॥ ब्रह्म निजऐक्यें परिपाटी ॥ प्रपंचू ब्रह्मत्वेंचि उठी ॥ संतासंत सकळस्रष्टी ॥ देखती दृष्टीं ब्रह्मरूप
॥ ६९० ॥ जेवीं नभीं नीळिमेचें भान ॥ तेवीं ब्रह्मीं माया नांदे संपूर्ण ॥ नवल तियेचें विंदान ॥ नपुंसका जाण पुरुषत्व केलें ॥ ९१ ॥
अगाध तिचा पतिव्रताधर्म ॥ नपुंसका उपजी काम ॥ अनाम्या ठेवी नाम ॥ कीं निष्कर्मा कर्म तिचेनी ॥ ९२ ॥ ते निःसंग संगा रातँ
ली ॥ स्पर्शेंवीण गुर्विणी झाली ॥ प्रधानमहत्तत्वें गर्भा आली ॥ तेथ त्रिगुणातें व्याली विकारयुक्त ॥ ९३ ॥ विद्या अविद्या निजस्व
भावीं ॥ जीवशिवांची भेदपदवी ॥ प्रियापुरुषांतें भोगवी ॥ ज्ञानाज्ञानगांवीं वसोनियां ॥ ९४ ॥ जेवीं सुवर्णीं अलंकार ॥ तंतूमाजी
पटाकार ॥ भिंतीवरी भासे चित्र ॥ तेवीं माया साकार ब्रह्मीं भासे ॥ ९५ ॥ मृत्तिकेचीं गोकुळें केलीं ॥ नानानामाकारीं जरी पूजिलीं ॥
तरी मृत्तिकाचि संचली ॥ तेवीं ब्रह्मीं संचली जगद्रूपें माया ॥ ९६ ॥ जैशा घृताच्या कणिका ॥ घृतेंसि नव्हती आणिका ॥ तेवीं ब्रह्मीं
मायाशक्ती देखा ॥ दावी अनेका अर्थातें ॥ ९७ ॥ ब्रह्म पूर्वी एकाकी एक ॥ तेंचि केवीं झालें अनेक ॥ तो मायायोगपरिपाक ॥ विशद
अर्थ देख पिप्पलायनू सांगे ॥ ९८ ॥ मुळीं मुख्य ब्रह्म ओंकार ॥ तें एकचि झालें त्रिप्रकार ॥ अकार उकार मकार ॥ सत्त्वादिविकार
गुणत्रयात्मक ॥ ९९ ॥ गुणत्रय समसमान ॥ त्यानाव बोलिजे प्रधान ॥ तेंचि क्रियाशक्ती सूत्र जाण ॥ तेथें प्रगटल्या ज्ञान महत्तत्त्व
ह्मणती ॥ ७०० ॥ अहंब्रह्म हे पूर्णस्फूर्त्ती ॥ तें अहंकारलें देहाकृती ॥ देहाभिमानें निश्चितीं ॥ जीव ह्मणती वरतूतें ॥ १ ॥ क्रिया ह्मणिजे
दशधा करणें ॥ ज्ञानशब्दें देवताधिष्ठानें ॥ अर्थ ऐसें विषयांसि ह्मणणे ॥ तेथें फळ जाणणें सुखदुःख ॥ २ ॥ गुणभूतें विषय करणें ॥
जीव भोक्ता सुखदुःखपणें ॥ ज्ञानक्रिया कर्माचरणें ॥ हें सर्वही जाणणें पूर्ण ब्रह्म ॥ ३ ॥ साकरेचा फणस प्रबळ ॥ तेथें कांटे त्वचा
बीजगोळ ॥ अवघी साकरचि केवळ ॥ तेवीं ब्रह्मचि सकळ जगदाकारें ॥ ४ ॥ जेवीं पाटाऊं पुतळीकृत ॥ तेथें विषमावयवीं समान
सूत ॥ तेवीं जगदाकारें आकारवंत ॥ दिसे अविकृत परब्रह्म ॥ ५ ॥ जग विश्वप्रपंचू नाम ॥ परी तें निखळ परब्रह्म ॥ हा उपनिषदर्थ
उत्तम ॥ वेदांतीं परम परमार्थ तो हा ॥ ६ ॥ जगदाकारें ब्रह्म निश्चित ॥ जग अवघें विकारवंत ॥ तें ब्रह्मासही विकार प्राप्त ॥ ह्मणती

---

१ ब्रह्मपणानें. २ निर्लेपणाचे. ३ आली. ४ दोऱ्यांत. ५ वस्त्राकार. ६ स्पष्ट. ७ अविकारी. ८ जगद्रूपानें.

तो अर्थ नघडे राया ॥ ७॥ ॥श्लोक॥ ॥नात्मा जजान न मरिष्यति नैधतेऽसौ नक्षीयते सवनविद्व्यभिचारिणां हि ॥ सर्वत्र शश्वदनपाय्युपलब्धिमात्रं प्राणो यथेंद्रियबलेन विकल्पितं सत् ॥ ३८॥ ॥टीका॥ ॥ब्रह्मासि नाहीं माता पिता ॥ यालागीं नघडे जन्मकथा॥ आत्मा एकदेशी होता ॥ तरी जन्मा येता जननीजठरा ॥ ८॥ आत्म्यावेगळा कांहीं ॥ तिळभरी ठाव रिता नाहीं ॥ यापरी पूर्णत्वें पाही॥ जन्म तेठायीं स्पर्शेना ॥ ९ ॥ जन्मापूर्वीं बाळाचें नास्तिक्य ॥ जन्मापाठी मानिती आस्तिक्य ॥ या अस्तिनास्तीची भाष्य ॥ आत्म्यासि देख असेना ॥ ७१० ॥ आतां आहे पूर्वीं नाहीं ॥ ऐसें आस्तिक्य आत्म्याचे ठायीं ॥ कदाकाळीं नरिघे कांहीं ॥ तो नित्य पाही निरंतर ॥ ११ ॥ देहीं जन्मल्या बाळकासी ॥ वाढी दिसे दिवस दिवसीं ॥ तो बाळजन्म नाहीं आत्म्यासी ॥ यालागीं वृद्धत्व त्यासी घडेना ॥ १२ ॥ ज्यासि वृद्धी नाहीं तत्त्वतां ॥ त्यासि नये विपरिणामता[1] ॥ बाल्य तारुण्य वृद्धावस्था ॥ आत्म्यासि सर्वथा असेना ॥ १३ ॥ जो मी बाळत्वें होतों धाकुटा ॥ तोचि मी तारुण्यें जाहलों मोठा ॥ तो मी वृद्ध झालों कटकटा ॥ ऐसा त्रिकाळद्रष्टा परमात्मा ॥ १४॥ द्रष्टा साक्षी जो अवस्थातीत[2] ॥ तो कदा नव्हे अवस्थाभूत ॥ देहीं असोनि अवस्थारहित ॥ जाण तो निश्चित परमात्मा ॥ १५ ॥ निरवस्थ आत्मा अविकारी पूर्ण ॥ त्यासि कदा नये क्षीणपण ॥ ज्यासि जन्मचि नाहीं जाण ॥ त्यासि मरण असेना ॥ १६ ॥ जो अविकारी निरवस्थ पूर्ण ॥ ज्यासि नाहीं जन्ममरण ॥ ऐसा तूं आत्मा ह्मणशील कोण ॥ तरी जाण सर्वज्ञ ज्ञानस्वरूप ॥ १७॥ ह्मणसी ज्ञान ही क्षणिक असे ॥ घटज्ञानें पटज्ञान[3] निरसे ॥ तेथें इंद्रियार्थवृत्तीचि नासे॥ज्ञान जैसें तैसें अविनाशी ॥ १८॥ तेचि अर्थींचा पूर्ण दृष्टांत ॥ जेवीं प्राणदेहातें वाढवित ॥ तो देहोचि होय अवस्थाभूत ॥ प्राण निरवस्थ जैसा तैसा ॥ १९ ॥ प्राण देहातें चाळिता ॥ त्यासि न बाधी देहावस्था ॥ आत्मा प्राणातें चेतविता[4] ॥ त्यासि देहावस्था असेना ॥ ७२० ॥ येणेंचि प्राणदृष्टांतें ॥ साधूनि घ्यावें परब्रह्मातें ॥ देहेंद्रियावेगळें आत्म्यातें ॥ पुढील श्लोकार्थें प्रबोधी ॥ २१ ॥ ॥श्लोक॥ ॥अंडेषु पेशिषु तरुष्वविनिश्चितेषु प्राणोहि जीवमुपधावति तत्र तत्र ॥ सन्ने यदिंद्रियगणेऽहमिच प्रसुप्ते कूटस्थ आशयमृते तदनुस्मृतिर्नः ॥ ३९॥ ॥टीका॥ ॥ अंडज स्वेदज जारज॥ चौथें जाण गा उद्भिज ॥ त्याचेठायीं प्राण सहज ॥ आत्मयोगें सदा वर्ते ॥ २२॥ प्राणयोगें आत्मा वर्ततां ॥ त्यासि जीव ह्मणती तत्त्वतां ॥ त्या प्राणासि नबाधिती देहावस्था ॥ या जीवाचे माथां त्या कैंच्या ॥ २३॥ देहेंद्रियांमाजी वर्ततां ॥ आत्मा अलिप्त[5] देहावस्था ॥ तो कैसा ह्मणसी आतां ॥ ऐक त्याही दृष्टांता सांगेन ॥ २४ ॥ आत्मा जागृतदेहीं वर्ते ॥ तैं सविकार[6] मानिती त्यातें ॥ तोचि सांडूनि देहेंद्रियांतें ॥

---

१ परिणाम. २ जागृति, स्वप्न, सुषुप्ति. तीन अवस्थेहून वेगळा. ३ वस्त्राचें ज्ञान. ४ हालविणारा. ५ नलागणारा. ६ विकारी.

स्वप्नीं वर्त्ते पूर्वानुध्यासें ॥ २५ ॥ देहइंद्रियांविहीन ॥ केवळ लिंगदेह जाण ॥ निजात्मा[1] देखे स्वप्न ॥ जागृत्यभिमान संकल्पें ॥ २६ ॥ तें उपरमल्या[2] स्वप्न ॥ देहाभिमान झालिया लीन ॥ सर्वविकारविहीन ॥ सुषुप्तिकाळीं पूर्ण परमात्मा उरे ॥ २७ ॥ देहेंद्रियांसि अभिमान लीन ॥ कोणीही स्फुरेना स्फुरण ॥ तरी तें झालें सर्व शून्य ॥ आत्मा चिद्घन[3] नाहीं ह्मणसी ॥ २८ ॥ जरी सुषुप्तीसि आत्मा नाहीं ॥ तरी सुखें निजेलों होतों पाही ॥ हें उपजे ज्याच्या ठायीं ॥ तो सर्वथा नव्हे कहीं शून्य ॥ २९ ॥ जो मी जागृतीं जागता ॥ जो मी सुषुप्तीं सुखभोक्ता ॥ जो मी स्वप्नातें देखिता ॥ एवं तिहीं अवस्था साक्षी जो ॥ ७३० ॥ जो अवस्थात्रयीं साक्षी पूर्ण ॥ तो सर्वथा नव्हे शून्य ॥ तोचि परमात्मा परिपूर्ण ॥ शुद्ध चिद्घन तो राया ॥ ३१ ॥ सुषुप्तीं ब्रह्मानुभव आहे ॥ तरी कां पुढती संसारू पाहे ॥ तेथें अविद्येसी अहं[4] लीन राहे ॥ यालागीं होय भवभ्रमु ॥ ३२ ॥ ते अविद्या अहंकारेंसि नाशे ॥ तैं जगद्रूपें परब्रह्म भासे ॥ जन्ममरणांचा ठावोचि पुसे ॥ जीव सभरसे[5] परब्रह्मीं ॥ ३३ ॥ तेथें हेतुमात्र दृष्टांत ॥ प्रमाणप्रमेयविवर्जित ॥ परमात्मा सदोदित ॥ परब्रह्म निश्चित परमानंदें ॥ ३४ ॥ तेथें सुखावरी सुख नांदे ॥ आनंद भोगिजे आनंदें ॥ जग दुमदुमी परमानंदें ॥ स्वानंदबोधें संपूर्ण ॥ ३५ ॥ निरसोनियां[6] निज माया ॥ ऐसा अनुभवो मुनिवर्या ॥ कैं होईल ह्मणसी राया ॥ तैं भजावें यदुवर्या निष्कामभावें ॥ ३६ ॥ ॥श्लोक॥ ॥यर्ह्यब्जनाभचरणैषणयोरुभक्त्या चेतोमलानि विधमेद्गुणकर्मजानि ॥ तस्मिन् विशुद्ध उपलभ्यत आत्मतत्वं साक्षाद्यथाऽमलदृशोः सवितृप्रकाशः ॥ ४० ॥ ॥टीका॥ ॥निर्विकार रूपप्राप्ती ॥ अवश्य पावणें आहे चित्तीं ॥ तैं करावी भगवद्भक्ती ॥ उत्कंठा प्रीती अविश्रम ॥ ३७ ॥ त्यजोनि पुत्रवित्तेषणेचें काज ॥ जीणोनि[7] लौकिकाची लाज ॥ पद्मनाभभजन भोज ॥ अतिनिर्लज्ज नाचावें ॥ ३८ ॥ पुत्रवित्तलोकेषणा ॥ त्यजूनि भजतां हरिचरणा ॥ तंवतंव चित्ताचे चेत्यमळ जाणा ॥ क्षणक्षणां नासती ॥ ॥ ३९ ॥ रजतमादि कर्ममळ ॥ चित्तीं बैसले जे सबळ ॥ ते प्रक्षाळती सकळ ॥ भक्तिप्रेमजळक्षाळणें ॥ ७४० ॥ जंवजंव थोरावे[8] सप्रेमभक्ती ॥ तंवतंव पायां लागे विरक्ती ॥ स्वयें विरमे विषयासक्ती ॥ होय चित्तवृत्ती निर्मळ ॥ ४१ ॥ निर्मळ जाहलिया चित्तवृत्ती ॥ परमात्मया सर्वभूतीं ॥ भजों लागे अनन्य प्रीती ॥ हे चौथी भक्ती उदार ॥ ४२ ॥ हे भक्ती अतिशयें उदार ॥ निर्दाळी[9] भक्तांचा अहंकार ॥ उद्धरी सुर[10] नर स्त्रिया शूद्र ॥ आनंदनिर्भर[11] करी जिवू ॥ ४३ ॥ हे भक्ती जैं लागे हातीं ॥ तैं भवभयाची निःशेष शांती ॥ पायां लागती चारी मुक्ती ॥ ऐशी उदारभक्ती हरीची ॥ ४४ ॥ जेवीं डोळां असतां पडळ ॥ सविता उगवे सर्वकाळ ॥ तो सन्मुख नदेखे रविमंडळ ॥ मा पदार्थ सकळ त्यां कैंचे ॥ ४५ ॥

---

[1] आपला आत्मा. [2] नाहींसे झाले असता. [3] चैतन्यरूप. [4] अहंकार. [5] एक होतो. [6] नाहींसी करून. [7] जिंकून. [8] मोठि होते. [9] नाहींसा करते. [10] देव. [11] आनंदानें भरलेला.

तेंचि फिटलिया पडळ ॥ दृष्टी होय अतिनिर्मळ ॥ देखों लागे पदार्थ सकळ ॥ रविमंडळ समन्वयें ॥ ४६ ॥ तेवीं निजात्मा[1] हृदयीं वसे ॥ परी चित्तवृत्ती मलिन असे ॥ तंव परब्रह्म नप्रकाशे ॥ चित्त वासनादोषें दूषित ॥ ४७ ॥ तेथें करितां भगवद्भक्ती ॥ निर्मळ होय चित्तवृत्ती ॥ तेव्हां निर्विकारस्वरूपप्राप्ती ॥ भक्त पावती निजभजनें ॥ ४८ ॥ पावावया परम प्राप्ती ॥ जगीं दाटुगी भगवद्भक्ती ॥ ते म्या सांगीतली तुजप्रती ॥ यथानिगुतीं नृपनाथा ॥ ४९ ॥ जेवीं डोळ्याचें पडळ फिटे ॥ तेथ प्रकाशेंसि सविता भेटे ॥ तेवीं कल्पना लोपे प्रगटे ॥ नेटेपाटे परब्रह्म ॥ ७५० ॥ जेथ निर्विकल्प समान ॥ निश्चयेंसि जाहलें मन ॥ त्यासि देहीं वर्त्ततांही जाण ॥ भवबंधन स्पर्शेना ॥ ५१ ॥ ऐसें गर्जोनियां जाण ॥ हर्षें बोले पिप्पलायन ॥ तंव राजा सुखावला संपूर्ण ॥ जीवींची खूण बाणली ॥ ५२ ॥ ऐकतां ब्रह्मनिरूपण ॥ राजा लांचावला[2] पूर्ण ॥ पुढें वाढावया निरूपण ॥ अन्वयें प्रश्न पुसत ॥ ५३ ॥ जेणें तुटे कर्मबंधन ॥ त्या कर्मयोगाचें लक्षण ॥ समूळ ऐकावया जाण ॥ राजा आपण सादरें पूसतू ॥ ५४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ राजोवाच ॥ ॥ कर्मयोगं वदत नः पुरुषो येन संस्कृतः ॥ विधूयेहाशु कर्माणि नैष्कर्म्यं विंदते परम् ॥ ४१ ॥ ॥ टीका ॥ ॥ राजा निजश्रद्धासंपन्न ॥ अतिविनीत[3] करी प्रश्न ॥ जेणें तुटे कर्मबंधन ॥ तो कर्मयोग संपूर्ण सांगा स्वामी ॥ ५५ ॥ कोणें कर्में कर्म तुटे ॥ नैष्कर्म्यसिद्धी स्वयें प्रगटे ॥ पुरुषा पुरुषोत्तम भेटे ॥ हें मज गोमटें कर्म सांगा ॥ ५६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवं प्रश्नमृषीन्पूर्वमपृच्छं पितुरंतिके ॥ नाब्रुवन् ब्रह्मणः पुत्रास्तत्र कारणमुच्यताम् ॥ ४२ ॥ ॥ टीका ॥ ॥ पूर्वीं हाचि प्रश्न सनकादिकां ॥ पुत्रीं पित्यासि पुशिला देखा ॥ तो उत्तर नदेचि कां ॥ हेही आशंका फेडावी स्वामी ॥ ५७ ॥ रायाचे प्रश्न अतिपवित्र ॥ त्याचें द्यावया प्रतिउत्तर ॥ हरिखावला[4] आविर्होत्र ॥ तो कर्मवैचित्र्य निरूपी ॥ ५८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ आविर्होत्रउवाच ॥ ॥ कर्माकर्मविकर्मेति वेदवादो न लौकिकः ॥ वेदस्य चेश्वरात्मत्वात्तत्र मुह्यंति सूरयः ॥ ४३ ॥ ॥ टीका ॥ ॥ कर्माकर्मविकर्म जाणा ॥ सामान्य नव्हे नृपनंदना ॥ करितां विभागविवंचना ॥ नुगवे[5] सज्ञानां स्मृतिकारांसी ॥ ५९ ॥ जे स्वयें प्रतिसृष्टिकारी ॥ तेही भुलले कर्मविभागावारीं ॥ जे समुद्र घोंटिती चुळें करीं ॥ तेही कर्मसागरीं[6] बुडाले ॥ ७६० ॥ येचि कर्मविवंचनेसाठीं ॥ ऋषिमहर्षींचिया कोटी ॥ मताभिमानें झाले हिंपुटी ॥ त्यांसीही शेवटीं नुगवेची ॥ ६१ ॥ कर्माकर्म विभाग जाणा ॥ स्वयें नुगवेचि चतुरानना[7] ॥ इतरांची कोण गणना ॥ कर्मविवंचना करावया ॥ ६२ ॥ कर्म वेदमूळ जाण ॥ वेदु स्वयें नारायण ॥ वेदवादविवंचन ॥ करितां मौन श्रुतिशास्त्रां ॥ ६३ ॥ कर्म अकर्म विकर्म जाण ॥ एकच परी त्रिविध भिन्न ॥ तेंही विभागविवंचन ॥ सावधान अवधारी ॥ ६४ ॥ श्वेत

---

[1] आपला आत्मा. [2] अनुभवास आली. [3] अति नम्र. [4] आनंदला. [5] उगवत नाहीं. [6] कर्मरूपसमुद्रांत. [7] ब्रह्मदेवास.

मृदु मधुर ॥ त्रिविधभेदें एक साकर ॥ तेवीं एकचि त्रिप्रकार ॥ कर्मठ नर मानिती कर्म ॥ ६५ ॥ भिन्न करितां मधुरता ॥ श्वेतताचि
भिन्न करितां ॥ माजीये मृदुश्वेतता ॥ मृदुमधुरता तीमाजी ॥ ६६ ॥ तेवीं भिन्न करितां कर्म ॥ कर्मा सर्वांगीं अकर्म ॥ कर्म अकर्मा
माजी विकर्म ॥ मिरवे परमसौभाग्यें ॥ ६७ ॥ मुख्य मुळीं जेकां निपजे[1] ॥ कर्म ऐसें त्यातें ह्मणिजे ॥ विहिताविहितक्रिया जेजे ॥ विकर्म
ह्मणिजे तियेनाव ॥ ६८ ॥ कर्मअकर्मयोगेंचळे ॥ ऐसें विकर्मी ज्यासि विवळे ॥ त्यास निष्कर्मता आकळे ॥ गुरुकृपाबळें तत्काळ
॥ ६९ ॥ कर्मावरी कर्म विशेष वाढे ॥ विकर्म त्यातें ह्मणणें घडे ॥ जेथें कर्म रिघों नशके पुढें ॥ अकर्म चोखडें यानाव ॥ ७७० ॥ ऐशी
कर्मविवंचना[2] अटक ॥ हा प्रश्नकेला तैं बाळक ॥ त्याचिलागीं गा राया देख ॥ सनकादिकां न सांगतीची ॥ ७१ ॥ कर्माकर्मविवंचना ॥
अधिकारेंवीण कोणा ॥ सांगोंनये नृपनंदना ॥ कर्म सज्ञाना अतिदुर्बोध ॥ ७२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ परोक्षवादोवेदोऽयं बालानामनुशासनम् ॥ कर्ममोक्षाय कर्माणि विधत्ते ह्यगदं यथा ॥ ४४ ॥ ॥ टीका ॥ ॥ जेवीं रोग झालिया निश्चित ॥ जावया बाळा पिता भेषज[3] देत ॥
तेथें साकर घाली हातांत ॥ तत्सेवनार्थ[4] प्रलोभें ॥ ७३ ॥ तेवीं वेदांचा परोक्ष वाद ॥ सत्य मानिती बुद्धिमंद ॥ कर्में छेदवी कर्मबाध ॥
हा वेदानुवाद मुख्यत्वें ॥ ७४ ॥ वेद बोले स्वर्गादिफळ ॥ तो प्रवृत्तिलोभ केवळ ॥ परी कर्में छेदी कर्ममूळ ॥ हें मुख्यत्वें फळ वेदोक्तीं
॥ ७५ ॥ लोहाची बेडी पडली पायीं ॥ ते तोडावया घणु[5] आणिला पाही ॥ तो घणूचि विकून खादला[6] जिहीं ॥ त्यांचें बंधन कहीं तुटेना
॥ ७६ ॥ तेवीं कर्में छेदावें कर्मबंधन ॥ तें कर्म वेंचिती विषयीं पूर्ण ॥ त्यांचें कदा नतुटे भवबंधन[7] ॥ जन्ममरण सरेना ॥ ७७ ॥ आह्मी
स्वर्गफळा विरक्त[8] ॥ ह्मणोनि नाचरे जो वेदोक्त ॥ त्याचें ज्ञान झालें विपरीत ॥ अति अनर्थ पावती ॥ ७८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नाचरेद्यस्तु
वेदोक्तं स्वयमज्ञोऽजितेंद्रियः ॥ विकर्मणा ह्यधर्मेण मृत्योर्मृत्युमुपैति सः ॥ ४५ ॥ ॥ टीका ॥ ॥ आह्मी जितेंद्रिय ह्मणवित ॥ ह्मणोनि
नाचरे[9] जो वेदोक्त ॥ त्यासि नातुडे गा परमार्थ ॥ अति अनर्थ अंगीं वाजे ॥ ७९ ॥ जरी शास्त्रज्ञ ज्ञाता झाला ॥ आणि वेदोक्ता विमुख[10]
ठेला ॥ तरी तो जाणपणेंचि नागवला ॥ जाण बुडाला दुःखार्णवीं ॥ ७८० ॥ नाचरे जो वेदोक्त कर्म ॥ त्यक्तकर्मे मानी निष्कर्म ॥ त्यासि
थोर पडला भ्रम ॥ नाडला परम अभिमानें ॥ ८१ ॥ जरी विषयो निग्रहिला[11] ॥ आणि वेदोक्ता जो दुरावला ॥ तो निजघाता[12] प्रवर्तला ॥
स्वयें बुडाला नरकार्णवीं[13] ॥ ८२ ॥ वेद निजमूळ परमार्था ॥ तें वेदोक्त नाचरतां ॥ जेंजें करणें नृपनाथा ॥ तेंतें तत्त्वतां अधःपाती ॥ ८३ ॥

---

१ उत्पन्न होते. २ कर्माचा विचार. ३ औषध. ४ त्याच्या सेवेकरितां. ५ मोठा हातोडा. ६ खाल्ला. ७ संसारबंधन. ८ वैरागी. ९ आचरण करीत नाहीं. १० नकरणारा. ११ नाहिसा केला. १२ आपल्या नाशास. १३ नरकरूप समुद्रांत.

डोळे देखणें तत्त्वतां ॥ तो काढूनि पाहोंजातां ॥ नदेखे आपुली डोळसता ॥ मा इतरपदार्थां कोण देखे ॥ ८४ ॥ तैसा नादेख चरोनि
वेदार्थू ॥ जोजो मानिला परमार्थू ॥ तेणें आंवतूनियां अनर्थू ॥ जाण निश्चितू आणिला घरा ॥ ८५ ॥ तेणें अनर्थपाटें ॥ वाहावले जन्ममरणवाटे ॥ तेथें नानायोनीगर्भसंकटें ॥ सोसितां नसुटे कल्पांतीं ॥ ८६ ॥ तेथें जन्मजन्मों जन्म नटके ॥ मरमरों मरण नचुके ॥ जैं
वेदविहित चुके ॥ तैं अतिदुःखें दुःखभोगु ॥ ८७॥ विकर्मणा त्वधर्मेण ॥ हें मुळींचें पदनिरूपण ॥ तेणें विकर्मामाजी अधर्म पूर्ण ॥ परी
अकर्म तें जाण अधर्म नव्हे ॥ ८८ ॥ ज्यासी लावितां नलागे कर्म ॥ यानांव मुख्य निष्कर्म ॥ निष्कर्मलक्षण हाचि धर्म ॥ येणेंचि परम
मुक्त साधूं ॥ ८९ ॥ ज्यासि शुद्ध आकळे अकर्म ॥ तो तत्काळ होय निष्कर्म ॥ अकर्माचें कळल्या वर्म ॥ मुक्तता परम पायां लागे
॥ ७९० ॥ ॥श्लोक॥ ॥वेदोक्तमेव कुर्वाणो निःसंगोऽर्पितमीश्वरे ॥ नैष्कर्म्यां लभते सिद्धिं रोचनार्था फलश्रुतिः ॥ ४५॥ ॥टीका॥
दासी स्वामीची आज्ञा धरी ॥ कां राजमुद्रा प्रजांवरी ॥ तैसी वेदाज्ञा[1] जो शिरीं धरी ॥ स्वधर्माचारीं निष्काम ॥ ९१ ॥ मी एकु कर्म
कर्ता ॥ ऐशी उठोंनेदी[2] अहंता ॥ तें कर्मचि स्वभावतां ॥ अर्पी श्रीअनंता ईश्वरातें ॥ ९२ ॥ एवं ईश्वरीं जें अर्पे कर्म ॥ तें कर्म होय निर्धर्म ॥ याचि नावें परम ॥ नैष्कर्म्य निजसिद्धी ॥ ९३ ॥ वेदें बोलिलें कर्मफळ ॥ ज्याची वासना निष्काम निर्मळ ॥ त्यासि वेदोक्त फळ
प्रबळ ॥ भोगावया केवळ स्वप्नीं नदिसे ॥ ९४ ॥ ऐसें असतां कर्मफळ ॥ वांछितां नाडिजे केवळ ॥ जेवीं परीस देऊनि सोज्वळ ॥ मागिजे
पोफळ[3] तांबूलासि ॥ ९५ ॥ कर्मीं निष्कामता नित्य फळ ॥ तेथें फळाशा नाडले सकळ ॥ चंदन सर्वांगीं सफळ ॥ तेथें मागतां फळ नाडिजे
स्वयें ॥ ९६ ॥ हातीं आतुडावया[4] मासा ॥ गळीं लाविजे अल्प आमिषा[5] ॥ तेवीं निष्काम करावया मानसा ॥ वेदू फळाशा प्रलोभी ॥ ९७॥
आमिष घालूनि मासे पाळी ॥ कीं तद्योगें जळाबाहेर गाळी ॥ तेवीं कर्म कर्मातें निर्दळी ॥ हें नेणिजे मुळीं फळकामीं ॥ ९८ ॥ होकां फळाचिये चाडें ॥ स्वधर्मकर्मीं प्रवृत्ति[6] घडे ॥ तेणें नैष्कर्म्यसिद्धी आतुडे ॥ हें वेदांचें फुडें[7] निजगुह्य ॥ ९९ ॥ कर्म ब्रह्मत्वें सदा सफळ ॥ फळ
वांछी त्यातें निष्फळ ॥ हें जाणोनि कर्मकुशळ ॥ समूळ छेदिती ॥ ८०० ॥ ऐसें आचरतां वैदिक कर्म ॥ तेणें कर्में पाविजे नैष्कर्म्य ॥ पाहोनियां अतिसुगम ॥ सांगेन वर्म तें ऐक ॥ १ ॥ ॥श्लोक॥ ॥य आशु हृदयग्रंथिं निर्जिहीर्षुः परात्मनः ॥ विधिनोपचरेद्देवं तंत्रोक्तेन चकेशवम् ॥ ४७॥ ॥टीका॥ ॥जेणें वासनेचें जाळ[8] तुटे ॥ अहंकाराची गांठी सुटे ॥ जीवीं परमात्मा स्वयें प्रगटे ॥ तें तांत्रिक विधान गोमटें ऐक राया ॥ २ ॥ जया तांत्रिक महापूजा ॥ संतोष होय गरुडध्वजा ॥ तें तांत्रिक विधान वोजा ॥ महाराजा अवधारी ॥ ३ ॥ वैदिक

---

१ वेदाची आज्ञा. २ उठूंदेत नाहीं. ३ सुपारी. ४ मिळण्याकरितां. ५ मांसास. ६ आरंभ. ७ खरे. ८ जाळें.

मंत्र तांत्रिकतंत्र ॥ हे मिश्रपूजा अतिपवित्र ॥ शीघ्र निष्काम करी नर ॥ तो पूजाप्रकार अति उत्तम ॥ ४ ॥ वैदिक अथवा तांत्रिक ॥ गुरु
मार्गें सिद्धिदायक ॥ यालागीं गा आवश्यक ॥ सद्गुरूसि देख शरण जावें ॥ ५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ लब्धानुग्रह आचार्य्यात्तेन संदर्शि
तागमः ॥ महापुरुषमभ्यर्चेन्मूर्त्याऽभिमतयाऽऽत्मनः ॥ ४८ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रवृत्तिनिवृत्ति कृत कार्या ॥ अवश्य पाहिजे आचार्या ॥ आप
मतीं भजतां राया ॥ अनेक अपायांमाजी पडे ॥ ६ ॥ भोयेपाय सिद्ध आहेती ॥ भोयाळेवीण वृथा भ्रमती ॥ तेवीं गुरुवीण जेजे क
रिती ॥ तेते अहंमती भ्रमले ॥ ७ ॥ गुरुब्रह्म दोनी एक ॥ ऐशिया भावना आवश्यक ॥ सेवा करून भावपूर्वक ॥ संतोषवूनि देख अनुग्रहो
घ्यावा ॥ ८ ॥ तेथें निजाधिकारप्राप्तें ॥ जे मूर्ति आवडेल आपणियातें ॥ तेचि मंत्रविद्या तेथें ॥ श्रद्धासभरितें अंगीकारावी ॥ ९ ॥ तेव्हां
गुरुमुखें मिश्र वोजा ॥ पुरुषोत्तममहापूजा ॥ शिकोनियां निजकाजा ॥ भजावें अधोक्षजा शिक्षिता मती ॥ ८१० ॥ तेचि भजती हात
वटी ॥ आगमोक्त निजपुष्टी ॥ राया सांगेन गोमटी ॥ सावधानदृष्टी अवधारी ॥ ११ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शुचिः संमुखमासीनः प्राणसंयम
नादिभिः ॥ पिंडं विशोध्य संन्यासकृतरक्षोऽर्चयेद्धरिम् ॥ ४९ ॥ ॥ टीका ॥ ॥ विध्युक्त करितां संध्या स्नान ॥ तेथेंचि आहे ब्रह्मज्ञान ॥ आ
चमनीं होय हरिरूप आपण ॥ हें नेणोनि अज्ञान आगमीं भरती ॥ १२ ॥ केशवादिनामीं जाण ॥ अंगप्रत्यंगीं न्यासितां पूर्ण ॥ तेव्हां हरि
रूप होय आपण ॥ हें नेणोनि अज्ञान आगमीं भरती ॥ १३ ॥ करून आगमोक्त संध्या स्नान ॥ मूर्तीपासी येऊन जाण ॥ संमुख घालावें
आसन ॥ चैलाजिनकुशयुक्त ॥ १४ ॥ रेचक पूरक कुंभकें जाण ॥ प्राणायामें प्राणसंयमन ॥ भूतशुद्ध्यादिकीं जाण ॥ शरीरशोधन करावें
॥ १५ ॥ भूतविलयें भूतशुद्धी ॥ प्राणप्रतिष्ठा पिंडादिशुद्धी ॥ मूंळमंत्रें न्यास प्रबुद्धी ॥ गुरुदीक्षाविधी विध्युक्त कीजे ॥ १६ ॥ हृदय क
वच शिखा शिर ॥ नेत्र अस्त्रादिफट्कार ॥ एवंविधान अनुकार ॥ आगमोक्त प्रकार करावे न्यास ॥ १७ ॥ यापरी मूळमंत्रदीक्षा ॥ क
रोनि दिग्बंधादि सँरक्षा ॥ मग मूर्त्तिपूजनपक्षा ॥ नृपाध्यक्षा अवधारी ॥ १८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अर्चादौ हृदयेचापि यथालब्धोपचा
रकैः ॥ द्रव्यक्षित्यात्मलिंगानि निष्पाद्य प्रोक्ष्य चासनम् ॥ ५० ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रयोग छंद संपूर्ण ॥ पूर्वान्वयो विपरीत जाण ॥ द्रव्यशुद्धि
क्षितिमार्जन ॥ हें मागील निरूपण पुढां आलें ॥ १९ ॥ द्रव्यशुद्धि मुखशोधन ॥ भूमिशुद्धि संमार्जन ॥ आत्मशुद्धि सावधान ॥ का
ढिल्या अनुलेपन मूर्तिशुद्धी ॥ ८२० ॥ पूंजासंभार सिद्ध करून ॥ समस्त शंखतोयें प्रोक्षून ॥ निजासनीं सावधान ॥ एकाग्र जाण बै
सावें ॥ २१ ॥ ज्यासि ध्यानीं मूर्ति नये संपूर्ण ॥ तेणें प्रतिमामूर्त्ति अधिष्ठान ॥ तेथेंचि करावें पूजन ॥ लब्धोपचारें जाण आगमोक्त ॥ २२ ॥

---

१ वेदानें सांगीतलेला. २ आपल्या बुद्धीनें. ३ विभ्रांत. ४ अहंकाराचे. ५ शास्त्रानें युक्त. ६ मूळच्या मंत्रानें. ७ रक्षण. ८ जमीनीवर पाणी सिंपडणें. ९ पूजेचें साहित्य.

ज्यासि ध्याना ये मूर्ति अतिसंकटीं ॥ तेणें बाह्योपचार आटाआटी ॥ सांडूनियां ध्यानदृष्टीं ॥ करावी गोमटी मानसपूजा ॥ २३ ॥ ज्याचे हृदयींचें न विकरे ध्यान ॥ बाह्यमूर्त्ति सावधान ॥ तेणें उभयतां पूजन ॥ करावें संपूर्ण आगमोक्त ॥ २४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पाद्यादीनुपकल्प्याऽथ सन्निधाप्य समाहितः ॥ हृदादिभिः कृतन्यासो मूलमंत्रेण चार्चयेत् ॥ ५१ ॥ ॥ टीका ॥ ॥ सकळ पूजासंभार ॥ निकट[१] ठेवूनि उपचार ॥ मग मूर्तीसि न्यासप्रकार ॥ उक्तशास्त्रें करावा ॥ २५ ॥ जैसे न्यास आपणास ॥ तैसेचि करावे मूर्तीस ॥ हा आगमोक्त गुरु सौरस ॥ मूळमंत्रें न्यास मूर्तीसी ॥ २६ ॥ आगमोक्त करितां न्यास ॥ अंगप्रत्यंगीं विन्यास ॥ तेणें करितां होय हृषीकेश ॥ हा अर्थ सौरस[२] दृढ करावा ॥ २७ ॥ दृढ करोनि अनुसंधान ॥ मूळमंत्रें मूर्तिपूजन ॥ हृदयीं आणि प्रतिमेसि जाण ॥ पूजाविधान दोहींठायीं ॥ २८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सांगोपांगां सपार्षदां तां तां मूर्त्ति स्वमंत्रतः ॥ पाद्यार्घ्याचमनीयाद्यैः स्नानवासोविभूषणैः ॥ ५२ ॥ ॥ टीका ॥ ॥ करचरणादि अभ्यंग ॥ मूर्त्ती चिंतावी सुंदर सांग ॥ श्याम मनोहर श्रीरंग ॥ उल्हास चांग निजध्यानीं ॥ २९ ॥ मूर्त्ति चतुर्भुज वेल्हाळ ॥ शंख चक्र गदा कमळ ॥ सुनंदादि पार्षदमेळ ॥ चिंतावे सकळ आयुधादिक ॥ ८३० ॥ यथोक्त मधुपर्कविधान ॥ अर्घ्यपाद्यादि आचमन ॥ पुरुषसूक्तमंत्रें जाण ॥ करावें स्नान निर्मळजळें ॥ ३१ ॥ मुकुट कुंडलें कटीं मेखळा ॥ कांसे[३] मिरवे सोनकळा ॥ आपाद[४] रुळे वनमाळा ॥ कौस्तुभ तेजाळा[५] कंठीं झळके ॥ ३२ ॥ पादपद्मांकित सुकुमार ॥ ऊर्ध्वरेखा ध्वज वज्र ॥ वांकी अंदुवांचा गजर ॥ चरणीं तोडर[६] गर्जत ॥ ३३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ गंधमाल्याक्षतस्रग्भिर्धूपदीपोपहारकैः ॥ सांगं संपूज्य विधिवत्स्तवैः स्तुत्वा नमेद्धरिम् ॥ ५३ ॥ ॥ टीका ॥ ॥ निढळीं शुद्ध श्याम कळा ॥ तिळकु रेखिला पिंवळा ॥ त्यावरी अक्षता सोज्ज्वळा ॥ आरक्त तेजाळा कुंकुमाक्त ॥ ३४ ॥ सुमनें गुंफिलीं वीरगुंठीं ॥ त्यावरी मधुकरांची घरटी ॥ तुळसी कमळमाळा कंठी ॥ चंदनाची उठी श्यामांगीं शोभे ॥ ३५ ॥ धूप दीप उपहार[७] ॥ तांबूल अर्पावें सकर्पूर ॥ निरंजनें जयजयकार ॥ मंत्रस्वरें अर्पावा ॥ ३६ ॥ स्तुति करावी वेदोक्तमंत्रें ॥ कां पुराणोक्त नानास्तोत्रें ॥ अथवा प्राकृतनामोच्चारें ॥ नानाप्रकारें गद्यपद्यें ॥ ३७ ॥ स्तवनें संतोष अधोक्षजा ॥ ऐसें भावावें[८] महाराजा ॥ मग साष्टांगें अतिवोजा ॥ गरुडध्वजा नमस्कारावें ॥ ३८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ आत्मानं तन्मयं ध्यायन् मूर्त्ति संपूजयेद्धरेः ॥ शेषामाधाय शिरसि स्वधाम्न्युद्वास्य सत्कृताम् ॥ ५४ ॥ ॥ टीका ॥ ॥ द्वैतभावें भजनविधी ॥ ते जाणावी स्थूलबुद्धी ॥ भजनाची भजनसिद्धी ॥ जाण त्रिशुद्धी तन्मय होणें ॥ ३९ ॥ मूर्तिध्यानें तन्मयस्थिती ॥ ऐक्यत्वें राहे निश्चळवृत्ती ॥ याचि नांव मुख्यभक्ती ॥ उठलियापुढती नमावें हरी ॥ ८४० ॥ ऐशी

---

१ जवळ. २ उत्तम. ३ कंबरेवर. ४ पायापर्यंत. ५ तेजस्वी. ६ तोरड्या. ७ फळेंआदि खाण्याचें पदार्थ. ८ भावना करावी. ९ ईश्वररूप.

पूजा करूनि हरी ॥ शेष प्रसाद धरोनि शिरीं ॥ मग देवो आपणिया भीतरी ॥ हृदयमंदिरीं निजविजे ॥ ४१ ॥ एवं पूजेचें उद्वासन[1] ॥ ध्यानमूर्त्ती हृदयीं शयन ॥ प्रतिमा पर्यंकीं निजवून ॥ विधिविधान समाप्ती ॥ ४२ ॥ जाहलिया पूजाविसर्जन ॥ विसर्जूनये अनुसंधान ॥ अखंड हरीचें स्मरण ॥ सर्वस्वें आपण सर्वदा कीजे ॥ ४३ ॥ या नांव गा आगमविधी ॥ राया जाण त्रिशुद्धी ॥ सदा पाळिती सद्बुद्धी ॥ परमात्मसिद्धिप्रापक ॥ ४४ ॥ आगमोक्त विधिलक्षण ॥ प्रतिमाचि मुख्य नव्हे जाण ॥ ज्यासि जेथ श्रद्धा पूर्ण ॥ तेथ हें विधान सुखें कीजे ॥ ४५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवमग्न्यर्कतोयादावतिथौ हृदये च यः ॥ यजतीश्वरमात्मानमचिरान्मुच्यते हि सः ॥ ५५ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ हे पूजा नव्हे एकदेशीं ॥ बहुत स्थानें ये पूजेसी ॥ त्यांत शीघ्रतर[2] जें प्राप्तीसी ॥ तें मी तुजपासीं सांगेन राया ॥ ४६ ॥ ॥ येणेंचि विधानें यथाकाळीं ॥ सांग पूजा कीजे जळीं ॥ अथवा सूर्यमंडळीं ॥ पूजा सोज्ज्वळी हरिध्यानें कीजे ॥ ४७ ॥ अग्नीच्याठायीं हृदयदीप्ती ॥ पूजा कीजे कमळापती ॥ अवघ्यापरी शीघ्रप्राप्ती ॥ पूजावा अतिथी भगवद्भावें[3] ॥ ४८ ॥ आलिया वैश्वदेवाचे अंतीं ॥ तो भलता हो भलते याती ॥ त्यासि जे भगवद्भावें पूजिती ॥ त्याचे घरा पूर्णप्राप्ती वोसरे[4] ॥ ४९ ॥ पूर्वी अनोळखु निश्चितीं ॥ आलिया वैश्वदेवाचे अंतीं ॥ त्यातें ब्रह्मभावें जे पूजिती ॥ त्यांसि भुक्तिमुक्ती आंदणी ॥ ८५० ॥ त्या वैश्वदेवाचे अंतीं जाण ॥ निजभाग्यें आलिया शुद्धब्राह्मण ॥ तया श्रद्धेनें पूजितां आपण ॥ तेघरीं नारायण स्वानंदें वसे ॥ ५१ ॥ राया वैश्वदेवाचे अंतीं ॥ अतिथीसवें भुक्तिमुक्ती ॥ विमुख जाहल्या त्या लाभा नाडती ॥ पूजकां सुखप्राप्ती परमानंदें ॥ ५२ ॥ अतिथीच्याठायीं मूर्त्तिध्यान ॥ सर्वथा करणें नलगे जाण ॥ तो स्वरूपें स्वयें नारायण ॥ पूजितां संपूर्ण सर्वार्थसिद्धी ॥ ५३ ॥ एवं अतिथींसि जें अर्पे ॥ तें भगवंतमुखीं समर्पे ॥ यालागीं अतिसाक्षेपें ॥ अतिथी ब्रह्मरूपें पूजिजे सदा ॥ ५४ ॥ जेंजें बोलिलें पूजास्थान[5] ॥ तेथें निजश्रद्धाचि[6] पूर्ण ॥ श्रद्धेवेगळे राया जाण ॥ प्राप्ति संपूर्ण कदा नलभे ॥ ५५ ॥ निजश्रद्धेचें हृदयस्थान ॥ ते हृदयीं विध्युक्त पूजन ॥ करितां श्रद्धेनें आपण ॥ प्राप्ति संपूर्ण उद्बोधे स्वयें ॥ ५६ ॥ येऱ्हवीं तरी आपुल्या देहीं ॥ चाळक ईश्वरू आहे हृदयीं ॥ श्रद्धेनें भजतां त्याचे ठायीं ॥ निजप्राप्ती पाही सहजें लाभे ॥ ५७ ॥ जेंजें आपण सेविजे ॥ तेंतें भगवन्मुखीं[7] पाविजे ॥ येणें निजभजनें पाविजे ॥ जाण सहजें परमात्मा ॥ ५८ ॥ सांडोनि देहींची अहंता ॥ सकळ भोग ईश्वरू भोक्ता ॥ ऐशी दृढभावना भावितां ॥ पाविजे परमार्था अपरोक्षसिद्धी ॥ ५९ ॥ देह जड मूढ अचेतन ॥ सकळ भोगभोक्ता ईश्वरू पूर्ण ॥ तेथ वाढवूनि देहाभिमान ॥ भोगिती

---

[1] विसर्जन. [2] फार लवकर. [3] ईश्वरभावनेनें. [4] येते. [5] पूजेचें ठिकाण. [6] आपली भक्तीच. [7] ईश्वराच्या तोंडांत.

अज्ञान अनेकदुःखें ॥ ६० ॥ ते सांडूनि देहअहंता ॥ हृदयस्था[1] शरण जातां ॥ पाविजे पूर्णपरमार्था ॥ जाण तत्त्वतां नृपवर्या ॥ ६१ ॥ निःशेष सांडिजे मीपण ॥ याचि नांव हृदयस्था शरण ॥ तूं सहजें परब्रह्म परिपूर्ण ॥ मिथ्या देहाभिमान धरूं नको ॥ ६२ ॥ राया येणें चि कर्में जाण ॥ तुटे कर्मांचें कर्मबंधन ॥ पाविजे पूर्ण समाधान ॥ तें हें मुख्य लक्षण नृपनाथा ॥ ६३ ॥ आगमोक्त निजभजन ॥ कर्मयोगाचें मुख्य लक्षण ॥ ऐकतां राजा समाधान ॥ परमानंदें पूर्ण निवाला[2] ॥ ६४ ॥ जंवजंव रायाचें पुरलें कोड ॥ तंवतंव कथा लागे गोड ॥ अतिशयें श्रवणाची चाड ॥ विशेषें वाड थोरावली ॥ ६५ ॥ राजा सुखावलेनि परमानंदें ॥ सुखावलेनि निजबोधें[3] ॥ लांचावलेनि स्वानंदें ॥ पुढां प्रश्न विनोदें पुसेल ॥ ६६ ॥ उगें राहतां आपण ॥ उठून जा ी मुनिगण ॥ यालागीं प्रश्नावरी प्रश्न ॥ विचित्र विंदान पुसत ॥ ६७ ॥ स्वानंदें वेधली चित्तवृत्ती ॥ इंद्रियें वेधलीं सुखस्थिती ॥ राज ला निश्चितीं ॥ तरी प्रश्नोक्ती पुसत ॥ ६८ ॥ पुसेल हरीचे अवतार ॥ ते कथा सुंदर मनोहर ॥ निरूपण अति अरुवार[4] ॥ निजा ववील ॥ ६९ ॥ त्या प्रश्नांचें प्रत्युत्तर ॥ कथाकौतुक सनागर ॥ एका जनार्दनाचे किंकर[5] ॥ उपानहधर[6] संताचे ॥ ७० ॥ संत सज्जन कृपास्थिती ॥ श्रीजनार्दन वरदमूर्त्ती ॥ पुढील कथेची उत्पत्ती ॥ सांगेन यथार्थी अर्थुनी ॥ ७१ ॥ श्रीभागवताचे राशीवरी ॥ एक जनार्दन केला मापारी[7] ॥ तो निजबोधाचे कुडवावारीं ॥ भरील वखारी श्रवणांच्या ॥ ८७२ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे निमिजायंतसंवादे मायाकर्मब्रह्मनिरूपणंनाम तृतीयाध्यायः संपूर्णः ॥ मूळश्लोक ॥ ५७ ॥ ॥ ओंव्या ॥ ८७२ ॥ ॥ एवंसंख्या ॥ ९२९ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

---

१ हृदयांत राहणारास. २ भरला. ३ आत्मज्ञानानें. ४ कोमल. ५ चाकर. ६ जोडे धरणारे. ७ मोजणारा.

# अध्याय ४ था.


वसुदेव.
नारद
जनकराजा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ओंनमो श्रीगुरु शिवशिवा ॥ नमनें जीवत्व जीवा ॥ नुरविसी तेथें देहभावा ॥ कैसेनि रिघावा[1] होईल ॥ १ ॥ जीवें घेऊनि जीवा ॥ देहत्व मोडूनि देहभावा ॥ याहीवरी करविसी सेवा ॥ हें लाघव देवा नवल तुझें ॥ २ ॥ जीव घेऊनि शंखासुरा ॥ त्याच्या वागविशी कलेवरा ॥ तो तूं रिघोनि मजभीतरा[2] ॥ माझिया शरीरा वागविशी ॥ ३ ॥ शंख मधुर ध्वनी गाजे ॥ तो वाजवी त्याचेनि वाजे ॥ तेवीं म्यां जेंजें बोलिजे ॥ तें बोलणें साजे तुझेनी ॥ ४ ॥ आतां माझें शरीर जें चळे ॥ तें तुझेनि आंगिके मेळे ॥ कर्में निपजती सकळें ॥ सत्ताबळें तुझेनि ॥ ५ ॥ माझे देहीचें जें मीपण ॥ तें तूंचि झालासि आपण ॥ तुझेनि प्राणें प्राण ॥ माझाही जाण चळे देवा ॥ ६ ॥ दृष्टीं जेंजें कांही देखें ॥ तेंतें तुझेनि ज्ञानउन्मेखें[3] ॥ श्रवणीं जेंजें कांहीं ऐकें ॥ तेंतें नेटकें अवधान तुझें ॥ ७ ॥ रसना जें जें कांहीं चाखे ॥ तें तें तुझेनि स्वादुमुखें ॥ बुद्धि जाणपणें तोखे[4] ॥ तेंही अतिनिकें वेदकत्व[5] तुझेनी ॥ ८ ॥ मन मनपणें अतिचपळ ॥ तेंही तुझेंचि आंगिक बळ ॥ विवेका विवेकु प्रबळ ॥ अतिसोज्वळ तुझेनी ॥ ९ ॥ वाचा जेंजें कांहीं वदे ॥ तें वाचिकत्व तुझेनि शब्दें ॥ बोध[6] जेणें उद्बोधे ॥ तो तुझेनि प्रबोधें प्रबोधू ॥ १० ॥ जागृती जागे तुझेनि हरिखें[7] ॥ स्वप्न स्वप्ना तुझेनि देखे ॥ सुषुप्ती सुखावे जेणें सुखें ॥ पूर्ण संतोखें तुझेनी ॥ ११ ॥ मी जेजे विषय भोगीं ॥ तें भोक्तेपण तुझे अंगीं ॥ तुझेनि निजसंयोगीं ॥ मीपणें जगीं वर्तविशी[8] मज ॥ १२ ॥ माझें करूनि खांबसूत्र ॥ तूं झालासि सूत्रधार ॥ हालवूनियां निजसूत्र ॥ कर्में विचित्र करविशी ॥ १३ ॥ ऐशिया श्रीजनार्दना ॥ जगचेतवित्या चिद्घना ॥ कृपाळुवा जगजीवना ॥ नमन श्रीचरणा तुझेनि तुज ॥ १४ ॥ यापरी मजमाजी तूं चाळिता ॥ चाळकत्वें करविसी ग्रंथा ॥ तेथें मी एक कवित्वकर्त्ता ॥ हे जाणावी तत्त्वतां स्थूळबुद्धी ॥ १५ ॥ एका एकु जनार्दनीं ॥ कीं जनार्दनु एकपणीं ॥ यथा पृथक नामाचीं लेणीं ॥ लेऊनि एकपणीं मिरवसी तूं ॥ १६ ॥ जेवीं कनकाचें[9] भूषण ॥ कीं भूषणीं कनक संपूर्ण ॥ तेवीं एका आणि जनार्दन ॥ एकत्वें जाण जनार्दनची ॥ १७ ॥ ऐशी ऐकोन विनवणी[10] ॥ सद्गुरु तुष्टला[11] संतोनी ॥ तेथें भिन्न भिन्न सोसणी[12] ॥ नलगे निरूपणीं करणीं तुज ॥ १८ ॥ जेव्हां कापूर अंगीं झगटे ॥ तेव्हांचि कापुरत्व खुंटे ॥ सच्छिष्यासि[13] सद्गुरु भेटे ॥ तेंव्हांचि फिटे भिन्नभेदू ॥ १९ ॥ जेणें फिटे भिन्नभेदू ॥ तो श्रीभागवतीं निजबोधू[14] ॥ वसुदेवाप्रती नारदू ॥ सांगत संवादू इतिहासाचा २० ॥ ज्या इतिहासाचा अर्थ ॥ प्रगटे परिसतां परमार्थ ॥ स्वानंदें बोध हृदयांत ॥ श्रवणें सदोदित श्रोते होती ॥ २१ ॥ तंव श्रोते

---

१ शिरणे. २ माझ्या आंत. ३ ज्ञानाच्या उदयानें. ४ संतोषते. ५ जाणतेपणा. ६ ज्ञान. ७ हर्षानें. ८ वागवितोस. ९ सोन्याचे. १० प्रार्थना. ११ प्रसन्न झाला. १२ ऐकविणें. १३ चांगल्या शिष्यास. १४ आत्मज्ञान.

संतसमुदावो ॥ ह्मणती कैसा नवलावो[1] ॥ सद्गुरुस्तवनीं ब्रह्मभावो ॥ साधिला आवो अभेदत्वें ॥ २२ ॥ हे सद्गुरूची विनवणी ॥ कीं ब्रह्मसुखाची खाणी ॥ परिसतां सप्रेमबोलणीं ॥ रिझली आइणी सज्जनांची ॥ २३ ॥ या देशभाषा वाणी ॥ उघडिली परमार्थाची खाणी ॥ बोल नव्हती हे स्पर्शमणी ॥ लागतां श्रवणीं पालटे जिवू ॥ २४ ॥ यापरी श्रीभागवतीं ॥ अनुपम अगाध स्थिती ॥ ते कथेची संगती ॥ लावी सुनिश्चिती अर्थावबोधें ॥ २५ ॥ ऐकोनि संताचें वचन ॥ शिरीं वंदोनि त्याचे चरण ॥ पुढील कथानिरूपण ॥ श्रोतीं सावधान परिसावें ॥ २६ ॥ येथें तृतीयअध्यायाचे अंतीं ॥ निरूपितां तांत्रिक भक्ती ॥ भजावें आवडेल तेमूर्ती ॥ रायासि तदर्थीं प्रश्न स्फुरला ॥ २७ ॥ देवो एकचि त्रिजगतीं ॥ त्याच्या किती अवतारमूर्ती ॥ जन्म कर्म अव्यय व्यक्ती ॥ हेंचि मुनीप्रति पूसत ॥ २८ ॥ श्लोक ॥ ॥ राजोवाच ॥ ॥ यानि यानीह कर्माणि यैर्यैः स्वच्छंदजन्मभिः ॥ चक्रे करोति कर्ता वा हरिस्तानि ब्रुवंतु नः ॥ १ ॥ ॥ टीका ॥ मुनीश्वराचें अगाध ज्ञान ॥ त्याहीवरी रसाळ निरूपण ॥ तेणें रायाचें वेधलें मन ॥ प्रश्नावरी प्रश्न यालागीं पुसे ॥ २९ ॥ तो ह्मणे देवाधिदेव हरी ॥ स्वलीला[4] कैसीं जन्में धरी ॥ स्वेच्छा[5] जीं जीं कर्में करी ॥ ते अगाध थोरी मज सांगा ॥ ३० ॥ ह्मणती देवा नाहीं जन्म ॥ तेथें कैंचें पुससी कर्म ॥ देव अरूप अनाम ॥ त्यासीं जन्मकर्म असेना ॥ ३१ ॥ तो अजन्मा[6] परी जन्म धरी ॥ अकर्मा[7] परी कर्में करी ॥ विदेही[8] तो देहधारी ॥ होऊनि संसारीं स्वधर्म पाळी ॥ ३२ ॥ त्याच्या अवतारांची स्थिती ॥ कवण जन्म कवण व्यक्ती ॥ किती अवतार किती मूर्ती ॥ कृपेनें मजप्रती सांगा स्वामी ॥ ३३ ॥ जेकां अतीत[9] अनागत[10] ॥ वर्तमान जे प्रस्तुत ॥ ते अवतार समस्त[11] ॥ इत्थंभूत सांगावे ॥ ३४ ॥ हरिचरित्र अवतारगुण ॥ प्रतिपादन करावयाचा प्रश्न ॥ तोसांगावया जयंतीनंदन ॥ स्वानंदें पूर्ण द्रुमिल सांगे ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ द्रुमिलउवाच ॥ योवा अनंतस्य गुणाननंताननुक्रमिष्यन् स तु बालबुद्धिः ॥ रजांसि भूमेर्गणयेत्कथंचित्कालेन नैवाखिलशक्तिधाम्नः ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ॥ ज्याची लीलाशक्ति अपरिमित[12] ॥ ऐशा अनंतशक्ती ज्याच्या नखांत ॥ यालागीं तो अनंत ह्मणत ॥ त्याचे गुण समस्त गणवती[13] कोणा ॥ ३६ ॥ त्या अनंताची गुणसमृद्धी[14] ॥ गणूं ह्मणे तो बालबुद्धी ॥ जेवींकां आकाशाची वृद्धी ॥ मुंगिये त्रिशुद्धी न करवे माप[15] ॥ ३७ ॥ सागरींचें जळ संपूर्ण ॥ केवीं गणूंशके लवण[16] ॥ तेवीं अनंताचे अनंत गुण ॥ आकळी कोण निजसत्ता[17] ॥ ३८ ॥ पर्जन्याचिया धारा ॥ गणितां येतील नृपवरा ॥ पृथ्वीचिया दूर्वांकुरा ॥ सुखें महावीरा गणितां

---

१ नवल. २ गुप्त. ३ लागले. ४ आपल्या लीलेनें. ५ आपल्या इच्छेनें. ६ जन्म रहित. ७ कर्मरहित. ८ देहरहित. ९ झालेले. १० होणारे. ११ सगळें. १२ समुद्रा प्रमाणे अपारावार. १३ मोजवती. १४ गुणाची वृद्धी. १५ मोजणे. १६ मीठ. १७ आपल्या पराक्रमानें.

येती ॥ ३९ ॥ वारा अफाट धांवे ॥ तोही गणितातें पावे ॥ निमेषोन्मेषांचे यावे ॥ त्यांसिही संभवे गणित राया ॥ ४० ॥ पृथ्वीचिया
परिमाणा ॥ काळें काळें होय गणना ॥ परी भगवंताचिया गुणा ॥ वेदांसही जाणा गणित नव्हे ॥ ४१ ॥ भगवंताचें नाम एक ॥
घेतां वेद झाले मूक[1] ॥ त्याचे गुण गणितां सकळिक ॥ शेषाचें मुख दुखंड[2] झालें ॥ ४२ ॥ त्या अनंताचे अनंत गुण ॥ तेथें गणूं शके
कवण ॥ कांहीं एक संक्षेपें जाण ॥ सांगेन लक्षण अवतारांचें ॥ ४३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भूतैर्यदा पंचभिरात्मसृष्टैः पुरं विराजं विर
चय्य तस्मिन् ॥ स्वांशेन विष्टः पुरुषाभिधानमवाप नारायण आदिदेवः ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ अवतारांमाजी प्रथमतां ॥ पुरुषावतारा
ची कथा ॥ द्रुमिल झाला सांगता ॥ ऐक तत्त्वतां महाराजा ॥ ४४ ॥ नारायणें आत्मशक्तीं ॥ पंचमहाभूतें भूताकृती ॥ सृजूनियां[3] यथा
निगुतीं ॥ ब्रह्मांडाची स्थिती निर्माण केली ॥ ४५ ॥ विराजपुरुष ब्रह्मांडा नाम ॥ तेथें लीलाप्रवेशे देवोत्तम ॥ यालागीं पुरुष हें नाम ॥
पुरुषोत्तम स्वांशें[4] पावे ॥ ४६ ॥ त्याचेनि अंशयोगें प्रकृती ॥ झाली प्रजातें प्रसवती ॥ यालागीं पुरुष नामस्थिती ॥ जाण निश्चितीं[5] पा
वला ॥ ४७ ॥ तो अकर्तात्मयोगयुक्तीं ॥ जग चेतवी[6] चिच्छक्ती ॥ ज्याचेनि जगा जगत्त्वें स्फूर्ती ॥ त्याची गुणकीर्ती दोश्लोकीं सांगों
॥ ४८ ॥ ॥ श्लोक ॥ यत्काय एष भुवनत्रयसन्निवेशो यस्येंद्रियैस्तनुभृतामुभयेंद्रियाणि ॥ ज्ञानं स्वतः श्वसनतो बलमोजईहासत्त्वा
दिभिः स्थितिलयोद्भवआदिकर्ता ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ त्रैलोक्य वसे जें कांही ॥ तेंचि शरीर त्याचें पाही ॥ ज्याचेनि योगें देही ॥ ठा
यींच्याठायीं वर्तती ॥ ४९ ॥ ब्रह्मादिक तनुधारी[7] ॥ त्यांच्या ज्ञानकर्मेंद्रियांची थोरी ॥ ज्याचेनि इंद्रियविकारीं ॥ निजव्यापारीं[8] वर्तती
॥ ५० ॥ जो जगाचे नयनांचा नयन[9] ॥ जो जगाच्या घ्राणाचें घ्राण[10] ॥ जो जगाच्या श्रवणांचें श्रवण[11] ॥ रसनेची जाण रसना[12] जोकां
॥ ५१ ॥ जो जगाच्या हाताचे हात ॥ ज्याचे पाय जगाच्या पायांत ॥ जो वाचेची वाचा निश्चित ॥ एवं उभयइंद्रियांआंत इंद्रियें ज्या
चीं ॥ ५२ ॥ जीवाचाठायीं जेकां ज्ञान ॥ तेंही त्याचेनि ज्ञानें जाण ॥ त्यासि ज्ञानदाता नाहीं आन[13] ॥ स्वयें ज्ञानघन स्वभावतांची
॥ ५३ ॥ ज्याचेनि प्राणें जाण ॥ जगाचा चळे प्राण ॥ बळ तेज क्रियाचरण ॥ जगासि संपूर्ण याचेनी ॥ ५४ ॥ रजतमसत्वादिगुण
युक्त ॥ उत्पत्तिस्थितिप्रळयांत ॥ मूळ आदिकर्त्ता भगवंत ॥ जाण तो निश्चित पुरुषावतार ॥ ५५ ॥ सत्वादि त्रिगुणावस्था ॥ उत्पत्तिस्थि
तिलयकर्ता ॥ तेही गुणावतारकथा ॥ ऐक नृपनाथा सांगेन ॥ ५६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ आदावभूच्छतधृतीरजसाऽस्य सर्गे विष्णुः स्थि:

---

१ मुके. २ दुभाग. ३ उत्पन्न करून. ४ आपल्या अंशानें. ५ निश्चयानें. ६ चेतनयुक्त करी. ७ देहधारण करणारे. ८ आपआपल्या कामांत. ९ डोळा. १० नाक. ११ कान.
१२ जीभ. १३ दूसरा.

तौ क्रतुपतिर्द्विजधर्मसेतुः ॥ रुद्रोऽप्ययाय तमसा पुरुषः स आद्य इत्युद्भवस्थितिलयाः सततं प्रजासु ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ तोचि आदिकल्पीं[1] उत्पत्ती ॥ रजोगुणें राजसा शक्ती ॥ स्वयें झाला शतधृती ॥ ब्रह्मा ह्मणती जयातें ॥ ५७ ॥ एवं ब्रह्मरूपें उत्पत्ती ॥ स्त्रजिताझाला निजशक्ती ॥ तेथें प्रतिपाळावया धर्मस्थिती ॥ सत्वगुणें निश्चितीं श्रीविष्णु जाहला ॥ ५८ ॥ तो द्विजधर्मप्रतिपालनु ॥ यज्ञभोक्ता श्रीविष्णु ॥ देखतां धर्माचा अवगुणु ॥ अवतरे नारायणु नानावतारीं ॥ ५९ ॥ तोचि ये सृष्टीचे प्रांतीं ॥ तमोगुणें तामसा शक्ती ॥ स्वयें जाहला रुद्रमूर्ती ॥ सकळ कल्पांतीं निर्दाळितू ॥ ६० ॥ जो शेताची पेरणी करी ॥ तोचि देखरेख करी ॥ तोचि पाळलियावरी[3] ॥ संवगणी[4] करी सर्वांची ॥ ६१ ॥ तेवीं उत्पत्तिकाळीं तोचि ब्रह्मा ॥ स्थितिकाळीं तोचि विष्णुनामा ॥ प्रळयकाळींही रुद्रप्रेमा ॥ ये पुरुषोत्तमा तेचिनामें ॥ ६२ ॥ यालागीं तो आदिकर्त्ता ॥ श्रुतिशास्त्रीं दृढवार्ता ॥ दक्षकश्यपादिकां कर्तव्यता ॥ त्यांसि समर्थता याचेनी ॥ ६३ ॥ यापरी विचारितां ॥ हाचि एक सकळकर्ता ॥ यावांचून कर्तव्यता ॥ अणुमात्रता नव्हे अन्यातें[5] ॥ ६४ ॥ जो सृष्टिपूर्वी स्वयंभ असे ॥ जेणें उत्पत्तिस्थिति प्रळय भासे[6] ॥ तोचि आदिकर्त्ता अनायासें ॥ तोचि निजांशें पुरुषावतारू ॥ ६५ ॥ ऐक राया अतिविचित्र ॥ जें परिसतां[7] पुण्य पवित्र ॥ तो नारायणाचा अवतार ॥ ज्याचें चरित्र अलोलिक ॥ ६६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ धर्मस्य दक्षदुहितर्यजनिष्ट मूर्त्यां नारायणो नरऋषिप्रवरः प्रशांतः ॥ नैष्कर्म्यलक्षणमुवाच चचार कर्म योऽद्यापि चास्तऋषिवर्यनिषेवितांघ्रिः ॥६॥ ॥ टीका ॥ ॥ जो अजन्मा[8] नित्य त्रिभुवनीं ॥ जो नजन्मोनि जन्मला योनीं ॥ तेणें धर्माची धर्मपत्नी ॥ केली जननी दक्षकन्यामूर्ती ॥ ६७ ॥ ते मूर्तीमातेच्या उदरीं ॥ नरनारायण अवतारी ॥ एकचि दोंरूपेंकरीं ॥ धर्माच्या घरीं अवतरले ॥ ६८ ॥ तेणें नारदादिकांसि जाण ॥ निरूपलें[9] नैष्कर्म्यलक्षण[10] ॥ स्वयें आचरला आपण ॥ तें कथन ऐक राया ॥ ६९ ॥ नारायण ह्मणसी कोणे देशीं ॥ तो बदरिकाश्रमीं आश्रमवासी ॥ नारद सनकादिक ऋषी ॥ अद्यापि त्यापासीं सेवे[11] असती ॥ ७० ॥ त्यासि स्वरूपाचें लक्ष ॥ सहजीं असे प्रत्यक्ष ॥ तेस्वरूपनिष्ठेचा पक्ष ॥ अलक्ष्याचें लक्ष प्रबोधी[12] स्वयें ॥ ७१ ॥ तया स्वरूपाचा निजबोध ॥ स्वयें पावावया विशद ॥ अद्यापवरी ऋषिवृंद[13] ॥ नित्य संवाद करिताति त्यासी ॥ ७२ ॥ जें स्वरूप लक्षेना जनीं ॥ तें विशद[14] करूनि दे वचनीं ॥ तेंचि अनुग्रहें करूनीं ॥ अनुभवा आणी तत्काळ ॥ ७३ ॥ ज्ञाते बहुसाल ऋषीश्वर ॥ त्यामाजि नारायण अवतार ॥ तेथें वर्तलें जें चरित्र ॥ अति विचित्र ऐक राया ॥ ७४ ॥

---

१ पहिल्या कल्पांत. २ शेवटी. ३ पाळि घाल्यावर. ४ कापणी. ५ दुसऱ्यास. ६ भासतो. ७ ऐकता. ८ जन्म रहित. ९ सांगितले. १० अकर्माचे लक्षण. ११ सेवेस. १२ उपदेशी. १३ ऋषीचा मेळा. १४ स्पष्ट.

॥ श्लोक ॥ ॥ इंद्रो विशंक्य मम धाम जिघृक्षतीति कामं न्ययुंक्त सगणं स बदर्युपाख्यम् ॥ गत्वाऽप्सरोगणवसंतसुमंदवातैः स्त्रीप्रेक्षणेषुभिरविध्यदतन्महिज्ञः ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐसा नारायणाचा प्रताप ॥ देखोनि निश्चा दृढ तप ॥ तेणें इंद्रासि आला कंप ॥ ह्मणे स्वर्ग निष्पाप घेईल[1] माझा ॥ ७५ ॥ त्याचें तप देखोनि परम ॥ ह्मणे गेलेंगेलें स्वर्गधाम ॥ इंद्रें कोपें प्रेरिला[2] काम ॥ अप्सरासंभ्रम समवेत ॥ ७६ ॥ कामसमवेत अप्सरा ॥ सवें वसंतही दूसरा ॥ क्रोध अवघियां[3] पुढारा ॥ जो तापसांतें पुरा[4] नागवी सदा ॥ ७७ ॥ तीर्थोंतीर्थींच्या अनुष्ठाना ॥ क्षमा[5] नुपजे अंतःकरणा ॥ कोप येतांच जाणा ॥ करी उगाणा[6] तपाचा ॥ ७८ ॥ क्रोध तापसांचा उघड वैरी[7] ॥ तापसां नागवी नानापरी ॥ तोही नारायणावरी ॥ अवघ्यां अग्रीं[8] चालिला ॥ ७९ ॥ ऐशीं मिळोनि बिरुदायितें ॥ आलीं बदरिकाश्रमा समस्तें ॥ नारायण तप करी जेथें ॥ उठावलीं तेथें अनुक्रमेंसी ॥ ८० ॥ वसंतें श्रृंगारिलें[9] वन ॥ कोकिळा कलारावें गायन ॥ सुगंध शीतळ झळके पवन ॥ पराग संपूर्ण वर्षती सुमनें[10] ॥ ८१ ॥ तेथें भ्रमरांचे झणत्कार ॥ कामिनी गायन कामाकार ॥ हावभाव कटाक्षविकार ॥ कामसंचार चेतविती ॥ ८२ ॥ नव्हेचि कामिनीकामबाधा ॥ पराक्रम नचलेचि क्रोधा ॥ तोही सांडोनियां विरुदा ॥ परतला नुसता म्लानवदनें ॥ ८३ ॥ मग मदनें[11] मांडूनियां ठाण ॥ विंधी कामिनीकटाक्षबाण ॥ तेणें घायें[12] नारायण ॥ अणुप्रमाण नढळेची ॥ ८४ ॥ शस्त्रें तोडितां आकाशासी ॥ आकाश स्वयें सावकाशीं ॥ तेवीं कामें छळितां नारायणासी ॥ तो निज[13] संतोषी निर्द्वंद्व ॥ ८५ ॥ अंगीं निजतेजसत्ता ॥ अग्नितेज प्राशूं[14] जातां ॥ तोंड जळे चवी चाखितां ॥ तेवीं कामिनीकामना नारायणदृष्टी ॥ ८६ ॥ नेणतां नारायणमहिमें ॥ धांवोनि घाला घातला कामें ॥ तेव्हां अवघींच पराक्रमें ॥ स्वनिंद्यकर्मे लाजलीं ॥ ८७ ॥ तेथें अवघीं झालीं पराङ्मुखें ॥ पाठमोरीं निघालीं अधोमुखें ॥ तेव्हां त्याची गती निःशेखे ॥ नारायण देखे खुंटली ॥ ८८ ॥ इंद्रियनियंता[15] नारायण ॥ नेणोनि छळूंगेलीं आपण ॥ यापुढती पुनरागमन ॥ सर्वथा जाण करवेना ॥ ८९ ॥ मागें ननिघवे निश्चितें ॥ ऐसें जाणोनि समस्तें ॥ थोर गजबजिलीं तेथें ॥ भयचकितें व्याकुळ ॥ ९० ॥ जाणोनि नारायणप्रताप ॥ आतां कोपून देईल शाप ॥ येणें धाकें म्लानरूप ॥ अतिसकंप भयभीतें ॥ ९१ ॥ ऐशी देखोनि त्यांची स्थिती ॥ कृपेनें तुष्टला[16] कृपामूर्ती ॥ अणुमात्र कोप नये[17] चित्तीं ॥ अभिनव शांती नारायणाची ॥ ९२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विज्ञाय शक्रकृतमक्रममादिदेवः प्राह प्रहस्य गतविस्मय एजमानान् ॥ माभैष्ट भो

---

१ पराक्रम. २ धाडिला. ३ सर्वांच्या. ४ पहिल्यानें. ५ सहन शक्ति. ६ नाश. ७ शत्रु. ८ पुढें. ९ सुशोभित केलें. १० फुले. ११ कामानें. १२ घावानें. १३ आपल्या संतोषानें. १४ गिळूं. १५ इंद्रिय स्वाधीन ठेविणारा. १६ प्रसन्न झाला. १७ येत नाही.

मदन मारुत देववध्वो गृह्णीत नो बलिमशून्यमिमं कुरुध्वम् ॥ ८ ॥

॥ टीका ॥ ॥ इंद्रें केला अपराध ॥ तरी नारायणासि नयेचि क्रोध ॥ बाप निजशांती अगाध ॥ नमानी विरुद्ध कामादिकांचें ॥ ९३ ॥ नयेचि कामादिकांवरी कोप ॥ इंद्रासही नेंदीच[1] शाप ॥ नारायणाच्या ठायीं अल्प ॥ कदा विकल्प नुपजेची ॥ ९४ ॥ अपकाऱ्यावरी जो कोपला ॥ तो तत्काळ कोपें नागविला ॥ अपकाऱ्या जेणें उपकार केला ॥ तोचि लांधला[2] परमार्थीं ॥ ९५ ॥ अपकाऱ्या उपकार करिती ॥ त्याचिनाव गा परम शांती ॥ ते शांतीची निजस्थिति ॥ दावी लोकांप्रती आँचरोनीं[3] ॥ ९६ ॥ परमार्थाची मुख्यत्वें स्थिती ॥ पाहिजे गा परमशांती ॥ ते शांतीची उत्कटगती ॥ दावी लोकांप्रती आचरोनीं ॥ ९७ ॥ भयभीत कामादिक ॥ अप्सरागण साशंक ॥ त्यांतें अभयदानें सुख ॥ देऊनियां देख नारायण बोले ॥ ९८ ॥ अहो कामवसंतादिकस्वामी ॥ कृपाकरून आलेत तुह्मी ॥ तुमचेनि पदाऽगर्मीं ॥ आश्रमभूमी पुँनीत[4] झाली ॥ ९९ ॥ तुमचें झालिया आँ[5]गमन ॥ अवश्य करावें आह्मी पूजन ॥ हेंचि आमुचें अनुष्ठान ॥ काहीं बळिदान अंगीकारा माझें ॥ १०० ॥ अहो अप्सरा देवकांता ॥ तुह्मी भिऊं नका सर्वथा ॥ येथें आलिया समस्ता ॥ पूज्य सर्वथा तुह्मी मज ॥ १ ॥ आश्रमा आलिया अतिथी ॥ जे कोणी पूजा न करिती ॥ त्यांची शून्य पुण्यसंपत्ती ॥ आश्रम स्थिती शून्य होय ॥ २ ॥ तुह्मीं नांँगीकारितां[6] पूजन ॥ कांहीं न घेतां बळिदान ॥ गेल्या आश्रम हा होईल शून्य ॥ यालागीं कृपा करून पूजा ध्यावी ॥ ३ ॥ आश्रमा आलिया अतिथी ॥ तो पूज्य सर्वांस सर्वार्थीं ॥ अतिथी आश्रमीं जे पूजिती ॥ ते आश्रमकीर्ती शिव वाँनी[7] ॥ ४ ॥ व्याही रुसलिया पायां पडती ॥ तेवीं विमुख जातां अतिथी ॥ जे वंदोनियां सुखी करिती ॥ ते सुख पावती स्वानंदें ॥ ५ ॥ व्याही रुसलिया कन्या न धाडी ॥ अतिथी रुसलिया पुण्य जोडी ॥ पूर्वापर जेंकां जोडी ॥ तेही रोकडी क्षय[8] पावे ॥ ६ ॥ वैकुंठीं ज्याची निजस्थिती ॥ तो त्या आश्रमा ये नित्यवस्ती ॥ जे आश्रमीं अतिथी ॥ पूजिती प्रीतीं ब्रह्मात्मभावें ॥ ७ ॥ ऐसें बोलिला तया प्रती ॥ परी माझी हे अगाध शांती ॥ हेही नारायणाचे चित्तीं ॥ गर्वस्थिती असेना ॥ ८ ॥ ऐक राया अतिअपूर्व ॥ असोनि निजशांती अनुभव ॥ ज्याच्याठायीं नाहीं गर्व ॥ तोचि देवाधिदेव निश्चयेंसी ॥ ९ ॥ जो नित्य नाचवी सुँरनरांसी[9] ॥ ज्याभेणें तप सांडिलें तांँपसीं[10] ॥ त्या अभय देवोनि कामक्रोधांसी ॥ आपणापासी राहविलीं ॥ ११० ॥

श्लोक ॥ ॥ इत्थं ब्रुवत्यभयदे नरदेवदेवाः सव्रीडनम्रशिरसः सघृणं तमूचुः ॥ नैतद्विभो त्वयि परेऽविकृते विचित्रं स्वारामधीरनिकरानतपादपद्मे ॥ ९ ॥

॥ टीका ॥ ॥ एवं अँभय[11] देत नारायण ॥ स्वमुखें बोलिला आपण ॥ तेणें कामादि अप्सरागण ॥ लाजा विरोन अ

---

[1] देत नाही. [2] मिळाला. [3] करून. [4] पवित्र. [5] यणे. [6] नघेता. [7] वर्णी. [8] नाश. [9] देव व मनुष्यास. [10] ऋषींनीं. [11] मोक्ष.

धोमुख झालीं ॥ ११ ॥ देखीनि निर्विकार पूर्णक्षमा ॥ श्रीनारायण हा परमात्मा ॥ कळोंसरलें वसंतादिकामां ॥ त्याचाचि महिमा वर्णिती स्वयें[१] ॥ १२ ॥ ऐके नरदेवचक्रवर्ती ॥ विदेहा सार्वभौमा भूपती ॥ त्या नारायणाची निजस्तुती ॥ कामादि करिती सद्भावेंसी ॥ १३ ॥ जे सदा सर्वांतें छळिती ॥ त्यांहीं देखिली पूर्ण शांती ॥ तेचि शांतीची स्तुति करिती ॥ नारायणाप्रती कामादिक्रोध ॥ १४ ॥ जेणें संतोषे श्रीनारायण ॥ त्यासि कृपा उपजे[२] पूर्ण ॥ ऐशियापरीचें स्तवन ॥ मांडिलें संपूर्ण परमार्थबुद्धी ॥ १५ ॥ जयजय देवाधिदेवा ॥ तुझिया अविकारभावा ॥ पाहतां नदेखों जी सर्वा ॥ देवांमानवां माझारी ॥ १६ ॥ मज कामाचेनि घायें ॥ ब्रह्मा कन्येसि धरूंजाये ॥ पराशरा केलें काये ॥ भोगिली पाहे दिवा दुर्गंधा ॥ १७ ॥ ज्यातें योगी वंदिती ॥ जो तापसांमाजी धूर्जटी[३] ॥ तो शिव लागे मोहिनीपाठी ॥ फिटोनि लंगोटी वीर्य[४] द्रवलें ॥ १८ ॥ विष्णु वृंदेच्या श्मशानीं ॥ धरणें बैसे विषयग्लानी ॥ अहल्येची काहणी[५] ॥ वेदीं पुराणीं वर्णिजे ॥ १९ ॥ नारद नायके माझी गोष्टी ॥ त्यासि जन्मले पुत्र साठी ॥ माझी साहों शके काठी ॥ ऐसा बळिया स्टष्टीं असेना ॥ १२० ॥ जो ब्रह्मचाऱ्यांमाजी राजा ॥ हनुमंत मिरवी पैजा[६] ॥ तयास्तव मकरध्वजा[७] ॥ संगेविण वोजा जन्मविला म्यां ॥ २१ ॥ कलंकिया[८] केला चंद्र ॥ भगांकित[९] केला इंद्र ॥ कपाटीं घातला षण्मुखवीर[१०] ॥ जो लाडका कुमर महेशाचा ॥ २२ ॥ मज मन्मथाचा यांवा[११] ॥ न साहवे देवांदानवां ॥ मग तेथें इतरा मानवां ॥ कोण केवा[१२] साहावयासी ॥ २३ ॥ मज जाळिलें महेशें ॥ त्यासि म्यां अनंगें केलें पिसें ॥ नवल धारिष्ट तुझ्या ऐसें ॥ पाहतां नदिसे तिहीं लोकीं ॥ २४ ॥ त्या मजकामानें सरतें केलें ॥ शांतीचें कल्याण पाहिलें ॥ हें तुवांचि एकें यश नेलें ॥ स्वभाव जिंकिले निजशांतियोगें ॥ २५ ॥ तो मी नसरता केला काम ॥ क्रोधा आणिला उपशम[१३] ॥ वासनेचा संभ्रम ॥ नित्यनिर्भ्रम त्वां केला ॥ २६ ॥ हे नारायणा तुझी निष्ठा ॥ नये आणिका तपोनिष्ठा ॥ केला अनुभवाचा चोहटा ॥ शांतीचा मोठा सुकाळ केला ॥ २७ ॥ मागें तपस्वी वाखाणिले[१४] ॥ ह्मणती कामक्रोधां जिंकिलें ॥ त्यांसिही आह्मीं पूर्ण छळिलें ॥ एक तें भलें सांगेन ॥ २८ ॥ कपिलाऐसा तेजोराशी[१५] ॥ क्रोधें तत्काळ छळिलें त्यासी ॥ शाप देतांचि सगराशी ॥ तोही क्रोधासी वश्य[१६] झाला ॥ २९ ॥ कोप आला नारदासी ॥ वृक्ष[१७] केलें नलकूबरांसी ॥ गौतमें अहल्येसी ॥ कोपें वनवासी[१८] शिळा केली ॥ १३० ॥ जो सर्वदा विघ्नांतें आकळी ॥ त्याविघ्नेशातें कोण छळी ॥ तेणें अतिकोपें कोपानळीं ॥ चंद्रासि तत्काळीं दीधला[१९] शाप ॥ ३१ ॥ कोप आला दुर्वासासी ॥

---

१ स्वतः. २ उत्पन्न होते. ३ शंकर. ४ धातु. ५ गोष्ठ. ६ पैन. ७ काम. ८ काळा. ९ भोके पाडिलेला. १० कार्तिकस्वामो. ११ येणे. १२ कथा. १३ शांति. १४ वर्णिले. १५ तेजस्वी. १६ स्वाधीन. १७ झाड. १८ अरण्यांत रहाणारी. १९ दिला.

शाप दीधला अंबरीषासी ॥ देव आणिला गर्भवासासी ॥ क्रोधें महाऋषी छळिले ऐसे ॥ ३२ ॥ जे दुजी सृष्टी करूंशकती ॥ तेही कामक्रोधें झडपिजेती ॥ सागरीं पडे इंद्रसंपत्ती ॥ हे क्रोधाची ख्याती पुराणप्रसिद्ध ॥ ३३ ॥ इतरांची गोष्टी कायसी ॥ क्रोधें छळिलें ईश्वरासी ॥ तेणें दीक्षिता द्विजदक्षासी ॥ शिरच्छेदासी करविता झाला ॥ ३४ ॥ जेथें मी का स्वयें वसें ॥ तेथें क्रोध वसे सावकाशें ॥ काम क्रोध असतचि नसे ॥ नारायणा ऐसें तुवां केलें ॥ ३५ ॥ हें परमाद्भुत तुझें वीर्य ॥ आणिका एवढें नाहीं धैर्य ॥ यालागीं तुझें परिचर्य ॥ सदा मुनिवर्य सेविती चरण ॥ ३६ ॥ शांतीच्या चाडें देवाधिदेवा ॥ जे नित्य करिती तुझी सेवा ॥ ते कामक्रोधादिस्वभावा ॥ स्मरतां तव[1] नांवा जिंकिती सुखें ॥ ३७ ॥ जेथें सन्मानें काम पुरत ॥ तेथें आदरें अनुग्रहो करित ॥ काम सन्मानें जेथें अतृप्त[2] ॥ तेथें शाप देत अतिक्रोधें ॥ ३८ ॥ यालागीं शापानुग्रहसमर्थ ॥ ते सर्वदा कामक्रोधयुक्त ॥ परी नवल तुझें सत्वोचित ॥ केले अंकित[3] कामक्रोध ॥ ३९ ॥ मज गर्व नाहीं सर्वथा ॥ हेही तुज नाहीं अहंता ॥ छळवाद्यां द्यावी लघुता ॥ अथवा उपेक्षता न करिसी ॥ १४० ॥ पृथ्वी दुःखी करिती नांगरीं ॥ ते पिकोनि त्यांतें सुखी करी ॥ तेवीं अपकाऱ्या जो उपकार करी ॥ तो मोक्षाच्या शिरीं मुगुट ॥ ४१ ॥ तुजमाजी निर्विकार शांती ॥ हें नवल नव्हे कृपामूर्ती ॥ तुझ्या स्वरूपाची स्थिती ॥ आजि निश्चितीं कळली आह्मा ॥ ४२ ॥ तूं निर्गुण निरुपम ॥ मायातीत पूर्ण ब्रह्म ॥ तुझें स्वभावें स्मरतां नाम ॥ सकामाही[4] काम स्पर्शों नशके ॥ ४३ ॥ जो नित्य स्मरे तुझें नाम ॥ त्यासि मी कामचि करीं निष्काम ॥ क्रोधचि करी क्रोधा शम ॥ मोह तो परम प्रबोध[5] होय ॥ ४४ ॥ जे धीर वीर निजशांती ॥ त्यांसि परमानंदें नित्य तृप्ती ॥ ऐशियांचिया अमितपंक्ती ॥ पांया लागती तुझिया ॥ ४५ ॥ तुज करावया नमस्कार ॥ पुढें सरसे महासिद्धीचा संभार ॥ त्यांसही नलभे आवर ॥ तूं परात्पर परमात्मा ॥ ४६ ॥ तुझिया सेवकांकडे ॥ विघ्न रिघतां होय बापुडें ॥ तें रिघावया तुजपुढें ॥ कोण्या परिपाडें रिघेल ॥ ४७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ त्वां सेवतां सुरकृता बहवोऽतरायाः स्वौको विलंघ्य परमं व्रजतां पदं ते ॥ नान्यस्य बर्हिषि बलीन् ददतः स्वभागान् धत्ते पदं त्वमविता यदि विघ्नमूर्ध्नि ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ तापसां बहु विघ्न अपावो[6] ॥ आह्मी करावा अंतरावो[7] ॥ हा आमुचा निजस्वभावो ॥ नव्हे नवलावो नारायणा ॥ ४८ ॥ हृदयींचा मुक्त करोनि काम ॥ बाह्य जप तप भक्तिसंभ्रम ॥ ऐसे जे कां शठ परम ॥ विघ्नाचा आक्रम त्यांवरी चाले ॥ ४९ ॥ ते आमची विघ्नस्थिती ॥ नचले

---

[1] तुझ्या. [2] तृप्त नहोणारा. [3] स्वाधीन. [4] कामी पुरुषासही. [5] ज्ञान. [6] अपाय. [7] विघ्न.

तुझिया भक्तांप्रती ॥ तूं रक्षिता भूतपती ॥ तेथें विघ्नांची गति ॥ पराङ्मुख ॥ १५० ॥ माझिया निजभक्तासी ॥ विघ्नें कैंची ह्मणसी यासी ॥ ऐक त्याही अभिप्रायासी ॥ सांगेन तुजपासी देवाधिदेवा ॥ ५१ ॥ पावावया निजपदातें[1] ॥ लाता हाणून स्वर्गभागातें ॥ जे नित्य निष्काम भजती तूतें ॥ नानाविघ्ने त्यांतें सुरवर चिंती ॥ ५२ ॥ उल्लंघूनियां आमुतें ॥ हे पावती अच्युतपदातें ॥ यालागीं सुरवर[2] त्यांतें ॥ अतिविघ्नांतें प्रेरिती ॥ ५३ ॥ बळी नेदूनि आह्मासी ॥ हे जाऊं पाहती पूर्णपदासी ॥ येणें क्षोभें इंद्रादिक त्यांपासी ॥ नानाविघ्नांसी मोकलिती ॥ ५४ ॥ यालागीं त्यांच्या भजनापासी ॥ विघ्नें छळूं धांवती अपैसीं ॥ विघ्नीं अभिनव नव्हे त्यासी ॥ तूं हृषीकेशी रक्षिता ॥ ५५ ॥ सांडूनि सकाम कल्पना ॥ जे रतले तुझ्या चरणा ॥ त्यांस आठही प्रहर जाणा ॥ तूं नारायणा रक्षिसी ॥ ५६ ॥ भक्त विघ्नीं होती कासाविसी ॥ धांवधांव ह्मणती हृषीकेशी ॥ तेव्हां तूं धांवण्या धांवसी ॥ निष्ठुर नव्हसी नारायणा ॥ ५७ ॥ विघ्न नयेतां भक्तांपासी ॥ आधींच भक्त संरक्षणासी ॥ तूं भक्ताचे चौंपासी ॥ अहर्निशी संरक्षिता ॥ ५८ ॥ विघ्न छळूंधांवे सकोप ॥ तंव विघ्नीं प्रगटे तुझें स्वरूप ॥ यालागीं भक्तांसि अल्प ॥ विघ्नप्रताप[3] बाधूं नशके ॥ ५९ ॥ कामें छळावें हरिभक्तांसी ॥ तंव हरी कामाचा हृदयवासी ॥ तेव्हां विघ्नचि निर्विघ्न त्यासी ॥ भय भक्तांसी स्वप्नीं नाहीं ॥ १६० ॥ विघ्न उपजवी विरोध ॥ तंव विरोधा सबाह्य गोविंद ॥ मग विरोध तोचि महाबोध ॥ स्वानंदकंद निजभक्तां[4] ॥ ६१ ॥ ज्यासि तुझ्या चरणीं भावार्थ ॥ त्यासि विघ्नीं प्रगटे परमार्थ ॥ ऐसा भावबळें तूं समर्थ ॥ साह्य सतत निजभक्तां ॥ ६२ ॥ यापरी समर्थ तूं संरक्षिता ॥ तें जाणोनि विघ्नांसमस्तां ॥ पाय देऊनि इंद्रपदमाथां[5] ॥ पावती परमार्था तुझिया रूपें ॥ ६३ ॥ देव संरक्षिता ज्यासी ॥ विघ्नें छळूं धांवती त्यासी ॥ मा सकामाची गती कायसी ॥ विदेहा ह्मणसी तें ऐक ॥ ६४ ॥ विषयकाम धरोनि मनीं ॥ इंद्रादिदेवां बळिपूजनीं ॥ जे भजले यागयजनीं ॥ देव त्यालागोनी करिती विघ्न ॥ ६५ ॥ इंद्र याज्ञिकांचा राजा ॥ सकाम याज्ञिक त्याच्या प्रजा ॥ यज्ञभाग अर्पिती वोजा[6] ॥ पावल्या बळिपूजा नकरिती विघ्न ॥ ६६ ॥ ह्मणसी कामादिक विटंबिती ॥ ते निष्काम कदा नातळती ॥ सहज कामा वश्य असती ॥ सदा कर्में करिती सकाम ॥ ६७ ॥ जे मजकामासी वश होती ॥ ते तप वेंचोनि[7] भोगभोगिती ॥ जे आतुडले क्रोधाच्या हातीं ॥ ते वृथा नागवती तपासी ॥ ६८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ क्षुत्तृट्त्रिकालगुणमारुतजैह्व्यशैश्न्यानस्मानपारजलधीनतितीर्य केचित् ॥ क्रोधस्य यांति विफलस्य वशं पदे गोर्मज्जंतिदुश्चरतपश्च वृथोत्सृजंति ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्राणायामें प्राणापानीं ॥ निजप्राणातें आकळोनी ॥ वात[8] वर्ष[9] शीत ऊष्ण साहोनी ॥ जे अनुष्ठानीं गुंतले

---

[1] आपल्या पदास. [2] देवश्रेष्ठ. [3] विघ्नाचा पराक्रम. [4] आपल्या भक्तांस. [5] इंद्रपदाच्या डोकीवर. [6] आदरानें. [7] खर्चून. [8] वायु. [9] पाऊस.

॥ ६९ ॥ क्षुधे तृषेतें नेमूनी ॥ जिव्हा शिश्न आकळोनी ॥ मज कामातें जिंकिलें मानूनी ॥ निष्कामाभिमानी उन्मत्त ॥ १७० ॥ जे अल्प अभिमानाहातीं ॥ जे क्रोधासि वश होती ॥ ते शाप देऊनि तपसंपत्ती ॥ व्यर्थ नागविती निजनिष्ठा ॥ ७१ ॥ सकामाच्या अनुष्ठाना ॥ मज कामसंगें स्रक्चंदना ॥ भोग भोगिती स्वर्गांगना ॥ अमृतपाना प्राशिती[1] ॥ ७२ ॥ त्या मज कामातें उपेक्षिती ॥ आणि जे कामासि वश होती ॥ ते निजतपा[2] नागविती ॥ शापोपदीप्ती अनुवादें ॥ ७३ ॥ जे अपार सागर तरती ॥ ते गोष्पदोदकीं बुडती ॥ तेवीं मज कामातें जिणोनि जाती ॥ तेही नागवती निजक्रोधें ॥ ७४ ॥ मज कामाची अपूर्ण कामवृत्ती ॥ तेचि क्रोधाची दृढ स्थिती ॥ काम क्रोध अभक्तां बाधिती ॥ हरिभक्तांप्रती तें नचले ॥ ७५ ॥ तुझ्या भक्तांप्रती जाण ॥ नचले कामक्रोधादिबंधन ॥ तो तूं भक्तपती[3] नारायण ॥ तुज आमुचें कामपण केवीं बाधी ॥ ७६ ॥ नेणतां तुझा महिमा ॥ आह्मी करूं आलों निजधर्मा ॥ तुजपासी नित्य निजक्षेमा ॥ पुरुषोत्तमा कृपाळुवा ॥ ७७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ इति प्रगृणतां तेषां स्त्रियोऽत्यद्भुतदर्शनाः ॥ दर्शयामास शुश्रूषां स्वर्चिताःकुर्वतीर्विभुः ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ अपकाऱ्या उपकार करिती ॥ यानाव निर्विकार निजशांती[4] ॥ तेचि शांतीची परिपाकास्थिती ॥ विप्रकर्त्याप्रती हरि दावी ॥ ७८ ॥ सांगोनियां आपुली स्थिती ॥ कामादिक स्तुति करिती ॥ तंव परमाश्चर्य देखती ॥ स्त्रिया अत्यद्भुतीं अकस्मात ॥ ७९ ॥ रूपवैभव अळंकार ॥ श्रियेहूनियां सुंदर ॥ सेवेलागीं अतितत्पर ॥ सदा सादर सावधानें ॥ १८० ॥ नवल लाघव नारायणा ॥ कैसें या दाखविलें विंदाना ॥ त्या स्त्रिया सकळ त्वर्गांगना ॥ दिवा खद्योत[6] जाणा तैशा दिसती ॥ ८१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ते देवानुचरा दृष्ट्वा स्त्रियः श्रीरिव रूपिणी ॥ गंधेन मुमुहुस्तासां रूपौदार्यहतश्रियः ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ ॥ या स्त्रिया देखोनि दृष्टीं ॥ काम मूर्छित पडिला सृष्टीं ॥ वसंत घटघटां लाळ घोंटी ॥ ती क्रोधाची दृष्टी तटस्थ ठेली ॥ ८२ ॥ भ्रमर विसरले झणत्कार ॥ कोकिळा विसरल्या पंचमस्वर ॥ प्राण विसरला संचार ॥ देवानुचर[7] भुलले ॥ ८३ ॥ देखोनि त्यांचिया स्वरूपासी ॥ अप्सरा दिसती जैशा दासी ॥ अत्यंत लज्जा झाली त्यांसी ॥ काळिमेसी उतरल्या ॥ ८४ ॥ त्यांचे अंगींचा सुगंध वात ॥ तेणें भुलला वसंत ॥ मलयानिल झाला भ्रांत ॥ त्याचा अंगवात[8] लागतां ॥ ८५ ॥ नारायणाची विद्या कैसी ॥ जे भुलवूं आले आपणासी ॥ भुली पाडिली तयांसी ॥ योगमायेसी दावूनी ॥ ८६ ॥ सुंदरत्वें रंभा तिलोत्तमा ॥ जिया मंदरमथनीं जिंतलीं रमा ॥ रमेहूनियां उपमा ॥ उत्तमोत्तमा अतिरूपें ॥ ८७ ॥ श्लोक ॥ ॥ तानाह देवदेवेशः प्रणतान्प्रहसन्निव ॥ आसामेकतमां वृङ्ध्वं सवर्णां स्वर्गभूषणाम् ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ तें अतिआश्चर्य देखो

---

१ पिताव. २ आपल्या तपास. ३ भक्तरक्षक. ४ आत्मशांति. ५ निदानास. ६ काजवा. ७ देवांचे चाकर. ८ अंगाचा वारा.

न॥ झाले कामादिक मूर्छायमान ॥ तयांप्रति नारायण ॥ काय हांसोन बोलिला ॥ ८८ ॥ आह्मी अवश्य पूजावें तुह्मासी ॥ कांहीं अर्पावें[1] बलिदानासी ॥ संतोषावया इंद्रासी ॥ यांतील एकादी दासी अंगीकारा[2] तुह्मी ॥ ८९ ॥ यांचें सौंदर्य अतिथोर ॥ ह्मणाल होईल अपमानकर ॥ तुह्मासमान जे सुंदर ॥ तिचा अंगीकार करावा तुह्मी ॥ १९० ॥ ह्मणाल यांत नाहीं हीन ॥ अवघ्या सौंदर्यें संपूर्ण ॥ कोणी नदिसे आह्मासमान ॥ केवीं आपण अंगीकारावी ॥ ९१ ॥ जरी नाहीं तुह्मांसमान ॥ सकळसौंदर्यें अतिसंपन्न ॥ तरी एकीचें करावें अंगीकरण ॥ होईल भूषण स्वर्गासी ॥ ९२ ॥ ऐसें नारायणाचें वचन ॥ ऐकोनि हरिखलीं[3] संपूर्ण ॥ करूनियां साष्टांग नमन ॥ मस्तकीं वचन वंदिलें ॥ ९३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ओमित्यादेशमादाय नत्वा तं सुरबंदिनः ॥ उर्वशीमप्सरःश्रेष्ठां पुरस्कृत्य दिवं ययुः ॥ १५ ॥ इंद्रायानम्य सदसि शृण्वतां त्रिदिवौकसाम् ॥ ऊचुर्नारायणबलं शक्रस्तत्रास विस्मितः ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐकोनि नारायणवचन ॥ मस्तकांबुजीं करूनियां नमन[4] ॥ उर्वशी पुढारून ॥ कामादिगण निघती वेगीं ॥ ९४ ॥ नारायणाचे ऊरुस्पर्शीं ॥ उभी होती नारायणापाशी ॥ तेंचि नाव झालें तिसी ॥ ह्मणती उर्वशी स्वर्गांगना ॥ ९५ ॥ ते देवाचे देवदूत ॥ स्वर्ग पावले समस्त ॥ मग शक्राचे[5] सभें आंत ॥ सांगती अद्भुत नारायणशक्ती ॥ ९६ ॥ तिहीं नारायणाचें चरित्र ॥ सांगीतलें अतिविचित्र ॥ तेणें अवघेचि सुरवर ॥ झाले थोर विस्मितपैं ॥ ९७ ॥ इंद्रें देखोनि उर्वशी ॥ तिसी भुलला अहर्निशीं ॥ बाहेर यावें सभेसी ॥ हें वर्षानुवर्षीं नावाटे ॥ ९८ ॥ हे प्रथमावतार वार्ता ॥ जे कां नारायणाची कथा ॥ पुढील अवतार आतां ॥ नृपनाथा अवधारीं ॥ ९९ ॥ ऐक राया अतिअपूर्व[6] ॥ छळवादियां पूजा सर्व ॥ करून दाखवी स्वयमेव ॥ पूर्णानुभव यानाव ॥ २०० ॥ ॥ आशंका ॥ ॥ भावें करितां भगवद्भजन ॥ यापरी इंद्र करी विघ्न ॥ नारायण चैतन्यघन ॥ तेणें विघ्नें संपूर्ण पराभविलीं[7] ॥ १ ॥ मा भाळ्याभोळ्याकरितां भक्ती ॥ ऐशीं विघ्नें जैं छळूं येती ॥ तैं कदा नव्हे भगवत्प्राप्ती[8] ॥ ऐसा विकल्प[9] चित्तीं ह्मणीं धरिशी ॥ २ ॥ ब्रह्मादिकां सर्वभूतां ॥ भ्रुकुटीमात्रें जो नियंता ॥ त्या भगवंतातें भजतां ॥ विघ्नें सर्वथा बाधूं न शकती ॥ ३ ॥ ज्याचेनि इंद्रा इंद्रपण ॥ तो भावें भजतां श्रीनारायण ॥ भक्तांसि विघ्न करी कोण ॥ हरी रक्षण निजभक्तां ॥ ४ ॥ इंद्रमुख कामादिक ॥ विघ्नें छळिती सकळ लोक ॥ त्यांचाही नारायण चाळक ॥ तो भक्तासि देख स्पर्शों नेदी[10] ॥ ५ ॥ विघ्नांसि भुलविलें जेणें संपूर्ण ॥ तो नित्य स्मरतां नारायण ॥ अपधाकें[11] विघ्नें पळती जाण ॥ भक्तसंरक्षण हरिनामें ॥ ६ ॥ करावया निजभक्त साहाकार[12] ॥ देव धरी नानावतार ॥ त्याच्या अवतारांचें चरित्र ॥ अतिविचित्र अवधारी ॥ ७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ हंसस्वरू

---

[1] समर्पावे. [2] घ्या. [3] संतोषली. [4] नमस्कार. [5] इंद्राचे. [6] न ऐकिलेले. [7] पराजय केला. [8] परमेश्वराच्या पदाची प्राप्ति. [9] कल्पना. [10] शिवूदेत नाही. [11] धाकानें. [12] साह्यकरणे.

प्यवददच्युत आत्मयोगं दत्तः कुमार ऋषभो भगवान् पिता नः ॥ विष्णुः शिवाय जगतां कलयाऽवतीर्णस्तेनाहृता मधुभिदाश्रुतयोहयास्ये ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ ॥ सनकादिक ब्रह्मनंदन ॥ तिहीं पित्यासि केला प्रश्न ॥ प्रश्नखंडणमिसें जाण ॥ केलें ब्रह्मज्ञान हंसावतारें ॥ ८ ॥ नित्य स्मरतां हरीचे नाम ॥ महाविघ्नें होती भस्म ॥ त्याचें अवतारसंभ्रम ॥ उत्तमोत्तम अवधारी ॥ ९ ॥ ज्याचेनि नामें पळे [1]कृतांत ॥ नामें जन्ममरणा घात ॥ तो अवतार श्रीदत्त ॥ मूर्तिमंत परब्रह्म ॥ २१० ॥ नैष्ठिकब्रह्मचारी निश्चितीं ॥ ज्यासि स्वप्नीं नाहीं वीर्यच्युती ॥ यालागीं कुमार ह्मणती ॥ अवतारमूर्त्ती सनकादिक ॥ ११ ॥ आणि आमुचा जोकां पिता ॥ ऋषभ नारायण ज्ञाता ॥ तोही अवतार नृपनाथा ॥ जाण तत्त्वतां भगवन्मूर्ती ॥ १२ ॥ येहीनाम संपूर्ण ॥ अवतारी अवतरे नारायण ॥ जो जगाचा प्रतिपाळण ॥ स्वांशें श्रीकृष्ण [2]अवतरे ॥ १३ ॥ तोचि स्वयेंगा श्रीकृष्ण ॥ मधुकैठभ निर्दाळून ॥ नामें जोकां मधुसूदन ॥ तोचि अवतरून हयग्रीव झाला ॥ १४ ॥ तेणें [3]शंख मर्दून पुढती ॥ उद्धरिल्या बुडाल्या श्रुती ॥ आणोनि दीधल्या ब्रह्म्या हातीं ॥ जाण निश्चितीं वेदरक्षण ॥ १५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ गुप्तोऽप्यये मनुरिलौषधयश्च मात्स्ये क्रोडे हतो दितिज उद्धरतांऽभसः क्ष्माम् ॥ कौर्मे धृतोऽद्रिरमृतोन्मथने स्वपृष्ठे ग्राहात्प्रपन्नमिभराजममुंचदार्तम् ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ ॥ तेणेंचि मत्स्यावतारें ॥ प्रलयकालांबुमहाभारे ॥ मनुसहित [4]रक्षिलें [5]धरे ॥ निजनिर्धारें औषधीसी ॥ १६ ॥ तेणेंचि कमठावतारा ॥ स्वपृष्टीं धरूनि गिरिवरा ॥ मंथोनियां क्षीरसागरा ॥ अमृत सुरवरा अर्पिलें ॥ १७ ॥ तेणें [6]आर्त्तत्राणा [7]तांतडी ॥ वैकुंठींहून घालोनि उडी ॥ गजाचें ग्रहबंधन तोडी ॥ उद्धरिले आवडीं गजेंद्रातें ॥ १८ ॥ ॥ श्लोक ॥ संस्तुन्वतोऽब्धिपतितान् श्रमणानृषींश्च शक्रं च वृत्रवधतस्तमसि प्रविष्टम् ॥ देवस्त्रियोऽसुरगृहे पिहिता अनाथा जघ्नेऽसुरेंद्रमभयाय सतां नृसिंहः ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ ॥ मार्कंडेया एकेवेळीं ॥ बुडतां अकाळप्रळयजळीं ॥ तेणें स्मरतां वनमाळी ॥ तारी तत्काळी वटपत्रशायी ॥ १९ ॥ शालग्रामपूजितां ऋषीश्वरीं ॥ नळवानरू तेअवसरीं ॥ देवपूजा टाकी सागरीं ॥ चेष्टा वानरी स्वभावें ॥ २२० ॥ तें देखोनि ऋषीश्वरीं ॥ शिळा नबुडोत तुझ्या करीं ॥ ऐसा शाप ते अवसरीं ॥ क्षोभेंकरीं दीधला ॥ २१ ॥ तैं शालग्राम सागरोदरीं ॥ तरतां देखिले ऋषीश्वरीं ॥ काढावया रिघतां भीतरीं ॥ लहरीकरीं निर्बुजले ॥ २२ ॥ तेकाळीं ऋषीश्वरीं ॥ आर्तिहरण स्तविलाहरी ॥ तेथें अवतरोनि श्रीहरी ॥ ऋषीतें तारी पूजेसहित ॥ २३ ॥ [9]वृत्र वधिला वज्रघातें ॥ ते ब्रह्महत्या इंद्रातें ॥ तेणें दोषें तो अंधतमातें ॥ जाण निश्चितें बुडत होता ॥ २४ ॥ तेथें अवतरोनि श्रीअनंतें ॥ [10]चतुर्धा वांटूनि ते हत्येतें ॥ शुद्ध केलें इंद्रातें ॥ कृपावंतें कृपाळुवें ॥ २५ ॥

---

१ यम. २ अवतार घेतो. ३ शंखासुर. ४ पाळिले. ५ पृथिवीस. ६ दीनरक्षणाकरिता. ७ जलदीनें. ८ रक्षो. ९ वृत्रासुर. १० चारप्रकारानें.

जिणोनियां अमरपुरें ॥ हिरोनियां देवांचीं अंतौरें ॥ तें कोंडोनियां समग्रें ॥ मुरें महा असुरें एकंदर केले ॥ २६ ॥ तो मुरमर्दन श्रीह
री ॥ यालागीं नावें मुरारी ॥ देवस्त्रिया काढोनि बाहेरी ॥ देवांच्या करीं अर्पिता झाला ॥ २७ ॥ जो असुरांमाजी चूडामणी ॥
जो द्वेषियांमाजी अग्रगणी[१] ॥ तो हरिनाम ऐकतां कानीं ॥ अतिक्षोभें मनीं प्रज्वळोंलागे ॥ २८ ॥ जो पूर्णक्रोधाचा उदधी[२] ॥ जो अ
विवेकाचा महानिधि ॥ जो हरि स्मरे त्या पुत्रातें बाधी ॥ गर्वमदीं उन्मत ॥ २९ ॥ तो हिरण्यकशिपू नखधारीं ॥ स्वयें निंवटी[३] नरके
सरी ॥ जो निजभक्तांचा कैवारी ॥ अभयकारी साधूंचा ॥ २३० ॥ ॥श्लोक॥ ॥देवासुरे युधि च दैत्यपतीन् सुरार्थे हत्वांऽतरेषु भु
वनान्यदधात्कलाभिः ॥ भूत्वाऽथ वामन इमामहरद्बलेः क्ष्मां याञ्चाच्छलेन समदाददितेः सुतेभ्यः ॥ २० ॥ ॥टीका॥ ॥समुद्रमंथना
च्या शेवटीं ॥ क्षीरसागराचे तटीं ॥ सुरांअसुरां कळी मोठी ॥ अमृतासाठीं मांडली ॥ ३१ ॥ तेव्हां अमृत विटे जें[४] देखोनी ॥ तो
अवतार घेतला मोहिनी ॥ तेणें असुरां सुरापानीं[५] ॥ अमृतदानीं देवांसी ॥ ३२ ॥ तेथें चोरूनि घेतां अमृतग्रासा[६] ॥ निंवटिला[७] राहू
चा घसा ॥ त्याच्या कबंधावरी झाळसा ॥ वासनिवासा स्वयें केला ॥ ३३ ॥ सुरसाह्य नारायण ॥ द्वारके कुश निर्दाळून ॥ कां
लवणासुर मर्दून ॥ अवतरे आपण कुमाररूपें ॥ ३४ ॥ ऐसा मन्वंतरा मन्वंतरीं ॥ निजभक्तकाजकैवारी ॥ सुरकार्यार्थ[८] श्रीहरी ॥ नानाअव
तारीं अवतरे स्वयें ॥ ३५ ॥ तो सुरसाह्य जगजीवन ॥ स्वयें कुब्ज झाला आपण ॥ अंगें याचक वामन ॥ देवांचा अपमान उतरला
जेणें ॥ ३६ ॥ दानें दांडुगा[९] बळी ॥ त्यासि देवांचेनि नव्हे कळी ॥ मग त्रिविक्रमरूपें आकळी ॥ त्याच छळें बळी छळिला जेणें ॥ ३७ ॥
तरी भावबळें बळी प्रबळ ॥ तेणें देव केला द्वारपाळ ॥ विष्णु सत्व पाहे छळ छळ ॥ शेखीं दासाचा दयाळ दास्य करी स्वयें ॥ ३८ ॥
यापरी बळीचा छळ ॥ करूनि घेतलें दिङ्मंडळ ॥ तेणें अमरगण सकळ ॥ अर्पूनि तत्काळ सुखी केले ॥ ३९ ॥ ॥श्लोक॥ निःक्षत्रियामकृत
गां च त्रिःसप्तकृत्वो रामस्तु हैहयकुलाप्ययभार्गवाग्निः ॥ सोऽब्धिं बबंध दशवक्त्रमहन्सलंकं सीतापतिर्जयति लोकमलघ्नकीर्तिः ॥ २१ ॥
टीका ॥ ॥ तो देवाधिदेवोत्तम ॥ स्वयें झाला परशुराम ॥ तेणें क्षत्रियांचा पराक्रम ॥ केला निर्धर्म निजप्रतापें ॥ २४० ॥ तो गोब्राह्मण
कैवारी ॥ सहस्रार्जुनातें संहारी ॥ सहस्रभुजांचीं कांडोरीं करी ॥ केली बोहरी दानवकुळा ॥ ४१ ॥ जमदग्नीचा कोपाग्नी ॥ परशुराम
तेजें प्रज्वळूनी[१०] ॥ हैहयकुळ जाळूनी ॥ आहाळिली अवनी[११] क्षत्रियांची ॥ ४२ ॥ तेणें तीन सप्तकें वीररस ॥ देऊनि क्षत्रियमद बहुवस ॥
त्या रोगाचा केला नाश ॥ धरेचे ईश धरामर केले ॥ ४३ ॥ जो अवतारांचें मूळपीठ ॥ जो वीरवृत्ती अतिउद्भट ॥ तो अवतारांमा

---

१ श्रेष्ठ. २ समुद्र. ३ मारी. ४ जे रूप. ५ अमृत पानाविषयी.. ६ अमृताच्या घासास. ७ नाहीसा केला. ८ देवांच्या कामाकरितां. ९ दांडगा. १० जळून. ११ पृथिवी.

जी श्रेष्ठ ॥ अतिवरिष्ठ श्रीराम ॥ ४४ ॥ पापें पळती रामनामें ॥ नामांकित वंदिजे यमें ॥ गणिकेचीं कर्माकर्में ॥ श्रीरामनामें निर्दळिलीं ॥४५॥ नामें कळिकाळासी धाक ॥ यमदूतां नमिळे भीक॥ रामनामगजरें देख ॥ पळे निःशेख जन्ममरण ॥ ४६॥ जो देवांचें बंधन सोडी ॥ नवग्रहांची बेडी तोडी ॥ जेणें रामराज्याची रोकडी ॥ उंभविली गुढी तिही लोकीं ॥ ४७ ॥ ज्याचेनि शिळा तरती सागरीं ॥ असुर मारिजेती वानरीं ॥ जेणें सुवर्णाची नगरी ॥ वोपिली पुरी शरणागतासी ॥ ४८ ॥ जो प्रतापचामरी गळा ॥ जेणें सेतु बांधिला अवलीला॥ चँरणीं उद्धरिली शिळा॥जो निजजिव्हाळा निजभक्तां ॥ ४९ ॥ तो अवतार मूर्त्तिमंत ॥ राया अद्यापि वर्तत ॥ हा संवाद त्रेतायुगांत ॥ द्रुमिल सांगत विदेहासी ॥ २५० ॥ यालागीं श्रीरामराम ॥ नित्य जपे जो हें नाम ॥ तो पुरुषामाजी पुरुषोत्तम ॥ कर्माकर्मा अँतीत तो ५१ ॥ तें रामनाम अँवचटें ॥ भीतरी रिघे कर्णपुटें ॥ तैं सकळमळांचीं मळकटें ॥ नाँमोद्घाटें नासती ॥ ५२ ॥ ऐशी रामनामाची ख्याती ॥ जगदुद्धारें केली कीर्ती ॥ धन्यधन्य जे परिसती ॥ धन्य जे गाती रामचरित ॥ ५३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भूमेर्भरावतरणाय यदुष्वजन्मा जातः करिष्यति सुरैरपि दुष्कराणि ॥ वादैर्विमोहयति यज्ञकृतोऽतदर्हान् शूद्रान् कलौ क्षितिभुजो न्यहनिष्यदंते ॥ २२ ॥ ॥टीका॥ ॥आतां भावी अवतारवार्ता ॥ तुज मी सांगेन नृपनाथा॥ श्रीकृष्णावतारकथा॥परमाद्भुता विचित्र॥५४॥ जो परेहून परात्पर ॥ जो कां अजन्मा अक्षर ॥ जो श्रुतिशास्त्रां अगोचर ॥ तो पूर्णावतार श्रीकृष्ण ॥ ५५ ॥ जेथें नाममात्र रिघों नलाहे ॥ तेथें रूपाची नलभे सोये ॥ ज्या ब्रह्मत्व अंगीं न साहे ॥ तो अवतार पाहे श्रीकृष्ण ॥ ५६ ॥ जो वर्णाश्रमांसि नाँतळे॥ ज्यासि ईश्वरत्वही वोंविलें ॥ जो अजय अव्यय स्वानंदमेळें ॥ तो अवतार स्वलीलें श्रीकृष्णनाथ ॥ ५७ ॥ ऐसा गुणधर्मकर्मातीत ॥ तो अवतार श्रीकृष्णनाथ ॥ प्रगटला यदुवंशांत ॥ स्वयें जगन्नाथ स्वइच्छें ॥ ५८ ॥ जैसें खळाळें कल्लोळ चंचळ ॥ भासे परी तें केवळजळ ॥ काळी भरडी पांढरी चोळ ॥ परी ते केवळ वसुधाची ॥ ५९ ॥ जे गोडी नाबदरासी ॥ तेचि वेगळी रवेयासी ॥ तैसा अवतार यदुवंशीं ॥ पूर्णांशेंसी श्रीकृष्ण ॥ २६० ॥ जैसा दीप लावितां तत्क्षणीं ॥ सर्वेचि प्रगटे तेजाची खाणी ॥ तैसा उपजतांचि बाळपणीं ॥ अभिनवकरणी स्वयें केली ॥ ६१ ॥ जे ब्रह्मादिकदेवां नव्हे ॥ ते बाळलीला स्वभावें ॥ करूनि दाविलें आंघवें ॥ देवादिदेवें श्रीकृष्णें ॥ ६२ ॥ वँणवा गिळिला मुखें ॥ पर्वत उचलिला नखें ॥ पूतनेचे स्तँनविखें ॥ प्याला निजमुखें जीवा सगट ॥ ६३ ॥ जेणें वत्साहरणमिसें ॥ स्रष्ट्यासही लाविलें पिसें ॥ जो वत्सवत्सपवेशें ॥ झाला सावकाशें एकाकी एक ॥ ६४ ॥ अघ चिरिला चाभाडा ॥ कालियाच्या कु

---

१ उभी केली. २ दिली. ३ पायानें. ४ वेगळा. ५ अवचित. ६ नामाच्या घोषानें. ७ मिळत नाही. ८ त्याच वेळी. ९ सर्व. १० दावाग्नि. ११ स्तनांतले विष.

टिल्या फडा ॥ यमलोकीं घेऊनि झाडा ॥ आणिला रोकडा गुरुपुत्र जेणें ॥ ६५ ॥ जे प्रजा पीडूनि[1] कर घेती ॥ जयां नावडे धर्मनीती ॥ ऐसे राजे भार[2]भूत क्षितीं ॥ नेणों किती निर्दाळिले ॥ ६६ ॥ एके सैन्यें एकस्वांगें ॥ एका वधवी आन[3]प्रयोगें ॥ एक गोत्रकलहप्रसंगें ॥ अग्रपूजायोगें एकासी ॥ ६७ ॥ अधर्मा लाविली सीक ॥ धर्माचें वाढवील बिक ॥ हें अवतारकौतुक ॥ राया तूं आवश्यक देखशील पुढां ॥ ६८ ॥ जैं जैं लोटेल आहोरात्र ॥ तैं तैं करील नवें चरित्र ॥ तया कृष्णसुखासि पात्र ॥ भक्त पवित्र होतील ॥ ६९ ॥ साधूंसि स्वानंद सोहळा ॥ नित्यनवा होईल आगळा ॥ ते श्रीकृष्णाची लीला ॥ देखसी डोळां नृपनाथा ॥ २७० ॥ तोचि बौद्धरूपें जाण ॥ पुन्हां धरील दृढ मौन ॥ तेव्हां कर्माकर्मविवंचन ॥ सर्वथा जाण कळेना ॥ ७१ ॥ तो तटस्थपणें सदा ॥ प्रवर्तवील महावादा ॥ तेणें वादमिसें सदा ॥ वाढवी मदा महामोहातें ॥ ७२ ॥ मोह उपजवील दुर्घट ॥ कर्म करवील कर्मठ ॥ एक होतील कर्मभ्रष्ट ॥ नकळे चोखट निजात्महित ॥ ७३ ॥ कैसें माजवील मत ॥ वेद मिथ्या मानित ॥ वेदविहिता नातळत ॥ तो जाण निश्चित महामोह ॥ ७४ ॥ मोहें केला सर्वांसि छळ ॥ एका ज्ञाना[4]भिमान प्रबळ ॥ ते कर्म निंदिती सकळ ॥ त्यागिती केवळ जाड्य ह्मणोनी ॥ ७५ ॥ ऐशिये वर्ततां मोहस्थिती ॥ पूर्ण कलीची होय प्र[5]वृत्ती ॥ तेव्हां नीच ते राजे होती ॥ प्रजा नागविती चोरप्राय ॥ ७६ ॥ शूद्राहूनि अतिकनिष्ठ ॥ ते राजे होती परमश्रेष्ठ ॥ वर्णा वर्ण करिती भ्रष्ट ॥ अतिपापिष्ठ अधर्मी ॥ ७७ ॥ अपराधेंवीण वितंड ॥ भले त्यांसि करिती दंड ॥ मार्गस्थांचा करिती कोंड ॥ करिती उदंड सर्वापहरण ॥ ७८ ॥ [6]अबळांचें निजबळ राजा ॥ तो राजाचि स्वयें ना[7]गवी प्रजा ॥ ऐसा अनर्थ उपजे क्षितिभुजां[8] ॥ तें गरुडध्वजा न साहवे ॥ ७९ ॥ जेव्हां स्वधर्माचें जिणें ॥ अधर्मी लागे गांजणें ॥ यालागीं श्रीनारायणें ॥ अवतारधरणें कल्कीनामा ॥ २८० ॥ तो शस्त्रधारप्रबळ ॥ नष्ट राजे निर्दाळील सकळ ॥ महामोहाचें मूळ ॥ स्वयें समूळ उच्छेदील ॥ ८१ ॥ तेव्हां धर्माची पाहाट फुटे ॥ सत्यासी सत्य चौपटे ॥ तेव्हां वेदोक्त विधान प्रगटे ॥ स्वधर्म राहाटें राहटती सर्व ॥ ८२ ॥ ॥ श्लोक ॥ एवंविधानि कर्माणि जन्मानि च जगत्पतेः ॥ भूरीणि भूरियशसो वर्णितानि महाभुज ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ जयाचीं गा अनंतनामें ॥ अनंत अवतार अनंत जन्में ॥ अनंत चरित्रें अनंत कर्में ॥ अनंतोत्तमें हरिकीर्तीं ॥ ८३ ॥ अगाध भगवंताचा म[9]हिमा ॥ त्याच्या पार नाहीं जन्मकर्मा ॥ त्याचा [10]अनुष्टुप् हा महिमा ॥ तुज म्यां नरोत्तमा निरूपिला येथें ॥ ८४ ॥ ऐशीं अवतारचरित्रनामें ॥ परिसतां विचित्र कर्में ॥ राजा अत्यंत सप्रेमें ॥ मनोधर्मैं निवाला ॥ ८५ ॥ जेजे अवतारीं देवो सगुण ॥ जाहला परी निर्गुणाचे गुण ॥ प्रगट करीतचि

---

१ दुःख देऊन. २ केवळ भारच. ३ अन्यउपायानें. ४ ज्ञानाचा अहंकार. ५ आरंभ. ६ दुर्बलांचे. ७ लुटी. ८ राजास. ९ माहात्म्य. १० संक्षेपानें.

आपण ॥ कर्माचरण स्वयें दावी ॥ ८६ ॥ धन्य धन्य ते हरिगण ॥ जेवर्णिती भगद्गुण ॥ ज्यांचेनि वचनें संपूर्ण ॥ निवे[1] अंतःकरण श्रोत्यांचें ॥ ८७ ॥ श्रोत्याचें अवधान निवे ॥ तेथ वक्ता स्वानंदसुख पावे ॥ ग्रंथ वोसंडे स्वभावें ॥ साहित्य गौरवें रसाळ ॥ ८८ ॥ जेवीं चंद्रकरें साचा ॥ मुखबंध सुटे चकोरांचा ॥ तेवीं एका जनार्दनाचा ॥ संतकृपा वाचा फुटली त्यासी ॥ ८९ ॥ जेवीं सूर्यकिरणस्पर्शें ॥ कमळकळी स्वयें विकासे ॥ तेवीं संतकृपासौरसें ॥ ग्रंथु विकासे[2] अर्थावबोधें ॥ २९० ॥ तेचि कृपेनें तत्त्वतां ॥ अर्थिलें श्रीभागवता ॥ आतां पंचमाध्यायीं कथा ॥ सावध श्रोता अवधारिजे ॥ ९१ ॥ राजा प्रश्न करील गोड ॥ जो परिसतां पुरेल कोड ॥ साधकांची उपशमेल[3] चाड ॥ होय निवाड धर्माधर्माचा ॥ ९२ ॥ जेथ भजनाभजन हातवटी ॥ प्रश्नोत्तरें कथा गोमटी ॥ अतिशयें रसाळ गोठी ॥ जेणें सुटे गांठी अधर्माची ॥ ९३ ॥ तें उत्तमोत्तम निरूपण ॥ भरीन संतांचे श्रवण ॥ जनार्दनकृपा पूर्ण ॥ एका जनार्दन सांगेल ॥ ९४ ॥ अंगीं वारियाचेंन संचरणें ॥ घुमारा घुमों लागे तेणें ॥ तेवीं एका जनार्दनें ॥ कविताकरणें निजांगें[4] ॥ ९५ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे निमिजायंतसंवादे एकाकारटीकायां चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ श्लोक ॥ २३ ॥ ओव्या ॥ २९५ ॥

---

[1] सुखरूप होते. [2] स्फुरे. [3] नाहीसी होईल. [4] आपल्या बुद्धीनें.

* * *

# अध्याय ५वा.


वसुदेव.
नारद
राजा जनक.
चमस.

श्रीगणेशाय नमः ॥ ओंनमो सद्गुरु देवा उदारा ॥ ह्मणतां कृपण तूं खरा ॥ मागुतें आपलिया घरा ॥ दुजेपणें दारा येऊं नदेसी ॥ १ ॥
अवचटें मागतयासी ॥ जैं भेटी होय तुजसी ॥ तैं घोट भरूं धांवसी ॥ देखतांचि घेसी जिवें त्यातें ॥ २ ॥ जेजे मागों येती तुजपासी ॥
ते बांधोनि ऐश्वर्यतेमाजी सुखी ॥ शेखीं त्यांचे सोडवणेंसी ॥ भेटी दुसऱ्यासी स्वप्नींही नसे ॥ ३ ॥ अणुमात्र तुझी प्राप्ती ॥ अवचटें
चढे ज्याचे हातीं ॥ त्याचिये संसारसंपत्ती ॥ सर्वस्वें निश्चितीं नाडिसी तूं ॥ ४ ॥ मैंदाचा विडा घेतां ॥ जो प्रवर्ते आपुले घाता ॥ तेवीं
तुझी प्रसन्नता ॥ झालिया जीविता स्वयें नाशी ॥ ५ ॥ जेजे तुजपैं मागों आले ॥ तेते सर्वस्वें नागवले ॥ शेवटीं नागवे तुवां केलें ॥
निर्लज्ज झाले तिहीं लोकीं ॥ ६ ॥ ऐशी तुझी निर्वाणगती ॥ त्या तुझी उदार कीर्ती ॥ घडे ह्मणशी कैशा रीतीं ॥ ते अगाध स्थिती अ
वधारी ॥ ७ ॥ मागें उदार वाखाणिले ॥ तेही आपणिया ऐसे केले ॥ मग सर्वस्व आपुलें ॥ दान दीधलें दातृत्वें ॥ ८ ॥ षड्गुणैश्वर्यवैभ
वेंसी ॥ आंपणियातें दाना देसी ॥ दीधलें तें घोवों नेणसी ॥ कदाकाळेंसी कल्पांतीं ॥ ९ ॥ आपणियां दीधलें दान ॥ यालागीं तूं दा
सां आधीन ॥ मग त्याचेनि छंदें जाण ॥ सर्वस्वें आपण नाचसी ॥ १० ॥ बळीनें सर्वस्व केलें दान ॥ शेखीं तूं झालासि त्या आधीन ॥
त्याचें द्वारपाळपण ॥ अद्यापि आपण चालविसी ॥ ११ ॥ धर्मे अर्पिलें अग्रपूजेसी ॥ शेखीं तूं त्याची सेवा करिसी ॥ नानासंकटें स्वयें
सोशिसी ॥ अंगें काढिसी उंच्छिष्टें ॥ १२ ॥ तुझा निजभक्त अंबऋषी ॥ त्याचे गर्भवास तूं सोशिसी ॥ तुज गौळे राखिती हृषीकेशी ॥
शेखीं त्या गोपाळांसी रक्षिसी ॥ १३ ॥ एवं स्वस्वरूपता द्यावयासी ॥ उदारत्व तुजपासी ॥ हें नयेगा आणिकासी ॥ हृषीकेशी कृपाळु
वा ॥ १४ ॥ तो तूं परम उदार ऐसा ॥ राया रंका समभावें सरिसा ॥ भाव तेथें भरंवसा ॥ तूं आपैसा आंतुडसी ॥ १५ ॥ त्या तुझिया
प्राप्तीलागीं ॥ कपाटें सदा सेविती योगी ॥ एक ते झाले भोगविरागी ॥ एक ते त्यागी सर्वस्वें ॥ १६ ॥ एक हिंडती दशदिशे ॥ एक तुज
लागीं झाले पिसे ॥ परी तुझी भेटी स्वप्नींहि दिसे ॥ ऐसा नदिसे क्षण एक ॥ १७ ॥ ऐशियाही तुझी प्राप्ती ॥ सुलभ असे एके रीतीं ॥ जरी
संतचरणीं रंगती ॥ अतिप्रीतीसप्रेमें ॥ १८ ॥ संतचरणीं जो विनटला ॥ तो निजप्राप्तीसि पावला ॥ संतस्वरूपें अवतरला ॥ स्वयें संचला पर
मात्मा ॥ १९ ॥ यालागीं जीं जीं संतांचीं रूपें ॥ तीं तीं श्रीहरीचीं स्वरूपें ॥ ह्मणोनि संतांचिये रूपें ॥ अतिसाक्षेपें अर्जावें ॥ २० ॥ ते ज्ञाना
र्थाचे परम पिसे ॥ यालागीं ग्रंथाचेनि मिसें ॥ त्यांचे चरण अनायासे ॥ सावकाशें वंदीन ॥ २१ ॥ संतकरुणावलोकन ॥ तें मजनेत्रींचें
अंजन ॥ चरणरूपा पाहतां जाण ॥ श्रीजनार्दन प्रकाशे ॥ २२ ॥ तया जनार्दनाचिये खेवें ॥ गुत्वाचेनि आडनावें ॥ रिघालों निजस्वभावें ॥

---

१ अवचित. २ सर्व प्रकारानें. ३ आपणांस. ४ उष्टे. ५ पानावाची मुक्ति. ६ मिळती. ७ सोपी. ८ लोळतात. ९. मोक्षास. १० साधूनी दयेनें पाहाणें.

॥ १ ॥ जीवें भावें भजनासी ॥ २३ ॥ भज्य भजक भजना ॥ एके अंगीं त्रिविध भावना ॥ दावूनियां जगजीवना ॥ जनीं जनार्दना निजभक्ती ॥ २४ ॥ हे अभेदभक्ती चोखडी[1] ॥ परम ऐक्यें भजनगोडी ॥ अधिकाधिक चढोवढी ॥ वाढे आवडी निजभक्तां ॥ २५ ॥ देव आपली सर्वस्वजोडी ॥ वेंची भक्तांचिये वोढी ॥ ऐशी अभेदभक्तीची गोडी ॥ पढियें गाढी गोविंदा ॥ २६ ॥ यालागीं भक्तांचा शरीरभार ॥ स्वयें[2] वागवी श्रीधर ॥ आपुलेनि अंगें परात्पर ॥ वागवी साचार निजभक्तां ॥ २७ ॥ निजभक्तांचा देहभावो ॥ निजांगें वागवी देवाधिदेवो ॥ तरी अभक्तांचा देहो ॥ वागवावया पहाहो काय आन आहे ॥ २८ ॥ भक्तां नाहीं देहअहंता ॥ यालागीं देवो वागविता ॥ पूर्ण देहाभिमान अभक्ता ॥ त्यासि अतिबद्धता या हेतू ॥ २९ ॥ यालागीं जो निरभिमान ॥ तोचि भगवद्भक्त संपूर्ण ॥ ज्यांच्या अंगीं देहाभिमान ॥ त्यांसि भक्तपण कदां[3] नघडे ॥ ३० ॥ निजभक्त[4] तारितां कौतुकें ॥ त्यांची रोमावळी केवीं दुखे ॥ निर्भय करोनि पूर्णहरिखें ॥ देवो निजसुखें निजभक्त तारी ॥ ३१ ॥ यालागीं निरभिमानता ॥ जे विनटले भक्तिपथा ॥ ते पाय देवोनि विघ्नांचे माथां ॥ पावती तत्त्वतां भगवत्पद ॥ ३२ ॥ भक्तांची ऐशी स्थिती ॥ तरी अभक्तां कवण गती ॥ तेंचि पुसावया नृपती ॥ प्रश्नार्थी प्रवर्ते ॥ ३३ ॥ पंचमामाजी निरूपण ॥ अभक्तांभक्तिलक्षण ॥ युगायुगीं पूजाविधान ॥ सांगेल पावन[5] हरीचें ॥ ३४ ॥ अवतारचरित्र पुरुषार्थ ॥ सांगोन संपला चतुर्थ ॥ आतां अभक्तांचा वृत्तांत[6] ॥ राजा पुसत मुनीसी ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ राजोवाच ॥ ॥ भगवंतं हरिं प्रायो न भजंत्यात्मवित्तमाः ॥ तेषामशांतकामानां का निष्ठाऽविजितात्मनाम् ॥ १ ॥ टीका ॥ ॥ राजा ह्मणे जी मुनिवरा ॥ जो भगवद्भजनीं पाठिमोरा ॥ ऐशिया अभक्ता नरा ॥ कोण दातारा गति त्यासी ॥ ३६ ॥ जे कामालागीं अतिउद्भट ॥ जे सक्रोध क्रोधें तेजिष्ठ ॥ जे अतिलोभें लोभिष्ठ ॥ जे परमश्रेष्ठ प्रपंचीं ॥ ३७ ॥ जे गर्वाचे अग्रगणी[7] ॥ जे अहंकाराचे चूडामणी ॥ जे विकारांची प्रवाहश्रेणी ॥ जे उघडली खाणी विकल्पाची ॥ ३८ ॥ ज्यांचे सद्बुद्धी आड आभाळ ॥ महामोहाचें सदा सबळ ॥ जे छलनार्थी अतिकुशल ॥ जे अतिप्रबळ प्रलोभें ॥ ३९ ॥ दिवसा न देखती निश्चितें ॥ ते अंधारीं देखती दिवाभीतें ॥ तेवीं नेणोनि[8] परमार्थातें ॥ जे अतिज्ञाते प्रपंचीं ॥ ४० ॥ जे नेणती आत्महित ॥ ज्ञान विकूनि कामा पोशित ॥ ऐसे जेकां अभक्त ॥ त्यांची गति निश्चित सांग मज ॥ ४१ ॥ तुह्मा ऐसे सद्बुद्धी ॥ चालते बोलाचे उदधी[9] ॥ भाग्यें लाधलों ज्ञाननिधी ॥ हा प्रश्न त्रिशुद्धी सांगावा ॥ ४२ ॥ राजा साक्षेपें बहुवस ॥ ॥ १ ॥ पुसे अभक्तगतिविन्यास ॥ तो सांगावया चमस ॥ सावकाश सरसावला ॥ ४३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ चमस उवाच ॥ ॥ मुखबा

---

१ चांगली. २ स्वतः ३ कधीही ४ आपले भक्त. ५ पवित्र. ६ कथा. ७ महागर्वी. ८ न जाणून. ९ समुद्र.

हूरुपादेभ्यः पुरुषस्याश्रमैः सह ॥ चत्वारो जज्ञिरे वर्णा गुणैर्विप्रादयः पृथक् ॥ २ ॥ टीका ॥ जोकां जगाचा जनक ॥ मुख्य गुरुत्वें तोचि एक ॥ त्यासि नभजे जो अविवेक[1] ॥ तो नाडला लोक सर्वस्वें ॥ ४४ ॥ पुरुषासूनि जन्मले जाण ॥ चाऱ्ही आश्रम चाऱ्ही वर्ण ॥ त्यांचे उत्पत्तीचें स्थान ॥ ऐक संपूर्ण नृपनाथा ॥ ४५ ॥ मुखीं वेदविद ब्राह्मण ॥ बाहू जन्मले राजन्य[2] ॥ ऊरू जन्मले वैश्यवर्ण ॥ चरणीं जन्म स्थान शूद्रवर्णा ॥ ४६ ॥ मुळीं अवघे तिन्ही गुण ॥ गुणयोगें वर्ण जाण ॥ त्रिगुणीं चारी वर्ण ॥ जन्मलक्षण घडे कैसें ॥ ४७ ॥ सत्वगुणें शुद्ध ब्राह्मण ॥ सत्वरजमिश्रें राजे जाण ॥ रजतमें वैश्यवर्ण ॥ केवळ तमोगुण शूद्रवर्ण ॥ ४८ ॥ क्षत्रिय वैश्य आणि ब्राह्मण ॥ द्विजन्मे हे तिन्ही वर्ण ॥ त्यांसि गायत्री वेदाध्ययन ॥ शूद्र ते जाण संस्काररहित ॥ ४९ ॥ ब्रह्मचर्य आणि गार्हस्थ्य[3] ॥ तिहीं वर्णां अवश्यप्राप्त ॥ चहूं आश्रमां आश्रयभूत[4] ॥ जाण निश्चित ब्राह्मण ॥ ५० ॥ गार्हस्थ्य पुरुषाच्या चरणीं ॥ ब्रह्मचर्य हृदयस्थानीं ॥ वक्षस्थळीं वसती वनी ॥ शिरोमणी संन्यास ॥ ५१ ॥ ॥ श्लोक ॥ य एषां पुरुषं साक्षादात्मप्रभवमीश्वरम् ॥ नभजंत्यवजानंति स्थानाद्भ्रष्टाः पतंत्यधः ॥ ३ ॥ टीका ॥ ॥ हे ब्राह्मणादिवर्ण पाहाहो ॥ ज्यापासोनि जन्मप्रभावो[5] ॥ तो न भजतां देवाधिदेवो ॥ उत्तम देहो अधःपाती ॥ ५२ ॥ पूर्वोत्तर मिमांसा दोनी ॥ नानाशास्त्रार्थकडसणी ॥ स्वरूप बोलती निर्वाणीं[6] ॥ एवं शब्दज्ञानी अतिचतुर ॥ ५३ ॥ यापरी जे पंडित ॥ ज्ञानाभिमानें अतिउन्मत्त ॥ तेणें अभिमानेंचि येथ ॥ भजनीं निश्चित विमुख केले ॥ ५४ ॥ एक अज्ञानी सर्वथा ॥ स्वप्नीं नेणती परमार्था ॥ ते नेणपणेंचि तत्त्वतां ॥ श्रीजगन्नाथा न भजती ॥ ५५ ॥ शेळी उसांची चव्ही गाढी ॥ नेणोनि पाचोळा करंडी[7] ॥ तेवीं नेणोनि हरिभक्तीची गोडी ॥ अज्ञानें बापुडीं विषयलुब्ध ॥ ५६ ॥ आलोडूनि[8] वेदशास्त्रार्थ ॥ ज्ञातेपणें जे पंडित ॥ गर्वें हेळसिती भक्तिपंथ ॥ अति उन्मत्त ज्ञातृत्वें ॥ ५७ ॥ जेवीं ज्वरिताचें मुख ॥ दूध मानी कडूविख ॥ तेवीं ज्ञानगर्वें पंडित देख ॥ ठेले विमुख हरिभजनीं ॥ ५८ ॥ यापरी ज्ञानाभिमानी ॥ विमुखझाले हरिभजनीं ॥ ते जरी वर्णांमाजी अग्रगणी ॥ तरी अधःपतनीं पडतील ॥ ५९ ॥ होकां वर्णांमाजी अग्रगणी ॥ जो विमुख हरिचरणीं ॥ त्याहूनि श्वपच[9] श्रेष्ठ मानी ॥ जो भगवद्भजनीं प्रेमळ ॥ ६० ॥ आह्मी मुक्त हें मानुनी ॥ जे विमुख भगवद्भजनीं ॥ ते पचिजेती अधःपतनीं ॥ तिर्यग्योनी[10] जन्ममरणें ॥ ६१ ॥ मनुष्यदेहीं जे भजन नष्ट ॥ ते होतीगा स्थानभ्रष्ट ॥ अधःपातें भोगिती कष्ट ॥ अतिउद्भट यातना ॥ ६२ ॥ ज्ञानाभिमानें जे न भजती ॥ ते प्रौढपतनीं पचिजेती ॥ अज्ञानांही तेचि गती ॥ सर्वथा नृपती ह्मणों नये ॥ ६३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ दूरे हरिकथाः केचिद्दूरे चाच्युतकीर्तनाः ॥ स्त्रियः शूद्रादयश्चैव तेऽनुकंप्या भवादृशाम् ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ एक पित्या

---

[1] अविचारी. [2] क्षत्रिय. [3] गृहस्थाश्रम. [4] साहाय्य. [5] जन्माचा मोठेपणा. [6] शेवटी. [7] करंडते. [8] शोधून. [9] चांडाळ. [10] पाश्वादिजन्मांत.

चे दोषे अर्भक[1] ॥ एक प्रबुद्ध एक बाळक ॥ पित्यासि अपमानितां[2] देख ॥ ताडी जनक प्रबुद्धासी ॥६४॥ बाळक पित्याचे माथां चढे ॥ जरी लाता हाणे तयाकडे ॥ तरी त्यासि दोष नघडे ॥ दोषांचें सांकडें सज्ञानासी ॥ ६५ ॥ ज्ञात्यापासोनि भजन ठाके ॥ ते कळविजेती महादोखें ॥ अज्ञान तरती भाविकें ॥ साधु कृपामुखें अनुग्रहितां ॥ ६६ ॥ अज्ञाना नाहीं विशेष बाध ॥ तो साधुविश्वासें होय शुद्ध ॥ ज्ञानाभिमानियां भाव विरुद्ध ॥ यालागीं सुद्धा दोष बाधी ॥ ६७ ॥ अज्ञानी विश्वासें साधु वंदी ॥ ज्ञानाभिमानी दोहींतें निंदी ॥ यालागीं त्यातें त्रिशुद्धी ॥ अवश्य बाधी अतिदोष ॥ ६८ ॥ साधुविश्वासें अज्ञान फिटे ॥ ज्ञानाभिमानियां विकल्प मोठे ॥ त्यांसि विश्वास कदा नघटे ॥ अभिमान हठें अधःपात ॥ ६९ ॥ एवं विचारितां नेटें पाटें ॥ अहंतेचें[3] बंधन मोठें ॥ अभिमानाऐसें नाहीं खोटें ॥ दुजें वोखटें[4] त्रिलोकीं ॥ ७० ॥ अभिमान ईश्वरा बाधी ॥ तोही सबळ कीजे सोपाधी ॥ अभिमानें देहबुद्धी ॥ बाधक त्रिशुद्धी सुरनरांसी ॥ ॥ ७१ ॥ यालागीं जे अज्ञान जन ॥ ज्यांसि नाहीं ज्ञानाभिमान ॥ तेही विश्वासल्या संपूर्ण ॥ साधुसज्जन अनुग्रहो करिती ॥ ७२ ॥ ज्यासि ह्मणती नीच वर्ण ॥ स्त्रीशूद्रादि हीनजन ॥ ज्यासिकां दूरीं शास्त्रश्रवण ॥ ज्यासि दूरी श्रवण वेदोक्त ॥७३॥ ज्यासि झाल्या सद्भाव संपूर्ण ॥ ते होतकां हीन जन ॥ परी संतकृपेसि आयतन[5] ॥ विश्वासें पूर्ण अधिकार झाला ॥ ७४ ॥ ऐसें पूर्ण भावार्थी ॥ त्यांसि तुह्मा ऐशा साधुसंती ॥ अनुग्रहोनि[6] तारिती ॥ कृपामूर्त्ती कृपाळुवा ॥ ७५ ॥ अज्ञानी यापरी तरती ॥ परी ज्ञानाभिमान ज्यांच्या मतीं ॥ ते ब्रह्मादिकां न तरती ॥ त्यांचीही स्थिती मुनि सांगे ॥ ७६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विप्रो राजन्यवैश्यौ च हरेः प्राप्ताः पदांतिकम् ॥ श्रौतेन जन्मनाऽथापि मुह्यंत्याम्नायवादिनः ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ अज्ञान जे नीचवर्ण ॥ भावें धरोनियां संतचरण ॥ निजविश्वासें संपूर्ण ॥ जन्ममरण निरसिती[7] ॥ ७७ ॥ येर द्विजन्मे जेकां तिन्ही ॥ स्वभावें प्राप्त हरिचरणीं ॥ आह्मी अधिकारी वेदज्ञानी ॥ जन्माभिमानी अतिगर्वी ॥७८॥ जन्माभिमान कर्माभिमान ॥ अग्रपूज्यत्वें पूज्याभिमान ॥ अल्पमात्र वेदींचें ज्ञान ॥ तो वेदाभिमान वाढविती ॥७९॥ ज्यासि प्राप्त उपनयन[8] ॥ ज्यांसि प्राप्त गायत्री पूर्ण ॥ ज्यांसि हरीचें आवडे भजन ॥ ज्यांचे धरितां चरण हरि भेटे ॥८०॥ ऐसे उत्तम जे ब्राह्मण ॥ त्यांसि वेदवादें ज्ञानाभिमान ॥ तेणें गर्वें पडे मोहन ॥ तेंचि नारायण विशद[9] सांगे ॥ ८१ ॥ श्लोक ॥ ॥ कर्मण्यकोविदाः स्तब्धा मूर्खाः पंडितमानिनः ॥ वदंति चाटुकान्मूढा यया माध्व्या गिरोत्सुकाः ॥ ६ ॥ टीका ॥ ॥ नकळे विधिविधानमंत्र ॥ कोणें कर्मीं कैसें तंत्र ॥ नेणोनियां[10] गर्व थोर ॥ ताठा अपार ज्ञातत्वाचा[11] ॥ ८२ ॥ गारोडियासि विद्या थोडी ॥ परी सर्वांगीं बिरुदें गाढीं ॥ कां जा

---

[1] लहान. [2] अपमान केला असता. [3] अहंकाराचें. [4] वाईट. [5] पात्र, अधिकारी. [6] दया करून. [7] नाहींसे करितात. [8] मौंजी. [9] स्पष्ट. [10] नसमजून. [11] ज्ञातेपणाचा.

णी जाणपणें जोडी ॥ कडोविकडी आसनपूजा ॥ ८३ ॥ देऊनि पतंगा वा चेढाळ ॥ स्फटिका अंगीं माणिककिळ ॥ तैसे मूर्खही केवळ ॥ भिरविती प्रबळ ज्ञानाभिमान ॥ ८४ ॥ आपण विधान नेणती ॥ शेखीं[1] संज्ञानाही[2] न पुसती ॥ कर्म आपमतीं[3] करिती ॥ लौकिकी स्थिती वाढवावया ॥ ८५ ॥ मिथ्या मधुरशब्दें चाटुक ॥ जे भोगीं अणुमात्र नाहीं सुख ॥ तरी इहामुत्रा भजविती लोक ॥ अप्सरादिक भोगलिप्सा ॥ ८६ ॥ येथें भोग भोगावे चोखडे ॥ आणि पुढें स्वर्गभोग जोडे ॥ येणें वचनें बापुडे ॥ यागाकडे[4] धांवती ॥ ८७ ॥ कर्ता सर्वस्वें नागवो[5] ॥ परी आचार्यत्व आह्मां येवो ॥ ऐशियांची बुद्धी पाहाहो ॥ यागप्ररोहो आरंभिला ॥ ८८ ॥ पावावया अतिप्रतिष्ठा ॥ नानाकर्मांच्या कर्मचेष्टा ॥ करूनि दाविती खटपटा ॥ कर्मारंभ मोठा आरंभूनी ॥ ८९ ॥ नातरी जैसा मद्यपानी ॥ मद्यरसा अमृत मानी ॥ या वचनगोडिया मद्यपानीं ॥ प्रवर्तिजे जनीं स्वादलिप्सा ॥ ९० ॥ तें सेविलिया काय जोडे ॥ तेथेंही सावधानता बुडे ॥ मग दुर्भंगत्व रोकडें ॥ पिशाचत्व गाढें अंगीं बाधिजे ॥ ९१ ॥ तैसें केवळ पतनात्मक ॥ त्या नाव ह्मणती स्वर्गसुख ॥ जाणोनि प्रवर्तती ते मूर्ख ॥ काळमुक अभिलाषी ॥ ९२ ॥ उंडणी लंघू नशके भिंतीसी ॥ तरी चढोंरिघे ते सायासीं ॥ चढतां पडे आपैसी[7] ॥ तेवीं स्वर्गसुखासी दृढपतन ॥ ९३ ॥ कर्माभिमानि वेश पडिपाडें ॥ कामलोभ दृढ वाढे ॥ तेणें दांभिक करणें घडे ॥ क्रोधाचे चढे महा[8] भरितें ॥ ९४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ रजसा घोरसंकल्पाः कामुका अहिमन्यवः ॥ दांभिका मानिनः पापा विहसंत्यच्युतप्रियान् ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ काय करितील बापुडे ॥ शुद्धसत्वें सांडिले[6] फुडे ॥ मग रजोगुणें कामाकडे ॥ झाले धडफुडे अतिकामी ॥ ९५ ॥ तेव्हां उर्वशीच्या अतिआवडी ॥ स्वर्गभोगाची अतिगोडी ॥ या लागीं याग परवडी ॥ पुण्याची जोडी जोडूं धांवे ॥ ९६ ॥ तेथें मंत्रतंत्रद्रव्यशुद्धी ॥ नाहीं यागयजनविधी ॥ तेणें स्वर्ग नव्हेचि त्रिशुद्धी ॥ ठकले दुर्बुद्धी अविहिताचारें[9] ॥ ९७ ॥ तया अल्पकामासाठीं ॥ सर्वांगीं क्रोध उठी ॥ जेवीं परिपाकापाठी ॥ धरी कडुवटी आंबिलकांजी ॥ ९८ ॥ जंवजंव पिकिजे[10] कोरिफडें ॥ तंवतंव कडूपण गाढें ॥ तैसा कामनाशापुढें ॥ क्रोध वाढे अत्युग्र ॥ ९९ ॥ क्रोध काळिया नाग खरा ॥ देत द्वेषाचा फुंफारा ॥ घाली पूज्यतेच्या अकारा ॥ धुधुःकारा साधुनिंदेचा ॥ ॥ १०० ॥ ऐसा क्रोधाचा वसे पाटा ॥ होय तमाचा चोहटा ॥ मग दंभाचे नानवटा ॥ हीन कसाचा खोटा विकरा मांडी ॥ १ ॥ मग जोजो भेटे प्राणिया ॥ त्यासि अभिचार यागक्रिया[11] ॥ लावूनि बाहेर मुदिया ॥ पापाचारें पापिया प्रवृत्ति मांडी ॥ २ ॥ स्वधर्माचे फाडोंवाडें ॥ प्रतिपदीं पाडापडे ॥ अधर्माची खाणी उघडे ॥ समूळ कुडें कर्माचरण ॥ ३ ॥ तेणें पापाचार पिके ॥ गगनचुंबित जाहलीं

---

१ गर्वानें. २ ज्ञानी पुरुषास. ३ आपल्या बुद्धिनें. ४ यज्ञाकडे. ५ भिकारी होवो. ६ सालले असतां. ७ आपले आपण. ८ पूर. ९ निंद्यकर्म करण्यानें. १० पिकते. ११ यज्ञाचे कर्म.

टेंकें ॥ मग अधमोत्तम एकतुकें ॥ घालिती यथासुखें अधर्मघालणी ॥ ४ ॥ तेथें ठाणें देऊनि अभिमाना ॥ वाढविती ज्ञानाभिमाना ॥
मग निंदिती साधुजना ॥ विपुळांती सज्जन उपहासयुक्त ॥ ५ ॥ जगीं सर्वत्र पाहतो दोष ॥ तथापि मान दीधल्या निर्दोष ॥ तरी करूनि
॥ ३ ॥ यां उपहास ॥ करिती सावकाश [1]असदारोपणें ॥ ६ ॥ यापरी अभिमानविदां ॥ पापबुद्धीची दृढबाधा ॥ सहजानुवादें सदा ॥ साधुनिं
दा अनुवादती ॥ ७ ॥ जेकां हरीतें आवडती ॥ ते सदा करिती हरिभक्ती ॥ त्यांतें सदा उपहासिती ॥ अनुवादती गुणदोष ॥ ८ ॥ द्विज
स्मरती हरिनाम ॥ त्यानाव ह्मणती अधर्म ॥ ऐकोनिही नामकीर्तनसंभ्रम ॥ ह्मणती हें परम महापाप ॥ ९ ॥ ऐसा जो हरिनामातें निं
दी ॥ हरिकीर्तनीं दुर्बुद्धी ॥ तो खळ जाणावा त्रिशुद्धी ॥ भजनापवादी दुर्जन ॥ ११० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ वदंति तेऽन्योन्यमुपासित
स्त्रियो गृहेषु मैथुन्यसुखेषु चाशिषः ॥ यजंत्यसृष्टान्नविधानदक्षिणं वृत्त्यै परं घ्नंति पशूनतद्विदः ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्त्रीकामें [2]अतिका
मुक ॥ मैथुनापरतें नाहीं सुख ॥ येणें प्रेमें कामी मूर्ख ॥ स्त्रिया आवश्यक [3]उपासिती ॥ ११ ॥ यापरी मंदबुद्धी ॥ कैसे संवादती शब्दी ॥
मनुष्यजन्म हेचि सिद्धि ॥ नानाभोगविधी भोगावया स्त्रिया ॥ १२ ॥ जें स्त्रीभोगीं सदा सुख ॥ तें त्यागविती ते अतिमूर्ख ॥ [4]वैराग्य
मिसें लोक ॥ ठकिले देख महामूढीं ॥ १३ ॥ सांडूनि गृहभोग अंगना ॥ जयां वैराग्यें उद्भटभावना ॥ ते [5]निजकर्में दंडिले जाणा ॥ ना
गवूनि वना दवडिले दैवें ॥ १४ ॥ काय गृहाश्रमीं देव नसे ॥ मग वना धांवताती पिसे ॥ साचचि देव वनीं वसे ॥ तरीकां मृग ससे [6]न
तरती व्याघ्र ॥ १५ ॥ घालोनियां आसनें ॥ देव भेटता जरी ध्यानें ॥ तरी [7]बकाचीं [8]पाळींगणें ॥ कांपां [9]तत्क्षणें नुद्धरती ॥ १६ ॥ एकां
तरहिवास विवरीं ॥ तेथेंचि भेटता श्रीहरी ॥ तरी न तरोनियां उंदिरीं ॥ कांपां घरोघरीं चिंवताती ॥ १७ ॥ देव सर्वज्ञ चोखडा ॥ तेणें
पशुपक्षियां केला जोंडा ॥ तोही लोकीं मानूनियां वेडा ॥ त्यागाचा गाढा पडिला मोळा ॥ १८ ॥ आनंदा उपस्थ एकायतन ॥ हें वे
दाचें वेदवचन ॥ तेंही न मानूनि अज्ञान ॥ त्यागाचें संपूर्ण मांडिती बंड ॥ १९ ॥ मैथुनीं परम सुख ॥ देवेंचि रचिलें देख ॥ तेंही त्या
गोनियां मूर्ख ॥ [10]वीतरागें लोक संन्यासी होती ॥ १२० ॥ जे जगामाजी केवळ पिशीं ॥ ते स्वयें होती संन्यासी ॥ तो स्त्रीताप बाधी
त्यांसी ॥ मागतां भिकेसी पोट नभरे ॥ २१ ॥ त्यागोनियां निजस्त्रियेसी ॥ कर्मत्यागें होती संन्यासी ॥ देवें दंड देऊनि त्यांसी ॥ लावि
ले भिकेसी दारोदारीं ॥ २२ ॥ हातावरी पावले दंड ॥ खांड मिशा केले मुंड ॥ हिंडती भगवीं गुंडगुंड ॥ हा स्त्रीशापें त्रितंड दंड केला ॥ ३ ॥
॥ २३ ॥ घेऊनियां दोहीं हातीं ॥ उदंड गांडीसि लाविती माती ॥ त्रिकाळ जळीं बुडवीजती ॥ ऐशी स्त्रीशापें ख्याती लाविली त्यासी

---

१ मायेचा आरोप करणें. २ कामानें व्याप्त. ३ प्रार्थितो. ४ वैराग्याच्या निमित्तानें. ५ आपल्या कर्मानें. ६ मोक्षास जात नाहीत. ७ बगळ्यांची ८ पिलें. ९ त्याचवेळीं. १० वैराग्य झालेले.

॥ २४ ॥ लंगोटी लाविली गांडीसी ॥ झोळी आली हातासी ॥ त्याहीवरी दंड देऊनि त्यासी ॥ स्त्रीशापें संन्यासी लाविले भिके ॥ २५ ॥
स्त्रीसुखापरतें नाहीं सुख ॥ स्त्रीत्यागापरता नाहीं दोष ॥ हेंचि नेणोनियां मूर्ख ॥ दंडिले अनेक वैराग्यत्यागें ॥ २६ ॥ स्त्रीसंगेंवीण विविध
भोग ॥ ते जाणावे अतिउद्वेग ॥ निजभाग्यें[1] जे सभाग्य सांग ॥ जे स्त्रीयोगें भोग भोगिती नाना ॥ २७ ॥ हेंचि देवाचें प्रसन्न होणें ॥
जे सदा इष्टभोग भोगणें ॥ ते भोग जेणें त्यागणें ॥ तेंचि क्षोभणें देवाचें ॥ २८ ॥ स्त्रियादिभोग त्यागिले रोकडे ॥ पुढें निजमोक्ष हें वचन
कुडें ॥ यापरी भोळे लोक बापुडे ॥ वैराग्यवादें कुडें नाडिले येथें ॥ २९ ॥ ऐसिऐसिया अनुवादा ॥ करिती परस्परें संवादा ॥ ह्मणती त्या
गाची बुद्धि कदा ॥ आह्मासि गोविंदा देऊं नको ॥ १३० ॥ त्याग करोनि भीक मागणें ॥ त्यापरीस भलें मरणें ॥ मुक्ति देखिली नाहीं को
णें ॥ आपदा भोगणें जन देखे[2] ॥ ३१ ॥ कोणासि तरी मुक्ती ॥ कोठें देखिजेती ॥ तरी ते सांच[3] मानूं नयेती ॥ मिथ्या वदती वैराग्य
त्यागा ॥ ३२ ॥ ऐशी त्यागाची करूनि निंदा ॥ भोग भोगावे ह्मणती सदा ॥ ऐशाऐशिया आशीर्वादा ॥ देती सदा स्वाध्यायासी ॥ ३३ ॥
स्त्रीसुख[4] परम मानून ॥ स्वयें सदा होती स्त्रैण ॥ मग जागृति सुषुप्ति स्वप्न ॥ स्त्रियेचें ध्यान अहर्निशीं[5] ॥ ३४ ॥ नाहीं सद्गुरूचें भजन ॥
नाहीं वृद्धासि पूजन ॥ नाहीं अतिथींसि अन्न ॥ स्त्री आधीन सर्वस्वें ॥ ३५ ॥ स्त्रियेचें दुखवूं नेदी मन ॥ कदा नुल्लंघी स्त्रियेचें वचन ॥
नित्य स्त्रियेचें अनुसंधान ॥ सद्भावें उपासन स्त्रियेचें सदा ॥ ३६ ॥ नाहीं कुळदेवता कुळवृत्ती ॥ नाहीं पिता माता सद्गुरुभक्ती ॥ संप
त्ती वोपी[6] स्त्रियेच्या हातीं ॥ आपण सार्वार्थीं तीआधीन वर्ते[7] ॥ ३७ ॥ ते स्त्रीभोग भोगावयासी ॥ धनार्जन अर्जावयासी ॥ याग आ
रंभी जीविकेसी ॥ केवळ दंभेंसी उदरार्थ ॥ ३८ ॥ ॥ पूर्वश्लोकार्ध ॥ ॥ यजंत्यसृष्टान्नविधानदक्षिणं वृत्त्यै परं घ्नंति पशूनतद्विदः ॥
॥ अर्थ ॥ ॥ यागें व्हावया सर्वसिद्धी ॥ हेही नाहीं दृढबुद्धी ॥ रोकडिये जीविकावधी ॥ उपाय त्रिशुद्धी हाची केला ॥ ३९ ॥ यज्ञदी
क्षेची प्रतिष्ठा ॥ तेणें पूज्य होईन वरिष्ठां ॥ अग्रपूजा माझा वांटा ॥ ऐशिया उत्कंठा आँदरी याग ॥ १४० ॥ ऐशिया नाना विवंचना ॥
आधीं संकल्पूनि मना ॥ मग प्रवर्ते यागयजना ॥ जोडावया धना कृतनिश्चय ॥ ४१ ॥ नपाहे विधिविधाना ॥ नाहीं आदरू मंत्रोच्चा
रणा ॥ नकरी अन्नसंपादना ॥ कोरडे कणा हवन मांडी ॥ ४२ ॥ मी यज्ञ करितों अंगें ॥ ऐसें जगापासी सांगे ॥ आणि तेणें यागयो
गें ॥ चालवी प्रसंगें जीविकायोग[8] ॥ ४३ ॥ स्वयें नेणती विधिविधाना ॥ आणि नपुसती सज्ञाना ॥ परी पशूंचिया हनना[9] ॥ प्रवर्तती
जाणा शठ नष्ट दंभें ॥ ४४ ॥ मग तेथिचा पुरोडाश ॥ सेविती यथासावकाश ॥ आह्मी पवित्र झालों निर्दोष ॥ ऐसाही उल्हास लाग

---

[1] आपल्या दैवानें. [2] पाहे. [3] खरीच. [4] स्त्रीचे सुख. [5] रात्रंदिवस. [6] विकितो. [7] करी. [8] निर्वाह. [9] मारण्यास.

ती करूं ॥ ४५ ॥ मौनता आवाहनबिसर्जना ॥ तेथें कैंची पूजा दक्षिणा ॥ सत्पात्राची अवगणना ॥ करिती हेळणा ज्ञानगर्वें ॥ ४६ ॥ केवळ जीविकेच्या आशा ॥ करूं लागती पशुहिंसा ॥ आह्मी याज्ञिक या अवेशा ॥ पिटिती ठसा[1] तिहीं लोकीं ॥ ४७ ॥ केवळ जीविकेचिया दुराशा ॥ अविधी करिती पशुहिंसा ॥ मज दोष होईल ऐसा ॥ कंटाळा मानसा कदा नुपजे ॥ ४८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रिया विभूत्याऽभिजनेन विद्यया त्यागेन रूपेण बलेन कर्मणा ॥ जातस्मयेनांधधियः सहेश्वरान् सतोऽवमन्यंति हरिप्रियान् खलाः ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ यापरीवर्ततां स्थिती ॥ त्याहीवरी जाहलिया संपत्ती ॥ तैं गर्वाचा भद्रजाती ॥ तैशिया उन्नतीं डुलों लागे ॥ ४९ ॥ कां लेंडिये[2] आला लोंढा ॥ वाहवी वाळलिया लेंडा ॥ कां मर्कठाचिया तोंडा ॥ मदिरेचा भांडा सांपडे जैसा ॥ १५० ॥ तैसा मी एकज्ञाता फुंडा[3] ॥ ह्मणोनि नाचे तडतडां ॥ सज्ञान आह्मापुढां ॥ कवण बापुडा आन आहे ॥ ५१ ॥ ऐशियाहीवरी अदृष्टता ॥ रत्नें मोति लगा वस्तुजाता ॥ गज वाजी नृयान प्राप्ता ॥ तेणें गर्वें इंद्रमाथां मोचे फेडी ॥ ५२ ॥ यज्ञीं यागस्वाहाकारीं ॥ इंद्र आमुची आशा करी ॥ त्याची आह्माहून थोरी ॥ कैशापरी मानावी ॥ ५३ ॥ मग शिष्यसुहृदसज्जनीं ॥ परिवारल्या सेवकजनीं ॥ मजसमान त्रिभुवनीं ॥ समर्थ कोणी असेना ॥ ५४ ॥ जैशीकां कांटीभोंवती हरळी ॥ तैशी शिष्यांची मांदियाळी[4] ॥ ते महिमेच्या गर्वमेळीं ॥ मानी पायांतळीं ध्रुवमंडळ ॥ ५५ ॥ जैसें विंचवा विष थोडें ॥ परी प्रबळेंसि वेदना चढे ॥ तेवीं विद्या थोडी परी गाढें ॥ गर्वाचें फुडें अतिभरितें ॥ ५६ ॥ तो अज्ञानांमाजी सर्वज्ञता ॥ मिरवी आपुली योग्यता ॥ जेवीं अंधारीं खद्योता[5] ॥ सतेजता झगमगी ॥ ५७ ॥ अल्पज्ञाता विद्येसाठीं ॥ वाचस्पतीसि[6] नाणी दृष्टी ॥ जेवीं मुंगी पांखासाठीं ॥ गरुडाचे पृष्ठीं[7] पाय देऊं पाहे ॥ ५८ ॥ निखळ ताबियाचें नाणें ॥ देवों रिघे दामोक्या येसनें ॥ तेणें आपुलेंनि दातेपणें ॥ मानी ठेंगणें बळीतें ॥ ५९ ॥ कर्ण दातत्वें मानिजे फुडा ॥ तोही नमंडे आह्मापुढां ॥ प्रत्यहीं भारसुवर्ण हुडा ॥ उपजे तेणें गाढा दाता कर्ण ॥ १६० ॥ आह्मी निजार्जित वित्तें ॥ दान देवों सत्पात्रातें ॥ मा दातत्वें कर्णातें ॥ विशेष येथें तो कायी ॥ ६१ ॥ सदा अपकारचि जोडे ॥ त्यासिही अल्प उपकार घडे ॥ इतुकियासाठीं न उकल पडे ॥ सर्वस्व रोकडें बुडवी सदा ॥ ६२ ॥ एवं अल्पदानासाठीं ॥ दातत्वाचा त्रिकुटीं ॥ मेघाच्यापरी अतिउद्भटीं ॥ स्वमुखें उठी गर्जत[8] ॥ ६३ ॥ बरवेपणाचेनि पांगे ॥ मदनासि विटावों लागे ॥ सौंदर्यें माझेनि अंगें ॥ दुजें मजजागें असेना ॥ ६४ ॥ कीं खळ बरवेपणासाठीं ॥ राजहंसा नाणी दिठीं ॥ कां आरवली मानी पोटीं ॥ मीही गोमटी सीतेपरीस ॥ ६५ ॥ तेवीं बरवेपणाचा जाण ॥ थोर चढे देहाभिमान ॥ जेवीं देखो

---

[1] छाप. [2] गांवाच्या जवळचा पाणि जाण्याचा मार्ग, (वोढा.) [3] मोठा. [4] समूह. [5] काजव्यास. [6] बृहस्पतीस. [7] पाठीवर. [8] ओरडत.

नि हिरवें रान ॥ ह्मैसा संपूर्ण[1] उन्मादे ॥ ६६ ॥ यावरी काहीं एक पराक्रम ॥ केलिया नमानी तीनही राम ॥ जेवीं गोग्रहणीं संग्राम ॥ शार्यधर्म उत्तराचा ॥ ६७ ॥ कां अंगिचेनि मोंजें ॥ रणशूर नमानी दुजें ॥ तैसा बळाचेनि फुंजें ॥ स्वयें गर्जे मुसमुसित ॥ ६८ ॥ ते आधींच ह्मणविती सज्ञान ॥ त्याहीवरी याज्ञिक हें महिमान ॥ ते याज्ञिक कर्माचरण ॥ दाविती आपण लोकांप्रती ॥ ६९ ॥ आलिया धनिकजनांप्रती ॥ आपुली स्तवी कर्मस्थिती ॥ मग कर्ममुद्रा नानायुक्ती ॥ स्वयें दाविती[2] लौकिका ॥ १७० ॥ ऐशियाही कर्माचारा ॥ ज्ञातत्वाचा गर्व पुरा ॥ जेवीं दिवाभीत अंधारा ॥ निघे बाहेरा दुदावितां ॥ ७१ ॥ अजाचे लेंडोरें पेटे ॥ तेथें ज्योतिज्वाळा कदा नुमटे ॥ परी धुर्कटलें धुपधुपी मोठें ॥ धुवें थिकटें दिग्मंडळ ॥ ७२ ॥ यापरी नानादंभोपाधी ॥ अतिगर्वाच्या उन्मादीं ॥ अंध जाहली सद्बुद्धी ॥ तो साधूतें निंदी हरिहरांसहित ॥ ७३ ॥ जेवीं दाटलेनि कांविळें[3] ॥ दृष्टीतें करी पीवळें ॥ मग देखों लागे सकळें ॥ असतां निर्मळें पीत वर्ण ॥ ७४ ॥ तेवीं निंदोपाधी अतिगर्वी ॥ मंद जाहली प्रज्ञा आंघवी[4] ॥ मग निर्दुष्टीं दोष लावी ॥ शुद्धातें भावी अतिमलिन ॥ ७५ ॥ जो योगियांच्या मुगुटीं ॥ ज्यातें ह्मणती धूर्जटी[5] ॥ त्याची पाहतां राहाटी ॥ दिसे शेवटीं अतिमंद ॥ ७६ ॥ रागें उमा घालीत आगीं ॥ यालागीं याज्ञिकाचे शिरभंगी ॥ सकामतरी मोहनी लागीं ॥ नग्न लागवेगीं पाठी लागे ॥ ७७ ॥ विष्णु सदाचा कपटी ॥ काहीं नदेखों शुद्धदृष्टीं ॥ वृंदा पतिव्रता गोमटी ॥ तेणें केली शेवटीं व्यभिचारिणी ॥ ७८ ॥ जेथें विष्णु व्यभिचारराशी ॥ तो ते वृंदावनीं वृंदेच्यापाशीं ॥ जट्याल कांट्याल मिळती ॥ केवीं साधुत्व त्यासी मानूं आह्मी ॥ ७९ ॥ साधु मानूं सनत्कुमार ॥ त्यांसिही वैकुंठीं क्रोध थोर ॥ शब्दासाठीं हरिकिंकर ॥ जयविजय वीर शापिले ॥ १८० ॥ श्रेष्ठ मानूं चतुरानन[6] ॥ तोहि निलागचि हीन ॥ उमा नोवरी देखोन ॥ ह्मणतां सावधान वीर्य द्रवलें ॥ ८१ ॥ नारद ब्रह्मचारी निजांगें ॥ तोही कृष्णदारा[7] स्वयें मागे ॥ तो कृष्णें ठकविला तत्प्रसंगें ॥ साठी पुत्र वेगें स्नानीं व्याला तो ॥ ८२ ॥ ज्यातें ह्मणती सत्य धर्म ॥ तोही केवळ अधर्म ॥ गोत्रवधाचा संभ्रम ॥ हा पूर्ण अधर्म धर्मासी ॥ ८३ ॥ व्यासतरी जारपुत्र ॥ तेणेंचि कर्मै पराशर ॥ द्वेषिया वसिष्ठ विश्वामित्र ॥ अतिमत्सर परस्परें ॥ ८४ ॥ साधु ह्मणों दुर्वासऋषी ॥ तो छळूं गेला अंबरीषासी ॥ पितृद्रोह[8] प्रल्हादासी ॥ साधुत्व त्यासी केवीं मानूं ॥ ८५ ॥ एवं वाखाणिले पुराणीं ॥ तेही सांच[9] नामनिती मनीं ॥ मा आतांचे वर्तमानीं ॥ साधु कोणी असेना ॥ ८६ ॥ ऐकोनियां अचाट गोष्टी ॥ येर धांवती येरापाठी ॥ एक करिती तोंडपिटी ॥ अतिचावटी उदरार्थ ॥ ८७ ॥ एक मुद्रा आसनीं ॥ एक बसती बकध्यानीं ॥ परी सत्यमाने मनीं ॥ ऐसा साधु कोणी असेना ॥ ८८ ॥

---

१ माजोरे पणानें. २ दाखवितात. ३ कामीन. ४ सगळी. ५ शंकर. ६ ब्रह्मदेव. ७ कृष्णाच्या स्त्रिया. ८ बापाचे वैर ९ खरे.

ऐशी आपुलियाचि युक्तीं ॥ साक्षेपें साधूंतें निंदिती ॥ साधु असती हे वस्ती ॥ अणुमात्र चित्तीं असेना ॥ ८९ ॥ जे जे हरीचे पढियंते ॥ ते ते नावडती तयातें ॥ जेवीं दाखविती दर्पणातें ॥ शोभे निजचितें निर्नासिक ॥ १९० ॥ ज्या ईश्वराचेनि जीतीं वर्तती ॥ तो ईश्वरु आहे नमामिती ॥ तो ईश्वर आहे कोणे स्थिती ॥ ऐक तुजप्रती सांगेन राया ॥ ९१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सर्वेषु शश्वत्तनुभृत्स्ववस्थितं यथा खमात्मानमभीष्टमीश्वरम् ॥ वेदोपगीतं च न श्रृण्वतेऽबुधा मनोरथानां प्रवदंति वार्त्तया ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ जो सर्वभूतांचा ठायीं ॥ निरंतर अंतर नाहीं ॥ [1]समसाम्यें सर्वदा पाही ॥ उणा पुरा कदाही कल्पांतीं नव्हे ॥ ९२ ॥ जो सर्वांमाजी असे सर्वदा ॥ परी सर्वपणा नातळे कदा ॥ जेवीं [2]पद्मपत्र जलस्पंदा ॥ अलिप्त [3]बुद्बुदा असोनि संगें ॥ ९३ ॥ तवीं असोनि सकळजनीं ॥ घटवटेना जनघसणीं ॥ नभ जैसें अलिप्तपणीं ॥ नरचूडामणी सबाह्य ॥ ९४ ॥ तैसें अलिप्तपण न मोडे ॥ परी रची अनंत ब्रह्मांडें ॥ तें ब्रह्मांड आंडें प्रचंडें ॥ वागवी उदंडें अकर्तात्मयोगें ॥ ९५ ॥ यालागीं तो अंतर्यामी ॥ अभिधा बोलिजे नित्य निगमीं ॥ जो सर्वांच्या हृदयग्रामीं ॥ चेतनानुक्रमीं लक्षिजे ॥ ९६ ॥ त्या ईश्वरातें नित्य ध्यातां ॥ आवडी मुखीं नाम गातां ॥ तरी अभीष्टमनोरथा ॥ होय वर्षता अखंड धारीं ॥ ९७ ॥ त्या ईश्वराच्या गातां गोष्टी ॥ सर्व [4]अरिष्टां होय तुटी ॥ जो देखतांचि दृष्टीं ॥ स्वानंदसृष्टी वर्षे तुष्टला ॥ ९८ ॥ एवं सुखदाता तोचि [5]शास्ता ॥ जोकां [6]अंतकाचा नियंता ॥ अकाळ काळासि सत्ता ॥ ज्या भेणें सर्वथा करूं नशके ॥ ९९ ॥ श्वासोच्छ्वासांचिया परिचारा ॥ ज्या भेणें [7]नेमस्त वाजे वारा ॥ त्याचेनि धाकें धरा ॥ नविरवे सागरा जळीं असतां ॥ २०० ॥ ज्याचे आज्ञेवरी जाण ॥ सूर्य चालवी दिनमान ॥ ज्याचे [8]पुरातन आज्ञेन ॥ समुद्र आपण [9]रेखा नुलंघी ॥ १ ॥ ज्यातें सदा गायिलें वेदीं ॥ जो वाखाणिजे उपनिषदीं ॥ त्याची पवित्र कीर्ति दुर्बुद्धी ॥ स्वयें त्रिशुद्धी नायकती कानीं ॥ २ ॥ ज्याचें नाम स्मरतां जाण ॥ सकळ दोषां निर्दळण ॥ ज्याचे [10]कृतांत वंदी चरण ॥ जन्मरण विभांडी ॥ ३ ॥ ज्याची कथा कर्णपुटीं ॥ पडतां विकल्पांचिया कोटी ॥ निर्दळूनि उठाउठी ॥ पडे मिठी परब्रह्मीं ॥ ४ ॥ यापरी जो पवित्रमूर्त्ती ॥ यालागीं वेद सदा वर्णिती ॥ अभाग्य नायकती त्याची कीर्ती ॥ वार्ता करिती मनोरथाच्या ॥ ५ ॥ अस्वल आपुलिया गुणगुणा ॥ नायके वाजत्या निःसाणा ॥ तेवीं नायकोनि हरीच्या गुणा ॥ विषयसंभाषणा आदरें करिती ॥ ६ ॥ यालागीं ते अतिमंद ॥ अविनीत सदा स्तब्ध ॥ विषयालागीं विषयांध ॥ अतिलुब्ध [11]लोलुप तें ॥ ७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ लोके व्यवायामिषमद्यसेवा नित्यास्तु जंतोर्न हि तत्र चोदना ॥ व्यवस्थितिस्तेषु विवाहयज्ञसुराग्रहैरासु निवृत्तिरिष्टा ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ वेदें नकरि

---

१ साम्यावस्थेनें. २ कमलाचे पान. ३ बुडबुडा. ४ विघ्नास. ५ दंड करणारा. ६ यमाचा. ७ नेमका. ८ जुन्या. ९ मर्यादा. १० यम. ११ लोभि.

तां प्रेरणा ॥ विषयावरी सहज वासना ॥ स्वभावें सकळजना ॥ सदा जाण सर्वांसी ॥ ८ ॥ मांससेवन मद्यपाना ॥ मिथुनीभूतमैथुना ॥ ये अर्थीं सर्वजनां ॥ तीव्र वासना सर्वदा ॥ ९ ॥ तेथें सेव्यासेव्यपरवडी ॥ विवंचना कोण निवडी ॥ लागली विषयाची गोडी ॥ ते अनर्थकोडी करितील ॥ २१० ॥ अग्नि लागलिया कापुसा॥ विझवितां न विझे जैसा ॥ तेवीं विषवंता मानसा॥ विवेकें[1] सहसा[2] उपजेना ॥ ११ ॥ झाल्या लोलिंगता[3] बँडिशा[4] ॥ निज मरण विसरे मासा ॥ कां मुठीचणियाच्या शाळा ॥ नळीमाजी अपैसा वानरू अडके ॥ १२ ॥ दूध मिळालिया मांजर ॥ नह्मणे द्विजअंत्यजघर ॥ तेवीं विषयउन्मत्त नर ॥ नकरिती विचार सेव्यासेव्य ॥ १३ ॥ कां खवळल्या विषयचाडें ॥ योनिसंकरू घडेल पुढें ॥ यालागीं वेदें चोखडें ॥ वर्णाश्रमपाडें विभाग केले ॥ १४ ॥ जैसें अफाट पृथ्वीचें अंग ॥ तेथें सप्तद्वीपें करूनि विभाग ॥ मग भिन्नाधिकारें चांग ॥ धरा सांग आक्रमिली ॥ १५ ॥ कां अनावृतमेघजळा॥ धरणें धरूनि घालिजे तळां ॥ मग नेमेंचि ढाळें ढाळा ॥ पिकालागीं जळा काढिजे पाट ॥ १६ ॥ आणि पवना नादाकारा ॥ साधूनि कीजे वाजंतरा ॥ मग जेवीं नानाध्वनि मधुरा ॥ वाजविजे यंत्रा सप्तमस्वरें ॥ १७ ॥ तैसें उच्छृंखळा विषयांसी ॥ वेदें नेमिलें नेमेंसी[5] ॥ तेचि वेदाज्ञा ऐशी ॥ ऐक तुजपासी सांगेन ॥ १८ ॥ आवरावया योनिभ्रष्टा ॥ मैथुनीं विवाहप्रतिष्ठा ॥ लावूनियां निजनिष्ठा ॥ वर्ण वरिष्ठा नेमिले ॥ १९ ॥ ब्राह्मण जातां रजकीपासी ॥ ते तंव कडू नलगे त्यासी ॥ रजक जातां ब्राह्मणीपाशीं ॥ तिखट त्यासी ते नलगे ॥ २२० ॥ भलती स्त्री भलता नर ॥ मैथुनीं होय वर्णसंकर ॥ तो चुकवावया प्रकार ॥ विवाहनिर्धार नेमिला वेदें ॥ २१ ॥ धर्मपत्नीपाणिग्रहण ॥ विवाह नेमिला सवर्ण ॥ तेथें सप्तम पंचम त्यजून ॥ स्वगोत्रीं लग्न करूं नये ॥ २२ ॥ तीन्ही वेद तीन्ही वर्ण ॥ वेदें सांडूनियां जाण ॥ सवेद आणि सवर्ण ॥ पाणिग्रहण नेमिलें ॥ २३ ॥ कन्या सवेद सवर्ण ॥ जीसि नाहीं रजोदर्शन ॥ तेहि पित्यापासी याचून ॥ करावें लग्न विधानोक्त ॥ २४ ॥ धर्म अर्थ कामाचरण ॥ अन्यत्रीं[6] नकरावें आपण ॥ ऐशी वाहूनियां आण ॥ पाणिग्रहण वेदोक्त ॥ २५ ॥ करितां वधूवरां पाणिग्रहण ॥ साक्षी देत द्विज देव हुताशन[7] ॥ इतर स्त्रिया माते समान ॥ स्वदारागमन[8] नेमिलें वेदें ॥ २६ ॥ एवं नेमूनियां विवाहासी ॥ वेदरायें दिली आज्ञा ऐशी ॥ सांडवूनि सकळ स्त्रियांसी ॥ स्वदारेसी मैथुन ॥ २७ ॥ दिवसां मैथुन नाहीं स्त्रियेसी ॥ रात्रीं त्यजूनि पूर्वपर प्रहरांसी ॥ मैथुन स्त्रियेपासी ॥ मध्यरात्रीसी नेमस्त ॥ २८ ॥ नेमिलें स्वदारा मैथून ॥ तेंही अहोरात्र नाहीं जाण ॥ प्रजार्थ स्त्रीसेवन ॥ ऋतुकाळीं गमन नेमस्त ॥ २९ ॥ ऋतुकाळीं ज्या स्त्रीगमन ॥ ते पुरुष ब्रह्मचारी पूर्ण ॥ वेद निवृत्तिपर जाण ॥ त्या

---

[1] विचार. [2] कधीही. [3] लोभ. [4] मांसास. [5] नेमानें. [6] दुसरे ठिकाणी. [7] अग्नि. [8] आपले स्त्रीशीं गमन.

गरूपें आपण भोगातें नेमी ॥ २३० ॥ आत्मा वै पुत्रनामासी ॥ पुत्रझालिया स्त्रियेसी ॥ संग करूंनये स्त्रीपासी ॥ शनैःशनैः[1] विषयांसी
त्यागवी वेद ॥ ३१ ॥ सेवावया आमिषा[2] ॥ वेदें नेम केला कैसा ॥ नघडावया पशुहिंसा ॥ संकट आयासा स्वयें द्योतीं[3] ॥ ३२ ॥
आवडी खावया मांसा ॥ अथवा स्वर्गाचिया आशा ॥ जे करिती पशुहिंसा ॥ तयां पुरुषां अधःपतन ॥ ३३ ॥ निष्कामकर्मीं पशुहिंसा ॥
करी तरी तो निष्काम कैसा ॥ तेथें निगमाचा नेम ऐसा ॥ मुख्य अहिंसा सर्व धर्मीं ॥ ३४ ॥ नित्य न करावया मांसभक्षण ॥ यज्ञीं
पुरोडाशसेवन ॥ तेंही परिमित जाण ॥ स्वेच्छामांसादन वारिलें वेदें ॥ ३५ ॥ याग करूनि सौत्रामणी ॥ प्रवर्तावें सुरापानीं[4] ॥ हे वेदाज्ञा
जो सत्य मानी ॥ तो स्वधर्माचरणीं नागवला ॥ ३६ ॥ जेकर्मीं मद्यपान घडे ॥ तो स्वधर्म ह्मणतां जीभ झडे ॥ लोलुप तें भुलले
बापुडे ॥ वेद विषयाकडे वोढिती ॥ ३७ ॥ याग करितां सौत्रामणी ॥ स्वयें नव्हावें मद्यपानी ॥ तें यज्ञशेष अवघ्राणीं ॥ परी सर्वथा
वदनीं घालुंनये ॥ ३८ ॥ हें विषयाचें त्रिविध विंदान ॥ मैथुन मांसभक्षण सुरापान ॥ यदर्थीं निवृत्तीचि[6] प्रमाण ॥ हें मनोगत पूर्ण वेदाचें
॥ ३९ ॥ विषयांपासूनि निवृत्ती ॥ वेद विभागें हेंचि द्योती ॥ परी धरावी विषयासक्ती ॥ हे वेदोक्ती सर्वथा नघडे ॥ २४० ॥ वेंचोनियां[7]
निजधन ॥ करोनियां विवाह यज्ञ ॥ सेवावें मद्य मांस मैथुन ॥ हें वेदवचन कदा न घडे ॥ ४१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ धनं च धर्मैकफलं
यतो वै ज्ञानं सविज्ञानमनुप्रशांति ॥ गृहेषु युंजंति कलेवरस्य मृत्युं न पश्यंति दुरंतवीर्यम् ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ नायकोनि
भगवत्कथा ॥ ज्ञानाभिमानी नाडले तत्त्वतां ॥ धनें परमार्थ यावा हाता ॥ तोही स्वधर्मता नलाविती धर्मीं ॥ ४२ ॥ विषयांचिया कामना
॥ सर्वस्वें वेंचिती धना ॥ तेंचि धर्मार्थ वेंचितां जाणा ॥ सांडिती प्राणा कवड्यासाठीं ॥ ४३ ॥ जया धनाचेनि पांगें ॥ हा धर्मचि
आलासे निजांगें ॥ जेवीं पायाळाचेनि योगें ॥ महानिधि वेगें आतुडे हातीं ॥ ४४ ॥ बीज तेथें द्रुमफळ ॥ चंदन तेथें परिमळ ॥
जळाचाठायीं केवळ ॥ नांदती सकळ रसस्वाद ॥ ४५ ॥ देह तेथें असे कर्म ॥ रूप तेथें वसे नाम ॥ धन तेथें उत्तमोत्तम ॥ सकळ
धर्म सदा वसती[8] ॥ ४६ ॥ तेवीं धनाचिया पाटोवाटीं ॥ परधर्मैंसी पडे गांठी ॥ धर्म तेथें उठाउठी ॥ ज्ञानाची भेटी विज्ञानेंसी[9] ॥ ४७ ॥
चंद्रास्तव वाढती कळा ॥ जीवनास्तव जिव्हाळा ॥ तेवीं धनास्तव सोज्वळा ॥ धर्माचा सोहळा धार्मिकांघरीं ॥ ४८ ॥ जेवीं एकादशीव्रतयोगें
॥ जागरीं गीतनृत्य पांगे ॥ तुष्टला देव लागवेगें ॥ आतुडे धनयोगें निजभक्ता करीं ॥ ४९ ॥ धर्म तेथें शुद्धज्ञान ॥ ज्ञान
तेथें विज्ञान ॥ विज्ञान तेथें समाधान ॥ शांति संपूर्ण नांदे तेथें ॥ २५० ॥ एवढें फळ ज्या धनापासी ॥ मूर्ख वेंचिती विषयासी ॥ देह

---

१ हळु हळु. २ मांसास. ३ सांगे. ४ दारुपिण्याविषयीं. ५ तोंडांत. ६ टाकणेच. ७ खर्चून. ८ राहती. ९ अनुभवानें.

लोभें भुललीं पिसीं ॥ अंगीच्या मृत्यूची विसरले ॥ ५१ ॥ जळतें घरीं ठेंवा ठेंवणें ॥ मरत्या देहा सुरवाडवर्णे ॥ नागवला वेद ह्मणे ॥ तें वेदाचें बोलणें नायके कोणी ॥ ५२ ॥ उपजलेनि दिवसदिवसें ॥ देहातें काळ ग्रासीतसे ॥ हें नित्य नवें मरण कैसें ॥ देहलोभ वशें विसरले ॥ ५३ ॥ ज्याचे त्या देखतां कैसा ॥ काळ गिळी बाळवयसा ॥ मग तारुण्याची दशा ॥ मुरडूनि घसा ग्रासी काळ ॥ ५४ ॥ गिळोनियां तारुण्यपण ॥ आणि वार्धक्यें कंपायमान[2] ॥ ऐसें काळाचें विंदान ॥ दुर्धर पूर्ण ब्रह्मादिकां ॥ ५५ ॥ जयाचेनि चपेटघातें ॥ मरण आणी अमरातें[3] ॥ मा मूर्ख तेथें जीवितातें ॥ अक्षय चित्तें दृढ मानिती ॥ ५६ ॥ मुळीं देहचि तंव अनित्य ॥ मग तेथींचे भोग काय शाश्वत[4] ॥ परी धन वेंचूनि विषयार्थ ॥ भुलले जाणा भ्रांत स्त्रीलोभें ॥ ५७ ॥ ऐसें नश्वर भोग जगीं ॥ ते भोगावया रिघावें स्वर्गी ॥ तदर्थ प्रवर्तती यागीं[5] ॥ लागवेगीं भोगेच्छा ॥ ५८ ॥ सुख भोगावया वेगीं ॥ पतंग जेवीं उडी घाली आंगीं[6] ॥ तेवीं इहामुत्र भोगीं ॥ पतनालागीं पावती ॥ ५९ ॥ स्त्री आमिष मद्यपान ॥ हे वेदोक्त भोग जाण ॥ तेथें केवीं घडे पतन ॥ तें वेदविधान नेणती मूर्ख ॥ २६० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यद्घ्राणभक्षो विहितः सुरायास्तथा पशोरालभनं न हिंसा ॥ एवं व्यवायः प्रजया न रत्या इमं विशुद्धं न विदुः स्वधर्मम् ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ ॥ वेदविहित कर्माचरण ॥ तेथें सर्वथा नव्हे पतन[7] ॥ जेथें चुके विधिविधान ॥ तेथें पावे पतन सज्ञान ॥ ६१ ॥ वेदींच्या अर्थवादासरिसा ॥ मनीं बांधोनि भोगाशा ॥ यज्ञमिषें पशुहिंसा ॥ भोगलिप्सा करूं धांवती ॥ ६२ ॥ वेदें बोलिलें आलभन ॥ त्या नाव ह्मणती पशुहनन ॥ हें सकाम मानिती विधान ॥ निष्कामा हनन कदा नघडे ॥ ६३ ॥ निष्कामकामासि जाण ॥ स्वधर्मार्थ करावे यज्ञ ॥ तेथें पशूचें आलभन ॥ सर्वथा हवन करूंनये ॥ ६४ ॥ पशूचें करूंनये हनन[8] ॥ देवतोद्देशें अंगस्पर्शन[9] ॥ यानांव बोलिजे आलभन ॥ हें यज्ञाचरण निष्काम ॥ ६५ ॥ हरिश्चंद्राच्या यागीं ॥ शुनःशेपपशुप्रसंगीं ॥ तेणें घाव लागों ने दितां अंगीं ॥ वेदोक्तप्रयोगीं यज्ञ सिद्धी केली ॥ ६६ ॥ वेदोक्तमंत्रभागार्थ ॥ देवां करवी करोनि समस्त ॥ आपण झाला निर्मुक्त ॥ हा ऋग्वेदार्थ ब्राह्मणीं ॥ ६७ ॥ यापरी पशुघात ॥ यज्ञीं नलगे निश्चित ॥ तो हरिश्चंद्र यागार्थ ॥ पशुघात निवारी ॥ ६८ ॥ तेथें मी मांसकाचें मत ॥ देवतोद्देशें जो पशुघात ॥ यानाव आलभन[10] ह्मणत ॥ स्वर्गफलार्थ आवश्यक ॥ ६९ ॥ केवळ मांसभक्षणार्थ ॥ जे करिती पशुघात ॥ हिंसादोष तेथें प्राप्त ॥ ऐसें बोलती मीमांसक ॥ २७० ॥ देवतोद्देशें पशूचा घात ॥ तेणें स्वर्गभोग होय प्राप्त ॥ तोही भोगक्षयें क्षया[11] जात ॥ तेणें हिंसा प्राप्त याज्ञिकां ॥ ७१ ॥ याग[12] करितां सौत्रामणी ॥ पुरोडाश घ्यावा अवघ्राणीं ॥ परी प्रवर्तावें सु

---

१ ठेव. २ कांपतो. ३ देवांस. ४ निरंतर. ५ यज्ञांत. ६ अग्नींत. ७ नरक. ८ नाश. ९ अंगास हात लावणें. १० स्पर्श. ११ नाशास. १२ यज्ञ.

रापानीं ॥ हें वेदविधानीं असेना ॥ ७२ ॥ एवं जेथें पशुहनन ॥ तें कर्म सदोष पूर्ण ॥ यालागीं तेथें अधःपतन ॥ बोलिलें जाण याज्ञिकांसी ॥ ७३ ॥ वेदें लिहिलें पाणिग्रहण ॥ तें प्रजार्थ स्वदारागमन ॥ परी रत्यर्थ नित्य मैथुन ॥ हे वेदाज्ञा जाण असेना ॥ ७४ ॥ मद्यमांसमैथुनप्रसंग ॥ स्वइच्छां नकरावया भोग ॥ वेदें द्योतिला विवाह याग ॥ भोगत्यागनियमार्थ ॥ ७५ ॥ नेणोनियां ऐशा शुद्ध कर्मा ॥ यागमिषें अधर्मा ॥ प्रवर्तोनि काम्यकर्मा ॥ भोगसंभ्रमा भोगिती मूर्ख ॥ ७६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ये त्वनेवंविदोऽसंतः स्तब्धाः सदभिमानिनः ॥ पशून्द्रुह्यंति विस्रब्धाः प्रेत्य खादंति ते च तान् ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ नेणोनि शुद्ध वेदविधानातें ॥ अतिगर्वाचेनि उद्धतें ॥ आपणिया मानूनि ज्ञाते ॥ अविधी पशूतें घात करिती ॥ ७७ ॥ केवळ अभिचारमतें ॥ पावोनि सकळभोगांतें ॥ ऐशिया मानोनि विश्वासातें ॥ स्वेच्छां पशूतें घात करिती ॥ ७८ ॥ अविधी पशूतें वधिती ॥ त्या याज्ञिकांचे देहांतीं ॥ मारिले पशू मारूं येती ॥ झळकत कांती घेऊनियां ॥ ७९ ॥ एवं निमालिया याज्ञिकासी ॥ भक्षिले पशु भक्षिती त्यासी ॥ जैसें सेविलें विष प्राणियांसी ॥ ग्रासी प्राणांसी समूळ ॥ २८० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ द्विषंतः परकायेषु स्वात्मानं हरिमीश्वरम् ॥ मृतके सानुबंधेऽस्मिन्बद्धस्नेहाः पतंत्यधः ॥ ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ परमात्मा जो श्रीहरी ॥ तो अंतर्यामी सर्वशरीरीं ॥ तेथें पराचा जो द्वेष करी ॥ तेणें द्वेषिला हरी निजात्मा ॥ ८१ ॥ परासि जो करी अपघात ॥ तेणें केला निजात्मघात ॥ त्यासि सकुटुंब अधःपात ॥ रौरवांत ते बुडती ॥ ८२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ये कैवल्यमसंप्राप्ता ये चातीताश्च मूढताम् ॥ त्रैवर्गिका ह्यक्षणिका आत्मानं घातयंति ते ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ सज्ञानी स्वतां तरती ॥ अज्ञानी सज्ञाना शरण येती ॥ तेणें त्यांसि कैवल्यप्राप्ती ॥ त्यांच्या वचनोक्तिविश्वासें ॥ ८३ ॥ जे अज्ञान सज्ञान ॥ ज्यांसि केवळ ज्ञानाभिमान ॥ ज्यांचें विषयीं लोलुप मन ॥ ते पुरुष जाण आत्मघाती ॥ ८४ ॥ साधावया अर्थकाम ॥ जे करिती अभिचारधर्म ॥ हें त्रैवर्णिक घोर कर्म ॥ आत्मघाती परम ज्याचे त्यासी ॥ ८५ ॥ देहाचिया गोमटिया ॥ जे करिती अभिचारक्रिया ॥ तेणें कर्में आपण आपणियां ॥ स्त्रजिला राया निजघात ॥ ८६ ॥ जो स्वयें बैसली खांदी तोडी ॥ तो खांदीसहित पडे बुडीं ॥ तेवीं काम्यकर्माच्या वोढी ॥ क्रियेसि रोकडीं अधःपात ॥ ८७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एत आत्महनोऽशांता अज्ञाने ज्ञानमानिनः ॥ सीदंत्यकृतकृत्या वै कालध्वस्तमनोरथाः ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ ॥ कामी क्रोधी अतिअद्भुत ॥ क्रूरकर्मी जे आसक्त ॥ तिहीं आपआपणा अनहित ॥ निजात्मघात जोडिला ॥ ८८ ॥ स्वयें कर्म करिती अविधी ॥ तेचि ह्मणती शुद्धविधी ॥ अज्ञान तेंचि प्रतिपदीं ॥ ज्ञान त्रिशुद्धी ह्मणो

---

१ पशूचा नाश. २ लग्न. ३ यज्ञाच्या निमित्तानें. ४ आपल्या इच्छेनें. ५ मरण पावलेल्या. ६ दुसऱ्याचा. ७ लोभी. ८ नरक. ९ आपल्या आत्म्याचा नाश.

नियां ॥ ८९ ॥ जे काम्यकर्मीं छळिले ॥ विषयबुद्धीं आकळिले ॥ निजहितासी ठकले ॥ मग अंतरले सद्बुद्धीसी ॥ २९० ॥ गर्वादिज्वरितमुखें ॥ गोडपणीं कडू ठांके ॥ विषप्राय विषयसुखें ॥ अतिहरिखें सेविती ॥ ९१ ॥ ऐशा विषयालागीं पहाहो ॥ आप्त मानूनि निजदेहो ॥ रचूनि नाना उपावो ॥ अर्थसंग्रहो स्वयें करिती ॥ ९२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ हित्वात्मायासरचिता गृहापत्यसुहृच्छ्रियः ॥ तमो विशंत्यनिच्छंतो वासुदेवपराङ्मुखाः ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ ॥ मरणेंसि झटें घेत ॥ श्री मेळविती श्रीमंत ॥ गृह दारा पुत्र वित्त ॥ नाना वस्तुजातसंग्रह ॥ ९३ ॥ ऐसे भोग आयासयुक्त ॥ सांडूनि ज्ञानगर्वीं समस्त ॥ ज्ञानाभिमानें नेइजेत ॥ अंधतमांत अतिगर्वें ॥ ९४ ॥ जेथें अंधाराचे डोळे ॥ होऊन ठाकती अंधळे ॥ तेथें मोहरात्रीचें काळें ॥ अंधतममेळें अधिककांटे ॥ ९५ ॥ जया अंधारातें प्रकाशूं[1]येतां ॥ निखळ काळा होय सविता ॥ जेथें गाढ मूढ अवस्था ॥ अतिमौढ्यता स्वयें पावे ॥ ९६ ॥ जेथें सुषुप्तिसी झोंप लागे ॥ आळसु आळसिजे सर्वांगें ॥ तेथें घर बांधोनि निजांगें ॥ निंदाक्रोध दोघे सदा वसती[3] ॥ ९७ ॥ तेथें भजन विमुखनरा ॥ अधःपतन अभिमानद्वारा ॥ जेवीं अंथावी[4] पडिला चिरा ॥ तेवीं बाहेरा निघों नशके ॥ ९८ ॥ जे वासुदेवीं सदा विमुख ॥ ज्यांसि हरिभजनीं नाहीं हरिख ॥ त्यांची दशा हे अधोमुख ॥ तीदुःखें दुःख भोगिती ॥ ९९ ॥ ऐशी अभक्तांची गती ॥ सांगीतली आहाचस्थिती ॥ वांचूनि त्यांची दुर्गती ॥ वाग्देवता भिती स्पष्ट वदतां ॥ ३०० ॥ अभक्तांची गति बोलणें ॥ यापरीस चांग मुकें होणें ॥ प्राण जावोकां सर्वप्राणें ॥ परी ते दोष कोणें बोलावें ॥ १ ॥ राया तुझिया प्रश्नकाजीं ॥ हे दशा बोलणें पडे आजी ॥ येऱ्हवीं अभक्तवादें आह्मांमाजी ॥ वाचेचि पां जी विटाळली नाहीं ॥ २ ॥ यावरी आतां नृपनाथा ॥ वक्ता आणि समस्त श्रोता ॥ रामस्मरणें तत्त्वतां ॥ वाचेसि प्रायश्चित्ता सवें कीजे ॥ ३ ॥ ऐकोनि अभक्तांची गती ॥ अतिशयेंसीं दुःखप्राप्ती ॥ राजा कंटाळला चित्तीं ॥ यालागीं निश्चितीं हरिनाम स्मरे[5] ॥ ४ ॥ ज्या स्मरविलें हरीतें ॥ तोचि यासी पुसों येथें ॥ युगायुगीं भक्त त्यातें ॥ कोणे विधीतें भजन करिती ॥ ५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ राजोवाच कस्मिन्काले स भगवान् किं वर्णः कीदृशो नृभिः ॥ नाम्ना वा केन विधिना पूज्यते तदिहोच्यताम् ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ ॥ ज्याचेनि स्मरणें तत्त्वतां ॥ कर्माकर्में नुघविती[6] माथा ॥ त्या भगवंताची कथा ॥ माझिया हितालागीं सांगा ॥ ६ ॥ जो परमात्मा श्रीहरी ॥ तो सृष्ट्यादि युगयुगांतरीं ॥ कोणें नामें रूपें वर्णाकारीं ॥ भक्त कैशापरी पूजिती ॥ ७ ॥ आणि ते काळीच्या प्रजा ॥ कैसेनि यजिती अधोक्षजा ॥ कवणें विधि करिती पूजा ॥ तें योगिराजा सांगिजे ॥ ८ ॥ तुमचे मुखींचें कृपावचन ॥ त्यापुढें अमृतही गौण[7] ॥ वचनें परमानंद पूर्ण ॥

---

१ प्रकाश करण्यास. २ सूर्य. ३ राहती ४ अडचणीचे जाग्यांत. ५ स्मरण करितो. ६ वर करीत नाहींत. ७ कमी.

जन्म मरण उच्छेदी[1] ॥ ९ ॥ त्याहीमाजी भवद्गुण ॥ युगानुवर्ती नारायण ॥ त्याचें भजनपूजनविधान ॥ कृपा करून सांगिजे स्वामी॥
॥ ३१० ॥ ऐकोनि रायाचें वचन ॥ संतोषले अवघेजण ॥ जाणोनि हरिगुणांचा प्रश्न ॥ कनिष्ठ करभाजन बोलता झाला ॥ ११ ॥
॥ ८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ करभाजनउवाच ॥ ॥ कृतं त्रेता द्वापरं च कलिरित्येषु केशवः ॥ नानावर्णाभिधाकारो नानैव विधिनेज्यते ॥ २० ॥
॥ टीका ॥ ॥ नानावर्ण नानाकारें ॥ नानानाम नानोपचारें ॥ कृतत्रेताद्वापारें ॥ भक्त निर्धारें केशवू यजिती ॥ १२ ॥ ककार ब्रह्मा
वकार विष्णु ॥ शकार स्वयें त्रिनयनु ॥ केशव तो गुणविहीनु ॥ प्रकाशक पूर्णु तिहींचा ॥ १३ ॥ केशव केशव अर्ध मात्रा ॥ नये व्यक्ताव्यक्त
उच्चारा ॥ व्याप्येंवीण व्यापक खरा ॥ सबाह्याभ्यंतरा ऐकत्वें[2] ॥ १४ ॥ तोचि युगपरत्वें स्वरूपनाम ॥ भजनविधि क्रिया धर्म
॥ भक्त पूजिती पुरुषोत्तम ॥ तो अनुक्रम अवधारी[3] ॥ १५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कृते शुक्लश्चतुर्बाहुर्जटिलो वल्कलांबरः ॥ कृष्णाजिनोपवीताक्षान्
बिभ्रद्दंडकमंडलून् ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥ कृतयुगीं श्वेतवर्णधर[4] ॥ जटिल चतुर्भुज वल्कलांबर[5] ॥ दंडकमंडल्वंकित
कर ॥ अजिन ब्रह्मसूत्र अक्षमाला हातीं ॥ १६ ॥ ब्रह्मचर्यें दृढव्रत ॥ ये चिन्हीं चिन्हांकित ॥ परमात्मा मूर्तिमंत ॥ कृतयुगीं भक्त यापरी
यजिती[6] ॥ १७ ॥ श्लोक ॥ मनुष्यास्तु तदा शांता निर्वैराः सुहृदः समाः ॥ यजंति तपसा देवं शमेन च दमेन च ॥ २२ ॥ ॥ टीका ॥
तेकाळींचे सकळ नर ॥ सदा शांत निर्वैर ॥ समताबुद्धि निरंतर ॥ सुहृन्मित्र परस्परें ॥ १८ ॥ तें तपें करावें देवयजन[7] ॥ त्या तपाचें मुख्य
लक्षण ॥ शम दम साधूनि संपूर्ण ॥ भगवद्भजन स्वयें करिती ॥ १९ ॥ तें देवाचें नामोच्चारण ॥ दशधा नामीं नामस्मरण ॥ तेंचि नामें
कोणकोण ॥ ऐक सावधान नृपनाथा ॥ ३२० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ हंसः सुपर्णो वैकुंठो धर्मो योगेश्वरोऽमलः ॥ ईश्वरः पुरुषोऽव्यक्तः
परमात्मेति गीयते ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ हंस सुपर्ण वैकुंठ ॥ धर्म योगेश्वर श्रेष्ठ ॥ अमल[8] ईश्वर वरिष्ठ ॥ पुरुष अव्यक्त नामपाठ
परमात्मा ह्मणती ॥ २१ ॥ तेकाळींचे भक्त श्रेष्ठ ॥ नामाचा नामपाठ ॥ गायन करिती घडघडाट ॥ भवसंकट निर्दाळिती ॥ २२ ॥ हें
कृतयुगींचें यजन ॥ तुज सांगितलें संपूर्ण ॥ आतां त्रेतायुगींचें भजन ॥ मूर्तीचें ध्यान तें ऐक ॥ २३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ त्रेतायां रक्तवर्णोऽसौ
चतुर्बाहुस्त्रिमेखलः ॥ हिरण्यकेशस्त्रय्यात्मा स्रुक्स्रुवाद्युपलक्षणः ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ त्रेतीं यज्ञमूर्ति पुरुषोत्तम ॥ रक्त ॥ ६ ॥
वर्ण ज्वलनोपम ॥ पिंगकेश निर्धूम ॥ देवदेवोत्तम चतुर्बाहू[9] ॥ २४ ॥ तया यज्ञपुरुषा निर्मळा ॥ त्रिगुणांची त्रिमेखळा ॥ वेदत्रयीचा पूर्ण
मेळा ॥ मूर्तीचा सोहळा तदात्मकची ॥ २५ ॥ स्रुक् स्रुवा पाणिग्रहण ॥ हेंचि तयाचें उपलक्षण ॥ त्रेतायुगीं नारायण ॥ येणें रूपें जाण

---

[1] नाहींसें करते. [2] एकरूपानें. [3] ऐक. [4] पांढरा वर्ण धारण करणारा. [5] झाडाचे सालीचे आहे वस्त्र ज्यास. [6] पूजिती. [7] देवाचे पूजन. [8] निर्मल. [9] चार आहेत हात ज्यास.

निजभक्त ध्याती ॥ २६ ॥ ॥श्लोक ॥ ॥ तं तदा मनुजा देवं सर्वदेवमयं हरिम् ॥ यजंति विद्यया त्रय्या धर्मिष्ठा ब्रह्मवादिनः ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ तैंचे जे मनुष्य जाण ॥ त्रिवेदीं करिती भजन ॥ सर्वदेवस्वरूप हरि पूर्ण ॥ यापरी यजन त्रेतायुगीं ॥ २७ ॥ त्रेतायुगीं सर्वही नर ॥ वेदोक्तीं नित्य सादर ॥ सर्वही भजनतत्पर ॥ धर्मिष्ठ समग्र अतिधार्मिक ॥ २८ ॥ ते धर्मिष्ठ धार्मिकजन ॥ अष्टधा नामीं नामस्मरण ॥ गजरें करिती सदा पठण ॥ तें नामाभिधान ऐक राया ॥ २९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विष्णुर्यज्ञः पृश्निगर्भः सर्वदेव उरुक्रमः ॥ वृषाकपिर्जयंतश्च उरुगाय इतीर्यते ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ॥ विष्णु यज्ञ पृश्निजन्म ॥ सर्वदेव उरुक्रम ॥ वृषाकपि जयंत नाम ॥ उरुगाय परम नामें स्मरती ॥ ३३० ॥ द्वापरीं भगवत्ध्यान ॥ तेयुगींचें पूजाविधान ॥ भक्त कैसें करिती भजन ॥ नामस्मरण तें ऐक ॥ ३१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ द्वापरे भगवान् श्यामः पीतवासा निजायुधः ॥ श्रीवत्सादिभिरंकैश्च लक्षणैरुपलक्षितः ॥ २७ ॥ ॥टीका ॥ ॥ द्वापरीं घनश्यामवर्ण ॥ अंतसीपुष्पप्रभासमान ॥ पीतांबरपरिधान ॥ श्रीवत्सचिन्हअंकित ॥ ३२ ॥ शंख चक्र पद्म गदा ॥ चारी भुजा सायुधा ॥ इहीं लक्षणीं गोविंदा ॥ लक्षिती सदा निजभक्त ॥ ३३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तं तदा पुरुषं मर्त्या महाराजोपलक्षणम् ॥ यजंति वेदतंत्राभ्यां परं जिज्ञासवो नृप ॥ २८ ॥ ॥टीका ॥ ॥ शशांकछत्र मणिचामर ॥ राजलक्षणीं राजोपचार ॥ यापरी द्वापरींचे नर ॥ अतिसादर पूजेसी ॥ ३४ ॥ शीघ्र पावावया परात्पर ॥ वैदिक तांत्रिक पूजा मिश्र ॥ तत्त्वजिज्ञासु करिती नर ॥ भजनतत्पर या रीतीं ॥ ३५ ॥ ते काळींचें नामस्मरण ॥ जेणें होय कलिमलदहन ॥ त्या नामाचें अभिधान ॥ ऐक सांगेन नृपनाथा ॥ ॥ ३६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नमस्ते वासुदेवाय नमः संकर्षणाय च ॥ प्रद्युम्नायानिरुद्धाय तुभ्यं भगवते नमः ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ वासुदेवा तुज लोटांगण ॥ संकर्षणा तुज नमन ॥ प्रद्युम्ना प्रणाम पूर्ण ॥ अभिवंदन अनिरुद्धा ॥ ३७ ॥ नारायणा ऋषिवरा ॥ महापुरुषा सुरेंद्रा ॥ विश्वरूपा विश्वेश्वरा ॥ महात्म्या श्रीवरा नमन तुज ॥ ३८ ॥ सर्वभूतीं भूतात्मा ॥ तुज नमो पुरुषोत्तमा ॥ द्वापरीं ऐशिया नामा ॥ नृपोत्तमा सदा स्मरती ॥ ३९ ॥ त्या नामाच्या पाठा ॥ तेणें देवासि संतोष मोठा ॥ वेगीं सांडोनि वैकुंठा ॥ धांवे अंवचटा कीर्तनामाजी ॥ ३४० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ इति द्वापर उर्वीश स्तुवंति जगदीश्वरम् ॥ नानातंत्रविधानेन कलावपि यथा शृणु ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ ॥ याहीं नामीं स्तुतिस्तवन ॥ द्वापरींचें करिती जन ॥ आतां कलियुगीचें भजन ॥ तंत्रोक्तविधान ऐक राया ॥ ४१ ॥ श्लोक ॥ कृष्णवर्णं त्विषा कृष्णं सांगोपांगास्त्रपार्षदम् ॥ यज्ञैः संकीर्तनप्रायैर्यजंति हि सुमेधसः ॥ ३२ ॥ ॥टीका ॥ ॥ कलियुगीं श्रीकृष्णदेवो ॥

---

१ वेदाचे वचनाविषयीं. २ ईश्वराचे ध्यान. ३ जासंदीचे फुलाप्रमाणें कांति. ४ ध्यान करितात. ५ ब्रह्म जाणण्याची इच्छा करणारे. ६ अवचित.

वर्णू कृष्णचि प्रभावो ॥ प्रभा इंद्रनीळकीळसमुदावो ॥ मूर्ति तैशी पाहाहो शोभायमान ॥ ४२ ॥ मूर्ति सर्वावयवीं सांग ॥ वेणुविषाणादि उपांग ॥ चारी भुजा पराक्रमी चांग ॥ आयुधें अव्यंग शंखचक्रादिक ॥ ४३ ॥ पृष्ठभागीं निजपार्षद ॥ नंदसुनंदादि सायुध ॥ कलियुगीं प्रज्ञाप्रवुद्ध ॥ यापरी गोविंदा चिंतिती सदा ॥ ४४ ॥ मधुपर्कादिक विधान ॥ सांग केलें जें पूजन ॥ तेंही मानोनियां गौण ॥ आवडे कीर्तन कलियुगीं कृष्णा ॥ ४५ ॥ नवल कैसें राजाधिराजा ॥ कीर्तन तेंचि महापूजा ॥ ऐशी ज्या आवडी अधोक्षजा ॥ कीर्तनें गरुडध्वजा उल्हास सदा ॥ ४६ ॥ कीर्तन पढियें गोविंदा ॥ यालागीं सन्मानी नारदा ॥ तो कृष्णकीर्ती पुढें सदा ॥ नामानुवादा गर्जत ॥ ४७ ॥ कीर्तन करितां नामानुवाद ॥ संकटीं रक्षिला प्रल्हाद ॥ कीर्तनें तुष्टे गोविंद ॥ छेदी भवबंध दासांचा ॥ ४८ ॥ गजेंद्रें नामस्मरण ॥ करितां पावला नारायण ॥ त्याचें तोडोनि भवबंधन ॥ निजधामा आपण स्वयें नेला ॥ ४९ ॥ अधमाधम अतिवोखटी ॥ तोंडा राम आला अवचटीं ॥ ते गणिका कीं वैकुंठीं ॥ कृष्णें नामासाठीं सरती केली ॥ ३५० ॥ महादोषांचा मरगळा ॥ अतिनष्ट अजामेळा ॥ तोही नामें निर्मळ केला ॥ प्रताप आगळा नामाचा ॥ ५१ ॥ नामें विनटली गोविंदीं ॥ ते संकटीं राखिली द्रौपदी ॥ नामें तोडी आधि व्याधी ॥ जाण त्रिशुद्धी दासांची ॥ ५२ ॥ आंतरशुद्धीचें कारण ॥ मुख्यत्वें हरिकीर्तन ॥ नामापरतें साधन ॥ सर्वथा आॅन असेना ॥ ५३ ॥ कीर्तनीं हरीची आवडी कैशी ॥ वत्सालागीं धेनु जैशी ॥ कां न विसंबे जेवीं माशी ॥ मोहळासी क्षणार्ध ॥ ५४ ॥ तेवीं नाम स्मरतया भक्ता ॥ अतिशयें आवडी अच्युता ॥ दासांची अणुमात्र अवस्था ॥ निजांगें सर्वथा निवारी स्वयें ॥ ५५ ॥ यालागीं हरिकीर्तनीं गोडी ॥ जयासि लागली धडफुडी ॥ त्यासि नानाधनांच्या वोढी ॥ सोसावया सांकडीं कारण नाहीं ॥ ५६ ॥ ज्या किर्तनीं कथाकथनीं ॥ चौगुण आॅल्हाद उपजे मनीं ॥ तो उद्धरला सर्वसाधनीं ॥ पवित्र अवनी त्याचेनी ॥ ५७ ॥ एकचि जरी नाम वाचे ॥ सदा वसे श्रीरामाचें ॥ तरी पर्वत छेदोनि पापाचे ॥ परमानंदाचें निजसुख पावे ॥ ५८ ॥ आवडीं करितां हरिकीर्तन ॥ हृदयीं प्रगटे श्रीजनार्दन ॥ त्याहोनि श्रेष्ठ साधन ॥ सर्वथा आन असेना ॥ ५९ ॥ थोर कीर्तनाचें सुख ॥ निष्ठा तुष्टे यदुनायक ॥ कीर्तनीं तरले असंख्य ॥ सैंवडे लोक हरिनामें ॥ ६० ॥ यालागीं कीर्तनाहूनि थोर ॥ आन साधन नाहीं सधर ॥ मा कवणा हेतु पामर ॥ कीर्तन नर निंदिती ॥ ६१ ॥ एवं नामकीर्तनीं विमुख ॥ ते स्वप्नींही नदेखती सुख ॥ कीर्तनद्वेषें मूर्ख ॥ अतिदुःख भोगिती ॥ ६२ ॥ ज्याचे हृदयीं द्वेष संचार ॥ जळोजळो त्याचा आचार ॥ सर्वकाळ द्वेषी नर ॥ दुःख दुस्तर भोगिती ॥ ६३ ॥ कलियुगीं जे बुद्धिमंत ॥ ते

---

१ आपले सनंदनादिक चाकर. २ ध्यातो. ३ आनंद. ४ संसाराचे बंधन. ५ दुसरे. ६ स्वतः. ७ आनंद. ८ पृथिवी. ९ संतोष पावतो. १० भावडे.

नामकीर्तनीं सदा निरत ॥ गौरवूनि नाम स्मरत ॥ हर्षयुक्त सप्रेम ॥ ६४ ॥ नाना अवतार अतिगहन ॥ त्यांत श्रीराम कां भगवान् कृष्ण ॥ यांचे चरित्र अतिपावन ॥ त्याचें चरणवंदन सांगत ॥ ६५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ध्येयं सदा परिभवघ्नमभीष्टदोहं तीर्थास्पदं शिवविरिंचिनुतं शरण्यम् ॥ भृत्यार्त्तिहन्प्रणतपाल भवाब्धिपोतं वंदे महापुरुष ते चरणारविंदम् ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ लयें लक्षें ध्यानलक्षणें ॥ देव देवी ध्येय ध्यानें ॥ तृणप्राय[1] केलीं जेणें ॥ हरिचरणस्मरणें तत्काळ ॥ ६६ ॥ यालागीं ध्यानासि ते वरिष्ठ ॥ ध्याता छेदी कल्पनादि कष्ट ॥ भक्ताचे अति अभीष्ट ॥ मनोरथ इष्ट सदा पुरवी ॥ ६७ ॥ नित्य ध्यातां हरीचे चरण ॥ करी भक्तदेहरोगदुःखहरण ॥ इतुकेंच राया नव्हे जाण ॥ करी निर्दळण[2] भवरोगा ॥ ६८ ॥ भक्तांचे पुरवी मनोरथ ॥ तेथें ह्मणसी विषययुक्त ॥ परमानंदें नित्य तृप्त ॥ निववी[3] निजभक्त चरणामृतें ॥ ६९ ॥ वानूं चरणाची पवित्रता ॥ शिव पांयवणी[4] वाहे माथा ॥ जे जन्मभूमी सकळतीर्थां ॥ पवित्रपण भक्तां चरणध्यानें ॥ ३७० ॥ अवचटें[5] लागल्या चरण ॥ पवित्र झाले पाषाण[6] ॥ मां जे जाणोनि करिती ध्यान ॥ त्याचें पवित्रपण काय वानूं ॥ ७१ ॥ जो सदा शत्रुत्वें वर्ततां ॥ जेणें चोरून नेली निजकांता[7] ॥ त्याचा बंधू शरणागता ॥ दिधली आत्मता निज भावें ॥ ७२ ॥ कोरडी आत्मतेची थोरी ॥ तैशी नव्हेगा नृपकेसरी ॥ देऊनि सुवर्णाची[8] नगरी ॥ अचळ तेवरी स्थापिला ॥ ७३ ॥ यालागीं शरणागतां शरण ॥ सत्य जाण हरीचे चरण ॥ यापरतें निर्भय स्थान ॥ नाहीं आन निजभक्तां ॥ ७४ ॥ भक्तांची अणुमात्र व्यथा[9] ॥ क्षण एक नसाहवे[10] भगवंता ॥ प्रल्हादाची अतिदुःखता ॥ होय निवारिता निजांगें ॥ ७५ ॥ दावाग्नि गिळूनि अंतरीं ॥ गोपाळ राखिले वनांतरीं ॥ पांडव जळतां जोहरीं ॥ काढिले बाहेरी विवरद्वारें ॥ ७६ ॥ करूनि सर्वांगाचा वोढा ॥ नित्य निवारी भक्तांची पीडा ॥ जोकां भक्तांचिया भिडा ॥ रणरंगीं फुडां वागवी रथ ॥ ७७ ॥ ते चरण वंदितां साष्टांगीं ॥ भक्तां प्रतिपाळी उत्संगीं ॥ ऐसा प्रणतपाळ रूपावोघीं ॥ दुसरा जगीं असेना ॥ ७८ ॥ तरावया भवाब्धि प्रबळ ॥ चरणाची नाव अडंडळ ॥ अनन्यशरण सकळ ॥ तारी[11] तत्काळ चरणानुरागें ॥ ७९ ॥ ते महापुरुषाचे श्रीचरण ॥ शरणागता निजशरण ॥ ज्यांचें सनकादिक ध्यान ॥ करिती अभिवंदन सद्भावें ॥ ३८० ॥ अगाध चरणांचें महिमान ॥ वानितां वेदां पडिलें मौन ॥ ब्रह्मा सदाशिव आपण ॥ करितां स्तवन तठस्थ ठेले ॥ ८१ ॥ अगम्य अतर्क्य श्रीचरण ॥ जाणोनि ब्रह्मादिक ईशान ॥ साष्टांगें अभिवंदन ॥ करूनियां स्तवन करिती ऐसें ॥ ८२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ त्यक्त्वा सुदुस्त्यजसुरेप्सितराज्यलक्ष्मीं धर्मिष्ठ आर्यवचसा यदगादरण्यम् ॥ मायामृगं दयितयेप्सितमन्वधावद्वंदे महापुरुष ते चरणा

---

[1] गवता प्रमाणें. [2] नाश. [3] शांत करी. [4] गंगा. [5] अवचित. [6] दगड. [7] आपली स्त्री. [8] सोन्याची. [9] दुःख. [10] सोसवत नाही. [11] रक्षण करी.

रविंदम् ॥ ३४ ॥ ॥ टीका ॥ ॥ जे राज्यश्रियेकारणें ॥ [१]अमर लोलंगत मनें ॥ ते राज्य श्रीरामें त्यागणें ॥ वचना करणें पित्याच्या ॥ ८३ ॥ श्रीराम धर्मिष्ठ चोख ॥ पितृवचनप्रतिपाळक ॥ उद्भट राज्य सांडोनि देख ॥ निघे एकाएक वनवासा ॥ ८४ ॥ वनवासा चरणीं जातां ॥ सवें घेतली प्रिया सीता ॥ येणें बोले स्त्रीकामता ॥ [२]श्रोतीं सर्वथा नमानावी ॥ ८५ ॥ तरी केवळ स्त्री नव्हे सीता ॥ ते निजभक्त जाण तत्त्वतां ॥ सांडूनि राजभोग समस्ता ॥ सेवेच्या निजस्वार्था वना आली ॥ ८६ ॥ राज्यीं असतां रघुवीरें ॥ दास्य दासां वांटलें अधिकारें ॥ ते मी एकली एकसरें ॥ सेवा वनांतरीं अवघीचि करीन ॥ ८७ ॥ ते सेवावया हाता ॥ सकळ सेवेच्या निजस्वार्था ॥ चरण चाली चालोनि सीता ॥ आली तत्त्वतां वनवासा ॥ ८८ ॥ कैसें श्रीरामसेवेंचें सुख ॥ चरणीं चालतां नाठवे दुःख ॥ विसरली माया मोहपक्ष ॥ अत्यंत [३]हरिख सेवेचा ॥ ८९ ॥ ऐशिया मनोगतसद्भावा ॥ वना आली करावया सेवा ॥ श्रीराम जाणें भक्तभावा ॥ येरां देवां दानवां कळेना ॥ ३९० ॥ निजभक्ताचें मनोगत ॥ जाणता एक रघुनाथ ॥ कां श्रीरामसेवेचा स्वार्थ ॥ जाणती निजभक्त भजनानंदे ॥ ९१ ॥ भगवद्भजनाचें सुख ॥ भक्त जाणती भाविक ॥ भावेंवीण भजनसुख ॥ अनोळख अभाविका ॥ ९२ ॥ पूर्ण भाविक भक्त सीता ॥ हें कळलेंसे रघुनाथा ॥ यालागीं तिचिया वचनार्था ॥ होय धांवता मृगामागें ॥ ९३ ॥ मायिक मृगाचें सुवर्णभान ॥ जरी जाणे रघुनंदन ॥ तरी भक्तलळें पाळण ॥ करी धावन मृगामागें ॥ ९४ ॥ बाळकाचेनि छंदें जाण ॥ जेवीं माउली नाचे आपण ॥ तेवीं मायामृगापाठीं [४]धांवन ॥ करी रघुनंदन [५]निजभक्तवाक्यें ॥ ९५ ॥ जो राम वानरांच्या गोष्टी ॥ ऐकतां विकल्प नधरी पोटीं ॥ तो सीतेच्या वचनासाठीं ॥ धांवे मृगापाठीं नवल कायो ॥ ९६ ॥ भलतैसें भक्तवचन ॥ मिथ्या न ह्मणे रघुनंदन ॥ यालागीं निजचरणीं धावन ॥ करी आपण मृगामागें ॥ ९७ ॥ एवं भक्तवाक्यें उठाउठी ॥ जो पायीं धांवे मृगापाठीं ॥ ज्याचे चरणरेणु अणुकुटी ॥ वंदिती मुकुटीं शिवादि सर्व ॥ ९८ ॥ तो मृगामागें धांवतां जाण ॥ पावन केले पाषाण ॥ त्याच्या चरणा अनन्यशरण ॥ अभिवंदन सद्भावें ॥ ९९ ॥ एवं महापुरुषाचे चरण ॥ अभिवंदनें करिती स्तवन ॥ कलियुगीं कीर्तनें जन ॥ [६]परमपावन नित्यमुक्त ॥ ४०० ॥

॥ श्लोक ॥ एवं युगानुरूपाभ्यां भगवान् युगवर्त्तिभिः ॥ मनुजैरिज्यते राजन् श्रेयसामीश्वरो हरिः ॥ ३५ ॥

॥ टीका ॥ ॥ एवं कृतादि कलियुगवरी ॥ इहीं नामीं रूपीं अवतारीं ॥ सद्भावें तैंच्या नरीं ॥ [७]भजिजे श्रीहरी श्रेयार्थ ॥ १ ॥ त्यांमाजी कलियुगाची थोरी ॥ [८]वानिजे सद्भावें ऋषीश्वरीं ॥ येथें हरिकीर्तनावरी ॥ मुक्ती चारी [९]वोळंगल्या ॥ २ ॥

॥ श्लोक ॥ ॥ कलिं सभाजयंत्यार्या गुणज्ञाः सारभागिनः ॥ यत्र संकीर्तनेनैव सर्वः स्वार्थोऽ

---

[१] देव. [२] श्रोत्यांनीं. [३] आनंद. [४] धावणें. [५] आपल्या भक्तांच्या बोलण्यानें. [६] अतिपवित्र. [७] सेविजे. [८] वर्णिजे. [९] आल्या.

भिलभ्यते ॥ ३६ ॥ ॥ टीका ॥ ॥ [1]अवधारी राया सर्वज्ञा ॥ धन्यधन्य कलियुग जाणा ॥ जेथें सर्व स्वार्थ हरिकीर्तना ॥ नामस्मरणासाठीं होती ॥ ३ ॥ कलियुगीं दोष बहुत ॥ केवीं कीर्तनें होय स्वार्थ ॥ तेथें दोषत्यागें जे गुण घेत ॥ ते नित्यमुक्त हरिकीर्तनीं ॥ ४ ॥ हरिकीर्तनें शुद्ध चित्त ॥ दोषत्यागें गुण संग्रहीत ॥ ऐसें सार भोगी कलियुगांत ॥ [2]परममुक्त हरिकीर्तनें ॥ ५ ॥ कलीच्या गुणातें जाणते ॥ नामें मोक्ष जोडणें येथें ॥ जाणोनि करिती कीर्तनातें ॥ ते जाण निश्चितें नित्यमुक्त ॥ ६ ॥ कलियुगीं हेंचि सार ॥ नाम स्मरावें निरंतर ॥ करिती नामाचा निजगजर ॥ ते मुक्त नर नृपनाथा ॥ ७ ॥ ॥ श्लोक संमत ॥ ॥ ध्यायन्कृते यजन्यज्ञैस्त्रेतायां द्वापरेऽर्चयन् ॥ यदाप्नोति तदाप्नोति कलौ संकीर्त्य केशवम् ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ कृतयुगीं शमदमसाधन ॥ त्रेतायुगीं वेदोक्त यज्ञ ॥ द्वापरीं आगमोक्त पूजन ॥ तंत्रविधान विधियुक्त ॥ ८ ॥ यापरी त्रियुगीं जन ॥ परम संकट साधन ॥ करितांहि परी मन ॥ अणुमात्र जाण उपरमु नव्हे ॥ ९ ॥ तीं अवघींच साधनें ॥ कलीनें लाजविलीं कीर्तनें ॥ जेथें गातां नाचतां आपणें ॥ वश्य करणें परमात्मा ॥ ४१० ॥ [3]आंखरी डुंबळी गुणें ॥ ऐकतां गोंवळांचें गाणें ॥ देव भुलला सर्वप्राणें ॥ त्यांसवें नाचणें स्वानंदें ॥ ११ ॥ कृष्णा कान्हो गोपाळा ॥ या आरुष नामांचा चाळा ॥ घेऊन गर्जती वेळोंवेळां ॥ तेणें घनसांवळा सुखावे ॥ १२ ॥ तेणें सुखाचेनि संतोषें ॥ देव परमानंदें उल्हासे ॥ एवं कलियुगीं कीर्तनवशें ॥ भक्त [4]अनायासें उद्धरती ॥ १३ ॥ कीर्तन आवर्तनमेळीं ॥ जळती पापाच्या वडवाळी ॥ भक्त उद्धरती तत्काळीं ॥ हरिनामें कली दाटुगा ॥ १४ ॥ कलियुगीं हेचि थोरी ॥ नामसंकीर्तनावारीं ॥ चहूंवर्णां मुक्तकरी ॥ तेथें नविचारी स्त्रीशूद्र ॥ १५ ॥ वेद अत्यंत कृपण झाला ॥ त्रिवर्णांचे कानीं लागला ॥ स्त्रीशूद्रादिकांसि अबोला ॥ धरूनि ठेला अद्यापी ॥ १६ ॥ तें वेदाचें अतिन्यून ॥ उद्धरी हरिनाम कीर्तन ॥ स्त्री शूद्र अंत्यजजन ॥ उद्धरण हरिनामें ॥ १७ ॥ कीर्तनें स्वधर्म वाढे ॥ कीर्तनें स्वधर्म जोडे ॥ कीर्तनें परब्रह्म आतुडे ॥ मुक्ति कीर्तनापुढें लाजोनि जाय ॥ १८ ॥ कीर्तनानंदें चारी मुक्ती ॥ हरिभक्तांतें वरूं येती ॥ भक्त त्यांतें उपेक्षिती ॥ तरी पांया लागती दास्यत्वें ॥ १९ ॥ एवढी कलियुगीं प्रचीती ॥ कीर्तनाची परम ख्याती ॥ राया जाणगा निश्चितीं ॥ [5]विकल्प चित्तीं झणीं नधरी ॥ ४२० ॥ कृतत्रेताद्वापारासी ॥ निषेध नाहीं नामासी ॥ कलियुगीं नामापासीं ॥ चारी मुक्ती दासी स्वयें होती ॥ २१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नह्यतः परमो लाभो देहिनां भ्राम्यतामिह ॥ यतो विंदेत परमां शांतिं नश्यति संसृतिः ॥ ३७ ॥ ॥ टीका ॥ ॥ जे जन्ममरणांच्या [6]आंवर्तीं ॥ पडिले संसारीं सदा भ्रमती ॥ त्या प्राणियां कलियुगाप्रती ॥ कीर्तनें गती नृपनाथा ॥ २२ ॥ कलियुगीं कीर्तनासाठीं ॥ संसाराची काढूनि कांटी ॥ परमशांति सुखसंतुष्टीं ॥ पडे मिठी परमानंदीं ॥ २३ ॥

---

१ ऐक. २ नित्यमुक्त. ३ तळावर. ४ श्रमावांचून. ५ संशय. ६ भवन्यांत

ऐसा कीर्तनीं परम लाभ ॥ शिणतां सुरनरां दुर्लभ ॥ तो कलियुगीं झाला सुलभ ॥ यालागीं सभाग्यां लाभ हरिकीर्तनीं ॥ २४ ॥ कीर्तनास्तव चारी मुक्ती ॥ भक्तांपासी वोळंगती[1] ॥ हें न घडे कोणी ह्मणती ॥ ऐक ते स्थिती नृपनाथा ॥ २५ ॥ कीर्तनीं हरिनामाचा पाठा ॥ तेणें देवासि संतोष मोठा ॥ वेगीं सांडोनि वैकुंठा ॥ धांवे अवचटा कीर्तनामाजी ॥ २६ ॥ हरिकीर्तनीं लोभतां देवो ॥ विसरला वैकुंठासीं जावों ॥ तोचि आवडला ठावो ॥ भक्तभावो देखोनी ॥ २७ ॥ जेथें राहिला यदुनायक ॥ तेथेंचि ये वैकुंठलोक ॥ यापरी मुक्तीस लौकिक ॥ कीर्तनें देख पावती भक्त ॥ २८ ॥ नामकीर्तन निजगजरीं ॥ भक्तांनिकट[3] धांवे श्रीहरी ॥ तेचि समीपता मुक्ती खरी ॥ भक्तांच्या करीं हरिकीर्तनें ॥ २९ ॥ कीर्तनें तोषला अधोक्षज ॥ भक्तां प्रत्यक्ष गरुडध्वज ॥ श्याम पीतवासा चतुर्भुज ॥ तें ध्यान सहज ठसावे ॥ ४३० ॥ भक्त कीर्तन करी जेणें ध्यानें ॥ तें ध्यान दृढ ठसावे मनें ॥ तेव्हां देवाचीं निजचिन्हें ॥ भक्तें पावणें संपूर्ण ॥ ३१ ॥ श्याम चतुर्भुज पीतांबरधारी ॥ शंखचक्रादिआयुधें करीं ॥ हे स्वरूपता भक्तांतें वरी ॥ कीर्तनगजरीं भाळोनी ॥ ३२ ॥ तेव्हां देवभक्त समसमान ॥ समान अवयव समचिन्ह ॥ भावें करितां हरिकीर्तन ॥ एवढें महिमान हरिभक्तां ॥ ३३ ॥ दोघां एकत्र रमा[4] देखे ॥ देव कोण तेंही नोळखे[5] ॥ ब्रह्मा नमस्कारीं चवके ॥ देव तात्त्विकें[6] नकळे त्यासी ॥ ३४ ॥ भावें करितां हरिकीर्तन ॥ तेणें संतोषे जनार्दन ॥ उभयतां पडे आलिंगन ॥ मिठी परतोन सुटेना ॥ ३५ ॥ तेव्हां सबाह्यांतरीं ॥ देव प्रगटे चराचरीं ॥ दुजें देखावया संसारीं ॥ सर्वथा उरी उरेना ॥ ३६ ॥ वृत्तिस्थानंदीं निमग्न ॥ परतोनि कदा नव्हे भिन्न ॥ सायुज्यमुक्ति यास जाण ॥ जेणें दुंजेपण[7] असेना ॥ ३७ ॥ ऐशी लाहूनि पूर्ण सायुज्यता ॥ तो जैं करी हरिकथा ॥ ते कथेची तल्लीनता ॥ जीवां समस्तां अतिप्रिय ॥ ३८ ॥ यापरी हरिकीर्तनापासी ॥ चारी मुक्ती होती दासी ॥ भक्त लोभले हरिभजनासी ॥ सर्वथा मुक्तीसी नघेती ॥ ३९ ॥ एवं योगयागादितपसाधनें ॥ पोरटीं[8] केलीं हरिकीर्तनें ॥ कलियुगीं नामस्मरणें ॥ जड उद्धरणें हरिकीर्तनीं ॥ ४४० ॥ ॥श्लोक॥ ॥ कृतादिषु प्रजा राजन् कलाविच्छंति संभवम्॥ कलौ खलु भविष्यंति नारायणपरायणाः॥ ३८ ॥ ॥ टीका ॥ ॥ कीर्तनासाठीं चारी मुक्ती ॥ हेचि कलियुगीं मुख्य भक्ती॥ यालागीं इंद्रादिक देवपंक्ती ॥ जन्म इच्छिती कलियुगीं ॥ ४१ ॥ स्वर्ग नव्हे भोगस्थान ॥ हें विषयाचें बंदिखान ॥ कलियुगीं सभाग्य जन ॥ जन्मोनि कीर्तन हरीचें करिती ॥ ४२ ॥ तेथींच्या जन्मा देव सकाम ॥ तेथें कृतादियुगींचें उत्तमोत्तम ॥ प्रजा अवश्य वांछिती जन्म ॥ कीर्तनधर्म निजभजना ॥ ४३ ॥ कृतयुगींचें सभाग्य जन ॥ यागीं[9] पावले स्वर्गस्थान ॥ तेही कलियुगींचें जाण ॥ जन्म आपण वांछिती ॥ ४४ ॥

---

१ येतात. २ जवळ. ३ जवळ. ४ लक्ष्मी ५ ओळखत नाही. ६ वास्तवीक. ७ वेगळे पणा. ८ पोरगळ. ९ यज्ञांत.

कृत त्रेत आणि द्वापार ॥ तेथीलही मुख्य नर ॥ कलियुगीं जन्म तत्पर ॥ निरंतर वांछिती ॥ ४५ ॥ तैंचे लोक करिती गोष्टी ॥ चारी पुषार्थ कीर्तनासाठीं ॥ कलियुगीं हे महिमा मोठी ॥ धन्यधन्य सृष्टी कलियुग ॥ ४६ ॥ जे असती धन्यभागी ॥ ते जन्म पावती कलियुगीं ॥ ऐसें कलीच्या जन्मालागीं ॥ नरसुरउरगीं[1] उत्कंठा ॥ ४७ ॥ तरावया दीन जन ॥ कलीमाजी श्रीनारायण ॥ नामें छेदी भवबंधन ॥ तारी हरिकीर्तन सकळांसी ॥ ४८ ॥ यालागीं कलीमाजी पाही ॥ श्रद्धा हरिकीर्तनाच्या ठायीं ॥ जन तरती सुखोपायीं ॥ संदेह[2] नाहीं नृपनाथा ॥ ४९ ॥ कलियुगीं बहुसाल[3] नर ॥ होतील नारायणीं तत्पर ॥ भक्तीचें भोज विचित्र ॥ स्त्रीशूद्र माजविती ॥ ४५० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ क्वचित् क्वचिन्महाराज द्रविडेषु च भूरिशः ॥ ताम्रपर्णी नदी यत्र कृतमाला पयस्विनी ॥ ३९ ॥ कावेरी च महापुण्या प्रतीची च महानदी ॥ ये पिबंति जलं तासां मनुजा मनुजेश्वर ॥ प्रायो भक्ता भविष्यंति वासुदेवेऽमलाशयाः ॥ ४० ॥ ॥ टीका ॥ ॥ विशेषें द्रविड देशाचा ठायीं ॥ अतिशयें भक्ती वाढेल पाही ॥ तेणेंही तीर्थविशेषभुयी ॥ ते ते ठायीं अतिउत्कट ॥ ५१ ॥ तांम्रपर्णींच्या[4] तीरीं ॥ हरिभक्तीची अगाध थोरी ॥ कृतमालेच्या परिसरीं ॥ उत्साहें करीं हरि भक्ति नांदे ॥ ५२ ॥ निर्मळजळ पयस्विनी ॥ जीचिये पयप्राशनीं ॥ वृत्ति वाढे हरिचरणीं ॥ भगवद्भजनीं दृढबुद्धी ॥ ५३ ॥ देखतां कावेरीची थडी ॥ पळती पापांचिया कोडी ॥ जेथें श्रीरंग वसे आवडी ॥ तेथें भक्ति दुथडीं उद्धवनांदे ॥ ५४ ॥ प्रतीचीमाजी देतां बुडी ॥ चित्तशुद्धी जोडे रोकडी ॥ भजन वाढे चढोवढी ॥ भक्तीची गुढी वैकुंठीं उभे ॥ ५५ ॥ ऐके नरवरचूडामणी ॥ या पंचनदींचिया तीर्थस्नानीं ॥ अथवा पयप्राशनीं[5] ॥ भगवद्भजनीं दृढबुद्धी ॥ ५५ ॥ या तीर्थांचें केल्या दर्शन ॥ होय कलिमलक्षालन ॥ केल्या स्नान पयप्राशन ॥ भगवद्भजन उल्हासे ॥ ५७ ॥ दर्शन स्पर्शन स्नान ॥ या तीर्थींचें करितां जाण ॥ वासुदेवीं निर्मळ भजन ॥ नित्य नूतन दृढ वाढे ॥ ५८ ॥ यापरी जे भगवद्भक्त ॥ ते ऋणत्रयासि निर्मुक्त ॥ सुरनरपितरां पंगिस्त ॥ हरिभक्त सदा नव्हती ॥ ५९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ देवर्षिभूताप्तनृणां पितॄणां न किंकरो नायमृणी च राजन् ॥ सर्वात्मना यः शरणं शरण्यं गतो मुकुंदं परिहृत्य कर्तम् ॥ ४१ ॥ ॥ टीका ॥ ॥ शरणागता निज शरण्य ॥ मुकुंदाचे श्रीचरण ॥ सद्भावें रिघाल्या शरण ॥ जन्मरण बाधीना ॥ ४६० ॥ जेथें बाधीना जन्मरण ॥ तेथें देव ऋषी आचार्य पितृगण ॥ यांच्या ऋणाचा पाड कोण ॥ ते झाले उत्तीर्ण[6] भगवद्भजनें ॥ ६१ ॥ जो विनटला[7] हरिचरणीं ॥ तो कोणाचा नव्हे ऋणी ॥ जेवीं परिसाचिये मिळणीं ॥ लोह काळेपणीं निर्मुक्त ॥ ६२ ॥ सकळपापापासूनी ॥ सुटिजे जेवीं गंगास्नानीं ॥ तेवीं विनटल्या हरिचरणीं ॥ निर्मुक्त त्रैऋणीं भगवद्भक्त ॥ ६३

---

[1] मनुष्य, देव, सर्प. [2] संशय. [3] नित्य. [4] या नावाच्या नदीच्या. [5] पाणि पिण्याविषयीं. [6] मुक्त. [7] मिळाला.

भावें करितां भगद्भक्ती ॥ सकळ पितर उद्धरती ॥ ऋषीश्वरां नित्य तृप्ती ॥ भगवद्भक्ती स्वानंदें ॥ ६४ ॥ स्वानंदें भगवद्भक्ती ॥ तेणें सर्व भूतें सुखी होती ॥ पुत्रें केल्या भगवद्भक्ती ॥ आप्त उद्धरती मातापितरें ॥ ६५ ॥ सकळ देवांचा नियंता[1] ॥ अति उल्हासें त्यातें भजतां ॥ देवऋणाची वार्ता ॥ भगवद्भक्तां बाधीना ॥ ६६ ॥ ज्यासि अनन्य भगवद्भजन ॥ ते कदा नव्हती कर्माधीन ॥ कर्म ज्यांचे आज्ञाधीन ॥ त्या हरीसी शरण जो झाला ॥ ६७ ॥ तो नव्हे कर्मांचा सेवक ॥ नव्हे देवाचा पाइक[2] ॥ नव्हे प्राकृताचा रंक ॥ अनन्य भाविक हरिभक्त ॥ ६८ ॥ जो हरीचा शरणागत ॥ तो कोणाचा नव्हे अंकित ॥ कर्माकर्मीं तो अलिप्त ॥ नित्यमुक्त[3] ऋणत्रयासी ॥ ६९ ॥ वासुदेव सर्वांभूतीं ॥ हें दृढ ठसावे प्रतीती ॥ यालागीं अलिप्त कर्मगती ॥ सकळ ऋणनिर्मुक्ती भगवद्भक्तां ॥ ४७० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्वपादमूलं भजतः प्रियस्य त्यक्तान्यभावस्य हरिः परेशः ॥ विकर्म यच्चोत्पतितं कथंचिद्धुनोति सर्वं हृदि सन्निविष्टः ॥ ४२ ॥ ॥ टीका ॥ सांडूनि देहाच्या अभिमाना ॥ त्यजूनि देवतांतरभजना[4] ॥ जे अनन्यशरण हरिचरणा ॥ ते कर्मबंधना नाकळती ॥ ७१ ॥ यापरी जे अनन्यशरण ॥ तेचि हरीसी पढियंते पूर्ण ॥ हरिप्रियां कर्मबंधन ॥ स्वप्नींही जाण स्पर्शों न शके ॥ ७२ ॥ राया ह्मणसी भगवद्भक्त ॥ विहितकर्मी[5] नित्यनिर्मुक्त ॥ ते जरी कर्म आचरत ॥ तरी प्रायश्चित्त नबाधी त्यांसी ॥ ७३ ॥ जेवीं पंचाननाचें[6] पिलें ॥ नवचे मंदगजांचेंनि[7] वेढिलें ॥ तेवीं हरिप्रियीं अकर्म केलें ॥ त्यांसि नवचे बाधिलें यमाचेनी ॥ ७४ ॥ स्मरतां एक हरीचें नाम ॥ महापातक्यां वंदी यम ॥ मा हरीचे पढियंते परम ॥ तयां विकर्मे यम केवीं दंडी ॥ ७५ ॥ ॥ आशंका ॥ ॥ वेदाज्ञा विष्णुचि परम ॥ वेदें विहिलें[8] धर्माधर्म ॥ भक्त आचरतां विकर्म ॥ केवीं वेदाज्ञानें[9] मन बाधी त्यांसी ॥ ७६ ॥ जेवीं रायाचा सेवक आप्त ॥ तो द्वारपाळां नव्हे अंकित ॥ तेथें रायाचा पढियंता सुत ॥ त्यांचा पंगिस्त तो केवीं होय ॥ ७७ हरिनामाचें ज्यासि स्मरण ॥ वेद त्याचे वंदी चरण ॥ मा जो हरीचा पढियंता पूर्ण ॥ त्यासि वेदेंविधान कदा नबाधी ॥ ७८ ॥ भक्तापासूनि विकर्मस्थिती ॥ कदा नघडेगा कल्पांतीं ॥ अवचटें घडल्या दैवगतीं ॥ त्या कर्मा निर्मुक्ति अच्युतस्मरणें ॥ ७९ ॥ बाधूं नशके कर्माकर्म ॥ ऐसा कोण भागवत धर्म ॥ ते भक्तीचें निजवर्म ॥ उत्तमोत्तम अवधारी ॥ ४८० ॥ त्यजूनि देहाभिमानवोढी ॥ सर्वांभूतीं हरिभक्ति गाढी ॥ तो कर्माकर्मे पायीं रगडी ॥ मुक्ति पाय झाडी निजकेशीं ॥ ८१ ॥ तो ज्याकडे कृपादृष्टीं पाहे ॥ त्याचें निर्दळे भवभयें ॥ तो जेथें ह्मणे राहे ॥ तेथें लाहे मुक्तिसुख ॥ ८२ ॥ त्याचेनि अनुग्रह करीं ॥ देव प्रगटे दीनाच्या अंतरीं ॥ त्याच्या कर्माकर्मांची बोहरी ॥ स्वयें श्रीहरी करूंलागे ॥ ८३ ॥ जेंवीं प्रगटल्या दिनमणी[10] ॥ अंधार जाय पळोनी ॥ राम प्र

---

१ नियामक. २ आज्ञाधारक. ३ जीवन्मुक्त. ४ दुसऱ्या देवतेच्या भजनास. ५ नित्य नैत्तिक कर्माविषयीं. ६ सिंहाचे. ७ उन्मत्त हात्तीचे. ८ केले. ९ वेदाची आज्ञा. १० सूर्य.

गटल्या हृदयभुवनीं ॥ कर्माकर्मधुणी सहजची ॥८४॥ भगवंताची नामकीर्ती ॥ याचिनामें परमभक्ती॥भक्तीपाशीं चारी मुक्ती॥दास्यत्वें
वसती नृपनाथा ॥ ८५ ॥ ऐकोनि भक्तीची पूर्णस्थिती ॥ रोमांचित झाला नृपती ॥ आनंदाश्रु नयनीं येती ॥ सुखावलिया वृत्ती डुल्लत
॥ ८६ ॥ सांगतां वैदेहाची स्थिती ॥ नारद सुखावे निजचित्तीं ॥ तो उल्हास वसुदेवाप्रती ॥ सांगे समाप्ती इतिहासाची ॥८७॥ श्लोक॥
नारद उवाच ॥ ॥ धर्मान्भागवतानित्थं श्रुत्वाऽथ मिथिलेश्वरः ॥ जायंतेयान् मुनीन् प्रीतः सोपाध्यायो ह्यपूजयत् ॥ ४३॥ टीका ॥ ॥ नारद
इतिहास सांगतु ॥ तेवींच आनंदें डुल्लतु ॥ तेणें आनंदे बोलतु ॥ भक्तीचें मथितु वसुदेवाप्रती ॥ ८८ ॥ यापरी जयंतीसुतीं ॥ भगवंताची
उद्भट भक्ती ॥ सांगीतली परमप्रीतीं ॥ मिथिलेशाप्रती निजबोधें[1] ॥ ८९ ॥ ऐकोनि त्यांचिया वचना ॥ सुख जाहलें विदेहाचिया मना ॥
मग अतिप्रीती पूजना ॥ जयंतीनंदना पूजिता झाला ॥४९०॥ श्रवणें झाली अतिविश्रांती ॥ तेणें पूजेलागीं अतिप्रीती ॥ विदेहा उल्हासु[2]
चित्तीं ॥ स्वानंद स्थितीं पूजिता झाला ॥ ९१ ॥ पूजेचा परम आदरु ॥ जयंतीनंदनां केला थोरू ॥ उपाध्याय जो अहल्याकुमरु ॥ तेणें
ही अत्यादरु पूजेसि केला ॥ ९२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ततोंऽतर्दधिरे सिद्धाः सर्वलोकस्य पश्यतः ॥ राजा धर्मानुपातिष्ठन्नवाप परमां गतिम्
॥ ४४ ॥ ॥ टीका ॥ ॥ यापरी ते भागवतश्रेष्ठ ॥ नवहीजण अतिवरिष्ठ ॥ समस्तां देखतांचि स्पष्ट ॥ झाले अदृष्ट ऊर्ध्वगमनें ॥
॥ ९३ ॥ ते भागवतधर्मस्थिती ॥ अनुष्ठूनि[3] भगवद्भक्ती ॥ राजा पावला परमगती ॥ पूर्णप्राप्ती निजबोधें ॥ ९४ ॥ भावें करितां भगवद्भक्ती
॥ देहीं प्रगटे विदेहस्थिती ॥ ते पावोनि जनक नृपती ॥ परमविश्रांती पावला ॥ ९५ ॥ श्लोक ॥ त्वमप्येतान्महाभाग धर्मान् भागवतान्
श्रुतान् ॥ आस्थितः श्रद्धया युक्तो निःसंगो यास्यसे परम् ॥ ४५ ॥ टीका ॥ सकळभाग्यांचिया पंक्ती ॥ जेथें थकल्या येती विश्रांती
॥ ते वसुदेवा भाग्यस्थिती ॥ तुझ्या घराप्रती क्रीडत ॥ ९६ ॥ वसुदेवा तुझेनि नावें ॥ देवातें वासुदेव ह्मणावें ॥ तेणें नामाचेनि
गौरवें[4] ॥ जनाचे आघवे निरसती[5] दोष ॥ ९७ ॥ येवढ्या भाग्याचा भाग्यनिधी ॥ वसुदेवा तूंचि त्रिशुद्धी ॥ तुवां भागवतधर्माचा विधी
॥ आस्तिक्यबुद्धी अवधारिला ॥ ९८ ॥ श्रद्धेनें केलिया वस्तुश्रवणा ॥ मननयुक्त धरावी धारणा ॥ तैं निःसंग होऊनियां जाणा ॥
पावसी तत्क्षणा निजधामासी[6] ॥ ९९ ॥ जया निजधामाच्या ठायीं ॥ कार्य कारण दोन्ही नाही ॥ त्या परमपदाचा ठायीं ॥ निजसुखें
पाही सुखरूप होती ॥ ५०० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ युवयोः खलु दंपत्योर्यशसा पूरितं जगत् ॥ पुत्रतामगमद्यद्वां भगवानीश्वरो हरिः ॥४६॥
॥ टीका ॥ ॥ तुह्मां दांपत्याचिये कीर्ती ॥ यशासी आली श्रीमंती ॥ तुमचें यश त्रिजगतीं[7] ॥ परमानंदें क्षिती परिपूर्ण झाली ॥ १ ॥

---

[1] आपल्या ज्ञानानें. [2] आनंद. [3] अनुष्ठान करून. [4] मोठेपणानें. [5] नाहींसे होतात. [6] आपल्या ठिकाणीं. [7] तीन लोकांत.

ज्यालागीं कीजे यजन[1] ॥ ज्यालागीं कीजे दान ॥ ज्यालागीं कीजे तपाचरण ॥ योगसाधन ज्यालागीं ॥ २ ॥ जो नवर्णवे वेदां शेषां ॥ जो दुर्लभ सनकादिकां ॥ त्या पुत्रत्वें यदुनायका ॥ उत्संगीं[2] देखा खेळविसी ॥ ३ ॥ जो काळिकाळाचा निजशास्ता ॥ जो ब्रह्मादिकांचा नियंता ॥ जो संहाकराचा संहर्ता ॥ जो प्रतिपाळिता त्रिजगती ॥ ४ ॥ जो सकळभाग्याचें भूषण ॥ जो सकळ मंडणा मंडण ॥ षड्गुणांचें अधिष्ठान ॥ तो पुत्रत्वें श्रीकृष्ण सर्वांगीं लोळे ॥ ५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ दर्शनालिंगनालापैः शयनासनभोजनैः ॥ आत्मा वां पावितः कृष्णे पुत्रस्नेहं प्रकुर्वतोः ॥ ४७ ॥ ॥ टीका ॥ ॥ परब्रह्ममूर्ती श्रीकृष्ण ॥ सादरें करितां अवलोकन ॥ तेणें दृष्टी होय पावन[3] ॥ डोळ्यां संपूर्ण सुखावबोधू ॥ ६ ॥ कृष्णमुखींचीं उत्तरें ॥ प्रवेशतां कर्णद्वारें ॥ पवित्र झालीं कर्णकुहरें[4] ॥ कृष्णकुमरें अनुवादें ॥ ७ ॥ आळवितां श्रीकृष्णकृष्ण ॥ अथवा कृष्णेंसी संभाषण ॥ तेणें वाचा झाली पावन ॥ जैसें गंगाजीवन[5] संतप्तां ॥ ८ ॥ नाना यागविधी यजितां ज्यातें ॥ तेथें न घे जो अवदानातें ॥ तो वारितांही दोहीं हातें ॥ बैसे सांगातें भोजनीं कृष्ण ॥ ९ ॥ जो दुर्लभ योगयागीं ॥ तो वेळ राखे भोजनालागीं ॥ मुखींचें शेष दे तुह्मालागीं ॥ लागवेगीं बाललीला ॥ ५१० ॥ तेणें संतप्त संतोखी ॥ तोही ग्रास घाली तुह्मामुखीं ॥ तुह्मा ऐसें भाग्य त्रिलोकीं ॥ नाहीं आणिकीं अर्जिलें[6] ॥ ११ ॥ तेणें कृष्णशेषामृतें ॥ रसना विटोंये अमृतातें ॥ मा इतर रसा गोड तेथें ॥ कोण ह्मणतें ह्मणावया ॥ १२ ॥ तेणें श्रीकृष्णरसशेषें ॥ अंतरशुद्धी अनायासें ॥ जें नानातप सायासें ॥ अतिप्रयासें नलभे कदा ॥ १३ ॥ देतां कृष्णासीं चुंबन ॥ तेणें अवघ्राणें घ्राण पावन ॥ चुंबितांचि निवे[7] मन ॥ स्वानंद पूर्ण उल्हासे ॥ १४ ॥ तुह्मा बैसले देखे आसनीं ॥ कृष्ण सवेग ये धांवोनी ॥ मग अंकावरी बैसोनी ॥ निजांगमिळणीं निववी कृष्ण ॥ १५ ॥ तेणें श्रीकृष्णाचेनि स्पर्शें ॥ सर्वेंद्रियीं काम नासे ॥ तेणें कर्मंचि अनायासें ॥ होय आपैसें निष्कर्म ॥ १६ ॥ सप्रेमभावें संलग्न ॥ देतां श्रीकृष्णासि आलिंगन ॥ तेणें देहाचें देहपण ॥ मीतूंस्फुरण हरपलें[8] ॥ १७ ॥ शयनाच्या समयरूपीं ॥ जना गाढ मूढ अवस्था व्यापी ॥ ते काळीं तुह्मासमीपीं ॥ कृष्णसद्रूपीं संलग्न ॥ १८ ॥ योगी भावना भावून ॥ कर्म कल्पिती कृष्णार्पण ॥ तुमचीं सकळ कर्में जाण ॥ स्वयें श्रीकृष्ण नित्यभोक्ता ॥ १९ ॥ पुत्रस्नेहाचेनि लालसें ॥ सकळ कर्में अनायासें ॥ स्वयें श्रीकृष्ण सावकाशें ॥ परमउल्हासें अंगीकारी ॥ ५२० ॥ तुमची पवित्रता सांगो कैसी ॥ पवित्र केलें यदुवंशासी ॥ पुत्रत्वें पाळूनि श्रीकृष्णासी ॥ जगदोद्धारासी कीर्ती केली ॥ २१ ॥ नाम घेतां वसुदेवसुत जाण ॥ स्मरतां देवकीनंदन ॥ होय भवबंधनछेदन ॥ ऐसें पावन नाम तुमचें ॥ २२ ॥ तुह्मी तरा अनायासीं ॥ हें नवल नव्हे विशेषीं ॥ केवळ जे

---

[1] यज्ञ.
[2] मांडीवर.
[3] पवित्र.
[4] कानाची भोकें.
[5] गंगेचेपाणी.
[6] मिळविले.
[7] शांत होवे.
[8] नाहींसे झाले.

कां कृष्णद्वेषी[1] ॥ ते वैरी अनाथासीं विरोधें तरती ॥ २३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ वैरेण यं नृपतयः शिशुपालपौंड्रशाल्वादयो गतिविलासविलोकनाद्यैः ॥ ध्यायंत आकृतधियः शयनासनादौ तत्साम्यमापुरनुरक्तधियां पुनः किम् ॥ ४८ ॥ ॥टीका॥ ॥ शिशुपाल दंतवक्त्र ॥ पौंड्रकशाल्वादि महावीर ॥ कृष्णासी चालविती वैर ॥ द्वेषें[2] मत्सरें ध्यान करिती ॥ २४ ॥ घनश्याम पीतांबर पुढें ॥ विचित्रालंकारीं कृष्ण नटे ॥ गदादि आयुधीं ऐसा वेटे ॥ अतिबळें तगटे[3] रणभूमीसी ॥ २५ ॥ ऐसें वैरवेशें[4] उद्भट ॥ क्रोधें कृष्ण उत्कट ॥ ते वैरभावें वरिष्ठ ॥ तद्रूपता स्पष्ट पावले द्वेषें ॥ २६ ॥ कंसासि परमभय जाण ॥ अखंड लागलें श्रीकृष्णध्यान ॥ अन्नपान शयनासन ॥ धाकें संपूर्ण श्रीकृष्ण देखे ॥ २७ ॥ कंसासुर भयवशें ॥ शिशुपाळादिक महाद्वेषें ॥ सायुज्य पावले अनायासें ॥ मा श्रद्धाळू कैसे नपावती मोक्ष॥ २८॥ तुह्मीतरी परमप्रीतीं ॥ चित्तें वित्तें आत्मशक्तीं ॥ जीवें वोवाळा श्रीपती ॥ पायां ब्रह्मप्राप्ती तुमच्या लागे ॥ २९ ॥ पूर्ण प्राप्ती तुह्मापासी ॥ तें तुमचें नकळे तुह्मासी ॥ बाळक मानितां श्रीकृष्णासी ॥ निजलाभासी[5] नाडणें ॥५३०॥ श्लोक ॥ ॥ माऽपत्यबुद्धिमकृथाः कृष्णे सर्वात्मनीश्वरे ॥ मायामनुष्यभावेन गूढैश्वर्यै परेऽव्यये ॥ ४९ ॥ ॥ टीका ॥ ॥ तुह्मी बाळक माना श्रीकृष्ण ॥ हा भावो अतिकृपण ॥ तो परमात्मा परिपूर्ण ॥ अवतरला[6] निर्गुण कृष्णावतारें ॥ ३१ ॥ यासि झणें ह्मणाल लेंकरूं ॥ हा ईश्वरांचा ईश्वरू ॥ सर्वात्मा सर्वेश्वरू ॥ योगियां योगींद्र श्रीकृष्ण ॥ ३२ ॥ हा अविकार अविनाश ॥ परात्पर परमहंस ॥ इंद्रियनियंता हृषीकेश ॥ जगन्निवास जगदात्मा ॥ ३३ ॥ माया मनुष्यवेशाकृती[7] ॥ हा भासताहे सकळांप्रती ॥ गूढ ऐश्वर्य महामूर्ती ॥ व्यापक त्रिजगतीं गुणातीत ॥ ३४ ॥ ॥ श्लोक ॥ भूभारासुरराजन्यहंतवे गुप्तये सताम् ॥ अवतीर्णस्य निर्वृत्यै यशो लोके वितन्यते ॥ ५० ॥ ॥ टीका ॥ ॥ काळयवनादि असुर ॥ कां जरासंधादि महावीर ॥ अथवा राजे अधर्मकर ॥ अतिभूभार सेना ज्यांची ॥ ३५ ॥ तो उतरावया धराभार[8] ॥ धर्म वाढवावया निर्विकार ॥ संतसंरक्षणीं शार्ङ्गधर ॥ पूर्णावतार श्रीकृष्ण ॥ ३६ ॥ प्रतिपाळावया निजभक्तांसी ॥ सुख द्यावया साधूंसी ॥ अवतरला यदुवंशीं ॥ हृषीकेशी श्रीकृष्ण ॥ ३७ ॥ तो असुरगजपंचानन ॥ सज्जनवनआनंदघन ॥ तुमच्या उदरीं श्रीकृष्ण ॥ अवतार पूर्ण पूर्णांशेंसी ॥ ३८ ॥ उद्धारावया त्रिजगती ॥ थोर उदार केली कीर्ती ॥ ज्याच्या अवताराची ख्याती ॥ पवाडे पढती ब्रह्मादिक ॥ ३९ ॥ तरावया अतिदुस्तर ॥ ज्याची कीर्ति गाती सुरनर ॥ परमादरें ऋषीश्वर ॥ कृष्णचरित्र सर्वदा गाती ॥५४०॥ ज्याचें नाम स्मरतां भक्त ॥ कळिकाळ नागवत ॥ तो अवतार श्रीकृष्णनाथ ॥ तुह्मा आंत प्रगटला ॥ ४१ ॥ श्रीकृष्ण परब्रह्मैकनिधी ॥ यासि पाहूंनका बाळबुद्धी ॥ इतुके

---

१ कृष्णाचे शत्रु. २ द्वेषानें. ३ लागे. ४ शत्रुत्वाच्या मिषानें. ५ आत्मलाभास. ६ अवतार घेतला. ७ मनुष्याचा आकार. ८ पृथिवीचा भार.

न तुह्मी भवाब्धी[1] ॥ जाणा त्रिशुद्धी तरलेती ॥ ४२ ॥ ऐशी श्रीकृष्ण अवतारकथा ॥ नारद वसुदेवा सांगता ॥ शुक ह्मणे गा नृपनाथा ॥
विस्मयो समस्तां थोर झाला ॥ ४३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीशुकउवाच ॥ ॥ एतच्छ्रुत्वा महाभागो वसुदेवोऽतिविस्मितः ॥ देवकी च महाभागा
जहतुर्मोहमात्मनः ॥ ५१ ॥ ॥ टीका ॥ ॥ निमि जायंत मुनिगण ॥ इतिहास पुरातन जीर्ण[2] ॥ कृष्ण परमात्मा ब्रह्म पूर्ण ॥ नारद
आपण निरूपी[3] हर्षें ॥ ४४ ॥ शुक ह्मणे परिक्षिती ॥ ऐकोनि नारदवचनोक्ती ॥ देवकी वसुदेव चित्तीं ॥ अतिविस्मिती तटस्थ ॥ ४५ ॥
तया नारदाचेनि वचनें ॥ कृष्ण परमात्मा बोले येणें ॥ देवकी वसुदेव निजमनें ॥ दोघेजणें विस्मित ॥ ४६ ॥ तीं परम भाग्यवंत दोन्हीं ॥
जो पुत्रस्नेहो होता श्रीकृष्णीं ॥ तो सांडोनियां तत्क्षणीं ॥ कृष्णपरब्रह्मपणीं निश्चयो केला ॥ ४७ ॥ श्रीकृष्णीं ब्रह्मभावो ॥ धरितां निःशेष
मोह स्नेहो ॥ हृदयींचा निघोनि गेला पहाहो ॥ बाप नवलावो भाग्याचा ॥ ४८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ इतिहासमिमं पुण्यं धारयेद्यः समाहितः ॥
सविधूयेह शमलं ब्रह्मभूयाय कल्पते ॥ ५२ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥ टीका ॥
जो निमिजायंत संवाद ॥ वसुदेवा सांगे नारद ॥ हा इतिहास अतिशुद्ध[4] ॥ जीवभेदछेदक ॥ ४९ ॥ सावधानपणें श्रोतां ॥ तल्लीन
होऊनि तत्त्वतां ॥ हे इतिहासाची कथा ॥ सादरता जो परिसे ॥ ५५० ॥ तेणें सकळपुण्यांचिया राशी ॥ श्रवणें जोडिल्या अहर्निशीं ॥
तो गा पुरुष अवश्यतेसीं ॥ ब्रह्मप्राप्तीसी सत्पात्र[5] ॥ ५१ ॥ सार्थक एकएक पद ॥ परिसतां होय अंतर शुद्ध ॥ यालागीं पावे ब्रह्मपद ॥
परमानंद निजबोधें ॥ ५२ ॥ हें पंचमाध्यायीं ह्मणणें घडे ॥ पंचवक्त्र चंद्रचूडें ॥ एकादशाचें ज्ञान गाढें ॥ वर्णावया फुडें ध्वज उभविला ॥
५३ ॥ हे पंचमाध्यायीं नव्हे जाण ॥ एकादशाचे पंचप्राण ॥ उपदेशावया शुद्ध ज्ञान ॥ सामोरे आपण स्वभक्तां आले ॥ ५४ ॥
हे पंचमाध्यायीं नव्हे केंवळ ॥ पंचम[6] आलापे शुककोकिळ ॥ एकादश वसंतमूळ ॥ भक्त अतिकुळ आलापवी स्वयें ॥ ५५ ॥ हाही नव्हे
प्रकार ॥ हे शर्करा पंचधार ॥ चाखों धाडिली सत्वर ॥ ज्ञानगंभीर निजभक्तां ॥ ५६ ॥ हे पंचमाध्यायी नव्हे सिद्ध ॥ एकादशाचे
पंच गंध ॥ भक्त आंवतावया शुद्ध ॥ धाडिली प्रसिद्ध गंधाक्षता ॥ ५७ ॥ एकादश अतिविवेकी ॥ यावया पंचाध्यायी पालखी ॥ पुढें
धाडिली कवतुकीं ॥ निजभक्तविखीं[7] कृपाळुवें ॥ ५८ ॥ हे कृष्ण उद्धवधर्ममात्रा ॥ अर्धोदयो महायात्रा ॥ ते यात्रेलागीं हांकार ॥ पंचाध्यायी
खरा साधकांकरी ॥ ५९ ॥ श्रीकृष्णउद्धवमेळा ॥ देखोनि ब्रह्मसुखाचा सोहळा ॥ तो सांगों आली कळवळा ॥ भक्ताजवळां
पंचाध्यायीं ॥ ५६० ॥ अहंकाराचें मेट होतें ॥ तें उठवूनि श्रीकृष्णनाथें ॥ केलें आत्मतीर्थें मुक्तें ॥ अभयहस्तें उद्धवासी ॥ ६१ ॥ ते मुक्ता

---

१ संसारसमुद्र. २ जुना. ३ सांगे. ४ फार पवित्र. ५ अधिकारी. ६ स्वर. ७ आपल्या भक्ताविषयीं.

तीर्थनवाई ॥ पुढें सांगों आली पंचाध्यायी ॥ संसारश्रांत जेजे कांहीं ॥ ते धांवा लवलाही विश्रांतिसी ॥ ६२ ॥ कृष्ण उद्धव गोडगोष्टी ॥ हे निर्विकल्प कपिलाषष्ठी ॥ ते पर्वकाळकसवटी ॥ सांगों उठाउठीं पंचाध्यायी आली ॥ ६३ ॥ उद्धवालागीं भवसागरीं[1] ॥ उतरावया पायउतारीं ॥ भागवतमिषें श्रीहरी ॥ सुगम सोपारी पायवाट केली ॥ ६४ ॥ पोहणियाङुनी पायउतारा ॥ भागवतधर्म अतिसोपारा[2] ॥ तो मार्ग दाखवावया पुरा ॥ हाकारी स्त्रीशूद्रां पंचाध्यायी ॥ ६५ ॥ पुढील निरूपण आवडी ॥ अतिशयें वाढे चढोवढी ॥ ते कृष्णवाक्यरसगोडी ॥ पंचाध्यायी फुडी साधावया सांगे ॥ ६६ ॥ कृष्णउद्धवसंवादीं ॥ होईल परब्रह्म गवादी ॥ साधकमुमुक्षांची मांदी ॥ धांवे त्रिशुद्धी निजसुखार्थ ॥ ६७ ॥ परब्रह्म झालें साव ॥ स्वरूपसुंदर ज्ञानगौरव ॥ मनोहर रूपवैभव ॥ स्वर्गींचे देव पाहों येती ॥ ६८ ॥ तो देवांचा स्तुतिवादु ॥ सवेंचि उद्धवाचा निर्वेदु[3] ॥ कृष्णउद्धवमहाबोधु ॥ जेणें परमानंदु वोसंडे ॥ ५६९ ॥ ते पुढील अध्यायीं कथा ॥ रसाळ सांगेन आतां ॥ अवधान द्यावें श्रोतां ॥ ग्रंथार्थां निजबोधें ॥ ७० ॥ स्वयें वावडी करूनि पूर्ण ॥ तिसी उडविजे जेवीं आपण ॥ मग उडालेपणें जाण ॥ आपल्या आपण संतोषे ॥ ७१ ॥ तेवीं मजनांवें कविता ॥ करूनि स्वयें सद्गुरू वक्ता ॥ एवं वदवूनियां[4] ग्रंथार्थां ॥ श्रोतेरूपें सर्वथा संतोषे स्वयें ॥ ७२ ॥ तो एकपणेंवीण एकला एका ॥ दुजेनवीण जनार्दनसखा ॥ तेणें पुढील ग्रंथ आवांका ॥ विशदार्थें देखा विवंचिला[5] ॥ ७३ ॥ नातळोनि दुजेपण ॥ एका जनार्दना शरण ॥ धरोनि श्रोत्यांचे चरण ॥ पुढील अनुसंधान पावेल ॥ ७४ ॥ एका जनार्दननांवें देख ॥ दोनांवीं स्वरूप एक ॥ हें जाणे तो आवश्यक ॥ परमसुख स्वयें पावे ॥ ७५ ॥ एका जनार्दना शरण ॥ त्याची कृपा परिपूर्ण ॥ पंचाध्यायी निरूपण ॥ झाली संपूर्ण जनार्दनकृपां ॥ ५७६ ॥

॥ इति श्रीभागवते एकादश स्कंधे वसुदेवनारदसंवादे एकाकारटीकायां पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥

---

१ संसारसमुद्रांत. २ फार सोपा. ३ वैराग्य. ४ बोलवून. ५ सांगितला.

# अध्याय ६ वा.


ब्रह्मा, शिव, इन्द्र, कार्तीकस्वामी, गणपती, सनकादिक ऋषी.
अष्टदिक्पाल येऊन स्तुती करितात.
भगवान.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ओंनमोजी जनार्दन ॥ भावार्थें नमितां चरण ॥ जनासहित मीपण ॥ गेलें तूंपण घेऊनी ॥ १ ॥ लिंगदेहाचें मर्दन ॥ तेंचि जनाचें अर्दन ॥ यालागीं नामें जनार्दन ॥ प्रगट जाण प्रसिद्ध ॥ २ ॥ तुझी ऐशीच करणी ॥ कर्मकर्ता नुरवूनी[1] ॥ सुखें नांदविसी जनीं ॥ समाधानीं जनार्दन ॥ ३ ॥ सुखेंचि तुझें नाम घेतां ॥ घात करिसी जीविता ॥ जीव घेऊनि तत्त्वतां ॥ होसी सर्वथा कृपाळू ॥ ४ ॥ तुझे नामाचें प्रवळबळ ॥ माथा नुघविती कळिकाळ ॥ चारी मुक्ति केवळ ॥ होती निश्चळ निजदासी ॥ ५ ॥ नामें एवढें ढसाळ देणें ॥ त्या तुझें स्वरूप कोण जाणे ॥ सांडूनि जाणणें[2] नेणणें[3] ॥ निवांत रहाणें तत्त्वतां ॥ ६ ॥ तुझा स्तुतिवाद करणें ॥ तंव परतलीं श्रुतिपुराणें ॥ तेथ माझें आरुष बोलणें ॥ कोठे कोणें सारावें ॥ ७ ॥ तुझा स्तुतिवाद तें मौन ॥ तुझा कळवळा तें कीर्तन ॥ काहीं नकरणें तें अनुसंधान ॥ साचार जाण श्रीकृष्णा ॥ ८ ॥ ऐशियाही अर्थीं तुझा ठायीं ॥ अवचटें हांव उठिली देहीं ॥ तेंचि अर्थीं चित्त देयी ॥ कृपा निर्वाही गुरुराया ॥ ९ ॥ खद्योत[4] प्रकाशूं पाहे चांदा ॥ मशक गरुडासि घे खांदां ॥ तैसा मी एकादशस्कंधा ॥ मूर्ख नुसधा टीकार्थीं ॥ १० ॥ येचि विषयीं गुरुनाथा ॥ कृपा करावी सर्वथा ॥ ग्रंथरचना ग्रंथार्था ॥ सार्थकता करावी ॥ ११ ॥ ऐशी विनवणी[5] ऐकतां ॥ कृपा पद्मकर ठेविला माथां ॥ तंव उद्योत्कार जाहला ग्रंथा ॥ यथार्थता निजबोधें ॥ १२ ॥ नवल कृपेची करणी ॥ अर्थचिंतामणीची खाणी ॥ उघडली तत्क्षणीं ॥ पदार्थश्रेणी कविमुद्रा ॥ १३ ॥ लेतां सिद्ध अलंकारा ॥ कवण सांकडें[6] लेणारा ॥ ताला राखतां खांबसूत्रा ॥ लेपाच्याकरा प्रयास काय ॥ १४ ॥ बापाची पक्कान्नें घेउनी ॥ बाळ घाली बापाचे वदनीं ॥ तेणें साचचि तो संतोषोनी ॥ होय मनीं सुखाचा ॥ १५ ॥ तैशीच हेही कथा ॥ तूंचि ग्रंथ तूंचि कविता ॥ तेथें कोणी घ्यावी अहंता ॥ मी कर्ता ह्मणोनी ॥ १६ ॥ गुरूनें सांडविली अहंता ॥ शेखीं राहों न देचि अहंता ॥ तेथें मी एक कवि कर्ता ॥ हेंही सर्वथा सरेना ॥ १७ ॥ सूचिता अहंकाराचा झाडा ॥ सूचनाचि होय त्याचा जोडा ॥ जो आपणियातें ह्मणवी वेडा ॥ तोचि गाढा अतिचतुर ॥ १८ ॥ तैशीच हेही होईल वार्ता ॥ यालागीं श्रीगुरुनाथा ॥ चरणीं ठेविला माथा ॥ कर्ता करविता तूंचि तूं ॥ १९ ॥ मागील ग्रंथसंगती ॥ पंचमाध्यायाचे अंतीं ॥ नारद वसुदेवाप्रती ॥ बोलिला उपपत्ति[7] ते ऐशी ॥ २० ॥ हा परमात्मा श्रीहरी ॥ लीलाविग्रहें देहधारी ॥ अवतरला तुमच्या घरीं ॥ भाग्यें करी नट नाट्य ॥ २१ ॥ हा ईशाचाही निजईशू ॥ वैकुंठींचा निवासू ॥ परमात्मा परेशू ॥ जगदीशू श्रीकृष्ण ॥ २२ ॥ तेंचि नारदवचनप्रमाण ॥ प्रार्थावया श्रीकृष्ण ॥ मिळवोनियां देवगण[8] ॥ द्वारकेसि जाण स्वयें आले ॥ २३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीशुकउवाच ॥ ॥ अथ ब्रह्मात्मजैर्देवैः प्रजेशैरावृतोऽभ्यगात् ॥ भवश्च भूतभव्येशो

---

१ न उरवून. २ समजणें. ३ न समजणे. ४ काजवा. ५ विनंती. ६ संकट. ७ युक्ती. ८ देवांचा समूह.

ययौ भूतगणैर्वृतः ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ शुक ह्मणे परिक्षिती ॥ पहावया श्रीकृष्णमूर्ती ॥ सुरवर द्वारकेसि येती ॥ विचित्र स्थिती तिहीं केली ॥ २४ ॥ श्रीकृष्णमूर्तीचें कौतुक ॥ पहावया देव सकळिक ॥ चतुर्मुख पंचमुख ॥ वेगें सन्मुख पातले ॥ २५ ॥ करावया प्रजाउत्पत्ती ॥ पूर्वीं नमिला प्रजापती ॥ तोही आला द्वारकेप्रती ॥ कृष्णमूर्ती पहावया ॥ २६ ॥ सनकादिक आत्माराम ॥ अवाप्तसकळकाम[1] ॥ तेही होऊनि आले सकाम ॥ मेघश्याम पहावया ॥ २७ ॥ भूतनायक रुद्रगण ॥ आले अकराहीजण ॥ पहावया श्रीकृष्ण ॥ भूतगणासमवेत ॥ २८ ॥ पहावया श्रीकृष्णरावो ॥ घेऊनि गणांचा समुदावो ॥ द्वारके आला महादेवो ॥ भूतभविष्यांचा पहाहो त्रिकाळज्ञाता ॥ २९ ॥ श्रीकृष्णदर्शनाची उत्कंठा ॥ थोर लागली नीलकंठा ॥ धांवतां मोकळ्या सुटल्या जटा ॥ कृष्णवरिष्ठा पहावया ॥ ३० ॥

श्लोक ॥ ॥ इंद्रो मरुद्भिर्भगवानादित्या वसवोऽश्विनौ ॥ ऋभवोंऽगिरसो रुद्रा विश्वे साध्याश्च देवताः ॥ २ ॥ गंधर्वाप्सरसो नागाः सिद्धचारणगुह्यकाः ॥ ऋषयः पितरश्चैव सविद्याधरकिन्नराः ॥ द्वारकामुपसंजग्मुः सर्वे कृष्णदिदृक्षवः ॥ ३ ॥

॥ टीका ॥ ॥ एकुणपन्नासमरुद्गण ॥ तेणेंसि इंद्र आला आपण ॥ पहावया श्रीकृष्ण ॥ स्वयें जाण सादर ॥ ३१ ॥ सांडोनियां रविमंडळा ॥ बारा आदित्यांचा मेळा ॥ पहावया कृष्णसोहळा ॥ तृषित[3] डोळां होऊनि आले ॥ ३२ ॥ सूर्यें[2] अधिष्ठिला डोळा ॥ देखे पदार्थां सकळां ॥ कृष्ण न देखतां डोळां ॥ सूर्यो पावला अंधत्व[4] ॥ ३३ ॥ पाहतां श्रीकृष्णाचें मुखकमळ ॥ फिटलें सूर्याचें पडळ ॥ मग देखणा जाहला केवळ ॥ सर्वांगें सकळ स्वयें रवी ॥ ३४ ॥ तिन्ही अग्नी तेजागळे ॥ परी ते धूमें झांकोळले[5] ॥ कृष्ण देखतांच उजळले ॥ निर्धूम जाहले निजतेजें[6] ॥ ३५ ॥ आठां वसूंचा मेळा ॥ पाहों आला कृष्णलीला ॥ ह्मणे मदनाचा पुतळा ॥ तंव तो खेळे लीला कृष्णांकीं ॥ ३६ ॥ अश्विनीकुमार धन्वंतरी ॥ तेही भवरोगें पीडिले भारी ॥ कृष्णदर्शनामृतें करी ॥ निरुज[7] क्षणावरी ते जाहले ॥ ३७ ॥ ऋषभ देव आंगिरस ॥ रुद्र मीनले[8] असमसमास ॥ विश्वे साध्यदेव बहुवस ॥ देवीं आकाश दाटलें ॥ ३८ ॥ आमुची गायनकळा मोठी ॥ होतें गंधर्वांच्या पोटीं ॥ ते कृष्णवेणुगीतासाठीं ॥ जाहली शेवटीं नसरती ॥ ३९ ॥ यालागीं दर्शनाची आस[9] ॥ क्षणक्षणा पाहती वास ॥ त्यांसि गायनकळा सावकाश ॥ दीधली सुरस रूपामात्रें ॥ ४० ॥ अप्सरा ह्मणती आह्मी नाचणी ॥ तंव काळियाच्या फणारंगणीं ॥ एकेचि तालें लाजवूनी ॥ तत्क्षणीं सांडिल्या ॥ ४१ ॥ त्या दीनवदना कामिनी ॥ आल्या दर्शनालागोनी ॥ नाचों शिकविल्या नाचणी ॥ रासरंगणीं श्रीकृष्णें ॥ ४२ ॥ पाहावया श्रीरंग ॥ आले पाताळींचे पन्नग[10] ॥ सिद्ध चारण अनेग ॥ विद्याधर सांग समुदायें ॥ ४३ ॥ कश्यपादि ऋषीश्वर ॥ अर्यमादि पितर ॥ गुह्य

---

[1] पूर्ण आहेत मनोरथ ज्यांचे. [2] सूर्याचा. [3] तान्हेला. [4] अंधळेपण. [5] झाकले. [6] आपल्या तेजानें. [7] रोगरहित. [8] मिळाले. [9] आशा. [10] नाग.

क आणि किन्नर ॥ आले अर्धार स्वगणेंसी ॥ ४४ ॥ एवं विमानांचिया पंक्ती ॥ दाटलिया द्वारकेप्रती ॥ पाहावया कृष्णमूर्ती ॥ आले सुरपती स्वानंदें ॥ ४५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ वपुषा येन भगवान्नरलोकमनोरमः ॥ यशो वितेने लोकेषु सर्वलोकमलापहम् ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ जेणें शरीरें श्रीहरी ॥ नानाचरित्रांतें करी ॥ यश विस्तारिलें संसारीं ॥ दुराचारी तरावया ॥ ४६ ॥ ऐकतां श्रीकृष्णकीर्ती ॥ चतुर्विध प्रायश्चित्तांची गती ॥ खुंटली जी निश्चितीं ॥ श्रवणार्थीं सादर जाहलिया ॥ ४७ ॥ भावें घेतलिया श्रीकृष्णनाम ॥ सकळ पातकां करी भस्म ॥ देवीं देखिला पुरुषोत्तम ॥ विश्रामधाम जगाचें ॥ ४८ ॥ ठाणठकारें अतिउत्तम ॥ सुरनरांमाजी मनोरम ॥ डोळयां जाहला विश्राम ॥ मेघश्याम देखोनी ॥ ४९ ॥ मुगुटकुंडलें मेखला ॥ कांसे कसिला सोनेसळा ॥ कंठीं रुळे वनमाळा ॥ घनसांवळा शोभत ॥ ५० ॥ लावण्यगुणनिधान ॥ अवतारमाळे मुख्य रत्न ॥ देवीं देखिला श्रीकृष्ण ॥ निवासस्थान द्वारका ॥ ५१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तस्यां विभ्राजमानायां समृद्धायां महर्द्धिभिः ॥ व्यचक्षतावितृप्ताक्षाः कृष्णमद्भुतदर्शनम् ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ कृष्णें अधिष्ठिली पुरी ॥ कनककळसांचिया हारी ॥ रत्नें जडिलीं नानाकुसरीं ॥ तेज अंबरीं नसमाये ॥ ५२ ॥ जे द्वारकेभीतरी ॥ कामधेनू घरोघरीं ॥ कल्पद्रुमांचिया हारी ॥ खेळणीं द्वारीं चिंतामणीचीं ॥ ५३ ॥ द्वारकाजननिवासियांसी ॥ घरीं नवरत्नांच्या राशी ॥ ऋद्धिसिद्धिकरूनि दासी ॥ हृषीकेशीनांदत ॥ ५४ ॥ कृष्णरूपाचिया लालसे ॥ डोळयां तेणें लाविलें पिसें ॥ आवडी जाहलें मोरपिसें ॥ अतिडोळसें हरिअंगीं ॥ ५५ ॥ कैशी बरवेपणाची शोभा ॥ पाहतां नयनीं निघती जिभा ॥ रसाळपणें तो वालभा ॥ उपनिषद्गाभा साकारिला ॥ ५६ ॥ कृष्ण पाहावया आवडी ॥ होताहे देवासी बरपडी ॥ डोळ्यां थोर लागली गोडी ॥ अर्धघडी नविसंबती ॥ ५७ ॥ कृष्णरूपाचें कौतुक ॥ पाहतां नयनां लागली भूक ॥ अंतरीं निबिड दाटलें सुख ॥ तरी अधिकाधिक भुकेले ॥ ५८ ॥ अवलोकितां श्रीकृष्णाशी ॥ दृष्टीसी दाटणी होतसे कैशी ॥ मंडपघसणी न्याहारासी ॥ हृषीकेशी पहावया ॥ ५९ ॥ मागें पुढें श्रीकृष्णासी ॥ देखणें वेढिलें चौंपाशीं ॥ भाग्य उपजलें डोळ्यांसी ॥ पूर्णपुरुषासी देखती ॥ ६० ॥ श्रीकृष्ण घन मेघ सांवळा ॥ निजात्मभावें पाहतां डोळा ॥ सहजें शामता आली बुबुळा ॥ कृष्णकळा ठसावली ॥ ६१ ॥ जो नकळेचि वेदेंविवंचना ॥ योगियांच्या नये ध्याना ॥ त्या प्रत्यक्ष देखोनि कृष्णा ॥ भाग्यगणना अपूर्व ॥ ६२ ॥ ऐसा देखोनियां श्रीहरी ॥ देव सुमनांच्या शतधारीं ॥ बहु वर्षलेपैं अंबरीं ॥ राहोनि वरी विमानीं ॥ ६३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्वर्गोद्यानोपगैर्माल्यैश्छादयंतो यदूत्तमम् ॥ गीर्भिश्चित्रपदार्थाभिस्तुष्टुवु

---

१ कीर्ति. २ सोन्याचा. ३ वसविली. ४ आकाशांत. ५ वेदाच्या विचारास.

जगदीश्वरम् ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ मांदार पारिजात संतान ॥ कल्पद्रुम हरिचंदन ॥ ऐशिया वृक्षांचीं सुमने[1] जाण ॥ कृष्णावरी संपूर्ण वर्षले ॥ ६४ ॥ श्रीकृष्णासी चहूंकडा ॥ दिव्य सुमनांचा जाहला सडा ॥ समस्तदेवीं सन्मुख पुढां ॥ केलापैं गाढा जयजयकारू॥ ॥ ६५ ॥ सार्थ पदबंधरचना ॥ नानाप्रबंध हरिकीर्तना ॥ स्तवूं आदरिलें[2] यदुनंदना ॥ अमरसेना[3] मिळोनी ॥ ६६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ॥ देवाऊचुः ॥ ॥ नताःस्म ते नाथ पदारविंदं बुद्धींद्रियप्राणमनोवचोभिः ॥ यच्चिंत्यतेंऽतर्हृदिभावयुक्तैर्मुमुक्षुभिः कर्ममयोरुपाशात् ॥ ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ विवेकयुक्त प्राणधारणा ॥ मनसा वाचा कर्मणा ॥ नमस्कारू तुझिया चरणा ॥ सच्चिद्घना श्रीकृष्णा ॥ ६७ ॥ इंद्रिय[4]उपरमालागीं जाणा ॥ सांडूनि विषयवासना ॥ दशइंद्रियीं लागलों चरणा ॥ नमन श्रीकृष्णा निजभावें ॥ ६८ ॥ विषयीं होऊनियां उदास ॥ सांडोनि संसाराची आस[5] ॥ चरण चिंतिती तापस ॥ कर्मपाश छेदावया ॥ ६९ ॥ ऐसे मुक्तीचिया वासना ॥ मुमुक्षु चिंतिती तुझिया चरणा ॥ त्यांसि अर्धक्षण नयेसी ध्याना ॥ दृढभावना करितांही ॥ ७० ॥ ते प्रत्यक्ष तुझे चरण ॥ आह्मासि जाहलें जी दर्शन ॥ देव आपुल्या भाग्यालागुन[6] ॥ अतिस्तवन करिताती ॥ ७१ ॥ देखूनि सगुणस्वरूपाशी ॥ एवढी श्लघ्यता[7] कां ह्मणसी ॥ जें आलें आकारासी ॥ तें निश्चयेंसी मायिक ॥ ७२ ॥ जैसे तुह्मी शरीरधारी ॥ तैसाच मीही एक शरीरी ॥ त्या माझेनि दर्शनेंकरी ॥ तुह्मी कैशापरी तराल ॥ ७३ ॥ ऐसें नह्मणावें जी अनंता ॥ जे तूं मायेचा नियंता ॥ हेंही कळलें असे तत्त्वतां ॥ समूळ कथा परियेसी ॥ ७४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ त्वं मायया त्रिगुणयाऽऽत्मनि दुर्विभाव्यं व्यक्तं सृजस्यवसि लुंपसि तद्गुणस्थः ॥ नैतैर्भवानजित कर्मभिरज्यते वै यत्स्वे सुखेऽव्यवहितेऽभिरतोनवद्यः ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ ॥ झोंप लागल्या झोंप नदिसे पाही ॥ जागें जाहल्या दिसतचि नाहीं ॥ तैसी माया अतर्क्य[8] देहीं ॥ नपडे ठायीं सुरनरां ॥ ७५ ॥ मुळींच तुझी अतर्क्य माया ॥ तिसी गुणक्षोभ जाहला साव्या ॥ ते ब्रह्मादिकां नयेचि आया ॥ देवराया श्रीकृष्णा ॥ ७६ ॥ तूं धरोनि देवीमायेसी ॥ ब्रह्मादिकांतें सृजिसी[9] ॥ प्रतिपाळोनि संहारिसी[10] ॥ तूं त्या कर्मासी अलिप्त ॥ ७७ ॥ स्वप्नीं स्वयें सृष्टि सृजिली ॥ प्रतिपाळूनि संहारिली ॥ ते क्रिया कर्त्यासि नाहीं लागली ॥ तेवीं सृष्टि केली त्वां अलिप्तत्वें ॥ ७८ ॥ मृगजळाची भरणी ॥ सूर्य करी निजकिरणीं ॥ शोषूनि ने अस्तमानीं ॥ अलिप्तपणीं तैसा तूं ॥ ७९ ॥ समूळ धर्माची वाढी मोडे ॥ अधर्माची शीग चढे ॥ तैं तुज अवतार धरणें घडे ॥ आमुचें सांकडें फेडावया ॥ ८० ॥ करोनि अ

---

[1] फुले. [2] आदर केला. [3] देवाची सेना. [4] इंद्रियाच्या शांतो करिता. [5] आशा. [6] ऐश्वर्या करिता. [7] थोरवी. [8] जाणली जात नाही. [9] उत्पन्न करितोस. [10] नाश करितोस.

धर्माचा घात ॥ धर्म वाढविशी यथास्थित ॥ देवांसि निजपदीं[1] स्थापित ॥ कर्मातीत तूं श्रीकृष्णा ॥ ८१ ॥ तुज अखंडदंडायमान ॥ आत्मसुखाचें अनुसंधान ॥ तें आम्हासि नाहीं अर्धक्षण ॥ दीनवदन यालागीं ॥ ८२ ॥ ज्यासि आत्मसुख[2] निरंतर ॥ तो देहधारी परी अवतार ॥ त्याचे चरण पवित्रकर ॥ गंगासागर आदितीर्थांसी ॥ ८३ ॥ तो जरी वर्ते गुणांआंत ॥ तरी तो जाणावा गुणातीत ॥ त्याचा चरणरेणु[3] करी घात ॥ त्रैलोक्यांत महापापा ॥ ८४ ॥ ऐशी तुझ्या दासाची कथा ॥ त्या तुझे चरण वंदूं माथां ॥ असो चरणाची हे कथा ॥ कीर्ति ऐकतां निजलाभू ॥ ८५ ॥ चरण देखती ते भाग्याचे ॥ त्यांचें महिमान नवर्णवे वाचे ॥ पवित्रपण तुझिये कीर्तीचें ॥ परिस साचें स्वामिया ॥ ८६ ॥ अग्निशिखा समसमानीं ॥ इंधन[4] घालितां वाढे अग्नी ॥ आशा वाढे देहाभिमानीं ॥ श्रवणकीर्तनीं ते त्यागावी ॥ ८७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शुद्धिर्नृणां न तु तथेड्यदुराशयानां विद्याश्रुताध्ययनदानतपःक्रियाभिः ॥ सर्वात्मनाम्ऋषभ ते यशसि प्रवृद्धसच्छ्रद्धया श्रवणसंभृतया यथा स्यात् ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ कृष्णस्तवनें स्तवनांतरें ॥ श्रवणद्वारें ऐंकतां उद्धरे ॥ यालागीं स्तव्य तूंचि निर्धारें ॥ स्तवनद्वारें तारकु ॥ ८८ ॥ एवं तुझें कीर्तीचें श्रवण ॥ तेंचि मनबुद्धीशीं कारण ॥ यावेगळें जें साधन ॥ तें केवळ जाण प्रयास[5] ॥ ८९ ॥ ऐकेगा सुरवरिष्ठा ॥ तुझिया श्रवणाची उत्कंठा ॥ अंतरीं[6] पापाचा मळकटा ॥ धुवोनि चोखटा करी वृत्ती ॥ ॥ ९० ॥ तुझ्या श्रवणीं होऊनि उदास ॥ तपें तपतां तापस ॥ नानासाधनीं कर्कश ॥ जाहल्या निराश मती त्यांच्या ॥ ९१ ॥ मंत्रविद्याग्रहण ॥ विकळ उच्चारितां वर्ण ॥ शुद्धी नव्हे परी दारुण ॥ पातक पूर्ण अंगीं वाजे ॥ ९२ ॥ करितां शास्त्रश्रवण ॥ चौगुणा गर्व चढे जाण ॥ तो ज्ञातेपणाचा अभिमान ॥ ननिघे जाण चतुर्मुखा ॥ ९३ ॥ करितां वेदाध्ययन ॥ विसर गेलिया उच्चारण ॥ शुद्धी नव्हेचि परी मरण ॥ अवश्य जाण वृत्रासुराऐसें ॥ ९४ ॥ दान देतां नहुष ॥ कूपीं[7] जाहला कृकलास ॥ प्राप्ती दुरी परी नाश ॥ असमसाहस रोकडा ॥ ९५ ॥ तप करितां ऋष्यशृंगासी ॥ तो वश जाहला वेश्यांसी ॥ श्रद्धा श्रवणाचिया ऐशी ॥ शुद्धी आणिकांसी पैंनाहीं ॥ ९६ ॥ कर्म करावें यथानिगुती ॥ तंव त्या कर्माची गहन गती ॥ प्राचीनबर्ह्याची कर्मस्थिती ॥ नारदोक्तीं सांडविली ॥ ९७ ॥ कर्मीं आचमन करावें ॥ तेथ माषमात्र[8] जळ घ्यावें ॥ न्यूनाधिकत्वासवें ॥ दोष पावे सुरापानसम ॥ ९८ ॥ एवं दुष्टहृदय ज्यासी ॥ तपादिक साधनें त्यासी ॥ शुद्धि नव्हे हृषीकेशी ॥ श्रवणें कीर्तीसी नायकतां ॥ ९९ ॥ श्रवणें परिक्षिती तरला ॥ श्रवणें क्रौंच उद्धरिला ॥ मकरोदरीं[9] श्रवण पावला ॥ सिद्ध जाहला मत्स्येंद्र ॥ १०० ॥ तुझें श्रवण दोंपरी ॥ एक तें चित्तशुद्धी करी ॥ दुसरी जीवब्रह्म

---

[1] आपल्या पदांस. [2] ब्रह्माचे सुख. [3] पायाची धूळ. [4] सर्पण. [5] श्रम. [6] मनांत. [7] अडांत. [8] उडदाच्या वजना इतके. [9] माशाचे पोटांत.

ऐक्य करी ॥ दोहींपरी उद्धारू ॥ १ ॥ प्रत्यक्ष पाहतां वाराणसी ॥ श्रवणीं तारक ब्रह्म उपदेशी ॥ मुक्तीक्षेत्र जाहली काशी ॥ श्रवणें जीवासी
उद्धारू ॥ २ ॥ तूं अवाप्तसकळकाम ॥ निष्कामाचें निजधाम ॥ ऐशिया तुज करणें कर्म ॥ भक्तभ्रम छेदावया ॥ ३ ॥ नानाचरित्रांची
करणी ॥ करिता जाहलासि चक्रपाणी ॥ मोक्षमार्गाची निश्रेणी[१] ॥ दिधली रचूनी जनासी ॥ ४ ॥ चित्तशुद्धीसि कारण ॥ प्रेमयुक्त
कीर्तिश्रवण ॥ येथ सच्छ्रद्धाचि प्रमाण ॥ अकारण[२] साधनें ॥ ५ ॥ अपेक्षा जेजें साधन साधिलें ॥ तेंतें अपेक्षेनेंचि फोल केलें ॥
निरपेक्षाचें हृदय भलें ॥ वेलीगेलें परमार्थीं ॥ ६ ॥ हृदयाचे सखोल आळा ॥ स्वधर्मबीजें अंकुरला ॥ श्रद्धेचा वेल उगवला ॥ कोंभ
निघाला तरितरितू ॥ ७ ॥ सच्छ्रवणप्रबळजळें ॥ रुतलीं वैराग्यदृढमूळें ॥ वेल गेली निजबळें ॥ श्रद्धामेळें चिदाकाशीं ॥ ८ ॥ तेंचिदाकाशींचा
चंद्रमा ॥ स्वप्रकाशें तूं पुरुषोत्तमा ॥ साधक ह्मणती मेघश्यामा ॥ तुझी प्रतिमा पहावया ॥ ९ ॥ त्या तुझे श्रीचरण ॥ प्रत्यक्ष
जाहलें दर्शन ॥ घालोनियां लोटांगण ॥ चरणस्तवन करिताती ॥ ११० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्यान्नस्तवांघ्रिरशुभाशयधूमकेतुः क्षेमाय
यो मुनिभिरार्द्रहृदोह्यमानः ॥ यः सात्वतैः समविभूतय आत्मवद्भिर्व्यूहेर्चितः सवनशः स्वरतिक्रमाय ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ आमुच्या अशुभाशयाचा
घातु ॥ करितां चरणधूमकेतु ॥ तुझाचि जी विख्यातु[३] ॥ त्रैलोक्यांतु श्रीकृष्णा ॥ ११ ॥ पापइंधनाचा[४] मेळ ॥ तेथ तुझा
चरण वडवानळ[५] ॥ लागतां तो अतितेजाळ ॥ तिळें तिळ जाळित ॥ १२ ॥ ऐसा पापियांतें कांपविता ॥ प्रेमळांतें अभयदाता ॥ तुझा
चरण जी अनंता ॥ हृदयीं सर्वथा वाहती ॥ १३ ॥ तेंचि हृदय जी कैसें ॥ वोळलें भक्तिप्रेमरसें ॥ तेथें तुझे चरण सावकाशें ॥ अति
उल्हासें वाहताती ॥ १४ ॥ करितां चरणाचें ध्यान ॥ जे विसरले भूक ताहान ॥ त्यांसी द्यावया अभयदान ॥ चरण ध्वज जाण पैं
तुझा ॥ १५ ॥ तोचि चरण सन्मतो ॥ पावावया समविभूती ॥ पूजिला जी श्रीपती ॥ चतुर्मूर्ती व्यूहरूपें ॥ १६ ॥ वासुदेव संकर्षण ॥
अनिरुद्ध आणि प्रद्युम्न ॥ हाचि चतुर्व्यूह जाण ॥ पूजास्थान भक्तांचें ॥ १७ ॥ भिन्नभिन्न चारी व्यक्ती ॥ चहूं[६] रूपीं एकमूर्ती ॥ ऐसें जाणोनि
पूजिजे भक्तीं ॥ व्यूहस्थिती त्यानाव ॥ १८ ॥ सात्वत ह्मणती ते भक्त ॥ भगवत्पद ऐश्वर्यातें वांछित ॥ चतुर्व्यूहरूपें पूजित ॥
ऐश्वर्यीं चित्त[७] ठेऊनी ॥ १९ ॥ जन्ममरणप्रवाहस्थिती ॥ नासावया एक भक्ती ॥ पूजा कीजे चतुर्मूर्ती ॥ आत्मवंत सज्ञानी ॥ १२० ॥
त्रिषवण[८] त्रिकाळ ॥ पूजा करितां अविकळ ॥ भजोनि जिंतिला कळिकाळ ॥ जन्ममूळ छेदावया ॥ २१ ॥ आणिकही भक्तजन ॥ तुझें
करिताति भजन ॥ यज्ञद्वारां होमहवन ॥ विधिविधान वेदोक्त ॥ २२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यश्चिंत्यते प्रयतपाणिभिरध्वराग्नौ त्रय्या नि

---

[१] पंक्ति. [२] कारणा वांचून. [३] प्रसिद्ध. [४] पापरूप सर्पणाचा. [५] वडवाग्नि. [६] चारमूर्ती. [७] मन. [८] प्रातःकाल, माध्यान्ह, सायान्ह,

रुक्तविधिनेश हविर्गृहीत्वा ॥ अध्यात्मयोग उतयोगिभिरात्ममायां जिज्ञासुभिः परमभागवतैः परीष्टः॥ ११॥ ॥ टीका ॥ ॥ दीक्षाग्रहणीं अतिसादर ॥ यज्ञद्वारा भजनतत्पर ॥ क्रियेपासोनि नेमिले कर ॥ हस्तव्यापार नकरिती ॥ २३ ॥ तेथ वेदत्रयीची विधानकळा ॥ बाहेर त्रिगुणांची त्रिमेखळा ॥ आंत यज्ञपुरुष आव्हानिला[१] ॥ चैतन्य तेजाळा सर्वात्मा ॥ २४ ॥ तेथ ओंकार वषट्कार ॥ क्षणोक्त मंत्रउच्चार ॥ द्रव्यें अर्पिती अपार ॥ अतिपवित्र अवदानीं ॥ २५ ॥ आणिक एक योगयुक्त ॥ योगधारणा तूतें भजत ॥ प्राणापानांची समता देत ॥ आसनस्थ होऊनियां ॥ २६ ॥ वज्रासनीं दृढ बंध ॥ भेदोनि षड्चक्रांचें भेद ॥ कुंडलिनीचा स्कंध ॥ अतिसुबद्ध थापटिला ॥ २७ ॥ ते खवळली महाशक्ती ॥ वेगें चालिली ऊर्ध्वगती ॥ पवन[२] प्राशूनि[३] ग्रासिती ॥ योगी स्थिती गगनातें ॥ २८ ॥ शोषूनि सहस्रदळाचे पाट ॥ औट पीठ आणि गोल्हाट ॥ क्रमोनियां श्रीहाट ॥ अतिउद्भट ब्रह्मस्थाना ॥ २९ ॥ परमानंदाचा तेथ भोग ॥ शिवशक्तींचा संयोग ॥ यापरी अभ्यासोनि योग ॥ हा भजनमार्ग योग्यांचा ॥ १३० ॥ तुझी जाणावया माया ॥ एक भजों लागले तुझीया पायां ॥ सर्वथा अतर्क्य तुझी माया ॥ देवराया श्रीकृष्णा ॥ ३१ ॥ माया नलक्षेचि लक्षितां[४] ॥ तोचि मायामोह जाहला चित्ता ॥ मग तेसिद्धीलागीं तत्त्वतां ॥ चरण भगवंता पूजिती ॥ ३२ आणिकही एक पक्ष ॥ तुज भजावया मुमुक्ष ॥ जाहलों गा अतिदक्ष ॥ अध्यात्मपक्ष निजयोगें ॥ ३३ ॥ आत्ममायेचा नाशू ॥ करावया जिज्ञासू ॥ निजात्मबोधें सावकाशू ॥ अतिउल्हासू पूजेचा ॥ ३४ ॥ विवेकाचिया भावना ॥ नित्यानित्याची विवंचना ॥ करूनि आणितां अनुसंधाना ॥ सर्वत्र जाणा तूंचितूं ॥ ३५ ॥ जें अनित्यपणीं वाळिलें ॥ तें मायिकत्वें मिथ्या जाहलें ॥ मग चिन्मात्रैक[५] उरलें ॥ निर्वाळिलें निजरूप ॥ ३६ ॥ एवं पाहतां चहूंकडे ॥ तुझेंचि स्वरूप जिकडेतिकडे ॥ मग पूजिती वाडेकोडे ॥ निजसुखवाडें सर्वत्र ॥ ३७ ॥ जेंजें देखती जेजेठायीं ॥ तें तुजवांचूनि आन[६] नाहीं ॥ ऐसा सर्वत्र चरण पाही ॥ ठायींचा ठायीं पूजिला ॥ ३८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पर्युष्टया तव विभो वनमालयेयं संस्पर्धिनी भगवती प्रतिपत्निवच्छ्रीः ॥ यः सुप्रणीतममुयाऽर्हणमाददन्नो भूयात्सदांऽघ्रिरशुभाशयधूमकेतुः ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐसे सर्वत्र तूतें पूजिती ॥ तें भक्त पढियंते होती ॥ त्यांची पूजा तेही अतिप्रीतीं ॥ स्वयें श्रीपती वानिसी ॥ ३९ ॥ रानींची रानवड वनमाळा[७] ॥ भक्तीं आणूनि घातली गळां ॥ रमा[८] सांडोनि उताविळा ॥ स्वयें भाळला माळेसी ॥ १४० ॥ भक्तीं अर्पिली आवडीं ॥ ह्मणोनि अधिक तियेची गोडी ॥ शिळी जाहलीतरी नकाढी ॥ अर्धघडी गळाची ॥ ४१ ॥ भक्तिभावार्थें अर्पिली ॥ देवें सर्वांगीं धरिली ॥ यालागीं सुकों विसरली ॥ टवटवीत सर्व

---

१ बोलाविला. २ वायु. ३ पिऊन. ४ पाहतां. ५ चिद्रूप. ६ दूसरे. ७ कमलाची माळ. ८ लक्ष्मी.

दा ॥ ४२ ॥ तिचा आस्वादितां गंध ॥ भावें भुलला मुकुंद ॥ श्रीयेसि उपजला क्रोध ॥ सवतीसंबंध मांडिला ॥ ४३ ॥ मज नयेतां आधी ॥ भक्तीं अर्पिली नेणों कधीं ॥ मी तरुण सांडोनि त्रिशुद्धी ॥ ते वृद्ध खांदीं वाहातसे ॥ ४४ ॥ देव नेणों भोगाची खुण ॥ ते वृद्ध मी तरुण ॥ परी तिर्शींच भुलला निर्गुण ॥ गुणागुण हा नेणे ॥ ४५ ॥ मज चरणसेवा एकादेवेळा ॥ हे सर्वकाळ पडली गळां ॥ मजहूनि स्नेह आगळा ॥ नेला वनमाळा सर्वथा ॥ ४६ ॥ मातें डावलूनि वेगीं ॥ हे बैसली दोहीं अंगीं ॥ इसी बोलतो श्रीशार्ङ्गी ॥ मजचिलागीं त्यागील ॥ ४७ ॥ मज दीधली चरणाची सेवा ॥ इचा म[1]त्सरू किती साहावा ॥ आ[2]पाद आवरिलें यादवा ॥ माझी सेवा हरितली ॥ ४८ ॥ मी कुलात्मजा क्षीरा[3]ब्धीची ॥ हे रानवट रानींची ॥ खांदीं बैसली देवाची ॥ भीड भक्तांची ह्मणवूनी ॥ ४९ ॥ हे भक्तिबळें बैसली खांदीं ॥ कहीं नुतरेचि त्रिशुद्धी ॥ रमा वनमाळेतें वंदी ॥ द्वेषबुद्धी सांडोनी ॥ १५० ॥ ऐशी भक्तांची पूजा ॥ तुज आवडे गरुडध्वजा ॥ सु[4]प्रणीतभावो वोजा ॥ चरणीं तुझ्या अर्पिला ॥ ५१ ॥ तो च[5]रणधूमकेतु तुझा ॥ आमुच्या पापातें नाशू वोजा ॥ पुनःपुनः गरुडध्वजा ॥ पापसमाजा निर्दळू ॥ ५२ ॥ करितां चरणाचें वर्णन ॥ नं[6]धाये देवाचें मन ॥ पुढतपुढती चरणस्तवन ॥ ध्वजलक्षण वर्णिती ॥ ५३ ॥ श्लोक ॥ ॥ केतुस्त्रिविक्रमयुतस्त्रिपतत्पताको यस्ते भयाभयकरोऽसुरदेवचम्वोः ॥ स्वर्गाय साधुषु खलेष्वितराय भूमन् पादः पुनातु भगवन् भजतामघं नः ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ ॥ बलिबंधनीं अनंता ॥ त्रिविक्रमीं चरण वाढता ॥ सत्यलोकाही वरुता ॥ दिसे झळकता श्रीचरण ॥ ५४ ॥ चरण वाढला सर्वांवरी ॥ तो के[7]तु बोलिजे कवीश्वरीं ॥ पताका झळकत कवणे परी ॥ झुरझुरी निजगंगा ॥ ५५ ॥ बळिबंधनीं आवेश ॥ चरण उचलिला दुराश ॥ नखें भेदला आवरणकोश ॥ जळ बहुवस चालिलें ॥ ५६ ॥ चरणस्पर्शें भगवंता ॥ जाहली जीव[8]नाशी पवित्रता ॥ ब्रह्मा कमंडलीं धरितां ॥ शिवें माथां वाहिली ॥ ५७ ॥ चरण ध्वजीं पताका ते गंगा ॥ त्रिवाहिनी त्रिपथगा ॥ चरणशोभा श्रीरंगा ॥ नयनब्रह्मा उल्हासू ॥ ५८ ॥ केतु झळकल्या पाठी ॥ आ[9]सुरी सेनेसि भय उठी ॥ दैवी संपत्तीचे पोटीं ॥ अत्यंत उठी आल्हादु ॥ ५९ ॥ आणिक चरणाची कथा ॥ देवासि स्वर्गसुखदाता ॥ तोच अधर्मवंता ॥ होय तत्वतां नरकहेतू ॥ १६० ॥ एक तरले चरण पूजितां ॥ एक तरले चरण ध्यातां ॥ चरण उपेक्षिती सर्वथा ॥ अधःपाता ते जाती ॥ ६१ ॥ चरण वंदिती कां निंदिती ॥ ते नि[10]जपदाप्रती जाती ॥ सर्वथा जे उपेक्षिती ॥ अधोगती तयांसी ॥ ६२ ॥ चरण वंदितां तरली शिळा ॥ निंदितां उद्धरिलें शिशुपाळा ॥ जे उपेक्षिती चरणकमळा ॥ तयां खळां रौरव ॥ ६३ ॥ ऐके स्वामिया व्यापका ॥ ऐसा तुझा

---

१ द्वेष. २ पायापर्यंत. ३ दुग्धसमुद्राचो. ४ नम्रभाव. ५ पाय हाच अग्नि. ६ धात नाही. ७ ध्वज. ८ पाण्यास. ९ दैत्याच्या सैन्यास. १० आपल्या पदास.

चरण निका ॥ आमुच्या सकळपातकां ॥ क्षणार्धें देखा उद्धारु ॥ ६४ ॥ जेथ पापाचा जाहला उद्धारू ॥ तेथ सहजचि खुंटला दुराचारू ॥ ऐसा तरावया संसारू ॥ चरण साचारू पैं तुझा ॥ ६५ ॥ ॥ श्लोक ॥ नस्योतगावइव यस्य वशे भवंति ब्रह्मादयस्तनुभृतोमिथुरर्घमानाः ॥ कालस्य ते प्रकृतिपूरुषयोः परस्य शंनस्तनोतु चरणः पुरुषोत्तमस्य ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ निजसुखातें विस्तारितां ॥ तुझा चरण जी अच्युता ॥ काळादिकर्मांचा शास्ता[1] ॥ आत्मनियंता देवाचा ॥ ६६ ॥ तूं काळाचा निजनियंता ॥ काळासि आकाळे नकरवे सत्ता ॥ देवांसि अधिकारीं स्थापिता ॥ देवनियंता तूं कृष्णा ॥ ६७ ॥ कर्मस्वामी तूं कृष्णनाथा ॥ इंद्रियक्रिया समस्ता ॥ कोणा नकरवे[2] अन्यथा ॥ कर्मनियंता श्रीकृष्ण ॥ ६८ ॥ ब्रह्मादिक शरीरधारी ॥ तुज आधीन गा श्रीहरी ॥ जैसे नाथिले बैल नांगरीं ॥ कृषीवळू[3] धरी सामर्थ्यें ॥ ॥ ६९ ॥ तेथ जो राहेगा मागें पुढें ॥ तो झोडिजे आसुडें ॥ तुझे आज्ञेवरी रोकडे ॥ वर्तंती गाढे कळिकाळादिक ॥ १७० ॥ संसारलक्षण शेतासी ॥ अधिकारी जुंफोनि सर्वांसी ॥ निजकर्में क्षेत्रासी ॥ तूं वाहविसी निजाज्ञा ॥ ७१ ॥ रोंवोनि अहंकाराची मेढी[4] ॥ महत्तत्त्वांचें खळें झाडी ॥ त्रिगुणदोरें बापुडीं ॥ बांधिशी कडोविकडी जीवपशूंतें ॥ ७२ ॥ उदोअस्तांचेनि झणत्कारें ॥ देतां निजकर्मांचे फेरे ॥ जो खांदा चुकवोनि वोसरे ॥ तोचि मारें मारिजे ॥ ७३ ॥ हा बोल जरी ह्मणसी वायां ॥ सृष्टिकर्त्री धरिती माया ॥ मजसी संबंध नाहीं यया ॥ देवराया हें नह्मणें ॥ ७४ ॥ मायेसि तूंच अधिष्ठान ॥ यालागीं तूं परमकारण ॥ तुझिये मांडीवरी जाण ॥ क्रीडास्थान प्रकृतिपुरुषां ॥ ७५ ॥ तूं मायेहूनि अपारू ॥ प्रकृतिपुरुषांहूनि परू ॥ काळाचा काळ तूं दुर्धरू ॥ सर्वसंहारू कर्ता तूं ॥ ७६ ॥ आमुच्या निजसुखा[5] उत्तमा ॥ तुझा चरणविस्तार मेघश्यामा ॥ हेंचि मागणें पुरुषोत्तमा ॥ कृपा आज्ञावरी कीजे ॥ ७७ ॥ ॥ श्लोक ॥ अस्यासि हेतुरुदयस्थितिसंयमानामव्यक्तजीवमहतामपि कालमाहुः ॥ सोऽयंत्रिणाभिरखिलापचये प्रवृत्तः कालो गभीररय उत्तमपूरुषस्त्वम् ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ जगाची उत्पत्ति स्थिती ॥ तुजचिपासोनि श्रीपति ॥ सकलसंहारिता अंतीं ॥ तूंचि निश्चितीं महाकाळ ॥ ७८ ॥ क्षोभलिया तामसी शक्ती ॥ सृष्टीचा प्रळय करी अंतीं ॥ तेथें बीजरूपीं अव्यक्तीं ॥ जीव राहती सूक्ष्मत्वें ॥ ७९ ॥ मग उत्पत्तीचे काळवेळे ॥ तींच बीजें विरूढती[6] सकळें ॥ पाल्हेजती स्थितिकाळें ॥ पुष्पफळें सफळित ॥ १८० ॥ हे गुणक्षोभाची अवस्था ॥ तेथ मी नव्हे प्रलयकर्ता ॥ ऐसें ह्मणसी जरी कृष्णनाथा ॥ तरी हे कथा परियेसी ॥ ८१ ॥ तुझा साचार जाहलिया भावो ॥ माया महत्तत्त्व आणि जीवो ॥ नासोनियां दास पाहाहो ॥ निजपदीं[7] निर्वाहो भोगिती ॥ ८२ ॥ त्या तुज सकळ संहारितां ॥ कोण निर्घटता कृष्णनाथा ॥

---

१ दंड करणारा. २ करवत नाही. ३ शेतकरी. ४ तिवढा. ५ स्वात्मसुखास. ६ उगवतात. ७ आपल्या स्थानावर.

कारणेंसी प्रळयकर्ता ॥ तूंचि सर्वथा महाकाळू ॥ ८३ ॥ कळोंनेदिसी संसारस्थिती ॥ अतिसूक्ष्म काळगती ॥ नाश करिशी अंतीं ॥ नि
जप्रकृतीसी विकार ॥ ८४ ॥ प्रळयासि प्रमाण मूळ ॥ लव निमेष घटिका पळ ॥ अहोरात्र त्रिकाळ ॥ त्रिनाभी केवळ जो ह्मणी पैं
॥ ८५ ॥ ऐसिये गंभीरगतीसी ॥ माया महत्तत्त्व नाशिसी ॥ तो तूं महाकाळ होसी ॥ हृषीकेशी श्रीकृष्णा ॥ ८६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ त्वत्तः
पुमान् समधिगम्य ययाऽस्य वीर्यं धत्ते महांतमिव गर्भममोघवीर्यः ॥ सोयं तयानुगत आत्मन आंडकोशं हैमं ससर्ज बहिरावरणैरुपते
म् ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ पुढतीं सृष्टीचा सृजिता[1] ॥ तूंचि होशी गा अनंता ॥ ते उत्पत्तीची अवस्था ॥ मूळकर्ता तूंचि तूं ॥ ८७ ॥ तुझी
लोहोनि[2] वीर्यशक्ती ॥ होय पुरुषासि पुरुषत्वप्राप्ती ॥ तेणें अंगीकारूनि प्रकृती ॥ केलें उत्पत्ती गर्भाधान ॥ ८८ ॥ तेचि तेवेळीं प्रकृती ॥
महत्तत्वीं होय गर्भवती ॥ पंचतत्वेंसी गर्भीं धरिती ॥ हिरण्यवर्ण अंडातें ॥ ८९ ॥ तें अमोघ वीर्य प्रबळ ॥ गर्भीं विश्वाकार बाळ ॥ ध
रिती जाहली वेल्हाळ ॥ ब्रह्मांड सकळ अंडामाजी ॥ १९० ॥ जैसें गर्भासि उल्व[3] जाण ॥ तैसें अंडासि बहिरावरण ॥ सप्तधा नेमस्त
प्रमाण ॥ तूं निर्माण करविता ॥ ९१ ॥ पृथ्वी जल अनल[4] अनिल ॥ नभ आणि अहंकार स्थूळ ॥ सातवें तें अतिसबळ ॥ जाण केवळ
क्रियासूत्र ॥ ९२ ॥ त्या गर्भासि जतनेवरी ॥ तूंचि आंतूं आणि बाहेरी ॥ रिघालासि सूत्रधारी ॥ खांबसूत्रीं जैसापैं ॥ ९३ ॥ ऐसें जग
जाहलें दोघांपासूनि ॥ परी तिसरें नदेखों कोणी ॥ अवघी सृष्टी दोघीजणीं ॥ दुमदुमुनी भरली असे ॥ ९४ ॥ वाती लावूनि पाहतां ॥ तिसरें
नलगेचि हातां ॥ दुसरी प्रकृती निर्धारितां ॥ नेही सर्वथा टवाळ ॥ ९५ ॥ ऐसा दुजेनिवीण एकला ॥ एकलाचि विश्व जाहला ॥ आकळी
त कौशल्यकळा ॥ मल्लमर्दना[5] श्रीकृष्णा ॥ ९६ ॥ एवं एकलेपणें तूं कर्ता ॥ त्यालागीं लेप नलगे सर्वथा ॥ कर्म करूनि तूं अकर्ता ॥ तेचि क
था परियेसी ॥ ९७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तत्तस्थुषश्च जगतश्च भवानधीशो यन्माययोत्थगुणविक्रिययोपनीतान् ॥ अर्थान् जुषन्नपि हृषीकप
ते नलिप्तो येऽन्ये स्वतःपरिहृतादपि बिभ्यति स्म ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ ॥ चरें आणि अचरें ॥ जंगमें आणि स्थावरें ॥ या जगाचा स्वामी
तूं निर्धारें ॥ केलें खरें गतश्लोकीं ॥ ९८ ॥ तेंचि स्वामित्व कैसें घडे ॥ हें जरी पुससी धडफुडें ॥ तरी तेहीं विखीं रोकडे ॥ वचन गाढें अव
धारी ॥ ९९ ॥ निजमायेचेनियोगें ॥ नाना विषय भोग भोगिसी अंगें ॥ तें भोगिलेंपण अंगीं नलागे ॥ अकर्तात्मसंगें[6] अलिप्त ॥ २०० ॥
तोचि अकर्तात्मबोधू कैसा ॥ जरी ह्मणशी हृषीकेशा ॥ तें आगमनिगम अतर्क्यदशा ॥ परमपुरुषा परियेसी ॥ १ ॥ भोग्य भोग भोक्ता ॥
या तिहींतें तूं प्रकाशिता ॥ जेवीं घटीं बिंबोनि सविता[7] ॥ अलिप्तता स्वभावें ॥ २ ॥ घटजळप्रतिबिंबासी ॥ स्वयें सविता प्रकाशी ॥ प्रकाशू

---

[1] उत्पत्ति करणारा. [2] मिळून. [3] जाळे. [4] अग्नि. [5] मल्ल दैत्याचा नाश करणारा. [6] अकर्ता आत्म्याच्या संगतीनें. [7] सूर्य.

नि अलिप्त त्यासी ॥ तेवीं तूं भोगासी श्रीकृष्णा ॥ ३ ॥ अथवा कारण कार्य कर्ता ॥ या तिहींमाजी निजात्मता[1] ॥ देखे तो अभोक्ता ॥ भोगोनि तत्त्वनां निजभोग ॥ ४ ॥ दर्पणींच्या प्रतिबिंबाशीं ॥ जो प्रवर्तला भोगासी ॥ व्यभिचाराचा आळ त्यासी ॥ केवीं अंगासी लागेल ॥ ५॥ जगचि हें अवघें॥ जो होऊनि ठाके अंगें ॥ त्यासि बाधावें कोणें भोगें ॥ निजात्मयोगें योगिया ॥ ६ ॥ ऐशिया बोधाचे नि बळें ॥ तो विषयावरी जरी लोळे॥ तरी विषयाचेनि विटाळें ॥ बोध नमळे तयाचा ॥७॥ तो घेणें देणें करी ॥ पाहतां दिसे व्यवहारी॥ नांदतांही घरदारीं॥ त्यामाझारी तो नाहीं ॥८॥ नेणोनियां बोधाची मागी॥ भोगत्यागें केला योगी॥ तरी कांपताति सर्वांगीं॥ वासना अंगीं उरलीसे ॥ ९ ॥ स्वप्नीं विषय देखती ॥ जागे जाहल्या प्रायश्चित्त घेती ॥ नाहीं मावळली अहंकृती[2] ॥ यालागीं भीती सर्वदा ॥ २१० ॥ ऐशियाजी विषयभेडा॥ नाहीं निजबोधू धडफुडा ॥ तैसा नव्हेसि तूं निधडा ॥ दिसे रोकडा निजबोधू ॥ ११ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्मायावलोकलवदर्शितभावहारिभ्रूमंडलप्रहितसौरतमंत्रशौंडैः ॥ पत्न्यस्तु षोडशसहस्रमनंगबाणैर्यस्येंद्रियं विमथितुं करणैर्न विभ्व्यः ॥१८ ॥ ॥ टीका ॥ ॥ मीं निधडा निजबोधें[3] संपूर्ण ॥ ह्मणशी देखोंशके कवण ॥ ये अर्थीचें उपलक्षण ॥ ऐक ते खूण स्वामिया ॥ १२ ॥ सोळासहस्रपत्नीचे घरीं ॥ आणि गोकुळीच्या परनारी ॥ कुब्जादि मथुरेमाझारी॥ कर्णकुमारी भोगिल्या ॥ १३ ॥ मुंजी नव्हतां आधी॥ भोगिली त्वां गोंवळी पेंदी ॥ धरोनियां सादीबिदी ॥ नदोंनदीं असंख्य ॥ १४ ॥ अविधी भोगितां नारी ॥ बोध न मळेचि श्रीहरी ॥ अंगें रिघालासि क्षीरसागरीं[4] ॥ अर्जुना करीं धरोनी ॥ १५ ॥ शेषशायी नारायणा ॥ उत्कंठा तुझिया दर्शना ॥ तेणें उपावो[5] केला जाणा ॥ हरूनि ब्राह्मणाचीं बाळें ॥ १६ ॥ जेवीं आपुलें स्वरूप आपण ॥ पहावया कीजे दर्पण[6] ॥ तेंवीं पहावया कृष्णार्जुन ॥ स्वयें नारायण अपत्यें आणवी ॥ १७॥ तूं अवतार नरनारायण ॥ तुझें घ्यावया दर्शन ॥ ब्राह्मण अपत्यें जाण ॥ म्यां आपण आणिलीं ॥ १८ ॥ ऐसे नारायणाचे बोल ॥ सप्रेम अतिसखोल ॥ आह्मी ऐकिले गा सकळ॥ तुझा बोध अकळ[7] श्रीकृष्णा ॥ १९ ॥ तीं ब्राह्मणाचीं अपत्यें ॥ जीं बहुकाळ जाहलीं होतीं मृतें ॥ तुवां आणोनि दीधलीं श्रीअनंतें ॥ तीं देखिलीं समस्तें[8] चरितें आह्मी ॥ २२० ॥ तुझी नारायणासि आस्था ॥ तेथ आमुची कवण कथा ॥ पार नकळे जी अच्युता ॥ गुणातीता श्रीकृष्णा ॥ २१ ॥ मागां अवतार जाहले ॥ परी ऐसें चरित्र नाहीं केलें॥ विधिवेदां लाजविलें ॥ व्यभिचारियां दीधलें निजपद ॥ २२ ॥ म्यां भोगिलें स्त्रियांसो ॥ ते तूं उदासीनत्वें ह्मणसी ॥ तेणें बाध नपवे बोधासी[9] ॥ हृषीकेशी तें नघडे ॥ २३ ॥ हावभाव विलासेंसी ॥ अंगें दाविती चपळतेसी ॥ तुज लक्षोनि पुरुषोत्तमासी ॥ का

---

१ आपलें आत्मपण. २ अहंकार. ३ स्वरूपाच्या ज्ञानानें. ४ दुधाचे समुद्रांत. ५ उपाय. ६ आरसा. ७ नकळणारा. ८ सर्व. ९ साक्षात्कारास.

मबाणासी योजिती ॥ २४ ॥ वाऊनि भूमंडलाचे वेढे ॥ व्यंकट कटाक्षें बाण गाढे ॥ सुरतमंत्री रोकडे ॥ केले धडफुडे सतेज ॥ २५ ॥ ज्या बाणाचे घायीं ॥ इंद्र चंद्र खोंचले सहस्रांठायीं ॥ शिव लोळविला पाही ॥ मोहिनीव्यां[1]मोहीं महाबाणें ॥ २६ ॥ ज्या बाणाचा पिसारा ॥ लागतांचि पैं भेदरा ॥ तापसी घेतला पुरा ॥ सोडोनि घरदारा पळाले ॥ २७ ॥ तैसे सोळासहस्र बाण ॥ अखंड तुजवरी अनुसंधान ॥ करितां नमळे बोध[2] जाण ॥ अतिविंदान हें तुझें ॥ २८ ॥ घरींच्या स्त्रिया सहस्र सोळा ॥ गोकुळादि मथुरेच्या अबळा ॥ तुजविषयीं करावया गोपाळा ॥ नव्हती सकळा समर्था ॥ २९ ॥ त्यांचेनि तुज नकरवेचि विषयी ॥ परी त्या त्वां केल्या निर्विषयी ॥ ऐसा तूं त्रैलोक्याचाठायीं ॥ स्वामी पाही श्रीकृष्णा ॥ २३० ॥ ऐशी तुझी कीर्ती ऐकतां ॥ अथवा चरणतीर्थ घेतां ॥ याचि दोहींची समर्थता ॥ पवित्रता[3] जगासी ॥ ३१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विभ्व्यस्तवामृतकथोदवहास्त्रिलोक्याः पादावनेजसरितः शमलानि हंतुम् ॥ आनुश्रवं श्रुतिभिरंघ्रिजमंगसंगैस्तीर्थद्वयं शुचिषदस्त उपस्पृशंति ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ ॥ तुझिये कीर्तीचें श्रवण ॥ आंतरमलाचें[4] क्षालन ॥ करूनियां वृत्ति जाण ॥ परमपावन कीर्तनें ॥ ३२ ॥ तुझिया चरणीची गंगा ॥ सकळ पातकें ने भंगा[5] ॥ ते पायवणी[6] श्रीरंगा ॥ पवित्र जगातें करी ॥ ३३ ॥ या दोहीं तीर्थांचें सेवन ॥ अखंड करिती साधुजन ॥ तेणें होऊनि परमपावन ॥ समाधान निजवृत्ती ॥ ३४ ॥ अवताराचे अंतीं ॥ ये दोन्हीं तीर्थीं अतिविख्यातीं ॥ प्रगट केली तुवां क्षिती ॥ तरावया श्रीपती निजदासा ॥ ३५ ॥ एक श्रवणें एक स्नानें ॥ दोन्हीं तीर्थें परमपावनें ॥ प्रगट केली जगजीवनें ॥ मलिनजनें तरावया ॥ ३६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीबादरायणिरुवाच ॥ इत्यभिष्टूय विबुधैः सेशः शतधृतिर्हरिम् ॥ अभ्यभाषत गोविंदं प्रणम्यांबरमाश्रितः ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ शुक ह्मणें परिक्षिती ॥ यापरी देवीं समस्तीं ॥ स्तविला[7] आनंदें[8] श्रीपती ॥ परमभक्तो भावार्थें ॥ ३७ ॥ ऐसा करूनि स्तुतिवादु ॥ संतोषविला गोविंदु ॥ देवासि होत असे आल्हादु ॥ परम विनोदु सर्वांसी ॥ ३८ ॥ स्तुति करावया अग्रणी[9] ॥ ब्रह्मा शिव पुढें येऊनी ॥ तींहीं जयजयकार करूनी ॥ लोटांगणें घातलीं ॥ ३९ ॥ देव राहूनियां गगनीं ॥ हात जोडोनियां विमानीं ॥ विनंती करावयालागोनी ॥ ब्रह्मा पुढें राहोनी बोलत ॥ २४० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ब्रह्मोवाच ॥ भूमेर्भारावताराय पुरा विज्ञापितः प्रभो ॥ त्वमस्माभिरशेषात्मंस्तत्तथैवोपपादितम् ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥ उतरावया धराभारा[10] ॥ पूर्वीं प्रार्थिलासि यदुवीरा ॥ अभय द्यावया सुरवरां ॥ आह्मी श्रीधरा विनविलें ॥ ४१ ॥ आह्मी विनविलें जैसें ॥ तुवां कार्य केलें ह्मणों कैसें ॥ त्याहूनियां विशेषें ॥ केली निजविन्यासें धर्मवृद्धी ॥ ४२ ॥ तूं सर्वेश्वर सर्वात्मा ॥ जें कार्य नकळेचि

---

[1] मोहानें. [2] ज्ञान. [3] पवित्रपणा. [4] मनातील पापाचे. [5] नाशास. [6] गंगा. [7] स्तुति केली. [8] आनंद. [9] पुढारी. [10] पृथिवीच्या भारास.

आज्ञा ॥ तेंही तुवां पुरुषोत्तमा ॥ घनश्यामा संपादिलें[1] ॥ ४३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ धर्मश्च स्थापितः सत्सु सत्यसंधेषु वै त्वया ॥ कीर्तिश्च दिक्षु विक्षिप्ता सर्वलोकमलापहा ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥ सत्यवादी साधु जे कांहीं ॥ ज्यांचा संकल्प तुझ्या पायीं ॥ धर्म स्थापिला त्यांच्याठायीं ॥ तुवां पाही यथास्थित ॥ ४४ ॥ आणिक दशदिशांप्रती ॥ विस्तारिली उदार कीर्ती ॥ तेणें पावन[2] त्रिजगतीं ॥ होय निश्चितीं श्रवणद्वारें ॥ ४५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अवतीर्य यदोर्वंशे बिभ्रद्रूपमनुत्तमम् ॥ कर्माण्युद्दामवृत्तानि हिताय जगतोऽकृथाः ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ पूर्णपुरुषा हृषीकेशी ॥ तूं अवतरलासि यदुवंशीं ॥ सीमा तुझिया रूपाशीं ॥ बरवेपणासी नकरवे ॥ ४६ ॥ तूं सर्वांमाजी सर्वोत्तम ॥ देखतां वृत्तीसि उपरम ॥ लीलाविग्रही[3] पुरुषोत्तम ॥ मनोरम सकळिकां ॥ ४७ ॥ कर्में केलीं परमद्भुतें ॥ गोवर्धन धरिला वामहस्तें ॥ मुखें प्राशूनि वणव्यातें ॥ गोपाळांतें वांचविलें ॥ ४८ ॥ मृतां आणिलें गुरुपुत्रांशी ॥ गत गर्भ भेटविले देवकीशी ॥ गोपाल वत्सें तूं जाहलासी ॥ विधात्यासी[4] भुलविलें ॥ ४९ ॥ जगाचिया परमहिता ॥ लागीं नानाचरित्रकथा ॥ करिता जाहलासि श्रीअनंता ॥ कृष्णनाथा निजजनका ॥ २५० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यानि ते चरितानीश मनुष्याःसाधवः कलौ ॥ शृण्वंतःकीर्तयंतश्च तरिष्यंत्यंजसा तमः ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ कथाकौतुकें विचित्रें ॥ नानापरीचीं चरित्रें ॥ परमपावन पवित्रें ॥ येणें अवतारें त्वां केलीं ॥ ५१ ॥ कलियुगीं साधुजन ॥ याचरित्राचें श्रवण कीर्तन ॥ करितां तरले जाण ॥ मायामोह त्रिगुणेंसी ॥ ५२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदुवंशेऽवतीर्णस्य भवतः पुरुषोत्तम ॥ शरच्छतं व्यतीयाय पंचविंशाधिकं प्रभो ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ अवतरल्या[5] यदुवंशीं ॥ पुरुषोत्तमा हृषीकेशी ॥ संख्या या अवतारासी ॥ जाहली ते तुजपाशीं सांगेन ॥ ५३ ॥ मृत्युलोकीं मनुष्यमर्यादा ॥ शतवर्षें जी गोविंदा ॥ ते अतिक्रमोनि आंवदा ॥ अधिक मुकुंदा पंचवीस जाहलीं ॥ ५४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नाऽधुना तेऽखिलाधार देवकार्यावशेषितम् ॥ कुलं च विप्रशापेन नष्टप्रायमभूदिदम् ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ॥ आतां पुढें येथें कांहीं ॥ देवकार्य[6] उरलें नाहीं ॥ यादवकुळ ह्मणसी तेंहीं ॥ नष्टप्राय[7] पाही उरलेंसें ॥ ५५ ॥ उठवणी आलें हतिरू ॥ कां पांख उपडिल्या पांखरूं ॥ तैसा यादवांचा दळभारू ॥ भूमिये भारू उरला असे ॥ ५६ ॥ निवणाचा फुटका डेरा ॥ कां क्षयो लागल्या राजकुमरा ॥ वणवा आहाळल्या अजगरा[8] ॥ यादववीरां ते दशा ॥ ५७ ॥ दारुण ब्राह्मणाचा शाप ॥ नाशला वीर्यशौर्यप्रताप ॥ गळाला वाढिवेचा दर्प ॥ केवळ प्रेतरूप दिसताती ॥ ५८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ततःस्वधाम परमं विशस्व यदि मन्यसे ॥ सलोकान् लोकपालान्नः पाहि वैकुंठकिंकरान् ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ ॥ यालागीं जी यादवराया ॥

---

१ मिळविले. २ पवित्र. ३ मजेनें शरीर धारण करणारा. ४ ब्रह्मदेवास. ५ प्रकट झाल्यास. ६ देवांचें काम. ७ नाहीं झाल्या सारखें. ८ सर्पास.

आह्मी वांच्छूं तुझ्या पायां ॥ वेग कीजे स्वधामा यावया ॥ सुरवर्या श्रीकृष्णा ॥ ५९ ॥ ऐके देवकीनंदना ॥ जरी मानेल तुझिया
मना ॥ तरी निघिजेजी याचियाक्षणा ॥ सुरसेना तिष्ठत ॥ २६० ॥ सलोक लोकपाळ जेजे ॥ त्यांवरी तुवां कृपा कीजे ॥ आह्मी
किंकर गा तुझे ॥ वचन मानिजे दासांचें ॥ ६१ ॥ ऐके जी वैकुंठनाथा ॥ तुझी थोर आह्मां आस्था ॥ आदिकरूनि उमाकांता ॥
आणि समस्तां देवांसी ॥ ६२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ अवधारितमे तन्मे यदात्थ विबुधेश्वर ॥ कृतं वः कार्यमखिलं
भूमेर्भारोवतारितः ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो योगज्ञाना मुकुटमणी ॥ मेघगंभीरया वाणी ॥ ब्रह्मयाप्रती चक्रपाणी ॥ हांस्यवदनीं
बोलिला ॥ ६३ ॥ नादब्रह्म मुसावलें ॥ कीं निजानंदाचें फळ पिकलें ॥ तैसें श्रीमुखें बोलों आदरिलें ॥ भाग्य उदेलें श्रवणाचें
॥ ६४ ॥ गौरवें ह्मणे ब्रह्मदेवा ॥ संतोषलों तुझिया भावा ॥ पुत्रस्नेहेंकरूनि तेव्हां ॥ उदित खेवा हरि जाहला ॥ ६५ ॥ आवडी
ह्मणें विबुधेंद्रा ॥ सत्य तुझी वाङ्मुद्रा ॥ तुझेनि वचनें ब्राह्मणेंद्रा ॥ धराभारा उतरिलें ॥ ६६ ॥ सकळ कार्य निःशेख ॥ म्या संपादिलें
देख ॥ तरी उरलें असे एक ॥ थोर अटक मजलागीं ॥ ६७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तदिदं यादवकुलं वीर्यशौर्यश्रियोद्धतम् ॥ लोकंजिघृक्षद्रुद्धं
मे वेलयेव महार्णवः ॥ २९ ॥ यद्यसंहृत्य दृप्तानां यदूनां विपुलं कुलम् ॥ गंतास्म्यनेन लोकोऽयमुद्वेलेन विनंक्ष्यति ॥ ३० ॥
॥ टीका ॥ ॥ हें यादवकुळ येथ ॥ वीर्यशौर्यश्रियोद्धत ॥ धर्म नाशावया उद्यत ॥ अतिदृप्त निजबळें ॥ ६८ ॥ हे छेदूं पाहती धर्ममूळें ॥
म्यां आवरिले असती योगबळें ॥ जेवीं समुद्र निजमर्यादेवेगळे ॥ असे राखिले नमूनी ॥ ६९ ॥ सांडोनि ऐशियांसी ॥ मज गेलिया
निजधामासी ॥ हे प्रवर्ततील अधर्मासी ॥ कोण यांसी वारील ॥ २७० ॥ जैसा निर्मर्याद सागरू ॥ खवळल्या सर्वसंहारू ॥ त्यासि
कोण शकेल आवरूं ॥ तैसा विचारू होईल ॥ ७१ ॥ हे अधर्मपर होतील गाढे ॥ तुह्मांसि पडेल सांकडें ॥ सांगों धांवाल मजपुढें ॥ यांचें
रोकडें गाऱ्हाणें ॥ ७२ ॥ हे नाटोपती देवां ॥ नाकळती दैत्यां दानवां ॥ हे अधर्म करिती जेव्हां ॥ तुह्मीच मज तेव्हां सांगोंयाल ॥ ७३ ॥
॥ श्लोक ॥ ॥ इदानीं नाश आरब्धः कुलस्य द्विजशापजः ॥ यास्यामि भवनं ब्रह्मन्नेतदंते तवानघ ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ ॥ यालागीं
कुळनाशासि त्वरित ॥ आजिपासोनि सुमुहूर्त ॥ केला असेगा निश्चित ॥ यथोचित यादवां ॥ ७४ ॥ ऐके सखया प्रजापती ॥ या
कुळनाशाचिया अंतीं ॥ तुझिया भुवनावरूनि निश्चितीं ॥ निजधामाप्रती येईन ॥ ७५ ॥ ऐसें बोलिला प्रभू ॥ ऐकोनि शंभु स्वयंभू ॥
आनंदला देवकदंबु ॥ समारंभू मांडिला ॥ ७६ ॥ जयजयकारू केला सकळीं ॥ परमानंदें पिटिली टाळी ॥ चरण वंदूनि वनमाळी ॥

---

१ वैकुंठास. २ मान्य असेल तर. ३ देवांची सेना. ४ हांसत मुखानें. ५ देवश्रेष्ठा. ६ सर्व. ७ केलें. ८ अति उन्मत्त. ९ निवारण करील. १० यथायोग्य. ११ देवांचा समूह.

पुष्पांजळी अर्पिल्या ॥ ७७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ इत्युक्तो लोकनाथेन स्वयंभूः प्रणिपत्य तम् ॥ सह देवगणैर्देवः
स्वधाम समपद्यत ॥ ३२ ॥ ॥ टीका ॥ शुक ह्मणे परिक्षिती ॥ ऐकोनि कृष्णवदंती[1] ॥ सुरवर[2] आनंदले चित्तीं ॥ आल्हादें करिती
अभिवंदन ॥ ७८ ॥ धाता सविता शूलपाणी ॥ मिळोनियां देवगणीं ॥ कृष्णासि येऊनि लोटांगणीं ॥ चरण वंदूनी निघाले ॥ ७९ ॥
एवं वंदूनि श्रीपती ॥ आपुलालिया स्थानाप्रती ॥ निघाल्याजी देवपंक्ति ॥ पवनगती[3] विमानें ॥ २८० ॥ श्लोक ॥ ॥ अथ तस्यां महो
त्पातान् द्वारवत्यां समुत्थितान् ॥ विलोक्य भगवानाह यदुवृद्धान् समागतान् ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ कुळनाश करणें रोकडें ॥ ऐसें
कृष्णें नेमिलें धडफुडें ॥ तंव द्वारकेसि येरीकडे ॥ महोत्पात गाढे उठिले ॥ ८१ ॥ गगनीं[4] निघाले त्रिकेतु ॥ धूमकेतू दंडकेतु ॥ शिखेस
हित शिखाकेतु ॥ गगनाआंतू उगवले ॥ ८२ ॥ मध्याह्नीं जाहला आघात ॥ दिवसा उल्कापात होत ॥ भूतें नागवीं नाचत ॥ गगना
आंत रुदती ॥ ८३ ॥ वृक जंबुक नगराआंत ॥ दिवसां चौबारा कुंकात ॥ नगरीं भालुवा भुंकत ॥ जन कांपत देखोनी ॥ ८४ ॥ नग
राआंत बाहेरी ॥ श्वानांच्यीं रडणीं भारी ॥ मार्जारकलहो[5] नगरीं ॥ घरोघरीं होतसे ॥ ८५ ॥ गाई आरडती मध्यरात्रीं ॥ लेंकुरें खेळ
ती झुंझारी ॥ माणसांतें झडपिती घारी ॥ घुंघाति घरोघरीं दिवाभीतें ॥ ८६ ॥ वागीश्वरी क्षोभली गाढी ॥ बोलीं ह्मणती आली यम
धाडी ॥ कारे धावतां तांतडी ॥ आगीं[6] उडी घालूं पहाती ॥ ८७ ॥ भूस्फोट भूमिकंप ॥ अग्निकिरणीं तपे आतप ॥ वोरनी सोडिला
आहा कंप ॥ लागे झडप खरस्पर्शें ॥ ८८ ॥ धुळोरा उधळन नगरीं ॥ रज भरती डोळ्यांमाझारी ॥ डोळे नुघडती[7] नरनारी ॥ दिशा
चारी धुमधुमिती ॥ ८९ ॥ ऐसे नानापरीचे उत्पात ॥ नगरीं रुधिरवृष्टि[8] होत ॥ देखोनि यादव समस्त ॥ भयचकित पैं जाहले ॥ २९० ॥
यादव मिळोनि थोरथोर ॥ वृद्धवृद्ध करिती विचार ॥ ये चिन्हें अरिष्टकर ॥ विघ्न थोर दिसतसे ॥ ९१ ॥ अवघे आले कृष्णापाशीं ॥
वृत्तांत सांगती तयाशी ॥ उद्विग्न देखोनि यादवांशी ॥ हृषीकेशी बोलिला ॥ ९२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ एते वै सुमहो
त्पाता व्युत्तिष्ठंतीह सर्वतः ॥ शापश्च नः कुलस्यासीद्ब्राह्मणेभ्यो दुरत्ययः ॥ ३४ ॥ ॥ टीका ॥ कृष्ण यादवांसी सांगत ॥ दिविभू
अंतरिक्षगत ॥ उठिले जे महोत्पात ॥ सर्वगत सर्वदा ॥ ९३ ॥ देखोनियां त्या चिन्हांसी ॥ मजही आठवलें मानसीं ॥ ब्राह्मणशाप
यदुकुळासी ॥ चिह्ने त्यासी सूचकें ॥ ९४ ॥ ब्राह्मणाचा शाप खरा ॥ नुल्लंघवे हरिहरां ॥ तुह्मी आतांचि विचार करा ॥ नगराबाहिरा
जन काढा ॥ ९५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ न वस्तव्यमिहास्माभिर्जिजीविषुभिरार्यकाः ॥ प्रभासंसुमहत्पुण्यं यास्यामोऽद्यैव माचिरम् ॥ ३५ ॥

---

१ कृष्णाची वाणी. २ देवश्रेष्ठ. ३ वाऱ्या प्रमाणें चालणारी. ४ आकाशांत. ५ मांजराचें भांडण. ६ अग्नींत. ७ उघडीत नाहीत. ८ रक्ताचा पाऊस. ९ वर्तमान. १० सर्वांनी.

॥ टीका ॥ ॥ येथोनि द्वारकेची वस्ती ॥ आह्मी सांडावी समस्तीं ॥ जीवायाची चाड चित्तीं ॥ तरी प्रभासाप्रती निघावें ॥ ९६ ॥ वेगीं करारे तांतडी ॥ आजचि निघावें लवडसवडी ॥ सांडा घरदारांची गोडी ॥ येथ अर्धघडी नरहावें ॥ ९७ ॥ श्लोक ॥ ॥ यत्र स्नात्वा दक्षपाद्गृहीतो यक्ष्मणोडुराट् ॥ विमुक्तः किल्बिषात्सद्यो भेजे भूयः कलोदयम् ॥ ३६ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐका समस्त यादवश्रेष्ठ ॥ प्रभासतीर्थ महावरिष्ठ ॥ जेथिचेंनि स्नानें उडुराट ॥ निस्तरला[1] कष्ट क्षयाचे ॥ ९८ ॥ दक्षें निजकन्या चंद्रासी ॥ सत्तावीस दिधल्या त्यासी ॥ तो रतला रोहिणीसी ॥ येरा सर्वांसी उपेक्षुनी ॥ ९९ ॥ दक्षें शापिलें चंद्रासी ॥ क्षयरोग लागला त्यासी ॥ तेणें येऊनि प्रभासासी ॥ स्नानदानासी पैं केलें ॥ ३०० ॥ स्नानमात्रें केवळ ॥ क्षयरोग गेला तत्काल ॥ कळा पावला सकळ ॥ शोभे निर्मळ निजतेजें ॥ १ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ वयं च तस्मिन्नाप्लुत्य तर्पयित्वा पितॄन् सुरान् ॥ भोजयित्वोशिजो विप्रान्नानागुणवतांऽधसा ॥ ३७ ॥ ॥ टीका ॥ ॥ आह्मीही तेथें स्नान दान ॥ पितृतर्पण देवतार्चन ॥ करूं ब्राह्मण पूजन ॥ जें संपन्न श्रुतिशास्त्रीं ॥ २ ॥ नानापरीचीं पक्कान्नें ॥ गुणाधिक्यें मिष्टान्नें[2] ॥ देवांब्राह्मणांसि भोजनें ॥ नानादानें विधानोक्त ॥ ३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तेषु दानानि पात्रेषु श्रद्धयोप्त्वा महांति वै ॥ वृजिनानि तरिष्यामो दानैर्नौभिरिवार्णम् ॥ ३८ ॥ ॥ टीका ॥ ॥ श्रद्धेचेनि नेटेंपाटें ॥ पाहूनि पानपात्रें चोखटें ॥ दान द्यावें गोमटें ॥ भूमि वोलटे जेवीं बीज ॥ ४ ॥ ब्राह्मणाचें मुंख[3] तेंच क्षेत्र ॥ पालवपेंढीवीण पवित्र ॥ ऐसें पाहूनि सुक्षेत्र ॥ दानें विचित्र पेरावीं ॥ ५ ॥ विनीततेची सेलवोल ॥ श्रद्धेंचें चाडें निर्मळ ॥ शमदमादि बैल सकळ ॥ ते तत्काळ जुंपोनी ॥ ६ ॥ ऐशिया वोजा परी ॥ बीज पेरिलिया क्षेत्रीं ॥ पीक पिकलें घुमरी ॥ पुरुषार्थ चौंरी[4] लगटे ॥ ७ ॥ त्या पिकांचेनि सबळें ॥ पापें तरोनि पैं सकळें ॥ जेवीं नावेचेनियां बळें ॥ समुद्रजळें तरिजेती ॥ ८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीशुकउवाच ॥ ॥ एवं भगवतादिष्टा यादवाः कुलनंदन ॥ गंतुं कृतधियस्तीर्थं स्यंदनान् समयूयुजन् ॥ ३९ ॥ ॥ टीका ॥ ॥ शुक ह्मणें कौरवनंदना ॥ ऐके परिक्षिती सज्ञाना ॥ कृष्णें दिधली अनुज्ञा ॥ तीर्थविधाना प्रभासा ॥ ९ ॥ यादव उठिले गाढें ॥ रथीं जुंपिले जी घोडे ॥ येर धांवती येरांपुढें ॥ चहूंकडे लगबग ॥ ३१० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तन्निरिक्ष्योद्धवो राजन् श्रुत्वा भगवतोदितम् ॥ दृष्ट्वारिष्टानि घोराणि नित्यं कृष्णमनुव्रतः ॥ ॥ टीका ॥ ॥ थोर वीरांचे बोंबाट ॥ गजरथांचे घडघडाट ॥ द्वारकेमाजी नफुटे वाट ॥ प्रयाण उद्भट प्रभासाशीं ॥ ११ ॥ हडबडली देखोनि द्वारावती ॥ ऐक राया परिक्षिती ॥ उद्धवास आठवलें चित्तीं ॥ कृष्णवदंती[4] देवांसी ॥ १२ कुळनाशासि त्वरित ॥ आजिपासूनि सुमुहूर्त ॥ तोचि देवें प्रस्तुत कार्यार्थ निश्चित मांडि

---

१ तरला. २ गोड अन्नामें. २ तोंड. ३ धर्म. अर्थ. काम. मोक्ष. ४ कृष्णाची वाणी. ५ कृष्णाच्या बरोबर.

ला ॥ १३ ॥ उद्धव कृष्णासवें[1] सनत ॥ कृष्णानुमतें तो वर्तत ॥ सुरसंवाद निश्चित ॥ होता श्रुत तयासी ॥ १४ ॥ असतां येथ कृष्णनाथ ॥ द्वारकेमाजी अतिउत्पात ॥ उठिले तें मनोगत ॥ जाण निश्चित कृष्णाचें ॥ १५ ॥ यादव नेऊनि प्रभासासी ॥ अर्धक्षणें नाशील यासी ॥ जावया निजधामासी[2] ॥ हृषीकेशी उद्यत[3] ॥ १६ ॥ ह्मणाल कां नेले इतुके दुरी ॥ नाश न करीच द्वारकापुरीं ॥ तरी तो सर्वज्ञ श्रीहरी ॥ सूत्रधारी जाणता ॥ १७ ॥ यादव देवांश[4] निश्चितीं ॥ सातवी पुरी द्वारावती ॥ येथ निमाल्या[5] सायुज्यमुक्ती ॥ हें जाणोनि श्रीपती ननाशी ॥ १८ ॥ यासि आहे पदाभिमान ॥ द्वारकेमाजी नघडे निधन ॥ हें जाणोनि जगजीवन ॥ करवी प्रयाण प्रभासासी ॥ १९ ॥ ब्रह्मशापाचें मूळ देखा ॥ प्रभासासि निघाली ते येरिका ॥ हें कळलेंसे यदुनायका ॥ तेथ सक्कळिकां धाडिलें ॥ २० ॥ स्वकुळ नासोनि श्रीपती ॥ निघेल निजधामाप्रती[6] ॥ हें जाणोनि उद्धव चित्तीं ॥ बहुता रीतीं कळवळला ॥ २१ ॥ बाष्पें कंठ निरोधला[7] ॥ नेत्रीं अश्रूंचा पूर लोटला ॥ स्वेदु[8] सर्वांगीं चालिला ॥ हृदयीं दाटला हुंदका ॥ २२ ॥ कृष्णवियोग अर्धक्षण ॥ तेणें निघों पाहे प्राण ॥ विसरला कार्य आठवण ॥ कृष्णवदन[9] निरीक्षी ॥ २३ ॥ वियोगप्राप्तीचे बाण प्रबळ ॥ हृदयीं रुतले अतिसबळ ॥ बुद्धिधैर्येंसी होती विकळ ॥ जीवीं तळमळ लागली ॥ २४ ॥ एकांत देखोनि श्रीकृष्णासी ॥ धांवोनि लागला पायांसी ॥ मिठी घालोनि चरणासी ॥ उकसाबुकसीं स्फुंदत ॥ ॥ २५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विविक्त उपसंगम्य जगतामीश्वरेश्वरम् ॥ प्रणम्य शिरसा पादौ प्रांजलिस्तमभाषत ॥ ४१ ॥ टीका ॥ ॥ जो जगाचा नियंता ॥ त्या काळाचा कृष्ण आकळिता ॥ त्याचे चरणीं ठेऊनि माथा ॥ विनीतता बोलत ॥ २६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धवउवाच ॥ ॥ देवदेवेश योगेश पुण्यश्रवणकीर्तन ॥ संहृत्यैतत्कुलं नूनं लोकं संत्यक्ष्यते भवान् ॥ विप्रशापं समर्थोऽपिप्रत्यहन्न यदीश्वरः ॥ ४२ ॥ ॥ टीका ॥ ॥ उद्धव ह्मणे यादवेंद्रा ॥ देवेंद्राच्या आदिइंद्रा ॥ योगियांच्या प्रबोधचंद्रा[10] ॥ अकळमुद्रा पैतुझी ॥ २७ ॥ देवांमाजी इंद्र ईश ॥ त्या इंद्राचा तूं जगदीश ॥ योगियांमाजी श्रेष्ठ महेश ॥ त्याचाही ईश तूं श्रीकृष्णा ॥ २८ ॥ तुझें जें श्रवणकीर्तन ॥ तें पुण्यासि करी पावन[11] ॥ छेदी संसारभवबंधन ॥ समाधान कीर्तनें ॥ २९ ॥ संहारूनि निजकुळासी ॥ सांडोनियां यालोकासी ॥ निजधामा जावों पाहसी ॥ हृषीकेशी निश्चित ॥ ३० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नाहं तवांध्रिकमलं क्षणार्धमपि केशव ॥ त्यक्तुं समुत्सहे नाथ स्वधाम नय मामपि ॥ ४३ ॥ ॥ टीका ॥ ॥ अन्यथा[12] विप्रशापासी ॥ करावया समर्थ होसी ॥ तें नकरूनि कुळ संहारिसी ॥ निजधामासी जावया ॥ ३१ ॥ ऐसें बोलतां आलें रुदन ॥ नधरत चालिलें स्फुंदन ॥ आसुवें पूर्ण जाहले नयन ॥ धांवोनि चरण धरियेले ॥

---

१ कृष्णाच्या बरोबर. २ आपल्या लोकास. ३ तयार. ४ देवांचा अंश. ५ मरण. ६ आपल्या स्थानास. ७ दाटला. ८ घाम. ९ कृष्णाचे तोंड. १० ज्ञानचंद्र. ११ पवित्र. १२ खोटा.

॥ ३२ ॥ माथा ठेविला चरणावरी ॥ सखा स्वामी तूं श्रीहरी ॥ आह्मांसि सांडोनियां दुरी ॥ कैशापरी जाशील ॥ ३३ ॥ ॥ तुझ्या प्रयाणाची वार्ता[1] ॥ ऐकतांचि गा अच्युता ॥ उभऊ सांठवेना चित्ता ॥ वियोग सर्वथा नव्हावा ॥ ३४ ॥ जळावेगळी मासोळी ॥ तैसा जीवु तळमळी ॥ निष्ठुर[2] जाहालासि अंतकाळीं ॥ वनमाळी मजलागीं ॥ ३५ ॥ तुज गेलिया पाठी ॥ मी दीनवदन ये सृष्टीं ॥ कोणासि सांगे गोड गोष्टी ॥ श्वास पोटीं नसमाये ॥ ३६ ॥ निघोनि गेलिया आत्मा ॥ प्रेतरूप उरे प्रतिमा ॥ तुवां गेलिया निजधामा ॥ तैसें आह्मा होईल ॥ ३७ ॥ तूंचि आह्मा जनक जननी ॥ हा दृढ विश्वास आमुचे मनीं ॥ केवीं जातोसि सांडोनि ॥ ह्मणोनि लोळणी घातली ॥ ॥ ३८ ॥ तूं निघालासि निजधामा ॥ कोणासी निरविलें जी आह्मा ॥ कां रुसलासि पुरुषोत्तमा ॥ बोल निजकर्मा आमुच्या ॥ ३९ ॥ मुकें बाळ सांडोनि क्षितीं[3] ॥ माता रिघोंपाहे सती ॥ तें जेवीं ये काकुळती ॥ तैसी गती उद्धवा ॥ ३४० ॥ गोडगिळी आमिषकवळ[4] ॥ सवेंचि पारधी आंसुडी[5] गळ ॥ त्या मीना ऐसा विकळ ॥ होय प्रेमळ उद्धव ॥ ४१ ॥ तुज गेलियावरी देवा ॥ म्यां कोणाची करावी सेवा ॥ कां रुसलासि यादवा ॥ आमच्या देवा निश्चित ॥ ४२ ॥ कांटवण आड क्षिती ॥ आंधळे सांडूनि जाये सांगाति ॥ ते ग्लानी करी वनांतीं ॥ तैसी गती उद्धवा ॥ ४३ ॥ धांवधांवोनि पायां पडे ॥ धाय मोकलोनि रडे ॥ मज सांडोनि तूंचि पुढें ॥ कोणीकडे जातोसी ॥ ४४ ॥ मी नव्हे पायां वेगळा ॥ क्षण न सांडीं चरणकमळा ॥ तुझें प्रयाण जी गोपाळा ॥ अंतकाळा मज काळ ॥ ४५ ॥ तुझी थोर लागली सवे ॥ मज न्यावें आपणासवें ॥ हेंचि प्रार्थीतसें जीवेंभावें ॥ कृपा यादवें मज कीजे ॥४६॥ तूं गरुडारूढ होसी ॥ तेव्हां कृपेनें बैसविसी पाठीसी ॥ सांडोनको हृषीकेशी ॥ निजधामासी मज नेयी ॥ ४७ ॥ सलगी दीधली जन्मवरी ॥ अंतीं कां त्यागिसी दुरी कृपाळुवा श्रीहरो ॥ कृपा करी सर्वथा ॥ ४८ ॥ ह्मणसी मी निजकुळासि[6] काळ ॥ तो तुज केवीं होईन कृपाळ ॥ हें नह्मणे तूं दीनदयाळ ॥ अतिस्नेहाळ भक्तांसी ॥ ४९ ॥ तुझी कृपा भक्तांवरी ॥ यालागीं मी सलगी करी ॥ मातें उद्धरी श्रीहरी ॥ जेणें संसारीं सांडिसी ॥ ३५० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तव विक्रीडितं कृष्ण नृणां परममंगलम् ॥ कर्णपीयूषमास्वाद्य त्यजत्यन्यस्पृहां जनः ॥ ४४ ॥ ॥ टीका ॥ ॥ तुझी क्रीडा नाना खेळ ॥ प्राणियांसि परण मंगळ ॥ कर्णद्वारें वेल्हाळ ॥ निजनिर्मळ सेविती ॥ ५१ ॥ तुझे कीर्तिश्रवणाची आवडी ॥ लागली कर्णपीयूषीं[7] गोडी ॥ तेथ अमृताची चवी थोडी ॥ होय अर्धघडी न लागतां ॥५२ ॥ ऐशी ऐकतां तुझी कीर्ती ॥ सवासना[8] स्पृहा नासती ॥ ते भक्त तुज न विसंबति ॥ हृदयीं वाहती सर्वदा ॥ ५३ त्या तुज प्रत्यक्ष श्रीकृष्णासी ॥ मज नसाहवे[9] वियोगासी ॥ सवे

---

१ गोष्ट. २ निर्दय. ३ पृथ्वीवर. ४ मासाचा घास. ५ ओढितो. ६ आपल्या कुळास. ७ कर्णामृतामध्यें. ८ वासनेसुद्धां. ९ सोसवे.

लाविली आह्मासी ॥ सौजन्येंसी स्वामित्वें ॥ ५४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शय्यासनाटनस्थानस्नानक्रीडाशनादिषु ॥ कथं त्वां प्रियमात्मा
नं वयं भक्तास्त्यजेमहि ॥ ४५ ॥ ॥ टीका ॥ ॥ तूं तंव आमुचा स्वामी होसी ॥ मज अर्धासनीं बैसविसी ॥ मजवेगळें हृषीकेसी ॥
निजगुजासी तुज नाहीं ॥ ५५ ॥ अचाट कार्य पडे थोर ॥ तेव्हां मज पुससी विचार ॥ मी सांगेन जोजो विचार ॥ तो साचार मा
निसी ॥ ५६ ॥ जेव्हां भोजन करूं रिघसी ॥ माझें ताट ताटासी मांडिसी ॥ जेवितां नानाविनोद करिसी ॥ निजशेष देसी मजलागीं
॥ ५७ ॥ ब्रह्मादिकां नलभे भक्ती ॥ तो मी बैसें तुझिया पंक्ती ॥ शेषविभागीजी श्रीपती ॥ केलें निश्चिंतीं त्वां मज ॥ ५८ ॥ मातें ध
रोनियां हातीं ॥ एकला बैससी एकांतीं ॥ ब्रह्मादिकांची विनंति ॥ तुजप्रती मी सांगें ॥ ५९ ॥ कळोंनेदितां कोणासी ॥ तुवां केलें रा
सक्रीडेसी ॥ तें गुह्य सांगोनि मजपाशीं ॥ गोकुळासी धाडिलें ॥ ३६० ॥ सेजेची उठवूनि भीमकीसी ॥ मज आपणाजवळ निज
विशी ॥ ते निद्रेचिया सुखाशीं ॥ समाधि कायसी बापुडी ॥ ६१ ॥ ऐशिया तुझे संगतीं ॥ रात्री भोगिल्या नेणों किती ॥ त्या मज सां
डोनि श्रीपती ॥ जाणें निश्चितीं करितोसी ॥ ६२ ॥ वेळ नेंगमे चक्रपाणी ॥ मज बोलावूं धाडिसी रुक्मिणी ॥ सारीपाट आह्मी दो
घीजणीं ॥ एकासनीं खेळिजे ॥ ६३ ॥ जेव्हा विहाळिये निघसी ॥ मज आपुले रथीं बैसविशी ॥ दोघां गमन एक्या रथेंसी ॥ आ
जि उबेंगलासी सांगतां ॥ ॥ ६४ ॥ जळक्रीडा करितां जळीं ॥ करितां गोपिकांसी रांडोळी ॥ तेव्हां मी तुजजवळी ॥ स्नानकाळीं स
र्वदा ॥ ६५ ॥ ऐसें सांगो मी किती ॥ तुजवेगळा जी श्रीपती ॥ नाहीं जाहलों आहोरातीं ॥ केवीं म्यां अंतीं सांडावें ॥ ६६ ॥ तूं स्वा
मी सखा सर्वात्मा ॥ जीवाचा जीव पुरुषोत्तमा ॥ तुझा वियोग मेघश्यामा ॥ केवीं आह्मा साहावेल ॥ ६७ ॥ आमुचा जीव आणि
प्राण ॥ ते तुझे गा श्रीचरण ॥ तें वियोगदुःख साँहावया जाण ॥ समर्थपण मज नाहीं ॥ ६८ ॥ आमुचा हाचि लाभ अव्यंग ॥ जे
तुझिया चरणाचा संग ॥ त्याचा नसाहावे वियोग ॥ देहभंग जाहलिया ॥ ६९ ॥ देह राहिला तरी राहो ॥ अथवा जाईल तरी जा
वो ॥ तुझ्या चरणाचा वियोग पाहाहो ॥ नशके साहों सर्वथा ॥ ३७० ॥ थोरदुस्तर तुझी माया ॥ ब्रह्मादिकां नये आया ॥ मज सु
गम जाहली तरावया ॥ यादवराया निःशेष ॥ ॥ ७१ ॥ ॥ श्लोक ॥ त्वयोपभुक्तस्रग्गंधवासोलंकारचर्चिताः ॥ उच्छिष्टभोजिनो
दासास्तवमायां जयेमहि ॥ ४६ ॥ ॥ टीका ॥ ॥ तुझें गंध शेष आणि माळा ॥ धरितां कपाळीं आणि गळां ॥ मी नागवें जी कळि
ळिकाळा ॥ दास गोपाळा पैं तुझा ॥ ७२ ॥ तुझे कांसेचा पिंवळा ॥ येऊनि माझे कांसे लागला ॥ तैंचि काम म्यां जिंकिला ॥

---

१ निघतोस. २ निश्चयानें. ३ रुक्मिणोस. ४ जात नाहो. ५ त्रासलास. ६ शेवटी. ७ सोसण्यास. ८ संगति. ९ कंबरेचा.

दृढ जाहला निजकांसे ॥ ७३ ॥ तुवां आपुले हृदयींचें पदक ॥ जेव्हां मज दीधलें देख ॥ तेव्हांचि माया जाहली विमुख ॥ दासां सन्मुख
नराहे ॥ ७४ ॥ मायेसि असतें मुख ॥ तरी हों लाहती सन्मुख ॥ ते मिथ्यागा निःशेख[1] ॥ वृथा लोक भ्रमलें पैं ॥ ७५ ॥ तुझें उच्छिष्ट[2]
सेवितां देख ॥ लाजोनि जाय समाधिसुख ॥ निडारला निजात्मतोख[3] ॥ शेषप्रत्यक्ष निज लाभु ॥ ७६ ॥ ऐसा तुझेनि दास्यें
सरताजाहला ॥ तुझेनि निजशेषें चर्चिला ॥ तुझी माया मी तरला ॥ जिया धाक लाविला योगियां ॥७७॥ ॥ श्लोक ॥ वाताशनाय
ऋषयः श्रमणा ऊर्ध्वमंथिनः ॥ ब्रह्माख्यं धाम ते यांति शांताः संन्यासिनोऽमलाः ॥४७॥ टीका॥ ॥ मिथ्यामायेच्या धाकासाठीं॥
योगी रिघाले[4] कपाटीं ॥ जरी सांडिली लंगोटी ॥ तरी पोटीं धाकती ॥ ७८ ॥ आसनस्थ होऊनि जाणा ॥ आकळात्रया प्राणापाना॥
मूळबंधा आकोचना ॥ दृढ धारणा ते करिती ॥ ७९ ॥ अंगुले बाराबारा ॥ जिणावया जी वारा ॥ रात्रंदिवस शरीरा ॥ अभ्यास
द्वारा आँटिती[5] ॥ ३८० ॥ क्षुधेनें खादली भूक ॥ तृषा तहान प्याली देख ॥ जिंणोनियां[6] सुखदुःख ॥ अतिनेटक निर्धारे ॥ ८१ सुबुद्धि
धरोनि हातीं ॥ आकळूनि इंद्रियवृत्ती ॥ वैराग्यें करित ख्याती ॥ ऊर्ध्वगती निघाले ॥ ८२ ॥ भेदोनि मणिकर्णिकावोवरी ॥ उसळले
जी ब्रह्मरंध्रीं ॥ जिणोनियां ब्रह्मगिरी ॥ निशाण भेरी लाविल्या ॥ ८३ ॥ तेथें शांतीचेनि योगें ॥ विलसत सर्वांगें ॥ संकल्पत्यागवेगें॥
जाहले अंगेचि ब्रह्म ॥ ८४ ॥ ऐसे योगबळें योगी ॥ माया जिंणती[7] अंगोअंगीं ॥ त्याहोनि अतिसुगममार्गीं ॥ आह्मालागीं त्वां केली
॥ ८५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ वयंत्विह महायोगिन् भ्रमंतः कर्मवर्त्मसु ॥ त्वद्वार्तया तरिष्यामस्तावकैर्दुस्तरं तमः ॥ ४८॥ टीका ॥ ॥ भजावें
तुझिया निजभक्तां ॥ ऐकावी तुझी कथावार्ता ॥ ईतुकेन[8] तरावें जी सर्वथा ॥ कृष्णनाथा निजमाया ॥ ८६ ॥ आह्मां कर्ममार्गीं
चिया कर्मठां ॥ तुवां उपकार केला मोठा ॥ तुझ्या कथेचा श्रवणपाठा ॥ मुक्त दारवठा मोक्षाचा ॥ ८७ ॥ असो मोक्षाची कथा ॥
चाड नाहींगा सर्वथा ॥ तुझ्या भक्तांशि तुझी कथा ॥ करितां भवव्यथा नबाधी ॥ ८८ ॥ तुझे अभेदैं[9] भक्तोचें कोड ॥ आह्मा संसारचि
गोड ॥ ठेंचूनियां त्रिगुणांचें तोंड ॥ भक्त प्रचंड भजताती ॥ ८९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्मरंतः कीर्तयंतस्ते कृतानि गदितानि च ॥ गत्युत्स्मितेक्षणक्ष्वेलियन्नृलोकविडंबनम् ॥ ४९ ॥ ॥ तुझ्या चरित्राचे श्रवण ॥ आवडीं करितां कीर्तन ॥ त्याचा भवबंधच्छेदन ॥ बळेंचि
जाण तूं करिशी ॥ ३९० ॥ पुसोनियां संसारभावो ॥ निजपदीं देसी ठावो ॥ हा श्रवणकीर्तनलाभ पहाहो ॥ आह्मीं सहज लाहों[10] निजभक्त
॥९१॥ स्वभावें कीर्तन करितां ॥ एवढा लाभ होय तत्त्वतां ॥ मा तुझिये मुखीच्या कथा गातां ॥ आपणियां देता तूं होशी॥९२॥

---

[1] सर्व. [2] उष्टे. [3] आपल्या आत्म्याचा संतोष. [4] निघाले. [5] पीडितात. [6] जिंकून. [7] जिंकितात. [8] इतक्यानेंच. [9] एकाच भक्तीचे. [10] मिळो.

तुझीं गोकुळींचीं गमनपदें ॥ आवडीं वर्णिती जे आनंदें ॥ त्यांसि वाहूनियां खांदीं निजबोधें[१] ॥ कीर्तनच्छंदें नाचशी ॥ ९३ ॥ तुवां जे
केली लीला ॥ ते आवडीं गातां जी गोपाळा ॥ नित्य त्या सेवकांजवळा ॥ अंगें अंगवळा तूं होशी ॥९४॥ तुझें वर्णिती जे हास्यवदन ॥
त्या भक्तांचें तूं करिशी ध्यान ॥ त्यांचेनि बोलें समाधान ॥ स्त्रीशूद्रां जाण तूं देशी ॥ ९५ ॥ तुझे दृष्टीचें दर्शन ॥ दृश्यातीत निरीक्षण[२] ॥ सर्वत्र
देखणेंपण ॥ कीर्तनीं गान[३] जे गाती ॥ ९६ ॥ त्यांच्या पाउलांपाउलांसी ॥ आपुलें सर्वांग तूं वोवाळिसी ॥ अंग टाकूनि तिष्ठसी ॥
त्यांपाशीं सर्वदा ॥ ९७ ॥ आपुली गुह्य ज्ञानमुद्रा ॥ त्यांसि अर्पिसी तूं ज्ञानिनरेंद्रा ॥ निजबोधचकोरचंद्रा ॥ त्यांच्या निजभद्रा तूं करिशी
॥ ९८ ॥ रासक्रीडादि नानाछंद ॥ अंगनामंगनादि प्रबंध ॥ कीर्ति अतिविशद ॥ भावार्थें शुद्ध जे गाती ॥ ९९ ॥ कां ठकवूनियां[४] ब्रह्मयासी
॥ गोपाळ वत्सें तूं जाहलासी ॥ ऐसऐसिया विनोदासी ॥ हृषीकेशी जे गाती ॥ ४०० ॥ त्यांसि सर्वांभूतीं निजात्मा ॥ देशी
तूं आपुली सत्ता ॥ त्याच्या बोलामाजी वर्तता ॥ कृष्णनाथा तूं होशी ॥ १ ॥ मनुष्यनाट्याचेनि योगें ॥ जेंजें केलें तुवां अंगें ॥ तें गातां
ऐकतां अनुरागें[५] ॥ तरले वेगें निजभक्त[६] ॥ २ ॥ म्यांचि केली जेजे आळी[७] ॥ ते त्वां पुरविली सर्वकाळीं ॥ त्या मज उपेक्षूनि वनमाळी ॥
अंतकाळीं कां जाशी ॥ ३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीशुक उवाच ॥ ॥ एवं विज्ञापितो राजन् भगवान्देवकीसुतः ॥ एकांतिनं प्रियं भृत्यमुद्धवं
समभाषत ॥ ५० ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ एवं यापरी देवकीसुत ॥
पूर्ण पूर्णांशें भगवंत ॥ विनविला[८] श्रीकृष्णनाथ ॥ निजभृत्य उद्धवें ॥ ४ ॥ निजभृत्य ह्मणणें ॥ उद्धवासि याकारणें ॥ निजगुण श्रीकृष्णें
॥ त्यासि बोलणें सर्वदा ॥ ५ ॥ जेथ रिगमू नाहीं रुक्मिणीसी ॥ ठाव नाहीं वसुदेवदेवकीशीं ॥ बळिभद्रा प्रद्युम्नाशीं ॥ अनवसरू
त्यांसी येठायीं ॥ ६ ॥ तेठायीं कृष्णाप्रती ॥ उद्धव असे अहोरातीं ॥ यालागीं पैं एकांती ॥ ज्ञाते ह्मणती तयासी ॥ ७ ॥ श्रीकृष्णासि
ह्मणती वाडेंकोडें ॥ जीवापरीस जें आवडे ॥ तें उद्धवासीच देणें पडे ॥ प्रेम गाढें[९] भक्तांचें ॥ ८ ॥ देतां तो जरी नेघे ॥ तरी धांवोनि
आलिंगी वेगें ॥ न घेतां देवो पायां लागे ॥ भक्तपांगें पांगिला ॥ ९ ॥ यालागीं कृष्णासि प्रियकर ॥ उद्धवचि साचार ॥ याहूनि प्रेम
थोर ॥ नाहीं सधर आनाचें ॥ ४१० ॥ यालागीं प्रिय भृत्य एकांती ॥ ये बिरुदें उद्धवासीच साजती[१०] ॥ तेणें निजस्वामीस विनंती ॥ निजप्रीतीं
पैं केली ॥ ११ ॥ ऐकोनि उद्धवाचें वचन ॥ चातकांलागीं जेवीं घन ॥ तेवीं वोळिला जगज्जीवन ॥ स्वानंदघन निजबोधें ॥ १२ ॥
चातकाची ताहान किती ॥ तृप्त करूनि निववी[११] क्षिती ॥ उद्धवउद्देशें श्रीपती ॥ त्रिजगती निववील ॥ १३ ॥ ऐकतां उद्धवाचे बोल ॥

---

[१] आपल्या बोधानें. [२] अवलोकन. [३] गाणें. [४] फसवून, [५] प्रेमानें. [६] आपले भक्त. [७] आटी. [८] प्रार्थिला. [९] अधिक. [१०] शोभती. [११] नाहींशी करितात.

येताति श्रीकृष्णासी डोल ॥ भक्तभाग्यजी सखोल ॥ जाहली बोल प्रेमाची ॥ १४ ॥ ते वोलवले भक्तभूमीसी ॥ निजबीज पेरील हृषी
केशी ॥ तें पीक पुरेल जगासी ॥ मुक्तराशी मुमुक्षां ॥ १५ ॥ धेनु वत्साचेनि वोरसें ॥ घरीं दुभतें पुरवी जैसें ॥ तेवीं उद्धवाचेनि उद्देशें ॥
जग हृषीकेशें निववविजे ॥ १६ ॥ घरीं पाहुण्यालागीं ॥ कीजेति पे[1]रवडी अनेगी ॥ तेथ बालकें जेवीं विभागी ॥ होती वेगीं न मागतां
॥ १७ ॥ पक्कान्नें सेवूं नें[2]णती बाळें ॥ तरी माता मुखीं घाली बळें ॥ तैसें जनार्दनें आह्मां केलें ॥ स्वयें दीधलें निजशेष ॥ १८ ॥ नवल
कृपा केली कैशी ॥ कृष्ण उद्धवातें उपदेशी ॥ तोचि अर्थ दिधला आह्मांसी ॥ देशभाषीं अर्थितां ॥ १९ ॥ एका जनार्दन ह्मणे ॥ श्रोतां
सावधान होणें ॥ हें बोलों मी कोण तोंडें ॥ तिहीं मज करणें सावध ॥ ४२० ॥ निजभक्तें केली विनंती ॥ निजज्ञान बोलेल भक्तप
ती ॥ श्रवणाची सावध पंक्ती ॥ बैसवा वृत्ती तद्बो[3]धें ॥ २१ ॥ येथ मुक्तांचें कोड ॥ पुरे मुमुक्षांची चाड ॥ येचिविषयीं कथा गोड ॥
श्र[4]वणकवाड उघडेल ॥ २२ ॥ उद्धवें श्रीकृष्ण विनविला ॥ नातो श्रवणीं डांगोरा पिटिला ॥ मुमुक्षां ह्मणे चलाचला ॥ कृष्णबोला नि
जबोधें ॥ २३ ॥ मोक्षमार्गींचे कापडी ॥ अर्थतृषें तृषित बापुडी ॥ प्रबोधबोधाची पव्हे गाढी ॥ उद्धवें रोकडी घालविली ॥ २४ ॥ भ[5]
क्तिजननी माझी तेथ ॥ कडे घेऊनि होती नेत ॥ जनार्दन परमामृत ॥ जाहलें प्राप्त तिचेनी ॥ २५ ॥ ते तुझी भक्ति तत्त्वतां ॥ आह्मां
सि असावी सर्वथा ॥ तुज मागावी मुक्तता ॥ तंव ते मूर्खता भक्तांची ॥ २६ ॥ सां[6]च असावी बद्धता ॥ तरी म्यां मागावी बद्धमुक्त
ता ॥ तेचि नाहींगा तत्त्वतां ॥ मिथ्या मागतां मूर्खत्वें ॥ २७ ॥ मीतूंपणेंवीण सहस्र स्थिती ॥ तुझी असे अभेदभक्ती ॥ हेंचि मागणें पुढ
तपुढतीं ॥ संतांप्रती सर्वदा ॥ २८ ॥ उद्धवासि ज्ञान गुप्त ॥ उपदेशील कृष्णनाथ ॥ एका जनार्दना विनवित ॥ दत्तचित्त त्वां दीजे ॥ ४२९ ॥
इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे एकाकारटीकायां दैवस्तुत्युद्धवविज्ञापनं नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ ॥ ग्रंथसंख्या मूळश्लो
क ॥ ५० ॥ ओंव्या ॥ ४२९ ॥ ॥ मिळून संख्या ॥ ४७९ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ शुभंभवतु ॥

---

[1] अनेकप्रकार. [2] जाणत नाहींत. [3] त्याच्या ज्ञानानें. [4] कान हेंच दार. [5] भक्ति हीच आई. [6] खरी.

# अध्याय ७ वा.


श्रीकृष्ण.
उद्धव.
दत्तात्रय.
सूर्य
गरुड.
देव

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ओंनमो सद्गुरु चतुरक्षरा ॥ चतुरचित्तप्रबोधचंद्रा ॥ जनार्दनासुरेंद्रइंद्रा॥ ज्ञाननरेंद्रा निजबोधा ॥ १ ॥ तुझी
करितांचि गोष्टी ॥ प्रगटसी पाठी पोटीं ॥ सन्मुख ठसावसी दृष्टीं॥ हृदयगांठी छेदूनी ॥ २ ॥ छेदूनि[1] विषयवासना ॥ स्वयें प्रगटसी
जनार्दना ॥ भवअभावभावना ॥ नेदिसी[2] मना आतळों ॥ ३ ॥ आतळतां तुझे चरण ॥ आकळलें राहे मन ॥ सहजें देशी समाधान॥
आनंदघन अच्युता ॥ ४ ॥ ऐशिया जी गुरुनाथा ॥ समचरणीं साम्य माथा ॥ पुढील परिसावी जी कथा॥ जेथ वक्ता श्रीकृष्ण॥५॥
उद्धवें विनविलियावरी ॥ कृपा कळवळला श्रीहरी ॥ निजज्ञान अतिविस्तारीं ॥ बोधकुसरी सांगत ॥ ६ ॥ होतें कृष्णाचे मानसीं ॥
मज गेलिया निजधामासी ॥ माझें निजज्ञान कोणापासी ॥ अतियत्नेंसी ठेवावें ॥ ७ ॥ तंव देखिली उद्धवाची आस्था ॥ सुख
झालें श्रीकृष्णनाथा ॥ वैराग्ययुक्त उपदेशितां ॥ होय सर्वथा निजज्ञान[3] ॥ ८ ॥ एवं वांचवावया उद्धवासी ॥ कृष्ण ब्रह्मज्ञान उपदेशी॥
शाप नबाधी[4] ब्रह्मवेत्त्यासी ॥ हें हृषीकेशी जाणत ॥ ९ ॥ ब्रह्मउपदेशाची हातवटी ॥ उपदेशूं जाणे जगजेठी ॥ वैराग्य उपजवी
उठाउठी ॥ जेणें पडे मिठी निजतत्त्वीं ॥ १० ॥ नव्हतां वैराग्य दारुण ॥ उपदेशु केला तो वृथा जाण ॥ हे श्रीकृष्णचि जाणे खुण ॥
वैराग्यविंदान बोलत ॥ ११ ॥ पहिलें उद्धवाच्या बोलासी ॥ अनुमोदन दे हृषीकेशी ॥ तेणें अन्वयें सावकाशीं ॥ ज्ञानवैराग्य त्यासी
बोलतु ॥ १२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ यदात्थ मां महाभाग तच्चिकीर्षितमेव मे ॥ ब्रह्मा भवो लोकपालाः स्वर्वासं
मेऽभिकांक्षिणः ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो वेदांचा वेद्यवक्ता ॥ जो ज्ञानियां ज्ञानदाता[5] ॥ तो श्रीकृष्ण ह्मणे भाग्यवंता ॥ ऐके निजभक्ता
उद्धवा ॥ १३ ॥ जें तूं बोलिलासि भावयुक्त ॥ तें वचन तुझें सत्यसत्य ॥ तेंचि माझें मनोगत ॥ जाण निश्चित निर्धारें ॥ १४ ॥ माझी
आस्था जाश्वनीळा ॥ ब्रह्मादिदेवां सकळां ॥ येथ आले होते मिळोनि मेळा ॥ लोकपाळांसमवेत[6] ॥ १५ ॥ येऊनि माझी घेतली
भेटी ॥ अपेक्षा जे होती पोटीं ॥ पुशिली माझ्या प्रयाणाची गोठी ॥ जेणें तुज मोठी अवस्था ॥ १६ ॥ म्या वेगीं यावें वैकुंठा ॥ हे
समस्तांसि उत्कंठा ॥ आदिकरून नीळकंठा ॥ सुरवरिष्ठां झालीसे ॥ १७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मया निष्पादितं ह्यत्र देवकार्यमशेषतः ॥
यदर्थमवतीर्णोहमंशेन ब्रह्मणार्थितः ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ॥ ज्यालागीं ब्रह्म्यानें प्रार्थिलें ॥ तें देवकार्य[7] म्या संपादिलें ॥ अवतार नटनाट्य
धरिले ॥ ज्येष्ठत्व[8] दीधलें बळिभद्रा ॥ १८ ॥ ज्येष्ठकनिष्ठभावना ॥ दोघांमाजी नाहीं जाणा ॥ कृष्णा आणि संकर्षणा ॥ निजात्मता
निजांशें ॥ १९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कुलं वै शापनिर्दग्धं नंक्ष्यत्यन्योन्यविग्रहात् ॥ समुद्रः सप्तमेन्ह्येतां पुरीं च प्लावयिष्यति ॥ ३ ॥ टीका ॥

---

१ तोडून. २ देत नाहीस. ३ आत्मज्ञान. ४ पीडा करित नाही. ५ ज्ञान देणारा. ६ इंद्रादि आठ लोकपालसहित. ७ देवांचे काम. ८ वडीलपणा.

उरलें असे आमुचें कुळ ॥ शापनिर्दग्ध[1] केवळ ॥ अन्योन्यविग्रहें सकळ ॥ कलहमूळ[2] नासेल ॥ २० ॥ भूमिमागोनि समुद्रापासी ॥ म्यां रचिलें द्वारकेसी ॥ मज गेलिया निजधामासी ॥ तो सातवे दिवसीं बुडवील ॥ २१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यर्ह्येवायं मया त्यक्तोलोकोऽयं नष्टमंगलः ॥ भविष्यत्यचिरात्साधो कलिनाऽपि निराकृतः ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐके उद्धवा हित गोष्टी ॥ म्यां सांडिलिया हे सृष्टी ॥ थोडियाचि काळा पाठी ॥ नष्टदृष्टी जन होती ॥ २२ ॥ अधर्म वाढेल प्रबळ ॥ लोक होतील नष्ट अमंगळ ॥ ते अमंगळतेचें मूळ ॥ ऐक समूळ सांगेन ॥ २३ ॥ मज नांदतां ये सृष्टीं ॥ कलि उघडूं न नशके दृष्टी ॥ मज गेलियापाठी ॥ तो उठाउठी उठेल ॥ २४ ॥ कलि वाढेल अतिविषम ॥ ब्राह्मण सांडितील स्वधर्म ॥ स्वभावें नावडे दानधर्म ॥ क्रियाकर्म दंभार्थ ॥ २५ ॥ श्लोक ॥ न वस्तव्यं त्वयैवेह मया त्यक्ते महीतले ॥ जनोऽधर्मरुचिर्भद्र भविष्यति कलौ युगे ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ म्यां सांडिलिया महीतळी ॥ प्रबळबळें वाढेल कली ॥ आजीच तुवां निघिजे तत्काळीं ॥ जंव तो कळी नातळे[3] ॥ २६ ॥ कली आतळेल जेव्हां ॥ जनीं अधर्म वाढेल तेव्हां ॥ कुविद्येच्या उठती हांवा ॥ सैघ धांवा निंदेच्या ॥ २७ ॥ नलभे स्वार्थाची कवडी ॥ तरी करिती निंदेच्या कोडी ॥ ऐसी कलियुगीं वस्ती कुडी ॥ तुवां अर्धघडी नराहावें ॥ २८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ त्वं तु सर्वं परित्यज्य स्नेहं स्वजनबंधुषु ॥ मय्यावेश्य मनः सम्यक् समदृग्विचरस्व गाम् ॥ ६ ॥ टीका ॥ उद्धवा तूं यालागीं ॥ येथोनि निघावें वेगवेगीं ॥ एकलाचि आंगोवांगीं ॥ हितालागी[4] सर्वथा ॥ २९ ॥ धनधान्यसमृद्धीसी ॥ सांडावें स्वजनगोत्रजांसी ॥ भ्राता दुहिता निजभगिनीसी ॥ स्त्रीपुत्रांसी त्यजावें ॥ ३० ॥ स्नेहो ठेवूनि घरदारीं ॥ अंगें तूं जरी निघालासि बाहेरी ॥ तरी तो त्यागूचि कठिण भारी ॥ अनर्थकारी[5] होईल ॥ ३१ ॥ आधीं समूळ स्नेह सांडावा ॥ पाठीं अभिमानही दंडावा ॥ वासनाजटाजूट मुंडावा ॥ मग सांडावा आश्रमु ॥ ३२ ॥ स्नेह कैसेनि सांडे ॥ अभिमान कैसेनि दंडे ॥ हें तुज वाटेल सांकडें[6] ॥ तरी रोकडें परियेसी ॥ ३३ ॥ माझें स्वरूप जें सर्वगत ॥ तेथें ठेवोनियां चित्त ॥ सावधानें सुनिश्चित ॥ राहावें सतत निजरूपीं ॥ ३४ ॥ तये स्वरूपीं चित्ता ॥ निर्धारेंसी[7] धारणा धरितां ॥ निजभावें[8] तन्मयता ॥ तद्रूपता पावेल ॥ ३५ ॥ भृंगी कीटक जडमूढ ॥ ध्यानें तद्रूप होय दृढ ॥ अभ्यासीं काहीं नाहीं अवघड ॥ तो अभ्यास गूढ विशद केला ॥ ३६ ॥ माझें स्वरूप ज्ञानघन ॥ ध्यातां जीवू स्वयें सज्ञान ॥ यास्थितीं करितां ध्यान ॥ सहजें जाण तद्रूप ॥ ३७ ॥ तेथें समसाम्यें समस्त ॥ समत्व पावेल चित्त ॥ तेणें समभावें निश्चित ॥ जेथिचा तेथ राहावे ॥ ३८ ॥ आधीं ग्रहाश्रमातें त्यागावें ॥ मग म्यां ह्मणसी कोठें राहावें ॥ ऐसें मानिसील स्वभावें ॥ तेवि

---

१ शापानें जळालेले. २ भांडण्याचे कारण. ३ आला नाही. ४ हिताकरिता. ५ दुःखदेणारा. ६ संकट. ७ निश्चयानें. ८ आपल्या भावनेनें.

षर्यी बरवें परियेसी ॥ ३९ ॥ [1]स्वरूपसाम्य समदृष्टी ॥ समभावें विचरे सृष्टी ॥ निवासस्थानाची आटाटी ॥ सर्वथा पोटीं नधरावी ॥
॥ ४० ॥ जेथ बहुसाल वस्ती घडे ॥ त्या ठायाचा अभिमान चढे ॥ वस्तिस्थान ऐसें कुडें ॥ वस्तीचें सांकडें [2]सहसा नधरी ॥ ४१ ॥ तूं
सर्वी सर्वगत होंसी ॥ सर्वाधार सर्वदेशी ॥ ऐसा मी होऊन मज पावसी ॥ नहालतां येसी निजधामा ॥ ४२ ॥ मज निजधामा न्या
वें ॥ होतें पुशिलें उद्धवें ॥ तें निजबोध स्वभावें ॥ स्वयें केशवें सांगीतलें ॥ ४३ ॥ नकरितां उपायस्थिती ॥ सर्वथा नघडे माझी प्राप्ती॥
मग तूं निजधामाप्रती ॥ कैशा गती येशील ॥ ४४ ॥ गरुडीं वाऊनि वेगेंसी ॥ न्यावें निजधामा ह्मणसी ॥ गति तेथ नाहीं पक्ष्यांसी ॥
गम्य गरुडासी तें नव्हे ॥ ४५ ॥ सांडूनि उभय पक्षांसी ॥ साधक पावती मद्रूपासी ॥ पक्षाभिमान असे गरुडासी ॥ गमन तेणें त्या
सी नव्हें ॥ ४६ ॥ तूं ह्मणसी न्यावें घेवोनि खांदीं ॥ मज खांदचि नाहीं त्रिशुद्धी ॥ तुज नसांडितां [3]अहंबुद्धी ॥ गमनसिद्धी तेथ नाहीं
॥ ४७ ॥ नत्यागितां अहंभावस्थिती ॥ केल्या नाना उपाय युक्ती ॥ तेणें निजधामाप्रती ॥ नव्हे गती सर्वथा ॥ ४८ ॥ जेंजें देखसी
[4]साकार ॥ तेंतें जाणपां [5]नश्वर ॥ तेचि विखींचा निर्धार ॥ करी साचार निजबोधें ॥ ४९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदिदं मनसा वाचा चक्षु
र्भ्यां श्रवणादिभिः ॥ नश्वरं गृह्यमाणं च विद्धि मायामनोमयम् ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ जेंजें दृष्टीं देखिलें ॥ तेते दृश्यत्वें वाळिलें ॥ जेंजें
श्रवणा गोचर झालें ॥ तेंही वाळिलें शब्दत्वें ॥ ५० ॥ जेजे शब्द [6]वाचा वदे ॥ तेंतें वाळिजे जल्पवादें ॥ वाचिक सांडविलें वेदें ॥ नेति
शब्दें लाजिला ॥ ५१ ॥ जेंजें संकल्पें आकळिलें ॥ तेंतें कल्पित पैं झालें ॥ जेंजें अहंकारा आलें ॥ तेंतें वाळिलें विजातीय ॥ ५२ ॥
जेंजें इंद्रियां गोचरें ॥ तेंतें जाणपां नश्वरें ॥ हें नित्यानित्यविचारें ॥ केलें खरें निश्चित ॥ ५३ ॥ तोही नित्यानित्य [7]विवेक ॥ जाणपां नि
श्चित मायिक ॥ एवं मायामय हा लोक ॥ करी संकल्प सृष्टीतें ॥ ५४ ॥ जेव्हडा देखसी संसार ॥ तेव्हडा मायिक व्यवहार ॥ हा वो
ळख तूं साचार ॥ धैर्य निर्धार धरोनी ॥ ५५ ॥ जैशी स्वप्नींची राणिव ॥ केवळ भ्रमचि जाणिव ॥ तैसेंचि जाण हें सर्व ॥ [8]भववैभव वि
लास ॥ ५६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पुंसोयुक्तस्य नानार्थो भ्रमः स गुणदोषभाक् ॥ कर्माकर्मविकर्मेति गुणदोषधियोभिदा ॥ ८ ॥ ॥ टीका ॥
परमात्मेंसि जो विभक्त ॥ तो पुरुष बोलिजे अयुक्त ॥ त्यासि नानात्वें भेदु भासत ॥ निर्जी [9]निजत्व विसरोनी ॥ ५७ ॥ त्या विसराचे
नि उल्हासें ॥ मिथ्या भेदु सत्यत्वें भासे ॥ त्याभेदाचेनि आवेशें ॥ अवश्य दिसे गुणदोषु ॥ ५८ ॥ जरी भेदूचि नाहीं ॥ तरी गुणदोष
नाहीं ॥ दिवसावया ठावो नाहीं ॥ शुद्धाचाठायीं सर्वथा ॥ ५९ ॥ यालागीं भेदाच्या उद्धटीं ॥ गुणदोषदृष्टी उठी ॥ तेथें कर्माकर्मत्रिपुटी ॥

---

१ आत्मरूपाचे समत्व. २ कधीही. ३ अहंकार. ४ सगुण. ५ नाहीसे होणारे. ६ वाणीनें. ७ विचार. ८ संसारातले ऐश्वर्य. ९ आपलेपण.

भेद दृष्टीं ठसावे ॥ ६० ॥ भेदें थोर केलें विषम ॥ कर्म अकर्म विकर्म ॥ जन्ममरणादिधर्म ॥ निजकर्म प्रकाशी ॥ ६१ ॥ कर्में विकर्में
नरकयातना ॥ काम्यकर्में स्वर्ग जाणा ॥ कर्मेंचि कर्ममोचना ॥ समाधाना पाविजे ॥ ६२ ॥ जेथ ह्मणसी कर्म कोण ॥ अकर्माचें काय
लक्षण ॥ विकर्माचा कवण गुण ॥ तेंही संपूर्ण परीस[1] पां ॥ ६३ ॥ काया वाचा अथवा मन ॥ करिजे तितुकें कर्म जाण ॥ सूक्ष्म
स्फूर्तीचें जें भान ॥ तें मूळ जाण कर्माचें ॥ ६४ ॥ मनसा वाचा देहीं ॥ सर्वथा कर्मबीज नाहीं ॥ अकर्म ह्मणिजे तें पाही ॥ नपडे ठायीं
देहवंता ॥ ६५ ॥ जें कर्मावेगळें सर्वांगें ॥ जेथ कर्म लावितांही नलगे ॥ जें नव्हे कर्मठाजोगें ॥ तें जाण सवेगें अकर्म ॥ ६६ ॥ विधिनिषेध
जोडेपाडें ॥ जेथ विशेष कर्म वाढे ॥ विकर्म त्यातें ह्मणणें घडे ॥ थोर सांकडेंपैं याचे ॥ ६७ ॥ कर्म सर्वसाधारण ॥ तेंचि विकारातें
पावलें जाण ॥ उठिले विधिनिषेध दारुण[2] ॥ विकर्म जाण तें ह्मणिपैं ॥ ६८ ॥ जें विधीसी नातुडे ॥ तें निषेधाचें अंग चढे ॥ करितां
चुके ठाके विकळ पडे ॥ तेंही रोकडें निषिद्धची ॥ ६९ ॥ ऐसें कर्म विकारलें ॥ तें विकर्मपदें वाखाणिलें ॥ एवं कर्माकर्म दाविलें
॥ विभागनिमित्त तुज ॥ ७० ॥ जीवासि आविद्यक[3] उत्पत्ती ॥ त्याचीं कर्में आविद्यकें होती ॥ श्रीधर व्याख्यानाची युक्ती ॥ तेही उपपत्ती
परियेसी ॥ ७१ ॥ अविद्यायुक्त जीव परम ॥ त्यासि नित्यक्रिया तेंचि कर्म ॥ नित्य न करणे तें अकर्म ॥ विकर्म तें निषिद्ध ॥
॥ ७२ ॥ तैशी कर्माकर्मविकर्म त्रिपुटी ॥ भेदानुरूपें वाढली सृष्टी ॥ तेथ गुणदोषबुद्धीच्या पोटीं ॥ भेददृष्टी वाढती ॥ ७३ ॥ अभेदीं भेद
कैसा उठी ॥ जेणें गुणदोषीं नांदे दृष्टी ॥ विधिनिषेधीं पाडी गांठी ॥ तेही गोठी परियेसी ॥ ७४ ॥ पुरुष एकला एक असे ॥ तोचि मनोरथ
पूजे बैसे ॥ ध्येयध्याताध्यानमिसें ॥ वाढवी पिसें[4] भेदाचें ॥ ७५ ॥ तेथें नानापरीचे उपचार ॥ पूजासामग्री संभार ॥ ऐसा एकपर्णी
अपार ॥ भेद साचार वाढवी ॥ ७६ ॥ तेथ ध्येय उत्तम ह्मणे जाण ॥ ध्याता नीच होय आपण ॥ तदंगें ध्यान गौण ॥ गुणदोष
जाण वाढवी ॥ ७७ ॥ ध्यानीं गुणदोष विचित्र ॥ ध्येय ह्मणे परमपवित्र ॥ ध्याता आपण होय अपवित्र ॥ शौचाचार दोषत्वें ॥ ७८ ॥
एवं ध्यानाचिये दृष्टीं ॥ आपणचि आपुल्या पोटीं ॥ गुणदोषांची त्रिपुटी ॥ भेददृष्टी[5] वाढवी ॥ ७९ ॥ ध्येय ध्याता ध्यान ॥ आघवाचि
आहे आपण ॥ तें सांडोनियां जाण ॥ गुणदोषलक्षण वाढवी ॥ ८० ॥ उद्धवा हे अवघी सृष्टी ॥ वाढली असे भेददृष्टीं ॥ तेणें भेदें उठाउठी
॥ कर्मत्रिपुटी वाढविली ॥ ८१ ॥ जंवजंव भेदाचा जिव्हाळा ॥ जंवजंव विषयाचा सोहळा ॥ पाळिजे इंद्रियांचा लळा ॥ तंवतंव
आगळा[6] संसारु ॥ ८२ ॥ सापा पाजिजे पीयूख[7] ॥ तेंचि परतोनि होय विख[8] ॥ तैसें इंद्रियां दीजे जंवजंव संतोख ॥ तंवतंव दुःख

---

[1] ऐक. [2] कठीण. [3] अज्ञानापासून. [4] वेडावे. [5] द्वैताची दृष्टि. [6] अधीक. [7] अमृत. [8] विष.

भोगिजे ॥ ८३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तस्माद्युक्तेंद्रियग्रामो युक्तचित्त इदं जगत् ॥ आत्मनीक्षस्व विततमात्मानं मय्यधीश्वरे ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ यालागीं इंद्रियांच्या द्वारीं ॥ विषयो नेदावा[1] चतुरीं ॥ जेवीं विषें रांधिली क्षीरधारी ॥ सांडिजे दुरी नचाखतां ॥ ८४ ॥ मघमघित अम्रृतफळें रसाळें ॥ वरी सर्पें घातलिया गरळें ॥ तें न शिवती काउळे ॥ सेवनीं कळे निजघातु ॥ ८५ ॥ तैसें सेवितां विषयांसी ॥ कोण गोडी मुमुक्षासी ॥ प्रतिपदीं आत्मघातासी ॥ अहर्निशीं देखतां ॥ ८६ ॥ आत्मघात न देखती ॥ ते विषयीं विषयो सेविती ॥ जैशी दिवाभीता[2] मध्यराती ॥ असतां गभस्ती[3] मध्यान्हीं ॥ ८७ ॥ तैसेंचि विषयसेवन ॥ मुमुक्षासी घडे जाण ॥ तेणें नचुके जन्ममरण ॥ आत्मपतन तयाचें ॥ ८८ ॥ ह्मणसी प्राणियाची स्थिती ॥ विषयावरी निश्चितीं ॥ विषयत्यागें केवीं राहती ॥ ते सुगमस्थिती अवधारी ॥ ८९ ॥ असतां इंद्रियांचा नेमु ॥ करी चित्ताचा उपरमु[4] ॥ ऐसा दोहींपरी सुगमु[5] ॥ उत्तमोत्तमु हा त्यागु ॥ ९० ॥ इंद्रियें असोनि विषयांवरीं ॥ मन रिघों नेदी त्यांभीतरी ॥ हाही त्यागू सर्वांपरी ॥ योगेश्वरी बोलिजे ॥ ९१ ॥ मनासि विषयाचें बळ ॥ विषयध्यासें तें चपळ ॥ ह्मणसी केवीं होय निश्चळ ॥ ऐक समूळ उपावो[6] ॥ ९२ ॥ माझें स्वरूप सर्वगत ॥ मना बाहेर आणि आंत ॥ जेथजेथ जाईल चित्त ॥ तेथतेथ तें असे ॥ ९३ ॥ मज वेगळें जावयासी ॥ ठावो नाहीं पैं चित्तासी ॥ स्वदेशीं हो परदेशीं ॥ अहर्निशीं मज आतू ॥ ॥ ९४ ॥ ऐसें निजरूप सतत ॥ पाहतां थोरावलें चित्त ॥ त्या चित्तामाजी आद्यंत ॥ पाहे समस्त हें जग ॥ ९५ ॥ अथवा जीवस्वरूप तुझें चांग ॥ त्यामाजी पाहतां हें जग ॥ जगचि होईल तुझें अंग ॥ अतिनिर्व्यंग निश्चित ॥ ९६ ॥ चरें आणि अचरें ॥ लहान कां थोरें ॥ जीवरूपीं सविस्तारें ॥ पाहे निर्धारें हें जग ॥ ९७ ॥ ह्मणसी जीव तो एकदेशी ॥ त्यामाजी केवीं पहावें जगासी ॥ त्यासि ऐक्यता करी मजसी ॥ जेवीं कनकेंसी[7] अलंकार ॥ ९८ ॥ चिंतितां कीटकी भिंगुरटी ॥ तेचि ते होऊन उठी ॥ तैसा तूं उठाउठी ॥ होसी निजदृष्टीं निजतत्व ॥ ९९ ॥ हो कां सैंधवाचा[8] खडा ॥ पडल्या सिंधूमाजी[9] वडा ॥ तो होवोनि ठाके त्याएवढा ॥ तैसा तूं रोकडा मी होसी ॥ १०० ॥ जेथ मीतूंपणाचा भेद ॥ फिटोनि जाईल विशद ॥ परमानंद शुद्ध बुद्ध ॥ मुक्त सिद्ध तूं होसी ॥ १ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ज्ञानविज्ञानसंयुक्त आत्मभूतः शरीरिणाम् ॥ आत्मानुभवतुष्टात्मा नांतरायैर्विहन्यसे ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ शास्त्रश्रवणें दृढ ज्ञान ॥ मननाभ्यासें होय विज्ञान ॥ या दोहींची जाणोनि खुण ॥ ब्रह्मसंपन्न तूं होसी ॥ २ ॥ ऐशिया स्वार्थाचेनि लवलाहें ॥ अविश्रम भजतां तुझे पाये ॥ ह्मणतील वोढवती अंतराये ॥ त्यासि काये करावें ॥ ३ ॥ सांडोनि दांभीक लौकिक ॥ त्यजोनियां फळाभिलाख[10] ॥ जो

---

[1] दाखवूनये.
[2] घुवडास.
[3] सूर्य.
[4] शांति.
[5] सोपा.
[6] उपाय.
[7] सोन्याबरोबर.
[8] मिठाचा.
[9] समुद्रांत.
[10] फलाची इच्छा.

मज भजे भाविक ॥ विघ्न देख त्या कैंचें ॥ ४ ॥ त्याच्या विघ्ननाशासि देख ॥ करी चक्राची लखलख ॥ घेऊनि पाठीसी [1]अचुक ॥ उभा सन्मुख मी असें ॥ ५ ॥ यापरी गा उद्धवा ॥ जो मज भजे निजभावा ॥ त्यासि विघ्न करावया देवा ॥ नव्हे उठावा मज असतां ॥ ६ ॥ एवं ब्रह्मसंपन्न जाहलियावरी ॥ आत्मा तूंचि चराचरीं ॥ जंगमीं आणि स्थावरीं ॥ सुरासुरीं तूंचि तूं ॥ ७ ॥ तुजहूनि काहीं ॥ अणुभरीं वेगळें नाहीं ॥ तेथ विघ्न कैंचें कायी ॥ तुझाठायीं बाधील ॥ ८ ॥ ब्रह्मादिकांसि जो [2]ग्रासी ॥ त्या काळाचा तूं आत्मा होसी ॥ पाठी थापटून हृषीकेशी ॥ उद्धवासी सांगतु ॥ ९ ॥ ऐशी बाध्यबाधकता फिटली ॥ संकल्पकल्पना तुटली ॥ ब्रह्मानंदें पाहांट फुटली ॥ वाट मोडली कर्मांची ॥ ११० ॥ ऐसा ब्रह्मानुभवी जो देख ॥ कर्म तेथ होय रंक ॥ वेद तयाचे सेवक ॥ विधिविवेक कामारी ॥ ११ ॥ हें कितीक सांगों कायी ॥ मी त्याचा [3]आज्ञाधारक पाही ॥ प्रतिष्ठिजे जेठायीं ॥ तेथ पाही प्रगट तूं ॥ १२ ॥ वचनमात्रासाठीं ॥ प्रगटलों कोरडे काष्ठीं ॥ दुर्वासा वाइला पाठी ॥ त्वांही [4]दिठी देखिलें ॥ १३ ॥ ह्मणसी देव ज्याचा आज्ञाधारू ॥ कर्म त्याचें होय [5]किंकरू ॥ तरी ज्ञाते यथेष्टाचारु ॥ विषयीं साचारु विचरती ॥ १४ ॥ ज्ञात्यासि स्वेच्छा विषयाचरण ॥ सर्वथा न घडे गा जाण ॥ तेंहीं विषयींचे लक्षण ॥ सावधान परियेसी ॥ १५ ॥ ज्यासि दग्धपट अभिधान ॥ मिथ्या प्रपंचाचें भान ॥ मृषा विषयाचें दर्शन ॥ विषयाचरण त्या नाहीं ॥ १६ ॥ जयासि प्रपंचाची आवडी ॥ विषयांची अति गोडी ॥ [6]यथेष्टाचरणाची वोढी ॥ पडे सांकडी तयासी ॥ १७ ॥ ज्ञातयाचा ठायीं ॥ सत्यत्वें विषयोही नाहीं ॥ मा भोगावया कायी ॥ अभिलाषीं पाहीं तो होईल ॥ १८ ॥ आतां ज्ञातयाचें कर्म ॥ ऐक सांगों त्याचें वर्म ॥ नातळतां मनोधर्म ॥ क्रियाकर्म आचरती ॥ १९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ दोषबुद्ध्योभयातीतो निषेधान्न निवर्तते ॥ गुणबुद्ध्या च विहितं नकरोति यथाऽर्भकः ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ गुणदोषातीत ज्ञाता ॥ तो निषेधीं नवर्तें सर्वथा ॥ परी भ्यालेपण चित्ता ॥ नाहीं तत्त्वतां तयांसी ॥ १२० ॥ तो विहितही कर्म करी ॥ तेथ गुणत्वें बुद्धि नधरी ॥ [7]कुलालचक्राचियेपरी ॥ पूर्वसंस्कारीं वर्तत ॥ २१ ॥ संकल्पनाहीं वृत्ती ॥ हेतु स्फुरेना चित्तीं ॥ ऐसीं कर्में ज्ञाते करिती ॥ शरीरस्थिती केवळ ॥ २२ ॥ तेथ सत्कर्म सिद्धी गेलें ॥ तेणें फुगेना म्या हें केलें ॥ अथवा माझारी विकळ पडिलें ॥ तेणें तगमगिलेपण नाहीं ॥ २३ ॥ निद्रितामागें बैसला वाघु ॥ अथवा पुढें आला स्वर्गभोगु ॥ त्यासि नाहीं, रागविरागु ॥ तैसा लागु ज्ञात्याचा ॥ २४ ॥ गुणदोषीं चित्तवृत्ती ॥ सांडोनियां सहजस्थिती ॥ बाळकें जेवीं क्रीडती ॥ तैशी स्थिती ज्ञात्याची ॥ २५ ॥ अभिमानें कर्मप्राप्ती ॥ त्याअभिमानातें त्यागिती ॥ मग निरभिमानें केवी वर्तती ॥

---

१ एकदम. २ गिळितो. ३ आज्ञापालनकरणारा. ४ दृष्टीनें. ५ चाकर. ६ मनाप्रमाणे वागण्याची. ७ कुंभाराचे चाकाप्रमाणे.

कर्मस्थिती त्यां नघडे ॥ २६ ॥ ऐसा विकल्प जरी करिसी ॥ ते स्थिती नकळे इतरांसी ॥ निरभिमानता स्वानुभवेंसी ॥ केवीं येरासी कळेल ॥ २७ ॥ देहप्रारब्धाचेनि मेळें ॥ स्वभावें सर्वकर्मीं चळे ॥ तेथ अज्ञानाचेनि बळें ॥ अभिमान नुखळे[1] मी कर्ता ॥ २८ ॥ तेथ गुरुवाक्यें अनुवृत्ती ॥ अभ्यासूनि यथानिगुती ॥ अज्ञानेंसहित निरसिती ॥ अभिमानस्थिती निजबोधें[2] ॥ २९ ॥ शेष प्रारब्धाचेनि मेळे ॥ निरभिमानें देह चळे ॥ ज्ञाते कर्मैं करिती सकळें ॥ जाण केवळें शरीरें ॥ १३० ॥ केवळशरीरें कर्मैं होती ॥ तींच अहेतुक[3] बोलिजेती ॥ अर्भकदृष्टांतें[4] उपपत्ती ॥ हेचि स्थिती सांगीतली ॥ ३१ ॥ निरभिमानांचीं लक्षणें ॥ कृष्ण उद्धवातें एक ह्मणे ॥ येरु आनंदला अंतःकरणें ॥ सादरपणें परिस तूं ॥ ३२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सर्वभूतसुहृच्छांतो ज्ञानविज्ञाननिश्चयः ॥ पश्यन्मदात्मकं विश्वं न विपद्येत वै पुनः ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ पहिलें शास्त्रश्रवणें ज्ञान ॥ तदनुभवें होय विज्ञान ॥ ऐसा ज्ञानविज्ञानसंपन्न ॥ निरभिमान तो होय ॥ ३३ ॥ साचचि निरभिमानता ॥ जरी आली होय हाता ॥ तरी शांती तेथ सर्वथा ॥ उल्हासता[5] पैं पावे ॥ ३४ ॥ दाटूनि निश्चळ होणें ॥ दांत चाऊनि साहणें ॥ ते शांती ऐसें कोण ह्मणे ॥ आक्रोशपणें साहातसे ॥ ३५ ॥ शांति ह्मणिजे ते ऐशी ॥ सागरीं[6] अक्षोभ्यता जैसी ॥ चढ वोहट नाहीं तिशी ॥ सर्वदेशीं सर्वदां ॥ ३६ ॥ नानासरितांचे[7] खळाळ ॥ आणूनि घालिती समळ जळ ॥ तो तिळभरी नव्हे डहुळ ॥ अतिनिर्मळ निजांगें ॥ ३७ ॥ तैशी नानाभूतविषमता ॥ स्वार्थविरोधें अंगीं आदळतां ॥ पालटू नव्हे ज्याच्या चित्ता ॥ ते जाण सर्वथा निजशांति[8] ॥ ३८ ॥ ऐशी शांति ज्यासि देखा ॥ तोचि सर्वभूतांचा सखा ॥ आवडता सर्वलोकां ॥ सुहृद तोकां सर्वांचा ॥ ३९ ॥ नवल सख्यत्वाची[9] परी ॥ सर्वस्वें दे निजमैत्री ॥ स्वार्थी वंचना नकरी ॥ कृपापात्रीं उपदेश ॥ १४० ॥ अतर्क्य त्याची पाहती दिठी ॥ मद्रूपें देखे सकळ सृष्टी ॥ जगासि मज अभिन्न गांठी ॥ निजदृष्टीं बांधली ॥ ४१ ॥ मग तो जेउतें पाहे ॥ तेउता मीचि तयातें आहें ॥ तो जरी मातें[10] न पाहे ॥ तें नपाहणेंही होय मी त्याचें ॥ ४२ ॥ त्याची पाहती जे दिठी ॥ ते मीचि होय जगजेठी ॥ ऐशी तया मज एक गांठी ॥ सकळ सृष्टीसमवेत ॥ ४३ ॥ अवघें जगचि मी होय ॥ तेव्हां तो मी हे भाष जाय ॥ ऐसा तो मजमाजी समाय ॥ समसाम्य समत्वें ॥ ४४ ॥ सांडोनियां मनोधर्म ॥ ऐसा ज्यासि मी झालों सुगम ॥ त्यासि पुढती कैंचें जन्म ॥ दुःख दुर्गम ज्याचेनी ॥ ४५ ॥ मातेच्या उदरकुहरीं[11] ॥ रजस्वलेच्या रुधिरामाझारी ॥ पित्याचेनि रेतद्वारी ॥ गर्भसंचारीं संसरण[12] ॥ ४६ ॥ जे मातेच्या उदरीं ॥ जंतु नाकीं तोंडीं उ

---

[1] नाहीसा होत नाहीं. [2] आपल्या ज्ञानानें. [3] निष्काम. [4] बालकाच्या दृष्टांतानें. [5] आनंदास. [6] समुद्रांत. [7] अनेकप्रकारच्या नद्यांचे. [8] ब्रह्मशांति. [9] मित्रपणाची. [10] मला. [11] पोटरूपदरीत. [12] जन्म.

रीं शिरीं ॥ विष्टामूत्राचे दाथरीं ॥ नवमासवरी उकडिजे ॥ ४७ ॥ जठराग्नीच्या तोंडीं ॥ घालूनि गर्भाची उंडी ॥ उकडउकडूनि पिंडीं ॥ गर्भकांडीं घडिजेति ॥ ४८ ॥ ते गर्भींची वेदना ॥ नानापरीची यातना ॥ नकोनको रघुनंदना ॥ चिळसी मना येतसे ॥ ४९ ॥ अवघ्याच्या शेवटीं ॥ प्रसूतिवात जो आटी ॥ सर्वांगीं वेदना उठी ॥ योनिसंकटीं देहजन्म ॥ १५० ॥ ऐसें अपवित्र जें जन्म ॥ तें न पवतीच ते नरोत्तम ॥ जिहीं टाकिलें [1]निजधाम ॥ ते पुरुषोत्तम समसाम्ये ॥ ५१ ॥ मी असतां पाठीपोटीं ॥ त्यासि काइशा जन्मगोठी ॥ कळिकाळा तें नाणिती दिठी ॥ आले उठाउठी मद्रूपा ॥ ५२ ॥ जेथें जन्म नाहीं जाहलें ॥ तेथ मरण नलगतांचि गेलें ॥ ऐसे भजोनि मातें पावले ॥ भजनबळें मद्भक्त ॥ ५३ ॥ कृष्ण उद्धवातें थापटी ॥ ह्मणे वेगें उठीउठी ॥ हेचि हातवशी हातवटी ॥ जन्मतुटी तेणें होय ॥ ५४ ॥ जैसें [2]मेघमुखींचें [3]उदक ॥ वरिच्यावरी झेलिती चातक ॥ तैसें कृष्णवचनासि देख ॥ उद्धवें मुख पसरिलें ॥ ५५ ॥ कां चंद्रकिरणीं चकोर ॥ जेवीं अत्यंत सादर ॥ तेवीं उद्धवाचा आदर ॥ दिसे थोर हरिवचनीं ॥ ५६ ॥ होकां पक्षिणी देखोनि पिलें ॥ जाणोनि चाऱ्याचे वेळे ॥ सांडोनियां आविसाळे ॥ मुख कोंवळें जेवीं पसरी ॥ ५७ ॥ तेवीं देखोनि कृष्णमुख ॥ उद्धवासि अत्यंत हरिख ॥ श्रवणाचे मुखें देख ॥ [4]कृष्णपीयूख सेवित ॥ ५८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीशुकउवाच ॥ ॥ इत्यादिष्टो भगवता महाभागवतो नृप ॥ उद्धवः प्रणिपत्याह तत्त्वजिज्ञासुरच्युतम् ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ ॥ शुक ह्मणे कौरवनाथा ॥ कृपा [5]उपजली भगवंता ॥ उपदेशिलें महाभागवता ॥ ज्ञानकथा निजबोधु ॥ ५९ ॥ तें ऐकोनि उद्धव ॥ श्रवणीं थोर उठी हाव ॥ कैसें बोलिला ज्ञानगौरव ॥ अति अपूर्व श्रीकृष्ण ॥ १६० ॥ श्रीकृष्ण श्रीमुखें सांगे कोड ॥ तें निरूपण अतिगोड ॥ जीवीं उठली श्रवणचाड ॥ नुलंघी भीड देवाची ॥ ६१ ॥ आवडीं कळवळे चित्त ॥ घाली साष्टांग दंडवत ॥ हात जोडोनि पुसत ॥ प्रेमळ भक्त उद्धव ॥ ६२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धवउवाच ॥ ॥ योगेश योगविन्यास योगात्मन्योगसंभव ॥ निःश्रेयसाय मे प्रोक्तस्त्यागः संन्यासलक्षणः ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐके योगियांच्या योगपती ॥ योग्यांचा [6]ठेवा तूं श्रीपती ॥ योगीं प्रगट तूं योगमूर्ती ॥ योगउत्पत्ती तुजपासी ॥ ६३ ॥ मज मोक्षासि कारण ॥ त्यागु संन्यासलक्षण ॥ बोलिलासि अतिकठिण ॥ परमदारुण हा त्यागू ॥ ६४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ त्यागोऽयं दुष्करो भूमन् कामानां विषयात्मभिः ॥ सुतरां त्वयि सर्वात्मन्नभक्तैरिति मे मतिः ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ पाहतां या त्यागाची रीती ॥ मज तंव दुर्धरगा श्रीपती ॥ मग इतरांची येथ गती ॥ कवण्या स्थिती होईल ॥ ६५ ॥ कामु जयाच्या चित्तीं ॥ विषयीं आसक्त मती ॥ त्यासि या त्यागाचीगती ॥ नव्हे श्रीपती सर्वथा ॥ ६६ ॥ तुझी कृपा जंव

---

१ आपले स्थान. २ मेघाच्या तोंडातले. ३ पाणि. ४ कृष्णरूप अमृत. ५ उत्पन्नझाली. ६ ठेव.

नव्हे ॥ तंव तो अभक्तां केवीं करवे ॥ त्यागु बोलिला जो देवें ॥ तो सर्वांसि नव्हे सर्वथा ॥ ६७ ॥ तूं सर्वात्मा असतां हृदयीं ॥ चित्त प्रवेशेना[1] तुझ्याठायीं ॥ तें आवरिलें असे विषयीं ॥ नवल कायी सांगावें ॥ ६८ ॥ ऐसे प्रपंचीं आसक्त[2] ॥ यालागीं विमुख झाले अभक्त ॥ त्यांसि त्यागु नव्हे निश्चित ॥ चित्त दुश्चित्त सर्वदा ॥ ६९ ॥ त्यागु कां नव्हे ह्मणसी ॥ तें परिसगा[3] हृषीकेशी ॥ कठिणत्व जें त्यागासी ॥ तें तुजपाशी सांगेन ॥ १७० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सोहं ममाहमिति मूढमतिर्विगाढस्त्वन्मायया विरचितात्मनि सानुबंधे ॥ तत्त्वं जसा निगदितं भवता यथाऽहं संसाधयामि भगवन्ननुशाधि भृत्यम् ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ तुझी माया विचित्र उपाधी ॥ शरीरीं केली आत्मबुद्धी ॥ आत्मीय शरीरसंबंधी ॥ विपरीत[4] सिद्धी वाढली ॥ ७१ ॥ मी माझें वाढलें गाढ ॥ तेणें मती[5] झाली मूढ ॥ गृहासक्ति लागली दृढ ॥ त्याग अवघड यालागीं ॥ ७२ ॥ ऐशीही बुद्धि विवळे ॥ अप्रयासें तत्त्व आकळे ॥ तैशी कृपा कीजे राउळें ॥ दासगोपाळें तारावया ॥ ७३ ॥ ऐकेगा पुरुषोत्तमा ॥ निजदासां[6] आपुल्या आह्मा ॥ सोडवी गा संसारश्रमा आत्मया रामा श्रीकृष्णा ॥ ७४ ॥ तुज सांडोनि हृषीकेशी ॥ पुसों जावें आणिकापासीं ॥ तें नये माझिया मनासी ॥ विषयीं सर्वांसी व्यापिलें ॥ ७५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सत्यस्य ते स्वदृश आत्मन आत्मनोऽन्यं वक्तारमीश विबुधेष्वपि नानुचक्षे ॥ सर्वे विमोहितधियस्तव माययेमे ब्रह्मादयस्तनुभृतो बहिरर्थभावाः ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ ॥ पुसों जावें ब्रह्मयासी ॥ तो गुंतला सृष्टिकर्मासी ॥ प्रजाउत्पत्ति मानसीं ॥ अहर्निशीं चिंतित ॥ ७६ ॥ जो आपुल्या निजस्वभावीं[7] ॥ सदा संसारू वाढवी ॥ तो केवीं संसारू तोडवी ॥ केलें नबुडवी सर्वथा ॥ ७७ ॥ वाढों नेदी संसारासी ॥ कोपु आला प्रजापतीसी ॥ शापु दीधला नारदासी ॥ ब्रह्मउपदेशी ह्मणोनी ॥ ७८ ॥ ऐसे संसारीं आसक्त ॥ नित्य संसारयुक्त ॥ त्यांसि पुसों नमनी चित्त ॥ जाण निश्चित श्रीकृष्णा ॥ ७९ ॥ पुसों जावे ऋषींप्रती ॥ तंव ते सदा आपमती ॥ आपुलें मत प्रतिष्ठिती[8] ॥ अन्यथा देती शापातें ॥ १८० ॥ जीवीं धरोनि अर्थासक्ती ॥ शिष्यांतें उपदेशिती ॥ विषयो धरोनियां चित्तीं ॥ जीविका वृत्ती उपदेशु ॥ ८१ ॥ गुरूसीच विषयासक्ती ॥ तेथ शिष्यासि कैंची विरक्ती ॥ ऐशियांसि जे पूसती ॥ ते भ्रंशती निजस्वार्थातें[9] ॥ ८२ ॥ सत्यस्वरूप स्वप्रकाश ॥ आत्मा तूं अविनाश ॥ युक्तिप्रयुक्तीं उपदेश ॥ विकल्पनिरास जाणसी ॥ ८३ ॥ ब्रह्मज्ञानाचा वक्ता ॥ तुजवेगळा श्रीकृष्णनाथा ॥ नदिसे गा सर्वथा ॥ मज पाहतां त्रिलोकीं ॥ ८४ ॥ एवं आत्मा तूं तत्त्वतां ॥ तूंचि आत्मज्ञानदाता ॥ आत्मबोधीं संस्थापिता ॥ कृष्णनाथा तूं एक ॥ ८५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तस्माद्भवंतमनवद्यमनंतपारं सर्वज्ञमीश्वरमकुंठविकुंठधिष्ण्यम् ॥ निर्विण्णधीरहमुह वृजिनाभि

---

१ शिरव नाही. २ प्रेम करणारे. ३ ऐक. ४ उलटी. ५ बुद्धि. ६ आपल्या चाकरास. ७ आपल्या स्वभावानें. ८ स्थापन करितात. ९ आपल्या परमार्थास.

तस्मो नारायणं नरसखं शरणं प्रपद्ये ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ ॥ यालागीं जी यादवपती ॥ नित्य शुद्ध पवित्र मूर्ती ॥ तुज मायामोहो ना
ळती ॥ पवित्र ख्यांती यालागीं ॥ ८६ ॥ गोंवळांचे उच्छिष्टकवळें ॥ ज्याची पवित्रता न मैळे ॥ तेणेंचि उच्छिष्टवळें ॥ गोंवळे सकळ
तारिले ॥ ८७ ॥ प्राणें शोषिलें पूतनेसी ॥ तरी पवित्रता अधिक कैशी ॥ तेणेंचि उद्धरिलें तिसी ॥ दोष दोष्यांसी तारकु ॥ ८८ ॥ करूनि
कालीयमर्दन ॥ मर्दिला त्याचा अभिमान ॥ तरी मैळेंना पवित्रपण ॥ निर्विषें जाण तारिला ॥ ८९ ॥ रँजक अंत्यज अत्यंत ॥ आतळे त
या अधःपात ॥ त्यासि मारूनियां निश्चित ॥ केला पुँनीत सायुज्या ॥ १९० ॥ करूनि गोपिकांसी निंद्यकाम ॥ तेणें त्या केल्या निष्काम ॥
तेचि पवित्रता अनुत्तम ॥ सायुज्यधाम पावल्या ॥ ९१ ॥ करितां सुकर्म कुकर्म ॥ ज्याची पवित्रता अनुत्तम ॥ यालागीं नामें पुरुषो
त्तम ॥ अकर्त्रात्मनिजबोधें ॥ ९२ ॥ जो आकळे गुणां आंतू, त्यासि ते गुण करिती प्रांतू ॥ या गुणांसि तुजमाजी अंतू ॥ यालागीं
अनंतू सर्वथा ॥ ९३ ॥ देशतः कालतः अपार ॥ तुजकरवेचि साचार ॥ यालागीं तूं अनंत अपार ॥ श्रुतींसि पार नकळेची ॥ ९४ ॥
तुज म्या करावी विनंती ॥ किती यावें काकुळती ॥ तूं हृदयस्थ ज्ञानमूर्ती ॥ जाणता त्रिजगतीं तूं एक ॥ ९५ ॥ ज्ञान अज्ञान माया श
क्ती ॥ ईश्वराआधीन गा असती ॥ त्या ईश्वराची तूं ईश्वरमूर्ती ॥ सत्यकीर्ती तूं श्रीकृष्णा ॥ ९६ ॥ तूं सर्वांचा नियंता ॥ सर्व करूनि अ
कर्ता ॥ ईश्वर तूं गा कृष्णनाथा ॥ भोगूनि अभोक्ता तूं एक ॥ ९७ ॥ देशतः कालतः स्वभावेंसी ॥ नाशु नपावे ज्या स्थानासी ॥ तेथीं
चा तूं निवासवासी ॥ पूर्ण पूर्णांशीं अवतारु ॥ ९८ ॥ नराचें अविनाश स्थान ॥ यालागीं तूं नारायण ॥ तुझेनि जीवासि चळणवळ
ण ॥ चाळकपण तुजपासी ॥ ९९ ॥ ऐसा ईश्वर तूं आपण ॥ नरसखा नारायण ॥ युद्धसमयीं अर्जुनासि जाण ॥ ब्रह्मज्ञान त्वां दीध
लें ॥ २०० ॥ दारुण होतां संग्रामासी ॥ पाँडुडा पांवो युद्धासी ॥ तेव्हां ब्रह्मज्ञान सांगसी ॥ निर्जसख्यासी अर्जुना ॥ १ ॥ ऐसा कृपाळू
तूं नारायण ॥ यालागीं तुज अलों शरण ॥ त्रिंविधतापें तापलों जाण ॥ दुःखदारुण संसारु ॥ २ ॥ संसार ह्मणजे अंधकूप ॥ माजी का
मक्रोधादि दुष्टसर्प ॥ निंदा स्पर्धा कांटे अमूप ॥ दुःखरूप मी पडिलों ॥ ३ ॥ तेथ पडलिया पाठीं ॥ ब्रह्मद्वेषाचा शूळ पोटीं ॥ भरला
जे उठाउठी ॥ तेणें हिंपुटी होतसें ॥ ४ ॥ तेथून निघावया त्रिशुद्धी ॥ उँपाव नदिसेगा निजबुद्धी ॥ कृपाळुवा कृपानिधी ॥ आत्मबो
धीं मज काढी ॥ ५ ॥ ॥ श्लोक ॥ श्रीभगवानुवाच ॥ प्रायेण मनुजा लोके लोकतत्त्वविचक्षणाः ॥ समुद्धरंति ह्यात्मानमात्मनैवाशु
भाशयात् ॥ १९ ॥ टीका ॥ भूत संचरल्या पाठी ॥ सुटती जल्पवादगोठी ॥ त्यातें गुणिया पाहोनि दिठीं ॥ अक्षता त्राहाटी मंत्रोनी ॥

---

१ कीर्ति. २ कालियनांवाच्या सर्पाचा नाश. ३ मळत नाही. ४ धोबी. ५ पवित्र. ६ शेवट. ७ आज्ञा. ८ आपल्या मिषास. ९ आध्यात्मिक,आधिदैविक, आधिभौतिक. १० उपाय

॥ ६ ॥ पाहतां पांचभौतिक संसारु ॥ सहजें झाला असे थोरु ॥ माजी झोंबलासे कृष्णवियोग खेचरु ॥ उद्धव लेंकरुं झडपिलें ॥ ७ ॥ मिसें उद्धवाची झडपणी ॥ अंहंमहिषासुर लागला झणीं ॥ त्यासि करावया झाडणी ॥ कृष्ण गणी चालिला ॥ ८ ॥ तेथ झाडणी लागीं आतां ॥ यदुअवधूतसंवादकथा ॥ त्याची मंत्रूनि मंत्राक्षता ॥ होय झाडिता श्रीकृष्ण ॥ ९ ॥ श्रीकृष्ण ह्मणे उद्धवासी ॥ सावध होयी निजमानसीं ॥ येऊनियां मनुष्यलोकासी ॥ आपण आपणासी उद्धरिती ॥ २१० ॥ पाहतां यया परमार्था ॥ साह्य नव्हे माता पिता ॥ पुत्र भ्राता दुहिता कांता ॥ साह्य सर्वथा हे नव्हती ॥ ११ ॥ साह्य परमार्था नव्हे व्याही ॥ शेखीं साह्य नव्हे जांवयी ॥ आपणिया आपण साह्य पाही ॥ जो निजदेहीं विवेकु ॥ १२ ॥ मुमुक्षुमार्गींचे सज्ञान ॥ लोकतत्त्वविचक्षण ॥ विचारूनि कार्यकारण ॥ स्वबुद्धी जाण उद्धरिले ॥ १३ ॥ नित्यानित्यविवेंकें ॥ अनित्य सांडिती त्यागमुखें ॥ नित्य तें यथासुखें ॥ हित संतोखें अंगीकारिती ॥ १४ ॥ नित्यत्वें जें उरलें जाण ॥ तें स्वरूप माझें चिद्घन ॥ तैसेंचि साधकाचें साधन जाण ॥ अनन्यपणें चिंतिती ॥ १५ ॥ भावितां माझी दृढ भावना ॥ मीचि ते होती जाणा ॥ कीटकी भृंगीचिया खुणा ॥ आंप आपणा उद्धरिती ॥ १६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ आत्मनो गुरुरात्मैव पुरुषस्य विशेषतः ॥ यत्प्रत्यक्षानुमानाभ्यां श्रेयोसावनुविंदते ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ पश्वादियोनींच्याठायीं ॥ हिंताहितज्ञान असे पाही ॥ मा पुरुषाच्या पुरुषदेहीं ॥ ज्ञान पाही स्फुरद्रूप ॥ १७ ॥ जें कर्म करितों मी देहीं ॥ तेणें तरेनकीं नाहीं ॥ हें ज्याचे त्याचे ठायीं ॥ स्फुरद्रूप पाही कळतसे ॥ १८ ॥ सांडूनि अंशुभ वासना ॥ जो नकरी विषयकल्पना ॥ तो आपुला गुरु आपण जाणा ॥ नरकयातना चुकविली ॥ १९ ॥ जो कंटाळला जन्मगर्भासी ॥ मरमरों उबगला मरणासी ॥ आधी लागली मानसीं ॥ जन्ममरणांसी नासावया ॥ २२० ॥ आवडी नुपजे स्त्रीपुत्रांसी ॥ निद्रा नलगे अहर्निशीं ॥ काळें ग्रासिलें आयुष्यासी ॥ निजहितासी न देखिजे ॥ २१ ॥ तुह्मीच तुज देखतां ॥ काळें गिळिली बाल्यावस्था ॥ तारुण्याचा ग्रासिला माथा ॥ वार्धक्याभंवता लागला असे ॥ २२ ॥ केवळ वार्धक्याचा जरंगा ॥ त्यासिही काळ लागला पैंगा ॥ आयुष्य व्यर्थ जातसे वेगा ॥ हा निंजनाडु जगा कळेना ॥ २३ ॥ क्षणक्षणा काळ जातसे व्यर्थ ॥ कांहीं नसाधेजी परमार्थ ॥ जन्ममरणांचा आवर्त ॥ पुढें अनर्थ रोकडा ॥ २४ ॥ स्वर्ग नरक कर्म ब्रह्म ॥ चहूं प्राप्तीसि मनुष्यधर्म ॥ यालागीं त्यजूनि पापकर्म ॥ मोक्षधर्म धरावा ॥ २५ ॥ नरदेह मोक्षाचा वांटा ॥ वृथा जातसे कटकटा ॥ हृदयीं आधी लागला मोठा ॥ विषयचेष्टा विसरला ॥ २६ ॥ प्रत्यक्षलक्षणें अनित्य ॥ संसारु दिसे नाशवंत ॥ यालागीं तो नव्हे आसक्त ॥ होय

---

१ अहंकार रूप महिष दैत्य. २ चैतन्यरूप. ३ आपण. ४ हित आणि अनिहित. ५ पापरूप. ६ आत्म्याचे नाडणे. ७ व्यर्थ.

विरक्त इहभोगीं ॥ २७ ॥ याचिपरी अनुमाना ॥ परलोकभोगभावना ॥ अतळों नेदी मना ॥ नश्वर पतना जाणोनी ॥ २८ ॥ कैं रुपा करील गोविंद ॥ कैं तुटेल भवबंध ॥ कैं देखेन तो निजबोध ॥ परमानंद जेणें होय ॥ २९ ॥ धांव पावगा श्रीहरी ॥ रुपा करी दीनावरी ॥ मज उद्धरी भवसागरीं ॥ भक्तकैवारी श्रीकृष्णा ॥ २३० ॥ जैसी जीवनावेगळी मासोळी ॥ तैसा बोधालागीं[1] तळमळी ॥ प्रेमपडिभराच्या मेळीं ॥ देह न सांभाळी सर्वथा ॥ ३१ ॥ एक नेणोनि नरदेहा मुकले ॥ एकीं नटके ह्मणोनि उपेक्षिले ॥ एक ज्ञानगर्वें[2] गिळिले ॥ एक भुलले विषयार्थीं ॥ ३२ ॥ एक साधनाभिमानें ठकिले ॥ एक करूंकरूं ह्मणतां गेले ॥ एक करितां अव्हाटा भरले ॥ करणें ठेलें तैसेंची ॥ ३३ ॥ जरी विवेक कळला मना ॥ तरी नतुटती विषयवासना ॥ तेणें संतप्त होऊनि जाणा ॥ नारायणा चिंतित ॥ ३४ ॥ कृष्ण ह्मणे उद्धवासी ॥ सविवेक[3] वैराग्य असे ज्यासी ॥ तोचि आपुला गुरु आपणासी ॥ विशेषेंसी जाणावा ॥ ॥ ३५ ॥ त्याचिये निजबुद्धीसी ॥ मीचि विवेकु[4] प्रकाशीं ॥ तो स्वयें जाणे निजबोधासी ॥ निजमानसीं विवेकें ॥ ३६ ॥ ज्यासि जैसा भावो ॥ त्यासि मी तैसा देवो ॥ या अर्थीं संदेहो[5] ॥ उद्धवा पहाहो न धरावा ॥ ३७ ॥ उद्धवा येथ केवळ ॥ पाहिजे निजबुद्धि निर्मळ ॥ तरी आत्मबोध तत्काळ ॥ होय सफळ सर्वथा ॥ ३८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पुरुषत्वे च मां धीराः सांख्ययोगविशारदाः ॥ आविस्तरां प्रपश्यंति सर्वशक्त्युपबृंहितम् ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥ एवं वैराग्यें पूर्ण भरित ॥ धीर पुरुष विवेकयुक्त ॥ सांख्य योग विवंचित ॥ निजीं निजप्राप्त तत्काळ ॥ ३९ ॥ नरदेहीं विवेक वसे ॥ निजरूप पावले कैसे ॥ जें शक्तियुक्त असे ॥ तें सावकाशें देखती ॥ २४० ॥ जें प्रसवे सर्वशक्तीतें ॥ तें सर्वशक्तिशक्तिदातें ॥ जें नातळे सर्वशक्तींतें ॥ त्या स्वरूपातें पाहती ॥ ४१ ॥ उद्धवा काय सांगों गोष्टी ॥ बहुत शरीरें सृजिलीं[6] सृष्टीं ॥ मज नरदेहीं आवड मोठी ॥ उठाउठी मी होती ॥ ४२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एकद्वित्रिचतुष्पादो बहुपादस्तथाऽपदः ॥ बव्ह्यःसंति पुरः सृष्टास्तासां मे पौरुषी प्रिया ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥ केलीं एकचरणीं शरीरें ॥ दोंपायांचीं अपारें ॥ तीपायांची मनोहरें ॥ अतिसुंदरें चतुष्पदें ॥ ४३ ॥ सर्पादियोनींचाठायीं ॥ म्या चरणचि केले नाहीं ॥ एकें चालती बहुपायीं ॥ केलीं पाही शरीरें ॥ ४४ ॥ ऐशीं शरीरें नेणों किती ॥ म्यां निर्माण केलीं ये क्षितीं ॥ मज कर्त्यातें नेणती ॥ मूढमती यालागीं ॥ ४५ ॥ मज कर्त्याची प्राप्ती ॥ व्हावयालागीं निश्चितीं ॥ स्वांशें प्रकाशोनि ज्ञानशक्ती ॥ पौरुषी[7] प्रकृति म्या केली ॥ ४६ ॥ जेणें देहें मज पावती ॥ त्या देहाची मज अतिप्रीती ॥ यालागीं श्रुति नरदेह वर्णिती ॥ देव वांछिती नरदेहा ॥ ४७ ॥ ऐशी नरदेहाची प्रीती ॥ कृष्ण सांगे उद्धवाप्रती ॥ येणें शरीरें

---

[1] ज्ञाना करिता. [2] मी ज्ञानी आशा अहंकारानें. [3] विचारासह. [4] विचार. [5] संशय. [6] उत्पन्न केली. [7] पुरुषांची.

मज पावती ॥ नानायुक्तीविचारें ॥ ४८ ॥ ॥श्लोक॥ ॥अत्र मां मार्गयंत्यद्धा युक्ता हेतुभिरीश्वरम् ॥ गृत्यमाणैर्गुणैर्लिंगैरग्राह्यमनुमानतः
॥ २३ ॥ ॥टीका॥ ॥ येऊनि नरदेहाप्रती ॥ कर्त्याची गवेषणा[१] जे करिती ॥ जो मी ईश्वर त्रिजगतीं ॥ उत्पत्तिस्थितीसंहर्ता ॥ ४९ ॥
बुद्धियुक्तीं विवेक करणें ॥ तें जडें जे प्रकाशपणें ॥ त्याचाही मी प्रकाशकु[२] ह्मणे ॥ येणें लक्षणें लक्षिती ॥ २५० ॥ ऐशा नानापरीच्या
अनुमाना ॥ मी तंव वश नव्हे जाणा ॥ जे लक्षिती सांडोनि अभिमाना ॥ साक्षात्पणां ते येती ॥ ५१ ॥ ज्याची आशा होय निराश ॥
तोचि ब्रह्म पावे सावकाश ॥ तेणें कळिकाळावरी कांस ॥ जाण अवश्य घातली ॥ ५२ ॥ मुख तंव स्वतःसिद्ध असे ॥ तें निर्मळ आरसां
दिसे ॥ तेवीं बुद्धीचेनि विवेकवशें ॥ आत्मा भासे नरदेहीं ॥ ५३ ॥ येचिविखींचा इतिहास जाण ॥ तुज मीं सांगेन पुरातन[३] ॥ यदु
अवधूतसंवादलक्षण ॥ ज्ञानसाधन साधकां ॥ ५४ ॥ ॥ श्लोक॥ ॥अत्राप्युदाहरंतीममितिहासं पुरातनम् ॥ अवधूतस्य संवादं यदोः
रमिततेजसः ॥ २४ ॥ ॥टीका॥ ॥हरिखें ह्मणतसे गोविंदु ॥ उद्धवा आमुचा पूर्वज यदू ॥ तेणें ब्रह्मज्ञानासि संवादु ॥ केला विशदू[४]
अवधूतासी ॥ ५५ ॥ राजा यदू ह्मणसी कैसा ॥ क्षात्रसृष्टीचा सूर्यो जैसा ॥ राजा चंद्राच्या प्रकाशा ॥ निजतेजवशा लोपित ॥ ५६ ॥
तेणें गुरूचीं लक्षणें ऐकतां ॥ सायुज्यमुक्ती आली हाता ॥ ते हे पुरातन कथा ॥ तुज मी आतां सांगेन ॥ ५७ ॥ ॥श्लोक॥ ॥ अवधूतं
द्विजं कंचिच्चरंतमकुतोभयम् ॥ कविं निरीक्ष्य तरुणं यदुः पप्रच्छ धर्मवित् ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ कोणी एक अवधूतु ॥ निजतेजें[५]
प्रकाशवंतु ॥ ब्रह्मानंदे डुल्लतु ॥ यदूनें येतू देखिला ॥ ५८ ॥ त्या अवधूताचें लक्षण ॥ यदु निरीक्षी[६] आपण ॥ देखिलें ब्रह्मसूत्रधारण ॥
होय ब्राह्मण ब्रह्मवेत्ता[७] ॥ ५९ ॥ ऐसा तो अवधूत ॥ निर्भय निःशंक वर्तत ॥ यदु न्याहाळिये होता जात ॥ देखिला वनांत सन्मुख ॥
॥ २६० ॥ आंतुला प्राण तत्त्वतां ॥ बाहेर रिघों नेदी[८] सर्वथा ॥ स्वभावें प्राणापानसमता ॥ जाहली नधरितां धारणा ॥ ६१ ॥ नवल तयाचें
पाहणें ॥ दृश्य दृश्यत्वें देखों नेणें ॥ झाला सर्वांग देखणें ॥ देखणेंपणें पाहातसे ॥ ६२ ॥ मी एकु वनीं वसता ॥ हेंही नाठवे त्याचिया
चित्ता ॥ झाली सर्वत्र सर्वगतता ॥ समसाम्यता समत्वें ॥ ६३ ॥ कर्म कार्य कर्ता जाण ॥ अवघा जाहला तो आपण ॥ क्रियेनें
वाहूनियां आण ॥ निंबलोण जिवें केलें ॥ ६४ ॥ देहाचिया माथा ॥ ठेविली होती अहंता ॥ तें देह मिथ्यात्व पावतां ॥ समूळ अहंता
पळाली ॥ ६५ ॥ नित्यानित्यहोमद्वारें[९] ॥ ब्रह्माग्नि प्रज्वळला एकसरें ॥ जाळूनि आश्रमांचीं चारी घरें ॥ केलें खरें निराश्रमी ॥ ६६ ॥
त्या आश्रमामाजी होती ॥ शास्त्रश्रवण विधिवादपोथी ॥ ते जळाली जी निश्चितीं ॥ भस्म हातीं नलगेची ॥ ६७ ॥ विधिनिषेधपैजा ॥

---

१ शोध. २ प्रकाश करणारा. ३ जुना. ४ स्पष्ट. ५ आपल्या तेजानें. ६ पाहतो ७ ब्रह्मजाणणारा. ८ देत नाही. ९ नित्यनैमित्तिक होमद्वारानें.

जळाली पंचायतनदेवपूजा ॥ होता संचितक्रियमाणपुंजा ॥ तोही वोजा जळाला ॥ ६८ ॥ यापरी तो अवधूत ॥ ब्रह्मानंदें जी डुल्लत ॥
निजसुखें[1] वेल्हावत ॥ देखिला येत यदुरायें ॥ ६९ ॥ संकल्पविकल्परहित ॥ शुद्ध सर्वांगीं विभूत ॥ यालागीं बोलिजे अवधूत ॥ येऱ्ह
वीं विख्यात ब्राह्मणू ॥ २७० ॥ सभोंवता समस्तु ॥ प्रपंच निजबोधें असे धूतू ॥ यालागीं बोलिजे अवधूतू ॥ येऱ्हवीं विख्यातू ब्रा
ह्मणू ॥ ७१ ॥ अहं धुईल तो अवधूत ॥ तोचि योगी तोचि पुनीत[2] ॥ जोकां अहंकारें ग्रस्त ॥ तोचि पतित जन्मकर्मीं ॥ ७२ ॥ बार्धक्य[3]
यावें देहासी ॥ तंव देहपण नाहीं देहापासी ॥ रिगमु नव्हेच जरेसी[4] ॥ तारुण्यासी तें मूळ ॥ ७३ ॥ आणिकही त्याचीं लक्षणें ॥ नि
च नवा बोधु मैळों नेणें ॥ भोगिजे नित्यनूतनपणें ॥ परमतारुण्यें टवटवला ॥ ७४ ॥ निजबोधाचिया सत्ता ॥ द्वैत जिंतिलें तत्त्वतां ॥
ऐसा निःशंकु[5] विचरतां ॥ भय सर्वथा त्या नाहीं ॥ ७५ ॥ ऐशीं लक्षणें निर्धारितां ॥ अवधूत निजबोधें पुरता ॥ यदूसि उपजली विनी
तता ॥ श्रद्धा सर्वथा अनिवार ॥ ७६ ॥ करूनि साष्टांग दंडवत ॥ अतिनम्र श्रद्धायुक्त ॥ हात जोडूनि पुसत ॥ प्रसन्नचित्त रायाचें ॥
॥ ७७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदुरुवाच ॥ ॥ कुतो बुद्धिरियं ब्रह्मन्नकर्तुः सुविशारदा ॥ यामासाद्य भवाँल्लोकं विद्वांश्चरति बालवत् ॥ २६ ॥
टीका ॥ ॥ अपूर्वबुद्धी हे स्वामी ॥ तुमच्याठायीं देखों आह्मी ॥ जे न लभे यमनियमीं ॥ कर्मधर्मीं आचरतां ॥ ७८ ॥ दिसतोसि स
र्वार्थीं कुशळ ॥ परी काहीं नकरूनि निश्चळ ॥ अकर्तात्मबोधें तूं केवळ ॥ जैसें बळ अहेतुक ॥ ७९ ॥ तूं बालाऐसा वर्तसी ॥ परी बा
लबुद्धी नाहीं तुजपासी ॥ सर्वज्ञ सर्वथा होसी ॥ ऐसें आह्मासी दिसतसे ॥ २८० ॥ येवोनियां या लोकासी ॥ पावोनियां नरदेहासी ॥
सार्थकता तुह्माऐसी ॥ आणिकापाशीं नदेखों ॥ ८१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रायो धर्मार्थकामेषु विवित्सायां च मानवाः ॥ हेतुनैव समी
हंते आयुषो यशसः श्रियः ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रायशा[6] येलोकीं लोक ॥ धर्मअर्थकामकामुक ॥ येचिविखीं ज्ञान देख ॥ आवश्यक
करिताती ॥ ८२ ॥ आह्मी स्वधर्म करितों ह्मणती ॥ स्नानसंध्येची कीर्ती मिरविती ॥ शेवटीं गायत्रीचें फळ देती ॥ अर्थप्राप्ती लागोनी ॥
॥ ८३ ॥ वेदोक्त आह्मी करितों याग[7] ॥ संस्थापितों वेदमार्ग ॥ शेखीं तो करिती जीविकायोग[8] ॥ स्वर्गभोग वांछिती ॥ ८४ ॥ एक ह्मण
ती आह्मी स्वकर्मक ॥ कुश मृत्तिका[9] नाशिती उदक ॥ समर्यीं आलिया याचक ॥ तेवेळीं भीक नघालिती ॥ ८५ ॥ दांभिक वाढवाव
या स्फीती ॥ वैष्णवदीक्षा अवलंबिती ॥ देवपूजा झळफळीत दाविती ॥ शंख लाविती दोंहातीं ॥ ८६ ॥ आयुष्यदानी पुण्यपुरुष ॥ आ
ह्मी चिकित्सक[10] अहिंस ॥ स्थावर जंगम जीव अशेष ॥ मारूनियां यश मिरविती ॥ ८७ ॥ यश वाढवावयाचें कारण ॥ तुळापुरुष

---

१ आत्मसुखानें. २ पवित्र. ३ ह्मातारपण. ४ रोगास. ५ निःसंशय. ६ बहुतकरून. ७ यज्ञ. ८ पोट भरण्याचे साधन. ९ माती. १० वैद्य.

करिती दान ॥ देह मूत्रविष्ठें परिपूर्ण ॥ धन त्यासमान जोखिती ॥ ८८ ॥ परी परमार्थाचिया चाडा ॥ कोणी वेंचीना कवडा ॥ भूल कैशी
पडली मूढां ॥ स्वार्थ रोकडा विसरले ॥ ८९ ॥ पूर्वीं अदृष्टीं नाहीं प्राप्ती ॥ ते श्रीकामा उपास्ती करिती ॥ श्रियेचा स्वामी श्रीपती ॥
त्यातें न भजती अभाग्य ॥ २९० ॥ लक्ष्मी विश्वगुरुहरीची पत्नी ॥ तीतें जोतो राखे अभिलाषूनी ॥ नेदिती हरीची हरिलागोनी ॥ त्यातें
पतनीं हरि पचवी ॥ ९१ ॥ रोगत्यागें आयुष्य मागती ॥ यालागीं सविता उपासिती ॥ देह नश्वर हें नाठवे चित्तीं ॥ पडली भ्रांती निजपदा
॥ ९२ ॥ एवं आयुष्य यश श्रीकामीं ॥ समस्त भजतां देखों आह्मी ॥ परी नवल केलें तुवां स्वामी ॥ परब्रह्मीं निजबोधू ॥ ९३ ॥
विषयबळ अलोलिक ॥ मिथ्या भ्रमें भ्रमले लोक ॥ ज्ञानसाधनें साधोनि देख ॥ विषयसुख वांछिती ॥ ९४ ॥ वेदांत वार्तिक वाक्स्फूर्ती
॥ अद्वैत ब्रह्म प्रतिपादिती ॥ शेखीं पोटासाठीं विकिती ॥ नवल किती सांगावें ॥ ९५ ॥ एक ह्मणविती योगज्ञानी ॥ वायुधारणा
दाविती जनीं ॥ टाळी लाऊनि बैसती ध्यानीं ॥ जीविका मनीं विषयांची ॥ ९६ ॥ ऐसे विविदिषा लोक ॥ साधनें साधूनि झाले मूर्ख ॥
तुवां केलें जी अलोलिक ॥ आत्मसुख साधिलें ॥ ९७ ॥ ऐसें स्वामी अवधूता ॥ तुवां तृणप्राय केलें जीविता ॥ तुच्छ करोनि लोकां समस्तां
॥ निजात्महिता मीनलासी ॥ ९८ ॥ निजानंदें निवालासी ॥ अंतरीं शीतळ ॥ झालासी ॥ ऐसें दिसताहे आह्मसी ॥ उपलक्षणेंसी परियेसी
॥ ९९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ त्वंतु कल्पः कविर्दक्षः सुभगोऽमृतभाषणः ॥ नकर्ता नेहसे किंचिज्जडोन्मत्तपिशाचवत् ॥ २८ ॥ ॥ टीका ॥
सर्वज्ञ ज्ञाता तूं होसी ॥ तें ज्ञातेपण दिसों नदेसी ॥ कांहीं करिसी नावांछिसी ॥ जडत्वें दाविसी निजशांती ॥ ३०० ॥ सर्वथा उगा
अससी ॥ परी तूं अंगें विकळ नव्हसी ॥ अंगीं अव्यंगी दिसतोसी ॥ स्वरूपरूपेंसी शोभित ॥ १ ॥ ज्ञान एकलेपणें ठेलें ॥ दुजेनिवीण
परदेशी झालें ॥ तें तुजमाजी सामावलें ॥ यालागीं आलें कविपद ॥ २ ॥ करूनि झालासि अकर्ता ॥ हेचि तुझी थोर दक्षता ॥
ब्रह्मरसें रसाळ बोलतां ॥ चवी अमृता ते कैंची ॥ ३ ॥ ब्रह्मरस तूं प्यालासी ॥ ब्रह्मानंदें मातलासी ॥ जगीं उन्मत्त जाहलासी ॥
दृष्टीं नाणिसी कोणातें ॥ ४ ॥ सदा सावध निजरूपेंसी ॥ यालागीं माझें तुझें नह्मणसी ॥ तेंचि पिसेपण तुजपाशी ॥ दिसे जगासी
सर्वथा ॥ ५ ॥ निजबोधें तृप्त झालासी ॥ परमानंदें निवालासी ॥ तीहीं लक्षणें तुजपासी ॥ निर्धारेंसी दिसताती ॥ ६ ॥ ॥ श्लोक ॥
जनेषु दह्यमानेषु कामलोभदवाग्निना ॥ नतप्यसेऽग्निना मुक्तो गंगांभस्थ इव द्विपः ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ कामलोभदावाग्नी ॥
माजी जळतां लोक तीन्ही ॥ देखत असोजी नयनीं ॥ वेगळा कोणी दिसेना ॥ ७ ॥ ते दावाग्नीमाजी असतां ॥ तूं नपोळसी

---

१ दुर्दैवी. २ सूर्य ३ योग. ४ जाणण्याची इच्छा करणारे. ५ गवता प्रमाणें. ६ मावले. ७ चातुर्य. ८ वेडेंपण. ९ निश्चयानें.

ला ॥ ४८ ॥ टिटवी आणि लेंकरूं ॥ कुमारी आणि शरकारु[1] ॥ सर्प कांतणीं पेशस्करु ॥ इतुकेन गुरु चोवीस ॥ ४९ ॥ पावावया तत्त्व पंचविसावें ॥ चोविसां गुरूंसि उपासावें ॥ विवेकयुक्तिस्वभावे ॥ गुरु भजावे निजबुद्धि[2] ॥ ३५० ॥ टाकावया निजबोधासी ॥ निंजविवेकें अहर्निशीं ॥ गुरुत्व देऊनि अनेकासी ॥ निजहितासी गुरु केले ॥ ५१ ॥ कोण युक्ती कोण विचारू ॥ कोणें लक्षणें कोण गुरू ॥ केला तोही निजनिर्धारू[3] ॥ सविस्तारू परियेसी ॥ ५२ ॥ ॥श्लोक॥ ॥एते मे गुरुवो राजंश्चतुर्विंशतिराश्रिताः ॥ शिक्षावृत्तिभिरेतेषामन्वशिक्षमिहात्मनः ॥ ३५ ॥ ॥टीका॥ ॥ऐके राजवर्य नृपती ॥ विवेकधवल चतुरकीर्ती ॥ गुरुसंख्या तुजप्रती ॥ यथानिगुतीं सांगीतली ॥ ५३ ॥ यांचिया शिक्षिता वृत्ती ॥ शिकलों आपुलिया युक्तीं ॥ मग पावलों आत्मस्थिती ॥ विकल्प भ्रांती सांडूनी ॥ ५४ ॥ श्लोक ॥ ॥यतो यदनुशिक्षामि यथा वा नाहुषात्मज ॥ तं तथा पुरुषव्याघ्र निबोध कथयामि ते ॥ ३६ ॥ ॥टीका॥ ॥नहुषाचा पुत्र ययाती ॥ ययातीचा यदु निश्चितीं ॥ नहुषनंदन यदूसि ह्मणती ॥ मूळव्युत्पत्ती तेणें योगें ॥ ५५ ॥ यालागीं ह्मणे नाहुषनंदना ॥ पुरुषांमाजी पंचानना ॥ सांगेन गुरूच्या लक्षणा ॥ विचक्षणा[4] परियेसी ॥ ५६ ॥ ज्या गुरूचें जैसें शिक्षित ॥ मी शिकलों सुनिश्चित ॥ तेंतें सांगेन समस्त ॥ सावधचित्त करी राया ॥ ५७ ॥ ऐकावया गुरुलक्षण ॥ यदूनें सर्वांग केलें श्रवण ॥ अर्थी बुडवूनियां मन ॥ सावधान परीस तू ॥ ५८ ॥ शब्द सांडोनियां मागें ॥ शब्दार्थामाजी रिगे ॥ जेंजें परिसतु तेंतें होय अंगें ॥ विकल्पत्यागें विनीत ॥ ५९ ॥ ॥श्लोक॥ ॥भूतैराक्रम्यमाणोपि धीरो दैववशानुगैः ॥ तद्विद्वान्न चलेन्मार्गादन्वशिक्षं क्षितेर्व्रतम् ॥ ३७ ॥ ॥टीका॥ ॥परमार्थीं मुख्य शांती ॥ साधकांसि पाहिजे निश्चितीं ॥ यालागीं प्रथम गुरु क्षिती ॥ निजशांती लागूनी ॥ ३६० ॥ पृथ्वी गुरु त्रिविध पाही ॥ पर्वत वृक्ष आणि मही[5] ॥ यांचीं लक्षणें धरितां देहीं ॥ गुरुत्व पाही पृथ्वीसी ॥ ६१ ॥ आंतर निग्रहो ते शांती ॥ बाह्येंद्रिय निग्रहो ते दांती ॥ उभयसहिष्णुता ते क्षांती ॥ शांतीसि क्षिती गुरु केली ॥ ६२ ॥ पृथ्वी ते नानाभूतीं ॥ माझी माझी ह्मणोनि झोंबती ॥ नाना भेदीं भिन्न करिती ॥ निजवृत्ती व्यवहारें ॥ ६३ ॥ त्या भूतांचें भिन्न वर्त्तन ॥ पृथ्वी संपादी आपण ॥ मोडों नेदी अभिन्नपण[6] ॥ अखंड जाण सर्वदा ॥ ६४ ॥ तैसें योगियाचें लक्षण ॥ करितां कर्म भिन्नभिन्न ॥ वृत्ति अखंडदंडायमान ॥ सर्वदा[7] जाण असावी ॥ ६५ ॥ देहासि अदृष्टयोगें गती ॥ भूतें अदृष्टयोगें आक्रमिती ॥ भूतीं निजात्मता भाविती ॥ द्वंद्वें नबाधती साधकां ॥ ६६ ॥ येथ भूतीं पृथ्वी पूजिली ॥ नातरी विष्ठामूत्रीं गांजिली ॥ हर्षविषादां नाहीं आली ॥ निश्चळ ठेली निजक्षांतीं ॥ ६७ ॥ भूतें पार्थिवेंचि तंव झालीं ॥

---

१ बाणकरणारा. २ आपल्या विचारानें. ३ आपला निश्चय. ४ चतुरा. ५ पृथिवी. ६ एकत्व. ७ नेहमी.

तिहीं पृथ्वी पूजिली नागांजिलीं ॥ ऐक्यें द्वंद्वभावा मुकलीं ॥ निश्चळ झालीं निजरूपें[1] ॥ ६८ ॥ तैसा योगियाही जाणा ॥ भूतवैषम्यें डंडळीना ॥ सर्वभूतीं निजात्मभावना ॥ विषमीं समाना भावितां ॥ ६९ ॥ आतां पृथ्वीची अभिनव[2]शांती ॥ तें सांगेन राया तुजप्रती ॥ जे शांति धरोनि संतीं ॥ भगवद्भक्ति पावले ॥ ३७० ॥ पृथ्वी दाहेंकरूनि जाळिली ॥ नांगर घालूनि फाळिली ॥ लातवरीं[3] तुडविली ॥ तोडिली झाडिली पैं भूतीं ॥ ७१ ॥ तो अपराधु नमानूनि क्षिती ॥ सर्वेंचि भूततें प्रसन्न होती ॥ तेथेंचि पिकवूनि नानासंपत्ती ॥ तृप्ति देती भूतांतें ॥ ७२ ॥ ऐसऐशिया निजशांती ॥ लागीं गुरु म्यां केली क्षितीं ॥ ऐक सभाग्या भूपती ॥ शांतीची स्थिति अभिनव ॥ ७३ ॥ एकें अपराध केला ॥ दुजेनि उगाचि साहिला ॥ इतुकेनि शांत केवीं झाला ॥ उपेक्षिला अपराधू ॥ ७४ ॥ ऊस मोडीत्या गोड भारी ॥ छेदितें शस्त्र गोड करी ॥ पिळिलिया आळिलिया वरी ॥ स्वादाचीया थोरी अपकाऱ्यां देतू ॥ ७५ ॥ अपराध साहोनि अंगीं ॥ त्याच्या प्रवर्ते हितालागीं ॥ तेचि शांती पैं जगीं ॥ होय दादुगी निर्द्वंद्व ॥ ७६ ॥ अपराध साहोनि अंगावरी ॥ अपराध्या होइजे उपकारी ॥ हें शिकलों पृथ्वियेवरी ॥ परोपकारी पर्वत ॥ ७७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शश्वत्परार्थसर्वेहः परार्थैकांतसंभवः ॥ साधुः शिक्षेत भूभृत्तो नगशिष्यः परात्मताम् ॥ ३८ ॥ ॥ टीका ॥ ॥ पृथ्वीपासोनि झाले ॥ ते पर्वतही म्यां गुरु[4] केले ॥ त्यांपासोनि जेंजें शिकलें ॥ तेंही वहिलें परियेसी ॥ ७८ ॥ रत्नादिनिकर समस्त ॥ पर्वत परार्थचि वाहत ॥ तृण जळ नाना अर्थ[5] ॥ तेही परार्थ धरीतसे ॥ ७९ ॥ कोणासि नेमी नानिवारी ॥ उँबगोनि नघाली बाहेरी ॥ याचकाचे इच्छेवरी ॥ परोपकारी देतसे ॥ ३८० ॥ ग्रीष्माअंतीं सर्वसरे ॥ परी तो देतां मागें नसरे ॥ सर्वेंचि भगवंतें कीजे पुरें ॥ वर्षोनि जळधरें[6] समृद्धी ॥ ८१ ॥ जंव जंव उल्हासे दाता देतू ॥ तंव तंव पुरवी जगन्नाथू ॥ विकल्प[7] नधरितां मनांतू ॥ देता अच्युतू अनिवार ॥ ८२ ॥ सत्य अच्युत दाता ॥ हें न मनेंचि तत्त्वतां ॥ यालागीं दरिद्रता ॥ विकल्पवंता लागली ॥ ८३ ॥ एवं पर्वताची जे उत्पत्ती ॥ ते परोपकारार्थ एकांतीं ॥ उपकारावांचूनि चित्तीं ॥ दुजी वृत्ती जाणेना ॥ ८४ ॥ त्या पर्वताऐशी तत्त्वतां ॥ असावी साधकासी उदारता ॥ काया वाचा आणि चित्ता ॥ सर्वस्व देतां उल्हासु ॥ ८५ ॥ चेष्टामात्रें[8] परोपकारता ॥ सर्वदा करावी समस्तां ॥ कोटिलाभा हाणोनि लाता ॥ उपकारीं तत्त्वतां उद्युक्त ॥ ८६ ॥ परमार्थाचिया चाडा ॥ स्वार्थ सांडोनि रोकडा ॥ परोपकारार्थ अवघडा ॥ रिघे सांकडा परार्थें ॥ ८७ ॥ उपकारचि साकारला ॥ कीं परोपकारू रूपा आला ॥ तैसा जन्मोनि उपकारी झाला ॥ उपकारिला सर्वांसी ॥ ८८ ॥ ऊस जैसा अवधारी ॥ सर्वांसि गोडपणें उपकारी ॥ तैसाचि योगिया संसारीं ॥ परो

---

१ आपल्यारूपानें. २ आश्चर्यकारक. ३ लातेनें. ४ मोठे. ५ वासून. ६ मेघानें. ७ संशय. ८ सर्वव्यवहारानें.

पकारी मधुरत्वें[1] ॥ ८९ ॥ जैसे पर्वतीं निर्झर[2] ॥ तैसे उपकाराचे पाझर ॥ सुकों नेणती निरंतर ॥ कृतोपकार जग केलें ॥ ३९० ॥ सां
डोनि कृपणवृत्तीची संगती ॥ उपकारी पर्वत एकांतीं ॥ राहिलासे उपकारमूर्ती ॥ धैर्यवृत्ती निर्धारें ॥ ९१ ॥ परोपकारालागीं निश्चित ॥
गुरु केला म्यां पर्वत ॥ आतां वृक्षापासोनि जें शिक्षित ॥ तेंही समस्त परियेसी ॥ ९२ ॥ सर्वांगें सर्वभावेंसी ॥ सर्वकाळ सर्वदर्शी ॥
पराधीन व्हावें सर्वांसी ॥ हें वृक्षापाशीं शिकलों ॥ ९३ ॥ वृक्ष जेणें प्रतिपाळिला ॥ तो त्या आधीन जाहला ॥ कां जो छेदावयाला
रिघाला ॥ त्याही झाला स्वाधीन ॥ ९४ ॥ योगिया पालखीसि घातला ॥ तेव्हां त्याचिया आधीन झाला ॥ एकीं सुळीं घ्यावया चाल
विला ॥ तेव्हां त्याच्याही बोला आधीन ॥ ९५ ॥ सांडूनि देहींची अहंता[3] ॥ योगियासि झाली पराधीनता ॥ विश्वामाझारी आत्मा
सर्वथा ॥ सर्वांचा वर्तता बोलानू ॥ ९६ ॥ सर्व तें मीचि आहें ॥ यालागीं साधक बाधक नपाहे ॥ त्याच्या बोलामाजी राहे ॥ वर्तता
होये संतोषें ॥ ९७ ॥ प्राप्त जेंजें सुखदुःख ॥ तेंतें अदृष्टाआधीन देख ॥ आत्मा मानी सकल लोक ॥ पराधीन देख वर्तत ॥ ९८ ॥ स
कळलोकीं निजात्मता[4] ॥ देखतां झाली अपराधीनता ॥ हे वृक्षापासोनि तत्त्वतां ॥ परार्थता शिकलों ॥ ९९ ॥ आणीक एक लक्षण ॥
वृक्षापासोनि शिकलों जाण ॥ अतिथीचें पूजाविधान ॥ तें सावधान परियेसी ॥ ४०० ॥ अतिथी आल्या वृक्षापासी[5] ॥ वंचना नक
रीच त्यासी ॥ पत्रपुष्पफलमूळछायेसी[6] ॥ त्वचाकाष्ठांसी[7] देतसे ॥ १ ॥ जो वृक्षासि प्रतिपाळी ॥ कां जो घावो घालूनि मूळीं ॥ दोहीं
सीही सममेळीं ॥ पुष्पीं फळीं संतुष्टी ॥ २ ॥ जैसा वृक्ष समूळ सगळा ॥ अर्थियांलागीं सार्थक जाहला ॥ तैसा चित्तें वित्तें देहें बो
ला ॥ साधु संतुष्टला अर्थ्यांसी ॥ ३ ॥ अतिथीसि नव्हे पराङ्मुख ॥ हा साधूसि गुण अलोलिक ॥ अन्न धन उदक ॥ यथासुखें दे
तसे ॥ ४ ॥ अर्थी आल्या अर्थावयासी ॥ विमुख नव्हावें सर्वस्वेंसी ॥ हें शिकलों वृक्षापाशी ॥ विवेकेंसी[8] निजबुद्धी ॥ ५ ॥ एवं पृथ्वी
गुरु झाली ऐसी ॥ दुजें गुरुत्व तें वायूसी ॥ आलें जेंजें युक्तीसी ॥ तें परियेसी नरदेवा ॥ ६ ॥ गुरुत्व जें वायूसी ॥ तें दोंप्रकारें प
रियेसी ॥ एक तें प्राणवृत्तीसी ॥ बाह्यवायूमी दुसरें ॥ ७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्राणवृत्त्यैव संतुष्येन्मुनिर्नैवेंद्रियप्रियैः ॥ ज्ञानं यथा न न
श्येत नावकीर्यैत वाङ्मनः ॥ ३९ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्राणाचियेपरी ॥ जो विषयीं आसक्ती[9] ॥ नधरी विषय सेविलियाहीवरी ॥ नव्हे
अहंकारी प्राण जैसा ॥ ८ ॥ प्राणाभ्यासें क्षुधा[10] अद्भुत ॥ तेव्हां प्राणासीच क्षोभ येत ॥ तेणें काया[11] वाचा चित्त ॥ विकळ पडत इंद्रियें
॥ ९ ॥ तया प्राणासि आधारू ॥ भलतसा मिळो आहारू ॥ परी धडगोडांचा विचारू ॥ नकरी साचारू पैं प्राणु ॥ ४१० ॥ तैसाचि यो

---

१ गोडपणानें. २ झरे. ३ अहंकार. ४ आपला आत्मपणा. ५ झाडाजवळ. ६ पानानीं,फुलांनीं. ७ साल. ८ विचारानें. ९ प्रीति. १० भूक. ११ शरीर.

गियाही पाही ॥ तो अभिमान नधरी देहीं ॥ विषयो सेवी परी कांहीं ॥ आसक्ति नाहीं तयासी ॥ ११ ॥ क्षुधेचिया तोंडां ॥ मिळो कोंडा अथवा मांडा ॥ परी रसनेचा पांगडा ॥ नकरी धडफुडा तयासी ॥ १२ ॥ ज्ञान धारणा नढळे ॥ इंद्रियें नव्हतीं विकळें ॥ तैसा आहार युक्तिबळें ॥ सेविजे केवळें निजधैर्यें[1] ॥ १३ ॥ प्राणास्तव इंद्रियें सबळें ॥ प्राणयोगें देह चळे ॥ त्या देहकर्मा प्राण नातळे ॥ अलिप्त मेळे वर्ततू ॥ १४ ॥ त्या प्राणाची ऐशी स्थिती ॥ योगियाची वर्तती वृत्ती ॥ सर्व करूनि नकरी आसक्ती ॥ देहस्थिती नातळे ॥ १५ ॥ ब्रह्मादिकांचा देह पाळूं ॥ कां सूकरादिकांचा[2] देह टाळूं ॥ ऐसा नमनींच विटाळू ॥ प्राणू कृपाळू समभावें ॥ १६ ॥ तैसें योगियाचें कर्म ॥ नधरी उंच नीच मनोधर्म ॥ कदा नदेखे अधमोत्तम ॥ भावना सम समभावें ॥ १७ ॥ आवडीं प्रतिपाळावा रांवो[3] ॥ रंकाचा टाळावा देहो ॥ ऐसा प्राणासि नाहीं भावो[4] ॥ शुद्ध समभावो सर्वत्र ॥ १८ ॥ प्राण अपान समान उदान ॥ सर्वसंधीं असे व्यान ॥ इतुकीं नामें स्थानें पावोनि जाण ॥ नसांडी प्राण एकपणा ॥ १९ ॥ तैसे उंच नीच वर्णावर्ण ॥ अधमोत्तमादि गुणागुण ॥ देखोनियां योगी आपण ॥ भावना परिपूर्ण नसांडी[5] ॥ २० ॥ प्राणू असोनि देहाभीतरी ॥ बाह्यवायूसि भेद नधरी ॥ तैशी योगिया भावना करी ॥ सबाह्याभ्यंतरीं ऐक्यता ॥ २१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विषयेष्वाविशन्योगी नानाधर्मेषु सर्वतः ॥ गुणदोषव्यपेतात्मा न विषज्जेत वायुवत् ॥ ४० ॥ पार्थिवेष्विह देहेषु प्रविष्टस्तद्गुणाश्रयः ॥ गुणैर्न युज्यते योगी गंधैर्वायुरिवाऽऽत्मदृक् ॥ ४१ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐक्यता साधावी चतुरीं ॥ ते वायूच्या ऐशी दोहींपरी ॥ बाह्य आणि अंतरीं ॥ ऐक्यकरीं वर्तावें ॥ २२ ॥ प्राणवृत्तीचीं लक्षणें ॥ तुज सांगीतलीं संपूर्णें ॥ आतां बाह्यवायूचीं चिह्नें ॥ सावधानें परियेसीं ॥ २३ ॥ वायु सर्वांतें स्पर्शोनि[6] जाये ॥ परी अडकला कोठें नराहे ॥ तैसें विषय सेवितां पाहे ॥ आसक्त नव्हे योगिया ॥ २४ ॥ असोनि इंद्रियांचेनि मेळें ॥ तो विषयांमाजी जरी लोळे ॥ तरी गुणदोषआसक्तिमेळें ॥ बोधूं[7] नमळे तयाचा ॥ २५ ॥ वस्त्र चंदन वनिता[8] माळा ॥ सदा भोगितां विषयसोहळा ॥ वायु नातळे जेवीं जळा ॥ तेवीं योगी वेगळा विषयासी ॥ २६ ॥ जैसें वारेनि जाळ उडे ॥ परी जाळीं वारा नातुडे ॥ तेवीं भोग भोगितां गाढे ॥ भोगीं नातुडे योगिया ॥ २७ ॥ ज्या तया वायूचे भेटी ॥ सुगंध कोटी घालिती मिठी ॥ त्याची आसक्ती[9] नाहीं पोटीं ॥ उठाउठी सांडितु ॥ २८ ॥ तैसा आत्मत्वें योगिया पाही ॥ प्रवेशलासे सर्वांदेहीं ॥ देहगुणाश्रयो पाही ॥ ठायींचाठायीं तोचि तो ॥ २९ ॥ निजात्मदृष्टीचेनि बळें ॥ तो देहगुणांसी नातळे ॥ जैसा गंधावरी वारा लोळे ॥ परी नाकळे गंधासी ॥ ३० ॥ तेचि परिपूर्ण आत्मस्थिती ॥ राया मी सांगेन तुजप्रती ॥ जैसी

---

१ आपल्या धैर्यानें. २ डुकर आदींचा. ३ राजा. ४ विश्वास. ५ सोडीतनाहीं. ६ शिवून. ७ ज्ञान. ८ स्त्री. ९ प्रीति.

आकाशाची प्रतीती ॥ सर्व पदार्थीं अलिप्त ॥ ३१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अंतर्हितश्च स्थिरजंगमेषु ब्रह्मात्मभावेन समन्वयेन ॥ व्याप्त्याऽ
व्यवच्छेदमसंगमात्मनो मुनिर्नभस्त्वं विततस्य भावयेत् ॥ ४२ ॥ ॥ टीका ॥ ॥ सर्वपदार्थीं समत्व ॥ यालागीं आकाशासि गुरुत्व ॥
अँसंगत्व अभेदत्व ॥ निर्मळत्व जाणोनी ॥ ३२ ॥ विषमीं असोनि समत्व ॥ सँगीं असोनि असंगत्व ॥ भेदु करितां अभेदत्व ॥ याला
गीं गुरुत्व आकाशासी ॥ ३३ ॥ वैर सर्पा मुंगुसांसी ॥ आकाश दोहींचें ह्रदयवासी ॥ वैर निर्वैरता आकाशासी ॥ ते स्थिती योगि
यासी पाहिजे ॥ ३४ ॥ तेणें आकाशदृष्टांतें ॥ ब्रह्मभावें आपणियातें ॥ योगी देखिजे पुरतें ॥ व्यापकत्वें आपुल्या ॥ ३५ ॥ ब्रह्मसमन्वयें
पाहतां पाही ॥ स्थावरजंगमांच्याठायीं ॥ तिळभरी वाढी रीती नाहीं ॥ आपणपैं पाही कोंदला[3] ॥ ३६ ॥ आकाश सर्वपदार्थीं असे ॥ प
री असे हें सर्वांसि नदिसे ॥ तेवीं दृश्यद्रष्टा अतीतदर्शे ॥ सर्वत्र असे योगिया ॥ ३७ ॥ नभ नखोंचे सांबळें ॥ जळेना वणव्याचेनि
जाळें ॥ नव्हतां ज्वाळांवेगळें ॥ असे सगळें टवटवित ॥ ३८ ॥ तैसीं योगियासि द्वंद्वें सकळें ॥ बाधूं नशकती कवणे काळें ॥ नव्हतां द्वंद्वा
वेगळें ॥ स्वरूप सगळें शोभत ॥ ३९ ॥ योगिया छेदावया लवलाहें ॥ सोडिले शस्त्राचे समुदाये ॥ तो शस्त्रामाजी आपणियातें पाहें ॥
नैंरुपती घायें जेवीं गगना ॥ ४४० ॥ जेंजें द्वंद्व बाधूं आलें ॥ तेंतें स्वरूप देखे आपुलें ॥ सहजें द्वंद्वभावा मुकले ॥ अबाधित उरलें नि
जरूप ॥ ४१ ॥ गगन बुडालें दिसे डोहीं ॥ परी तें उदकें भिजलेंचि नाहीं ॥ तैसा असोनियां सर्वदेहीं ॥ अलिप्त पाही योगिया ॥ ४२ ॥
आकाशा चिखल माखूं जातां ॥ तें नमाखे माखेलावितां ॥ तैसा योगिया दोषी ह्मणतां ॥ दोष सर्वथा ह्मणत्यासी ॥ ४३ ॥ गगन अ
सोनियां जनीं ॥ मैळेना जनघसणीं ॥ तैसा योगिया सकळकर्में करूनी ॥ कर्मठपणीं नमैळे ॥ ४४ ॥ मोटे बांधितां आकाशातें ॥ चारी
पांलव पडती रिते ॥ तेवीं कर्मीं बांधितां योगियातें ॥ कर्म तेथें निष्कर्म ॥ ४५ ॥ घटामाजी आकाश असे ॥ तें वाच्य कीजे घटाका
शें ॥ पाहतां घटास बाह्यसमरसें ॥ आकाश असे परिपूर्ण ॥ ४६ ॥ तैसा आत्मा ह्मणती देहीं ॥ तंव तो देहास बाह्यपाही ॥ देह मिथ्या
त्वें ठायींचे ठायीं ॥ चिंन्मात्र पाही परिपूर्ण ॥ ४७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तेजोऽबन्नमयैर्भावैर्मेघाद्यैर्वायुनेरितैः ॥ नस्पृश्यते न भस्तद्वत्कालसृ
ष्टैर्गुणैः पुमान् ॥ ४३ ॥ ॥ टीका ॥ ॥ नभ पृंथ्वीरजें न गंदळे ॥ उदकें करी न पघळे ॥ अग्नीचेनि ज्वाळें नजळे ॥ वायुबळें उडेना
॥ ४८ ॥ कडकडीत आभाळें ॥ येऊनि आकाश झांकोळे ॥ त्या समस्तां नभ नातळे ॥ अलिप्त बळें संस्थित ॥ ४९ ॥ तैसेंचि योगिया
सी ॥ असतां निजात्मसमरसीं ॥ काळें सजिल्या गुणांसी ॥ वश्य त्यांसी तो नव्हे ॥ ४५० ॥ काळाचें थोर सामर्थ्य जाण ॥ देहासि

---

१ संग नसणें. २ संसर्गी. ३ भरला. ४ रुतत नाहींत. ५ आत्मरूप. ६ पदर. ७ चैतन्यरूप. ८ धुळीनें. ९ गदळ होत नाहीं.

आणी जरामरण ॥ योगी देहातीत[1] आपण ॥ जन्ममरण नदेखे ॥ ५१ ॥ स्वप्नीं चिंतामणी जोडला ॥ सवेंचि अंधकूपीं पडला ॥ जागा जाहल्या नह्मणे नाडला ॥ तैसा घडला देहसंग ॥ ५२ ॥ जो ब्रह्मादिदेवांसि खाये ॥ तो काळ वंदी योगियाचे पाये ॥ जो काळाचाही आत्मा होये ॥ निधडा पाहे महाकाळू ॥ ५३ ॥ विजू कडकडूनि आकाशीं ॥ तेजें प्रकाशी गगनासी[2] ॥ गगन नातळे ते विजूसी ॥ असोनि तिशीं सबाह्य ॥ ५४ ॥ तैसा सत्त्वगुण प्रकाशी ज्ञान ॥ त्यासि योगिया नातळे जाण ॥ ज्ञानस्वरूप निखळ आपण ॥ वृत्तिज्ञान मग नेघे ॥ ५५ ॥ जाहलिया सूर्यउदयासी ॥ दीपप्रभा नये उपेगासी ॥ तेवीं सहज आलिया हातासी ॥ वृत्तिज्ञानासी कोण पुसे ॥ ५६ ॥ सत्त्वें प्रकाशिलें ज्ञान ॥ तें आवडोनि नेघे जाण ॥ अथवा खवळल्या रजोगुण ॥ कर्मठपण त्या नये ॥ ५७ ॥ होकां तमोगुणाचेनि मेळें ॥ क्रोधमोहांसि नातळे ॥ गुणातीत झाला बळें ॥ बोधकल्लोळें स्वानंदें ॥ ५८ ॥ उदकासि गुरुपण[3] ॥ आलें तें ऐक लक्षण ॥ अवधूत ह्मणे सावधान ॥ नृपनंदन यदुवीरा ॥ ५९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्वच्छः प्रकृतितः स्निग्धो माधुर्यस्तीर्थभूर्नृणाम् ॥ मुनिः पुनात्यपां मित्रमीक्षोपस्पर्शकीर्तनैः ॥ ४४ ॥ ॥ टीका ॥ ॥ लक्षणें पाहतां जळ ॥ स्वभावें अतिनिर्मळ ॥ प्रकृतीस्तव कोमळ ॥ मधुर केवळ सर्वांसी ॥४६०॥ पवित्र व्हावया प्राणियांसी ॥ तीर्थीं तीर्थत्व उदकासी ॥ इतुकीं लक्षणें योगियासी ॥ अहर्निशीं असावीं ॥६१॥ उदकीं रिघाले जे सभैळ ॥ ते स्वभावें करी निर्मळ ॥ परी नधरी अहंबळ ॥ जे म्यां हे मळ क्षाळिले[4] ॥ ६२ ॥ तैसें योगियासि भजनशीळ ॥ भावें भाविक जे केवळ ॥ त्याचे निरसूनि कळिमळ ॥ नधरी बळ गुरुत्वें ॥ ६३ ॥ प्राण गेलियातरी प्राणियासी ॥ कठिणत्व उपजे ना मानसीं ॥ जेंजें भेटे तयासी ॥ मृदुता[5] कैसी वर्तत ॥ ६४ ॥ जेवीं चंद्रकिरण चकोरांसी ॥ पाखोवा जेवीं पिलियांसी ॥ जीवन[6] जैसें कां जीवांसी ॥ तेवीं सर्वांसी मृदुत्व ॥ ६५ ॥ जळ वरिवरी क्षाळी मळ ॥ योगिया सबाह्य करी निर्मळ ॥ उदक सुखी करी एकवेळ ॥ योगी सर्वकाळ सुखदाता ॥ ६६ ॥ उदकाचें सुख तें किती ॥ सवेंचि[7] क्षणां तृषित होती ॥ योगिया दे स्वानंदतृप्ती ॥ सुखासि विकृती[8] पैं नाहीं ॥ ६७ ॥ उदकाची जे मधुरता ॥ ते रसनेशींचि तत्त्वतां ॥ योगियांचें गोडपण पाहतां ॥ होय निवविता सर्वेंद्रियां ॥ ६८ ॥ लागलिया योगियांची गोडी ॥ अमृताची चवी थोडी ॥ ब्रह्मेंद्रादिपदें बापुडीं ॥ अर्धघडीमाजी करीत ॥ ६९ ॥ तापले आले उदकापाशीं ॥ अंगस्पर्शें निववी[9] त्यांसी ॥ तैसीचि दशा योगियासी ॥ स्पर्शें तापासी निवारी ॥ ४७० ॥ उदकें निवविलें ज्यासी ॥ परतोनि ताप होय त्यासी ॥ योगी कृपेनें स्पर्शे ज्यासी ॥ त्रिविधतापासी निर्मुक्त[10] ॥ ७१ ॥ योगी ज्यासि निववी जीवें भावें ॥ त्यासि जीव गेलियाही

---

१ ह्या शरीराहून वेगळा. २ आकाशास. ३ मोठेपण. ४ धुतले. ५ मउपणा. ६ पाणि. ७ लागलोच. ८ विकार. ९ शांतवो. १० सुटलेला.

तापू नव्हे ॥ निवालेपणें तो वोल्हावे ॥ स्वानुभवें[1] डुल्लत ॥ ७२ ॥ मेघमुखें अधःपतन ॥ उदकाचें देखोनि जाण ॥ अधःपातें निवती जन ॥ अन्नदान सकळांसी ॥ ७३ ॥ तैसें योगियासी खालुतें येणें ॥ जें इहलोकीं जन्म पावणें ॥ जन निववी श्रवणकीर्तनें ॥ निंज ज्ञानें[2] उद्धरी ॥ ७४ ॥ पर्जन्योदक देखतां जाग ॥ जेवीं निवती सकळही जन ॥ कां गंगादिकांचें दर्शन ॥ करी मोचन[3] पापाचें ॥७५॥ तैसें योगियाचें दर्शन ॥ भाग्येंवीण नव्हे जाण ॥ ज्याणें देखिले त्याचे चरण ॥ करी मोचन भवरोगां ॥ ७६ ॥ नघडे दर्शनस्पर्शन ॥ तरी करावें त्याचें नामस्मरण ॥ इतुकेनि भवमूळ जाण ॥ करी छेदन तें नाम ॥ ७७॥ सांडूनि भगवंताचें कीर्तन ॥ कल्या भक्ताचें नामस्मरण ॥ केवीं तुटे भवबंधन[4] ॥ ऐसें नह्मणे सर्वथा ॥ ७८ ॥ देवासि पूर्वीं नामचि नाहीं ॥ त्यासि भक्तीं प्रतिष्ठूनि पाही॥ नामरूपादि सर्वही ॥ नानाविलासही अर्पिले ॥ ७९ ॥ ऐसा देव भक्तीं थोर केला ॥ आणूनि वैकुंठीं बैसविला ॥ भक्तउपकारें दाटला ॥ मग त्याच्या बोलामाजी वर्ते ॥ ४८० ॥ देव भक्तवचनें करी ॥ झाला नर ना केसरी[5] ॥ प्रगटला खांबामाझारी ॥ शब्द करी भक्ताचा ॥ ८१ ॥ आतांही प्रत्यक्ष प्रमाण ॥ दासाचेनि वचनें जाण ॥ पाषाणप्रतिमें देवो आपण ॥ आनंदघन प्रगटे पैं ॥ ८२ ॥ भक्तभावें आभारला ॥ देवो उपकारें दाटला ॥ यालागीं उल्लंघवेना बोला ॥ पांगें पांगला भक्तांच्या ॥ ८३ ॥ एवं भक्तांचें जेथें नाम घेणें ॥ तेथें अवश्य देवें धांवणें ॥ भक्तउपकारा उत्तीर्ण होणें ॥ वेगें पावणें त्यालागीं ॥ ८४ ॥ यालागीं भक्ताचें नाम घेतां ॥ तुटती भवबंधन व्यथा ॥ ऐसें सांगतां अवधूता ॥ प्रेम सर्वथा नसंडे[6] ॥ ८५ ॥ आतां अग्नी जो गुरु करणें ॥ त्याचीं सांगेन लक्षणें ॥ कानां मनां एक करणें ॥ सावधपणें परियेसी ॥ ८६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तेजस्वी तपसा दीप्तो दुर्धर्षोदरभाजनः ॥ सर्वभक्षोऽपि युक्तात्मा नादत्ते मलमग्निवत् ॥ ४५ ॥ ॥ टीका ॥ ॥ अग्नी निंजतेजें[7] देदीप्यमान ॥ साक्षात हातीं नधरवे जाण ॥ उदरमात्रीं सांठवण ॥ सर्वभक्षण निजतेजें ॥ ८७ ॥ तैसाचि योगियांही जाण ॥ भगवद्भावें देदीप्यमान ॥ त्यासि धरावया आंगवण ॥ नव्हे जाण सुरनरां[8] ॥ ८८ ॥ हातीं नधरवे खदिरांगारू[9] ॥ तैसा योगिया अतिदुर्धरू ॥ तयासि नशके आवरूं ॥ मायाव्यवहारू गुणेंसी ॥ ८९ ॥ आग्नीसि जेवीं मुखचि पात्र ॥ तैसें योगियासि उदरमात्र[10] ॥ ठेवा ठेवणें विचित्र ॥ नाहीं पात्र गांठीसी ॥ ४९० ॥ अग्नीनें जेंजें सेवणें ॥ तेंतें जाळूनि आपुल्याऐसें करणें ॥ यापरी सर्वभक्षणें ॥ नाहीं स्पर्शणें मळासी ॥ ९१ ॥ चंदन सुवासें दुर्गंधधुरे ॥ निंब कडू ऊंस गोडि रे॥ ते जाळूनि आकारविकारें ॥ कीजे वेश्वानरें आपणांऐसें ॥ ९२ ॥ तैसा योगी जें अंगीकारी ॥ तें आत्मदृष्टीं निर्धारी॥ दोष दवडूनियां दुरीं ॥ मग स्वी

---

१ आपल्या अनुभवाच्या सुखानें. २ आपल्या ज्ञानानें. ३ नाश. ४ संसारबंधन. ५ सिंह. ६ नाहीसें होतनाहीं. ७ आपल्या तेजानें. ८ देवमनुष्यांस. ९ खैराचा विस्तव. १० पोट.

कारी निजबोधें ॥ ९३ ॥ भोग्य जें भोगूं जाये ॥ तेथें आत्मप्रतीति पाहे ॥ भोक्ता तद्रूपचि होये ॥ हा भोगू पाहे योगियां ॥ ९४ ॥ अग्नींत
पडलें जें समळ ॥ तें अग्निमुखें होय निर्मळ ॥ योगिया जें सेवी अळुमाळ ॥ परममंगळ तें होय ॥ ९५ ॥ अग्निमुखीं यागू[1] घडे ॥
तेणें अदृष्टें स्वर्गभोगू जोडे ॥ योगियाचे मुखीं जें पडे ॥ तेणें जोडे निजपद ॥ ९६ ॥ आणिक अग्नीचें चिन्ह ॥ ऐक राया सावधान ॥
तेंचि साधकांसि साधन ॥ सिद्ध लक्षण सिद्धाचें ॥ ९७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ क्वचिच्छन्नः क्वचित्स्पष्ट उपास्यः श्रेय इच्छताम् ॥ भुंक्ते सर्वत्र
दातॄणां दहन् प्रागुत्तराशुभम् ॥ ४६ ॥ ॥ टीका ॥ ॥ भीतरी[2] तेजस्वी वरी झांकिला ॥ होमकुंडीं अग्नी पुरिला ॥ कां यज्ञशाळे प्रज्वळला
॥ याज्ञिकीं केला महायागू ॥ ९८ ॥ जोंजों उपासका भावो जिवीं ॥ त्यात्या श्रेयातें उपजवी ॥ पूर्वोत्तर अशुचित्वें[3] आघवीं ॥ जाळूनि
हवी सेवित ॥ ९९ ॥ तैशीचि योगियांची लीला ॥ भाविकां प्रगट दिसे डोळां ॥ एकां गुप्तचि होऊनि ठेला ॥ नदिसे पाहिला सर्वथा
॥ ५०० ॥ ऐशियांच्याही ठायीं ॥ भावबळें भाविक पाही ॥ अर्पिती जेंजें कांहीं ॥ तेणें मोक्ष पाही मुमुक्षां ॥ १ ॥ तें पडतांचि योगियांच्या
मुखीं ॥ संचितक्रियमाणें असकीं[4] ॥ जाळोनियां एकाएकीं ॥ करी सुखी निजपदीं ॥ २ ॥ आणीकही अग्नीचें लक्षण ॥ राया
तुज सांगेन जाण ॥ जेणें सगुण आणि निर्गुण ॥ दिसे समान[5] समसाम्यें ॥ ३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्वमायया सृष्टमिदं सदसल्लक्षणं विभुः
॥ प्रविष्ट ईयते तत्तत्सरूपोऽग्निरिवैधसि ॥ ४७ ॥ ॥ टीका ॥ ॥ अग्नि सहजें निराकार ॥ त्यासि काष्ठानुरूपें आकार ॥ दीर्घ वक्र वर्तुल[6]
थोर ॥ नानाकार भासत ॥ ४ ॥ तैसीचि भागवतांची भक्ती ॥ स्वमायाकल्पित कल्पनाकृती ॥ तेथें प्रवेशला सहजस्थितीं ॥ बहुधा व्यक्ती
तो भासे ॥ ५ ॥ जैसें गंगेचें एक जळ ॥ भासे भंवरे लहरी कल्लोळ ॥ तैसा जगदाकारें[7] अखिल ॥ भासे सकळ जगदात्मा ॥ ६ ॥
कां छायामंडपींच्या चित्रासी ॥ दीपप्रभा भासे जैसी ॥ राम रावण यानावेंसी ॥ दावी जगासी नटनाट्य ॥ ७ ॥ तैशा नानाविधा व्यक्ती
॥ नानामतें नानाकृती ॥ तेथें प्रवेशोनि श्रीपती ॥ सहजस्थितीं नाचवी ॥ ८ ॥ तैशी योगियांची स्थिती ॥ पाहतां नानाकारें व्यक्ती ॥
आपणियातें देखे समवृत्ती ॥ भेदभ्रांती त्यां नाहीं ॥ ९ ॥ तेथें जेंजें कांहीं पाहे ॥ तेंतें आपणचि आहे ॥ या उपपत्ती[8] उभवूनि वाहे ॥
सांगताहे अवधूतू ॥ ५१० ॥ देहासि जन्म नाशू ॥ आत्मा नित्य अविनाशू ॥ हा दृढ केला विश्वासू ॥ गुरु हिमांशू[9] करूनि ॥ ११ ॥
श्लोक ॥ ॥ विसर्गाद्याः श्मशानांता भावा देहस्य नात्मनः ॥ कलानामिव चंद्रस्य कालेनाव्यक्तवर्त्मना ॥ ४८ ॥ टीका ॥ ॥ शुक्लकृष्णपक्षपाडी
॥ चंद्रकळांची वाढी मोडी ॥ ते निजचंद्रीं नाहीं वोढी ॥ तैशी रोकडी योगियां ॥ १२ ॥ जन्मनाशादि षड्विकार ॥ हे देहा

---

१ यज्ञ. २ आंत. ३ अपवित्रपणा. ४ सगळी. ५ सारखे. ६ वाटोळा. ७ जगद्रूपानें. ८ युक्ति. ९ चंद्र.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

सीच साचार ॥ आत्मा [1]अविनाशी निर्विकार अनंत अपार स्वरूपत्वें ॥ १३ ॥ घट स्वभावें नाशवंतू असे ॥ त्यामाजी चंद्रमा बिंबलासे ॥ नश्वरीं अनश्वर दिसे ॥ विकारदोषें लिंपेना ॥ १४ ॥ घटासवें चंद्रासि उत्पत्ती ॥ नाहीं नाशासवें नाशप्राप्ती ॥ चंद्रमा आपुलें सहजस्थितीं ॥ नाशउत्पत्तीरहित ॥ १५ ॥ तैसा योगिया निंजरूपपणें ॥ देहासवें नाहीं होणें ॥ देह निमाल्या नाहीं [3]निभणें ॥ अखंडपणें परिपूर्ण ॥ १६ ॥ काळाची अलक्ष्य गती ॥ दाखवी नाश आणि उत्पत्ती ॥ ते काळसत्ता देहाप्रती ॥ आत्मस्थिति नातळे ॥ १७ ॥ एवं काळाचें बळ गाढें ॥ ह्मणती तें देहाचिपुढें ॥ पाहतां आत्मस्थितीकडे ॥ काळ बापुडें तेथें नाहीं ॥ १८ ॥ सूक्ष्म काळगती सांगतां ॥ वेगें आठवलें अवधूता ॥ सिंव्हावलोकनें मागुता ॥ अग्निदृष्टांता सांगतू ॥ १९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कालेन ह्योघवेगेन भूतानां प्रभवाप्ययौ ॥ नित्यावपि नदृश्येते आत्मनोऽग्नेर्यथाऽर्चिषाम् ॥ ४९ ॥ ॥ टीका ॥ ॥ काळनदीचा महावेगू ॥ सूक्ष्मगती वाहतां वोघू ॥ तेथ भूततरंगा जन्मभंगू ॥ देखतांचि जगू न[4]देखे ॥ ५२० ॥ जैंराजर्जरित जाण ॥ वाहतां नदीमाजी वोसण ॥ षड्विकार तेचि परिपूर्ण ॥ शंवरे दारुण [5]शवताती ॥ २१ ॥ बाल्यतारुण्यांचे खळाळ ॥ वार्धक्याचें मंद जळ ॥ जन्ममरणांचें उसाळ ॥ अतिकल्लोळ उठनी ॥ २२ ॥ वोघवेगाच्यां कडाडी ॥ पडत आयुष्याची दरडी ॥ स्वर्गादि देउळें मोडी ॥ शिखरींचें पाडी सुरेंद्र ॥ २३ ॥ तळीं रिचवितां धोघें ॥ पाताळादिविवरे वेगें ॥ नाशूनियां पन्नगें ॥ अंगभंगें आडिमोडी करी ॥ २४ ॥ ऐशियाजी काळवोघासी ॥ घडी मोडी भूततरंगांसी ॥ होतसे अहर्निशीं ॥ ते कोणासी लक्षेना ॥ २५ ॥ जैं महाप्रळयीं मेघ गडाडी ॥ तैं पूर चढे कडाडी ॥ ब्रह्मादिक [6]तरुवर [7]उपडी ॥ समूळ सशेंडी वाहविले ॥ २६ ॥ जैं आत्यंतिक पूर चढे ॥ तैं वैकुंठ कैलासही बुडे ॥ तेथें काळा [8]रिगू नघडे ॥ हें अवचट घडे एकदा ॥ २७ ॥ अनिवार काळनदीची गती ॥ सूक्ष्म लक्षेना निश्चितीं ॥ ते सूक्ष्मचि गति स्थिती ॥ अतिनिगुतीं परियेसी ॥ २८ ॥ दीपू तोचि तोहा ह्मणती ॥ परी शिखा क्षणक्षणा जाती ॥ तें लक्षेना सूक्ष्मगती ॥ अंतीं ह्मणती विझाला ॥ २९ ॥ प्रत्यक्ष प्रवाहे गंगाजळ ॥ तें काळीचें ह्मणती वरळ ॥ तैशी काळगती अकळ ॥ लोक सकळ नेणती ॥ ५३० ॥ प्रत्यक्ष पाहे पां देहासी ॥ काळ वयसे तें ग्रासी ॥ बाल्यकौमारतारुण्यांसी ॥ निकट काळासी नदेखती ॥ ३१ ॥ अलक्ष्य काळाची काळगती ॥ यालागीं गुरु केला [9]गभस्ती ॥ त्यापासोनि शिकलों स्थिती ॥ तेही नृपती परियेसी ॥ ३२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ गुणैर्गुणानुपादत्ते यथाकालं विमुंचति ॥ नतेषु युज्यते योगी गोभिर्गाइव गोपतिः ॥ ५० ॥ ॥ टीका ॥ ॥ सूर्य काळें निजकिरणीं ॥ रसेंसहित शोषी पाणी ॥ तोचि वर्षाकाळीं वर्षोनी ॥ निववी

---

१ नाश रहित. २ आपल्या रूपानें. ३ नाश. ४ पाहत नाही. ५ रोगांनीं व्याकुळ. ६ झाडे. ७ उपटतो. ८ शिरकाव. ९ सूर्य.

जनीं सहस्रधा ॥ ३३ ॥ सूर्य शोषूनि घे किरणीं ॥ तें शोखिलें लक्षण नेणें कोणी ॥ देतां मेघमुखें वर्षोनी ॥ विनवी अवनी जनेंसी ॥
॥ ३४ ॥ तैसीचि योगियाची परी ॥ अल्प ज्यातें अंगीकारी ॥ त्याचे मनोरथ पूर्णकरी ॥ सहस्रप्रकारीं हितत्वें ॥ ३५ ॥ ज्यासि सेविती
योगी आत्माराम ॥ त्याचे पुरती सकळ काम ॥ अंतीं करोनियां निष्काम ॥ विश्रामधाम आणिती ॥ ३६ ॥ एवं योगिया आपुले योगबळें ॥
विषयो सेविती इंद्रियमेळें ॥ जे देती त्यासी यथाकाळें ॥ रूपावळें निवविती ॥ ३७ ॥ त्यासि विषयो देतां कां घेतां ॥ आसक्ति
नाहीं सर्वथा ॥ रस शोखूनि घेतां देतां ॥ अलिप्त सविता तैसे ते ॥ ३८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ बुध्यते स्वेन भेदेन व्यक्तिस्थ इव तद्गतः ॥ लक्ष्यते
स्थूलमतिभिरात्मा चावस्थितोर्कवत् ॥ ५१ ॥ ॥ टीका ॥ ॥ सूर्यो थिल्लरामाजी बिंबला ॥ मूढ ह्मणती थिल्लरीं बुडला ॥ त्याचेनि
कंपें कंपु मानिला ॥ डहुळें डहुळला ह्मणती तो ॥ ३९ ॥ त्या थिल्लरातें नातळतां ॥ गंगनीं अलिप्त जेवीं सविता ॥ तैसीच योगियाची
योग्यता ॥ देहातीता देहकर्म ॥ ४० ॥ त्यासि देहबुद्धीचेनि छंदें ॥ ह्मणती योगिया देहीं नांदे ॥ त्या देहाचेनि नानाबोधें ॥ स्वबुद्धिभेदें
बांधला ह्मणती ॥ ४१ ॥ त्यासि देहाचें बाधित भान ॥ हें नकळे त्याचें गुह्यज्ञान ॥ दोराचेनि सापें जाण ॥ डसोनि कोण मारिला ॥ ४२ ॥
एवं आत्मा तो चिदाकाशीं ॥ मिथ्या देहीं मिथ्यात्वेंसी ॥ बिंबोनि दावी देहकर्मासी ॥ नव्हे तें त्यासी बाधक ॥ ४३ ॥ देखे आपणातें जळीं
बिंबळा ॥ परि नह्मणे मीं जळीं बुडाला ॥ तैसा देहातीत बोध झाला ॥ नाहीं भ्याला देहकर्मा ॥ ४४ ॥ देखोनि मृगजळाचा पूरू ॥
मूर्ख करूं धांवती तारूं ॥ तैसा मिथ्या हा संसारू ॥ भयंकरू मूर्खासी ॥ ४५ ॥ यालागीं दारागृहपुत्रप्राप्ती ॥ तेथें नकरावी अतिप्रीती ॥
येचिविषयीं रायाप्रती ॥ कथा कापोती सांगत ॥ ४६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नातिस्नेहः प्रसंगो वा कर्तव्यः क्वापि केनचित् ॥ कुर्वन्विंदेत संतापं
कपोतइव दीनधीः ॥ ५२ ॥ ॥ टीका ॥ ॥ संसार दुःखाचें मूळ ॥ स्त्री आसक्तीच जाण केवळ ॥ स्त्रीलोभाचें जेथ प्रबळ बळ ॥ दुःख
सकळ त्यापासी ॥ ४७ ॥ स्त्रीपासाव झाले पुत्र ॥ त्यांचाठायीं स्नेह विचित्र ॥ करितां दुःखासि पात्र ॥ संसारी नर होताती ॥ ४८ ॥
आसक्ति आणि स्नेहसूत्र ॥ या दोन्हीपासाव दुःख विचित्र ॥ पदोपदीं भोगिती नर ॥ अस्वतंत्र होऊनी ॥ ४९ ॥ यालागीं भलतेनभलते
ठायीं ॥ आसक्ति स्नेहो नकरावा पाही ॥ अतिस्नेहो मांडिजे जिहीं ॥ दुःख तिहीं भोगिजे ॥ ५५० ॥ स्नेहदुःखाची वार्ता ॥ कपोताकपोतीची
कथा ॥ तुज सांगेन गा नृपनाथा ॥ स्वस्थचित्ता परियेसी ॥ ५१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कपोतः कश्चनारण्ये कृतनीडो वनस्पतौ ॥
कपोत्या भार्यया सार्धमुवास कतिचित्समाः ॥ ५३ ॥ ॥ टीका ॥ ॥ कपोतीचे स्नेह गोड ॥ धरोनि स्त्रीमुखाची चाड ॥ वनीं वृक्ष पा

---

१ पर्जन्याच्या मुखानें. २ शांत करितात. ३ प्रेम. ४ सूर्य. ५ आकाशांत. ६ देहावेगळा. ७ स्त्रीपासून. ८ परतंत्र. ९ प्रीति.

होनियां गूढ ॥ करी नीड[1] कपोता ॥ ५२ ॥ तेणें वनचरें वनस्थळीं ॥ नीडामाजी स्त्रीमेळीं ॥ वास केला बहुकाळीं ॥ भार्येंजवळी भूल
ला ॥ ५३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कपोतौ स्नेहगुणितहृदयौ गृहधर्मिणौ ॥ दृष्टिं दृष्ट्यांऽगमंगेन बुद्धिं बुद्ध्या बबंधतुः ॥ ५४ ॥ ॥ टीका ॥
कपोता आणि कपोती ॥ परस्परें दोघां अतिप्रीती ॥ स्नेह वाढलासे चित्तीं ॥ हृदयीं आसक्ती नीच[2] नवी ॥५४॥ हाव भाव विलास
स्थिती ॥ येरयेरांकडे पाहती ॥ परस्परें कुरवाळिती ॥ वोढंगिती येरयेरां ॥ ५५ ॥ येरयेरां वेगळें होणें ॥ नाहीं जीवें अथवा मनें ॥ दो
घें वर्तती एके प्राणें ॥ खाणें जेवणें एकत्र ॥ ५६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शय्यासनाटनस्थानवार्ताक्रीडाशनादिकं ॥ मिथुनीभूय विस्रब्धौ चे
रतुर्वनराजिषु ॥ ५५ ॥ ॥ टीका ॥ ॥ सेवितां ज्याची अतिगोडी ॥ तें घालिती येरयेरांच्या तोंडीं ॥ जीवें प्राणें शिणोनि[3] जोडी ॥ तें दे
आवडी स्त्रियेसि ॥ ५७ ॥ ॥ स्त्रियेसि सांडूनि दुरी ॥ पाउल नघाली बाहेरी ॥ हात धरोनि परस्परीं ॥ आंत बाहेरीं हिंडती ॥ ५८ ॥ स
दा एकांतीं बसती ॥ एके स्थानीं दोघे असती ॥ दोघे क्रीडाविहार करिती ॥ खेळ खेळती विनोदें ॥ ५९ ॥ एकांतीं गोड बोली ॥ सा
सुसासऱ्यांचा विकल्पु घाली ॥ दिराभाव्यांच्या मोडी चाली ॥ बोलाच्या भुलीं भुलवित ॥६०॥ एके आसनीं बैसती ॥ येरयेरांतें टेंक
ती ॥ एके शय्ये निद्रा करिती ॥ अहोरातीं एकत्र ॥ ६१ ॥ मैथुनसुखाचेनि वैभवें ॥ विश्वासोनि जीवें भावें ॥ हिताहित कांहीं नाठवे ॥
गृहिणीगौरवें[4] नाचतू ॥ ६२ ॥ खेंडकुलिया आराम[5] ॥ त्यामाजी दोघां संगम ॥ नाममात्र गृहाश्रम ॥ विषयसंभ्रम वनराजी ॥ ६३ ॥
॥ श्लोक ॥ ॥ यं यं वांच्छति सा राजंस्तर्पयंत्यनुकंपिताः ॥ तंतं समानयत्कामं कृच्छ्रेणाप्यजितेंद्रियः ॥ ५६ ॥ ॥ टीका ॥ ॥ जीविता
परीस समर्थ ॥ जेजे मागे तेते अर्थ ॥ जीवें प्राणेंसि शिणोनि देत ॥ काममोहित होऊनि ॥ ६४ ॥ जाणोनि जीवींचे खुणे ॥ नमागतां
अर्थ देणें ॥ त्याहीवरी जरी त्यामागणें ॥ तरी विकूनि देणें आपणियातें ॥ ६५ ॥ धर्माची वेळ नाठवणें ॥ दीनावरी दया नेणे ॥ कृपा
स्त्रियेवरी करणें ॥ जीवें प्राणें सर्वस्वें ॥ ६६ ॥ बैसली साकरेवर माशी ॥ मारितांही नुठे जैशी ॥ तैसा भोगितां विषयांसी ॥ जरामर
णांसी नाठवी[6] ॥ ६७ ॥ जैशी पूर्वजांची भाक ॥ पाळिती सत्यवादी लोक ॥ तैसा स्त्रियेचेंचि सुख ॥ पाळी देख सर्वस्वें ॥ ६८ ॥ जैसी
आत्मउपासकासी ॥ एकात्मता[7] होय त्यासी ॥ तैसें स्त्रीवांचोनि दृष्टीसी ॥ जगीं आणिकासी नदेखे ॥ ६९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कपोती प्र
थमं गर्भं गृण्हती काल आगते ॥ अंडानि सुषुवे नीडे स्वपत्युः सन्निधौ सती ॥ ५७ ॥ ॥ टीका ॥ ॥ आधीचि प्रिया पढियंती ॥ तेही
झाली गर्भवती ॥ जैशी लोभाचिये हातीं ॥ सांपडे अवचितीं[8] धन लोहें ॥ ५७० ॥ तैसें तिच्या गर्भाचें कोड ॥ अधिकाधिक वाढवी गो

---

१ कोटें. २ नित्य. ३ श्रमून. ४ बायकोच्या मोठेपणानें. ५ बाग. ६ आठवीत नाही. ७ एकपणा. ८ एकदम.

ड ॥ जैसें मदिरा पीऊनि माकड ॥ नाचे तडतड डुल्लत ॥ ७१ ॥ तैसे गर्भांचे सोहळे ॥ सर्वस्वें पुरवी डोहळे ॥ तिचे लीळेमाजीं खेळे ॥ प्राप्तकाळें प्रसूती ॥ ७२ ॥ स्वनीडाआतौती ॥ जाहली अंडातें प्रसवती ॥ प्रसूतिवाधावा सांगती ॥ ऐकोनि पती उल्हासे ॥ ७३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तेषु काले व्यजायंत रचितावयवा हरेः ॥ शक्तिभिर्दुर्विभाव्याभिः कोमलांगतनूरुहाः ॥ ५८ ॥ ॥ टीका ॥ ॥ अघट घटी हरीची माया ॥ अलक्ष लक्षेना ब्रह्मया ॥ आंवेव अंडामाजी तया ॥ देवमाया रचियेले ॥ ७४ ॥ रसें भरलीं होतीं अंडें ॥ त्यांमाजी नख पक्ष चांचुवडें ॥ उघडिलीं डोळयांचीं कवाडे ॥ करी कोंडें हरिमाया ॥ ७५ ॥ अंडें उलोनि आपण ॥ कोंवळीं पिलीं निघालीं जाण ॥ पितरें दृष्टीं देखोन ॥ जीवें प्राणें भुललीं ॥ ७६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रजाः पुपुषतुः प्रीतौ दंपती पुत्रवत्सलौ ॥ शृण्वंतौ कूजितं तासां निर्वृतौ कलभाषितैः ॥ ५९ ॥ ॥ टीका ॥ ॥ अत्यंत कोंवळीं बाळें ॥ दोघेंजणें पुत्रवत्सलें ॥ शांतविती मंजुळें ॥ अतिस्नेहाळें प्रजांसी ॥ ॥ ७७ ॥ जेसमयीं जैसें लक्षण ॥ तैसें प्रजांचें पोषण[2] ॥ अंगें करिताती आपण ॥ दोघेंजण मिळोनि ॥ ७८ ॥ गोड गोजिरे बोल ॥ ऐकोनि दोघां येती डोल ॥ धांवोनियां वेळोवेळ ॥ निंबलोण उतरिती ॥ ७९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तासां पतत्रैः सुस्पर्शैः कूजितैर्मुग्धचेष्टितैः ॥ प्रत्युद्गमैरदीनानां पितरौ मुदमापतुः ॥ ६० ॥ ॥ टीका ॥ ॥ त्याचेनि आलिंगनचुंबनें ॥ मृदुमंजुळकोमळभाषणें ॥ दों पक्षांचेनि स्पर्शनें ॥ दोघेजणें निंवताती[3] ॥ ५८० ॥ माता पिता दोघें बैसती ॥ सन्मुख अपत्यें धांवती ॥ लोल वक्र वेलंगती ॥ वेगें दाविती येरयेरां ॥ ८१ ॥ मग देवोनियां खेवे ॥ दूरी जाती मुग्धभावें ॥ तेथूनि घेऊनियां धांवें ॥ वेगें पावे तयापासी ॥ ८२ ॥ मायबापांच्या पाखोव्यापासी ॥ हीन दीनता नाहीं बाळांसी ॥ जे जन्मोनि त्याचे कुशी ॥ त्या दोघांसी संभाग्यता[4] ॥ ८३ ॥ लाडकीं लडिवाळ बाळें ॥ दोघें धांवती एके वेळें ॥ उचलोनियां स्नेहबळें ॥ मुख कोंवळें चुंबिती ॥ ८४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्नेहानुबद्धहृदयावन्योऽन्यं विष्णुमायया ॥ विमोहितौ दीनधियौ शिशून्पुपुषतुः प्रजाः ॥ ६१ ॥ ॥ टीका ॥ ॥ अजाची जे अजा माया ॥ त्या कैसी भुलविली गा राया ॥ अन्योन्यस्नेह बांधोनि ह्रदया ॥ पिलीं पोषावया उदित ॥ ८५ ॥ स्त्रीपुत्रांचा मोह गहन ॥ त्यांचें करावया पोषण ॥ चिंतातुर अतिदीन ॥ करी भ्रमण अन्नार्थ ॥ ८६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एकदा जग्मतुस्तासामन्नार्थौ तौ कुटुंबिनौ ॥ परितः कानने तस्मिन्नर्थिनौ चेरतुश्चिरम् ॥ ६२ ॥ ॥ टीका ॥ ॥ एवं टणकीं जाहलीं बाळें ॥ कुटुंब थोर थोरावलें ॥ अन्न बहुसाल पाहिजे झालें ॥ दोघें विव्हळें गृहधर्में ॥ ८७ ॥ यापरी कुटुंबवत्सलें ॥ पुत्रस्नेहें स्नेहाळें ॥ दोघेंजणें एके वेळे ॥ अन्न बहुकाळें अर्थिती ॥ ८८ ॥ सहसा[6] मिळेना अन्न ॥ यालागीं हिंडती वनोपवन ॥ बहुसाल श्र

---

१ हाव पाय आदि. २ अन्नादिक देणें. ३ शांत होतात. ४ दैववानपणा. ५ नेहमीं. ६ कधींही.

मतांही जाण ॥ पूर्ण पोषण मिळेना ॥ ८९ ॥ बहुसाल मेळवूनि चारा ॥ दोघेंजणें जाऊं घरा ॥ मग आपुल्या लेंकरां ॥ नाना उप
चारां प्रतिपाळूं ॥ ५९० ॥ ऐसऐशिया वासना ॥ मेळवावया अन्ना ॥ दोघेंजणें नानास्थाना ॥ वना उपवना हिंडती ॥ ९१ ॥ ॥
श्लोक ॥ ॥ दृष्ट्वा तान् लुब्धकः कश्चिद्यदृच्छातो वनेचरः ॥ जगृहे जालमातत्य चरतः स्वालयांतिके ॥ ६३ ॥ ॥ टीका ॥ ॥ माता पिता
गेलीं दुरी ॥ उडतीं पिलें नीडाभीतरीं[1] ॥ क्षुधेनें पीडिलीं भारी ॥ निघालीं बाहेरी अदृष्टें ॥ ९२ ॥ ते वनीं कोणी एक लुब्धक ॥ पक्षिबं
धनीं अतिसाधक ॥ तेणें ते कपोतबाळक ॥ अदृष्टें देख देखिले ॥ ९३ ॥ तेणें पसरोनियां काळजाळें ॥ पाशीं[2] बांधिलीं तीं बाळें ॥
कपोतकपोतीचे वेळे ॥ राखत केवळें राहिला ॥ ॥ ९४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कपोतश्च कपोती च प्रजापोषे सदोत्सुकौ ॥ गतौ पोषणमादाय
स्वनीडमुपजग्मतुः ॥ ६४ ॥ ॥ टीका ॥ ॥ बाळकांच्या अतिप्रीती ॥ कपोता आणि कपोती ॥ चारा घेऊनि येती ॥ निजप्रीतीं[3] लवलाहें
॥ ९५ ॥ स्त्रीसुखाची आसक्ती ॥ तेचि वाढत्या दुःखाची सूती ॥ स्त्रीसंगें दुःखप्राप्ती ॥ सांगों किती अनिवार ॥ ९६ ॥ पुरुषासि द्याव
या दुःख ॥ स्त्रीसंगूचि आवश्यक ॥ पुत्र पौत्र दारा[4] देख ॥ नानादुःख भोगवी ॥ ९७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कपोती स्वात्मजान्वीक्ष्य बाल
कान् जालसंवृतान् ॥ तानभ्यधावत्क्रोशंती क्रोशतो भृशदुःखिता ॥ ६५ ॥ ॥ टीका ॥ ॥ तंव काळजाळीं एके वेळे ॥ कपोती बांध
लीं देखे बाळें ॥ तोंड घेऊनि पिटी कपाळें ॥ आक्रोशें[5] लोळे दुःखित ॥ ९८ ॥ बाळें चरफडतां देखे जाळीं ॥ आक्रंदोनि दे आरोळी ॥
बाळां सन्मुख धांवे वेळोवेळीं ॥ दुःखें तळमळी दुःखित ॥ ९९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ साऽसकृत्स्नेहगुणिता दीनचित्ताऽजमायया ॥ स्वयं
चाबध्यत शिचा बद्धान्पश्यत्यपस्मृतिः ॥ ६६ ॥ ॥ टीका ॥ ॥ दुःख द्यावया भर्तारासी[6] ॥ आक्रंदें कपोती चालिली कैसी ॥ शतगुणें
स्नेहो वाढला तिसी ॥ मृतपुत्रांसी देखोनी ॥ ६०० ॥ पुत्रस्नेहें केलें वेडें ॥ गुण आठआठवूनि रडे ॥ हिताहित नदेखे पुढें ॥ बळेंचि पडे जा
ळांतु ॥ १ ॥ मायामोहें भुलली कैशी ॥ जेथें बांधलें देखे पुत्रासी ॥ ते जाळीं घाली आपणासी ॥ मोहें पिशी ते केली ॥ २ ॥ ॥ श्लो
क ॥ ॥ कपोतश्चात्मजान् बद्धानात्मनोऽप्यधिकान्प्रियान् ॥ भार्यां चात्मसमां दीनां विललापातिदुःखितः ॥ ६७ ॥ ॥ टीका ॥ ॥ अंतर
ला स्त्रीबाळकीं ॥ कपोता तो एकाएकीं ॥ रुदन करी अधोमुखीं ॥ अतिदुःखी विलपत ॥ ३ ॥ जीवाहोनि प्रिय अधिकें ॥ तें निर्जीव दे
खिलीं बाळकें ॥ अनुकूल अनुरूपकें ॥ भार्या देखे अंतरली ॥ ४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अहो मे पश्यतापायमल्पपुण्यस्य दुर्मतेः ॥ अतृप्त
स्याकृतार्थस्य गृहस्त्रैवर्गिको हतः ॥ ६८ ॥ ॥ टीका ॥ ॥ धर्म अर्थ काम ॥ या तिहींचा आश्रयो गृहाश्रम ॥ तो भंगला मी अनाश्रम ॥

---

[1] कोठ्यांत. [2] फाशांत. [3] आपल्या प्रेमानें. [4] स्त्री. [5] ओरडण्यानें. [6] पतीस.

अतृप्त काम सांडूनी ॥ ५ ॥ पूर्वपापाचा आंवर्तु[१] ॥ मज सांडूनि अकृतार्थु ॥ माझा काम नव्हता तृप्तु ॥ धर्मकामार्थु भंगला ॥ ६ ॥ गृहीं त्रैवर्गु[२] भंगला ॥ चौथा पुरुषार्थ[३] असे उरला ॥ तो साधूनि घेवों वहिला ॥ आश्रमू भंगल्या क्षती[४] काय ॥ ७ ॥ ऐसें ह्मणसी जरी निगुतीं ॥ ये अर्थी मानी दुर्मती ॥ विषयवासना न सांडितां चित्तीं ॥ कैसेनि मुक्ती[५] साधेल ॥ ८ ॥ म्यां पूर्वीं अल्पपुण्य होतें केलें ॥ यालागीं अंतरायीं घर घेतलें ॥ माझें परलोकसाधन ठेलें ॥ विधुर केलें मजलागीं ॥ ९ ॥ होका गृहीं असतां गृहस्थां ॥ काय परलोक साधे समस्तां ॥ इतरांची असो कथा ॥ मज साधनता तंव होती ॥६१०॥ ॥श्लोक॥ ॥ अनुरूपानुकूला च यस्य मे पतिदेवता॥ शून्ये गृहे मां संत्यज्य पुत्रैः स्वर्याति साधुभिः ॥ ६९ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्त्रीपुरुषांची चित्तवृत्ती ॥ अनुकूलें वर्तें धर्मप्रवृत्ती ॥ तरीच परलोक[६] साधिती ॥ इतरां प्राप्ती ते नाहीं ॥ ११ ॥ एकाच्या भार्या त्या तोंडाळा ॥ एकाच्या त्या बहु वोढाळा ॥ एकाच्या त्या अतिचांडाळा॥ एकी दुःशीला दुर्भगा ॥ १२ ॥ एकीचा तो क्रोध गाढा ॥ एकी अत्यंत खादाडा ॥ एकी सोलिती दांत दाढा ॥ आरसा पुढां मांडूनी ॥ ॥ १३ ॥ एकी ओंगळा आळसिणी ॥ एकी त्या महाडाकिनी ॥ एकी सुकुमारा विलासिनी ॥ बरवेपणीं गर्विता[७] ॥ १४ ॥ तैशी नव्हे माझी पत्नी ॥ सदा अनुकूल मजलागूनी ॥ मजसी वर्ते अनुरूपपणीं ॥ धर्मपत्नी धार्मिक ॥ १५ ॥ मी जेव्हां धर्मीं तत्पर ॥ तेव्हां धर्मासि ते अतिसादर ॥ मज कामीं जेव्हां आदर ॥ तेव्हां ते कामचतुर कामिनी ॥ १६ ॥ मजवांचोनि तत्त्वतां ॥ न भजे आणिका देवा देवता ॥ मज सांडूनि नवचे तीर्था ॥ माझें वचन सर्वथा नुल्लंघी ॥ १७ ॥ एवंरूप गुणकुलशील ॥ मजसी सदा अनुकूल ॥ पतिव्रता जे केवळ ॥ पत्नी निर्मळ पैं माझी ॥ १८ ॥ मज सांडूनि शून्यगृहीं ॥ पुत्रेंसहित साध्वी[८] पाही ॥ जातसे स्वर्गाच्याठायीं ॥ मज अपायीं घालूनी ॥ १९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सोहं शून्ये गृहे दीनो मृतदारो मृतप्रजः ॥ जिजीविषे किमर्थं वा विधुरो दुःखजीवितः ॥७०॥ ॥टीका॥ नाशिली स्त्री नाशिल्या प्रजा ॥ येथें म्यां राहावें कोण्या काजा ॥ दुःखें प्राण जाईल माझा ॥ लोकलाजा[९] निंदित ॥६२०॥ एवढें अंगीं वाजलें दुःख ॥ काय लौकिकीं दाखवूं मुख ॥ भंगलें संसाराचें सुख ॥ जिता मूर्ख ह्मणतील ॥ २१ ॥ जळो विधुराचें[१०] जिणें ॥ सदा निंद्य लाजिरवाणें ॥ नये श्राद्धीचें आंवतणें ॥ सदा वसणें एकाकी ॥ २२ ॥ ऐसेनि वसतां ये लोकीं ॥ शून्यगृहीं एकाकी ॥ धड गोड नमिळे मुखीं ॥ परमदुःखी मी होईन ॥२३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तांस्तथैवावृतनान् शिग्भिर्मृत्युग्रस्तान्विचेष्टतः ॥ स्वयं च कृपणः शिक्षु पश्यन्नप्यबुधोऽपतत् ॥ ७१ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐसें बोलोनि केलें काये ॥ मृतस्त्रीपुत्रांकडे पाहे ॥ काळपाशीं बांधिलीं आहे ॥ चेष्टा राहे निःशेष ॥

---

[१] समूह, भोंवरा. [२] धर्म, अर्थ, काम. [३] मोक्ष. [४] नाश. [५] मोक्ष. [६] स्वर्गलोक. [७] गर्विष्ठ. [८] पतिव्रता. [९] लोकाच्या लज्जेनें. [१०] स्त्रीरहित पुरुषाचें.

॥ २४ ॥ ऐसें देखतांही अबुद्धी ॥ विवेक[1] नधरीचि बुद्धी ॥ आपण जाऊनि त्रिशुद्धी ॥ जाळामध्यें पडियेला ॥ २५ ॥ मेल्यामागें मरणें ॥ देखे हेंचि सर्वांसि करणें ॥ परी जन्ममृत्युनिवारणें ॥ हा स्वार्थु कवणें नधरिजे ॥ २६ ॥ पहापां स्त्रीपुत्रांकारणें ॥ आपुलाही जीवू देणें ॥ परी भगवत्पदवी साधणें ॥ हें नमनें मनें सर्वथा ॥ २७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तं लब्ध्वा लुब्धकः क्रूरः करोतं गृहमेधिनम् ॥ कपोतकान्कपोतीं च सिद्धार्थः प्रययौ गृहम् ॥ ७२ ॥ ॥ टीका ॥ ॥ जाळीं पडला कपोता दुर्बुद्धी ॥ झाली लुब्धकाची कार्यसिद्धी ॥ सहकुटुंब घेऊनि खांदीं ॥ निघे पारधी निजस्थाना ॥ २८ ॥ ऐसा जो कोणी गृहमेधी[2] ॥ त्यासि सर्वथा काळ साधी ॥ जैशी कपोत्याची बुद्धी ॥ तैसी सिद्धी गृहमेध्या ॥ २९ ॥ बाळकाच्या काकुळतीं ॥ मरण पावली कपोती ॥ ऐसें देखतां देखतां दुर्मती[3] ॥ तेथें निश्चितीं उडी घाली ॥६३०॥ यापरी तो कपोता ॥ कुटुंबाची मेधा वाहतां ॥ मरण पावला सर्वथा ॥ विवेक चित्ता नधरीची ॥३१॥ ॥ श्लोक ॥ एवं कुटुंब्यशांतात्मा द्वंद्वारामः पतत्रिवत् ॥ पुष्णन्कुटुंबं कृपणः सानुबंधोवसीदति ॥ ७३ ॥ ॥ टीका ॥ ॥ जैसा कुटुंबी गृहस्थु ॥ कुटुंब पोषणीं अशक्तु ॥ विषयवासना अशांतु ॥ पावे घातु सकुटुंब ॥ ३२ ॥ गृहासक्ती गृहाश्रमु ॥ तो केवळ द्वंद्वाचा आरामु ॥ कपोत्या ऐसा पडे भ्रमु ॥ वृथा जन्मु दवडावा ॥३३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यः प्राप्य मानुषं लोकं मुक्तिद्वारमपावृतम् ॥ गृहेषु खगवत्सक्तस्तमारूढच्युतं विदुः ॥ ७४ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ येवोनियां कर्मभूमीसी ॥ जो पावला उत्तमदेहासी ॥ त्यांहीमाजी उत्तमता[5] कैशी ॥ अग्रवर्णासी[6] पैं जन्म ॥ ३५ ॥ आलिया मनुष्यदेहासी ॥ मुक्तीचा दारवंटा मुक्त त्यासी ॥ लव निमेष सर्वदिशीं ॥ यावज्जन्मेंसीं मोकळ ॥ ३६ ॥ इतरां वर्णांची हे गती ॥ मा ब्राह्मणतरी पुण्यमूर्ती ॥ ते सदा मुक्तचि असती ॥ वृथा[7] आसक्ती गुंतले ॥ ३७ ॥ विद्वांस[8] आणि वैराग्य ॥ तें ब्रह्मादिकां नलभे भाग्य ॥ वृथा आसक्ती केले अभाग्य ॥ शिश्नोदरा सांग वेंचले[9] ॥ ३८ ॥ मनुष्यदेहीं गृहासक्तु ॥ तो बोलिजे आरूढच्युतु ॥ कपोत्याचेपरी दुःखितु ॥ सिद्ध स्वार्थु नाशिला ॥३९॥ विषयीं सर्वथा नाहीं तृप्ती ॥ ऐसें श्रुतिपुराणें बोलती ॥ करितां विषयाची आसक्ती ॥ थित्या मुकती नरदेहा ॥६४०॥ नवल नरदेहाची ख्याती ॥ रामनामाच्या आवृत्ती ॥ चारी मुक्ती दासी होती ॥ तो देहो वेंचिती विषयांसी ॥ ४१ ॥ विषयसुखाची आसक्ती ॥ कोणा नाहीं झाली तृप्ती[10] ॥ मृगजळाचिये प्राप्ती ॥ केवीं निवती[11] तृषार्त ॥ ४२ ॥ यालागीं जाणतेनि मनुष्यें ॥ नरदेहाचेनि आयुष्यें ॥ विषयाचेनि सायासें ॥ व्यर्थ कां पिसे कष्टती ॥ ४३ ॥ नरदेहाऐसें निधान ॥ अनायासें लाधलें जाण ॥ सांडी सांडी अभिमान ॥ तेणें समा

---

१ विचार. २ गृहस्थ. ३ दुर्बुद्धि. ४ काळजी. ५ चांगलेपणा. ६ ब्राह्मणास. ७ व्यर्थ. ८ विद्वान. ९ खर्चिले. १० संतोष. ११ शांत होवात.

धान पावसी ॥ ४४ ॥ पुढती नरदेहाची प्राप्ती ॥ होईल येथें नाहीं युक्ती ॥ यालागीं सांडूनि विषयासक्ती ॥ भावें श्रीपती भजावा ॥ ४५ ॥ कलियुगीं सुगम[1] साधन ॥ नलगे योग याग त्याग दान ॥ करितां निर्लज्ज[2] हरिकीर्तन ॥ चारी मुक्ती चरण वंदिती ॥ ४६ ॥ इटेसाठीं परीस पालटे ॥ येतां कां मानिती वोखटें[3] ॥ तैसा कीर्तनाचेनि नेटेंपाटें ॥ देवो भेटे प्रत्यक्ष ॥ ४७॥ एका जनार्दनु ह्मणे ॥ नश्वर[4] देहाचेनि साधनें ॥ जनीं जनार्दनु होणें ॥ हे मुद्रा तेणें लाविली ॥ ४८ ॥ एका जनार्दना शरण ॥ तंव जनार्दनु जाहला एकपण ॥ जैसें सुवर्ण आणि कंकण[5] ॥ दों नांवीं जाण एकचि तें ॥ ४९ ॥ तोचि एका एकादशीं ॥ श्रीकृष्ण सांगे उद्धवासी ॥ अवधूत सांगे यदूसी ॥ गुरुउपदेशीं उपदेशु ॥ ६५० ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे यद्ववधूतेतिहासे एकाकारटीकायां सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ॥ मूळश्लोक ॥ ७४ ॥ ॥ ओंव्या ॥ ६५० ॥ ॥ एवंसंख्या ॥ ७२४ ॥ ॥ ॐ ॥ ॥ ॐ ॥

---

१ सोपें. २ लाज न धरितां. ३ वाईट. ४ नष्ट होणाऱ्या. ५ कडें.

* * *

# अध्याय ८ वा.


यदु राजा.
श्रीदत्तात्रय.
श्रीदत्तात्रयानी चोवीस
गुरु केले त्यांतील हे नउ.
मीन.
अवधूत
माशी
मधमाशी
हरीण.
भ्रमर
समुद्र.
पिंगला.
गज.
अजगर.

श्रीगणेशाय नमः॥ ॥ॐनमो सद्गुरु तूं ज्योतिषी ॥ एकात्मतेचें घटित पाहसी ॥ चिद्ब्रह्मेंसि लग्न लाविशी ॥ ॐपुण्येंसी तत्त्वतां ॥१॥
वधुवरां लग्न लाविती ॥ हें देखिलें असे बहुतीं ॥ आपुली आपणा लग्नप्राप्ती ॥ हे अलक्ष्य गती गुरुराया ॥ २ ॥ लग्न लाविती हातवटी ॥
पांचां पंचकांची आटाटी ॥ चुकवूनि काळाची काळदृष्टी ॥ घटिका प्रतिष्ठी निजबोधें ॥ ३ ॥ चहूं पुरुषार्थांचें तेलवण ॥ लाडु वाइलें
संपूर्ण ॥ अहंभावाचें निंबलोण ॥ केलें जाण सर्वस्वें ॥ ४ ॥ साधनचतुष्टयाचा सम्यक ॥ यथोक्त देऊनि मधुपर्क ॥ जीवभावाची मूद
देख ॥ एकाएक सांडविली ॥ ५ ॥ विषयसुख मागें सांडे ॥ तेंचि पायातळी पाय मांडे ॥ सावधान ह्मणती दोहींकडे ॥ वचन धडफुडें तें
तुझें ॥ ६ ॥ व्यवधानाचें विधान तुटे ॥ सहजभावें अंत्रपाट फिटे ॥ शब्द उपरमोनि खुंटे ॥ मुहूर्त गोमटे पैं तुझे ॥ ७ ॥ अर्धमात्रा सम
दृष्टी ॥ निजबिंबीं पडे ग्रांठी ॥ ऐक्यभावाच्या मींनल्या मुष्टी ॥ लग्नकसवटी अनुपम ॥ ८ ॥ तेथ काळा ना धवळा ॥ गोरा नव्हे ना सां
वळा ॥ नोवरा लक्षेना डोळा ॥ लग्नसोहळा तेठायीं ॥ ९ ॥ परी नवल कैसें कवतुक ॥ दुजेनवीण एकाएक ॥ एकपणीं लग्न देख ॥ ला
विता तूं निःशेख गुरुराया ॥ १० ॥ तुज गुरुत्वें नमूं जातां ॥ आज्ञा तूंचि आंतौता ॥ आंत कीं बाहेर पाहों जातां ॥ सर्वीं सर्वथा तूंचितूं
॥ ११ ॥ तुझें तूंपण पाहतां ॥ माझें मीपण गेलें सर्वथा ॥ ऐसें करूनियां गुरुनाथा ॥ ग्रंथकथा करविसी ॥ १२ ॥ मागील कथासंगती ॥
सप्तमाध्यायाचे अंतीं ॥ अवधूतें यदूप्रती ॥ कथा कपोती सांगीतली ॥ १३ ॥ पृथ्वी आदिअंतीं चोखट ॥ कपोतापर्यंत गुरु आठ ॥ सां
गीतले अतिश्रेष्ठ ॥ गुरु वरिष्ठ निज बोधें ॥ १४ ॥ उरल्या गुरूंची स्थिती ॥ अवधूत सांगेल यदूप्रती ॥ तेथें सावधान ठेवा चित्तवृत्ती ॥
श्रवणें स्थिती तद्बोधें ॥ १५ ॥ ॥श्लोक॥ ॥ब्राह्मणउवाच॥ सुखमैंद्रियकं राजन् स्वर्गे नरक एव च ॥ देहिनां यद्यथादुःखं तस्मान्नेच्छेत
तद्बुधः ॥ १ ॥ ॥टीका॥ ॥श्रवणीं सादरता यदूसी ॥ देखोनि सुख झालें ब्राह्मणासी ॥ तेणें सुखें निरूपणासी ॥ उल्हासेंसी करीतसे
॥ १६ ॥ तो ह्मणे राया सावधान ॥ विषयसुखाचें जें सेवन ॥ तें स्वर्गनरकीं गा समान ॥ नाहीं अनुमान येअर्थीं ॥ १७ ॥ भोगितां उर्वशी
शीं ॥ जें सुख स्वर्गीं इंद्रासी ॥ तेंचि विष्ठेमाजी सूंकरासी ॥ सूकरीपासीं निश्चित ॥ १८ ॥ हें जाणोनि साधुजन ॥ उभयभोगीं नघालिती
मन ॥ न देवे प्रेतासि आलिंगन ॥ तेवीं साधुजन विषयासी ॥ १९ ॥ जीत सापू धरावा हातीं ॥ हें प्राणियांसि नुपजे चित्तीं ॥ तेवीं विष
याची आसक्ती ॥ साधु नधरिती सर्वथा ॥ २० ॥ जैसें नप्रार्थितां दुःख ॥ प्राणी पावताती देख ॥ तैसें नइच्छितां इंद्रियसुख ॥ भोगवी
आवश्यक अदृष्ट ॥ २१ ॥ मज दुःखभोगु व्हावा ॥ हें नावडे कोणाच्या जीवा ॥ तें दुःख आणि अदृष्ट तेव्हां ॥ तेवीं सुखाचा यावा अदृष्टें

---

१ आत्मज्ञानानें. २ नाहींसाहोऊन. ३ मिळाल्या. ४ आंत. ५ आनंदानें. ६ तर्क. ७ डुकरास. ८ दैव.

॥ २२ ॥ ऐसें असून उद्योग करितां ॥ आयुष्य नाशिलें सर्वथा ॥ यालागीं सांडूनि विषयावस्था ॥ परमार्था भजावें ॥ २३ ॥ केवळ
झालिया परमार्थपर ॥ ह्मणसी आहारेंवीण नराहे शरीर ॥ येच निर्धारीं साचार ॥ गुरु अजगर[1] म्यां केला ॥ २४ ॥ ॥श्लोक॥ ॥ग्रासं
सुमृष्टं विरसं महांतं स्तोकमेववा ॥ यदृच्छयैवापतितं ग्रसेदाजगरोऽक्रियः ॥ २ ॥ ॥टीका॥ ॥उद्योगेंवीण आहारू ॥ अयाचित सेवी
अजगरू ॥ डंडळोनि नसांडी धीरू[2] ॥ निधडा निर्धारू पैं त्याचा ॥ २५ ॥ स्वभावें तो मुख पसरी ॥ सहज पडे जें भीतरी ॥ सरस निरस
विचार नकरी ॥ आहार अंगीकारी संतोषें ॥ २६ ॥ ऐशीचि योगियांची गती ॥ सदा भाविती आत्मस्थिती ॥ यदृच्छा आलें तें सेविती ॥
रसआसक्ती सांडूनी ॥ २७ ॥ योगियांचा आहारू घेणें ॥ काय सेविलें हें रसना नेणें ॥ रसना पंगिस्त नाहीं होणें ॥ आहारू सेवणें
निजबोधें ॥ २८ ॥ आंबट तिखट तरी जाणे ॥ परी एके स्वादें अवघें खाणें ॥ सरस निरस कांहीं नह्मणे ॥ गोड करणें निजगोडिये ॥ २९ ॥
मुख पसरलिया निर्धारा ॥ स्वभावें रिघालिया वारा ॥ तोचि आहारू पैं अजगरा ॥ तेणेंचि शरीरा पोषण ॥ ३० ॥ तैशीच योगियांची
स्थिती ॥ वाताशनें[3] सुखें वर्तती ॥ आहारालागुनी पुढिलांप्रती ॥ नयेत काकुलती सर्वथा ॥ ३१ ॥ थोडेंबहु सरस निरसासी ॥ हें कांहीं
ह्मणणें नाहीं त्यासी ॥ स्वभावें जें आलें मुखासी ॥ तें सावकाशीं सेवितू ॥ ३२ ॥ ॥श्लोक॥ ॥शयीताहानि भूरीणि निराहारोनुप
क्रमः ॥ यदि नोपनमेद्ग्रासोमहाहिरिव दिष्टभुक् ॥ ३ ॥ ॥टीका॥ ॥अजगरासि बहुकाळें ॥ यदृच्छा[4] आहारू[5] नमिळे ॥ तरी धारणेसि
नटळे ॥ पडिला लोळे निजस्थानीं ॥ ३३ ॥ तैसें योगियासि अन्न ॥ बहुकाळें नमिळे जाण ॥ तरी करूनियां लंबासन ॥ निद्रेविण नि
जतू ॥ ३४ ॥ निद्रा नाहीं तयासी ॥ परी निजे निर्जीं अहर्निशीं ॥ बाह्य नकरी उपायासी ॥ भक्ष्य देहासी अदृष्टें ॥ ३५ ॥ अदृष्ट असेल
जेजे वेळे ॥ तेंतें मिळेल तेणें काळें ॥ यालागीं त्याचें ज्ञान नमैळे[6] ॥ धारणा नढळे निजबोधें ॥ ३६ ॥ ॥श्लोक॥ ॥ओजःसहोबल
युतं बिभ्रद्देहमकर्मकं ॥ शयानो वीतनिद्रश्च नेहेतेंद्रियवानपि ॥ ४ ॥ ॥टीका॥ ॥अजगरासि बळ उदंड ॥ देहोपराक्रम प्रचंड ॥ परी
नकरो उद्योगाचें बंड ॥ पसरोनि तोंड पडतसे ॥ ३७ ॥ तैसाचि योगिया केवळ ॥ शरीरीं असे शारीर बळ ॥ बुद्धिही असे अतिकुश
ळ ॥ इंद्रियबळ पटुतर[7] ॥ ३८ ॥ आहारालागीं सर्वथा ॥ देहीं स्फुरों नेदी चिंता ॥ कायावाचा तत्त्वतां ॥ नेदी स्वभावतां दंडळूं ॥ ३९ ॥
स्वप्नजागृती मुकला ॥ सुषुप्ती सांडोनि निजेला ॥ शून्याचा पासोडा झालिला ॥ निर्जीं पहुडला निर्जत्वें[8] ॥ ४० ॥ ॥श्लोक॥ ॥मुनिः
प्रसन्नगंभीरो दुर्विगाह्यो दुरत्ययः ॥ अनंतपारो ह्यक्षोभ्यस्तिमितोद इवार्णवः ॥५॥ ॥टीका॥ ॥समुद्र जो गुरु करणें ॥ त्याचीं परिस

---

१ साप. २ धैर्य. ३ वाराखाण्यानें. ४ ईश्वराच्या इच्छेनें. ५ खाण्याचे पदार्थ. ६ मळत नाहीं. ७ चांगले. ८ आपलेपणानें.

पां लक्षणें ॥ गंभीरत्व पूर्णपणें ॥ निर्मळ असणें इत्यादि ॥ ४१ ॥ समुद्र सदा सुप्रसन्न ॥ योगी सदा प्रसन्नवदन ॥ केव्हांहीं धुसमुशि लेपण ॥ नव्हे जाण निजबोधें ॥ ४२ ॥ मीनल्या[1] सरितांचें समळजळ ॥ समुद्र डहुळेना अतिनिर्मळ ॥ तैसीं नानाकर्मैं करितां सकळ ॥ सदा अविकळ योगिया ॥ ४३ ॥ जळें गंभीर सागर ॥ योगिया स्वानुभवें गंभीर ॥ वेला नुल्लंघी सागर ॥ नुल्लंघी योगीश्वर गुरुआज्ञा ॥ ४४ ॥ समुद्रीं नें[2]रिघवे भलत्यासि ॥ तो बुडवील कल्लोळेंसी ॥ योगिया बुडवी संसाराशी ॥ भावें त्यापासी गेलिया ॥ ४५ ॥ रिघणें निघणें जाणें जळीं ॥ तो समुद्रीं करी आंघोळी ॥ येरांसि लाटांच्या कल्लोळीं ॥ कासाकुळी करीतसे ॥ ४६ ॥ तैसीचि योगियासी ॥ सलगी नकरवे भलतियासी ॥ औं[3]पभयें भीती आपैसी ॥ तो भाविकासी सुसेव्य ॥ ४७ ॥ जाहल्या धनवंत वेव्हारा ॥ उपायीं नुल्लंघवे सागरा ॥ तैसें नुल्लंघवे योगीश्वरा ॥ नृपा सुरनरां किन्नरां ॥ ४८ ॥ मळ नराहे सागरीं ॥ लाटांसरिसा टाकी दुरी ॥ तैसा मळ योगियाभीतरी ॥ ध्यानें निर्धारीं नराहे ॥ ४९ ॥ समुद्रीं मीनली[4] ताम्रपर्णी ॥ तेथ झाली मुक्ताफळाची खाणी ॥ योगिया मिनली श्रद्धा येऊनी ॥ तेथ मुक्त[5] खाणी मुमुक्षा ॥ ५० ॥ जो समुद्रामाजी रिघोनि राहे ॥ तो नानापरीचीं रत्नें लाहे ॥ योगियामाजी जो समाये ॥ त्याचे वंदिती पाये चिद्रत्नें ॥ ५१ ॥ जैशी समुद्राची मर्यादा ॥ कोणासि नकरवे कदा ॥ तैशी योगियाची मर्यादा ॥ शास्त्रां वेदां नकरवे ॥ ५२ ॥ प्रवाहेंवीण जळ ॥ समुद्रीं जेवीं निश्चळ ॥ मृत्युभयेंवीण अचंचळ ॥ असे केवळ योगिया ॥ ५३ ॥ समुद्रीं प्रवाहो नव्हे कांहीं ॥ सदा पूर्ण ठायींच्या ठायीं ॥ तैसें योगिया जन्ममरण नाहीं ॥ परिपूर्ण पाही सर्वदा ॥ ५४ ॥ समुद्रलक्षणें साधितां ॥ अधिक दशा आली हातां ॥ ते योगियाची योग्यता ॥ परीस तत्त्वतां सांगेन ॥ ५५ ॥ समुद्रामाजी जळ ॥ लाटा खालीं अतिचंचळ ॥ योगिया अं[6]तरीं अति निश्चळ ॥ नाहीं तळमळ कल्पना ॥ ५६ ॥ समुद्र क्षोभे वेळोवेळे ॥ योगिया क्षोभेना कवणे काळें ॥ सर्वथा योगी नुचंबळे ॥ योगबळें सावध ॥ ५७ ॥ समुद्रीं भरतें पर्वसंबंधें ॥ योगिया परिपूर्ण सदानंदें ॥ समुद्रीं चढू वोहटू चांद ॥ योगिया निजबोधें सदासम ॥ ५८ ॥ समुद्र सर्वांप्रति क्षार ॥ तैसा नव्हे योगीश्वर ॥ तो सर्वां जीवांसि मधुर ॥ बोधु साचार पैं त्याचा ॥ ५९ ॥ जयासि बोधु नाहीं पुरता ॥ अनुभवूं नेणों निजात्मता ॥ त्यासि कैंची मधुरता ॥ जेवीं अपक्कता सेंदेची ॥ ६० ॥ सां[7]गरीं वरुषल्या घन ॥ वृथा जाय तें जीं[8]वन ॥ तैसा योगिया नव्हे जाण ॥ सेविल्या व्यर्थपण येवों नेदी ॥ ६१ ॥ अल्पही योगिया होय घेता ॥ तेणें निवारी भवव्यथा ॥ यालागीं मुमुक्षीं सर्वथा ॥ भगवद्भक्तां भजावें ॥ ६२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ समृद्धकामो हीनो वा नारायणपरो मुनिः ॥ नोत्सर्पेत नशुष्येत सरिद्भिरिव सागरः ॥ ६ ॥

---

[1] मिळालेल्या. [2] जाववत नाहीं. [3] आपल्या. [4] मिळाली. [5] मोत्याची खाण. [6] मनांत. [7] समुद्रांत. [8] पाणी.

॥ टीका ॥ ॥ वर्षाकाळीं सरिता सकळ ॥ घेऊन आल्या अमूप जळ ॥ तेणें हर्षें हर्षिजेना प्रबळ ॥ नचढे जळ जळाब्धी ॥ ६३ ॥ ग्रीष्म काळाचिये प्राप्ती ॥ सरितांचे यावे राहती ॥ तें मानूनियां खंती ॥ अंपांपती वोहटेना ॥ ६४ ॥ तैसेंचि योगियाच्या ठायीं ॥ नाना सम्रद्धि आलिया पाही ॥ अहंता नधरी देहीं ॥ गर्व कांहीं चढेना ॥ ६५ ॥ सम्रद्धि वेंचलिया पाठीं ॥ खंती नाहीं योगियापोटीं ॥ तो नारायण परदृष्टी ॥ सुखसंतुष्टी वर्त्ततू ॥ ६६ ॥ संपत्तीमाजी असतां ॥ मी संपन्न हें नाठवे चित्ता ॥ दरिद्र आलिया दरिद्रता ॥ नेणें सर्वथा योगिया ॥ ६७ ॥ दरिद्र आणि संपन्नता ॥ दोन्ही समान त्याचिया चित्ता ॥ नाहीं प्रपंचाची आसक्तता ॥ नारायणपर तत्त्वतां निजबोधें ॥ ६८ ॥ या प्रपंचाचा कठिण लागू ॥ नाशासि मूळ स्त्रीसंगू ॥ येचिविषयीं गुरु पतंगू ॥ केला चांगू परियेसी ॥ ६९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ दृष्ट्वा स्त्रियं देवमायां तद्भावैरजितेंद्रियः ॥ प्रलोभितः पतत्यंधे तमस्यग्नौ पतंगवत् ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ दैवी गुणमयी जे माया ॥ तिचें सगुण रूप तें स्त्रिया ॥ तेथें प्रलोभ उंपजला प्राणियां ॥ भोग भोगावया स्त्रीसुखें ॥ ७० ॥ हावभाव विलासगुणी ॥ व्यंकटकटाक्षांच्या बाणीं ॥ पुरुषधैर्यकवच भेदोनी ॥ हृदयभुवनीं संचरती ॥ ७१ ॥ दारुण कटाक्षांच्या घायीं ॥ पुरुषधैर्य पाडिलें ठायीं ॥ योषिताबंदीं पाडिले पाही ॥ भोगकारागृहीं घातले ॥ ७२ ॥ स्त्रीभोगाचें जें सुख ॥ तें जाण पां केवळ दुःख ॥ तोंडीं घालितां मधुर विख ॥ परिपाकीं देख प्रांणांतू ॥ ७३ ॥ दीपाचिया अंगसंगा ॥ कोण सुख आहे पतंगा ॥ बळें आलिंगूं जातां पैं गा ॥ मरणमार्गा लागला ॥ ७४ ॥ पुढिला पतंग निमाला देखती ॥ तरी मागिल्या दीपीं अतिआसक्ती ॥ तेवीं स्त्रीकामें एक ठकती ॥ एका अतिप्रीती पतंगन्यायें ॥ ७५ ॥ तेवीं विवेकहीन मूर्खा ॥ लोलुप्य उपजे स्त्रीसुखा ॥ तत्संसर्गें मरण लोकां ॥ नचुके देखा सर्वथा ॥ ७६ ॥ दीपरूपाचेनि कोडें ॥ पतंग जळोनि स्नेहीं बुडे ॥ तेवीं स्त्रीसंगें अवश्य घडे ॥ पतन रोकडें अंधतमीं ॥ ७७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ योषिद्धिरण्याभरणांबरादिद्रव्येषु मायारचितेषु मूढः ॥ प्रलोभितात्मा ह्युपभोगबुद्ध्या पतंगवन्नश्यति नष्टदृष्टिः ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ ॥ पाहा पां कांता आणि सोनें ॥ वस्त्रें आभरणें रत्नें ॥ मायेनें रचिलीं पडणें ॥ पतनाकारणें जनाच्या ॥ ७८ ॥ एकली योषिता नरकीं घाली ॥ सुवर्णलोभें नरक बळी ॥ रत्नें भूषणें तत्काळीं ॥ नरकमेळीं घालिती ॥ ७९ ॥ ते अवघेचि अनर्थकारी ॥ मीनले योषिताशरीरीं ॥ तें देखतांचि पुरंध्री ॥ जनासि उरी मग कैंचेनी ॥ ८० ॥ अंगीं वेताळसंचरा ॥ त्यावरी पाजिलिया मैंदिरा ॥ मग डुल्लतनाचतां त्या नरा ॥ वोढावारा पैं नाहीं ॥ ८१ ॥ कां भांडाचे तोंडीं भंड पुराण ॥ त्यावरी आला शिमग्याचा सण ॥ मग करितां वाग्विटंबन ॥ आवरी कोण तयासी ॥ ८२ ॥ होकां मोहक मदिरा सर्वांसि ॥

---

१ नद्या. २ बहुत. ३ समुद्र. ४ खर्चु झाला असता. ५ प्रीति. ६ चांगला. ७ उत्पन्न झाला. ८ धैर्य हाच अंगरखा. ९ प्राणाचा नाश. १० मेला. ११ दारु.

त्यांत घातलें उन्मादद्रव्यासी ॥ सेवन करितां त्या रसासी ॥ पारु भ्रमासी पैं नाहीं ॥ ८३ ॥ तैसें सोलिव मोहाचें रूप ॥ तें जाण योषिता स्वरूप ॥ त्याहीवरी खटाटोप ॥ वस्त्रें पडप भूषणें ॥ ८४ ॥ काजळ कुंकू अलंकार ॥ लेऊनि विचित्र अंबर ॥ वनिता शोभत सुंदर ॥ मायेचे विकार विकारले ॥ ८५ ॥ माया अजितेंद्रिया[1] बाधी ॥ दासां संमुख नसे त्रिशुद्धी ॥ ज्याची अतिप्रीती गोविंदीं ॥ त्यासि रुपानिधी रक्षिता ॥ ८६ ॥ कैशा रीतीं रक्षी भक्त ॥ मुळीं आत्मा आत्मीं नाहीं तेथ ॥ स्त्रीरूपें[2] भासे भगवंत ॥ भक्त रक्षित निजबोधें ॥ ८७ ॥ वनिता देखोनि गोमटो[3] ॥ विवेकाची होय नष्ट दृष्टी ॥ प्रलोभें उपभोगा देती मिठी ॥ ते दुःखकोटी भोगिती ॥ ८८ ॥ देखोनि दीपरूपीं झगमगी ॥ उपभोगबुद्धी पतंगीं ॥ उडी घालितां वेगीं ॥ जळोनि आगीं नासती ॥ ८९ ॥ एवं योषितारूपें माया ॥ उपभोगें भुलवी प्राणिया ॥ जे विमुख हरीच्या पायां ॥ त्यांसीच माया भुलवित ॥ ९० ॥ मधुकराचेनि विंदाणें ॥ मधुकर[4] म्यां गुरु करणें ॥ दुःख नेदितां कार्य साधणें ॥ तींहीं लक्षणें परीस पां ॥ ९१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्तोकंस्तोकं ग्रसेद्ग्रासं देहो वर्त्तेत यावता ॥ गृहानहिंसन्नातिष्ठेद्वृत्तिं माधुकरीं मुनिः ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ भ्रमर रिघोनि पुष्पामधीं ॥ फूलतरी कुचुंबों नेदी ॥ आपुली करी अर्थसिद्धी ॥ चोखट बुद्धी भ्रमराची ॥ ९२ ॥ तैसीच योगियांची परी ॥ ग्रासमात्र घरोघरीं ॥ भिक्षा करूनि उदर भरी ॥ पीडा नकरी गृहस्थां ॥ ९३ ॥ प्राणधारणेपुरतें ॥ योगी मागे भिक्षेतें ॥ समर्थ दुर्बळ विभागातें ॥ न मानूनि चित्तें सर्वथा ॥ ९४ ॥ रिघोनि कमळणीपाशीं ॥ भ्रमरु लोभला आमोदासीं[5] ॥ पद्मसंकोचें अस्तासो ॥ तेंचि भ्रमरासी बंधन ॥ ९५ ॥ जो कोरडें काष्ठ भेदोनि[6] जाये ॥ तो कमळदळीं गुंतला ठाये ॥ प्रिया दुखवेल ह्मणोनि राहे ॥ निर्गम न पाहे आपुला ॥ ९६ ॥ तैसाचि जाण संन्यासी ॥ एकेठायीं राहे लोलुप्येंसी ॥ तेंचि बंधन होय त्यासी ॥ विषयभोगासीं गुंतला ॥ ९७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अणुभ्यश्च महद्भ्यश्च शास्त्रेभ्यः कुशलो नरः ॥ सर्वतः सारमादद्यात्पुष्पेभ्यइव षट्पदः ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ अतिलहान सुमन[7] जें कांहीं ॥ भ्रमरा तेथ उपेक्षा नाहीं ॥ रिघोनी[8] त्याच्याहीठायीं ॥ आमोद पाही सेवितु ॥ ९८ ॥ थोरथोर ज्या कमळणी ॥ विकासल्या समर्थपणीं ॥ त्यांच्याहीठायीं रिघोनी ॥ सारांश सेवुनी जातसे ॥ ९९ ॥ तैसाचि योगियां नेटकू ॥ शास्त्रदृष्टी अति विवेकू ॥ नकरी लहान थोर तर्कू ॥ सारग्राहकू होतसे ॥ १०० ॥ वेदांतीं ब्रह्मस्थिती ॥ बोलिली मानी यथानिगुतीं ॥ इतरा स्तोत्रीं ब्रह्मव्युत्पत्ती ॥ तेही अतिप्रीतीं मानितू ॥ १ ॥ पंडितांचें वचन मानी ॥ साधारणु बोलिला हितवचनीं ॥ तेंही अतिआदरें मानूनी ॥ सार[9] निवडोनी घेतसे ॥ २ ॥ प्रीति व्हावया पतीच्या मानसीं ॥ कुळवधू[10] मानी सासूसासऱ्यांसी ॥ मानू देतसे

---

१ इंद्रिय न जिंकणारास. २ स्त्री. ३ चांगली. ४ भ्रमर. ५ सुगंधास. ६ फोडून. ७ फूल. ८ बसून. ९ तत्त्व. १० पतिव्रता.

त्यांच्या दासासी ॥ त्याचे प्रीतीसी लक्ष्मूनी ॥ ३ ॥ मिसळल्या क्षीरनीरासी[1] ॥ निवडूनि घेइजे राजहंसीं ॥ तैसा विवेकयुक्त मानसीं ॥ सारभागासी घेतसे ॥ ४ ॥ सर्वभूतीं भगवद्भावो ॥ हा सारभाग मुख्य पहा हो ॥ हे निष्ठा ज्यासि महाबाहो ॥ त्यासि अपावो[2] स्वप्नीं नाहीं ॥ ५ ॥ भरला या जगा आंतू ॥ सारभागी तो योगयुक्तू ॥ यदूसि अवधूतू सांगतू ॥ गुरुवृत्तांतू लक्षणें ॥ ६ ॥ गुरुत्वें म्यां मानिली माशी ॥ ऐक राया दोंप्रकारेंसी ॥ एक ते मोहळमासी ॥ ग्रामवासी दूसरी ॥ ७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सायंतनं श्वस्तनं वा न संगृह्णीत भिक्षितम् ॥ पाणिपात्रोदरामत्रो मक्षिकेव न संग्रही ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ पहा पां घरींची माशी ॥ बैसल्या साखरेच्या राशीं ॥ हातीं धरोनि घाली मुखाशी ॥ संग्रहो तिसी पैं नाहीं ॥ ८ ॥ हे होईल सायंकाळां ॥ हे भक्षीन प्रातःकाळां ॥ ऐसा संग्रहो नसे वेगळा ॥ नाहीं केला मक्षिका ॥ ९ ॥ ऐशी योगसंन्यासगती ॥ प्राप्त भिक्षा घेऊनि हातीं ॥ तिशीं निक्षेपु मुखाप्रती ॥ संग्रहस्थिती त्या नाहीं ॥ १० ॥ भिक्षेलागीं पाणिपात्र[3] ॥ सांठवण उदरमात्र ॥ यावेगळें स्वतंत्र ॥ नाहीं घर पात्र सांठवणें ॥ ११ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सायंतनं श्वस्तनं वा न संगृह्णीत भिक्षुकः ॥ मक्षिकाइव संगृह्णन् सह तेन विनश्यति ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ सायंकाळप्रातःकाळासी ॥ भक्ष्यसंग्रहो नसावा भिक्षूसी ॥ संग्रहें पावती नाशासी ॥ येविषयीं मधुमासी गुरु केला ॥ १२ ॥ रिघोनि नानासंकटस्थानासी ॥ मधुसंग्रहो करी मधुमाशी ॥ तो संग्रहोचि करी घाताशी[4] ॥ मधुन्यायासी जे येती ॥ १३ ॥ संग्रहो यत्नाचिया चाडा ॥ मोहळ बांधिती अवघड कडां ॥ ते दुर्गमीं रिगू करिती गाढां ॥ अर्थचाडा मधुहर्त्ते ॥ १४ ॥ कां झाडितां मोहळासी ॥ नाश होतसे माशियांसी ॥ संग्रहाची जाती ऐशी ॥ जीवघातासी करवितू ॥ १५ ॥ ऐसें देखोनियां जनीं ॥ भक्त भिक्षुक योगी सज्जनीं ॥ संग्रहो[5] नसावा भरवसेनी ॥ नाश निदानीं दिसतसे ॥ १६ ॥ आचरावें सत्कर्म ॥ संग्रहावा शुद्धधर्म ॥ हेंचि नेणोनियां वर्म ॥ धनकामें अधम नाशती ॥ १७ ॥ अर्थ विनाशाचें फळ ॥ दुसरें एक नाशाचें मूळ ॥ विशेषनाशाचें आळबाळ ॥ स्त्री केवळ ओळख पां ॥ १८ ॥ मूळ नाशासी जीविता ॥ कनक आणि योषिता[6] ॥ जंवजंव यांची आसक्तता ॥ तंवतंव चढता भवरोगू ॥ १९ ॥ कनक आणि कामिनी ॥ ज्यासि नावडे मनीहुनी ॥ तोचि जनार्दनू जनीं ॥ भरवसेनी ओळख पां ॥ २० ॥ जो सुख इच्छील सर्वांशीं ॥ तेणें नातळावें स्त्रियेसी ॥ येचिविषयीं मदगजासी ॥ गुरु विशेषीं म्यां केला ॥ २१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पदाऽपि युवतीं भिक्षुर्न स्पृशेद्दारवीमपि ॥ स्पृशन्करीव बध्येत करिण्या अंगसंगतः ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ पहा पां षष्टिहायन भद्रजाती ॥ त्यापुढें मनुष्य तें किती ॥ ते हस्तिणीचे अंगसंगतीं ॥ बंधन पावती मनुजांचें ॥ २२ ॥ जो दृष्टीं नाणी मनु

---

१ दूधपाण्यास. २ अपाय. ३ हातच भांडें. ४ मरणास. ५ शिलक. ६ स्त्री.

ष्यांसी ॥ तो स्त्रियां वश केला मानवांसी ॥ त्याचेनि बोलें उठी बैशी ॥ माथां अंकुशीं मारिजे ॥ २३ ॥ एवं जिणावया[1] संसारासी ॥ जे स्वधर्मनिष्ठ संन्यासी ॥ तिहीं देखोनियां योषितांसी ॥ लागवेगेंसी पळावें ॥ २४ ॥ नको स्त्रियांची भेटी ॥ नको स्त्रियांसि गोष्टी ॥ स्त्री देखतांचि दिठीं[2] ॥ उठाउठीं पळावें ॥ २५ ॥ पळतपळत पायांतळीं ॥ आल्या काष्ठाची पुतळी ॥ तेही नातळावी कुशळीं ॥ निर्जीव स्त्री छळी पुरुषातें ॥ २६ ॥ अनिरुद्धें स्वप्नीं देखिली उखा ॥ तो धरूनि नेला चित्ररेखा ॥ बाणासुरें बांधिला देखा ॥ कृष्ण सखा जयाचा ॥ २७ ॥ त्यासि सोडवणेया आला हरी ॥ धांवत आड आला कामारी ॥ युद्ध झालें परस्परीं ॥ शस्त्रास्त्रीं दारुण ॥ २८ ॥ एवं हरिहरां भिडतां ॥ जो बांधला स्वप्नींचिया कांता ॥ तो सहसा नसोडवे सोडवितां ॥ इतरांची कथा कायसी ॥ २९ ॥ पहापां स्वप्नींचिया कांतां ॥ अनिरुद्धासि केली निरुद्धता[3] ॥ मा साचचि स्त्री हातीं धरितां ॥ निर्गमता त्या कैंची ॥ १३० ॥ पुरुष आपण्या ह्मणविती ॥ शेखीं स्त्रियांचे पाय धरिती ॥ त्यांसि कैसेनि होईल मुक्ती[4] ॥ स्त्रीसंगतीं अधःपात ॥ ३१ ॥ ॥श्लोक॥ ॥नाऽधिगच्छेत्स्त्रियं प्राज्ञः कर्हिचिन्मृत्युमात्मनः ॥ बलाधिकैः स हन्येत गजैरन्यैर्गजो यथा ॥ १४॥ ॥टीका॥ ॥क्रीडतां गजीमाजीं गजपती ॥ त्यावरी सबळ भद्रजाती ॥ येऊनियां युद्ध करिती ॥ निजबळें मारिती तयातें ॥ ३२ ॥ तो मारोनियां हस्ती ॥ त्या हस्तिणी समस्ती ॥ सबळ भोगी भद्रजाती ॥ नाशात्रती स्त्री मूळ ॥ ३३ ॥ अहल्येचिया संगतीं ॥ गौतमें विटंबिला अमरपती[5] ॥ भस्मासुरासि नाशप्राप्ती ॥ स्त्रीसंगतीस्तव जाहली॥ ३४ ॥ देखोनि तिलोत्तमा उत्तम वधू ॥ सुंद उपसुंद सखे बंधू ॥ स्त्रीअभिलाषें चालिला क्रोधू ॥ सुहृदसंबंधू विसरले ॥ ३५ ॥ मग स्त्रीविरहें युद्धाच्या ठायीं ॥ दोघे निमाले[6] येरयेरांचे घायीं ॥ शेखीं स्त्रीभोगूही नाहीं ॥ मरणमूळ पाही योषिता[7] ॥ ३६ ॥ ऐशीच पूर्वकल्पींची कथा ॥ अवतारी श्रीकृष्ण नांदता ॥ तेणें शिशुपाळ गांजोनि सर्वथा ॥ हिरोनि कांता पैं नेली ॥ ३७ ॥ एवं सुर नर पशुपती ॥ नाशासि मूळ स्त्रीसंगती ॥ तिचेनि संगें गृहासक्ती ॥ कलहप्राप्ती स्त्रीमूळ ॥ ३८ ॥ ग्राम्यस्त्रियांचे[8] संगतीं जाणें ॥ तो बैसला मरणा धरणें ॥ मरण आल्याही नकरणें ॥ जीवें प्राणें स्त्रीसंग ॥ ३९ ॥ वेश्येचे संगतीं जाता ॥ बळाधिक करी घाता ॥ निरंतर स्वपत्नी भोगितां ॥ नाहीं बाधकता हें नह्मणे ॥ १४० ॥ अविश्रम स्त्री सेवितां ॥ कामु पावे उन्मत्तता ॥ उन्मत्त कामें सर्वथा ॥ अधःपाता नेइजे ॥ ४१ ॥ एवं हा ठावोवरी ॥ स्त्रीसंग कठिण भारी ॥ क्वचित्संगू झाल्यावरी ॥ नरकद्वारीं घालील ॥ ४२ ॥ नरकीं घालील हे वार्ता ॥ उद्धाराची कायसी कथा ॥ नरकरूप ग्राम्ययोषिता ॥ पाहे सर्वथा निर्धारें[9] ॥ ४३ ॥ स्त्री आणि दुसरा अर्थू ॥ हाचि येलोकीं घोर अनर्थू ॥ येणें अंतरला निजस्वार्थू ॥

---

[1] जिंकावयास. [2] दृष्टीनें. [3] बंधन. [4] मोक्ष. [5] इंद्र. [6] मेले. [7] स्त्रिया. [8] गांवांतल्या स्त्रियांच्या. [9] निश्चयानें.

शेखीं[1] करी घातू प्राणाचा ॥ ४४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ न देयं नोपभोग्यं च लुब्धैर्यद्दुःखसंचितम् ॥ भुंक्ते तदपि तच्चान्यो मधुहेवार्थविन्मधु ॥ १५ ॥
॥ टीका ॥ ॥ स्वयें खाई ना धर्म नकरी ॥ घरच्यांसि खाऊं नेदी दरिद्री ॥ मधुमक्षिकेच्या परी ॥ संग्रहो करी कष्टोनी[2] ॥ ४५ ॥ माशा मो
हळ बांधिती बळें ॥ माजी सांचले मधाचे गोळे ॥ तें देखोनि जगाचे डोळे ॥ उपायबळें घेऊं पाहती ॥ ४६ ॥ मग झाडीं खोडीं अरडीं
दरडीं ॥ तेथिच्या तेथ जग झोडी ॥ भरती मधाचिया कावडी ॥ ते सेविती गोडी श्रीमंत ॥ ४७ ॥ माशा मधु[3] नखाती काकुळती ॥
झाडी त्याचे हात माखनी ॥ स्वादु श्रीमंत सेविती ॥ ज्यांसि लक्ष्मीपती प्रसन्न ॥ ४८ ॥ तैसेंचि कृपणाचें यक्षधन ॥ नाहीं दान धर्म र
क्षण ॥ त्यातें तस्कर[4] नेती मारून ॥ त्यांसही दंडून राजा ने[5] ॥ ४९ ॥ जे शिणोनि संग्रह करिती ॥ त्यांसि नव्हे भोगप्राप्ती ॥ ते द्रव्यें अप
रिग्रह सेविती ॥ दैवगती विचित्र ॥ १५० ॥ प्रयासें गृहस्थ करवी अन्न ॥ तें संन्यासी न शिणतां जाण ॥ करूनि जाय भोजन ॥ अदृष्ट
प्रमाण ये अर्थी ॥ ५१ ॥ यालागीं दैवाधीन जो राहे ॥ तो संग्रहाची चाड न वाहे ॥ तें अदृष्टचि साह्य आहे ॥ कृपणता वायें[6] करिताती
॥ ५२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सुदुःखोपार्जितैर्वित्तैराशासानां गृहाशिषः ॥ मधुहेवाग्रतो भुंक्ते यतिर्वै गृहमेधिनाम् ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ दुःखें
उपार्जूनि[7] वित्त ॥ गृहसामग्री नानापदार्थ ॥ त्याचे पाक करवी गृहस्थ ॥ निजभोगार्थ आवडीं ॥ ५३ ॥ तेथ समर्यीं आला अतीत ॥
संन्यासी ब्रह्मचारी अन्नार्थ ॥ गृहस्था आधीं ते सेवित ॥ तोंड पाहत गृहमेधी ॥ ५४ ॥ जैसें दवडून मोहळमाशियांसी ॥ मधुहर्त्ता मधु
प्राप्तीसी ॥ तैसें होय गृहस्थासी ॥ नेती संन्यासी सिद्धपाकू ॥ ५५ ॥ समर्यीं पराङ्मुख झालिया यती ॥ सकळ पुण्यें क्षया जाती ॥
यथाकाळीं आलिया अतिथी ॥ स्वधर्म रक्षिती सर्वथा ॥ ५६ ॥ अर्थसंग्रहाची बाधकता ॥ तुज म्यां सांगीतली तत्त्वतां ॥ मृग[8] गुरु केला
सर्वथा ॥ तेही कथा परियेसी ॥ ५७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ग्राम्यगीतं न शृणुयाद्यतिर्वनचरः क्वचित् ॥ शिक्षेत हरिणाद्बद्धान्मृगयोर्गीतमोहि
तात् ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ ॥ ग्राम्यजनवार्ता ॥ कां ग्राम्यस्त्रियांच्या[9] गीता ॥ ऐके जोकां तत्त्वतां ॥ बंधन सर्वथा तो पावे ॥ ५८ ॥ अखंड
पाहतां दीपाकडे ॥ घंटानादें झालें वेडें ॥ मृग पाहों विसरला पुढें ॥ फांसीं पडे सर्वथा ॥ ५९ ॥ ग्राम्ययोषितांचें गीत ॥ ऐकतां कोणाचें
भुलेना चित्त ॥ मृगाच्या ऐसा मोहित ॥ होय निश्चित निजस्वार्था ॥ १६० ॥ जो बोलिजे तापसाचा मुकुटी ॥ ज्यासि स्त्रियांसी नाहीं
भेट गोष्टी ॥ तो ऋष्यशृंग उठाउठी ॥ स्त्रीगीतासाठीं भुलला ॥ ६१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नृत्यवादित्रगीतानि जुषन् ग्राम्याणि योषिताम् ॥
आसां क्रीडनको वश्य ऋष्यशृंगो मृगीसुतः ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ ॥ मधुर वीणागुणक्वणित ॥ ग्राम्यस्त्रियांचें गीत नृत्य ॥ देखतां पुरुष

---

१ शेवटीं. २ श्रमकरून. ३ मद. ४ चोर. ५ नेबो. ६ व्यर्थ. ७ मिळवून. ८ हरिण. ९ गावांतल्या बायांच्या.

वश्य होत ॥ जैसें गळबंधस्थं वानर ॥ ६२ ॥ जो तापसांमाजी जगजेठी ॥ जो जन्मला मृगीच्या पोटीं ॥ जो नेणें स्त्रियांची खोटी गोठी ॥ नपाहे दृष्टीं योषिंता ॥ ६३ ॥ तो ऋष्यशृंग स्त्रीदृष्टीं ॥ वश्य जाहला उठाउठी ॥ धांवे योषितांचे पाटोवाटीं ॥ त्यांचे गोष्टीमाजी वर्त्ते ॥ ६४ ॥ गारुड्याचें वानर जैसें ॥ स्त्रियांसंगें नाचे तैसें ॥ प्रमदादृष्टीं जाहला पिसें ॥ विवेकू मानसें विसरला ॥ ६५ ॥ विसरला तपाचा खटाटोप ॥ विसरला विभांडक बाप ॥ विसरला ब्रह्मचर्यकृत संकल्प ॥ स्त्रियानुरूप नाचतू ॥६६ ॥ स्त्रीबाधें एवढा बाधू ॥ संसारीं आणिक नाहीं गा सुबद्धू ॥ नकोनको स्त्रियांसी विनोदू ॥ दुःखसंबंधू सर्वांशीं ॥ ६७ ॥ वारिलें नाइकावें ग्राम्य गीता ॥ हें सत्य सत्य गा सर्वथा ॥ तेथ हरिकीर्तन हरिकथा ॥ झाल्या परमार्थता ऐकावें ॥ ६८ ॥ रामनामें विवर्जित ॥ ग्रामणीं बोलिजे तें ग्राम्यगीत ॥ तें नाइकावें निश्चित ॥ कवतुकें तेथ नवचावें ॥ ६९ ॥ मीन गुरु करणें ॥ तेंही अवधारा लक्षणें ॥ रसनेचेनि लोलुप्यपणें ॥ जीवें प्राणें जातसे ॥ १७० ॥ ॥श्लोक॥ ॥जिव्हयातिप्रमाथिन्या जनो रसविमोहितः॥ मृत्युमृच्छत्यसद्बुद्धिर्मीनस्तु बडिशैर्यथा॥ १९॥ ॥टीका॥ ॥अर्थसंग्रहें जीवघातू॥ स्त्रिया आसक्तीं अधःपातू ॥ रसनालोलुप्यें पावे मृत्यू ॥ त्रिविध घातू जीवासी ॥ ७१ ॥ ज्यासि रसनालोलुप्यता गाढो ॥ त्यासि अनर्थचि जोडे जोडी ॥ दुःखाच्या भोगवी कोडी ॥ रसनागोडी बाधक ॥ ७२ ॥ रसना आँमिषाची गोडी ॥ लोलुप्यें मीनु गिळी उंडी ॥ सवेंचि गळ टाळू फोडी ॥ मग चरफडी अडकलिया ॥ ७३ ॥ पाहतां रस उत्तम दिसत ॥ भीतरी रोगांचे गळ गुप्त ॥ रस आसक्ती जे सेवित ॥ ते चरफडित भवरोगें ॥ ७४ ॥ गळीं अडकला जो मासा ॥ तो जिता ना मरे चरफडी तैसा ॥ तेवीं रोगू लागल्या माणसा ॥ दुःख दुर्दशा भोगित ॥ ७५ ॥ रसना लोलुप्यें प्रमादी ॥ त्यासि कैंची सुबुद्धी ॥ जन्ममरणें निरँवधी ॥ भोगी त्रिशुद्धी रसदोषें ॥ ७६ ॥ रस सेविलियासाठीं ॥ भोगवी जन्माचिया कोटी ॥ हें नघडे ह्मणसी पोटीं ॥ राया ते गोठी परियेसी ॥ ७७ ॥ इंद्रियांची सजीवता ॥ ते रसनेआधीन सर्वथा ॥ रसँनाद्वारें रस घेतां ॥ उन्मत्तता इंद्रियां ॥ ७८ ॥ मातली जे इंद्रियसत्ता ॥ ते नेऊन घाली अधःपाताः ॥ रसना नँजिणतां सर्वथा ॥ भवँव्यथा चुकेना ॥ ७९ ॥ आहारेंवीण देह नचले ॥ सेविल्या इंद्रियवर्गू खवळे ॥ रसनाजयाचें मूळ कळे ॥ तैं दुःखें सकळें मांवळती ॥१८० ॥ ॥श्लोक॥ ॥इंद्रियाणि जयंत्याशु निराहारा मनीषिणः ॥ वर्जयित्वातु रसनं तन्निरन्नस्य वर्धते ॥ २० ॥ ॥टीका॥ ॥आहार वर्जूनि साधक ॥ इतर इंद्रियें जिंतिलीं देख ॥ तंवतंव रसना वाढे अधिक ॥ ते अजिंक न जिंकवे ॥ ८१ ॥ इंद्रियांसि आहाराचें बळ ॥ तीं निराहारें झालीं विकेळ ॥ तंव तंव रसना वाढे प्रबळ ॥ रसनेचें बळ निरन्नें ॥ ८२ ॥

---

१ स्त्रिया. २ मासा. ३ मांसाची. ४ अपार. ५ जिभेनें. ६ न जिंकिलीअसतां. ७ जन्ममरणाचें दुःख. ८ नाहींसी होतात. ९ व्याकुळ.

॥श्लोक॥ ॥तावज्जितेंद्रियो न स्याद्विजितान्यैंद्रियः पुमान् ॥ न जयेद्रसनं यावज्जितं सर्वं जिते रसे ॥ २१ ॥ ॥टीका॥ ॥निरन्नें इंद्रियें जितिलीं ॥ तीं जिंतिलीं हे मिथ्या बोली ॥ अन्न घेतांचि सरसावलीं ॥ सावध झालीं निजकर्मीं ॥ ८३ ॥ जंव रसना नाहीं जिंकिली ॥ तंव जितेंद्रिय मिथ्या बोली ॥ जैं साचार रसना जिंकिली ॥ तैं वाट मोडिली विषयांची ॥ ८४ ॥ विषयाआंतील गोडपण ॥ रसने आंतील जाणपण ॥ दोहींसी ऐक्य केल्या जाण ॥ रसना संपूर्ण जिंतिली ॥ ८५ ॥ सर्वां गोडियांचें गोड आहे ॥ ते गोडीस जो लागला आहे ॥ त्यासीचि रसना वश्य होये ॥ रस अपायें नबाधिती ॥ ८६ ॥ रसना जिताचें बा धांवणें ॥ तेणें ब्रह्मसायुज्यीं पडे ठाणें ॥ सोहळा परमानंदें भोगणें ॥ रसना जेणें जिंतिली ॥ ८७ ॥ ॥श्लोक॥ ॥पिंगला नाम वेश्यासीद्विदेहनगरे पुरा ॥ तस्या मे शिक्षितं किंचिन्निबोध नृपनंदन ॥ २२ ॥ ॥टीका॥ ॥अवधूत ह्मणे नृपनंदना ॥ वेश्या गुरु म्यां केली जाणा ॥ तिच्या शिकलों ज्या लक्षणा ॥ विचक्षणा अवधारी ॥ ८८ ॥ पूर्वीं विदेहाचे नगरीं ॥ पिंगलानामें वेश्या वास करी ॥ तीशीं आसनिरासेंवरी ॥ वैराग्य भारी उपजलें ॥ ८९ ॥ ॥श्लोक॥ ॥सा स्वैरिण्येकदा कांतं संकेत उपनेष्यती ॥ अभूत्काले बहिर्द्वारि बिभ्रती रूपमुत्तमम् ॥ २३ ॥ ॥टीका॥ ॥ते स्वैरिणी स्वेंच्छाचारी ॥ सायंकाळीं उभी द्वारीं³ ॥ नानाअळंकारअंबरीं⁴ ॥ शृंगारकुमरी शोभत ॥ १९० ॥ आधींच रूप उत्तम ॥ वरी शृंगारिली मनोरम ॥ करावया ग्राम्यधर्म ॥ पुरुष उत्तम पहातसे ॥ ९१ ॥ ॥श्लोक॥ ॥मार्ग आगच्छतो वीक्ष्य पुरुषान्पुरुषर्षभ ॥ तान् शुल्कदान्वित्तवतः कांतान्मेनेऽर्थकामुका ॥ २४ ॥ ॥टीका॥ ॥सगुण सुरूप धनवंत ॥ कामकौशल्यें पुरवीत आंर्त ॥ अर्थ देऊनि करी समर्थ ॥ ऐसा कांत पहातसे ॥ ९२ ॥ ऐकगा पुरुषश्रेष्ठा ॥ पुरुष येतां येतां देखे वाटा ॥ त्यासि खुणावी नेत्रवेंकटा ॥ कामचेष्टा दावूनि ॥ ९३ ॥ ॥श्लोक॥ ॥आगतेष्वपयातेषु सा संकेनोपजीविनी ॥ अप्यन्योवित्तवान्कोपि मामुपैष्यति भूरिदः ॥ २५ ॥ ॥टीका॥ ॥येत्या पुरुषास हाणी खडा ॥ एकासी ह्मणे घ्याजी विडा ॥ डोळा घाली जात्याकडा ॥ एकापुढां भंवरी दे ॥ ९४ ॥ ठेऊनि संकेतीं जीवित⁶ ॥ ऐसे नाना संकेत दावित ॥ पुरुष तिकडे नपाहत ॥ येत जात कार्यार्थी ॥ ९५ ॥ गेल्या पुरुषातें निंदित ॥ द्रव्यहीन हे असक्त ॥ रूपें विरूप अत्यंत ॥ उपेक्षित धिक्कारें ॥ ९६ ॥ आतां येईल विंत्तवंत ॥ अर्थदानी अतिसमर्थ ॥ माझा धरोनियां हात ॥ कामआर्त पुरवील ॥ ९७ ॥ ॥श्लोक॥ ॥एवं दुराशया ध्वस्तनिद्रा द्वार्यवलंबती ॥ निर्गच्छंती प्रविशती निशीथं समपद्यत ॥ २६ ॥ ॥टीका॥ ॥ऐसें दुराशा भरलें चित्त ॥ निद्रा नलगे उद्वेगित ॥ द्वार धरोनि तिष्ठत ॥ काम वांछित पुरुषासी ॥ ९८ ॥ रिघोंजाय घराभीतरी ॥ सांचल ऐकोनि रिघे बाहेरी ॥ रिघतांनि

---

१ अन्न नसाल्यानें. २ आपल्या इच्छेप्रमाणें वागणारी. ३ दरवज्यांत. ४ वस्त्रानें. ५ इच्छा. ६ प्राण. ७ धनवान्. ८ द्वार.

घतां येरझारीं ॥ मध्यरात्री पैं झाली ॥ ९९ ॥ सरली पुरुषाची वेळ ॥ रात्र झाली जी प्रबळ ॥ निद्रा व्यापिले लोक सकळ ॥ पिंगला विव्हळ ते काळीं ॥ २०० ॥ ॥श्लोक॥ ॥तस्या वित्ताशया शुष्यद्वक्त्राया दीनचेतसः॥ निर्वेदः परमो जज्ञे चिंताहेतुः सुखावहः ॥ २७ ॥ ॥टीका॥ ॥तुटला आशेचा जिव्हाळा ॥ सुकले वोंठ वाळला गळा ॥ कळा उतरली मुखकमळा ॥ खेदु आंगळा चिंतेचा ॥ १ ॥ वित्त नयेचि हाता ॥ तेणें ते झाली दीनचित्ता ॥ वैराग्यें परम वाटली चिंता ॥ सुखस्वार्था ते हेतू ॥२॥ ॥श्लोक॥ ॥तस्या निर्विण्णचित्ताया गीतं शृणु यथा मम ॥ निर्वेद आशापाशानां पुरुषस्य यथा ह्यसिः ॥ नह्यंगाजातनिर्वेदो देहबंधं जिहासति ॥२८॥ ॥टीका॥ ॥कैसें वैराग्य उपजलें तिसी ॥ जे चिंतीत होती विषयासी ॥ त्या विटली विषयसुखासी ॥ छेदक आशेसी वैराग्य ॥ ३ ॥ तेणें वैराग्यें विवेकयुक्त ॥ पिंगलेनें गाइलें गीत ॥ तें आइक राया समस्त ॥ चित्तीं सुचित्त होऊनि ॥ ४ ॥ ऐक राया विवेकनिधी ॥ वैराग्य नाहीं ज्याचे बुद्धी ॥ ज्यासि जन्म मरण आधि व्याधी ॥ प्रतिपदीं बाधक ॥ ५ ॥ अनुताप नाहीं ज्यासी ॥ विवेक नुपजे मानसीं ॥ तो संसाराची आंदणी दासी ॥ आशापाशीं बांधिजे ॥ ६ ॥ त्यासि मोहममतेची गाढी ॥ घालिजे देहबुद्धीची बेडी ॥ अहोरात्र विषय भरडी ॥ अर्ध घडी नराहे ॥ ७ ॥ जराजर्जरित वांकले ॥ माजी पडले अखंड लोळे ॥ फुटले विवेकाचे डोळे ॥ मार्ग नकळे विध्युक्त ॥ ८ ॥ त्यासि अव्हासव्हा जातां ॥ अंधकूपीं पडे दुश्चित्ता ॥ तेथूनि निघावया मागुता ॥ उपावो सर्वथा नेणती ॥ ९ ॥ तेथ काया मनें वाचें ॥ निघणें नाहीं जी साचें ॥ तंव फणकाविला लोभविंचें ॥ चढणें त्याचें अनिवार ॥ २१० ॥ तेथ निंदेचिया तिडका ॥ आंत बाहेर निघती देखा ॥ वित्तहानीचा थोर भडका ॥ जळजळ देखा द्वेषाची ॥ ११ ॥ अभिमानाचे आळेपिळे ॥ मोहउमासे येती बळें ॥ तरी विषयदळणें आगळें ॥ दुःखें लोळे गेहसेजे ॥ १२ ॥ ऐशीं अवैराग्यें बापुडीं ॥ पडलीं देहाचे बांदवडीं ॥ भोगितां दुःखकोडी ॥ सबुड बुडीं बुडालीं ॥ १३ ॥ पहापां नीचवर्णासी ॥ निंद्य कर्में निंदिती कैशीं ॥ वैराग्य उपजलें वेश्येसी ॥ देहबंधासी छेदिलें ॥ १४ ॥ देहबंध छेदित्या उक्ती ॥ वेश्या बोलिली नानायुक्ती ॥ झाली पिंगलेसि विरक्ती ॥ चक्रवर्ती परीसपां ॥ १५ ॥ ॥श्लोक॥ ॥पिंगलोवाच ॥ अहो मे मोहविततिं पश्यताविजितात्मनः ॥ या कांतादसतः कामं कामये येन बालिशा ॥ २९ ॥ ॥टीका॥ ॥मिथ्या मोहाचा विस्तार ॥ म्यां वाढविला साचार ॥ माझ्या मूर्खपणाचा पार ॥ पाहतां विचार पांगुळे ॥ १६ ॥ नाहीं अंतःकरणासि नेम ॥ अपार वाढविला भ्रम ॥ असंतपुरुषांचा काम ॥ मनोरम मानितां ॥ १७ ॥ जरी स्त्रीसि पुरुष पाहिजे ॥ तरी जवळील पुरुष नलाहिजे ॥ हेंचि मूर्खपण माझें ॥ सदा भजें असंतां ॥ १८ ॥

---

१ झोपेनें. २ ओलावा. ३ अधोक. ४ भासली. ५ खोल अडांत. ६ लोभरूप विंचवानें. ७ वैराग्य. ८ दुष्टपुरुषांचा.

॥ श्लोक ॥ ॥ संतं समीपे रमणं रतिप्रदं वित्तप्रदं नित्यमिमं विहाय ॥ अकामदं दुःखभयादिशोकमोहप्रदं तुच्छमहं भजेऽज्ञा ॥ ३० ॥

॥ टीका ॥ ॥ सत्पुरुषाची प्राप्ती ॥ जवळी असतां नेणें असती[1] ॥ ज्यासी केलिया रती[2] ॥ कामनिवृत्ती तत्काळ ॥ १९ ॥ काम निवर्त्तवूनि देख ॥ अनिवार पुरवी नित्य सुख ॥ वित्तदाता[3] तोचि एक ॥ अलोलिक पैं देणें ॥ २२० ॥ सकळ ऐश्वर्य निजपदेंसी ॥ संतोषोनि दे रतीसी ॥ रमवूं जाणें नरनारींसी ॥ रमणू सर्वांसी तो एकू ॥ २१ ॥ सांडोनि ऐशिया कांतासी ॥ माझी मूढमती पहा कैशी ॥ नित्य अकामदा पुरुषासीं ॥ कामप्राप्तीसी भजिन्नलें ॥ २२ ॥ आपुला पूर्ण नकरवे काम ॥ ते मज केवीं करिती निष्काम ॥ त्यांचेनि संगें मोहभ्रम ॥ दुःख परम पावलें ॥ २३ ॥ त्यांचेनि सुख नेदवेच[4] मातें ॥ परी झाले दुःखाचेचि दाते ॥ भयशोकआधिव्याधींतें ॥ त्याचेनि सांगातें पावलें ॥ २४ ॥

॥ श्लोक ॥ ॥ अहो मयात्मा परितापितो वृथा सांकेत्यवृत्याऽतिविगर्ह्यवार्त्तया ॥ स्त्रैणान्नरादर्थतृषोनुशोच्यात् क्रीतेन वित्तं रतिमात्मनेच्छती ॥ ३१ ॥

॥ टीका ॥ ॥ जारपुरुषापासोनि सुख ॥ इच्छितें ते मी केवळ मूर्ख ॥ वृथा परितापू[5] केला देख ॥ मज असुख[6] म्यां दीधलें ॥ २५ ॥ स्त्रैण पुरुष ते नराधम ॥ वेश्यागामी त्याहूनि[7] अधम ॥ त्यांत कृपण तो अधमाधम ॥ तयांचा संगम मी वांछितें ॥ २६ ॥ जितुक्या अतिनिंदका वृत्ती ॥ मज आतळतां त्या भीती ॥ योनिद्वारें जीविकास्थिती ॥ नीच याती व्यभिचारू ॥ २७ ॥ अल्प द्रव्य जेणें देणें ॥ त्याची जाती कोण हें नाहीं पाहणें ॥ याहोनि काय लाजिरवाणें ॥ निंदित जिणें पैं माझें ॥ २८ ॥ जया पुरुषासि देह विकणें ॥ तें अत्यंत हीनदीनपणें ॥ काय सांगों त्याचीं लक्षणें ॥ सर्वगुणें अपूर्ण ॥ २९ ॥ वित्त नदेववे कृपणता ॥ काम नपुरवे पुरता ॥ प्रीति नकरवे तत्त्वतां ॥ भेटी मागुता तो नेदी ॥ २३० ॥ ऐशिया पासाँव सुख ॥ वांछितां वाढे परम दुःख ॥ जळो त्याचें न पाहें मुख ॥ वोकारी देख येतसे ॥ ३१ ॥ एवं जारपुरुषाची स्थिती ॥ आठवितां चिळसी येती ॥ पुरेपुरे ते संगती ॥ चित्तवृत्ती वीटली ॥ ३२ ॥

॥ श्लोक ॥ ॥ यदस्थिभिर्निर्मितवंशवश्यस्थूणं त्वचारोमनखैः पिनद्धम् ॥ क्षरन्नवद्वारमगारमेतद्विण्मूत्रपूर्ण मदुपैति कान्या ॥ ३२ ॥

॥ टीका ॥ ॥ नरशरीर गृह सांकडें ॥ आडीं पाखाड्या नुसधीं हाडें ॥ अस्थींच्या मेढी दोहींकडे ॥ वोले कातडेनी मढियेलें[8] ॥ ३३ ॥ त्यासि सर्वांगीं सगळे ॥ दीधले रोमावळीचे[9] खिळे ॥ घालूनि नखाचे खोबळे ॥ अग्रीं अंग बळें बुजिले ॥ ३४ ॥ अस्थि मांस चर्म बांधा ॥ सर्वांगीं आवळूनि दीधला सांदा ॥ रंगीत चर्म रसास्वादा ॥ पुढिले बांधा बांधिली ॥ ३५ ॥ वायुप्रसरणपरिचारें ॥ केलीं प्राणापानरंध्रें ॥ वरिलें डळमळीत शिखरें ॥ वालांकुरें लाविलीं ॥ ३६ ॥ बुजूनि भीतरील सवडी ॥ बांधाटिलें नवनाडी ॥ विष्ठामूत्रांची

---

[1] वेश्या. [2] भोग. [3] धन देणारा. [4] देववत नाहीं. [5] पश्चात्ताप. [6] दुःख. [7] पासून. [8] मढविले. [9] केसाचे.

गाढी ॥ नित्य परवडी सांठवण ॥ ३७ ॥ भीतरिले अवकाशीं ॥ दुर्गंधि ऊठली कैशी ॥ तेचि प्रवाह अहर्निशीं ॥ नवद्वारांसी वाहती ॥ ३८ ॥ अखंड वाहती मळें ॥ देखोनि ज्याचें तो कंटाळे ॥ अहर्निशीं धुतां जळें ॥ कदा निर्मळे ते नव्हती ॥ ३९ ॥ सांगतांचि हे गोष्टी ॥ ओकारी येतसे पोटीं ॥ ऐशियास मी भुलल्यें करंटी ॥ विवेकदृष्टीं[१] नपाहे ॥ २४० ॥ अस्थिमांसाचा कोथळा ॥ विष्ठामूत्रांचा गोळा ॥ म्या आलिंगिला वेळोवेळां ॥ जळो कंटाळा नयेचि ॥ ४१ ॥ ॥श्लोक॥ ॥विदेहानां पुरे ह्यस्मिन्नहमेकैव मूढधीः ॥ याऽन्यमिच्छंत्यसत्यस्मादात्मदात्कामम‍च्युतात् ॥ ३३ ॥ ॥टीका॥ ॥या विदेहाचे नगरीं ॥ मूर्ख मीचि एक देहधारी ॥ हृदयस्थ सांडूनि श्रीहरी ॥ असतां नरीं व्यभिचारु ॥ ४२ ॥ असंत[२] पुरुष नेणों किती ॥ म्यां भोगिले अहोरातीं ॥ सुख नपवेचि[३] निश्चितीं ॥ रति[४] भगवंतीं जंव नाहीं ॥ ४३ ॥ जो निकटवर्ती हृदयस्थ ॥ पुरुषीं पुरुषोत्तम अच्युत ॥ वीर्यच्युतीवीण रमत ॥ संतोषें देत निजात्मता ॥ ४४ ॥ अच्युतें ज्यासि निज सुख दीधलें ॥ तें सुख च्यवेना कांहीं केलें ॥ ऐशिया हृदयस्था विसरलें ॥ आणिका भुललें अकामदा ॥ ४५ ॥ अकामद नाशवंत ॥ त्यासी संग केलिया दुःखचि देत ॥ कैसें माझें मूर्ख चित्त ॥ त्यासी आसक्त पैं होतें ॥ ४६ ॥ त्या आसक्तीची झाली तडातोडी ॥ लागली अच्युतसुखाची गोडी ॥ ज्याचें सुख भोगितां चढोवढी ॥ घडियाघडी वाढतें ॥ ४७ ॥ ॥श्लोक॥ ॥सुहृत्प्रेष्ठतमो नाथ आत्मा चायं शरीरिणाम् ॥ तं विक्रीयात्मनैवाहं रमेऽनेन यथा रमा ॥ ३४ ॥ ॥टीका॥ ॥जो सोयरा माझा हृदयस्थू ॥ सुख प्रीति प्रिय अच्युतू ॥ तोचि सर्वात्मा सर्वगतू ॥ नाथ कांतू तो माझा ॥ ४८ ॥ त्यासीच आपुलें संवसाटी ॥ विकत घेईन उठाउठी ॥ परमानंदें देईन मिठी ॥ गोठी चावटी सांडोनी ॥ ४९ ॥ रमा झाली पायांची दासी ॥ मी भोगीन अनारिसी ॥ सर्वकाळ सर्वदेशीं ॥ सर्वरूपेंसी सर्वस्वें ॥ २५० ॥ ॥श्लोक॥ ॥कियत्प्रियं ते व्यभजन् कामा ये कामदा नरः ॥ आद्यंतवंतो भार्याया देवा वा कालविद्रुताः ॥ ३५ ॥ ॥टीका॥ ॥सांडूनि हृदयस्था अच्युतातें ॥ वरावें वरा नरदेवातें ॥ तंव ते द्वैतभयें भयचकितें ॥ कालग्रस्तें सर्वदा ॥ ५१ ॥ जे निजभयें सर्वदा दुःखी ॥ ते भार्येसि काय करिती सुखी ॥ अवघीं पडलीं काळमुखीं ॥ नदिसे येलोकीं सुखदाता ॥ ५२ ॥ असो नराची ऐशी गती ॥ वरू[५] अमरांमाजी अमरपती ॥ वेळांत ते चौदा निमती ॥ पदच्युती अमरेंद्रा ॥ ५३ ॥ एवं सुर नर लोक लोकीं ॥ आत्ममरणें सदा दुःखी ॥ ते केवीं भार्येसि करिती सुखी ॥ भजावें मुर्खीं तेठायीं ॥ ५४ ॥ धन्य माझी भाग्यप्राप्ती ॥ येचिक्षणीं येचिरातीं ॥ झाली विवेकवैराग्यप्राप्ती ॥ रमापती[६] तुष्टला[७] ॥ ५५ ॥ ॥श्लोक॥ ॥नूनं मे भगवान्प्रीतो विष्णुः केनापि मर्मणा ॥ निर्वेदोऽयं दुराशाया यन्मे जातः सुखावहः ॥ ३६ ॥ ॥

---

[१] विचारदृष्टीनें. [२] दुष्ट. [३] पावले नाहीं. [४] प्रीति. [५] थोर. [६] विष्णु. [७] संतुष्टझाला.

॥टीका॥ ॥येजन्मीचें माझें कर्म ॥ पाहतां केवळ निंद्य कर्म ॥ मज तुष्टला पुरुषोत्तम ॥ पूर्वजन्मसामग्रीं ॥ ५६ ॥ मज कैंचें पूर्वजन्मीं साधन ॥ ज्याचें नाम पतितपावन ॥ कृपाळू जो जनार्दन ॥ त्याचें कृपेनें हें घडलें ॥ ५७॥ दुष्ट दुराशा व्यभिचारु ॥ भगद्वारा चालवीं संसारू ॥ तिसि मज वैराग्ययुक्त विचारू ॥ विष्णु साचारु तुष्टला ॥ ५८ ॥ जरी असतें पूर्वसाधन ॥ तरी निंद्य नव्हतें मी आपण ॥ योनिद्वारा कर्माचरण ॥ पतित पूर्ण मी एक ॥ ५९ ॥ यापरी मी पूर्ण पतित ॥ पतितपावन जगन्नाथ ॥ तेणें कृपा करून येथ ॥ केलें विवेकयुक्त वैरागी ॥ २६० ॥ तेणें वैराग्य विचारें देख ॥ दुष्टदुराशेचें फिटलें दुःख ॥ मज झालें परम सुख ॥ निजसंतोख पावलें ॥ ६१ ॥ हें दुःख आदळतां अंगासी ॥ वैराग्य नुपजे[1] अभाग्यासी ॥ भगवंतें कृपा केली ऐशी ॥ दुःखें निजसुखासी दीधलें ॥ ६२ ॥ ॥श्लोक॥ ॥मैवं स्युर्मंदभाग्यायाः क्लेशा निर्वेदहेतवः ॥ येनानुबंधं निर्हृत्य पुरुषः शमम्टच्छति ॥ ३७॥ ॥टीका॥ ॥अंगीं आदळतां दुःखद्वंद्व ॥ अभाग्यासि ये प्रळयक्रोध ॥ थिता विवेक होय अंध ॥ भाग्यमंद ते जाणा ॥ ६३ ॥ दुःख देखतांचि दृष्टीं ॥ ज्यासि विवेक वैराग्य उठी ॥ तेणें छेदूनियां सुहृदस्नेहगांठी ॥ पावे उठाउठी निजपद ॥ ६४ ॥ पुरुषासि परमनिधान ॥ विवेकयुक्त वैराग्य जाण ॥ तेणें होऊनियां प्रसन्न ॥ समाधान पावती ॥ ६५॥ मी पूर्वीं परम अभाग्य ॥ महापुरुषांचें जें निजभाग्य ॥ तें भगवंतें दीधलें[2] वैराग्य॥ जाहलें श्लाघ्य[3] मी तिहीं लोकीं ॥ ६६ ॥ ॥श्लोक॥ ॥तेनोपकृतमादाय शिरसा ग्राम्यसंगताः ॥ त्यक्त्वा दुराशाः शरणं व्रजामि तमधीश्वरम् ॥ ३८ ॥ ॥टीका॥ ॥कृपा करोनि भगवंतें ॥ निजवैराग्य दीधलें मातें ॥ तेणें सांडविलें दुराशेतें ॥ ग्राम्य विषयांते छेदिलें ॥ ६७ ॥ तो उपकार मानोनियां माथां ॥ त्यासि मी शरण जाईन आतां ॥ जो सर्वाधीश नियंता ॥ त्या कृष्णनाथा मी शरण ॥ ६८ ॥ ॥श्लोक॥ ॥संतुष्टा श्रद्दधत्येतद्यथालाभेन जीवती ॥ विहराम्यमुनैवाहमात्मना रमणेन वै ॥ ३९ ॥ ॥टीका॥ ॥शरण गेलिया पाठी ॥ सहज संतुष्ट मी ये सृष्टीं ॥ स्वभावें सत्श्रद्धा[4] पोटीं ॥ जीविका गांठीं अदृष्ट ॥ ६९ ॥ मुनीश्वर भोगिती निजात्मा ॥ त्या मी भोगीन आत्मया रामा ॥ जो काम पुरवी निष्कामकामा ॥ तो परमात्मा वल्लभू[5] ॥ २७० ॥ ब्रह्मादिक समर्थ असती ॥ ते सांडूनियां निश्चितीं ॥ भगवद्भजनाची स्थिती ॥ अतिप्रीती कां ह्मणसी ॥ ७१ ॥ मजसारिखिया दुराचारी ॥ जडजीवांते उद्धरी ॥ तारकु तोचि भवसागरीं ॥ स्वामी श्रीहरी कृपाळु॥ ७२ ॥ ॥श्लोक॥ ॥संसारकूपे पतितं विषयैर्मुषितेक्षणम्॥ग्रस्तं कालाहिनाऽऽत्मानं कोऽन्यस्त्रातुमधीश्वरः ॥ ४० ॥ ॥टीका॥ ॥संसारलक्षण कूप अंध ॥ तेथ विषयदृष्टीं विषयांध ॥ पडोनि गेले अंधांध ॥ बुद्धिमंद उपायीं ॥ ७३ ॥ ते कल्पनाजळीं बुडाले ॥ वास

---

[1] उत्पन्न होत नाहीं. [2] दिले. [3] स्तुति करण्यास योग्य. [4] चांगली श्रद्धा. [5] आवडता.

नाकल्लोळीं कवळले ॥ दंभमदादिजळचरीं तोडिलें ॥ तृष्णेच्या पडले कर्दमीं[1] ॥ ७४ ॥ दुःखाच्या खडकीं आदळले ॥ स्वर्गपायरीस अडकले ॥ तेथूनिही एक पडले ॥ निर्बुजले भवजळें ॥ ७५ ॥ नास्तिकें गेलीं सबुड बुडीं ॥ कर्मठीं धरिल्या कर्मदरडी ॥ वेदबाल्य तीं बापुडीं ॥ पडलीं देव्हडीतळवटीं ॥ ७६ ॥ निंदेचे शूळ कांटे ॥ फुटोनि गेले उफराटे ॥ द्वेषाचे पाथर मोठे ॥ हृदय फुटे लागतां ॥ ७७ ॥ कामाची उकळी प्रबळ ॥ भीतरूनि बाहेरि ये सबळ ॥ तेणें डहुळलें तें जळ ॥ होय खळबळ जीवासी ॥ ७८ ॥ सुटले क्रोधाचे चिरे ॥ वरी पडल्या उरी नुरे ॥ वनितामगरीं[2] नेलें पूरें ॥ विवरद्वारें आतौतें ॥ ७९ ॥ तेथ अवघियांसि एकसरें ॥ गिळिलें काळें काळअजगरें ॥ विखें घारलें थोर घोरें ॥ ज्ञान पाठिमोरें सर्वांसी ॥ २८० ॥ सर्प चढलिया माणुसा ॥ गूळ कडू लागे कैसा ॥ निंब खाय घसघसा ॥ गोड गूळसा ह्मणोनी ॥ ८१ ॥ केवळ विषप्राय[3] विषय कडू ॥ तो प्रपंचिया झाला गोडू ॥ अमृतप्राय परमार्थ गोडू ॥ तो जाहला कडू विषयिकां ॥ ८२ ॥ कूपाबाहेरी वास ज्यांसी ॥ ते नदेखती कूपासी[4] ॥ कूपांतले बाहेरिलांसी ॥ कदाकाळेंसी नदेखती ॥ ८३ ॥ ऐसियां पीडतयां जीवांसी ॥ काढावया धिवसा नव्हे कोण्हासी ॥ तुजवांचोनि हृषीकेशी ॥ पाव वेगेंसी कृपाळुवा ॥ ८४ ॥ एवं दुःखरूप पतितां ॥ हृदयस्थु भगवंतु त्राता[5] ॥ धांव पाव कृष्णनाथा ॥ भवव्यथा[6] निवारी ॥ ८५ ॥ ऐसें जाणोनि तत्त्वतां ॥ त्याच्या चरणा शरण आतां ॥ शरण गेलिया सर्वथा ॥ सहज भवव्यथा निवारे[7] ॥ ८६ ॥ ॥श्लोक॥ ॥आत्मैव ह्यात्मनो गोप्ता निर्विद्येत यदाखिलात् ॥ अप्रमत्त इदं पश्येद्ग्रस्तं कालाहिना जगत् ॥ ४१ ॥ ॥टीका॥ ॥ऐसें कळलें जी तत्त्वतां ॥ येथ आपणचि आपणिया त्राता ॥ सर्वपदार्थीं सर्वथा ॥ निर्वेदता[8] दृढ झालें ॥ ८७ ॥ दृढ वैराग्यता ते ऐशी ॥ विषयो टेंकल्या अंगासी ॥ चेतना नव्हे इंद्रियांसी ॥ निद्रितापासी जेवीं रंभा ॥ ८८ ॥ अथवा वमिलिया[9] अन्ना ॥ जेवीं वांछिना रसना ॥ तेवीं विषय देखोनि मना ॥ नधरी वासना आसक्ती ॥ ८९ ॥ तें वैराग्य कैसेनि जोडे ॥ तरी सावधान पाहतां रोकडें ॥ जग काळें गिळिलें चहूंकडे ॥ वेगळें पडे तें नाहीं ॥ २९० ॥ पिता पितामह काळें नेले ॥ पुत्र पौत्रां काळें गिळिलें ॥ वैराग्य नुपजे येणें बोलें ॥ तरी नागवले नरदेहा ॥ ९१ ॥ मृत्युलोक याचें नांव ॥ अनित्य स्वर्गाची काइसी हांव ॥ वैराग्येंवीण निर्दैव ॥ झाले सर्व सर्वथा ॥ ९२ ॥ ॥श्लोक॥ ॥ब्राह्मणउवाच ॥ एवं व्यवसितमतिर्दुराशां कांततर्षजाम् ॥ छित्त्वोपशममास्थाय शय्यामुपविवेश सा ॥ ४२ ॥ ॥टीका॥ ॥अवधूत ह्मणे यदूसी ॥ धन्य भाग्य तये वेश्येसी ॥ वैराग्य उपजलें तिशीं ॥ विवेकेंसी निजोत्तम ॥ ९३ ॥ एवं विवंचूनि निजबुद्धी ॥ परमपुरुषदुराशा छेदी ॥ ज्याचेनि संगें आधिव्याधी ॥ बहु उपाधी बाधक ॥ ९४ ॥

---

[1] चिखलांत. [2] स्त्रीरूप माशानें. [3] विषरूप. [4] अडास. [5] रक्षणकरणारा. [6] संसाराचें दुःख. [7] नाहींसी होईल. [8] वैराग्य. [9] ओकलेल्या.

जे उपाधीचेनि कोडें ॥ जन्ममृत्यूंचा पूर चढे ॥ दुःखभोगाचें सांकडें[1] ॥ पाडी रोकडें जीवासी ॥ ९५ ॥ येणें वैराग्यविवेकबळें ॥ छेदूनि
दुराशेचीं मूळें ॥ उपरमु पावली एके वेळे ॥ निजात्मसोहळे ते भोगी ॥ ९६ ॥ नित्य सिद्ध सुखदाता ॥ तो हृदयस्थ कांत आश्रयिता ॥
विकल्प सांडूनि चित्ता ॥ वेगीं हृदयस्था मानली ॥ ९७ ॥ त्यासि देखतां अनुभवाचे दिठीं ॥ ऐक्यभावें घातली मिठी ॥ निजसुख पावला
गोरटी ॥ उठाउठी तत्काळ ॥ ९८ ॥ बोल घेऊनि गेला बोली ॥ लाज लाजोनियां गेली ॥ दृश्यद्रष्टादशा ठेली ॥ वाट मोडिली विषयाची
॥ ९९ ॥ सुखें सुखावलें मानस ॥ तें सुखरूप झालें निःशेष ॥ संकल्पविकल्प पडले वोस ॥ दोघां सावकाश निजप्रीती ॥ ३०० ॥
नावद पडलिया उदकांत ॥ विरोनि तया गोड करित ॥ तेवीं निराशीं पावोनि भगवंत ॥ समरसत स्वानंदें ॥ १ ॥ तेथ हेतूसि नाहीं
ठावो ॥ निमाला[2] भावाभावो ॥ वेडावला अनुभवो ॥ दोघां प्रीति पहाहो अनिवार ॥ २ ॥ सांडूनि मीतूंपणासी ॥ क्षेम दीधलें समरसीं
॥ मग समाधीचिये शेजेशी ॥ निजकांतेंसी पहुडली ॥ ३ ॥ झणी मायेची लागे दिठी ॥ यालागीं स्फूर्तीचिये कोटी ॥ निंबलोण
गोरटी ॥ उठाउठी ओंवाळी ॥ ४ ॥ ऐशी समाधिशेजेशी ॥ पिंगला रिघे निजसुखासी[3] ॥ अवधूत ह्मणे यदूसी ॥ वैराग्यें वेश्येसी उपरमु
॥ ५ ॥ वैराग्यें छेदिले आशापाश ॥ पिंगला झाली गा निराश ॥ निराशेसि असमसाहस ॥ सुख संतोष सर्वदा ॥ ६ ॥ ॥श्लोक॥
॥ आशा हि परमं दुःखं नैराश्यं परमं सुखम् ॥ यथा संछिद्य कांताशां सुखं सुष्वाप पिंगला ॥ ४३ ॥ ॥टीका॥ ॥ आशा तेथ लोलुपता ॥
आशेपासी असे दीनता ॥ आशा तेथ ममता ॥ असे सर्वथा नाचती ॥ ७ ॥ आशेपासी महाशोक ॥ आशा करवी महादोख ॥ आशेपासी
पाप अशेख[4] ॥ असे देख तिष्ठत ॥ ८ ॥ आशेपासी अधर्म सकळ ॥ आशा मानीना विटाळ ॥ आशा नेणे काळवेळ ॥ कर्म
सकळ उच्छेदी ॥ ९ ॥ आशा अंत्यजातें उपासी ॥ नीचसेवन आशेपासी ॥ आशा नसांडी मेल्यासी ॥ प्रेतापाशी नेतसे ॥ ३१० ॥
आशा उपजली अनंतासी ॥ नीच वामनत्व आलें त्यासी ॥ आशें दीन केलें देवांसी ॥ कथा कायसी इतरांची ॥ ११ ॥ जगाचा जो
नित्य दाता ॥ तो आशेनें केला भिकेसवता ॥ वैऱ्याचे द्वारीं झाला मागता ॥ द्वारपाळता तेणें त्यासी ॥ १२ ॥ आशा तेथ नाहीं सुख ॥
आशेपासी परम दुःख ॥ आशा सर्वांसी बाधक ॥ मुख्य देख ते आशा ॥ १३ ॥ ज्याची आशा निःशेष जाये ॥ तोचि परम सुख[5] लाहे ॥
ब्रह्मादिक वंदिती पाये ॥ अष्टमा सिद्धि राहे दास्यत्वें ॥ १४ ॥ निराशेचा शुद्धभावो ॥ निराशेपासी तिष्ठे[6] देवो ॥ निराशेचें वचन पहाहो ॥
रावो देवो नुल्लंघो ॥ १५ ॥ निराश तोचि सद्बुद्धि ॥ निराश तोचि विवेकनिधी[7] ॥ चारी मुक्ती पदोपदीं ॥ नैराश्य आधीं वंदिती ॥ १६ ॥

---

१ संकट. २ नाहींसा झाला. ३ आत्मसुखास. ४ सगळे. ५ ब्रह्मानंद. ६ राहतो. ७ विचाराचा समुद्र.

निराशा तीर्थांचें तीर्थ ॥ नैराश्य[1] मुमुक्षूचा अर्थ ॥ निराशेपाशीं परमार्थ॥ असे तिष्ठत निरंतर ॥ १७॥ जाण नैराश्यतेपाशीं॥ वैराग्य हो
ऊनि असे दासी ॥ निराश पहावया अहर्निशीं ॥ हृषीकेशी चिंतितू ॥ १८ ॥ निराश देखोनि पडे दुःख ॥ निराशेमाजी नित्यसुख ॥
निराशेपाशीं संतोख[2] ॥ यथासुखें क्रीडतू ॥ १९ ॥ नैराश्येचे भेटीसि पाहों ॥ धांवे वैकुंठींचा रावो ॥ नैराश्याचा सहज स्वभावो ॥ महा
देवो उपासी ॥ ३२० ॥ निराशेपाशीं नये आधी ॥ निराशेपाशीं सकळ विधी ॥ सच्चिदानंदपदीं॥ मिरवे त्रिशुद्धी निराशू ॥ २१ ॥ ऐ
कोनि निराशेच्या नांवा ॥ थोरला देवो घेत असे धांवा ॥ त्यासि देवोनियां खेंवा ॥ रूपनांवा विसरला ॥ २२ ॥ ते निराशेचा जिव्हा
ळा ॥ पावोनि वेश्या पिंगला ॥ जारपुरुषाशेच्या मूळा ॥ स्वयें समूळा छेदिती झाली ॥ २३ ॥ जें आशापाशाचें छेदन ॥ तेंचि समा
धीचें निजस्थान ॥ ते निजसमाधी पावोन ॥ पिंगला जाण पहुडली[3] ॥ २४ ॥ सर्ववर्णांमाजी वोखटी ॥ कर्म पाहतां निंद्य दृष्टीं ॥ ते
वेश्या पावन[4] झाली सृष्टीं ॥ माझे वाक्पुटीं कथा तिची ॥ २५ ॥ यालागीं वैराग्यापरतें ॥ आन साधन नाहीं येथें ॥ कृष्ण थापटी उद्ध
वातें ॥ आह्लादचित्तें प्रबोधी ॥ २६ ॥ अवधूत सांगे यदूसी ॥ प्रत्यक्ष वेदबाह्यता वेश्येसी ॥ ते निराश होतां मानसीं ॥ निजसुखा
सी पावली ॥ २७ ॥ यालागीं कायावाचाचित्तें ॥ उपासावें निराशेतें ॥ यापरतें परमार्थातें ॥ साधन येथें असेना ॥ २८ ॥ इतर जि
तकीं साधनें ॥ तितुकीं असे निराशेकारणें ॥ ते निराशा साधिली जेणें ॥ परमार्थ तेणें लुटिला ॥ २९ ॥ कृपा आकळिलें अवधूता
सी ॥ यदूसि धरोनि पोटासी ॥ निराशता हे जे ऐशी ॥ अवस्थतेसी साधावी॥ ३३० ॥ एका जनार्दना शरण ॥ त्याची कृपा परिपूर्ण ॥
तोचि आशापाश छेदून ॥ समाधान पावला ॥ ३३१ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे यद्ववधूतसंवादे एकाकारटीका
यां अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ मूळश्लोक ॥ ४३ ॥ ॥ ओंव्या ॥ ३३१ ॥ ॥ एवंसंख्या ॥ ३७४ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

[1] आशा सोडणें. [2] संतोष. [3] निजली. [4] पवित्र.

## अध्याय ९ वा.


श्रीदत्तात्रय.
यदुराजा.
अवधूतानें गुरु केले.
कोळी
कुंभारीण.
टिटवी
लोहार
मुलगा.
मुलगी.

श्रीगणेशाय नमः॥ ॥ ॐनमो सद्गुरु अमरपती[१] ॥ अनुभवूं तोचि ऐरावती ॥ स्वानंदमदें भद्रजाती ॥ उन्मत्तस्थितीं डुल्लत ॥ १ ॥ उपदेशाचें वज्र तीख[२] ॥ छेदी संकल्पविकल्पपांख ॥ जडजीव ते पर्वत[३] देख ॥ निजस्थानीं सम्यक स्थापिसी ॥ २ ॥ विवेकाचे पारिजात ॥ वैराग्य सुमनीं घमघमित ॥ मुमुक्षुभ्रमर रिघोनि तेथ ॥ आमोद[४] सेविती चित्सुख ॥ ३ ॥ उपशम तोचि बृहस्पती ॥ विश्वासें तुझा निकटवर्ती[५] ॥ त्यासि मानिसी अतिप्रीतीं ॥ तो सभेप्रती सदस्य[६] ॥ ४ ॥ कृपाकामधेनूंचीं खिल्लारें ॥ श्रद्धावत्सांचेनि हुंकारें ॥ वोळल्या वोरसाचेनि भरें॥ तें दुभतें पुरे भाग्यवंता ॥ ५ ॥ सतेज चिंतामणीचे खडे ॥ सभोंवती लोळती चहूंकडे ॥ भक्त न पाहती तयांकडे ॥ चरणसुरवाडें सुखावले ॥ ६ ॥ स्वर्गांगना[७] अष्टमासिद्धी ॥ तुजपुढें नाचती नानाछंदीं ॥ त्यांतें दास नपाहती त्रिशुद्धी ॥ मंदबुद्धी भाळले ॥ ७॥ समसाम्यें समान ॥ अढळ तुझें सिंहासन ॥ सच्चिदानंदाची गादी जाण ॥ तेथें सुखासन पैं तुझें ॥ ८ ॥ पावावया तुझिया पदप्राप्ती ॥ साधनचतुष्टय संपत्ती ॥ जोडूनियां याजक[८] यजिती ॥ प्रत्यगावृत्तीचेनि योगें ॥ ९ ॥ जे मन होमिताति सावधानीं ॥ ऐसें भक्तभजन देखोनी ॥ तेणें भावार्थयोगें संतोषोनी ॥ निजपददानी तूं होशी ॥ १० ॥ त्यासि निजात्मता देऊनी ॥ बैसविती निजासनीं ॥ मरणेंवीण अमर[९] करूनी ॥ अपतनीं स्थापिसी ॥ ११ ॥ इंद्रा अहल्येशीं व्यभिचारू ॥ तुज वृंदेशीं दुराचारू ॥ इंद्र जाहला सहस्रनेत्रू ॥ तूं सर्वांगें सर्वत्रू देखणा ॥ ॥ १२ ॥ इंद्रासि दैत्य करिती दीन ॥ त्याचें पद घेती हिरोन ॥ तुज भक्त करिती प्रसन्न ॥ पद चिह्न ते घेती ॥ १३ ॥ ककुत्स्थ बैसला इंद्राचे स्कंधीं ॥ दूर्वास बैसला तुझ्या खांदीं ॥ इंद्र वर्ते विष्णूचे बुद्धी ॥ तूं भक्तछंदीं वर्तसी ॥ १४ ॥ रावणें बंदीं घातलें इंद्रासी ॥ तुज बळीनें राखिलें द्वारासी ॥ इंद्र याची यागअवदानासी ॥ तूं भूमिदानासी याचिता ॥ १५ ॥ इंद्रासि अग्निमुखें प्राप्ती ॥ तुज विश्वतोमुखीं तृप्ती[१०] ॥ ऐसा सद्गुरू तूं कृपामूर्ती ॥ अमरचक्रवर्ती गुरुराया ॥ १६ ॥ तुझी करावी विनवणी ॥ तंव तेथें नरिघे वाणी ॥ वाणीप्रकाश तुझेनी ॥ वक्ता वदनीं तूं सत्य ॥ १७ ॥ एका एक जनार्दनीं ॥ तो जनार्दन वक्ता वदनीं ॥ ऐसा वचनामाजी प्रवेशोनी ॥ ग्रंथकरणी करविता ॥ १८ ॥ तेथें मुळीं निमाली अहंता ॥ अहं[११] दवडूनि तूं कवि कर्ता ॥ एका जनार्दनु अभंगी सुता ॥ अभंगता गुरुचरणीं ॥ १९ ॥ त्या गुरुचरणप्रतापें ॥ गुरूचीं लक्षणें विदगदें ॥ वाखाणिलीं यथाबोधें ॥ यदुसंवादें अवधूतें ॥ २० ॥ मागे अष्टमाध्यायाच्या अंतीं ॥ असतां पिंगलेसि एकांतीं ॥ विवेक[१२] वैराग्यनिवृत्ती ॥ निजसुखप्राप्ती पावली ॥ २१ ॥ जंवजंव अपरिग्रह[१३] होणें ॥ तंवतंव निजसुख[१४] पाव

---

[१] इंद्र. [२] तीक्ष्ण, धारलाविलेले. [३] डोंगर. [४] सुगंध. [५] जवळ रहाणारा. [६] सभासद. [७] अप्सरा. [८] याज्ञिक. [९] मृत्युरहित. [१०] संतोष. [११] अहंकार. [१२] विचार. [१३] निरुपाधि. [१४] आत्म्याचे सुख.

णें ॥ हेंचि प्रस्तुत बोलणें ॥ तेणें ब्राह्मणें बोलिजे ॥ २२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ब्राह्मणउवाच ॥ ॥ परिग्रहो हि दुःखाय यद्यत्प्रियतमं नृणाम् ॥
अनंतं सुखमाप्नोति तद्विद्वान्यस्त्वकिंचनः ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ ब्राह्मण ह्मणे रायासी ॥ परिग्रहो जयापाशी ॥ वाढतें दुःख तयासी ॥
॥ १ ॥ अहर्निशीं चढोवढी ॥ २३ ॥ कुटुंबपरिग्रहाचे आसक्ती ॥ कपोता निमाला[1] दुर्मती ॥ आतां एकाकी परिग्रहो करिती ॥ तेही पावती
दुःखातें ॥ २४ ॥ गृहपरिग्रहें गृहस्था ॥ पाषाणमृत्तिकेची ममता ॥ काडीकारणें कलहो करितां ॥ सुहृदता सांडिती ॥ २५ ॥ निःसंगा
परिग्रहो लागला कैसा ॥ शिष्यसंप्रदायें घाली फांसा ॥ शास्त्रपुस्तकसंग्रहवशा ॥ वाढवी आशा मठाची ॥ २६ ॥ त्या मठशिष्यांचें
सांत्वन ॥ करितां अत्यंत होय दीन ॥ मग परिग्रहाचें उपशमन ॥ अपरिग्रही जाण करिताती ॥ २७ ॥ त्या मठाचिया आशा ॥
शिष्यसंप्रदायवशा ॥ कलहो लागे आपैसा[2] ॥ विरोधू संन्यासा परिग्रहें ॥ २८ ॥ परिग्रहो जिणोनि गाढा ॥ लंगोटी त्यजूनि जाहला उघडा
॥ नागवे माथां घेऊनि घडा ॥ लाविल्या झाडा शिंपित ॥ २९ ॥ त्या वृक्षाचें कोणी पान तोडी ॥ त्यासि आक्रोशें कलह मांडी॥
थोर परिग्रहाची सांकडी ॥ दुःखें पीडी सर्वांतें ॥ ३० ॥ आवडीं केला जो परिग्रहो ॥ तोतो उपजवी[3] दुःकलहो ॥ हा होतांही अनुभवो॥
वैराग्य पहाहो उपजेना ॥ ३१ ॥ ऐशी परिग्रहाची कथा ॥ देखोनि देखणा जो ज्ञाता ॥ आसक्ती सांडोनि सर्वथा ॥ अकिंचनपंथा
लागला ॥ ३२ ॥ प्रपंच अनित्य नाशवंत ॥ तेथील संग्रह काय शाश्वत[4] ॥ ऐसें विवंचूनि समस्त ॥ अकिंचनचित्त ते जाहले ॥ ३३ ॥
परिग्रहामाजी गाढा ॥ देह परिग्रहाचा खोडा ॥ मिथ्यात्वें फोडी रोकडा ॥ तो विवेकें गाढा ज्ञातापैं ॥ ३४ ॥ जेथ देहपरिग्रह मिथ्या
जाहला ॥ तो अनंतसुखाच्या घरा आला ॥ त्या सुखासी अंत नवचे केला ॥ त्या पावला निजसुखा ॥ ३५ ॥ परिग्रहो दुःखवंतू ॥ हाहा
करूनि गुरुत्वें वृत्तांतू ॥ तुज सांगेन साद्यंतू ॥ उपहासें अवधूतू बोलिला ॥ ३६ ॥ तंव राजा मनीं चमत्कारला ॥ ह्मणे मी राज्यपरिग्रहें
गुंतला ॥ देहपरिग्रहें बंदीं पडला ॥ पाहिजे केला हा त्यागू ॥ ३७ ॥ ऐसा राजा वैराग्यु ॥ करूं पाहे सर्वत्यागु ॥ श्रवणें जाहला तो
सभाग्यु[5] ॥ होय योग्यु निजज्ञाना ॥ ३८ ॥ करूनि गुरुत्वें जाणा ॥ परिग्रहत्यागविवंचना ॥ आणावया जी मना ॥ सादर श्रवणा करीतसे
॥ ३९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सामिषं कुररं जघ्नुर्बलिनो ये निरामिषाः ॥ तदामिषं परित्यज्य स सुखं समविंदत ॥ २ ॥ ॥ टीका ॥
कुरर बोलिजे टिटवा ॥ पावला आमिष कवळूं बरवा ॥ तेणें तेथेंचि भक्षावा ॥ तो लोभ स्वभावा ठेविला ॥ ४० ॥ तें आमिष[6] देखोनियां ॥ ॥ १ ॥
फार ॥ बळी जे निरामिष कुरर ॥ ते धांविन्नले अतिसत्वर ॥ लहान थोर मिळोनी ॥ ४१ ॥ हिरोनि घेऊं पाहती बळें ॥ हें जाणो

---

[1] मरण पावला. [2] आपले आपण. [3] उत्पन्न करितो. [4] नित्य. [5] दैववान. [6] मांस.

निर्यां तो पुढें पळे ॥ पळतां देखोनि एकवेळे ॥ त्वरें तत्काळें वेढिला ॥ ४२ ॥ त्या आमिषाचिया चाडा ॥ थोर मांडला झगडा ॥ मारूं लागले फडफडां ॥ चहूंकडां निष्ठुर ॥ ४३ ॥ एक झडपिती पांखीं ॥ एक चपेटे हाणिती नखीं ॥ एक विदारिती[1] मुखीं ॥ परमदुःखी होत से ॥ ४४ ॥ आमिषकवळें गुंतलें मुख ॥ मारितां देऊंनशके हाक ॥ खस्ताबस्त करितां देख ॥ बोलावया मुख त्या नाहीं ॥ ४५ ॥ हे माझे स्वजाती पहाहो ॥ सांडोनियां सुहृद्भावो[2] ॥ मज कां करूं आले अपावो[3] ॥ तो अभिप्रावो विवंची ॥ ४६ ॥ ह्मणे माझिया दुःखासि मूळ ॥ मजपाशील आमिषकवळ ॥ तो त्यजोनियां तत्काळ ॥ सुखी सुनिश्चळ बैसला ॥ ४७ ॥ जेथें आमिषकवळु पडे ॥ तेथें कलहाचा गोंधळ मांडे ॥ परस्परें फुटती मुंडें ॥ ठेंचिती तोंडें येरयेरां ॥ ४८ ॥ आमिष त्यजोनि बैसला देख ॥ तो पाहे कलहाचें कौतुक ॥ मूळपरिग्रहो तेथें दुःख ॥ परम सुख त्यागितां ॥ ४९ ॥ माड्या गोपुरें धवळारा ॥ धनधान्य नानाअंबरा[4] ॥ रत्नें प्रवाल धनपुत्रदारा ॥ हा समुदायो खरा परिग्रहो ॥ ५० ॥ या समस्तपरिग्रहाचें मूळ ॥ देहबुद्धीगा केवळ ॥ तेही अभिमानें सबळ ॥ एवं सर्वांसी मूळ अभिमानू ॥ ५१ ॥ तो अभिमानूं जैं सांडे ॥ तैं प्रपंचाचें मूळ खंडे ॥ मूळ छेदिल्या जेवीं उलंडे ॥ अतिप्रचंडें तरुवर[5] ॥ ५२ ॥ अभिमान देहबुद्धिजीवन ॥ देहबुद्धि संगास्तव गहन ॥ उभयसंगू तो आयतन[6] ॥ निवासस्थान परिग्रहो ॥ ५३ ॥ एवं अन्योन्य सापेक्षक ॥ येरयेरां आवश्यक ॥ याचे त्यागीं परमसुख ॥ अतिदुःख तो परिग्रहो ॥ ५४ ॥ परिग्रहत्यागाचें मूळ जाण ॥ आधीं त्यजावा अभिमान ॥ तेणेंवीण त्यागु तो विटंबन ॥ केल्या जाण होईल ॥ ५५ ॥ अभिमानसहित सकळ सांडे ॥ तैं पडती सुखाचे पायमांडे ॥ तें सुख नबोलवे तोंडें ॥ शब्द मुरडे लाजोनी ॥ ५६ ॥ अभिमान जाऊन वर्तण ॥ कैसें राया ह्मणसी जाण ॥ तें अर्भक[7] गुरुत्व लक्षण ॥ तुज संपूर्ण सांगेन ॥ ५७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ न मे मानावमानौ स्तो न चिंता गेहपुत्रिणाम् ॥ आत्मक्रीड आत्मरतिर्विचरामीह बालवत् ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ बाल माझें तुझें नह्मणे ॥ उंच नीच कांहीं ह्मणों नेणे ॥ यालागीं मानापमान तेणें ॥ सुखें साहणे[8] सर्वथा ॥ ५८ ॥ तिमासाचेनि बाळकें ॥ मानू कोण हें नोळखे ॥ अभिमानू तोही नदेखे ॥ आपुलेनि सुखें क्रीडत ॥ ५९ ॥ दुजेपणातें[9] नातळे ॥ बालक आपुलियाचि लीलें ॥ आप आपणियाशीच खेळे ॥ आपुलेनि मेळे आपण ॥ ६० ॥ देहगेहांची चिंता ॥ बाळासि नांतळे[10] सर्वथा ॥ स्वभावेंचि निश्चिंतता ॥ चिंताकथा त्या नाहीं ॥ ६१ ॥ नदेखतां दुजी स्थिती ॥ बाळका आपुली आपणिया प्रीती ॥ आपुली आपणिया अतिरती ॥ तैशी गती योगियां ॥ ६२ ॥ योगियासी प्रपंचाचें भान[11] ॥ सत्यत्वें नाहीं जाण ॥ यालागीं मानापमान ॥ दोन्ही समान तयासी ॥ ६३ ॥ चि

---

१ फाडितो. २ प्रेमभाव. ३ अपाय. ४ वस्त्र. ५ वृक्ष. ६ ठिकाण. ७ बालक. ८ सहन करणे. ९ वेगळेपणास. १० होत नाही. ११ भास.

त्रींचेनि सापें खादला[1] ॥ तो चित्रींचेनि अमृतें वांचला ॥ तेवीं जिण्या मरण्या सुकला[2] ॥ निश्चळ ठेला निर्द्वंद्व ॥ ६४ ॥ गृहदारापुत्रचिंता ॥ हे समूळ मिथ्या वार्ता ॥ स्वदेहो सत्यत्वें असता ॥ तरी करूं लाहता चिंतेतें ॥ ६५ ॥ भवमूळ कल्पना जाण ॥ ते कल्पना मनाआधीन ॥ तें मन स्वरूपीं जाहलिया लीन ॥ तेव्हां वस्तु चिद्घन सर्वत्र ॥ ६६ ॥ तेणें स्वरूपानुसंधानें ॥ सुखें क्रीडतू चिद्घनें ॥ क्रीडा दैवयोगें करणें ॥ देहाभिमानें विरहित ॥ ६७ ॥ पावोनि निजसुखप्राप्ती ॥ मनादि इंद्रियें उपरमती ॥ अणुभरी स्फुरेना वृत्ती ॥ समाधि बोलती यानाव ॥ ६८ ॥ तेचि स्वरूपीं ठेवूनि मन ॥ बाह्यस्फूर्तीचें स्फुरेना भान ॥ ते दशा गा व्युत्थान ॥ साधुजन बोलती ॥ ६९ ॥ उंबऱ्यावरी ठेविला दिवा ॥ तो जेवीं देखे दोहीं सवा ॥ तैसी व्युत्थानदशा जीवभावा ॥ उभयस्वभावां देखणी ॥ ७० ॥ लवण जळा समरसता ॥ तेवीं स्वरूपीं निरवूनि चित्ता ॥ समाधि व्युत्थाना हाणी लाथा ॥ निजीं निजस्वरूपता पावोनी ॥ ७१ ॥ त्यासि कोणाचा मानापमान ॥ गृहपुत्रचिंता करी कोण ॥ स्वरूपीं हारपलें[3] मन ॥ निजसमाधान पावला ॥ ७२ ॥ मनेंवीण जें विहरण ॥ तें बालकाच्या ऐसें जाण ॥ दैवयोगें चलनवलन ॥ वृत्तिशून्य वर्तत ॥ ७३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ द्वावेव चिंतया मुक्तौ परमानंद आप्लुतौ ॥ यो विमुग्धो जडो बालो यो गुणेभ्यः परंगतः ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ थोर चिंतेचा आवर्त[4] ॥ जेथ ब्रह्मादिक बुडत ॥ ते आवर्तीं दोघे मुक्त ॥ परीस निश्चित यदुवीरा ॥ ७४ ॥ दोघां नाहीं द्वैतभान ॥ दोघे नेणती मानापमान ॥ दोघे सुखें सुखसंपन्न ॥ दोघे मनेंवीण वर्तती ॥ ७५ ॥ एकासि पुढें भेटेल दुःख ॥ दुजेनि जिंतिलें सुखदुःख ॥ एकासि मुग्धतेचें सुख ॥ दुजा देख निजज्ञान ॥ ७६ ॥ पाहतां बालकाचे ठायीं ॥ गुप्तवासना असे देहीं ॥ ते अंकुरीजोनि पाही ॥ अवश्य अपायीं[5] घालील ॥ ७७ ॥ तैसा नव्हे योगिया गुणातीत ॥ जो पूर्णानंदें पूर्ण भरित ॥ त्यासि सुखदुःखांची मात ॥ नाहीं जगांत सर्वथा ॥ ७८ ॥ देहीं दिसे जीव वर्तत ॥ तो केवीं जाहला गुणातीत ॥ ऐसें ह्मणसी तो वृत्तांत[6] ॥ ऐक साद्यंत सांगेन ॥ ७९ ॥ साधकें सेवूनि साधुजन ॥ वाढविला सत्वगुण ॥ वाढलेनि सत्वें जाण ॥ ज्ञानसाधन साधिलें ॥ ८० ॥ साधिलेनि ज्ञानसाधनें ॥ छेदी रजतमांचीं विंदानें ॥ जें मोहममतेचीं दारुणें ॥ उभय भोगजन्यें कर्मठां ॥ ८१ ॥ एवं वाढलेनि सत्वोत्तमें ॥ निर्दळलीं रजतमें ॥ सत्व एकलेपणें निमे[7] ॥ स्वयें उपशमे तें जाणा ॥ ८२ ॥ जंवजंव काष्ठसंभार असे ॥ तंवतंव अग्नि जाळी उल्हासें ॥ सरलेनि काष्ठलेशें ॥ अग्नि प्रवेशे निजतेजीं ॥ ८३ ॥ ऐसी जिणोनि[8] गुणावस्था ॥ योगी पावला गुणातीतता ॥ त्यासि नबाधी भवव्यथा ॥ प्रलयकल्पांता जाहलिया ॥ ८४ ॥ ज्या सुखासि नाहीं अंत ॥ तें सुख स्वरूपें जाहलें प्राप्त ॥ ते देहीं

---

[1] खालला. [2] मुराले. [3] नाहोसे झाले. [4] भवरा. [5] संकटांत. [6] कथा. [7] नाहीसा होतो. [8] जिंकून.

वर्ततां देहातीत ॥ चिंताआवर्त त्यां नाहीं ॥ ८५ ॥ एकाकी जाहल्यावीण तत्त्वतां ॥ ते अवस्था नं[1]चढे हाता ॥ येचिविशीं नृपनाथा ॥ कुमारीगुरुकथा सांगेन ॥ ८६ ॥ श्लोक ॥ ॥ क्वचित्कुमारी त्वात्मानं वृणानान्गृहमागतान् ॥ स्वयं तानर्हयामास क्वापि यातेषु बंधुषु ॥ ५ ॥ टीका ॥ कोणीएक कुमारीसी ॥ घरीं राखण ठेऊनि तिसी ॥ पितामाता स्वगोत्रेंसी ॥ गेलीं यात्रेसी कुळदेवा ॥ ८७ ॥ ते कुमारीचें विवाहलग्न ॥ पूर्वीं नेमिलें जाण ॥ त्या निश्चयालागीं ब्राह्मण ॥ घरा संपन्न पैं आले ॥ ८८ ॥ पुसती घरीं आहे कोण ॥ लाजें नोवरी धरी मौन ॥ त्यांसि नदेतां दर्शन ॥ पूजाविधान ते मांडी ॥ ८९ ॥ वां[3]तायनद्वारा आसनें ॥ दिधलीं समस्तांकारणें ॥ गंधाक्षता सुं[4]मनें पानें ॥ दिधले मौनें उपचार ॥ ९० ॥ देखोनि पूजेचें विधान ॥ जाणोंसरले ते ब्राह्मण ॥ घरीं नोवरीचि आहे जाण ॥ हें चतुरलक्षण तियेचें ॥ ९१ ॥ त्यांच्या पाहुणेराची चिंता ॥ उशिरा येईल माझी माता ॥ तेकाळीं साळी सडितां ॥ विलंब सर्वथा होईल ॥ ९२ ॥ ॥ श्लोक ॥ तेषामभ्यवहारार्थं शालीन् रहसि पार्थिव ॥ अवघ्नंत्याः प्रकोष्ठस्थाश्चक्रुः शंखाः स्वनं महत् ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐसें विचारूनि जाण ॥ साळी कांडूनि घे आपण ॥ ते कंडणकाळींचें विंदान ॥ चतुरलक्षण परियेसी ॥ ९३ ॥ घावो घालितां कांडणा ॥ उठी झणत्कार करकंकणा ॥ तेणें नादें लाजोनि जाणा ॥ विचारु मनामाजी करी ॥ ९४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सा तज्जुगुप्सितं मत्वा महती व्रीडिता ततः ॥ बभंजैकैकशः शंखान् द्वौद्वौ पाण्योरशेषयत् ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ या शंखवलयांचा ध्वँ[5]नी ॥ पडेल पाहुण्यांचे कानीं ॥ ते अत्यंत लाज मजलागूनि ॥ नववधू कांडणीं बैसली ॥ ९५ ॥ त्यांच्या कानीं ध्यानीं नपडे ॥ कांडणतरी चाले पुढें ॥ ऐसें विचारोनि रोकडें ॥ कांकणाकडे पाहिलें ॥ ९६ ॥ पाहतां दिसे ते अबला ॥ विचार वृद्धाहोनि आगळा ॥ करींचा कंकण खळाळा ॥ युक्ती वेल्हाळा विभागी ॥ ९७ ॥ जरी कंकण फोडूं आतां ॥ तरी ते मुहूर्तींच अशुभता ॥ शतायु हो माझा भर्ता ॥ नफोडी सर्वथा हा हेतू ॥ ९८ ॥ अतिबुद्धिमंत ते कुमारी ॥ हळूचि कंकणें उतरी ॥ ते ठेवी जतनेवरी ॥ राखे दोंकरीं दोनी दोनी ॥ ९९ ॥ दोनी कंकणें उरवूनी ॥ कांडूं बैसली कांडणीं ॥ दोहींमाजी उठे ध्वनी ॥ ऐकोनि काँ[6]नीं लाजिली ॥ १०० ॥ ॥ श्लो० ॥ उभयोरप्यभूद्घोषो ह्यवघ्नंत्याः स्म शंखयोः ॥ तत्राप्येकं निरभिददेकस्मान्नाभवद्ध्वनिः ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ ॥ ह्मणे दोघांचा संगु एके स्थानीं ॥ तेथें सर्वथा नँ[7]राहे ध्वनी ॥ दोंतील एक वेगळें काढोनी ॥ बैसे कांडणीं कुमारी ॥ १ ॥ एकपणीं कांडितां ॥ ध्वनी नुठेचि तत्त्वतां ॥ तो उपदेशू नृपनाथा ॥ जाहलों शिकता मी तेथ ॥ २ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अन्वशिक्षमिमं तस्या उपदेशमरिंदम ॥ लोकाननुचरन्नेतॉंल्लोकतत्त्वविवित्सया ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ जिणोनि प्रतिस्प

---

१ मिळत नाहीं. २ करी. ३ खिडकीवाटे. ४ फुलें. ५ शब्द. ६ कानानें. ७ रहात नाहीं.

र्थीं भूपाळ ॥ किंकरें केले राजे सकळ ॥ तूं अरिमर्दन सबळ ॥ मिथ्या केवळ तो गर्व ॥३॥ कामक्रोधादि अरिवर्ग ॥ न जिणतां सकळ सांग ॥ अरिमर्दन हा बोल व्यंग ॥ होईल चांग ये अर्थीं ॥४॥ कामादिक सहा वैरी ॥ येणें उपदेशें शस्त्रधारीं ॥ जिणोनि घालितां तोडरीं ॥ मग संसारीं अरि नाहीं ॥ ५ ॥ लोकांविगळा तूं अवधूतू ॥ ह्मणसी कुमारी ते घरा आंतू ॥ तो एकांतींचा वृत्तांतू ॥ कैसेनि प्राप्त तुज जाहला ॥ ६ ॥ राहोनियां विजनस्थानीं ॥ विश्वासोनि गुरुवचनीं ॥ दृढबैसोनि आसनीं ॥ निजतत्त्व ध्यानीं आकळिलें ॥ ७ ॥ त्याचि तत्त्वनिश्चयालागुनी ॥ मी विचरतसें ये मेदिनीं ॥ निजात्मभावें जनीं वनीं ॥ दृढ करोनि पाहतसें ॥ ८ ॥ होतां दृश्येंसी भेटी ॥ दृश्य दृश्यत्वें न पडे मिठी ॥ द्रष्टेपणही घालोनि पोटीं ॥ ऐशिया दृष्टीं विचरत ॥ ९ ॥ अंगीं करितां गुरुत्वगुण ॥ देखतां जगाचें दर्शन ॥ मज होतसे चैतन्यभान ॥ ऐसेंन जाण मी विचरत ॥ ११० ॥ ऐशिया निजदृष्टीं विचरा ॥ मजं विचरतां चराचरा ॥ अवचटें कुमारीमंदिरा ॥ त्याचि अवसरा मी आलों ॥ ११ ॥ करितां कंकणविवंचना ॥ निजस्वार्थाचिया खुणा ॥ पाहोनि घेतलें ज्या लक्षणा ॥ ते विचक्षणा परियेसी ॥१२॥ ॥ श्लोक ॥ ॥ वासे बहूनां कलहो भवेद्वार्ता द्वयोरपि ॥ एक एव चरेत्तस्मात्कुमार्या इव कंकणः ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ जेथ होय बहुतांची वस्ती ॥ तेथ अनिवार कलहप्राप्ती ॥ दोघे बैसल्या एकांतीं ॥ वार्ता करिती बहुविधा ॥१३॥ जेथें गोष्टीखालीं काळू जाये ॥ तेथें निजस्वार्थू होंनलाहे ॥ यालागीं मी पाहें ॥ विचरत आहें एकाकी ॥१४॥ एकाकी एकाग्रता साधिल्या थोर लाभू ये हातां ॥ येचविषयीं शरकर्ता ॥ गुरु तत्वतां म्यां केला ॥ १५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मन एकत्र संयुज्याज्जितश्वासो जितासनः ॥ वैराग्याभ्यासयोगेन ध्रियमाणमतंद्रितः ॥ ११ ॥ टीका ॥ ॥ वैराग्येंवीण अभ्यासु घडे ॥ तेथ विषयचोर उठती गाढे ॥ कामाचा घाला पडे ॥ मुद्दल बुडे निजज्ञान ॥ १६ ॥ विवेकदीप करूनि धुरे ॥ निरसी अज्ञानाचे अंधारे ॥ वैराग्याचें बळ पुरें ॥ महामुद्रेचेनि योगें ॥ १७ ॥ प्राणापानांची चुकामुकी ॥ जाहली होती बहुकाळ कीं ॥ ते अभ्यासबळें एकाएकी ॥ केली वोळखी देघांसी ॥१८॥ वोळखीसवेंचि जाण ॥ पावली जुनाट पहिली खुण ॥ दोघां पडिलें आलिंगन ॥ समाधान समसाम्यें ॥ १९ ॥ दृढ बैसोनि आसनीं ॥ ऐशी प्राणापानमिळणी ॥ करूनि लाविली निशाणी ॥ ब्रह्मस्थानीं रिघावया ॥ १२० ॥ ब्रह्मगिरीचिया कडा ॥ शमदमें घालोनियां वेढा ॥ प्रत्याहाराचा झगडा ॥ पुढिले कडा लाविला ॥ २१ ॥ प्राणापानांच्या विवरीं ॥ पहिली वोळखी होती खरी ॥ माळ लाविली अभेदकरीं ॥ मन एकाग्रीं राखोनि ॥ २२ ॥ एकाग्रतेचेनि कल्लोळें ॥ पुढारें नढळवे चालिले बळें ॥ उल्हाटयंत्राचेनि मेळें ॥ षट्चक्रपाळें भेदिलें ॥ २३ ॥ वैराग्याचीं वज्रकवचें ॥ निधडे वीर लेऊनि साचे ॥ एकाग्रताबळें बळाचें ॥ झळकें ध्यानाचें करीं

---

१ चाकर. २ शत्रूंचा नाश करणारा. ३ शत्रूंचा समूह. ४ एकांत ठिकाणीं. ५ एकाएकी. ६ बाण करणारा. ७ निघण्याकरितां. ८ भांडण. ९ त्यांचेंत.

खड्ग ॥ २४ ॥ नवल खड्गचा वाहो ॥ लहान थोर निपटी पहाहो ॥ संमुख आलिया संदेहो ॥ न लगतां घावो छेदित ॥ २५ ॥ निर्दाळूनि आळसासी ॥ दासी केलें निद्रेसी ॥ ऐसें सावधान अहर्निशीं ॥ योगदुर्गासी झोंबती ॥ २६ ॥ रणरंगींचे वीर गाढे ॥ निजबळें[3] चालिले पुढें ॥ सत्रावीचें पाणी वाढे ॥ जितलें रोकडें महावीरीं ॥ २७ ॥ येथ युद्ध जाहलें चांग[4] ॥ कामादिक अरि षड्वर्ग ॥ रणीं पाडिले अमोघ ॥ सतेज खड्ग झळकत ॥ २८ ॥ ऐसे वैरी पाडूनि रणीं ॥ प्राशिलें सतरावीचें पाणी ॥ तंव अनुहताची सुडावणी ॥ दुर्गामधोनि ऊठली ॥ २९ ॥ तेथ सोहंवीराची एकाग्रता ॥ होतां भीतरील भेदू आला हातां ॥ दुर्ग राखती अहंममता ॥ मरों सर्वथा टेंकली ॥ १३० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यस्मिन्मनो लब्धपदं यदेतच्छनैः शनैर्मुंचति कर्मरेणून् ॥ सत्वेन वृद्धेन रजस्तमश्च विधूय निर्वाणमुपैत्यनिंधनम् ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ कामक्रोधादि महाशूर ॥ पुत्र रणां पडले थोर ॥ तेणें दुःखें अतिजर्जर ॥ मरणतत्पर दिसताती ॥ ३१ ॥ ऐसी ऐकोनि दुर्गाची वार्ता ॥ उल्हासु वीरांचिया चित्तां ॥ उठावा दीधला मागुता ॥ दुर्ग सर्वथा घ्यावया ॥ ३२ ॥ निजधैर्यें वीर अदट ॥ निजसत्वें अतिउद्धट ॥ पुढें निर्धारितां वाट ॥ थोर अचाट देखिलें ॥ ३३ ॥ कर्मरेणूंचा दुर्धर घाट ॥ विधिवादें अवघड वाट ॥ हळूहळू उल्लंघितां अचाट ॥ समूळ सपाट तो केला ॥ ३४ ॥ पुढां रजतमांचें आगड ॥ खोलपणें अत्यंत गूढ ॥ घालूनि निवृत्तीचे दगड ॥ सत्वें सुदृढ बूजिलें ॥ ३५ ॥ साचलू नव्हतां बाहेरी ॥ जिणोनि मनकर्णिकावोवरी ॥ माळ चढविली ब्रह्मगिरी ॥ ब्रह्मरंध्रीं उसळले ॥ ३६ ॥ तेथ जैताची एक घायी ॥ अनुहत निशाण लागलें पाही ॥ शोधितां पारखें[6] कोणी नाहीं ॥ केलें ठायीं स्ववश[7] ॥ ३७ ॥ तेथ रजतमांच्या वाटा ॥ सहजें जाहल्या सपाटा ॥ हरिखें रामराज्याचा चोहटा ॥ धेंडे दारवंटा पीटिले ॥ ३८ ॥ परिकें कोणी नपडे दृष्टी ॥ ध्यानखड्गची सोडिली मुष्टी ॥ वैराग्यकवचाचिया गांठी ॥ समदृष्टीं सोडिल्या ॥ ३९ ॥ ध्येय ध्यान ध्याता ॥ त्रिपुटी नदिसे पाहतां ॥ ध्यानखड्ग तत्त्वतां ॥ नधरी सर्वथा याहेतू ॥ १४० ॥ दारुण युद्धसामग्री ॥ सत्वें[8] केली होती भारी ॥ ते साधनें सांडिलीं दुरी ॥ कोणी वैरी असेना ॥ ४१ ॥ तन्मयतेचें छत्र धरूनी ॥ समसाम्यसिंहासनीं ॥ बैसला सहज समाधानी ॥ त्यागी वोंवाळूनी जीवभावो ॥ ४२ ॥ शोधित वाढला सत्वगुण ॥ तेणें सर्वस्वें केलें निंबलोण ॥ पायां लागोनि आपण ॥ स्वयें जाण उपरमला[9] ॥ ४३ ॥ जैसा अग्नि असे काष्ठाच्या मेळीं ॥ मंथिल्या काष्ठाची करी होळी ॥ काष्ठ नाशूनि तत्काळीं ॥ त्यजूनि इंगळीं उपशमे ॥ ४४ ॥ तैसें वाढोनि सत्व उत्तम ॥ नाशूनि सांडी रजतम ॥ पाठी सत्वाचाही संभ्रम ॥ स्वयें उपरम पावला ॥ ४५ ॥ तेथें निमालें जीवाचें जीवपण ॥ ज्ञातृत्वेंसी निमालें ज्ञान ॥ निमालें प्रपं

---

१ तलवार. २ नाहींसें करतें. ३ आपल्या बळानें. ४ चांगलें. ५ मोठा. ६ दुसरें. ७ आपले स्वाधीन. ८ सत्वगुणानें. ९ शांत झाला.

चाचें भान[1] ॥ चिन्मात्र पूर्ण कोंदलें ॥ ४६ ॥ ॥श्लोक॥ ॥तदैवमात्मन्यवरुद्धचित्तो न वेद किंचिद्बहिरंतरं वा ॥ यथेषुकारो नृपतिं व्रजं
तमिषौ गतात्मा न ददर्श पार्श्वे ॥ १३॥ टीका॥ ॥ऐसी चिन्मात्र परिपूर्णता ॥ तेथ निरोधूनि आणितां चित्तां ॥ चित्त पावे चैतन्यता ॥ जा
ण सर्वथा नरवीरा ॥ ४७ ॥ तेव्हां अंतरीं चैतन्यघन ॥ बाह्य चिन्मात्र परिपूर्ण ॥ आणिक न दिसे गा जाण ॥ वृत्तीनें आण[2] वाहिली
॥ ४८ ॥ पाहतां ध्येय ध्याता ध्यान ॥ जेथ उल्हासें विगुंतलें मन ॥ ते संप्रज्ञातसमाधी जाण ॥ गुणेंवीण भोगिती ॥ ४९ ॥ तेथ निःशेष
समरसे मन ॥ जाहला सुखरूप चिद्घन ॥ ते समाधी परम कारण ॥ विचक्षण बोलती ॥ १५० ॥ ब्रह्म इंद्रियां गोचर नसे ॥ गुण गेलि
या डोळां दिसे ॥ हें अनुभव्यासीचि भासे ॥ बोलावें ऐसें तें नव्हे ॥ ५१ ॥ येथ शास्त्रें विषम जाहलीं वादें ॥ नेतिनेति ह्मणीतलें वेदें ॥
थोंटावलीं योगिवृंदें ॥ अनुभवी निजबोधें जाणती ॥ ५२ ॥ तेथ हेतुमात्र दृष्टांतू ॥ समूळ बुडाला समस्तू ॥ अद्वैतवादाची मातू ॥ ज्या
ठायांतू लाजिली ॥ ५३ ॥ सबाह्य समदर्शन ॥ हे अनुभवाची निर्वाण खुण ॥ शरकार[3] गुरु केला जाण ॥ हेंचि लक्षण लक्षूनी ॥५४॥
तावूनि उजू करितां बाण ॥ दृढ लागलें अनुसंधान ॥ इतुकेंन प्रपंचाचें भान ॥ खुंटलें जाण तयाचें ॥ ५५ ॥ निःसाण भेरी वाजंतरें ॥
रथ गज सैन्यसंभारें ॥ राजा गेला अतिगजरें ॥ नेणिंजे[4] शरकारें शरदृष्टीं ॥ ५६ ॥ मागूनि रायाचा हेंडपी[5] आला ॥ तो पुसे ये मार्गीं
राया गेला ॥ येरु ह्मणे नाहीं देखीला ॥ गेलाकीं नगेला कोण जाणे ॥ ५७ ॥ तो शरकारू देखिला दृष्टीं ॥ हे ऐकोनि तयाची गोष्टी ॥
जगीं एकाग्रता मोठी ॥ प्रपंच दृष्टीं येवों नेदी ॥ ५८ ॥ हेंचि साधावया साधन ॥ गृहारंभेवीण एकपण ॥ सर्प गुरु केला जाण ॥ हेंचि
लक्षण देखोनि ॥ ५९ ॥ ॥ श्लोक ॥ एकचार्यनिकेतः स्यादप्रमत्तो गुहाशयः ॥ अलक्ष्यमाण आचारैर्मुनिरेकोऽल्पभाषणः ॥ १४ ॥
॥ टीका ॥ ॥ सर्प सांघातू न साहे ॥ एकाकीं सुखें विचरत जाये ॥ सदा सावधान राहे ॥ श्वासू वाये जावो नेदी ॥ १६० ॥ तैसीच यो
गियांची गती ॥ न साहे[6] द्वैताची संगती ॥ एकाकी वसे एकांतीं ॥ जनाप्रती अलक्ष्य ॥ ६१ ॥ विषमाचा संगू न करी ॥ परी समाचाही
संगू न धरी ॥ निघे देहसंगाबाहेरी ॥ त्वचेचेपरी[7] सर्पाचे ॥ ६२ ॥ सदा सावधानबुद्धी ॥ लवनिमेष वायां जावों नेदी ॥ अनुसंधान त्रि
शुद्धी ॥ तुटोंनेदी सर्वथा ॥ ६३ ॥ सर्प बिळामाजी रिघे बळें ॥ मार्गीं मागू देखती सकळें ॥ धाला भुकेला हें त्यां न कळे ॥ गेला कळे स
र्वांशीं ॥ ६४ ॥ तैसाचि योगियाही योगबळें ॥ नराहे जनामाजी जनमेळें ॥ गुहेमाजी पडिला लोळे ॥ एकला खेळे एकपणीं
॥ ६५ ॥ होकां योगियांचा आचार ॥ करितां देखती लहान थोर ॥ सविकल्पनिर्विकल्प विचार ॥ नकळे साचार कोणासी ॥ ६६ ॥ एक

---

[1] अनुभव. [2] शपथ. [3] बाण करणारा. [4] समजत नाहीं. [5] चाकर. [6] सहन करीत नाहीं. [7] कातेसारखें.

ह्मणती कर्मठ ॥ एक ह्मणती कर्मभ्रष्ट ॥ एक ह्मणती आत्मनिष्ठ ॥ कळेना स्पष्ट कोणासी ॥ ६७ ॥ सर्पास बोलणेंचि नाहीं ॥ बोले तरी अल्प कांहीं ॥ तैसाच योगिया पाही ॥ वाग्वादीं नाहीं सादर ॥ ६८ ॥ आंतुलें[1] कृपेचेनि बळें ॥ बोले मृदु मंजुळ कोंवळें ॥ श्रवणासि दोंदे एक वेळे ॥ तेणें वचनमेळें निघाली ॥ ६९ ॥ बोलणें तरी अति अल्प ॥ परी छेदी संकल्पविकल्प ॥ त्याच्या बोलाचें स्वरूप ॥ सत्यसंकल्प जाणती ॥ १७० ॥ जो एकाकी उदास ॥ ज्याचें परमार्थी मानस[2] ॥ तेणें गृहारंभाची आस[3] ॥ वृथा प्रयास न करावे ॥ ७१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ गृहारंभोऽतिदुःखाय विफलश्चाध्रुवात्मनः ॥ सर्पः परकृतं वेश्म प्रविश्य सुखमेधते ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ मुळीं गृहारंभ तें दुःख ॥ कष्ट करितां दुःखकारक ॥ निपजविलें त्रिमाळिक ॥ तें अध्रुव[4] देख सर्वथा ॥ ७२ ॥ जेथें संसारचि नाशवंत ॥ देह प्रत्यक्षाकारें असंत ॥ तेथींचें गृह काय शाश्वत[5] ॥ मूर्ख मानित सत्यत्वें ॥ ७३ ॥ जें गर्भींच निमालें ॥ तें उपजतां जातक केलें ॥ मृताचें जन्मनांव ठेविलें ॥ तैसें गृह केलें असंत ॥ ७४ ॥ तोही असंतू आरंभ कुडा ॥ मृत्तिकेसाठीं लावी झगडा ॥ भांडवी दगडासाठीं लांकुडा ॥ सुहृदभिडा सांडोनी ॥ ७५ ॥ वोळंबा घर करी सायासें ॥ त्यामाजी सर्प राहे सावकाशें ॥ न शिणतां अप्रयासें ॥ परघरवासें संतुष्ट ॥ ७६ ॥ तैसाचि योगियाही जाण ॥ न धरी देहगेहअभिमान ॥ परगृहीं वसे[6] निरभिमान ॥ सुखसंपन्न सर्वदा ॥ ७७ ॥ एकही गृह न करावें ॥ हें सत्य मानिलें जीवें ॥ एवढी सृष्टि केली देवें ॥ बांधूं नपवे त्या केवीं ॥ ७८ ॥ सृष्टि रचिली कैसेनी ॥ निपजली कोणापासूनी ॥ येचि अर्थीं गुरु कांतिणी ॥ लक्षण लक्षूनि म्यां केली ॥ ७९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एको नारायणो देवः पूर्वसृष्टं स्वमायया ॥ संहृत्य कालकलया कल्पांत इदमीश्वरः ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ नराचें आश्रयस्थान ॥ यालागीं बोलिजे नारायण ॥ जीवाचें तोचि जीवन ॥ स्वामी नारायण सर्वांचा ॥ १८० ॥ ऐसा एक नारायण ॥ तेणें पूर्वीं जग सृजिलें[7] जाण ॥ उपकरणसामग्रीवीण ॥ केलें निर्वाण जगाचें ॥ ८१ ॥ एकलेनि सामग्रीवीण ॥ केवीं केलें जग संपूर्ण ॥ स्वमाया क्षोभवूनि जाण ॥ करी निर्माण जगाचें ॥ ८२ ॥ तें निजमायेच्या पोटीं ॥ असंख्यजीवसामग्रीच्या कोटी ॥ ते माया अवलोकिली दृष्टीं ॥ तोचि उठाउठी निजकाळू ॥ ८३ ॥ ऐशी निजमाया अवलोकिली ॥ ते निजांगावरी[8] नांदविली ॥ परी अंगीं लागों नाहीं दीधली ॥ हे अलिप्तता केली तो जाणे ॥ ८४ ॥ धुई दाटली आकाशीं ॥ आकाश नातळे धुईशी ॥ तैसी निजांगें वागवूनि मायेसी ॥ अलिप्त तियेसी वर्ततू ॥ ८५ ॥ उदकें कमळणी वाढिन्नली[9] ॥ ते जळ आवरी निजदळीं ॥ तैसी माया आनंदू आकळी ॥ चित्सत्ता मोकळी संदेशेंसी ॥ ८६ ॥ स्वमायेसि

---

१ मनांतोल. २ मन. ३ आशा. ४ क्षणिक. ५ नित्य. ६ राहतो. ७ उत्पन्न केलें. ८ आपल्या देहावर. ९ वाढली.

जो अधिष्ठान ॥ मायेसि नांदावया तोचि भुवन ॥ एवं मायानियंता नारायण ॥ सत्य जाण सर्वथा ॥ ८७ ॥ रजोगुण स्रजी[1] सृष्टीशी ॥
सत्वगुण प्रतिपाळी तिसी ॥ कल्पांतीं क्षोभोनि तमोगुणासी ॥ काळरूपेंसी ॥ संहारी ॥ ८८ ॥ हे मायेची क्षोभक शक्ती ॥ असे नारायणाचे
॥ ५ ॥ हातीं ॥ यालागीं संहारिता अंतीं ॥ ईश्वरू ह्मणती याहेतू ॥ ८९ ॥ ॥ श्लोक ॥ एक एवाद्वितीयोऽभूदात्माधारोऽखिलाश्रयः ॥
कालेनात्मानुभावेन साम्यं नीतासु शक्तिषु ॥ १७ ॥ सत्वादिष्वादिपुरुषः प्रधानपुरुषेश्वरः ॥ परावराणां परम आस्ते कैवल्यसंज्ञितः ॥
केवलानुभवानंदसंदोहो निरुपाधिकः ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ ॥ एवं संहारोनि कार्य कारण ॥ एक अद्वितीय नारायण ॥ एकपणें परिपूर्ण ॥
गुणागुण निरसोनि[2] ॥ १९० ॥ एकला एकू नारायण ॥ हेंही तेथ ह्मणे कोण ॥ हें अद्वितीयलक्षण ॥ भेदशून्य अवस्था ॥ ९१ ॥ विजातीय
भेद तेठायीं ॥ नसे सजातीय भेदू कांहीं ॥ स्वगतभेदू तोही नाहीं ॥ भेदशून्य पाहीं ये रीतीं ॥ ९२ ॥ ऐसा अभेदू जो साचारू ॥ तोचि
प्रकृतिपुरुषांचा ईश्वरू ॥ नियंता तो परावरू ॥ तोहि निर्धारू परियेसी ॥ ९३ ॥ प्रकृति पुरुष दोन्ही ॥ कल्पिलीं जेणें अमन मनीं ॥ तो
ईश्वर होय भरंवसेनि[3] ॥ त्याचे सामर्थ्यैंकरूनि वर्तती ॥ ९४ ॥ प्रकृतीतें चेतवी सत्ता ॥ तेचि याची पुरुषता ॥ यालागीं प्रकृतीचा
भर्त्ता ॥ होय सर्वथा हाचि एकू ॥ ९५ ॥ पर जे अजप्रमुख ॥ अवर मनुमुख्य स्थावरांतक ॥ यांचा नियंता तो देख ॥ सर्वचाळक
सर्वांचा ॥ ९६ ॥ ज्याचे आज्ञेवरी पाहे ॥ सैरा वायू जाऊं नलाहे ॥ समुद्र वेळेमाजी राहे ॥ सूर्य वाहे दिनमान ॥ ९७ ॥ ज्याची
आज्ञा करूनि प्रमाण ॥ बारा अंगुळे विचरे प्राण ॥ परता जाऊं नशके जाण ॥ आज्ञेभेण सर्वथा ॥ ९८ ॥ आज्ञा जाणोनि
धडफुडी ॥ मेरू बैसका[4] नसोडी ॥ चेतना आज्ञा करी गाढी ॥ अचेतन कुडी चेतवी ॥ ९९ ॥ तो स्वयें तंव निराधार ॥ परी जाहला विश्वासि
आधार ॥ जेवीं सर्पाभास दोर ॥ दिसे साचार आश्रयो ॥ २०० ॥ सत्वादिक ज्या गुणशक्ती ॥ आवरूनि निज काळगती ॥ समत्वा
आणिल्या स्थिती ॥ निजप्रकृती माझारी ॥ १ ॥ तेहि प्रकृती उपरमोनि ॥ राहिली असे निर्गुणस्थानीं ॥ जेवीं वटबीजीं[5] सामावोनी
॥ केवळपणीं राहिला ॥ २ ॥ तैसा उपाधि गिळूनि सकळ ॥ निरुपाधिक केवळ ॥ जेवीं काढिलिया मंदराचळ ॥ राहे निश्चळ क्षीराब्धी
॥ ३ ॥ नाना अलंकारठसे ॥ घातलिया जेवीं मुसें ॥ पूर्वरूप सोनें जैसें ॥ होय तैसें केवळ ॥ ४ ॥ नाना नक्षत्रावलोकू ॥ निज
तेजें लोपी अर्कू[6] ॥ तैसा उपाधि गिळूनि एकू ॥ निरुपाधिकू उरलासे ॥ ५ ॥ होकां ग्रीष्माच्या अंतीं ॥ बीजें लीन होती क्षितीं ॥ तैशी ॥ ५ ॥
लीन होऊनि प्रकृती ॥ केवळ सुखमूर्ती उरलासे ॥ ६ ॥ ऐसा निरुपाधिकू केवळ ॥ सुखस्वरूपानंद केवळ ॥ चिन्मात्र तेजें बहळ ॥

---

[1] उत्पन्न करितो. [2] नाहींसें करून. [3] निश्चयानें. [4] ठिकाण. [5] वडाच्या बियांत. [6] सूर्य.

नित्यनिर्मळ सदंशें ॥ ७ ॥ तेणें ज्ञानस्वरूपें अनंतें ॥ सर्जनकाळअवस्थेतें ॥ स्रजिता जाहला सृष्टीतें ॥ तेंही निरुतें अवधारी ॥ ८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ केवलात्मानुभावेन स्वमायां त्रिगुणात्मिकाम् ॥ संक्षोभयन् सृजत्यादौ तया सूत्रमरिंदम ॥ १९ ॥ तामाहुस्त्रिगुणव्यक्तिं सृजंतीं विश्वतोमुखम् ॥ यस्मिन्प्रोतमिदं विश्वं येन संसरते पुमान् ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ तेणें निजात्मकाळसत्तें ॥ अवलोकिलें निजमायेतें ॥ ते क्षोभोनि तेथें ॥ निजसुखातें[2] उपजवी ॥ ९ ॥ तेंचि बोलिली क्रियाशक्ती ॥ करिती जाहली त्रिगुणव्यक्ती ॥ अहंकारद्वारा स्वजिती ॥ जगउत्पत्तीतें मूळ ॥ २१० ॥ तेथें गुणागुणविभाग ॥ सुर नर आणि पन्नग ॥ अध ऊर्ध्व मध्यभाग ॥ रचिलें जग तत्काल ॥ ११ ॥ ब्रह्मांडीं सूत्र जाण ॥ पिंडू वर्तवी प्राण ॥ पिंडब्रह्मांडविंदान ॥ कर्त्री जाण क्रियाशक्ती ॥ १२ ॥ जीव करावया संसारी ॥ षड्विकार वाढवी शरीरीं ॥ षडूर्मी त्यामाझारी ॥ जीव साचारीं संचरवी ॥ १३ ॥ एवढी संसारउत्पत्ती ॥ करावया इची व्युत्पती ॥ यालागीं नावें क्रियाशक्ती ॥ सांख्यसंमतीं बोलिजे ॥ १४ ॥ या क्रियाशक्तीं सूत्राचा ठायीं ॥ जग वोतिलें असे पाही ॥ आडवेंतिडवें ठायींचाठायीं ॥ गोंवून लवलाहीं वाढत ॥ १५ ॥ दृढबंध तो देहाभिमाना ॥ देऊनि संसारी करी जना ॥ उपजवी[3] अनिवार वासना ॥ योनी नाना जन्मवी ॥ १६ ॥ पित्याचेनि रेतमेळें ॥ रजस्वलेचेनि रुधिरबळें[4] ॥ उकडतां जठराग्निज्वाळें ॥ बहुकाळें गोठलें ॥ १७ ॥ तेथ निघाले अवयवांकुर ॥ करचरणादिक लहान थोर ॥ देह जाहलाजी साकार ॥ तरी अपार यातना[5] ॥ १८ ॥ जठरीं गर्भाची उकडतां उंडी ॥ नानादुःखांची होय पेडी ॥ रिघे विष्ठा कृमी नाकीं तोंडीं ॥ तेणें मस्तक झाडी पुरेपुरे ॥ १९ ॥ थोर गर्भींची वेदना ॥ आठवितां थरकांपू मना ॥ भगद्वारें जन्म जाणा ॥ परम यातना जीवासी ॥ २२० ॥ ऐसें जन्मवूनि जनीं ॥ घाली स्वर्गाच्या बंदीखानीं ॥ कां पचती अधःपतनीं ॥ देहाभिमानेंकरूनियां ॥ २१ ॥ ऐसी सुखदुःखांची कडी ॥ घालोनि त्रिगुणीं दृढ बेडी ॥ भोगवी दुःखांच्या कोडी ॥ तरी न सोडी अविद्या ॥ २२ ॥ हा थोर मायेचा खटाटोपू ॥ राया तुज नाहीं भयकंपू ॥ तुवां दृढ धरोनि अनुतापु[6] ॥ अभिमानदर्पू छेदिला ॥ २३ ॥ तुझी पालटली दिसे स्थिती ॥ हृदयीं प्रगटली चिच्छक्ती ॥ मावळली[7] अविद्येची राती[8] ॥ बोधगभस्ती[9] उगवला ॥ २४ ॥ जेथ छेदिला अभिमान ॥ तेथें कामादि वैरी निमाले जाण ॥ जेवीं शिर छेदिल्या करचरण ॥ सहजें जाण निमाले ॥ २५ ॥ यापरी तूं अरिमर्दन ॥ बोलिलों तें सत्य जाण ॥ ऐकोनि अवधूतवचन ॥ सुखसंपन्न नृप जाहला ॥ २६ ॥ ह्मणे धन्य धन्य मी सनाथ ॥ मस्तकीं ठेविला हस्त ॥ प्रेमें वोसंडला अवधूत ॥ हृदयीं हृदयांत आलिंगी ॥ २७ ॥ दोघां निजात्मबोधें जाहली भेटी ॥ यालागीं खेवा पडली मिठी ॥ तेणें आनंदें वोसंडे स्व

---

१ सृष्टि. २ आत्मसुखास. ३ उत्पन्न करिते. ४ रक्ताच्या बळानें. ५ दुःख. ६ वैराग्य. ७ नाहींसी झाली. ८ रात्र. ९ ज्ञानसूर्य.

ष्टी ॥ सभाग्यभेटी सद्गुरूसी ॥ २८ ॥ बाळका कीजेति सोहळे ॥ तेणें निवती[1] जननीचे डोळे ॥ शिष्यासि निजबोधू आकळे ॥ ते सुखसोहळे सद्गुरूशी ॥ २९ ॥ करितां दोघांसी संवादु ॥ वोसंडला[2] परमानंदु ॥ पुढील कथेचा संवादु ॥ अतिविशदू[3] सांगत ॥ २३० ॥ ॥ श्लोक ॥ यथोर्णनाभिर्हृदयादूर्णां संतत्य वक्त्रतः ॥ तथा विहृत्य भूयस्तां ग्रसत्येवं महेश्वरः ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऊर्णनाभि ह्मणजे कांतिणी ॥ ह्रदयतंतु मुखेंकरूनि ॥ विस्तारी बाहेर काढूनी ॥ निजगुणीं स्वभावें ॥ ३१ ॥ त्या विस्तारिल्या तंतूंवरी ॥ तळीं आणि उपरी ॥ आपणचि क्रीडा करी ॥ नानापरी स्वलीला ॥ ३२ ॥ तंतुविस्तारें खेळती लीला ॥ प्रत्यक्ष देखतांचि डोळां ॥ ग्रासूनि ने हृदयकमळा ॥ अद्वैतकळा दाखवी ॥ ३३ ॥ याचि रीतीं सर्वेश्वरू ॥ एकला रची संसारू ॥ अंतीं करूनि संहारू ॥ उरे निर्विकारू निजात्मा ॥ ३४ ॥ या लक्षणाचा निर्धारू ॥ धरूनि ऊर्णनाभी केला गुरू ॥ आतां सारूप्यतेचा विचारू ॥ पेशस्कारू गुरू म्यां केला ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यत्र यत्र मनो देही धारयेत् सकलं धिया ॥ स्नेहाद्द्वेषाद्भयाद्वाऽपि याति तत्तत्सरूपताम् ॥ २२ ॥ टीका ॥ ॥ काया वाचा आणि मन ॥ पुरुषें एकाग्र करून ॥ जेजेवस्तूचें करी ध्यान ॥ तद्रूप जाण तो होय ॥ ३६ ॥ स्नेहें द्वेषें अथवा भयें ॥ दृढ ध्यान जेणें होये ॥ तेणेंचि तद्रूपता लाहे ॥ उभवूनि बाहे सांगतू ॥ ३७ ॥ देह गेलिया तद्रूपता ॥ होईल हें वचन वृथा ॥ येणेंचि देहें येथ असतां ॥ तद्रूपता पाविजे ॥ ३८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कीटः पेशस्कृतं ध्यायन् कुड्यां तेन प्रवेशितः ॥ याति तत्साम्यतां राजन्पूर्वरूपमसंत्यजन् ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ भिंगुरटी कीटकीतें[4] धरी ॥ कोंडी भिंतीमाजिले घरीं ॥ ते मरणभयें ध्यना करी ॥ निरंतरीं भ्रमरीचें ॥ ३९ ॥ तेणें तीव्रध्यानें ती कीटी ॥ होऊनि ठाके भिंगुरटी ॥ गगना चढे उठाउठी ॥ प्रत्यक्षदृष्टीं देखिजे ॥ २४० भिंगुरटी जड असंत ॥ मूढ कीडी तिचें ध्यान करीत ॥ तेणें तद्रूपता प्राप्त ॥ तैसा भगवंत तंव नव्हे ॥ ४१ ॥ तो अज चिद्रूप सुखदाता ॥ ज्ञाता अधिकारी ध्यान करिता ॥ तेथ तद्रूपता पावतां ॥ विलंबू सर्वथा पैं नाहीं ॥ ४२ ॥ कीटकीस भ्रमरत्व जोडे ॥ हें तीव्रध्यानें नघडतें घडे ॥ विचारितां दोन्हीं मूढें ॥ जड जडें वेधिलें ॥ ४३ ॥ भगवद्ध्यान[6] नव्हे तैसें ॥ ध्याता भगवद्रूपचि असे ॥ ध्यानें भ्रममात्र नासे ॥ अनायासें तद्रूप ॥ ४४ ॥ येणें देहें याचि वृत्तीं ॥ आपुली आपण नजाणे मुक्ती ॥ नघेवे भगवत्पदप्राप्ती ॥ तैं वृथा व्युत्पत्ती नरदेहीं ॥ ४५ ॥ वृथा त्याचें ज्ञान ध्यान ॥ वृथा त्याचें यजन[7] याजन ॥ वृथा त्याचें धर्माचरण ॥ चैतन्यघन[8] जरी नोहे ॥ ४६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवं गुरुभ्य एतेभ्य एषा मे शिक्षिता मतिः ॥ स्वात्मोपशिक्षितां बुद्धिं श्रृणु मे वदतः प्रभो ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ अवधूत ह्मणें यदूशी ॥ इतुकि

---

१ शांत होतात. २ आला. ३ अति स्पष्ट. ४ किड्यास. ५ जन्मरहित. ६ ईश्वराचें ध्यान. ७ यज्ञ. ८ चैतन्यरूप.

या गुरूपाशी ॥ मीं शिकलों जें जें मतीशीं ॥ तें तुजपाशीं सांगितलें ॥ ४७ ॥ निजबुद्धिचिया व्युत्पत्ती ॥ कांहीं एक शिकलों युक्ती ॥ तेंही सांगेन तुजप्रती ॥ अनन्यप्रीती स्वभावें ॥ ४८ ॥ चोवीस गुरूंचाहीगुरु ॥ विवेकवैराग्यविचारू ॥ हा नरदेहीं लाधे सधरू ॥ यालागीं मुख्यगुरू नरदेहो[1] ॥ ४९ ॥ ॥श्लोक ॥ देहो गुरुर्ममविरक्ति विवेकहेतुर्बिभ्रत्स्म सत्वनिधनं सततार्त्युदर्कम् ॥ तत्त्वान्यनेन विम्रशामि यथा तथापि पारक्यमित्यवसितो विचराम्यसंगः ॥ २५ ॥ ॥ टिका ॥ देहासी जें गुरुत्व जाणा ॥ तें दोंप्रकारीं विचक्षणा ॥ सांगेन त्याच्या लक्षणा ॥ संरक्षणा परमार्था ॥ २५० ॥ देहाऐसें वोखटें[2] ॥ पृथ्वीमाजी नाहीं कोठें ॥ देहाऐसें गोमटें[3] ॥ पाहतां नभेटे त्रिलोकीं ॥ ५१ ॥ वोखटें ह्मणोनि त्यागावें ॥ तैं मोक्षसुखासि नागवावें ॥ होकां गोमटें ह्मणोनि भोगावें ॥ तैं अवश्य जावें नरकासी ॥ ५२ ॥ तरी हें त्यागावें ना भोगावें ॥ मध्यभागें विभागावें ॥ आत्मसाधनीं राखावें ॥ निजस्वभावें हितालागीं ॥ ५३ ॥ जैसें भाडियाचें घोडें ॥ आसक्ति सांडोनि पुढें ॥ येणेंवरी नेणें घडे ॥ स्वार्थचाडेलागूनी ॥ ५४ ॥ हेतू ठेवूनि परमार्थी ॥ गेहीं वस्ती करूं जेवीं उखिता ॥ देहआसक्तीची कथा ॥ बुद्धीच्या पंथा येवोंनेदी ॥ ५५ ॥ देहाची नश्वर गती ॥ नश्वरत्वें उपजे विरती ॥ नाशवंताची आसक्ती[4] ॥ मुमुक्षु नकरिती सर्वथा ॥ ५६ ॥ जेणें उपजे विरक्ती ॥ तो विवेक जाणावा निश्चितीं ॥ एवं विवेकवैराग्यप्राप्ती ॥ निजयुक्तीं नरदेहीं ॥ ५७ ॥ इतरदेहाच्या ठायीं ॥ हा विचारूचि नाहीं ॥ केवळ शिश्नोदर पाही ॥ व्यवसावो[5] देही करिताती ॥ ५८ ॥ यालागीं नरदेह निधान ॥ जेणें ब्रह्मसायुज्यीं घडे गमन ॥ देव वांछिती मनुष्यपण ॥ देवाचें स्तवन नरदेहा ॥ ५९ ॥ ह्मणती नरदेह पावन ॥ परी तो अत्यंत निंद्य जाण ॥ योनिद्वारें ज्याचें जननं[6] ॥ पाठीच मरण लागलेंसें ॥ २६० ॥ जंव जन्मलेंचि नाहीं ॥ तंव मरण लागलें पाही ॥ गर्भाच्याचि ठायीं ॥ मरणघायीं धाकती ॥ ६१ ॥ एवं यादेहासरिसा ॥ नित्यमृत्यु लागला कैसा ॥ पोषूनियां बालवयसा ॥ तारुण्यासरिसा लागला ॥ ६२ ॥ विसरोनियां आत्ममरण ॥ तारुण्य चढलें जी दारुण ॥ चतुर शाहणा सज्ञान ॥ बळें संपूर्ण मी एकू ॥ ६३ ॥ त्या तारुण्याची नवाळी[7] ॥ देऊनि फेडितां काळ गिळी ॥ मग जराजर्जरित मेळी ॥ मरणकाळीं पातली ॥ ६४ ॥ धवलचामरेंसि आलें जाण ॥ जरामृत्यूचें प्रस्थान ॥ मागूनि यावया आपण ॥ वेळा निरीक्षण[8] करीतसे ॥ ६५ ॥ सर्वांगीं कंपायमान ॥ तो आला मृत्यूव्यजन ॥ मान कांपे तों जाण ॥ डोल्हारा पूर्ण मृत्यूचा ॥ ६६ ॥ दांत पाडूनि सपाट ॥ काळें मोकळी केली वाट ॥ मृत्यूसेनेंचा घडघडाट ॥ वेगीं उद्भट रिघावया ॥ ६७ ॥ पाठी जाली दुणी ॥ तेंचि मृत्यूची निशाणी ॥ दोनीं कानीं खिळे देऊनी ॥ सुबद्ध

---

१ मनुष्याचे शरीर. २ वाईट. ३ चांगले. ४ प्रेम. ५ व्यवहार. ६ जन्म. ७ नवे पणा. ८ पाहाणे.

करूनी बांधिला ॥ ६८ येतिया मृत्यूसि पुढारे ॥ नयनतेज[1] धांवे सामोरे ॥ मग न्याहाळतीना अक्षरें ॥ अंजनोपचारें शिणतांही ॥६९॥
उभळीचा उजगरा ॥ उबगु सेजारिल्या घरा ॥ ह्मणती नमरे हा ह्मातारा ॥ बाळाची निद्रा मोडितो ॥२७०॥ देखोनि मृत्यूची धाडी ॥
पायां वळतसे वेंगडी ॥ जिव्हेसि चालली बोबडी ॥ तुटल्या नाडी सर्वांगीं ॥ ७१ ॥ मरण नयेतां जाण ॥ थोर जरेचें विटंबन ॥ विमुख
स्त्रीपुत्रजन ॥ अतिदीन ते करी ॥ ७२ ॥ जन्मवरी सायासीं ॥ प्रतिपाळिलें जयांसी ॥ तेंचि उबगलीं[2] त्यासी ॥ जरेनें देहासी कवळिल्या
॥ ७३ ॥ जरा लागलिया पाठीं ॥ कोणी नाइके त्याची गोष्टी ॥ विटावों लागलीं धाकुटीं ॥ कुतरीं पाठी भुंकती ॥ ७४ ॥ शाहणी सां
गती अबलांसी ॥ बागुल आला ह्मणती वृद्धासी ॥ निसुर पडोनेदी ढांसी ॥ कासाविसी होतसे ॥ ७५ ॥ ह्मातारा हो हा आशीर्वाद ॥
दीधला तेंही केलें द्वंद्व ॥ जरेएवढें विरुद्ध ॥ आणिक द्वंद्व तें नाहीं ॥ ७६ ॥ ऐसी जरेची जाचणी ॥ देखोनियां तरुणपणीं ॥ हेचि दशा
मजलागूनी ॥ हात धरूनी येईल ॥ ७७ ॥ देहो तितुका षड्विकारी ॥ कोटि अनर्थ एकेके विकारीं ॥ षडूर्मी लागल्या भीतरीं ॥ जेवीं अ
ग्नीवरी घृतधारा[3] ॥ ७८ या दुःखाचें जें मूळ ॥ तें देहाचें आळवाळ ॥ देहो वाढवितां दुःख प्रबळ ॥ उत्तरफळ महादुःख ॥ ७९ ॥ एवं
देहाची जे संगती ॥ ते निरंतर दुःखप्राप्ती ॥ यापरी सांडावी आसक्ती[4] ॥ हेतुविरक्ती देह गुरु ॥ २८० ॥ या देहाचेनि साधनें ॥ अवि
नाश[5] पद पावणें ॥ याहीपरी येणें गुणें ॥गुरुत्व ह्मणणें देहासी ॥ ८१ ॥ देह उपकारी अपकारी ॥ यासि गुरुत्व दोन्हीपरी ॥ येथ विवंचू
नि चतुरीं ॥ निजहित करी तो धन्य ॥ ८२ ॥ करितां तत्त्वविवंचन[6] ॥ देहाचें मूळ तें अज्ञान ॥ निजरूपाचें अदर्शन ॥ तेंचि भान[7] प्रकृ
तीचें ॥ ८३ ॥ प्रकृतीस्तव त्रिगुणसूत्र ॥ त्रिगुणीं त्रिविध अहंकार ॥ येथूनि महद्भूतविकार ॥ इंद्रियव्यापार देहेंसी ॥ ८४ ॥ एवं ब्र
ह्मांड खटाटोप ॥ हा अवघाचि आरोप ॥ दोरू जाहला नाहीं साप ॥ भ्रमें सर्प तो ह्मणती ॥ ८५ ॥ पाहतां देहाचें मूळ ॥ भा
से जैसें मृगजळ ॥ भ्रमाची राणीव प्रबळ ॥ हा आरोपचि केवळ वस्तूचाठायीं ॥ ८६ ॥ नसतें देह आभासे जेथें ॥ आरोपू ह्मणणें
घडे त्यातें ॥ आतां सांगेन अपवादातें ॥ सावचित्तें[8] परियेसी ॥ ८७ ॥ देह पांचभौतिक प्रसिद्ध ॥ तो मी ह्मणणें हें अबद्ध ॥ देहो मलिन
मी शुद्ध ॥ अतिविरुद्ध या आह्मा ॥ ८८ ॥ पृथ्वी मी नव्हे जडत्वें ॥ जळ मी नव्हे द्रवत्वें ॥ तेज मी नव्हे दाहकत्वें ॥ चंचलत्वें[9] न
व्हे वायू ॥ ८९ नभ मी नव्हे शून्यत्वें ॥ अहं[10] मी नव्हे दृश्यत्वें ॥ जीव नव्हे मी परिच्छिन्नत्वें ॥ माया मिथ्यात्वें मी नव्हे ॥ २९० ॥ दे
ह नव्हे मी नश्वरत्वें ॥ विषय नव्हें मी बाधकत्वें ॥ या तत्वा आणि मातें ॥ संबंधू येथें असेना ॥ ९१ ॥ ब्रह्माहमस्मी[11] अभिमान ॥

---

[1] डोळ्याचा कांती. [2] त्रासले. [3] तुपाच्या धारा. [4] प्रीति. [5] नाशरहित. [6] तत्वविचार. [7] भास. [8] एकाग्रतेनें. [9] चपळपणानें. [10] अहंकार. [11] मी ब्रह्म आहे.

हंसपरमहंसांसि मान्य ॥ तें सत्वावस्थेचें साधन ॥ तोही अभिमान मी नव्हें ॥ ९२ ॥ जितुका तत्त्वांचा अनुवादू ॥ तितुका मजवरी अपवादू ॥
हा माझा बुद्धीचा बोधू ॥ तुज म्यां यदू सांगीतला ॥ ९३ ॥ हें माझें गुप्त ज्ञान ॥ तुझें देखोनि अनन्यपण ॥ केलें गा निरूपण ॥ भावें संपूर्ण
तूं भावार्थी ॥ ९४ ॥ येरवीं करावया हे कथा ॥ मज चाड नाहीं सर्वथा ॥ परी बोलवीतसे तुझी आस्था ॥ नृपनाथा सभाग्या ॥ ९५ ॥ ऐशिया
संवादाचे समेळीं ॥ अद्वैतबोधें पिटिली टाळी ॥ दोघे आनंदकल्लोळीं ॥ ब्रह्मसुकाळीं मातले ॥ ९६ ॥ ऐसा उपकारी देखा ॥ या देहासारिखा
नाहीं सखा ॥ ह्मणसी राखावा नेटका ॥ तंव तो पारका मुळींची ॥ ९७ ॥ यासि अत्यंत करितां जतन ॥ दिसे विपरीत निदान ॥ श्वानशृगालांचें[1]
भोजन ॥ कां होय भक्षण[2] अग्नीचें ॥ ९८ ॥ या दोहीं गतीवेगळें पडे ॥ तरी सुळबुळीत होती किडे ॥ चौथी अवस्था यासि न घडे ॥ हें तूंही
रोकडें जाणशी ॥ ९९ ॥ यालागीं देहाची आसक्ती[3] ॥ मी न धरीच गा नृपती ॥ निःसंगु विचरतसें क्षितीं ॥ आत्मस्थितीचेनि बोधें
॥ ३०० ॥ देहासि उपभोगसाधनें ॥ तितुकीं जाण पां बंधनें ॥ दृढ वासना तेणें ॥ अनिवारपणें वाढते ॥ १ ॥ ॥ श्लोक ॥ जायात्मजा
र्थपशुभृत्यगृहाप्तवर्गान्पुष्णाति यत्प्रियचिकीर्षया वितन्वन्॥ स्वांते सकृच्छ्रमवरुद्धधनः स देहः सृष्ट्वाऽस्य बीजमवसीदति वृक्षधर्मः॥ २६॥
टीका ॥ देहभोगीं मुख्य गोडी ॥ स्त्रीभोगाची अतिआवडी ॥ सर्वस्व वेंचोनि[4] जोडी ॥ आणी रोकडी योषिता ॥ २ ॥ स्त्री हातीं धरितां देख ॥
वाढे प्रपंचाचें थोर दुःख ॥ गृह पाहिजे आवश्यक ॥ भोगार्थ देख स्त्रियेच्या ॥ ३ ॥ त्या गृहाचे गृहसिद्धी ॥ पाहिजे धनधान्यसमृद्धी ॥
जाहली प्रजांची वृद्धी ॥ तेणें अतिआधी अनिवार ॥ ४ ॥ त्या प्रजांचा अतिलालसू ॥ दासदासी मेळवी पशू ॥ थोर कष्टांचा पडे सोसू ॥
सुखलेशू पैं नाहीं ॥ ५ ॥ व्याहीजांवयांच्या वोढी ॥ आप्तवर्गांचिया कोडी ॥ पडे उचिताचिया सांकडीं ॥ सोशितां कोरडी देहाची ॥ ६ ॥
पोसावया पोष्यांसी[5] ॥ रची नाना उपायराशी ॥ हिंडे स्वदेशीं परदेशीं ॥ अहर्निशीं व्याकुळ ॥ ७ ॥ देहासि द्यावया सुख ॥ शतधा
वाढवी दुःख ॥ देहाभिमानें जन मूर्ख ॥ वृथाभिलाष वाढविती ॥ ८ ॥ देहसुखाचिया चाडा ॥ पडे परगृहाचे खोडां ॥ दारागृहलोभें के
ला वेडा ॥ न देखे पुढां निजस्वार्थू[6] ॥ ९ ॥ देहें वाढविली प्रीती ॥ गृह दारा पुत्र संपत्ती ॥ तेचि वासना होय देहांतीं ॥ देहांतराप्रती निज
बीज ॥ ३१० ॥ जैसा जोंधळा कणिसा चढे ॥ कणसींचा क्षितीवरी[7] झडे ॥ वाढीवाढलें झाड मोडे ॥ तें बीज गाढें उरलेंसे ॥ ११ ॥ तेंचि
बीज जळभूमीचे संगतीं ॥ सवेंचि झाड वाढे पुढती ॥ तैसी वासना उरे देहांतीं ॥ देहांतराप्रती न्यावया ॥ १२ ॥ त्या वृक्षाचियापरी ॥

---

१ कुतऱ्यांचें व कोल्ह्यांचें. २ खाणें. ३ प्रीति. ४ खर्चून. ५ पालन करण्यास योग्य अशास. ६ आपला परमार्थ. ७ पृथ्वीवर.

वासना बीज शरीरीं ॥ उरवूनि स्वर्गसंसारी ॥ योनिद्वारीं जन्मवी ॥ १३ ॥ देहीं वासना केवीं वाढे ॥ तेंही सांगेन तुजपुढें ॥ विषय सेवितां वाढें कोडें ॥ वासना वाढ अनिवार ॥ १४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ जिह्वैकतोऽमुमपकर्षति कर्हि तर्षा शिश्नोऽन्यतस्त्वगुदरं श्रवणं कुतश्चित् ॥ घ्राणोऽन्यतश्चपलदृक् क्व च कर्मशक्तीर्बह्व्यःसपत्न्य इव गेहपतिं लुनंति ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ ॥ जिह्वा साकर वाढी ॥ तृषा[1] प्राशनालागीं[2] तोडी ॥ शिश्नासी रतिसुखाची गोडी ॥ ते चरफडी रमावया ॥ १५ ॥ त्वचा पाहे मृदुपण ॥ उदर वांछी पूर्णअन्न ॥ श्रवण मागती गायन ॥ मधुरध्वनी आलापू ॥ १६ ॥ घ्राण उद्यत परिमळा ॥ रूप पहावया वोढी डोळा ॥ हस्त वांछिती खेळा ॥ नानालीळा स्वभावें ॥ १७ ॥ पाय वांछिती गती ॥ ऐशीं इंद्रियें वोढा वोढिती ॥ जेवीं एका गेहपती ॥ बहुता सवती तोडिती ॥ १८ ॥ एवं इंद्रियांसि विषयासक्ती ॥ तेणें वासना दृढ होती ॥ त्या देहदेहांतराप्रती ॥ पुरुषासि नेती सर्वथा ॥ १९ ॥ यालागीं करावया विषयत्यागू ॥ अवश्य छेदावा[3] देहसंगू ॥ इये अर्थीं मनुष्यदेह चांगू ॥ ज्ञानविभागू ये देहीं ॥ ३२० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सृष्ट्वा पुराणि विविधान्यजयाऽऽत्मशक्त्या वृक्षान् सरीसृपपशून् खगदंशमत्स्यान् ॥ तैस्तैरतुष्टहृदयः पुरुषं विधाय ब्रह्मावलोकधिषणं मुदमाप देवः ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ ॥ हेंचि जाणावया निजरूपातें ॥ पूर्वीं तेणें श्रीअनंते ॥ निजमायेचेनि हातें ॥ केलीं बहुतें शरीरें ॥ २१ ॥ एकें केलीं जे भूचरें ॥ एकें तें केलीं खेचरें ॥ एकें केलीं जळचरें ॥ चरें अचरें तीं एकें ॥ २२ ॥ वृक्ष सर्प पशु दंश ॥ राक्षस पिशाच[4] बकं[5] हंस ॥ मत्स्य कच्छादि अशेष ॥ सृजी[6] बहुवस योनींतें ॥ २३ ॥ ऐशा चौऱ्यांशीं लक्ष योनी ॥ सृजूनि पाहे परतोनि ॥ तंव निजप्राप्तीलागोनि ॥ न देखे कोणी अधिकारी ॥ २४ ॥ ऐशिये देखोनि सृष्टीतें ॥ सुख न वाटेचि देवातें ॥ मग मानवी प्रकृतीतें ॥ आदरें बहुतें निर्मिलीं ॥ २५ ॥ बाहुलें मनुष्यदेहीं ॥ निजज्ञान घातलें पाहीं ॥ जेणें ज्ञानें देहीं ॥ विदेह पाही पावती ॥ २६ ॥ आहार[7] निद्रा[8] भय मैथुन ॥ सर्वां योनींसि समसमान ॥ मनुष्यदेहींचें ज्ञान ॥ अधिक जाण सर्वांशीं ॥ २७ ॥ देखोनि मनुष्यदेहासी ॥ सुख झालें भगवंतासी ॥ अधिकार ब्रह्मज्ञानासी ॥ येणें देहेंसी मत्प्राप्ती ॥ २८ ॥ पावोनियां मनुष्यपणा ॥ जो नसाधी ब्रह्मज्ञाना ॥ तो दाढीचा मेंढा जाणा ॥ विषयाचरणा विचरतू ॥ २९ ॥ मनुष्यदेहींचेनि ज्ञानें ॥ सच्चिदानंदपदवी घेणें ॥ एवढा अधिकार नारायणें ॥ रूपावलोकनें[9] दीधला ॥ ३३० ॥ मनुष्यदेहीं ब्रह्मज्ञान ॥ पुढील जन्मीं मी करीन ॥ ह्मणे तो नागवला जाण ॥ सोलींव अज्ञान त्यापासी ॥ ३१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ लब्ध्वा सुदुर्लभमिदं बहुसंभवांते मानुष्यमर्थदमनित्यमपीह धीरः ॥ तूर्णं यतेत न पतेदनुमृत्यु यावन्निःश्रेयसाय विषयः खलु सर्वतः स्यात् ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ चौऱ्यांशी लक्षयोनींप्रती ॥ जैं को

---

१ तहान. २ पिण्याकडे. ३ तोडावा. ४ भूतें. ५ बगळे. ६ उत्पन्न करितो. ७ खाणे. ८ झोप. ९ रूपादृष्टीच्या पाहण्यानें.

टिकोटि फेरे होती ॥ तैं नरदेहाची प्राप्ती ॥ अवचटें लाहती निजभाग्यें ॥ ३२ ॥ जो मनुष्यदेहीं जन्मला ॥ तो परमार्थासि लिंगटला[1] ॥ एवढा
अलभ्य लाभ जाहला ॥ पितरीं मांडिला उत्साहो ॥ ३३ ॥ झालिया मनुष्यदेहप्राप्ती ॥ परमार्थ साधूं भोगाअंतीं ॥ एवढी येथ
नाहीं निश्चिंती ॥ मृत्युप्राप्ती अनिवार ॥३४ ॥ मृत्यु न विचारी गुणदोष ॥ न ह्मण देशविदेश ॥ न पाहे रात्रदिवस ॥ करीत नाश तत्काळ
॥ ३५ ॥ देह जैंपासोनि जाहला ॥ तैंपासूनि मृत्यु लागला ॥ जेवीं सापें बेडूक धरिला ॥ गिळूं लागला लवनिमिषें ॥ ३६ ॥
साप बेडूकातें गिळी ॥ बेडूक मुखें माशा कवळी ॥ तैशी मृत्युमुखीं पडलीं ॥ विषयभुलीं झोंबती ॥ ३७ ॥ येथ आळसु जेणें केला ॥
तो सर्वस्वें नागावला ॥ थिता[2] परमार्थ हातींचा गेला ॥ आवर्तीं पडला भवचक्रीं ॥ ३८ ॥ ऐसें जाणोनि यदुराया ॥ देहाचिया लवलाह्या
॥ परमार्थ साधावया ॥ ब्रह्मोपाया[3] उद्यत व्हावें ॥ ३९ ॥ छेदोनियां आळसासी ॥ दवडूनियां निद्रेसी ॥ आत्मचिंतन अहर्निशीं
॥ अविश्रमेंसी साधावें ॥ ३४० रणीं रिघालिया शूरासी ॥ नजिणतां[4] परचक्रासी ॥ विसांवा नाहीं क्षत्रियासी ॥ तेणें वेगेंसी साधावें
॥ ४१ ॥ साधावया आत्मलग्न ॥ सावधान बिजवराचें मन ॥ तेणें साक्षेपें आपण ॥ सायुज्य लग्न साधावें ॥ ४२ ॥ रायाचें एकुलतें
एक ॥ चुकल्या अवचटें बाळक ॥ तो जेवीं शोधी सकळ लोक ॥ तेवीं निजसुख[5] साधावें ॥ ४३ ॥ काळाचा चपेटघात ॥ जंव वाजला
नाहीं येथ ॥ तंव साधावया परमार्थ ॥ आयुष्य व्यर्थ न करावें ॥ ४४ ॥ नरदेहींचेनि आयुष्यें ॥ प्रपंचाचेनि हरुषें ॥ विषयाचेनि
विलासें ॥ भोगपिसे[6] नर जाहले ॥ ४५ ॥ पश्वादियोनींच्या ठायीं ॥ विषयावांचोनि आन[7] नाहीं ॥ तोचि विषयो नरदेहीं ॥ वाढविल्या
कायी हित जाहलें ॥ ४६ ॥ विचारितां विवेकदृष्टीं ॥ विषयांसि प्रारब्धें भेटी ॥ वृथा करितां आटाटी ॥ मुद्दलतुटी नरदेहा ॥ ४७ ॥ नरदेह
परम पावन ॥ पावोनि न साधी ब्रह्मज्ञान ॥ तो लांडा गर्दभ जाण ॥ पुच्छेवीण दुपायी ॥४८ ॥ अपरोक्षज्ञानेंवीण वांझट ॥ उदरार्थ
दंभ खटपट ॥ जेवीं मदिरापानीं मर्कट[8] ॥ उडे उद्भट तडतडां ॥ ४९ ॥ ब्रह्मज्ञानेंवीण शास्त्रज्ञ ॥ ते अंधारींचे खद्योत जाण ॥ अज्ञान
निशीमाजी तेज गहन ॥ सूर्योदयीं कोण त्यां देखे ॥ ३५० ॥ ब्रह्मज्ञानेंवीण संन्यासी ॥ नटाच्याऐसें मुंडण त्यासी ॥ सोकले मिष्टान्न
भिक्षेसी ॥ वृथा गेरूशी नाशिलें ॥ ५१ ॥ मनीं विषयाचें अभिलाषण[9] ॥ धरूनि करिती वेदाध्ययन ॥ ते वर्षाकाळींचे दर्दुर[10] जाण ॥
कर्दमपानें जल्पती ॥ ५२ ॥ विषयप्राप्तीलागीं मौन ॥ तें बकाचें बकध्यान ॥ विषयबुद्धीं जें गायन ॥ तें खरी देखोनि खर भुंके ॥ ५३ ॥
विषयालागीं उपन्यास ॥ नानायुक्तीचे विलास ॥ जेवीं पिंड देखोनि वायस[11] ॥ करिती बहुवस अतिशब्द ॥ ५४ ॥ पोट भरावया भां

---

१ लागला. २ असलला. ३ ज्ञानास. ४ जिंकिल्यावांचून. ५ ब्रह्मसुख. ६ विषयभोगाविषयीं वेड. ७ दुसरें. ८ माकड. ९ इच्छा. १० बेडूक. ११ कावळा.

ड ॥ सैरा वाजविती तोंड ॥ तैसे विषयालागीं वितंड ॥ शास्त्रपाखंड बोलती ॥ ५५ ॥ विषयवासना धरूनि थोर ॥ बाह्य मिरविती आ
चार ॥ जेवीं कागाचा शौचाचार ॥ विष्ठातत्पर मानसीं ॥ ५६ ॥ हृदयीं धरूनि जीविका चांग ॥ करिती अग्निहोत्रयाग ॥ जेवीं
वेश्या विकोनि अंग ॥ चालवि सांग संसारा ॥५७॥ नरदेहींचा हाचि स्वार्थ ॥ साधावा चौथा पुरुषार्थ ॥ तो न करितां जो कां अर्थ ॥
तो अनर्थ जाणावा ॥ ५८ ॥ साधीना देहीं ब्रह्मज्ञान ॥ तो श्वानसूकरांप्रमाण[1] ॥ अथवा त्यांहोनि हीन ॥ ते विवंचना परियेसी ॥ ५९ ॥
पशूसि हाणिल्या लाथा ॥ द्वेष न धरी सर्वथा ॥ मनुष्यासि तूं ह्मणतां ॥ जीवघाता प्रवर्ते ॥३६०॥ पशूसि लोभ नाहीं संग्रहता ॥ एक
आहार होय भक्षिता ॥ मग उरलिया अर्था ॥ त्यागी सर्वथा तत्काल ॥ ६१ ॥ मनुष्याचें लोभिष्ठपण ॥ गांठीं असल्या कोटि धन ॥
पोटा नखाय आपण ॥ मा त्यागितां प्राण त्यजील ॥ ६२ ॥ सायंप्रातरचिंता ॥ पशूसि नाहीं सर्वथा ॥ मनुष्याची चिंता
पाहतां ॥ जन्मशतां न राहे ॥६३॥ अमित[2] धन असतां गांठीं ॥ तरी चिंता अनिवार मोठी ॥ नाथिलेंचि[3] भय घे पोटीं ॥ अवि
श्वासी सृष्टीं नरदेही ॥ ६४ ॥ जरी मरों टेंकलें शरीर ॥ तरी व्यवहारी साधी वृत्ति क्षेत्र ॥ पाया शोधोनि बांधे घर ॥ पुत्रपौत्र नांदावया
॥ ६५ ॥ ऐसी दुस्तर चिंता ॥ पशूसि नाहीं सर्वथा ॥ आतां मैथुनाची कथा ॥ ऐक तत्त्वतां सांगेन ॥ ६६ ॥ पशूसि ऋतुकाळीं मैथु
न ॥ मग स्त्रियेसीं नातळे आपण ॥ पुरुषासि नित्य स्त्रीसेवन ॥ गरोदरही जाण न सोडी ॥६७॥ काम क्रोध सलोभता ॥ चिंता निं
दा अतिगर्वता ॥ हे मनुष्याचेनि माथां ॥ पशूसि सर्वथा[4] असेना ॥ ६८ ॥ न साधितां आत्मज्ञान ॥ केवळ जे विषयीं जन ॥ ते श्वानसूक
रांपरीस हीन ॥ माणुसपण त्यां नाहीं ॥ ६९ ॥ विषयाचें जें सुख जाण ॥ तें स्वर्गीं नरकीं समान ॥ जें इहलोकीं भोगी श्वान ॥ तें स्व
र्गीं जाण इंद्रासी ॥ ३७० ॥ मनुष्यदेहावांचोनी ॥ पशुपक्ष्यादि नानायोनी ॥ त्या विषयभोगालागोनी ॥ विषयच्छेदनीं नरदेह ॥ ७१ ॥
तो नरदेह कैसेनी जोडे ॥ ते प्राप्तीचे कठिण गाढे ॥ तें सांगेन तुजपुढें ॥ परिस निवाडे विभागु ॥ ७२ ॥ अत्यंतसुकृतें[5] स्वर्गा चढे ॥ अत्यंतपापें
अधोगती घडे ॥ पापपुण्य निःशेष झडे ॥ तैं आंतुडे[6] निजमुक्ति ॥ ७३ ॥ जैं पापपुण्यसमानसमीं ॥ तैं मनुष्यदेह आक्रमी ॥ जन्म पांवे
कर्मभूमी ॥ आश्रमधर्मी सुमेधा ॥ ७४ ॥ साक्षेपें मनुष्यदेह जोडे ॥ ऐसें करितां तंव न घडे ॥ अवचट हाता चढे ॥ भाग्य चोखडें ज
याचें ॥ ७५ ॥ मोलें अनर्घ्यरत्नें येती ॥ तैसा चिंतामणी नये हातीं ॥ तेवीं बहुत योनिये जन्म होती ॥ परी मनुष्यदेहप्राप्ती दुर्लभ
॥ ७६ ॥ ऐसा नरदेह पावोनि देख ॥ जो न साधीचि ब्रह्मसुख ॥ तो जनामाजी परम मूर्ख ॥ विश्वासघातक देवाचा ॥ ७७ ॥ निजा

---

१ कुत्रें, डुकर त्यासारखा. २ फार. ३ नसलेलें. ४ सर्वप्रकारानें. ५ फार पुण्यानें. ६ पावे. ७ मिळते.

त्मप्राप्तीलागोनी ॥ देवें केली मनुष्ययोनी ॥ तो देवाचा विश्वास बुडवूनि ॥ विषयसेवनीं निजपतन[1] ॥ ७८ ॥ होतें पितराचें मनोगत ॥ पुत्र होईल हरिभक्त ॥ कुळ उद्धरील समस्त ॥ विषयीं प्रतिहत तें केलें ॥ ७९ ॥ होकां सकळभाग्याचें फळ ॥ मनुष्यदेह गा केवळ ॥ तें करावया सफळ ॥ वैराग्य अढळ म्यां केलें ॥ ३८० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवं संजातवैराग्यो विज्ञानालोक आत्मनि ॥ विचरामि महीमेतां मुक्तसंगोऽनहंकृतिः ॥ ३० ॥ ॥ टीका ॥ ॥ देहो निजात्मसाधनीं साधक ॥ तोचि विषयभोगीं बाधक ॥ ऐसें हें देखोनियां देख ॥ केलें निष्टंक वैराग्य ॥ ८१ ॥ त्या वैराग्याचेनि बळें[2] ॥ गुरुकृपावचनमेळे ॥ विषयइंद्रियांचे पाळे ॥ एकेचि वेळे विभांडिले ॥ ८२ ॥ अविद्या जंव घ्यावी जीवें ॥ तंव अविद्या येणें नावें ॥ मागें मी विद्यमान नोहे ॥ हेंही अनुभवें जाणीतलें ॥ ८३ ॥ ऐशी मिथ्यात्वें अविद्या जातां ॥ चित्प्रकाश पूर्ण लाभे हातां ॥ तेणें स्वदेहस्थ अहंता[3] ॥ गेली सर्वथा निःशेष ॥ ८४ ॥ ज्ञानसाधन जो निजदेहो ॥ तयाच्याठायीं वैराग्य पहाहो ॥ मा देहसंबंधाचा स्नेहो ॥ कैसेनि राहों शकेल ॥ ८५ ॥ ऐसेनि अनुभवें पाही ॥ निःसंग मी विचरें मही ॥ अहंता स्वदेहीं नाहीं ॥ पुशिलें तें पाही सांगितलें राया ॥ ८६ ॥ जें पुरुषाची अहंता गळे ॥ तैं देह अदृष्टयोगें[4] चळे ॥ जेवीं सुकलें पान वायुबळें ॥ पडिलें लोळे सर्वत्र ॥ ८७ ॥ यालागीं ब्रह्मसाक्षात्कारा ॥ वृत्ति लय पावे जंववरा ॥ तंवतरी जो वैराग्यें खरा ॥ अभंग पुरा पुरुषार्थी तो ॥ ८८ ॥ ह्मणसी एका गुरूचेठायीं ॥ तुज सर्वथा विश्वास नाहीं ॥ ये अर्थीं सावध होई ॥ विशद[5] पाही सांगेन ॥ ८९ ॥ गुरूनें सांगतांचि कानीं ॥ ज्याची वृत्ति जाय विरोनि ॥ जेवीं मिळतां लवणपाणी ॥ अभिन्नपणीं समरसे[6] ॥ ३९० ॥ त्यासि साधकबाधकताबाध ॥ हें बोलणें अति अबद्ध ॥ जेवीं निमालियांसि[7] वोखद ॥ न पाजवे दुग्ध गर्भस्था ॥ ९१ ॥ यापरी ज्यासि कर्तव्यता ॥ नाहींनाहींगा सर्वथा ॥ त्याऐशी हे अवस्था ॥ कदा कल्पांता नलभेची ॥ ९२ ॥ गुरूनें सांगितलें कानीं ॥ स्वरूपावबोध जाहला मनीं ॥ परी तें न राहेचि निश्चळपणीं ॥ बाह्यदर्शनीं विक्षेपू ॥ ९३ ॥ आसनीं बैसल्या स्वरूपस्थिती ॥ आसन सोडिल्या प्रपंचस्फूर्ती ॥ ऐशी एकदेशी स्थिती ॥ नातळती निजयोगी ॥ ९४ ॥ देह आसनीं निश्चळ ॥ अथवा कर्मीं हो चंचळ ॥ परी वृत्ति सर्वदा निश्चळ ॥ तेचि निर्मळ निजयोगी ॥ ९५ ॥ परशुरामेंसी रणांरणीं ॥ भीष्म भिडला निर्वाणबाणीं ॥ तोडरीं घातिला जिंणोनी[8] ॥ वृत्ति समाधानी अचंचळ ॥ ९६ ॥ करितां निर्वाणयुद्धीं ॥ ज्याची न मोडे समाधी ॥ हेंचि साधावया त्रिशुद्धी ॥ चोवीस गुरु विधीं वंदिले म्यां ॥ ९७ ॥ देह निश्चळत्वें वृत्ति निश्चळ ॥ देहचंचळत्वें वृत्ति चंचळ ॥ तरी ते देहबुद्धीचि सबळ ॥ नव्हे केवळ निजबोधू ॥ ९८ ॥ होतां प्रपंचदर्शन ॥ वृत्ती

---

१ आपल्यास नरक. २ मुळें. ३ अहंकार. ४ नशीबानें. ५ स्पष्ट. ६ एक होतें. ७ मेलेल्या मनुष्यास. ८ जिंकून.

सि विक्षेप होय जाण ॥ तो विक्षेप करावया छेदन ॥ बहुगुरुसाधन म्यां केलें ॥ ९९ ॥ निजगुरूंनीं[1] सांगीतल्या अर्था ॥ त्या साधावया परमार्था ॥ नानाप्रपंचपदार्था ॥ गुरुसंस्था म्यां केली ॥ ४०० ॥ जेयोनियां विक्षेपता ॥ तेचि लाविली गुरुत्वपंथा ॥ ऐसेनि साधनें साधिता ॥ जग स्वभावतां परब्रह्मीं ॥ १ ॥ पूर्वीं गुरूंनीं बोधिलें नाहीं ॥ तरी पृथ्व्यादिक बोधितील कायी[2] ॥ तोचि निजार्थ साधावया पाही ॥ गुरुउपायीं प्रवर्तलों ॥ २ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ न ह्येकस्माद्गुरोर्ज्ञानं सुस्थिरं स्यात्सुपुष्कलम् ॥ ब्रह्मैतदद्वितीयं वै गीयते बहुधर्षिभिः ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ ॥ गुरूनें सांगितलें ज्ञान ॥ हृदयीं प्रकाशलें चिद्धान ॥ तें विद्युत्प्राय[3] चंचळ जाण ॥ स्थैर्यपण त्या नाहीं ॥ ३ ॥ जें मुळींचि चंचळ ॥ तें कदा नव्हे पुष्कळ ॥ क्षणां भासे क्षणां चपळ ॥ तेणें तळमळ साधकां ॥ ४ ॥ जैसें मुखींचें आमिष जाये ॥ तेणें सर्प डंखला राहे ॥ तैसी वेधना साधकां होये ॥ वियोगू न साहे सर्वथा ॥ ५ ॥ येरवीं ब्रह्म अद्वैत नित्य ॥ हें सकळसंमत ॥ त्यासीही पुसों जातां बहुत ॥ विक्षेप तेथ उठती ॥ ६ ॥ एक ह्मणती ब्रह्म सगुण ॥ एक ह्मणती तें निर्गुण ॥ ऐसे वाद करिती दारुण ॥ युक्तिखंडण अभिमानें ॥ ७ ॥ एक ह्मणती ब्रह्म सप्रपंच ॥ एक ह्मणती निष्प्रपंच ॥ मिळोनियां पांचपांच ॥ शब्दकचकच वाढविती ॥ ८ ॥ प्रपंचदर्शनें विक्षेपता ॥ तेथ साधावया निजऐक्यता[4] ॥ सुबुद्धीनें नानापदार्था ॥ गुणग्राहकता गुरुरूपें ॥ ९ ॥ तेथ साधकाचे प्रश्न ॥ सहसा[5] न पावती समाधान ॥ यालागीं पुसावया मन ॥ न रिघे जाण ते ठायीं ॥ ४१० ॥ जेथूनि विक्षेपता वाढे ॥ तेथेंचि ऐक्यता जोडे ॥ ते नानागुरुत्वें रोकडें[6] ॥ साधन चोखडें योजिलें ॥ ११ ॥ जीं जीं सांगितलीं गुरुलक्षणें ॥ तींतीं निजबुद्धीचीं साधनें ॥ समूळ विक्षेपू तेणें ॥ तीव्रध्यानें छेदिला ॥ १२ ॥ तेणें चंचलत्वें निश्चल ॥ फावलें निजबोधाचें मूळ ॥ दृश्य देखतां केवळ ॥ भासे सकळ चिन्मात्र ॥ १३ ॥ जें माझ्या निजगुरूंनीं ॥ पूर्वीं दिधलें होतें बोधूनी[7] ॥ तेंचि नानागुरुत्वें साधूनी ॥ विक्षेप छेदुनी पावलों ॥ १४ ॥ निजगुरु तो एकचि जाण ॥ इतर गुरु साधकत्वें साधन ॥ हें यर्थातथ[8] लक्षण ॥ तुज निरूपण म्यां केलें ॥ १५ ॥ येथें प्रपंचाचें भानाभान ॥ कर्म करितां न कळें जाण ॥ लाधली[9] निजबोधाची खुण ॥ समदर्शन सर्वदा ॥ १६ ॥ दृश्य देखतां दृष्टीं ॥ नव्हे दृश्येंसी भेटी ॥ हारपली कर्मत्रिपुटी ॥ बोधकसवटी अभिनव ॥ १७ ॥ यथेष्ट करितां भोजन ॥ उठेना निराहालक्षण ॥ जगेंसी वागतां जाण ॥ एकलेपण मोडेना ॥ १८ ॥ तरंग सागरामाजी[10] क्रीडतां ॥ न मोडे उदकाची एकात्मता ॥ तेवीं जगामाजी वर्ततां ॥ दुजी वार्ता मज नाहीं ॥ १९ ॥ नवल सद्गुरूची नवायी ॥ सर्वीं सर्व तोचि पाही ॥ गुरुवेगळें रितें कांहीं ॥ उरलें नाहीं सर्वथा ॥ ४२० ॥ आतां माझें जें मीपण ॥ तें सद्गुरु जाहला आपण ॥ बोलतें तुझें जें तूंपण ॥ तेंही जाण सद्गुरूची ॥ २१ ॥

---

[1] आपल्या गुरूंनीं. [2] उपदेश करतील काय. [3] विजेप्रमाणें. [4] आपलें एकत्व. [5] कधींही. [6] चांगलें. [7] उपदेश करून. [8] खरें. [9] मिळाली. [10] समुद्रांत.

॥ २१ ॥ याहीपरी पाहतां ॥ माझा गुरु एक एकुलता ॥ तेथें दुजेपणाची वार्ता ॥ नाहीं सर्वथा यदुराया ॥ २२ ॥ ऐशी सद्गुरुकथा ॥ तुज सांगीतली परमार्था ॥ हर्षें आलिंगिलें नृपनाथा ॥ दोघां ऐक्यता निजबोधें ॥ २३ ॥ जीवीं जीवा पडली मिठी ॥ आनंदें वोसंडिली सृष्टी ॥ तेणें वाचेसि पडली बेलवटी ॥ बोलों उफराटी विसरली ॥ २४ ॥ हर्ष नमा[1]य हृदयभुवनीं ॥ बाहेर वोसंडे स्वेदेंजोनी ॥ आनंदघन वोळला नयनीं ॥ स्वानंदजीवनीं वर्षत ॥ २५ ॥ तुटली अहंकाराची बेडी ॥ पावलों भवार्णवपरथडी ॥ ह्मणोनि रोमांचीं उभविली गुढी ॥ जिंतली गाढी अविद्या ॥ २६ ॥ समूळ देहभाव पळाला ॥ यालागीं गात्रकंपू चळचळा ॥ संकल्पविकल्प निमाला ॥ मानेंसी बुडाला मनोरथू ॥ २७ ॥ जीवभावो उखिता ॥ यदूनें अर्पिला गुरुनाथा ॥ तें चिह्न बाहेरी तत्त्वतां ॥ दावी सर्वथा निजांगीं ॥ २८ ॥ तो अवधूत जाण दत्तात्रया ॥ तेणें आलिंगूनि यदुराया ॥ निजरू[2]पांचा बोधू तया ॥ अनुभवावया दीधला ॥ २९ ॥ दत्तात्रेयशिष्यपरंपरा ॥ सहस्रार्जुन यदु दुसरा ॥ तेणें जनार्दनू तिसरा ॥ शिष्य केला खरा कलियुगीं ॥ ४३० ॥ गुरुप्राप्तीलागीं सर्वथा ॥ थोर जनार्दनासी चिंता ॥ विसरला तिन्हीं अवस्था ॥ सद्गुरु चिंतितां चिंतनीं ॥ ३१ ॥ देवो भावाचा भोक्ता ॥ दृढ जाणोनि अवस्था ॥ येणें जाहलें श्रीदत्ता ॥ तेणें हात माथां ठेविला ॥ ३२ ॥ हात ठेवितांचि तत्काळ ॥ बोधू आकळिला सकळ ॥ मिथ्या प्रपंचाचें मूळ ॥ स्वरूप केवळ स्वबोधें ॥ ३३ ॥ कर्म करूनि अकर्ता ॥ तोचि अकर्तात्मबोध जाहला देता ॥ देहीं असोनि विदेहता ॥ तेही तत्त्वता आकळिली ॥ ३४ ॥ गृहा[3]श्रमू न सांडितां ॥ कर्मरेखा[4] नोलांडितां ॥ निजव्यापारीं वर्ततां ॥ बोधू सर्वथा नेमै[5]ळे ॥ ३५ ॥ तो बोधू आकळतां मनां ॥ मन मुं[6]कलें मनपणा ॥ अवस्था नावरेचि जनार्दना ॥ मूर्छापन्न पडियेला ॥ ३६ ॥ त्यासी सावध करूनि तत्त्वतां ॥ ह्मणे प्रेमा हे सत्त्वावस्था ॥ तोही गिळोनि सर्वथा ॥ होयी वर्तता निजबोधें ॥ ३७ ॥ पूजाविधी करोनियां ॥ जंव जनार्दनू लागला पायां ॥ तंव अदृश्य जाहला दत्तात्रेया ॥ योगमायेचियेनि योगें ॥ ३८ ॥ कथेसी फांकलों सर्वथा ॥ तो कोपू न मानावा श्रोतां ॥ प्रसंगें गुरुविवचंना होतां ॥ मीही गुरुकथा बोलिलों ॥ ३९ ॥ मज तंव चुकी पडली मोठी ॥ चुकूनि सांगितली गुरुगोठी ॥ तेही संस्कृत नव्हे मराठी ॥ वृ[7]था चावटी न ह्मणावी ॥ ४४० ॥ जो असेल गुरुभक्त ॥ तो हें जाणेल मनोगत ॥ जो गुरुस्मरणें सदोदित ॥ त्यासि हें हृद्गत कळेल ॥ ४१ ॥ ज्यासि गुरुचरणीं श्रद्धा गाढी ॥ ज्यासि गुरुभजनीं अति आवडी ॥ जिहीं गुरुप्रेम जोडिलें जोडी ॥ ते हे गोडी जाणती ॥ ४२ ॥ ज्या सद्गुरूचें नांव घेतां ॥ चारी मुक्ती वोडविती माथा ॥ मुक्ती नावडे गुरुभक्ता ॥ नित्य मुक्तता गुरुचरणीं ॥ ४३ ॥

---

१ मावत नाहीं. २ आत्मस्वरूपाचा. ३ गृहस्थाश्रम. ४ कर्माची मर्यादा. ५ मळत नाहीं. ६ सोडते. ७ व्यर्थ.

ज्याचे घेतां चरणतीर्थ ॥ चारी मुक्ती पवित्र होत ॥ पायां लागती पुरुषार्थ ॥ धन्य गुरुभक्त त्रिलोकीं ॥ ४४ ॥ चैतन्य नित्य निराधार[1] ॥ निर्धर्मक निर्विकार ॥ त्याचा केला जीर्णोद्धार ॥ सत्य साचार सद्गुरू ॥ ४५ ॥ सद्गुरुकृपा नव्हतां ॥ नव्हती देवाची कथावार्ता ॥ देवासि देवपणीं स्थापिता ॥ सत्य सर्वथा सद्गुरू ॥ ४६ ॥ सद्गुरुकृपेवीण पाहो ॥ देवो असतचि जाहला होता नाहीं ॥ त्यासि देवपणें ठेवूनि ठायीं ॥ भजवितां[2] पाही गुरुरावो ॥ ४७ ॥ त्या सद्गुरूची कथा ॥ चुकोनि जाहलों बोलता ॥ थोर अपराध हा माझे माथां ॥ क्षमा श्रोतां करावी ॥ ४८ ॥ वृथा बोलिलों नाहीं जाण ॥ जाहलें बोलावया काय कारण ॥ दत्तात्रेयशिष्यकथन ॥ करितां जनार्दन आठवला ॥ ४९ ॥ मीं जरी नाठवीं[3] जनार्दनासी ॥ परी तो विसरों नेदीच आपणासी ॥ हटें देतसे आठवणेसी ॥ अहर्निशीं सर्वदा ॥ ४५० ॥ जिकडे जिकडे मी पाहें ॥ तिकडे तिकडे तोच होऊनि राहे ॥ मी जरी त्याकडे न पाहें ॥ तें नपहाणेंही होय तो माझें ॥ ५१ ॥ जिकडे मी विसरोनि जाये ॥ तिकडेची तो येऊनि राहे ॥ मी जरी त्याकडे न पाहें ॥ तें नपहाणें होय तो माझें ॥ ५२ ॥ घट सांडूं पाहे आकाशासी ॥ तंव आकाश न सांडी घटाशी ॥ तेवीं जनार्दनू आह्मासी ॥ अहर्निशीं लागला ॥ ५३ ॥ मी न करीं त्याची कथा ॥ तंव तोचि होय मुखीं[4] वक्ता ॥ ऐसेंनि बलात्कारें बोलविता ॥ काय म्यां आतां करावें ॥ ५४ ॥ दृश्य मी देखावया बैसें ॥ तंव दृश्यासि बाह्य जनार्दनू दिसे ॥ श्रवणीं ऐकतां सौरसें ॥ शब्दीं प्रवेशे जनार्दनू ॥ ५५ ॥ आतां नाइके न पाहे ॥ ह्मणोनि मी उगा राहें ॥ तंव उगेपणाचे अन्वयें ॥ जनार्दनू पाहे लागला ॥ ५६ ॥ ऐसा आकळलों त्रिशुद्धी ॥ जनार्दनू उगंडू नेदी ॥ श्रोतां सांगावी जी निजबुद्धी[5] ॥ मी अपराधी सर्वथा ॥ ५७ ॥ श्रोते ह्मणती नवलावो ॥ येथें नदेखों अहंभावो ॥ पाहतां बोलाचा अभिप्रावो ॥ प्रेम पहाहो लोटत ॥ ५८ ॥ तेथील विचारिता बोल ॥ क्षीराब्धीहूनि सखोल ॥ नवल प्रेमाची बोल ॥ येताती डोल स्वानंदें ॥ ५९ ॥ जें त्वां केलें गुरुनिरूपण ॥ तें सप्रेम ब्रह्मज्ञान ॥ थोर निववविलों[6] जाण ॥ नाहीं दूषण गुरुनिरूपणा ॥ ४६० ॥ नित्य करावें गुरुस्मरण ॥ तें गुरूनें केलें निजकथन ॥ करितां अमृताचें आरोगण ॥ पुरे कोण ह्मणेल ॥ ६१ ॥ जनार्दनीं दृढ भावो ॥ हाही कळला अभिप्रावो[7] ॥ निरूपणाचा नवलावो ॥ रसाळ पहाहो वोडवला ॥ ६२ ॥ तूं मूळकथा निरूपिसी ॥ अथवा आडकथा सांगसी ॥ परी गोडी यानिरूपणीं ऐसी ॥ नदेखों[8] आणिकासी सर्वथा ॥ ६३ ॥ शुद्धनिरूपणें गुरु वर्णिसी ॥ वर्णूनि अपराधी ह्मणसी ॥ ऐक्यें भोगिली बुद्धी कैसी ॥ भागू श्रोत्यासी वाढविला ॥ ६४ ॥ तुझी जे अपराधबुद्धी ॥ प्रवेशली भगवत्पदीं ॥ जाहली अपराधाची शुद्धी ॥ देखणा त्रिशुद्धी तूं होसी ॥ ६५ ॥ गुरुस्तवनीं रतसी ॥ ते

---

१ आधाररहित. २ भजन करविणारा. ३ स्मरण करीत नाहीं. ४ तोंडांत. ५ आपली बुद्धी. ६ शांत झालों. ७ मतलब. ८ पहात नाहीं.

व्हां मूळकथा विसरसी ॥ प्रेमाची जाती ऐसी ॥ कळलें आह्मांसी सर्वथा ॥ ६६ ॥ श्रोते ह्मणतां आतां ॥ विस्मयो दाटला चि
त्तां ॥ वेगीं चालवावें ग्रंथा ॥ पूर्वकथा मुळींची ॥ ६७ ॥ हें संतवचन मानोनि माथां ॥ चरण वंदूनि तत्त्वतां ॥ सावधान व्हावें जी
चित्तां ॥ पुढील कथा सांगेन ॥ ६८ ॥ यापरी तो अवधूतू ॥ यदूसि सांगे परमार्थू ॥ संवादें निमाला[1] परमाद्भुतू ॥ मग निवांतू राहिला
॥ ६९ ॥ ॥श्लोक॥ ॥श्रीभगवानुवाच ॥ ॥ इत्युक्त्वा स यदुं विप्रस्तमामंत्र्य गभीरधीः ॥ वंदितोऽभ्यर्थितो राज्ञा ययौ प्रीतो यथागत
म् ॥ ३२ ॥ ॥टीका॥ ॥उद्धवासि ह्मणे श्रीकृष्ण ॥ रायासि सांगोनि ब्रह्मज्ञान ॥ जाहलें देखोनि समाधान ॥ नपुसत जाण निघाला
॥ ४७० ॥ राजा धांवोनि लागला चरणां ॥ परमप्रेमें करी पूजना ॥ करोनियां प्रदक्षिणा ॥ मागुता चरणां लागला ॥ ७१ ॥ जाय ऐसें
न बोलावें सर्वथा ॥ राहे ह्मणतां ह्मणे स्वामिता ॥ वियोग न साहवें तत्त्वतां ॥ बोलू सर्वथा कुंटलों[2] ॥ ७२ ॥ ते देखोनि अवस्था ॥ कृ
पा उपजली श्रीदत्ता ॥ हात ठेऊनि माथां ॥ प्रसन्नता उपजली ॥ ७३ ॥ येथूनि तुज मज आतां ॥ वियोग नाहीं सर्वथा ॥ ऐसें आ
श्वासोनि नृपनाथा ॥ होय निघता श्रीदत्त ॥ ७४ ॥ जेणें सुखें हा आला ॥ तेणेंचि सुखें निघतां जाहला ॥ राजा अतिप्रीतीं निवाला ॥ सु
खी जाहला निजबोधें[3] ॥ ७५ ॥ ॥श्लोक॥ ॥ अवधूतवचः श्रुत्वा पूर्वेषां नः स पूर्वजः ॥ सर्वसंगविनिर्मुक्तः समचित्तो बभूव ह ॥ ३३ ॥
॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे नवमोऽध्यायः ॥ ॥ टीका ॥ ॥ पाहोनि उद्धवा उजू ॥ बोलतसे अधो
क्षजू ॥ ह्मणे आमचे पूर्वजांचा पूर्वजू ॥ राजध्वजू यदुवीरू ॥ ७६ ॥ ह्मणसी मी नेणें त्याचें नांव ॥ तूं सांगतोसि हें अपूर्व[4] ॥ परी ज्याचेनि
नामें आह्मी सर्व ॥ वीर यादव ह्मणवितों ॥ ७७ ॥ हरिखें ह्मणे नंदनंदू[5] ॥ तो आमचा पूर्वज यदू ॥ ब्रह्मज्ञानाचा संवादू ॥ दत्तात्रयेंसी पैं
केला ॥ ७८ ॥ श्रीदत्तात्रेयाच्या वचनार्था ॥ विश्वासोनि[6] जाहला घेता ॥ तेणें सर्वसंगविनिर्मुक्तता ॥ आली हातां यदूच्या ॥ ७९ ॥ जो
संगू सोडूनि दूर गेला ॥ तेणें संगू त्यागूचि केला ॥ संगीं असोनि स्नेह सांडिला ॥ संगमुक्त जाहला तो जाण ॥ ४८० ॥ आकाश सर्व
पदार्थांसी ॥ मिळालें असे सर्वदेशीं ॥ परी नातळेची सर्वसंगासी ॥ संगमुक्तता त्यासी बोलिजे ॥ ८१ ॥ याहूनि विशेषें संगमुक्त
ता ॥ आली यदूचिया हातां ॥ तेही सांगेन कथा ॥ परिसे तत्त्वतां उद्धवा ॥ ८२ ॥ दत्तात्रेयबोधें तत्त्वतां ॥ सर्वसंगामाजी असतां ॥ न
देखे कथावार्ता ॥ विशेषमुक्तता या नांव ॥ ८३ ॥ मज पूर्वीं द्वैतसंगू होता ॥ तो जाऊनि निःसंग जाहलों आतां ॥ या दोनी समूळ मि
थ्या वार्ता ॥ विनिर्मुक्तता[7] पावलों ॥ ८४ ॥ दोर सापू नाहीं जाहला ॥ परी सापूपणाचा आळ आला ॥ तोही दोरें नाहींसा केला ॥

---

१ शांत झाला. २ बंद झाला. ३ आपल्या ज्ञानानें. ४ पूर्वी नाहीं तें. ५ कृष्ण. ६ विश्वास ठेवून. ७ मोक्ष.

भ्रांतीं कल्पिला निजभ्रमू[1]॥८५॥ दोरू दोरपणें असे॥ सर्प तो बोलिजे भ्रांतां मनीं वसे॥ ऐसें सांडूनी द्वैतपिसें॥रायासि सावकाशें समाधी
॥८६॥समसाम्य समानबुद्धी॥ ते बोलिजे निजसमाधी॥ते समाधी पावोनि त्रिशुद्धी॥राजा निजपदीं पावला॥८७॥कृष्ण ह्मणे उद्धवासी॥
तूं जन्मूनि ऐशिये वंशीं॥जरी ब्रह्मज्ञान न सांगशी॥तरी उणें पूर्वजांसी येईल॥८८॥ यापरी हृषीकेशीं॥ तिरस्कारोनि उद्धवासी॥झों बावया
अद्वैताशीं॥पुट बुद्धीसी देतसे॥८९॥आधींचि विखारू[2] काळियाणा॥ त्याचेंही पुच्छ रगडिल्या जाणा॥ मग झों बिन्नल्या सत्राणा॥नावरे को
णा सर्वथा॥४९०॥आधींचि अनुताप[3] उद्धवाशी॥ वरी तिरस्कारिला हृषीकेशीं॥तो गिळावया ब्रह्मासी॥निजमानसीं खवळला॥९१॥ पुढि
ले अध्यायीं निरूपण॥कृष्णउद्धवसंवाद जाण॥ सांगेल गुरुशिष्यलक्षण॥ श्रोते विचक्षण परिसतू॥९२॥एका जनार्दनू ह्मणे॥अगाध कृष्ण
मुखींचें बोलणें॥ तरी तें मी जरी निरोपूं[4] नेणें॥परी तें गोडपणें निववित॥९३॥ साखरेचा बोळू केला॥ परी तो कडूपणा नाहीं आला॥ तैसा
ग्रंथू प्राकृतभाषा जाहला॥असे संचलें[5] स्वानंदू॥९४॥ जरी सोन्याचें पेंडूकें केलें॥ परी ते दगडमोला नाहीं आलें॥ तैसें भागवत प्राकृत जा
हलें॥ परी नाहीं चुकलें निजज्ञाना॥ ९५॥ मुक्ताफळालागीं सागरीं॥ बुड्या देती नानापरी॥ परी तें सांपडलिया घरींच्या विहिरीं॥ जो अ
व्हेरी तो मूर्ख॥९६॥तैशी व्याख्या आटाआटी॥अतिकष्टें परमार्थ भेटी॥ तें जोडल्या मराठीसाठीं॥उपेक्षादृष्टी न करावी॥९७॥धनवंत रत्नपा
रखी पुरा॥तेणें धुळीमाजी देखिल्या हिरा॥गांठी बांधोनि आणिला घरां॥ पारखी खरा निजज्ञानें॥९८॥तैसें ज्ञाते विद्वज्जन॥ग्रंथ मराठी दे
खोन॥उपेक्षा न करावी करावा यत्न॥पारखोनि चिद्रत्न साधावें॥९९॥ क्षुद्रदृष्टीं पाहणें पाहतां॥ बोलूं लागेल व्यासाचे ग्रंथा॥क्षमा हे तरी मरा
ठी कविता॥सांडूनि कुटिळतां[6] पहावी॥५००॥ज्यासी निजसुखाची[7] आवडी॥ ते प्राकृतीं न काढिती खोडी॥घेतील ज्ञानगर्भाची गोडी॥अव
स्था गाढी परमार्थीं॥१॥जे साचार परमार्थी॥ते अधिकारी या ग्रंथीं॥ज्यांसि भागवतीं भक्ती॥ते पावती निजसुख॥२॥ज्यांसी भागवतीं ना
हीं भक्ती॥कोरडी व्युत्पत्ती मिरविती॥तेही जरी निंदा करिती॥तरी पुढें पावती भक्तीतें॥३॥निंदा वसे ज्यांचे चित्तां॥त्यांस गति नाहीं सर्वथा॥
निंदा सकळपापांचें माथां॥दोष ईपरता असेना॥४॥निंदकाचें नांव घेतां॥दोष वाचेशीं[8] होय लागता॥तिशीं द्यावया प्रायश्चित्ता॥ रामराम
सर्वथा ह्मणावें॥५॥निंदेमाजी देखिजे स्वार्था॥ निंदक प्रवर्तले भक्तहितां॥बुडवूनि आपुले स्वार्था॥ परदोष सर्वथा क्षाळिले[9]॥६॥सांडूनियां गु
णदोष॥श्रोतीं व्हावें सावकाश॥जेथें वक्ता हृषीकेश॥अतिसुरस तें ज्ञान॥७॥कृष्णउद्धवांचें ज्ञान॥ तत्काळ निरसी[10] अज्ञान॥ एका विनवी ज
नार्दन॥सावधान परियेसा॥५०८॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे कृष्णउद्धवसंवादे एकाकारटीकायां नवमोऽध्यायः॥ ९॥

---

[1] आपली भ्रांति. [2] सर्प. [3] वैराग्य. [4] सांगू. [5] सांचिवलेला. [6] वाकडेपणा. [7] ब्रह्मसुखाची. [8] वाणीस. [9] धुतले. [10] नाहींसें करितें.

# अध्याय १० वा.



श्रीकृष्ण
उद्धव.
गुरु.
शिष्य.

श्रीगणेशाय नमः ॥ ओं नमो सद्गुरुधन्वंतरी ॥ ज्याची दृष्टीच [1]निरुज करी ॥ त्यावांचोनि संसारीं ॥ भवरोग दूरी नकरवे ॥ १ ॥ ज्या भवरोगाचेनि दर्पें ॥ फुंफात तापलीं त्रिविधतापें ॥ मी माझें येणें संकल्पें ॥ वाग्जल्पें जल्पती ॥ २ ॥ पडिलीं द्वैतांचिया दुखणा ॥ तोंडींची चवी गेली जाणा ॥ मुखा आला कडवटपणा ॥ कटुकवचना बोलती ॥ ३ ॥ जे व्याधीचेनि सन्निपातें ॥ [2]विवेक हाणोनियां लातें ॥ उमरडूनियां धैर्य हातें ॥ वासनावनातें हिंडविती ॥ ४ ॥ मनोरथकर्दमीं चरफडित ॥ संकल्पमृगजळीं बुडत ॥ वेगीं निसरोनियां पडत ॥ टेंक चढतां स्वर्गाचे ॥ ५ ॥ वोरबडत स्वर्गाची आराटी ॥ गोंवीत लोभाची बोराटी ॥ खिळिला प्रपंचाचिया कांटीं ॥ मारितां नुठी तेथूनि ॥ ६ ॥ रोगभ्रमें भ्रमले कैसे ॥ खावोंनये तें खावों बैसे ॥ करूंनये तें करितां दिसे ॥ [3]योषितांसरिसे धांवत ॥ ७ ॥ तेथ धनभयाचें शारे येत ॥ तेणें थरथरां कांपत ॥ धाकेंकरूनि घामेजत ॥ दडी देत गुम्हत्वें ॥ ८ ॥ रोगाभिमान चढे देहीं ॥ तेव्हां नराहे खाटे ना भुईं ॥ विधीचें वस्त्र टाकी पाही ॥ डोळा ठायीं लागेना ॥ ९ ॥ उभें नराहवे ऐक्यवृत्ती ॥ क्षीण झाली ज्ञानशक्ती ॥ पडलीं ज़डत्वें लोळती ॥ पाणी मागती विषयाचें ॥ १० ॥ अल्प अल्प देतां तें जळ ॥ कडकडूनि झोंबती प्रबळ ॥ आह्मासि फार घागा जळ ॥ तृषा केवळ बोळेना ॥ ११ ॥ कुपथ्य करितां निरंतर ॥ तंव तो झाला जीर्णज्वर ॥ क्षयो लागलाजी थोर ॥ क्षीण शरीर पडियेलें ॥ १२ ॥ क्षणक्षणां अतिक्षीणता ॥ विकार संचरले जीविता ॥ तेणें प्रबळ वाढली चिंता ॥ सुख सर्वथा बुडालें ॥ १३ ॥ नवल रोगाचा पडिपाडू ॥ गोड परमार्थ झाला कडू ॥ [4]विषप्राय विषय कडू ॥ तोचि गोडू पैं झाला ॥ १४ ॥ ते व्याधीचिया उफाडा ॥ देतां सत्कथा काढा ॥ श्रवणमुखींच्या भावार्थदाढा ॥ पाडी फुडां दांतखिळी ॥ १५ ॥ देतां मकरंदू तुळसीनसू ॥ वरता जावोंनेदी श्वासू ॥ मस्तक झाडी मानी त्रासू ॥ रोगें बहुवसू व्यापिला ॥ १६ ॥ ऐसा रोग देखोनि गाढा ॥ वैद्य आचार्य धडफुडा ॥ कृपा पाहे जयाकडा ॥ तो रोकडा वांचवी ॥ १७ ॥ निंधडा वैद्यतो सुबुद्धी ॥ जीव गेलिया मरों नेदी ॥ जीवेंवीण वांचवी त्रिशुद्धी ॥ अगाध सिद्धी तयाची ॥ १८ ॥ शुद्धभाग्यें करूनि जाण ॥ तो करी जैं कर्मावलोकन ॥ तेंचि रोगिया अमृतपान ॥ होय सावधान तत्काळ ॥ १९ ॥ एवं झालिया सावधान ॥ रोगी आपणिया आपण ॥ नित्यानित्याचें पाचन ॥ करी सेवन साक्षेपें ॥ २० ॥ तेणें न फिटेचि जीर्णज्वरू ॥ न तुटे क्षयाचा महापूरू ॥ देखोनियां वैद्यसद्गुरू ॥ रसोपचारू मांडिला ॥ २१ ॥ तेणें अक्षररस अर्धमात्रा ॥ घालोनि ब्रह्मवसंतरां ॥ मोडोनियां क्षयाचा थारा ॥ अक्षयशरीरा पैं केलें ॥ २२ ॥ दारुण चुकवावया कुपथ्य ॥ वैराग्य राखण ठेविलें नित्य ॥ लावूनि अनुसंधानाचें

---

१ आरोग्य. २ विचार. ३ स्त्रियाबरोबर. ४ विषासारखे. ५ मोठा. ६ देत नाही.

पथ्य ॥ निर्दाळिला[1] तेथ भवरोगू ॥ २३ ॥ रोगी उपचारिल्यावरी ॥ प्रबळ क्षुधा खवळे भारी ॥ चित्तचिंतेच्या लाह्या करी ॥ क्षणामाझारीं खादल्या ॥ २४ ॥ काळे गोरे चतुर्वर्ण चणे ॥ आश्रमेंसि भाजिले फुटाणे ॥ अहंसोहंगुळेंसि तेणें ॥ निःशेष खाणें तत्काळ ॥ २५ ॥ फळाभिलाषेसि आशा ॥ बोंडें भरलीं होतीं खसखसा ॥ तींही खादलीं घसघसां ॥ नलगतां घांसा गिळियेलीं ॥ २६ ॥ गूळसाकरेचा पडिपाडू ॥ खादले कर्माकर्मलाडू ॥ खातां नह्मणे गोडकडू ॥ लागला झोंडू स्वइच्छा ॥ २७ ॥ ब्रह्माहमस्मीचीं[2] गोमटीं ॥ पक्वान्नें देखिलीं दिठी[3] ॥ तींही खाऊनि उठाउठी ॥ मायेपाठी लागला ॥ २८ ॥ ते धाकेंधाकेंचि निमाली[5] ॥ मिथ्यात्वें नासोनि गेली ॥ स्वानंदें तृप्त[4] झाली ॥ झाडी केली भवरोगा ॥ २९ ॥ ऐसा सद्गुरु वैद्य गाढा ॥ जेणें उपचारोनि केलों निधडा ॥ शरण रिघावें तुजपुढां ॥ तंव चहूंकडां तूंचितूं ॥ ३० ॥ तुजवेगळें आपणियातें ॥ देखोनि शरण यावें तूतें ॥ तंव मीतूंपण हौरपलें थितें ॥ कैसेनि तूंतें भजावें ॥ ३१ ॥ ज्यांच्या सुटल्या जीवग्रंथी ॥ झाले आत्माराम निश्चितीं ॥ तेही अहेतुक भक्ति करिती ॥ प्राप्तीची स्थिती हे जाणा ॥ ३२ ॥ गुरुभजनापरतें सुख ॥ मोक्ष मानिती तेही मूर्ख ॥ मोक्ष गुरुचरणींचा रंक ॥ विरळ लोक हें जाणती ॥ ३३ ॥ आह्मां सद्गुरुदृष्टी परम योग्य ॥ आह्मां सद्गुरुकृपा सदा[6] श्लाघ्य[7] ॥ गुरुसेवें आह्मीं सभाग्य ॥ परमयोग्य गुरुस्तवनें ॥ ३४ ॥ सद्गुरूचें नाममात्र ॥ तेंचि आह्मां वेदशास्त्र ॥ सकळमंत्रावरिष्ठमंत्र ॥ नाम सर्वत्र गुरूचें ॥ ३५ ॥ सद्गुरूचें तीर्थमात्र ॥ सकळतीर्थां करी पवित्र ॥ गुरुचरण तें आमुचें क्षेत्र ॥ वृत्तिस्वतंत्र ते आह्मा ॥ ३६ ॥ तूं पुरेपुरे ह्मणसी स्तवन ॥ परी वर्णितां तुझे उदार गुण ॥ अतृप्त सर्वथा नुठी मन ॥ तुझी आण वाहतसें ॥ ३७ ॥ तुझे गुण वर्णावया तत्त्वतां ॥ मी प्रवर्तलों श्रीभागवता ॥ त्वां मज लाविलें भक्तिपंथा[8] ॥ निजकथाकीर्तनीं ॥ ३८ ॥ जयजय सद्गुरु जनार्दना ॥ भवगजपंचानना[9] ॥ एकाकी शरण आलों जाणा ॥ तुझ्या श्रीचरणा पावलों ॥ ३९ ॥ पावलों शास्त्र भागवत ॥ अवधारा तेथिंचा मथितार्थ ॥ उद्धवासि श्रीकृष्णनाथ ॥ परम परमार्थ सांगेल ॥ ४० ॥ यदु अवधूतसंवादेंसी ॥ लक्षणोक्त चोविसां गुरूंसी ॥ परिसोनियां उद्धवासी ॥ भावना ब्रह्मेंसीं लिंगटली[10] ॥ ४१ ॥ ब्रह्म सर्वगत सत्य होये ॥ मज सबाह्य कोंदलें आहे ॥ तेंही माझें मज ठाउकें नोहे ॥ कोण उपाये करावा ॥ ४२ ॥ ऐसी उद्धवाची चिंता ॥ कळों सरली कृष्णनाथा ॥ तोचि उपावो सर्वथा ॥ होय सांगता अविरोधें ॥ ४३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ मयोदितेष्ववहितः स्वधर्मेषु मदाश्रयः ॥ वर्णाश्रमकुलाचारमकामात्मा समाचरेत् ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ पूर्वी वेदरूपें वर्णाश्रम ॥ मीचि बोलिलों स्वधर्म ॥ पंचरात्रादिवैष्णवधर्म ॥ हें उपासनावर्म

---

१ नाहीसा केला. २ मी ब्रह्मआहे याची. ३ दृष्टीनें. ४ संतुष्ट. ५ नाहीसे झाले. ६ निरंतर. ७ उत्तम. ८ भक्तिमार्गास. ९ संसाररूपी हात्ती नाहीसा करणारा सिंह. १० लागली.

गुह्य माझें ॥४४॥ जो वर्ण जो आश्रम ॥ तेणेंचि ते करावे स्वधर्म ॥ आचरतां परधर्म ॥ दुःख परम पाविजे ॥४५॥ उद्धवा येथें जाण॥ कर्ता पाहिजे सावधान ॥ ते सावधानेंचें लक्षण ॥ अतिविचक्षण जाणती ॥ ४६ ॥ कर्म चतुर्विध येथ ॥ नित्य आणि नैमित्य ॥ काम्य आणि प्रायश्चित्त ॥ जाण निश्चित विभाग ॥ ४७ ॥ येथ कर्म आचार निश्चितीं ॥ सावधान राखावी वृत्ती ॥ आचरणाची व्युत्पत्ती ॥ विचित्र[1]स्थिती सांगेन ॥ ४८ ॥ नित्य आणि नैमित्तिक ॥ हें कर्म जाण आवश्यक ॥ सांडोनियां फलाभिलाख[2] ॥ विधिप्रमुख आचरावें ॥ ४९ ॥ नित्यकर्म अधिक वाढे ॥ तैं नैमित्त्याचें अंग चढे ॥ काम्य उचंबळलें विषयाचे चाडें ॥ तैंचि पडे निषिद्धीं ॥ ५० ॥ फलाभिलाषेंविण ॥ नित्य नैमित्तिक जाण ॥ करावेंगा कृष्णार्पण ॥ अर्पिती खूण जाणोनी ॥ ५१ ॥ काम्य कर्म आवश्यक ॥ त्यजावें[3] गा निःशेख ॥ जेवीं कां वमिलें[4] वमक[5] ॥ तैसें देख त्यजावें ॥ ५२ ॥ समूळीं कामनेतें दंडावें ॥ तैंचि काम्यकर्म सांडावें ॥ येऱ्हवीं कर्मत्याग नसंभवे ॥ कामना जीवें राखतां ॥ ५३ ॥ अंतरीं अनिवार कामना ॥ बाह्य विरक्ती दावी जना ॥ ते सहावया विटंबना ॥ त्याग विचक्षणा तो नव्हे ॥५४॥ कामाचेनि अधिकमदें ॥ कर्मैं निपजती निषिद्धें ॥ समूळ कामनेचेनि छेदें ॥ सर्व निषिद्धें मावळती ॥५५॥ अथवा देखतांचि निषिद्धदिठीं ॥ जो हरिनामें गर्जतउठी ॥ निषिद्ध पळे बारा वाटीं ॥ प्रायश्चित्तकोटी हरिनामें ॥ ५६ ॥ जेथ हरिनामाचे उमाळे ॥ तेथ निषिद्ध तत्काळ पळे ॥ निषिद्ध अभक्तां आदळे ॥ भक्तां जवळें तें नये ॥ ५७ ॥ काम्यनिषिद्धाची कथा ॥ भक्तांसि नातळे सर्वथा ॥ भगवंत रक्षी निजभक्तां ॥ दोष तत्त्वतां त्यां नाहीं ॥ ५८ ॥ नामें प्रायश्चित्ताच्या कोटी ॥ हें म्यां सांगीतली गुह्य गोष्टी ॥ प्रकट करावी सृष्टी ॥ गुप्त पोटीं राखावी ॥ ५९ ॥ काम्यनिषिद्धाचा त्याग ॥ तुज म्यां सांगीतला सांग ॥ नित्यनैमित्त्यविभाग ॥ तोही विनियोग[6] परियेसी ॥ ६० ॥ मदर्पणें आवश्यक ॥ करावें नित्यनैमित्तिक ॥ तेंचि चित्ताचें शोधक ॥ साधन मुख्य परमार्था ॥ ६१ ॥ एक ह्मणती स्वधर्म निष्फळ ॥ वर्म नेणती तेचि बरळ ॥ स्वधर्मे होय जन्म सफळ ॥ परमार्थ फळ स्वधर्मीं ॥ ६२ ॥ किडाळ[7] झाडावया दृष्टीं ॥ रज देऊनि पाठीं पोटीं ॥ सुवर्ण घालितां पुटीं ॥ झळकत उठी निजतेजें ॥ ६३ ॥ तैसा मज अर्पितां स्वधर्म ॥ त्याचें सफळ होय निजकर्म ॥ ऐसें नेणोनियां वर्म ॥ कर्मभ्रम कर्मठां ॥ ६४ ॥ मज अर्पिती हातवटी ॥ अवघड वाटेल जगजेठी ॥ ज्यासि माझी आवड मोठी ॥ त्याची दृष्टी मदर्पण[8] ॥ ६५ ॥ कृष्णीं निश्चळ ज्याचें मन ॥ त्याचें कर्म तितुकें कृष्णार्पण ॥ त्यासि न अर्पितांही जाण॥ सहजें मदर्पण होतसे ॥ ६६ ॥ जो निश्चळ होऊनियां बैसे ॥ तो नचालतांही चालत दिसे ॥ जाण स्वकर्म त्याचें तैसें ॥ अनायासें

---

१ अनेक रीतीनें. २ सुखाची इच्छा. ३ टाकावे. ४ ओकलेले अन्न. ५ ओकलेला ओक. ६ विचार,आज्ञा. ७ मळ. ८ मला अर्पण करणे.

मज अर्पे[1] ॥ ६७ ॥ यापरी होऊनियां निष्काम ॥ सुखें आचरावे स्वधर्म ॥ तेणें सांडूनि रजतम ॥ सत्त्वें पुरुषोत्तम पावती ॥ ६८ ॥ वर्णाश्रमसमुद्भवा ॥ मूळ आश्रयो मी वोळखावा ॥ कुळकर्म निजस्वभावा ॥ उपासावा[2] मी एक ॥ ६९ ॥ वर्णांसि आश्रयो मी प्रसिद्ध ॥ जे जन्मले मुखबाहूरुपाद ॥ आश्रमा आश्रयो मी विशद[3] ॥ गर्जती वेद ये अर्थी ॥ ७० ॥ देवो देवी कुळाचार ॥ याचे वस्तीचें[4] मी घर ॥ एवं मी सर्वाधार ॥ हा कर्मीं विचार देखावा ॥ ७१ ॥ गुज परिसे उद्धवा ॥ कर्माध्यक्षू मी जाणावा ॥ कर्मीं मीचि अभिलाषावा ॥ क्रियेनें धरावा मी एकू ॥ ७२ ॥ एवं कर्मा आदि मध्यें अंतीं ॥ मी अविनाश धरितां चित्तीं ॥ तीं कर्मेंचि निष्कर्में होती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ७३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अन्वीक्षेत विशुद्धात्मा देहिनां विषयात्मनाम् ॥ गुणेषु तत्त्वध्यानेन सर्वारंभविपर्ययम् ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ॥ यापरी स्वधर्में जाण ॥ ज्यांचें विशुद्ध[5] अंतःकरण ॥ ते विषयीं उदासीन ॥ हें वोळखण तयांचें ॥ ७४ ॥ तयांसि विषयाची आस्था ॥ नाहींनाहीं गा सर्वथा ॥ परी सर्वार्थविपरीतता ॥ विषयासक्ता देखती ॥ ७५ ॥ भरलीं मृगजळाचीं तळीं ॥ तेणें नपिकती साळी केळी ॥ तैसी विषयबुद्धी जवळी ॥ स्वसुखफळीं फळेना ॥ ७६ ॥ पाहे पां विषयासक्त ॥ कर्मारंभीं संकल्प करित ॥ आयुःकामार्थ क्षेमार्थ ॥ धनधान्यार्थ समृद्धी ॥ ७७ ॥ या हेतूं कर्म आरंभित ॥ तें स्वकर्म नव्हे निश्चित ॥ स्वधर्ममिषें[6] मनोरथ ॥ उपासित सर्वदा ॥ ७८ ॥ बैलाची कांस दुहितां ॥ सिंपीभरी दूध नये हाता ॥ तेवीं मनोरथ उपासितां ॥ नलभे सर्वथा निजसुख[7] ॥ ७९ ॥ एवं कर्मचि तें नव्हे ॥ केल्याही सिद्धी नपवे ॥ तें कर्म बाहुल्यें नाश पावे ॥ विघ्न संभवे देवांचें ॥ ८० ॥ विषयसेवनीं आहे सुख ॥ या बुद्धीं सिणसिणोनि मूर्ख ॥ पावले परमदुःखें दुःख ॥ मुख्य याज्ञिक घालूनी ॥ ८१ ॥ वेदत्रय जाणूनि चपळ ॥ यज्ञकर्मी अतिकुशळ ॥ वांछितां स्वर्गादिक फळ ॥ पतन केवळ अधोमुखें ॥ ८२ ॥ ऐसेनि विवेकें निपुणदृष्टी ॥ जो स्वर्गु नेघे तृणासाठीं ॥ वैराग्य लागे त्यापाठीं ॥ उठाउठी घर रिघे ॥ ८३ ॥ तो वैराग्याचें माहेर ॥ विश्रांतीचें विसांवतें घर ॥ तो नररूपें साचार ॥ विवेक साकार पैं झाला ॥ ८४ ॥ ऐसेनि विवेकें विवेकदृष्टी ॥ स्वर्गादिविषय मिथ्या सृष्टी ॥ ते मिथ्यात्वाची गोठी ॥ ऐक जगजेठी उद्धवा ॥ ८५ ॥ श्लोक ॥ ॥ सुप्तस्य विषयालोको ध्यायतो वा मनोरथः ॥ नानात्मकत्वाद्विफलस्तथा भेदात्मधीर्गुणैः ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्वप्न आणि मनोरथ ॥ मनोमात्रविलसित[8] ॥ ते निद्रितासि सत्य पदार्थ ॥ मिथ्या होत जागृतीं ॥ ८६ ॥ तैसें कामनेचेनि उल्हासें ॥ इंद्रियांचेनि सौरसें ॥ उभयभोगपिसें ॥ नाथिलें सवे बुद्धीसी ॥ ८७ ॥ शिंपीं शिंपपणें असे ॥ धनलोभ्या रुपें भासे ॥ तेवीं विषयाचेनि अभि

---

१ पोचते. २ उपासना करावी. ३ स्पष्ट. ४ राहण्याचें. ५ पवित्र. ६ आपल्या धर्माच्या निमित्तानें. ७ आत्म्याचें सुख. ८ मनानेंच केवळ भासलेलें.

लाघें ॥ भेद[1]पिसें भलतेंची ॥ ८८ ॥ स्वप्नीं देखिलें आत्ममरण ॥ जागृतीं मिथ्या ह्मणे आपण ॥ तैसा स्वरूपीं जागा जाहल्या जाण ॥
जन्ममरण त्या नाहीं ॥८९॥ जंववरी भेदाची भेदसिद्धी ॥ तंववरी जन्ममरण बाधी ॥ भेद मिथ्या झालिया त्रिशुद्धी ॥ अभेदीं बाधी ते
नाहीं ॥ ९० ॥ तो भेदू कैसेनि तुटे ॥ निजस्वरूप कैसेनि भेटे ॥ ते अर्थीं साधन गोमटें ॥ ऐक चोखटें विभागें ॥ ९१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ निवृत्तं
कर्म सेवेत प्रवृत्तं मत्परस्त्यजेत् ॥ जिज्ञासायां संप्रवृत्तो नाद्रियेत्कर्मचोदनाम् ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ चित्तीं वासनेचे मळ ॥ तेणें भेदु भासे
सबळ ॥ तो नाशावया चित्तमळ ॥ कर्म निर्मळ सेवावें ॥ ९२ ॥ मागें सांगीतलें निश्चित ॥ जें कां नित्यनैमित्य ॥ तेंचि कर्म गा नि
वृत्त ॥ सा[3]धकी प्रस्तुत सेवावें ॥ ९३ ॥ जो प्रवर्तला माझ्या भजनीं ॥ तेणें काम्य सांडावें निपटूनी ॥ हें मागें सांगीतलें विवं[4]चूनी ॥
कामना मनीं न धरावी ॥ ९४ ॥ धरोनि मदर्पणाचें बळ ॥ नित्य आचरतां निर्मळ ॥ चित्ताचे चैत्य मळ ॥ जाती तत्काळ नासोनी
॥ ९५ ॥ कृ[5]षीवळू करी शेतासी ॥ यथार्थ द्रव्य दे राजयासी ॥ तो नभी ग्रामकंटकासी ॥ तेवीं कृष्णार्पणेंसी होतसे ॥ ९६ ॥ झाल्या
चित्तमळक्षाळणें ॥ नित्य विवेक उपजे तेणें ॥ इहामुत्रां लाता हाणे ॥ अनित्य त्य[6]जणें वैराग्यें ॥ ९७ ॥ एवं वैराग्य झालिया अढळ ॥
तेणें सत्व होय प्रबळ ॥ तेव्हां मज जाणावया केवळ ॥ वृत्तिनिर्मळ ते काळीं ॥ ९८ ॥ करितां माझी चिंता ॥ कामक्रोध नाठवती चित्तां ॥
थोर लागली माझी आस्था ॥ न राहे सर्वथा अणुभरी ॥ ९९ ॥ होकां ऐशिये अवस्थेसी ॥ कर्मक्रिया नावडे ज्यासी ॥ तेणें संन्यासूनि
सर्वकर्मांसी ब्रह्मज्ञानासी रिघावें ॥ १०० ॥ श्रवण मनन करितां ॥ कर्मासि झालिया विगुणता ॥ बाधक नव्हे माझ्या भक्ता ॥ क[7]र्म
किंकरता त्या नाहीं ॥ १ ॥ स्वधर्म केलिया फळ काये ॥ चित्ताचा मळमात्र जाये ॥ भक्तजन निर्मळ होये ॥ बाधूं नलाहे स्वकर्म
॥ २ ॥ एवं कर्माची चोदना ॥ मद्भक्तांसि नाहीं जाणा ॥ करितां श्रवणकीर्तना ॥ कर्मबंधना नातळती ॥ ३ ॥ ऐशिया जिज्ञासावस्थेसी ॥
कर्मबाधा नाहीं त्यासी ॥ मुख्य तात्पर्य ब्रह्मज्ञानासी ॥ हेंचि उद्धवासी सांगत ॥ ४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यमानभीक्ष्णं सेवेत नियमान्म
त्परः क्वचित् ॥ मदभिज्ञं गुरुं शांतमुपासीत मदात्मकम् ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ व्हावया वृत्तीचा [8]उपरम ॥ अहिंसासत्यादि धर्म ॥ नाचरावे
अविश्रम ॥ बाह्य नेम अविरोधें ॥ ५ ॥ आचरतां अहिंसासत्यादिकेंसी ॥ तंव तंव दशा उजळे कैसी ॥ अतिप्रीती गुरुभक्तीसी ॥ अ
हर्निशीं गुरु चिंती ॥ ६ ॥ सद्गुरूवीण ब्रह्मज्ञान ॥ सर्वथा नव्हे नव्हे जाण ॥ हें उपनिषदर्थ प्रमाण ॥ परमनिर्वाण सांगीतलें ॥ ७ ॥
डोळां देखणाचि आहे ॥ त्यासि सूर्य नव्हतां साह्ये ॥ सिद्ध पदार्थ देखों नलाहे ॥ स्तब्ध राहे अंधारीं ॥ ८ ॥ नाव तारी हें साचार ॥

---

१ द्वैताचें वेड. २ चांगलें. ३ मुमुक्षूनें. ४ स्पष्ट करून. ५ शेतकरी. ६ टाकणें. ७ कर्माचा सेवकपणा. ८ लय. ९

माजी बैसले थोरथोर ॥ परी तारकेंवीण परपार ॥ समर्थ नर न पावती ॥ ९ ॥ पर्जन्यें भूमी मार्दवा आली ॥ बीजें कणिंग असे भरली
॥ परी ज्ञातेनें पेरणी नाहीं केली ॥ तंव पिकाची बोली पोंचट ॥ ११० ॥ रत्न सांपडलें अवचितें ॥ परी खरेंखोटें संशयें तेथें ॥ रत्नपारखी
करी मोलातें ॥ अति यत्न त्यातें मग करिती ॥ ११ ॥ तैसें निजस्वरूप आइतें ॥ श्रद्धासद्गुरूचेनि हातें ॥ खरें करूनियां ज्ञाते ॥
निजसुखातें[1] पावले ॥ १२ ॥ साधावया निजज्ञान ॥ करितां सद्गुरूचें सेवन ॥ निवाले संतसज्जन ॥ आनंदघन सद्गुरू ॥ १३ ॥ ह्मणसी
साधनें केलीं अनेक ॥ तैसें सद्गुरूही साधन एक ॥ ह्मणतां मुमुक्षू झाले मूर्ख ॥ निजात्मसुख बुडालें ॥ १४ ॥ सद्गुरु केला तें साधन ॥
त्याहूनि परतें साध्य आन ॥ ह्मणतां आली नागवण ॥ नागवला जाण सर्वस्वें ॥ १५ ॥ जो चित्सुखें सदा संपन्न ॥ चिद्रूपीं ज्यासी
समाधान ॥ तो चिन्मात्र होऊनि भिन्न ॥ नव्हे जाण सर्वथा ॥ १६ ॥ लवण[2] सागरीं रिघालें ॥ तेव्हांचि तें समुद्र झालें ॥ दीपें वणवया
आलिंगिलें ॥ वणवाचि झालें तें तेज ॥ १७ ॥ एवं चिद्रूपाचें ज्यासि ज्ञान ॥ तो चिद्रूपचि सत्य संपूर्ण ॥ गुरु ब्रह्म अभिन्न
जाण ॥ येअर्थीं प्रमाण उपनिषद ॥ १८ ॥ होकां घृतांची[3] पुतळी ॥ नव्हतां घृतपणा वेगळी ॥ घृतरूपें रूपा आली ॥ तैसी मूर्ती जाहली
सद्गुरूची ॥ १९ ॥ तो चित्सुखाचा पुतळा ॥ कीं सच्चिदानंदाचा सोहळा ॥ प्रत्यक्ष देखावया डोळां ॥ धरी लीलाविग्रह ॥ १२० ॥
त्याची व्हावया भेटी ॥ पाहिजेती भाग्याचिया कोटी ॥ हेळणेवरी दिसे दिठी ॥ तैसी गोठी त्या नाहीं ॥ २१ ॥ सद्गुरु जेउती वास
पाहे ॥ तेउती सुखाची दृष्टि होये ॥ तो ह्मणे तेथ राहे ॥ महाबोधु आहे स्वानंदें ॥ २२ ॥ त्या सद्गुरूचे देखिल्या पाये ॥ ताहानभूक तल्काळ
जाये ॥ कल्पना उठोंचि नलाहे ॥ निजसुख आहे गुरुचरणीं ॥ २३ ॥ त्या सद्गुरूचें लक्षण ॥ सांगतां शब्द थोटावे[4] जाण ॥ जो
सनातन[5] ब्रह्म पूर्ण ॥ उण खूण त्या नाहीं ॥ २४ ॥ तरी स्फुरली एक स्फूर्ती ॥ त्यासि सर्वार्थीं दिसे शांती ॥ शांतीवेगळी उपपत्ती[6] ॥ प्रमाण
निश्चितीं रिघेना ॥ २५ ॥ शांति तेचि ब्रह्मज्ञान ॥ शांति तेचि समाधान ॥ शांति तेचि ब्रह्म पूर्ण ॥ सत्य जाण उद्धवा ॥ २६ ॥
ऐसी सद्गुरूची स्थिती ॥ ऐकोनि शिष्याच्या चित्तीं[7] ॥ वाढली अतिप्रीती ॥ गुरुभक्तीलागोनी ॥ २७ ॥ यालागीं गुरुगवेषणा[8] ॥ उसंत
घेवोंनेदी मना ॥ अष्टौ प्रहर विचक्षणा ॥ गुरुलक्षणा लक्षितू ॥ २८ ॥ कैं तो स्वामी देखेन ऐसा ॥ कैं हा माझा फिटेल फांसा ॥ कैं उपरमु
होईल मानसा ॥ सद्गुरुपिसा तो झाला ॥ २९ ॥ आयुष्य वेंचतां उठाउठी ॥ अझूनि नव्हे सद्गुरूची भेटी ॥ झाल्या मनुष्यदेहासि
तुटी ॥ सर्वस्व शेवटीं बुडेल ॥ १३० ॥ ऐकतां गुरूचें नांव ॥ मनापुढें घेत धांव ॥ ते गोष्टीसीच देत खेव ॥ येवढी हांव जयाची ॥ ३१ ॥

---

१ ब्रह्मसुखास. २ मीठ. ३ तुपाची. ४ थकतो. ५ जुना. ६ युक्ति. ७ मनांत. ८ गुरूचा शोध.

सद्गुरु प्रत्यक्ष भेटतां ॥ मनेंचि पूजी गुरुनाथा ॥ परमआदरें पूजा करितां ॥ प्रेम तत्त्वतां नेंसंडे ॥ ३२ ॥ सद्गुरु भेटावयाकारणें ॥ हिंडे
तीर्थें तपोवनें ॥ गुरु न विसंबे मनें ॥ नित्यविधीनें आचरतां ॥ ३३ ॥ सद्गुरुप्राप्तीचिया काजा ॥ लहानथोरांची करी पूजा ॥ अत्यादरें मा
नी द्विजा ॥ गुरु मज माझा भेटावा ॥ ३४ ॥ अस्वलाचिया परी ॥ गुरुनामाचा जप करी ॥ गुरुत्वांचोनि निरंतरीं ॥ चिंता न करी अं
नाची ॥ ३५ ॥ आसनीं भोजनीं शयनीं ॥ गुरूतें न विसंबे मनीं ॥ जागृतीं आणि स्वप्नीं ॥ निदिध्यासनीं गुरु केला ॥ ३६ ॥ गुरु
स्मरण करितां देख ॥ स्मरणें विसरे ताहानभूक ॥ विसरला देहगेहसुख ॥ सदा संमुखपरमार्था ॥ ३७ ॥ ऐसी सद्गुरूची आवडी ॥
ज्याची आस्था चढोवढी ॥ त्यासि गुरुरूपें तांतडी ॥ भेटी रोकडी मी देतों ॥ ३८ ॥ जंवजंव आस्था अधिक ॥ तंवतंव भेटीची जव
ळिक ॥ साधनांमाजी हें साधन मुख्य ॥ आस्थाचि एक विशेषें ॥ ३९ ॥ करितां वरिष्ठसाधनें कोडी ॥ बोधाची जोडेना कवडी ॥
सद्गुरुभजनाची अर्ध घडी ॥ जोडी कोडी बोधाच्या ॥ १४० ॥ सद्गुरुभजनीं लागवेगें ॥ मोक्ष येऊनि पायां लागे ॥ गुरुभक्त तोही
नेघे ॥ चरणरंगें[3] रंगला ॥ ४१ ॥ श्रीगुरुचरणाची गोडी ॥ विसरवी मोक्षसुखाच्या कोडी ॥ गुरुभजनीं जयां अनावडी[4] ॥ ते संसारबां
दवडीं पडियेले ॥ ४२ ॥ संसार छेदावया बंधन ॥ करावें सद्गुरुसेवन ॥ सद्गुरुसेवा तें भजन ॥ गुरु आह्मां भिन्नभावो नाहीं ॥ ४३ ॥
गुरुभक्तांची श्रद्धा गाढी ॥ आणि गुरुभजनाची गोडी ॥ ते सांगीतली आवडीं ॥ प्रत्यक्ष उघडी करूनी ॥ ४४ ॥ सहज प्रसंगें येणें ॥
शिष्यांचींही लक्षणें ॥ सांगेन तुजकारणें ॥ कृष्ण ह्मणे उद्धवा ॥ ४५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अमान्यमत्सरो दक्षो निर्ममो दृढसौहृदः ॥ अस
त्वरोऽर्थजिज्ञासुरनसूयुरमोघवाक् ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ मान देखोनि सहसा ॥ शिष्य सांकडों लागे कैसा ॥ जेवीं गळीं लागला मासा ॥
चरफडी तैसा सन्मानें ॥ ४६ ॥ नाम ऐकोनि बागुलातें ॥ बाळ सांडूं पाहे प्राणातें ॥ तेवीं ऐकतांचि सन्मानातें ॥ भयें प्राणातें सां
कडें ॥ ४७ ॥ प्रचंडवातें[6] जेवीं केळी ॥ समूळ कांपे चळचळी ॥ कां लहरीच्या कल्लोळीं ॥ कांपे जळीं रविंबिंब[7] ॥ ४८ ॥ सन्मानू तेणें
पाडें ॥ दृष्टीं देखोंची नावडे ॥ महत्त्वें थोर सांकडें ॥ अंगाकडे येवोंनेदी ॥ ४९ ॥ आदरें घेतां सन्मान ॥ दृढ होईल देहाभिमान ॥ सां
डोनि मानाभिमान ॥ हीनदीन होऊनि असे ॥ १५० ॥ समूळ नामरूप जाये ॥ मज कोणी देखों नलाहे ॥ ऐसी दशा जेणें होये ॥ तेते
उपाये करीतसे ॥ ५१ ॥ लौकिक देखोनि उद्वेगू ॥ देहगेहांचा उबगू ॥ एकलेपणीं अति चांगू ॥ न धरी संगू द्वैताचा ॥ ५२ ॥ मज कोणी
न देखावें ॥ मज कोणी न वोळखावें ॥ मज कोणी न लाजावें ॥ ऐसें जीवीं वांछितू ॥ ५३ ॥ मान देखोनियां दिठीं ॥ लपे देह उपेक्षेच्या

---

१ सांडत नाहीं. २ दुसऱ्याची. ३ पायाच्या प्रेमानें. ४ प्रीति नाहीं. ५ वेगळेपणा. ६ मोठ्या वाऱ्यानें. ७ सूर्याचें प्रतिबिंब. ८ दृष्टीनें.

पोटीं ॥ जेवीं चोर लागलिया पाठीं ॥ लपे संकटीं धनवंतू ॥ ५४ ॥ मी एक लौकिकीं आहे ॥ ऐसें कोणा ठावें नोहे ॥ ऐशीऐशी दशा पाहे ॥ मान नसाहे यालागीं ॥ ५५ ॥ सांडावया अहंममता ॥ मानू नसाहे सर्वथा ॥ लौकिकीं सन्मानू घेतां ॥ दृढ अहंता होईल ॥ ५६ ॥ ज्यांचे पोटीं दृढ अभिमान ॥ ते सदा वांछिती अभिमान ॥ जो सांडूं रिघे अभिमान ॥ तो मानापमान न पाहे ॥ ५७ ॥ जेणें घेतला सन्मान ॥ त्या नेघवे अपमान ॥ तेथ सहजें आला देहाभिमान ॥ यालागीं सन्मान नावडे ॥ ५८ ॥ सन्मान घ्यावया तत्त्वतां॥ ज्ञातेपण मिरवी ज्ञाता ॥ ते संधी वसे ममता ॥ अर्थस्वार्थाचेनि लोभें ॥ ५९ ॥ एवं नापेक्षी सन्मान ॥ हें प्रथम शिष्याचें लक्षण ॥ आतां निर्मत्सरत्व[3] संपूर्ण ॥ तें सुलक्षण परियेसी ॥ १६० ॥ सज्ञानामाजी वैर ॥ ज्ञातृत्वाचा मत्सर ॥ तेथें देहाभिमानें केलें घर ॥ अतिदुस्तर[4] जीवासी ॥ ६१ ॥ ज्ञानाभिमानाची गोष्टी ॥ वेंचूनि तपाचिये कोटी ॥ दुजी करीत होता सृष्टी ॥ अभिमान पोटीं ज्ञानाचा ॥ ६२ ॥ ज्ञानाभिमान दुर्वासासी ॥ व्यर्थ शापिला अंबर्षी ॥ म्यां सोशिलें गर्भवासासी ॥ ज्ञानाभिमानासी भिऊनी ॥ ६३ ॥ ज्ञानाभिमान ब्रह्मयासी ॥ नेलें गोपालवत्सांसी ॥ मज होणें पडिलें त्या वेषांसी ॥ ज्ञानाभिमानासी भेऊनी ॥ ६४ ॥ उद्धवा ज्ञानाभिमान ॥ सर्वां अभिमानांमाजी कठिण ॥ वसिष्ठ विश्वामित्र जाण ॥ ज्ञानाभिमानें भांडती ॥ ६५ ॥ एवं ज्ञानाभिमानाभेण ॥ म्यां घेतलें गोवळेंपण ॥ मज मूर्ख ह्मणती याज्ञिक ब्राह्मण ॥ त्यांसि ज्ञानाभिमान कर्माचा ॥ ६६ ॥ मुख्य माझीच ऐशी दशा ॥ तेथें इतरांचा पाडें कायसा ॥ ज्ञानाभिमानाचा दृढ फांसा ॥ नुंगवे सहसा ज्ञात्यासी ॥ ६७ ॥ ज्ञानाभिमानाची जाती कैशी ॥ उभा न ठाके मूर्खांपाशीं ॥ वैर लावी सज्ञानासी ॥ मत्सरेंसी वर्तवी ॥ ६८ ॥ एवं निर्मत्सर होणें ज्यासी ॥ तेणें सांडावें ज्ञानाभिमानासी ॥ येरवीं तो ज्ञातयासी॥ समत्सरेंसी नांदवी ॥ ६९ ॥ ऐक मत्सराची सामग्री ॥ देहीं देहाभिमान दृढ करी ॥ तोही ज्ञातेपणाचें बळ धरी ॥ लोभ माझारी अर्थस्वार्थें ॥ १७० ॥ इतुकी सामग्री जेथें होये ॥ तोचि मत्सरें द्वेषु वाहे ॥ शुद्ध शिष्य हें न साहे ॥ त्यागोनि जाये मत्सरू ॥ ७१ ॥ मत्सराची जाती कैशी ॥ अवश्य वसे ज्ञात्यापाशीं ॥ मत्सरू थोर पंडिताशी ॥ यावज्जन्मेंसी न सांडिती ॥ ७२ ॥ पंडित भेटती समत्सर ॥ लवण भजन अतिनम्र ॥ बोलती अतिमधुर ॥ समत्सर छळणोक्तीं ॥ ७३ ॥ मत्सरें पंडित येती क्रोधा ॥ असदारोपणें करिती निंदा ॥ एवढी मत्सराची बाधा ॥ नातळे कदा सच्छिष्या ॥ ७४ ॥ मत्सरू ज्ञात्यातें न सांडी ॥ मा इतर काइसीं बापुडीं ॥ सच्छिष्य द्वेषाची गोष्टी सोडी ॥ मत्सरू तोडी सर्वस्वें ॥ ७५ ॥ मत्सर सांडूनि तत्त्वतां ॥ सच्छिष्यें राहावें सर्वथा ॥ निर्मत्सरें तेचि कथा ॥ ऐक

---

१ सहन करीत नाहीं. २ इच्छा करीत नाहीं. ३ द्वेष नसणें. ४ फार कठीण. ५ मोठेपणा. ६ उगोवतां येत नाहीं. ७ वागविती. ८ खोट्या आरोपानें.

आतां सांगेन ॥ ७६ ॥ पुढूनि स्वार्थ नेतां ॥ द्वेष [1]उपजोंनेदी चित्ता ॥ भूतीं भगवंतू भावितां ॥ द्वेषू सर्वथा येवों नेदी ॥ ७७ ॥ निंदेचिया वाग्बाणीं ॥ दारुण विंधिल्या दुर्जनीं ॥ द्वेष उपजों नेदी मनीं ॥ हित मानी निंदेचें ॥ ७८ ॥ जेणें जेणें निजनिंदा केली ॥ तो तो मानी हित माउली ॥ पापमळाची क्षाळणा झाली ॥ शुद्ध केली माझी वृत्ती ॥ ७९ ॥ ऐसऐशिया विवंचना ॥ द्वेष आतळों नेदी मना ॥ निर्मत्सरता ते हे जाणा ॥ दुसरी लक्षणा शिष्याची ॥ १८० ॥ यावरी जे [2]दक्षता ॥ तेही तुज सांगों आतां ॥ शिष्याची [3]प्रगल्भता ॥ निजस्वार्था लागोनी ॥ ८१ ॥ उगवल्या सावधानभास्करा ॥ नाशी निद्रेतंद्रेच्या अंधारा ॥ होय धारणेचा दिवस खरा ॥ धृतीच्या दुपारा वर्ततु ॥ ८२ ॥ त्या दिवसाचेंनि लवलाहे ॥ शमदमादिसमुदायें ॥ [4]भक्तिपंथें चालताहे ॥ मार्गीं नराहे क्षणभरी ॥ ८३ ॥ तेथें उचलता पाउलीं ॥ निजबोधाचीं पव्हें टाकिलीं ॥ जेथ [5]पथिकांची निवाली ॥ निजआर्ते[6] तृष्णेची ॥ ८४ ॥ तेथ [7]निजग्रामींचे भेटले ॥ सोहंसांगाती एकवटले ॥ तेथूनि [8]चुकणया मुकले ॥ नीट लागले निजपंथीं ॥ ८५ ॥ ऐके बापा विचक्षणा ॥ आळसू आतळों नेदी मना ॥ त्या नांव दक्षता जाणा ॥ तिसरी लक्षणा शिष्याची ॥ ८६ ॥ जुनाट संग्रहो सवें होतां ॥ ते सर्व सांडिलो ममता ॥ सांडिल्याची [9]क्षिंती मागुता ॥ नकरी सर्वथा निजबोधें ॥ ८७ ॥ देहीं दृढ धरावी अहंता ॥ तेणें देहसंबंधाची ममता ॥ देहाभिमान नातळे चित्ता ॥ गेली ममता नलगतां ॥ ८८ ॥ देह नश्वरत्वें देखिला ॥ विष्ठामूत्रांचा मोधळा ॥ यालागी अहंकारू गेला ॥ सोहं लागला दृढभावो ॥ ८९ ॥ दृढ वाढवूनि सोहंता ॥ तेणें सांडविली अहंममता ॥ हे चौथी गा अवस्था ॥ जाण तत्त्वतां शिष्याची ॥ १९० ॥ गुरु माता गुरु पिता ॥ गुरु गणगोत तत्त्वतां ॥ गुरु बंधूसी सुहृदता ॥ निजस्वार्था शिष्याच्या ॥ ९१ ॥ गुरुपरिचर्या नित्यकर्म ॥ गुरुसेवा हाचि स्वधर्म ॥ गुरु तोचि आत्माराम ॥ सुहृदसंभ्रम सद्गुरूसी ॥ ९२ ॥ ऐसें सद्गुरूसी सुहृदपण ॥ असावें शिष्यासि संपूर्ण ॥ हें पांचवें गा लक्षण ॥ सत्य जाण उद्धवा ॥ ९३ ॥ चंचळत्वें [10]चंळु चित्ता ॥ येवोंनेदीच सर्वथा ॥ निजीं निजरूपनिश्चळता ॥ साधी सर्वथा सर्वस्वें ॥ ९४ ॥ जरी चंचळ झालें अंग ॥ चित्त गुरुचरणीं निश्चळ चांग ॥ अंगीं वाजतां लगबग ॥ वृत्ति अभंग गुरुचरणीं ॥ ९५ ॥ शरीर वर्ततां व्यापारां ॥ ज्याचे हृदयीं नाहीं त्वरा ॥ गुरुचरणीं धरिला थारा ॥ हा शिष्य खरा परमार्थी ॥ ९६ ॥ ज्यासि हृदयीं चंचळता ॥ तो शिष्य नव्हे निजस्वार्था ॥ ज्याचे अंतरीं निश्चळता ॥ तोचि परमार्था साधकू ॥ ९७ ॥ ऐसी साधूनि निश्चळता ॥ ज्यासि निजस्वार्थीं जिज्ञासुता ॥ तोचि क्षणार्धें परमार्था ॥ पावे तत्त्वतां गुरुवाक्यें ॥ ९८ ॥ जैसा दीपें दीप लाविला ॥ लावितांचि [11]तत्समान झाला ॥ तैसा नि

---

१ उत्पन्न होऊं देत नाही. २ चातुर्य. ३ धैर्य. ४ भक्तिमार्गानें. ५ वाटसरूंची. ६ तृष्णेची पीडा. ७ आपल्या मावातले. ८ चुकावयास. ९ दुःख. १० चळन. ११ दीपासारखा.

श्रयेंसी गुरु भेटला ॥ तो तत्काळ झाला तद्रूप ॥ ९९ ॥ एवं अंतरीं[1] जें निश्चळपण ॥ तें शिष्याचें श्रेष्ठ लक्षण ॥ तो साहवा गा गुण जाण ॥ तणें निर्दळण षड्विकारां ॥ २०० ॥ षड्विकार देहावरी ॥ शिष्य देहबुद्धी हातीं नधरी ॥ यालागीं मावळली जे विकारीं ॥ गुरुवाक्यें करी वर्तता ॥ १ ॥ ऐसी साध्य करूनि निश्चळता ॥ सांधूं रिघे जो परमार्था ॥ धरोनियां अर्थजिज्ञासुता ॥ होय भजता गुरुचरणीं ॥ २ ॥ ज्यासि अर्थजिज्ञासुता नाहीं ॥ तो भजेना गुरूच्याठायीं ॥ जरी भजे कहिंबहीं ॥ तरी स्वार्थें पाही विषयाच्या ॥ ३ ॥ सांडोनियां विषयस्वार्था ॥ इत्थंभूत[2] जाणावया अर्था ॥ जो भजे परमार्था ॥ जिज्ञासुता त्या नांव ॥ ४ ॥ ऐशी धरोनि जिज्ञासुता ॥ चढती आवडी परमार्था ॥ आराणुक[3] नाहीं चित्ता ॥ निजस्वार्थाचेनि लोभें ॥ ५ ॥ अतिप्रीतीं परमार्था ॥ चढती वाढती अवस्था ॥ हे सातवी लक्षणता ॥ जाण तत्त्वतां शिष्याची ॥ ६ ॥ हें सातवें लक्षण ॥ परमार्थाचें अंगवण ॥ पावलें असे जाण ॥ जिज्ञासुपणाचेनि नेटें ॥ ७ ॥ गुरु बहुतांची साउली ॥ शिष्यवर्गाची माउली ॥ तेथें असूया[4] जेणें केली ॥ त्याची बुडाली निजप्राप्ती ॥ ८ ॥ यालागीं गुरूचा जो अंकितू ॥ तो गुरुत्वेंचि मानितू ॥ असूया नाठवे मनांतू ॥ अतिविनीतू सर्वांसी ॥ ९ ॥ गुरुबंधु कनिष्ठ दीन ॥ त्याच्याठायीं उत्तम गुण ॥ जाणोनि मनीं आपण ॥ असदारोपण[5] तेथें करी ॥ २१० ॥ पुढिलांचा उत्तम गुण ॥ त्यासि मिथ्या लावूनि दूषण ॥ लटिकें ह्मणे त्याचें ज्ञान ॥ असूया जाण यानांव ॥ ११ ॥ प्रत्यक्ष भेटल्या वर्णी गुण ॥ नम्र होवोनि वंदी चरण ॥ सवेंचि मार्गें करी छळण ॥ असूया संपूर्ण यानांव ॥ १२ ॥ सच्छिष्य ये अर्थीं निर्मळ ॥ होवों नेदी असूयेचा विटाळ ॥ उत्तममध्यमप्राकृतमेळ ॥ वंदी परी छळ करूं नेणें ॥ १३ ॥ गुरूनें शिकविली वस्तुसमता ॥ तेथ निरंतर ठेवूनि चित्ता ॥ समभावें वंदी समस्तां ॥ छळूं सर्वथा तो नेणें ॥ १४ ॥ यापरी गा उद्धवा ॥ छळूं नेणें कोणा जीवा ॥ हा अनसूयु ह्मणावा ॥ गुण आठवा शिष्याचा ॥ १५ ॥ हे अष्टौ महामणिमाळी ॥ अखंड ज्याच्या हृदयकमळीं ॥ तो पावे सद्गुरुजवळी ॥ नवी नव्हाळी भेटीची ॥ १६ ॥ यावरी नववें लक्षण ॥ तें जाण नवविधान ॥ सत्य धृत संभाषण ॥ वाग्विलापन[6] सांडूनी ॥ १७ ॥ सद्गुरूप्रति जाण ॥ मृदु विनीत करी प्रश्न ॥ सत्याचें सत्य तें गुरुवचन ॥ मानी जाण निजभावें[7] ॥ १८ ॥ युक्ति वाढवून उदंड ॥ नानामतें अकांडतांड ॥ साद्य संचरोनि पाखंड ॥ गर्जत तोंड महावादें ॥ १९ ॥ साधिका बाधिका युक्ती ॥ माजी संचरोनि छळणोक्ती ॥ आपुली मिरवावी युक्ती ॥ हें नाहीं चित्तीं शिष्याचे ॥ २२० ॥ सद्गुरुपुढें अतिजल्प ॥ करणें तेंचि महापाप ॥ हें जाणूनि सांडी वृथालाप ॥ मिथ्या स्वल्प बोलेना ॥ २१ ॥ शिष्याचें बो

---

[1] मनांत. [2] आहेतसा. [3] संतोष, करमणूक. [4] द्वेषबुद्धि. [5] खोटेपणाचा आरोप. [6] बडबड. [7] आपल्या भक्तीनें.

लणें कैसें ॥ वाचा परिपक्क अमृत जैसें ॥ बोळघोळले प्रेमरसें ॥ प्रश्न पुसे एकांतीं ॥ २२ ॥ मिथ्यावादाचीं[1] अपक्कफळें[2] ॥ तुखें तिखटें तोंडाळें ॥ सदटें झडलीं पूर्वकाळें ॥ बोले प्रांजळें परिपक्क ॥ २३ ॥ बोलों नेणें छळ छद्म ॥ स्पर्शों नेदी परवर्म ॥ बोली नुपजवी अधर्म ॥ मनोधर्म क्षोभक ॥ २४ ॥ व्यर्थ न करी आशंका ॥ निंदेलागीं तो मुका ॥ झुकवूं नेणे लोकां ॥ बाळां मूर्खां पंडितां ॥ २५ ॥ बोलों नेणे अतिकर्कश[3] ॥ करूं नेणे उपहास ॥ बोलामाजी न धरी आस ॥ बोले नैराश्य वैराग्य ॥ २६ ॥ बोली बोलूं नेणे आटू ॥ छळणोक्तीं नव्हे शठू ॥ बहु बोलतां मानी विटू ॥ मौननिष्ठ होऊनि राहे ॥ २७ ॥ वाद विवाद अतिवाद ॥ नावडे कोणाचा संवाद ॥ न करी बोलाचा विनोद ॥ लौकिकशब्द न बोले ॥ २८ ॥ वक्रोक्ति नाहीं जाण ॥ बोली न बोले विंदाण ॥ करूं नेणे प्रतारण ॥ मिथ्या वचन न बोले ॥ २९ ॥ पोटीं कार्य नाहीं करणें ॥ होहो ह्मणोनि झकविणें ॥ हेंही नाहीं तया बोलणें ॥ सदा पठणें हरिनाम ॥ २३० ॥ पश्चिम द्वारींचें कवाड ॥ सदा वाऱ्यानें करी खडखड ॥ तैशी न करी बडबड ॥ वृथा तोंड पिटीना ॥ ३१ ॥ करितां शब्दब्रह्मसंवादू ॥ युक्तिबोधें विद्वांसा[4] क्रोधू ॥ अनिवार देखोनि बाधू ॥ न बोले शब्दू शाब्दिक ॥ ३२ ॥ न मिरवी शब्दज्ञान ॥ न दाखवी आत्ममौन ॥ न धरी वचनाभिमान ॥ सदा स्मरण गुरूचें ॥ ३३ ॥ बोलें नुपजवी[5] उद्वेग ॥ बोलावया न करी उद्योग ॥ बोली नुठवी महावेग ॥ अनुद्वेग बोलणें ॥ ३४ ॥ सत्य आणि अतिमधुर ॥ ऐकतां अत्यंत आल्हादकर[6] ॥ सर्वांसि हितत्वें साचार ॥ बोले सनागर हरिकथा ॥ ३५ ॥ प्रार्थूनियां सद्गुरूसी ॥ बहु बोलणें नाहीं त्यासी ॥ पुसणें एकाक्षरासी ॥ निजसुखासी सेवावया ॥ ३६ ॥ एवं शिष्याचीं नव लक्षणें ॥ नवखंडपृथ्वीचीं आभरणें[7] ॥ निजकृपेनें नारायणें ॥ भक्ताकारणें दीधलीं ॥ ३७ ॥ हे नवरत्नमाळा गोमटी ॥ जो घाली सद्गुरूच्या कंठीं ॥ तो बैसे सायुज्याच्या पाठीं ॥ उठाउठीं तत्काळ ॥ ३८ ॥ या नवरत्नाचें पदक ॥ ज्या शिष्याचे हृदयीं देख ॥ तो सद्गुरूचा आवश्यक ॥ विश्वासिक सर्वार्थीं ॥ ३९ ॥ या नवरत्नांची अभिन्न गांठी ॥ जो सद्गुरूसि आणी भेटी ॥ तो स्वराज्याच्या मुकुटीं ॥ झळकत उठी महामणी ॥ २४० ॥ उद्धवा येथें आशंका धरिसी ॥ नांदतां स्त्रीपुत्रधनधान्येंसी ॥ निर्ममता शिष्यासी ॥ कैसेनि त्यासी उपजवी[8] ॥ ४१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ जायापत्यगृहक्षेत्रस्वजनद्रविणादिषु ॥ उदासीनः समं पश्यन् सर्वेष्वर्थमिवाऽऽत्मनः ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ येविखीं सादर ऐक ॥ शिष्य निरसावया[9] निजदुःख[10] ॥ पावावया आत्मसुख ॥ साधी विवेक साधनें ॥ ४२ ॥ विचारितां आत्मसुख ॥ सर्वदेहीं समान देख ॥ विजातीय स्त्रीपुरुषवेख ॥ सुखविशेख तेथ नाहीं ॥ ४३ ॥ पाहे पां स्त्रीपुरुषदेहीं ॥ आत्मा आत्मीं हें तंव नाहीं ॥ आत्मसुख

---

१ खोटया वादांचीं. २ कच्ची फळें. ३ फार कठीण. ४ विद्वानास. ५ उत्पन्न करीत नाहीं. ६ आनंद देणारें. ७ अलंकार. ८ उत्पन्न करिते. ९ नाहींसें करण्याकरितां. १० आपलें दुःख.

आपुल्याठायीं ॥ असे पाही स्वतःसिद्ध ॥ ४४ ॥ सुखाचिलागीं सर्वथा ॥ झोंबती प्रपंचपदार्थां ॥ ज्यासि गुरुवाक्य आलें हातां ॥ अद्वैतता निजसुख ॥ ४५ ॥ एकपणीं निजात्मसुख ॥ हातां आलें नित्य निर्दोख ॥ आतां द्वैत वांछी तो अतिमूर्ख ॥ थितें सुख नासावया ॥ ४६ ॥ प्रपंचामाजी असतें सुख ॥ तरी कां त्यजिती सनकादिक ॥ द्वैत तितुकें केवळ दुःख ॥ परम सुख अद्वैतीं ॥ ४७ ॥ हेंचि साधकीं साधूनि ज्ञान ॥ स्त्री पुत्र स्वजन धन ॥ त्यांसि झाले उदासीन ॥ अद्वैतीं मन लागलें ॥ ४८ ॥ तेथ कोणाचें गृहक्षेत्र ॥ कोण पुसे कलत्र पुत्र ॥ धनधान्यसमृद्धि विचित्र ॥ माझें स्वतंत्र देह न ह्मणे ॥ ४९ ॥ ऐक उद्धवा यापरीं ॥ माझे भक्त संसारीं ॥ उदास झाले घरदारीं ॥ तत्त्वविचारीं लिगटोनी ॥ २५० ॥ लिगटोनियां गुरुचरणीं ॥ केली प्रपंचाची सांडणी ॥ मग अत्यादरें गुरुभजनीं ॥ निजसुखदानी गुरुरावो ॥ ५१ ॥ गुरुसेवेसि अत्यादर ॥ करितां न राहे आठौ प्रहर ॥ ठेविलें गुरुचरणीं अंतर ॥ निरंतर निजभावें ॥ ५२ ॥ उद्धवा येथें आशंका धरिसी ॥ जे देहावेगळ कोणे वस्तूसी ॥ देखोनि पावला निजसुखासी[3] ॥ विदेहत्वासी अनुभवू ॥ ५३ ॥ देहीं असोनि विदेहता ॥ प्रपंचीं असोनि अद्वैतता ॥ आली शिष्याचिया हातां ॥ तेही कथा परियेसी ॥ ५४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विलक्षणः स्थूलसूक्ष्माद्देहादात्मेक्षिता स्वदृक् ॥ यथाऽग्निर्दारुणो दाह्याद्दाहकोऽन्यः प्रकाशकः ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्थूलसूक्ष्मदेहांहून ॥ आत्मा तो सर्वदा भिन्न ॥ तेणें वेगळेपणें जाण ॥ करी वर्त्तन प्रपंचीं ॥ ५५ ॥ जीव उभय[4]देहीं वर्ततां ॥ प्राणियासि देहातीतता ॥ स्फुरत असे सर्वथा ॥ तेचि तत्त्वतां नेणती ॥ ५६ ॥ ह्मणे माझा डोळा दुखों लागला ॥ परी न ह्मणे मीचि दुखों आला ॥ माझा पांवोचि मोडला ॥ परी मी मोडला हें न ह्मणे ॥ ५७ ॥ यापरीं देहीं वर्ततां ॥ प्रत्यक्ष सांगे देहातीतता ॥ हे आपुली आपणां अवस्था ॥ न कळे भ्रांतां देहभ्रमें ॥ ५८ ॥ द्रष्टा दृश्य नव्हे सर्वथा ॥ तें जड तो चेतविता ॥ एवं आत्म्यासि विलक्षणता ॥ जाण तत्त्वतां या हेतूं ॥ ५९ ॥ विलक्षणता दोंप्रकारेंसी ॥ एक ते जाण द्रष्टेपणेंसी ॥ दुसरी ते स्वप्रकाशेंसी ॥ देहद्वयासी विलक्षण ॥ २६० ॥ द्रष्टा दृश्याहूनि भिन्न ॥ तरी तो ह्मणसी झाला मन ॥ तें चार्वाकमत जाण ॥ मनपण त्या नाहीं ॥ ६१ ॥ अकरा इंद्रियांमाजी जाण ॥ मन तेंही एक करण ॥ करणत्वें त्या जडपण ॥ आत्मा नव्हे जाण या हेतूं ॥ ६२ ॥ प्रपंचीं मनाची द[6]क्षता ॥ तें मनपणेंचि नव्हे तत्त्वतां ॥ जेवीं प्राणेंवीण नृपनाथा ॥ न दिसे सर्वथा निजभाग्य ॥ ६३ ॥ शस्त्राचेनि एकघायें ॥ छेदिले लोहार्गळसमुदाये ॥ तें शस्त्राचें सामर्थ्य नोहे ॥ बळ पाहे शूराचें ॥ ६४ ॥ लोहाँचा[7] लोहगोळ ॥ अग्निसंगें झाला इंगळ ॥ धडधडां निघती ज्वाळ ॥ तें नव्हे बळ लोहाचें ॥ ६५ ॥ त्या लोखंडाऐ

---

१ असलेलें. २ स्त्री. ३ आत्मसुखास. ४ स्थूल व सूक्ष्म दोन शरीरांत. ५ पाय. ६ चतुरता. ७ लोखंडाचा.

सें जड मन ॥ त्यासीच प्रभा प्रकाशून ॥ प्रवृत्तिमाजी प्रवर्तन ॥ करवी जाण श्रेष्ठत्वें ॥ ६६ ॥ पांव्यामाजी रागज्ञान ॥ केल्या अति मधुर गायन ॥ तो पांव्याचा नव्हे गुण ॥ कळा जाण गात्याची ॥ ६७ ॥ तैसा मनाचा जो व्यापार ॥ तो जाण पां परतंत्र ॥ नव्हे त्याचा तो स्वतंत्र ॥ जड विचार मनाचा ॥ ६८ ॥ सूर्याचेनि किरणसंगें ॥ सूर्यकांतीं अग्नि निघे ॥ तैसें आत्म्याचेनि प्रकाशयोगें ॥ मन सवेगें वर्तत ॥ ६९ ॥ मन जडत्वें जड जाण ॥ आत्मा स्वप्रकाशें प्रकाशघन ॥ मन तें आत्म्याआधीन ॥ आत्मा स्वाधीन आत्मत्वें ॥ २७० ॥ प्रत्यक्ष ह्मणे माझें मन ॥ परी मीचि मन न ह्मणे जाण ॥ यालागीं मनाहोनि आत्मा भिन्न ॥ वेगळेपण साक्षित्वें ॥ ७१ ॥ देहद्वयाहोनि भिन्न ॥ दृढ साधोनि आत्मज्ञान ॥ देहात्मबुद्धीचें छेदन ॥ केलें जाण शिष्याचें ॥ ७२ ॥ यालागीं देहात्मवादी ॥ जे सत्य मानिती उपाधी ॥ ते मिथ्या केली त्रिशुद्धी ॥ शुद्ध बुद्धी ते नव्हे ॥ ७३ ॥ मनावेगळा साधिला पहाहो ॥ तो तूं ह्मणसी पितामहो ॥ तो देवामध्यें श्रेष्ठ देवो ॥ हाही संदेहो न धरावा ॥ ७४ ॥ होकां गेल्या कल्पाचिये आदी ॥ ब्रह्मयासि मौढ्य होतें आधीं ॥ कर्हूं नशके सर्जनविधी ॥ जड बुद्धी तयाची ॥ ७५ ॥ त्यासि करूनि सावधान ॥ म्यांचि प्रकाशिलें निजज्ञान ॥ तेव्हां तो झाला ज्ञानसंपन्न ॥ सृष्टिसर्जन करावया ॥ ७६ ॥ नाभिकमळीं जन्मलें केवळ ॥ ब्रह्मा माझे पोटींचें बाळ ॥ माझ्या दोंदावरी खेळखेळ ॥ आत्मा केवळ तो नव्हे ॥ ७७ ॥ जितका देवांचा समुदावो ॥ तितुका प्रकाशचि पहाहो ॥ मी प्रकाशक अनादिदेवो ॥ स्वप्रकाशस्वभावो आत्मा तो मी ॥ ७८ ॥ देहद्वय आणि मन ॥ त्यांहोनि आत्मा विलक्षण ॥ हिरण्यगर्भाहोनि जाण ॥ विलक्षणपण आत्म्याचें ॥ ७९ ॥ हिरण्यगर्भचि परमात्मा ॥ हेंही न घडे गा भक्तोत्तमा ॥ मी हिरण्यगर्भाचाही आत्मा ॥ माझी महिमा त्या कैंची ॥ २८० ॥ एवं हिरण्यगर्भउपासना ॥ ते साधनरूपेंचि सेवना ॥ परी केवळ आत्मपणा ॥ नये जाणा मायिकत्वें ॥ ८१ ॥ तेंचि विलक्षणता ॥ आणोनियां दृष्टांता ॥ साधीतसे तत्त्वतां ॥ भक्ताच्या हातां चढे जेणें ॥ ८२ ॥ अग्नि काष्ठामाजी वसे ॥ परी तो काष्ठ होऊनि नसे ॥ मथिल्या काष्ठीं प्रकट दिसे ॥ जाळी उल्हासें काष्ठातें ॥ ८३ ॥ तैसा आत्मा देहीं असे ॥ तो देहोचि होऊनि नसे ॥ ब्रह्मज्ञानें जेव्हां प्रकाशे ॥ जाळी अनायासें देहभाव ॥ ८४ ॥ असोनि एकेठायीं जाण ॥ दाह्याहोनि दाहक भिन्न ॥ तैसें प्रकाशाहोनि जाण ॥ भिन्नपण स्वप्रकाशा ॥ ८५ ॥ अग्निदृष्टांतें निश्चित ॥ आत्मयाचें निजतत्त्व ॥ नित्यत्व आणि विभुत्व ॥ असे साधित निजबोधें ॥ ८६ ॥ काष्ठाचेनि योगें अग्नीसी ॥ जन्म निरोध नामरूपांसी ॥ पावे तेवीं आत्मयासी ॥ विकारिता तैसी देहयोगें ॥ ८७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ निरोधोत्पत्त्य

---

१ तेजोरूप. २ वेगळा. ३ संशय. ४ स्पष्ट केलें. ५ सृष्टीची उत्पत्ति. ६ दोन शरीरें ( स्थूल, सूक्ष्म. ) ७ व्यापकत्व.

णुबृहन्नानात्वं तत्कृतान्गुणान् ॥ अंतःप्रविष्ट आधत्त एवं देहगुणान्परः ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ नानाकाष्ठांच्या संयोगीं ॥ काष्ठगुण अग्नीच्या
अंगीं ॥ आले असती प्रत्यक्ष जगीं ॥ अग्नि तेसंगीं अलिप्त ॥ ८८ ॥ काष्ठमथनें अग्नि प्रकटला ॥ त्या नाव ह्मणती उपजला[1] ॥
काष्ठाकारें आरला ॥ लहान थोर झाला तद्योगें ॥ ८९ ॥ अग्नि काष्ठविकारवशें ॥ त्रिकोण वर्तुळ वक्र आभासे ॥ काष्ठाचेनि निःशेष
नाशें ॥ नाशला ऐसें मानिती ॥ २९० ॥ तैसा अज नित्य अव्ययो ॥ त्यासि आकार विकार जन्म क्षयो ॥ हा देहादिसंबंधस्वभावो ॥
मिथ्या पहाहो मानिती ॥ ९१ ॥ जें सांगीतलें अग्निदृष्टांतें ॥ तें उद्धवासि नेमनेल[2] चित्तें ॥ यालागीं निरूपण मागुतें ॥ श्रीअनंतें मांडिलें
॥ ९२ ॥ उद्धवा तूं ऐसें ह्मणसी ॥ मुळीं सिद्ध संयोगू अग्निकाष्ठांसी ॥ तो काष्ठधर्म लागला अग्नीसी ॥ हें आह्मांसी मानलें ॥ ९३ ॥
आत्मा नित्य शुद्ध अविकारी[3] स्वांगें ॥ जो गगनासी नातळे अंगें ॥ त्यासि देहसंगू केवीं लागे ॥ मग तद्योगें विकारी ॥ ९४ ॥ आत्म्यासि
देहसंगु घडे ॥ हें बोलणेंचि तंव कुडें ॥ ऐसें न घडे तेंही जरी घडे ॥ तरी तो सांपडे देहबुद्धी ॥ ९५ ॥ जो देहबुद्धीमाजी आला ॥ तो
केवळ देहधारी झाला ॥ पुढें केवीं जाय त्यागू केला ॥ ऐसा उपजला संदेहो ॥ ९६ ॥ कृष्ण ह्मणे उद्धवासी ॥ ऐसी आशंका प्राणें धरिसी
॥ मन घालोनि मनाचे मानसीं ॥ या अर्थासी परियेसी ॥ ९७ ॥ हे शब्दचातुर्यासाठीं ॥ हातां नये गा जगजेठी ॥ हे माझ्या गुह्याचीहो
गुप्त गोष्टी ॥ तुजसाठीं बोलतों ॥ ९८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ योऽसौ गुणैर्विरचितो देहोऽयं पुरुषस्य हि ॥ संसारस्तन्निबंधोऽयं पुंसोऽविद्याच्छिदात्मनः
॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐके पुरुष जो पुरुषोत्तम ॥ ज्या आधीन मायागुणग्राम ॥ ज्यासी ईश्वरू ऐसा नामधर्म ॥
शास्त्रानुक्रम बोलती ॥ ९९ ॥ त्या ईश्वराची जे माया ॥ ज्या उपजविलें नानाकार्या ॥ जीव संसारी करावया ॥ भ्रमू वांयां[4] वाढविला
॥ ३०० ॥ तेथें चैतन्य जें प्रतिबिंबलें ॥ तेंचि जीवपणें वाच्य झालें ॥ जेवीं थिल्लरीं[5] चंद्रबिंब बुडालें ॥ दिसे नाथिलें मूर्खांसी ॥ १ ॥
त्या थिल्लरासी नातळत ॥ चंद्रमा असे गगनीं[6] अलिप्त ॥ तैसा आत्मा अविद्यातीत ॥ अविद्या नातळत प्रतिबिंबाला ॥ २ ॥ अहमिति[7]
प्रथमाध्यासें ॥ सूक्ष्म लिंगदेह मायावशें ॥ नाना अर्थकारो कैसें ॥ वासनासौरसें उपजलें ॥ ३ ॥ जरी लिंगदेह जाहलें सबळ ॥ विषयभोगा
दृढ मूळ ॥ तरी भोगू नव्हे स्थूळ ॥ सूक्ष्म भूतगोळ स्थूळावला ॥ ४ ॥ स्थूळापासोनि स्थूळ देहो ॥ पांचभौतिक घडला पहाहो ॥
एवं उभय देह अभिप्रावो ॥ झाला निर्वाहो या रीतीं ॥ ५ ॥ ऐसा उभयदेहीं वर्ततां ॥ दृढ लागली देहात्मता ॥ तेणें वाढली अहंममता[8] ॥
मी कोण हें तत्त्वतां विसरला ॥ ६ ॥ न कळे निजसुखाची गोडी ॥ पडला विषयाचिये वोढी ॥ पापपुण्याचिया जोडी कोडी ॥ पडिली

---

[1] उत्पन्न झाला. [2] कबूल होणार नाहीं. [3] विकाररहित. [4] व्यर्थ. [5] डबकांत. [6] आकाशांत. [7] मीपणा असा. [8] मीपणा व माझेपणा.

बेडी सुबद्धा ॥ ७ ॥ देहाध्यासें[१] देहधर्म ॥ सत्य मानी वर्णाश्रम ॥ मग आचरों लागे कर्म ॥ फळसंभ्रम वांछूनी ॥ ८ ॥ राजा चक्रवर्ती निजमंदिरीं ॥ निजेला सुमनशेजेवरी[२] ॥ तो स्वप्नीं होऊनि भिकारी ॥ अंत्यजाघरीं अन्न मागे ॥ ९ ॥ तेथ कुटका एक यावया हातां ॥ नीचासि ह्मणे तूं राजा तत्त्वतां ॥ परी मी राजा हें नाठवे चित्तां ॥ स्वप्नीं भिक्षुकता दृढ झाली ॥ ३१० ॥ तैसी विसरोनि निजात्मता ॥ फळें मागे देवां देवतां ॥ मी देवांचा देवो तत्त्वतां ॥ हें त्यासि सर्वथा नाठवे ॥ ११ ॥ त्या स्वप्नाचेनि अतिअध्यासें ॥ राजा वोसणावे मी भिकारी ऐसें ॥ ऐकोनि सेवकां येत हांसें ॥ राजा स्वप्नवशें जल्पतू[३] ॥ १२ ॥ येथ गाढ मूढ अवस्थाघोरें ॥ सर्वांग गडबडी निदसुरें ॥ नागवें उघडें न स्मरे ॥ निद्राभरें घेरिला ॥ १३ ॥ त्यासि थापटी पुरोहितू[४] ॥ जागा होतां होय विस्मितू ॥ मग नागवेपणा आच्छादितू ॥ सांगों लाजतू भिक्षुकता ॥ १४ ॥ तेवीं अविद्या निद्रा उद्भटा ॥ जल्पे मी देही मी करंटा ॥ मी संपन्न मी ज्ञाता मोठा ॥ देहात्मनिष्ठा बडबडी ॥ १५ ॥ तेणें निदसुरपणाचेंनि लवलाहें ॥ कर्माकर्मांचे पसरी पाये ॥ अविद्याबळें घोर लाहे ॥ देहमोहें मोहितू ॥ १६ ॥ तो गाढमूढ अवस्थेआंतू ॥ होता दीर्घसंकल्पें लोळतू ॥ लोभें अतिजल्प जल्पतू ॥ वोसणतू मी माझें ॥ १७ ॥ तेथें दैवयोगें बडबडितू ॥ अवचटें गुरुचरणीं आदळतू ॥ निकटता[५] देखोनि कृपावंतू ॥ थापटितू निजबोधें ॥ १८ ॥ ब्रह्माहमस्मि[६] ऐशी वाणी ॥ एकवेळ पडली कानीं ॥ अविद्यानिद्रा गेली पळोनी ॥ तो तत्क्षणीं जागिन्नला ॥ १९ ॥ जागतांचि होय विस्मित ॥ मी देह ह्मणतां लाजत ॥ देहकर्म देखे निंदित ॥ कर्मातीत ब्रह्म मी ॥ ३२० ॥ व्हावया संसारबंधन ॥ त्यासि अविद्याचि गा कारण ॥ तिसी छेदावया जाण ॥ खड्ग[७] तीक्ष्ण ब्रह्मविद्या ॥ २१ ॥ अविद्या निरसी ब्रह्मज्ञान ॥ तें अवश्य ह्मणसी ब्रह्माहोनि भिन्न ॥ मोडलें ह्मणसी अद्वैतपण ॥ तें नव्हे जाण सिद्धांतीं ॥ २२ ॥ प्रपंच अज्ञानें लाटा ॥ ज्ञानअज्ञानाच्या सत्ववाटा ॥ फेडिजे कांटेनकांटा ॥ मग खटपटा निमाल्या ॥ २३ ॥ अविद्या जीवबंधनीं ॥ ब्रह्मविद्या बंधच्छेदनी ॥ या समूळ तुजलागुनी ॥ सांगीतल्या दोनी सविस्तर ॥ २४ ॥ तेचि ब्रह्मविद्या जाणा ॥ कैसेनि प्राप्त होय आपणा ॥ ते पूर्वपीठविवंचना ॥ सावधमनां परियेसी ॥ २५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तस्माज्जिज्ञासयाऽऽत्मानमात्मस्थं केवलं परम् ॥ संगम्य निरसेदेतद्वस्तुबुद्धिं यथाक्रमम् ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ उद्धवा याचिलागीं नित्य ॥ जिज्ञासें बैसवावें चित्त ॥ त्यासि विवेक[८] उपजवित ॥ सत्यासत्य विभागें ॥ २६ ॥ तेथ असत्य[९] तितुकी अविद्या ॥ जीचेनि जीवासि परमबाधा ॥ तिच्या समूळ करावया छेदा ॥ सद्विद्या[१०] साधावी ॥ २७ ॥ सद्विद्या साधिलिया पाही ॥ केवळ वस्तु ते दूरी नाहीं ॥ असे आपुल्याचिठायीं ॥ येचि देहां कूटस्थ ॥ २८ ॥

---

१ अज्ञान्यास. २ फुलांच्या बिछान्यावर. ३ बडबडतो. ४ उपाध्याय. ५ निकड. ६ मी ब्रह्म आहें. ७ तलवार. ८ विचार. ९ खोटें. १० ब्रह्मविद्या.

कार्यकारणसंघात ॥ त्यामाजी वस्तु असे व्याप्त ॥ व्यापूनियां अलिप्त ॥ नित्यमुक्त स्वभावें ॥ २९ ॥ करूनि सद्विद्यासाधन ॥ धरूनि आत्मानुसंधान ॥ देहद्वयाचें निरसन[1] ॥ साधकें जाण साधावें ॥ ३३० ॥ स्थूळ नश्वरत्वें मिथ्या झालें ॥ सूक्ष्म वासनामय कल्पिलें ॥ ते कल्पनेसि मिथ्यात्व आलें ॥ ब्रह्म उरलें निर्विकल्प ॥ ३१ ॥ जैशा गगनीं नाना मेघपंक्ती ॥ निजबळें त्या वर्षती ॥ त्याचि शारदियेचे[2] अंतीं ॥ हरपोनि जाती आकाशीं ॥ ३२ ॥ तैशी देहीं देहात्मबुद्धी ॥ दृढ केली होती त्रिशुद्धी ॥ तेचि विवेकाचिया प्रबोधीं ॥ नास्तिकसिद्धी पावली ॥ ३३ ॥ देहसद्भावाची पदवी ॥ ब्रह्मविद्येच्या सद्भावीं ॥ खद्योत[3]तेजाची दिवी ॥ सूर्यें देखावी कैसेनी ॥ ३४ ॥ दोर भासला होता विखार ॥ त्याचा करित निजनिर्धार ॥ हारपोनियां सर्पाकार ॥ उरे दोर निजरूपें ॥ ३५ ॥ पाहतां विवेकाचेनि निवाडें ॥ दोराचें सर्पत्व जेवीं उडे ॥ तेवीं ब्रह्मसद्भावीं रोकडें ॥ देह नातुडे सत्यत्वें ॥ ३६ ॥ नरदेह आश्रऊन ॥ ब्रह्मविद्या वाढली जाण ॥ तें आपुलें जन्मस्थान ॥ देहनिर्दळण[4] केवीं करी ॥ ३७ ॥ उद्धवा तूं ऐसऐशी ॥ आशंका झणी धरिसी ॥ ते अग्निउत्पत्तिदृष्टांतेंसी ॥ तुजपाशीं सांगेन ॥ ३८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ आचार्योऽरणिराद्यः स्यादंतेवास्युत्तरारणिः ॥ तत्संधानं प्रवचनं विद्यासंधिः सुखावहः ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ दोंकाष्ठाचिया घसणीं ॥ अग्नि काढिला मंथोनी ॥ तो काष्ठें काष्ठ जाळूनी ॥ अग्नि अग्निपणीं प्रज्वळला ॥ ३९ ॥ तैसी ब्रह्मविद्या जाण ॥ गुरुशिष्यसंवादमथन ॥ त्या मथनाचें निरूपण ॥ सावधान परियेसी ॥ ३४० ॥ येथ आचार्य आद्य[5] अरणी ॥ शिष्य तो झाला उत्तरारणी[6] ॥ उपदेश तो मंथास्थानीं ॥ संवादमंथनीं मंथावें ॥ ४१ ॥ ये मथनीं जरी आळसू केला ॥ तरी ज्ञानाग्नीचा आविर्भाव[7] गेला ॥ आपणिया आपण वंचला ॥ थित्या मुकला साधना ॥ ४२ ॥ धरितां आळसाची मागी ॥ येव्हडा अनर्थू वाजे अंगीं ॥ आठही पाहार शिणताति योगी ॥ या योगालागीं साधावया ॥ ४३ ॥ निजस्वार्थालागीं सावधान ॥ गुरुवचनाचें अनुसंधान[8] ॥ अविश्रम करितां मथन ॥ ब्रह्मज्ञान तैं प्रकटे ॥ ४४ ॥ प्रकटलें ब्रह्मज्ञान ॥ उरोंनेदी देहाचें भान ॥ दृश्य द्रष्टा दर्शन ॥ करी प्राशन तत्काळ ॥ ४५ ॥ कार्य कर्म आणि कर्ता ॥ ज्ञान ज्ञेय आणि ज्ञाता ॥ हें उरोंनेदी सर्वथा ॥ निजात्मता निजबोधें ॥ ४६ ॥ निजबोधें संसारदुःख ॥ निरसूनि[9] दिधलें निजसुख ॥ निजात्मसुखीं निःशेख ॥ मायागुणदोष नासिले ॥ ४७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ वैशारदी साऽतिविशुद्धबुद्धिर्धुनोति मायां गुणसंप्रसूताम् ॥ गुणांश्च संदह्य यदात्ममेतत्स्वयं च शाम्यत्यसमिद्यथाऽग्निः ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ ॥ नाशावया निजमायागुण ॥ शिष्य विशारद बुद्धिनिपुण ॥ दैवी संपदेचें अधिष्ठान ॥ सद्गुणीं संपन्न सर्वदा ॥ ४८ ॥ ऐसा मुमुक्षु अधिकार

---

१ नाश. २ शरदृतूचे. ३ काजव्याच्या कांतीची. ४ देहाचा नाश. ५ खालची. ६ वरचें अग्निमंथनाचें लांकूड. ७ उत्पत्ति. ८ स्मरण. ९ नाहींसें करून.

वंतू ॥ त्यासि शब्द आणि परनिष्णातू ॥ गुरूनी माथां ठेविला हातू ॥ निजबोध[1] प्राप्त तत्काळें ॥ ४९ ॥ निजबोधीं बैसतां दृष्टी ॥ गुणकार्य रिघे गुणांच्या पोटीं ॥ तेव्हां गुणचि गुणातें आटी ॥ तमातें घोंटी मध्यमू ॥ ३५० ॥ तम खाऊनि रजोगुण ॥ अत्यंत उन्मत्त झाला जाण ॥ त्याचें देखोनि उन्मत्तपण ॥ सवेंं सत्वगुण खवळला ॥ ५१ ॥ जेव्हां खवळला सत्वगुण ॥ त्यासि न साहे दुजेपण ॥ रजोगुणाचें प्राशन ॥ केलें जाण तत्काळ ॥ ५२ ॥ केवळ सत्वाचा स्वभावो ॥ तेणें निजसुखाचा अनुभवो ॥ क्षणक्षणा नीत नवा पहाहो ॥ अतिनवलावो अनुभवी ॥ ५३ ॥ तेणें सुखानुभवें देखा ॥ रजतमांच्या बीजकणिका ॥ ज्या सृष्टी सृजूनी[2] उन्मुखा ॥ त्याही निःशेखा जाळिल्या ॥ ५४ ॥ तेव्हां गुण प्रसवती माया ॥ शोधितसत्वें आणिली लया ॥ ते सत्ववृत्ति एकलिया ॥ अद्वैततया उरली ॥ ५५ ॥ तेव्हां ब्रह्माहमस्मिलक्षण[3] ॥ तेंही हों लागलें क्षीण ॥ सोहंहंसाची वोळखण ॥ ते संधी जाण होतसे ॥ ५६ ॥ तेथ देहींचें गेलें देहपण ॥ जन्ममरणा आलें मरण ॥ विश्वाचें न दिसे भान ॥ आनंदघन कोंदला ॥ ५७ ॥ तेणें सुखरूप जाहली दृष्टी ॥ आनंदमय झाली सृष्टी ॥ परमानंदें चढली पुष्टी ॥ स्वानंदें मिठी घातली ॥ ५८ ॥ त्या सुखाची मर्यादा ॥ कासयानें नव्हे कदा ॥ येथ मौन पडिलें वेदा ॥ वृत्ति तत्पदा पावली ॥ ५९ ॥ द्वैत सर्वथा नाहीं पुढें ॥ यालागीं वृत्तीची वाढी मोडे ॥ तेव्हां तेही सुखरूपीं बुडे ॥ पुढें वाढे तें नाहीं ॥ ३६० ॥ जैसा निरिंधन[4] अग्नी ॥ जाय निजतेजीं[5] मिळूनि ॥ तैशी वृत्ति अद्वैतपणीं ॥ मिळे मिळणी सुखरूपीं ॥ ६१ ॥ गंगा सागरां मीनली[6] ॥ ते समुद्रचि होऊनि ठेली ॥ कां लवणजळां भेटी झाली ॥ मिठी पडली जळत्वें ॥ ६२ ॥ दीपीं दीपू एकवटला ॥ मिळणी एकचि होऊनि ठेला ॥ तैसा वृत्तीचा लयो झाला ॥ निर्व्यंग पावला निजसुख ॥ ६३ ॥ तेव्हां आत्मा एक अद्वैत ॥ तेंही ह्मणणें नाहीं तेथ ॥ एवं द्वैतद्वैतातीत ॥ नित्य निश्चित निजात्मा ॥ ६४ ॥ तो ज्ञानरूप स्वप्रकाश ॥ अविकारी अविनाश ॥ अकर्ता अभोक्ता उदास ॥ निर्विशेष निजरूप ॥ ६५ ॥ तो अदेही अगोत्र ॥ अचक्षु अश्रोत्र ॥ अमनस्क अमंत्र ॥ मंत्रीं मंत्रार्थ जो कां ॥ ६६ ॥ जो आद्य अज[7] अप्रमेय ॥ अतर्क्य अलक्ष्य अव्यय ॥ नामरूपादिअभाव ॥ भावनाशून्य ॥ ६७ ॥ जो भोग्य भोगा नव्हे भोक्ता ॥ जो काम्य कर्म नव्हे कर्ता ॥ कर्ता अकर्ता या वार्ता ॥ जेथ सर्वथा निमाल्या ॥ ६८ ॥ जो अविनाशी अभंग ॥ जो शुद्ध बुद्ध असंग ॥ देहद्वयाचा संग ॥ ज्याचें अंग स्पर्शेना ॥ ६९ ॥ आत्म्यावेगळें तें अनित्य ॥ हा पूर्वनिश्चय होतां सत्य ॥ आतां बुडालें नित्यानित्य ॥ सभराभरीत निजात्मा ॥ ३७० ॥ नेणपण निमालें सर्वथा ॥ बुडाली जाणपणाची अवस्था ॥ गुणगुणिगुणातीतता ॥ देहीं तत्त्वतां तेथ नाहीं ॥ ७१ ॥ उद्धवा

---

१ आत्मज्ञान. २ उत्पन्न करून. ३ मी ब्रह्म आहें असें लक्षण. ४ लांकडावांचून. ५ आपल्या तेजांत. ६ मिळाली. ७ जन्मरहित. ८ नाहींसें झालें.

परमात्मा तो तत्वतां ॥ हा माझा निश्चयो सर्वथा ॥ तोचि उपनिषदर्थें अर्थितां ॥ निजात्मता प्रतिपाद्य ॥ ७२ ॥ तेथ पावलिया वृत्ती॥ होय संसारनिवृत्ती ॥ हेंचि वेदांतसिद्धांतीं ॥ निश्चयो निश्चितीं केला असे ॥ ७३ ॥ येथूनि कार्यकर्तृकर्तव्यता ॥ निःशेष खुंटली सर्वथा ॥ निजीं निजरूप निजात्मता ॥ जाण तत्त्वतां पावल्या ॥ ७४ ॥ हें अद्वैतश्रुती सुरवाडे ॥ सद्गुरुकृपा उजियेडें ॥ वृत्ति निजात्मपदीं चढे ॥ भाग्य केव्हडें पाहे पां ॥ ७५ ॥ मी वंद्य देवादिदेवां ॥ त्या माझाही निजज्ञानठेवा ॥ परमकृपेनें उद्धवा ॥ तुज म्यां ओंघवा दीधला ॥ ७६ ॥ तुज व्हावया निजवृत्ती ॥ हाचि अर्थ नानासंगतीं ॥ सांगीतला परमप्रीतीं ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ७७ ॥ आतां देहादिक जे असंत ॥ अतिनिंद्यत्वें कुत्सित ॥ तेथ आतळोंनेदी चित्त ॥ होई अलिप्त[2] परमार्था ॥ ७८ ॥ हे तुजलागीं अलभ्य प्राप्ती ॥ परी यत्न करावा अतिनिगुती ॥ येथ मतांतरें छळूं येती ॥ तेही उपपत्ती[3] परियेसी ॥ ७९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अथैषां कर्मकर्तॄणां भोक्तॄणां सुखदुःखयोः ॥ नानात्वमथ नित्यत्वं लोककालागमात्मनाम् ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ नानाफळें अभिलाषिते ॥ कर्मांचे जे कर्मकर्त्ते ॥ सुखदुःखांचे जे भोक्ते ॥ अनेकत्वें येथें अनंत ॥ ३८० ॥ ह्मणिजे मानिती एकात्मता ॥ तरी एकाचेनि सुखें सुख समस्तां ॥ कां एकाचेनि पापें पापता ॥ न घडे सर्वथा सकळांसी ॥ ८१ ॥ ऐसें कर्मवादियांचें मत ॥ जीव नित्य आणि अनंत ॥ मुख्य ईश्वरचि नाहीं ह्मणत ॥ कर्ते येथ निजकर्म ॥ ८२ ॥ मीपणें जें स्फुरे स्फुरण ॥ ते प्रतिशरीरीं जीव भिन्न ॥ त्यांच्या स्वरूपाचें प्रमाण ॥ कर्त्ता भोक्ता जाण ह्मणताती ॥ ८३ ॥ ऐके विवंचना[4] सावचित्त ॥ लोक काळ श्रुति जीवित ॥ अनेकत्वें अनित्य ॥ हें वेदांतमत पैं माझें ॥ ८४ ॥ उद्धवा कर्मवाद्यांचें ऐसें मत ॥ सत्य मानील तुझें चित्त ॥ तरी बुडवील निजस्वार्थ ॥ अति अनर्थ वाजेल ॥ ८५ ॥ तोचि अनर्थ ह्मणसी कैसा॥ तरी कर्मवाद्यांचा भावो ऐसा ॥ हा पूर्वपक्षाचा ठसा ॥ अभिप्रावो[5] ऐसा परियेसी ॥ ८६ ॥ परमात्मा निर्विकाररूप ॥ एक न मानिती सर्वस्वरूप ॥ संन्यासु ऐकतां ह्मणती पाप ॥ मतजल्प मतवाद्यां ॥ ८७ ॥ त्यागसंन्यास जे करिती ॥ त्यांतें अनधिकारी ह्मणती ॥ कर्म मुख्यत्वें मानिती ॥ वैराग्य निंदिती निजमतें ॥ ८८ ॥ कर्म करोनि भोगिजे सुख ॥ तें कर्म त्यजिंती निःशेख ॥ निष्कर्मासी कैंचें सुख ॥ परम दुःख तो त्यागू ॥ ८९ ॥ वैराग्य न घडावया कारण ॥ चौंप्रकारें बोलती जाण ॥ तेंही सांगेन मी लक्षण ॥ सावधान परियेसी ॥ ३९० ॥ ह्मणती अनित्य असतें कांहीं ॥ तरी वैराग्य नघडे ते ठायीं ॥ ॥ येथ अनित्यचि नाहीं ॥ वैराग्यें कायी त्यजावें ॥ ९१ ॥ वैराग्य होय चौंप्रकारीं ॥ मीमांसक नित्य मानिती चारी ॥ निजमताचा गर्व भा

---

१ सर्व. २ न लागणारा. ३ युक्ति. ४ विचार. ५ मत. ६ टाकितात.

री ॥ चाऱ्ही करी नित्यत्वें ॥ ९२ ॥ कर्मप्रकाशक वेद मूळ ॥ तो आगम नित्य मानी अढळ ॥ जीव नित्यचि ह्मणे सकळ ॥ भोग काळ
तोही नित्य ॥ ९३ ॥ स्वर्गादिलोक भोगस्थान ॥ वेदु बोलिला आपण ॥ मिथ्या नव्हे वेदवचन ॥ चारी प्रमाण नित्यत्वें ॥ ९४ ॥ उद्ध
वा यापरी पाही ॥ ह्मणती अनित्य[१] येथ नाहीं ॥ वैराग्यें करावें कायी ॥ मिथ्या पाही वैरागी ॥ ९५ ॥ होकां भोग्य जरी नश्वर होतें ॥
अथवा मायिक कांहीं असतें ॥ तरी वैराग्य संभवतें ॥ तें तंव येथें असेना ॥ ९६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मन्यसे सर्वभावानां संस्था ह्यौत्प
त्तिकी यथा ॥ तत्तदाकृतिभेदेन जायते भिद्यते च धीः ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ जीवाच्या भोग्यपदार्थां ॥ स्रक्चंदनादि वनिता[२] ॥ त्यांसि
प्रवाहरूपें नित्यता ॥ ह्मणती तत्त्वतां स्वमतें[३] ॥ ९७ ॥ आत्मा आहे जग नाहीं ॥ हें घडलेंचि नाहीं कहीं[४] ॥ जळेंवीण समुद्र पाही ॥ उर
ला नाहीं सर्वथा ॥ ९८ ॥ सृष्टि प्रवाहरूपें नित्य ॥ पितृपुत्रत्वें अखंड वाहत ॥ कर्मास्तव यातायात ॥ सृष्टि अनित्य हें नघडे ॥ ९९ ॥
नित्यासि ईश्वरू कर्ता ॥ हेंही नघडे गा तत्त्वतां ॥ नित्याचा कोण नव्हे कर्ता ॥ ईश्वरू सर्वथा येथ नाहीं ॥ ४०० ॥ वेदांतीं स्वरूपभूत ॥
आत्मा ज्ञानस्वरूप ह्मणत ॥ तेंही नघडे गा येथ ॥ ऐसें स्वमत बोलती ॥ १ ॥ घटपटाकार पाहतां ॥ ज्ञानासि त्रिक्षणावस्था ॥ आत्मा
ज्ञानस्वरूप ह्मणतां ॥ लाज सर्वथा त्यां नये ॥ २ ॥ एवं वेदांताच्या ठायीं ॥ आत्मनिश्चयो[५] दृढ नाहीं ॥ मोक्ष ह्मणती जो कांहीं ॥ तोही
पाही मिथ्याची ॥३॥ इंद्रियसुखेंवीण सुख ॥ मोक्ष ह्मणती ते अविवेक ॥ इंद्रियद्वारा जीवांसि हरिख ॥ भोगितांही मूर्ख नमानिती॥४॥
देहेंवीण विदेहीं ॥ सुख भोगिजे कोणें कहीं ॥ अद्वैतवादी जल्पती कांहीं ॥ तें सत्य नाहीं सर्वथा ॥ ५ ॥ जीवासि जेणें सुखप्राप्ती ॥ ते
इंद्रियेंचि नाहीं ह्मणती ॥ डोळे फोडूनि देखणें होती ॥ तैसी वदंती वेदांत्यां ॥ ६ ॥ येथ ईश्वरूचि नाहीं फुडा ॥ मा तो फळ देईल हा बो
ल कुडा ॥ अद्वैतवादी मूर्ख गाढा ॥ नागवी मूढां वैराग्यें ॥ ७ ॥ गांव ना ठावो पदवी ॥ तो मिथ्या ईश्वर धरोनि जीवीं ॥ कर्मनैराश्य
करवी ॥ अथवा सांडी कर्मातें ॥ ८ ॥ नरदेहीं ज्ञान उपजलें ॥ तेणें देहचि नाशिलें ॥ फळें वृक्षमूळ छेदिलें ॥ कोणी देखिलें कोठेंही॥ ९॥
ज्ञानाचे परिपाकदशें ॥ ह्मणती अवघा संसारूचि नाशे ॥ सृष्टि प्रवाहरूपें नित्य असे ॥ नित्यनासे कैसेनी ॥ ४१० ॥ मनुष्याचे हृदयीं
चें ज्ञान ॥ तेणें संसाराचें निर्दळण[६] ॥ तरी खद्योततेजें जाळिले जाण ॥ ग्रहगण[७] शशी सूर्य ॥ ११ ॥ एवं करूं जातां निवृत्ती ॥ केले क
ष्ट ते मिथ्या होती ॥ इंद्रियेंवीण सुखप्राप्ती ॥ नव्हे निश्चितीं जीवासी ॥ १२ ॥ यालागीं निवृत्ति ते वृथा कष्ट ॥ सर्वांसि प्रवृत्तीच अति
श्रेष्ठ ॥ कर्में करोनियां उद्भट ॥ फळें वरिष्ठ भोगावीं ॥ १३ ॥ संसार ह्मणती मायिक ॥ ते जाणावे केवळ मूर्ख ॥ संसारावेगळें सुख॥

---

[१] क्षणभंगुर. [२] स्त्री. [३] आपल्या मतानें. [४] कधीं. [५] आपला निश्चय. [६] नाश. [७] सूर्यादि नऊ ग्रह.

नाहीं देख जीवासी ॥ १४ ॥ मनुष्याधिकारें सुखप्राप्ती ॥ यालागीं देव मनुष्यत्व[1] वांछिती ॥ वेदांती मनुष्यत्व निंदिती ॥ केवीं ते युक्ती
मानावी ॥ १५ ॥ वेदें अधिकारू बोलिला ॥ तो वेदूचि इहीं वेडा केला ॥ त्यांचे लागला जो बोला ॥ तो नागवला सर्वस्वें ॥१६॥ वे
दाचें वेदवचन ॥ सर्वार्थीं तें प्रमाण ॥ मिथ्या ह्मणती तें वेदवचन ॥ थोर सज्ञान हे झाले ॥ १७ ॥ ऐशी मीमांसकाची वदंती[2] ॥ ना
नापरीच्या चाळिती युक्ती ॥ आपुलें मत स्थापिती ॥ तें मिथ्याचि निश्चितीं उद्धवा ॥ १८ ॥ लापनिकाऐसें मिथ्या त्यांचें मत ॥ अंगी
कारूनि प्रस्तुत ॥ प्रपंचअनर्थता दावित ॥ दृढ स्थापित वैराग्य ॥ १९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवमप्यंग सर्वेषां देहिनां देहयोगतः॥ काला
वयवतः संति भावा जन्मादयोऽसकृत् ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ ह्मणे ऐक बापा उद्धवा ॥ हा मिथ्या मतवादू आघवा ॥ ह्मणसी कैसेनि
जाणावा ॥ विवेक करावा मताचा ॥ ४२० ॥ निवृत्ति ते केवळ कष्ट ॥ ह्मणती प्रवृत्ति अतिश्रेष्ठ ॥ प्रवृत्तीमाजी परम कष्ट ॥ मरणअ
रिष्ट अनिवार ॥ २१ ॥ धरोनियां जन्ममूळ ॥ अखंड लागलासे काळ ॥ लवनिमेषपळेंपळ ॥ काळ वेळसाधित ॥ २२ ॥ जैसें साव
चोराचें साजणें ॥ तैसें काळाचें जोगावणें ॥ वेळ आल्या जीवें प्राणें ॥ नाहीं राखणें सर्वस्वें ॥ २३ ॥ काळ नह्मणे हाट घांट ॥ नह्म
णे आवशी पहांट ॥ नह्मणे देश विदेश वाट ॥ नाशी उद्भट निजतेजें[3] ॥ २४ ॥ करितां प्रवृत्तीचे कष्ट ॥ अवचितां[4] मृत्यूचा चपेट ॥
अंगीं वाजे जी उद्भट ॥ अहा कटकट तेकाळीं ॥ २५ ॥ जीवीं वासनेचा थोर हावा ॥ ह्मणे गेलों मेलों धांवा पावा ॥ कोण निवा[5]
री मृत्युप्रभावा ॥ उपावो तेव्हां चालेना ॥ २६ ॥ काळ मारोनि नसोडी ॥ यातना भोगावी गाढी ॥ सवेंचि गर्भवासीं पाडी ॥ जेथें
दुःखकोडी अनिवार ॥ २७ ॥ मातेच्या जठरकुहरीं ॥ विष्ठामूत्रांच्या दाथरीं ॥ अधोमुख नवमासवरी ॥ उकडी भारी जठराग्नी ॥२८॥
विष्ठालेप चहूंकडे ॥ नाकीं तोंडीं कृमी किडे ॥ गर्भवासाचे कष्ट गाढे ॥ कोणापुढें सांगेल ॥ २९ ॥ कट्वम्ललवण मेळे ॥ गर्भवतीचे पु[6]
रती डोहळे ॥ त्वचेवीण गर्भांग पोळे ॥ तेणें दुःखें लोळे अतिदुःखी ॥ ४३० ॥ ते गर्भोदरींची व्यथा ॥ नेणती[7] माता आणि पिता ॥
तेथ नाहीं कोणी सोडविता ॥ जीवींची व्यथा जीव जाणें ॥ ३१ ॥ ज्या ठायाची करूंनये गोठी ॥ प्रकट दाऊंनये दिठी ॥ ते योनिद्वा
रें अतिसंकटीं ॥ जन्म शेवटीं जीवासी ॥ ३२ ॥ जे नित्य मूत्राची नाहाणी ॥ कीं नवया नरकांची खाणी ॥ रजस्वलारुधिराची श्रे
णी ॥ जन्म तेथोनी पावती ॥ ३३ ॥ अपवित्र विटाळशीचें रुधिर ॥ ते गोठोनि झालें जी शरीर ॥ निंद्यद्वारें जन्मोनि नर ॥ आह्मी प
वित्र ह्मणविती ॥ ३४ ॥ गर्भवासाहूनि गाढें ॥ दुःख कोण आहे पुढें ॥ मतवादी बोले तें कुडें ॥ सुख नातुडे[8] प्रवृत्ती ॥ ३५ ॥ एकें ज

---

[1] मनुष्यपणा. [2] बोलणें. [3] आपल्या पराक्रमानें. [4] एकदम. [5] नाहींसें करील. [6] पूर्ण होतात. [7] जाणत नाहींत. [8] मिळत नाहीं.

न्में जन्म नसरे ॥ एकें मरणें भरण नोसरे ॥ कोटिकोटि जन्माचे फेरे ॥ काळ योनिद्वारें करवित ॥ ३६ ॥ पुढती जन्म पुढती मरण ॥ अनिवार लागलें जाण ॥ प्रवृत्तीमाजी सुख कोण ॥ दुःख दारुण भोगवी ॥ ३७ ॥ जन्ममरणांमाजिले संधी ॥ आणिकही थोर दुःख बाधी ॥ त्या दुःखाची दुःखसिद्धी ॥ ऐक त्रिशुद्धी सांगेन ॥ ३८ ॥ धाडीभेणें पळतां थोर ॥ आडवे नागवती चोर ॥ तैसें जन्ममरणांचें अंतर ॥ षड्विकार राखती ॥ ३९ ॥ षड्विकारांच्या पतिव्रता ॥ षडूर्मी लागल्या जीविता ॥ एवं प्रवृत्तीमाजी परम व्यथा॥ सुख सर्वथा असेना ॥ ४४० ॥ कर्मवादियाच्या मतां ॥ जीवू स्वतंत्र कर्मकर्ता ॥ ह्मणसी ते मिथ्या वार्ता ॥ परतंत्रता प्रत्यक्ष॥४१॥ ॥ श्लोक ॥ ॥ अत्रापि कर्मणां कर्तुरस्वातंत्र्यं च लक्ष्यते ॥ भोक्तुश्च दुःखसुखयोः को न्वर्थो विवशं भजेत् ॥ १७॥ ॥ टीका ॥ ॥ जीवासि असती स्वतंत्रता ॥ तरी तो दुःखभोगू न भोगिता ॥ सदा[1] सुखीचि असता ॥ पाप न करिता अळुमाळ ॥४२ ॥ जीवू बापुडें सदा दीन ॥ कर्में करूनि कर्माधीन ॥ कर्मफळदाता तो भिन्न ॥ सुखदुःख जाण तो भोगवी ॥ ४३ ॥ यालागीं ईश्वराची सत्ता ॥ तो कर्मफळाचा दाता ॥ जीव सुखदुःखांचा भोक्ता ॥ स्वतंत्रता त्या नाहीं ॥ ४४ ॥ ऐसें लक्षितां लक्षण ॥ जीवू तितका पराधीन ॥ पराधीनपणें जाण ॥ भोगवी दारुण सुखदुःख ॥ ४५ ॥ मजलागीं दुःख व्हावें ॥ ऐसें कोणी भाविना जीवें ॥ न वांछितां दुःख पावे ॥ येणें न संभवे स्वतंत्रता ॥ ४६ ॥ श्रुतिस्मृतींतें विचारितां ॥ जीवासि नाहीं स्वतंत्रता ॥ पराधीनपणें वर्ततां ॥ भोगी अप्रार्थितां सुखदुःख ॥ ४७ ॥ वादी परिहार करिती ॥ सांग कर्म जे नेणती ॥ तेते जीव दुःखी होती ॥ सुख पावती कर्मज्ञ ॥ ४८ ॥ जे सदाचार श्रोत्री ॥ जे याज्ञिक अग्निहोत्री ॥ जे उभयलोकव्यापारी ॥ सांग करीत कर्मातें ॥ ४९ ॥ जे अविकळ अव्यंग ॥ कर्में करूनियां सांग ॥ उभयलोकीं सुख भोग ॥ कर्मयोग भोगिती ॥ ४५० ॥ कर्मी ज्याची योग्यता ॥ तो सुखभोगाचा भोक्ता ॥ हेंही नघडे गा सर्वथा ॥ ऐक आतां सांगेन ॥ ५१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ न देहिनां सुखं किंचिद्विद्यते विदुषामपि ॥ तथा च दुःखमूढानां वृथाहंकरणं परम् ॥ १८॥ ॥ टीका॥ ॥कर्माचे जे तत्त्वज्ञाते ॥ तेही दुःखी देखों येथें ॥ सुखी देखिजे मूर्खातें ॥ जे कर्मातें नातळती ॥ ५२ ॥ चुकोनि यज्ञपुरुषा अच्युतातें ॥ अग्निहोत्री करिती यागातें ॥ तें स्वकर्मचि त्यांचें त्यांतें ॥ विपरीतार्थें[3] फळतसे ॥ ५३ ॥ अग्नि तो तंव स्वरूप माझें ॥ श्रुतिमंत्र ते तंव माझीं बीजें ॥ आणि होमद्रव्यही जें जें ॥ तेंही माझें स्वरूप ॥ ५४ ॥ ऐशिया मज सर्वगतातें ॥ नास्तिक्य देवोनि निजचित्तें ॥ अनीश्वरवादी[4] करिती यागातें[5] ॥ तोचि त्यांतें बाधक ॥ ५५ ॥ स्रुक् स्रुवा आणि प्रणीतापात्र ॥ मांडूं शिकले कर्मतंत्र ॥ मज निजात्मयाचें चुकलें सूत्र॥

---

१ निरंतर. २ मोठें. ३ उलट्या अर्थानें. ४ ईश्वर नाहीं असें ह्मणणारे. ५ यज्ञास.

तेणेंचि अपवित्र तो यागू ॥ ५६ ॥ सकळ हें सर्वमुखीं ॥ मज अर्पितसे यज्ञपुरुखीं ॥ हें नमनिजे याज्ञिकीं॥ बुद्धी अल्प कीं सकाम ॥ ५७ ॥ मज न अर्पितां जें सुकृत ॥ तेंचि जाण दुःख करित॥ विषा नांव अमृत ह्मणत ॥ तैसें सुकृत सकामा॥ ५८ ॥ मातें न पावतां जो स्वर्ग ॥ तो जाणावा उपसर्ग ॥ तेथिंचा भोग तो महारोग॥ मूढ उद्योग याज्ञिकां ॥ ५९ ॥ कर्मी कर्म विगुण होत ॥ तेथ स्मरावा मी अच्युत ॥ नामें न्यून तें संपूर्ण होत ॥ हें सामर्थ्य नामाचें ॥ ४६० ॥ तो मी अंगें आपण ॥ याज्ञिकां मागों गेलों अन्न ॥ मज नेदितीच ते ब्राह्मण ॥ कर्मठपण कर्माचें ॥ ६१ ॥ मज यज्ञपुरुषातें सांडून ॥ करिती इंद्रादिकांचें भजन ॥ ते इंद्रादिक मजआधीन ॥ कर्मवैगुण्य हें त्यांसी ॥ ६२ ॥ जे कर्म न करिती कृष्णार्पण ॥ त्यांचें मलिन प्राक्तन ॥ तेणें इहलोकीं दरिद्रता जाण ॥ पडे विघ्न परलोकां ॥ ६३ ॥ चुकवूनियां निजमुख ॥ सर्वांगीं खिरीसाकरेचा देख ॥ लेपू देतां नवचे भूक ॥ अधिक दुःख तेणें होय ॥ ६४ ॥ तैसें मज चुकवूनि यज्ञपती ॥ जे यागातें आचरती ॥ बाळविधवे गर्भप्राप्ती ॥ तैशीं फळें येती त्या यागा ॥ ६५ ॥ कर्मउद्देशें द्रव्य मागतां॥ यज्ञफळ ने द्रव्यदाता ॥ याज्ञिक तो राहे रिता ॥ मी कर्ता हा अभिमान ॥ ६६ ॥ जैसा चाटू खिरीआंत ॥ चाटुवेंचि खिरी वाढिजेत ॥ चाटू खरकटल्या सांडित ॥ भोक्ते भोगित परमान्न ॥ ६७॥ सरस ऊंस घालिजे घाणां ॥ रस पिळूनि भरे भाणां ॥ रिता चोपटी करकरी घाणा ॥ ते गती जाणा याज्ञिकां ॥ ६८ ॥ तैसे याज्ञिक यज्ञ आचरत ॥ द्रव्यदात्यासि तें फळ होत ॥ पशुहिंसा याज्ञिकां प्राप्त ॥ दोषी होत अभिमानें ॥ ६९ ॥ एवं कर्मकुशळ याज्ञिक ॥ यापरी ते भोगिती दुःख ॥ कर्म नेणती जे मूर्ख ॥ ते परमसुख भोगिती ॥ ४७० ॥ नेणती कर्माच्या घडमोडी ॥ परी माझी श्रद्धा पोटीं गाढी ॥ तेणें उल्लंघोनि दुःखकोडी ॥ निजात्मगोडी भोगिती ॥ ७१ ॥ कर्मी कर्मादरू नेणत ॥ माझ्याठायीं श्रद्धायुक्त ॥ भाळे भोळे माझे भक्त ॥ सुख अनंत पावले ॥ ७२ ॥ काय कर्म केलें गोपाळीं ॥ जे अखंड मजसवें गोकुळीं ॥ भोगिली निजसुखनव्हाळी ॥ करोनि होळी कर्मांची॥ ७३ ॥ हें पाहतां गोपिकांचें कर्म ॥ कर्ममार्गी निंद्य धर्म ॥ पावल्या माझें परम धाम ॥ जीवीं पुरुषोत्तम आवडला ॥ ७४ ॥ खगमृगगोसर्पादि समस्त ॥ माझे निजपदीं झाले प्राप्त ॥ याज्ञिकां कर्माभिमान बहुत ॥ दुःख भोगित निजकर्मे ॥ ७५ ॥ केवळ कर्मठ कर्मजड ॥ आह्मी सर्वज्ञ ज्ञाते दृढ ॥ हा अभिमान धरिती मूढ ॥ दुःखवाढ तयांसी ॥ ७६ ॥ दीपीं पतंगा मरण देख ॥ तो उडी घालितां मानी सुख ॥ तैसें कर्मठां कर्म केवळ दुःख ॥ मानिती सुख अभिमानें ॥ ७७ ॥ अभिमानेंचि सर्वथा ॥ नसती जीवासि ह्मणे स्वतंत्रता ॥ तेंही नघडे विचारितां ॥ ऐक आतां सांगे

---

१ विघ्न. २ पापरूप. ३ यज्ञास. ४ जाणत नाहींत. ५ ठिकाण. ६ पक्षी, पशु आदि.

न ॥ ७८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदि प्राप्तिं विघातं च जानंति सुखदुःखयोः ॥ तेऽप्यद्धा न विदुर्योगं मृत्युर्न प्रभवेद्यथा ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ ॥ दुःख निरसूनि[1] सुखप्राप्ती ॥ यालागीं कर्में आचरती ॥ कर्मवादी ज्ञाते ह्मणती ॥ तेही नेणती दुःखनाशू ॥ ७९ ॥ कर्में करितां नाशू नोहे ॥ ऐसें दुःख कोण आहे ॥ पुसशील तरी पाहे ॥ यथान्वयें सांगेन ॥ ४८० ॥ मरणापरतें[2] दुःख चढे ॥ ऐसें दुःख तंव नाहीं पुढें ॥ तें निवारूं नेणती बापुडे ॥ अतिबळ गाढें मृत्यूचें ॥ ८१ ॥ आंतु घालितां हात पोळे ॥ तेणें उन्हपणें घर न जळे ॥ तैसा कर्में मृत्यू न टळे ॥ प्रबळबळें अनिवार ॥ ८२ ॥ मारिता मृत्यू जेणें मारिजे ॥ तो उपावो कर्मठीं नेणिजे ॥ कर्मामाजी जेणें असिजे ॥ अचुक पाविजे तेणें मृत्यू ॥ ८३ ॥ अंतीं येईल मरणदुःख ॥ जंव जीजे तंव भोगिजेल सुख ॥ हें बोलणें बोलती मूर्ख ॥ जीतां सुख त्यां कैचें ॥ ८४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ को न्वर्थः सुखयत्येनं कामो वा मृत्युरंतिके ॥ आघातं नीयमानस्य वध्यस्येव न तुष्टिदः ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ जितांही[3] सुखाची वार्ता ॥ कर्मठां नाहीं सर्वथा ॥ तेही सांगेन मी कथा ॥ ऐक आतां उद्धवा ॥ ८५ ॥ विखें[4] रांधिलें मिष्टान्न[5] ॥ तें गोड न ह्मणती अज्ञान ॥ पुढें देखोनियां मरण ॥ शेष तें अन्न सांडिती ॥ ८६ ॥ आगी लागलिये घरीं ॥ क्षण न राहिजे चतुरीं ॥ मरण नांदतां उरीं ॥ सांडूनि दूरी पळताती ॥ ८७ ॥ धाडी आल्या निजद्वारीं ॥ गोड न लागे साकरखिरी ॥ तैसा मृत्यू आलियां शरीरीं ॥ विषयाकारीं सुख कैंचें ॥ ८८ ॥ दाढी लागलिया आगी ॥ तो शृंगारू नमनी सुखालागीं ॥ तैसा नीत नवा मृत्यु अंगीं ॥ विषयसंगीं सुख कैंचें ॥ ८९ ॥ उठिल्या मरणांत व्यथा ॥ जन धन अन्न आणि कांता ॥ सुख नेदी सर्वथा ॥ झालीं तत्त्वतां दुःखमूळ ॥ ४९० ॥ अंतकाळीं स्त्री धन ॥ झालीं दुःखासीच कारण ॥ त्यांसि सांडूनि न निघती प्राण ॥ तळमळी जाण प्राणांतीं ॥ ९१ ॥ जैसा सुळीं द्यावया जो नेइजे ॥ त्यासि नानासमारंभू कीजे ॥ मुखीं घालिती पंचखाजें ॥ तेणें तो नव्हीजे सुखिया कीं ॥ ९२ ॥ तैसें संमुख असतां मरण ॥ विषयसुखें सुखावे कोण ॥ विषय त्यागिती[6] सज्ञान ॥ मूर्खांसि जाण आसक्ती ॥ ९३ ॥ हे दुःखाची अर्ध घडी ॥ नाशी विषयसुखाची कोडी ॥ विषयालागीं शिणतीं वेडीं ॥ अविनाश गोडी नेणती ॥ ९४ ॥ एवं या लोकांच्याठायीं ॥ सुख सर्वथैव नाहीं ॥ लोकांतरीं ह्मणती कांहीं ॥ नघडे तेंही उद्धवा ॥ ९५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रुतं च दृष्टवद्दुष्टं स्पर्धासूयात्ययव्ययैः ॥ बह्वंतरायकामत्वात्कृषिवच्चापि निष्फलम् ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥ जैसा देखिला हा लोक ॥ तैसासि श्रुत[7] स्वर्गादिक ॥ अनादिदोषयुक्त देख ॥ सदोष मूर्ख वांछिती ॥ ९६ ॥ स्वर्गीं ह्मणसी दोष कोण ॥ ऐक तयांचें लक्षण ॥ स्पर्धा असूया नाश जाण ॥ तपक्षीण दिविं भोगें

---

१ नाहींसें करून. २ मरणापेक्षां अधिक. ३ जीवंतपणींही. ४ विषानें. ५ गोड अन्न. ६ टाकितात. ७ ऐकलेला.

॥ ९७ ॥ तपसंपत्ति समान पाही ॥ स्पर्धा मांडी त्याच्याठायीं ॥ मजसमान भोगू पाही ॥ तैं सुख नाहीं मानसीं ॥ ९८ ॥ आपणाहोनि
अधिकपदीं ॥ त्यासि दोष आरोपोनि निंदीं ॥ तेथेंही ऐसी विषमबुद्धी ॥ सुख त्रिशुद्धी तेथें कैचें ॥ ९९ ॥ यालागीं स्वर्गभोगें जें सुख ॥
॥१२॥ सकळांसारिखें नाहीं देख ॥ तपानुसारें न्यूनाधिक[१] ॥ भोगिती लोक निजकर्में ॥ ५०० ॥ एक उर्वशी भोगूं लागला ॥ एक काळो विद्रूप
पावला ॥ भोगें तपक्षयो[२] झाला ॥ नाशू आला अनिवार ॥ १ ॥ जंवजंव स्वर्गभोग भोगिती ॥ तंवतंव तपाची क्षीणशक्ती ॥ तपक्षयें
क्षया जाती ॥ नाशू पावती स्वर्गस्थ ॥ २ ॥ स्वर्गप्राप्तीचिये विधी ॥ कर्में करितां विघ्न बाधी ॥ तेणें नव्हे स्वर्गसिद्धी ॥ जाण त्रिशुद्धी
उद्धवा ॥ ३ ॥ जें गर्भींच सटवलें ॥ त्याचें बारसें नवचे केलें ॥ तेवीं कर्मींचि विघ्न उद्भवलें ॥ पावणें ठेलें कर्माचें ॥ ४ ॥ ह्मणशी विघ्न
करी कोण ॥ कर्म करितां होय विगुण ॥ तें कर्मचि कर्मासि जाण ॥ विघ्न दारुण उपजवी[३] ॥ ५ ॥ कर्मचि कर्मासि साधक ॥ कर्मचि
कर्मासि बाधक ॥ कर्मचि कर्मासि मोचक[४] ॥ हें नेणोनि लोक गुंतले ॥ ६ ॥ काम्यकर्मीं विघ्न विचित्र ॥ देश काळ मंत्र तंत्र ॥ द्रव्य
दक्षिणा विधिपात्र ॥ शुद्धि सर्वत्र पाहिजे ॥ ७ ॥ जैसें क्षयरोगाचे रोगियासी ॥ अल्प कुपथ्य बाधी त्यासी ॥ तैसें जाण काम्यकर्मासी
॥ अल्पदोषीं सविघ्न ॥ ८ ॥ प्रचंड दुधाचें भांडें ॥ माजी थेंबु एक कांजी पडे ॥ तेणें दहीं दूध ना तूप जोडे ॥ करी खवडे दुधाचे
॥ ९ ॥ तैसें काम्य कर्म जाण ॥ अल्पही होतां विगुण ॥ फळ नव्हे परी दारुण ॥ तें कर्मचि विघ्न उपजवी ॥ ५१० ॥ कष्टोनियां बारा मासीं
॥ जैसा कृषीवळू[५] करी कृषी ॥ त्याच्या फळाआड विघ्नें कैशीं ॥ केल्या कष्टासी नाशक ॥ ११ ॥ भूमी शुद्ध शुद्ध बीज ॥ काळीं पर्जन्य
कर्ता निरुज[६] ॥ उपकरणसामग्री समाज ॥ पहिलें हें वोज पाहिजे ॥ १२ ॥ पेरणी झालियापाठीं ॥ देखणें राखणें कूप कांटी ॥
सोंकरावें आवशीं पाहाटीं ॥ आळस पोटीं सांडूनी ॥ १३ ॥ पीक येतयेतां कणशीं ॥ आभाळें हिंसळा पडे त्यासी ॥ कां कान्हीं[७] पडे
पिकासी ॥ घाली शेतासी निंदणें ॥ १४ ॥ गर्वाचा तांबारा पडे ॥ कां अहंतेचा रोग पडे ॥ कीं अधर्माची आळी वाढे ॥ पीक बुडे
तेणेंही ॥ १५ ॥ सबळ सोंकरणें नधडी ॥ तरी आशेतृष्णेच्या भोरडी ॥ कीजे पिकाची ओरबडी ॥ दाणा बुडीं उरेना ॥ १६ ॥ दंभाची
घांटी पडिल्या ठायीं ॥ घांटा दिसे परी दाणा नाहीं ॥ कामक्रोधांच्या उदरीं पाही ॥ मूळाच्याठायीं करांडिलें ॥ १७ ॥ आल्या ॥१२॥
विकल्पाची धाडी ॥ शेतामाजी नुरे काडी ॥ कुवासना टोळाची पडे उडी ॥ समूळ सशेंडीं खुराट ॥ १८ ॥ एवं कृषीवळाचेपरी ॥ सकामासि
विघ्नें भारी ॥ फळ अंतरलें दूरी ॥ विघ्नसागरीं बुडाले ॥ १९ ॥ स्वर्ग एक याज्ञिक बहुत ॥ यागीं देव विघ्नें करित ॥ मुख्य

---

१ कमीजास्त. २ तपाचा नाश. ३ उत्पन्न करितें. ४ सोडविणारें. ५ शेतकरी. ६ रोग नसलेला. ७ काहणी.

इंद्रविघ्न प्रवर्तत ॥ स्वर्ग राखन निजभोगा ॥ ५२० ॥ जेवीं वेश्या एकी राती ॥ येथ सकाम बहुत येती ॥ ते जैसे कलहो करिती ॥ तैशी गती याज्ञिकां ॥ २१ ॥ कां शुनी[1] जैशी ऋतुस्नात ॥ तिसी भोगूं येती श्वान बहुत ॥ परस्परें गुरगुरित ॥ तैसा स्वर्गभोगत सकामा ॥ २२ ॥ तेथ ज्यासि भोग घडे ॥ भोगूं जातां अडकोनि पडे ॥ भंडिमा होय जगापुढें ॥ सज्ञान तोंडें थुंकिती ॥ २३ ॥ जिचें भोगूं जाय सुख ॥ अडकल्या तें होय विमुख ॥ मैथुनद्वारें गुंतल्या देख ॥ थुंकिती लोक मुखामुखीं ॥ २४ ॥ तैशी याज्ञिकां स्वर्गप्राप्ती ॥ भोगें होय तपच्युती[2] ॥ स्वर्गभोगीं गुंतली आसक्ती[3] ॥ विमुख पडती इहलोकीं ॥ २५ ॥ एवं कृषीवळाचियापरी ॥ स्वर्गप्राप्तीसि विघ्नें भारी ॥ केले कष्ट वृथा करी ॥ भोगू कैशापरी घडेल ॥ २६ ॥ एक ह्मणती कर्मकुशळ ॥ आह्मी कर्म हों नेदूं विकळ ॥ अच्छिद्र साधूनि सकळ ॥ स्वर्गसुख फळ भोगूं ॥ ५२७ ॥ उद्धवा ऐसेंही न घडे ॥ तें मी सांगेन तुजपुढें ॥ पंचश्लोकीं फाडोवाडें ॥ विशद[4] निवाडें परियेसी ॥ २८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अंतरायैरविहतो यदि धर्मः स्वनुष्ठितः ॥ तेनापि निर्जितं स्थानं यथा गच्छति तच्छृणु ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥ जेणें अंतराय[5] नपवती ॥ ऐशीं अच्छिद्र कर्में नव्हती ॥ जरी झाली दैवगतीं ॥ तरी स्थानप्राप्ती ते नश्वर[6] ॥ २९ ॥ कर्में ज्या स्थानाप्रति जाये ॥ तेथ गेलिया जेंजें लाहे[7] ॥ तेंतें सांगेन मी पाहे ॥ सावध होये उद्धवा ॥ ५३० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ इष्ट्वेह देवता यज्ञैः स्वर्लोकं याति याज्ञिकः ॥ भुंजीत देववत्तत्र भोगान् दिव्यान्निजार्जितान् ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ पावोनि कर्मभूमी उत्तम ॥ वर्णवरिष्ठ ब्राह्मणजन्म ॥ ज्योतिष्टोमादिक करिती कर्म ॥ नित्य काम्य अग्निहोत्र ॥ ३१ ॥ त्रयीविद्या जाणती सकळ ॥ कर्मकलापीं अति कुशळ ॥ ऐसे सज्ञान मूर्ख केवळ ॥ स्वर्गफळ वांछिती ॥ ३२ ॥ जेणें पुण्यें मी न जोडें ॥ तें पुण्य ह्मणतां वाचा रडे ॥ याज्ञिक विषयासक्त[8] गाढे ॥ स्वर्गभोगाकडे धांविन्नले ॥ ३३ ॥ यजूनि[9] इंद्रादिदेवांसी ॥ जेणें अंतर पडे मजसी ॥ त्या पावले स्वर्गलोकासी ॥ दिविभोगासी भोगावया ॥ ३४ ॥ बहुतीं चघळिलें जुनें हाड ॥ तें श्वान स्वलीला करी गोड ॥ तैसें याज्ञिकां स्वर्गकोड ॥ स्वपुण्यें गोड करिताती ॥ ३५ ॥ कां स्मशानबळीचें अन्न ॥ कलहें श्वानशेष[10] खाय श्वान ॥ तैसाचि स्वर्गभोग जाण ॥ शेष भोजन बहुतांचें ॥ ३६ ॥ गांठीचें वेंचून शुद्ध सुकृत[11] ॥ उच्छिष्ट भोग विकत घेत ॥ याज्ञिक पवित्र ह्मणवित ॥ मोलें सेवित बहुशेष ॥ ३७ ॥ केवळ वायसाचें मांस ॥ तेंही श्वानमुखींचे शेष ॥ मोलें न मिळेचि बहुवस ॥ तैसी रसकस याज्ञिकां ॥ ३८ ॥ स्वर्ग उच्छिष्ट बहुतांचें ॥ त्यासि मोल वेंचें अतिकष्टाचें ॥ तेंही नमिळेचि धणीचें ॥ भय पतनाचें अहर्निशीं ॥ ३९ ॥ स्वर्गभोग भोगिती देव ॥ तेही ह्मणताति आह्मी निर्दैव ॥

---

१ कुत्री. २ तपापासून भ्रष्टता. ३ प्रीति. ४ स्पष्ट. ५ विघ्न. ६ नाहींशी होणारी. ७ मिळतें. ८ विषयावर प्रेम करणारे. ९ पूजा करून. १० कुत्र्यानें खाऊन उरलेलें. ११ पुण्य.

याज्ञिकांठायीं थोर हांव ॥ दिव्यवैभव भोगार्थ ॥ ५४० ॥ एवं झालिया स्वर्गप्राप्ती ॥ तेथ जेजे भोग भोगिती ॥ ते मी सांगेन तुजप्रती ॥ ऐक निश्चितीं उद्धवा ॥ ४१ ॥ स्वर्गीं समान भोगूं समस्तां ॥ नाहीं जाण गा सर्वथा ॥ ज्यासी जैसी पुण्यअवस्था ॥ तैशी प्राप्तता तयासी ॥ ४२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्वपुण्योपचिते शुभ्रे विमान उपगीयते ॥ गंधर्वैर्विहरन्मध्ये देवीनां हृद्यवेषधृक् ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ आपुले पुण्याचेनि मोलें ॥ चंद्रप्रभविमान आलें ॥ त्यामाजी आरूढले[1] ॥ भोगूं लागले दिविभोगू ॥ ४३ ॥ तेथें दिव्यदेहाची प्राप्ती ॥ मनोहरवेषातें धरिती ॥ अतिमधुर गंधर्व गाती ॥ स्वेच्छा क्रीडती स्त्रियांसी ॥ ४४ ॥ त्या स्वर्गींच्या स्वर्गांगेना[2] ॥ देखतां भुली पडली मनां ॥ मग त्यांचेनि छंदें जाणा ॥ नानास्थाना क्रीडतू ॥ ४५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्त्रीभिः कामगयानेन किंकिणीजालमालिना ॥ क्रीडन्न वेदात्मपातं सुराक्रीडेषु निर्वृतः ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ त्या स्त्रियांसमवेत आपण ॥ विमानीं करोनि आरोहण ॥ स्वेच्छागामी गमन ॥ शोभे विमान तें कैसें ॥ ४६ ॥ घंटा घंटिकाजाळमाळा ॥ क्षुद्रघंटिका रत्नमेखळा ॥ किंकिणी लाविलिया सकळा ॥ विमानलीळा विचित्र ॥ ४७ ॥ इच्छिल्या ठायां ने विमाना ॥ चैत्रवना कां नंदनवनां ॥ भोगावया स्वर्गांगनां ॥ आसक्त जाणा झालासे ॥ ४८ ॥ वनीं सुमनांचे[3] संभार ॥ परांग[4] उधळत सुंदर ॥ कोकिळांचे मधुर स्वर ॥ झणत्कार भ्रमरांचे ॥ ४९ ॥ मंद सुगंध सुशीतळ ॥ झळकतसे मलयानिळ[5] ॥ स्वर्गांगना[6] गदारोळ ॥ कामसुकाळ सकामा ॥ ५५० ॥ आगीकापुरां होतां भेटी ॥ एकवेळे भडका उठी ॥ तैसें पुण्य वेंचलें उठाउठी ॥ भोगासाठीं सकाम ॥ ५१ ॥ मज पतन होईल येथ ॥ भोग जातील समस्त ॥ हेंही नाठवी त्याचें चित्त ॥ कामासक्त झालेंसे ॥ ५२ ॥ दीपासि देतां आलिंगन ॥ पतंगा[7] नाठवे निजमरण[8] ॥ तैसें नाठवे आत्मपतन ॥ भोगीं मन विगुंतलें ॥ ५३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तावत्प्रमोदते स्वर्गे यावत्पुण्यं समाप्यते ॥ क्षीणपुण्यः पतत्यर्वागनिच्छन्कालचालितः ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ॥ जंव असे पुण्यसंपत्ती ॥ तंव स्वर्गभोग भोगिती ॥ क्षीण झाल्या पुण्यशक्ती ॥ पतन पावती तत्काळ ॥ ५४ ॥ जंववरी गांठीं असे धन ॥ तंववरी वेश्येचें सौजन्य ॥ निःशेष वेंचल्या धन ॥ मुख परतोन पाहेना ॥ ५५ ॥ तैशी स्वर्गींची वस्ती ॥ निजपुण्यें भोगिती ॥ पुण्यक्षयें क्षया जाती ॥ पतन पावती अनिच्छा ॥ ५६ ॥ कष्ट करूनियां याज्ञिकीं[9] ॥ स्वर्ग साधिला व्हावया सुखी ॥ ते झाले जी परमदुःखी ॥ पतन अधोमुखीं पावले ॥ ५७ ॥ उडालें स्वर्गभोगाचें सुख ॥ आलें गर्भवासाचें दुःख ॥ जळो सकामाचें सुख ॥ ठकले याज्ञिक सुखलोभें ॥ ५८ ॥ उद्धवा जे ह्मणती स्वर्गसुख ॥ ते यारीतीं पावले दुःख ॥ स्वर्गसुख मानिती मूर्ख ॥ नव्हे निर्दोख[10] तो मार्ग ॥ ५९ ॥ विधियुक्त आचरतां

---

१ चढले. २ अप्सरा. ३ फुलांचे. ४ पुष्पांतील पिंवळे रजःकण. ५ मलयपर्वतावरील वायु. ६ अप्सरा. ७ कीटविशेषास. ८ आपलें मरण. ९ यज्ञकरणारे ब्राह्मणांनीं. १० दोषरहित.

याज्ञिक ॥ पुढती पावले थोर दुःख ॥ तरी अविधीनें होईल सुख ॥ झणी देख ह्मणशील ॥ ५६० ॥ येथ प्रवृत्तिमार्गींची प्रवृत्ती ॥ दों प्रकारें असे वर्तती ॥ एकी विधि[1]रूपें आचरती ॥ दुजी स्थिती अवि[2]धीनें ॥ ६१ ॥ आतां सांगीतली तुजप्रती ॥ ते वेदोक्त विधानस्थिती ॥ जे विधीनें स्वर्गप्राप्ती ॥ हे प्रवृत्ती उत्कट ॥ ६२ ॥ पुण्यक्षयें स्वर्गपतन ॥ तेंही सांगीतलें कथन ॥ आतां अविधी जें आचरण ॥ तेंही लक्षण परियेसी ॥ ६३ ॥ वेदउल्लंघनें कुमती ॥ कुश्चित जनाचे संगतीं ॥ अप्र[3]वृत्तीची प्रवृत्ती ॥ अधर्मस्थिती अवधारी ॥ ६४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यद्यधर्मरतः संगादसतां वाजितेंद्रियः ॥ कामात्मा कृपणो लुब्धः स्त्रैणो भूतविहिंसकः ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ ॥ सहजें प्राणी कामासक्त ॥ प्राप्तकामें अतिलुब्ध होत ॥ काम न पावतां दीनचित्त ॥ स्वभावो नित्य जीवाचा ॥ ६५ ॥ ऐशिया स्वभावनिष्ठासी ॥ जरी संग होय अ[4]संतूपुरुषीं ॥ तरी रति वाढे अधर्मासी ॥ अकर्मासी प्रवर्ते ॥ ६६ ॥ चंचलत्वें कर्मठ मन ॥ त्यास असत्संग मदिरापान ॥ काम[5]वृश्चिकें दंशिलें जाण ॥ तेव्हां वर्तन यद्दां[6]तद्वा ॥ ६७ ॥ पिशा हातें धेंडें[7]वाळी ॥ दीधल्या तो सर्वत्र जाळी ॥ तेवीं असत्संगें करी होळी ॥ स्वधर्म समूळीं जाळित ॥ ६८ ॥ बाळकाहातीं दीधलें शस्त्र ॥ खोंचितां न ह्मणे आप पर ॥ छेदी अपुलेंचि शरीर ॥ हित विचार तें नेणें ॥ ६९ ॥ जेंवी जनीं अवतरे दे[8]व्हारा ॥ तिच्या तोंडा नाहीं वोंवारा ॥ कां बहुरूप्याच्या दिगंतरा ॥ नाहीं थारा वैराग्या ॥ ५७० ॥ तैसा असत्संगें खरा ॥ घाली दंभाचा पसारा ॥ नाहीं विवेकाचा थारा ॥ कामशास्त्रा प्रवर्ते ॥ ७१ ॥ कामशास्त्रें अतिसकाम ॥ कामास्तव जी अधर्म ॥ अधर्मास्तव अकर्म ॥ निंद्य धर्म आचरे ॥ ७२ ॥ निंद्यकर्माचा संयोग ॥ यासि मुद्दल लुब्धभोग ॥ लुब्धभोगामाजी चांग ॥ अधर्म सांग सविस्तर ॥ ७३ ॥ अधर्म वाढतां उबारा ॥ परद्रव्य आणि परदारा ॥ याचिलागीं शरीरा ॥ उपायद्वारा कष्टवी ॥ ७४ ॥ अंगनेलागीं अतिदीन ॥ स्त्रीध्यानें होय स्त्रैण ॥ स्त्री साधावया जाण ॥ भूतहनन आरंभी ॥ ७५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पशूनविधिनालभ्य प्रेतभूतगणान्यजन् ॥ नरकानवशो जंतुर्गत्वा यात्युल्बणं तमः ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ ॥ विधि ह्मणे तें न करावें ॥ वेदु बोले तें नाइकावें ॥ स्मृतिशास्त्र नावडे जीवें ॥ कर्म करावें स्वेच्छा ॥ ७६ ॥ जारण मारण उच्चाटन ॥ स्तंभन मोहन वशीकरण ॥ असाध्य साधूनि अंजन ॥ करी लागवण स्त्रियांसी ॥ ७७ ॥ लोण राई आणि बिबवे ॥ मधुरसीं कालवी आघवे ॥ शाबरी मंत्राचेनि वैभवें ॥ होम करूं धांवे तामस ॥ ७८ ॥ कर्म करावया अभिचार ॥ मेष जंबूक वानर ॥ सरड बेडूक मत्स्य मगर ॥ गीध घार होमिती ॥ ७९ ॥ नग्नभैरव वेताळ ॥ झोटिंग पिशाच कंकाळ ॥ मारको मेसको मैराळ ॥ भूतें प्रबळ उपासी ॥ ५८० ॥ काळी चिडी

---

[1] यथाविधि. [2] विधिरहित. [3] वाईटाविषयीं. [4] दुष्ट पुरुषांशीं. [5] मदनरूपी विंचवानें. [6] वेडेंवांकडें. [7] पेटती उजेडणी. [8] देवाचें वारें अगांत येतें ह्मणून खोटें लोकांत दंभ माजविणारी.

टोंकण घारी ॥ काग बक उलूक मारी ॥ आवंतूनि काळी मांजरी ॥ शाबरमंत्रीं होमिती ॥ ८१ ॥ वाहत्या घाण्याचें तेल चोरी ॥ प्रदोषसंधीं न्हाय शनिवारीं ॥ शाकिनी डाकिनी मध्यरात्रीं ॥ होमामाझारीं चेतवी ॥ ८२ ॥ मद्यांचे[1] घट पूर्ण भरी ॥ मातंगीची[2] पूजा करी ॥ रुधिर[3] घाली प्रेतपात्रीं ॥ मोहनीमंत्र जपोनी ॥ ८३ ॥ घेती हळदीची उटी ॥ सेंदूर लाविती ललाटीं ॥ काम साधावया हटीं ॥ अंजन कर्षीं साधिती ॥ ८४ ॥ होमपात्रें करावया तांतडी ॥ समूळ अश्वत्थातें तोडी ॥ फळित पुष्पित ओषधी उपडी ॥ आसनाबुडीं घालावया ॥ ८५ ॥ बीज जपावया मंत्राचें ॥ वोलें कातडें प्रेताचें ॥ आणवी मृग अस्वलांचें ॥ भय पापाचें मानीना ॥ ८६ ॥ खेचर भूचर जळचर ॥ जीव पीडिती अपार ॥ घेऊनि ब्राह्मणाचें रुधिर ॥ अभिचार आचरती ॥ ८७ ॥ गायीब्राह्मणांसि जाण ॥ पीडा करिती दारुण[4] ॥ क्षेत्रवित्तदाराहरण ॥ स्वार्थें प्राण घेताती ॥ ८८ ॥ देवालयींचें देवशेष ॥ कां शिवालयींचें शिवशेष ॥ घेतां न करिती आळस ॥ वासना असोस अधर्मीं ॥ ८९ ॥ एवं कर्म करितां ऐसें ॥ तेणें अकर्म कर्मवशें ॥ अंधतमीं ते प्रवेशे ॥ जेवीं कां आंवसे चंद्रमा ॥ ५९० ॥ अकर्म जाण अतुर्बळी ॥ जीवाचें निज ज्ञान छळीं ॥ अतिमूढ करूनि ते काळीं ॥ निरयकल्लोळीं घालित ॥ ९१ ॥ ते नरकींची नवलकथा ॥ कोटिवर्षें तळीं जातां ॥ ठाव नलगे गा सर्वथा ॥ केवीं वरुता येईल ॥ ९२ ॥ त्यातें अंधतम ह्मणती ॥ जे देखतां अंध[6] होय वृत्ती ॥ निघतां निर्गमू विसरती ॥ नरकीं वसती मूढत्वें ॥ ९३ ॥ जंव होय कर्मभोगांत ॥ तंव नरक भोगी आकल्पांत ॥ मग स्थावरत्व पावत ॥ वृक्ष होत कां पाषाण ॥ ९४ ॥ ऐशी अवस्था गाढमूढ ॥ केवळ जाड्य झालें जड ॥ स्वप्नीं सुख नेणती[7] गोड ॥ दुःख दुर्वाड भोगिती ॥ ९५ ॥ एवं अधर्मवृत्तीं वर्ततां ॥ सुखलेश नलभे सर्वथा ॥ दुःख अनिवार भोगितां ॥ निर्गमना त्यां नाहीं ॥ ९६ ॥ ॥ श्लोक ॥ "॥ कर्माणि दुःखोदर्काणि कुर्वन्देहेन तैः पुनः ॥ देहमाभजते तत्र किं सुखं मर्त्यधर्मिणः ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐके बापा उद्धवा ॥ मरणधर्मात्मका जीवा ॥ सुख न भेटे त्याच्या भावा ॥ दुःखप्रभवामाजी वासू ॥ ९७ ॥ नरदेहा येवोनि केवळ ॥ क्रूर कर्में करिती प्रबळ ॥ ज्यांसि उत्तरोत्तर दुःखफळ ॥ यातना[8] सकळ भोगवी ॥ ९८ ॥ मरमरों दुःख भोगी दारुण ॥ उपजोनि कर्में करी हीन ॥ दुःखावर्तीं पडिले जाण ॥ आपणिया आपण घातक ॥ ९९ ॥ जे संतचरणीं विमुख ॥ त्यांसि स्वप्नीं नाहीं सुख ॥ क्रूर कर्में करी कामुक ॥ चढे दुःख सकामा ॥ ६०० ॥ एवं प्रवृत्तीमाजी असतां ॥ सकाम कर्में आचरता ॥ सविधि कर्में करितां ॥ दुःख सर्वथा अनिवार ॥ १ ॥ सविधिकाम्यें स्वर्गपतन[9] ॥ अविधिकाम्यें नरक दारुण ॥ एवं प्रवृत्तीमाजी जाण ॥ सुख कोण सकामा ॥ २ ॥

---

१ दारूचे. २ मांगिणीचो. ३ रक्त. ४ मोठी. ५ नरकांत. ६ आंधळी. ७ जाणत नाहींत. ८ दुःख. ९ स्वर्गांतून पडणें.

ह्मणशी लोकपाळांच्याठायीं ॥ नित्य सुख असेल पाहीं ॥ त्यांसि जन्ममरण नाहीं ॥ अमरत्व[1] आह्मीं साधावें ॥ ३ ॥ लोकपाळांचे नित्य लोक ॥ लोकपाळही नित्य देख ॥ तेथें असेल नित्य सुख ॥ ऐसें मूर्ख कल्पिती ॥ ४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ लोकानां लोकपालानां मद्भयं कल्पजीविनाम् ॥ ब्रह्मणोऽपि भयं मत्तो द्विपरार्धपरायुषः ॥ ३० ॥ ॥ टीका ॥ ॥ लोकपाळांमाजी अमरेंद्र ॥ मरुद्गणांचा राजा इंद्र ॥ ज्यासि मानिती सूर्यचंद्र ॥ वरुण कुबेर यमादी ॥ ५ ॥ ज्या अमरावती सिंहासन ॥ ऐरावताचें आरोहण ॥ उच्चैःश्रवा अश्व जाण ॥ पुढें आपण खोलणिये ॥ ६ ॥ ज्यासि उर्वशी भोगपत्नी ॥ रंभामुख्य विलासिनी ॥ जेथ तिलोत्तमा नाचणी ॥ चिंतामणी लोळती ॥ ७ ॥ अष्टमासिद्धींचीं भांडारें ॥ रत्नजडित धवळारे[2] ॥ मरगजाचे डोल्हारे ॥ सुवर्णसूत्रें लाविले ॥ ८ ॥ वैदूर्याचे शाहाडे ॥ कामधेनूचे वाडे ॥ कल्पद्रुमांचे मांदोडे ॥ चहूंकडे शोभतो ॥ ९ ॥ लोकपाळ आज्ञेचे ॥ सुरसेना सैन्य ज्याचें ॥ एवढें ऐश्वर्य जयाचें ॥ राज्य स्वर्गाचें भोगित ॥ ६१० ॥ त्यासि माझी काळशक्ती ॥ ब्रह्मयाचे दिनांतीं ॥ चौदा इंद्र क्षया जाती ॥ येरांची गती कायशी ॥ ११ ॥ ब्रह्मायु ह्मणती समता ॥ जो द्विपरार्धआयुष्यवंता ॥ जंव नपवे[3] माझी काळसत्ता ॥ तंव श्लाघ्यता आयुष्याची ॥ १२ ॥ ज्यासि अग्रपूजेची मान्यता ॥ जो लोकलोकपाळांचा कर्त्ता ॥ त्या ब्रह्म्यासि माझी काळसत्ता ॥ ग्रासी[4] सर्वथा सलोकें ॥ १३ ॥ मी काळात्मा दंडधरू ॥ शास्ता नियंता ईश्वरू ॥ अंतर्यामी सर्वेश्वरू ॥ अतिदुर्धरू व्यापकू ॥ १४ ॥ माझा काळक्षोभ दारुण ॥ त्यातें आवरूं शके कोण ॥ धर्म अर्थ काम जाण ॥ निवारण त्या नहे ॥ १५ ॥ प्रळयकर्त्या महाकाळासी ॥ माझी कीर्ति ग्रासी ॥ माझें महाभय सर्वांसी ॥ लोकपाळांसी सुख कैंचें ॥ १६ ॥ लव निमेष पळापळें ॥ माझेनि भयें सूर्य चळे[5] ॥ माझेनि भयें प्राण खेळे ॥ वायू चळे माझेनि भेणें ॥ १७ ॥ माझे आज्ञेवरी अग्नि जाण ॥ वसवीतसे[6] जठरस्थान ॥ मद्भयें नव्हे अधिक न्यून[7] ॥ पचवी अन्न चतुर्विध ॥ १८ ॥ यथाकाळीं पर्जन्यधारीं ॥ इंद्र वर्षे[8] मद्भयेंकरी ॥ मृत्यु स्वकाळें प्रळय करी ॥ भय भारी त्या माझें ॥ १९ ॥ माझेनि भयेंकरी देखा ॥ समुद्र नोलांडी निजरेखा ॥ माझिया भयाची थोर शंका ॥ तिहीं लोकां कांपवी ॥ ६२० ॥ तिहीं लोकांचा शास्ता ॥ ईश्वर तो मी नियंता ॥ तेणें कर्मजडाची वार्ता ॥ अनीश्वरता छेदिली ॥ २१ ॥ प्रवृत्तीसि अनर्थता ॥ मागां दाविली तत्त्वतां ॥ वैराग्य स्थापिलें सदृढता ॥ निवृत्ति सर्वथा अतिश्रेष्ठ ॥ २२ ॥ आपुल्या ऐश्वर्याच्या आविष्कारें ॥ साधूनि ईश्वरत्व[9] केलें खरें ॥ मीमांसकमत निराकारें ॥ निरूपण पुढारें चालवी ॥ २३ ॥ मीमांसक वार्ता ॥ बोलिले जीवासि अनेकता ॥ तोचि कर्ता आणि भोक्ता ॥ हेंचि सर्वथा निराकारी ॥ २४ ॥ ॥

---

[1] देवत्व. [2] घरें. [3] पावत नाहीं. [4] गिळिते. [5] हाले. [6] राहवितो. [7] कमी. [8] पाऊस पाडतो. [9] देवपणा.

श्लोक ॥ ॥ गुणाः सृजंति कर्माणि गुणोऽनुसृजते गुणान् ॥ जीवस्तु गुणसंयुक्तो भुंक्ते कर्मफलान्यसौ ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ ॥ कृष्ण ह्मणे उद्धवातें ॥ एकादश इंद्रियें समस्तें ॥ करिती नानाविध कर्मांतें ॥ आत्मा तो येथें सर्वसाजी ॥ २५ ॥ दीपु उजळलियां घरीं ॥ लोक वर्तती व्यापारीं ॥ तो नेमी ना निवारी ॥ तैशापरी जीवू येथें ॥ २६ ॥ जीवू प्रेरोनि इंद्रियांतें ॥ ह्मणाल करवितसे कर्मांतें ॥ जेवीं कुऱ्हाडी घेऊनि हातें ॥ छेदी वृक्षातें कृषीवळू[1] ॥ २७ ॥ ऐशी इंद्रियांची प्रेरकता ॥ जीवासि न घडे सर्वथा ॥ ते नघडायाची ऐक कथा ॥ तुज तत्त्वतां सांगेन ॥ २८ ॥ इंद्रियां कर्मीं प्रेरण ॥ करिते सत्वादिक गुण ॥ जीवू उभयसाक्षी जाण ॥ कर्मकारण त्यां नाहीं ॥ २९ ॥ अंगें नातळतां आपण ॥ चुंबक संनिधिमात्रें कारण ॥ अचेतन लोहा करी चळण ॥ तैसा जाण जीव येथें ॥ ६३० ॥ कां उगवल्या दिवाकर ॥ सुष्टु[2] दुष्टु लोकव्यापार ॥ तो सूर्यासि नातळे कर्मभार ॥ साक्षी साचार कर्मांचा ॥ ३१ ॥ तैसी जीवासि कर्तव्यता ॥ सत्य नाहीं गा सर्वथा ॥ दिसे जें कांहीं आपाततां ॥ ते आध्यासिकता[3] मिथ्यात्वें ॥ ३२ ॥ कवळें अध्यासिला डोळा ॥ तों चंद्रमा देखे पिंवळा ॥ तेवीं आत्मा कर्त्ता भासे स्थूळा ॥ केवळ निश्चळा नेणती ॥ ३३ ॥ सवेग चालतां आभाळें ॥ बाळें ह्मणती चंद्रमा पळे ॥ तेवी आत्मा कर्ता माविती स्थूळें ॥ उपाधिमेळें अध्यास ॥ ३४ ॥ देह मी कर्म माझें ॥ हें आत्मेनि स्वप्नीं नेणिजे ॥ मृगजळीं बुडाले राजे ॥ सत्य मानिजे तैसें हें ॥ ३५ ॥ एवं आत्म्यास कर्तव्यता ॥ सत्य नाहीं गा सर्वथा ॥ त्यासि ह्मणताति फळभोक्ता ॥ तेही वार्ता मिथ्यात्वें ॥ ३६ ॥ स्वप्नीं जोडिल्या सहस्र गायी ॥ जागृतीं त्यांचें दुभतें नाहीं ॥ आत्मा भोक्ता तैसा पाहीं ॥ उपाधीच्या ठायीं मिथ्यारूपें ॥ ३७ ॥ डबकीं प्रतिबिंबला रवी ॥ तो जैं तेथील कर्दम सेवी ॥ तैं भोक्ता आत्मा देहगांवीं ॥ सत्य मानवीं मानावा ॥ ३८ ॥ मृगजळामाजी मासे ॥ बिंबला चंद्र गिळिती आंवसें ॥ तैसा आत्मा देहाभिमानवशें[4] ॥ भोगविशेषें भोगिता ॥ ३९ ॥ एवं आत्मा जो भोक्ता ॥ ते सोपाधिक वार्ता ॥ उपाधि मिथ्या गा तत्त्वतां ॥ आत्मा भोक्ता कैसेनी ॥ ६४० ॥ आत्मा अकर्ता अभोक्ता ॥ सदृढ साधिलें तत्त्वतां ॥ जीवासि बोलिली अनेकता ॥ ते मिथ्या आतां साधितू ॥ ४१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यावत्स्याद्गुणवैषम्यं तावन्नानात्वमात्मनः ॥ नानात्वमात्मनो यावत्पारतंत्र्यं तदेव हि ॥ ३२ ॥ ॥ टीका ॥ ॥ सत्वरजतमांचा ॥ अंतरीं धुमाडू गुणकर्मांचा ॥ तंव जीवासि अनेकत्वाचा ॥ आभासू साचा मानला ॥ ४२ ॥ अहंकारादि देहपर्यंत ॥ जंव जीवासि मीपण भासत ॥ तंव नानात्व मानी सत्य ॥ तैं मिथ्या निश्चित उद्धवा ॥ ४३ ॥ जैसें आपुलेंचि निजमुख ॥ आरिसा करी आपणासंमुख ॥ तैसें अविद्यायोगें[5] मायिक ॥ द्वैत देख ते दाखवी ॥ ४४ ॥ आरिशामा

---

१ शेतकरी. २ चांगले. ३ भ्रांती. ४ देहाच्या अभिमानानें. ५ अज्ञानानें.

जी आपुला ॥ जो द्वैतभावो स्वयें देखिला ॥ तेणें आपण नाहीं द्विधा[1] झाला ॥ मिथ्या भासला आभास ॥ ४५ ॥ तो आभास झालिया समोर ॥ त्रिगुण गुणांचे विकार ॥ एकचि दावी नानाकार ॥ दिसे साचार गुणक्षोभें ॥ ४६ ॥ जैसें आपुलेंचि मुख केवळ ॥ शस्त्र आदर्श आणि जळ ॥ लांब निश्चळ चंचळ ॥ करी प्रबळ विकारी ॥ ४७ ॥ एवं त्रिप्रकार कार्यविशेखें ॥ मुखचि देखिजे निजमुखें[2] ॥ तैसें तें नानात्व लटिकें ॥ गुण क्षोभकें भासत ॥ ४८ ॥ सूत्रचि विणिलें पटाकारीं[3] ॥ पटावरी तंतूंच्या हारी ॥ दिसती तेवीं चराचरीं ॥ नानाकारीं एकची ॥ ४९ ॥ साकरेचा केला ऊंसू ॥ वरी कठिण आंत बाकसू ॥ मधील पिळून घ्यावा रसू ॥ हा त्रिगुण दोषू त्या नाहीं ॥ ६५० ॥ तैसा परमात्मा श्रीहरी ॥ अद्वितीय एक चराचरीं ॥ त्यासि अनेकत्वाची परी ॥ सत्वादि करीं गुणक्षोभू ॥ ५१ ॥ जैसा बहुरूपी आपुल्याठायीं ॥ नाना सोंगें धरी देहीं ॥ तितुकीं रूपें त्यासि नाहीं ॥ एकला पाही अद्वैत ॥ ५२ ॥ तैसा सच्चिदानंद श्रीहरी ॥ आत्मा एक चराचरीं ॥ नांदताहे नानाकारीं ॥ द्वैतामाझारीं अद्वैत ॥ ५३ ॥ अद्वैत साधिलें जीवासी ॥ सत्य मानलें आह्मांसी ॥ परी एक आशंका[4] ऐसी ॥ निजमानसीं वर्तत ॥ ५४ ॥ तूंचि ह्मणसी जीव परतंत्र ॥ आतां अद्वैतपणें स्वतंत्र ॥ बोलासी बोलणें विचित्र ॥ केवीं साचार मानावें ॥ ५५ ॥ अद्वैतपण संपादिसी ॥ माझें भय लोकपाळां ह्मणसी ॥ हें नमने[5] गा आह्मांसी ॥ अद्वैतासी भय कैंचें ॥ ५६ ॥ ऐशिया रीतीं उद्धवा ॥ झाल्या संदेहासी रिघावा ॥ तो तूं आतळोंनेदीं जीवा ॥ ऐक बरवा निर्धारू ॥ ५७ ॥ जीवासि तदात्मता ॥ तंव तंव आभासे नानात्मता ॥ नानात्वीं परतंत्रता ॥ ईश्वरसत्ता नेमक ॥ ५८ ॥ अमित मीनलिया[6] दळ ॥ सेनापतीवीण विकळ ॥ आंबा पिकलिया रसाळ ॥ राखण सबळ त्यापासीं ॥ ५९ ॥ तैसी जीवासि जंव अनेकता ॥ तंव सृष्टीसि कर्ता हर्ता नियंता ॥ जाण ईश्वरूचि सर्वथा ॥ परतंत्रता ते जीवासी ॥ ६६० ॥ अनेकत्वें परतंत्रता ॥ यालागीं ईश्वर नियंता ॥ ऐसी देखोनि ईश्वरसत्ता ॥ भय समस्ता जीवांसी ॥ ॥ ६१ ॥ माझे ईश्वरीसत्तेचे भयें ॥ देखोनि अंतकूही भीताहे ॥ इंद्रादिकांचा पाडू काये ॥ भय वाहे विधाता ॥ ६२ ॥ माझी अत्यंत प्रळयींची सत्ता ॥ वाजे हरिहरांचे माथां ॥ अनेकत्वाचा संहर्ता ॥ मीचि सर्वथा निजकाळू ॥ ६३ ॥ यालागीं अनेकत्व जंव आहे ॥ तंववरी दुस्तर काळभये ॥ जेव्हां अनेकत्व नाहीं होये ॥ तेव्हां काळू काये नाशील ॥ ६४ ॥ एवं अनेकत्वाचे माथां ॥ ईश्वरभयाची काळसत्ता ॥ अनेकत्वें परतंत्रता ॥ जाण सर्वथा उद्धवा ॥ ६५ ॥ तें अनेकत्व जैं जाये ॥ तैं काळ नाहीं मा कैंचें भये ॥ पर[7] नसतां परतंत्र न होये ॥ एकत्वीं आहे स्वानंद ॥ ६६ ॥ तेथ अद्वैताचा मळू नुठी[8] ॥ ऐक्य देखे सकळसृष्टीं ॥ तेव्हां स्वानंदाचिया कोटी ॥ भोगी

---

१ दोनप्रकारचा. २ आपल्या मुखानें. ३ वस्त्राच्या आकारानें. ४ संशय. ५ मान्य नाहीं. ६ मिळाल्यास. ७ दुसरा. ८ उठत नाहीं.

उठाउठी निजबोधें ॥ ६७ ॥ ज्या सु[1]खाची मर्यादा ॥ देशें काळें न करवे कदा ॥ त्या सुखाची सुखसंपदा ॥ भोगिती सदा अद्वैतें॥६८॥ निजात्मज्ञान अलोलिक ॥ दुजेनवीण अद्वैतसुख ॥ सांडूनि कर्मवादी परम मूर्ख ॥ नानालोक वांछिती ॥ ६९ ॥ मागां कर्मवादी कर्मठ ॥ बोलिलें प्रवृत्ति अतिश्रेष्ठ ॥ कर्मे करूनियां उद्भट ॥ भोग वरिष्ठ भोगावे ॥ ६७० ॥ तेचि निर[2]सोनि आतां ॥ पुढारीं चालविली कथा ॥ उद्धवासि अद्वैतता ॥ दृढ सर्वथा सांगत ॥ ७१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यावदस्याऽस्वतंत्रत्वं तावदीश्वरतो भयम् ॥ य एतत्समुपासीरंस्ते मुह्यंति शुचार्पिताः ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ गुणवैषम्य ज्यांचे ठायीं ॥ ते नरकभोगासक्त पाहीं ॥ या[3]गादिकर्मे करूनि देहीं ॥ भोगस्थाना तिहीं टाकिलें ॥ ७२ ॥ जेजे टाकूनि गेले लोक ॥ तेथूनि याज्ञिका पतनधाक ॥ तंव दुःखी देखे लोकनायक ॥ अनित्य लोक देखोनी ॥ ७३ ॥ पद्च्युतीं लोकच्युती ॥ भोगकर्में भोगच्युती ॥ केले कष्ट वृथा जाती ॥ दुःखी होती निजपतनें ॥ ७४ ॥ घायाळा कीजे तरटमार ॥ तैसें ओ[4]तप्रोत दुःख फार ॥ भंवे जन्ममरणव्यवहार ॥ भोगी अघोर गर्भवास ॥ ७५ ॥ राहाटमाळेचे करे ॥ पुढती रिता पुढती भरे ॥ तैसा अविश्रम फिरे ॥ गर्भद्वारें मरणांत ॥ ७६ ॥ विंचें खादिल्या दुःखितासी ॥ दाढीसि आग लागे त्यासी ॥ तेवीं भोगक्षयें पतितासी ॥ गर्भवासीं पीडा होय ॥ ७७ ॥ लोकांसि अनित्यता नेणती ॥ यालागीं परमदुःखी होती ॥ कष्टाचें फळ दुःखप्राप्ती ॥ संसारावर्तीं अडकले ॥ ७८ ॥ केवळ लोकभोग नित्य ॥ हेंही न घडे गा येथ ॥ भोगलोक होत सत्य ॥ तरी अनित्य ह्मणावे ॥ ७९ ॥ जेवीं दोरीं स[5]र्पाभास ॥ तेवीं लोक चतुर्दश ॥ केवळ मायामय विलास ॥ सुखलेश तेथ कैंचा ॥ ६८० ॥ केवळ जें कां मायिक ॥ त्यामाजी कैंचें भोगसुख ॥ कर्मठ ते केवळ मूर्ख ॥ विषय मायिक वांछिती ॥ ८१ ॥ भरलें मृगजळाचें तळें ॥ तेणें जैं पिकती साळीकेळें ॥ तैं विषयभोगीं सुख फळे ॥ हें न कळे भ्रांतासी ॥ ८२ ॥ जग दुमदुमित भरलें दिसे ॥ तें तूं मायिक ह्मणसी कैसें ॥ हेंचि कळे अनायासें ॥ तुजमी तैसें सांगेन ॥ ८३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ काल आत्माऽऽगमो लोकः स्वभावो धर्म एव च ॥ इति मां बहुधा प्राहुर्गुणव्यतिकरे सति ॥ ३४ ॥ ॥ टीका ॥ ॥ केवळ मायामय कल्पित ॥ संसार तो अ[6]ज्ञानजनित ॥ एकातें अनेक ह्मणत ॥ चित्तें दुश्चित्त होउनी ॥ ८४ ॥ कन[7]कबीजसेवनें जैसें ॥ शहाणें माणूस होय पिसें ॥ मग त्यासि नसतेंचि आभासे ॥ ससे मासे गोसर्प ॥ ८५ ॥ तैसें मायावशें अतिभ्रांता ॥ तैसें अनेकत्व भासे चित्ता ॥ न[8]भीं गंधर्वनगर पाहतां ॥ दिसे शोभिता पुरदुर्गू ॥ ८६ ॥ कां अंधारीं दोरू दिसे डोळां ॥ ह्मणे सर्प दंड कीं सुमनमाळा ॥ नाना एकावळी मुक्ताफळां ॥ कोणी अबळा विसरली ॥ ८७ ॥ तेवीं निजात्मा मी पुरुषोत्तम ॥ त्या मज नानारूपें

---

[1] ब्रह्मसुखाची. [2] नाहींसें करून. [3] यज्ञादि कर्में. [4] आंतबाहेर. [5] सर्पभ्रांति. [6] अज्ञानापासून उत्पन्न झालेला. [7] धोत्र्याचें बी खाण्यानें. [8] आकाशांत.

नाम कर्म ॥ काळु आत्मा आगम ॥ स्वभाव धर्म मज ह्मणती ॥ ८८ ॥ काळ ह्मणती प्रकृतिक्षोभकू ॥ आत्मा ह्मणती प्रकृतिनेमकू ॥ वेद ह्मणती कर्मबोधकू ॥ अदृष्टद्योतकू धर्म ह्मणती ॥ ८९ ॥ अदृष्ट दृष्ट करूनि भोगविजे ॥ यालागीं धर्म तो ह्मणिजे ॥ आतां स्वभावो जेणें बोलिजे ॥ तेंही सहजें परियेसी ॥ ६९० ॥ आत्मा भोक्ता हा स्वभावो ॥ जेणें परिणामें देवाधिदेवो ॥ इत्यादिका हेतू पहाहो ॥ मजचि स्वभावो ह्मणताती ॥ ९१ ॥ अदृष्टाचें फळ नानालोक ॥ लोक ह्मणावया हेतु हे देख ॥ एवं मज एकातें अनेक ॥ मिथ्या मूर्ख मानिती ॥ ९२ ॥ नानारंगांचिया वृत्ती ॥ चित्र लिहिलें यथानिगुतीं ॥ तेंही नानाकारें दिसे भिंतीं ॥ सर्वव्यक्तिद्योतक ॥ ९३ ॥ तैसे नानाकार नानाधर्म ॥ नानानामें नानाकर्म ॥ तें मी अवघा आत्माराम ॥ सर्वोत्तम सर्वथा ॥ ९४ ॥ मजवेगळा रिता कांहीं ॥ अणु[1] भरी ठाव उरला नाहीं ॥ मी सर्वात्मा सर्वदेहीं ॥ सर्वगत पाहीं सर्वदा ॥ ९५ ॥ जैसे सागरा[2]माजी तरंग ॥ तैसें मजमाजी दिसे जग ॥ जग नव्हे तें मीचि चांग ॥ सुख अव्यंग मजमाजी ॥ ९६ ॥ मी शुद्ध बुद्ध मुक्त स्वभावो ॥ त्या मज नानात्वें ठेविती नांवो ॥ उद्धवा ज्यासि जैसा भावो ॥ तैसा मी देवो तयासी ॥ ९७ ॥ नास्तिक्य वसे ज्याचे ठायीं ॥ त्यासि मी सर्वथा कोठें नाहीं ॥ आस्तिक्यवंतालागीं पाहीं ॥ मी सर्वांठायीं तिष्ठतू[3] ॥ ९८ ॥ भावार्थें ज्या मज जेथें पाहे ॥ त्यासि मी तेव्हांचि तेथें आहें ॥ मज पावावया उपाये ॥ बहुत पाहे न लगती ॥ ९९ ॥ मी सर्वात्मा सर्वगत एकू ॥ ऐसा जयाचा भाव निष्टंकू[4] ॥ तोचि पढियंता मज एकू ॥ ज्ञाननिलकू तो माझा ॥ ७०० ॥ तो आत्मा मी त्याचें देह ॥ मी ध्याता तो माझें ध्येय ॥ मी ज्ञाता तो शुद्ध ज्ञेय ॥ ऐसा पढियंता तो आह्मा ॥ १ ॥ उद्धवा हे एकात्मभक्ती ॥ सज्ञान ज्ञाते येणें भजती ॥ तयां मज अभेदप्रीती ॥ तुवांही यारीतीं भजावें ॥ २ ॥ परमात्मा एक नित्य शुद्ध ॥ त्यासि माया[5]मय संसारबंध ॥ मिथ्या जाण देहसंबंध ॥ हा निजात्मबोध पैं माझा ॥ ३ ॥ हा मिथ्याबंध पडे जीवासी ॥ आत्मज्ञानें मुक्ती त्यासी ॥ हें मागें बोलिलों तुजपाशीं ॥ तेंचि मतनिरासीं दृढ केलें ॥ ४ ॥ धरोनि श्लोक चौदावा ॥ अंतीं श्लोक चौतिसावा ॥ मीमांसकमताचा आघवा ॥ निरासू[6] बरवा येणें केला ॥ ५ ॥ एवं निरसोनि मतांतर[7] ॥ अद्वैत स्थापिलें दृढतर ॥ हेंचि निजज्ञान[8] साचार ॥ चराचरवरिष्ठ ॥ ६ ॥ अद्वैतज्ञान शुद्ध चोख ॥ ऐकोनि उद्धवा झालें सुख ॥ ह्रदयीं दाटला हरिख ॥ पाहे श्रीमुख कृष्णाचें ॥ ७ ॥ चालिलें सात्विकाचें भरितें ॥ चित्त विसरलें चिंतनातें ॥ अश्रु लोटले जी तेथें ॥ आप आपणियातें विसरला ॥ ८ ॥ उद्धवासि नावेक ॥ पडोनि ठेलें जी ठक ॥ सावध होऊनियां देख ॥ कृष्णासंमुख तो झाला ॥ ९ ॥ अद्वैतभजनें जे भजते ॥ ते भक्त कृष्णासि आवडते ॥ तें के

---

[1] थोडाही. [2] समुद्रांत. [3] राहतों. [4] निश्चयात्मक. [5] मायारूप. [6] नाश. [7] अन्यमतें. [8] आत्म्याचें ज्ञान.

वीं प्राप्त होय मातें ॥ यालागीं हरीतें पुसत ॥ ७१० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धव उवाच ॥ ॥ गुणेषु वर्तमानोऽपि देहजेष्वनपावृतः ॥ गुणैर्न बध्यते देही बध्यते वा कथं विभो ॥ ३५ ॥ ॥ टीका ॥ ॥ उद्धव ह्मणे कृष्णनाथा ॥ आत्मा देहामाजी असतां ॥ बंधन[1] पावेजी तत्त्वतां ॥ कीं सर्वथा पावेना ॥ ११ ॥ गुण असतां मुक्ति घडे ॥ कीं गुण गेलिया मुक्ति जोडे ॥ हेंचि सांगावें मजपुढें ॥ अतिनिवाडें निश्चित ॥ १२ ॥ गुण असतां मुक्ति घडे ॥ हें सर्वथा बोलणें कुडें ॥ ज्वर असतां आरोग्य न घडे ॥ वृक्ष[2] न वाढे भिरुंडेंसी ॥ १३ ॥ बाहीं बांधोनि पाषाण[3] ॥ समुद्रामाजी तरे कोण ॥ तैसे देहीं असतां त्रिगुण ॥ मुक्तपण कैसेंनी ॥ १४ ॥ गुण जे रजतमादिक ॥ त्यांचें कार्य देह देख ॥ गुणासारिखीं आवश्यक ॥ कर्में अनेक आचरे ॥ १५ ॥ कर्मांचें फळ सुखदुःख ॥ भोगणें पडे गा अचुक ॥ गुणांसि मुक्ति न घडे देख ॥ हें ज्ञाते लोक ह्मणताती ॥ १६ ॥ गुण गेलिया मुक्ती ॥ हेंही न घडे गा श्रीपती ॥ येहीविषयीं विनंती ॥ कृपामूर्ती अवधारी ॥ १७ ॥ गुणांचें कार्य देहेंद्रियें ॥ ते गुण जाऊनि देह राहे ॥ भूमीविण वृक्ष होये ॥ हें अबद्ध पाहे बोलणें ॥ १८ ॥ कारण जाऊनि कार्य राहे ॥ हें बोलणें घडे काये ॥ गुण जातां देहोचि जाये ॥ मुक्त वर्तताहे कैसेंनी ॥ १९ ॥ एवं गुण असतां नसतां ॥ मुक्ति[4] न घडे गा सर्वथा ॥ येचिविषयीं कृष्णनाथा ॥ तुज मी तत्त्वतां पुसतू ॥ ७२० ॥ आणिक एक जगन्नाथा ॥ तुज मी विनंती करीन आतां ॥ गुणआत्म्यांसि एकत्रता ॥ न घडे सर्वथा निश्चित ॥ २१ ॥ भरलें मृगजळाचें तळें ॥ चंद्रमा बिंबेना तेणें जळें ॥ तेवीं आत्मा गुणांसि नाकळे ॥ स्वभावें नातळे गुणांतें ॥ २२ ॥ गुण ते अज्ञानाची राती[5] ॥ आत्मा स्वप्रकाश गभस्ती[6] ॥ त्यासमोर ते कैंचे येती ॥ मग बाधिती आत्म्यातें ॥ २३ ॥ अंधार सूर्यातें गिळी ॥ काउळा कैलास आतळी ॥ बागुल हनुमंतातें सळी ॥ मशक[7] गिळी गजातें ॥ २४ ॥ माशी पांखें गगन उडे ॥ सगळा मेरु थिल्लरीं बुडे ॥ मृगजळीं जैं तारूं पडे ॥ तैं आत्मा सांपडे गुणांत ॥ २५ ॥ जेवीं आकाश नातुडे जाळीं ॥ तेवीं आत्मा नाकळे गुणमेळीं ॥ मा सुखदुःखांची नवाळी ॥ गुणकल्लोळीं कां भोगी ॥ २६ ॥ यापरी न घडे गा बद्धता ॥ मा मुक्ताची कायसी कथा ॥ कैसेंनि बद्धमुक्तव्यवस्था ॥ घडे कृष्णनाथा तें सांग ॥ २७ ॥ येथ बद्धासि काय कारण ॥ आणि मुक्ताची कोण खूण ॥ एवं बद्धमुक्तलक्षण ॥ मज संपूर्ण सांगावें ॥ २८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कथं वर्तेत विहरेत्कैर्वा ज्ञायेत लक्षणैः ॥ किं भुंजीतोत विसृजेच्छयीताऽऽसीत याति वा ॥ ३६ ॥ ॥ टीका ॥ ॥ आतां बद्धमुक्तांची स्थिती ॥ मज सांगावी श्रीपती ॥ कोणें लक्षणें जाणिजेती ॥ दोघे कळती कैसेंनी ॥ २९ ॥ पावोनियां विदेहावस्था ॥ देहीं कैसेंनि वर्तता ॥ वश करूनि गुणातीतता ॥ गुणीं क्रीडतां कैसेनी ॥ ७३० ॥ पा

---

१ जन्म व मरण. २ झाड. ३ दगड. ४ मोक्ष. ५ रात्र. ६ सूर्य. ७ मुर्कुट.

वोनियां मुक्तदशा[1] ॥ देहीं भोग भोगी कैसा ॥ त्यासि त्यागाचा कोण ठसा ॥ हृषीकेशा सांगिजे ॥ ३१ ॥ त्याचे निद्रेचें कोण लक्षण॥ कोण बैसका कोण आसन ॥ वस्तु जाणोनि संपूर्ण ॥ गमनागमन[2] त्या कैसें ॥ ३२ ॥ ऐशीं मुक्तांचीं लक्षणें ॥ त्याहोनि बद्धांचीं विलक्षणें ॥ कृपा करोनि नारायणें ॥ मजकारणें सांगिजे ॥ ३३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एतदच्युत मे ब्रूहि प्रश्नं प्रश्नविदांवर ॥ नित्यमुक्तो नित्यबद्ध एक एवेति मे भ्रमः ॥ ३७ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे दशमोऽध्यायः ॥ १० ॥ टीका ॥ याप्रश्नोत्तरांची उत्कंठा ॥ थोर वर्ततसे वैकुंठा ॥ प्रश्नवेत्त्यांमाजी श्रेष्ठा ॥ अतिवरिष्ठा गोविंदा ॥ ३४ ॥ अनादि असे गुणसंबंधू ॥ तेणें आत्मा झाला नित्यबद्धू ॥ नित्यमुक्त हा शब्दू ॥ असंबद्धू सर्वथा ॥ ३५ ॥ जरी आत्म्यासि नित्यमुक्तता ॥ तरी बोलोचिनये बद्धता ॥ एकचि बद्धमुक्त ह्मणतां ॥ भ्रम अच्युता वाटत ॥ ३६ ॥ आत्मा एकचि तत्त्वतां ॥ त्यासि बद्धता आणि मुक्तता ॥ एकासीच दोनी अवस्था ॥ कृष्णनाथा कैसेंनी ॥ ३७ ॥ जो धाला[3] तोचि भुकेला ॥ जागा तोचि निजेला ॥ जो जिता तोचि मेला ॥ सत्यत्व या बोला कैसेंनी ॥ ३८ ॥ काळें तेंचि धवळें ॥ देखणें तेंचि आंधळें ॥ अर्धें तेंचि सगळें ॥ कुहिऱ्या केळें केवीं होती ॥ ३९ ॥ लोण तेंचि अलवणी ॥ कोरडें तें पाणी ॥ अतिशीतळ तो दारुण अग्नी ॥ मुकें पुराणीं बोलिगडें ॥ ७४० ॥ लुगडें नागवेपणें लाजाळू ॥ अन्न भुकेलेंपणें भुकाळू ॥ मुक्तीसि मुक्तीचा दुकाळू ॥ कापुरा परिमळू मिळेना ॥ ४१ ॥ तैसे संत तेचि असंत ॥ अद्वैत तेंचि होय द्वैत ॥ तेव्हां हित तेंचि अनहित ॥ दिसे प्रस्तुत आह्मांसी ॥ ४२ ॥ आत्मा नित्यमुक्त शुद्ध बुद्ध ॥ ऐसा तुवांचि केला मनोबोध ॥ तो गुणसंगें[4] ह्मणसी बद्ध ॥ भ्रमू अगाध येणें मज ॥ ४३ ॥ एकासचि बद्धमुक्तता ॥ कैसेंनि घडे कृष्णनाथा ॥ कृपाळुवा अनंता ॥ हें मज तत्त्वतां सांगावें ॥ ४४ ॥ ह्मणसी मुक्तीसी आगंतुकता ॥ तेणें मोक्षासि आली अनित्यता ॥ बद्ध आगंतुक ह्मणतां ॥ त्यासि सादिता येऊं पाहे॥४५॥ पूर्वीं बद्धचि नव्हता ॥ येथूनि उपजला आतां ॥ ऐशी सादिता बोलता ॥ होईल शास्त्रार्था विरुद्ध ॥ ४६ ॥ श्रुतिस्मृतिशास्त्रसिद्ध ॥ अनादि मुक्ति अनादि बद्ध ॥ आत्मा एक अवस्था द्विविधें[5] ॥ त्याही विरुद्ध परस्परें ॥ ४७ ॥ उठिली बद्धता मुक्तीतें छळी ॥ खवळली मुक्ती बद्धता गिळी ॥ ऐशा विरुद्धता आत्म्याजवळी ॥ केवीं वनमाळी राहताती ॥ ४८ ॥ जैं सांजवेळे भेटे पाहांट ॥ तैं विद्या अविद्या होय एकवट ॥ सूर्य अंधाराची बांधे मोट ॥ तैं आत्म्यानिकट अवस्था ॥ ४९ ॥ हिंगासि कापूराचा वासु जोडे ॥ तैं अविद्या विद्येमाजी पडे ॥ ससा सिंहावरी जैं चढे ॥ तैं आत्म्यापुढें अवस्था ॥ ७५० ॥ उद्धव ह्मणे कृष्णनाथा ॥ या जैं कळल्या दोनी अवस्था ॥ तैंचि

---

१ मुक्तांची अवस्था. २ जाणें व येणें. ३ तृप्त झाला. ४ सत्व रज तमोगुणांच्या संगतीनें. ५ दोनप्रकारची.

मुक्ति[1] आली हातां ॥ मज सर्वथा मानलें ॥ ५१ ॥ मग ह्मणे श्रीअनंता ॥ विशद[2] सांगाव्या अवस्था ॥ ह्मणोनि चरणीं ठेविला माथा ॥ मोक्षदाता तूं मज ॥ ५२ ॥ सखोल उद्धवाचा प्रश्न ॥ ऐकोन सुखावला नारायण ॥ माझा उद्धव झाला सज्ञान ॥ हरिखें जगज्जीवन डोलत ॥ ५३ ॥ परमार्थीं अवस्था गाढी ॥ देखोनि प्रश्नाची अतिगोडी ॥ उद्धवासि ओंवाळाया आवडी ॥ जीवें कुरवंडी करूं पाहे ॥ ५४ ॥ नुल्लंघी भक्ताचें उत्तर ॥ फोडिलें गुह्य ज्ञानभांडार ॥ भक्तकृपा जी अपार ॥ हरि साचार तुष्टला[3] ॥ ५५ ॥ उद्धवाचा प्रश्न गहन ॥ कृपें द्रवला जगज्जीवन ॥ एका विनवी जनार्दन ॥ आनंदघन बोळला ॥ ५६ ॥ त्या आनंदाचा महापूरू ॥ शिष्यसरितेसि[4] येईल थोरू ॥ तेणें चिद्गंगासागरू ॥ शिष्यसत्वरू टाकील ॥ ५७ ॥ टाकोनियां संसारआस्था ॥ जो लागला भक्तिपंथा ॥ तोचि अधिकारी भागवता ॥ परमार्था ग्राहक ॥ ५८ ॥ ज्याचे पोटीं संसारचिंता ॥ तो कथा ऐकतांचि दुश्चिता ॥ चित्त चिंती ज्याज्या अर्था ॥ तो सर्वथा तेथें असे ॥ ५९ ॥ चित्त जंव नाहीं सुचित ॥ तंव न कळे श्रीभागवत ॥ गुरुवांचूनि श्रीभागवतार्थ॥नव्हे प्राप्त प्राप्यासी॥७६०॥ जो संसारापासोनि विरक्त ॥ गुरुचरणीं अतिअनुरक्त ॥ त्यासीच फावला एक परमार्थ ॥ फळे भागवत तयासी ॥ ६१ ॥ देखतां कृष्णाचें श्रीमुख ॥ उद्धवा नीचें[5] नवें समाधिसुख ॥ तरी श्रवणाची श्रद्धा अधिक ॥ आवडी देख अनिवार ॥ ६२ ॥ जो श्रुतिप्रतिपाद्य चिद्घन ॥ त्या श्रीकृष्णाचें गुह्यज्ञान ॥ पुढतपुढती व्हावया श्रवण ॥ करी प्रश्न अतियोग्य ॥ ६३ ॥ विद्याअविद्येचा निरास ॥ श्रीकृष्ण सांगेल परेश ॥ पुढील अध्याय अतिसुरस[6] ॥ श्रोतां अवकाश मज द्यावा ॥ ६४ ॥ तो कृष्णउद्धवसंवादू ॥ पुढिले कथेचा अतिविनोदू ॥ एका जनार्दनीं महाबोधू ॥ परमानंदू प्रकटेल ॥ ६५ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे श्रीकृष्णोद्धवसंवादे परमहंससंहितायां एकाकारटीकायां दशमोध्यायः ॥ १० ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ अ० १० ॥ ॥ ओं० ७६५ ॥ ॥छ॥ ॥छ॥

---

[1] मोक्ष. [2] स्पष्ट. [3] संतोष पावला. [4] शिष्यरूपनदीस. [5] नित्य. [6] रसभरित.

मुक्ति[1] आली हातां ॥ मज सर्वथा मानलें ॥ ५१ ॥ मग ह्मणे श्रीअनंता ॥ विशद[2] सांगाव्या अवस्था ॥ ह्मणोनि चरणीं ठेविला माथा ॥ मोक्षदाता तूं मज ॥ ५२ ॥ सखोल उद्धवाचा प्रश्न ॥ ऐकोन सुखावला नारायण ॥ माझा उद्धव झाला सज्ञान ॥ हरिखें जगज्जीवन डोलत ॥ ५३ ॥ परमार्थीं अवस्था गाढी ॥ देखोनि प्रश्नाची अतिगोडी ॥ उद्धवासि ओंवाळाया आवडीं ॥ जीवें कुरवंडी करूं पाहे ॥ ५४ ॥ नुल्लंघी भक्ताचें उत्तर ॥ फोडिलें गुह्य ज्ञानभांडार ॥ भक्तकृपा जी अपार ॥ हरि साचार तुष्टला[3] ॥ ५५ ॥ उद्धवाचा प्रश्न गहन ॥ कृपें द्रवला जगज्जीवन ॥ एका विनवी जनार्दन ॥ आनंदघन बोळला ॥ ५६ ॥ त्या आनंदाचा महापूरू ॥ शिष्यसरितेसि[4] येईल थोरू ॥ तेणें चिद्गंगासागरू ॥ शिष्यसत्वरू टाकील ॥ ५७ ॥ टाकोनियां संसारआस्था ॥ जो लागला भक्तिपंथा ॥ तोचि अधिकारी भागवता ॥ परमार्था ग्राहक ॥ ५८ ॥ ज्याचे पोटीं संसारचिंता ॥ तो कथा ऐकतांचि दुश्चिता ॥ चित्त चिंती ज्याज्या अर्था ॥ तो सर्वथा तेथें असे ॥ ५९ ॥ चित्त जंव नाहीं सुचित ॥ तंव न कळे श्रीभागवत ॥ गुरुवांचूनि श्रीभागवतार्थ ॥ नव्हे प्राप्त प्राण्यासी ॥ ७६० ॥ जो संसारापासोनि विरक्त ॥ गुरुचरणीं अतिअनुरक्त ॥ त्यासीच फावला एक परमार्थ ॥ फळे भागवत तयासी ॥ ६१ ॥ देखतां कृष्णाचें श्रीमुख ॥ उद्धवा नीचें[5] नवें समाधिसुख ॥ तरी श्रवणाची श्रद्धा अधिक ॥ आवडी देख अनिवार ॥ ६२ ॥ जो श्रुतिप्रतिपाद्य चिद्घन ॥ त्या श्रीकृष्णाचें गुह्यज्ञान ॥ पुढतपुढती व्हावया श्रवण ॥ करी प्रश्न अतियोग्य ॥ ६३ ॥ विद्याअविद्येचा निरास ॥ श्रीकृष्ण सांगेल परेश ॥ पुढील अध्याय अतिसुरस[6] ॥ श्रोतां अवकाश मज द्यावा ॥ ६४ ॥ तो कृष्णउद्धवसंवादू ॥ पुढिले कथेचा अतिविनोदू ॥ एका जनार्दनीं महाबोधू ॥ परमानंदू प्रकटेल ॥ ६५ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे श्रीकृष्णोद्धवसंवादे परमहंससंहितायां एकाकारटीकायां दशमोध्यायः ॥ १० ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ अ० १० ॥ ॥ ओं० ७६५ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

---

१ मोक्ष. २ स्पष्ट. ३ संतोष पावला. ४ शिष्यरूपनदीस. ५ नित्य. ६ रसभरित.


अध्याय ११ वा.
श्रीकृष्ण.
उद्धव

शुभाशीर्वाद देत आहे.

पाटण संस्थेचे उपाध्यक्ष रा. बलवंतरा
महाजन यांचे चिरंजीव नारायणराव यांचा विवा

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ओंनमो श्रीगुरु सच्चिद्घन ॥ वर्षताहे स्वानंदजीवन ॥ मुमुक्षुमयूर[1] आनंदले जाण ॥ हरिखें उड्डाण करिताती ॥ १ ॥ तो सजल देखोनि मेहें[2] ॥ सोहंभावें फोडिती टाहो ॥ रोमांचपिच्छें पसरूनि पहाहो ॥ सत्वें लवलाहो नृत्याचा[3] ॥ २ ॥ नाचे स्वानंदाचेनि मेळे ॥ तेणें सर्वांगीं निघाले डोळे ॥ पिसें देखणीं जाहलीं सकळें ॥ तें शिरीं गोपाळें वाहिलीं ॥ ३ ॥ तो मेघ देखोनि संमुख ॥ आर्तचातक पसरिती मुख ॥ बिंदुमात्रें पावती सुख ॥ नित्य निर्दोख ते जाहले ॥ ४ ॥ आर्ततृषा तत्काळ बोलें ॥ निवाले तेणें स्वानंदजळें ॥ मग हरिखाचेनि कल्लोळें ॥ सुखसोहळे भोगिती ॥ ५ ॥ सुभूमि देखोनि निर्मळ ॥ न पाहतां काळवेळ ॥ वर्षोंलागले जी प्रबळ ॥ जळकल्लोळ अनिवार ॥ ६ ॥ तेणें वोळलेनि कृपाभरें ॥ शिष्यसरितेसि पूर भरे ॥ विकल्प वोसणें एकसरें ॥ महापूरें वाहाविलीं ॥ ७ ॥ तेणें प्रवाहनिर्मळजळें ॥ चिदैक्यसागरीं सरिता मिळे ॥ मग समरसोनि[4] तेणें जळें ॥ राहे निश्चळें निजरूपें ॥ ८ ॥ वैराग्य रावे शुद्ध केली ॥ पृथ्वी निजवोला वोळली ॥ कठिणत्वें मार्दवा आली ॥ नाहीं अंकुरली बहुबीजें ॥ ९ ॥ अखंड वर्षतां जळमेळीं ॥ वासनेचीं ढेपें विरालीं ॥ सद्भावाची वोल जाहली ॥ वाफ लागली बोधांची[5] ॥ १० ॥ तेथें न पेरितांचि जाण ॥ सहजें निजबीजें परिपूर्ण ॥ अंकुरली आपणिया आपण ॥ सिद्ध संपूर्ण स्वभावें ॥ ११ ॥ ते परमकृपेचिये पुष्टी ॥ स्वानंदें पिकली समदृष्टी ॥ परमानंदें कोंदली[6] सृष्टी ॥ ऐक्य सवसाठी जीवशिवा ॥ १२ ॥ फिटला दुःखदुष्काळू ॥ जाहला सुखाचा सुकाळू ॥ वोळला सद्गुरु कृपाळू ॥ आनंदकल्लोळू सच्छिष्यां ॥ १३ ॥ वर्षतां निजपर्जन्यधारा ॥ वर्षला नानावतार गारा ॥ कार्यानुरूपें तदाकारा ॥ विरोनि निराकारा त्या होती ॥ १४ ॥ त्या पर्जन्याचा वोसाडा ॥ दैवें लागला जडमूढां ॥ तो सरता होय संतापुढां ॥ अवचटेंसि तोंडा जैं लागे ॥ १५ ॥ तो महामेघ श्रीहरी ॥ सद्गुरुकृपा वोळे जयावरी ॥ तोचि धन्य चराचरीं ॥ पूज्य सुरनरीं[7] तो कीजे ॥ १६ ॥ गुरुनामें अतिघनवट ॥ शिष्य तारूनि अतिहळुवट ॥ ज्याचा आदि मध्य शेवट ॥ नकळे स्पष्ट वेदांसी ॥ १७ ॥ तो सद्गुरु श्रीजनार्दन ॥ वोळलासे आनंदघन ॥ तेणें एकाएकु केला पावन ॥ सांडवोन एकपणें ॥ १८ ॥ एक तेंचि अनेक ॥ अनेक तेंचि एक ॥ हेंही केलें निष्टंक ॥ स्वबोधें देख बोधोनी ॥ १९ ॥ बोधोनियां निजऐक्यता ॥ ऐक्यें लाविलें भक्तिपंथा ॥ मज प्रवर्तविलें श्रीभागवता ॥ निजकथा[8] गावया ॥ २० ॥ तेचि श्रीभागवतींची कथा ॥ दशमाध्याय संपतां ॥ बद्धमुक्तांची व्यवस्था ॥ उद्धवें कृष्णनाथा पूशिली ॥ २१ ॥ सखोल उद्धवाचा प्रश्न ॥ ऐकोनियां श्रीकृष्ण ॥ निजहृदयींचें गुह्यज्ञान ॥ उद्धवासि जाण सांगेल ॥ २२ ॥ येणें प्रश्नोत्तरश्रवणें ॥ उठे जन्ममरणाचें धरणें ॥ संसा

---

[1] मुक्त होण्याची इच्छा करणारे हेच मोर. [2] मेघ. [3] नाचाचा. [4] मिसळून. [5] ज्ञानाची. [6] भरली. [7] देवांनीं आणि मनुष्यांनीं. [8] आपली कथा.

राचें खत फाडणें ॥ फिटल लहाणें विषयाचें ॥ २३ ॥ मोक्षमार्गींचे कापडी ॥ साधनीं शिणती बापुडीं ॥ तिहीं शीघ्र यावें तांतडी ॥ जिणावया वोढी बंधमोक्षांच्या ॥ २४ ॥ जे कष्टती[1] जपतपसाधनें ॥ शिणती ध्येयध्यानअनुष्ठानें ॥ तेंतें शीघ्र या विंदानें ॥ ज्ञानज्ञानें जिणावया ॥ २५ ॥ ऐशी कथा आहे गहन ॥ श्रोतां व्हावें सावधान ॥ एका विनवी जनार्दन ॥ स्वानंदघन तुष्टला ॥ २६ ॥ अकरावे अध्यायीं जाण ॥ इतुकें सांगेल श्रीकृष्ण ॥ बद्धमुक्तांचें वैलक्षण्य ॥ आणिक लक्षण साधूचें ॥ २७ ॥ तेणेंच प्रसंगें जाण ॥ सांगेल भक्तीचें लक्षण ॥ अकराही पूजेसि अधिष्ठान ॥ इतुकें निरूपण हरि बोले ॥ २८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ बद्धो मुक्त इति व्याख्या गुणतो मे न वस्तुतः ॥ गुणस्य मायामूलत्वान्न मे मोक्षो न बंधनम् ॥१॥ ॥टीका ॥ ॥ उद्धवा बद्ध मुक्त अवस्था ॥ जरी सत्य ह्मणसी वस्तुतां ॥ तरी न घडे गा सर्वथा ॥ ऐक आतां सांगेन ॥ २९ ॥ बद्ध मुक्त अवस्था ॥ माझे स्वरूपीं नाहीं सर्वथा ॥ हे गुणकार्याची वार्ता ॥ संबंधू तत्त्वतां मज नाहीं ॥ ३० ॥ माझ्या निजस्वरूपाच्या ठायीं ॥ बद्धमुक्तता[2] दोनी नाहीं ॥ बद्धता मुक्तता गुणांच्याठायीं ॥ आभासे कांहीं[3] गुणकार्यें ॥ ३१ ॥ गुण ते समूळ मायिक ॥ मी गुणातीत मायिक ॥ सत्यासि जैं बाधे लटिक ॥ तैं मृगजळीं लोक बुडाले ॥ ३२ ॥ चित्रींचेनि हुताशनें ॥ जैं जाळिजती पुरें पट्टणें ॥ कां स्वप्नींचेनि महाधनें ॥ वेव्हारा होणें जागृतीं[4] ॥ ३३ ॥ सूर्यासि प्रतिबिंब गिळी ॥ छाया पुरुषातें आकळी ॥ समुद्र बुडे मृगजळीं ॥ तैं मज गुणमेळीं बद्धता ॥ ३४ ॥ जैं जिभेसि केंसु निघे ॥ जैं तळहातीं वृक्ष लागे ॥ डोळयांमाजी पर्वत रिगे ॥ तैं मी गुणसंगें अतिबद्धू ॥ ३५ ॥ आकाश खोंवे सांबळीं ॥ कां जळ लागे वारया निडळीं ॥ कां विजूचे कपाळीं ॥ बाशिंग सकळीं बांधावें ॥ ३६ ॥ गगन[5] तुटोनि समुद्रीं बुडे ॥ सपर्वत[6] धरा[7] वारेनि उडे ॥ सूर्य अडखळोनि अंधारीं पडे ॥ तरी मी सांपडें गुणांत ॥ ३७ ॥ अंतरिक्षगगनीं सरोवर ॥ त्यामाजी सुमनें[8] मनोहर ॥ तो आमोद सेविती भ्रमर ॥ ऐसें साचार जैं घडे ॥ ३८ ॥ तैं मी आत्मा गुणसंगें ॥ नानाविषयभोग संभोगें ॥ मग त्या विषयाचेनि पांगें ॥ होईन अंगें गुणबद्धू ॥ ३९ ॥ त्रिगुण अंगीकारें वर्ततां ॥ गुणकार्य तदात्मता ॥ तेणें बद्ध मुक्त अवस्था ॥ भासे वृथा[9] भ्रांतासी ॥ ४० ॥ गुणा आत्म्यासि भिन्नता ॥ ह्मणसी मानली तत्त्वतां ॥ परी गुणसंगें आत्मा असतां ॥ अवश्य विकारिता येईल ॥ ४१ ॥ अग्निसंगें पात्र तप्त ॥ पात्रसंगें जळ संतप्त[10] ॥ जळतापें धान्यपाक होत ॥ तेवी विकारती नव्हे आत्मा ॥ ४२ ॥ अग्नितापा आंत ॥ आकाश नव्हे संतप्त ॥ तेवीं गुणसंगा आंत ॥ विकारवंत नव्हे आत्मा ॥ ४३ ॥ नट अंधत्वें अवगला ॥ परी तो आंधळा नाहीं जाहला ॥ तैसा आत्मा गुणसंगें क्रीडला ॥ तरी असे

---

[1] दुःख भोगिताती. [2] बंध व मोक्ष. [3] अज्ञानें. [4] जागेपणीं. [5] आकाश. [6] पर्वतांसुद्धां. [7] पृथिवी. [8] फुलें. [9] व्यर्थ. [10] तापलेलें.

संचला निर्गुणत्वें ॥ ४४ ॥ नटु·अंधत्वें नव्हे अंधू ॥ आत्मा गुणसंगें नव्हे बद्धू ॥ गुण मायिक आत्मा शुद्धू ॥ या त्या संबंधू असेना
॥ ४५ ॥ आत्मा व्यापक गुण परिच्छिन्न ॥ यांहीं हेतूं न घडे बंधन ॥ सकळसमुद्राचें प्राशन[1] ॥ केवीं रांजण करूं शके ॥ ४६ ॥ मोहरी
माजी मेरु राहे ॥ पशामाजी पृथ्वी समाये ॥ मुंगी गज गिळोनि जाये ॥ खद्योत खाये सूर्यातें ॥ ४७ ॥ मशक ब्रह्मांडातें आकळी ॥
पतंग प्रळयानळ गिळी ॥ तरी आत्मा गुणाचे मेळीं ॥ गुणकल्लोळीं बांधवे ॥ ४८ ॥ यापरी नसंभवे बद्धता ॥ बद्धतेसवें गेली मुक्तता ॥
बद्धमुक्तअवस्थापरता ॥ जाण तत्त्वतां आत्मा मी ॥ ४९ ॥ स्वप्नींचा अत्यंत सुकृती[2] ॥ अथवा महापापी दुष्कृती ॥ दोन्ही मिथ्या जेवीं
जागृतीं ॥ तेवीं बद्धमुक्ती आत्मत्वीं ॥ ५० ॥ होकां जीवात्म्यासि बद्धता ॥ सत्य नाहीं गा तत्त्वतां ॥ मा मज परमात्म्यासि अवस्था ॥
बद्धमुक्तता ते कैंची ॥ ५१ ॥ बिंबीं प्रतिबिंब नाहीं ॥ मध्येंच अरिशाचेठायीं ॥ मळ बैसले ते पाही ॥ प्रतिबिंबाचे देहीं लागले दिसती
॥ ५२ ॥ तो मळू जैं पडे फेडावा ॥ तैं चारी सांची शाहणें तोडावा ॥ परी प्रतिबिंब त्या साहणे धरावा ॥ हें सद्भावा मिळेना ॥ ५३ ॥
जेवीं जीवशिवभेद नाहीं ॥ दोष अंतःकरणाचा ठायीं ॥ तें चित्त शुद्ध केल्या पाहीं ॥ बंध मोक्ष दोहीं बोळवण ॥ ५४ ॥ सर्वे हें आविद्यक[3]
सकळ ॥ गुणकार्य नाना मळ ॥ जीवा अंगीं प्रबळ ॥ मूढमती स्थूळ स्थापिती ॥ ५५ ॥ जैं सत्वगुण निरसे सबळ ॥ तैं आविद्यक
फिटती मळ ॥ तेचि सद्विद्या होय निर्मळ ॥ जीवचि केवळ शिव होये ॥ ५६ ॥ तेव्हां जीव शिवनामेंसि दोनी ॥ जाती मजमाजी सम
रसोनी ॥ तैं मीच एकू वांचूनी ॥ आन जनीं वनीं असेना ॥ ५७ ॥ जीवभावनें मीचि जिवू ॥ शिवभावनें मीचि शिवू ॥ मी एक ना
नव्हे बहू ॥ माझा अनुभवू मीचि जाणें ॥ ५८ ॥ ह्मणी आशंका धरिशी येथ ॥ जरी जीव शिव तूंचि समस्त ॥ तरी ते शुकवामदेवचि
कां मुक्त ॥ येरां ह्मणत जडजीव ॥ ५९ ॥ तूंचि जीवरूपें तत्त्वतां ॥ तरी हे ऐशी कां विषमता ॥ शुकवामदेवांची अवस्था ॥ वेदशास्त्रार्थी
सम्मत ॥ ६० ॥ तिहीं लोकामाजी जाण ॥ वेदवचन तंव प्रमाण ॥ हें बोलणें विलक्षण ॥ अप्रमाण जैं मानिशी ॥ ६१ ॥ होकां वेद
ह्मणे जें निश्चित ॥ तें बोलणें माझें सत्य ॥ तोचि मीं स्वमुखीं[4] बोलत ॥ तें तूं अयुक्त ह्मणतोशी ॥ ६२ ॥ जो वेदांचा वेदवक्ता ॥ सकळ
शास्त्रांचा मूळकर्ता ॥ त्या माझें वचन ह्मणसी वृथा ॥ अतियोग्यता तुज आली ॥ ६३ ॥ वेदाचें जाण त्रिविध बंड ॥ त्रिकांडीं केला
तो त्रिखंड ॥ वेदबळें बा पाखंड ॥ वाजवी तोंड अव्हासव्हा ॥ ६४ ॥ भासले बहुसाल मज भेद ॥ वेदबळें नानावाद ॥ तो वेद माझा
परोक्षवाद ॥ तेणें तत्त्वावबोध[5] केवीं होय ॥ ६५ ॥ शब्दज्ञान ब्रह्मज्ञान ॥ बाह्यस्पर्धी समसमान ॥ जेवीं वाल आणि वालभर सुवर्ण ॥

---

१ पिणें. २ पुण्यवान्. ३ अज्ञानाचें. ४ आपल्या तोंडानें. ५ तत्त्वाचें ज्ञान.

तुकितां पूर्ण समता आली ॥ ६६ ॥ परी वाला सुवर्णा समता ॥ मोलें कदा नव्हे तत्त्वतां ॥ तेवीं वेदवादयोग्यता ॥ ब्रह्मानुभविता सम नव्हे ॥ ६७ ॥ जो मी हरिहरां प्रमाण ॥ त्या माझें वचन अप्रमाण ॥ तूं ह्मणशी हा ज्ञानाभिमान ॥ हेंही जाणपण सांडावें ॥६८॥ माझें वचन सत्याचें सत्य ॥ सत्य मानूनि निश्चित ॥ येणें भावें साधे परमार्थ ॥ हें ब्रह्मलिखित मद्वाक्य ॥६९॥ उद्धवा मज पाहतां ॥ वसिष्ठ वामदेवादि समस्तां ॥ न देखे बद्ध आणि मुक्तता ॥ हा माझा तत्त्वतां निजबोध ॥ ७० ॥ मुक्तांचिये दृष्टीं ॥ मुंक्तीच दिसे सकलसृष्टीं ॥ तेथें शुकवामदेवांची गोष्टी ॥ वेगळी पाठी केवीं राहे ॥ ७१ ॥ बद्धमुक्तांहूनि भिन्न ॥ परमात्मा मी चिद्घन ॥ जरी ह्मणशी जीवाशि बंधन ॥ तेंही सत्यत्वें जाण घडेना ॥७२॥ ॥श्लोक॥ ॥शोकमोहौ सुखं दुःखं देहोत्पत्तिश्च मायया ॥ स्वप्ने यथाऽऽत्मनः ख्यातिः संसृतिर्न तु वास्तवी ॥ २ ॥ ॥टीका॥ ॥दोन मुहूर्तें स्वप्नवृत्ती ॥ त्या माजी देखे जन्मपंक्ती ॥ तेथें पावला नाना याती ॥ तेवीं मिथ्या प्रवृत्ती भवभाव ॥ ७३ ॥ नसतां आंभासु मांवळे ठायीं ॥ त्यालागीं हाहाकारू उठे देहीं ॥ गेले मेले नाहीं नाहीं ॥ शोक पाही त्या नाव ॥ ७४ ॥ भग्नपात्रीं भरिलें जळ ॥ तेथें बिंबलें चंद्रमंडळ ॥ तें पात्र पोटींशी धरी बाळ ॥ रत्न प्रबळ हें माझें ॥ ७५ ॥ जळ गळोनि जाय सकळ ॥ चंद्रमा हरपे तत्काळ ॥ त्यालागीं तळमळी तें बाळ ॥ शोक केवळ या नाव ॥ ७६ ॥ अथवा घटँचंद्र धरूं जातां ॥ तो नये बालकाचे हातां ॥ यालागीं करी जेजे व्यथा ॥ शोक सर्वथा या नाव ॥ ७७ ॥ काढावया आरशांतील धन ॥ करी दर्पणामाजी खनन ॥ फुटल्या नागवलों ह्मणे जाण ॥ शोक दारुण या नाव ॥ ७८ ॥ नसते वस्तूच्याठायीं जाण ॥ मीं माझें हा अभिमान ॥ तेंचि मोहाचें लक्षण ॥ ममता दारुण तेसंधी ॥ ७९ ॥ देखोनि मृगजळाचें तळें ॥ येणें पिकती रायकेळें ॥ यालागीं मृगतृष्णेचीं जळें ॥ औटकाळें राखतू ॥ ८० ॥ मृगजळाकडे कोणी भंवे ॥ त्यासि सक्रोधें भांडूं धांवे ॥ अतिमोहित मोहस्वभावें ॥ विवेकू नकरवे सत्याचा ॥ ८१ ॥ तेवीं पुत्रापासोन सुखप्राप्ती ॥ माता पिता होईल ह्मणती ॥ शेखीं पुत्र अंगोठा दाविती ॥ केवळ भ्रांतीमोहो ॥ ८२ ॥ गंधर्वनगरींची रचना ॥ देखोनि अभिलाष होय मना ॥ ते घ्यावया मेळवी सेना ॥ नानासूचनाउपायें ॥ ८३ ॥ तैसा मिथ्या देहीं अभिमान ॥ देहसंबंधाची ममता गहन ॥ हेंचि मोहाचें मूळ लक्षण ॥ ममताभिमान प्राणिया ॥ ८४ ॥ एवं अहं आणि ममता ॥ हेंचि मोहाची माता पिता ॥ त्याचेनि उत्तरोत्तर वाढतां ॥ जनमोहिना त्यामोहें ॥ ८५ ॥ प्रियविषयीं आसक्ति देख ॥ याची नित्यप्राप्ती अनेक ॥ त्याचि नाव ह्मणती सुख ॥ जेवीं चाखितां विख अतिमधुर ॥ ८६ ॥ विषयप्राप्तीं जो हरिख ॥ तया नाव ह्मणती सुख ॥ विषयविनाश तेंचि दुःख ॥ परम असुख

---

१ मोजिता. २ आत्मज्ञान. ३ ज्ञातेपण. ४ मोक्ष. ५ भ्रम. ६ नाहींसा होतो. ७ भांड्यांत प्रतिबिंबित झालेला चंद्र. ८ इच्छा.

त्यानाव ॥ ८७ ॥ शोक मोह सुख दुःख ॥ येणेंचि देहाची प्राप्ती देख ॥ देहाभिमानें देह अनेक ॥ दुःखदायक भोगवी ॥ ८८ ॥ जो जेणें तीव्रध्यानें मरे ॥ तो तेंचि होऊनि अवतरे ॥ कां जो निमे अतिद्वेषाकारें ॥ तो द्वेषानुसारें जन्मतू ॥ ८९ ॥ सर्प मुंगुस पूर्ववृत्ती ॥ वैराकारें जन्म पावती ॥ जेजे वासना उरे अंतीं ॥ तेते गतीं प्राण्यासी ॥ ९० ॥ यालागीं हृदयामाजी निश्चितीं ॥ जे सबळ वासना उठे अंतीं ॥ तोतो प्राणि पावे तये गतीं ॥ श्रुति बोलती पुराणें ॥ ९१ ॥ पुरुषासवें वृथा छाया ॥ तैशी ब्रह्मीं मिथ्या माया ॥ ते उपजवी गुणकार्या ॥ देह भासावया मूळ ते ॥ ९२ ॥ जेवीं कां स्वप्नीं एकलें मन ॥ नानाकार होय आपण ॥ तेवीं चैतन्याचें अन्यथा भान ॥ तें हें जाण चराचर ॥ ९३ ॥ एवं वस्तुतां संसार नाहीं ॥ तेथें सुख दुःख कैंचें कायी ॥ देहेवीण छाया पाही ॥ कोणेठायीं उपजेल ॥ ९४ ॥ जें उपजलेंच नाहीं ॥ तें काळें गोरें सांगों कायी ॥ अवघें स्वप्नप्राय पाही ॥ वस्तुतां नाहीं संसारू ॥ ९५ ॥ इहीं दोहीं श्लोकीं अगाधू ॥ परिहरिला वस्तुविरोधू ॥ आतां प्रतीतीनें जो अनुरोधू ॥ तो सत्या बाधू करूं नशके ॥ ९६ ॥ डोळां अंगुळी लाविती ॥ तेणें दोन चंद्र आभासती ॥ गगनीं दोंचंद्रां नाहीं वस्ती ॥ मिथ्या प्रतीती निरांकारीं ॥ ९७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विद्याऽविद्ये मम तनू विद्ध्युद्धव शरीरिणाम् ॥ मोक्षबंधकरी आद्ये मायया मे विनिर्मिते ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ निजबोधें येत बोधा ॥ ब्रह्मोंहमस्मि स्फुरे सदा ॥ ते जाण शुद्ध विद्या ॥ जे अविद्याछेदक ॥ ९८ ॥ मी पापी मी सदा निर्दैवो ॥ ऐसा नित्य स्फुरे भावो ॥ तेचि सबळ अविद्या पहाहो ॥ जे नानासंदेहो उपजवी ॥ ९९ ॥ एकी जीवातें घाली बंदीं ॥ एकी जीवाचें बंधन छेदी ॥ या दोनी माझ्या अवस्थाशक्ति अनादि ॥ जाण त्रिशुद्धी उद्धवा ॥ १०० ॥ तूं चिन्मात्र चैतन्यघन ॥ चित्तस्वरूपें वृत्तिशून्य ॥ तुज शक्ती कैंच्या जाण ॥ निर्धर्मकपणें सर्वदा ॥ १०१ ॥ उद्धवा हे आशंका वायां ॥ कारण नाहीं करावया ॥ या शक्ती जन्मवी माझी माया ॥ जे नये आयां सुरनरां ॥ २ ॥ सत् ह्मणों तरी तत्काळ नासे ॥ असत् ह्मणों तरी आभासे ॥ जिणें नामरूपांचें पिसें ॥ लाविलें असे जगासी ॥ ३ ॥ नातुडे संतासंतबोली ॥ माया अनिर्वचनीय झाली ॥ तिणें विद्या अविद्या ययें पिलीं ॥ वाढविलीं निजपक्षीं ॥ ४ ॥ आजिकाळीं केल्या नव्हती ॥ विद्या अविद्या अनादि शक्ती ॥ बंधमोक्षांते भासविती ॥ यां दोनी वृत्ती मायेच्या ॥ ५ ॥ ते माया तूं ह्मणसी कोण ॥ तुझी कल्पना ते माया पूर्ण ॥ बद्धमुक्ततास्फुरण ॥ तीमाजी जाणा स्फुरताती ॥ ६ ॥ बंधमोक्षांची राहती स्थिती ॥ ते मी सांगेन तुजप्रती ॥ ऐक उद्धवा निश्चितीं ॥ यथानिगुतीं निवाडें ॥ ७ ॥ स्वप्नीं नदेखे आराधन ॥ ज्यासि नाहीं माझें भजन ॥ अविद्या त्यामाजी संपूर्ण ॥ प्रबळ जाण वाढत ॥ ८ ॥ जो माझ्याठायीं अनिसादर ॥ भजनशीळ

---

१ मिळणें. २ देहरूप. ३ स्वप्नप्रमाणें. ४ निर्गुणाकार. ५ मी ब्रह्म आहें. ६ संसाराची व मुक्तीची.

आठौ प्रहर ॥ तें ब्रह्मविद्येचें घर ॥ तेथ निरंतर ते वाढे ॥ ९॥ जेथ माझा भजनाचा उल्हासू ॥ तेथ अविद्येचा निरासू ॥ तोचि ब्रह्मविद्येचा प्रवेशू ॥ हा अतिश्वासू भक्तांचा॥१०॥येथ बद्धाचें कारण ॥ आणि मोक्षाचें साधन ॥ भक्तीचें दृढ स्थापन ॥ अर्थास्तव जाण बोलिलों ॥ ११॥ ज्यां बंधमोक्षां दोनी वृत्ती ॥ त्या तूं मायेच्या ह्मणशी शक्ती ॥ तेव्हां माया झाली मोक्षदाती ॥ हें केवीं श्रीपती घडेल ॥ १२ ॥ जरी माया झाली मोक्षदाती ॥ तरी कां करावी तुझी भक्ती ॥ हेंचि सत्य गा श्रीपती ॥ सांग निश्चितीं निवाडू ॥ १३ ॥ कृष्ण ह्मणे उद्धवाशी ॥ स्वयें चलन[1] नाहीं छायेशीं ॥ तेवीं सामर्थ्य नाहीं मायेशी ॥ केवीं मोक्षासी देईल ॥ १४ ॥ जो मायेचा नियंता ॥ तो विष्णु मोक्षाचा दाता ॥ तोडूनि जीवाची बद्धता ॥ सायुज्यता देतसे ॥ १५ ॥ ह्मणशी अविद्या कामकर्मादृष्टें ॥ जिवासि बंधन लागे मोटें ॥ ते ब्रह्मविद्या निष्कर्में तुटे ॥ हा बोध करी नेटें गुरु श्रुतिद्वारा[2] ॥ १६ ॥ येथ विष्णु काय जाहला कर्ता ॥ मा तो होईल मोक्षदाता ॥ हे विकल्पाची वार्ता ॥ नघडे सर्वथा उद्धवा ॥ १७ ॥ गुरुरूपें विष्णु जाण ॥ श्रुत्यर्थ विष्णूचि आपण ॥ शमदमादि साधन ॥ तेंही जाण विष्णूचि ॥ १८ ॥ शिष्यबुद्धीसि बोधकता ॥ विष्णूचि जाण तत्त्वतां ॥ यापरी गा निजभक्तां[3] ॥ मोक्षदाता श्रीकृष्ण ॥ १९ ॥ त्या मोक्षाचा जो परिपालक ॥ ते समाधीसि विष्णूचि देख ॥ समाधीचें समाधिसुख ॥ आवश्यक श्रीविष्णू ॥२०॥ परमात्मा परिपूर्ण ॥ तो मी विष्णु ब्रह्म सनातन ॥ भक्तभवपाशमोचन[4] ॥ कृपाळू जाण करीतसें ॥ २१ ॥ गतश्लोकींचेनि अनुवादें ॥ शरीरिणां येणें पदें ॥ जीवासि बद्धपण उद्बोधे ॥ तेंही विनोदें निवारितों ॥ २२ ॥ एकाशीच बद्धमुक्तता ॥ घडे नघडे तत्त्वतां ॥ या उद्धवाच्या प्रश्नार्था ॥ विशद आतां करीतसें ॥ २३ ॥ ॥श्लोक॥ ॥एकस्यैव ममांशस्य जीवस्यैव महामते ॥ बंधोऽस्याविद्ययाऽनादिर्विद्यया च तथोत्तरः ॥ ४॥ ॥टीका॥ ॥रिती वाडी असे अग्नीशी ॥ तेथ फुणगे[5] उसळले आकाशीं ॥ रिती वाडी नाहीं स्वरूपाशीं ॥ असंभाव्यासी ठाव कैंचा ॥ २४ ॥ जेणें पाविजे निजबोधातें[6] ॥ ते बुद्धी उद्धवापाशीं वर्ते ॥ यालागीं कृष्ण ह्मणे महामते ॥ उद्धवातें अतिप्रीतीं ॥ २५॥ अतिप्रीती पुरस्करून ॥ उद्धवाशि ह्मणे सावधान ॥ ये श्लोकींचा अर्थ गहन ॥ ते धारणा जाण धरावी ॥ २६ ॥ यालागीं कृष्णजगजेठी॥ उद्धवाची पाठी थापटी॥ अतिगुह्याची गुह्य गोष्टी ॥ तुझे कृपेसाठीं मी बोलतों ॥ २७ ॥ पाठी थापटावयामिसें जाण ॥ करीत स्वशक्ति संचरण ॥ तेणें अद्वयबोधलक्षण ॥ उद्धवाशी जाण प्रकाशी ॥ २८ ॥ जीव एकचि त्रिजगतीं ॥ हें जाण उद्धवा निश्चितीं ॥ जेवीं नानादीपांचिया दीप्ती[7] ॥ तेजाची ज्योती अभिन्न ॥ २९ ॥ दोनी दीप एक होती ॥ तैशीं टिवळीं ऐक्या नयेती ॥ जडत्वापाशीं

---

[1] चालणें. [2] वेदमार्गानें. [3] आपल्या भक्तांस. [4] भक्तांचे संसाररूप पाश सोडविणारा. [5] ठिणग्या. [6] आत्मज्ञानास. [7] प्रकाश.

पुडे देहबंदीं ॥ ५२ ॥ हेंचि निरूपण पुढें ॥ श्लोक सांगती सुरवाडें ॥ तें मी सांगेन वाडेंकोडें ॥ अतिनिवाडें निश्चित ॥ ५३ ॥ ॥श्लोक॥ अथ बद्धस्य मुक्तस्य वैलक्षण्यं वदामि ते ॥ विरुद्धधर्मिणोस्तात स्थितयोरेकधर्मिणि ॥ ५ ॥ ॥टीका॥ ॥येणेंचि प्रसंगें जाण ॥ मागील तुझे जे प्रश्न ॥ बद्धमुक्तांचें लक्षण ॥ तेंही निरूपण सांगेन ॥ ५४ ॥ दोघांही देहीं असतां ॥ दिसे विरुद्धधर्म स्वभावतां ॥ एक तो सदा सुखी सर्वथा ॥ एक दुःखभोक्ता अहर्निशीं ॥ ५५ ॥ येथ विलक्षणता दोंप्रकारीं ॥ एक तो जीव ईश्वरामाझारी ॥ एक ते जीवासि परस्परीं ॥ बद्धमुक्त निर्धारीं निर्धास्त[1] ॥ ५६ ॥ पहिली जीवेश्वरांची कथा ॥ तुज मी सांगेन विलक्षणता ॥ मग जीवाची बद्धमुक्तता ॥ विशद व्यवस्था सांगेन ॥ ५७ ॥ जीवेश्वरांचें वैलक्षण्य ॥ अडीचश्लोकीं निरूपण ॥ स्वयें सांगताहे नारायण ॥ भाग्य पूर्ण उद्धवाचें ॥ ५८ ॥ ॥श्लोक॥ ॥सुपर्णावेतौ सदृशौ सखायौ यदृच्छयैतौ कृतनीडौ च वृक्षे ॥ एकस्तयोः खादति पिप्पलान्नमन्यो निरन्नोऽपि बलेन भूयान् ॥ ६ ॥ ॥टीका॥ ॥सुपर्ण ह्मणतां पक्षी ॥ ये वृक्षींचा जाय ते वृक्षीं ॥ तैसा देही देहांतरातें लक्षी ॥ यालागीं पक्षी ह्मणिजेत ॥ ५९ ॥ पक्ष्यांच्या ऐशियाच गती ॥ हा देह सांडूनि त्यादेहा जाती ॥ पक्षी ह्मणावया हे उपपत्ती[2] ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥१६०॥ एवं आत्मा देहाहूनि भिन्न ॥ तें सांगितलें उपलक्षण ॥ देहात्मवादाचें खंडन ॥ प्रसंगीं जाण दाखविलें ॥ ६१ ॥ आत्मा देह सर्वथा नघडे॥ देहबुद्धि धरणें तें तंव कुडें ॥ हें उद्धवासि फाडोवाडें ॥ निजनिवाडें दावित ॥ ६२ ॥ देहबुद्धीचिया पोटीं ॥ जन्ममरणांचिया कोटी ॥ स्वर्गनरकांची आटाटी ॥ देहबुद्धि गांठी जीवशिवपणें ॥ ६३ ॥ दोघेही चिद्रूपें सारिखे ॥ कधीं नोंहे आनासारिखे[3] ॥ अनादि हे दोघे सखे ॥ अतिनेटके जिवलग ॥ ६४ ॥ काळें अकाळें सकाळें ॥ नव्हती येरयेरांविगळे ॥ एकत्र वर्तती खेळमेळें ॥ निजप्रांजळें सख्यत्वें ॥ ६५ ॥ प्रभा दीप दवडिना वेगळा ॥ दीप प्रभेसी नव्हे निराळा ॥ तेवीं जीवशिवांचा मेळा ॥ एकत्र स्वलीळा नांदती स्वयें ॥ ६६ ॥ जीव इच्छी जेंजें कांहीं ॥ तेंतें वासनेसरिसें[4] पाही ॥ ईश्वर पुरवी सर्वही ॥ विमुख कांहीं होंनेणें ॥ ६७ ॥ अंतकाळीं जें जीव मागे ॥ तें अलोट ईश्वर देऊंलागे ॥ आणि ईश्वरआज्ञेचेनि योगें ॥ जीव सर्वांगें वर्तत ॥ ६८ ॥ ईश्वरआज्ञा त्रिशुद्धी ॥ जीवें जीव सर्वस्वें वंदी ॥ होय नव्हे न ह्मणे कधीं ॥ अभिनवसिद्धी सखेपण ॥ ६९ ॥ नवल सख्यत्वाची परी ॥ ईश्वरू जैसें जैसें प्रेरी ॥ जीवू तैसेंतैसें करी ॥ निमेषभरी ढळेना ॥१७०॥ निमेष आरंभोनि जन्मवरी ॥ जीवू ईश्वराची आज्ञा करी ॥ इश्वरू जीवाचा साहाकारी ॥ परस्परीं निजसख्यें ॥ ७१ ॥ जीव अत्यंत अडलेपणें ॥ ईश्वरासि धांवधांव ह्मणे ॥ तों तत्काळ पावे धांवणें ॥ करी सोडवणें जीवाचें ॥ ७२ ॥ एवं शिवाचे आज्ञें जीवू

---

१ स्पष्ट. २ युक्ति. ३ एकसारखे. ४ वासनेप्रमाणें.

भेदप्राप्ती ॥ ऐक्यवृत्ती अजडत्वीं ॥१३०॥ चंदनकुटके बहुवस ॥ परी सर्वी एकचि सुवास ॥ तेवीं जीवरूपें मी अविनाश ॥ परमपरेश आभासें ॥ ३१ ॥ जीवरूपें तूं श्रीकृष्ण ॥ हें सत्य मानावें वचन ॥ तैं भवपाशादि बंधन ॥ तुजचि जाण आदळलें ॥ ३२ ॥ ऐशी कल्पिशी जरी वार्ता ॥ ते मज नघडे गा सर्वथा ॥ जेवीं शरीराशी प्राण चाळिता ॥ शरीर अवस्था त्या नाहीं ॥ ३३ ॥ लिंगशरीरीं स्वयंभ ॥ जीव तो मदंशें[1] प्रतिबिंब ॥ त्यासि देहादि बंधनभाव ॥ मिथ्या विटंब आभासे ॥ ३४ ॥ घटें आवरिलें आकाश ॥ त्या नाव ह्मणती घटाकाश ॥ घटभंगें त्या नव्हे नाश ॥ तेवीं मी अविनाश जीवित्वीं ॥ ३५ ॥ थिल्लरीं प्रतिबिंबला सविता[2] ॥ तो गगन सांडोनि थिल्लरा आतौता ॥ नाहीं रिघाला तत्त्वतां ॥ तेवि मी जीवत्वा अलिप्त ॥ ३६ ॥ रवी थिल्लरीं बिंबला दिसे ॥ तेवीं मी लिंगदेहीं वसें ॥ मिथ्या तेथींचे भोगपिसें ॥ तें बंधन कैसें मज लागे ॥ ३७ ॥ येथें बोलणें नलगे बहू ॥ प्रतिबिंबा नाव जिवू ॥ मुख्य बीज तो मी शिवू ॥ विशद[3] उगवू हा जाण ॥ ३८ ॥ तळाव विहरी नाना थिल्लरीं ॥ सूर्य प्रतिबिंबे त्यां माझारीं ॥ तितुकीं रूपें दिवाकरीं ॥ पाहतां अंबरीं तंव नाहीं ॥ ३९ ॥ तैसें एकासि जें अनेकत्व ॥ तें मिथ्या जाण जीवत्व ॥ हें भागवताचें निजतत्त्व ॥ शुद्ध सत्व ज्ञानाचें ॥१४०॥ थिल्लरीं प्रतिबिंबला सविता ॥ चंचल निश्चल मलिनता ॥ हे थिल्लराचे गुण तत्त्वतां ॥ प्रतिबिंबमाथां मानिती ॥ ४१ ॥ तेवीं शिवासि बाधकता ॥ पाहतां नाहीं गा सर्वथा ॥ हें अविद्याकार्य तत्त्वतां ॥ जीवांचे माथां मानिती ॥ ४२ ॥ एवं मिथ्या जीवभेद सर्वथा ॥ त्यासि बद्धता आणि मुक्तता ॥ विद्या अविद्या निजपक्षपाता ॥ दावी तत्त्वतां निजकर्में[4] ॥ ४३ ॥ त्या जीवभासासि प्रस्तुत ॥ नित्यबद्ध नित्यमुक्त ॥ एकासि दोन अवस्था येथ ॥ असें दावित विद्या अविद्या ॥ ४४ ॥ जेंवीं जळीं बिंबला सविता ॥ त्या जळाची चंचळनिश्चळता ॥ या प्रतिबिंबासीच अवस्था ॥ मुख्य सविता तें नेणें ॥ ४५ ॥ तेवीं जीवांची बद्धमुक्तता ॥ परमात्म्यासि नलागे सर्वथा ॥ जेवींका अंधारींच्या खद्योता[5] ॥ नदेखे सविता कल्पांतीं ॥ ४६ ॥ जळीं आकाश दिसे बुडालें ॥ परी तें काहीं नाहीं झालें वोलें ॥ ते विद्येसी अलिप्त[6] ठेलें ॥ असें संचलें निजरूप ॥ ४७ ॥ एक बद्ध एक मुक्त ॥ हें जीवामाजी भासत ॥ तेंही मी सांगेन निश्चित ॥ सावचित्त परियेसी ॥ ४८ ॥ सहस्रघटीं जळभरितां ॥ एकचि सहस्रधा[7] दिसे सविता ॥ तेथ येचि घटींची अवस्था ॥ त्या घटस्था लागेना ॥ ४९ ॥ तेथ जो घट होय चंचळू ॥ त्यांतील प्रतिबिंब लागे अंदोळू ॥ परी दुजेघटीं जे चंचळू ॥ तें नव्हें निश्चळू याचेनी ॥१५०॥ तेथें एकें दैवबळें ॥ सूक्ष्मछिद्रें घटें जळ गळे ॥ तें प्रतिबिंब निज बिंबीं मिळे ॥ येर सकळें तैसींची ॥ ५१ ॥ तेवीं गुरुकृपा उजियेडें ॥ ज्याचें लिंगदेह विघडे[8] ॥ त्यासी परमात्म्यासी ऐक्य घडे ॥ येर बा

---

[1] माझ्या अंशानें. [2] सूर्य. [3] स्पष्ट. [4] आपल्या कर्मानें. [5] काजव्यास. [6] नलागणारे. [7] हजारप्रकारानें. [8] नाहींसेहोते.

राहे ॥ जीवपण गेलिया शिवीं समाये[1] ॥ जीवालागीं हा शिवपण लाहे ॥ येरवीं राहे सांडूनी ॥ ७२ ॥ ऐसें सखेपण यांचें ॥ केवीं अनुवादवे वाचें ॥ उद्धवा हें मीचि जाणें साचें ॥ या सखेपण[2]ाचें सौजन्यें ॥ ७३ ॥ जीव ईश्वराआधीन ॥ हें दृढ केलें संस्थापन ॥ अनीश्वरवादाचें खंडण ॥ प्रसंगें जाण दाविलें ॥ ७४ ॥ अनीश्वरवादू खंडितां ॥ खंडिली कर्मपाखंडवार्ता ॥ कर्मपाखंडाच्या मता ॥ ईश्वरता नमानिती ॥ ७५ ॥ ह्मणती चित्तधर्म ईश्वरासी ॥ तंव चिद्रूपता स्थापूनि त्यासी ॥ निराकारिलें चित्तधर्मासी ॥ अनायासीं चिद्रूपें ॥ ७६ ॥ नानापरीचें अतिचिंतन ॥ त्याचिनाव चित्त जाण ॥ चित्तेंवीण निश्चळपण ॥ तेंचि चैतन्य उद्धवा ॥ ७७ ॥ धर्माधर्म नविचारितां ॥ ह्मणती ईश्वर मोक्षदाता[3] ॥ हे भक्तपाखंडी कथा ॥ स्थापूनि चिद्रूपता निवारी ॥ ७८ ॥ टिळे माळा मुद्रा धारणें ॥ लावूनि संतांसि निंदिलें जेणें ॥ पाप रम्हटे भक्तपणें ॥ त्यासि नारायणें नुद्धरिजे[4] ॥ ७९ ॥ अंतरींचे सर्व जाणता मी ॥ यालागीं नावें अंतर्यामी ॥ तो मी शाब्दिकवचनधर्मीं ॥ चालविला धर्मी केवीं जाय ॥ १८० ॥ मी ज्ञानरूप तत्त्वतां ॥ सर्वद्रष्टा सर्वज्ञाता ॥ तो मी धर्माधर्म न विचारितां ॥ मोक्षदाता हें नघडे ॥ ८१ ॥ धरोनियां भक्तभावो ॥ पाप राहाटे जो स्वयमेवो ॥ याचिनामीं दांभिक पहाहो ॥ त्यातें देवो नुद्धरी ॥ ८२ ॥ सदृशौ[5] आणि सखायौ[6] ॥ धरोनि या पदांचा अन्वयो ॥ पाखंडमात्रातें पहाहो ॥ स्वयें देवो उच्छेदी ॥ ८३ ॥ निरसोनि नानामतांतरें ॥ स्वमत करावया खरें ॥ श्लोकींचीं पदें अतिगंभीरें ॥ सारंगधरें[7] वर्णिलीं ॥ ८४ ॥ ते दोनी मिळोनियां पक्षी ॥ नीड केलें देहवृक्षीं[8] ॥ वृक्ष ह्मणिजे कोणे पक्षीं ॥ तीं हीं लक्षी लक्षणें ॥ ८५ ॥ जननीउदर तेंचि आळ ॥ पित्याचें रेत बीज सकळ ॥ गर्भाधान पेरणी केवळ ॥ संकल्पजळ वृद्धीसी ॥ ८६ ॥ सोहंभावाचा गुप्त अंकुरू ॥ त्रिगुणभूमीं तीवडीरू ॥ कोहंभावें वाढला थोरू ॥ वृक्ष साकारू तेणें जाहला ॥ ८७ ॥ करचरणादि नानाशाखा ॥ प्रबळबळें वाढल्या देखा ॥ अधऊर्ध्व नखशिखा ॥ वृक्षाचा निका विस्तारू ॥ ८८ ॥ तया दहबुद्धीचीं दृढ मूळें ॥ विकल्पपारंब्या तेणें मेळे ॥ भूमीं रुतल्या प्रबळबळें ॥ कामाचे कोंवळे फुटती कोंब ॥ ८९ ॥ तेथ कर्माकर्मांचीं पानें ॥ निबिड दाटलीं अतिगहनें ॥ मोहममतेचे घोंस तेणें ॥ सलोभपणें दाटले ॥ १९० ॥ ज्या उंचावल्या थोर शाखा ॥ त्या फळीं फळोनि सुखदुःखां ॥ उतरल्या जी अधोमुखा ॥ अधःपतनें देखा लोळती ॥ ९१ ॥ ऐशिया वृक्षामाजी जाण ॥ अतिगूढ गुप्त गहन ॥ नीड केलें ह्रदयस्थान ॥ जीवशिव आपण बैसावया ॥ ९२ ॥ जेथ जीवपरमात्मा वसती ॥ तरी देहाची जाहली सत्यप्राप्ती ॥ ऐसें कोणी कोणी ह्मणती ॥ तें मत श्रीपती निराकारी ॥ ९३ ॥ पुरुषासवें[9] लटकी छाया ॥ तोडितां मोडितां नाडळे घाया ॥ तैशी अनिर्वच

---

१ मावते. २ मित्रपणाच्या. ३ मोक्ष देणारा. ४ उद्धार केला जात नाहीं. ५ सारखे. ६ मित्र. ७ कृष्णानें. ८ देहरूपी झाडावर. ९ पुरुषाबराबर.

नीय माझी माया ॥ तेणें यदृच्छया नीड[1] केलें ॥ ९४ ॥ जेवीं स्वप्नगृह चोरु निद्रिता ॥ तेवीं जीवात्मा नीडीं वसतां ॥ हें मायामय सर्वथा ॥ नव्हे वस्तुतां साचार ॥ ९५ ॥ येणें निरूपणें गोविंदू ॥ नैयायिकमताचा कंदू ॥ समूळ केला त्याचा उच्छेदू ॥ देहसंबंधू मिथ्यात्वें ॥ ९६ ॥ ऐशियाहि या वृक्षाशी ॥ जन्मादि निमेषोन्मेषीं ॥ काळ छेदीतसे अहर्निशीं ॥ बाळादिवयसासी छेदकू ॥ ९७ ॥ तया वृक्षाचीं फळें ॥ तुरटें तिखटें तोंडाळें ॥ पक्कें अपक्कें सकळें ॥ ज्यांसि पिप्पलें ह्मणताती ॥ ९८ ॥ त्या दोंपक्ष्यांमाजी तत्त्वतां ॥ जो जीवपणें बोलिजेता ॥ तो या कर्मफळाचा भोक्ता ॥ जो नानाव्यथादायक ॥ ९९ ॥ जीं फळें खातां पोट नभरे ॥ खादल्या दारुण दुर्जरें ॥ जेणें भवचक्रीं पडोनि फिरे ॥ तरी अत्यादरें सेवितू ॥ २०० ॥ दुजा फळ खातां खुणा वारी ॥ जीवासि त्या फळाची गोडी भारी ॥ अखंड जाहला फळाहारी ॥ वारिलें नकरी शिवाचें ॥ १ ॥ फळें सेवितां अहर्निशीं ॥ तिळभरी शक्ति नाहीं जीवासी ॥ अशक्त देखोनियां त्याशी ॥ काळपाशीं[3] बांधित ॥ २ ॥ जो इयें सेवी कर्मफळें ॥ तो तत्काळ बांधिजे काळें ॥ दुजा कर्मफळा नातळे ॥ त्यातें देखोनि पळे कळिकाळू ॥ ३ ॥ जो कर्मफळातें नसेवितू ॥ तो ज्ञानशक्तीनें अधिक अनंतू ॥ सदा परमानंदें तृप्तु ॥ असे डुल्लतू स्वानंदें ॥ ४ ॥ उद्धवासि होय निजबोधू[4] ॥ यालागीं जिवशिवांचा भेदू ॥ अत्यादरें सांगे गोविंदू ॥ निजात्मबोधू प्रांजळू ॥ ५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ आत्मानमन्यं च स वेद विद्वानपिप्पलादो न तु पिप्पलादः ॥ योऽविद्यया युक् स तु नित्यबद्धो विद्यामयो यः स तु नित्यमुक्तः ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो कर्मफळातें नसेविता ॥ जो स्वरूपाचा जाणता ॥ द्रष्टा हे प्रपंचाचा तत्त्वतां ॥ अलिप्तता निजज्ञानें ॥ ६ ॥ जीव प्रपंचाचा ज्ञाता ॥ परी परमात्मा नेणे तत्त्वतां ॥ यालागीं भोगी भवव्यथा[5] ॥ कर्मफळें खातां अतिबद्धू ॥ ७ ॥ जो कर्मफळें सेवि बापुडा ॥ तो अंधपंगू जाहला वेडा ॥ मी कोण हें नेणे फुडा ॥ पडिला खोडां देहाचे ॥ ८ ॥ देहसंबंधा आंतू ॥ प्रतिपदीं होय आत्मघातू ॥ नाहीं जन्ममरणांसि अंतू ॥ दुःखी होतू अतिदुःखें ॥ ९ ॥ नश्वरविषयाचा छंदू ॥ तेणें जीव जाहला अतिबद्धू ॥ हा अविद्येचा[6] संबंधू ॥ लागला सुबद्धू देहवंतां ॥ २१० ॥ जितुकी विषयाची अवस्था ॥ तितुकी जीवासि नित्यबद्धता ॥ जो विषयातीत सर्वथा ॥ नित्यमुक्तता तेठायीं ॥ ११ ॥ जो विद्याप्राधान्यें नित्यमुक्त ॥ जो ज्ञानशक्तीनें शक्तिमंत ॥ सर्वव्यापकू सर्वीं अलिप्त ॥ तो नित्यमुक्त बोलिजे ॥ १२ ॥ सांगीतली जीवाची नित्यबद्धता ॥ प्रगट केली शिवाची नित्यमुक्तता ॥ जीवाची जे बद्धमुक्तता ॥ तेही आतां सांगतू ॥ १३ ॥ उद्धवाप्रती श्रीकृष्ण ॥ बद्धमुक्तांचें लक्षण ॥ दोघांचीही उणखुण ॥ विचित्र जाण सांगेल ॥ १४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ देहस्थोपि न देहस्थो

---

[1] कोठें. [2] चांगलें. [3] कालरूप पाशांनीं. [4] आत्मज्ञान. [5] संसाराचें दुःख. [6] अज्ञानाचा.

विद्वान् स्वप्नाद्यथोत्थितः ॥ अदेहस्थोऽपि देहस्थः कुमतिः स्वप्नदृग्यथा ॥ ८ ॥ ॥टीका॥ ॥बद्धमुक्तांचें मिश्र लक्षण ॥ तीं श्लोकीं सांगेल जाण ॥ केवळ मुक्ताचें सुलक्षण ॥ गोड निरूपण सातश्लोकीं ॥ १५ ॥ देहीं असोनि देहबुद्धि नाहीं ॥ [1]मुक्तांचें मुक्तलक्षण पाही ॥ यालागीं देहीं असोनि विदेही ॥ ह्मणिये पाही याहेतू ॥ १६ ॥ स्वप्नीचें राज्य आणि भीक ॥ जागृतीं मिथ्या दोन्ही देख ॥ तैसें देहादि जें सुखदुःख ॥ तें मिथ्या देख मुक्तांसी ॥ १७ ॥ जो स्वप्नीं मरोनि जाळिला ॥ तो [2]जाग्रतीं नाहीं राख जाहला ॥ तैसा प्रपंच मिथ्या जाणीतला ॥ मुक्त बोलिला त्या नाव ॥ १८ ॥ स्वप्नींचें साधकबाधक ॥ जागृतीं आठवे सकळिक ॥ त्याचे बाधीना सुखदुःख ॥ तैसें संसारिक मुक्तासी ॥ १९ ॥ आतां ऐक बद्धाची हे स्थिती ॥ तो वस्तुत्तां असे देहातीती ॥ परी मी देह मानी कुमती ॥ दुःखप्राप्ती तेणें त्याशी ॥ २२० ॥ जळीं देखे प्रतिबिंबातें ॥ मी बुडालों ह्मणोनि कुंथे ॥ कोणी काढाकाढा मातें ॥ पुण्य तुमतें लागेल ॥ २१ ॥ स्वप्नीं [3]घाय लागले खड्गाचे ॥ तेणें जागृतीं ह्मणे मी न वांचें ॥ ऐसें निबिड भरितें श्रमाचें ॥ तें बद्ध त्याचें लक्षण ॥ २२ ॥ स्वप्नींचें सुखदुःख नसतें ॥ तें स्वप्नभ्रमें भोगितां कुंथे ॥ तेवीं देह मी ह्मणोनि येथें ॥ नानादुःखातें भोगितू ॥ २३ ॥ [4]स्वस्वरूपाचें विस्मरण ॥ तेणें विषयासक्ति दृढ जाण ॥ संकल्प विकल्प अतिगहन ॥ तेंचि लक्षण बद्धाचें ॥ २४ ॥ आणिक लक्षणें त्याचीं आतां ॥ सांगत असें तत्त्वतां ॥ भोग भोगोनि [5]अभोक्ता ॥ ते मुक्तावस्था परियेसी ॥ २५ ॥ ॥श्लोक॥ ॥इंद्रियैरिंद्रियार्थेषु गुणैरपिगुणेषु च ॥ गृह्यमाणेष्वहं कुर्यान्न विद्वान्यस्त्वविक्रियः ॥ ९ ॥ ॥टीका ॥ ॥[6]अवशेष प्रारब्धगती ॥ मुक्तांचे देहीं दिसे वस्ती ॥ परी जागृतीं स्वप्न सुषुप्तीं ॥ देहस्थिती नातळे ॥ २६ ॥ छायापुरुषाचेनि चळे ॥ ते छायेसि पुरुष नातळे ॥ तेवीं मिथ्या देह मुक्ताजवळें ॥ कल्पांतकाळें येवों नशके ॥ २७ ॥ आपुले छायेसि जाण ॥ जेवीं बैसों नशके आपण ॥ तेवीं मायादि तिन्ही गुण ॥ जवळी असोन [7]स्पर्शेना ॥ २८ ॥ इंद्रियद्वारा यथानिगुतीं ॥ प्राप्तविषयांतें सेविती ॥ परी सेविलें ऐसेंही नेणती ॥ विषयस्फूर्ती स्फुरेना ॥ २९ ॥ गुण [8]पोखिती गुणावस्था ॥ इंद्रियें घेती इंद्रियार्थां ॥ मी उभयसाक्षी अकर्ता ॥ चिन्मात्रता अलिप्त ॥ २३० ॥ तो इंद्रियांचेनि खेळेमेळें ॥ सुखें विषयामाजी जरी लोळे ॥ तरी विकाराचेनि विटाळें ॥ कदाकाळें मैळेना ॥ ३१ ॥ जेथ कामाची अतिप्रीती ॥ तेथ लोभाची दृढ वस्ती ॥ अथवा कामाची जेथ अप्राप्ती ॥ तेथ महाख्याती क्रोधाची ॥ ३२ ॥ मुक्त जाहला नित्य निष्काम ॥ क्रोधलोभेंसी [9]निमाला काम ॥ तो स्वयें जाहला आत्माराम ॥ [10]विश्रामधाम जगाचें ॥ ३३ ॥ एवं मुक्ताच्याठायीं जाण ॥ उपजों नशके पापपुण्य ॥ कामक्रोधादिवृत्तिशून्य ॥

---

१ ज्ञात्यांचें. २ जागेपणांत. ३ घांव. ४ आपल्या स्वरूपाचें. ५ न भोगणारा. ६ उरलेली. ७ शिवत नाहींत. ८ पोषितात. ९ नाहींसा झाला. १० विसाव्याची जागा.

जाहला परिपूर्ण चिद्ब्रह्म ॥ ३४ ॥ मुक्तांची विषयस्थिती ॥ विषयीं स्फुरे ब्रह्मस्फूर्ती ॥ यालागीं पापपुण्यें नुपजती ॥ नित्यमुक्ती तेणें त्यासी ॥ ३५ ॥ ऐशी मुक्तांची हे कथा ॥ ऐक बद्धाची हे वार्ता ॥ अकर्ताचि ह्मणे मी कर्ता ॥ येणेंचि सर्वथा गुंतला ॥ ३६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ दैवाधीने शरीरेऽस्मिन् गुणभाव्येन कर्मणा ॥ वर्तमानोऽबुधस्तत्र कर्त्ताऽस्मीति निबध्यते ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ अदृष्टाआधीन[1] जें शरीर ॥ तेथें आलिया हरिहर ॥ अन्यथा न करवे अणुमात्र ॥ हें वेदशास्त्र संमत ॥ ३७ ॥ देहीं ज्या गुणाचें प्राधान्य ॥ तैसेंचि कर्म निपजे जाण ॥ इंद्रियें तयागुणाआधीन ॥ तदनुसार जाण वर्तती ॥ ३८ ॥ एवं दैवगुणें देहवर्तन ॥ तेथ मी कर्ता ह्मणवी आपण ॥ तेंचि त्यासी दृढ बंधन ॥ आपुल्या आपण घातक ॥ ३९ ॥ नळीमाजील चण्यांच्या आशा ॥ वानरें मुठी धरणें तोचि फांसा ॥ तेवीं देहींच्या विषयविलासा ॥ अभिमानें तैसा गुंतला ॥ २४० ॥ जो देहातीत वस्तुतां ॥ जो गुणकर्मांचा अकर्ता ॥ तो ह्मणे मी कर्मकर्ता ॥ अहंममता भूलला ॥ ४१ ॥ जो न करितांचि चोरी ॥ मी चोर ह्मणे राजद्वारीं ॥ तो मारिजे लहानथोरीं ॥ तैशी परी जडजीवा ॥ ४२ ॥ प्रकृतीचें[2] कर्म आपुले माथां ॥ घेऊनि नाचे अहंममता ॥ तेणें अभिमानें दृढ बद्धता ॥ आकल्पांता अनिवार ॥ ४३ ॥ तळीं घालूनि काजळा ॥ वरी ठेविला स्फटिक सोज्ज्वळा ॥ श्वेतता लोपूनि दिसे काळा ॥ तेवीं आंधळा जीवू झाला ॥ ४४ ॥ कां आंधळें मारिलें हतिरूं ॥ नेणें निजपतन[3] निर्धारू ॥ तैसा जीव लागे कर्म करूं ॥ पतनविचारू तो न देखे ॥ ४५ ॥ मी देह मी कर्मकर्ता ॥ मी ज्ञाता मी विषयभोक्ता ॥ ऐशी जे कां देहात्मता ॥ दृढ बद्धता तियेनाव ॥ ४६ ॥ एवं बद्धमुक्तवर्तन ॥ विशद केलें निरूपण ॥ आतां केवळ मुक्ताचें लक्षण ॥ आवडीं श्रीकृष्ण सांगत ॥ ४७ ॥ ज्ञानिया तो तंव आत्मा माझा ॥ हे अतिप्रीतीं गरुडध्वजा[4] ॥ हें गुह्य सांगीतलें कपिध्वजा ॥ रणसमाजा रणरंगीं ॥ ४८ ॥ तेंचि आतां उद्धवाप्रती ॥ अत्यादरें सांगे श्रीपती ॥ ज्ञानियाची मुक्तस्थिती ॥ यथानिगुतीं निजगुह्य ॥ ४९ ॥ ज्ञानलक्षणें सांगतां ॥ धणी न पुरे कृष्णनाथा ॥ निरूपणमिषें ज्ञानकथा ॥ मागुतमागुतां सांगत ॥ २५० ॥ यालागीं ज्ञानभक्तांची गोडी ॥ श्रीकृष्णाची जाणें फुडी ॥ कृष्णभजनाची आवडी ॥ भक्त ते गोडी जाणती ॥ ५१ ॥ आधींच तंव हे मुक्तांची कथा ॥ वरी श्रीकृष्णासारिखा वक्ता ॥ उद्धवाचें भाग्य[5] वर्णितां ॥ नवर्णवे सर्वथा शेषादिकां ॥ ५२ ॥ उद्धव अर्जुनासमान ॥ त्याहूनि हा दिसे गहन ॥ ते परस्परें नरनारायण ॥ गुह्य ज्ञान बोलिले ॥ ५३ ॥ तेचि उलथोनि ज्ञानकथा ॥ उद्धवासि होय सांगता ॥ उद्धवा ऐसें भाग्य तत्त्वतां ॥ न दिसे सर्वथा आनासी ॥ ५४ ॥ जेणें सोडूनि निजधामा[6] ॥ मागें ठेवूनि आपुल्या कामा ॥ उद्धव आवडला पुरुषोत्तमा ॥

---

[1] दैवाधीन. [2] मायेचें. [3] आपला शस्त्रघाय. [4] विष्णूस. [5] दैव. [6] आपल्या स्थानास.

त्याचिया प्रेमा विगुंतला ॥ ५५ ॥ यालागीं उद्धवाचें शुद्ध पुण्य ॥ जगीं उद्धवचि धन्यधन्य ॥ जयालागीं स्वयें नारायण ॥ स्वानंदघन बोळला ॥ ५६ ॥ जो नातुडे योगयागसंकटीं ॥ तो उद्धवाच्या बोलासाठीं ॥ जेवीं व्यायिली धेनु वत्सा चाटी ॥ तेवीं गुह्यगोष्टी सांगत ॥ ५७ ॥ जो निजकुळासि काळू ॥ तो उद्धवासि अति स्नेहाळू ॥ बाप भक्तकाज कृपाळू ॥ ज्ञानकल्लोळू तुष्टला[1] ॥ ५८ ॥ यालागीं उद्धवाचें नाम घेतां ॥ श्रीकृष्ण निवारी भवव्यथा ॥ ऐशी भक्तप्रीती भगवंता ॥ भक्तांतें स्मरतां हरी तारी ॥ ५९ ॥ मुक्तांचीं लक्षणें निर्धारितां ॥ लाभे आपुली निजमुक्तता ॥ एका जनार्दनु विनवी संतां ॥ मुक्तकथा हरि बोले ॥ २६० ॥ कृष्ण उद्धवासि ह्मणे मी तुज ॥ सांगेन आपुलें निजगुज ॥ मुक्तलक्षणाचें भोज ॥ नवल चोज परियेसी ॥ ६१ ॥ ॥श्लोक॥ ॥एवं विरक्तः शयन आसनाटनमज्जने ॥ दर्शनस्पर्शनघ्राणभोजनश्रवणादिषु ॥ ११ ॥ ॥टीका॥ ॥ऐक मुक्ताचें लक्षण ॥ आसन भोजन शयन ॥ दर्शन[2] स्पर्शन घ्राण[3] ॥ अटण[4] मज्जन[5] करी कैसें ॥ ६२ ॥ मागील अध्याय संपतां ॥ प्रकृति कर्म अभिमानता ॥ तेणें लागली दृढ बद्धता ॥ तो अहंकारू ज्ञाता नातळे ॥ ६३ ॥ सर्वकर्मीं स्वभावता ॥ ज्ञात्याची निरभिमानता ॥ ते मी समूळ सांगेन कथा ॥ सावधानता अवधारी ॥ ६४ ॥ जेवीं छायेचा मानापमान ॥ पुरुषा न बाधी अणुप्रमाण ॥ तेवीं देहाचें कर्माचरण ॥ निरभिमान मुक्तांसी ॥६५ ॥ स्वाधिष्ठान तेंचि आसन ॥ अखंड त्यावरी आरोहण[6] ॥ तेथें येऊचि नेणें अभिमान ॥ बैसलें मन उठेचिना ॥ ६६ ॥ नवल आसनाचें महिमान ॥ हारपोनि गेलें विस्मरण ॥ कदा एकांत न मोडे जाण ॥ हें सहजासन मुक्तांचें ॥ ६७ ॥ जें आसनींचें समाधान ॥ समाधि आणि व्युत्थान ॥ करी दोहींची वोळखण ॥ चालतें आसन मुक्तांचें ॥ ६८ ॥ चालतांही चपळपदीं ॥ मी चालतों नाठवे बुद्धी ॥ चालतां न मोडे समाधी ॥ हे लक्षणसिद्धी मुक्तांची ॥ ६९ ॥ जरी त्रैलोक्य हिंडला ॥ तरी ठायींहूनि नाहीं हालला ॥ ऐसा नचलोनि मुक्त चालला ॥ जेवीं अभ्रें धांवला दिसे चंद्र ॥ २७० ॥ कुलालचक्रीं[7] बैसली माशी ॥ ते नहालतां भंवे चक्रासरसी ॥ मुक्तांची गमनसिद्धी तैशी ॥ देहगमनेंसी आभासे ॥ ७१ ॥ देह प्रारब्धास्तव हिंडे ॥ बैसका स्वस्वरूपींची नसंडे ॥ जेवीं रथीं धांवता सवेग घोडे ॥ निद्रा नमोडे रथस्थाची ॥ ७२ ॥ जें आमनीं बैसल्या समाधान ॥ त्याची स्थिती गमनागमन ॥ उठलों बैसलों नाठवे जाण ॥ चाललेंपण स्फुरेना ॥ ७३ ॥ ऐसें नचळतां जें वळण ॥ तें जाण मुक्तांचें गमन ॥ आतां ऐक स्नान ॥ निमज्जन निजरूपीं ॥ ७४ ॥ स्नान करी गंगाजळें ॥ परी गंगाजळातें नातळे ॥ मन चित्स्वरूपीं केलें सोंवळें ॥ तें वोंवळें हों नेणें ॥ ७५ ॥ त्यासि निजस्वरूपीं नाहतां ॥ जाहली परम पवित्रता ॥ तीर्थें मागती चरण

---

[1] संतुष्ट झाला. [2] पाहणें. [3] वास घेणें. [4] हिंडणें. [5] अंगूळ करणें. [6] चढणें. [7] कुंभाराचे चाकावर.

तीर्था ॥ ऐशी सुस्नातता मुक्तांची ॥ ७६ ॥ तो चिन्मात्र देखे जीवन ॥ अखंड चिद्रूपीं अवगाहन[1] ॥ इतर ह्मणती केलें स्नान ॥ त्याचें
निमज्जन[2] निजरूपीं ॥ ७७॥ ज्याचे चरणींचे रजःकण ॥ लाहोनि धरा परम पावन ॥ त्याचेनि प्राणसंगें जाण ॥ पवित्रपण वायूसी
॥ ७८ ॥ ज्याचे चरणस्पर्शें तत्त्वतां ॥ पवित्र जाहल्या गंगादिसरिता ॥ त्याचे जठरसंगें सर्वथा ॥ अतिपवित्रता अग्नीसी ॥ ७९ ॥ ज्याच्या
हृदयावकाशीं आकाश ॥ सगळें राहिलें सावकाश ॥ तेणें पवित्र जाहलें आकाश ॥ अलिप्त उदास सर्वत्र ॥ २८० ॥ जे चढोनि बैसले
वैकुंठीं ॥ ते सदा वांछिती याची भेटी ॥ वेद ऐकोंधांवे गोष्टी ॥ तो पहावया दिठीं देव येती ॥ ८१ ॥ एवं चित्स्वरूपीं करूनियां स्नान ॥
जाहला सर्ववंद्य[3] अतिपावन ॥ हें मुक्ताचें स्नानलक्षण ॥ आतां निरीक्षण तें ऐक ॥ ८२ ॥ अवघें चराचर देखतां ॥ तो देखोनिही न देखता
॥ दर्शनदृष्टीं अलिप्तता ॥ दृश्य देखतां हरी दिसे ॥ ८३ ॥ दृश्यें दुमदुमित दिसे सृष्टी ॥ परी दृश्य नपडे त्यांचे दृष्टीं ॥ होतांही दृश्येंसी
भेटी ॥ पडे मिठी अदृश्यीं ॥ ८४ ॥ दृष्टि प्रकाशे देखणेपणीं ॥ तें देखणें देखे दृश्यस्थानीं ॥ जेवीं डोळयां डोळा दिसे दर्पणीं[4] ॥ निजदर्शनीं
देखतू ॥ ८५ ॥ डोळेनि दर्पणप्रकाशे ॥ त्यामाजी डोळेन डोळा दिसे ॥ मुक्ताचें देखणें तैसें ॥ आपणाऐसें जग देखे ॥ ८६ ॥
दृश्य द्रष्टा दर्शनीं ॥ त्रिपुटी गेली हारपोनी[5] ॥ देखणें देखें देखणेनी ॥ देखणा होऊनी सर्वांगें ॥ ८७ ॥ होतां नानापदार्थेंसी भेटी ॥ तें
देखणेंपणें दृश्य लोटी[6] ॥ दृश्यातीता निजदृष्टीं ॥ सुखें सृष्टी देखत ॥ ८८ ॥ मुक्तांची देख ती स्थिती ॥ देखणेपणें यथानिगुतीं ॥ उद्धवाचे
दृष्टीची जयासी प्राप्ती ॥ तोचि त्रिजगतीं पां धन्य ॥ ८९ ॥ यादृष्टीं जे नित्य वर्तत ॥ ते जाण पां परममुक्त ॥ यादृष्टीं जे मज पाहत ॥
ते परमभाग्यवंत प्रिय माझे ॥ २९० ॥ परादिवाचामाजी वचन ॥ उपजे तेथें याचें श्रवण ॥ श्रोता वक्ता कथाकथन ॥ अवघें आपण
होऊनि ऐके ॥ ९१ ॥ शब्दजातेंसी कान ॥ अखंड जडले सावधान ॥ श्रवणामाजी हारपे गगन ॥ परम समाधान श्रवणाचें ॥ ९२ ॥
ऐकतां लौकिक शब्द ॥ कां नारायण उपनिषद ॥ परिसतां नाम हरिगोविंद ॥ अर्थावबोध समत्वें ॥ ९३ ॥ बोलातें जो बोलविता ॥ तोचि
श्रवणामाजी श्रोता ॥ येणें अन्वयें श्रवण करितां ॥ शब्दीं निःशब्दता अतिगोड ॥ ९४ ॥ जो जो श्रवणीं पडे शब्द ॥ तो तो होतजाय
निःशब्द[7] ॥ यापरी श्रवणीं श्रवणानंद ॥ स्वानंदबोध[8] मुक्तांचा ॥ ९५ ॥ अकारादिवर्णत्रिपुटी ॥ प्रणव मूळशब्द सृष्टी ॥ तो ओंकार
ब्रह्मरूपें उठी ॥ हे श्रवणतुष्टी मुक्तांची ॥ ९६ ॥ श्रवणीं पडतां शब्दज्ञान ॥ सहजें शाब्दिक जाय उडोन ॥ श्रवणें ठसावे ब्रह्म पूर्ण ॥
स्वानंदश्रवण मुक्तांचें ॥ ९७ ॥ परिसतां उपनिषद ॥ कां लौकिकादि नानाशब्द ॥ मुक्तांचा पालटेना बोध ॥ श्रवणीं स्वानंद कोंदेला[9]

---

[1] बुडी मारणें. [2] स्नान. [3] सर्वांस पूज्य. [4] आरशांत. [5] नाहींसो होऊन. [6] जाते. [7] शब्दरहित. [8] ब्रह्मानंदाचें ज्ञान. [9] भरला.

॥ ९८ ॥ एक अद्वितीय ब्रह्म ॥ हें वेदशास्त्रांचें गुह्य वर्म ॥ तें मुक्तांसि जाहलें सुगम ॥ शब्दीं परब्रह्म कोंदलें ॥ ९९ ॥ लौकिक वैदिक
शब्द जाण ॥ शब्दमात्रीं ब्रह्म पूर्ण ॥ ऐसें मुक्तांचें हें श्रवण ॥ घ्राणलक्षण परियेसी ॥ ३०० ॥ घ्रांणासि[1] येतां सुगंधू ॥ मुक्तांसि नोहे
विषयबोधू ॥ गंधमिषें स्वानंदकंदू ॥ परमानंदू उल्लासे ॥ १ ॥ यापरी घ्राण सुमन चंदन ॥ अवघें तो होय आपण ॥ यापरी गंध भोगी
जाण ॥ भोक्तेपण सांडोनी ॥ २ ॥ घ्राणां येतांचि सुवासू ॥ सुवासीं प्रकटे परेशू ॥ तेव्हां सुवास आणि दुर्वासू ॥ हा विषयविलासू स्फुरेना
॥ ३ ॥ मलयानिलसंगें[2] जाण ॥ जेथें जेथें गंधाचें गमन ॥ तेथें तेथें मुक्तांचें घ्राण ॥ अगम्यपण याभोगा ॥ ४ ॥ जितका चळता
वायू जाण ॥ तितुकें मुक्तांचें घ्राण ॥ यापरी गंधग्रहण ॥ स्वभावें जाण होतसे ॥ ५ ॥ यापरी जाण तत्त्वतां ॥ होय गंधाचा भोक्ता ॥
हे घ्राणक्रिया जाण मुक्तां ॥ रसभोग्यता अवधारी ॥ ६ ॥ रस रसना भोजन ॥ तो स्वयेंचि आहे आपण ॥ हातू नमाखितां सर्वांपोशन
॥ रसनेविण सेवितू ॥ ७ ॥ षड्रसांचा[3] स्वादू जाणें ॥ परी एकीं चर्वीं अवघें खाणें ॥ भोक्तेपणा आतळोंनेणें ॥ ऐसेंनि भोजनें
नित्यतृप्त ॥ ८ ॥ भूक उपजोंचि नेणे ॥ जेवूं बैसल्या पुरे न ह्मणे ॥ सर्वभक्षी नखातेपणें ॥ उच्छिष्ट होणें त्या नाहीं ॥ ९ ॥ ताट अन्न
आणि आपण ॥ तो नदेखे भिन्नपण ॥ रसमिषें स्वानंदपूर्ण ॥ सर्वांगें जाण सेवित ॥ ३१० ॥ जंव रसना घेवों जाय रसस्वादू ॥ तंव तेथें
प्रकटे परमानंदू ॥ करूनि रसरसने उच्छेदू ॥ निजानंदू सेवित ॥ ११ ॥ सकळ गोडियांची मूळगोडी ॥ तेथ बैसली निजआवडी ॥ सेवितां
नानापरवडी ॥ तेचि गोडी गोडपणें ॥ १२ ॥ सकळगोडियां जें गोड आहे ॥ ते गोडीच तो जाहला स्वयें ॥ आतां जोजो रसविषयोखाये
॥ तेथतेथ आहे ते गोडी ॥ १३ ॥ कैसा मुक्ताचा निजबोधू[4] ॥ घेवों जातां सर्वस्वादू ॥ रसत्व लोपूनि स्वानंदकंदू ॥ परमानंदू वोसंडे
॥ १४ ॥ यालागीं जोजो रस सेवूं जाये ॥ तोतो ब्रह्मरसूच होये ॥ मुक्तांची रसना यापरी पाहे ॥ घेत आहे रसातें ॥ १५ ॥ एवं
मुक्ताचें रसभोजन ॥ ते क्रिया करिती ऐशी जाण ॥ आतां तयाचें स्पर्शन ॥ तेंही लक्षण परियेसी ॥ १६ ॥ मुक्तांसि लागतांचि जाणा ॥
शीत सांडी शीतळपणा ॥ स्पर्शें उष्ण मुकलें उष्णपणा ॥ स्पर्शलक्षणा हे त्यासी ॥ १७ ॥ जेवीं कां टेंकितां अग्नीशी ॥ धूरें आणी चंदनाशी
॥ जाणूनि त्याच्या विकाराशी ॥ आपणाऐशी करी वह्नी[5] ॥ १८ ॥ तेवीं मुक्तांसि द्वंद्वें आदळतां ॥ द्वंद्वाची बुडाली द्वंद्वता ॥ तो सर्वांगीं
सर्वपणीं असतां ॥ सहजें द्वंद्वता निमाली[6] ॥ १९ ॥ तेथें कैचें मृदु कैचें कठिण ॥ कैचें शीत कैचें उष्ण ॥ सर्वीं सर्वात्मा तो जाण ॥ द्वंद्वाचें
भान स्पर्शेना ॥ ३२० ॥ आगीसि पोळीना उन्हाळा ॥ हींव पीडीना हिमाचळा ॥ तैशी द्वंद्वाची हे माळा ॥ मुक्तांचे गळां पडेना ॥ २१ ॥

---

१ नाकास. २ मलयपर्वतसंबंधिवायूच्या संगतीनें. ३ सहा रसांचा. ४ आत्मबोध. ५ अग्नि. ६ मेली.

सुवर्णाचे अलंकार भले ॥ सुवर्णपेटी माजी झांकिले ॥ झांकिले ह्मणतां उघडे ठेविले ॥ तेवीं द्वंद्वें सकळें परब्रह्म ॥ २२ ॥ त्यासि अंगीं जेंजें आदळे ॥ तें अंगचि होय तत्काळें ॥ कांहीं नुरे त्यावेगळें ॥ द्वंद्वें सकळें निमालीं[1] ॥ २३ ॥ हातीं लीलाकमळ सांपडे ॥ तंव कमळीं कमळत्व उडे ॥ कमळजन्मा तोही बुडे ॥ करी रोकडें निजरूप ॥ २४॥ स्पर्शें स्पर्शातें स्पर्शावें ॥ हेही त्रिपुटी न संभवे ॥ किंबहुना आपणचि आघवें ॥ निजस्वभावें होऊनि ठेला ॥ २५ ॥ तो देवपूजा हातीं धरी ॥ तंव मीची देवपूजेभीतरी ॥ अथवा खेळों रिघाल्या पाथरी ॥ त्याहीमाझारी मी त्यासी ॥ २६ ॥ भिंती नानावर्ण विचित्राकृती ॥ तेथें जें स्पर्शे तें तें भिंती ॥ तेवीं मुक्तांची सर्पे न स्थिती॥ पूर्ण अद्वैतीं निजबोधू ॥ २७ ॥ यापरी गा तत्त्वतां ॥ स्पर्शलक्षण वर्ते मुक्तां ॥ त्यांचें बोलणें जें सर्वथा ॥ ऐक आतां सांगेन ॥ २८ ॥ सुरस कथा सांग वाडेंकोडें ॥ अथवा लौकिक बोलणें घडे ॥ परी त्याची समाधिमुद्रा न खंडे ॥ मौन न मोडे बोलतां ॥ २९ ॥ बोलतांही न मोडे मौन ॥ हेचि अनुभवाची आंतुली खूण ॥ शब्दामाजी निःशब्द[3]गुण ॥ सज्ञान जाण जाणती ॥ ३३० ॥ स्त्रीपुरुषें अबोला चालती ॥ तों अबोला कीं अतिप्रीती ॥ तेवीं मुक्तांची बोलती स्थिती ॥ शब्द शब्दार्थी निःशब्द ॥ ३१ ॥ जयाची बोलती अक्षरें॥ अक्षररूपेंचि साचारें ॥ त्यांचीं ऐकतांउत्तरें ॥ चमत्कारें मन निवे ॥ ३२ ॥ मी एक चतुर बोलका ॥ हाही नाहीं आवांका ॥ अथवा रंज[4]वावें लोकां ॥ हेंही देखा स्मरेना ॥ ३३ ॥ निःशब्दीं उठती शब्द ॥ शब्दामाजी ते निःशब्द ॥ यापरी करितांही अनुवाद ॥ बोलोनि शुद्ध बोलणा ॥ ३४ ॥ जळामाजी उपजे तरंग ॥ जळतरंगाचें निजांग ॥ तेवीं निःशब्दीं शब्द सांग ॥ शब्दचि सर्वांग निःशब्द ॥ ३५ ॥ वाच्यवाचकता त्रिपुटी ॥ लोपवूनि सांगे गोड गोठी ॥ करितां सैराट चावटी ॥ न सुटे मिठी मौनाची ॥ ३६ ॥ म्यां सत्यचि बोलावें ॥ हेंही त्यासी जीवें नाठवे ॥ मिथ्या बोलों लोभ स्वभावें ॥ हेंही न संभवे मुक्तांशी ॥ ३७ ॥ सत्य मिथ्या जीं बोलणीं ॥ निःशेष प्रांशूनि[5] नेलीं दोनी ॥ मुळींच्या मौनें जाहला मौनी ॥ नानावचनीं बोलतां ॥ ३८ ॥ तेथें सैराट हाक देतां ॥ कां सिंहनादें त्या गर्जतां ॥ शब्दीं ठसावली निःशब्दता ॥ मौनसर्वथा मोडेना ॥ ३९ ॥ जरी तो माझें स्तवन करी ॥ तरी मी त्याच्या स्तवामाझारी ॥ तो जरी सैरा बडबड करी ॥ त्याहीमाझारी मी त्यासी ॥ ३४० ॥ जरी त्यासी येऊनि भांडण पडे ॥ तरी भांडणही करणें घडे ॥ त्या कलहामाजी मागें पुढें ॥ चहूंकडे मज देखे ॥ ४१ ॥ त्याचे वांकडे तिकडे बोल ॥ तें जाण ब्रह्मचि केवळ ॥ तया आह्मा अभिन्न मेळ ॥ निजात्मरसाभक्तींशीं ॥ ४२ ॥ अवचटें त्याच्या मुखाबाहेरी ॥ ज्यासो ह्मणे तुज देवो तरी ॥ त्यासी वांउनि[6] मी शिरीं ॥ ब्रह्मसाक्षात्कारीं पाववीं ॥ ४३ ॥ यालागीं त्याच्या

---

१ मेलीं. २ वास्तविक. ३ शब्द नसणें. ४ रमवावें. ५ गिळून. ६ वाहून.

वचनाआधीन ॥ मी सर्वथा असें जाण ॥ त्याचें वचन तें प्रमाण ॥ सर्वस्वें जाण मी मानीं ॥ ४४ ॥ आतां तो मी हे ऐशी बोली ॥
बाहेर सवडी वाढिन्नली ॥ मी तोचि तो हे केली ॥ मार्गीं चोजविली निजभक्तां ॥ ४५ ॥ यालागीं तो माझा जीवप्राण ॥ मी त्याचें नि[1]
जजीवन ॥ तयासी मज भिन्नपण ॥ कल्पांतीं जाण असेना ॥ ४६ ॥ एवं तो सगळा मजभीतरीं ॥ मी तया आंत बाहेरी ॥ ऐसेनि अ
भिन्नपणें[2] करी ॥ सुखें संसारीं नांदतूं ॥ ४७ ॥ त्यांचें मुखींचे जेजे बोल ॥ तेचि मी बोलता सकळ ॥ मुक्तांचें बोलणें केवळ ॥ तुजप्रती वि
वळ म्यां केलें ॥ ४८ ॥ हातीं कांहीं घेवों जाये ॥ तंव तो घेवो देवा होये ॥ देतां कांहीं देवो पाहे ॥ तेंही होये तद्रूप ॥ ४९ ॥ तेव्हां दान आ
णि देते घेते ॥ भिन्नपणें[3] न देखे तेथें ॥ यालागीं करोनियां अकर्तें ॥ या परिकरातें वर्तती ॥ ३५० ॥ निजस्वभावें ते कर ॥ जो कांहीं क
रिती व्यापार ॥ तेथें नकेलेंपणाचें सूत्र ॥ सहजीं साचार ठसावे ॥ ५१ ॥ करीं पडलिया शस्त्र ॥ करूं जाणे तो व्यापार ॥ परी मी क
र्ता हा अहंकार ॥ अणुमात्र असेना ॥ ५२ ॥ पुढें वोढवलें अवचितें ॥ परी खेळों जाणें द्यूतकर्मातें[4] ॥ हारी जीत नाठवे चित्तें ॥ निजस्व
भावें तो खेळे ॥ ५३ ॥ वोढवल्या ब्राह्मणपूजा ॥ करी जाणे अतिवोजा ॥ पूज्यपूजकत्वें भाव दुजा ॥ न मनूनि द्विजां पूजित ॥ ५४ ॥
धनुर्षीं काढूं जाणें वोढी ॥ अनुसंधानें बाण सोडी ॥ लक्ष लक्षूनि भेदी निरवडी ॥ परी न धरी गोडी श्लाघेची ॥ ५५ ॥ कैसें कर्म निप[5]
जे करीं ॥ जैशा समुद्रामाजी लहरी ॥ तैसा निजस्वरूपामाझारी ॥ नानाव्यापारीं निश्चळ ॥ ५६ ॥ सूर्य मृगजळातें भरी ॥ तैसा व्या
पार निजनिर्विकारीं ॥ परी केलेपण शरीरीं ॥ तिळभरी असेना ॥ ५७ ॥ सूर्यकांतीं अग्नि खवळे ॥ तें कर्म ह्मणती सूर्यें केलें ॥ तैसें हस्त
व्यापारें जेंजें जाहलें ॥ नाहीं केलें तें त्याणें ॥ ५८ ॥ सूर्यकांतीं पडावा अग्नी ॥ हें नाहीं सूर्याचे मनीं ॥ तेवीं मुक्त निरभिमानी ॥ क्रि
याकरणीं विचरत ॥ ५९ ॥ त्यासी चालूं जातां पायें ॥ तळीं पृथ्वी नाहीं होये ॥ आप आपणियावरी पाहे ॥ चालत जाये स्वानंदें ॥ ३६० ॥
जळींचा जळावरी तरंग ॥ अभिन्नपणें चाले चांग ॥ तैसा तो निजरूपीं सांग ॥ चालवी अंग चिद्रूपें ॥ ६१ ॥ तयासि असतांही चर
ण ॥ आवडीं चाले चरणेंविण ॥ करी सर्वांगें गमन ॥ सर्वत्र जाण झालासे ॥ ६२ ॥ जेवीं अखंडदंडायमान ॥ पायेंवीण चाले जीवन[6]
तेवीं चरणेंविण गमन ॥ नित्य सावधान भक्तांचें ॥ ६३ ॥ सर्वथा पायेंवीण ॥ वायूचें सर्वत्र गमन ॥ तैसेंच मुक्ताचें लक्षण ॥ स्वरू
पीं जाण सर्वत्र ॥ ६४ ॥ यापरी न हालतां जाण ॥ त्याचें सर्वत्र गमन ॥ नाठवे चालतेपण ॥ ऐसेंच लक्षण मुक्ताचें ॥ ६५ ॥ मुळीं
आत्मा आत्मीं नाहीं जाणा ॥ यालागीं स्त्रीपुरुषभावना ॥ त्यासि सर्वथा आठवेना ॥ दैवें अंगना तो भोगी ॥ ६६ ॥ नटू नाटक अ

---

१ आपले प्राण. २ एकपणानें. ३ वेगळेपणानें. ४ जुव्वा. ५ उत्पन्न होतें. ६ पाणी. ७ सर्वठिकाणीं. ८ मिळविला.

वगला ॥ पुरुष स्त्रीवेषें दिसे आला ॥ स्त्रीपुरुषभाव संपादिला[1] ॥ तेवीं हा जाहला गृहस्थ ॥ ६७॥ कां अर्धनारीनटेश्वरी ॥ जो पुरुष तो
चि नारी ॥ मुक्तांशि जाण तैशापरी ॥ स्त्रीपुरुषांपरी निजबोधू ॥ ६८ ॥ जेवीं कां आपुली साउली ॥ आवडी आपण आलिंगिली ॥
तेवीं मुक्तें स्त्री भोगिली ॥ द्वैताची भुली सांडोनी ॥ ६९ ॥ छाया कोठें असे कोठें वसे ॥ सरशी असतां ज्याची तो पुसे ॥ मुक्तांसि जा
ण तैसें ॥ लांलुप्य[2] नसे स्त्रियेचें॥ ३७० ॥ एवं स्त्रीपुरुषविकारप्राप्ती ॥ त्याची न मोडे आत्मस्थिती ॥ दैवें जाहलिया संतती ॥ आत्मप्र
तीती तेथें नाहीं ॥ ७१ ॥ आत्मा वै पुत्रनामासी ॥ सत्यत्व आलें ये श्रुतीशीं ॥ पुत्रत्वें देखे आपणासी ॥ निजरूपेंसी सर्वदा॥ ७२॥
स्वयें जनकू स्वयें जननी ॥ स्वयें क्रीडे पुत्रपणीं ॥ आपणावांचूनि जनीं वनीं[3] ॥ आणिक कोणी देखेना ॥ ७३ ॥ एवं स्त्रीपुत्रसंतती ॥
जेवीं आकाशीं मेघपंक्ती ॥ काळें येती काळें जाती ॥ तैशी स्थिती मुक्तांची ॥ ७४ ॥ स्त्रीसंभोगीं होय सुख ॥ तें सुख मुक्तांसि सदा
देख ॥ यालागीं स्त्रीकामीं अभिलाख ॥ नाहीं विशेख मुक्तांसी ॥ ७५ ॥ जैसें राजहंसापाशीं शेण ॥ तैसें मुक्तांपाशीं जाण धन[4] ॥
त्यावरी त्याचें नाहीं मन ॥ उदासीन सर्वदा ॥ ७६ ॥ व्याघ्रासि[5] वाढिलें मिष्टान्न ॥ तें त्यासि जैसें नावडे जाण ॥ तैसें मुक्तांसि नावडे
धन ॥ धनलोभिपण त्यां नाहीं ॥ ७७ ॥ पाहतां कापूर पडला ॥ जेवीं नातळे काउळा ॥ तेवीं अनर्घ्य रत्नमाळा ॥ मुक्तें सांडिल्या थुं
कोनी ॥ ७८ ॥ ज्यासि धनलोभाची आस्था ॥ त्यासि कल्पांतीं न घडे मुक्तता ॥ तैसें स्त्रीकामिया सर्वथा॥ नव्हे परमार्थता निजबोधू
॥ ७९ ॥ मुक्तांचिये निद्रेपाशीं ॥ समाधि ये विश्रांतीशीं ॥ शिणली धांवे माहेरां जैशी ॥ तैशी विसाव्यासी येतसे ॥ ३८० ॥ जागृ
तिस्वप्नसुषुप्तींसि ॥ नातळोनि तीहीं अवस्थांसी ॥ निर्जीं[6] निजला निजत्वेंसी॥ अहर्निशीं निजरूपें ॥ ८१ ॥ निर्जीं निजे जातां निर्धा
रा ॥ तळीं हरपली धरा ॥ वरी ठावो नाहीं अंबरा ॥ ऐशिया सेजारामाजी निजे ॥ ८२ ॥ नवल निजत्याची वोज ॥ चालतां बोल
तां न मोडे निज ॥ खातां जेवितां अखंडनिज ॥ सहजीं सहज निजरूप ॥ ८३ ॥ निजवितें कां उठवितें ॥ दोनी तोचि आहे तेथें ॥ को
ण कोणा जागवितें ॥ निजे सुचित्तें[7] निजरूपें ॥ ८४ ॥ जागतां निजेशीं वागे ॥ वागतांही निज लागे ॥ एवं निजरूप जाहला अंगें ॥
निद्रेचेनि पांगें पांगेना ॥ ८५ ॥ शय्या शयन सेजार ॥ अवघें तोचि असे साचार ॥ आपुल्या निजाचें आपण घर ॥ नित्य निरंतर निर्जीं
निजे ॥ ८६ ॥ ऐसें जेंजें करूं जाय कर्म ॥ तेथतेथ प्रकटे परब्रह्म ॥ मुक्तांसि एकही नाहीं नेम ॥ हें मुख्य वर्म मुक्तांचें ॥ ८७ ॥ मुक्तांसि
नेमबंधन ॥ तें अंगीं लागलें साधन ॥ साधन असतां मुक्तपण ॥ न घडे जाण सर्वथा ॥ ८८ ॥ मुक्तांसि तंव आसक्ती[8] ॥ सर्वदा नाहीं सर्वा

---

[1] मिळविला. [2] आसक्ति. [3] निर्जनप्रदेशांत. [4] द्रव्य. [5] वाघास. [6] आपल्या ठिकाणीं. [7] स्वस्थमनानें. [8] लोभ.

र्थी ॥ शेष प्रारब्धाचे स्थितीं ॥ कर्में निपजती निरपेक्ष ॥ ८९ ॥ ज्याचा निमाला[1] अहंकारू ॥ तो माझें स्वरूप साचारू ॥ ये अर्थीं नलगे विचारू ॥ वेदशास्त्रसंमत ॥ ३९० ॥ जो नित्यमुक्त निर्विकारी ॥ तो वर्ततां वर्ते मजमाझारीं ॥ मी तया आंत बाहेरीं ॥ जेवीं सागरीं कल्लोळ ॥ ९१ ॥ यापरी झाला जो परब्रह्म ॥ त्यासि स्वप्नप्राय धर्माधर्म ॥ बाधूं न शके इंद्रियकर्म ॥ हें त्याचें वर्म तो जाणे ॥ ९२ ॥

॥ श्लोक ॥ ॥ न तथा बध्यते विद्वांस्तत्रतत्रादयन् गुणान् ॥ प्रकृतिस्थोऽप्यसंसक्तो यथा खं सविताऽनिलः ॥ १२ ॥ ॥ टीका ॥

॥ जीहीं इंद्रियीं कर्म करितां ॥ मूर्खासि जाहली दृढबद्धता ॥ तिहीं इंद्रियीं वर्ततां ज्ञाता ॥ नित्यमुक्तता अनिवार ॥ ९३ ॥ मूर्खासि कर्मीं अभिमान ॥ ज्ञाता सर्वकर्मीं निरभिमान ॥ बद्धमोक्षाचें कारण ॥ अहंकार जाण जीवासी ॥ ९४ ॥ अहं कर्ता अहं भोक्ता ॥ हेचि मूर्खाची दृढबद्धता ॥ तें प्रकृतिकर्म आपुले माथां ॥ नेघे ज्ञाता अभिमानें ॥ ९५ ॥ तेचि ज्ञात्याची निरभिमानता ॥ तुज म्यां सांगीतली आतां ॥ इंद्रियां विषयो भोगवितां ॥ आपुली अभोक्तृता[2] तो जाणे ॥ ९६ ॥ आपुली छाया विष्ठेवरी पडे ॥ अथवा पालखीमाजी चढे ॥ तो भोगू आपणियां न घडे ॥ तैसेंचि देह कोरडें मुक्तांसी ॥ ९७ ॥ मज तो व्हावी विषयप्राप्ती ॥ हेंही ज्ञाते न वांछिती ॥ विषय मिथ्यात्वें देखती ॥ जेवीं कां संपत्ती स्वप्नींची ॥ ९८ ॥ यालागीं असोनियां देहीं ॥ तो नित्यमुक्त विदेही ॥ उद्धवा ऐसें कल्पिशीं कांहीं ॥ तो दृष्टांत पाही सांगेन ॥ ९९ ॥ आकाश सर्वांमाजी असे ॥ सर्वपदार्थीं लागलें दिसे ॥ परी एकेही पदार्थदोषें ॥ मलिन कैसें हो नेणें ॥ ४०० ॥ त्या गगनाचे परी पाही ॥ ज्ञाता असोनियां देहीं ॥ देहकर्मांच्याठायीं ॥ अलिप्त पाही सर्वदा ॥ १ ॥ प्रचंड आणोनि पाषाणीं ॥ आकाश नचेंपे चेंपणीं ॥ तेवीं क्षोभलियाही प्रकृतिगुणीं ॥ ज्ञाता जडपणीं नबांधवे[3] ॥ २ ॥ आकाश असोनियां जनीं ॥ कदा रुळेना जनघसणीं ॥ तैसा प्रकृतिकर्मीं वर्तोनी ॥ प्रकृतिगुणीं अलिप्त ॥ ३ ॥ गगन जळीं बुडालें दिसे ॥ परी तें जळामाजी कोरडें असे ॥ तेवीं पुत्रकलत्रीं ज्ञाता वसे ॥ तेणें दोषें अलिप्त ॥ ४ ॥ आकाशां मषी[4] लावूं जातां ॥ मषी माखे तो लाविता ॥ तेवीं मुक्तांसि दोषी ह्मणतां ॥ दोष सर्वथा ह्मणत्यासी ॥ ५ ॥ शीत उष्ण पर्जन्यधारा ॥ अंगीं न लागती अंबरां ॥ तेवीं नानाद्वंद्वसंभारा ॥ मुक्तांचा उभारा निर्द्वंद्व ॥ ६ ॥ येऊनि नाना मेघपडळें ॥ विजूगर्जनें गगन झांकोळे ॥ त्यामाजी असोनि त्यावेगळें ॥ गगन नातळे मेघाशी ॥ ७ ॥ तेवीं मोहममतेच्या कडाडी ॥ मुक्तांसि करिती ताडातोडी ॥ ते तंव त्यास नलगे वोढी ॥ परापरथडी अलिप्त ॥ ८ ॥ गगनासि आगी लावूं जातां ॥ अग्नि विझोनि जाय सर्वथा ॥ तेवीं त्रिगुणीं मुक्तासि बद्धतां[5] ॥ गुणीं सगुणता[6] निमाली ॥ ९ ॥ प्रळयवायूचेनि झडाडें ॥ आकाश निज

---

[1] नाहींसा झाला. [2] अलिप्तता. [3] बांधला जात नाहीं. [4] काजळ. [5] बंधन. [6] सगुणपणा.

स्वभावें नुडे ॥ सगळा वायू गगनीं बुडे ॥ पाहतां नातुडे गगनींही ॥ ४१० ॥ तेवीं अविद्या निजस्वभावतां ॥ मुक्तांसि न करवे बद्धता ॥
अविद्या नांवें मिथ्या वार्ता ॥ मुक्त तत्त्वतां देखेना ॥ ११ ॥ गगनाच्या ऐशी अलिप्तता ॥ सर्वकर्मीं वर्त्ते ज्ञाता ॥ जनीं अलिप्त वर्ते
सविता ॥ तेवीं मुक्तता अवधारीं ॥ १२ ॥ घृतमद्यजळां आतौता ॥ बिंबोनि अलिप्त सविता ॥ तेवीं बाल्य तारुण्य वृद्धता ॥ वयसा
चाळिता अलिप्त ॥ १३ ॥ नातरी सूर्याचेनि प्रकाशें ॥ शुभाशुभ कर्म वाढलें असे ॥ सविता[1] अलिप्त तेणें दोषें ॥ निजप्रकाशें प्रकाश
कू ॥ १४ ॥ तेवीं आश्रमधर्मीं असतां ॥ नित्यादिकर्मैं आचरितां ॥ मुक्तांसि नाहीं कर्मबद्धता ॥ अकर्तात्मता निजबोधें ॥ १५ ॥ सूर्यकां
तीं सविता ॥ अग्नि उपजवूनि अकर्ता ॥ तैसा निजतत्त्वाचा ज्ञाता ॥ करोनि अकर्ता कर्मांसी ॥ १६ ॥ जळीं सविता प्रतिबिंबला ॥
परी तो नाहीं वोला झाला ॥ तैसा स्त्रीसंगें प्रजा व्याला ॥ नाहीं मुकला ब्रह्मचर्या ॥ १७ ॥ सवित्याचें अलिप्तपण ॥ तें निरूपिलें निरू
पण ॥ आतां देहीं असोनि अलिप्तपण ॥ तेंहीं लक्षण अवधारीं ॥ १८ ॥ जेवीं देहामाजी असे प्राण ॥ प्राणास्तव देह[2]चलन ॥ देहदो
षा नातळे प्राण ॥ अलिप्त जाण सुखदुःखा ॥ १९ ॥ तैसा मुक्त असोनि संसारीं ॥ संसारव्यवहार सर्व करी ॥ परी संसारदोष अंगा
वरी ॥ तिळहीभरी असेना ॥ ४२० ॥ वायू सर्वांतें स्पर्शत ॥ परी स्पर्शदोषासि अलिप्त ॥ तेवीं अहंममता नातळत ॥ मुक्त वर्तत देह
गेहीं ॥ २१ ॥ वायूसि जेवीं सर्वत्र गमन ॥ परी कोठें आसक्त नव्हे जाण ॥ तेवीं विषयीं नहोनि आपण ॥ विषयसेवन मुक्तांचें ॥ २२ ॥
वायूसि एकेठायीं नाहीं वस्ती ॥ मुक्तांसि देहगेहीं नाहीं आसक्ती ॥ वायूसि नभा[3]माजी विश्रांती ॥ मुक्तांसि गुणातीतीं[4] विश्राम ॥ २३ ॥
एवढें जें अगाधपण ॥ तें मुक्तांचें मुक्तिकारण ॥ उद्धवासि ह्मणे श्रीकृष्ण ॥ प्रथम जाण विवेकू ॥ २४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ वैशारद्येक्ष
याऽसंगशितया छिन्नसंशयः ॥ प्रतिबुद्ध इव स्वप्नान्नानात्वाद्विनिवर्तते ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ ॥ विवेकें बुद्धि अतिसंपन्न ॥ तिसी उपजे
नित्यानित्यज्ञान ॥ परी तें खिरगोटलें असे जाण ॥ वैराग्येंवीण वाढेना ॥ २५ ॥ विवेकेंवीण वैराग्य गहन ॥ तें केवळ आंधळें जाण ॥
तेणें आपुलें निजात्मपतन ॥ अंधकूपीं[5] जाण तें पडे ॥ २६ ॥ मातलें हतिरू अंध ॥ सैरा धांवे सुबद्ध ॥ नेणें निजात्मपतनबाध ॥ तेवीं
वैराग्यमंद विवेकेंवीण ॥ २७ ॥ जेथें विवेकवैराग्यसंयोग ॥ तेथें नित्यसंग्रह अनित्यत्याग ॥ तेचि सद्विद्यालक्षण खड्ग ॥ झळकत
चांग नैराश्यें[6] ॥ २८ ॥ तेंचि गुरुवचन साहाणेसीं ॥ लावूनि अतितीक्ष्ण केलें त्यासी ॥ घांयें छेदिलें संशयासी ॥ संकल्पविकल्पेंसी
समूळ ॥ २९ ॥ असंभावना विपरीतभावना ॥ निःशेष तुटलिया वासना ॥ निजस्वरूपीं तेव्हां आपणा ॥ जागेपणा तो आला ॥ ४३० ॥

---

[1] सूर्य. [2] देहाचे व्यापार. [3] आकाशांत. [4] गुणरहितठिकाणीं. [5] अंधार पडलेल्या विहिरीत. [6] निराशेनें.

जो अविद्यालक्षण दीर्घ स्वप्न ॥ नानातत्त्वें भोगितां आपण ॥ तो अद्वैतीं जागा झाला जाण ॥ कृपाथापटण गुरुवचनें ॥ ३१ ॥ तेव्हां नांनात्वासीं[1] नाहीं ठावो ॥ मी माझें हें झालें वांवो[2] ॥ फिटला अविद्याभेदसंदेहो ॥ आत्मानुभवों तो भोगी ॥ ३२ ॥ जागा झाल्या स्वप्न भासे ॥ परी तें मिथ्या झालें अनायासें ॥ मुक्तांसि जग तैसें दिसे ॥ यालागीं तेणें दोषें अलिप्त ॥ ३३ ॥ एवं मुक्तांचें जें जें वर्तन ॥ तें अलिप्तपणें ऐसें जाण ॥ कथं वर्तते हा प्रश्न ॥ प्रसंगें लक्षण सांगीतलें ॥ ३४ ॥ कथं विहरेतू या प्रश्नाचें ॥ उत्तर ऐकावया साचें ॥ उद्यत मन उद्धवाचें ॥ जाणोनि जीवींचें हरि बोले ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यस्य स्युर्वीतसंकल्पाः प्राणेंद्रियमनोधियाम् ॥ वृत्तयः स विनिर्मुक्तो देहस्थोऽपि हि तद्गुणैः ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ विद्यमान[3]देहीं असतां ॥ देहस्थ गुण नातळती मुक्ता ॥ पापपुण्यादि हे कथा ॥ सुखदुःखवार्ता तो नेणें ॥ ३६ ॥ सांडिल्या संकल्पविकल्पांसी ॥ कल्पांतींही नातळे त्यांसी ॥ जेवीं कां ओकिल्या ओकासी ॥ परतोनि कोणासी न घेववे ॥ ३७ ॥ यालागीं मन बुद्धि इंद्रिय प्राण ॥ मुक्तांचीं झालीं संकल्पशून्य ॥ यालागीं पापपुण्य ॥ नलगे जाण मुक्तांसीं ॥ ३८ ॥ इंद्रियें[4] विषयक्रीडन ॥ करितां संकल्पशून्य ॥ मुक्तासि मनपणें नाहीं मन ॥ वृत्तिशून्य यालागीं ॥ ३९ ॥ बाळक लेणया प्रमाण नेणे ॥ तरी अंगीं लेइलेपणें ॥ तेवीं कर्में विगुंतलीं करणें ॥ मुक्त अकर्तेपणें अलिप्त ॥ ४४० ॥ संकल्पविरहित विहार ॥ तोचि मुक्त जाण पां साचार ॥ कथं विहरति[5] हें उत्तर ॥ थोडेनिपणें सांगीतलें ॥ ४१ ॥ म्या सांगीतलीं जीं जीं लक्षणें ॥ तीं तीं मुक्तांचीं मुक्तच जाणे ॥ आणिकासी व्युत्पत्तिपणें ॥ मुक्त जाणणें हें नघडे ॥ ४२ ॥ सकळ वेदशास्त्रसंपन्न ॥ त्यासिही मुक्त नकळे जाण ॥ देहीं असे ज्यासि देहाभिमान ॥ त्यासि मुक्तलक्षण कळेना ॥ ४३ ॥ म्यां बोलिलें लक्षणांची पोथी ॥ साक्षेपें घेऊनि हातीं ॥ जरी हिंडिन्नला त्रिजगतीं ॥ तरी मुक्तांची स्थिती कळेना ॥ ४४ ॥ जेणें साचार मुक्त जाणीतला ॥ तोही सत्य जाण मुक्त झाला ॥ अनुमानयोग्यतेच्या बोला ॥ मुक्त जाणवला हें मिथ्या ॥ ४५ ॥ जेणें सूर्य देखिला यथार्थता ॥ तो जग देखे तत्प्रकाशता ॥ तेणें मुक्त जाणीतला तत्त्वतां ॥ तो मुख्य मुक्तता जग देखे ॥ ४६ ॥ तेथ हा मुक्त हा बद्ध ॥ देखणें हें अतिअबद्ध ॥ ऐसें देखती ते महामंद ॥ अज्ञानांध[6] अज्ञानी ॥ ४७ ॥ मुक्त नकळे सर्वथा ॥ ऐसें बोलणें ऐकतां ॥ उद्धवासि हों लागली चिंता ॥ तें कृष्णनाथा कळों सरलें ॥ ४८ ॥ मागां सांगीतलीं मुक्तलक्षणें ॥ ते मुक्तांचीं मुक्तचि जाणें ॥ लौकिकीं मुक्त कळे जेणें ॥ तींही लक्षणें परियेसी ॥ ४९ ॥ आश्वासावया[7] उद्धवाचें मन ॥ मुक्ताचें जाण तें लक्षण ॥ सांगेन ह्मणे श्रीकृष्ण ॥ येरू सावधान सर्वस्वें ॥ ४५० ॥ कळती मुक्तांचीं लक्षणें ॥ उद्धव ऐका

---

[1] बहुप्रकाराला. [2] व्यर्थ. [3] असलेल्या शरीरांत. [4] कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें. [5] विहार करितो. [6] अज्ञानामुळें अंध झालेले. [7] धीर द्यावयास.

वया उत्तम मनें ॥ तें जाणोनियां श्रीकृष्णें ॥ विचित्रनिरूपणें निरूपी ॥ ५१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यस्यात्मा हिंस्यते हिंस्रैर्येन किंचिद्यदृच्छया ॥ अर्च्यते वा क्वचित्तत्र न व्यतिक्रियते बुधः ॥१५॥ ॥ टीका ॥ ॥ ज्याचिया देहासि जाण ॥ हिंसा करिती हिंसक जन ॥ छेद[1] भेद दंड मुंडण ॥ गर्जन तर्जन जरी केलें ॥ ५२ ॥ तरी ते देहाची व्यथा ॥ मुक्तांसि नाहीं सर्वथा ॥ नानाउपचारीं पूजितां ॥ नेघे श्लाघ्यता[3] सन्मान ॥ ५३ ॥ देहीं वर्तमान असतां ॥ देहबुद्धि नाहीं सर्वथा ॥ त्यासीच बोलिजे जीवन्मुक्तता ॥ यालागीं देहव्यथा त्या नाहीं॥५४॥जैशी पुरुषासवें छाया असे॥पुरुषयोगें चळती दिसे ॥ ते छायेची अहंममता[4] नसे॥ निजमानसें पुरुषासी ॥५५॥ तैसाचि मुक्तांचा देहो ॥ मुक्तांसवें वर्ते पहाहो ॥ परी त्यासि नाहीं अहंभावो॥ हा नित्यस्वभावो मुक्तांचा॥५६॥त्यासि चोरू हेरू कातरू ॥ म्हणोनि दंड केला थोरू ॥ कां पूजिला ईश्वरू ॥पुरुष म्हणोनी॥५७॥ परी पूजितां कां गांजितां॥ त्याची दंडळीना समता ॥ जेवीं छायेची मानापमानता ॥ न करी व्यथा पुरुषासी ॥५८॥ देह व्याघ्रमुखीं सांपडला ॥ दैवें पालखीमाजी चढला ॥ तो हर्षविषादा[5] नाहीं आला ॥ समत्वें झाला निर्द्वंद्व[6] ॥ ५९ ॥ देहो घावया नेतां सुळीं ॥ मी मरतों ऐसें न कळवळी ॥ कां गजस्कंधीं पूजिल्या सकळीं ॥ तेणें सुखावली वृत्ती नव्हे ॥ ४६० ॥ सुखदुःखादि नानाव्यथा ॥ आगमापायीं आविद्यकता ॥ देहाचें मिथ्यात्व[7] जाणता ॥ यालागीं व्यथा पावेना ॥ ६१ ॥ अतिसन्मान जेथें देखे ॥ तेथें न राहे तेणें सुखें ॥ अपमानाचिये आडके ॥ देखोनि न फडके भयाभीतू ॥ ६२ ॥ देहासि नानाविपत्ती होये ॥ तेंही त्या देहाचें कौतुक पाहे ॥ देह मी मज व्यथा आहे ॥ हेंही ठावें नोहे मुक्तासी ॥ ६३ ॥ येथवर देहातीतता ॥ दृढ बाणली जीवन्मुक्ता ॥ यालागीं देहदुःखाची कथा ॥ त्यासी सर्वथा बाधेना ॥ ६४ ॥ नानाजनपदवार्ता ॥ अतिस्तवनें स्तुति करितां ॥ कां स्पर्शवचनीं निंदितां ॥ मुक्तांसी व्यथा उपजेना ॥ ६५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ न स्तुवीत न निंदेत कुर्वतः साध्वसाधु वा ॥ वदतो गुणदोषाभ्यां वर्जितः समदृङ्मुनिः ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ निंदेच्या तिखटबाणीं ॥ दृढ विंधिल्या दुर्जनीं ॥ हे असाधू हें नुपजे मनीं ॥ न बोले वचनीं तो दोष ॥ ६६ ॥ भाविक सात्विक साधू ॥ मिळोनि करिती स्तुतिवादू ॥ तूं ईश्वरीपुरुष शुद्धू ॥ हा गुणानुवादू ऐकोनी ॥ ६७ ॥ मी मुक्त हें नुपजे मनीं ॥ उंच नीच न देखे जनीं ॥ हे साधु लोक भले गुणी ॥ हे मुक्ताची वाणी वदेना ॥ ६८ ॥ साधु असाधु पाहतां जनीं ॥ तो ब्रह्मरूप देखे दोनी ॥ देखतेंदेखतें दृढपणीं ॥ निजात्मदर्शनीं निजबोध ॥ ६९ ॥ तेथ कोणाची करावी निंदा ॥ कोणाच्या करावें गुणानुवादा ॥ मीचि विश्व हें आलें बोधा ॥ स्तुति निंदा निमाली ॥ ४७० ॥ त्यासि आत्मसाक्षात्कारीं विश्राम ॥ नित्य निजात्म[9]

---

१ तोडणें. २ केश काढणें. ३ मोठेपण. ४ मी माझें असा भाव. ५ आनंद व खेदाला. ६ भेदरहित. ७ नाशिवंतपणा. ८ दुष्टभाषणांनीं. ९ आपल्या आत्म्याच्या ठिकाणीं.

पदीं आराम ॥ साधु असाधू हा फिटला भ्रम ॥ स्वयें आत्माराम तो झाला ॥ ७१ ॥ असाधुत्वें निंदावें ज्यासीं ॥ तंव आत्मस्वरूपें देखे त्यासीं ॥ साधु ह्मणोनि वर्णितां गुणासी ॥ देखे त्यासी निजरूपें ॥ ७२ ॥ उजव्या वंद्यत्वें शुद्धभावो ॥ डाव्या निंद्यत्वें निजनिर्वाहो ॥ पुरुषासि दोहींचा समभावो ॥ वंद्य निंद्य पाहाहो समत्वें तैसे ॥ ७३ ॥ तेथें साधु असाधु अनुवादा ॥ वर्जिली स्तुती आणि निंदा ॥ समत्वें पावला समपदा ॥ सुखस्वानंदाचेनि बोधें ॥ ७४ ॥ मुक्तांची हे वोळखण ॥ यापरी उद्धवा तूं जाण ॥ आतां आणिकही लक्षण ॥ तुज मी खूण सांगेन ॥ ७५ ॥ प्रकट मुक्ताचें लक्षण ॥ म्या तुज सांगीतलें जाण ॥ तें लौकिकीं मानी कोण ॥ विकल्प गहन जगाचे ॥ ७६ ॥ प्रारब्ध[1]वशास्तव जाण ॥ एकादें अंवचट[2] दिसे चिह्न ॥ इतुक्यासाठीं मुक्तपण ॥ मानी कोण जगामाजी ॥ ७७ ॥ मुक्ता मुक्तपणाची पदवी[3] ॥ सर्वथा जगामाजी लपवी ॥ जो आपुली मुक्तता मिरवी ॥ तो लोभस्वभावी दांभिक ॥ ७८ ॥ शुक वामदेव मुक्त ह्मणतां ॥ सर्वांसि न ह्मणवे सर्वथा ॥ मा इतराची काय कथा ॥ माझीही मुक्तता न मानिती ॥ ७९ ॥ म्या गोवर्धन उचलिला ॥ म्या दावाग्नी प्राशिला ॥ अघ बक विदारिला[4] ॥ प्रत्यक्ष नाशिला काळया ॥ ४८० ॥ जों जों हा देहाडा ॥ तों तों नीत नवा पवाडा ॥ निजसुखाचा उघडा ॥ केला रोकडा सुकाळ ॥ ८१ ॥ त्या माझें मुक्तपण ॥ न मानिती याज्ञिक ब्राह्मण ॥ इतरांची कथा कोण ॥ विकल्प दारुण लौकिकीं ॥ ८२ ॥ यालागीं मुक्तांचें मुक्तपण ॥ मुक्तचि जाणें आपण ॥ इतरांसि नकळे तें लक्षण ॥ अतिविचक्षण[5] जरी झाला ॥ ८३ ॥ मुक्त लौकिकीं वर्तत ॥ जड मूढ पिशाचवत ॥ तीं ही चिन्हें समस्त ॥ ऐक निश्चित सांगेन ॥ ८४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ न कुर्यान्न वदेत्किंचिन्न ध्यायेत्साध्वसाधु वा ॥ आत्मारामोऽनया वृत्त्या विचरेज्जडवन्मुनिः ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ कायिक वाचिक मानसिक ॥ उद्देशें[6] कर्म नकरी एक ॥ जें निपजे तें स्वाभाविक ॥ अहेतुक या नांव ॥ ८५ ॥ हेतु ठेवूनि गुणागुणीं ॥ स्तुतिनिंदेची बोलणीं ॥ सांडोनियां झाला मौनी ॥ परी मौनाभिमानीं हेतु नाहीं ॥ ८६ ॥ जरी तो झाला मौनाभिमानी ॥ तरी मुक्त पडला बंधनीं ॥ यालागीं बोलणें न बोलणें दोन्ही ॥ सांडूनि मौनी तो झाला ॥ ८७ ॥ अवघ्या वृत्तीनें जाण ॥ करावें असंतनिरसन[7] ॥ मग सद्वस्तूचें ध्यान ॥ अखंड जाण करावें ॥ ८८ ॥ तंव पावली सद्गुरूची खूण ॥ उडालें ध्येय ध्याता ध्यान ॥ बुडालें भेदाचें भेदभान ॥ चैतन्यघन कोंदला ॥ ८९ ॥ मेळवूनि शास्त्रांचा भारा ॥ बांधला सत्यासत्य बांधारा[8] ॥ तो चैतन्याच्या महापूरा ॥ माजी खरा विराला ॥ ४९० ॥ तेव्हां बुडलें सत्यासत्यभान ॥ निबिड दाटलें चैतन्यघन ॥ मोडलें मनाचें मनपण ॥ वृत्तिशून्य अवस्था ॥ ९१ ॥ मनें ध्यावें चैतन्यघन ॥ तंव चैतन्यचि

---

१ दैवानें. २ चमत्कारिक. ३ मार्ग. ४ मारिला. ५ ज्ञाता. ६ इच्छेनें. ७ मिथ्यापदार्थांचें दूरीकरण. ८ पाट.

झालें मन ॥ सहजचि खुंटलें ध्यान ॥ हें मुख्य लक्षण मुक्काचें ॥ ९२ ॥ चैतन्यीं हरपलें[1] चित्त ॥ जड मूक पिशाचवत ॥ लौकिकीं वर्ततां दिसे मुक्त ॥ जाणा निश्चित उद्धवा ॥ ९३ ॥ नैष्कर्म्य ब्रह्म पावला दृढ ॥ अंतरीं निजबोधें अतिगोड ॥ बाह्य लौकिकीं दिसे जड ॥ अचेतन[2] दगड होऊनि असे ॥ ९४ ॥ उठी बैसी करितें मन ॥ तें स्वरूपीं झालें लीन ॥ पडले ठायींहूनि नुठी[3] जाण ॥ यालागीं जडपण आभासे ॥ ९५ ॥ शब्दब्रह्म गिळोनि वेगें ॥ निःशब्द वस्तु झाला अंगें ॥ निंदास्तुतीचें नाव नेघे ॥ मुका सर्वांगें सर्वदा ॥ ९६ ॥ ब्रह्म सर्वथा न बोलवें कोणा ॥ जरी सांगवे तरी दाखवी खुणा ॥ यालागीं मुका ह्मणती जाणा ॥ अबोलणा[4] स्तुतिनिंदा ॥ ९७ ॥ द्रव्यलोभ नाहीं चित्तीं ॥ कदा द्रव्य नातळती ॥ यालागीं लोक पिशाच ह्मणती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ९८ ॥ नवल त्याचें पिसेपण[5] ॥ जगास नकरवे जें प्राशन ॥ ते वस्तूचें करी अपेयपान ॥ अभक्ष्य जाण भक्षितूं ॥ ९९ ॥ जेथ जगासीं गमन नव्हे जाण ॥ तेथें हा करी अगम्यागमन ॥ जगाचें जेथ नरिघे मन ॥ तेथ सर्वांगें जाण हा वेंघे ॥५०० ॥ नधरी विधिनिषेधविभाग ॥ नकरी कर्माकर्मांचा पांग ॥ स्वानंदें नाचवी सर्वांग ॥ यालागीं जग पिसें ह्मणे ॥ १ ॥ एवं जड मूढ मूक पिशाच ॥ समूळ लक्षणीं तोचि साच ॥ मिथ्या नव्हती अहाचवहाच ॥ वृथा कचकच तो नेणें ॥ २ ॥ जाणपां मुक्तांच्या ठायीं ॥ कोणे विषयीं आग्रह नाहीं ॥ जो अतिशयेंसि आग्रही ॥ तो बद्ध पाही निश्चित ॥ ३ ॥ जीं बोलिलीं मुक्तांचीं लक्षणें ॥ तींचि साधकाचीं साधनें ॥ सिद्धासि असती सहजगुणें ॥ साधकें करणें ग्रहनिष्ठा ॥ ४ ॥ बोलिलीं या लक्षणा ॥ सिद्धचि भोक्ता जाणा ॥ साधकूहि येथ लहाणा ॥ जो या साधनां साधूं जाणे ॥ ५ ॥ इतर जे पंडिताभिमानी ॥ आह्मी शास्त्रज्ञ ज्ञाते ह्मणूनी ॥ ते वाळिले[6] येथूनी ॥ जेवी सज्जनीं दुर्बुद्धी ॥ ६ ॥ जो न साधी येथिच्या साधना ॥ कोरडा शास्त्राभिमानी जाणा ॥ सदा वांछितां धनमाना ॥ तो येथिच्या ज्ञाना अलिप्त ॥ ७ ॥ आह्मी कर्मकुशळ याज्ञिक ॥ शास्त्रसंपन्न वेदपाठक ॥ सदा अर्थकामकामुक ॥ त्यांसी हें सुख अप्राप्त[8] ॥ ८ ॥ तिहीं जे कष्ट केले सर्वथा ॥ ते समस्त जाण झाले वृथा ॥ उद्धवा तेही विषयीं तत्त्वतां ॥ ऐक आतां सांगेन ॥ ९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शब्दब्रह्मणि निष्णातो न निष्णायात्परे यदि ॥ श्रमस्तस्य श्रमफलो ह्यधेनुमिव रक्षतः ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ ॥ शब्दब्रह्म वेदशास्त्रार्थ ॥ पढोनि वाचोनि अंतीं पंडित ॥ चारी वेद मूर्तिमंत ॥ सदा तिष्ठत वाचेसी ॥ ५१० ॥ संहिता पद क्रम स्वरयुक्त ॥ अरण ब्राह्मण सूत्र निरुक्त ॥ जटावळी ध्वजरथ ॥ पढों जाण वर्णक ॥ ११ ॥ आयुर्वेद धनुर्वेद ॥ गांधर्ववेदींचा जाण भेद ॥ काव्यनाटकीं अतिशुद्ध ॥ वेद उपवेद तो जाणे ॥ १२ ॥ व्याकरणीं अतिनेटक ॥ सांख्य

---

१ लीन झालें. २ निर्जीव. ३ उठेना. ४ न बोलणारा. ५ वेडेपण. ६ दूर टाकिले. ७ भास होत नाहीं. ८ वागवात.

पातंजळ जाणे तर्क ॥ शास्त्र जाणे वैशेषिक ॥ कर्ममीमांसक यज्ञांत ॥ १३ ॥ विरण वाचस्पति वेदांत ॥ शास्त्र जाणे वार्तिकांत ॥ तिन्हीं प्रस्थानें मूर्तिमंत ॥ पुढां तिष्ठत योगत्वें ॥ १४ ॥ शिल्पशास्त्रीं अतिनिपुण ॥ सूपशास्त्रामाजी प्रवीण ॥ रत्नपरीक्षालक्षण ॥ जाणे आपण वाजिवाह ॥ १५ ॥ आगमीं नेटका मंत्रतंत्रीं ॥ शैववैष्णवदीक्षेची परी ॥ सौर शाक्त अभिचारी ॥ नानामंत्रीं प्रवीण ॥१६॥ कोकशास्त्रींची अधिष्ठात्री ॥ अतिप्रवीण संगीतशास्त्रीं ॥ प्रबंध करूं जाणे कुसरी ॥ राजमंत्रीं राजसु ॥ १७ ॥ निघंटु वसे प्रज्ञेपुढां ॥ चमत्कार जाणे गारुडा ॥ पंचाक्षरी अतिगाढा ॥ वैद्य धडफुडा रसज्ञ ॥ १८ ॥ रसौषधी साधावी तेणें ॥ भूत भविष्य ज्योतिष जाणे ॥ अमरकोश अभिधानें ॥ अठरा पुराणें मुखोद्गत ॥१९॥ प्रश्नावली पाहोंजाणें ॥ स्वप्नाध्याय सांगावे तेणें ॥ इतिहासादि प्रकरणें ॥ जाणे लक्षणें गर्भाचीं ॥ ५२० ॥ शब्दज्ञानाची व्युत्पत्ती ॥ जाणे साधक बाधक युक्ती ॥ समयाची समयीं स्फूर्ती ॥ अपार बृहस्पती बोलावया ॥ २१ ॥ जेवीं तळहातींचा आंवळा ॥ तेवीं ब्रह्मज्ञान बोले प्रांजळा ॥ परी अपरोक्षसाक्षात्कारीं आंधळा ॥ नेणे जिव्हाळा नेर्थीचा ॥ २२ ॥ मोराअंगीं अतिडोळसे ॥ अंगभरी भरलीं पिसें ॥ एके दृष्टीवीण आंधळे जैसे ॥ जाहलें तैसें विद्वांसा ॥ २३ ॥ जेथूनि क्षीर सँवतो सड ॥ तेथें लागोनि गोचिड ॥ अशुद्ध सेविती अतिमूढ ॥ तेवीं विद्वांस दृढ विषयांसी ॥ २४ ॥ गोचिडाचे मुखीं क्षीर रिघे ॥ तो अशुद्धावांचोनि तें नेघे ॥ तेवीं ज्ञान विकूनि अंगें ॥ विद्वांस मागे विषयातें ॥२५॥ सांडूनि सुगंधचंदनासीं ॥ आवडीं दुर्गंधा धांवे माशी ॥ तेवीं सांडूनि निजात्मज्ञानासी ॥ पंडित विषयासी झोंबत ॥ २६ ॥ असोनि कमळ आमोदापाशीं ॥ दर्दुर सेविती कर्दमासी ॥ तेवीं सांडूनि निजात्मज्ञानासी ॥ पंडित विषयासी लोलुप ॥ २७ ॥ करूनि अद्वैतव्युत्पत्ती ॥ तें ज्ञान विकूं देशांतरा जाती ॥ मूर्ख जात्यातें उपहासिती ॥ तरी वांछिती सन्मान ॥ २८ ॥ सांगतां ब्रह्मनिरूपण ॥ सात्विकाचें परमार्थीं मन ॥ व्याख्याता तो वांछी धन ॥ विपरीत ज्ञान विद्वांसा ॥२९॥ सांगे आँन करी आन ॥ तेथें कैंचें ब्रह्मज्ञान ॥ जेथ वसे धन मान ॥ तेथ आत्मज्ञान असेना ॥५३०॥ दृढ धन मान करोनि पोटीं ॥ सांगतां ब्रह्मज्ञानगोठी ॥ त्यास आत्मसाक्षात्कार भेटी ॥ नव्हे कल्पकोटी गेलिया ॥ ३१ ॥ नानापद व्युत्पत्तिविंदान ॥ एके श्लोकीं दशधा व्याख्यान ॥ पोटीं असतां मानाभिमान ॥ ब्रह्मज्ञान त्यां कैंचें ॥ ३२ ॥ मी पंडित अतिज्ञाता ॥ ऐशिया नागवलें अहंता ॥ जेवीं आंधळें नोळखे पिता ॥ नित्य असतां एकत्र ॥ ३३ ॥ तैशी गति विद्वांसासी ॥ नित्य असती आत्मसमरसीं ॥ तेंचि वाखाणिती अहर्निशीं ॥ परी त्या स्वरूपासी नेणती ॥ ३४ ॥ करावया विषयभरण ॥ केलें शास्त्रव्युत्पत्तिव्याख्यान ॥ ते वृथा

---

१ योगशास्त्र. २ न्यायशास्त्र. ३ पाकशास्त्रांत. ४ अश्वशास्त्र. ५ शब्दकोश. ६ विद्वानांस. ७ सोडिती. ८ चिखलास. ९ आसक्त. १० एक.

कष्ट गेले जाण ॥ जेवीं वंध्याधेन[1] पोशिली ॥ ३५ ॥ जे कधीं वोळेना फळे ॥ सुटली तरी सैरां पळे ॥ नित्य वोढाळी राजमळें ॥ तें दुःख
आदळे स्वामीसी ॥ ३६ ॥ तैशी गति राजमान्याची ॥ व्युत्पत्तीं पोशिलें वाचेसी ॥ तो वोढाळ जाळी विषयासी ॥ ज्याचि त्यासीं नावरे ॥ ३७ ॥ जेवीं कां निर्दैवाहातीं ॥ कनक[2] पडल्या होय माती ॥ तेवीं पंडितमान्याची व्युत्पत्ती ॥ विषयासक्ती नाशिली ॥ ३८ ॥ द्विजा
दीधला भद्रजाती[3] ॥ त्यासि न पोसवे तो निश्चितीं ॥ मग फुकासाठीं विकिती ॥ तेवीं व्युत्पत्ती विद्वांसा ॥ ३९ ॥ अद्वैतशास्त्राची
व्युत्पत्ती ॥ हे त्यासि झाली अभयप्राप्ती ॥ जे विषयालागीं विकिती ॥ ते मूर्ख निश्चितीं विद्वांस ॥ ५४० ॥ मुखीं गूळ ऊंस घालिजे घाणा ॥
तो रस पिळूनि भरे मांदणा[4] ॥ फिका चोपटीं करकरी घाणां ॥ ते गति जाणा विद्वांसा ॥ ४१ ॥ विद्वांसा करितां ज्ञानकथन ॥ सारांश
सात्विकीं नेला जाण ॥ शब्दसोपटी करकरी वदन ॥ गोडपण तेथें कैंचें ॥ ४२ ॥ जेवीं कां नपुंसकाच्या करीं ॥ वोपिली पद्मिनी सुंदरी ॥
ते अखंड रडे जयापरी ॥ तेवीं विद्वांसाघरीं व्युत्पत्ती ॥ ४३ ॥ पाहे पां ब्रह्मज्ञानेंवीण ॥ शब्दज्ञानें संन्यासग्रहण ॥ केलें तेंही वृथा जाण
॥ जरी धारणाध्यान धरीना ॥ ४४ ॥ जैसी जैसी शब्दज्ञानव्युत्पत्ती ॥ तैशी न करितां स्थिती ॥ वर्तणें जें विषयासक्ती ॥ तैं निजमुखीं
माती घातली ॥ ४५ ॥ वेदशास्त्रसंपन्न झाला ॥ त्यावरी पोट भरूं लागला ॥ तरी तो उद्यमी[5] थोर झाला ॥ परी थित्या मुकला मुदलासी
॥ ४६ ॥ रत्न देऊनि कवडा घेतला ॥ कां अमृत देऊनि कांजी प्याला ॥ तैसा परिपाकु पंडितां झाला ॥ थित्या नागवला निजज्ञाना
॥ ४७ ॥ शब्दज्ञान जोडिलें कष्टें ॥ तेणेंचि साधनें परब्रह्म भेटे ॥ इटेसाठीं परीस पालटे[6] ॥ मूर्ख वोखटें मानिती ॥ ४८ ॥ पोट
भरावयाची युक्ती ॥ आपुली मिरवावया व्युत्पत्ती ॥ पत्रावलंबनें करिती ॥ द्वाराप्रती साधनाच्या ॥ ४९ ॥ जेवीं पोट भरावया भांड ॥
नानापरी वाजवी तोंड ॥ तेवीं नानाव्युत्पत्ती वाद वितंड ॥ करिती अखंड उदरार्थ ॥ ५५० ॥ करूनि व्युत्पत्ती शब्दब्रह्म ॥ जरी न साधिती
परब्रह्म ॥ तरी त्या श्रमाचेंही फळ श्रम ॥ जेवीं रत्नें उत्तम घाणा गाळी ॥ ५१ ॥ तेथें तेल ना पेंडी ॥ झाली रत्नाची रांखोडी[7] ॥
तैशीं विद्वांसें झालीं वेडीं ॥ श्रमें श्रमकोडी भोगिती ॥ ५२ ॥ श्रमें श्रमचि पावती ॥ दुःखें दुःखचि भोगिती ॥ हेंचि कथन बहु दृष्टांतीं ॥
उद्धवाप्रती हरि बोले ॥ ५३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ गां दुग्धदोहामसतीं च भार्यां देहं पराधीनमसत्प्रजां च ॥ वित्तं त्वतीर्थीकृतमंग वाचं
हीनां मया रक्षति दुःखदुःखी ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ ॥ दुग्धाचिया लोलुप्यता[8] ॥ भाकड[9] गाय दोहूं जातां ॥ शिंपीभरी दूध नये हातां ॥
हाणें लाता तत्काळ ॥ ५४ ॥ जे कुंडी कुचरडीवरी ॥ विषयमेळवणा अतिखाइरी ॥ अधर्मशीळ लातरी ॥ सर्वांपरी अन्हाड ॥ ५५ ॥

---

[1] वांझ गाय. [2] सोनें. [3] उत्तमलक्षणी गज. [4] नांदींत. [5] व्यापार करणारा. [6] मोबदला करितो. [7] नासाडी. [8] लोभानें. [9] न व्यालेली.

सुटली राजाघरीं भरे ॥ धर्मदंडें मागें न सरे ॥ सद्बुद्धि धरितां न धरे ॥ सैर चरे सुनाट ॥५६॥ जिचें कधीं नव्हे दुभतें ॥ जे धरूं नेणें
गर्भातें ॥ पोषितां ऐशा गायीतें ॥ पावे दुःखातें पोषक ॥ ५७ ॥ गृहिणी लागला गृहाचार ॥ तो अनुकूळ स्त्री नसतां नर ॥ अतिदुःखी
दुखिया थोर ॥ सदा करकर कपाळीं ॥ ५८ ॥ निंदा अवज्ञा[1] हेळण ॥ भ्रताराचें करी जाण ॥ स्वयें भक्षी मिष्टान्न[2] ॥ हें असंतलक्षण
स्त्रियांचें ॥ ५९ ॥ खातां जेवितां द्रव्य देतां ॥ गोड गोष्टीशीं सर्वथा ॥ धर्म देखोनि फोडी माथा ॥ तेही सर्वथा असंताची ॥ ५६० ॥ जे
न विचारिती पाप पुण्य ॥ कामाचारी धर्मशून्य ॥ हेंही असे तिचें लक्षण ॥ उद्धवा जाण निश्चित ॥ ६१ ॥ असो तिचिये संगतीं ॥ कैं
ची होईल सुखप्राप्ती ॥ अतिदुःखें दुःखी होती ॥ जाण निश्चितीं ते नर ॥ ६२ ॥ ज्याचें देह पराधीन ॥ तो जीवे जितां सदा दीन ॥ परा
धीना समाधान ॥ नव्हे जाण कल्पांतीं ॥ ६३ ॥ सांडोनि आपली निजसत्ता ॥ ज्यासी लागली पराधीनता[3] ॥ तो स्वप्नींही सुखाची वा
र्ता ॥ न देखे सर्वथा निश्चित ॥ ६४ ॥ पर ह्मणिजे माया जाण ॥ जो झाला तिचे आधीन ॥ त्यासि सुखाचें न दिसे स्वप्न ॥ दुःख सं
पूर्ण सर्वदा ॥ ६५ ॥ पराधीनासि सुख ॥ आहे ह्मणे तो केवळ मूर्ख ॥ सोलींव दुःखाचें दुःख ॥ अवश्य देख पराधीना ॥ ६६ ॥ ऐक प्र
जांचा विवेक ॥ एक पुत्र एक लेंक ॥ एक ते केवळ मूर्ख ॥ दुःखदायक पितरांसी ॥ ६७ ॥ जो नरकापासोनि तारी ॥ जो पूर्वजांतें उद्ध
री ॥ जो मातापित्यांची भक्ति करी ॥ अव्यभिचारी हरिरूपें ॥ ६८ ॥ जो सांडोनियां मातापिता ॥ जाऊं नेणें आणिके तीर्थां ॥ त्या
चेनि तीर्थें पवित्रता ॥ मानिती सर्वथा अनिवार ॥ ६९ ॥ जैशीं रमा[4] आणि नारायण ॥ तैशीं मातापिता मानी जाण ॥ चढत्या आ
वडीं करी भजन ॥ नुबगे[5] मन सेवेशी ॥ ५७० ॥ जो अतिसत्वें सात्विकू ॥ जो पितृवचनपाळकू ॥ जेणें धर्माधर्मविवेकू ॥ हा नैसर्गिकू[6]
स्वभावो ॥ ७१ ॥ जो मातापित्यांचे सेवेवरी ॥ आपआपणियातें तारी ॥ सकळ पूर्वजांतें उद्धरी ॥ तो संसारीं सुपुत्र ॥ ७२ ॥ ऐशिया
पुत्रांसि प्रतिपाळितां ॥ सुख पावे मातापिता ॥ पूर्वजांतें उद्धरिता ॥ स्वयें तरता पितृभक्ती ॥ ७३ ॥ झालिया सुपुत्रसंतती ॥ एवढी होय
सुखप्राप्ती ॥ आतां असत्प्रजांची[7] स्थिती ॥ ऐक तुजप्रती सांगेन ॥ ७४ ॥ मूळींचें पद असत्प्रज ॥ त्याचे वर्तणुकेची वोज ॥ सांगतां अ
त्यंत निर्लज्ज ॥ तेही मी तुज सांगेन ॥ ७५ ॥ पोटीं उपजले जे लेंक ॥ त्यांची वर्तणुक ऐशी देख ॥ आवडे कांता आणि कनक ॥ उपे
क्षिती निःशेख मातापिता ॥ ७६ ॥ जे कुडे कुचर कुलट ॥ जे कां अत्यंत शठ नष्ट ॥ जे अनाचारी कर्मभ्रष्ट ॥ अतिदुष्ट दुर्जन ॥७७॥
त्यांसि भांडवल लटिक ॥ लटकी घावी आण भाक ॥ मातापिता ठकवी देख ॥ सात्विक लोक नाडावे ॥ ७८ ॥ आपण नरका जावें

---

१ अपमान. २ गोड अन्न. ३ लोकाधीन असणें. ४ लक्ष्मी. ५ त्रासत नाहीं. ६ सहज. ७ वाईट संततींची.

ते जाती ॥ परी पूर्वज नेले अधोगती ॥ ऐशिया प्रजांतें प्रतिपाळिती ॥ ते दुःखें होती अतिदुःखी ॥ ७९ ॥ पोटामाजी उठिला फोडू ॥ त्यासि करितां नये फाडू ॥ तैसा असत्प्रजासंसार कडू ॥ दुःख दुर्वाडू भोगवी ॥ ५८० ॥ ऐशिया पुत्रांचें जितां दुःख ॥ मेल्यापाठीं देती नरक ॥ असत्प्रजांचें कौतुक ॥ दुःखेंदुःख अनिवार ॥ ८१ ॥ गांठीं असोनियां धन ॥ जो सत्पात्रीं[1] न करी दान ॥ तें सर्वदुःखाचें मूळ जाण ॥ दुःख दारुण धनलोभ्या ॥ ८२ ॥ धन अर्जावया[2] अनेक ॥ उपाय अपाय करिती लोक ॥ नाना क्लेश भोगोनि दुःख ॥ द्रव्य देख सांचिती ॥ ८३ ॥ प्रथम दुःख द्रव्य संचितां ॥ दुसरें दुःख द्रव्य रक्षितां ॥ स्त्री पुत्र प्रवर्तें घाता ॥ इतर कथा ते भिन्न ॥ ८४ ॥ सत्पात्रीं न करितां दान ॥ जेणें रक्षिलें यक्षधन[3] ॥ तेथें दुःखबाहुल्यें[4] उठे विघ्न ॥ धर्मरक्षण तेथ नाहीं ॥ ८५ ॥ ऐसेंही धन गेलियापाठीं ॥ अतिदुःखें भडका उठी ॥ धनवंत जन्मासाठीं ॥ दुःख कोटी भोगिती ॥ ८६ ॥ येवोनियां नरदेहासी ॥ अविकळ वाचा असे ज्यासी ॥ जो नुच्चारी[5] हरिनामासी ॥ पाप त्यापाशीं संचलें ॥ ८७ ॥ पुरिले लोहा[6] माती खाये ॥ तें उपेगा नये वायां जाये ॥ तैशी नामेंवीण वाचा पाहे ॥ वृथा जाये सर्वथा ॥ ८८ ॥ आसनध्यान परिश्रम ॥ न करूनि ह्मणे जो रामराम ॥ तेणें कोटिजन्मांचा हरे श्रम ॥ उत्तमोत्तम ते वाणी ॥ ८९ ॥ जो नित्य जपे रामनाम ॥ तो जाणावा मजचिसम ॥ तेणेंचि केले सकळही नेम ॥ पुरुषीं पुरुषोत्तम तो जाणा ॥ ५९० ॥ चतुर्वर्णांमाजी[7] जो कोणी ॥ अविश्रमू[8] राम जपे वाणीं ॥ तोचि पढियंता मजलागुनी ॥ आन त्रिभुवनीं नावडे ॥ ९१ ॥ ऐसें रामनाम नावडे ज्यासी ॥ तैं पापमुखरोग आला मुखासी ॥ तो स्वयें मुकला निजसुखासी ॥ आप आपणासी घातक ॥ ९२ ॥ रामनामेंवीण जें तोंड ॥ तें जाणावें चर्मकुंड ॥ भीतरी जिह्वा तें चामखंड ॥ असत्य कांटेड कांटली ॥ ९३ ॥ होकां हरिनामेंवीण जे वाणी ॥ ते गलितकुष्ठें झाली कुष्ठिणी ॥ असत्यकुष्ठाचें गेलें पाणी ॥ उठी पोहाणी निंदेची ॥ ९४ ॥ ऐशिया वाचेसि रोकडे ॥ पडती अधर्मांचे किडे ॥ चुळबुळती चहूंकडे ॥ मागें पुढें वळवळती ॥ ९५ ॥ ते वाचा होय ज्यासमोर ॥ देखे तों पाठीमोरा ठाके नर ॥ नांक झांकूनि ह्मणे हरहर ॥ लहान थोर थुंकिती ॥ ९६ ॥ ते वाचेची जे दुर्गंधी ॥ मजही न साहवे त्रिशुद्धी ॥ हे वाचा वाहे ते दुर्बुद्धी ॥ नामीं विमुख जे वाणी ॥ ९७ ॥ सोलींव दुःखाचें अतिदुःख ॥ त्या नराची वाचा देख ॥ केवळ निरय तें त्याचें मुख ॥ नामीं विमुख जे वाणी ॥ ९८ ॥ होकां वेदशास्त्रसंपन्न वाणी ॥ करूनि निंदकू नामकीर्तनीं ॥ तो पापी महापाप्याहूनी ॥ त्याचेन अवनी अतिदुःखी ॥ ९९ ॥ नामकीर्तनें धन्य वाणी ॥ येचिअर्थीं सारंगपाणी ॥ प्रवर्तला[9] निरूपणीं ॥ विशद[10] करूनी सांगावया ॥ ६०० ॥ ॥ श्लोक ॥ ॥

---

१ चांगल्या ब्राह्मणास. २ मिळवावयास. ३ कुबेराचें द्रव्य. ४ फारदुःखानें. ५ वेत नाहीं. ६ लोखंड. ७ चारवर्णांत. ८ निरंतर. ९ करूं लागला. १० स्पष्ट.

यस्यां न मे पावनमंग कर्म स्थित्युद्भवप्राणनिरोधमस्य ॥ लीलावतारेप्सितजन्म वा स्याद्वंध्यां गिरं तां बिभृयान्न धीरः ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ जगातें पवित्र करिती ॥ महादोषां हरिती ॥ माझीं नामकर्में गुणकीर्ती ॥ जड उद्धरती हरिनामें ॥ १ ॥ ह्मणसी तूं बोलिलासि निजवर्म ॥ मी विद्याअविद्यातीत ब्रह्म ॥ त्या तुज कैंचें गुण नाम कर्म ॥ कीर्तनधर्म केवीं घडे ॥ २ ॥ उद्धवा हें मनीं न धरीं ॥ मी स्वलीला स्वमायें करीं ॥ नानाअवतारांतें धरीं ॥ न करूनि करीं स्थित्यंत ॥ ३ ॥ त्रिगुण गुणी गुणावतार ॥ ब्रह्मा आणि हरि हर ॥ तिहीं रूपीं मीच साचार ॥ चराचर करीं हरीं[1] ॥ ४ ॥ स्रष्टृरूपें मी स्रजिता ॥ विष्णुरूपें मी प्रतिपाळिता[2] ॥ रुद्ररूपें मी संहर्ता[3] ॥ जाण तत्त्वतां मीचि एक ॥ ५ ॥ बाल्यतारुण्यवार्द्धक्यांसी ॥ एक पुरुष तिहीं अवस्थांसी ॥ तेवीं उत्पत्तिस्थितिप्रळयांसी ॥ गुणकर्मांसो मी कर्ता ॥ ६ ॥ मी कर्ताचि अकर्ता ॥ अकर्तेपणें कर्ता ॥ हें माझें मीचि जाणें तत्त्वतां ॥ आणिकासी सर्वथा कळेना ॥ ७ ॥ हींचि माझीं नामकर्में गातां ॥ माझी पदवी लाभे वक्ता ॥ माझे लीलावतार कीर्तितां ॥ कीर्तिमंता निजलाभू[4] ॥ ८ ॥ अवतारांमाजी उत्तमोत्तम ॥ श्रीरामकृष्णादिजन्मकर्म ॥ नानाचरित्रें संभ्रम ॥ अविश्रम जे गाती ॥ ९ ॥ सेतु बांधिला अवलीला[5] ॥ सागरीं तारिल्या शिळा ॥ गोवर्धन उचलिला हेळां ॥ दावानळा प्राशिलें ॥ ६१० ॥ ताटिका वधिली एकबाणीं ॥ पूतना शोषिली तानेपणीं ॥ अहल्या तारिली चरणीं ॥ विमलार्जुन दोन्ही उद्धरिले ॥ ११ ॥ रावण आदळला धनुष्य वाहतां ॥ तें भंगोनि[6] पर्णिली[7] सीता ॥ मंथूनि[8] चैद्यादिसमस्तां ॥ भीमकदुहिता[9] आणिली ॥ १२ ॥ मारिला सुबाहु खर दूषण ॥ अघ बक केशिया मारी श्रीकृष्ण ॥ सुग्रीव स्थापिला राज्य देऊन ॥ येरें उग्रसेन स्थापिला ॥ १३ ॥ मेळवूनि वानरांचा पाळा ॥ वधू[10] केला राक्षसकुळा ॥ मेळवून बाळां गोपाळां ॥ मल्लां सकळां मर्दिलें ॥ १४ ॥ रावणकुंभकर्णां केला मारू ॥ मारिला कंसचाणूरू ॥ रामें ठकिला वाळी वानरू ॥ ठकिला महावीरू काळयवन ॥ १५ ॥ रामें विभीषण स्थापिला ॥ कृष्णें धर्म संस्थापिला ॥ एक पितृवचनें वनां गेला ॥ एक घेऊनि आला गतपुत्र ॥ १६ ॥ हीं अवतारचरित्रें वर्णितां ॥ चोरटा वाल्मीकि झाला तत्त्वतां ॥ व्यास जारपुत्र सर्वथा ॥ केला सरता तिहीं लोकीं ॥ १७ ॥ या दोहीं अवतारांची पदवी ॥ वर्णितां दोन्ही झाले महाकवी ॥ व्यास वाल्मीकि वंदि जेवीं ॥ कीर्तिगौरवीं गौरविलें ॥ १८ ॥ त्या महाकवींची कवित्वकथा ॥ शेष नेत्रद्वारें श्रवण करितां ॥ दोनसहस्रनयनीं आइकतां ॥ धणी सर्वथा बाणेना ॥ १९ ॥ हेचि कथा स्वर्गाच्याठायीं ॥ श्रवण करावया पाहीं ॥ इंद्र लागे बृहस्पतीचे पायीं ॥ कीर्ति लोकत्रयीं वर्णिती ॥ ६२० ॥ असो कथेचें महिमान ॥ माझेनि नाममात्रें जाण ॥ तारिला

---

१ संहार करितों. २ रक्षण करणारा. ३ नाश करणारा. ४ आत्मलाभ. ५ सहज. ६ मोडून. ७ वरिली. ८ नाश करून. ९ रुक्मिणी. १० नाश.

अजामिळ ब्राह्मण ॥ गजेंद्रउद्धरण हरिनामें ॥ २१ ॥ पक्ष्याचे मिषें करूनी ॥ राम या दोंअक्षरस्मरणीं ॥ महादोषांची श्रेणी ॥ तत्काळ कुंटिणी तारिली ॥ २२ ॥ माझिया नामासमान ॥ नव्हे वेद शास्त्र शब्दज्ञान ॥ वेदशास्त्रांचा बोध जाण ॥ तैसें जाण नाम नव्हे ॥ २३ ॥ पठणमात्रें वेदशास्त्रवक्ता ॥ नव्हे मजमाजी येणेंचि सरता ॥ स्वभावें माझें नाम घेतां ॥ अतिपढियंता मज होय ॥ २४ ॥ वेदशास्त्रांचा अधिकारी ब्राह्मण ॥ नामासि अधिकारी चारी वर्ण ॥ जग उद्धरावया कारण ॥ नाम जाण पैं माझें ॥ २५ ॥ जेथ नित्य नामाचा उच्चार ॥ तेथें मी असें साचार ॥ येथ करणें नलगे विचार ॥ नाम सधर[1] तारावया ॥ २६ ॥ माझे जन्म नाम कीर्ति गुण ॥ जे वाचेसि नाहीं पठण ॥ ते वाचा पिशाचिका[2] जाण ॥ वृथालापन वटवटी ॥ २७ ॥ माझे कीर्तिवीण जें वदन ॥ तें केवळ मद्यपानाचें भाजन[3] ॥ त्या उन्मादविटाळभेण ॥ नाम जाण तेथें नये ॥ २८ ॥ जेथ उच्चारू नाहीं नामाचा ॥ ते जाणावी वांझ वाचा ॥ गर्भ न धरी हरिकथेचा ॥ निष्फळ तिचा उद्योगू ॥ २९ ॥ उद्धवासि ह्मणे श्रीरंगू ॥ ऐके बापा उपाय चांगूं ॥ नाममार्ग सुगम[4] सांगूं ॥ न पडे पांगू आणिकांचा ॥ ६३० ॥ हरिनामेंवीण वाणी ॥ कदा न राखावी सज्जनीं ॥ हाचि अभिप्रावो[5] चक्रपाणी ॥ प्रीति करोनि सांगीतला ॥ ३१ ॥ करूनियां शब्दज्ञान ॥ अतियोग्यता पंडितपण ॥ तेणें माझी प्राप्ति नव्हे जाण ॥ वैराग्येंवीण सर्वथा ॥ ३२ ॥ अथवा वैराग्यही झालें ॥ परी तें विवेकहीन[6] उपजलें ॥ जैसें धृतराष्ट्रा ज्येष्ठत्व[7] आलें ॥ नेत्रेंवीण गेलें स्वराज्य ॥ ३३ ॥ तैसें वैराग्यविवेकेंवीण ॥ केवळ आंधळे अनधिकारी जाण ॥ नाहीं सन्मार्गदेखणेंपण ॥ वृथा भ्रमण तयाचें ॥ ३४ ॥ जो विवेकें पूर्ण भरित ॥ त्यावरी वैराग्य ओसंडत ॥ माझी जिज्ञासा[8] अद्भुत ॥ ते निश्चित सांगतू ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवं जिज्ञासयाऽपोह्य नानात्वभ्रममात्मनि ॥ उपारमेत विरजं मनोमय्यर्प्य सर्वगे ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥ नित्यमुक्त अव्ययो[9] ॥ स्वरूप जाणावया पहाहो ॥ ज्याचा लागला दृढ भावो ॥ आन ठावो नाठवे ॥ ३६ ॥ ऐशी मज जाणायाची आस्था ॥ या नांव बोलिजे जिज्ञासता ॥ माझे प्राप्तीलागीं सर्वथा ॥ पांडित्य मान्यता तो नेघे ॥ ३७ ॥ देहादिअध्यासू आपुल्याठायीं ॥ श्रवणें मननें मिथ्या केला पाही ॥ दृढ विश्वास गुरूच्या पायीं ॥ पूर्णब्रह्माच्याठायीं निजनिर्धार[10] ॥ ३८ ॥ तेथ पुढारीं चालवावया वाट ॥ भगवद्भजनीं अतिउद्भट ॥ कां सोडोनि कर्मकचाट[11] ॥ ध्याननिष्ठ तो होय ॥ ३९ ॥ तेथ ध्येय ध्याता ध्यान ॥ न दिसे त्रिपुटीचें भान ॥ कोंदलें चैतन्यघन ॥ वस्तु सनातन तो पावे ॥ ६४० ॥ तेथ कैंचा कर्ता क्रियाकर्म ॥ फिटला नानात्वाचा[12] भ्रम ॥ सबाह्य कोंदलें परब्रह्म ॥ झाली उत्तम गुरुकृपा ॥ ४१ ॥ सर्वगत सर्वकाळ ॥ सर्वदेशीं सर्वीं सकळ ॥ वस्तु

---

[1] समर्थ. [2] हडळ. [3] भांडें. [4] सोपा. [5] अभिप्राय. [6] विचार नसलेला. [7] वडीलपण. [8] जाणण्याची इच्छा. [9] नाशरहित. [10] आपला निश्चय. [11] कर्मांचें जाळें. [12] वेगळेपणाचा.

असे जे केवळ ॥ तेथ निश्चळ निजबोधू ॥ ४२ ॥ ऐशिये वस्तूची धारणा ॥ ज्याचेनि न करवे जाणा ॥ तरी सुगम उपाया आना ॥ ऐक विचक्षणा सांगेन ॥ ४३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यद्यनीशो धारयितुं मनो ब्रह्मणि निश्चलम् ॥ मयि सर्वाणि कर्माणि निरपेक्षः समाचर ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्वभावतां मन चंचळ ॥ विषयवासना अतिचपळ ॥ निर्गुणब्रह्मीं केवळ ॥ नाहीं बळ प्रवेशावया ॥ ४४ ॥ तरी सांख्य योग संन्यासू ॥ हा न करावा [1]आयासू ॥ माझिया भक्तीचा विलासू ॥ अतिउल्हासू करावा ॥ ४५ ॥ मागें बद्धमुक्तांचें निरूपण ॥ सांगीतलें मुक्ताचें लक्षण ॥ वृथा [2]शाब्दिकांचें शब्दज्ञान ॥ तेंही व्याख्यान दाविलें ॥ ४६ ॥ आतां आपुली निजभक्ती ॥ सांगावया उद्धवाप्रती ॥ अतिआदरें श्रीपती ॥ भक्तीची स्थिती सांगतू ॥ ४७ ॥ उद्धवा चढत्या आवडीं मत्कर्म ॥ जे भक्तीसि विकावा मनोधर्म ॥ माझें स्मरावें गुणकीर्तिनाम ॥ नानासंभ्रम विनोदें ॥ ४८ ॥ माझे भजनें कृतकृत्या ॥ दृढविश्वास धरोनि चित्तां ॥ भजनीं [3]प्रवर्तावें सर्वथा ॥ [4]अविश्रमता अहर्निशीं ॥ ४९ ॥ माझ्या भजनाच्या आवडीं ॥ नुरेचि [5]ओराणुकेसि वाडी ॥ वायां जावोंनेदी अर्धघडी ॥ भजनपरवडी या नांव ॥ ५५० ॥ माझ्या भजनीं प्रेम अधिकू ॥ न सांडावें नित्यनैमित्तिकू ॥ वैदिकलौकिकदैहिकू ॥ भक्तासि बाधकू नव्हे कर्म ॥ ५१ ॥ आचरतां सकळ कर्म ॥ न कल्पावा फळसंभ्रम ॥ हेंचि भक्तीचें गुह्य वर्म ॥ उत्तमोत्तम अधिकारू ॥ ५२ ॥ [6]उबग न मानूनि अंतरीं ॥ माझ्या प्रीतीं सर्वकर्मांतें करी ॥ जो फळाशेतें कांहीं न धरी ॥ भक्तीचा अधिकारी तो जाणा ॥ ५३ ॥ पिंपरें खावयाचे चाडें ॥ न लाविती पिंपळाचीं झाडें ॥ तेंवीं कर्म करितां वाडेंकोडें ॥ फळाशा पुढें उठेना ॥ ५४ ॥ माझें भजन करितां ॥ नपडे ज्ञानाची [7]पंगिस्तता ॥ माझे भजनीं नित्यमुक्तता ॥ जाण मद्भक्तां मद्भावें ॥ ५५ ॥ ज्ञानेंवीण भक्ति न घडे ॥ ह्मणती तें शब्दज्ञान धडफुडे ॥ भक्तीस्तव जाण रोकडें ॥ ज्ञान जोडे अपरोक्ष ॥ ५६ ॥ यालागीं माझें भजन करितां ॥ ज्ञानाचा पांग न पडे भक्तां ॥ देहगेहांमाजी वर्ततां ॥ बंधन मद्भक्तां लागेना ॥ ५७ ॥ ज्याच्या मुखीं माझें नाम ॥ ज्यासि माझा भजनसंभ्रम ॥ ज्याच्या मनीं मी आत्माराम ॥ त्याचें दासीकाम मुक्ति करी ॥ ५८ ॥ मुक्तीमाजी विशेष कायी ॥ वृत्ति [8]निर्विषय असे पाही ॥ भक्तांसि सर्वकर्मांच्याठायीं ॥ स्फुरण नाहीं विषयाचें ॥ ५९ ॥ भक्तांचें विषयीं नाहीं चित्त ॥ त्याचा विषय तो मी भगवंत ॥ ते सदा मजमाजी लोलुप्त ॥ नित्यमुक्त यालागीं ॥ ६६० ॥ भक्त विषयो सेविती ॥ ते ग्रासोग्रासीं मज अर्पिती ॥ तेणेंचि त्यांसि वंदी मुक्ती ॥ सर्वभूतीं मद्भावो ॥ ६१ ॥ यालागीं कर्मबंधन ॥ मद्भक्तांसि नलगे जाण ॥ करितां माझें स्मरणकीर्तन ॥ जगाचें बंधन छेदिती ॥ ६२ ॥ माझ्या भक्तांचें वसतें

---

१ श्रम. २ शब्द जाणणारांचें. ३ असावें. ४ विसाव्यावांचून. ५ कर्मणुकेस. ६ त्रास. ७ कमतरता. ८ विषयरहित.

घर ॥ तें जाण माझें निजमंदिर[१] ॥ मुक्ति तेथें आठौ प्रहर ॥ वोळंगे[२] द्वार तयांचें ॥ ६३ ॥ माझें भजन करितां ॥ कोण्या अर्थाची नाहीं दुर्लभता ॥ चहूं पुरुषार्थांचे माथां ॥ भक्ति सर्वथा मज पढियंती ॥ ६४ ॥ ज्ञान नित्यानित्यविवेक ॥ भक्तीमाजी माझें प्रेम अधिक ॥ प्रेमळाचें मजलागीं सुख ॥ चढतें देख अहर्निशीं ॥ ६५ ॥ जेवीं एकुलतें बाळक ॥ जननीसि आवडे अधिक ॥ तैसें प्रेमळाचें कौतुक ॥ चढतें सुख मजलागीं ॥ ६६ ॥ यालागीं आपुलिये संवसाठीं ॥ मी प्रेमळ घें उठाउठी ॥ वरी निजसुख[३] दें सदेंठीं ॥ आणि मी शेवटीं सेवकू होयें ॥ ६७ ॥ प्रेमाचिया परमप्रीतीं ॥ जेणें मज अर्पिली चित्तवृत्ती[४] ॥ तेव्हांचि त्याचे सेवेची सुती ॥ जाण निश्चितीं म्यां घेतली ॥ ६८ ॥ प्रेमळाचें शेष खातां ॥ मज लाज नाहीं घोडीं धुतां ॥ शेखीं उच्छिष्ट[५] काढितां ॥ लाज सर्वथा मज नाहीं ॥ ६९ ॥ मज सप्रेमाची आस्था ॥ त्याचे मोचे वाहें माथां ॥ ऐशी प्रेमळाची सांगतां कथा ॥ प्रेम कृष्णनाथा चालिलें ॥ ६७० ॥ कंठ झाला सद्गदित ॥ अंग झालें रोमांचित[६] ॥ धांवोनि उद्धवासि खेंव[७] देत ॥ प्रेम अद्भुत हरीचें ॥ ७१ ॥ सजल जाहले लोचन ॥ वर्षताती स्वानंदजीवन ॥ भक्तिसाम्राज्यपट्टाभिषिंचन ॥ उद्धवासी जाण हरि करी ॥ ७२ ॥ सहजें प्रेमळाची करितां गोठी ॥ संमुख उद्धव देखिला दृष्टीं ॥ धांवोनियां घातली मिठी ॥ आवडी मोठी भक्तांची ॥ ७३ ॥ आवडीं पडलें आलिंगन ॥ विसरला कार्यकारण ॥ विसरला स्वधामगमन[८] ॥ मीतूंपण नाठवे ॥ ७४ ॥ नाठवे देवभक्तपण ॥ नाठवे कथानिरूपण ॥ नाठवे उद्धवा उद्धवपण ॥ कृष्णा कृष्णपण नाठवे ॥ ७५ ॥ प्रेमळाचे गोठीसाठीं ॥ परात्पर परतटीं ॥ दोघां ऐक्यें पडली मिठी ॥ आवडी मोठी प्रेमाची ॥ ७६ ॥ आजि भक्तीचें निजसुख ॥ उद्धवासि फावलें देख ॥ भक्तीचें प्रेम अलोलिक ॥ उद्धवें सम्यक विस्तारिलें ॥ ७७ ॥ श्रीकृष्ण निजधामासि जातां ॥ उद्धव जरी हें न पुसता ॥ तरी ज्ञानवैराग्यभक्तिकथा ॥ कां सांगता श्रीकृष्ण ॥ ७८ ॥ विशेष भक्ति प्रेम अचुंबित ॥ उद्धवें काढिलें निश्चित ॥ उद्धवप्रश्नें श्रीभागवत ॥ झालें सनाथ तिहीं लोकीं ॥ ७९ ॥ यालागीं तनुमनप्राणें ॥ उद्धवा जीवें ओंवाळणें ॥ याहून अधिक वानणें[९] ॥ तें बोलणें न साहे ॥ ६८० ॥ जे बोला बुद्धी नये सहज ॥ तें भक्तिप्रेम निजगुज[१०] ॥ उद्धवा द्यावया गरुडध्वज ॥ करी व्याज खेंवाचें ॥ ८१ ॥ भक्तीचें शोधित प्रेम ॥ उद्धवासि अतिउत्तम ॥ देता झाला पुरुषोत्तम ॥ मेघश्याम तुष्टला[११] ॥ ८२ ॥ प्रेमळाची गोठी सांगतां ॥ विसरलों जी श्लोकार्था ॥ कृष्णासि आवडली प्रेमकथा ॥ ते आवरितां नावरे ॥ ८३ ॥ प्रेमाची तंव जाती ऐशी ॥ आठव येऊं नेदी आठवणेंशीं ॥ हा भाव जाणवे सज्जनांसी ॥ ते भक्तिप्रेमार्सी जाणती ॥ ८४ ॥ होकां ऐसेंही असतां ॥ माझा अपराध जी सर्वथा ॥ चुकोनि फांकलों श्लोका

---

[१] आपलें घर. [२] आवडती. [३] आत्मसुख. [४] मनाची वृत्ति. [५] उष्टें. [६] ज्यावर केंस उभारले असें. [७] आलिंगन. [८] वैकुंठास जाणें. [९] स्तुति करणें. [१०] आपलें गुह्य. [११] संतुष्ट झाला.

र्था ॥ क्षमा श्रोतां करावी ॥ ८५ ॥ तंव श्रोता ह्मणती राहे ॥ जेथें निरूपणीं सुख आहे ॥ त्यावरी बोलणें न साहे ॥ ऐसें रहस्य आहे अतिगोड ॥ ८६ ॥ आधींच भागवत उत्तम ॥ तेथें हें वांखाणिलें[1] भक्तिप्रेम ॥ तेणें उल्हासें परब्रह्म ॥ आमुचे मनोधर्म निवाले ॥ ८७ ॥ श्लोकसंगतीची भंगी ॥ दूर ठेली कथेची मागी ॥ हे प्रार्थना न लगे आह्मांलागीं ॥ आह्मीं हरिरंगीं रंगलों ॥ ८८ ॥ ऐकतां भक्तिप्रेमाचा जिव्हाळा ॥ श्रवणसुखाचा पूरू आला ॥ हे न बोलसीच उंगला[2] ॥ निरूपण वहिला चालवी ॥ ८९ ॥ सांगतां प्रेमळाची गोठी ॥ कृष्णउद्धवां एक गांठी ॥ प्रेमें पडली होती मिठी ॥ ते कृष्ण जगजेठी सोडवी ॥ ६९० ॥ ह्मणे हे अनुचित सर्वथा ॥ आतांचि उद्धव जरी ऐक्या येता ॥ तरी कथेचा निजभोक्ता ॥ ऐसा श्रोता कैंचा मग ॥ ९१ ॥ माझिया भक्तिज्ञानविस्तारा ॥ उद्धवूचि निजांचा[3] सोयरा ॥ यालागीं ब्रह्मशापाबाहिरा ॥ काढितू खरा निजबोधें ॥ ९२ ॥ जितुकी गुह्यज्ञानगोडी ॥ भक्तिप्रेमाची आवडी ॥ ते उद्धवाचिकडे रोकडी ॥ दिसते गाढी कृष्णाची ॥ ९३ ॥ भक्तिप्रेमाचा कृष्ण भोक्ता ॥ कृष्णकृपा कळलीसे भक्तां ॥ हे अनिर्वचनीय[4] कथा ॥ नये बोलतां बोलासी ॥ ९४ ॥ कृष्ण उद्धवासि ह्मणे आतां ॥ सावध होयी गा सर्वथा ॥ पुढारीं परियेसी कथा ॥ जे भक्तिपंथा[5] उपयोगी ॥ ९५ ॥ सर्वकर्मै मंदर्पण[6] ॥ फळत्यागें नकरवे जाण ॥ तरी अतिसोपें निरूपण ॥ प्रेमलक्षण सांगेन ॥ ९६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रद्धालुर्मे कथाः शृण्वन्सुभद्रा लोकपावनीः ॥ गायन्ननुस्मरन्कर्म जन्म चाभिनयन्मुहुः ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ करितां माझी कथाश्रवण ॥ काळासि रिगमू नाहीं जाण ॥ इतरांचा पाड कोण ॥ कर्मबंधन तेथें कैंचें ॥ ९७ ॥ जो हरिकथेनें गेला क्षण ॥ काळासि नव्हे प्राशन ॥ काळसार्थकता त्या नांव जाण ॥ जैं श्रद्धाश्रवण हरिकथा ॥ ९८ ॥ परिस कथेचें महिमान ॥ श्रद्धायुक्त करितां श्रवण ॥ तिहीं लोकींचें दोषदहन ॥ अक्षरें जाण होतसे ॥ ९९ ऐक श्रद्धेचें लक्षण ॥ करितां हरिकथाश्रवण ॥ ज्याचें अर्थारूढ[7] मन ॥ श्रद्धाश्रवण त्या नांव ॥ ॥ ७०० ॥ श्रवण ऐकोनि नास्तिक ॥ देवोचि नाहीं ह्मणती देख ॥ आहे ह्मणती ते थोंटवाइक ॥ आह्मांसि निःशंक ठांकेना ॥ १ ॥ नास्तिका देवोनि तिळोदक ॥ ज्याचें वाढलें आस्तिक्य ॥ श्रद्धा त्या नांव अलोलिक ॥ अगाध सुख तीमाजी ॥ २ ॥ श्रवणीं ध्यानीं अंतराय ॥ लय विक्षेप कषाय[8] ॥ कां रसस्वादुही होय ॥ हे चारी अपाय चुकवावे ॥ ३ ॥ ऐकतांही हरिकथा ॥ विषयचिंतनीं गोडी चित्ता ॥ ते श्रद्धा नव्हे गा सर्वथा ॥ मुख्य विक्षेपता तीनाव ॥ ४ ॥ हाव भाव कटाक्षगुण ॥ सुरतकामनिरूपण ॥ तेथ ज्याचें श्रद्धाश्रवण ॥ रसस्वादन त्या नांव ॥ ५ ॥ हरिकथेपाशीं बैसला दिसे ॥ परी कथेपाशीं मनही नसे ॥ चित्त भंवे[9] पिसें जैसें ॥ तो मर्कटविशें विशे

---

१ वर्णिले. २ उगाच. ३ भक्तांचा. ४ बोलतां येत नाही असी. ५ भक्तिमार्गास. ६ मला देणें. ७ अर्थ जाणणारे. ८ विघ्न. ९ हिंडते.

षु ॥ ६ ॥ नातरी नानाउद्वेगें ॥ ऐकतां कथा मनीं नलगे ॥ कां कथेमाजी झोंप लागे ॥ तो जाणावा वेगें लयविक्षेपू ॥ ७॥ श्रवणीं ध्यानीं बैसल्यापाठी ॥ सगुण निर्गुण काहीं नुंठी[१] ॥ निळें पिंवळें पडे दिठीं[२] ॥ गुणक्षोभ त्रिपुटीं कषाय ॥ ८ ॥ श्रवणीं ध्यानीं हे अवगुण ॥ तैसाचि त्रिविध प्रेमा जाण ॥ तो वोळखती विचक्षण ॥ ऐक लक्षण सांगेन ॥ ९ ॥ महावीरांचें शौर्यपण ॥ ऐकोनि युद्ध दारुण ॥ अत्यंत हर्ष उल्हासे मन ॥ तो प्रेमा जाण राजस ॥ ७१० ॥ दुःखशोकांची अवस्था ॥ कां गेल्यामेल्यांची वार्ता ॥ अत्यंत विलापाची कथा ॥ ज्यासीं ऐकतां न कंठे ॥ ११ ॥ नेत्रीं अश्रूंचिया धारा ॥ स्फुंदनें कांपे थरथरां ॥ प्रेमविलाप अवसरां ॥ तो जाण खरा तामसू ॥ १२ ॥ सगुणमूर्तींची संपदा[३] ॥ शंख चक्र पद्म गदा ॥ पीतांबरधारी गोविंदा ॥ ऐकोनि आनंदा जो भरे ॥ १३ ॥ नेत्रीं आनंदजीवन ॥ हृदयीं न सांठे स्फुंदन ॥ कृष्णमय[४] झाले मन ॥ तो प्रेमा जाण सात्विक॥ १४॥ यावरी जो प्रेमा चौथा ॥ अतर्क्य तर्केना सर्वथा॥ उद्धवा तूं मजलागीं पढियंता ॥ तोही आतां सांगेन ॥ १५ ॥ तुझ्या भावार्थाची आस्था मोठी ॥ ते बोलविते गुह्यगोष्टी ॥ तुजवेगळा पाहतां दृष्टीं ॥ अधिकारी सृष्टीं दिसेना ॥ १६ ॥ श्रीकृष्ण ह्मणे सावधान ॥ ऐकोनि निर्गुणश्रवण ॥ ज्याचें चिन्मात्रीं बुडे मन ॥ उन्मज्जन[५] होऊं नेणें ॥ १७ ॥ जेवीं कां सैंधवाचा[६] खडा ॥ पडला सिंधूमाजी वडा ॥ तो झाला सिंधूचियेवढा ॥ तेवीं तो धडफुडा होय ॥ १८ ॥ चित्तचैतन्या पडतां मिठी ॥ सुटतां लिंगदेहाची गांठी ॥ नेत्रीं अश्रूचा पूर दाटी ॥ रोमांच उठी सर्वांगीं ॥ १९ ॥ जीवभावाची दशा आटे ॥ अनिवार बाष्प कंठीं दाटे ॥ कांहीं केल्या शब्द न फुटे ॥ पूर लोटे स्वेदाचा[७] ॥ ७२० ॥ नेत्र झाले उन्मीलित ॥ पुंजाळले जेथिचे तेथ ॥ विस्मयाचें भरतें येत ॥ वोसंडत स्वानंदें ॥ २१ ॥ हा जाण पां प्रेमा चौथा ॥ उत्तम भागवत अवस्था ॥ तुज म्यां सांगीतली तत्त्वतां ॥ इचा जाणता मी एकू ॥ २२ ॥ निर्गुणीं जो प्रेमा जाण ॥ तें शोधितसत्वाचें लक्षण ॥ हें मी जाणें उणखूण ॥ कां ब्रह्मसंपन्न जाणती ॥ २३ ॥ उद्धवा श्रद्धायुक्तश्रवण ॥ तेणें येवढी प्राप्ती आहे जाण ॥ श्रद्धाश्रवणाचें महिमान ॥ अतिगहन[८] तिहीं लोकीं ॥ २४ ॥ सविवेकनैराश्य[९] वक्ता ॥ जोडल्या श्रद्धेनें ऐकावी कथा ॥ कां सज्ञान मीनलिया[१०] श्रोता ॥ स्वयें कथा सांगावी ॥ २५॥ जो श्रोता वक्ता दोन्हीं नाहीं ॥ तैं रिघावें मनाच्याठायीं ॥ कां माझीं जन्मकर्में जे कांहीं ॥ एकलाचि पाहीं विचारीं ॥ २६ ॥ सांडूनि विषयाची आस ॥ घालोनि कळिकाळावरी कास ॥ माझ्या कीर्तनीं उदास ॥ अतिउल्हास करावा ॥ २७ ॥ त्यजूनियां कामाचें बीज ॥ सांडूनि लौकिकाची लाज ॥ कीर्तनीं नाचावें वोज ॥ गरुडध्वज स्मरोनी ॥ २८ ॥ रामकृष्ण हरि गोविंद ॥ ऐशिया नामाचे प्रबंध ॥ गा

---

[१] उठत नाहीं. [२] दृष्टीस. [३] शोभा. [४] कृष्णरूप. [५] वर येणें. [६] मिठाचा. [७] घामाचा. [८] फार कठीण. [९] विचारी आणि आशा नसलेला. [१०] मिळाला असता.

तां नानापदें छंदबंध ॥ करावा विनोद कीर्तनीं ॥ २९ ॥ जेणें आत्मतत्त्व जोडे जोडी ॥ एशिया पदांची घडमोडी ॥ कीर्तनीं गाती आवडीं ॥ संत परवडी बैसवूनी ॥ ७३० ॥ श्रुती मृदंग टाळ घोळ ॥ मेळवूनि वैष्णवांचा मेळ ॥ कीर्तनीं करावा गदारोळ ॥ काळवेळ न ह्मणावा ॥ ३१ ॥ दशमी दंडीं जागरणें ॥ आळस सांडूनि गावें गाणें ॥ हाव भाव दाखवणें ॥ कर्म स्मरणें माझींची ॥ ३२ ॥ वोढूनि धनुष्याची वोढी ॥ त्र्यंबक मोडिलें कडाडी ॥ मी राम ह्मणोनि हांक फोडी ॥ जैताची गुढी कीर्तनीं ॥ ३३ ॥ गोवर्धन उचलिला ॥ दावाग्नि प्राशियेला ॥ तो तो विन्यासू दाविला ॥ सेतु बांधिला अनुकारू ॥ ३४ ॥ आळस दवडूनि दुरी ॥ अभिमान घालोनियां बाहेरीं ॥ अहर्निशीं[1] कीर्तन करी ॥ गर्व न धरी गाणिवेचा ॥ ३५ ॥ गाणीव जाणीव शहाणीव ॥ वोंवाळूनि सांडावें सर्व ॥ सप्रेम साबडी कथा गौरव ॥ सुख अभिनव[2] तेणें मज ॥ ३६ ॥ गर्जतनामाच्या कल्लोळीं ॥ नामासरिसी वाजे टाळी ॥ महापातकां झाली होळी ॥ ते वैष्णवमेळीं मी उभा ॥ ३७ ॥ जें सुख क्षीरसागरीं[3] नसे ॥ पाहतां वैकुंठींही नसे ॥ तें सुख मज कीर्तनीं असे ॥ कीर्तनवशें डुल्लत ॥ ३८ ॥ मज सप्रेमाची आवडी भारी ॥ भक्तिभावाचिया कुसरी[4] ॥ मीही कीर्तनीं नृत्य करीं ॥ छंदतालवरी विनोदें ॥ ३९ ॥ ऐशिया कीर्तनपारीपाठी ॥ बुडाल्या प्रायश्चित्तांच्या कोटी ॥ खुंटली यमदूतराहाटी ॥ काढिली कांटी पापाची ॥ ७४० ॥ नामस्मरणाच्या आवडीं ॥ लाजल्या मंत्रबीजांच्या कोडी ॥ तपादिसाधनें बापुडीं ॥ झालीं वेडीं हरिनामें ॥ ४१ ॥ ऐकोनि हरिनामाचा घोष ॥ योगयागीं[5] लपविलें मुख ॥ धाकें पळालें विषयसुख ॥ विराले[6] देख अधर्म ॥ ४२ ॥ हरिनामाच्या कडकडाटीं ॥ दोष रिघाले दिक्पटीं[7] ॥ तीर्थांची उतरली उटी ॥ कीर्तन कसवटी हरिप्रिय ॥ ४३ ॥ माझेनि प्रेमें उन्मत्त होऊनी ॥ आवडीं कीर्तन अनुदिनीं ॥ मनसा वाचा कर्मैं करूनी ॥ मजवांचूनी नेणती ॥ ४४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मदर्थे धर्मकामार्थानाचरन्मदपाश्रयः ॥ लभते निश्चलां भक्तिं मय्युद्धव सनातने ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ माझे भक्त जे उत्तम ॥ त्यांचा धर्म अर्थ मीचि काम ॥ मजवेगळा मनोधर्म ॥ अन्यथा कर्म करूं नेणें ॥ ४५ ॥ माझें भजन उत्तम कर्म ॥ त्याचा धर्म अर्थ मीचि काम ॥ मजकामनें हा शुद्धकाम ॥ ज्याचा आराम मजमाजी ॥ ४६ ॥ वेंचूनियां नाना अर्थ ॥ संग्रह करिती परमार्थ ॥ नश्वर[8] अर्थ जें वित्त ॥ तें माझे भक्त न संचिती ॥ ४७ ॥ ज्यांचें धनावरी चित्त ॥ ते केवळ जाण अभक्त ॥ ते जें जें कांहीं भजन करित ॥ तें द्रव्यार्थ नटनाट्य ॥ ४८ ॥ मनसा वाचा कर्मैं जाण ॥ जेथें नाहीं मदर्पण[9] ॥ तेंतें दांभिक भजन ॥ केवळ जाण उदरार्थ ॥ ४९ ॥ भक्तीमाजी विरुद्धपण ॥ विरुद्धधर्माचें लक्षण ॥ तेंही करीन निरूपण ॥ सावधान अवधारी ॥ ७५० ॥ माझें भजन

---

१ रात्रंदिवस. २ साश्चर्य. ३ दुधाच्या समुद्रांत. ४ चतुरपणानें. ५ योग व यज्ञांनीं. ६ गेले. ७ दिशेकडे. ८ नाशशील. ९ मला अर्पण करणें.

करूनि गौण ॥ जो करूनि घे धनार्जन ॥ हें भजनविरुद्ध लक्षण ॥ मुख्य जाण भक्तांचें ॥ ५१ ॥ गांठींचें वेंचू नेणे धन ॥ कोरडें करी माझें भजन ॥ मजसीं जेणें केलें वंचन ॥ विरुद्धलक्षण मुख्यत्वें ॥ ५२ ॥ या नांव अर्थविरुद्धता ॥ आतां दुष्टकर्मीं जो विचरता ॥ मी भजतसें भगवंता ॥ दोष सर्वथा मज न लागे ॥ ५३ ॥ ऐसऐशिया भावना ॥ जो दुष्टकामीं विचरे जाणा ॥ हें भजनीं विरुद्धलक्षणा ॥ भक्ता अभक्तपणा आणित ॥ ५४ ॥ मज नार्पितां जें जें श्राद्ध ॥ ते त्याची कल्पना विरुद्ध ॥ श्राद्धसंकल्प अविरुद्ध ॥ मदर्पणें[१] वेद गर्जती ॥ ५५ ॥ श्राद्धीं मुख्य संकल्प जाण ॥ पितरस्वरूपी जनार्दन ॥ ऐसें असोनियां जाण ॥ नैवेद्य मदर्पण न करिती ॥ ५६ ॥ अन्न ब्रह्म अहं ब्रह्म ॥ हें श्राद्धींचें गुह्य वर्म ॥ ऐसें नेणोनि शुद्ध कर्म ॥ वृथा भ्रमण वाढविती ॥ ५७ ॥ मी सकळजगाचा जनिता ॥ मुख्य पितरांचाही मी पिता ॥ त्या मज कर्म नार्पितां ॥ विरुद्ध सर्वथा तें श्राद्ध ॥ ५८ ॥ मज नार्पितां जें जें कर्म करणें ॥ तें तें उपजे[२] अभक्तपणें ॥ विरुद्धधर्माचीं लक्षणें ॥ दुःखदारुणें अनिवार ॥ ५९ ॥ उत्तमभक्तांचें लक्षण ॥ संकल्पेंवीण जाण ॥ अन्नपानादि मदर्पण ॥ करिती खूण जाणती ॥ ७६० ॥ ध्रुवाच्यापरी अढळ[३] ॥ जे माझाठायीं भजनशीळ ॥ ते माझी भक्ति अचंचळ ॥ अतिनिश्चळ पावती ॥ ६१ ॥ आर्तो[४]जिज्ञासु[५]रर्थार्थी[६] ॥ या तिघांसीं जी नव्हे प्राप्ती ॥ ते माझी जे चौथी भक्ती ॥ प्रेमें पावती उद्धवा ॥ ६२ ॥ आर्त आर्तिहरण काजें ॥ जिज्ञासु जाणपणालागीं भजे ॥ तिजेनि वांछिजे ॥ अती अर्थसिद्धी ॥ ६३ ॥ यावरी चौथिया चेठायीं ॥ या कल्पनांचा मागमोस नाहीं ॥ यालागीं चौथी भक्ति पाही ॥ त्याच्याठायीं घर रिघे ॥ ६४ ॥ जया भक्तीमाजी वाडेंकोडें ॥ मीच मी चहूंकडे ॥ जेथिंच्या तेथें सांपडे ॥ हें भजनें जोडे तयांसी ॥ ६५ ॥ संकल्प केलियावीण ॥ सहजें होतसे मदर्पण ॥ हें चवथें भक्तीचें लक्षण ॥ अतर्क्यभजन पैं माझें ॥ ६६ ॥ तेथ जें करणें तेंचि पूजा ॥ जें बोलणें तो जपू माझा ॥ जें देखणें तें अधोक्षजा ॥ दर्शन वोजा होतसे ॥ ६७ ॥ तेथ चालणें ते यात्रा माझी ॥ जें भक्षी तें मजचि यजी ॥ त्याची निद्रा ते समाधि माझी ॥ ऐसा मजमाजी भजतसे ॥ ६८ ॥ यापरी अनायासें जाण ॥ सहजें होतसे मदर्पण ॥ हे चौथी भक्ती सनातन ॥ उद्धवा संपूर्ण तो लाभे ॥ ६९ ॥ उद्धवा ऐसें मानिसी चित्तीं ॥ जे मुळींहूनि चारी भक्ती ॥ पहिली दुजी तिजी चौथी ॥ मिथ्यावदंती[७] कल्पना ॥ ७७० ॥ सहज माझी जे प्रकाशस्थिती ॥ ते भक्ति बोलिजे भागवतीं ॥ संवित्ती[८] बोलिजे वेदांतीं ॥ शैवीं शक्ती हे बोलिजे ॥ ७१ ॥ बौद्धजीनेश नमिनाथा ॥ जोगी ह्मणती आदिनाथा ॥ भैरव खंडेराव गाणपत्यां ॥ अव्यक्त ह्मणतां एक पैं ॥ ७२ ॥ एक ह्मणती हे आदिमाता ॥ सौर ह्मणती तो हा सविता ॥ असो नांवाची बहु

---

१ मला निवेदन करण्यानें. २ उत्पन्न होतें. ३ निश्चल. ४ रागी. ५ मुमुक्षु. ६ धनेच्छु. ७ खोटी वाणी. ८ ज्ञान.

कथा ॥ उपासकता विभागें ॥ ७३ ॥ ऐशी जे कां प्रकाशस्थिती ॥ त्या नाव बोलिजे भक्ती ॥ तेणें प्रकाशें त्रि[1]जगतीं ॥ उत्पत्ति स्थिती लय भासे ॥ ७४ ॥ माझ्या नाना अवतारमाळा ॥ येणें प्रकाशें प्रकाशती सोज्ज्वळा ॥ देवो देवी सकळा ॥ येणें प्रकाशमाळा भासती ॥ ७५ ॥ माझ्या अवतारांची उत्पत्ती ॥ तेणें प्रकाशें असे होती ॥ नानाचरित्रें अंतीं ॥ प्रवेशती ते प्रकाशीं ॥ ७६ ॥ ऐशिया प्रकाशाची जे प्राप्ती ॥ ते जाण सं[2]नातन माझी भक्ती ॥ उद्धवा म्यां हे तुजप्रती ॥ यथानिगुतीं सांगीतली ॥ ७७ ॥ निश्चळ भक्ती सनातन ॥ हें मूळींचें पदव्याख्यान ॥ यालागीं भक्ति सनातन ॥ समूळ जाण बोलिलों ॥ ७८ ॥ सांडूनि पदपदार्था ॥ नाहीं बोलिलों जी वृथा ॥ सावधान व्हावें श्रोतां ॥ पुढील कथा अनुपम ॥ ७९ ॥ उद्धवा हे ऐशी माझी भक्ती ॥ कैसेनि होय ह्मणसी प्राप्ती ॥ भावें धरिलिया सत्संगती ॥ माझी भक्ती उद्बोधे ॥ ७८० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सत्संगलब्धया भक्त्या मयि मां स उपासिता ॥ स वै मे दर्शितं सद्भिरंजसा विंदते पदम् ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ मुख्यत्वें संतांची सेवा ॥ हेंचि साधन आवडे देवा ॥ संतवचनें निजभावा ॥ देतसे तेव्हां निजभक्तीं ॥ ८१ ॥ ज्यासि आवडे संतसंगाचा मेळू ॥ जो साधुवचनीं अति[3]भुकाळू ॥ जो पडिलें वचन नेणें उगळूं ॥ तोचि पायाळू निजभक्ती ॥ ८२ ॥ साधुवचनीं श्रद्धा बरी ॥ देखोनियां नि[4]जनिर्धारीं ॥ त्यावरी सद्गुरु कृपा करी ॥ साधु चरा चरीं गुरुरावो ॥ ८३ ॥ गुरुवांचोनि तत्त्वतां ॥ नाहीं संसारीं तारिता ॥ गुरुवचनें निजभक्तिदाता ॥ मीचि सर्वथा भक्तांसी ॥ ८४ ॥ सद्गुरु जो संसारीं ॥ त्याची आज्ञा मी वाहें शिरीं ॥ तो ज्यावरी कृपा करी ॥ तो मी उद्धरीं तात्काळ ॥ ८५ ॥ त्या सद्गुरूचें भजन ॥ जो मद्रूपें करी जाण ॥ त्याचें मज पढियंतेपण ॥ माझेनि जाण न बोलवे ॥ ८६ ॥ त्याचा इहलोक परलोक ॥ दोन्हीं चालवितां मीचि देख ॥ त्याचें मज अत्यंत सुख ॥ हरिखें हरिख वोसंडे ॥ ८७ ॥ त्यासि गुरूनें जो दाविला मार्ग ॥ चालतां न पडे प्रयासपांग ॥ मी सामोरा धांवें श्रीरंग ॥ आपुलें सर्वांग मी वोडवीं ॥ ८८ ॥ तेणें जावें ज्या पदासी ॥ तें पदचि मी आणी त्यासी ॥ संतभजनीं प्रीति ऐशी ॥ हृषीकेशी सांगतु ॥ ८९ ॥ ऐसें ऐकोनियां वचन ॥ उद्धवाचें कळवळलें मन ॥ कोणकोण ते साधुजन ॥ त्यांचें नि[6]जचिह्न पुसों पां ॥ ७९० ॥ कोण तें भक्तीचें लक्षण ॥ भजती खुण कोणकोण ॥ हें समूळ जाणावया आपण ॥ उद्धवें प्रश्न मांडिला ॥ ९१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धव उवाच ॥ साधुस्त्वोत्तमश्लोक मतः कीदृग्विधः प्रभो ॥ भक्तिस्त्वय्युपयुज्येत कीदृशी सद्भिरादृता ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ज्ञाते वक्ते आहेत बहुत ॥ परी ते रजतमगुणयुक्त ॥ गुणानुसारें निरूपित ॥ त्यांसी पुसों चित्त मानीना ॥ ९२ ॥ अथवा सात्विक केवळ ॥

---

१ तीनलोकांत. २ जुनी. ३ फार भूक लागलेला. ४ आपल्या निश्चयानें. ५ स्थावरजंगमांत. ६ आपलें लक्षण.

तो सत्वगुणें विव्हळ ॥ बोलणें बोलतां जाय बरळ ॥ नव्हे केवळ निजबोधू[1] ॥ ९३ ॥ तैसा तूं नव्हेसि कृष्णनाथा ॥ तुजआधीन गुण तत्त्वतां ॥ लीलाविग्रहें देह धरिता ॥ निजज्ञानवक्ता[2] तूं एक ॥ ९४ ॥ यालागीं जो उत्तमश्लोक ॥ तुज ह्मणती तिनीलोक ॥ तुज वेगळा आणिक ॥ आह्मासी देख मानेना[3] ॥ ९५ ॥ माझिया प्रश्नाचा वक्ता ॥ तूंचि एक कृष्णनाथा ॥ तरी साधु कोण तत्त्वतां ॥ तुज सर्वथा मानला ॥ ९६ ॥ तुज मानले जे साधुजन ॥ त्यांचें संपूर्ण सांग लक्षण ॥ तुज पढियंती भक्ती कोण ॥ तेंही लक्षण सांगावें ॥ ९७ ॥ भक्तीमाजी भक्ती सधर ॥ जे कां तुझी प्राप्तिकर ॥ अतिउत्तम परात्पर ॥ संतीं निरंतर आदरिली ॥ ९८ ॥ संतीं आदरिलें जे भक्तीसी ॥ संतांसि पुसूं जा ह्मणशी ॥ मज विश्वास तुझिया वचनाशीं ॥ पुसों आणिकांसी मानेना ॥ ९९ ॥ जे ज्या देवतांतरा[4] भजती ॥ ते ती उत्तमभक्ति ह्मणती ॥ तुज मानली जे श्रीपती ॥ ते मजप्रती सांगावी ॥ ८०० ॥ समान कुळशीळसंवादु ॥ तैसियासींच ह्मणती साधू ॥ तूं निजमुखें जो ह्मणशी शुद्धु ॥ तो मज वंद्यूं[5] सर्वथा ॥ १ ॥ तीं संबोधनीं सारंगधरू ॥ उद्धव प्रार्थूनि करी सादरू ॥ तो विशेष विचारू ॥ श्रवणाधिकारू[6] सांगत ॥ २ ॥

॥ श्लोक ॥ ॥ एतन्मे पुरुषाध्यक्ष लोकाध्यक्ष जगत्प्रभो ॥ प्रणतायानुरक्ताय प्रपन्नाय च कथ्यताम् ॥ २७ ॥

॥ टीका ॥ ॥ पुरुषीं पुरुषोत्तम तूंचि कीं ॥ तूंचि कर्मधर्मांचा विवेकी ॥ यालागीं बोलिजे पुरुषाध्यक्षीं ॥ सर्वसाक्षी गोविंदा ॥ ३ ॥ जैसें कर्म तैसा फलदाता ॥ यालागीं बोलिजे कर्माध्यक्षता ॥ तूंचि ब्रह्मादिकांचा नियंता ॥ प्रतिपाळिता[7] जगाचा ॥ ४ ॥ होकां मी जगाचा प्रतिपाळिता ॥ त्या जगामाजी तूंही असतां ॥ तुजचि सांगावी ज्ञानकथा ॥ हे अधिकता कां ह्मणसी ॥ ५ ॥ जरी तूं सर्वज्ञ सर्वेश्वरू ॥ अंतर्यामी नियंता ईश्वरू ॥ जरी देखसी माझा अधिकारू ॥ तरी ज्ञाननिर्धारू[8] सांगावा ॥ ६ ॥ होकां मज अधिकारू नाहीं ॥ तरी शरण आलों तुज पाहीं ॥ शरणागताची तुझ्या ठायीं ॥ उपेक्षा[9] नाहीं सर्वथा ॥ ७ ॥ विषय देखोनि थोर दुःख ॥ झालों तुझिया चरणासंमुख ॥ अतिदीन मी तुझा रंक ॥ कृपा आवश्यक तुवां कीजे ॥ ८ ॥ माझ्या दुर्जयवासना[10] ॥ अनिवार मज निवारति ना ॥ त्या तूं निवारी श्रीकृष्णा ॥ शरण चरणा यालागीं ॥ ९ ॥ मी एक भक्त अनुरक्त ॥ ऐसें बोलतां बहु गर्व दिसत ॥ तूं सर्वज्ञ श्रीअनंत ॥ कृपावंत दीनाचा ॥ ८१० ॥ मी एक भक्त श्रवणाधिकारी ॥ हेंही न ह्मणें गा मुरारी ॥ ऐसें बोलोनियां पाय धरी ॥ कृपा करी कृपानिधी ॥ ११ ॥ आह्मीं गोत्रसखे सहज ॥ पाय धरणें न घडे तुज ॥ या ह्मणणियाचें निजबीज ॥ कळलें मज गोविंदा ॥ १२ ॥

॥ श्लोक ॥ ॥ त्वं ब्रह्म परमं व्योम पुरुषः प्रकृतेः परः ॥ अवतीर्णोऽसि भगवन् स्वेच्छोपात्तपृथग्वपुः ॥ २८ ॥

॥ टीका ॥ ॥ तूं निर्गुण निर्विशेष ॥ चिन्मात्रैक चिदाकाश ॥ पुरुषांमाजी उत्तम पु

---

[1] आत्मबोध. [2] ब्रह्मज्ञान सांगणारा. [3] मान्य नाहीं. [4] दुसऱ्या देवतेस. [5] पूज्य. [6] ऐकण्याचा अधिकार. [7] रक्षण करणारा. [8] ज्ञानाचा निश्चय. [9] हयगय. [10] न जिंकल्या जाणाऱ्या वासना.

रुष ॥ वंद्य सर्वांस तूं एक ॥ १३ ॥ तूं ब्रह्म गा निर्विकार ॥ प्रकृतिपुरुषांहूनि पर ॥ तुझा वेदशास्त्रां न कळे पार ॥ अगोचर इंद्रियां ॥ १४ ॥ ऐक आमुचे भाग्याची कळा ॥ त्या तुज प्रत्यक्ष देखतों डोळां ॥ मुकुटकुंडलें वनमाळा ॥ घनसांवळा शोभत ॥ १५ ॥ सुंदर राजीव[1]लोचन ॥ पीतांबरपरिधान ॥ देखोनि निवताहे[2] तनुमन[3] ॥ तूं जगज्जीवन जगाचा ॥ १६ ॥ त्या तुझें दर्शन अतिगोड ॥ देखतां पुरे जगाचें कोड ॥ त्याही देहाची तुज नाहीं चाड ॥ ऐसा निचाड तूं देवा ॥ १७ ॥ तरी भक्तकृपेचा कळवळा ॥ धरिसी नानावतारमाळा ॥ भक्तइच्छा तूं स्वलीळा ॥ देहाचा सोहळा दाविसी ॥ १८ ॥ भक्तकृपेनें तत्त्वतां ॥ तूं अवतरलासि[4] कृष्णनाथा ॥ तरी माझिया प्रश्नाचा वक्ता ॥ न प्रार्थितां जाहलासी ॥ १९ ॥ जेवीं वत्सां हुंकारे गाये ॥ वोसरली धांवताहे ॥ तेवीं उद्धवप्रश्नीं देव पाहे ॥ बोलिलाहे निजबोधें[5] ॥ ८२० ॥ धन्यासी दुभतें दोनीसांजें ॥ तेंही वत्सयोगें पाविजे ॥ वत्सासि वाळली सदा सहजें ॥ तेवीं अधोक्षजें उद्धवासी ॥ २१ ॥ उद्धव आवडला आवडीं ॥ त्याच्या प्रश्नाची अतिगोडी ॥ बाप भाग्याची परवडी ॥ जोडिल्या जोडी श्रीकृष्ण ॥ २२ ॥ जें जें कांहीं उद्धव पुसत ॥ त्यासि अंजुळी ओढवी[6] श्रीकृष्णनाथ ॥ आवडी त्यातें चाटूं पहात ॥ भावार्थी अनंत भूलला ॥ २३ ॥ जैशीं अजातपक्ष[7] पिलीं ॥ त्यांसि पक्षिणी चारा घाली ॥ तैसी निजज्ञानगुह्यबोली ॥ कृष्ण हृदयीं घाली उद्धवाचे ॥ २४ ॥ उद्धवप्रश्नाचें उत्तर ॥ पांच श्लोकीं शार्ङ्गधर ॥ साधुलक्षणें विचित्र ॥ अतिपवित्र सांगेल ॥ २५ ॥ साधुलक्षणें अपार जाण ॥ त्यांत उत्तमोत्तम तीस गुण ॥ निवडोनियां श्रीकृष्ण ॥ उद्धवासी आपण सांगत ॥ २६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ कृपालुरकृतद्रोहस्तितिक्षुः सर्वदेहिनाम् ॥ सत्यसारोऽनवद्यात्मा समः सर्वोपकारकः ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ कृपेसी स्वतंत्र जन्म नाहीं ॥ जेथ उपजे तो साधु पाही ॥ कृपा वसे संतांच्या देहीं ॥ त्याचेनि ते पाही दाटुगी जगीं ॥ २७ ॥ कृपा त्यांचेनि महिमें[8] आली ॥ दया त्यांचेनि जीवें झाली ॥ कठिणत्वाची कांटी काढिली ॥ समूळा उपटिली निष्ठुरता ॥ २८ ॥ कृपा भूतमात्राच्याठायीं ॥ सारिखीच सर्वदेहीं ॥ येथ तेथ हें त्या नाहीं ॥ अवकृपा ठायीं निमाली ॥ २९ ॥ दुःख हरोनि सुख देत ॥ नवल कृपाळुत्वाचें चित्त ॥ जीवाचा जीव जीवीं सुत ॥ कृपा अद्भुत तयापरी ॥ ८३० ॥ जेणें आपणासी होय दुःख ॥ तें परासि न करी निःशेख ॥ जेणें आपणिया होय सुख ॥ तें करी आवश्यक प्राणिमात्रां ॥ ३१ ॥ या नाव कृपाळुता ॥ हें पहिलें लक्षण संतां ॥ दुसरें तें अद्रोहता[9] ॥ ऐक आतां सांगेन ॥ ३२ ॥ लोकीं हिंडतां अद्रोहता ॥ ठावो न लभेचि सर्वथा ॥ मग शरण आला साधुसंतां ॥ सावकाशता वस्तीसी ॥ ३३ ॥ ते दयाळु शरणागता ॥ तिहीं प्रतिपाळिली अद्रोहता ॥ भूतीं भग

---

१ कमलनेत्र. २ शांत होत आहेत. ३ शरीर आणि मन. ४ अवतार घेतलास. ५ आत्मज्ञानानें. ६ पसरतो. ७ पंख न आलेलीं. ८ मोठेपणास. ९ द्रोह न करणें.

वंत देखतां ॥ द्रोहाची वार्ता नि[1]माली ॥ ३४ ॥ व्याघ्रसर्पादि देहांसी ॥ कदा द्वेष नु[2]पजे त्यांसी ॥ जरी देऊं आले उपद्रवासी ॥ तरी द्वेषासी करीना ॥ ३५ ॥ देहास आली आपदा ॥ तेणें सांडी करी प्रारब्धा ॥ द्वेष येऊं नेदी कदा ॥ नातळे क्रोधा निजबळें ॥ ३६ ॥ हे जाण पां अद्रोहता ॥ दुसरें लक्षण तत्त्वतां ॥ तितिक्षा[3] ते ऐक आतां ॥ सहनशीलता साधूंची ॥ ३७ ॥ शांति परदेशी झाली होती ॥ जेथें जाये तो दवडी परती ॥ मग अतिदीन येतां काकूलती ॥ निजधामा[4] संतीं आणिलो ॥ ३८ ॥ संतीं वाढविली अतिप्रीतीं ॥ ते भगवंतासि झाली पँढियंती[5] ॥ तेणें आपुली निजसंपत्ती ॥ शांतीच्या हातीं दीधली ॥ ३९ ॥ शांती सकळ वैभवेंसी ॥ अखंड असे संतांपाशीं ॥ यालागीं सहनशीलता तयांसी ॥ अहर्निशीं अनिवार ॥ ८४० ॥ हिंडतां सकळभूतीं सैराटा ॥ न ह्मणे हा भला वोखटा[6] ॥ नाचत निजशांतीचे चोहटा ॥ संत गोमटा त्या नाव ॥ ४१ ॥ ऐशी जे सहनशीलता ॥ ते तितिक्षा जाण तत्त्वतां ॥ हे तिसरी लक्षणता ॥ सत्याची सत्यता अवधारी ॥ ४२ ॥ सत्य अँल्पायुषी[7] झालें येथें ॥ मरे उपजे तेथिंच्या तेथें ॥ कोठें कांहीं नव्हेचि वाढतें ॥ तेणें संतांतें टाकिलें ॥ ४३ ॥ सत्यासी संतांसी होतां भेटी ॥ तंव सत्यस्वरूपीं पडली गांठी ॥ सत्य सदसत्यें उठी ॥ झालें सृष्टीं चिरायु ॥ ४४ ॥ यापरी सत्य संतदृष्टीं ॥ सत्य सारें आलें[8] पुष्टीं ॥ तंव बळें वाढलें सृष्टीं ॥ सत्यें भेटी परब्रह्मीं ॥ ४५ ॥ संतांसि व्हावया उतरायी ॥ सत्य लागलें त्यांचे पायीं ॥ संतचरणावेगळा पाही ॥ थारा नाहीं सत्यासी ॥ ४६ ॥ ऐसें सत्यास आधारभूत ॥ ज्यांचे पाखोवा सत्य जीत ॥ ज्यांचेनि बळें सत्य समर्थ ॥ ते शुद्ध संत जाणावे ॥ ४७ ॥ ज्यांसि सबाह्य सत्यत्वें तुष्टी ॥ जे सत्यस्वरूपें आले पुष्टी ॥ सत्यें घाली दे ढेंकर दृष्टी ॥ ज्यांची उठी सत्यत्वें ॥ ४८ ॥ या नांव जाण सत्याचें सार ॥ हें संतांचें वसतें घर ॥ हे मज मान्य संत साचार ॥ मी निरंतर त्यांपाशीं ॥ ४९ ॥ जीहीं असत्याची वाहूनि आण ॥ ज्यांमाजी सत्य सप्रमाण ॥ जे सदा सत्यत्वें संपन्न ॥ हें मुख्य लक्षण साधूंचें ॥ ८५० ॥ या नांव सत्य सार ॥ संतलक्षण साचार ॥ हा चौथा गुण सधर ॥ अनवद्य अपार तें ऐका ॥ ५१ ॥ निंदा असूयादि[9] दोष समस्त ॥ निजात्मबोधें प्रक्षाळित ॥ अत्यंत पवित्र केलें चित्त ॥ अनिंदित निजबोधें ॥ ५२ ॥ गुरुआज्ञातीर्थीं न्हाला ॥ न्हावोनि सर्वांगीं निवाला ॥ त्रिविधतापें सांडँवला[10] ॥ पवित्र झाला मद्रूपें ॥ ५३ ॥ काय सांगूं त्याची पवित्रता ॥ तीर्थें मागती चरणतीर्था ॥ मीही पदरज वांछिता ॥ इतरांची कथा काय ती ॥ ५४ ॥ कृष्ण ह्मणे उद्धवा ॥ हा अनवद्य गुण पांचवा ॥ ऐक आतां सहावा ॥ सम सर्वां समभावें ॥ ५५ ॥ निजरूपें सर्वसमता ॥ समचि देखे सर्वभूतां ॥ निःशेषें[11] निमाली[12] विषमता ॥ जेवीं सैंधवता सागरीं ॥ ५६ ॥ नाना अलंकार

---

१ गेली. २ उत्पन्न होत नाहीं. ३ क्षमा. ४ आपल्या घरीं. ५ आवडती. ६ वाईट. ७ नष्टप्राय. ८ शुद्ध. ९ गुणांवर दोषांचा आरोप करणें. १० दूर झाला. ११ सर्व. १२ नाहींसी झाली.

पदार्थां ॥ सोनेपणें विकत घेतां ॥ ते ते पदार्थ न मोडितां ॥ स्वभावतां सम सोनें ॥ ५७ ॥ तैसे नानाकार नाना[1] नाम ॥ अवघें जग दिसे विषम ॥ साधुचिद्रूपें सर्व सकाम ॥ न देखे विषम निजबोधें ॥ ५८ ॥ ऐशिया समसाम्यावस्थेसी ॥ दैवें आलिया सुखदुःखांसी ॥ तेही मुकली द्वंद्वभावासी ॥ सहजें समरसीं निजसाम्यें ॥ ५९ ॥ सव्यें[2] मिनल्या[3] महानदीसी ॥ अपसव्यें[4] आल्या गांवरसासी ॥ गंगादोहींतेंही समरसी ॥ गुणदोषांसी उडवूनी ॥ ६० ॥ तेथ पवित्र अपवित्रता ॥ बोलूंचि नये सर्वथा ॥ गोडकडूपणांची वार्ता ॥ निजांगें समता करी गंगा ॥ ६१ ॥ तैसें सुखदुःखांचें भान ॥ साधूंसि समत्वें समान ॥ सदा निजबोधें संपन्न ॥ हें अगाध लक्षण संतांचें ॥ ६२ ॥ नटिया[5] एकचि एकला ॥ गायव्याघ्रांचें सोंग अवगला[6] ॥ भीतरी खेळा जैं बोळखिला ॥ तैं फिटला भवभ्रमू ॥ ६३ ॥ तैशी भयाभयवार्ता ॥ द्वैतभावो उठी सर्वथा ॥ साधु उभयसाम्यें पुरता ॥ भयनिर्भयता तो नेणें ॥ ६४ ॥ द्वंद्वसाम्यें परिपूर्ण ॥ साधूचा हा सहावा गुण ॥ एक सातवें लक्षण ॥ परोपकारीपण तयाचें ॥ ६५ ॥ पत्र पुष्प छाया फळ ॥ त्वचा काष्ठ समूळ मूळ ॥ वृक्ष सर्वांगें सफळ ॥ सर्वांसि केवळ उपकारी ॥ ६६ ॥ जो वृक्ष प्रतिपाळी ॥ कां जो घाव घाली मूळीं ॥ दोनींतें वृक्ष पुष्पीं फळीं ॥ समानमेळीं तुष्टला ॥ ६७ ॥ मोडूनि फळें आलिया वृक्षें ॥ तो एकही स्वयें न चाखे ॥ तेवीं कर्मफळा जो न टेंके ॥ तो यथासुखें परब्रह्म ॥ ६८ ॥ तैसा कायावाचामनें प्राणें ॥ साधु बाढला उपकाराकारणें ॥ आपुलें पारखें ह्मणों नेणें ॥ उपकारू करणें सर्वांसी ॥ ६९ ॥ होकां चंद्र उगवोनि अंबरीं ॥ जेवीं जगाचे आंधारें निवारी ॥ विश्वाचा ताप दूर करी ॥ निववी निजकरीं सर्वांतें ॥ ८७० ॥ तेथ चंद्रामृत चकोरीं सेवावें ॥ येरांसी चंद्र न ह्मणें न द्यावें ॥ जोजो भजे जेणें भावें ॥ तोतो पावे तें सुख ॥ ७१ ॥ तैसेंचि जाण साधूपाशीं ॥ जोजो श्रद्धा करी जैशी ॥ त्यात्या देतसे सुखासी ॥ होत जगासी उपकारी ॥ ७२ ॥ काउळे चंद्रासि हेळसिती ॥ चकोर चंद्रामृत सेविती ॥ तेवीं दुष्ट साधूतें धिक्कारिती ॥ भावार्थी पावती निजलाभू ॥ ७३ ॥ सातव्या लक्षणाचा उभारा ॥ सांगीतलें परोपकारा ॥ पुढीलश्लोकीं लक्षणें अकरा ॥ साधुनिर्धारा सांगत ॥ ७४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कामैरहतधीर्दांतो मृदुः शुचिरकिंचनः ॥ अनीहो मितभुक् शांतः स्थिरो मच्छरणो मुनिः ॥ ३० ॥ ॥टीका॥ ॥उर्वशी आलिया सेजेंसी ॥ कामक्षोभ[7] नुपजे ज्यासी ॥ स्वानंदें भोगितां अहर्निशीं ॥ विषयकामासीं विसरला ॥ ७५ ॥ रंकू[8] पालखिये बैसला ॥ तो पूर्ववाहना विसरला ॥ तेवीं हा निजानंदें तृप्त झाला ॥ काम विसरला तुच्छत्वें[9] ॥ ७६ ॥ कांहीं अप्राप्त पावावया कामावें[10] ॥ साधूसि अप्राप्तता न संभवे ॥ प्राप्तपदीं यथागौरवें ॥ निजानुभवें विराजतू ॥ ७७ ॥ ख

---

१ अनेक. २ डावेकडून. ३ मिळाल्या. ४ उजवेकडून. ५ सोंग घेणारा. ६ वटला. ७ कामाचा उद्वेग. ८ दरिद्री. ९ परिणामीं हेय यामुळें. १० इच्छा करितो.

घोतां सूर्य भेटों जातां ॥ खद्योता न भेटे सविता ॥ सूर्यासीं न भेटवे खद्योता ॥ तेवीं अप्राप्तता साधूसी ॥ ७८ ॥ एवं उभयपरीं पाहतां ॥ कामू निवाला सर्वथा ॥ हें आठवें लक्षण तत्त्वतां ॥ अकामता साधूची ॥ ७९ ॥ सावधानें अंतर नेमितां ॥ तेचि बाह्येंद्रियां नियामकता ॥ जेवीं कां लेंकीसी शिकवण देतां ॥ सून सर्वथा चळीं कांपे ॥ ८८० ॥ मुख्य धूर रणीं लागल्या हातां ॥ येर कटक जिंतिलें न झुंझतां ॥ कां मूळ छेदिलें असतां ॥ शाखा समस्तां छेदिल्या ॥ ८१ ॥ एवं अंतरवृत्तीचा जो नेम ॥ तोचि बाह्येंद्रियां उपरम ॥ ऐसेंनीही जें उपजे कर्म ॥ तें निर्भ्रम अहैतुक ॥ ८२ ॥ अंतर जडलें आत्मस्थितीं ॥ बाह्य रंगली मद्वृत्ती ॥ तेथें जीं जीं कर्मे निपजती ॥ तीं तीं होती ब्रह्मरूप ॥ ८३ ॥ बाह्येंद्रियीं करितां नेम ॥ अंतरींचें कर्मीं प्रकटे ब्रह्म ॥ हा बाह्येंद्रियांचा नेम ॥ आत्मारांम जाणती ॥ ८४ ॥ ऐशी बाह्येंद्रियनियामकता ॥ हे जाणावी साधूची दांतता ॥ हा नववा गुण तत्त्वतां ॥ ऐक आतां दशमातें ॥ ८५ ॥ आकाश सर्वांसीही लागे ॥ परी कठिण नव्हे कोणी भागें ॥ तेवीं साधु जाण सर्वांगें ॥ मृदु लागे सर्वांसी ॥ ८६ ॥ पिंजल्या कापुसाचा गोळा ॥ फोडूं नेणें कोणाच्या कपाळा ॥ तैसाचि साधूचा जिव्हाळा ॥ अतिकोंवळा सर्वांसी ॥ ८७ ॥ पाहे पां जैसें गंगाजळ ॥ गायीव्याघ्रांसी करी शीतळ ॥ तैसाचि साधु केवळ ॥ मृदु मंजुळ सर्वांसी ॥ ८८ ॥ साधूची अतिमृदुता ॥ या नांव जाण सर्वथा ॥ हें दशम लक्षण योग्यता ॥ ऐक आतां अकरावें ॥ ८९ ॥ साधूंची जे शुचिष्मंतता ॥ ते भगवद्भजनेंचि तत्त्वतां ॥ व्रततपदानादितीर्थां ॥ शुचिष्मंतता त्यांचेनी ॥ ८९० ॥ परदारा आणि परधन ॥ सर्वथा नातळे ज्यांचें मन ॥ गंगादि तीर्थें त्यांचें जाण ॥ चरणस्पर्शन वांछिती ॥ ९१ ॥ स्वदारा स्वधन सलोभता ॥ अवश्य जाणें अधःपांता ॥ द्रव्यदारानिरपेक्षता ॥ शुचिष्मंतता साधूची ॥ ९२ ॥ ऐशी असोनि शुचिष्मंतता ॥ तो निंदीना व्रततपादि तीर्थां ॥ तेते विधीतें आचरितां ॥ सदाचारता अतिश्रोत्रीं ॥ ९३ ॥ पडिलिया मगरमिठी ॥ ते न सोडी प्राण संकटीं ॥ सांपडे तें सगळेंचि घोटी ॥ तैशी पडली मिठी जीवब्रह्मां ॥ ९४ ॥ हें पुढें सूनि परब्रह्म ॥ आश्रमधर्मादि स्वकर्म ॥ आचरोनि दावी उत्तमोत्तम ॥ कर्मीं ब्रह्मप्रतीती ॥ ९५ ॥ कर्म करितो लोक ह्मणती ॥ तो वर्तताहे ब्रह्मस्थितीं ॥ हें ज्याचें तो जाणे निश्चितीं ॥ लोका प्रतीती कळेना ॥ ९६ ॥ कुल्लाळ भांडें करूनि उतरी ॥ चक्र भोंवें पूर्वील भंवरीं ॥ तैसा साधू पूर्वसंस्कारीं ॥ स्वकर्में करी वृत्तिशून्य ॥ ९७ ॥ हें साधुलक्षण अत्यंत थोर ॥ ऐकतां सुगम करितां दुर्धर ॥ हें अकरावें अतिपवित्र ॥ ऐक विचित्र तें बारावें ॥ ९८ ॥ साधूची अपरिग्रहता ॥ परिग्रहो नातळे चित्ता ॥ देह गेहें निःसंगता ॥ अकिंचनता त्यासी नांव ॥ ९९ ॥ स्फटिक जपाकुसुमीं ठेविला ॥

---

१ काजव्यास. २ योजिलें असतां. ३ आत्म्याच्याच ठिकाणीं रममाण होणारे. ४ अंतःकरण. ५ नरकास. ६ पवित्रपणा. ७ गिळी. ८ कुंभार. ९ फिरे. १० कोणत्याही वस्तूचा स्वीकार न करणें.

पाहतां दिसे तांबडा झाला ॥ नीळवर्णीं भासे निळा ॥ तरी तो वेगळा शुद्धत्वें ॥ ९०० ॥ स्फटिक जपाकुसुमीं[1] ठेविला ॥ पाहतां दिसे तांबडा झाला ॥ परी तो अलिप्तपणें संचला ॥ नाहीं माखला तेणें रंगें ॥ १ ॥ तैसा साधु परिग्रहामाजी वसे ॥ परिग्रही[2] झालाही दिसे ॥ परी जागृतिस्वप्नसुषुप्तिवशें ॥ परिग्रहो न स्पर्शे निजबोधें ॥ २ ॥ परीस सर्वधातूंसी खेंव देतां ॥ मिळणीं सोनें करी तत्त्वतां ॥ तो सुवर्णावांचूनि सर्वथा ॥ आणिका पदार्था नातळे ॥ ३ ॥ तैसा साधू ह्मणे जें जें माझें ॥ तें तें त्यासी नाठवे दुजें ॥ ऐक्यभावाचें नाचवी भोजें ॥ अधोक्षजें अंकितु ॥ ४ ॥ चिन्मात्रीं जडलें मन ॥ विश्व जाहलें चैतन्यघन ॥ बुडालें परिग्रहाचें भान ॥ अकिंचनपण या नांव ॥ ५ ॥ सकळ सांडूनि वनां गेला ॥ वनीं वनिता चिंतूं लागला ॥ तो त्यागचि बाधकत्वा आला ॥ उलथोन पडिला परिग्रहीं ॥ ६ ॥ उडणी भिंती चढों आहे ॥ चढते कष्ट व्यर्थ पाहे ॥ ते पूर्वील्यापरीस तळीं जाये ॥ उलंडूनि ठाये अतिदुःखी ॥ ७ ॥ तैशी मुंगी नव्हे पाहे ॥ उडणी घेऊनि वृक्षावरी जाये ॥ सत्संगतीं मूर्ख उद्धरो लाहे ॥ परी ते उपाये न करिती ॥ ८ ॥ मुंगी लहान उडणी[3] थोर ॥ ते तिचा करूं शके उद्धार ॥ तैसे अकिंचन जे नर ॥ ते करिती उद्धार सकळांचा ॥ ९ ॥ असो मूर्खांची जे त्यागगती ॥ ते अत्यंतबाधें बाधक होती ॥ जंव धरिली नाहीं सत्संगती ॥ तंव त्यागस्थिती कळेना ॥ ९१० ॥ प्रपंच सांडूनि वनां गेला ॥ तो देहप्रपंचें दृढ अडकला ॥ देहीं देहो जेणें मिथ्या केला ॥ तो सत्य झाला अकिंचन[4] ॥ ११ ॥ मूर्खासि त्याग तो झाला बाधू ॥ परिग्रहीं असोनि मुक्त साधू ॥ सबाह्य त्यागें अतिशुद्धू ॥ शुकनारदू तिहीं लोकीं ॥ १२ ॥ ते दोघेही लागती जनकाच्या पायीं ॥ तो राज्य करितांही विदेही[5] ॥ त्यासि जाणीतसें[6] मीही ॥ नवल नवाई साधूची ॥ १३ ॥ या नांव मुख्य अकिंचनता ॥ तुज म्यां सांगीतली तत्त्वतां ॥ हे बारावी लक्षणता ॥ एक आतां अनीहा[7] ॥ १४ ॥ अनीहा झाली बापुडी ॥ जेथ जाय तो दूर दवडी ॥ कोणी राहोंनेदी अर्धघडी ॥ अतिचरफडी निराश्रयें ॥ १५ ॥ अनीहा हिंडतां लोकीं तिहीं ॥ तिळभरी ठावो वसावया नाहीं ॥ ईहा वैरिणी लागली पाही ॥ ठायींच्या ठायीं दंडवी ॥ १६ ॥ कोणी येवों नेदी दाराकडे ॥ अतिदीन झाले बापुडे ॥ धाय मोकलोनि रडे ॥ गार्‍हाणें संतांपुढें देवों आली ॥ १७ ॥ ते कृपाळू दयामेळें ॥ निज करें पुसोनि डोळे ॥ प्रतिपाळिली स्वहितकाळें ॥ संतबळें वाढली ॥ १८ ॥ त्यापूर्वील वैर स्मरोनियां ॥ ईहा वैरिणी साधावया ॥ संतांसि पुसोनि उपाया ॥ तिच्या अपाया प्रवर्तली ॥ १९ ॥ ईहेसि नानाचेष्टीं चेष्टवितां ॥ अहं आणि ममता ॥ कामें अंगीं घातली तत्त्वतां ॥ कामकांता ते झाली ॥ ९२० ॥ ईहा कामबळें वाढली थोर ॥ व्यापूनि राहिली घरोघर ॥ तिसी साधावया वैर ॥ अनीहा सत्वर चालिली ॥ २१ ॥ अनीहा पाठीं लागल्या जाण ॥ अहंममतेसी

---

[1] जास्वंदीच्या फुलावर. [2] सर्व वस्तूंचें ग्रहण करितो असा. [3] एक प्रकारचा किडा. [4] ज्याजवळ कांहीं नाहीं तो. [5] देहाभिमान ज्यास नाहीं असा. [6] जाणतों. [7] मुळींच इच्छा नसणें.

ह्मातारपण ॥ थरथरां कांपोनि प्राण ॥ घायेंवीण सांडवी ॥ २२ ॥ असंगशस्त्र मागोनि संतां ॥ ईहेच्या करावया घाता ॥ आधीं मारूं धांवे अहंममता ॥ दोघें धांकतां निमालीं ॥ २३ ॥ अनीहा देखोनि दिठीं ॥ काम पळे बारावाटीं ॥ संकल्पाचे शेवटिले गांठीं ॥ उठाउठी साधिला ॥ २४ ॥ काम पडला रणांगणीं ॥ क्रोधादि शूर पडियेले रणीं ॥ ईहेचा कैवारी नुरेच कोणी ॥ एकेक शोधूनी मारिले ॥ २५ ॥ एवं अनीहसमोर ॥ राही ऐसा नाहीं वीर ॥ मारूनि अवघ्यांचा केला चूर ॥ क्रिया करणार कोणी नाहीं ॥ २६ ॥ काम निमाल्या सर्वथा ॥ ईहा रांडवैली वस्तुतां ॥ मुख न दावीच संतां ॥ अधोगमनता पळाली ॥ २७ ॥ यालागीं ईहेसवें जो लागला ॥ तो जाणावा अधोगतीं गेला ॥ अनीहेचा जो अंकितैं झाला ॥ तो आवडला गोविंदा ॥ २८ ॥ ह्मणसी अनीहा ते कोण ॥ काय तियेचें लक्षण ॥ ऐक सांगेन संपूर्ण ॥ जेणें वाँणे खूण जिव्हारीं ॥ २९ ॥ कामकर्मादि क्रियाजाळ ॥ तेचि ईहा जाणावी अतिचपळ ॥ अंतरीं जे सुनिश्चळ ॥ तेचि केवळ अनीहा ॥ १३० ॥ अंतरीं कामाची वार्ता ॥ नुपजे कर्मांची कर्मावस्था ॥ अणुभरी न रिघे उद्वेगैंता ॥ अनीहा तत्त्वतां ते जाणा ॥ ३१ ॥ ऐशी अनीहा असे ज्यासी ॥ देव आज्ञाधारकू त्यापाशीं ॥ ते अनीहा संतांची दासी ॥ अहर्निशीं जीवें भावें ॥ ३२ ॥ हे अनीहा अतिगौरवें ॥ साधुलक्षण तेरावें ॥ मितभोजन तें चौदावें ॥ लक्षणवैभवें अवधारी ॥ ३३ ॥ न कोडे रसनेच्चिया चाडा ॥ न पडे क्षुधेचा पांगडा ॥ आवडी नावडीचा उपाडा ॥ करूनि निधडा भोजनीं ॥ ३४ ॥ प्राणु आकांक्षी अन्नातें ॥ जठराग्नि भक्षी त्यातें ॥ उभयसाक्षी मी येथें ॥ जाणोनि निरुते रस सेवीं ॥ ३५ ॥ जें जें आलें भोजनासी ॥ दृष्टीनें त्याचे दोष हरसी ॥ अतिपवित्र करूनि त्यासी ॥ निजसमरसीं सेवितू ॥ ३६ ॥ न देखे भोग्यपदार्था ॥ नाठवे मी एक भोक्ता ॥ ग्रासी समरसी अच्युता ॥ भोगूनि अभोक्ता मितभोजी ॥ ३७ ॥ अग्नि आधीं आपण्याऐसें करी ॥ मग त्या आहारातें अंगीकारी ॥ साधु आधीं द्वैतातें निवारी ॥ मग स्वीकारी आहारातें ॥ ३८ ॥ याचि नांव मितभोजन ॥ साधूचे आहाराचें लक्षण ॥ युक्तीवीण अल्प भोजन ॥ तें पथ्य जाण रोग्याचें ॥ ३९ ॥ ग्रासोग्रासीं ब्रह्मार्पण ॥ त्या नांव परिमितभोजन ॥ हें चौदावें लक्षण ॥ साधूचें जाण उद्धवा ॥ १४० ॥ समळजळसंभारीं ॥ सरितामेळू मिळे सागरीं ॥ तो ढुळेना तिळभरी ॥ निर्विकारी निर्मळू ॥ ४१ ॥ ऐशा आलिया नाना ऊर्मी ॥ ज्यांसि गजबजु नाहीं मनोधर्मी ॥ शांति संताचा पराक्रमी ॥ उपक्रमी निजशक्ती ॥ ४२ ॥ जेवीं कां नागवेली वेली ॥ आधारावीण न वचे गेली ॥ तैसी संतबळें शांती वाढली ॥ मंडपा चढली चिन्मात्रा ॥ ४३ ॥ झांकळोनि दशदिशासी ॥ आभाळ दाटल्या आकाशीं ॥ गगन अविकारी त्या दोषासी ॥ आभाळासी नातळे ॥ ४४ ॥

---

१ मुळींच इच्छा नसणें. २ विषयवासना. ३ पतिरहित झाली. ४ स्वाधीन. ५ ठसे. ६ थोडीही. ७ उदासीनपणा. ८ प्रमाणानें आहार करणें.

शीत उष्ण पर्ज्यन्यधारा ॥ अंगीं नलगतीं अंबरा[1] ॥ तेवीं साधूचा उभारा ॥ द्वंद्वसंभारा निर्द्वंद्व ॥ ४५ ॥ तैशा उंच नीच नाना अवस्था ॥
निबिड दाटल्या मोहममता ॥ क्षोभु नुपजे ज्याच्या चित्ता ॥ त्यानांव तत्त्वतां निजशांती ॥ ४६ ॥ संताचेनि शांति गहन ॥ शांतीचेनि
संत पावन ॥ हें अन्योन्य निजलक्षण ॥ पंधरावा गुण संताचा ॥ ४७ ॥ जैं मीपणें नव्हतें जन्मनाम ॥ तेंच पूर्वजाचें निजधाम ॥
आपुली मिरासो जे उत्तम ॥ तेथ मनोधर्म स्थिरू ज्याचा ॥ ४८ ॥ मज जन्मचि नाहीं झालें ॥ मरण म्यां नाहीं देखिलें ॥ ऐसें मन मू
ळीं स्थिरावलें ॥ स्थिरता बोलें या नांव ॥ ४९ ॥ चहूं आश्रमांहूनि उत्तम ॥ आपुला जो निजाश्रम ॥ तेथें स्थिरावोनि मनोधर्म ॥ व
र्णाश्रम चालवी ॥ ९५० ॥ चहूंवर्णांमाजी पवित्रता ॥ जाणा ब्राह्मणांची ब्राह्मणता ॥ तेथें स्थिराविलें जेणें चित्ता ॥ जाण स्थिरता ती
नांव ॥ ५१ ॥ तिहीं लोकीं स्थिरता ॥ मरों टेंकली सर्वथा ॥ कोणा नाहीं प्रतिपाळिता ॥ हातीं धरिती नदेखे ॥ ५२ ॥ दारीं राहों नेदी को
णी ॥ कोण देईल पथ्यपाणी ॥ अवघी ठाकली निराजनीं ॥ ते सज्जनीं प्रतिपाळिली ॥ ५३ ॥ स्थिरता वाढली संतबळें ॥ जिणोनि व
र्णाश्रमादि टवाळें ॥ भेदोनि आकारादिवर्णपडळें ॥ एके वेळे वाढली ॥ ५४ ॥ स्वस्वरूपीं सायुज्यता ॥ पावोनि स्थिरावली स्थिरता ॥
तेथ वाट मोकळी संता ॥ स्वभावतां त्यां केली ॥ ५५ ॥ तेथ स्वस्वरूपें स्वकर्म ॥ स्वस्वरूपें वर्णाश्रम ॥ स्वस्वरूपें स्वधर्म ॥ स्थिरतासंभ्रम
या नांव ॥ ५६ ॥ ऐसी स्वधर्मकर्मीं अवस्था ॥ ती नांव उत्तम स्थिरता ॥ हे सोळावी लक्षणता ॥ मच्छरणता ते ऐक ॥ ५७ ॥ सरिता सा
गरा शरण आली ॥ ते समरसोनि सिंधू[2] झाली ॥ तैशी शरण जे वृत्ती मज आली ॥ ते पावली दशा माझी ॥ ५८ ॥ लवण जीवना आ
लें शरण ॥ तें तत्काळ जाहलें जीवन[3] ॥ तैसा अनन्य मज जो शरण ॥ तोचि मीं जाण होऊनि ठाकें ॥ ५९ ॥ मज रिघोनियां[4] शरण ॥
जे वांछिती महिमा सन्मान ॥ तो गुळांतील पाषाण ॥ केवळ जाण गुळदगडू ॥ ९६० ॥ जो कां गुळें माखिला दगडू ॥ तो पाहतां दि
से वरिवरी गोडू ॥ शेखीं[5] परिपाकीं[6] निवाडू ॥ अतिजडू कठिणत्वें ॥ ६१ ॥ तैसें वरिवरी दावी माझें भजन ॥ हृदयीं विषयअभिलाषण[7] ॥
तो नव्हे माझा अनन्यशरण ॥ अतिदूषण लोभांचें ॥ ६२ ॥ सर्वांगीं सुंदर सुरेख ॥ जिच्या नाकावरी पांढरें ठिकें[8] ॥ तिसी वरीना साधु
लोक ॥ तैसा विषयलोभ देख मद्भजनीं ॥ ६३ ॥ रांडवा[9] केलें काजळकुंकूं ॥ देखोनि जग लागे थुंकूं ॥ तैसा विषयाचा अभिलाखू ॥ जे
वीं वोकिला वोकू अतिनिंद्य ॥ ६४ ॥ त्रैलोक्यसाम्राज्यवैभव जाण ॥ जो थुंकोनि रिघाला मज शरण ॥ तो समरसें[10] मीची
जाण ॥ मानापमान त्या कैंचा ॥ ६५ ॥ या नांव मच्छरण ॥ हें सतरावें लक्षण ॥ उद्धवा जाण संपूर्ण ॥ मननगुण तो ऐक ॥ ६६ ॥

---

१ आकाशास. २ समुद्र. ३ पाणी. ४ येऊन. ५ शेवटीं. ६ पाकामध्यें. ७ इच्छा. ८ पांढरा कोडाचा चट्टा. ९ विधवेनें. १० समानधर्मानें.

श्रुतिगुरुवाक्यें निरू[1]पण ॥ ऐकतां अद्वैतश्रवण ॥ युक्तिप्रयुक्तीं पर्या[2]लोचन ॥ मनन गुण त्या नांव ॥ ६७ ॥ अग्निकापुरां भेटी होतां ॥
तो अग्नीचि होय वस्तु[3]तां ॥ तेवीं माझे स्वरूपीं मन ठेवितां ॥ मन चित्स्वरूपता पावलें ॥ ६८ ॥ मन चिदंशें असे जाण ॥ तें चिन्मात्र
जाहलें करितां मनन ॥ जेवीं जीवनीं जन्मलें लवण ॥ तें होय जीवन निजमिळणीं ॥ ६९ ॥ ऐसे मननाचेनि लवलाहें ॥ मन जेथ
वरी जावों पाहे ॥ तेथवरी तया मीचि आहें ॥ नवचतां राहें तेथ मीचि ॥ १७० ॥ दीप जेउ[4]तां जाऊं बैसे ॥ तेउं[5]ता प्रकाशचि तया
असे ॥ कोठेंही नवचोनि ठार्यी वसे ॥ तेथेंही वसे प्रकाशू ॥ ७१ ॥ तेथें माझें करितां मनन ॥ मद्रूपचि जाहलें मन ॥ मग करितां
गमनागमन ॥ मद्रूपता जाण मोडेना ॥ ७२ ॥ एवं माझें स्वरूप जें केवळ ॥ तेथें मद्रूपें मन निश्चळ ॥ ध्रुवाचेपरी अचं[6]चळ ॥ मननशीळ
त्या नांव ॥ ७३ ॥ मुनि या पदाचें व्याख्यान ॥ मननशीलता जाण ॥ हें अठरावें लक्षण ॥ तेंही निरूपण सांगितलें ॥ ७४ ॥ अत्यंत
गोड निरूपण ॥ पुढिले श्लोकीं दशलक्षण ॥ तें ऐकावया उद्धव सावधान ॥ सर्वांगीं कान होऊनि ठेला ॥ ७५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अप्रमत्तो
गभीरात्मा धृतिमान् जितषड्गुणः ॥ अमानी मानदः कल्पो मैत्रः कारुणिकः कविः ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ ॥ जंववरी वृत्तिशून्य नव्हे मन ॥
तंववरी विश्वासेना विचक्षण[7] ॥ वृत्तिरूपेंसी तरील जाण ॥ यालागीं सावधान निजबोधें ॥ ७६ ॥ हाहो दुर्वासाऐसा सज्ञान ॥ त्यासि
क्षणक्षणा क्षोभवी मन ॥ नविचारितां गुणागुण ॥ शाप दारुण देवों धांवे ॥ ७७ ॥ दुर्गंधा जन्मली मत्स्याचे पोटीं ॥ पराशर नाडला
तीसाठीं ॥ नारद कौतुक[8]पाहतां दिठीं ॥ केला गंगातटीं नारदी ॥ ७८ ॥ आपुली कन्या देखोनी गोमटी ॥ मनक्षोभें भोगावया उठी ॥
ब्रह्मा धांवें सरस्वतीपाठीं ॥ जोकां स्रष्टी पितामहो ॥ ७९ ॥ या मनाऐसें नाटक ॥ जगामाजी नाहीं आणिक ॥ छळछळोनि नाडी
ज्ञातेलोक ॥ साधु घातक मनाचे ॥ १८० ॥ ह्मणाल मनेंवीण भोग घडे ॥ तरी वृत्तीसि क्षोभू कां पां चढे ॥ हे बोल बोलती सज्ञानवेडे ॥
साधूसि नावडे हे गोष्टी ॥ ८१ ॥ अधिष्ठूनि सत्वगुण ॥ सूक्ष्मरूपें वृत्ति जाण ॥ ते क्षोभवूनियां मन ॥ मी मुक्त ह्मणोन पिसें करी ॥ ८२ ॥
मुक्ताभिमानें विषयासं[9]क्ती ॥ हेचि मनक्षोभाची प्राप्ती ॥ वृत्ति असोनियां मुक्ती ॥ साधू न मानिती सर्वथा ॥ ८३ ॥ अतिनाटकी नाटक
मन ॥ मुक्तत्वें धरी अभिमान ॥ त्याचें करावया निर्दळण ॥ साधू सावधान निजबोधें ॥ ८४ ॥ मुखीं धरिल्या कृष्णसर्पासी ॥ ढील
करितां तो तत्काळ ग्रा[10]सी ॥ मरे तंववरी आवळावें त्यासी ॥ तेवीं मनासी निर्दाळिती ॥ ८५ ॥ मन निर्दाळावें सावधानता ॥ बोलिलें तें
साधुसंता ॥ हा एकुणिसावा गुण सर्वथा ॥ ऐक आतां विसावा ॥ ८६ ॥ वर्षा[11]काळीं जळवळें सरिता ॥ आल्या समुद्र नुचंबळे सर्व

---

१ सांगणें. २ वरचेवर विचार करणें. ३ खरोखर. ४ जेथें जेथें. ५ तेथें तेथें. ६ स्थिर. ७ चांगली. ८ वेडें. ९ विषयाचें प्रेम. १० खातो. ११ पर्जन्यकाळांत.

र्थी ॥ उष्णकाळीं त्या न येतां ॥ क्षोभोनी सर्वथा आटेना ॥ ८७ ॥ तैसें जाहलिया समृद्धी धन ॥ साधूचें उल्हासेना मन ॥ सकळ जाऊ
नि जाहला निर्धन ॥ दीनवदन तो नव्हे ॥ ८८ ॥ दिवसराती येतां जातां ॥ प्रकाशें पालटेना सविता ॥ तेवीं आल्यागेल्या नाना अव
स्था ॥ गंभीरता अक्षोभ ॥ ८९ ॥ कडकडीत विजेचे कल्लोळ ॥ तेणें गगनासि नव्हे खळबळ ॥ तैसा नानाउर्मीमाजी निश्चळ ॥ गांभी
र्य केवळ या नांव ॥ ९९० ॥ हे संताची गंभीरता ॥ विसावा जीवशिवांसी तत्त्वतां ॥ हे विसावी संतांची अवस्था ॥ धृतीची[1] व्यवस्था
अवधारी ॥ ९१ ॥ मन बुद्धि इंद्रियें प्राण ॥ निजधैर्यें धरोनि आपण ॥ नित्य केलिया आत्मार्पण ॥ परतोनी जाण येवों नेदी
॥ ९२ ॥ स्वयंवरीं जिणोनि अरिरायासी[2] ॥ बळें आणिलें नोवरीशी ॥ तो जाऊं नेदी आणिकापाशीं ॥ तेवीं वृत्तीसी निजधैर्य ॥ ९३ ॥
वागुरें बांधिल्या मृगासी ॥ पारधी न जाऊं दे त्या वनासी ॥ तेवीं धैर्यें आकळूनि मनासी ॥ देहापाशीं येऊं नेदी ॥ ९४ ॥ देहासि नाना
भोगसमृद्धी ॥ वाऊनियां गजस्कंधीं ॥ ऐसें सुख होतां त्रिशुद्धी ॥ मनासी देहबुद्धी धरूं नेदी ॥ ९५ ॥ प्रळयकाळाच्या कडकडाटीं ॥
महाभूतां होतां आटाआटी ॥ तरी मनासि देहाची भेटी ॥ धैर्यें जगजेठी होंनेदी ॥ ९६ ॥ तैं काळाचेनि हटतटें ॥ वृत्ति परब्रह्मेंसी नीट
वाटें ॥ लावूनियां आटेंपाटें ॥ चिन्मात्रपेठें विकिली ॥ ९७ ॥ तेथ स्वानंदाचा[3] ग्राहकु ॥ तात्काळ भेटला नेटकु ॥ त्यासि जीवेंसहित
विवेकु ॥ घालूनि अंकुश वसाटी केली ॥ ९८ ॥ या नांव धृतीचें लक्षण ॥ हा एकविसावा साधूचा गुण ॥ आतां जिंतिले जे षड्गुण ॥
तेहीं लक्षण अवधारी ॥ ९९ ॥ स्वानंदें तृप्त जाहला ॥ यालागीं क्षुधेसि मुकला ॥ जगाचे जीवनीं निमाला ॥ तृषा विसरला
निःशेषें ॥ १००० ॥ भोगितां निजात्मसुख ॥ विसरला शोकदुःख ॥ चिन्मात्रज्ञानें निशंक[4] ॥ त्यासंमुख मोहो नये ॥ १ ॥ तिहीं अ
वस्थाबाहिरा ॥ वसिन्नला निजबोधवोंवरा ॥ तेथें जरा आली अतिजर्जरा ॥ कांपत थरथरां पळाली ॥ २ ॥ मिथ्या जाहलें कार्यका
रण ॥ देहाचें न देखे देहभान[5] ॥ तंव मरणासचि आलें मरण ॥ काळाचें प्राशन[6] तेणें केलें ॥ ३ ॥ यापरी गा हे षड्गुण ॥ अनायासें
जिंतोन ॥ सुखें वर्तती साधुजन ॥ हें लक्षण बाविसावें ॥ ४ ॥ आपुला स्वामी देखे सर्वांभूतीं ॥ तेथें मान इच्छावा कवणाप्रती ॥ मानाभि
मान सोडिले निश्चितीं ॥ अतिनम्रवृत्तीं[7] वर्तणें ॥ ५ ॥ आधीं देहीं धरावा अभिमान ॥ मग इच्छावा अति सन्मान ॥ तंव देहाचें खुंटलें
भान ॥ मानाभिमान पळाले ॥ ६ ॥ या नांव गा अमानिता ॥ हे तेविसावी लक्षणता ॥ साधु सन्मानाचा दाता ॥ तेही कथा अवधा
री ॥ ७ ॥ ब्रह्मादि मशकवरी[8] ॥ सर्वांतें वंदो शिरीं ॥ एवं निष्ठा[9] चराचरीं ॥ बुद्धि दुसरी जाणेना ॥ ८ ॥ सर्वभूतीं स्वामी देखे ॥ लोटांग

---

[1] धैर्याची. [2] शत्रुराजांस. [3] ब्रह्मानंदाचा. [4] निःसंशय. [5] शरीराची भ्रांति. [6] पिणें. [7] फार नम्र. [8] मशकापर्यंत. [9] नेम.

ण घाली हरिखें ॥ सुरवरनर हे नोळखे ॥ अतिसंतोखें वंदित ॥ ९ ॥ नाना अलंकार घडिले गुणें ॥ सोनें सोनेंपणें नव्हेच उणें ॥ तेवीं
नामरूपांचे विंदाणें ॥ पालटु मनें नेणे घेऊं ॥१०१०॥ साकरेची निंबोळी केली ॥ परी ते कडूपणा नाहीं आली ॥ तेवीं सूकरादि योनीं
जरी जाहली ॥ तरी नाहीं भंगली चित्सत्ता ॥ ११ ॥ सागरीं नानापरीचे विकाळ ॥ जरी उठिले अनंत कल्लोळ ॥ ते गा केवळ जेवीं
जळ ॥ तेवीं वस्तु सकळ भूतमात्रीं ॥ १२ ॥ यापरी सकळ भूतां ॥ साधु सन्मानातें देता ॥ हे चोविसावी लक्षणता ॥ पर[1]बोधकता ते ऐ
क ॥ १३ ॥ जैसा भावो जैशी श्रद्धा ॥ तैसतैशा करूं जाय बोधा ॥ ज्ञान पावोनि नव्हे मेधां[2] ॥ स्वरूपश्रद्धा प्रबोधी ॥ १४ ॥ एक ज्ञान पा
वोनि जाहला पिसा ॥ पडिला अव्यवस्थ ठसा ॥ नोळखेचि सच्छिष्याची दशा ॥ योग्य उपदेशा तो नव्हे ॥ १५ ॥ एक ज्ञानऐश्वर्यें
कोंदला[3] ॥ विस्मयें तटस्थ होऊनि ठेला ॥ काष्ठलोष्टांचेपरी पडला ॥ नाहीं उरला उपदेश ॥ १६ ॥ एक ज्ञान पावोनि अतिरूपण ॥ जी
व गेलिया न बोले जाण ॥ भेणेंभेणें धरोनि मौन ॥ न बोले वचन सर्वथा ॥ १७ ॥ ज्यासी धनकोडी जोडी जाहली ॥ ते पुरूनि वरी
दगड घाली ॥ दान न देतां वृथा गेली ॥ संपत्ती केली भूमिसवती[4] ॥१८॥ तैसें कष्टीं जोडूनि ज्ञान ॥ सत्पात्रीं न करीच दान ॥ हें ज्ञा
त्याचें रूपणपण ॥ वंच कपंण स्वभावें ॥ १९ ॥ एक ज्ञान पावोनि सांगोजाये ॥ उपदेशी शिष्या बोधू नव्हे ॥ तें ज्ञान अबीज जाह
लें पाहे ॥ अंकुरां न लाहे सत्क्षेत्रीं ॥ १०२० ॥ सधन शिष्य करावया जाण ॥ स्वयें प्रयत्न करी पूर्ण ॥ आमुची दीक्षा अनुभव गह
न ॥ यापरी ज्ञानविकरा घाली ॥ २१ ॥ जेणें प्रलोभेंच मन ॥ तैसें निरूपी निरूपण ॥ अर्थस्वार्थ आंपदेश पूर्ण ॥ धनलोभें ज्ञान
निर्वीर्य ॥ २२ ॥ बिजीं रिघालिया पाणी ॥ त्या धान्याची नव्हे पेरणी ॥ तेवीं धनलोभ रिघालिया ज्ञानी ॥ उपदेशें कोणी सुखें नव्हे
॥ २३ ॥ शिष्य बोधें[6]वीण झुरे अंतरीं ॥ गुरु गुरुपणें गुरगुरी ॥ ते बोधकता नव्हे खरी ॥ घरच्याघरीं चुकामुकी ॥ २४ ॥ शब्दज्ञानें पा
रंगत ॥ जो ब्रह्मानंदें सदा डुल्लत ॥ शिष्यप्रबोधनीं समर्थ ॥ तो मूर्तिमंत स्वरूप माझें ॥ २५ ॥ होकां मी जैसा अवतारधारी ॥ तैसाचि
तोही अवतारधारी ॥ चिद्रत्नाचा अलंकारी ॥ अलंकारी सच्छिष्यां ॥ २६ ॥ तो मी या शब्दकुसरीं ॥ नांवाचीं अंतरें बाहेरीं ॥ आंतुव
टे निजनिर्धारीं ॥ एके घरीं नांदत ॥ २७ ॥ एकचि बहुतांचे उपदेशी ॥ एकाची प्राप्ती सुटंक कैशी ॥ एकें अज्ञानें जैशीतैशी ॥ हा बो
लू कोणासी ह्मणाल ॥ २८ ॥ कृषीवल[9] पेरणी करी ॥ भूमिपाडें पिकती घुमरी ॥ अंकुरेना क्षितितळीं उकरी ॥ तें बीज तरी अतिशुद्ध
॥ २९ ॥ भूमीची सखर निकर ॥ बीज पावन गा साचार ॥ भाविकीं उपदेशितां सविस्तर ॥ विकल्पीं[10] नर सुनाट ॥ १०३० ॥

---

लोकांस सांगणें. २ बुद्धि. ३ भरला. ४ पृथ्वींत पुरली. ५ मिस. ६ ज्ञानावांचून. ७ उपदेशपणा. ८ आंत. ९ शेतकरी. १० संशयांत.

जो जैसा देखे अनर्थ ॥ तोचि निर्धार बोधी करी परमार्थ ॥ ऐसा परबोधनीं समर्थ ॥ गुण विख्यात पंचविसावा ॥ ३१ ॥ साधूची मैत्री चोखट ॥ वोळखी सर्वांसी जुनाट ॥ सर्वांचा सखा श्रेष्ठ ॥ सर्वांसकट सारिखा ॥ ३२ ॥ सुहृद सर्वांचा सोयरा ॥ सर्वांचा जिवलग खरा ॥ होऊनि सर्वांही बाहिरा ॥ मित्राचारा चालवी ॥ ३३ ॥ सांगतां आपुली गुह्यगोष्टी ॥ अळौंचावयां[1] वेगळा नुठी ॥ आत्मभावें देखे सृष्टी ॥ अवंचक[2] पोटीं सर्वांसी ॥ ३४ ॥ क्षीरनीरांची[3] मैत्री जैशी ॥ भेद नाहीं मिळणीपाशीं ॥ साधू सर्वजीवसमरसी ॥ अभेद भावेंसी मित्रत्वें ॥ ३५ ॥ परममैत्रीचा भावो देख ॥ दुःख हिरोनि द्यावें सुख ॥ साधू जीवांचें निरसोनि[4] दुःख ॥ परमसुख देतसे ॥ ३६ ॥ नवल मैत्रीचें महिमान ॥ सखा सर्वांचा पुरातन ॥ सर्वांसि नीच नवें सौजन्य ॥ अवंचकपण सर्वदा ॥ ३७ ॥ बंधूहूनि मित्र अधिक ॥ पुत्राहूनि मित्र विश्वासुक ॥ तो मित्र जैं जाहला वंचक ॥ तैं केवळ ठक तो जाण ॥ ३८ ॥ मनें धनें कर्तव्यता ॥ ज्याची अनन्य अवंचकता ॥ त्या नांव परममित्रता ॥ हे खूण तत्त्वतां जाणावी ॥ ३९ ॥ समूळ मैत्रीचें निरूपण ॥ विशद[5] सांगीतलें जाण ॥ हें सव्विसावें साधुलक्षण ॥ कारुण्यपण तें ऐका ॥ १०४० ॥ प्रत्युपकार[6] न वांछितां ॥ मी कारुणिक हे ना देहीं अहंता ॥ ऐसेनि दीनदुःखनिवारिता ॥ कारुण्य सर्वथा त्या नांव ॥ ४१ ॥ रसपूजा धरोनि पोटीं ॥ वैद्य औषधांच्या सोडी गांठी ॥ कां सभाग्या देखोनि दिठी ॥ सांगे गोष्टी पुराणिक ॥ ४२ ॥ ऐशी वर्तणूक सर्वथा ॥ ते लागली विषयस्वार्था ॥ साधूची नव्हे तैशी कथा ॥ नैराश्यता[7] दयाळू ॥ ४३ ॥ दयार्णवें[8] द्रवली दृष्टी ॥ तनु मन धन वेंचूनि गांठी ॥ अनाथावरी कृपा मोठी ॥ उद्धरी संकटीं दीनातें ॥ ४४ ॥ जैसा कळवळा निजस्वार्था ॥ त्याहून अधिक अनाथभूतां ॥ तिये नांव परमकारुण्यता ॥ जाण तत्त्वतां उद्धवा ॥ ४५ ॥ हें सत्ताविसावें लक्षण ॥ साधूचें जाण संपूर्ण ॥ कविपदाचें व्याख्यान ॥ सावधान अवधारी ॥ ४६ ॥ वेदशास्त्राचें मथितार्थ ॥ झालें करतलामलक समस्त ॥ तैसाच ब्रह्मानंदें डुल्लत ॥ कवि निश्चित या नांव ॥ ४७ ॥ उपनिषदांचा मथितार्थ ॥ ज्याच्या मुखाचा वास पहात ॥ परोक्षापरोक्ष ज्यांचेनि सत्य ॥ कवि विख्यात त्या नांव ॥ ४८ ॥ कवि या पदाचें व्याख्यानें ॥ झालीं अठ्ठावीस लक्षणें ॥ उरलीं जें अतिगहनें ॥ तें दों श्लोकीं कृष्णें आदरिलें सांगों ॥ ४९ ॥

॥ श्लोक ॥ ॥ आज्ञायैवं गुणान् दोषान् मयादिष्टानपि स्वकान् ॥ धर्मान् संत्यज्य यः सर्वान् मां भजेत स सत्तमः ॥ ३२ ॥

॥ टीका ॥ ॥ प्रपंचनगरासभोंवतीं ॥ कर्मनदीची महाख्याती ॥ तिचेनि जळें जीव वर्तती ॥ उत्पत्ति स्थिती आरतिरीं[9] ॥ १०५० ॥ ते नदीचेनि जीवनमेळें ॥ कर्मासि येती कर्मफळें ॥ स्वर्गनरकादि सोहळे ॥ तेणें जळबळें भोगिती ॥ ५१ ॥ प्रपंचनगरींहूनि निघतां ॥ वेगें

---

[1] विचार करण्यास. [2] निष्कपट. [3] दुध व पाण्याची. [4] नाहींसें करून. [5] स्पष्ट. [6] परत उपकार करणें. [7] आशा नसणें. [8] दयारूपसमुद्रानें. [9] अलिकडील तीरी.

परमार्थासि येतां ॥ जों तों कर्मनदी आतौतां ॥ बुडे सर्वथा निर्बुजला ॥ ५२ ॥ एक तरूं ऐसें ह्मणती ॥ ते कर्मीं कर्मगुचकिया खाती ॥ स्वयें बुडोनि आणिका बुडविती ॥ तरलों ह्मणती तोंडाळ ॥ ५३ ॥ ऐसे बुडाले नेणों किती ॥ बुडतां[1] शिकवणें तेचि देती ॥ कर्मंचि उपावो तरुणोपायप्राप्ती ॥ ह्मणोनि बुडविती सर्वांतें ॥ ५४ ॥ न कर्मणा हें वेदवचन ॥ कर्में नव्हे ब्रह्मज्ञान ॥ तें न मानिती कर्मठ जन ॥ त्यांसि कर्माभिमान कर्मांचा ॥ ५५ ॥ कर्म देहाचे माथां पूर्ण ॥ तो न सांडितां देहाभिमान ॥ कर्मांचा त्याग नव्हे जाण ॥ कर्मबंधन देहबुद्धी ॥ ५६ ॥ एक आरतिरीं असती नष्ट ॥ तरलों ह्मणती अकर्मनिष्ठ ॥ स्वकर्म[2]त्यागी कर्मभ्रष्ट ॥ जाण पापिष्ठ पाखंडी ॥ ५७ ॥ या कर्मनदीतें तरला ॥ ऐसा नदेखों दादुलौं[3] ॥ बुडाल्या धुराचि मुदला ॥ पाड केतुलौं[4] इतराचा ॥ ५८ ॥ या कर्मनदीची उत्पत्ती ॥ मजचि पासोनि निश्चितीं ॥ तेही सांगेन तुजप्रती ॥ यथानिगुतीं निजबोधें ॥ ५९ ॥ आज्ञायैवं हें मूळीचें मूळ ॥ श्लोकीचें प्रथम पद केवळ ॥ येणेंचि कर्मनदी झाली स्थूळ ॥ करूनि विवळ सांगत ॥ १०६० ॥ मदाज्ञा मेघ गंभीरा ॥ निःश्वसितपवनद्वारा ॥ चतुर्वेदविधीच्या धारा ॥ अति अनिवारा वर्षले ॥ ६१ ॥ तेणें कर्मनदी आतौतें ॥ अनिवार उलथलें भरतें ॥ पूर दाटला जेथिचा तेथें ॥ उतार कोणातें दिसेना ॥ ६२ ॥ तेथ गुणदोषांचा वळसौं[5] ॥ विधिनिषेधांचा धारसा ॥ कर्माकर्मांचा आवर्त[6] कैसा ॥ सबाह्य सरिसा भंवतसे ॥ ६३ ॥ संकल्पविकल्पांचेनि हँटें[7] ॥ नदी दाटली चहूंकडे ॥ तरीं जाय तो गुंतोनि बुडे ॥ पाऊल पुढें न घालवें ॥ ६४ ॥ प्रत्यवायाची मगरमिठी ॥ पडल्या सगळेंचि घाली पोटीं ॥ उगळोनि न सांडी संकटीं ॥ ने उठाउठीं अधोगती ॥ ६५ ॥ अंगविकळतेचे मासे ॥ तळपताति घ्यावया आंविसें ॥ कर्मठतेचे कर्मठ कैसे ॥ खडक तैसे निबर ॥ ६६ ॥ काळविक्षेप सर्पासी ॥ एक सांपडे विलासआळशीं ॥ विकळ विचार वोढियेसि ॥ तेणें वेगेंसी बुडाले ॥ ६७ ॥ एक तरावयाच्या आशा ॥ पडिले कर्मांच्या धारसा ॥ ते विधिनिषेधवळसां ॥ पडिले सहसा नुगडती ॥ ६८ ॥ एक स्वकर्मधारीं ॥ पडोनि वाहावले दूरी ॥ ते असत्य लोक मगरीं ॥ आपल्या विवरीं सूदले[9] ॥ ६९ ॥ एका नवचे परतटीं ॥ माझारींच फळें गोमटीं ॥ देखोनि धांविन्नलें अव्हाटीं ॥ ते स्वर्गसंकटीं गुंतले ॥ १०७० ॥ आह्मी तरों युक्तिबळें ॥ ह्मणोनि रिघाले एकेवेळें ॥ ते अहंकारखळाळें ॥ अंधतमशिळे चूर्ण होती ॥ ७१ ॥ एकीं वेदत्रयाची पेटी ॥ दीक्षेची दोरी बांधली पोटीं ॥ ते स्वर्गांगना[10]कुचतटीं ॥ गुंतोनि शेवटीं बुडाले ॥ ७२ ॥ मंत्रतंत्रादि दीक्षितें ॥ गुंतोनि बुडालीं जेथिच्या तेथें ॥ कर्मनदीच्या परपारातें ॥ कोणी पावतें दिसेना ॥ ७३ ॥ विरळा[11] कोणीएक सभाग्य येथें ॥ हे सकळ उपाय हाणोनि लाथें ॥ जो अति आवडीं भजे

---

१ बुडत असतां. २ आपल्या कर्मांचा त्याग करणारे. ३ पुरुष. ४ काय. ५ वेढा. ६ भोंवरा. ७ बळानें. ८ पापाची. ९ घातले. १० स्वर्गांतील स्त्रीसुखास. ११ एकादा.

मातें ॥ कर्मनदी त्यातें कोरडी ॥ ७४ ॥ माझे भक्तीचें तारूं नातुडें[1] ॥ जंव सप्रेमाचें शीड न चढे ॥ तंव तरणोपाय बापुडे ॥ वृथा कां वे
डे शिणताती ॥ ७५ ॥ धरूनि अनन्यभक्तीचा मार्ग ॥ करूनि सर्वधर्मकर्मत्याग ॥ हा तरणोपाय चांग ॥ येरू[2] तो व्यंग[3] अधःपाती[4]
॥ ७६ ॥ अथवा शरीरक्लेशाभेण ॥ किंवा सर्वथा उबगोन ॥ कां धरोनि ज्ञानाभिमान ॥ स्वकर्म जाण सांडिना ॥ ७७ ॥ माझी वेद
रूप आज्ञा शुद्ध ॥ ते वेदविवंचना विशद ॥ स्वधर्मकर्मांचे कर्मवाद ॥ अति अविरुद्ध जाणता ॥ ७८ ॥ नेणोनि स्वधर्मकर्मातें ॥ कां ना
स्तिक्य मानूनि चित्तें ॥ किंवा धरोनियां आळसातें ॥ त्यागी कर्मातें तैसा नव्हे ॥ ७९ ॥ स्वधर्माचा उत्तम गुण ॥ प्रत्यवायें अधःपतन ॥
या दोहींतें जाणोन ॥ मद्भक्तीसी प्राण विकिला ॥ १०८० ॥ विसरोनी अन्य आठवण ॥ अखंडता हरिस्मरण ॥ त्या नांव भक्ती
सि विकिला प्राण ॥ इतरभजन आनुमानिक ॥ ८१ ॥ माझे निजभजनप्रेमें जाण ॥ विसरला कर्मांची आठवण ॥ कर्म बापुडें रंक
कोण ॥ बाधक जाण नव्हे भक्तां ॥ ८२ ॥ सप्रेम करितां भजनविधी ॥ सर्वकर्मांतें विसरली बुद्धी ॥ ते जाणावी भजनसमाधी ॥ तेथ
कर्म त्रिशुद्धी बाधेना ॥ ८३ ॥ ज्याची श्रद्धा कर्मावरी ॥ तोचि कर्माचा अधिकारी ॥ ज्याची श्रद्धा श्रीधरीं ॥ तो नव्हे अधिकारी कर्मा
चा ॥ ८४ ॥ जो जीवें प्राणें भक्तीसि विकिला ॥ तो तेव्हांचि कर्मावेगळा जाहला ॥ त्याच्या भावार्था मीं विकला ॥ तो कर्मीं बांधला
केवीं जाये ॥ ८५ ॥ गुणदोषांची जननी ॥ ते निःशेष अविद्या निरसूनी ॥ जो प्रवर्तला माझे भजनीं ॥ तो साधु मी मानी मस्तकीं
॥ ८६ ॥ निजकल्पना जे देहीं ॥ तेचि मुख्यत्वें अविद्या पाही ॥ ते कल्पना निवालिया ठायीं ॥ जाण अविद्या नाहीं निश्चित ॥ ८७ ॥ अ
विद्येच्या त्यागासवें ॥ धर्माधर्मादि आघवे ॥ न त्यजितांचि स्वभावें[5] ॥ त्याग फावे अनायासें ॥ ८८ ॥ शिर तुटलिया पाठीं ॥ शरीर नि
जकर्मासि नुठी[6] ॥ तेवीं अविद्या त्यागितां शेवटीं ॥ त्यजिले उठाउठीं सर्वधर्म ॥ ८९ ॥ दिवसा चंद्रउदयो पाहे ॥ तो झाला तैसा नाहीं हो
ये ॥ तेवीं अविद्येचेनि विलयें ॥ सर्वधर्म लाहे ते दशा ॥ १०९० ॥ खद्योत सूर्योदयापाठीं ॥ शोधूनि पाहतां नये दिठीं[7] ॥ तेवीं अविद्येच्या
शेवटीं[8] ॥ धर्माधर्मकोटी मावळती ॥ ९१ ॥ जेवीं नक्षत्रमाळा ॥ खद्योततेज उमाळा ॥ रात्रीसकट बोळवण सकळां ॥ तेवीं धर्माधर्मक
ळा अविद्येसवें ॥ ९२ ॥ सर्वधर्मत्यागाची खूण ॥ उद्धवा मुख्यत्वें हेचि जाण ॥ याहीवरी माझें भजन ॥ मुख्य भागवतपण या
नांव ॥ ९३ ॥ ह्मणसी अविद्याचि केवीं नासे ॥ मा धर्माधर्म नासती तीसरिसे ॥ ते अविद्यानाशें अनायासें ॥ भक्ति उल्हासें माझेनि
॥ ९४ ॥ सूर्योदय देखतां दृष्टीं ॥ चंद्रनक्षत्रांची मावळे सृष्टी ॥ तेवीं माझ्या भक्तिउल्हासापाठीं ॥ अविद्या उठाउठीं निमाली ॥ ९५ ॥

---

१ प्राप्त झालें नाहीं. २ इतर. ३ व्यर्थ. ४ नरकांत घालविणारा. ५ आपोआप. ६ उठत नाहीं. ७ पहाण्यांत. ८ नाश झाल्यानंतर.

अविद्येच्या नाशासवें ॥ नासती धर्माधर्म आघवे ॥ जेवीं गैरोदर मारितां जीवें ॥ गर्भही तीसवें निमाला ॥ ९६ ॥ जेव्हां माझे भक्तीचा उल्हासू ॥ तेव्हांचि अविद्येचा निरासू ॥ अविद्येसवें होय नाशू ॥ अनायासू सर्वधर्मां ॥९७॥ ते तूं भक्ति ह्मणसी कोण ॥ जीचें मागां केलें निरूपण ॥ ते माझी चौथी भक्ति जाण ॥ अविद्यानिरसन तिचेनी ॥९८॥ येर आर्त जिज्ञासु अर्थार्थी ॥ जे जे भक्तीतें आदरिती ॥ ते अविद्यायुक्त निश्चितीं ॥ चौथी भक्ति मुख्यत्वें माझी ॥९९॥ जे भक्तीमाजी कांहीं ॥ अविद्येचा विटाळ नाहीं ॥ भजन तरी ठायींच्या ठायीं ॥ अनायासें पाही होतसे ॥ ११०० ॥ ते माझी आवडी भक्ती ॥ उद्धवा जाण निश्चितीं ॥ जीसि अविद्या असे धाकैंती ॥ सर्वधर्म कांपती सर्वदा ॥ १ ॥ ते भक्तीची देखोनि गुढी ॥ अविद्या धाकेंचि प्राण सांडी ॥ सर्वधर्मांची आवडी ॥ घायेंवीण बापुडीं निमाली ॥ २ ॥ हा मद्भक्तीचा पर्यावो ॥ आवडीच्या गोडिया सांगे देवो ॥ ऐक भक्ताचा भजनभावो ॥ जेणें निर्वाहो भक्तीचा ॥ ३ ॥ माझेनि अनुसंधानेंवीण ॥ स्नानसंध्या जप होम दान ॥ ते अवघेचि अधर्म जाण ॥ मद्भजन तें नव्हे ॥ ४ ॥ गोडीआवडी ते परपुरुषीं ॥ मिथ्या लुडबुडी निजपतीपाशीं ॥ ते पतिव्रता नव्हे जैशी ॥ जाण भक्ति तैशी व्यभिचारी ॥ ५ ॥ नानाविषयीं ठेऊनि मन ॥ जो करी ध्यान अनुष्ठान ॥ तें जारस्त्रियेच्या ऐसें जाण ॥ नव्हे पावन ते भक्ती ॥ ६ ॥ काया वाचा मनसा ॥ माझे भक्तीचा पडला ठसा ॥ भजतां नाठवे दिवसनिशा ॥ भक्तीची दशा या नांव ॥ ७ ॥ जपेंवीणँ नाम वदनीं ॥ धारणेंवीणँ ध्यान मनीं ॥ संकल्पेंवीणँ मदर्पणीं ॥ सर्वकर्मर्पणीं सर्वदा ॥ ८ ॥ निरोधेंवीणँ वायुरोधू ॥ मर्यादेवीण स्वरूपबोधू ॥ विषयेंवीण सदा स्वानंदू ॥ मद्भक्तशुद्धू या नांव ॥ ९ ॥ भक्त न ह्मणवितां गोड वाटे ॥ परी भजनमार्गीं हृदय स्फुटे ॥ अकृत्रिमभक्ति जैं उमटे ॥ तैं मी भेटें उद्धवा ॥ १११० ॥ ऐसेंनि भजनें जो भजत ॥ तो मजमाजी मी त्याआंत ॥ भक्तांमाजी जो उत्तम भक्त ॥ साधू निश्चित या नांव ॥ ११ ॥ तो पुरुषांमाजी पुरुषोत्तम ॥ साधूं माजी अति उत्तम ॥ तो माझा अतिविश्राम ॥ अकृत्रिम उद्धवा ॥ १२ ॥ तयालागीं मी आपण ॥ करीं सर्वांगाचें आंथरुण ॥ जीवें सर्वस्वें निंबलोण ॥ प्रतिपदीं जाण मी करीं ॥ १३ ॥ तो मजकडे ह्मणशी कैसा ॥ जीवासि पुढियें प्राण जैसा ॥ सांगतां उत्तम भक्तदशा ॥ प्रेमपिसा देवो झाला ॥ १४ ॥ मग नधरत सांवरत ॥ उद्धवासि कडिये घेत ॥ भुलला स्वानंदें नाचत ॥ विस्मयें स्फुंदत उद्धवू ॥ १५ ॥ मी एक देव हा एक भक्त ॥ हेंही विसरला श्रीकृष्णनाथ ॥ हा देवो मी एक भक्त ॥ तैं उद्धवाआंत नुरेची ॥ १६ ॥ ऐशा भक्तिसाम्राज्यपाटीं ॥ दोघां पडली ऐक्यगांठी ॥ तंव देवोचि कळवळला पोटीं ॥ निजभक्तगोठी ॥ सांगावया ॥ १७ ॥ ऐशी उत्तम भक्तांची

---

१ गर्भिणी. २ पूर्वी. ३ भिते. ४ जपांवाचून नामस्मरण हाच जप होतो. ५ पल्याद्या वस्तूवर लक्ष न ठेवितांच. ६ ईश्वरार्पण करण्याचा संकल्प न केला तरी. ७ प्राणायाम इत्यादि साधनांवांचूनच.

कथा ॥ अतिशयें आवडे कृष्णनाथा ॥ रुचलेपणें सर्वथा ॥ मागुतां मागुतां सांगतू ॥ १८ ॥ श्लोकीं प्रमेय दिसतां अनेगे ॥ तें श्रीकृणें सांडूनि मागें ॥ हा ग्रंथार्थू श्रीरंगें ॥ साक्षेपें स्वांगें लिहविला ॥ १९ ॥ हे माझे युक्तीची कथा ॥ नव्हेनव्हेजी सर्वथा ॥ सत्य मानावें श्रोता ॥ ते अर्थींचा वक्ता श्रीकृष्ण ॥ ११२० ॥ श्रोता व्हावें सावधान ॥ मागील कथा अनुसंधान ॥ दोघां पडिलें होतें आलिंगन ॥ विस्मयें पूर्ण उद्धवा ॥ २१ ॥ चढतां प्रेमाचें भरितें ॥ तें आवरोनि कृष्णनाथें ॥ थापटूनि उद्धवातें ॥ सावध त्यातें करी हरी ॥ २२ ॥ उद्धवातें ह्मणे तत्त्वतां ॥ तुज आवडली भक्तिकथा ॥ तेचि मी सांगेन आतां ॥ सावधानता अवधारी ॥ २३ ॥ एक जाणोनि भजती मातें ॥ एक ते केवळ भावार्थें ॥ मी दोहींच्या भुललों भावातें ॥ दोघे मातें [1]पढियंते ॥ २४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ज्ञात्वाऽज्ञात्वाऽथ ये वै मां यावान् यश्चाऽस्मि यादृशः ॥ भजंत्यनन्यभावेन ते मे भक्ततमा मताः ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ मी स्वरूपीं सच्चिदानंद ॥ जगदादि [2]आनंदकंद ॥ नित्य सिद्ध परम [3]विबुध ॥ माझें स्वरूप शुद्ध जाणती ॥ २५ ॥ देश काळ वर्तमान ॥ सर्वीं सर्वदा [4]अनविच्छिन्न ॥ सर्वात्मा सच्चिदानंदघन ॥ [5]भेदशून्य मी एक ॥ २६ ॥ सत्य ज्ञान अनंत ॥ परब्रह्म मी निश्चित ॥ ऐसें जाणूनि मज भजत ॥ उत्तम भक्त ते जाण ॥ २७ ॥ शुद्ध ज्ञालिया स्वरूपप्राप्ती ॥ ह्मणशी भजन कैशा रीतीं ॥ देवभक्त तेचि ते होती ॥ मी होऊन भजती मजमाजी ॥ २८ ॥ वाम सव्य दोनी भाग ॥ दों नांवीं एकचि अंग ॥ तेवीं देवभक्तविभाग ॥ मद्रूपीं सांग भासती ॥ २९ ॥ पाहतां लोखंडाचा आरिसा ॥ लोखंडेंचि घडिजे जैसा ॥ लोखंडेंचि उजळे कैसा ॥ स्वप्रकाशा निजतेजें ॥ ११३० ॥ दर्पण उजळलिया पाहीं ॥ शशी सूर्य गगन मही ॥ बिंब धरी आपुल्याठायीं ॥ [6]अप्रयासें पाहीं स्वलीला ॥ ३१ ॥ तैसें मी होऊनि माझे भक्त ॥ अनन्यभावें मजचि भजत ॥ तैं माझें ऐश्वर्य समस्त ॥ प्रतिबिंबत तयामाजी ॥ ३२ ॥ होकां तरंगू जैसा सागरीं ॥ त्यासी जळचि तळींवरी ॥ तैसा माझा भक्त मजमाझारीं ॥ सबाह्याभ्यंतरीं मद्रूप ॥ ३३ ॥ जैसा सुवर्णाचा नरहरी ॥ सुवर्णहिरण्यकशिपूतें [7]विदारी ॥ सुवर्णप्रह्लाद पोटींसि धरी ॥ तैशी परी मद्भजना ॥ ३४ ॥ तेथें सगुण आणि निर्गुण ॥ उभयरूपें मीचि जाण ॥ जैसें सुवर्ण आणि [8]कंकण ॥ तैसे अभिन्न जाण मद्रूपें ॥ ३५ ॥ तेथ जें जें दृश्य देखे दृष्टीं ॥ तें तें मद्रूपेंसि पडे मिठी ॥ दृश्य द्रष्टा लोपूनि त्रिपुटी ॥ उठाउठी मज मिळे ॥ ३६ ॥ ऐसें जाणोनियां मज भजत ॥ ते जाणपां उत्तम भक्त ॥ ऐसें नेणोनियां मज भजत ॥ भोळे भक्त ते माझे ॥ ३७ ॥ नाहीं श्रुतीचें पठण ॥ नाहीं वेदांतशास्त्रश्रवण ॥ नाहीं विकल्पलक्षण ॥ अनन्य जाण भावार्थी ॥ ३८ ॥ सगुण निर्गुण नेणे कांहीं ॥ परी देवो आहे ह्मणे हृदयीं ॥ जडत्व अ

---

१ आवडते. २ आनंदाचें मूळ. ३ देव. ४ आच्छादलें जात नाहीं. ५ एकरूप. ६ यत्नावांचून. ७ फाडतो. ८ कांकण.

से देहाच्या ठायीं ॥ तें देवो पाही वागवीत ॥ ३९ ॥ यालागीं देहाचें जें चळण ॥ तें हृदयस्थ करवी नारायण ॥ दृष्टीचें जें दे[1]खणेपण ॥ त्याचेनि जाण होतसे ॥ ११४० ॥ काढूनि आपुला डोळा ॥ दूरी ठेविला वेगळा ॥ तो हृदयस्थेंवीण आंधळा ॥ देखणी कळा देवाची ॥ ४१ ॥ रसना केवळ चांबडी ॥ ते काय जाणे रसगोडी ॥ कापूनि टाकिल्या बापुडी ॥ गोडी अगोडी ते नेणें ॥४२॥ रसनाद्वारें रसस्वादू ॥ घेतां हृदयस्थ परमानंदू ॥ बुद्धीसि करितां उद्बोधू ॥ सत्य गोविंदू हृदयींचा ॥४३॥ मनाचें गमनागमन ॥ दिसे हृदयस्थाअधीन ॥ यालागीं दूरि जावोनि परते मन ॥ हृदयस्थाअधीन येतसे ॥ ४४ ॥ इंद्रियें प्रेरिता वारिता ॥ हे सत्ता अधीन हृदयस्था ॥ यालागीं नांवें हृषीकेशता ॥ त्यासचि तत्त्वतां ह्मणताती ॥ ४५ ॥ एवं जीवांचा निर्वाहो ॥ करितां निजहृदयीं असे देवो ॥ तो पहावया बाहेरी धांवो ॥ तैं मूर्ख पहाहो मी झालों ॥ ४६ ॥ तीर्थीं क्षेत्रीं भेटेल देवो ॥ हा आपले हृदयींचा भावो ॥ निजभावेंवीण पहाहो ॥ तीर्थींही देवो असेना ॥ ४७ ॥ एवं देवो तो मजमाजी आहे ॥ त्याचेंनि टवटविती इंद्रियें ॥ क्रियाकर्म जें जें होये ॥ तें त्याचेनि पाहे निपजत ॥ ४८ ॥ देह तंव बापुडें ॥ केवळ अचे[3]तन मढें ॥ त्याचेनि कर्म नुपजे फुडे ॥ हें तंव कुडें सर्वथा ॥ ४९ ॥ इंद्रियांतें चेतवि[2]ता ॥ कर्म क्रिया कर्तव्यता ॥ देहाचेनि नोहे तत्त्वतां ॥ मुख्यत्वें कर्ता हृदयस्थ ॥ ११५० ॥ यापरी जे कांहीं कर्तव्यता ॥ ते भोळेपणें नेघे माथां ॥ सर्वकर्मांचा आत्मा कर्ता ॥ विश्वासें सर्वथा दृढ मानी ॥ ५१ ॥ मग अन्नपानादि सेवितां ॥ मानी आत्माराम भोक्ता ॥ सर्वकर्मकर्तव्यता ॥ अहं कर्ता हें ह्मणों नेणे ॥ ५२ ॥ ऐसे भोळिवेचेनि समजें ॥ माझें भजन निपंजे वोजें ॥ ते म्यां आवडीं सेविजे ॥ जाण तें माझें खाजुं[6]कें ॥ ५३ ॥ सर्वभावें सर्वथा ॥ बाळकांसि जेवीं माता ॥ तेवीं माझिया भोळ्या भक्तां ॥ मी सर्वथा सर्वस्वें ॥ ५४ ॥ धांवोनि मिठी घालावयासी ॥ हित गुज आळोंचासी ॥ खाणें जेवणें विश्रांतीसी ॥ जेवीं बाळकासी निजजननी ॥ ५५ ॥ तेवीं माझिया भोळ्या भक्तां ॥ मीचि जाण जिवलग माता ॥ अर्थ स्वार्थ परमार्थता ॥ जाण तत्त्वतां मी त्यांसी ॥ ५६ ॥ तोंडिंचें पोटिंचें गांठिंचें ॥ माता बाळकालागीं वेंचँ ॥ तेवीं भाविकालागीं आमुचें ॥ सर्वस्व साचें मी वेंचीं ॥ ५७ ॥ बाळक न मागतां धांवोनी ॥ कळकळोनि माता लावी स्तनीं ॥ तेवीं भोळ्या भक्तांलागुनी ॥ मी अनुसंधानीं लाविता ॥ ५८ ॥ ज्येष्ठ कनिष्ठ पुत्रातें पिता ॥ एकचि जाण प्रतिपाळिता ॥ ज्येष्ठातें निग्रहो करिता ॥ लळे पुरविता बाळाकांचे ॥५९॥ ज्येष्ठ वांकुडें बोलतां ॥ तोंडावरी हाणे पिता ॥ बाळक बोबडें बोलतां ॥ संतोषें सर्वथा सर्वस्वें ॥ ११६० ॥ सज्ञानासि अवद्ध पडतां ॥ दोष वाजती त्याचे माथां ॥ भोळ्यां भक्तांची अवद्ध कथा ॥ तेणें

---

१ पाहणेपणा. २ चेतविता. ३ जड. ४ हालविणारा. ५ उत्पन्न होतें. ६ खाणें. ७ सर्चिते.

देव तत्त्वतां संतोषें ॥ ६१ ॥ कर्माकर्म[1]प्रत्यवायता ॥ हे सज्ञानासीच सर्वथा ॥ भोळ्या भक्तांसि कर्मबाधकता ॥ मी सर्वथा येऊं नेदीं ॥ ६२ ॥ भोजनीं बैसतां बापासी ॥ दूरी बैसवी ज्येष्ठपुत्रासी ॥ अंकीं वा[2]ऊनि बाळकासी ॥ तृप्ति निजग्रासीं देतसे ॥ ६३ ॥ तेथें जें जें गोड आपणासी ॥ तें तें दे बाळकासी ॥ नघेतां प्रार्थूनि त्यासी ॥ निजतृप्तीसी करवित ॥ ६४ ॥ तेवीं साधनीं शिणतां सज्ञानासी ॥ प्राप्ती होय अतिप्रयासीं ॥ माझिया भोळ्या भक्तांसी ॥ मी अनयासें उद्धरी ॥ ६५ ॥ वाट चुकल्या भु[3]याँळासी ॥ फेरा पडे चालत्यासी ॥ बाळक बापाचे कडियेसी ॥ श्रमू तयासी येवों न शके ॥ ६६ ॥ तेवीं साधनीं अंगवि[4]कळता ॥ ते वाजे सज्ञानाचे माथां ॥ भोळ्या भक्तांतें मी उद्धरिता ॥ प्रयांस सर्वथा या नाहीं ॥ ६७ ॥ त्यासि वाऊनि आपुल्या खांदीं ॥ मी पाववीं सायुज्यसिद्धी ॥ नवल त्याची भोळी बुद्धी ॥ तेथही भजनविधी नसांडी ॥ ६८ ॥ हृदयीं कपटाचा थारा ॥ तोचि भजनाशी आडवारा ॥ करितां युक्तिप्रयुक्ति विचारा ॥ विचारबाहिरां मी त्यासी ॥ ६९ ॥ नेणे आचाराविचारा ॥ केवळ भावार्थी भोळा खरा ॥ नधरत नसांवरत एकसरां ॥ मजभीतरा तो पावे ॥ ११७० ॥ देखोन भोळ्या भक्तासी ॥ मीची सामोरा धांवें त्यासी ॥ त्यापाशीं मी अहर्निशीं ॥ भुललों भावासी सर्वथा ॥ ७१ ॥ केवळ जे भोळे भक्त ॥ ते भगवंतासी आवडत ॥ सांगतां कृष्ण मिठिया देत ॥ लाळ घोटीत उद्धवू ॥ ७२ ॥ मज भोळ्या भक्तांची आवडी ॥ काय सांगों त्यांची गोडी ॥ त्यावेगळ अर्धघडी ॥ कोडी परवडी नावडती ॥ ७३ ॥ यापरीचे जे भोळे भक्त ॥ ते मी मानी उत्तम भागवत ॥ त्यांच्या पायां मी लागें भगवंत ॥ उत्तम निश्चित ते जाणा ॥ ७४ ॥ त्यांलागीं मी आर्तभूत ॥ त्यांलागीं सदा सा[6]वचित्त ॥ त्यांलागीं मी दशदिशा धांवत ॥ भोळा भक्त दुर्लभ ॥ ७५ ॥ उद्धवा काय सांगों गोठी ॥ भोळा भक्त देखोनि दिठीं ॥ मीही आपुलिये सवसाठीं ॥ उठाउठी घेतसें ॥ ७६ ॥ येऱ्हवीं मोल करितां जाण ॥ मजहूनि माझे भक्त गहन ॥ यालागीं मी त्याअधीन ॥ भक्तवचन नु[7]लंघीं ॥ ७७ ॥ भोळ्या भक्तांचें वचन ॥ माझेनि नुलंघवे जाण ॥ देवकीवसुदेवांची आण ॥ भावें प्रमाण भजनासी ॥ ७८ ॥ वृथा घृतें[8]वीण भोजन ॥ वृथा वंध्येचें मैथुन ॥ वृथा भावेंवीण भजन ॥ सत्य जाण उद्धवा ॥ ७९ ॥ भावो तेथ भाग्य पहाहो ॥ भावो तेथ निःसंदेहो ॥ भावो तेथें प्रकटे देवो ॥ निजस्वभावो स्वानंदें ॥ ११८० ॥ भावो तेथ वि[9]रक्ती ॥ भावो तेथ प्रकटे शांती ॥ भावो तेथें भक्ती ॥ उल्हासती निजबोधें ॥ ८१ ॥ एवं भाविकांमाजी भक्ती ॥ मजसहित स्वानंदें नाचती ॥ यालागीं भोळे जे भावार्थी ॥ ते उत्तम होती भाग्यवंत ॥ ८२ ॥ नेणते भक्त जे मातें भजती ॥ ते मज पावले या रीतीं ॥ सांगीतली ते म्यां व्युत्पत्ती ॥ आतां उत्तम भक्ती अ[10]वधारी ॥ ८३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मल्लिंग

---

१ प्रायश्चित्त. २ घेऊन. ३ भोयास. ४ कमीपणा. ५ श्रम. ६ सावध. ७ ओलांडीत नाहीं. ८ तुपावांचून. ९ वैराग्य. १० ऐक.

मद्भक्तजनदर्शनस्पर्शनार्चनम् ॥ परिचर्या स्तुतिः प्रह्वगुणकर्मानुकीर्तनम् ॥३४॥ ॥टीका॥ ॥नाना अवतार अनुक्रमा ॥ शैव वैष्णव अतिउत्तमा ॥ शास्त्रोक्त माझ्या प्रतिमा ॥ तीर्थक्षेत्रीं महिमा विशेष ज्यांचा ॥ ८४ ॥ प्रतिमा देवीं प्रतिष्ठिलिया ॥ ज्या नरकिन्नरीं[1] संस्थापिलिया ॥ ज्या स्वयें स्वयंभ[2] प्रकटलिया ॥ शास्त्रीं बोलिलिया गंडकी ॥ ८५ ॥ एकीं भक्त अनुग्रहें आल्या ॥ आसुरीं[3] निशाचरीं[4] ज्या केल्या ॥ आपुल्या घरीं पूजिल्या ॥ भक्तीं करविल्या त्रैवर्णिकीं ॥ ८६ ॥ ऐशा माझ्या प्रतिमांची भेटी ॥ पाहों धांवे उठाउठी ॥ पूजा करावया पोटीं ॥ आवडी मोठी उल्हासे ॥ ८७ ॥ माझें स्वरूप तें माझे भक्त ॥ मी तैसेचि माझे संत ॥ त्यांचे भेटीलागीं आर्तभूत ॥ जैसें कृपणाचें चित्त धनालागीं ॥ ८८ ॥ माझ्या प्रतिमांहूनि अधिक ॥ संतभजनीं अत्यंत हरिख ॥ साधुसंगतीचें अतिसुख ॥ सांडूनि देख घरदारां ॥ ८९ ॥ चिंतामणीसि कीजे जतन ॥ तैसी मर्यादा राखे सज्जन ॥ नीच नवें अधिक भजन ॥ न धाय मन पूजितां ॥ ११९० ॥ सिद्ध करूनि पूजासंभार ॥ माझे पूजेचा अत्यादर ॥ पूजा करितां एकाग्र ॥ जैं साधुनर घरां येती ॥ ९१ ॥ त्या साधूंची पूजा न करितां ॥ जो माझी पूजा करी सर्वथा ॥ तेणें मज हाणितल्या लाता ॥ कीं तो माझ्या घाता प्रवर्तला ॥ ९२ ॥ बालक एक एकुलता ॥ तेणें माता हाणितली लाता ॥ मग पाटोळाही[5] नेसवितां ॥ क्षोभली माता समजेना ॥ ९३ ॥ तेवीं अव्हेरूनि माझिया संतां ॥ मीचि क्षोभें मज पूजितां ॥ ते सेवा नव्हे सर्वथा ॥ अतिक्षोभकता मज केली ॥९४॥ संत माझे लळेवाड[6] ॥ त्यांची पूजा मज लागे गोड ॥ संतसेवकांचें मी पुरवीं कोड ॥ मज निंचाडा[7] चाड संतांची ॥ ९५ ॥ सांडूनि माझें पूजा ध्यान ॥ जो संतांसि घाली लोटांगण ॥ कोटियज्ञाचें फळ जाण ॥ मदर्पण तेणें केलें ॥ ९६ ॥ प्रतिमा माझ्या अचेतन व्यक्ती ॥ संत सचेतन माझ्या मूर्ती ॥ दृढ भावें केल्या त्यांची भक्ती ॥ ते मज निश्चितीं पावली ॥ ९७ ॥ सकळतीर्थीं तोचि न्हाला ॥ जपतपांचें फळ तोचि लाधला ॥ सर्वपूजांचें सार[8] पावला ॥ जेणें साधू वंदिला सन्मानें ॥ ९८ ॥ प्रतिमा निजकल्पना उत्तम ॥ संत प्रत्यक्ष पुरुषोत्तम ॥ चालतें बोलतें परब्रह्म ॥ अतिउत्तम साधुसेवा ॥ ९९ ॥ माझ्या प्रतिमा आणि साधुनर ॥ तेथें यारीतीं भजती तत्पर ॥ हा तंव सांगीतला निर्धार ॥ भजनप्रकार तो ऐक ॥ १२०० ॥ प्रतिमा आणि साधु सोज्वळे ॥ आवडीं न पाहती ज्याचे डोळे ॥ दृष्टि असोनि ते आंधळे ॥ जाण केवळें मोरपिच्छें ॥१॥ जेवीं कां प्रिया पुत्र धन ॥ देखोनियां सुखावती नयन ॥ तैसें संतप्रतिमांचें दर्शन ॥ आवडीं जाण जो करी ॥ २ ॥ अतिउल्हासें जें दर्शन ॥ या नांव गा देखणेपण ॥ तेणें सार्थक नयन ॥ दृष्टीचें भजन यारीतीं ॥ ३ ॥ देखोनि संत माझी रूपडीं ॥ जो धांवोनियां लवडसव

---

१ मनुष्य व किन्नरांनीं. २ आपले आपण झालेल्या. ३ दैत्यांनीं. ४ राक्षसांनीं. ५ पाटाव वगैरे महावस्त्रास. ६ आवडते. ७ ज्यास कोणाची गरज नाहीं अशा मला. ८ फल. ९ मोठ्या घाईनें.

डी ॥ खेंव[1] देऊनियां आवडीं ॥ मिठी न सोडी विस्मयें ॥ ४ ॥ ऐसें संतांचें आलिंगन ॥ तेणें सर्वांग होय पावन ॥ कां मूर्तिस्पर्शें जाण ॥ शरीर पावन होनसे ॥ ५ ॥ तीर्थयात्रे न चालतां ॥ संतासमीप नवेंचतां[2] ॥ हरिरंगीं न नाचतां ॥ चरण सर्वथा निरर्थक ॥ ६ ॥ जो कां नानाविषयस्वार्थी ॥ नलाजे नीचापुढें विलगता ॥ तो हरिरंगणीं नाचतां ॥ आला सर्वथा उठवण्या ॥ ७ ॥ तीर्थयात्रा क्षेत्रगमनता ॥ हरिकीर्तना जागरणा जातां ॥ संतसमागमें चालतां ॥ कां नृत्य करितां हरिरंगीं ॥ ८ ॥ या नांव गा सार्थक चरण ॥ इतर संसार अधोगमन ॥ चरणाचें पावनपण ॥ या नांव जाण उद्धवा ॥ ९ ॥ सर्वभावें अवंचन[3] ॥ कवडी धरूनि कोटी धन ॥ जेणें केलें मदर्पण ॥ माझें अर्चन या नांव ॥ १२१० ॥ धन धान्य वेंचूनि[4] गांठीं ॥ माझी पूजा आहाच दृष्टी ॥ ते नव्हे अर्चनहातवटी ॥ तो जाण कपटी मजसी पैं ॥ ११ ॥ लोभें खावया आपण ॥ ठेवी प्रतिमेपुढें पक्वान्न ॥ अतीतें[5] आलिया न घाली कण ॥ मदर्चन तें नव्हे ॥ १२ ॥ कर पवित्र करितां पूजा ॥ ते आवडती अधोक्षजा ॥ जे न पूजिती गरुडध्वजा ॥ त्या जाण भुजा प्रेताच्या ॥ १३ ॥ न करितां हरिपूजन ॥ न देतां सत्पात्रीं जाण ॥ जडितमुद्रा बाहुभूषण ॥ तें प्रेतासि लेणें लेवविलें ॥ १४ ॥ वाचा सार्थक हरिकीर्तनें ॥ कां अनिवार नामस्मरणें ॥ जयजयकाराचेंनि गर्जनें ॥ केलीं त्रिभुवनें पावन ॥ १५ ॥ रामनामाच्या गजरीं ॥ सदा गर्जे ज्याची वैखरी[6] ॥ तेथ कळिकाळाची नुरे उरी ॥ दूरिच्यादूरी द्वैतें पळालीं ॥ १६ ॥ हरिनाम सांडूनि करंटीं ॥ मिथ्या करिताति चावटी[7] ॥ जेवीं हागवणी पटपटी ॥ तैशा गोठी जल्पती ॥ १७ ॥ हरिनामाचा सुखसुरवाड ॥ ज्याचे मुखीं लागला गोड ॥ त्याचे मजपाशीं सरतें तोंड ॥ मी अखंड त्याजवळीं ॥ १८ ॥ गद्यपद्यें स्तवनमाळा ॥ नानापदबंधाची कळा ॥ छंदकुसरीं विचित्र लीळा ॥ स्तुति गोपाळा अर्पावी ॥ १९ ॥ धैर्य स्थैर्य औदार्य ॥ घनश्याम अतिसौंदार्य ॥ शौर्य वीर्य माधुर्य ॥ गुणगांभीर्य गोविंद ॥ १२२० ॥ त्रिविक्रम उभा बळीच्या द्वारीं ॥ द्वार न सांडूनि द्वारकरी[8] ॥ तेणें द्वारें द्वारकेभीतरी ॥ येऊनि उद्धरी कुशातें ॥ २१ ॥ तो अद्यापि श्रीहरी ॥ स्वयें उभा समुद्रतीरीं ॥ शोभा विराजमान साजिरी ॥ सुरासुरनरीं वंदिजे ॥ २२ ॥ मत्स्य झाला तो सागरीं ॥ वराह झाला नासिकद्वारीं ॥ उपजला खांबामाझारीं ॥ यशोदेघरीं पोसणा ॥ २३ ॥ जठरपाठीं झाला कमठू ॥ बळिछळणीं तो खुजंटू[9] ॥ वेदवादें अतिवांजटू ॥ फुरफुराटू निःश्वासें ॥ २४ ॥ बाईल चोरीं नेली परदेशीं ॥ तीलागीं रडे पडे वनवासीं ॥ एकही गुण नाहीं त्यापाशीं ॥ शेखीं दासी कुब्जेसी रतला ॥ २५ ॥ स्तुतिगुणकर्मानुकीर्तन ॥ या नांव गायन तूं जाण ॥ प्रह्व ह्मणिजे तें नमन ॥ तेंही व्याख्यान अवधारी ॥ २६ ॥ माझे प्रतिमांचें दर्शन ॥ कां देखोनि संतजन ॥ जो भावें घाली लोटां

---

१ भेट. २ नजातां. ३ कपटावांचून. ४ बांधून. ५ अतिथि. ६ वाणी. ७ व्यर्थ. ८ द्वारपाळ. ९ वामन.

गण ॥ देहाभिमान सांडूनि ॥ २७॥ साधुजनांसी वंदितां ॥ धणी न बाणे चित्तां ॥ पुनःपुन्हा चरणीं माथा ॥ विनीतता अतिनम्र ॥ २८ ॥ भागवतांचे रजःकण ॥ जो मस्तकीं वंदीना आपण ॥ तो जीवें जीतां प्रेत जाण ॥ अपवित्रपण तैसें तया ॥ २९ ॥ सांडूनि लौकिकाच्या लाजा ॥ जो वैष्णवांच्या रेणुरजा ॥ गडबडां लोळे वोजा ॥ हा भक्तीचा माझा उल्हास ॥ १२३० ॥ या आवडीं करितां भजन ॥ सहजें जाती मानाभिमान ॥ हें मुख्य भक्तीचें लक्षण ॥ जे मानाभिमान सांडावे ॥ ३१ ॥ त्यजूनियां मानाभिमान ॥ करावें मत्कीर्तनश्रवण ॥ श्रवणादिभक्तीचें लक्षण ॥ ऐक संपूर्ण उद्धवा ॥ ३२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मत्कथाश्रवणे श्रद्धा मदनुध्यानमुद्धव ॥ सर्वलाभोपहरणं दास्येनात्मनिवेदनम् ॥ ३५ ॥ टीका ॥ ॥ दृढ आस्तिक्य समाधान ॥ शुद्ध श्रद्धा त्या नांव जाण ॥ भावार्थें नडंडळो मन ॥ कथाश्रवण सादरें ॥ ३३ ॥ वक्तयाच्या वचनापाशीं ॥ जडूनि घाली कानामनांसी ॥ श्रवणार्थ वाढवी बुद्धीसी ॥ विकला कथेसी भावार्थें ॥ ३४ ॥ जेवीं दुधालागीं मांजर ॥ संधी पहावया सादर ॥ तेवीं सेवावया कथासार ॥ निरंतर उल्हास ॥ ३५ ॥ जडितकुंडलें मंडित कान ॥ तें श्रवणासि नोहे मंडण ॥ श्रवणासि श्रवँण भूषण ॥ श्रवणें श्रवण सार्थक ॥ ३६ ॥ जरी स्वयें झाला व्याख्याता ॥ पुराणपठणें पुरँता ॥ तरी साधुमुखें हरिकथा ॥ ऐके सादरता अतिप्रीतीं ॥ ३७ ॥ श्रवणें श्रवणार्थीं सावधान ॥ तोचि अर्थ करी मनन ॥ संपल्या कथाव्याख्यान ॥ मनीं मनन संपेना ॥ ३८ ॥ ऐसें ठसावल्या मनन ॥ सहजेंचि लागे माझें ध्यान ॥ सगुण अथवा निर्गुण ॥ आवडी प्रमाण ध्यानासी ॥ ३९ ॥ तेथ ध्येय ध्यान ध्याता ॥ तिहींसि एकी गांठी नसतां ॥ तंवचिवरी ध्यानावस्था ॥ जाण तत्त्वतां उद्धवा ॥ १२४० ॥ ज्याच्या जीवीं ध्यानाची आवडी ॥ ज्याच्या मनासि माझी गोडी ॥ उद्धवा हे तैंचि जोडे जोडी ॥ जैं जन्मकोडी निजभाग्यें ॥ ४१ ॥ निष्काम करोनियां मन ॥ जन्मजन्मांतरीं साधन ॥ केलें असेल तैं माझें ध्यान ॥ विश्वासें जाण दृढ लागे ॥ ४२ ॥ दृढ लागल्या माझें ध्यान ॥ अनन्यभावें माझें भजन ॥ सर्वपदार्थेंसि जाण ॥ आत्मसमर्पण मज करी ॥ ४३ ॥ वैदिकँ लौकिकँ देहिकँ ॥ या क्रियांचे लाभ देख ॥ जरी झाल्या अलोलिक ॥ भक्त भाविक तैं नेघे ॥ ४४ ॥ वैदिक लाभ दिव्य सामग्री ॥ स्वर्गादि सत्यलोकवरी ॥ भक्त तेंही हातीं न धरी ॥ भजनसुखें करी सुटंक ॥ ४५ ॥ लौकिकलाभाची श्रेणी ॥ कल्पतरु कामधेनु चिंतामणी ॥ भक्त अर्पी कृष्णार्पणीं ॥ हरिभजनीं संतुष्ट ॥ ४६ ॥ दैहिकलाभाची थोरी ॥ गजांत लक्ष्मी आल्या घरीं ॥ भक्त कृष्णार्पणें करी ॥ भजनसुखें करी संतुष्ट ॥ ४७ ॥ विरिंच्यादि लाभ जाण ॥ सर्व मानोनियां गौणँ ॥ माझे भक्तीसि विकिला प्राण ॥ सर्व मदर्पण मज करी ॥ ४८ ॥ जेणें सेवेसि विकिला प्राण ॥ वृथा जावोंनेदी अर्धक्षण ॥ माझी कथा माझें ध्यान ॥

---

१ भगवद्भक्तांचे. २ खवड. ३ हरिकथा ऐकणें. ४ निपुण. ५ वेदांत सांगितलेल्या. ६ लोकांत असलेल्या. ७ देहसंबंधी. ८ घेत नाहींत. ९ पंक्ति. १० ब्रह्मपदादिकांचा. ११ कमी.

महोत्साहो जाण माझाची ॥ ४९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मज्जन्मकर्मकथनं मम पर्वानुमोदनम् ॥ गीततांडववादित्रगोष्ठीभिर्मद्गृहोत्सवः ॥ ३६ ॥ टीका ॥ ॥ ध्यानावस्थें करी ध्यान ॥ नातरी कथा निरूपण ॥ अनुसंधानीं सावधान ॥ रितें[1] मन राहूंनेदीं ॥ १२५० ॥ माझीं जन्मकर्मैं निरूपितां ॥ आवडी उल्हास थोर चित्ता ॥ स्वेदें[2] रोमांच द्रवतां ॥ सप्रेम कथाउल्हासें ॥ ५१ ॥ ऐकूनि रहस्य[3] हरिकथा ॥ द्रव नुपजे ज्याचिया चित्तां ॥ तो पाषाण जाण सर्वथा ॥ जळीं असतां कोरडा ॥ ५२ ॥ ऐक माझे भक्तीचें चिह्न ॥ माझ्या पर्वांचें अनुमोदन ॥ करी करवी आपण ॥ दीनोद्धरण उपावो ॥ ५३ ॥ पर्वविशेष भागवतधर्मीं ॥ नृसिंहजयंती रामनवमी ॥ वामनजयंती जन्माष्टमी ॥ उत्तमोत्तमीं शिवरात्र ॥ ५४ ॥ वैष्णवांसि शिवरात्री विरुद्ध ॥ हें बोलणें अति अबद्ध ॥ सकळपुराणीं अविरुद्ध ॥ व्यास विशुद्ध बोलिला ॥ ५५ ॥ शिव श्याम तमोगुणी ॥ तो शुद्ध झाला विष्णूच्या ध्यानीं ॥ विष्णु श्याम शिवचिंतनीं ॥ विनटले गुणीं येरयेरां ॥ ५६ ॥ शिव धवळधाम गोक्षीर ॥ विष्णु घनश्याम अतिसुंदर ॥ बाप ध्यानाचा बडिवार ॥ येरें येर व्यापिला ॥ ५७ ॥ मुदलीं दोहींसी ऐक्य शुद्ध ॥ मा उपासकांसि कां विरुद्ध ॥ शिवरात्री वैष्णवांसि अविरुद्ध ॥ व्रत विशुद्ध सर्वांसी ॥ ५८ ॥ जें पर्व प्रिय चक्रपाणी ॥ जे सकळ कल्याणाची श्रेणी ॥ उभयपक्षां तारिणी ॥ वैष्णवजननी एकादशी ॥ ५९ ॥ जे शुक्लकृष्णपक्षविधी ॥ भक्त वाऊनियां खांदीं ॥ नेऊनियां सायुज्यसिद्धी ॥ मोक्षपदीं बैसवी ॥ १२६० ॥ करावी शुक्ल एकादशी ॥ त्यजावें कृष्णपक्षासी ॥ उपडलिया एका पांखासी ॥ सायुज्यासी ॥ केवीं पावे ॥ ६१ ॥ दोपाखीं उड्डाण पक्ष्यासी ॥ एक उपडिल्या नुडवे त्यासी ॥ तेवीं पां त्यजितां कृष्णपक्षासी ॥ सायुज्यासी नपाविजे ॥ ६२ ॥ तेवीं एकादशी पाही ॥ जोजो उत्सवो जेजे समयीं ॥ तोतो उप[4]तिष्ठे माझ्याठायीं ॥ संदेह नाहीं सर्वथा ॥ ६३ ॥ जो एकादशीचा व्रतधारी ॥ मी नित्य नांदें त्याच्या घरीं ॥ सर्व पर्वकाळाच्या शिरीं ॥ एकादशी खरी पैं माझी ॥ ६४ ॥ जो एकादशीचा व्रती माझा ॥ तो व्रततपतीर्थांचा राजा ॥ मज आवडे तो अधोक्षजा ॥ परिग्र[5]हो माझा तो एकु ॥ ६५ ॥ जैं माझे भक्त येती घरा ॥ तैं सर्वपर्वकाळ येती दारा ॥ वैष्णवां तो दिवाळी दसरा ॥ तीर्थें घरां पैं येती ॥ ६६ ॥ चंद्रसूर्यग्रहणांसी ॥ वोंवाळूनि सांडी[6] ते दिवसीं ॥ कपिलाषष्ठी तिची दासी ॥ मा अर्धोदयासी कोण पुसे ॥ ६७ ॥ ऐसें मद्भक्तांचें आगमन ॥ तेणें उल्हासें नसंठे मन ॥ सर्वस्व[7] वेंचितां धनधान्य ॥ हरिखें[8] जाण नाचत ॥ ६८ ॥ ऐशी माझ्या भक्तांची आवडी ॥ त्यांचे संगतीची अतिगोडी ॥ त्या नांव भक्तीची कुळ[9]वाडी ॥ पर्वकोडी ते दिवसीं ॥ ६९ ॥ पर्वविशेष आदरें ॥ संत आलेनि अवसरें ॥ शृंगारी हरिमंदिरें ॥ गुढिया मखरें महोत्साह ॥ १२७० ॥ संत बैसवूनि परवडीं ॥ कीर्तन

---

[1] रिकामें. [2] घाम. [3] तत्त्वभूत अशा. [4] प्राप्त होतो. [5] कुटुंबांतील. [6] टाक. [7] सर्व पदरचें. [8] आनंदानें. [9] शेतकी.

मांडिती निरवडी ॥ हर्षें नाचती आवडीं ॥ धरिती बागडी विन्यासें ॥ ७१ ॥ टाळ घोळ मृदंग कुसरीं ॥ नानाचरित्रं गाती गजरीं ॥ गर्जती स्वानंदें अवसरीं ॥ जयजयकारीं हरिनामें ॥ ७२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यात्रा बलिविधानं च सर्ववार्षिकपर्वसु ॥ वैदिकी तांत्रिकी दीक्षा मदीयव्रतधारणम् ॥ ३७ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐक दीक्षेचें लक्षण ॥ वैदिकी तांत्रिकी दोन्ही जाण ॥ वैदिकी वेदोक्त ग्रहण ॥ तांत्रिकी जाण आगमोक्त ॥ ७३ ॥ वैष्णवी दीक्षा व्रतग्रहण ॥ पांचरात्रिक मंत्रानुष्ठान ॥ हें आगमोक्त शुद्धलक्षण ॥ व्रतधारण तें माझें ॥ ७४ ॥ वैष्णवव्रतधर्मासि ॥ पर्वें करावीं वार्षिकेंसी ॥ जे बोलिलीं चातुर्मासीं ॥ एकदश्यादि जयंत्या ॥ ७५ ॥ शयनी कंटिनी प्रबोधिनी ॥ पवित्रारोपणी नीराजनी ॥ वसंतदमनकारोपणी ॥ जन्मदिनी जयंत्या ॥ ७६ ॥ इत्यादि नानापर्वकाळीं ॥ महामहोत्साहो पूजावळी ॥ नीराजनें दीपावळी ॥ मृदंगटाळीं गर्जत ॥ ७७ ॥ उचंबळोनि अतिसुखें ॥ यात्रे निघावें येणें हरिखें ॥ दिंडी पताका गरुडटके ॥ नामघोषें गर्जत ॥ ७८ ॥ यात्रे जावें ज्या देवासी ॥ तो देवो आणो निजगृहासी ॥ आपली आवडी जे मूर्तीसी ॥ ते प्रतिमेसी प्रतिष्ठी ॥ ७९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ममार्चास्थापने श्रद्धा स्वतः संहत्य चोद्यमः ॥ उद्यानोपवनाक्रीडपुरमंदिरकर्मणि ॥ ३८ ॥ ॥ टीका मूर्ति निपजावी[2] वरिष्ठ ॥ नेटुगी देटुगी चोखट ॥ साधुमुखें अतिनिर्दुष्ट ॥ घवघवीत साजिरी ॥ १२८० ॥ मूर्ति करावी अतिसुरेख ॥ कृश[3] न करावी अधोमुखं[4] ॥ स्थूळ न करावी ऊर्ध्वमुख ॥ रडकी दुर्मुख न करावी ॥ ८१ ॥ अंग स्थूळ वदन हीनें ॥ मूर्ति न करावी अतिदीन ॥ खेंचरी भूचरी जिचे नयन ॥ विक्राळ वदन न करावी ॥ ८२ ॥ अंग साजिरें नाक हीन ॥ वरदळ चांग चरण क्षीण ॥ मोदळी बुदगुली ठेंगणें ठाण ॥ अतिदीर्घ जाण न करावी ॥ ८३ ॥ मूर्ति साजिरी सुनयन ॥ सम सपोष सुप्रसन्न ॥ अंगीं प्रत्यंगीं[6] नव्हे न्यून ॥ सुचिह्न लक्षण सायुध ॥ ८४ ॥ पाहतां निवे तनमन ॥ देखतां जाय भूक तहान ॥ घवघवीत प्रसन्नवदन ॥ रूपालक्षण सुकुमार ॥ ८५ ॥ जे देखतांचि जीवीं जँडे ॥ अतिशयें सर्वांसि आवडे ॥ पाहों जातां निजनिवाडें ॥ पूरू चढे प्रेमाचा ॥ ८६ ॥ ईषत् दिसे हास्यवदन ॥ अतिशयेंसि सुप्रसन्न ॥ जिचेनि घवघवाटें निवे मन ॥ प्रतिमा संपूर्ण ती नांव ॥ ८७ ॥ तेथें मेळवूनि साधुश्रेष्ठां ॥ अभ्युत्तारण करावें निष्ठा ॥ चक्षून्मीलन प्राणप्रतिष्ठा ॥ करावी वरिष्ठाचेनि हातें ॥ ८८ ॥ देवालय करावें गहन ॥ वन उद्यान उपवन ॥ खेंडकुलिया विश्रामस्थान ॥ आराम जाण करावे ॥ ८९ ॥ नानाजातीचे वृक्ष तें वन ॥ फळभक्ष वृक्ष तें उपवन ॥ पुष्पवाटिका तें उद्यान ॥ कृष्णार्पण पूजेसी ॥ १२९० ॥ हाट हाटवटियां चौवासी ॥ नगर वसवावें देवापाशीं ॥ वेदाध्ययन शास्त्रश्रवणेंसी ॥ अहर्निशीं कीर्तनें ॥ ९१ ॥

---

१ परिवर्तिनी. २ तयार करावी. ३ रोडकी. ४ जिचें खालीं तोंड अशी. ५ तेजरहित. ६ वोटें इत्यादिकांनीं. ७ भरे. ८ किंचित्.

इतुकें करावया असमर्थ ॥ श्रद्धा आहे परी नसे वित्त ॥ तरी साह्य मेळवून समर्थ ॥ मद्भावयुक्त करावें ॥ ९२ ॥ कां मेळवूनि भगवद्भक्त ॥ त्यांत श्रद्धाळू जे वित्त[1]वंत ॥ भावपूर्वक दिधल्या वित्त ॥ तेणें हें समस्त करावें ॥ ९३ ॥ देउळीं करूनि मूर्तिप्रतिष्ठा ॥ परतोनि नवचे जो त्या वाटा ॥ तो अळशी जाणावा करंटा ॥ नव्हे चोखटा भावाचा ॥ ९४ ॥ जो करूं जाणे मूर्तिप्रतिष्ठा ॥ धन वेंचून भावार्थी मोठा ॥ नीचसेवा तो माझा वांटा ॥ भाडितां खरांटा न सांडी ॥ ९५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ संमार्जनोपलेपाभ्यां सेकमंडलवर्तनैः ॥ गृहशुश्रूषणं मह्यं दासवद्यदमायया ॥ ३९ ॥ ॥ टीका ॥ ॥ असतां शिष्य सेवकजन ॥ ते प्रतिष्ठा सांडूनि सन्मान ॥ स्वयें करी सडा संमार्जन ॥ देवालयीं जाण निर्दंभें[2] ॥ ९६ ॥ रंगमाळा घाली कुसरीं ॥ नानायंत्रें नानाकारीं ॥ नानापरींचे रंग भरी ॥ आवडी भारी मद्भजनीं ॥ ९७ ॥ जैसे कां नीच रंक ॥ तैसी सेवा करी देख ॥ नीचसेवेसि अतिसुख ॥ निर्मायिक मद्भजनीं ॥ ९८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अमानित्वमदंभित्वं कृतस्यापरिकीर्तनम् ॥ अपि दीपावलोकं मे नोपयुंज्यान्निवेदितम् ॥ ४० ॥ ॥ टीका ॥ ॥ अपार वेंचूनि नाना अर्थ[3] ॥ प्रसादप्रतिष्ठा ज्यां केली येथ ॥ मी एक देवाचा मोठा भक्त ॥ न धरी पोटांत अभिमान ॥ ९९ ॥ श्रद्धा भावो नाहीं चित्तीं ॥ खटाटोप अहाच भक्ती ॥ ऐशी जे दांभिक स्थिती ॥ भक्त नातळती भाविक ॥ १३०० ॥ भक्तें न धरावा अभिमान ॥ नापेक्षावा मानसन्मान ॥ न करावें दांभिक भजन ॥ अभिलाष जाण न धरावा ॥ १ ॥ अनुभव आला तो आपण ॥ कां देवालयीं वेंचिलें धन ॥ अथवा जें दिधलें दान ॥ तें वाच्यँ[4] जाण न करावें ॥ २ ॥ यजमान जैं केलें बोले ॥ तैं केलें कर्म वृथा झालें ॥ प्राणेंवीण प्रेत उरलें ॥ तैसें झाले ते धर्म ॥ ३ ॥ कृषीवळ[5] पेरूनियां धान्य ॥ सवेंचि आच्छादी आपण ॥ तें सबळ पिके जाण ॥ तैसें फळदान न बोलतां ॥ ४ ॥ देवासि समर्पिलें आपण ॥ कां आणिकीं केलें निवेदन[6] ॥ तें घेऊं नये आपण ॥ देवलकँपण[7] तो दोष ॥ ५ ॥ देवाचा प्रसाद घेतां ॥ लोभें न घ्यावा सर्वथा ॥ आधीं वांटावा समस्तां ॥ अल्पमात्रता स्वयें घ्यावा ॥ ६ ॥ दीपु समर्पिला श्रीहरी ॥ तेणें न वर्तावें गृहव्यापारीं ॥ हें बोलिलें आगमशास्त्रीं ॥ स्मृतिकारीं सज्ञानीं ॥ ७ ॥ हे तंव अवघी साधारण बाह्यपूजा ॥ परी दृढविश्वासें भावो माझा ॥ ते भक्ति आवडे अधोक्षजा ॥ भाविकांची पूजा भावार्थें ॥ ८ ॥ ऐक या भक्तीचा इत्यर्थ ॥ जेणें भजनें ह्मणिजे भक्त ॥ तरी जेजे उत्तम या लोकांत ॥ आवडीं पदार्थ मज अर्पिला ॥ ९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यद्यदिष्टतमं लोके यच्चातिप्रियमात्मनः ॥ तत्तन्निवेदयेन्मह्यं तदानंत्याय कल्पते ॥ ४१ ॥ ॥ टीका ॥ होकां चंद्रामृत तत्त्वतां ॥ अवचटें[8] आलें भक्ताचे हातां ॥ तें अवघेंचि अर्पी भगवंता ॥ देहलोभता न सेवी ॥ १३१० ॥ देहासि यावया

---

[1] द्रव्यवान. [2] दांभिकपणा सोडून. [3] धन. [4] उच्चारण. [5] शेतकरी. [6] समर्पण. [7] पुजारीपणा. [8] अवचित.

अमरता ॥ येणें लोभें सेवावें अमृता ॥ अमर अमृतपान करितां ॥ मरती सर्वथा सकाळें॥ ११ ॥ नश्वर[1] देहाचिया ममता॥ भक्त से
वीना अमृता ॥ तेंचि भगवंतासि अर्पितां ॥ अक्षयता अनश्वर[2] ॥ १२ ॥ परिस चिंतामणि न प्रार्थितां ॥ दैवें आलिया भक्ताच्या हातां॥
तो लोभें न ठेवी सर्वथा ॥ अर्पी भगवंता तत्काळ ॥ १३ ॥ लोभें कल्पतरु राखतां ॥ कल्पना वाढे अकल्पिता ॥ तोचि भगवंतीं अर्पि
तां ॥ निर्विकल्पता स्वयें वाढे ॥ १४ ॥ स्वार्थें चिंतामणी राखितां ॥ अत्यंत हृदयीं वाढे चिंता ॥ तोचि भगवंतीं अर्पितां ॥ अ
चिंतता चित्तासी ॥ १५ ॥ कामधेनु राखतां आपण ॥ अनिवार कामना वाढे जाण ॥ तेचि करितां कृष्णार्पण ॥ निरपेक्षता पूर्ण अंगीं
बाणे[3] ॥ १६ ॥ लोभें स्पर्शपणी राखतां ॥ तो वाढवी धनलोभता ॥ तोचि भगवंतीं अर्पितां ॥ अर्थस्वार्थता निर्मुक्त ॥ १७॥ हो कां
देशकाळऋतुमेळें ॥ उत्तमपदार्थ अथवा फळें ॥ नव[4] धान्यादिकें सकळें॥ अर्पी भावबळें मजलागीं॥ १८ ॥ पोटांतूनि आवडता॥ प्रा
प्त झालिया पदार्था ॥ मजचि अर्पिती सर्वथा ॥ लोलिंगता[6] सांडूनी ॥ १९ ॥ आपुले हृदयींची आवडी ॥ हरिचरणीं लाविली फुडीं ॥
आतां नानापदार्थांची जे गोडी॥ ते मजचि रोकडी अर्पिती ॥ १३२० ॥ मज अनंताच्या हातीं ॥ आवडीं अर्पिली मद्भक्ती ॥ त्याचीं
फळें सांगतां श्रुती ॥ मुक्या होती सर्वथा॥ २१ ॥ मी वेदांचा वेदवक्ता ॥ मजही न बोलवे सर्वथा ॥ त्याचें फळ तेंचि मी आतां ॥ जाण
तत्त्वतां उद्धवा ॥ २२ ॥ जीवाहोनि वरुती ॥ माझ्याठायीं अत्यंत प्रीती ॥ तिये नांव गा माझी भक्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा॥ २३ ॥ त
त्काळ मज पाविजे जेणें ॥ ते माझे पूजेचीं स्थानें ॥ अतिपवित्र जें कल्याणें ॥ तुजकारणें सांगेन ॥ २४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सूर्योऽग्नि
र्ब्राह्मणो गावो वैष्णवः खं मरुज्जलम् ॥ भूरात्मा सर्वभूतानि भद्रपूजापदानि मे ॥ ४३ ॥ ॥ टीका ॥ ॥ एकादशी एकादश्याध्यायीं ॥ एका
दश पूजास्थाने पाही ॥ एका जनार्दनु तेंही ॥ एकरूप पाही वर्णिलें ॥ २५ ॥ सूर्य अग्नि आणि ब्राह्मण ॥ गायी वैष्णव आणि गगन ॥ अ
निळें[7] जळ मही जाण ॥ पूज्य आपण आपणासी ॥ २६ ॥ अकरावें पूजास्थान॥ सर्वभूतें पूज्य जाण॥ ऐक पूजेचें विधान ॥ यथायो
ग्य लक्षण अवधारी॥ २७॥ ॥ श्लोक ॥ ॥ सूर्ये तु विद्यया त्रय्या हविषाग्नौ यजेत माम् ॥ आतिथ्येन तु विप्राग्र्ये गोष्वंग यवसादिना
॥ ४३ ॥ ॥ टीका ॥ ॥ सविता माझें अधिष्ठान ॥ माझेनि तेजें विराजमान ॥ जेणें तेजें जगाचे नयन ॥ देखणे[8] जाण होताती॥ २८ ॥
दीप लाविल्या गृहाभींतरी ॥ तो प्रकाश दिसे गवाक्षद्वारीं ॥ तैसें माझें निजतेजें अंतरीं ॥ सूर्यद्वारीं प्रकाशे॥ २९ ॥ तो सविता मंडळ
मध्यवर्ती ॥ जाण नारायण मी निश्चितीं ॥ त्या मज सूर्याची उपास्ती ॥ सौर सुनिश्चितीं त्रैविद्या ॥ १३३० ॥ ऋग्वेदादि वेद तिनी ॥ सां

---

१ नाश पावणाऱ्या. २ नित्य. ३ ठसते. ४ नवीन. ५ मनापासून. ६ लुब्धपणा. ७ वायु. ८ पहाणारे. ९ धान्यावाटें.

ग सौरमंत्र जाणोनी ॥ सूर्यसूक्तें संमुख पठणीं ॥ पूजा सज्ञानीं करावी ॥ ३१ ॥ हे वैदिकी उपासकता ॥ वेदज्ञासीचि तत्त्वतां ॥ नेणत्या
योग्य नव्हे सविता ॥ ऐसें सर्वथा न ह्मणावें ॥ ३२ ॥ तत्काळ प्रसन्न होय सविता ॥ ऐशी सुगम उपासकता ॥ तुज सांगेन आतां ॥
सावधानता अव[१]धारी ॥ ३३ ॥ सकळवेदांची जननी ॥ सकळमंत्रांचा मुकुटमणी ॥ ते गायत्री उत्तम[२]वर्णीं ॥ सकळ ब्राह्मणीं जाणिजे
॥ ३४ ॥ तिचा अर्थ विचारितां ॥ ती[३]अधीन असे सविता ॥ त्रिपदा त्रिकाळीं अर्घ्यदेतां ॥ त्रैविद्या तत्त्वतां त्या नांव ॥ ३५ ॥ अर्धमा
त्रा अर्धबिंबध्यान ॥ त्रिपदा त्रिकाळीं अर्घ्यदान ॥ तेणें संतोषे चिद्घन ॥ आपणासमान भक्त करी ॥ ३६ ॥ हें प्रथम माझें अधिष्ठान ॥
सूर्यपूजा याचि नांव जाण ॥ आतां अग्निपूजेचें लक्षण ॥ सांग संपूर्ण तें ऐक ॥ ३७ ॥ सर्वांगां मुख प्रधान ॥ तें तुझें मुख अग्नि जाण
॥ ये अर्थीं वेदशास्त्र पुराण ॥ साक्ष जाण गर्जताती ॥ ३८ ॥ ब्राह्मण माझे आवडते ॥ माझें मुखींहूनि सरते ॥ त्यां लाविले अग्नि
सेवेतें ॥ तेही तेथें चूकले ॥ ३९ ॥ घालूनि मजमुखीं अवदान ॥ इंद्राय स्वाहा ह्मणती जाण ॥ कर्मकांडें ठकिले ब्राह्मण ॥ शुद्ध मदर्पण
चूकले ॥ १३४० ॥ केवळ मजमुखीं अर्पितां ॥ आड घाली त्याची योग्यता ॥ इंद्र यम वरुण सविता ॥ नानाविकल्पता अव[४]दानीं
॥ ४१ ॥ देवो देवीं मीचि आहें ॥ हेंही सत्य न मानिती पाहे ॥ मजवेगळा विनियोग होये ॥ नवल काये सांगावें ॥ ४२ ॥ जेंजें सेविजे
तिहीं लोकीं ॥ तेंतें अर्पे माझ्या मुखीं ॥ हें नमनिजे याज्ञिकीं ॥ कर्माविखीं विकल्प ॥ ४३ ॥ विकल्पबुद्धि ब्राह्मण ॥ अद्यापि संशयीं
पडिले जाण ॥ करूनि वेदशास्त्रपठण ॥ शुद्ध मदर्पण बोलती ॥ ४४ ॥ माझें मुख वैश्वानरें[५] ॥ येणें भावें विनटे नर ॥ सांडूनि भेद दे[६]वतांतर ॥
मजचि साचार अर्पिती ॥ ४५ ॥ त्यांचे समिधांनीं मन तृप्त झालें ॥ तेथही जरी हविर्द्रव्य आलें ॥ तरी माझें निजसुख सुखावलें ॥ सर्वस्व
आपुलें त्यासि दें ॥ ४६ ॥ मज नैराश्यतेची आस ॥ त्याच्या हाताची मी पाहे वास ॥ त्यालागीं सदा सावकाश ॥ अल्पही ग्रास जें देती
॥ ४७ ॥ त्याचेनि हातें निर्विकल्पें ॥ मद्भावें जें अग्नीस अर्पे ॥ तृण काष्ठ तिळ तुपें ॥ तें चि[७]द्रूपें सेविजे ॥ ४८ ॥ यापरी अग्नीची उपा[८]स्ती
॥ जे दुजेस्थानींची पूजास्थिती ॥ सांगीतली म्यां तुजप्रती ॥ ब्राह्मणभक्ती अवधारी ॥ ४९ ॥ पूजेमाजी अतिश्रेष्ठ जाण ॥ शीघ्र
मत्प्राप्तीचें कारण ॥ ब्राह्मण माझें पूजास्थान ॥ अतिगहन उद्धवा ॥ १३५० ॥ त्यांचिया भजनाची नवलपरी ॥ आं[९]ड पडावें देखोनि
दूरीं ॥ मस्तक ठेवावा चरणावरी ॥ चरणरज शिरीं वंदावें ॥ ५१ ॥ आवाहनविसर्जनेंवीण ॥ शालग्राम माझें अधिष्ठानें[१०] ॥ परी तें
केवळ अचेतन ॥ ब्राह्मण सचेतन मद्रूपें ॥ ५२ ॥ मी अव्यक्तरूपें जनार्दन ॥ तो मी व्यक्तें[१२] ब्राह्मणरूपें जाण ॥ धरातळीं मीं असें ना

---

१ ऐक. २ प्रथमवर्णांनीं. ३ तिच्या स्वाधीन. ४ आहुतीविषयीं. ५ अग्नि. ६ अन्यदेवाविषयीं. ७ ज्ञानस्वरूप अज्ञानें. ८ उपासना. ९ आडवें. १० राहण्याचें स्थान. १२ स्पष्टपणानें.

रायण ॥ धरामर ब्राह्मण यालागीं ॥ ५३ ॥ ब्राह्मणमुखें वेदासि महिमा ॥ यज्ञदानतीर्थांसि गरिमा ॥ ब्राह्मण देवासि परम प्रेमा ॥ ब्रह्मत्व ब्रह्मा ब्राह्मणमुखें ॥ ५४ ॥ त्या ब्राह्मणांसि अपमानितां ॥ अपमानिल्या यज्ञदेवता ॥ वेदादि तपदानतीर्थां ॥ परब्रह्म तत्त्वतां अपमानिलें ॥ ५५ ॥ मज त्रिलोकीं नाहीं सांठवण ॥ मजहूनि अधिक माझे ब्राह्मण ॥ त्यांमाजी मी वेदरूप नारायण ॥ सगळा जाण सांठवलों ॥ ५६ ॥ ब्राह्मणपद हृदयीं धरितां ॥ मज आली परम पवित्रता ॥ लक्ष्मी पायां लागे उपेक्षितां ॥ चरणतीर्थ माथां शिवूं धरी ॥ ५७ ॥ यालागीं ब्राह्मण पूज्य जाण ॥ अंगें मी करीं चरणक्षालन ॥ त्यांचें उच्छिष्ट मी काढीं आपण ॥ पाडू कोण इतरांचा ॥ ५८ ॥ मुख्य माझें अधिष्ठान ॥ सर्वोपचारपूजास्थान ॥ दान मान मिष्टान्न ॥ विधिपूजन विप्रांचें ॥ ५९ ॥ एका नेमू शालग्रामाचा ॥ एका स्थावर लिंगाचा ॥ एका नेमू गणेशाचा ॥ एका सूर्याचा दर्शननेमू ॥ १३६० ॥ एका नेमू तुळशीचा ॥ एका बांधल्या अनंताचा ॥ नित्य नेम ब्राह्मणाचा ॥ सभाग्य भाग्याचा दुर्लभ ॥ ६१ ॥ नित्यनेमस्त द्विजपूजा ॥ षोडशोपचारें करी वोजा ॥ माझे भक्तीचा तो राजा ॥ आत्मा माझा तो एकू ॥ ६२ ॥ जो देवांतरा नुपासित ॥ जीवें भावें ब्राह्मणभक्त ॥ त्याचा चुकवूनियां अनर्थ ॥ निजस्वार्थ मी कर्ता ॥ ६३ ॥ ऐसे जे ब्राह्मणभक्त ॥ त्यांच्या पायीं पृथ्वी पुनीत ॥ गंगा चरणतीर्थ वांछित ॥ शिरीं वंदीत मी त्यासी ॥ ६४ ॥ त्याचे सेवेचा सेवक ॥ मोलेंवीण मी झालों देख ॥ ब्राह्मणसेवेचें मज सुख ॥ अलोलिक अनिवार ॥ ६५ ॥ नित्यनेम द्विजपूजा ॥ करी तो आवडे अधोक्षजा ॥ यालागीं पसरूनि चारी भुजा ॥ आलिंगनीं माझा जीव जिवे ॥ ६६ ॥ ब्राह्मणांच्या स्नानप्रवाहतळीं ॥ जेणें भावार्थें केली आंघोळी ॥ कोटि अवभृथें पायांतळीं ॥ तेणें तत्काळीं घातलीं ॥ ६७ ॥ ब्राह्मणचरणतीर्थ देखतां ॥ पळ सुटे दोषदुरिता ॥ तें भावार्थें तीर्थ घेतां ॥ दोष सर्वथा निमाले ॥ ६८ ॥ जो कोणी नित्य नेमस्त ॥ सेवी ब्राह्मणाचें चरणतीर्थ ॥ तो स्वयें झाला तीर्थभूत ॥ त्याचेनि पुनीत जड जीव ॥ ६९ ॥ त्या ब्राह्मणाचे ठायीं जाण ॥ अभ्यंगादि सुमन चंदन ॥ आसन भोजन धन धान्य ॥ शक्तिप्रमाण पूजेसी ॥ १३७० ॥ ब्राह्मणासि प्रिय भोजन ॥ दानीं श्रेष्ठ अन्नदान ॥ निपजवूनियां मिष्टान्न ॥ द्यावें भोजन मद्भावें ॥ ७१ ॥ एक हेळसूनि देती अन्न ॥ एक उबगल्यासाठीं जाण ॥ एक देती निर्भर्त्सून ॥ एक वसवसोन घालिती ॥ ७२ ॥ तैसें न करावें आपण ॥ ब्राह्मण माझें स्वरूप जाण ॥ त्यांसि नेऊनियां सन्मान ॥ द्यावें भोजन यथाशक्ति ॥ ७३ ॥ अज्ञान अतीत आल्यासमयीं ॥ खोडी काढूं नये त्याच्याठायीं ॥ तोही माझें स्वरूप पाही ॥ अन्न तेसमयीं अर्पावें ॥ ७४ ॥ अतीत जातां पराङ्मुख ॥ त्यासवें जाय पुण्य निः

---

१ भृगूची लाथ. २ शंकर. ३ दुसऱ्या देवाची. ४ उपासना करित नाहीं. ५ संकटें. ६ पवित्र. ७ यज्ञाच्या शेवटचें स्नान. ८ सुवासिक तैल लावून ऊनपाण्यानें स्नान करणें इत्यादि. ९ सर्वदानांमध्यें.

शेख ॥ अन्न द्यावें समर्यीं अवश्यक ॥ नातरी उदक तरी द्यावें ॥ ७५ ॥ ब्राह्मण बैसवूनि पंक्तीं ॥ जे कोणी पंक्तिभेद करिती ॥ ते मोलें पाप विकत घेती ॥ त्यांसि अधोगती निश्चितीं ॥ ७६ ॥ ब्राह्मणसेवेलागीं जाण ॥ कायावाचा मन धन ॥ यथासामर्थ्यें अर्चन ॥ अतिथिपूजन त्या नांव ॥ ७७ ॥ त्रिपदाजपे पवित्र पूर्ण ॥ यालागीं वेदांचें निवासस्थान ॥ ब्राह्मण माझें स्वरूप जाण ॥ श्रेष्ठ अधिष्ठानपूजेचें ॥ ७८ ॥ ब्राह्मणपूजेलागीं जाण ॥ अतिसादर ज्याचें मन ॥ देणें देववणें दान ॥ श्रद्धा संपूर्ण या नांव ॥७९॥ ब्राह्मणसेवा धनेंवीण ॥ सर्वथा न घडे ऐसे न ह्मण ॥ सेवेसि श्रद्धा प्रमाण ॥ उल्हास पूर्ण भजनाचा ॥ १३८० ॥ एकाची शरीरें सेवा जाण ॥ एकाचें वाचिक पूजन ॥ एकाचें मानसिक भजन ॥ दया पूर्ण द्विजांची ॥ ८१ ॥ ब्राह्मण भक्तिलागीं जाण ॥ हर्षें निर्भर अंतःकरण ॥ श्रद्धायुक्त उल्हास पूर्ण ॥ आतिथ्य जाण या नांव ॥ ८२ ॥ यापरी ब्राह्मणभजन ॥ तिसरें पूजेचें अधिष्ठान ॥ हें सांगीतलें जाण ॥ गोशुश्रूषण[1] तें ऐक ॥ ८३ ॥ जो गायीच्या कैवारा ॥ घायें सहस्रबाहो[2] केला पुरा ॥ तीनसप्तकें[3] वसुंधरा ॥ मुख्य धुरा म्यां मारिल्या ॥ ८४ ॥ रामावतारीं अतिमहिमान ॥ तैं न घडेचि गोशुश्रूषण ॥ यालागीं गोकुळीं जाण ॥ गायीचें सेवनें[4] म्यां केलें ॥ ८५ ॥ गायीचे सेवें झालो पुष्टी ॥ बाळपणीं मारिले जेठी[5] ॥ कंस चाणूर मारिले हटीं ॥ बैसविला राज्यपटीं[6] उग्रसेन ॥ ८६ ॥ गायीचे सेवेची अतिगोडी ॥ तेणें माझी कीर्ति झाली चोखडी ॥ फोडिली कंसाची बांदोडी ॥ तोडिली बेडी पितरांची ॥ ८७ ॥ यालागीं गायी आणि ब्राह्मण ॥ माझा जाण जीवप्राण ॥ माझे पूजेचें अधिष्ठान ॥ सुलभ जाण इयें दोन्हीं ॥ ८८ ॥ आपत्काळीं[7] गोरक्षण ॥ करी तो पढियंता मज जाण ॥ त्यासवें मी आपण ॥ गोरक्षण करी तसे ॥ ८९ ॥ गायीचे सेवेचें विधान ॥ गोग्रास द्यावा जे तृण ॥ करावें अंगकुरवाळण ॥ इतुकेनि प्रसन्न मी होये ॥ १३९० ॥ निर्लोभ गायीची सेवा ॥ करितां माझी प्राप्ति उद्धवा ॥ ऐक वैष्णवाची सेवा ॥ पूजा सद्भावा विभागू ॥ ९१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ वैष्णवे बंधुसत्कृत्या हृदि खे ध्याननिष्ठया ॥ वायौ मुख्यधिया तोये द्रव्यैस्तोयपुरस्कृतैः ॥ ४४ ॥ ॥ टीका ॥ ॥ वैष्णवसेवा अत्यंतकठिण ॥ तेथें जातीचें नाहीं गा प्रमाण ॥ न ह्मणावा शूद्र ब्राह्मण ॥ भक्तिप्राधान्य भावार्थें ॥ ९२ ॥ विदुर दासीपुत्र प्रसिद्ध ॥ त्यासि आवडला गोविंद ॥ झाला वैष्णवांमाजी अतिशुद्ध ॥ कैसेनि निंद्य ह्मणावा ॥ ९३ ॥ योनिजन्मला मर्कट ॥ तो वैष्णवांमाजी अतिश्रेष्ठ ॥ हनुमंत ह्मणावा कनिष्ठ ॥ ऐसा पापिष्ठ कोण आहे ॥ ९४ ॥ राक्षसांमाजी बिभीषण ॥ दैत्यांमाजी प्रल्हाद जाण ॥ भगवंतासी अनन्यशरण ॥ वैष्णवपण तेणें त्यासी ॥ ९५ ॥ जाती उत्तम भक्तिहीन ॥ तो वैष्णव नव्हे जाण ॥ अथवा करी दांभिक भजन ॥ वैष्णवपण त्या नाहीं ॥ ९६ ॥

---

[1] गायीची सेवा. [2] कार्तवीर्यार्जुन. [3] एकवीसवेळां. [4] सेवा. [5] मल्ल. [6] राजासनावर. [7] संकटकाळीं.

वैष्णवीं मानी जातिप्रमाण ॥ शालग्राम मानी पाषाण ॥ गुरूसि मानी माणुसपण ॥ तो पापिष्ठ जाण सर्वथा ॥ ९७ ॥ जाणीव[1] शा
हणीव ज्ञातेपण ॥ सांडूनि जातीचा अभिमान ॥ जो मज होय अनन्यशरण ॥ वैष्णव जाण तो माझा ॥ ९८ ॥ त्या वैष्णवाचें पूज
न ॥ बाह्यउपचारें नव्हे जाण ॥ बंधुस्नेहें कळवळी मन ॥ साचार पूजन त्या नांव ॥ ९९ ॥ ऐक सख्याबंधूचा स्नेहो ॥ बंधूसि रणीं
लागतां घावो ॥ घायाआड स्वयें रिघोनि पहाहो ॥ शत्रुसमुदावो विभांडी ॥ १४०० ॥ तैसा पोटांआंत कळवळा ॥ तोचि वैष्णवपू
जेचा सोहळा ॥ स्नेहेंवीण टिळे माळा ॥ सुख गोपाळा तेणें नव्हे ॥ १ ॥ एका पितयाचे पुत्र साधू ॥ अकृत्रिम होती बंधू ॥ माजी सा
पत्नविरोधू ॥ स्नेह शुद्धू तो नव्हे ॥ २ ॥ भक्ता अभक्तांची उत्पत्ती ॥ मजपासूनि गा निश्चितीं ॥ भावाभावे सापत्नप्राप्ती ॥ विरुद्ध स्थि
ती परस्परें ॥ ३ ॥ वैष्णव विष्णुउदरीं जाण ॥ ते उदरीं उदरस्थ व्हावें आपण ॥ तैं सहजें झालें सखेपण ॥ अकृत्रिम जाण कळवळा
॥ ४ ॥ ऐसा बंधुस्नेहें जो कळवळा ॥ तेचि पूजा वैष्णवकुळा ॥ वैष्णवपूजकाजवळा ॥ भावें भुलला मी तिष्ठें ॥ ५ ॥ वैष्णवपूजेचें ल
क्षण ॥ तें पांचवें माझें अधिष्ठान ॥ ऐक आकाशाचें पूजन ॥ केवळ माझें ध्यान तेठायीं ॥ ६ ॥ आकाश निर्लेप निर्विकार ॥ अति
सूक्ष्म निराकार ॥ तैसें माझें ध्यान निरंतर ॥ हृदयीं साचार करावें ॥ ७ ॥ ध्यानीं बैसोनि सावकाश ॥ सगळें सर्व महदाकाश ॥ जो
आपुलें करी हृदयाकाश ॥ तेणें मी परेश पूजिलें ॥ ८ ॥ अतिसूक्ष्म निर्विकार ॥ हृदयीं भासे ध्यान सधर ॥ तेचि पूजा साचार ॥ अ
परंपार मी पूजिलों ॥ ९ ॥ आकाशा लेप लावूं जातां ॥ लावितां न लागे सर्वथा ॥ तेवीं सर्वकर्मीं वर्ततां[2] ॥ आपुली मुक्तता जो देखे
॥ १४१० ॥ आकाश सर्वपदार्थीं व्याप्त ॥ व्याप्त असोनि अलिप्त ॥ तेवीं सर्वकर्मीं मी वर्तत ॥ कर्मातीत नभीं[3] निष्ठा ॥ ११ ॥ आकाश माझें
पूजास्थान ॥ तेथील पूजेचें जें विधान ॥ हें सहावें पूजाअधिष्ठान ॥ वायूचें अर्चन तें ऐक ॥ १२ ॥ वायूच्या ठायीं भगवद्बुद्धी ॥ ज्याची
चळंनेणे[4] कधीं ॥ वायूचेनि भूतां चलनसिद्धी ॥ जगातें त्रिशुद्धी धरिता तो मी ॥ १३ ॥ वायुरूपें मीचि जाण ॥ झालों सर्वभूतांचा प्रा
ण ॥ प्राणाचा मी मुख्यप्राण ॥ मद्रूपें पवन याहेतू ॥ १४ ॥ वायू व्योमीं[5] जन्म पावे ॥ जन्मोनि व्योमावेगळा नव्हे ॥ सर्वकर्मीं तेथें
चि संभवे ॥ अंतीं स्थिरावे निजव्योमीं ॥ १५ ॥ तेवीं जन्मकर्मनिदान ॥ पावोनि नेसांडी[6] अधिष्ठान ॥ प्राणाचा जो होय प्राण ॥ हें
निजपूजन वायूचें ॥ १६ ॥ प्राणाचें गमनागमन ॥ तेथ सोहंहंसाचें नित्य ध्यान ॥ तेंचि करितां नित्य सावधान ॥ हेंजि पूजन वायूचें
॥ १७ ॥ मद्रूपें दृढभावन[7] ॥ वायूचें जो करी आपण ॥ तें पवनाचें पूजन ॥ पूजास्थान सातवें ॥ १८ ॥ जीवा जीववी[8] जीवन ॥ त्या

---

१ जाणतेपणा. २ राहत असतां. ३ आकाशाचे ठिकाणीं. ४ नष्ट होत नाहीं. ५ आकाशांत. ६ सोडित नाहीं. ७ चांगलें चिंतन. ८ वांचवितें.

जीवना मी निजजीवन ॥ जीवनें पूजिजे जीवन ॥ जेवीं समुद्रपूजन तरंगीं ॥ १९ ॥ नद्यस्तर्प्यंतु समुद्रास्तर्प्यंतू ॥ हें जळेंचि जळ पूजिजेतू
॥ पूज्यपूजकां एकत्व येथू ॥ हेंचि वेदोक्त विधिपूजा ॥ १४२० ॥ जीवनें जीवनाची पूजा ॥ जीवनेंचि निपजे वोजा ॥ ते पूजा
पावे अधोक्षजा ॥ तो भक्त माझा पढियंता ॥ २१ ॥ आपो नारायण साक्षात ॥ या मंत्राचा जो मंत्रार्थ ॥ देवें देवोचि पूजिजेत ॥
जाण निश्चित उद्धवा ॥ २२ ॥ क्षीरें पूजिला क्षीरसागरू ॥ तेवीं द्रव्यें द्रव्योपचारू ॥ हा जीवनपूजाप्रकारू ॥ जाण निर्धारू उद्धवा
॥ २३ ॥ जीवनें पूजिजे जीवन ॥ ~~हें आठवें पूजास्थान~~ ॥ ऐक पृथ्वीचें पूजन ॥ श्लोकार्थीं संपूर्ण सांगेन ॥ २४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥
स्थंडिले मंत्रहृदयैर्भोगैरात्मानमात्मनि ॥ क्षेत्रज्ञं सर्वभूतेषु समत्वेन यजेत माम् ॥ ४५ ॥ ॥ टीका ॥ ॥ जळामाजी धरा अधर ॥ विरोनि
होंपाहे नीरें ॥ तीमाजी मी प्रवेशलों धराधर ॥ अधर ते सधर तेणें झाली ॥ २५ ॥ यालागीं पृथ्वी माझें पूजास्थान ॥ ऐक पूजेचें
विधान ॥ गोसदृश स्थंडिलीं जाण ॥ आवाहन पैं माझें ॥ २६ ॥ गोसदृश स्थंडिलीं कां म्हणसी ॥ पृथ्वी आहे गायीच्या ऐशी ॥ जैं
पूजा करावीपडे तिसी ॥ तैं तदाकारेंसि स्थंडिल ॥ २७ ॥ ते स्थंडिलीं पूजावया धरा ॥ आवाहन करावें धराधरा ॥ तल्लिंग हृदयमंत्रा ॥
मंत्रद्वारा जपावी ॥ २८ ॥ हृदय कवच शिखा नेत्र ॥ शक्तिबीज मंत्रास्त्र ॥ स्थंडिलीं रेखूनियां यंत्र ॥ धराधर महापूजा ॥ २९ ॥ यापरी
पृथ्वीपूजन ॥ सांग सांगीतलें जाण ॥ आपुलें आपण पूजास्थान ॥ दहावें लक्षण तें ऐक ॥ १४३० ॥ आधीं एक पुढें पूर्ण ॥ त्यानांव
दहावें लक्षण ॥ आपलें आपण पूजास्थान ॥ विचित्र विंदान पूजेचें ॥ ३१ ॥ पूज्यापुढें पूज्यकोटी ॥ केल्या गणितासी पडे तुटी
॥ पहिल्या पूज्यासी जैं फांटा उठी ॥ तैं गणितसृष्टी असंख्य ॥ ३२ ॥ पूर्णासि फांटा काढिजे ॥ त्या नांव एक म्हणिजे ॥ एकपणेंही पूर्ण
असिजे ॥ सहज निजे परिपूर्ण ॥ ३३ ॥ पूर्णापुढें पूर्ण पडे ॥ तैं गणित काय आतुडे ॥ जैं निचाडा चाड वाढे ॥ तैं निजनिवाडें पाविजे
॥ ३४ ॥ एकासि एक मेळविजे ॥ तैं दोनीपणें होय दुजें ॥ जैं एकें एक भागिजे ॥ तैं देखिजे निजपूज्य ॥ ३५ ॥ आपणचि आपला
देवो ॥ आपुला पूजक आपण पहाहो ॥ आपुला आपणासि भावो ॥ नवलनवलावो पूजेचा ॥ ३६ ॥ हृदयीं भावूनि चैतन्यघन ॥
स्वयें तद्रूप होऊनि जाण ॥ मग जे भोग भोगी आपण ॥ ब्रह्मार्पण सहजेंची ॥ ३७ ॥ तो ग्रास घाली स्वमुखीं ॥ तेणें मुखें मी होय
सुखी ॥ तृप्ति उपजे परमपुरुखीं ॥ पूजा नेटकी हे माझी ॥ ३८ ॥ तो जेजे कांहीं भोग भोगी ॥ ते अर्पती मजचिलागीं ॥ मी रंगलों
त्याचे रंगीं ॥ पावे श्रीरंगीं ते पूजा ॥ ३९ ॥ मुख्यपूजेमाजी हे पूजा ॥ तेणें पूजिलें मज वोजा ॥ पूजामिसें गरुडध्वजा ॥ अधोक्षजा

---

१ वेदांत सांगितलेली. २ पाणी. ३ पृथ्वी. ४ आधारावांचून. ५ उदक. ६ ज्यास गरज नाहीं त्यास. ७ परमेश्वरास. ८ सांग. ९ रममाण झालों.

तेणें केलें ॥ १४४० ॥ हे आवडती माझी पूजा ॥ अत्यंत प्रिय अधोक्षजा ॥ हे भक्ति पढियंती अधोक्षजा ॥ जाणतो माझा प्रियभक्त ॥ ४१ ॥ होकां सगुण अथवा निर्गुण ॥ दोहीं रूपें मीचि जाण ॥ तेथ जो करी निजभोग अर्पण ॥ शुद्धपूजन तें माझें ॥ ४२ ॥ निजात्मभोगीं अधोक्षजा ॥ पूजिजे ते हे जाण पूजा ॥ सर्वभूतांते जाणिजे वोजा ॥ समसाम्य समजा समभावें ॥ ४३ ॥ अकरावे पूजेचा विवेकें[1] ॥ मागां पुढां एकएक ॥ अकरा इंद्रियां पडे आंख ॥ तोचि पूजक सर्वभूतां ॥ ४४ ॥ मागां पुढां एकएक कीजे ॥ त्या नांव एकादश ह्मणिजे ॥ हाचि विवेक जेणें जाणिजे ॥ तेणें पूजिजे सर्वभूतां ॥ ४५ ॥ आत्मभोग मदर्पण पाही ॥ वस्तू जाणितली स्वदेहीं ॥ तोचि सर्वभूतांच्या ठायीं ॥ देहविदेही समसाम्यें ॥ ४६ ॥ सर्वक्षेत्रांतें वागविता ॥ मी क्षेत्रज्ञ जाण तत्त्वतां ॥ देखतांही विषमभूतां ॥ ज्याची समता मोडेना ॥ ४७ ॥ उं[3]चनीच विषम न्यूनता ॥ वस्तूसि न देखे विषमता ॥ समसाम्यें देखे समस्तां ॥ सर्वभूतां समत्वें ॥ ४८ ॥ माझिया साम्यें सर्वसमता ॥ ते पूजा सर्वभूतां ॥ तोचि पूजक तत्त्वतां ॥ ज्यासि विषमता बाधीना ॥ ४९ ॥ जो भावार्थें मजमाजी आला ॥ तैं सर्वभूतें तोचि झाला ॥ समत्वें सहज पावला ॥ पूज्यपूजा आत्मत्वें ॥ १४५० ॥ पूजूं जाणे रंक रावो ॥ परि पालटेना समभावो ॥ न सांडितां समतेचा ठावो ॥ यथायोग्य पहाहो पूजित ॥ ५१ ॥ ऐक यदुवंश[4]ध्वजा ॥ सर्वभूतीं माझी पूजा ॥ माझेनि समत्वें निपजे वोजा ॥ या अकराही पूजा समत्वें ॥ ५२ ॥ इ[5]यें अकराही अधिष्ठानें ॥ मत्प्राप्ति[6]कर अतिपावनें ॥ म्यां सांगीतलीं अनुसंधानें ॥ पूजा करणें यथाविधी ॥ ५३ ॥ म्यां सांगीतल्या ज्या निगुतीं ॥ पूजा करावी त्याचि स्थितीं ॥ सर्वाधिष्ठानीं माझी मूर्ती ॥ सुचित्तचित्तीं चिंतावी ॥ ५४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ धिष्ण्येष्वेष्विति मद्रूपं शंखचक्रगदांबुजैः ॥ युक्तं चतुर्भुजं शांतं ध्यायन्नर्चेत्समाहितः ॥ ४६ ॥ ॥ टीका ॥ ॥ निर्गुणाहूनि सगुण न्यून ॥ ह्मणे तो केवळ मूर्ख जाण ॥ सगुण निर्गुण दोनी समान ॥ न्यून पूर्ण असेना ॥ ५५ ॥ विघुरलें तें तूप होये ॥ थिजलें त्यापरीस गोड आहे ॥ निर्गुणापरिस सगुणीं पाहें ॥ अतिलवलाहें स्वानंदू ॥ ५६ ॥ निर्गुणाचा बोध कठिण ॥ मनबुद्धिवाचे अगम्य जाण ॥ शास्त्रांसि न कळे खूण ॥ वेदीं मौन धरियेलें ॥ ५७ ॥ वारा उ[9]माणावा वावें ॥ आकाश आकळावें खेंवें[10] ॥ भावना भांबावली धांवे ॥ काय धरावें स्फुरेना ॥ ५८ ॥ तैशी सगुणमूर्ती नव्हे जाण ॥ सुलभ आणि सुलक्षण ॥ देखतां जाय भूक तहान ॥ निवताहे मन सप्रेमें ॥ ५९ ॥ जो नित्य शुद्ध सच्चिदानंद ॥ प्रकृतिपर परमानंद ॥ सगुण साजिरा गोविंद ॥ स्वानंदकंद स्वलीला ॥ १४६० ॥ साखरेची गोडी वाखाणिली ॥ तिची नौं[11]बद निगुती केली ॥ गोडिये अधिक शोभली ॥

---

१ विचार. २ शरीरांस. ३ लहानमोठा. ४ उद्धवा. ५ हीं. ६ माझी प्राप्ती करून देणारीं. ७ विचारानें. ८ कमी. ९ मोजावा. १० कवळींत. ११ खडीसाखर.

तैशी मूर्ति झाली साकार ॥ ६१ ॥ लाऊनियां कसवटी ॥ उत्तम सुवर्णाची खोटी ॥ बांधल्या नववधूच्या कंठीं ॥ तेणें ते गोमटी दिसे काय ॥ ६२ ॥ त्याचीच करूनियां भूषणें ॥ अंगीं प्रत्यंगीं बाणतां लेणें ॥ नववधू अत्यंत शोभली तेणें ॥ निंबलोणें उतरिती ॥ ६३ ॥ तैसें जें निर्गुण निर्विकार ॥ त्याची सगुणमूर्ती साकार ॥ चिन्मात्रैक[1] अतिसुंदर ॥ मनोहर स्वलीला ॥ ६४ ॥ घवघवित घनसांवळा ॥ मुकुट कुंडलें मेखळा ॥ कंठीं कौस्तुभ वनमाळा ॥ सोनसळा झळकत ॥ ६५ ॥ आधींच तो अतिसांवळा ॥ वरी टिळक रेखिला पिंवळा ॥ आरक्त प्रांत दोहींडोळां ॥ कमळदळां लाजवी ॥ ६६ ॥ चिन्मात्रींचें देखणेपण ॥ त्या डोळ्यां आलें शरण ॥ सैराट हिंडतां शिणला पवन ॥ हरीचें घ्राण ठाकिलें ॥ ६७ ॥ जैशा ओंकारामाजी श्रुती ॥ तैशा मुखामाजी दंतपंक्ती ॥ चौकीचे चारी झळकती ॥ सच्चिद्दीप्तीं सोलींव ॥ ६८ ॥ जेवीं जीव शिव भिन्नपणीं ॥ तेवीं अध ऊर्ध्व अधर दोन्ही ॥ हरिअंगीं मिळणी ॥ समानपणीं समत्वें ॥ ६९ ॥ देखोनियां कृष्णवदन ॥ चंद्रमा कृष्णपक्षीं क्षीण ॥ तो तंव पूर्णिमेसि पूर्ण ॥ हा सदा संपूर्ण वदनेंदू ॥ १४७० ॥ दिवसां चंद्राची क्षीण प्रभा ॥ वदनेंदूची[2] नवल शोभा ॥ लोपोनि चंद्रसूर्यप्रभा ॥ स्वयें स्वयंभा प्रकाशे ॥ ७१ ॥ तो आर्तचकोरा[3] अमृतपान ॥ मुमुक्षुचातका[4] स्वानंदघन ॥ सगुणपणें नारायण ॥ भूषणां भूषण तो झाला ॥ ७२ ॥ चहूं खाणीच्या क्रिया विविधा ॥ तैशा चहूं भुजींच्या चारी आयुधां ॥ सगुण देखोनि गोविंदा ॥ वेद निजबोधा आयुधें झाले ॥ ७३ ॥ देवो नकळे श्रुतीसी ॥ लाज आली होती वेदासी ॥ निज मिरवावया प्रतापासी ॥ आयुधें हरीपासी ते झाले ॥ ७४ ॥ सामवेद झाला शंख ॥ यजुर्वेद चक्र देख ॥ अथर्वण गदा तिख ॥ कमळ साजुंक[5] ऋग्वेदू ॥ ७५ ॥ साकारपणें सच्चिदानंदा ॥ शंख चक्र पद्म गदा ॥ चहूं करीं चहूं वेदां ॥ निववी सदा निजांगें ॥ ७६ ॥ जगीं मिरवावया उपनिषदें ॥ झालीं बाहुभूषणें अंगदें ॥ करीं कंकणें अतिशुद्धें ॥ सोहंशब्दें रुणझुणती ॥ ७७ ॥ नख केश अंगुलिका ॥ कराग्रीं जडितमुद्रिका ॥ त्रिकोण षट्कोणी या देखा ॥ उपासकां विधिपीठ ॥ ७८ ॥ अगम्य तेज हृदयींच्या पदका ॥ गुण त्रिवेणी उदरीं देखा ॥ मध्यें कळसू नेटका ॥ क्षुद्रघंटिका[6] मेखळे ॥ ७९ ॥ कांतीव मर्गजस्तंभ जाण ॥ तैसे शोभताती दोन्ही चरण ॥ ते केवळ अचेतन ॥ हे सचेतन हरिअंगीं ॥ १४८० ॥ ध्वज वज्र अंकुश ऊर्ध्वरेखा ॥ दोन्ही पायीं पद्में देखा ॥ यवांकित सामुद्रिका ॥ अतिनेटका पदबंधू ॥ ८१ ॥ आरक्त रंग चरणतळां ॥ वरील घनसांवळी कळा ॥ नभीं इंद्रधनुष्यमेळा ॥ तैसी लीळा हरिचरणीं ॥ ८२ ॥ सगुण देखोनियां जगन्नायका ॥ दशदिशांसीं चरणीं आवांका ॥ पावावया निजसुखा ॥ दशांगुलिका होऊनि ठेल्या ॥ ८३ ॥

---

[1] केवळ ज्ञानमात्र. [2] मुखरूप चंद्र. [3] दुःखित हेच चकोरपक्षी यांस. [4] संसारांतून मुक्त होण्यास इच्छिणारे हेच चातक त्यांस. [5] ताजें. [6] बारिक घुंगुरू.

चंद्र कृष्णपक्षीं क्षीण ॥ तेणें ठाकिले हरिचरण ॥ नखीं चंद्र जडोनियां जाण ॥ परम पावन तो झाला ॥ ८४ ॥ हें जाणोनि
त्रिनयनें ॥ चंद्रमा मस्तकीं धरणें ॥ पायवणी माथां वाहणें ॥ जगउद्धारणें तेणें झालें ॥ ८५ ॥ सगुण देवो देखोनि पाही ॥ चारी मुक्ती
लागल्या पायीं ॥ यालागीं संतचरणाच्याठायीं ॥ तत्पर पाही सर्वदा ॥ ८६ ॥ सलोकता समीपता ॥ दोहीं पायीं वांकी गर्जतां ॥ अंदू
झाली स्वरूपता ॥ सायुज्यता तोडरू ॥ ८७ ॥ ज्या तोडराचा धाक पाही ॥ अहंगर्वित असुर वाहती देहीं ॥ सर्वसुख तें हरीच्याठायीं ॥
त्याच्या पायीं समाधी ॥ ८८ ॥ धैर्य वीर्य उदार कीर्ती ॥ गुणगांभीर्य शौर्य ख्याती ॥ यांसि कारण माझी सगुण मूर्ती ॥ जाण निश्चितीं
उद्धवा ॥ ८९ ॥ माझे ये मूर्तीचेनि दर्शनें ॥ होत डोळ्यां पारणें ॥ उठी जन्ममरणांचें धरणें ॥ खत फाडणें विषयांचें ॥ १४९० ॥ माझी
मूर्ती देखिल्या पाठीं ॥ नलगे योगयाग आटाआटी ॥ नलगे रिघावें गिरिकपाटीं ॥ नानासंकटीं नपडावें ॥ ९१ ॥ नलगे आसन ध्यान
॥ नलगे समाधिसाधन ॥ माझिये प्राप्तीसि कारण ॥ माझी भक्ति जाण उद्धवा ॥ ९२ ॥ एकादश पूजाअधिष्ठान ॥ तेथें माझें करोनि
आह्वान ॥ म्यां सांगीतलें मूर्तीचें ध्यान ॥ सावधान करावें ॥ ९३ ॥ माझें अर्चन माझें ध्यान ॥ माझें करावें कीर्तन ॥ माझ्या नामाचें
नामस्मरण ॥ माझे गुण वर्णावे ॥ ९४ ॥ अहर्निशीं माझी कथा ॥ अहर्निशीं माझी वार्ता ॥ अहर्निशीं मातें ध्याता ॥ भक्तितत्त्वतां
ती नांव ॥ ९५ ॥ दीपकळिका हातीं चढे ॥ तैं घराभीतरी प्रकाशू सांपडे ॥ माझी मूर्ती जैं ध्यानीं जडे ॥ तैं चैतन्य आतुडे अवघेंची
॥ ९६ ॥ या उपपत्ति उद्धवा देख ॥ सगुण निर्गुण दोन्हीं एक ॥ जाण पां निश्चयो निष्टंक ॥ सच्चिदानंदसुख समत्वें ॥ ९७ ॥ जो
कसू सुवर्णाचिये खोटीं ॥ तोचि वाला एका कसवटीं ॥ सगुणनिर्गुणपरिपाटीं ॥ नाहीं तुटी चित्सुखा ॥ ९८ ॥ तेवीं सगुण निर्गुण
निःशेष ॥ जाण निश्चियें दोन्ही एक ॥ सगळे साखरेचे टेक ॥ ना नव टांक सम गोडी ॥ ९९ ॥ हें अंतरंग माझें ध्यान ॥ तेथें मन करोनि
सावधान ॥ अतिहर्षें मदर्पण ॥ मद्भक्तीं जाण करावें ॥ १५०० ॥ उद्धवा ऐसें ह्मणसी मनीं ॥ हे भक्ति पाविजे कैसेंनी ॥ हें साध्य
होय जिहीं साधनीं ॥ तें तुजला गोठी सांगेन ॥ १ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ इष्टापूर्तेन मामेवं यो यजेत समाहितः ॥ लभते मयि सद्भक्तिं
मत्स्मृतिः साधुसेवया ॥ ४७ ॥ ॥ टीका ॥ ॥ करितां नाना योगयाग ॥ वापी कूप वनतडाग ॥ श्रौत स्मार्त कर्म चांग ॥ मदर्पण सांग
जिहीं केलें ॥ २ ॥ श्रौत अग्निहोत्र सोमयाग ॥ स्मार्त वापी कूप तडाग ॥ मज नार्पितां दोन्ही व्यंगें ॥ सत्कर्म सांग मदर्पणें ॥ ३ ॥
कर्म करितां मदर्पण ॥ अवचट फळ वांछी मन ॥ इतुकियासाठीं भक्तासि विघ्न ॥ सर्वथा जाण येवों नेदीं ॥ ४ ॥ सकामकर्मकर्त्या

---

१ शंकरानें. २ पादोदक. ३ दैत्य. ४ सार्थक. ५ नाहींसें होतें. ६ खटपट. ७ नामाचा उच्चार. ८ मता. ९ मुल्य. १० न्यून.

सी ॥ जे प्राप्ति नव्हे अतिप्रयासीं ॥ त्या उत्तमलोकगतिभोगांसी ॥ मद्भक्तांसी मी देता ॥ ५ ॥ पोटांतूनि माझा भक्तू ॥ दिव्य भोगांसि होय विरक्तू ॥ ते भोग भोगितां मातें स्मरतू ॥ भोगासक्तू तो नव्हे ॥ ६ ॥ साधु देवालया जातां ॥ पर्जन्यें पीडिलें धारावर्ती[1] ॥ तो वेश्यागृहासि नेणतां ॥ आला अवचितां वोसरिया ॥ ७ ॥ तो वसोनि वेश्येसी नांतळे ॥ तेवीं भक्त दिव्यभोगांसि कंटाळे ॥ ठकलों ह्मणे अनुतापबळें ॥ पिटूनि कपाळें हरि स्मरे ॥ ८ ॥ ऐशिया अनुतापस्थितीं ॥ तत्काळ भोग क्षया जाती ॥ तो जन्म पावे महामती[3] ॥ माझी भक्ती जिये गृहीं ॥ ९ ॥ त्यासि पूर्वसंस्कारस्थितीं ॥ सकळविषयांची विरक्ती ॥ उपजतचि लागे भक्तिपंथीं ॥ भक्त आवडती जीवें प्राणें ॥ १५१० ॥ तो मुक्तींतें हाणोनि लाते ॥ निजसर्वस्वें भजे मातें ॥ यापरी मी निजभक्तातें ॥ नेदीं विघ्नातें आतळूं ॥ ११ ॥ यापरी ज्यास विषयविरक्ती ॥ तेही इष्टापूर्त जैं करिती ॥ योगयाग जैं साधिती ॥ माझी भक्ती तैं उपजे ॥ १२ ॥ समाहित[4] करोनि मन ॥ श्रौतस्मार्तकर्मानुष्ठान ॥ योगयाग त्याग साधन ॥ निष्ठेनें जाण ते करिती ॥ १३ ॥ तेणें शुद्ध होय चित्तवृत्ती ॥ झाली चित्स्वरूपाची प्राप्ती ॥ तैं उपजे माझी सद्भक्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ १४ ॥ इतुकी नकरितां आटाटी ॥ माझे भक्तीची होय भेटी ॥ हें अति गुह्य आहे माझे पोटीं ॥ ते तुज मी गोठी सांगेन ॥ १५ ॥ सांडोनि सकळ साधन ॥ जो करी साधुभजन ॥ तेव्हांचि त्याचें शुद्ध मन ॥ सत्य जाण उद्धवा ॥ १६ ॥ ह्मणसी साधु तो कैसा कोण ॥ मांगां[5] सांगीतलें लक्षण ॥ बहु बोलावया नाहीं कारण ॥ साधु तो जाण सद्गुरू ॥ १७ ॥ त्या सद्गुरूचें भजन ॥ जो भावार्थें करी आपण ॥ सर्वशुद्धीचें कारण ॥ सद्गुरु जाण सर्वांशीं ॥ १८ ॥ त्याचे मुखीं वचन ॥ ब्रह्मसाक्षात्कारा पाववी जाण ॥ त्याचे सेवितां श्रीचरण ॥ शुद्धि कोण कोण होईना ॥ १९ ॥ गुरुनाम घेतां मुखें ॥ कळिकाळ पाहूं नशके ॥ त्याची सेवा करितां हरिखें ॥ पायां मोक्षसुखें लागती ॥ १५२० ॥ ज्यासि सद्गुरूची आवडी चित्तीं ॥ ज्यासि सद्गुरुभजनीं प्रीती ॥ त्यासि भाळली[6] माझी भक्ती ॥ पाठी लागे निश्चितीं वरावया ॥ २१ ॥ जो गुरुभजनीं भावार्थी ॥ जगामाजी तोचि स्वार्थी ॥ त्यापाशीं माझी सद्भक्ती ॥ असे तिष्ठती पायांतळीं ॥ २२ ॥ सद्भक्ति बापुडी कायसी ॥ अंगें मीही अहर्निशीं ॥ तिष्ठतसें स्वानंदेंसी ॥ गुरुप्रेमासी भूललों ॥ २३ ॥ मज माझ्या भक्तांची थोडी गोडी ॥ परी गुरुभक्तांची अतिआवडी ॥ सत्संगेंवीण रोकडी[7] ॥ सद्भक्ति चोखडी उपजेना ॥ २४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रायेण भक्तियोगेन सत्संगेन विनोद्धव ॥ नोपायो विद्यते सध्र्यङ् प्रायणं हि सतामहम् ॥४८॥ ॥ टीका ॥ ॥ माझिये प्राप्तीलागुनी ॥ भक्तिज्ञानमार्ग दोन्ही ॥ ज्ञान अत्यंत कठिणपणीं ॥ भक्ति निर्विघ्नीं पाववी मज ॥२५॥

---

१ चोंहींकडून धारांनीं. २ संबंध करित नाहीं. ३ महाज्ञानी. ४ सावध. ५ पूर्वी. ६ भुळली. ७ पूर्ण.

संसार तरावयालागीं ॥ अनेक साधनें अनेगीं[1] ॥ बोलिलीं ते जाण वाउगीं ॥ उत्तम प्रयोगीं मद्भक्ती ॥ २६ ॥ उपायांमाजी अतिप्रांजळ ॥ निर्विघ्न आणि नित्य निर्मळ ॥ माझा भक्तिमार्ग केवळ ॥ ज्ञान तें विकळ मध्यपाती ॥ २७ ॥ मळा शिंपावयालागुनी ॥ मोट पाट उपाय दोन्ही ॥ मोटां काढिजे विहीरवणी ॥ बहुत कष्टोनी अतिअल्प ॥ २८ ॥ मोट नाडा बैलजोडी ॥ अखंड झोडितां आसुडीं[2] ॥ येतां जातां वोढावोढी ॥ भोंय[3] भिजे थोडी भाग एक ॥ २९ ॥ तेथही मोट फुटे कां नाडा तुटे ॥ वोडव पडे बैल अवचटे ॥ तरी हातां येतां पीक आटे ॥ वोल तुटे तत्काळ ॥ १५३० ॥ तैसा नव्हे सरितेचा पाट ॥ एक वेळ केल्या वाट ॥ अहर्निशीं घडघडाट ॥ चालती लोट जीवनाचे[4] ॥ ३१ ॥ मोटेचें पाणी तैसें ज्ञान ॥ करूनि वेदशास्त्रपठण ॥ नित्यानित्य विवेकासी जाण ॥ पंडित विचक्षण बैसती ॥ ३२ ॥ एक कर्माकडे वोढी ॥ एक संन्यासाकडे बोडी ॥ एक ह्मणती हे गोष्टी कुडी ॥ देहो वोढावोढीं न घालावा ॥ ३३ ॥ एक ह्मणती प्रारब्ध प्रमाण ॥ एक ह्मणती सत्य शब्दज्ञान ॥ एक ह्मणती धरावें मौन ॥ अतिजल्प[5] जाण नकरावा ॥ ३४ ॥ एक ह्मणती सांड व्युत्पत्ती ॥ ज्याची चढे अधिक युक्ती ॥ तोचि ज्ञाता निश्चितीं ॥ सांगों किती मूर्खांसी ॥ ३५ ॥ एक ह्मणती तप प्रमाण ॥ एक ह्मणती पुरश्चरण ॥ एक ह्मणती वेदाध्ययन ॥ द्यावें दान एक ह्मणती ॥ ३६ ॥ एक तो अवघेंचि मोडी ॥ घाली योगाचिये कडाडीं ॥ लावी आसनमुद्रेची वोढी ॥ बैसवी रोकडी वारयावरी ॥ ३७ ॥ ऐसे नानावाद करितां ॥ एक निश्चयो नव्हे सर्वथा ॥ ज्ञानाभिमान अति पंडितां ॥ ज्ञान तत्त्वतां कळेना ॥ ३८ ॥ ऐसी ज्ञानमार्गींची गती ॥ नानापरीचीं विघ्नें येती ॥ विकल्पें नासल्या व्युत्पत्ती ॥ माझी निजप्राप्ती तेथें नाहीं ॥ ३९ ॥ तैसी नव्हे माझी भक्ती ॥ नाममात्रें मज पावती ॥ नामें उद्धरले[6] नेणों किती ॥ हेंचि भागवतीं बोलिलें ॥ १५४० ॥ माझें करितां गुणवर्णन ॥ कां हरिकथा नामसंकीर्तन ॥ तेथें रिघों नशके विघ्न ॥ गडगर्जन हरिनामें ॥ ४१ ॥ जेथें हरिनामाचे पवाडे ॥ तेथें विघ्न कैचें बापुडें ॥ विघ्न पळे सद्भक्तांपुढें ॥ उघडती कवाडें[7] मोक्षाची ॥ ४२ ॥ माझे भक्त अतिनिराश ॥ न धरिती मोक्षाची आस ॥ यालागीं मी हृषीकेश ॥ त्यांच्या भावार्थास भूललों ॥ ४३ ॥ एवं निर्विघ्न मजमाजी सरता ॥ मार्ग नाहीं भक्तिपरता ॥ हें सत्य सत्य गा सर्वथा ॥ भक्ति तत्त्वतां मज पढीये ॥ ४४ ॥ ऐशी निजभक्ति सुलभ फुडी ॥ देवो सांगे अतिआवडीं ॥ उद्धवासि हरिभक्तीची गोडी ॥ हर्षाची गुढी उभारिली तेणें ॥ ४५ ॥ जें उद्धवाच्या जीवीं होतें ॥ तेंचि निरूपिलें श्रीअनंतें ॥ हर्षें नाचों लागला तेथें ॥ जीवें श्रीकृष्णातें वोवाळी ॥ ४६ ॥ ऐशी तुझी सुलभ भक्ती ॥ तरी अवघेचि भक्ति कां न करिती ॥ देवो ह्मणे भाग्येंवी

---

१ अनेकांनीं. २ चाबुकानें. ३ जमीन. ४ पाण्याचे. ५ फार बडबड. ६ मोक्षास गेले. ७ दारें.

ण प्राप्ती ॥ नघडे निश्चितीं उद्धवा ॥ ४७ ॥ कोटिजन्मांची पुण्यसंपत्ती ॥ जरी गांठीं असेल आइती ॥ तैं जोडे माझ्या संतांची संगती ॥ सत्संगें भक्ती उल्हासे ॥ ४८ ॥ सत्संगें भक्तीची प्राप्ती ॥ उद्धवा जाण तूं निश्चितीं ॥ संतापाशीं माझी भक्ती ॥ वास पाहती उभी असे ॥ ४९ ॥ हो कां तूं संत माझे ह्मणसी ॥ येर लोक सांडिले कोणापाशीं ॥ तुझी भक्ति अहर्निशीं ॥ संतांपाशीं कां असे ॥ १५५० ॥ उद्धवा ऐसा विकल्पभावो ॥ येथें धरावया नाहीं ठावो ॥ संतभजनीं माझा सद्भावो ॥ केवा कोण पहाहो इतरांचा ॥ ५१ ॥ संतसेवा करावयासी ॥ कोण कारण तूं मज ह्मणसी ॥ अनावरा मज अनंतासी ॥ तिहीं निजभावेंसी आकळिलें ॥ ५२ ॥ मज आकळिलें ज्या हेतू ॥ तेही सांगेन तुज मातू[3] ॥ मजवांचूनि जगाआंतू ॥ दुसरा अर्थू नेणती ॥ ५३ ॥ आपुलें जें स्वकर्म ॥ मज अर्पिले सर्व धर्म ॥ देह गेहँ[4] रूप नाम ॥ आश्रमधर्म मदर्पण ॥ ५४ ॥ कल्पांतींचेंनि कडकडाटें ॥ जैं धाकें धाकें विराट आटे ॥ ऐसीं वोढवल्या अचाटें ॥ मजवेगळें नेटें नढळती ॥ ५५ ॥ तुटोनि पडतां आकाश ॥ आणिकाची न पाहती वास ॥ यालागीं मी हृषीकेश ॥ त्यांचा दास झालों असें ॥ ५६ ॥ नवल भावार्थाचा महिमा ॥ मज विश्वात्म्याचा झाला आत्मा ॥ ऐसें लाहाणें तया आह्मा ॥ मज पुरुषोत्तमा वश केलें ॥ ५७ ॥ संतांसि मज भिन्नपण ॥ कल्पांतींही नाहीं जाण ॥ हे जिव्हारींची उणखुण ॥ तुज संपूर्ण सांगीतली ॥ ५८ ॥ संत माझे झाले माझ्या भक्तीं ॥ येर लोक मज न भजती ॥ ते म्यां दीधलें काळाच्या हातीं ॥ अदृष्टगतीं बांधोनी ॥ ५९ ॥ माझिया संतापाशीं ॥ यावया प्राप्ती नाहीं काळासी ॥ मी सदा संरक्षिता त्यांसी ॥ ते कळिकाळासी नागवती ॥ १५६० ॥ यापरी संतांचें सर्वकाज ॥ करितां मज नाहीं लाज ॥ उद्धवा माझें अत्यंत निजगुज ॥ तें मी तुज सांगेन ॥ ६१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अथैतत्परमं गुह्यं श्रृण्वतो यदुनंदन ॥ सुगोप्यमपि वक्ष्यामि त्वं मे भृत्यः सुहृत्सखा ॥ ४० ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐक यदुवंशकुळटिळका ॥ तूं स्वगोत्रसुहृद भृत्य सखा ॥ तुज न सांगिजे हा आवांका ॥ सर्वथा देखा नधरवे ॥ ६२ ॥ मज गुप्ताचें गुप्त सार ॥ साराचें गुप्त भांडार ॥ तें भांडारींचें निजसार ॥ तुज मी साचार सांगेन ॥ ६३ ॥ ऐकें गुह्याचें गुह्य निश्चितीं ॥ नाहीं सांगीतलें कोणाप्रती ॥ तूं सखा जिवलग सांगाती ॥ अनन्यप्रीतीं मजलागीं ॥ ६४ ॥ केवळ कोरडी नव्हे प्रीती ॥ तैसीच माझी अनन्यभक्ती ॥ भक्तीसारिखी विरक्ती ॥ अवंचक[9]स्थिती तुजपाशीं ॥ ६५ ॥ यादववंशीं पाहतां देख ॥ मजसमान तूंचि एक ॥ समान सगोत्र आणि सेवक ॥ हें अलोलिक उद्धवा ॥ ६६ ॥ नव्हेसि कार्यार्थी सेवक ॥ सर्वभावें विश्वासुक ॥ किती वांणूं गुण एकएक ॥ परम हरिख मज झाला ॥ ६७ ॥ यालागीं गुह्य तेंही तुझ्याठायीं ॥ वंचावया[11] म

---

१ पदरीं. २ स्वाधीन न येणारा. ३ गोष्ट. ४ घर. ५ गरज. ६ दैवनिमित्तानें. ७ रहस्य. ८ बरोबर राहणारा. ९ निष्कपट. १० वर्णन करूं. ११ तुला न सांगतां मनांत ठेवण्यास.

ज धीरु[1] नाहीं ॥ हृदय आलिंगिलें हृदयीं ॥ चिदानंद पाही तुष्टला ॥ ६८ ॥ मग ह्मणे सावधान ॥ सादर आइक माझें वचन ॥ तुज फावल्या माझें गुह्यज्ञान ॥ वंशउद्धरण तुझेनी ॥ ६९ ॥ जे वंशीं होय ब्रह्मज्ञानी ॥ तो वंश पवित्र त्याचेनीं ॥ हे सत्य माझी वाणी ॥ विकल्प मनीं न धरावा ॥ १५७० ॥ ह्मणसी स्वयें तूं ब्रह्म पूर्ण ॥ वंशीं अवतार श्रीकृष्ण ॥ तेणें वंशउद्धरण ॥ माझें ज्ञान तें किती ॥ ७१ ॥ तरी नाम रूप जाति गोत ॥ या अवघ्यांसी मी अलिप्त ॥ सकळकुळेंसि मी कुळवंत ॥ गोत समस्त जग माझें ॥ ७२ ॥ ऐसें जाणोनि निजगुह्यसार ॥ तुज मी सांगेन साचार ॥ होईल जगाचा उद्धार ॥ ऐसें सारंगधर बोलिला ॥ ७३ ॥ तें ऐकावया गुह्यज्ञान ॥ उद्धवें मनाचे उघडिले कान ॥ सावध पाहतां हरीचें वदन ॥ नयनीं नयन विगुंतलें[2] ॥ ७४ ॥ यापरी उद्धव सावधान ॥ त्यासि कृष्ण सांगेल गुह्य ज्ञान ॥ पुढिले अध्यायीं अतिगहन[3] ॥ रसाळ निरूपण हरीचें ॥ ७५ ॥ एका विनवी जनार्दन ॥ श्रोतीं व्हावें सावधान ॥ संतीं द्यावें अवधान ॥ मस्तकीं चरण वंदिले ॥ ७६ ॥ तुमचेनि पादप्रसादें ॥ श्रीभागवतींचीं श्लोकपदें ॥ वाखाणीन अर्थावबोधें[4] ॥ संत स्वानंदें तुष्टलिया ॥ ७७ ॥ यालागीं एका शरण जनार्दनीं ॥ तंव जनार्दनचि एकपणीं ॥ जेवीं कां सागरीचें[5] पाणी ॥ तरंगपणीं विराजे ॥ १५७८ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे एकाकारटीकायां श्रीकृष्णोद्धवसंवादे एकादशपूजाविधानयोगो नाम एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

॥ अध्याय ॥ ११ ॥ ॥ संख्या ॥ ॥ श्लोक ॥ ४९ ॥ ॥ ओंव्या ॥ १५७८ ॥

॥ मिळून ॥ १६२७ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

१ धैर्य. २ लागलें. ३ कठिन. ४ अर्थज्ञानानें. ५ समुद्राचें.

# अध्याय १२ वा.



श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ओंनमो सद्गुरु वसंतू ॥ ऐक्य ऋतुकाळें तुझा ऋतू ॥ तया ऋतुकाळींचा मारुतू[1] ॥ ज्ञानवनांतू जैं रिघे ॥ १ ॥
तैं अविद्येचीं जुनीं पानें ॥ गळूनि जाती तत्क्षणें ॥ नवपल्लवीं विराजमानें ॥ विरक्तपणें आरक्त ॥ २ ॥ अत्यंत वैराग्याची हांव ॥ खां
कर झाले वृक्ष सर्व ॥ त्यांसि निघाले नव पल्लव ॥ अतिलवलव कोंवळिक ॥ ३ ॥ जाहल्या वसंताचें रिगवणें ॥ वृक्ष आडवे फुटले ते
णें ॥ सोहंभावाचीं सुमनें ॥ तेणें गुणें विकासलीं ॥ ४ ॥ कृष्णसारूप्यें कृष्णभ्रमर ॥ तेथें झेंपावले अतिसत्वर ॥ आमोद[3] सेविती अरु
वार ॥ कैसेनि केसर कुचंबे ॥ ५ ॥ सद्भावाच्या आमोदभारा ॥ सेवितां सुख झालें भ्रमरा ॥ हृदयकमळीं केला थारा ॥ मध्यमद्वारां
चालिले ॥ ६ ॥ भेदोनियां साही कमळें ॥ द्विदळादिषोडशदळें ॥ झेंपावले मायानिळें ॥ सहस्रदळीं मिसळले ॥ ७ ॥ तेथ सेवूनि पराग
धवळ ॥ उन्मत्त मातलें अळिकुळ[4] ॥ करिती आनंदाचा गोंधळ ॥ सुखकल्लोळ स्वानंदें ॥ ८ ॥ लागल्या अनुहत ध्वनी ॥ रुणझुणिती द
शलक्षणीं ॥ त्याही नादातें प्राशुनीं ॥ निःशब्दपणीं निवांत ॥ ९ ॥ तेथें मोक्षसुखाचे घड ॥ डोलतां दिसे अतिगोड ॥ तेणें जीवाचें पुर
त कोड ॥ करिती धुमाड सोहंशब्दें ॥ १० ॥ मुमुक्षुमयूर अतिप्रीतीं ॥ पिच्छें पसरूनि नाचती ॥ येऊन वसंतवनाप्रती ॥ टाहो फोडिती
गुरुनामें ॥ ११ ॥ नेमस्त कोकिळां होतें मौन ॥ वसंतऋतुराज देखोन ॥ तिहीं करोनि विसर्जन ॥ मधुरस्तवनें गर्जती ॥ १२ ॥ भक्तिस
रोवरीं निर्मळ पाणी ॥ विकासल्या नवविध कमळणी ॥ भक्त सुस्नात तियेस्थानीं ॥ निमज्जनीं निश्चळ ॥ १३ ॥ ते सरोवरींचें सेवितां
पाणी ॥ जीवशिव चक्रवाकें दोनी ॥ सद्गुरु चिद्भानु वसंतवनीं ॥ देखोनि मिळणी मिळालीं ॥ १४ ॥ वसंतें उल्हास तरुवरां[6] ॥ उतोनि
लागल्या स्वानंदधारा ॥ पारंब्या भेदूनियां धरा ॥ धराधारा विगुंतल्या ॥ १५ ॥ बोध[7]मलयानिळ झळकत ॥ तेणें वनश्री मघमघित ॥
मोक्षमार्गींचे पांथिक तेथ ॥ निर्जी निजत निजरूपें ॥ १६ ॥ ऐसा सद्गुरु वसंतरावो ॥ निजभक्तवनां दे उत्सावो ॥ तो भागवतभजन
अध्यावो ॥ उद्धवासी देवो सांगत ॥ १७ ॥ बारावे अध्यायीं निरूपण ॥ सत्संगाचा महिमा गहन ॥ कर्माचा कर्त्ता तेथ कोण ॥ त्या
गि तें लक्षण कर्माचें ॥ १८ ॥ संपतां अकरावा अध्यावो ॥ गुह्य सांगेन ह्मणे देवो ॥ तें परिसावया उद्धवो ॥ न्याहाळी पाहवो हरि
वदन ॥ १९ ॥ काय सांगेल गुह्य गोष्टी ॥ कोण अक्षरें निघती ओंठीं ॥ त्या वचनार्था घालावया मिठी ॥ उल्हास पोटीं उद्धवा ॥ २० ॥
जैसें मेघमुखींचें उदक ॥ वरच्यावरी झेली चातक ॥ तैसें कृष्णवचनालागीं देख ॥ पसरी मुख उद्धवू ॥ २१ ॥ स्नान संध्या भोजन ॥
करावया एके काळें जाण ॥ तैसें ज्ञेय ज्ञाता ज्ञान ॥ घ्यावया सावधान उद्धव ॥ २२ ॥ ऐसा उद्धवाचा आदरू ॥ देखोनि हरि झाला

---

१ वायु. २ आरंभ. ३ सुवास. ४ भुंग्यांचे समुदाय. ५ पवित्र. ६ उत्तम झाडांस. ७ ज्ञान. ८ आनंद.

सादरू ॥ भक्तकृपाळू अतिउदारू ॥ निजगुह्यसारू सांगत ॥ २३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ न रोधयति मां योगो न सांख्यं धर्म
एव च ॥ न स्वाध्यायस्तपस्त्यागो नेष्टापूर्तं न दक्षिणा ॥१॥ व्रतानि यज्ञच्छंदांसि तीर्थानि नियमा यमाः ॥ यथाऽवरुंधे सत्संगः सर्वसंगा
पहो हि माम् ॥ २ ॥ टीका ॥ मज वश करावयालागीं ॥ सामर्थ्य नाहीं अष्टांगयोगीं ॥ नित्यानित्यविवेक जगीं ॥ गांवोगांवीं मज नंप[1]
वे ॥ २४ ॥ प्रकृतिपुरुषविवंचना ॥ अखंड आलोडितां मनां ॥ पावावया माझिया स्थानां ॥ सामर्थ्य जाणा त्या नाहीं ॥ २५ ॥ धर्म
अहिंसादि समस्त ॥ सत्यातें मी नव्हे प्राप्त ॥ मुख्य वेदाध्ययनेंही मी अप्राप्त ॥ सांग समस्त[2] जरी पढिले ॥ २६ ॥ तेथ तपें कायसीं बा
पुडीं ॥ पंचाग्नि असार परवडी ॥ कृच्छ्रचांद्रायणें झालीं वेडीं ॥ त्यांचे जोडी मी न जोडें ॥ २७ ॥ देहगेह सांडूनि उदास ॥ विरजा[3] हो
मीं हवी सर्वस्व ॥ साधनीं अतिश्रेष्ठ संन्यास ॥ त्यासि मी परेश नातुडें ॥ २८ ॥ करितां श्रौतस्मार्त्तकर्मासी ॥ कर्मठें झालीं पानपिसीं ॥
तरी मी नाकळें त्यांसी ॥ क्लेशहोमेंसी कष्टतां ॥ २९ ॥ गोदान भूदान तिलदान ॥ दान देतां धन धान्य ॥ त्यासि मी नाटोपें जाण ॥
दानाभिमान नवचतां ॥ ३० ॥ संकटचतुर्थी ऋषिपंचमी ॥ विष्णुपंचक बुधाष्टमी ॥ अनेक व्रतें करितां नेमीं ॥ मी ते कर्मी नातुडें
॥ ३१ ॥ अश्वमेध राजसूययाग ॥ सर्वस्व वेंचूनि करितां चांग ॥ माझी प्राप्ति नव्हेचि सांग ॥ तेणें मी श्रीरंग नातुडें ॥ ३२ ॥ हो कां वा
पी कूप आराम[4] ॥ वृक्षारोपणें[5] मनविश्राम ॥ आचरतां स्मार्तकर्म ॥ मी आत्माराम न भेटें ॥ ३३ ॥ नानाछंद रहस्यमंत्र ॥ विधिविधा
नें अतिविचित्र ॥ सामर्थ्यें अतिविशेष पवित्र ॥ नव्हती स्वतंत्र मत्प्राप्तीं ॥ ३४ ॥ पुष्करादि नानातीर्थें ॥ पापनिर्दळणीं अतिसमर्थें ॥
शीघ्र पावावया मातें ॥ सामर्थ्य त्यांतें असेना ॥ ३५ ॥ यमनियम अहर्निशीं ॥ जे सदा शिणती साधनेंसी ॥ ते यावया माझ्या द्वारा
सी ॥ सामर्थ्य त्यांसी असेना ॥ ३६ ॥ उद्धवा यमनियम निर्धार ॥ एकुणिसावे अध्यायीं सविस्तर ॥ तुज मी सांगेन साचार ॥ सं
क्षेपाकार बारावा ॥ ३७ ॥ ते यमनियम बाराबारा ॥ आणि सकळ साधन संभारा ॥ यावया माझिया नगरा[6] ॥ मार्ग पुढारां चाले
ना ॥ ३८ ॥ ते गेलिया संताच्या दारा ॥ धरूनि साधूच्या आवारा ॥ अवघीं आलीं माझ्या घरा ॥ एवं परंपरा मत्प्राप्ती ॥ ३९ ॥ तै
शी नव्हे सत्संगती ॥ संगें सकळ संगातें छेदिती ॥ ठाकठोक माझी प्राप्ती ॥ पंगिस्त नव्हती आणिका ॥ ४० ॥ किडी भिंगुरटीच्या सं
गतीं ॥ पालटे स्वदेहस्थिती ॥ तेवीं धरिलिया संतांची संगती ॥ भक्त पालटती मद्रूपता ॥ ४१ ॥ केवळ पाहे पां जडमूढें ॥ चंदनास
भोंवतीं झाडें ॥ ते सुगंध होऊनि लांकडें ॥ मोल गाढें पावलीं ॥ ४२ ॥ तें अचेतन झाड सर्वथा ॥ चढलें देवब्राह्मणांचे माथां ॥ त्या

---

[1] प्राप्त होत नाहीं. [2] सर्व. [3] संन्यास घेतांना एक होम त्यांत. [4] बाग. [5] झाडें लावणें. [6] पुरास.

चा पांग पडे श्रीमंता ॥ राजे तत्त्वतां वंदिती ॥ ४३ ॥ तैशी धरिल्या सत्संगती ॥ भक्त माझी पदवी पावती ॥ शेखीं मजही पूज्य होती ॥ सांगों किती महिमान ॥ ४४ ॥ संतसंगती वेगळें जाण ॥ तत्काळ पावावया माझें स्थान ॥ आणिक नाहींच साधन ॥ सत्य जाण उद्धवा ॥४५॥ मागां बोलिलीं जीं साधनें ॥ तीं अवघींही मलिन अभिमानें ॥ ऐक तयांचीं लक्षणें ॥ तुजकारणें सांगेन॥४६ ॥ अष्टांगयोगीं दुर्जयो[1] पवन[2] ॥ सर्वथा साधेना जाण॥साधला तरी नागवण[3] ॥ अनिवार जाण सिद्धीची ॥४७॥ नित्यानित्यविवेक ज्ञान ॥ तेथें बाधी पंडिता अभिमान ॥ [illegible] वांछी धन मान ॥ ज्ञानचि विघ्न ज्ञात्यांसी ॥ ४८ ॥ अहिंसाधर्म करितां जनीं ॥ धर्मिष्ठपणीं गाळिती पाणी ॥ गाळितां निमाल्या जीव[4]श्रेणी ॥ अधर्मपणीं तो धर्म ॥ ४९ ॥ करितां वेदाध्ययन ॥ मुख्य वेदें धरिलें मौन ॥ पठणमात्रें मी नातुडें जाण ॥ याजन दान वांछितांही ॥ ५० ॥ तप करूं जातां देहीं॥ क्रोध तापसांच्या ठायीं ॥ परता जावों नेदी कांहीं ॥ वाढला पाही नीच नवा ॥ ५१ ॥ सर्वस्वत्यागें संन्यासग्रहण ॥ तेथही न जळे देहाभिमान ॥ व्यर्थ विरजाहोम गेला जाण ॥ मानाभिमान बाधिती ॥ ५२ ॥ श्रौत स्मार्त कर्म सांग ॥ इष्टापूर्त[5] जे कां याग ॥ तेथ आडवा ठाके स्वर्गभोग ॥ कर्म क्षयरोग साधकां ॥ ५३ ॥ नानादानें देतां सकळ ॥ वासना वांछी दानफळ ॥ कां दातेपणें गर्व प्रबळ ॥ लागला अढळ ढळेना ॥ ५४ ॥ अनंतव्रत्तें व्रती झाला ॥ चौदा गांठीं देवो बांधला ॥ शेखीं अनंतातें विसरला ॥ देवो हरविला हातींचा ॥ ५५ ॥ नानायज्ञ करितां विधी ॥ मंत्र तंत्र पात्रशुद्धी ॥ सहसा पावों न शके सिद्धी ॥ पावल्या बाधी फळभोग ॥ ५६ ॥ नानाछंदें रहस्यमंत्र ॥ विकळ हों नये उच्चार ॥ मंत्रीं मंत्र रचिले साचार ॥ चळले अपार मंत्रवादी ॥ ५७ ॥ भगवीं करूनि तांबडीं ॥ तीर्थाभिमानें कापडी ॥ भिके लागलीं बापुडीं ॥ नाहीं अर्धघडी विश्रांती ॥ ५८ ॥ यमनियम बाराबारा ॥ करितां अखंड बोरबारा ॥ चोविसांमाजी यांचा उभारा ॥ नेणती सोयरा पंचविसांवा ॥ ५९ ॥ एवं[6] सांगीतल्या साधनासी ॥ आपमती[7] करितां त्यांसी॥ बाधकता आहे सर्वांसी ॥ ते म्यां तुजपासी सांगीतली ॥ ६० ॥ करितां साधनें आपमतीसी ॥ तेथें विघ्नें उपजती ऐशीं ॥ तींच साधनें साधु उपदेशीं ॥ सर्वही सिद्धीसी पावती ॥ ६१ ॥ साधु न सांगतां निर्धारीं ॥ नानासाधनें हा काय करी ॥ कोण विधान कैशी परी ॥ निजनिर्धारीं कळेना ॥ ६२॥ न करितां साधनव्युत्पत्ती ॥ केवळ जाण सत्संगती ॥ मज पावले नेणों किती ॥ तें मी तुजप्रती सांगेन॥ ६३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सत्संगेन हि दैतेया यातुधाना मृगाः खगाः ॥ गंधर्वाप्सरसो नागाः सिद्धाश्चारणगुह्यकाः ॥ ३ ॥ विद्याधरा मनुष्येषु वैश्याः शूद्राः स्त्रियोऽत्यजाः ॥ रजस्तमःप्रकृत

---

१ जिंकण्यास कठिण. २ वायु. ३ नुकसान. ४ जीवांचे समुदाय. ५ कूप, तळीं, विहिरी इत्यादिक बांधणें. ६ याप्रमाणें. ७ तिरस्कार.

यस्तस्मिंस्तस्मिन्युगेऽनघ ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ पाहतां केवळ जडमूढ ॥ रजंतमयोंनीं जन्मले गूढ ॥ सत्संगतींलागोनि दृढ ॥ मातें सदृढ पावले ॥ ६४ ॥ दैत्य दानव निशाचर ॥ खग मृग गंधर्व अप्सर ॥ सिद्ध चारण विद्याधर ॥ नाग विखार गुह्यक ॥ ६५ ॥ खग मृग सर्प पावले मातें ॥ मानव तंव सहजें सरतें ॥ वैश्य शूद्र स्त्रियादि समस्तें ॥ पावलें मातें सत्संगें ॥ ६६ ॥ जे सकळ वर्णधर्मांविगळे ॥ ज्यांच्या नामास कोणी नातळे ॥ छाया देखूनि जग पळे ॥ अत्यंत मैळे अंत्यज ॥ ६७ ॥ तिहीं धरोनि सत्संगती ॥ आले माझिया पदाप्रती ॥ देवद्विज तयांतें वंदिती ॥ अभिनव कीर्ती संतांची ॥ ६८ ॥ धरिलिया सत्संगती ॥ निंद्य तेही वंद्य होती ॥ उद्धवा तूं निष्पाप निश्चितीं ॥ तरी सत्संगती करावी ॥ ६९ ॥ सोनें साडेपंधरें चोखडें ॥ त्यासि रत्नाची संगती जोडे ॥ तैं अधिकाधिक मोल चढे ॥ मुकुटीं चढे महींद्रा ॥ ७० ॥ तैशी पुण्यें पुरुषा सत्संगती ॥ जाहल्या अनंत सुख पावती ॥ सुरवर त्यातें वंदिती ॥ शिवादि येती भेटीसी ॥ ७१ ॥ यमधर्म पायां लागती ॥ तीर्थें पायवणी मागती ॥ भावें धरिल्या सत्संगती ॥ एवढी प्राप्ती पुरुषासी ॥ ७२ ॥ दैत्य राक्षस स्त्री शूद्र पाहीं ॥ अंत्यज तरले ह्मणसी कायी ॥ त्यात्या युगाच्या ते ते ठायीं ॥ बहुसाल पाहीं उद्धरिले ॥ ७३ ॥ ॥ श्लोक ॥ बहवो मत्पदं प्राप्तास्त्वाष्ट्रकायाधवादयः ॥ वृषपर्वा बलिर्बाणो मयश्चाऽथ विभीषणः ॥ ५ ॥ सुग्रीवो हनुमानृक्षो गजो गृध्रो वणिक्पथः ॥ व्याधः कुब्जा व्रजे गोप्यो यज्ञपत्न्यस्तथाऽपरे ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ वृत्रासुर गाइजे वेदीं ॥ जो इंद्रासि मिसळला युद्धीं ॥ युद्धींही अविरुद्ध बुद्धीं ॥ माझे निजपदीं पावला ॥ ७४ ॥ ऐकतां नारदाच्या गोठी ॥ गर्भींच मजसी घातली मिठी ॥ जो जन्मला कयाधूच्या पोटीं ॥ भक्त जगजेठी प्रल्हाद ॥ ७५ ॥ वृषपर्वा दैत्य उद्भट ॥ माझे पदीं झाला प्रविष्ट ॥ बळीच्या द्वारीं मी खुजटू ॥ झालों बटू भिकेसी ॥ ७६ ॥ छळें करितां बळिबंधन ॥ छळितां मी छळिलों जाण ॥ अंगा आलें द्वारपाळपण ॥ बळिअधीन मी झालों ॥ ७७ ॥ त्या बळीचा पुत्र बाणासुर ॥ शिववरदें मातला थोर ॥ माझे पुत्राचा चोरिला पुत्र ॥ दोहींचा हेर नारदू ॥ ७८ ॥ तो म्यां साधूनि धरिला चोरू ॥ बाणीं केला अतिजर्जरू ॥ छेदिला सहस्रभुजांचा भारू ॥ शिव जीवें मारूं नेदीच ॥ ७९ ॥ तो ह्मणे भक्तपुत्र स्वयें मारी ॥ मजही बळीची भीड भारी ॥ अखंड मी असें त्याच्या द्वारीं ॥ यालागीं उद्धरीं बाणातें ॥ ८० ॥ मग संबोखावया शिवातें ॥ बाण आपुले निजहस्तें ॥ ऐक्यें शिवपदीं स्थापिलें त्यातें ॥ कल्याणातें पावला ॥ ८१ ॥ खांडववन अग्नीसी ॥ अर्जुनें दीधलें खावयासी ॥ तेथें जळतां मयासुरासी ॥ म्यांचि तयासी उद्धरिलें ॥ ८२ ॥ राक्षसकुळीं जन्मला जाण ॥ शत्रूचा बंधु विभीष

---

१ रजोगुणी व तामस. २ पक्षी. ३ पशु. ४ सर्प. ५ इंद्रादिदेव. ६ चंडाळ, नीच जातीचे. ७ अनेक प्रकारचे. ८ शिवाच्या वरानें. ९ हाक मारण्याकरितां. १० बाहेर काढलें.

ण ॥ माझ्याठायीं अनन्यशरण ॥ जीवप्राण तो माझा ॥ ८३ ॥ सुग्रीव हनुमंत जांबवंतू ॥ यांचा पवाडा विख्यातू ॥ जाटायु उद्धरिला वनांतू ॥ जो रावणें खस्तूं[1] केला होता ॥ ८४ ॥ गज सरोवरीं ग्रहग्रस्त[2] ॥ स्त्रियां पुत्रीं सांडिला जीत ॥ अंतकाळीं मातें स्मरत ॥ आर्तभूत अतिस्वरें ॥ ८५ ॥ सांडूनि समस्तांची आस ॥ पाहोनि वैकुंठाची वास ॥ राजीव उचलूनि राजस ॥ पाव परेश ह्मणे वेगीं ॥ ८६ ॥ त्या गजेंद्राचे तांतडीं ॥ वैकुंठींहूनि लवडसवडी ॥ म्यां गरुडापुढें घालोनि उडी ॥ बंधन तोडीं गजाचें ॥ ८७ ॥ त्यासि पशुयोनीं जन्म होतें ॥ परी तो अंतीं स्मरला मातें ॥ पावला माझ्या निजधामातें ॥ गाइजे त्यातें पुराणीं ॥ ८८ ॥ वैश्य तुळाधार वाणी ॥ सत्य वाचा सत्य जोखणी ॥ सत्यें पावला मजलागुनी ॥ सत्यतोलणी त्याचें नाव ॥ ८९ ॥ अंत्यजामाजी धर्मव्याध ॥ माझें पावला निजपद[3] ॥ जराव्याध गा प्रसिद्ध ॥ करोनि अपराध उद्धरिला ॥ ९० ॥ चरणीं विंधोनियां बाण ॥ घांयें घेतला माझा प्राण ॥ तो जराव्याध जाण ॥ कृष्णें आपण तारिला ॥ ९१ ॥ कौलिकामाजी गुहक देख ॥ आला श्रीरामासंमुख ॥ कर्म निरसलें निःशेख ॥ निजधाम देख पावला ॥ ९२ ॥ कुब्जा तींठायीं वांकुडी ॥ नीट निजभावें चोखडी ॥ तिच्या चंदनाची शुद्ध गोडी ॥ अति आवडी मजलागीं ॥ ९३ ॥ तिणें चर्चूनियां चंदन ॥ मन केलें मदर्पण[4] ॥ मी झालों तिजआधीन ॥ निजधाम ते जाण पावली ॥ ९४ ॥ गोकुळींचिया गोपिका ॥ संसारासि होऊनि विमुखा ॥ तनमनप्राणें मजलागीं देखा ॥ भाळोनि निजसुखा पावल्या ॥ ९५ ॥ माझी गोपिकांसी परम आवडी ॥ कीं मजचि गोपिकांची गोडी ॥ पाहतां याचे समानपाडी ॥ जाहलीं बापुडीं साधनें ॥ ९६ ॥ सांडूनि संसाराची चाड ॥ न करूनि पतिपुत्रांची भीड ॥ यज्ञपत्न्यांसि माझें कोड ॥ भावार्थें दृढ भाविकां ॥ ९७ ॥ तिहीं मज अर्पोनियां अन्न ॥ माझें निजधाम पावल्या जाण ॥ मज न पावतीच[5] ते ब्राह्मण ॥ जयांसि कर्माभिमान कर्मांचा ॥ ९८ ॥ एक ब्राह्मण अति शास्त्रबळें ॥ पत्नीसि येवूं नेदी मजजवळें ॥ तुह्मी वेद शास्त्रांही वेगळे ॥ गोरक्ष गोंवळे केवीं पूजा ॥ ९९ ॥ येरी समस्तां जातां देखोन ॥ तिचें मजलागीं तळमळी मन ॥ अतिकर्मठ तो ब्राह्मण कठिण ॥ अवरोधून राखिली ॥ १०० ॥ पित्यानें लाविलीस माझ्या हातीं ॥ तेव्हांच मी तुझ्या देहाचा पती ॥ मज सांडूनि केउती[6] ॥ गोवळाप्रती जातेसी ॥ १ ॥ येरी ह्मणे तूं या देहाचा पती ॥ तो देह ठेऊनियां तयाप्रती ॥ जीवित्वें मी नलिया[7] मजप्रती ॥ सायुज्य मुक्ती पावली ॥ २ ॥ ज्या माझिया प्राप्तीसी ॥ साधक शिणती नानासायासीं ॥ तीं साधनें न करितां त्यासी ॥ अनायासीं मज पावल्या ॥ ॥ ३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ते नाधीतश्रुतिगणा नोपासितमहत्तमाः अव्रतातप्ततपसः सत्संगान्मामुपागताः ॥ ७ ॥ टीका ॥ ॥ तिहीं नाहीं केलें

---

[1] छिन्नभिन्न. [2] मगरानें गिळिलेला. [3] आपलें स्थान. [4] मला अर्पण. [5] प्राप्त होत नाहींत. [6] कशी. [7] प्राप्त झाल्यावर.

वेदपठण ॥ नाहीं गुरु केले केवळ शास्त्रज्ञ ॥ व्रततपादि नाना साधन ॥ नाहीं जाण तिहीं केलें ॥ ४ ॥ केवळ गा सत्संगतीं ॥ मज पावल्या
नेणों किती ॥ एकभावें जे भावार्थी ॥ त्यांसि मी श्रीपती सुलभ ॥ ५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ केवलेन हि भावेन गोप्यो गावो नगा मृगाः ॥
येऽन्ये मूढधियो नागाः सिद्धा मामीयुरंजसा ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ केवळस्वरूप जें संत ॥ त्यां माझी संगती झाली प्राप्त ॥ काय करिसी तप
व्रत ॥ भावार्थें प्राप्त मज जाहलिया ॥ ६ ॥ व्हावया माझें पद प्राप्त ॥ त्यांसि भांडवल गा भावार्थ ॥ भावबळें गा समस्त ॥ पद निश्चित पाव
ल्या ॥ ७ ॥ ऐकोनि माझें वेणुगीत ॥ गोपिका सांडूनि समस्त ॥ निज[1]देहातें न सांभाळित ॥ मज गिवसीत पावल्या ॥ ८ ॥ सांडूनि पति
पित्यांची चाड ॥ न धरोनि वेदशास्त्रांची भीड ॥ माझे ठायीं निजभाव दृढ ॥ प्रेम अतिगोड गोपिका ॥ ९ ॥ पुत्रस्नेह तोडूनि घांयें ॥ विधी
तें रगडूनि पायें ॥ माझे आवडीचेनि लवलाहें ॥ गोपिका मज पाहें पावल्या ॥ १० ॥ त्याचपरी जाण गायी ॥ वेणुध्वनीं वेधल्या पाही ॥
व्याघ्रभय[2] विसरल्या देहीं ॥ माझ्याठायीं विनटल्या ॥ ११ ॥ माझ्या वेणुध्वनीं वेधलें मन ॥ वत्सें विसरलीं स्तनपान ॥ मुखींचा कवळ
मुखीं जाण ॥ माझें ध्यान लागलें ॥ १२ ॥ माझ्या वेणुश्रवणास्तव जिहीं ॥ निजवैर सांडूनि देहीं ॥ येरयेरांवरी माना पाही ॥ व्याघ्रहरिणें
तेंही विसरलीं ॥ १३ ॥ म्यां उपडिले यमलार्जुन ॥ ते तरले हें नवल कोण ॥ वृंदावनींचे वृक्ष तृण ॥ माझ्या सांनिध्यें जाण उद्धरिले ॥ १४ ॥
मयूर तरले मोरपिसीं ॥ गुल्मलतातृणपाषाणांसी ॥ जडमूढ वृंदावनवासी ॥ मत्सांनिध्यें[3] त्यांसी उद्धारू ॥ १५ ॥ माझे संगतीं अनन्य प्रीती ॥
तेचि त्यांस शुद्धभक्ती ॥ तेणें कृतकृत्य होऊनि निश्चितीं ॥ माझी निजप्राप्ती पावले ॥ १६ ॥ माझेनि चरणघातें[4] साचार ॥ कालिय तरला दुरा
चार ॥ नागनागिणी सपरिवार ॥ माझेनि विखार[5] उद्धरले ॥ १७ ॥ आपुली जे निजपदप्राप्ती ॥ ते सत्संगेंवीण निश्चितीं ॥ दुर्लभ हें उद्ध
वाप्रती ॥ स्वयें श्रीपती सांगत ॥ १८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ येन योगेन सांख्येन दानव्रततपोऽध्वरैः ॥ व्याख्यास्वाध्यायसंन्यासैः प्राप्नुयाद्य
त्नवानपि ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ योग याग व्रत दान ॥ वेदाध्ययन व्याख्यान ॥ तप तीर्थ ज्ञान ध्यान ॥ संन्यासग्रहण सादरें ॥ १९ ॥
इत्यादि नाना साधनें ॥ निष्ठा करितां निर्बंधनें ॥ माझी प्राप्ति दुरासतेनें ॥ जीवें प्राणें नपविजे ॥ १२० ॥ यापरी शिणतां साधनेंसी ॥
माझी प्राप्ति नव्हे अतिप्रयासीं ॥ ते गोपी पावल्या अप्रयासीं ॥ सत्संगासी लाहोनी[6] ॥ २१ ॥ त्या गोपिकांसि माझी प्रीती ॥ मीचि त्यांची
सत्संगती ॥ सत्संगें निजपदप्राप्ती[7] ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ २२ ॥ गोपिकांची सप्रेम स्थिती ॥ ते तुज गोकुळीं झाली प्रतीती ॥ तुजही
नतर्केच[8] त्यांची प्राप्ती ॥ तें मी तुजप्रती सांगेन ॥ २३ ॥ गोपिकांचें अत्यंत प्रेम ॥ स्वमुखें सांगे पुरुषोत्तम ॥ उद्धवाचें भाग्य उत्तम ॥

---

१ आपल्या शरीरास. २ वाघाचें भय. ३ माझ्या सहवासानें. ४ पायांनीं तुडविल्यानें. ५ सर्प. ६ प्राप्त होऊन. ७ आपल्या स्थानाची प्राप्ती. ८ कळणार नाहीं.

आवडीचें वर्म देवो सांगे ॥ २४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ रामेण सार्द्धं मथुरां प्रणीते श्वाफल्किना मय्यनुरक्तचित्ताः ॥ विगाढभावेन न मे वियोगतीव्राधयोऽन्यं ददृशुः सुखाय ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ बळिभद्रासमवेत तत्त्वतां ॥ अक्रूरें मज मथुरें नेतां ॥ तैं गोपिकांसि जे झाली व्यथा ॥ ते सांगतां मज नये ॥ २५ ॥ ते त्यांची अवस्था सांगतां ॥ मज अद्यापि धीर नधरवे चित्तां ॥ ऐसें देवो सांगतसांगतां ॥ कंठीं बाष्पंता[1] दाटली ॥ २६ ॥ सांगतां भक्तांचें निजप्रेम ॥ प्रेमें द्रवला पुरुषोत्तम ॥ जो भक्तकाम[2]कल्पद्रुम ॥ कृपा निरुपम भक्तांची ॥ २७ ॥ मज मथुरें जातां देखोनी ॥ आंसुवांचा पूर नयनीं ॥ हृदय फुटे मजलागुनी ॥ प्रेमें लोळणी घातली ॥ २८ ॥ पोटांतील परम प्रीती ॥ सारितां[3] मागें न सरती ॥ धरिले चरण न सोडिती ॥ येती काकुलती मजलागीं ॥ २९ ॥ नवल भावार्थ त्यांच्या पोटीं ॥ माझ्या रूपीं घातली मिठी ॥ सोडवितां न सुटे गांठी ॥ श्वास पोटीं परतेना ॥ १३० ॥ लाज विरल्या सर्वथा ॥ सासुरां पतिपित्यां देखतां ॥ माझे चरणीं ठेवूनि माथा ॥ रडती दीर्घता आक्रंदें ॥ ३१ ॥ मजवीण अवघे देखती वोस ॥ माझीच पुनःपुन्हा पाहती वास ॥ थोर घालोनि श्वासोच्छ्वास ॥ उकसाबुकसीं स्फुंदत ॥ ३२ ॥ आमुचा जिवलग सांगाती ॥ घेऊनि जातो हा दुष्टमूर्ती ॥ अक्रूरासंमुख शिव्या देती ॥ येती काकुळती मजलागीं ॥ ३३ ॥ उभ्या ठाकोनि[4] संमुख ॥ माझें पाहती श्रीमुख[5] ॥ आठवे वियोगाचें दुःख ॥ तेणें अधोमुखें[6] विलपती[7] ॥ ३४ ॥ ऐशिया मजलागीं आसक्त ॥ माझ्याठायीं अनन्यचित्त ॥ विसरल्या देह समस्त ॥ अति अनुरक्त मजलागीं ॥ ३५ ॥ माझेनि वियोगें तत्त्वतां ॥ त्यांसि माझी तीव्र व्यथा ॥ ते व्यथेची अवस्था ॥ बोलीं सांगतां मज नये ॥ ३६ ॥ मजवेगळें जेंजें सुख ॥ तें गोपिकांसि केवळ दुःख ॥ कैशी आवडी अलोलिक ॥ मज हृदयीं देख न विसंबती ॥ ३७ ॥ मज गोकुळीं असतां ॥ माझे ठायीं आसक्तचित्ता ॥ ते आसक्ती समूळ कथा ॥ ऐक आतां सांगेन ॥ ३८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तास्ताः क्षपाः प्रेष्ठतमेन नीता मयैव वृंदावनगोचरेण ॥ क्षणार्द्धवत्ताः पुनरंग तासां हीना मया कल्पसमा बभूवुः ॥ ॥ टीका ॥ ॥ नवल गोपिकांचा हरिखें[8] ॥ मज वृंदावनां जातां देख ॥ माझें पाहोनि श्रीमुख ॥ प्रातःकाळीं सुख भोगिती ॥ ३९ ॥ गायी पाजोनियां पाणी ॥ गोठणीं बैसवीं मध्याह्नीं ॥ तेथें उदकमिषें गौळणी ॥ पहायालागूनी मज येती ॥ १४० ॥ तेथें नानाकौतुकें नानालीला ॥ नानापरीच्या खेळतां खेळां ॥ तो तो देखोनि सोहळा ॥ सुखें वेल्हाळा सुखावती ॥ ४१ ॥ मज सायंकाळीं येतां देखोनी ॥ आरत्या निंबलोण घेऊनी ॥ सामोऱ्या येती धांवोनी ॥ लागती चरणीं स्वानंदें ॥ ४२ ॥ माझी गोपिकांसि आवडी ॥ कीं गोपिकांची मज गोडी ॥ पाहतां याची समानपाडी ॥ झालीं बापुडीं साधनें ॥ ४३ ॥ सांडूनि

---

[1] कंठ दाटून आला. [2] भक्तांच्या इच्छा पूर्ण करण्यास कल्पवृक्षच. [3] दूर केल्या असता. [4] राहून. [5] तोंड. [6] खालीं तोंड घालून. [7] शोक करितात. [8] आनंद.

संसाराची चाड ॥ न धरोनि पतिपुत्रांची भीड ॥ माझे ठायीं निजभाव दृढ ॥ प्रेम गोड गोपिकां ॥ ४४ ॥ऐशीं त्रिकाळ दर्शनें घेतां ॥ धणी न पुरे त्यांचे चित्ता ॥ त्याहीवरी वर्तली कथा ॥ एकांतता अतिगुह्य ॥ ४५ ॥ त्या गुह्याचें निजगुंज ॥ उद्धवा मी सांगेन तुज ॥ महासुखाचें सुखभोज ॥ मी अधोक्षज नाचिंनलों ॥ ४६ ॥ तें सुख गोपिका जाणती ॥ कीं माझें मी जाणें श्रीपती ॥ जे रास क्रीडच्या रांतीं ॥ झालीं सुखप्राप्ती सकळिकांसी ॥ ४७ ॥ त्या सुखाची सुखगोडी ॥ [३]रमा काय जाणे बापुडी ॥ ब्रह्मादिकें केवळ वेडीं ॥ त्या सुखाची गोडी नेणती ॥ ४८ ॥ पावावया त्या सुखासी ॥ सदाशिव झाला योगाभ्यासी ॥ तरी प्राप्ति नव्हे तयासी ॥ भुलला मोहिनीसी देखतां ॥ ४९ ॥ उमा होऊनि [४]भिल्लटी ॥ तिणें भुलविला धूर्जटी ॥ त्या सुखाची हातवटी ॥ नेणती हटी तापसी ॥ १५० ॥ जवळी असोनि निश्चितीं ॥ संकर्षण महामूर्ती ॥ त्यासि त्या सुखाची प्राप्ती ॥ नव्हे निश्चितीं उद्धवा ॥ ५१ ॥ रासक्रीडा गोपिकांप्रती ॥ कोणी ह्मणेल कामासक्ती ॥ तेथ कामाची कैंची प्राप्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ५२ ॥ शिवातें जिणोनि फुडा ॥ काम ह्मणे मी सबळ गाढा ॥ माझी भेदावया रासक्रीडा ॥ वाऊनि मेढा चालिला ॥ ५३ ॥ तेथ माझ्या स्वरूपाचें वोडण ॥ तेथ नचले कामाचें कामपण ॥ मोडले मदनाचे बाण ॥ दृढ वोडण स्मरणाचें ॥ ५४ ॥ काम कामिकां चपळदृष्टी ॥ निजबोधाची तीक्ष्ण बाणाटी ॥ संधि साधूनि विंधे हटी ॥ ते नव्हेचि पैठी हरिरंगीं ॥ ५५ ॥ जेथ क्रीडे आत्मारामू ॥ तेथ केवीं रिघे बापुडा कामू ॥ माझे कामें गोपिका निष्कामू ॥ कामसंभ्रमू त्यां नाहीं ॥ ५६ ॥ जो कोणी स्मरे माझें नामू ॥ तिकडे पाहूं न शके कामू ॥ जेथ मी रमें पुरुषोत्तमू ॥ तेथ कामू कर्म स्मरेना ॥ ५७ ॥ कामू ह्मणे कटकटा ॥ अभाग्य भाग्यें झालों मोठा ॥ रासक्रीडेचिया शेवटील गोटा ॥ आज मी करंटा नपवेची ॥ ५८ ॥ देखोनि रासक्रीडा गोमटी ॥ काम घटघटां लाळ घोटीं ॥ लाज सांडूनि जन्मला पोटीं ॥ त्या सुखाचे भेटी लागोनि ॥ ५९ ॥ तो काम म्यां आपुलें अंकीं ॥ केला निजभावें निजसुखी ॥ तें माझें निजसुख गोपिकीं ॥ रासमिषें कीं भोगिलें ॥ १६० ॥ ते रासक्रीडेची राती ॥ म्यां ब्रह्मषण्मास केली होती ॥ गोपिका अर्धक्षण मानिती ॥ वेगीं कां गभस्ति उगवला ॥ ६१ ॥ जेथ माझी क्रीडासुखकल्लोळ ॥ तेथ कोण स्मरे काळवेळ ॥ गोपिकांचे भाग्ये प्रबळ ॥ माझें सुख केवळ पावल्या ॥ ६२ ॥ ऐशा माझिया संगतीं ॥ भोगिल्या राती नेणों किती ॥ तरी त्यांसि नव्हे तृप्ती ॥ चढती प्रीती मजलागीं ॥ ६३ ॥ गोपिका करूनि माझी भक्ती ॥ मी प्रसन्न केलों श्रीपती ॥ रास मागीतला एकांतीं ॥ माझी सुखप्राप्ती पावावया ॥ ६४ ॥ त्या जाण वेदगर्भींच्या श्रुती ॥ श्रुतिरूपें नव्हे मत्प्राप्ती ॥ तैं परतल्या ह्मणोनि नेतिनेति ॥ माझी सुख

---

१ आपलें गुप्त. २ रात्री. ३ लक्ष्मी. ४ भिल्लीण. ५ शंकर. ६ ढाल. ७ सुंदर. ८ ब्रह्मदेवाच्या सहामहिन्यांचो. ९ सूर्य.

संगती नपवेची ॥ ६५ ॥ विषयबुद्धी तें मुख्य अज्ञान ॥ तें असतां मी न भेटें जाण ॥ असतां वेदोक्त जाणपण[1] ॥ तेणेंही संपूर्ण न भेटें मीं
॥ ६६ ॥ जाणीव नेणीव गेलिया निःशेष ॥ माझें पाविजे निजात्मसुख ॥ श्रुति जाणोनि हें निष्टंक[2] ॥ गोकुळी त्या देख सुखार्थ आल्या
॥ ६७ ॥ त्याचि जाण समस्तु[3] श्रुती ॥ गोपिकारूपें गोकुळां येती ॥ रासक्रीडामिसें एकांतीं ॥ माझी सुखप्राप्ती पावल्या ॥ ६८ ॥ हा
ही असो अभिप्रावो ॥ उद्धवा ज्यांसि जैसा भावो ॥ त्यांलागीं मी तैसा देवो ॥ यदर्थीं[4] संदेहो असेना ॥ ६९ ॥ उद्धवा मी भक्तांसि दे
ख ॥ कोणे काळीं नव्हे विमुख ॥ जो जैसा भावी भाविक ॥ तैसा मी देख तयासी ॥ १७० ॥ मी जनांसि सदा संमुख ॥ जनचि मज
सी देख विमुख ॥ यासि कांहीं नचले देख ॥ दाटूनि[5] दुःख भोगिती ॥ ७१ ॥ मी सकाम सकामाच्या ठायीं ॥ निष्कामासि निष्काम पा
ही ॥ नास्तिका मी लोकीं तिहीं ॥ असतूचि नाहीं नास्तिक्यें ॥ ७२ ॥ असो हे किती उपपत्ती ॥ ऐक गोपिकांसी माझी प्रीती ॥ माझे सु
खें भोगिल्या राती ॥ त्या मानिती निमेषार्ध ॥ ७३ ॥ माझ्या वियोगें त्यांसि राती ॥ ज्या आलिया यथास्थिती ॥ त्या गोपिका कल्प
प्राय[6] मानिती ॥ सन्निध स्वपती[7] असतांही ॥ ७४ ॥ त्यांच्या दुःखाची अवस्था ॥ बोलें न बोलवे सर्वथा ॥ माझेनि वियोगें मातें स्मर
तां ॥ समाधिअवस्था पावल्या ॥ ७५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ता नाविदन्मय्यनुषंगबद्धधियः स्वमात्मानमदस्तथेदम् ॥ यथा समाधौ मुन
योऽब्धितोये नद्यः प्रविष्टा इव नामरूपे ॥ १२ ॥ टीका ॥ ॥ मज गोकुळीं असतां ॥ माझे ठायीं आसक्तचित्ता ॥ हे अवघी समूळ क
था ॥ तुज म्यां तत्त्वतां सांगीतली ॥ ७६ ॥ ऐशियांसि म्यां अतिनिचाडतां ॥ कृतघ्नाचेपरी सांडूनि जातां ॥ माझ्या वियोगकाळींची
व्यथा ॥ पाषाण पाहतां तटतटी ॥ ७७ ॥ यापरी मज वेगळ्या असतां ॥ मागें माझी कथा वार्ता ॥ सदा माझें स्मरण करितां ॥ म
दा[8]कारता पावल्या ॥ ७८ ॥ करितां दळण कांडण ॥ माझे दीर्घस्वरें गाती गुण ॥ कीं आदरिलेया[9] दधिमंथन ॥ माझें चरित्रगायन त्या
करिती ॥ ७९ ॥ करितां सडा संमार्जन ॥ गोपिकांसि माझें ध्यान ॥ माझेनि स्मरणें जाण ॥ वरिये देणें बाळकां ॥ १८० ॥ गायीचें दोहन क
रितां ॥ माझे स्मरणीं आसक्तता ॥ एवं सर्वकर्मीं वर्ततां ॥ माझ्या विसराची वार्ता[10] विसरल्या ॥ ८१ ॥ करितां गमनागमन ॥ अखंड
माझ्या ठायीं मन ॥ आसन भोजन प्राशन ॥ करितां मध्यान तयांसी ॥ ८२ ॥ एवं मज गेलियापाठीं ॥ ऐशी माझी आवडी मोठी ॥
अखंड माझ्याठायीं दृष्टी ॥ माझ्याचि गोष्टी सर्वदा ॥ ८३ ॥ ऐशा अनन्य ठायींच्या ठायीं ॥ गोपिकांसि माझी प्रीति पाही ॥ त्या वर्ततां[11]
ही देहींगेहीं[12] ॥ ॥ माझ्या ठायीं विनटल्या ॥ ८४ ॥ यापरी बुद्धि मदाकार ॥ ह्मणोनि विसरल्या घरदार ॥ विसरल्या पुत्र भ्रतार ॥ नि

---

१ शहाणपणा. २ संपूर्ण. ३ सर्व. ४ याविषयीं. ५ बुद्ध्या. ६ कल्पाप्रमाणें. ७ आपला स्वामी. ८ माझ्या स्वरूपास. ९ करित असतां. १० गोष्ट. ११ असतांही. १२ शरीरानें व घरांत.

जव्यापार विसरल्या ॥८५॥ विसरल्या विषयसुख ॥ विसरल्या द्वंद्व[1]दुःख ॥ विसरल्या तहान भूक ॥ माझेनि एक निदिध्यासें ॥८६॥
जेणें देहें पतिपुत्रांतें ॥ आप्त मानिलें होतें चित्तें ॥ तें चित्त रतलें मातें ॥ त्या देहातें विसरोनी ॥ ८७ ॥ विसरल्या इहलोक[2] परलोक ॥
विसरल्या कार्य कारण निःशेख ॥ विसरल्या नामरूप देख ॥ माझें ध्यानसुख भोगितां ॥ ८८ ॥ निरसोनि तत्त्वांचें विकार ॥ समा
धि पावे मुनीश्वर ॥ तो विसरे जेवीं संसार ॥ तेवीं मदाकार गोपिका ॥८९ ॥ जेवीं कां नाना सरिता ॥ आलिया सिंधूतें ठाकितां ॥ ते
थें पावोनि समरसता ॥ नामरूपता विसरल्या ॥ १९० ॥ तेवीं गोपिका अनन्यप्रीतीं ॥ माझी लाहोनियां[3] प्राप्ती ॥ नामरूपाची व्युत्प
त्ती॥ विसरल्या स्फूर्ती स्फुरेना ॥ ९१ ॥ सच्चिदानंदस्वरूपप्रभावो ॥ नेणता माझा निजस्वभावो ॥ गोपिकांचा अनन्यभावो ॥ परब्रह्म
पहाहो पावल्या ॥ ९२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मत्कामा रमणं जारमस्वरूपविदोऽबलाः ॥ ब्रह्म मां परमं प्रापुः संघाच्छतसहस्रशः ॥ १३ ॥
॥ ॥टीका॥ ॥ त्या केवळ अबळा निश्चितीं ॥ सत्संगाचो अतिप्रीती ॥ तेही संगती कामासक्ती ॥ शास्त्रप्रवृत्तीविरुद्ध ॥ ९३ ॥ मी भ्र
तारू नव्हे शास्त्रविधी ॥ रूपें मदनमोहन त्रिशुद्धी ॥ मज रतल्या ज्या अविरुद्धीं ॥ जारबुद्धीं अविचारें ॥९४॥ चौंप्रकारींच्या कामिनी ॥
हस्तिनी इत्यादि पद्मिनी ॥ चौघींसि चौं मुक्तिस्थानी ॥ काममोहिनी मिरवती ॥९५॥ इतरपुरुषाचे संगतीं ॥ क्षणभंगुर[4] सुख भोगिती ॥
अविनाश नित्यसुखप्राप्ती ॥ कामासक्ती माझेनी ॥ ९६ ॥ स्वपतिसंगें क्षणिक आनंदू ॥ माझ्या सुखाचा निजबोधू ॥ नित्य भोगिती
परमानंदू ॥ स्वानंदकंदू सर्वदा ॥९७॥ यालागीं गा अबळा चपळा ॥ सांडूनि स्वपतीचा सोहळा ॥ मजचि रतल्या सकळा ॥ माझी
कामकळा अभिनव ॥ ९८ ॥ नवरसांचा रसिक ॥ नव रंगडा मीच एक ॥ यालागीं माझ्या कामीं कामुक ॥ भाव निशंक गोपिकां
चा ॥९९ ॥ जीवाआंतुलिये खुणें ॥ मीचि एक निववूं जाणें ॥ ऐसें जाणोनि मजकारणें ॥ जीवें प्राणें विनटल्या ॥ २०० ॥ अंगीं प्र
त्यंगीं मीचि भोक्ता ॥ सबाह्यसर्वांगें मीचि निववीता ॥ ऐसें जाणोनि तत्त्वतां ॥ कामासक्तता मजलागीं ॥ १ ॥ हावभावकटाक्षगुण ॥
मीचि जाणें उणखुण ॥ कोण वेळ कोण लक्षण ॥ कोण स्थान मिळणीचें ॥ २ ॥ जे निजोनियां निजशेजारीं ॥ जे काळीं माझी इ
च्छा करी ॥ तेचि काळीं तेचि अवसरीं ॥ सुखशेजारीं मी निववीं ॥ ३ ॥ मज कुडकुडें नाहीं येणें ॥ नित्य निजसेजें निववणें ॥ नाहीं
कवाड टणत्कारणें ॥ जे जीवें प्राणें अनुसरली ॥४॥ ज्यासि भाळले[5] निष्काम तापसी ॥ ज्यासि भाळले योगी संन्यासी ॥ गोपी भाळ
ल्या त्यासी ॥ देहगेहांसी विसरोनी ॥ ५ ॥ ऐसा सर्वकामदायक ॥ पुरुषामाजी मीचि एक ॥ हा गोपिकीं जाणोनि विवेक[6] ॥ भावें नि

---

१ शीत उष्ण इत्यादिक. २ हा लोक. ३ मिळवून. ४ क्षणांत नष्ट होणारें. ५ भुलले. ६ विचार.

ष्टंक धरियेला ॥ ६ ॥ म्यां गोपिकांसि काम केला ॥ कीं त्यांचा सर्व काम हरिला ॥ विचारितां अर्थ इतुलें[1] ॥ मोक्ष फावला मत्कामें
॥ ७ ॥ अंधारीं गुळ खातां ॥ कडू नलगे तो सर्वथा ॥ तेवीं नेणोनि माझी सच्चिदानंदता ॥ मातें सेवितां मी जाहल्या ॥ ८ ॥ परीस
मानोनि पाषाण ॥ फोडूं जातां लोहांचा[2] घण ॥ लागतांचि होय सुवर्ण ॥ तैशा जाण गोपिका ॥ ९ ॥ ज्यांसि झाली माझी संगती ॥ त्या
एक दोन सांगों किती ॥ शत सहस्र अमितीं[3] ॥ निजप्राप्ती निजपदीं ॥ २१० ॥ विष ह्मणोनि अमृत घेतां ॥ मरण जाऊनि ये
अमरता ॥ तेवीं जारबुद्धीं मातें भजतां ॥ माझी सायुज्यता पावल्या ॥ ११ ॥ वैरागराच्या मणीप्रती ॥ खडे लागले हिरे होती ॥ तै
शा गोपिका माझ्या संगतीं ॥ नेणों किती उद्धरल्या ॥ १२ ॥ मी परब्रह्ममूर्ती चोखडी ॥ माझिया व्यभिचारपरवडी ॥ धुतल्या अवि
द्यापापकोडी ॥ मुक्ति रोकडी पावल्या ॥ १३ ॥ मी अथवा माझे भक्त ॥ संगती होईल ज्यांसि प्राप्त ॥ ते मज पावले निश्चित ॥ सं
देह[4] येथ न धरावा ॥ १४ ॥ माझे स्वरूपावरी लोक ॥ विकल्पें ठेविती नानादोख[5] ॥ संत माझे नित्य निर्दोख ॥ सत्संगें सुख निर्दुष्ट
॥ १५ ॥ उद्धवा तुवां येचि अर्थीं ॥ बहुत न धरावी व्युत्पत्ती ॥ धरोनियां सत्संगती ॥ संसारगुंती उगवावी ॥ १६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ त
स्मात्त्वमुद्धवोत्सृज्य चोदनां प्रतिचोदनाम् ॥ प्रवृत्तं च निवृत्तं च श्रोतव्यं श्रुतमेव च ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ माझें स्वरूप नित्य निर्गुण ॥
वेद तितुका त्रिगुण ॥ त्या वेदाचें जें प्रेरण ॥ तें गौण जाण मत्प्राप्तीं ॥ १७ ॥ त्या वेदार्थ श्रुतिस्मृती ॥ नाना कर्में करविती ॥ त्या क
र्मांची कर्मगती ॥ न कळे निश्चितीं कोणासी ॥ १८ ॥ कर्मस्वरूप परमगूढ ॥ विधिनिषेध अतिअवघड ॥ सज्ञानासि नव्हे निर्वाड[6] ॥
शास्त्रें दृढ विचारितां ॥ १९ ॥ केवळ कर्मचि कर्माआंत ॥ एक प्रवृत्त एक निवृत्त ॥ सकाम निष्काम अद्भुत ॥ अंगीं आदळत साधकां
॥ २२० ॥ कर्म तितुकें अविद्यक ॥ वेद तो त्रिगुणात्मक ॥ तत्संबंधीं श्रवण देख ॥ साधनरूप वेदांत ॥ २१ ॥ तमोगुणें कर्मकांड ॥ रजो
गुणें उपासनाकांड ॥ सत्वगुणें ज्ञानकांड ॥ वेद त्रिकांडें[7] त्रिगुणात्मक ॥ २२ ॥ वेद शास्त्र विधान विधी ॥ यांचें मूळ अविद्या आधीं ॥ ते अ
विद्येस्तव देहबुद्धी ॥ विधिनिषेधीं गोंवित ॥ २३ ॥ यालागीं उद्धवा तूं आधीं ॥ सांडी अविद्या पां त्रिशुद्धी ॥ अविद्या सांडिल्या[8]संबंधीं ॥
सहजें वेदविधी सांडिला ॥ २४ ॥ आधीं अविद्या ते कोण ॥ हेंच आह्मां न कळे ज्ञान ॥ मग तिचें निराकरण ॥ केवीं आपण करावें
॥ २५ ॥ निजकल्पनेचा जो बोध ॥ तेचि अविद्या स्वतःसिद्ध ॥ तेणेंचि बाधे विधिनिषेध ॥ ते त्यागिल्या शुद्ध ब्रह्मचि तो ॥ २६ ॥ धूरें[9] पडि
लिया रणीं ॥ सहज कटकें[10] जाय पळोनी ॥ तेवी अविद्या सांडितां सांडणी ॥ विधिविधान दोनीं सहजेंची ॥ २७ ॥ आंखु[11] छेदिलिया

---

१ इतका. २ लोखंडाचा. ३ असंख्य. ४ संशय. ५ अनेकप्रकारचे दोष. ६ निर्णय. ७ कर्म, उपासना व ज्ञान या तीनप्रकरणानें. ८ सोडल्यामुळें. ९ पुढारी, मुख्य. १० सेना. ११ आंस.

पडिपाडें ॥ रथ नचाले असतांही घोडे ॥ तेवीं अविद्या छेदिलिया सुरवाडे ॥ विधिनिषेध पुढें नचलती ॥ २८ ॥ मूळ छेदिलिया एके घायीं ॥ शाखा पल्लव छेदिले पाही ॥ तेवीं अविद्या छेदिलिया लवलाहीं विधिनिषेध ॥ राही सहजेंची ॥ २९ ॥ ऐके वेदींचा तात्पर्यार्थ ॥ मुख्य भजावा मी भगवंत ॥ तोचि शास्त्रीं विशदार्थ ॥ करी वेदांतश्रवणार्थें ॥ २३० ॥ श्रवण केलियाचें फळ जाण ॥ करावें अविद्यानिरसन ॥ अविद्या निरसिलिया श्रवण ॥ पुढारें जाण लागेना ॥ ३१ ॥ जेवीं ठाकिलिया स्वस्थान ॥ पुढारें नलगे गमनागमन ॥ तेवीं झालिया अविद्यानिरसन ॥ श्रवण मनन लागेना ॥ ३२ ॥ ह्मणसी अविद्या केवीं सांडे ॥ हेंचि अवघड थोर मांडे ॥ जे अवघें उगेंवे सांकडें ॥ तें मी तुजपुढें सांगेन ॥ ३३ ॥ वेद शास्त्र कर्मविधान ॥ हें अविद्यायुक्त साधन ॥ ते अविद्या जावया जाण ॥ मजलागीं शरण रिघावें ॥ ३४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मामेकमेव शरणमात्मानं सर्वदेहिनाम् ॥ याहि सर्वात्मभावेन मया स्या ह्यकुतोभयः ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ सांडूनि स्त्रीपुत्रविषयध्यान ॥ सांडूनि योग योग्यता शहाणपण ॥ सांडूनि कर्मठता कर्माभिमान ॥ मजलागीं शरण रिघावें ॥ ३५ ॥ सांडूनिया वेदाध्ययन ॥ सांडूनियां शास्त्रश्रवण ॥ सांडूनि प्रवृत्ति निवृत्ति जाण ॥ मजलागीं शरण रिघावें ॥ ३६ ॥ सांडूनियां वैदिक लौकिक ॥ सांडूनि आगम तांत्रिक[3] ॥ मज शरण रिघालिया देख ॥ माझें निजसुख पावसी ॥ ३७ ॥ सांडूनि कुळाचें उंचपण ॥ सांडूनि जातीचा अभिमान ॥ सांडूनि आश्रमाचें[4] श्रेष्ठत्व जाण ॥ मजलागीं शरण रिघावें ॥ ३८ ॥ सर्व त्यागाचें त्यागितेपण ॥ उद्धवा तुज मी सांगेन खुण ॥ सर्व सांडावा अभिमान ॥ हें मुख्य लक्षण त्यागाचें ॥ ३९ ॥ सर्वही सांडोनि अभिमान ॥ मज रिघालिया शरण ॥ तुज कैचें जन्ममरण ॥ माझे प्रतापें जाण तरशील ॥ २४० ॥ ह्मणसी शरण रिघावें कवणे ठायीं ॥ तरी मी असें तुझ्या हृदयीं ॥ त्या हृदयस्थासि[5] लवलाहीं ॥ शरण पाही रिघावें ॥ ४१ ॥ सर्वभावें सर्वस्वेंसी ॥ मज हृदयस्था शरण येसी ॥ तैं माझी सर्वगतता[6] पावसी ॥ सर्वभूतनिवासी हृदयस्थ ॥ ४२ ॥ तिळभरी राखोनि अभिमान ॥ जरी मज रिघशी शरण ॥ तरी माझी प्राप्ती नव्हे जाण ॥ अभिमान विघ्न प्राप्तीसी ॥ ४३ ॥ श्वानें[7] स्पर्शिलें पक्कान्न ॥ तें जेवीं नातळती ब्राह्मण ॥ तेवीं जीवीं असतां अभिमान ॥ साधकासि मी जाण नातळें ॥ ४४ ॥ रजस्वलेची ऐकोनि वाणी ॥ दूर पळिजे पुरश्चरणीं ॥ तेवीं अहंकाराच्या साधनीं ॥ थिता जवळुनी मी जायें ॥ ४५ ॥ रजकविटाळाचें जीवन ॥ जेवीं नातळती सज्जन ॥ तेवीं हृदयीं असतां अभिमान ॥ उद्धवा मी जाण न भेटें ॥ ४६ ॥ डोळां हरळ नविरे ॥ घायीं चाकोत नजिरे ॥ टांकी मुक्ताफळां नशिरे ॥ खिरीमाजी नसरे सरांटा ॥ ४७ ॥ तेवीं मजमाजी अभिमान ॥ उद्धवा नरिघे गा जा

---

१ पानें. २ प्राप्त होतें. ३ पंचरात्रागमांत सांगितलेलें कर्म. ४ ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ व संन्यास यांचें. ५ हृदयांत राहणाऱ्या मला. ६ सर्वव्यापकता. ७ कुत्र्यानें. ८ घेत नाहींत. ९ रज.

ण ॥ हे त्यागतात्पर्याची खुण ॥ तुज म्यां संपूर्ण सांगीतली ॥ ४८ ॥ पत्नी विचरतां परपुरुषीं ॥ देखोनि निजपती त्यागी तिसी ॥ तेवीं अभिमानरतभक्तांसी ॥ मी हृषीकेशी नातळें ॥ ४९ ॥ यालागीं सांडूनि अभिमान ॥ मज हृदयस्था रिघालिया शरण ॥ तुज मी उद्धरीन जाण ॥ देवकीची आण उद्धवा ॥ २५० ॥ ह्मणसी तुज दोघी माता ॥ कोणतीची आण मानूं सत्यता ॥ मज तुझीचि आण तत्त्वतां ॥ तुज निर्भयता माझेनी ॥ ५१ ॥ तूं बोलीं नातुडसी कांहीं ॥ तुज सर्वथा क्रिया नाहीं ॥ तुझी आण भाक मानावी कायी ॥ ऐसें जरी कांहीं कल्पिसी ॥ ५२ ॥ पातेजूनि तुझिया बोलासी ॥ यिति सांडावें स्वधर्मासी ॥ लटकें जाहलिया आणेसी ॥ कोणें समर्थासी भांडावें ॥ ५३ ॥ उद्धवा ऐसें न ह्मण ॥ म्यां जे वाहिली तुझी आण ॥ तें परमात्म्यावरी प्रमाण ॥ सत्य जाण सर्वथा ॥ ५४ ॥ उद्धवा तूं आत्मा परिपूर्ण ॥ मज तुज नाहीं मीतूंपण ॥ त्या तुझी म्यां वाहिली आण ॥ परमप्रमाण परमात्मता ॥ ५५ ॥ असतां प्रत्यक्ष प्रमाण ॥ कां लागे भाक आण ॥ सर्वभावें मज आलिया शरण ॥ आतांचि जाण तरशील ॥ ५६ ॥ मज शरण रिघाल्या वाडेंकोडें ॥ कळिकाळ तुझिया पायां पडे ॥ कायसें भवभय बापुडें ॥ कोण तुजकडे पाहेल ॥ ५७ ॥ शरण रिघतांचि तत्काळ ॥ तूं लाहोसी माझें बळ ॥ तेव्हां भवभय पळे सकळ ॥ तुज कळिकाळ कांपती ॥ ५८ ॥ तृणीं पेटलिया अग्निस्फुलिंग ॥ तो जाळी नानावनाचे दांग ॥ तैसें शरण आलिया अव्यंग ॥ संसारदांग तूं जाळिसी ॥ ५९ ॥ शरण यावें हृदयस्थासी ॥ तो हृदयस्थ न कळे आह्मांसी ॥ उद्धवा तूं ऐसें ह्मणसी ॥ तरी ऐक त्या स्वरूपासी सांगेन ॥ २६० ॥ सांडूनि रूपनाम अभिमान ॥ स्फुरे जें कां उद्धवपण ॥ तें मज हृदयस्थाचें रूप जाण ॥ त्यासि तुवां शरण रिघावें ॥ ६१ ॥ नामरूप गुणवार्ता ॥ हे माया जाण तत्त्वतां ॥ ते सांडूनि जे स्फुरे सत्ता ॥ तें मज हृदयस्थाचें रूप ॥ ६२ ॥ ऐसेनि हृदयस्थ जोडल्या पहा हो ॥ तेव्हां सर्वभूतीं पाहतां देवो ॥ तेथ वेगळा उरावया उद्धवो ॥ रिता ठावो न दिसेचि ॥ ६३ ॥ तेव्हां सर्वभूतीं मी एकू ॥ निश्चयें जाण निश्शंकू ॥ देखतांही अनेक लोकू ॥ त्यांसि मी एकू एकला ॥ ६४ ॥ ऐसा तूं मिळोनि हृदयस्थासी ॥ मी होऊनि मज पावसी ॥ माझी प्राप्ती उद्धवा ऐशी ॥ निर्भयेंसी निश्चित ॥ ६५ ॥ ऐशी सांगोनि गुह्य गोष्टी ॥ देवो उद्धवाची पाटी थापटी ॥ येरें चरणीं घातली मिठी ॥ उठवितां नुठी सर्वथा ॥ ६६ ॥ तुवां जें सांगितलें निजगुज ॥ तें मज मानलें गा सहज ॥ बोला एकाचा संशय मज ॥ तो मी तुज पुसेन ॥ ६७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धव उवाच ॥ ॥ संशयः शृण्वतो वाचं तव योगेश्वरेश्वर ॥ न निवर्तत आत्मस्थो येन भ्राम्यति मे मनः ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ वेदशास्त्रांचें मथितं सार ॥ योगदुर्गींचें भांडार ॥ पिकल्या सुखा

---

१ शपथ. २ संसाराचें भय. ३ प्राप्त होशील. ४ गवतांत. ५. ठिणगी. ६. झाडांचीं बेटें. ७ भासतें. ८ मत्स्वरूप. ९. आपलें रहस्य. १० अतिप्रयत्नानें काढलेलें.

चा सागर ॥ मज साचार उपदेशिला ॥ ६८ ॥ स्वेस्वेकर्मण्यभिरत ॥ येणेंचि ह्मणशी वस्तु प्राप्त ॥ तेंही सांडूनि समस्त ॥ शरण निश्चि
त रिघा ह्मणसी ॥ ६९ ॥ तूं योगियांचा योगीश्वर ॥ सकळ जगाचा ईश्वर ॥ तुझें सत्य गा उत्तर ॥ संशयकर मज वाटे ॥ २७० ॥ तुवां
च सांगितलें संक्षेपें जाण ॥ करावें गा स्वधर्माचरण ॥ तें सत्य मानूनि वचन ॥ सर्वस्वें जाण विश्वासलों ॥ ७१ ॥ करावें जें स्वधर्माच
रण ॥ तेंच ह्मणशी माझें भजन ॥ शेखीं तेही आतां सांडून ॥ रिघावें शरण ह्मणतोसी ॥ ७२ ॥ तरी आत्मा कर्त्ता कीं अकर्ता ॥ हेंचि न
कळे तत्त्वतां ॥ कर्म करावें कीं सर्वथा ॥ आह्मी आतां सांडावें ॥ ७३ ॥ तुझी विषम उपदेशव्युत्पत्ती ॥ सांगतां आह्मां अबळांप्रती ॥
थोर संदेह वाटे चित्तीं ॥ काय श्रीपती करावें ॥ ७४ ॥ जरी आत्मा झाला अकर्त्ता ॥ तरी कर्मांचा कोण कर्त्ता ॥ जैं आत्म्यासी अक
र्तव्यता ॥ तैं त्याग सर्वथा घडेना ॥ ७५ ॥ ऐकोनि उद्धवाचा प्रश्न ॥ सांवळा राजीवलोचन ॥ काय बोलिला हांसोन ॥ सावधान प
रिसावें ॥ ७६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ स एष जीवो विवरप्रसूतिः प्राणेन घोषेण गुहां प्रविष्टः ॥ मनोमयं सूक्ष्ममुपेत्य रू
पं मात्रा स्वरो वर्ण इति स्थविष्ठः ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐक बापा उद्धवा ॥ मी निजमायेच्या स्वभावा ॥ अनुसरोनि जीवभावा ॥ क
र्तृत्व जीवा जीवत्वें ॥ ७७ ॥ जळीं प्रतिबिंबला सविता ॥ तो जळकंपें दिसे कांपता ॥ तेवीं अकर्त्ताचि मी दिसें कर्ता ॥ जीवअहंतास्वभावें
॥ ७८ ॥ राजा झालिया निद्रेआधीन ॥ तो स्वप्नीं रंक होय आपण ॥ तेवीं प्रकृतीस्तव मज जाण ॥ जीवपण आभासे ॥ ७९ ॥ स्वयें
राजा आहे आपण ॥ तो स्वप्नीं रंकत्वें करी कोरान्न ॥ तेथें जो दे पसाभर कण ॥ त्यासि वानी आपण राजा रे तूं ॥ २८० ॥ आपणचि
राजा आहे ॥ हें त्याचें त्यास ठाउकें नव्हे ॥ तैसेच जीवासही होये ॥ पूर्णत्व स्वयें स्मरेना ॥ ८१ ॥ जेवीं स्वप्नाचिया अवस्था ॥ राजा
रंकक्रियां करी समस्ता ॥ तेवीं अविद्येस्तव तत्त्वतां ॥ कर्मकर्त्ता मी झालों ॥ ८२ ॥ तेथें वेदोक्त विधिविधान ॥ जीवाअंगीं आर्दळे
जाण ॥ जंव नव्हे ब्रह्मज्ञान ॥ तंव स्वधर्माचरण करावें ॥ ८३ ॥ राजा राज्यपदीं जागा नव्हे ॥ तंव रंकक्रिया त्यासि संभवे ॥ तेवीं
जंव ब्रह्मज्ञान नव्हे ॥ तंव सर्व करावें स्वधर्म ॥ ८४ ॥ राजा राज्यपदीं जागा झाला ॥ तो भीक स्मरतांचि लाजला ॥ तेवीं ब्रह्म
ज्ञान जो पावला ॥ तो मी कर्त्ता या बोला न बोले कदां ॥ ८५ ॥ जैसें रायास मिथ्या रंकपण ॥ तेवीं परमात्म्यासि जीवत्व जाण ॥
त्या जीवास शरीरीं संचरण ॥ तें उपलक्षण अवधारी ॥ ८६ ॥ जैसा जीव जडातें जीवंविता ॥ यालागीं जीवू ऐशी वार्ता ॥ सहजें त
री स्वभावतां ॥ चैतन्यरूपता जीवाची ॥ ८७ ॥ घटामाजी दीप घातला ॥ तैं घटभरीं प्रकाश झाला ॥ तोचि घरामाजी ठेविला ॥ घर

---

१ आपापल्या कर्मांत तत्पर. २ संशय उत्पन्न करणारें. ३ सर्वतऱ्हेनें. ४ ऐकावें. ५ सूर्य. ६ भिक्षा. ७ गरीबाचा धंदा. ८ भास होतें. ९ प्राणधारण करविणारा.

भरीं झाला प्रकाश ॥ ८८ ॥ तेवीं शरीरामाजी तरी जीवू ॥ सहजें तरी हा सदाशिवू ॥ येथ बोलणें नलगे बहू ॥ जीवशिवअनुभवू
तो ऐसा ॥ ८९ ॥ आरिशाचा सूर्य दिसे हातीं ॥ तेवीं शरीरीं जीवाची प्रसूती ॥ प्रकर्षेंसी राहती स्थिती ॥ यालागीं प्रसूती बोलिजे
॥ २९० ॥ आरसा अत्यंत लहान ॥ तथें सूर्य बिंबे संपूर्ण ॥ तेवीं विदेहा देहधारण ॥ विवरप्रवेशन त्या नांव ॥ ९१ ॥ थिल्लुरीं चंद्रा
सि अभिव्यक्ती ॥ तो गगनींचा दिसे अधोगती ॥ तेवीं शरीरीं जीवासि प्रसूती ॥ अव्यक्त व्यक्तीं प्रवेशे ॥ ९२ ॥ जळीं सविता प्रतिबिं
बला ॥ परी तो जळें नाहीं ओला झाला ॥ तेवीं कर्मं करोनि संचला ॥ अलिप्त ठेला निजआत्मा ॥ ९३ ॥ जळीं प्रतिबिंब आंदोलाय
मान ॥ तेवीं जीवासि जन्ममरण ॥ थिल्लुरीं चंद्र अडकला पूर्ण ॥ तेवीं कर्मबंधन जीवासी ॥ ९४ ॥ थिल्लुरजळ आटलें ॥ तेथें काय
चंद्रबिंब निमालें ॥ ना तें चंद्राबिंब बिंबोनि ठेलें ॥ जाहलें निमालें दोनी मिथ्या ॥ ९५ ॥ थिल्लुरींचा चंद्र काढूं जातां ॥ तो मिथ्यात्वें न
ये हातां ॥ तेवीं देहीं मिथ्या जीवता ॥ ते सत्य मानितां अतिदुःखी ॥ ९६ ॥ आरसा थोर अथवा लहान ॥ तेथें सूर्य बिंबे संपूर्ण ॥ तेवीं
मी अंतर्यामी जाण ॥ सर्वांभूतीं समान समग्र असें ॥ ९७ ॥ सूर्य थिल्लुराआतौता ॥ अडकला दिसें समस्तां ॥ तेवीं जीवासि कर्म
बाधता ॥ मूर्खता मानिती ॥ ९८ ॥ गगनींचा सूर्यो न देखती ॥ थिल्लुरीं अडकला मानिती ॥ तेवीं निर्गुणीं जयां नाहीं प्रतीती ॥ ते ब
द्ध ह्मणती जीवातें ॥ ९९ ॥ अग्निज्वाळा जाळीं आकळितां ॥ जाळ जळे आकळूं जातां ॥ तेवीं आत्मया कर्मीं बद्धकता ॥ कर्मीं कर्म
ता निष्कर्म ॥ ३०० ॥ नाद उत्पत्तीसि ठावो ॥ मुख्य वावो कां दुसरा घावो ॥ या दोहीं वेगळा नित्य निर्वाहो ॥ तो नादू पहाहो अ
नुहत ॥ १ ॥ अनुहताचा सोलींव शब्दू ॥ परापरता पराख्य नादू ॥ ज्याचा योगियां सदा छंदू ॥ बोलिला अनुवादू नव्हे त्याचा ॥ २ ॥
ज्या नादाची सुखगोडी ॥ सदाशिवूच जाणें फुडी ॥ कां सनकादिकीं चोखडीं ॥ चाखिली गोडी ते चवी ॥ ३ ॥ वायूचें शोधिता सत्व ॥
त्यासि एकवटलें तें शब्दतत्त्व ॥ उभयचेतनें जीवित्व ॥ मनोमयत्व धरूं पाहे ॥ ४ ॥ जें चेतनेचें चेतनत्व ॥ तें वायूचें शोधित सत्व ॥
तेंचि शब्दाचें निजतत्त्व ॥ तेणें जीवित्व मनोरूप होय ॥ ५ ॥ जीवाचा शरीरसंयोग ॥ स्वयें सांगे तो श्रीरंग ॥ आधारादिचक्रप्रयोग
क्रमेंचि सांग[3] सांगत ॥ ६ ॥ अहमिति प्रथमा[4]ध्यासें ॥ जीवासि जीवत्व आभासे ॥ तो जेजे तत्त्वीं प्रवेशे ॥ तें मीं ऐसें ह्मणतची
॥ ७ ॥ तेथ मी देहो ह्मणतां ॥ तत्काळ जाय पूर्णता ॥ तेव्हां एकदेशी परिच्छिन्नता ॥ देहात्मता लागली ॥ ८ ॥ निर्विशेष[5] नाद अति
सूक्ष्म प्राण ॥ त्यासहित आधारीं प्रवेशोन ॥ अतिसूक्ष्म प्रथम स्फुरण ॥ पावोनि जाण परा झाला ॥ ९ ॥ आधारचक्रीं सूक्ष्म प्राण ॥

---

१ डबक्यांत. २ इकडे तिकडे संचार करणारें. ३ संपूर्ण. ४ पहिल्या अभ्यासानें. ५ सामान्य.

परावाचा तेथिंची जाण ॥ मनाचें कोंवळें स्फुरण ॥ अति सपुरण सूक्ष्मत्वें ॥ ३१० ॥ स्वाधिष्ठानचक्राच्या ठायीं ॥ मनाचें वाढतें बाळसें[1] पाही ॥ पश्यंती वाचा तयेठायीं ॥ बोलूं देखे परी कांहीं बोलेना ॥ ११ ॥ तिये चक्रीं एकवटला प्राण ॥ पुढारां नचलेचि गाजाण ॥ प्राणापानां[2] झालें भांडण ॥ दोघेजण रूसलें ॥ १२ ॥ घरकलहो[3] लागला भारी ॥ मग निघाले वेगळेचारी ॥ पांचही[4] राहिले पांचापरी ॥ ऐक निर्धारीं विचारू ॥ १३ ॥ मागें रुसोनि गेला जाण ॥ त्या नांव ह्मणती अपान ॥ रागें पुढारां आला पवन ॥ त्या नांव प्राण ह्मणताती ॥ १४ ॥ दोहींमाजी समत्वें जाण ॥ नाभीं राहिला तो समान ॥ कंठीं राहिला उदान ॥ व्यानासि स्थान असेना ॥ १५ ॥ अद्यापि शरीरीं जाण ॥ व्यानासि नाहीं एक स्थान ॥ तो सर्वांगीं सर्वदा जाण ॥ परिभ्रमण करीतसे ॥ १६ ॥ याहून धाकटे पांच प्राण ॥ तेही वेगळे राहिले जाण ॥ तिहीं वेगळालें आपण ॥ वस्तीसि[5] स्थान योजिलें ॥ १७ ॥ नाग कूर्म कृकल देवदत्तू ॥ पांचवा धनंजय जाण तेथू ॥ यांची वस्ती शरीरांतू ॥ ऐक निश्चितू सांगेन ॥ १८ ॥ शिंक जांभई आणि ढेंकर ॥ नाग[6] कूर्म[6] कृकलांचें[6] घर ॥ उचकी देवदत्ताचें बिढार[7] ॥ धनंजयासि थार मिळेचिना ॥ १९ ॥ जीव देहाचे आप्तवादापासी ॥ धनंजयो राहिला वस्तीसी ॥ जीवें सांडिल्या शरीरासी ॥ मुहूर्तार्ध देहासी तो वांचवी ॥ ३२० ॥ स्वाधिष्ठानाहोनि[8] जाण ॥ अनुक्रमें दशधा होती प्राण ॥ त्याचें स्थान मान उपलक्षण ॥ तुज म्यां जाण सांगीतलें ॥ २१ ॥ मागें म्यां सांगितली गोष्टी ॥ प्राणापान रुसल्यापाठीं ॥ दोघां अद्यापि नाहीं भेटी ॥ महाहटी छांदस[9] ॥ २२ ॥ त्या दोघांसि करी बुझावण[10] ॥ तो माझा पढियंता तूं जाण ॥ त्या सर्वस्व दें मी आपण ॥ योगसाधन यानांव ॥ २३ ॥ उद्धवा प्राणलक्षणें सांगतां ॥ अवचटें प्राणापानसमता ॥ प्रसंगीं आली कथा ॥ त्वांही स्वभावतां ऐकावी ॥ २४ ॥ स्वाधिष्ठानाहूनि मणिपूरां येतां ॥ जीवामनांची एकात्मता ॥ सूक्ष्मप्राण तेथ असतां ॥ परेच्या ऐक्यता पश्यंती ॥ २५ ॥ तेथ मनाचें खेळुगेपण ॥ कुमार अवस्था बाणली जाण ॥ तंव डोलत पुढें चाले प्राण ॥ अनुहतस्थान टाकिलें ॥ २६ ॥ धरोनि पश्यंतीचें अनुसंधान ॥ मध्यमा वाचा उपजे जाण ॥ मौनाची मिठी न सोडून ॥ करी गुणगुण आपैण्यांत[11] ॥ २७ ॥ तेथ मनाची पौगंडें[12] अवस्था ॥ मागें पुढें सांभाळितां ॥ वांछी नाना भोग अवस्था ॥ लाजा सर्वथा बोलेना ॥ २८ ॥ मग वेगें टाकिलें विशुद्धस्थान ॥ तेथ उसळत उदान प्राण ॥ तंव मनासि तारुण्यपण ॥ पुरतें जाण बाणलें ॥ २९ ॥ त्या विशुद्धचक्राप्रती ॥ परा मिळोनि आतौती ॥ पश्यंती मध्यमा एक होती ॥ वाचा दुमदुमती झणत्कारें ॥ ३३० ॥ त्या झणत्काराप

---

[1] पुष्टपणा. [2] गुदस्थ व हृदयस्थ वायूंचें. [3] घरांत तंटा. [4] प्राण, अपान, व्यान, उदान व समान असे पांच. [5] राहण्यास. [6] शिंक नागाचें, जांभई कूर्माचें, ढेंकर कृकलाचें, याप्रमाणें. [7] स्थान. [8] आपल्या स्थानापासून. [9] वादी. [10] समजूत. [11] आपसांत. [12] सोळावर्षांच्या आंतची.

रिपाठीं ॥ वर्क्रीं वाचा तत्काळ उठी ॥ तारुण्यें उन्मत्त झाली मोठी ॥ त्या स्वरवर्ण चावटी मांडिली ॥ ३१ ॥ अग्निचक्र भ्रूस्थान ॥ तें याहूनि वेगळें जाण ॥ तेथें वाचेसि नाहीं गमन ॥ हंसलक्षण योगाचें ॥ ३२ ॥ हीं साही चक्रें अनुक्रमें जाण ॥ चार मातृका अठ्ठावीस वर्ण ॥ सोळाही स्वर संपूर्ण ॥ तेंही लक्षण अवधारी ॥ ३३ ॥ कोण चक्रीं कोण वर्ण ॥ मातृकांचें कोणतें स्थान ॥ कोठें उठती स्वर संपूर्ण ॥ तेंही लक्षण अवधारी ॥ ३४ ॥ आधारचक्रीं चतुर्दळ उभारा ॥ तेथ न्यासिल्या[1] चारी मात्रा ॥ विशेषतां या अक्षरा ॥ बोलिजे मात्रा शास्त्रज्ञीं ॥ ३५ ॥ स्वाधिष्ठान षड्दळ[2] जेथ ॥ साही वर्ण स्थापिले तेथ ॥ बकारादि[3] लकारांत[3] ॥ जाण निश्चित ते स्थानीं ॥ ३६ ॥ मणिपूर दशदळ निश्चित ॥ दहा वर्ण स्थापिले तेथ ॥ उकारादि पकारांत ॥ वर्ण नांदत ते चक्रीं ॥ ३७ ॥ अनाहतचक्र द्वादशदळयुक्त ॥ बारा वर्ण न्यासिले तेथ ॥ ककारादि ठकारांत ॥ वर्ण विराजत ते चक्रीं ॥ ३८ ॥ विशुद्धिचक्रींच्यां सोळादळा ॥ अ इ उ ऋ ऌ हे वर्ण सोळा[4] ॥ कंठस्थानीं मीनला मेळा ॥ यांचा वेदीं आगळा प्रताप ॥ ३९ ॥ अज्ञातचक्र अतिअवघड ॥ नुघडे एकाकीं मुखाचें कवाड ॥ नचले प्राणाची चडफड ॥ मार्ग अतिगूढ लक्षेना ॥ ३४० ॥ तें अज्ञातचक्र गा द्विदळ ॥ केवळ हंसाचें राउळ ॥ तेथ पावावया योगबळ ॥ अतिप्रबळ पाहिजे ॥ ४१ ॥ हें स्थान पावावयासाठीं ॥ योगी झाले महाहटी ॥ अभ्यास करितां अतिसंकटीं ॥ तेही शेवटीं न पावती ॥ ४२ ॥ हें पावावया माझें स्थान ॥ अति गुह्य आहे अनुष्ठान ॥ सोहंहंसाचें साधन ॥ सावधान जो साधी ॥ ४३ ॥ प्राणाचेनि गमनागमनें ॥ सोहंहंसाचेनि स्मरणें ॥ सावधानें जो साधूं जाणें ॥ तेणें पावणें हें स्थान ॥ ४४ ॥ त्यासीचि पवनंजयो[6] घडे ॥ तोचि अज्ञातचक्रामाजी चढे ॥ तेथूनि मार्ग काढी पुढें ॥ अतिनिवाडें अचुक ॥ ४५ ॥ तेथ नानाभोगसमृद्धिफळें ॥ आणिती ऋद्धिसिद्धींचें पाळें ॥ ते डावलूनियां सकळें ॥ निघे निर्मळें निजपंथें ॥ ४६ ॥ जो कां ऋद्धिसिद्धींसी भुलला ॥ मी सिद्ध ये श्लाघे आला ॥ तो अज्ञातचक्रावरोनि च्यवला[7] ॥ केल्या मुकला कष्टासी ॥ ४७ ॥ ज्यासि वैराग्य असें पुरतें ॥ तो कदा भुलेना सिद्धीतें ॥ लाता हाणोनि भोगमान्यतेतें ॥ निजे निजपंथें मजलागीं ॥ ४८ ॥ तैं औटपीठ गोल्हाट ॥ सांडूनि भ्रमरगुंफा कचाट ॥ शोखूनि सहस्रदळाचे पाट ॥ मजमाजी सुभट मिसळले ॥ ४९ ॥ सांगतां अज्ञातचक्राची संस्था ॥ पुढें गोडी लागली योगपंथा ॥ मागील विसरलों जी कथा ॥ क्षमा श्रोतां करावी ॥ ३५० ॥ ह्मणाल वाहवटीं पडला मासा ॥ तो परतेना जेवीं सहसा ॥ ग्रंथनिरूपणीं तूं तैसा ॥ जल्पू वायसा कां करिसी ॥ ५१ ॥ जेवीं चुकलिया बाळकातें ॥ माता शिकवण दे त्यातें ॥ तेवीं तुमचें वचन मातें ॥ निजहितातें द्योतक ॥ ५२ ॥

---

[1] स्थापिल्या. [2] सहा पाकळ्यांचें. [3] ब, भ, म, य, र, ल. [4] अ आ, इ ई, उ ऊ, ऋ ॠ, ऌ ॡ, ए ऐ, ओ औ, अं अः असे. [5] स्थान. [6] प्राणायाम साध्य. [7] समाधिभ्रष्ट झाला.

करितां चक्रांचें निरूपण ॥ योगारूढ झालें मन ॥ विसरोनि मागील निरूपण ॥ गेलें निघून शेवटां ॥ ५३ ॥ हें ऐकोनि हांसिले श्रोते ॥ तूं ग्रथकर्त्ता नव्हसी येथें ॥ हें कळोनि गेलें आमुतें ॥ नको परिहारातें उपपादूं ॥ ५४ ॥ आलोडितां ग्रंथकोडी ॥ न कळे योगज्ञानाची गोडी ॥ ते तुवां विशद केली फुडी ॥ निजपरवडी विभागें ॥ ५५ ॥ तुझेनि मुखें कृष्णनाथें ॥ श्रीभागवत जें कठिण होतें ॥ तें अर्थविलें यथार्थें ॥ सत्य आमुतें मानलें ॥५६॥ हा बारावा अध्यावो ॥ अतिगूढ बोलिला देवाधिदेवो ॥ तेथिंचाही त्वां अभिप्रावो ॥ विशद पहाहो विवँरिला ॥ ५७ ॥ ऐसा संतीं करोनि आदरू ॥ निर्भय दीधला नाभिकारू ॥ एका जनार्दनीं हर्षनिर्भरू ॥ केला नमस्कारू संतांसी ॥ ५८ ॥ वैखरी मात्रा स्वर वर्ण ॥ या पदांचें झालें व्याख्यान ॥ तेंचि दृष्टांतें श्रीकृण ॥ उद्धवासि जाण सांगतू ॥ ५९ ॥ सूक्ष्म जीवशिवांचें मूळ ॥ तोचि वाग्द्वारां झाला स्थूळ ॥ येचि अर्थीं अतिविवळ ॥ करूनि प्रांजळ सांगत ॥ ३६० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यथाऽनलः खेऽनिलबंधुरूष्मा बलेन दारुण्यधिमथ्यमानः ॥ अणुः प्रजातो हविषा समिध्यते तथैव मे व्यक्तिरियं हि वाणी ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ ॥ अव्यक्तरूपें ऊष्मा गगनीं ॥ व्यापकपणें असे वह्नी ॥ तो अरणीमाजी मथितां मंथनीं ॥ अतिसूक्ष्मपणीं प्रकटला ॥ ६१ ॥ अनळा अनिळ निजसखा ॥ कोमळतुकें फुंकितां देखा ॥ दिसे लखलखीत नेटका ॥ ज्वाळा साजुका कोंवळिया ॥ ६२ ॥ तेथ पावला दशा मध्यम ॥ मग हवनद्रव्यें करितां होम ॥ तेणें थोरावला निरुपम ॥ वाढला व्योमचुंबित ॥ ६३ ॥ तैसा सूक्ष्मनाद शिवसंयोगें ॥ प्राणसंगमें लागवेगें ॥ षट्चक्रादिप्रयोगें ॥ वैखरीयोगें अभिव्यक्त ॥६४॥ मरा हे ऐकतां गोठी ॥ ते वाचा सर्वांशें वाटे खोटी ॥ तेंचि अक्षरें केल्या उफराटीं ॥ रामनामें गोमटी निववी वाचा ॥ ६५ ॥ करितां सुष्ठु दुष्ठु उच्चार ॥ वर्ण नव्हती क्षर अक्षर ॥ यालागीं नांव तें अक्षर ॥ यापरी पवित्र ते वाणी ॥ ६६ ॥ जैशी वाचेची अभिव्यक्ती ॥ तैशीच इतरइंद्रियप्रवृत्ती ॥ संक्षेपें तेही स्थिती ॥ उद्धवाप्रती सांगतू ॥ ६७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवं गदिः कर्मगतिर्विसर्गो घ्राणो रसो दृक् स्पर्शः श्रुतिश्च ॥ संकल्पविज्ञानमथाऽभिमानः सूत्रं रजःसत्त्वतमोविकारः ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ ॥ जैशी वाचेची व्युत्पत्ती ॥ तशीच कर्मेंद्रियांची प्रवृत्ती ॥ चरणाच्याठायीं गती ॥ ग्रहणशक्ती हस्ताची ॥ ६८ ॥ विसर्ग जाण वायूचा ॥ सुखोद्रेक तो लिंगाचा ॥ कर्मेंद्रियीं पांचवी वाचा ॥ विस्तारू तिचा सांगीतला ॥ ६९ ॥ तैशींच जाण ज्ञानकरणें ॥ दृष्टी उठी देखणेपणें ॥ रसना रसातें चाखोंजाणें ॥ श्रवण श्रवणें अधिकारू ॥ ३७० ॥ शीत उष्ण मृदु कठिण ॥ हें त्वगिंद्रियेंचें लक्षण ॥ सुगंध दुर्गंध जाणतेपण ॥ घ्राण विचक्षण ते कर्मीं ॥ ७१ ॥ संकल्प विकल्प मनाचे ॥ निश्चयो कर्म बुद्धीचें ॥ चिंतन जाण चित्ताचें ॥ अहं

---

समाधान. ३ स्पष्ट. ३ प्राकृतभाषेंत केलें. ४ व्याख्यारूपानें सांगितला. ५ रुकार. ६ अतिसदय. ७ अग्नीचा. ८ वायु. ९ ज्ञानेंद्रियें. १० कान. ११ मऊ. १२ त्वचेचें.

काराचें मीपण ॥ ७२ ॥ सूत्र तंव प्रधानाचें ॥ विकार रजतमसत्वांचे ॥ संक्षेपें विवरण तिहींचें ॥ ऐक साचें सांगेन ॥ ७३ ॥ आधिदैव आधिभौत ॥ ज्यासि आध्यात्म ह्मणत ॥ बाढला जो प्रपंच येथ ॥ ईश्वराचें अभिव्यक्त स्वरूप जाण ॥ ७४ ॥ जगाचें मूळकारण ॥ अंगें ईश्वरचि आपण ॥ त्या कारणाहूनि कार्य भिन्न ॥ नव्हे जाण सर्वथा ॥ ७५ ॥ होकां घृता[2]ची एकेकाळीं ॥ थिजोनि झाली पुतळी ॥ ते घृता होनि वेगळी ॥ नाहीं देखिली प्रत्यक्ष ॥ ७६ ॥ काष्ठाचा घोडा केला ॥ अंगें ठाणें अतिमिरविला ॥ तो काष्ठपणा नाहीं मुकला ॥ सर्वांगें शोभला काष्ठत्वें ॥ ७७ ॥ त्याचे पाहतां वेगळाले अवयव ॥ खूर खांद काष्ठचि सर्व ॥ तेवीं महाभूतें गुणप्रभाव ॥ स्वरूप सां[3]वेव शिवाचें ॥ ७८ ॥ सुवर्णाचिं झालें लेणें ॥ तें जेवीं मिरवें सोनेंपणें ॥ तेवीं महाभूतें विषयकरणें ॥ अभिन्नपणें शिवरूप ॥ ७९ ॥ फडा[4] पुच्छ वांकुडा चांग ॥ येणें आकारें ह्मणती नाग ॥ तो नाग नव्हे सोनेंचि चांग ॥ तेवीं हें मज मद्रूप ॥ ३८० ॥ प्रपंच ईश्वरासि अभिन्न ॥ येचि अर्थीं श्रीनारायण ॥ उद्धवासि सांगे आपण ॥ अभिन्नपणें जीवशिवां ॥ ८१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अयं हि जीवस्त्रिवृदब्जयोनिरव्यक्त एको वयसा स आद्यः ॥ विश्लिष्टशक्तिर्बहुधेव भाति बीजानि योनिं प्रतिपद्य यद्वत् ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ जीवाचा जीवू आपण ॥ यालागीं बोलिजे जीवपण ॥ जीवशिवरूपें हा भिन्न ॥ जीवत्व जाण याहेतू ॥ ८२ ॥ सागरु आपुल्या अंगावरी ॥ वर्तुळ आवर्त्त[5] करीं धरी ॥ तेवीं लोकपद्मातें श्रीहरी ॥ करीं धरी निजनाभीं ॥ ८३ ॥ त्रिवृद अब्ज ह्मणिजे यापरी ॥ त्या नाभिकमळामाझारी ॥ स्वलीलां त्रैलोक्यातें धरी ॥ पद्मनाभ हरी याहेतू ॥ ८४ ॥ सुवर्णाच्या सिंहासनीं ॥ सुवर्णमूर्ती बैसवूनी ॥ पूजिजे सुवर्णसुमनीं[6] ॥ एकपणें तीन्ही भासती ॥ ८५ ॥ तेवीं नाभिपद्मीं त्रैलोक्य धरितां ॥ तिहींतें भासवी अभिन्नता[7] ॥ यालागीं पद्मनाभ तत्त्वतां ॥ आलें वाक्पथां[8] श्रुतीचिया ॥ ८६ ॥ अतिमार्दवें पिंवळी ॥ एकली भासे चांपेकळी ॥ विकासे जेवीं नानादळीं ॥ तेवीं मी वनमाळी लोकत्वें ॥ ८७ ॥ हें नसतां काय कारण ॥ यापूर्वीं मी अव्यक्त जाण ॥ जो मी प्रमाणांचाही प्रमाण ॥ भेदें जेथ आण वाहिली ॥ ८८ ॥ हेतु मातु दृष्टांत ॥ रिघों नशके ज्या गांवांत ॥ अपार अनादि अनंत ॥ आद्य अव्यक्त मी ऐसा ॥ ८९ ॥ एवं केवळ जें अभेद ॥ तेथें कैंचे त्रिविध भेद ॥ जेथ लाजोनि परतले वेद ॥ स्वरूप शुद्ध तें माझें ॥ ३९० ॥ तो न मेळवितां सात्म्यमेळू ॥ स्वलीलाक्षोभें क्षोभक[9] काळू ॥ स्वशक्तीनें झालों सबळू ॥ शक्तिबंबळू चेतविला ॥ ९१ ॥ ते निजशक्तीचे विभाग ॥ म्यांचि विभागिले चांग ॥ त्या विभागाचे भाग ॥ ऐक सांग सांगेन ॥ ९२ ॥ गुणशक्ति देवताशक्ती ॥ मनोशक्ति इंद्रियशक्ती ॥ महाभूतांची भूतशक्ती ॥ एथ क्रियाशक्ती मुख्यत्वें ॥ ९३ ॥ जीवापासाव

---

१ लिंगदेह. २ तुपाची. ३ अवयवांसुद्धां. ४ फणा. ५ भोंवरा. ६ सोन्याच्या फुलांनीं. ७ ऐक्य. ८ वाणीरूपमार्गानें. ९ प्रेरक.

अदृष्टशक्ती ॥ झाली अनिवार त्रिजगतीं ॥ हरिहरां नावरे निश्चितीं ॥ अदृष्टशक्ती अनिवार ॥ ९४ ॥ जें अदृष्टशक्तीनें जीवातें ॥ बाधोनि
केलें आपैतें[2] ॥ तिशी आवरावया मातें ॥ सामर्थ्य येथें आथिना ॥ ९५ ॥ जेवीं कां राजाज्ञा जाण ॥ राजा प्रतिपाळी आपण ॥ तेवीं
अदृष्टशक्तिउल्लंघन ॥ मी सर्वथा जाण करीना ॥ ९६ ॥ जीभ कापूनि देवासि वाहती ॥ तैसें नासिक न छेदिती ॥ तेवीं छेदीं कर्मस्थिती
॥ परी अदृष्टगती छेदीना ॥ ९७ ॥ अथवा विशेषेंसि निश्चितीं ॥ मी माया आलिंगिली निजशक्ती ॥ तो मी एकूची त्रिजगतीं ॥ बहुधा[3]
व्यक्तीं आभासें ॥ ९८ ॥ माझिया साक्षात्कारा आला ॥ जो जीवन्मुक्तत्व पावला ॥ तोही अदृष्टें बांधला ॥ वर्त्ते उगला देहगेहीं[4]
॥ ९९ ॥ जनकराजा निजपदीं नांदे ॥ शुक नागवा प्रारब्धें ॥ कळी लाविजे नारदें ॥ अदृष्टच्छंदें विनोदी ॥ ४०० ॥ वसिष्ठ पुरोहितत्व
करी ॥ भीष्म पहुडे शरपंजरीं ॥ याज्ञवल्क्या दोनी नारी ॥ अदृष्टाकरीं वर्त्तत ॥ १ ॥ यापरी गा अदृष्टशक्ती ॥ अनिवार वाढली त्रिजगतीं
॥ त्या जीव बांधले अदृष्टगतीं ॥ जेवीं गारोडियाहातीं वानर ॥ २ ॥ त्या जीवादृष्टें बहुधा व्यक्ती ॥ मी एक भासें त्रिजगतीं ॥ विश्वतश्चक्षु
या श्रुतीं[5] ॥ बहुधा मूर्ती मी एक ॥ ३ ॥ मृत्तिकेचीं गोकुळें केलीं ॥ नानानामाकारें पूजिलीं ॥ परी ते मृत्तिकाचि संचली ॥ तेवीं
सृष्टि झाली मद्रूपें ॥ ४ ॥ जेवीं एकुला आपण ॥ निद्रेसि देता आलिंगन ॥ स्वप्नीं देखे बहुविध आपण ॥ तेवीं मी जाण विश्वात्मा ॥ ५ ॥
जेवीं सूक्ष्म[6] वट[7]बीज केवळ ॥ त्यासि मीनल्या[8] भूमिजळ ॥ वाढोनियां अतिप्रबळ ॥ वृक्ष विशाळ आभासे ॥ ६ ॥ तेथ नाम रूप पुष्पफळ
॥ तें बीजची आभासे समूळ ॥ तेवीं जगदाकारें सकळ ॥ भासे केवळ चिदात्मा ॥ ७ ॥ जेकां मूळबीजाची गोडी ॥ तोचि स्वाद वाढला
वाढी ॥ कांडोकांडी स्वादुपरवडी ॥ अविकार[9] गोडी ऊंसाची ॥ ८ ॥ तेवीं मूळीं चिदात्माचि कारण ॥ तेथूनि जें जें तत्त्व झालें जाण
॥ तें तें निखळ[10] चैतन्यघन ॥ जग संपूर्ण चिद्रूपें ॥ ९ ॥ ऊंस सर्वांगें बीज सकळ ॥ बीजरूपें ऊंस सफळ ॥ तेवीं जगाचें चिन्मात्र मूळ
॥ जाण सकळ तें चिद्रूप ॥ ४१० ॥ बीज ऊंस दोनी एकरूप ॥ तैसा प्रपंच जाण चित्स्वरूप ॥ येचि अर्थीं अतिसाक्षेप ॥ रूपापूर्वक सांगत
॥ ११ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अस्मिन्निदं प्रोतमशेषमोतं पटो यथा तंतुवितानसंस्थः ॥ ॥ टीका ॥ ॥ यालागीं संसार जो समस्त ॥ माझ्याठायीं
ओतप्रोत ॥ मजवेगळें कांहीं येथ ॥ नाहीं निश्चित अणुमात्र ॥ १२ ॥ येचि अर्थींचा दृष्टांतू ॥ देवो उद्धवासि सांगतू ॥ जेवीं
कापुसाचे सूक्ष्मतंतू ॥ कांतोनि निश्चितू पट केला ॥ १३ ॥ आडवे तिडवे विणले तंतू ॥ त्यांसि वस्त्रनाम मृषा[11] मातू ॥ तेवीं संसारशब्द
हा व्यर्थू ॥ स्फुरे भगवंतू मी तद्रूपें ॥ १४ ॥ पाहतां सूतचि दिसे उघडें ॥ त्याचें नाम ह्मणती लुगडें ॥ प्रत्यक्ष चैतन्य स्फुरतां पुढें ॥

---

१ भारब्धशक्ती. २ आपल्या स्वाधीन. ३ अनेकरूपांत. ४ शरीररूपगृहांत. ५ मंत्रांत. ६ अत्यंत बारीक. ७ वडाचें बीं. ८ मिळाल्यास. ९ बदल न पडतां. १० केवळ. ११ व्यर्थ, खोटी.

त्यासि संसारू वेडे ह्मणताती ॥ १५ ॥ सुतावेगळें वस्त्र न दिसे॥ मज वेगळा प्रपच न भासे ॥ उद्धवा अप्राप्ताचें भाग्य कैसें ॥ मीचि नसें ह्मणताती ॥ १६ ॥ यापरी मी सर्वगत ॥ विश्वात्मा विश्वभरीत ॥ वृक्षदृष्टांतें प्रस्तुत[1] ॥ तुज म्यां येथ सांगीतलें ॥ १७॥ मज देखणा ज्याचा निर्धारू ॥ त्यासि मी केवळ सर्वेश्वरू ॥ मज अप्राप्त जो नरू ॥ त्यासि संसारू आभासे ॥ १८॥ जो सर्वात्मा सर्वेश्वरू॥ भ्रांतासि भासे भवतरुवरू ॥ त्याभवतरूचा विस्तारू॥ स्वयें श्रीधरू सांगत॥ १९॥ ॥ श्लोकार्ध॥ ॥ य एष संसारतरुः पुराणः कर्मात्मकः पुण्यफले प्रसूते ॥ २१ ॥ ॥ टीका॥ ॥ भ्रांतीस्तव भवतरुवरू[2] ॥ कर्माकर्मजळें वाढला थोरू ॥ जीर्ण[3] जुनाट अपरंपारू ॥ तो तरुवरू फळपुष्पीं ॥ ४२० ॥ त्याचें कोण बीज कोण मूळ॥ जेणें भ्रमले जीव सकळ ॥ कोण रस कोण फळ ॥ तें मी समूळ सांगेन ॥ २१ ॥ ॥ श्लोक॥ ॥ द्वे अस्य बीजे शतमूलस्त्रिनालः पंचस्कंधः पंचरसप्रसूतिः॥ दशैकशाखो द्विसुपर्णनीडस्त्रिवल्कलो द्विफलोऽर्कं प्रविष्टः ॥ २२॥ ॥ टीका ॥ ॥ भ्रममूल भूमीमाजी वडे ॥ पापपुण्यजोडी वाडे ॥ बीजपडतांचि वृक्ष विरूढे ॥ अग्रीं वाढे कल्पना ॥ २२ ॥ पान फुल न दिसे फळ॥ वेलाअंगीं देखा सकळ ॥ तेणेंचि वेला वाढ प्रबळ ॥ संसार सबळ कल्पनाग्रें ॥ २३ ॥ कर्माकर्मप्रवाहजळें॥ भरिलें अविद्येचें आळें ॥ अनंतवासना तेचि मूळें ॥ वृक्ष तेणेंबळें[4] ढळेना[5] ॥ २४ ॥ सूक्ष्म वासना कल्पकोडी ॥ अधोगती रुतल्या बुडीं॥ संकल्पविकल्पें चहूंकडीं ॥ पसरल्या बुडीं बुचबुचित ॥ २५ ॥ संचितक्रियमाण[6] वाफे भारी॥ सुबद्ध भरले जळेंकरी॥ भरिलेच मागुते भरी॥ प्रवाह यापरी वाहत ॥ २६ ॥ तेणें वृक्ष सबळ भारी ॥ नित्य नूतन[7] वाढी धरी॥ सगुण गुणाचे वाढीवरी॥ त्रिगुणअहंकारीं त्रिनाळ ॥ २७॥ त्रिगुणांची परवडी ॥ येरांची येरांमाजी मुरडी ॥ येरयेरांवरी बुडी ॥ मिसळे वाढीं वाढती ॥ २८॥ पंचभूतांच्या खांद्या थोरी॥ प्रपंच वाढल्या बाहेरी ॥ पसरल्या येरयेरांवरी ॥ मीनल्या परस्परीं वाढती ॥ २९ ॥ समूळ गर्भ[8] लाधूनि रुखा॥ मनोमय वाढलिया शाखा ॥ अग्रीं दशेंद्रियफांटे देखा ॥ तिच्या झुळका डोलती॥ ४३० ॥ त्या त्या शाखामाजी देखा ॥ दैवतें आलीं वस्ती सुखां ॥ करूनि कर्मांचा आंवांका ॥ आपुलाली शाखा ते धरिती॥ ३१॥ दशधा वायूची झडाड॥ तेणें तें डोलत दिसे झाड॥ त्यामाजी दोंपक्ष्यांचें नीडें[9] ॥ अतिगूढ अतर्क्या ॥ ३२ ॥ जेथूनि उपजे निजज्ञान॥ तेंचि नीड हृदयभुवन ॥ जीवू परमात्मा दोघेजण ॥ अतर्क्य पूर्ण वसताती ॥ ३३॥ जीवू जो देहाभिमानी[10] ॥ परमात्मा जो निरभिमानी ॥ इहीं दोघींजणीं मिळोनी ॥ हृदयभुवनीं नीड केलें ॥ ३४ ॥ जीव संकल्प

---

१ हल्लीं. २ संसार हाच मोठा वृक्ष. ३ मोडकळीस आलेला. ४ त्याच्या जोरावर. ५ हालत नाहीं. ६ पूर्वी केलेलें व करीत आहे तें. ७ नवा. ८ आश्रय. ९ घरटें. १० माझा देह किंवा मीं देह असे मानणारा.

विकल्पप्राप्ती ॥ परमात्मा निर्विकल्पस्थिती ॥ दोहींची हृदयामाजी वस्ती ॥ नीड निश्चितीं या हेतू ॥ ३५ ॥ पाहे पां वात पित्त श्लेष्मा[1] ॥ आंतरत्वचा भवद्रुमा ॥ वल्कलें ह्मणावयाचा महिमा[2] ॥ भक्तोत्तमा या हेतू ॥ ३६ ॥ गगनाहूनि वाढला वरुता ॥ शून्यासहित लांबला आरुता ॥ सैंध[3] पसरला सभोंवता ॥ दिशांच्या प्रांता सांडुनी ॥ ३७ ॥ एवं विस्तारलेनि ॥ विस्तारा वृक्ष उन्मळोनि मदभारा ॥ पंचविषयरसधारा ॥ अतिमधुरा वर्षतू ॥ ३८ ॥ श्रुति स्मृति हींच पानें ॥ त्यामाजी उगवलीं स्वर्गसुमनें[4] ॥ दीक्षितभ्रमर ज्यांकारणें ॥ अतिसत्राणें उडताती ॥ ३९ ॥ त्या वृक्षाचीं झांवळीं फळें ॥ सुखदुःखें दोनी एकेमेळें ॥ शेंडा धरोनि समूळें ॥ दोनीचि फळें पैं त्यासी ॥ ४४० ॥ जितुकीं सूर्यमंडळें भासती ॥ तितुकी जाण याची स्थिति ॥ सुखदुःखफळें तितुक्यांप्रती ॥ कर्मप्राप्ती देतसे ॥ ४१ ॥ सूर्यमंडळाआरुतें ॥ सांगीतलें भववृक्षातें ॥ चंद्रमंडळादि समस्तें ॥ भवभय तेथें नाहीं न ह्मणे ॥ ४२ ॥ मी सूर्यमंडळमध्यवर्ती ॥ त्या मज वेगळी जे स्फुरे स्फूर्ती ॥ तेथवरी भवभयाची प्राप्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ४३ ॥ सूर्याचें जें सूर्यमंडळ ॥ तेंही संसारामाजी केवळ ॥ जो न खाय या वृक्षाचें फळ ॥ तोचि रविमंडळभेदक ॥ ४४ ॥ वृक्षाचीं दोनीं फळें येथें ॥ दोहों फळांचे दोन भोक्ते[6] ॥ दोघे संसारा आतौते ॥ ऐक तूतें सांगेन ॥ ४५ ॥

॥ श्लोक ॥ ॥ अदंति चैकं फलमस्य गृध्रा ग्रामेचरा एकमरण्यवासाः ॥ हंसा य एकं बहुरूपमिज्यैर्मायामयं वेद स वेद वेदम् ॥ २३ ॥

॥ टीका ॥ ॥ दुःखफळाचे भोक्ते ॥ अत्यंत विषयासक्त जेचि ते ॥ गीध गृहस्थ कां जे येथें ॥ अविधीं[7] विषयातें सेविती ॥ ४६ ॥ ग्राम्यविषयीं अतितत्पर ॥ यालागीं बोलिजे ग्रामचर ॥ ग्राम्य गीध जैसे घार ॥ तैसे सादर विषयांसी ॥ ४७ ॥ जेवीं कां घार गगना चढे ॥ तेथूनि अमिषा उडी पडे ॥ तेवीं नरदेह पावोनि चोखडे ॥ विषयीं झडपडे झोंबती ॥ ४८ ॥ एवं विषयासक्त जे चित्तें ॥ जे अधोगतीतें पावते ॥ ते दुःखफळाचे भोक्ते ॥ जाण निश्चितें उद्धवा ॥ ४९ ॥ सांडोनियां गार्हस्थ्य[9] ॥ वनवासी वानप्रस्थ ॥ त्यांसचि सुखफल प्राप्त ॥ जाण निश्चित उद्धवा ॥ ४५० ॥ त्या सुखफळाचे विभाग ॥ ब्रह्मसदनादि इतर स्वर्ग ॥ कर्में करूनियां सांग ॥ जेथिंचा मार्ग चालिजे ॥ ५१ ॥ ब्रह्मचर्यें वेदाध्ययन ॥ गार्हस्थ्यें पूजिजे अग्निब्राह्मण ॥ वानप्रस्थाश्रमीं जाण ॥ वन्यफळभोजन वनवासी ॥ ५२ ॥ येणें क्रमेंचि क्रममुक्तिस्थान ॥ जिहीं ठाकिलें ब्रह्मसदन ॥ सुखफळाचे भोक्ते जाण ॥ ब्रह्मभुवननिवासी ॥ ५३ ॥ इतर स्वर्गीं सुखप्राप्ती ॥ जेथें आहे पुनरावृत्ती[10] ॥ ब्रह्मसदनीं पावल्या वस्ती ॥ त्यासि क्रमें मुक्ती होईल ॥ ५४ ॥ मूळाचें पद अरण्यवासी ॥ तेणें घेतलें वानप्रस्थासी ॥ तेथ नाहीं घेतला संन्यासी ॥ त्यासि वनवासी ह्मणों नये ॥ ५५ ॥ संन्याशासि निवासस्थान ॥

---

१ कफ. २ प्रौढी. ३ निकोप. ४ स्वर्ग हींच फुलें. ५ यज्ञकरणारे हेच भृंगे. ६ उपभोग घेणारे. ७ विधीचें उल्लंघन करून. ८ मांसावर. ९ गृहस्थाश्रम. १० पुनः जन्ममरणाचे फेरे.

वेदीं बोलिलें नाहीं जाण ॥ तिहीं स्वदेहाचें केलें दहन ॥ नेमलें स्थान त्यां नाहीं ॥ ५६ ॥ जे अविद्यादिकर्मप्रवृत्ती ॥ विरजाहोमीं स्वयें जाळिती ॥ ते भववृक्षाचीं फळें खाती ॥ हेही युक्ती घडेना ॥ ५७ ॥ जागृतींच्या पाहुण्यासी ॥ जेवूं धाडावें स्वप्नगृहासी ॥ तेवीं निरस्तसंकल्प[1] संन्यासी ॥ संसारसुखासी केवीं भोक्ते ॥ ५८ ॥ स्वकर्म जाळोनि विरजाहोमीं ॥ जिहीं साध्य[2] केलें ब्रह्माहंमस्मी[3] ॥ त्यांसि निवासस्थान कोण नेमी ॥ वनीं ग्रामीं नेमस्त ॥ ५९ ॥ बिऱ्हाड घ्यावया आकाशीं ॥ कोण घर नेमावें त्यासी ॥ तेवीं निरस्तसंकल्प संन्यासी ॥ त्यांच्या निवासासी कोण नेमी ॥ ४६० ॥ जे न्यस्तसंकल्प संन्यासी ॥ त्यांसि कोण ह्मणे अरण्यवासी ॥ मायिक[4] भववृक्षींच्या फळासी ॥ भोक्तेपणें त्यांसि ह्मणों नये ॥ ६१ ॥ मूळींचें पद अरण्यवासी ॥ तें भागा आलें वानप्रस्थासी ॥ वानप्रस्थ सदा वनवासी ॥ दुसऱ्या फळासी तो भोक्ता ॥ ६२ ॥ ऐक संन्याशाची सुखप्राप्ती ॥ येथें दोनी फळें मिथ्या जाणती ॥ मीचि एक त्रिजगतीं ॥ हे प्रतीति निश्चितीं त्यां झाली ॥ ६३ ॥ जो हा बहुरूपें विस्तारू ॥ तो मी चिदात्मा साचारू ॥ जाणोनि गुरुमुखें निर्धारू ॥ माझें सुख साचारू पावले ॥ ६४ ॥ ते मद्रूपें मज पावले ॥ माझेनि सुखें सुखरूप झाले ॥ सुखदुःखफळांतें मुकले[5] ॥ येवों चुकले संसारां ॥ ६५ ॥ मायामय मिथ्याभास ॥ जाणे तोचि वेदज्ञ विद्वांस ॥ त्यासीच बोलिजे परमहंस ॥ विश्वनिवासनिवासी ॥ ६६ ॥ ऐशी व्हावया पदप्राप्ती ॥ सुदृढ करावी गुरुभक्ती ॥ जेणें होय संसारनिवृत्ती ॥ तेंचि श्रीपती सांगत ॥ ६७ ॥ पहिली सांगितली सत्संगती ॥ तेणें जाहली मत्पदप्राप्ती ॥ तेचि अध्यायाच्या अंतीं ॥ करावी गुरुभक्ती सांगतू ॥ ६८ ॥ ॥श्लोक॥ ॥एवं गुरूपासनयैव भक्त्या विद्याकुठारेण शितेन धीरः ॥ विवृश्च्य जीवाशयमप्रमत्तः संपद्य चात्मानमथ त्यजाऽस्त्रम् ॥२४॥ ॥इतिश्री० द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ ॥टीका॥ ॥न करितां गुरुभजन ॥ नव्हे भववृक्षाचें छेदन[6] ॥ जरी कोटिकोटी साधन ॥ आनेआन केलिया ॥ ६९ ॥ भववृक्षातें छेदितीं[7] ॥ केवळ जाण गुरुभक्ती ॥ अरिनिर्दळणीं[8] निश्चितीं ॥ जेवीं निजशक्ती सुरांची[9] ॥ ४७० ॥ दूरी करावया दुरितें[10] ॥ जेवीं गंगाजळ समर्थ ॥ तेवीं भवभया भस्म करीत ॥ जाण निश्चित गुरुभक्ती ॥ ७१ ॥ करितां सत्यव्रतग्रहण ॥ पाप स्वयें जाय पळोन ॥ तेवीं करितां गुरुभजन ॥ भवनिर्दळण स्वयें होय ॥ ७२ ॥ हनुमंत देखतां दिठीं ॥ भूतें पळती बारावाटीं ॥ तेवीं गुरुभजनपरिपाठीं ॥ पळे उठाउठी भवभय ॥ ७३ ॥ मरत्या घडे अमृतपान ॥ तैं मरणासचि आलें मरण ॥ तेवीं करितां गुरुभजन ॥ जन्ममरण निमालें ॥ ७४ ॥ अंतीं[11] अवचटें हरि ह्म

---

[1] गेल्या आहेत मानसिक इच्छा ज्यांच्या असे. [2] सिद्ध केलें. [3] मी ब्रह्म आहें असें. [4] मायेनें कल्पिलेल्या. [5] सुटलें. [6] नाश. [7] छेदन करणारी. [8] शत्रूच्या नाशाविषयी. [9] देवांची. [10] पाप. [11] मरणकालीं.

णतां ॥ पापरा हाणे यमदूतां ॥ तेवीं सद्गुरूतें भजतां ॥ हाणे लाता भवभया ॥ ७५ ॥ करावया भवनिर्दळण ॥ मुख्य करावें गुरुभजन ॥ हेंचि श्रेष्ठ गा साधन ॥ सभाग्य जाण गुरुभक्त ॥ ७६ ॥ कोण सद्गुरु कैशी भक्ती ॥ ऐसें कांहीं कल्पिसी चित्तीं ॥ तेंही मी यथानिगुर्तीं[1] ॥ सांगेन तुजप्रती उद्धवा ॥ ७७ ॥ जो शब्दपर निष्णात ॥ शिष्यप्रबोधनीं समर्थ ॥ तोचि सद्गुरु येथ ॥ जाण निश्चित उद्धवा ॥ ७८ ॥ जो स्वरूपीं करी समाधान ॥ तोचि सद्गुरु सत्य जाण ॥ त्यावेगळे सद्गुरुपण ॥ व्हावया कारण असेना ॥ ७९ ॥ त्या सद्गुरुभजनाची परी ॥ तुज मी सांगेन निर्धारीं ॥ सर्वकर्मधर्मांचिया शिरीं ॥ जो कां करी गुरुभजन ॥ ४८० ॥ गुरु ह्मणों पित्यासमान ॥ तंव तो एकजन्मींचा जाण ॥ हा मायबापू सनातन ॥ जनक पूर्ण जगाचा ॥ ८१ ॥ गुरु मातेसमान पाहों ॥ तंव गर्भजन्में तिचा मोहो ॥ गर्भवास निवारी गुरुरावो ॥ अधिक स्नेहो पुत्रापरिस ॥ ८२ ॥ उदराबाहेर पडल्यापाठीं ॥ पुत्रमोहें माता उठी ॥ तें बाहेरील घालूनि पोटीं ॥ स्नेहाळ गोमटी गुरुमाता ॥ ८३ ॥ गुरु मानूं स्वामीसमान ॥ तरी तो निवारूं[2] न शके मरण ॥ सद्गुरु चुकवी जन्ममरण ॥ स्वामी संपूर्ण गुरुरावो ॥ ८४ ॥ गुरु मानूं कुलदेवता ॥ तंव तिसी कुलधर्मीं पूज्यता ॥ हा कुलदेवतेची देवता ॥ नित्य पूज्यता निजकर्मीं ॥ ८५ ॥ गुरु मानूं कल्पतरुसमान ॥ तंव कल्पतरु दे कल्पिलें दान ॥ सद्गुरु दे निर्विकल्पता पूर्ण ॥ अगाध दान निलोंभ ॥ ८६ ॥ चिंतामणी दे चिंतिल्या अर्था ॥ सद्गुरु करी चिंतेच्या घाता ॥ चित्ता मारूनि दे चैतन्यता[3] ॥ अक्षयता निजज्ञान ॥ ८७ ॥ कामधेनु दे दुभतें ॥ तें दे कामनेचपुरतें[4] ॥ सद्गुरु देत स्वानंदातें ॥ कामनेतें निर्दळी ॥ ८८ ॥ गुरुसमान ह्मणों सागरू ॥ तो गंभीर परी सदा क्षारू[5] ॥ स्वानंदें नित्य निर्भरू ॥ अतिमधुरू निजबोधें ॥ ८९ ॥ गुरु परब्रह्मसमान ॥ हेंही बोलणें किंचित् न्यून ॥ गुरुवाक्यें ब्रह्म सप्रमाण ॥ येरवीं ब्रह्मपण शब्दमात्र ॥ ४९० ॥ शब्दीं लोपूनि शब्दार्था ॥ गुरु प्रबोधी संविदर्था[6] ॥ त्याहूनि पूज्य परता[7] ॥ नाहीं सर्वथा त्रिलोकीं ॥ ९१ ॥ गुरु माता गुरु पिता ॥ गुरु स्वामी कुळदेवता ॥ गुरुवांचोनि सर्वथा ॥ आणिक देवता स्मरेना ॥ ९२ ॥ थोर मांडलिया सांकडें ॥ जैं गगन गडगडूनि पडे ॥ तैंही न पाहे आणिकाकडे ॥ नाम पढें गुरूचें ॥ ९३ ॥ कायां वाचा मनें प्राणें ॥ जो गुरुवांचोनि आन नेणे ॥ तैसाचि भजे अनन्यपणें ॥ गुरुभक्ति ह्मणणें त्या नांव ॥ ९४ ॥ पक्षिणीचीं अपक्ष[8] पिलें ॥ तीं तिसीच स्मरती सर्वकाळें ॥ तेवीं जागृती स्वप्नसुषुप्तिमेळें जो गुरुवेगळें स्मरेना ॥ ९५ ॥ मागां सांगीतलें भगवद्भजन ॥ आतां सांगसी गुरुसेवन ॥ नाहीं नाहीं एकविध निरूपण ॥ ऐसा विकल्प जाण न धरावा ॥ ९६ ॥ सद्गुरू तोचि माझी मूर्ती ॥ निश्चयेंसि जाण निश्चितीं ॥ विकल्प न धरा

---

[1] यथास्थित. [2] दूर करण्यास. [3] ईश्वरसरूपता. [4] जेवढी इच्छा करावी तेवढेंच. [5] खारट. [6] ज्ञानरूपवस्तूस. [7] दुसरा. [8] पंख न फुटलेलीं.

वा ये अर्थीं ॥ अनन्यभक्ती या नांव ॥ ९७ ॥ एकाग्रता जें गुरुभजन ॥ तेंचि माझें परम पूजन ॥ गुरूसि मजवेगळेपण ॥ कल्पांतीं जाण असेना ॥ ९८ ॥ गुरु भगवंत दोन्ही एक ॥ येणें भावें निजनिष्टंक ॥ भजे तोचि गुरुसेवक ॥ येरू तो देख अनुमानी ॥ ९९ ॥ माझिया ऐक्यंता[1] अतिप्रीतीं ॥ जेणें आदरिली गुरुभक्ती ॥ तोचि धनधान्य त्रिजगतीं ॥ भजती स्थिती ते ऐक ॥ ५०० ॥ करावया गुरुसेवे ॥ मनापुढें देह धांवें ॥ एकला करीन सर्वसेवे ॥ येवढें हांवें उद्यतू ॥ १ ॥ सेवेच्या दाटणी जाण ॥ अधिकचि होय ठाणमाण ॥ अंग अंगऊनि अंगवण ॥ सेवेमाजी जाण विसांवा त्यासी ॥ २ ॥ सेवेचिया आवडीं ॥ हा राहेना अर्ध घडी ॥ आवडीचे चढोंवढीं ॥ चढती गोडी गुरुभजनीं ॥ ३ ॥ नित्य करितां गुरुसेवा ॥ प्रेमपडिभरू नीच नवा ॥ सद्भावाचिया हांवा ॥ गुरुचरणीं जीवा विकिलें ॥ ४ ॥ आळस येवोंचि विसरला ॥ आरांणुकेचा[2] ठावो गेला ॥ गुरुसेवासंभ्रमें[3] भुलला ॥ घेवों विसरला विषयांतें ॥ ५ ॥ तहान विसरली जीवन[4] ॥ क्षुधा विसरली मिष्टान्न ॥ करितां गुरुचरणसंवाहन[5] ॥ निद्रा जाण विसरला ॥ ६ ॥ जांभयी यावयापुरती ॥ सवडी उरेना रिती ॥ तेथें निद्रेलागीं केउती ॥ राहावया वस्ती मिळेल ॥ ७ ॥ मुखीं सद्गुरूचें नाम ॥ हृदयीं सद्गुरूचें प्रेम ॥ देहीं सद्गुरूचें कर्म[6] ॥ अविश्रम[7] अहर्निशीं ॥ ८ ॥ मुखीं गुरुसेवेसि गुंतलें मन ॥ विसरला स्त्री पुत्र धन ॥ विसरला मनाची आठवण ॥ मी कोण हें स्फुरेना ॥ ९ ॥ नवल भजनाचा उत्सावो ॥ भजतां नाठव निजदेहो ॥ थोर सेवेचा नवलावो[8] ॥ निजात्मभावो गुरुचरणीं ॥ ५१० ॥ ऐसाही प्रारब्धमेळा ॥ अवचटें झालिया वेगळा ॥ न तुटे प्रेमाचा जिव्हाळा ॥ भजनीं आगळा सद्भावो ॥ ११ ॥ गुरूचा वसता जो ग्राम ॥ तेथेंचि वसे मनोधर्म ॥ गुरुध्यान तें स्वधर्मकर्म ॥ सेवासंभ्रम सांडीना ॥ १२ ॥ गुरुमूर्तीची सेवे[9] ज्यासी ॥ ते मूर्ति बैसली हृदयावकाशीं ॥ मग नानाभजनविलासीं ॥ आवडी कैशी भजनाची ॥ १३ ॥ चिन्मात्र पूर्णिमा गुरु पूर्णचंद्र ॥ तळीं आपण होय आर्त्त चकोर ॥ मग स्वानंदबोधाचे चंद्रकरें[10] ॥ निरंतर स्वयें सेवी ॥ १४ ॥ सद्गुरु सूर्य करी चिद्गगनीं ॥ आपण होय सूर्यकांतमणी ॥ त्याचेनि तेजें प्रज्वळोनी ॥ स्वभावें मायावनीं होळी करी ॥ १५ ॥ सद्गुरुकृपामृताच्या डोहीं ॥ स्वयें तरंगू होय तयेठायीं ॥ सबाह्य तद्रूपें पाही ॥ भावना हृदयीं भावितू ॥ १६ ॥ आपुला निजस्वामी जो सद्गुरू ॥ भावी निर्विकल्प कल्पतरू ॥ त्याचे छाये बैसोनि साचारू ॥ मागे वरू गुरुभक्ती ॥ १७ ॥ सद्गुरु कामधेनु जाणा ॥ वत्सरूपें भावी आपणा ॥ आवडीं चाटवी बोधरसेना[11] ॥ स्वानंदपान्हा ॥ सेवितू ॥ १८ ॥ तुझ्या सकळवृत्तींची सेवा ॥ म्यांचि करावी गा देवा ॥ ऐसें प्रार्थूनि सद्भावा ॥ हा वरू मज द्यावा कृपानिधी ॥ १९ ॥ तेथ संतोषोनि गुरुनाथें ॥ वरू दीधला वरदहस्तें ॥ हर्षें

---

[1] ऐक्यप्राप्तीकरितां. [2] विसाव्याचा. [3] गुरुसेवेच्या गर्दीत. [4] पाणी. [5] रगडणें. [6] काम. [7] विसावाच नाहीं. [8] महिमा. [9] अभ्यास. [10] चंद्राचे किरण. [11] ज्ञानरूपजोंध.

वोसंडत चित्तें ॥ धन्य मी वरातें लाधलों ॥ ५२० ॥ ऐशी लाहोनि वरदस्थिती ॥ तेंचि सेवा आदरी प्रीतीं ॥ अतिधन्य भावार्थ गुरुभक्ती ॥ नाना उपपत्ती गुरुभजनीं ॥ २१ ॥ सद्गुरूचीं दहाही करणें ॥ मनबुद्धि अंतःकरणें ॥ क्रियामात्र मीचि होणें ॥ ऐसें जीवें प्राणें भावितू ॥ २२ ॥ सद्गुरू जेजे भोग भोगिती ॥ ते मीचि होईन निश्चितीं ॥ एवं मीचि एक गुरुभक्ती ॥ दुजी स्थिती हों नेदी ॥ २३ ॥ सद्गुरु जेथें उभे ठाकती ॥ तें पांयातळीं मीचि क्षिती ॥ सद्गुरु जेथें जेथें चालती ॥ ते मार्गींची माती मी होईन ॥ २४ ॥ चरणक्षालनासि समस्त ॥ मीचि उदक मीचि तस्तें[2] ॥ मीचि चरण क्षालित ॥ चरणतीर्थ मी सेवीं ॥ २५ ॥ सद्गुरुचरणींचे रजःकण ॥ मीचि होईन आपण ॥ सद्गुरु करिती आरोहण ॥ तें सिंहासन होईन मी ॥ २६ ॥ सद्गुरूचें सिंहासन ॥ तें मीचि होईन आपण ॥ त्यावरी बैसतें आसन ॥ तेंही जाण होईन मी ॥ २७ ॥ सद्गुरूसि स्नेह लागे ॥ तें मी होईन सर्वांगें ॥ गुरूसि वोटंगावया[3] पुढें मागें ॥ मृदुळी सर्वांगें मी होईन ॥ २८ ॥ मनींचा ऐसा आशंका[4] ॥ सद्गुरूच्या सिद्ध पादुका ॥ त्या मी होईन देखा ॥ नेदी आणिकां आतळों ॥ २९ ॥ मी होईन गुरूच्या श्वासोच्छ्वासा ॥ वेगीं बाहेर निघेन नासां[5] ॥ गुरु घेती ल ज्या सुवासा ॥ त्या त्या विलासा मी होईन ॥ ५३० ॥ गुरु अवलोकिती रूपादर्शीं ॥ त्या दृश्यांचो मी होईन सृष्टी ॥ गुरूची देखती देखणीं पुष्टी ॥ ते मी उठाउठीं होईन ॥ ३१ ॥ गुरूसि आवडतें निरूपण ॥ तें मी श्रवणीं होईन श्रवण ॥ अथवा रुचेल जें कीर्तन ॥ ते गाता[6] गायन मी होईन ॥ ३२ ॥ सद्गुरुमुखींची जे कथा ॥ ते मी आदरें होईन तत्त्वतां ॥ अक्षरीं अक्षर अक्षरार्था ॥ मीचि सर्वथा होईन ॥ ३३ ॥ सद्गुरु जेथ करिती स्नान ॥ तें मी अंगस्पर्शनाचें जीवन ॥ गुरु करिती जें आचमन ॥ तेंही जाण होईन मी ॥ ३४ ॥ गुरु परिधान[7] करिती वास[8] ॥ तें मी होईन सुवास ॥ गुरुचरण पुसावयास ॥ तेंही धौतवास मी होईन ॥ ३५ ॥ गुरूसि करिती विलेपन ॥ तें मी होईन शुद्ध चंदन ॥ चरणीं अर्पितें सुमन ॥ मीचि जाण होईन ॥ ३६ ॥ सद्गुरु करिती भोजन ॥ तेथ मीचि ताट मीचि अन्न ॥ रसस्वाद पक्कान्न ॥ पंक्तिकारु जाण मी होईन ॥ ३७ ॥ मथोनियां दहीं मथित ॥ सारांश तें नवनीत[9] ॥ वैराग्यअग्निसंतप्त ॥ भोजनीं मुख्य घृत मी होईन ॥ ३८ ॥ परिपाकीं स्वादिष्ठपण सर्वां चवींचें कारण ॥ मी होईन वरी लवण ॥ न्यून तें पूर्ण गुरु करिती ॥ ३९ ॥ गुरु करिती प्राशन ॥ तें मी होईन जीवन ॥ सद्गुरूचें धालेपण ॥ ते उद्गार जाण मी होईन ॥ ५४० ॥ गुरूसि जेंजें गोड लागे ॥ तेते पदार्थ मी होईन अंगें ॥ सद्गुरूसि ज्याची रुचि लागे ॥ तें मीं सर्वांगें होईन ॥ ४१ ॥ सद्गुरु आंचवती जेथ ॥ मी उष्णोदक मी तस्त ॥ शिंतोडे लागती जेथ जेथ ॥ तेही समस्त होईन मी ॥ ४२ ॥ गुरूसि अर्पिती जें फळ ॥ तें मी होईन तत्काळ ॥ गुरु अर्पणें सफळ ॥ फळाचें फळ मी होईन ॥ ४३ ॥

---

१ आश्रय. २ पाणी सांडण्याचें पात्र. ३ लोळण्यास, टेंकण्यास. ४ उत्कट इच्छा. ५ नाकाबाहेर. ६ गाणारा. ७ नेसतात. ८ वस्त्र. ९ लोणी.

सद्गुरूचें घ्यावया उच्छिष्ट[1] ॥ मजचि मोठा लवलवाट ॥ मांजर होऊनियां ताट ॥ चरचराट चाटीन मी ॥ ४४ ॥ गुरु करिती करोद्वर्तनें[2] ॥ तो मी होईन सुगंधचंदन ॥ मुखवासा सुवासपण[3] ॥ मीचि जाण होईन ॥ ४५ ॥ फळाशा फोडूनि फोडी ॥ वासनाशिरा काढूनियां विडी ॥ रिघोनियां सद्गुरूच्या तोंडीं ॥ तांबूलगोडी मी होईन ॥ ४६ ॥ जाळूनियां अहंकठिणपणा[4] ॥ मी होईन सोहं शुद्धचुना ॥ शांतिपरिपक्क लागोनि पाना ॥ सद्गुरुवदना पावेन ॥ ४७ ॥ सर्वसारांचें शुद्धसार ॥ तो होईन खदिरसार[5] ॥ सद्गुरुमुखीं रंगाकार ॥ मीचि साचार शोभेन ॥ ४८ ॥ सद्गुमुखीचें पवित्र पीक ॥ वरच्यावरी मी घेईन देख ॥ पिकदाणीचे मुखत्वें मुख ॥ आवश्यक मी होईन ॥ ४९ ॥ गुरूचा उगाळू मी होईन ॥ पीक पिकदाणी धरोनि जाण ॥ चवरी जी मक्षिकानिवारण[6] ॥ ती मी होईन निजांगें ॥ ५५० ॥ गुरूचा उगाळू[7] घ्यावया देख ॥ मी होईन आगळा सेवक ॥ नातरीं लडिवाळ बाळक ॥ गुरुअंकीं देख मी होईन ॥ ५१ ॥ माझिया गुणांची सुमनमाळा ॥ आवडीं घालीन गुरूच्या गळां ॥ गुरु झेलिती लीलाकमळा ॥ त्या करकमळा मी होईन ॥ ५२ ॥ गुरूसी नीराजन[8] करिती ॥ तें मी निजतेजें उजळीन ज्योती ॥ गुरु जेणें प्रकाशें चालती ॥ ते दीप्तिदीपिका मी होईन ॥ ५३ ॥ जीवभावाचें निंबलोण ॥ गुरूसी मी करीन आपण ॥ इडापीडा मी घेईन जाण ॥ तें लोणलक्षण मजलागीं ॥ ५४ ॥ मी छत्र मी छत्राकारू ॥ मी चवर मीचि चवरधरू ॥ मीचि विंजणा[9] मीचि वारू ॥ गुरूचा परिवारू मी होईन ॥ ५६ ॥ गुरु करिती आरोहण ॥ तो मी होईन श्यामकर्ण[10] ॥ गुरूचा भरभार साहावया जाण ॥ वाजीवाहन होईन मी ॥ ५६ ॥ गुरुपुढें मी वाट सुभटू ॥ गुण वर्णीन मी गर्जता भाटू ॥ गुरुगृहीं शांतिपाठू ॥ पढता भटू मी होईन ॥ ५७ ॥ मीचि बारी मी कऱ्हेरो ॥ मी हडपी मी फुलारी ॥ मी झाडणा मी खिंल्लारी[11] ॥ मी द्वारपाळ द्वारीं होईन ॥ ५८ ॥ गुरु जेथें देती अवधान ॥ तेते कळा मी होईन जाण ॥ गुरुवेगळा अर्धक्षण ॥ गेला प्राण तरी नवचें ॥ ५९ ॥ गुरु सांगती जे कथा ॥ तेथ मी होईन सादर श्रोता ॥ गुरुकृपा मी होईन वक्ता ॥ निजात्मका बोलका ॥ ५६० ॥ गुरु गंभीर दान देतां ॥ तेथ दीन मी होईन मागता[12] ॥ मी होईन दान वांटितां ॥ सादर एकांता होईन ॥ ६१ ॥ गुरु बैसती सावकाश ॥ तैं मी होईन अवकाश ॥ गुरुहृदयींचें चिदाकाश ॥ निरवकाश ॥ मी होईन ॥ ६२ ॥ गुरु बैसती आपण ॥ तें मी होईन सुखासन ॥ तें मीचि वाहेन आपण ॥ भोई होईन चालणा[13] ॥ ६३ ॥ स्वामी सूनियां दिठी ॥ चपळ पाउलांच्या नेटीं ॥ चालेन मी उठाउठो ॥ धुरेसि[14] गोठी सांगेन ॥ ६४ ॥ आंतुले दृष्टीं पुढिले चालीं ॥ गोवींचें पाउल उगवोनि घाली ॥ उंच नीच भूमी

---

१ सेवून उरलेलें, उष्टें. २ करशुद्धि. ३ तांबूल. ४ अहंकाराचा कठिणपणा. ५ काथ. ६ माशा वारण्याकरितां. ७ पीक. ८ आरती. ९ पंखा. १० सुलक्षण घोडा. ११ गुरें राखणारा. १२ याचक. १३चांगला चालणारा. १४ पुढारीपणाच्या.

ची खोली ॥ चुकवूनि चाली चालणें ॥ ६५ ॥ संकल्पविकल्पांचे झोंक ॥ ज्यांत वाम सव्य अनेक ॥ ते आंवरूनियां देख ॥ पाहत
श्रीमुख चालेन मी ॥ ६६ ॥ न चुकतां निजमार्ग ॥ न्याहाळूनि धुरेचें अंग ॥ न करितां आणिकांचा पांग ॥ भोई चांग मी होईन ॥ ६७ ॥
सुखासनाचेनि पडिपाडें ॥ चालतां सुख अधिक वाढे ॥ मागील सूड काढूनि पुढें ॥ सुखसुरवाडें चालेन ॥ ६८ ॥ चढणें पडणें अडखुळणें ॥
दडकणें फडकणें अडकणें ॥ सांभाळूनियां निष्ठेनें ॥ टणकपणें चालेन ॥ ६९ ॥ उरीं शिरीं खांदीं कोंपरीं ॥ मागील सूड पुढें करी ॥
दृष्टी ठेऊनि पायांवरी ॥ निर्विकारी चालेन ॥ ५७० ॥ आटी मुरडी उलट लोट ॥ धापकांप पडे मेट ॥ आधार धरूनि सुभट ॥ चढती वाट
चालेन ॥ ७१ ॥ उल्लंघूनि कामाचा पाट ॥ आंवरूनि क्रोधाचा लोट ॥ चुकवूनि खोलव्याची वाट ॥ धुरेसकट मी चालेन ॥ ७२ ॥
ममतेची ओल प्रबळ ॥ तेठायीं रुती गुंती सबळ ॥ तेथ न माखतां पाऊल ॥ लंघूनि तत्काळ जाईन ॥ ७३ ॥ मोहनदीची थोर कऱ्हाडी ॥
माजी समळ जळ प्रबळ वोढी ॥ शिंतोडा न लगतां धूर मी काढीं ॥ परापरथडी तत्काळ ॥ ७४ ॥ दृष्टी ठेवूनि स्वामीकडे ॥ सवेग
चालतां मागेंपुढें ॥ भोई होईन दोहींकडे ॥ सूड सुडें काढान ॥ ७५ ॥ एवं मीचि मी मागें पुढें ॥ सुखासनाचेनि सुरवाडें ॥ स्वामीची
निजनिद्रा न मोडे ॥ तेणें पडिपाडें चालेन ॥ ७६ ॥ उच्छिष्टअन्नाचा पोसणा ॥ आठांप्रहरांचा जागणा ॥ सदा गुरु गुरु करीत जाणा ॥
गुरुद्वारीं सुणा मी होईन ॥ ७७ ॥ विजाती देखोनि नयना ॥ सोहंभावें भुंके जाणा ॥ भजनथाळोरां बैसणा ॥ गुरुदारीं सुणा मी
होईन ॥ ७८ ॥ ऐसऐशियां भावना ॥ गुरुसेवेलागीं जाणा ॥ अतिशयें आवडी मना ॥ नानाविवंचना विवंची ॥ ७९ ॥ जरी दैववशें दूर
गेला ॥ परी तो भावबळें जवळी आला ॥ गुरुसेवे जो जीवें विकला ॥ तो शास्त्र पावला सद्विद्या ॥ ५८० ॥ असो जवळी अथवा
दूरी ॥ परी गुरुभक्तीची आवडी भारी ॥ जीवित्व ठेविलें सेवेवरी ॥ गुरूच्या द्वारीं भजनासी ॥ ८१ ॥ ऐसा गुरुभक्तीसि सादर ॥ चढत्या
आवडीं एकाग्र ॥ तेंचि सद्विद्यालक्षण शस्त्र ॥ गुरुकृपाकुठार पैं पावे ॥ ८२ ॥ लावोनि वैराग्याचें साहाणे ॥ प्रत्यावृत्ती बोधकपणें ॥
शस्त्र केलें जी सैंणाणें[11] ॥ तीक्ष्णपणें अतिसज्ज ॥ ८३ ॥ शस्त्र सजिलें निजदृष्टीं ॥ दृढ धरिलें ऐक्याचे मुष्टीं ॥ शस्त्र आणि शस्त्रधरा एकी
गांठीं ॥ करूनि उठी भवछेदा[13] ॥ ८४ ॥ दृढ साधोनियां आवो ॥ निजबळें घालितां घावो ॥ झाला भववृक्षाचा अभांवो[14] ॥ घायेंवीण
पहाहो छेदिला ॥ ८५ ॥ जीवीं विषयवासना ॥ ते छेदावी निजकल्पना ॥ तोचि भववृक्षाचा छेदू जाणा ॥ सावधाना धृतिबळें[15] ॥ ८६ ॥

---

१ डावे उजवे. २ गुरूचें तोंड. ३ गरज. ४ उमेदीनें. ५ उशी. ६ ओलांडून. ७ दरड. ८ कुत्रा. ९ आयुष्य. १० कुऱ्हाड. ११ चांगलें धार लावलेलें. १२ मुठींत. १३ संसारनाशाकरितां. १४ नाहींपणा. १५ बुद्धीच्या बळानें.

झालिया चैतन्यपदप्राप्ती[1] ॥ सकळ साधनें सहजें जाती ॥ भोजनीं झालिया पूर्ण तृप्ती ॥ ठायींच राहतीं पक्कान्नें ॥ ८७ ॥ परमतृप्ती उलथल्या पोटीं ॥ अमृतही न लावी ओंठीं ॥ तेवीं ब्रह्मपद पावल्यापाठीं ॥ साधन आटाटी सांडती ॥ ८८ ॥ हाचि भावो धरोनि चित्तीं ॥ मागां सांगीतलें तुजप्रती ॥ सांडीं साधनव्युत्पत्ती ॥ प्रवृत्तिनिवृत्तीसमवेत ॥ ८९ ॥ पावलिया परब्रह्म ॥ मिथ्या वेदोक्त सकळ कर्म ॥ मिथ्या आश्रमादि वर्णधर्म ॥ हें त्यागितें वर्म कर्माचें ॥ ५९० ॥ स्वप्नीं चालतां लवडसवडीं ॥ जो अडखळूनि पडला आडीं ॥ तो जागा होऊनि आपणा न काढी ॥ तैशी वृथा वोढी साधनीं ॥ ९१ ॥ पीक आलिया घुमरी[3] ॥ ते शेतीं कोणी नांगर न धरी ॥ गजांतलक्ष्मी आलिया घरीं ॥ भीक दारोदारीं कोण मागे ॥ ९२ ॥ हातीं लागलिया निधान ॥ नयनीं कोण घाली अंजन ॥ साधलिया निजात्मज्ञान ॥ वृथा साधन कोण सोशी ॥ ९३ ॥ अंगीकारोनि ज्ञानशक्ती ॥ केली संसारनिवृत्ती ॥ ते हे त्यागाची निजवृत्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ९४ ॥ अग्नीस्तव[4] निपजे अन्न ॥ तें वाफ न जिरतां जाण ॥ पोळी अवशेष तापलेपण ॥ रांधितेंही जाण चवी नेणें ॥ ९५ ॥ आंबया पाडू लागला जाण ॥ तरी अंगीं असे आम्लपण ॥ सेजेसि मुरालिया मघमघोन ॥ न चांखतां घ्राणें[5] चवी सांगे ॥ ९६ ॥ सेजे मुरल्याची गोठी ॥ तेथ न व्हावी द्वैताची दिठी ॥ येरयेरां जाहलिया भेटी ॥ दोनि शेवटीं टिकाळती ॥ ९७ ॥ टिकाळलीं सेजे घालिती ॥ तत्संगें आणिकें नासती ॥ निश्चळ राहिल्या एकांतीं ॥ परिपारकपूर्ती घ्राण सांगें ॥ ९८ ॥ शत्रु जिणोनियां कडाडी ॥ रणांगणीं उभवितां गुढी[6] ॥ शस्त्रेंसि कवच जंव न फेडी ॥ तंव विश्रांति गाढी न पाविजे ॥ ९९ ॥ गरोदरेसि प्रसूति होये ॥ पुत्रजन्में सुखावली ठाये ॥ तेही बारांबळी[7] जैं पाहे ॥ तैं भोगूं लाहे पुत्रसुख ॥ ६०० ॥ पुरुष निर्मोनियां जाये ॥ त्या देहांचें दहन होये ॥ तरी अवशेष सूतक राहे ॥ तें गेलिया होये निजशुद्धी ॥ १ ॥ तेवीं जावोनियां अज्ञान ॥ उरला जो ज्ञानाभिमान ॥ तोही त्यागिलिया जाण ॥ चित्समाधान स्वानंदें ॥ २ ॥ खैराचा शूळ तत्त्वतां मारी ॥ मा चंदनाचा काय आन करी ॥ तेवीं अभिमान दोहींपरी ॥ बाधकता धरी ज्ञानाज्ञानें ॥ ३ ॥ लोखंडाची बेडी तोडी ॥ आवडीं सोनियाची जडी ॥ चालतां तेही तैशीच आडी ॥ बाधा रोकडी जैशी तैशी ॥ ४ ॥ ब्रह्माहमस्मि हा अभिमान ॥ शुद्ध ब्रह्म नव्हे जाण ॥ अहंपणें तेंही कठिण ॥ तेंही लक्षण अवधारी ॥ ५ ॥ जळापासोनि लवण होये ॥ तें जळींचें जळीं विरोनि जाये ॥ मोतीं झालें तें कठिण पाहे ॥ उदकीं न जाये विरोनी ॥ ६ ॥ मुक्तपणें मोला चढलें ॥ तें वनिताअधरीं फांसा पडिलें ॥ मुक्तचि परी नासा आलें ॥ कठिण केलें अभिमानें ॥ ७ ॥ तेवीं अज्ञान अभिमान आहे ॥ तो सर्वथा तत्काळ जाये ॥ ज्ञानाभिमान कठिण पाहे ॥ गों

---

१ साक्षात्कार. २ व्यर्थ. ३ आपोआप. ४ विस्तवावर. ५ नाक. ६ झेंडा. ७ बाराव्या दिवसाचा एक विधी. ८ मरून. ९ स्त्रियांच्या ओठांवर.

विताहे मुक्तत्वें ॥८॥ अपक्क घटू तत्काळ गळे ॥ तो पृथ्वीचा पृथ्वीस मिळे ॥ भाजिलें खापर अतिकाळें[1] ॥ पृथ्वीस न मिळे कठिणत्वें ॥ ९ ॥ प्रपंच अज्ञानें झाला लाठा ॥ ज्ञानअज्ञानांचा सेलबांठा ॥ फेडूनि कांटेन कांटा ॥ दोनी आव्हाटा सांडावे ॥ ६१० ॥ जरी सांडिले वाटेवरी ॥ तरी आपणासीचि बाधु करी ॥ यालागीं सांडावे दूरी ॥ निजनिर्धारीं हा त्यागू ॥ ११ ॥ जेथवरी अहंपण ॥ तेथवरी बद्ध कथा जाण ॥ शुद्धाशुद्ध अभिमान ॥ निःशेष सज्ञान सांडिती ॥ १२ ॥ उद्धवा तुज करितां माझी भक्ती ॥ झाली माझ्या पदाची प्राप्ती ॥ आतां नानासाधन उपपत्ती ॥ शास्त्रयुक्ती कां करिसी ॥ १३ ॥ सद्भावें करितां माझें भजन ॥ तूं झालासि ब्रह्मसंपन्न[2] ॥ आतां त्रिगुणात्मक सर्वसाधन ॥ शास्त्रश्रवणेंसी सांडीपां ॥ १४ ॥ तस्मादुद्धव उत्सृज्य ॥ ये श्लोकींचें हें त्यागबीज ॥ विशद सांगीतलें म्यां तुज ॥ निजगुज हृदयस्था ॥ १५ ॥ सकळां साधनां श्रेष्ठ साधन ॥ शिष्यासि सद्गुरूचें भजन ॥ तेणें पाविजे ब्रह्मसमाधान ॥ सत्य जाण उद्धवा ॥ १६ ॥ जो भावें भजे गुरुचरणीं ॥ तो नांदे सच्चिदानंद भुवनीं ॥ हे सत्यसत्य माझी वाणी ॥ विकल्प कोणीं न धरावा ॥ १७ ॥ ऐसें बोलोनि श्रीहरी ॥ आवडीं चारी बाह्या[3] पसरी ॥ उद्धवातें प्रीति करीं ॥ हृदयीं धरी स्वानंदें ॥ १८ ॥ देवें सद्भक्ता[4] क्षेमें[5] दीधलें ॥ निजहृदयीं हृदय एक झालें ॥ सांगणें पुसणें सहज ठेलें ॥ बोलणें बोलें प्राशिलें ॥ १९ ॥ चहूं वाचां पडलें मौन ॥ जीवू विसरला जीवपण ॥ एका तुष्टला जनार्दन ॥ स्वानंदघन वर्षला ॥ ६२० ॥ तोचि सद्भक्तीं भावार्थ ॥ विशद बोलिला बाराव्यांत ॥ निजभावें श्रीकृष्णनाथ ॥ नित्यतृप्त भाविकां ॥ २१ ॥ निजात्मप्राप्तीचें कारण ॥ केवळ भावार्थचि जाण ॥ भावार्थाविगळें साधन ॥ वृथा जाण परिश्रमू ॥ २२ ॥ जप तप यज्ञ दानें ॥ भावार्थां[6]लागीं करणें ॥ तो भावार्थ लाहिजे[7] जेणें ॥ धन्य जिणें तयाचें ॥ २३ ॥ धन्य नरदेहाची प्राप्ती ॥ धन्य साधूची संगती ॥ धन्यधन्य ते भावार्थी[8] ॥ जे भगवद्भक्तीं रंगले ॥ २४ ॥ जे रंगले भगवत्पथा ॥ त्यांचें चित्त विसरलें विषयावस्था ॥ ते हंसगीताची कथा ॥ उद्धव कृष्णनाथा पुसेल ॥ २५ ॥ तें अतिरसाळ निरूपण ॥ केवळ शुद्ध ब्रह्मज्ञान ॥ श्रोतां व्हावें सावधान ॥ एका जनार्दन विनवितू ॥ ६२६ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंदे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीकायां द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ मूळश्लोक ॥ २४ ॥ ओंव्या ॥ ६२६ ॥ मिळून एकंदर संख्या ॥ ६५० ॥ ॥ॐ॥ ॥ॐ॥ ॥ॐ॥

---

१ फार दिवसांनींही. २ ज्ञानी. ३ हात. ४ उद्धवास. ५ क्षेमालिंगन. ६ भक्तीकरितां. ७ प्राप्तकरून घेतला. ८ भक्तिमान.


अध्याय १३ वा.
श्रीकृष्ण.
उद्धव.
नारद.
हंस

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ओंनमो जी अनादि हंसा ॥ हंसरूपा जीं जगदीशा ॥ तूं सद्गुरु परमहंसा ॥ परमपरेशा परिपूर्णा ॥ १ ॥ उभय पक्षेंवीण देख ॥ तुझे शोभती दोनी पांख ॥ शुद्ध सत्वाहोनि चोंख ॥ स्वरूप सुरेख सोज्ज्वळ ॥ २ ॥ हंस बोलिजे शुभ्रवर्ण ॥ तुझी हंसता विलक्षण ॥ सांडोनियां सकळ वर्ण ॥ हंसपण तुज शोभे ॥ ३ ॥ विकासल्या सुवर्णपंकजें ॥ इतरहंसीं तेथें क्रीडिजे ॥ प्रेमें उत्फुल्लित कमळ जें ॥ तुवां क्रीडिजे तेठायीं ॥ ४ ॥ मानससरोवरीं वस्ती हंसासी ॥ तूं मानसातीतरहिवासी ॥ हंसा उत्पतन वन आकाशीं ॥ तुझें चिदाकाशीं[3] उड्डाण ॥ ५ ॥ विवेकचुंचीचिया मुद्रा ॥ स्वभावें निवडिसी क्षीरनीरां[4] ॥ मग सांडोनियां असारा ॥ शुद्ध सारा सेविसी ॥ ६ ॥ ऐशिया हंसा जी सुकुमारा ॥ मुक्तमोतियांचा तुज चारा ॥ जीं कां वैराग्यैंशुक्तिद्वारां ॥ चित्सागरामाजी झालीं ॥ ७ ॥ सर्वथा नातळोनि क्षितीं ॥ निरालंब मार्गाप्रती ॥ चालणें चालसी हंसगती ॥ हे गमनशक्ती अभिनव ॥ ८ ॥ अभिन्नस्वभावतां निजअंशीं ॥ चिन्मात्रवागीश्वरी तूं वाहसी ॥ हंसवाहिनी आख्या ऐशी ॥ तुझेनि अंशेंसी तीस झाली ॥ ९ ॥ तुझेनि चालविल्या सरस्वती चाले ॥ तुवां बोलविल्या वेदू बोले ॥ तुवां चेतविल्या प्राण हाले ॥ तुझेनि वाचाळें वाग्देवी वदे ॥ १० ॥ झाली वागीश्वरी वाग्देवता ॥ तिये तुझेनि वाचाळता ॥ जेवीं कां वेणु वाजे मधुरता ॥ परी वाजविता तो भिन्न ॥ ११ ॥ एवं वाच्य वचन वक्ता ॥ तूंचि वागीश्वरी तूंचि वदता ॥ आपुल्या हंसरूपाची कथा ॥ स्वभावतां बोलविसी ॥ १२ ॥ बोलावया महाकवीच्याठायीं ॥ तुवां वागीश्वरी घोतिली पाही ॥ ते हंसरूपाची नवाई ॥ अभिनव कांहीं बोलवी ॥ १३ ॥ तो तूं सर्वभूतीं समान ॥ हंसस्वरूपी जनार्दन ॥ त्याचे वंदितां निजचरण ॥ जन्ममरण पळालें ॥ १४ ॥ आपभयें पळतां त्यासी ॥ लपणी मिळाली भ्रमापाशी ॥ जन्मामागें मरणासी ॥ ठावू वसतीसी दीधला ॥ १५ ॥ यालागीं भ्रमामाजी जो पडला ॥ तो जन्ममरणांसि आंतुडला ॥ मग न सुटे कांहीं केल्या ॥ यंत्रीं पडला भ्रमचक्रीं ॥ १६ ॥ तेथ राहाटमाळेच्यापरी ॥ जन्ममरणांचे पडे यंत्रीं ॥ एकाची सोस भरोवरी ॥ तंव दुसरें शिरीं आदळे ॥ १७ ॥ तें निस्तरावया जन्ममरण ॥ तुज सोहंहंसाचें स्मरण ॥ जैं कां करी सावधान ॥ भ्रममोचन तैं होय ॥ १८ ॥ तो तूं परमात्मा परमहंसू ॥ परब्रह्मैक पूर्ण परेशू ॥ ब्रह्मपुत्रांसि उपदेशू ॥ करावया हंसू झालासी ॥ १९ ॥ तें हंसमुखीचें निरूपण ॥ बोलावया बोलका श्रीशुक जाण ॥ त्या वचनार्थातें सेवून ॥ परमपावन परीक्षिती ॥ २० ॥ त्या हंसाचें हंसगीत ॥ कृष्ण उद्धवासि सांगत ॥ श्रोतां द्यावें दत्तचित्त ॥ अचुंबित निजबोधू ॥ २१ ॥ तो हा तेरावा अध्यावो ॥ अत्यादरें सांगे देवो ॥ तें ऐकतां उद्धवो ॥ विषयविलयो देखेल ॥ २२ ॥ तेरावे अध्यायीं निरूपण ॥ सत्ववृद्धीचें कारण ॥ विद्याउद्धवक्रमू जाण ॥

---

१ चांगलें- २ क्रीडा करणें- ३ चैतन्यरूपआकाशांत- ४ दूध आणि पाणी- ५ वैराग्यरूपशिंपद्वारानें- ६ वाणी- ७ प्रकाशित केली- ८ मिळाला- ९ विषयाचा लय-

अतिसुलक्षण सोपारा ॥ २३ ॥ हंसइतिहासाचा योगू ॥ स्वयें सांगेल श्रीरंगू ॥ तेणें चित्तासि विषयवियोगू ॥ सुगम सांगू सांगेल ॥ २४ ॥ द्वादशाध्यायाचे अंतीं ॥ करूनि सद्गुरूची भक्ती ॥ पावोनि विद्याकुठारप्राप्ती ॥ छेदावया निश्चितीं जीवाशयो ॥ २५ ॥ छेदिल्या जीवाचें जीवपण ॥ सकळ सांडावें साधन ॥ हें उद्धवें ऐकूनि जाण ॥ प्रतिवचन नेदीच ॥ २६ ॥ उद्धवाचे जीवींचा भावो ॥ सखोलहृदयींचा अभिप्रावो ॥ सकळ ओळखोनियां सद्भावो ॥ स्वयें श्रीकृष्णदेवो बोलत ॥ २७ ॥ ह्मणसी लागोनि सूत्र त्रिगुण ॥ जीवासि आलें जीवपण ॥ ते अंगीं असतां तिनी गुण ॥ सद्विद्या जाण उपजेना ॥ २८ ॥ तोंडींचा खिळू नव्हतां दूरी ॥ नारेळजळ न चढे करीं ॥ तेवीं गुण नवचतां निर्धारीं ॥ विद्या कैशापरी उपजेल ॥ २९ ॥ ऐसा आशंकेचा भावो ॥ जाणोनियां श्रीवासुदेवो ॥ तिहीं श्लोकीं तो पहाहो ॥ गूढाभिप्रावो निरसितू[3] ॥ ३० ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ सत्वं रजस्तम इति गुणा बुद्धेर्न चात्मनः ॥ सत्वेनान्यतमौ हन्यात्सत्वं सत्वेन चैव हि ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ सत्वरजतमादि गुण ॥ निश्चयेंसि मायेचे जाण ॥ हें द्वादशाध्यायीं निरूपण ॥ तुज म्यां संपूर्ण सांगीतलें ॥ ३१ ॥ सद चिद आनंद जो येथ ॥ आत्म्यासि अभिन्न नित्य ॥ तैसे गुण नव्हती समस्त ॥ ते प्राकृत प्रकृतिकार्य ॥ ३२ ॥ जें सद तेंचि चिद ॥ जें चिद तोचि आनंद ॥ स्वरूपीं[4] नाहीं त्रिविध भेद ॥ ते एक वद सच्चिदानंद ॥ ३३ ॥ जेवीं श्वेतता[5] मृदु मधुर ॥ त्रिविध भेदें एक साखर ॥ तेवीं सच्चिदानंद अविकार ॥ वस्तु साकार एकवद ॥ ३४ ॥ प्रकृती गुणांतें उपजविती ॥ गुणास्तव सबळ प्रकृती ॥ गुणासि आत्म्यासि संगती ॥ न घडे कल्पांतीं उद्धवा ॥ ३५ ॥ येथ विद्याउत्पत्तिलक्षण ॥ स्वयें सांगे नारायण ॥ करूनि गुणांचें मर्दन[6] ॥ सद्विद्या जाण साधावी ॥ ३६ ॥ सत्व वाढवून सुरवाडें ॥ जैं रज तम निःशेष झडे ॥ तैं सद्विद्या हातां चढे ॥ सत्वाची वाढी मोडे निजसत्वें करूनी ॥ ३७ ॥ सर्पु लागला होय ज्यासी ॥ विष खादल्या उतार त्यासी ॥ तें विष खातां येरे दिशीं ॥ आत्मघातासी[7] वाढवी ॥ ३८ ॥ तैसें रजतमलोपें सत्व वाढे ॥ वाढलें सत्व बाधक कुडें ॥ तेही बाधा मी तुजपुढें ॥ अतिनिवाडें सांगेन ॥ ३९ ॥ मी अलिप्त कर्मकार्या ॥ मी ज्ञाता मी महासुखिया ॥ ऐशा वाढवूनि अभिप्राया ॥ गुणें गुणकार्या गोंविजे सत्वें ॥ ४० ॥ ऐसा वाढला जो सत्वगुण ॥ त्यासि उपशमात्मक[8] निजसत्वें जाण ॥ समूळ करावें निर्दळण ॥ तैं समाधान पाविजे ॥ ४१ ॥ उद्धवा तूं ऐसें ह्मणसी ॥ समानता तिहीं गुणांसी ॥ केवीं वाढी होईल सत्वासी ॥ गुण गुणांसी राखण ॥ ४२ ॥ वाढल्या तमोगुण ॥ नावडे तेव्हां ज्ञान ध्यान ॥ नावडे त्याग भोग चंदन ॥ निद्रा दारुण कां कलहो ॥ ४३ ॥ वाढल्या रजोगुण ॥ ऐकतां ज्ञाननिरूपण ॥ त्याचें भोगासक्त मन ॥ सदा ध्यान विषयाचें ॥ ४४ ॥

---

१ करून. २ ब्रह्मविद्या. ३ निरास करितो. ४ ब्रह्मरूपीं. ५ पांढरेपणा. ६ नाश. ७ आपल्या नाशास. ८ शांतिरूप.

धनलोभ सुदल्या दिठी ॥ पांघरा घेतल्या क्रोध नुठी ॥ हे रजोगुणाची कोटी ॥ लोभिष्ठ पोटीं स्त्रीपुत्रां ॥ ४५ ॥ वाढलिया सत्वगुण ॥ स्त्रियादिभोगीं उदासीन ॥ सदा करी भगवच्चिंतन ॥ कां करी कीर्तन हरिभक्ती ॥ ४६ ॥ क्रोधलोभमोहलक्षण ॥ सत्वकाळीं नुठे जाण ॥ परी एकला केवीं वाढे सत्वगुण ॥ गुणांसि राखण गुण होती ॥ ४७ ॥ मागें तम पुढें रज पूर्ण ॥ मध्यें अडकला सत्वगुण ॥ तो कैसेनि वाढेल जाण ॥ अडकलेपण सुबद्ध ॥ ४८ ॥ ऐसी आशंका धरूनि जाण ॥ ह्मणसी वाढेना सत्वगुण ॥ तें सत्वशुद्धीचें लक्षण ॥ ऐक संपूर्ण सांगेन ॥ ४९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सत्वाद्धर्मो भवेद्वृद्धात्पुंसो मद्भक्तिलक्षणः ॥ सात्विकोपासया सत्त्वं ततो धर्मः प्रवर्तते ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ॥ येश्लोकींचें निरूपण ॥ पहिलें उत्तरार्धव्याख्यान ॥ तेथें सत्ववृद्धीचें कारण ॥ सात्विक सेवन करावें ॥ ५० ॥ सात्विक पदार्थ सेवितां ॥ सत्ववृद्धि होय सर्वथा ॥ सत्वविजयें वर्ततां ॥ पवित्रता जीवाची ॥ ५१ ॥ सत्वउत्कर्षाचें लक्षण ॥ धर्मनिष्ठा स्वधर्माचरण ॥ तैसें तेथील वासनाबंधन ॥ इहामुत्र[3] जाण वांछिना ॥ ५२ ॥ झालिया शुद्ध अंतःकरण ॥ तेव्हां निःसीम[4] वाढे सत्वगुण ॥ पुरुषासि मद्भक्तिलक्षण ॥ धर्म जाण उपतिष्ठ ॥ ५३ ॥ सत्व वाढल्या धर्मप्रवृत्ती ॥ तैं गुरुभजनीं अतिप्रीती ॥ कां सत्वविग्रही माझी मूर्त्ती ॥ तेठायीं भक्ती उल्हासे ॥ ५४ ॥ कायिक वाचिक मानसिक ॥ मदर्पण करी स्वाभाविक ॥ मजवेगळा आणिक ॥ भावार्थ देख स्फुरेना ॥ ५५ ॥ गुरु भगवंत अभिन्न ॥ हें तेकाळीं प्रकटे चिह्न ॥ ते अतिसत्वाची वोळखण ॥ हे धर्म पूर्ण सात्विका ॥ ५६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ धर्मो रजस्तमो हन्यात् सत्ववृद्धिरनुत्तमः ॥ आशु नश्यति तन्मूलो ह्यधर्म उभये हते ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐसा वाढलिया सात्विक धर्म ॥ तैं सत्ववृद्धि पुरुषोत्तम ॥ जे सत्वीं प्रकटे सर्वोत्तम ॥ विश्रामधाम[6] मुमुक्षां ॥ ५७ ॥ एवं सत्ववृत्तीं वाढला धर्म ॥ तो तत्काळ नाशी अधर्म ॥ अधर्माचें मूळ रजतम ॥ त्यांचें रूपनाम उरोंनेदी ॥ ५८ ॥ सात्विकसेवनें सत्ववृद्धी ॥ तेणें सद्विद्येची उपलब्धी ॥ हे उपायाची विधानविधी ॥ कृष्ण कृपानिधी बोलिला ॥ ५९ ॥ करावें सात्विकसेवन ॥ ते सात्विक पदार्थ कोणकोण ॥ ऐक त्यांचेंही निरूपण ॥ दशलक्षण[7] सांगेन ॥ ६० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ आगमोऽपः प्रजा देशः कालः कर्म च जन्म च ॥ ध्यानं मंत्रोऽथ संस्कारो दशैते गुणहेतवः ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ गुणवृद्धीचें कारण ॥ आगम ह्मणिजे शास्त्र जाण ॥ आप ह्मणिजे तें जीवन ॥ आवडतें स्थान तो देशू ॥ ६१ ॥ ऐक प्रजाचें विवरण ॥ प्रजा ह्मणिजे त्रिविधजन ॥ जैशी ज्याची संगती जाण ॥ तैसें लक्षण तो पावे ॥ ६२ ॥ काळ ह्मणिजे दिवसभाग ॥ कर्म ह्मणिजे करी अंग ॥ जन्म ह्मणिजे दीक्षा सांग ॥ मंत्राचें लिंग यथारुची ॥ ६३ ॥ कर्त्यांचा जेथ अत्यादरू[8] ॥ त्या

---

१ वाहणा. २ सत्वगुणाच्या वाढण्यानें. ३ या आणि परलोकांत. ४ अधीक. ५ भासत नाहीं. ६ विसाव्याचो जागा. ७ दहा लक्षणें. ८ फार आदर.

नांव बोलिजे संस्कारू ॥ हा दशलक्षण प्रकारू ॥ गुणवृद्धिविचारू तो ऐक ॥ ६४ ॥ येथ सत्ववृद्धीसी प्रस्तुत ॥ साधकांसि शास्त्र निवृत्त[1]
॥ उपनिषद्भागेंसि वेदांत ॥ त्याचा मथितार्थ सेवावा ॥ ६५ ॥ आप ह्मणिजे जळपवित्रता ॥ गौतमीभागीरथ्यादि पुण्यसरिता[2] ॥
ज्यांचा अवचटें शिंतोडा लागतां ॥ पाप सर्वथा उरेना ॥ ६६ ॥ कां माझ्या प्रतिमाचें चरणामृत ॥ ज्यालागीं ब्रह्मादिक आर्तभूत ॥
किंवा शालग्रामशिळेचें तीर्थ ॥ सकळ दुरित निवारी ॥ ६७ ॥ जेणें सकळ तीर्थें होती पावन ॥ तें ब्राह्मणाचें चरणतीर्थ जाण ॥ स्वयें
वंदी श्रीनारायण ॥ निजहृदयीं[3] चरण वाहतसे ॥ ६८ ॥ भलतैसें होकां पाणी ॥ जें लागे सद्गुरुचरणीं ॥ तें सकळतीर्थां शिरोमणी ॥
सेवितां तत्क्षणीं उद्धरी ॥ ६९ ॥ सत्ववृद्धीचें कारण आप ॥ तें इये तीर्थीं जाण पुण्यरूप ॥ सेवितां सत्ववृद्धी स्वरूप ॥ आपेंआप प्रकाशे
॥ ७० ॥ प्रजा ह्मणिजे महाजन ॥ सेवावे साधुसज्जन ॥ ज्यांचे संगतीस्तव जाण ॥ उद्धरण जडजीवां ॥ ७१ ॥ सत्ववृद्धीसी कारण
॥ मुख्यत्वें सत्संगतीचि[4] जाण ॥ त्या सत्संगाचें महिमान ॥ केलें निरूपण द्वादशीं ॥ ७२ ॥ देश पुण्यभूमिका[5] सिद्धिस्थळ ॥ विजनवासू[6]
एकांतशीळ ॥ जेथ बैसतांचि तत्काळ ॥ सत्वासि बळ चढोवढीं ॥ ७३ ॥ एकांतीं स्थिरावल्या आसन ॥ सहजें वाढे सत्वगुण ॥ मनीं
हव्यासू चढतां जाण ॥ वस्तु चिद्घन साधावया ॥ ७४ ॥ साधकांसि काळ यथोचित ॥ अवश्य ब्राह्म्यमुहूर्त ॥ कां जे काळीं उद्वेगरहित ॥
हर्षयुक्त मन होय ॥ ७५ ॥ प्रेमयुक्तअंतःकरणें ॥ जो काळ जाय कथाश्रवणें ॥ कां जयंत्यादिमहापूजा करणें ॥ जागरणें हरिदिनीं
॥ ७६ ॥ थोर काळाची सार्थकता ॥ हरिकीर्त्तनीं गातां नाचतां ॥ त्या काळाचा महिमा तत्त्वतां ॥ माझेंन सर्वथा न बोलवे ॥ ७७ ॥
निरभिमान कीर्त्तन करणें ॥ निर्लोभ गाणें नाचणें ॥ तो काळू वंदिजे म्यां श्रीकृष्णें ॥ महिमा कोणें बोलावा ॥ ७८ ॥ कर्म ह्मणिजे तें
निवृत्त ॥ जें आशापाशफळरहित ॥ कां क्रिया जे उपकारार्थ ॥ सात्विक निश्चित तें कर्म ॥ ७९ ॥ गुरुपासोनि दीक्षाग्रहण[7] ॥ तो पुरुषासि
नवा जन्म जाण ॥ गुरु मायबाप संपूर्ण ॥ तें ऐक लक्षण उद्धवा ॥ ८० ॥ उपजलिया बाळकासि तत्त्वतां ॥ पंचविधजाण पिता ॥ जनिता
आणि उपनेता[8] ॥ तिजा [illegible]तपाळिता अन्नदानें ॥ ८१ ॥ जो भयापासूनि सोडविता ॥ जो बंदिविमोचन करविता ॥ जो देहाचें मरण चुकविता
॥ तोही पिता शास्त्रार्थें ॥ ८२ ॥ या वेगळा पांचवा पिता ॥ जो झाडणी करी पंचभूतां ॥ मृत्युपासून सोडविता ॥ जो गर्भव्यथा
निवारी ॥ ८३ ॥ ज्याचे देखिलिया चरण ॥ बाधूं न शके भवबंधन ॥ तो सद्गुरु पिता जाण ॥ भाग्येंवीण न पाविजे ॥ ८४ ॥ उपजल्या
बाळकासि सर्वथा ॥ वेगळालीं माता पिता ॥ एक वीर्यातें निक्षेपिता ॥ धारणी पोषणता जननीची ॥ ८५ ॥ तैसा सद्गुरु नव्हे पिता ॥

---

१ निवृत्तिशास्त्र वेदांत. २ पुण्यरूप नद्या. ३ आपल्या मनांत. ४ साधूंची संगतव. ५ पवित्र स्थळें. ६ निर्जन प्रदेशांत राहणें. ७ उपदेश घेणें. ८ उपनयन करणारा.

निजवीर्य न वेंचितां ॥ योनिद्वारें नुपजवितां ॥ जननी जनिता स्वयें झाला ॥ ८६ ॥ उदराबाहेर निघाल्यापाठीं ॥ माता पुत्रस्नेहें कळवळाउठी ॥ बाहेरिले नसूनि आपुले पोटीं ॥ निजस्नेहें गोमटी गुरुमाता ॥ ८७ ॥ यालागीं शिष्यासि तत्त्वतां ॥ सद्गुरूचि माता पिता ॥ निजस्नेहें वाढविता ॥ तदात्मता अभेदें ॥ ८८ ॥ मागील पिते जे चौघेजण ॥ ते याचे सावत्र बाप जाण ॥ माता पिता भिन्नभिन्न ॥ सखेपण त्यां कैंचें ॥ ८९ ॥ यालागीं सद्गुरु सद्रूपू[1] ॥ तो सच्छिष्यासि सखा बापू ॥ पित्यापुत्रांमाजी अल्पू ॥ कांहीं विकल्पू[2] उपजेना ॥ ९० ॥ त्या सद्गुरूपासून जाण ॥ शैववैष्णवदीक्षाग्रहण ॥ अथवा उपदेशी निर्गुण ॥ चैतन्यघन निजबोध ॥ ९१ ॥ ऐक दीक्षानामाची युक्ती ॥ दे चारी पुरुषार्थ[3] चारी मुक्ती ॥ निःशेष अविद्येची नाशी स्थिती ॥ दीक्षा व्युत्पत्ती त्या नांव ॥ ९२ ॥ एवं दीक्षाजन्माची जे कथा ॥ उद्धवा सांगीतली म्यां तत्त्वतां ॥ ध्याननिष्ठ जे सात्विकता ॥ ऐक आतां सांगेन ॥ ९३ ॥ सत्वोपाधि शरीर सांचें[4] ॥ चैतन्यघन स्वरूप ज्याचें ॥ तो श्रीविष्णु ध्येय सात्विकांचें ॥ ध्यान त्याचें करावें ॥ ९४ ॥ अथवा धवळ धाम गोक्षीर ॥ कर्पूरगौर पंचवक्र[5] ॥ ध्यानीं आणावा शंकर ॥ संसारपार तरावया ॥ ९५ ॥ या मूर्तीचें ध्यान करितां ॥ हारपे ध्येय ध्यान ध्याता ॥ ठसावे चैतन्यघनता ॥ सात्त्विकता हें ध्यान ॥ ९६ ॥ जैशी दीक्षा तैसें ध्यान ॥ हें आगमशास्त्रींचें प्रमाण ॥ त्या ध्यानाचें पर्यवसान[6] ॥ चैतन्यघन पावावें ॥ ९७ ॥ केवळ जें चैतन्यघन ॥ तें सद्गुरुस्वरूप जाण ॥ त्याचें करावें निजध्यान ॥ अनुसंधान नित्यनिष्ठा ॥ ९८ ॥ पंचभूतदेहाची मूस ॥ तेथ ओतिला ब्रह्मरस ॥ गुरुस्वरूप तें सविलास ॥ ध्यान रात्रंदिवस करावें त्याचें ॥ ९९ ॥ सात्विकांचें जें कां ध्यान ॥ तें हें तूं उद्धवा जाण ॥ आतां मंत्राचें मंत्रग्रहण ॥ तेंही निरूपण अवधारी ॥ १०० ॥ सकळमंत्रांची जननी ॥ जे द्विजन्मा करी तत्क्षणीं ॥ गायत्रीच्या मंत्रग्रहणीं ॥ ब्राह्मणपणीं अधिकारू ॥ १ ॥ जे सकळमंत्रांचा राजा ॥ जे वांट्या आली असे द्विजा ॥ जिचेनि धाकें द्विजपूजा ॥ मज अधोक्षजा करणें पडे ॥ २ ॥ ते गायत्री स्वभावतां ॥ आली असे ब्राह्मणांच्या हातां ॥ तिची उपेक्षा करितां ॥ लौल्य[7] दरिद्रता पावले ॥ ३ ॥ गायत्रीनिष्ठ जो ब्राह्मण ॥ त्याचे मस्तकीं मी वंदीं चरण ॥ मंत्रीं गायत्री श्रेष्ठ जाण ॥ वेद प्रमाण ये अर्थीं ॥ ४ ॥ गायत्री रिघाल्यावीण कांहीं ॥ इतरमंत्रां रिगमू[8] नाहीं ॥ मुख्यत्वें गायत्रीच्या ठायीं ॥ ते लागले पाही सकळ मंत्र ॥ ५ ॥ नव्हतां गायत्रीसंबंध ॥ मुख्य रिघों न शके वेद ॥ इतरमंत्रां केवीं संवाद ॥ वेदां वंद्य गायत्री ॥ ६ ॥ गायत्रीचें गुह्य परम ॥ चिन्मात्रैक परब्रह्म ॥ तो मंत्र ब्राह्मणासीच सुगम[9] ॥ परी तेंही वर्म चूकले ॥ ७ ॥ एवं गायत्रीमंत्र ब्रह्मपूर्ण ॥ सकळसिद्धीचें कारण ॥ शैववैष्णवमंत्र

---

१ सद्रूप. २ कल्पना. ३ पुरुषांचीं कर्में. ४ खरें. ५ पांच तोंडाचा. ६ शेवट. ७ लोभिष्टपणा. ८ रिघाव. ९ सोपा.

ग्रहण ॥ तेणें त्वरित जाण सत्वशुद्धी ॥ ८ ॥ सत्वशुद्धीचे परिपाठीं ॥ शैववैष्णवमंत्रकोटी ॥ तेणें सत्वशुद्धी उठाउठीं ॥ होय निजात्मदृष्टी साधकां ॥ ९ ॥ मंत्रग्रहणविचार ॥ उद्धवा जाण हा साचार ॥ आतां बोलिला जो संस्कार ॥ तोही प्रकार परियेसी ॥ १० ॥ मनाचे संकल्पविकल्प ॥ तोडावया अतिसाक्षेप ॥ येचि अर्थींचा खटाटोप ॥ महासाटोप जो मांडी ॥ ११ ॥ संकल्पु उठूंचि नलाहे ॥ जेथें उठी तेथें ठेंचित जाये ॥ विवेकाचेनि बळें पाहे ॥ मोकळु होय मनाचा ॥ १२ ॥ परमात्मनिष्ठा परवडी ॥ अखंड मनाची मोडी पाडी ॥ उसंत घेवों नेदी अर्धघडी ॥ स्मरण निरवडी मन राखे ॥ १३ ॥ वैराग्यबळें[१] दमी मन ॥ तेणें भेणें करी हरिचिंतन ॥ दासी नुल्लंघी स्वामीचें वचन ॥ तैसें स्मरणाधीन मन करी ॥ १४ ॥ इंद्रियें पाहती नानापदार्थां ॥ मन न पाहे आणिका अर्था ॥ जागृतीं स्वप्नीं स्वभावतां ॥ अखंडता हरि स्मरे ॥ १५ ॥ ऐशा संस्कारें संस्कारिलें मन ॥ निमेषोन्मेषीं हरिचिंतन ॥ श्वासोच्छ्वासांचें गमनागमन ॥ सोहंध्यान[२] त्याठायीं ॥ १६ ॥ स्वभावें स्मरणादर ॥ या नांव आत्मसंस्कार ॥ हा सत्ववृद्धीचा प्रकार ॥ सारंगधर बोलिला ॥ १७ ॥ आत्मशुद्धीचें महाकारण ॥ बोलिलों तें हें दशलक्षण ॥ साधकीं सेवावया जाण ॥ विशद[३] निरूपण म्यां केलें ॥ १८ ॥ जेणें खवळला वाढे तमोगुण ॥ तें तमोवृद्धीचें दशलक्षण ॥ केवळ त्यागावया जाण ॥ तेंही निरूपण सांगेन ॥ १९ ॥ तेथिंचा आगम अभिचारिक ॥ वेदविरुद्ध मार्ग देख ॥ वारुणी माध्वी[४] मद्योदक ॥ आवश्यक सेविती ॥ १२० ॥ जे उभयभ्रष्ट पाखंडी ॥ वेषधारी वृथा मुंडी ॥ त्यांचे संगतीची अतिगोडी ॥ जेथ परवडी विधिवेदां ॥ २१ ॥ द्वेष जुव्वा ठक परद्वार ॥ तेथेंचि बैसका निरंतर ॥ काळ तों त्यांसि मध्यरात्र ॥ तैं व्यापार कर्मांचा ॥ २२ ॥ क्रियारंभु जारणमारण ॥ मोहन स्तंभन उच्चाटण ॥ कां करावें वशीकरण ॥ हें कर्म जाण तामस[५] ॥ २३ ॥ जन्म ह्मणिजे दीक्षाग्रहण ॥ प्रेतभूतपिशाचविद्या जाण ॥ करितां प्रेतभूतआराधन ॥ प्रेतजन्म जाण तामसां ॥ २४ ॥ जेथ तमोगुण प्रधान ॥ तो क्रोधयुक्त पुरुष जाण ॥ सदा शत्रूचें करी ध्यान ॥ करावया हनन[६] उद्यतू ॥ २५ ॥ तामसी मंत्र मुकी मैराळी ॥ अथवा उच्छिष्टचांडाळी ॥ कां प्रेतदेवता कंकाळी ॥ मंत्रशैली हे तेथें ॥ २६ ॥ संस्कार दगड माती ॥ माझें घर हें माझी क्षिती ॥ स्वप्नीं निजेला घाली भिंती ॥ एवढी असक्ती[७] गृहाची ॥ २७ ॥ घर करावया अशक्त ॥ तरी तो खिंडेरां अति स्मरत ॥ सदा दगडमाती राखत ॥ नांदतें तेथ येवों नेदी ॥ २८ ॥ देहालागीं गेह[८] करणें घडे ॥ तेहीं देह कष्टवी अतिदुर्वाडें ॥ तामससंस्कारें रोकडें ॥ केवळ वेडें गृहासक्तीं ॥ २९ ॥ गृहासक्तीचा व्यापारू ॥ जो मरणांत न सोडी नरू ॥ तो जाण तामससंस्कारू[९] ॥ त्याचा संसारू तो माती ॥ १३० ॥ जेणें थोरावे तमोगुण ॥ तें हें जाण

---

१ वैराग्याच्या बळानें. २ तो मी असें ध्यान. ३ स्पष्ट. ४ मोहाची दारू. ५ तमोगुणी. ६ नाश. ७ प्रीति. ८ घर. ९ तमोगुणाचा अभ्यास.

दशलक्षण ॥ ऐक राजसाचें चिह्न ॥ त्याचें भिन्न स्वरूप ॥ ३१ ॥ करावया सत्वाच्या अंगीकारा ॥ त्यागावा तमोगुण दुसरा ॥ पुढें चाविरा[1] मागें लातिरा[2] ॥ ऐक तिसरा रजोगुण ॥ ३२ ॥ होकां शाहाणी शिनळी नारी ॥ तें पुरुषाचें मन बरें धरी ॥ मग ठकोनि व्यभिचारी ॥ तैशी परी रजोगुणा ॥ ३३ ॥ जैसें कां कुचर घोडें ॥ बरें दिसे परी आडवीं अडें ॥ कांहीं केल्या न ढळे पुढें ॥ मागिलीकडे सरें लागे ॥ ३४ ॥ तैसी रजोगुणाची स्थिती ॥ त्यागू न संभवे कल्पांतीं ॥ धर्म करितो केवळ स्फीती ॥ मनीं आसक्ती कामाची ॥ ३५ ॥ सर्वस्व घ्यावया सवचोरू ॥ सवें धांवे होऊनि नफरू ॥ तैसा रजोगुणाचा विचारू ॥ कामना संसारू वाढवी ॥ ३६ ॥ धर्म करी कां[3]मासक्ती ॥ केलें भोगवी निश्चितीं ॥ पाडी जन्ममरणआवर्तीं ॥ कदा कल्पांतीं सुटेना ॥ ३७ ॥ सात्विक तरले माझेनि भजनें ॥ तामस तरले मद्विरोधध्यानें ॥ राजसाचें जन्ममरणधरणें ॥ रजोगुणें उठीना ॥ ३८ ॥ जेणें प्रबळ वाढ रजोगुणा ॥ त्या सांगेन मी दशलक्षणा ॥ केवळ त्यागावया काम्यकल्पना ॥ त्या निरूपणा अवधारी ॥ ३९ ॥ राजसाचें प्रवृत्तिशास्त्र ॥ जें केवळ कामनापर ॥ जेणें होय इहामुत्र ॥ तेथें अत्यादर राजसा ॥ १४० ॥ आप ह्मणिजे तें तंव जळ ॥ वेळा वाळा सुपरिमळ ॥ कर्पूरयुक्त अतिशीतळ ॥ प्रिय प्रबळ तें राजसा ॥ ४१ ॥ प्रजासंगती त्याची ऐक ॥ राजवर्गीं सभानायक ॥ व्यवहारीं चतुर अतिरंजक ॥ प्रवृत्ति लोकप्रिय त्यासी ॥ ४२ ॥ राजद्वारीं कां सभेमाझारी ॥ बैसावें पारीं अथवा वेव्हारीं ॥ कां मंडपतोरणाभीतरी ॥ सन्मानेंकरी उपविष्ट ॥ ४३ ॥ वेळु न गमे जैं घरिच्या घरीं ॥ तैं क्रमी चौहाटा नगरीं ॥ कां बैसे बुद्धिबळांवरी ॥ अत्यादरीं सादर ॥ ४४ ॥ ऐक रजोगुणाची वेळ ॥ सूर्योदयाउपरि जो काळ ॥ कां राजस जे सांजवेळ ॥ तोतो काळ प्रिय त्यांसी ॥ ४५ ॥ राजसाचें सकाम कर्म ॥ धनधान्यार्थ करिती धर्म ॥ वासना ते पशुपुत्रकाम ॥ स्वप्नीं निष्[4]काम नेणती ॥ ४६ ॥ राजसांसि काम गहन ॥ कामासक्ती दीक्षाग्रहण ॥ तेंचि त्यांचे जन्म जाण ॥ सदा ध्यान स्त्रियेचें ॥ ४७ ॥ मंत्र घ्यावा अभिलाखें ॥ जेणें सन्मान होय लौकिकें ॥ ज्याच्या सुगँ[5]रावा थोर देखे ॥ त्याचा मंत्र आवश्यकें आदरी ॥ ४८ ॥ संस्कार अतिराजस ॥ शरीरभोगाचे विलास ॥ नानापरिमळ बहुवस ॥ उत्तमवास सुधौता ॥ ४९ ॥ संस्काराची अं[6]तरनिष्ठा ॥ लौकिकीं व्हावी देहँ[7]प्रतिष्ठा ॥ माझी आज्ञा वंद्य वरिष्ठां ॥ सभेचे चौहाटा मी पूज्य ॥ १५० ॥ रजोगुण दशलक्षण ॥ उद्धवा त्याची ही वोळखण ॥ राजसासि जन्ममरण ॥ सर्वथा जाण सोडीना ॥ ५१ ॥ सात्विक त्याग करी विवेकनिष्ठें ॥ तामस त्याग करी कडकडाटें ॥ राजसासि त्याग न घडे स्पष्टें ॥ द्रव्यदारालोभिष्टें लोभाळू ॥ ५२ ॥ तिहीं गुणांचें लक्षण ॥ म्यां सांगीतलें भि

---

१ इसणारा. २ लाथा मारणारा. ३ कामाची इच्छा. ४ कामनारहित. ५ सुगरणपणा. ६ एकनिष्ठा. ७ मोठेपणा.

न्नभिन्न ॥ तिहींचें सर्वसाधारण ॥ सांगेन चिह्न तें ऐक ॥ ५३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तत्तत्सात्विकमेवैषां यद्यद्वृद्धाः प्रचक्षते ॥ निंदंति तामसं
यत्तद्राजसं तदुपेक्षितम् ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ विवेकवृद्ध[1] वृद्धाचारें ॥ ज्यातें स्तविती अत्यादरें[2] ॥ तेंतें सात्विक जाण खरें ॥ निज
॥ ४ ॥ निर्धारें निश्चित ॥ ५४ ॥ विवेकियाचे अनुवादा ॥ ज्या पदार्थांची करिती निंदा ॥ तेते जाण तामस बाधा ॥ माझ्या निजबोधा[3] मानलें
॥ ५५ ॥ ज्यातें स्तवित ना निंदित ॥ जीवें भावें उपेक्षित ॥ तें राजस जाण निश्चित ॥ बाधा अद्भुत तयाची ॥ ५६ ॥ जैसें कां विखें[4]
रांधिलें अन्न ॥ वरिवरी गोड अंतरीं मरण ॥ तैसा जाण राजस गुण ॥ अतर्क्य बंधन तयाचें ॥ ५७ ॥ राजसासि ज्ञानबोधू ॥ करितां
थोंटावला वेदू ॥ त्याचे उपदेशीं ब्रह्मा मंदू ॥ माझेंनिही बोधू न करवे ॥ ५८ ॥ याचिलागीं रजोगुण ॥ विवेकीं सांडिला उपेक्षून ॥ उपेक्षेचें
हेंच कारण ॥ तुज म्यां जाण सांगीतलें ॥ ५९ ॥ यालागीं सात्विक सेवन ॥ साधकीं अवश्य करावें जाण ॥ सात्विकसेवनाचा[5]
गुण ॥ तुज मी संपूर्ण सांगेन ॥ १६० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सात्विकान्येव सेवेत पुमान् सत्वविवृद्धये ॥ ततो धर्मस्ततो ज्ञानं यावत्स्मृतिरपोहनम्
॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ सात्विक द्रव्य सेवितां ॥ सत्ववृद्धी होय तत्त्वतां ॥ सत्ववृद्धी पुरुषीं होतां ॥ धर्म स्वभावतां प्रवर्त्ते ॥ ६१ ॥
धर्मप्रवृत्ति माझें भजन ॥ माझ्या भक्तिउल्हासें[6] जाण ॥ भक्तांसि मी होये प्रसन्न ॥ तैं स्वभावें ज्ञान प्रकाशे ॥ ६२ ॥ तत्त्वमस्यादि वाक्यव्युत्पत्ती
॥ ते गुरुद्वारा[7] ज्ञानाची प्राप्ती ॥ तरी सत्वशुद्धित्वें धर्म भक्ती ॥ कोणे अर्थीं सेवावी ॥ ६३ ॥ ऐसा विकल्प जरीं तूं धरिसी ॥
उद्धवा ऐक त्याही विचाराशी ॥ यथार्थ[8] सांगेन तुजपाशीं ॥ सत्वशुद्धीसी उपयोगू ॥ ६४ ॥ केवळ सत्वशुद्धीविण ॥ जाहल्या गुरुवाक्याचें
श्रवण ॥ तें हाटगाण्याऐसें जाण ॥ अनोळखपण[9] स्वस्वरूप ॥ ६५ ॥ आंधळें उपजलें जे कुशीं ॥ स्तनपान करी अहर्निशीं ॥ परी
ते न देखे माउलीसी ॥ दशा तैशी उपदेशा ॥ ६६ ॥ इंद्रिय सचेतनमेळीं ॥ भगवंत सर्वांतें प्रतिपाळी ॥ त्यातें न देखती विषयांधळीं ॥
अतिअंध झालीं चित्तशुद्धीविण ॥ ६७ ॥ अजांगळां[10] लोंबते जाण ॥ मिथ्याभाषणें ह्मणती ते स्तन ॥ त्यापरी सत्वशुद्धीविण ॥ वृथा
जाण उपदेश ॥ ६८ ॥ वाहते उदकीं लिहिले लेखें[11] ॥ तळीं अक्षर नुमटे एक ॥ तेवीं सत्वशुद्धीविण देख ॥ निजज्ञान सुटंक प्रकटेना
॥ ६९ ॥ झाल्या आपाततां सत्वशुद्धी ॥ जंव प्रकटेना धर्मबुद्धी ॥ तंव निजज्ञानाची[12] नव्हे सिद्धी ॥ जेवीं ग्रहणामधीं चंद्रमा ॥ १७० ॥ ॥ ४ ॥
ऐकतां हरिकथाश्रवण ॥ बाष्प रोमांच खेद रुदन ॥ रुका वेंचितां जाय प्राण ॥ तेथेंही ब्रह्मज्ञान प्रकटेना ॥ ७१ ॥ हृदयींचा[13] लोभ जं

---

१ फार विचारी. २ फार नम्रत्वानें. ३ आत्मज्ञानास. ४ विषानें. ५ सत्वगुणिपदार्थांच्या सेवनाचा. ६ भक्तीच्या आधिक्यानें. ७ गुरुकडून. ८ सत्य. ९ न जाणणें. १० शेळीच्या गळ्यांत.
११ अक्षरें. १२ आपल्या अनुभवाचो. १३ मनांतला.

व न तुटे ॥ तंव निश्चयज्ञान कैंचें भेटे ॥ सत्वशुद्धिधर्मू जैं प्रकटे ॥ तैं निजज्ञाननेटें सुपंथीं लागे ॥ ७२ ॥ ते चालतां धर्मपंथीं[1] ॥ जैं माझी भक्ति होय सांगाती ॥ तैं चोरांचीन पडे गुंती ॥ शीघ्रगती मज पावे ॥ ७३ ॥ ते भक्तीचा सांडितां सांगातू ॥ पुढील अनोळख महापंथू ॥ तेथ कामक्रोध करिती घातू ॥ विकल्पआवर्तू बुडविती ॥ ७४ ॥ भाग्येंवीण माझी भक्ती ॥ प्राण्यासि नव्हे गा सांगाती ॥ जिचे संगें चालतां पंथीं ॥ अल्पही गुंती पडेना ॥ ७५ ॥ माझे भक्तिसवें महाशूर ॥ नांवानिके नवविध वीर ॥ सन्नद्ध बद्ध सदा समोर ॥ महाझुंझार निजबोधें ॥ ७६ ॥ यालागीं माझे भक्तिविण ॥ सहस्रधा[2] केल्या श्रवण मनन ॥ माझी प्राप्ति नव्हे जाण ॥ भजनें पूर्ण मत्प्राप्ती ॥ ७७ ॥ सर्वभूतीं भगवद्भावो ॥ या नांव मुख्यभक्ति पहाहो ॥ ते सांगाती झालिया स्वयमेवो ॥ कामक्रोधमोहो न शकती बाधू ॥ ७८ ॥ साक्षेपें नेऊनि घागरी ॥ पालथी घातल्या गंगासागरीं ॥ जळबिंदु रिघेना भीतरीं ॥ तैशी परी महावाक्या ॥ ७९ ॥ यालागीं अत्यादरेंसि जाण ॥ धर्मयुक्त माझें भजन ॥ करितां मी होय प्रसन्न ॥ मत्प्रसादें[3] ज्ञान प्रकाशे ॥ १८० ॥ लोभ ठेऊनि अर्थस्वार्थीं ॥ कोरडी करितां माझी भक्ती ॥ मी प्रसन्न नव्हे श्रीपती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ८१ ॥ जो धनें मनें कायावचनें ॥ वेंचूनि भजे मजकारणें ॥ त्यासीच म्यां प्रसन्न होणें ॥ जेवीं चंद्रकिरणें चकोरा ॥ ८२ ॥ व्याली धेनु वत्सवोरसें ॥ तेवीं मी तुष्टें अतिसंतोषें ॥ तेणें माझेनि प्रसादवशें[4] ॥ माझें ज्ञान प्रकाशे मद्भक्तां ॥ ८३ ॥ सगुण सुंदर आणि पतिव्रता ॥ अतिशयें पढियंती होय कांता ॥ तिसी सर्वस्व दे न मागतां भर्त्ता ॥ तेवीं मी मद्भक्तां प्रसन्न ॥ ८४ ॥ माझेंनि प्रसादें प्रकाशे ज्ञान ॥ स्मृति तीतें ह्मणणें जाण ॥ सविलास अविद्यानिरसन ॥ अपोहन[5] या नांव ॥ ८५ ॥ गुणास्तव देह जाण ॥ देहास्तव उपजे ज्ञान ॥ तेणें ज्ञानें गुणनिर्दळण[6] ॥ देहनिरसन न घडे ह्मणसी ॥ ८६ ॥ हे गोष्टी तूं ह्मणसी कुडी ॥ कीं पक्षी आपुले पांख मोडी ॥ नारळ नारळीतें तोडी ॥ स्वमांसाची गोडी व्याघ्र चाखे ॥ ८७ ॥ हें न घडे तें जैं घडों बैसे ॥ तैं देहीचेनि ज्ञानें गुणदेह नासे ॥ हा विकल्पू धरिसी मानसें ॥ ऐक अनायासें तो निरासू ॥ ८८ ॥ ॥ श्लोक ॥ वेणुसंघर्षजो वह्निर्दग्ध्वा शाम्यति तद्वनम् ॥ एवं गुणव्यत्ययजो देहः शाम्यति तत्क्रियः ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ दैवें वायूच्या कल्लोळीं ॥ परस्परें वेळू जाळी ॥ स्वजाति कांचणीं इंगळी ॥ पेटली ते होळी वनाची करी ॥ ८९ ॥ अग्नि उपजला जे कांडीं ॥ तेंही कांडें जाळूनि सांडी ॥ वनीं नुरवूनियां काडी ॥ स्वयें राखोडी होऊनि विझे ॥ १९० ॥ तेवीं वैराग्याभ्यासवायूनीं ॥ होतां त्रिगुणाची कांचणीं ॥ तेथें प्रकटला ज्ञानाग्नी ॥ अविद्यावनीं[7] दाहकू[8] ॥ ९१ ॥ तो हरिगुरुकृपाखवळला ॥ वृत्तिरूपें प्रज्वळला ॥ देहत्रयेंसि लागला ॥ प्रवर्त्तला गु

---

१ मार्गांत. २ हजारप्रकारानें. ३ माझ्याकृपेनें ४ प्रसन्नतेनें. ५ निरसन. ६ गुणाचा नाश. ७ अविद्यारूप रानांत. ८ जाळणारा.

णांतें जाळूं ॥ ९२ ॥ जळाल्या आशातृष्णेच्या पाळी ॥ जळालीं कामलोभाचीं कोल्हीं ॥ क्रोधव्याघ्राची होळी झाली ॥ आगी लागली मदंगजा[1] ॥ ९३ ॥ जाळिली स्नेहाची आराटी ॥ जाळिली असत्याची बोरांटी ॥ जाळिला मोहअजगरू[2] उठाउठी ॥ जाळिला शेवटीं काळविट काळू ॥ ९४ ॥ उठिला अहंकाराचा सोरू ॥ धरितां नधरे अनिवारू ॥ तोहि लाजिला दुर्धरू ॥ वणवा चौंफेरू कोंडला ॥ ९५ ॥ पळूनि जावया पुरता ॥ अणुभरी ठावो नुरेचि रिता ॥ एवं जळाला तो पळतपळतां ॥ अहंसोरु सर्वथा निमाला ॥ ९६ ॥ नवल अग्नीचें विंदाण ॥ आपणिया जाळीं आपण ॥ दाहकशक्तीतें जाळून ॥ स्वस्वरूपीं जाण उपरमे[3] ॥ ९७ ॥ ऐसें ऐकोनि निरूपण ॥ उद्धवासि विस्मयो गहन ॥ जनास केवढी नागवण ॥ आपणिया आपण वोढवली ॥ ९८ ॥ नश्वरदेहाचिये साठीं ॥ पाविजे परब्रह्माची पुष्टी ॥ ते सांडूनियां करंटी ॥ विषयासक्ती धरधरोनि मरती ॥ ९९ ॥ सात्विकसेवनें सत्ववृद्धी ॥ तेणें अलभ्य[4] लाभे[5] सिद्धी ॥ ते सांडोनियां दुर्बुद्धी ॥ विषयविधी रातले ॥ २०० ॥ केवढा नाडू मांडला लोकां ॥ ऐशी जीवींची आशंका ॥ यालागीं यदुनायका ॥ आदरें देखा पुसत ॥ १ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धव उवाच ॥ ॥ विदंति मर्त्याः प्रायेण विषयान्पदमापदाम् ॥ तथाऽपि भुंजते कृष्ण तत्कथं श्वखराजवत् ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ ॥ उद्धव ह्मणे श्रीमुकुंदा ॥ ऐक सर्वज्ञा गोविंदा ॥ विषयांची पदोपदीं आपदा[6] ॥ सर्वी सर्वदा कळलीसे ॥ २ ॥ जो झाला विषयाधीन ॥ तो सर्वीं सर्वत्र सदा दीन ॥ ऐसें जाणतजाणतां जन ॥ आसक्ति गहन विषयांसी ॥ ३ ॥ जैसे कां श्वान आणि खर अज ॥ तैसे विषयांसि लोक निर्लज्ज ॥ सांडूनि स्वहिताचें काज ॥ कां विषयांचे भोज नाचती ॥ ४ ॥ शुनी वसवसोनि पाठीं लागे ॥ श्वान सवेंच लागे मागें ॥ पुच्छ हालवूनि हुंगे ॥ लाज नेघे जनाची ॥ ५ ॥ काणा कुंटा व्याधिव्याप्त ॥ चिंता काठफरा गळां वाहत ॥ तोही शुनीमागें[7] धांवत ॥ कामासक्त अविचारी ॥ ६ ॥ शुनी सक्रोधें वसवसी ॥ तें गोड लागे श्वानासी ॥ जीवित बांधलें तिच्या पुच्छीं ॥ तीमागमागेंसी हिंडत ॥ ७ ॥ अंगीं अंगा होतां भेटी ॥ सक्रोध शुनी लागे पाठीं ॥ तरी न सोडी पुसांटी ॥ कुंकात उठी कामासी ॥ ८ ॥ ऐशा संकटीं जैं भोग चढे ॥ तैं भोगासवेंचि आडकोनि पडे ॥ हडहड करिती चहूंकडे ॥ जगापुढें फजीती ॥ ९ ॥ निंदेचे सैघ वाजती धोंडे ॥ मूर्ख तेही थुंकिती पुढें ॥ ऐसेंचि पुरुषासही घडे ॥ तरीही आवडे अतिकामू ॥ २१० ॥ श्वानाचें हेंड तत्काळ सुटे ॥ मनुष्याचें आकल्प न सुटे ॥ स्त्रीलोभाळू अतिलोभिष्टें ॥ तीलागी संकटें नाना सोशी ॥ ११ ॥ नातरीं गाढवाच्यापरी ॥ दूरीं देखोनियां खरी ॥ भुंकत धांवे तीवरी ॥ लाज न धरी सर्वथा ॥ १२ ॥ खरी पळे पुढेंपुढें ॥ खरू धांवे वाडेंकोडें ॥ लाता

---

१ माजलेल्या हत्तीस. २ सर्प. ३ शांत होतो. ४ न मिळणारी. ५ मिळाले. ६ संकट. ७ कुत्रीमागें. ८ कुत्र्याचें.

हाणोनि फोडी जाभाडें ॥ तरी पुढेंपुढें धसों लागे ॥ १३ ॥ लाता हाणे उरावरी ॥ तरी तिची प्रीति धरी ॥ ऐशिया स्त्रियांचे घराचारी॥ खराच्यापरी नांदती ॥ १४ ॥ नानरी बोकडाची गति जैसी ॥ तैशी दशा दिसे पुरुषासी ॥ मारूं आणिल्या पशुहत्याऱ्यापाशीं ॥ तरी शेळ्यांसी सेविता ॥ १५ ॥ स्वयाती मारितां देखे ॥ अनुताप[1] नेघे तेणें दुःखें ॥ मृत्युसमीपही अभिलाखें ॥ कामसुखें वांछिती ॥ १६॥ पूर्ण मृत्यूची पायरी ॥ तें वार्धक्य वोंजलें[2] उरीं ॥ तरी धांवे विषयावरी ॥ आठवू न धरी मरणाची ॥ १७ ॥ मेष[3] मारूं आणिला घातकें ॥ निजसख्यातें मारितां देखे ॥ तें नमनूनियां यथासुखें ॥ अजीसि सुखें रमों धांवे ॥ १८ ॥ मेष श्वान आणि खर ॥ हे ऋतुकाळींचि अतितत्पर ॥ त्याहूनि विशेषेंसी नर ॥ कामी दुर्धर सर्वदा ॥ १९ ॥ गर्भ संभवल्यापाठीं ॥ श्वानही स्त्रीभोगासि नुंठी[4] ॥ पुरुषाची अभिनव गोठी ॥ गरोदर मोमटी भोगिती ॥ २२० ॥ गाढव गाढवीसि बुंथड ॥ न करी अलंकार मोथड ॥ मनुष्यासि स्त्रियेचें कोड ॥ तिचें वालंभ वाड वाढवी ॥ २१ ॥ दांडा गोंडा मूद वेणी ॥ टिकुलीवरी रत्नखेवणी ॥ नाकींचें हाले सुपाणी ॥ हें मनुष्यपणीं वालंभ ॥ २२॥ जरी प्रसूती निकट ॥ गाड्याएवढें वाढलें पोट ॥ तरी कामचारी विवेकनष्ट ॥ रमताती दुष्ट स्त्रियांसी ॥ २३ ॥ अस्थि मांस विष्ठा मूत ॥ तेणेंकामिनी पूर्ण भरित ॥ ते कुश्चळीं जन कामासक्त[5] ॥ जाणोनि होत कां देवा ॥ २४ ॥ या प्रश्नाचें प्रत्युत्तर ॥ तीं श्लोकीं सांगे सारंगधर ॥ कामासक्तीचा विचार ॥ ऐक सादर उद्धवा ॥ २५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ अहमित्यन्यथाबुद्धिः प्रमत्तस्य यथा हृदि ॥ उत्सर्पति रजो घोरं ततो वैकारिकं मनः॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ मोहप्रमत्त विवेकशून्य ॥ त्या पुरुषांच्याठायीं जाण ॥ देहात्मवादें अभिमान ॥ रजोगुणें खवळला ॥ २६॥ जैसा मदिरापानें[6] उन्मत्तू ॥ विसरूनि आपुला निजस्वार्थू[7] ॥ मग अन्योन्य अनर्थू ॥ आत्मघातू करूं धांवे ॥ २७॥ तेवीं शुद्ध बुद्ध नित्यमुक्त ॥ हा विसरोनि निजस्वार्थ ॥ रजोगुणें लोलंगत[8] ॥ कामासक्त नरू कीजे ॥ २८ ॥ रजीं रंगल्या अभिमान ॥ दुःखरूप दारुण ॥ दुर्धर वाढे रजोगुण ॥ विकारी मन तेणें होय ॥ २९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ रजोयुक्तस्य मनसः संकल्पः सविकल्पकः ॥ ततः कामो गुणध्यानादुःसहः स्याद्धि दुर्मतेः ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ जैं रजोयुक्त झालें मन ॥ तैं संकल्पविकल्प गहन ॥ एकांतीं घातल्या आसन ॥ ध्यानीं चिंतन स्त्रियेचें ॥ २३० ॥ रजोगुणें कामासक्ती ॥ होय दुष्टवासना दुर्मती ॥ कामावांचूनि चित्तीं ॥ आणिक स्फुर्तीं स्फुरेना ॥ ३१ ॥ जनीं वनीं आणि विजनीं ॥ जागृतीं सुषुप्तीं स्वप्नीं ॥ ध्यानीं मनीं चिंतनीं ॥ स्त्रीवांचूनी स्मरेना ॥ ३२ ॥ कामिनी कामाचा अध्यास ॥ हावभाव अतिविलास ॥ गुणलावण्य सुरतरस ॥ आसक्त मानस तेठायीं ॥ ३३ ॥ रतिसुखाचा आराम[9] ॥ का

---

१ वैराग्य. २ आलें. ३ मेंढा. ४ उठत नाहीं. ५ विषयावर प्रेम करणारा. ६ दारूपिण्यानें. ७ आपला अर्थ. ८ लोभी. ९ बाग.

मिनी क्रीडेचा संभ्रम ॥ तेणें दुर्धर झाला जो काम ॥ तयासि नियम चालेना ॥ ३४ ॥ धनधान्यपुत्रसुख ॥ वांछी इहलोक परलोक ॥
हा रजोगुणाचा देख ॥ अलोलिक अतिकामू ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ करोति कामवशगः कर्माण्यविजितेंद्रियः ॥ दुःखोदर्काणि संपश्य
न् रजोवेगविमोहितः ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ जेथ रजोंचा[1] वेग उदित ॥ तेथ कामग्रहो खवळे अद्भुत ॥ जो पुरुष झाला कामग्रस्त ॥ तो
सदा अंकित कामाचा ॥ ३६ ॥ ज्यासि विवेक नाहीं मानसीं ॥ तो जाण पां कामाची आंदणी[2] दासी ॥ काम नाचवी जैसें त्यासी ॥ ते
णें विकारेंसी नाचत ॥ ३७ ॥ कामांकित झालिया पुढें ॥ सकाम कर्म करणें पडे ॥ ज्याचें उत्तरोत्तर दुःख वाढे ॥ अतिदुर्वाडें गर्वितें
॥ ३८ ॥ रजोगुणें अतिमोहित ॥ यालागीं अजितेंद्रिय[3] अयुक्त ॥ जन्ममरणांचा अंकित ॥ कर्में करीत तद्रूपें ॥ ३९ ॥ रजोगुणाचा अ
तिबाध ॥ तेणें जन केले विषयांध ॥ रजरागी महामंद ॥ जाण प्रसिद्ध उद्धवा ॥ २४० ॥ रजें बांधल्यापाठीं जाण ॥ होय महामोहा
चें संचरण ॥ तेव्हां भ्रमाचें उंधेपण ॥ सैरा तमोगुण उल्हासे ॥ ४१ ॥ ऐशी प्राणियांची मती ॥ उद्धवा जाण निश्चितीं ॥ यालागीं का
म ते सेविती ॥ नव्हे विरक्ती विषयाची ॥ ४२ ॥ तुज ऐसें वाटेल चित्तीं ॥ बुडाली तरणोपायस्थिती[4] ॥ खुंटली प्राण्यांची परमगती ॥
विषयासक्ती अनिवार ॥ ४३ ॥ जीवा अविद्याविषयसंबंधू ॥ याचा बाधू अतिसुबद्धू ॥ अविद्यायोग अनादिसिद्धू ॥ तेणें दृढभेदू जी
वासी ॥ ४४ ॥ अंतःकरणही अनादि ॥ प्रवाहरूपें त्याची सिद्धी ॥ तेणें दृढ झाली विषयबुद्धी ॥ त्याग त्रिशुद्धी घडेना ॥ ४५ ॥ सत्वीं
उत्पन्न अंतःकरण ॥ परी तें प्रकृतिकार्य[5] जाण ॥ तेथें भोगध्यासें रजोगुण ॥ खवळला कोण आवरी ॥ ४६ ॥ विषय बांधिले विवेकीं[6] ॥
तो विषयत्याग नव्हे ये लोकीं ॥ उद्धवा तुझी आशंका हेच कीं ॥ ऐक तेविखीं उपावो ॥ ४७ ॥ विवेकियांच्याठायीं ॥ विषयबुद्धि नुपजे
पाही ॥ विक्षेपू झाल्या कहिंबही[7] ॥ अभ्यासू तिहीं करावा ॥ ४८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ रजस्तमोभ्यां यदपि विद्वान्विक्षिप्तधीः पुनः ॥ अतं
द्रितो मनो युंजन् दोषदृष्टिर्न सज्जते ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ होकां रजतमाचेनि गुणें ॥ जरी बुद्धि विक्षिप्त केली तेणें ॥ तरी आळस
सांडूनि सज्ञानें[8] ॥ आवरणें मनातें ॥ ४९ ॥ अस्थिमांसाचा घडिला ॥ विष्ठामूत्रांचा कोथळा ॥ स्त्री विचारितां कंटाळा ॥ नरक जि
व्हाळा तो भोगू ॥ २५० ॥ भोगीं दावूनि दोषदृष्टी ॥ मनासि विषयांची तुटी ॥ करावी गा उठाउठी ॥ नेमूनि नेहटीं मनातें ॥ ५१ ॥
ऐसेंनिही मन अतिदुर्धर ॥ नियमासि नावरे अनावर ॥ साधकांसि अतिदुस्तर ॥ आसक्त नर येअर्थीं ॥ ५२ ॥ तरी ऐक बापा साव
धान ॥ मनोनिग्रहाचें[9] लक्षण ॥ तेंही सांगेन साधन ॥ जेणें प्रकारें मन आकळे ॥ ५३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अप्रमत्तोऽनुयुंजीत मनो म

---

[1] रजोगुणाचा. [2] बक्षीस दिलेली. [3] इंद्रियपरतंत्र. [4] तरून जाण्याचा उपाय. [5] मायेचें कार्य. [6] विचारानें. [7] कधींमधीं. [8] ज्ञात्यानें. [9] मन स्वाधीन करण्याचें.

य्यर्पयन् शनैः ॥ अनिर्विण्णो यथाकालं जितश्वासो जितासनः ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ ॥ आळसनिद्रेसि दवडूनि दूरी ॥ जो सावधान निजवृत्ति[1] धरी ॥ माझें चिद्रूप निर्धारी ॥ शनैःशनैः करी अभ्यासू ॥ ५४ ॥ अभ्यासीं प्रथम भूमिका ॥ शिकावी आसनगाढिका ॥ मूळबंध अतिनेटका ॥ आसनजयो देखा शिकावा ॥ ५५ ॥ आसनजयो आल्या हातां ॥ सहजें चढे योगपंथा[2] ॥ तेथें प्राणापानसमता[3] ॥ अभ्यासितां होंलागे ॥ ५६ ॥ विषय ते मनाआधीन ॥ मन पवनासि[4] वश्य जाण ॥ अभ्यासें वश केला पवन ॥ सहजें मन स्थिरावें ॥ ५७ ॥ यापरी जो हळुहळू ॥ अभ्यासें सार्थक करी काळू ॥ अविरक्तही[5] परी प्रबळू ॥ होय भुकाळू परमार्थीं ॥ ५८ ॥ हरिचिंतनीं एकाग्र मन ॥ तैं एक होती प्राणापान ॥ हाचि पवनजयो पूर्ण ॥ योगसाधन सहजेंची ॥ ५९ ॥ तंव प्राणापान सम जोडी ॥ षट्चक्राचे पदर फोडी ॥ तैं विषयांतें चित्त सांडी ॥ विषयो वोसंडी चित्तातें ॥ ६० ॥ यापरी या अभ्यासवाटें ॥ सकाम कामाचा तणका तुटे ॥ सनकादिक येणें परिपाठें ॥ म्यां आत्मनिष्ठे लाविले ॥ २६१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एतावान्योग आदिष्टो मच्छिष्यैः सनकादिभिः ॥ सर्वतो मन आकृष्य मय्यद्धावेश्यते यथा ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ येणेंचि उपदेशें देख ॥ माझे शिष्य सनकादिक ॥ अभ्यासबळें अलोलिक ॥ निजात्मसुख पावले ॥ ६२ ॥ तो उपदेश कोण ह्मणसी ॥ जो वियोग चित्तविषयांसी ॥ हें म्यां सांगोनियां त्यांसी ॥ आत्माभ्यासीं लाविले ॥ ६३ ॥ मन जेथेंजेथें जाये ॥ तेथेंतेथें वस्तूचि आहे ॥ येणें अभ्यासें लवलाहें ॥ सनकादिक पाहे सिद्ध झाले ॥ ६४ ॥ चित्तासी विषयांचा वियोगू ॥ हा सनकादिकीं[6] साधिला योगू ॥ त्यांसि उपदेशावया सांगू ॥ मीं स्वयें श्रीरंगू उपदेष्टा[7] ॥ ६५ ॥ तें ऐकोनि उद्धव पाही ॥ विचारी आपुलियाठायीं ॥ मी श्रीकृष्णावेगळा कांहीं नाहीं ॥ सनकादिक कैं उपदेशिले ॥ ६६ ॥ सनकादिक ब्रह्मशीळ[8] ॥ पूर्वीं जाहले बहुकाळ ॥ कृष्ण येकाळीचें देवकीबाळ ॥ गुरुत्व केवळ घडे कैसें ॥ ६७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धव उवाच ॥ ॥ यदा त्वं सनकादिभ्यो येन रूपेण केशव ॥ योगमादिष्टवानेतद्रूपमिच्छामि वेदितुम् ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ उद्धव ह्मणे गा केशवा ॥ सनकादिकांसि केव्हां ॥ उपदेश केला गा तुवां ॥ जवळी तेव्हां मी कां नव्हतों ॥ ६८ ॥ येणेंचि रूपें हृषीकेशी ॥ योग सांगीतला तयांसी ॥ किंवा रूपांतरें ह्मणसी ॥ तें जाणावयासी मज इच्छा ॥ ६९ ॥ कोण काळ समयो कोण ॥ कोण योग कैसा प्रश्न ॥ तें रूपा करोनि आपण ॥ मज संपूर्ण सांगावें ॥ २७० ॥ ऐकोनि उद्धवाचा प्रश्न ॥ रूपें कळवळला नारायण ॥ हंसइतिहास[9] निरूपण ॥ आपुलें आपण सांगत ॥ ७१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ पुत्रा हिरण्यगर्भस्य मानसाः सनकादयः ॥ पप्रच्छुः पितरं सूक्ष्मां योगस्यै

---

[1] आपली वृत्ती. [2] योगाचे मार्गास. [3] प्राण व अपान यांचा सारखेपणा. [4] वायूस. [5] संसारी. [6] सनक आदि चारजणांनीं. [7] गुरु. [8] ब्रह्मनिष्ठ. [9] हंसाची कथा.

त्यामाजी सांपडला स्पर्शमणी ॥ अमृत स्रवे त्यापासोनी ॥ तैसा सभाग्यपणीं उद्धवा ॥ ३१० ॥ सांगतां श्रीमहाभागवता ॥ श्रीकृ
ष्णासारिखा वक्ता ॥ त्याहीमाजी हंसगीतकथा ॥ आदरें सांगता हरि झाला ॥ ११ ॥ सनकादिकांची जे प्राप्ती ॥ ते दाटूनि उद्धवाचे
हातीं ॥ स्वयें देतसे श्रीपती ॥ त्याचें भाग्य किती वर्णावें ॥ १२ ॥ ब्रह्मरूप स्वयें वक्ता ॥ तोही उपदेशी ब्रह्मकथा ॥ गुरु ब्रह्मचि स्वभा
वतां ॥ हे सभाग्यता उद्धवीं ॥ १३ ॥ यालागीं निजभाग्यें भाग्यवंतू ॥ जगीं उद्धवचि अतिविख्यातू ॥ ज्यालागीं स्वयें जगन्नाथू ॥ ज्ञा
नसमर्थू तुष्टला ॥ १४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ वस्तुनो यद्यनानात्वमात्मनः प्रश्न ईदृशः ॥ कथं घटेत वो विप्रा वक्तुर्वा मे क आश्रयः ॥ २२ ॥
॥ ॥ टीका ॥ ॥ परमात्मा अवघा एक ॥ तेथ मी तूं हें न रिघे देख ॥ तूं कोण हें जें वाचिक ॥ वृथा शाब्दिक वाचाळ ॥ १५ ॥ तुह्मीं केला जो
प्रश्न ॥ त्यासि द्यावया प्रतिवचन ॥ वक्त्यासि आश्रयो नाहीं जाण ॥ मीतूंपण दिसेना ॥ १६ ॥ तुह्मी पुसिलें नेणोन ॥ म्यां काय सांगावें जाणो
न ॥ मुळीं नाहीं मीतूंपण ॥ पुशिला प्रश्न तो मिथ्या ॥ १७ ॥ नामरूपवर्णव्यक्ती ॥ नाहीं स्वजातिविजाती ॥ विप्रहो तुमची वचनोक्ती ॥ नघडे
निश्चितीं सत्यत्वें ॥ १८ ॥ चारी पुरुषार्थ पूर्ण करिती ॥ हे विप्रनामाची[3] परम ख्याती ॥ त्या तुह्मांस ज्ञानाची प्रश्नोक्ती ॥ न घडे निश्चितीं
विप्रहो ॥ १९ ॥ असावें जरी बहुपण ॥ तरीं पुसणें घडे तूं कोण ॥ आत्म्याचेठायीं ऐसा प्रश्न ॥ न घडे जाण सर्वथा ॥ ३२० ॥ प्रश्न
न घडे आत्म्याच्याठायीं ॥ जरी ह्मणाल देहाविषयीं ॥ तेंही न घडे गा पाहीं ॥ तो देहाचेठायीं योजेना[4] ॥ २१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पंचात्म
केषु भूतेषु समानेषु च वस्तुतः ॥ को भवानिति वः प्रश्नो वाचारंभो ह्यनर्थकः ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ आदि ब्रह्मा अंतीं मशक ॥ देह ति
तुका पांचभौतिक ॥ तेथ तूं कोण ह्मणावया देख ॥ वेगळीक दिसेना ॥ २२ ॥ कटक[6] कुंडलें मुकुट माळा ॥ करमुद्रिका[7] कटिमेखळा[8] ॥
अलंकार पाहतां डोळां ॥ सुवर्णावेगळा अंशु नाहीं ॥ २३ ॥ कां घडा गाडगें वेळणी ॥ परेळ रांजण माथणी ॥ हें मृत्तिकेवांचुनी ॥
आन कांहीं असेना ॥ २४ ॥ तेवीं सर्वदेहीं देहत्व जाण ॥ पांचभौतिक समसमान ॥ तेथ ह्मणावया तूं कोण ॥ वेगळेपण असेना
॥ २५ ॥ वस्तु वस्तुत्वें समसमान ॥ भूतें भूतत्वें समान जाण ॥ तेथ प्रश्नोक्ति वाचारंभण ॥ तूं कोण हें अनर्थू ॥ २६ ॥ होकां आप
णियां आपण ॥ जो कोणी पुसेल तूं कोण ॥ तो अतिभ्रमें भुलला जाण ॥ निजात्मज्ञान विसरला ॥ २७ ॥ विचारितां प्रश्ना
चा अर्थू ॥ एवढा दिसतसे अनर्थू ॥ कांहीं भासेना[9] परमार्थू ॥ तूं कोण हा व्यर्थू प्रश्न तुमचा ॥ २८ ॥ देहासि तूं कोण ऐसें ॥ आत्मा
जैं स्वयें पुसे ॥ तैं आत्मत्वा लागलें पिसें ॥ अतिभ्रंशें भूलला ॥ २९ ॥ दोरा अंगीं सर्प नसे ॥ त्यावरी तो भ्रमें भासे ॥ त्या सर्पातें

---

१ आपल्या दैवानें. २ फार प्रसिद्ध. ३ ब्राह्मण या नांवाची. ४ मिळेना. ५ मुकुट. ६ कडीं. ७ अंगठी. ८ कटिदोरा. ९ दिसत नाहीं.

दोरू पुसे ॥ तूं कोण ऐसें तें मिथ्या ॥ ३३० ॥ या रीतीं त्यांचें प्रश्नखंडन ॥ उद्धवा तैं म्यां केलें जाण ॥ तेणें भेदांचें[1] निरसन ॥ वचनोक्ती जाण दाविलें ॥ ३१ ॥ प्रश्नखंडनाचे अर्थें ॥ कैंचीं करणें कैंचीं भूतें ॥ भेद नाहीं जीवशिवांतें ॥ हेंही त्यांतें सूचिलें ॥ ३२ ॥ याहीवरी जे कथा गहन ॥ परम कारणेंसि अभिन्न ॥ त्यासि म्यां सांगीतलें निजज्ञान[2] ॥ ऐक सावधान उद्धवा ॥ ३३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मनसा वचसा दृष्ट्या गृह्यतेऽन्यैरपींद्रियैः ॥ अहमेव न मत्तोऽन्यदिति बुध्यध्वमंजसा ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ मजवेगळा तिळाइतुका ॥ रिता ठावो नाहीं देखा ॥ तेथ व्याप्य आणि व्यापका ॥ अभिन्नत्व[3] देखा सहजची ॥ ३४ ॥ मनाच्या संकल्पा आलें जें जाण ॥ त्यासि शाब्दिक[4] ह्मणती भिन्न ॥ माझ्या स्वरूपाचा विवर्त्त तें मन ॥ हे अभिन्न खूण कळेना ॥ ३५ ॥ मन लक्षितां सावधान ॥ सर्वथा लक्षेना तें जाण ॥ परब्रह्महीही अलक्ष्य पूर्ण ॥ दोनी समान चिद्रूपें ॥ ३६ ॥ शिंपीच्या अंगीं रुपें आभासे ॥ तेंचि तेथें साचें[5] नसे ॥ माझ्या स्वरूपीं मन तैसें ॥ मिथ्या भासे कल्पनामात्र ॥ ३७ ॥ विचारितां शब्दमहिमान[6] ॥ शब्दस्वरूपें ज्ञानघन ॥ ज्ञानार्थेंवीण वचन ॥ अल्पही जाण असेना ॥ ३८ ॥ वक्ता वाच्य वचन ॥ तिनी मीचि आहें जाण ॥ बोलु बोलका मजवीण ॥ दुसरा जगीं कोण असे ॥ ३९ ॥ मी वेदू जाण पां वेदांचा ॥ प्रणवरूप[7] मीचि साचा ॥ मुख्य वाचेची मीचि वाचा ॥ वेगळा शब्दाचा ठाव नाहीं ॥ ३४० ॥ दृष्टीचें जें देखणेंपण ॥ देखणें तेंचि मुख्य ज्ञान ॥ तेंचि जाण ब्रह्म पूर्ण ॥ चैतन्यघन निजदृष्टीं ॥ ४१ ॥ मीचि डोळा मीचि देखता ॥ दृश्य द्रष्टा मीचि तत्त्वतां ॥ मजवेगळी देखणी अवस्था ॥ नाहीं सर्वथा तिहीं लोकीं ॥ ४२ ॥ मीच डोळियांचा निजडोळा ॥ मी सर्वांगदेखणा सोज्ज्वळा ॥ मजवेगळी देखणी कळा ॥ नाहीं जिव्हाळा आणिकांचा ॥ ४३ ॥ मीचि शब्दांतें शब्दविता[8] ॥ मीचि श्रवणामाजी श्रोता ॥ ऐशिया एकात्मता पाहतां ॥ शब्द निःशब्दता परब्रह्म ॥ ४४ ॥ कान वचन मीचि श्रोता ॥ मीचि जाणता शब्दार्था ॥ ऐकणाही मजपरता ॥ नाहीं तत्त्वतां श्रवणाचा ॥ ४५ ॥ मीचि घ्राण मीचि वास ॥ मीचि जाणता सुवास ॥ मजवेगळा रहिवास[9] ॥ परिमळास असेना ॥ ४६ ॥ रसना रसत्वें चोखडी ॥ परी ते केवळ चामडी ॥ कापून सोडिल्या बापुडी ॥ गोडी अगोडी ते नेणें ॥ ४७ ॥ मीचि रसू मीचि रसना ॥ स्वादु सेविता मीचि जाणा ॥ मजवेगळा चवीचाखणा ॥ रसज्ञपणा आन नाहीं ॥ ४८ ॥ इतरइंद्रियवृत्ती ॥ त्याही मद्रूप जाण निश्चितीं ॥ मी सर्वात्मा आत्ममूर्तीं ॥ क्रियाशक्ती तेही मीची ॥ ४९ ॥ पांचभौतिकदेहाचा गोळा ॥ भ्रांत ह्मणती मजवेगळा ॥ चुकोनि व्यापका सकळा ॥ तो कोठें निराळा राहोंलाहे ॥ ३५० ॥ जैसे जळींचे जळतरंग ॥ जळरूपें जळीं क्रीडती चां

---

१ द्वैताचें. २ आत्मज्ञान. ३ ऐक्य. ४ शब्दज्ञानी. ५ खरें. ६ शब्दाचा मोठेपणा. ७ ओंकारस्वरूप. ८ शब्द करणारा. ९ राहणें.

ग ॥ तैसे माझ्या स्वरूपीं सांग ॥ देह अनेग मद्रूपें ॥ ५१ ॥ होकां घृताची पुतळी॥ थिजोनि अवयवें आकारली ॥ परी ते नव्हे घृतप
णावेगळी ॥ तेवीं भूतें झालीं मजमाजी ॥ ५२ ॥ जळीं जळाची जळगार ॥ जळामाजी भासली साकार ॥ तैसें मजमाजी चराचर ॥
अभिन्न साचार मद्रूपें ॥ ५३ ॥ जैसा एकला एक तंतू ॥ सुतेंचि विणिला सुताआंतू ॥ त्यां वेगळाले ह्मणती तांतू ॥ तैसें मजआंतू ज
ग भांसे[1] ॥ ५४ ॥ तंतु पाहतां वस्त्र न दिसे ॥ आत्मा लक्षितां जगचि नसे ॥ येणें अद्वैततत्त्वसौरसें ॥ पाहे अनायासें परब्रह्म ॥ ५५ ॥
ऐसा अद्वैतबोधें मी एकू ॥ सर्वात्मा सर्वात्मकू ॥ हा निश्चयेंसि विवेकू ॥ बुद्धिबोधें निष्टंकू[2] जाणावा ॥ ५६ ॥ मीचि एक सर्वांठायीं ॥
मानिल्या हेंचि दृढ पाही ॥ मग साधनाचें कार्य नाहीं ॥ ठायींच पाही नित्यमुक्त ॥ ५७ ॥ सर्वात्मा चैतन्यघन ॥ अतिसुलभ हें निज
ज्ञान ॥ उद्धवा म्यां हें सांगोन जाण ॥ भेदखंडन केलें त्यांचें ॥ ५८ ॥ सनकादिकांचा पूर्वील प्रश्न ॥ जो ब्रह्मादिकां अटक जाण ॥
त्याचेंही म्यां प्रतिवचन ॥ विंवंचूनि[3] ज्ञान सांगीतलें ॥ ५९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ गुणेष्वाविशते चेतो गुणाश्चेतसि च प्रजाः ॥ जीवस्य दे
ह उभयं गुणाश्चेतो मदात्मनः ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ तुह्मी ब्रह्म्यासि पुसिलें पाही॥ विषय रिघाले चित्ताच्याठायीं ॥ चित्त जें रिघालें
विषयीं ॥ तें वेगळें कांहीं निवडेना ॥ ३६० ॥ विषयत्यागेविण ॥ कदा नव्हे ब्रह्मज्ञान ॥ त्याही त्यागाची त्यागिती खुण ॥ ऐक संपूर्ण
सांगेन ॥ ६१ ॥ चित्त विषय दोनी पाहे ॥ तें जीवाचें निजस्वरूप नव्हे ॥ या उपाधिवशें[4] दोनी देहें ॥ लागलीं पाहे प्रवाहरूपें ॥ ६२ ॥
कर्तृत्वभोक्तृत्वरूपें जाण ॥ विषयी जाहलें अंतःकरण[5] ॥ तेणें उभयदेहांचें कारण ॥ अहंकार जाण खवळला ॥ ६३ ॥ तेणें भुलविलें
चित्त विषयासी ॥ विसरला निजात्मरूपासी ॥ तेणें तदात्मता जीवामनांसी ॥ अतिशयेंसी दृढ झाली ॥ ६४ ॥ चित्त जीवाचें स्वरूप
होतें ॥ तरी विषयीं लोलुपत्व[6] नव्हतें ॥ हे उभयउपाधी जीवातें ॥ अभिमान येथें वाढला ॥ ६५ ॥ जेवीं का विसरोनि आपणासी ॥
स्वप्नींचिया स्वप्नदेहासी ॥ अतिप्रीति वाढे पुरुषासी ॥ तैशी दशा जीवासी येथ झाली ॥ ६६ ॥ नित्य शुद्ध मुक्त जाण ॥ जीवाचें स्व
रूप चैतन्यघन ॥ त्यासि अभिमानें हें जाण ॥ मिथ्याबंधन लाविलें ॥ ६७ ॥ यालागीं सांडावा अभिमान ॥ तैं तुटे सकळ बंधन ॥
अभिमान निरँसावया[7] जाण ॥ माझें भजन करावें ॥ ६८ ॥ परी वैराग्येंवीण माझी भक्ती ॥ पोंचट जाण पां निश्चितीं ॥ जैं वैराग्य
युक्त उपजे भक्ती ॥ तैं मद्रूपप्राप्ती जीवासी ॥ ६९ ॥ हृदयीं विषयांचा अभावो[8] ॥ आणि सर्वांभूतीं भगवद्भावो ॥ हे वैराग्ययुक्ती पा
हाहो ॥ तैं जीवासि निर्वाहो मद्रूपीं ॥ ३७० ॥ जीव मद्रूपचि तत्त्वतां ॥ त्यासि देहाभिमान जीवितां ॥ सदा भूतीं मद्भावो पाहतां ॥ सि

---

[1] भासवें. [2] सनिश्चय. [3] विचार करून. [4] उपाधीच्या योगानें. [5] मन. [6] लोभिष्ठपणा. [7] नाहींसा करण्याकरितां. [8] नसणें.

द्द मद्रूपता उद्बोधे ॥ ७१ ॥ जीवासि जाहल्या मद्रूपता ॥ सहज त्यागू विषयचित्ता ॥ देखे उभयासि मि[1]थ्यता ॥ न त्यागितां हा त्यागू ॥ ७२ ॥ चित्तविषयांचा त्यागू ॥ पुत्रहो तुह्मी पुशिला चांगू ॥ तो म्यां सांगीतला अ[2]व्यंगू ॥ हा ज्ञानमार्गू अतिशुद्ध ॥ ७३ ॥ ह्मणाल मिथ्या उभयांचें भान ॥ तरी एवढें जीवासि बंधन ॥ लागावया कांहीं कारण ॥ ऐसें कांहीं मन कल्पील जरी ॥ ७४ ॥ गगन[3]सुमनांची माळा ॥ कधीं कोणी लेइली गळां ॥ तारू बुडे मृगजळां ॥ हें कोणी डोळां देखिलें काय ॥ ७५ ॥ सत्यासि तरी बाधक ॥ कदा बाधूं न शके लटिक ॥ ऐसें कल्पाल तुह्मी कल्पक ॥ तोही परिपाक अवधारा ॥ ७६ ॥ तरी परिसा सावधान ॥ तें मी सांगेन निरूपण ॥ जेणें जीवासि बंधन ॥ लटिकेंचि जाण दृढ झालें ॥ ७७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ गुणेषु चाविशच्चित्तमभीक्ष्णं गुणसेवया ॥ गुणाश्च चित्तप्रभवा मद्रूप उभयं त्यजेत् ॥२६॥ ॥ टीका ॥ ॥ अनादिसंसारमाळेच्याठायीं ॥ नित्य विषय भोगिले पाही ॥ ते ठसावले चित्ताच्याठायीं॥वारंवार देहीं सेवितां ॥ ७८ ॥ चित्तासि विषयांची अतिप्रीती ॥ तेणें वाढली विषयासक्ती ॥ तें प्रवेशलें विषयांप्रती ॥ न निघे मागुतीं सर्वथा ॥ ७९ ॥ बुद्धीसि विषयांचें ध्यान ॥ चित्तीं विषयांचें चिंतन ॥ विषयांलागीं तळमळी मन ॥ विषयाभिमान तेणें झाला ॥ ३८० ॥ विषयीं खवळल्या अभिमान ॥ देहद्वयाचें दृढ बंधन ॥ जीवासि लागलें अतिकठिण ॥ परम दारुण दुस्तर ॥ ८१ ॥ मग त्या देहाचे विकार ॥ ते आपुले मानी साचार ॥ अंध पं[4]गू मी कु[5]ष्ठी नर ॥ स्वरूपें सुंदर मी ज्ञाता ॥ ८२ ॥ मी देह हें मानोनि चित्तें ॥ निजरूप विसरला भावार्थें ॥ हें मिथ्याबंधन जीवातें ॥ सत्यत्वें त्यातें अभिमानू ॥ ८३ ॥ मिथ्या बुद्धिबळाचा खेळ ॥ हारी जैती निष्फळ ॥ तरी खेळल्या अभिमान प्रबळ ॥ तैसें देहबळ जीवासी ॥ ८४ ॥ त्या खेळाचे घोडे हस्ती ॥ पहिलीं काय जीत होतीं ॥ मा मारिलें ह्मणोनि भांडती ॥ तेवीं जन्मपंक्ती जीवासी ॥ ८५ ॥ हें निरसावया जीवबंधन ॥ निःशेष सांडावा देहाभिमान ॥ अभिमान सांडितांचि जाण ॥ मद्रूपपण सहजेंची ॥ ८६ ॥ जीवें साधिल्या मद्रूपता ॥ सहजेंचि त्याग विषयचित्ता ॥ माझे स्वरूपीं अ[6]हंना ॥ नाहीं वार्त्ता विषयांची ॥ ८७ ॥ जेवीं बुद्धिबळाचा खेळ मोडे ॥ तेव्हां राजा प्रधानादि लांकुडें ॥ तेवीं अहंकारू निमाल्या पुढें ॥ प्रपंच उडे मिथ्यात्वें ॥ ८८ ॥ जेवीं स्वप्नींचा स्वप्नाभिमान ॥ दारा पुत्र स्वजन धन ॥ स्वदेहेंसि मिथ्या जाण ॥ जागेपण झालिया ॥८९ ॥ तेवीं पावलिया माझी सरूपता ॥ कैंचा देह कैंची अहंता ॥ विषय चित्तांची वार्त्ता ॥ नाहीं अवस्था गुं[7]णत्रय ॥ ३९० ॥ तिहीं अवस्थीं अवस्थाभूत ॥ जागृतिस्वप्नसुषुप्तिमंत ॥ तो होऊनि जीव निर्[8]वस्थ ॥ परमात्म्यांत मिळे कैसा ॥ ९१ ॥ ऐसा कांहीं कल्पाल भावो ॥ त्या जीवासि अवस्थांचा अभा

---

१ खोटेपणा. २ सांग. ३ आकाशरूप फुलांची. ४ पांगळा. ५ कोढी. ६ अहंकार. ७ तीनगुणांची. ८ अवस्थारहित.

वो ॥ त्रिगुणगुणांचा स्वभावो ॥ या वृत्ति पहाहो बुद्धीच्या ॥ ९२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ जाग्रत्स्वप्नः सुषुप्तं च गुणतो बुद्धिवृत्तयः ॥ तासां विलक्षणो जीवः साक्षित्वेन विनिश्चितः ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ ॥ तिन्ही गुणांच्या तिन्ही वृत्ती ॥ सत्वगुणाची जागृती ॥ रजोगुणें स्वप्नप्राप्ती ॥ केवळ सुषुप्ती तमाची ॥ ९३ ॥ या तिनी अवस्था पाही ॥ दृढ जडल्या बुद्धीच्याठायीं ॥ जीवासि यांचा संबंध नाहीं ॥ तो वेगळा पाही साक्षित्वें ॥ ९४ ॥ जैं जीवाअंगीं अवस्था जडे ॥ तैं तो अवस्थेमाजी बुडे ॥ तिहींचें साक्षित्व यासि न घडे ॥ ऐक निवाडें अवस्था ॥ ९५ ॥ जागृतीमाजी नाहीं स्वप्न ॥ स्वप्न जागृतीसि नेणें जाण ॥ सुषुप्ती नेणें जागृतिस्वप्न ॥ सुषुप्तीचें भान त्या नेणती ॥ ९६ ॥ जीवू अवस्थांचा अभिमानी ॥ हेंही न घडे जीवालागुनी ॥ विश्व तैजस प्राज्ञ तिन्हीं ॥ अवस्थाभिमानी हे तिहींचे ॥ ९७ ॥ जो जे अवस्थेचा अभिमानी ॥ तो अवस्थेसवें जाय निमोनी ॥ जीव वेगळा साक्षिपणीं ॥ अवस्थाभिमानी[1] तो नव्हे ॥ ९८ ॥ देहातीत[2] गुणातीत[3] ॥ तिहीं अवस्थाअतीत ॥ द्रष्टा साक्षी निश्चित ॥ जाणता येथ तो जीवू ॥ ९९ ॥ अवस्थाभिमान नाहीं जीविता ॥ तरी कवण भोगी तिनी अवस्था ॥ मी निजलों मीचि जागता ॥ म्यां स्वप्नावस्था देखिली ॥ ४०० ॥ ऐसा प्रत्यक्ष अनुभवू ॥ स्वयें बोलता हे जीवू ॥ हा ह्मणाल जीवाचा स्वभावू ॥ ऐक अभिप्रावू सांगेन ॥ १ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यर्हि संसृतिबंधोऽयमात्मनो गुणवृत्तिदः ॥ मयि तुर्ये स्थितो जह्यात्त्यागस्तद्गुणचेतसाम् ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो डोल्हारां बैसे यथासुखें ॥ तो न हालतां हाले तेणें हरिखें ॥ उंच नीच खाय झोंके ॥ निजकौतुकें हिंदोळे ॥ २ ॥ हिंदुळतांही प्रबळ ॥ डोल्हाराचि अतिचंचळ ॥ बैसला तो निजनिश्चळ ॥ मानी केवळ मी हालतों ॥ ३ ॥ जीवासि झाली तैशी वाणी ॥ अहंममतेच्या अभिमानीं ॥ तिनी अवस्था स्वयें मानी ॥ जेवीं कां स्वप्नीं गृहदारा[4] ॥ ४ ॥ होकां लोखंडकाम घडतां ॥ लोहाचे[5] घाय अग्नीचे माथां ॥ प्रत्यक्ष दिसती वाजतां ॥ लोहतदात्मतासंयोगें ॥ ५ ॥ तेणें अग्नि संगें वाडे कोडें ॥ लोहकामचि घडे मोडे ॥ परी अग्नीस घडमोड न घडे ॥ तेणें पडिपाडें जीवू येथें ॥ ६ ॥ जेवीं अग्निवीण लोह न घडे ॥ तेवीं आत्मसंयोगेंवीण पुढें ॥ बुद्धि केवळ जड वेडें ॥ कर्मक्रिया नातुडे सर्वथा ॥ ७ ॥ लोह घडवूनि अग्नि न घडता ॥ कर्म करूनि जीवात्मा अकर्ता ॥ तरी वृत्तिसंयोगें तदात्मता ॥ अहंकर्ता हें मानी ॥ ८ ॥ जीव आपुले प्रकाशता ॥ झाला वृत्तीतें प्रकाशकरिता ॥ वृत्ति जीवासि नानावस्था ॥ निजस्वभावतां देतसे ॥ ९ ॥ सूर्यें प्रकाशिलें जळ ॥ जळें केलें प्रतिमंडळ ॥ खळाळ चंचळ निश्चळ ॥ कांपे चळचळ जळकंपें ॥ ४१० ॥ सूर्याची गगनीं[6] नित्य वस्ती ॥ जो जळीं आणिला अधोगती ॥ तेवीं वृत्तीचिया निजख्यातीं[7] ॥

---

[1] मला अवस्था असा अभिमान बाळगणारा. [2] देहावेगळा. [3] गुणावेगळा. [4] घर व बायको. [5] लोखंडाचे. [6] आकाशांत. [7] प्रसिद्धीनें.

मुक्तांतें दाविती बद्ध करूनी ॥ ११ ॥ आत्म्यानें प्रकाशिली वृत्ती ॥ वृत्तीनें आत्म्यासि जीवप्राप्ती ॥ जीवा जीवत्वें देहासक्तीं[1] ॥ सुख
दुःखप्राप्ती तेणें भोगी ॥ १२ ॥ एवं वृत्तीचिया संगतीं ॥ वाढली विषयाची आसक्ती[2] ॥ तेणें संसारबंधप्राप्ती ॥ झाली निश्चितीं जीवासी
॥ १३ ॥ होकां गुणचित्तविषयासक्तीं ॥ जरी झाली जीवासि बंधप्राप्ती ॥ तरी आवरा विषयासक्ती ॥ वैराग्ययुक्तीं गुरुकृपा ॥ १४ ॥
ऐक गुरुकृपेची मातू[3] ॥ तिहीं अवस्थांमाजी संततू[4] ॥ जो मी तुरीय गुणातीतू ॥ ते अभ्यासवीतू निजबोधें ॥ १५ ॥ नवल अभ्यासाची
कोटी ॥ विषयवृत्तीच्या पाठींपोटीं ॥ मज तुरीयातें दावी दिठी ॥ बोधपरिपाठी निजबोधें[5] ॥ १६ ॥ मी तुरीय तंव सतत ॥ सर्वीं असें
सर्वगत ॥ शिष्यवृत्तीसी मज आंत ॥ गुरु निजस्वार्थ दाखवी ॥ १७ ॥ सुतावेगळें लुगडें ॥ करूं जातां गा उघडें ॥ तेथ क्रियाचि ला
जोनि बुडे ॥ मागें पुढें सूतची ॥ १८ ॥ तेवीं साधकासि जाण ॥ विषयासि विषयभान ॥ माझे स्वरूपीं नव्हेचि भिन्न ॥ चैतन्यघन मी
चि मी ॥ १९ ॥ तेथ नामरूपवर्णभेद ॥ नाहीं कर्म कर्त्ता विधिवाद[6] ॥ बुडाले प्रणवेंसि वेद ॥ केवळ शुद्ध मी एक ॥ ४२० ॥ तेथें भ्रमें
सहित पळाली भ्रांती ॥ क्रियेसहित पळाली प्रवृत्ती[7] ॥ लाजा निवाली निवृत्ती ॥ स्वस्वरूपीं[8] वृत्ती विनटली ॥ २१ ॥ सूर्योदयो जाहल्या
पाठीं ॥ समूळ अंधारातें घोंटी ॥ खद्योताची[9] नळी निमटी ॥ नक्षत्रकोटी तत्काळ गिळी ॥ २२ ॥ तेवीं माझी स्वरूपप्राप्ती ॥ मायेची
मावळे स्फूर्ती ॥ लाज विसरे प्रवृत्तिनिवृत्ती ॥ नित्य तृप्ती स्वानंदें ॥ २३ ॥ ऐशी माझ्या स्वरूपाची गोडी ॥ जैं साधकां लागे धडफुडी ॥
तैं चित्त विषयातें सांडी ॥ विषयो वोसंडी चित्तातें ॥ २४ ॥ जीं देठीं वाढलीं फळें ॥ तींचि परिपाकाचे वेळें ॥ होती देठावेगळें ॥ देठू
तो फळें धरीना ॥ २५ ॥ कां मथूनि काढिलें नवनीत[10] ॥ तें परतोनि घातल्या ताकाआंत ॥ तें ताकेंसि होय अलिप्त ॥ तैसें चित्त विषयां
सी ॥ २६ ॥ पावल्या माझी स्वरूपता ॥ दैवबळें विषयो देतां ॥ चित्तासि नुपजे विषयावस्था ॥ स्वभावतां अलिप्त ॥ २७ ॥ एवं सा
धिल्या महायागू ॥ चित्तविषयांचा वियोगू ॥ सहजेंचि होय चांगू ॥ हा सुगम सांगू उपावो ॥ २८ ॥ येथें झणें आशंका धराल देख ॥
स्वरूप शुद्ध अवघें एक ॥ तेथें कैंचें बाध्यबाधक ॥ काय साधक साधिती ॥ २९ ॥ ऐशाही संधीमाजी जाण ॥ अहंता बंधाचें कार
ण ॥ त्याचें सांगेन मी लक्षण ॥ सावधान परियेसी ॥ ४३० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अहंकारकृतं बंधमात्मनोऽर्थविपर्ययम् ॥ विद्वान्निर्विद्य सं
सारचिंतां तुर्ये स्थितस्त्यजेत् ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ जेथ मुहूर्तमात्र वसती घडे ॥ त्या ठायाचा अभिमान चढे ॥ ऐसें अभिमानाचें सां
कडें ॥ पाहे पां रोकडें कौतुक त्याचें ॥ ३१ ॥ बुद्धि अहंकार अळुमाळ ॥ उठतां शुद्धासि करी शबळ[11] ॥ तेणें देहयोगें धरिल्या बळ ॥ करी

---

१ देहावर प्रीति. २ प्रेम. ३ गोष्ट. ४ निरंतर. ५ आत्मज्ञानानें. ६ वेदवाद. ७ कर्ममार्ग. ८ आपल्या स्वरूपांत. ९ काजव्याची. १० लोणी. ११ मायिक.

तत्काळ विपरीत ॥ ३२ ॥ अहंकार खवळल्या जाण ॥ करी आनंदाचें आवरण ॥ बुडे परमात्मस्फूर्तीचें स्फुरण ॥ देहाचें मीपण वाढवी ॥ ३३ ॥ जेवीं कूर्मीच्या पिलियां ॥ चंक्षुरमृतें तृप्ती तयां ॥ तेंचि मातेसि चुकलिया ॥ मग भुकेलिया कर्दम सेवी ॥ ३४ ॥ तेवीं खुंटलिया आनंदअभिव्यक्ती ॥ जीवासि वाढे विषयासक्ती ॥ कामिनीकामापंगिस्त होती ॥ चिंता चित्तीं विषयांची ॥ ३५ ॥ विसरला आपुलें पूर्णपण ॥ धनालागीं अतिहीन दीन ॥ मी देहवंत परिच्छिन्न ॥ ऐसा देहाभिमान दृढ होय ॥ ३६ ॥ तेणें कर्माकर्माचे आधांत ॥ नाना नरकयातना होत ॥ जन्ममरणादिआवर्त ॥ तेणें दुःखी होत अतिदुःखें ॥ ३७ ॥ भोगितां दुःखयातना ॥ त्रासु उपजे ज्याच्या मना ॥ न साहवे भंववेदना ॥ तेणें देहाभिमाना सांडावें ॥ ३८ ॥ अभिमान सांडितां नसंडे ॥ हेंचि दुर्घट थोर मांडे ॥ यालागीं साधनाचें सांकडें ॥ सोसणें पडे साधकां ॥ ३९ ॥ जेंजें करावें साधन ॥ साधनीं रिघे साधनाभिमान ॥ धांवणें नागवी संपूर्ण ॥ साधनीं विघ्न होय तैसें ॥ ४४० ॥ ऐक साधकांचें साधन ॥ वेदोक्त स्वधर्माचरण ॥ साधावें वैराग्य पूर्ण ॥ माझें भजन अतिप्रीतीं ॥ ४१ ॥ तत्काळ जावया देहाभिमान ॥ अखंड माझें नामस्मरण ॥ गीत नृत्य हरिकीर्तन ॥ सर्वांभूतीं समान मद्भावो ॥ ४२ ॥ मद्भावें भूतें समस्त ॥ सर्वदा पाहतां सतत ॥ मी तुरीय जो सर्वगत ॥ ते ठायीं चित्त प्रवेशे ॥ ४३ ॥ तिहीं अवस्थांमाजी मी सतत ॥ तिहीं अवस्थांतें प्रकाशित ॥ तिहीं अवस्थांहूनि अतीत ॥ तो जाण निश्चित तुरीय ॥ ४४ ॥ तिहीं गुणांहूनि परता ॥ चौथेपणेंवीण चौथा ॥ तो मी तुरीय जाण तत्त्वतां ॥ तेठायीं चित्ता जो ठेवी ॥ ४५ ॥ तेथें ठेवितां चित्ता ॥ जीवू पावे मद्रूपता ॥ निमाली सांसारिकचिंता ॥ विषयावस्था बुडाली ॥ ४६ ॥ तेव्हां चित्त चिंता चिंतन ॥ विषयवासना अभिमान ॥ अवघियांचें होय शून्य ॥ मी स्वानंदघन स्वयें प्रकटें ॥ ४७ ॥ न तुटतां भेदाचें भेदभान ॥ जो ह्मणवी मी सज्ञान ॥ वृथा धरी ज्ञानाभिमान ॥ तोही अज्ञान तें ऐका ॥ ४८ ॥

॥ श्लोक ॥ ॥ यावन्नानार्थधीः पुंसो न निवर्त्तेत युक्तिभिः ॥ जागर्त्यपि स्वपन्नज्ञः स्वप्ने जागरणं यथा ॥ ३० ॥ ॥ टीका ॥ ॥ नाना वर्ण नाना व्यक्ती ॥ नाना गोत्रें नाना जाती ॥ अधमोत्तमविधानस्थिती ॥ भेदु चित्तीं दृढ भासे ॥ ४९ ॥ मी काळा गोरा सांवळा ॥ मी सज्ञानत्वें आगळा ॥ मी उत्तम पवित्र लीळा ॥ मी कुळें आगळा सत्कुलीन ॥ ४५० ॥ ऐशी झाल्या भेदप्राप्ती ॥ पाहतां अभेदपरा श्रुती ॥ साधकां शास्त्रार्थयुक्तीं ॥ भेदनिवृत्ती ज्यां नव्हेची ॥ ५१ ॥ त्यांचा व्यर्थ ज्ञानाभिमान ॥ त्याचें व्यर्थ कर्माचरण ॥ तो जागाचि निजेला जाण ॥ जागेपण त्या नाहीं ॥ ५२ ॥ दृढ जोकां देहाभिमान ॥ तेंचि कनकबीजसेवन ॥ करूनि थोर भ्रमला जाण ॥ अ

---

१ नेत्ररूपअमृतानें. २ चिखल. ३ पराधीन. ४ प्रहार. ५ संसाराचें दुःख. ६ शेवटचा. ७ द्वैतभास. ८ ऐक्य सांगणाऱ्या. ९ धोत्र्याचें बीज खाणें.

विद्या दीर्घस्वप्नभेदु देखे ॥ ५३ ॥ बोसणतां बोली नलभे अर्थू ॥ तेवीं पठणमात्रें परमार्थू ॥ श्रुतिशास्त्रांचा निजशास्त्रार्थू ॥ नव्हे प्राप्तू तयांसी ॥ ५४ ॥ वेदाध्ययन नित्य करिती ॥ अरण ब्राह्मण सूत्र निरुक्ती ॥ नव्हेच कामक्रोधनिवृत्ती ॥ पठणें परप्राप्ती कदा न घडे ॥ ५५ ॥ देहाभिमान भेददृष्टी ॥ पढतां श्रुतिशास्त्रांच्या कोटी ॥ परमार्थेंसि नव्हे भेटी ॥ भेददृष्टी नवचतां[1] ॥ ५६ ॥ जोकां स्वप्नींचे स्वप्नीं जागा जाहला ॥ स्वप्नीं वेदशास्त्र पढिनला ॥ जागा ह्मणतां असे निजेला ॥ तैसा व्यवहारू झाला शास्त्रज्ञांसी ॥ ५७ ॥ देहाभिमानेंसी भेदभान ॥ निःशेष जंव नवचे जाण ॥ तंववरी नव्हे निजज्ञान ॥ अत्यंत बंधन तो भेद ॥ ५८ ॥ सनकादिकांची आशंका ॥ घेऊनि देव बोले देखा ॥ वेदविभाग[2] नेटका ॥ सकळलोकां कळे तैसा ॥ ५९ ॥ स्वयें प्रकाशोनि सकळभेदू ॥ गर्जत उठी तुझा वेदू ॥ भेद वेदेंचि प्रतिपाद्यू ॥ वेदानुवादू नव्हे मिथ्या ॥ ४६० ॥ वेदवचन तें सात्विक ॥ मानावें पैं आवश्यक ॥ हे तुझीच शिकवण देख ॥ तो वेदु लटिक ह्मणावा कैसा ॥ ४६१ ॥ वेदाज्ञेचा परम नेम ॥ वेदें प्रतिपाद्य क्रियाकर्म ॥ वेदबळें वर्णाश्रम ॥ निज स्वधर्म चालविती ॥ ६२ ॥ वेद ह्मणे जो लटिक ॥ तो वेदबाह्य आवश्यक ॥ हें तूंचि बोलसी देख ॥ तो वेद लटिक केवीं मानूं ॥ ६३ ॥ ऐशी मानाल आशंका ॥ तेहीविषयीं मीचि देखा ॥ वेदवादाच्या विवेका ॥ विभाग नेटका सांगेन ॥ ६४ ॥ अविद्याभेद सबळ ज्यासी ॥ वेदू नियामक म्यां केला त्यासी ॥ मद्रूपीं अभेदता ज्या भक्तासी ॥ मिणधा[3] त्यापाशीं वेदवादु ॥ ६५ ॥ वेद तितुकाही त्रिगुण ॥ अभेदभजनें भक्त निर्गुण ॥ त्यासि वेदाचें नियामकपण[4] ॥ नचले जाण ममाज्ञा[5] ॥ ६६ ॥ रायाचा जिवलग सेवकू ॥ त्यासि द्वारपाळ नव्हे नियामकू ॥ कां दासीस लागल्या रांजांकू[6] ॥ तीस मानी लोकू प्रधानादी ॥ ६७ ॥ निजकन्येसि शिकवी माता ॥ लाज धरावी लोकांदेखतां ॥ एकांतीं मीनल्या[7] कांता ॥ लाज सर्वथा सोडावी ॥ ६८ ॥ सबळ भेदाचें भान ॥ तंव दुर्लंघ्य वेदवचन ॥ अभेदभक्त माझे जाण ॥ वेदविधान त्यां न बाधी ॥ ६९ ॥ आशा तेचि अविद्याबाधू[8] ॥ छेदिल्या बाधिना[9] वेदवादू ॥ जेवीं सूर्योदयापुढें चांदू ॥ होय मंदू निजतेजें ॥ ४७० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ असत्वादात्मनोऽन्येषां भावानां तत्कृता भिदा ॥ गतयो हेतवश्चास्य मृषा स्वप्नदृशो यथा ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ गुरुरूपें जो सज्ञान ॥ त्यासि देहाचें अबाधित भान ॥ मिथ्या प्रपंचाचें दर्शन ॥ कर्मीं कर्तेपण त्या नाहीं ॥ ७१ ॥ अविद्या द्योतिले वर्णाश्रम ॥ तेथीचें अविद्यक[10] क्रियाकर्म ॥ तेथील जो वेदोक्त धर्म ॥ तो अविद्याभ्रम अज्ञाना ॥ ७२ ॥ सज्ञान भक्तांच्याठायीं ॥ ते अविद्या निःशेष नाहीं ॥ मा वेदविधान तेथें पाही ॥ रिघावया कायी कारण ॥ ७३ ॥ आंबा सफळीत जंव असे ॥ तंव नेटेंपाटें राखण

---

[1] न गेल्यानें. [2] वेदाचा विभाग. [3] मिंधा. [4] प्रतिबंधकपणा. [5] माझी आज्ञा. [6] राजाची मांडी. [7] मिळाल्या. [8] अज्ञानाचा नाश. [9] निर्बाध. [10] अविद्येचें.

बैसे ॥ फळ हातां आल्या आपैसें ॥ राखण वांयसें राहवेना ॥ ७४॥ तेवीं अविद्येचें जंव बंधन ॥ तंव वेदाचें वेदविधान ॥ अविद्या नाशिलिया जाण ॥ विधीनें तें स्थान सोडिलें ॥ ७५ ॥ अविद्या जाऊनि वर्ततां देहीं ॥ देहाचा देहत्वें हेतु नाहीं ॥ हें ह्मणाल नघडेच कांहीं ॥ ऐक तेंही[१] सांगेन ॥ ७६ ॥ स्वप्नींचें देहादिप्रपंचभान ॥ स्वप्नाचमाजी सत्य जाण ॥ जागें होतां तें अकारण[२] ॥ संस्कारें स्वप्न दिसतांही ॥ ७७ ॥ स्वप्नीं राज्यपद पावला ॥ कां व्याघ्रमुखीं सांपडला ॥ अथवा धनादिलाभ झाला ॥ रत्नें पावला अनर्घ्य[३] ॥ ७८ ॥ तेथींचें सुख दुःख हरिख ॥ जागत्यासि नाहीं देख ॥ तेवीं सज्ञानासि अविद्यक ॥ नोहे बाधक निजबोधें ॥ ७९ ॥ देहीं असोनि विदेहस्थिती ॥ ऐशा बोधसाधिका[४] ज्या युक्ती ॥ स्वयें सांगेन ह्मणे श्रीपती ॥ भेदाची उत्पत्ती छेदावया ॥ ४८० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यो जागरे बहिरनुक्षणधर्मिणोऽर्थान् भुंक्ते समस्तकरणैर्हृदि तत्सदृक्षान् ॥ स्वप्ने सुषुप्त उपसंहरते स एकः स्मृत्यन्वयात्त्रिगुणवृत्तिदृगिंद्रियेशः ॥ ३२ ॥ ॥ टीका ॥ ॥ तिहीं अवस्थांच्या ठायीं ॥ आत्मा एकचि असे देहीं ॥ तोचि देहाच्याठायीं विदेही ॥ साक्षी पाही सर्वांचा ॥ ८१ ॥ मी बाळ तोचि झालों तरुणा ॥ आतां आलों ज्ञातारपणा ॥ ऐशा वयसांचे साक्षीपणा ॥ आपणा आपण देखतू ॥ ८२ ॥ जागृतीसि नानाभोग ॥ सविस्तर भोगी अनेग ॥ तेची स्वप्नामाजी चांग[५] ॥ निजहृदयीं सांग विस्तारी ॥ ८३ ॥ जागृतिभोगाचा संस्कारू ॥ तोचि स्वप्नामाजी विस्तारू ॥ मनोमय[६] विश्वाकारू ॥ निजहृदयीं वेव्हारू वाढवी ॥ ८४ ॥ गज तुरंग खर नर ॥ गिरि दुर्ग पुर नगर ॥ विशाळ सरिता समुद्र ॥ वासनेंचें वैचित्र्य स्वप्नीं देखे ॥ ८५ ॥ नाहीं जागृती नाहीं स्वप्न ॥ अंतःकरणही करोनि लीन ॥ सुषुप्तिकाळीं तोचि जाण ॥ अहंकारेंवीण उरलासे ॥ ८६ ॥ विश्वाभिमानीं इंद्रियवृत्ती ॥ तेणें तो देखतसे जागृतीं ॥ तैजस अभिमानी अविद्यावृत्ती ॥ स्वप्नस्थिती तो देखे ॥ ८७ ॥ प्राज्ञ अभिमानी मूढवृत्ती ॥ तो देखतसे सुषुप्तीं ॥ एक आत्मा तिहींप्रती ॥ न घडे निश्चितीं ह्मणाल ॥ ८८ ॥ तिहीं अवस्थांचे अभिमानी ॥ ह्मणाल देखणे भिन्न तिनी ॥ तरी एक आत्मा द्रष्टेपणीं[७] ॥ उरला निदानीं तें ऐका ॥ ८९ ॥ पहिला जो कां मी जागता ॥ तेणें म्यां देखिली स्वप्नावस्था ॥ तोचि मी सुखें निजेला होता ॥ या तिनी अवस्था स्वयें मी जाणें ॥ ४९० ॥ जेणें जें देखिली नाहीं ॥ तो ते अवस्था सांगेल कायी ॥ यालागीं तिहीं अवस्थांचे ठायीं ॥ आत्मा पाही अनुस्यूत[८] ॥ ९१ ॥ जागृतीं इंद्रियां देखणेपण ॥ स्वप्नीं देखणें तें तंव मन ॥ सुषुप्ति गाढ मूढ अज्ञान ॥ कैंचें देखणेपण आत्म्यासी ॥ ९२ ॥ एहि आशंकेचें वचन ॥ ऐका द्विजहो सावधान ॥ मनइंद्रियें जडें जाण ॥ देखणेपण त्यां कैंचें ॥ ९३ ॥ जो मनाचा चाळकू ॥ जो इंद्रियांचा प्रकाशकू ॥ जो सु

---

[१] थोडेंही. [२] निष्कारण. [३] अमूल्य. [४] ज्ञान देणाऱ्या. [५] चांगले. [६] मनोरूप. [७] पाहणेपणानें. [८] व्यापक.

षुप्तीचा द्योतकू ॥ साक्षित्वें एकू तो आत्मा ॥ ९४ ॥ ह्मणाल सुषुप्तीं आत्मा नाहीं ॥ हें बोलणें नघडे कांहीं ॥ मी सुखें निजेलों होतों
पाही ॥ हें कोणाचे ठायीं जाणवें ॥ ९५ ॥ प्रकृतिकार्याहूनि परता ॥ देहादिअवस्थांतें प्रकाशिता ॥ गुणइंद्रियांचा नियंता ॥ जाण त
त्वतां तो आत्मा ॥ ९६ ॥ इंद्रियें आत्मा नव्हती हा नेम ॥ त्यांचे सदा एकदेशी कर्म ॥ आत्मा सर्वकर्त्ता सर्वोत्तम ॥ करोनि निष्कर्म स
र्वदा ॥ ९७ ॥ मन आत्मा नव्हे तें ऐक वर्म ॥ संकल्पविकल्प त्याचें कर्म ॥ आत्मा निर्विकल्प निरुपम ॥ विश्राम[3]धाम जगाचें ॥ ९८ ॥
जो सुषुप्तिसुखभोगसाक्षी ॥ जो देखणेपणें तिहीं लोकीं ॥ तो मी आत्मा गा एकाकी ॥ जाण निशंकीं निश्चित ॥ ९९ ॥ एवं युक्ती
चिया विभागलीला ॥ परमात्मा जो एकू साधिला ॥ तो साधकांसि उपयोगा आला ॥ योग सिद्धी नेला तेणें बळें ॥ ५०० ॥ ॥ श्लो
क ॥ ॥ एवं विमृश्य गुणतो मनसस्त्र्यवस्था मन्मायया मयि कृता इति निश्चितार्थाः ॥ संछिद्य हार्दमनुमानसदुक्तितीक्ष्णज्ञानासिना
भजत माऽखिलसंशयाधिम् ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ म्यां सांगीतल्या ज्या युक्ती ॥ ज्या कां श्रुतिशास्त्रार्थसंमती ॥ त्या विचारूनि प
रमार्थगतीं ॥ संसा[4]रगुंती उगवावी ॥ १ ॥ संसारगुंतीसि कारण गुण ॥ गुणावस्थीं व्यापिलें मन ॥ यांसि माझी माया मूळ जाण ॥ जि
या केलें आवरण माझेंची ॥ २ ॥ माझी माया माझेनि सबळ ॥ त्या मजचि आवरिलें तत्काळ ॥ जैसे डोळ्याचें डोळां जळ ॥ गोठूनि
पडळ होऊनि ठाके ॥ ३ ॥ कां पूर्णचंद्र अतिनिर्मळ ॥ तेथ पृथ्वी बिंबली सबळ ॥ तेणें स[5]लांछन चंद्रमंडळ ॥ लोक सकळ देखती ॥ ४ ॥
पृथ्वीचंद्रांसि अंतर ॥ विचारितां दूरांतर ॥ मिथ्या बांधिला रज[6]नीकर ॥ ते लोक साचार मानिती ॥ ५ ॥ यापरी माया माझ्याठायीं ॥
आतळली नाहीं कहीं ॥ मिथ्या भासें लोक पाही ॥ तिच्याठायीं भूलले ॥ ६ ॥ तेणें नाथिली गुणावस्था ॥ अहंकर्त्तृत्वें घेतली माथां ॥
तेणें विषयभोगअवस्था ॥ वासनायुक्ता वाढवी ॥ ७ ॥ एवं उभयदेहबंधन ॥ मिथ्या जीवत्वें लागलें जाण ॥ त्याचें करावया छेद[7]न ॥
माझ्या युक्ती जाण विव[8]राव्या ॥ ८ ॥ करितां युक्तीचें अनुमान ॥ तेणें अनुमानिक होय ज्ञान ॥ न तुटे अविद्याबंधन ॥ यालागीं सा
धुसज्जन सेवावे ॥ ९ ॥ साधूंमाजी साधुत्व पूर्ण ॥ सेवावें सद्गुरुचरण ॥ तेणें निर[9]से भवबंधन ॥ साधुसज्जन सद्गुरु ॥ ५१० ॥ त्या सा
धूंचिया सदुक्ती ॥ श्रुत्यर्थ उपदेश करिती ॥ तेणें होय ज्ञानखड्गप्राप्ती ॥ जे बुद्धीच्या हातीं हातवशी ॥ ११ ॥ तेंही वैराग्यनैराश्यसाहणें ॥
लावूनि सतेज शस्त्र करणें ॥ धृ[10]तींच्या धारणा दृढ धरणें ॥ सावधपणें निःशंक ॥ १२ ॥ शस्त्रासि आणि आपणा ॥ एकपणाची धार
णा ॥ दृढ साधनीं साधना ॥ देहाभिमाना छेदावें ॥ १३ ॥ जो सकळसंशयाचा कंदू ॥ जेणें देहदुःखाचा उद्बोधू ॥ ज्याचेनि सदा वि

---

[1] प्रकाशक. [2] स्वाधीन ठेवणारा. [3] विसाव्याची जागा. [4] संसार हाच गुंता. [5] सचिन्ह. [6] चंद्र. [7] नाश. [8] स्पष्ट कराव्या. [9] नाहीसें होतें. [10] धैर्याच्या.

षयच्छंदू ॥ जो कामक्रोधपोषकू[1] ॥ १४ ॥ जो वाढवी तिनी गुण ॥ जो शुद्धासी आणी जीवपण ॥ ज्याचेनि जीवा जन्ममरण ॥ दुर्निवार
जाण लागलें ॥ १५ ॥ जो सकळअनर्थांचा दाता ॥ ज्याची लडेवाळ कन्या ममता ॥ तियेसि वाढवी माया माता ॥ तिच्या सत्ता
हा दाटुगा ॥ १६ ॥ तेथें शस्त्राचेनि लखलखाटें ॥ राहोनिया नेटेंपाटें ॥ समरांगणीं सुभटें ॥ घावो येणें नेटें हाणावा ॥ १७ ॥ एकेचि
घायें जाण ॥ माया ममता अभिमान ॥ त्रिपुटीचें होय छेदन ॥ येणें बळें जाण छेदावा ॥ १८ ॥ भोग्य भोगू भोक्ता ॥ कर्म कार्य कर्ता
॥ ध्येय ध्यान ध्याता ॥ त्रिपुटी तत्त्वतां छेदावी ॥ १९ ॥ अहं कोहं सोहं स्वभावो ॥ हाही छेदूनि अहंभावो ॥ साधकां निजपदीं[2] ठावो
॥ ब्रह्म स्वयमेवो होऊनि ठाकती ॥ ५२० ॥ ह्मणाल सांगतां जो प्रकारू ॥ तो शब्दज्ञानवेव्हारू ॥ बोलाचा कडकडाट थोरू ॥ कैसें
न अहंकारू मारवे ॥ २१ ॥ शब्दमात्रें अभिमान ॥ जरी पावता निर्दळण[3] ॥ तरी कां पां विद्वज्जन ॥ अभिमानमग्न होताती ॥ २२ ॥
अभिमान संमुख दिसनां ॥ तरी धांवोनि करूं ये घाता ॥ तो अतर्क्य[4] जी सर्वथा ॥ शब्दें अहंता मरेना ॥ २३ ॥ घडे अपरोक्षसाक्षात्कारू
॥ तो शब्दमात्रें नव्हे प्रकारू ॥ ऐसा आशंकेचा विचारू ॥ ऐक निर्धारू सांगेन ॥ २४ ॥ जो अनन्यभावें माझें भजन ॥ सर्वदा
करी सावधान ॥ कां सद्गुरूचे चरण ॥ सद्भावें जाण जो सेवी ॥ २५ ॥ मज आणि सद्गुरुमूर्त्तीं ॥ भेद नाहीं गा कल्पांतीं ॥ येणें अभेदभावें[5]
जें भजती ॥ ते ज्ञान पावती सहजची ॥ २६ ॥ त्यांसि स्वभावें भजनस्थिती ॥ ज्ञानखड्गाची[6] होय प्राप्ती ॥ सहजें सांपडे हातीं
॥ ज्यां शस्त्रदीप्तीं काळ कांपे ॥ २७ ॥ ज्या शस्त्राच्या धाकाभेण ॥ माया ममता अभिमान ॥ सांडूनियां जीवपण ॥ समूळ जाण पळालीं
॥ २८ ॥ हाणावया पुरता घावो ॥ अहंममतेसि नाहीं ठावो ॥ अविद्येचाही अभावो ॥ अपभयें[7] पहाहो आपणची ॥ २९ ॥
सद्भावें जें माझें भजन ॥ करितां एवढें होय ज्ञान ॥ येथ आशंका करील मन ॥ कोठें भजन करावें ॥ ५३० ॥ तुझें स्वरूप अतर्क्य
जाण ॥ अतिसूक्ष्म आणि निर्गुण ॥ तुज भजावया कवण स्थान ॥ आह्मासि जाण कळेना ॥ ३१ ॥ ऐसें कल्पील जरी मन ॥ तरी
ऐक सावधान ॥ अतिसुगम भजनस्थान ॥ मी सांगेन तें ऐक ॥ ३२ ॥ नुल्लंघितां पर्वतकोटी ॥ न रिघतां गिरिकपाटीं ॥ दूरी न करितां
आटाटी ॥ जे स्थानीं भेटी सदा माझी ॥ ३३ ॥ भजनस्थान निरुपम ॥ जेथ मी वसें पुरुषोत्तम ॥ प्राप्तीलागीं अतिसुगम ॥ विश्राम
धाम भक्तांचें ॥ ३४ ॥ सर्वसुखांचा आराम ॥ निजहृदयीं आत्माराम ॥ सर्वदा असे सम ॥ भजावें सप्रेम तेठायीं ॥ ३५ ॥ आदि ब्रह्मा
अंतीं मशक[8] ॥ सर्वांचे हृदयीं मीचि एक ॥ ऐसें पाहे तो सभाग्य देख ॥ हें भजन चोख मत्प्राप्ती ॥ ३६ ॥ ज्या मज हृदयस्थाचे

---

[1] वाढविणारा. [2] आपल्या चरणीं. [3] नाश. [4] तर्क करितां येत नाहीं असा. [5] एकरूपानें. [6] ज्ञानरूपतलवारीची. [7] निर्भयत्वानें. [8] कीटक.

दीप्तीं[1] ॥ मनबुद्ध्यादिकें वर्त्तती ॥ ज्या माझिया स्फुरणस्फूर्तीं ॥ ज्ञानव्युत्पत्ती पायां लागे ॥ ३७ ॥ त्या मज हृदयस्थाच्याठायीं ॥ भजनशीळ कोणीच नाहीं ॥ शिणतां बाह्यउपायीं ॥ जन अपायीं[2] पडताती ॥ ३८ ॥ ऐशांत सदैव कोणी एक ॥ निजभाग्यें अत्यंत चोख ॥ मज हृदयस्थाचा विवेकं[3] ॥ करूनि निष्टंक मद्भजनीं ॥ ३९ ॥ करितां हृदयस्थाचें भजन ॥ माझें पावे निजज्ञान ॥ वैराग्ययुक्त संपूर्ण ॥ जे ज्ञानीं पतन रिघेना ॥ ५४० ॥ ज्या ज्ञानाभेणें जाण ॥ धाकेंचि पळे अभिमान ॥ तें मी आपुलें त्यांसि दें ज्ञान ॥ जे हृदयस्थाचें भजन करिती सदा ॥ ४१ ॥ ज्या ज्ञानाचिये ज्ञानसिद्धी ॥ अखिल जाती आधिव्याधी[4] ॥ संशय पळती त्रिशुद्धी ॥ भक्त निजपदीं[5] पावती ॥ ४२ ॥ सबळबळें सुभटें ॥ शस्त्राचेनि लखलखाटें ॥ संशय छेदावा कडकडाटें ॥ हें म्यां नेटेंपाटें सांगीतलें ॥ ४३ ॥ यावरी असें गमलें चित्तीं ॥ संसाराची सत्यप्राप्ती ॥ त्यासि शस्त्र घेऊनि हातीं ॥ कोणे युक्तीं छेदावा ॥ ४४ ॥ तरी संसार तितुकी भ्रांती ॥ हेंचि सांगावया दृष्टांतीं ॥ पुढील श्लोकाची श्लोकोक्ती ॥ स्वयें श्रीपती सांगतू ॥ ४५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ईक्षेत विभ्रममिदं मनसो विलासं दृष्टं विनष्टमतिलोलमलातचक्रम् ॥ विज्ञानमेकमुरुधेव विभाति माया स्वप्नस्त्रिधा गुणविसर्गकृतो विकल्पः ॥ ३४ ॥ ॥ टीका ॥ ॥ देहादिअहंकारपर्यंत ॥ पिंड ब्रह्मांड जें भासत ॥ तें मनोमात्र विलसत[6] ॥ मिथ्याभूत संसार ॥ ४६ ॥ जैसें स्वप्नीं निद्रेमाजी मन ॥ स्वयें देखे त्रिभुवन ॥ तैसेंचि हें दीर्घस्वप्न ॥ अविद्या जाण विकाशी ॥ ४७ ॥ आन असूनि आन देखती ॥ यानांव आभास ह्मणती ॥ शुक्तिकेंमाजी[7] रजतभ्रांतीं[8] ॥ दोरातें ह्मणती महासर्पू ॥ ४८ ॥ सूर्याचे किरण निखळ ॥ तेठायीं देखती मृगजळ ॥ तैशी शुद्ध वस्तू जे केवळ ॥ तो संसार बरळ ह्मणताती ॥ ४९ ॥ तया आरोपासि अधिष्ठान ॥ मीचि साचार असें जाण ॥ जेवीं कां कोलिताचें कांकण ॥ अग्नितें जाण आभासे ॥ ५५० ॥ अलातचक्रींचा निर्धार ॥ अग्नि सत्य मिथ्या चक्र ॥ तेवीं निर्धारितां संसार ॥ ब्रह्म साचार संसार मिथ्या ॥ ५१ ॥ तेथ आधिदैव आधिभौतिक ॥ आध्यात्मादि सकळिक ॥ अलातचक्राच्या[9] ऐसे देख ॥ त्रिगुणमायिक परिणाम ॥ ५२ ॥ कोलिताचेनि भ्रमभासें ॥ भ्रमणबळें तें चक्र दिसे ॥ क्षणां दिसे क्षणां नासे ॥ तैसा असे हा संसारू ॥ ५३ ॥ जंव भ्रमणाचें दृढपण ॥ तंव कोलिताचें कांकण ॥ भ्रम गेलिया जाण ॥ कांकणपण असेना ॥ ५४ ॥ तेवीं जंव जंव भ्रम भासे ॥ तंवतंव दृढ संसार असे ॥ भ्रम गेलिया अनायासें ॥ संसार नसे पाहतांही ॥ ५५ ॥ माझें कलत्र[10] पुत्र ॥ हें भ्रमाचें मुख्य सूत्र ॥ तें न छेदितां पामर ॥ मुक्तता अहंकार मिरविती ॥ ५६ ॥ एवं मायामय[11] संसार ॥ ऐसा जाणोनि निर्धार ॥ तेथील सांडूनि अत्यादर ॥ उपरमप्रकार सांगत ॥ ५७ ॥

---

[1] तेजानें. [2] दुःखांत. [3] विचार. [4] मनोव्याधी व शरीरव्याधी. [5] आपल्या पदावर. [6] भासतें. [7] शिंपेंत. [8] रुप्याच्या भ्रांतीनें. [9] कोलित फिरविणें हेंच चक्र. [10] स्त्री. [11] मायारूप.

॥ श्लोक ॥ ॥ दृष्टिं ततःप्रतिनिवर्त्य निवृत्ततृष्णस्तूष्णीं भवेन्निजसुखानुभवो निरीहः ॥ संदृश्यते क्व च यदीदमवस्तुबुद्ध्या त्यक्तं भ्रमाय न भवेत्स्मृतिरानिपातात् ॥ ३५ ॥ ॥ टीका ॥ ॥ पूर्विल्या भजनपरिपाटीं ॥ सहजें निर्मळ होय दृष्टी ॥ मिथ्या सांसारिक त्रिपुटी ॥ हा निर्धार पोटीं दृढ होय ॥ ५८ ॥ तेथें सांसारिक त्रिपुटी ॥ सांडूनि उपरमवितां दृष्टी ॥ मज हृदयस्थासि होय भेटी ॥ जेवीं सुवर्णदृष्टीं अळंकारू ॥ ५९ ॥ तेथ दृश्य द्रष्टा दर्शन ॥ मोडूनि त्रिपुटीचें भान ॥ तेचि धारणा तेंचि ध्यान ॥ तेथ समाधान धरावें ॥ ५६० ॥ तेंचि अंगें व्हावया आपणा ॥ सांडावी सकळ तृष्णा ॥ वाचेसि धरावें महामौना ॥ देहचेष्टा जाणा आवरावी ॥ ६१ ॥ सांडावी वेदशास्त्रव्युत्पत्तिवाद ॥ सांडावी वाग्वादवडबड ॥ भगवद्भावो धरावा दृढ ॥ जेणें आशेचें बुड समूळ छेदे ॥ ६२ ॥ काया वाचा आणि मन ॥ दृढ आवरावें आपण ॥ तुटों नेदावें अनुसंधान ॥ सदा सावधान निजरूपीं ॥ ६३ ॥ ते स्वरूपसुखीं लाधल्या जाण ॥ देहाचें स्फुरेना देहपण ॥ अहंकारेंसि मावळे मन ॥ स्वानंद पूर्ण वोसंडे ॥ ६४ ॥ तेथ संमुख ना पाठिमोरें ॥ एकपण ना दुसरें ॥ देव भक्त हेंही नुरे ॥ सुखें सुखभरें सुखरूप ॥ ६५ ॥ मी एक सुखरूप आहें ॥ वेगळेपणें ठावें नोहे ॥ येणें आत्मानुभवें राहे ॥ एवढी प्राप्ती होये मद्भक्तां ॥ ६६ ॥ ह्मणाल काष्ठाच्या परी त्यासी ॥ पडला असेल अहर्निशीं ॥ हेंही नघडे गा तयासी ॥ सांडूनि हेतूसी देहीं वर्त्ते ॥ ६७ ॥ तोही प्रारब्धाचेनि बळें ॥ आहारनिद्रादि खेळें मेळें ॥ देहींचीं कर्में करितां सकळें ॥ सर्वथा नातळे देहबुद्धी ॥ ६८ ॥ दंड काढोनि नेलिया कुंभारें ॥ पहिले भवंडीं चक्र फिरे ॥ तेवीं प्रारब्धाचेनि संस्कारें ॥ कर्मानुसारें देह वर्त्ते ॥ ६९ ॥ कुलालचक्रीं बैसली माशी ॥ नहालतां भोंवे चक्रासरसी ॥ कोटी फेरे ह्मणती तिसी ॥ तेवीं मुक्तासी देहकर्में ॥ ५७० ॥ यापरी देहकर्मीं वर्ततां ॥ ज्ञाता न ह्मणे अहं कर्त्ता ॥ जेवीं वाऱ्याचिया स्वभावतां ॥ दिसे चपळता गलितपत्रीं ॥ ७१ ॥ जेवीं कां पुरुषासवें छाया असे ॥ परी ते छायेसि पुरुष बैसे ॥ तेवीं ज्ञात्या सवेंही देह दिसे ॥ परी तो देहदोषें मैळेना ॥ ७२ ॥ निजछायेसि बैसों जातां ॥ छायाचि पळे तत्त्वतां ॥ तेवीं मद्भक्तीं माया पाहतां ॥ देह स्वभावतां मिथ्यात्वें पळे ॥ ७३ ॥ हो कां मुक्ताफळांची माळा ॥ भ्रमें सर्परूप भासे डोळां ॥ तेचि भ्रमांतीं घालितां गळां ॥ नुपजे कंटाळा सर्पभयाचा ॥ ७४ ॥ तेवीं अधमोत्तम योनी ॥ कां वंद्यनिंद्य जे जनीं ॥ ते मी ह्मणतां ज्ञानी ॥ शंका नमानी देहमिथ्यात्वें ॥ ७५ ॥ यापरी ते अतिसज्ञान ॥ जाणोनि देहाचें मिथ्याभान ॥ देहकर्मीं वर्ततां जाण ॥ देहाचें देहपण स्फुरेना ॥ ७६ ॥ तो देहो सर्वांगीं तोडितां ॥ कां वृकेंव्याघ्रादिकीं फाडितां ॥ कां अग्निमाजी धडाडितां ॥ त्यासि देहअहंता स्फुरेना ॥ ७७ ॥ आपुली छाया दे

---

१ इच्छेचें. २ कथारस. ३ नाहींसें होतें. ४ कर्माप्रमाणें. ५ कुंभाराच्या चाकावर. ६ देहाच्या दोषानें. ७ मोत्यांची. ८ भ्रमाच्या पोटीं. ९ लांडगे वाघ इत्यादिकांनीं.

खिली सुळीं ॥ तीलागीं पुरुष न तळमळी ॥ तेवीं देहाची होत होळी ॥ ज्ञाता न डळमळी निजबोधें ॥ ७८ ॥ ह्मणाल देहसंगें वर्ततां ॥ केवीं बाधीना देहअहंता ॥ सांडूनि अंगींची क्षारता[1] ॥ लवण वर्त्ततां उरे कैसें ॥ ७९ ॥ हिंग सांडूनि आपुली घाणी ॥ केवीं राहेल सुगंधपर्णीं ॥ निःशेष सांडोनि अंगींचें पाणी ॥ केळी केळीपणें उरे कैंची ॥ ५८० ॥ नझुंझे ह्मणोनि रणीं रिघतां ॥ जेवीं कां घाय वाजती माथां ॥ तेवीं देहासंगें वर्ततां ॥ देहअहंता सोडीना ॥ ८१ ॥ येविषयीं ऐका सावधान ॥ ज्ञात्यासि देहाचें बाधित भान ॥ तेथें स्फुरे जो अभिमान ॥ तो भर्जित जाण बीज जैसें ॥ ८२ ॥ भर्जितबीजें जाण ॥ हों शके क्षुधाहरण[2] ॥ परी करितां बीजारोपण ॥ अंकुर जाण त्या नाहीं ॥ ८३ ॥ चित्रामाजी व्याघ्र दिसे ॥ परी बाधकत्व त्यासि नसे ॥ तेवीं भर्जितअभिमानशेषें ॥ बाधा नसे ज्ञात्यासी ॥ ८४ ॥ चित्रींच्या वाघासि जाण ॥ निःशेष नाहीं व्याघ्रपण ॥ तेवीं मुक्तांच्या देहासि जाण ॥ देहपण असेना ॥ ८५ ॥ दृढ ठसावल्या चैतन्यघन ॥ स्वरूपीं वृत्ति होय निमग्न ॥ तेव्हां दिसतेंही भर्जित भान ॥ तेंही स्फुरण निमालें ॥ ८६ ॥ ऐशी भावळल्या स्मृती ॥ ज्ञात्यासि वर्तती स्थिती ॥ स्वयें सांगत श्रीपती ॥ यथानिगुतीं निजबोधें ॥ ८७ ॥ सर्वकर्मीं वर्ततां जाण ॥ देहाचें स्फुरेना देहपण ॥ तें मुख्य समाधिलक्षण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ८८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ देहं च नश्वरमवस्थितमुत्थितं वा सिद्धो न पश्यति यतोऽध्यगमत्स्वरूपम् ॥ दैवादुपेतमुतदैववशादपेतं वासो यथा परिकृतं मदिरामदांधः ॥ ३६ ॥ ॥ टीका ॥ ॥ जया देहाचेनि मद्भजनें ॥ माझें शुद्धस्वरूप पावणें ॥ त्या देहासि विसरिजे तेणें ॥ मी माझेंपणें देखेना ॥ ८९ ॥ जेवीं कां भाडियाचें घोडें ॥ जेणें आणिलें निजधामा[3] रोकडें ॥ तें आहे कीं गेलें कोणीकडे ॥ हें स्मरेना पुढें तो जैसा ॥ ५९० ॥ होकां भेटावया भ्रतारासी[4] ॥ स्वयें मजुर आणी विश्वासी ॥ ते पतीसि पहुडल्या राणिवेसी ॥ त्या मजुरासी विसरली ॥ ९१ ॥ कां जो दैवयोगें पालखीं चढे ॥ तो पूर्वील तुटके मोचडे ॥ आहेत कीं गेले कोणीकडे ॥ हें स्मरेना पुढें तेणें हरिखें ॥ ९२ ॥ होकां बहुकाळें पत्नी जैसी ॥ भर्तारू मीनल्या[5] निजसेजेसी ॥ ते निःशेष विसरे लाजेसी ॥ देहाची तैशी दशा जाहली ॥ ९३ ॥ त्या दांपत्याचे सुखभेटी ॥ पारकें देखतां लाज उठी ॥ तेवीं देहाचें भान[6] द्वैतदृष्टीं ॥ मदैक्यपुष्टीं देह कैचें ॥ ९४ ॥ एवं पावोनि माझ्या स्वरूपासी ॥ स्वानंदपूर्ण साधकासी ॥ सुखें सुखरूपता जाहली त्यासी ॥ निजदेहासी विसरोनी ॥ ९५ ॥ मग उठलें कीं बैसलें ॥ चालतें कीं राहिलें ॥ जागतें कीं निजलें ॥ हें स्मरण ठेलें[7] देहाचें ॥ ९६ ॥ हें धालें कीं भुकेलें ॥ हिंवलें कीं तापलें ॥ प्यालें कीं तान्हलें ॥ राहिलें उगलें स्मरेना तो ॥ ९७ ॥ हें येथें कीं तेथें ॥ मुकें कीं बोलतें ॥ होतें कीं

---

१ खारटपणा. २ भूक नाहींसी करणें. ३ आपले स्थानास. ४ नवऱ्यास. ५ मिळाल्या. ६ भास. ७ राहिलें.

नव्हतें ॥ स्मरणसहितें स्मरेना तो ॥ ९८ ॥ हें ओंवळें कीं सोंवळें ॥ चोखटी कीं मैळें ॥ डोळस कीं आंधळें ॥ अंगीं पांगुळलें स्मरेना
तो ॥ ९९ ॥ हें आलें कीं गेलें ॥ होतें कीं केलें ॥ जाहलें कीं मेलें ॥ तटस्थ राहिलें स्मरेना तो ॥ ६०० ॥ हें बाळ कीं प्रौढ ॥ मोठें कीं
रोड ॥ हळू कीं जड ॥ आणणें दृढ स्मरेना तो ॥ १ ॥ हें खाटें कीं भुर्यीं ॥ ठार्यीं कीं कुठार्यीं ॥ आहे कीं नाहीं ॥ हेंही पाही स्मरेना तो
॥ २ ॥ हें मंत्रीं कीं तंत्रीं ॥ तीर्थीं कीं क्षेत्रीं ॥ विष्ठीं कीं मूत्रीं ॥ आहे पवित्रीं[1] स्मरेना तो ॥ ३ ॥ हें जनीं कीं वनीं ॥ अथवा निरंजनीं॥
जपीं कीं ध्यानीं ॥ हेंही मनीं स्मरेना तो ॥ ४ ॥ हें सुजनीं कीं दुर्जनीं ॥ बंदीं कीं विमानीं ॥ मंदिरीं कीं मसणीं ॥ पाहती कोणी स्मरेना
तो ॥ ५ ॥ हें गजीं कीं तुरगीं ॥ कीं अंगेनासंभोगीं[2] ॥ खरीं कीं उरगीं ॥ अंगींच्या अंगीं स्मरेना तो ॥ ६ ॥ हें काशीं कीं कैंकटीं[3] ॥
नरकीं कीं वैकुंठीं ॥ घरीं कीं कपाटीं ॥ राहिलें नेहटीं स्मरेना तो ॥ ७॥ हें पूजिलें कीं गांजिलें ॥ धरिलें कीं मारिलें ॥ देहाचिये कहीं केलें
॥ अथवा काय झालें स्मरेना तो ॥ ८ ॥ मी शेषशयनावरी ॥ कीं मातंगाच्या[4] घरीं ॥ कीं बैसलों शूळावरीं ॥ हेंही नस्मरी सहसा
तो ॥ ९ ॥ ऐशी ज्ञात्याची निरभिमानता ॥ माझेनि न सांगवे तत्त्वतां ॥ जे पावले माझी सायुज्यता ॥ त्यांची कथा न बोलवे ॥ ६१० ॥
जेथ वेदां मौन पडे ॥ स्वरवर्णेंसि वाचा बुडे ॥ त्या संतांचे पवाडे[5] ॥ माझेनिही निवाडे न सांगवती ॥ ११ ॥ ऐकोन सज्ञानाची स्थिती॥
तुह्मासि गमेल ऐसें चित्तीं ॥ केवळ जड मूढ झाली प्राप्ती ॥ एकही स्फूर्ती स्फुरेना ॥ १२ ॥ जेवीं कां केवळ पाषाण ॥ तैसें झालें अंतःकरण
॥ एकही स्फुरेना स्फुरण ॥ ज्ञातेपण घडे कैसें ॥ १३ ॥ ऐशी धरिल्या आशंका ॥ तेविषयीं सावध ऐका ॥ ज्ञानअज्ञानभूमिका ॥
अतर्क्य लोकां निश्चित ॥ १४ ॥ केवळ जें शुद्ध ज्ञान ॥ आणि जडमूढ अज्ञान ॥ दोहींची दशा समान ॥ तेथीलही खूण मी जाणें
॥ १५ ॥ निबिड दाटला अंधकारू ॥ त्यामाजी काजळाचा डोंगरू ॥ तेथ आंधळा आला विभाग करूं ॥ तैसा व्यवहारू अज्ञाना
॥ १६ ॥ शोधावया अध्यात्मग्रंथ भले ॥ अंधमूकांहातीं दीधले ॥ ते ऐकेना देखेना बोले ॥ तैसें जडत्वें झालें अज्ञान ॥ १७ ॥ ऐशी
अज्ञानाची गती ॥ ऐका सज्ञानाची स्थिती ॥ अपरोक्षसाक्षात्कारप्रतीती ॥ देहीं वर्त्तती विदेहत्वें ॥ १८ ॥ जेवीं कां रत्नें आणि गारा॥
दोहींचा सारिखा उभारा ॥ मोल वेंचूनि नेती हिरा ॥ फुकट गारा नघेती ॥ १९ ॥ जैसें कण आणि फलकट[6] ॥ दोहींसि वाढी एकवाट ॥
तैसें ज्ञानाज्ञान निकट ॥ दिसे सम सकट सारिखें ॥ ६२० ॥ जेवीं कां खरें कुडें[7] नाणें ॥ पाहतां दिसे सारिखेपणें ॥ खरें पारखोनि घेती
देखणे ॥ मूर्खीं नाडणें तेठायीं ॥ २१ ॥ तेवीं ज्ञानाज्ञानाची पेंठ ॥ भेळली दिसे एकवट ॥ तेथ अणुभरी[8] चुकल्या वाट ॥ पाखंड उ

---

१ चांगल्या जागेवर. २ स्त्रोच्या भोगाविषयीं. ३ कैकाडदेशांत. ४ मांगाच्या. ५ इतिहास, कीर्ति. ६ फोल. ७ खोटें. ८ थोडीही.

द्रूट अंगीं वाजे ॥ २२ ॥ यालागीं मद्भक्तीपाशीं आले ॥ जे माझ्या विश्वासा टेंकले ॥ त्यांसि म्यां निजरूप आपुलें ॥ खरें दीधलें अतिशुद्ध
॥ २३ ॥ माझ्या नामविश्वासासाठीं ॥ प्रह्लाद द्वंद्वें पायें पिटी ॥ नघेतां मुक्ती लागे पाठीं ॥ विश्वासें भेटी माझ्या रूपीं ॥ २४ ॥ पावोनि माझ्या
निजस्वरूपासी[1] ॥ तेंचि तें झाले मद्भावेंसी ॥ जेवीं लवण मीनल्या[2] जळासी ॥ लवणपणासी मूकलें ॥ २५ ॥ तेथ मी एक लवण ॥ हेही विराली[3]
आठवण ॥ स्वयें समुद्र झालें जाण ॥ तेवीं सज्ञान मद्रूपें ॥ २६ ॥ ऐसें पावोनि माझ्या स्वरूपासी ॥ विसरले देहअभिमानासी ॥ झाले
चैतन्यघन सर्वांशीं ॥ आनंद[4]समरसीं निमग्न ॥ २७ ॥ जेवीं दोरीं सर्पू उपजला ॥ नांदोनि स्वयें निमाला ॥ तो दोरें नाहीं देखिला ॥ तै
सा झाला देहभाव मुक्तां ॥ २८ ॥ तेव्हां मी तूं हे आठवण ॥ आठवितें आहे कोण ॥ विसरोन गेलें अंतःकरण ॥ आपण्या आपण वि
सरला ॥ २९ ॥ तेथ कैंचा स्वर्ग कैंचा नरक ॥ कैंचें चोख कैंचें वोख ॥ कैंचे चतुर्दश[5] लोक ॥ ब्रह्म एक एकलें ॥ ६३० ॥ कैंचें पवित्र
कैंचें अपवित्र ॥ कैंचें तीर्थ कैंचें क्षेत्र ॥ कैंचें दान कैंचें सत्पात्र ॥ ब्रह्म स्वतंत्र अद्वय ॥ ३१ ॥ तेथ कैंचा उत्पत्तिविनाशू ॥ कैंचा वैकुंठ
कैलासू ॥ कैंचा ब्रह्मा विष्णु महेशू ॥ एक अविनाशू उरलासे ॥ ३२ ॥ तेथ कैंचा बोधू कैंची बुद्धी ॥ देवपण बुडालें त्रिशुद्धी ॥ लाजा
निमाली मोक्षसिद्धी ॥ कैंचा क्षीराब्धिशेषशायी ॥ ३३ ॥ तेथ माझीही भगवंतता ॥ हारपोनि[6] जाय तत्त्वतां ॥ प्रणवाचा बुडाला मा
थां ॥ ऐशी सायुज्यता पावले ॥ ३४ ॥ यालागीं देहाचें केलें ठेलें ॥ अथवा आलें कां गेलें ॥ हें स्फुरेना जें बोलिलें ॥ तें विशद[7] केलें
यारीतीं ॥ ३५ ॥ अविद्या कारण देहकार्यें ॥ ते अविद्या नासोनि जाये ॥ कारण नसल्या कार्य राहे ॥ हें नघडे ह्मणाल ॥ ३६ ॥ वृक्ष
समूळीं उपडिला जाये ॥ सार्द्रता[8] तत्काळ नजाये ॥ पत्र पुष्प फळ सार्द्र राहे ॥ शुष्क होये अतिकाळें ॥ ३७ ॥ तेवीं अविद्या नासोनि
जाये ॥ भोगानुरूप दैव जें राहे ॥ तेणें ज्ञाता वर्त्तताहे ॥ निजदेहीं पाहे विदेहत्वें ॥ ३८ ॥ ह्मणाल वाढवितां वाडेंकोडें ॥ प्रतिपाळितां सु
खाडें ॥ राखतराखतां देह पडे ॥ प्रत्यक्ष रोकडें दिसताहे ॥ ३९ ॥ ज्याचें देह त्यासि दृढ नव्हे ॥ तरी तें तत्काळचि पडावें ॥ वांचलें अ
से कोणभावें ॥ ऐसें कांहीं जीवें कल्पाल ॥ ६४० ॥ ज्याचें देह तो नपुसे त्यातें ॥ तरी तें देह केवीं कर्मीं वर्ते ॥ ऐशी आशंका तुह्मांतें ॥
ऐका सावचित्तें[9] सांगेन ॥ ४१ ॥ देहाचें उत्पत्ति स्थिती निधन ॥ पुरुषासि वश्य नव्हे जाण ॥ त्यासि अदृष्टचि प्रमाण ॥ दैवयोगें चळण
दहाच ॥ ४२ ॥ उठणें कां बैसणें ॥ तें देहासि दैवगुणें ॥ अदृष्टगतीं देणें घेणें ॥ खाणें जेवणें अदृष्टें ॥ ४३ ॥ स्वदेशीं कां परदेशीं ॥ अ
दृष्ट नेतसे देहासी ॥ स्वर्ग नरक भोगासी ॥ अदृष्ट देहासी उपजवी ॥ ४४ ॥ यश लाभ हानि मृत्यु ॥ देहासि अदृष्टें[10] असे होतू ॥ ज्ञाता

---

१ आपल्या स्वरूपास. २ मिळाल्या. ३ जिराली. ४ आनंदरूपरसांत. ५ चवदा लोक. ६ नाहींशी होऊन. ७ स्वच्छ. ८ ओलेपणा. ९ एकाग्रमनानें. १० दैवानें.

देहासि अलिप्त ॥ जैसा घटांतू चंद्रमा ॥ ४५ ॥ जैशी छाया पुरुषासरसी ॥ तैशी काया सज्ञानाशी ॥ ते राहिली अदृष्टापाशीं ॥ निज[1] कर्मासी भोगावया ॥ ४६ ॥ जन्मोनि छाया सरसी वाढे ॥ माझी ऐशी अहंता नचढे ॥ तैसेंच देह ज्ञात्याकडे ॥ मी ह्मणोनि पुढें येवों नशके ॥ ४७ ॥ सदा छाया सरिसी असे ॥ परी कोठें असे कोठें नसे ॥ हें ज्याची तो नपुसे ॥ देहाचें तैसें वर्त्तन झालें ॥ ४८ ॥ छाया विष्ठेवरि पडे ॥ कां पालखीमाजी चढे ॥ पुरुषासि सुखदुःख नजोडे ॥ ज्ञात्यासि तेणें पाडें देहभोग ॥ ४९ ॥ तेथवरी निजदेहासी ॥ कैसेन विसर पडिला त्यासी ॥ ऐक त्याही अभिप्रायासी ॥ दृष्टांतेंसीं सांगेन ॥ ६५० ॥ जो मोलें मदिरा पिवोनि ठाये ॥ तो तेणें मदें नाचे गाये ॥ देहवंत देह विसरोनि जाये ॥ वस्त्र नाहीं आहे स्मरेना ॥ ५१ ॥ हा तंव ब्रह्मरस प्याला ॥ परमानंदें तृप्त झाला ॥ देहो झाला कीं मेला ॥ आठवू ठेला तेणें मदें ॥ ५२ ॥ एवं देहाचें भरण पोषण ॥ जन्म अथवा मरण ॥ तें दैवयोगें जाण ॥ तेंचि निरूपण हंस बोले ॥ ५३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ देहोऽपि दैववशगः खलु कर्म यावत्स्वारंभकं प्रतिसमीक्षत एव सासुः ॥ तं सप्रपंचमधिरूढसमाधियोगः ॥ स्वाप्नं पुनर्न भजते प्रतिबुद्धवस्तुः ॥ ३७ ॥ ॥ टीका ॥ ॥ जितुकें देहाचें वर्त्तन ॥ तितुकें अदृष्टास्तव जाण ॥ अज्ञानासि देहाभिमान ॥ त्यातें सज्ञान नधरिती ॥ ५४ ॥ जैसें अदृष्ट पूर्वस्थित ॥ तैसा देह उपजे येथ ॥ सावेव प्राणेंसहित ॥ ऐसें वर्तत जंव दैवें ॥ ५५ ॥ ह्मणाल दैवयोगें देहीं असतां ॥ अवश्य वाढेल देहअहंता ॥ जेवीं एकत्र गमनें मार्गस्थां ॥ येरयेरांच्या व्यथा[3] भोगिती ॥ ५६ ॥ लवणाच्या मिळणीं पाणी ॥ होऊनि ठाके खारवणी[4] ॥ तेवीं ज्ञाताही देहाचे मिळणीं ॥ देहाभिमानी होईल ॥ ५७ ॥ जेवीं लोहसंगाचिये[5] प्राप्ती ॥ दुर्धर अग्नि घण वरी घेती ॥ तेवीं देहाचिया संगतीं ॥ ज्ञाते भोगिती सुखदुःखें ॥ ५८ ॥ ऐसा कल्पाल अभिप्रावो ॥ तो सज्ञानासि नघडे भावो ॥ तिहीं निवटुनियां[6] अहंभावो ॥ चिदानंदें पहाहो समाधिस्थ ॥ ५९ ॥ अधिरूढ समाधियोग ॥ हें मूळींचें पद अभंग ॥ येणें समाधि अतिनिर्व्यंग ॥ साधिली चांग निजबोधें ॥ ६६० ॥ तरी समाधी ते कैशी असे ॥ तटस्थ काष्ठाचेपरी दिसे ॥ कां समाधी ते केवळ पिसें ॥ अथवा असे सज्ञान ॥ ६१ ॥ ते समाधीचीं लक्षणें ॥ ऐक सांगेन संपूर्णें ॥ देहीं असोनि देहबंधनें ॥ नाहीं अडकणें सज्ञाना ॥ ६२ ॥ केवळ ताटस्थ्या नांव समाधी ॥ ह्मणतां ज्ञात्याची[7] ठकली बुद्धी ॥ ते समाधि नव्हे त्रिशुद्धी ॥ मूर्च्छित ते संधी असे वृत्ती ॥ ६३ ॥ निरभिमान निरवधी ॥ त्या नांव अखंडसमाधी ॥ परी काष्ठातें त्रिशुद्धी ॥ नव्हे समाधी सर्वथा ॥ ६४ ॥ ताटस्थ्यचि समाधि साचें ॥ जे मानिती त्यांसि स्वरूप साचें ॥ ज्ञान नाहीं निश्चयाचें ॥ अनुमानाचें बोलणें ॥ ६५ ॥ प्रचंड आघाता

---

१ आपल्या कर्मास. २ मद्यावर. ३ दुःख. ४ खारट. ५ लोखंडाच्या. ६ नाहींसा करून. ७ ब्रह्मनिष्ठाची.

च्या भुलीं ॥ तत्काळ तटस्था बाणली[1] ॥ तरी काय तेणें झाली ॥ सत्याची भली समाधि त्यासी ॥ ६६ ॥ ओंवाळणीचिया आस्था ॥ बहुरूपी सोंग संपादितां ॥ वायु स्तंभविला अवचितां ॥ तेणें तटस्थता बहुकाळ ॥ ६७ ॥ परी वासना जंव उरली आहे ॥ तंव समाधि कैसेनि हो लाहे ॥ सावध होतांचि ह्मणे काये ॥ ये दात्याचेरायें उचित द्यावें ॥ ६८ ॥ सर्वसंकल्पांची अवधी[2] ॥ त्या नांव निर्विकल्प समाधी ॥ सकळ शास्त्र हेंचि प्रतिपादी ॥ समाधि त्रिशुद्धी त्या नांव ॥ ६९ ॥ सापु आल्या शेळीप्रती ॥ तटस्थ होय सकळवृत्ती ॥ तैशी झालिया ताटस्थ्यस्थिती ॥ नव्हे निश्चितीं ते समाधी ॥ ६७० ॥ अकस्मात् अवचितां ॥ दिव्य स्वरूप देखतां ॥ आश्चर्यें झाली तटस्थता ॥ तेथ जाणावी तत्त्वतां वृत्ति आहे ॥ ७१ ॥ स्वरूप देखतां प्रथमदृष्टीं ॥ नावरत विस्मयो उठी ॥ तोही जिरवूनियां[3] पोटीं ॥ दशा जे उठी ते समाधी ॥ ७२ ॥ निःशेष कल्पना जेथ विरे ॥ तेथ विस्मयो कोठें स्फुरे ॥ सूक्ष्म कल्पना थावरे ॥ तेणें वोसरे विस्मयो ॥ ७३ ॥ जेथ साचार ब्रह्मप्राप्ती होये ॥ तेथें देहचि स्फुरों नलाहे ॥ तेथें तटस्थ कीं चालताहे ॥ हें देखणें होये पुढिलाचें ॥ ७४ ॥ एवं देहचि जेथ मिथ्यापणें ॥ त्याचीं कवण लक्षी लक्षणें ॥ हों कां मृगजळींचेनि नाहाणें ॥ जेवीं कां निवणें सज्ञानी ॥ ७५ ॥ मिथ्या देहासि तटस्थता ॥ झाल्या मानावी समाध्यवस्था[4] ॥ ऐशीं लक्षणें सत्य मानितां ॥ ठकले तत्त्वतां परीक्षक ॥ ७६ ॥ होकां स्वप्नींचे सज्ञानासी ॥ ताटस्थ्य मुद्रा लागल्या त्यासी ॥ तरी मान्य झाल्या स्वप्नींच्यासी ॥ परी जागृतीसी नाहीं आला ॥ ७७ ॥ होकां स्वप्नींच्या लोकांप्रती ॥ थोर झाली समाधीची ख्याती[5] ॥ तरी नाहीं आला तो जागृती ॥ जाणावा निश्चितीं निद्रितू ॥ ७८ ॥ जेवीं ताटस्थ्या नांव समाधी ॥ तेवीं अविद्या स्वप्नमूर्च्छासिद्धी ॥ परी स्वस्वरूपप्रबोधीं[6] ॥ जागा त्रिशुद्धी नाहीं झाला ॥ ७९ ॥ जो जागा होऊनि स्वप्न पाहे ॥ तें मिथ्यात्वें देखताहे ॥ त्यांतु आपुला देहो सत्य काये ॥ मा ताटस्थ्य राहे तेठायीं ॥ ६८० ॥ जो जागा होऊनि तत्त्वतां ॥ स्वप्नदेहासि तटस्थता ॥ साक्षेपपूर्वक लावूं जातां ॥ लाजे परी अधिकता दशा नमनीं ॥ ८१ ॥ तो जागा होऊनि स्वप्न सांगे ॥ तें मिथ्यापणचि अवघें ॥ परी सत्यत्वाचेनि पांगें ॥ कदा निजांगें नातळे ॥ ८२ ॥ तैशी साचार वस्तुप्राप्ती ॥ तो नातळे देहस्थितीं ॥ तरी देह वर्ते कोणे रीतीं ॥ तो प्रारब्धगतीचेनि शेषें ॥ ८३ ॥ स्थंडिलीं अग्नि विझोनि जाये ॥ तरी भूमिये उष्णता राहे ॥ कर्पूर[7] सरल्याही पाहे ॥ सुवासु आहे ते देशीं ॥ ८४ ॥ पाळणा हालवितां वोसरे ॥ तरी तो हाले पूर्वसंस्कारें ॥ तेवीं अविद्यानाशें प्रारब्ध उरे ॥ तेणें देहो वावरे[8] मुक्तांचा ॥ ८५ ॥ शरीराचेनि छाया चळे ॥ परी शरीर छायेवेगळें ॥ तेवीं देह मिथ्या मुक्ताजवळें ॥ चळे वळे प्रारब्धें ॥ ८६ ॥ हेतुवीण अना

---

१ कळली. २ शेवट. ३ पचवून. ४ समाधीची स्थिति. ५ प्रसिद्धि. ६ आपलें स्वरूप जाणण्याविषयीं. ७ कापूर. ८ फिरतो.

यासें ॥ पुरुषासवें छाया असे ॥ तेवीं सज्ञानासरिसें ॥ देह दिसे मिथ्यात्वें ॥ ८७ ॥ लक्ष भेदोनियां तीरें ॥ बळें चालिजे पुढारें ॥ तेवीं अविद्यानाशे दैव उरे ॥ तेणें देहो वावरे मुक्ताचा ॥ ८८ ॥ जैसें गलितपत्र[1] वारेंनि चळे ॥ तैसें देह वर्ते प्राचीनमेळें ॥ परी देहकर्मांचेनि विटाळें ॥ ज्ञाता न मैळे निजबोधें ॥ ८९ ॥ त्या प्रारब्धाच्या पोटीं ॥ सांगो सकळजगेंसि गोठी ॥ कां धरोनि मौनाची मिठी ॥ गिरिकें[2] पाटीं पडो सुखें ॥ ६९० ॥ तो आचरो सकळ कर्में ॥ अथवा पिसा होकां निभ्रमें ॥ तेणें तेणें अनुक्रमें ॥ जाण परिणामे प्रारब्धें ॥ ९१ ॥ तो चढो पालखीं गजस्कंधीं ॥ कां पडो विष्ठामूत्रसंधीं ॥ तेते प्रारब्धाची सिद्धी ॥ जाण त्रिशुद्धी ज्ञात्याची ॥ ९२ ॥ जेथ बाध्यबाधकता फिटली ॥ सकळ अहंविद्या तुटली ॥ सहज समाधी त्यानांव झाली ॥ हे संस्था[3] केली सिद्धांतीं ॥ ९३ ॥ ऐशी जे सैर समाधिअवस्था ॥ तोचि भोग भोगोनि अभोक्ता ॥ कर्म करोनि अकर्त्ता ॥ जाण तत्त्वतां तो एक ॥ ९४ ॥ तो क्रियाकारणसंयोगें ॥ दुह्मुत देखिजे विषयभोगें ॥ परी समाधिमुद्रा न भंगे ॥ भोगसंगें[4] अलिप्त ॥ ९५ ॥ त्यासि स्त्री ह्मणे माझा भर्ता ॥ पुत्र ह्मणे माझा पिता ॥ शिष्य ह्मणे स्वामी तत्त्वतां ॥ त्याहूनि परता त्यामाजी वर्ते ॥ ९६ ॥ होकां काष्ठास्तव उत्पत्ती ॥ काष्ठावरी ज्याची स्थिती ॥ तो आकळितां काष्ठीं बहुतीं ॥ नावरे निश्चितीं अग्नि जैसा ॥ ९७ ॥ फुंकितां लखलखिला ॥ जो फुंकास्तव प्रकटला ॥ तो फुंक नसाहतां[5] ठेला ॥ निवातींचा संचला दीप जैसा ॥ ९८ ॥ तेवीं कर्मास्तव उत्पत्ती ॥ कर्मेंचि झाली परब्रह्मप्राप्ती ॥ त्या कर्मामाजी वर्त्तती ॥ निष्कर्मस्थिती महायोगी ॥ ९९ ॥ तो व्यवहारी दिसों जनीं ॥ कीं पिसेपणीं नाचो वनीं ॥ अथवा तटस्थ राहो विजनीं ॥ दशा अधिक उणी बोलूंनये ॥ ७०० ॥ जे सिंहासनीं राजत्व जोडे ॥ तें वसंत खेळतां नमोडे ॥ कीं धांवतां व्याहाळीपुढें ॥ राजपद चोखडें ढळूं नेणे ॥ १ ॥ रावो रानीं वशिन्नला[6] ॥ त्या रानासि राजभोग आला ॥ रानीं राजत्वा मुकला ॥ मूर्खही या बोला नबोलती ॥ २ ॥ तेवीं पावोनि स्वरूपप्राप्ती ॥ योगी प्रारब्धाच्या स्थितीं ॥ नानाकर्में करितां दिसती ॥ परी निजात्मस्थिती[7] भंगेना ॥ ३ ॥ यालागीं समाधि आणि व्युत्थान[8] ॥ या दोहीं अवस्थांचें लक्षण ॥ अपक्कासीचि घडे जाण ॥ पूर्णासि लक्षण तें कैंचें ॥ ४ ॥ स्वरूपावेगळें कांहीं एक ॥ पूर्णासि उरलें नाहीं देख ॥ समाधिव्युत्थानाचें मुख ॥ त्यासंमुख येवों लाजे ॥ ५ ॥ अर्जुना देवोनि समाधी ॥ सवेंचि घातला महायुद्धीं ॥ परी कृष्णकृपानिधी ॥ तटस्थ त्रिशुद्धी नधरीच ॥ ६ ॥ यालागीं समाधिव्युत्थानविधी ॥ ताटस्थ्येसहित निरवधी[9] ॥ गिळूनि झाली सैरसमाधी ॥ पूर्णनिजपदीं विलसता[10] ॥ ७ ॥ एवं प्रारब्ध जंव असे ॥ तंवमुक्ताचे देह वर्त्ते ऐसें ॥ परिअहंममतेचें पिसें ॥ पूर्वील्या ऐसें बाधीना ॥ ८ ॥

---

१ गळालेलें पान. २ पर्वताच्या गुहेंत. ३ शेवट. ४ भोगाच्या योगानें. ५ न सोसता. ६ राहिला. ७ आपल्या आत्म्याची स्थिति. ८ समाधिविसर्जन. ९ अनंत. १० शोभणारा.

जेवीं स्वप्नदेहाच्या नाना अवस्था ॥ जागृतीं आलिया तत्त्वतां ॥ पुरुष नेघे आपुले माथां ॥ तेवीं समाधिस्था देहकर्में ॥ ९ ॥ हेचि परमार्थता ब्रह्मस्थिती ॥ नानापरीच्या उपपत्ती ॥ म्यां सांगीतल्या तुह्मांप्रती ॥ ज्ञानसंपत्ती निजगुह्य ॥ ७१० ॥ तूं कोण हें पुसिलें होतें ॥ सांगावया तें सनकादिकांतें ॥ सांगतसें निजरूपातें ॥ विश्वास त्यातें दृढ व्हावया ॥ ११ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मयैतदुक्तं वो विप्रा गुह्यं यत्सांख्ययोगयोः ॥ जानीत मागतं यज्ञं युष्मद्धर्मविवक्षया ॥ ३८ ॥ ॥ टीका ॥ ॥ अतिगुह्य ज्ञान परात्पर ॥ जें उपनिषदांचें भांडार ॥ म्यां सांगीतलें साचार ॥ योगसार[1] योग्यांचें ॥ १२ ॥ ज्या ज्ञानालागी साधनकोटी ॥ मुमुक्षु करिती हटतटीं ॥ योगी रिघोनि गिरिकपाटीं[2] ॥ महामुद्रा नेटीं साधिती ॥ १३ ॥ वेदशास्त्रांचिया युक्ती ॥ थोंटावल्या जिये अर्थी ॥ तें निजज्ञान[3] म्यां तुह्मांप्रती ॥ यथानिगुतीं सांगीतलें ॥ १४ ॥ एवढिया ज्ञानाचा वक्ता ॥ मी कोण हें न कळेल सर्वथा ॥ तरी यज्ञाचा यज्ञभोक्ता ॥ जाण तत्त्वतां मी विष्णू ॥ १५ ॥ मज यावया हेंचि कारण ॥ तुह्मी ब्रह्म्याप्रति केला प्रश्न ॥ तें उपदेशावया ब्रह्मज्ञान ॥ स्वयें आपण येथें आलों ॥ १६ ॥ ज्या उपदेशाच्या पोटीं ॥ वर्णाश्रमपरिपाटी ॥ न सांडितां होय माझी भेटी ॥ तेही गोष्टी ध्वनिलीसे ॥ १७ ॥ सांडावें ब्राह्मणपण ॥ मग मांडावें संन्यासग्रहण ॥ हे दोनी धर्म देहींचे जाण ॥ उपदेशीं देहपण मुख्यत्वें मिथ्या ॥ १८ ॥ उपदेशू करूनि प्रमाण ॥ सनकादिकीं ब्राह्मणपण ॥ अद्यापि सांडिलें नाहीं जाण ॥ माझें गुह्यज्ञान पावले ॥ १९ ॥ तेणेंचि उपदेशें निश्चित ॥ नारद ब्राह्मणपणें वर्तत ॥ ब्रह्मानंदें डुल्लत ॥ गात नाचत निजबोधें ॥ ७२० ॥ ऐसें जें चैतन्यघन ॥ आपुलें स्वरूप आपण ॥ स्वयें करिताहे स्तवन ॥ निजमहिमान द्योतावया ॥ २१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अहं योगस्य सांख्यस्य सत्यस्यर्तस्य तेजसः ॥ परायणं द्विजश्रेष्ठाः श्रियः कीर्तेर्दमस्य च ॥ ३९ ॥ ॥ टीका ॥ ॥ सांख्य जें परम ज्ञान ॥ योग अष्टांगसाधन ॥ सत्याचें सत्यपण ॥ सत्यस्वरूप जाण मी एक ॥ २२ ॥ पहा पां ज्या सत्याच्या ठायीं ॥ संतसद्धर्में[4] राहिले पाही ॥ सूनृत[5] जे वाचा तेही ॥ मजवेगळी कांहीं हों नेणें ॥ २३ ॥ तेजाची जे प्रगल्भता[6] ॥ ते माझेनि तेजें सतेजता ॥ श्रियेची जे ऐश्वर्यता[7] ॥ जाण तत्त्वतां माझेनी ॥ २४ ॥ कीर्ति माझेनि कीर्तनें ॥ सदा वंदिजे साधुजनें ॥ मजवेगळे कीर्तीचें जिणें ॥ कोणी पोसणें नघेती ॥ २५ ॥ माझेनि तेजें निग्रहता ॥ निग्रहो करी समस्ता ॥ अदम्या दमू दमिता ॥ जाण तत्त्वतां माझेनी ॥ २६ ॥ ध्येय आणि ध्यान ॥ कां साध्य आणि साधन ॥ या अवघियां मी अधिष्ठान ॥ मजवेगळें भान यां कैंचें ॥ २७ ॥ तुह्मी ब्राह्मण अतिश्रेष्ठ ॥ मजही पूज्यपणें वरिष्ठ ॥ यालागीं निजज्ञान चोखट ॥ तुह्मासि म्यां प्रकट सांगीतलें ॥ २८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मां भजंति गु

---

[1] योगाचें तत्त्व. [2] पर्वताच्या दरींत. [3] आत्मज्ञान. [4] चांगल्या धर्मानें. [5] चांगली. [6] आधिक्य. [7] धनीपणा.

णाः सर्वै निर्गुणं निरपेक्षकम् ॥ सुहृदं प्रियमात्मानं साम्यासंगादयो गुणाः ॥ ४० ॥ ॥ टीका ॥ ॥ मी वस्तुतां निरपेक्ष[1] निर्गुण ॥ त्या
माझ्याठायीं भजोनि गुण ॥ सुहृद आत्मा प्रिय जाण ॥ ऐसें लक्षण मज करिती ॥ २९ ॥ संगता आणि असंगता ॥ याही गुणांच्या अवस्था ॥
आणूनि ठेविती माझ्या माथां ॥ गुणस्वभावतां लक्षणें ॥ ७३० ॥ होकां सबळ बळें अंधकार ॥ कैं युद्धा आला सूर्यासमोर ॥
तरी तमारी[2] हा बडिवार ॥ सूर्या आंधार जेवीं देत ॥ ३१ ॥ कोणें धरोनियां आकाश ॥ घटीं घातलें सावकाश ॥ तरी घटयोगें घटाकाश ॥
मिथ्या गगनास[3] नांव आलें ॥ ३२ ॥ नाहीं घटासि आतळला[4] ॥ गगनींचा गगनींच संचला ॥ तो घटें घटचंद्रमा केला ॥ मूर्खासि
मानला सत्यत्वें ॥ ३३ ॥ तेवीं मी केवळ निर्गुण ॥ त्या माझ्याठायीं भजोनि गुण ॥ सुहृद आत्मा इत्यादि जाण ॥ असंगादिलक्षण मज
देती ॥ ३४ ॥ गुणासि मी नातळें जरी ॥ तरी मज ह्मणती लीलाधारी ॥ एवं गुणचि गुणामाझारी ॥ मिथ्या मजवरी आळ हा ॥ ३५ ॥
तेथ मी घेता ना देता ॥ कर्ता ना करविता ॥ हे माझी निजस्वभावता ॥ येर ते अवस्था गुणांची ॥ ३६ ॥ एवं पूर्वापर अतिविचित्र ॥ सांगोनि
ज्ञानविज्ञाननिर्धार ॥ त्या इतिहासाचा उपसंहार ॥ स्वयें सारंगधर करीतसे ॥ ३७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ इति मे छिन्नसंदेहा मुनयः सनकादयः ॥
सभाजयित्वा परया भक्त्यागृणत संस्तवैः ॥ ४१ ॥ ॥ टीका ॥ ॥ आत्मज्ञानी परम दक्ष ॥ मुमुक्षूमाजी अतिनेटक ॥ संदेहापन्न[5] सनकादिक ॥
म्यां यापरी देख निःसंदेह केले ॥ ३८ ॥ सदा सावधानें निर्मळ ॥ माझ्या भजनीं अतिप्रेमळ ॥ सदा मद्रूपें मननशीळ ॥ अव्याकुळ
श्रवणार्थी ॥ ३९ ॥ उद्धवा तिहीं ऐकतां माझी गोष्टी ॥ माझ्या स्वरूपीं घातली मिठी ॥ मद्रूप झाले उठाउठी ॥ बाप जगजेठी
ब्रह्मपुत्र ॥ ७४० ॥ तिहीं दृश्य द्रष्टा दर्शन ॥ त्रिपुटीचें केलें शून्य ॥ परब्रह्मचि झाले पूर्ण ॥ माझेनि जाण उपदेशें ॥ ४१ ॥ परम पावले
समाधान[6] ॥ गद्यपद्यादि सुलक्षण ॥ माझें करोनियां स्तवन ॥ पूजाविधान मांडिलें ॥ ४२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तैरहं पूजितः सम्यक् संस्तुतः
परमर्षिभिः ॥ प्रत्येयाय स्वकं धाम पश्यतः परमेष्ठिनः ॥ ४२ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥
॥ टीका ॥ ॥ जरी पूज्यपूजकता गेली ॥ तरी तिहीं गुरूची पूजा केली ॥ सांडूनि द्वैताची भुली ॥ पूजा मांडिली अतिप्रीतीं ॥ ४३ ॥ शिष्य
झालियाही ब्रह्मसंपन्न ॥ त्याहीवरी त्यासि गुरु पूज्यजाण ॥ सद्गुरु तोचि ब्रह्म पूर्ण ॥ हे पावली खूण सनकादिकां ॥ ४४ ॥ ज्याच्या
बोलासरिसेंचि पाहे ॥ अवघें ब्रह्मचि होऊनि ठाये ॥ त्या सद्गुरूचे पूज्य पाये ॥ सांगूं काये बोलवरी ॥ ४५ ॥ ज्यासि परब्रह्म आलें हातां ॥
तोचि जाणे सद्गुरूची पूज्यता ॥ इतरांसि हे नकळे कथा ॥ अनुमानता बोलवरी ॥ ४६ ॥ ते सनकादिक समस्त ॥ माझी पूजा

---

[1] इच्छारहित. [2] अंधाराचा नाश करणारा. [3] आकाशास. [4] मिळाला. [5] संशय पावलेले. [6] शांति.

करोनि यथोक्त ॥ वारंवार स्तवन करित ॥ चरणा लागत पुनःपुनः ॥ ४७ ॥ माझ्या भजनीं एकमुख ॥ माझिया निजभावें अतिभाविक ॥ मज अवाप्तकामासि सुख ॥ त्याचे पूजनीं देख उसळलें ॥ ४८ ॥ मग करूनि प्रदक्षिणा ॥ ते लागले माझिया चरणा ॥ परम सुख झालें ब्राह्मणां ॥ वचनार्थें जाणा माझेनी ॥ ४९ ॥ पहात असतां प्रजापती ॥ सनकादिक उभे असती ॥ त्या देखतां निजधामाप्रती ॥ शीघ्रगतीं मी आलों ॥ ७५० ॥ माझे शिष्य सनकादिक ॥ उद्धवा या रीतीं झाले देख ॥ तो इतिहास अलोलिक ॥ तुज म्यां सम्यक सांगीतला ॥ ५१ ॥ ते योगियांमाजी अतिउद्भट ॥ भक्तांमाजी अतिश्रेष्ठ ॥ ज्ञानियांमाजी अतिवरिष्ठ ॥ ॥ शिष्य चोखट सनकादिक ॥ ५२ ॥ हंसगीतनिरूपण ॥ पुरातन जें ब्रह्मज्ञान ॥ तें उद्धवासि श्रीकृष्णें ॥ प्रसन्न होऊन दीधलें ॥ ५३ ॥ भागवतपंथें चालतां ॥ हे पुरातन ब्रह्मकथा ॥ एका एकादशू पाहतां ॥ स्वभावें हातां पैं आली ॥ ५४ ॥ जीं हंसमुखींचीं चिद्रत्नें ॥ तीं सनकादिकां झालीं भूषणें ॥ उद्धव अळंकारिला श्रीकृष्णें ॥ तें शेष जनार्दनें मज दीधलें ॥ ५५ ॥ सनकादिक उद्धवाचें शेष ॥ हातां आलें हा बोल वोस ॥ ते गोष्टीसि जाहले बहुदिवस ॥ ह्मणाल वायस हा जल्पू ॥ ५६ ॥ कृतयुगीं शंखासुरासी ॥ देवें मर्दिलें होतें त्यासी ॥ तेठायीं अद्यापि सभाग्यासी ॥ अव्हाड शंखासी पावती ॥ ५७ ॥ रामें पूर्वीं अयोध्येसी ॥ केलें होतें महायागासी ॥ तेथें हविःशेष लोकांसी ॥ अद्याप हातांसी येतसे ॥ ५८ ॥ तैसेंचि येथें भागवतीं ॥ जनार्दन कृपापद्धतीं ॥ सनकादिकांची शेषप्राप्ती ॥ एकादशार्थीं आह्मां झाली ॥ ५९ ॥ मागें पुढें अवघें एक ॥ हा एकादशाचा विवेक ॥ तेणें सनकादिक उद्धवशेष ॥ आह्मांही देख प्राप्त झालें ॥ ७६० ॥ करूं नेदितां गया वर्जनीं ॥ न रिगवे समर्थजनीं ॥ ते पदीं माशी लागुनी ॥ निवारण कोणी करीना ॥ ६१ ॥ तेवीं नानाशास्त्रयुक्तींसी ॥ शिणतां समर्थ साधकांसी ॥ प्राप्ति नव्हे ज्ञानशेषासी ॥ ते झाली आह्मांसी एकादशें ॥ ६२ ॥ हंस कृष्ण जनार्दन ॥ स्वरूप एक नामें भिन्न ॥ तेणें घालून बोधांजन ॥ जुना ठेवा जाण दाखविला ॥ ६३ ॥ तेथ मी एका देखतां ॥ आणि तो एक मातें दाखविता ॥ हेही नुरेचि बोध्यबोधकता ॥ पाहता पाहविता तोचि तो ॥ ६४ ॥ आरसा आलिया मुख दिसे ॥ तो गेलिया तें न दिसे ॥ परी येणें जाणें मुखासि नसे ॥ तें सहजेंचि असे संचलें ॥ ६५ ॥ आरिशाचें मुख आरिशें नेलें ॥ परी पाहातया नाहीं ऐसें झालें ॥ जें कटकटा माझें मुख गेलें ॥ तें असे संचलें तो जाणे ॥ ६६ ॥ तेवीं अज्ञानें नयावें ॥ कां ज्ञान झालिया यावें ॥ तैसें वस्तुसि नसंभवे ॥ तें असे स्वभावें संचलें ॥ ६७ ॥ तैसें देखतें आणि दाखवितें ॥ दोनी जाऊनियां तेथें ॥ माझें मीपण जें जुनें होतें ॥ तें दाखविलें मातें जनार्दनें ॥ ६८ ॥

---

१ आपल्या भावनेनें. २ पूर्णकामास. ३ आपल्या लोकांस. ४ चांगले. ५ चैतन्यरूप रत्नें. ६ नाशिलें. ७ विचार. ८ आहे तसें आहे. ९ पहाणारास.

जेवीं सूर्याचेनि प्रकाशें ॥ सूर्यासीचि कीं सूर्यों दिसे ॥ तेवीं माझेनि प्रकाशें ॥ मज मीचि असें देखत ॥ ६९ ॥ ऐशियाही ठायीं जाण ॥ कैंचें नवें जुनें ज्ञान ॥ बहुकाळ ठेविलें सुवर्ण ॥ त्यासि ह्मणे कोण कुहजकु[1] ॥ ७७० ॥ कालचाचि आजि उगवला ॥ तो सूर्य काय ह्मणावा शिळा ॥ कीं आजिचा अग्नि सोंवळा ॥ कालिचा काय वोंवळा ह्मणों ये ॥ ७१ ॥ तेवीं सनकादिकांचें जें ज्ञान ॥ तेंचि मराठीभाषेमाजी जाण ॥ येथें ठेवूं जातां दूषण ॥ दोषी आपण होइजे ॥ ७२ ॥ कां सुवर्णाचें केलें सुणें ॥ परी तें मोलें नव्हेचि उणें ॥ तेवीं सनकादिकांचीं ज्ञानें ॥ देशभाषा हीनें नव्हतीच ॥ ७३ ॥ जेवीं कां गुळाचें कारलें केलें ॥ परी तें कडूपणा नाहीं आलें ॥ तेवीं हंसगीत मराठें झालें ॥ नाहीं पालटलें चिन्मात्र ॥ ७४ ॥ जें मोल मुकुटींच्या हेमासी[2] ॥ तेंचि मोल सुवर्णश्वानासी[3] ॥ जो कां ग्राहिक सुवर्णासी ॥ दोघे दोघांसि समत्वें ॥ ७५ ॥ तैसें आत्मानुभवी जे येथें ॥ ते मानितील या ग्रंथातें ॥ येर ते हेळसितील यातें ॥ निजभावार्थें[4] न घेती ॥ ७६ ॥ जे वंदिती कां निंदिती ॥ ते दोघे आह्मां ब्रह्ममूर्ती ॥ हे निजात्मभावाची प्रतीती ॥ केली निश्चितीं जनार्दनें ॥ ७७ ॥ एका जनार्दना शरण ॥ रिघतां विरालें एकपण ॥ जेवीं कां समरसोनि[5] लवण ॥ स्वयें जाण समुद्र झालें ॥ ७८ ॥ तेथें एका आणि जनार्दन ॥ एक झालें हें ह्मणे कोण ॥ जेवीं डोळ्यांचें देखणेपण ॥ डोळाचि आपण स्वयें जाणें ॥ ७९ ॥ डोळ्यांनीं आरिसा प्रकाशिजे ॥ तेथें डोळेनि डोळा पाहिजे ॥ तेवीं हें ज्ञान जाणिजे ॥ देखणें देखिजे देखणेनी ॥ ७८० ॥ सांडोनियां एकपण ॥ एका जनार्दना शरण ॥ हेंचि हंसगीतनिरूपण ॥ झालें परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ७८१ ॥

॥ इति श्रीभागवते दशमस्कंधे एकाकारटीकायां श्रीकृष्णोद्धवसंवादे हंसगीतनिरूपणं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ मू० श्लो० ४२ ॥ ओं० ॥ ७८१ ॥ एकंदरसंख्या ॥ ८२३ ॥ ॥ छ ॥

---

[1] कुजलेलें. [2] सोन्यास. [3] सोन्याच्या कुत्र्यास. [4] आपल्या भक्तीनें. [5] एकत्र होऊन.

# अध्याय १४ वा.


श्रीकृष्ण भगवान्
भागवतोत्तम भ०

श्रीगणेशायनमः॥ ॥ ओंनमो स्वामिसद्गुरू ॥ तूं निजांगें क्षीरसागरू ॥ तुझा उगवल्या प्रबोध[1]चंद्रू ॥ आल्हादकरू[2] जीवासी ॥ १ ॥ ज्या चंद्राचे चंद्रकरीं ॥ निबिड[3] अज्ञान अंधारीं ॥ त्रिविध ताप दूर करी ॥ हृदय[4]चिदंबरीं उगवोनी ॥ २॥ ज्या चंद्राचे चंद्रकिरण ॥ आर्त चकोरांलागीं जाण ॥ स्वानंदचंद्रामृतें स्रवोन ॥ स्वभावें पूर्ण करिताती ॥ ३॥ अविद्याअंधारीं अंध बंधें ॥ संकोचलीं जीवकुमुदें[5] ॥ तीं ज्याचेनि किरणप्रबोधें ॥ अतिस्वानंदें विकासलीं ॥ ४ ॥ जो चंद्र देखतांचि दिठीं ॥ सुख होय जीवाच्या पोटीं ॥ अहंसोम[6]कांतखोटी ॥ उठाउठी विरवितू ॥ ५॥ पूर्णिमा पूर्णत्वें पूर्ण वाढे ॥ देखोनि क्षीराब्धी भरतें गाढें ॥ गुरुआज्ञामर्यादा न मोडे ॥ स्वानंद चढे अद्वयें ॥ ६ ॥ सद्गुरु क्षीराब्धी अतिगहन ॥ सादरें करितां निरीक्षण ॥ वेदांतलहरीमाजी जाण ॥ शब्दचिद्रत्नें भासती ॥ ७ ॥ तेथ विश्वासाचा गिरिवर ॥ वैराग्यवासुकी रविदोर ॥ निजधैर्याचे सुरासुर ॥ मथनतत्पर समसाम्यें ॥ ८॥ मथनीं प्रथम खळखळाटीं ॥ लयविक्षेप हाळाहळ उठी ॥ तें विवेकनीळकंठें कंठीं ॥ निजात्मदृष्टीं गिळिलें ॥ ९ ॥ मग अभ्यासप्रत्यगावृत्ती ॥ क्रियेसि झाली विश्रांती ॥ प्रकटली रमा निजशांती ॥ जीस श्रीपती वश्य झाला ॥ १०॥ तेथ ब्रह्मरस आणि भ्रमरस ॥ इहीं युक्त अमृतकलश ॥ मथनीं निघाला सावकाश ॥ ज्याचा अभिलाष सुरासुरां[7] ॥ ११ ॥ ते विभागावयालागुनी ॥ माधवचि झाला मोहिनी ॥ अहंराहूचें शिर छेदूनी ॥ अमृतपानीं निवविले ॥ १२ ॥ ते वृत्तिरूप मोहिनी ॥ पालटली तत्क्षणीं ॥ ठेली नारायण होउनी ॥ पहिलेपणीं उठेना ॥ १३ ॥ ते क्षीरसागरीं नारायण ॥ समाधि शेषशयनीं आपण ॥ सुखें सुखावला जाण ॥ अद्यापि शयन केलें असे ॥ १४ ॥ ऐसा सद्गुरु चित्सागरू ॥ ज्याचा वेदांसि न कळे पारू ॥ नारायणादि नानावतारू ॥ ज्याचेनि साचारू उपजती ॥ १५ ॥ ज्याचीं चिद्रत्नें गोमटीं ॥ हरिहरांचे कंठीं मुकुटीं ॥ बाणलीं शोभती वेदपाठीं ॥ कविवरिष्ठीं[8] वानिलीं ॥ १६ ॥ ऐशिया जी अतिगंभिरा ॥ जनार्दना सुखसागरा ॥ अनंतरूपा अपारा ॥ तुझ्या परपारा कोण जाणें ॥ १७ ॥ विवेक न देखे दिठीं ॥ वेदां न बोलवे गोठी ॥ तेथ हे माझी मराठी ॥ कोणें परिपाटीं[9] सरेल ॥ १८ ॥ होकां राजचक्रवर्तीचे माथां ॥ कोणासि न बैसवे सर्वथा ॥ तेथ माशी जाऊनि बैसतां ॥ दुर्गमता तंव नाहीं ॥ १९॥ कां राजपत्नीचे स्तन ॥ देखावया शके कोण ॥ परी निजपुत्र तेथें जाण ॥ बळें स्तनपान करीतसे ॥ २०॥ तेवीं माझी हे मराठी ॥ जनार्दनकृपापरिपाटीं ॥ निःशब्दाच्या सांगे गोठी ॥ चिन्मात्रें मिठी घालूनी ॥ २१॥ असो आकाश घटा सबाह्य[10] आंतू ॥ तेवीं शब्दामाजी निःशब्दवस्तु ॥ रिता बोल रिघावया प्रांतू ॥ उरला प्रस्तुत[11] दिसेना ॥ २२ ॥ बाळक बोलों नेणें तत्त्वतां ॥ त्यासि बोलिकें बोलवी पिता ॥

---

[1] ज्ञानरूप चंद्र. [2] आनंद देणारा. [3] गाढ, दाट. [4] हृदयाकाशांत. [5] कमलें. [6] अहंकाररूपचंद्रकांतमणी. [7] देवांस व दैत्यांस. [8] मोठमोठ्या कवींनीं. [9] परंपरा. [10] बाहेर. [11] सांप्रत.

तैसीच हेही जाणावी कथा ॥ वाचेचा वक्ता जनार्दन ॥ २३ ॥ त्या जनार्दनाचे रुपादर्शीं ॥ भागवत सांगों मराठिये गोष्टी ॥ जेंकां आलोडितां ग्रंथकोटी ॥ अर्थीं दृष्टी पडेना ॥ २४ ॥ तेंचि श्रीमहाभागवत ॥ जनार्दनरुपें येथ ॥ देशभाषां[1] हंसगीत ॥ ज्ञान सुनिश्चित सांगीतलें ॥ २५ ॥ सद्भावें करितां माझी भक्ती ॥ तेणें ज्ञानखड्गाची होय प्राप्ती ॥ छेदोनि संसारआसक्ती ॥ सायुज्यमुक्ती मद्भक्तां ॥ २६ ॥ माझेनि भजनें मोक्ष पावे ॥ ऐसें बोलिलें जें देवें ॥ तें आइकोनियां उद्धवें ॥ विचारू जीवें आदरिला ॥ २७ ॥ देवो सांगे भजनेंचि मुक्ती ॥ आणिका ज्ञात्यांची व्युत्पत्ती ॥ अनेकसाधनें मोक्षाप्रती ॥ सांगताती आनआनें[2] ॥ २८ ॥ एवं या दोहींपक्षीं जाण ॥ मोक्षीं श्रेष्ठ साधन कोण ॥ तेचि आशंकेचा प्रश्न ॥ उद्धवें आपण मांडिला ॥ २९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धव उवाच ॥ ॥ वदंति कृष्ण श्रेयांसि बहूनि ब्रह्मवादिनः ॥ तेषां विकल्पप्राधान्यमुताहो एकमुख्यता ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ उद्धव ह्मणे गा श्रीपती ॥ मोक्षमार्गीं साधनें किती ॥ वेदवादियांची व्युत्पत्ती ॥ बहुत सांगती साधनें ॥ ३० ॥ तीं अवघींच समान ॥ कीं एक गौण एक प्रधान ॥ देवें सांगीतलें आपण ॥ भक्तीचि कारण मुक्तीसी ॥ ३१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भवतोदाहृतः स्वामिन् भक्तियोगोऽनपेक्षितः ॥ निरस्य सर्वतः संगं येन त्वय्याविशेन्मनः ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ॥ आणिका साधना नापेक्षिती[3] ॥ सर्वसंगांतें निरसिती ॥ मोक्षमार्गीं मुख्य भक्ती ॥ जेणें स्वरूपप्राप्ती तत्काळ ॥ ३२ ॥ माझ्या स्वरूपीं ठेवूनि मन ॥ फळाशेवीण[4] माझें भजन ॥ हेंचि मोक्षाचें मुख्य साधन ॥ देवें आपण बोलिलों ॥ ३३ ॥ स्वामी बोलिले मुख्य भक्ती ॥ इतर जे साधनें सांगती ॥ त्यांसि प्राप्तीची अस्तिनास्ती ॥ देवें मजप्रती सांगावी ॥ ३४ ॥ याचि प्रश्नाची प्रश्नस्थिती ॥ विवंचीतसे[5] श्रीपती ॥ त्रिगुण ज्ञात्यासी प्रकृती ॥ साधनें मानिती यथारुचि ॥ ३५ ॥ ज्याची आसक्ती जिये गुणीं ॥ तो तींचि साधनें सत्य मानी ॥ यापरी ज्ञानाभिमानी ॥ नानासाधनीं जल्पती[6] ॥ ३६ ॥ परंपरा बहुकाळें ॥ ज्ञात्याचें ज्ञान झालें मैळें ॥ तें सत्य मानिती तुच्छफळें ॥ ऐक प्रांजळें उद्धवा ॥ ३७ ॥ चौदाव्यामाजी निरूपणस्थिती ॥ इतुकें सांगेल श्रीपती ॥ साधनांमाजी मुख्य भक्ती ॥ ज्ञानयोगस्थिती समाधियुक्त ॥ ३८ ॥ इतरसाधनांचें निराकरण[7] ॥ तुच्छफलत्वें तेंही जाण ॥ सातश्लोकीं श्रीकृष्ण ॥ स्वमुखें आपण सांगतू ॥ ३९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ कालेन नष्टा प्रलये वाणीयं वेदसंज्ञिता ॥ मयाऽऽदौ ब्रह्मणे प्रोक्ता धर्मो यस्यां मदात्मकः ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ माझी वेदवाणी प्रांजळी ॥ ज्ञानप्रकाशें अतिसोज्ज्वळी ॥ ते नाशिली प्रळयकाळीं ॥ सत्यलोकहोळी जेव्हां झाली ॥ ४० ॥ ब्रह्मयाचा प्रळय होतां ॥ वेदवाणीचा वक्ता ॥ कोणी नुरेचि तत्त्वतां ॥ यालागीं सर्वथा

---

[1] देशभाषेंत. [2] वेगवेगळीं. [3] इच्छित नाहींत. [4] फलाविषयीं इच्छा न करितां. [5] विचार करी. [6] बडबडतात. [7] निवारण.

बुडाली ॥ ४१ ॥ तेंचि वेदवाणी कल्पादीसी ॥ म्यांचि प्रकाशिली ब्रह्म्यासी ॥ जिच्याठायीं मद्भक्तीसी ॥ यथार्थेंसी बोलिलों ॥४२॥ जे वाचेचें अनुसंधान ॥ माझे स्वरूपीं समाधान ॥ ऐसें माझें निजज्ञान ॥ ब्रह्म्यासि म्यां जाण सांगीतलें ॥४३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तेन प्रोक्ता च पुत्राय मनवे पूर्वजाय सा ॥ ततो भृग्वादयोऽगृह्णन् सप्त ब्रह्ममहर्षयः ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ तो सकळ वेद विवंचूनू ॥ ब्रह्मेनि उपदेशिला मनू ॥ सप्तमहर्षी त्यापासूनू ॥ वेद संपूर्णू पावले ॥ ४४ ॥ ब्रह्मेनि दक्षादि प्रजापती ॥ उपदेशिले त्याचि स्थिती ॥ यापासून नेणों किती ॥ ज्ञानसंपत्ती पावले ॥४५॥ सप्तऋषींची जे मातू ॥ भृगु मरीचि अत्रि विख्यातू ॥ अंगिरा पुलस्त्य पुलह क्रतू ॥ हा जाण निश्चितू ऋषिभागू ॥ ४६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तेभ्यः पितृभ्यस्तत्पुत्रा देवदानवगुह्यकाः ॥ मनुष्याः सिद्धगंधर्वाः सविद्याधरचारणाः ॥ ५ ॥ किंदेवाः किन्नरा नागा रक्षः किंपुरुषादयः ॥ बह्व्यस्तेषां प्रकृतयो रजःसत्वतमोभुवः ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ तिहीं ऋषीश्वरीं पुत्रपौत्र ॥ उपदेशिले नर किन्नर ॥ देव दानव अपार ॥ सिद्ध विद्याधर चारण ॥ ४७ ॥ गुह्यक गंधर्व राक्षस ॥ कीं देव आणि किंपुरुष ॥ नागसर्पादि तामस ॥ परंपरा उपदेश पावले ॥ ४८ ॥ मुखारुनीं दिसती नर ॥ शरीरें केवळ वनचर ॥ ऐसे जे कां रीसें थोर ॥ त्यांसि किन्नर बोलिजे ॥ ४९ ॥ मुखाभासें दिसती पुरुष ॥ शरीर पाहतां श्वापदवेष ॥ ऐसे जे वानर रामदास ॥ त्यांसि किंपुरुष बोलिजे ॥ ५० ॥ स्वेददुर्गंधिक्रुमिरहित ॥ शरीरें अतिभव्य भासत ॥ मनुष्यदेवां ऐसें दिसत ॥ ते बोलिजेत किंदेव ॥ ५१ ॥ यापरीच्या बहुधा व्यक्ती ॥ रजतमादिसत्वप्रकृती ॥ उपदेश परंपरा प्राप्ती ॥ ज्ञान बोलती यथारुचि ॥ ५२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ याभिर्भूतानि भिद्यंते भूतानां मतयस्तथा ॥ यथाप्रकृति सर्वेषां चित्रा वाचः स्रवंति हि ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ जैशी प्रकृति तैशी भावना ॥ जैसा गुण तैशी वासना ॥ जे वासनेस्तव जाणा ॥ भूतें विषमपणा आणि भेदु ॥ ५३ ॥ देवमनुष्यतिर्यगता ॥ हे वासनेची विषमता ॥ येवढा भेद करी भूतां ॥ अनेकता यथारुचि ॥ ५४ ॥ ज्याची जैशी प्रकृती ॥ ते तैसा वेदार्थ मानिती ॥ तेंचि शिष्यांसि सांगती ॥ परंपरास्थिती उपदेशू ॥ ५५ ॥ विचित्र वेदार्थ मानणें ॥ विचित्र संगती साधनें ॥ विचित्र उपदेश करणें ॥ प्रकृतिगुणें मतवाद ॥ ५६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवं प्रकृतिवैचित्र्याद्भिद्यंते मतयो नृणाम् ॥ पारंपर्येण केषांचित्पाखंडमतयोऽपरे ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ ॥ यापरी गा निजप्रकृती ॥ वाढली जाण नानामतीं ॥ तो मतवाद ठसावला चित्तीं ॥ यथानिगुतीं सत्यत्वें ॥५७॥ मिथ्या स्वप्न जेवीं निद्रितां ॥ सत्य मानलेंसे सर्वथा ॥ तेवीं नानामतवादकथा ॥ सत्य तत्वतां मानिती ॥५८॥ हे वेदपढियंत्यांची कथा ॥ ज्यांसि वेदीं नाहीं अधिकारता ॥ त्यासी उपदेशपरंपरता ॥ नानामतता सत्य मानें ॥५९॥

---

१ सृष्टीच्या आरंभीं. २ उपदेशिली. ३ ब्रह्मदेवानें. ४ तमोगुणप्रधान. ५ अस्वलें. ६ पशूच्या आकाराचे. ७ स्वभाव. ८ झोंपीं जाणारास. ९ वेदज्ञांचो.

एकाची वेदबाह्यव्युत्पत्ती ॥ ते आपुलालिये स्वमतीं ॥ पांषंडातें प्रतिष्ठिती ॥ तेंच उपदेशिती शिष्यांतें ॥ ६० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मन्मायामो
हितधियः पुरुषाः पुरुषर्षभ ॥ श्रेयो वदंत्यनेकांतं यथा कर्म यथारुचि ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ नानावासनागुणानुवृत्ती ॥ नानापरीच्या पुरुष
प्रकृती ॥ यांसि माझी माया मूळकर्त्री ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ६१ ॥ माझिया मायें मोहिले वरिष्ठ ॥ जन केले विवेकनष्ट ॥ भुल
वूनियां मोक्षाची वाट ॥ विषयनिष्ठ विवेकू ॥ ६२ ॥ ऐक उद्धवा पुरुषश्रेष्ठा ॥ यापरी भ्रंशली जनाची निष्ठा ॥ चुकोनि मोक्षाचा दार
वंटा ॥ साधनकचाटा जल्पती ॥ ६३ ॥ त्या नानासाधनांच्या युक्ती ॥ ज्या मतवादें प्रतिपादिती ॥ त्यांही दीडश्लोकीं श्रीपती ॥ उद्धवा
प्रती सांगत ॥ ६४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ धर्ममेके यशश्चान्ये कामं सत्यं दमं शमम् ॥ अन्ये वदंति स्वार्थं वा ऐश्वर्यं त्यागभोजनम् ॥ केचि
द्यज्ञतपोदानं व्रतानि नियमान्यमान् ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ मीमांसकाचें मत येथ ॥ काम्यनिषिद्धरहित ॥ कर्मचि साधन मानित ॥
मोक्ष येणें प्राप्त मानिती ॥ ६५ ॥ काव्य नाटक अलंकार करिती ॥ ते कवित्वची साधन मानिती ॥ कविताप्रबंधव्युत्पत्ती ॥ मोक्ष मानिती
तेणें यशें ॥ ६६ ॥ कवीश्वराचें मत ऐसें ॥ आपुलें कवित्वाचेनि यशें ॥ मोक्ष लाहीं अनायासें ॥ हें कवितापिसें कवीश्वरां ॥ ६७ ॥
वात्स्यायनकोकशास्त्रमत ॥ त्यांचा अभिप्रायो विपरीतें ॥ कामसुखें मोक्ष मानित ॥ काम सतत सेवावा ॥ ६८ ॥ सांख्ययोगांची वंदंती
॥ सत्य शमदमादिसंपत्ती ॥ हेंचि साधन मोक्षाप्रती ॥ नेम निश्चितीं तिहीं केला ॥ ६९ ॥ नीतिशास्त्रकाराचें मत ॥ सार्वभौम राज्य
प्राप्त ॥ त्यातेंचि मोक्ष मानित ॥ सामदंडानादि तेथ साधन ॥ ७० ॥ एकाचा मतविभाग ॥ शिखासूत्रमात्रत्याग ॥ त्याचें नांव मोक्षमार्ग
॥ परम श्लाघ्य मानिती ॥ ७१ ॥ देहात्मवांधाचा योग ॥ स्वेच्छा भोगावे यथेष्ट भोग ॥ कैंचा नरक कैंचा स्वर्ग ॥ मेल्या मग कोण
जन्मे ॥ ७२ ॥ अश्वमेध राजसूययाग ॥ हाचि एकाचा मोक्षमार्ग ॥ एका मूर्तिउपासना सांग ॥ पूजाविभाग तें साधन ॥ ७३ ॥ एकाचें
मत साक्षेप ॥ कडकडाटेंसि खटाटोप ॥ शरीरशोषणादि जें तप ॥ तो मार्ग समीप मोक्षाचा ॥ ७४ ॥ एक ह्मणती श्रेष्ठ साधन ॥
मोक्षमार्गीं केवळ दान ॥ दीक्षित ह्मणती व्रतग्रहण ॥ हेंचि साधन मोक्षाचें ॥ ७५ ॥ एकाच्या मताचा अनुक्रम ॥ ॥ अवश्य करावे
व्रत नियम ॥ एवं मतानुसारें उपक्रम ॥ नानासाधन संभ्रमें बोलती ॥ ७६ ॥ या साधनांची पाहतां स्थिती ॥ आद्यंतवंत निश्चितीं ॥
तेंचि पैं उद्धवाप्रती ॥ कृष्ण कृपामूर्ती सांगत ॥ ७७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ आद्यंतवंत एवैषां लोकाः कर्मविनिर्मिताः ॥ दुःखोदर्कास्तमो
निष्ठाः क्षुद्रानंदाः शुचाऽर्पिताः ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ सांडूनि फळाशा देहाभिमान ॥ मज नार्पिती जे साधन ॥ त्याचें फळ दुःखरूप

---

१ नास्तिकमतास. २ विचारशून्य. ३ प्राप्त होतो. ४ कामशास्त्र. ५ उलट. ६ वार्ता. ७ गोडबोलणें व कर देणें इत्यादि. ८ बुद्धांचा. ९ यज्ञकरणारे. १० अनित्य.

जाण ॥ जन्ममरणदायक ॥ ७८ ॥ तिहीं साधनीं साधिले लोक ॥ ते अंतवंत नश्वर देख ॥ ते लोकींचें जें सुख ॥ साखरेसि विख रांधिलें[१] ॥ ७९ ॥ त्याचे जिह्वाग्रीं गोडपण ॥ परिपाकीं[२] अचूक मरण ॥ तैसा तो क्षुद्रानंद जाण ॥ शोकासि कारण समूळ ॥ ८० ॥ निजकर्मे मलिन लोक ॥ त्यांच्याठायीं कैंचें सुख ॥ उत्तरोत्तर वाढतें दुःख ॥ अंधतमदायक परिपाकू ॥ ८१ ॥ भोगासक्त जें झालें मन ॥ त्यासि अखंड विषयांचें ध्यान ॥ विषयाध्यासें तमोगुण ॥ अधःपतन[३]दायक ॥ ८२ ॥ इहींच साधनीं माझी भक्ती ॥ जो कोणी करील परमप्रीतीं ॥ ते भक्तीची मुख्यत्वें स्थिती ॥ स्वयें श्रीपती सांगत ॥ ८३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मय्यर्पितात्मनः सभ्य निरपेक्षस्य सर्वतः ॥ मयात्मना सुखं यत्तत्कुतः स्याद्विषयात्मनाम् ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ भक्ती निजसुखाची मातू ॥ सांगावया उद्धवासि संबोधितू ॥ भक्तिसुखालागीं भाग्यवंतू ॥ तूंचि निश्चितू उद्धवा ॥ ८४ ॥ भक्तिसुखाचें भाग्य यासी ॥ ह्मणोनि सभ्य ह्मणणें त्यासी ॥ ऐसें पुरस्करोनि उद्धवासी ॥ भक्तिसुखासी देवो सांगे ॥ ८५ ॥ पावावया माझी स्वरूपप्राप्ती ॥ इहलोकींची भोगासक्ती ॥ निःशेष नातळे[४] चित्तवृत्ती ॥ जेवीं निजपती रजस्वला ॥ ८६ ॥ साधूनि माझिया अनुसंधाना ॥ परलोक नातळे वासना ॥ धिक्कारी पैं ब्रह्मसदना ॥ इतर गणना कोण पुसे ॥ ८७ ॥ ऐशिया गा निरपेक्षता ॥ माझेनि भजनें सप्रेमता ॥ तेथ मी जाण स्वभावतां ॥ प्रकटे तत्त्वतां निजरूपें ॥ ८८ ॥ मी प्रकटलों हें ऐसें ॥ बोलणें तें ओहाच[५] दिसे ॥ सदा मी हृदयींचि वसें ॥ प्रकटलों दिसे निर्विकल्पें ॥ ८९ ॥ आभाळ गेलिया सविता ॥ सहजेंचि दिसे आतौता ॥ तेवीं गेलिया विषयावस्था ॥ मी स्वभावतां प्रकटची ॥ ९० ॥ एवं भक्ताचिया भावार्था ॥ भावबळें मज प्रकटतां ॥ तेव्हां भक्ताचिया चित्तां ॥ विषयवार्ता स्फुरेना ॥ ९१ ॥ सांडूनि विषयावस्था ॥ मद्रूपीं लागल्या चित्ता ॥ भक्तासि होय मद्रूपता ॥ स्वभावतां निजबोधें ॥ ९२ ॥ लोह एकांगें स्पर्शमणी[६] ॥ लागतां सर्वांग होय सुवर्णी ॥ तेवीं मद्भक्त माझ्या ध्यानीं ॥ चिद्रूपपणीं सर्वांग ॥ ९३ ॥ तेकाळीं सहजसुख ॥ भक्तांसि जें होय देख ॥ त्यासि तुकावया[७] तुक ॥ कैंचें आणिक काटाळें ॥ ९४ ॥ ज्या निजसुखाकारणें ॥ सदा शिवू सेवी श्मशानें ॥ ब्रह्मा तें सुख काय जाणे ॥ त्याकारणें म्यां उपदेशिलें ॥ ९५ ॥ भक्तीं भोगितां माझें सुख ॥ विसरले देहादिजन्मदुःख ॥ विसरले ते तहान भूक ॥ निजात्मसुख कोंदलें ॥ ९६ ॥ ऐशिया निजसुखाची गोडी ॥ विषयी काय जाणतीं बापुडीं ॥ वेंचितां लक्षालक्षकोडी ॥ त्या सुखाची कवडी[८] लाभेना ॥ ९७ ॥ धन धान्य पुत्र स्वजन ॥ सर्वस्व वेंचितांही जाण ॥ त्या सुखाचा रजःकण ॥ विषयी जन न लाभती ॥ ९८ ॥ होकां सत्यलोकनिवासी[९] ॥ तेही न पावती त्या सुखासी ॥ इतरांची कथा कायसी ॥ मुख्य प्रजापतीसी[१०]

---

[१] माखिलें. [२] परिणामीं. [३] नरक प्राप्त करविणारें. [४] आसक्त होत नाहीं. [५] व्यर्थ. [६] परिस. [७] तुलना करण्यास. [८] थोडाही अंश. [९] सत्यलोकांत राहणारे. [१०] ब्रह्मदेवास.

हें सुख कैंचें ॥ ९९ ॥ मज निजात्म्याचे सुखप्राप्ती ॥ सकळ इंद्रियें सुखरूप होती ॥ त्या सुखाची सुखस्थिती ॥ लोकांतरप्राप्ती कोट्यंशीं[1] न तुके ॥ १०० ॥ निष्काम निर्लोभ निर्दंभ भजन ॥ निर्मत्सरें[2] निरभिमान ॥ ऐशिया मद्भक्तांसि जाण ॥ माझें सुख संपूर्ण मी देतों ॥ १ ॥ जे कां देशतां कालतां ॥ अनवच्छिन्न गा वस्तुतां ॥ ऐशिया निजसुखाचे माथां ॥ माझिया निजभक्तां रहिवासू ॥ २ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अकिंचनस्य दांतस्य शांतस्य समचेतसः ॥ मया संतुष्टमनसः सर्वाः सुखमया दिशः ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐक अकिंचनाची गोठी ॥ नाहीं मठ मठिका पर्णकुटी[3] ॥ पांचापालवी मोकळ्या गांठी ॥ त्यांसि ये भेटीं निजसुख माझें ॥ ३ ॥ जो दमनशीळ जगजेठी ॥ अकरांचीही नळी निमटी ॥ तो निजसुखाचे साम्राज्यपाटीं ॥ बैसे उठाउठीं तत्काळ ॥ ४ ॥ देखतां नानाभूतविषमता ॥ ज्यासि साचार दिसे समता ॥ तो माझिया निजसुखाचे माथां ॥ क्रीडे सर्वार्थता समसाम्यें ॥ ५ ॥ सर्पत्वचा जेवीं पापरीं ॥ माथा हालविल्या फडा न करी ॥ तेवीं धनदारागृहपुत्रीं ॥ छळितां ज्याभीतरीं क्रोध नुमटे ॥ ६ ॥ कामक्रोध मावळले देहीं ॥ साचार शांति त्याच्याठायीं ॥ माझें निजसुख त्याच्या पायीं ॥ लोळत पाहीं सर्वदा ॥ ७ ॥ तो जरी तें सुख नेघे ॥ तरी तें सुख तया पुढें मागें ॥ जडोनि ठेलें सर्वांगें ॥ सांडितां वेगें सांडेना ॥ ८ ॥ तो जेउती वास पाहे ॥ तें दिग्मंडळ सुखाचें होये ॥ तो जेथ कां उभा राहे ॥ तेथ मुंसावलें[4] राहे महासुख ॥ ९ ॥ त्याचें पाऊल जेथें पडे ॥ तेथें निजसुखाची खाणी उघडे ॥ तो प्रसंगें पाहे जयाकडे ॥ तेथें वाढे परमानंद ॥ ११० ॥ तो ज्यासि भेटे अदृष्टें ॥ त्यास सुखाची पहांट फुटे ॥ त्यासि पावों लागलिया अवचटें ॥ सुखाचें गोमटें निजसुख लाभे ॥ ११ ॥ ज्याचे श्वासोच्छ्वासांचा परिचार ॥ कीं निमेषोन्मेषांचे व्यापार ॥ माझेनि निजसुखें साचार ॥ तेथेंचि घर बांधलें ॥ १२ ॥ तो सकळसुखांचा मंडपू ॥ कीं निजसुखाचा कंदर्पू ॥ तो सर्वांगें सुखस्वरूपू ॥ सबाह्य सुखरूपू समसुखत्वें ॥ १३ ॥ त्याचे सुखाची परिपूर्णता ॥ पुढिलेनि श्लोकें तत्त्वतां ॥ स्वयें देवोचि झाला सांगता ॥ सुखसंपन्नता भक्ताची ॥ १४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ न पारमेष्ठ्यं न महेंद्रधिष्ण्यं न सार्वभौमं न रसाधिपत्यम् ॥ न योगसिद्धीरपुनर्भवं वा मय्यर्पितात्मेच्छति मद्विनाऽन्यत् ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ माझे ठायीं अर्पितचित्त ॥ ऐसे माझे निजभक्त ॥ माझेनि सुखें सुखी सतत ॥ ते अनासक्त[5] सर्वार्थीं ॥ १५ ॥ माझ्याठायीं नित्यभक्ती ॥ आणि लोकालोकांतर आसक्ती ॥ ते भक्ति नव्हे कामासक्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ १६ ॥ सकळद्वीपां[6]समवेत ॥ सार्वभौम वलयांकित ॥ येऊनियां होतां प्राप्त ॥ माझे निजभक्त थुंकिती[7] ॥ १७ ॥ विष्ठेमाजील सगळे चणे ॥ ते सूकरासि गोडपणें ॥ त्यातें कंटाळती शहाणे ॥ तेवीं मद्भ

---

[1] कोटी अंशानें. [2] हेवा न करितां. [3] खोपटें. [4] एकवटून. [5] अलिप्त. [6] सप्तद्वीप पृथ्वी. [7] टाकून देतात.

क्तीं सांडणें सार्वभौमता ॥ १८ ॥ रसातळादि समस्त ॥ पाताळीं भोग अमृतयुक्त ॥ ते प्राप्त होतां माझे भक्त ॥ लाता हाणत अनि
च्छा ॥ १९ ॥ खात्या सांडूनि अमृतफळा ॥ शाहणा नघे पेंडीचा गोळा ॥ तेवीं सांडूनि माझा सुखसोहळा ॥ भक्त रसातळा न वच
ती ॥ १२० ॥ सुर नर पन्नग वंदिती ॥ येणें महत्त्वें आलिया अमरावती[1] ॥ जेवीं कां कस्तूरीपुढें माती ॥ तेवीं उपेक्षिती[2] मद्भक्त ॥ २१ ॥
जें इंद्रादिकां वंद्य स्थान ॥ उत्तमोत्तम ब्रह्मसदन[3] ॥ तें तुच्छ करिती भक्तजन ॥ जे सुखसंपन्न मद्भावें ॥ २२ ॥ ताक दूध पाहतां दिठीं ॥
सारिखेपणें होतसे भेटी ॥ सज्ञान दूध लाविती ओंठीं ॥ त्यागिती वाटी ताकाची ॥ २३ ॥ तेवीं सत्यलोक आणि भक्तिसुख ॥ समान
मानिती केवळ मूर्ख ॥ मद्भावें माझे भक्त जे चोख ॥ ते सत्यलोक धिक्कारिती ॥ २४ ॥ इंद्रपद ब्रह्मसदन ॥ पाताळभोग अमृतपान ॥ ए
के काळें द्यावया जाण ॥ सर्वसिद्धि आपण आलिया ॥ २५ ॥ ज्या साधावया महासिद्धी ॥ योगी शिणताती नानाविधीं ॥ त्या प्रकट
ल्या त्रिशुद्धी ॥ भक्त सद्बुद्धी नातळती ॥ २६ ॥ त्या अणिमादिसिद्धींच्या माथां ॥ मद्भक्तीं हाणोनि लाता ॥ लागले माझ्या भक्तिपंथां[4] ॥
जाण तत्त्वतां उद्धवा ॥ २७ ॥ या सिद्धींची कायसी कथा ॥ सलोकता समीपता ॥ माझी देतां स्वरूपता ॥ भक्त सर्वथा न घेती ॥ २८ ॥
जेथ न रिघेचि काळसत्ता ॥ नाहीं जन्ममरणवार्ता ॥ ऐशी देतां माझी सायुज्यता ॥ भक्त सर्वथा न घेती ॥ २९ ॥ आधीं असावें वेग
ळेपणें ॥ मग सायुज्यें एक होणें ॥ हें मूळचें अबद्ध बोलणें ॥ सायुज्य न घेणें मद्भक्तीं ॥ १३० ॥ भक्तिसुखें सुखावली स्थिती ॥ या
लागीं आवडे माझी भक्ती ॥ पायां लागती चारी मुक्ती ॥ भक्त न घेती मजवीण ॥ ३१ ॥ एक मजवांचूनि कांहीं ॥ भक्तांसि आणिक
प्रिय नाहीं ॥ माझेनि भजनसुखें पाही ॥ लोकीं तिहीं नसमाती[5] ॥ ३२ ॥ आदिकरूनि चारी मुक्ती ॥ मजवेगळी जे सुखप्राप्ती ॥ भक्त
सर्वथा न घेती ॥ माझ्या अभेदभक्ती लाधले ॥ ३३ ॥ मजवेगळें जेंजें सुख ॥ तुच्छ करूनि सांडिती देख ॥ माझ्या भजनाचा परम
हरिख[6] ॥ अलोलिक मद्भक्तां ॥ ३४ ॥ ह्मणाल भक्त केवळ वेडीं ॥ तुझ्या भजनीं धरिती गोडी ॥ परी तुज तयांची आवडी ॥ नसेल गाढी
अतिप्रीती ॥ ३५ ॥ जेवीं गोंचिडां आवडे ह्मशी ॥ परी गोंचिड नावडे तिसी ॥ तेवीं भक्तांची प्रीती तुजसरिसी[8] ॥ तुज त्याच्याऐशी
प्रीति नसेल ॥ ३६ ॥ भज्य भजन भजता[9] ॥ हे त्रिपुटी अविद्यकता[10] ॥ अविद्यायुक्त भजनपंथा ॥ नसेल सर्वथा तुज प्रीती ॥ ३७ ॥ जेवीं
कां स्वप्नींचें आवतणें[11] ॥ जागत्यासि नाहीं जेवूं जाणें ॥ तेवीं अविद्यायुक्त मिथ्याभजनें ॥ प्रीति करणें हें घडेना ॥ ३८ ॥ ऐसा आशं
केचा अभिप्रावो ॥ तेचि अर्थीं सांगताहे देवो ॥ भजनीं भक्तांचा शुद्ध भावो ॥ तेथ मजही पहाहो अतिप्रीती ॥ ३९ ॥ जो जैसा म

---

१ इंद्रपुरी. २ टाकितात. ३ सत्यलोक. ४ भक्तिमार्गास. ५ मावत नाहींत. ६ आनंद. ७ ह्मशीस. ८ तुझ्यापेक्षां अधिक. ९ भजनकरणारा. १० माया. ११ आमंत्रण.

जकारणें ॥ मी तैसाचि त्याकारणें ॥ भक्त अनन्य मजकारणें ॥ मी त्याहीकारणें अनन्य ॥ १४० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ न तथा मे प्रिय
तम आत्मयोनिर्न शंकरः ॥ न च संकर्षणो न श्रीर्नैवात्मा च यथा भवान् ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ माझ्या भक्तांची मज प्रीती ॥ ते मी
॥ ४ ॥ चि जाणें श्रीपती ॥ ते उपमेलागीं त्रिजगतीं ॥ नाहीं निश्चितीं काटाळें ॥ ४१ ॥ जो अनन्य झाला माझे भक्तीं ॥ तेव्हांचि त्याची अ
विद्यानिवृत्ती[1] ॥ ऐशिया भक्तांची जे मज प्रीती ॥ ते सांगूं मी किती उद्धवा ॥ ४२ ॥ ब्रह्मा माझे पोटींचें बाळ ॥ त्याचे लळे मी पुरवीं
सकळ ॥ परी भक्तांच्या ऐसा प्रबळ ॥ प्रीति कल्लोळ तेथ नाहीं ॥ ४३ ॥ म्यां ब्रह्मा लाविला कर्मपंथा ॥ भक्तांसि दिधली निष्कर्मता ॥
यालागीं नवचें मीं ब्रह्मा प्रार्थितां ॥ होय भातखाता गोंवळ्यांचा ॥ ४४ ॥ उणें[2] आणून ब्रह्म्यासी ॥ मी तों झालों वत्सें वत्सपांसी ॥
एवं निजभक्तांच्या ऐशी ॥ प्रीती ब्रह्म्यासी मज नाहीं ॥ ४५ ॥ असो ब्रह्म्याची ऐशी कथा ॥ संकर्षण[3] माझा श्रेष्ठभ्राता ॥ परी
भक्तांच्या ऐशी सर्वथा ॥ नसे प्रीति तत्त्वतां तयासी ॥ ४६ ॥ कौरवांच्या पक्षपातासी ॥ उणें आणोनि बळिभद्रासी ॥ म्यां वां
चविलें निजभक्तांसी ॥ पांडवांसी निजांगें ॥ ४७ ॥ तुज देखतां भीष्माच्या पणीं[4] ॥ म्यां हारी घेऊनि रणांगणीं ॥ वांचविला कोदंड
पाणी ॥ भक्तचूडामणी अर्जुन ॥ ४८ ॥ रमा माझ्या पट्टाची राणी ॥ ते म्यां सेवेसि लाविली चरणीं ॥ खांदीं वाहिल्या गौळणी ॥ भ
क्तशिरोमणी गोपिका ॥ ४९ ॥ जे लक्ष्मी निःशेष उपेक्षिती ॥ ते मज पूज्य परमप्रीतीं ॥ जे मज लक्ष्मी मागती ॥ त्यांसि श्री[5] ना श्री
पती ऐसें होय ॥ १५० ॥ लक्ष्मी उपेक्षूनि निश्चितीं ॥ मज निजभक्त आवडती ॥ मज पढियंता उमापती ॥ त्याहून अतिप्रीती भ
क्तांची ॥ ५१ ॥ ज्या महादेवाचेनि गुणें ॥ म्यांही श्यामवर्ण धरणें ॥ ज्या महादेवाचेनि वचनें ॥ म्यां मोहिनी होणें दुसरेंनी ॥ ५२ ॥
ते मोहिनीच्या दर्शनीं ॥ म्यां शिव भुलविला तत्क्षणीं ॥ रुक्मांगद मोहिनीपासूनी ॥ अर्धक्षणीं तारिला ॥ ५३ ॥ यापरी माझ्या भक्तां
हुनी ॥ मज प्रिय नव्हे शूलपाणी[6] ॥ मज पढियंता त्रिभुवनीं ॥ भक्तांवांचुनी आन नाहीं ॥ ५४ ॥ आगमनिगमीं[7] प्रतिपाद्य ॥ माझी
चतुर्भुजमूर्ति शुद्ध ॥ ते निजहृदयीं मी परमानंद ॥ भक्तनिजपद[8] वाहतसें ॥ ५५ ॥ मज निजदेहाची गोडी ॥ गोंवळ झालों अतिआ
वडीं ॥ गायीराखें अरडीदरडी ॥ कीं थापटीं घोडीं भक्तांचीं ॥ ५६ ॥ मी अवाप्तसकळकाम ॥ परी प्रेमळांलागीं सदा सकाम ॥ देख ॥ ५ ॥
तां प्रेमळांचा भाव परम ॥ मी आत्माराम उडी घालीं ॥ ५७ ॥ प्रेमळ देखतांचि दिठीं ॥ मी घें आपुलिये संवसाठीं ॥ नव्हतां वरिवदे
सुखकोटी ॥ नये तरी उठाउठी सेवक होय ॥ ५८ ॥ सांडूनि महत्त्वपरवडी ॥ मी निजभक्तांचीं उच्छिष्टें काढीं ॥ भक्तकाजाचे सांकडीं ॥

---

[1] अज्ञाननाश. [2] कमीपणा. [3] बलराम. [4] प्रतिज्ञेंत. [5] लक्ष्मी. [6] शंकर. [7] वेदशास्त्रांत. [8] भृगुपद. [9] उडीं.

करी कुरवंडी देहाची ॥ ५९ ॥ उपेक्षूनि निजदेहासी ॥ उद्धवा तुजसारिखिया भक्तांसी ॥ मज आवडती ते अहर्निशीं ॥ जीवें सर्वस्वेंसी पढियंते ॥ १६० ॥ आवडीं करितां माझें भजन ॥ मज पूज्य झाले भक्तजन ॥ त्या भक्तांचें निजलक्षण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ६१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ निरपेक्षं मुनिं शांतं निर्वैरं समदर्शनम् ॥ अनुव्रजाम्यहं नित्यं पूयेयेत्यंघ्रिरेणुभिः ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ अनन्य[1] करितां माझें भजन ॥ माझ्या स्वरूपीं झगटलें मन ॥ सकळ वासना गेल्या विरोन ॥ वृत्तिशून्य अवस्था ॥ ६२ ॥ अर्थ आटाटी[2]वीण न प्रार्थितां ॥ अयाचित अर्थ प्राप्त होतां ॥ तोही हातीं घेवों जातां ॥ निरपेक्षता बुडाली ॥ ६३ ॥ अर्थ देखोनि जो लविन्नला[3] ॥ तो जाण लोभें वोणवा केला ॥ तोही उपेक्षूनि जो निघाला ॥ तो म्यां वंदिला सर्वस्वें ॥ ६४ ॥ मार्गीं अर्थ पडतां ॥ कोणी नाहीं माझा ह्मणतां ॥ तोही स्वयें हातीं घेतां ॥ निरपेक्षता बुडाली ॥ ६५ ॥ वृत्तिशून्य जे अवस्था ॥ तीं नांव जाण निरपेक्षता ॥ ते काळिची जे मननता[4] ॥ ऐक तत्त्वतां सांगेन ॥ ६६ ॥ वेदशास्त्रार्थ परम प्रमाण ॥ तें माझें शुद्ध स्वरूप जाण ॥ तये स्वरूपीं निज निर्धारण ॥ त्या नांव मनन बोलिजे ॥ ६७ ॥ करितां स्वरूपें[5]विवंचन ॥ स्वरूपरूप झालें मन ॥ तेथें धारणेवीण मनन ॥ करितां स्मरण होतसे ॥ ६८ ॥ या नांव मननावस्था ॥ सत्य जाण पां सर्वथा ॥ याहीवरी शांतीची जे कथा ॥ ऐक तत्त्वतां सांगेन ॥ ६९ ॥ कामक्रोध सलोभता ॥ समूळ मूळेंसि नवचतां ॥ देहीं आली जे निश्चळता ॥ ते नसरे सर्वथा येथ शांती ॥ १७० ॥ मत्स्य[6] धरूनियां मनीं ॥ बक निश्चळ राहिला ध्यानीं ॥ ते शांति कोण मानी ॥ अंतःकरणीं सकाम ॥ ७१ ॥ देहीं स्फुरेना देहअहंता ॥ विराली कामक्रोधसलोभता ॥ हे शांति बाणे[7] भाग्यवंता ॥ मुख्य शांतता या नांव ॥ ७२ ॥ उद्धवा जाण पां निश्चितीं ॥ मजही मानली हेचि शांती ॥ याहीवरी समतेची स्थिती ॥ ऐक तुजप्रती सांगेन ॥ ७३ ॥ विचित्र भूतें विचित्र नाम ॥ विचित्राकारें जग विषम ॥ तेथें देखे सर्वीं सर्व सम ॥ परब्रह्म समत्वें ॥ ७४ ॥ फाडाफाडीं न शिणतां ॥ तडातोडी न करितां ॥ माझेनि भजनें मद्भक्तां ॥ सर्वसमता सद्भावें ॥ ७५ ॥ सद्भावें समता आल्या हातां ॥ खुंटली भूतभेदाची वार्ता ॥ भेदशून्य स्वभावतां ॥ निर्वैरता सहजेंची ॥ ७६ ॥ जंववरी द्वैताचें भान ॥ तंवचि विरोधाचें कारण ॥ अवघा एकचि आपण ॥ तेथ वैरी कोण कोणाचा ॥ ७७ ॥ गगन गगनासि कैं भांडे ॥ कीं चंद्र चंद्रेंसि झुंझ[8] मांडे ॥ कीं वायूचेनि वायु कोंडे ॥ कीं जिह्वेचीं दुखंडें जिह्वा करी ॥ ७८ ॥ जें भेदाचें निराकरण ॥ तेंचि निर्वैरतेचें लक्षण ॥ उद्धवा हें सत्य जाण ॥ निर्वैरपण या नांव ॥ ७९ ॥ निरपेक्षता आणि माझें मनन ॥ शांति आणि समदर्शन ॥ पांचवें तें निर्वैर जाण ॥ पांच लक्षण

---

१ एकनिष्ठपणें. २ श्रमावांचून. ३ घेण्याकरितां वांकला. ४ विचार करणें. ५ आपल्या स्वरूपाचा विचार. ६ मासा. ७ ठसे. ८ कलह.

हें मुख्यत्वें ॥ १८० ॥ असो पंचलक्षणकथा[१] ॥ एक निरपेक्षता[२] आल्या हातां ॥ पायां लागे सायुज्यता ॥ पूर्ण ब्रह्मता[३] ठसावे ॥ ८१ ॥
निरपेक्षाचें निश्चळ मन ॥ निरपेक्ष तो निर्वैर जाण ॥ निरपेक्ष तो शांत संपूर्ण ॥ निरपेक्षाची जाण सेवा मी करीं ॥ ८२ ॥ कडेकपाटीं
न रिघतां जाण ॥ न सोशितां अतिसाधन ॥ हें हातां आल्या पंचलक्षण ॥ विश्व[४]उद्धरण त्याचेनी ॥ ८३ ॥ ऐशिया भक्तांचें दर्शन ॥ झा
ल्या तरतो हें नवल[५] कोण ॥ त्याचें करितां नामस्मरण ॥ उद्धरण जडजीवां ॥ ८४ ॥ हें पंचलक्षण आल्या हातां ॥ मजहोनि अधिक
पवित्रता ॥ जोडली माझ्या निजभक्तां ॥ मीही वंदीं माथां चरणरेणु ॥ ८५ ॥ समुद्रोदक मेघीं चढे ॥ त्यासि मधुरता अधिक वाढे ॥
जग निववी वाडें कोडें ॥ फेडी सांकडें दुकाळाचें[६] ॥ ८६ ॥ तेंचि उदक समुद्रीं असतां ॥ उपयोग[७] नये गा सर्वथा ॥ तेवीं माझेनि भज
नें मद्भक्तां ॥ झाली पवित्रता मजहुनी ॥ ८७ ॥ केळी चाखतां चवी नातुडे ॥ तिचींच केळें तें अतिगोडें ॥ तेवीं मजहूनि माझ्या भ
क्तांकडे ॥ पवित्रता वाढे अनिवार ॥ ८८ ॥ माझ्याठायीं जें पवित्रपण ॥ तें भक्तांचेनि मज जाण ॥ यालागीं भक्तामागें मी आप
ण ॥ धांवें चरणरेणू वंदावया ॥ ८९ ॥ भक्तचरणरेणु वंदितां ॥ मज केवढी आली पवित्रता ॥ माझें पायवणी[८] वाहे माथां ॥ जाण
तत्त्वतां सदाशिवू ॥ १९० ॥ एवं माझ्या भक्तांचें जें सुख ॥ सुखपणें अलोलिक ॥ तें सुख नेणती आणिक ॥ तें बोलावया मुख शिरे
ना ॥ ९१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ निष्किंचना मय्यनुरक्तचेतसः शांता महांतोऽखिलजीववत्सलाः ॥ कामैरनालब्धधियो जुषंति यत्तन्नैरपेक्ष्यं
न विदुः सुखं मम ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ ॥ मीवांचूनि[९] ज्यांचे गांठीं ॥ नाहीं फुटली कांचवटी ॥ मजवांचोनि सगळे सृष्टीं ॥ आणिकांतें
दृष्टीं न देखती ॥ ९२ ॥ ऐसें करितां माझें भजन ॥ जाती कुळदेहाभिमान ॥ सहजें जाय निरसोन ॥ अकिंचन या नांव ॥ ९३ ॥ या
हीवरी प्रेमयुक्त ॥ माझ्या स्वरूपीं रंगलें चित्त ॥ अतएव निजशांति तेथ ॥ असे नांदत निजरूपें ॥ ९४ ॥ ऐशिया गा निजशांती ॥ प
रिपाकातें पावली भक्ती ॥ तें मीवांचूनि सर्वभूतीं ॥ दुजी स्थिती जाणेना ॥ ९५ ॥ जो जो जीवू जेथें देखे ॥ तो तो मद्रूपें वोळखे ॥ ते वो
ळखीचेनि हरिखें ॥ प्रीति यथासुखें अनन्य करी ॥ ९६ ॥ ऐशिया मद्रूपस्थिती ॥ जीवमात्रीं अनन्यप्रीती ॥ एवं[१०] मद्भावें माझी भक्ती ॥
महंतस्थिती या नांव ॥ ९७ ॥ ऐसा मद्भावनायुक्त ॥ सर्वीं सर्वत्र माझा भक्त ॥ तेथ कामादि दोष समस्त ॥ अस्तमाना[११] जात तेकाळीं
॥ ९८ ॥ सविता येतां प्राचीजवळी[१२] ॥ मावळे नक्षत्रमंडळी ॥ तेवीं भक्तीच्या प्रबोधकाळीं[१३] ॥ झाली होळी कामादिकां ॥ ९९ ॥ झालि
या कामाची निवृत्ती ॥ सहजेंचि निर्विषयस्थिती ॥ तेथें माझ्या सुखाची सुखप्राप्ती ॥ सुखें सुख भोगिती सुखरूप ॥ २०० ॥ देशें का

---

१पांचलक्षणांनीं युक्त.२निरिच्छता.३ईश्वरसंबंधि ज्ञान.४जगाचा उद्धार.५आश्चर्य.६दुष्काळाचें.७उपयोगास.८पादोदक.९माझ्यावांचून.१०याप्रमाणें.११लयास.१२पूर्वदिशेस.१३प्रकाशसमयीं.

ळें वेदानुवादा ॥ ज्या सुखाची न करवे मर्यादा ॥ त्या सुखाची सुखसंपदा ॥ मद्भक्त सदा भोगिती ॥ १ ॥ ज्या सुखाचे सुखप्राप्ती ॥ विरोनि जाय चित्तवृत्ती ॥ सुखें सुखरूप सर्वांगें होती ॥ ऐवढी सुखप्राप्ती मद्भक्तां ॥ २ ॥ इतर मी सांगों कायी ॥ मोक्षसुखाच्याही ठायीं ॥ त्या सुखाची गोडी नाहीं ॥ धन्य पाही हरिभक्ती ॥ ३ ॥ ऐशिया सुखाकारणें ॥ साधक शिणती जीवें प्राणें ॥ तपादि शरीर[1]शोषणें ॥ व्रत धरणें विषयांचें ॥ ४ ॥ एक करिती योग याग ॥ एक करिती शास्त्रसंग ॥ एक करिती सर्वस्वत्याग ॥ एकीं सांडिला संग गृहदारा ॥ ५ ॥ एक फळाहारी निराहारी ॥ एक ते नग्न ब्रह्मचारी ॥ एक कडाकपाटीं शिखरीं ॥ गिरिकंदरीं[2] रिघाले ॥ ६ ॥ एक ते जटाळ गांठ्याळ ॥ एक नखधारी ढिसाळ ॥ एक महाहटी विशाळ ॥ एक पिसाळ मत्तमुद्रा ॥ ७ ॥ एक तांबडे बोडके ॥ एक ते केवळ सुडके ॥ एक तीर्थाटणें रोकडे ॥ एक ते मुके मौननिष्ठ ॥ ८ ॥ एक राखे एक संखे ॥ एक ते अत्यंत बोलके ॥ एक पाणीपिशीं झालीं उदकें ॥ कुशमृत्तिके विगुंतलीं ॥ ९ ॥ ऐशा नानापरीच्या व्युत्पत्ती ॥ साधक शिणती नेणों किती ॥ माझ्या भजनसुखाची प्राप्ती ॥ नव्हे निश्चितीं कोणासी ॥ २१० ॥ जें माझ्या भक्तांचें निजसुख ॥ तें कोणासि नपवेचि देख ॥ स्वप्नींही त्या सुखाचें मुख ॥ अनोळख पैं झालें ॥ ११ ॥ चंद्रकिरणींचें अमृत ॥ जेवीं वायसां[3] अप्राप्त ॥ तेवीं माझें निजसुख निश्चित ॥ नव्हेचि अप्राप्त अभक्तां ॥ १२ ॥ थानीं लागल्या गोंचिडा ॥ अशुद्धचि[4] आवडे मूढा ॥ जवळिल्या क्षीरा वरपडा ॥ नव्हेचि रोकडा अभाग्य ॥ १३ ॥ तेवीं सांडोनि माझी भक्ती ॥ नानासाधनीं व्यर्थ शिणती ॥ त्यांसि माझ्या निजसुखाची सुख प्राप्ती ॥ नव्हे निश्चितीं उद्धवा ॥ १४ ॥ जीहीं माझ्या भजनपरवडी ॥ केली भक्तीची कुळवाडी[5] ॥ ते माझ्या निजसुखाची गोडी ॥ पावले रोकडी आत्यंतिक ॥ १५ ॥ ज्या निजसुखाच्या ठायीं ॥ शिळेपणाची भाषाचि[6] नाहीं ॥ विटों नेणें कल्पांतींही ॥ इंद्रियांचा कांहीं न पडे पांगू ॥ १६ ॥ जेंजें विषयांचें सुख ॥ तेंतें इंद्रियां पंगिस्त देख ॥ अपंगिस्त भक्तिसुख चोख[7] ॥ सभाग्य लोक पावती ॥ १७ ॥ जें सुख भोगितां पाही ॥ देही तोचि होय विदेही ॥ तें सुख माझ्या भक्तांच्याठायीं ॥ प्रकटलें कांहीं लोपेना ॥ १८ ॥ हे उत्तमोत्तम भक्त पाही ॥ सुख पावले नवल कायी ॥ परी केवळ जे विषयी[8] ॥ भजनें त्यांही सुखप्राप्ती ॥ १९ ॥ भाग्यवशें सत्संगती ॥ आस्तिक्यभावें अनन्यस्थिती ॥ अल्पही माझी घडल्या भक्ती ॥ विषयनिवृत्ती तेणें होय ॥ २२० ॥

॥ श्लोक ॥ ॥ बाध्यमानोऽपि मद्भक्तो विषयैरजितेंद्रियः ॥ प्रायः प्रगल्भया भक्त्या विषयैर्नाभिभूयते ॥१८॥

॥ टीका ॥ ॥ माझ्याठायीं अनन्य प्रीती ॥ प्रेमयुक्त भजनस्थिती ॥ ऐशिया भक्तां विषय बाधिती ॥ हे व्याख्यान[9]स्थिती केवीं घडे

---

[1] देहास ताप देणें. [2] गुहेंत. [3] कावळ्यास. [4] रक्तच. [5] लागवड वगैरे शेतकी [6] गोष्टच. [7] चांगलें. [8] विषयासक्त. [9] गोष्ट.

॥ २१ ॥ आवडीं करितां माझी भक्ती ॥ विषयवासना जळून जाती ॥ तेथ उपजे विषयासक्ती ॥ हे कोणे युक्तीं मानावी ॥ २२ ॥ आरिसा उटिंतां[1] उजळे ॥ तेवीं भक्तीनें विषयो क्षाळे ॥ तेथ विषयासक्ती खवळे ॥ हें निरूपण कोंवळें[2] साधारण ॥ २३ ॥ केवळ जो विषयासक्त ॥ संसारीं प्रपंचयुक्त ॥ तोही प्रसंगें झालिया भक्त ॥ होय विरक्त तें ऐक ॥ २४ ॥ जीवीं भक्ति लागली गोड ॥ नाहीं मावळली विषयचाड ॥ ऐसें उभय अवघड ॥ अतिसांकड जयासी ॥ २५ ॥ तेणें मुख्यत्वें ध्यावी भक्ती ॥ गौण धरावी विषयासक्ती ॥ तिचीही होय विरक्ती ॥ ऐक ते युक्ती सांगेन ॥ २६ ॥ लवणासि[3] मिळतां जळ ॥ विरवूनि सांडी तत्काळ ॥ तेवीं भक्ति वाढविल्या प्रबळ ॥ विषयमंडळ विभांडी ॥ २७ ॥ यापरी भजनपरिपाठीं ॥ विषयांसि पडे तुटी ॥ निजसुखाची लाभे भेटी ॥ पडे मिठी स्वानंदें ॥ २८ ॥ मज पाहिजे विषयनिवृत्ती ॥ या हेतू केली नाहीं भक्ती ॥ ह्मणाल विषयाची विरक्ती ॥ कोणें युक्ती घडे त्या ॥ २९ ॥ येचिविषयीं उत्तर ॥ सांगताहे शार्ङ्गधर ॥ दीपाचा पेटल्या वैश्वानर[4] ॥ तो जाळील घर नगर तैसें हें ॥ २३० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यथाऽग्निः सुसमृद्धार्चिः करोत्येधांसि भस्मसात् ॥ तथा मद्विषया भक्तिरुद्धवैनांसि कृत्स्नशः ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ ॥ दीप लावावयालागुनी ॥ सोज्ज्वळ केला जो वन्ही[5] ॥ तो अवचटें पडला वनीं ॥ तिडकी[6] उडोनी तृणांकुरीं[7] ॥ ३१ ॥ तो अनिच्छितूचि एकसरें ॥ कोपटें आणि धवळारें[8] ॥ नगरें पुरें मंदिरें ॥ गिरिकंदरें भस्म करी ॥ ३२ ॥ तैशी अल्पही माझी भक्ती ॥ श्रद्धायुक्त प्रवेशल्या चित्तीं ॥ संचित क्रियमाण पापपंक्ती ॥ होय जाळिती निःशेष ॥ ३३ ॥ पूर्वपापाचे समूळ मळ ॥ चित्तीं जडले होते प्रबळ ॥ तें चित्त अतिचंचळ ॥ विषयीं व्याकुळ सर्वदा ॥ ३४ ॥ त्यासि माझिया भक्तिलेशें ॥ पूर्वपापाचा समूह नासे ॥ जेवीं कां कर्पूर दीपस्पर्शें[9] ॥ निःशेष नासे तत्काळ ॥ ३५ ॥ ऐसें निर्मळ झालिया चित्त ॥ ब्रह्म प्रकाशे सदोदित ॥ मग तें नव्हे विषयासक्त ॥ होय विरक्त अनिच्छितां ॥ ३६ ॥ भक्तिलेशाची एवढी गरिमा[10] ॥ तो संपूर्ण भक्तीचा महिमा ॥ कोण जाणे भक्तोत्तमा ॥ आगमनिगमा अतर्क्य ॥ ३७ ॥ अलक्ष्य लक्षेना माझी भक्ती ॥ अतर्क्य तर्केंना शास्त्रयुक्तीं ॥ अगाध नाकळे निश्चितीं ॥ साधनव्युत्पत्ती शिणतांही ॥ ३८ ॥ पूर्ण माझे भक्तीचा पार ॥ मजही न कळे साचार ॥ यालागीं मी भक्तांचा आज्ञाधार ॥ नुल्लंघी उत्तर सर्वथा ॥ ३९ ॥ अगाध भक्तीची थोरी ॥ यालागीं मीही सेवा करीं ॥ भक्तपद धरिलें उरीं ॥ वंदीं शिरीं अंघ्रिरेणू ॥ ४० ॥ भक्त ह्मणवितां वाटे गोड ॥ भजनमुद्रा अति अवघड ॥ भक्तीचें अंतर अति गूढ ॥ नकळे उघड श्रुतिशास्त्रां ॥ ४१ ॥ ज्ञान सांगतां अतिसुगम ॥ भक्तिरहस्य गुह्य परम ॥ अकृत्रिम उपजे प्रेम ॥ ऐसें हें वर्म लाविल्या

---

१ घासला असतां. २ पोरकटपणाचें. ३ मिठास. ४ मोठा अग्नि. ५ अग्नि. ६ ठिणगी. ७ गवतांवर. ८ मोठाले वाडे. ९ दिव्याचा स्पर्श झाल्याबरोबर. १० मोठेपणा.

नलगे ॥ ४२ ॥ कृपण जरी दूरि जाये ॥ तो घरीचें ठेवणें जीवीं वाहे ॥ तैसें माझें प्रेम पाहे ॥ जो हृदयीं वाहे सर्वदा ॥ ४३ ॥ कां गर्भ संभवल्यापाठीं ॥ उल्हासें वाढवी गोरटी ॥ तैशी माझ्या प्रेमाची पोटीं ॥ आवडी मोठी जैं होय ॥ ४४ ॥ जैसे गर्भाचे डोहळे ॥ तैसे माझ्या प्रेमाचे सोहळे ॥ पोटांतलेन कळवळे ॥ उल्हासबळें चढोवढी ॥ ४५ ॥ सदैव जांवयी आल्या घरां ॥ जेवीं सर्वस्व वेंची सुंदरा ॥ तेवीं माझा कळवळा पुरा ॥ ज्याच्या जिव्हारा वोसंडे ॥ ४६ ॥ बीज अधिकाधिक पेरितां ॥ उल्हास कृषीवळाचे चित्तां ॥ तेवीं सर्वस्व मज अर्पितां ॥ तैशी उल्हासता जैं होये ॥ ४७ ॥ सगुण सुरूप समर्थ भर्ता ॥ निघोन गेलिया तत्त्वतां ॥ त्यालागीं तळमळी जैशी वनितां ॥ तैशी कळवळना जैं उठी ॥४८॥ त्यानांव गा माझी भक्ती ॥ उद्धवा जाण निश्चितीं ॥ जे भक्तीसि मी भुलोनि श्रीपती ॥ भक्तां हातीं आतुडलों ॥ ४९ ॥ चढत्या आवडीं माझी प्रीती ॥ तेचि जाण पां माझी भक्ती ॥ ऐसा भक्तीचा महिमा श्रीपती ॥ स्वयें उद्धवाप्रती सांगत ॥ २५० ॥ आवडी धरोनि पोटेंसी ॥ देवो सांगे उद्धवासी ॥ माझी भक्ति ते जाण ऐशी ॥ अखंड जीपाशीं मी असें ॥ ५१ ॥ संसारतरणोपायीं ॥ हेंचि एक मुख्य पाही ॥ मोक्ष लागे इच्या पायीं ॥ इतरसाधनें कायी बापुडीं ॥५२॥ मी तंव अजित लोकीं तिहीं ॥ त्या मज भक्तप्रतापें पाही ॥ जिंतोनियां ठायींच्याठायीं ॥ भावंबळें पाही स्ववश केलों ॥ ५३ ॥ यावरी सर्व विषयांचे माथां ॥ माझे भक्तीचि गा सर्वथा ॥ ऐक पां तेही कथा ॥ तुज मी तत्त्वतां सांगेन ॥ ५४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ न साधयति मां योगो न सांख्यं धर्म उद्धव ॥ न स्वाध्यायस्तपस्त्यागो यथा भक्तिर्ममोर्जिता ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ सांख्य जें कां नित्यानित्य ॥ कर्म जें कां नित्यनैमित्य ॥ अष्टांगयोग समस्त ॥ नव्हती समर्थ मत्प्राप्तीं ॥ ५५ ॥ स्वाध्याय जें वेदाध्ययन ॥ तप जें वाताम्बुपर्णाशन ॥ त्याग जो संन्यासग्रहण ॥ माझे भक्तीवीण बापुडीं ॥ ५६ ॥ जैशी नाकेंवीण बरव ॥ कां शिरेंवीण अवयव ॥ भर्त्तारेंवीण अहेव ॥ जाण पां तो सर्व विटंबू ॥ ५७ ॥ तैसें माझे भक्तीविण ॥ सकळ साधनें बापुडीं जाण ॥ मज पावावया समर्थपण ॥ नाहीं आंगवण समस्तां ॥ ५८ ॥ तैशी नव्हे माझी भक्ती ॥ चढती वाढवून माझी प्रीती ॥ तत्काळ करी माझी प्राप्ती ॥ नव्हे पंगिस्ती आणिकाची ॥ ५९ ॥ जेव्हां उपजली माझी भक्ती ॥ तेव्हांच झाली माझी प्राप्ती ॥ हें पुनःपुन्हा उद्धवाप्रती ॥ हरिखें श्रीपती सांगत ॥ ६० ॥ रत्नासवें जैशी दीप्ती ॥ अरुणासवें जेवीं गभस्ती ॥ तेवीं भक्तिपाशीं मी श्रीपती ॥ असें निश्चितीं उद्धवा ॥ ६१ ॥ ते भक्ति लागे ज्याच्या चित्तीं ॥ तैं मीं सांपडलों त्याच्या हातीं ॥ आणिका साधनाचे प्राप्ती ॥ विनाभक्ती मी नातुडें ॥६२॥ ॥ श्लोक ॥ ॥ भक्त्याऽहमेकया ग्राह्यः श्रद्धयाऽऽत्मा प्रियः सताम् ॥ भक्तिः

---

१ पति. २ स्त्री. ३ अंतःकरणांत. ४ संसारांतून तरून जाण्याच्या उपायांमध्यें. ५ भक्तीच्या सामर्थ्यानें. ६ माझ्या प्राप्तीविषयीं. ७ वायु, उदक व पिकलीं पानें भक्षणकरणें.

पुनाति मन्निष्ठा श्वपाकानपि संभवात् ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ इतर साधनें व्युत्पत्ती ॥ दूरी सांडूनि परतीं ॥ श्रद्धायुक्त माझी भक्ती ॥ धरिल्या हातीं मी लाभें ॥ ६३ ॥ निर्विकल्प निःसंदेहो ॥ सर्वभूतीं भगवद्भावो ॥ हा भक्तीचा निजनिर्वाहो ॥ भजनभावो या नांव ॥ ६४ ॥ होऊनि सर्वार्थीं उदासू ॥ माझ्या भजनाचा उल्हासू ॥ न धरी मोक्षाचा अभिलाषू[1] ॥ एवढा विश्वासू मद्भजनीं ॥ ६५ ॥ तेथें तरें कीं नतरें ॥ हा विकल्पू कोठें उरें ॥ माझेनि भजनें निर्धारें ॥ केले पाठिमोरे विधिवाद ॥ ६६ ॥ एवढा विश्वासि ज्याचा भावो ॥ न धरी भक्तीवेगळा उपावो ॥ आज्ञा त्याचेनि जीवें जीवो ॥ तो आत्मा पहाहो पैं माझा ॥ ६७ ॥ जो मी ज्ञानियांचा आत्मा ॥ भक्तांचा प्रिय परमात्मा ॥ शास्त्रीं प्रतिपादिती पुरुषोत्तमा ॥ तो मी साउमा त्या धांवें ॥ ६८ ॥ मज आवडे अनन्य भक्ती ॥ मी त्याचा अंकित[3] निश्चितीं ॥ त्याचेनि माझी त्रैलोक्यीं[4] ख्याती[5] ॥ मज महंती[6] त्याचेनी ॥ ६९ ॥ त्याचेनि मज खाणें जेवणें ॥ त्याचेनि मज लेणें नेसणें ॥ त्याचेनि जीवें प्राणें ॥ म्यां वर्त्तणें सर्वत्र ॥ २७० ॥ माझे गांठीं कांहीं नाहीं ॥ भक्ति सर्वस्वें वेंचूनि पाही ॥ नाना उपचारउपायीं ॥ महत्त्व तिहीं मज दिधलें ॥ ७१ ॥ मज अचक्षूसि दिधले डोळे ॥ अश्रोत्रा[7] श्रवण दिधले ॥ मज अमुखा तिहीं मुख केलें ॥ त्याचेनि बोलें मी बोलका ॥ ७२ ॥ मज त्याचेनि गमनागमन ॥ त्याचेनि अवयव अळंकरण ॥ त्याचेनि मज नेमस्त स्थान ॥ मज समर्थपण त्याचेनी ॥ ७३ ॥ मज नामरूप तिहीं करणें ॥ मज पवित्रता त्याचेनि गुणें ॥ मज वैकुंठींचें ठाणें भक्तिअचळपणें दीधलें ॥ ७४ ॥ येथवरी निजभक्तांसी ॥ मी वश्य झालों भक्तीपाशीं ॥ यालागीं अहर्निशीं ॥ मी भक्तांपाशीं तिष्ठतू ॥ ७५ ॥ मी अजन्मा त्याचेनि जन्मधारी ॥ मी अकर्मा त्याचेनि कर्म करीं ॥ त्याचेनि बोलें उद्धरीं ॥ नाममात्रें महापापिया ॥ ७६ ॥ नारदवचनासाठीं ॥ वाल्मीकि परम पापी सृष्टीं ॥ म्यां वंद्य केला वैकुंठीं ॥ नामपरिपाटीं पवित्रत्वें ॥ ७७ ॥ येथवरी भक्तीची सत्ता ॥ मजवरी चाले तत्त्वतां ॥ भक्तिवेगळा सर्वथा ॥ मी नये[9] हातां कोणाचे ॥ ७८ ॥ भक्तांच्या उपकारता ॥ मी थोर दाटलों तत्त्वतां ॥ नव्हेचि प्रत्युपकारता ॥ अधीन सर्वथा यालागीं ॥ ७९ ॥ त्यालागीं व्हावया उतरायी ॥ माझे गांठीं कांहींच नाहीं ॥ लटुफटु दीधलें कांहीं ॥ टेंहळूनि पाही सांगेन ॥ २८० ॥ भक्त माझेनि सनाथ ॥ माझेनि झाले ते कृतकृत्य ॥ माझेनि आनंदें ते तृप्त ॥ सदा वोसंडत निजबोधें ॥ ८१ ॥ माझेनि बळें जगजेठी ॥ घायेंवीण छेदिती सृष्टी ॥ माझेनि बळें त्यांचे दृष्टीं ॥ संमुख नुठी कळिकाळ ॥ ८२ ॥ माझेनि न मानिती लोकीं तिहीं ॥ माझेनि ते देहीं विदेही ॥ माझेनि बळें पाही ॥ प्रळयकाळ तिहीं प्राशिला ॥ ८३ ॥ माझेनि बळें जाण ॥ विभांडिलें[10] जन्ममरण ॥ माझें करोनियां भ

---

१ इच्छा. २ दूर. ३ स्वाधीन. ४ तिन्ही लोकांत. ५ प्रसिद्धि. ६ मोठेपणा. ७ कर्णरहितास. ८ शोधून. ९ येत नाहीं. १० दूर केलें.

जन ॥ ब्रह्म सनातन ते झाले ॥ ८४ ॥ हेंही नाहीं म्यां दीधलें ॥ भजनबळें तिहीं नेलें ॥ त्यांसि माझें कांहीं नचलें ॥ सर्वस्व लुटिलें निजभक्तीं ॥ ८५ ॥ भक्तीं भजनभावबळें ॥ अजिता मातें तिहीं जिंकिलें ॥ जिंकोनि आपण्या वश्य[१] केलें ॥ माझें निजपद नेलें हरिभक्तीं ॥ ८६ ॥ एवं निजपदाची माझ्या सत्ता ॥ जरी आली भक्तांच्या हातां ॥ तरी स्वामित्व ठेवूनि माझे माथां ॥ माझे भक्तिपंथा विनटले ॥ ८७ ॥ ते माझे भक्तीची पवित्रता ॥ आश्चर्य वाटेल तुज ऐकतां ॥ संदेहो नाहीं मज सांगतां ॥ ऐक तत्त्वतां तो महिमा ॥ ८८॥ सांडोनि दांभिक लौकिक[२] ॥ माझ्या भजनीं भावार्थें चोख ॥ तो ज्ञाती जरी झाला श्वपाक[३] ॥तरी आवश्यक मज पूज्य ॥ ८९ ॥ केवळ जीं अपवित्रें ॥ रिसें आणि वानरें ॥ म्यां पूजिलीं गौळ्यांचीं पोरें ॥ ताकपिणारें रानटें ॥ २९० ॥ जो जातीनें नीचत्वा नेला ॥ परी भक्तिभावें उंचावला ॥ तो मद्रूपता पावला ॥ पूज्य झाला तिहीं लोकीं ॥ ९१ ॥ विप्राद्द्विषड्गुणयुक्तता ॥ येश्लोकींची हे कथा ॥ जळो त्या द्विजाची पवित्रता ॥ जो माझ्या भजनपथा विन्मुख[४]॥ ९२ ॥ त्याहूनि श्वपच[३] गा वरिष्ठ ॥ जो माझ्या भजनीं भजननिष्ठ ॥ त्यातें वंदिती पुराण श्रेष्ठ ॥ कविवरिष्ठ महाकवी ॥ ९३ ॥ विदुर दासीपुत्र तत्त्वतां ॥ भावें पढिया भगवंता ॥ भावो प्रमाण परमार्था ॥ जात्यभिमानता सरेना ॥ ९४ ॥ मज पावावया साचोकारें ॥ भावें सरों जाती नसरे ॥ यालागीं अवघ्यांचे धुरे ॥ म्यां वनचरें उद्धरिलीं ॥ ९५ ॥ पक्ष्यांमाजी केवळ निंद्य ॥ जटायु उद्धरिला म्यां गीध[५] ॥ अंत्यज उद्धरिला धर्मव्याध ॥ भाव शुद्ध मदर्थीं ॥ ९६ ॥ भलता हो भलते जातीं ॥ ज्यासि माझी भावार्थें भक्ती ॥ तोचि जाणपां पवित्र मूर्ती ॥ माझी प्राप्ती मद्भजनें ॥ ९७ ॥ सांडोनियां माझी भक्ती ॥ नानासाधनें व्युत्पत्ती ॥ करितां नव्हे माझी प्राप्ती ॥ तेंचि श्रीपती सांगत ॥९८॥ ॥श्लोक॥ ॥ धर्मः सत्यदयोपेतो विद्या वा तपसान्विता ॥ मद्भक्त्यापेतमात्मानं न सम्यक् प्रपुनाति हि ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥माझे भक्तिवीण कर्म धर्म ॥ जाण पां तो केवळ भ्रम ॥ चुकलें मत्प्राप्तीचें वर्म ॥ तो धर्म अधर्म परिणामीं ॥ ९९ ॥ माझे भक्तिवीण सत्यवादू ॥ तो जाण पां जैसा गर्भांधू ॥ प्रतिपदीं घडे प्रमादू ॥ अधःपतनबाधू देखेना ॥ ३०० ॥ भक्तिवीण दयेची थोरी ॥ जेवीं पुरुषेंवीण सुंदरी[६] ॥ ते विधवा सर्वधर्मांबाहेरी ॥ तैसी परी दयेची ॥१॥ माझे भक्तिवीण जे विद्या ॥ ते केवळ जाण पां अविद्या ॥ जेवीं वायस[७] नेणती चांदा[८] ॥ तेवीं माझ्या निजबोधा नोळखती ॥ २ ॥ चंदनभार वाहे खर[९] ॥ परी तो नेणे सुवासाचें सार ॥ माझे भक्तिवीण विद्याशास्त्र ॥ केवळ भारवाहक ॥ ३ ॥ माझे भक्तिवीण जें तप ॥ शरीरशोषणादि अमूप ॥ तें पूर्वअदृष्टें भोगी पाप ॥ नव्हे सद्रूप तपःक्रिया ॥ ४ ॥ माझे भक्तिवीण जें साधन ॥

---

[१] स्वाधीन. [२] लोकव्यवहार. [३] चंडाल. [४] अव्हेर करणारा. [५] गृध्र. [६] सुंदर स्त्री. [७] कावळे. [८] चंद्रास. [९] गाढव.

तें कोशकीटांच्या[1] ऐसें जाण॥ आपण्या आपण बंधन ॥ भक्तिहीन क्रिया ते॥ ५॥ एवं माझे भक्तिवीण॥ जें केलें तें अप्रमाण॥ तें भक्तीचें शुद्ध लक्षण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥६॥ ॥श्लोक॥ ॥कथं विना रोमहर्षं द्रवता चेतसा विना॥ विनाऽऽनंदाश्रुकलया शुध्येद्भक्त्या विनाऽऽशयः॥ २३॥ ॥टीका॥ ॥आवडीं हरिकथा ऐकतां ॥ नानाचरित्रें श्रवण करितां॥ माझी आत्मचर्चा हृदयीं धरितां॥ पालटू चित्ता तेणें होये ॥ ७ ॥ तेणेंचि उपजे माझी भक्ती ॥ माझ्या भजनाच्या अतिप्रीतीं ॥ आवडीं माझीं नामें गाती ॥ रंगीं नाचती सद्भावें ॥ ८ ॥ पोटांतूनिया उल्हासता ॥ रंगीं गातां पैं नाचतां ॥ अंतरीं द्रवो झाला चित्तां ॥ ते अवस्था बाह्य दिसे ॥ ९ ॥ अंतरीं सुखाची झाली जोडी ॥ बाह्यरोमांचीं उभिली गुढी ॥ त्या स्वानुभवसुखाची गोडी ॥ नयनीं रोकडी प्रवाहे ॥ ३१० ॥ माझे भक्तीचिया आवडीं ॥ अहंसोहं दोनी कुडीं ॥ तुटली अभिमानाची बेडी ॥ विषयगोडी निमाली ॥ ११ ॥ ते काळीचें हेंचि चिह्न ॥ रोमपुलकांकित देहो जाण ॥ नयनीं आनंद[3]जीवन ॥ हृदयीं परिपूर्ण स्वानंदू ॥ १२ ॥ पुंजाळले दोनी नयन ॥ सदा सर्वदा सुप्रसन्न ॥ स्फुरेना देहाचें भान ॥ भगवंतीं मन रंगलें ॥ १३ ॥ ऐसी नुपजतां[4] माझी भक्ती ॥ कैंची होय विषयविरक्ती ॥ विरक्तीवीण माझी प्राप्ती ॥ नव्हे निश्चितीं उद्धवा ॥ १४ ॥ माझी शुद्धभक्ती तत्त्वतां ॥ साचार आली जयाचे हातां ॥ ऐक त्याच्या चिह्नांची कथा ॥ आणि पवित्रता तयाची ॥ १५ ॥ माझे भक्तीसि जो लागला ॥ तो तत्काळ पवित्र झाला ॥ त्याणें त्रिलोक पवित्र केला ॥ हें गर्जोनि बोलिला श्रीकृष्ण ॥ १६ ॥ ॥श्लोक॥ ॥वाग्गद्गदा द्रवते यस्य चित्तं रुदत्यभीक्ष्णं हसति क्वचिच्च ॥ विलज्ज उद्गायति नृत्यते च मद्भक्तियुक्तो भुवनं पुनाति ॥ २४ ॥ ॥टीका॥ ॥अंगीं रोमांच रवरवित ॥ स्वेद[5]बिंदू डळमळित ॥ चित्त चैतन्यें द्रवत ॥तेणें सद्गदित पैं वाचा ॥ १७ ॥ हर्ष बोसंडतां पोटीं ॥ अर्धोन्मीलित[6] होय दृष्टी ॥ जीवशिवां पडली मिठी ॥ ध्यानत्रिपुटी मावळली ॥ १८ ॥ नयनीं आश्रूंचा पूर लोटी ॥ उभंडून संठेचि पोटीं ॥ होत जीवशिवांची तुटी ॥ पडे स्पर्शीं मूर्छित ॥ १९ ॥ आक्रंदे थोर आक्रोशें ॥ वारंवार रडता दिसे ॥ रडण्यामाजी गद्गदां हांसे ॥ जेवीं लागलें पिसें ब्रह्मग्रहो ॥ ३२० ॥ रडणें हांसणें न सांडी ॥ त्याहीमाजी नवल आवडी ॥ अर्थावबोधें गाणें मांडी ॥ निजात्मगोडीचेनियोगें ॥ २१ ॥ विसरोनि माझें तुझें ॥ सांडोनिया लोकलाजे ॥ हरिखें प्रेमाचेनि भोजें ॥ तेणें नाचिजे निःशंक ॥ २२ ॥ गाणें नाचणें हांसणें ॥ तो रडे कासयाकारणें ॥ ऐक तींही लक्षणें ॥ तुजकारणें सांगेन ॥ २३ ॥ माउलीवेगळ बाळक पडे ॥ जननी पाहतां कोठें नातुडे ॥ भेटतां ओरडूनि रडे ॥ मिठी पडे सप्रेम ॥ २४ ॥ जीव परमात्मा दोनीं ॥ चुकामुकी झाली भ्रमपट्टनीं ॥

---

१ कोळ्याप्रमाणें. २ नाहींशी झाली. ३ आनंदाश्रु. ४ उत्पन्न न होतां. ५ घामाचे थेंब. ६ अर्धी उघडणारी. ७ वेड. ८ आईवांचून. ९ भ्रांतिरूपनगरांत.

त्यांसि एकाकीं होतां मिळणी[1] ॥ रडे दीर्घस्वरें स्फुंदत ॥ २५ ॥ बहुकाळें झाली भेटी ॥ ऐक्यभावें पडली मिठी ॥ तेणें उभंड न
संठे पोटीं ॥ रुदन उठी सप्रेम ॥ २६ ॥ देवो लाघवी[2] नानापरी ॥ मायावी नातुडे निर्धारीं ॥ तो सांपडला घरींच्या घरीं ॥ तेणें विस्मय
करी टवकारें ॥ २७ ॥ देव सदा जवळीच असे ॥ त्यालागीं जन कैसे पिसे ॥ पाहों जाती देशोदेशें ॥ तें देखोनि हांसे गदगदां ॥ २८ ॥
देव सर्वांसि अजितू ॥ तो म्यां जिंकिला भगवंतू ॥ धरोनि राखिला हृदयांतू ॥ यालागीं नाचतू उल्हासें ॥ २९ ॥ निवटूनि[3] दुजयांची मा
तू ॥ अंगें जीतिला भगवंतू ॥ जगीं झाला यशवंतू ॥ यालागीं गातनाचतू उल्हासें ॥ ३३० ॥ पाहतां दुसरें नदिसे मज ॥ यालागीं
धरूं विसरला लाज ॥ जगीं झाला तो निर्लज्ज ॥ निर्लज्जतेचि वोज हे त्याची ॥ ३१ ॥ यापरी भक्तियुक्त ॥ होऊनियां माझे भक्त ॥ निजानंदें
गातनाचत ॥ तेणें केलें पुनीत[4] लोकत्रय[5] ॥ ३२ ॥ जयाचे देखतां चरण ॥ जडजीवां उद्धरण ॥ ज्याचे लागतां चरणरेण[6] ॥ पशुपाषाण उद्धरती
॥ ३३ ॥ कीर्तनाचेनि महाघोकें ॥ नाशिलीं जगाचीं सर्व दुःखें ॥ अवघें विश्वचि हरिखें ॥ भरिलें महासुखें उचंबळत ॥ ३४ ॥ दर्शनें
स्पर्शनें वचनें ॥ एक तारिले कीर्तनें ॥ एक तारिले नामस्मरणें ॥ यापरी जग उद्धरणें उद्धवा ॥ ३५ ॥ अविद्यायुक्त जीव मलिन ॥ त्यासि
शुद्ध व्हावया जाण ॥ माझी भक्तीचि प्रमाण ॥ हेंचि श्रीकृष्ण स्वयें सांगे ॥ ३६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यथाऽग्निना हेममलं जहाति ध्मातं पुनः
स्वं भजते स्वरूपम् ॥ आत्मा च कर्मानुशयं विधूय मद्भक्तियोगेन भजत्यथो माम् ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ डांकमिळणीं सुवर्ण ॥ हीनकसें
झालें मलिन ॥ उदकें धुतांही जाण ॥ निर्मळपण नये त्या ॥ ३७ ॥ त्याच सुवर्णाचें तगट[7] ॥ अग्निमुखें देतां पुट ॥ मळत्यागें होय चोखट[8]
॥ दिसे प्रकट पूर्वरूपें ॥ ३८ ॥ तेवीं अविद्याकामकर्मीं मलिन ॥ त्याचे चित्तशुद्धिलागीं जाण ॥ माझी भक्तीचि परम प्रमाण ॥
मलक्षालन जीवाचें ॥ ३९ ॥ जंव जंव भक्तीचें पूट चढे ॥ तंवतंव अविद्याबंध विघडे ॥ मायेचें मूळचि खुडे[9] ॥ जीवू चढे निजरूपा
॥ ४० ॥ तुटोनियां अविद्याबंधू ॥ चिन्मात्रैक अतिविशुद्धू ॥ जीव पावे अगाधबोधू ॥ परमानंदू निजबोधें ॥ ४१ ॥ जीवासि अविद्ये
ची प्राप्ती ॥ ते ज्ञानास्तव होय निवृत्ती ॥ तेथ कांपों लागली भक्ती ॥ ऐशी आशंका चित्तीं जरी धरिसी ॥ ४२ ॥ तरी माझे भक्तिवीण
ज्ञान ॥ सर्वथा नुपजे जाण ॥ तेचि अर्थीचें निरूपण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ४३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यथायथात्मा परिमृज्यतेऽसौ
मत्पुण्यगाथाश्रवणाभिधानैः ॥ तथातथा पश्यति वस्तु सूक्ष्मं चक्षुर्यथैवांजनसंप्रयुक्तम् ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ॥ माझी प्रतिपाद्य स्वरूपता ॥
नानाचरित्रें पवित्र कथा ॥ तेथें श्रवणमननें चित्ता ॥ प्रक्षाळितां कीर्तनें ॥ ४४ ॥ जंवजंव करी माझी भक्ती ॥ तंवतंव अविद्यानि

---

१ भेट. २ नाटकी. ३ न ऐकून. ४ पावन. ५ तिन्ही लोक. ६ पायाची धूळ. ७ पत्रा. ८ स्वच्छ. ९ खंडून जातें.

वृत्ती ॥ तेणें माझे स्वरूपाची प्राप्ती ॥ जे श्रुतिवेदांतीं अतर्क्य ॥ ४५ ॥ जेकां अतिसूक्ष्म निर्गुण ॥ अलक्ष्य लक्षेना गहन ॥ तेणें स्वरूपें होय संपन्न ॥ जीवसमाधान मद्भजनें ॥ ४६ ॥ नयनीं सूदल्या[1] अंजन ॥ देखे पृथ्वीगर्भींचें[2] निधान[3] ॥ तेवीं मद्भजनें लाहोनि ज्ञान ॥ चैतन्यघन[4] जीव होय ॥ ४७ ॥ उद्धवा एक पां निश्चितीं ॥ बहुत नलगे व्युत्पत्ती ॥ जैसा भावो[5] ज्याचे चित्तीं ॥ तैशी प्राप्ती तो पावे ॥ ४८ ॥ ॥श्लोक॥ ॥विषयान्ध्यायतश्चित्तं विषयेषु विषज्जते ॥ मामनुस्मरतश्चित्तं मय्येव प्रविलीयते ॥ २७ ॥ ॥टीका॥ ॥जो करी विषयाचें ध्यान ॥ तो होय विषयीं निमग्न ॥ जो करि सदा माझें चिंतन ॥ तो चैतन्यघन मीचि होय ॥ ४९ ॥ स्त्री गेली असतां माहेरीं ॥ ध्यातांचि प्रकटे जिव्हारीं ॥ हावभावकटाक्षेंवरी ॥ सकाम करी पुरुषातें ॥ ३५० ॥ नसते स्त्रियेचें ध्यान करितां ॥ प्रकट दिसे यथार्थता[6] ॥ मी स्वतःसिद्ध हृदयीं असतां ॥ सहजें मद्रूपता चिंतितां मज ॥ ५१ ॥ आवडीं माझें जें चिंतन ॥ चित्त चिंता चिंतितेपण ॥ विरोनि होय चैतन्यघन ॥ मद्रूपण या नांव ॥ ५२ ॥ माझे प्राप्तीलागीं जाण ॥ हेंचि गा मुख्य लक्षण ॥ माझें ध्यान माझें भजन ॥ मद्रूपपण तेणें होय ॥ ५३ ॥ मजवेगळें जें जें ध्यान ॥ तेंचि जीवासि दृढबंधन ॥ यालागीं सांडूनि विषयाचें ध्यान ॥ माझें चिंतन करावें ॥ ५४ ॥ ॥श्लोक॥ ॥तस्मादसदभिध्यानं यथा स्वप्नमनोरथम् ॥ हित्वा मयि समाधत्स्व मनो मद्भावभावितम् ॥ २८ ॥ ॥टीका॥ ॥साचाच्यापरी दिसत ॥ परिणामीं नाशवंत ॥ त्यासीच बोलिजे असत ॥ जें मिथ्याभूत आभासू[7] ॥ ५५ ॥ तेवीं इहामुत्र[8] कमनीये[9] ॥ जे अविचारितरमणीय[10] ॥ त्यालागीं प्राणी पाहे ॥ नानाउपायें शिणताती ॥ ५६ ॥ कष्टीं सेवूनि साधन ॥ साधिलें सर्वभोगस्थान ॥ तेंही नश्वर गा जाण ॥ जेवीं कां स्वप्नमनोरथ ॥ ५७ ॥ यालागीं विषयाचें ध्यान ॥ सांडूनि करावें माझें भजन ॥ माझिया भावना मन ॥ सावधान राखावें ॥ ५८ ॥ सावधान करितां भजन ॥ एकाग्र धरितां माझें ध्यान ॥ तेथ अत्यंत जें बाधकपण ॥ तें त्यागलक्षण हरि बोले ॥ ५९ ॥ ॥श्लोक॥ ॥स्त्रीणां स्त्रीसंगिनां संगं त्यक्त्वा दूरत आत्मवान् ॥ क्षेमे विविक्त आसीनश्चिंतयेन्मामतंद्रितः ॥ २९ ॥ ॥टीका॥ ॥जो मजलागीं आर्तभूत ॥ तेणें सांडावी स्त्रीसंगाची मात ॥ मी चिंतावा भगवंत ॥ तेणें एकांत सेवावा ॥ ३६० ॥ स्त्रियेच्याहीपरीस वोखटी[11] ॥ संगति स्त्रैणांचीं अतिखोटी ॥ त्यांसि नव्हावी भेटिगोठी ॥ न पहावी दिठीं दूरोनी ॥ ६१ ॥ साधकें कायावाचाचित्तीं ॥ सांडूनि दोहींची संगती ॥ परतोनि स्फुरेना स्फूर्ती ॥ ऐशी दृढस्थिती धरावी ॥ ६२ ॥ केवळ एकांत जें विजन ॥ प्रशस्त[12] आणि पवित्रस्थान ॥ तेथें घालोनिया आसन ॥

---

१ घातल्यास. २ भूमींत ठेविलेलें. ३ ठेवा. ४ ज्ञानस्वरूप. ५ भक्ति. ६ सत्याप्रमाणें. ७ भ्रममात्र. ८ ह्या लोकीं व परलोकीं. ९ इच्छा करण्यास योग्य. १० अविचारानें बरें वाटणारें. ११ वाईट. १२ शास्त्रांत सांगितलेलें.

माझें चिंतन करावें ॥ ६३ ॥ करोनि आळसाची वोळवण ॥ धरूनि निजवृत्ति सावधान ॥ त्यावरी करावें माझें ध्यान ॥ एकाग्र मन
राखूनी ॥ ६४ ॥ माझें विध्वंसोनि ध्यान ॥ माझे प्राप्ती आड विघ्न ॥ साधकांसि अतिबंधन ॥ स्त्री आणि स्त्रैणसंगती ॥ ६५ ॥ ॥श्लो
क॥ ॥न तथाऽस्य भवेत्क्लेशो बंधश्चान्यप्रसंगतः ॥ योषित्संगाद्यथा पुंसो यथा तत्संगिसंगतः ॥ ३० ॥ ॥टीका॥ ॥अविद्येच्या अनंत
कांटी ॥ जाण पां स्त्रीसंगाचे पोटीं ॥ अधर्माचा भडका उठी ॥ योषिता दृष्टीं देखतां ॥ ६६ ॥ जें महामोहाचें मेळवण ॥ जें खवळल्या
कामाचें इंधन ॥ जें वाचेचें परममोहन ॥ अधःपतन ते योषिता ॥ ६७ ॥ जे मदनाचे तिखट बाण ॥ जें मायेचें चक्र जाण ॥ जें अं
धतमाचें पूर्ण ॥ भरितें तें जाण योषिता ॥ ६८ ॥ होकां जीचिये संगतीं ॥ आंधळी होय ज्ञानशक्ती ॥ जे वाढवी नाना आसक्ती ॥ जि
चेनि विस्मृती निजस्वार्था ॥ ६९ ॥ जिचेनि संसार बहुवस ॥ जिचेनि असोसें गर्भवास ॥ जिचेनि विषयविलास ॥ जे वज्रपाश जीवा
चा ॥ ३७० ॥ जे अखंड सोशी दुःखशोक ॥ जे सदा सोशी नरकवोक ॥ ते माता अनाप्त करूनि देख ॥ स्त्री आवश्यक आप्त होय ॥ ७१ ॥
जे मातृस्नेहातें तोडवी ॥ जे बंधुस्नेहातें विघडवी ॥ जे सदा गोंवी हावभावीं ॥ अधर्म अडवीं जे पाडी ॥ ७२ ॥ जिचे कटाक्ष अतिति
ख ॥ जिव्हारीं रुतले देख ॥ जे जीवाची व्यामोहक ॥ जिचें चढलें विख उतरेना ॥ ७३ ॥ एवढी बाधा जाण स्त्री ती ॥ जो वांछूं पाहे मा
झी प्राप्ती ॥ तेणें सांडावी स्त्रियेची आसक्ती ॥ हृदयीं प्रीती न राखावी ॥ ७४ ॥ स्त्री आठवतां चित्तां ॥ उच्छेदी ज्ञानध्यान अवस्था ॥
एवढी स्त्रीसंगबाधकता ॥ त्याहूनि अधिकता स्त्रैणसंगें ॥ ७५ ॥ स्त्रीसंगाच्या मोहमदा ॥ सुटका आहे यदाकदा ॥ परी स्त्रैणसंगतीची बा
धा ॥ ते आपदा अनिवार ॥ ७६ ॥ चूडालास्त्रियेचे संगतीं ॥ तरला शिखिध्वज भूपती ॥ नातरी मदालसेचे संगतीं ॥ तरला नृपती कु
वलयाश्वू ॥ ७७ ॥ होकां लीलेनें करोनि भक्ती ॥ प्रसन्न केली सरस्वती ॥ तिया उद्धरिला निजपती ॥ हें बोलिलें ग्रंथीं वसिष्ठें ॥ ७८ ॥
यापरी स्त्रीसंगतीं ॥ उद्धरले ऐकिजेती ॥ परी स्त्रैणाचे संगतीं ॥ उद्धरागती असेना ॥ ७९ ॥ जोकां स्त्रियेचा अंकिला ॥ जो स्त्रियेसि जी
वें विकिला ॥ जो स्त्रियेचा पोसणा झाला ॥ तिचे बोलामाजी वर्त्ते ॥ ३८० ॥ जैशी कुलदेवता खेचरी ॥ तैसें स्त्रियेसि पूज्य करी ॥ मग
तिचेचि सेवेवरी ॥ नानाउपचारीं नाचत ॥ ८१ ॥ पाळिल्या श्वानांचे परिपाटीं ॥ लाविल्या लागे सुहृदापाठीं ॥ त्या हडकिलिया शेव
टीं ॥ काम थाळोरां पुढीं घालूनि पडे ॥ ८२ ॥ धड गोड उत्तमपदार्था ॥ आपण भोगीना सर्वथा ॥ तें देऊन स्त्रियेच्या हातां ॥ आपु
ली सत्ता निवर्त्तवी ॥ ८३ ॥ इसि जैं विरुद्ध वाटेल ॥ तैं हें ब्रह्मांड पालथेल ॥ इचा उल्लंघितां बोल ॥ क्षीराब्धि सुकेल सुखाचा ॥ ८४ ॥

---

१स्त्रीस लुब्ध झालेल्या पुरुषाची संगत. २जळण. ३स्त्री. ४नरकाचें. ५सहन न होणारा. ६वश करिते. ७तरून जाण्यास उपाय. ८स्वाधीन झालेला. ९आकाशांत असणारी. १०कुत्र्याच्या. ११घालवितो.

नाहीं देवो कुळदेवां पूजणें ॥ मायबापांतें वंचणें ॥ शेखीं गुरूतेंही ठकणें ॥ परी सर्वस्व देणें स्त्रियेसी ॥ ८५ ॥ एवं माकड जैसें गारुड्याचें ॥ तैसा स्त्रियेचेनि छंदें नाचे ॥ ऐशिया स्त्रैणाचे संगतीचें ॥ तेथ सुख कैंचें साधका ॥ ८६ ॥ ज्याच्या ऐकतां स्त्रियेच्या गोठी ॥ सज्ञानासही काम उठी ॥ जो लावी योषितापाठीं ॥ उठाउठी सकामत्वें ॥ ८७ ॥ ऐशिया स्त्रैणाचे संगतीं ॥ कैंची साधका सुखप्राप्ती ॥ तो घालील अधोगतीं ॥ अंधतमाप्रती नेईल ॥ ८८ ॥ यालागीं स्त्रैणाची कथा ॥ कानीं नायकावी वार्त्ता ॥ त्याचा वाराही लागतां ॥ तेथूनि सर्वथा पळावें ॥ ८९ ॥ त्याची न घ्यावी भेटी ॥ त्यासी न करावी गोठी ॥ तो न पहावा दिठीं ॥ न लागावें पाठीं स्त्रैणाचिये ॥ ३९० ॥ स्त्रैण पुढें वाटे जाय ॥ त्याच्यामार्गीं मागू उरला राहे ॥ तेही आपण चुकवावी भोये ॥ येथवरी पाहे त्यागावा ॥ ९१ ॥ स्त्री आणि स्त्रैणाचे संगतीं ॥ जैशी होय दुःखप्राप्ती ॥ तैसें दुःख त्रिजगती ॥ माजी निश्चितीं असेना ॥ ९२ ॥ अत्यंत स्त्रीकामीं वशता ॥ ती नांव मुख्य स्त्रैणता ॥ केवळ स्त्रियेची अधीनता ॥ तो बाधू परमार्था अतिनिंद्यत्वें ॥ ९३ ॥ आपुले हृदयींची कामासक्ती ॥ तेचि स्त्रीसंगाची दृढप्राप्ती ॥ तेथ उपजलिया विरक्ती ॥ मग स्त्रियेची प्राप्ती कोण पुसे ॥ ९४ ॥ ऐसें हृदयींचें कणवें ॥ उद्धवासि सांगीतलें देवें ॥ हें ऐकोनियां उद्धवें ॥ विचारु जीवें आदरिला ॥ ९५ ॥ अनिवार उपजे विरक्ती ॥ जेणें बाधीना विषयासक्ती ॥ ऐशी जे ध्यानस्थिती ॥ तेचि देवाप्रती पुसत ॥ ९६ ॥ जें लागलिया ध्यान ॥ न दिसे स्त्रीपुरुषभान ॥ जीवीं उपजे चित्तसमाधान ॥ तैसें वि[3]धान पुसत ॥ ९७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धव उवाच ॥ ॥ यथा त्वामरविंदाक्ष यादृशं वा यदात्मकम् ॥ ध्यायेन्मुमुक्षुरेतन्मे ध्यानं मे वक्तुमर्हसि ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ ॥ उद्धव ह्मणे कमळनयना ॥ मुमुं[4]क्षु करिती तुझिया ध्याना ॥ त्या ध्यानाची ध्यानलक्षणा ॥ जगज्जीवना मज सांगे ॥ ९८ ॥ तें सगुण कीं निर्गुण ॥ कोण रूप कैसा वर्ण ॥ तें अवघेंही संपूर्ण ॥ कृपा करून मज सांगा ॥ ९९ ॥ जेथ रिघतां नुं[5]बगे मन ॥ ज्याचें अत्यंत गोडपण ॥ जें तुजही आवडतें जाण ॥ तें मज ध्यान सांगावें ॥ ४०० ॥ ऐकोनि उद्धवाचा प्रश्न ॥ सांगावया उत्तम ध्यान ॥ पूर्वपीठिका आसन ॥ प्राणायामलक्षण सांगतों ॥ १ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ सम आसन आसीनः समकायो यथासुखम् ॥ हस्तावुत्संग आधाय स्वनासाग्रकृतेक्षणः ॥ ३२ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐक आसनाचें लक्षण ॥ पाषाणीं व्याधि संभ[6]वे जाण ॥ केवळ धरणीचें आसन ॥ तें अतिकठिण दुःखरूप ॥ २ ॥ दारु[7]कासनें निर्दय मन ॥ कोरड्या काष्ठा ऐसें होय जाण ॥ तृणासनीं विकल्प गहन ॥ जैसें कां तृण विचित्रांकुरें ॥ ३ ॥ वृक्षपल्लवावरी आसन ॥ तेणें चित्त आंदोलायमान ॥ जारण मारण स्तंभन ॥ तेथ काळें आसन साधकां ॥ ४ ॥

---

१ नादानें. २ गुप्तगोष्ट. ३ प्रकार. ४ मोक्षाची इच्छा करणारे. ५ उदासीन होत नाहीं. ६ उत्पन्न होतो. ७ लांकडाच्या आसनानें.

ज्ञानोपलब्धि मृगाजिनीं[1] ॥ मोक्षसिद्धि व्याघ्राजिनीं ॥ मोक्षादिसर्वसिद्धींची श्रेणी ॥ श्वेतकंबलासनीं साधकां ॥ ५ ॥ भूमिका शुद्ध आणि समान[2] ॥ पाहोनि निरुपद्रवस्थान ॥ तेथ रचावें आसन ॥ सुलक्षण अनुक्रमें ॥ ६ ॥ कुश[3] वस्त्र कंबलाजिन ॥ इहीं युक्त घालावें आसन ॥ उंच नीच न व्हावें जाण ॥ समसमान समभागें ॥ ७ ॥ उंच झालिया आसन डोले ॥ नीची भूमी दोष आदळे ॥ यालागीं समत्वें प्रांजळें ॥ रचावें कोंवळें मृदु आसन ॥ ८ ॥ तेथ शुद्ध मुद्रा वज्रासन ॥ कां अंबुजासनही जाण ॥ अथवा घालावें सहजासन ॥ जे आसनीं मन सुखावे ॥ ९ ॥ तेणें मेरुदंड अवक्र शुद्ध ॥ समकाया राखोनि प्रसिद्ध ॥ मूळाधारादि तिनीबंध ॥ अतिसुबद्ध पैं द्यावें ॥ ४१० ॥ ऐसें आसन लागतां ॥ आसनावरी स्वभावतां ॥ करांबुजाची[4] विकसता ॥ उत्संगता शोभती ॥ ११ ॥ नाकाचें अग्र सांडूनि दूरी ॥ दृष्टि ठेवावी नासिकाग्रीं ॥ तेठायीं बैसे अग्निचक्रीं ॥ योगगंभिरीं योग्यता ॥ १२ ॥ ते अभ्यासीं निजनिश्चळें ॥ योगाभ्यासें योगबळें ॥ अर्धोन्मीलित होती डोळे ॥ धारणा[5]मेळें तेकाळीं ॥ १३ ॥ भेदापासाव उठाउठी ॥ उपरमतां अभेदीं दृष्टी ॥ तिची नासाग्रीं दिसे मिठी ॥ इतरदृष्टी न लक्षितां ॥ १४ ॥ आसनजयो त्रिबंधप्राप्ती ॥ दृष्टीची उपरमास्थिती ॥ हे अकस्मात कोणे रीतीं ॥ साधकाहातीं आतुडेल ॥ १५ ॥ ऐसी आशंका धरिसी चित्तीं ॥ त्याही अभ्यासाची स्थिती ॥ उद्धवा मी तुजप्रती ॥ यथानिगुतीं ॥ सांगेन ॥ १६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्राणस्य शोधयेन्मार्गं पूरकुंभकरेचकैः ॥ विपर्ययेणापि शनैरभ्यसेन्निर्जितेंद्रियः ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ अभ्यासाचें लक्षण ॥ प्रथम प्राणमार्गशोधन ॥ पूरक[6] कुंभक[7] रेचक[8] जाण ॥ प्राणापानशोधक ॥ १७ ॥ जिह्वा उपस्थ[9] उपमर्दवे[10] ॥ ऐसा इंद्रियनेम जैं संभवे ॥ त्यासीच हा प्राणजयो फावे ॥ येरां नव्हे श्रमतांही ॥ १८ ॥ प्राणशोधन तें तूं ऐक ॥ पूरक कुंभक रेचक ॥ सवेंचि रेचक पूरक कुंभक ॥ हा उभय देख अभ्यासू ॥ १९ ॥ इडेनीं करावा प्राण पूर्ण ॥ तो कुंभीनीं राखावा जाण ॥ मग तिनेंचि करावा रेचन ॥ हें एक लक्षण अभ्यासीं ॥ ४२० ॥ कां पिंगलेनें करावा पूर्ण ॥ तो तिनेंचि करावा रेचन ॥ हें एक अपारलक्षण विचक्षण बोलती ॥ २१ ॥ सर्वसंमत योगलक्षण ॥ इडेनें प्राण करावा पूर्ण ॥ तो कुंभकें राखावा स्तंभून ॥ करावें रेचन पिंगलया ॥ २२ ॥ होकां पिंगलेनें पुरावा प्राण ॥ तोही कुंभकें राखावा कुंभून ॥ मग इडेनें सांडावा रेचून ॥ हें विपरीत लक्षण अभ्यासीं ॥ २३ ॥ तेथ न करावी फाडाफोडी ॥ न मांडावो ताडातोडी ॥ सांडोनियां लवडसवडी ॥ अभ्यासपरवडी शनैःशनैः ॥ २४ ॥ येथ मांडलिया

---

[1] कृष्णाजिनाव. [2] सपाट. [3] दर्भ. [4] हस्तकमलाची. [5] ध्यानाच्या योगानें. [6] बाहेरचा वायु आंत घेणें. [7] तो कांहीं नियमितकाळपर्यंत कोंडून ठेवणें. [8] बाहेर सोडून देणें. [9] लिंग. [10] विषयेच्छा करणार नाहींत.

तांतडी ॥ तैं प्राण पडेल अनाडीं[1] ॥ मग हे थडी ना ते थडी ॥ ऐशी परवडी साधकां ॥ २५ ॥ जेवीं मुंगी वळंघे पर्वता ॥ ते चढे परी प
डेना सर्वथा ॥ तेथ वायस चालों जातां ॥ नचढे तत्त्वतां अतिकष्टी ॥ २६ ॥ तैसें ये योगाभ्यासीं जाण ॥ नचले जाणीव शहाणपण ॥
जाणिवा येथ होय पतन ॥ सर्वथा गमन घडेना ॥ २७ ॥ ते मुंगीच्यापरी योगपंथा ॥ जो शनैःशनैः अभ्यासता ॥ प्रणवाच्या च
ढे माथां ॥ जाण तत्त्वतां उद्धवा ॥ २८ ॥ दृढ अभ्यास आल्या हातां ॥ जैशी साधकाची मनोगतता ॥ तैसा पवन चाले तत्त्वतां ॥ जे
वीं रणाआतौता महाशूर ॥ २९ ॥ अभ्यासाच्या गडार्डीं ॥ प्राण खवळल्या कडाडी ॥ तो प्राणापानांचे भेद मोडी ॥ पदर फोडी च
क्राचे ॥ ४३० ॥ येथ द्विविधं[2] माझें भजन ॥ एक तें योगयुक्त निर्गुण ॥ एक तें प्रणवाभ्यासें भक्त सगुण ॥ तेंही लक्षण अवधारी ॥ ३१ ॥
ऐक प्राणायामाचे भेद ॥ सगर्भ अगर्भ द्विविध ॥ सगर्भ आगमोक्तें[3] शुद्ध ॥ सगुण संबंध ध्यानादि ॥ ३२ ॥ ॥श्लोक॥ ॥हृद्यविच्छि
न्नमोंकारं घंटानादं बिसोर्णवत् ॥ प्राणेनोदीर्य तत्राथ पुनः संवेशयेत्स्वरम् ॥ ३४॥ ॥टीका॥ ॥वाचेसि नव्हतां गोचरू ॥ दीर्घ प्रणवाचा
उच्चारू ॥ हृदयीं अनवच्छिन्न[4] ओंकारू ॥ अखंडाकारू उल्हासे ॥ ३३ ॥ घंटानादसदृशस्थितू ॥ जैसा कमळमृणाल[5] सूक्ष्मतंतू ॥ तैसा मूळा
दारभ्य[6] ब्रह्मरंध्रांतू ॥ प्राणायामयुक्त प्रणवू भासे ॥ ३४ ॥ तेथ दीर्घस्वरें उच्चारू ॥ तेणें प्रणवू भासे अतिसपुरू ॥ तो प्राणायामें करा
वा स्थिरू ॥ अखंडाकारू स्वरयुक्त ॥ ३५ ॥ ॥श्लोक॥ ॥एवं प्रणवसंयुक्तं प्राणमेव समभ्यसेत् ॥ दशकृत्वस्त्रिषवणं मासादर्वाग् जितानि
लः ॥ ३५ ॥ ॥टीका॥ ॥स्वरवर्णमात्रातीत पर ॥ प्रणव जो कां अगोचर ॥ तो अभ्यासबळें नर ॥ वृत्तिगोचर स्वयें करिती ॥ ३६ ॥
नवल उच्चाराचा चमत्कार ॥ ऊर्ध्वमुख अखंडाकार ॥ अभ्यासें प्रणवू करिती स्थिर ॥ झणत्कार स्वरयुक्त ॥ ३७ ॥ ऐसा प्राणायाम
युक्त प्रणवाभ्यास ॥ त्रिकाळ करितां सांडूनि आळस ॥ काळीं आवर्तन[7] दशदश ॥ सावकाश करितां पैं ॥ ३८ ॥ तरी एक मास न
लागतां ॥ हा प्राणजयो आतुडे हातां ॥ जेवीं कां सती पतिव्रता ॥ नुल्लंघी सर्वथा पतिवचन ॥ ३९ ॥ ये अभ्यासीं अतितत्पर ॥ झा
लिया गा निरंतर ॥ योगाभ्यासाचें सार ॥ सहजेंचि नर पावती ॥४४०॥ ऐसा प्राणजयो आलिया हातां ॥ दों प्रकारीं भजनावस्था ॥
एकी[8] सगुण आगमोक्ता ॥ दुजो योगाभ्यासना निर्गुणत्वें ॥ ४१ ॥ परी दोहींचें समाधान ॥ निर्गुणींच पावे जाण ॥ त्या दोहींचें उ
पलक्षण ॥ संक्षेपें श्रीकृष्ण सांगत ॥ ४२ ॥ अगा ओं हें स्मरोंसरे ॥ स्मरतां स्वरेंसि प्राणू प्रणवीं[9] भरे ॥ मग प्रणवूचि तेव्हां स्फुरे ॥ अखं
डाकारें उल्हासतू ॥ ४३ ॥ जेथूनि अक्षरें उपजती ॥ शब्द वदोनि जेथ समावती ॥ मग जे उरे जाण ती स्फूर्ती ॥ प्रणवू निश्चितीं त्या

---

१ संकटांत. २ दोन्प्रकारचें. ३ पंचरात्रागमांत सांगितलेलें. ४ मर्यादारहित. ५ कमळाचा देंठ. ६ मूळास आरंभ करून. ७ आवृत्त्या. ८ एक. ९ ओंकारांत.

नांव ॥ ४४ ॥ त्या प्रणवाचेनि आधारें ॥ जिणोनियां साही चक्रें ॥ तो प्रणवू वसूनि धुरे ॥ निजनिर्धारें चालिजे ॥ ४५ ॥ तेथ उद्घाट
शक्तीचा लोट ॥ वैराग्याचा नेटपाट ॥ जिणोनि काकीमुखाची वाट ॥ सवेगें त्रिकूट घेतलें ॥ ४६ ॥ तेव्हां अनुहताच्या घायीं ॥ निशाण
लागलें पाही ॥ तंव पुढील जे योगभुयी ॥ तेआपैती पाही होंसरली ॥ ४७ ॥ तेथें हरिखें अतिउद्भट ॥ औट पीठ आणि गोलाट
॥ तेहि जिणोनियां वाट ॥ घडघडाट चालिला ॥ ४८ ॥ मागील ठेली आठवण ॥ झाली विकल्पाची बोळवण ॥ सत्रांवी वोळली
जाण ॥ स्वानंदजीवन जीवाचें ॥ ४९ ॥ ते सहस्रदळाचे पाट ॥ वरूनि उतरले घडघडाट ॥ स्वानंदजीवनानिकट ॥ नीट वाट पैं आले
॥ ४५० ॥ तें सेवितां संतोषें पाणी ॥ निवली संतप्त अवनी[3] ॥ इंद्रियांची पुरली धणी ॥ गुणांची त्रिवेणी बुडाली ॥ ५१ ॥ तंव भ्रमर
गुंफे आंत ॥ जीवशिवांचा एकांत ॥ तेणें जीवपणाचा प्रांत ॥ वृत्तिसी घात होंसरला ॥ ५२ ॥ तेथ शिवशक्तिसंयोग ॥ निजऐक्यें झाला
चांग ॥ परमानंदें कोंदलें अंग ॥ सुखाचा सुखभोग सुखरूप झाला ॥ ५३ ॥ तेव्हां हेतु मातु दृष्टांतू ॥ खुंटली वेदवादाची मातू ॥
झाला मीतूंपणाचा प्रांतू ॥ एकला एकांतू एकत्वें ॥ ५४ ॥ तें एकलेपणाचें एक ॥ ह्मणावया ह्मणतें नाहीं देख ॥ ऐसे योगबळें जे नेटक
॥ माझें निजसुख पावले ॥ ५५ ॥ हे योगमार्गींची वाट ॥ अति अवघड परमकष्ट ॥ थोर विघ्नांचा कडकडाट ॥ प्राप्ति अवचट[6] एखाद्या
॥ ५६ ॥ तैसा नव्हे माझा भक्तिपंथू ॥ तेथ नाहीं विघ्नाचो मातू ॥ भक्तांसिही हाचि ठावो प्राप्तू ॥ ऐक तेही मातू मी सांगेन ॥ ५७ ॥
मूळीं योग हा नाहीं स्पष्ट ॥ ह्मणाल कैंचें काढिलें कचाट ॥ पदबंधाची चुकली वाट ॥ वृथा वटवट न ह्मणावी ॥ ५८ ॥ येच श्लोकीं
देवो बोलिला ॥ मासादर्वाक् प्राणजयो जाहला ॥ यांतू ध्वनितू योग बोलिला ॥ तो म्यां केला प्रकटार्थ ॥ ५९ ॥ जेथ प्राणापानजयो
झाला ॥ तेथ महायोगू हा भागा आला ॥ हा योगू शास्त्रार्थ बोलिला ॥ विशद केला आकुलागमीं ॥ ४६० ॥ प्राणापानजयो झाला
पहाहो ॥ जैसा साधकाचा भावो ॥ सगुणनिर्गुण उपावो ॥ प्राप्ती ठावो सहजेंची ॥ ६१ ॥ प्राणापानजयोप्राप्ती ॥ सगुण उपासनास्थिती
॥ तद्द्वारां निर्गुणप्राप्ती ॥ उद्धवाप्रती हरि बोले ॥ ६२ ॥ कशासारिखें तुझें ध्यान ॥ ऐसा उद्धवें केला प्रश्न ॥ यालागीं सांगोनियां
सगुण ॥ सवें निर्गुण संस्थापी ॥ ६३ ॥ मत्स्य साधावया बडिशें जाण ॥ चित्त साधावया मूर्त्ति सगुण ॥ तेचि मूर्त्तीचें सगुण
ध्यान ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ६४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ हृत्पुंडरीकमंतस्थमूर्ध्वनालमधोमुखम् ॥ ध्यात्वोर्ध्वमुखमुन्निद्रमष्टपत्रं सकर्णिकम्
॥ ३६ ॥ ॥ टीका ॥ ॥ जैसें केळीचें कमळ[10] ॥ तैसें हृदय अष्टदळ ॥ अधोमुख ऊर्ध्वनाळ ॥ अतिकोमळ लसलसित ॥ ६५ ॥ धरोनि

---

१ जीवनकळा. २ पाझर. ३ भूमि. ४ संगम. ५ गोष्टी. ६ कदाचित. ७ अडचण. ८ त्याच्या द्वारानें. ९ गळ. १० केळफूल.

प्राणायामाचें बळ ॥ ऊर्ध्वमुख हृदयकमळ ॥ विकसित करावें अष्टदळ ॥ ध्यानें प्रबळ ध्यातां पैं ॥ ६६ ॥ तेथ ऊर्ध्वमुख अधोनाळ ॥
ध्याना आलिया हृदयकमळ ॥ अति उन्निद्र[1] अष्टदळ ॥ ध्यानीं[2] अचंचळ स्थिरावल्या ॥ ६७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कर्णिकायां न्यसेत्सूर्यसो
माग्नीनुत्तरोत्तरम् ॥ वह्निमध्ये स्मरेद्रूपं ममैतद्ध्यानमंगलम् ॥ ३७ ॥ ॥ टीका ॥ ॥ कर्णिकेमाजी चंद्रमंडळ ॥ ध्यावें सोळाकळीं अविकळ
॥ त्याही माजी सूर्यमंडळ ॥ अतिसोज्ज्वळ बाराकळीं ॥ ६८ ॥ त्याहीमाझी वह्निमंडळ ॥ वह्निकळीं अतिजाज्वल्य ॥ ते अग्निमंडळीं
सुमंगल ॥ ध्यावी सोज्ज्वळ मूर्ति माझी ॥ ६९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ समं प्रशांतं सुमुखं दीर्घचारुचतुर्भुजम् ॥ सुचारुसुंदरग्रीवं सुकपोलं
शुचिस्मितम् ॥ ३८ ॥ समानकर्णविन्यस्तस्फुरन्मकरकुंडलम् ॥ हेमांबरं घनश्यामं श्रीवत्सश्रीनिकेतनम् ॥ ३९ ॥ ॥ टीका तेंचि माझे
मूर्तीचें ध्यान ॥ उद्धवा ऐक सावधान ॥ आपुले मूर्तीचें आपण ॥ ध्यान श्रीकृष्ण सांगत ॥ ४७० ॥ अतिदीर्घ ना ठेंगणेपण ॥ सम अवयव
समान ठाण ॥ सम सपोष[3] अतिसंपूर्ण ॥ मूर्त्ति सुलक्षण चिंतावी ॥ ७१ ॥ मूर्त्ति चिंतावी संमुख ॥ प्रसन्नवदन आणि सुरेख ॥
जिचें देखतांचि मुख ॥ हृदयीं हरिखें[4] कोंदाटे ॥ ७२ ॥ जैशी विशाळ कमळदळें ॥ तैसे आकर्णांत दोनी डोळे ॥ भंवया रेखिल्या काजळें
॥ तैशी रेखा धनुष्याकृती ॥ ७३ ॥ कपाळ मिरवत सांवळें ॥ त्याहीवरी चंदन पिंवळें ॥ माजी कस्तूरीचीं दोनीं अंगुळें ॥ कुंकुममेळें अक्षता
॥ ७४ ॥ दीर्घ नासिक आणि कपाळें ॥ लखलखित गंडस्थळें ॥ मुख सुकुमार कोंवळें ॥ अधरें[5]प्रवाळें आरक्त ॥ ७५ ॥ श्याम[6]चंद्राची
सपोष कोर ॥ तैशी चुबुकें[7] अतिसुंदर ॥ मुख निमासुरें मनोहर ॥ भक्तचकोरचंद्रमा ॥ ७६ ॥ जैशा हिरियाच्या ज्योती ॥ कीं दाळिंबबीजांची
दीप्ती ॥ तैशी मुखामाजी दंतपंक्ती ॥ दशन झळकती बोलतां ॥ ७७ ॥ समानकर्ण दोनी सधर ॥ स्फुरत कुंडलें मकराकार[8] ॥
ईषि[9]त हास्य मनोहर ॥ ग्रीवा सुंदर कंबु[10] जैशी ॥ ७८ ॥ कंठींची त्रिवळी उभवणी ॥ माजीं मिरवे कौस्तुभमणी ॥ ते प्रकाशली दीप्ती
कवणगुणीं ॥ तेजें दिनमणी[11] लोपला ॥ ७९ ॥ भुजंगाकार स्वभावो ॥ चतुर्भुज आजानु[12] बाहो ॥ विशाळ वक्षस्थळनिर्वाहो ॥ श्रीवत्स
पहाहो चिह्नित ॥ ४८० ॥ श्रीवत्स श्रीनिकेतन ॥ हृदयीं दोहीं भागीं जाण ॥ त्रिवळीयुक्त उदर गहन ॥ दामोदरें[13]चिह्न त्या आलें
॥ ८१ ॥ विद्यु[illegible]ळपे तैसा पिंवळा ॥ लखलखित दिसे डोळां ॥ तेवीं कासिला[14] सोनसळा ॥ तेणें घनसांवळा शोभत ॥ ८२ ॥ जैसें चांदिणें
गगनामाझारीं ॥ शुभ्रता बैसे श्यामतेवरी ॥ तेवीं श्यामांगीं चंदनाची भुरी ॥ तेणें श्रीहरी शोभत ॥ ८३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शंखच

---

१ विकसित. २ एकाग्रमनानें. ३ पुष्ट. ४ आनंद. ५ ओंठ-हेंच पोंवळें. ६ शुक्लपक्षांतील द्वितीयेच्या चंद्राची. ७ ओंठ व हनुवटीच्या मधील भाग. ८ मत्स्याच्या आकाराचीं. ९ किंचित्. १० शंख. ११ सूर्य. १२ गुडघ्यापर्यंत. १३ यशोदेनें दाव्यांनीं बांधल्याचें चिन्ह. १४ कमरेला.

कगदापद्मवनमालाविभूषितम् ॥ नूपुरैर्विलसत्पादं कौस्तुभप्रभया युतम् ॥ ४० ॥ द्युमत्किरीटकटककटिसूत्रांगदायुतम् ॥ सर्वांगसुंदरं हृद्यं प्रसादसुमुखेक्षणम् ॥ ४१ ॥ टीका ॥ ॥कौस्तुभासि सँल्लग्न गळा ॥ आपाद[1] रुळे वनमाळा ॥ कटीं बाणली रत्नमेखळा ॥ किंकिणीजाळमाळा संयुक्त ॥ ८४ ॥ करकंकणें बाहुअंगदें ॥ शंखचक्रपद्मगदादि आयुधें ॥ जडितमुद्रिका नानाछंदें ॥ कराग्रीं विनोदें बाणल्या ॥ ८५ ॥ नाभी सखोल निर्मळ ॥ जेथ ब्रह्मा झाला पोटिचें बाळ ॥ जें लोकपद्माचें समूळमूळ ॥ तें नाभिकमळ हरीचें ॥ ८६ ॥ जैसे सचेतन मर्गजस्तंभ ॥ तैसे घोंटीव साजिरे स्वयंभ ॥ उभयचरणांची अभिनवशोभ ॥ हरीअंगीं स्वयंभ शोभती ॥ ८७ ॥ ध्वज वज्र अंकुश देखा ॥ यवांकित ऊर्ध्वरेखा ॥ पद्मचक्रादि सामुद्रिका ॥ चरण नेटका हरीचा ॥ ८८ ॥ त्रिकोण कांतीव इंद्रनीळीं ॥ तैशीं साजिरीं घोंटीव सांवळीं ॥ पाउलें सुकुमारें कोंवळीं ॥ आरक्त तळीं पदप्रभा ॥ ८९ ॥ पाउलावरी सांवळी प्रभा ॥ तळवातळीं आरक्त शोभा ॥ जेवीं संध्याराग[2] मीनला नभां ॥ तैशी शोभा हरिचरणीं ॥ ४९० ॥ नभमंडळीं चंद्ररेखा ॥ तैशी प्रपदाग्रीं मांडणी नखा ॥ पोटऱ्या सुकुमार नेटका ॥ जंघा सुरेखा जानुद्वय ॥ ९१ ॥ अतिशयें माजु साना ॥ होता अभिमान पंचानना ॥ मध्य देखोनि जगजीवनां ॥ लाजोनि रानां तो गेला ॥ ९२ ॥ अद्यापि तो झाला अरण्यवासी ॥ लाजा मुख न दाखवी कोणासी ॥ पहावया हरिमध्यासी ॥ लेप[3] मेखलेसी तो झाला ॥ ९३ ॥ चरणीं नूपुरांचा गजर ॥ वांकीतोडरांचा झणत्कार ॥ मस्तकीं कुटिलालकभार[4] ॥ सुमनीं कबर[5] शोभत ॥ ९४ ॥ नानारत्नीं अतिगहन ॥ मस्तकीं मुकुट देदीप्यमान ॥ सर्वांगीं सुलक्षण ॥ मूर्ति संपूर्ण हरीची ॥ ९५ ॥ जे मूर्तीची धरिल्या सोये ॥ तहान भूक विसरोनि जाये ॥ जे ध्यानीं आतुडल्या पाहे ॥ सुखाचा होय सुदिन ॥ ९६ ॥ सर्वांगसुंदर श्याम वर्ण ॥ ज्येष्ठ वरिष्ठ गंभीर गहन ॥ सुमुख आणि सुप्रसन्न ॥ मूर्तीचें ध्यान करावें ॥ ९७ ॥ ॥श्लोक॥ ॥सुकुमारमभिध्यायेत्सर्वांगेषु मनो दधत् ॥ इंद्रियाणींद्रियार्थेभ्यो मनसाकृष्य तन्मनः ॥ बुद्ध्या सारथिना धीरः प्रणयेन्मयि सर्वतः ॥ ४२ ॥ तत्सर्वव्यापकं चित्तमाकृष्यैकत्र धारयेत् ॥ नान्यानि चिंतयेद्भूयः सुस्मितं भावयेन्मुखम् ॥ ४३ ॥ ॥ टीका ॥ ॥ झणी दृष्टीचा रुपेल न्याहारू ॥ लागतां खुपेल चंद्रकरू ॥ तैशी मूर्ति ध्यावी सुकुमारू ॥ अति अरुवारू ध्याननिष्ठा ॥ ९८ ॥ इंद्रियार्थीं अतिलोलुप[6] ॥ तें वैराग्यें अवरोनि चित्त ॥ माझे ध्यानीं सुनिश्चित ॥ बुद्धिमंत लाविती ॥ ९९ ॥ विषयीं आवरोनि मन ॥ अखंड करितां माझें ध्यान ॥ मद्रूपचि होय जाण ॥ ऐसें चिंतन करावें ॥ ५०० ॥ चिंतनीं बिचकतां मन ॥ सविवेक बुद्धिबळें जाण ॥ निःशेष करितां माझें स्मरण ॥ धारणेवीण ध्यान ठसावें ॥ १ ॥

---

१ पाउलापर्यंत. २ संध्याकाळीं लालपणा. ३ गर्व. ४ कुरळकेशांचें ओझें. ५. केशबंधविशेष. ६ अत्यासक्त.

धारणा जरी तुटोनि जाये ॥ ध्यानठसा नतुटत राहे ॥ मन मूर्तीच्याठायीं पाहें ॥ जडलें ठायें सर्वांगीं ॥ २ ॥ अंगप्रत्यंगीं ध्यानयु
क्त ॥ जडोनि ठेलें जें चित्त ॥ तें आवरूनि समस्त ॥ चिंतावें निश्चित हास्यवदन ॥ ३ ॥ सर्वही सांडोनियां जाण ॥ सांगोपांग मूर्ति
ध्यान ॥ चिंतावें गा हास्यवदन ॥ स्वानंदघन हरीचें ॥ ४ ॥ अंग प्रत्यंग मूर्त्तिध्यान ॥ पुढती न करावेंचि गा जाण ॥ ध्यातां माझें हा
स्यवदन ॥ तल्लीन मन करावें ॥ ५ ॥ उद्धवें केला होता प्रश्न ॥ कशासारिखें तुझें ध्यान ॥ तें सांगोनियां जाण ॥ यदात्मलक्षण हरि
बोले ॥ ६ ॥ ध्यानां आलें जें हास्यवदन ॥ त्यांतूनही सांडोनि वदन ॥ केवळ हास्याचें करावें ध्यान ॥ हास्यामाजी मन घालूनी ॥७॥
त्याही हास्याचें सांडूनि ध्यान ॥ हास्यामाजी जो आनंदघन ॥ तेथ प्रवेशवावें मन ॥ अतिसावधान निजनिष्ठा ॥ ८ ॥ ते आनंदीं
आनंदयुक्त ॥ जाहलिया आपुलें चित्त ॥ आनंदाची उपलब्धि तेथ ॥ होय सुनिश्चित साधकां ॥ ९ ॥ ॥श्लोक॥ ॥तत्र लब्धपदं चित्त
माकृष्य व्योम्नि धारयेत् ॥ तच्च त्यक्त्वा मदारोहो न किंचिदपि चिंतयेत् ॥ ४४ ॥ ॥टीका॥ ॥जाहलिया आनंदपद प्राप्त ॥ चिदाकाश
चि दिसे समस्त ॥ ते चिदाकाशीं चित्त ॥ अतिसावचित्त ठेवावें ॥ ५१० ॥ तेव्हां चिदाकाश चित्त चिंतन ॥ हेंही सांडूनि त्रिविध भेद
ध्यान ॥ जो मी परमानंद परिपूर्ण ॥ भेदशून्य चिदात्मा ॥ ११ ॥ तेथें वृत्ति करूनि निमग्न ॥ सांडावें चिदाकाशाचेंही ज्ञान ॥ तेव्हां ज्ञे
य ज्ञाता ज्ञान ॥ हेंही स्फुरण स्फुरेना ॥ १२ ॥ ॥श्लोक॥ ॥ एवं समाहितमतिर्मामेवात्मानमात्मनि ॥ विचष्टे मयि सर्वात्मन् ज्योतिर्ज्योति
षि संयुतम् ॥ ४५ ॥ ॥टीका॥ ॥यापरी साधकांची निजवृत्ती ॥ माझ्या स्वरूपीं मीनल्या स्वरूपस्थिती ॥ तेव्हां मीपणाची स्फुरे जे
स्फूर्ती ॥ तेही अद्वैतीं विराली ॥ १३ ॥ तेथें मीतूंपणाचा भास ॥ यापरी निमालों निःशेष ॥ माझें परमानंद निजसुख ॥ अद्वैत देख कों
दलें ॥ १४ ॥ जेवीं ज्योतिसि मीनल्यां ज्योती ॥ दोहींची होय एकचि दीप्ती ॥ तेवीं जीवचैतन्यांची स्फूर्ती ॥ अद्वैतसुखप्राप्ती समरसें
॥ १५ ॥ कोटि स्नेहसूत्रें मांडिती ॥ तेणें कोटिदीप नामाभिव्यक्ती ॥ ते कोटिदीपीं एक दीप्ती ॥ तेवीं जीव अद्वैतीं चिन्मात्र ॥ १६ ॥ दे
हेंद्रिय उपाधिवशें ॥ जीवासि भिन्नत्व आभासे ॥ अद्वैतबोधसौरसें ॥ जीव प्रवेशे सुखस्वरूपीं ॥ १७ ॥ तेव्हां एक परमसुख ॥ हेंही
ह्मणतें नाहीं देख ॥ एकाकी एकलें एक ॥ सुखेंसि निजसुख कोंदलें ॥ १८ ॥ जेवीं साखरें साखर चाखित ॥ कीं उदकीं उदक स्नान
करित ॥ होकां घृत जाहलें घृताआंत ॥ सुनिश्चित सुवासा ॥ १९ ॥ यापरी माझी ध्यानस्थिती ॥ साधकां जाहली परमप्राप्ती ॥ तेचि उपसंहारें
श्रीपती ॥ उद्धवाप्रती सांगत ॥ ५२० ॥ ॥श्लोक॥ ॥ध्यानेनेत्थं सुतीव्रेण युंजतो योगिनो मनः ॥ संयास्यत्याशु निर्वाणं द्रव्यज्ञानक्रि

---

१ हांसत मुख. २ तत्पर. ३ मोठ्या सावधगिरीनें. ४ स्मरण. ५ नष्ट झाला. ६ मिळाल्यावर. ७ निमित्तामुळें. ८ शेवटीं.

याभ्रमः ॥ ४६ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे चतुर्दशोऽध्यायः॥ १४॥ ॥टीका॥ ॥यापरी तीव्रध्यानस्थिती ॥ समाधिपर्यंत माझी प्राप्ती ॥ साधकासी होय शीघ्रगती[1] ॥ यथानिर्गुतीं[2] ध्यान करितां ॥ २१ ॥ हें माझें ध्यान उत्तमोत्तम ॥ सर्वदा ठसावलें जैं निःसीम ॥ तैं अधिभूत अधिदैव अध्यात्म ॥ हा त्रिविध[3] भ्रम उरोंनेदी ॥ २२ ॥ विषयीं विषयो विषय संभ्रम ॥ ज्ञेय ज्ञाता ज्ञानोपक्रम ॥ कर्म कर्ता क्रियाभ्रम ॥ यांचें रूपनाम उरोंनेदी॥ २३॥ तेथ ध्येय ध्याता ध्यान ॥ दृश्य द्रष्टा[4] आणि दर्शन ॥ मन मंता[5] आणि मनन ॥ यांचें समूळ भान उच्छेदी ॥ २४॥ देवो देवी देवता ॥ भज्य भजन भजता ॥ लक्ष्य लक्षण लक्षिता ॥ हेही कथा नुरेची ॥ २५ ॥ तेथ योग्यतेशी महायोगू ॥ समाधिसुखाचा सुखभोगू॥ जीवशिवांचा निजसंयोगू ॥ हाही उपयोगू उडाला ॥ २६ ॥ तेथें बोध कैंचा कैंची बोधकता ॥ कैंची बद्धता आणि मुक्तता ॥ ब्रह्मनाम हेही वार्ता ॥ जाण सर्वथा बुडाली ॥ २७ ॥ सच्चिद आणि आनंद ॥ या नांवाचा जो प्रवाद ॥ तो मज मायावी[6] संबंध ॥ ऐक तोही विशद[7] विभाग ॥ २८ ॥ असंताचे व्यावृत्तीं ॥ संत मातें ह्मणती श्रुती ॥ करितां जडाची समाप्ती ॥ चिन्मात्र ह्मणती मजलागीं ॥ २९ ॥ तोडितां दुःखाचा संबंधू ॥ मातें ह्मणती परमानंदू ॥ एवं सच्चिदानंदप्रवादू ॥ हा विपरीत बोध विद्येचा ॥ ३० ॥ जेथ असंतचि नाहीं ॥ तेथ संत ह्मणणें घडे कायी ॥ समूळ अज्ञानचि जेव्हां नाहीं ॥ तेव्हां सन्मात्र हेंही ह्मणे कोण ॥ ३१ ॥ जेव्हां दुःखाचा लेशू नाहीं ॥ तेव्हां सुख ह्मणावें कोणे ठायीं ॥ यालागीं नामरूप मज पाही ॥ ठेवितां ठायीं तुकेना ॥ ३२ ॥ समूळ उडे त्रिपुटीचें भान ॥ या नांव गा तीव्रध्यान ॥ माझें करूनियां भजन ॥ निजसमाधान पावले ॥ ३३ ॥ एवं माझेनि ध्यानप्रकारें ॥ संसार उडे चमत्कारें ॥ माझें केवळ स्वरूपचि उरे ॥ निर्जनिर्धारें उद्धवा॥३४॥ तेस्वरूपीं सुख ना दुःख ॥ नाहीं संतासंतांचे लेखें[9] ॥ ज्ञानाज्ञानांची अटक ॥ ते ठायीं देख असेना ॥ ३५ ॥ तेथ नाम रूप गुण ॥ नाहीं मीतूंपणाची खुण ॥ अविद्या अविद्यमान[10]॥ आनंदघन निजरूप ॥३६॥ भक्तिसुखाचे हेलावे ॥ नानाउपायगौरवें॥ उद्धवालागीं देवें ॥ निजानुभवें दीधले ॥ ३७ ॥ ठसावल्या माझी भक्ती ॥ सकळसिद्धींची होय प्राप्ती ॥ संदेह नाहीं येअर्थीं[11] ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ३८ ॥ भजनपंथें निरंतर ॥ दोहोनि भक्तिसुख क्षीर ॥ त्याचेंही मंथोनियां सार ॥ उद्धवासि श्रीधर वदता जाहला ॥ ३९ ॥ तो हा चौदावा अध्यावो ॥ स्वमुखें बोलिला देवो ॥ भक्तीसि मी वश्य पहाहो ॥ येर उपावो तो गौण ॥ ४० ॥ सकळयोगांचें योगगव्हरें[12] ॥ वेदांत निज भांडार ॥ सकळसिद्धींचें परमसार ॥ भक्ति साचार हरीची ॥ ४१ ॥ निजभाग्याची परम जोडी ॥ महासुखाची आवडी

---

१ त्वरित. २ सांगितल्याप्रमाणें. ३ तीनप्रकारचा. ४ पहाणारा. ५ मानणारा. ६ मायेच्या योगानें. ७ स्पष्ट. ८ आपल्या भक्तीनें. ९ अंश. १० नसतां. ११ याविषयीं. १२ आश्रय.

गाढी ॥ सकळगोडियांची गोडी ॥ भक्ति रोकडी हरीची ॥ ४२ ॥ भावें करितां भगवद्भजन ॥ श्वपंच जाहले पावन ॥ जेणें भक्तीशीं विकिलें मन ॥ त्याअधीन सदा देवो ॥ ४३ ॥ उपेक्षूनियां[3] निजमुक्ती ॥ एका जनार्दनीं एव्हढी भक्ती ॥ त्याचेंनि प्रसादें भगवत्प्राप्ती ॥ जाहली अहोरांती[4] खेळणें ॥ ४४ ॥ तो जरी भगवत्प्राप्ती नेघे ॥ तरी ते दाटूनि घर रिघे ॥ ऐसे गुरुभक्तीचेनि योगें ॥ देवो सर्वांगें भूलला ॥ ४५ ॥ भगवत्प्राप्ती पाहिजे ज्यासी ॥ तेणें न विसंबावें सद्भक्तीशीं ॥ अखंड स्मरे जो हरिनामासी ॥ देवो त्यापाशीं तिष्ठत ॥ ४६ ॥ सकळभजनाचे शिरीं ॥ रामनाम दों अक्षरीं ॥ सदा गर्जे ज्याजी वैखरी[6] ॥ धन्य चराचरीं तो एक ॥ ४७ ॥ एका जनार्दना शरण ॥ इतुकें करितां नामस्मरण ॥ पाठिमोरें होय जन्ममरण ॥ महासिद्धी आंगण वोळंगती ॥ ४८ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे एकाकारटीकायां श्रीकृष्णोद्धवसंवादे भक्तिरहस्यावधारणयोगो नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ॥ श्लोक ॥ ॥[illegible] ॥ ओंव्या ॥ ५४८ ॥ एकुणसंख्या ॥ ५९४ ॥ ॥छ॥ ॥छ॥ ॥छ॥ ॥

---

१ एक. २ चंडाल, अतिनीच. ३ अव्हेरून. ४ रात्रंदिवस. ५ इच्छा न करितांच. ६ वाणी.

# अध्याय १५ वा.


श्रीकृष्ण.
उत्धव.
योगी.
अणिमादि अष्ट महासिद्धी.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ओं नमोजी जनार्दन ॥ सकळसिद्धींचें सिद्धस्थान[1] ॥ सकळऋद्धींचें परम निधान[2] ॥ तुझे श्रीचरण सर्वार्थी ॥ १ ॥ निधान साधावया अंजन ॥ नयनीं काळिमा घालिती जन ॥ तेणें काळवंडले नयन ॥ थितें[3] निधान दिसेना ॥ २ ॥ तैसे नव्हती तुझे चरण ॥ करितां चरणरजवंदन ॥ निःशेष काळिमा निरसे जाण ॥ पूर्णनिधान दाविसी ॥ ३ ॥ अंजनें साधितां निधान ॥ तेथ छळावया पावे विघ्न ॥ बळी देऊनि साधिल्या जाण ॥ नश्वरपण[4] तयासी ॥ ४ ॥ हें साधूनियां निधान ॥ झाले सनकादिक संपन्न[5] ॥ नारदाचें उदार पण ॥ येणेंचि जाण वाखाणे ॥ ५ ॥ तैसे नव्हती तुझे चरण ॥ अवलीला करितां स्मरण ॥ नित्य सिद्ध अव्यय जाण ॥ निजनिधान ठसावे ॥ ६ ॥ वज्रकवच प्रह्लादासी ॥ हेंचि भांडवल गांठीसी ॥ शुकादिवामदेवांसी ॥ महिमा येणेंसी पावले ते ॥ ७ ॥ व्यास वाल्मीकि महावेव्हारे[7] ॥ येणेंचि भांडवलें झाले खरे ॥ त्यांचेनि भांडवलें लहान थोरें ॥ छेदूनि दरिद्रें नांदती ॥ ८ ॥ त्या सद्गुरूचे श्रीचरण ॥ परम निधींचें निधान ॥ एका जनार्दना शरण ॥ हें आह्मा परिपूर्ण भांडवल ॥ ९ ॥ येणेंचि भांडवलें प्रस्तुत ॥ प्राप्त झालें श्रीभागवत ॥ तेथ उद्धवासि श्रीअनंत ॥ ज्ञानमथितार्थ सांगत ॥ १० ॥ त्या दोघांची एकांतमातु ॥ प्रकट जाहली जगाआंतू ॥ हा परीक्षितीचा विख्यातू ॥ उपकार लोकांतू थोर झाला ॥ ११ ॥ ज्याचे श्रद्धेच्या आवडीं ॥ शुक पावला लवडसवडी ॥ तेणें गुह्यज्ञानाची गोडी ॥ प्रकट उघडी दाखविली ॥ १२ ॥ त्या शुकाचें नवल महिमान ॥ कानीं न सांगतां गुह्य ज्ञान ॥ श्रवणें तोडोनि भवबंधन ॥ परीक्षिती जाण उद्धरिला ॥ १३ ॥ एथवरी श्रवणाची गोडी ॥ प्रसिद्ध दाविली उघडी ॥ तरी अभाग्यें दांतखिळी पाडिली ॥ कानाची निमटली[9] नुघडी मिठी ॥ १४ ॥ श्रवणीं घालितां वाडेंकोडें ॥ कथासारामृत बाहेरी सांडे ॥ श्रवणीं[10] आतौता थेंब नपडे ॥ यालागीं रडें विषयासी ॥ १५ ॥ असो हे श्रोत्यांची कथा ॥ कथा सांगे जो वक्ता ॥ तोही तैसाचि रिता ॥ बिंदु आतौता पावोंनेदी ॥ १६ ॥ जैसा गुळउंसाचा घाणा ॥ रसु बाहेरी जाये माणा ॥ फिकेपणें करकरी जाणा ॥ ते गती वदना वक्तयाचे ॥ १७ ॥ जें कथामृताचें गोडपण ॥ तें सद्गुरूवीण चोखवी कोण ॥ यालागीं जनार्दना शरण ॥ तेणें गोडपण चाखविलें ॥ १८ ॥ परी चाखविती उणखुण ॥ तेही अभिनव आहे जाण ॥ स्वाद स्वादितां[11] आपण ॥ होऊनि गोडपण चाखवी ॥ १९ ॥ बाळकाहातीं दिधल्या फळा ॥ खावें हें न कळे त्या अबैळा[12] ॥ त्याचे मुखीं घालूनि गळाळा ॥ गोडी जिह्वाळा जनक दावी ॥ २० ॥ गोडी लागल्या बाळकासी ॥ तेंचि फळ खाय अहर्निशीं ॥ तेवीं जनार्दनें आह्मासी ॥ गोडी भागवतासी लाविली ॥ २१ ॥ ऐशी लाविली गोडी ॥ तेणें झाली नवलपरवडी ॥ मज सांडितांही ते गोडी ॥ न सोडी मजलागीं ॥ २२ ॥ ते गोडीनें

---

१ मूलस्थान. २ सांठा. ३ असलेलें. ४ अनित्यता. ५ सुखी. ६ मोठेपण. ७ स्तुत्य उद्योग करणारे. ८ सारांश. ९ मिटून घेतली. १० कानांत. ११ चाखिता. १२ अज्ञास.

गिळिलें मातें ॥ मीपण गेलें गोडीआतौतें ॥ ते गोडीचें उथळलें[1] भरितें ॥ सबाह्य रितें उरों नेदी ॥ २३ ॥ हें शुकमुखींचें श्रेष्ठ फळ ॥ गोडीपणें अतिरसाळ ॥ त्वचाआंठोळीवीण[2] केवळ ॥ गोडीच सकळ फळरूपें ॥ २४ ॥ ते श्रीभागवतींची गोडी ॥ श्रीकृष्णें निजआवडीं ॥ उद्धवासि कडोविकडी ॥ भक्ति चोखडी चाखविली ॥ २५ ॥ करितां माझें भजन ॥ करितां माझे मूर्त्तीचें ध्यान ॥ समाधिपर्यंत समाधान ॥ उद्धवासि संपूर्ण सांगीतलें ॥ २६ ॥ ते कृष्णमुखींची मातू ॥ ऐकोनि चौदाव्या अध्यायांतू ॥ उद्धव हरिखेला[3] अद्भुतू ॥ माझा निजस्वार्थू फावला[4] ॥ २७ ॥ मज कृष्णमूर्तीचें ध्यान ॥ सहजें सदा असे जाण ॥ तेणेंच होय समाधान ॥ तरी कां प्रश्न करूं आतां ॥ २८ ॥ ऐकोनि चौदावा अध्यावो ॥ झाला उद्धवासि हा दृढभावो ॥ हें देखोनि स्वयें देवो ॥ पुढील अभिप्रावो सूचितूं[5] ॥ २९ ॥ दृढविश्वासेंसि जाण ॥ करितां माझें भजन ध्यान ॥ पुढां उपजे सिद्धीचें विघ्न ॥ तेअर्थीं कृष्ण उपदेशी ॥ ३० ॥ पंधरावे अध्यायीं निरूपण ॥ भक्तीं माझें करितां भजन ॥ अवश्य सिद्धि उपजती जाण ॥ त्या त्यागवी[6] विघ्न ह्मणोनी ॥ ३१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ जितेंद्रियस्य युक्तस्य जितश्वासस्य योगिनः ॥ मयि धारयतश्चेत उपतिष्ठंति सिद्धयः ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्राणापानजयो जयासी ॥ इंद्रियजयो असे ज्यासी ॥ यावरी उल्हास[7] मद्भक्तीसी ॥ चित्त अहर्निशीं मद्युक्त ॥ ३२ ॥ उद्धवा गा त्याच्या ठायीं ॥ अनिवार सिद्धी उपजती पाही ॥ येअर्थीं संदेह नाहीं ॥ जेजे समयीं जें इच्छी ॥ ३३ ॥ ऐसें उद्धवें ऐकतां ॥ चमत्कारू झाला चित्ता ॥ समूळ सिद्धींची कथा ॥ श्रीकृष्णनाथा पुसों पां ॥ ३४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धव उवाच ॥ ॥ कया धारणया कास्वित् कथं वा सिद्धिरच्युत ॥ कति वा सिद्धयो ब्रूहि योगिनां सिद्धिदो भवान् ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ॥ कोण्या धारणा कोण सिद्धी ॥ ते सांगावी विधानविधी ॥ संख्या किती सकळसिद्धी ॥ तेंही कृपानिधी[8] सांगिजे ॥ ३५ ॥ या सकळसिद्धींची कथा ॥ तूं एक जाणता तत्त्वतां ॥ ते मज सांगिजे जी अच्युता ॥ तूं सिद्धिदाता योगियां ॥ ३६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ सिद्धयोऽष्टादश प्रोक्ता धारणा योगपारगैः ॥ तासामष्टौ मत्प्रधाना दशैव गुणहेतवः ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ सिद्धि अष्टादश[9] जाण ॥ त्यांचि धारणा भिन्नभिन्न ॥ ऐसें बोलिले योगींद्र[10] ॥ योगसंपन्न महासिद्ध ॥ ३७ ॥ या नांव गा सिद्धि समस्ता ॥ यांत अष्ट[11] महासिद्धि विख्याता ॥ त्या माझे स्वरूपीं स्वरूपस्थिता ॥ आणिकासि तत्त्वतां त्या नाहीं ॥ ३८ ॥ मनसा वाचा कर्मणा जाण ॥ विसरोनि देहाचें देहपण ॥ माझेनि स्वरूपें अतिसंपन्न ॥ चैतन्यघन जो झाला ॥ ३९ ॥ त्यापाशीं या सिद्धि जाण ॥ उभ्या असती हात जोडून ॥ परी तो न पाहे थुंकोन ॥ निचाड जाण यापरी ॥ ४० ॥ इतर

---

१ अतिशय आलें. २ साल कोईवांचून. ३ आनंदला. ४ साधला. ५ सांगतात. ६ टाकाव्यात. ७ उत्सुकता. ८ दयासागरा. ९ अठरा १० योगी. ११ आठ.

दहा सिद्धींची कथा ॥ ज्या गुणात्मकें गुणभूता ॥ साधक शुद्धसत्वात्मा होतां ॥ त्यापाशीं सर्वथा प्रकटती ॥ ४१ ॥ अष्टमहासिद्धींची कथा ॥ तुज मी सांगेन तत्त्वतां ॥ ज्या माझे स्वरूपीं स्वभावतां ॥ असती वर्त्तता अहर्निशीं ॥ ४२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अणिमा महिमा मूर्तेर्लघिमा प्राप्तिरिंद्रियैः ॥ प्राकाम्यं श्रुतदृष्टेषु शक्तिप्रेरणमीशिता ॥ ४ ॥ गुणेष्वसंगो वशिता यत्कामस्तदवस्यति ॥ एता मे सिद्धयः सौम्य अष्टावौत्पत्तिका मताः ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ अणिमा महिमा लघिमास्थिती ॥ या तिन्ही देहसिद्धीचे प्राप्ती ॥ प्राप्तिरिंद्रियें जे वदंती ॥ ते जाण चौथी महासिद्धी ॥ ४३ ॥ प्राकाँम्यश्रुतदृष्टांता ॥ ते पांचवी सिद्धी गा सर्वथा ॥ शक्तिप्रेरण असंगईशिता ॥ हे जाण तत्त्वतां सहावी सिद्धी ॥ ४४ ॥ माझे धर्म जेथ वश होती ॥ ते वशिता बोलिजे सिद्धांतीं ॥ ते सातवी सिद्धी वदंती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ४५ ॥ त्रिलोकीं भोग जो निरुपम ॥ तो न करितां परिश्रम ॥ इच्छामात्रें उत्तमोत्तम ॥ भोग सुगम होंलागे ॥ ४६ ॥ यत्कामस्तदवस्यति ॥ इच्छिल्याकामसुखाची प्राप्ती ॥ त्रिभुवनींची भोगसंपत्ती ॥ एकेच काळें अवचितीं ॥ ते जाण पां त्याती आठवी सिद्धी ॥ ४७ ॥ या अष्टमहासिद्धीची राशी ॥ स्वभावें असे मजपाशीं ॥ साधक शिणतां प्रँयासीं ॥ एखादी कोणासी उँपतिष्ठे ॥ ४८ ॥ हे महासिद्धींची व्युत्पत्ती ॥ इतर दहा ज्या बोलिजेती ॥ त्याही सांगेन तुजप्रती ॥ यथानिंगुतीं उद्धवा ॥ ४९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अनूर्मिमत्त्वं देहेऽस्मिन्दूरश्रवणदर्शनम् ॥ मनोजवः कामरूपं परकायप्रवेशनम् ॥ ६ ॥ स्वच्छंदमृत्युर्देहानां सहक्रीडानुदर्शनम् ॥ यथासंकल्पसंसिद्धिराज्ञाऽप्रतिहता गतिः ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ देहीं बाधिती ना ऊँर्मि साही ॥ ते अनूर्मिसिद्धी पहिली पाही ॥ दूरली वाचा एके ठायीं ॥ दूँरश्रवण नवाई दुसरी सिद्धी ॥ ५० ॥ त्रिलोकींचा सोहळा ॥ बैसले ठायीं देखे डोळां ॥ हे तिसरे सिद्धीची लीला ॥ दूरदर्शन कळा ती नांव ॥ ५१ ॥ मनोजवसिद्धि ऐशी आहे ॥ कल्पिल्या ठायासी पाहे ॥ मनोवेगें शरीर जाये ॥ चौथी होये हे सिद्धी ॥ ५२ ॥ कामरूपसिद्धीची परी ॥ जैशिया रूपाची काँमना करी ॥ तैसें रूप तत्काळ धरी ॥ हे पांचवी खरी कामनासिद्धी ॥ ५३ ॥ आपुलें शरीर ठेवूनि दूरी ॥ परशरीरीं प्रवेश करी ॥ हे परकायप्रवेशपरी ॥ सहावी साजिरी अतिसिद्धी ॥ ५४ ॥ काळासि वश्य नाहीं होणें ॥ आपुलिये इच्छेनें मरणें ॥ हे सातवी सिद्धि जाणणें ॥ स्वच्छंदमरणें ती नांव ॥ ५५ ॥ स्वर्गीं देवांचें जें क्रीडन ॥ त्याचें हा देखे दर्शन ॥ राजाही आ स्वयें क्रीडावया अंगवँणं ॥ ते सिद्धि जाण आठवी ॥ ५६ ॥ जैसा संकल्प तैसी सिद्धी ॥ ते नववी जाण पां त्रिशुद्धी ॥

---

१ केवळ सत्वरूप. २ इंद्रियांसह त्यांत्या विषयाची प्राप्ति. ३ परलोकांतील अदृश्यविषयांचेंही ज्ञान होणें ४ मोठ्या श्रमानें ५ प्राप्त होते. ६ यथास्थित. ७ क्षुत् पिपासा इत्यादि. ८ लांबचें ऐकूं येणें. ९ इच्छा. १० सामर्थ्य.

ज्ञा शिरीं वंदी ॥ ज्याची गमनसिद्धी सर्वत्र ॥ ५७ ॥ जीस आज्ञा आणि गमन ॥ कोठेंही अवरोधेना जाण ॥ हें दहावे सिद्धीचें लक्षण ॥ ज्ञानवि[1]चक्षण जाणती ॥ ५८ ॥ या गुणहेतुसिद्धींची विधी ॥ म्यां सांगीतली हे त्रिशुद्धी ॥ यांहीहोनि क्षुद्रसिद्धी ॥ त्याही निजबुद्धीं अवधारी ॥ ५९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ त्रिकालज्ञत्वमद्वंद्वं परचित्ताद्यभिज्ञता ॥ अग्न्यर्कांबुविषादीनां प्रतिष्टंभोऽपराजयः ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ ॥ क्षुद्रसिद्धि पंचलक्षण ॥ भूत भविष्य वर्तमान ॥ या त्रिकाळांचे जें ज्ञान ॥ तें पहिलें जाण ये ठायीं ॥ ६० ॥ सुख दुःख शीत उष्ण ॥ मृदु आणि अति कठिण ॥ या द्वंद्वांसि वश नव्हे जाण ॥ तें दुसरें लक्षण सिद्धीचें ॥ ६१ ॥ पराचें स्वप्न स्वयें सांगणें ॥ पुढिलांचें[2] चित्तींचें जाणणें ॥ हे तिसरी सिद्धि ह्मणणें ॥ ऐक लक्षणें चौथीचीं ॥ ६२ ॥ अग्नि वायु आणि उदक ॥ शस्त्र विष आणि अर्क ॥ यांचें प्रतिस्तंभन देख ॥ ते सिद्धि निष्टंक हे चौथी ॥ ६३ ॥ कोणासि जिंकिला नवचे पाहे ॥ जेथिंचा तेथ विजयी होये ॥ एकला सर्वत्र विजयो लाहे ॥ हे पांचवी आहे विजयसिद्धी ॥ ६४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एताश्चोद्देशतः प्रोक्ता योगधारणसिद्धयः ॥ यया धारणया या स्याद्यथा वा स्यान्निबोध मे ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ उद्देशमात्रें[3] सिद्धींची गती ॥ म्यां सांगीतली तुजप्रती ॥ आतां कोणे धराणे कोणे स्थिती ॥ सिद्धीची प्राप्ती होय ते ऐक ॥ ६५ ॥ अष्टमहासिद्धींची धारणा ॥ गुणहेतु दहा सिद्धि जाणा ॥ क्षुद्रसिद्धि पंचलक्षणा ॥ त्यांचे साधित्या साधना हरि बोले ॥ ६६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भूतसूक्ष्मात्मनि मयि तन्मात्रं धारयेन्मनः ॥ अणिमानमवाप्नोति तन्मात्रोपासको मम ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ अष्टमहासिद्धि स्वाभाविका ॥ माझ्याठायीं असती देखा ॥ या असाध्य[4] साधावया आवांका ॥ करित्या साधका साधन सांगे ॥ ६७ ॥ मी अणुरेणुंचाही[5] अणुरेणु[6] ॥ जीवाचाही हृदयस्थ जाण ॥ तेथ अणुतन्मात्र करूनि मन ॥ माझ्या ठायीं जाण जो राखे ॥ ६८ ॥ अणुतन्मात्र ध्यान सदा राहे ॥ त्याचा अणुमात्रचि देह होये ॥ कीटकी[7] भृंगींच्या ऐसें पाहे ॥ अणिमेची लाहे तो सिद्धी ॥ ६९ ॥ तो अच्छिद्रीं निघोनि जाये ॥ जगाच्या डोळयामाजी समाये ॥ कोठेंही खुपेना पाहे ॥ अणिमेची लाहे तो सिद्धी ॥ ७० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ महत्यात्मन्मयि परे यथासंस्थं मनोदधत् ॥ महिमानमवाप्नोति भूतानां च पृथक्पृथक् ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ माझें स्वरूप अनंत अपार ॥ महत्तत्त्वाहोनि[8] अतिथोर ॥ आणि महत्तत्त्वाचाही साचार ॥ नियंता ईश्वर जो कांमी ॥ ७१ ॥ ते सिद्धि साधावया जो नर ॥ माझी धारणा धरी अपरंपार ॥ तेवढेंच होय त्याचें शरीर ॥ हे सिद्धि महाथोर महिमान ॥ ७२ ॥ सूक्ष्म कापुसाचे तंतू पाहे ॥ तो कल्पने ऐसा पटू होये ॥ माझी महती धारणा वाहे ॥ तो माझी सिद्धि लाहे महिमत्वें ॥ ७३ ॥ तुकितां[9] त्याच्या

---

१ ज्ञाते. २ दुसऱ्याच्या. ३ त्यात्या अनुसरून. ४ साधण्यास कठीण. ५ सूक्ष्मापेक्षां. ६ सूक्ष्म. ७ एकाजातीचा किडा. ८ महान् यापेक्षां. ९ तुळितां.

समान भारा ॥ नपुरे सं[1]पर्वत संगळी धरा ॥ एवढ्या महत्तत्त्वाचा उभारा ॥ सिद्धिद्वारा तों पावे ॥ ७४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ परमाणुमये चित्तं भूतानां मयि रंजयन् ॥ कालसूक्ष्मार्थतां योगी लघिमानमवाप्नुयात् ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ वाय्वादिप्राणप्रमाण ॥ जेणें काळसूत्राचें गणन ॥ तो परमाणुरूप भगवंत जाण ॥ त्याचेंचि दृढ ध्यान सदा जो करी ॥ ७५ ॥ परमाणुधारणेचा महिमा ॥ त्याच्या देहासि ये अतिलघिमा[2] ॥ तो मस्तकीं चढोनि पाहे मा ॥ उडे व्योमामाँ[3]जी सुखें ॥ ७६ ॥ अणिमादि तिनी धारणा ॥ या देहींच्या सिद्धी जाणा ॥ लहान थोर हळुपणा ॥ हे लक्षणा उपजवी ॥ ७७ ॥ उरल्या ज्या पंचमहासिद्धी ॥ त्यांच्या धारणेचा विधी[4] ॥ तोही सांगेन त्रिशुद्धी ॥ ऐक सुबुद्धी उद्धवा ॥ ७८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ धारयन्मय्यहंतत्त्वे मनो वैकारिकेऽखिलम् ॥ सर्वेंद्रियाणामात्मत्वं प्राप्तिं प्राप्नोति मन्मनाः ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ ॥ मुळींचा शुद्ध अहंकारू ॥ ज्यापासूनि इंद्रियविकारू ॥ इंद्रियअधिष्ठात्रीं सुरवरू ॥ चे[5]तविता ईश्वरू जो कां मी ॥ ७९ ॥ त्या माझ्याठायीं धारणा धरितां ॥ इंद्रियअधिष्ठात्री देवता ॥ त्यासि पावोनि एकात्मता ॥ इंद्रियप्रकाशता स्वयें लाहे ॥ ८० ॥ जे कां इंद्रियव्यापार जगाचे ॥ प्रकाशूनि हा देखे साचे ॥ एवढिये इंद्रियप्राप्तीचें ॥ साधी सिद्धीचें वैभव ॥ ८१ ॥ तेव्हां ज्याचा जो जेथ पाहे ॥ इंद्रियांचा व्यापारू होये ॥ तो येणेंचि केला आहे ॥ ऐशी प्र[6]तीति होये इंद्रियप्राप्ती ॥ ८२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ महत्यात्मनि यः सूत्रे धारयन्मयि मानसम् ॥ प्राकाश्यं पारमेष्ठ्यं मे विंदतेऽव्यक्तजन्मनः ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ जें महत्तत्त्व गा जाण ॥ तें मायेचें प्रथम स्फुरण ॥ ज्यासि क्रिया सूत्र प्रधान ॥ नामाभि[7]धान बोलती ॥ ८३ ॥ तेथ अजन्मा मी आपण ॥ जाहलों सूत्राचा सूत्रात्म जाण ॥ त्या माझ्या स्वरूपाचें ध्यान ॥ सावधान जो करी ॥ ८४ ॥ ज्या सूत्राचेनि प्रकाश वाहे ॥ ब्रह्मांड हिरण्य प्रकाशला राहे ॥ ते प्रकाशता त्यासि वश्य होये ॥ येणें सूत्रात्मा पाहे निदिध्यासनें[8] ॥ ८५ ॥ त्या निदिध्यासनापोटीं ॥ करूं शके ब्रह्मांडकोटी ॥ एवढी प्रकाश सिद्धि गोमटी ॥ हे मजवीण नुठी साधकां ॥ ८६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विष्णौ त्र्यधीश्वरे चित्तं धारयेत्कालविग्रहे ॥ स ईशित्वमवाप्नोति क्षेत्रक्षेत्रज्ञचोदनाम् ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ मायादित्रिगुणनियंता ॥ जो कळिकाळातें आकळिता ॥ उत्पत्तिस्थितिप्रळयकर्त्ता ॥ जाण तत्त्वतां अंतर्यामी ॥ ८७ ॥ त्या मज विष्णूचें ध्यान ॥ निरंतर जो करी जाण ॥ त्यासि अदृष्टद्रष्टे[9]पण ॥ शक्तिप्रेरण ईशत्वें ये ॥ ८८ ॥ मिथ्या बुद्धिबळाच्या खेळाप्रती ॥ स्वारीची जाणे गतिविगुती ॥ तेवीं मिथ्या संसारप्रतीती ॥ भूतांची आँ[10]गती निर्[11]गती स्वयें जाणे ॥ ८९ ॥ तो जीवादिशरीरप्रेरण ॥ स्वयें करूं शके आपण ॥ करितां अंतर्याम्याचें ध्यान ॥ एवढी सिद्धि जाण उपतिष्ठे ॥ ९० ॥ तो आपुलेनि

---

१ पर्वतासुद्धां. २ अत्यंत सूक्ष्मरूपता. ३ आकाशांत. ४ प्रकार. ५ प्रेरक, क्षोभक. ६ अनुभव. ७ नांवानें. ८ ध्यानयोगानें. ९ न दिसणारी वस्तु पाहतां येणें. १० येणें. ११ जाणें.

प्रतापस्वभावीं ॥ मशकाहातीं मेरु विभांडवी ॥ नीचहस्तें सृष्टि विध्वंसूनि मांडवी ॥ कां इंद्रातें मारवी उंदिराहातीं ॥ ९१ ॥ यापरी ए
कातें मारवी ॥ जीवें गेलिया जीववी ॥ अचेतनातें पालेजंवी ॥ ये सिद्धीची पदवी ईशत्व ॥ ९२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नारायणे तुरीया
ख्ये भगवच्छब्दशब्दिते ॥ मनो मय्यादधद्योगी मद्धर्मा वशितामियात् ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ जीव शिव आणि प्रकृती ॥ यांहूनि
परती चौथी स्थिती ॥ ज्यातें नारायण ह्मणती ॥ जाण निश्चितीं सज्ञान ॥ ९३ ॥ जागृति स्वप्न सुषुप्ती ॥ यावेगळी तुरीय स्थिती ॥
त्यातें नारायण ह्मणती ॥ यथानिगुतीं सज्ञान ॥ ९४ ॥ दृश्य द्रष्टा दर्शन ॥ याअतीत चौथा जाण ॥ त्यातें ह्मणती नारायण ॥ ज्ञानवि
चक्षण निजबोधें ॥ ९४ ॥ त्रिपुटीवेगळी जे मातू ॥ असोनियां त्रिपुटी आंतू ॥ जोकां त्रिपुटीसि अलिप्तू ॥ तो मी विख्यातू नारायण
॥ ९६ ॥ यश श्री वैराग्य ज्ञान ॥ ऐश्वर्य औदार्य हे षड्गुण ॥ नित्य वसती परिपूर्ण ॥ तो मी नारायण भगवंत ॥ ९७ ॥ त्या मज ना
रायणातें ध्यातां ॥ माझी वशिता सिद्धि ये हातां ॥ सर्वकर्मीं अलिप्तता ॥ भोगूनि अभोक्ता भोगातें ॥ ९८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ निर्गुणे
ब्रह्मणि मयि धारयन् विशदं मनः ॥ परमानंदमाप्नोति यत्र कामोऽवसीयते ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ चित्तदेवता सत्त्वगुण ॥ इंद्रियें तो र
जोगुण ॥ विषय केवळ तमोगुण ॥ हेंचि आवरण परमानंदा ॥ ९९ ॥ परमानंदासि आवरण ॥ आडवे असती तिन्ही गुण ॥ त्यांतें
सांडूनि निर्गुण ॥ ब्रह्म परिपूर्ण मज जो ध्याये ॥ १०० ॥ त्यासि माझिये ध्यानास्थितीं ॥ होय परमानंदअवा[३]प्ती ॥ ज्या आनंदामाजी
उपशांती ॥ होय निश्चितीं सकळकामा ॥ १ ॥ झालिया परमानंदप्राप्ती ॥ सकळ काम निमग्न होती ॥ जेवीं सूर्योदयाप्रती ॥ तारा
हारपती सचंद्र ॥ २ ॥ तेवीं परमानंदाच्यापोटीं ॥ हारपती कामकोटी ॥ तेथ इंद्रियसुखाच्या गोठी ॥ लाजोनि उठाउठी विरताती ॥ ३ ॥
उद्धवा ऐक पां निश्चितीं ॥ न[४]व्हतां परमानंदप्राप्ती ॥ कदा नव्हे कामनिवृत्ती ॥ नानायुक्ती करितांही ॥ ४ ॥ या अष्टमहासिद्धीच्या धार
णा ॥ तुज म्यां सांगीतल्या जाणा ॥ यांसि साधावया आंगवणा ॥ सुरनरगणां पैं नाहीं ॥ ५ ॥ यापरी अष्टमहासिद्धी ॥ तुज म्यां सां
गीतली धारणाविधी ॥ आतां गुणहेतुकाचे प्रबोधीं ॥ सावधबुद्धी अवधारी ॥ ६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्वेतद्वीपपतौ चित्तं शुद्धधर्ममये
मयि ॥ धारयन् श्वेततां याति षडूर्मिरहितो नरः ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ ॥ सांडूनि कार्यैंसि रजतमें दूरी ॥ जो मी सत्वाधिष्ठाता श्रीह
री ॥ त्यामाजी जो धारणा धरी ॥ अखंडाकारी सर्वदा ॥ ७ ॥ तो माझेनि सत्वें सत्वतंतू ॥ होय षडूर्मींसि रहितु ॥ शोक मोह जरा
मृत्यु ॥ क्षुधा तृषा हातू लावूं न शके ॥ ८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मय्याकाशात्मनि प्राणे मनसा घोषमुद्वहन् ॥ तत्रोपलब्धा भूतानां हंसो वाचः

---

१ व्यापारयुक्त करितो. २ वेगळा. ३ प्राप्ति. ४ न होतां. ५ सामर्थ्य. ६ सत्वगुणाभिमानी देवता.

श्टणोत्यसौ ॥ १९ ॥ टीका ॥ ॥ सघोषप्राणेंसि शब्दमहिमा ॥ अवस्य विश्रांतीस ये व्योमा ॥ त्या आकाशाचाही मी आत्मा ॥ मज माजी व्योमा[1] रहिवासू ॥ ९ ॥ तो मी सघोषप्राणाचाही प्राण ॥ सकळ वाचांची वाचा जाण ॥ वागीश्वरीचें[2] जीवन ॥ सत्य मी जाण उद्भवा ॥ ११० ॥ ऐसें माझें दृढ ध्यान ॥ निजहृदयीं जो करी जाण ॥ तोचि श्रोता वाचांचें श्रवण ॥ जीवस्वरूपें जाण स्वयें ऐके ॥ ११ ॥ सनाद माझी धारणा पोटीं ॥ धरितां जगाच्या गुह्य गोष्टी ॥ त्याचे पडती कर्णपुटीं ॥ तेकाळीं उठी दूरश्रवणसिद्धी ॥ १२ ॥ ॥ श्लोक ॥ चक्षुस्त्वष्टरि संयोज्य त्वष्टारमपि चक्षुषि ॥ मां तत्र मनसा ध्यायन् विश्वं पश्यति सूक्ष्मदृक् ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ सविता[3] तो मी नारायण ॥ ऐसें डोळ्यांमाजी करी ध्यान ॥ तेव्हां डोळाचि मद्रूप जाण ॥ सविता आपण स्वयें होय ॥ १३ ॥ एवं डोळा सविता हें माझें ध्यान ॥ तिहींस एकात्मता झाल्या जाण ॥ तेव्हां सूक्ष्मद्रष्टा होय आपण ॥ जग संपूर्ण तो देखे ॥ १४ ॥ बैसलेचि ठायीं जाण ॥ चतुर्दशभुवनांचें[4] दर्शन ॥ एके काळें देखे आपण ॥ दूरदर्शन हे सिद्धी ॥ १५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मनो मयि सुसंयोज्य देहं तदनु वायुना ॥ मद्धारणानुभावेन तत्रात्मा यत्र वै मनः ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥ अत्यंत सवेग तें मन ॥ त्या मनाचेंही मी मन जाण ॥ त्या मनासि मजसी अभिन्न ॥ प्राणधारणयुक्त राखे ॥ १६ ॥ ऐसें प्राणधारणयुक्त मन ॥ मजसी राखतां अभिन्न ॥ त्या धारणाप्रभावें जाण ॥ मनोवेगें गमन देहासि होय ॥ १७ ॥ जेथें संकल्पें जाय मन ॥ तेथें होय देहाचेंही गमन ॥ हे मनोजवसिद्धि जाण ॥ धारणालक्षण या हेतू ॥ १८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदा मन उपादाय यद्यद्रूपं बुभूषति ॥ तत्तद्भवेन्मनोरूपं मद्योगबलमाश्रयः ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥ पहिली मनोजवधारणा ॥ त्याही वरी माझी भावना ॥ अचिंत्य सामर्थ्य माझें जाणा ॥ अनुसंधानां[5] जो आणी ॥ १९ ॥ मी नानारूपांतें धरिता ॥ सर्वेंचि रूपांतरें विसृजिता[6] ॥ ऐशी माझी संपूर्ण सत्ता ॥ ते त्याच्या हातां पैं लाभे ॥ १२० ॥ एवं माझिया दृढ धारणा ॥ माझें सामर्थ्य ये त्याच्या मना ॥ मग ज्या रूपाची करी भावना ॥ तद्रूप जाणा स्वयें होय ॥ २१ ॥ सुरनरपन्नगांमाजी जें जें रूप ॥ धरावया करी जो संकल्प[7] ॥ तो तत्काळ गा तद्रूप ॥ हे कामरूप सिद्धीमाजी ॥ २२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ परकायं विशन् सिद्ध आत्मानं तत्र भावयेत् ॥ पिंडं हित्वा विशेत्प्राणो वायुभूतः षडंघ्रिवत् ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ परकायप्रवेशू करितां जाणा ॥ आवरूनि स्वदेहींच्या सर्वप्राणां ॥ जेथ प्रवेश करितां आपणा ॥ तेथ आपुली भावना करावी ॥ २३ ॥ तेव्हां लिंगदेहाचे माथां[8] ॥ जीवप्राणांची एकात्मता ॥ धरोनि देहांतरअहंता ॥ बाह्यवायूच्या पंथीं[9] मिळोनि जाय ॥ २४ ॥ तेथ मिळतांचि मिळवणी ॥ या देहाचा अभि

---

१ आकाश. २ सरस्वतीचें. ३ सूर्य. ४ चवदाभुवनांचें. ५ ध्यान करण्यांत. ६ टाकणारा. ७ मनांत इच्छा. ८ डोक्यावर. ९ मार्गानें.

मान सांडूनी ॥ देहांतरीं प्रवेशोनी ॥ मी ह्मणोनी उठे तेथें ॥ २५ ॥ जैसें कमळींहूनि कमळांतरा ॥ वायुबळें प्रवेशनें भ्रमरा ॥ तैसें सांडोनियां स्वशरीरा ॥ देहांतरा जीवू जाये ॥ २६ ॥ हें परकायप्रवेशन ॥ म्यां सांगीतलें संपूर्ण ॥ माझिया स्वरूपाचें धारण ॥ तें निजलक्षण अवधारी ॥ २७ ॥ दृढ ध्यातां माझे स्वरूपासी ॥ तैं सर्वदेहीं तूंचि आहेसी ॥ न सांडितां निजदेहासी ॥ हा परकायेंसी प्रवेशू ॥ २८ ॥ स्वसत्ता स्वदेह सांडणें ॥ तेचि अर्थीचीं लक्षणें ॥ पुढिले श्लोकीं नारायणें ॥ विशद निरूपणें निरूपिलीं ॥ २९ ॥ ॥ श्लोक ॥ पार्ष्ण्यापीड्य गुदं प्राणं हृदुरःकंठमूर्द्धसु ॥ आरोप्य ब्रह्मरंध्रेण ब्रह्म नीत्वोत्सृजेत्तनुम् ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ देहत्यागाचें प्राणधारण ॥ तेंच स्वच्छंदमृत्यूचें लक्षण ॥ तदर्थीं जें प्राणोत्क्रमण ॥ तें योगधारण अवधारी ॥ १३० ॥ मूळाधारीं वामचरण ॥ टांचेचेनि नेटें जाण ॥ अपानाचें अधोगमन ॥ गुद पीडून राखावें ॥ ३१ ॥ हृदयीं विचरता जो प्राण ॥ त्याचें सदा ऊर्ध्वगमन ॥ तो प्राणायामें आवरून ॥ अधोमुंख जाण करावा ॥ ३२ ॥ अपानाचें ऊर्ध्वगमन ॥ स्वाधिष्ठानपर्यंत जाण ॥ प्राणाचें अधःसंचरण ॥ तेचि चक्रीं जाण जैं घडे ॥ ३३ ॥ तेथ प्राणापानांची बुझावण ॥ त्या चक्रामाजी करी समान ॥ ऐर्स्यें पडिलें आलिंगन ॥ एकात्मता जाण चालिले ॥ ३४ ॥ सांडोनि अपमानाची अधोवाट ॥ प्राणें त्यजिला हृदय कंठ ॥ फोडूनि सुषुम्नेचें कँपाट ॥ ऊर्ध्वमुखें नीट चालिले ॥ ३५ ॥ जीणँतां सुषुम्नेचें घर ॥ भेदिले साही चक्रांचें पदर ॥ उघडूनि काकिमुखाचें द्वार ॥ ब्रह्मरंध्र टाकिलें ॥ ३६ ॥ तेथ पावल्या यथानिगुतीं ॥ या देहाची सांडूनि स्थिती ॥ जो कामभोग वाहे चित्तीं ॥ त्या देहाची प्राप्ती तो पावे ॥ ३७ ॥ वैकुंठ कैलास अमरावती ॥ सार्वभौम चक्रवर्त्ती ॥ जे कामना काँमी चित्तीं ॥ ते पावे गती तत्काळ ॥ ३८ ॥ जरी तो ब्रह्मसायुज्यता वाहे ॥ तरी सांडूनि देहाची सोये ॥ शुद्धब्रह्मधारणा पाहे ॥ तो ब्रह्मचि होये स्वतँःसिद्ध ॥ ३९ ॥ यापरी प्राणधारण ॥ करूनि निवर्त्ते जो जाण ॥ तें स्वच्छंदमृत्यूचें लक्षण ॥ त्या अधीन कळिकाळ ॥ १४० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विहरिष्यन्सुराक्रीडे मत्स्थं सत्त्वं विभावयेत् ॥ विमानेनोपतिष्ठंति सत्त्ववृत्तीः सुरस्त्रियः ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ देवाचे दिव्यभोगीं आसक्त ॥ योगियांचें झाल्या चित्त ॥ ते प्राप्तिलागीं येथ ॥ माझें सत्त्व निश्चित चिंतावें ॥ ४१ ॥ जेणें सत्त्वें म्यां जाण ॥ स्वर्गीं स्थापिले सुरगण ॥ त्या सत्वगुणाचें धारण ॥ निजहृदयीं जाण जो राखे ॥ ४२ ॥ ध्यातां सुरस्त्रियांची कामनिष्ठा ॥ तो पावे सुरस्वर्गींची प्रतिष्ठा ॥ विमानीं चढोनि वरिष्ठा ॥ करी काँमचेष्टा अप्सरांसी ॥ ४३ ॥ ॥ श्लोक ॥ यथा संकल्पयेद्बुद्ध्या यदा वा मत्परः पुमान् ॥ मयि सत्ये मनो युंजंस्तथा तत्समुपाश्नुते ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ॥ संकल्पमात्रें करी

---

१ दुसऱ्याच्या शरीरांत प्रवेश करणें. २ प्राण बाहेर येणें. ३ खालीं तोंड असलेला. ४ द्वार. ५ जिंकल्यावर. ६ इच्छितो. ७ आपोआप. ८ अनंगव्यापार.

समस्त ॥ जो मी सत्यसंकल्प भगवंत ॥ त्या माझे ठायीं चित्त ॥ विश्वासयुक्त जो राखे ॥ ४४ ॥ तो जे जे काळीं जेजे देशीं ॥ जेजे कर्मीं जेजे अवस्थेसी ॥ जेंजें कांहीं वांछी[1] मानसीं ॥ ते संकल्प त्यापाशीं सदा सफळ ॥ ४५ ॥ मी सत्यसंकल्प भगवंत ॥ हृदयीं धरिल्या ध्यानयुक्त ॥ त्याचें जेजे काम कामी[2] चित्त ॥ ते संकल्प प्राप्त होती त्यासी ॥ ४६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यो वै मद्भावमापन्न ईशितुर्वशितुः पुमान् ॥ कुतश्चिन्न विहन्येत तस्य चाज्ञा यथा मम ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो कामीं सर्वांचा नियंता ॥ स्वयें[3] स्वतंत्र तत्त्वतां ॥ त्या माझें ध्यान करितां ॥ मद्भावता[4] उपतिष्ठे[5] ॥ ४७ ॥ मीचि भगवंत सुनिश्चित ॥ ऐसें बोधा आलें यथास्थित ॥ त्याची आज्ञा सुरवर[6] वंदित ॥ पशुपक्षी नुल्लंघित ते आज्ञा ॥ ४८ ॥ जैशी माझी आज्ञा सर्वांपरी ॥ तैशी त्याची आज्ञा चराचरीं ॥ कोणी नुल्लंघिती तिळभरी ॥ हे आज्ञासिद्धि खरी तो लाहे ॥ ४९ ॥ एवं या गुणहेतुसिद्धि दहाही ॥ धारणायुक्त सांगीतल्या पाही ॥ आतां क्षुद्र पंच[7] सिद्धि ज्याही ॥ तुज मी त्याही सांगेन ॥ १५० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मद्भक्त्या शुद्धसत्वस्य योगिनो धारणाविदः ॥ तस्य त्रैकालिकी बुद्धिर्जन्ममृत्यूपबृंहिता ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ ॥ जगाचें उत्पत्तिस्थितिनिधन ॥ सत्यत्वें असे मजआधीन ॥ त्या माझ्या ठायीं करितां भजन ॥ अंतःकरण अतिशुद्ध ॥ ५१ ॥ ते शुद्ध अंतःकरणीं जाण ॥ भूत[8]भविष्य वर्तमान ॥ जगाचें जन्म भोग मरण ॥ हे त्रिकाळज्ञानसिद्धि प्रकटे ॥ ५२ ॥ ॥ श्लोक ॥ अग्न्यादिभिर्न हन्येत मुनेर्योगमयं वपुः ॥ मद्योगश्रांतचित्तस्य यादसामुदकं यथा ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ अतिप्रयास करितां चित्त ॥ मजसी योगातें झालें प्राप्त ॥ तेणें योगें शरीर योगयुक्त ॥ अबाधित महाद्वंद्वीं ॥ ५३ ॥ त्यासि बाधीना शीत उष्ण ॥ मृदु आणिक कठिण ॥ अग्नि लागलियाही जाण ॥ देहदहन नव्हे त्याचा ॥ ५४ ॥ ते अग्निमाजी विश्रांति त्यासी ॥ जेवीं कां जळीं जळचरांसी[9] ॥ अद्वंद्वतासिद्धि ऐसी ॥ साधकासी उपतिष्ठे ॥ ५५ ॥ येचि सिद्धीच्या धारणा ॥ प्रतिष्टंभसिद्धि प्रकटे जाणा ॥ ऐक तिच्याही लक्षणा ॥ जिचे तोडरीं[10] जाणा सकळ बाधा ॥ ५६ ॥ त्यासि बाह्यवायूचेनि झडाडें ॥ बाधकता कदा न घडे ॥ प्राण जिंतोनि आंतुलीकडे ॥ करी रोकडें दासी त्यासी ॥ ५७ ॥ देंठ फेडूनि सुमनसेजे ॥ जेवीं कां सुखें निद्रा कीजे ॥ तेवीं इंगळावरी हा निजे ॥ बाधा नुपजे अग्नीची ॥ ५८ ॥ शीतळजळीं शीतळकाळीं ॥ सिद्ध बुडविल्या कौतुकें[11] जळीं ॥ तो बाहेरी निघावया न तळमळी ॥ जळीं मासोळी जेवीं क्रीडे ॥ ५९ ॥ ग्रीष्मकाळींचें निदाघ उष्ण ॥ त्यामाजी सिद्ध घातल्या जाण ॥ रविकरीं पद्म उल्हास गहन ॥ तैसे लागतां उष्ण टवटवी ॥ १६० ॥ यापरी अर्कबाधकता ॥ त्यासि बाधीना सर्वथा ॥ तैशींच सिद्धासि शस्त्रें लागतां ॥ शस्त्रघाना नातुडे तो ॥ ६१ ॥ आका

---

[1] इच्छा करितो. [2] इच्छितें. [3] स्वतः. [4] मत्सरूपता. [5] प्राप्त होते. [6] ब्रह्मादिक. [7] पांच. [8] झालेलें व होणारें. [9] पाण्यांत राहणाऱ्या प्राण्यांस. [10] पेक्षां कमी. [11] मौजेनें.

शा खोंचूं जातां पाहें ॥ शस्त्रेंसि घावो वायां जाये ॥ तेवीं सिद्धासि न लागती घाये ॥ शस्त्रउपाये सुनाट[1] ॥ ६२ ॥ सिद्धासि दिधलि
या विख ॥ विखही नव्हे त्या बाधक ॥ जेवीं विखकिडे विखीं देख ॥ यथासुखें[2] क्रीडती ॥ ६३ ॥ छाया[3] पर्वतातळीं दडपितां ॥ ते
दाटेना जेवीं पर्वता ॥ तेवीं अग्नि अर्क[4] विष अंबु[5] वातां[6] ॥ सिद्धासि सर्वथा बाधेना ॥ ६४ ॥ ऐकोनि सिद्धींची कथा ॥ उल्हासू
जरी माने चित्तां ॥ तरी माझे प्राप्तीसि तत्त्वतां ॥ सिद्धि सर्वथा बाधक ॥ ६५ ॥ माझें स्वरूप शुद्ध अद्वैत ॥ तेथ सिद्धीचे जे मनोरथ ॥
लोकरंजन[7] समस्त ॥ नाहीं परमार्थ सिद्धींमाजी ॥ ६६ ॥ मागिलेचि श्लोकसंधीं ॥ परचित्ताभिज्ञतेची[8] सिद्धी ॥ ध्वनित सुचविली त्रि
शुद्धी ॥ तिचाही विधी अवधारी ॥ ६७ ॥ तेच श्लोकीं व्याख्यान ॥ करितां भगवंताचें ध्यान ॥ प्रकृतिनियंता आपण ॥ साक्षी जा
ण सर्वांचा ॥ ६८ ॥ ऐसें ईश्वरत्व दृढ ध्यातां ॥ चित्तचालकता ये त्याच्या हातां ॥ तेव्हां चित्ताची अभिज्ञता[9] ॥ स्वभावतां उपतिष्ठे ॥ ६९ ॥
तेव्हां जीवाची स्वप्नावस्था ॥ हा साक्षित्वें देखता ॥ जोजो संकल्प त्याच्या चित्तां ॥ तो स्वभावतां हा जाणे ॥ १७० ॥ जिव्हारींची[10] जे
आवडी मोठी ॥ तो हा अवलीला सांगे गोष्टी ॥ एवढी ये सिद्धीची कसवटी ॥ उठाउठी तो लाभे ॥ ७१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मद्विभूती
रभिध्यायन् श्रीवत्सास्त्रविभूषिताः ॥ ध्वजातपत्रव्यजनैः स भवेदपराजितः ॥ ३० ॥ ॥ टीका ॥ ॥ अपराजयसिद्धीची प्राप्ती ॥ ध्यानां
आणावी माझी मूर्ती ॥ जिचेनि नांवें जयो पावती ॥ जाण निश्चितीं सुरवर ॥ ७२ ॥ चतुर्भुज घनश्याम ॥ शंखचक्रगदापद्म ॥ छत्रा
तपत्र चामरयुग्में[11] ॥ ध्वजीं उत्तम गरुडलांछन ॥ ७३ ॥ रत्नदंडझणत्कार ॥ व्यजन वीजिती सनागर ॥ चरणीं गर्जती तोडर ॥ तोड
रीं अपार हरिख ॥ ७४ ॥ ऐशिये माझे मूर्तीचें ध्यान ॥ जो सर्वदा करी सावधान ॥ तो सर्वत्र विजयी जाण ॥ अभंगपण माझेनी
॥ ७५ ॥ तो माझेनि ध्यानें पाहे ॥ कोणी न मेळवितां साह्ये ॥ एकला सर्वत्र विजयी होये ॥ ऐशी सिद्धि लाहे या निष्ठा ॥ ७६ ॥ जो
मी हृदयीं धरी अजितू ॥ तो सर्वत्र होय अपराजितू ॥ ऐसें सांगोनि भगवंतू ॥ उपसंहारितू सिद्धींतें ॥ ७७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उपासक
स्य मामेवं योगधारणया मुनेः ॥ सिद्धयः पूर्वकथिता उपतिष्ठंत्यशेषतः ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ ॥ म्यां सांगीतल्या ज्या योगधारणा ॥ मज
भजतां त्या भावना ॥ त्यात्या सिद्धि त्यासि जाणा ॥ पूर्वोक्तलक्षणां[12] उपजती ॥ ७८ ॥ अनेकभावना धरितां चित्तीं ॥ त्यात्या धारणे
च्या व्युत्पत्ती ॥ अनेकसिद्धींची होय प्राप्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ७९ ॥ नानायोगधारणाव्युत्पत्ती ॥ न करितां सकळसिद्धींची

---

[1] व्यर्थ.
[2] यथेच्छ.
[3] सावली.
[4] सूर्य.
[5] उदक.
[6] वारा.
[7] लोकांस गोड वाटण्याकरितां.
[8] दुसऱ्याचें मन जाणण्याची.
[9] जाणतेपणा.
[10] मनांतील.
[11] दोन चामरें.
[12] पूर्वीं सांगितलेल्या लक्षणाप्रमाणें.

प्राप्ती ॥ एके धारणेनें होय निश्चितीं ॥ ते मी तुजप्रती सांगेन ॥ १८० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ जितेंद्रियस्य दांतस्य जितश्वासात्मनो मुनेः ॥ मद्धारणां धारयतः का सा सिद्धिः सुदुर्लभा ॥ ३२ ॥ ॥ टीका ॥ ॥ पांचपांच इंद्रियांची जोडी ॥ जाणोनि शमदमपरवडी ॥ उभवूनि वैराग्याची गुढी ॥ प्राणापानवोढी जिंकिल्या ॥ ८१ ॥ विवेकाचेनि बळें जाण ॥ वृत्ति राखोनि सावधानें[1] ॥ सदा करितां माझें मननें[2]॥ मननें मन जिंकिलें ॥ ८२ ॥ यापरी गा साधकासी ॥ धारणा धरोनि मानसीं ॥ मी एक ध्याता अहर्निशीं ॥ सकळसिद्धि दासी त्यासि होती ॥ ८३ ॥ सांडूनि सकळ उपाये ॥ मी एक ध्यानीं धरिल्या पाहे ॥ साधकासि काय उणें आहे ॥ दुर्लभ काये सिद्धीचें ॥ ८४ ॥ माझे भजनें सावकाशीं ॥ सिद्धि प्रकटती साधकासी ॥ त्या सेव्य नव्हती त्यासी ॥ तेंचि हृषीकेशी सांगतू ॥ ८५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अंतरायान्वदंत्येता युंजतो योगमुत्तमम् ॥ मया संपद्यमानस्य कालक्षपणहेतवः ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ अहेतुक करितां माझें भजन ॥ तेणें शीघ्र माझी प्राप्ती जाण ॥ तेथें सिद्धींवरी घालितां मन ॥ आली नागवण[3] मत्प्राप्तीसी ॥ ८६ ॥ ज्यासि विषयभोग लागे गोड ॥ तोचि विषयसिद्धींची वाहे चाड ॥ ज्यासि माझें प्राप्तीचें कोड[4] ॥ तो वांछीना वंड[5] ऋद्धिसिद्धींचें ॥ ८७ ॥ ज्यासि लौकिकीं अतिप्रतिष्ठा ॥ तो सिद्धींच्या सोशी खटपटा ॥ ज्यासि मत्प्राप्तीची निष्ठा ॥ तो वंचेना[6] वाटा सिद्धींच्या ॥ ८८ ॥ पावतपावतां वाराणसी ॥ जो वस्तीसि गेला वेश्यागृहासी ॥ तेथें भुलोनि तिच्या भोगासी ॥ सर्वस्व तियेसी समर्पी ॥ ८९ ॥ इयेपासूनि जीवें प्राणें ॥ सर्वथा वेगळें नाहीं जाणें ॥ ऐसा संकल्प करोनि तेणें ॥ वश्य होणें वेश्येसी ॥ १९० ॥ जंव असे गांठी गांठोडी ॥ तंव ते त्यापाशीं लुडबुडी ॥ निःशेष वेंचलियाँ[7] कवडी ॥ बाहेरि दवडी[8] तत्काळ ॥ ९१ ॥ तो दवडितांही न जाये ॥ निर्लज्ज निःसंग होऊनि राहे ॥ तरी आपणचि सांडोनि जाये ॥ तैस्याचि पाहे महासिद्धी ॥ ९२ ॥ सकळपापांतें निर्दळणें[9] ॥ सकळकुळातें उद्धरणें ॥ तें काशीचें खुंटलें पावणें ॥ वेश्यानागवणें भोगलिप्सा[10] ॥ ९३ ॥ तैसीच सिद्धींचीही कथा ॥ माझे प्राप्तीसि प्रतिबद्धता ॥ माझें ध्यान ज्ञान वैराग्यावस्था ॥ नागवूनि रितीं[11] सांडिती ॥ ९४ ॥ माझे प्राप्तीनिकट जाण ॥ उठे सिद्धींची नागवण ॥ भोगें छळावया मोहकपण ॥ विलंबकारणें[12] मत्प्राप्ती ॥ ९५ ॥ माझें स्वरूप अद्वैतता ॥ तेथें सिद्धींच्या नानावस्था ॥ ते मायेची व्यामोहकता ॥ जाण तत्त्वतां उद्धवा ॥ ९६ ॥ माझे प्राप्तीआड सिद्धींचें विघ्न ॥ हेंचि तुज कळावया विघ्नें[13] ॥ म्यां सर्वसिद्धींचें निरूपण ॥ समूळ संपूर्ण सांगीतलें ॥ ९७ ॥ माझ्याठायीं धरितां ध्यान ॥

---

१ सावध. २ चिंतन. ३ हानि. ४ इच्छा, गरज. ५ थोतांड. ६ जात नाहीं. ७ खर्च झाल्यावर. ८ घालविते. ९ दूर करणें. १० भोगप्राप्तीची इच्छा. ११ उगीच. १२ अवकाश लागण्यास हेतु. १३ कठीण.

एकाग्रता होतां मन ॥ तेथ भोगलिया सिद्धी जाण ॥ करिती नागवण साधका ॥ ९८ ॥ सिद्धीचे प्राप्तीचें कारण ॥ जन्मौषधि मंत्र
तप जाण ॥ कां साधल्या प्राणापान ॥ सकळसिद्धि जाण योगाभ्यासीं ॥ ९९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ जन्मौषधितपोमंत्रैर्यावतीरिह सिद्धयः ॥
योगेनाप्नोति ताः सर्वा नान्यैर्योगगतिं व्रजेत् ॥ ३५ ॥ ॥ टीका ॥ ॥ एकी जन्मास्तव सहज सिद्धी ॥ एकी त्या साधिती औषधी ॥
एकी त्या तपादिमहाविधी ॥ एकी त्या त्रिशुद्धी मंत्रद्वारा ॥ २०० ॥ सर्पासि वायुधारण ॥ मीनासि जळतरण ॥ पक्ष्यासि नभोगमन ॥
हे जन्मसिद्धि जाण स्वाभाविक ॥ १ ॥ हंस निवडी क्षीरनीर[1] ॥ कोकिळेसि मधुर स्वर ॥ चंद्रामृत सेवी चकोर ॥ हे सिद्धि
साचार जन्मास्तव ॥ २ ॥ जन्मास्तव सहज सिद्धी ॥ त्या म्यां सांगीतल्या सुबुद्धी ॥ आतां साधिलिया औषधी ॥ लाभती सिद्धी त्या
ऐक ॥ ३ ॥ श्वेतमांदारीं[2] गजानन ॥ अंगारकचतुर्थीं साधिल्या जाण ॥ सकळ विद्यांचें होय ज्ञान ॥ धनधान्यसमृद्धी ॥ ४ ॥ अजाणवृक्षाची
वोळखण ॥ त्याचीं फळें श्वानमुखें जाण ॥ त्याचें घडल्या क्षीरपान ॥ होय आपण अजरामर ॥ ५ ॥ पिचुमंद नित्य
सेविल्या देख ॥ त्यासि बाधीना कोणी विख ॥ पाताळगरुडाचें प्राशिल्या मुख ॥ त्यासि देहदुःख बाधीना ॥ ६ ॥ पूतिकावृक्षाचे मुळीं ॥
असे महाशक्तीची पुतळी ॥ ते साधल्या अप्सरांचे मेळीं ॥ क्रीडे तत्काळीं साधक ॥ ७ ॥ अनंत औषधी अनंत सिद्धी ॥ त्यांची
साधना कठिण त्रिशुद्धी ॥ तपादिसिद्धीची विधी ॥ ऐक सुबुद्धी उद्धवा ॥ ८ ॥ कृच्छ्र पराक चांद्रायण ॥ आसार[3] जलाशय धूम्रपान[4] ॥
तप करी जेंजें भावून ॥ तेते सिद्धि जाण तो पावे ॥ ९ ॥ ऐक मंत्रसिद्धीचें लक्षण ॥ प्रेतावरी बैसोनि आपण ॥ एकरात्र
केल्या अनुष्ठान ॥ प्रेतदेवता संपूर्ण प्रसन्न होय ॥ २१० ॥ तेणें भूत भविष्य वर्तमान ॥ ते सिद्धि प्राप्त होय जाण ॥ करितां सूर्यमंत्र
विधान ॥ दूरदर्शनसिद्धि उपजे ॥ ११ ॥ जैसा मंत्र जैसी बुद्धी ॥ तैसी त्यास प्रकटे सिद्धी ॥ या सकळसिद्धींची समृद्धी ॥ योगधारणा
विधीमाजी असती ॥ १२ ॥ नेहटूनियां आसना ॥ ऐक्य करोनि प्राणापानां ॥ जो धरी योगधारणा ॥ सकळसिद्धि जाणा तेठायीं
॥ १३ ॥ म्यां सांगीतली सिद्धींची कथा ॥ झालिया प्राणापानसमता ॥ आलिया योगधारणा हातां ॥ तैं सिद्धि समस्ता प्रकटती
॥ १४ ॥ प्राणापान समान करितां ॥ योगधारणाही न धरितां ॥ मज एकांतीं हृदयीं धरितां सिद्धि समस्ता दासी होती
॥ १५ ॥ मज पावावया तत्त्वतां ॥ मज एकांतें स्मरतां ध्यातां ॥ पावो देऊन सिद्धींचे माथां ॥ चारी मुक्ति स्वभावतां[6] दासी होती
॥ १६ ॥ नानासिद्धींची धारणा धरितां ॥ माझी सलोकता समीपता ॥ हातां नये गा सरूपता ॥ मग सायुज्यता ते कैंची ॥ १७ ॥

---

१ दूध व पाणी. २ पांढऱ्या मंदाराखालीं. ३ पावसाच्या धारा. ४ धूर पिणें. ५ दूरचें दिसणें. ६ सहजच.

झे भक्त जाण ॥ कर्म मदर्पण स्वयें करिती ॥ २६० ॥ ऐशीं सर्व कर्में कृष्णार्पण ॥ सर्वदा जो करी जाण ॥ त्याचें मन होय मदर्पण ॥ तेंचि निरूपण देवो सांगे ॥ ६१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवं धर्मैर्मनुष्याणामुद्धवात्मनिवेदिनाम् ॥ मयि संजायते भक्तिः कोऽन्योऽर्थोऽस्याऽवशिष्यते ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ सर्व कर्में मदर्पण ॥ करितां शुद्ध होय मन ॥ जेवीं लोहं[1] कमावितां[2] जाण ॥ होय मदर्पण सोज्ज्वळ ॥ ६२ ॥ पुटीं घालितां सुवर्ण ॥ अधिक तेज चढे जाण ॥ करितां वस्त्राचें क्षाळण ॥ स्वच्छपण धोवटीं ॥ ६३ ॥ तैसी सर्वकर्में मदर्पण ॥ करितां निर्मळ होय मन ॥ तेकाळीं मनाचें अर्पण ॥ मद्रूपीं होंलागे ॥ ६४ ॥ पूर दाटलिया सरितांसी[3] ॥ सवेग ठाकती[4] सिंधूसी[5] ॥ तेवीं निर्मळत्वें मनासी ॥ माझ्या स्वरूपासी पावणें ॥ ६५ ॥ माझे स्वरूपीं मनाची स्थिती ॥ तैं आर्त जिज्ञासु अर्थार्थी ॥ हे तीनही तेकाळीं हारपती ॥ माझी भक्ति चौथी उल्हासे ॥ ६६ ॥ माझें भांडवल मज एक भक्ती ॥ तेथ दुजी तिजी आणि चौथी ॥ हे साधकांची साधनभ्रांती ॥ बहुत भक्ती मज नाहीं ॥ ६७ ॥ तेंचि मुख्य भक्ती ॥ येणें साधनें होय प्राप्ती ॥ जे भक्तीस्तव भक्त ह्मणविती ॥ ब्रह्मा उमापती[6] सनकादिक ॥ ६८ ॥ निःशेष मावळल्या अहंकृती ॥ भूतें निजात्मरूप दिसती ॥ माझ्या स्वरूपाची सहजास्थिती ॥ ते माझी मुख्यभक्ती उद्धवा ॥ ६९ ॥ ये भक्तीच्या लेशस्थितीं ॥ आर्त जिज्ञासु अर्थार्थी ॥ प्रकाशले गा वर्तती ॥ निजस्वार्थी साधक ॥ ७० ॥ हेंचि आर्तांच्या विषयीं ॥ आर्तीतें प्रकाशी पाही ॥ मग आर्तु असे त्याच्या ठायीं ॥ नांवाची नवायी उपतिष्ठे ॥ ७१ ॥ रोगिया नांव आर्तता ॥ हे व्याख्या नव्हे परमार्था ॥ देवप्राप्तीची ती व्यथा ॥ ते आर्तता परमार्थीं ॥ ७२ ॥ जो भगवंताचे प्राप्तीलागीं ॥ कडां घालूं धांवे वेगीं ॥ कां रिघों पाहे जळते आगीं ॥ ते आर्त सवेगीं बोलिजे ॥ ७३ ॥ आर्तांची स्थिति ऐसी ॥ जिज्ञासु वारी[7] त्यासी ॥ मनुष्यदेह ब्रह्मप्राप्तीसी ॥ तो आत्महत्येसी नका योजूं ॥ ७४ ॥ मागील भक्त कोणे रीतीं ॥ जाणोनि पावले भगवद्भक्ती ॥ जीवें भावें त्या विवरी युक्ती ॥ जिज्ञासु निश्चितीं या नांव ॥ ७५ ॥ मज जाणावें ऐशी जे आशा ॥ तीतें ह्मणती शुद्ध जिज्ञासा ॥ तेही प्रकाशक माझ्या प्रकाशा ॥ मी जिज्ञासु ऐसा तेणें जाणे ॥ ७६ ॥ ब्रह्मप्रापक युक्तीचा ठसा ॥ या नांव शुद्ध जिज्ञासा ॥ वेदशास्त्रजाणीववळसा ॥ लौकिकजिज्ञासा त्या नांव ॥ ७७ ॥ सर्वाअर्थीं मीचि अर्थना[8] ॥ शुद्ध अर्थार्थी या नांव जाणा ॥ जाणती अर्थार्थी द्रव्यकामना ॥ ते मंद व्याख्याना प्रवृत्ती ॥ ७८ ॥ दृष्टीं पडे नानाअर्थीं ॥ जो विवंचोनि लावी परमार्थीं ॥ त्या नांव बोलिजे अर्थार्थी ॥ त्यातेंही निजभक्ती प्रकाशे माझी ॥ ७९ ॥ एवं आर्त जिज्ञासु अर्थार्थी ॥ त्यांतें प्रकाशे माझी सहजभक्ती ॥ तीतें भक्त चतुर्धा[9] ह्मणती ॥ अधिकार

---

[1] लोखंड. [2] तयार केलें असतां. [3] नद्यांस. [4] मिळतात. [5] समुद्रास. [6] शंकर. [7] निवारण करितो. [8] मागणें. [9] चारप्रकारची.

स्थितीविभागें ॥ २८० ॥ भक्त कल्पनेचिया भ्रांती ॥ माझी भक्ति चतुर्धा मानिती ॥ ते मिथ्या गा वदंती ॥ माझी निजभक्ती एकली ॥ ८१ ॥ ऐशिये निजभक्तीची प्राप्ती ॥ आत्मनिवेदनाची स्थिती ॥ उद्धवा म्यां तुजप्रती ॥ यथानिगुती निरूपिली ॥ ८२ ॥ माझिये निजभक्तीचें सार ॥ भक्त पावले जे साचार ॥ त्यांचे सर्वही व्यापार ॥ मदाकार[1] होऊनि ठाकती ॥ ८३ ॥ तो जेउती वास पाहे ॥ ते दिशाचि मी होऊनि ठाये ॥ तो जेउतें चालती पायें ॥ ते धरा मी होयें धराधर ॥ ८४ ॥ तो करूं बैसल्या भोजन ॥ षड्रस होय मी आपण ॥ त्यासि करावया प्राशन ॥ निर्जीवन[2] मी होयें ॥ ८५ ॥ त्यासी चालतां निजपदीं ॥ बोधें दृश्याची निवारी मांदी ॥ शांति पायघड्या घाली आधीं ॥ करी पदोपदीं निंबलोण ॥ ८६ ॥ शमदम आज्ञाधारी ॥ हात जोडूनि उभे द्वारीं ॥ ऋद्धिसिद्धी दासी घरीं ॥ विवेक कामारी[3] घरींच सदा ॥ ८७ ॥ त्याचा बैसतां अवकाश ॥ अंगें मी होय हृषीकेश ॥ तो निजावया सावकाश ॥ समाधि मी त्यास आंथुरी ॥ ८८ ॥ तो जे कांहीं बोल बोले ॥ तें निःशब्द ब्रह्म शब्दा आलें ॥ यालागीं श्रोत्यांसि वहिलें ॥ होय भलें समाधान ॥ ८९ ॥ तो अवलीला बोले वोठीं ॥ शब्दांसवें[4] माझी गोडी उठी ॥ श्रोत्यांसि तेथ पडे मिठी ॥ स्वभावें गोठी ऐकतां ॥ २९० ॥ चढतां परेची उपरी ॥ वैकुंठ कैलास पायरी ॥ उन्मनी घालोनि बाहेरी ॥ सुखशेजारी तो पहुडे ॥ ९१ ॥ मिळोनियां मुक्ती चारी ॥ पाणी वाहती त्याच्या घरीं ॥ श्रीसहित[5] राबें मी श्रीहरी ॥ येरांची थोरी कोण पुसे ॥ ९२ ॥ अवचटें ये त्याच्या मुखासी ॥ ह्मणे ज्यासीं तूं उद्धरिलासी ॥ तो माथां वाहें मी हृषीकेशी ॥ शब्दें निजधामासी पाठवीं वेगीं ॥ ९३ ॥ जे पावले माझी सहज भक्ती ॥ त्यांचे लळे[6] पाळीं मी या रीतीं ॥ त्यांची मज अनन्य प्रीती ॥ सांगों किती उद्धवा ॥ ९४ ॥ बहुतबोलीं काय कारण ॥ मी देहो तो आत्मा जाण ॥ तो माझा जीव प्राण ॥ हे जाणती खूण निजभक्त ॥ ९५ ॥ नांदतां सहज भक्ति आंत ॥ मी देवो तो माझा भक्त ॥ येरवीं मी सगळा त्या आंत ॥ तो समस्त मजमाजी ॥ ९६ ॥ निजभक्त मजभीतरीं ॥ मी तया आंतबाहेरीं ॥ ऐसें सामरस्यें नांदों भारी ॥ वेगळें बाहेरीं नाममात्रें ॥ ९७ ॥ माझिया सायुज्या जे आले ॥ ते मीचि होऊनियां ठेले ॥ परी मी होऊनि मज भजले ॥ ते भक्त मानिले म्यां ऐसे ॥ ९८ ॥ सायुज्यापरीस भक्ति गोड ॥ याचि निरूपणाचें कोड ॥ उद्धवा तुझी जाणोनि चाड ॥ विशद निवाड[7] सांगीतला ॥ ९९ ॥ ऐशिया माझ्या निजभक्तांसी ॥ अवशेष अर्थ नुरेचि त्यांसी ॥ मी तुष्टलों गा हृषीकेशी ॥ निजभावासी सर्वस्वें ॥ ३०० ॥ भक्तिप्राधान्य भागवत शास्त्र ॥ तें भक्तीचें निजसार ॥ तुज मी सांगीतलें साचार ॥ अत्यादरपूर्वक ॥ १ ॥ उद्धवा तुझे प्रीतीचेनि व्याजें[8] ॥ मज गुह्याचें निज

---

१ मत्सरूप. २ पाणी. ३ विषयांचा शत्रु. ४ शब्दाबरोबर. ५ लक्ष्मीसहित. ६ कोड. ७ निर्णय. ८ निमित्तानें.

माझे अतिशयें शुद्धभक्त ॥ ते मुक्तीसि दूर दवडित ॥ माझेनि भावार्थें नित्यतृप्त ॥ ते पूज्य होंत मजलागीं ॥ १८ ॥ जो सकळसिद्धींचा ईश्वरू ॥ तो मी लागें त्याची पूजा करूं ॥ तेथें लाजोनि सिद्धींचा संभारू ॥ घेऊनि निजवेव्हारू पळताती ॥ १९ ॥ सकळसिद्धींच्या स्वामित्वेंसी ॥ मी भगवंत तिष्ठें भक्तांपाशीं ॥ तेंचि श्लोकार्थें हृषीकेशी ॥ उद्धवासी सांगत ॥ २२० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सर्वासामपि सिद्धीनां हेतुः पतिरहं प्रभुः ॥ अहं योगस्य सांख्यस्य धर्मस्य ब्रह्मवादिनाम् ॥ ३५ ॥ ॥ टीका ॥ ॥ सकळसिद्धींचें मी जन्मस्थान ॥ माझेनि सिद्धीचें थोर महिमान ॥ सिद्धींसि मजमाजी निदान ॥ यापरी मी जाण स्वामी त्यांचा ॥ २१ ॥ जे जीवात्म्याची ऐक्यता ॥ त्या योगाचा स्वामी मी तत्त्वतां ॥ जेथ जीवत्वाची मिथ्या वार्ता ॥ त्या ज्ञानाचाही सर्वथा स्वामी मीचीं ॥ २२ ॥ ज्ञानोपदेशी जे साधू ॥ त्यांचाही स्वामी मी प्रसिद्धू ॥ माझेनि प्रसादें ज्ञानबोधू ॥ होतसे विशदू सज्ञाना ॥ २३ ॥ उपदेशी उपनिषद्भागें वेदू ॥ त्या वेदाचाही स्वामी मी गोविंदू ॥ मजवेगळा वेदवादू ॥ उच्चारी शब्दू नुच्चारे ॥ २४ ॥ धर्म ह्मणिजे ज्ञानसाधन ॥ त्याचाही स्वामी मीचि जाण ॥ मी सबाह्य परिपूर्ण ॥ चैतन्यघन सर्वात्मा ॥ २५ ॥ मी सर्वात्मा सर्वव्याप्त ॥ सबाह्य परिपूर्ण समस्त ॥ हे माझ्याठायीं सहज स्थित ॥ ऐक सुनिश्चित उद्धवा ॥ २६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अहमात्मांतरो बाह्योऽनावृतः सर्वदेहिनाम् ॥ यथा भूतानि भूतेषु बहिरंतः स्वयं तथा ॥ ३६ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ जीवाच्या जीवामाजी माझा वास ॥ जीव मजमाजी सावकाश ॥ माझें स्वरूप गा असमसाहस ॥ गुणमायेस अनावृत ॥ २७ ॥ जेवीं घटाची वस्ती आकाशीं ॥ आकाश सबाह्य या घटासी ॥ तेवीं मी जीवमात्रांसी ॥ सबाह्य हृषीकेशी परिपूर्ण ॥ २८ ॥ जैशीं महाभूतें भौतिकांसी ॥ सबाह्य असती सर्वांसी ॥ तेवीं मी सकळजगासी ॥ सबाह्य हृषीकेशी परिपूर्ण ॥ २९ ॥ जीवन जैसें तरंगांसी ॥ कां गोडी जैसी गुळासी ॥ तेवीं अनंतकोटिब्रह्मांडांसी ॥ मी पूर्णत्वेंसी परिपूर्ण ॥ २३० ॥ मज पूर्णाची पूर्ण प्राप्ती ॥ निकट येतेंयेतां हातीं ॥ ते संधीं सिद्धि नागविती ॥ भोगसंपत्तीउपचारें ॥ ३१ ॥ ज्याचें रायापाशीं चलनें ॥ त्याचे हातां ये लांच संपूर्ण ॥ तेणेंचि तो पावे मरण ॥ तैशा सिद्धि जाण घातका ॥ ३२ ॥ ये अध्यायींचें निरूपण ॥ सांगावया हेंचि गा कारण ॥ माझे प्राप्तीस सिद्धि विघ्न ॥ उद्धवा जाण निश्चितीं ॥ ३३ ॥ एकाग्रभजनें माझी प्राप्ती ॥ होतां ते संधीसि सिद्धि येती ॥ त्या भुलवोनियां भोगासक्तीं ॥ नागविती साधकां ॥ ३४ ॥ जे नेणती माझें निजसुख ॥ ऐसे जे कां केवळ मूर्ख ॥ त्यांसीच सिद्धींचें कौतुक ॥ अलोलिक भोगलिप्सा ॥ ३५ ॥ जैसे वेश्येचे हाव

---

१ आपला व्यापार. २ समाप्ति. ३ स्पष्ट. ४ उच्चारण केला जात नाहीं. ५ आंत बाहेर. ६ आत्म्यांत. ७ अतीत, वेगळें. ८ लाटांस. ९ येत असतां. १० वेळेस. ११ गमन.

गुह्य हें जें ॥ तें भक्तीचें करूनियां खाजें ॥ तुज म्यां वोजें दीधलें ॥ २ ॥ म्यां सांगीतलें जैशा रीतीं ॥ तैशी सेवावी माझी निजभक्ती ॥ ऐसें बोलत बोलतां श्रीपती ॥ उद्धव प्रीतीं उचलिला ॥ ३ ॥ मागां टाकूनि पीतांबरें ॥ सांडोनियां शंखचक्रें ॥ उद्धव उचलिला श्रीधरें ॥ तरी प्रेम न सांवरे देवातें ॥ ४ ॥ हांव न वाणेचि दोंकरीं ॥ मग चारी भुजा पसरी ॥ उद्धवातें हृदयावरी ॥ प्रीती थोरी आलिंगी ॥ ५ ॥ हृदयीं हृदय एक जाहलें ॥ ये हृदयींचें ते हृदयीं घातिलें ॥ कृष्णें सर्वस्वें आपुलें ॥ तें हृदयीं सूदलें उद्धवाचे ॥ ६ ॥ देव अवाप्तकाम निचाड ॥ त्यासीही भक्तीची ऐसी चाड ॥ अतिशयें उद्धवा लागला गोड ॥ स्वानंदें कोड पुरवी त्याचें ॥ ७ ॥ उद्धव प्रेमाचा लवलाहो ॥ आलिंगन सोडूं विसरे देवो ॥ कृष्णहृदय हृदया जडल्या पहाहो ॥ उद्धवा उद्धवो विसरला ॥ ८ ॥ ऐसें स्वानंदें वाडें कोडें ॥ दोघे मिसळले निचाडचाडें ॥ भक्तिसुखाच्या सुरवाडें ॥ उद्धव गाढ मीनेला ॥ ९ ॥ कृष्णें सर्वस्व आपुलें ॥ उद्धवाचे हृदयीं सूदलें ॥ हें उद्धवा कळों नाहीं दीधलें ॥ लाघव केलें गोविंदें ॥ ३१० ॥ हा अर्थ कळला उद्धवासी ॥ होईल मजसी ऐक्यासी ॥ पुढील कथा सुरस ऐसी ॥ मग कोणापाशीं सांगावी ॥ ११ ॥ उद्धवा मज वाडेंकोडें ॥ अखंड हेंचि बोलों आवडे ॥ परी तैसा श्रोता न जोडे ॥ हें थोर मज सांकडें[3] असे ॥ १२ ॥ भक्तिसुखाचा सुरवाड[4] ॥ सांगतां माझें पुरे कोड ॥ ऐसा श्रोता कैंचा गोड ॥ यालागीं उद्धवा आड प्रेम सूर्य ॥ १३ ॥ सूर्यापासूनि फांकती किरण ॥ तैसें सुटलें आलिंगन ॥ कृष्ण उद्धव जाहले भिन्न ॥ परी अभिन्नपण मोडेना ॥ १४ ॥ पुढील कथेची संगती ॥ दूर ठेली श्लोकसंमती ॥ श्रोतां विरुद्ध[5] न घ्यावें चित्तीं ॥ मूळार्थ निश्चितीं विचारावा ॥ १५ ॥ मुळींचें पद संकोचित ॥ तेथ उत्तम भक्ति भावार्थ ॥ स्वयें बोलिला श्रीकृष्णनाथ ॥ तोचि म्यां अर्थ विस्तारिला ॥ १६ ॥ नारळांतल्या वस्त्राची घडी ॥ उकलितां थोर वाढे वाढी ॥ तेवीं मूळपदाची घडमोडी ॥ कथा एवढी विस्तारली ॥ १७ ॥ मूळपदाचा पदपदार्थ ॥ श्लोकीं पहावा सावचित्त ॥ श्लोक[6]उत्तरार्धीं भगवंत ॥ ध्वनितार्थ[7] बोलोनि गेला ॥ १८ ॥ त्याचि ध्वनिताचे पोटीं ॥ होती भक्तिरहस्याची पेटी ॥ ते म्यां उघडूनि दाविली दिठीं[8] ॥ वृथा चावटी ह्मणी ह्मणाल ॥ १९ ॥ तंव श्रोते ह्मणती नवल येथ ॥ मुळींचें पद होतें गुप्त ॥ तें काढिलें भक्तिसारामृत ॥ हृदयस्थ हरीचें ॥ ३२० ॥ तुझे हृदयीं कृष्णनाथ ॥ प्रकटोनि आपुलें हृद्गत[9] ॥ ग्रंथीं असे बोलवित ॥ हें सुनिश्चित कळलें आह्मां ॥ २१ ॥ आह्मां ऐकतां भक्तिसारामृत ॥ चित्तीं चैतन्य उधळत ॥ होशी देखणा सुनिश्चित ॥ ग्रंथ यथार्थ अर्थिला ॥ २२ ॥ हें ऐकोनि संतांचें वचन ॥ हरिखला एका जनार्दन ॥ मस्तकीं वंदिले चरण ॥ पुढील निरूपण अवधारा ॥ २३ ॥ निजभक्तीचें दृढीक

---

१ शातलें. २ भेटला. ३ संकट. ४ मांठेपणा. ५ संशय. ६ श्लोकाच्या दुसऱ्या अर्धांत. ७ सूचितार्थ. ८ दृष्टीनें. ९ मनांतील.

रण ॥ आदरें करिताहे श्रीकृष्ण ॥ सांगीतलें तेंचि निरूपण ॥ पुढती जाण सांगत ॥ २४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदात्मन्यर्पितं चित्तं शांतं सत्वोपबृंहितम् ॥ धर्मं ज्ञानं सवैराग्यमैश्वर्यं चाभिपद्यते ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ आपुलें जें कां अंतःकरण ॥ तें करितां मदर्पण ॥ माझी निजभक्ति उल्हासे जाण ॥ जिचें निरूपण म्यां केलें ॥ २५ ॥ मद्रूपीं अर्पावया मन ॥ सुगम[१] वर्म[२] सांगेन जाण ॥ माझें करितां नामस्मरण ॥ पापनिर्दळण तेणें होय ॥ २६ ॥ सकाम स्मरतां नाम ॥ नाम पुरवी सकामकाम ॥ निर्विकल्पें[३] स्मरतां राम ॥ करी भस्म पापाचें ॥ २७ ॥ होतां पापाचें क्षाळण ॥ रज तम जिणोनि जाण ॥ सहजें वाढे सत्वगुण ॥ धर्मपरायण धार्मिक ॥ २८ ॥ स्वधर्मनिष्ठ सत्वगुणें ॥ अढळ पडे वैराग्याचें ठाणें ॥ वैराग्यें विषयनिर्दळणें ॥ निजज्ञान तेणें प्रकाशे ॥ २९ ॥ वाढल्या सविवेक ज्ञान ॥ लागे स्वरूपाचें अनुसंधान ॥ चढे शांतीचें समाधान ॥ तैं मदर्पण मन होये ॥ ३३० ॥ मन जाहल्या मदर्पण ॥ निजभक्ति उल्हासे जाण ॥ जिचें गत[४] श्लोकीं निरूपण ॥ मी संपूर्ण सांगीतलें ॥ ३१ ॥ निजभक्ति पावल्या संपूर्ण ॥ भक्तें न मागतां जाण ॥ अष्ट[५] महासिद्धी आपण ॥ त्याचें आंगण वळंगती ॥ ३२ ॥ जो सिद्धींकडे कदा न पाहे ॥ त्यासि अवशेष[६] कोण अर्थ राहे ॥ माझी संपूर्ण पदवी लाहे ॥ मदैक्य होये मद्भक्त ॥ ३३ ॥ ऐशी न जोडतां माझी भक्ती ॥ न लाभतां आत्मस्थिती ॥ वर्तणें जैं विषयासक्तीं ॥ तैं अनर्थप्राप्ती अनिवार ॥ ३४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदर्पितं तद्विकल्पे इंद्रियैः परिधावति ॥ रजस्वलं चासन्निष्ठं चित्तं विद्धि विपर्ययम् ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो सत्य न मानी वेदशास्त्रार्थ ॥ साँच[७] न ह्मणे जो परमार्थ ॥ जो गृहदाराद्रव्यासक्त ॥ लोलंगत[८] विषयासी ॥ ३५ ॥ तेणें अत्यंत समळमेळें ॥ दारुण रजोगुण खवळे ॥ तेणें चित्त होय ज्ञानांधळें ॥ विपरीत कळे भावार्थ ॥ ३६ ॥ ज्यासि विषयींच्या युक्ति गहन ॥ त्यासि ह्मणती अतिसज्ञान ॥ जो करी युक्तीचें छळण ॥ तो होय मान्य पंडितपणें ॥ ३७ ॥ ज्यासि प्रपंचाच्या अतिविस्तार ॥ त्यास ह्मणती भाग्य थोर ॥ जो नानाभोगीं पाळी शरीर ॥ सुकृती[१०] नर त्या ह्मणती ॥ ३८ ॥ जो अनुतापी परमार्थविखीं ॥ त्यासि ह्मणती परमदुःखी ॥ जो नानाविषयांतें पोखी[९] ॥ त्यातें महासुखी मानिती ॥ ३९ ॥ ज्याचेनि बोलें मनुष्य मरे ॥ त्याचें सिद्धत्व मानिती खरें ॥ जो उदास राहे नानाचारें ॥ मुक्त निर्धारें तो ह्मणती ॥ ३४० ॥ ज्याचा दांभिक आचार ॥ त्यातें ह्मणती पवित्र नर ॥ जे स्त्रियादिशूद्रां देती मंत्र[११] ॥ ते ज्ञाते थोर मानिती ॥ ४१ ॥ जो कां अनुतापी वैरागी ॥ त्यातें ह्मणती अतिअभागी ॥ जो उघड विषयांतें भोगी ॥ तो राजयोगी मानिती ॥ ४२ ॥ स्वयें द्रव्याचा अभिलाखी ॥ द्रव्य वेंची मूर्खलोकीं ॥ त्यातें ह्मणती अतिविवेकी ॥ धर्मज्ञ लोकीं हा एक ॥ ४३ ॥ ज्याचे गांठीं बहुसाल धन ॥ तो स

---

१ सोपा. २ उपाय. ३ एकनिष्ठपणानें. ४ मागील श्लोकांत. ५ आठ. ६ बाकी. ७ सत्य. ८ लुब्ध होतो. ९ पुष्ट व रक्षण करितो. १० पुण्यवान्. ११ वैदिक मंत्र.

वांसि अवश्य मान्य ॥ तोचि पवित्र तो सज्ञान ॥ ऐसें विपरीत ज्ञान होंलागे ॥ ४४ ॥ आपण सर्वात्मा सर्वेश ॥ हें विसरोनियां निःशेष ॥ अधर्मी अकर्मी अनीश[1] ॥ मी अज्ञान पुरुष हें मानी ॥ ४५ ॥ तेथ कैं उपजे माझी भक्ती ॥ कैसेनि होईल माझी प्राप्ती ॥ ऐसे भ्रमले नेणों किती ॥ संसारआवर्त्तीं वर्त्ततां ॥ ४६ ॥ परमात्मप्राप्तीचीं कारणें ॥ अतिगुह्य चारी लक्षणें ॥ पोटांतील कृपागुणें ॥ उद्धवा कारणें हरि सांगे ॥ ४७ ॥ धर्मची भजन भोय ॥ ज्ञान वैराग्य ऐश्वर्य ॥ माझी प्राप्ति अवश्य होय ॥ हे चारी उपाय अवधारी ॥ ४८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ धर्मो मद्भक्तिकृत्प्रोक्तो ज्ञानं चैकात्म्यदर्शनम् ॥ गुणेष्वसंगो वैराग्यमैश्वर्यं चाणिमादयः ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐक उद्धवा निजवर्म ॥ गुह्य सांगेन मी परम ॥ माझी भक्ति जे सप्रेम ॥ उत्तम धर्म तो जाण ॥ ४९ ॥ ऐके एकात्मता निजबोध ॥ परतोनि[2] कदा नुपजे भेद ॥ या नांव गा ज्ञान शुद्ध ॥ कृष्ण परमानंद सांगत ॥ ३५० ॥ धनधान्य रत्नांच्या राशी ॥ उर्वशी आल्या शेजाराशीं ॥ तें अवघें तृणप्राय[3] ज्यासी ॥ वैराग्य त्यासी आह्मी ह्मणों ॥ ५१ ॥ ऐक उद्धवा सुबुद्धी ॥ माझ्या ज्या अष्ट महासिद्धी ॥ मज वेगळ्या दूरी कधीं ॥ जाण त्रिशुद्धीं न ढळती कदा ॥ ५२ ॥ माझे निजभक्तीच्या निर्धारीं ॥ जो माझी पदवी[4] घे ऐक्यकरीं ॥ माझ्या सिद्धि त्याच्या घरीं ॥ होती किंकरी निजदासी ॥ ५३ ॥ सिद्धि सेवा करिती ॥ हेंचि नवल सांगों किती ॥ श्रीसहित मी श्रीपती ॥ भक्तांची भक्ती सर्वस्वें करीं ॥ ५४ ॥ ऐश्वर्याचें मुख्य लक्षण ॥ अतिशयेंसी संपूर्ण ॥ भगवत्पदवी घेणें आपण ॥ अतिसंपन्न ऐश्वर्य ॥ ५५ ॥ म्यां हे सांगीतली जे बोली ॥ ते निजगुह्यभांडाराची किली ॥ येणें उघडूनि स्वानंद किली ॥ भोगी आपुली सुखसिद्धी ॥ ५६ ॥ चहूं पदांचीं उत्तरें ॥ वाखाणिलीं अतिगंभीरें ॥ ऐकोनि उद्धव गंभीरें ॥ अत्यादरें विस्मित ॥ ५७ ॥ धर्मादि चहूं पदांचा अर्थ ॥ अलोलिक सांगे कृष्णनाथ ॥ तरी यमादिकांचा[5] उत्तमार्थ ॥ देवासि प्रत्यक्ष पुसों पां ॥ ५८ ॥ गुह्यार्थ सांगेल श्रीकृष्ण ॥ यालागीं यमादिकांचे प्रश्न ॥ उद्धव पुसताहे आपण ॥ परमार्थ पूर्ण आकळावया[6] ॥ ५९ ॥ पांच श्लोक पंचतीस[7] प्रश्न ॥ उद्धवें केले ज्ञानगहन ॥ ज्यांचें ऐकतां प्रतिवचन ॥ समाधान जीवशिवां ॥ ३६० ॥ पहिल्या श्लोकींचे सहा प्रश्न ॥ दुसऱ्या माजी नव जाण ॥ तिसरा चौथा आठ आठ जाण ॥ चारी प्रश्न पंचमीं ॥ ६१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धव उवाच ॥ ॥ यमः कतिविधः प्रोक्तो नियमो वारिकर्शन ॥ कः शमः को दमः कृष्ण का तितिक्षा धृतिः प्रभो ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ ॥ अहो रिपुदळणा श्रीपती ॥ यमनियमप्रकार किती ॥ शम दम कोण ह्मणिजेती ॥ तितिक्षा धृती ते कैशी ॥ ६२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ किं दानं किं तपः शौर्यं किं सत्यमृतमुच्यते ॥ कस्त्यागः किं धनं चेष्टं को यज्ञः का च दक्षिणा ॥ २९ ॥

---

१ असमर्थ. २ पुनः. ३ तुच्छ. ४ स्थान. ५ यम, नियम इत्यादिकांचा. ६ साधावयास. ७ पस्तीस.

॥ टीका ॥ ॥ कोण दान कोण तप येथ ॥ शौर्य कोण कोण तें सत्य ॥ ऋत जेंकां ह्मणिजेत ॥ तेंही निश्चित सांगावें ॥६३॥ कोणता जी त्याग येथें ॥ इष्ट धन कोण पुरुषातें ॥ यज्ञ कशातें ह्मणिजेतें ॥ दक्षिणा तेथें ते कायी ॥ ६४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पुंसः किंस्विद्बलं श्रीमन् भगो लाभश्च केशव ॥ का विद्या ह्रीः परा का श्रीः किं सुखं दुःखमेव च ॥ ३० ॥ ॥ टीका ॥ ॥ पुरुषासि बळाची कोण शक्ती ॥ दया बोलिजे कोणे स्थितीं ॥ लाभ कोणता गा श्रीपती[1] ॥ सांग कृपामूर्ती केशवा ॥ ६५ ॥ विद्या ह्मणावें कशातें ॥ लज्जा कोणे ठायीं वर्ते[2] ॥ उत्कृष्ट लक्ष्मी कोण येथें ॥ तेही अनंतें सांगावी ॥ ६६ ॥ येथील कोण पां कैसें सुख ॥ मज सांगावें कृपापूर्वक ॥ सुखाचे सांगातीचें जें दुःख ॥ त्याचेंही रूपक सांगावें ॥ ६७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कः पंडितः कश्च मूर्खः कः पंथा उत्पथश्च कः ॥ कः स्वर्गो नरकः कःस्वित्को बंधुरुत किं गृहम् ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ ॥ पंडिताचें काय लक्षण ॥ मूर्ख ह्मणावया कोण गुण ॥ सुमार्ग ह्मणावा तो कोण ॥ सांगे निरूपण उन्मार्गाचें[3] ॥ ६८ ॥ स्वर्ग कैशातें बोलिजे ॥ नरक कैसा वोळखिजे ॥ सखा बंधु कोण ह्मणिजे ॥ गृह माझें तें कोण ॥ ॥ ६९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ क आढ्यः को दरिद्रो वा कृपणः कः क ईश्वरः ॥ एतान् प्रश्नान्मम ब्रूहि विपरीतांश्च सत्पते ॥ ३२ ॥ ॥ टीका ॥ ॥ आढ्य कैसेंनि ह्मणिजे ॥ दरिद्री कैसेंनि जाणिजे ॥ कृपण कोणातें बोलिजे ॥ ईश्वर वोळखिजे तो कैसा ॥ ३७० ॥ हे माझे प्रश्न जी समस्त ॥ यांचा सांगावा विशदार्थ ॥ जो लौकिकाहूनि विपरीत[4] ॥ उपयुक्त परमार्था ॥ ७१ ॥ लौकिकाहूनि विपरीतार्थ ॥ त्यातें बोलती गा विपरीत ॥ या अवघियांचा मथितार्थ ॥ परमार्थयुक्त प्रश्न सांगा ॥ ७२ ॥ ज्ञाते सज्ञान संतमूर्ती ॥ त्यांचा स्वामी तूं निश्चितीं ॥ यालागीं तूतें गा सत्पती[5] ॥ सज्ञान ह्मणती शास्त्रार्थें ॥ ७३ ॥ माझ्या प्रश्नांची प्रश्नोक्ती ॥ परमार्थप्राप्तीलागीं श्रीपती ॥ मज सांगावें यथार्थस्थिती ॥ देवासि विनंती उद्धवें केली ॥ ७४ ॥ ऐकोनि भक्तांची विनवण ॥ कृपां द्रवला नारायण ॥ परमार्थरूप त्याचे प्रश्न ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगेल ॥ ७५ ॥ प्रथमश्लोकींचे यमनियम ॥ विशद[6] सांगेल पुरुषोत्तम ॥ इतर प्रश्न अतिउत्तम ॥ सांगे मेघश्याम अध्यायांतीं ॥ ७६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ अहिंसा सत्यमस्तेयमसंगो ह्रीरसंचयः ॥ आस्तिक्यं ब्रह्मचर्यं च मौनं स्थैर्यं क्षमाऽभयम् ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रथमश्लोकींचा उभारा ॥ यमांचीं लक्षणें बारा ॥ पुशिल्या प्रश्नानुसारा[7] ॥ प्रतिउत्तरा हरि बोले ॥ ७७ ॥ पुढां प्रश्न आहेत फार ॥ यालागीं यमनियमांचें उत्तर ॥ आवरूनि संक्षेपाकार ॥ स्वयें श्रीधर सांगत ॥ ७८ ॥ अहिंसा कायावाचामनें ॥ परपीडा त्याग करणें ॥ सत्य तें यर्थार्थ[8] बोलणें ॥ अचौर्यलक्षणें तीं ऐक ॥ ७९ ॥ हातें चोरी नाहीं करणें ॥ परी परद्रव्याकारणें ॥

---

१ श्रीकृष्णा. २ राहते. ३ वाईट मार्गाचें. ४ विरुद्ध. ५ भक्तांचा रक्षक. ६ स्पष्ट. ७ प्रश्नांच्या क्रमानें. ८ असेल तसें.

मनीं अभिलाष नाहीं धरणें ॥ अस्तेय[1]लक्षण त्या नांव ॥ ३८० ॥ असतां देहगेहसंगती ॥ ज्याचे पोटीं नाहीं आसक्ती ॥ जेवीं यात्रेमाजी लोक येती ॥ परी संगासक्ती त्या नाहीं ॥ ८१ ॥ स्फटिक ठेविला ज्या रंगावरी ॥ त्यासारिखा दिसे बाहेरी ॥ आपण निर्विकार अंतरीं ॥ तेवीं जो शरीरीं असंगत्वें ॥ ८२ ॥ निंद्यकर्माकारणें ॥ पोटांतूनि कंटाळणें ॥ लौकिकीं निंद्यकर्मा लाजणे ॥ ह्री ह्मणणें या नांव ॥ ८३ ॥ इह[2]लोकीं संग्रहो करूं नेणे ॥ जाणे दैवाधीन देहाचें जिं[3]णें ॥ सर्व सुखभोगाकारणें ॥ नाहीं संग्रहणें पुण्यातें ॥ ८४ ॥ पुण्यें स्वर्गभोगप्राप्ती ॥ पुण्यक्षयें पुन[4]रावृत्ती ॥ जेणें क्षयो पावे पुण्यसंपत्ती ॥ ते न संचिती निजभक्त ॥ ८५ ॥ या नांव गा असंचयो ॥ ऐक आस्तिक्याचा निर्वाहो ॥ सर्वत्र माझा ब्रह्मभावो ॥ कोठेंही अभा[5]वो घेऊं नेणें ॥ ८६ ॥ ब्रह्मचर्य ऐसें येथ ॥ जैसें आश्रमप्रयुक्त ॥ बोलिलें शास्त्रीं यथोचित ॥ तें निश्चित करावें ॥ ८७ ॥ मौनी न बोलावें इतुकें जाण ॥ मिथ्यालाप संभाषण ॥ नित्य करावें वेदपठण ॥ गायत्री[6]स्मरण कां हरिनाम ॥ ८८ ॥ स्थिर वृत्ति आत्मारामीं ॥ कां असावी निजधर्मीं ॥ भावार्थें संतसमागमीं ॥ स्थिरता उपक्रमीं या नांव ॥ ८९ ॥ स्वदेह दंडिलें कां वंदिलें ॥ परी क्षमा सम दोहींकाळें ॥ देहाचा भोगू तो दैवें[7]मेळें ॥ येणें विवेकमेळें क्षमावंत ॥ ३९० ॥ या नांव क्षमा ह्मणिजे ॥ अभय तें ऐसें जाणिजे ॥ जेंजें पा[8]रिखें देखिजे ॥ तेंतें होइजे आपणची ॥ ९१ ॥ आत्मा एक पंचभूतें एक ॥ दुजें पाहतां नाहीं देख ॥ निमालें भयाचें महादुःख ॥ अभयनिःशंख या नांव ॥ ९२ ॥ निमाल्या दुजयाच्या गोठी ॥ वोखदासि भय नमिळे स्पर्शीं ॥ अभयाची स्वानंदपुष्टी ॥ निजदृष्टीं ठसावे ॥ ९३ ॥ या नांव गा बाराही यम ॥ उद्धवा सांगीतले सवर्म ॥ आतां जयाचें नाम नेम ॥ तेंही सुगम अवधारीं ॥ ९४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शौचं जपस्तपो होमः श्रद्धातिथ्यं मदर्चनम् ॥ तीर्थाटनं परार्थेहा तुष्टिराचार्यसेवनम् ॥ ३४ ॥ ॥ टीका ॥ ॥ शौचाची एक ऐशी परी ॥ अंतरीं शुचि विवेकेंकरी ॥ बाह्य तें वेदाज्ञेवरी ॥ शौं[9]चें करी मृज्जलें ॥ ९५ ॥ परिसे जपाचा विचार ॥ ज्यासी जैसा अधिकार ॥ तैसा जपावा मंत्र ॥ कां स्वतंत्र हरिनाम ॥ ९६ ॥ ब्राह्मणाचा जप वेदोच्चार ॥ संन्यासी जपे ओंकार ॥ द्विजन्म्यासि आगममंत्र ॥ कां नाम सर्वत्र सर्वांसीं ॥ ९७ ॥ तपाचा जो मुख्य प्रकार ॥ जेणें शुद्ध होय अभ्यं[10]तर ॥ ते स्वधर्मीं गा सादर ॥ अत्यादर करावा ॥ ९८ ॥ शरीरशोषणा नांव तप ॥ हा मूर्खांचा खटाटोप ॥ हृदयीं श्रीहरि चिंतणें सद्रूप ॥ परम तप या नांव ॥ ९९ ॥ ऐक होमाचा विचार ॥ देवाचें मुख वैश्वानर ॥ पंचमहायज्ञ अग्निहोत्र ॥ होम साचार या नांव ॥ ४०० ॥ माझ्या भजनाची अतिआवडी ॥ कां धर्माची अधिक गोडी ॥ या नांव श्रद्धा रोकडी ॥ जाण धडफुडी

---

[1] अचौर्याचें लक्षण. [2] या लोकांत. [3] वांचणें. [4] पुनः जन्म. [5] सत्ता नसणें. [6] गायत्रीमंत्राचा जप. [7] प्रारब्धानें. [8] भिन्न. [9] स्वच्छ. [10] हृदय.

उद्धवा ॥ १ ॥ नसतांही अन्न धन ॥ आतिथ्यें दे समाधान ॥ मस्तकीं वंदूनि चरण ॥ निववी वचनें सुखरूपें ॥ २ ॥ दीन देखोनि तत्त्वतां ॥ अतिनम्र विनीतता ॥ यथाशक्ति अर्पणें अर्था ॥ आतिथ्य तत्त्वतां या नांव ॥ ३ ॥ पोटींच्या कळवळेंनि वोजा ॥ अत्यादरें गरुडध्वजा ॥ सांग साजिरी करणें पूजा ॥ श्रद्धा समाजा संभारी ॥ ४ ॥ मेळवूनि ब्राह्मणसंभार ॥ श्रद्धायुक्त षोडशोपचार ॥ पूजितां संतोषे श्रीधर ॥ पूजा पवित्र ब्राह्मणाची ॥ ५ ॥ शुद्ध व्हावया अंतःकरण ॥ करावें गा तीर्थगमन ॥ तीर्थयात्रीं श्रद्धा गहन ॥ तीर्थाटन[3] या नांव ॥ ६ ॥ पदोपदीं माझें नाम ॥ गर्जतां स्मरती माझें कर्म ॥ यात्रा करणें निजनिष्काम ॥ तीर्थयात्रा परम या नांव ॥ ७ ॥ परोपकारार्थ[4] पर्वत ॥ जेवीं कां सामग्री वाहत ॥ तेवीं क्रियामात्रें उपकारार्थ ॥ सदा वर्तत उपकारीं ॥ ८ ॥ जेवीं कां चंद्राचे किरण ॥ लागतांचि निववितीं जाण ॥ तेवीं जयाचें आचरण ॥ उपकारें जन सुखी करी ॥ ९ ॥ जें प्राप्त जाहलें अदृष्टीं ॥ तेणें काळ यथासुखें लोटी ॥ कदा समसम नाहीं पोटीं ॥ यथालाभसंतुष्टी या नांव ॥ ४१० ॥ काया वाचा मनें धनें ॥ जो विनटला गुरुकारणें ॥ त्याचें उठे संसारधरणें ॥ गुरुसेवा ह्मणणें या नांव ॥ ११ ॥ उभयशौचाचे दोनी गुण ॥ जपादि येर दशलक्षण ॥ हे बारा नेम जाण ॥ देवो आपण बोलिला ॥ १२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एते यमाः सनियमा उभयोर्द्वादश स्मृताः ॥ पुंसामुपासितास्तात यथाकामं दुहंति हि ॥ ३५ ॥ ॥ टीका ॥ ॥ दोहीं श्लोकीं यमनियम ॥ निरूपिले उत्तमोत्तम ॥ बारा बारा यांचें वर्म ॥ गुह्य परम शास्त्रार्थीं ॥ १३ ॥ पुरुष याचें उपासन ॥ जरी करी सकामन ॥ तैं कामधेनूच्या ऐसें जाण ॥ करिती पूर्ण सकळ कामना ॥ १४ ॥ हेचि पैं गा यमनेम ॥ पुरुष उपासी निष्काम ॥ तयासि माझें निजधाम ॥ अतिसुगम निजाप्ती ॥ १५ ॥ आतां शमदमादिक तुझे प्रश्न ॥ जेणेंहातीं पावे ब्रह्मज्ञान ॥ तें सांगेन गुह्य निरूपण ॥ सावधान उद्धवा ॥ १६ ॥ प्रश्नोत्तर सांगेल श्रीकृष्ण ॥ तें अवधारितां सावधान ॥ तत्काळ होय ब्रह्मज्ञान ॥ हें परम प्रमाण अतिगुह्य ॥ १७ ॥ तृप्त व्हावया बाळकासी ॥ निजकरें माता ग्रास दे त्यासी ॥ तेवीं श्रीकृष्ण उद्धवासी ॥ ब्रह्मरसासी देतसे ॥ १८ ॥ जो रसू गोड लागे पित्यासी ॥ तो बळेंचि पाजी बाळकासी ॥ तेवीं श्रीकृष्ण उद्धवासी ॥ ब्रह्मरसासी देतसे ॥ १९ ॥ आधींचि तानयाचें प्रेम मोठें ॥ वरी लागतां त्याचें मुखवटें[11] ॥ मग स्वानंदाचेनि नेटें ॥ पान्हा लोटे अनिवार ॥ ४२० ॥ तेवीं स्वयें श्रीकृष्ण ॥ दाटूनि देतसे ब्रह्मज्ञान ॥ तेथें उद्धवें पुशिले प्रश्न ॥ तेणें अधिक जाण तुष्टला ॥ २१ ॥ आधींच पर्जन्यें[12] खरा ॥ वरी मीनलासे[13] वीजवारा ॥ मग अनिवार वर्षे धारा ॥ खणोनि धरा वाहतसे ॥ २२ ॥ तेवीं द्यावया ब्रह्मज्ञान ॥ मिष

---

१ द्रव्य. २ अतिथिसत्कार. ३ तीर्थयात्रा. ४ उपकाराकरितां. ५ कपाळीं. ६ शरण गेला. ७ इच्छा धरून. ८ वैकुंठ. ९ प्रश्नाचें उत्तर. १० आपल्या हातानें. ११ तोंड. १२ मेघ. १३ मिळाला.

उद्धवाचे प्रश्न ॥ स्वानंदें तुष्टला श्रीकृष्ण ॥ ब्रह्म पूर्ण देतसे ॥ २३ ॥ निमाले देतां मिठाचे खडे ॥ चिंतामणी हातीं चढे ॥ कां विटेसाठीं परीस जोडे ॥ न घे तो नाडे निजस्वार्था ॥ २४ ॥ तेवीं उद्धवाचे थोडे प्रश्न ॥ तेणें आतुडे ब्रह्म पूर्ण ॥ एका विनवी जनार्दन ॥ श्रोतां अवधान मज द्यावें ॥ २५ ॥ उद्धवाचे चौतीस प्रश्न ॥ त्यांत यम नियम जाहले जाण ॥ उरले बत्तीस गुण ॥ तेंही विवंचन[1] अवधारा ॥ २६ ॥ प्रश्नीं दयेचें उत्तर ॥ न सांगेचि सारंगधर ॥ त्याअर्थीं भावगर्भ सार ॥ षड्गुणैश्वर्य बोलिलें ॥ २७ ॥ एहीविखींचें आख्यान ॥ पुढें सांगेल श्रीकृष्ण ॥ दयेच्याठायीं भाग्य पूर्ण ॥ कोण कारण सांगावया ॥ २८ ॥ एवं उरले एकतीस प्रश्न ॥ अधिक एक सांगेल श्रीकृष्ण ॥ कर्मस्वसंगम शौच जाण ॥ कार्याकारण संबंध ॥ २९ ॥ ऐसे होते तीस गुण ॥ व्याख्यानें सांगेल श्रीकृष्ण ॥ तैं करतळीं ब्रह्मज्ञान ॥ उद्धवासि जाण देतसे ॥ ४३० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शमो मन्निष्ठता बुद्धेर्दम इंद्रियसंयमः ॥ तितिक्षा दुःखसंमर्षो जिह्वोपस्थजयो धृतिः ॥ ३६ ॥ ॥ टीका ॥ ॥ बुद्धी जे कां विवेकवंती ॥ असार सांडूनि सार धरिती ॥ तिणें मनाच्या सकळवृत्ती ॥ विवेकस्थिती आवरोनी ॥ ३१ ॥ त्या वृत्तीसमवेत आपण ॥ बुद्धि परमात्मीं मिळे जाण ॥ जेवीं सागरासी लवणें ॥ दे आलिंगन भावार्थें ॥ ३२ ॥ समुद्रीं मिळतां लवण ॥ समुद्रचि होय आपण ॥ तेवीं आत्मनिश्चयें बुद्धि पूर्ण ॥ चैतन्यघन स्वयें होय ॥ ३३ ॥ ऐसा बुद्धीचा उपरम[3] ॥ त्यातें ह्मणिजे गा शम ॥ यापूर्वीं करावया दम ॥ तोही अनुक्रम अवधारी ॥ ३४ ॥ शत्रूचें जें दुर्दमन ॥ तो दमू येथें नव्हे जाण ॥ करावें इंद्रियदमन ॥ तेंही लक्षण अवधारी ॥ ३५ ॥ जेणें सहाय होती शमासी ॥ त्या युक्ती राखणें इंद्रियांसी ॥ विधी[4]वेगळें नेदी भोगासी ॥ आवरी अहर्निशीं वैराग्यें ॥ ३६ ॥ ऐसें इंद्रियांचें निग्रहण ॥ त्या नांव गा दमगुण ॥ आतां तितिक्षे[5]चें लक्षण ॥ ऐक संपूर्ण सांगेन ॥ ३७ ॥ महासुख आलें होये ॥ तें जेणें उल्हासें अंगीं वाहे ॥ तेणेंचि उल्हासें पाहे ॥ दुःखही साहे निजांगीं ॥ ३८ ॥ तेज आणि आंधारी ॥ नभ समत्वें अंगीं धरी ॥ तेवीं जो अविकारी ॥ सुखदुःखपरी साहता ॥ ३९ ॥ गोफणेचा सुवर्णपाषाण[6] ॥ लागतां दुःख होय परम ॥ तोचि वोळखिलिया सुवर्ण ॥ दुःख जाऊन सुख होय ॥ ४४० ॥ तैसें द्वंद्वांचें निजस्वरूप ॥ वोळखिलिया मद्रूप ॥ तेव्हां द्वंद्वें होती चिद्रूप ॥ हें मुख्य स्वरूप तितिक्षेचें ॥ ४१ ॥ सांडूनियां देहअहंते ॥ सुखदुःखांही परतें ॥ देखणेंही आपणातें ॥ तेचि येथें तितिक्षा ॥ ४२ ॥ स्वप्नींचें दरिद्र आणि सधनता ॥ जागृतीसि दोन्ही मिथ्या ॥ तेवीं सुखदुःखापरता ॥ देखणें तत्त्वतां ते तितिक्षा ॥ ४३ ॥ जिव्हा आणि दुसरें शिश्नं[7] ॥ यांचा जयो करावा आपण ॥ या नांव धृति संपूर्ण ॥ विद्या

---

[1] विचार. [2] मोह. [3] समाप्ति. [4] शास्त्रांत ग्राह्य सांगितल्यावांचून. [5] क्षमेचें. [6] सोन्याचा गोळा. [7] लिंग.

धारण धृता नव्हे ॥ ४४ ॥ जेवीं कृष्णसर्प धरिजे हातीं ॥ हे दोनी धरिजे तैशिया रीतीं ॥ अळुमाळ ढिलावतां धृती ॥ परतोनि खाती धरि त्यासी ॥ ४५ ॥ ज्यासि द्रव्यदारासक्ती ॥ तेथ कदा न रिगे हे धृती ॥ द्रव्यदाराअनासक्ती ॥ त्याचे घरीं धृती पोषणी सदा ॥ ४६ ॥ श्लोक ॥ ॥ दंडन्यासः परं दानं कामत्यागस्तपः स्मृतम् ॥ स्वभावविजयः शौर्यं सत्यं च समदर्शनम् ॥ ३७ ॥ ॥ टीका ॥ ॥ सर्वभूतांसि न द्यावें दुःख ॥ त्याचे पोटीं आलें सुख ॥ महादान हेंचि देख ॥ द्यावें सुख सर्वांसी ॥ ४७ ॥ दुःख निरसूनि भूतांसी ॥ सुख देणें सर्वांसी ॥ हेंचि उत्तम दान पृथ्वींसी ॥ अनायासीं तुकेनां ॥ ४८ ॥ जन्ममरणांचें दुःख ॥ निरसूनि द्यावें निजसुख ॥ याचि नांवें दान देख ॥ अलोलिक उद्धवा ॥ ४९ ॥ या नांव गा परम दान ॥ उद्धवा निश्चयेंसी जाण ॥ ऐक तपाचें लक्षण ॥ तुज संपूर्ण सांगेन ॥४५० ॥ करूनियां कामाचा त्याग ॥ तप करणें अतिचांग ॥ हृदयीं असतां कामँदांग ॥ तपाचें लिंग शोभेना ॥ ५१ ॥ सकाम वना जाय तपासी ॥ तो वनींही चिंती वँनितेसी ॥ तेंचि तपा बाधक होय त्यासी ॥ काम मानसीं वर्ततां ॥ ५२ ॥ त्यागोनि कामाची कामस्थिती ॥ तैं तपाची उत्तमगती ॥ अखंड लागे माझी स्मृती ॥ शुद्ध तपप्राप्ती या नांव ॥ ५३ ॥ माझ्याठायीं अनुताप ॥ त्या नांव गा शुद्ध तप ॥ कां हृदयीं चिंतितां चित्स्वरूप ॥ हें परम तप तपांमाजी ॥५४॥ ऐक शौर्याचा विचार ॥ रणीं मर्दूनि अरिवीर ॥ जिंतिला शत्रूंचा संभार ॥ तो एक शूर मानेना ॥ ५५ ॥ प्रवाहरूपें अनिवार ॥ जीवभाव लागला थोर ॥ त्यातें जिंके जो महावीर ॥ तो परमशूर बोलिजे ॥५६॥ माझा सदाचार निर्वाहो ॥ मी सज्ञान निःसंदेहो ॥ माझा पवित्र ब्राह्मणदेहो ॥ हा जीवभावो जीवाचा ॥५७॥ देहाचे माथां वर्णाश्रम ॥ आश्रमाचे माथां कर्म ॥ तो कर्माभिमान ज्यां परम ॥ त्यांसि देहभ्रम अनिवार ॥५८॥ जिणोनि जीवाचे स्वभाव ॥ चिदानंदाची राँणीव ॥ भोगिजे स्वराज्यवैभव ॥ हें परम गौरव शौर्याचें ॥५९॥ ज्या नांव बोलिजे निजसत्य ॥ तें मी सांगेन निश्चित ॥ सम ब्रह्म देखणें संतत ॥ तें परम सत्य उद्धवा ॥४६०॥ वस्तु न देखतां सर्वसम ॥ जें देखणें गा विषम ॥ तेंचि असत्य अतिदुर्गम ॥ सत्य तें ब्रह्म समसाम्यें ॥ ६१ ॥ केवळ जें सत्यभाषण ॥ तें निजसत्य नव्हे जाण ॥ तेचिविखींचें निरूपण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ६२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ऋतं च सूनृता वाणी कविभिः परिकीर्तिता ॥ कर्मस्वसंगमः शौचं त्यागः संन्यास उच्यते ॥ ३८ ॥ ॥ टीका ॥ ॥ इतरकवींची वँदंती ॥ ऋत या नांव सत्य ह्मणती ॥ हें सत्य मानावें प्रवृत्तीं ॥ सम ब्रह्म निवृत्तीमाजी सत्य ॥ ६३ ॥ ऋत ह्मणिजे तें ऐसें येथ ॥ सत्य वाचा जें श्रोत्यांचें हित ॥ तेंही दुःखसंबंधरहित ॥ ऋत निश्चित बोलिजे ॥ ६४ ॥ चित्र पाहतां दिसे विषम ॥ त्यामाजी भिंती सदा सम ॥ तेवीं जग

---

१ वारंवार. २ तुलना करवेना. ३ कामाचा अंकुर. ४ स्त्रीस. ५ असतां. ६ शत्रूंचे मोठाले योद्धे. ७ राज्य. ८ वाणी.

दिसतां विषम ॥ ज्यां ब्रह्म सम निजबोधें ॥ ६५ ॥ या नांव गा सत्य जाण ॥ उद्धवें केला नाहीं जो प्रश्न ॥ त्या शौचाचें निरूपण ॥ देवो आपण सांगत ॥ ६६ ॥ नव्हतां शुद्ध अंतःकरण[1] ॥ त्याग संन्यास न घडे जाण ॥ अंतरशुद्ध्यर्थ शौच पूर्ण ॥ स्वधर्माचरण हरी सांगे ॥ ६७ ॥ अंतरीं कर्मबळाचें बंधन ॥ त्याचें स्वधर्में[2] करावें क्षालन ॥ कर्में कर्मांचें निर्दळण ॥ करूनि आपण निष्कर्म व्हावें ॥ ६८ ॥ ते स्वधर्मीं फळाशा न सुटतां ॥ कर्मबंधनें न तुटती सर्वथा ॥ यालागीं फळ निराशता ॥ अंतरशौचता अतिशीघ्र ॥ ६९ ॥ नैराश्यें स्वधर्माचरण ॥ तेणें अंतरमळाचें क्षालन ॥ या नांव गा शौच[3] जाण ॥ शौच पूर्ण नैराश्यें ॥ ४७० ॥ ऐसें शुद्ध शौचांतःकरणीं ॥ ते भूमिका संन्यासग्रहणीं ॥ यालागीं शौच अप्रश्नीं[4] ॥ सारंगपाणी बोलिला ॥ ७१ ॥ सकळ संकल्पांचा त्याग ॥ हाचि पैं संन्यास चांग ॥ ऐसें बोलिला तो श्रीरंग ॥ त्याग तो सांग[5] या नांव ॥ ७२ ॥ मी देह हे दृढता जीवीं ॥ संकल्पें तगमग नित्य नवी ॥ बाह्य दंड कमंडलु भगवीं ॥ हे संन्यासपदवी लौकिक ॥ ७३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ धर्म इष्टं धनं नृणां यज्ञोऽहं भगवत्तमः ॥ दक्षिणा ज्ञानसंदेशः प्राणायामः परं बलम् ॥ ३९ ॥ ॥ टीका ॥ ॥ धन धान्य पशु रत्न ॥ हें प्राण्यासि नव्हे इष्ट धन ॥ मोक्षमार्गीं सबळ जाण ॥ इष्ट धन तो धर्म ॥ ७४ ॥ घरीं जें पुरिलें धन ॥ तें घरींच राहे जाण ॥ धर्म तो सवें[6] चालतें धन ॥ अंगा बंधन येवों नेदी ॥ ७५ ॥ धर्मिष्ठां[7] येवढा कृपण ॥ नदेखें मी आणिक जाण ॥ मरे तोही स्त्रीपुत्रां वंचून[8] ॥ अवघेंचि धन स्वयें ने ॥ ७६ ॥ धार्मिकीं धर्मार्थ वेंचूनि धन ॥ मी भांडारी केला नारायण ॥ जे समयीं जें जें लागे जाण ॥ तें मी आपण स्वयें पुरवीं ॥ ७७ ॥ यालागीं धर्म तो इष्ट धन ॥ हें सत्यसत्य माझें वचन ॥ ऐक यज्ञाचें व्याख्यान ॥ यथार्थ जाण सांगतों ॥ ७८ ॥ अग्नी तो माझें मुख जाण ॥ यज्ञभोक्ता मी नारायण ॥ अवघा यज्ञचि मी श्रीकृष्ण ॥ परम प्रमाण वेदोक्तं[9] ॥ ७९ ॥ तथें माझें स्वरूप ब्राह्मण ॥ मद्दीक्षादीक्षित जाण ॥ मद्भावें करूनियां यजन ॥ माझें सुख संपूर्ण पावले ॥ ४८० ॥ तेथ अधर्मद्रव्याचेनि कोडें ॥ अविधीं दांभिक याग घडे ॥ तोही मज मुखींच पडे ॥ परी ते कोरडे खडखडित ॥ ८१ ॥ अविधीं जाहले पशुघातकी ॥ तेणें अवदानें मी नव्हे सुखी ॥ दंभें पडले कुंभपाकीं[10] ॥ महानरकीं रौरवीं ॥ ८२ ॥ सर्व भूतांच्या भूतमुखीं ॥ अर्पी तें पावे यज्ञपुरुखीं ॥ हे दीक्षा नेणोनि याज्ञिकीं ॥ जाहले नरकी हिंसादोषें ॥ ८३ ॥ मद्भावें दीक्षित जाण ॥ विश्वतोमुखीं ज्याचें यजन ॥ त्याचा यज्ञ तो मी नारायण ॥ दक्षिणा कोण ते ऐका ॥ ८४ ॥ यज्ञासि मोल नाहीं देख ॥ त्यासि ज्ञानदक्षिणा अमोलिक ॥ हातां येतांचि याज्ञिक ॥ महासुख पावले ॥ ८५ ॥ दक्षिणा आल्या ज्ञानधन ॥ याज्ञिक होती अतिसंपन्न ॥

---

१ मन. २ [illegible]. ३ पवित्रता. ४ प्रश्न केल्यावांचून. ५ पूर्ण. ६ बरोबर. ७ धर्मकरणाऱ्या प्रमाणें ८ ठकवून. ९ वेदांत सांगितलेलें. १० या नांवाच्या नरकांत.

कल्पांतीं [illegible] धन ॥ निजीं समाधान जीवशिवां ॥ ८६ ॥ सर्वांमाजी प्राण सबळ ॥ प्राणबळें बळी सकळ ॥ प्राणयोगें मन चपळ ॥ अतिचंचळ प्राणस्पर्शें ॥ ८७ ॥ यापरी बळिष्ठ प्राण ॥ प्राणाअधीन सदा मन ॥ तो प्राण जिंकावा आपण ॥ बळवंतपण या नांव ॥ ८८ ॥ गजें[2] उपडिजे पायीं धरून ॥ घायीं चूर कीजे पंचानन[3] ॥ प्राण न जिंकतां जाण ॥ शूरांचें प्रमाण नव्हे बळा ॥ ८९ ॥ प्राणाअधीन जीव मन ॥ त्या प्राणाचें करूनि दमन ॥ तो स्वयें कीजे गा स्वाधीन ॥ अतिबळ जाण या नांव ॥ ४९० ॥ दृढ प्राणायाम साधिल्या पाठीं ॥ थोरला देवो धांवे भेटी ॥ भेटलिया न सुटे मिठी ॥ ऐसा बळी सृष्टीं प्राणायामी ॥ ९१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भगो म ऐश्वरो भावो लाभो मद्भक्तिरुत्तमः ॥ विद्यात्मनि भिदाबाधो जुगुप्सा ह्रीरकर्मसु ॥ ४० ॥ ॥ टीका ॥ ॥ उद्धवें पुशिला दयेचा प्रश्न ॥ तें न सांगोनि श्रीकृष्ण ॥ परमभाग्याचें निरूपण ॥ स्वयें आपण सांगत ॥ ९२ ॥ केवळ भाग्येंवीण ॥ दया तितुकी वांझ[4] जाण ॥ यालागीं भाग्यनिरूपण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ९३ ॥ ह्मणसी कृपणाचें धनभाग्य ॥ तो असतेंनि धनें अभाग्य ॥ परमभाग्य त्याचें चांग ॥ जो दयेतें सांग प्रतिपाळी ॥ ९४ ॥ त्या परमभाग्याचें लक्षण ॥ तुज मी सांगेन संपूर्ण ॥ ऐक तेथिची उणखूण ॥ उदारपण भाग्याचें ॥ ९५ ॥ ज्ञान आणि वैराग्य पूर्ण ॥ लक्ष्मी आणि औदार्यगुण ऐश्वर्य आणि यश गहन ॥ हे षड्गुण जाण महाभाग्य ॥ ९६ ॥ हे षड्गुण माझें भाग्य ॥ भाग्यें पावे जो सभाग्य ॥ तोचि दयेतें पाळी सांग ॥ अतिअव्यंग पूर्णत्वें ॥ ९७ ॥ जो षड्गुणेंशीं[5] संपन्न[6] ॥ तोचि दीनदयाळु जाण ॥ देवों जाणे दान सन्मान ॥ दरिद्र विच्छिन्न[7] करूं शके ॥ ९८ ॥ ऐशि या सभाग्याची भेटी ॥ होय तें भाग्य पाहिजे ललाटीं ॥ माझ्या भाग्यासम सृष्टीं ॥ आणिक दृष्टीं दिसेना ॥ ९९ ॥ ऐसेनि ऐश्वर्यें[8] संपन्न ॥ तो दयेचें माहेरें[9] जाण ॥ तिसी सोहळे करी आपण ॥ दयासंपन्न त्या नांव ॥ ५०० ॥ यालागीं दयेचे पोटीं ॥ म्यां सांगीतली भाग्याची गोठी ॥ भूतदया जयाच्या पोटीं ॥ तो अभाग्य सृष्टीं कदा नोहे ॥ १ ॥ तुवां पुशिला लाभ तो कोण ॥ ऐक त्याचेंही लक्षण ॥ माझी उत्तम भक्ति जाण ॥ लाभ संपूर्ण त्या नांव ॥ २ ॥ माझी करितां उत्तमभक्ती ॥ चारी मुक्ती पायां लागती ॥ सुरवर लोटांगणीं येती ॥ लाभ श्रीपती मी लाभें ॥ ३ ॥ हा लाभ नयेतां हातीं ॥ धनादिकांची जे प्राप्ती ॥ तो नाडु[10] जाण निश्चितीं ॥ नरकगतिदायक ॥ ४ ॥ यालागीं परम लाभ माझी भक्ती ॥ तेणें मी लाभें[11] श्रीपती ॥ एक विद्येची व्युत्पत्ती ॥ यथानिगुतीं सांगेन ॥ ५ ॥ दृढवासनेचिया संबंधा ॥ शुद्धास आणी जीवपदा ॥ अभेदीं उपजवी भेदा ॥ अविद्याबाधा या नांव ॥ ६ ॥ देहाचे माथां वर्णाश्रम ॥ आश्रमांचे माथां कर्म ॥ कर्मांचा

---

१ सरेना. २ हत्ती. ३ सिंह. ४ व्यर्थ. ५ सहागुणांनीं. ६ युक्त. ७ दूर. ८ पारख्यीं. ९ आश्रय. १० विघ्न. ११ प्राप्त होतों.

अभिमान परम ॥ तो जीवभ्रम देहबुद्धी ॥७॥ ते छेदोनि गृहाची बाधा ॥ तो मेळविजे चिदानंदा ॥ ते नांव शुद्ध आत्मविद्या ॥ येरें ते अविद्या सर्वही ॥ ८ ॥ जे निरसी गा अविद्या ॥ ते बोलिजे शुद्ध विद्या ॥ येरी शास्त्रादि चौदा विद्या ॥ ते जाण अविद्या पाल्हेळी ॥ ९ ॥ जे निरसी जीवाची बाधा ॥ ते बोलिजे शुद्ध आत्मविद्या ॥ एन्हवींच्या संबंधा ॥ लाजावें सदा निंद्यकर्मी ॥ ५१० ॥ केवळ अवयव झांकणें ॥ ते लज्जा येथ कोण ह्मणे ॥ गेलियाही जीवें प्राणें ॥ अकर्म न करणें ते लज्जा ॥ ११ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीर्गुणा नैरपेक्ष्याद्याः सुखं दुःखसुखात्ययः ॥ दुःखं कामसुखापेक्षा पीडितो बंधमोक्षवित् ॥ ४१ ॥ ॥ टीका ॥ ॥ सकळसाम्राज्यवैभवेंसी ॥ चतुर्दशभुवनविलासेंसी ॥ अंगीं लक्ष्मी आलिया जयापाशीं ॥ परी थुंकोनि तिसी पुसेना ॥ १२ ॥ ऐशी ज्याची निरपेक्षता ॥ त्याची नित्यवस्ती माझे माथां ॥ त्याहीहोनि परता ॥ आणिक सर्वथा मज नाहीं ॥ १३ ॥ सुख आणि महादुःख ॥ दोनीतें ग्रासोनियां देख ॥ प्रकटे स्वानंद स्वाभाविक ॥ या नांव सुख उद्धवा ॥ १४ ॥ जेथ दुजयाची चौंड नाहीं ॥ इंद्रियांचा पांग नपडे कांहीं ॥ विषयावीण आनंद हृदयीं ॥ निजसुख पाही या नांव ॥ १५ ॥ विसरोनि हें निजसुख ॥ कामापेक्षा करणें देख ॥ या नांव गा परम दुःख ॥ केवळ ते मूर्ख सेविती ॥ १६ ॥ नित्य होतां कामप्राप्ती ॥ कदा नव्हे कामतृप्ती ॥ कामापेक्षा पाडी दुःखावर्तीं ॥ दुःख निश्चितीं कामापेक्षा ॥ १७ ॥ हा बंधमोक्ष चोख ॥ जाणणें आलोलिक ॥ कदा नव्हे आनुमानिक ॥ पंडित देख या नांव ॥ १८ ॥ ऐशी जोडतां अवस्था ॥ आह्मी सज्ञान वेदशास्त्रता ॥ ऐशी अभिमानी पंडितता ॥ ते नये सर्वथा उपेगा ॥ १९ ॥ ज्याशी शांति आणि समाधान ॥ साचार बंधमोक्षांचें ज्ञान ॥ तो महापंडित जाण ॥ ऐसें श्रीकृष्ण बोलिला ॥ ५२० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मूर्खो देहाद्यहंबुद्धिः पंथा मन्निगमः स्मृतः ॥ उत्पथश्चित्तविक्षेपः स्वर्गः सत्त्वगुणोदयः ॥ ४२ ॥ ॥ टीका ॥ ॥ वेदशास्त्र नेणता एक ॥ त्यासि मूर्ख ह्मणती लोक ॥ ते मूर्खता येथें नंमने देख ॥ केवळ मूर्ख देहाभिमानी ॥ २१ ॥ केवळ नश्वरदेह देख ॥ तो मी ह्मणोनि मानी हरिख ॥ देहाभिमानें भोगी नरक ॥ यापरता मूर्ख कोण आहे ॥ २२ ॥ विटाळें देहाचा संभवो ॥ विटाळें देहाचा उद्भवो ॥ विटाळें निधन पहाहो ॥ विटाळासी ठावो देहापाशीं ॥ २३ ॥ देहाचें निजरूप येथ ॥ अस्थि चर्म विष्ठा मूत्र ॥ तो मी ह्मणवूनि जो श्लाघत ॥ मूर्ख निश्चित तो जाण ॥ २४ ॥ ऐशी जेकां देहअहंता ॥ ती नांव परममूर्खता ॥ चालणें माझ्या वेदपंथा ॥ सन्मार्गता ती नांव ॥ २५ ॥ ज्याशी जाहली चित्तविक्षेपता ॥ तो निंदी गुरुदेवता ॥ जो न मानी वेदशास्त्रार्थां ॥ तो उत्पथांमाजी पडे ॥ २६ ॥ जो गुरुदोषदर्शी समत्सरता ॥ जो क्रोध करी सुहृद आप्तां ॥ जो

---

१ [illegible]. २ [illegible]रिखे. ३ ऐश्वर्य. ४ गरज. ५ न जाणणारा. ६ मानित नाहीं. ७ यापेक्षां. ८ स्त्रीच्या रक्तापासून. ९ मरण. १० मल. ११ वाईटमार्गांत.

धिक्कारी [illegible] ॥ चित्तविक्षेपता ती नांव ॥ २७ ॥ जो सन्मानालागीं पाही ॥ जो साधुसज्जनांतें करी द्रोही ॥ जो दोष देखे
ठायींठायीं ॥ चित्तविक्षेप पाही या नांव ॥ २८ ॥ जो वेदपरापवादा ॥ जो करूं रिघे परनिंदा ॥ जो विश्वासे स्त्रियेचे शब्दां ॥ चि
त्तविक्षेपबाधा ती नांव ॥ २९ ॥ जो सन्मार्गापासूनि चेवंता ॥ पडे अधर्म अकर्मउत्पथा ॥ तेही चित्तविक्षेपना ॥ जाण तत्त्वतां उद्धवा
॥ ५३० ॥ आपण तत्त्वतां परब्रह्म ॥ जाणणें हा वेदमार्ग उत्तम ॥ हें नेणोनि वर्तणें सकाम ॥ तोचि परम उन्मार्ग ॥ ३१ ॥ स्वर्गशब्दा
ची उत्पत्ती ॥ सत्वगुणाची व्युत्पत्ती ॥ जेणें निजसुखाची होय प्राप्ती ॥ परी इंद्रलोकगती तो स्वर्ग नोहे ॥ ३२ ॥ अमर[3]भुवना जे जे गे
ले ॥ ते परतोनि पतना आले ॥ शुद्धसत्वीं जे मिसळले ॥ ते पावले निजसुख ॥ ३३ ॥ ऐसा जो कां सत्वगुण ॥ तोचि येथें स्वर्ग जा
ण ॥ आतां नरकाचें लक्षण ॥ तुज संपूर्ण सांगेन ॥ ३४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नरकस्तम उन्नाहो बंधुर्गुरुरहं सखे ॥ गृहं शरीरं मानुष्यं गु
णाढ्यो ह्याढ्य उच्यते ॥ ४३ ॥ ॥ टीका ॥ ॥ कामक्रोधलोभउद्रेक ॥ तेणें खवळे महामोह देख ॥ तो बुडवी सज्ञान विवेक ॥ एकलें
एक तम[4] वाढे ॥ ३५ ॥ अरुणोदयीं दाटे कुहर ॥ निबिड पडे अंधकार ॥ न कळे दिवसनिशां[5]व्यवहार ॥ सूर्य चंद्र दिसेना ॥ ३६ ॥ याप
री गा निजचित्तीं ॥ अंधतमें वाढे वृत्ती ॥ कर्तव्याकर्तव्यस्थिती ॥ एकही स्फूर्तीं स्फुरेना ॥ ३७ ॥ ऐसा तमाचा उन्नाह उद्रेक ॥ त्या नांव
जाण महानरक ॥ परी यम[6]यातना जें दुःख ॥ तो नरक ह्मणोंनये ॥ ३८ ॥ यमयातनां पाप झडे ॥ महामोहें पाप वाढे ॥ यां[7]म्य नरक
ते बापुडे ॥ अतिनरक गाढे महामोहीं ॥ ३९ ॥ काम क्रोध लोभ देख ॥ हेचि तीनी नरयदायक ॥ तेथ महामोहो आवश्यक ॥ जैं होय
एक अंधतम ॥ ५४० ॥ इतुका मिळे जेथ समुदावो ॥ त्यातें बोलिजे उत्तम उन्नाहो ॥ ऐसा जेथ घडे भावो ॥ तो पुरुष पहाहो नरक
रूप ॥ ४१ ॥ जो घोरनरकाप्रती जाये ॥ त्याचा तेथूनि उद्धार होये ॥ तमउन्नाह जे कां लाहे ॥ त्यांचा निर्गमें नोहे महाकल्पांतीं ॥ ४२ ॥
ऐशी तमउन्नाहाची ख्याती ॥ ऐकोनि उद्धव कंटाळे चित्तीं ॥ ऐसे बुडते जीव तमोवृत्ती ॥ त्याची उद्धरागती कोण करी ॥ ४३ ॥ ऐसा
उद्धवाचा भावो ॥ जाणोनि बोलिला देवाधिदेवो ॥ बुडतयातें उद्धरी पहाहो ॥ गुरुरावो निजसखा ॥ ४४ ॥ ऐसा गुरु तूं कोण ह्मण
शी ॥ मी नित्य लागें ज्याच्या पायांशीं ॥ तो चिन्मात्र पूर्ण ब्रह्मराशी ॥ गुरुनाम तयासी बोलिजे ॥ ४५ ॥ त्या ब्रह्मापरीस अधिकता ॥
गुरूसि आली तत्त्वतां ॥ ब्रह्म ब्रह्मत्वें हा प्रतिपादिता ॥ येऱ्हवीं ब्रह्माची वार्ता कोण पुसे ॥ ४६ ॥ अज अव्यय अनंत ॥ अच्छेद्य अ
भेद्य अपरिमित ॥ हे ब्रह्ममहिमा समस्त ॥ सद्गुरूंनीं येथ विस्तारिली ॥ ४७ ॥ ऐशी ऐकतां सद्गुरुकीर्ती ॥ जडजीव उद्धरती ॥ गुरु

---

१ देष. २ दूर होणारा. ३ देवलोकास. ४ अज्ञान. ५ दिवस किंवा रात्रि हा व्यवहार. ६ यमलोकच्या तीव्र वेदना. ७ यमलोकचे. ८ निषणें.

नामाची महाख्याती ॥ ऐकोनि कांपती यमकाळ ॥ ४८ ॥ त्या सद्गुरूचें महिमान ॥ करी बुडत्याचें उद्धरण ॥ निवारी जन्ममरण ॥
शिष्यसमाधान निजदाता ॥ ४९ ॥ सुहृद आप्त सखा बंधू ॥ शिष्याचे सद्गुरु प्रसिद्धू ॥ निवारूनि नरकसंबंधू ॥ परमानंदू सुखदाता
॥ ५५० ॥ आतां गृहाचें लक्षण ॥ तुज मी सांगेन संपूर्ण ॥ माझ्या गोपुरें धवलारें जाण ॥ गृहप्रमाण तें नव्हे ॥ ५१ ॥ मनुष्यदेह
तो गृहाश्रम ॥ जेथें नित्य वसें मी पुरुषोत्तम ॥ तेथील करितां स्वधर्मकर्म ॥ आत्माराम उल्हासे ॥ ५२ ॥ ज्या नरदेहाचिये प्राप्ती ॥
इंद्रादिक देव वांछिती ॥ वेद वानी ज्या देहाची स्थिती ॥ निजमोक्षप्राप्ती नरदेहीं ॥ ५३ ॥ निजगृह जें साचार ॥ तें जाणावें निज
शरीर ॥ आतां आढ्यपणाचा विचार ॥ तोही प्रकार अवधारी ॥ ५४ ॥ जो ज्ञानगुणअतिसंपन्न ॥ जें कल्पांतींही न वेंचे धन ॥
तोचि आढ्यतम जाण ॥ येर तें धन नश्वर ॥ ५५ ॥ नश्वरधनाची आढ्यता ॥ अवश्य नेत अधःपाता ॥ ज्ञानधनें जे आढ्यता ॥
तेणें ये हाता परब्रह्म ॥ ५६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ दरिद्रो यस्त्वसंतुष्टः कृपणो योऽजितेंद्रियः ॥ गुणेष्वसक्तधीरीशो गुणसंगो विपर्ययः
॥ ४५ ॥ ॥ टीका ॥ ॥ एक दरिद्राचें लक्षण ॥ गांठीं असतां कोटी धन ॥ ज्याचें संतुष्ट नाहीं मन ॥ परम दरिद्री जाण या नांव
॥ ५७ ॥ ज्याचे गांठीं नाहीं कांचवटी ॥ परी संतुष्टता नित्य पोटीं ॥ तोचि संपन्न सकळसृष्टीं ॥ सत्यगोष्टी हे उद्धवा ॥ ५८ ॥ गां
ठीं असोनियां धन ॥ जो पोटें न खाय आपण ॥ सदा लोलिंगत मन ॥ दरिद्रलक्षण या नांव ॥ ५९ ॥ यापरी जो कृपण ॥ ऐक
त्याचेंही लक्षण ॥ जेवीं राजा बांधी सेवकजन ॥ तेवीं इंद्रियांअधीन जो होय ॥ ५६० ॥ निर्धारितां निजरूप जाण ॥ सर्वांचा
राजा तो आपण ॥ ते विसरोनि होय दीन ॥ इंद्रियांअधीन होऊनि ठाके ॥ ६१ ॥ मन तयाचें आज्ञाधार ॥ मनाचीं इंद्रियें किंकर ॥
त्यांच्यानी हा होय डिंगर ॥ अजितेंद्रियें होय थोर कृपणऐसें ॥ ६२ ॥ निजकिंकराचीं किंकरें ॥ त्या इंद्रियांचे हा बोळंगे द्वारें ॥ अजि
तेंद्रियत्वें अतिखरें ॥ निजांगीं सुभरे कृपणत्व ॥ ६३ ॥ या नांव गा कृपणपण ॥ तुज म्यां सांगीतलें जाण ॥ आतां ईश्वराचें सुलक्षण ॥
एक संपूर्ण उद्धवा ॥ ६४ ॥ कनँक आणि कामिनी ॥ ज्यासि नावडे मनींहूनी ॥ तोचि ईश्वरू त्रिभुवनीं ॥ सत्यसत्य हेवाणी उद्धवा
॥ ६५ ॥ तुवां जितुके केले प्रश्न ॥ तितुके ज्यासी बोळंगती गुण ॥ त्यांचेंही ज्यासी अलिप्तपण ॥ ईश्वर संपूर्ण त्या नांव ॥ ६६ ॥ कन
क आणि कामिनी ॥ यांचा पंगिस्त मनींहूनी ॥ तोचि अनीश्वरू जनीं ॥ हें सत्य मानी उद्धवा ॥ ६७ ॥ शमादि सांगीतले प्रश्न ॥ त्यां
चें जें विपरीत लक्षण ॥ तेंचि अनश्वरत्व जाण ॥ अशमादिगुण ते ठायीं ॥ ६८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एत उद्धव ते प्रश्नाः सर्वे साधु नि

---

१ मित्र. २ [illegible] ३ प्रासाद. ४ सरे. ५ जवळ. ६ लोभी. ७ सुवर्ण. ८ स्त्री. ९ इच्छा करणारा.

रूपितः ॥ किं वर्णितेन बहुना लक्षणं गुणदोषयोः ॥ ४५ ॥ ॥ टीका ॥ ॥ उद्धवा तुझे सकळ प्रश्न ॥ म्यां निरूपिले सुलक्षण ॥ जेणें होइजे ब्रह्मसंपन्न ॥ तैसें व्याख्यान सांगीतलें ॥ ६९ ॥ संसारीं गुणदोषलक्षण ॥ सांचतां अपरिमित जाण ॥ यालागीं करावया मौन ॥ परम कठिण गुणदोष ॥ ५७० ॥ गुणदोष नायकावे[1] कानीं ॥ गुणदोष न देखावे नयनीं ॥ गुणदोष न बोलावे वदनीं ॥ गुणदोष मनीं न धरावे ॥ ७१ ॥ ब्रह्मज्ञानाचें मुख्य लक्षण ॥ तेंही बहुत नाहीं निरूपण ॥ श्लोकार्धें श्रीकृष्ण ॥ स्वयें आपण सांगत ॥ ७२ ॥ ॥ ॥ श्लोक ॥ गुणदोषदृशिर्दोषो गुणस्तूभयवर्जितः ॥ ४६ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे एकोनविंशोऽध्यायः ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ ॥ ब्रह्म एक परिपूर्ण ॥ तेथें कैंचे दोष कैंचे गुण ॥ अविद्या क्षोभली तैं जाण ॥ गुणदोषलक्षण वाढवी ॥ ७३ ॥ जो देखों लागे दोषगुण ॥ त्यासि अविद्या क्षोभली जाण ॥ जो न देखे गुणदोषभान ॥ तो ब्रह्मसंपन्न उद्धवा ॥ ७४ ॥ पराचा देखोनि दोषगुण ॥ हाचि दोषांमाजी महादोष जाण ॥ गुणदोष न देखावा आपण ॥ हा उत्तम गुण सर्वार्थीं ॥ ७५ ॥ ब्रह्मीं नाहींत दोषगुण ॥ हें सर्वार्थीं सत्य जाण ॥ जो देखे गा दोषगण ॥ ब्रह्मत्व जाण तेथें नाहीं ॥ ७६ ॥ जे गुणदोष देखों लागले त्यांचें ब्रह्मत्व कैसेनि गेलें ॥ त्यांपाशीं तें वोसं[2] जाहलें ॥ कीं रुसूनि गेलें तेथूनी ॥ ७७ ॥ जेवीं रविबिंबा राहो ग्रासी ॥ तैं दिवसा देखिलें नक्षत्रांसी ॥ तैं अविद्या ब्रह्मत्व जैं प्राशी ॥ तैं गुणदोषांसी देखिजे ॥ ७८ ॥ आदरें सांगे श्रीकृष्ण ॥ उद्धवा न देखावे दोषगुण ॥ हे माझे जिवींची निजखूण ॥ तुज म्यां संपूर्ण सांगीतली ॥ ७९ ॥ जनीं चौऱ्याशीं लक्षयोनी ॥ त्यांत गुणदोष एकेस्थानीं ॥ न देखावे मनुष्ययोनीं ॥ इतुकेनी नित्यमुक्त ॥ ५८० ॥ ह्मणसी साचार परिपाटी ॥ गुणदोष देखावे चित्तीं ॥ उद्धवा हे गोष्टी खोटी ॥ स्वधर्मराहाटी ते भिन्न ॥ ८१ ॥ निजदोष निरसावयाकारणें ॥ स्वधर्मकर्म आचरणें ॥ तेणें गुणदोष देखणें ॥ तैं नागवी धावणें तैसें जाहलें ॥ ८२ ॥ साळी पिकावया शेतीं ॥ तृण जाळूनि दाढ[3] करिती ॥ तेथ पिकली साळी पैं जाळिती ॥ तैं तोंडीं माती पडली कीं ॥ ८३ ॥ व्हावया दोषनिवृत्ती ॥ वेदें घोतिलीं[4] धर्मप्रवृत्ती ॥ तेणें स्वधर्में जैं दोष देखती ॥ तैं निजप्राप्तीं नागवले[5] ॥ ८४ ॥ जेवीं कां सोंगें नटनटी ॥ दाविती हाव भाव नाना गोठी ॥ परी तो भाव नाहीं त्यांचे पोटीं ॥ स्वधर्म त्यादृष्टीं करावा ॥ ८५ ॥ न देखोनि दोषगुण ॥ स्वधर्ममर्यादा नोसंडून[6] ॥ करावें गा स्वधर्माचरण ॥ हें मुख्य लक्षण धर्माचें ॥ ८६ ॥ ऐशिया स्वधर्मगती ॥ कर्ममळ निःशेष जाती ॥ साधकां निजपदप्राप्ती ॥ गुणदोषस्थिती सांडितां ॥ ८७ ॥ गुणदोष देहाचेठायीं ॥ आत्मा नित्य देही विदेही ॥ गुणदोष ज्याच्याठायीं ॥ सर्वथा नाहीं उद्धवा

---

[1] ऐकूंनयेत. [2] शून्य. [3] जमीन जाळणें. [4] सांगितली. [5] चूकले. [6] न सोडितां.

॥ ८८ ॥ साधकें न देखावा दोषगुण ॥ सिद्धासी सहजचि नाहीं जाण ॥ जरी दिसों लागले दोषगुण ॥ तरी आली नागवण दोघांसी
॥ ८९ ॥ साधकाची प्राप्ति बुडे ॥ सिद्धाची सिद्धि तत्काळ उडे ॥ एवं गुणदोषांचें सांकडें[1] ॥ दोहींकडे उद्धवा ॥ ५९० ॥ गुणदोषीं भरली
सृष्टी ॥ तेथ न ठेवावी निजदृष्टी ॥ हे कळवळोनियां पोटीं ॥ श्रीकृष्णें गोष्टी सांगीतली ॥ ९१ ॥ गुणदोष विविधभेद ॥ ऐसे आहेत
निषेध ॥ तरी कां पां स्वमुखें गोविंद ॥ बोलिला प्रसिद्ध वेदानुवादें ॥ ९२ ॥ येचि अर्थींचा प्रश्न ॥ पुढें उद्धव करील जाण ॥ तेंचि
व्यासाचें निरूपण ॥ विसावा जाण जीवशिवां ॥ ९३ ॥ तेथ सकाम आणि निष्काम भक्त ॥ यांचें अधिकार अभिव्यक्तें[2] ॥ स्वयें सांगेल
भगवंत ॥ कथा अद्भुत ते आहे ॥ ९४ ॥ संतीं द्यावें अवधान ॥ श्रोतां व्हावें सावधान ॥ एका विनवी जनार्दन ॥ रसाळ निरूपण
पुढें आहे ॥ ९५ ॥ ॥ इतिश्रीभागवते महापुराणें एकादशस्कंधे एकाकारटीकायां भगवदुद्धवसंवादे एकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥ ॥
॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ १९ ॥ ॥ श्लोक ॥ ४६ ॥ ॥ ओंव्या ॥ ५९५ ॥ ॥ एकूण ॥ ६४१ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

---

१ संकट. २ स्पष्ट.

# अध्याय २० वा.


उद्धव.
श्रीकृष्ण.
गुरु.
शिष्य मंडळी.

श्रीग[illegible] ॐ नमो सद्गुरु चित्समुद्रा ॥ मुक्तमोतियांचा तुजमाजी थारा ॥ ज्ञान वैराग्यशुक्तिद्वारा ॥ सभाग्यनरा तूं देशी ॥ १ ॥ तुझी खोली अमर्याद ॥ माजी चिंद्रत्नें अतिविविध ॥ देखोनि निजप्रबोधचांद ॥ भरतें अगाध तुज दाटे ॥ २ ॥ उलथल्या स्वानंदभरत्यासी ॥ गुरुआज्ञामर्यादा नुल्लंघिसी ॥ स्वानंदलहरी चढोवढीसी ॥ तुजमाजी अहर्निशीं उसळती ॥ ३ ॥ ब्रह्मविद्या महाबंदर[2] ॥ तेथ निजभक्ती हें तारूं थोर ॥ त्यासि वागविता तूं कर्णधार[3] ॥ प्रेमाचें साचार चढविशी शिड ॥ ४ ॥ तेथ भक्त संत सज्ञान नर ॥ स्वयें पावविशी परपार ॥ त्यांची मागुती येरझार ॥ सत्य साचार खुंटली ॥ ५ ॥ एक लावूनि कासेसी ॥ भवसागरीं वागविशी ॥ बुडण्याचें भय त्यासी ॥ महाकल्पेंसी बाधीना ॥ ६ ॥ एक बुडाले भक्तिसमरसीं ॥ ते घातले शेषशयनापाशीं ॥ एक बैसले अढळतेसी ॥ ते ब्रह्मादिकांसी न ढळती ॥ ७ ॥ तुझ्या सागरत्वाची परी ॥ विजातीय तिळभरी ॥ राहोंनेदिसी भीतरी ॥ हे अगाध थोरी पैं तुझी ॥ ८ ॥ अत्यंतत्रळयीं जैं हा चढे ॥ तैं संसार हे नांव बुडे ॥ वैकुंठकैलासावरता चढे ॥ मागें पुढें हाचि हा ॥ ९ ॥ ऐशिया सद्गुरुसमुद्रोदकीं ॥ एका एकपणें हरीतकी ॥ भीतरी पडतां आवश्यकीं ॥ अंगीकारी कीं जनार्दन ॥ १० ॥ तो जानर्दन स्वयें देखा ॥ एकादशाची करी टीका ॥ तेणें अभंगीं घालूनि एका ॥ कवित्व लोकां ऐकवी ॥ ११ ॥ जनार्दना आवडे एक ॥ तो मी एका भेटतां देख ॥ निजात्मभावें पडिलें ऐक्य ॥ आपुलें निज[4]सुख बोलवी ॥ १२ ॥ बोलवी निजसुखाची कथा ॥ त्यासि आपणचि होय श्रोता ॥ मग अर्थाच्या यथार्थता ॥ समाधानता देतसे ॥ १३ ॥ यापरी गा जनार्दनें ॥ एकादश महाराष्ट्रकरणें ॥ नव्हे माझे युक्तीचें बोलणें ॥ हें स्वयें सज्ञानें जाणिजेल ॥ १४ ॥ त्या एकादशाची गतकथा ॥ एकुणिसावा संपतां ॥ गुणदोषांची कांहीं वार्ता ॥ उद्धवासि तत्त्वतां सांगीतली ॥ १५ ॥ गुणदोष जो देखणें ॥ तोचि महादोष जाणणें ॥ गुणदोष स्वयें न देखणें ॥ तो गुण म्यां श्रीकृष्णें मानिजे ॥ १६ ॥ हें ऐकोनि देवाचें उत्तर ॥ उद्धव चमत्कारला थोर ॥ काय गुणदोषांचा विचार ॥ घरोघर लोकीं केला ॥ १७ ॥ तुह्मींच वेदमुखें आपण ॥ प्रकटिलें गुणदोषलक्षण ॥ तें तुमचें वेदवचन ॥ कैवीं[5] अमान्य करावें ॥ १८ ॥ ऐसें विधिनिषेधलक्षण ॥ विचारितें वेदवचन ॥ कां पां निषेधी श्रीकृष्ण ॥ उद्धव तो प्रश्न स्वयें पुसे ॥ १९ ॥ विसावे अध्यायीं निरूपण ॥ सांगावया गुणदोषलक्षण ॥ भक्ति ज्ञान कर्म जाण ॥ तिन्हीं अधिकार भिन्न सांगेल ॥ २० ॥ उद्धव ह्मणे हे श्रीकृष्ण ॥ तूं वेदरूपें आपण ॥ बोलिलासि दोषगुण ॥ तें परम प्रमाण आह्मीं मानूं ॥ २१ ॥ हा विधि हा निषेध ॥ हें दाविताहे तुझा वेद ॥ तो वेदानुवाद विशद[6] ॥ एक प्रसिद्ध सांगेन ॥ २२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धव उवाच ॥ ॥ वि

---

१ चैतन्यरूप रत्नें. २ समुद्रकांठची व्यापाराची जागा. ३ नावाडी. ४ ब्रह्मानुभव. ५ कसें. ६ स्पष्ट.

धिश्च प्रतिषेधश्च निगमो हीश्वरस्य ते ॥ अवेक्षतेऽरविंदाक्ष गुणदोषं च कर्मणाम् ॥ १ ॥ ॥टीका ॥ ॥ कमलनयन श्रीकृष्णा ॥ विधिनिषेधलक्षणा ॥ दाखवीतसे दोषगुणा ॥ तुझी वेदाज्ञा प्रसिद्ध ॥ २३ ॥ तुझिया वेदाचे वेदविधि ॥ गुणदोषीं जडली बुद्धी ॥ ते मी सांगेन प्रसिद्धी ॥ कृपानिधी अवधारी ॥ २४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ वर्णाश्रमविकल्पं च प्रतिलोमानुलोमजम् ॥ द्रव्यदेशवयःकालान् स्वर्गं नरकमेव च ॥ २॥ ॥टीका॥ ॥तुझी जे गा वेदवाणी ॥ उघडी गुणदोषांची खाणी ॥ अधममध्यमोत्तम मांडणी ॥ वर्णाश्रमपणीं भेद दावी ॥ २५ ॥ द्रव्य विहित अविहित ॥ हेंही वेद असे दावित ॥ देशू पुनीत अपुनीत ॥ काळही दावी सुष्टुदुष्टत्वें ॥ २६ ॥ पूर्ववयीं चित्त निश्चित ॥ तारुण्यें तेंचि कामासक्त[३] ॥ वार्द्धक्य तें अतिकुश्चित ॥ ते बुद्धि उपजवित गुणदोष वेदू ॥ २७ ॥ तुझाचि गा वेद देख ॥ सूचिताहे स्वर्ग नरक ॥ तेणें कर्माचें आवश्यक ॥ साधक बाधक तो दावी ॥ २८ ॥ वर्णाश्रमांमाजी गुज ॥ प्रतिलोमानुलोमज ॥ ऐसा नाना भेदभोज ॥ वेदेंचि सहज नाचविजे ॥ २९ ॥ उत्तमवर्णाची जे नारी ॥ हीनवर्णाचा गर्भ धरी ॥ तिची संतती संसारीं ॥ अभिधान धरी प्रतिलोमज ॥ ३० ॥ तेचि संतती प्रसिद्ध ॥ सूत वैदेह मागध ॥ ऐशिया नामाचें जें पद ॥ तें जाण शुद्ध प्रतिलोमज ॥ ३१ ॥ हीनवर्णाची जे नारी ॥ उत्तमपुरुषाचा गर्भ धरी ॥ ते अनुलोमज संसारीं ॥ शास्त्रकारीं बोलिजे ॥ ३२ ॥ अंबष्ठ आणि मूर्धावसिक्त ॥ प्रवृत्तिकास्त आणि सारस्वत ॥ इत्यादिनांवें जे वर्तत ॥ ते जाण समस्त अनुलोमज ॥ ३३ ॥ ऐसे नाना भेदप्रकार ॥ अविधिविधींचा विचार ॥ वेद प्रकाशितो[४] साचार ॥ गुणदोषां माहेर वेद तुझा ॥ ३४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ गुणदोषभिदादृष्टिमंतरेण वचस्तव ॥ निश्रेयसं कथं नृणां निषेधविधिलक्षणम् ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ हे गुण आणि हे दोष ॥ उभयतां वैर लावी देख ॥ तुझा वेद गा आवश्यक ॥ होय प्रकाशक गुणदोषां ॥ ३५ ॥ वैर लावूनि वेदवाणी ॥ वाढवी गुणदोषमांडणी ॥ तेथ मोक्ष पाविजे प्राणी ॥ वेदवचनीं घडे केवीं ॥ ३६ ॥ राऊळ बोलिलें आपण ॥ जे न देखावे दोष गुण ॥ तूंचि ह्मणसी वेद प्रमाण ॥ तैं दोषगुण देखावे ॥ ३७ ॥ एवं ऐकतां तुझें वचन ॥ उभयतां आली नागवण ॥ वेद प्रमाण कीं अप्रमाण ॥ हें समूळ जाण कळेना ॥ ३८ ॥ तुझ्या वचना विश्वासावें ॥ तैं गुणदोषां न देखावें ॥ तुझें वेदवचन मानावें ॥ तैं देखावें गुणदोषां ॥ ३९ ॥ ऐसे तुझेनि बोलें जाण ॥ संशयीं पडले सज्ञान ॥ मां[५] इतर साधारण जन ॥ त्यांची कथा कोण सेठायीं ॥ ४० ॥ ॥ आशंका ॥ ॥ माझें वचन वेदवचन ॥ दोनी एकरूपें ह्मणशी प्रमाण ॥ तरी गुणदोषदर्शन ॥ कां पां विलक्षण[६] परस्परें ॥ ४१ ॥ माझे वेदाचें विधान ॥ नव्हतां वेदार्थाचें ज्ञान ॥ ह्मणशी मोक्ष नव्हे जाण ॥ वेद

---

१ [illegible] २ [illegible] ३ विषयांत गुंतलेलें. ४ दाखवितो. ५ मग. ६ विरुद्ध.

प्रमा[illegible] ॥ त्या मोक्षामाजी काय कठिण ॥ सकळ कर्मँ सांडितां जाण ॥ घरामोक्ष ये आपण ॥ सहजचि जाण न प्रार्थितां ॥ ४३ ॥ ह्मणसी वेदार्थ न कळतां ॥ कर्म करितां कां त्यागितां ॥ कदा मोक्ष नये हातां ॥ जाण तत्त्वतां निश्चित ॥ ४४ ॥ भासला दोराचा सर्प थोर ॥ तेथ जपतां नाना मंत्रभार ॥ करितां वाजंत्र्यांचा गजर ॥ मारितां तिळभर ढळेना ॥ ४५ ॥ तो सादरें[1] निरीक्षितां[2] जाण ॥ होय त्या सर्पाचें निरसन[3] ॥ तेवीं निर्धारितां वेदवचन ॥ भवभय जाण निरसे ॥ ४६ ॥ भवभयाची विरक्तता ॥ त्या नांव जाण मोक्ष तत्त्वतां ॥ तो वेदार्थावीण हातां ॥ नये सर्वथा आणिकें ॥ ४७ ॥ वेदविधान न करितां ॥ कर्म त्यागिलें उद्धतँतां[4] ॥ तेणें निजमोक्ष नये हातां ॥ परी पाखंडता अंगीं वाजे ॥ ४८ ॥ विधानोक्त जो कर्मत्यागू ॥ करूनि संन्यास घेतल्या सांगू ॥ तैं ह्मणसी न पडे वेदपांगू ॥ हाही व्यंगूँ[5] विचारू ॥ ४९ ॥ श्रवणांग संन्यासग्रहण ॥ तेथही असे विधिविधान ॥ गुरुमहावाक्यें जें श्रवण ॥ तोही जाण वेदार्थ ॥ ५० ॥ ॥ आशंका ॥ ॥ करितां देवपितरांचें यजँन[6] ॥ ते होऊनियां प्रसन्न ॥ मोक्ष देती आपण ॥ तेंही वेदेंविण घडेना ॥ ५१ ॥ स्वाहाकारें तृप्त सुरँ[7] ॥ स्वधाकारें तृप्त पितर ॥ वेदविवियोगेंविण सुरपितर ॥ प्रसन्नाकार कदा नव्हती ॥ ५२ ॥

॥ श्लोक ॥ ॥ पितृदेवमनुष्याणां वेदश्चक्षुस्तवेश्वर ॥ श्रेयस्त्वनुपलब्धेऽर्थे साध्यसाधनयोरपि ॥ ४ ॥

॥ टीका ॥ ॥ नाथिलेंचि[8] चराचर ॥ देव मनुष्य आणि पितर ॥ वेदें प्रकाशूनि साचार ॥ पूज्यत्वें थोर प्रतिपादी ॥ ५३ ॥ त्याहीमाजी अतिविषम ॥ उत्तम मध्यम आणि अधम ॥ हे त्रिविध भेदसंभ्रम ॥ वेद उपक्रम करूनि दावी ॥ ५४ ॥ यापरी गुणदोषलक्षण ॥ तुवांचि वाढविले आपण ॥ या नांव ह्मणसी मोक्षसाधन ॥ तरी कां गुणदोष निवारिसी ॥ ५५ ॥ ऐशिया निरूपणघडमोडी ॥ तुझेनि बोलें पडे आँडी[9] ॥ तेणें गुणदोषांची परवडी ॥ बाधा रोकडी अंगीं वाजे ॥ ५६ ॥ अवघा संसार काल्पनिक ॥ तेथ एक स्वर्ग एक नरक ॥ हा मोक्ष हा अतिबंधक ॥ येणें वेदवादें लोक भ्रमविले तुवां ॥ ५७ ॥ पूर्वीं पुरुषाचे पोटीं ॥ नव्हती गुणदोषांची गोठी ॥ तुझ्या वेदानुवादपरिपाटीं ॥ गुणदोषीं दृष्टी दृढ झाली ॥ ५८ ॥ एवं तुझेनि बोलें जाण ॥ लोकांसि आली नागवण ॥ भोगावया नरक दारुण ॥ भ्रामक जाण वेदोक्ति तुझी ॥ ५९ ॥

श्लोक ॥ ॥ गुणदोषभिदादृष्टिर्निगमात्ते न हि स्वतः ॥ निगमे नापवादश्च भिदाया इति ह भ्रमः ॥ ५ ॥

॥ टीका ॥ ॥ एवं नानागुणदोषदृष्टीं ॥ तुझेनि वेदें वाढविली सृष्टी ॥ स्वतां पुरुषाचे पोटीं ॥ गुणदोषदृष्टी असेना ॥ ६० ॥ तुझ्या वेदानुवादविस्तरें ॥ गुणदोष झाले खरे ॥ ते तुझेनिही बलात्कारें ॥ चित्ताबाहेरें न निघती ॥ ६१ ॥ अनादि वेद प्रमाण ॥ हें तुझें मुख्य वेदवचन ॥ आतां न देखावे दोष

---

[1] विचारानें. [2] पहातां. [3] दूरीकरण. [4] उन्मत्तपणानें. [5] अविचाराचा. [6] पूजन. [7] देव. [8] न इच्छा करिता, अज्ञात असे. [9] संशय.

गुण ॥ हें नवें वचन मानेना[१] ॥ ६२ ॥ पहिले प्रकाशिले दोषगुण ॥ आतां निवारावया काय कारण ॥ हें न कळतां संपूर्ण ॥ भ्रमित
मन होतसे ॥ ६३ ॥ या भ्रमाची भ्रमनिवृत्ती ॥ कृपेनें करावी कृपामूर्ती ॥ ऐकोनि उद्धवाची वचनोक्ती ॥ काय श्रीपती बोलिला
॥ ६४ ॥ ऐकोनि उद्धवाची विनंती ॥ योगत्रयाची उपपत्ती ॥ अधिकारभेदें वेदार्थप्राप्ती ॥ स्वयें श्रीपती सांगत ॥ ६५ ॥ ॥ श्लोक ॥
श्रीभगवानुवाच ॥ ॥ योगास्त्रयो मया प्रोक्ता नृणां श्रेयोविधित्सया ॥ ज्ञानं कर्म च भक्तिश्च नोपायोऽन्योऽस्ति कुत्रचित् ॥ ६ ॥
॥ ॥ टीका ॥ ॥ तेथ मेघगंभीरा[२] वाणी ॥ गर्जोनि बोले सारंगपाणी[३] ॥ माझे परमकृपेवांचूनी ॥ माझी वेदवाणी कळेना ॥ ६६ ॥
वेदशास्त्रार्थें अतिसंपन्न ॥ जरी झाले अतिसज्ञान ॥ परी माझ्या अनुग्रहेंवीण[४] ॥ माझा वेदार्थ जाण कळेना ॥ ६७ ॥ ब्रह्मा चहूंमुखीं
वेद पढे ॥ त्यासीही वेदार्थाचें चोखडें ॥ कर्म नातुडेचि धडफुडें ॥ मा इतर बापुडे ते किती ॥ ६८ ॥ ब्रह्मा वेदार्थ आकळिता[५] ॥ तैं
शंखासुर वेद कां नेता ॥ ब्रह्मा वेदार्थी लीन[६] होता ॥ तैं नाभिलाषिता[७] सरस्वती ॥ ६९ ॥ माझा वेदाचा निर्धार ॥ तुज मी सांगेन
साचार ॥ ऐक उद्धवा सार ॥ वेदविचार तो ऐसा ॥ ७० ॥ माझ्या वेदासि नाहीं बहुबंड ॥ वृथा न बोलें उदंड ॥ ज्ञान भक्ति कर्म
कांड ॥ वेद त्रिकांड नेमस्त ॥ ७१ ॥ माझिया वेदांची उक्ती ॥ या तिहीं तें प्रतिपादिती ॥ यावेगळी उपायस्थिती ॥ नाहीं निश्चितीं उ
द्धवा ॥ ७२ ॥ कोणते तिनी योग ॥ कैसे अधिकाराचे भाग ॥ तेही पुसशी जरी चांग ॥ तरी ऐक सांग[९] सांगेन ॥ ७३ ॥ ॥ श्लोक ॥
निर्विण्णानां ज्ञानयोगो न्यासिनामिह कर्मसु ॥ तेष्वनिर्विण्णचित्तानां कर्मयोगस्तु कामिनाम् ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ जे कां ब्रह्मभुवन
पर्यंत ॥ साचार जीवीहूनि विरक्त ॥ जे विधिपूर्वक संकल्पयुक्त ॥ कर्म त्यागित संन्यासी ॥ ७४ ॥ ऐशिया अधिकाऱ्यांकारणें ॥ ज्ञान
योग प्रकट करणें ॥ जे कां निजज्ञान साधनें ॥ मज पावणें सायुज्यता ॥ ७५ ॥ जे कां केवळ अविरक्त[१०] ॥ विषयालागीं कामासक्त ॥
त्यांलागीं म्यां प्रस्तुत ॥ कर्मयोग येथ प्रकाशिला ॥ ७६ ॥ उंच नीच अधिकारी देख ॥ दोनी सांगीतले सविशेख ॥ आतां तिसरा अ
धिकारी अतिचोख ॥ अलोलिक अवधारी ॥ ७७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदृच्छया मत्कथादौ जातश्रद्धस्तु यः पुमान् ॥ न निर्विण्णो नाति
सक्तो भक्तियोगोऽस्य सिद्धिदः ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ ॥ हरिकथा अवघेचि ऐकती ॥ परी माझी श्रद्धा नुपजे चित्तीं ॥ कोणा एका अभि
नवगती ॥ श्रद्धा उत्पत्ती श्रवणेंचि होय ॥ ७८ ॥ आणिक श्रद्धेचें लक्षण ॥ जेंजें करी कथाश्रवण ॥ तें हृदयीं वाढे अनुसंधानें[१२] ॥ सप्रे
म मन उल्हासे ॥ ७९ ॥ नवल कथेची आवडी ॥ दाटती हरिखाचिया कोडी ॥ हृदयीं स्वानंदाची उभे गुढी ॥ एवढी गोडी श्रवणार्थी ॥ ८० ॥

---

१ [illegible] २ [illegible]भीर. ३ कृष्ण. ४ कृपेवांचून. ५ ग्रहण करितां. ६ तत्पर. ७ न इच्छिता. ८ पुष्कळ. ९ संपूर्ण. १० विषयलंपट ११ हर्षी. १२ मनन.

विषयांचें दोषदर्श[illegible] मुख्यत्वें बाधक स्त्री आणि धन ॥ आवरावीं रसना शिश्न ॥ हे आठवण अहर्निशीं ॥ ८१ ॥ घार्यीं आड कलें फळें ॥ तें पानयेना उपचारबळें ॥ तेवीं विषयदोष भोगमेळें ॥ कदाकाळें शमेनां[1] ॥ ८२ ॥ येतां देखोनियां मरण ॥ स्वयें होय कंपायमान ॥ तेवीं विषयभोग दारुण ॥ देखोनि आपण चळीं कांपे ॥ ८३ ॥ एवं विषयीं दोषदर्शन ॥ सर्वदा देखे आपण ॥ परी त्यागालागीं जाण ॥ सामर्थ्य पूर्ण आथिनां[2] ॥ ८४ ॥ सेवकीं राजा बंदीं धरिला ॥ तया स्त्रीचंदनादि भोग दीधला ॥ परी तो त्यासि विषप्राय जाहला ॥ भोगीं उबगला[3] अगत्यता ॥ ८५ ॥ एवं भोगितां त्या भोगासी ॥ नित्य पाहे निजनिर्गमासी ॥ तेवीं भोगितां हा विषयासी ॥ अहर्निशीं अनुतापी ॥ ८६ ॥ यापरी जो नव्हे विषयासक्त ॥ ना निधडा जो नव्हे विरक्त ॥ यालागीं माझा भक्तिपंथ ॥ मी बोलिलों निश्चित वेदवाक्यें ॥ ८७ ॥ येहीकरितां माझी भक्ती ॥ माझ्या स्वरूपीं लागे प्रीती ॥ सहजें होय विषयविरक्ती ॥ एवं सिद्धिदाती भक्ति हे माझी ॥ ८८ ॥ मी वेदोक्त बोलिलों आपण ॥ तेही त्रिविध योग संपूर्ण ॥ ज्ञान कर्म उपासन ॥ वेदोक्त लक्षण विभागे ॥ ८९ ॥ तेथ कोण देखे दोषगुण ॥ कोणांसि देहींचें अदर्शन[4] ॥ मध्यम भागें वर्त्ते कोण ॥ तेंही लक्षण अवधारी ॥ ९० ॥ जो आसक्त विषयांवरी ॥ तो कर्ममार्गींचा अधिकारी ॥ त्यासि गुणदोषां नाहीं उरी[5] ॥ हें सांगेल श्रीहरी पुढिले अध्यायीं ॥ ९१ ॥ जोकां विरक्त ज्ञानाधिकारी ॥ तो गुणदोषांहूनि बाहेरी ॥ तो पाहतां अवघे संसारीं ॥ न देखे तिळभरी गुणदोष ॥ ९२ ॥ जगअवघें ब्रह्मपूर्ण ॥ तेथ कैंचे दोषगुण ॥ ऐसे जे ज्ञानसंपन्न ॥ त्यां दोषदर्शन असेना ॥ ९३ ॥ अति आसक्त ना विरक्त ॥ ऐसे कां जे माझे भक्त ॥ ते पूर्वीं गुणदोष देखत ॥ परी सांडित विवेकें ॥ ९४ ॥ भूतीं[6] भूतात्मा मी परेश ॥ तेथ देखोंनये गुणदोष ॥ ऐसे भजननिष्ठ राजहंस ॥ ते गुणदोष सांडिती ॥ ९५ ॥ मी वेदार्थीं बोलिलों दोषगुण ॥ ते दोष त्यालागीं जाण ॥ पराचे देखावे दोषगुण ॥ हें वेदवचन असेना ॥ ९६ ॥ ऐसें करावें वेदार्थश्रवण ॥ दोष त्यजूनि घ्यावा गुण ॥ परी पुढिलांचा दोषगुण ॥ सर्वथा आपण न देखावे ॥ ९७ ॥ जो ज्याचे गुणदोष पाहे ॥ तो त्याचा पापविभागी होये ॥ जो पुढिलांचे गुणदोष गाये ॥ तो निरयां[7] जाये तेणें दोषें ॥ ९८ ॥ आतां कर्माचा अधिकारू ॥ सांगताहे शारंगधरू ॥ तो जाणोनियां विचारू ॥ कर्मादरू करावा ॥ ९९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तावत्कर्माणि कुर्वीत न निर्विद्येत यावता ॥ सत्कथाश्रवणादौ वा श्रद्धा यावन्न जायते ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ तंवचि करावा कर्मादर ॥ जंव विरक्ति नुपजे साचार ॥ ठाकल्या विरक्तीचें घर ॥ स्वर्गसंसार मळप्राय ॥ १०० ॥ होकां वमिलिया मिष्टान्ना ॥ परतोनि श्रद्धा नधरी रस

---

[1] नष्ट होतनाहीं. [2] सोडवतनाही. [3] कंटाळा. [4] नपाहणें. [5] ठिकाणा. [6] प्राणिमात्राचेठाईं. [7] नरकास.

ना ॥ तेवीं विषयभोगीं जाणा ॥ साचार मना चिळशी उपजे ॥ १ ॥ तेथ कर्मांची परिपाटी ॥ समूळ खुंटली गा गोठी ॥ कां दैवयोगें उल्हासू पोटीं ॥ माझ्या कथेचा उठी श्रवणादरू ॥ २ ॥ करितां माझी कथाश्रवण ॥ प्रेमें वोसंडे अंतःकरण ॥ विसरे देहगेहांची आठवण ॥ तेथें प्रत्यवाय जाण बाधीना ॥ ३ ॥ जैसें माझे कथेचें श्रवण ॥ तैसेंचि माझें हृदयीं स्मरण ॥ तेथें प्रत्यवाय धरी चरण ॥ येथून बोळवण माझी झाली ॥ ४ ॥ करितां मत्कथाश्रवण ॥ लोपल्या कोटिकर्माचरण ॥ प्रत्यवाय न बाधी जाण ॥ हा प्रताप पूर्ण मत्कथेचा ॥ ५ ॥ ॥ संमति श्लोक ॥ ॥ मत्कर्म कुर्वतां पुंसां कर्मलोपो भवेद्यदि ॥ तत्कर्म तेषां कुर्वंति तिस्रः कोट्यो महर्षयः ॥ १ ॥ ॥ ॥ अर्थ ॥ ॥ माझी करितां सप्रेम भक्ती ॥ भक्तांचीं नित्यकर्में राहती ॥ तेतीसकोटी ऋषि महंती ॥ संपूर्ण करिती कर्में त्यांचीं ॥ ६ ॥ एवढें मत्कथेचें महिमान ॥ माझें करितां कीर्तन पूजन ॥ तेथें प्रत्यवायाचें तोंड कोण ॥ संमुखवदन दाऊं नशके ॥ ७ ॥ होकां पूर्ण विरक्त नर ॥ कां माझे सेवेसि जो तत्पर ॥ तेथ कर्म बापुडें किंकर ॥ हें स्वयें श्रीधर बोलिला ॥ ८ ॥ कर्में करितां स्वधर्मस्थितीं ॥ उद्धवा आहे माझी प्राप्ती ॥ ते मी सांगेन तुजप्रती ॥ यथानिगुतीं अवधारी ॥ ९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्वधर्मस्थो यजन्यज्ञैरनाशीः काम उद्धव ॥ न याति स्वर्गनरकौ यद्यन्यन्न समाचरेत् ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ गृहस्थाश्रमीं स्वधर्मस्थिती ॥ जरी विचरे अनन्यगती ॥ तरी येथेंचि लाहे विरक्ती ॥ सुनिश्चितीं उद्धवा ॥ ११० ॥ अनन्यगतीचें विवरण ॥ तें तूं ह्मणशील कोण ॥ ऐक त्याचेंही लक्षण ॥ समूळ खूण सांगेन ॥ ११ ॥ परदारापरद्रव्यरती ॥ परवादाची वदंती ॥ ई नांव गा नारकी गती ॥ जाण निश्चितीं निर्धारू ॥ १२ ॥ दिविभोगाचेनि श्रवणें ॥ ज्याच्या मनचें बैसे धरणें ॥ कर्में तदनुकूल करणें ॥ तैं स्वर्गभोगणें अलोट ॥ १३ ॥ या जाण दोन्ही अनन्यगती ॥ यांतूनि काढूनियां वृत्ती ॥ यज्ञादिकीं मज यजिंती ॥ तैं नैराश्यस्थिती नित्यनैमित्यें ॥ १४ ॥ तैं नपडे स्वर्गीचे पेणें ॥ न घडे नरकासि जाणें ॥ येचि लोकीं विरक्त होणें ॥ तेंचि बोलणें हरि बोले ॥ १५ ॥ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अस्मिँल्लोके वर्तमानः स्वधर्मस्थोऽनघः शुचिः ॥ ज्ञानं विशुद्धमाप्नोति मद्भक्तिं वा यदृच्छया ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ असतां येलोकीं वर्तमान ॥ ऐसें करितां स्वधर्माचरण ॥ होय पुण्यपापांचें निर्दळण ॥ निर्मळत्वें जाण तो अतिपवित्र ॥ १६ ॥ तेथ निरसोनि भवभान ॥ प्रकाशे माझें शुद्ध ज्ञान ॥ कां सप्रेम माझें भजन ॥ परा भक्ति जाण तो लाहे ॥ १७ ॥ जे भक्तीमाजी मी आपण ॥ सदा होय भक्ता आधीन ॥ तेथ मोक्षासहित ज्ञान ॥ येऊनि आपण पायां लागे ॥ १८ ॥ ऐक ज्ञानाचा परिपाक ॥ संसारा नाव महादुःख ॥ मोक्ष तो ह्मणे परम सुख ॥ मद्भ

---

१ तिर[illegible] २ रोति. ३ [illegible]धाचो घोडा. ४ समोर तोंड. ५ एकनिष्ठतेचें. ६ दुसऱ्याशीं तंटाकरण्याची. ७ गोष्ट. ८ नरकसंबंधी. ९ अमर्याद. १० पूजिति. ११ जाणें. १२ राहत असतां.

क्त देख दोनी नम [illegible] ९ ॥ सप्रेम करितां माझें भजन ॥ नाठवे भवभयबंधन ॥ तेथ मोक्षासि पुसे कोण ॥ मद्भक्तां भक्तीचा पूण उल्हास ॥ १२० ॥ ज्यातें ह्मणती महादुःख ॥ तें भक्तांसि भगवद्रूप देख ॥ ज्यातें ह्मणती परम सुख ॥ तेंही आवश्यक भगवंत ॥ २१ ॥ यापरी भक्त माझ्या भजनीं ॥ विसरला सुखदुःखें दोनी ॥ मी एक मजवांचूनी ॥ आन त्रिभुवनीं देखेना ॥ २२ ॥ ऐशी माझी भक्ति पूर्ण ॥ साधूनि आणितां नये जाण ॥ जैं मी भगवंत होय प्रसन्न ॥ तैं यदृच्छा[२] जाण हें भक्ति लाभे ॥ २३ ॥ मी कैसेनि होय प्रसन्न ॥ ऐसें कल्पील तुझें मन ॥ तेथ नरदेह[३] गा कारण ॥ माझें प्रसन्नपण व्हावया ॥ २४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्वर्गिणोऽप्येतमिच्छंति लोकं निरयिणस्तथा ॥ साधकं ज्ञानभक्तिभ्यामुभयं तदसाधकम् ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ ज्यासि स्वर्गभोगाची थोर जोडी[४] ॥ जीहीं अमरत्वाची उभविली गुढी ॥ जे पडले स्वर्गाचे बांदवडीं[५] ॥ ते वांछिती आवडीं नरदेहातें ॥ २५ ॥ नरक यातना महाथोर ॥ जीहीं भोगिले भोग घोर ॥ ते मनुष्यदेहातें नर ॥ अतिसादर वांछिती ॥ २६ ॥ नरदेह परम पावन ॥ जो भक्तिज्ञानाचें आयतन[६] ॥ जेणें साधे ब्रह्मज्ञान ॥ तो धन्य धन्य नरदेह ॥ २७ ॥ जेणें नरदेह जाण ॥ निःशेष खुंटे जन्ममरण ॥ जेणें जीव पावे समाधान ॥ स्वानंदघन स्वयें होय ॥ २८ ॥ ज्या नरदेहाचे संगतीं ॥ होय अविद्येची निवृत्ती ॥ लाभे भगवत्पदप्राप्ती ॥ हे विख्यात ख्याती नरदेहीं ॥ २९ ॥ ज्या नरदेहाची प्राप्ती ॥ प्राणिमात्र[७] वांछिती ॥ प्राणी बापुडे ते किती ॥ स्वयें प्रजापती नरदेह वांछी ॥ १३० ॥ ऐसें नरदेहाचें श्रेष्ठपण ॥ येथ साधे भक्तिज्ञान ॥ परी भक्तिज्ञानास्तव जाण ॥ मनुष्यपण साधेना ॥ ३१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ न नरः स्वर्गतिं कांक्षेन्नारकीं वा विचक्षणः ॥ नेमं लोकं च कांक्षेत देहावेशात्प्रमाद्यति ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ ॥ झालिया नरदेहाची प्राप्ती ॥ अधर्में होय नरकगती ॥ कां संचितां[८] पुण्यसंपत्ती ॥ तेणें स्वर्गप्राप्ती अनिवार ॥ ३२ ॥ स्वर्गें होय पुनरावृत्ती[९] ॥ नरकीं घोर दुःखप्राप्ती ॥ सांडोनि देहाची प्रीती ॥ नरदेहीं आसक्ती[१०] धरूं ह्मणसी ॥ ३३ ॥ मनुष्यदेहाची आवडी ॥ तेचि देहबुद्धि रोकडी ॥ जेथ कामक्रोधांची पडे उडी ॥ प्रमाद[११] कोडी क्षणक्षणां ॥ ३४ ॥ नरक स्वर्ग इहलोकीं ॥ यांची प्रीती सांडूनि देख ॥ साधावें गा आवश्यक ॥ ज्ञान चोख कां निजभक्ती ॥ ३५ ॥ ज्ञान साधावयालागीं जाण ॥ कष्टावें नलगें गा आपण ॥ सप्रेम करितां माझें भजन ॥ दवडितां ज्ञान घरंरिघे[१२] ॥ ३६ ॥ गव्हांची राशी जोडल्या हातीं ॥ सकळ पक्कान्नें त्याचीं होती ॥ तेवीं आतुडल्या माझी भक्ती ॥ ज्ञानसंपत्ती घररिघे ॥ ३७ ॥ द्रव्य झालिया आपुले हातीं ॥ सकळ पदार्थ घरास येती ॥ तेवीं जोडल्या माझी भक्ती ॥ भुक्तिमुक्ती होती दासी ॥ ३८ ॥ ह्मणसी करितां भगवद्भक्ती ॥

---

[१] दुजें. [२] स्वाभाविकपणानें. [३] मनुष्यदेह. [४] प्राप्ति. [५] हद्दींत. [६] स्थान. [७] सर्व जीव. [८] संचय होतां. [९] पुनः जन्म. [१०] प्रीत. [११] असावधपणा. [१२] घरीं प्राप्त होतें.

विघ्नें छळावया आड येती ॥ मी सुदर्शन[१] घेऊन हातीं ॥ राखें अहोरात्रीं निजभक्तां ॥ ३९ ॥ पक्ष्याचेनि नामोच्चारें ॥ म्यां वेश्या[२] तारिली चमत्कारें ॥ पाडूनि विघ्नाचें दांतोरें[३] ॥ म्यां व्यभिचारें उद्धरिली ॥ १४० ॥ यालागीं नरदेह पावोन ॥ जो करी माझें भजन ॥ तोचि संसारीं धन्यधन्य ॥ उद्धवा जाण त्रिशुद्धी[४] ॥ ४१ ॥ भावें करितां माझे भक्तीसी ॥ भाविक उद्धरीं मी हृषीकेशी ॥ जे चढले ज्ञानाभिमानासी ॥ ते म्यां यमासी निरविली ॥ ४२ ॥ साधितां माझी भक्ति कां ज्ञान ॥ ज्यासि चढे ज्ञानाभिमान ॥ तो म्यां आपुलेनि हातें जाण ॥ दीधला आंदण महा दोषां ॥ ४३ ॥ उद्धवा तूं ऐसें ह्मणशी ॥ ते कां दीधले यमहातेशीं ॥ तो जाचूनियां महादोषियासी ॥ ज्ञानाभिमानासी सांडवी ॥ ४४ ॥ यालागीं सांडूनि देहाभिमान ॥ भावें करितां माझें भजन ॥ पूर्वील साधु सज्ञान ॥ नरदेहें जाण मज पावले ॥ ४५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एतद्विद्वान्पुरा मृत्योरभवाय घटेत सः ॥ अप्रमत्त इदं ज्ञात्वा मर्त्यमप्यर्थसिद्धिदम् ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ केवळ अस्थि[५] चर्म[६] मूत्र मळ ॥ पाहतां देहो अतिकर्दमळ[७] ॥ परि ब्रह्म परिपूर्ण निश्चळ ॥ हें निर्मळ फळ येणें साधे ॥ ४६ ॥ ऐसें नरदेहाचें कारण ॥ जाणोनि पूर्वील सज्ञान ॥ सांडोनियां देहाभिमान ॥ ब्रह्मसमाधान पावले ॥ ४७ ॥ देह निंद्य ह्मणोनि सांडावा ॥ तरी एवढा लाभ हारवावा[८] ॥ वंद्य ह्मणोनि प्रतिपाळावा ॥ तैं नेईल रौरवा[९] निश्चित ॥ ४८ ॥ देह सांडावा ना मांडावा[१०] ॥ येणें परमार्थचि साधावा ॥ तें सावधान ऐक उद्धवा ॥ गुप्त निजठेवा[११] सांगेन ॥ ४९ ॥ जेणें देहें वाढे भवभावो ॥ तेणेंचि देहें करी पहाहो ॥ होय संसाराचा अभावो ॥ अहंभावो सांडितां ॥ १५० ॥ सांडावया देहाभिमान ॥ पूर्वील साधु सज्ञान ॥ होऊनि नित्य सावधान ॥ ब्रह्मसंपन्न मद्रूपें ॥ ५१ ॥ नरदेहें ब्रह्मप्राप्ती ॥ ऐसें मानूनि निश्चितीं ॥ ह्मणसी विषयभोगाचे अंतीं ॥ ब्रह्मस्थिती साधीन ॥ ५२ ॥ ऐसें विश्वासतां आपण ॥ रोकडी आली नागवण[१२] ॥ देहासवें लागलें मरण ॥ हरिहरां जाण टळेना ॥ ५३ ॥ एवं देहाचें अनिवार्य मरण ॥ तें केव्हां येईल न कळे जाण ॥ यालागीं पूर्वींच आपण ॥ निज स्वार्थ जाण साधावा ॥ ५४ ॥ धरितां निजदेहाची गोडी ॥ अवचितां अदळेल[१३] यमधाडी ॥ बुडेल निजस्वार्थाची गोडी ॥ तें निजनिवाडीं हरि सांगे ॥ ५५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ छिद्यमानं यमैरेतैः कृतनीडं वनस्पतिम् ॥ खगः स्वकेतमुत्सृज्य क्षेम याति ह्यलंपटः ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ जेवीं कां वृक्षाचे अग्रीं नीड[१४] ॥ पक्षी करूनि वसे अतिगूढ[१५] ॥ तळीं त्याचि वृक्षाचें बूड ॥ छेदिती सदृढ निर्दय नर ॥ ५६ ॥ तें देखोनि वृक्षच्छेदन ॥ पक्षें सांडोनि गृहाभिमान ॥ पळाल्या[१६] पाविजे

---

[१] या नांवांचें चक्र. [२] व्यभिचारिणी स्त्री. [३] दांत. [४] निश्चयानें. [५] हाडें. [६] चामडें. [७] अमंगल, दुर्गंधि. [८] घालवावा. [९] नरकास. [१०] पाळावा. [११] रहस्य. [१२] विघ्न. [१३] येईल. [१४] घरटें. [१५] गुप्त. [१६] [illegible]तां.

कल्याण ॥ राहतां भर[illegible] अचुक ॥ ५७ ॥ त्या वृक्षाचिया ऐसें जाण ॥ देहासवें लागलें मरण ॥ तेथें जीवासि राहतां जाण ॥ दुःख दारुण अनिवार ॥ ५८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अहोरात्रैश्छिद्यमानं बुद्धायुर्भयवेपथुः ॥ मुक्तसंगः परं बुद्धा निरीह उपशाम्यति ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ अहोरात्र आयुष्यभंग ॥ कळिकाळाचा सवेग वेग ॥ हा जाण नीच नवा रोग ॥ अंगीं सांग लागला ॥ ५९ ॥ काळें काळवयसा[1] खातू ॥ हा देखोनि आयुष्याचा वातू ॥ जाणोनि नरदेहाचा प्रांतू ॥ होय अनासक्तु देहगेहां ॥ १६० ॥ जाणोनि देहाचें क्षणिकपण ॥ त्यागावया देहाभिमान ॥ साधावया भक्तिज्ञान ॥ अति सावधान जो होय ॥ ६१ ॥ न सांडितां देहाभिमान ॥ अंगीं आदळे जन्ममरण ॥ तेणें भयें कंपायमान ॥ वैराग्य पूर्ण स्वयें धरी ॥ ६२ ॥ वैराग्ययुक्त करितां भक्ती ॥ होय देहाभिमानाची निवृत्ती ॥ तैं घर रिघे ज्ञानसंपत्ती ॥ पायां लागती मुक्ती चारी ॥ ६३ ॥ ऐशी झालिया निजात्मप्राप्ती[2] ॥ सहजेंचि राहे प्रवृत्ती ॥ निवृत्तीसी होय निवृत्ती ॥ संसाराची शांती स्वयें होय ॥ ६४ ॥ ऐसे नरदेहा येऊनि देख ॥ पुरुष पावले परम सुख ॥ हें न साधिती जे मूर्ख ॥ त्यांसि देवो देख निंदित ॥ ६५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं प्लवं सुकल्पं गुरुकर्णधारम् ॥ मयानुकूलेन नभस्वतेरितं पुमान् भवाब्धिं न तरेत्स आत्महा ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ ॥ चौऱ्याशी लक्ष जीवयोनी ॥ त्यांत मनुष्यदेहावांचूनी ॥ अधिकारी ब्रह्मज्ञानीं ॥ आन[3] कोणी असेना ॥ ६६ ॥ जेणें देहें होय माझी प्राप्ती ॥ यालागीं आद्य[4] देहो यातें ह्मणती ॥ याची दुर्लभ गा अवाप्ती[5] ॥ भाग्यें पावती नरदेहा ॥ ६७ ॥ सदृढ ह्मणजे अव्यंग[6] ॥ अविकळ सकळ भोग ॥ नव्हे बहिरे मुके अंध पंग ॥ सर्वांगें सांग संपूर्ण ॥ ६८ ॥ भरतखंडीं नरदेहप्राप्ती ॥ हे परमभाग्याची संपत्ती ॥ तेथही विवेकू[7] परमार्थी ॥ त्याचा वशवर्ती[8] मी परमात्मा ॥ ६९ ॥ मी परमात्मा जेथ वशवर्ती ॥ तेथ सुरवरांचा केवा[9] किती ॥ परी हा देह नये पुढती ॥ दुर्लभ प्राप्ती नरदेहा ॥ १७० ॥ जोखितां पुण्यपाप समान ॥ तैं नरदेहाची प्राप्ती जाण ॥ तें पुडती पावावया आपण ॥ जोखूनि कर्माचरण कोणी न करी ॥ ७१ ॥ पुण्य झालिया अधिक ॥ स्वर्ग भोगणें आवश्यक ॥ पापाचें वाढल्या तुकं[10] ॥ भोगावे नरक अनिवार ॥ ७२ ॥ ऐसी कर्माची गति गहन ॥ एथ काकतालीयन्यायें[11] जाण ॥ अवचटें लाभे माणुसपण ॥ भवाब्धितारण महातारूं ॥ ७३ ॥ सुलभ ह्मणिजे अविकळ ॥ सुकल्प ह्मणिजे विवेकशीळ ॥ यासि वागवितां केवळ ॥ नावाडा कुशळ गुरु कर्णधार ॥ ७४ ॥ कानीं निजगुज उपदेशितां ॥ यालागीं गुरु कर्णधार ह्मणती तत्वतां ॥ कानीं धरितांचि उद्धरी

---

१ काळरूप आयुष्यानें. २ आत्मस्वरूपाच्या ज्ञानाची प्राप्ति. ३ इतर. ४ श्रेष्ठ. ५ प्राप्ति. ६ संपूर्ण अवयवांनीं युक्त. ७ विचार. ८ आज्ञेंत वागणारा. ९ पाड. १० माप. ११ कावळा बसण्यास व फांदी मोडण्यास जसी एक वेळ यावी त्याप्रमाणें.

भक्तां ॥ यालागीं सर्वथा गुरु कर्णधार ॥ ७५ ॥ भवाब्धीमाजी नरदेह तारूं ॥ तेथ सद्गुरु तोचि कर्णधारू ॥ त्यासि अनुकूल वायू मी श्रीधरू ॥ भवाब्धि परपारू पावावया ॥ ७६ ॥ कैसा गुरु कर्णधार कुशाळ ॥ आवर्त[1] खळाळ आंदोळ[2] ॥ चुकवूनि विकल्पाचे कल्लोळ ॥ साम्य पाणिढाळ सवेग काढी ॥ ७७ ॥ लावूनि विवेकाचे आवळें[3] ॥ तोडिती कर्माकर्मांचीं जळें ॥ भजनशिडाचेनि बळें ॥ नाव चाले सवेग ॥ ७८ ॥ कामक्रोधादि महामासे ॥ तळपती घ्यावया आमिषें[4] ॥ त्या घालूनि शांतिचेनि पाशें ॥ तारूं उल्हासें चालवी ॥ ७९ ॥ ठाकतां सारूप्यादि बंदरें ॥ तारुवामाजी अतिगजरें ॥ लागलीं अनुहत[5] तुरें ॥ जयजयकारें गर्जती ॥ १८० ॥ नेतां सलोकतेचे पेंठे ॥ तारूं उलथेल अवचटें ॥ लावितां समीपतेचे वाटे ॥ तारूं दाटे दोहींसवां ॥ ८१ ॥ करावें स्वरूपतेमाजी स्थिरू ॥ तंव तो दाटणीचा उतारू ॥ ऐसा जाणोनियां निर्धारू ॥ लोटिलें तारूं सायुज्यामाजी ॥ ८२ ॥ ते धार्मिकाची धर्मपेंठ ॥ नाहीं शुकसारा खटपट ॥ वस्तु अवघीच चोखट ॥ घ्यावी एकवट संवसाटी ॥ ८३ ॥ ऐसें दुर्लभ नरदेहाचें तारूं ॥ जेथ श्रीगुरुरूपें कर्णधारू ॥ येणें नतरेच संसारू ॥ तो जाणावा नरू आत्महंता[6] ॥ ८४ ॥ नरदेह वेंचिलें विषयासाठीं ॥ पुढें नरक भोगावया कल्पकोटी ॥ तरी आपुलेनि हातें निजपोटीं ॥ शस्त्र दाटी[7] स्वयें जेवीं ॥ ८५ ॥ परपारा अवश्य आहे जाणें ॥ तेणें नाव फोडूनि भाजिजे चणे ॥ कां पांघरुणें जाळूनि तापणें ॥ हिंवाभेणें सुज्ञानीं ॥ ८६ ॥ तैसें येथ झालें गा साचार ॥ थित्या नरदेहा नागवले नर ॥ पुढां दुःखाचे डोंगर ॥ अति दुस्तर वोढवले ॥ ८७ ॥ सकळ योनी विषयासक्ती ॥ सर्वांसि आहे निश्चितीं ॥ नरदेहीं तैशी विषयस्थिती ॥ तैं तोंडीं माती पडली कीं ॥ ८८ ॥ पावोनि श्रेष्ठ नरशरीर ॥ जो नुतरेचि[8] संसारपार ॥ तो आत्महत्यारा नर ॥ सत्य साचार उद्धवा ॥ ८९ ॥ कोटि ब्रह्महत्या गोहत्यांसी ॥ प्रायश्चित्त आहे शास्त्रार्थैंसी ॥ परी आत्महत्या घडे ज्यासी ॥ प्रायश्चित्त त्यासी असेना ॥ १९० ॥ जो आत्महत्या करूनि निमाला[9] ॥ तो मरतांचि नरकासि गेला ॥ प्रायश्चित्ता कोण आहे उरला ॥ मा शास्त्रार्थैं बोला बोलवे ॥ ९१ ॥ अमृत विकूनि कांजी प्याला ॥ तैसा नरदेहीं विषय भोगिला ॥ हा थोर नाड जीवासि झाला ॥ विसरोनि आपुला निजस्वार्थ ॥ ९२ ॥ लाहोनि उत्तम शरीर ॥ व्यर्थ विषयासक्त नर ॥ नरकीं बुडाले अपार ॥ हें सारंगधर बोलिला ॥ ९३ ॥ असो तया मूर्खांचिया गोठी ॥ ऐक उत्तमाची हातवटी ॥ जे वेदार्थपरिपाटीं ॥ निजहितदृष्टी सावध ॥ ९४ ॥ अतिविरक्त जे स्वभावें ॥ तिहीं काय कर्तव्य करावें ॥ कोणा अर्थातें त्यजावें ॥ तेंचि देवें सांगिजे ॥ ९५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदारंभेषु निर्विण्णो विरक्तः संयतेंद्रियः ॥ अभ्यासेनात्मनो योगी धार

---

१ भोंवरे. २ हेळकावे. ३ [illegible]. ४ मांस. ५ प्रणवाचीं. ६ आपला घात करणारा. ७ खुपशी. ८ उतरतनाहीं. ९ मेला.

येद्चलं मनः ॥ १८ [illegible]ीका ॥ ॥ जो कर्मारंभींच विरक्त ॥ फळाशे नातळे[1] ज्याचें चित्त ॥ मज निजमोक्ष व्हावा येथ ॥ हेंही पो
टांत स्मरेना ॥ ९६ ॥ खडतर वैराग्याची दृष्टी ॥ इंद्रियांसि विषयाची गोष्टी ॥ करूंचि नेदी महाहटी ॥ धारणा नेहटीं दृढ राहे ॥ ९७ ॥
करूनियां श्रवण मनन ॥ माझ्या स्वरूपाचें अनुसंधान ॥ अखंड करी निदिध्यासन ॥ तिळभरी मन ढळों नेदी ॥ ९८ ॥ धरोनि धार
णेचें बळ ॥ स्वरूपीं मन अचंचळ ॥ अणुभरी[2] होउंनेदी विकळ ॥ राखे निश्चळ निजबोधें ॥ ९९ ॥ एकाकी मन पाहे ॥ स्वरूपीं कैंचें
निश्चळ होये ॥ त्या अभ्यासाचे उपायें ॥ स्वयें सांगताहे श्रीकृष्ण ॥ २०० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ धार्यमाणं मनो यर्हि भ्राम्यदाश्वनवस्थि
तम् ॥ अतंद्रितोऽनुरोधेन मार्गेणात्मवशं नयेत् ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्वरूपीं लावितां अनुसंधान[3] ॥ जरी निश्चळ नव्हे मन ॥ न सां
डी आपुले गुण ॥ चंचळपण स्वभावें ॥ १ ॥ साधक आळसें विकळे ॥ कां आठवी विषयसोहळे ॥ तैं स्वरूपींहूनि मन पळे ॥ निज
चंचळे स्वभावें ॥ २ ॥ तेथें नेहटूनि[4] आसन ॥ स्वयें होऊनि सावधान ॥ स्मरोनि सद्गुरूचे चरण ॥ स्वरूपीं मन राखावें ॥ ३ ॥ ॥ आ
शंका नेदितां विषयदान ॥ हाटवलें[5] क्षोभे मन ॥ तरी न सांडोनि अनुसंधान ॥ द्यावें अन्नपान विधानोक्त ॥ ४ ॥ सर्पा पाजिलें पी
यूष[6] ॥ तेंचि परतोनि होय विष ॥ तेवीं मनासि देतां विषयसुख ॥ अधिक देख खवळेल ॥ ५ ॥ ऐसें द्यावें विषयदान ॥ जेणें आकळ
लें राहे मन ॥ तेंचि अर्थाचें निरूपण ॥ स्वयें नारायण सांगत ॥ ६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मनोगतिं न विसृजेज्जितप्राणो जितेंद्रियः ॥ स
त्वसंपन्नया बुद्ध्या मन आत्मवशं नयेत् ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ मोकळें न सांडूनि मन ॥ न सोडूनि अनुसंधान ॥ करावें अन्नपानश
यन[7] ॥ हें विषयदान निजहिता ॥ ७ ॥ साधकें साधूनि आपण ॥ जरी जिंकिले इंद्रियप्राण ॥ तरी मोकळें सोडूंनये मन ॥ स्वरूपें नेह
टून राखावें ॥ ८ ॥ जो मनासि विश्वासला ॥ तो कामक्रोधीं नागवला[8] ॥ संकल्पविकल्पीं लुटिला ॥ विसंचिला[9] मायामोहें ॥ ९ ॥
जाणोनि मनाचें महाबळ ॥ त्यासि विवेक द्यावा मोकळ ॥ तो हालोंनेदी केवळ ॥ करी निश्चळ निजांगें ॥ २१० ॥ मनाविवेका
चे उभयसंधीं ॥ सत्वसंपन्न[10] होय बुद्धी ॥ ते विषयांचे कंद[11] छेदी ॥ तोडी उपाधी सविकार[12] ॥ ११ ॥ मन जेथ जेथ पळोनि जाये ॥
तेथ तेथ विवेक उभा राहे ॥ मग सत्वबुद्धीचेनि साह्यें ॥ मोडी पाये मनाचे ॥ १२ ॥ ऐसें मनाचें खुंटलिया बळ ॥ मन स्वरूपीं
होय निश्चळ ॥ जेवीं जळगार केवळ ॥ ठाके गंगाजळवस्तीसी ॥ १३ ॥ यापरी स्वरूपीं मन ॥ स्वयें पावे समाधान ॥ तोचि यो
ग परम पावन ॥ समाधान जीवशिवां ॥ १४ ॥ जीवपरमात्म्यांची एकात्मता ॥ तोच परमयोग तत्त्वतां ॥ येचिविखींची कथा ॥

---

१ लुब्ध होतनाहीं. २ यत्किंचितही. ३ लक्ष्य. ४ घालून. ५ हट्टी. ६ अमृत. ७ भोजन, पाणी पिणें व निद्रा. ८ नाडला. ९ सांपडला. १० सत्त्वगुणयुक्त. ११ मूळ. १२ विकारासहित.

अश्वदृष्टांता हरि सांगे ॥ १५॥ ॥ श्लोक ॥ ॥एष वै परमो योगो मनसः संग्रहः स्मृतः ॥ हृदयज्ञत्वमन्विच्छन् दम्यस्येवार्वतो मुहुः
॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥जैसा अश्वारूढ उपलाणी[1] ॥ वश्य करी अश्वसाहणी ॥ मागें तरटांचा कर झणाणी ॥ पुढें राखे नेहटूनि रागवाग
॥ १६ ॥ तेथ जेंजें पाऊल वोजा करी ॥ तेथ मान दे जीजीकारीं ॥ जेथ फुटोनि पडे बाहेरी ॥ तेथ तरट मारी सवर्म ॥ १७॥ जेथ ह
टावला न सांडी खोडी ॥ तेठायीं दे मोकळी वाडी ॥ परी निःशेष पाडी ना सोडी ॥ ऐसा पडिपाडीं[3] राखत ॥ १८ ॥ दमनीं देखोनि अ
त्यादरू ॥ स्वामिहृदय जाणे वारू ॥ आणि वारुवाचें अभ्यंतरू ॥ कळे साचारू स्वामीसी ॥ १९ ॥ ऐसें उभयशरीर ऐक्ययोगें ॥ वारू
न धरितां रागवागें ॥ अडणें उडणें सांडी वेगें ॥ मग नाचों लागे मोकळा ॥ २२० ॥ ऐसें वश्य केलिया अश्वातें ॥ मग कर्त्याचिया
मनोगतें ॥ वारू नाचे कांचेनि[4] सुतें ॥ यापरी मनातें दमावें ॥ २१ ॥ मनोजयो कीजे आपण ॥ तोचि योग परम कारण ॥ हेंचि मागि
ले श्लोकीं निरूपण ॥ तुज म्यां संपूर्ण सांगीतलें ॥ २२ ॥ नृदेहमाद्यं या श्लोकाचे अंतीं ॥ कर्मवैराग्यद्वारा मुक्ती ॥ आतां सांगीतली
हे स्थिती ॥ उत्तमगतीं अभ्यास ॥ २३ ॥ मुख्य सांख्ययोगें माझी प्राप्ती ॥ तें मी सांगेन तुजप्रती ॥ मिथ्या संसाराची स्फूर्ती ॥ ब्रह्मसं
वित्तीं साचार ॥ २४ ॥ हें ज्ञानगहन निरूपण ॥ तुज मी सांगेंन गुह्यज्ञान ॥ जें असोनि त्रिगुणीं वर्तमान ॥ अलिप्त जाण गुणकार्या
॥ २५ ॥ तुज मी सांगेन गुह्यज्ञान ॥ हें ऐकोनि देवाचें वचन ॥ उद्धव स्वयेंचि झाला कान ॥ अतिसावधान श्रवणार्थीं ॥ २६ ॥ देखो
नि उद्धवाचा अत्यादरू ॥ आर्त्तचित्तचकोरचंद्रू ॥ निजज्ञानगुणसमुद्रू ॥ काय यादवेंद्रू बोलिला ॥ २७॥ ॥ श्लोक ॥ ॥ सांख्येन सर्व
भावानां प्रतिलोमानुलोमतः ॥ भवाप्ययावनुध्यायेन्मनोयावत्प्रसीदति ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥ जें सृष्टिपूर्वीं अलिप्त ॥ तेंचि सृष्टिउदयीं
सृष्टी आंत ॥ महत्तत्त्वादि देहपर्यंत ॥ तत्त्वीं अनुगत[5] तेंचि वस्तु ॥ २८ ॥ आणि सृष्टीच्या स्थितिविशेषीं ॥ गुणकार्यातें तेंचि प्रकाशी ॥
शेखीं गुणकार्यातें ग्रासी ॥ उरे अवशेषीं तें वस्तु ॥ २९ ॥ नग न घडतां सोनेंचि साचें ॥ नग घडवितां सोनेपण नवचे[6] ॥ नग मो
डितां सोन्याचें ॥ घडमोडिचें भय नाहीं ॥ २३० ॥ मेघापूर्वीं शुद्ध गगन ॥ मेघ विराल्या गगनीं गगन ॥ मेघासबाह्य गगन जाण ॥
अलिप्त जाण संचलें ॥ ३१ ॥ तेवीं उत्पत्तिस्थितिप्रळयांतीं ॥ वस्तु संचली[7] अलिप्तस्थिती ॥ तेहीविखींची उपपत्ती ॥ उद्धवा तुजप्रती
सांगेन ॥ ३२ ॥ कुलाल जेंजें भांडें घडित ॥ त्यासि मृत्तिका नित्य व्याप्त ॥ तेवीं जेंजें तत्त्व उपजत ॥ तेंतें व्यापिजेत वस्तूनें ॥ ३३ ॥
सागरीं जेजे उपजे लहरी ॥ तीसि जळ सबाह्यांतरीं ॥ तेवीं महत्तत्त्वादिदेहवरी ॥ सबाह्याभ्यंतरीं चिन्मात्र[8] ॥ ३४ ॥ होकां जोजो

---

१ घोड्याच्या उपमेनें. [illegible]रस्वार. ३ मोठ्या युक्तीनें. ४ कच्या. ५ प्राप्त. ६ जातनाहीं. ७ पसरली. ८ केवळ ब्रह्मच.

पदार्थनिपजे ॥ तो [illegible]शें व्यापिजे सहजें ॥ तेवी जेंजें तत्त्व उपजे ॥ तेंतें व्यापिजे चैतन्यें ॥ ३५ ॥ अनुलोमें पाहतां यापरी ॥ वस्तु वेगळें तिळभरी ॥ कांहीं न दिसे गा बाहेरी ॥ निजनिर्धारीं विचारितां ॥ ३६ ॥ पृथ्वीपासूनि प्रकृतीवरी ॥ लयो पाहतां प्रति[1]लोमकरीं ॥ जेवीं जळगारा जळाभीतरी ॥ तेवीं लयो चिन्मात्रीं तत्त्वांचा ॥ ३७ ॥ प्रकृत्यादितत्त्वें प्रबळलीं ॥ विकारोनि लया गेलीं ॥ वस्तू अलिप्तपणें संचली ॥ नाहीं मारवली अणुमात्र ॥ ३८ ॥ एवं उत्पत्तिस्थितिप्रळयांत ॥ वस्तू अविनाशी अलिप्त ॥ नित्य शुद्ध बुद्ध मुक्त ॥ जाण निश्चित उद्धवा ॥ ३९ ॥ ऐशा वस्तूच्याठायीं भवं[2]जल्प ॥ तो जाण पां मिथ्या आरोप ॥ जेवीं दोराअंगीं सर्प ॥ वृथा भयकंप भ्रांतासी ॥ २४० ॥ सर्प दवडोनि दोर शुद्ध ॥ करावा ऐसा नाहीं बोध ॥ एकला एक परमानंद ॥ ऐसें गोविंद बोलिला ॥ ४१ ॥ ऐशिये वस्तूच्याठायीं जाण ॥ मन विसरे मनपण ॥ येणें साधनें पैं जाण ॥ होय ब्रह्म पूर्ण साधकू ॥ ४२ ॥ हें परम अगाध साधन ॥ ज्यासि नाटोपे गा जाण ॥ त्याचें निश्चळ व्हावया मन ॥ सुगं[3]म साधन देवो सांगे ॥ ४३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ निर्विण्णस्य विरक्तस्य पुरुषस्योक्तवेदिनः ॥ मनस्त्यजति दौरात्म्यं चिंतितस्यानुचिंतया ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ जन्ममरणांचे महा आवर्त ॥ भोगितां वैराग्यें अतिसंतप्त ॥ अ[4]तएव विषयीं विरक्त ॥ जैसें विषयुक्त परमान्न ॥ ४४ ॥ मघमघीत अमृतफळ ॥ त्यावरी सर्पें[5] घातली गरळ ॥ तेवीं विषयमात्र सकळ ॥ देखे केवळ महाबाधा ॥ ४५ ॥ ऐसेनि विवेकें विवेकवंत ॥ श्रद्धापूर्वक गुरुभक्त ॥ गुरूनें सांगीतला जो अर्थ ॥ तो हृदयांत विसरेना ॥ ४६ ॥ गुरूनें बोधिला जो अर्थ ॥ सदा असे तो हृदयीं ध्यात ॥ चित्तीं चिंतिला जो अर्थ ॥ तोचि असे चिंतित पुनःपुनः ॥ ४७ ॥ करितां प्रत्यावृत्तीं चिंतन ॥ संकल्प विकल्प सांडी मन ॥ त्यजोनियां देहाभिमान ॥ ब्रह्मसंपन्न स्वयें होय ॥ ४८ ॥ झालिया ब्रह्मसंपन्न ॥ स्वरूपीं लीन होय मन ॥ हाही एक उपावो जाण ॥ न ठाके तरी आन अवधारी ॥ ४९ ॥ ॥ श्लोक ॥ यमादिभिर्योगपथैरान्वीक्षिक्याच विद्यया ॥ ममार्चोपासनाभिर्वा नान्यैर्योग्यं स्मरेन्मनः ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ त्यजोनियां सकळ भोग ॥ यमनियमेंसी योगमार्ग ॥ आसनस्थ होऊनि चांग ॥ देऊनि मुद्रा सांग अवधारी ॥ २५० ॥ तेव्हां अपान ऊ[6]र्ध्वमुखें वाढे ॥ जों वरता स्वाधिष्ठानें[7] चढे ॥ प्राण प्राणायामीं अडे ॥ तो मागुता मुरडे नाभिस्थाना ॥ ५१ ॥ सम होतां प्राणापान ॥ पिंडब्रह्मांडशोधन ॥ स्वयें वायु करी गा आपण ॥ मलक्षालन शरीरीं ॥ ५२ ॥ कफ पित्त दोहीं खाये ॥ नाडींतें शोधीत जाये ॥ जुने संचित मळ पाहे ॥ तेही लवलाहें निर्दळी ॥ ५३ ॥ नवल वायूचें प्रबळबळ ॥ पिंडब्रह्मांडींचे सकळ मळ ॥ धोऊनि करी गा निर्मळ ॥ पवि

---

१ उलट क्रमानें. २ संसाराची वार्ता. ३ सोपें. ४ म्हणूनच. ५ वरचेवर. ६ वरच्या बाजूनें. ७ या नांवाच्या चक्रीं.

त्रता केवळ महायोगें ॥ ५४ ॥ जेथें प्रकटे रोगाची परवडी ॥ महाविघ्नांची पडे उडी ॥ धांवती विकल्पाच्या कोडी ॥ सिद्धीची रोकडो नागवण पावे ॥ ५५ ॥ इतुकीं अंगीं आदळतां जाण ॥ साधक न सांडी जैं आपण ॥ तैं सम होती प्राणापान ॥ सत्य जाण उद्धवा ॥ ५६ ॥ प्राणापानाच्या मिळणी ॥ शक्ति चेतवे कुंडलिनी[1] ॥ ते प्राणापानांतें घेऊनी ॥ सुषुम्नास्थानीं प्रवेशे ॥ ५७ ॥ ते आद्यशक्ति अचाट ॥ चढे पश्चिमेचा महाघाट ॥ तेथें षड्चक्रांचा कडकडाट ॥ पूर्वींच सपाट पवनें[2] केला ॥ ५८ ॥ कुंडलिनी चालतां वाटा ॥ चुकल्या आधिव्याधीच्या लाटा ॥ बुजाल्या विकल्पाच्या वाटा ॥ महाविघ्नाच्या झटा बाधूं न शकती ॥ ५९ ॥ साधितां उल्हाट[3]शक्तीचे उलट ॥ उघड ब्रह्मरंध्रींचें कपाट ॥ तंव लोटले सहस्रदळाचे पाट ॥ अतिचोखट चंद्रामृत ॥ २६० ॥ तें प्राशूनि कुंडलिनी[4] बाळा ॥ संतोषें सांडी गरळा ॥ ते शरीरीं वोतली कळा ॥ तेणें पालटला देहभाव ॥ ६१ ॥ शरीराकारें वोतिली कळा ॥ तेणें देहो दिसे अति सोज्वळा ॥ ना तो ब्रह्मरसाचा पुतळा ॥ कीं उमलेला[5] कळा शांतिसुखाचा ॥ ६२ ॥ जीवाचें जीवन मुसावलें ॥ कीं ब्रह्मविद्येसी फळ आलें ॥ ना ते चैतन्या कोंब निघाले ॥ तैसे शोभले अवयव ॥ ६३ ॥ त्या देहाचेनि लाघवें ॥ जगाच्या डोळां सामावे ॥ जीवामाजी वांवरों पावे ॥ निजस्वभावें सबाह्य ॥ ६४ ॥ तो पवनाची करोनि पायरी ॥ सुखें चाले गगनावरी ॥ या नांव परमखेचरी ॥ सिद्धेश्वरीं बोलिजे ॥ ६५ ॥ त्याचिया अंगींचिया दीप्ती ॥ खद्योतप्राय गभस्ती[7] ॥ त्याचें चरणामृत वांछिती ॥ अमृतपती इंद्र चंद्र ॥ ६६ ॥ क्रमूनि औटपीठ गोल्हाट[8] ॥ भ्रमर गुंफादि शेवट ॥ भेदूनि सोहंहंसाचें पीठ ॥ परमात्मा प्रकट होऊनि ठाके ॥ ६७ ॥ हा योगाभ्यासें योग गहन ॥ अवचटें कोणा साधे जाण ॥ हा मार्ग गा अतिकठिण ॥ स्वयें श्रीकृष्ण बोलिला ॥ ६८ ॥ हेंचि मानतें श्रीकृष्णनाथा ॥ तरी आन साधन न सांगता ॥ हा मूळश्लोकार्थ पाहतां ॥ कळेल तत्त्वतां साधूंसी ॥ ६९ ॥ हा ऐकतां अतिगोड वाटे ॥ परी करितां काळीज फाटे ॥ परी न साधेचि महाहटें ॥ येथ थकले लाटें सुरनर ॥ २७० ॥ असो हें अत्यंत कठिण ॥ तुज मी सांगेन गा आन ॥ आन्वीक्षिकी[9] विद्या जाण ॥ त्वंपदशोधन विवेकू ॥ ७१ ॥ तत्पदाहूनि वेगळा ॥ पांचं[10]भौतिक त्वंपदाचा गोळा ॥ चुकोनि व्यापका सकळा ॥ कोठें निपजला एकदेशीं ॥ ७२ ॥ अनादिमायाप्रवाहयोगें ॥ तन्मात्राविषयसंगें ॥ मनाचेनि संकल्प पांगें ॥ वेगळें सवेगें मानलें ॥ ७३ ॥ मनें मानिला जो भेदू ॥ त्यासि करावा अभेदबोधू ॥ येचि अर्थीं स्वयें गोविंदू ॥ विवेक विशदू दाखवी ॥ ७४ ॥ पांचभौतिक शरीर सरे ॥ तेथ पृथ्वी प्रत्यक्ष जळीं विरे ॥ पृथ्वीचा गंध जळीं भरे ॥ तैं पृथ्वी सरे निःशेष ॥ ७५ ॥ त्या जळाचा जळरसू ॥ शोधूनि जैं हुताशू ॥

---

१ या नांवाच्या चक्रीं [illegible] भून-२ या नांवाचें चक्र. ४ नाभिजवळील चक्र. ५ विकसला. ६ संचार करू. ७ सूर्य. ८ एक चक्र. ९ तर्कशास्त्र. १० पांच भूतांपासोन झालेला

तैं जळाचा होय हा[illegible]जनिःशेषू तेजत्वें ॥ ७६ ॥ त्या तेजाचें कारणरूप ॥ गिळी वायूचा पूर्ण प्रताप ॥ तेव्हां निजतेजाचें मावळे रूप ॥ वायूची झडप लागतां ॥ ७७ ॥ त्या वायूचा स्पर्शगुण ॥ नेतां गगनें हिरून ॥ तेव्हां वायूचें नुरे भान ॥ राहे मुसावोन[1] गगनींची ॥ ७८ ॥ केवळ गगना नुरे उरी ॥ तें गुणकार्येंसी रिघे अहंकारीं ॥ अहंकारू रिघे माये माझारी ॥ माया परमेश्वरीं मिथ्या होय ॥ ७९ ॥ रात्रि आपुलिया प्रौढीं ॥ आंधारातें वाढवी वाढी ॥ तेथ नक्षत्रखद्योतकोडी ॥ मिरवती गाढीं निजतेजें ॥ २८० ॥ ते रात्री येतां सूर्यापुढें ॥ स्वकार्येंसी सगळी उडे ॥ पाहों जातां मागें पुढें ॥ कोणीकडे असेना ॥ ८१ ॥ तेवीं परमेश्वरीं माया ॥ कार्यकारणेंसी गेली वायां ॥ मिथ्यात्वेंचि नये आया ॥ नुरेचि दिसावया मार्गमोसू[2] ॥ ८२ ॥ माया प्रतिबिंबित चैतन्या ॥ आणि जीव या अभिधाना ॥ ते माया गेलिया जाणा ॥ जीवपणा हांसू[3] ॥ ८३ ॥ बुडालें जीवशिवांचें भान ॥ उडालें मनाचें मनपण ॥ कोंदलें चैतन्यघन ॥ परम समाधान साधकां ॥ ८४ ॥ करितां त्वंपदाचें शोधन ॥ होय तत्पदीं समाधान ॥ हे आन्वीक्षिकी विद्या जाण ॥ विवेकसंपन्न पावती ॥ ८५ ॥ न करितां योगसाधन ॥ न शिणतां कष्टें जाण ॥ सुगम जोडे समाधान ॥ तुज मी आन सांगेन ॥ ८६ ॥ जेथ कष्ट करितो थोडे ॥ परम यागाचें फळ जोडे ॥ त्वंपदशोधन त्यापुढें ॥ होय बापुडें लाजोनी ॥ ८७ ॥ ते माझी गा निजभक्ती ॥ माझ्या रामकृष्णादि मूर्त्ती ॥ पूजितां त्या अतिप्रीतीं ॥ मी श्रीपती संतोषें ॥ ८८ ॥ तेथें माझें श्रवण माझें कीर्तन ॥ माझें नाम माझें स्मरण ॥ माझें ध्यान माझें भजन ॥ माझें चिंतन सर्वदा ॥ ८९ ॥ हृदयीं माझें सदा ध्यान ॥ मुखीं माझें नाम माझें स्तवन ॥ श्रवणीं माझी कथा माझें कीर्त्तन ॥ माझें पूजन सर्वदा ॥ २९० ॥ चरणीं प्रदक्षिणा यात्रागमन ॥ अष्टांगीं[4] सर्वदा माझें नमन ॥ ऐसें अनन्य माझें भजन ॥ विनटलेपण मद्भक्तीं ॥ ९१ ऐसे विनटले जे माझे भजनीं ॥ त्यांसि मी विकलों चक्रपाणी ॥ त्यावेगळें पढियंतेपणीं ॥ आन त्रिभुवनीं मज नाहीं ॥ ९२ ॥ यापरी करितां माझें भजन ॥ नलगे योगादिकांचें स्मरण ॥ मी भक्तिवेगळा श्रीकृष्ण ॥ नातुडें जाण उद्धवा ॥ ९३ ॥ अवचटें[5] दैवगतीं येथ ॥ योग्यासि जैं घडे दुरितें[6] ॥ त्यासि नलगे कर्म प्रायश्चित्त ॥ तेंचि सांगत श्रीकृष्ण ॥ ९४ ॥

॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदि कुर्यात् प्रमादेन योगी कर्म विगर्हितम् ॥ योगेनैव दहेदंहो नान्यत्तत्र कदाचन ॥ २५ ॥

॥ टीका ॥ ॥ भक्तासि निंद्य कर्म न घडे ॥ त्यासि मी राखता मागें पुढें ॥ हें आलें या योग्यांकडे ॥ तेथही घडे प्रमादें[7] ॥ ९५ ॥ प्रमादें घडलें जें पाप ॥ त्याचा तीव्र अनुताप ॥ जेवीं दावाग्नीं[8] पोळल्या सर्प ॥ तैसा संकल्प पापासी ॥ ९६ ॥ गोमाशी लागतां सिंहासी ॥ तो जेवीं झाडी सर्वांगासी ॥

---

१ लीन होऊन. २ खूण. ३ नाश. ४ दोन हात, दोन पाय, दोन गुडघे, हृदय व मस्तक या आठ अंगांनीं ५ सहज. ६ पातक. ७ असावधपणानें. ८ वणव्यांत.

तेवीं योगी देखोनि पापासी ॥ जो अहर्निशीं अनुतापी ॥ ९७ ॥ तेणें होऊनि सावचित्त ॥ योगबळें निजयोगयुक्त ॥ पाप निर्दाळावें समस्त ॥ हेंचि प्रायश्चित्त योग्यांसी ॥ ९८ ॥ हे सांडोनियां योगस्थिती ॥ जैं लावूं धांवे शेणमाती ॥ तैं नागवला गा निश्चितीं ॥ नव्हेचि निष्कृती[1] पापाची ॥ ९९ ॥ हृदयीं नाहीं अनुतापवृत्ती ॥ वरिवरी गा शास्त्रोक्तीं ॥ लावूं जातां शेणमाती ॥ पाप निश्चितीं तेणें न जाय ॥ ३०० ॥ माझें क्षणार्ध अनुसंधान ॥ कोटिकल्मषां[2] करी दहन ॥ तेथ इतरांचा केवा कोण ॥ हें स्वयें श्रीकृष्ण बोलिला ॥ १ ॥ ज्याचें अधिकारीं माझें ध्यान ॥ तें सांडोनियां जाण ॥ प्रायश्चित्त सांगतां आन ॥ लागे दूषण सांगत्यासी ॥ २ ॥ यालागीं मुख्यत्वें जाण ॥ येथ अधिकारचि प्रमाण ॥ येचिविखींचे निरूपण ॥ श्रीनारायण सांगत ॥ ३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्वेस्वेऽधिकारे या निष्ठा स गुणः परिकीर्त्तितः ॥ कर्मणां जात्यशुद्धानामनेन नियमः कृतः ॥ गुणदोषविधानेन संगानां त्याजनेच्छया ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ॥ न प्रेरितां[3] शास्त्रें श्रुती ॥ विषयीं स्वाभाविक प्रवृत्ती ॥ तिची करावया निवृत्ती ॥ माझी वेदोक्ती प्रवर्त्तली ॥ ४ ॥ एकाएकीं विषयत्याजन ॥ करावया अशक्त जाण ॥ त्यासि वेद दावी दोषगुण ॥ त्यागावया जाण विषयांसी ॥ ५ ॥ हे माता हे सहोदर ॥ येथ करूंनये व्यभिचार ॥ हे वेद न बोलता अधिकार ॥ तैं यथेष्टाचार विषयांचा ॥ ६ ॥ जेथवरी स्त्रीपुरुषव्यक्ती ॥ तेथवरी कामासक्ती ॥ मी नेमितों ना वेदोक्ती ॥ तैं व्यभिचारप्राप्ती अनिवार ॥ ७ सकळ स्त्रिया सांडून ॥ त्यजोनियां इतर वर्ण ॥ सवर्ण स्त्री वरावी आपण ॥ अष्टवर्षा जाण नेमस्त ॥ ८ ॥ तिचें वेदोक्त पाणिग्रहण ॥ तेथ साक्षी अग्नि आणि ब्राह्मण ॥ इतरस्त्रियांची वाहूनि आण ॥ स्वदारा गमन विध्युक्त ॥ ९ ॥ यापरी म्यां सकळ लोक ॥ स्त्रीकामें अतिकार्मुक ॥ स्वदारागमन देख ॥ केलें एक मुख वेदोक्ती ॥ ३१० ॥ याचिपरी म्यां अन्नसंपर्क ॥ वेदवादें नेमिले लोक ॥ येरवीं वर्णसंकर देख ॥ होता आवश्यक वेदेंविण ॥ ११ ॥ तो चुकवावया वर्णसंकर ॥ वर्णाश्रमांचा प्रकार ॥ वेद बोलिला साचार ॥ विषयसंचार त्यागावा ॥ १२ ॥ विषयांची जे प्रवृत्ती ॥ तेचि अविद्याबाधा निश्चितीं ॥ जे विषयाची अतिनिवृत्ती ॥ ती नाव मुक्ती उद्धवा ॥ १३ ॥ करावया विषयनिवृत्ती ॥ वेदें द्योतिर्ली कर्मप्रवृत्ती ॥ वर्णाश्रमाचार स्थिती ॥ विषयासक्ती छेदूं ॥ १४ ॥ नित्य नैमित्य कर्मतंत्र ॥ नाना गुणदोषप्रकार ॥ वेदें द्योतिलि स्वाधिकार ॥ विरक्त नर व्हावया ॥ १५ ॥ स्वकर्मैं होय चित्तशुद्धी ॥ तेणें वैराग्य उपजे त्रिशुद्धी ॥ वैराग्य विषयावस्था छेदी ॥ गुणकार्य उपाधी रजतम हे ॥ १६ ॥ तेव्हां उरे

---

१ नाश. २ अनंत पातकांस. ३ सांगता. ४ ही आई हा सखाभाऊ. ५ ब्राह्मणानें ब्राह्मणाची याप्रमाणें. ६ विषयी. ७ ब्राह्मण, क्षत्रिय इत्यादि वर्ण व ब्रह्मचर्य गृहस्थाश्रम इत्यादि आश्रमयांचा. ८ दाखविली. [illegible]र्ग.

शुद्ध सत्व गुण ॥ तेथें [illegible] गुरुभजन ॥ गुरुभजनास्तव जाण ॥ ज्ञानविज्ञान घर रिघे ॥ १७ ॥ पूर्ण करितां भगवद्भक्ती ॥ तें गुरुभजनीं
अधिकारप्राप्ती ॥ सद्गुरुमहिमा सांगों किती ॥ मी आज्ञावर्त्ती गुरूचा ॥ १८ ॥ गुरु ज्यावरी अनु[1]ग्रहो करी ॥ त्यासि मी भगवंत
उद्धरीं ॥ आदरें वाऊनियां शिरीं ॥ निजऐश्वर्यावरी बैसवीं ॥ १९ ॥ गुरु परमात्मा परेशु ॥ ऐसा जयाचा विश्वासू ॥ त्याचा अंकिला
मी हृषीकेशू ॥ जो जगदीशू जगाचा ॥ ३२० ॥ जेथ मी अंकित झालों आपण ॥ तेथ समाधीसी ज्ञानविज्ञान ॥ वोळंगे गुरुभक्ताचें
अंगण ॥ तेथ केवा कोण सिद्धींचा ॥ २१ ॥ त्या गुरूचें करूनि हेळण ॥ जो करी माझें भजन ॥ तेणें विखेंसी मिष्टान्न ॥ मज भोज
न घातलें ॥ २२ ॥ तोंडीं घांस डोइये टोला ॥ ऐसा भजनार्थ तो झाला ॥ तो जाण सर्वस्वें नागवला ॥ वैरी आपला आपणची
॥ २३ ॥ येथवरी गुरूचें महिमान ॥ माझेनि वेदें द्योतिलें जाण ॥ करूनि विषयनिर्दळण ॥ स्वाधिकारें जन तरावया ॥ २४ ॥ याला
गीं ज्यासि जो अधिकार ॥ तो तेणें नुल्लंघावा[2] अणुमात्र ॥ हा वेदें केला निज निर्धार ॥ स्वधर्मे नर तरावया ॥ २५ ॥ जरी ह्मणशी क
र्मचि पावन ॥ हेंही सर्वथा न घडे जाण ॥ स्वाधिकारेंवीण कर्माचरण ॥ तें अतिदारुण बाधक ॥ २६ ॥ संन्यासी करी गृहस्थधर्म ॥
तें त्यासि वोडवलें[3] अकर्म[4] ॥ गृहस्थ करी करपात्रें[5]कर्म ॥ तोचि अधर्म तयासी ॥ २७ ॥ हितासि वोखद घेतां जाण ॥ त्याचें चुकलिया
अनुपान ॥ तेंचि अन्यथा होय आपण ॥ पीडी दारुण मरणांत ॥ २८ ॥ तैसें अनधिकारें करितां कर्म ॥ तेंचि बाधक होय परम ॥ हें
वेदें जाणोनियां वर्म[6] ॥ स्वधर्म सुगम नेमिले ॥ २९ ॥ स्वाधिकारें स्वधर्मनिष्ठा ॥ हाचि पुरुषाचा गुण मोठा ॥ तेणें फिटे गुणकर्ममळ
कटा ॥ प्रिय वैकुंठा[7] तो होय ॥ ३३० ॥ वेदें बोलिला जो गुण ॥ तो अंगीकारावा आपण ॥ वेदें ठेविलें ज्यासि दूषण ॥ तें सर्वथा जा
ण त्यजावें ॥ ३१ ॥ हेंचि गुणदोषकृत्य जाण ॥ करितां वेदविवंचन[8] ॥ गुंतले गा अतिसज्ञान ॥ माझे कृपेवीण वेदार्थ न कळे ॥ ३२ ॥
निषेधमुखें करितां त्यागू ॥ वेद त्यागविती विषयसंगू ॥ हें वर्म जाणोनि जो चांगू ॥ तो होय निःसंगू महायोगी ॥ ३३ ॥ उद्धवा हें वे
दगुह्यसार ॥ तुज म्यां सांगीतलें साचार ॥ ज्यालागीं शिणताति सुर[9]नर ॥ ऋषीश्वर तपस्वी ॥ ३४ ॥ परी माझे कृपेवीण सर्वथा ॥
हें नये कोणाचिये हातां ॥ तें तुज म्यां सांगीतलें आतां ॥ तुझे हितार्था निज गुह्य ॥ ३५ ॥ मागें म्यां केलें निरूपण ॥ गुणदोष देख
णें तो दोष जाण ॥ त्याचेंही विशद विवेचन ॥ तुज मी संपूर्ण सांगीतलें ॥ ३६ ॥ पराचा[10] देखावा दोषगुण ॥ हें नाहीं नाहीं गा माझें
वेदवचन ॥ दोष त्यजोनियां आपण ॥ घ्यावा गुण हा वेदार्थ ॥ ३७ ॥ त्यजोनि पराचे दोषगुण ॥ स्वयें गुण घ्यावा आपण ॥ हेंही माझे

---

१ कृपा. २ सोडूंनये. ३ आलें. ४ अधर्म. ५ हातांत भिक्षान्न खाणें. ६ खूण. ७ विष्णूस. ८ वेदार्थविचार. ९ देवमनुष्यें १० दुसऱ्याचा.

रुपेवीण ॥ नव्हे जाण उद्धवा ॥ ३८ ॥ न देखोनि पराचे दोषगुण ॥ स्वयें होइजे ब्रह्म आपण ॥ ह्मणशी ऐशी रुपा परिपूर्ण ॥ केवीं आपण लाहिजे[1] ॥ ३९ ॥ तेचिविखींचें निरूपण ॥ रुपेनें सांगताहे श्रीकृष्ण ॥ माझे रुपेचें आयतन[2] ॥ उद्धवा जाण मद्भक्ती ॥ ३४० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ जातश्रद्धो मत्कथासु निर्विण्णः सर्वकर्मसु ॥ वेद दुःखात्मकान् कामान् परित्यागेऽप्यनीश्वरः ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ ॥ माझे कथेचेनि श्रवणें ॥ उठी संसाराचें धरणें ॥ ऐसा विश्वासु धरिला ज्याणें ॥ जीवें प्राणें निश्चितीं ॥ ४१ ॥ ह्मणे अर्धोदकीं[3] प्राणांतीं ॥ जैं हरिकथा आठवे चित्तीं ॥ तैं उठे जन्ममरणपंक्ती ॥ येथवरी भक्ती मत्कथेची ॥ ४२ ॥ ऐशिया भावार्थाचे स्थिती ॥ अनिवार उपजे विरक्ती ॥ नावडे कर्माची प्रवृत्ती ॥ विषयासक्ती नावडे ॥ ४३ ॥ नावडे इतरकथावदंती[4] ॥ नावडे लौकिकाची प्रीती ॥ परी निःशेष त्यागाची प्रीती ॥ सामर्थ्यशक्ती ज्या नाहीं ॥ ४४ ॥ तेणें अनन्यभावें जाण ॥ अत्यादरें करावें भजन ॥ येचिविखींचें निरूपण ॥ स्वमुखें श्रीकृष्ण सांगत ॥ ४५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ततो भजेत मां प्रीतः श्रद्धालुर्दृढनिश्चयः ॥ जुषमाणश्च तान्कामान्दुःखोदर्कांश्च गर्हयन् ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ ॥ त्यागावया नाहीं सामर्थ्यशक्ती ॥ त्यासि विषयभोग जेव्हां येती ॥ ते भोगी ऐशिया रीतीं ॥ जेवीं श्रृंगारिति सुळीं घावया ॥ ४६ ॥ त्यासि केळें साखर चोखटीं ॥ दूध तूप लाबितां ओंठीं ॥ शूळ भरलिया भोगापाठीं ॥ तो धाक पोटीं धुकधुकी ॥ ४७ ॥ तेवीं विषय भोगितां जाण ॥ पुढें निरयें[5] अतिदारुण ॥ मज कां विसरला नारायण ॥ मधुसूदन माधव ॥ ४८ ॥ मी पडिलों विषयबंदिखानीं ॥ वेगीं पावे गरुडा वळंघोनी ॥ कृपाळुवा चक्रपाणी ॥ मजलागोनी सोडवी ॥ ४९ ॥ विषयमहाग्रहाचे तोंडीं ॥ मी सांपडलों बडिशपिंडीं[6] ॥ गजेंद्राचेपरी तांतडीं ॥ घाली उडी मजलागीं ॥ ३५० ॥ धांवपाव गा गोविंदा ॥ निवारी माझी विषयबाधा ॥ उपेक्षूं नको मुकुंदा ॥ घेऊनि गदा धांव वेगीं ॥ ५१ ॥ तूं अडलियाचा सहाकारी ॥ भक्तकाजकैवारी ॥ मज बुडतां विषयसागरीं ॥ वेगें उद्धरी गोविंदा ॥ ५२ ॥ मी पडिलों विषयसागरीं ॥ बुडालों कामक्रोधलहरीं ॥ क्रोधें विसंचिलों भारी ॥ अभिमानसुसरीं गिळिलों ॥ ५३ ॥ तूं दीनदयाळ श्रीहरी ॥ हें आपुलें बिरुंद[7] साच[8] करी ॥ मज दीनातें उद्धरी ॥ निजबोधकरीं धरोनियां ॥ ५४ ॥ हे विषयबाधा अतिगहन ॥ कां न पवे जनार्दन ॥ येणें अट्टहासें जाण ॥ करीं स्मरण हरीचें ॥ ५५ ॥ न सुटे विषयवज्रमिठी ॥ पडिलों कामदंष्ट्रांचिये[9] पोटीं ॥ कांहीं केलिया नसुटे मिठी ॥ आतां जगजेठी धांव वेगीं ॥ ५६ ॥ ऐसा निजभक्तांचा धांवा ॥ क्षणही न साहवे उद्धवा ॥ माझी कृपा होय तेव्हां ॥ पूर्ण स्वभावा अनुतापें ॥ ५७ ॥ उद्धवा जेथ अनुताप नाहीं ॥ तेथ माझी कृपा नव्हे कांहीं ॥ कृपेचें

---

[1] प्राप्त करून घ्यावी. [2] [illegible]. [3] पाण्यांत अर्धे बुडतअसतां. [4] वार्ता. [5] नरक. [6] गळांब. [7] भक्तवत्सल अशी प्रतिज्ञा. [8] सत्य. [9] कामरूपदाढांच्या.

वर्म हेंच पाही ॥ जैं अ[illegible]देहीं अनिवार ॥ ५८ ॥ माझे कृपेवीण निश्चितीं ॥ कदा नुपजे माझी भक्ती ॥ माझी झालिया प्राप्ती ॥ अनन्यभक्ती तो करी ॥ ५९ ॥ माझे कृपेचें लक्षण ॥ प्राप्त विषय भोगितां जाण ॥ न तुटे माझें अनन्य भजन ॥ पूर्ण कृपा जाण या नांव ॥ ३६० ॥ देह गेह[1] स्त्री पुत्र संपत्ती ॥ मग चढत्या वाढत्या प्रीतीं ॥ नीच नवी करी भक्ती ॥ वेंची माझे प्रीतीं धनधान्य ॥ ६१ ॥ माझे भक्तीलागीं आपण ॥ सर्वस्व वेंची हें नवल कोण ॥ स्वयें वेंचितां जीवूप्राण ॥ ऐसें अनन्यभजन सर्वदा ॥ ६२ ॥ माझ्या भजनाची अतिप्रीती ॥ स्मरण न सांडी अहोरातीं ॥ माझा विसर नपडे चित्तीं ॥ त्याची फळप्राप्ती हरि सांगे ॥ ६३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रोक्तेन भक्तियोगेन भजतो माऽसकृन्मुनेः ॥ कामा हृदय्या नश्यंति सर्वे मयि हृदि स्थिते ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ माझी जे कां निजभक्ती ॥ मागां सांगीतली तुजप्रती ॥ त्या हातवटिया[2] मी श्रीपती ॥ यजिलों[3] अतिप्रीतीं वारंवार ॥ ६४ ॥ पळपळ क्षणक्षण ॥ माझें नविसरत स्मरण ॥ करिती अनन्य भजन ॥ मदर्पण तो मींची ॥ ६५ ॥ दिवसदिवसां चढोवढी ॥ अनिवार प्रीति वाढे गाढी ॥ लागतां नीच नवी गोडी ॥ भजे आवडीं पुनःपुनः ॥ ६६ ॥ केलीचि भक्ती करितां ॥ उबगूं नये सर्वथा ॥ अधिक हर्ष वाटे चित्तां ॥ उल्हासता मद्भजनीं ॥ ६७ ॥ मज आंकळूनि[4] आपले मनीं ॥ मनींहोनि प्रीति भजनीं ॥ तेथ सकळ काम जाती नासोनी ॥ जेवीं कां तरणीं खद्योत[5] ॥ ६८ ॥ जेवीं कां केसरी देखोनी ॥ मदगजा होय भंगणी ॥ तेवीं काम जाती हृदयींहूनी ॥ मी चक्रपाणी प्रकटल्या ॥ ६९ ॥ मी प्रकटलों ऐसें ह्मणतां ॥ लाज लागेल या वचनार्था ॥ मजवीण ठावो नाहीं रिता ॥ प्रकटलों आतां ह्मणे कोण ॥ ३७० ॥ उद्धवा जाण तत्त्वतां ॥ मी सदा ह्रदयीं वसता ॥ भक्तांची भ्रांती जातां ॥ मी स्वभावतां प्रकटची ॥ ७१ ॥ भक्तीं करूनि माझी भक्ती ॥ नाशिली गा निजभ्रांती ॥ तेथ स्वयंभ मी श्रीपती ॥ सहजस्थितीं प्रकटें ॥ ७२ ॥ मी हृदयीं प्रकटल्या पुढें ॥ भक्तांसि अलभ्य[6] लाभ जोडे ॥ फिटे संसाराचें सांकडें ॥ ऐक पां रोकडें उद्धवा ॥ ७३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यंते सर्वसंशयाः ॥ क्षीयंते चास्य कर्माणि मयि दृष्टेऽखिलात्मनि ॥ ३० ॥ ॥ टीका ॥ ॥ उद्धवा मी ज्यासि हृदयीं भेटें ॥ तो मी हृदयामाजी नसंठे[7] ॥ सर्वात्मा सर्वरूपें प्रकटें ॥ नव्हे धाकुटें स्वरूप माझें ॥ ७४ ॥ ऐसा मी प्रकटलिया पाठी ॥ संसारूचि न पडे दिठीं ॥ मावळे गुणेंसि भेदत्रिपुटी[8] ॥ पळे उठाउठी भवभय ॥ ७५ ॥ लागतां सूर्याचे किरण ॥ घृताचें नासे कठिणपण ॥ तेवीं मी प्रकटल्या नारायण ॥ न फोडितां जाण लिंगदेह नाशे ॥ ७६ ॥ धुई दाटली चहूंकडे ॥ ते चंडवातें तत्काळ उडे ॥ तेवीं माझ्या प्रकाशापुढें ॥ वासनेचें उपडे समूळ जाळ ॥ ७७ ॥ समूळ उपडतां वा

---

१ घर. २ अभ्यासानें. ३ पूजिलों. ४ वश करून. ५ काजवा. ६ न मिळणारा. ७ सांठवत नाहीं. ८ ध्येय, ध्याता व ध्यान असें तीन.

सनेसी ॥ संशय निर्मे[1] जीवभावेंसी ॥ जेथ क्षयो झाला कर्मासी ॥ जेवीं रवीपाशीं आंधारें ॥ ७८ ॥ तेवीं गुण नासती स्वकार्येंसी ॥ अविद्या नासे अज्ञानेंसी ॥ जीव नाशे शिवपणेंसी ॥ चिद्चिद्ग्रंथीसी[2] अहंकारू ॥ ७९ ॥ तेथ सोहंहंसांची[3] बोळवण ॥ न करितांचि जाहली जाण ॥ भेणें पळालें जन्ममरण ॥ पडलें शून्य संसारा ॥ ३८० ॥ यापरी भक्तियोगें गहन ॥ माझें करूनियां भजन ॥ भक्त पावले समाधान ॥ निजभजन जाण ऐसें ॥ ८१ ॥ एवं भक्तिज्ञानकर्मयोग ॥ या तिहीं योगाचा विभाग ॥ तुज म्यां सांगीतला सांग ॥ हें वर्म चांग मत्प्राप्ती ॥ ८२ ॥ येथ विशेषें माझी भक्ती ॥ न पाहे आन सांगाती ॥ नव्हे आणिकांची पंगिस्ती[4] ॥ साधो मत्प्राप्ती अंगोवांगी ॥ ८३ ॥ न करितां माझें भजन ॥ सर्वथा नुपजे माझें ज्ञान ॥ कर्म न करितां मदर्पण ॥ तेंचि जाण अकर्म ॥ ८४ ॥ यालागीं मुख्य जें निजज्ञान ॥ तें अपेक्षी माझें भजन ॥ तेथ कर्म बापुडें रंक जाण ॥ भजनेंवीण सरेना ॥ ८५ ॥ एवं ज्ञानकर्मैं परमार्थीं ॥ माझी भक्तीस्तव होती सरतीं ॥ ते भक्तीची निजख्याती ॥ ऐक तुजप्रती सांगेन ॥ ८६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तस्मान्मद्भक्तियुक्तस्य योगिनो वै मदात्मनः ॥ न ज्ञानं नच वैराग्यं प्रायः श्रेयो भवेदिह ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ ॥ करूं नेणें कर्माचरण ॥ न साधितां वैराग्य ज्ञान ॥ भावें करितां माझें भजन ॥ माझ्या स्वरूपीं मन ठेवूनी ॥ ८७ ॥ तेथ ज्ञानकर्मादिकें जाण ॥ मुख्य वैराग्यही आपण ॥ मद्भक्तीसी येती लोटांगण ॥ चरणा शरण पैं येती ॥ ८८ ॥ शरण येणें हें कायशी गोठी ॥ केवळ जन्मती भक्तीच्या पोटीं ॥ मग लडेवाळें घालूनि मिठी ॥ स्वानंदाची गोमटी मागती गोडी ॥ ८९ ॥ एवं भक्ति आपुले अंकीं जाण ॥ करी ज्ञानादिकांचें लालन ॥ परमानंद पाजूनि पूर्ण ॥ करी पालन निजांगें ॥ ३९० ॥ ते आतुडल्या[6] माझी भक्ती ॥ ज्ञानादिकें कामारी होती ॥ तेचिविखींची उपपत्ती ॥ स्वयें श्रीपती सांगत ॥ ९१ ॥ ॥ श्लोक ॥[5] ॥ यत्कर्मभिर्यत्तपसा ज्ञानवैराग्यतश्च यत् ॥ योगेन दानधर्मेण श्रेयोभिरितरैरपि ॥ ३२ ॥ सर्वं मद्भक्तियोगेन मद्भक्तो लभतेऽञ्जसा ॥ स्वर्गापवर्गं मद्धाम कथंचिद्यदि वांछति ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ जें न पाविजे स्वधर्मकर्मादरें ॥ जें नपाविजे निर्बंध तपाचारें ॥ जें सांख्यँ[7] ज्ञानविचारें ॥ पाविजेना निर्धारें जे वस्तु ॥ ९२ ॥ जें न पाविजे विषयत्यागें ॥ जें न पाविजे अष्टांगयोगें ॥ जें वार्तांबुपर्णाशनभोगें[8] ॥ जें ज्ञानप्रसंगें न पाविजे ॥ ९३ ॥ जें न साधे वेदाध्ययनें ॥ जें न साधे सत्यवचनें ॥ जें न साधे अनेकीं साधनें ॥ तें मद्भजनें पाविजे ॥ ९४ ॥ हें न साधितां साधन सांकडें ॥ नुल्लंघितां गिरिकपाटकडे ॥ हीं सकळ फळें येती दारापुढें ॥ जैं माझी आतुडे निजभक्ती ॥ ९५ ॥ उद्धवा तूं ह्मणसी जाण ॥ ऐशी ते तुझी भक्ति कोण ॥ ब्रह्मभावें जें गुरुभजन ॥ ते भक्तीचा पूर्ण हा प्रतापू ॥ ९६ ॥

---

१ दूर होतो. २ ज्ञान व अज्ञान[illegible]ज्या विचारानें. ३ अशा भावनेची. ४ गरज. ५ अनावश्यक. ६ प्राप्त झाल्यास. ७ प्रकृति पुरुषाच्या विवेकानें. ८ वायु, पाणी व पानें यांच्या सेवनानें.

सद्गुरुभजनापरती ॥ साध[illegible]सि नाहीं प्राप्ती ॥ मी भगवंत करीं गुरुभक्ती ॥ इतरांचा किती पवाडूं[1] ॥ ९७ ॥ मीही सद्गुरूचेनि धर्में ॥ पावलों ऐवढिये महिमें ॥ त्या सद्गुरू[illegible][2]रिमें ॥ कोणें उपमें उपमावें ॥ ९८ ॥ जे गुरुब्रह्म अभेदभक्त ॥ अवचटें अणुमात्र वांछित ॥ तया वैकुंठादि समस्त ॥ मी त्यासि देत स्वर्गापवर्ग[3] ॥ ९९ ॥ हेंही बोलतां अत्यंत थोडें ॥ मी त्याच्या भजनसुरवाडें ॥ भुललों गा वाडेंकोडें ॥ त्या मागें पुढें सदा तिष्ठें[4] ॥ ४०० ॥ मद्भक्त नैराश्यें अतिगाढे ॥ ते मागतील हें कदा न घडे ॥ तेंही लक्षण तुजपुढें ॥ अतिनिवाडें सांगेन ॥ १ ॥ श्लोक ॥ ॥ न किंचित्साधवो धीरा भक्ता ह्येकांतिनो मम ॥ वांछंत्यपि मया दत्तं कैवल्यमपुनर्भवम् ॥ ३४ ॥ ॥ टीका ॥ ॥ ज्यासि न घेणेंपणाचा प्रबोधू[5] ॥ साचार झाला अतिविशद्धू ॥ ऐसा निरपेक्ष जो शुद्धू ॥ तो सत्य साधू मज मान्य ॥ २ ॥ ज्याच्या ठायीं निरपेक्षता ॥ धैर्य त्याचे चरण वंदी माथां ॥ ज्याच्याठायीं अधीरता ॥ तेथ निरपेक्षता असेना ॥ ३ ॥ कोटिजन्में बोधू जोडे ॥ तैं हे निरपेक्षता आतुडे ॥ निरपक्षतेवरुतें चढें ॥ ऐसें नाहीं पुढें साधन ॥ ४ ॥ ऐशिये निरपेक्षता प्राप्तीं ॥ माझ्या भजनीं अतिप्रीती ॥ तों लाभे माझी चौथी भक्ती ॥ जीसि एकांती ह्मणे वेदू ॥ ५ ॥ ऐक एकांतभक्तीची मातू ॥ देवाभक्तांस होय एकांतू ॥ भक्तू रिघे[6] देवा आंतू ॥ देव भक्तांतू सबाह्य ॥ ६ ॥ ऐसें अभेदें माझें भजन ॥ या नांव एकांत भक्ति जाण ॥ मजवेगळें कांहीं भिन्न ॥ न देखे आन जगामाजी ॥ ७ ॥ त्यासि चहूं पुरुषार्थेंसि मुक्ती ॥ मी स्वयें देताहें श्रीपती ॥ ते दुरोनि दृष्टीं न पाहती ॥ मा धरिती हातीं हें केवीं घडे ॥ ८ ॥ ते स्वमुखें कांहीं मागती ॥ हें न घडे कदा कल्पांतीं ॥ सांडूनि माझी एकांतभक्ती ॥ कैवल्य न घेती ते निजभक्त ॥ ९ ॥ मोक्षही घ्यावया कोणभावो ॥ त्याचाही मथित[7] अभिप्रावो ॥ स्वयें सांगे देवाधिदेवो ॥ अगम्य पहाहो श्रुतिशास्त्रां ॥ ४१० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नैरपेक्ष्यं परं प्राहुर्निःश्रेयसमनल्पकम् ॥ तस्मान्निराशिषो भक्तिर्निरपेक्षस्य मे भवेत् ॥ ३५ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो निरपेक्ष निर्विशेष ॥ तो मज पूज्य महापुरुष ॥ मोक्ष त्याचे दृष्टीं भूस ॥ धन्य नैराश्य तिहीं लोकीं ॥ ११ ॥ ऐक निरपेक्षतेचा उत्कृष्ट ॥ तेथ चारी पुरुषार्थ फळेंकट ॥ वैकुंठ कैलासादि श्रेष्ठ ॥ ते पायवाट निरपेक्षा ॥ १२ ॥ निरपेक्षापाशीं जाण ॥ वोळंगें येती सुरगण ॥ तेथ ऋद्धिसिद्धींचा पाड कोण ॥ वोळंगे अंगण कळिकाळ ॥ १३ ॥ स्वयें महादेव आपण ॥ सर्वस्वें करी निंबलोण ॥ श्रियेसहित मी आपण ॥ अंकित जाण तयाचा ॥ १४ ॥ निरपेक्ष जो माझा भक्त ॥ तो मजसमान समर्थ ॥ हेंही बोलणें अहाच येथ ॥ तो मीचि निश्चित चिद्रूपें ॥ १५ ॥ मी परमात्मा परमानंद ॥ भक्त मद्भजनें शुद्ध स्वानंद ॥ दोघे अभेद स्वानंदकंद ॥ सच्चिदानंद निजरूपें ॥ १६ ॥ ऐसें मद्भावें भक्त संपन्न ॥ ते न देखती दोषगुण ॥ तेच्चिविखीचें निरूप

---

१ पाड. १ मोठेपणास. ३ स्वर्ग व मोक्ष. ४ राहतों. ५ ज्ञान. ६ लीन होतो. ७ सारांशरूपानें. ८ उत्कर्ष. ९ अतिसुगम. १० स्वतःपायांनीं. ११ लक्ष्मीसुद्धां. १२ व्यर्थ.

ण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ १७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ न मय्येकांतभक्तानां गुणदोषोद्भवा गुणाः ॥ साधूनां समचित्तानां बुद्धेः परमुपेयुषाम् ॥ ३६ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो न देखे विषयभेदू ॥ ज्यासि समत्वाचा निजबोधू ॥ तोचि बोलिजे शुद्ध साधू ॥ परमानंदू मद्भजनें ॥ १८ ॥ मी एक परमात्मा सर्वभूतीं ॥ न देखे द्वैताची प्रतीती ॥ ऐशी ज्यास भजनस्थिती ॥ एकांतभक्ती त्या नांव ॥ १९ ॥ सदा समभावें एकाग्र ॥ माझ्या भजनीं अतितत्पर ॥ ते प्रकृतीचे परपार ॥ पावले साचार मद्रूपीं ॥ ४२० ॥ ऐसे मद्भावें भक्त परिपूर्ण ॥ ते न देखती दोषगुण ॥ उद्धवा म्यां हे निजखूण[1] ॥ पूर्वीं तुज जाण सांगीतली ॥ २१ ॥ साकरेची साल काढणें ॥ कापुरेंकोंडा[2] पाखडणें ॥ रत्नदीपीं काजळ धरणें ॥ तरी गुणदोष देखणें मद्भक्तां ॥ २२ ॥ ज्याचा घ्यावा अवगुण ॥ मुख्य अगुणी मी आपण ॥ ज्याचा घ्यावा उत्तम गुण ॥ तेंही जाण मद्रूप ॥ २३ ॥ यापरी भक्त जगजेठी ॥ मद्रूपें देखणें सृष्टीं ॥ त्यांसि गुणदोषांची गोष्टी ॥ न पडे दृष्टीं सर्वथा ॥ २४ ॥ गुणदोष न देखावे जाण ॥ हेंचि साधनीं मुख्य साधन ॥ येचि अर्थीचें निरूपण ॥ आदरें श्रीकृष्ण सांगत ॥ २५ ॥ ॥ श्लोक ॥ एवमेतान्मयादिष्टाननुतिष्ठंति मे पथः ॥ क्षेमं विंदंति मत्स्थानं यद्ब्रह्म परमं विदुः ॥ ३७ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे विंशतितमोऽध्यायः ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ उद्धवा यापरी जाण ॥ म्यां वदंवोदें[3] आपण ॥ उपदेशिले गा जन ॥ भक्तिज्ञानकर्मयोगें ॥ २६ ॥ कर्मेंचि कर्में छेदिंजेती[4] ॥ ऐशी कर्मयोगाची गती ॥ स्वधर्मकर्में माझी प्राप्ती ॥ ते म्यां तुजप्रती सांगीतली ॥ २७ ॥ नित्यानित्यविवंचन ॥ करूनि अनित्यनिर्दळण ॥ हें ज्ञानयोगाचें लक्षण ॥ तुज म्यां संपूर्ण सांगीतलें ॥ २८ ॥ तैशीच करितां माझी भक्ती ॥ सकळ फळें पायां लागती ॥ भक्तांसि अनायासें माझी प्राप्ती ॥ हेंही तुजप्रती सांगीतलें ॥ २९ ॥ अधिकारभेदेंसी सांग ॥ त्रिकांड विविधें[5] भेदमार्ग ॥ माझे प्राप्तीलागीं चांग ॥ विशद विभाग म्यां केला ॥ ४३० ॥ म्यां सांगीतल्या ऐसें जाण ॥ जो वेदमार्गें करी अनुष्ठान ॥ तो माझी प्राप्ती पावे संपूर्ण ॥ सगुण निर्गुण यथारुचि ॥ ३१ ॥ सगुणसाक्षात्कार जो येथ ॥ तें पंचरात्रागममत ॥ वैकुंठचि मुख्य ह्मणत ॥ तें मत निश्चित तयांचें ॥ ३२ ॥ सप्तावरणांबाहेरी ॥ मायावरणाभीतरीं ॥ वैकुंठ रचिलें श्रीहरीं ॥ हें बोलिजेलें धीरीं वेदांतीं ॥ ३३ ॥ तेथ आगमाचें मनोगत ॥ माया ते भगवल्लीला ह्मणत ॥ स्वलीला वैकुंठ रची भगवंत ॥ क्षयो[6] तेथ असेना ॥ ३४ ॥ जेथ लीलाविग्रही[7] मेघश्याम ॥ स्वयें वसे पुरुषोत्तम ॥ तेथ नाहीं गुणकाळ कर्म ॥ मायादिभ्रम रिघेना ॥ ३५ ॥ एवं जन्मक्षयातीत ॥ वैकुंठ अक्षयी निज नित्य ॥ तेथ पावले ते नित्यमुक्त [illegible] हें आगममत उद्धवा ॥ ३६ ॥ मंत्रें आराध्य दैवतें प्रसन्नें ॥ हें वेदार्थियाचें बोलणें ॥ तें म्यां तुजप्रती

---

१ अनुभव. २ कापुराची सा[illegible] ३ वक्रपणानें. ४ छेदावीत. ५ अनेकप्रकारचे. ६ नाश. ७ लीलेनें शरीर धारण करणारा.

अनुसंधानें ॥ बोलिलों ज[illegible]द्धवा ॥ ३७ ॥ भावार्थभक्तीचें लक्षण ॥ ते प्रसन्नतेची खूण ॥ हें पूर्वीं केलें निरूपण ॥ निरुतें जाण उद्धवा ॥ ३८ ॥ ये अर्थीं वेदांत[illegible]ात ॥ अत्यंत प्रळयींचा जो आघात ॥ तो वैकुंठकैलासादि समस्त ॥ आकारवंत निर्दाळी ॥ ३९ ॥ ते काळींचे उर्वरितें[1] ॥ केवळ जे गुणातीत ॥ ते पूर्ण ब्रह्म सदोदित ॥ जाण निश्चित उद्धवा ॥ ४४० ॥ जेथ काळ ना कर्म ॥ जेथ गुण ना धर्म ॥ जेथ माया पावे उपरम ॥ तें परब्रह्म उद्धवा ॥ ४१ ॥ माझें स्थान वैकुंठ जाण ॥ तेथील प्राप्ति सायुज्य सगुण ॥ पूर्ण सायुज्यता जाण ॥ ब्रह्म परिपूर्ण सदोदित ॥ ४२ ॥ पावावया पूर्ण परब्रह्म ॥ साधकांसि कोणे मार्गीं क्षेमें[2] ॥ वेदोक्त मद्भक्ति सुगम ॥ उत्तमोत्तम हा मार्ग ॥ ४३ ॥ आणिकेमार्गीं जातां जाण ॥ कामलोभादि उठे विघ्न ॥ कां बुडवी ज्ञानाभिमान ॥ ये नागवण प्रत्यवायाची[3] ॥ ४४ ॥ तैसें नाहीं भक्तिपंथीं ॥ सवें[4] नवविध[5] सांगाती ॥ चढतां पाउलीं अतिविश्रांती ॥ भजनें मुक्ति मद्भावें ॥ ४५ ॥ येथील मुख्यत्वें साधन ॥ गेलियाही जीव प्राण ॥ कदा न देखें दोषगुण ॥ तैं ब्रह्म परिपूर्ण पाविजे ॥ ४६ ॥ जेथ नाहीं भवभयभ्रांती ॥ जेथ नाहीं दिवसराती ॥ जेथ नाहीं जीवस्थिती ॥ तें ब्रह्म पावती मद्भक्त ॥ ४७ ॥ जेथ नाहीं रूपनाम ॥ जेथ नाहीं काळ कर्म ॥ जेथ नाहीं मरण जन्म ॥ तें परब्रह्म पावती ॥ ४८ ॥ जेथ नाहीं ध्येय ध्यान ॥ जेथ नाहीं ज्ञेय ज्ञान ॥ जेथ नाहीं मीतूंपण ॥ तें ब्रह्म पूर्ण पावती ॥ ४९ ॥ ज्यासि नाहीं मातापिता ॥ जें नव्हे देवो देवता ॥ जें बहु ना एकुलता[6] ॥ तें ब्रह्म तत्त्वतां पावती ॥ ४५० ॥ जेथ नाहीं वर्णाश्रम ॥ जेथ नाहीं क्रियाकर्म ॥ जेथ नाहीं मायाभ्रम ॥ तें परब्रह्म पावती ॥ ५१ ॥ जें गुणागुणीं अतीत[7] ॥ जें लक्ष्यलक्षणारहित ॥ जें स्वानंदें सदोदित ॥ तें ब्रह्म प्राप्त मद्भक्तां ॥ ५२ ॥ पूर्णरूपेंचा हेलावा[8] ॥ न संठेचि देवाधिदेवा ॥ तो हा एकादशीं विसावा ॥ तुज म्यां उद्धवा दीधला ॥ ५३ ॥ जेथ ठावो नाहीं देहभावा ॥ जेथ सामरस्य[9] जीवशिवां ॥ तो हा एकादशींचा विसावा ॥ तुज म्यां उद्धवा दीधला ॥ ५४ ॥ जेथ उगाणा होय अहंभावा ॥ शून्य पडे मायेच्या नांवा ॥ तो हा एकादशींचा विसावा ॥ तुज म्यां उद्धवा दीधला ॥ ५५ ॥ कर्षी स्वानंदें स्वयें जोडावा ॥ त्या स्वानंदाचा आइता ठेवा ॥ तो हा एकादशीं विसावा ॥ तुज म्यां उद्धवा दीधला ॥ ५६ ॥ जेथ देवभक्तांचा कालोवा[10] ॥ एकत्र होय आघवा ॥ तो हा एकादशींचा विसावा ॥ तुज म्यां उद्धवा दीधला ॥ ५७ ॥ करोनि भेदाचा नागोवा[11] ॥ होय अभेदाचा रिगावा ॥ तो हा एकादशींचा विसावा ॥ तुज म्यां उद्धवा दीधला ॥ ५८ ॥ काढोनि भावार्थाचा भावो ॥ सोलींव सोलिवांचा सोलावो ॥ गाळुनी गाळिवांचा भक्तिभावो ॥ उद्धवासी देवो

---

१ शेष. २ फळप्राप्ति. ३ प्रायश्चित्ताची. ४ बरोबर. ५ नऊ प्रकाराचे. ६ एक. ७ रहित. ८ भरतें. ९ ऐक्यता. १० मेळ. ११ नाश.

देतसे ॥ ५९ ॥ यापरी श्रीकृष्णनाथू ॥ होऊनियां स्वानंदभरितू ॥ विसाव्या अध्यायींची मातू[1] ॥ हरिखें सांगतू उद्धवा ॥ ४६० ॥ आतां विसाव्याचा विसावा ॥ स्वानंदसुखाचा हेलावा[2] ॥ तो मी सांगेन एकविसावा ॥ ऐक उद्धवा सादर ॥ ६१ ॥ वेदीं शुद्धाशुद्धलक्षण ॥ हें पुढिले अध्यायीं निरूपण ॥ एका विनवी जनार्दन ॥ श्रोतां अवधान मज द्यावें ॥ ६२ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे एकाकारटीकायां वेदत्रयीविभागयोगो नाम विंशतितमोऽध्यायः ॥ २० ॥ ॥ अध्याय ॥ २० ॥ ॥ श्लोक ॥ ३७॥ ओंव्या ॥ ४६२ ॥ एकूण ॥ ४९९ ॥ ॥छ॥ ॥छ॥ ॥छ॥ ॥छ॥

---

[1] कथा. [2] भरतें.


अध्याय २१ वा.
गुरु.
शिष्य.
उद्धव.
श्रीकृष्ण.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ॐनमो सद्गुरु वैकुंठनाथा ॥ स्वानंदवैकुंठीं सदा वसंता[१] ॥ तुझें ऐश्वर्य स्वभावतां ॥ न कळे अनंता अव्यया ॥ १ ॥ तुझ्या निजबोधाचा[२] गरुड ॥ कर जोडूनि उभा दृढ ॥ त्याच्या पंखाडांचा[३] झडाड ॥ उन्मळी सुदृढ भववृक्षां[४] ॥ २ ॥ तुझे स्वानुभवैकचक्र ॥ लखलखित तेजाकार ॥ द्वैतदळणीं सतेजधार ॥ अतिदुर्धर महामारी ॥ ३ ॥ कैसा पांचजन्य अगाध ॥ शब्दीं उठवी महाशब्द ॥ वेदानुवादें गर्जे शुद्ध ॥ तोचि प्रसिद्ध शंख तुझा ॥ ४ ॥ झळफळित सर्वदा ॥ निजतेजें मिरवे गदा ॥ करी मानाभिमानांचा चेंदा ॥ ते तुझी गदा गंभीर ॥ ५ ॥ अतिमनोहर केवळ ॥ देखतां उपजवी सुखकल्लोळ[५] ॥ परमानंदें आनंद बहुळ[६] ॥ तें लीलाकमळ झेलित ॥ ६ ॥ जीवशिव समसमानी ॥ जयविजय नांवें देऊनी ॥ तेचि द्वारपाळ दोनी ॥ आज्ञापूनी स्थापिले ॥ ७ ॥ तुझी निजशक्ति साजिरी ॥ रमा[७] रूपें अतिसुंदरी ॥ अखंड चरणसेवा करी ॥ अत्यादरीं सादर ॥ ८ ॥ तुझे लोकींचे निवासी[८] जाण ॥ अवघे तुजचि समान ॥ तेथ नाहीं मानापमान ॥ देहाभिमान असेना ॥ ९ ॥ तेथ काळाचा रिगमु[९] नाहीं ॥ कर्माचें नचले कांहीं ॥ जन्ममरणांचें भय नाहीं ॥ ऐशिया ठायीं तूं स्वामी ॥ १० ॥ जेथ कामक्रोधांचा घात ॥ क्षुधेतृषेंचा वोसाड प्रांत ॥ करूनि निजानंदें नित्यतृप्त ॥ निजभक्त तुझेनि ॥ ११ ॥ तुझेनि कृपाकटाक्षें ॥ अलक्ष न लक्षितां[१०] लक्षे ॥ तुझे चरणसेवापक्षें ॥ नित्य निरपेक्षें नांदविसी ॥ १२ ॥ साम्यतेचें सिंहासन ॥ ऐक्यतेची गादी जाण ॥ त्यावरी तुझें सहजासन ॥ परिपूर्ण स्वभावें ॥ १३ ॥ तन्मयतेचें निजच्छत्र ॥ संतोषाचें आतपत्र ॥ ज्ञानविज्ञानयुग्म चामर ॥ सहजें निरंतर ढळताती ॥ १४ ॥ तेथ चारी वेद तुझे भाटें[११] ॥ कीर्ति वर्णिती उद्भट ॥ अठरा मागध अतिश्रेष्ठ ॥ वर्णिती चोखट वंशावळी ॥ १५ ॥ तेथ साहीजणांचें वाद ॥ नानाकुसरीं बोलती शब्द ॥ युक्तिप्रयुक्तीं देती बाध ॥ दाविती विनोद जाणिवा ॥ १६ ॥ एक भावार्थी तुजलागुनी ॥ स्तुति करिती न बोलूनी ॥ तेणें स्तवनें संतोषोनी ॥ निजासनीं बैसविशी ॥ १७ ॥ ऐसा सद्गुरु महाविष्णू ॥ जो चिद्रूपें सम सहिष्णू ॥ जो भ्राजमानें भ्राजिष्णू[१२] ॥ जनीं जनार्दनू तो एक ॥ १८ ॥ जनीं जनार्दनुचि एकला ॥ तेथ एकपणें एका मीनला ॥ तेणें एकपणाचा ग्रास केला ॥ ऐसा झाला निजबोधू ॥ १९ ॥ त्या महाबोधाचें बोधांजन ॥ हातें वीण लेववी जनार्दन ॥ तेणें सर्वांगीं निघाले नयन[१३] ॥ देखणेंपण सर्वत्र ॥ २० ॥ परी सर्वत्र देखतां जाण ॥ देखणेंनि दिसे जनार्दन ॥ ऐशी पूर्ण कृपा करूनि एकपण ॥ दुजेपण सांडविलें ॥ २१ ॥ ऐसा तुष्टोनि भगवंत ॥ माझेनि हातें श्रीभागवत ॥ अर्थविलें[१४] जी यथा

---

[१] राहणारा. [२] छंदोमय. [३] पंखांचा [४] संसाररूपवृक्षास. [५] सुखाचें भरतें. [६] पुष्कळ. [७] लक्ष्मी. [८] राहणारे. [९] प्रवेश. [१०] पाहतां. [११] स्तुतिपाठकविशेष. [१२] तेजस्वी. [१३] डोळे. [१४] अर्थकथन करविलें.

र्थ ॥ शेखी प्राकृत देशभाषा ॥ २२ ॥ श्रीभागवतीं प्राकृत ॥ उपाय असतां बहुत ॥ काय नेणों आवडलें येथ ॥ करवी प्राकृत प्रबोधें ॥ २३ ॥ म्यां करणें कां न करणें ॥ हें हिंरूनि नेलें जनार्दनें ॥ आतां ग्रंथार्थनिरूपणें ॥ माझें बोलणें तो बोले ॥ २४ ॥ तेणें बोलोनि निजगौरवा ॥ वेदविभागसद्भावा ॥ तो एकादशीं विसावा ॥ उद्धवासि बरवा निरूपिला ॥ २५ ॥ तेथ भक्त आणि सज्ञान ॥ त्यांसि पावली वेदार्थखूण ॥ कर्म देखतां दोषगुण ॥ संशयीं जाण ते पडिले ॥ २६ ॥ त्या संशयाचें निरसन ॥ करावया श्रीकृष्ण ॥ एकविसावा निरूपण ॥ गुणदोषलक्षण स्वयें सांगे ॥ २७ ॥ त्या गुणदोषांचा विभाग ॥ सांगोनियां विषयत्याग ॥ करावया श्रीरंग ॥ निरूपण सांग सांगत ॥ २८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ य एतान्मत्पथो हित्वा भक्तिज्ञानक्रियात्मकान् ॥ क्षुद्रान्कामांश्चलैः प्राणैर्जुषंतः संसरंति ते ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ म्यां सांगीतले जे विभाग ॥ भक्तिज्ञानक्रियायोग ॥ हा सांडूनि शुद्ध वेदमार्ग ॥ सकाम भोग जे वांछिती ॥ २९ ॥ क्षणभंगुर देहाचा योग ॥ हें विसरोनियां चांग ॥ सकामकर्मांची लगबग ॥ भव स्वर्गभोग भोगावया ॥ ३० ॥ चळतेनि प्राणसंगे ॥ देहातें काळ ग्रासूं लागें ॥ येथ नानाकामसंभोगें ॥ मूर्ख तद्योगें मानिती सुख ॥ ३१ ॥ भोगितां काम भोगसोहळे ॥ नेणे आयुष्य ग्रासिलें काळें ॥ मग जन्ममरणमाळें ॥ दुःखउमाळें भोगिती ॥ ३२ ॥ काम्य आणि नित्य कर्म ॥ आचरतां दिसे सम ॥ तरी फळीं कां पां विषम ॥ सुगमदुर्गम परिपाकूं ॥ ३३ ॥ तें कर्मवैचिञ्यविंदान ॥ संकल्पास्तव घडे जाण ॥ तेचिअर्थीचें निरूपण ॥ जागोनि श्रीकृष्ण सांगत ॥ ३४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्वेस्वेऽधिकारे या निष्ठा स गुणः परिकीर्तितः ॥ विपर्ययस्तु दोषः स्यादुभयोरेष निश्चयः ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ॥ कर्म विचारितां अवघें एक ॥ परी अधिकार भिन्नभिन्न देख ॥ ते मी सांगेन आवश्यक ॥ जेणें सुखदुःख भोगणें घडे ॥ ३५ ॥ मुखाचा व्यापार भोजन ॥ तो नाकें करूं जातां जाण ॥ सुख बुडवूनि दारुण ॥ दुःख आपण स्वयें भोगी ॥ ३६ ॥ कां पायांचें जें चालणें ॥ पडे जैं डोईं करणें ॥ तैं मार्ग नँकंठे तेणें ॥ परी कष्टणें अनिवार ॥ ३७ ॥ तेवीं जें कर्म स्वाधिकारें ॥ सुखातें दे अत्यादरें ॥ तेंचि कर्म अन्याधिकारें ॥ दुःखें दुर्धरें भोगवी ॥ ३८ ॥ गजाचें आभरण ॥ गाढवासि नव्हे भूषण ॥ परी भारें आणी मरण ॥ तेवीं कर्म जाण अनधिकारीं ॥ ३९ ॥ मेघ वर्षे निर्मळ जळ ॥ परी जैसें बीज तैसें फळ ॥ एक भोगी पीक सकळ ॥ एका प्रबळ साळी केळें ॥ ४० ॥ पाहे पां जैसें दुग्ध चोख ॥ ज्वरितांमुखीं कडू विख ॥ तेंचि निरुजां गोड देख ॥ पुष्टिदायक सेवनीं ॥ ४१ ॥ तेवीं सका कर्म घडे ॥ तें बाधक होय गाढें ॥ तेंचि गा निष्कामाकडे ॥ मोक्षसुखवाडे सुखावी ॥ ४२ ॥ स्वाधिका

---

१ हरणकरून. २ अनित्य. ३ त्याच्या भातीनें. ४ फळ. ५ नसरे. ६ वस्त्रालंकार. ७ दूध. ८ ताप आलेल्याच्या तोंडास. ९ नीरोग्यास.

रें स्वधर्माचरण ॥ तोचि येथें मुख्यत्वें गुण ॥ अनधिकारीं कर्म जाण ॥ तोचि अवगुण महादोष ॥ ४३ ॥ या रीतीं गा कर्माचरण ॥ उपजवी दोष आणि गुण [illegible]ेंचि गुणदोषलक्षण ॥ शास्त्रज्ञ जाण बोलती ॥ ४४ ॥ तेंचि गुणदोषलक्षण ॥ शुद्ध्यशुद्धींचें कारण ॥ तेचि अर्थींचें विवंचन ॥ देव आप[illegible] सांगत ॥ ४५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शुद्ध्यशुद्धी विधीयेते समानेष्वपि वस्तुषु ॥ द्रव्यस्य विचिकित्सार्थं गुणदोषौ शुभाशुभौ ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ पंचभूतें समान जाण ॥ वस्तुं सर्वत्र समसमान ॥ तेथ गुणदोष अप्रमाण ॥ परी केलें प्रमाण या हेतू ॥ ४६ ॥ न प्रेरितां श्रुतिस्मृती ॥ अविद्यक विषयप्रवृत्ती ॥ अनिवार सकळभूतीं ॥ सहजस्थितीं स्वभावें ॥ ४७ ॥ ऐसी स्वाभाविक विषयस्थिती ॥ तेचि करावया उपरती ॥ नानागुणदोष बोले श्रुती ॥ विषयनिवृत्ती लागुनी ॥ ४८ ॥ हें एक शुद्ध एक अशुद्ध ॥ पैलं[3] शुभ हें विरुद्ध ॥ मीचि बोलिलों वेदानुवाद ॥ विषयबाध छेदावया ॥ ४९ ॥ विषयाची जे निवृत्ती ॥ तीचि वेदरूपें म्यां केली स्तुती ॥ निंदिली विषयप्रवृत्ती ॥ चिळसी चित्तीं उपजावया ॥ ५० ॥ चालतां कर्मप्रवृत्ती ॥ हो विषयांची निवृत्ती ॥ ऐशी वेदद्वारें केली युक्ती ॥ ऐक तुजप्रती सांगेन ॥ ५१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ धर्मार्थं व्यवहारार्थं यात्रार्थमिति चानघ ॥ दर्शितोऽयं मयाचारो धर्ममुद्वहतां धुरम् ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ उद्धवा तूं निष्पाप त्रिशुद्धी[4] ॥ यालागीं तुझी शुद्ध बुद्धी ॥ धर्मादिव्यवहारसिद्धी ॥ ऐक तो विधी सांगेन ॥ ५२ ॥ करितांही धर्माचरण ॥ प्रवृत्ति[5]धर्म तो अप्रमाण ॥ निवृत्ति[6]धर्म तो अतिशुद्ध जाण ॥ हे दोषगुण स्वधर्मीं ॥ ५३ ॥ जो व्यवहार विषयासक्तीं ॥ तो अशुद्ध व्यवहारस्थितीं ॥ जे परोपकारप्रवृत्तीं ॥ तो व्यवहार वंदिती[7] सुरनर ॥ ५४ ॥ अदृष्टदाता ईश्वर ॥ हें विसरोनि उत्तम नर ॥ द्रव्यलोभें नीचांचे दारोदार ॥ हिंडणें अपवित्र ते यात्रा ॥ ५५ ॥ आळस सांडोनि आपण ॥ करूंजातां श्रवण कीर्तन ॥ कां तीर्थयात्रा साधुदर्शन ॥ पूजार्थ गमन देवालयीं ॥ ५६ ॥ कां अनाथप्रेतसंस्कार[8] ॥ करितां पुण्य जोडे अपार ॥ पैदीं[9] कोटियज्ञफळसंभार ॥ जेणें साचार उपजती ॥ ५७ ॥ जेणें पाविजे परपार ॥ तिये नांव यात्रा पवित्र ॥ हा यात्राशास्त्रार्थ ससाचार ॥ गुणदोषविचार वेदोक्त ॥ ५८ ॥ राजा निजपादुका हटेंसीं[10] ॥ वाहवी ब्राह्मणाचे शिर्सीं ॥ तो दोष नपवे द्विजासी ॥ स्वयें सदोषी होय राजा ॥ ५९ ॥ जेवीं आपत्काळबळें जाण ॥ पडतां लंघनीं लंघन ॥ तें घेऊनि नीचाचें धान्य ॥ वांचवितां प्राण दोष नाहीं ॥ ६० ॥ तेंचि नीचाचें दान ॥ अनापदीं घेतां जाण ॥ जनीं महादोष दारुण ॥ हेंही जाण वेदोक्त ॥ ६१ ॥ जे कर्मधर्मप्रवर्तक शुद्ध ॥ मनुपराशरादि प्रसिद्ध ॥ तिहीं हे गुणदोष विविध ॥ शुद्धाशुद्ध बोलिले ॥ ६२ ॥ तेंचि शुद्धाशुद्धनिरूपण ॥ तीं श्लोकीं नारायण ॥

---

१ विचार. २ परमात्मा. ३ पलीकडचें. ४ सत्य. ५ कर्ममार्ग. ६ ज्ञानमार्ग. ७ मान्य करितात. ८ ज्यास कोणी संबंधी माहींत अशा प्रेतास अग्नि देणें वगैरे. ९ पावलोंपावलीं. १० जुलुमानें.

स्वयें सांगताहे आपण ॥ गुणदोषलक्षणविभाग ॥ ६३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भूम्यंब्वग्न्यनिलाकाशा भूतानां पंच धातवः ॥ आब्रह्मस्थावरादीनां शारीरा आत्मसंयुताः ॥ ५ ॥ वेदेन नामरूपाणि विषमाणि समेष्वपि ॥ धातुषूद्धव कल्प्यंत एतेषां स्वार्थसिद्धये ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ पृथ्वी आप[1] तेज वायु गगन ॥ ब्रह्मादि स्थावरांत[2] जाण ॥ भूतीं पंचभूतें समान ॥ वस्तूहि आपण सम सर्वी ॥ ६४ ॥ नाहीं नाम रूप गुण कर्म ॥ ऐसें जें केवळ सम ॥ तेथ माझेनि वेदें विषम ॥ केलें निरुपम नाम हितार्थ ॥ ६५ ॥ तळीं पृथ्वी वरी गगन ॥ पाहतां दोनी समान ॥ तेथ दशदिशा कल्पिल्या जाण ॥ देशांतरगमनसिद्ध्यर्थ ॥ ६६ ॥ तेवीं नामरूपवर्णाश्रम ॥ समाच्या ठायीं जें विषम ॥ हा माझेनि वेदें केला नेम ॥ स्वधर्मकर्मसिद्ध्यर्थ ॥ ६७ ॥ येणेंचि द्वारें सुलक्षण ॥ धर्मार्थकाममोक्षसाधन ॥ पुरुषांच्या हितालागीं जाण ॥ म्यां केलें नियमन वेदाज्ञें ॥ ६८ ॥ रूप नाम आश्रम वर्ण ॥ वेदू नेमिता ना आपण ॥ तैं व्यवहारू न घडता जाण ॥ मोक्षसाधन तैं कैंचें ॥ ६९ ॥ एवं वेदें लावूनि व्यवहारू ॥ तेथेंचि परमार्थविचारू ॥ दाविला असे चमत्कारू ॥ सभाग्य नरू तोचि जाणे ॥ ७० ॥ अत्यंत करितां कर्मादरू[3] ॥ तेणें कर्मठचि होय नरू ॥ तेथ परमार्थ नाहीं साचारू ॥ विधिनिषेधीं थोरू पीडिजे ॥ ७१ ॥ केवळ स्वधर्मकर्म सांडितां ॥ अंगीं आदळे पाषंडता[4] ॥ तेणेंही मोक्ष नये हातां ॥ निजस्वार्था नागवले ॥ ७२ ॥ यालागीं स्वधर्म आचरतां ॥ निजमोक्ष लाभे आइता ॥ हे वेदार्थाची योग्यता ॥ जाणे तो ज्ञाता सज्ञान ॥ ७३ ॥ हे वेदार्थनिजयोग्यता ॥ सहसा नये कवणाचे हातां ॥ याचिलागीं गा परमार्था ॥ गुरु तत्त्वतां करावा ॥ ७४ ॥ त्या सद्गुरूची पूर्ण कृपा होय ॥ तरीच आतुडे[6] वेदगुह्य ॥ गुरुकृपेवीण जे उपाय ॥ ते अपाय साधकां ॥ ७५ ॥ यालागीं माझा वेद जगद्गुरू ॥ दावी आपाततां व्यवहारू ॥ नेमी स्वधर्मकर्मादरू ॥ जनाचा उद्धारू करावया ॥ ७६ ॥ ऐसा माझा वेदू हितकारी ॥ दावूनि गुणदोष नानापरी ॥ जन काढी विषयाबाहेरीं ॥ वेद उपकारी जगाचा ॥ ७७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ देशकालादिभावानां वस्तूनां मम सत्तम ॥ गुणदोषौ विधीयेते ॥ नियमार्थं हि कर्मणाम् ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ भक्तांमाजी भक्तोत्तम ॥ साधुलक्षणी[7] साधु सम ॥ यालागीं उद्धवासि सत्तम ॥ ह्मणे पुरुषोत्तम अतिप्रीतीं ॥ ७८ ॥ उद्धवा येथ भलता नर ॥ भलता करील कर्मादर ॥ यालागीं वर्णाश्रमविचार ॥ नेमिला साचार वेदांनीं ॥ ७९ ॥ जेथ करूं नये कर्मतंत्र ॥ ऐसा देश जो अपवित्र ॥ आणि काळादि द्रव्य विचित्र ॥ पवित्रापवित्र सांगेन ॥ ८० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अकृष्णसारो देशानामब्रह्मण्योऽशुचिर्भवेत् ॥ कृष्णसारोऽप्यसौवीरकीकटासंस्कृतेरिणम् ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ ॥ कोणे एके पृथ्वीतळीं ॥ मेघ न वर्ष

---

१ उदक. २ जडापर्यंत. ३ कर्माच्याठिकाणीं आसक्ति. ४ नास्तिकपणा. ५ साधनावांचून. ६ प्राप्त होतें. ७ उत्तमलक्षणाचा.

तां जळीं ॥ पेरिलीं धान्यें सदा निळीं ॥ वसुधा जिव्हाळी तेणें ह्मणती ॥ ८१ ॥ तेंचि पाहतां पृथ्वीवरी ॥ एके भागीं गा उखरीं ॥ मेघ वर्षतां शरधारीं ॥ अंकुर ना डि[illegible]खरंरवें ॥ ८२ ॥ तेवीं देशाची शुद्धयशुद्धी ॥ तुज मी सांगेन यथाविधी ॥ जेथ कर्मी नोहे कार्यसिद्धी ॥ तेथ कर्म त्रिशुद्धी न करावें ॥ ८३ ॥ कृष्णमृग जेथ नाहीं ॥ ते जाण पां अपवित्र भुयी ॥ कर्मदिरू तियेठायीं ॥ न करावा पाही सर्वथा ॥ ८४ ॥ जेथ ब्राह्मणचि नाहीं ॥ तो देश अपवित्र पाही ॥ ब्राह्मण अकर्मी[3] जेठायीं ॥ भूमी तेही अपवित्र ॥ ८५ ॥ जेथ ब्राह्मणाची अभक्ती ॥ शेखीं हेळूनि[4] निंदिती ॥ तो देशु कर्माप्रती ॥ जाण निश्चितीं अपवित्र ॥ ८६ ॥ जे देशीं कृष्णमृग असती ॥ परी नाहीं भगवद्भक्ती ॥ तो देशु कर्माप्रती ॥ जाण निश्चितीं अपवित्र ॥ ८७ ॥ भक्तिहीन देश प्रसिद्ध ॥ कीकट कलिंग मागध ॥ तेथ स्वधर्म नव्हती शुद्ध ॥ जाण अशुद्ध ते देश ॥ ८८ ॥ नाहीं उपलेप संमार्जन ॥ ते स्वगृहीं भूमी अशुद्ध जाण ॥ कां जेथ वेदबाह्यें असज्जन ॥ तेंही स्थान अपवित्र ॥ ८९ ॥ जे भूमी केवळ उखर ॥ ते जाण सदा अपवित्र ॥ आतां काळाचें काळतंत्र ॥ पवित्रापवित्र सांगेन ॥ ९० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कर्मण्यो गुणवान्कालो द्रव्यतः स्वत एव वा ॥ यतो निवर्त्तते कर्म स दोषोऽकर्मकः स्मृतः ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ देश काळ द्रव्य पात्र ॥ हे सामग्री होय स्वतंत्र ॥ तोचि काळ अतिपवित्र ॥ वेदशास्त्रसंमत ॥ ९१ ॥ ग्रहणकपिलाषष्ठ्यादिद्वारा ॥ तो काळ परम पवित्र खरा ॥ कां संतसज्जन आलिया घरा ॥ काळाचा उभारा अतिपवित्र ॥ ९२ ॥ हो कां संपत्ति आलिया हातां ॥ कां धर्मीं उल्हास जेव्हां चित्तां ॥ तो पुण्यकाळ तत्त्वतां ॥ वेदशास्त्रार्थां अनुकूल ॥ ९३ ॥ पुरुषासि पर्वकाळ ॥ जन्मांत जोडे एकवेळ ॥ मातापित्यांचा अंतकाळ[6] ॥ ते धर्माची वेळ अतिपवित्र ॥ ९४ ॥ हा पर्वकाळ मागुता ॥ पुरुषासि नातुडे सर्वथा ॥ तेथ श्रद्धेनें धर्म करितां ॥ पवित्रता अक्षय ॥ ९५ ॥ स्वभावें काळाची पवित्रता ॥ तुज मी सांगेन आतां ॥ जो उपकारी सर्वथा ॥ निजस्वार्था साधका ॥ ९६ ॥ ब्राह्म[7] मुहूर्त्त स्वसत्ता ॥ पवित्र जाण स्वभावतां ॥ जो साधकांच्या निजस्वार्था ॥ होय वाढविता अनुदिनीं ॥ ९७ ॥ काळाची अकर्मकता ॥ ऐक सांगेन मी आतां ॥ कर्म करूं नये स्वभावतां ॥ निषिद्धता महादोषू ॥ ९८ ॥ जेथ जळस्थळादि सर्वथा ॥ विहित द्रव्य नये हातां ॥ तो काळ अकर्मकता ॥ जाण तत्त्वतां निश्चयें ॥ ९९ ॥ जो काळ सूतकें व्यापिला ॥ कां राष्ट्रा उपप्लुव आला ॥ जे काळीं देह परतंत्र झाला ॥ तो काळ बोलिला अकर्मक ॥ १०० ॥ जो काळ दुर्भिक्षासि आला ॥ जो कां ज्वरादिदोषदूषिला ॥ जो काळ चोराकूलित झाला ॥ तो काळू बोलिला अकर्मकू ॥ १ ॥ जे काळीं क्रोध संचरला ॥ जेथ तमोगुण क्षोभला ॥ निद्राआलस्यें व्या

---

१ पृथ्वी. २ खडकाळपणानें. ३ विहितकर्म न करणारे व निषिद्ध कर्म करणारे. ४ अनादर करून. ५ वेदविहितधर्म न आचरणारे. ६ मृत्युसमय. ७ पहांट. ८ उपद्रव.

पिला ॥ तो काळू बोलिला अकर्मक ॥ २ ॥ अकस्मात सुखसंपदा ॥ कां अभिनव वार्ता[१] एकदा ॥ कां लंघिजे भल्याची मर्यादा ॥ तो काळ सर्वदा अकर्मकू ॥ ३ ॥ कां मार्गीं विषमता ॥ पंथ क्रमिजे चालतां ॥ तेथ पडे दुर्धर्षता[२] ॥ तो काळ तत्त्वतां अकर्मक ॥ ४ ॥ जे काळीं द्रव्यलोभ दारुण ॥ जे काळीं चिंता गहन ॥ जेव्हां विकल्पें भरे मन ॥ तो काळजाण अकर्मक ॥ ५ ॥ ऐशी काळाची अकर्मकता ॥ तुज म्यां सांगीतली तत्त्वतां ॥ आतां द्रव्याची शुद्धाशुद्धता ॥ ऐक सर्वथा सांगेन ॥ ६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ द्रव्यस्य शुद्ध्यशुद्धी च द्रव्येण वचनेन च ॥ संस्कारेणाऽथ कालेन महत्त्वाल्पतयाऽथवा ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ पुरुषें गोमूत्र सेवितां ॥ तात्काळ पावे पवित्रता ॥ तेंचि ताम्रपात्रें[३] घेतां ॥ ये अपवित्रता तत्काळ ॥ ७ ॥ पुरुषें जळ प्रोक्षितां[४] ॥ पुष्पांसि[५] पवित्रता ॥ तेंचि पुरुषें अवघ्राणितां[६] ॥ अपवित्रता पुष्पासी ॥ ८ ॥ अग्नीची सेवा करितां ॥ द्विजासि परमपवित्रता ॥ तोचि द्विज[७] अग्नीनें जाळितां ॥ ये अपवित्रा अग्नीसी ॥ ९ ॥ दर्भीं पिंड ठेवितां पवित्र ॥ पिंडस्पर्शें दर्भ अपवित्र ॥ ऐशीं शुद्ध्यशुद्धि विचित्र ॥ बोलिले शास्त्र श्रुत्यर्थें ॥ ११० ॥ जे वस्तु संशयापन्न ॥ त्याच्या शुद्धीसि ब्राह्मणवचन ॥ ज्याचें वचन प्रमाण ॥ हरिहर जाण मानिती ॥ १ ॥ घृतसंस्कारें[८] शुद्ध अन्न ॥ होमसंस्कारें नवधान्य ॥ अग्निसंस्कारें लवण ॥ पवित्र जाण शास्त्रार्थें ॥ १२ ॥ राकारापुढें मकार ॥ मांडूनि करितां उच्चारें[९] ॥ जिणोनि पापांचा संभार ॥ होय तो नर शुद्धात्मा ॥ १३ ॥ त्याचि मकारापुढें यकार ॥ ठेवूनि करितां उच्चार ॥ अंगीं आदळे पाप घोर ॥ तेणें होय नर अतिबद्ध ॥ १४ ॥ रजस्वला शुद्ध चतुर्थेंहनीं[१०] ॥ मेघोदक शुद्ध तिसरे दिनीं ॥ वृद्धिसूतक दहावे दिनीं ॥ काळ शुद्धपणीं या हेतू ॥ १५ ॥ पूर्व दिवशींचें जें अन्न ॥ तें काळेंचि पावे गा दूषण ॥ ज्यासि आलें शिळेपण ॥ तें अन्न जाण अशुद्ध ॥ १६ ॥ तैसें नव्हे घृतपाचित[११] ॥ तें बहुतकाळें तरी पुनीत ॥ जें विटोनि विकारी होत ॥ तें अपुनीत काळेंची ॥ १७ ॥ जें सांचवणी अल्पजळ ॥ त्यासि स्पर्शल्या चांडाळ ॥ तें अपवित्र गा केवळ ॥ नये अळुमाळ[१२] स्पर्शकरूं ॥ १८ ॥ तेंचि निर्झर[१३] कां अक्षोभ जळ ॥ तेथ स्पर्शल्याही चांडाळ ॥ त्यासि लागेना तो विटाळ ॥ तें नित्य निर्मळ पवित्र ॥ १९ ॥ अल्प केलिया स्वयंपाक ॥ त्यासि जैं आंतळे[१४] श्वानें[१५] काक ॥ तैं तें सांडावें[१६] निःशेख ॥ अपवित्र देख तें अन्न ॥ १२० ॥ तोचि सहस्रभोजनाचा पाक ॥ त्यासि आतळल्या श्वान काक ॥ सांडावें जेथ लागलें मुख ॥ ये[illegible]न्न निर्दोख भोजनीं ॥ २१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शक्त्याऽशक्त्याऽथवा बुद्ध्या समृद्ध्या च यदात्म

---

१ कधीं न ऐकिलेली. २ संकट. ३ [illegible]च्या भांड्यानें. ४ शिंपडलें असतां. ५ फुलास. ६ वास घेतला असतां. ७ ब्राह्मण. ८ तूप घातलें असतां. ९ राम या नामाचा. १० चवथे दिवशीं. ११ तुपांत तळलेलें. १२ थोडेंही. १३ प्रवाहरूपें १४ शिवे. १५ कुत्रा. १६ टाकावें. १७ तोंड.

ने ॥ अघं कुर्वंति हि यथा देशावस्थानुसारतः ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ झालिया चंद्रसूर्यग्रहण ॥ शक्तें स्नान न करितां दूषण ॥ बाळक वृद्ध आतुर[2] जन ॥ न करितां [illegible] दोष नाहीं ॥ २२ ॥ पुत्र जन्मलिया देख ॥ स्वगोत्रज जे सकळिक ॥ त्यांसि जाण आवश्यक ॥ बाधी सूतक दहा दिवस ॥ २३ ॥ [illegible] स्थळांतरीं पुत्रश्रवण ॥ सूतकाअंतीं झाल्या जाण ॥ त्या सूतकाचें बंधन ॥ न बाधी आपण सर्वथा ॥ २४ ॥ पूर्वदिनीं गोत्रज[3] मरे ॥ तें स्वगोत्रीं सूतक भरे ॥ येरे दिवशीं दुसरा जैं मरे ॥ तैं सूतकें उतरे[4] दोहींचें ॥ २५ ॥ जं गें घेतलें होय विख ॥ त्यासि सर्पु लाविलिया देख ॥ तेणें विखें उतरे विख ॥ तेवीं सूतकें सूतक निवारे ॥ २६ ॥ जें बुद्धिपूर्वक केलें आपण ॥ तें अवश्य भोगावें पाप पुण्य ॥ जें बुद्धीसि नाहीं विद्यमान ॥ तें अहेतुकपण बाधीना ॥ २७ ॥ आपुलें जें अंतःकरण ॥ त्यासि पवित्र करी निजज्ञान ॥ हे विशुद्ध बुद्धि जाण ॥ विवेकसंपन्न वैराग्यें ॥ २८ ॥ जो धनवंत अतिसंपन्न ॥ त्यासि जुनें वस्त्र अपावन[5] ॥ शिविलें दंडिलें तेंही जाण ॥ नव्हे पावन समर्था ॥ २९ ॥ तेंचि दुर्बळाप्रति जाण ॥ अतिशयें परमपावन ॥ हा वेदवाद अतिगहन ॥ स्मृतिकारें जाण प्रकाशिला ॥ ३० ॥ समर्थासि असाक्ष[6] भोजन ॥ तें जाणावें अशुद्धान्न ॥ दुर्बळासि एकल्या अशन ॥ परम पावन श्रुत्यर्थें ॥ ३१ ॥ स्वयें न करितां पंचयज्ञ ॥ भोजन तें पापभक्षण ॥ सकळसुकृतासि नागवण ॥ जैं पराङ्मुखपण अतिथीसी ॥ ३२ ॥ स्वग्रामीं सर्वही आचार ॥ ग्रामांतरीं अर्ध आचार ॥ पुरीं पट्टणीं[7] पादमात्र[8] ॥ मार्गीं कर्मादर संगानुसारें ॥ ३३ ॥ विचारोनि देशावस्था ॥ हे वेदमर्यादा तत्त्वतां ॥ याहूनि अन्यथा करितां ॥ दोष सर्वथा कर्त्यासी ॥ ३४ ॥ ॥ पूर्वीं द्रव्यें द्रव्यशुद्धी ॥ सांगीतली यथाविधी ॥ तोचि मागुतेंनि प्रतिपादी[9] ॥ धर्मशास्त्रसिद्धी वेदोक्त ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ धान्यदार्वस्थितंतूनां रसतैजसचर्मणाम् ॥ कालवाय्वग्निमृत्तोयैः पार्थिवानां युतायुतैः ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ शूद्रप्रतिग्रहाचें धान्य ॥ एकरात्रीं शुद्धत्व जाण ॥ स्रुक्स्रुवादिकाष्ठ[10]भाजन ॥ जलप्रक्षालन[11] शुद्धत्व ॥ ३६ ॥ व्याघ्रनख[12] गजदंत[13] ॥ अपवित्र जंव स्नेहयुक्त ॥ जेव्हां होती स्नेहातीत ॥ अतिपुनीत ते काळीं ॥ ३७ ॥ पट्टतंतु स्वयें पुनीतू ॥ वायूनें शुद्ध ऊर्णातंतू[14] ॥ वस्त्रतंतु जळाआंतू ॥ होय पुनीतू प्रक्षाळिल्या ॥ ३८ ॥ गोक्षीर[15] पवित्र कांस्यमृत्पात्रीं ॥ तेंचि अपवित्र ताम्रपात्रीं ॥ ताम्र पवित्र आम्लें[16]करी ॥ आम्ल लवणांतरीं पवित्र ॥ ३९ ॥ घृत पवित्र अग्निसंस्कारीं ॥ अग्नि पवित्र ब्राह्मणमंत्रीं ॥ ब्राह्मण पवित्र स्वाचारीं ॥ पवित्रता आचारीं वेदविधी ॥ ४० ॥ वेद पवित्र गुरुमुखें ॥ गुरु

---

१ नीरोग्यानें. २ दुखणेकरी. ३ भाऊबंद. ४ जातें. ५ अपवित्र. ६ कोणी पंक्तीस नसतां. ७ राजधानींत. ८ चवथ्या अंशानें. ९ सांगतो. १० लांकडाचीं पात्रें. ११ पाण्यानें धुतल्यानें. १२ वाघनख. १३ हस्तिदंत. १४ मेंढरें इत्यादिकांची लोंकर. १५ गायीचें दूध. १६ आंबटानें.

पवित्र निजात्मसुखें ॥ आत्मा पवित्र गुरुचरणोदकें[1] ॥ पवित्र उदकें द्विजचरणीं ॥ ४१ ॥ पृथ्वी पवित्र जळसंस्कारीं ॥ जळ पवित्र पृ
थ्वीवरी ॥ चर्म पवित्र तैलेंकरी ॥ तैल चर्मपात्रीं पवित्र ॥ ४२ ॥ व्याघ्रादि जें मृगाजिन ॥ ईयें[2] स्वभावें पवित्र जाण ॥ अग्निसंस्कारें
सुवर्ण ॥ पवित्रपण स्वभावें ॥ ४३ ॥ एवं इत्यादि परस्परीं ॥ शुचित्व बोलिलें शास्त्रीं ॥ आतां मळलिप्त[3] झालियावरी ॥ त्याचें अव
धारी शुचित्व ॥ ४४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अमेध्यलिप्तं यद्येन गंधं लेपं व्यपोहति ॥ भजते प्रकृतिं तस्य तच्छौचं तावदिष्यते ॥ १२ ॥ ॥
टीका ॥ ॥ पात्र पीठ कां आसन ॥ अमेध्यें लिप्त झाल्या जाण ॥ त्या गंधाचें निःशेषक्षालन ॥ तेणें पवित्रपण तयांसी ॥ ४५ ॥ ना
भीखालता ज्याच्या शरीरा ॥ अमेध्य लेप लागल्या खरा ॥ ते ठायींचा गंधू जाय पुरा ॥ ऐसें धूतल्या त्या नरा शुचित्व लाभे ॥ ४६ ॥
नाभीवरतें अमेध्यलेपन ॥ अवचटें झालिया जाण ॥ तैं करावें मृत्तिकास्नान ॥ तेणें पावन तो पुरुष ॥ ४७ ॥ मळ धूतल्या तत्काळ
जाती ॥ परी त्या गंधाची होय निवृत्ती ॥ प्रकृती पावे जैं निजस्थिती ॥ मळनिष्कृती[4] या नांव ॥ ४८ ॥ बाह्यपदार्थ निवृत्तिनिष्टें ॥
वेद बोलिला या खटपटें ॥ आतां कर्त्याचें शुचित्व प्रकटे ॥ ते ऐक गोमटे[5] उपाय ॥ ४९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्नानदानतपोवस्थावीर्यसं
स्कारकर्मभिः ॥ मत्स्मृत्या चात्मनः शौचं शुद्धः कर्माचरेद्द्विजः ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ गर्भाधानादि अन्नप्राशन ॥ ते बाल्यावस्था संपूर्ण ॥
चौल तें कुमारावस्था जाण ॥ ब्राह्मणपण उपनयनें[6] ॥ ५० ॥ कर्मभूमिकेलागीं स्नान ॥ द्रव्यशुद्धीलागीं कीजे दान ॥ वैराग्याला
गीं तप जाण ॥ कर्माचरण जडत्वत्यागा[7] ॥ ५१ ॥ ऐसऐसिया विधीं ॥ ब्राह्मण जे कां सुबुद्धी ॥ सबाह्य पावावया शुद्धी ॥ वेद उप
पादी स्वकर्में ॥ ५२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मंत्रस्य च परिज्ञानं कर्मशुद्धिर्मदर्पणम् ॥ धर्मः संपद्यते षड्भिरधर्मस्तु विपर्ययः ॥ १५ ॥ ॥ टी
का ॥ मंत्रशुद्धि मंत्रार्थज्ञानें ॥ कर्मशुद्धि ब्रह्मार्पणें[9] ॥ हें कर्त्याचे शुद्धीकारणें ॥ साही लक्षणें वेदू बोले[8] ॥ ५३ ॥ देशकाळद्रव्यसंपन्न
ता ॥ मंत्रकर्मा निरुज कर्ता ॥ या साहींची शुद्धावस्था ॥ स्वधर्मता फलोन्मुख ॥ ५४ ॥ जें द्रव्य पावे दीनाचे आर्त्ता ॥ कां माझिया
निजभक्तां ॥ या नांव द्रव्यपवित्रता ॥ जाण तत्त्वतां निश्चित ॥ ५५ ॥ धर्मशास्त्रार्थें शुद्ध धन ॥ कष्टें मिळवूनियां जाण ॥ धनलोभीं ठे
विल्या प्राण ॥ अवघेंचि जाण अशुद्ध ॥ ५६ ॥ या नांव द्रव्यशुद्धता ॥ ऐक मंत्राची पवित्रता ॥ जेणें मंत्रें पाविजे मंत्रार्था ॥ शुद्ध स
र्वथा तो मंत्र ॥ ५७ ॥ जेथ केलिया मंत्रग्रहण ॥ अंगीं चढता वाढे अभिमान ॥ कां जेथ जारण मारण ॥ ते मंत्र जाण अपवित्र
॥ ५८ ॥ या नांव मंत्रशुद्धी जाण ॥ ऐक कर्माचें लक्षण ॥ जेणें कर्में तुटे बंधन[10] ॥ तें कर्माचरण अतिशुद्ध ॥ ५९ ॥ स्वयें करितां

---

१ गुरूच्या पायाच्या तीर्थानें. २ हीं. ३ मलिन. ४ मळाचें दूरीकरण. ५ सुंदर. ६ मुंजीनें. ७ आलस्य दूर होण्याकरितां. ८ सांगतो. ९ ईश्वरार्पण केल्यानें. १० संसारसंबंध.

कर्माचरण ॥ जेथ खवळे मोहाभिमान ॥ कर्त्यांसि लागे दृढबंधन ॥ तें कर्म जाण अपवित्र ॥ ६० ॥ जेणें कर्में कर्मांचा निरास ॥ तें शुद्ध कर्म सावकाश ॥ जेथ स[illegible]बुद्धि सदा अविनाश ॥ तो पुण्यदेश उद्धवा ॥ ६१ ॥ जरी सुक्षेत्रीं केला वास ॥ आणि परांचे देखे गुणदोष ॥ तो देश जाणावा तामस ॥ अचुक नाश कर्त्यांसी ॥ ६२ ॥ अन्यक्षेत्रीं देखिल्या दोष ॥ त्याचा सुक्षेत्रीं होय नाश ॥ सुक्षेत्रीं देखिल्या दोष ॥ तो न सांडी जीवास कल्पांतीं ॥ ६३ ॥ जेथ उपजे साम्यशीळ[3] ॥ तो देश जाणावा निर्मळ ॥ चित्त सुप्रसन्न जे वेळ ॥ तो पुण्यकाळ साधकां ॥ ६४ ॥ स्वभावें शुद्ध ब्राह्मं[4] मुहूर्त ॥ तेथही क्षोभल्या चित्त ॥ तोही काळ अपुनीत ॥ जाण निश्चित वेदार्थ ॥ ६५ ॥ येथ जो कां कर्मकर्ता ॥ त्याची गेलिया कर्म अहंता ॥ पुढें कर्म चाले स्वभावतां ॥ हे पवित्रता कर्त्यांची ॥ ६६ ॥ येथ जो ह्मणे अहं कर्ता ॥ तो पावे अतिबद्धता ॥ हे कर्त्यांची अपवित्रता ॥ देहअहंताअभिमानें ॥ ६७ ॥ धर्माधर्मांचे साही प्रकार ॥ हें वेदाचें तत्त्व[5]सार ॥ येही धर्मीं मुक्त होय नर ॥ अधर्मीं अपवित्र अतिबद्ध ॥ ६८ ॥ गुणदोषांचें लक्षण ॥ सांगतां अतिगहन ॥ येथ गुंतले सज्ञान ॥ अतिविचक्षण पंडित ॥ ६९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ क्वचिद्गुणोऽपि दोषः स्याद्दोषोऽपि विधिना गुणः॥ गुणदोषार्थनियमस्तद्विदामेव बाधते ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ ज्याचा मानिजे उत्तम गुण ॥ तोचि दोष होय परतोन ॥ एवं कर्मचि कर्मासि जाण ॥ दोष दारुण उपजवी ॥ ७० ॥ कर्मीं मुख्यत्वें गा आचमन ॥ हें कर्म शुद्धीचें निजकारण ॥ तेंचि दक्षिणाभिमुखें केल्या जाण ॥ दोष दारुण उपजवी ॥ ७१ ॥ कानीची जेणें जाय तिडिक ॥ तेंचि मुखीं घालितां देख ॥ होय अत्यंत बाधक ॥ प्राणांतिक पावती बाधा ॥ ७२ ॥ आचमनीं माष[9]मात्र जीवन[10] ॥ घेतल्या होइजे पावन ॥ तेंचि अधिक घेतां जाण ॥ सुरापाना[11]सम दोष ॥ ७३ ॥ फणस खातां लागे गोड ॥ तें जैं अधिक खाय तोंड ॥ तैं शूळ उठे प्रचंड ॥ फुटे ब्रह्मांड अतिव्यथा ॥ ७४ ॥ सूर्यपूजनीं पुण्य घडे ॥ तेथ जैं बेलपत्र चढे ॥ तैं पुण्य राहे मागिलीकडे[12] ॥ दोष रोकडें[13] पूजकां ॥ ७५ ॥ ऐसा कर्मीं कर्मविन्यास ॥ गुण तोचि करी दोष ॥ कोठें दोषांचाही विलास ॥ पुण्य बहुवस उपजवी ॥ ७६ ॥ चोराकुलितमार्गीं जाण ॥ ब्राह्मण करितां प्रातःस्नान ॥ तो नेतां कर्म त्यागून ॥ दोषचि परी गुण गंभीर होय ॥ ७७ ॥ सर्पगरळेचें जीवन ॥ ब्राह्मणें करितां प्राशन ॥ तें पात्र घेतां हिरोनें[14] ॥ दोष परी तो गुण गंभीर होय ॥ ७८॥ गृहस्थासि अग्निहोत्र गुण ॥ तोचि संन्याशासि अवगुण ॥ ब्राह्मणीं विहितमंत्रपठण ॥ शूद्रासि जाण तो दोष

---

[1] दुसऱ्याचे. [2] कर्मास अपवित्र. [3] ऐक्यबुद्धि. [4] पहांट. [5] मो. [6] गुह्य. [7] दक्षिणेस तोंड करून. [8] वेदना. [9] उडीद बुडेल इतकेंच. [10] पाणी. [11] दारू प्याल्याप्रमाणें. [12] एकीकडे. [13] उलटें. [14] हिसकावून.

॥ १७९ ॥ विषयनिवृत्तीलागीं सुगम ॥ गुणदोषांचा केला नेम ॥ हें नेणोनि वेदाचें वर्म ॥ विषयभ्रम भ्रांतासी ॥८० ॥ जव भ्रां
ति तंव कर्मप्रवृत्ती ॥ तेथ गुणदोषांची थोर ख्याती ॥ जेवीं कां खद्योत[1] लखलखिती ॥ आंधारे रातीं सतेज ॥ ८१ ॥ तेवीं गुणदोषां
माजी जाण ॥ अवश्य अंगीं आदळे पतन ॥ तेचिअर्थींचें निरूपण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ८२ ॥ ॥ श्लोक ॥ समानकर्माचरणं
पतितानां न पातकम् ॥ औत्पत्तिको गुणः संगो न शयानः पतत्यधः ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्वकर्मे पतित जाहले जाण ॥ डोंब भि
ल्लु कैंवर्त्तक[2] जन ॥ यांसि मद्यपानादिदोषीं जाण ॥ नाहीं पतन[3] पतितासी ॥ ८३ ॥ जें नीळीमाजी काळें केलें ॥ त्यासि काय बाधा
वें काजळें ॥ कां अंधारासि मसीं[4] माखिलें ॥ तेणें काय मळलें तयाचें ॥ ८४ ॥ जो स्वभावें जन्मला चांडाळ ॥ त्यासि कोणाचे बाध
ती विटाळ ॥ हो कां काळें करावें काजळ ॥ ऐसें नाहीं बळ कवणासी ॥ ८५ ॥ निर्जीवा[5] दीधलें विख ॥ तेणें कोणासि द्यावें दुःख ॥
तेवीं पतितासि पातक ॥ नव्हे बाधक सर्वथा ॥ ८६ ॥ जो केवळ खालें निजेला ॥ त्यासि पडण्याचा भेवो गेला ॥ तेवीं देहाभिमानें
जो आला ॥ तो नीचाचा झाला अतिनीच ॥ ८७ ॥ रजतमादिगुणसंगीं ॥ जो लोलंगत[6] विषयालागीं ॥ त्यासि गुण रतिलागीं ॥
कामभोगीं नव्हे नवी बुद्धी ॥ ८८ ॥ जो कनकबीजें[7] भुलला ॥ तो गाये नाचे हरिखेला ॥ परी संचितार्थ[8] चोरीं नेला ॥ हा नेणेचि आ
पुला निजस्वार्थ ॥ १८९ ॥ तेवीं देहाभिमानें उन्मत्त ॥ अतिकामें कामासक्त ॥ तो नेणे बुडाला निजस्वार्थ ॥ आपुला अपघात दे
खेना ॥ ९० ॥ ज्यासि चढला विखाचा बाचंटा[9] ॥ त्यासि पाजावी सूकरविष्ठा ॥ तेवीं अतिकामी पापिष्ठा ॥ त्यां स्वदारानिष्ठा नेमि
ली ॥ ९१ ॥ ज्यासि विख चढलें गहन ॥ त्यासि सूकरविष्ठेचें अनुपान ॥ हें ते काळींचें विधान ॥ स्वयें सज्ञान बोलती ॥ ९२ ॥ तेवीं जे
थवरी स्त्रीपुरुषव्यक्ती ॥ तेथवरी स्वेच्छा कामासक्ती ॥ त्याची करावया निवृत्ती ॥ स्वदारास्थिती नेमिली ॥ ९३ ॥ वेदें निरूपिलें आप
ण ॥ न दिवा[10] रातीं स्वदारागमन ॥ तेंही नेमिक बोलिलें जाण ॥ स्वदारागमन ऋतुकाळीं ॥ ९४ ॥ तेथ जन्मलिया पुत्रासी ॥ आत्मा
वै पुत्रनामासी ॥ येणें वेदवचनें पुरुषासी ॥ स्त्रीकामासी निवर्तवी ॥ ९५ ॥ निःशेष विष उतरल्यावरी ॥ तो सूकरविष्ठा हातीं न धरी ॥
तेवीं विरक्ति उपजल्या अंतरीं ॥ स्वदारा दूरी त्यागिती ॥ ९६ ॥ यापरी विषयनिवृत्ती ॥ माझ्या वेदाची वेदोक्ती ॥ दावूनि गुणदोषां
ची उक्ती ॥ विषयासक्ती सांडावी ॥ ९७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यतो यतो निवर्त्तेत विमुच्येत ततस्ततः ॥ एष धर्मो नृणां क्षेमः शोकमोहभ
यापहः ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ ॥ माझिया वेदाचें मनोगत[11] ॥ विषयीं व्हावें निवृत्त ॥ यालागीं गुणदोष दावित ॥ विषयत्यागार्थ उपा

---

१ काजवे. २ धीवर. ३ पातक. ४ काजळांनीं. ५ प्रेतास. ६ लुब्ध. ७ धोतऱ्याच्या ब्यानें. ८ जवळचा ठेवा. ९ कुपथ्य. १० दिवसां. ११ अभिप्राय.

वो ॥ ९८ ॥ एकाएकीं सकळविषयांसी ॥ त्याग न करवे प्राण्यासी ॥ यालागीं निषेधोंन[1] त्यासी ॥ शनैःशनैः[2] विषयांसी त्यागवी ॥ ९९ ॥ जैं जैं विषयाची निवृत्ती ॥ तैं तैं निजसुखाची प्राप्ती ॥ पूर्ण बाणल्या[3] विरक्ती ॥ साधक होती मद्रूप ॥ २०० ॥ मद्रूपते[4]चिये प्राप्ती ॥ आड असे विषयासक्ती ॥ ते झालिया [illegible]यनिवृत्ती ॥ साधक होती मद्रूप ॥ १ ॥ जेथ माझिया स्वरूपाची प्राप्ती ॥ तेथ निःशेष निमे[5] अहंकृती[6] ॥ शोकमोहेंसि होय शांती ॥ जाण निश्चितीं अविद्येची ॥ २ ॥ अविद्यानाशासवें जाण ॥ नाशती भवजन्मभाव दारुण ॥ तेव्हां मरणासि ये मरण ॥ हारपे जीवपण जीवाचें ॥ ३ ॥ अविद्या निमाल्या[7] जीवेंसी ॥ ठावो नाहीं भवभयासी ॥ जेंवीं सबळ अंधारेंसीं ॥ नुरे निशी[8] दिनोदयीं[9] ॥ ४ ॥ जेवीं कां मृगजळाचा पूर ॥ न साहे दृष्टीचा निर्धार ॥ तेवीं भवभयेंसि संसार ॥ झाला साचार वाउँगा[10] ॥ ५ ॥ प्राणी पावावया कल्याण ॥ हें वेदोक्त स्वधर्माचरण ॥ विषयत्यागालागीं जाण ॥ केलें निरूपण गुणदोषां ॥ ६ ॥ जे साच वेदार्थातें नेणती ॥ ते वेदा प्रवृत्तिपरें[11] ह्मणती ॥ परी वेदें द्योतिली विरक्ती ॥ विषयासक्तिछेदक ॥ ७ ॥ वेदोक्त स्वधर्मास्थितीं ॥ होय विषयाची विरक्ती ॥ प्राणी निजमोक्ष पावती ॥ हे वेदोक्ती पैं माझी ॥ ८ ॥ सांडोनियां वेदस्थिती ॥ केवळ विषयाची आसक्ती ॥ प्राणी अतिदुःख पावती ॥ ऐक तुजप्रती सांगेन ॥ ९ ॥ प्रवृत्ति तितुकी अनर्थहेतू ॥ येचि अर्थीचा वृत्तांतू ॥ चौं श्लोकीं श्रीभगवंतू ॥ असे सांगतू उद्धवा ॥ १० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विषयेषु गुणाध्यासात्पुंसः संगस्ततो भवेत् ॥ संगात्तत्र भवेत्कामः कामादेव कलिर्नृणाम् ॥ १९ ॥ कलेर्दुर्विषहः क्रोधस्तमस्तमनुवर्त्तते ॥ तमसा ग्रस्यते पुंसश्चेतना व्यापिनी द्रुतम् ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ विषयाचें गोडपण ॥ सदा ध्याय ज्याचें मन ॥ त्यासि विषयासक्ति जाण ॥ अतिगहन उल्हासे ॥ ११ ॥ विषयासक्तीचा संभ्रम ॥ तेथ निर्लज्ज खवळे काम ॥ कामास्तव अतिविषम ॥ सोशी दुर्गम उपाय ॥ १२ ॥ विषयकामार्थ जे उपाय ॥ त्यांसि प्रतिपदीं[12] अपाय ॥ जेव्हां विषयकामसिद्धि न होय ॥ तेव्हां महाकलह विवादू ॥ १३ ॥ जेथ अतिजल्पाचा विवाद ॥ तेथ खटाटोपेंसि सन्नद्ध ॥ खवळला उठी क्रोध ॥ अतिविरुद्धदुर्धर ॥ १४ ॥ क्रोध खवळल्या दारुण ॥ बुद्धीचें तत्काळ नासे ज्ञान ॥ तेव्हां विवेकाचें प्राशन ॥ करिजे जाण महामोहें ॥ १५ ॥ विवेकाचें लोपल्या भान ॥ स्तब्ध चेतना होय जाण ॥ तेव्हां कार्याकार्य आठवण ॥ हें स्मरण बुडालें ॥ १६ ॥ विवेकशून्य[13] ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तया विरहितः साधो जंतुः शून्याय कल्पते ॥ ततोऽस्य स्वार्थविभ्रंशो मूर्च्छितस्य मृतस्य च ॥ २१ ॥

---

[1] निषेध करून. [2] हलकें हलकें [3] ठसल्या. [4] माझ्या स्वरूपाच्या. [5] नाहींशी होते. [6] अहंकार. [7] नाहींसें होतें. [8] रात्री. [9] दिवस उगवल्यावर. [10] व्यर्थ. [11] कर्ममार्ग सांगणारा. [12] पावलोंपावलीं. [13] विचाररहित.

स्तब्धवत ॥ तेथ विषयो ना परमार्थ ॥ न कळे सन्मार्गपंथ ॥ आत्मघात पदोपदीं ॥१७॥ केवळ जड मूढ होऊनी ॥ जेवीं कां मूर्च्छित[1] प्राणी ॥ तैसेपरी स्तब्ध होऊनी ॥ अज्ञानपणीं श्रमला ॥१८॥ यापरी जीत ना मेला ॥ जड मूढ होऊनि ठेला ॥ थित्या निजस्वार्थां मुकला ॥ अंगीं वाजला अनर्थू ॥ १९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विषयाभिनिवेशेन नात्मानं वेद नापरम् ॥ वृक्षजीविकया जीवन् व्यर्थं भस्त्रेव यः श्वसन् ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥ एवं विषयाचे आसक्तीं ॥ तमोगुणें ग्रासिली वृत्ती ॥ तेव्हां एकोंहि[2] स्फुरेना स्फूर्ती[3] ॥ मी कोण हें चित्तीं स्फुरेना ॥२०॥ ऐसा भ्रमें भुलला प्राणी ॥ जैसा उन्मत्त मदिरापांनी[4] ॥ त्यासि स्मरणांची विस्मरणी ॥ भ्रमिस्तमनीं पडिला ॥ २१ ॥ कां विषमसंधीचा ज्वरू ॥ तेणें ज्वरें डुंबरे थोरू ॥ त्यासि नावडे आपपरू ॥ वृथा विकारू बडबड करी ॥ २२ ॥ फांटाफुटलि[5] यावरी ॥ भलतेंचि स्मरणकरी ॥ तया नाठवे कांहीं ते परी ॥ प्राणी अघोरीं पडले जाण ॥ २३ ॥ कां झालिया भूतसंचार ॥ प्राणी डुंबरे डुंडुंकार ॥ पडिला चित्तासि विसर ॥ ह्मणे मी कुर्कर[6] ह्मणोनि भुंकें ॥ २४ ॥ ऐसे जीविके नेणोनि प्राणी ॥ घाबरे जैसा स्वप्नीं ॥ ह्मणे मी पडलों रणीं ॥ ऐसे प्राणी स्वप्नीं भुलले ॥ २५ ॥ तैशी भुली लटकी भुलवणी ॥ काममोहें व्यापिले प्राणी ॥ जडमूढपण टाकूनी ॥ अंतःकरणीं वेडावले ॥ २६ ॥ मुक्यानाकीं भरे मुरकुट ॥ तें फेंफें बेंबें करी निकृष्ट[7] ॥ न कळे रडे करी हाहाट ॥ ते खटपट वाउगी ॥ २७ ॥ तैसे दुःखबळें प्राणी ॥ परी न कळे उंच करणी ॥ पडिले मोहमदें भुलोनी ॥ मुकेपणीं वेंवात ॥ २८ ॥ अहंकृतीचा उभारा ॥ शरीरीं भरलासे वारा ॥ सो होऊनि बाधक नरा ॥ पडले आडद्वारा अंधकूपीं ॥ २९ ॥ कां तेलियाचा ढोर[8] पाही ॥ डोळां झांपडी स्वदेहीं ॥ अवघा वेळ चाले परी पाही ॥ पंथ कांहीं नठकेची ॥ ३० ॥ भंवता फिरे लाग[9]वेगीं ॥ परी पाहतां नलगे आगी ॥ घाणियाचि भोंवतें वेगी ॥ भोंवंडी अंगीं जिराली ॥ ३१ ॥ तैसे विषय भवंडित भव ॥ परी नकळेचि विवर विधमाव ॥ जैसा सर्प भ्रमला लागे धांव ॥ तैसे विषय अवेव धांवती ॥३२॥ अंवसेचें काळें गडद ॥ तैसा जडमूढ झाला स्तब्ध ॥ स्मरेना आपपर महाबोध ॥ जगदांध्य वोढवलें ॥ ३३ ॥ जेवीं लोहकारा[10]ची भातीं ॥ तेवीं वृथा श्वासोच्छ्वास होती ॥ वृक्षाची जैशी तटस्थ[11] स्थिती ॥ यापरी जीती जीत ना मेलें ॥ ३४ ॥ सकामासि स्वर्गप्राप्ती ॥ ह्मणशी बोलिली वेदोक्तीं ॥ तेही प्रलोभाची वेंदंती[12] ॥ एक तुजप्रती सांगेन ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ फलश्रुतिरियं नृणां न श्रेयो रो[illegible] परम् ॥ श्रेयोविवक्षया प्रोक्तं यथा भैषज्यरोचनम् ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ निष्काम जे कां कर्मस्थिती ॥ ते मूर्ख सर्वथा न करिती ॥ त्यांसि दावूनियां फलश्रुती ॥ स्वकर्मप्रवृत्ती लाविले ॥ ३६ ॥ सकाम अथवा निष्काम ॥

---

[1] चेतनारहित. [2] एकहो. [3] आठवण. [4] दारूपिणारा. [5] चित्तास भ्रम झाल्यामुळें. [6] कुत्रें. [7] अत्यंत. [8] बैल. [9] त्वरेनें. [10] लोंहाराचीं. [11] स्तब्ध. [12] भाषण.

कर्मक्रिया दोहींची सम ॥ येथ वासनाचि विषम ॥ सकाम निष्काम फलहेतु ॥३७॥ जेवीं कां स्वातीचें जळ ॥ शिंपीमाजी होय मुक्ताफळ ॥ तेंचि सेवी जैं महा[2]व्याळ ॥ तैं हळाहळ होऊनि ठाके ॥ ३८ ॥ तेवीं आपुली जे कां कल्पना ॥ निष्कामें आणि मुक्तपणा ॥ तेचि सकामत्वें जाणा ॥ हृढयंधना [illegible] ॥ ३९ ॥ वेदू बोलिला जें स्वर्गफळ ॥ तें मुख्यत्वें नव्हे केवळ ॥ जेंवीं भे[4]षज घ्यावया बाळ ॥ देऊनि गूळ चाळविजे ॥२४०॥ ओखद घेतलियापाठीं ॥ क्षयरोगाची होय तुटी ॥ परी बाळ हातींचा गूळ चाटी ॥ तेव्हां नव्हे फळदृष्टी भेषजीं ॥ ४१ ॥ तेवीं वेदाचें मनोगती ॥ स्वर्गफळाची अभिव्यक्ती ॥ मूर्खांसि द्यावया मुक्ती ॥ स्वधर्मस्थिती लावि तूं ॥ ४२ ॥ ह्मणसी कर्मवादी जे नर ॥ वेद सांगती प्रवृत्तिपर ॥ तो वेदार्थ निवृत्तितत्पर ॥ केवीं साचार मानावा ॥ ४३ ॥ श्रुत्यर्थ जैं प्रवृत्ति धरी ॥ तैं वेदू झाला अनर्थकारी ॥ त प्रवृत्ति दूषूनि श्रीहरी ॥ दावी निवृत्तिवरी वेदार्थ ॥ ४४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उत्पत्त्यैव हि कामेषु प्राणेषु स्वजनेषु च ॥ आसक्तमनसो मर्त्या आत्मनोऽनर्थहेतुषु ॥ २४ ॥ न तानविदुषः स्वार्थं भ्राम्यतो वृजिनाध्वनि ॥ कथं युंज्यात्पुनस्तेषु तांस्तमो विशतो बुधः ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ उपजतांचि प्राणिमात्रांसी ॥ देह आवडे सर्वस्वेंसी ॥ देहात्मवादें विषयासी ॥ जीवें प्राणेंसी लोलुप ॥ ४५ ॥ विषयकामाच्या आसक्तीं ॥ स्त्रीपुत्रांची गोडी चित्तीं ॥ स्वजनधनाची अतिप्रीति ॥ स्वभावस्थिती अनिवार ॥ ॥ ४६ ॥ जेणें जाइजे अधोगती ॥ ऐशी जे कां कामासक्ती ॥ ते प्राण्यासि सहजगती ॥ विषयासक्ती स्वभावें ॥ ४७ ॥ तेचि विषयांची प्रवृत्ती ॥ वेद बोले जैं विध्युक्ती ॥ तैं सर्वांचा स्वार्थघाती ॥ झाला अनर्थी वेदवादू ॥ ४८ ॥ मरतया तरटमारू केला ॥ बुडत्याचे डोयीं दगड दीधला ॥ आंधळा अंधकूपीं घातला ॥ तैसा वेदू झाला अनर्थी ॥ ४९ ॥ वेदु जैं विषयीं गोवी ॥ तैं प्राण्यातें कोण उगवी ॥ राजा सर्वस्व नागवी ॥ तैं कोण सोडवी दीनातें ॥२५०॥ नेणोनि वेदाचा मथि[11]तार्थू ॥ स्वयें जो कां विषयासक्तू ॥ तो मानी प्रवृत्तिपर श्रुत्यर्थू ॥ अनर्थहेतू बालिशां ॥ ५१ ॥ पुत्र पित्यास पुसे जाण ॥ ग्रहणीं जेऊं परमान्न ॥ येरू ह्मणे सुटल्या ग्रहण ॥ उष्णभोजन स्वगृहीं करूं ॥ ५२ ॥ तैशी माझ्या वेदाची उक्ती ॥ निषेधमुखें दावी प्रवृत्ती ॥ येणें वेदाच्या मनोगती ॥ विषयनिवृत्ती मुख्यत्वें ॥ ५३ ॥ विषयीं बुडते जे जन ॥ त्याचें करावया उद्धरण ॥ माझा वेदवादू जाण ॥ सकामपण त्या नाहीं ॥ ५४ ॥ कोणी एक मंदबुद्धी ॥ केवळ विषयांध त्रिशुद्धी ॥ सकाम जल्[13]पती वेदविधी ॥ त्यांची कुबुद्धी हरि सांगे ॥ ५५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवं व्यवसितं केचिदविज्ञाय कुबुद्धयः ॥

---

मोवीं. २ मोठा सर्प. ३ जाज्वल्य विष. ४ औषध. ५ प्रवृत्तिपरता. ६ लुब्ध. ७ नरकास. ८ तरटाच्या फोंकाचा मार. ९ सोडवी. १० हरण करी. ११ तत्त्व. १२ अज्ञांस. १३ बडबडतात.

फलश्रुतिं कुसुमितां न वेदज्ञा वदंति हि ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ॥ फलत्यागें स्वधर्मस्थिती ॥ सर्वथा सकाम न करिती ॥ यालागीं वेद बोले फळश्रुती ॥ स्वधर्मप्रवृत्तीलागूनी ॥ ५६ ॥ सैंधव[1] सागरा भेटूं जातां ॥ जेवीं कां हारपे सैंधवता ॥ तेवीं स्वधर्मीं प्रवर्ततां ॥ सकामता उरेना ॥ ५७ ॥ जैशी दों दिव्याची वाती ॥ एकवट केलिया ज्योती ॥ तेथ न दिसे भेदगती ॥ पाहतां ज्योती एकची ॥ ५८ ॥ जेवीं अग्नीं कापुर मिळतां ॥ तो अग्निची होय स्वतां ॥ तेवीं स्वधर्मींकर्मीं प्रवर्ततां ॥ कर्मीं निष्कर्मता स्वयें प्रकटे ॥ ५९ ॥ कर्माकर्मांची वेळ झाली ॥ तेथ स्वधर्मकर्मांची कांचमेळीं ॥ पडे चित्तशुद्धीची इंगळी[2] ॥ ते करी होळी कर्माकर्मांची ॥ २६० ॥ सकामता करितां कर्म ॥ स्वधर्म नाशी फळकाम ॥ तेव्हां सकाम आणि निष्काम ॥ दोहींचें भस्म स्वधर्म करी ॥ ६१ ॥ जेवीं दोंकाष्ठाच्या घर्सणी[3] ॥ माजी प्रकटे जो कां वन्ही ॥ तो दोहींतेही जाळूनी ॥ स्वतेजपणीं प्रकाशे ॥ ६२ ॥ तेवीं माझा वेद प्रबोधु ॥ स्वकर्में छेदी कर्म बाधू ॥ हें नेणोनि जो विषयांधू ॥ जडला सुबद्धू फळाशे ॥ ६३ ॥ वेदें प्रवृत्तिरोचनाकारणें ॥ स्वर्गादि नानाफळें बोलणें ॥ त्यांलागीं ज्याचें बैसे धरणें ॥ तेणें नागवणें निजस्वार्था ॥ ६४ ॥ कष्टोनि शेतीं पेरिले चणे ॥ त्यांची उपडोनि भाजी करणें ॥ तो लाभ कीं तेणें नाडणें ॥ तैसें फळ भोगणें सकामीं ॥ ६५ ॥ बोलीं जोंधळियाचीं करबाडें[4] ॥ खातां अत्यंत लागती गोडें ॥ त्यालागीं शेत जैं उपडे ॥ तैं लाभू कींनाडे निजस्वार्था ॥ ६६ ॥ तैशी सकाम कामना उन्मत्तें ॥ जे फळीं फळाशा लोलिंगतें ॥ ते नाडली स्वधर्मलाभातें ॥ ऐक तूं तें सांगेन ॥ ६७ ॥ शेतीं पेरावया आणिले चणे ॥ त्याचें आदरें करी जो फुटाणे ॥ तो शाहणा कीं मूर्ख ह्मणणें ॥ तैसें फळ भोगणें सकामीं ॥ ६८ ॥ घोडा विकोनि पलाण[5] घेणें ॥ लोणी देऊनि ताक मागणें ॥ भात सांडूनि वेळण[6] पिणें ॥ तैसें फळ भोगणें सकामीं ॥ ६९ ॥ ऐसे सकाम अति दुर्बुद्धी ॥ जे नाडले स्वधर्मसिद्धी ॥ यालागीं देवो ह्मणे कुबुद्धी ॥ ते कुबुद्धीचा विधी हरि सांगे ॥ २७० ॥ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कामिनः कृपणा लुब्धाः पुष्पेषु फलबुद्धयः ॥ अग्निमुग्धा धूमतांताः स्वं लोकं न विदंति ते ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ ॥ सकामाची तृष्णा पूर्ण ॥ कदाकाळीं नव्हे जाण ॥ कामेच्छा तो सदा दीन ॥ कृपणपण या हेतू ॥ ७१ ॥ जळीं बक धरोनि ध्यान ॥ जेवीं कां टपे मीनाकारण ॥ तेवीं सकामा अनुष्ठान ॥ लुब्धोनि जाण कामासी ॥ ७२ ॥ जावया परपुरुषापासी ॥ लवोंटें बोलावी[9] निजपतीसी ॥ तेवीं काम धरोनि [illegible] स्वधर्मकर्मासी आचरे ॥ ७३ ॥ जेवीं कां अज्ञान बाळ ॥ फूल तेंचि ह्मणे फळ ॥ तेवीं स्वर्गभोग केवळ ॥ मानी अढळ मूर्खत्वें ॥ ७४ ॥ त्याही स्वर्गभोगासि पाहे ॥ कर्मवैकल्यें[10] होय कीं नोहे ॥ हाही संदेह वर्तताहे ॥

---

१ मीठ. २ ठिणीगी. ३ घर्षणापासून. ४ ताटें. ५ [illegible]गीर. ६ पेज. ७ आशा. ८ माशाकरितां. ९ प्रेमयुक्तकरी. १० कर्मांच्या अपूर्णतेनें.

तेणेंही होये अतिदीन ॥ ७५ ॥ सकाम तो सदा दीन ॥ दीनत्वें अतिकृपण ॥ कृपणत्वें सलोभपण ॥ लोभास्तव ज्ञान महामोह ग्रासी ॥ ७६ ॥ मोहाचें खवळल्या भान ॥ सविवेक ग्रासी ज्ञान ॥ तेव्हां बुद्धीमाजी तमोगुण ॥ सबाह्य परिपूर्ण उल्हासे ॥ ७७ ॥ तमें कोंदटल्या वृत्ती ॥ धूमांकित होय स्थिती ॥ [illegible] कां आंधळ्याच्या अंध सांगाती ॥ आंधारे राती आडवीं चुके ॥ ७८ ॥ त्यां आंधळ्याची जैशी स्थिती ॥ तैशीच कामाची होय गती ॥ चुकला विवेकाच्या सांगाती ॥ आंधळी वृत्ती अतिमूढ ॥ ७९ ॥ जैसें कां अज्ञान बाळ ॥ तैसा मुग्ध होय केवळ ॥ कोण कर्म काय तें फळ ॥ नेणें विवळ[3] मूढत्वें ॥ २८० ॥ माझी कोण लोकीं स्थिती ॥ पुढें कोण आपुली गती ॥ हें कांहींच न स्मरे चित्तीं ॥ धूम्रवृत्ती देहांतू ॥ ८१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ न ते मामंग जानंति हृदिस्थं य इदं यतः ॥ उक्थशस्त्रा ह्यसुतृपो यथा नीहारचक्षुषः ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ ॥ वेदतात्पर्याचे निजखुणें ॥ तुवां पुसिलें मजकारणें ॥ तें वेदगुह्यनिरूपणें तुजकारणें म्यां निरूपिलें ॥ ८२ ॥ परिसोनि वेदाचे विभाग ॥ उद्धव सुखावला चांग ॥ तेणें संतोषें श्रीरंग ॥ संबोखोनि अंग[4] उद्धवासि ह्मणे ॥ ८३ ॥ जो मी हृदयामाजिले वस्ती ॥ परमात्मा निकटवर्ती ॥ त्या मातें सकाम नेणती ॥ कामासक्तीं नाडले ॥ ८४ ॥ तो मी हृदयामाजी असें ॥ हें एकदेशित्व मज नसे ॥ जगदाकारें मीचि भासें ॥ जेवीं कल्लोळें[6] विलासे सागरू ॥ ८५ ॥ अलंकार झालेपणें ॥ जेवीं असे निखळ सोनें ॥ तेवीं जगदाकारें म्यां श्रीकृष्णें ॥ परिपूर्ण असणें पूर्णत्वें ॥ ८६ ॥ नाम रूप वर्ण विविध ॥ माझेन प्रकाशें जगदुद्बोध ॥ परी नामरूपजातिभेद ॥ मजसी संबंध असेना ॥ ८७ ॥ आकाश जळीं बुडालें दिसे ॥ परी तें न माखे जळरसें ॥ तेवीं मी जगदाकारें असें ॥ जगदादिदोषें अलिप्त ॥ ८८ ॥ ऐसा मी जगदात्मा विश्वंभरू ॥ विश्वमूर्त्ति विश्वेश्वरू ॥ त्या मज नेणती अज्ञाननरू ॥ जेकां शिश्नोदरूपोषक ॥ ८९ ॥ ज्यासि आंधारें दाटे गाढें ॥ काम कुहारीं जो सांपडे ॥ तो कांहीं न देखे पुढें ॥ अवचितां पडे महागर्तीं ॥ २९० ॥ तेवीं अतिमोहममताभ्रांतें ॥ अज्ञानविहारें सबाह्य व्याप्तें ॥ जवळीं न देखोनि मातें ॥ पडिले मोहगर्तें तमामाजी ॥ ९१ ॥ न कळोनि माझ्या वेदार्थातें ॥ केवळ जीं कां कामासक्तें ॥ तीं पावलीं अधःपातातें ॥ मज हृदयस्थातें नेणोनी ॥ ९२ ॥ तो मी जवळी कैसा ह्मणसी ॥ तरी सर्वांच्या हृदयदेशीं ॥ वसतसें अहर्निशीं ॥ चेतनेसी चेतविता ॥ ९३ ॥ त्या माझें वेदार्थमत ॥ नेणतीचि कामासक्त ॥ तेचिविखीं श्रीकृष्णनाथ ॥ विशदार्थ स्वयें सांगे ॥ ९४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ते मे मतमविज्ञाय परोक्षं विषयात्मकाः ॥ हिंसायां यदि रागः स्याद्यज्ञ एव न चोदना ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ माझ्या वेदार्थाचा अग

---

१ अज्ञान. २ मोहयुक्त. ३ व्याकूल. ४ हा संबोधनाचा पर्याय. ५ परिच्छिन्नपणा. ६ मोठ्या लाटांनीं. ७ सूर्य. ८ आहारव मैथून वाढविणारें.

म्य भावो ॥ नकळोनि गूढ अभिप्रावो ॥ तेणें सकामासि उत्साहो ॥ स्वर्गातें पहाहो मानिती सत्य ॥ ९५ ॥ रोचनार्थ स्वर्ग बोले वेद ॥ तो प्रगटार्थ मानूनि शुद्ध ॥ मग स्वर्गसाधनें विविध ॥ कामलुब्ध आचरती ॥ ९६ ॥ तेथ यज्ञ हें मिषमात्र जाण ॥ स्वयें करावया मांसभक्षण ॥ अविधीं करिती पशुहनन ॥ अतिसक्त जाण कामार्थी ॥ ९७ ॥ त्यांसि त्याचिपैं गा देहांतीं ॥ मारिले पशु मारावया येती ॥ हातीं घेवूनि खड्गकाती ॥ सूड घेती यमद्वारीं ॥ ९८ ॥ तेथ कैंचें स्वर्गसुख ॥ अवघीं साधनें महामूर्ख ॥ पावले गा अघोर नरक ॥ सकामें देख नाडले ॥ ९९ ॥ यथेष्ट करावया मांसभक्षण ॥ स्वेच्छा जे कां पशुहनन ॥ त्यांसि वेदें केलें निर्बंधन ॥ पशुहनन यज्ञार्थ ॥ ॥३००॥ तेथही अर्गळा घातली जाण ॥ देशकाळ आणि वर्तमान ॥ मंत्र तंत्र विधिविधान ॥ धन संपूर्ण अतिशुद्ध ॥ १ ॥ शक्त सज्ञान धनवंत ॥ ऐसा कर्ता पाहिजे येथ ॥ मुष्टिघातें करावया पशुघात ॥ पडे प्रायश्चित्त मेमाता ॥ २ ॥ ऐशी वेदाज्ञा नाना अवघड ॥ घातलीं प्रायश्चित्तें अतिगूढ ॥ तरी सकाम जे महामूढ ॥ ते धांवती दृढ पशुहनना ॥ ३ ॥ ऐसें झाल्या पशुहनन ॥ विभागा येईल कवण प्रमाण ॥ तेंचि करावें भक्षण ॥ दांतासि जाण न लागतां ॥ ४ ॥ विभाग भक्षितां आपण ॥ जो करी रसस्वादन ॥ त्यासिही प्रायश्चित्त जाण ॥ हेंही निर्बंधन वेदें केलें ॥ ५ ॥ करावें मांसभक्षण ॥ हे वेदाज्ञा नाहीं जाण ॥ त्याचें करावया निराकरण ॥ लाविलें विधान यज्ञाचें ॥ ६ ॥ स्वेच्छा पशु न मारावया जाण ॥ यज्ञीं नेमिलें पशुहनन ॥ करावया मांसभक्षण ॥ नेमिला प्रमाण यज्ञभाग ॥ ७ ॥ हेंहो वेदाचें बोलणें ॥ मूर्ख न लोभाकारणें ॥ येऱ्हवीं पशुहिंसा न करणें ॥ मांस न भक्षणें हें वेदगुह्य ॥ ८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ हिंसाविहाराह्यालब्धैः पशुभिः स्वसुखेच्छया ॥ यजंते देवता यज्ञैः पितृभूतपतीन् खलाः ॥ ३० ॥ ॥ टीका ॥ ॥ न मानूनि वेदविधानासी ॥ पशुहननीं क्रीडा ज्यासी ॥ अविधि मारूनि पशूंसी ॥ मिरविती श्लाघेसी याज्ञिकत्व ॥ ९ ॥ अविधीं करूनि जीवहनन ॥ तेणें पशूनें करिती यज्ञ ॥ पितृदेवभूतगण ॥ करिती यज्ञ सुखेच्छा ॥ ३१० ॥ बावंडें बीज पेरिलया शेतीं ॥ पिकास नाडती निश्चितीं ॥ शेखीं निजबीजा नागवती ॥ राजे दंडूनि घेती करभार ॥ ११ ॥ तैशी अविधीं याज्ञिकगती ॥ स्वर्ग स्वप्नींही न देखती ॥ थित्या नरदेहा नागवती ॥ शेखीं दुःख भोगती यमदंडें ॥ १२ ॥ वृथा पशूंस दुःख देती ॥ तेणें दुःखें स्वयें दुःखी होती ॥ ऐशी याज्ञिकांची गती ॥ आश्चर्यें श्रीपती सांगत ॥ १३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्वप्नोपममसुं लोकमसंतं श्रवणप्रियम् ॥ आशिषो हृदि संकल्प्य त्यजंत्यर्थान्यथा व

---

[1] यापुढें हिंसायांयदिरागःस्याद्यज्ञएवनचोदना ॥ [illegible]विद्ध्वनिंश्रुत्वानावबध्येचकर्मसु ॥ असाश्लोक पुस्तकांतरीं लिहिला आहे याचा अर्थ पुढील व्याख्येंत नाहीं आणि याचा उत्तरार्ध भागवतांत मुळींच नाहीं पूर्वार्द्ध मात्र पूर्वश्लोकाचा उत्तरार्ध आहे. ॥ [2] ज्यास अंकूर न येणारा असें. ~~२ अर्थ~~.

णिक् ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्वप्न दिसे सवेंचि नासे ॥ तेवीं काल्पनिक जग भासे ॥ येथ सकाम कामनापिसें ॥ स्वर्ग विश्वासें मानि
ती सत्य ॥ १४ ॥ मुळींच मिथ्या मृगजळ ॥ त्यामाजी शीतळ जळ ॥ थाँया घेऊनि मागे बाळ ॥ तैसे सकाम केवळ स्वर्गालागीं ॥
॥ १५ ॥ पिंपळावरून मार्ग आहे ॥ ऐकोनि [illegible]खा वेंघों जाये ॥ तो जेवीं भ्रमें गुंतोनि राहे ॥ तेवीं स्वर्ग श्रवणें होयें सकाम ॥ १६ ॥
स्वधर्ममार्गीं चालावया नर ॥ वेदू स्वर्ग बोले अवांतर ॥ ते फांटां भरले अपार ॥ स्वर्ग तत्पर सकाम ॥ १७ ॥ वाट पिंपळावरी ऐको
नी ॥ शाहणा चाले मार्ग लक्षोनी ॥ अश्वत्थ सांडी डावलोनी ॥ तो पावे स्वस्थानीं संतोषें ॥ १८ ॥ तेवीं स्वधर्माच्या अनुष्ठानीं ॥ जो
सांडी स्वर्ग फळें उपेक्षूनी ॥ तो चित्तशुद्धीतें पावोनी ॥ ब्रह्म समाधानीं स्वयें पावे ॥ १९ ॥ या सांडूनि स्वधर्ममार्गासी ॥ श्रवँण प्रि
य स्वर्गसुखासी ॥ सकाम भुलले त्यासी ॥ जेवीं घंटानादासी मृग लुब्धे ॥ ३२० ॥ तेवीं जन्मोनि कर्मभूमीसी ॥ वेंचूनि धनधान्यसमृ
द्धीसी ॥ थित्या नाडले नर देहासी ॥ स्वर्गसुखासी भाळोनी ॥ २१ ॥ जैसा कोणी एक वाणी ॥ जुनी नाव आश्रयोनी ॥ द्वीपांतरीं
चा लाभ ऐकोनी ॥ न विचारितां मनीं समुद्रीं रिघे ॥ २२ ॥ उन्मत्त कर्णधाँराचे संगतीं ॥ फुटकी नाव धरोनि हातीं ॥ घेऊनियां स
कळ संपत्तो ॥ रिघे कुमती महार्णवीं ॥ २३ ॥ तो जेवीं समुद्रीं बुडे ॥ तैसेंचि सकामासि घडे ॥ स्वर्ग वांछितां बापुडे ॥ बुडाले रोकडे
भवार्णवीं ॥ २४ ॥ वांछितां स्वर्गसुखफळ ॥ बुडाले स्वधर्मवित्त सकळ ॥ बुडालें चित्तशुद्धीचें मूळ ॥ बुडालें मुद्दल नरदेह ॥ २५ ॥
येव्हडें हानीचें कारण ॥ देवो सांगत आपण ॥ सकामतेसि मूळ गुण ॥ तेंही लक्षण स्वयें सांगे ॥ २६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ रजःसत्त्वत
मोनिष्ठा रजः सत्त्वतमोजुषः ॥ उपासते इंद्रमुख्यान् देवादीन्न तथैव माम् ॥ ३२ ॥ ॥ टीका ॥ ॥ रजतमाचेनि उन्मत्तें ॥ सत्त्व संकीर्ण
होय तेथें ॥ तेव्हां रजतमाचेनि संमतें ॥ काम चित्तातें व्यापूनि खवळे ॥ २७ ॥ अतिकाम खवळल्या चित्तीं ॥ गुणानुसारें विषयीं प्री
ती ॥ तेव्हां सकामाची संगती ॥ धरी निश्चितीं भावार्थें ॥ २८ ॥ सकामसंगती साचार ॥ कामकर्मीं अत्यादर ॥ स्वर्गभोगीं महातत्प
र ॥ यजी देवपितर प्रमथादिक ॥ २९ ॥ मी सर्वात्मा सर्वेश्वर ॥ त्या माझ्याठायीं अनादर ॥ कामलंपटत्वें नर ॥ देवतांतर उपासि
ती ॥ ३३० ॥ ह्मणसी देवतांतर जें कांहीं ॥ तें तूंचि पैं गा सर्वही ॥ हा ऐक्यभावो नाहीं ॥ भेदबुद्धीं पाही विनियोग ॥ ३१ ॥ इंद्रादिदेवद्वा
रां जाण ॥ मीचि होय गा प्रसन्न ॥ त्या माझ्याठायीं नाहीं भजन ॥ सकाम मन स्वर्गार्थीं ॥ ३२ ॥ दृढ कामना जडली चित्तीं ॥ सां
गतां स्वर्गीं पुनरावृत्ती ॥ तेही हितत्वें मानिती ॥ ऐक निश्चितीं अभिप्रावो ॥ ३३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ इष्ट्वेह देवता यज्ञैर्गत्वा रंस्यामहे दि

---

१ तत्काल. २ इच्छेच्या नादानें. ३ हट्ट. ४ कान. ५ नावाड्याच्या. ६ मोठ्या समुद्रांत. ७ मिश्रित. ८ पूजितो. ९ दुसऱ्या देवास.

वि ॥ तस्यांत इह भूयाःस्म महाशाला महाकुलाः ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ जे कर्मभूमीसि मनुष्य झाले ॥ ते सहजें मोक्षाधिकारा आले ॥ तेथही कामना नागविले[1] ॥ स्वर्गार्थ भजले देवतांतरा ॥ ३४ ॥ स्वर्गभोगीं[2] ठेवूनि मन ॥ नानायागीं करिती यजन ॥ येणें दिविभोग पावेन ॥ हा निश्चय जाण याज्ञिकां ॥ ३५ ॥ काळे भोगक्षयाच्या पतनीं ॥ हेही घेती हितत्व मानोनी ॥ सर्वेचि इहलोकीं जन्मोनी ॥ ब्राह्मणपणीं सुशील ॥ ३६ ॥ वेदवेदांगअध्ययन ॥ धनधान्यें अतिसंपन्न ॥ आह्मी विख्यात गृहस्थ होऊन ॥ क्षीण पुण्य स्वर्गस्थ ॥ ॥ ३७ ॥ नेणोनि वेदार्थनिजस्थिती ॥ ऐसऐशिया उपपत्ती ॥ सकामी भुलले निश्चित्तीं ॥ ऊंस सांडूनि मागती कणीस त्याचें ॥ ३८ ॥ ॥ ॥ श्लोक ॥ एवं पुष्पितया वाचा व्याक्षिप्तमनसां नृणाम् ॥ मानिनां चातिस्तब्धानां मद्वार्त्ताऽपि न रोचते ॥ ३४ ॥ ॥ ॥ टीका ॥ ॥ फल सांडूनि फूल खाये ॥ तैसा परिपाक[3] याज्ञिका होये ॥ स्वर्गकामाचेनि उपायें ॥ अपायीं स्वयें पडतातीं ॥ ३९ ॥ अवघा संसार काल्पनिक ॥ तेथ सत्य कैंचें स्वर्गसुख ॥ परी श्रवणमात्रें देख ॥ भुलले मूर्ख स्वर्गसुखा ॥ ३४० ॥ जैसा नपुंसक वांछी स्त्रीसुख ॥ परी संग तया कैंचा देख ॥ मुळींच नाहीं बीजारोप[4] ॥ मा कैंचा काम साटोप तयासी ॥ ४१ ॥ परी लटिकाचि तडतडां उडे ॥ कष्टोनि व्यर्थचि पहुडे ॥ परी तया नसे भगभोग[5] रोकडे ॥ तैसे स्वर्ग फुडे प्राणिया ॥ ४२ ॥ गव्हाचा जो प्रथम मोडू ॥ तोंडीं घालितां लागे गोडू ॥ परी जो जाणे पिकाचा निर्वाडू[6] ॥ तो ते मोडू उपडिना ॥ ४३ ॥ पालेयाची चवी घेतां ॥ गव्हांची गोडी नलगे तत्त्वतां ॥ मग पाला पाळूनि स्वभावतां ॥ शेवटीं रडता गव्हाचिकारणें ॥ ४४ ॥ तेवीं बोलिला स्वर्गफळ ॥ तें स्वधर्माचें कोंवळें मूळ ॥ तें उपडूनि खातां तत्काळ ॥ मोक्षफळ अंतरे ॥ ४५ ॥ हें जाणती जे सज्ञान ॥ ते स्वर्गासि नातळती[7] आपण ॥ परी मूर्खाचें सकामपण ॥ अनिवार जाण अतिशयें ॥ ४६ ॥ कामाचिया लोलंगती ॥ सदा सकाम कर्में[8] करिती ॥ तेणें जन्ममरणांचे आवर्ती ॥ पडले नुलंडती आकल्प ॥ ४७ ॥ त्यांसि हित सांगती साधुजन ॥ ते न मानिती संतवचन ॥ आह्मीं वेदार्थें सज्ञान ॥ हा ज्ञानाभिमान अतिगर्वें ॥ ४८ ॥ मी भगवंत नियंता सृष्टी ॥ हें सुख दाविल्या नावडे गोष्टी ॥ निष्कामता कपाळउठी ॥ सकाम पोटीं सुबद्ध ॥ ४९ ॥ एवं वेदा मानूनि प्रवृत्तिपर[9] ॥ ठकले सकळ सकाम नर ॥ तोचि वेदार्थ ब्रह्मपर ॥ स्वयें श्रीधर सांगत ॥ ३५० ॥ ॥ श्लोक ॥ वेदा ब्रह्मात्मविषयास्त्रिकांडविषया इमे ॥ परोक्षवादा ऋषयः परोक्षं मम च प्रियम् ॥ ३५ ॥ ॥ टीका ॥ ॥ कर्मकांड उपासना ज्ञान ॥ इहीं त्रिकांडीं वेदू आपण ॥ चित्तशुद्धिद्वारा जाण ॥ ब्रह्मसंपन्न जीव करी ॥ ५१ ॥ अपरोक्ष वाद[10] वेदव्युत्पत्ती ॥ त्यागमुखें गा अन्योक्ती ॥ सांडवी विषयासक्ती ॥ ब्रह्मप्राप्तीला

---

[1] नाडले गेले. [2] स्वर्गातील उपभोग. [3] परिणाम. [4] बीयेची उत्पत्ति. [5] योनिसुख. [6] परिणाम. [7] दुःख होत नाहींत. [8] आसक्तीनें. [9] कर्ममार्गपर. [10] स्पष्टरीतीनें बोलणें

गूनी ॥ ५२ ॥ पारधी लावून बडिशीं[illegible]ढी ॥ मीनासि जळा बाहेर काढी ॥ तेवीं दावूनि स्वर्गसुखगोडी ॥ वेद जीवास वोढी परमार्थी ॥ ५३ ॥ हें जाणोनि वेदगुह्य [illegible]न ॥ जो जीव झाला ब्रह्मसंपन्न ॥ तेथ कर्ता मिथ्या जाण ॥ आश्रम वर्ण मग कैंचे ॥ ५४ ॥ तेथ कैंचें ध्येय ध्याता ध्ये[illegible]वें ज्ञेय ज्ञाता ज्ञान ॥ नाहीं भज्य भजक भजन ॥ ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ५५ ॥ तेथ कैंचें कर्म कर्माचरण ॥ कैंचा वेद वेदाध्ययन ॥ कैंचें साध्य आणि साधन ॥ ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ५६ ॥ तेथ कैंचे दोष कैंचे गुण ॥ कैंचें पाप कैंचें पुण्य ॥ कैंचें जन्म कैंचें मरण ॥ ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ५७ ॥ तेथ कैंचा भेदू कैंचा बोधूं[2] ॥ कैंचा मोक्ष कैंचा बंधू ॥ सदोदित परमानंदू ॥ हा वेदार्थ शुद्धू उद्धवा ॥ ५८ ॥ या वेदार्थाचें निरूपण ॥ प्रकट करितां आपण ॥ निज स्वार्था नाडती जन ॥ यालागीं जाण म्यां गुप्त केलें ॥ ५९ ॥ हें वेदार्थाचें गुह्य सार ॥ मज गुप्ताचें गुप्त भांडार ॥ तुझा देखोनि अधिकार ॥ म्यां साचार सांगीतलें ॥ ३६० ॥ हा गुह्यार्थ करितां प्रकट ॥ सांडोनि कर्माकर्माची वाट ॥ कर्म ब्रह्म उभय भ्रष्ट ॥ होतील नष्ट अनधिकारी ॥ ६१ ॥ हें जाणोनि ज्ञाते ऋषीश्वरीं ॥ वेदार्थनिरूपणकुसरी ॥ हा मुख्यार्थ झांकोनि निर्धारीं ॥ परोक्षावरी[3] व्याख्यान ॥ ६२ ॥ सकळलोकहितार्थ ॥ माझेंही हेंचि मनोगत[4] ॥ परोक्षवाद गोड लागत ॥ लोकसंग्रहार्थ उद्धवा ॥ ६३ ॥ मीही लोकसंग्रहार्थ ॥ अकर्त्ता कर्में आचरत ॥ वेदाचें जें परोक्ष मत ॥ मी स्वयें राखत निजहिता ॥ ६४ ॥ त्या वेदाचें स्वरूप गहन ॥ अतर्क्य अलक्ष्य अगम्य जाण ॥ तेंचिअर्थीचें निरूपण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ६५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शब्दब्रह्म सुदुर्बोधं प्राणेंद्रियमनोमयम् ॥ अनंत पारं गंभीरं दुर्विगाह्यं समुद्रवत् ॥ ३६ ॥ ॥ टीका ॥ ॥ माझी वेदरूप जे बोली ॥ शब्दतः[5] अर्थतः[6] अतिखोली ॥ ब्रह्मादिकां भुली पडली ॥ मर्यादा केली नवचेची ॥ ६६ ॥ बाँहीं न तरवे समुद्र ॥ तेवीं स्वमतीं न कळे वेदपार ॥ येचि अर्थीं नानाऋषीश्वर ॥ युक्तीचे संभार वेंचिलें ॥ ६७ ॥ परी एवंविध तत्त्वतां ॥ हे वेदवादाची कथा ॥ न ये कोणाचेही हाता ॥ अर्थतः शब्दतः दुर्ज्ञेय[8] ॥ ६८ ॥ ज्यासी शब्दवाचकता ॥ स्वरवर्णें शुद्ध न ये हाता ॥ त्याची अर्थावबोधकता[9] ॥ अगम्य सर्वथा सुरनरां ॥ ६९ ॥ पूर्वीं हाचि वेद अनुच्छिष्ट ॥ म्यां ब्रह्म्याहातें करविला पाठ ॥ तेणेंही नेणोनियां स्पष्ट ॥ कर्मीं कर्मठ होवूनि ठेला ॥ ३७० ॥ ते कर्मक्रिया अतिगोमटी ॥ शंखें[10] हरिली उठाउठी ॥ ब्रह्मा विसरला वेदगोठी ॥ पडलें सृष्टीकर्मांध्य ॥ ७१ ॥ तो करावया वेदोद्धार ॥ म्यां मर्दिला शंखासुर ॥ सकळश्रुतीचा संभार ॥ ब्रह्म्यासि साचार दीधला ॥ ७२ ॥ म्यां वेद ठेविले ब्रह्म्यापुढें ॥ तो पूर्व स्मरेना धडफुडें ॥ तेव्हां चाकाटलें[11] बापुडें ॥ केवळ वेडें

---

१ गळास मांस. २ ऐक्यज्ञान. ३ प्रपंचपर. ४ मनांतील आशय. ५ शब्दानें. ६ अर्थानें. ७ हातानें. ८ जाणण्यास कठीण. ९ अर्थाचा ज्ञातेपण. १० शंखा सुरानें. ११ चपापून गेला.

होऊनि ठेलें ॥ ७३ ॥ त्या वेदभागालागीं जाण ॥ ऋषीं वेंचिलें निजज्ञान ॥ शाखोपशाखीं रावण ॥ वेदविभाग करूं आला ॥ ७४ ॥
परी इत्थंभूतं[1] तत्त्वतां ॥ माझ्या वेदविभागाची वार्ता ॥ न येचि कोणाचिया हाता ॥ जाण तत्त्वता उद्धवा ॥ ७५ ॥ तो मी वेदस्थापक
श्रीहरी ॥ लोक राखावया मर्यादेवरी ॥ स्वयें सत्यवतीच्या उदरीं ॥ झालों अवतारधारी श्रीव्यास ॥ ७६ ॥ वेदविभागीं राजहंसू ॥
यालागीं नामें वेदव्यासू ॥ तेणें म्यां केला श्रुतिविलासू[2] ॥ वेदविशेषू चतुर्धा[3] ॥ ७७ ॥ वेद अर्थत्वें अतिदुर्घट ॥ परी वाचकत्वें झाला प्र
कट ॥ त्या चारी वाचा अतिश्रेष्ठ ॥ ऐक स्पष्ट सांगेन ॥ ७८ ॥ नादाचें प्रथम स्फुरण ॥ घोषवतां सूक्ष्म प्राण ॥ ती नाव परा वाचा जाण ॥
प्रथम लक्षण ॐकारी ॥ ७९ ॥ तोचि नादयुक्त प्राण ॥ अंतःकरणीं होय स्फुरण ॥ ते पश्यंती वाचा जाण ॥ विवेकलक्षण तीमाजी ॥
॥३८०॥ नाभीपासोनी[4] नाभिस्वरीं ॥ जे घुमघुमी कंठवरी ॥ ते मध्यमा वाचा खरी ॥ स्वयें श्रीहरी सांगत ॥ ८१ ॥ अकारउकार म
कार ॥ स्वरवर्णयुक्त उच्चार ॥ जेथ प्रकट होय ओंकार ॥ ते वाचा साचार वैखरी ॥ ८२ ॥ ते वैखरीच्याठायीं ॥ शाखोपशाखीं जो कां
हीं ॥ वेद अनंतरूप पाही ॥ त्यासही नाहीं मर्यादा ॥ ८३ ॥ यापरी वेद अमर्याद ॥ जरी चतुर्धा केला विशद[5] ॥ तरी जनासि अतिदु
र्बोध ॥ यालागीं उपवेद विभागिले ॥ ८४ ॥ ऐसेंनीहि जनासि न कळे वेद ॥ यालागीं वेदावरी पद ॥ श्रीव्यासें केलें विशद ॥ तरी वेदा
र्थ शुद्ध कळेना ॥ ८५ ॥ येचि अर्थीं ऋषीश्वरीं बहुत ॥ सुमंतु जैमिनी भाष्य भारत ॥ पैलसूत्रादि जे समस्त ॥ शिणतां वेदार्थ न कळे
ची ॥ ८६ ॥ एवं वाच्यता आणि लक्ष्यता ॥ स्थूलसूक्ष्मत्वें वेदार्थज्ञाता ॥ मजवांचूनि तत्त्वतां ॥ आणिक सर्वथा असेना ॥ ८७ ॥ ॥
श्लोक ॥ ॥ मयोपबृंहितं भूम्ना ब्रह्मणाऽनंतशक्तिना ॥ भूतेषु घोषरूपेण बिसेषूर्णेव लक्ष्यते ॥ ३७ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो मी अंतर्यामी
आपण ॥ भूमा ह्मणिजे अपरिच्छिन्न[6] ॥ सबाह्य व्यापकत्वें संपूर्ण ॥ ब्रह्म परिपूर्ण जोकां मी ॥ ८८ ॥ तेणें म्यां वेद अधिष्ठिता ॥ त्यासि
तत्काळ ये साकारता ॥ मग प्रबळ आणि शांतता ॥ या विकारावस्था अग्नीसी ॥ ८९ ॥ यापरी विकारी नव्हे जाण ॥ मी अंतर्यामी
नारायण ॥ ब्रह्मस्वरूपें परिपूर्ण ॥ विकारनिर्दळण स्वयें कर्त्ता ॥३९०॥ मीचि विकारांचा कर्त्ता ॥ करूनि मीचि अकर्त्ता ॥ त्या मज न
ये विकारिता ॥ ब्रह्मस्वरूपता स्वभावें ॥ ९१ ॥ ब्रह्म केवळ निर्धर्म ॥ तें केवीं करी विकारी कर्म ॥ ऐसा कांहीं कल्पिसी भ्रम ॥ तेंही सुगम
सांगेन ॥ ९२ ॥ माझी योगमाया अनं[illegible] ॥ जे शंभुंस्वयंभुंसि[7] नये व्यक्ती[8] ॥ तिचेनि योगें मी चिन्मूर्ती ॥ उत्पत्तिस्थितीसंहर्त्ता ॥
॥ ९३ ॥ एवं योगमायास्वभावता ॥ मी सकळ करूनि अकर्त्ता ॥ त्या मज देशता काळता ॥ विकारिता स्पर्शेना ॥ ९४ ॥ जरी स

---

१ याप्रमाणें. २ वेदार्थांचा प्रकाश. ३ चारप्रकारचा. ४ बेंबीपासून. ५ स्पष्ट. ६ मर्यादारहित. ७ ब्रह्मा व शंकरास. ८ स्पष्टपणास.

त्य असती भेदता ॥ तरी मज येती विका[illegible]ना ॥ माझें निजस्वरूपीं पाहतां ॥ भेदाची वार्त्ता असेना ॥ ९५ ॥ जेवीं भ्रमें सर्पत्व दोरा
वरी ॥ परी दोर सर्पत्व कदा न धरी ॥ तेवीं मी परमात्मा श्रीहरी ॥ करूनि अविकारी निजरूपें ॥ ९६ ॥ घोषरूपें अतिसूक्ष्म नादू ॥ तो
मी प्रणवरूपें निजवेदू ॥ प्राणिमात्रीं [illegible]ःसिद्धू ॥ परी नेणती बोधू सकामत्वें ॥ ९७ ॥ जेवीं कां विष्ठा भक्षी सूकर[2] ॥ उपेक्षी क
स्तूरी कापुर ॥ तेवीं सूक्ष्मवेदाचें निजसार ॥ सकाम नर उपेक्षिती ॥ ९८ ॥ मी निजानंद हृदया आंत ॥ त्या मज उपेक्षूनि भ्रांत ॥
कामासक्ती लोलंगत[3] ॥ द्वारें वोळंगतनीचाचीं ॥९९॥ त्या हृदयस्थवेदाचें ध्यान ॥ नित्य योग्यासि निदिध्यासन ॥ सम करोनि प्राणा
पान ॥ सदा अनुसंधान नादांचें ॥४००॥ माझें वेदतत्त्व सदा गुप्त ॥ प्रणवरूपें हृदयाआंत ॥ योगी सदा अनुभवित ॥ त्याचें स्वरूप नि
श्चित अवधारी ॥ १ ॥ जैसा कमळनाळीं बिसतंत ॥ तैसा सूक्ष्म नाद अत्यंत ॥ नाभीपासूनि ब्रह्मरंध्रांत[4] ॥ ओंकार स्वरांत लक्षि
ती ॥ २ ॥ ऐसा ओंकाराच्या स्वराआंत ॥ नाभीपासोनि ब्रह्मरंध्रांत ॥ सूक्ष्म नादाचा निजतंत ॥ योगधारणा राखत महायोगी ॥ ३ ॥
हाचि नाद पैं प्रस्तुत ॥ लौकिकीं असे भासत ॥ दोहीं कर्णीं देतां हात ॥ तोचि घुमघुमित निजनादू ॥ ४ ॥ योगी ह्मणती अनाहत शब्दू ॥
वेदांती ह्मणती सूक्ष्म नादू ॥ आह्मी ह्मणो हा शुद्धवेदू ॥ असो अनुवादू हा नांवाचा ॥ ५ ॥ ऐशिया स्वतःसिद्ध वेदांसी ॥ श्रद्धा नुप
जेचि प्राणियांसी ॥ यालागीं सूक्ष्म वेद स्थूलतेसी ॥ म्यां जनहितासी आणिला ॥ ६ ॥ तोचि स्थूलत्वें झाला प्रकट ॥ ते प्रकट होती
वेदवाट ॥ दृष्टांतें करूनि स्पष्ट ॥ तुज मी चोखट सांगेन ॥ ७ ॥ ऐसें बोलला श्रीनिवास[5] ॥ तेणें उल्हासला हृदयहंस ॥ ह्मणे मजकारणें
हृषीकेश ॥ अत्यंत सौरस निरूपणीं ॥ ८ ॥ मजवरी बहुत स्नेहाळ ॥ मज उद्धरावया गोपाळ ॥ निरूपणीं सुकाळ ॥ अतिरसाळ
अमृतरसू ॥ ॥ ९ ॥ ऐसें उद्धवाचें बोलणें एकोनी ॥ काय बोलिला सारंगपाणी ॥ ह्मणे मी तोचि निरूपणीं ॥ सांगेन तुजलागोनी
उद्धवा ॥४१०॥ ॥ श्लोक ॥ यथोर्णनाभिर्हृदयादूर्णामुद्वमते मुखात् ॥ आकाशाद्घोषवान्प्राणो मनसा स्पर्शरूपिणा ॥ छंदोमयोऽमृत
मयः सहस्रपदवीं प्रभुः ॥ ३८ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऊर्णनाभी[6] ह्मणिजे कांतणी ॥ ते जेवीं निजमुखापासूनी ॥ तंतु काढी अतिसूक्ष्मपणीं ॥
तेवीं निर्गुणीं ओंकार ॥ ११ ॥ तो ओंकार होतां सप्राण ॥ सहजस्वभावें गा जाण ॥ झालें हिरण्यगर्भ अभिधान ॥ आपणि
या आपण वेदाज्ञा ॥ १२ ॥ प्रभु ह्मणजे ऐश्वर्य ख्याती ॥ अचिंत्यानंत त्याची शक्ति ॥ तो छंदोमय वेदमूर्त्ती ॥ जाण निश्चितीं उद्ध
वा ॥ १३ ॥ तो अविनाशी वास्तवस्थिती ॥ नित्य सुखमय सुखमूर्त्ती ॥ तेणें सप्राण नादाभिव्यक्ती[7] ॥ मनःशक्ती चेतवी ॥ १४ ॥ चे

---

१ शरीरमल. २ डुकर. ३ लुब्ध. ४ मस्तकापर्यंत. ५ लक्ष्मीपति कृष्ण. ६ कोळी. ७ ध्वनीचा प्रकाश.

तविली जे मनःशक्ती ॥ होय स्पर्शस्वरवर्णकल्पिती ॥ वेदज्ञ बृहती ह्मणती ॥ जिचा अपरिमिती विस्तार ॥ १५ ॥ ते स्वरवर्णसंवलित
मंत्र ॥ हृदयाकाशीं विचित्र ॥ सहस्रशाखीं विस्तार ॥ वाढली अपार वैखरी ॥ १६ ॥ स्वरवर्णादिउच्चारीं ॥ वेदाधिष्ठान वैखरी ॥ ते उ
पजली जेणेंकरी ॥ तेही परी सांगेन ॥ १७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ओंकाराद्व्यंजितस्पर्शस्वरोष्मांतस्थभाषिताम् ॥ ३९ ॥ विचित्रभाषावित
तां छंदोभिश्चतुरुत्तरैः ॥ अनंतपारां बृहतीं सृजत्याक्षिपने स्वयम् ॥ ४० ॥ ॥ टीका ॥ ॥ मात्रात्रयमिळणीं लोक ॥ ओंकार बोलती
आवश्यक ॥ हा ओंकार अलोलिक ॥ अतिसूक्ष्म देख देहस्थ ॥ १८ ॥ त्याचि ओंकारासि प्राणसंगती ॥ आधारादिचक्रीं ऊर्ध्वग
ती ॥ तेथ वाचा होती अभिव्यक्ती ॥ परा पश्यंती मध्यमा ॥ १९ ॥ परावाचेच्या अभ्यंतरीं ॥ जन्मे पश्यंती ज्येष्ठकारी ॥ मध्यमा जन्मे
तिच्या उदरीं ॥ एवं परस्परीं जन्मती ॥ ४२० ॥ तैशाचि येरीतें येरी ॥ नासंडोनि क्षणभरी ॥ चालती उपरांउपरी ॥ चक्रींच्या चक्रांत
रीं समवेत ॥ २१ ॥ आधारचक्रीं परा वाचा ॥ स्वाधिष्ठानीं जन्म पश्यंतीचा ॥ मणिपूरींहूनि विशुद्धीचा ॥ ठायीं मध्यमेचा रिगुनि
गु ॥ २२ ॥ तेथोनियां मुखद्वारीं ॥ वाचा प्रकाशे वैखरी ॥ तैं स्वरवर्णउच्चारीं ॥ नानामंत्रीं गर्जत ॥ २३ ॥ तेचिस्वर आणि वर्ण ॥
सांगेन स्पर्शव्यक्तिलक्षण ॥ अंतस्थ ऊष्म कोण कोण ॥ विभागलक्षण अवधारीं ॥ २४ ॥ केवळ अकचटतप देख ॥ हे ककारादि पं
चपंचक ॥ स्पर्शवर्णाचें रूपक ॥ अक्षरें निष्टंक पंचवीस ॥ २५ ॥ सवर्णे गर्जतां उच्चार ॥ ते अकारादि सोळाही स्वर ॥ यरलवयांचा
विचार ॥ जाण साचार अंतस्थ ॥ २६ ॥ शषसह हे वर्ण चारी ॥ ऊष्मे बोलिजे शास्त्रकारीं ॥ विसर्गादिअनुस्वारीं ॥ अंअः वरी विभा
गू ॥ २७ ॥ येथ बावन्नावी मातृका एक ॥ केवळ क्षकारू गा देख ॥ यांतु सानुनासिक निरनुनासिक ॥ जाणती लोक शास्त्रज्ञ ॥ २८ ॥
एवं स्वरवर्णविधिउच्चारीं ॥ लौकिकी वैदिकीभाषांवरी ॥ वेदशास्त्रार्थप्रकारीं ॥ वाढली वैखरी शब्दचातुर्यें ॥ २९ ॥ बोलेंचि गा बोला
प्रती ॥ चाळूनि नाना उपपत्ती ॥ बोलें बोलोनि गृहस्थीं ॥ युक्तिप्रयुक्ती साधूनी ॥ ४३० ॥ ऐशिया नानाशब्द[4]कुसरीं ॥ अत्यंत विस्तारि
ली वैखरी ॥ तीचि चौंचौं अक्षरीं ॥ वाढवूनि धरी नानाछंदें ॥ ३१ ॥ वाढतां चतुरक्षर भेदें ॥ उत्तरोत्तर नाना छंदें ॥ वाढविलीं स्व
यें वेदें ॥ निजाज्ञाबोधें नेमूनी ॥ ३२ अतएव अनंत अपार ॥ अर्थतां शब्दतां अतिदुस्तर ॥ माझ्या शब्दज्ञानाचा पार ॥ सुरनर नेण
ती ॥ ३३ ॥ ऐशी वैखरी अनंतशक्ती ॥ [illegible] ह्मणिजे ते बृहती ॥ इच्या विस्ताराची गती ॥ स्वयें नेणती शिव स्रष्टा ॥ ३४ ॥ हिरण्य
गर्भत्वें स्वयें जाण ॥ जीव शिव अंतर्यामिलक्षण ॥ वेदाज्ञा माझी प्रकाशी आपण ॥ जिचें नामाभिधान वैखरी ॥ ३५ ॥ जो मी वे

---

१ उत्पन्न होतात. २ न सोडतां. ३ पांच वर्ग. ४ अनेक शब्दांच्या भेदानें. ५ ह्मणूनच. ६ अंतरहित. ७ ब्रह्मा.

दात्मा श्रीहरी ॥ तो वेदू या रीतिं विस्तारी नि संहारी ॥ मर्यादेवरी स्वकाळें ॥ ३६ ॥ मागां बोलिलीं छंदें जाण ॥ त्या छंदांचे निजलक्षण ॥ स्वयें सांगताहे श्रीकृ ें कारण निजस्वरूप ॥ ३७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ गायत्र्युष्णिगनुष्टुप्च बृहती पंक्तिरेव च ॥ त्रिष्टुब्जगत्यतिच्छंदो ह्यत्यष्ट्यतिज १ ॥ ॥ टीका ॥ ॥ सकळ छंदांचें अधिष्ठान ॥ मुख्य गायत्री छंद जाण ॥ त्या गायत्रीछंदाचें लक्षण ॥ ऐक संपूर्ण साग आठआठां अक्षरीं त्रिपदें[1] ॥ गणितां जेथ येती शुद्ध ॥ त्यानांव गायत्री छंद ॥ हें वेदानुवाद निजबीज ॥ ३९ ॥ हें वेदाचें नि जव्हार ॥ ब्रह्मज्ञानाचें परपार ॥ परमानंदाचें सोलींव सार ॥ जाण साचार गायत्री ॥ ४४० ॥ हें चैतन्याचें जीवन ॥ मज गोप्याँचें[3] गुप्तधन ॥ जेथ जीवशिवां समाधान ॥ तें हें छंद जाण गायत्री ॥ ४१ ॥ ये छंदींचें एक अक्षर ॥ अक्षराचें निज सार ॥ सच्चिदानंदाचें निजभांडार ॥ जाण साचार गायत्री ॥ ४२ ॥ करितां गायत्रीचें अनुष्ठान ॥ विश्वामित्र झाला ब्राह्मण ॥ मी कृष्ण वंदीं त्याचे चरण ॥ माझाही तो गुरु जाण रामावतारीं ॥ ४३ ॥ यालागीं सकळछंदीं प्राधाँन्य[4] ॥ मुख्यत्वें गायत्रीछंद जाण ॥ इतर छंद होती पावन ॥ कासे लागोन पैं इच्या ॥ ४४ ॥ गायत्रीछंदाचे अंगीकाँरीं[5] ॥ त्यासि मिळाल्या अक्षरें चारी ॥ उष्णिक्छंदाची थोरी ॥ त्याचवरी ठसावे ॥ ४५ ॥ उष्णिक्छंदाचें अंगीकारीं ॥ त्यासि मिळाल्या अक्षरें चारी ॥ अनुष्टुप्छंदाची थोरी ॥ त्याचिवरी ठसावे ॥ ४६ ॥ अनुष्टुप्छंदाचें अंगीकारीं ॥ आणिक मिळाल्या अक्षरें चारी ॥ बृहतीछंदाची थोरी ॥ त्याचिवरी ठसावे ॥ ४७ ॥ एवं पंक्ति त्रिष्टुप् जगती ॥ चौंचौं अक्षराचे अधिकप्राप्तीं ॥ अत्यष्टि अतिजगती ॥ छंदें वेदोक्तीं विभाग ॥ ४८ ॥ एशिया चतुरक्षरमिळणीं ॥ नाना छंदांचिया श्रेँणी[6] ॥ वेदरायाची राजधानी ॥ मंत्रध्वनी गर्जती ॥ ४९ ॥ तेथ अक्षरमर्यादा न करवे ॥ शाखांची मर्यादा न धरवे ॥ अर्थता वाच्यना नेणवे ॥ वेद वैभवें दुर्ज्ञेय ॥४५०॥ ॥ श्लोक ॥ ॥ किं विधत्ते किमाचष्टे किमनूद्य विकल्पयेत् ॥ इत्यस्या हृदयं लोके नान्यो मद्वेदकश्चन ॥ ४२ ॥ ॥ टीका ॥ ॥ कर्मकांडविधिनिषेधीं ॥ कोण अर्थ त्यागार्थ निंदी ॥ कोणता अर्थ प्रतिपाँदी[7] ॥ स्वहितबुद्धी साधकां ॥ ५१ ॥ मंत्रकांडें मंत्रमूर्त्तीं ॥ सांगोपांग सायुधस्थिती ॥ उपासना उपास्ययुक्ती ॥ किमर्थ भक्ती करविली ॥ ५२ ॥ ज्ञानकांड त्रिशुद्धी ॥ कोण पदार्थ निषेधी ॥ कोण्या अर्थातें प्रतिपादी ॥ निजबुद्धी बोधूनी ॥ ५३ ॥ एवं वेदाचें अचळ मूळ ॥ विधिविधानेंसि मुख्य फळ ॥ जाणावया केवळ ॥ नाहीं ज्ञानबळें सुरनरां ॥ ५४ ॥ या वेदार्थातें तत्त्वतां ॥ मीचि एक सर्वज्ञ ज्ञाता ॥ माझे कृपेवीण सर्वथा ॥ नयेचि हाता ब्रह्मादिकां ॥ ५५ ॥ तेथ उद्धवाचें मनोगत ॥ देवो जाणे वेदींचा ईत्यर्थ[8] ॥

---

१ तीन चरण. २ विच्छेद. ३ रक्षण करणाराचें. ४ श्रेष्ठ. ५ स्वीकार करून. ६ ओळ. ७ सांगति. ८ सारांश.

तरी भक्तकृपाळू श्रीकृष्णनाथ ॥ मजही तो अर्थ दयेनें सांगे ॥ ५६ ॥ हा उद्धवाचा निजभावो ॥ जाणों सरला देवाधिदेवो ॥ तो वेदा
र्थांचा अभिप्रावो ॥ श्लोकान्वयो पहाहो सांगत ॥ ५७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मां विधत्तेऽभिधत्ते मां विकल्प्यापोह्यते त्वहम् ॥ एतावान्
सर्ववेदार्थः शब्द आस्थाय मां भिदाम् ॥ मायामात्रमनूद्यांते प्रतिषिध्य प्रसीदति ॥ ४३ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे
एकविंशोध्यायः ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ माझी पाववया स्वरूपसिद्धी ॥ मलिनाचिया चित्तशुद्धी ॥ वेद स्वधर्म प्रतिपादी ॥ त्यागवी निषे
धीं विषयांतें ॥ ५८ ॥ तेथ अग्निहोत्रींचें विधान ॥ यज्ञांत कर्माचरण ॥ तें चित्तशुद्धीचें कारण ॥ वैराग्य दारुण[1] उपजवी ॥ ५९ ॥
दारुण वैराग्यउत्पत्ती ॥ इहामुत्र[2]विषयनिवृत्ती ॥ तेव्हां साधकास माझी प्राप्ती ॥ सहजस्थिती स्वभावें ॥४६०॥ एवं कर्मकांडाचिये स्थि
ती ॥ विधिनिषेध वेदोक्ती ॥ साधकांसि माझी प्राप्ती ॥ जाण निश्चितीं याहेतू ॥ ६१ ॥ विषयीं परम बाधा देखती ॥ परी त्यागीं नाहीं सा
मर्थ्यशक्ती ॥ ऐशिया साधकांप्रती ॥ वेदें मद्भक्ती द्योतिली[3] ॥ ६२ ॥ येथ मंत्रमूर्त्ती उपासन ॥ माझें सगुण अनुष्ठान ॥ तेथ करितां अ
नन्यभजन ॥ रज तम जाण नासती ॥ ६३ ॥ मग केवळ सत्त्ववृत्ती ॥ श्रवणकीर्तनीं अतिप्रीती ॥ तेणें मद्भावो सर्वांभूतीं ॥ माझी चौ
थी भक्ती तेणें होय ॥ ६४ ॥ आतुडल्या माझी चौथी भक्ती ॥ मद्भक्तां नावडे मुक्ती ॥ अद्वैतभजनाचिया प्राप्ती ॥ धिक्कारिती कैवल्य[4]
॥ ६५ ॥ अद्वैतबोधें करितां भजन ॥ मी अनंत अपार चिद्घन[5] ॥ भक्तीमाजी आकळें जाण ॥ ये मद्रूपपण मद्भक्तां ॥ ६६ ॥ तेव्हां
भज्य भजक भजन ॥ पूज्य पूजक पूजन ॥ साध्य साधक साधन ॥ अवघा आपण स्वयें होय ॥ ६७ ॥ माझी ऐश्वर्यसामर्थ्यशक्ती ॥
तेही ये निजभक्तांच्या हातीं ॥ अद्वैतभजनाचिया प्रीती ॥ मत्पदप्राप्ती मद्भक्तां ॥ ६८ ॥ मी देव तो भक्त शुद्ध ॥ हा बाहेरी नांवाचा
चि भेद ॥ आंतवटां[6] पाहतां बोध ॥ सच्चिदानंद निजऐक्यें ॥ ६९ ॥ हे उपासनाकांडस्थिती ॥ साधकीं करूनि माझी भक्ती ॥ यापरी पा
वले माझी प्राप्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ४७० ॥ मायाप्रतिबिंबित चैतन्य ॥ त्वंपदार्थें वाच्य जाण ॥ ज्याच्या अंगीं जीवाभिधान ॥ अवि
द्या जाण उपजवी ॥ ७१ ॥ जेवीं स्वप्नामाजी आपण ॥ [illegible]न असोनि देखे आन ॥ तेवीं आविद्यकत्व जाण ॥ जीवपण एकदेशीं ॥ ७२ ॥
जो मायासंवलित[7] चैतन्य ॥ जो योगजन्य ज[illegible]ो सर्वद्रष्टा सर्वज्ञ ॥ सदासंपन्न ऐश्वर्यें ॥ ७३ ॥ जो सकळकर्मांचा कर्त्ता ॥
जो कर्त्ताचि परी अकर्त्ता ॥ ज्याचे अंगीं स्व[illegible]मुक्तता स्वयंभ ॥ ७४ ॥ ज्याची अकुंठित सहज सत्ता ॥ जो परमानंदें स
दा पुरता ॥ ज्यासि ईश्वरत्वें समर्थता ॥ हे ज[illegible]तत्पदार्थाची ॥ ७५ ॥ जीवाचें साडोनियां अज्ञानत्व ॥ शिवाचें सांडूनि स

---

१ दृढ. हा २ या लोकच्या व परलोकींच्या विषयो[illegible]ांगितलो. ४ मोक्ष. ५ [illegible]प. ६ अंतरीं. ७ मायायुक्त.

वंज्ञत्व ॥ दोहींचें शोधित जें लक्ष्यत्व ॥ ऐ साधिती ॥ ७८ ॥ लग्नीं नोवरा निमासुरा ॥ तोचि गेलिया दशावरा ॥ विदेशीं देखिला एकसरा ॥ तारुण्यमदभरा स ॥ तेकाळींची त्यजूनि बाल्यावस्था ॥ आजिची नेघूनि तारुण्यता ॥ पत्नी अनु[3]सरे निजकांता ॥ निजस्वरूपता स्वभावें त्वंपदतत्पदवाच्यार्थ ॥ दोहींचा सांडावा निश्चित ॥ ऐक्यें अंगीकारावा लक्ष्यार्थ ॥ हा ज्ञानकांडार्थ उद्धवा ॥ ७९ ॥ जीव न ऐक्यें जाण ॥ माझे चित्स्वरूपीं समाधान ॥ स्वयें पाविजे आपण ॥ हें ज्ञानकांड संपूर्ण बोलिलें वेदें ॥ ४८० ॥ वेदाआदिमध्यअवसानीं ॥ मातें लक्षिती कांडें तिनी ॥ तोचि अर्थ उपसंहारूनी ॥ ग्रंथावसानीं हरि बोले ॥ ८१ ॥ उद्धवा वेदाचें वेद्वचन ॥ अर्थगंभीर[4] अतिगहन ॥ तेथ शिणतां ऋषिजन ॥ अर्थावसान अलक्ष्य ॥ ८२ ॥ ते वेदार्थाचें निजसार ॥ माझें गुह्य ज्ञानभांडार ॥ तुज म्यां सांगीतलें साचार ॥ पूर्वापर अविरोधें ॥ ८३ ॥ तें ऐंकोनि देवाचें उत्तर ॥ उद्धव चमत्कारला थोर ॥ तेंचि वेदाचें निजसार ॥ पुढती श्रीधर सांगोकां ॥ ८४ ॥ पान्हा लागतांचि तोडीं ॥ दोहेंक वांसरूं आंखुडी ॥ त्या परी अति आवडीं ॥ स्वयें चरफडी उद्धव ॥ ८५ ॥ जेंवीं कां पक्षिणीपुढें ॥ चारा घ्यावयाचे चाडे ॥ पिलें पसरी चांचुवडे ॥ तेवीं कृष्णाकडे उद्धवू ॥ ८६ ॥ तें उद्धवाचें मनोगत ॥ जाणोनियां श्रीअनंत ॥ सकळ वेदार्थ संकळित ॥ ग्रंथांतीं सांगत निजसारांश ॥ ८७ ॥ नानाशास्त्रीं अतिप्रसिद्ध ॥ त्रिकांडीं वाढला जो वेद ॥ तेथील नानाशब्दीं हाचि बोध ॥ जो मी अभेद परमात्मा ॥ ॥ ८८ ॥ त्या मातें धरोनि हातीं ॥ त्रिकांडीं चालिल्या श्रुती ॥ त्या श्रुत्यर्थाची उपपत्ती ॥ यथास्थिती सांगेन ॥ ८९ ॥ मी कर्मादिमध्य अंतीं ॥ मी कर्मकर्त्ता क्रिया शक्ती ॥ कर्मफळदाता मी श्रीपती ॥ हा इत्यर्थ निश्चितीं कर्मकांडींचा ॥ ४९० ॥ मंत्रमूर्ति आणि मंत्रार्थ ॥ तेही मीचि गा निश्चित ॥ पूज्य पूजक पूजा समस्त ॥ मजव्यतिरिक्त अणु नाहीं ॥ ९१ ॥ देवें देवोचि पूजिजे ॥ देव होऊनि देवा भजिजे ॥ हें वेदींचें निजबीज माझें ॥ हेंचि आगमीं बोलिजे मुख्यत्वें ॥ ९२ ॥ मीच देवो मीचि भक्तू ॥ पूजोपचार मी समस्तू ॥ मीचि मातें पूजितू ॥ हे इत्थंभूतू उपासना ॥ ९३ ॥ हें उपासनाकांडींचें निजसार ॥ अगम्य शास्त्रींचें गुह्यभांडार ॥ माझ्या निजभक्तीचे वस्तीचें घर ॥ तें हे साचार उपासना ॥ ९४ ॥ ज्ञानकांड तें अलोलिक ॥ वेद आपला आपण द्योतक ॥ अवघा संसार कल्पनिक[9] ॥ तेथ वेद नियामक कोणे अर्थें ॥ ९५ ॥ वोस[10] घरास वस्तीस पहाहो ॥ निर्जीव पाहुणा आला राहो ॥ त्याचा कोण करील उठावो[11] ॥ तैं

---

१ लहान वयांतला. २ न घेऊन. ३ ग्रहण करिते. ४ गूढ अर्थाचें. ५ धारकाढणारा. ६ थोड्यांत. ७ सारांश. ८ या प्रकारची. ९ मिथ्या. १० रिकाम्या. ११ आदर.

सा भावो वेदाज्ञे ॥ ९६ ॥ खांबसूत्रावरील पुतळीसी ॥ तिची जरी बोडलिया शिसी ॥ नाहीं निघणें पांढरे केंसाशीं ॥ तेवीं शुद्धी वेदासीं ठाव नाहीं ॥ ९७ ॥ मूळ संसारचि मायिक ॥ तेथ वेद तोही तद्रूप देख ॥ मृगजळीं नाहीं उदक ॥ परी खोलही देख असेना ॥ ९८ ॥ जेथ मुळीं मुख्य अद्वैतता ॥ तेथ कैंचा वक्ता कैंचा श्रोता ॥ कैंचें कर्म कैंचा कर्त्ता ॥ मी वेदवार्त्ता ते कैंची ॥ ९९ ॥ नाहीं दृश्य द्रष्टा दर्शन ॥ नाहीं ध्येय ध्याता ध्यान ॥ नाहीं ज्ञेय ज्ञाता ज्ञान ॥ वेदवचन तेथें कैंचें ॥ ५०० ॥ तेथ भ्रमाची रांणीव ॥ तेथ भेदाची शाहाणीव ॥ तेथ वेदाची जाणीव ॥ गोड गाणीव उपनिषदांची ॥ १ ॥ जंव भेदाची सबळ स्थिती ॥ तंव वेदांची थोर ख्याती ॥ भेदू आलिया अद्वैतीं ॥ वेद विरला नेती ह्मणोनी ॥ २ ॥ जळगार जळीं विरे ॥ तेवीं वेदू अद्वैतीं मुरे ॥ हें ज्ञानकांड साचोकारें ॥ तुज म्यां खरें सांगीतलें ॥ ३ ॥ जेथ उपजला स्वयें अग्नी ॥ त्या अरणीं जाळूनि शमे वन्ही ॥ तेवीं ज्ञानकांड निरूपणीं ॥ वेदू निर्दळणीं प्रवर्त्तला ॥ ४ ॥ एक ब्रह्म जें अद्वैत ॥ तेणें श्रुतिवाक्यें मिथ्या द्वैत ॥ हें बोलूनि वेद हारपे तेथ ॥ ब्रह्म सदोदित संपूर्ण ॥ ५ ॥ शुद्ध ब्रह्म मी हे स्फूरे स्फुर्त्ती ॥ तेथ ओंकाराची उत्पत्ती ॥ तोही ब्रह्मरूप निश्चितीं ॥ त्यासि ब्रह्म ह्मणती एकाक्षर ॥ ६ ॥ त्या ओंकारापासोनि गहन ॥ श्रुति शाखा स्वर वर्ण ॥ झालें तें ब्रह्मरूप जाण ॥ एवं वेद पूर्ण परब्रह्म ॥ ७ ॥ जेवीं सोन्याचे अळंकार ॥ पाहतां सोनेंचि साचार ॥ तेवीं श्रुतिशाखावेदविस्तार ॥ तो अवघा ओंकार मद्रूपें ॥ ८ ॥ जो वेदप्रतिपाद्य पुरुषोत्तम ॥ जो भक्तकामकल्पद्रुम ॥ तो हें बोलिला मेघश्याम ॥ आत्माराम श्रीकृष्ण ॥ ९ ॥ तिहीं कांडीं निजसंबंधू ॥ पूर्वापर अतिविरुद्धू ॥ हा वेदार्थ परमशुद्धू ॥ तुजम्यां विशदू बोधिला ॥ ५१० ॥ याहोनियां परता ॥ वेदार्थ नाहीं गा सर्वथा ॥ तुज म्यां सांगितला आतां ॥ जाण तत्त्वतां उद्धवा ॥ ११ ॥ या वेदार्थाची निजखूण ॥ हृदयीं भोगितां आपण ॥ होय जीवशिवां समाधान ॥ ऐसें श्रीकृष्ण बोलिला ॥ १२ ॥ हें ऐकोनि उद्धवें जाण ॥ झाला वेदार्थीं निमग्न ॥ दोनीं टंवकारले नयन ॥ स्वानंदीं मन बुडालें ॥ १३ ॥ चित्तचैतन्या मिळणी पाडी ॥ कंठीं बाष्प दृढ आडी ॥ लागतां स्वानंदाची गोडी ॥ उभिली गुढी रोमांचीं ॥ १४ ॥ दें[4] सकंपता ॥ नयनीं स्वानंदजळ येतां ॥ बोल बुडाला सर्वथा ॥ मूर्च्छा येतयेतां सांवरी ॥ १५ ॥ तंव हृदया आली लें नव्हे दुश्चित्तपण ॥ झणी निजधामा जाय श्रीकृष्ण ॥ येणें धाकें नयन उघडिले ॥ १६ ॥ तंव घवघवीत घनसांवळा मेखळा ॥ कांसे झळके सोनसळा ॥ आपाद वनमाळा शोभत ॥ १७ ॥ अं

---

१ वार्ता. २ अगत्यानें. ३ पूर्वापर विरोधरहित. ४ ायांपर्यंत लोंबणारी.

तरीं भोगी चैतन्यघन ॥ बाहेसी उघडितां विग्रंही श्रीकृष्ण ॥ मूर्ति संपूर्ण संमुख देखे ॥ १८ ॥ ह्मणे श्रीकृष्ण चैतन्यघन ॥
चैतन्यविग्रही श्रीकृष्ण ॥ सगुणनिर्गुणरूपे रिपूर्ण श्रीकृष्ण ॥ १९ ॥ बाप भाग्य उद्धवाचें ॥ सगुणनिर्गुण दोहींचें ॥ सुख
भोगीतसे साचें ॥ हें श्रीकृष्णकृपेचें महि ॥ जेथ सद्गुरुकृपा संपूर्ण ॥ तेथ शिष्याची आवडी प्रमाण ॥ तो जैं मागे मू
र्ति सगुण ॥ तैं तेचि जाण गुरु देती ॥ २१ ॥ र्गुण निजप्राप्ति ॥ ऐशी आवडी ज्याचे चित्तीं ॥ तैं निर्गुणाचिये निजस्थितीं ॥
गुरुकृपा निश्चितीं नांदवी ॥ २२ ॥ सगुणनिर्गुण स्वरूप दोनी ॥ भोगावया आवडी ज्याचे मनीं ॥ तेही स्थितीच्या गुरु दोनीं ॥ कृपाळु
पणीं समर्थ ॥ २३ ॥ सद्गुरूचें अगाध महिमान ॥ जें वेदा न बोलावेचि जाण ॥ त्याची कृपा झालिया पूर्ण ॥ दुर्लभ कोण पदार्थ ॥
॥ २४ ॥ ते कृष्णकृपेस्तव जाण ॥ फिटलें उद्धवाचें दुर्लभपण ॥ सगुणनिर्गुण एक कृष्ण ॥ हे खूण संपूर्ण बाणली ॥ २५ ॥ जाणोनि
कृष्णाचें पूर्णपण ॥ त्याचें लक्षोनि श्रीचरण ॥ धांवोनि उद्धवें आपण ॥ घाली लोटांगण हरिचरणीं ॥ २६ ॥ तेव्हां सांवळा संकर्षण ॥
चारी बाह्या पसरी श्रीकृष्ण ॥ उद्धवा सप्रेमें उचलून ॥ दीधलें आलिंगन स्वानंदें ॥ २७ ॥ त्या आलिंगनाचें सुख ॥ अनुभवी जाण
ती देख ॥ जो उद्धवासि झाला हरिख[३] ॥ त्याचा जाणता एक श्रीकृष्ण ॥ २८ ॥ तो कृष्ण ह्मणे उद्धवा ॥ हा विसाव्याचा विसावा ॥ मा
झ्या वेदाचा निजगुह्यठेवा ॥ तो हा एक विसावा तुज सांगीतला ॥ २९ ॥ जेणें मोडे लिंगदेहाचा यावा[४] ॥ जेणें जीवत्व नाठवे जीवा ॥
तो हा विसाव्याचा विसावा ॥ तुज एकविसावा निरूपिला ॥ ५३० ॥ जेणें मिथ्यात्व ये देहभावा ॥ जेणें शून्य पडे रूपनांवा ॥ तो हा
विसाव्याचा विसावा ॥ एकविसावा निरूपिला ॥ ३१ ॥ जेथ अज्ञाना होय नागोवा[५] ॥ जेथ ज्ञानही ये अभावा ॥ तो विसाव्याचा वि
सावा ॥ एक विसावा निरूपिला ॥ ३२ ॥ जेथ वेदूही वेडावला ॥ बोध लाजोनि बुडाला ॥ अनुभवो स्वयें थोंटावला ॥ तो हा निरूपि
ला वेदार्थ ॥ ३३ ॥ हें वेदार्थसारनिरूपण ॥ मज विश्वात्म्याचें निजनिधान ॥ तुज म्यां सांगीतलें संपूर्ण ॥ हे जीवींची खूण उद्धवा ॥ ३४ ॥
कोटिकोटिसाधनें करितां ॥ गुरुकृपेवीण सर्वथा ॥ हे नये कोणाचे हाता ॥ जाण तत्वतां उद्धवा ॥ ३५ ॥ ते गुरुकृपेलागीं जाण ॥ आ
चरावे स्वधर्म पूर्ण ॥ करावें गा शास्त्रश्रवण ॥ वेदपठण तदर्थ[६] ॥ ३६ ॥ ते कृपेलागीं आपण ॥ व्हावें दीनाचेंही दीन ॥ धरितां संतांचे
चरण ॥ स्वामी जनार्दन संतुष्टे ॥ ३७ ॥ गुरु संतुष्टोनि आपण ॥ करवी भागवतनिरूपण ॥ एका विनवी जनार्दन ॥ कृपा नित्य नूत

---

[१] आनंद शरीर.
[२] देण्यास.
[३] आनंद.
[४] ठिकाणा.
[५] नागवण.
[६] त्या करितां.

न करावी ॥ ३८ ॥ पुढील अध्यायीं गोड प्रश्न ॥ उद्धव पुसेल आपण ॥ प्रकृतिपुरुषांचें लक्षण ॥ तत्त्वसंख्या पूर्णविभाग ॥ ३९ ॥
त्याचें सांगतां उत्तर ॥ जन्ममरणांचा प्रकार ॥ स्वयें सांगेल शार्ङ्गधर ॥ कथा गंभीरत्वपरमार्थी ॥ ५४० ॥ जे कथेचें करितां श्रवण ॥ वै
राग्य उठे कडकडून ॥ येणें विन्यासें निरूपण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगेल ॥ ४१ ॥ घटाकाशें टाकिजे गगन ॥ तेवीं एका जनार्दना शरण ॥
त्याचे वंदितां श्रीचरण ॥ रसाळ निरूपण स्वयें स्मरे ॥ ५४२ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे भगवदुद्धवसंवादे एकादशस्कंधे
एकाकारटीकायां वेदत्रयविभागनिरूपणं नाम एकविंशतितमोऽध्यायः ॥ २१ ॥ अध्याय ॥ २१ ॥ श्लोक ॥ ४३ ॥ ओंव्या ॥
॥ ५४२ ॥ एवंसंख्या ॥ ५८५ ॥

---

१ श्रीकृष्ण.

## अध्याय २२ वा.


श्रीकृष्ण.
उद्धव.
आदिमाया.
काम:
क्रोध:
लोभ:
मोह:
मद:
मत्सर:

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ओंनमो सद्गुरु खांबसूत्री ॥ चौऱ्यांशी लक्ष पुतळ्या यंत्रीं ॥ नाचविशी निजतंत्रीं ॥ प्राचीनदोरीस्वभावें ॥ १ ॥ दोरी धरिली दिसों न देशी ॥ परी पुतळ्या स्वयें नाचविशी ॥ नवल लाघवी कैसा होशी ॥ अलिप्ततेशी सर्वदा ॥ २ ॥ तेथ जैशी ज्याची पूर्वगती ॥ भूतें नाचती तैशा रीतीं ॥ ते नाचवी चेतनाशक्ती ॥ तुझ्या हातीं वीण हातें ॥ ३ ॥ जेवी कां अचेतन[१] लोहातें ॥ चुंबक खेळवी निजसामर्थ्यें ॥ तेवीं तूं सकळभूतांते ॥ निजसत्तें नाचविशी ॥ ४ ॥ ऐशीं सदा नाचती परतंत्र[२] ॥ तरी अभिमानाचें बळ थोर ॥ सत्य मानोनि देहाकार ॥ आह्मी स्वतंत्र ह्मणविती ॥ ५ ॥ आह्मी सज्ञान अतिदाते ॥ आह्मी कुशल कर्मकर्त्ते ॥ इतर मूर्खें समस्तें ॥ ऐशा अभिमानातें वाढविती ॥ ६ ॥ एवं अभिमानाचे हातें ॥ विसरोनि आपुल्या अकर्त्तृत्वातें ॥ स्वयें पावले कर्मबंधातें ॥ जेवीं स्वप्नावस्थेतें विषबाधा ॥ ७ ॥ स्वप्नीं अतिशय चढलें विख ॥ आतां उतरलें निःशेख ॥ तेवीं बंधमोक्ष देख ॥ सत्यत्वें मूर्ख मानिती ॥ ८ ॥ हे तुझे खांबसूत्रींची कळा ॥ मिथ्या सत्यत्वें दाविशी डोळां ॥ हा अतिशयें अगाध सोळ्हा ॥ तुझी अतर्क्य लीळा तर्केना ॥ ९ ॥ अचेतनीं चेतनधर्म ॥ प्रत्यक्ष दाविशी सुगम ॥ हेंचि तुझें नकळे वर्म ॥ करोनि कर्म अकर्ता ॥ १० ॥ अकर्त्ताचि तूं होशी कर्ता ॥ कर्त्ता होत्सातां अकर्त्ता ॥ हे तुझी खांबसूत्रता ॥ न कळे सर्वथा कोणातें ॥ ११ ॥ तुझी माया पाहों जातां ॥ तोचि तो मायेनें ग्रासिला[३] तत्त्वतां ॥ असो तुजचि पाहों ह्मणतां ॥ तेही सत्वावस्था मायेची ॥ १२ ॥ ऐसें तुझें खांबसूत्र ॥ अकळ न कळे गा तुझें चरित्र ॥ देखोंनेदितां निजसूत्र ॥ भूतें विचित्र नाचविशी ॥ १३ ॥ तुझेनि जग होये जाये ॥ परी म्यां केलें हें ठावें नोहे ॥ ऐसा तुझा खेळ पाहे ॥ कोणें काये लक्षावा ॥ १४ ॥ यापरी खेळ वाढविशी ॥ स्वयेंचि कल्पोनि मोडिशी ॥ विकार महत्त्वीं सांडविशी ॥ हेंही कर्त्तृत्व अंगासी नलगत गेलें ॥ १५ ॥ याचें मुख्यत्वें मूळ लक्षण ॥ तुझें रुपेवीण न कळे जाण ॥ तुझी रुपा झालिया पूर्ण ॥ जनीं जनार्दन प्रकटे पैं ॥ १६ ॥ जनीं प्रकटल्या जनार्दन ॥ तद्रूप[४] होयिजे आपण ॥ हे मूळींची निजखूण ॥ तेथ मीतूंपण रिगेना ॥ १७ ॥ मीतूंपणेंवीण प्रसिद्ध ॥ जनीं जनार्दन निजानंद[५] ॥ त्याचे रुपेस्तव विशद[६] ॥ श्रीभागवत शुद्ध वाखाणिलें ॥ १८ ॥ तेथ एकविसाव्याचे अंतीं ॥ वेद त्रिकांड लक्ष्यार्थस्थिती ॥ ब्रह्म एकचि निश्चितीं ॥ अद्वयस्थिती अविनाशी[७] ॥ १९ ॥ हें वेदार्थसार निरूपण ॥ ऐकतां उद्धवा पावली खूण ॥ ब्रह्म एकाकी परिपूर्ण ॥ दुजेनवीण संचले ॥ २० ॥ वेदवादें ब्रह्म एक ॥ स्वानुभवें तैसेंचि देख ॥ तरी ज्ञाते ऋषिजन लोक ॥ केवीं तत्त्वें अनेक बोलती ॥ २१ ॥ येचि आशंकेलागीं जाण ॥ उद्धवें स्वयें मांडिला प्रश्न ॥ परी पोटांतील भिन्न खूण ॥ उगा श्रीकृष्ण न रहावा ॥ २२ ॥

---

१ जड. २ पराधीन. ३ गिळिला. ४ ईश्वरसरूप. ५ ब्रह्मानंद. ६ स्पष्ट. ७ नाशरहित.

मी झालों जी ब्रह्मसंपन्न ॥ हें ऐकतां माझें वचन ॥ निजधामा[१] निघेल श्रीकृष्ण ॥ मग हें दर्शन मज कैंचें ॥ २३ ॥ ऐशिया काकुळतीं जाण ॥ संशयें वीण करी प्रश्न ॥ तेंचि ऐकतां कृष्णवचन ॥ सुख समाधान भोगित ॥ २४ ॥ तंव कृष्णाचे मनीं आणिक ॥ उद्धव मी दोघे एक ॥ मिथ्या वियोगाचें दुःख ॥ हें कळे तंव देख प्रश्न सांगे ॥ २५ ॥ बाविसावें अध्यायीं देख ॥ तत्त्वसंख्या सांगेल आवश्यक ॥ प्रकृतिपुरुषविवेक ॥ जन्ममरणद्योतक[२] प्रकारू ॥ २६ ॥ आत्मा एक कीं अनेक ॥ आणि तत्त्वसंख्याविवेक ॥ हें कळावया निष्टंक ॥ उद्धव देख पूसत ॥ २७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धव उवाच ॥ ॥ कति तत्त्वानि विश्वेश संख्यातान्यृषिभिः प्रभो ॥ नवैकादश पंच त्रीण्यात्थ त्वमिह शुश्रुम ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ विश्वात्मया विश्वेश्वरा ॥ विश्वधारका विश्वंभरा ॥ विश्वसाक्षी विश्वाकारा ॥ विश्वैक सुंदरा श्रीकृष्णा ॥ २८ ॥ तुज विश्वात्मक ह्मणतां ॥ जड मलिन एकदेशिता ॥ आली ह्मणशी अज्ञानता ॥ यालागीं प्रभुता उपपादी ॥ २९ ॥ जड मलिन अज्ञानता ॥ हे मायेस्तव होती तत्त्वतां ॥ ते मायेचा तूं नियंता ॥ हे अगाध प्रभुता पैं तुझी ॥ ३० ॥ ऐशिया स्वबोधनद्वारा ॥ विनवूनि स्वामी सारंगधरा ॥ तत्त्वसंख्येच्या विचारा ॥ निजनिर्धारा पूसत ॥ ३१ ॥ जे तपसामर्थ्यें समर्थ थोर ॥ अनागतद्रष्टे ऋषीश्वर ॥ त्यांची तत्त्वसंख्या विचित्र ॥ पृथक्पृथगाकार बोलती ॥ ३२ ॥ तत्त्वसंख्या इत्थंभूत ॥ एकुणिसाव्या अध्यायांत ॥ तुह्मीच निरूपिला तत्त्वार्थ ॥ तोचि वृत्तांत सांगत ॥ ३३ ॥ ॥ पूर्वश्लोकार्ध ॥ ॥ नवैकादशपंचत्रीणि ॥ ॥ चौदावे श्लोकींच्या निरूपणीं ॥ हे अठ्ठावीस तत्त्वगणनीं ॥ सांगतली शार्ङ्गपाणीं ॥ मजलागोनी निश्चित ॥ ३४ ॥ ये तत्त्वसंख्येचा विचार ॥ प्रकृति पुरुष महदहंकार ॥ पंच महाभूतें थोर ॥ हा संख्या प्रकार नवांचा ॥ ३५ ॥ दाही इंद्रियें अकरावें मन ॥ पंच विषय तिन्ही गुण ॥ हे अठ्ठावीस संख्यागणन ॥ स्वमुखें आपण निरूपिलें ॥ ३६ ॥ यापरी गा लक्ष्मीपती ॥ हे मुख्यत्वें तुझी तत्त्वोक्ती ॥ आतां ऋषीश्वरांच्या युक्ती ॥ ऐक तुजप्रती सांगेन ॥ ३७ ॥ ते तूं ऐक गा निश्चित ॥ तुज सांगेन तयाचा अर्थ ॥ ह्मणोनियां निरूपित ॥ स्वयें मनोगत उद्धव ॥ ३८ ॥ ह्मणे तत्त्वतां अवधारी ॥ मी सांगेन प[illegible]ुमरीं ॥ प्रकृतिपुरुषांमाझारी ॥ विचित्र परी सांगत ॥ ३९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ केचित्षड्विंशतिं प्राहुरपरे पंचविंशतिम् ॥ सप्तैके नव षट् केचिच्चत्वार्येकादशापरे ॥ २ ॥ केचित्सप्तदश प्राहुः षोडशैके त्रयोदश ॥ एतावत्त्वं हि संख्यानामृषयो यद्विवक्षया ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ येथ तत्त्वसंख्या मतवाद[३] ॥ ऋषीश्वरांमाजी विवाद ॥ त्या विवादाचे शब्द ॥ ऐक विशद[४] सांगेन ॥ ४० ॥ एक ह्मणे तत्वें सव्वीस ॥ दुजा ह्मणे उगा बैस ॥ बहु बोलावया नाहीं पैस ॥ तत्त्वें पंचवीस नेमस्त ॥ ४१ ॥

---

१ आपले स्वस्थानास. २ जन्म मरण दाखविणारा. ३ अनेक मताचे भेद. ४ स्पष्ट.

तिजा ह्मणे तुह्मी येथ ॥ कैंसेनि वाढविलें स्वमत ॥ तत्त्वें नेमस्तचि सात ॥ कैंव्हीं बहुत बोलतां ॥ ४२ ॥ एक ह्मणे हें अभिनव[1] ॥ बोलतां न लाजती मानव ॥ वृथा बोलाची लवलव ॥ तत्त्वें नव नेमस्त ॥ ४३ ॥ तंव हांसोनि बोले एक ॥ सोपे सज्ञान झाले लोक ॥ मिथ्या बहु तत्त्वजल्पक ॥ तत्त्वषट्क[2] नेमस्त ॥ ४४ ॥ एक ह्मणती परते सरा ॥ नेणा तत्त्वसंख्याविचारा ॥ तत्त्वें नेमिलींच अकरा ॥ बडबड सैरा[3] न करावी ॥ ४५ ॥ दुजा ह्मणे तत्त्वविचारा ॥ नेणोनि धरिती अहंकारा ॥ पुसोनियां थोरथोरां ॥ तत्त्वें सतरा नेमस्त ॥ ॥ ४६ ॥ एक ह्मणे व्युत्पत्तिबळा ॥ कां व्यर्थ पिटाल कपाळा ॥ न कळे भगवंताची लीळा ॥ तत्त्वें सोळा नेमस्त ॥ ४७ ॥ एक ह्मणे या गर्विता पोरां ॥ कोण पुसे तत्त्वविचारा ॥ तत्त्वें नेमस्तचि तेरा ॥ निजनिर्धारा म्यां केलें ॥ ४८ ॥ एक ह्मणे सांडा चातुरी ॥ तत्त्वें नेमस्तचि चारी ॥ दुजा ह्मणे या कायशा कुसरीं ॥ तत्त्वें निर्धारीं दोनची ॥ ४९ ॥ तिजा ह्मणे वाचाट[4] लोक ॥ कोणें धरावें यांचें मुख ॥ निजनिर्धारीं तत्त्व एक ॥ एकाचे अनेक विस्तार ॥ ५० ॥ एवं मतपरंपरा नानामतीं ॥ ऋषीश्वरीं वेंचितां युक्ती ॥ माझ्या तत्त्ववादाची निश्चितीं ॥ कोणे इत्थंभूतीं मानावी ॥ ५१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ गायंति पृथगायुष्मन्निदन्नो वक्तुमर्हसि ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ तूं निजात्मा परमेश्वर ॥ तुज जाणावया ऋषीश्वर ॥ वेंचूनि[5] युक्तीचे संभार ॥ तत्त्वविचार बोलती ॥ ५२ ॥ स्वामीनें सांगीतलें तत्त्व एक ॥ ऋषीश्वर बोलती अनेक ॥ येचिविषयींचें निष्टंक ॥ मज आवश्यक सांगावें ॥ ५३ ॥ एवं या तत्त्वनिश्चयासी ॥ मज सांगावया योग्य होसी ॥ ऐसा विनविला ह्रषीकेशी ॥ तो उद्धवासी तुष्टला[7] ॥ ५४ ॥ जींजीं ऋषीश्वर बोलती ॥ तींतीं तत्त्वें सत्य होती ॥ हें सर्वज्ञ ज्ञाते जाणती ॥ तेचि अर्थीं हरि बोले ॥ ५५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ युक्तयः संति सर्वत्र भाषंते ब्राह्मणा यथा ॥ मायां मदीया मुद्गृह्य वदतां किंनु दुर्घटम् ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ ज्याचेनि मतें जैसें ज्ञान ॥ तो तैसें करी तत्त्वव्याख्यान ॥ या हेतू बोलती ब्राह्मण ॥ तें सत्य जाण उद्धवा ॥ ५६ ॥ जरी अवघीं मतें प्रमाण ॥ तरी कां करावें मतखंडण ॥ उद्धवा तूं ऐसें नह्मण ॥ ते मी निजखूण सांगेन ॥ ५७ ॥ अघटित[7] घडवी माझी माया ॥ ते हरिहरां नये आया ॥ जे नाथिलें[8] वाढवूनियां ॥ लोकत्रया भुलवित ॥ ५८ ॥ ते माया धरोनियां हातें ॥ ऋषीश्वर निजमतें ॥ जो जो जेंथें बोलेल जेंथें ॥ तें तें तेजें घडे सत्य ॥ ५९ ॥ केवळ दोराच सर्पाकार ॥ हा श्वेत कृष्ण कीं रक्तांबर ॥ ज्यासि जैसा भ्रमाकार ॥ त्यासि साचार तो तैसा ॥ ६० ॥ तेवीं आत्मतत्त्व एकचि जाण ॥ अविकारी निज निर्गुण ॥ तेथ नानातत्त्वांचें व्याख्यान ॥ बोलती ब्राह्मण मायायोगें ॥ ६१ ॥ ते मायेचरा मायिका व्युत्पत्ती ॥ नानावाग्वाद स्वमतीं ॥

---

१ नवल. २ सहातत्वें. ३ उगीच. ४ बडबडे. ५ खर्चकरून. ७ संतुष्ट झाला. ७ न घडणारें. ८ नसतलें.

त्याच वादाची वादस्थिती ॥ ऐक तुजप्रती सांगेन ॥ ६२ ॥ ऐसें बोलोनि श्रीकृष्णनाथ ॥ उद्धवाप्रति सांग निरूपित ॥ तत्त्वविचारणा यथार्थ॥
स्वयें सांगत आपण ॥६३॥ हें पांचवे श्लोकींचें निरूपण ॥ श्रीकृष्ण उद्धव विवरण ॥ सांगितलें तत्त्वव्याख्यान ॥ उद्धवा जाण यथार्थ॥६४॥
॥ श्लोक ॥ ॥ नैतदेवं यथात्थ त्वं यदहं वच्मि तत्तथा ॥ एवं विवदतां हेतुशक्तयो मे दुरत्ययाः ॥ ५॥ ॥टीका ॥ ॥ माझे मायेचें प्रबळ बळ ॥
तेणें अभिमान अतिसबळ॥वादवूनि[1] युक्तिचें वाग्जाळ॥करिती कोल्हाळ वाग्वादी॥६५॥प्रबळ शास्त्रश्रवणाभिमान ॥ तुझें वचन तें अप्रमा
ण ॥ मी बोलतों हेंचि प्रमाण ॥ पत्रावलंबन केलें असे ॥ ६६ ॥ सत्वरजादिगुणोत्पत्ती ॥ माझे मायेच्या अनंतशक्ती ॥ तेणें क्षोभें विवादती ॥
स्वमतव्याप्तीअभिमानें ॥ ६७॥ ॥ श्लोक ॥ ॥ यासां व्यतिकरादासीद्विकल्पो वदतां पदम् ॥ प्राप्ते शमदमेऽप्येति वादस्तमनुशाम्यति॥६॥
॥टीका ॥ ॥ कां गुणक्षोभें अभिमान॥विकल्प उपजवी[2] गहन॥विकल्पें युक्तीचें छळण ॥ करी आपण अतिवादें ॥६८॥सांडितां गुणक्षोभवि
लास ॥ रजतमांचा होय ऱ्हास सत्ववृत्तीचा निजप्रकाश ॥ अति उल्हास शमदमांचा ॥ ६९ ॥ शमदमांचे निजवृत्ती ॥ संकल्प विकल्पेंसी
जाती ॥ वाद अतिवाद उपरमती ॥ जेवीं सूर्याप्रती आंधारें ॥ ७० ॥ सर्वज्ञ ज्ञाते जे गा होती ॥ ते नानातत्त्वांच्या तत्त्वोक्ती ॥ स्वयें विवंचूनि
जाणती ॥ ऐक तुजप्रती सांगेन ॥ ७१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ परस्परानुप्रवेशात्तत्त्वानां पुरुषर्षभ ॥ पौर्वापर्यप्रसंख्यानं यथा वक्तुर्विवक्षितम् ॥ ७ ॥
॥टीका ॥ ॥ गुरुपाशीं शास्त्रपाठा ॥ करूनि साधिली निजनिष्ठा ॥ ऐक उद्धवा पुरुषश्रेष्ठा ॥ प्रियवरिष्ठा प्रियोत्तमा ॥ ७२ ॥ तत्त्वगणने
चे जे लेख ॥ एकाचें थोडें एकाचें अधिक ॥ हा अनुप्रवेश[3] वोळख ॥ एका माजी एक उपजती ॥ ७३ ॥ तत्त्वांपासूनि तत्त्वें होती ॥
कारणरूपें कार्याची स्थिती ॥ अंतीं जेथील तेथें प्रवेशती ॥ हे तत्त्वोपपत्ती[4] उद्धवा ॥ ७४ ॥ पूर्वस्थित जें तें कारण ॥ त्यापासोनि उ
पजें तें कार्य जाण ॥ हें कार्यकारणांचें लक्षण ॥ तत्त्वविचक्षण बोलती ॥ ७५ ॥ येथ वक्त्याचें जैसें मनोगत ॥ तैशी तत्त्वसंख्या हो
त ॥ कार्य कारण एकचि गणित ॥ तत्त्वसंख्या तेथ थोडीच ॥ ७६ ॥ एकचि कार्य आणि कारण ॥ गणितां आणिती भिन्नभिन्न ॥
तेथ तत्त्वसंख्या अधिक जाण ॥ होय गणन उद्धवा॥ ७७ ॥ एवं कार्य कारणें भिन्नभिन्नें ॥ तत्त्वसंख्या थोडी बहुत होणें ॥ ही तत्त्वव
त्त्यांचीं लक्षणें ॥ तुज सुलक्षणें सांगीतलीं ॥ ७८ ॥ येचिविषयींची उपपत्ती ॥ स्वयें सांगताहे श्रीपती ॥ कार्यकारण निजयुक्ती ॥ उद्ध
वाप्रती निवाडे ॥ ७९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एकस्मिन्नपि दृश्यंते प्रविष्टानीतराणि च ॥ पूर्वस्मिन्वापरस्मिन्वा तत्त्वे तत्त्वानि सर्वशः ॥ ८॥
॥ टीका ॥ ॥ आकाशापासूनि वायु झाला ॥ तो गगनावेगळा नाहीं गेला ॥ वायूपासूनि अग्नि झाला ॥ तेथ प्रवेशु आला दोहींचा ॥ ८० ॥

---

१ वाद करितात. २ उत्पन्न करितो. ३ एका पाठीमागून एक शिरणें. ४ तत्वाची युक्ति.

अग्नीपासूनि झाला जळरसू[1] ॥ त्यामाजी तिहींचा रहिवासू ॥ जळापासून पृथ्वीचा प्रकाशू ॥ तीमाजी प्रवेशू चहूंचा ॥ ८१ ॥
तैसें कार्य आणि कारण ॥ परस्परें अभिन्न जाण ॥ जेवीं लेणें[2] आणि सुवर्ण ॥ वेगळेपण एकत्वें ॥ ८२ ॥ जेवीं तंतू[3] आणि
पट[4] ॥ दोनी दिसती एकवट ॥ तेवीं कार्यकारणसगट ॥ दिसे स्पष्ट अभिन्नत्वें ॥ ८३ ॥ साकरेचीं नारळें केळीं ॥ परी तीं साकरत्वा[5] नाहीं
मुकलीं ॥ तेवीं करणांचीं कार्यें झालीं ॥ अ[illegible]तां संचलीं कारणत्वें ॥ ८४ ॥ जेवीं कां पृथ्वीचा मृत्पिंड ॥ मृत्पिंडीं अनेक भांड ॥
होती गाडगीं उदंड ॥ मृत्तिका[6] अखंड कारणत्वें ॥ ८५ ॥ तेवीं कारणीं कार्यविशेषू ॥ कार्यासि कारणत्वें प्रकाशू ॥ हा परस्परानुप्रवेशू ॥
अनन्यविलासू अखंडत्वें ॥ ८६ ॥ एक कार्य आणि कारण ॥ होय भिन्न आणि अभिन्न ॥ तेणें तत्त्वसंख्यालक्षण ॥ घडे जाण न्यूनाधिक्यें
॥ ८७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पौर्वापर्यमतोऽमीषां प्रसंख्यानमभीप्सताम् ॥ यथा विविक्तं यद्वक्त्रं गृह्णीमो युक्तिसंभवात् ॥ ९ ॥ ॥ टीका ॥
॥ म्यां सांगीतली तैशी जाण ॥ तत्त्वसंख्या अधिक न्यूंन[7] ॥ व्हावया हेंचि कारण ॥ वक्त्याची ज्ञानविवक्षा ॥ ८८ ॥ जैसें ज्यासि
असे ज्ञान ॥ जैसा ईप्सितमताभिमान ॥ तैसतैसें तत्त्वव्याख्यान ॥ ऋषीश्वर जाण बोलती ॥ ८९ ॥ जो बोले ज्या मतयुक्ती ॥ तें
तें घडे त्या मतसंमतीं ॥ हें मीं जाणें सर्वज्ञ श्रीपती ॥ यालागीं त्या युक्ती मीही मानीं ॥ ९० ॥ जे बोलिले ऋषिजन ॥ सव्वीस तत्त्वें
विवंचून ॥ उद्धवा तुज मी सांगेन ॥ सावधान अवधारी ॥ ९१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अनाद्यविद्यायुक्तस्य पुरुषस्यात्मवेदनम् ॥ स्वतो न संभवादन्यस्तत्त्वज्ञो ज्ञानदो भवेत् ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रकृतिपुरुषमहत्तत्वें येथें ॥ अहंकार आणि महाभूतें ॥ इंद्रियें विषयसमेतें ॥ यें
तत्त्वें निश्चितें पंचवीस ॥ ९२ ॥ येथ पुरुष होऊनि भिन्न ॥ जीव वेगळा करूनि जाण ॥ तत्त्वसंख्यालक्षण ॥ केलीं संपूर्ण सव्वीस
॥ ९३ ॥ जीवाच्या भिन्नत्वाचें कारण ॥ अनादी अविद्येस्तव जाण ॥ घेऊनि ठेला देहाभिमान ॥ कर्मबंधन दृढ झालें ॥ ९४ ॥ अहंकर्तेपणाचा खटाटोप ॥ तेणें अंगीं आदळे पुण्यपाप ॥ विसरला निजरूप ॥ विषर्य[8]लोलुप्य वाढवितां ॥ ९५ ॥ लागलें बद्धतेचें बंधन ॥
नकरवे कर्मपाशच्छेदन[9] ॥ त्याच्या उद्धारालागीं जाण ॥ ज्ञानदाता सर्वज्ञ ईश्वर ॥ ९६ ॥ गुरुद्वारा[10] पाविजे ज्ञान ॥ तेथें ईश्वराचा आभार
कोण ॥ येथ ईश्वररुपेवीण ॥ सद्गुरु जाण भेटेना ॥ ९७ ॥ झालिया सद्गुरुप्राप्ती ॥ ईश्वररुपेवीण न घडे भक्ती ॥ सद्गुरु तोचि ईश्वरमूर्त्ती
॥ वेदशास्त्रार्थीं संमत ॥ ९८ ॥ गुरुईश्वरां भिन्नपण ॥ देखे तो नागवला आपण ॥ एवं ईश्वरानुग्रहें जाण ॥ ज्ञानसंपन्न होय
जीवू ॥ ९९ ॥ गुरूनीं सांगीतली ज्ञानस्थिती ॥ ते ईश्वररुपेवीण चित्तीं ॥ ठसावेना साधकांप्रती ॥ जाण निश्चिती उद्धवा ॥ १०० ॥

---

[1] पाणि आणि रस. [2] दागिने. [3] दोरा. [4] वस्त्र. [5] साकरपणास. [6] माती. [7] कमी. [8] विषयाचा लोभ. [9] कर्मरूपपाशांचा नाश. [10] गुरूच्या मुखानें.

जीव नियम्य[1] ईश्वर नियंता[2] ॥ जीव अज्ञान ईश्वर ज्ञानदाता ॥ जीव परिच्छिन्न[3] एकदेशतां ॥ ईश्वर सर्वथा सर्वज्ञ ॥ १ ॥ जीव हीन दी
न अज्ञान ॥ ईश्वर समर्थ सर्वज्ञ ॥ जीवास दृढ कर्मबंधन ॥ ईश्वर तो जाण निष्कर्म[4] ॥ २ ॥ एवं ईश्वररूपें जाण ॥ जीवासि प्राप्त होय
ज्ञान ॥ यालागीं ईश्वराहून ॥ जीव भिन्न या हेतू ॥ ३ ॥ ह्मणशी करितां कर्माचरण ॥ जीवासि प्राप्त होईल ज्ञान ॥ हें सर्वथा नघडे
जाण ॥ जडत्वपण कर्मासी ॥ ४ ॥ कर्मा जडत्व जाण ॥ त्यासि बद्धत्व अज्ञान ॥ त्या कर्मासि अत्यंत बद्धपण ॥ हें सज्ञान[5] जाणती
॥ ५ ॥ कर्म स्वरूपें जड अचेतन ॥ त्यासि चेतविता ईश्वर जाण ॥ तें नकरितां ईश्वरार्पण ॥ ज्ञानदाता कोण कर्मासी ॥ ६ ॥ कर्मासि
जडत्वें नाहीं सत्ता ॥ कर्मक्रियेचा ईश्वर ज्ञाता ॥ ईश्वरचि कर्मफळदाता ॥ कर्मचेतविता ईश्वरू ॥ ७ ॥ जीवासि ज्ञानें सायुज्यता ॥ कां
कर्मभोगफळदाता ॥ अथवा इहलोकीं वर्त्तविता ॥ जीवासि तत्त्वतां ईश्वरू ॥ ८ ॥ यापरी अवश्य जाण ॥ जीव ईश्वर करितां भिन्न ॥
तत्त्वे सव्वीस संपूर्ण ॥ बोलिले ब्राह्मण या हेतू ॥ ९ ॥ पंचवीस तत्त्वांची कथा ॥ ते जीवेश्वरांची ऐक्यता ॥ तेही सांगेन मी आतां ॥
त्याच्या मता संमत ॥ ११० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पुरुषेश्वरयोरत्र न वैलक्षण्यमण्वपि ॥ तदन्यकल्पनाऽपार्था ज्ञानं च प्रकृतेर्गुणः ॥ ११ ॥
॥ ॥ टीका ॥ ॥ जीवेश्वरांची ऐक्यता ॥ सहजचि असे स्वभावतां ॥ तेथ अणुमात्र भेदवार्त्ता ॥ न रिगे सर्वथा निश्चित ॥ ११ ॥ स्वभा
वें पाहतां दर्पण[6] ॥ एकाचें देखिजे दुजेपण ॥ परी द्विधा[7] नव्हेचि आपण ॥ यापरी जाण जीवशिव ॥ १२ ॥ अज्ञानप्रतिबिंबित जीव ॥ त्या
चा द्रष्टा तो सदाशिव ॥ तरी ऐक्यतेचें जें वैभव ॥ तो निजस्वभाव मोडेना ॥ १३ ॥ जेवीं दर्पणामाजी आपण ॥ तेवीं जीवरूपें शि
वूचि जाण ॥ दोनी चेतनत्वें समान ॥ तेंही लक्षण अवधारी ॥ १४ ॥ जैशी चेष्टा कीजे आपण ॥ तेचि प्रतिबिंबीं दिसे जाण ॥ तेवीं
ईश्वरसत्ता सचेतन ॥ गमनागमन जीवासी ॥ १५ ॥ तेवीं स्वरूपें असे आपण ॥ तद्रूप प्रतिबिंबीं दिसे जाण ॥ तेवीं ईश्वरत्व संपूर्ण ॥
असे अविच्छिन्न जीवामाजी ॥ १६ ॥ जैसा अग्नि [illegible]खां झांकोळिला ॥ तरी अग्निपणें असे संचला[9] ॥ तेवीं शिवासि जीवभावो आ
ला ॥ परी नाहीं मुकला निजत्व[10] ॥ १७ ॥ ॥ आ[illegible]का ॥ ॥ होकां जीव शिव दोनी एक ॥ तरी एक मलिन एक चोख ॥ सदोख[11] आणि
निर्दोखें[12] ॥ हे विशेख[13] कां दिसती ॥ १८ ॥ थिल्ल[illegible] प्रतिबिंबला सविता ॥ त्या प्रतिबिंबाअंगीं सर्वथा ॥ थिल्लरींचें मळ पाहतां ॥ दिसती
तत्त्वतां लागले ॥ १९ ॥ तेचि निर्धारूनि पाहतां वेगीं ॥ बिंबा प्रतिबिंबनियोगीं ॥ सर्वथा मळ नलगे अंगीं ॥ उभयभागीं विशुद्ध
॥ १२० ॥ आरशाअंगीं टिकले मळ ॥ सुबुद्ध बैसले बहुकाळ ॥ ते प्रतिबिंबा अंगीं केवळ ॥ दिसती प्रबळ जडलेसे ॥ २१ ॥ तो मळ

---

१ नियमांत राहणारा. २ नियमनकरणारा. ३ एकदेशी. ४ कर्मरहित. ५ ज्ञाते. ६ आरसा. ७ दोनप्रकार. ८ झांकला. ९ प्रकटला १० स्वरूप. ११ सदोष. १२ निर्दोष. १३ विशेष.

जैं पडे फेडावा ॥ तैं आरिसा साहणे तोडावा ॥ तरी बिंब प्रतिबिंब केव्हां ॥ साहणे धरावा हें बोलूंनये ॥ २२ ॥ तेवीं सदोष आणि निर्दोष ॥ केवळ अविद्याचि देख ॥ जीव शिव उभयतां चोख ॥ नित्य निर्दोख निजरूपें ॥ २३ ॥ पाहतां शुद्धत्वें स्फटिक जैसा ॥ जे रंगीं ठेवावा दिसे त्या ऐसा ॥ स्वयें अलिप्त जैसा तैसा ॥ जीव स्वभाववशा तैसाची ॥ २४ ॥ जीव स्वयें चि[1]त्स्वरूप ॥ जे गुणीं मिळे दिसे तद्रूप ॥ परी गुणदोष पुण्य पाप ॥ जीवासि अल्प लागेना ॥ २५ ॥ प्रत्यक्ष प्रतिबिंबीं मिथ्यता ॥ दिसे निजबिंबाचिया सत्ता ॥ तेवीं जीवशिवांसि अभिन्नतां ॥ जाण तत्त्वतां निश्चित ॥ २६ ॥ जीवशिवांचें एकपण ॥ तेणें सर्वां[2]माजी जाण ॥ एक तत्त्व होतां न्यून ॥ शेष तेंचि पूर्ण पंचविस ॥ २७ ॥ ॥ आशंका ॥ जीवशिवांचें एकपण ॥ ऐसें जें जाणणें तें ज्ञान ॥ तें एक तत्त्व येथें आन ॥ त्यांमाजी जाण उपजलें ॥ २८ ॥ तें ज्ञानतत्त्व अंगीकारितां ॥ पंचवीस सव्वीस तत्त्वकथा ॥ दोनी मतें होती वृथा ॥ ऐसें सर्वथा न ह्मणावें ॥ २९ ॥ येथ मूळींचें निरूपण ॥ श्लोकाचे अंतींचा चरण ॥ ज्ञान तें प्रकृ[3]तीचा गुण ॥ त्यासि वेगळेपण असेना ॥ १३० ॥ गुणकर्माच्या खटपटा ॥ प्रपंच अज्ञाने अतिलाठा ॥ ज्ञान अज्ञानांचा सत्त्ववाटा ॥ जेवीं कांटा कांटें काढिजे ॥ ३१ ॥ शोधित जो सत्वगुण ॥ त्या नांव बोलिजे मुख्य ज्ञान ॥ तेंही गुणांमाजी पडे जाण ॥ वेगळेपण नव्हेचि तत्त्व ॥ ३२ ॥ ज्ञान स्वतंत्र तत्त्व होतें ॥ तरी नासती दोनी मतें ॥ तें पडे गुणा[4]आंतौतें ॥ यालागीं दोनी मतें निर्दुष्ट ॥ ३३ ॥ तेचि त्रिगुणांची व्यवस्था ॥ तुज मी सांगेन आतां ॥ एक उद्धवा तत्त्वतां ॥ गुण सर्वथा आ[5]विद्यक ॥ ३४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रकृतिर्गुणसाम्यं वै प्रकृतेर्नात्मनोर्गुणाः ॥ सत्त्वं रजस्तमइति स्थित्युत्पत्त्यंतहेतवः ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ उत्पत्तिस्थितिनिर्दळण ॥ हे त्रिगुणकार्यार्थें पूर्ण ॥ गुण[6]साम्य ते प्रकृति जाण ॥ आत्मा निर्गुण गुणातीत ॥ ३५ ॥ ह्मणशी परमात्मा गुणातीत ॥ परी जीवात्मा गुणग्रस्त ॥ हेही गा मिथ्या मात[7] ॥ ऐक वृत्तांत सांगेन ॥ ३६ ॥ चंद्र निश्चळ निजस्वभावें ॥ तोच चाले त्या अभ्रासवें ॥ दिसे जेवीं सवेग धांवे ॥ तेवीं गुणस्वभावें जीवात्मा ॥ ३७ ॥ घटामाजी उदक भरितां ॥ घटाकाश भिजेना सर्वथा ॥ तेवीं जीवात्मा गुणीं वर्ततां ॥ अलिप्तता गुणकर्मीं ॥ ३८ ॥ जीव अहंकर्तेपणीं विख्यात ॥ तो केवीं ह्मणावा कर्मातीत ॥ येचि अर्थीं कृष्णनाथ ॥ विश[8]दार्थ सांगत ॥ ३९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सत्त्वं ज्ञानं रजः कर्म तमोऽज्ञानमिहोच्यते ॥ गुणव्यतिकरः कालः स्वभावः सूत्रमेव च ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ ॥ सत्वगुणास्तव ज्ञान ॥ रजोगुणें कर्म जाण ॥ मोह आलस्ययुक्त गहन ॥ तमीं अज्ञान नांदत ॥ १४० ॥ सत्वादि जे तिन्ही गुण ॥ केवळ प्रकृतीचे हे जाण ॥ यांसि स्वतंत्रपण ॥ नव्हेचि जाण याहेतू ॥ ४१ ॥ गुणक्षोभक काळ देख ॥ तो पुरुषाचा अवलोक ॥ पुरुष काळ हा नामविशेख ॥ स्वरूपें एक हें दोन्ही ॥ ४२ ॥

---

[1] चैतन्यरूप. [2] एकत्र. [3] मायेचा. [4] आंत. [5] माये पासून झालेलें. [6] सारखेगुण होणें. [7] गोष्ट. [8] स्पष्ट करून.

स्वाभाविक मायेचें स्फुरण ॥ प्रथम कार्य जें निर्माण ॥ त्या नांव महत्तत्त्व जाण ॥ सूत्र प्रधान ज्यासि ह्मणती ॥ ४३ ॥ यालागीं प्रकृतीहूनि भिन्न ॥ यासि नये वेगळेपण ॥ हे प्रकृति कार्यकारणीं अभिन्न ॥ तत्त्वविचक्षण मानिती ॥ ४४ ॥ अठ्ठावीस तत्त्वें पूर्वोक्त ॥ हें भगवंताचें निज मत ॥ तेंचि अडीचाश्लोकीं सांगत ॥ संख्या तत्त्वार्थ निजबोधें ॥ ४५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पुरुषःप्रकृतिर्व्यक्तमहंकारो नभोऽनिलः ॥ ज्योतिरापः क्षितिरिति तत्त्वान्युक्तानि मे नव ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रकृति पुरुष महत्तत्त्व ॥ महाभूतें अहंभाव ॥ अठ्ठाविसांतहीं तत्त्वें नव ॥ इतर वैभव तें ऐक ॥ ४६ ॥ ॥ श्लोक ॥ श्रोत्रं त्वग्दर्शनं घ्राणो जिव्हेति ज्ञानशक्तयः ॥ वाक्पाण्युपस्थपाय्वंघ्रिः कर्माण्यंगोभयं मनः ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ मुख्य ज्ञानेंद्रियें पांच जाण ॥ पांच कर्मेंद्रियें आन ॥ कर्मेंद्रियें ज्ञानेंद्रियांअधीन ॥ स्वतां गमन त्या नाहीं ॥ ४७ ॥ आंधळें पायीं चालों जाणें ॥ पांगुळ केवळ देखणें ॥ अंधें पंगु खांदीं घेणें ॥ परी बोले वर्तणें देखण्याचेनी ॥ ४८ ॥ तेवीं ज्ञानेंद्रियां कर्मेंद्रियांसी ॥ संगती घडली असे तैशी ॥ यालागीं मुख्यत्वें ज्ञानेंद्रियांसी ॥ हृषीकेशी बोलिला ॥ ४९ ॥ उभय इंद्रियां चाळक ॥ तेणें मनचि गा एकलें एक ॥ येणेंचि अकरा इंद्रियें देख ॥ यदुनायक सांगत ॥ १५० ॥ इंद्रियविषयनिरूपण ॥ स्वयें सांगताहे नारायण ॥ मुख्य विषय पांच जाण ॥ तयांचें साधन गत्यादिक ॥ ५१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शब्दः स्पर्शो रसो गंधो रूपं चेत्यर्थजातयः ॥ गत्युक्त्युत्सर्गशिल्पानि कर्मायतनसिद्धयः ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ रसस्पर्शादिलक्षण ॥ पांचही विषय ते जाण ॥ गत्यादिक्रियाचरण ॥ तें जाण साधन या विषयांचें ॥ ५२ ॥ दृष्टि रूपातें प्रकाशी ॥ चरण धांवती तयापाशीं ॥ हस्त उँद्यत ध्यावयाशी ॥ रस स्पर्शसिद्धीसी विषयांचे ॥ ५३ ॥ एवं उभय इंद्रियीं जाण ॥ विषय पांचचि प्रमाण ॥ नव्हे अधिक तत्त्वतां गणन ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ५४ ॥ नव एकादश तत्त्वलक्षण ॥ मागां दोंश्लोकीं केलें निरूपण ॥ येणें श्लोकें परम प्रमाण ॥ विषय जाण पांचची ॥ ५५ ॥ केवळ ज्ञानेंद्रियीं भोगू नव्हे ॥ कर्मेंद्रियांही भोग न पावे ॥ उभयसंयोगें भोग पावे ॥ परी विषय आघवे पांचची ॥ ५६ ॥ इहीं पांचविषयीं आपण ॥ व्यापिलें चतुर्दश भुवन ॥ सुराँसुर भुलविले जाण ॥ यांचें गोडपण मारक ॥ ५७ ॥ जेवीं कां मैंद गोडपणें ॥ संगती लागोनि जीव घेणें ॥ तेवीं विषयसंगाचें साजणें ॥ बांधोनि नेणें नरकासी ॥ ५८ ॥ नरकीं निरय भोगिती ॥ तेथही नसोडी विषयासक्ती ॥ विषया ऐसा विश्वासघाती ॥ आन त्रिजगतीं असेना ॥ ५९ ॥ ते हे पंच विषय प्रमाण ॥ पांचचि परी अतिदारुण ॥ ब्रह्मादिक नाडले जाण ॥ इतरांचा कोण पडिपाडू ॥ १६० ॥ विषयांचें गोडपण ॥ तें विखाहूनि दारुण ॥ विष एकदा आणी मरण ॥

---

१ तत्वज्ञ. २ अहंकार. ३ दुसरीं. ४ जाणें आदिकरून. ५ तयार. ६ चवदा. ७ देव व दैत्य. ८ मोठेपणा.

पुनःपुनः मारण विषयांचें ॥ ६१ ॥ पुढती जन्म पुढती मरण ॥ हें विषयांस्तव घडे जाण ॥ संसाराचें सबळपण ॥ विषयाधीन उद्धवा ॥ ६२ ॥ जेथ विषयांचा विषयत्यागू ॥ तेथें उन्मळे [1]भंवरोगू ॥ त्याचा आंदणा मी श्रीरंगू ॥ त्यासि विषयभोगू नावडे ॥ ६३ ॥ ते हे पंच विषय गा जाण ॥ तुज म्यां केले निरूपण ॥ आतां त्रिगुणांचें लक्षण ॥ ऐक सावधान सांगतों ॥ ६४ ॥ उत्पत्ति स्थिती निर्दळण ॥ त्रिगुणांस्तव घडे जाण ॥ यालागीं स्वयें श्रीकृष्ण ॥ तिन्ही गुण अंगीकारी ॥ ६५ ॥ अंगीकारूनि तिन्ही गुण ॥ अठ्ठावीस तत्त्वें केलीं पूर्ण ॥ हें कृष्णसंमत लक्षण ॥ उद्धवा जाण निश्चित ॥ ६६ ॥ त्रिगुणगुणेंवीण प्रकृती ॥ [2]सृष्टिसर्जनीं नाहीं शक्ती ॥ गुणद्वारा उत्पत्ति स्थिती ॥ संहार अंतीं स्वकार्यें ॥ ६७ ॥ तेचि अर्थींचें निरूपण ॥ स्वयें सांगताहे श्रीकृष्ण ॥ कार्यकारणलक्षण ॥ यथार्थ जाण विभाग ॥ ६८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सर्गादौ प्रकृतिर्ह्यस्य कार्यकारणरूपिणी ॥ सत्वादिभिर्गुणैर्धत्ते पुरुषोऽव्यक्त ईक्षते ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रकृती[3]पासाव विकारमेळा ॥ त्रिगुणांचिया गुणलीळा ॥ सात कारणें कार्यें सोळा ॥ ऐक वेगळा विभाग ॥ ६९ ॥ महदहंकारमहाभूतें ॥ सातही कारणें हे निश्चितें ॥ अकरा इंद्रियें विषययुक्तें ॥ यें जाणावीं येथें कार्यें सोळा ॥ १७० ॥ यापरी निजप्रकृती ॥ रजोगुणातें धरोनि हातीं ॥ कार्यकारणांचिया युक्ती ॥ करी उत्पत्ती सृष्टीची ॥ ७१ ॥ सर्जिलिये सृष्टीसि जाण ॥ सत्वगुणें करी पालन ॥ तमोगुणें [4]निर्दळण ॥ प्रकृति आपण स्वयें करी ॥ ७२ ॥ पुरुषें नकरितां [5]ईक्षण ॥ उत्पत्ति स्थिति निर्दळण ॥ प्रकृतीचेनि नव्हे जाण ॥ तेंही उपलक्षण अवधारी ॥ ७३ ॥ हात पांय नलावितां जाण ॥ केवळ कूर्मीचें अवलोकन ॥ करी पिलियांचें पालन ॥ तैसें ईक्षण पुरुषाचें ॥ ७४ ॥ कां सूर्यांचिया निजकिरणीं ॥ जेवीं अग्नीतें स्रवे मणी ॥ तेणें स्वधर्मकर्में ब्राह्मणीं ॥ कीजे यज्ञाचरणीं महायागू ॥ ७५ ॥ तैसें हें जाण चिह्न ॥ येणें होय कार्यकारण ॥ चाले स्वधर्म आचरण ॥ यापरी जाण उद्धवा ॥ ७६ ॥ ऐसें चालतां प्रकृतिपर ॥ ब्राह्मण करिती स्वाचार ॥ तेणें वृद्धि कर्माचार ॥ परापर उद्धवा ॥ ७७ ॥ तेवीं पुरुषाचें ईक्षण ॥ प्रकृति [6]लोहोनि आपण ॥ उत्पत्ति स्थिति निर्दळण ॥ करावया पूर्ण सामर्थ्य पावे ॥ ७८ ॥ छायामंडपींचें विचित्र सैन्य ॥ दिसावया दीपचि कारण ॥ तेवीं प्रकृतिकार्यांसि जाण ॥ केवळ ईक्षण पुरुषाचें ॥ ७९ ॥ जगाचें आदिकारण ॥ प्रकृति होय गा आपण ॥ प्रकृति प्रकाशी पुरुष जाण ॥ तो महाकारण या हेतू ॥ १८० ॥ प्रकृति व्यक्त पुरुष [7]अव्यक्त ॥ हे विकारी तों विकाररहित ॥ हे [8]गुणमयी गुणभरित ॥ तो गुणातीत निजांगें ॥ ८१ ॥ प्रकृति स्वभावें चंचळ ॥ पुरुष अव्ययत्वें अचळ ॥ प्रकृति बद्धत्वें सबळ ॥ पुरुष केवळ बंधातीत ॥ ८२ ॥ प्रकृति स्वभावें सदा शून्य ॥ पुरुष केवळ चै

---

[1] संसार हाच रोग. [2] जग उत्पन्न करण्याविषयीं. [3] पासून. [4] नाश. [5] अवलोकन. [6] मिळून. [7] दिसत नाहीं. [8] गुणरूप.

तन्यघन ॥ प्रकृतीस होय अवसान[1] ॥ पुरुष तो जाण अनंत ॥ ८३ ॥ प्रकृति केवळ निरानंद ॥ यालागीं तेथ विषयच्छंद ॥ पुरुष पूर्ण प
रमानंद ॥ विषयकंदच्छेदक ॥ ८४ ॥ प्रकृतिपुरुषांचें वेगळेपण ॥ तुज म्यां सांगीतलें संपूर्ण ॥ हेचि परमार्थाची निज खूण ॥ पुरुष तो
भिन्न प्रकृतीसी ॥ ८५ ॥ तेचि जाणावया विशद ॥ नानामतांचे मतवाद ॥ त्या मतांचा मतप्रबोध ॥ तुज मीं शुद्ध सांगेन ॥ ८६ ॥
॥ ॥ श्लोक ॥ ॥ व्यक्तादयो विकुर्वाणा धातवः पुरुषेक्षया ॥ लब्धवीर्याः सृजंत्यंडं संहताः प्रकृतेर्बलात् ॥ १८ ॥ टीका ॥ ॥ पुरुषेक्षण[2] ज्ञा
लिया प्राप्त ॥ महदहंकारादि पदार्थ ॥ प्रकृतिबळें समस्त ॥ एकत्र होत ब्रह्मांड ॥ ८७ ॥ पुरुषावलोकें वीर्यप्राप्त ॥ लाहोनि ब्रह्मांडातें ध
रिती ॥ यालागीं यातें धातु ह्मणती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ८८ ॥ हें सामान्यतां निरूपण ॥ तुज म्यां सांगीतलें आपण ॥ जे ना
नामतवादी जाण ॥ विशेष लक्षण बोलती ॥ ८९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सप्तैव धातवइति तत्रार्थाः पंच खादयः ॥ ज्ञानमात्मोभयाधार
स्ततो देहेंद्रियासवः ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ ॥ पंचवीस सव्वीस तत्त्वगणन ॥ मागां सांगीतलें निरूपण ॥ आतां सातां तत्त्वांचें लक्षण ॥
ऐक सुलक्षण सांगेन ॥ ९० ॥ महाभूतें जीव शिव ॥ हा सातां तत्त्वांचा भाव ॥ प्राणेंद्रियसमुदाव ॥ याचि पासाव पैं होत ॥ ९१ ॥ म
हाभूतें अचेतन ॥ यांसि चेतविता[3] जीव जाण ॥ त्याचाही द्रष्टा परिपूर्ण ॥ ईश्वर जाण सातवा ॥ ९२ ॥ माया महत्तत्त्व अहं[4] जें येथ ॥
हें सूक्ष्मकारणें निश्चित ॥ यांपासोनि स्थूळभूतें होत ॥ कारण कार्यांत सबाह्य ॥ ९३ ॥ मनइंद्रियादि जेकां येथें ॥ तेही यांत अंतर्भू
तें ॥ एवं जाण येणें मतें ॥ पांच महाभूतें नेमिलीं ॥ ९४ ॥ यांसि चेतविता जीव ॥ सर्वनियंता सदाशिव ॥ एवं सप्ततत्त्वसमुदाव ॥ तो
हा उगव उद्धवा ॥ ९५ ॥ आतां सहा तत्त्वें येपक्षीं जाण ॥ तुज मी सांगेन निरूपण ॥ जें बोलिले ऋषिजन ॥ तें विवेचन[5] अवधारी
॥ ९६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ षडित्यत्रापि भूतानि पंच षष्ठः परः पुमान् ॥ तैर्युक्त आत्मसंभूतैः सृष्ट्वेदं समुपाविशत् ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ पा
हे पां पंच महाभूतें ॥ पुरुषें सृजिलिया[6] येथें ॥ स्वयें प्रवेशला तेथें ॥ यालागीं त्यातें षष्ठें ह्मणती ॥ ९७ ॥ ज्याचेंनि मतें तत्त्वें चारी ॥ त
यांची ऐक नवलपरी ॥ जो देखे प्रत्यक्षाकारीं ॥ तोचि धरी तत्त्वार्थ ॥ ९८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ चत्वार्येवेति तत्रापि तेज आपोऽन्नमात्म
नः ॥ जातानि तैरिदं जातं जन्मावयविनः खलु ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रत्यक्ष देखिजेती नयनीं ॥ अग्नि आप आणि अवनी ॥ तींचि
सत्यत्वें मानी ॥ मतज्ञानी मतवादी ॥ ९९ ॥ या स्थूळांतें चेतविता[7] ॥ तो आत्मा घेतला चौथा ॥ यांतिहींवीण साकारता ॥ न घडे सर्व
था सृष्टीसी ॥ २०० ॥ नाम रूप क्रिया कारण ॥ सृष्टीसी मुख्यत्वें यांचें जाण ॥ यालागीं भूतें तीनचि प्रमाण ॥ बोलतें लक्षण तें ऐ

---

[1] शेवट. [2] पुरुषाची दृष्टि. [3] हलविणारा. [4] अहंकार. [5] वीचार. [6] उत्पन्न केल्यावर. [7] हलविणारा.

सें ॥ १ ॥ एवं भूतें तीन आत्मा चौथा ॥ हे चौं तत्त्वांची व्यवस्था ॥ आतां सतरातत्त्वांची कथा ॥ ऐक तत्त्वतां सांगेन ॥ २॥ ॥श्लोक॥
॥ संख्याने सप्तदशके भूतमात्रेंद्रियाणि च ॥ पंचपंचैकमनसा आत्मा सप्तदशः स्मृतः ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥ पंच विषय पंच भूतें
पांचचि इंद्रियें घेतलीं येथें ॥ मन आत्मा मेळवूनि तेथें ॥ केलीं निश्चितें सतरा हीं ॥ ३ ॥ यापरी तूं गा जाण ॥ सोळातत्त्वांचें निरूपण
॥ तेथेंचि त्रयोदशलक्षण[1] ॥ स्वयें नारायण सांगत ॥ ४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तद्वत् षोडशसंख्याने आत्मैव मन उच्यते ॥ भूतेंद्रियाणि
पंचैव मन आत्मा त्रयोदश ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ सतरातत्त्वाचें निरूपण[2] ॥ तुज सांगीतलें संपूर्ण ॥ त्यांत मन आत्मा एक जाण ॥
तेंही लक्षण अवधारी ॥ ५ ॥ जेवीं कां कथा सांगतां आपण ॥ स्वभावें हात हाले जाण ॥ तेवीं मनाचें चंचळपण ॥ स्वभावें जाण
होतसे ॥ ६ ॥ राजा सिंहासनीं बैसला ॥ तो राजत्वें पूज्य झाला ॥ वसंत खेळतां धाविन्नला[3] ॥ तरी काय मुकला राज्यपदा ॥ ७ ॥
जेवीं सागर[4] क्षोभला अतिथोर ॥ तरी तो बोलिजे सागर ॥ कां निश्चळ राहिलिया नीरें[5] ॥ तरी समुद्र समुद्रत्वें ॥ ८ ॥ तेवीं मनपणें अतिचंचळ
॥ कां आत्मत्वें निज निश्चळ ॥ दोहींपरी अविकळ ॥ जाण केवळ परमात्मा ॥ ९ ॥ यालागीं मनाचें जें मनपण ॥ आत्मसाक्षात्कारेंवीण
॥ कोणासि नकळेचि गा जाण ॥ हें मुख्य लक्षण मनाचें ॥ २१० ॥ मनआत्म्यांचें उभयऐक्य ॥ तेंचि सतरामाजी उणें एक
॥ उरलीं तीं आवश्यक ॥ सोळाही देख निजतत्त्वें ॥ ११ ॥ पांच इंद्रियें पंच महाभूतें ॥ अकरावें मन ठेवूनि तेथें ॥ जीव शिव दोनी
घेऊनि येथें ॥ केलीं निश्चितें तेराची ॥ १२ ॥ आणिकही नानातत्त्वमतें ॥ मागां पुशिलीं तुवां मातें ॥ तींही सांगेन मी तूंतें ॥ सुनिश्चितें
उद्धवा ॥ १३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एकादशत्वमात्माऽसौ महाभूतेंद्रियाणि च ॥ अष्टौ प्रकृतयश्चैव पुरुषश्च नवेत्यथ ॥ २४ ॥ ॥ टीका ॥
॥ ॥ अकरा तत्त्वें बोलिलीं येथें ॥ पांच इंद्रियें पंच महाभूतें ॥ जीव शिव आणि मनातें ॥ एकत्वें येथें गणिलीं[6] देख ॥ १४ ॥ इति मधु
आणि पिंवळा ॥ तीं नावें एक चांपेकळा ॥ सुवास सुस्वाद[7] सुनीळा ॥ एकत्र मेळा आम्रफळीं ॥ १५ ॥ तेवीं जीव शिव आणि मन
॥ तिन्हीं एकरूपचि जाण ॥ जेवीं हेममणी[8] संपूर्ण ॥ हेमसूत्रीं[9] सज्ञान वोंविती ॥ १६ ॥ पंच इंद्रियें पंच महाभूतें ॥ जीव शिव मन
एकात्मतें ॥ एकादश तत्त्वें येथें ॥ जाण निश्चितें याहेतू ॥ १७ ॥ प्रकृति पुरुष महदहंकार ॥ पंच महाभूतें अविकार ॥ सकळ विकारसंभार
॥ यामाजी साचार अंतर्भूत ॥ १८ ॥ एवं ऋषीश्वरांच्या व्युत्पत्ती ॥ तत्त्वविवक्षा उपपत्ती ॥ नव तत्त्वसंख्यायुक्ती ॥ जाण यारीतीं
उद्धवा ॥ १९ ॥ एक बोलती निजज्ञानी ॥ प्रकृति पुरुष तत्त्वें दोनी ॥ आन पाहतां जनीं वनीं ॥ तिसरें नयनीं दिसेना ॥ २२० ॥ जे

---

१ तेरातत्वांचें लक्षण. २ व्याख्यान. ३ धांवला. ४ समुद्र. ५ पाणी. ६ मोजलीं. ७ उत्तम गोडी. ८ सोन्याचे मणि. ९ सोन्याच्या सुतांत.

निश्चयें अतिनिष्टंक[1] ॥ ते ह्मणती तत्त्व एक ॥ एक तेंचि अनेक ॥ अनेकीं एक निश्चित ॥ २१ ॥ जेवीं सुवर्णाचें भूषण ॥ भूषणी स्वयें सुवर्ण ॥ तेवीं अनेकीं एकपण ॥ एकत्वें जाण निश्चित ॥ २२ ॥ जेवीं उसाची निजगोडी ॥ गूळसाकरेच्या मोडी ॥ तेचि दिसे चढोवढी ॥ तेवीं तत्त्वपरवडी निजतत्त्वें ॥ २३ ॥ त्या जाणावया निजतत्त्वांतें ॥ ऋषीश्वरांचीं बहुत मतें ॥ मी स्वल्पचि बोलिलों येथें ॥ येरवीं अगणितें ग्रंथांतरीं ॥ २४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ इति नाना प्रसंख्यानं तत्त्वानामृषिभिः कृतम् ॥ सर्वं न्याय्यं युक्तिमत्त्वाद्विदुषां किमशोभनम् ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ येथ सर्वज्ञ ज्ञाते होती ॥ ते नानामतें तत्त्वयुक्ती ॥ विवंचोनियां उपपत्ती ॥ विभागूं जाणती यथार्थें ॥ २५ ॥ निजतत्त्व जाणावया जाण ॥ करितां तत्त्वविवंचन ॥ सर्वथा नलगे दूषण ॥ तत्त्वें अधिकन्यून बोलती ॥ २६ ॥ वस्तुतां विकाराच्याठायीं ॥ ज्ञात्यासि[2] बोलावया विशेष नाहीं ॥ विकार ते प्रकृतीच्या ठायीं ॥ आत्मा शुद्ध पाहीं अविकारि ॥ २७ ॥ प्रकृतीहूनि आत्मा भिन्न ॥ यालागीं तो अविकारी जाण ॥ विकार प्रकृतीमाजी पूर्ण ॥ हें मुख्य लक्षण तत्त्वाचें ॥ २८ ॥ प्रकृतीहूनि वेगळेपण ॥ पुरुषाचें जाणावया आपण ॥ यालागीं उद्धवा जाण ॥ तत्त्वविवंचन[3] साधावें ॥ २९ ॥ हें ऐकोनि कृष्णवचन ॥ उद्धव चमत्कारला जाण ॥ प्रकृतिपुरुषांचें भिन्नपण ॥ देवासि आपण पुसों पां ॥ २३० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धव उवाच ॥ ॥ प्रकृतिः पुरुषश्चोभौ यद्यप्यात्मविलक्षणौ ॥ अन्योऽन्यापाश्रयात्कृष्ण दृश्यते न भिदा तयोः ॥ प्रकृतौ लक्ष्यते ह्यात्मा प्रकृतिश्च तथात्मनि ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रकृति पुरुष भिन्नभिन्न ॥ येचि अर्थीं उद्धवें जाण ॥ साडेतीनश्लोकीं अगाध प्रश्न ॥ देवासि आपण पुसत ॥ ३१ ॥ प्रकृतीहूनि पुरुष भिन्न ॥ हें ऐकोनि देवाचें वचन ॥ प्रकृतिपुरुषांवेगळा श्रीकृष्ण ॥ हा द्रष्टा[4] संपूर्ण दोहींचा ॥ ३२ ॥ ह्मणे ऐक श्रीकृष्णा श्रेष्ठा ॥ हे प्रकृतिपुरुषांची चेष्टा ॥ तूं वेगळेपणें देखणा द्रष्टा ॥ सुरवरिष्ठा श्रीपती ॥ ३३ ॥ प्रकृति पुरुष दोनी भिन्न ॥ एक जड एक चेतन ॥ हें मजही कळतसे जाण ॥ परी वेगळेपण लक्षेना ॥ ३४ ॥ जैसा तप्तलोहाचा[5] गोळ ॥ दिसे अग्नीचि केवळ ॥ तेवीं प्रकृतिपुरुषांचा मेळ ॥ दिसे सबळ एकत्वें ॥ ३५ ॥ जेंवीं बीज धरोनियां पोटेंसी ॥ निकण कोंडा वाढे कणेंसी ॥ तेवीं प्रकृति जाण पुरुषेंसी ॥ अभिन्नतेंसी[6] जडलीसे ॥ ३६ ॥ कां नारळ चोख धरोनि पोटीं ॥ निरस कठिण वाढे नरोटी ॥ तेवीं पुरुषयोगें प्रकृति लाठी ॥ झाली सृष्टी अनिवार ॥ ३७ ॥ कणावेगळा कोंडा न वाढे ॥ तेवीं पुरुषावेगळी प्रकृति नातुडे[7] ॥ हें प्रकृतिपुरुषांचें बिरडें ॥ तुजवेगळें निवाडें निवडेना ॥ ३८ ॥ जेवीं कां शिंपीचे अंगीं ॥ जडली रुपेपणाची झिगी[8] ॥ तेवीं पुरुषाच्या संयोगीं ॥ प्रकृति जगीं भासत ॥ ३९ ॥ तीक्ष्ण रविकरसंबंधीं ॥ भासे मृगजळाची महानदी ॥

---

[1] अतिनिश्चयो. [2] ज्ञान्यास. [3] तत्त्वविचार. [4] पाहणारा. [5] तापलेल्या लोखंडाचा. [6] एकपणानें. [7] राहत नाहीं. [8] झिलई.

तेवीं पुरुषाच्यासंबंधीं ॥ प्रकृति त्रिशुद्धी आभासे ॥ २४० ॥ जेवीं कां नभीं नीलिमा ॥ वेगळी न दिसे सांडूनि व्योमा ॥ तेवीं प्रकृति पुरुषोत्तमा ॥ वेगळी आह्मां दिसेना ॥ ४१ ॥ मुख्य देहाचें जें देहपण ॥ तेंचि प्रकृतीचें बंधकत्व जाण ॥ या देहाहोनियां भिन्न[1] ॥ पुरुषाचें भान दिसेना ॥ ४२ ॥ अहंप्रत्ययें आत्मा ह्मणती ॥ हेही देहाकारें स्फुरे स्फूर्ती ॥ देहावेगळी आत्मप्रतीती ॥ न दिसे निश्चितीं गोविंदा ॥ ४३ ॥ डोळा सांडूनि दृष्टि उरे ॥ वातीवेगळा दीप थावरे ॥ तैं देहावेगळा आत्मा स्फुरे ॥ साचोकारें गोविंदा ॥ ४४ ॥ जिह्वेंवीण रसस्वादू ॥ श्रोत्रेंवीण ऐकवे शब्दू ॥ तैं देहावेगळा आत्मबोधू ॥ होय विशदू[2] गोविंदा ॥ ४५ ॥ कांटेंवीण फणस आतुडे ॥ कां सोपटेंवीण ऊंस वाढे ॥ तैं देहावेगळा आत्मा जोडे ॥ वाडेकोडें गोविंद ॥ ४६ ॥ तुझीच सांगीतली निजात्मखूण ॥ नरदेह ब्रह्मप्राप्तीचें कारण ॥ शेखीं देहावेगळें आत्मदर्शन ॥ केवीं आपग प्रतिपादा[3] ॥ ४७ ॥ आत्म्यावेगळी प्रकृती ॥ सर्वप्रकारें नये व्यक्ती ॥ रूपावेगळी छाया केउती ॥ कैशा रीतीं आभासे ॥ ४८ ॥ गोडीवेगळी साकर होये ॥ परिमळावेगळा कापूर राहे ॥ तैं आत्म्यावेगळी पाहे ॥ प्रकृति लाहे अभिव्यक्ती ॥ ४९ ॥ गगनावेगळा घट राहे ॥ तंतुवेगळा पट होये ॥ तैं आत्म्यावेगळी पाहे ॥ प्रकृति लाहे अभिव्यक्ती ॥ २५० ॥ गोडीवेगळा वाढे ऊंस ॥ कणेंवीण जैं वाढे भूस ॥ तैं आत्म्यावेगळी रूपस ॥ माया सावकाश व्यक्तीसि[4] ये ॥ ५१ ॥ प्रकृतिलक्षणीं आत्मा लक्षिजे ॥ आत्मेनि प्रकृतीसि प्रकाशिजे ॥ अनादि दोनीं इयें योग जें ॥ वेगळा लाहिजे बोधें[5] केवीं ॥ ५२ ॥ प्रकृतीहूनि आत्मा भिन्न ॥ सर्वथा आह्मां न दिसे जाण ॥ येचि अर्थींची विनवण[6] ॥ उद्धव आपण करितसे ॥ ५३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवं मे पुंडरीकाक्ष महांतं संशयं हृदि ॥ छेत्तुमर्हसि सर्वज्ञ वचोभिर्नयनैपुणैः ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ ॥ कमलनाभा कमलनयना ॥ कमलालया कमलधारणा ॥ कमलाकमळीं निवासस्थाना ॥ कमलानयना श्रीकृष्णा ॥ ५४ ॥ प्रकृतिपुरुषयोग अवघड ॥ योग्यां नकळे भिन्न निवाड ॥ या संशयाचें अतिजाड ॥ हृदयीं झाड वाढलें ॥ ५५ ॥ हृदयीं संदेहांचीं[7] मूळें ॥ प्रकृतिभूमीं विकल्पजळें ॥ संशयवृक्ष तेणें बळें ॥ वाढला अहंफळें सदा फळित ॥ ५६ ॥ ज्या वृक्षाचीं सदा फळें खातां ॥ जीव न राहे सर्वथा ॥ तेणें संशयाची अधिकता ॥ उसंतु चित्ता पैं नाहीं ॥ ५७ ॥ ऐशिया वृक्षाचें छेदन ॥ कृपेनें करावें आपण ॥ सोडूनि ज्ञानतिखवाग्बाण ॥ करी निर्दळण[8] निजांगें ॥ ५८ ॥ योग यागशास्त्रपाठें ॥ करितां धर्म कर्मकचाटें ॥ या वृक्षाचें मूळ न तुटें ॥ हें कठिनत्व मोठें गोविंदा ॥ ५९ ॥ या वृक्षाचें करितां छेदन ॥ ब्रह्मा झाला ब्रह्मसंपन्न ॥ तुवां हंसगीत सांगोन ॥ उद्धरिला जाण सुपुत्र ॥ २६० ॥ मुख्य ब्रह्म्याची ऐशी अवस्था ॥ तेथ इतरांची कोण

---

१ वेगळें. २ स्पष्ट. ३ सांगता. ४ रूपास. ५ ज्ञान. ६ विनंति. ७ संशयाचीं. ८ नाश.

कथा ॥ या वृक्षाचा छेदिता ॥ तुजवीण सर्वथा आन[१] नाहीं ॥ ६१ ॥ छेद करितां वरिवरी ॥ वासना मूळ उरल्या उरी ॥ फांफाईल चौं
गुण्यापरी ॥ अतिशयें भारी बांबळे ॥ ६२ ॥ याचा वासना समूळ मूळेंसी कंदू ॥ छेदितां छेदक तूं गोविंदू ॥ तुजवेगळा संशयच्छेदू[२] ॥
भलता प्रबुद्धू करूं न शके ॥ ६३ ॥ ह्मणशी संशय हृदयाच्याठायीं ॥ तेथ शास्त्रांचा रिगमू नाहीं ॥ म्यां छेदावें कैसें कायी ॥ तेअर्थीचें
मी पाही सांगेन ॥ ६४ ॥ तुझें ज्ञानचक्र अलोलिक ॥ तुझे शब्द ते अतितिख ॥ समूळ संशयाचें छेदक[३] ॥ तुझें वचन एक गोविंदा
॥ ६५ ॥ ऐसें तुझें ज्ञानवचन ॥ तुवां केलिया कृपावलोकन ॥ समूळ संशयाचें निर्दळण ॥ सहजेंचि जाण होताहे ॥ ६६ ॥ तरी तुवां
श्रीमुकुंदा ॥ फेडावी माझी संशयबाधा ॥ तया उद्धवाचिया शब्दा ॥ गोपीराजा सांगेन ह्मणे ॥ ६७ ॥ असतां बहुसाल सज्ञान ॥ सकळसंशयांचें निर्दळण ॥ मीचि कर्त्ता हें काय कारण ॥ तेंही लक्षण अवधारी ॥ ६८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ त्वत्तो ज्ञानं हि जीवानां प्रमोषस्तेऽत्र शक्तितः ॥ त्वमेव ह्यात्ममायाया गतिं वेत्थ नचापरः ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ ॥ अतर्क्य[४] तुझी मायाशक्ती ॥ त्या आवरूनि आनंद
स्फूर्ती ॥ दृढ लावूनि विषयासक्ती ॥ तेणें जीव होती अज्ञान ॥ ६९ ॥ करितां विषयांचें ध्यान ॥ जीव होय मनाअधीन ॥ त्यास मन
करी हीन दीन ॥ अतिकृपण जड मूढ ॥ २७० ॥ ऐसे केवळ जीव जे अज्ञान ॥ ते तुझ्या कृपाकटाक्षें जाण ॥ झाले गा ज्ञानसंपन्न ॥
हे कृपा पूर्ण पैं तुझी ॥ ७१ ॥ तुझी कृपा झालिया परिपूर्ण ॥ करूनि मायेचें निर्दळण ॥ जीव होती ब्रह्म पूर्ण ॥ तुझेनि जाण श्रीकृष्णा
॥ ७२ ॥ ह्मणशी माझे गांठीं जाण ॥ नाहीं ज्ञान ना अज्ञान ॥ तरी तूं ज्ञानदाता आपण ॥ झालासि पूर्ण तें ऐक ॥ ७३ ॥ धाता[५] सविता[६]
सनत्कुमारांसी ॥ नारदप्रह्लादअंबरीषांसी ॥ कलीं उपदेशिलें अर्जुनासी ॥ ऐसा तूं होशी ज्ञानदाता ॥ ७४ ॥ ह्मणशी बहुत असती
सज्ञान ॥ त्यांसिं पुसोनि साधावें ज्ञान ॥ तुजवेगळें मायेचें नियमन ॥ त्यांचेनि जाण कदा नोहे ॥ २७५ ॥ मायेची उत्पत्ति
स्थिती ॥ मायानिर्दळणी गती ॥ तूं एक जाणता त्रिजगतीं ॥ यालागीं श्रीपती कृपा करी ॥ ७६ ॥ यापरी उद्धवें विनंती ॥ करूनि प्रार्थिला
श्रीपती ॥ तो प्रकृतिपुरुषविभाग युक्तीं ॥ उद्धवाप्रती सांगेल ॥ ७७ ॥ जेवीं सूर्यापाशीं मृगजळ ॥ कां गगनीं[७] उपजे आभाळ ॥
कांचभूमिके दिसे जळ ॥ तैशी प्रकृति सबळ पुरुषापाशीं ॥ ७८ ॥ यापरी स्वयें श्रीकृष्ण ॥ प्रकृतिपुरुषनिरूपण ॥ समूळ सांगताहे आपण
॥ तो ह्मणे सावधान उद्धवा ॥ ७९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ प्रकृतिः पुरुषश्चेति विकल्पः पुरुषर्षभ ॥ एष वैकारिकः
सर्गो गुणव्यतिकरात्मकः ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रकृति पुरुष हे दोनी ॥ सदा अत्यंत वेगळेपणीं ॥ जैसा दिवस आणि रजनी[८] ॥ एक

---

[१] अन्य. [२] संशयाचा नाश. [३] नाशकें. [४] तर्क करवत नाहीं अशी. [५] ब्रह्मदेव. [६] सूर्य. [७] आकाशांत. [८] रात्रि.

लोपोनी एक प्रबळे ॥ २८० ॥ दिवस लोपतांचि जाण ॥ अंधकारेंसि परिपूर्ण ॥ येऊनियां तारागण ॥ रात्री आपण उल्हासे ॥ ८१ ॥ तेवीं लोपतां पुरुषाचें भान ॥ घेऊनि कार्येंसि कारणगुण ॥ ज्ञानाज्ञानेंसि परिपूर्ण ॥ प्रकृति जाण थोरावे ॥ ८२ ॥ येथ मुख्यत्वें जो देहाकार ॥ तेंचि प्रकृतीचें दुर्ग थोर ॥ तेथें ठेविला ठाणेंधर ॥ देहअहंकार महायोद्धा ॥ ८३ ॥ जो जिव्हलग विश्वासाचा ॥ प्रकृतीस विश्वास त्याचा ॥ तो नेटका झुंझार दुर्गींचा ॥ भरभारू तेथींचा तो वाहे ॥ ८४ ॥ तेथ अभिमान आपण ॥ प्रकृतीस निर्भय देऊनि जाण ॥ घालूनि सामग्रीविकारभरण ॥ दुर्ग दारुण बळकाविलें ॥ ८५ ॥ ऐक उद्धवा पुरुषश्रेष्ठा ॥ निजप्रकृतीचिया निष्ठा ॥ देहदुर्गीं अभिमान लाठा ॥ जाहला वरिष्ठा याहेतू ॥ ८६ ॥ देहदुर्ग गुण अहंकार ॥ दुर्ग सामग्री विकार ॥ अवघें प्रकृतीच साचार ॥ तदाकार भासत ॥ ८७ ॥ गगनीं गंधर्वनगर जाण ॥ माड्या गोपुरें वन उपवन ॥ दिसे तैशी प्रकृति आपण ॥ नानाकारें जाण भासत ॥ ८८ ॥ जैशी मृगजळाची सरिता ॥ दुरोनि दिसे प्रवाहता ॥ तेवीं प्रकृतीची सर्वथा ॥ नानाकारता आभासे ॥ ८९ ॥ ऐसें प्रकृतिदुर्ग महाथोर ॥ तेथें नाना सामग्रीविकार ॥ जे जे घाली अहंकार ॥ ते ऐक साचार सांगेन ॥ २९० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ममांग माया गुणमय्यनेकधा विकल्पबुद्धीश्च गुणैर्विधत्ते ॥ वैकारिकस्त्रिविधोऽध्यात्ममेकमथाधिदेवमधिभूतमन्यत् ॥ ३० ॥ ॥ टीका ॥ ॥ माझी माया गा आपण ॥ सर्वांगें जाहले तिनी गुण ॥ तेही अभिमानें आपण ॥ निजसत्ता जाण आवरिले ॥ ९१ ॥ तेचि देहदुर्गाभंवतीं जाण ॥ त्रिगुणांचें आगड पूर्ण ॥ तेथें मांडूनि त्रिपुटीविंदाण ॥ मारा दारुण अभिमान करी ॥ ९२ ॥ त्या दुर्गाचें दृढ रक्षण ॥ मुख्यत्वें त्रिपुटीचि जाण ॥ ते त्रिपुटीचें मुख्य लक्षण ॥ तुज मी आपण सांगेन ॥ ९३ ॥ अगा उद्धवा बुद्धिमंता ॥ तुज मी सांगेन ऐक आतां ॥ तेथ असती तिनी वाटा ॥ दोनी अव्हांटा एकी नीट ॥ ९४ ॥ त्या मार्गींची उभारणी ॥ सैन्य रचिलें दाही आरणी ॥ युद्धकार जो निर्वाणी ॥ तो तेथूनी निरिक्षी ॥ ९५ ॥ तेही मार्ग धरिले चौपाशीं ॥ राखण बैसले तिनी वाटेशीं ॥ तेथ रिघावया सायासीं ॥ ज्ञानियांसीं काय काज ॥ ९६ ॥ आतां असो इतुली परी ॥ देहदुर्गाची थोर भरोभरी ॥ ह्मणे ऐकें गा यया थोरी ॥ उद्धवातें हरी सांगत ॥ ९७ ॥ कार्य कारण कर्तव्यता ॥ कर्म क्रिया अहंकर्त्तृता ॥ ध्येय ध्यान विषय ध्याता ॥ दुर्ग सर्वथा दृढ केलें ॥ ९८ ॥ तेथ भोग्य भोग भोक्ता ॥ कर्म कार्य आणि कर्ता ॥ अभिमान जाहला वसता ॥ प्रकृतिसंमतासंयोगें ॥ ९९ ॥ तेथ चोरद्वाराचिया लक्षीं ॥ उघडूनि कामक्रोध खिडकी ॥ घाला घालितां एकाएकीं ॥ सकळलोकीं कांपिजे ॥ ३०० ॥ त्याचा घेऊनियां भेदरा ॥ तापस पळाले सैरा ॥ लंगोटी सांडिल्याही दिगंबरा ॥

---

१ मोठी होते. २ नदी. ३ स्वाधीन ठेविले. ४ वांकड्या. ५ पाहतो.

क्रोध थरथरां कांपवी ॥ १ ॥ लोभयंत्राचे कडाडे ॥ तमधूम दाटे चहूंकडे ॥ महामोहाचें गडद पडे ॥ मागें पुढें दिसेना ॥ २ ॥ दुर्गास
भोंवतीं नवद्वारें ॥ नवद्वारीं नवही यंत्रें ॥ तेगें तेणें यंत्रद्वारें ॥ विषयमहामारें मारिती ॥ ३ ॥ देहाभिमानाचें चाळक ॥ मुख्यत्वें मनचि
एक ॥ तें दुर्धर महामारक ॥ दुर्ग अटक तेणें केले ॥ ४ ॥ माल चढोनि अवचट ॥ पारके रिघती घडघडाट ॥ ते दशमद्वाराची वाट ॥
देऊनि कपाट दृढ बुजिलें ॥ ५ ॥ यापरी स्वयें मन ॥ दुर्गपन्नासीं आपण ॥ त्यासि सबाह्य राखण ॥ घरटी जाण स्वयें करी ॥ ६ ॥
धरोनि कामाचा हात ॥ मन रिघे पारक्यांत ॥ मुख्य धुराचि लोळवीत ॥ इतरांचा तेथ कोण पाडू ॥ ७ ॥ ऐसें मनाचें मारकपण ॥
अनिवार अति कठिण ॥ त्रिविधतापें खोंचूनि जन ॥ डुंबत जाण पाडिले ॥ ८ ॥ देवापासूनि आधिदैविक ॥ मानस ताप आध्या
त्मिक ॥ भूतांपासाव तो भौतिक ॥ यानांव देख त्रिविध ताप ॥ ९ ॥ सत्वगुणें देख अंतःकरण ॥ रजोगुणें इंद्रियें जाण ॥ महाभूतें वि
षयभान ॥ तमोगुण जाण प्रसवत ॥ ३१० ॥ त्रिविध विकारीं विकारबहुळ ॥ ते हे प्रकृतीच येथें केवळ ॥ हेचि दुर्गसामग्री प्रबळ ॥
प्रपंच सबळ येणें जाहला ॥ ११ ॥ संकल्पमहापर्जन्योदकीं ॥ वासनाजीवनें भरलीं टांकीं ॥ तेणें जीवनें दुर्गाच्या लोकीं ॥ संसार
सुखदुःखीं विचारिजे ॥ १२ ॥ दुर्ग नवद्वारीं समस्तें ॥ आधिदैव आणि आधिभूतें ॥ अध्यात्म तें कोण येथें ॥ ऐक निश्चितें सांगेन
॥ १३ ॥ कोणे द्वारीं कोण यंत्र ॥ कोण चेतविता कैसें सूत्र ॥ कैसा होतसे विषयमार ॥ तोही निर्धार तूं ऐक ॥ १४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥
दृग्रूपमार्कं वपुरत्र रंध्रे परस्परं सिद्ध्यति यः स्वतः खे ॥ आत्मा यदेषामपरो य आद्यः स्वयाऽनुभूत्याऽखिलसिद्धसिद्धिः ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ ॥
चक्षु इंद्रिय यंत्र थोर ॥ तेथ कामिनीरूपाचा महामार ॥ घायें भेदिती जिव्हार ॥ पडले सुरनर कोट्यानुकोटी ॥ १५ ॥ चक्षुगोल इंद्रि
य शरीरीं ॥ तेथ अधिदैव सूर्य अधिष्ठात्री ॥ देखिल्या रूपाची धारणा धरी ॥ तेंचि निजनिर्धारीं अध्यात्म ॥ १६ ॥ नीलपीतरूपाभरण ॥
दृष्टीं देखिजे दर्शन ॥ तेंचि अधिभूत सत्य जाण ॥ दृश्याचें भान दृष्टीशीं ॥ १७ ॥ सूर्य अधिदैव सिद्ध आहे ॥ अधिभूत दृष्टी भरलें
पाहे ॥ शरीरीं चक्षुगोलही होये ॥ परी अध्यात्मतेजेंवीण राहे अंधत्व ॥ १८ ॥ अधिदैव अधिभूत असतां पाही ॥ अध्यात्म तेज जं
व दृष्टीसि नाहीं ॥ तंव देखणें न घडे कांहीं ॥ अंधत्व ते ठायीं ठसावोनि ठाके ॥ १९ ॥ अध्यात्म अधिभूत दोनी आहे ॥ जैं अधिदैव
सूर्य अस्ता जाय ॥ तैं दृष्टीचें देखणें ठाये ॥ स्तब्धत्वें राहे तमांमाजी ॥ ३२० ॥ ते काळीं दृष्टीसि पाहें ॥ स्नेहसूत्र मेळवूनि राहे ॥ अ
ग्नि जरी केला साह्ये ॥ तरी प्रकाशू नोहे रवीऐसा ॥ २१ ॥ तेथ चंद्रोदयो जरी जाहला ॥ तो सूर्यसमान नाहीं आला ॥ निशानिरसू

---

१ वेगळे. २ मनापासून होणारा संताप. ३ थोर. ४ धावानें. ५ अंधारांत. ६ उजेड.

नि दृष्टीं सात्य जाहला ॥ यालागीं सूर्य बोलिला अधिदैव ॥ २२ ॥ अध्यात्म अधिभूत असतां पाही ॥ अधिदैव सूर्य जेथ नाहीं ॥ तेथ दृष्टीचें नचले कांहीं ॥ तुज म्यां तेंही सांगीतलें ॥ २३ ॥ अध्यात्म अधिदैव दोनी आहे ॥ आधिभूतें दृश्यदर्शन राहे ॥ तैं सत्य ब्रह्मज्ञान होये ॥ जैं गुरुकृपा पाहे पूर्णांतें ॥ २४ ॥ येथ जें दृश्याचें दर्शन ॥ तेणें देहबुद्धि दृढ जाण ॥ तें दृश्याचें पुशिल्या भान ॥ होय देहेंशीं जाण शून्य संसार ॥ २५ ॥ अधिदैव अध्यात्म अधिभूत ॥ त्रिपुटी बोलिजे हे येथ ॥ तुज म्यां सांगीतली सांद्यंत[1] ॥ जाण निश्चित विभाग ॥ २६ ॥ तेथूनि त्रिपुटीचें विंदान ॥ दृश्य द्रष्टा आणि दर्शन ॥ कर्म कर्त्ता क्रियाचरण ॥ ध्येय ध्यान ध्यातृत्व ॥ २७ ॥ त्रिपुटी ह्मणावयाचें कारण ॥ परस्परें साक्षेपपण ॥ तें अपेक्षेचें लक्षण ॥ ऐक संपूर्ण सांगेन ॥ २८ ॥ नानाकारें अतिविलास ॥ येथ देखणी दृष्टी डोळस ॥ तेंही सूर्येंवीण वोस[2] ॥ हा अनुप्रवेश परस्परें ॥ २९ ॥ सूर्य आहे डोळा नाहीं ॥ तेथ पाहणें न चले पाही ॥ हो कां डोळा आहे सूर्य नाहीं ॥ तेथ दृष्टीचें कांहीं चालेना ॥ ३३० ॥ सूर्य आणि दृष्टी दोनी आहे ॥ परी दृश्य जैं नाहीं होये ॥ तैं दोहींचें सामर्थ्य राहे ॥ देखावें काये दृष्टीनें ॥ ३१ ॥ सूर्य प्रकाशी रूपासीं ॥ दृष्टी सात्य होय त्यासी ॥ दाखवी नाना आकारांसीं ॥ परस्परानुप्रवेशीं बोलिजे सिद्धि ॥ ३२ ॥ इतुकें करोनियां संविता[3] ॥ नभोमंडळीं अलिप्तता[4] ॥ तेवीं जगदाकारें चेतविता ॥ अलिप्त तत्त्वतां चिदात्मा ॥ ३३ ॥ जो जगामाजी भरला राहे ॥ जगाचा हृदयस्थही होये ॥ हें जग जरी होय जाये ॥ परी तो आहे जैसा तैसा ॥ ३४ ॥ जेवीं आकाशा अभ्यंतरीं[5] ॥ होतां घटाकाश सहस्रवरी ॥ आकाश त्या घटाभीतरी ॥ प्रत्यक्षाकारीं भरलें दिसे ॥ ३५ ॥ ते घटचि होति जाति ॥ परी आकाश सहजस्थिती ॥ तेवीं उत्पत्तिस्थितिअंतीं ॥ अलिप्त श्रीपती चिदात्मा ॥ ३६ ॥ तो आदीची अनादी आदी ॥ तो बुद्धीची अनादि बुद्धी ॥ तो सिद्धीची अनादि सिद्धि ॥ जाण त्रिशुद्धि परमात्मा ॥ ३७ ॥ हा प्रकाशां प्रकाशक ॥ अर्काचाही आदि अर्क ॥ स्वयें त्रिपुटीचा प्रकाशक ॥ अलिप्त एक परमात्मा ॥ ३८ ॥ हा विवेकांचा[6] विवेक ॥ हा सुखाचा सुखदायक ॥ बुद्धीचा जो बोधकं[7] ॥ प्रकाशां प्रकाशक परमात्मा ॥ ३९ ॥ त्यासि जाणोजातां जाणणें ॥ वेदांसि जाहलें लाजिरवाणें ॥ वेडावलीं स्मृति पुराणें ॥ न कळे शास्त्रपठणें भांडतां ॥ ३४० ॥ देवो देवी आणि देवता ॥ भोग्य भोग आणि भोक्ता ॥ नाना त्रिपुटींची त्रिगुणता ॥ जाण तत्त्वतां त्रिपुटीचि हे ॥ ४१ ॥ हा आद्य अव्यक्त अतर्क्य ॥ प्रकृति पुरुष परमात्मा एक ॥ यासि जाणावया विवेक ॥ नचले देव आणिकांचा ॥ ४२ ॥ यचिनि हा हृदयीं देखिजे ॥ याचेनि हा इत्थंभूत जाणिजे ॥ यातें धरोनि हा पाविजे ॥ हेंही लाहिजे[8] कृपें

---

[1] आरंभापासून तों शेवटापर्यंत. [2] शून्य. [3] सूर्य. [4] न लागणारा. [5] आंत. [6] ज्ञानाचा. [7] ज्ञान देणारा. [8] मिळतो.

याचेनी ॥ ४३ ॥ हा स्वप्रकाश सहज निजे ॥ याशीं प्रकाशी ऐसें नाहीं दुजें ॥ याचेनि प्रकाशें हा देखिजे ॥ याचेनि होइजे या ऐसें
॥ ४४ ॥ अधिदैव अध्यात्म अधिभूत ॥ नेत्रद्वारां सांगीतलें तेथ ॥ तैसेंच अन्यइंद्रियीं व्यावृत्त ॥ देव सांगत संक[1]लितें ॥ ४५ ॥ ॥ श्लो
क ॥ ॥ एवं त्वगादि श्रवणादि चक्षुर्जिह्वादि नासादि च चित्तयुक्तम् ॥ ३१ ॥ योऽसौ गुणक्षोभकृतो विकारः प्रधानमूलान्महतः प्रसू
तः ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रधाना[2]पासाव महदादिद्वारा ॥ नाना विकारांचा पसारा ॥ गुणक्षोभें क्षोभूनि पुरा ॥ उठी उभारा त्रिपुटीरूपें ॥ ४६ ॥
जेवीं सूर्यें चक्षुरादि विंदान ॥ तैसेंचि श्रोत्र त्वचा रसनादि घ्राण ॥ हें ज्ञानेंद्रियपंचक जाण ॥ याचें कर्म प्रधान त्रिपुटीरूपें ॥ ४७ ॥
येथ कर्मेंद्रियें पांच आ[3]न ॥ तीं ज्ञानेंद्रियां [4]अधीन ॥ हस्त पाद गुद शिश्न ॥ वाचा जाण पांचवी ॥ ४८ ॥ त्यांसि ज्ञानेंद्रियें प्रेरिती ॥
तें कर्मेंद्रियें कर्मीं वर्तती ॥ एवं उभयइंद्रियस्थिती ॥ जाण निश्चितीं दशेंद्रियें ॥ ४९ ॥ चि[5]त्तचतुष्टयचमत्कार ॥ मन बुद्धि चित्त अहंकार ॥
हीं एकचि परी भिन्नकार ॥ जैसा व्यापार तैसें नांव ॥ ३५० ॥ केवळ देहाकारें मीपण ॥ तो सबळ अहंकार जाण ॥ संकल्प विकल्प
जे गहन ॥ तेंचि मन उद्धवा ॥ ५१ ॥ गतभोगाचें जें चिंतन ॥ तें चित्ताचें लक्षण ॥ केवळ निश्चयात्मक जाण ॥ बुद्धि संपूर्ण तीनांव
॥ ५२ ॥ हें गुणक्षोभाचें लक्षण ॥ भोगसाधन भोग्य जाण ॥ त्याहूनि भोक्ता तो भिन्न ॥ तेंही लक्षण अवधारीं ॥ ५३ ॥ त्वगिंद्रियीं
विषयस्पर्शन ॥ तेथें अधिदैव वायू जाण ॥ त्याहूनि परमात्मा भिन्न ॥ चित्[6]स्वरूपें जाण अविकारी ॥ ५४ ॥ रसनेंद्रिय अतिगहन ॥
रसविषयो तेथील जाण ॥ वरुण अधिदैवत आपण ॥ आत्मा स्वानंदपूर्ण रसातीत ॥ ५५ ॥ गंधविषयो घ्राणेंद्रियें ॥ तेथ अधिदैवत
अश्विनीदेव होये ॥ आत्मा त्याहूनि वेगळा पाहे ॥ चित्स्वरूपें राहे अविकारी ॥ ५६ ॥ श्रवणेंद्रियीं विषयो शब्द ॥ तेथ दिशा अधिदै
वत प्रसिद्ध ॥ शब्दीं निजात्मा निःशब्द ॥ चिदत्वें शुद्ध अविकारी ॥ ५७ ॥ चक्षुरिंद्रियलक्षण ॥ पूर्वीं निरूपिलें जाण ॥ हें ज्ञानेंद्रियविं
दान ॥ त्रिपुटी संपूर्ण ऐशा रीतीं ॥ ५८ ॥ चित्त इंद्रिय जें कां येथ ॥ चिंतन विषयो त्यासि प्राप्त ॥ तेथ वासुदेव अधिदैवत ॥ आत्मा
अलिप्त चित्तेंसी ॥ ५९ ॥ मनेंद्रिय अतिचपळ ॥ संकल्प विषयो त्याचा प्रबळ ॥ तेथ अधिदैवत चंद्र निर्मळ ॥ आत्मा केवळ मनाती
त ॥ ३६० ॥ अहंकार इंद्रिय कठिण ॥ तेथील विषयो मीपण ॥ रु[7]द्र अधिदैवत जाण ॥ परमात्मा भिन्न अहंकारेंसी ॥ ६१ ॥ बुद्धीं
द्रिय अतिसज्ञान ॥ बो[8]द्धव्य तेथींचा विषयो जाण ॥ ब्रह्मा अधिदैवत आपण ॥ आत्मा चिद्घन बुद्ध्यतीत ॥ ६२ ॥ चित्तचतुष्टय सका
रण ॥ त्रिपुटी सांगीतली हे संपूर्ण जाण ॥ आतां कर्मेंद्रियांचें लक्षण ॥ ऐक संपूर्ण सांगेन ॥ ६३ ॥ वागिंद्रियीं वाच्य विषयो ॥ अग्नि

---

[1] संक्षेपानें. [2] प्रकृतीपासून. [3] दुसरीं. [4] स्वाधीन. [5] मन, बुद्धि, चित्त, अहंकार. [6] चैतन्यरूपानें. [7] तमोगुणाची देवता. [8] जाणणें.

अधिदैवत तेथील पहा हो ॥ तेथ सरस्वतीशक्तीचा निर्वाहो ॥ यासि अलिप्त[1] देवो महामौनें ॥ ६४ ॥ पाणींद्रियीं ग्रहण विषयो ॥ इंद्र अधिदैवत तेथील पहा हो ॥ तेथ क्रियाशक्तीचा निर्वाहो ॥ यासि अलिप्त देवो अक्रियत्वें ॥ ६५ ॥ पादेंद्रियीं गति विषयो ॥ तेथें उपेंद्र अधिदैवो ॥ तेथें गमनशक्तीचा निर्वाहो ॥ यासि अलिप्त देवो निश्चलत्वें ॥ ६६ ॥ गुदेंद्रियीं विसर्ग विषयो ॥ निर्ऋति अधिदैवत तेथील पहाहो ॥ क्षरशक्तीचा तेथ निर्वाहो ॥ त्यासि अलिप्त देवो अक्षरत्वें ॥ ६७ ॥ शिश्नेंद्रियीं रति विषयो ॥ प्रजापति तेथें अधिदेवो ॥ आनंदशक्तीचा तेथें निर्वाहो ॥ त्यासि अलिप्त देवो परमानंदें ॥ ६८ ॥ ज्ञानकर्मेंद्रियें कर्माचरण ॥ चित्तचतुष्टयाचें लक्षण ॥ हें गुणक्षोभाचें कारण ॥ समूळ जाण मायिक ॥ ६९ ॥ तेंचि गुणक्षोभाचें प्रधान मूळ ॥ प्रकृतिविकारें होय स्थूळ ॥ आत्मा अविकारी[3] निर्मळ ॥ अलिप्त केवळ प्रकृतीसी ॥ ३७० ॥ जेवीं वृत्तिभूमीसमवेत ॥ गृहीं गृहसामग्री समस्त ॥ अभिमानें उपार्जी गृहस्थ ॥ परी तो त्याअतीत आपण जैसा ॥ ७१ ॥ तेवीं त्रिगुणक्षोभें अभिमान ॥ वाढवी नाना विकारवन ॥ आत्मा वसंत तो भिन्न ॥ तेंचि निरूपण हरि बोले ॥ ७२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अहं त्रिवृन्मोहविकल्पहेतुर्वैकारिकस्तामस ऐंद्रियश्च ॥ ३२ ॥ आत्मा परिज्ञानमयो विवादो त्यस्तीतिनास्तीतिभिदाऽर्थनिष्ठः ॥ ॥ टीका ॥ ॥ अहंअध्यासें[4] संसारप्राप्ती ॥ जीवासि लागली निश्चिती ॥ त्या अहंकाराचे निवृत्तीं ॥ भवनिर्मुक्ती जीवासी ॥ ७३ ॥ ऐसा बाधकत्वें दुर्धर ॥ कैंचा उठिला अहंकार ॥ नाहीं पुसों पाहसी विचार ॥ ऐक साचार सांगेन ॥ ७४ ॥ स्वस्वरूपातें विसरून ॥ दृढ जें स्फुरे मीपण ॥ तोचि अहंकार जाण ॥ विकारें त्रिगुण क्षोभक ॥ ७५ ॥ जागृतीचा जो विसरू ॥ तोचि स्वप्नसृष्टीचा विस्तारू ॥ वस्तुविमुख जो अहंकारू ॥ तोचि संसारू गुणात्मक ॥ ७६ ॥ विकारें क्षोभती तिन्ही गुण ॥ हें विस्मरण मोहाचें लक्षण ॥ तेणें विकारले तीन गुण ॥ ते विकार भिन्न अवधारी ॥ ७७ ॥ मुळीं बोलिला वैकारिकू ॥ तो अहंकार जाण सात्विकू ॥ तो चित्तचतुष्टयद्योतकू[5] ॥ होय प्रकाशकू अधिदैवें ॥ ७८ ॥ सत्वापासोनि उपजे मन ॥ मनापासाव विकार गहन ॥ यालागीं वैकारिक जाण ॥ सत्वगुण बोलिजे ॥ ७९ ॥ ज्ञान कर्म उभय पंचक ॥ हा इंद्रियांचा दशक ॥ जाहला रजोगुणद्योतक ॥ यालागीं ऐंद्रियक ह्मणो पैं त्यासी ॥ ३८० ॥ तामस गुण जो कां येथें ॥ आकाशादि अपंचीकृतें ॥ आवरणरूपें महाभूतें ॥ विषयसमवेतें उपजवी ॥ ८१ ॥ महाभूतें विषयपंचक ॥ झाला तमोगुण प्रकाशक ॥ यालागीं भूतादि[6] देख ॥ यासि आवश्यक बोलिजे ॥ ८२ ॥ एवं त्रिगुणगुणविकारें ॥ काम्यकर्मसंस्कारें ॥ सबळ होऊनि अहंकारें ॥ संसारीं संचरे नानाहेतु ॥ ८३ ॥ या प्रकृति[7]विकारांपासून ॥ आत्मा अतिशयें भिन्न ॥

---

१ आसक्त न होणारा. २ मृत्यु. ३ विकाररहित. ४ हें माझें, हा मी, अशा चिंतनानें. ५ प्रकाशकरणारा. ६ भूतांच्या अगोदर. ७ माया.

जेवीं मृगजळातें भरून ॥ अलिप्त भान नभामाजी[1] ॥ ८४ ॥ जैसा प्रकाशोनि सर्पाकार ॥ सर्पासि नातळे स्वयें दोर ॥ तेवीं प्रकाशोनि संसार ॥ निःसंग निर्विकार निजात्मा ॥ ८५ ॥ जेवीं कृष्ण पीत रक्त श्वेत ॥ स्फटिक ठेवितां तेथ तेथ ॥ जरी तदाकार भासत ॥ तरी तो अलिप्त शुद्धत्वें ॥ ८६ ॥ तैसा गुणसंगें जीवात्मा बद्ध ॥ दिसे तरी तो अतिशुद्ध ॥ हा नेणोनियां निजबोध ॥ करिती विवाद मतवादी ॥ ८७ ॥ एक ह्मणती आत्मा देही ॥ एक ह्मणती तो विदेही[2] ॥ एक ह्मणती आत्म्याच्याठायीं ॥ हे दोन्ही नाहीं सर्वथा ॥ ८८ ॥ एक ह्मणती आत्मा सगुण ॥ एक ह्मणती तो गुणविहीन ॥ एक ह्मणती ते वेगळी खूण ॥ सगुण निर्गुण परमात्मा ॥ ८९ ॥ एक प्रतिपादिती भेद ॥ एक प्रतिपादिती अभेद ॥ एक ह्मणती दोनी अबद्ध ॥ आमुचें मत शुद्ध देहात्मवादें ॥ ३९० ॥ एक ह्मणती हें मिथ्याभूत ॥ प्रत्यक्ष दिसताहे जो येथ ॥ तो प्रपंच मानिती सत्य ॥ हेंचि मत एकाचें ॥ ९१ ॥ ऐसे भेदवाद सकळ ॥ विचारितां अज्ञानमूळ ॥ आत्मा चिन्मात्र[3] केवळ ॥ भेदातें समूळ छेदक ॥ ९२ ॥ आत्मा परिज्ञानमय शुद्ध ॥ हें श्लोकींचें मूळ पद ॥ तेणें निरसे अज्ञानभेद ॥ आत्मा शुद्ध बुद्ध चिदात्मा ॥ ९३ ॥ जेवीं सनक्षत्ररजनी[4] ॥ निवटीत[5] प्रकटे तरणी[6] ॥ तेवीं सभेदकार्य निरसूनी ॥ प्रकटे चित्किरणीं चिद्भानू ॥ ९४ ॥ जेथ गुणेंसि माया उडे ॥ भेदासहित वाद बुडे ॥ मूळासह अज्ञान खुंडे[7] ॥ चहूंकडे सच्चिदानंद ॥ ९५ ॥ आत्मा सच्चिदानंद पूर्ण ॥ तेथ सकळ मिथ्या अज्ञान ॥ तें अज्ञाननिरासीं साधन ॥ विवेक सांख्य ज्ञान व्यर्थ दिसे ॥ ९६ ॥ तेचि विषयींचें निरूपण ॥ श्लोकार्धें सुलक्षण ॥ स्वयें सांगताहे श्रीकृष्ण ॥ साध्यसाधनविभाग ॥ ९७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ व्यर्थोऽपि नैवोपरमेत पुंसां मत्तः परावृत्तधियां स्वलोकात् ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ मूळीं समूळ मिथ्या अज्ञान ॥ अज्ञानजन्य विषयभान ॥ तें देखोनि भुलले जन ॥ पडिलें विस्मरण स्वस्वरूपीं ॥ ९८ ॥ मी परमात्मा हृदयस्थ सन्निधी ॥ त्या मजपासोनि उपरमे बुद्धी ॥ मग विषयासक्ति त्रिशुद्धी ॥ आवडे उपाधी देह गेह[8] दारा[9] ॥ ९९ ॥ जें स्वस्वरूपाचें विस्मरण ॥ तें वाढवी तीव्र विषयध्यान ॥ तेणें जीवासि जन्ममरण ॥ अनिवार जाण देहाभिमानें ॥ ४०० ॥ तो नासावया देहाभिमान ॥ वैराग्ययुक्त ज्ञान ध्यान ॥ मींचि बोलिलों साधन ॥ समूळ अज्ञानच्छेदक ॥ १ ॥ जंववरी अंगीं देहाभिमान ॥ तंव अवश्य पाहिजे साधन ॥ निःशेषं[10] निरसल्या अज्ञान ॥ वृथा साधन मीही मानीं ॥ २ ॥ ह्मणशी तें कोण पां अज्ञान ॥ जें शुद्धासि लावी जीवपण ॥ त्या जीवा अंगीं जन्ममरण ॥ अनिवार जाण वाढवी ॥ ३ ॥ स्वस्वरूप विसरोनि जाण ॥ देहीं स्फुरे जें मीपण ॥ अत्यंत दृढतर अज्ञान ॥ तो देहाभिमान उद्धवा ॥ ४ ॥ गौण नांव त्याचें अज्ञान ॥ येऱ्हवीं

---

१ आकाशांत. २ देहरहित. ३ ज्ञानरूपी. ४ रात्री. ५ नाशोत. ६ सूर्य. ७ नाहींसें होई. ८ घर. ९ स्त्री. १० संपूर्ण.

मुख्यत्वें देहाभिमान ॥ हें ऐकोनि देवाचें वचन ॥ दचकलें मन उद्धवाचें ॥ ५ ॥ तेचि अर्थींचा प्रश्न ॥ देवासि पुसे आपण ॥ कोण्या युक्तीं देहाभिमान ॥ जन्ममरण भोगवी ॥ ६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धवउवाच ॥ ॥ त्वत्तः परावृत्तधियः स्वकृतैः कर्मभिः प्रभो ॥ उच्चावचान् यथा देहान् गृह्णंति विसृजंति च ॥ ३४ ॥ ॥ टीका ॥ ॥ सर्वत्र सदा संमुख गगन ॥ त्यासि कदा न घडे विमुखपण[1] ॥ तेवीं सबाह्य[2] आत्मा परिपूर्ण ॥ वृत्ति विमुख जाण होय कैशी ॥ ७ ॥ जैं जाळीं बांधवे गगन ॥ तैं अक्रिया लागे कर्मबंधन ॥ वंध्या गर्भ सटवे जाण ॥ जैं जन्ममरण मुक्तांसी ॥ ८ ॥ आत्म्यावेगळें कांहीं ॥ रितें तंव उरलें नाहीं ॥ तरी ये देहींचा ते देहीं ॥ गमनसिद्धी पाही कैसेंनी ॥ ९ ॥ पृथ्वी रुसोनि ओसरां राहे ॥ आकाश पळोनि पऱ्हां[3] जाय ॥ तैं देहींचा देहांतरा पाहे ॥ आत्मा लाहे संसरण ॥ ४१० ॥ सात समुद्र गिळी मुंगी ॥ तैं आत्मा ऊंचनीच योनी भोगी ॥ हें अतर्क्य तर्केना मार्गीं ॥ भुलले योगी ये अर्थीं ॥ ११ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तन्ममाख्याहि गोविंद दुर्विभाव्यमनात्मभिः ॥ नह्येतत्प्रायशो लोके विद्वांसः संति वंचिताः ॥ ३५ ॥ ॥ टीका ॥ ॥ अभिनव[4] हे तुझी गती ॥ सर्वथा नकळे श्रीपती ॥ मायामोहित जे चित्तीं ॥ त्यां तुझी स्थिती नेणवे ॥ १२ ॥ तूं आत्मा अद्वितीय अविनाश ॥ तेथ उत्पत्ति स्थिती विनाश ॥ नाथिला दाविशी भवभास ॥ हा अतर्क्य विलास तर्केना ॥ १३ ॥ येथ वेदाची युक्ती ठेली ॥ उपनिषदें[5] वेडावलीं ॥ पुराणें मुकीं झालीं ॥ अतियत्नें लक्षिलीं नवचेचि मार्गीं ॥ १४ ॥ तुझे केवळ कृपेवीण ॥ तुझें इत्थंभूत नव्हे ज्ञान ॥ ऐसे जड मूढ हरिकृपाहीन ॥ त्यांसि भवबंधन तुटेना ॥ १५ ॥ तुझे योगमायेची अतर्क्यता ॥ ब्रह्मा भुलविला वत्सें नेतां ॥ शिवू भुलविला मोहनी देखतां ॥ इतरांची कथा ते कोण ॥ १६ ॥ प्रपंचीं अथवा परमार्थीं ॥ तुझेनि चालती इंद्रियवृत्ती ॥ यालागीं गोविंदनामाची ख्याती ॥ त्रिजगतीं वाखाणिली ॥ १७ ॥ सादर कृपापूर्वक आपण ॥ माझा सांगावा अतर्क्य[6] प्रश्न ॥ देहीं देहांतरीं संचरण ॥ जीवासि जन्ममरण तें कैसें ॥ १८ ॥ ऐकोनि उद्धवाचा प्रश्न ॥ हांसिनला मधुसूदन[7] ॥ हें अवघें मायिक जाण ॥ कल्पनाविंदान मनोमय ॥ १९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ मनः कर्ममयं नृणामिंद्रियैः पंचभिर्युतम् ॥ लोकाल्लोकं प्रयात्यन्य आत्मा तदनुवर्त्तते ॥ ३६ ॥ ॥ टीका ॥ ॥ अकरा इंद्रियें पंच महाभूतें ॥ हें सोळाकळांचें लिंगदेह येथें ॥ मुख्यत्वें प्राधान्य मनाचें तेथें ॥ नानाविषयांतें कल्पक ॥ ४२० ॥ येथ लिंगदेह तेंचि मन ॥ मनाअधीन इंद्रियें जाण ॥ मनाचेनि देहासि गमन ॥ तेथ देहाभिमान मनासवें ॥ २१ ॥ मन ज्यातें सोडूनि जाये ॥ तेथ अभिमान उभा न राहे ॥ मनोवेगें अभिमान पाहे ॥ देहाचा वाहे खटाटोप ॥ २२ ॥ जेथ विषयासक्त मन ॥ करी शुभाशुभ कर्माचरण ॥

---

१ पराङ्मुखत्व. २ आंत बाहेर. ३ गांवांतील पाण्याचा ओढा. ४ चमत्कारिक. ५ वेदशिरोभाग. ६ तर्क करण्यास अशक्य. ७ मधु दैत्याला मारणारा.

तेव्हां होऊनि कर्माधीन ॥ देही करी गमन देहांतरा[1] ॥ २३ ॥ आत्मा यासि अलिप्त भिन्न ॥ परी देहासवें दावी गमन ॥ हें अति अतर्क्य
विंदान ॥ ऐक लक्षण तयाचें ॥ २४ ॥ घट जेथ जेथ हिंडों बैसे ॥ आकाश त्यासवें जात दिसे ॥ परी ढळणें नाहीं आकाशें ॥ आ
त्म्याचें तैसें गमन येथें ॥ २५ ॥ घटामाजी भरिजे अमृत ॥ अथवा घालिजे खातमूत ॥ आकाश दोहींशीं अलिप्त ॥ तेवीं सुखदुःखा
तीत देहस्थ आत्मा ॥ २६ ॥ घट घायें कीजे शतचूर ॥ परी आकाशीं न निघे चीर ॥ तेवीं नश्वरीं अनश्वर[2] ॥ जाण साचार निजात्मा
॥ २७ ॥ घट फुटोनि जेथ नाशे ॥ तेथ आकाश आकाशीं सहज असे ॥ नवा घट जेथ उपजों बैसे ॥ तों तेथ आकाशें व्यापिजे ॥ २८ ॥
तेवीं देहाचें नश्वरपण ॥ आत्मा अखंडत्वें परिपूर्ण ॥ आत्म्यासि देहांतरगमन ॥ जन्ममरण असेना ॥ २९ ॥ देहीचें देहांतरगमन ॥ वास
नायोगें करी मन ॥ तें मनोगमनाचें लक्षण ॥ ऐक संपूर्ण सांगेन ॥ ४३० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ध्यायन्मनोऽनुविषयान् दृष्टान्वाऽनुश्रुता
नथ ॥ उद्यत्सीदत् कर्मतंत्रं स्मृतिस्तदनु शाम्यति ॥ ३७ ॥ ॥ टीका ॥ ॥ श्रुतदृष्टविषयांचें ध्यान ॥ निरंतर वाढवी मन ॥ तीव्र धारण
दारुण ॥ अन्य स्फुरण स्फुरेना ॥ ३१ ॥ आवडल्या विषयाचें ध्यान ॥ अंतकाळीं ठसावे जाण ॥ तेव्हां तदाकार होय मन ॥ सर्वभावें
आपण तन्निष्ठा ॥ ३२ ॥ तेव्हां भोगक्षयें जाण ॥ मागल्या देहाचा अभिमान ॥ सहजेंचि विसरे मन ॥ पुढील ध्यान एकाग्रतां[3] ॥ ३३ ॥
विषयवासनारूढ मन ॥ निजकर्मतंत्रें जाण ॥ देहांतरीं करी गमन ॥ तेथ सप्राणं[4] संचरे ॥ ३४ ॥ मागील सांडिल्या देहातें ॥ सर्वथा
स्मरेना चित्तें ॥ पुढें धरिलें आणिकातें ॥ हेंही मनातें स्मरेना ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विषयाभिनिवेशेन नात्मानं यत्स्मरेत्पुनः ॥ जंतो
र्वै कस्यचिद्धेतोर्मृत्युरत्यंतविस्मृतिः ॥ ३८ ॥ जन्म त्वात्मतया पुंसः सर्वभावेन भूरिद ॥ विषयस्वीकृतिं प्राहुर्यथा स्वप्नमनोरथः ॥ ३९ ॥
॥ टीका ॥ ॥ विषयाभिनिवेशें मन ॥ ज्या स्वरूपाचें करी ध्यान ॥ तद्रूप होय आपण ॥ पूर्वदेहाचें स्मरण विसरोनियां ॥ ३६ ॥ तेंचि
विस्मरण कैसें ॥ निजबालत्व प्रौढवयसें ॥ निःशेष नाठवे मानसें ॥ पूर्वदेह तैसें विसरोनि जाय ॥ ३७ ॥ ऐसें अत्यंत विस्मरण ॥ त्या
नांव देहाचें मरण ॥ त्या विसरावें जाण ॥ चेतनां[5] सप्राण रिघोनि जाये ॥ ३८ ॥ जेव्हां चेतना जाय सप्राण ॥ तेव्हां देहासि ये प्रेत
पण ॥ त्या नांव उद्धवा मरण ॥ जन्मकथन तें ऐक ॥ ३९ ॥ स्नेहें द्वेषें अथवा भयें ॥ अंतकाळीं जें ध्यान राहे ॥ पुरुष तद्रूपचि होये ॥
जन्महीं लाहे तैसेंची ॥ ४४० ॥ भरत करितां अनुष्ठानं[6] ॥ अंतीं लागलें मृगाचें ध्यान ॥ तो मृगचि जाहला आपण ॥ ध्यानानुरूपें मन
जन्म पावे ॥ ४१ ॥ भयास्तव भृंगा[7]चें ध्यान ॥ कीटकीं[8] करितां जाण ॥ ते तद्रूप होय आपण ॥ ध्यानानुरूपें जन्म पावे ॥ ४२ ॥ द्वेषें

---

१ दुसऱ्या देहीं. २ अविनाशी. ३ तदाकार. ४ प्राणासहित. ५ चैतन्य. ६ नित्यनैमित्तिककर्म. ७ भ्रमराचें. ८ किड्यानें.

ध्यातां श्रीकृष्णासी ॥ तद्रूपता झाली पौंड्रकासी ॥ जैसें दृढ ध्यान मानसीं ॥ ते गति पुरुषासी त्रिशुद्धी ॥ ४३ ॥ वाढवूनियां संभ्रम ॥ अंतकाळीं आवडे सप्रेम ॥ जेथें ध्यान ठसावे मनोरम ॥ तेंचि जन्म पुरुषासी ॥ ४४ ॥ मग तेणें ध्यानानुभावें ॥ जैसा कांहीं आकारू संभवे ॥ तेथ देहाभिमान पावे ॥ हें मी आघवें ह्मणोनि ॥ ४५ ॥ येथ मन आणि अभिमान ॥ स्वरूप एक कार्यें भिन्न ॥ हें चित्तचतुष्टय लक्षण ॥ जाणती सज्ञान एकात्मता ॥ ४६ ॥ दैवयोगें त्या देहाचें ॥ बरवें बोखटें घडे साचें ॥ तैं अभिमान घेऊनि नाचे ॥ जन्म पुरुषाचें या नांव ॥ ४७ ॥ परी हें देह नव्हे आन[1] ॥ हेंही स्मरेना तें मन ॥ पूर्वील जो देहाभिमान ॥ तोचि येथ जाण आरोपी ॥ ४८ ॥ येचि अर्थींचा दृष्टांत ॥ स्वयें सांगताहे श्रीकृष्णनाथ ॥ जेवीं स्वप्न आणि मनोरथ ॥ विसरवित निजदेहा ॥ ४९ ॥ स्वगृहीं दरिद्री निद्रित ॥ तो स्वप्नीं होय अमरनाथ[2] ॥ मग उर्वशीप्रमुख अप्सरांत ॥ असे मिरवत ऐरावतीं ॥ ४५० ॥ तें दरिद्रदेह माझें गेलें ॥ हें अमर देह प्राप्त झालें ॥ ऐसें स्वप्नीं नाहीं आठवलें ॥ तैसें जन्म झालें जनासी ॥ ५१ ॥ मजूर राउळीचें घृत नेतां ॥ तो तुरंगीं चढे मनोरथा ॥ मन नाचूं लागे उल्हासता ॥ स्वकल्पित कल्पना ॥ ५२ ॥ सबळ वारू[3]चें उड्डाण ॥ ह्मणूनि उडूं जातां आपण ॥ पडोनि घृतकुंभ होय भग्न ॥ पुसती जन काय झालें ॥ ५३ ॥ बळें उडाला माझा घोडा ॥ परी स्मरेना तो फुटला घडा ॥ बंदीं पडला रोकडा ॥ नेणें बापुडा मनोरथें ॥ ५४ ॥ येथवरी तीव्र जें विस्मरण ॥ त्या नांव देहाचें मरण ॥ अतिउद्यत जें मनाचें ध्यान ॥ तेंचि जन्म प्राण्यासी ॥ ५५ ॥ एवं आत्म्यासि जन्म मरण ॥ तें केवळ भ्रमाचें लक्षण ॥ तेचि अर्थींचें निरूपण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ५६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्वप्नं मनोरथं चेत्थं प्राक्तनं न स्मरत्यसौ ॥ तत्र पूर्वमिवात्मानमपूर्वं चानुपश्यति ॥ ४० ॥ ॥ टीका ॥ ॥ स्वप्न देखत्या पुरुषासी ॥ विसरोनि निजदेहाँ[4]सी ॥ स्वप्नींच्या देहगेहांसी ॥ साभिमानेंसी वाढवी ॥ ५७ ॥ जागृतिदेहो राहिला तेथें ॥ स्वप्नदेहो पावलों येथें ॥ एवं पूर्व अपर देहींतें ॥ नरस्मरे चित्तें पुरुष जैसा ॥ ५८ ॥ जागृति आणि देखिलें स्वप्न ॥ या दोहीं देहासि देखता भिन्न ॥ तेवीं जन्म आणि मरण ॥ जीवासि जाण असेना ॥ ५९ ॥ एवं देहासि जन्म नाश ॥ आत्मा नित्य मुक्त अविनाश ॥ स्वप्नमनोरथविलास ॥ तैसा बहुवस संसार ॥ ४६० ॥ देहासि जन्म स्थि[5]ति मरण ॥ यांसि मनचि गा कारण ॥ मनःकल्पित संसार जाण ॥ तेंचि श्रीकृष्ण सांगत ॥ ६१ ॥ ॥ श्लोक ॥ इंद्रियायनसृष्ट्येदं त्रैविध्यं भाति वस्तुनि ॥ बहिरंतर्भिदाहेतुर्जनोऽसज्जनकृद्यथा ॥ ४१ ॥ ॥ टीका ॥ ॥ मनें कल्पिली सकळ सृष्टी ॥ मनःकृत इंद्रियकामाटी ॥ मनें वाढविली त्रिपुटी ॥ कर्मकसवटी विभागें ॥ ६२ ॥ अधिदैव अध्यात्म अधिभूत ॥ हें त्रैविध्य मनःकृत ॥

---

[1] हा आत्मा देह नव्हे देहाहून भिन्न वस्तु आहे. [2] इंद्र. [3] घोड्याचें. [4] आपल्या देहास. [5] असणें.

वस्तु अखंडचि तेथ ॥ त्रिधा भासत कल्पना ॥ ६३ ॥ जैसें भांडें कुंभार करी ॥ तेथ नभ दिसे तदाकारीं ॥ गगन सर्वथा अविकारी ॥
तें दिसे विकारी भांडयोगें ॥ ६४ ॥ तेवीं आत्मा अविकारी[1] नित्य शुद्ध ॥ तेथ मनःकल्पित त्रिविध ॥ नानापरीच्या त्रिपुटी विविध ॥
वाढविला भेद तो ऐक ॥ ६५ ॥ कार्य कर्म आणि कर्त्ता ॥ ध्येय ध्यान आणि ध्याता ॥ ज्ञेय ज्ञान आणि ज्ञाता ॥ या मनःकल्पिता त्रिविध
॥ ६६ ॥ अहं[2] कोहं[3] सोहं[4] भेद ॥ त्वंपद तत्पद असिपद ॥ सद चिद आणि आनंद ॥ हेही संबंध मायिक ॥ ६७ ॥ असतांचि ये निवृत्ती
॥ संतत्व प्रतिपादी वेदोक्ती ॥ जडाचिये समाप्ती ॥ चिदत्व बोलती वस्तूसी ॥ ६८ ॥ करितां दुःखाचा छेद ॥ वस्तूसि ह्मणती परमानंद
॥ एवं सच्चिद आनंद ॥ जाण प्रसिद्ध मायिक ॥ ६९ ॥ असंत मिथ्या मायिक पाही ॥ तैसें तत्त्व कोण ठेवी ठायीं ॥ जडासीचि
ठाव नाहीं ॥ तेथ चिदत्व कायी संपादे ॥ ४७० ॥ जेथ नाहीं दुःखसंबंध ॥ तेथ कोण ह्मणे आनंद ॥ एवंवस्तूच्या ठायीं सच्चिदानंद ॥
मायिक संबंध या हेतू ॥ ७१ ॥ येथ जें भासे संसारभान ॥ तें त्रिगुणत्रिपुटी विंदान ॥ सर्व मायिक मनःकृत जाण ॥ आत्मा तो भिन्न
गुणातीत ॥ ७२ ॥ आत्मा नित्य मुक्त शुद्ध बुद्ध ॥ तेथ भासे जो त्रिविध भेद ॥ तो मनःकृत गुणसंबंध ॥ जाण प्रसिद्ध मायिक ॥ ७३ ॥
पुरुष श्रोत्रिय सदाचार ॥ त्याची स्त्री करी व्यभिचार ॥ तेणें दोषी ह्मणती भ्रतारें[5] ॥ तैसा भेदप्रकार आत्म्यासी ॥ ७४ ॥ जेवीं स्वप्ना
माजी नर ॥ एकला होय संसार ॥ तो निद्रायोगें चमत्कार ॥ तैसा भेदप्रकार मायिक ब्रह्मीं ॥ ७५ ॥ जडाजड देहभेद ॥ परिच्छिन्नत्वें
जीवभेद ॥ हा स्वप्नप्राय मायिक बोध ॥ आत्मा नित्य शुद्ध द्वितीय ॥ ४७६ ॥ ऐसे मायाविभेदनिष्ठ जन ॥ त्यांसि वैराग्यसिद्ध्यर्थ
जाण ॥ काळकृत जन्म मरण ॥ तेंचि निरूपण हरि बोले ॥ ७७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नित्यदा ह्यंग भूतानि भवंति न भवंति च ॥ काले
नालक्ष्यवेगेन सूक्ष्मत्वात्तन्न दृश्यते ॥ ४२ ॥ ॥ टीका ॥ ॥ ह्मणे ऐक बापा उद्धवा ॥ स्थावरजंगमादि देहभावा ॥ काळाचिया काळप्रभावा
॥ लागला नीच नवा जन्ममृत्यू ॥ ७८ ॥ अतिसू[illegible]त काळगतीसी ॥ काळ ग्रासीतसे जगासी ॥ या अंगींच्या जन्ममृत्यूसी ॥
नेणवे जीवासी मायामोहें ॥ ७९ ॥ निजमाता बाळवयसीं ॥ प्रकटावयवीं[6] लाडवी पुत्रासी ॥ तेचि माता प्रौढवयसेंसी ॥ होय त्या
पुत्रासी सलज्ज ॥ ४८० ॥ ते बाल्यावस्था काळें नेली ॥ हे प्रौढवयसा नवी आली ॥ यालागीं माता सलज्ज झाली ॥ हे काळें केली
घडमोडी ॥ ८१ ॥ ऐसा नित्य नाश नित्य जन्म ॥ भूतांसि करी काळ सूक्ष्म ॥ या जन्ममृत्यूंचें वर्म[7] ॥ नेणती सभ्रम भ्रांत प्राणी ॥ ८२ ॥
जो अवस्थाभाग काळें नेला ॥ त्यासवें तो देहचि गेला ॥ पुढें वयसा नवी पावला ॥ तो काळें आणिला नवा देहो ॥ ८३ ॥ ऐसा

---

१ विकाररहित. २ मी. ३ कोण मी. ४ तो मी. ५ पति. ६ आच्छादन नसतां, नग्न असतां. ७ कारण.

संभव आणि असंभवो ॥ नीच नवा काळकून पहाहो ॥ यालागीं त्रिविधविकारी देहो ॥ स्वयें स्वयमेवो देखिजे ॥ ८४ ॥ अतर्क्य काळाची काळगती ॥ भूतें जन्ममृत्यु पावती ॥ ते अलक्ष्यगतीचे अर्थी ॥ दृष्टांत श्रीपती दावीत ॥ ८५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यथार्चिषां स्रोतसां च फलानां वा वनस्पतेः ॥ तथैव सर्वभूतानां वयोऽवस्थादयः कृताः ॥ ४३ ॥ ॥ टीका ॥ ॥ नित्य नूतन दीपज्वाळा ॥ होतां जातां नदिसती डोळां ॥ सवेग वाहता जळकल्लोळा ॥ यमुनाजळा नदेखिजे ॥ ८६ ॥ फळ न सांडितां वृक्षदेंठ ॥ कडवट तुरट आंबट ॥ तेंचि गोड होय चोखट ॥ ऐशी अतर्क्य अदृष्ट काळसत्ता ॥ ८७ ॥ तोचि काळ देहासरिसा ॥ नित्य नूतन लागला कैसा ॥ बाल्यतारुण्य वृद्धवयसा ॥ देहदशा पालटी ॥ ८८ ॥ मूढ कुशळ अशक्त ॥ अवस्था नाशी तये अवस्था ॥ तेंथ मी तोचि हें तत्त्वतां ॥ स्फुरे सर्वथा कैसेनी ॥ ८९ ॥ ऐसें कल्पील तुझें मन ॥ तेंचि अर्थीचें निरूपण ॥ अखंडस्फूर्तीचें कारण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ४९० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सोऽयं दीपोऽर्चिषां यद्वत् स्रोतसां तदिदं जलम् ॥ सोऽयं पुमानिति नृणां मृषा गीर्धीर्मृषायुषाम् ॥ ४४ ॥ ॥ टीका ॥ ॥ दीपज्वाळा होती जाती ॥ अग्नि जैसा पूर्वस्थिती ॥ यालागीं तोचि दीपू ह्मणती ॥ ऐशा युक्ती उद्धवा ॥ ९१ ॥ प्रवाह वाहती कल्लोळ ॥ परी अखंड एकचि जळ ॥ यालागीं ह्मणती सकळ ॥ तेंचि जळ या हेतू ॥ ९२ ॥ तेवीं देहीं वयसा होती जाती ॥ आत्मा अखंड अनुस्यूती ॥ तोचि मी हे स्फुरे स्फूर्त्ती ॥ या उपपत्ती[३] उद्धवा ॥ ९३ ॥ ह्मणसी मीपणें अहंकार रूढ ॥ तोही अज्ञानत्वें जडमूढ ॥ त्यासि प्रकाशक आत्मा दृढ ॥ मीपणें अखंड वस्तुत्वें स्फुरे ॥ ९४ ॥ येथ देहासीचि जन्म मरण ॥ आत्मा अखंडत्वें परिपूर्ण ॥ येथ देहात्मबुद्धीं मीपण ॥ ते वाचा जाण अतिमिथ्या ॥ ९५ ॥ विषयांची जे विषयसिद्धी ॥ देहीं जे कां देहबुद्धी ॥ तेही मिथ्या जाण त्रिशुद्धी ॥ भवबंधीं स्थापक ॥ ९६ ॥ कर्मभूमीं नरदेहाऐसें ॥ निधान[४] लाधलें अनायासें ॥ तेथिचेंनिही आयुष्यें ॥ जे विषयविलासें विगुंतले ॥ ९७ ॥ जो अमृत विकूनि कांजी प्याला ॥ रत्नें देऊनि कोंडा घेतला ॥ पर्वत फोडूनि टोळ धरिला ॥ गज[६] विकिला इटेसाठीं ॥ ९८ ॥ डोळे फोडोनि काजळ ल्याला ॥ नाक कापूनि शिमगा खेळला ॥ तैसा नरदेहा नाडला ॥ नाश केला आयुष्याचा ॥ ९९ ॥ वेंचिता धन लक्षकोटी ॥ आयुष्य क्षणाची नव्हे भेटी ॥ तेहीं वेंचिलें विषयासाठीं ॥ हतायु करंटीं अतिमूढें ॥ ५०० ॥ मुख्य देहोचि काल्पनिक जाण ॥ तेथील काल्पनिक अभिमान ॥ तें हें देहबुद्धीचें मीपण ॥ लावी दृढ[७] बंधन जगासी ॥ १ ॥ तें सांडितां देहाचें मीपण ॥ कैंचें जन्म कैंचें मरण ॥ तेव्हां संसारूचि नाहीं जाण ॥ भवबंधन मग कैंचें ॥ २ ॥ जैसा मिथ्या बागुलाचा भेवो ॥ बाळकें सत्य मानिला पहाहो ॥ तैसा मृषा

---

१ तर्ककरण्यास अशक्य. २ निराळो करो. ३ युक्ति. ४ ठेवा. ५ पेज. ६ हत्ती. ७ बळकट.

काल्पनिक देहो ॥ सत्यत्वें पहाहो मानिला ॥ ३ ॥ मिथ्या देहो आणि देहबुद्धी ॥ त्यासि पुढें कैसी जन्मसिद्धी ॥ मिथ्याभूतासि नव्हे वृद्धी ॥ तेविखींची विधी हरि बोले ॥ ४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मा स्वस्य कर्मबीजेन जायते सोप्ययं पुमान् ॥ म्रियते वाऽमरो भ्रांत्या यथाग्निर्दारुसंयुतः ॥ ४५ ॥ ॥ टीका ॥ ॥ देहात्मवादें हेहाभिमान ॥ जनीं वासनाबी[1]ज गहन ॥ तेणें स्वसंकल्पें आपण ॥ मानी जन्ममरण नसतेंची ॥ ५ ॥ तेणें देहाभिमानें आपण ॥ अहं कर्म कर्त्ता क्रियाचरण ॥ निष्कर्मा कर्मबंधन ॥ अ[2]मरा जन्ममरण आरोपी ॥ ६ ॥ थि[3]ल्लराचेनि जाहलेपणें ॥ त्यांत सूर्याचें जन्म मानणें ॥ थिल्लरनाशें सूर्याचें जिणें ॥ नासलें ह्मणे बाळक ॥ ७ ॥ तेवीं अजन्म्यासि जन्म कर्म ॥ मानिती तो मायिक भ्रम ॥ येचिविषयीं पुरुषोत्तम ॥ दृष्टांत सुगम सांगत ॥ ८ ॥ जैसा अग्नि अजन्मा अ[4]व्यक्त ॥ त्यासि काष्ठीं जन्मला ह्मणत ॥ दिसे काष्ठाकारें आकारवंत ॥ काष्ठनाशें मानित नाश त्यासी ॥ ९ ॥ येथ देहासीच जन्म नाश ॥ आत्मा नित्य अविनाश ॥ देह अवस्था नवविलास ॥ स्वयें हृषीकेश सांगत ॥ ५१० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ निषेकगर्भजन्मानि बाल्य कौमारयौवनम् ॥ वयोमध्यं जरा मृत्युरित्यवस्थास्तनोर्नव ॥ ४६ ॥ ॥ टीका ॥ देहींच्या अवस्था त्या नव ॥ ऐक तयाचाही स्वभाव ॥ भिन्न विभाग वैभव ॥ यथागौरव सांगेन ॥ ११ ॥ पितृदेहीं पावोनि शुक्रत्व ॥ तेथूनि जननीजठर प्राप्त ॥ त्यानांव निःशंक बोलिजेत ॥ देहींची हे येथ प्रथमावस्था ॥ १२ ॥ जननीजठरीं रुधिरयुक्त ॥ मुं[5]सावोनि खोटी होत ॥ क्षणक्षणां वृद्धि प्राप्त ॥ गर्भ तो येथ दुजी अवस्था ॥ १३ ॥ प्रसूतिवाताच्या आघातीं ॥ उदराबाहेर उत्पत्ती ॥ त्यानांव जन्म बोलती ॥ जाण निश्चितीं तिजी अवस्था ॥ १४ ॥ अतिशयें आवडे स्तनपान ॥ मुख्यत्वें माताचि प्राधान्य ॥ रुदनाचें बळ संपूर्ण ॥ ते चौथी जाण बाल्यावस्था ॥ १५ ॥ मळमूत्रीं लोळे अज्ञान ॥ गुदेंद्रिय विवेकेंशून्य ॥ गोड गोजिरें कळ भाषण ॥ पंचहायनं[6] बाल्यावस्था ॥ १६ ॥ इंद्रियीं चेतना वाढत ॥ परी पोटीं नाहीं विषयस्वार्थ ॥ खेळावरी आसक्तचित्त ॥ ते पांचवी येथ कुमारावस्था ॥ १७ ॥ याउपरी तरुणपण ॥ इंद्रियसामर्थ्य संपूर्ण ॥ मी शहाणा मी सज्ञान ॥ देहीं देहाभिमान मुसमुशी ॥ १८ ॥ तेथ स्त्रीकाम आवडे चित्तीं ॥ धनकामाची अतिप्रीती ॥ देहगेहांची आसक्ती ॥ नामरूपाची ख्याती लौकिकीं मिरवी ॥ १९ ॥ श्रीमदें गर्वितमानस ॥ स्त्रीपुत्रांचा अतिउल्हास ॥ तृष्णा दुर्धर अतिसोस ॥ कामक्रोधांचा बहुवस वळसा भोंवे ॥ ५२० ॥ नसाहे ऐकिलेपण ॥ तूं ह्मणतां टाकी प्राण ॥ ते सहावी अवस्था जाण ॥ तरुणपण अनर्थ ॥ २१ ॥ पंधरापासोनि पंचवीस ॥ पूर्ण तरुणपणाचा पैस ॥ तेथ नानाविकारी मानस ॥ नांदवी सावकाश देहाभिमान ॥ २२ ॥ चाळिसापासोनि

---

१ बीं. २ मरणरहितास. ३ खातोदकाच्या. ४ अस्पष्ट. ५ सांठवून. ६ पांच वर्षें.

साठीवरी ॥ देहीं उत्तरवयसा पुरी ॥ झुरडी पडों लागे शरीरीं ॥ इंद्रियशक्ति करी प्राशन काळ ॥ २३ ॥ क्षीणपणाचा सुमुहूर्त ॥ काळ आरंभ करी जेथ ॥ ते हे उत्तरावस्था येथ ॥ जाण निश्चित सातवी ॥ २४ ॥ तेचि हातधरणी जरा ॥ कांपवीतसे सुभटां नरां ॥ भोग न साहे शरीरा ॥ इंद्रियव्यापाराहारासी ॥ २५ ॥ अस्त व्यस्त केला शरीरवेश ॥ दांताळी[1] पाडिली वोस ॥ भेणें पालटे केश ॥ धाकें सीस[2] कांपत ॥ २६ ॥ शरीर जरा करी क्षीण ॥ तरी विषयावस्था अतिगहन ॥ चिंता अनिवार दारुण ॥ तृष्णा अपूर्ण सर्वदा ॥ २७ ॥ तेज सांडूनि जाय नयना ॥ टाळी पडोनि ठाती काना ॥ मुखीं लागे चोरपान्हा ॥ तरी देहाभिमाना वाढवी ॥ २८ ॥ जरा पावलिया निज संधी ॥ अनिवार येती आधिव्याधी[3] ॥ महामोहें व्यापिजे [illegible]द्धी ॥ विवेक त्रिशुद्धीं बुडाला ॥ २९ ॥ पायां पडे वेंगडी ॥ आधार टेंकण लांकुडी[4] ॥ त्वचा लफलफी जडत्वें गाढी ॥ हाले होंटाची जोडी उंदिरप्राय ॥ ५३० ॥ डोळां चिपडीं तोंड भरे ॥ नाकींची लोळी वोठीं उतरे ॥ मुखींचे लाळेचिया धारें ॥ थिबथिबिजे उरें चिकटोनी ॥ ३१ ॥ चुंबन लागेना तोंडाप्रती ॥ ती थुंका ह्मणोनि दूर पळती ॥ उसंत नाहीं खोकल्या हातीं ॥ श्वास कास उठती अनिवार ॥ ३२ ॥ शरीरीं थरकंप उठी ॥ तरी देहाभिमान दृढ पोटीं ॥ अवघ्यातें ह्मणे धाकुटीं ॥ सांगे जुनाट गोष्टी मोठमोठ्या ॥ ३३ ॥ अधोवाताचें वावधान ॥ अनिवार सुटे जाण ॥ जीवें जितां विटंबण ॥ हें जरा जाण आठवी अवस्था ॥ ३४ ॥ जेवीं सुईमागें दोरा जाण ॥ तेवीं जरेसवें असे मरण ॥ जरा शरीर पाडी क्षीण ॥ तंव वाजे निशाण मृत्यूचें ॥ ३५ ॥ देहीच्या तुटल्या नाडी ॥ वाचा होंलागे बोबडी ॥ तरी देहाची धरी गोडी ॥ अधिक आवडी स्त्रीपुत्रांची ॥ ३६ ॥ मज मागें हे अनाथें[5] ॥ कोण सांभाळील यांतें ॥ पोटासी धरोनि त्यांतें ॥ रडे बहुतें आक्रोशें ॥ ३७ ॥ द्रव्यलोभ अतिकठिण ॥ अंतीं न वेंची आपण ॥ दूरी करूनि इतर जन ॥ सांगे उणखूण ठेव्याची ॥ ३८ ॥ नवल वासनाविंदान ॥ विसरोन देहाचें स्मरण ॥ सर्वस्वें जे धरिजे आठवण ॥ तेंचि आपण दृढ होय ॥ ३९ ॥ या देहाची निःशेष आठवण ॥ ते नाठवणें सवेंचि जाण ॥ चेतनासहित जाय प्राण ॥ या नांव मरण देहाचें ॥ ५४० ॥ एवं गर्भादि मरणांता ॥ या देहींच्या नव अवस्था ॥ येथ आत्म्याची अलिप्तता[6] ॥ स्वभावतां देहासी ॥ ४१ ॥ देह अवस्था विकारवंता ॥ आत्मा अलिप्त विकारतां ॥ ह्मणसी देहविकारा जडता ॥ यासि विकारता घडे केवीं ॥ ४२ ॥ सूर्य थापटूनि जन ॥ कदा नुठवी आपण ॥ तो प्रकाशतांचि जाण ॥ सहजें जन चेतवी ॥ ४३ ॥ त्या जनाची कर्मकर्त्तव्यता ॥ सूर्या अंगीं नलगे सर्वथा ॥ तेवीं प्रकाशोनि विकारता ॥ अलिप्त तत्त्वतां निजात्मा ॥ ४४ ॥ झालिया सूर्यकिरण प्राप्त ॥ जेवीं अग्नि संवे[7]

---

१ दांत. २ शिर. ३ मानसिकव्यथा व शारीर व्यथा. ४ काठी. ५ पालकरहित. ६ लिप्त न असणें. ७ उत्पन्न होइ.

सूर्यकांत ॥ तेणें याग कां दाह होत ॥ त्या कर्मातीत सूर्य जैसा ॥ ४५ ॥ तेवीं चित्प्रकाशें[1] मन ॥ शुभाशुभकर्में करी जाण ॥ त्या मनोविकारा
चिद्धान ॥ अलिप्त जाण निजात्मा ॥ ४६ ॥ येथ मनःकृत विकार पूर्ण ॥ मनःकृत कर्माकर्म जाण ॥ मनःकृत जन्ममरण ॥ स्वर्ग
नरकगमन मनःकृत ॥ ४७ ॥ मनःकृत लक्ष्यालक्ष्य ॥ मनःकृत बंध मोक्ष ॥ तेंचि निरूपण प्रत्यक्ष ॥ श्रीकृष्ण अध्यक्ष सांगत ॥ ४८ ॥
॥ ॥ श्लोक ॥ ॥ एता मनोरथमयीर्ह्यन्यस्योच्चावचास्तनूः ॥ गुणसंगादुपादत्ते क्वचित्कश्चिज्जहाति च ॥ ४७ ॥ ॥ टीका ॥ ॥ संसारविकाराचें
भान ॥ अभिमानयुक्त करी मन ॥ स्वर्ग नरक गमनागमन ॥ देहाभिमान भोगवी ॥ ४९ ॥ आत्मा याहूनि सहजें भिन्न ॥ चिन्मात्रैक
चिद्धन ॥ तेथ आतळों नशके मन ॥ शुद्धि अभिमान असेना ॥ ५५० ॥ मन अभिमान प्रसवे माया ॥ अभिमानें गुण आणिले
आया ॥ गुणीं मायिक केली काया[2] ॥ विकार सामग्रीयासमवेत ॥ ५१ ॥ तैशी देहापाशीं छाया ॥ तैशी स्वरूपीं मिथ्या माया ॥
जेथ जन्ममरणेंसि काया ॥ रिघावया[3] ठावो नाहीं ॥ ५२ ॥ आत्मा शुद्ध काया मलिन ॥ काया जड आत्मा चिद्धन ॥ अज अव्यय
आत्मा परिपूर्ण ॥ जन्ममरण देहासी ॥ ५३ ॥ तिनी गुण तिनी अवस्था ॥ कार्य कर्म अहंकर्त्ता ॥ हें देहाभिमानाचे माथां ॥ आत्मा
सर्वथा अलिप्त ॥ ५४ ॥ यापरी विकारांहून ॥ आत्मा चिद्रूपें सहज भिन्न ॥ ह्मणशी जीवास देहाभिमान ॥ तेंही कथन अवधारीं ॥ ५५ ॥
जीव अलिप्त मायागुणीं ॥ ऐक सांगेन ते काहाणी ॥ स्फटिक ठेविजे जैशा वर्णीं ॥ तद्रूपपणीं तो भासे ॥ ५६ ॥ हो कां तद्रूपपणेंही
दिसतां ॥ स्फटिक अलिप्त निजशुद्धता ॥ तेवीं सत्वादिगुणीं क्रीडतां ॥ जीव तत्त्वतां अलिप्त ॥ ५७ ॥ स्फटिक काजळीं दिसे काळा ॥ परी
तो काळेपणावेगळा ॥ तेवीं तमोगुणें जीवू[4] मैळा[5] ॥ दिसोनि निराळा तमेंसी ॥ ५८ ॥ स्फटिक आरक्तीं आरक्त किळा ॥ दिसोन आरक्तते
वेगळा ॥ तेवीं जो गुणीं राजसलीळा ॥ भोगूनि वेगळा जीवात्मा ॥ ५९ ॥ स्फटिक श्वेतवर्णीं दिसे श्वेत ॥ परी तो श्वेतपणा
अलिप्त ॥ तेवीं सत्वीं दिसे ज्ञानवंत ॥ गुणज्ञानातीत जीव[illegible]मा ॥ ५६० ॥ त्रिगुण गुणेंसि अलिप्तता ॥ दाविली जीवशिवांची तत्त्वतां ॥
देहीं असोनि निःसंगता[6] ॥ ऐक आतां सांगेन ॥ ६१ ॥ जेवीं घटामाजील जीवन ॥ घटीं चंद्रबिंब आणी जाण ॥ तेवीं शुद्धासि जीवपण
॥ देहाभिमान देहीं दिसे ॥ ६२ ॥ घटनिश्चळत्वें बिंब निश्चळ ॥ घटचंचलत्वें तें चंचळ ॥ तेवीं देहाच्या अवस्था सकळ ॥ मानी केवळ
जीवात्मा ॥ ६३ ॥ घटीं कालविल्या अंजन[7] ॥ तरी तें काळें होय जीवन[8] ॥ परी बिंबप्रतिबिंबां जाण ॥ काळेपण लागेना ॥ ६४ ॥
तेवीं देहाची सुखदुःखकथा ॥ कां पापपुण्या दिसे वार्त्ता ॥ नाहीं जीवशिवांच्या माथा ॥ देह अहंता ते भोगी ॥ ६५ ॥ ये घटींचें जळ

---

[1] चैतन्यप्रकाशें. [2] देह. [3] राहण्याला. [4] जीव. [5] मलिन. [6] संगरहित असणें. [7] काजळ. [8] उदक.

ते घटीं भरित ॥ चंद्रबिंब असे त्याही आंत ॥ तेवीं या देहींचा त्या देहीं जात ॥ जीवात्मा ह्मणत या हेतू ॥ ६६ ॥ चंद्र गगनीं अलिप्त
असे ॥ तो मिथ्या प्रतिबिंबें घटीं भासे ॥ तेवीं वस्तु वस्तुत्वें सावकाशें ॥ जीवू हें पिसें देहात्मता ॥ ६७ ॥ त्रिगुणगुणीं गुणातीत ॥ देही
देहसंगा अलिप्त ॥ जीवशिव दोन्ही येथ ॥ तुज म्यां साद्यंत दाखविले ॥ ६८ ॥ हें नेणोनियां समस्त ॥ देहात्मवादें जाहले भ्रांत ॥ स्वर्ग
नरकादि आवर्त[1] ॥ योनी भोगवीत अभिमान ॥ ६९ ॥ द्विजदेह आरंभूनि येथ ॥ परमेष्ठि[2]देहपर्यंत ॥ स्वर्गसुख देहें समस्त ॥ भोगवी निश्चित
पुण्याभिमान ॥ ५७० ॥ याहूनियां अधोमुख येथ ॥ द्विजत्वाहूनि खालते जात ॥ नाना दुःखयोनी भोगवित ॥ जाण निश्चित पापाभि
मान ॥ ७१ ॥ येथ पापपुण्यकर्माचरण ॥ तें वाढविताहे जन्ममरण ॥ यांत विरळा सभाग्य जाण ॥ जन्ममरणच्छेदक ॥ ७२ ॥ ज्यासि
निष्काम पुण्याचिया कोडी ॥ जिहीं स्वधर्म जोडिला जोडी ॥ त्यासि भूतदया गाढी ॥ ज्याची आवडी द्विजभजनीं ॥ ७३ ॥ जे अहिं
सेसि अधिवास ॥ ज्याचें द्वैतपर मानस ॥ जे सारासारराजहंस ॥ जन्ममरणांचा त्रास घेतला जिहीं ॥ ७४ ॥ जे उपनिषदर्थचातक ॥
जे जीवजनकाचे शोधक ॥ जे निजात्मतत्त्वसाधक ॥ जे विश्वासुक भावार्थी ॥ ७५ ॥ ज्यांसि संतचरणीं सद्भावो ॥ जे गुरुवचनीं
विकले पहाहो ॥ त्यांसि देहीं विदेहभावो ॥ मद्रूपें पहाहो पावती ॥ ७६ ॥ तेहीं निजबोधें देहाची बेडी ॥ तोडूनि जन्ममरणांची कोडी ॥
उभवूनि सायुज्याची गुडी[3] ॥ परापरथडी पावले ॥ ७७ ॥ त्यांसि संसाराचे आवर्त्त[1] ॥ सर्वथा गेले नलगत ॥ जेवीं बुडण्याचा संकेत ॥
मृगजळाआंत असेना ॥ ७८ ॥ ऐसे प्राप्त पुरुष येथ ॥ संसारीं नाहीं गा बहुत ॥ हिंडतां अवघ्या जगांत ॥ एखादा कदाचित देखिजे
॥ ७९ ॥ असो देखिल्याही त्यातें ॥ कोण आहे ओळखतें ॥ उद्धवा जाण निश्चितें ॥ आत्मा येथें दिसेना ॥ ५८० ॥ जरी निकट[4] भेटला
ज्ञाता ॥ त्याचा देह देखिजे वर्त्तता ॥ परी भीतरील निजात्मता ॥ नदिसे सर्वथा कोणासी ॥ ८१ ॥ आत्मा गेला आला ह्मणती ॥
शेखीं येणें जाणें न देखती ॥ तेचविषयींची उपपत्ती[5] ॥ स्वयें श्रीपती सांगत ॥ ८२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ आत्मनः पितृपुत्राभ्यामनुमेयौ
भवाप्ययौ ॥ न भवाप्ययवस्तूनामभिज्ञोऽद्वयलक्षणः ॥ ४८ ॥ ॥ टीका ॥ ॥ ह्मणती पित्याचा आत्मा गेला ॥ यालागीं पितृदेह नासला
॥ परी पैल तो आत्मा गेला ॥ ऐसा नाहीं देखिला कोणीही ॥ ८३ ॥ ह्मणती पुत्रजन्में आत्म्यासि जन्म ॥ करितां पुत्राचें जातकर्म[6] ॥
देखिजे देहाचा संभ्रम ॥ आत्मा दुर्गम दिसेना ॥ ८४ ॥ येथ आत्म्यासि येणें जाणें ॥ सर्वथा नाहीं पूर्णपणें ॥ देहासीचि जन्ममरणें ॥
येणें जाणें दृष्टांतें ॥ ८५ ॥ प्रत्यक्ष देहासि जन्म नाश ॥ आत्मा साक्षित्वें अविनाश ॥ येचिअर्थीं विशद विलास ॥ स्वयें हृषीकेश

---

१ फेरे. २ ब्रह्मदेव. ३ ध्वज. ४ नजीक. ५ युक्ति. ६ जातकर्मनामकसंस्कार पुत्रावण ह्मणतात तो.

सांगत ॥ ८६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तरोर्बीजविपाकाभ्यां यो विद्वान् जन्मसंयमौ ॥ तरोर्विलक्षणो द्रष्टा एवं द्रष्टा तनोः पृथक् ॥ ४९ ॥
॥ टीका ॥ ॥ बीजपरिपाकें वाढले वृक्षीं ॥ पर्वत त्या वृक्षाचा साक्षी[1] ॥ तो पर्वत वृक्षच्छेदनें नव्हे दुःखी ॥ तेवीं द्रष्टा साक्षी देहाचा ॥ ८७ ॥
द्रष्टा साक्षी देहमात्रासी ॥ ते देहधर्म न लगती द्रष्ट्यासी ॥ तो देहीं असोनि विदेहवासी ॥ भवबंध[2] त्यासी स्पर्शेना ॥ ८८ ॥ हा अर्थ
नेणोनि अविवेकी[3] ॥ अतिबद्ध जाहले येलोकीं ॥ तोचि अर्थ पांचश्लोकीं ॥ श्रीकृष्ण स्वमुखीं सांगत ॥ ८९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रकृतेरे
वमात्मानमविविच्याऽबुधः पुमान् ॥ तत्त्वेन स्पर्शसंमूढः संसारं प्रतिपद्यते ॥ ५० ॥ ॥ टीका ॥ ॥ कर्माकर्मकर्त्तेपण ॥ आत्म्यासि सर्वथा
नाहीं जाण ॥ येचि अर्थीचें निरूपण ॥ मागां संपूर्ण सांगीतलें ॥ ५९० ॥ आत्मा नातळे तिह्नी गुण ॥ देही देहातीत जाण ॥ प्रकृतीहू
न पुरुष भिन्न ॥ हें निजात्मज्ञान जो नेणे ॥ ९१ ॥ तोचि संसाराचा आपण ॥ घरजांवई झाला जाण ॥ देहाभिमानासि संपूर्ण ॥
एकात्मपण मांडिलें ॥ ९२ ॥ विषयभोग तोचि पुरुषार्थ ॥ ऐसें मानूनियां निश्चित ॥ शुभाशुभकर्मीं येथ ॥ भोगवीत नानायोनी ॥ ९३ ॥
विषयभोग अभिमानें जाण ॥ पुढती जन्म पुढती मरण ॥ नानायोनीं आवर्तन ॥ देहाभिमान भोगवी ॥ ९४ ॥ तें नानायोनीं गर्भदुः
ख ॥ देहाभिमानें भोगिती मूर्ख ॥ तेंचि नानातत्त्वांचें रूपक ॥ यदुनायक सांगत ॥ ९५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सत्वसंगादृषीन् देवान् रज
सा सुरमानुषान् ॥ तमसा भूततिर्यक्त्वं भ्रामितो याति कर्मभिः ॥ ५१ ॥ ॥ टीका ॥ ॥ देहाभिमानाचिये स्थिती ॥ त्रिगुण गुणांचीं
कर्में होती ॥ तेणें त्रिविध संसारप्राप्ती ॥ ऐक निश्चितीं उद्धवा ॥ ९६ ॥ न करितां कृष्णार्पण ॥ सात्विक कर्म कीजे आपण ॥ तेणें क्षो
भें सत्त्वगुण ॥ उत्तम देह जाण उपजवी ॥ ९७ ॥ सत्वाच्या अतिउत्कर्षगतीं ॥ देवऋषि ब्रह्मऋषि होती ॥ सत्वाच्या समसाम्यस्थितीं ॥
कल्पायु जन्मती आजानबाहो ॥ ९८ ॥ सत्वगुणें क्रियायुक्त ॥ स्वर्गीं देव होती सत्वस्थ ॥ भोगक्षयें अधःपात ॥ या योनीं जनित स
त्वगुणें ॥ ९९ ॥ आश्रयुनि राजसगुण ॥ करितां राजस कर्माचरण ॥ तेणें क्षोभला रजोगुण ॥ योनि कोण उपजवी ॥ ६०० ॥ राजस
कर्म ब्रह्मीं अर्पिती ॥ ते दैत्यही भगवद्भक्त होती ॥ जे रजउत्कर्षें भोग वांछिती ॥ ते असुर होती महायोद्धे ॥ १ ॥ रजोगुणें स्वकर्माचर
ण ॥ तेणें कर्में जन्मती ब्राह्मण ॥ रजतारतम्यें जाण ॥ चारी वर्ण जन्मती ॥ २ ॥ तामसाचे संगतीं जाण ॥ करितां तमिष्ठ कर्माचरण ॥
तेणें क्षोभला जो तमोगुण ॥ तो नीचयोनि दारुण उपजवी ॥ ३ ॥ भूत प्रेत पिशाचक ॥ तिर्यग्योनि असंख्य ॥ वृक्ष पर्वत पाषाण देख ॥
या योनि अनेक भोगवी ॥ ४ ॥ ॥ आशंका ॥ ॥ कर्म त्रिगुणात्मक साचार ॥ परी कर्मफळभोक्ता ईश्वर ॥ हा वेदशास्त्रें विचार ॥

---

१ द्रष्टा. २ संसारबंध. ३ अविचारी. ४ फिरून. ५ भोंवरा. ६ नाशें.

केला निर्धार तुह्मींही ॥ ५ ॥ देहसाक्षित्वें आत्मा निराळा ॥ ऐसा गतश्लोकीं केला निर्वाळा ॥ जैं कर्मफळभोक्ता कर्मावेगळा ॥ तैं कर्मफळा केवीं भोगी ॥ ६ ॥ ऐसें आशंकेचें[1] अंतर ॥ जाणोनियां शारंगधर ॥ तेंचि अर्थीचें उत्तर ॥ विशद साचार सांगत ॥ ७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नृत्यतो गायतः पश्यन् यथैवानुकरोति तान् ॥ एवं बुद्धिगुणान्पश्यन्ननीहोप्यनुकार्यते ॥ ५२ ॥ ॥ टीका ॥ ॥ कळाकुशल सभानायक ॥ त्यापुढें रंग होतां कौतुक ॥ गात्या नाचत्याचे ताल थाक ॥ स्वयें देख अनुकरें ॥८॥ सभेसि बैसल्या निश्चळा ॥ रंगींच्या अनुकरें थाकताळा ॥ तेवीं प्रकृति पुरुष वेगळा ॥ तो प्रकृतीची लीळा अनुकरे ॥ ९ ॥ तेंचि अनुकार ह्मणशी कैसें ॥ प्रकृति केवळ जडांशें ॥ जाणपण आत्म्यासि असे ॥ येणें विन्यासें भोक्ता ह्मणती ॥६१०॥ ॥ आशंका ॥ ॥ प्रकृतिच्छंदें अनुकारता ॥ गुणकर्मांचा फळभोक्ता ॥ आत्मा झाला जैं तत्त्वतां ॥ तैं नित्यमुक्तता भंगली ॥ ११ ॥ जो करी कर्मफळस्वादन ॥ त्यासि लागे कर्मबंधन ॥ कर्मास्तव जन्म मरण ॥ आत्म्यासि जाण लागलें ॥ १२ ॥ नित्यमुक्त अविकारी[2] ॥ या गोष्टी राहिल्या दुरी ॥ आत्मा जाहला संसारी ॥ गुणविकारीं अतिबद्ध ॥ १३ ॥ उद्धवा तूं ऐसऐशी ॥ आशंका ह्मणी धरिशी ॥ आत्मा अलिप्त गुणकर्मांसी ॥ दृष्टांतेंसी हरि सांगे ॥ १४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यथाऽम्भसा प्रचलता तरवोऽपि चला इव ॥ चक्षुषा भ्राम्यमाणेन दृश्यते भ्रमतीव भूः ॥ ५३ ॥ ॥ टीका ॥ ॥ जेवीं गंगातीरींचें तारूं ॥ जळीं वाहतां देखे नरू ॥ तेवीं मायागुणअनुकारू ॥ भासे विकारू आत्मत्वीं ॥ १५ ॥ ज्याचे डोळां भवंडी सबळ ॥ तो भवंतां देखे भूमंडळ ॥ तेवीं मायिक विकारमेळ ॥ मिथ्या केवळ आत्म्यासी ॥ १६ ॥ जो अश्वारूढ[3] होऊनि पाहे ॥ जळीं प्रवाहासंमुख राहे ॥ तो देखे मीं जळीं प्रवाहें ॥ ऐसा मिथ्या होये अनुभवू ॥ १७ ॥ तेवीं आत्मा नित्य निर्विकार ॥ तेथ मायावी गुणसंसार ॥ कल्पनायोगें साचार ॥ मानिती नर मनोमय ॥ १८ ॥ आब्रह्मस्तंबपर्यंत[4] ॥ नानायोनि विकारवंत[5] ॥ कर्म क्रिया फळभोग येथ ॥ जाण निश्चित मनोजन्य ॥ १९ ॥ ऐसें सांगतां हरि सांवळा ॥ तेणें उल्हास उद्धवजीवाला ॥ तया आनंदाच्या कल्लोळां ॥ उद्धवचि लीला पोखित ॥ ६२० ॥ निववावया उद्धवाचा ताप ॥ स्वयें सांगे तो विश्वतोमुख[6] ॥ जेणें उद्धवा बहु हरुख ॥ तेंचि श्रीकृष्ण देख सांगतसे ॥ २१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यथा मनोरथधियो विषयानुभवो मृषा ॥ स्वप्नदृष्टाश्च दाशार्ह तथा संसार आत्मनः ॥ ५४ ॥ ॥ टीका ॥ ॥ आत्मा नित्यमुक्त अविकारी ॥ तो संकल्पें कीजे विकारी ॥ असंसारी परी संसारी ॥ मनोविकारीं मानिजे ॥ २२ ॥ ऐसें दुजयावीण कांहीं ॥ कथा वार्ता सांगतां नाहीं ॥ एक श्रोता दुसरा वक्ता पाही ॥ यालागीं येही उपाये ॥ २३ ॥ जेवीं एकटा क्रमेना पंथ ॥ मी राजा करी मनोरथ ॥ परचक्र[7] कल्पूनि तेथ ॥

---

१ शंकेचें. २ विकाररहित. ३ घोड्यावर बसून. ४ ब्रह्मदेवापासून तृणापर्यंत. ५ नाशयुक्त. ६ सर्वतोमुख. ७ शत्रु व सैन्य वगैरे.

होय उद्यत युद्धासी ॥ २४ ॥ तो युद्ध आवेश कडकडाट ॥ तेणें सत्राणें उडे उद्भट ॥ अडखळूनि आदळे पोट ॥ ह्मणे मी घायवट पडिलों कीं ॥ २५ ॥ मिथ्या भ्रमें पडला भुली ॥ चालतां चालतां मृगजळीं ॥ उतरावया पैलतीरीं ॥ बुडी वहिली देतसे ॥ २६ ॥ गंधर्वनगरीं प्रचंड ॥ माड्या सोपे उदंड ॥ क्षणांमाजो विरस चंड ॥ वातवितंड करी निर्वाळा ॥ २७ ॥ तेवीं संसार हा काल्पनिक ॥ तेथील सुख आणी दुःख ॥ मिथ्या केवळ मायिक ॥ जाण निष्टंक निजभक्ता ॥ २८ ॥ दाशार्हवंशीं जन्मलासी ॥ तूं उत्तम दशा पावलासी ॥ यालागीं ह्मणे हृषीकेशी ॥ उद्धवासी दाशार्ह ॥ २९ ॥ जेवीं कां स्वप्नभोग जाण ॥ स्वप्नीं सत्य मानी आपण ॥ तेवीं संसार हा दीर्घ स्वप्न ॥ मायिक जाण मिथ्यात्वें ॥ ६३० ॥ जागा झालिया स्वप्न वृथा ॥ निरहंकारी संसार मिथ्या ॥ हे ब्रह्मज्ञानाची मुख्य कथा ॥ जाण तत्त्वतां उद्धवा ॥ ३१ ॥ संसार तो कल्पनामात्र ॥ आत्मा निर्विकार चिन्मात्र ॥ जेवीं मृगजळ भरी भास्कर[1] ॥ तेवीं संसार करी आत्मा ॥ ३२ ॥ उद्धवा तूं ह्मणशी आतां ॥ ऐकतां तुझे मुखींची कथा ॥ संसार मिथ्या समस्ता ॥ तरी साधनावस्था कां सोसावी ॥ ३३ ॥ जेवीं वंध्यापुत्राचें लग्न ॥ करावया कोणी न करी यत्न ॥ कां मृगजळीं बांधोनि धरण ॥ पाट जाण कोणी काढीना ॥ ३४ ॥ तेवीं मिथ्या संसारबंधन ॥ तेथ श्रवण मनन चिंतन ॥ विवेक[2] वैराग्य ज्ञान ध्यान ॥ वृथा कां जन सोशिती ॥ ३५ ॥ उद्धवा बागुलाचें भय खोटें ॥ परी बाळकासि सत्य वाटे ॥ तेवीं मिथ्या संसारकचाटें ॥ जीवीं प्रकटे बद्धता ॥ ३६ ॥ तेची अर्थींचा दृष्टांत ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ मिथ्या सांसारिक येथ ॥ भ्रमें बाधीत भ्रांतासी ॥ ३७ ॥ ॥ श्लोक ॥ अर्थे ह्यविद्यमानेऽपि संसृतिर्न निवर्त्तते ॥ ध्यायतो विषयानस्य स्वप्नेऽनर्थागमो यथा ॥ ५५ ॥ ॥ टीका ॥ ॥ विचारें पाहतां मिथ्या स्वप्न ॥ तेथील विषयसेवन ॥ सुखदुःखें बाधिती गहन ॥ ऐक लक्षण तयाचें ॥ ३८ ॥ स्वप्नीं राजलाभ सन्मान ॥ तेणें सुखें ओसंडे आपण ॥ कां झालिया धनहरण ॥ तेणें दुःखें दारुण आक्रंदे[3] ॥ ३९ ॥ त्यासि जागें न करितां ॥ स्वप्नसुखदुःखबाधकता ॥ निवर्त्तेना सर्वथा ॥ जाण तत्त्वतां उद्धवा ॥ ६४० ॥ तेवीं विषयासक्त जन ॥ ज्यांसि अखंड विषयध्यान ॥ ज्यांचें विषयीं सदा मन ॥ देहाभिमान गोंवित ॥ ४१ ॥ तयांसि देखावया उपावो ॥ जयां विषयासक्ति होय वावो ॥ येचि अर्थींचा दृष्टांत पहाहो ॥ स्वयें सांगे देवो उद्धवासी ॥ ४२ ॥ न करितां श्रवण मनन ॥ न साधितां विवेकज्ञान ॥ न धरितां वैराग्य पूर्ण ॥ भवभय[4] जाण तुटेना ॥ ४३ ॥ संसार मिथ्या तोंडें ह्मणतां ॥ न तुटे सुखदुःखभवव्यथा ॥ जन्ममरणादि अवस्था ॥ अहंममता सुटेना ॥ ४४ ॥ ऐसे जे अज्ञान जन ॥ तिहीं अवश्य करावें साधन ॥ विवेकें वैराग्य धरितां पूर्ण ॥ भव

---

[1] सूर्य. [2] विचार. [3] ओरडे. [4] संसाराचें भय.

बंधन निवारे ॥ ४५ ॥ यालागीं उद्धवा जाण ॥ सकळसाधनांचें कारण ॥ जेणें हातां चढे ब्रह्मज्ञान ॥ तें वैराग्य पूर्ण साधावें ॥ ४६ ॥ ऐक विरक्तीची मागी ॥ जैशी धडधडीत आगी ॥ तैसें वैराग्य व्हावें अंगीं ॥ तैं प्राप्तीलागीं अधिकारू ॥ ४७ ॥ ऐसे मुमुक्षु[1] जे पुरते ॥ परमरूपेचेनि हातें ॥ सद्गुरु थापटोनि[2] ज्यांतें ॥ करी अद्वैतें जागृत ॥ ४८ ॥ ज्यासि देहादिभेदपुष्टी ॥ मिथ्या माया गुणत्रिपुटी ॥ ब्रह्मानंदें कोंदली सृष्टी ॥ स्वप्नवत् दृष्टीं संसारू ॥ ४९ ॥ येव्हडी ही परम प्राप्ती ॥ वैराग्यविवेकें चढे हातीं ॥ तेंचि वैराग्य उद्धवाप्रती ॥ स्वयें श्रीपती सांगत ॥ ६५० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तस्मादुद्धव मा भुंक्ष्व विषयानसदिंद्रियैः ॥ आत्माग्रहणनिर्भातं पश्य वैकल्पिकं भ्रमम् ॥ ५६ ॥ ॥ टीका ॥ ॥ विषयांची जे आसक्ती ॥ ते साधक परमार्थप्राप्ती ॥ विषय सांडी सांडी निश्चितीं ॥ परतोनि हातीं नातळे ॥ ५१ ॥ आसक्त वृत्ति इंद्रिययोग ॥ अतिलोलुप्यें विषयभोग ॥ तोचि मुख्यत्वें भवरोग ॥ यालागीं त्याग करावा ॥ ५२ ॥ विखें रांधिलें पक्वान्न ॥ तें ग्रासमात्र हरी प्राण ॥ विष एकदा मारक जाण ॥ विषय पुनःपुनः मारक ॥ ५३ ॥ ह्मणसी प्रारब्धें भोग येती ॥ ते त्यागिले केवीं जाती ॥ विषयत्यागाची युक्ती ॥ वैराग्यस्थिती घडे केवीं ॥ ५४ ॥ प्रारब्धें विषयभोग येती ॥ ते साधका दुःखरूप होती ॥ वणवां मृगें आंहाळती[3] ॥ तैशी स्थिती भोगणें ॥ ५५ ॥ व्याघ्रमुखीं सांपडे गाये ॥ तैसा भोगी चरफडीत जाये ॥ ऐसेंनि अनुतापें पाहे ॥ वैराग्य होये अनिवार ॥ ५६ ॥ वैराग्य जाहलिया धडफुडें ॥ सद्गुरुकृपा हातां चढे ॥ तेणें गुरुकृपा उजियेडें ॥ संसार उडे हृद्देसी ॥ ५७ ॥ झालिया गुरुकृपा सुगम ॥ सर्वत्र ठसावे परब्रह्म ॥ तेथ जन्ममरण कैचें कर्म ॥ भवभ्रम असेना ॥ ५८ ॥ तेथ वाती लावूनि पाहतां ॥ संसार दिसेना मागुता ॥ जेवीं निभ्रमें पाहों जातां ॥ नलगे हातां रज्जुसर्प ॥ ५९ ॥ भवंडीचेनि वेगवशें ॥ भिंगोरी[4] नीट उभी दिसे ॥ तेवीं भ्रमाचेनि आवेशें ॥ संसार भासे सत्यत्वें ॥ ६६० ॥ केवळ जो निबिड भ्रम ॥ संसार हें त्याचें नाम ॥ येऱ्हवीं निखिल परब्रह्म ॥ तेथ जन्म कर्म असेना ॥ ६१ ॥ ऐसें जरी झालें ब्रह्मज्ञान ॥ तरी प्रारब्ध भोगावें गा जाण ॥ जेवीं कुलाल[5] भांडें ने आपण ॥ परी चक्रभ्रमण राहेना ॥ ६२ ॥ वृक्ष समूळ उपढल्या जाण ॥ उपढितां नवेचे सार्द्रपण ॥ तेवीं होतांचि ब्रह्मज्ञान ॥ प्रारब्ध जाण सोडीना ॥ ६३ ॥ त्या प्रारब्धाचिये गती ॥ विषयभोग जरी येती ॥ तेथ उपावो न करावा निवृत्ती ॥ निजशांतीं साहावें ॥ ६४ ॥ विषयभोग आलियाही जाण ॥ निजशांति धरोनि संपूर्ण ॥ सुखें वर्तती साधुजन ॥ विवेकसंपन्न क्षमावंत ॥ ६५ ॥ हातां आलिया निजशांती ॥ संसार बापुडा तो किती ॥ तेचि शांतीची स्थिती ॥ स्वयें श्रीपती सांगत ॥ ६६ ॥ निजशांतीचें कल्याण ॥ जेणें जीव पावे

---

१ मुक्त व्हावें अशी इच्छा आहे ज्यांस ते. २ शिजविलें. ३ पोळती. ४ भिंगरी. ५ कुंभार.

समाधान ॥ तें अतिगोड निरूपण ॥ दों श्लोकीं श्रीकृष्ण सांगत ॥ ६७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ क्षिप्तोऽवमानितोऽसद्भिः प्रलब्धोऽ
सूयितोऽथवा ॥ ताडितः सन्निबद्धो वा वृत्त्या वा परिहापितः ॥ ५७ ॥ निष्ठितो मूत्रितो वाऽज्ञैर्बहुधैवं प्रकंपितः ॥ श्रेयस्कामः
कृच्छ्रगत आत्मनात्मानमुद्धरेत् ॥ ५८ ॥ ॥ टीका ॥ ॥ देहाभिमानी तामस जन ॥ अतिदुष्ट जे दुर्जन ॥ तिहीं साधूंसि करितां छळण ॥
शांतीस्तव सज्जन क्रोधी नव्हती ॥ ६८ ॥ अल्प उपद्रवीं जाण ॥ न येती क्रोधा सज्ञान ॥ तैसें नव्हे अतिनिर्वाण ॥ पीडा दारुण क
रितांही ॥ ६९ ॥ कायिक वाचिक मानसिक ॥ त्रिविध पीडा देतां देख ॥ साधु निजशांतीं नेटक[1] ॥ जाणोनि विवेक ते साहती ॥६७०॥
उजू बोलतां शुद्ध युक्ती ॥ आक्षेपूनि हेडाविती ॥ झिडकावूनियां निर्भर्त्सिती ॥ अपमानिती सभेसी ॥ ७१ ॥ शब्दीं शब्दानें करूनि
छळ ॥ ह्मणतो दुष्ट दुर्जन दुःशीळ ॥ अपवित्र अमंगळ ॥ नष्ट चांडाळ हा एक ॥ ७२ ॥ ऐशा दुर्जनांच्या दुष्टोक्ती ॥ साधु साहे निज
शांतीं ॥ ते शांतीची उपपत्ती ॥ विवेकस्थिती अवधारी ॥ ७३ ॥ पराची जिह्वा होंट हालती ॥ माझ्या अंगीं ते न रुपती ॥ यालागीं क्रोध
नये चित्तीं ॥ निजशांती ढळेना ॥ ७४ ॥ सभेसि सन्मानें पूजितां ॥ लोटूनि घातला खालता ॥ हाणोनियां चरणघाता ॥ नेला परता
अपमानें ॥ ७५ ॥ सन्मानें जेथ पूजूंनेती ॥ तेथ केवळ असे क्षितीं[2] ॥ अपमानें जेथ लोटिती ॥ तेथही क्षिती तेचि पैं ॥ ७६ ॥ येथ मान
आणि अपमान ॥ कल्पना मनाची जाण ॥ ऐसेनि विवेकें सज्जन ॥ द्वेषिना जन निजशांतीं ॥ ७७ ॥ प्रलोभू नानायुक्ती ॥ धनें ठक
वूनियां निर्भर्त्सिती ॥ धनलोभ केवळ अधःपाती ॥ त्याची निवृत्ती जिहीं केली ॥ ७८ ॥ त्यांसि निंदितांचि जाण ॥ दोषी होइजे आप
ण ॥ यालागीं क्रोधा न ये मन ॥ शांति संपूर्ण ढळेना ॥ ७९ ॥ शुद्ध बोलती शास्त्रार्थ ॥ अर्थ तितुका अनर्थ ॥ त्या अनर्था जो करी
निवृत्त[3] ॥ त्यातें द्वेषित ते मूर्ख ॥ ६८० ॥ सद्गुणीं दोष आरोपिती ॥ नानापरी निंदा करिती ॥ तेणें हित मानिती चित्तीं ॥ तारक निश्चितीं
हे माझे ॥ ८१ ॥ मातेचे जे करतळ ॥ ते वरीवरी क्षाविती बाह्य मळ ॥ जे जनक माझे केवळ ॥ सबाह्य मळ सकळ जिह्वाग्रें धुती
॥ ८२ ॥ ऐशियांचें करितां छळण ॥ हितास नाडिजे आपण ॥ कोणाचे न बोले दोषगुण ॥ तेणें शांति जाण थोरावे ॥ ८३ ॥ जेणें
चाले जीविकास्थिती ॥ धन धान्य क्षेत्र वृत्ती ॥ छळें बळें हिरोनि नेती ॥ तेणेंही चित्तीं क्षोभ नुपजे ॥ ८४ ॥ येथ लाभालाभ दैवा
धीन ॥ त्यासि देतें घेतें तेंचि जाण ॥ यालागीं द्वेषिनां[4] जन ॥ शांतीचा गुण न सांडी ॥ ८५ ॥ वृत्ति घेऊनि उगे नसती ॥ अन्यायी ह्म
णोनि बांधिती ॥ एक तोंडावरी थुंकिती ॥ एक माथां[5] मुतती अतिदुष्ट ॥ ८६ ॥ एक ताडिती पाडिती ॥ एक नानापरी गांजिती ॥ तरी अं

---

१ नीट. २ पृथिवी. ३ दूर. ४ द्वेष करीना. ५ मस्तकावर.

गींची ढळेना शांति ॥ विवेकसांगाती सज्जन ॥८७॥ थुंका आणि जें मूत ॥ तें देहाचिमाजी उपजत ॥ देहींचें देहास लागत ॥ क्षोभ तेथ कोण मानी ॥ ८८ ॥ थुंका आणि जें मूत ॥ जैसें देहीं उपजे देहाचें अपत्य ॥ देहाचें देहावरी खेळत ॥ दुःख तेथ कोणाचें ॥८९॥ धरितां मारितां ह्मणे देख ॥ देहो तितुका पांचभौतिक ॥ मारिता मारिजता दोनी एक ॥ कोणाचें दुःख कोणासी ॥ ६९० ॥ ऐशी स विवेकें ज्यासि शांती ॥ चारी मुक्ती त्याच्या दासी होती ॥ त्याचा अंकिला[1] मी श्रीपती ॥ यावरी प्राप्ती ते कायी ॥ ९१ ॥ तेथ केवळ जो मोक्षार्थी ॥ तेणें सर्वस्वें पाळावी शांती ॥ ते दुःखसागरावर्त्तीं ॥ होय तारिती सुखरूप ॥ ९२ ॥ वैराग्य योग ज्ञान ध्यान ॥ त्याचें फळ तें शांति जाण ॥ ते शांति साधूनि संपूर्ण ॥ आपणि[illegible] आपण उद्धरिती ॥ ९३ ॥ यालागीं उद्धवा जाण ॥ साहोनि द्वंद्वांचें काठिन्य ॥ शांति साधूनि संपूर्ण ॥ ब्रह्म परिपूर्ण पावावें ॥ ९४ ॥ पूर्ण ब्रह्म पावल्यापाठीं ॥ जन्ममरणाची खुंटे गोठी ॥ परमानंदें पडे मिठी ॥ भवभयाची तुटी तैं होय ॥ ९५ ॥ ऐकोनि श्रीकृष्णाचे बोला ॥ उद्धव अत्यंत चाकाटला[2] ॥ द्वंद्वबाध जो ऐकिला ॥ तो नवचे साहिला आह्मांसी ॥ ९६ ॥ ऐकिल्या नाहीं ये शांतीच्या गोष्टी ॥ मा केवीं देखिजेल दृष्टीं ॥ ऐशी शांति ज्याच्या पोटीं ॥ तो पुरुष सृष्टीं नसेल ॥ ९७ ॥ मागें ऐकिली ना देखिली ॥ ऐशी शांति त्वां कैंची काढिली ॥ हे ऐकतां तुझी बोली ॥ भयें दचकली बुद्धि माझी ॥ ९८ ॥ ऐशी शांति ज्यासि आहे ॥ तो मागें झाला ना पुढें होये ॥ देवो बोलिला निजनिर्वाहें ॥ तें दुःसह होये आह्मांसी ॥ ९९ ॥ सांगीतलिया द्वंद्वांसी ॥ तो अतिदुःसह[3] योगियांसी ॥ केवीं साहवती आह्मांसी ॥ तेंचि देवासी पूसत ॥ ७०० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उद्धवउवाच ॥ ॥ यथैवमनुबुध्येयं वद नो वदतांवर ॥ सुदुःसहमिमं मन्ये आत्मन्यसदतिक्रमम् ॥ ५९ ॥ विदुषामपि विश्वात्मन् प्रकृतिर्हि बलीयसी ॥ ऋते त्वद्धर्मनिरतान्छातांस्ते चरणालयान् ॥ ६० ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे द्वाविंशोऽध्यायः ॥ २२ ॥

॥ टीका ॥ ॥ जे सांगोंजाणती वेदशास्त्रार्था ॥ ते वक्ते ह्मणविती तत्त्वतां ॥ त्या वक्त्यांमाजी तुझी श्रेष्ठता ॥ मुख्य वेदाचा वक्ता तूं होशी ॥ १ ॥ शास्त्रें लाहोनि तुझी युक्ती ॥ तुझी तुज प्रतिपादिती[4] ॥ ते परोक्षवादें थोंटावती ॥ श्रुति[5] नेतिनेती[6] परतल्या[7] ॥ २ ॥ त्या तुझे मुखींच्या ज्ञानोक्ती ॥ रूपेनें ऐकूनि रूपामूर्ती ॥ श्रवर्णाचें भाग्य सांगों किती ॥ जे ऐकती ते धन्य ॥ ३ ॥ ऐसऐशिया अतियुक्तीं ॥ उद्धवें प्रार्थिला श्रीपती ॥ हात जोडूनि परमप्रीतीं ॥ ह्मणे विनंती अवधारी ॥ ४ ॥ स्वामी बोलती अति अगाध ॥ हें बोलणें परम शुद्ध ॥ माझे बुद्धीसि न ये बोध ॥ पराचे अपराध कोण सोंहे ॥ ५ ॥ सोसावे पराचे अपराध ॥ तेंही कठिनत्वें अतिविरुद्ध ॥ हा दुःसह महा

---

१ स्वाधीन झाला. २ चकित झाला. ३ सहन होण्यास कठिन. ४ उपपादन करितात. ५ वेद. ६ तें नव्हे, तें नव्हे. ७ माघाऱ्या फिरल्या. ८ कर्णांचें. ९ सहन करील.

बोध ॥ कैसेंनि द्वंद्व साहवे ॥ ६ ॥ उत्तमें केलिया अपराधा ॥ कोटीमाजी साहे एकादा ॥ परी नीचाची विरुद्ध बाधा ॥ कोणीही कदा न साहे ॥ ७ ॥ ज्याचें न व्हावें दर्शन ॥ ज्यासि करूंनये नमन ॥ त्याचे मस्तकीं वाजतां चरण ॥ साहेल कोण गोविंदा ॥ ८ ॥ ज्याचा निःशेष जाय प्राण ॥ तोचि साहे हें कठिन ॥ जो होय सचेतन ॥ त्यासि सर्वथा जाण न साहे ॥ ९ ॥ इतरांची कायशी कथा ॥ सज्ञान जे कां तत्त्वतां ॥ तेही अतिक्रमूं न साहती अल्पता ॥ मा अपमानता कोण साहे ॥ ७१० ॥ क्रोध जाहला कपिलमहामुनीशी ॥ तेणें भस्म केलें सागरांशीं ॥ नारदें कुबेरपुत्रांशीं ॥ वृक्षत्वाशीं आणिलें ॥ ११ ॥ दुर्वासाची सांगतां गोठी ॥ त्याची कथा आहे मोठी ॥ कोप आला शृंगीचे[१] पोटीं ॥ मेल्या सर्पासाठीं शापिलें ॥ १२ ॥ मुख्यत्वें शांति सनकादिकांशी ॥ द्वारीं आडकाठी केली त्यांशी ॥ वैकुंठीं क्षोभूनि आवेशीं[२] ॥ जयविजयांशीं शापिलें ॥ १३ ॥ सज्ञानाची ऐशी स्थिती ॥ मा इतरांची कोण गणती ॥ परापराधसहन[३] शांती ॥ दुर्लभ त्रिजगतीं गोविंदा ॥ १४ ॥ प्रकृति निजगुणीं सबळ ॥ ते अल्पें क्षोभवी तत्काळ ॥ साधु सज्जन केवळ ॥ वरी विकळ अशांती ॥ १५ ॥ ज्यासि तुझी पूर्ण भक्ति जडे ॥ त्यासि त्या तुझी पूर्ण कृपा जोडे ॥ जो तुझे चरणीं अखंड जोडे ॥ त्याशींच घडे हे शांती ॥ १६ ॥ तूं विश्वात्मा त्रिजगतीं ॥ चोरी नचले तुजप्रती ॥ मज हीं द्वंद्वें नसाहवती[४] ॥ तूंही श्रीपती जाणशी ॥ १७ ॥ परम पावन निजशांती ॥ अतिनिंद्य ते अशांती ॥ ऐसें व्याख्यान जे ज्ञाते करिती ॥ तेही नसाहती द्वंद्वांतें ॥ १८ ॥ द्वंद्वें दुःसह सर्वार्थीं ॥ तेथें माझा पाड किती ॥ एवं द्वंद्वसहिष्णुतेची[५] युक्ती ॥ मज कृपामूर्तीं सांगावी ॥ १९ ॥ सकळ साधनें वश्य होती ॥ परी हे सहिष्णुता न ये चित्तीं ॥ ते मी लाभें निजशांती ॥ ऐशी कृपा निश्चितीं करावी ॥ ६२० ॥ मी शांतीचें लाभें कल्याण ॥ ऐशी कृपा करावी परिपूर्ण ॥ ह्मणोनि धरिले श्रीचरण ॥ उद्धवें आपण निजभावें ॥ २१ ॥ ऐकोनि उद्धवाची विनंती ॥ संतोषला कृपामूर्ती ॥ जेवीं चातकाचिया तृषार्तीं ॥ गर्जोनि त्रिजगती निववी मेघ ॥ २२ ॥ तेवीं [illegible]कवचनासरिसा ॥ उल्हासला कृष्ण कैसा ॥ उद्धवाचिया निजमानसां ॥ शांतीचा ठसा घालील ॥ २३ ॥ उद्धवप्रश्नाचें प्रत्युत्तर ॥ उदार सुंदर गुणगंभीर ॥ उघडोनि शांतीचें भांडार ॥ स्वयें सारंगधर सांगेल ॥ २४ ॥ नवल सांगती ते ठेव ॥ युक्तिचातुर्यवैभव ॥ निजशांतीस पडे खेंव ॥ ऐसें अपूर्व सांगेल ॥ २५ ॥ श्रीकृष्णमुखींच्या ज्ञानोक्ती ॥ ऐकतां स्वयंभ प्रकटे शांती ॥ ते ऐकावया उद्धव चित्तीं ॥ जाहला निश्चितीं सावध ॥ २६ ॥ जेवीं गजग्रहणाविखीं पंचानन ॥ साटोप धरी आपण ॥ तेवीं शांति साधावया जाण ॥ सावधान उद्धवा ॥ २७ ॥ जळीं तळपतांचि मासा ॥ कवडा झेलूनि ने आकाशां ॥ तेवीं

---

[१] शृंगीनामक ऋषीचे. [२] द्वेषानें. [३] दुसऱ्याचा अपराध सहन करण्याची. [४] सहन न होती. [५] द्वंद्वें सहन करण्याची.

बगळा पक्षी

शांतीचिया आमिषा ॥ उद्धव तैसा तळपत ॥ २८ ॥ तें भिक्षुगीतनिरूपण ॥ पुढिले अध्यायीं श्रीकृष्ण ॥ निजशांति बाणे संपूर्ण ॥ तेंचि लक्षण सांगेल ॥ २९ ॥ ज्यासि परमार्थाची चाड ॥ तिहीं सांडूनि साधनकवाड ॥ शांति श्रवणीं श्रद्धा वाढ ॥ अतिदृढ राखावी ॥ ३० ॥ श्रीकृष्ण सांगेल शांति पूर्ण ॥ उद्धव तया अर्था सावधान ॥ एका विनवी जनार्दन ॥ श्रोतां अवधान मज द्यावें ॥ ३१ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीकायां द्वाविंशतितमोध्यायः ॥ २२ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ मूळ श्लोक ॥ ६० ॥ ओंव्या ॥ ७३१ ॥ एकुणसंख्या ॥ ७९१ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

# अध्याय २३ वा.


श्रीकृष्ण:
उद्धव:
गुरु:
शिष्य:

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ओंनमो सद्गुरु विश्वरूप ॥ विश्वा सबाह्य[1] तूं चित्स्वरूप ॥ तुझें निर्धारितां रूप ॥ तूं अरूप अव्यय ॥ १ ॥ चराचर
जें सावेव[2] ॥ तें तुज अरूपाचे आवेव ॥ जीव शिव हे तुझी माव[3] ॥ अद्वयवैभव पैं तुझें ॥ २ ॥ घृतपुतळी दिसे साकार ॥ घृतपणें ते
निराकार ॥ तैसा तूं अव्यय अक्षर[4] ॥ जगदाकार भाससी ॥ ३ ॥ ठसावलें जें दिसे जग ॥ निर्धारितां तुझें अंग ॥ अंग पाहतां तूं अनं
ग ॥ अनंगाचा[5] माग तुजमाजी नाहीं ॥ ४ ॥ देखिजे तें तूं नव्हसी ॥ नव्हे तें तें तूंचि होसी ॥ होणें न होणें नाहीं तुजपाशीं ॥ ऐसा
तूं जगासी जगद्गुरू ॥ ५ ॥ शब्द तुजहोनियां दूरी ॥ तूं शब्दासबाह्य अंतरीं ॥ बोलका तूं चराचरीं ॥ वेदशास्त्रीं तूं वक्ता ॥ ६ ॥
उंसापासूनि गोडी दिसे ॥ उसासबाह्य गोडीचि असे ॥ गोडियेमाजी ऊंस नसे ॥ वेदासि तुज तैसें सौजन्य ॥ ७ ॥ वेदांचा वक्ता
तूंचि होसी ॥ वेदीं प्रतिपादिजे तुह्मासी ॥ शेखीं वेदांसि न कळसी ॥ निःशब्दवासी गुरुराया ॥ ८ ॥ जेवीं कां निःशब्द अनाहतध्वनी ॥
असे ध्वनिमात्रीं मिळूनी ॥ अनाहत[6] वाजविजे जनीं ॥ ऐसें नाहीं कोणी वाजंत्र ॥ ९ ॥ तेवीं तूं वेदांचा वक्ता ॥ सकळशास्त्रां युक्ति
दाता ॥ परी वेदशास्त्रार्थनिर्धार सांगता ॥ तुज तत्त्वतां न बोलवे ॥ १० ॥ ह्मणोनि तूं केवळ निःशब्द ॥ तंव निःशब्द आणि सशब्द ॥
हाही मायिक अनुवाद ॥ तूं एवंविध[7] न कळसी ॥ ११ ॥ तूं न कळसी तत्त्वतां ॥ ऐशिया युक्तींचा तूंचि ज्ञाता ॥ ज्ञाताचि जंव स्थापूं
जातां ॥ तंव अज्ञानता असेना ॥ १२ ॥ जेथ अज्ञानता नाहीं ॥ तेथ ज्ञातेपण कैंचें कायी ॥ होकां मुख्यत्वें नोवरी नाहीं ॥ तैं नोवरा
पाही ह्मणे कोण ॥ १३ ॥ तूं ज्ञाता ना अज्ञाता ॥ तूं बोलता ना न बोलता ॥ तूं बहु ना एकुलता ॥ तुझी अलक्ष्यता लक्षेना ॥ १४ ॥
तूं निःशब्द निर्विकार ॥ तूं निर्गुण निरहंकार ॥ हेंही ह्मणतां पडे विचार ॥ तूं जगदाकार जगदात्मा ॥ १५ ॥ जगदाकारें तूं प्रसिद्ध ॥ तेथ
कोणाचें कोणा बाधे द्वंद्व ॥ पर नाहीं मा परापराध ॥ अतिविरुद्ध कोणासी ॥ १६ ॥ यापरी सद्गुरुनाथा ॥ तुझे चरणीं द्वंद्वसमता ॥ तेणें
समसाम्यें निजकथा ॥ श्रीभागवता चालविसी ॥ १७ ॥ तेंचि श्रीभागवतीं ॥ बाविसावे अध्याया अंतीं ॥ उद्धवें पुशिलें निजशांती ॥
द्वंद्वसमाप्ती उपावो ॥ १८ ॥ उद्धवें प्रश्न केला वाड[8] ॥ जेणें ब्रह्मज्ञानाची पुरे चाड ॥ तो श्रीशुकासि लागला गोड ॥ तेणें पुरे कोड परी
क्षितीचें ॥ १९ ॥ ऐकोनि उद्धवाची प्रश्नोक्ती ॥ शुक सुखावला आनंदस्फूर्ती ॥ तो ह्मणे सावध परीक्षिती ॥ तुष्टला श्रीपती उद्धवासी
॥ २० ॥ ब्रह्मज्ञानाची निर्वाणस्थिती ॥ ते जाण पां मुख्यत्वें शांती ॥ ते उद्धवें पुशिली अतिप्रीतीं ॥ तेणें श्रीपती संतोषला ॥ २१ ॥ ते
शांति आणि निवृत्ती ॥ सांगेल चौं[9]अध्यायांप्रती ॥ ऐक राया परीक्षिती ॥ ते मी तुजप्रती सांगेन ॥ २२ ॥ ऐके पांडवकुलदीपका ॥

---

[1] आंतबाहेर. [2] साकार. [3] माया. [4] क्षर ह्मणजे भूतें त्यांरहित. [5] कामाचा. [6] ताडण केल्यावांचून. [7] या प्रकारचा, असा. [8] उत्तम. [9] चार अध्यांत.

कौरवकुळीं कुलतिलका ॥ तूं शांतीसि अधिकारी निका ॥ निजात्मसुखा साधकू ॥ २३ ॥ साधावया ब्रह्मप्राप्ती ॥ तूं त्यक्तोदक श्रवणार्थी ॥ यालागीं शांति आणि निवृत्ती ॥ ऐक तुजप्रती सांगेन ॥ २४ ॥ तेविसावे अध्यायीं निरूपण ॥ दुर्जनीं क्षोभविलें मन ॥ त्या मनासि ये क्षमा[1] पूर्ण ॥ तेंचि श्रीकृष्ण सांगेल ॥ २५ ॥ भिक्षुगीत संरक्षण ॥ तें मनोजयाचें कारण ॥ प्रकृतिजयाचें निरूपण ॥ सांगेल संपूर्ण चोविसावा ॥ २६ ॥ सांगोनि त्रिविध त्रिगुण ॥ परी लक्षविलें निजनिर्गुण ॥ हें गुण जयाचें निरूपण ॥ सुलक्षण पंचविसावा ॥ २७ ॥ सव्विसावा अध्यावो येथ ॥ तो धडधडीत विरक्त ॥ सांगोनियां ऐलेंगीत[2] ॥ स्त्रियादि समस्त विषयत्यागू ॥ २८ ॥ गुण विषय प्रकृति मन ॥ या चहूंचें समाधान ॥ चहूं अध्यायीं विशद जाण ॥ स्वमुखें श्रीकृष्ण सांगेल ॥ २९ ॥ यापरो परीक्षितीस जाण ॥ करोनियां सावधान ॥ श्रीशुकयोगींद्र आपण ॥ कथालक्षण निरूपी ॥ ३० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ बादरायणिरुवाच ॥ स एवमाशंसित उद्धवेन भागवतमुख्येन दशार्हमुख्यः ॥ सभाजयन् भृत्यवचो मुकुंदस्तमाबभाषे श्रवणीयवीर्यः ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ शुक ह्मणे परीक्षिती ॥ ऐकोनि उद्धवाची विनंती ॥ वचनें संतोषला श्रीपती ॥ ते उद्धवाप्रती संबोधी ॥ ३१ ॥ कोटिजन्मांतीं केवळ ॥ द्विजत्व पाविजे सुकुळ ॥ हें महापुण्यांचें निज फळ ॥ तेंचि निष्फळ हरिभक्तिविणें ॥ ३२ ॥ सदा सफळ आंब्याचा रुखं[3] ॥ त्यावरी उपजे कांबरुखं[4] ॥ तो सफळींहि निष्फळ देख ॥ तैसे उत्तम लोक भजनेंवीण ॥ ३३ ॥ ते स्थिती नाहीं उद्धवापाशीं ॥ उत्तम जन्म यादववंशीं ॥ सभासदता आल्याही हातासी ॥ श्रीमदासी भुलेचिना ॥ ३४ ॥ झालियाही राज्यसंपत्ती ॥ जो विसंबेना भगवद्भक्ती ॥ भागवतमुख्यत्वाची प्राप्ती ॥ त्यासीच निश्चितीं महाराजा ॥ ३५ ॥ सगुण सुंदर पतिव्रता ॥ अनुकूल मिळालिया कांता ॥ जो विसंबेना भगवत्पथा[5] ॥ भागवतमुख्यता त्या नांव ॥ ३६ ॥ इहीं गुणीं अतियुक्त ॥ विवेकेंसी अतिविरक्त ॥ श्रीकृष्णचरणीं अनुरक्त ॥ मुख्य भागवत उद्धवू ॥ ३७ ॥ वयें धनें जें श्रेष्ठपण ॥ तें श्रेष्ठत्व अतिगौण ॥ भगवत्प्राप्ती ते श्रेष्ठ जाण ॥ तेणें भाग्यें परिपूर्ण उद्धवू ॥ ३८ ॥ जो श्रीकृष्णाचा विश्वासी ॥ कृष्ण एकांत करी ज्यासी ॥ गुह्य ज्ञान सांगे ज्यापाशीं ॥ त्याच्या भाग्यासी केवीं वानूं[6] ॥ ३९ ॥ परब्रह्म जें कां साक्षात् ॥ जें उद्धवासि झालें हस्तगत ॥ त्याच्या बोलां[7]माजी वर्तत ॥ भाग्यें भाग्यवंत तो एक ॥ ४० ॥ उद्धवभाग्य वानित वानित ॥ शुक झाला सद्गदित ॥ स्वानंदें वोसंडला तेथ ॥ ठेला तटस्थ[8] महासुखें ॥ ४१ ॥ उद्धवभाग्याचा उद्रेक ॥ सांगतां वोसंडला श्रीशुक ॥ तें देखोनि कुरुनायक[9] ॥ जाहला आत्यंतिक विस्मित ॥ ४२ ॥ ज्याचें निजभाग्य सांगतां ॥ श्रीशुकासि होतसे अवस्था ॥ उद्धव भाग्याचा सर्वथा ॥ मजही तत्त्वतां

---

[1] सहनशीलता, वैराग्य. [2] बुधापासून ऐलेच्या ठिकाणीं झालेला पुरूरवा त्याचें गीत. [3] वृक्ष. [4] बांडगूळ. [5] ईश्वरमार्गास. [6] वर्णू. [7] वचनांत. [8] शब्दरहित. [9] परीक्षिति.

मानला ॥ ४३ ॥ तंव शुक ह्मणे रायासी ॥ परमभाग्य तें उद्धवासी ॥ तेणें विनवितां हृषीकेशी ॥ वचनमात्रेंसी तुष्टला ॥ ४४ ॥ उद्धवास शांतीची चाड ॥ तो प्रश्न श्रीकृष्णासि झाला गोड ॥ त्याचें पुरवावया कोड ॥ निरूपण वाड सांगेल ॥ ४५ ॥ परमशांतीचा अधिकारी ॥ तूंचि एक निजनिर्धारीं ॥ ऐसें उद्धव[1]प्रेमपुरस्करीं ॥ शांति श्रीहरी सांगत ॥ ४६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ बार्हस्पत्य स वै नात्र साधुर्वै दुर्जनेरितैः ॥ दुरुक्तैर्भिन्नमात्मानं यः समाधातुमीश्वरः ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ॥ उद्धवा तूं जें बोलिलासी ॥ मीही सत्य मानीं त्यासी ॥ दुर्जनीं केल्या अपमानासी ॥ सहावया कोणासी शांति नाहीं ॥ ४७ ॥ देव पादुका वाहती शिरसीं[2] ॥ मुख्य इंद्र लागे ज्याच्या पायांसी ॥ अष्ट महासिद्धि ज्याच्या दासी ॥ ब्रह्मज्ञान ज्यापाशीं वचनांकित ॥ ४८ ॥ ऐसा देवगुरु बृहस्पती ॥ त्याचा शिष्य तूं विवेकमूर्ती ॥ यालागीं शांतीच्या साधक युक्ती ॥ तूंचि निश्चितीं जाणसी ॥ ४९ ॥ शांति आकळावया उद्धवासी ॥ आदरें सत्कारी हृषीकेशी ॥ अनुमोदूनि त्याचे बोलासी ॥ शुद्ध शांतीसी हरी सांगे ॥ ५० ॥ निंदा अवज्ञा हेळण ॥ दुर्जनीं केलिया अपमान ॥ हें साहे तो ईश्वर जाण ॥ निजबोधें पूर्ण तो मद्रूप ॥ ५१ ॥ ज्यासि सर्वभूतीं निजात्मता ॥ दृढ बाणली[3]से तत्त्वतां ॥ तोचि दुर्जनाचिया घाता ॥ साहे सर्वथा यथासुखें ॥ ५२ ॥ जो स्वयें होय अवघें जग ॥ त्यासि लागतां उपद्रव अनेग ॥ उठेना क्रोधाची लगबग ॥ साहे अनुद्वेग यथासुखें ॥ ५३ ॥ निजांगीं लागतां निजकर ॥ नुठी क्रोधद्वेषांचा उद्गार ॥ निजात्मता[4] जो देखे चराचर ॥ शांति त्याचें घर स्वयें रिघे ॥ ५४ ॥ उद्धवा ऐसा ज्यासि निजबोधू ॥ त्यासि ह्मणिजे सत्य साधू ॥ तोचि साहे पराचा अपराधू ॥ शांतिशुद्धू तो एक ॥ ५५ ॥ नेणोनियां निजबोधातें ॥ इतर जे सज्ञान ज्ञाते ॥ ते न साहती द्वंद्वांतें ॥ ऐक तूंतें सांगेन ॥ ५६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ न तथा तप्यते विद्धः पुमान्बाणैः सुमर्मगैः ॥ यथा तुदंति मर्मस्था ह्यसतां परुषेषवः ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ तिख्याचे अतितिख बाण ॥ जेणें घायें होती विकळ प्राण ॥ त्याहूनि दुर्जनाचे वाग्बाण ॥ अधिक जाण रुपती ॥ ५७ ॥ लोहाचे बाण जेथ लागती ॥ तेचि अंगें व्यथित होती ॥ परी वाग्बाणांची अधिक शक्ती ॥ घायें भेदिती पूर्वज ॥ ५८ ॥ लोहबाणाचे लागलिया घाये ॥ ते पान[6]पाल्या व्यथा जाये ॥ परी वाग्बाण रुपल्या पाहे ॥ तें शल्य राहे जन्मांत ॥ ५९ ॥ वर्मस्पर्शाचें बासटें जाण ॥ विंधितां निंदेचें वाग्बाण ॥ तेणें भेदिनांचि अंतःकरण ॥ सर्वांगीं पूर्ण भडका उठी ॥ ६० ॥ दुर्जनाचिया दुरुक्ती ॥ अपमानाची उद्धती ॥ साहावयालागीं शांती ॥ नव्हे निश्चितीं प्राकृतां ॥ ६१ ॥ ऐशिया रीतीं यथोचित ॥ उद्धवाचें मनोगत ॥ संरक्षूनि श्रीकृष्णनाथ ॥ शांतीचा निश्चितार्थ सांगोंपाहे ॥ ६२ ॥ पूर्वीं

---

[1] उद्धवाच्या प्रेमास्तव. [2] मस्तकावर. [3] ठसली आहे. [4] आपल्याप्रमाणें. [5] मर्मभेदक व कठोर भाषणें. [6] वनस्पतिवगैरे ओषधीनें.

सांगीतलें निजशांतीसी ॥ वेगीं साधी ह्मणे उद्धवासी ॥ ते अटक वाटेल तयासी ॥ अतिसंकोचासी पावेल ॥ ६३ ॥ होतें उद्धवाचे मानसीं ॥ हे शांति असाध्य सर्वांसी ॥ जाणोनियां हृषीकेशी ॥ सांगे इतिहासेंसी भिक्षुगीत[1] ॥ ६४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कथयंति महत्पुण्यमितिहासमिहोद्धव ॥ तमहं वर्णयिष्यामि निबोध सुसमाहितः ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ अशांति क्षोभाचे चित्तमळ ॥ क्षाळावया तत्काळ ॥ इतिहासगंगा केवळ ॥ अतिनिर्मळ कृष्णोक्ती ॥ ६५ ॥ श्रीकृष्णवदन ब्रह्माद्रीं ॥ श्रीभागवत औदुंबरीं ॥ जन्मली शांति गोदावरी ॥ निजमूळाकारीं निर्मळ ॥ ६६ ॥ तें गुप्त ओघें नारदगती ॥ उद्धवगंगाद्वारीं व्यासोक्ती ॥ तेचि शुकमुखकुशावर्तीं ॥ प्रकटे अवचितीं पवित्रपणें ॥ ६७ ॥ तया पवित्र ओघाचिये गती ॥ श्रद्धाघृतीं समरसे भक्ती ॥ त्याचि अरुणा वरुणा सरस्वती ॥ हे संगमप्राप्ती जेथ होय ॥ ६८ ॥ तेणें शांति[2]गंगेची स्थिती ॥ भरूनि उथळे अतिउन्नती ॥ तेथ श्रवणार्थी बुडी देती ॥ ते पवित्र होती निज[3]क्षमा ॥ ६९ ॥ ते शांतिगंगा अतिविख्यात ॥ उद्धव करावया पुनीत ॥ प्रकट करी श्रीकृष्णनाथ ॥ भिक्षुगीतविन्यासें ॥ ७० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ केनचिद्भिक्षुणा गीतं परिभूतेन दुर्जनैः ॥ स्मरता धृतियुक्तेन विपाकं निजकर्मणाम् ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ उद्धवा कोणी एक संन्यासी ॥ दुर्जनीं उपद्रवितां त्यासी ॥ ह्मणे क्षयो होय दुष्टकर्मासी ॥ येणें संतोषें मानसीं क्षमावंत ॥ ७१ ॥ आपुले अंगींचे मळ ॥ पुढिलीं क्षाळितां सकळ ॥ जो क्रोधेंसि करी तळमळ ॥ तो मूर्ख केवळ आत्मघाती ॥ ७२ ॥ लोक ह्मणती ज्यासि दुर्जन ॥ संन्यासी ह्मणे ते माझे स्वजन ॥ माझे दोषांचें निर्दळण ॥ यांचेनि धर्में जाण होतसे ॥ ७३ ॥ संमुख[4] कोणी निंदा करिती ॥ तेणें अत्यंत सुखावे चित्तीं ॥ ह्मणे मज तुष्टला श्रीपती ॥ पापाची निवृत्ती सहजें होय ॥ ७४ ॥ ऐसेंनि विवेकें तत्त्वतां ॥ शांतीसि ढळोंनेदी सर्वथा ॥ चढोनि निजधैर्याचे माथां ॥ गायिली गाथा[5] ते ऐक ॥ ७५ ॥ उद्धवासि ह्मणे श्रीकृष्ण[illegible]थ ॥ ये अर्थी होईं साव[6]चित्त ॥ अतिलोभी तो अतिविरक्त ॥ झाला तो वृत्तांत सांगेन ॥ ७६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अवंतिषु द्विजः कश्चिदासीदाढ्यतमः श्रिया ॥ वार्तावृत्तिः कदर्यस्तु कामी लुब्धोऽतिकोपनः ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ मालवदेशीं अवंतीनगरीं ॥ तेथ ब्राह्मण वसे गृहद्वारीं ॥ कृषिवाणिज्य वृत्तीवरी ॥ जीविका[7] करी निरंतर ॥ ७७ ॥ गांठीं धनधान्यसमृद्धी ॥ अमर्याद द्रव्यसिद्धी ॥ परी अतिशयें कृपणबुद्धी ॥ पोटाही त्रिशुद्धी नखाय ॥ ७८ ॥ पोटां सदा खाय कदन्न[8] ॥ तेंही नाहीं उदरपूर्ण[9] ॥ तेथ स्त्रीपुत्रादिदासीजन ॥ जठरतपर्ण न पावती ॥ ७९ ॥ न करी नित्यनैमित्त्य ॥ स्वप्नीं नेणे धर्मकृत्य ॥ देव ब्राह्मण अतिथी नेथ ॥ सदा जात पराङ्मुख[10] ॥ ८० ॥ कवडी एक लाभू पाहे ॥ तें मातापित्यांचें श्राद्ध आहे ॥ तें सांडूनि अंत्यजगृहा

---

[1] एका संन्याशाचें गीत. [2] शांति होय गंगा तिची. [3] आपल्या शांतीनें. [4] समक्ष. [5] गाणें. [6] सावध. [7] निर्वाह. [8] वाईट अन्न. [9] पोटभर. [10] अन्नावांचून माघारे.

जाये ॥ नमनी भये स्पर्शाचें ॥८१॥ मी उत्तम हा हीनवर्ण ॥ हे धनलोभें गिळी आठवण ॥ हातां येतां देखोनि धन ॥ स्वीकारी अन्न पतिताचें ॥ ८२ ॥ धनकामासाठीं देख ॥ न मनी पाप महादोख ॥ कवडीच्या लोभें केला मूर्ख ॥ नाठवे नरक महापातू ॥ ८३ ॥ यापरी तो कर्मभ्रष्ट ॥ अकर्म करी क्रियानष्ट ॥ अतिवंचक महाशठ ॥ केवळ नष्ट धनलोभी ॥ ८४ ॥ त्या धनलाभाचा अवरोधू ॥ होतां देखोनि खवळे क्रोधू ॥ गोहत्यादि ब्रह्मवधू ॥ करावया सिद्ध स्वयें होय ॥ ८५ ॥ धनकामीं क्रोधाची वस्ती ॥ धनापाशीं पापें असती ॥ धनलोभी ज्याची स्थिती ॥ कदर्युवृत्ती त्यानांव ॥ ८६ ॥ ऐसें धन सांचिलें [1]फांडोवाडे ॥ त्याचाही व्यय जैं करणें पडे ॥ तैं प्राणांतचि येऊनि घडे ॥ विचार पुढें असेना ॥ ८७ ॥ वानराचे गा[illegible]ंचे चणे ॥ हातां नयेती जीवें प्राणें ॥ तैसा द्रव्याचा व्ययो करणें ॥ तेंचि मरणें ॥ कदर्या ॥ ८८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ज्ञातयोतिथय[illegible] वाङ्मात्रेणापि नार्चिताः ॥ शून्यावसथ आत्माऽपि काले कामैरनार्चितः ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ घरींचा भात वेंचेल कांहीं ॥ यालागीं वैश्वदेव करणें नाहीं ॥ तेथ अतिथि आलिया पाही ॥ कोणे समयीं कोण पूजी ॥ ८९ ॥ अतिथि आलिया जाण ॥ ऐसे बोल बोले आपण ॥ जे वचनमात्रें[3] जातो प्राण ॥ त्यासि मागे कोण अन्नोदक ॥ ९० ॥ देखोनि त्याचिया घरासी ॥ ब्रह्मचारी नित्य उदासी ॥ आशा त्यजिली संन्यासीं ॥ जेवीं राजहंसीं गोमय[4] ॥ ९१ ॥ भिकारीं सांडिलें त्याचें घर ॥ अतिथी डावलिले निरंतर ॥ पाहुणा दूरी पाहे बिढार ॥ निराशी पितर सर्वदा ॥ ९२ ॥ दारा न ये कोरान्नकर ॥ घर सांडूनि गेले उंदिर ॥ काउळीं वोसंडिलें तें घर ॥ चिडियाँ साचार नमिळे दाणा ॥ ९३ ॥ मुंग्यांसि पडे नित्य लंघन ॥ तिहीं धरिलें बिढार आन ॥ पोटें नाखाय जो आपण ॥ तेथ कथा कोण इतरांची ॥ ९४ ॥ अत्यंत भूक लागल्या पोटीं ॥ चणेही न खाय जगजेठी[6] ॥ तेथ कायसी सेवकांची गोठी ॥ कावलीं पोटीं स्त्रीपुत्रें ॥ ९५ ॥ जैं वमन घडे त्यासी ॥ तैं न करी फळाहारासी ॥ अधिक वेंचूं कोण सोशी ॥ यालागीं उपवासी स्वयें पडे ॥ ९६ ॥ तेथ कुळगुरूचा सन्मान ॥ कुळधर्म गोत्रभोजन ॥ व्याही जांवई यांचा मान ॥ धनलोभी जाण कदा नकरी ॥ ९७ ॥ ऋतुकाळें फळें येती पूर्ण ॥ त्यांसि दृष्टिभेटीं जाण ॥ परी जिह्वेसि आलिंगन ॥ प्राणांतीं आपण हों नेदी ॥ ९८ ॥ मातेचें स्तनपान सेविलें ॥ तेंचि क्षीर[7] रसना[8] चाखिलें ॥ पुढें दुधचि वर्जिलें ॥ व्रत धरिलें धनलोभें ॥ ९९ ॥ रस रसनेचें माहेर ॥ तेणें वीण ते गादली[9] थोर ॥ धनलोभ अतिनिष्ठुर ॥ करितां करकर भेटों नेदी ॥ १०० ॥ वस्त्रें मळकीं अतिजीर्ण ॥ मस्तक सदाच मलिन ॥ मुखीं वास निघती जाण ॥ स्वप्नींही पान खाय ॥ १ ॥ सण वार दिवाळी दसरा ॥ तैं जुने जोंधळे धाडी घरा ॥ अन्नेंवीण पीडी लेंकुरां ॥

---

१ अनेक खटपटीनें. २ कृपणास. ३ कवल बोलण्यानेंच. ४ शेण. ५ विमण्यास. ६ स्वतां मालक. ७ दूध. ८ जिभेनें. ९ गांजली.

कदर्यु खरा यानांव ॥ २ ॥ धनलोभी धर्महीन ॥ देखोनि कदर्युवर्तन ॥ विमुख झाले स्वजन ॥ तेंचि निरूपण हरि सांगे ॥ ३ ॥ ॥ श्लोक ॥ दुःशीलस्य कदर्यस्य द्रुह्यंते पुत्रबांधवाः ॥ दारा दुहितरोभृत्या विषण्णा नाचरन् प्रियम् ॥८॥ ॥ टीका ॥ ॥ नाहीं स्वधर्मीं निजशीळ ॥ दानधर्म खुडी सकळ ॥ अत्यंत धनलोभी केवळ ॥ त्यासि दुःशीळ बोलिजे ॥ ४ ॥ अन्नआच्छादनेंवीण ॥ कुटुंबेंसहित आपण ॥ जो कदर्थवी निजप्राण ॥ कदर्यु पूर्ण त्यानांव ॥ ५ ॥ कदर्युनरासी तंव देख ॥ मुख्य स्त्री होय विमुख ॥ स्वजन आणि सेवक ॥ पुत्रही पराङ्मुख होती त्यासी ॥ ६ ॥ आपले जे कां सखे बंधू ॥ तेही करूं लागती विराधू ॥ द्रव्यविभागाचा संबंधू ॥ कलह सुबद्धू आरंभे ॥ ७ ॥ गांठी असोनि अमित धन ॥ नकरी माहेर सण बाळवण ॥ कन्या क्षोभोनियां जाण ॥ शाप दारुण त्या देती ॥ ८ ॥ गोत्रज सदा चिंतित ॥ हा मरे तैं जेवूं दूधभात ॥ आप्त ते झाले अनाप्त ॥ अवघे अहित वांछिती ॥ ९ ॥ जयाचिया द्रव्यासि जाण ॥ नाहीं धर्मांचें संरक्षण ॥ ते काळेंचि होय क्षीण ॥ तेंचि लक्षण हरि सांगे ॥ ११० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तस्यैवं यक्षवित्तस्य च्युतस्योभयलोकतः ॥ धर्मकामविहीनस्य चुक्रुधुः पंचभागिनः ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ खाय जेवीं न लावी हात ॥ ठेव्यापाशीं जैसें भूत ॥ तैसें याचें यक्षवित्त ॥ असे राखत ग्रहो जैसा ॥ ११ ॥ केवळ धर्मकामरहित ॥ धनलोभी जैसें भूत ॥ त्या नांव बोलिजे यक्षवित्त ॥ जीवाहून आप्त अर्थ मानी ॥ १२ ॥ शरीरीं भोग नाहीं जाण ॥ तेणें इहलोक झाला शून्य ॥ नाहीं स्वधर्म कर्म पंचयज्ञ ॥ परलोक शून्य तेणें झाला ॥ १३ ॥ यज्ञाचे पंच विभागी ॥ यज्ञभाग नपवे त्यांलागीं ॥ ते कोपोनियां पंचविभागी ॥ वित्तनाशालागीं उद्यत ॥ १४ ॥ पावोनि ब्राह्मणजन्म वरिष्ठ ॥ धनलोभें स्वधर्मनष्ट ॥ तो होय उभयलोकीं भ्रष्ट ॥ पावे कष्ट कृपणत्वें ॥ १५ ॥ करितां अति आयास ॥ जोडला अर्थ बहुवस ॥ त्यासि अधर्में आला नाश ॥ तोही विलास हरि सांगे ॥ [illegible] ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तदवध्यानविस्रस्तपुण्यस्कंधस्य भूरिद ॥ अर्थोऽप्यगच्छन्निधनं बह्वायासपरिश्रमः ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ पंचयज्ञदेवता सकळ ॥ येणें उपेक्षिल्या केवळ ॥ तेणें द्रव्यलाभाचें मूळ ॥ पुण्यक्षयें तत्काळ छेदिलें ॥ १७ ॥ द्रव्यप्राप्तिपुण्यदिवाकर[4] ॥ अस्तमाना गेला तो भास्कर ॥ मग द्रव्यलाभाचा अंधकार ॥ अधर्में थोर दाटला ॥ १८ ॥ प्रयासें संचिली संपत्ती ॥ तीसि अधर्म आंधारची ये राती ॥ क्षोभल्या पंचधा यज्ञमूर्ती ॥ पंचधा पावती महानाश ॥ १९ ॥ जो सुखी न करी कुटुंबालागीं ॥ जो निववि ना नानाभोगीं ॥ जो द्रव्य न वेंचीं धर्मालागीं ॥ त्यासि पंचविभागी ऊठती ॥ १२० ॥ दायादें चोर राजा आगी ॥ अधर्में रोग संचरे अंगीं ॥ हे पांचजण विभागी ॥ द्रव्यनाशालागीं पावती ॥ २१ ॥ नाहीं द्विजपूजा श्रद्धा

---

१ न्हासवितो. २ शत्रु. ३ आवडतें. ४ सूर्य. ५ भाऊबंद.

युक्त ॥ नाहीं लौकिक क्रिया उचित ॥ नाहीं दानादि धर्म वेदोक्त ॥ द्रव्यक्षयो तेथ आवश्यक ॥ २२ ॥ जेथ नाहीं वडिलांसि सन्मान ॥
जेथ नाहीं पंचमहायज्ञ ॥ जेथ गुरूसि करी अभिमान ॥ तेथ क्षयो जाण उद्धवा ॥ २३ ॥ ज्यांसि परांचा द्वेष सदा ॥ जे बोलती परा
पवादा ॥ जे चढती धनगर्वमदा ॥ तेथ क्षयो सदा उद्धवा ॥ २४ ॥ त्याच द्रव्यक्षयाचें लक्षण ॥ ग्रंथाधारीं निरूपण ॥ स्वयें सांगताहे
श्रीकृष्ण ॥ दयाळू पूर्ण निजभक्तां ॥ २५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ज्ञातयो जगृहुः किंचित् किंचिद्दस्यव उद्धव ॥ दैवतः कालतः किंचिद्ब्रह्मबंधो
र्नृपार्थिवात् ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्त्री पुत्र होऊनि एक ॥ तिहीं ठेवा नेला कित्येक ॥ गोत्रज मिळोनि सकळिक ॥ बलात्कारें देख वांटा
नला ॥ २६ ॥ चोरीं फोडोनियां घर ॥ काढूनि नेलें भांडार ॥ आगी लागोनियां घर ॥ वस्तु अपार जळल्या ॥ २७ ॥ हिंसाळ्यानें गेलें
शेत ॥ प्रवर्त बुडाला जेथिचा तेथ ॥ विश्वासू ठेवा घेऊनि [illegible] ॥ खतखूत हारपलें ॥ २८ ॥ भांडीं ठेविला कापूर उडे ॥ समुद्रामाजी
तारूं बुडे ॥ पातिकरावरी घाला पडे ॥ चहूंकडे अपावो ॥ २९ ॥ ठक येऊनि एकांतीं ॥ मुलाम्याचीं नाणीं देती ॥ धनलोभाचे काकुल
ती ॥ हातींची संपत्ती त्यांसि दे ॥ १३० ॥ स्वचक्रपरचक्रविरोधधाडी ॥ खणती लावूनि घर फोडी ॥ तळघरींचें ठेवे काढी ॥ भरोनि
कावडी धन नेती ॥ ३१ ॥ पाणी रिघे पेंवा आंत ॥ तेणें धान्य नासे समस्त ॥ धैंटु झोंबोनि हरी सेत ॥ दैवहत तो झाला ॥ ३२ ॥ गो
ठणीं सेपाऱ्यां रोगू पडे ॥ निमाले गायीह्मशींचे वाडे ॥ उधारें नेले ठाणबंदी घोडे ॥ तो रणीं पडे महायुद्धीं ॥ ३३ ॥ भूमिनिक्षेप जे करूं
जाती ॥ ते आपणियाकडे धूळी वोढिती ॥ तेथ घालूनि निजसंपत्ती ॥ तोंडीं माती स्वयें घाली ॥ ३४ ॥ बुद्धि सांगती वाडवाड ॥ येथूनि
तोंडीं घाला दगड ॥ ऐसे ठेवे बुजिले दृढ ॥ त्याची चाड धरूं गेला ॥ ३५ ॥ ठेवे ठेविले जे अनेक ॥ ते पृथ्वीं गिळिले निःशेख ॥ भाग्य
झालें जैं विमुखें ॥ झाले अनोळख ते ठाय ॥ ३६ ॥ अधर्मैं अदृष्ट झालें क्षीण ॥ विपरीत भासे देहींचें चिह्न ॥ पालटला निजवर्ण ॥
ब्राह्मणपण लक्षेना ॥ ३७ ॥ देखे तो पुसे ज्ञाति कोण ॥ तो सांगे जरी मी ब्राह्मण ॥ ऐकत्याचें नमनी मन ॥ वर्णाग्रपण मावळलें
॥ ३८ ॥ एवं निःशेष नासलें धन ॥ ब्रह्मवर्चस्व गेलें जाण ॥ म्लानवदन हीन दीन ॥ खेदखिन्न अतिदुःखी ॥ ३९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥
स एवं द्रविणे नष्टे धर्मकामविवर्जितः ॥ उपेक्षितश्च स्वजनैश्चिंतामाप दुरत्ययाम् ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ गेलें शेत निमाली कुळवा
डी ॥ घर पाडिलें परचक्रधाडीं ॥ धन नासलें नाहीं कवडी ॥ अधर्म जोडी हे दशा ॥ १४० ॥ नाहीं स्वधर्मकर्म ना दान ॥ विहित भोग
न करी आपण ॥ त्या धनलोभ्याचें नासलें धन ॥ जेवीं कां स्वप्न रंकाचें ॥ ४१ ॥ दैव झालें पराङ्मुख ॥ त्या हतभाग्याची दशा देख ॥

---

१ दुसऱ्याचे दोष. २ शिरे. ३ कोणो धोट. ४ नाहींसे झाले. ५ प्रतिकूल. ३ ब्रह्मतेज.

स्त्रीपुत्रें झालीं विमुख ॥ तिहीं निःशेख दवडिला ॥ ४२ ॥ ऐक धनलोभ्याच्याठायीं ॥ इष्ट मित्र पूर्वींचि नाहीं ॥ गोत्रजासि त्याचें सुख
कायी ॥ दवडिला पाहीं उपेक्षितू ॥ ४३ ॥ निंदा प्रत्यक्ष करिती लोक ॥ रांडा पोरें थुंकती देख ॥ खावया नाहीं निःशेख ॥ मागतां
भीक मिळेना ॥ ४४ ॥ भिकेलागीं जेथ जेथ गेला ॥ ह्मणती काळमुखा येथें कां आला ॥ होता धनलोभें भुलला ॥ भला नागविला
ईश्वरें ॥ ४५ ॥ यापरी धिक्कारिती लोक ॥ धन जाऊनि झाला रंक[1] ॥ चिंतावर्तीं पडला देख ॥ दुःखें महादुःख पावला ॥ ४६ ॥
॥ ॥ श्लोक ॥ ॥ तस्यैवं ध्यायतो दीर्घं नष्टरायस्तपस्विनः ॥ खिद्यतो बाष्पकंठस्य निर्वेदः सुमहानभूत् ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ ॥ धनलो
भ्याचें गेलें धन ॥ धनासवें नवचे आठवण ॥ तें आठवतां फुटताहे मन ॥ तळमळी जाण अतिदुःखें ॥ ४७ ॥ कांटा रुतल्या भुजंगक
पाळीं ॥ पुच्छ तुटल्या सापसुरळी ॥ हो कां जळावेगळी मासोळी ॥ तैसा तळमळी अतिदुःखें ॥ ४८ ॥ मनें आठवितांचि धन ॥
हृदयीं चालिलें स्फुंदन ॥ अश्रुधारा स्रवंती[2] नयन ॥ मूर्च्छापन्न क्षणक्षणां ॥ ४९ ॥ पोटीं दुःखें अतिचरफडे ॥ धाय मोकलूनियां
रडे ॥ उठे बैसे पाहे पडे ॥ लोळे गडबडे आरडत ॥ १५० ॥ मग ह्मणे रे कटकटा[3] ॥ झालों एक वेळ करंटा ॥ अहा विधातया दुष्टा ॥
काय अदृष्टा लिहिलेंसी ॥ ५१ ॥ मज ठावो नाहीं कोणिकडे ॥ विचारु संभवेना पुढें ॥ अति दुःखआलें जी रोकडें ॥ तेणें विचारें रडे
महादुःखी ॥ ५२ ॥ हें अल्प दुःख पावलों येथें ॥ पुढें थोर दुःख आहे मातें ॥ यम दंडील निष्ठुरघातें ॥ कोण तेथें सोडवी ॥ ५३ ॥ म्यां
नाहीं केले पंचमहायज्ञ ॥ नाहीं दीधलें अतिथींसि अन्न ॥ नाहीं केलें पितृतर्पण ॥ माझें दुःख कोण निवारी ॥ ५४ ॥ म्यां नाहीं
केली द्विजपूजा ॥ नाहीं भजलों अधोक्षजा ॥ नाहीं वंदिलें वैष्णवराजा ॥ माझें दुःखसमाजा कोण नाशी ॥ ५५ ॥ मी सर्वथा अक
र्मकारी ॥ बुडालों बुडालों अघोरीं ॥ धांव पाव गा श्रीहरी ॥ मज उद्धरी दीनातें ॥ ५६ ॥ म्यां नाहीं दीधलें दान ॥ मी नाहीं स्मरलों
नारायण ॥ मज येती नरक दारुण ॥ तेथ कोण सोडवी ॥ ५७ ॥ कृष्णा माधवा मुरारी ॥ अच्युतानंता श्रीहरी ॥ गरुडध्वजा गोवर्ध
नधारी ॥ मज उद्धरी दीनातें ॥ ५८ ॥ तुवां रक्षिलें प्रह्लादासी ॥ अंबरीष गर्भवासीं ॥ उदरीं राखिलें परीक्षितीसी ॥ तैसें मज दीनासी
उद्धरी ॥ ५९ ॥ तुवां तारिलें अहल्येसी ॥ उद्धरिलें नष्टा[4] अजामिळासी ॥ उडी घातली गजेंद्रासी ॥ तेणें वेगेंसी मज तारी ॥ १६० ॥
महादोषांची दोषश्रेणी ॥ रामें तारिली कुंटिणी ॥ तेणें लाघवें[5] चक्रपाणी ॥ मज दुष्टालागोनी उद्धरी ॥ ६१ ॥ जळोजळो हा धन
काम ॥ गेलें वृथा माझें जन्म ॥ कुकाचें जें रामनाम ॥ तें मी अधम न ह्मणेची ॥ ६२ ॥ रामनामाच्या प्रतापासाठीं ॥ जळती महा

---

१ भिकारी. २ वाहतात. ३ दैवा. ४ पातकी. ५ कौतुकानें.

पापांच्या कोटी ॥ थोर अधम मी जे स्पर्शीं ॥ नाम वाक्पुटीं न ह्मणेची ॥ ६३ ॥ ऐसा मानोनि अपराध ॥ अनुतापें करितां खेद ॥ उपजला अतिनिर्वेद ॥ तेंचि गोविंद स्वयें सांगे ॥ ६४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स चाहेदमिदं कष्टं वृथात्मा मेऽनुतापितः ॥ न धर्माय न कामाय यस्यार्थायास ईदृशः ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ हात चुरूनि ह्मणे कटकटा ॥ ब्राह्मणदेहो मोक्षाचा वांटा ॥ तो [1]लाहोनि मी अतिकरंटा ॥ धनलोभचेष्टा नाडलों ॥ ६५ ॥ जेणें देहलोभें मोक्षसुख ॥ त्या देहासि म्यां दीधलें दुःख ॥ धनलोभी मी परम मूर्ख ॥ मजऐसा आणिक असेना ॥ ६६ ॥ न वेंचितां धर्मकामासी ॥ अर्थ जोडिला सा[2]यासीं ॥ त्या अर्थाची दशा ऐशी ॥ अतिदुःखेंसी मज फळला ॥ ६७ ॥ बाप धनलोभाचें कवतिक ॥ नाहीं इहलोक ना परलोक ॥ थितें अंतरलें मोक्षसुख ॥ भोगवी नरक अनिवार ॥ ६८ ॥ देखे नरकाचे ठायीं ॥ आकल्प बुडतां ठावो नाहीं ॥ धनलोभ घा[illegible]तैसेठायीं ॥ तें म्यां नरदेहीं जोडिलें ॥ ६९ ॥ जो जन्मला ब्राह्मणदेहीं ॥ तो पूज्य होय लोकीं तिहीं ॥ मोक्ष लागे त्याच्या पायीं ॥ म्यांअभाग्यीं नाशिला ॥ १७० ॥ लोभें जें धन संचिलें ॥ तें निःशेष नासोनि गेलें ॥ परी मजलागीं अतिदुःखी केलें ॥ बांधोनि दीधलें महानरका ॥ ७१ ॥ उत्तम देहो झाला प्राप्त ॥ तो धनलोभें केला व्यर्थ ॥ आयुष्य गेलें हातोंहातें[3] ॥ अतिसंतप्त अनुतापें ॥ ७२ ॥ धनलोभें अचाट ॥ वृथा गेले माझे कष्ट ॥ वैराग्य उपजलें उद्भट ॥ अतिचोखट सविवेक ॥ ७३ ॥ धनलोभी जो कां नर ॥ तो सकळदुःखांचें भांडार ॥ धनबद्धक तो पामर ॥ स्वमुखें साचार निंदित ॥ ७४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रायेणार्थाः कदर्याणां न सुखाय कदाचन ॥ इह चात्मोपतापाय मृतस्य नरकाय च ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्राय[4]शां जे धनबद्धक ॥ त्यांसि इहलोकीं नाहीं सुख ॥ धनरक्षणीं अतिदुःख ॥ तें जातां देख प्राणांत ॥ ७५ ॥ धनाग[5]मनीं अतिकष्ट ॥ धनरक्षणीं कलह श्रेष्ठ ॥ धननाशें होय हृदयस्फोट ॥ इहलोकीं कष्ट धनलोभ्या ॥ ७६ ॥ यापरी इहलोकदुःख ॥ अधमें खुंटला परलोक ॥ मरतां उरीं आदळे नरक ॥ आवश्यक धनलोभ्या ॥ ७७ ॥ जो धर्म करीना स्वयें न खाये ॥ तो मजसारिखा कदर्यु होये ॥ त्यासि चढतें दुःख पाहे ॥ नाहीं सुखसोये कद[6]र्या ॥ ७८ ॥ लोभाची वस्ती जियेठायीं ॥ तेथ स्वप्नींही सुख नाहीं ॥ लोभ अतिशयें निंद्य पाही ॥ तें आपण स्वमुखेंही सांगत ॥ ७९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यशो यशस्विनां शुद्धं श्लाघ्या ये गुणिनां गुणाः ॥ लोभः स्वल्पोपि तान् हंति श्वित्रो रूपमिवेप्सितम् ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ रणीं पडतां मुख्य धुरे[7]सीं ॥ जो अंगें विभांडी त्या रणासी ॥ खांदीं वाऊनि रायासी ॥ येवढी कीर्ति ज्यासी जोडिली ॥ १८० ॥ लोभ संचरोनि त्यापाशीं ॥ एक शेत मागवी रायासी ॥ तेंचि अपकीर्ति होय त्यासी ॥ जग उपहासी

---

[1] प्राप्त होऊन. [2] अतिश्रमानें. [3] बोलतां बोलतां. [4] बहुतकरून. [5] द्रव्य प्राप्त होण्यास. [6] कृपणास. [7] पुढारी.

मूर्खत्वा ॥ ८१ ॥ त्यासि न मागतां राजा जाण ॥ करूंपाहे आपणासमान ॥ त्यासि लोभें आणोनि नागवण ॥ मूर्खपण स्थापिलें
॥ ८२ ॥ स्वयें करितां कन्यादान ॥ सकळ कुळ होय पावन ॥ तेथेंही लोभें घेतां धन ॥ अधःपतन लोभिया ॥ ८३ ॥ दाता देऊनियां
दान ॥ दानप्रसंगें उपार्जी[1] धन ॥ तेंचि दात्यासि दूषण ॥ लोभ लांछन दानासी ॥ ८४ ॥ वेदशास्त्रें करूनि पठण ॥ पंडित झाले अतिस
ज्ञान ॥ तेही लोभें छळिले जाण ॥ ज्ञानाभिमान प्रतिष्ठे ॥ ८५ ॥ देहप्रतिष्ठेच्चिये सिद्धी ॥ पंडित पंडितां वादविधी ॥ नाना छळणोक्तीं
विरोधी ॥ ठकिले[2] त्रिशुद्धी ज्ञाते लोभें ॥ ८६ ॥ सविवेक सज्ञान ज्ञात्यासी ॥ लोभ आणी निंदास्पदासी[3] ॥ इतरांची गति काइसी ॥ ते
लोभाची दासी होऊनि ठाती ॥ ८७ ॥ लोभ शुद्धासि करी अशुद्ध ॥ लोभ तेथ निंदास्पद[4] ॥ तोचि दृष्टांत विशद ॥ ऐक प्रसिद्ध सांगत
॥ ८८ ॥ कुलशील अतिसुकुमार ॥ रूपें सर्वांगमनोहर ॥ नाकीं श्वेतता[5] अणुमात्र ॥ निंद्य सुंदर तेणें होय ॥ ८९ ॥ तेवीं अल्पही लो
भाची जे वस्ती ॥ नाशी गुणौदार्ययशकीर्ती ॥ लोभाऐसा त्रिजगतीं ॥ कर्ता अपकीर्ति आन[6] नाहीं ॥ १९० ॥ धनलोभीं सदा विरोधू ॥
धनलोभ तोडी सखेबंधू ॥ धनलोभाऐसा नाहीं बाधू ॥ अति अशुद्धू आणिक असेना ॥ ९१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अर्थस्य साधने सिद्ध
उत्कर्षे रक्षणे व्यये ॥ नाशोपभोग आयासस्त्रासश्चिंता भ्रमो नृणाम् ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रथम शिणावें द्रव्य जोडितां ॥ दुसरें शि
णावें तें वाढवितां ॥ द्रव्य जरी झालें उत्कर्षता ॥ तरी लोभ सर्वथा पुरे न ह्मणे ॥ ९२ ॥ द्रव्यालागीं भावार्थतां ॥ जैसे कष्टती सर्वथा ॥
तैसा जरी कष्टे परमार्था ॥ तैं ब्रह्म तत्त्वतां खेळणें होय ॥ ९३ ॥ एवंकष्टीं जोडल्या द्रव्यासी ॥ रक्षणीं अतिचिंता मानसीं ॥ अतिश
य लागली जीवासी ॥ अहर्निशीं धुकधुकी[7] ॥ ९४ ॥ स्त्री पुत्र हे मातापिता ॥ त्यांसि पातिजेना[8] सर्वथा ॥ आपणाहूनि परता ॥ विश्वा
सु अर्था मानेना ॥ ९५ ॥ वित्तरक्षणीं निजचिंता ॥ विसरे[illegible]यां निजघाता ॥ चोरापासोनि राखे चित्ता ॥ तिन्ही अवस्था एकाग्र
॥ ९६ ॥ ऐशी एकाग्रता करूनी ॥ जरी लागता भगवद्भजनीं ॥ तरी वश्य होता चक्रपाणी ॥ अर्धक्षणीं साधक ॥ ९७ ॥ उचितानुचि
त विवाहासी ॥ द्रव्य वेंचितां उदरासी ॥ अतिशय होय कासाविसी ॥ धनव्ययो त्रासासी उपजवी ॥ ९८ ॥ एवं जोडूनि रक्षितां द्रव्या
सी ॥ अवचटें नाश होय जैं त्यासी ॥ तैं अतिभ्रम चढे मानसीं ॥ होती धनपिशीं बद्धक ॥ ९९ ॥ द्रव्यार्जनीं वसे[9] प्रयास ॥ द्रव्यर
क्षणीं चिंतेचा वास ॥ द्रव्यें[10]व्ययीं वसे त्रास ॥ भ्रमाचा रहिवास धननाशीं ॥ २०० ॥ आदिमध्यावसानीं पाही ॥ द्रव्य तें समूळ अ
पायी ॥ तेथ सुखाचा लेश नाहीं ॥ हें नातें ऐसें पाही मज जाहलें ॥ १ ॥ आयासत्रासचिंतेसहित ॥ धनापाशीं भ्रम नांदत ॥ अर्थ

---

१ मिळवितो. २ फसले. ३ निंदा करण्याच्या योग्यतेस. ४ निंदेचें स्थल. ५ पांढऱ्या कोडाचा डाग. ६ दुसरा. ७ काळजी. ८ विश्वासुक मानित नाहीं. ९ असतात. १० द्रव्य खर्च झालें असतां.

तितुका अनर्थयुक्त ॥ तोचि अर्थ स्वयें सांगे ॥ २ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्तेयं हिंसाऽनृतं दंभः कामः क्रोधः स्मयो मदः ॥ भेदो वैरमविश्वासः संस्पर्धा व्यसनानि च ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ ॥ अर्थ सर्वांगें अनर्थभूत ॥ हें माझें वचन त्रिसत्य ॥ पृथ्वीमाजी जे जे अनर्थ ॥ ते ते अर्थांत उपजती ॥ ३ ॥ पुसाल अर्थांचे अनर्थ ॥ ते सांगतां असंख्य अनंत[2] ॥ संक्षेपें सांगेन येथ ॥ पंधरा अनर्थ अर्थासी ॥ ४ ॥ प्रथम अनर्थ अर्थासी ॥ चोरी वसे अर्थापाशीं ॥ अर्थू नाहीं गा जयापाशीं ॥ चोरापासून त्यासी भय नाहीं ॥ ५ ॥ द्रव्य नाहीं ज्याच्या हातीं ॥ त्यातें देखोनि चोर भिती ॥ कांहीं मागेल आह्मांप्रती ॥ ह्मणोनि लपती त्याभेणें ॥ ६ ॥ अतर्क्य नेत्रांतरें नेणें ॥ कां धातुवादें सर्व घेणें ॥ परस्व भोळ्यानीं बुडवणें ॥ कां विजनीं हरणें सर्वस्व ॥ ७ ॥ मार्गीं पडलें धन पराचें ॥ स्वयें जाणोनि अमकियाचें ॥ नाहीं देणें त्यासि साचें ॥ हेंही चोराचें लक्षण ॥ ८ ॥ स्वर्णस्तेयें[3] [illegible]रकप्राप्ती ॥ ऐसे विवेकीही चोरी करिती ॥ मा इतरांची कायशी गती ॥ चोरीची वस्ती धनापाशीं ॥ ९ ॥ जगीं महापापिणी चोरी ॥ त[illegible] कोणी बैसों नेदी द्वारीं ॥ ते राहिली सुवर्णामाझारीं ॥ धन तेथ चोरी निश्चित ॥ २१० ॥ देखतांचि त्या धनासी ॥ विकल्पी होती संन्यासी ॥ इतरांची कथा काइसी ॥ चोरी धनापाशीं स्वयें नांदे ॥ ११ ॥ प्रथम अनर्थलक्षण ॥ धनापाशीं चोरी जाण ॥ दुसरें हिंसेचें आयतन[4] ॥ तेंही निरूपण अवधारीं ॥ १२ ॥ धनालागीं द्वंद्व दारुण ॥ पुत्र पौत्र मारिती जाण ॥ धनालागीं घेती प्राण ॥ सुहृद्पण सांडोनी ॥ १३ ॥ धनलोभाचें कवतिक ॥ कन्या बापासि देतसे विख ॥ पितृघाताचें न मानी दुःख ॥ निष्ठुर देख धनलोभ ॥ १४ ॥ धनलोभीं सांडी बाप माये ॥ स्त्री घेऊनि वेगळा राहे ॥ तेथही धनलोभ पाहे ॥ वैर होये स्त्रीपुरुषां ॥ १५ ॥ धनलोभाची नवलपरी ॥ पुत्र पित्यातें जीवें मारी ॥ पिता पुत्रातें संहारी ॥ कठिन भारी धनलोभ ॥ १६ ॥ जे नवमास वाहे उदरांत ॥ जे सदा सोशी नरक मूत ॥ ते मातेचा करी घात ॥ द्रव्यानिमित्त निजपुत्र ॥ १७ ॥ अभिनव धनलोभाची त्राय ॥ नवल तें मी सांगों काय ॥ पोटीचा पुत्र मारी माय ॥ ऐसा अनर्थ होय धनासाठीं ॥ १८ ॥ एवं हिंसा ते हे संपूर्ण ॥ दुसरें अनर्थलक्षण ॥ आतां असत्याचें विंदान[5] ॥ तेंही निरूपण स्वयें सांगे ॥ १९ ॥ असत्य जन्मलें अर्थाच्या पोटीं ॥ अर्थबळें तें दाटुगें सृष्टीं ॥ अर्थासवें असत्य उठी ॥ असत्याची गांठी अर्थेंसी ॥ २२० ॥ तो अर्थ असे जयापाशीं ॥ कां अर्थअपेक्षा जयासी ॥ तेथ असत्य वसे कुटुंबेंसी ॥ धन तें मिरासी मिथ्यात्वीं ॥ २१ ॥ अर्थबळ थोर असे त्यासी ॥ मिथ्या[6] बोलवी बापासी ॥ धनलोभें झकवी[7] मातेसी ॥ सत्यत्व धनापाशीं असेना ॥ २२ ॥ क्रयविक्रयीं[8] धनलोभें जाण ॥ मिथ्या बोलती साधारण ॥ परी वेदशास्त्रसंपन्न ॥

---

१ क्लेशदायक. २ कधीं न सरणारे असे. ३ सोनें चोरल्यानें. ४ जागा. ५ कारण. ६ खोटें. ७ फसवितो. ८ देण्याघेण्यांत.

धनार्थ सज्ञान बोलती मिथ्या ॥ २३ ॥ वेदींचा आठव नये पूर्ण ॥ तो संभावनेलागीं जाण ॥ ह्मणवी मी वेदसंपन्न ॥ कराया यजनं[1]
नीचाचें ॥ २४ ॥ भाग देऊनि मध्यस्था ॥ मी चतुःशास्त्री विख्याता ॥ ऐसें मिथ्यात्वें छळी पंडितां ॥ राजद्रव्यार्थालागूनी ॥ २५ ॥
विरक्त ह्मणविती परमार्थी ॥ तेथही असत्यें घातली वस्ती ॥ नाथल्या सिद्धि दाविती ॥ अर्थप्राप्तीलागोनी ॥ २६ ॥ अर्थी असत्याचा
बडिवारू ॥ तद्भावें केला जो सद्गुरू ॥ त्यासि मिथ्या नास्तिक विचारू ॥ एकांतीं नेंरू[2] प्रतिपादी ॥ २७ ॥ अर्थ नाहीं जयापाशीं ॥ ना
अर्थ कल्पना जयासी ॥ असत्य स्पर्शेना तयासी ॥ कदाकाळेंसी कल्पांतीं ॥ २८ ॥ अर्थापाशीं असत्य जाण ॥ त्याचें सांगीतलें लक्षण
॥ आतां अर्थापाशीं दंभं[3] संपूर्ण ॥ तेही वोळखण अवधारी ॥ २९ ॥ पोटीं नाहीं परमार्थ ॥ धरोनियां अर्थस्वार्थ ॥ स्वयें ह्मणविती
हरिभक्त ॥ या नांव निश्चित भजनदंभू ॥ २३० ॥ धन जोडावयाकारणें ॥ टिळे माळा मुद्रा धारणें ॥ धनेच्छा उपदेश देणें ॥ या नांव
जाणणें दीक्षादंभू ॥ ३१ ॥ देखोनि धनवंत थोरू ॥ त्याचे उपदेशीं अत्यादरू ॥ नेमूंनि[4] गुरुपूजाकरभारू ॥ सांगे मंत्रू तो दांभिक ॥ ३२ ॥
जयांपासोनि होय अर्थप्राप्ती ॥ ते समर्थ शिष्य आवडती ॥ दीन शिष्यातें उपेक्षिती ॥ हे दांभिकस्थिती गुरुत्वा ॥ ३३ ॥ गुरूसि द्यावें
तनु मन धन ॥ ऐसें उपदेशूनि जाण ॥ जो द्रव्यसंग्रही आपण ॥ तें दांभिकपण गुरुत्वा ॥ ३४ ॥ जेथ धनलोभ गुरूपाशीं ॥ तो काय
तारील शिष्यासी ॥ धनलोभाची जाती ऐसी ॥ करी गुरुत्वासी दांभिक ॥ ३५ ॥ अखंड भूतीं ऐसा जाण ॥ गुरूपाशील न्यावया धन ॥
उपदेश घेऊनि दीन ॥ तो दांभिक जाण शठ शिष्य ॥ ३६ ॥ गुरुउपदेशें शिकोनि युक्ती ॥ स्वयें ज्ञानाभिमाना येती ॥ गुरूतें मानी
प्राकृत[5]स्थिती ॥ तोहि निश्चितीं दांभिकू ॥ ३७ ॥ मी एक सधन सज्ञान ॥ ऐसा सूक्ष्मरूपें ज्ञानाभिमान ॥ करी गुरुआज्ञेचें हेळण ॥ हेंही
लक्षण दंभाचें ॥ ३८ ॥ अहं ब्रह्म हेही स्फूर्ती ॥ न साहे जेथ स्वरूपस्थिती ॥ तेथ मी ज्ञाता हे धोंगडी युक्ती ॥ स्फुरे निश्चितीं सूक्ष्मदंभें
॥ ३९ ॥ जीवासि देहाचें मध्यस्थान ॥ तेथ दंभाचें अधिष्ठान ॥ त्यासि मिळोनियां मन ॥ ज्ञानाभिमान उपजवी ॥ २४० ॥ नवल दंभाचें
कवतिक ॥ आह्मी अग्निहोत्री याज्ञिक ॥ तेचि जीविका करूनि देख ॥ नाडले वेदपाठक धनलोभें ॥ ४१ ॥ सोडोनि परमार्थाची पोथी ॥
ब्रह्मज्ञान सांगे नानायुक्तीं ॥ तेही ज्ञाते दंभें नाडिजेती ॥ द्रव्यासक्ती धनलोभें ॥ ४२ ॥ मंत्रतंत्रांची कथा कोण ॥ मुख्य गायत्री वेंचिती
ब्राह्मण ॥ आह्मी स्वधर्मनिष्ठापावन ॥ ह्मणती जाण दांभिक ॥ ४३ ॥ दंभें नाडिले संन्यासी ॥ लौकिक राखणें पडे त्यासी ॥ ज्यालागीं
मुंडिले शिर्सीं ॥ त्या अर्थासी विसरले ॥ ४४ ॥ दृष्टिसूंनि[6] अन्नसन्मान ॥ संन्यासी करिती शौच स्नान ॥ शुद्ध न करवेचि निजमन ॥

---

१ याग. २ मनुष्य. ३ ढोंग. ४ द्रव्य नि[illegible]मित घेऊन. ५ अज्ञानी. ६ पाहून.

वादव्याख्यान अतिदंभें ॥ ४५ ॥ घ्यावया परद्रव्य परान्न ॥ कां देहप्रतिष्ठेलागीं जाण ॥ मिथ्या दाखवी सात्विकपण ॥ हें दंभलक्षण पैं चौथें ॥ ४६ ॥ द्रव्यापाशीं वसे काम ॥ अतिशयें अतिदुर्गम ॥ द्रव्य तेथ काम संभ्रम ॥ अतिविषम सांगत ॥ ४७ ॥ द्रव्य नसतां अपेक्षा काम ॥ ती सबाह्य करवी अतिभ्रम ॥ अनेक कष्टाचें विषम ॥ अतिदुर्गम भोगवी ॥ ४८ ॥ धन झालिया उन्माद[1] काम ॥ करूं लागे अगम्यागम ॥ उपजवी नाना अधर्म ॥ निंद्य कर्म धनवंता ॥ ४९ ॥ कामु जडलासे धनेंसी ॥ तो सदा छळी धनवंतासी ॥ काम खवळे धनापाशीं ॥ अहर्निशीं[2] मुसमुशित ॥ २५० ॥ धनापाशीं अतिउद्धतू ॥ काम पांचवा अनर्थू ॥ काम तेथ निश्चितू ॥ क्रोध नांदतू सैन्येंसी ॥ ५१ ॥ कामप्राप्तीसी आडवी काडी ॥ होतां क्रोधाची पडे उडी ॥ खवळला अतिकडाडी ॥ तापाच्या कोडी निर्दाळित ॥ ५२ ॥ जप तप निष्ठा[3] नेम ॥ शिणोनि साधिलें दुर्गम ॥ क्रोध खवळल्या परम ॥ ते करी भस्म क्षणार्धें ॥ ५३ ॥ धनाकडे कोणी दावी बोट ॥ तेथ क्रोध उठी अचाट[4] ॥ वाढवी प्राणांत कचाट ॥ क्रोध अतिदुष्ट धनेंसी ॥ ५४ ॥ होतां काम अवरोधू ॥ कां धनव्ययाचा[5] संबंधू ॥ तेसंधीं खवळे क्रोधू ॥ अतिविरोधू उन्मत्त ॥ ५५ ॥ धनापाशीं क्रोध समर्थू ॥ हा साहवा अतिअनर्थू ॥ धनापाशीं गर्व अद्भुतू ॥ तेंचि निश्चितू सांगत ॥ ५६ ॥ धन गर्वाचिये पुष्टी ॥ सखा बाप नाणी दृष्टीं ॥ मातेतें ह्मणे करंटी ॥ इतरांच्या गोष्टी त्या काय ॥ ५७ ॥ सिद्ध साधक तपासी ॥ त्यांतें देखोनि उपहासी[6] ॥ ह्मणे करंटे ते होती संन्यासी ॥ हरिदासासी विटावी ॥ ५८ ॥ अंगीं धनाचें समर्थपण ॥ त्याहीवरी जैं झालें ज्ञान ॥ तैं गर्वाचा ताठा चढे पूर्ण ॥ जेवीं आरें धारण गिळिला ॥ ५९ ॥ धनज्ञानगर्वाची जात कैशी ॥ गर्व करी सद्गुरूसी ॥ त्याच्या वचनातें हेळसी ॥ शेखीं धिक्कारेंसी निर्भर्त्सी ॥ २६० ॥ धनज्ञानगर्वाचें लक्षण ॥ देखे सद्गुरूचे अवगुण ॥ गुरूसि ठेवी मूर्खपण ॥ मी[7] एक सज्ञान हें मानी ॥ ६१ ॥ जो भ्रांत ह्मणे सद्गुरूसी ॥ गुरु मानी त्यातें द्वेषी ॥ बाप गर्वाची जाति कैशी ॥ देखे गुणदोषांसी सर्वांच्या ॥ ६२ ॥ नवल गर्वाची पैं काहणी ॥ गुरु सर्वथा सत्य नमानी ॥ दोष पडतांचि कानीं ॥ सत्य मानी निश्चित ॥ ६३ ॥ सात्विक ये गर्वितापुढें ॥ त्यासि सर्वथा मानी कुडें ॥ अतिसात्विकता दृष्टीं पडे ॥ तरी मानी वेडें अर्बुज[9] ॥ ६४ ॥ अंगीं भवंडी भरें लाठी ॥ तैं भूमी लागे ललाटीं ॥ साष्टांग नमावया सृष्टीं ॥ पात्र गर्वदृष्टी दिसेना ॥ ६५ ॥ तेथें कोण दे सन्मान श्रेष्ठा ॥ कायसी वृद्धाची प्रतिष्ठा ॥ धनगर्वें चढला ताठा ॥ मी एक मोठा ब्रह्मांडीं ॥ ६६ ॥ एक गुरुसेवा विश्वासिकू ॥ निजसेवा झाला वश्यकू ॥ त्यासि गर्व चढे मी सेवकू ॥ तो अतिबाधकू सेवका ॥ ६७ ॥ ऐसा अतिगर्वें उन्मंद्ध[10] ॥ हा सातवा गर्वबाध ॥ आतां धनापा

---

१ उन्मत्तपणा. २ रात्रंदिवस. ३ भक्ति. ४ अत्यंत. ५ द्रव्य खर्च करण्याचा. ६ थट्टा करितो. ७ मीच. ८ तऱ्हा. ९ व्यवहारशून्य. १० उन्मत्त.

शीं महामद ॥ तोही संबंध द्विज सांगे ॥ ६८ ॥ जयासि चढे धनमदू ॥ तो उ[1]घडे डोळां होय अंधू ॥ कानीं नायके शब्दबोधू ॥ धनमदें
स्तब्धू सर्वदा ॥ ६९ ॥ धनमदें अति अहंता ॥ धनमदें उद्धतता ॥ धनमदें अघातघाता ॥ करी सर्वथा अधर्म ॥ २७० ॥ धनमद अ
ति अपवित्र ॥ तो चढल्या होय अतिदुस्तर ॥ न ह्मणे पात्र अपात्र ॥ विचरे विचित्र योनीसी ॥ ७१ ॥ जो धनमदा वश होय ॥ तो न
मानी कोणाचेंही भय ॥ न जावें तेथ स्वयें जाय ॥ न खावें तें खाय यथेष्ट ॥ ७२ ॥ न धरावा तो संग धरी ॥ न करावें तें कर्म करी ॥
न बोलावें तें उच्चारी ॥ जनाभीतरीं उद्धतू ॥ ७३ ॥ न देखे आपुलें केलें ॥ परापवाद स्वयें बोले ॥ नायके बापाचें शिकविलें ॥ वेडें के
लें धनमदें ॥ ७४ ॥ शिकविलें तें नायके ॥ वा[2]रिलें तें करी आवश्यकें ॥ साधुनिंदा निजमुखें ॥ यथासुखें जल्पत ॥ ७५ ॥ न मानी स्व
याती स्वाचारू ॥ न मानी दोष अनाचारू ॥ न मानी वडिलांचा विचारू ॥ धनमदें थोरू मातला ॥ ७६ ॥ आधींच तारुण्यें अतिला
ठा ॥ वरी धनमदें चढला ताठा ॥ यापरी मातला मोठा ॥ न चाले वाटा सुपथीं ॥ ७७ ॥ स्त्रीकामें अतिविव्हळ ॥ न विचारी कुलशी
ळ ॥ न ह्मणे सकाळ सांजवेळ ॥ विचरे केवळ खर जैसा ॥ ७८ ॥ अभिलाषूनि परनारी ॥ दिवसां विचरे दुपारीं ॥ गत[3]धवाही अंगी
कारी ॥ भय न धरी पापाचें ॥ ७९ ॥ जो मातला करूनि मद्यपान ॥ तो मद तत्काळ उतरे जाण ॥ त्याहूनि धनमद दारुण ॥ आल्या
ही मरण उतरेना ॥ २८० ॥ अकर्म करितां आपण ॥ तेंचि निजघातें घेईल प्राण ॥ हेंही नाठवे आठवण ॥ धनमदें जाण भुलला ॥ ८१ ॥
महा[4]अनर्थी धनमद जाण ॥ हें आठव्या अनर्थाचें लक्षण ॥ आतां धनापाशीं भेद पूर्ण ॥ तेंचि निरूपण द्विज सांगे ॥ ८२ ॥ भेद ज
न्मला धनाचे कुशीं ॥ धन तेथ भेदाची मिरा[5]शी ॥ भेद सपरिवार धनापाशीं ॥ अहर्निशीं जागत ॥ ८३ ॥ हातां आलिया बहु धन ॥
मातेहूनि राखे भिन्न ॥ पित्यासि करी वंचन ॥ स्त्रियेसिही जा[illegible] कळों नेदी ॥ ८४ ॥ अर्थ पुत्रासी अ[6]तर्क्यता ॥ तेथ इतरांची कोण क
था ॥ भेदू तो अर्थापरता ॥ जगीं सर्वथा असेना ॥ ८५ ॥ माथां साहोनि शस्त्रघात ॥ बंधू बंधूसि रणीं साह्य होत ॥ तेचि बंधू अ
नाप्त होत ॥ वांटितां अर्थविभाग ॥ ८६ ॥ मित्र मित्रांसि वेंचि[7]ती प्राण ॥ तेथें प्रवेशोनियां धन ॥ विकल्पा आणि मित्रपण ॥ भेद
दारुण धनापाशीं ॥ ८७ ॥ आपणचि गांठीं बांधिलें धन ॥ तें क्षणक्षणां पाहे आपण ॥ येथवरी धनापाशीं जाण ॥ विकल्प पूर्ण नां
दत ॥ ८८ ॥ ऐसा धनापाशीं भेद जाण ॥ हें नववें अनर्थलक्षण ॥ अतिशयें अतिनिर्वाण ॥ वैर दारुण धनेंसी ॥ ८९ ॥ धनापाशीं
वैर पूर्ण जाण ॥ हें अंगें भोगूनि आपण ॥ सांगे कदर्यु ब्राह्मण ॥ वैरलक्षण धनाचें ॥ २९० ॥ पित्यापुत्रांमाजी विरोधू ॥ पाडितो हा

---

१ दिसत असतां. २ निषेध केलेलें. ३ विधवा स्त्रीही. ४ मोठा अनर्थ करणारा. ५ अक्षयीचें स्थान. ६ न समजणारा. ७ देतात. ८ भिक्षु.

द्रव्यसंबंधू ॥ वैरी करी अतिसखे बंधू ॥ तो हा प्रसिद्ध धनलोभ ॥ ९१ ॥ आपुल्या कळवळ्याचे सुहृद ॥ त्यांसी धनलोभ पाडी द्वंद्व[1] ॥ धनास्तव सुबद्ध ॥ वैर विरुद्ध सर्वांसी ॥ ९२ ॥ प्राणाहूनि पढिये[2] मित्रू ॥ त्यासि धनलोभ करी शत्रू ॥ धनलोभ अतिअपवित्रु ॥ वैरी दुस्तरू जगीं हा ॥ ९३ ॥ बंधु कलहें धन वांटितां ॥ अधिक न ये आपुल्या हातां ॥ तैं वांटा करिती जे धर्मतां ॥ त्यां साधूंसि तत्त्वतां वैर चाळी ॥ ९४ ॥ जिचे उदरीं जन्मला आपण ॥ जिचें सदा केलें स्तनपान ॥ ते मातेसि धनलोभें जाण ॥ वैर संपूर्ण चालवी ॥ ९५ ॥ आपली जे कां निजजननी[3] ॥ अर्थ तीतें करी वैरिणी ॥ बाहेर घाली घरांतूनी ॥ मुख परतोनी पाहेना ॥ ९६ ॥ ज्याचेनि तुटे भवबंधन ॥ ज्याचेनि बोलें होइजे पावन ॥ त्या सद्गुरूसि अबोला[4] जाण ॥ धनाभिमान धरवित ॥ ९७ ॥ धनाभिमानाचा बडिवार ॥ सद्गुरुमाजी पाडी वैर ॥ धनाभिमानी अणुमात्र ॥ नव्हे निर्वैर कोणासी ॥ ९८ ॥ जें सांगीतलें निरूपण ॥ त्या नांव वैर संपूर्ण ॥ हें दहावें अनर्थ लक्षण ॥ अविश्वासी धन तें ऐक ॥ ९९ ॥ धनाभिमानाचा विलास ॥ न मानी पित्याचा विश्वास ॥ पूर्ण बंधूचा अविश्वास ॥ केवीं सुहृदांस पातेजे ॥ ३०० ॥ आत्मा वै पुत्रनामासी ॥ जो साचार धणी सर्वस्वासी ॥ त्या पातेजेना निजपुत्रासी ॥ अति अविश्वासी धनलोभ ॥ १ ॥ धर्म अर्थ काम संपूर्ण ॥ त्रिसत्य सत्यें अवंचन ॥ पूर्वजांची भाक निर्वाण ॥ देऊनि आपण जे परणी[6] ॥ २ ॥ जिणें जीवू प्राण सर्वस्वेंसी ॥ साचार अर्पिला भ्रतारासी ॥ ऐशियेही धर्मपत्नीसी ॥ अविश्वासी धनलोभ ॥ ३ ॥ जे उदरीं वाहे नवमासी ॥ जे सर्वदा विष्ठामूत्र सोशी ॥ धनलोभाची जाती कैशी ॥ तेही मातेसी न विश्वासे ॥ ४ ॥ धनाभिमान ये जयापाशीं ॥ तो विश्वासेना सद्गुरूसी ॥ इतरांची कथा कायसी ॥ पूर्ण अविश्वासी धनमानी ॥ ५ ॥ अविश्वासाचें मुख्य कारण ॥ धन आणि दुसरी स्त्री जाण ॥ तेथ मोहावलें ज्याचें मन ॥ तो अतिसंपन्न अविश्वासे ॥ ६ ॥ जो धनमानी आणि स्त्रीजित[7] ॥ त्यासि विमुख होय हृदयस्थ ॥ त्यातें सद्गुरूही उपेक्षित ॥ परम अनर्थ अविश्वासें ॥ ७ ॥ सकळदोषां मुकुटमणी ॥ अविश्वास बोलिला पुराणीं ॥ जो प्रकटतां अर्धक्षणीं ॥ करी धुळदाणी वृत्तीची ॥ ८ ॥ अविश्वासा अभिमान भेटे ॥ तैं मुक्ताची मुक्तता तुटे ॥ मग विकल्पाचेनि नेटें ॥ घाली उफराटें देहबंदीं ॥ ९ ॥ अविश्वासें कवळिल्या वित्ता ॥ अभिमानें ह्मणे मी ज्ञाता ॥ तेव्हां उर्भउभ्यां पळे आस्तिकता ॥ देखे नास्तिकता सर्वत्र ॥ ३१० ॥ अविश्वास येतांचि पहाहो ॥ सकुटुंब पळे सद्भावो ॥ मग लोकत्रयीं अभावो ॥ नांदवी निर्वाहो विकल्पेंकरूनी ॥ ११ ॥ वाडेंकोडें अविश्वासी ॥ विकल्पू नांदे अहर्निशीं ॥ जेथ रिंगावा[9] अविश्वासासी ॥ विकल्प त्यासी नागवी[10] ॥ १२ ॥ अंगोंवांगीं अविश्वास ॥ परमा

---

१ वैर. २ आवडते. ३ आई. ४ द्वेष. ५ प्रताप. ६ विवाहित करितो. ७ स्त्रीलंपट. ८ तत्काल. ९ थार. १० बुडवितो.

र्थराष्ट्र पाडी वोस ॥ सद्गुरूचेही दावी दोष ॥ न मानी विश्वास ब्रह्म्याचा ॥ १३ ॥ यालागीं सकळदोषांचा राजा ॥ अविश्वासाहूनि नाहीं दुजा ॥ तो रिगोनियां निजपैजा ॥ विभांडी वोजा महासिद्ध ॥ १४ ॥ जिकडे अविश्वासें चाली केली ॥ तिकडे परमार्था पळणी झाली ॥ विकल्पाची धाडी आली ॥ ते संधी नागवली बहुतेकें ॥ १५ ॥ सिद्धाचें गेलें सिद्धिभूषण ॥ साधकें सपाई नागवलीं जाण ॥ रानभरी झाले साधारण ॥ श्रद्धेचें उद्यान[1] छेदिलें ॥ १६ ॥ यमनियमांचीं नगरें जाळी ॥ क्रोधु तापसा[2] करी होळी ॥ मोक्षफळें सफळिता केळी ॥ समूळ उन्मळी मोहगजू ॥ १७ ॥ शमदमांचें घरटें ॥ खणोनि सांडिलें आव्हाटे ॥ वोस विवेकाचे चोहटे ॥ कोणी ते वाटें वागेना ॥ १८ ॥ व्रतोपवास यांचीं साजिरीं ॥ निष्काम उपवनें चौफेरीं ॥ तीं जाळिलीं उपराउपरी ॥ नानापरी विकल्पें ॥ १९ ॥ ऐशिया अविश्वासासी ॥ ज्ञानाभिमानी आला भेटीसी ॥ विकल्पें अभय देऊनि त्यासी ॥ आपणियापाशीं राहविलें ॥ ३२० ॥ ऐशिया अविश्वासापुढें ॥ परमार्थ काईसें बापुडें ॥ विकल्पाचें बळ गाढें[3] ॥ तो करी कुडें तत्काळ ॥ २१ ॥ पोटांतून जो अविश्वासी ॥ तो सदा देखे गुणदोषांसी ॥ अखंड द्वेषी परमार्थासी ॥ हा त्यापाशीं स्वभावो ॥ २२ ॥ यापरी अविश्वासी ॥ बद्धवैर पडे परमार्थासी ॥ जो पोटींचा अविश्वासी ॥ हांसल्याही त्यापाशीं नवचावें दिनीं ॥ २३ ॥ सकळदोषांमाजी समर्थ ॥ सकळदोषांचें राजत्व प्राप्त ॥ तो हा अकरावा अनर्थ ॥ असे नांदत अविश्वासीं ॥ २४ ॥ अकराही इंद्रियांसी ॥ पूर्ण करी अविश्वासेंसी ॥ यालागीं अकरावें स्थान यासी ॥ वस्ति[4] अविश्वासासी मनामाजी ॥ २५ ॥ मुख्यत्वें स्पर्धेचें[5] आयतन[6] ॥ बहुविद्या कां बहुधन ॥ हेंचि स्पर्धेचें जन्मस्थान ॥ येथूनि जाण तें वाढे ॥ २६ ॥ विद्या झालिया संपन्न ॥ पंडित पंडितां हेळण ॥ मुख्य गुरूसीच स्पर्धा करी जाण ॥ हें स्पर्धालक्षण विद्येचें ॥ २७ ॥ गांठीं झालिया धन ॥ स्पर्धा खवळे दारुण ॥ कुबेर [illegible] धनें संपन्न ॥ मी स्वसत्ता जाण धनाढ्य ॥ २८ ॥ माझिया निजधनापुढें ॥ गणितां अल्प गंगेचे खंडे[7] ॥ माझिये धनाचेनि पडिपाडें ॥ कोण बापुडें उभें राहे ॥ २९ ॥ मग जें जें देखे धनवंत ॥ तें तें हेळूनि सांडी तेथ ॥ यापरी स्पर्धा अद्भुत ॥ धरूनि अर्थ उल्हासे ॥ ३३० ॥ एवं धरूनियां अर्थ ॥ स्पर्धा बारावा अनर्थ ॥ सदा नांदे धनाआंत ॥ तो हा वृत्तांत सांगीतला ॥ ३१ ॥ आतां तीनअर्थांचा मेळा ॥ एके पदीं[8] झाला गोळा ॥ तोही नांदे धनाजवळा ॥ ऐक वेगळा विभाग ॥ ३२ ॥ स्त्री द्यूत[9] आणि मद्यपान ॥ या तिहींतें वाढवी धन ॥ हे तीन अनर्थ दारुण ॥ धनवंता जाण आदळती ॥ ३३ ॥ जो कां पुरुष निर्धन ॥ तो स्त्रियेस जैंडीसमान[10] ॥ देखोनि निर्धनाचें वदन ॥ प्रत्यक्ष जाण स्त्री थुंकी[11] ॥ ३४ ॥ धनहीन पुरुषाचे घरीं ॥ कलहो

---

१ बाग. २ तपाची. ३ मोठें. ४ राहणें. ५ दुसऱ्याचा पराभव करण्याचें. ६ स्थान. ७ वाळूचे खडे. ८ स्थानीं. ९ जुव्वा. १० दगडासारखा. ११ थुंकते.

स्त्रीपुरुषांमाझारी ॥ निर्भर्त्सूनि नानापरी ॥ दवडी घराबाहेरी पुरुषातें ॥ ३५ ॥ धनवंता पुरुषासी ॥ स्त्री लवोटवो[1] करी कैशी ॥ कुटका देखोनि शुनी[2] जैसी ॥ हालवी पुच्छासी कुंकात ॥ ३६ ॥ त्या धनाची झालिया तुटी ॥ स्त्री वसवसोनि लागे पाठी ॥ आतां नावडती तुमच्या गोठी ॥ रागें उठी फडफडोनी ॥ ३७ ॥ दिवसां पोरांची तडातोडी ॥ रात्रीं न सोसे तुमची वोढी ॥ हातीं नाहीं फुटकी कवडी ॥ जळो गोडी जिण्याची ॥ ३८ ॥ ऐशापरी कडोविकडी ॥ निर्भर्त्सूनि दूरी दवडी ॥ निर्धनपुरुषाची आवडी ॥ न धरी गोडी स्वदारा ॥ ३९ ॥ यापरी निर्धनपुरुषासी ॥ स्वस्त्री वश्य नव्हे त्यासी ॥ स्त्रीबाधा धनवंतासी ॥ अहर्निशीं अनिवार ॥ ३४० ॥ लक्षूनि धनवंत नर ॥ वेश्या मिरवी शृंगार ॥ हाव भाव चमत्कार ॥ त्यांसी धनाढ्य थोर भाळले ॥ ४१ ॥ वेश्याकामसंगें जाण ॥ अखंड लांचावलें मन ॥ तद्योगें मद्यपान[3] ॥ करिती सधन धनमदें ॥ ४२ ॥ मद्यपानें जो उन्मत्त ॥ तो स्वेच्छा खेळे द्यूत ॥ एवं हे तिन्ही अनर्थ ॥ जाण निश्चित अर्थैंसी ॥ ४३ ॥ अर्थापाशीं पंधरा अनर्थ ॥ ते सांगीतले इत्थंभूत ॥ सुखाचा लेशु येथ ॥ नाहीं निश्चित धनवंता ॥ ४४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एते पंचदशानर्था ह्यर्थमूला मता नृणाम् ॥ तस्मादनर्थमर्थाख्यं श्रेयोर्थी दूरतस्त्यजेत् ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ ॥ एवं हे पंधराही अनर्थ ॥ मूर्ख अथवा पंडित ॥ जे अर्थसंग्रह करित ॥ अवश्य हे तेथ उठती ॥ ४५ ॥ यासि नाममात्र हा अर्थ ॥ येऱ्हवीं मूर्तिमंत अनर्थ ॥ यालागीं श्रेयार्थी[4] जे हरिभक्त ॥ तिहीं निश्चित त्यागावा ॥ ४६ ॥ जेवीं कां बोळ हुंगेना माशी ॥ ढेंकुण नये तेलापाशीं ॥ वोळंबा नलगे अग्नीसी ॥ तेवीं जो अर्थासी नातळे ॥ ४७ ॥ जेवीं कां अग्नीमाजी लवण[5] पडे ॥ तें तडतडोनि बाहेर पडे ॥ तेवीं मोक्षाचिये चाडे ॥ त्यागी रोकडें निज धन ॥ ४८ ॥ नाग[6] मुखीं घालितां आपण ॥ क्षणार्ध दावी गोडपण ॥ तोचि परिपाकीं आणी मरण ॥ तैसा अर्थ जाण अनर्थी ॥ ४९ ॥ यालागीं जो मोक्षार्थी ॥ तेणें अर्थ न धरावा हातीं ॥ काया वाचा चित्तवृत्ती ॥ अनर्थ निश्चितीं त्यागावा ॥ ३५० ॥ अर्थमूळें[7] सकळ भेद ॥ पूर्वीं बोलिला एवंविध ॥ तोचि पुनःपुनः गोविंद ॥ करूनि विशद सांगत ॥ ५१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भिद्यंते भ्रातरो दाराः पितरः सुहृदस्तथा ॥ एकास्निग्धाः काकिणिना सद्यः सर्वेऽरयः कृताः ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ इष्टमित्रांचें मित्रत्व मोडी ॥ बंधुबंधूंचा स्नेह विघडी ॥ सुहृदांचें सौजन्य तोडी ॥ फुटकी कवडी अर्थाचिये ॥ ५२ ॥ पित्यापुत्रांमाजी विरोध ॥ स्त्रीपुत्रांमाजी द्वंद्व ॥ तो हा जाण अर्थसंबंध ॥ विभांडी हार्द[8] सुहृदांचें ॥ ५३ ॥ काकिणी ह्मणजे वीस कवडी ॥ ते आप्तांचा स्नेह तोडी ॥ त्यांतील एक फुटकी कवडी ॥ भेदूं[9] पाडी सुहृदांसी ॥ ५४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अर्थेनाल्पीयसा ह्येते संरब्धा दीप्तमन्यवः ॥ त्यजंत्याशुस्पृधो घ्नंति सहसोत्सृज्य सौहृदम् ॥ २१ ॥

---

१ आर्जव. २ कुत्री. ३ दारूपिणें. ४ कल्याणाची इच्छा करणारे. ५ मीठ. ६ बचनाग. ७ द्रव्यामुळें. ८ अंतःकरणांतील प्रेम. ९ वैर.

॥ ॥ टीका ॥ ॥ अतिअल्प अर्थासाठीं ॥ सुहृदता सांडोनि पोटीं ॥ कोपें खवळला उठी ॥ शस्त्रमुठी उद्यत ॥ ५५ ॥ तेथें आप्त होऊनि अनाप्त ॥ परस्परें करिती घात ॥ अर्थ अनर्थी प्राणांत ॥ निजस्वार्थघातकू ॥ ५६ ॥ जितां अर्थ अनर्थ करी ॥ मेल्या ने नरकद्वारीं ॥ उत्तम देहाची बोहरी ॥ अर्थ करी ते ऐक ॥ ५७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ लब्ध्वा जन्माऽमरप्रार्थ्यं मानुष्यं तद्द्विजाग्र्यताम् ॥ तदनादृत्य ये स्वार्थं घ्नंति यांत्यशुभां गतिम् ॥ २२ ॥ टीका ॥ ॥ कोटिजन्मांचें शुद्ध सुकृत ॥ तेणें कर्मभूमीं नरदेह प्राप्त ॥ तेथेंही वर्णाग्र्य जन्म समर्थ ॥ सत्कुळप्रसूत ब्राह्मणत्वें ॥ ५८ ॥ ऐसें जन्म पावावया येथ ॥ अमरही[1] मरण मागत ॥ इंद्रादि देव जे स्वर्गस्थ[2] ॥ तेही वांछित हें जन्म ॥ ५९ ॥ जे सत्यलोकपर्यंत ॥ ऐश्वर्य पावले अद्भुत ॥ तेही हें जन्म वांछित ॥ उत्कंठित अहर्निशीं ॥ ३६० ॥ येथ करितां भगवद्भक्ती ॥ पायां लागती चारी मुक्ती ॥ यालागीं हे जन्मप्राप्ती ॥ अमर मागती अहर्निशीं ॥ ६१ ॥ ऐसें उत्तम जन्म पावोनी ॥ अति अभाग्य मी त्रिभुवनीं ॥ निजस्वार्थातें उपेक्षूनी[3] ॥ भुललों धनीं धनलोभें ॥ ६२ ॥ धनलोभाचिया भ्रांतीं ॥ कां लोकेषणा[4] लौकिकस्थितीं ॥ जो उपेक्षी भगवद्भक्ती ॥ अशुभगती तयासी ॥ ६३ ॥ तेचि कैशी अशुभगती ॥ धनलोभ्यां नरकप्राप्ती ॥ चौऱ्यांशीलक्ष योनींप्रती ॥ गर्भ भोगिती अतिदुःखें ॥ ६४ ॥ जयां ब्राह्मणजन्माआंत ॥ स्वर्गमोक्ष सहजें प्राप्त ॥ तेचि अर्थांचा इत्यर्थ[5] ॥ स्वयें सांगत धनलोभी ॥ ६५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्वर्गापवर्गयोर्द्वारं प्राप्य लोकमिमं पुमान् ॥ द्रविणे कोऽनुषज्जेत मर्त्योऽनर्थस्य धामनि ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ ब्राह्मण करितां स्वधर्म ॥ वासना झळंबे स्वर्गकाम ॥ तैं इंद्रचंद्रांचें धाम[6] ॥ पावे द्विजोत्तम सहजची ॥ ६६ ॥ ज्याचिया याजनास्थिती ॥ इतरांसि होय स्वर्गप्राप्ती ॥ एवं स्वर्ग तो ब्राह्मणां[illegible]्या हातीं ॥ त्यासि ते गती सहजची ॥ ६७ ॥ सांडूनि एषणात्रयांसी[7] ॥ निष्काम स्वधर्म ज्या द्विजासी ॥ मोक्ष पायां लागती त्यासी [illegible]तिष्ठे अहर्निशीं आज्ञाधारी ॥ ६८ ॥ तो अनुग्रही[8] जयासी ॥ ते पावती निजमोक्षासी ॥ एवढें सामर्थ्य ब्राह्मणापाशीं ॥ अनायासीं सहजची ॥ ६९ ॥ स्वर्ग जयाची पायरी ॥ मोक्ष ज्याचा आज्ञाधारी ॥ एवढी ब्राह्मणाची थोरी ॥ धनलोभावरी नाशिती ॥ ३७० ॥ ब्राह्मणजन्म पावल्या जाण ॥ निःशेष खुंटे जन्ममरण ॥ तेथ मी नाडलों जाण ॥ जोडूनि धन धनलोभें ॥ ७१ ॥ दुर्लभ येथें माणूसपण ॥ त्यामाजी अतिदुर्लभ ब्राह्मणें[9] ॥ तेंही पावोनि मी आपण ॥ धनलोभें पूर्ण नागवलों ॥ ७२ ॥ पावोनि ब्राह्मणशरीर ॥ धनें नाडले थोरथोर ॥ अर्थ अनर्थाचें मुख्य घर ॥ दुःख दुर्धर वाढवी ॥ ७३ ॥ अर्थ अनर्थाचें भाजन ॥ तें निःशेष त्यागावें धन ॥ वैराग्य पावल्या पूर्ण ॥ स्वयें ब्राह्मण बोलत ॥ ७४ ॥ आशंका ॥ दैवें जोडिलें संप

---

[1] देवही. [2] स्वर्गांत राहणारे. [3] सोडून. [4] लोकलज्जेनें. [5] सारांश. [6] स्थान. [7] दारषणा, पुत्रैषणा व वित्तैषणा अशा तीन. [8] कृपा करितो. [9] ब्राह्मणपण.

त्तीसी ॥ नेऊनि सांडावें बिदीसी ॥ कां घालावें जळप्रवाहेंसी ॥ त्याग अर्थासी तो कैसा ॥ ७५ ॥ तें अर्थत्यागनिरूपण ॥ स्वयें सांगताहे
ब्राह्मण ॥ जे असतील सधन ॥ तिहीं सावधान परिसावें ॥ ७६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ देवर्षिपितृभूतानि ज्ञातीन्बंधूंश्च भागिनः ॥ असंवि
भज्य चात्मानं यक्षवित्तः पतत्यधः ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ दैवें जोडिलियां धन ॥ आचरावे पंचमहायज्ञ[१] ॥ करावें भगवत्पूजन ॥ उ
ल्हासें जाण महोत्साह ॥ ७७ ॥ स्वयें करावें पितृतर्पण ॥ षण्णवति[२] श्राद्धें जाण ॥ पितर उद्धरावे आपण ॥ गयावर्जन करोनियां ॥ ७८ ॥
जित्यां पितरां त्रिकाळीं नमन ॥ कदा न करावें हेळण ॥ त्यांची अवज्ञा आपण ॥ प्राणांतीं जाण न करावी ॥ ७९ ॥ त्यांसि गौरवू
नि आपण ॥ यथारुचि[३] द्यावें अन्न ॥ यथाशक्ति द्यावें धन ॥ सेवेनें संपूर्ण सुखी करावीं ॥ ३८० ॥ पिता स्वयमेव नारायण ॥ माताप्रत्यक्ष
लक्ष्मी आपण ॥ ऐसें भावें ज्याचें भजन ॥ सुपुत्र जाण तो [illegible] ॥ ८१ ॥ ज्याचे सेवें सुखी पितर ॥ तेंचि पितृतर्पण साचार ॥ जितां
अवज्ञा तो अनाचार ॥ मेल्या श्राद्धविचार तो लौकिक ॥ ८२ ॥ जो पितृवचन अविश्वासी ॥ त्याचि तेणें केल्या पापराशी ॥ जो पितृ
वचनविश्वासी ॥ मोक्ष त्यापाशीं वोळंगणा ॥ ८३ ॥ जितमृत पितृतर्पण ॥ ते सांगीतली उणखूण ॥ या नांव गा पितृभजन ॥ ऋषिपू
जन तें ऐक ॥ ८४ ॥ सन्मानें आणूनि ब्राह्मण ॥ श्रद्धा कीजे चरणक्षाळण ॥ चरणतीर्था अभिवंदनें[४] ॥ सबाह्य जाण स्वयें कीजे ॥ ८५ ॥
धूपें दीपें यथोक्त पूजन ॥ यथारुचि तृप्ति सदन्न ॥ यथाशक्ति द्यावें धन ॥ ऋषिपूजन या नांव ॥ ८६ ॥ ब्राह्मण तेचि ऋषीश्वर ॥ ब्राह्मण
ते सनत्कुमार ॥ ब्राह्मणमुखें शार्ङ्गधर ॥ धालों[५] ढेंकर देतसे ॥ ८७ ॥ बंधु स्वगोत्र स्वजन ॥ त्यांची दरिद्रपीडा दारुण ॥ निरसावी देऊनि
धन ॥ हा मुख्य धर्म जाण श्रेष्ठत्वें ॥ ८८ ॥ कुटुंब पीडूनि आपण ॥ अन्यत्रां द्यावें अन्नदान ॥ तोचि अधर्म परिपूर्ण ॥ शुद्ध पुण्य तें नव्हे
॥ ८९ ॥ कुटुंबासि यथोचित ॥ सुखी करूनि समस्त ॥ याहूनि उरला जो अर्थ ॥ तो श्रेयार्थ वेंचावा ॥ ३९० ॥ अतिथि आलिया देख ॥
अन्न द्यावें आवश्यक ॥ तो झालिया पराङ्मुख ॥ पुण्य निःशेष हरासे[६] ॥ ९१ ॥ सकळदानांमाजी जाण ॥ अतिश्रेष्ठ अन्नदान ॥ दीनास
देऊनि सन्मान ॥ द्यावें सदन्न अतिश्रद्धा ॥ ९२ ॥ कुटुंब सुखी करी आपण ॥ स्वेच्छा दे दीनभोजन ॥ परी कंदर्थवी[७] जो निजप्राण ॥ तोही
दारुण अधर्म ॥ ९३ ॥ जैसें कीजे दीनतर्पण ॥ त्यांत आपणही एक दीन ॥ तेथ न करूनि अधिकन्यून ॥ करावें भोजन समभागें ॥ ९४ ॥
पंक्तीमाजी प्रपंच[८] जाण ॥ तें अन्नदानीं अतिविघ्न ॥ यालागीं करावें भोजन ॥ समभागीं आपण सकळांसी ॥ ९५ ॥ धनाचा सद्व्ययो
खरा ॥ द्यावें अनाथप्रेतसंस्कारा ॥ अर्पावें दीनांच्या उद्धारा ॥ धाडावें घरा अयाचिताच्या ॥ ९६ ॥ अंध पंगु मुके दीन ॥ यांसि संरक्षी

---

१ भूतयज्ञ, पितृयज्ञ, देवयज्ञ, ब्रह्मयज्ञ, मनुष्ययज्ञ. २ षाण्णव. ३ गोड लागेल तसें. ४ मस्तकास लावणें. ५ तृप्त झालेला. ६ भ्रष्ट होतें. ७ खाण्या पिण्यावांचून क्लेशयुक्त करितो. ८ भेद.

जो आपण ॥ त्याचेंनि सार्थक धन ॥ शुद्ध पुण्य तयाचें ॥ ९७ ॥ साधुसज्जनां विटंबु अडी ॥ तो विटंबु जो सधन तोडी ॥ त्याच्या निज
धर्मांची गुडी ॥ उभारे रोकडी वैकुंठीं ॥ ९८ ॥ दुर्बळ जो कां भगवद्भक्त ॥ त्यासि संरक्षी जो धनवंत ॥ तेणें तुष्टला भगवंत ॥ त्यातें
उद्धरीत भक्ताआधीं ॥ ९९ ॥ सकळमंगळां मंगळ पूर्ण ॥ सकळकल्याणांचें कल्याण ॥ ते हे सद्गुरुश्रीचरण ॥ तेथ निजधन जयांचें
अर्पे ॥ ४०० ॥ तयाच्या निजधर्मांचें निशाण ॥ सत्यलोकीं लागलें जाण ॥ वैकुंठीं कैलासीं संपूर्ण ॥ भेरी निशाण त्राहाटिलें[1] ॥ १ ॥
स्वधर्मे जोडलें निजधन ॥ जो करी सद्गुरूसि अर्पण ॥ तोचि निष्कर्म कर्मीं जाण ॥ परम पावन तो एक ॥ २ ॥ ज्यासि चढोवढी भगवद्भक्ती
॥ गुरूसि अर्पी निजसंपत्ती ॥ त्यातें अंगीकारूनि लक्ष्मीपती ॥ आपुली निजभक्ती त्यासि दे ॥ ३ ॥ ज्यासि अनन्य गुरुभक्ती ॥
त्याच्या द्वारीं चारी मुक्ती ॥ दासील्वें उभ्या असती ॥ त्यापासोनि श्रीपती परता नव्हे ॥ ४ ॥ ज्याचें तंनु[2] मन धन ॥ गुरुचरणीं अर्पे
पूर्ण ॥ त्यासि भवभयाचें भान ॥ कल्पांतीं जाण दिसेना ॥ ५ ॥ दैवें जोडली जे संपत्ती ॥ ते वेंचोनि ऐशा निगुतीं ॥ अर्थें परमार्थप्राप्ती
॥ सभाग्य लाहती निजनिष्ठा ॥ ६ ॥ ऐसेनि वेंचोनियां धन ॥ स्वयाति कुटुंब पीडी पूर्ण ॥ जो पोटा न खाय आपण ॥ तें यक्षधन
संचित ॥ ७ ॥ एवं कदर्थूनि निजप्राण ॥ जैसें संचिलें यक्षधन ॥ तें अधःपातासि कारण ॥ दुःख दारुण धनलोभ्या ॥ ८ ॥ म्हणे मीहा
याच निष्ठा ॥ यक्षवित्तें झालों करंटा ॥ हातींचा स्वार्थ गेला मोठा ॥ वंचलों कटकटा[3] निजमोक्षा ॥ ९ ॥ सांचोनियां यक्षवित्त ॥ म्यां
माझें केलें अहित ॥ ऐसा तो खेदयुक्त ॥ कष्टें बोलत निजदुःखें ॥ ४१० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ व्यर्थयाऽर्थेहया वित्तं प्रमत्तस्य वयो बलम्
॥ कुशला येन सिद्ध्यंति जरठः किंनु साधये ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ निजभोगविवर्जित ॥ शिणोनि काया वाचा चित्त ॥ कष्टें मिळवा
वया वित्त ॥ झालों उन्मत्त अविवेकी ॥ ११ ॥ करितां वित्ता आयास[4] ॥ गेलें तारुण्य बळ आयुष्य ॥ शरीर क्षीण झालें निःशेष ॥
तरी वित्ताचा शोष शमेना ॥ १२ ॥ अर्थें अर्थ वाढवितां ॥ अनिवार वाढली चिंता ॥ तेणें विसरलों निजस्वार्था ॥ अर्थलोभता कदर्यू
॥ १३ ॥ जेणें वित्तें जीवितें साचार ॥ भूतदया परोपकार ॥ करूनियां विवेकी नर ॥ भवाब्धिपरपार[5] पावले ॥ १४ ॥ ते मज निर्दैवाचें
येथ ॥ वृथा वित्त वृथा जीवित ॥ आयुष्यही गेलें व्यर्थ ॥ निजस्वार्थ बुडाला ॥ १५ ॥ म्हणाल असतां जीवें जीत ॥ साधूनि घेऊं निज
स्वार्थ ॥ तें आतां न चले येथ ॥ अर्थ सामर्थ्य दोनी गेलीं ॥ १६ ॥ अधर्मास्तव गेलें वित्त ॥ जरेनें गिळिलें सामर्थ्य ॥ केवळ मी जरठ[6]
येथ ॥ दैवहत उरलों असें ॥ १७ ॥ कटकटा जोडितां अर्थ ॥ लोक नाडले समस्त ॥ ऐसें जाणोनि प्रस्तुत ॥ स्वयें सांगत कदर्यु[7] ॥ १८ ॥

---

१ फडकावलें. २ शरीर. ३ हा दैवा. ४ श्रम. ५ संसारसमुद्राचें पैलतीर. ६ वृद्ध. ७ कृपण.

॥ श्लोक ॥ ॥ कस्मात्संक्लिश्यते विद्वान् व्यर्थयाऽर्थेहया सकृत् ॥ कस्यचिन्मायया नूनं लोकोऽयं सुविमोहितः ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ॥
येथ अज्ञानाची कोण गती ॥ जे अर्थ अनर्थी ह्मणती ॥ तेही अर्था अर्थीं[1] होती ॥ ज्ञाते भ्रमती अर्थासी ॥ १९ ॥ ऐसे भ्रमले जे स
ज्ञान ॥ तेही अर्जावयां[2] धन ॥ युक्तायुक्त प्रयत्न ॥ अनुदिनीं जाण स्वयें करिती ॥ ४२० ॥ सज्ञान भ्रमावया कारण ॥ ईश्वराची माया
पूर्ण ॥ अघटघटी जीचें लक्षण ॥ त्या अधीन सज्ञान मोहिले ॥ २१ ॥ कृष्णमाया मोहिले पंडित ॥ नव्हे ह्मणाल हा इत्यर्थ ॥ ते जोडिता
ति अर्थ ॥ निजसुखार्थ भोगेच्छा ॥ २२ ॥ भोगांमाजी जे ह्मणती सुख ॥ ते जाणावे केवळ मूर्ख ॥ येच अर्थींचा विवेक ॥ कदर्यु देख
बोलत ॥ २३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ किं धनैर्धनदैर्वा किं कामैर्वा कामदैरुत ॥ मृत्युना ग्रस्यमानस्य कर्मभिर्वोत जन्मदैः ॥ २७ ॥ ॥ टीका ॥
कटकटा वर्णाग्र्यें पूज्य पहाहो ॥ त्या द्विजांसि[3] भुलवी माया मोहो ॥ भोगीं वाढवी जो देहो ॥ तोचि पहाहो नश्वर ॥ २४ ॥ त्या देहासि
जे नाना भोग ॥ तोच त्यासि क्षयरोग ॥ धन जोडणें अनेग ॥ तोचि मार्ग निधनत्वा ॥ २५ ॥ तें धन मिळे अनायासीं ॥ यालागीं धनवं
त उपासी ॥ अर्थ जोडोनियां प्रयासीं ॥ भोगितां कामासी सुख काय ॥ २६ ॥ कामसुख कांमिनीमेळीं[4] ॥ सुखार्थ स्त्रियेतें प्रतिपाळी ॥ ते
चि नानापरी सळी ॥ देतां किंकळी सुटेना ॥ २७ ॥ स्त्री पुत्र काम भोगादिक ॥ तेणें देहासि द्यावें सुख ॥ तो देहोचि मरणोन्मुख ॥ नित्य
अंतक[5] लागला ॥ २८ ॥ जेजे अतिक्रमें घडी ॥ तेते काळवयसा तोडी ॥ येथ कोण भोगाची गोडी ॥ धनकामें वेडीं सज्ञानें केलीं ॥ २९ ॥
सर्पमुखीं दर्दुरं[6] जातां ॥ तो दर्दुर होय माशा खाता ॥ तेणें न सुटे सर्पग्रासता ॥ जाण तत्त्वतां जयापरी ॥ ४३० ॥ तेवीं नानाभोग
मेळें ॥ देहींचा मृत्यु मागें न ढळे ॥ हें जाणोनि आंधळे ॥ धनकामें झाले सज्ञान ॥ ३१ ॥ स्वयें करितां तोचि मरणधर्म ॥ त्यासि कोण
निववी भोगकाम ॥ हा केवळ मायेचा भ्रम ॥ भ्रमले परम महासिद्ध ॥ ३२ ॥ धनें होईल परलोक ॥ तोही भोगु दुःखदायक ॥ भोग
क्षयें कर्ममूर्ख ॥ येती देख अधःपाता ॥ ३३ ॥ करितां भोग्य काम्य कर्म ॥ पुढती[7] मरण पुढती जन्म ॥ भोगणें पडे अविश्रम[8] ॥ हें दुःख
परम धनकामा ॥ ३४ ॥ धनकामासि निजसुख ॥ सर्वात्मना नाहीं देख ॥ मीही ऐसाचि होतों मूर्ख ॥ निजभाग्यें देख धन गेलें
॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नूनं मे भगवांस्तुष्टः सर्वदेवमयो हरिः ॥ येन नीतो दशामेतां निर्वेदश्चात्मनः प्लवः ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ ॥ मी
पूर्वीं होतों अति अभाग्य ॥ आतां झालों अतिसभाग्य ॥ मज तुष्टला श्रीरंग[9] ॥ विवेक वैराग्य पावलों ॥ ३६ ॥ माझें संचित जें कां
धन ॥ तेंचि माझें मुख्य अज्ञान ॥ तें हरीनें हरोनि आपण ॥ कृपा पूर्ण मज केली ॥ ३७ ॥ भक्तांचें अज्ञान निरसी हरी ॥ याचिलागीं

---

१ इच्छा करणारे. २ मिळविण्यास. ३ ब्राह्मणास. ४ स्त्रियाचे ठिकाणीं. ५ मृत्यु. ६ बेडूक. ७ पुनः. ८ एकसारखें. ९ विष्णु.

नांवें तो मुरारी ॥ तेणें कृपा करून पुरी ॥ विवेक अंतरीं उपजविला ॥३८॥ वैराग्य विवेकावीण आंधळें ॥ विवेक वैराग्यावीण पांगळें ॥ ते माझे हृदयीं जावळीं फळें ॥ एकवेळें उपजविलीं ॥ ३९ ॥ ऐशी हरीनें कृपा करूनी ॥ माझें धनेंशि अज्ञान हरूनी ॥ विवेक वैराग्य यें दोनी ॥ माझे हृदयभुवनीं प्रकाशिलीं ॥ ४४० ॥ परी कोणें काळें कोण देशीं ॥ कोण समयविशेषीं ॥ हरि कृपा करितो कैशी ॥ हें कोणासी कळेना ॥४१॥ भक्तांचें हरावया चित्त ॥ हरि हरितो त्याचें वित्त ॥ वित्तत्यागें करूनि सुचित्त ॥ दे विवेकयुक्त वैराग्य ॥४२॥ ऐसें घेतें देतें विंदान[1] ॥ ब्रह्मादिकां अतर्क्य जाण ॥ यालागीं तो भगवंत पूर्ण ॥ त्यासि साही गुण वशवर्त्ती[2] ॥ ४३ ॥ त्याचें अचिंत्यानंतरूप ॥ परी मजलागीं झाला सरूप ॥ माझें धनेंसि निरसूनि पाप ॥ ज्ञानदीप उजळला ॥ ४४ ॥ होकां कृपा उपजली भगवंता ॥ परी म्यां वंचिल्या यज्ञदेवता ॥ त्या क्षोभल्या करिती घाता ॥ हेंही सर्वथा घडेना ॥ ४५ ॥ करीं[3] चक्र धगधगित ॥ ज्याचा पाठिराखा हरि समर्थ ॥ विघ्नाचा वारा न लागे तेथ ॥ देव वंदीत तयासी ॥ ४६ ॥ देवीं वंदूनि प्रह्लादासीं ॥ शांत करविलें नृसिंहासी ॥ तो पाठिराखा नरहरि ज्यासी ॥ विघ्न त्यापाशीं रिघे केवीं ॥ ४७॥ जेणें देवांचिया कोडी ॥ क्षणें सोडविल्या बांदवडी ॥ त्याचे भक्तांची लोंव[4] वांकुडी ॥ देवें बापुढीं केवीं करिती ॥४८॥ जो सकळदेवांचा नियंता ॥ ज्याचे चरण देव वंदिती माथां ॥ तो भगवंत साह्य असतां ॥ विघ्न सर्वथा बाधीना ॥ ४९ ॥ ज्याचेनि बळें वाढले देव ॥ देव जयाचे अवयव ॥ तो हरि तुष्टला स्वयमेव ॥ तेथ विघ्नसंभव कोणाचा ॥ ४५० ॥ सर्वदेवमय श्रीहरी ॥ इंद्रचंद्ररूपें माझारी ॥ ऐशिया मज दीनावरी ॥ विघ्न संसारी मज असेना ॥ ५१ ॥ ऐशिये कृपेचें मज कारण ॥ ये जन्मीं नाहीं साधन ॥ हें माझें पूर्वील जुनें ऋण[5] ॥ देवापाशीं जाण ठेविलें होतें ॥ ५२ ॥ पूर्वीं कोण जन्मीं कोण देशीं ॥ तीर्थक्षेत्रीं कोण वंशीं ॥ कोण आचरलों सत्कर्मासी ॥ तेणें हृषीकेशी तुटला ॥ ५३ ॥ मातें अतिदुःखी देखोन ॥ हरि तुष्टला कृपा पूर्ण ॥ त्याचे कृपेस्तव जाण ॥ विवेकसंपन्न मी झालों ॥५४॥ हो कां धनक्षयें झालें दुःख ॥ तेणें दुःखें पावलों निजसुख ॥ भवाब्धि[6] तरावया देख ॥ वैराग्यविवेक दृढ तारूं ॥ ५५ ॥ हरिखें वोसंडूनि ब्राह्मण ॥ ह्मणे उरले आयुष्येंनि जाण ॥ वृथा जावोंनेदी अर्धक्षण ॥ करीं निर्दळण सुखदुःखां ॥ ५६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सोऽहं कालावशेषेण शोषयिष्येंऽगमात्मनः ॥ अप्रमत्तोऽखिलस्वार्थे यदि स्यात्सिद्ध आत्मनि ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ काइसा भवभयाचा पाँड ॥ घेईन कोटिजन्मांचा सूड ॥ नासल्या आयुष्याचा कैवाड ॥ करीन निवाड येणें देहें ॥ ५७ ॥ देहासि आली बाधकता ॥ परी वृद्धत्व[7] नव्हे माझिया चित्ता ॥ तेणें चित्तें चिंती भगवंता ॥ भवबंध आतां

---

१ कारण. २ स्वाधीन. ३ हातांत. ४ केश. ५ कर्ज. ६ संसारसमुद्र. ७ मोठेपणा.

छेदीन ॥ ५८ ॥ उरले आयुष्यें येथ ॥ कळिकाळाचे पाडोनि दांत ॥ गर्भदुःखाचें खणेनं खत ॥ मरणाचा घात मी करीन ॥ ५९ ॥ जेणें देहें सत्यानृत[2] ॥ कर्मे आचरलों समस्त ॥ ते देहेंसि मी सोशीन येथ ॥ विदेहत्व निजभावें ॥ ४६० ॥ घालूनि निजबोधाची धाडी ॥ फोडीन देहाची बांदवडी ॥ तोडूनि सुखदुःखांची बेडी ॥ उभवीन गुढी सायुज्याची ॥ ६१ ॥ आजि वैराग्यविवेकयुक्त ॥ मी निजस्वार्थी सावचित्तें[3] ॥ जो जो साधीन परमार्थ ॥ तो तो हस्तगत[4] मज होय ॥ ६२ ॥ मजचि साधे निजस्वार्थ ॥ हाचि नेम नाहीं येथ ॥ जों जों वैराग्यविवेकयुक्त ॥ त्यासि परमार्थ आंदणा[5] ॥ ६३ ॥ वैराग्यविवेकाचें लक्षण ॥ देह गेह स्त्रियादि धन ॥ असतां आसक्त नव्हे मन ॥ वैराग्य पूर्ण या नांव ॥ ६४ ॥ म्यां जो आरंभ केला पहाहो ॥ यासि देवो देवीसमुदावो ॥ येणें सहित देवाधिदेवो ॥ मज साह्य हो हें प्रार्थित ॥ ६५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तत्र मामनुमोदेरन् देवास्त्रिभुवनेश्वराः ॥ मुहूर्त्तेन ब्रह्मलोकं खट्वांगः समसाधयत् ॥ ३० ॥ ॥ टी० ॥ इंद्रियअधिष्ठात्री[6] देवता ॥ मज साह्य होतु समस्ता ॥ सिद्धि पावावया परमार्था ॥ इंद्रियजयता मज द्यावी ॥ ६६ ॥ जो त्रिभुवनेश्वर विख्यात ॥ तो साह्य झालिया भगवंत ॥ देवता साह्य होती समस्त ॥ त्या अंतर्भूत हरिरूपीं ॥ ६७ ॥ देवतारूपें भावूनि हरी ॥ सकळदेवांची सेवा करीं ॥ साह्य होऊनि दीनोद्धारीं ॥ मज भवसागरीं तारावे ॥ ६८ ॥ ह्मणाल वयसेंचा[7] शेवट ॥ केवळ झालासी तूं जरठ ॥ वार्द्धकीं हे खटपट ॥ वृथा कष्ट कां करिशी ॥ ६९ ॥ ऐसा न मानावा अर्थ ॥ खट्वांगराजा विख्यात ॥ मुहूर्तें साधिला परमार्थ ॥ निजस्वार्थ फावला ॥ ४७० ॥ त्याहूनि माझें तंव येथ ॥ आयुष्य असेल बहुत ॥ देव साह्य होत समस्त ॥ निमेषें परमार्थ साधीन ॥ ७१ ॥ आजि विवेकवैराग्य जैसें आहे ॥ हें जैं निर्वाहलें[8] राहे ॥ तैं कळिकाळ बापुडें काये ॥ म्यां जिंतिला होये संसार ॥ ७२ ॥ हा पूर्वी कैसा होता येथ ॥ आतां पालटलें याचें वृत्त ॥ झाला विवेकवैराग्ययुक्त ॥ हें आश्चर्य सांगत श्रीकृष्ण ॥ ७३ ॥ ॥ श्लोक ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ इत्यभिप्रेत्य मनसा ह्यावंत्यो द्विजसत्तमः ॥ उन्मुच्य हृदयग्रंथीन् शांतो भिक्षुरभून्मुनिः ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐसा तो अवंतीचा ब्राह्मण ॥ अतिकदर्यु होता जाण ॥ त्याच्या हातींचें गेलिया धन ॥ वैराग्यचिह्न पालटलें[9] ॥ ७४ ॥ यालागीं वैराग्यविवेक चित्तीं ॥ झाल्या आंदणी ब्रह्मप्राप्ती ॥ कृष्ण सांगे उद्धवाप्रती ॥ निजात्मस्थिती साधावया ॥ ७५ ॥ पूर्वी होता ब्राह्मण अधम ॥ धनलोभी निंद्यकर्म ॥ तोचि झाला द्विजोत्तम ॥ विवेकें परम वैरागी ॥ ७६ ॥ पूर्वी केलिया निश्चितार्था ॥ मी साधीन सर्वथा ॥ ऐशिया अतिउल्हासता ॥ निजपरमार्था साधक ॥ ७७ ॥ माझिया दुःखाचें कारण ॥ माझा मीचि झालों जाण ॥ धरितां काम लोभ

---

१ फाडीन. २ चांगलीं किंवा वाईट. ३ सावध. ४ स्वाधीन. ५ वक्षीस. ६ इंद्रियाचे ठिकाणीं राहणाऱ्या. ७ वयाचा. ८ कायम, निरंतर. ९ शांत झालें.

धनाभिमान ॥ दुःख दारुण मज माझें ॥ ७८ ॥ मज दुःख देऊनि गेलें धन ॥ धन तें दुःखाचें भाजन ॥ स्त्रीपुत्रार्थ सलोभी आपण ॥ तिहींच जाण मज दंडिलें ॥ ७९ ॥ धरावा ज्ञातीचा अभिमान ॥ तंव स्वयातीं मी[1] सांडिलो[2] जाण ॥ मजसी विमुख झाले स्वजन ॥ त्यांचा लोभ न मज आतां ॥ ४८० ॥ स्त्री पुत्र स्वजन धन ॥ हेंचि लोभाचें मुख्य कारण ॥ माझा मज देहाभिमान ॥ त्यासि माझें नमन[3] साष्टांग ॥ ८१ ॥ नमन स्त्री पुत्रादिधनांसी ॥ नमन स्वयाति स्वजनांसी ॥ नमन देहाभिमानासी ॥ संबंध तुह्मां आह्मांसी असेना ॥ ८२ ॥ जेवीं कां जळा आणि चंद्रबिंबासी ॥ एकत्र वास दिसे दोहींसी ॥ परी चंद्र अलिप्त जळेंसी ॥ तेवीं संबंध आह्मांसी तुह्मां नाहीं ॥ ८३ ॥ जेवीं कां अखंड अहर्निशीं ॥ छाया जडलीसे रूपासी ॥ तैं रूप न बैसे निजच्छायेसी ॥ तेवीं संबंधू तुह्मांसी मज नाहीं ॥ ८४ ॥ जेवीं तारुण्य ये देहापाशीं ॥ तेणें तारुण्यें ये देहो मुसमुशी ॥ शेखीं तारुण्य सांडी देहासी ॥ तेवीं म्यां तुह्मांसी सांडिलें ॥ ८५ ॥ वनीं वसंताचें रिगंवणें[4] ॥ वनश्री शोभा मिरवी तेणें ॥ तो वसंतु जेवीं सांडी वनें ॥ तेवीं म्यां सांडणें अहंममता ॥ ८६ ॥ बाप सवैराग्य विवेक ॥ त्याग करविला अलोलिक ॥ देहाभिमाना तिळोदक ॥ दीधलें देख ममतेसी ॥ ८७ ॥ जेवीं भ्रष्टलिया पुत्रासी ॥ पिता घटस्फोटें त्यागी त्यासी ॥ तेवीं त्यागूनि देहाभिमानासी ॥ स्वयें संन्यासी तो झाला ॥ ८८ ॥ जेवीं ये फळ परिपाकातें ॥ सांडी जन्मल्या निजदेहातें ॥ देंठ न धरी त्या फळातें ॥ फळ देंठातें धरीना ॥ ८९ ॥ तेवीं हा न धरी अहंतेसी ॥ अहंता त्यजिली नये त्यापाशीं ॥ हाही देहाभिमानासी ॥ सद्भावेंसी नातळे ॥ ४९० ॥ जळीं जेवीं पद्मिणीपान[5] ॥ असोनि जळेंसी अलिप्त जाण ॥ तेवीं नातळोनि देहाभिमान ॥ संन्यासग्रहण विध्युक्त ॥ ९१ ॥ अन्य संन्यासी करोनि होम ॥ जाळिला ह्मणती क्रोध काम ॥ शेखीं तिळ तूप होय भस्म ॥ क्रोध काम संचले ॥ ९२ ॥ तैशी नव्हेच याची होमस्थिती ॥ जाळिल्या विकल्पाच्या वृत्ती ॥ कामक्रोधांची पूर्णाहुती ॥ केली अहंकृतीसमवेत ॥ ९३ ॥ होमूनि निजस्वभावासी ॥ झाला त्रिदंडी संन्यासी ॥ आज्ञा घेऊनि गुरूपाशीं ॥ सुखें सुखवासी विचरत ॥ ९४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सचचार महीमेतां संयतात्मेंद्रियानिलः ॥ भिक्षार्थं नगरग्रामानसंगोऽलक्षितोऽविशत् ॥ ३२ ॥ ॥ टीका ॥ ॥ जिणोनियां मनपवन[6] ॥ सांडोनियां मानाभिमान ॥ परमानंदें परिपूर्ण ॥ पृथ्वीमाजी जाण विचरत ॥ ९५ ॥ ज्यासि नावडे देहसंगती ॥ त्यासि कैंचा संगू सांगाती ॥ एकला विचरे क्षितीं ॥ आत्मस्थिती निजबोधें ॥ ९६ ॥ अखंड वसे वनांतरीं ॥ भिक्षेलागीं निघे नगरीं ॥ खेटखर्वट ग्रामीं पुरीं ॥ भिक्षा करी यथाप्राप्त ॥ ९७ ॥ मी एक भिक्षेसि येता ॥ हा नेम न करी सर्वथा ॥ अलक्ष्य[7] येवोनि अवचितां ॥ जें आलें हातां तेणें

---

१ मला. २ सोडिलें. ३ नमस्कार. ४ प्राप्ति. ५ कमलाचें पत्र. ६ मन व प्राण. ७ कोणाच्या दृष्टीस न पडतां.

सुखी ॥ ९८ ॥ पंचागार[1] सत्तागार ॥ हाही नेम नाहीं निर्धार ॥ कोणेंविखींचा अहंकार ॥ अणुमात्र धरीना ॥ ९९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तं वै प्रवयसं भिक्षुमवधूतमसज्जनाः ॥ दृष्ट्वा पर्यभवन् भद्र बह्वीभिः परिभूतिभिः ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ न करी देहमळक्षाळण ॥ मुसलवंत् करी स्नान ॥ यालागीं तो धूसरवर्ण[3] ॥ अवधूतपण या हेतू ॥ ५०० ॥ ऐसा विचरतां पृथ्वीसी ॥ अवचटें आला अवंतीसी ॥ अति वृद्ध आणि संन्यासी ॥ अवधूतवेशी देखिला ॥ १ ॥ संन्यास घेतलिया जाण ॥ पूर्वभूमिका अवलोकन ॥ एक वेळा करावी आपण ॥ पद्धतीलेखन आश्चर्याचें ॥ २ ॥ ते नगरींचे ह्मणती जन ॥ अरे हा कदर्यु ब्राह्मण ॥ याचें हारपल्या धन ॥ संन्यासी जाण हा झाला ॥ ३ ॥ हें ऐकोनियां अतिदुर्जन ॥ त्या सभोंवतें मीनले जाण ॥ परस्परें दावूनि खूण ॥ विरुद्ध छळण मांडिलें ॥ ४ ॥ त्यासि बहुसाल[4] उपद्रवितां ॥ क्षणार्ध पालट नव्हे चित्ता ॥ क्रोधा नयेचि सर्वथा ॥ अतिविवेकता महाधीरू ॥ ५ ॥ त्याच्या उपद्रवाची कथा ॥ आणि त्याची सहनशीलता ॥ तुज मी सांगेन तत्त्वतां ॥ सावधानता अवधारी ॥ ६ ॥ दृष्टि ठेवूनि येथिच्या अर्था ॥ विवेकें कुशळ होय श्रोता ॥ अर्थ धरी भावार्थता ॥ शांति तत्त्वतां तो लाभे ॥ ७ ॥ विवेकचित्तचकोरचंद्रा ॥ भागवतभाग्यें शुद्धमुद्रा ॥ शांतिसौभाग्यनरेंद्रा ॥ ऐक सुभद्रा उद्धवा ॥ ८ ॥ आकळावया निजशांतीसी ॥ कृष्ण संबोधी उद्धवासी ॥ ऐसें सावध करोनि त्यासी ॥ दशा ते ऐशी शांतीची ॥ ९ ॥ अवरोधितां जीविकेसी ॥ सन्मान देतां अपमानेंसी ॥ जो सर्वथा न ये क्षोभासी ॥ शांति त्यापाशीं तें एक ॥ ५१० ॥ ॥ श्लोक ॥ केचित्त्रिवेणुं जगृहुरेके पात्रं कमंडलुम् ॥ पीठं चैकेऽक्षसूत्रं च कंथां चीराणि केचन ॥ ३४ ॥ ॥ टीका ॥ ॥ दुर्जनीं वेढूनि संन्यासी ॥ छळणार्थ लागती पायांसी ॥ तेणें नमनप्रसंगेंसी[5] ॥ करिती स्पर्शासी अवघेही ॥ ११ ॥ एक ह्मणती वृद्ध संन्यासी ॥ एक ह्मणती किती चातुर्मासी[6] ॥ एक पुसती संप्रदायासी ॥ कोणे गुरूनें तुह्मांसी मुंडिलें ॥ १२ ॥ एक खुणाविती एकासी ॥ पूर्वभूमी[7] पुसा यासी ॥ एक ह्मणती यापाशीं ॥ धनसंग्रहासी पुसा रे ॥ १३ ॥ एक ह्मणती अहो स्वामी ॥ तुमची कवण पूर्वभूमी ॥ तुह्मी व्यापारी कीं उद्यमी ॥ कोणे ग्रामीं निवासू ॥ १४ ॥ एक ह्मणती कांहीं आहे धन ॥ एक ह्मणती आतां निर्धन ॥ एक ह्मणती न करा छळण ॥ विरक्त पूर्ण संन्यासी ॥ १५ ॥ ऐसें करितां छळण ॥ संन्यासी अनुद्वेग जाण ॥ निःशब्दवादें धरिलें मौन ॥ कांहीं वचन न बोले ॥ १६ ॥ एक ह्मणती त्रिदंडा कारण ॥ हा पूर्वी होता अतिसधन ॥ कोरूनि भरिलें असे धन ॥ हेंचि लक्षण त्रिदंडा ॥ १७ ॥ एक ह्मणती सहस्रदोरीं ॥ कंथा केली असे अतिथोरी ॥ एक ह्मणती त्यामाझारी ॥ धन तळींवरी खिळिलेंसे ॥ १८ ॥ एक ह्मणती काय पाहतां तोंड ॥ येणें मांडि

---

[1] पांच घरें. [2] अंग न चोळतां. [3] मलिन. [4] अनेकरीतीनें. [5] पायां पडण्याच्या निमित्तानें. [6] संन्यास घेऊन वर्षें किती झालीं. [7] पहिली राहाण्याची जागा.

लेंसे पाखंड ॥ ऐसा निर्भर्त्सितां वितंड ॥ एकें त्रिदंड हरि[1]तला ॥ १९ ॥ एकें हरितलें पाणिपात्र ॥ एकें नेलें पीठ पवित्र ॥ एकें नेलें अ
क्षसूत्र ॥ काषायवस्त्र तें एकें ॥ ५२० ॥ एक ह्मणे हा माझा ऋणायित ॥ भला सांपडला येथ ॥ ह्मणोनि कंथेसि घाली हात ॥ कौपीन
युक्त तेणें नेली ॥ २१ ॥ ऐसें करितांही दुर्जन ॥ त्याचें गजबजिना मन ॥ कांहीं न बोले वचन ॥ क्षमेनें पूर्ण निजधैर्य ॥ २२ ॥ तो
ह्मणे येणें जाणें हीं दोनी ॥ केवळ अदृष्टाअधीनी[2] ॥ यालागीं मागण्याची ग्लानी ॥ न करूनि मुनी निघाला ॥ २३ ॥ संन्यासी जातां
देखोनी ॥ सभ्य सभ्य शठ येऊनी ॥ साष्टांग नमस्कार करूनी ॥ अतिविनीतपणीं विनवित ॥ २४ ॥ मग ह्मणती हरहर ॥ अपराध
घडला थोर ॥ मातले हे रांडपोर ॥ पात्रापात्र न ह्मणती ॥ २५ ॥ स्वामी कोप न धरावा मनीं ॥ वस्त्रें घ्यावीं कृपा करूनी ॥ परतविला
पायां लागूनी ॥ पूर्णछळणीं छळावया ॥ २६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रदाय च पुनस्तानि दर्शितान्याददुर्मुनेः ॥ ॥ टीका ॥ ॥ संन्यासी
आणूनि साधुवृत्ती ॥ दंडकमंडलू पुढें ठेविती ॥ एक वस्त्रें आणोनि देती ॥ एक ते नेती हिरोनी ॥ २७ ॥ एक ते ह्मणती वृद्ध संन्यासी ॥
याचीं वस्त्रें द्यावीं यासी ॥ एक ह्मणती या शठां[3]सी ॥ दंडितां आह्मांसी अतिपुण्य ॥ २८ ॥ वस्त्रें न देती उपहासीं ॥ संन्यासी निघे सा
वकाशीं ॥ एक परतवूनि त्यासी ॥ देऊनि वस्त्रांसी जा ह्मणती ॥ २९ ॥ एक धांवूनि हाणे माथां ॥ वस्त्रें हिरोनि जाय परता ॥ एक
ह्मणती द्यारे आतां ॥ वृद्ध कां वृथा शिणवाल ॥ ५३० ॥ यापरी संन्यासी आपण ॥ गेला वस्त्रें वोसंडून ॥ करोनियां संध्या स्नान ॥
भिक्षार्थ जाण निघाला ॥ ३१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अन्नं च भैक्ष्यसंपन्नं भुंजानस्य सरित्तटे ॥ ३५ ॥ मूत्रयंति च पापिष्ठाः ष्ठीवंत्यस्य
च मूर्द्धनि ॥ यतवाचं वाचयंति ताडयंति न वक्ति चेत् ॥ ३६ ॥ ॥ टीका ॥ ॥ भिक्षा मागोनि संपूर्ण ॥ शास्त्रविभागें भागून ॥ सरि
तातटीं[4] करितां भोजन ॥ तें देखोनि दुर्जन तेचि आले ॥ ३२ ॥ अरे हा संन्यासी नव्हे साचा ॥ कदर्यु आमुचे गांवींचा ॥ होय नव्हे
न बोले वाचा ॥ हा ठकपणाचा उपावो ॥ ३३ ॥ यास बोलविल्यावीण राहे ॥ तो याचाचि दासीपुत्र होये ॥ ऐशी शपथ करूनि
पाहे ॥ आले समुदायें तयापाशीं ॥ ३४ ॥ एक ह्मणे याचें मौनँ[5] ॥ उडवीन मी न लागतां क्षण ॥ हा जेणें करी शंखस्फुरण ॥ तो उ
पावो जाण मी जाणें ॥ ३५ ॥ तो महापापी अतिदुर्मती ॥ जेवितां त्याचे मस्तकीं मुती ॥ तरी क्रोध नये त्याचे चित्तीं ॥ निजात्म
स्थितीं निवाला ॥ ३६ ॥ जरी अंतरीं क्रोध आला ॥ तरी तो अशांतँ[6]चि झाला ॥ बाहेरी न बोलेचि बोला ॥ लोकलाजे भ्याला
पोटास्थे ॥ ३७ ॥ तैसा नव्हे हा संन्यासी ॥ धोऊनि सांडिलें जनलाजेसी ॥ निजशांतीची दशा कैशी ॥ क्रोध मानसीं वोळेना ॥ ३८ ॥

---

१ हिसकावून घेतला. २ दैवाधीन. ३ टोंग्यास. ४ नदीच्या कांठीं. ५ मुकेपणा. ६ क्रोधयुक्त.

आंत एक बाह्य एक ॥ या नांव मुख्य दांभिक ॥ तैसा संन्यासी नव्हे देख ॥ सबाह्य चोख निजशांती ॥ ३९ ॥ तंव ते दुर्जन ह्मणती ॥ अरे हा न बोले निश्चितीं ॥ संमुख मुखावरी थुंकिती ॥ अतिनिंदिती नोकूनी ॥ ५४० ॥ एक हाणिती लाता ॥ एक टोले देती माथां ॥ एक हाणिती न बोलता ॥ यासी सर्वथा न सोडा ॥ ४१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तर्जयंत्यपरे वाग्भिः स्तेनोयमितिवादिनः ॥ बध्नंति रज्ज्वा तं केचिद्बध्यतां बध्यतामिति ॥ ३७ ॥ ॥ टीका ॥ ॥ आणिक दुरूनि जाण ॥ वर्मीं विंधूनि[1] वाग्बाण ॥ याच्या धैर्याचें लक्षण ॥ आह्मीं संपूर्ण जाणीतलें ॥ ४२ ॥ याचे वेषाचा विचारू ॥ शठ नष्ट दांभिक थोरू ॥ भिक्षामिसें हिंडे हेरूं[2] ॥ धरा चोरू निश्चिती ॥ ४३ ॥ ऐसे विकल्पवाक्यें गर्जती ॥ एक बांधाबांधा ह्मणती ॥ एक दृढदोरीं बांधिती ॥ दोहीं हातीं अधोमुख ॥ ४४ ॥ ॥ श्लोक ॥ क्षिपंत्येकेऽवजानंत एष धर्मध्वजः शठः ॥ क्षीणवित्त इमां वृत्तिमग्रहीत्स्वजनोज्झितः ॥ ३८ ॥ ॥ टीका ॥ ॥ त्याचें पूर्व वृत्त[3] जे जाणती ॥ ते अपमानूनि निंदिती ॥ पूर्वीं कदर्यूची[4] स्थिती ॥ हा आह्मांप्रती संन्यास मिरवी ॥ ४५ ॥ येणें सूक्तासूक्त[5] संचिलें धन ॥ अधर्में वित्त झालें क्षीण ॥ स्वजनीं सांडिला दवडून ॥ पोटासी अन्न मिळेना ॥ ४६ ॥ अन्न मिळावया पोटासी ॥ झाला कपटवेष संन्यासी ॥ लाज नाहीं या निर्लज्जासी ॥ योग्यता आह्मांसी दावितां ॥ ४७ ॥ पूर्वीं लागूनि हा वंचकू ॥ झाला संन्यासी दांभिकू ॥ याचें मत नेणें हा भोळा लोकू ॥ महाठकू दृढमौनी ॥ ४८ ॥ होकां बहुरूप्याचीं सोंगें जैसीं ॥ तेवीं हा उत्तमवेषें संन्यासी ॥ होऊनि ठकूं[6] आला आह्मासी ॥ मारितां यासी दोषू नाहीं ॥ ४९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अहो एष महासारो धृतिमान्गिरिराडिव ॥ मौनेन साधयत्यर्थं बकवद्दृढनिश्चयः ॥ ३९ ॥ ॥ टीका ॥ ॥ दांभिकांमाजी हा बळी ॥ धरिल्या वेषातें प्रतिपाळी ॥ आह्मी पीडितां न डंडळी[7] ॥ जेवीं कां शेळीं महामेरू ॥ ५५० ॥ याच्या धैर्याचें शहाणपण ॥ साधावया अन्न आच्छादन ॥ बकाच्या ऐसें धरिलें मौन ॥ स्वार्थ पूर्ण लक्षूनी ॥ ५१ ॥ बक गिळावया मासा ॥ मौन धरोनि राहे जैसा ॥ हाही जाणावा तैसा ॥ भोळ्या माणुसां नाडील[8] ॥ ५२ ॥ हा धनलोभार्थ जाणा ॥ पूर्वील उपद्रव नाणी मना ॥ तेचि झालीसे दृढ धारणा ॥ उपद्रवगणना या नाहीं ॥ ५३ ॥ एक ह्मणती धैर्यमूर्ती ॥ ह्मणोनियां लाता हाणिती ॥ एक ते नाकीं काड्या खुपसिती ॥ याची निजशांती पाहोंपां ॥ ५४ ॥ ऐसऐसे उपद्रविती ॥ नानापरी उपहासिती[9] ॥ तरी द्वेष नुपजे चित्तीं ॥ निजशांतीं निश्चळू ॥ ५५ ॥ जंवजंव देखती त्याची शांती ॥ तंव तंत दुर्जन क्षोभा येती ॥ नाना उपद्रव त्यासि देती ॥ तेंचि श्रीपती सांगत ॥ ५६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ इत्येके विहसंत्येनमेके दुर्वातयंति च ॥ तं बबंधुर्निरुरुधुर्यथा क्रीडनकं द्विजम् ॥ ४० ॥

---

[1] खोंचून. [2] पाळत ठेवण्याकरितां. [3] पहिली स्थिति. [4] कृपणाची. [5] वाटेल त्या रीतीनें. [6] फसविण्यास. [7] घाबरत नाहीं. [8] फसवील. [9] थट्टा करितात.

॥ टीका ॥ ॥ कद्र्यु बाणला पूर्ण शांती ॥ ऐसे एक उपहासिती ॥ एक नाकीं चुना लाविती ॥ एक मुख माखिती काजळें ॥ ५७ ॥ एक अतिशठ सांचोकारें[1] ॥ पुढां ठांकोनि पाठिमोरे ॥ श्रद्धा[2] करिती अधोद्वारें ॥ नाकीं तोंडीं भरे दुर्गंध ॥ ५८ ॥ तरी त्याचिया निजस्थिती ॥ अणुमात्र क्षोभ नये चित्तीं ॥ तोचि संन्यासी त्रिजगतीं ॥ ज्याची ढळेना शांती क्षोभविल्याही ॥ ५९ ॥ एवं क्षोभेना त्याचें मन ॥ देखोन खवळले दुर्जन ॥ त्यासि गळां साखळ निरोधून ॥ आणिला बांधून चौबारा[3] ॥ ५६० ॥ यासि वोळखारे कोणी तुह्मी ॥ हा धनलोभी जो अकर्मी ॥ तो आजि सांपडविला आह्मी ॥ अति अधर्मी दांभिक ॥ ६१ ॥ जेवीं गारुडी बांधी माकडा ॥ तेवीं संन्यासी बांधिला गाढा[4] ॥ मिळोनियां चहूंकडा ॥ मागां पुढां वोढिती ॥ ६२ ॥ एक वोढिती पूर्वेसी ॥ एक वोढिती पश्चिमेसी ॥ संन्यासी हांसे निजमानसीं[5] ॥ सुख सर्वांसी होय जेणें ॥ ६३ ॥ देहप्रारब्ध भोगवी जाण ॥ यांचा मजसी संबंध कोण ॥ येणें विवेकें क्षमा पूर्ण ॥ कोणाचें मन दुखवीना ॥ ६४ ॥ जेथ स्वगोत्र[6] सोइरे स्वजन ॥ जिहीं दीधला अतिसन्मान ॥ त्यांदेखतां अपमान ॥ अनुद्विग्न[7] जो साहे ॥ ६५ ॥ त्यापाशीं शांति संपूर्ण ॥ उद्धवा निश्चयेंचि जाण ॥ ज्याचें लोकेषणा लाजेना मन ॥ शांतिठावो जाण तेठायीं ॥ ६६ ॥ ऐसा क्षोभवितां पहाहो ॥ क्षोभा न चढे त्याचा भावो[8] ॥ त्या संन्याशाचा अभिप्रावो ॥ स्वयें देवाधिदेवो सांगत ॥ ६७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवं स भौतिकं दुःखं दैविकं दैहिकं च यत् ॥ भोक्तव्यमात्मनो दिष्टं प्राप्तं प्राप्तमबुद्ध्यत ॥ ४१ ॥ ॥ टीका ॥ ॥ भिक्षु बोले निजविवेक ॥ त्रिविधप्रारब्धें बांधले लोक ॥ तेणें भोगणें पडे आवश्यक ॥ रावो[9] रंक[9] सुटेना ॥ ६८ ॥ भूतांची पीडा ते भौतिक ॥ देवांची पीडा ते दैविक ॥ देहीं उपजती ज्वरादिक ॥ हे पीडा देख देहाची ॥ ६९ ॥ यापरी त्रिविध दुःख ॥ प्रारब्ध झालें जनक[10] ॥ तें भोगितां मानी असुख ॥ तो केवळ मूर्ख मतिमंद ॥ ५७० ॥ जे भोग आले प्रारब्धेंसी ॥ तेथें साह्य केल्या हरिहरांसी ॥ भोग न चुकती प्राण्यासी ॥ हें जाणोनि संन्यासी क्षमावंत ॥ ७१ ॥ कृष्ण साह्य पांडवांसी ॥ ते भोगिती नष्टचर्यासी ॥ साह्य केल्या हरिहरांसी ॥ प्रारब्ध कोणासी टळेना ॥ ७२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ परिभूत इमां गाथामगायत नराधमैः ॥ पातयद्भिः स्वधर्मस्थो धृतिमास्थाय सात्त्विकीम् ॥ ४२ ॥ ॥ टीका ॥ दुर्जनांच्या उपद्रवाहातीं ॥ निजशांति नसांडी[11] यती ॥ धरोनियां सात्विकी धृती[12] ॥ स्वधर्मस्थिती नढळेची ॥ ७३ ॥ तेणें भिक्षूनें गायिली गाथा ॥ ते तुज मी सांगेन आतां ॥ उद्धवा अतिसावधानता ॥ तो बोध तत्वतां अवधारी ॥ ॥ ७४ ॥ तो बोधु धरितां चित्तीं ॥ द्वंद्व

---

१ बुद्ध्या. २ वायुयुक्त गुदशब्द. ३ वऱ्हाड्यांत, मैदानांत. ४ बळकट. ५ आपल्या मनांत. ६ भाऊबंद. ७ उदासीन न होतां. ८ मन. ५ राजा अथवा अत्यंत दरिद्री. १० उत्पन्न होण्यास कारण. ११ सोडीना. १२ धैर्य, संतोष.

साम्या पावे स्थिती ॥ सहजें उल्हासे[1] निजशांती ॥ सायुज्यमुक्ती घर रिघे ॥ ७५ ॥ जगीं उद्धवाचें भाग्य पूर्ण ॥ ज्यासि श्रीकृष्ण करी सावधान ॥ काय बोलिला भिक्षु आपण ॥ तें निरूपण अवधारी ॥ ७६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ द्विज उवाच ॥ ॥ नायं जनो मे सुखदुःखहेतुर्न देवतात्मा ग्रहकर्मकालाः ॥ मनः परं कारणमामनंति संसारचक्रं परिवर्तयेद्यत् ॥ ४३ ॥ ॥ टीका ॥ ॥ सुजन दुर्जन साधारण ॥ ऐसे जे त्रिविधें[2] जन ॥ माझ्या सुखदुःखांसि कारण ॥ सर्वथा जाण ते नव्हती ॥ ७७ ॥ जन तितुके पांचभौतिकें[3] ॥ माझाही देहो तो देख ॥ जनांसि मज सहजें ऐक्य ॥ उपजे सुखदुःख मनापाशीं ॥ ७८ ॥ देवता सुखदुःखदायक ॥ ऐसें ह्मणावें आवश्यक ॥ तीं दैवतें मनःकल्पनिक[4] ॥ त्याचें सुखदुःख मजसी नलगे ॥ ७९ ॥ देवतारूपें मन आपण ॥ मनें कल्पिले देवतागण ॥ ते जैं सुखदुःखें देती जाण ॥ तैं मुख्य कारण मन झालें ॥ ५८० ॥ जेथ जैसा मनाचा सद्भावो ॥ जेथ मनाचा विकल्प पहाहो ॥ तेथ तद्रूपें भासे देवी देवो ॥ थिता[5] देवो कोठें दिसेना ॥ ८१ ॥ यालागीं सकळ देवता ॥ त्या जाण मनःकल्पिता ॥ त्यांपासाव सुखदुःखव्यथा ॥ ते मनाचे माथां निश्चित ॥ ८२ ॥ आत्मा सुखदुःखासि कारण ॥ हें समूळ मिथ्या वचन ॥ आत्म्याचे ठायीं द्वैतभान ॥ त्रिशुद्धी[6] जाण असेना ॥ ८३ ॥ मी एक सुखदुःखांचा दाता ॥ हा एक सुखदुःखांचा भोक्ता ॥ हें आत्म्याचेठायीं तत्त्वतां ॥ जाण सर्वथा असेना ॥ ८४ ॥ जन्मकाळींचे ग्रह दारुण ॥ ह्मणों सुखासि कारण ॥ ग्रहांचा ग्रहो मन आपण ॥ जन्ममरण भोगवी ॥ ८५ ॥ ग्रहांची ग्रहगती देहांतवरी ॥ मनाची ग्रहगती त्याहूनि थोरी ॥ दुःख भोगवी नानाप्रकारीं ॥ जन्मजन्मांतरीं सोडीना ॥ ८६ ॥ दुष्टग्रह चारी दिवस पीडी ॥ मनाची पीडा जन्मकोडी ॥ दुष्टग्रहो भोगूनि सोडी ॥ मन न सोडी कल्पांतीं ॥ ८७ ॥ जैं मन न धरी देहाभिमान ॥ तैं ग्रहांची पीडा मानी कोण ॥ यालागीं सुखदुःखां कारण ॥ मनचि जाण महाग्रहो ॥ ८८ ॥ येथ निजकर्म दुःखदायक ॥ हेंही ह्मणोंनये देख ॥ कर्माकर्म बंधमोचक ॥ तें दुःखदायक घडे केवीं ॥ ८९ ॥ स्वकर्म शुद्ध स्वाभाविक ॥ त्यासि मनें करूनि सकामिक ॥ नानापरी अतिदुःख ॥ योनि अनेक भोगवी ॥ ५९० ॥ होकां कर्मांचेनि क्रियायोगें ॥ जैं मनःसंकल्प कर्मीं नलगे ॥ तैं सुखदुःखांचीं अनेगें ॥ विभांडी वेगें निजकर्म ॥ ९१ ॥ देह सुखदुःखांसि काय जाणे ॥ आत्मा सुखदुःख सर्वथा नेणे ॥ येथ सुखदुःखांचे गाडे भरणें ॥ मनें भोगणें निजसत्ता ॥ ९२ ॥ येथ सुखदुःखदायक ॥ मनचि झालें असे एक ॥ मनाअधीन होऊनि लोक ॥ मिथ्या सुखदुःख भोगिती ॥ ९३ ॥ काळ सुखदुःखांचा दाता ॥ हेंही न घडे गा सर्वथा ॥ मनःसंकल्पविकल्पकता ॥ काळाची सत्ता लागली ॥ ९४ ॥ अजरामर[7] असतां आपण ॥ मनें घेतलें मज

---

[1] उत्कर्षास पावते. [2] तीन प्रकारचे. [3] पृथ्वी, अप्, तेजस्, वायु, आकाश यांचा विकार. [4] मनानें कल्पिलेलीं. [5] खरा असणारा. [6] निःसंशय. [7] कधीं वृद्धत्व व मरण न प्राप्त होणारें.

आहे मरण ॥ तेथचि काळ लागला जाण ॥ क्षणें क्षण निर्दाळित ॥ ९५ ॥ आपुलेनि हातें आपण ॥ पंठाडे खोंविला दाभण ॥ रात्रीं रुपतांचि तें जाण ॥ सर्पभयें प्राण सांडिला ॥ ९६ ॥ त्यासि सर्प नाहीं लागला ॥ मा विखें केवीं तो घाबरला ॥ परी निजशंके स्वयें निमाला ॥ तैसा काळ लागला जनासी ॥ ९७ ॥ एकासि सर्प झोंबला पाठीसी ॥ काय रुतलें ह्मणे सांग यासी ॥ तो ह्मणे कांटी लागली कैसी ॥ ते म्या अनायासीं उपडिली ॥ ९८ ॥ तो नव्हे सर्पा साशंक ॥ यालागीं त्यासि न चढेचि विख ॥ निजव्यापारीं देख ॥ यथासुखें वर्तती ॥ ९९ ॥ त्यासि सांगोनि बहुकाळें खूण ॥ देतां सर्पाची आटवण ॥ तत्काळ विषें आंवळोन ॥ आशंका प्राण सांडिला ॥ ६०० ॥ तेवीं निर्विकल्पपुरुषा ॥ उठी संकल्प आशंका ॥ ते काळीं काळु देखा ॥ बांधे आंवांका निर्दळणीं ॥ १ ॥ निःशंकपणें साचार ॥ ज्याचें मन ह्मणे मीं अमर ॥ त्याचें काळ वर्जी घर ॥ काळ दुर्धर मनःशंका ॥ २ ॥ जो निर्विकल्प निजनिवाडें ॥ काळ सर्वथा न ये त्याकडे ॥ नश्वर नाहीं तयापुढें ॥ काळ कोणीकडे रिघेल ॥ ३ ॥ यापरी गा काळ देख ॥ नव्हे सुखदुःखदायक ॥ सुखदुःखांचें जनक ॥ मनचि एक निश्चित ॥ ४ ॥ मनःकल्पित संसार जाण ॥ मनें कल्पिलें जन्ममरण ॥ संसारचक्रीं आवर्तन ॥ मनास्तव जाण पुनःपुनः ॥ ५ ॥ हे साही प्रकार जाण ॥ ह्मणती सुखदुःखांसि कारण ॥ विचारितां हें अप्रमाण ॥ मनोजन्य सुखदुःखें ॥ ६ ॥ नवल लाघवी कैसें मन ॥ शुद्धि उपजवी मीपण ॥ चिद्रूपा लावूनि जीवपण ॥ सुखदुःखें जाण भोगवी ॥ ७ ॥ डोळींचा कणु अल्प एक ॥ तो शरीरासि दे अतिदुःख ॥ तेवीं वासनामात्रें मन देख ॥ दारुण सुखदुःख भोगवी ॥ ८ ॥ ह्मणाल येथ अविद्या एक ॥ ते होय सुखदुःखदायक ॥ अविद्या ब्रह्म असतां देख ॥ मनेंवीण सुखदुःख कदा नुपजे ॥ ९ ॥ अविद्या ब्रह्म असतां पाही ॥ मन लीन सुषुप्तीच्या ठायीं ॥ तेव्हां सुखदुःखचि नाहीं ॥ भोग कोणेंही कहीं देखिजेना ॥ ६१० ॥ मन दुश्चित जेव्हां पाही ॥ तेव्हां भोग भोगिजे देहीं ॥ तें सुखदुःख न पडे ठायीं ॥ स्वयें स्वदेहीं देखिजे ॥ ११ ॥ यालागीं सुखदुःखांचें कारण ॥ मनचि आपण्या आपण ॥ तेणें लावूनि जन्ममरण ॥ भोवंडी दारुण भवचक्रीं ॥ १२ ॥ भवचक्रीं प्रत्यावर्तन ॥ कोणे रीतीं करवी मन ॥ तेचि अर्थीचें निरूपण ॥ भिक्षु आपण्या आपण निरूपी ॥ १३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मनो गुणान्वै सृजते बलीयस्ततश्च कर्माणि विलक्षणानि ॥ शुक्लानि कृष्णान्यथ लोहितानि तेभ्यः सवर्णाः सृतयो भवंति ॥ ४४ ॥ ॥ टीका ॥ ॥ मनें कल्पोनि निजसत्तें ॥ उपजवी नानावृत्तींतें ॥ त्याचि त्रिगुणा होती येथें ॥ गुणविभागातें गुणवृत्ती ॥ १४ ॥ सत्वरजतमादिगुणीं ॥ सुर नर तिर्यगादि योनी ॥ मनें त्रिभुवन उभवूनी ॥ संसारभुवनीं स्वयें नांदे ॥ १५ ॥

---

१ पथारोस. २ सापाविषयीं. ३ व्यापून. ४ उमेद. ५ नाश करण्याविषयीं. ६ मरणरहित. ७ खोटें. ८ मनापासून उत्पन्न होणारीं. ९ केवळ ज्ञानस्वरूप अशा आत्म्यास. १० गाढनिद्रेंत.

त्या मनाची प्रौढी गाढी ॥ क्षणें रची क्षणें मोडी ॥ मन ब्रह्मादिकां भुली पाडी ॥ इतर बापुडीं ते कायी ॥ १६ ॥ मनाचा बलात्कार
कैसा ॥ निर्गुण पाडी गुणाचे फांसा ॥ लावूनि जीवपणाचा झांसा ॥ संसारवळसा आवर्ती ॥ १७ ॥ केवळ विचारितां[1] मन ॥ तें जड
मूढ अचेतन ॥ त्याचें केवीं घडे सृजन[2] ॥ तेंचि निरूपण सांगत ॥ १८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अनीह आत्मा मनसा समीहता हिरण्मयो
मत्सख उद्विचष्टे ॥ मनः स्वलिंगं परिगृह्य कामान् जुषन्निबद्धो गुणसंगतोऽसौ ॥ ४५ ॥ ॥ टीका ॥ ॥ आत्मा चित्स्वरूप परिपूर्ण ॥
निःसंग निर्विकार निर्गुण ॥ त्यासि संसारबंधन ॥ सर्वथा जाण घडेना ॥ १९ ॥ जो स्वप्रकाशें प्रकाशघन ॥ निजतेजें विराजमान ॥
जो परमात्मा परिपूर्ण ॥ त्यासि क्रियाचरण कदा न घडे ॥ ६२० ॥ विचारितां निजनिवाडें ॥ मनाचें जडत्वचि जोडे ॥ त्यासिही
संसार न घडे ॥ भवबंध घडे तो ऐका ॥ २१ ॥ नवल मनाचें विंदान ॥ शुद्धी उपजवी मीपण ॥ तेंचि वस्तूसि जीवपण ॥ सगुणत्वा
जाण स्वयें आणी ॥ २२ ॥ मनःसंकल्पाचें बळ ॥ शुद्धासि[3] करी सबळ ॥ लावूनि त्रिगुणाची माळ ॥ भवबंधजाळ स्वयें बांधे ॥ २३ ॥
जेवीं घटामाजील घटजळ ॥ आकळी अलिप्त चंद्रमंडळ ॥ तेवीं मनःसंकल्पें केवळ ॥ कीजे शबल[4] चिदात्मा ॥ २४ ॥ घटींचें हालतां
जीवन ॥ चंद्रमा करी कंपायमान ॥ तेवीं शुद्धासि जन्ममरण ॥ मनोजन्य सुखदुःखें ॥ २५ ॥ आत्मा स्वप्रकाश चित्स्वरूप ॥ मन जड
कल्पनारूप ॥ तें मानूनि आपुलें स्वरूप ॥ त्याचें पुण्यपाप स्वयें भोगी ॥ २६ ॥ जीवाचा आप्त आवश्यक ॥ सुहृद सखा परमात्मा
एक ॥ तो मनाजीवाचा नियामक ॥ द्रष्टा देख साक्षित्वें ॥ २७ ॥ अविद्या प्रतिबिंबी नेटका ॥ जीव जो कां माझा सखा ॥ तो मनोभ्रमें
भ्रमोनि देखा ॥ भोगी सुखदुःखा मनोजन्य ॥ २८ ॥ मनाची एकात्मता परम ॥ जीवासि पडला थोर भ्रम ॥ आपण असतांही निष्कर्म
॥ कर्माकर्म स्वयें भोगी ॥ २९ ॥ मुळीं जीव मनाचा नियंता ॥ तोचि मनाच्या एकात्मतां ॥ मनाचिया सुखदुःखव्यथा ॥ आपुले
माथां नाथिल्या सोशी ॥ ६३० ॥ जेवीं अति आप्तता प्रधान ॥ रायासि लावी दृढबंधन ॥ मग राजा तो होय दीन ॥ तो भोगवी तें
जाण सुखदुःख भोगी ॥ ३१ ॥ ते दशा झाली जीवासी ॥ मनें संसारी केलें तयासी ॥ मग नानाजन्ममरणें सोशी ॥ अहर्निशीं सुख
दुःखें ॥ ३२ ॥ त्या मनासि निग्रहो न करितां ॥ जीवाची न चुके व्यथा ॥ मनाचेनि छंदें नाचतां ॥ साधनें सर्वथा व्यर्थ होती ॥ ३३ ॥
॥ श्लोक ॥ ॥ दानं स्वधर्मो नियमो यमश्च श्रुतानि कर्माणि च सद्व्रतानि ॥ सर्वे मनोनिग्रहलक्षणांताः परो हि योगो मनसः समाधिः
॥ ४६ ॥ ॥ टीका ॥ ॥ न लक्षितां मनोनियमन ॥ सर्वस्वही दिधल्या दान ॥ एक मी दाता होय अभिमान ॥ तेणें दानें मन दाटुगें[5] होय ॥ ३४ ॥

---

[1] विचार केला असतां. [2] उत्पत्ति. [3] आत्म्यास. [4] अविद्यायुक्त. [5] गर्विष्ठ.

चुकोनि मनोनिग्रहाचें वर्म ॥ आचरतां वर्णाश्रमधर्म ॥ तेणें उल्हासे मनोधर्म ॥ माझें स्वकर्म अतिश्रेष्ठ ॥ ३५ ॥ मीचि एक तिहीं लोकीं ॥ स्वाचारनिष्ठ[1] स्वयंपाकी[2] ॥ यापरी स्वकर्मादिकीं ॥ मन होय अधिकीं चौविरें[3] ॥ ३६ ॥ मनोनियमनीं नाहीं बुद्धी ॥ तैं यमनियम ते उपाधी ॥ मी एक साधक त्रिशुद्धी ॥ हेंचि प्रतिपादी मनोधर्म ॥ ३७ ॥ करितां वेदशास्त्रश्रवण ॥ गर्वाचें भरतें गहन ॥ पांडित्यीं अति अभिमान ॥ मनोनियमन तेथें कैंचे ॥ ३८ ॥ करूं जातां निजकर्म ॥ कर्मक्रिया अतिदुर्गम[4] ॥ कर्मठतेचा चढे भ्रम ॥ मनाचा नियम घडे केवीं ॥ ३९ ॥ कर्म केवळ देहाचे माथां ॥ आत्मा देहीं असोनि विदेहता ॥ त्यासि कर्मीं कर्मबद्धता ॥ कर्मठ मूर्खतां[5] मानिती ॥ ६४० ॥ अनंतव्रतें झाला व्रती ॥ तेणें धनधान्य वांछिती ॥ मनोनिग्रहो नाहीं चित्तीं ॥ सद्व्रतें जाती सुनाट[6] ॥ ४१ ॥ व्रत दान स्वधर्म सकळ ॥ यांसि मनोनिग्रहो[7] मुख्य फळ ॥ तेणेंवीण अवघे विकळ ॥ साधनें निष्फळ साधकां ॥ ४२ ॥ दानादिक सप्त पदार्थ ॥ हे ज्ञानाचे अंगभूत ॥ तीं साधनें समस्त ॥ निष्फळ येथ केवीं ह्मणा ॥ ४३ ॥ दानादिकें जीं जीं येथें ॥ इहामूत्र[9] फळ ये त्यांतें ॥ तें फळचि निष्फळ येथें ॥ जन्ममरणांतें वाढवी ॥ ४४ ॥ येथ साधक होय सज्ञान ॥ फळाशा निःशेष त्यागून ॥ दानादि स्वधर्माचरण ॥ चित्तशुद्धी जाण उपेगा ते ॥ ४५ ॥ माझी व्हावी चित्तशुद्धी ॥ ऐशी उपजावया बुद्धी ॥ भगवत्कृपा पाहिजे आधीं ॥ तैं साधनें सिद्धि पावती ॥ ४६ ॥ साधनीं माझी मुख्यभक्ती ॥ त्यांत विशेषें नामकीर्ती ॥ नामें चित्तशुद्धि चित्तीं ॥ स्वरूपस्थिती साधकां ॥ ४७ ॥ नामापरतें साधन ॥ सर्वथा नाहीं आन ॥ नामें भवबंधच्छेदन ॥ सत्य जाण उद्धवा ॥ ४८ ॥ स्वरूपस्थिति निश्चळ मन ॥ जेथ लाजोनि जाय साधन ॥ तेथ दानादिकांचें प्रयोजन ॥ सहजचि जाण खुंटलें ॥ ४९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ समाहितं कस्य मनः प्रशांतं दानादिभिः किं वद तस्य कृत्यम् ॥ असंयतं यस्य मनो विनश्येद्दानादिभिश्चेदपरं किमेभिः ॥ ४६ ॥ ॥ टीका ॥ ॥ जेथ ज्या पुरुषाचें मन ॥ टाकी आपुलें जन्मस्थान ॥ त्यासि दानादिकांचें कोण ॥ प्रयोजन साधनीं ॥ ६५० ॥ पूर्णतृप्तापाशीं जाण ॥ वोगॅरलिया[10] सदन्न ॥ तो जेवीं न पाहे ढुंगोन ॥ तेवीं साधन अमनस्का[11] ॥ ५१ ॥ गंगा उतरावया महापूरीं ॥ अतिप्रयासीं ताफा करी ॥ तोचि पूर बोहटल्यावरी ॥ ताफा आव्हेरी निःशेष ॥ ५२ ॥ तेवीं कामक्रोधादिवेगशून्य ॥ ज्याचें निर्विकल्पीं निश्चळ मन ॥ त्यासि दानादिकीं प्रयोजन ॥ नाहीं जाण निश्चित ॥ ५३ ॥ जेवीं सूर्योदय झाल्यापाठीं ॥ उपेगा न ये लक्ष दिवटी ॥ तेवीं निर्विकल्पता मनीं उठी ॥ तैं साधनें कोटी

---

१ आपल्या आचारांत निपुण. २ स्वतः अन्न शिजवून भोजन करणारा. ३ चावट. ४ जाणण्यास अत्यंत कठिन. ५ अज्ञानानें. ६ व्यर्थ. ७ चित्तवृत्तिनिरोध. ८ साधनें. ९ ह्या लोकीं व परलोकीं. १० वाढल्यास. ११ मन वश न करणारास.

सुनाट ॥ ५४ ॥ एवं समाहित[1] ज्याचें मन ॥ त्यासि दानादि नानासाधन ॥ करावया नाहीं प्रयोजन ॥ कल्पना पूर्ण निमाल्या ॥ ५५ ॥ ज्याचें नेम न मनी[2] चित्त ॥ जें सदा विवेकरहित ॥ जें अनिवार[3] विषयासक्त ॥ त्यासिही अनुपयुक्त साधनें ॥ ५६ ॥ जेवीं मदगजाच्या लोटीं ॥ सैन्य पळे बारावाटीं ॥ तेवीं विषयासक्तापाठीं ॥ साधनें हिंपुटी होऊनि ठाती ॥ ५७ ॥ जो विषयासक्त मना ॥ तो सर्वथा नातळे साधना ॥ करी तैं तेथेंही जाणा ॥ विषयकल्पना संकल्पी ॥ ५८ ॥ स्वयें करितां पैं साधना ॥ जेंजें फळ वांछी वासना ॥ तें तेणेंचि फळें जाणा ॥ करी उगाणा[4] दानादिकाचा ॥ ५९ ॥ जेवीं कां बुद्धिबळाचा वारू[5] ॥ त्यावरी बैसला निर्बळ नरू ॥ तो त्यासि सर्वथा अनावरू ॥ नव्हे स्थिरू अणुमात्र ॥ ६६० ॥ तैसें त्याचे अतिदुर्मन ॥ सदा कामक्रोधीं परिपूर्ण ॥ तो स्वयें झाला मनाचे अधीन ॥ ज्याचा विवेक निमग्न महामोहीं ॥ ६१ ॥ तेथ साधनचि करी कोण ॥ करी तें मोहास्तव जाण ॥ तेणें वाढे तमोगुण ॥ मनोनियमन घडेना ॥ ६२ ॥ श्रवणादि इंद्रियबंधन ॥ करूनि करितां साधन ॥ तेणें वश्य नव्हे मन ॥ मनाअधीन इंद्रियें ॥ ६३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मनोवशेऽन्ये ह्यभवन्स्म देवा मनश्च नान्यस्य वशं समेति ॥ भीष्मो हि देवः सहसः सहीयान् युंज्याद्वशे तं स हि देवदेवः ॥ ४८ ॥ ॥ टीका ॥ मनें आकळिलें सर्वांसी ॥ परी मन नाकळे कोणासी ॥ मनें छळिलें देवांसी ॥ तें केवीं इंद्रियांसी आटोपे ॥ ६४ ॥ चंद्र अधिष्ठाता[6] मनासी ॥ मनें छळिलें चंद्रम्यासी ॥ व्यभिचारोनि[7] गुरुपत्नीसी ॥ क्षयरोगी त्यासी मनें केलें ॥ ६५ ॥ ब्रह्मा अधिष्ठाता बुद्धीसी ॥ मनचि ब्रह्म्याची बुद्धि भ्रंशी ॥ निजपुत्री[8] वरितां त्यासी ॥ स्वकन्येसी अभिलाषी ॥ ६६ ॥ चित्तीं वासुदेवाचें अधिष्ठान ॥ त्यातेंही हळूच ठकी मन ॥ लावूनि द्वंद्वेचें ध्यान ॥ श्मशानीं जाण पाडिला ॥ ६७ ॥ रुद्र अधिष्ठाता अहंकारीं ॥ त्यातेंही मन सिंतरी[9] ॥ अभिलाषितां ऋषि नारी ॥ शापिला ऋषीश्वरीं लिंगपातें ॥ ६८ ॥ ऐसें देवां दुर्जय जें मन ॥ त्यासि आवरी इतर कोण ॥ ह्मणाल इंद्रियें नेमित मन ॥ ते मनाधीन इंद्रियें ॥ ६९ ॥ जें इंद्रियें धरोनि हातीं ॥ मन एकाग्र होय जे अर्थीं ॥ तेव्हां इतर इंद्रियांची स्थिती ॥ राहे निश्चितीं सुनाट ॥ ६७० ॥ इंद्रियविषयां होय संगती ॥ तेकाळीं जे दुश्चिती मनोवृत्ती ॥ तेव्हां न घडे विषयप्राप्ती ॥ इंद्रियां स्फूर्ती स्फुरेना ॥ ७१ ॥ जेव्हां अनासक्त मनोधर्म ॥ तेव्हां इंद्रियांचें नचले काम ॥ मनाअधीन इंद्रियग्रामं[10] ॥ इंद्रियां मनोनेम कदा न घडे ॥ ७२ ॥ इंद्रियांचा राजा मन ॥ इंद्रियें न चालती मनेंवीण ॥ पुरुषातेंही मन आपण ॥ वश्य जाण स्वयें करी ॥ ७३ ॥ अतिबळियां बळी मन ॥ तेथ इंद्रियें बापुडीं कोण ॥ मनाचें करावया दमन ॥ नव्हे आंगवण[11] वरिष्ठां ॥ ७४ ॥ काळ निजसत्ता सर्व ग्रासी ॥ परी मनाची लोंव नुपडे

---

१ समाधियुक्त. २ मानी. ३ अतिशय. ४ फेड. ५ घोडा. ६ नियामक देवता. ७ दूषित करून. ८ आपल्या कन्येनें. ९ फसवितें. १० इंद्रियांचा समुदाय. ११ सामर्थ्य.

त्यासी ॥ करितां उत्पत्तिस्थितिप्रळयांसी ॥ मन काळासी नाटोपे ॥ ७५ ॥ शस्त्रें न तुटे सर्वथा मन ॥ त्यासि विरवूं न शकेचि जीवन ॥
मन जाळूं न शके दहनें[1] ॥ मनातें गगन शून्य करूं न शके ॥ ७६ ॥ मनासि लागों न शके व्याधी ॥ मन रोडे जे ऐशी नाहीं व्याधी ॥
मन आकळावया सिद्धी ॥ पाहतां त्रिशुद्धी दिसेना ॥ ७७ ॥ मन ब्रह्मादिकांच्या रची कोडो ॥ मन ब्रह्मांडें घडी मोडी ॥ मन निजकल्पनाकडोडीं ॥ नाचवी धांदडी त्रैलोक्या ॥ ७८ ॥ मन कळिकाळातें छळी ॥ मन प्रळयानळातें[3] गिळी ॥ मन बळियांमाजी अतिबळी ॥ मनातें आकळी ऐसा नाहीं ॥ ७९ ॥ मन देवांसि दुर्धर[2] ॥ मन भयंकरां भयंकर ॥ मनें आकळिले हरिहर ॥ मनासमोर कोण
राहे ॥ ६८० ॥ मनाचा अनिवार मार ॥ कोण राहे मनासमोर ॥ मनास पर्जी ऐसा थोर ॥ सुर नर असुर दिसेना ॥ ८१ ॥ मनासि
मेळवी हातोफळी ॥ ऐसा त्रिलोकीं नाहीं बळी ॥ मन कळिकाळातें आकळी ॥ प्रळयरुद्रातें गिळी न माखतां[4] दाढ ॥ ८२ ॥ ऐसा मनाचा अगाध भावो ॥ यालागीं यातें ह्मणिजे देवो ॥ मनाचा भयानक भेवो[5] ॥ यालागीं भीष्मदेवो मनातें ह्मणती ॥ ८३ ॥ ऐशी
मनाची अनावर स्थिती ॥ यासि आकळावयाची सवर्म युक्ती ॥ साचार[6] सांगेन तुह्मांप्रती ॥ सावधानस्थितीं अवधारा[7] ॥ ८४ ॥ जेवीं
हिरेंनि हिरा चिरिजे ॥ तेवीं मनेंचि मन धरिजे ॥ हेंही तैंचि गा लाहिजे ॥ जेवीं गुरुकृपा पाविजे संपूर्ण स्वयें ॥ ८५ ॥ मन गुरुकृपेची
आंदणी दासी ॥ मन सदा भीतसे सद्गुरूसी ॥ तें ठेवितां गुरुचरणापाशीं ॥ दे साधकांसी संतोष ॥ ८६ ॥ या मनाची एक उत्तम गती ॥
जरी स्वयें लागलें परमार्थी ॥ तरी दासी करी चारी मुक्ती ॥ दे बांधोनि हातीं परब्रह्म ॥ ८७ ॥ मनचि मनाचें घोतक ॥ मनचि मनाचें
साधक ॥ मनचि मनाचें बाधक ॥ मनचि घातक मनासी ॥ ८८ ॥ जेवीं वेळु वाढवी वेळु जाळी ॥ वेळु वेळुवां कांचणीमेळीं[8] ॥ स्वयें
पाडूनि इंगळीं[9] ॥ समूळ जाळी आपण्यातें ॥ ८९ ॥ तेवीं मन मनासि चिंती मरण ॥ तैं सद्गुरूसि रिघवी शरण ॥ त्याचे वचनीं विश्वासोन ॥ करवी गुरुभजन निरभिमानें ॥ ६९० ॥ सद्गुरुकृपा झालिया पूर्ण ॥ हें मनचि मनासि दावी खूण ॥ तेणें निजसुखें सुखावोन ॥
मनचि प्रसन्न मनासि होय ॥ ९१ ॥ मन मनासि झालिया प्रसन्न ॥ तेव्हां वृत्ति होय निरभिमान ॥ ऐसें साधकां निजसमाधान ॥ मनें
आपण साधिजे ॥ ९२ ॥ पावोनि गुरुकृपेची गोडी ॥ मनोविजयाची निजगुढी ॥ मनें उभवूनि लवडसवडी ॥ दीजे रोकडी साधकां
हातीं ॥ ९३ ॥ यापरी साधकांसि संपूर्ण ॥ मन आपला विजयो दे आपण ॥ शेखीं सद्गुरुनिजबोधीं पूर्ण ॥ मन होय लीन निजात्मतां[10]
॥ ९४ ॥ जेवीं कां सैंधवाचा खडा ॥ रिघोनि सिंधूमाजी[11] वडा ॥ स्वयें विरोनियां रोकडा ॥ सिंधूयेव्हडा तो होय ॥ ९५ ॥ यापरी

---

१ अग्नि. २ जोरावर. ३ प्रळयकालच्या अग्नीस. ४ स्पर्श करितां. ५ भय. ६ खरी. ७ ऐका. ८ घर्षण करीत असतां. ९ ठिणगी. १० ऐक्यरूपानें. ११ समुद्रांत.

साधक जाण ॥ होतांच निरभिमान ॥ स्वयें होती ब्रह्म पूर्ण ॥ मीतूंपण गिळोनी ॥ ९६ ॥ मग त्याचिया निजदृष्टी ॥ मीचि एक अवघे सृष्टीं ॥ मावळली द्वंद्वत्रिपुटी ॥ सुखदुःख पाठीं लागेना ॥ ९७ ॥ तेथें कैंचें सुख कैंचें दुःख ॥ कैंचा बंध कैंचा मोक्ष ॥ कोण पंडित कोण मूर्ख ॥ ब्रह्म एक एकलें ॥ ९८ ॥ तेथ कोण देव कोण भक्त ॥ कोण शांत कोण अशांत ॥ मावळलें द्वैताद्वैत ॥ वस्तु सदोदित स्वानंदें ॥ ९९ ॥ तेथ उगाणलें क्रियाकर्म ॥ लाजा विराले धर्माधर्म ॥ कैंचें अधम उत्तम मध्यम ॥ परिपूर्ण ब्रह्म कोंदलें ॥ ७०० ॥ तेथ कैंचें शास्त्र कैंचा वेद ॥ कैंची बुद्धि कैंचा बोध ॥ निःशेष निमाला भेद ॥ परमानंद कोंदला ॥ १ ॥ यापरी मनोविजय पहाहो ॥ ऐशिया स्थितीं पावला भावो ॥ तेंचि स्वयें वदे देवो ॥ ये अर्थीं संदेहो असेना ॥ २ ॥ मनोजयाचा सद्भावो ॥ ब्रह्मादिकां अगम्य पहा हो ॥ जो स्वांगें करी स्वयमेवो ॥ तो देवाधिदेवो निजबोधें ॥ ३ ॥ जो निजमनातें जिंकोनी ॥ जनीं पावला जनार्दनीं ॥ तो धन्यधन्य त्रिभुवनीं ॥ त्याचेनि अवनीं[3] पवित्र ॥ ४ ॥ तेणेंचि पूर्वज तारिले ॥ तेणें सकळ कुळ उद्धरिलें ॥ तेणेंचि परब्रह्म आंगविलें ॥ जेणें जिंकिलें मनातें ॥ ५ ॥ मनोजय अतिसमर्थ ॥ शांति सर्वस्वें विकिली जेथ ॥ त्यासि सुखदुःखांचे आवर्त ॥ गेले नकळत निजात्मता ॥ ६ ॥ ऐशी भिक्षूची निजवाणी ॥ उल्हासें सांगे सारंगपाणी ॥ उद्धवास ह्मणे संतोषोनी ॥ धन्य त्रिभुवनीं मनोजय ॥ ७ ॥ जेणें निजमनातें जिंकिलें ॥ त्यासि मी किती वानूं बोलें ॥ तेणें मज आपुले पोसणें[4] केलें ॥ कीं विकत घेतलें उखितेंची[5] ॥ ८ ॥ मज सुखरूपा त्याचेनि सुखप्राप्ती ॥ मज नित्यतृप्ता त्याचेनि तृप्ती ॥ मज अनंता त्यामाजी वस्ती ॥ मी दाटुगा त्रिजगतीं त्याचेनी ॥ ९ ॥ मी तो या शब्दकुसरी ॥ त्याही जाण आह्मांबाहेरी ॥ आंतुवटे निजविचारीं ॥ तोचि मी निर्धारीं निजऐक्यता ॥ ७१० ॥ मनोजयें हे पदवी प्राप्त ॥ तो मनोजय न करूनि येथ ॥ प्राकृत रिपुजयें जे गर्वित ॥ त्यांतें निर्भर्त्सित स्वयें भिक्षु ॥ ११ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तं दुर्जयं शत्रुमसह्यवेगमरुंतुदं तं न विजित्य केचित् ॥ कुर्वंत्यसद्विग्रहमत्र मर्त्यैर्मित्राण्युदासीनरिपून्विमूढाः ॥ ४९ ॥ ॥ टीका ॥ ॥ पार्थिव शत्रु सबळ येती ॥ तेथ सामदानादिका स्थिती ॥ कारणीं लावोनियां ख्याती ॥ जिंकिले जाती निजांगें ॥ १२ ॥ हे प्रकार मनाच्याठायीं ॥ करितां न चलती पाही ॥ मनासि करावी शिष्टाई ॥ ते कोणाचें कहीं ऐकेना ॥ १३ ॥ मनासि द्यावें विषयदान ॥ परी विषयीं तृप्त नव्हे मन ॥ तेणें अधिकचि होय दारुण ॥ आवरी कोण तयासी ॥ १४ ॥ न चले शमदमादिप्रकारू ॥ तरी मनासि करावा मारू ॥ तेथ न चले हातियेरू ॥ मा रंगीं विचारू स्फुरेना ॥ १५ ॥ यापरी हाहा मनोवैरी ॥ दुर्जयत्वें कठिण भारी ॥ त्या सुखदुःखांच्या भरोवरी ॥ सर्वदा मारी जन्म

---

१ शून्य झालें. २ मिळण्यास कठिन. ३ पृथ्वी. ४ पोषिंदा. ५ मोहोगमच. ६ निंदा करितो. ७ चांगल्या गोष्टी सांगणें. ८ शस्त्र.

मरणें ॥ १६ ॥ इतर शत्रु नावरती ॥ तरी पळोंये[1] हातोहातीं ॥ रिघोनियां गडदुर्गांप्रती ॥ वांचती गती देखिजे ॥ १७ ॥ परी पळावया मनापुढें ॥ पळतां त्रैलोक्य होय थोडें ॥ जेथ लपावें अवघडें ॥ तेथही रोकडें मन पावे ॥ १८ ॥ मनाचे सेनापति शूर ॥ कामक्रोधादि महावीर ॥ त्यांचा मार अतिदुर्धर ॥ घायीं थोरथोर लोळंविती ॥ १९ ॥ बाह्यशत्रु ते दूरदेशीं ॥ येतां बहुदिन लागतां त्यांसी ॥ मनःशत्रु तो अंगेंसी ॥ अहर्निशीं जडलासे ॥ ७२० ॥ आसनीं भोजनीं एकांतीं ॥ जपीं अथवा ध्यानस्थितीं ॥ मनाची उडी पडे अवचितीं ॥ विभांडी[3] सर्वार्थी वैराकारें ॥ २१ ॥ बाह्यशत्रूचें अल्प दुःख ॥ मनाची पीडा विशेख ॥ जन्ममरणाचे आवर्त देख ॥ मन आवश्यक भोगवी ॥ २२ ॥ बाह्यशत्रु मरणात्मक[4] ॥ मन मरणासी अटक ॥ हा वैरी न जिंकितां देख ॥ जीवाचें अतिदुःख टळेना ॥ २३ ॥ मनाचे सवेगवेगासी ॥ न साहवे सुरनरांसी ॥ कष्टीं न जिंकवे कोणासी ॥ यालागीं मनासी दुर्जयत्व ॥ २४ ॥ ऐशिया मनातें न जिंकित ॥ बाह्य शत्रु जिणोनि येथ ॥ जे होती अतिगर्वित ॥ ते निश्चित जाण महामूर्ख ॥ २५ ॥ मनेंचि जिंकावें मनासी ॥ हें गतश्लोकीं[5] तुजपाशीं ॥ सांगीतलें यथार्थेंसी ॥ मनोजयासी उपावो ॥ २६ ॥ एवं मनातें ऐशियापरी ॥ न साधवेचि करूनि वैखरी ॥ तरी मनासी करोनि मैत्री ॥ मन सुखी करी मित्रत्वें ॥ २७॥ प्राकृतमित्रांची मैत्री ॥ उपकारीं प्रत्युपकारी ॥ ते विषयसुखावरी ॥ येरयेर घरीं उचितानुकाळें ॥ २८ ॥ तैशी नव्हे मनाची मैत्री ॥ उपकारेंवीण प्रत्युपकारी ॥ सकळदुःखातें निवारी ॥ सुखसागरीं नांदवी ॥ २९ ॥ प्राकृतीं अतिमित्रत्व ज्यासी ॥ निजदुःख सांगतां त्यापाशीं ॥ सर्वथा निवारेना त्यासी ॥ ह्मणे हें आह्मांसी असाध्य ॥ ७३० ॥ तैसें मित्रत्वा नव्हे मन ॥ मना बैसवूनि सावधान ॥ करितां निजदुःख निवेदन[6] ॥ हरी[7] जन्ममरण महाबोधें ॥ ३१ ॥ मरणभय असतां चित्तीं ॥ कनक[8]कामिनींची आसक्ती ॥ स्त्रिया अतिशयें निर्भर्त्सिती ॥ तरी निर्लज्जवृत्ती लाजेना ॥ ३२ ॥ परदारा परधन ॥ परद्रोहो[9] परनिंदा जाण ॥ लागल्या न सांडिती क्षण ॥ नरक दारुण भोगावया ॥ ३३ ॥ उसंत[10] नाहीं क्षुधेहातीं ॥ द्वंद्वसुखाची अतिप्रीती ॥ नावरे इंद्रियवृत्ती ॥ ऐसें मनाप्रती सांगतां ॥ ३४ ॥ ऐसें ऐकतां स्वयें मन ॥ वैराग्यें खवळे पूर्ण ॥ वेंचूनि विवेकाचें धन ॥ दुःखनिर्दळण करूं पाहे ॥ ३५ ॥ चोरूं[11] भांडारीं करितां पूर्ण ॥ चोर चोरातें निवारी जाण ॥ तेवीं मनासि करितां मित्रपण ॥ मनाचे अवगुण मनचि नाशी ॥ ३६ ॥ स्वधर्मीं प्रवर्ततां आपण ॥ मनचि मनासि निवारी जाण ॥ असत्याची वाचेसि आण ॥ आपण्या आपण मन घाली ॥ ३७ ॥ कैशी मनाची मैत्री परम ॥ निःशेष जाळावया कर्माकर्म ॥ जोडावया चित्तशुद्धीचें वर्म ॥ स्मरे हरिनाम अहर्निशीं ॥ ३८ ॥

---

१ पळ काढतां येतो. २ पाडितात. ३ नाश करितें. ४ साक्षात् मरणच. ५ मागील श्लोकांत. ६ कथन. ७ दूर करितें. ८ सुवर्ण व स्त्रीची. ९ दुसऱ्याचा द्वेष. १० अवकाश. ११ चोरी.

श्रीराम जयराम दों अक्षरीं ॥ महापातका होय बोहरी ॥ नाम न विसंबे क्षणभरी ॥ अखंडाकारीं हरि स्मरे ॥ ३९ ॥ तेव्हां असत्याचें शीस तोडी ॥ अधर्माची साल काढी ॥ कल्पनेचे पाय मोडी ॥ तणका तोडी आशेचा ॥ ७४० ॥ विकल्पाचा घरटा मोडी ॥ प्रपंचाचे दांत पाडी ॥ अविश्वासू तींठायीं तोडी ॥ विश्वासाची गुढी उभवी मन ॥ ४१ ॥ ऐसेनि परिपक्वविश्वासीं ॥ येऊनि सद्गुरुचरणापाशीं ॥ तनु मन धन सर्वस्वेंशी ॥ गुरुवचनाशी विश्वासे ॥ ४२ ॥ पूर्णविश्वासाचें लक्षण ॥ होतां गुरुवाक्यश्रवण ॥ परिसीं लोह[1] पालटे जाण ॥ तैसें अंतःकरण पालटे ॥ ४३ ॥ गुरुवचन सांगोन राहे ॥ परी मनींचें मनन न राहे ॥ कीटकी भ्रमरी ऐसा पाहे ॥ तद्रूप होये निदिध्यासें ॥ ४४ ॥ तेव्हां कमनीय[2] कामिनी धन ॥ तें देखे विष्ठेसमान[3] ॥ निंदा द्वेष मानाभिमान ॥ हे मनाचे अवगुण मनचि नाशी ॥ ४५ ॥ धन्यधन्य मनाची मैत्री ॥ विश्वास धरोनि निर्धारीं ॥ जन्ममरण जीवें मारी ॥ जीवातें करी परब्रह्म ॥ ४६ ॥ ऐशी मनाशीं करितां मैत्री ॥ मन परम उपकारी ॥ जीवातें धरूनि निजकरीं ॥ स्वानंदसागरीं बुडी दे ॥ ४७ ॥ तेथ मनाचें मनपण सरे ॥ जीवाचें जीवपण विरे ॥ बंधमोक्षांची धांव पुरे ॥ समूळ वोसरे[4] भवभय[5] ॥ ४८ ॥ मनाचें मित्रत्व यापरी ॥ आपुलें कुळ स्वयें संहारी ॥ आपणही मरे मित्रोपकारीं ॥ मन मित्राचारीं[6] अवंचक ॥ ४९ ॥ ऐसें मैत्रीसि मन सादर ॥ जवळीं असतां निरंतर ॥ त्यातें वोसंडूनि पामर ॥ प्राकृत नर मित्र करिती ॥ ७५० ॥ वैर करोनि मनचि मारावें ॥ मित्रत्वें मनें मन साधावें ॥ इयें दोनीं जैं न संभवे ॥ तैं उपेक्षावें मनातें ॥ ५१ ॥ मन ह्मणेल तें न करावें ॥ मनातें हातीं न धरावें ॥ मनातें कांहीं नातळावें ॥ जीवें भावें निःशेष ॥ ५२ ॥ मन ह्मणेल जें सुख ॥ तें सांडावें आवश्यक ॥ मन ह्मणेल जें दुःख ॥ तेंही निःशेख त्यजावें ॥ ५३ ॥ ऐसें उदास मन देख ॥ जो करी आवश्यक ॥ तरी तो झाला अमनस्क ॥ शांति अलोलिक तेठायीं ॥ ५४ ॥ शत्रु मित्र उदासीन[7] ॥ करूनि वश्य न करी मन ॥ जो धरी देहाभिमान ॥ त्याचें भवभ्रमण सरेना ॥ ५५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ देहं मनोमात्रमिमं गृहीत्वा ममाहमित्यंधधियो मनुष्याः ॥ एषोऽहमन्योऽयमिति भ्रमेण दुरंतपारे तमसि भ्रमंति ॥ ४० ॥ ॥ टीका ॥ ॥ आत्मा विदेहो चिद्घन ॥ तेथ मी देही हें मानी मन ॥ त्या देहासवें मीमाझेंपण ॥ जन्ममरण सुखदुःखें ॥ ५६ ॥ आत्मा नित्यमुक्त विदेही ॥ तया मनाची एकात्मता पाही ॥ विदेही ह्मणे देही ॥ शेखीं देहाच्याठायीं आत्मत्व मानी ॥ ५७ ॥ मी देह हें मानी मन ॥ तेणें दृढ होय देहाभिमान ॥ तेव्हां देहचि होय आपण ॥ मीमाझेंपण तेठायीं ॥ ५८ ॥ मी सच्चिदानंद परिपूर्ण ॥ हें आपलें विसरे आपण ॥ मी वैश्य शूद्र क्षत्रिय ब्राह्मण ॥ मूर्ख सज्ञान मी एक ॥ ५९ ॥ मी रोडका बोडका कुब्ज काण ॥

---

१ लोखंड. २ इच्छा करण्यास योग्य. ३ दुर्गंधिमलाप्रमाणें ४ दूर होतें. ५ संसारभय. ६ मित्राप्रमाणें वागणारें. ७ समान.

मी धांटा मोठा विचक्षण ॥ हे नाथिले[1] घेऊनि देहगुण ॥ माणुसपण स्वयें मिरवी ॥ ७६० ॥ स्वप्नांमाजी संन्यासी ॥ आपणास देखे अंत्यजवंशीं ॥ तो आर्त लोभी ब्राह्मणासी ॥ जीवास तैशी दशा झाली ॥ ६१ ॥ स्वयें परमात्मा भेदशून्य ॥ तेथ मी माझे स्त्री पुत्र धन ॥ स्वजन दुर्जन उदासीन ॥ त्रिविध भेद पूर्ण सत्यत्वें मानी ॥ ६२ ॥ ऐशी देहात्मभावसिद्धि ॥ सत्य मानितां भेदविधी ॥ जीवाची निजात्मबुद्धी ॥ झाली त्रिशुद्धी आंधळी ॥ ६३ ॥ जैसा स्वप्नींचा मिथ्या वेव्हार ॥ तैसा मनःकल्पित संसार ॥ तो मानितांचि साचार ॥ देहअहंकार दृढ झाला ॥ ६४ ॥ दृढ होतां देहाभिमान ॥ पुढतीं जन्म पुढतीं मरण ॥ भवचक्रीं परिभ्रमण ॥ निजभ्रमें जाण जीवासी ॥ ६५ ॥ जेवीं केवळ अग्नीप्रती ॥ घण[3]घाय कदा न लागती ॥ तोचि लोहाचिया संगतीं ॥ घणावरी घेती सुबद्ध ॥ ६६ ॥ तेवीं नित्य मुक्त परिपूर्ण ॥ तेणें धरितां देहाभिमान ॥ अंगीं लागलें जीवपण ॥ जन्ममरण तेणें सोशी ॥ ६७ ॥ जेवीं डोळे बांधोनि व्यापारू ॥ भंवे तेलियाचा ढोरू[4] ॥ तेवीं अहंकारें अंध नरू ॥ परिभ्रमें थोरू भवचक्रीं ॥ ६८ ॥ तेथ सोशितां जन्ममरण ॥ अतिदुःखी होय आपण ॥ तरी न सांडी देहाभिमान ॥ अंधतमीं जाण तो घाली ॥ ६९ ॥ ज्याचे दुःखें न पविजे पार ॥ तो तरवेना अतिदुस्तर ॥ जो भोग भोगवी अघोर ॥ तो संसार मनोजन्य[5] ॥ ७७० ॥ मनचि सुखदुःखांसि कारण ॥ हें आठवे श्लोकीं निरूपण ॥ भिक्षु बोलोनि आपण ॥ जनादि दुःखकारण मिथ्यात्वें दावी ॥ ७१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ जनस्तु हेतुः सुखदुःखयोश्चेत् किमात्मनश्चात्र हि भौमयोस्तत् ॥ जिह्वां क्वचित्संदशति स्वदद्भिस्तद्वेदनायां कतमाय कुप्येत् ॥ ५१ ॥ ॥ टीका ॥ ॥ जननीजठरीं ज्यासि जनन ॥ त्या नांव बोलिजेति जन ॥ तो सुखदुःखासि कारण ॥ सर्वथा जाण मज नव्हेची ॥ ७२ ॥ जन जनासि दे दुःखबाधू ॥ तेथ आत्म्यासी काय संबंधू ॥ आत्मा देहातीत[6] शुद्धू ॥ सुखदुःखबाधू त्या नलगे ॥ ७३ ॥ देहे देहासि होईल दुःख ॥ देहो तितुका पांचभौतिक ॥ त्यांसि परस्परें असे ऐक्य ॥ सर्वथा सुखदुःख घडेना ॥ ७४ ॥ जळामाजी जळ सूतां[7] ॥ जेवीं जळासि नव्हे व्यथा ॥ कां दीपू दीपें एकवटतां ॥ दीपासि सर्वथा दुःख न बाधी ॥ ७५ ॥ तेवीं पार्थिवें पार्थिवासी ॥ सुखदुःखबाधा न घडे त्यासी ॥ आत्मा नातळे सुखदुःखांसी ॥ तो देहासी स्पर्शेना ॥ ७६ ॥ म्हणाल जीव जो देहाचा अभिमानी ॥ सुखदुःखें होती त्यालागोनी ॥ दुःखभोक्ता दुजेपणीं[8] ॥ पाहतां कोणी दिसेना ॥ ७७ ॥ आपुली जिह्वा आपुले दांतीं ॥ रगडिली होय अवचितीं ॥ तया कोपाची संतप्तता अती ॥ कोणाप्रती करावी ॥ ७८ ॥ तेथील कोपाच्या कडाडीं ॥ दांत पाडी कीं जीभ तोडी ॥ तैशी जगीं एकात्मता धडफुडी ॥ कोप यावया सवडी असेना ॥ ७९ ॥ जो पुढिलाचे

---

[1] नसतांना. [2] खोटा. [3] घण नांवाचें हत्यार त्याचा घांव. [4] बैल. [5] मनःकल्पित. [6] देहाहून वेगळा. [7] मिसळलें असतां. [8] दुसरा.

ढक्यांनीं पडे ॥ तो त्यावरी कोपें वावडे ॥ स्वयें निसरोनि गडबडे ॥ तो लाजे मागें पुढें न कोपतां निघे ॥ ७८० ॥ तेवीं मीचि भूतें भो
क्ता ॥ माझ्या दुःखाचा मी दाता ॥ जगीं मीच मी एकात्मता ॥ कोणावरी आतां कोपावें ॥ ८१ ॥ माझ्या सुखदुःखांसि कारण ॥ या
परी नव्हतीच जन ॥ ह्मणाल जरी देवतागण ॥ तेंही प्रमाण घडेना ॥ ८२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ दुःखस्य हेतुर्यदि देवतास्तु किमात्मनस्तत्र
विकारयोस्तत् ॥ यदंगमंगेन निहन्यते क्वचित्क्रुध्द्येत कस्मै पुरुषः स्वदेहे ॥ ५२ ॥ ॥ टीका ॥ ॥ आतां दुसरें कारण मती ॥ देवांपासोनि
दुःखप्राप्ती ॥ देवांची देहामाजी वस्ती ॥ आत्मा निजस्थितीं विदेही ॥ ८३ ॥ देहींच्या इंद्रियविकारीं ॥ देव झाले अधिष्ठात्री ॥ आत्मा
अखंड अविकारी ॥ सुखदुःखांमाझारी अलिप्त ॥ ८४ ॥ भूमि सहजें निर्विकार ॥ तिची भिंती तीवरी सविकार ॥ तेवीं वस्तु नित्य निर्वि
कार ॥ तेथ भासती सविकार अधिष्ठात्री[1] ॥ ८५ ॥ भिंती पडल्या भूमीवरी ॥ ते मेळवी आपण्यामाझारी ॥ तेवीं निर्गुणनिर्विकारी ॥
इंद्रियें अधिष्ठात्रीं[2] येती ऐक्या ॥ ८६ ॥ स्वदेहीं परदेहीं जाण ॥ इंद्रिय अधिष्ठात्री समान ॥ इंद्रियांचें सुखदुःख दारुण ॥ आपुलें आपण
भोगिती देव ॥ ८७ ॥ हातें हाणतां तोंडावरी ॥ तेथ इंद्र अग्नि अधिष्ठात्री ॥ तेव्हां इंद्रचि अग्नीतें मारी ॥ आत्मा अविकारी दुःखांतीत[3]
॥ ८८ ॥ होकां मुखें डसल्या हातासी ॥ अग्नीनें घाय केले इंद्रासी ॥ आत्मा अलिप्त इंद्रियदेवांसी ॥ सुखदुःख त्यासी स्पर्शेना ॥ ८९ ॥
परमुखें स्वमुखावरी थुंकिजे ॥ दोहीं मुखीं अग्निनें नांदिजे ॥ तेथ कोणें कोणावरी कोपिजे ॥ आत्मस्वरूपीं दुजें असेना ॥ ७९० ॥
थुंक आणि जें कां मूत ॥ देहीं उपजे देहाचें आप्त ॥ तें देहींचें देहावरी लोळत ॥ कोपे तेथ कोण कोणा ॥ ९१ ॥ स्वमुखें परमुखा चुंबन
दीजे ॥ तेथ अग्नीनें अग्नीसि चुंबिजे ॥ तेणें सुखें कोण फुंजे ॥ आत्मत्वीं दुजें असेना ॥ ९२ ॥ स्वदेहें परदेहा आलिंगन ॥ उभयस्प
र्शीं वायूचि जाण ॥ तेणें सुखें सुखावे कोण ॥ दुजेपण असेना ॥ ९३ ॥ यापरी देवतागण ॥ नव्हे सुखदुःखांसि कारण ॥ आत्म्याचे
ठायीं दैवतें जाण ॥ हारपती पूर्ण अभेदत्वें॥ ९४ ॥ देवीं देहो पीडितां निःशेख ॥ देहाभिमान्या होईल दुःख ॥ हें मानिती ते अतिमूर्ख ॥
देवीं देख घडेना ॥ ९५ ॥ पुर ह्मणिजे देहो देख ॥ ते पुरीं पुरनिवासक[4] ॥ तो सकळदेहीं पुरुष एक ॥ तेथ कोणाचें दुःख कोण मानी
॥ ९६ ॥ जेवीं संभ्रमे आवेशवेगीं ॥ निजकरें[5] हाणतां निजांगीं ॥ तेथील व्यथेचा भागी ॥ कोपावयालागीं आप आपण्या ॥ ९७ ॥
देखतां आपलें एकपण ॥ कोणाची व्यथा मानी कोण ॥ कोण कोणावरी कोपे जाण ॥ आपण्या आपण एकला ॥ ९८ ॥ तेवीं विश्वा
त्माचि एक ॥ मीचि दैवतें मीचि लोक ॥ तेथ कोण कोणा दुःखदायक ॥ म्यां कोणावरी देख कोपावें ॥ ९९ ॥ यापरी स्वयें विचारितां ॥

---

[1] नियामक देवता. [2] नियामकदेवतांत. [3] दुःखरहित. [4] पुरांत राहणारा. [5] आपला हात.

देवांपासाव[1] सुखदुःखता ॥ समूळ न घडे सर्वथा ॥ दैविकी व्यथा घडेना ॥ ८०० ॥ आत्मा सुखदुःखांसि कारण ॥ मूळ मजचि हें अप्रमाण ॥ आत्म्याच्याठायीं कार्य कारण ॥ सुखदुःख जाण असेना ॥ १ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ आत्मा यदि स्यात्सुखदुःखहेतुः किमन्यतस्तत्र निजस्वभावः ॥ न ह्यात्मनोऽन्यद्यदि तन्मृषा स्यात्क्रुद्ध्येत कस्मान्न सुखं न दुःखम् ॥ ५३ ॥ ॥ टीका ॥ ॥ आत्मा केवळ एकला एक ॥ तेथ कैंचें सुख कैंचें दुःख ॥ आत्मा सुखदुःखदायक ॥ ह्मणती ते मूर्ख अविवेकी ॥ २ ॥ जेवीं विघुरलें घृत[2] जाण ॥ त्यासि नसे आकार गुण वर्ण ॥ तेंचि सहजें थिजोनि जाण ॥ दिसे शुभ्रवर्ण कणिकारूपें ॥ ३ ॥ त्या घृतकणिका मिळतां देख ॥ नाहीं परस्परें सुखदुःख ॥ तेवीं निजात्मा एकला एक ॥ तोचि अनेक स्वरूपें ॥ ४ ॥ जळीं जळाच्या जळलहरी ॥ आदळतांही परस्परीं ॥ सुखदुःख नुमटे त्यां माझारी ॥ तेवीं चराचरीं परमात्मा ॥ ५ ॥ परमात्मा एकला एक ॥ एकपणेंचि तो अनेक ॥ तेथ विजातीय[3] नाहीं देख ॥ मा सुखदुःख कोणाचें ॥ ६ ॥ आत्मा सुखरूप अवघा एक ॥ तेथ आभासे जें अनेक ॥ तें मायामय काल्पनिक ॥ स्वप्नप्राय देख मिथ्यात्वें ॥ ७ ॥ मृगजळीं पाहतां दिसे जळ ॥ परी तें कोरडें देख केवळ ॥ तेवीं दिसे जें जगड्वाळ ॥ तें मिथ्या सकळ मायिक ॥ ८ ॥ जेथ मिथ्या द्वैत मायिक ॥ तेथ परमात्मा एकला एक ॥ तेव्हांचि हारपलें सुखदुःख ॥ कोपावया निःशेख ठावो नाहीं ॥ ९ ॥ जेथ निजात्मता एकपण ॥ तेथ सुखदुःखें नाहीं जाण ॥ कोणावरी कोपे कोण ॥ आपल्या आपण एकला ॥ ८१० ॥ जेथ आत्म्याचा निजानुभावो ॥ तेथ द्वैताचा अभावो ॥ सुखदुःखें झालीं वावो[4] ॥ कोपासि ठावो असेना ॥ ११ ॥ हे निजात्मता नेणोनि देख ॥ सत्य मानिती जे सुखदुःख ॥ ते होत कां वेदशास्त्रज्ञ[5] लोक ॥ तयां क्रोध देख विभांडी ॥ १२ ॥ ज्यासि सर्वभूतीं निजात्मता ॥ तेथ कोण कोण दुःखदाता ॥ कोण कोणावरी कोपता ॥ निजात्मता एकली ॥ १३ ॥ आत्मा सुखदुःखांचा दाता ॥ यापरी नव्हे गा तत्त्वतां ॥ आपण्या आपण व्यथा ॥ मूर्खही सर्वथा न देती ॥ १४ ॥ एथिलेनि चौथे मतें ॥ ग्रह मानावे दुःखदाते ॥ तेंही न घडे गा येथें ॥ एक निश्चितें सांगेन ॥ १५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ग्रहा निमित्तं सुखदुःखयोश्चेत् किमात्मनोऽजस्य जनस्य ते वै ॥ ग्रहैर्ग्रहस्यैव वदंति पीडां क्रुध्येत कस्मै पुरुषस्ततोऽन्यः ॥ ५४ ॥ टीका ॥ ॥ [6]जननीजठरीं जन्मे जाण ॥ देहाचें नांव ह्मणती जन ॥ ते जन्मकाळीं जें होय लग्न ॥ त्या जन्मापासून पूर्ण ग्रहगण लागे ॥ १६ ॥ तेथ द्वादशाष्टमजन्मस्थ ॥ शुभाशुभ ग्रह जे येत ॥ ते सुखदुःखांतें देत ॥ आत्मा अलिप्त ग्रहगतीं ॥ १७ ॥ मुळीं आत्म्यासि जन्म नाहीं ॥ मा ग्रह लागती कवणे ठायीं ॥ जेथ शेतचि पेरिलें नाहीं ॥ तेथ उंदिरीं काय करडावें[7] ॥ १८ ॥ मुख्यत्वें घर केलें नाहीं ॥

---

१ देवतांपासून. २ तूप. ३ दुसरा. ४ व्यर्थ. ५ वेदशास्त्र जाणणारे. ६ मातेच्या उदरीं. ७ तोडावें.

तेथील माडी जळेल कायी ॥ आत्म्यासि तंव जन्मचि नाहीं ॥ मा ग्रहगती कैं लागेल ॥ १९ ॥ ग्रहांची ग्रहगती देहापाशीं ॥ आत्मा
अलिप्त देहभावासी ॥ जेवीं काउळा न चढे कैलासीं ॥ तेवीं ग्रह आत्म्यासी न लागती ॥ ८२० ॥ जेवीं कां अग्नि न चाखे माशी ॥
घारी झडपिना चंद्रासी ॥ तेवीं लागावया आत्म्यासी ॥ सामर्थ्य ग्रहांसी असेना ॥ २१ ॥ आत्मा सर्वांचा अवघा एक ॥ तैं ग्रहांचा
आत्मा तोचि देख ॥ तया निजात्म्यासि देतां दुःख ॥ ग्रह पीडी देख आपण्या ॥ २२ ॥ देह जड मूढ अज्ञान ॥ तें सुखदुःखा नेणे ज्ञान
॥ आत्म्यासि सुखदुःख देतां जाण ॥ तैं आपण्या आपण पीडिती ग्रह ॥ २३ ॥ आपणचि आपण्याप्रती ॥ कदा न देववे दुःखप्राप्ती
॥ यालागीं आत्म्यासि ग्रहगती ॥ जाण कल्पांतीं बाधीना ॥ २४ ॥ ग्रह ग्रहांमाजी वैरस्थिती ॥ ग्रह ग्रहांतें पीडा देती ॥ तेही अर्थींची
उपपत्ती[1] ॥ यथानिगुती अवधारा ॥ २५ ॥ ज्योतिषशास्त्रसंमती ॥ शनि भौम सूर्यां वैरप्राप्ती ॥ गुरु शुक्र दोनी वैरी होती ॥ बुध
सोमांप्रती महावैर ॥ २६ ॥ तेथ एकाची ते शीघ्रगती ॥ एक ग्रह मंदगामी होती ॥ अतिचार[2] कां वक्रगती ॥ मंडळभेदें येती एकत्र
॥ २७ ॥ वैरी मीनल्या एके राशीं ॥ एके चरणीं एकत्रवासी ॥ तैं राहु गिळी सूर्यासी ॥ सूर्यचंद्रांसी कुहूं[3] करी ॥ २८ ॥ ऐसे ग्रहचि ग्रहांसि
जाण ॥ परस्परें पीडिती आपण ॥ मी आत्मा त्याहूनि भिन्न ॥ सुखदुःख कोण मज त्यांचें ॥ २९ ॥ अलंकार मोडितां क्षणोक्षण ॥
सोनें मोडेना आपण ॥ तेवीं ग्रह ग्रहांसि पीडितां जाण ॥ मज आत्म्यासि कोण सुखदुःख ॥ ८३० ॥ रणभूमीं युद्ध झोटधरणी ॥
होतां घायवट नव्हे धरणी ॥ तेवीं ग्रहपीडेपासूनी ॥ मी अलिप्तपणीं निजात्मा ॥ ३१ ॥ रजस्वला चालतां भूमीसी ॥ तो विटाळ बाधीना
पृथ्वीसी ॥ तेवीं ग्रहीं पीडितां ग्रहांसी ॥ मी सुखदुःखांसी अलिप्त ॥ ३२ ॥ एवं ग्रहानिमित्त जें कांहीं ॥ सुखदुःख उठे देहीं ॥ तें मज
आत्म्यासि न लगे कहीं ॥ मग कोणें पाही कोणा कोपावें ॥ ३३ ॥ सुखदुःख नुमटे ज्याच्याठायीं ॥ त्यासि क्रोधचि नये कहीं ॥ एवं
ग्रहनिमित्त दुःख कांहीं ॥ सर्वथा नाहीं याहेतू ॥ ३४ ॥ सुखदुःखदातें निजकर्म ॥ ह्मणतां जनांसि पडे भ्रम ॥ आत्मा केवळ निष्कर्म[4] ॥
त्यासि जड कर्म केवीं बाधी ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कर्मास्तु हेतुः सुखदुःखयोर्वै किमात्मनस्तद्धि जडाजडत्वे ॥ देहस्त्वचित्पुरुषोऽयं
सुपर्णः क्रुद्ध्येत कस्मै नहि कर्म मूलम् ॥ ५५ ॥ ॥ टीका ॥ ॥ कर्म जडत्वें अतिबद्ध ॥ आत्मा चिद्रूपें[5] परम शुद्ध ॥ त्यासि कर्माचा कर्म
बाध ॥ सर्वथा संबंध धरीना ॥ ३६ ॥ रवीसि अंधारीं लपवे[6] ॥ वणवा तृणामाजी बांधवे ॥ गोचिडाचेनि मुखलाघवें ॥ जरी लागवे
दीपासी ॥ ३७ ॥ चंडवातातें तुष राखे ॥ थिल्लरचिखलें चंद्र माखे ॥ तैं कर्मजन्य सुखदुःखें ॥ आत्मा यथासुखें बद्धता भोगी ॥ ३८ ॥

---

[1] युक्ति. [2] अंत्यतत्वरित गमन करणें. [3] अमावास्या. [4] कर्मरहित. [5] चैतन्यरूपानें. [6] झांकवे.

आत्मा कर्माकर्म संहारी ॥ सुखदुःखांची होळी करी ॥ तो कर्मफळांचा फळाहारी ॥ मूर्ख गव्हारीं मानिजे ॥ ३९ ॥ स्वप्नींची स्वप्नसंतती ॥ जागृतीं कोणा भेटों येती ॥ तरी कर्माची सुखदुःखप्राप्ती ॥ आत्म्याप्रती बाधक ॥ ८४० ॥ जेवीं अग्नीवरी मुंगी चले ॥ तेवीं आत्मा नमाखे[1] कर्ममळें ॥ आकाश न खोंचे शस्त्रबळें ॥ तेवीं आत्मा कर्मफळें स्पर्शेना ॥ ४१ ॥ कर्म तितुकें आविद्यक[2] ॥ आत्मा विद्याअविद्यातीत चोख ॥ त्यासि कर्माचें सुखदुःख ॥ मानिती मूर्ख देहमोहें ॥ ४२ ॥ कर्म अतिजड आत्मा शुद्ध ॥ कर्म परिच्छिन्न आत्मा अगाध ॥ कर्म कर्मठ नित्य बद्ध ॥ आत्मा चिदानंदस्वरूप ॥ ४३ ॥ कर्म मिथ्याभूत मायिक ॥ आत्मा नित्य अमायिक ॥ कर्मासि ब्रह्मअनोळख[3] ॥ ब्रह्म तेथ देख कर्म नाहीं ॥ ४४ ॥ दोराचे सर्पीं सर्पत्व नाहीं ॥ मा तो डसोनि चढेल कायी ॥ तेवीं स्वरूपीं कर्म मिथ्या पाही ॥ तें आत्म्यासि कायी बाधील ॥ ४५ ॥ वांझनारीचा[4] लाडका नातू ॥ राजबळें जगा दंडितू ॥ तेवीं कर्माची सुखदुःखमातू ॥ कर्मठां तू दाटुगी ॥ ४६ ॥ एवं कर्मचि मिथ्या एथें ॥ तें केवीं दे सुखदुःखांतें ॥ हें जाणोनियां निश्चितें ॥ कोणें कोणातें कोपावें ॥ ४७ ॥ कर्म सुखदुःखांचें दातें ॥ यापरी न घडे एथें ॥ ह्मणाल काळ दे सुखदुःखांतें ॥ तेंही निश्चितें घडेना ॥ ४८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कालस्तु हेतुः सुखदुःखयोश्चेत् किमात्मनस्तत्र तदात्मकोऽसौ ॥ नाग्नेर्हि तापो न हिमस्य तत्स्यात्क्रुध्येत कस्मै न परस्य द्वंद्वम् ॥ ५६ ॥ ॥ टीका ॥ ॥ काळ शीतकाळीं शीतें पीडी ॥ उष्णकाळीं उबारा सोडी ॥ वर्षाकाळीं पर्जन्य धाडी ॥ विकळ पाडी धवळारें ॥ ४९ ॥ बैसवूनि सात वांकडीं ॥ अखंड धारा डोळा नुघडी ॥ जीवमात्रा तेणें पीडी ॥ पडे सांकडी अन्नाची ॥ ८५० ॥ अन्नाचिया चिडाणीं ॥ पीडती पशुपक्षिप्राणी ॥ ते काळीं सुखदुःख न मानी कोणी ॥ दुःखदाता जनीं निजकाळू ॥ ५१ ॥ अतिताप अतिशीत ॥ सोडूनियां अतिवात ॥ काळ जगातें खात ॥ जग कांपत काळासी ॥ ५२ ॥ ऐकोनि काळाची गोठी ॥ देव कांपती उठाउठी ॥ इतरांची कायसी गोठी ॥ धाके पोटीं विधाता ॥ ५३ ॥ अतिवृष्टि अनावृष्टी ॥ जन पीडी नानासंकटीं ॥ शेखीं प्रळयो करी उठाउठी ॥ दुःखदाता स्रष्टीं महाकाळ ॥ ५४ ॥ ऐसें बोलती ज्ञाते लोक ॥ ते ज्ञातेपणें झाले मूर्ख ॥ काळ तोचि ईश्वरू देख ॥ सुखदायक सर्वांसी ॥ ५५ ॥ ईश्वराहूनि काळ भिन्न ॥ ह्मणे तो जड मूढ अज्ञान ॥ काळ तोचि ईश्वर जाण ॥ कृपाळु पूर्ण विश्वात्मा ॥ ५६ ॥ काळ स्वकाळीं वर्षोनि जीवन ॥ सुखी करी संतप्त जन ॥ पृथ्वी निववूनियां जाण ॥ नव धान्य वाफवी[5] ॥ ५७ ॥ ते काळीं जैं शीत न वाहे ॥ तैं वाफिलें धान्य राख होये ॥ तेव्हां शीतकण वर्षोनि पाहे ॥ करी लवलाहें सफळित धान्यें ॥ ५८ ॥ तीं आर्द्रधान्यें भूतांसी ॥ उपेगा न येती संग्रहासी ॥ यालागीं उष्ण

---

१ लिप्त न होय. २ अज्ञानानें युक्त. ३ ब्रह्माची ओळख नाहीं. ४ वंध्या स्त्रियेचा. ५ पेरवितो.

काळेंसी ॥ काळ शोषी आर्द्रता ॥ ५९ ॥ यापरी शीतोष्णपर्जन्यांसी ॥ काळ उत्पादी भूतहितासी ॥ तेंचि कठिण वाटे त्यासी ॥ देहभ्रमासी भुलोनी ॥ ८६० ॥ हिरोनि[१] अतिजीर्ण[२] वस्त्रासी ॥ नवीं नेसवी जो साक्षेपेंसी ॥ ऐशिया हितकारिया काळासी ॥ वैरी पिशीं ह्मणताती ॥ ६१ ॥ तेवीं जराजर्जरित विकळ ॥ तें देह निर्दळी सकाळें काळ ॥ आणिक नवें दे तत्काळ ॥ ऐसा कृपाळू काळ जनासी ॥ ६२ ॥ जुनें घेऊनि दे नव्यासी ॥ ऐशा उपकारिया काळासी ॥ अपकारी ह्मणती पिशीं ॥ देहमोहेंसी मोहूनी ॥ ६३ ॥ जन जैशिया निजभावना ॥ जेजे धरी दृढ वासना ॥ काळ कृपाळू तत्क्षणा ॥ तेते देह जाणा त्या देत ॥ ६४ ॥ महामहोत्साहें पिता पुत्रासी ॥ सांडवूनि जीर्णवासांसी ॥ नवीं वस्त्रें दे तयासी ॥ तेवीं जगासी प्रळयकाळू ॥ ६५ ॥ तेवीं प्रळयकाळीं जगासी ॥ जीर्ण काळ देह नाशी ॥ मग नूतन देह सर्वांसी ॥ अतिकृपेंसी गौरवीं ॥ ६६ ॥ यापरी काळ कृपाळू ॥ त्यासि वैरी ह्मणे जन बरळू ॥ जगाचा निजात्मा स्वयें काळू ॥ तो दुःखाचा सळू[३] कोणासि नेंदी ॥ ६७ ॥ जनाचा देवीं दृढ भावो ॥ भावनानुसारें काळ पहाहो ॥ देहापाठीं उपजवी[४] देहो ॥ जन्ममरणनिर्वाहो तेणें वाढे ॥ ६८ ॥ जो साचार वांछी[५] विदेहभावो ॥ त्याचा काळ निर्दळी[६] अहंभावो ॥ निजानंदें निववूनि स्वयमेवो ॥ जन्ममरणांचा ठावो विभांडी ॥ ६९ ॥ जैशी ज्यासि होय बुद्धी ॥ काळ तैशी दे त्यासि सिद्धी ॥ हें नेणिजे देहमोहांधीं ॥ काळ त्रिशुद्धी कृपाळू ॥ ८७० ॥ काळ तोचि निजात्मा जनीं ॥ ऐसें जाणे जो निजज्ञानी ॥ तो कोणाचें दुःख कोण कां मानी ॥ दुसरें कोणी असेना ॥ ७१ ॥ मी एक एथें दुःखदाता ॥ पैल तो एक दुःखभोक्ता ॥ हेही नाहीं द्वैतकथा ॥ जगासि एकुलता निजात्मा काळ ॥ ७२ ॥ काळ निजात्मा दोनी एक ॥ तैं कोणाचें कोणास होय सुख ॥ कोण कोणाचा मानी शोक ॥ द्वंद्व सुखदुःख असेना ॥ ७३ ॥ जेवीं नाममात्र मृगजळ ॥ तेथ नाहीं तिळभरी जळ ॥ तेवीं आत्मत्वीं जगड्वाळ ॥ तो भ्रम केवळ मनाचा ॥ ७४ ॥ आत्मा एकत्वें अभेद ॥ काळनामें तोचि प्रसिद्ध ॥ जीव तदंशें चिदत्वें शुद्ध ॥ त्यासि काळादि द्वंद्व बाधीना ॥ ७५ ॥ आगीनें काय आगी जळे ॥ कां उन्हाळेनि सूर्य पोळे ॥ सागरू[७] बुडे लहरीबळें[८] ॥ कीं अंधारातें काळें काजळें कीजे ॥ ७६ ॥ कीं हिमाचळ हिमकणें[९] कांपे ॥ तुपासि मोडशी होय तुपें ॥ तैं काळसत्ता खटाटोपें ॥ आत्मा अमूपें द्वंद्वें भोगी ॥ ७७ ॥ आप आपणियां आपदा ॥ कोणा नकरवे विरुद्धा ॥ तेवीं आत्म्यासि द्वंद्वबाधा ॥ काळाचेनि कदा करवेना ॥ ७८ ॥ एवं एकात्मता अभेद ॥ तेथ काळाचा नचले बाध ॥ अभेदीं सर्वथा नाहीं द्वंद्व ॥ कोणावरी क्रोध करावा ॥ ७९ ॥ जीव शिवत्वें मी केवळ ॥ मीचि आत्मा मीचि काळ ॥ मिथ्या द्वंद्वदुःखगोंधळ ॥ क्रोधाचा

---

१ घेऊन. २ अत्यंत जुन्या. ३ छळ. ४ उत्पन्न करी. ५ इच्छी. ६ नाश करी. ७ समुद्र. ८ लाटांच्या बळानें. ९ बर्फाच्या कणानें.

कल्लोळ कोणावरी करूं ॥ ८८० ॥ काळ सुखदुःखांचा दाता ॥ यापरी नव्हे विचारितां ॥ सुखदुःखांची बाधकता ॥ आत्म्यासि सर्वथा
असेना ॥ ८१ ॥ सुखदुःखादि हेतुषट्क ॥ नायं जनोइत्यादिक ॥ याचा करितां निजविवेक[1] ॥ नव्हती बाधक आत्म्यासी ॥ ८२ ॥ याही
वेगळीं बाधकपणें ॥ देशवासें त्रिगुणगुणें ॥ आत्म्यासि बाधावयाकारणें ॥ कोठें कोणे दिसेना ॥ ८३ ॥ निजात्म्यासि बाधकता ॥ का
सेनि न संभवे सर्वथा ॥ जनासि बाधक देहअहंता ॥ त्याचि निजस्वार्था भिक्षु बोले ॥ ८४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ न केनचित्क्कापि कथंच
नास्य द्वंद्वोपरागः परतः परस्य ॥ यथाऽहमः संस्तिरूपिणः स्यादेवं प्रबुद्धो न बिभेति भूतैः ॥ ५७ ॥ ॥ टीका ॥ ॥ आत्मा गुणांतीत[2] शु
द्ध ॥ परात्पर[3] स्वानंद[4] ॥ परिपूर्ण सच्चिदानंद ॥ तेथ द्वंद्वबाध रिघेना ॥ ८५ ॥ द्वंद्व रिघावया आत्मभुवनीं ॥ कैसेंनि कासेंनि कोणाचेंनी ॥
कर्म कार्य क्रिया करणी ॥ बाधकपणीं असेना ॥ ८६ ॥ अभेदा नाहीं द्वंद्वबाध ॥ आनंदासि दुःखसंबंध ॥ पूर्णासि कैंचें विरुद्ध ॥ पर
मानंद एकला ॥ ८७ ॥ ॥ आशंका ॥ ॥ आत्म्यासि न घडे द्वंद्वसंबंध ॥ देहो जडत्वें नेणे द्वंद्व ॥ तरी सुखदुःखांचा महाबाध ॥ कोणासि
प्रसिद्ध होतसे ॥ ८८ ॥ सुखदुःखभोगासि जाण ॥ सोसावया जन्ममरण ॥ एथ मुख्यत्वें देहाभिमान ॥ तेंही लक्षण अतर्क्य ॥ ८९ ॥
जेवीं असोनि भर्त्तारापाशीं ॥ व्यभिचार करितां अहेवेसी ॥ पोट वाढल्याही परपुरुषीं ॥ तें कोणासी कळेना ॥ ८९० ॥ तैसें अभिमा
नाचें विंदान ॥ चित्स्वरूपीं जडोनि जाण ॥ मिथ्या दावूनि जीवपण ॥ सुखदुःखें आपण स्वेच्छा भोगी ॥ ९१ ॥ जेवीं रायापाशील कुंडा[5]
मंत्री[6] ॥ राजबळें अधर्म करी ॥ प्रजेतें छळी नानापरी ॥ तैसा शरीरीं अभिमान ॥ ९२ ॥ कां अग्निसंगें लोह जाण ॥ अग्निप्राय होय
आपण ॥ तया हातीं धरूं शके कोण ॥ पोळीं[7] दारुण सर्वांसी ॥ ९३ ॥ तेवीं चिद्रूपाचा अभिमान ॥ देहात्मता खवळोनि पूर्ण ॥ सुख
दुःखादि जन्ममरण ॥ वाढवितां कोण आवरी ॥ ९४ ॥ स्वप्नींचा देह केवळ मन ॥ त्याहीदेहासि असे मनपण ॥ तैसा हाही देहो मनचि
जाण ॥ अभिमानें कठिण स्थूळ केला ॥ ९५ ॥ कार्यकारणरूपें जाण ॥ संसारचि मनोभिमान ॥ वाढवूनि सुखदुःख दारुण ॥ जन्म
मरण स्वयें भोगी ॥ ९६ ॥ भोगिलेचि भोग भोगितां ॥ नानापरीची पावे व्यथा ॥ तरी न सांडी अहंता ॥ देहात्मता वाढवी ॥ ९७ ॥
ब्रह्मप्रळय होतां जाण ॥ देहअहंता नव्हे क्षीण ॥ प्रळयीं विरेना[8] अभिमान ॥ सुखदुःख जाण तो भोगी ॥ ९८ ॥ यामाजी जीव असे
कैसा ॥ जपाकुसुमीं[9] स्फटिक जैसा ॥ दिसोन त्या रंगा ऐसा ॥ स्वयें तैसा होयेना ॥ ९९ ॥ आत्मत्वीं सुखदुःख नाहीं ॥ तें प्रत्यक्ष दिसता
हे देहीं ॥ हें अविचार रमणीय पाही ॥ कल्पनेच्याठायीं आभासे ॥ ९०० ॥ तें देह माझें ह्मणोनि तत्त्वतां ॥ अभिमानें घेऊनि माथां ॥

---

१ स्वतः विचार. २ सत्वादिगुणरहित. ३ मायेच्या पलीकडे. ४ परमानंद. ५ कपटी. ६ प्रधान. ७ जाळी. ८ नाहींसा होईना. ९ जास्वंदीचे फुलाचे ठिकाणीं.

जन्ममरणादि आवर्तां ॥ सुखदुःखभोक्ता स्वयें होय ॥ १ ॥ येणेंचि विवेकें निजज्ञानी ॥ प्राप्ततत्त्व गुरुवचनीं ॥ ते वर्ततांही जनीं वनीं ॥ देहाभिमानी कदा नव्हती ॥ २ ॥ ऐसे प्रबुद्ध जे आत्मप्रतीतीं ॥ त्यांसि प्रारब्धाचिये निजगती ॥ नानासुखदुःखें देतां भूतीं ॥ आत्मस्थिती ढळेना ॥ ३ ॥ त्यांसि द्वेष नुपजे भूतीं ॥ कोप सर्वथा न ये चित्तीं ॥ मी एक त्रिजगतीं ॥ जाणोनि निश्चितीं निर्द्वंद्व ॥ ४ ॥ तो देखोनियां विषमासी ॥ भय न धरी मानसीं ॥ पारकें न ह्मणे कोणासी ॥ आप्त सर्वांसी निजात्मा ॥ ५ ॥ समविषमभाव ना भेद ॥ ज्ञाता सर्वरूपें अभेद ॥ तो न मानी कोणाचा भय खेद ॥ सुख स्वानंद सर्वदा ॥ ६ ॥ निंदा उपद्रव अनुद्विग्न ॥ साहोनियां सुखसंपन्न ॥ हें सिद्धाचें मुख्य लक्षण ॥ तेंचि साधन साधकां ॥ ७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एतां समास्थाय परात्मनिष्ठामध्यासितां पूर्वतमैर्महर्षिभिः ॥ अहं तरिष्यामि दुरंतपारं तमो मुकुंदांघ्रिनिषेवयैव ॥ ५८ ॥ ॥ टीका ॥ ॥ माझ्या पूर्वापरभाग्योदयें ॥ अध्यात्मनिष्ठा उपजली पाहे ॥ जे निष्ठेचेनि समवायें ॥ नानादुःखें साहें निर्द्वंद्व ॥ ८ ॥ द्वंद्वसुखदुःखसहिष्णुपण ॥ हें सिद्धाचें सहज लक्षण ॥ माझें मुख्यत्वें हेंचि साधन ॥ मनोजयो जाण येणें होये ॥ ९ ॥ हेंचि परमार्थसाधन वरिष्ठा ॥ हेचि महाऋषींची निजनिष्ठा ॥ हेंचि निजभजन वैकुंठा ॥ निजात्मनिष्ठा येणें साधे ॥ ९१० ॥ येणें न बाधे द्वंद्वदुःख ॥ येणें पाविजे नित्यसुख ॥ दुस्तर[3] संसारतारक ॥ हा निजविवेक आह्मांसी ॥ ११ ॥ दुस्तर तरावया संसारू ॥ हा विवेकु सुकल्प तारूं ॥ एथ सद्गुरु कर्णधारू[4] ॥ परात्परपारू पाववी ॥ १२ ॥ हा विवेक कैसेनि ये हाता ॥ हेंही करणें नलगे चिंता ॥ निजभावें एकाग्रता ॥ शरण भगवंता रिघावें ॥ १३ ॥ सांडोनि लौकिकाचे लाजे ॥ सांडोनि अभिमानाचें वोझें ॥ भगवंता शरण रिघिजे ॥ तैं लाहिजे विवेक ॥ १४ ॥ तानें बाळ जेवीं जननीसी ॥ अनन्य शरण सर्वभावेंसी ॥ ऐशिया अनन्यता अहर्निशीं[5] ॥ शरण हरीसी रिघावें ॥ १५ ॥ हरीसि रिघालिया शरण ॥ मुख न दाखवी जन्ममरण ॥ तेथ बाधूं शके द्वंद्व कोण ॥ हरी रक्षण निजभक्तां ॥ १६ ॥ मोक्षदाता मुकुंद पूर्ण ॥ त्यासि कैसें रिघावें शरण ॥ तो अनंतत्वें निजनिर्गुण ॥ तेथ कोण पावेल ॥ १७ ॥ असो हरिरूप अतिनिर्गुण ॥ त्याचि मूर्ति चिंतितां सगुण ॥ ध्यानीं स्थिरावल्या संपूर्ण ॥ द्वंद्वदुःखें जाण हारपती ॥ १८ ॥ ध्यानीं मूर्ति नये संपूर्ण ॥ तैं दृढ धरावे हरीचे चरण ॥ तेणें उठोनि पळे जन्ममरण ॥ आपभयें आपण पळती द्वंद्वें ॥ १९ ॥ जैं न धरवती दृढ चरण ॥ तैं करावें नामस्मरण ॥ ज्याचेनि नाममात्रें जाण ॥ यम[6] काळ[7] पूर्ण कांपती ॥ ९२० ॥ जेथ हरिनामाचा नित्य घोष ॥ तेथ मरणा

---

१ भोंवऱ्यांमध्यें. २ संकटास. ३ तरून जाण्यास अशक्य. ४ नावाडी. ५ रात्रंदिवस. ६ सूर्यपुत्र. ७ नाशकर्ता.

मरण आलें देख ॥ जन्माचें होय काळें मुख ॥ लाजोनि निःशेख ते पळे ॥ २१ ॥ रामनामाच्या गजरापुढें ॥ काइसें द्वंद्वदुःख बापुडें ॥ अवघें भवभयचि उडे ॥ नामपवाडे गर्जतां ॥ २२ ॥ अखंड नामें गर्जे वाणी[1] ॥ त्याचे बोलांमाजी चक्रपाणी ॥ तेथ ऋद्धिसिद्धी वाहे पाणी ॥ मुक्ति आंदणी तयाची ॥ २३ ॥ निर्विकल्प भावार्थें आपण ॥ सगुण निर्गुण कां नामस्मरण ॥ भक्तभावार्थें आदरी जाण ॥ तैंतें होय पूर्ण सद्भावेंच ॥ २४ ॥ भावार्थें जे भगवत्प्रीती ॥ तेचि जाणावी साचार भक्ती ॥ भावें तुष्टला श्रीपती[2] ॥ दे निजशांति साधकां ॥ २५ ॥ ते निजशांतीच्या पोटीं ॥ हर[3]पती द्वंद्वदुःखकोटी ॥ परमानंदें कोंदे सृष्टी ॥ मी तूं दृष्टीं दिसेना ॥ २६ ॥ ऐसेनि अभेद भावें जाण ॥ सेवितां मुकुंदश्रीचरण ॥ मी आपणिया आपण ॥ तारीन जाण निश्चित ॥ २७ ॥ तारीन ह्मणतां उद्धारू ॥ बोल दिसताहे उशिरू ॥ जो झाला हरीचा डिंगरू ॥ त्यासि संसारू असेना ॥ २८ ॥ ऐशी भिक्षूनें गाइली गाथा ॥ ते अत्यंत रुचली श्रीकृष्णनाथा ॥ हरिखें वोसंडोनि चित्ता ॥ उद्धवाचा माथा थापटी ॥ २९ ॥ ऐशी जे हे निजशांती ॥ माझ्या उद्धवासि व्हावी प्राप्ती ॥ ऐसा कळवळोनि श्रीपती ॥ काय उद्धवाप्रती बोलिला ॥ १३० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ निर्विद्य नष्टद्रविणो गतक्लमः प्रव्रज्य गां पर्यटमान इत्थम् ॥ निराकृतोऽसद्भिरपि स्वधर्मादकंपितोऽमूं मुनिराह गाथाम् ॥ ५९ ॥ ॥टीका॥ ॥ज्याचे निःश्वासें जन्मले वेद ॥ ज्याचेनि चरणीं गंगा प्रसिद्ध ॥ ज्याचें नाम छेदी भवबंध ॥ तो उद्धवासि गोविंद स्वमुखें बोले ॥ ३१ ॥ यालागीं उद्धवाचें भाग्य थोर ॥ ज्यासि तुष्टोनि सारंग[4]धर ॥ दाखवी निजशांतीचें घर ॥ निरंतर वस्तीसी ॥ ३२ ॥ उद्धवा ऐक सावधान ॥ धनलोभ्याचें नासोनि धन ॥ तो धननाशु झाला प्रसन्न ॥ केला विवेकसंपन्न वैरागी ॥ ३३ ॥ जो धनलोभी न खाता ॥ ज्याचें नांव न घेती सर्वथा ॥ तोचि वैराग्यें केला सरता ॥ माझे मुखीं कथा तयाची ॥ ३४ ॥ त्याचें नाम माझे मुखीं जाण ॥ त्याचें कर्म वर्णीं मी आपण ॥ तो मज पढियंता जाण ॥ जो विवेकसंपन्न वैरागी ॥ ३५ ॥ वैराग्यापरतें भाग्य थोर ॥ जगीं नाहीं आन सधर ॥ विवेकवैराग्यें जो साचार ॥ तो माझें जिव्हार उद्धवा ॥ ३६ ॥ जो विवेकवैराग्यें आंथिला ॥ तो जाण मजमाजी आला ॥ मी अधीन त्याचिया बोला ॥ तो मज विकला सर्वस्वें ॥ ३७ ॥ लोभ्याचें निःशेष गेलें धन ॥ धनासवें गेले मानाभिमान ॥ अभिमानासवें जाण ॥ गेलें द्वंद्व दारुण सुखदुःख ॥ ३८ ॥ धन जातां झाली विरक्ती ॥ तेणें भेमस्त झाला यती[6] ॥ भिक्षार्थ हिंडतां क्षितीं ॥ दुर्जनीं दुरुक्तीं निर्भर्त्सिला ॥ ३९ ॥ पीडितां नानावि

---

१ वागींद्रिय. २ लक्ष्मीपति. ३ नाहींशा होतात. ४ शार्ङ्गनामक धनुष्य धारण करणारा. ५ युक्त झाला. ६ संन्यासी.

कारीं ॥ उपद्रवितां नानापरी ॥ न डंडळीच निजनिर्धारीं ॥ स्वधर्म धैर्य करी निर्द्वंद्व ॥ ९४० ॥ संन्याशाचा स्वधर्म पूर्ण ॥ मी देहातीत नारायण ॥ साचार हरविला देहाभिमान ॥ यालागीं जाण न डंडळी ॥ ४१ ॥ जेवीं छायेसि लागतां घावो ॥ पुरुषासि नाहीं भय संदेहो ॥ तेवीं दुर्जनीं दंडितां देहो ॥ नाहीं दुःखभेंवो[1] निरहंकारा ॥ ४२ ॥ देहासि होतां नानाव्यथा ॥ आपुली जे देहातीतता ॥ तेचि भिक्षूनें गायिली गाथा ॥ ते तुज म्यां आतां निरूपिली ॥ ४३ ॥ येथ सुखदुःखांसि कारण ॥ आपला भ्रम आपणा जाण ॥ येचि अर्थीचें निरूपण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ४४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सुखदुःखप्रदो नान्यः पुरुषस्यात्मविभ्रमः ॥ मित्रोदासीनरिपवः संसारस्तमसः कृतः ॥ ६० ॥ ॥ टीका ॥ ॥ आविद्यक जें निजअज्ञान ॥ तेथें मनपणें उठी मन ॥ मनें भेदोनियां पूर्ण ॥ सुखदुःखें जाण भोगवी ॥ ४५ ॥ आत्मा केवळ भेदशून्य ॥ तेथ शत्रु मित्र उदासीन ॥ मनें कल्पूनियां जाण ॥ मन संपूर्ण स्वयें चाळी ॥ ४६ ॥ ऐसें भेदीं ठसावलें मन ॥ तेंचि पुरुषाचें अज्ञान ॥ तेणें द्वंद्वदुःखेंसि जाण ॥ संसार दारुण सभ्रांता ॥ ४७ ॥ मन सुखदुःखांसि कारण ॥ मनःकल्पित संसार जाण ॥ त्या मनाचें निग्रहणें[2] ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ४८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तस्मात्सर्वात्मना तात निगृहाण मनो धिया ॥ मय्यावेशितया युक्त एतावान् योगसंग्रहः ॥ ६१ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो नासूं पाहे संसारदुःख ॥ तेणें मन नेमावें[3] आवश्यक ॥ मनावेगळें दुःखदायक ॥ नाहीं आणिक त्रिलोकीं ॥ ४९ ॥ मन अतिशयें चंचळ ॥ तें सहसा नव्हे निश्चळ ॥ त्यासि विवेक द्यावा मोकळ ॥ अभेदशील अहर्निशीं ॥ ९५० ॥ मन सिंतरील[4] विवेकासी ॥ तयालागीं हातकडिया दोहींसीं ॥ करूनियां अहर्निशीं ॥ येरयेरांपाशीं राखावीं ॥ ५१ ॥ मन जेथ विकल्पूं[5] धांवे ॥ तेथ महामारी विवेकू पावे ॥ मन जेथ अधर्में संभवे ॥ तेथ विवेक धांवे हाकित ॥ ५२ ॥ मन जाय कामक्रोधापाशीं ॥ विवेक वोढी धरोनि केशीं ॥ मन रिघतां निंदेपाशीं ॥ विवेक त्यासी बुकाली[6] ॥ ५३ ॥ मन ह्मणे विषय सुटी ॥ विवेक हाणे वैराग्यकाठी ॥ मन धांवतां कल्पनेपाठीं ॥ विवेक उठाउठीं सोडवी ॥ ५४ ॥ परदारा[7] परधन ॥ अभिलाषूं धांवे मन ॥ तेथ विवेक पावोन ॥ रणकंदन आरंभी ॥ ५५ ॥ ऐसा मनविवेकांचा झगडा ॥ गाऱ्हाणें आलें सद्गुरुपुढां ॥ तेणें करावया निवाडा ॥ अद्वैतवाडां कोंडिलीं ॥ ५६ ॥ तो दृष्टी देखतांचि ठावो ॥ मनाचा मोडला स्वभावो ॥ देहींचा झाडोनि अहंभावो ॥ विवेकेंसि पहाहो ऐक्य केलें ॥ ५७ ॥ तेथ मनाचें गेलें मनपण ॥ विवेक विसरला आकळण ॥ जीवाचें विरालें जीवपण ॥ वस्तु संपूर्ण अद्वयें ॥ ५८ ॥

---

[1] भय. [2] जिंकून स्वाधीन ठेवणें. [3] स्वाधीन ठेवावें. [4] वंचना करील. [5] कल्पना करूंलागे. [6] धक्के देऊन बाहेर काढितो. [7] परस्त्री.

जेवीं सुवर्णाचीं नागभूषणें[1] ॥ फडा पुच्छ मिरवी नागपणें ॥ तें न मोडितां नागत्वाचें लेणें ॥ सोनें सोनेपणें नागत्व विसरे
॥ ५९ ॥ तेवीं जाणोनि वस्तु पूर्ण ॥ न मोडितां जग जाण ॥ जीव विसरला जीवपण ॥ मनत्वा मन मूकलें ॥ ९६० ॥ ऐशिया विवेकयुक्ती
जाण ॥ माझे स्वरूपीं प्रवेशे मन ॥ जेथ मनपणें नुठी मन ॥ मनोनिग्रहण या नांव ॥ ६१ ॥ ऐक चतुरचित्तचिंतामणी ॥ विवेक
चक्रवर्तिचूडामणी ॥ उद्धवा भक्तशिरोमणी ॥ मनोनिग्रहणीं प्रवर्त ॥ ६२ ॥ आवडी भुलला कृष्णनाथ ॥ तो उद्धवासि ह्मणे तात ॥
मनोनिग्रही तूं एथ ॥ होईं साक्षेपयुक्त सादर ॥ ६३ ॥ साक्षेपें निग्रहूनि मनासी ॥ जो सांडवी मनोजन्यभेदासी ॥ शांति सांडूं नेणें
त्यासी ॥ जेवीं तान्हयासी माउली[2] ॥ ६४ ॥ निजशांति बाणल्या शुद्ध ॥ त्यासि न बाधी कोणी द्वंद्व ॥ हाचि योगसंग्रहो प्रसिद्ध ॥ बोलिले
सिद्ध महायोगी ॥ ६५ ॥ सांडूनि संसारस्फूर्ती ॥ चित्स्वरूपीं जडे वृत्ती ॥ जीवशिव एकत्वा येती ॥ योगसंग्रहस्थिती या नांव
॥ ६६ ॥ ऐशिया योगसंग्रहशांती ॥ साधकां द्वंद्वें न बाधिती ॥ हे असे जया भिक्षुगीतभक्ती ॥ द्वंद्वनिर्मुक्ती तया लाभे ॥ ६७॥ ॥ श्लोक॥
य एतां भिक्षुणा गीतां ब्रह्मनिष्ठां समाहितः ॥ धारयन् श्रावयन् श्रृण्वन् द्वंद्वैर्नैवाभिभूयते ॥ ६२ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे भगवदुद्धवसंवादे
त्रयोविंशोऽध्यायः ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ साधावया शांतीची प्राप्ती ॥ कोटिसाधनें नलभे शांती ॥ हा भिक्षुगीतार्थ
धरितां चित्तीं ॥ शांति आपैती[3] साधकां ॥ ६८ ॥ योगनिष्ठ ब्रह्मज्ञान ॥ तें हें भिक्षुगीतानिरूपण ॥ जो हृदयीं धरी सावधान ॥ शांति
आंदण तयाची ॥ ६९ ॥ ये भिक्षुगीतेचा गीतार्थू ॥ जो जीवीं धरी समाहितू[4] ॥ त्यासि द्वंद्वांचा न बाधी घातू ॥ अतिशांतू निजबोधें
॥ ९७० ॥ भिक्षुगीतार्थें समाधान ॥ हें सांगतां नवल कोण ॥ जो सादरें करी श्रवण ॥ त्यासि द्वंद्वें जाण न बाधिती ॥ ७१ ॥ परदेशा
गेला बहुकाळ भर्ता ॥ त्याचें पत्र सादर ऐके कांता ॥ तैशिया अतिएकाग्रतां ॥ भिक्षुगीता ऐकावी ॥ ७२ ॥ निघोनि गेलिया पुत्रासी॥
त्याची शुद्धि ये मातेपाशीं ॥ ऐकोनियां उणखुणेसी ॥ चरफडी जैसी विव्हळ ॥ ७३ ॥ तीजवळ ज्या सोयऱ्या असती ॥ त्याही स्नेहें
कळवळती ॥ परी माता जैशी तळमळी चित्तीं ॥ ते आणिकाप्रती असेना ॥ ७४ ॥ तैसें भिक्षुगीताश्रवण ॥ करितां द्रवे ज्याचें मन ॥
जो सात्विकें वोसंडे पूर्ण ॥ तो द्वंद्वांसि जाण नाटोपे ॥ ७५ ॥ असो नव्हे सादरें[5] श्रवण ॥ तरी करितां याचें नित्य पठण ॥ भिक्षुगीताप्रतापें
करून ॥ द्वंद्वें जाण नातळती ॥ ७६ ॥ पडतां पंचाननांची[6] घाणी ॥ मदगजां होय महापळणी ॥ तेवीं भिक्षुगीतापठणीं ॥ होय भंगणी[7]

---

१ सर्पाकार भूषणें. २ माता. ३ प्राप्त होते. ४ स्वस्थपणें. ५ प्रेमयुक्त. ६ सिंहाची. ७ नाश.

द्वंद्वांची ॥ ७७॥ निर्लोभ होऊनि मानसीं ॥ बैसोनि साधुसज्जनांपाशीं ॥ जो निरूपी भिक्षुगीतेसी ॥ द्वंद्वें त्यासी नातळती ॥ ७८॥ अर्थें पाठें श्रवण करितां ॥ द्वंद्वें निवारी भिक्षुगीता ॥ हें वर्म कळलेंसे श्रीकृष्णनाथा ॥ तो सांगे हितार्था उद्धवा ॥ ७९ ॥ ज्या भिक्षुगीतेची फळश्रुती ॥ स्वमुखें सांगताहे श्रीपती ॥ त्या भिक्षुगीतेचें भाग्य वानूं[1] किती ॥ धन्य त्रिजगतीं तो एक ॥ ९८० ॥ विवेकवैराग्यसमरसीं ॥ जो साहे अतिद्वंद्वांसी ॥ तोचि पढियंता हृषीकेशीं ॥ हें उद्धवासी दाविलें ॥ ८१ ॥ जगासि उद्धवाचा उपकार ॥ गुह्यज्ञान परात्पर ॥ उघडूनि श्रीकृष्णें भांडार ॥ भिक्षुगीता सार प्रकटिलें ॥ ८२ ॥ उद्धव न पुसता जैं शांती ॥ तैं कां सांगता श्रीपती ॥ कृष्णासि उद्धवाची प्रीती ॥ त्यासि नाना उपपत्ती[2] उपदेशी ॥ ८३ ॥ हेंचि जडजीवां उद्धरण ॥ येणें उपायें तरती दीन ॥ जग तारावया जगज्जीवन ॥ उद्धव मिषें श्रीकृष्ण बोलिला ॥ ८४ ॥ श्रीकृष्ण बोलिला भिक्षुगीत ॥ जें वेदशास्त्रार्थमथित ॥ उपनिषदांचें[3] सारभूत ॥ वार्तिकांतरगत रहस्य ॥ ८५ ॥ येणें आपणियां आपण ॥ लागताहे निजात्मलग्न ॥ हें ज्ञानाचेंही गुह्य ज्ञान ॥ भक्तकृपें श्रीकृष्ण बोलिला ॥ ८६ ॥ येणें जीवाचें जीवत्व उडे ॥ शिवाचें शिवत्वही बुडे ॥ द्वंद्वाचें बाधकत्व मोडे ॥ स्वानंदाचें उघडे भांडार ॥ ८७ ॥ वेदें मौन धरिलें जेथ ॥ सशब्दशास्त्रें लाजलीं तेथ ॥ ऐसें अतिरहस्य भिक्षुगीत ॥ तें मी प्राकृत बोलिलों ॥ ८८ ॥ जेवीं जळीं बुडते पाषाण ॥ श्रीरामें तारिले आपण ॥ तेवीं मी जड मूढ अज्ञान ॥ बोलवी ब्रह्मज्ञान जनार्दनरूपा ॥ ८९ ॥ अहल्या[4] जे व्यभिचारिणी ॥ ते लागतां श्रीरामचरणीं ॥ तिचेनि नामें पापा धुणी[5] ॥ प्रातःस्मरणीं पढविली ॥ ९९० ॥ तेवीं सद्गुरुकृपेची करणी ॥ माझी प्राकृत जड मूढ वाणी ॥ मानिजे साधुसज्ञानीं ॥ तैशीं बोलणीं बोलविलीं ॥ ९१ ॥ सरस्वती ज्यासि वोळे ॥ तो मुकाही वेदशास्त्र बोले ॥ तैसें जनार्दनें आह्मां केलें ॥ भिक्षुगीत बोलविलें प्राकृत ॥ ९२ ॥ राजमुद्रा चढे ज्याचे हातीं ॥ त्यातें समस्त सन्मानिती ॥ तेवीं माझी वाणी सरती ॥ केली निश्चितीं जनार्दनें ॥ ९३ ॥ बाळकाची बोबडी वाणी ॥ ऐकोनि संतोषे निजजननी ॥ तेवीं माझी आरुष वाणी ॥ संतसज्जनीं प्रियकर ॥ ९४ ॥ मी माझें उंच नीच बोलणें ॥ हेंही माथां घ्यावें कोणें ॥ मीपण नेऊनि जनार्दनें ॥ ग्रंथकथनें कथवित ॥ ९५ ॥ आधींच हें भागवत ॥ त्यामाजी गूढ एकादशार्थ ॥ त्याहीमाजी भिक्षुगीत ॥ अतिगुह्यार्थ निर्द्वंद्व ॥ ९६ ॥ त्या भिक्षुगीताची टीका ॥ एकला कर्ता नव्हे एका ॥ तें एकपण हिरोनि देखा ॥ ग्रंथार्थलेखा जनार्दन वदवी[6] ॥ ९७ ॥ तेथ एक ना अनेक ॥ ऐसें जनार्दनें केलें देख ॥ त्यावरी द्वंद्वसाम्य

---

[1] सांगूं. [2] युक्ति. [3] वेदशिरोभागाचें. [4] गौतमऋषीची बायको. [5] नाश. [6] बोलवी.

कवतिक ॥ ग्रंथ सम्यक वाखाणवी ॥ ९८ ॥ एका जनार्दना शरण ॥ जनार्दनु झाला एकपण ॥ ऐसेंनि एकत्वें जाण ॥ केलें संपूर्ण
भिक्षुगीत ॥ ९९ ॥ तेणें तोषलेनि अवधूतें ॥ आदरें आश्वासूनि मातें ॥ अभय देऊनि निजहस्तें ॥ पूर्ण ग्रंथार्थें डुल्लत ॥ १००० ॥ माझे
निजगुरूचाही[1] गुरू ॥ श्रीदत्त परमगुरू ॥ तो भिक्षुगीतार्थें साचारू ॥ योग्यां योगेश्वरू[2] तुष्टला ॥ १ ॥ तेणें तोखलेनि अद्भुतें ॥ आदरें
आश्वासूनि मातें ॥ अभय देऊनि निजहस्तें ॥ पूर्ण ग्रंथार्थें डुल्लतू ॥ २ ॥ एका जनार्दना शरण ॥ श्रोतां व्हावें सावधान[4] ॥ पुढील अध्यायीं
श्रीकृष्ण ॥ प्रकृतिपुरुषलक्षण सांगेल ॥ ३ ॥ ते प्रकृतिपुरुषांची कथा ॥ विवंचना हृदयीं धरितां ॥ मी सुखदुःखद्वंद्वापरता ॥
निजात्मता निजबोधू ॥ ४ ॥ संतसज्जनां साष्टांग नमन ॥ श्रोतेजनांसि लोटांगण ॥ एका विनवी जनार्दन ॥ अतिगोड निरूपण पुढें
आहे ॥ ५ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीकायां भिक्षुगीतनिरूपणं नाम त्रयोविंशतितमोध्यायः ॥ २३ ॥ ॥ ओं० ॥ १००५ ॥ ॥ मू० ॥ ६२ ॥ ॥ एकूण ॥ १०६७ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

---

[1] स्वकीय. [2] योगिपुरुषांमध्यें श्रेष्ठ. [4] स्वस्थ.

# अध्याय २४ वा.


ब्रह्मदेव.
शेषशाई
वटपत्रशाई.
लक्ष्मी
प्रकृती
पुरुष.
उद्धव
श्रीकृष्ण.

श्रीगणेशाय नमः ॥ ॐनमोजी गुणातीता ॥ व्यक्तिरहिता अव्यक्ता ॥ तुजमाजी नाहीं द्वैतकथा ॥ अद्वैततारहिवासी ॥ १ ॥ तुझा अ
द्वैत निजनिर्वाहो ॥ तेथ नाहीं देव देवी देवो ॥ उदयअस्तांचा अभावो ॥ रविचंद्रांसी ठावो असेना ॥ २ ॥ तेथ सशब्द हारपला वेदू ॥ बुद्धीसि
मिथ्या बोधू ॥ तिळभरी नाहीं भेदू ॥ अद्वयानंदू एकला ॥ ३ ॥ ऐशिया अद्वैतपणीं ॥ प्रकृतिपुरुषांची कहाणी[1] ॥ सांगिजे केवळ अज्ञा
नीं ॥ ज्ञातेपणीं चातुर्यें ॥ ४ ॥ जेथ मीतूंपणा नाहीं ठावो ॥ तेथ प्रकृतिपुरुषां नाहीं निर्वाहो ॥ ज्याचा नाहीं गर्भसंभवो ॥ त्याचें जात[2]
क पहा हो वर्तविती ॥ ५ ॥ जें जन्मलेंचि नाहीं ॥ त्याचें श्राद्ध करावें कायी ॥ हें ज्ञात्यासि पुसतां पाही ॥ ठेवितां ठायीं तुकेना ॥ ६ ॥
वांझेच्या पुत्राचा विवाहो ॥ समारंभ चला पहाहो ॥ नेणा साच जाणा वावो ॥ तैसा निर्वाहो प्रकृतिपुरुषां ॥ ७ ॥ ऐसा एकपणें एकु
लता ॥ तोचि आपण आपली झाला कांता ॥ आपुले कांतेचा आपण भर्त्ता ॥ अतिलाघवतां अतर्क्य ॥ ८ ॥ जेवीं अर्धनारी[3]नटेश्वरी ॥
जो पुरुष तोचि नारी ॥ तेवीं प्रकृतिपुरुष संसारीं ॥ एकावरी एक नांदत ॥ ९ ॥ तो पुरुष ते पतिव्रता ॥ दोघां अनन्यप्रीति एकात्मता ॥
येरयेरां वेगळीकता ॥ पाऊल सर्वथा न घालिती ॥ १० ॥ ऐसें नसतेंचि नाथिलें ॥ साचाचेपरी नाडविलें ॥ एकीं अनेकत्व दाविलें ॥
एकपण संचलें न मोडतां ॥ ११ ॥ दोघां एकत्र सदा असणें ॥ दोघांसि एकचि नेसणें ॥ दोघां एके सत्ता बैसणें ॥ दोघें एके प्राणें व
र्तती ॥ १२ ॥ दोघां एकचि देखणें ॥ दोघां एकचि चाखणें ॥ दोघां एकचि बोलणें ॥ दोघां करणें एकची ॥ १३ ॥ कैशी दोघां प्रीति
अलोलिक ॥ येर[4]येरांवीण न घेती विख ॥ येरयेरांवीण न चाखिती उदक ॥ येरयेरेंवीण देख आंधळीं ॥ १४ ॥ नवल बाइलेचें करणें ॥
नपुंसका पुरुषत्व इणें देणें ॥ मग तिचेनि अधीनपणें ॥ पुरुषें नांदणें सर्वदा ॥ १५ ॥ मग हा तिचेनि डोळां देखे ॥ मग हा तिचेनि बो
ले मुखें ॥ तिचेनि भोगी हा सुखदुःखें ॥ बंधमोक्ष चाखें तिचेनि ॥ १६ ॥ तिचेनि ह्मणवी मी ब्रह्म ॥ तिचेनि हा कर्माकर्म ॥ तिचेनि
भोगी हा मरण जन्म ॥ धर्माधर्मविभागें ॥ १७ ॥ तिचेनि यासि पाप घडे ॥ तिचेनि यासि पुण्य जोडे ॥ निचेनि हा महत्त्वा चढे ॥ ति
चेनि पडे अधःपातीं[5] ॥ १८ ॥ एथवरी अतिप्रीतीं ॥ वाढविली निजप्रकृती ॥ प्रकृति पातिव्रत्यस्थिती ॥ वश्य निजपती तियें केला ॥ १९ ॥
नवल दोघांची सोयरिकी ॥ दोघीं भावंडें होती सखीं ॥ तो बाप ते त्याची लेंकी ॥ पाहतां विवेकीं तो पुत्र तिचा ॥ २० ॥ यापरी अ
गम्या[6]गमन ॥ तिहीं दोघीं करूनि जाण ॥ वाढविले अनेक जन ॥ तिसरेपण नातळतां ॥ २१ ॥ ऐसा अव्यभिचारीं व्यभिचारू ॥ क
रूनि वाढविला संसारू ॥ तो अतिअतर्क्य[7] अगोचरू ॥ अगम्य दुर्धरू शिवादिकां ॥ २२ ॥ हा निजशक्तिप्रकृतिमेळें ॥ भोगी निजत्वाचे

---

१ वार्ता. २ जन्मपत्रिका. ३ शंकर. ४ एकमेकावांचून. ५ नरकांत. ६ ज्यावरोबर अथवा जोबरोबर गमन करूं नये अशांशीं गमन. ७ जाणण्यास अशक्य.

सोहळे ॥ प्रिया न देखतां तात्काळें ॥ सांडी सगळें शिवत्व ॥ २३ ॥ ज्यासि गांव ठाव ना जीवमेळ ॥ रूप नांव ना काळ वेळ ॥ ऐसा ही प्रकृतीवेगळ ॥ केवळ सबळ निजगुणीं ॥ २४ ॥ प्रकृति निजगुणास्तव ॥ निजभर्ता केला सांवेव ॥ वर्णव्यक्ति रूप नांव ॥ नाना वैभवविलासें ॥ २५ ॥ तंव पूर्णत्व लोपोनियां शिवें ॥ अंगावरी वाढविलें शांभवें ॥ येरी पतिव्रता आहेवें ॥ रूपें नांवें शिव पूजी ॥ २६ ॥ दोघांपासूनि झालें जग ॥ परी न दिसे तिसरा भाग ॥ न तुटे अनन्यमिळणी योग ॥ भिन्न विभाग दाखवितां ॥ २७ ॥ त्रैलोक्य पाहतां सांग ॥ न दिसे तिसरें अंग ॥ दोघीं दुमदुमीत जग ॥ भरलें चांग दुबंधीं ॥ २८ ॥ दोघांची अतिप्रीति ऐशी ॥ अनन्यमिळणी अनन्यासी ॥ दोघें अणूमाजी सावकाशीं ॥ निज रहिवासी नांदत ॥ २९ ॥ पतिवीण जे पतिव्रता ॥ सगळी विरजे सर्वथा ॥ प्रियेवीण असतचि नसता ॥ होय कांहीं नव्हतां भर्तारू ॥ ३० ॥ शिव निःसंग जो पैं सदा ॥ क्रियाकरणें वीण नुसधा ॥ त्यासिही अतिप्रीतीं प्रमदा ॥ सुखदुःखबाधा भोगवी ॥ ३१ ॥ यापरी निजवोवरां ॥ प्रकृतीं गोविला घरचारा ॥ मग घरवातेचा थारा ॥ त्याच्याचि शिरीरावरी केला ॥ ३२ ॥ प्रकृति पतिव्रता अवंचक ॥ कर्माकर्मीं शिणोनि अनेक ॥ सुखदुःखांची परवडी देख ॥ अर्पी आवश्यक निजकांता ॥ ३३ ॥ नवल तें मी सांगावें काये ॥ स्त्री जोडी तें पुरुष खाये ॥ तियेवीण तो पाहे ॥ कहीं नलाहे कवडाही ॥ ३४ ॥ प्रकृति पतिव्रताशिरोमणी ॥ कांत वश्य करोनि निजगुणीं ॥ वासना सूक्ष्म सेवया अनुदिनीं ॥ भोगवी सुगरणी भर्ताराकरवीं ॥ ३५ ॥ तेथ प्रकृतीचेनि गदारोळें ॥ भवाब्धीं जळक्रीडा खेळे ॥ प्रकृति पुरुषातें बुडवी बळें ॥ पुरुष एके काळें प्रकृति बुडवी ॥ ३६ ॥ ऐशा प्रकृतीच्या संगाआंत ॥ पुरुषास लाविलें पंचभूत ॥ जन्ममरणांच्या बुज्या देत ॥ अवस्थाभूत होऊनि ॥ ३७ ॥ ऐसा प्रकृतीचिया भिडा ॥ पुरुष केवळ झाला वेडा ॥ निजत्व विसरोनि बापुडा ॥ केला गाढा अतिदीन ॥ ३८ ॥ ऐसा विसरोनि पूर्णत्वासी ॥ जीवशिवद्वंद्वें स्वयें सोशी ॥ त्यासि न्यावया निजत्वासी ॥ गुणिया पूर्णांशीं गुरुरावो ॥ ३९ ॥ ज्याचे वचनमात्रें पहाहो ॥ जीवाचा हारपे जीवभावो ॥ शिवा शिवपदीं ठावो ॥ ज्याचा वचनगौरवो नांदवी ॥ ४० ॥ ज्याची भावार्थें ऐकतां गोठी ॥ अहंकारू निमे उठाउठी ॥ जन्ममरणांसि पडे तुटी ॥ न दिसे दृष्टीं भवभय ॥ ४१ ॥ ज्याचिया कृपादृष्टीपुढें ॥ जीवशिवांचें फिटे बिरडें ॥ माया मिथ्यात्वें समूळ उडे ॥ पूर्णत्वाचें उघडे भांडार ॥ ४२ ॥ शिवू मुकला शिवत्वासी ॥ यावया तो निजपदासी ॥ आज्ञा जैं पुसे सद्गुरूसी ॥ तैंच शिवासी शिवत्व ॥ ४३ ॥ एवढी महिमा सद्गुरूसी ॥ वचनें केवीं वांनूं त्यासी ॥ तंव वानिते वाणीनें वानाव्यासी ॥ वदवी वाचेसीं गुरुरावो ॥ ४४ ॥

---

१ साकार. २ मिळवी. ३ संभ्रमानें. ४ आत्मस्वरूप. ५ वर्णन करूं.

तेथ एक मी वानिता ॥ हें कोणें घ्यावें आपुले माथां ॥ गुरूनें हरितली अहंता ॥ तेथ मी एक कर्त्ता घडें केवीं ॥ ४५ ॥ तेथ मीपणें ध्यावी अहंता ॥ तंव गुरूचि मीपणा आतौता ॥ गुरुवेगळा ठाव नाहीं रिता ॥ मीपणाचे माथां गुरुरावो ॥ ४६ ॥ माझें जें कां मीपण ॥ तें सद्गुरू झाला आपण ॥ तेव्हां रूप एक नांवें भिन्न ॥ एका जनार्दन एकत्वें ॥ ४७ ॥ अवघा जनार्दनचि देखा ॥ तोचि उपनांवें झाला एका ॥ तेणें नामें श्रीभागवत देखा ॥ देशभाखा अर्थवी ॥ ४८ ॥ तेवीसावे अध्यायाचे अंतीं ॥ देवो बोलिला उद्धवाप्रती ॥ द्वंद्वभोगाची निजप्राप्ती ॥ साहावी शांती धरोनि ॥ ४९ ॥ ज्यांसि बाणली अढळशांती ॥ ते मज अजितातें जिंकिती ॥ तेचि साचार परमार्थी ॥ स्वमुखें श्रीपती बोलिला ॥ ५० ॥ तें ऐकोन कृष्णवचन ॥ उद्धवाचें दचकलें मन ॥ द्वंद्वसहिष्णुता अतिकठिन ॥ कैसेनि आपण साहाती ॥ ५१ ॥ द्वंद्वसहिष्णुतासाधन ॥ पुसतां उंबगेल श्रीकृष्ण ॥ ऐशिया भिडा उद्धव पूर्ण ॥ धरोनि मौन राहिला ॥ ५२ ॥ तो उद्धवाचा अभिप्रावो ॥ जाणोनियां देवाधिदेवो ॥ द्वंद्वसहिष्णुताउपावो ॥ समूळ पहा हो सांगत ॥ ५३ ॥ अद्वयत्वें परिपूर्ण ॥ प्रकृतीहूनि पुरुष भिन्न ॥ हें आकळल्या निजज्ञान ॥ द्वंद्वबंधन बाधीना ॥ ५४ ॥ द्वंद्वें जिणावया पूर्ण ॥ प्रकृतिपुरुषविवंचन ॥ उद्धवें न करितां प्रश्न ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ५५ ॥ भक्तअंतरींचें जाणता ॥ यालागीं अंतर्यामी तत्त्वतां ॥ तो निजभक्तांचिया स्वार्था ॥ पूर्ण परमार्था सांगत ॥ ५६ ॥ निजभक्तांचें मनोगत ॥ जाणोनियां श्रीकृष्णनाथ ॥ करावया भक्तहित ॥ कृपेनें सांगत कृपाळू ॥ ५७ ॥ आशंकेचें निरूपण ॥ उद्धवें न सांगतांही जाण ॥ तें जाणोनियां श्रीकृष्ण ॥ कृपां निरूपण निरूपी ॥ ५८ ॥ जगीं धन्य भाग्य उद्धवाचें ॥ कृष्णदैवत तिहीं लोकींचें ॥ कृपा वोसंरोनियां साचें ॥ प्रकृतिपुरुषांचें निज सांगें ॥ ५९ ॥ कृष्ण ह्मणे ज्यासि तारीन ॥ तो पहिलाचि तरला जाण ॥ करावया जगाचें उद्धरण ॥ कृपें श्रीकृष्ण बोलत ॥ ६० ॥ धेनु वत्साचेनि लोभें ॥ जेवीं घरापुरतें दुभे ॥ तेवीं उद्धवाचेनि वालभें ॥ जग पद्मनाभें उद्धरिलें ॥ ६१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ अथ ते संप्रवक्ष्यामि सांख्यं पूर्वविनिश्चितम् ॥ यद्विज्ञाय पुमान् सर्वं जह्याद्वैकल्पिकं भ्रमम् ॥ १ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो योगियांचा योगेंद्र ॥ जो ज्ञानियांचा ज्ञाननरेंद्र ॥ जो भक्तचित्तकोरचंद्र ॥ जो यादवेंद्र यदुवंशीं ॥ ६२ ॥ जो प्रकृतिपुरुषांहूनि पर ॥ तो स्वयें बोले शार्ङ्गधर ॥ उद्धवा द्वंद्वसनहप्रकार ॥ अतिगुह्य विचार अवधारी ॥ ६३ ॥ जें ऐकतांची निरूपण ॥ सुखदुःखातीत आपण ॥ हे संपूर्ण पावे खूण ॥ तें गुह्यज्ञान अवधारी ॥ ६४ ॥ मी कपिलरूपें अवतरूनी ॥ प्रकृतिपुरुष विवंचोनी ॥ उपदेशिली निजजननी ॥ ते जुनी कहाणी सांगेन ॥ ६५ ॥ जे परिसतां सावधान ॥

---

१ नाहींशी केली. २ रागावेल. ३ प्रकृतिपुरुषांचा विचार. ४ वाढवून. ५ प्रेमानें.

स्वयें होइजे ज्ञानसंपन्न ॥ पुरुषाहूनि प्रकृति भिन्न ॥ सुखदुःख जाण तीपाशीं ॥ ६६ ॥ सुखदुःख मायिक पूर्ण ॥ ऐसें ज्यासि कळलें ज्ञान ॥ तेव्हां भवभयभ्रम दारुण ॥ तत्काळ जाण तो सांडी ॥ ६७ ॥ जेवीं मोतियांची कंठमाळा ॥ भ्रमें सर्प भासली डोळां ॥ ते भ्रमांतीं घालितां गळां ॥ नबाधी कंटाळा सर्पभयाचा ॥ ६८ ॥ तेवीं शिव[1]शक्तिविवंचन ॥ तुज मी सांगेन संपूर्ण ॥ जे आकर्णितां सावधान ॥ द्वंद्वें सकारण हारपती ॥ ६९ ॥ ब्रह्म सुखरूप एकलेपणीं ॥ तेथ प्रकृतिपुरुष कैंचीं दोनी ॥ द्वंद्वदुःखें ज्यापासोनी ॥ त्रिभुवनीं न समाती ॥ ७० ॥ तेचि अर्थीचें निरूपण ॥ स्वयें सांगताहे श्रीकृष्ण ॥ प्रकृतिपुरुषांचें जन्म जाण ॥ तें मुख्य कारण सुखदुःखां ॥ ७१ ॥

॥ श्लोक ॥ ॥ आसीज्ज्ञानमथो ह्यर्थ एकमेवाविकल्पितम् ॥ यदा विवेकनिपुणा आदौ कृतयुगेऽयुगे ॥ २ ॥

॥ टीका ॥ ॥ जेवीं निजेल्या पुरुषाची छाया ॥ पुरुषातळीं जाय लया ॥ तेवीं सविकार गिळोनि माया ॥ ब्रह्म एक लया एकाकीं ॥ ७२ ॥ ब्रह्म एकाकीं परिपूर्ण ॥ हेंही ह्मणावया ह्मणतें कोण ॥ नाहीं नाम रूप व्यक्ति पूर्ण ॥ ब्रह्मीं ब्रह्मपण स्फुरेना ॥ ७३ ॥ तेथ नाहीं युगसंख्या काळ वेळ ॥ नाहीं दिनमान घटिका पळ ॥ नाहीं शून्यत्वें शून्य मंडळ ॥ ब्रह्म केवळ परिपूर्णत्वें ॥ ७४ ॥ तेथ मी ब्रह्म स्फुरे जें स्फुरण ॥ तेंचि मायेचें मुख्य लक्षण ॥ तेंचि प्रकृतिपुरुषांचें जन्मस्थान ॥ जांवळीं फळें जाण जन्मलीं ॥ ७५ ॥ जेवीं कां कवळूनियां कण ॥ निकण कोंडा वाढे आपण ॥ तेवीं पुरुषयोगें पूर्ण ॥ प्रकृति जाण थोरावे ॥ ७६ ॥ धरूनि गोडपणाचा साटा ॥ फणसाअंगीं वाढे कांटा ॥ तेवीं पुरुषयोगें ताठा ॥ चढला मोठा प्रकृतीसी ॥ ७७ ॥ जेवीं कां डोळींचेंचि जळ ॥ गोठोनि डोळां होय पडळ[3] ॥ तेवीं ब्रह्मीं मायामळ ॥ करी सबळ शुद्धासी ॥ ७८ ॥ पडळ डोळा मंद करी ॥ माया निजानंद आवरी ॥ वाढोनि त्याची त्यावरी ॥ वेडा करी पुरुषातें ॥ ७९ ॥ ऐसें कर्त्तैंनवीण आपसया ॥ कार्यकारण जें आलें आया ॥ त्यातें कृतयुग ह्मणावया ॥ वेदु लवलाह्यां उदेला ॥ ८० ॥ अकारउकारमकारेंसी ॥ वेदू उपजे प्रकृतिपुरुषीं ॥ जेवीं उगवल्या बीजासी ॥ प्रथम ये त्यासि तिवणां[4] डिरूं[5] ॥ ८१ ॥ ते वेदींचा अभिप्रावो ॥ ब्रह्म सत्य माया वावो[6] ॥ आपुलेनि अभेदें ब्रह्मभावो ॥ विवेकनिपुण पहाहो जाणती ॥ ८२ ॥ ऐसे वेदविवेकें अभेदयोगी ॥ ते कृतादि होत का कलियुगीं ॥ वर्त्ततांते सदा अयुगीं[7] ॥ युग त्यांलागीं असेना ॥ ८३ ॥ कृतयुगादि युगपंक्ती ॥ चराचर नानाव्यक्ती ॥ यासि उपजवी प्रकृती ॥ तिची उत्पत्ती हरि सांगे ॥ ८४ ॥

॥ श्लोक ॥ ॥ तन्मायाफलरूपेण केवलं निर्विकल्पितम् ॥ वाङ्मनोगोचरं सत्यं द्विधा समभवद्बृहत् ॥ ३ ॥

॥ टीका ॥ ॥ तें बृहत् जें परब्रह्म ॥ जेथ न रिगे रूप नाम ॥ जें मनबुद्धींसी अगम्य ॥ जें दुर्गम इंद्रियां ॥ ८५ ॥

---

[1] प्रकृतिपुरुषांचा विचार. [2] जोडोनें. [3] पडदा. [4] तीन पानांचा. [5] अंकूर. [6] असत्य, मिथ्या. [7] अद्वैतानें.

जें निर्गुण निराकार ॥ जें सत्यस्वरूप साचार ॥ जें परेहूनि परात्पर ॥ निर्विकार निजवस्तु ॥ ८६ ॥ तेथ अतर्क्य मायाचमत्कार ॥ करी दृश्यद्रष्टृत्वें सविकार ॥ तेचि प्रकृतिपुरुष साचार ॥ जे चराचर वाढवी ॥ ८७ ॥ जेवीं रूपासवें छायेची व्यक्ती[1] ॥ तेवीं ब्रह्मीं मायेची स्थिती ॥ तिणें उपजविली शिवशक्ती ॥ पुरुष प्रकृती द्विधा भेदें ॥ ८८ ॥ ब्रह्मांडीं ईश्वरस्वभावो ॥ पिंडीं[3] त्यासीच जीवभावो ॥ ऐसा प्रकृतिपुरुषनिर्वाहो ॥ मायें पहाहो द्विधा केला ॥ ८९ ॥ ब्रह्म अच्छेद्य वेदु बोले ॥ तें फाडूनि द्विधा केलें ॥ जेवीं आरिसां आपण आपुलें ॥ मुख देखिलें संमुख ॥ ९० ॥ आपण पूर्वामुख आहे ॥ प्रतिबिंब पूर्वेकडे न होये ॥ आपलें आपणा संमुख होये ॥ हें लाघवं[4] पाहे मायेचें ॥ ९१ ॥ प्रतिबिंब दिसतां संमुख ॥ संमुख ह्मणतां अतिविमुख ॥ पुरुष पूर्वेकडे देख ॥ प्रतिबिंबाचें मुख पश्चिमेकडे ॥ ९२ ॥ तेवीं आत्मदृष्टि स्वरूपीं पडे ॥ जीवदृष्टि प्रपंचाकडे ॥ येणें संमुखत्व न घडे ॥ विमुखत्व गाढें जीवासी ॥ ९३ ॥ तेवीं ब्रह्मीं जें ब्रह्मस्फुरण ॥ तेंचि मूळमायेचें लक्षण ॥ तेथ ईश्वरत्वें जाण ॥ होय आपण्या आपण संमुख ॥ ९४ ॥ जे अद्वितीय वस्तु शुद्ध ॥ तेथ मिथ्या मायासंबंध ॥ अभेदीं उपजवूनि भेद ॥ केलीं द्विविध[2] शिवशक्ती ॥ ९५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तयोरेकतरो ह्यर्थः प्रकृतिः सोभयात्मिका ॥ ज्ञानं त्वन्यतमो भावः पुरुषः सोऽभिधीयते ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ त्या दोहीं भागांमाझारी ॥ प्रकृतिभाग तो विकारी ॥ पुरुषभाग तो अविकारी ॥ स्वयें श्रीहरी सांगत ॥ ९६ ॥ तेथ आपण आपुली कांता ॥ आपुले कांतेचा आपण भर्त्ता ॥ एकपणीं दावूनि द्वैता ॥ भिन्नविभागता शिवशक्ती ॥ ९७ ॥ जेवीं आपुलें एक अंग ॥ तेथ बोलती वाम सव्यं[5] भाग ॥ तेवीं प्रकृतिपुरुषविभाग ॥ जाणावे सांग मायिक ॥ ९८ ॥ अर्धनारीनटेश्वरी ॥ जो पुरुष तोचि नारी ॥ प्रकृतिपुरुषीं तैशी परी ॥ एकशरीरीं एकात्मता ॥ ९९ ॥ जैं पुरुषविभाग लपवी ॥ तैं स्वेच्छा प्रकृति नाचवी ॥ प्रकृति भाग जैं लपवी ॥ तैं पुरुषाची पदंवी[6] प्रकट दिसे ॥ १०० ॥ मधील पडदा जैं तोडिती ॥ तैं पुरुष ना प्रकृति ॥ तेव्हां प्रकटे निजात्मस्थिती ॥ स्त्रीपुरुषव्यक्ती समूळ मिथ्या ॥ १ ॥ ऐशी मिथ्या मायिक प्रकृती ॥ तीपासावं[7] गुणोत्पत्ती ॥ गुणास्तव संसारस्थिती ॥ स्वयें श्रीपती सांगत ॥ २ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तमो रजः सत्वमिति प्रकृतेरभवन्गुणाः ॥ मया प्रक्षोभ्यमाणायाः पुरुषानुमतेन च ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रकृति गुणमयी पूर्ण ॥ ते ल्हाहोनि[8] पुरुषईक्षणें[9] ॥ प्रकट करी तिन्ही गुण ॥ तेंचि निरूपण हरि सांगे ॥ ३ ॥ जेवीं सूर्यावलोकनमेळीं ॥ कळी विकाशे कमळदळीं ॥ ते वेगळवेगळी पांकोळी ॥ होती मुळीं कळिकेमाजी ॥ ४ ॥ तेवीं पुरुषाच्या ईक्षणीं ॥ गुणमयी झाली गुर्विणी[10] ॥ ते तमरजसत्वगुणी ॥ प्रसवली तिनी गुणांतें ॥ ५ ॥

---

१ दर्शन. २ दोनप्रकारच्या. ३ शरीरांत. ४ कौतुक. ५ उजवा. ६ मार्ग. ७ तिच्यापासून. ८ प्राप्त होऊन. ९ ईश्वरप्रेरणा. १० गर्भिणी.

जेवीं जळें बीज क्षोभूनी ॥ दोनी दळें उलवूनी ॥ डिरू निघाला त्यांतूनी ॥ नरतरूनी तिवणा पैं ॥ ६ ॥ तेवीं परमात्मा मी आपण ॥
पुरुषत्वातें पावोनि जाण ॥ प्रकृति क्षोभवूनी पूर्ण ॥ तिनी गुण प्रकटविले ॥ ७ ॥ जेवीं कां सूर्यांचे किरणीं ॥ सूर्यकांतीं[1] पडे अग्नी ॥
तेवीं पुरुषें प्रकृति क्षोभवूनी ॥ गुण तिनी ते प्रसवे ॥ ८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तेभ्यः समभवत्सूत्रं महान् सूत्रेण संयुतः ॥ ततो विकुर्वतो
जातोऽहंकारो यो विमोहनः ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ ते तिनी गुण भिन्नभिन्न ॥ भिन्नपणें वाढी समान ॥ त्या नांव सूत्र प्रधान ॥
क्रियाशक्ती जाण जिया नांव ॥ ९ ॥ क्रियाशक्तीस जडपण ॥ तेथ चेतनात्मक उपजे ज्ञान ॥ तेंचि महत्तत्त्व नांव जाण ॥ भिन्नाऽभिधान[2]
या हेतू ॥ ११० ॥ महत्तत्त्व आणि प्रधान ॥ दोहींचें रूप एकचि जाण ॥ तेथ क्रिया आणि स्फुरे ज्ञान ॥ यालागीं नांव
भिन्न दोहींचें ॥ ११ ॥ क्रियायुक्त जें स्फुरे ज्ञान ॥ तेथ चेतवे अभिमान ॥ त्रिगुण अहंकार पूर्ण ॥ ते ठायीं जाण उठावे ॥ १२ ॥ अहं
खवळल्या दारुण ॥ शिवासि विसरवी शिवपण ॥ देहात्मवादें भुलवी पूर्ण ॥ जन्ममरण भोगवी ॥ १३ ॥ त्या अहंकाराची मोहक
शक्ती ॥ भवभ्रमें पाडी भ्रांती ॥ अहंकाराची विकारउत्पत्ती ॥ स्वयें श्रीपती सांगत ॥ १४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ वैकारिकस्तैजसश्वतामसश्चेत्यहंत्रिवृत् ॥ तन्मात्रेंद्रियमनसां कारणं चिदचिन्मयः ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ अहंकार अतिदुर्धर ॥ गुणानुसारें त्रिप्रकार[3] ॥ गुण
अहंता दृढ संसार ॥ गुणविकार तो ऐसा ॥ १५ ॥ प्रथम अहंभावो सात्विक ॥ झाला अंतःकरणद्योतक ॥ तोचि देवताविकारजनक
॥ यालागीं वैकारिक बोलिजे त्यासी ॥ १६ ॥ अहंकार जो राजसू ॥ तो ज्ञानकर्मेंद्रियप्रकाशू ॥ वांछी रजतेजविलासू ॥ यालागीं
तैजसू बोलिजे ॥ १७ ॥ तामसाहंकाराची सिद्धी ॥ सूक्ष्मभूतांतें[4] उत्पादी ॥ यालागीं ह्मणिजे तो भूतादी ॥ जाण त्रिशुद्धी उद्धवा
॥ १८ ॥ नवल अहंकाराची थोरी ॥ सचेतना अचेतना नोवरी ॥ स्वयें लग्न लावी प्रीतीवरी ॥ चिदचिद्ग्रंथी पुरी पाडूनी ॥ १९ ॥
चिन्मात्रस्वरूपता जीवासी ॥ लग्न लावी जडदेहेंसी ॥ ओंपुण्या एकात्मतेंसी ॥ कर्ता ज्योतिषी अभिमान ॥ १२० ॥ जीव ज्ञानस्वरूप
चोखडा ॥ तो करूनि जडमूढ वेडा ॥ दृढ घाली हाडांचे खोडां ॥ तो हा धडफुडा अहंकारू ॥ २१ ॥ तोचि सात्विक आणि राजस ॥
होऊनि तिसरा तामस ॥ त्रिविधविकारीं बहुवस ॥ वाढवी असोसें[5] संसारू ॥ २२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अर्थस्तन्मात्रिकाज्जज्ञे तामसादिंद्रियाणि
च ॥ तैजसाद्देवता आसन्नेकादश च वैकृतात् ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ ॥ विषय तेचि महाभूतें ॥ तामस प्रसवला अपंचीकृतें[6]
॥ विषयास्तव प्रकटती भूतें ॥ ऐक तूंतें सांगेन ॥ २३ ॥ शब्दापासाव नभ उद्भवत ॥ स्पर्शापासाव मारुत ॥ रूपापासाव तेज हो

---

[1] सूर्यकांतमण्यापासून. [2] वेगळें नांव. [3] तीन प्रकारचा. [4] परमाणुरूपभूतांस. [5] हाव. [6] वेगवेगळीं.

त ॥ रसास्तव येथ आप[1] उपजे ॥ २४ ॥ गंधापासोनि पृथ्वी कठिण ॥ उपजली आपीं आपण ॥ येरयेरांचें अनुस्यूतपणें[2] ॥ सर्वथा जाण मोडेना ॥ २५ ॥ शब्द निःशब्दीं[3] जन्मला ॥ तो आकाशातें प्रसवला ॥ आकाशीं सूक्ष्म स्पर्श झाला ॥ तो स्पर्श व्याला मारुतँ[4] ॥ २६ ॥ जन्मल्या मारुताआंत ॥ शब्द स्पर्श दोनी नांदत ॥ मारुत रूपातें प्रसवत ॥ त्या रूपांत तेज जन्मलें ॥ २७ ॥ त्या जन्मल्या तेजाआंत ॥ शब्द स्पर्श रूप नांदत ॥ रूप रसातें प्रसवत ॥ आप रसांत जन्मलें ॥ २८ ॥ जन्मलें आपीं समरस ॥ शब्द स्पर्श रूप रस ॥ नांदताती सावकाश ॥ विषयीं विषयांस प्रवेशू ॥ २९ ॥ आपांमाजी जन्मे गंध ॥ गंधापासाव पृथ्वी शुद्ध ॥ शब्द स्पर्श रूप रस गंध ॥ पृथ्वी पंचविध विषययुक्त ॥ १३० ॥ विषययुक्त अपंचीकृतें ॥ पूर्विलीं न होतीं समस्तें ॥ तींचि स्थूळावलीं येथें ॥ महाभूतें प्रसिद्ध ॥ ३१ ॥ ज्ञान कर्म उभय पंचक ॥ श्रोत्रादि इंद्रियदशक ॥ राजसापासोनि देख ॥ स्वाभाविक जन्मलीं ॥ ३२ ॥ सत्वअहंतेचा विकार ॥ चित्तचतुष्टय चमत्कार ॥ मन बुद्धि चित्त अहंकार ॥ अकराही सुरें[5] इंद्रियाधिप ॥ ३३ ॥ महाभूतें अतिजडें देख ॥ इंद्रियें तेथें प्रवर्त्तक ॥ अंतःकरणचाळक ॥ देव प्रकाशक कर्मांचे ॥ ३४ ॥ त्रिविध अहंकारवृत्ती ॥ गुणक्षोभें क्षोभक शक्ती ॥ यापरी झाली उत्पत्ती ॥ ब्रह्मांडस्थितीलागूनी ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मया संचोदिता भावाः सर्वे संहत्यकारिणः ॥ अंडमुत्पादयामासुर्ममायतनमुत्तमम् ॥ ९ ॥ ॥ टीका ॥ ॥ भूतां[6] परस्परें वैर देख ॥ पृथ्वीतें गिळूं धांवे उदक ॥ उदकातें आवश्यक ॥ तेज देख निर्दळी ॥ ३६ ॥ तेजातें प्राशी पवन ॥ पवनातें ग्रासी गगन ॥ एवं भूतांसि सौजन्यँ[7] ॥ सर्वथा जाण असेना ॥ ३७ ॥ तेथ अंतर्यामिरूपें मी जाण ॥ स्वयें प्रवेशोनि आपण ॥ भूतें मेळवूनि पूर्ण ॥ करीं संरक्षण मर्यादा ॥ ३८ ॥ माझे मर्यादेची रेखा ॥ पृथ्वी न विरवी उदका ॥ उदकातें तेज देखा ॥ न लववी नखा शोषाचे ॥ ३९ ॥ तेजातें न प्राशी पवन ॥ वायु स्वेच्छां विचरतां जाण ॥ सर्वथा ग्रासीना गगन ॥ गतिबंध न करीना ॥ १४० ॥ यापरी हीं महाभूतें ॥ एकवटूनि समस्तें ॥ सृजिलें[8] ब्रह्मांडातें ॥ मज महापुरुषातें वस्तीशीं ॥ ४१ ॥ सप्तावरणें सि प्रचंड ॥ आवो साधूनि उदंड ॥ निर्माण केलें ब्रह्मांड ॥ मयूरांड आकारें ॥ ४२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तस्मिन्नहं समभवमंडे सलिलसंस्थितौ ॥ मम नाभ्यामभूत्पद्मं विश्वाख्यं तत्र चात्मभूः ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐसें ब्रह्मांड जें विद्यमानें[9] ॥ त्यामाजी मी नारायण ॥ लीलाविग्रही[10] झालों जाण ॥ आपण्या आपण विश्वात्मा ॥ ४३ ॥ त्या माझे नाभीसि नाभिपद्म ॥ विकासलें विश्वधामें[11] ॥ त्याहीमाजी उत्तमोत्तम ॥ आत्मभू नाम जन्मला ब्रह्मा ॥ ४४ ॥ नाहीं योनिद्वारा उदरगर्भू ॥ मज आत्म्यापासूनि स्वयंभू ॥ उपज

---

१ उदक. २ ऐक्य. ३ अहंकारापासून. ४ वायु. ५ देवता. ६ पंचभूतांत. ७ मैत्री. ८ उत्पन्न केलें. ९ हद्दीं असणारें. १० लीलाच आहे शरीर ज्याचें. ११ जगताला आधारभूत.

ला यालागीं आत्मभू ॥ नामाचा शोभू ब्रह्म्यासी ॥ ४५ ॥ ब्रह्मांड तो विराटदेहो ॥ त्याचा मुख्य भाग विग्रहो ॥ माझे नाभिकम
ळीं पहाहो ॥ ब्रह्मदेवो जन्मला ॥ ४६ ॥ करावया लोकसर्जनं ॥ पद्मनाभाचे नाभीसि जाण ॥ स्वयें जन्मला चतुरानन ॥ रजोगुण
प्राधान्यें ॥ ४७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सोऽसृजत्तपसा युक्तो रजसा मदनुग्रहात् ॥ लोकान् सपालान् विश्वात्मा भूर्भुवःस्वरिति त्रिधा
॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ ब्रह्मा रजोगुणप्रधान ॥ नाभिकमळीं बैसोनि जाण ॥ मी जन्ममूळ जो नारायण ॥ त्यासि तो आपण दे
खेना ॥ ४८ ॥ स्वयें बैसल्या कमळासी ॥ कमळमूळ न कळे त्यासी ॥ देखे एकार्णवजळासी ॥ रजोगुणेंसी मोहित ॥ ४९ ॥ तें कम
ळमूळ पहावया बुडीं ॥ एकार्णवीं घालोनि उडी ॥ बुडतां दिवसांचिया कोडी ॥ त्या मूळाची जोडी न लभेचि ब्रह्मा ॥ १५० ॥ तेथ
निबुजलों जळभयें ॥ बाहेरी उसासे लवलाहे ॥ कमळावरी बैसोनि पाहे ॥ करावें काये स्मरेना ॥ ५१ ॥ धांव पाव गा अच्युता ॥
निवारी माझी जगदांध्यता[4] ॥ तुजवांचूनि सर्वथा ॥ संरक्षिता मज नाहीं ॥ ५२ ॥ ब्रह्मा माझे पोटीचें बाळ ॥ रजें रजांध झालें केव
ळ ॥ धरोनि ठेला नाभिकमळ ॥ कृपा तत्काळ मज आली ॥ ५३ ॥ मज विश्वात्म्याचें अपत्य ॥ जडत्वें राहिला तटस्थ ॥ म्यां उपदे
शिला तेथ ॥ सृष्टिसर्जनार्थ तपनिष्ठा ॥ ५४ ॥ महाकल्पादि मांडणी ॥ माझिया अशरीरा वाणी ॥ तप[6] तप या दोंवचनीं ॥ उपदे
शिला अग्रगणी[7] चतुरानन ॥ ५५ ॥ यथोक्त तप करितां जाण ॥ वृद्धि पावला सत्वगुण ॥ त्याचिया सात्विकता पूर्ण ॥ प्रत्यक्ष नारा
यण मी झालों ॥ ५६ ॥ काळत्रयीं अबाधित ॥ तूंचि विश्वात्मा निश्चित ॥ हें चतुःश्लोकी[8] भागवत ॥ म्यां त्यासि तेथ उपदेशिलें ॥ ५७ ॥
माझिया उपदेशविधीं ॥ होऊनियां समबुद्धी ॥ कल्पकल्पांचिये अवधी ॥ मोह त्रिशुद्धी बाधीना ॥ ५८ ॥ यापरी ब्रह्मा कल्पादि ॥ पावला
परम समाधी ॥ प्रकटोनि निजात्मबुद्धी ॥ सर्जनसिद्धी तेणें केली ॥ ५९ ॥ सुरासुर मानव पन्नग[9] ॥ यांचे वसते तिन्ही लोक ॥ सप्तपा
ताळें घरें देख ॥ गोपुरें अलोलिक सप्तसंख्या ॥ १६० ॥ भूशब्दें पाताळलोक ॥ भुवःशब्दें मृत्युलोक ॥ स्वःशब्दें स्वर्गलोक ॥ त्रिलोक
देख या नांव ॥ ६१ ॥ चतुर्दश भुवनें सकळ ॥ तेथ वसते लोकपाळ ॥ तेंचि करोनियां विवळ[10] ॥ सांगे प्रांजळ श्रीकृष्ण ॥ ६२ ॥ ॥ श्लोक ॥
देवानामोक आसीत्स्वर्भूतानां च भुवः पदम् ॥ मर्त्यादीनां च भूर्लोकः सिद्धानां त्रितयात्परम् ॥ १२ ॥ अधोऽसुराणां नागानां भूमेरोकोऽ
सृजत्प्रभुः ॥ त्रिलोक्या गतयः सर्वाः कर्मणां त्रिगुणात्मनाम् ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ ॥ मागील श्लोकाचे अंतीं ॥ भूर्भुवःस्वरइति ॥ यापरी
त्रिलोकी श्रीपती ॥ जाण निश्चितीं बोलिला ॥ ६३ ॥ तेंचि पुढील श्लोकार्था ॥ पाताळलोक होय चौथा ॥ तो मृत्युलोक एकात्मता ॥

---

१ शरीर. २ उत्पत्ति. ३ त्याला. ४ जगत् न दिसणें. ५ सृष्टि उत्पन्न करण्याकरितां. ६ तपश्चर्या कर. ७ श्रेष्ठ. ८ चारश्लोकाचें मूळचें. ९ सर्प. १० उघड.

जाण तत्वतां व्याख्यान ॥ ६४ ॥ इंद्रादिसकळदेवांसी ॥ स्वर्ग निजमंदिर त्यांसी ॥ यक्षरक्षभूतगंधर्वांसी ॥ निवासार्सी अंतरिक्ष[1] ॥ ६५ ॥ जेणें पाविजे निजमोक्षासी ॥ जेथूनि गमन लोकांतरासी ॥ ते कर्मभूमी मनुष्यासी ॥ निजभाग्येंसी भूलोक ॥ ६६ ॥ त्रिलोकीवरतें जाण ॥ सिद्धि वोळंगती आपण ॥ तें सिद्धाचें सिद्धिस्थान ॥ वसतें जाण निरंतर ॥ ६७ ॥ अतळ वितळ सुतळ ॥ रसातळ महातळ ॥ तळातळ आणि पाताळ ॥ अधःसंख्या सकळ पाताळा ॥ ६८ ॥ सप्तपाताळीं अधिकारमेळू ॥ अतळीं वसे मयपुत्र बाळू ॥ प्रतापें अतिप्रबळू ॥ दैत्यमेळू समुदाय ॥ ६९ ॥ वितळीं वसे हाटकेश्वरू ॥ जो उमाकांत कर्पूरगौरू ॥ जेथिले हाटकनदीचा पूरू ॥ सुवर्ण[2]भारूप्रवाही ॥ १७० ॥ सुतळीं महावैष्णव बळी ॥ ज्याचा द्वारपाळ वनमाळी ॥ प्रह्लादही त्याचिजवळीं ॥ वैष्णवकुळीं नांदत ॥ ७१ ॥ त्रिपुर भेदूनि शंकरू ॥ रसातळीं स्थापिला मयासुरू ॥ तो मायालाघवी महावीरू ॥ सपरिवारू वसताहे ॥ ७२ ॥ महातळीं कद्रूसुतें[3] ॥ जे विषधर क्रोधयुक्त ॥ ते सर्प जाण समस्त ॥ तेथ नांदत निजवासें ॥ ७३ ॥ तळातळीं नांदती दानव ॥ निवातकवची वीर सर्व ॥ फणिमुख्य राजगौरव ॥ रचना अपूर्व तेठायीं ॥ ७४ ॥ सातवे पाताळीं वसती नाग ॥ शतसहस्र फणिगण भोग ॥ वासुकिप्रमुख अनेग ॥ पद्मिनीभोग भोगिती ॥ ७५ ॥ स्वर्गीं रंभा उर्वशी सुंदरी ॥ कां पाताळीं पद्मिणी नारी ॥ त्यांच्या सौंदर्याची थोरी ॥ लोकांतरीं वाखाणे[4] ॥ ७६ ॥ त्यातळीं तीं शतयोजनावरी ॥ शेष वसे सहस्रशिरी ॥ जयाच्या निजांगावरी ॥ निद्रा करीं मी भगवंत ॥ ७७ ॥ त्याहूनि तळीं आत्यंतिक[5] ॥ अधंतामिस्रादि महानरक ॥ त्याहीतळीं कूर्म देख ॥ आवरणोदक तयातळीं ॥ ७८ ॥ ज्याचा स्वर्गभोग होय क्षीण ॥ अधोभोगाचें उरे पुण्य ॥ तेणें पुण्यानुक्रमें जाण ॥ सप्तपाताळीं जन जन्मती ॥ ७९ ॥ ज्याचे गांठीं पाप चोख ॥ तो भोगी नाना नरक ॥ ऐशी त्रिलोकी देख ॥ चतुर्मुख[6] स्वयें रची ॥ १८० ॥ ज्यांसि निष्कामता नाहीं चित्तीं ॥ जे स्वप्नीं न देखती विरक्ती ॥ त्यांसि त्रिलोकीवरती गती ॥ नाहीं निश्चितीं उद्वा ॥ ८१ ॥ जे न करितीचि माझी भक्ती ॥ जे नायकतीचि माझी कीर्ती ॥ जे माझें रामनाम नुच्चारिती ॥ भवबंधपंक्तिच्छेदक ॥ ८२ ॥ त्यांसि पुनःपुनः स्वर्गलोक ॥ पुनःपुनः भोगिती नरक ॥ पुनः पाताळ मृत्युलोक ॥ नानायोनीं दुःख भोगिती ॥ ८३ ॥ जे त्रिगुणगुणी सकाम ॥ जे सदा करिती सकाम कर्म ॥ त्यांसि त्रैलोक्याबाहेरी निर्गम ॥ त्रिगुणधर्म निघों नेदी ॥ ८४ ॥ सांगीतली पाताळविवंचना[7] ॥ आतां ऐक स्वर्गरचना ॥ लोकीं लोकांतरगणना ॥ समूळ जाणा सांगेन ॥ ८५ ॥ रविचंद्रप्रभा जेथवरी ॥ तेथवरी पृथ्वीची थोरी ॥ तळीं पाताळ स्वर्गवरी ॥ लोकलोकांतरीं निवास ॥ ८६ ॥ पायीं चालिजे तो भूलोक जोडे ॥ येथूनि सूर्याऐलीकडे ॥ भुवर्लोकथोरी वाढे ॥ तेथ वस्ती[8]

---

[1] आकाश. [2] पुष्कळ सोनें ज्यामध्यें अशा प्रवाहाचा. [3] काद्रवेय. [4] वर्णन करितात. [5] महाभयंकर. [6] ब्रह्मा. [7] सप्तपाताळांचा विचार. [8] राहणें.

घडे यक्षरक्षगंधर्वां ॥ ८७ ॥ भुवर्लोकाहीवरी ॥ सूर्यलोकाचो वाढे थोरी ॥ पृथ्वीपासूनि लक्षावरी ॥ जाण निर्धारीं रविलोक ॥ ८८ ॥ वायूपासूनि चक्राकारीं ॥ रविचंद्रतारालोककुसरी ॥ खेवणोनियां तयावरी ॥ काळ सूत्रधारी भवंडीतं ॥ ८९ ॥ त्या काळाहीवरी माझी सत्ता ॥ माझेनि भेणें काळु तत्त्वतां ॥ क्षणलवनिमिषावस्था ॥ अधिकन्यूनता होऊं नेदी ॥ १९० ॥ नवल काळचक्रगती ॥ मांसां रवि चंद्र समान होती ॥ सूर्याआड चंद्राची गती ॥ जाण निश्चितीं दिनद्वयें ॥ ९१ ॥ ते अमवास्याप्रतिपदेसी ॥ चंद्र चंद्रमंडळीं सावकाशीं ॥ सूर्यसमभागें गमन त्यासी ॥ तें या लोकांसी दिसेना ॥ ९२ ॥ इतुक्यासाठीं ते दिवशीं ॥ जीवें जीं त्या चंद्राशीं ॥ नष्टत्व स्थापिती ज्योतिषी ॥ तें या लोकांसी सत्य माने ॥ ९३ ॥ रविचंद्र एकासनीं ॥ सर्वथा नव्हती गमनीं ॥ लक्षांतरें वसती दोन्हीं ॥ मंडळसमानीं मासांतीं गती ॥ ९४ ॥ रविआड गति ज्या ग्रहासी ॥ त्याचा अस्त सांगे ज्योतिषी ॥ सत्य माने या लोकांसी ॥ तो ग्रहो दृष्टीसी दिसेना ॥ ९५ ॥ दृष्टिसृष्टीचा जो न्यावो ॥ तो ज्योतिषशास्त्री सत्य पहाहो ॥ न दिसे त्याचा अस्तभावो ॥ दिसे तो पहाहो पूजिती ॥ ९६ ॥ अभ्राआड ग्रहण झालें ॥ देखिलें तेथें पर्व फावलें ॥ न दिसे ते देशीं नाहींच झालें ॥ येणेंही बोलें वर्त्तती ॥ ९७ ॥ रविचंद्रांहूनि आँरती ॥ राहूकेतूंची असे वस्ती ॥ ते जैं मंडळाआड येती ॥ तैं ग्रासिलें ह्मणती रविचंद्रां ॥ ९८ ॥ राहु सूर्या गिळिता साचें ॥ तैं तोंड जळतें राहूचें ॥ मंडळीं मंडळ आड ये त्याचें ॥ हें सर्वथा साचें संमत ॥ ९९ ॥ सूर्य सूर्यमंडळीं राज्य करी ॥ त्याच्या सर्वग्रासाची थोरी ॥ ज्योतिषी सांगे घरोघरीं ॥ तें देखोनि नरीं महाशब्द कीजे ॥ २०० ॥ सूर्य सर्वग्रासाचिया गोठी ॥ जगीं एक बोंब उठी ॥ शेखीं रविराहूंसि नाहीं भेटी ॥ स्पर्शही शेवटीं असेना ॥ १ ॥ ग्रहचक्र वेगें चळतां पाही ॥ रविचंद्रांसि कां चालणें नाहीं ॥ ते निश्चळ निज राज्याच्या ठायीं ॥ न चालतां पाहो चालती ॥ २ ॥ रविलोकाहूनि वरी ॥ चंद्रलोक लक्षांतरीं ॥ चंद्रलोकाहूनि दूरी ॥ लक्षांतरीं ताँरा लोक ॥ ३ ॥ तारालोकाहूनि वरी ॥ बुधलोक दोंलक्षांतरीं ॥ बुधलोकाहूवि वरी ॥ दोंलक्षांतरीं शुक्रलोक ॥ ४ ॥ मिळोनियां दैत्यगण ॥ ज्याच्या चरणा येती शरण ॥ नित्य घालिती लोटांगण ॥ तो शुक्राचार्य जाण दैत्यगुरु ॥ ५ ॥ शुक्रलोकाहूनि दोंलक्षांतरीं ॥ भौमं लोक वसे वरी ॥ भौमलोकाहूनि दोंलक्षांतरीं ॥ देवगुरु करी निजवासू ॥ ६ ॥ ज्याचे चरण वंदिती देव ॥ इंद्र चंद्र वरुणादि अँर्क ॥ नित्य येती आवश्यक ॥ तो बृहस्पतिलोक गुरूचा ॥ ७ ॥ त्याहीवरी लक्ष दोनी ॥ सूर्यसुत वसे शनी ॥ लक्षांतरें तेथूनी ॥ सप्तऋषिजनीं निवासु ॥ ८ ॥ सप्तऋषींची ऋषिपंक्ती ॥ तेथेंचि वसे अरुंधती ॥ त्यावरी वसे अमरावती ॥ इंद्रसंपत्तीसमवेत ॥ ९ ॥ जेथ अंगें वसे

---

१ फिरवितो. २ महिन्यानें. ३ अलीकडे. ४ नक्षत्रलोक. ५ मंगळाचा लोक. ६ बृहस्पति. ७ सूर्य. ८ इंद्रपुरी.

इंद्र जाण ॥ ऐरावतीं आरोहण ॥ पार्षद[१]गण मरुद्गण ॥ सुरसेना जाण जयाची ॥ २१० ॥ उच्चैःश्रवा वारू[२] जाण ॥ कल्पतरूंचें उ
द्यान[३] ॥ कामधेनूंचें गोधन ॥ नंदनवन क्रीडेसी ॥ ११ ॥ जेथिंच्या पायऱ्या चिंतामणी ॥ रंभा उर्वशी विलासिनी ॥ अष्टनायिका ना
चणीं ॥ ज्याच्या रंगणीं नांदती ॥ १२ ॥ येणें वैभवें अमरावती ॥ इंद्र तेथील अधिपती ॥ येथूनि स्वर्गाची समाप्ती ॥ त्रैलोक्य निश्चि
तीं या नांव ॥ १३ ॥ आतां त्रैलोक्याबाहेरी ॥ एकलक्ष योजनावरी ॥ भक्तकृपाळू श्रीहरी ॥ ध्रुवमंडळ करी कृपेनें ॥ १४ ॥ त्रिलोकीं
होतां प्रळयकाळ ॥ ध्रुवासि कदा नव्हे चळ ॥ तो सर्वदा अचळ ॥ यालागीं अढळ[४] ध्रुवपद ॥ १५ ॥ पृथ्वीपासोनि कोटियोजन ॥ मह
र्लोक वसे जाण ॥ तेथ वसती कल्पायु[५] जन ॥ तें वसतिस्थान तयाचें ॥ १६ ॥ तेथूनि कोटियोजनें देख ॥ वरुता असे जनोलोक ॥ ते
थ वसती सनकादिक ॥ ऊर्ध्वरेते[६] देख महायोगी ॥ १७ ॥ तेथूनि दोनकोटीअधिक ॥ वसताहे तपोलोक ॥ तेथील निवासी आवश्यक ॥
वैराजदेव देख तपस्वी ॥ १८ ॥ तपोलोकाहूनि देख ॥ चौकोटी[७] उंच अधिक ॥ तेथ वसताहे सत्यलोक ॥ तेथील नायक चतुरानन[८] ॥ १९ ॥
तेथ मूर्तिमंत चारी वेद ॥ मूर्तिमंत धर्म प्रसिद्ध ॥ मूर्तिमंत ब्रह्मचर्य शुद्ध ॥ तपही विशद मूर्तिमंत ॥ २२० ॥ गायत्री मूर्तिमंत तेथ ॥
वाचा मूर्तिमंत वर्त्तत ॥ दया मूर्तिमंत नांदत ॥ योग मूर्तिमंत ब्रह्मसदनीं ॥ २१ ॥ तेथ अग्नि तिनी[९] मूर्तिमंत ॥ ते एकरूपें त्रिधा[१०] भा
सत ॥ सत्य सत्यलोकीं मूर्तिमंत ॥ असत्य तेथ असेना ॥ २२ ॥ तेलोकीं वसते कोण लोक ॥ गायत्रीमंत्र जे जापक ॥ जे ब्राह्मणतीर्थ
प्राशक ॥ जे यागउपासक निष्काम ॥ २३ ॥ जे ब्राह्मणकार्यीं निमाले ॥ जे गोसंरक्षणीं जीवें गेले ॥ जे परोपकारार्थ वेंचले ॥ ते पावले
सत्यलोक ॥ २४ ॥ जे निष्काम द्विजां भजले ॥ जिहीं निष्काम द्विज पूजिले ॥ जिहीं निष्काम द्विज भोजिले[११] ॥ ते पावले सत्यलोक ॥ २५ ॥ जे
कृपाळु दीनार्थ देख ॥ जे कृपाळु बंधमोचक ॥ जे सत्यवादी सात्विक ॥ ते सत्यलोकनिवासी ॥ २६ ॥ जे परापवादीं[१२] मूक ॥ परदारानपुंसक ॥
जे परद्रव्या पराङ्मुख ॥ ते सत्यलोकनिवासी ॥ २७ ॥ ऐशी सत्यलोकींची स्थिती ॥ तेथींचा ब्रह्मा अधिपती ॥ ब्रह्मसृष्टि याहीवरती ॥ नाहीं
निश्चितीं उद्धवा ॥ २८ ॥ ब्रह्मांडाहूनि वेगळा ॥ कैलास निर्माण करी भोळा ॥ वैकुंठ रची घनसांवळा ॥ हे लोक स्वलीळा निर्मित ॥ २९ ॥
होतां ब्रह्मांडा घडमोडी ॥ वैकुंठ कैलास नलगे वोढी ॥ तेथील वस्तीची अभिन्न गोडी ॥ हरिहरभक्त फुडी जाणती ॥ २३० ॥ तेथ ना
हीं काळाचें गमन ॥ नाहीं कर्माचें कर्मबंधन ॥ तेथ नाहीं जन्म मरण ॥ हें भक्त अनन्य[१३] पावती ॥ ३१ ॥ वैकुंठकैलासरचना ॥ सांगतां

---

१ सभासद. २ घोडा. ३ बाग. ४ निश्चल. ५ एक कल्पवर्ष आयुष्य ज्यांचें असे. ६ कधीं रेतस्खलन होणारे असे. ७ चार कोटी. ८ ब्रह्मा. ९ दक्षिणाग्नि, गार्हपत्य, आहवनीय. १० तीन प्रकारचे. ११ भोजन करविलें. १२ दुसऱ्याचे दोष काढण्याविषयीं. १३ एकनिष्ठ.

मन मुके मनपणा ॥ तेलोकींची लोकलक्षणा ॥ ऐक विचक्षणा सांगेन ॥ ३२ ॥ सकळब्रह्मांडाबाहेरी ॥ माया आवरणाभीतरीं ॥ वै
कुंठ कैलास हरहरीं ॥ स्वलीलेकरीं निर्मिजे ॥ ३३ ॥ सकळजीवां सुखकरू ॥ कैलासीं वसे शंकरू ॥ जो कां पार्वतीपरमेश्वरू ॥ जो यो
गेश्वरू योगियां ॥ ३४ ॥ जटाजूटीं गंगाधर ॥ पिनाकपाणी[1] पंचवक्त्र[2] ॥ कर्पूरगौर गोक्षीर ॥ अभयवरदकर निजभक्तां ॥ ३५ ॥ त्रिमा
त्रातीत त्र्यंबक ॥ त्रिपुटीत्रिपुरत्रिपुरांतक ॥ त्रिविधतापउच्छेदक ॥ तिनीलोक सुखकारी ॥ ३६ ॥ नागभूषणीं शोभे लीला ॥ रुद्राक्षयु
क्त रुंडमाळा[3] ॥ नीळकंठ जाश्वनीळा ॥ भस्मोद्धूलीधूसर ॥ ३७ ॥ त्रिशूळडमरांकितकर ॥ त्रिनेत्र व्याघ्राजिन अंबर ॥ रामनामीं अ
तितत्पर ॥ करी निरंतर जपमाळा ॥ ३८ ॥ सहस्रबाहु[4] बळिपुत्र बाण ॥ शृंगी भृंगी चंडी पार्षद पूर्ण ॥ साठी सहस्र रुद्रगण ॥ कात्या
त्रिशूळ जाण झेलिती ॥ ३९ ॥ गणेश स्वामिकार्तिक ॥ नंदी पंचमुखासंमुख[5] ॥ वीरभद्र सेनानायक ॥ जेणें लाविली सीक[6] दक्षासी
॥ २४० ॥ भूत प्रेत पिशाचक ॥ महाप्रमथ ज्याचें सैन्यक ॥ अवघे शिवांकित देख ॥ शिवनामघोष गर्जती ॥ ४१ ॥ शंभु शिव शू
ली शंकर ॥ उमाकांत कर्पूरगौर ॥ भव शर्व भवानीवर ॥ कपर्दी ईश्वर महादेव ॥ ४२ ॥ हरहरशंकरनामोच्चारीं ॥ धाकें कळिकाळ
पळे दूरी ॥ शिवनामें गर्जे सदा गौरी[7] ॥ गिरीश राज्य करी तेठायीं ॥ ४३ ॥ जेथ शिवनामाचा उच्चार ॥ तेथ सुखेंसीं तिष्ठे शंकर ॥
भक्तकृपाळु ईश्वर ॥ भोळा निरंतर भावार्थ्यां ॥ ४४ ॥ निजदासांचे[8] त्रिगुण वैरी ॥ छेदावया त्रिशूळ करीं ॥ निजडमरूच्या गजरीं ॥
पापाची उरी[9] उरोंनेदी ॥ ४५ ॥ कैलासीं तृणतरु समस्त ॥ पशु पक्षी जे जे तेथ ॥ ते अवघेचि शिवांकित ॥ सर्वरूपें समस्त शिवू नांदे
॥ ४६ ॥ यापरी ब्रह्मांडाबाहेरी ॥ शिवू स्वलीला निर्माण करी ॥ नेमूनियां कैलासगिरी ॥ शंभु राज्य करी भवानीशीं ॥ ४७ ॥ आतां
वैकुंठींची स्थिती ॥ ऐक सांगेन तुजप्रती ॥ जे ऐकतां चित्तप्रकृती ॥ स्वानंदस्फूर्ती वोसंडे ॥ ४८ ॥ ऊंस गाळूनि काढिजे सार ॥ त्याची
आळूनि[10] कीजे साकर ॥ तिचेही नाना प्रकार ॥ करिती नानाकार अतिकुशळ ॥ ४९ ॥ तेवीं चैतन्यचि निश्चितें ॥ मुसांवूनि श्रीभगवं
तें ॥ वैकुंठ रचिलें तेथें ॥ निजसामर्थ्यें नांदावया ॥ २५० ॥ स्वलीला सगुण साकार ॥ सुकुमार अतिसुंदर ॥ घनश्याम मनोहर ॥ मू
र्ति चिन्मात्र चोखडी ॥ ५१ ॥ शंख चक्र पद्म गदा ॥ चारी भुजा सायुधा ॥ डोळे लांचावले आनंदा ॥ सगुण गोविंदा देखोनी ॥ ५२ ॥
मुकुटकुंडलें मेखळा ॥ कांसे[11] मिरवे सोनसळा ॥ कौस्तुभ झळके गळां ॥ आपाद वनमाळा शोभत ॥ ५३ ॥ चरणींची गंगा अतिपुनीत ॥

---

१ पिनाकनांवाचें धनुष्य हातांत ज्याच्या असा. २ पांचमुखाचा. ३ मनुष्यांच्या शिराच्या माळा. ४ हजार हातांचा. ५ शिवासमोर. ६ शिक्षा. ७ पार्वती. ८ भक्तांस. ९ शेष. १० आटवून. ११ कमरेस.

जे जगातें पवित्र करित ॥ ते माथां वाहे उमाकांत ॥ निजस्वार्थ देखोनी ॥ ५४ ॥ त्या श्रीहरीचें पदद्वंद्व[1] ॥ वानितां मुका झाला वेद ॥ अगम्य हरीचें निजपद ॥ महिमा अगाध हरिचरणीं ॥ ५५ ॥ पाहतां मुकुंदाचें श्रीमुख ॥ फिकें झालें पीयूख[2] ॥ डोळ्यां झालें परमसुख ॥ धन्य श्रीमुख हरीचें ॥ ५६ ॥ ज्याचें निमेषार्ध[3] देखिल्या मुख ॥ हारपे[4] कोटिजन्मांचें दुःख ॥ त्रिलोकीं न माय हरिख ॥ धन्य श्रीमुख हरीचें ॥ ५७ ॥ ज्याचा देखिलिया वदनेंदू ॥ बाधूं न शके द्वंद्वबाधू ॥ चढता वाढता परमानंदू ॥ स्वानंदकंदू जगाचा ॥ ५८ ॥ जयाची विक्षेपभ्रुकुटी ॥ रची ब्रह्मांडें उठाउठी ॥ ज्याचे रोमकूपीं[5] ब्रह्मांडें कोटी ॥ तो हरि वैकुंठीं नांदत ॥ ५९ ॥ ज्याची झालिया कृपादृष्टी ॥ अहंकाराची विरे[6] गांठी ॥ दुसरें दिसोंनेदी सृष्टीं ॥ तो हरि वैकुंठीं नांदत ॥ २६० ॥ जया दादुल्याचें नाम ॥ निर्दाळी गा मरण जन्म ॥ समूळ उपडी कर्माकर्म ॥ तो पुरुषोत्तम नांदत ॥ ६१ ॥ ते वैकुंठीं पाहतां साचार ॥ अवघे चतुर्भुज नर ॥ घनश्याम पीतांबरधर ॥ शंखचक्र अवघ्यांसी ॥ ६२ ॥ अवघ्यांचें एक स्वरूप ॥ अवघे दिसती एकरूप ॥ जेथ हरि नांदे स्वयें सद्रूप ॥ तेथ कोणी कुरूप दिसेना ॥ ६३ ॥ तेथ नाहीं आधिव्याधी ॥ नाहीं विषयवार्ता उपाधी ॥ स्त्रीपुरुषां समान बुद्धी ॥ जाण त्रिशुद्धी उद्धवा ॥ ६४ ॥ तेथ नाहीं तहान भूक ॥ नाहीं कामक्रोध द्वंद्वदुःख[7] ॥ नाहीं जन्ममरण निःशेख ॥ ऐसा वैकुंठलोक नांदत ॥ ६५ ॥ लक्ष्मीनें करावें अवलोकन ॥ यालागीं कष्टती सुरगण ॥ ते लक्ष्मी अंगें आपण ॥ करी संमार्जन वैकुंठीं ॥ ६६ ॥ ते वैकुंठीं जगन्नाथ ॥ उद्धरावया निजभक्त ॥ स्वलीलां असे नांदत ॥ दीनकृपायुक्त दयाळू ॥ ६७ ॥ अंतीं नाममात्र घेतल्यासाठीं ॥ उद्धरल्या जीवकोटी ॥ तो स्वामी श्रीविष्णु वैकुंठीं ॥ दीनकृपादृष्टी नांदत ॥ ६८ ॥ जैसा ज्यासि भावार्थ ॥ तैसा पुरवी मनोरथ ॥ पढिये पंचम पुरुषार्थ ॥ तो हरि नांदत वैकुंठीं ॥ ६९ ॥ लोकलोकांतरगणना ॥ ब्रह्मांडसंख्या अवघी जाणा ॥ वैकुंठकैलासरचना ॥ समूळ विवंचना सांगीतली ॥ २७० ॥ लोक सांगीतले भिन्नभिन्न ॥ तेथील प्राप्तीचे कोण जन ॥ ऐसे कल्पील तुझें मन ॥ ते अर्थीं[8] निरूपण अवधारीं ॥ ७१ ॥ महर्जनतपःसत्यलोक ॥ वैकुंठरचना अलोलिक ॥ तेथील प्राप्तीचे कोण लोक ॥ ते यदुनायक सांगत ॥ ७२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ योगस्य तपसश्चैव न्यासस्य गतयोऽमलाः ॥ महर्जनस्तपः सत्यं भक्तियोगस्य मद्गतिः ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ निश्चळ करावया निजचित्ता ॥ साधिली प्राणापानसमता ॥ षट्चक्रें[9] भेदूनि तत्त्वतां ॥ पुढें निजात्मता पाववी ॥ ७३ ॥ तंव आयुष्या झालें अस्तमान ॥ निजांगीं आदळे मरण ॥ ऐसे निमाले जे योगीजन ॥ त्यांसि ऊर्ध्व गमन महर्जनादिलोकीं ॥ ७४ ॥ जो कां नैष्ठिक ब्रह्मचारी ॥ ब्रह्मचर्यनेमें व्रतधारी ॥ जो स्वप्नींही नातळे[10] नारी ॥ जो

---

१ दोनी पाय. २ अमृत. ३ अर्धनिमेषपर्यंत. ४ दूर होतें. ५ रोमाच्या छिद्रांत. ६ तुटते. ७ शीतोष्ण इत्यादिकांचें. ८ विचार. ९ आधारादि सहा चक्रें. १० संबंध करीत नाहीं.

भिक्षाहारी सर्वदा ॥ ७५ ॥ जो सदा धडधडीतविरक्ती ॥ एक भिक्षा न धरी हातीं ॥ सद्गुरूचिया सेवा करिती ॥ आत्मज्ञानप्राप्ती पा
वया ॥ ७६ ॥ जे संधीं[1] व्हावें आत्मज्ञान ॥ ते संधीसि आलें मरण ॥ ऐसा ब्रह्मचारियांसि जाण ॥ ऊर्ध्व गमन महर्जनादिलोकीं ॥ ७७ ॥
जे गृहस्थाश्रमीं नेटक ॥ जे अग्निसेवें साग्निक ॥ जे स्वधर्मचित्तशोधक ॥ जे सेवक द्विजदेवां ॥ ७८ ॥ जे भूतदयाळु भाविक ॥ जे स
त्यवादी सात्विक ॥ जे निजात्मज्ञानसाधक ॥ जे अवंचक[2] गुरुभजनीं ॥ ७९ ॥ गुरुकृपा साधूनि ज्ञान ॥ पावावें ब्रह्म सनातन ॥ तंव
वेंचलें[3] आयुष्यधन ॥ अंगीं निधन[4] आदळलें ॥ २८० ॥ तेणें खोळंबली ब्रह्मप्राप्ती ॥ परी ऊर्ध्वलोकीं होय गती ॥ तैशी उपासना वि
रक्ती ॥ तेणें तारतम्यें जाती महर्जनादिलोकीं ॥ ८१ ॥ जे वनवासी वानप्रस्थ ॥ जे वैराग्यें अतिविरक्त ॥ जे कंदमूळफळीं तृप्त ॥ जे
सदा नेमस्त आश्रमधर्मीं ॥ ८२ ॥ वर्षाकाळीं आकाशीं[5] राहे ॥ हेमंतऋतीं जळाशयें ॥ उष्णकाळीं पंचाग्नि साहे ॥ तपश्चर्या वाहे अ
तिनिष्ठा ॥ ८३ ॥ शरीरशोषणाचें पाहे ॥ सर्वथा न धरी भये ॥ स्वार्थाचेनि लवलाहें ॥ तपोनिष्ठा साहे दारुण ॥ ८४ ॥ वैराग्य साधू
नि पूर्ण ॥ करावें संन्यासग्रहण ॥ साधावया ब्रह्मज्ञान ॥ तेचिकाळीं मरण वोढवलें ॥ ८५ ॥ ऐसेनि देहांतस्थिती ॥ त्यासि ऊर्ध्वलोकीं
होय गती ॥ महर्जनतपोलोकप्राप्ती ॥ तारतम्यस्थिती उपासना ॥ ८६ ॥ जो समूळ संकल्पसंन्यासी ॥ लोकलोकांतर न घडे त्यासी ॥ हें
नटकें गा जयासी ॥ आणि झाले संन्यासी विधियुक्त ॥ ८७ ॥ जे कां पोटींहून अतिविरक्त ॥ स्वप्नीं धातूसि न लाविती हात ॥ जे य
तिधर्मीं सदा निरत ॥ जे सदा जपत प्रणवातें ॥ ८८ ॥ अंगीकारिले आश्रमविधी ॥ उबगू न मानी जो त्रिशुद्धी ॥ मरणीं डंडळीना[6]
बुद्धी ॥ त्या गमनसिद्धी सत्यलोकीं ॥ ८९ ॥ ऐसे सत्यलोकातें पावती ॥ तेथिल्या भोगाची ज्यां विरक्ती ॥ ते ब्रह्म्यासवें मुक्त होती ॥
येर ते येती माघारे ॥ ९० ॥ ज्यांसि सत्यलोकीं भोगासक्ती ॥ ते खचोनि माघारे येती ॥ इतरलोकांची कोण गती ॥ पुनरावृत्ती सोडीना ॥ ९१ ॥
जेथवरी भोगासक्ती ॥ तेथवरी पुनरावृत्ती ॥ जेथ भोगाची निवृत्ति ॥ तेथ चारी मुक्ती आंदण्या ॥ ९२ ॥ ज्या लोकीं ज्या भोगविरक्ती ॥ तेथूनि
ते पुढारे जाती ॥ जे लोकीं ज्या भोगासक्ती ॥ ते खचोनि पडती भूलोकीं ॥ ९३ ॥ तैशी नव्हे माझी भक्ती ॥ भक्तां नाहीं इतरप्राप्ती ॥
मद्भक्तां माझी गती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ९४ ॥ जे सकाम माझी सेवा करिती ॥ त्यांसि कामनाफळीं पडे वस्ती ॥ ज्यांसि नि
ष्काम माझी भक्ती ॥ त्यांसि माझी प्राप्ती अनन्य ॥ ९५ ॥ सकाम भक्तांचे पुरवूनि काम ॥ त्यांसि मी करीन नित्य निष्काम ॥ निज
भक्तांसि निजधाम ॥ मी पुरुषोत्तम पाववीं ॥ ९६ ॥ यालागीं गोपींची कामासक्ती ॥ म्यांचि आणूनि निष्कामस्थितीं ॥ त्यांसि दिधली

---

[1] वेळीं. [2] निष्कपट. [3] संपलें. [4] मरण. [5] परजन्यवृष्टींत. [6] चंचल होईना. [7] उपभोगास.

सायुज्यमुक्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ९७ ॥ म्यां गोपिकांसि कामू केला ॥ कीं निःशेष कामू त्यांचा हरिला ॥ न विचारितां या बोला ॥ कृष्ण व्यभिचरला[1] मूर्ख ह्मणती ॥ ९८ ॥ सलोकता आवडे भक्तांसी ॥ तैं मी करीं वैकुंठवासी ॥ भक्त मागे समीपतेसी ॥ करीं मी तयासी जिवलग ॥ ९९ ॥ हितगुज आळोंचेसी ॥ हृदयींचें गोड सांगावयासी ॥ उद्धवा तूं जैसा आवडशी ॥ ऐशीच त्यांशीं करीं प्रीति ॥ ३०० ॥ भक्त मागे सरूपता ॥ त्यासि मी दें चतुर्भुजता ॥ शंखचक्रादि सायुधता ॥ घनश्यामता सुरेख ॥ १ ॥ मुकुटकुंडलें मेखळा ॥ कासे मिरवे सोनसळा ॥ वांकी तोडरू चरणकमळा ॥ कौस्तुभ गळां मत्सम ॥ २ ॥ ठाण माण गुण लक्षण ॥ वीर्य शौर्य गांभीर्य पूर्ण ॥ रूप रेखा समसमान ॥ दोघेही अन्यून[2] सरूपतां ॥ ३ ॥ रमा दोघांसि एकत्र देखे ॥ देवो कोण हें तों नोळखे ॥ पार्षद्क्रिया ठकली ठाके ॥ कोणासि सेवकें सेवावें ॥ ४ ॥ छत्रधरू वंचके[3] चित्तीं ॥ कोणावरी धरूं छत्री ॥ चवरधर चवरें हातीं ॥ कोणाप्रती विंजावें ॥ ५ ॥ नमना येती ब्रह्मादिदेव ॥ तेही मानिती अति अपूर्व ॥ दोंमाजी कोण आदिदेव ॥ त्यांसिही स्वयमेव कळेना ॥ ६ ॥ जेवीं दीपें दीपू लाविला ॥ न कळे वडील कोण धाकुला ॥ तेवीं माझी सरूपता पावला ॥ नवचे[4] ओळखिला आनासी ॥ ७ ॥ जेवीं आरिशाचें प्रतिबिंब ॥ दिसे समरूपें स्वयंभ ॥ तैशी सरूपतेची शोभ ॥ सम विडंब दोहींचा ॥ ८ ॥ देवो होऊनियां प्रसन्न ॥ आपुली सरूपता दे संपूर्ण ॥ नेदी हृदयींचा द्विजचरण ॥ श्रीवत्सलांछन आनासी ॥ ९ ॥ श्रीवत्स चिह्न द्यावयासि पाही ॥ विष्णु ह्मणे मज सामर्थ्य नाहीं ॥ तें असे ब्राह्मणाच्या पायीं ॥ त्याचा चरण हृदयीं धरिल्या लाभे ॥ ३१० ॥ सरूपतेमाजी जाण ॥ देवा भक्तांची हेचि खूण ॥ ज्याचे हृदयीं श्रीवत्सलांछन ॥ तो स्वामी श्रीविष्णु जाण सर्वांचा ॥ ११ ॥ ऐशी सरूपता जरी झाली प्राप्त ॥ तरी हा देवो मी एक भक्त ॥ हा भिन्नत्वाचा भेद किंचित ॥ त्या आंत उरला असे ॥ १२ ॥ देवभक्तांमाजी भेदू ॥ भिन्न सरूपतासंवादू ॥ जंव नाहीं अद्वयबोधू ॥ तंव परमानंदू प्रकटेना ॥ १३ ॥ सांडूनि भिन्न भेदवार्ता ॥ भक्त मागे सायुज्यता ॥ ते गोड निरूपण कथा ॥ तेथील स्वादता मी जाणें ॥ १४ ॥ सायुज्याचें गोडपण ॥ माझें मी जाणें आपण ॥ उद्धवा तुज तेंही जाण ॥ सांग संपूर्ण सांगेन ॥ १५ ॥ देह सरूपता सारिखेपण ॥ हृदयीं भिन्न मीतूंपण ॥ ऐशियेही मुक्तीशि जाण ॥ भक्त सज्ञान नातळती ॥ १६ ॥ मी होऊनियां मातें ॥ भजन स्वतःसिद्ध आइतें ॥ तें सांडूनियां भेदातें ॥ निजभक्त चित्तें नातळती ॥ १७ ॥ देवेंसि भक्त अनादिसिद्ध ॥ ठायीं मूळींहून अभेद ॥ तेथ भेदूनि[5] जो धरी भेद ॥ तो भक्तिमंद मायिक ॥ १८ ॥ आर्त जिज्ञासु आणि अर्थार्थी ॥ हे भेद नेले मायिकाभक्ती ॥ जे अभेदभावें

---

[1] दोषी झाला. [2] सारखे. [3] संशयांत पडे. [4] जात नाहीं. [5] पृथक् करून.

मज भजती ॥ सायुज्यमुक्ति तयांसी ॥ १९ ॥ ज्यासि रावो रंक समान ॥ वंद्य निंद्य न मनी मन ॥ जे न धरिती देहाभिमान ॥ सायुज्य
जाण तयांसी ॥ ३२० ॥ जैशी आपुली साउली ॥ मिथ्या आपणासवें लागली ॥ तैसी देहबुद्धि ज्यांसि झाली ॥ त्यांसि फळावली[1]
सायुज्यता ॥ २१ ॥ जन्मूनि छाया सरिसी वाढे ॥ माझी हे ममता नुठी पुढें ॥ ऐसे देहाचें न बाधी सांकडें ॥ सायुज्य रोकडें तयासी
॥ २२ ॥ सांडूनि देहाची विषयासक्ती ॥ जो करी भावें अभेदभक्ती ॥ त्यासीचि सायुज्यमुक्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ २३ ॥ ज्यासि
देहीं नुठी मीपण ॥ भूतमात्रीं न देखे तूंपण ॥ त्यासि सायुज्यमुक्ति जाण ॥ सांग संपूर्ण सांपडे ॥ २४ ॥ जेवढी मज आत्म्याची व्यक्ती
॥ तेवढीच त्याची प्रतीती ॥ त्यासीच सायुज्यता मुक्ती ॥ सहज आपैती[2] उद्धवा ॥ २५ ॥ त्यासि विष्णुस्वरूप व्हावा देहो ॥ हा सर्वथा
नुपजे अहंभावो ॥ त्यासि विष्णुसगट स्वदेह वावो ॥ यालागीं सारूप्य पहाहो वांछीना ॥ २६ ॥ निजविवेकें पाहतां ठायीं ॥
देहो तितुका मिथ्या पाही ॥ तेथ सारूप्यता कोणे ठायीं ॥ सज्ञानीं कायी मागावी ॥ २७ ॥ सायुज्यता आलिया हाता ॥ वस्तुवीण
ठावो नाहीं रिता ॥ सकळभूतीं एकात्मता ॥ सायुज्य तत्त्वतां या नांव ॥ २८ ॥ सकळरूपें नांदतें जग ॥ तें जाणे आपुलें अंग ॥ आपण
सर्वात्मा अभंग ॥ त्यासीच सांग सायुज्य ॥ २९ ॥ मी एक सबाह्याभ्यंतरीं ॥ मी एक जंगमीं[3] स्थावरीं[4] ॥ मीचि आत्मा चराचरीं ॥ जाण
त्याचे घरीं सायुज्य नांदे ॥ ३३० ॥ मीचि एक एकला ॥ एकपणेंचि संचला ॥ ज्यासि द्वैताचा दुकाळ पडिला ॥ सत्य पावला सायुज्य
॥ ३१ ॥ एवं भावार्थाच्या अतिप्रीतीं ॥ जें जें निजभक्ता वांछिती ॥ तें तें मी पुरवीं श्रीपती ॥ चारी मुक्ती भक्तांसी ॥ ३२ ॥ यावेगळे
माझे प्रियभक्त ॥ भक्तिप्रतापें प्रतापवंत ॥ भजन शौर्य अतिअद्भुत ॥ निष्काम निरंतर मद्भजनीं ॥ ३३ ॥ आर्त जिज्ञासु अर्थार्थी
॥ या कल्पना न धरोनि हातीं ॥ नित्य निष्काम अतिप्रीतीं ॥ मज भजती महाभाग[5] ॥ ३४ ॥ नेघे सालोक्य सामीप्य सरूपता ॥
शेखीं[6] न मागती सायुज्यता ॥ निष्काम भजती भगवंता ॥ भक्ति तत्त्वतां या नांव ॥ ३५ ॥ नवल भजनाची परवडी ॥ आवडीतें प्रसवे
आवडी ॥ क्षणोक्षण चढोवढी ॥ नित्य नूतन गोडी प्रेमासी ॥ ३६ ॥ माझिया आवडीं तत्त्वतां ॥ सर्वस्वें वेंचितां जीविता ॥ कदा
पालट नव्हे चित्ता ॥ भावार्थता विश्वासी ॥ ३७ ॥ मीच एक देवाधिदेवो ॥ सर्वभूतीं माझाचि भावो ॥ विकल्प विकृति संदेहो ॥ घालितां
पहाहो उपजेना ॥ ३८ ॥ नवल भावार्थाची थोरी ॥ मद्भावें देखे नरनारी ॥ श्वानसूकरादिआकारीं ॥ नमस्कारी मद्भावें ॥ ३९ ॥
नवल त्याची भजनख्याती ॥ सायुज्यादि चारी मुक्ती ॥ माझ्या नांवावरूनि ओंवाळिती ॥ भक्ति पढियंती येणें पाडें ॥ ३४० ॥ मांडल्या

---

[1] प्राप्त झाली. [2] प्राप्त होते. [3] चेतनांत. [4] जडांत. [5] मोठे भाग्यवान्. [6] शेवटीं.

अतिविघ्नसांकडें ॥ ग्लानी[1] न करिती आणिकांकडे ॥ जाणती रामनामापुढें ॥ विघ्न बापुडें तें कायी ॥ ४१ ॥ गगन पडों पाहे कडाडें ॥ पृथ्वी उलथावया गडगडे ॥ ऐसें मांडलिया सांकडें ॥ नाम पढे श्रीहरीचें ॥ ४२ ॥ ऐशी देखोनि अनन्यप्रीती ॥ मी सर्वस्वें भुललों श्रीपती ॥ मग न पाहतां कुळ जाती ॥ त्याच्या घराप्रती मी धांवें ॥ ४३ ॥ ते न घेती वैकुंठींची वाट ॥ त्याचें घरचि मी करीन वैकुंठ ॥ तेथें चिन्मात्रें फुटे पांहाट ॥ पिके पेंठ संतांची ॥ ४४ ॥ उपनिषदें येती तयापाशीं ॥ स्वधर्म ये सुखवस्तीसी ॥ नारदादिसनकादिकांसी ॥ तया घरासी अतिप्रीती ॥ ४५ ॥ गर्जती नामाचे पवाडे ॥ माझी कीर्ति गाती वाडेंकोडें ॥ माझ्या रामनामापुढें ॥ द्वंद्वाचें उडे बाधकत्व ॥ ४६ ॥ ऐशी देखोनि माझी भक्ती ॥ वोरसोनियां निजशांती ॥ धांवोनि ये तयाप्रती ॥ वोळली मागुती जावों विसरे ॥ ४७ ॥ त्यासि छळों ये जें जें दूषण ॥ तें तें त्यासि होय भूषण ॥ माझे भक्तीचें प्रसन्नपण ॥ जाण संपूर्ण या नांव ॥ ४८ ॥ तेथ सायुज्यादि चारी मुक्ती ॥ त्याचे सेवेसि स्वयें येती ॥ ते जेथ विषय सेवूं जाती ॥ तेथ सायुज्यमुक्ती सेवा करी ॥ ४९ ॥ ऋद्धिसिद्धि त्याच्या घरीं ॥ होऊनि राहती कौमारी[3] ॥ तरी तो सिद्धींची चाड नधरी ॥ माझे भक्तीवरी निश्चयो ॥ ३५० ॥ ऐशी देखोनि निश्चयें भक्ती ॥ मीही करीं अनन्यप्रीती ॥ भक्त जेउती[4] वास पाहती ॥ तेउता मी श्रीपती स्वयें प्रकटें ॥ ५१ ॥ भक्त स्वभावें बोलोंजाये ॥ त्याचें बोलणें मीचि होयें ॥ त्याचे बोलण्यासबाह्यें ॥ मीचि राहें शब्दार्थें ॥ ५२ ॥ तो कौतुकें खेळे खडे ॥ ते खडेचि मज होणें घडे ॥ तो कृपाळु पाहे जयाकडे ॥ त्याचे छेदीं मी गाढे[5] भवबंध ॥ ५३ ॥ तो वास पाहे जेणें मोहरीं ॥ तेउती मी सुखाची सृष्टी करी ॥ तो ह्मणे जयातें उद्धरीं ॥ तो मी स्वपदावरी बैसवीं ॥ ५४ ॥ त्यासि अल्पही विचंबु पावे ॥ तो सर्वांगें मी करूं धांवें ॥ त्याचें नाम जिहीं स्मरावें ॥ त्यांसि म्यां तारावें सर्वथा ॥ ५५ ॥ जेवीं तान्हयालागीं माता ॥ तैसी त्या भक्तांची मज चिंता ॥ त्याची सेवाही करितां ॥ मी सर्वथा लाजेना ॥ ५६ ॥ माता बाळकाचें पुरवी कोड ॥ तैसे ते माझे लळे[6]वाड ॥ त्याचें प्रेमचि मज गोड ॥ उपचारचाड मज नाहीं ॥ ५७ ॥ मी शरीर तो माझा आत्मा ॥ प्रेमळ असे पढिया आह्मां ॥ प्रेमळावरती सीमा ॥ भक्तीचा महिमा चढेना ॥ ५८ ॥ त्यासि झणें[7] काळ संहारी ॥ यालागीं त्या आंतबाहेरी ॥ मी निजांगाचें दुर्ग करीं ॥ ऐशी प्रीति पुरी प्रेमळाची ॥ ५९ ॥ तेथ काळाचेनि हटतटें ॥ लावूनि ब्रह्मस्थितीचे वाटे ॥ माझे भक्त नेटेंपाटें ॥ आपणिया आंतवटें स्वसुखें वसवीं ॥ ३६० ॥ त्याचें स्वाभाविक कर्म जाण ॥ तें माझें प्रीतीचें पूजन ॥ तो देखे तें माझें दर्शन ॥ त्याची चावटी तें स्तवन खुणेचें माझें ॥ ६१ ॥ तो स्वयें करी आरोगण[8] ॥ तेंचि मज नैवेद्यअर्पण ॥

---

१ दीनवाणी प्रार्थना. २ मोठ्या त्वरेनें. ३ कामकरी. ४ जेवढी. ५ बळकट. ६ लाडके. ७ कदाचित्. ८ भक्षण.

नि

त्याची निद्रा ते जाण ॥ समाधि संपूर्ण पैं माझी ॥ ६२ ॥ त्याचा निमेषोन्मेषांचा व्यापार ॥ तो मज अत्यंत प्रियकर ॥ त्याच्या विश्वासाचे
परिवार ॥ मज अपार सुखाविती ॥ ६३ ॥ भक्तांची शरीरस्वभावस्थिती ॥ तेणें मी सुखावें श्रीपती ॥ ऐसे सप्रेम भक्त आवडती
॥ माझी अनन्यप्रीती मद्भक्तां ॥ ६४ ॥ चारी पुरुषार्थां नातळती ॥ उपेक्षूनि चारी मुक्ती ॥ सप्रेम करिती माझी भक्ती ॥ मजचि पावती
मद्भक्त ॥ ६५ ॥ गंगा सागरीं मीनली मिळे ॥ मीनली त्याचीच त्यावरी लोळे ॥ तैसा भक्त मिळोनि भावबळें ॥ माझे भक्तीचे सोहळे
मजमाजी भोगी ॥ ६६ ॥ जेवीं कां भरें तरुणांगी ॥ तरुणपण भोगी सर्वांगीं ॥ तेवीं भक्त मिळोनि मजलागीं ॥ माझे भक्तीचें भोगी
वैभव ॥ ६७ ॥ कां सतरावीचें गोडपण ॥ चंद्र जाणें आपुलें आपण ॥ तेवीं मी होऊनि माझें भजन ॥ भक्त सज्ञान जाणती ॥ ६८ ॥
जाति स्वभावें उदक एक ॥ तेंचि गंगा यमुना मी देख ॥ प्रयागसंगमीं उद्धरी लोक ॥ तेवीं भक्त भाविक मद्योगें ॥ ६९ ॥ तेवीं माझे
भक्त मज मिळून ॥ अनन्य करिती माझें भजन ॥ येथ भाविक सात्विक अतिदीन ॥ उद्धरती जाण मद्योगें ॥ ३७० ॥ पृथ्वी निधानें[2]
भरली आहे ॥ परी पायाळेंवीण प्राप्ति नोहे ॥ तेवीं आत्मा स्वतःसिद्ध आहे ॥ गुरुकृपा पाहे ते प्राप्ती ॥ ७१ ॥ चहूं पुरुषार्थांतें त्यागिती ॥
चारी मुक्ति उपेक्षिती ॥ पंचम पुरुषार्थाची भक्ती ॥ मज पढियंती उद्धवा ॥ ७२ ॥ येचि भक्तीचें मज कोडें[3] ॥ हेंचि भक्त माझे लडिवाड
॥ मज अवाप्तकाम त्याची चाड ॥ ऐसें प्रेम गोड तयांचें ॥ ७३ ॥ आह्मीं प्रेमाचे पाहुणे ॥ भावार्थाचे आंदणे ॥ म्यां अनन्याची
सेवा करणें ॥ जीवें प्राणें सर्वस्वें ॥ ७४ ॥ माझें नाम आत्माराम ॥ मी अवाप्तसकळकाम ॥ परी प्रेमळांलागीं सकाम ॥ ऐसें गोड प्रेम
तयांचें ॥ ३७५ ॥ मग आपुलिये संवसाटीं[4] ॥ प्रेमळू घे मी उठाउठी ॥ वरीव सुखही दें शेवटीं ॥ मज प्रीति मोठी प्रेमाची ॥ ७६ ॥
प्रेमळ मजसीं मोलें अधिक ॥ संवसाटीं करितां नव्हे देख ॥ यालागीं वरीव देतां सुख ॥ न ये तैं सेवक सेलेचा होय ॥ ७७ ॥ प्रेमाचा
जिव्हाळा पूर्ण ॥ भावार्थाची उणखूण ॥ जाणता मी एक श्रीकृष्ण ॥ इतरांसि जाण कळेना ॥ ७८ ॥ मज गोपिकांची कोण गोडी ॥
त्यांच्या प्रेमाची जाति चोखडी ॥ यालागीं मज त्यांची आवडी ॥ अतिगाढी उद्धवा ॥ ७९ ॥ कुब्जा काय सुंदर होती ॥ तिच्या प्रेमाची
मज प्रीती ॥ राधा प्रार्थी मी वनाप्रती ॥ काय विषयासक्तीलागूनी ॥ ३८० ॥ कोण भक्ति केली गोपाळीं ॥ काय तीं सोंवळीं कीं
ओवळीं ॥ त्यांचें उच्छिष्ट कवळ मीचि गिळीं ॥ प्रेमसमेळीं[5] डुल्लत ॥ ८१ ॥ पांडवांच्या बाचें मी काय लागें ॥ त्यांचीं वेंवटें[6] सोशीं अनेगें
॥ मी सुदाम्याच्या पायां लागें ॥ काय त्याचेनि पांगें पांगलों ॥ ८२ ॥ मी काय अन्नासि दुकाळलों ॥ तो यज्ञपत्न्यांसी मागों गेलों ॥

---

[1] पाषण्या हाळवण्याचा. [2] ठेव्यानें. [3] अपेक्षा. [4] प्रेमानें. [5] प्रेमाच्या भरांत. [6] त्रास.

मी भावार्थाचा भुकेलों ॥ प्रेमाच्या पावलों पाहुणेरा ॥ ८३ ॥ माझी काय क्षीण झाली शक्ती ॥ मज गोपिका दांवीं बांधिती ॥ त्यांच्या निजप्रेमाची जाती ॥ मी स्वयें श्रीपती पोखिंतू ॥ ८४ ॥ मी न लागतां कोणाची कवडी ॥ अर्जुनाचीं धूतसें घोडीं ॥ धर्माघरीं उच्छिष्टें काढीं ॥ मज आवडी प्रेमाची ॥ ८५ ॥ मज प्रेमळांची अति आवडी ॥ ते लोकेंपणा लाज दवडी ॥ महत्त्वाच्या विसरवी कोडी ॥ त्यांच्या सेवेची जोडी मजलागीं ॥ ८६ ॥ सकळ अळंकार लेऊनि माता ॥ निजपुत्र मस्तकीं लाडवितां ॥ त्याच्या कंटाळेना थुंकमुता ॥ तेवीं प्रेमळें सर्वथा मजलागीं ॥ ८७ ॥ ऐसा प्रेमाचेनि अतिपांगें ॥ म्यां पंगिस्त होइजे श्रीरंगें ॥ यालागीं तया पुढें मागें ॥ सदा सर्वांगें तिष्ठत ॥ ८८ ॥ उद्धवा यादव समस्त ॥ असतां माझें बहुत गोत ॥ तूंचि प्रियकर मज जो येथ ॥ माझें प्रेम अद्भुत तुज माजी ॥ ८९ ॥ हे ऐकोनि देवाची गोठी ॥ उद्धवें पायीं घातली मिठी ॥ देवो सुखावोनि पोटीं ॥ उठाउठी आलिंगी ॥ ३९० ॥ हृदयीं हृदय झालें संलग्न ॥ देहीं देहा पडिलें आलिंगन ॥ मनेंसि मन झालें एकमन ॥ स्वानंदें पूर्ण वोसंडे ॥ ९१ ॥ देवो विसरला देवपण ॥ भक्ता नाठवे भक्तपण ॥ दोघांचें उडालें दोनीपण ॥ स्वानंदीं पूर्ण बुडाले ॥ ९२ ॥ सेव्यसेवकता ठेली[3] गोठी ॥ द्वैतभावाची खुंटली दृष्टी ॥ भक्तिसाम्राज्याच्या पाटीं ॥ दोघां झाली भेटी निजात्मता ॥ ९३ ॥ स्थूळ लिंग आणि कारण ॥ इहीं उपलक्षिजे महाकारण ॥ ते देहचतुष्टयाची आठवण ॥ आठवितें[4] कोण तेठायीं ॥ ९४ ॥ तेथ निबिड आणि निघोट ॥ सुखस्वरूप घनदाट ॥ नाहीं आदि मध्य शेवट ॥ तें झालें प्रकट स्वयंभ[5] ॥ ९५ ॥ नवल देवाचें पूर्णपण ॥ तेथही लाघव केलें जाण ॥ मोडों नेदीचि उद्धवपण ॥ ऐसा भक्त आन मज मिळेना ॥ ९६ ॥ उद्धवा ऐसा मजपाशीं ॥ कोण मिळेल अळोंचासी[7] ॥ माझें निज गोड कोणापाशीं ॥ म्यां सावकाशीं सांगावें ॥ ९७ ॥ मज निजधामा गेलिया जाण ॥ माझें जें निःसीम निजज्ञान ॥ त्यासि उद्धव शुद्ध सांठवण ॥ यालागीं उद्धवपण राखिलें ॥ ९८ ॥ उद्धव स्वानंदीं निमग्न ॥ त्यासि थापटूनि आपण ॥ सावध करी श्रीकृष्ण ॥ येरा भक्तपण आठवलें ॥ ९९ ॥ ह्मणे जयजय श्रीकृष्णनाथा ॥ जें मज सुख दाविलें आतां ॥ तें नित्य निर्वाहे सर्वथा ॥ ऐशी कृपा तत्त्वतां करावी ॥ ४०० ॥ तंव श्रीकृष्ण ह्मणे उद्धवा ॥ हा माझा निजगुह्य गोप्य ठेवा ॥ तुज म्यां सांगीतला कणवा[9] ॥ पुरुषार्थ पांचवा या नांव ॥ १ ॥ हें वेदशास्त्रां अगम्य ॥ सकळदेवांसि अतिदुर्गम ॥ जेणें लाभें मी पुरुषोत्तम ॥ तें हें भक्तिप्रेमरहस्य ॥ २ ॥ मज वश्य करावयाचें वर्म[10] ॥ पोटीं धरावें भक्तिप्रेम ॥ चहूं मुक्तींचा पडे भ्रम ॥ पुरुषार्थांचें काम वोसरे ॥ ३ ॥ ज्यासि माझी सप्रेमभक्ती ॥ ज्याचेनि नांवें विघ्नें पळती ॥ मजवेगळी त्वां

---

१ पोषण करितों. २ लौकिक. ३ राहिली. ४ आठवण करणारें. ५ ब्रह्म, स्वतःच. ६ कौतुक. ७ निजगुज सांगण्यास. ८ राहील. ९ कृपाळुपणानें. १० खूण.

अनन्यगती ॥ करावया प्राप्ती कोणाची ॥ ४ ॥ जयासि माझी अनन्यभक्ती ॥ तेथ माझी पूर्ण कृपास्थिती ॥ मद्भक्तां मजवेगळी गती ॥ कदा कल्पांतीं असेना ॥ ५ ॥ वेदविधीं करावा बोधू ॥ तो निः[1]श्वसित माझा वेदू ॥ जेथ माझा पूर्ण कृपाबोधू ॥ तेथ विधिवादू बाधीना ॥ ६ ॥ जे कां माझे भक्त सकाम ॥ ते फळ भोगिती होऊनि निष्काम ॥ तेही ठाकिती माझें निजधाम ॥ भक्तां अन्यगमन असेना ॥ ७ ॥ ज्यासि माझें अनन्य भजन ॥ स्वकर्म त्याचे सेवी चरण ॥ विधि वेदू वोळंगे अंगण ॥ त्यासि अन्यथागमन असेना ॥ ८ ॥ जेथ सप्रेम नाहीं माझी भक्ती ॥ तेथ कर्में अवश्य बाधिती ॥ कर्मास्तव अन्यथा गती ॥ अभक्त पावती उद्धवा ॥ ९ ॥ जेथ माझी साचार भक्ती ॥ तेथ कर्माची नचले गती ॥ मद्भक्तां माझी प्राप्ती ॥ सत्य निश्चितीं या हेतू ॥ ४१० ॥ भक्तांसि सर्वभूतीं मद्भावो ॥ तेथ कर्मबंधा कैंचा ठावो ॥ कर्मानुगती खुंटली पहाहो ॥ मत्प्राप्ति स्वयमेवो मद्भक्तां ॥ ११ ॥ भक्त पाऊल ठेवी अं[2]वनीं ॥ परी म्यां ठेविलें न धरी मनीं ॥ कर्त्ता भगवंत सत्य मानी ॥ यालागीं कर्मबंधनीं बांधवेना ॥ १२ ॥ भक्तांस नाहीं अन्यथा गती ॥ मद्भक्तां माझी अनन्यप्राप्ती ॥ त्या भक्तभावार्थाच्या युक्ती ॥ विशद श्रीपती स्वयें त्या केल्या ॥ १३ ॥ न मे भक्तः प्रणश्यति ॥ हें बोलिला अर्जुनाप्रती ॥ तें साचार बि[3]रुद श्रीपती ॥ तो भक्तां अनन्यगती घडोंचि नेदी ॥ १४ ॥ भक्तशापाची ऐकतां गोठी ॥ देवो कैवारें सवेग उठी ॥ सुदर्शन लावूनि पाठी ॥ केला हिं[4]पुटी दुर्वासा ॥ १५ ॥ एका अंबरीषाकारणें ॥ दहा गर्भवास सोशिले जेणें ॥ अनन्य भक्तांसि उणें ॥ कोण्याही गुणें येवों नेदी ॥ १६ ॥ भक्तकैवारी श्रीकृष्ण ॥ हे भावार्थाची निजखूण ॥ एका जनार्दना शरण ॥ भावो प्रमाण भक्तांसी ॥ १७ ॥ शुद्धभावेंवीण जे भक्ती ॥ तेचि दांभिक जाण निश्चितीं ॥ ते अपक्वचि राहे प्राप्ती ॥ जेवीं कांकेंड जाती मुगांची ॥ १८ ॥ भक्तियोग्यस्य मद्गती ॥ हें मूळपदींची पदस्थिती ॥ तेंचि तें वाढविलें किती ॥ ऐसें श्रोतीं न ह्मणावें ॥ १९ ॥ मद्गती या पदाची व्युत्पत्ती ॥ कोण आहे जाणे किती ॥ हें रहस्य जाणे वि[6]रळा क्षितीं ॥ यालागीं क्षमा श्रोतीं करावी ॥ ४२० ॥ होकां भक्ति माझी निजजननी ॥ ज्यां प्रेमपान्हा ये वाढवूनी ॥ सरता केलों भगवद्भजनीं ॥ ते म्यां गौण महिमेंनी वानिली ॥ २१ ॥ भगवद्भक्तीचें महिमान ॥ मी केवीं जाणें अज्ञान ॥ जें बोलिलों तें सर्वथा गौणँ ॥ क्षमा पूर्ण करावी ॥ २२ ॥ भक्ति माझी निजमाउली ॥ ते मी आपुल्या बोबडे बोलीं ॥ ग्रंथाधारें गौरविली ॥ सप्रेमभुली भुलोनी ॥ २३ ॥ प्रेमाची निजजाति कैशी ॥ आठवों नेदी आपणेंसी ॥ एवं विसरवूनि हेतूसी ॥ भक्तिरहस्यासी बोलविलें ॥ २४ ॥ जेवीं कां निजबाळकातें ॥ माउली बोल बोलवी त्यातें ॥ तेवीं भक्तीनें मज केलें येथें ॥ म्यां चुकी कोणातें

---

१ श्वासोच्छ्वासरूप. २ भूमीवर. ३ प्रतिज्ञा. ४ गर्वहीन, दीन. ५ कुचर. ६ एकादा. ७ स्वल्प, थोडें. ८ दोष.

ठेवावी ॥ २५ ॥ माउलीचें लोभाळूपण ॥ प्रकट करी तो मूर्ख जाण ॥ याहीपरी मी अज्ञान ॥ चुकलेपण दिसताहे ॥ २६ ॥ उडिदीं काळें जेथिच्या तेथें ॥ तेवीं चुकलेपण माझें येथें ॥ चुकीचि मानावी निश्चितें ॥ हेंही गुरुनाथें वारिलें ॥ २७ ॥ चुकलेपणचि मानितां ॥ मी हेंपाहें कवि कर्त्ता ॥ मीपण नावडे गुरुनाथा ॥ तेणें तें तत्त्वतां सांडविलें ॥ २८ ॥ सांग[1] झालिया कथाकथन ॥ तेणें श्लाघें[2] नघ्यावें मीपण ॥ तंव गुरूनी दावूनि निजखूण ॥ मीतूंपण उडविलें ॥ २९ ॥ हेही हो बोल बोलता ॥ मी नव्हे नव्हे गा सर्वथा ॥ मी नव्हें कवि कर्त्ता ॥ हें गुरूचें तत्त्व गुरु जाणे ॥ ४३० ॥ तंव श्रोते ह्मणती चमत्कार ॥ भक्तिसुखाचें सुखसार ॥ भक्ति परमामृतसागर ॥ उघड साचार तुवां केला ॥ ३१ ॥ भागवत मुख्य भक्तिंप्रधान[3] ॥ जे भक्तीच सुख सनातन[4] ॥ तें करतळामळ[5] करूनि जाण ॥ तुवां परिपूर्ण दाविलें ॥ ३२ ॥ तुवां हा थोर केला उपकार ॥ तरावया स्त्रियादिशूद्र ॥ जग व्हावया भजनतत्पर ॥ भागवतनिजसार काढिलें ॥ ३३ ॥ भागवतींचें गुप्त पीयूख[6] ॥ तें त्वां प्रकटिलें भक्तिसुख ॥ तेणें संत सुखावले देख ॥ श्रोते सकळिक निवाले ॥ ३४ ॥ तुज संतोषोनि श्रीपती ॥ दीधली आपली निजभक्ती ॥ यालागीं तुवां भक्तीची कीर्ती ॥ यथार्थस्थितीं वर्णिली ॥ ३५ ॥ तुझे भक्तीचा एकेक बोल ॥ ब्रह्मसुखेंसि सखोल ॥ त्याहीमाजी प्रेमाची वेल ॥ येताति डोल चित्सुखें ॥ ३६ ॥ तुज वाखाणितां निजभक्ती ॥ प्रेमें वोसंडे चित्तवृत्ती ॥ विसरोनियां ग्रंथस्फूर्ती ॥ भक्तीची कीर्ती वानिशी[7] ॥ ३७ ॥ निज आवडी वाडकोडें ॥ वानितां भक्तीचे पवाडे ॥ तुज नाठवे मागें पुढें ॥ प्रेम गाढें जाणवलें ॥ ३८ ॥ जंवजंव भक्तीचें निरूपण ॥ अधिकाधिक वाढतां जाण ॥ तंवतंव येतसे स्फुरण ॥ तेथ कोण पुरे ह्मणेल ॥ ३९ ॥ जंवजंव निरूपणाची वाडी[8] ॥ तंवतंव भक्तीची अधिक गोडी ॥ तेणें श्रोत्यांची आवडी ॥ चढोवढी वाढली ॥ ४४० ॥ करितां भक्तिसुखनिरूपण ॥ श्रोते वक्ते लांचावले जाण ॥ होतां अमृताची आरोगण ॥ पुरे कोण ह्मणों शके ॥ ४१ ॥ यापरी गा अतिप्रीतीं ॥ वाढली निरूपणीं भक्ती ॥ ते आवरूनियां स्फूर्ती ॥ पुढील ग्रंथार्थीं प्रवर्तत ॥ ४२ ॥ हें ऐकोनि संतवचन ॥ केलें साष्टांग नमन ॥ भली दीधली आठवण ॥ येरवीं निरूपण नांव तें ॥ ४३ ॥ भक्तियोगस्य मद्गती ॥ ये पदाची पदव्युत्पत्ती ॥ निरूपिली भगवद्भक्ती ॥ जेणें भगवत्प्राप्ती सुलभ ॥ ४४ ॥ हे न करितां भगवद्भक्ती ॥ त्रिगुणगुणीं जीवपंक्ती ॥ बांधिल्या संसारीं उन्मंज्जती[9] ॥ हेही स्थिती हरि सांगे ॥ ४५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मया कालात्मना धात्रा कर्मयुक्तमिदं जगत् ॥ गुणप्रवाह एतस्मिन्नुन्मज्जति निमज्जति ॥ १५ ॥ ॥ टीका ॥

---

[1] संपूर्ण. [2] मोठेपणानें. [3] भक्तिच आहे श्रेष्ठ ज्यामध्यें असें. [4] जुनें, अनादिसिद्ध. [5] तळहातांतील आंवळ्याप्रमाणें सुगम. [6] अमृत. [7] वर्णन करितोस. [8] वृद्धि. [9] उत्कृष्ट दशेला पोहोंचतो.

मुख्य मुळीं मी जगाचा धरिता ॥ स्रष्टृरूपें मीचि स्रजिता ॥ विष्णुरूपें मी प्रतिपाळिता ॥ मीचि संहर्त्ता रुद्ररूपें ॥ ४६ ॥ हे त्रिगुण काळाची काळसत्ता ॥ तो मी निजकाळ तत्त्वतां ॥ स्रजिता पाळिता संहर्त्ता ॥ गुणावस्थाविभागें ॥ ४७ ॥ जनांचें वासनाकर्म विचित्र ॥ तेचि काळसत्ता निजसूत्र ॥ तेणें रचिला संसार ॥ चराचर गुणबद्ध ॥ ४८ ॥ गुणकर्में स्वर्गा चढे ॥ गुणकर्मीं नरकीं पडे ॥ नानायोनीचें सांकडें ॥ भोगणें घडे गुणकर्में ॥ ४९ ॥ स्वर्ग भोगूनि वाडेंकोडें ॥ महर्जनतपोलोकांपुढें ॥ सत्यलोकवरी वरता चढे ॥ उन्मज्जन घडे या नांव ॥ ४५० ॥ पशुपक्षिस्थावरांत ॥ वृक्षपाषाणकृमित्व प्राप्त ॥ महानरकीं अधःपात ॥ निमज्जन[2] एथ त्या नांव ॥ ५१ ॥ उंचीं चढोनि नीचीं पडणें ॥ भोगवी नाना जन्ममरणें ॥ तें प्रकृतिपुरुषांचें साजणें ॥ जीवबंधनें भोगवी ॥ ५२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अणुर्बृहत्कृशः स्थूलो यो यो भावः प्रसिध्यति ॥ सर्वोऽप्युभयसंयुक्तः प्रकृत्या पुरुषेण च ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ अणु ह्मणिजे अतिसूक्ष्म सान[3] ॥ बृहत् ह्मणिजे विशाळ जाण ॥ कृश ह्मणिजे किरकोळपण ॥ स्थूळ तें पूर्ण जडावयवीं ॥ ५३ ॥ जेंजें दृष्टिगोचर[4] झालें ॥ जेंजें नांवरूपा आलें ॥ तेंतें उभययोगें केलें ॥ जाण घडलें प्रकृतिपुरुषीं ॥ ५४ ॥ जें उभययोगसंभव ॥ जग ऐसें ज्याचें नांव ॥ तें प्रकृतिपुरुषें सावेवं[5] ॥ तिसरा भाव असेना ॥ ५५ ॥ या दोहींवेगळें निरवयव[6] ॥ जेथूनि या दोहींचा उद्भव ॥ तेचि सद्वस्तु सर्वीं सर्व ॥ देवाधिदेव सांगत ॥ ५६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यस्तु यस्यादिरंतश्च स वै मध्यं च तस्य सत् ॥ विकारो व्यवहारार्थो यथा तैजसपार्थिवाः ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रकृतिपुरुषेंसि साकार ॥ जें दिसताहे चराचर ॥ त्यासि आद्यंतीं जें अनश्वर ॥ तेंचि साचार मध्येंही ॥ ५७ ॥ लेण्याआधीं[7] कनक[8] एक ॥ लेण्याअंतीं तेंचि आवश्यक ॥ मध्येंही लेणेंरूपें देख ॥ भासे कनक अद्वितीय ॥ ५८ ॥ न करितां मातीचें गोकुळ ॥ पूर्वीं मृत्तिकाचि केवळ ॥ गोकुळ मोडल्या सकळ ॥ उरे अविकळ[9] मृत्तिका ॥ ५९ ॥ तेचि गोकुळरूपें असतां ॥ भासे मृत्तिकाचि तत्त्वतां ॥ तेवीं आदिमध्यअवसानता ॥ आभासे चित्सत्ता अनश्वर ॥ ४६० ॥ त्रिगुणगुणें सविकार ॥ जें जग दिसता हे साकार ॥ तें मायिक[10] गा चराचर ॥ जेवीं व्यवहार स्वप्नींचा ॥ ६१ ॥ सकळविकारांचें कारण ॥ अंगीं अविद्या आपण ॥ ते विकारीं स्थापितां जाण ॥ आलें सत्यपण अविद्येसी ॥ ६२ ॥ अविद्या आपुलेनि नांवें जाण ॥ आपुलें नास्तिक्य[11] सांगे आपण ॥ हें वर्म जाणती सज्ञान ॥ नेणोनि अज्ञान[12] मानिती सत्य ॥ ६३ ॥ अविद्या अविद्यात्वें मिथ्या जाण ॥ वस्तु वस्तुत्वें सदसंपन्न ॥ येचि अर्थीचें निरूपण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ६४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदुपादाय पूर्वस्तु भावो विकुरुते परम् ॥ आदिरंतो यदा यस्य तत्सत्यम

---

१ उत्पन्न करणारा. २ बुडणें. ३ लहान. ४ पहाण्यास योग्य. ५ साकार. ६ निराकार. ७ अलंकाराच्या पूर्वी. ८ सोनें. ९ विकाररहित. १० अविद्याकल्पित. ११ नाहींपणा, अभाव. १२ मूढ.

भिधीयते ॥ १८ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रकृति अंगीकारें देख ॥ वस्तुपासाव[1] होती लोक ॥ जेवीं निद्रायोगें एक ॥ होय अनेक निजस्वप्नीं ॥ ६५ ॥ जेवीं तंतूपासाव कोटी पट ॥ कोटिपटीं तंतु एकट ॥ पाहतां आदि मध्य शेवट ॥ द्वैताचें बोट रिघेना ॥ ६६ ॥ तेवीं वस्तूपासोनियां लोक ॥ प्रकृतिपुरुषादि सकळिक ॥ आदिमध्यअवसानीं एक ॥ द्वैतवार्ता देख असेना ॥ ६७ ॥ तंतु सत्य पट मायिक ॥ वस्तु सत्य अविद्यो[2] लटिक ॥ जें आदिमध्यअवसानीं एक ॥ तें सत्य निष्टंक उद्धवा ॥ ६८ ॥ जेवीं कां काष्ठाची बाहुली ॥ काष्ठावयवें शोभे आली ॥ तेवीं वस्तु वस्तुत्वें एकली ॥ शोभा पावली जगत्त्वें ॥ ६९ ॥ जेवीं कां एकलें देह देख ॥ दिसे अवयवरूपीं अनेक ॥ तेवीं वस्तु एकली एक ॥ आभासे अनेकस्वरूपीं ॥ ४७० ॥ जेवीं कां जळीं क्रीडतां जळा ॥ उपजवी तरंगाच्या मौळा[3] ॥ तेवीं वस्तूचिया स्वलीळा ॥ जगदादिमेळा प्रकाशे ॥ ७१ ॥ तरंगा[4] आदिमध्यअवसानीं ॥ जेवीं पाणीपणें असे पाणी ॥ तेवीं उत्पत्तिस्थितिनिदानीं ॥ वस्तु वस्तुपणीं अनश्वर ॥ ७२ ॥ ब्रह्म सत्य प्रपंच वावो ॥ हा साधकां साधावा निर्वाहो ॥ कार्यकारण अभिन्नभावो ॥ देवाधिदेवो बोलिला ॥ ७३ ॥ कार्य कारणीं अभिन्न ॥ तैं ब्रह्मीं माया कैंची भिन्न ॥ जगद्रूपें ब्रह्म परिपूर्ण ॥ अन्योपदेशें जाण दाविलें ॥ ७४ ॥ ब्रह्म माया काळगती ॥ यें तिन्ही अनादि ह्मणती ॥ तेही न घडे उपपत्ती[5] ॥ येचि अर्थीं हरि बोले ॥ ७५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रकृतिर्ह्यस्योपादानमाधारः पुरुषः परः ॥ सतोऽभिव्यंजकः कालो ब्रह्म तत्रितयं त्वहम् ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ ॥ ब्रह्मावेगळी माया ॥ सर्वथा नये आया ॥ ते ब्रह्माधारें वाढोनियां ॥ गुणकार्या वाढवी ॥ ७६ ॥ मायानियंतें ब्रह्म आपण ॥ यालागीं यासि पुरुषपण ॥ पुरुषाची प्रिया माया पूर्ण ॥ प्रकृति अभिधान[6] याहेतू ॥ ७७ ॥ ब्रह्माहून पुरुष भिन्न ॥ हे सर्वथा मिथ्या वचन ॥ ब्रह्मपुरुषनामाभिधान ॥ एकासीचि जाण आलें असे ॥ ७८ ॥ मायाप्रकृति अभिधान ॥ दोहीं नांवीं मायाचि पूर्ण ॥ आविद्यक दावी कार्य भिन्न ॥ अविद्या जाण याहेतू ॥ ७९ ॥ माया ब्रह्मींची शक्ति जाण ॥ तेही ब्रह्मेंसी असे अभिन्न ॥ वेगळी नव्हे अर्धक्षण ॥ सदा सुलीन ब्रह्मेंसी ॥ ४८० ॥ जेवीं शूरांची शौर्यशक्ति पूर्ण ॥ शूरांहोनि नव्हे भिन्न ॥ तेवीं ब्रह्मीं मायाशक्ति जाण ॥ असे सुलीन सर्वदा ॥ ८१ ॥ माया ब्रह्म असतां जाण ॥ क्षोभेंवीण[7] नव्हे सर्जन ॥ मायाक्षोभकू काळ पूर्ण ॥ काळास्तव जन जन्मती ॥ ८२ ॥ ब्रह्मीं चित्सत्ता तो काळ जाण ॥ प्रकृति क्षोभवूनि आपण ॥ दावी उत्पत्तिस्थितिनिधन ॥ तो काळही अभिन्न ब्रह्मेंसी ॥ ८३ ॥ जेवीं रायाच्या राजपुत्राशीं ॥ राजाचि दमूं शके त्यासी ॥ तेवीं झालें जें प्रकृतीचे कुशीं ॥ तें निजसत्तेंसी निर्दळी ॥ ८४ ॥ विवेकदृष्टीं[8] पाहतां जाण ॥ काळ परमात्मा दोन्हीं अभिन्न ॥ प्रकृति

---

[1] ब्रह्मापासून. [2] माया. [3] पंक्ती. [4] लाटांच्या. [5] युक्ति. [6] नांव. [7] प्रेरणेवांचून. [8] विचारदृष्टीनें.

पुरुष काळ जाण ॥ तिहींसी एकपण याहेतू ॥ ८५ ॥ ब्रह्म माया काळसंबंध ॥ हे तिनी मुळींचि अभेद ॥ दिसे जो व्यावहारिक भेद ॥
तोही अभेद मिथ्यात्वें ॥ ८६ ॥ वस्तु एकलीचि आपण ॥ प्रकृतिपुरुषकाळरूपें जाण ॥ अखंडत्वें दावितां पूर्ण ॥ तो मी श्रीकृष्ण परमात्मा
॥ ८७ ॥ उत्पत्तिपूर्वीं मी ब्रह्म पूर्ण ॥ उत्पत्तीचें मी बीज आदिकारण ॥ स्थितिकाळीं मी ब्रह्मरूपें जाण ॥ एकीं अनेकपण स्वलीलां
दावीं ॥ ८८ ॥ स्वलीला सृष्टीचे प्रांतीं[1] जाण ॥ प्रळयीं उरें मी ब्रह्म परिपूर्ण ॥ तेचि अर्थींचें निरूपण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ८९ ॥
॥ श्लोक ॥ ॥ सर्गः प्रवर्त्तते तावत्पौर्वापर्येण नित्यशः ॥ महान् गुणविसर्गार्थः स्थित्यंतो यावदीक्षणम् ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ महान्
ह्मणिजे अतिथोरू ॥ पितृपुत्रप्रवाहें संसारू ॥ अविच्छिन्न[2] निरंतरू ॥ अतिदुर्धरू वाढला ॥ ४९० ॥ अतिशयेंसि दुर्धरू ॥ कैसेनि वाढला
संसारू ॥ तेहीअर्थींचा विचारू ॥ सारंगधरू सांगत ॥ ९१ ॥ विषयांचिये आसक्ती ॥ वासनानिष्ठ झाली वृत्ती ॥ ते देहात्मता अति
प्रीतीं ॥ संसारस्थिती वाढवी ॥ ९२ ॥ खवळला जो देहाभिमान ॥ तो शुद्धासि लावी जीवपण ॥ नानायोनीं जन्ममरण ॥ विशेषें जाण
वाढवी ॥ ९३ ॥ ऐसेन अतिदुर्धरू ॥ स्रष्टें[3] सृजिला संसारू ॥ तो ब्रह्मायुपर्यंत स्थिरू ॥ ब्रह्मप्रळयीं संहारू सृष्टीचा ॥ ९४ ॥ एक
नित्यप्रळयो लागला आहे ॥ एक दैनंदिन प्रळयो पाहे ॥ एक कर्मजन्य प्रळयो लाहे ॥ एक तो होये अवांतर प्रळयो ॥ ९५ ॥ सकळ
प्रळयांच्या शिरीं ॥ ब्रह्मप्रळयाची थोरी ॥ तो सकळसृष्टीतें संहारी ॥ कांहीं संसारीं उरोंनेदी ॥ ९६ ॥ ब्रह्मप्रळयीं नाश सृष्टीसी ॥ पुढती
रचावया कल्पादीसी ॥ उंच नीच नाना योनीसी ॥ नव्या करावयासी कारण काय ॥ ९७ ॥ ब्रह्मप्रळयीं सृष्टीचा ह्रासू ॥ परी निःशेष
नव्हेचि नाशू ॥ उरे वासनाबीजविलासू ॥ सुलीन[4] रहिवासू अविद्येअंगीं ॥ ९८ ॥ तेचि बीज कल्पादि जाण ॥ मीचि स्रष्टृरूपें आपण
॥ मज म्यां अनुग्रहूनि पूर्ण ॥ सूक्ष्म कारण लक्षविलें ॥ ९९ ॥ जेवीं वर्षाकाळीं नानातृणें ॥ वाढूनि शरत्काळीं होती पूर्णें ॥ तींच
उष्णकाळीं बीजकणें ॥ होती सुलीनें पृथ्वीसी ॥ ५०० ॥ सुलीन बीजें पूर्ण क्षितीं ॥ परी तीं कोणा व्यक्ती[5] न येती ॥ तेवीं वासनाबीजें
प्रळयांतीं ॥ उरे अव्यक्तीं संसारू ॥ १ ॥ जेवीं काळीं वरुषलेनि घनें ॥ बीजें विरूढती सत्राणें[6] ॥ वाढती नानाजाति तृणें ॥ पूर्वलक्षणें
यथास्थित ॥ २ ॥ तेवीं उत्पत्तिकाळावरी ॥ सूक्ष्मवासना बीजांकुरीं ॥ नानायोनी चराचरीं ॥ जंगमस्थावरीं जग वाढे ॥ ३ ॥ ब्रह्म्याचे
प्रळयाआंतू ॥ निःशेष सृष्टीचा नव्हे अंतू ॥ यालागीं संसारीं अनंतू ॥ वेदशास्त्रार्थू प्रतिपादी ॥ ४ ॥ ऐसा संसार अनंतू ॥ याचा निःशेष
होय अंतू ॥ तेचि अर्थीं श्रीकृष्णनाथू ॥ श्लोकींचा पदार्थू बोलिला ॥ ५ ॥ स्थित्यंतो यावदीक्षणम् ॥ येणें पदें श्रीकृष्ण ॥ अत्यंत

---

१ शेवटीं. २ अखंड. ३ ब्रह्मयानें. ४ अतिसूक्ष्मस्वरूपानें. ५ स्पष्टतेस. ६ मोठ्या जोरानें.

प्रळयींचें लक्षण ॥ सूत्र[1]प्राय जाण बोलिला ॥ ६ ॥ ईक्षण या पदाचा अर्थ जाण ॥ सद्गुरुकृपादृष्टि पूर्ण ॥ तेंचि माझें रूपावलोकन ॥ जेणें ब्रह्मज्ञान प्रकारो ॥ ७ ॥ पूर्ण प्रकाशल्या ब्रह्मज्ञान ॥ संसार झाला नाहींच जाण ॥ वस्तु वस्तुत्वें परिपूर्ण ॥ मीतूंपण असेना ॥ ८ ॥ तेथ ध्रुवमंडळाची ठेली मात ॥ वैकुंठकैलासां झाला प्रांत ॥ शेषशायीचाही अंत ॥ ब्रह्मज्ञानांत होऊं सरला ॥ ९ ॥ हारपलें मीतूंपण ॥ उडालें देवभक्तभजन ॥ बुडालें साकारतेचें भान ॥ ब्रह्म सनातन सदोदित ॥ ५१० ॥ प्रपंच एक झाला होता ॥ हे समूळ मिथ्या वार्ता ॥ पुढें होईल मा[2]गुता ॥ कदा कल्पांता घडेना ॥ ११ ॥ हें अत्यंतप्रळयाचें लक्षण ॥ भाग्येंवीण न पाविजे जाण ॥ ज्यासि साचार सद्गुरुचरण ॥ ते सभाग्य जन पावती ॥ १२ ॥ अत्यंतप्रळयींची गती ॥ न घडे गा समस्तांप्रती ॥ हे परमनिर्वाणगती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ १३ ॥ ज्याची अहंममता खुंटे ॥ त्याची निःशेष कल्पना तुटे ॥ अत्यंत प्रळयो त्यासीच भेटे ॥ नेटें पाटें निजात्मता ॥ १४ ॥ देह पडलिया हा प्रळयो घडे ॥ हें बोलणें सर्वथा कुडें[3] ॥ जितांचि हा प्रळयो जोडे ॥ वाडेंकोडें निजनिष्ठा ॥ १५ ॥ जितांचि हा प्रळयो जाण ॥ येणें संसारबीजदहन ॥ आतां ब्रह्मप्रळय लक्षण ॥ ऐक संपूर्ण सांगेन ॥ १६ ॥ ब्रह्मांडप्रळयाचा अनुक्रम ॥ तेथ अंतीं उरे पूर्ण ब्रह्म ॥ हें उद्धवें जाणावया वर्म ॥ पुरुषोत्तम बोलत ॥ १७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विराण्मयाऽऽसाद्यमानो लोककल्पविकल्पकः ॥ पंचत्वाय विशेषाय कल्पते भुवनैः सह ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥ चतुर्दशभुवनेंसि ब्रह्मांड ॥ काळें कल्पिलें प्रचंड ॥ तें स्थितिकाळीं पाळूनि अंड ॥ अंतीं नाशाचें बंड आदरी काळू ॥ १८ ॥ तो तूं काळ ह्मणशी कोण ॥ तरी काळात्मा मीचि जाण ॥ तेणें काळें म्यां प्रळ[4]यईक्षण ॥ केलें जाण सृष्टीसी ॥ १९ ॥ पंचभूतांचे भिन्न भाग ॥ काळसत्ता राखिले विभाग ॥ ते सत्ता म्यां आवरितां सांग ॥ खवळे लग[5]बग पंचत्वाची ॥ २० ॥ जैसा उत्पत्तीचा अनुक्रमू ॥ भूतीं भूतलयो सुगमू ॥ तैसाचि प्रळयाचा उपक्रमू ॥ पुरुषोत्तमू सांगत ॥ २१ ॥ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अन्ने प्रलीयते मर्त्यमन्नं धानासु लीयते ॥ धाना भूमौ प्रलीयंते भूमिर्गंधे प्रलीयते ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥ म्यां पाहिल्या प्रळयदृष्टीं ॥ पडोनि ठाके अना[6]वृष्टी ॥ तेणें अन्न क्षीण होय सृष्टीं ॥ अन्नापाठीं शरीरें ॥ २२ ॥ तेथ असे अन्नमयप्राण ॥ हें वचन प्रत्यक्ष प्रमाण ॥ तें अन्न होतांचि क्षीण ॥ अन्नासवें प्राण प्राण्यांचे जातो ॥ २३ ॥ अन्नवृद्धि खुंटल्या धान्य ॥ बीजमात्र राहे आपण ॥ तेंही पृथ्वीसी होय लीन ॥ तत्काळ जाण उद्धवा ॥ २४ ॥ तंव द्वादशादित्यमेळा ॥ एकत्र होय रविमंडळा ॥ तो पीठ[7] करी पर्वतशिळा ॥ तेंही तृण[8]शरां उरोंनेदी ॥ २५ ॥ तेणें तापलें सप्तपाताळ ॥ पोळलें शेषाचें कपाळ ॥ तो वमी विषाग्निकल्लोळ ॥ महाज्वाळ धड

---

[1] थोडक्यांत, अतिसंक्षेपानें. [2] पुनः. [3] कोतें, खोटें. [4] संहार करण्याच्या इच्छेनें अवलोकन. [5] त्वरा. [6] पर्जन्यवृष्टीचा अभाव. [7] भस्म. [8] दर्भ वगैरेस.

धडीत ॥ २६ ॥ तो संकर्षणमुखानळ ॥ पार्थिव[1] जाळी सकळ ॥ ब्रह्मांड जाळोनि तत्काळ ॥ पृथ्वी केवळ भस्म करी ॥ २७ ॥ तेव्हां पृथ्वीचें पृथ्वीपण सरे ॥ तें गंधमात्रस्वरूपें उरे ॥ तोही गंधू जळीं विरे ॥ तेंचि सारंगधरें सांगिजे ॥ २८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अप्सु प्रलीयते गंध आपश्च स्वगुणे रसे ॥ लीयते ज्योतिषि रसो ज्योतीरूपे प्रलीयते ॥२३ ॥ ॥ टीका ॥ ॥ तेव्हां प्रळयमेघांचा मेळा ॥ शुंडादंड धारा प्रबळा ॥ शतवरुषें वर्षतां जळा ॥ सप्तसमुद्रमेळा एकत्र जाहला ॥ २९ ॥ तेणें जळ कोंडलें सुबद्ध ॥ ते जळीं पृथ्वीचा विरे गंध ॥ तेव्हां जळचि एकविध ॥ प्रळयीं प्रसिद्ध उरलें पैं ॥ ५३० ॥ सांवर्तकमेघांचें लक्षण ॥ सिंधु एकत्र करिती पूर्ण ॥ पृथ्वी विरवूनि[3]यां जाण ॥ ते जळीं आपण विरोनि जाती ॥ ३१ ॥ ते काळीं अतिदुर्धर ॥ सांवर्ताग्नी[4] खवळे थोर ॥ तो जळ शोषी सर्वत्र ॥ उरे रसमात्र ॥ अवशेष ॥ ३२ ॥ रसमात्र जळ उरे तेंही ॥ लीन होय तेजाचे ठायीं ॥ तेव्हां तेजचि दिशा दाही ॥ कोंदोनि पाही वोसंडे॥३३॥ सांवर्ताग्नीची मातू ॥ जळ शोषूनि राहे निवांतू ॥ जाळिती शक्ति स्वयें जाळितू ॥ या नांव निश्चितू सांवर्तकाग्नी ॥ ३४ ॥ तेणेंचि काळें झंझामारुत ॥ उठी तेजातें शोषित ॥ तें तेज शोषितां समस्त ॥ उरे तेथ रूप मात्र ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ रूपं वायौ स च स्पर्शे लीयते सोऽपि चांबरे ॥ अंबरं शब्दतन्मात्र इंद्रियाणि स्वयोनिषु ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ तेजाचें जें उरे रूप ॥ तें वायु शोषूनि करी अरूप ॥ तेव्हां वायूचि एकरूप ॥ अति अमूप कोंदाटे ॥ ३६ ॥ कोंदाटल्या वायूसी ॥ गगन जेथिचें तेथें ग्रामासी ॥ तेव्हां वायू प्रवेशे स्पर्शीं ॥ तो उरे अवशेषीं स्पर्शमात्र ॥ ३७ ॥ उरल्या वायूच्या स्पर्शासीं ॥ लयो तत्काळ होय आकाशीं ॥ आकाश प्रवेशे[6] शब्दासीं ॥ उरे अवशेषीं शब्दतन्मात्र ॥ ३८ ॥ दशेंद्रियांची मंडळी ॥ राजसापासोनि जन्मली ॥ ते निजगुणीं सामावली ॥ जेवीं पंचांगुळी मुष्टीमाजी ॥ ३९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ योनिर्वैकारिके सौम्य लीयते मनसीश्वरे ॥ शब्दो भूतादिमप्येति भूतादिर्महति प्रभुः ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ वैकारिक जो सत्वगुण ॥ व्याला देवता अंतःकरणें ॥ प्रळयस्वभावें आपण ॥ मनामाजी जाण प्रवेशे ॥ ५४० ॥ सकळ इंद्रियांचा राजा मन ॥ मनःकल्पना जीवशिवपण ॥ श्लोकपदें मनसीश्वरपूर्ण ॥ मनाशींच जाण हरि बोले ॥ ४१ ॥ मनोदेवता अंतःकरण ॥ घेऊनि प्रवेशे सत्वगुण ॥ ज्या कार्याचें जें कारण ॥ तेथ तीं जाण प्रवेशती ॥ ४२ ॥ शब्दतन्मात्र उरलें आर्धीं ॥ तें मीनलें तामसामधीं ॥ कारणीं कार्यासि[7] अवधी ॥ जाण त्रिशुद्धी उद्धवा ॥४३॥ त्रिविध गुणी अहंकारू ॥ एकवटला महाथोरू ॥ ऐक त्याचा बडिवारू ॥ तोचि दुर्धरू संसारीं ॥ ४४ ॥ जो शिवातें महत्त्वा चढवी ॥ जीवातें देहात्मता गोंवी ॥ अहंममता जग भुलवी ॥ प्रभुत्वपदवी

---

१ पृथ्वीचा विकार. २ प्रलयकालींच्या मेघांचें. ३ बुडवून. ४ प्रलयाग्नि. ५ मोठा सोंसाट्याचा वायु. ६ लीन होतें. ७ कार्याची. ८ समाप्ति.

महत्तत्त्वें येणें ॥ ४५ ॥ अहंकारू ऐसा आहे ॥ तो जैं परमार्थीं साद्य होये ॥ तैं सोहंभावाचेनि लवलाहें ॥ विभांडी पाहे संसारू॥४६॥ चोर जैं विश्वासु मित्र होये ॥ चोर चोरा[1] निवारी पाहे ॥ तेवीं अभिमानु जैं साद्य होये ॥ तैं भवभये[2] बाधीना ॥ ४७ ॥ याहीपरी अभिमान ॥ सामर्थ्यें अतिगहन ॥ यालागीं प्रभुत्वें जाण ॥ केलें व्याख्यान उद्धवा ॥ ४८ ॥ त्रिगुणगुणीं गुणाभिमान ॥ एकत्र होऊनियां पूर्ण ॥ महत्तत्त्वीं होय लीन ॥ अतिसुलीन तद्रूपें ॥ ४९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स लीयते महान्स्वेषु गुणेषु गुणवत्तमः ॥ तेऽव्यक्ते संप्रलीयंते तत्काले लीयतेऽव्यये ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ॥ तेंही महत्तत्त्व येथें ॥ कारणगुणीं लीन होतें ॥ तेंही गुणसाम्य निश्चितें ॥ पावे लयातें अव्यक्तीं[3] ॥ ५५० ॥ आकार विकार समस्त ॥ हारपोनि जाती जेथ ॥ उरे बीजमात्र अवशेषित ॥ त्या नांव अव्यक्त बोलिजे ॥ ५१॥ वटाचा आकार विकार ॥ ना शेंडा मूळ पुष्प पत्र ॥ उरे अवशेष बीजमात्र ॥ तेवीं संसार अव्यक्तीं ॥ ५२ ॥ वटबीज उरलें येथ ॥ तें दृष्टीसि तरकेना निश्चित ॥ तेवीं भवबीज जें अव्यक्त ॥ तें नव्हे व्यक्त जीवासी ॥ ५३ ॥ नाना तृणजातिबीजगहन ॥ उष्णकाळीं काळ करी लीन ॥ तेवीं भवबीज अव्यक्त जाण ॥ होय सुलीन काळेंसी ॥ ५४ ॥ पूर्वीं काळें क्षोभोनि अव्यक्त ॥ जगदाकारें केलें व्यक्त ॥ तेंचि काळयोगें अव्यक्त ॥ सुलीन होत काळेंसी ॥ ५५ ॥ या नांव अव्यक्ताचा पहाहो ॥ काळामाजी बोलती लयो ॥ काळ बोलिजे महाबाहो ॥ त्याचा होय लयो पुरुषेंसी ॥ ५६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कालो मायामये जीवे जीव आत्मनि मय्यजे ॥ आत्मा केवल आत्मस्थो विकल्पापायलक्षणः ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ ॥ पुरुषाची पूर्ण क्षोभकता ॥ तोचि काळ बोलिजे तत्त्वतां ॥ उत्पत्तिस्थितिप्रळयांता ॥ तिनी अवस्था काळाच्या ॥ ५७ ॥ तिनी अवस्था लोटल्या ठायीं ॥ काळासि कर्त्तव्यता नाहीं ॥ तो उपजत व्यापारें पाही ॥ जीवाचेठायीं सामावे ॥ ५८ ॥ अचेतनीं चेतविता ॥ जडातें जो जीवविता ॥ यालागीं जीवू ऐशी वार्ता ॥ जाण तत्त्वतां पुरुषासी ॥ ५९ ॥ प्रकृतीचेनि संगें जाण ॥ शुद्धासि बोले जीवपण ॥ पुरुषें हेंही अभिधान ॥ त्यासीच जाण बोलिजे ॥ ५६० ॥ करितां प्रकृतिविवंचन ॥ केवळ मृगजळासमान ॥ दिसे परी साचपण ॥ सर्वथा जाण असेना ॥ ६१ ॥ मृगजळामाजी जो पडे ॥ तेथ जळ नाहीं मा तो कोठें बुडे॥ तेवीं प्रकृति नसतां जोडे ॥ वाडेंकोडें जीवत्व कोण ॥ ६२ ॥ जळीं बुडालें दिसे व्योम ॥ सत्य मानणें तो मूर्खधर्म ॥ तैसें रूप नाम गुण कर्म ॥ हा मिथ्या भ्रम मायिक ॥ ६३ ॥ प्रवृत्तिकाळींही जाण ॥ सत्य नाहीं जीवपण ॥ तेहीअर्थीची निजखूण ॥ उद्धवा संपूर्ण अवधारी ॥ ६४ ॥ स्वयें अवलोकितां दर्पण[4] ॥ दर्पणामाजी दिसे आपण ॥ तरी आपुलें वेगळेपण ॥ स्वयें आपण जाणिजे ॥६५॥ तेवीं

---

१ दुसऱ्या चोरास. २ संसारभय. ३ प्रकृतींत. ४ आरसा.

प्रकृति कर्म करितां ॥ जरी दिसे प्रकृतीआतौता ॥ तरी मी प्रकृतीपरता ॥ जाण तत्त्वतां उद्धवा ॥६६॥ दिसे व्योम जळीं बुडालें ॥ परी तें नाहीं वोलें झालें ॥ तेवीं प्रकृतिकर्म म्यां केलें ॥ नाहीं माखलें ममांग ॥ ६७ ॥ यापरी करितां निर्वाहो ॥ प्रकृतीचा झाला अभावो ॥ तेव्हां जीवशिवनांवें वावो ॥ जीव तोचि पहाहो परमात्मा ॥ ६८ ॥ जीवाचें गेलिया जीवपण ॥ सहजेंचि उडे शिवपण ॥ दोघेही आत्मत्वें जाण ॥ होती परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ६९ ॥ जीवासि निजस्वरूप आठवो ॥ मायानांवाचा परब्रह्मीं लयो ॥ परमात्मा अज अव्ययो ॥ अविनाश अद्वयो अनंत ॥ ५७० ॥ ब्रह्मीं स्फुरेना ब्रह्मपण ॥ तेथ मी तूं ह्मणे कोण ॥ परमानंद परिपूर्ण ॥ उरे जाण उद्धवा ॥ ७१ ॥ ऐसा परमानंद ह्मणसी कोण ॥ तो मी अज अव्यय श्रीकृष्ण ॥ आनंदस्वरूप तो मी जाण ॥ मजवेगळें स्थान असेना ॥ ७२ ॥ ज्या स्वानंदा नांव श्रीकृष्ण ॥ तें तुझें स्वरूप उद्धवा जाण ॥ तेथ नाहीं गा मीतूंपण ॥ परमकारण उर्वरितें ॥ ७३ ॥ उद्धवा जीवाचा जीव मी श्रीकृष्ण ॥ मज तुज नाहीं वेगळेपण ॥ यालागीं जीवाची हे निजखूण ॥ परमकारण सांगीतलें ॥ ७४ ॥ जगाचा आधारी श्रीकृष्ण ॥ त्या माझा आत्मा तूं उद्धव पूर्ण ॥ हें ऐकोनि श्रीकृष्णवचन ॥ उद्धव जाण गजबजिला ॥ ७५ ॥ कृष्ण मज ह्मणे आपुला आत्मा ॥ परी मी नेणें कृष्णमहिमा ॥ अगाध लीला पुरुषोत्तमा ॥ ते केवीं आत्मा आकळे ॥ ७६ ॥ नाथिलेंचि उद्धवपण॥ माझ्या अंगीं जडलें जाण ॥ कृष्णा विवेकें पाहतां पूर्ण ॥ माझें मीपण दिसेना ॥ ७७ ॥ मज उद्धवपण सांडितां ॥ कृष्ण निजधामा जाईल तत्त्वतां ॥ ते न साहवे अवस्था ॥ सखेदता सप्रेम ॥ ७८ ॥ हे उद्धवाची अवस्था ॥ कळोंसरली श्रीकृष्णनाथा ॥ तेचि अर्थींची हे कथा ॥ शब्दार्थता निरूपी ॥ ७९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एवमन्वीक्षमाणस्य कथं वैकल्पिको भ्रमः॥ मनसो हृदि तिष्ठेत व्योम्नीवाऽर्कोदये तमः ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रकृतिपुरुषविवंचन ॥ आदि मध्य अवसान ॥ तुज म्यां दाविलें एकपण ॥ तेथ कां भिन्नपण कल्पिसी वायां ॥ ५८० ॥ उत्पत्तिआदि ब्रह्म पूर्ण ॥ उत्पत्तीसि तेंचि कारण ॥ जग जन्मलें जें सगुण ॥ तेंही ब्रह्मरूपें जाण दाविलें मज ॥ ८१ ॥ आणि प्रळयाच्या अंतीं ॥ ब्रह्मचि उरे निजस्थितीं ॥ तेही विखींची प्रतीती ॥ तुज म्यां निश्चितीं दाविली ॥ ८२ ॥ प्रकृतीहूनि पुरुष भिन्न ॥ प्रकृति स्वातंत्र्यें मिथ्या जाण ॥ ऐसें प्रकृतिपुरुष ज्यासि ज्ञान ॥ त्यासि मीतूंपण भासेना ॥ ८३ ॥ जेथ नाहीं मीतूंपण ॥ तेथ विकल्प कल्पी कोण ॥ आद्यंतीं वस्तु पूर्ण ॥ हें विवेकज्ञान जयासी ॥ ८४ ॥ जो विवेक पुरुषप्रकृती ॥ सांख्य जागे ज्याचे चित्तीं ॥ त्यासि विकल्पाची प्राप्ती ॥ नव्हे कल्पांतीं उद्धवा ॥८५॥ सांख्यविवेकगभस्ती॥ पूर्ण उगवला ज्याचे चित्तीं॥ तेथ विकल्पाची

---

१ आकाश. २ शेष. ३ गोंधळला. ४ अनुभव. ५ सांख्यशास्त्रांतील विचार हाच कोणीएक सूर्य.

अंधारी रीती ॥ कैशा रीतीं उरेल ॥ ८६ ॥ ज्यासि पटुतर सांख्यज्ञान ॥ विकल्प विसरे त्याचें मन ॥ हृदयीं उगवे चिद्भान ॥ अज्ञान निशा पूर्ण निरसूनी ॥ ८७ ॥ जेथ निरसलें अज्ञान ॥ तेथ विकल्पाचें कैंचें स्थान ॥ यापरी सांख्यज्ञान ॥ साधकां पूर्ण उपकारी ॥ ८८ ॥ जें साराचें निजसार ॥ जें गुह्यज्ञानभांडार ॥ जें कां विवेकरत्नाकर ॥ तें सांख्य साचार उद्धवा ॥ ८९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एष सांख्यविधिः प्रोक्तः संशयग्रंथिभेदनः ॥ प्रतिलोमानुलोमाभ्यां परावरदृशा मया ॥ २९ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे चतुर्विंशोऽध्यायः ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ मी विवेकाचा विवेकू ॥ मी अर्कांचा आदि अर्कू ॥ मी ज्ञानियांचा ज्ञानतिलकू ॥ त्या माझा परिपाकू तें हें सांख्य ॥ ५९० ॥ नेणें म्यां सर्वज्ञें श्रीकृष्णें ॥ निर्धारोनि निजज्ञानें ॥ सांख्ययोगउपलक्षणें ॥ ब्रह्म अव्ययपणें दाविलें ॥ ९१ ॥ जेवीं गरगरीत वाटोळा ॥ करतळीं दिसे आंवळा ॥ तेवीं सांख्ययोगलीळा ॥ ब्रह्म तुज डोळां दाविलें ॥ ९२ ॥ जो ब्रह्म डोळां देखों जाये ॥ तो सर्वांगें देखणा[3] होये ॥ ऐशी सांख्यज्ञाननिजसोये ॥ तुज म्यां पाहे दाविली ॥ ९३ ॥ हा सांख्ययोगअनुक्रम ॥ अन्वयव्यतिरेकउपक्रम ॥ आलोडितां आकळे वर्म ॥ अखंड ब्रह्म अद्वय ॥ ९४ ॥ उत्पत्तिस्थितिप्रळयांत ॥ ब्रह्म अखंड निज नित्य ॥ हेंचि सांख्ययोगें प्राप्त ॥ जाण निश्चित साधकां ॥ ९५ ॥ ज्यासि ब्रह्मज्ञानाचें कोड[4] ॥ ते सांख्ययोग पुरवी चाड ॥ लिंगदेहाचें सुहृद झाड ॥ त्याचें समूळ बूड उन्मळी ॥ ९६ ॥ लिंगदेह अत्यंत कठिण ॥ तें सांख्ययोगापुढें जाण ॥ जेवीं अग्नीमाजी तृण ॥ तेवीं होय संपूर्ण भस्मांत ॥ ९७ ॥ लिंगदेह सैंधवगिरिवर ॥ सांख्य अत्यंत प्रळयसागर ॥ खवळला विरवूनि करी नीर ॥ एकाकार निजात्मता ॥ ९८ ॥ खवळल्या अत्यंत चित्सागरा ॥ नानासंशयजळगारा ॥ उरावया नाहीं थारा[5] ॥ निजनिर्धारा उद्धवा ॥ ९९ ॥ सकळ संशयांचें छेदन ॥ लिंगदेहाचें भेदन ॥ करी तें सांख्ययोगज्ञान ॥ उद्धवा जाण निश्चित ॥ ६०० ॥ अनुलोम प्रतिलोम ॥ विवंचना वाटेल दुर्गम ॥ हें न करितां सांख्य सुगम ॥ आकळे तें वर्म सांगेन ऐक ॥ १ ॥ सांडूनि आकारविषमता ॥ सर्वभूतीं भगवंतता[6] ॥ जो पावे सद्भावता ॥ सांख्य त्याचे हातां समूळ आलें ॥ २ ॥ कां जैसें होईल कर्माचरण ॥ तैसें सुखेंचि हो आपण ॥ मी कर्त्ता हें तूं न ह्मण ॥ इतकेन ब्रह्म पूर्ण तूं होसी ॥ ३ ॥ याही वरती सुगमता ॥ मज दिसेना सर्वथा ॥ उद्धवा तुझे निजहितार्था ॥ जाण तत्त्वतां सांगीतलें ॥ ४ ॥ हेंचि एक माझें वचन ॥ विचारूनियां संपूर्ण ॥ निजहितार्थ आपण ॥ अवश्य जाण करावें ॥ ५ ॥ ऐसें बोलिला देवाधिदेवो ॥ तेथ जडला उद्धवाचा भावो ॥ निःशेष अँहं सांडितां पहाहो ॥ ब्रह्म स्वयमेवो सहजचि ॥ ६ ॥ विचारितां सांख्यज्ञान ॥ जगातें गोंवी अहंपण ॥

---

१ उत्कृष्ट ज्ञान. २ प्रत्यक्ष. ३ डोळस. ४ आवड, इच्छा. ५ स्थान, जागा. ६ ईश्वरबुद्धि. ७ अहंकार.

अहंपाशीं जन्म मरण ॥ दुःख दारुण अहंभावीं ॥७॥ऐसा अहंभावो कठिण ॥ सांडितां न सांडे आपण ॥ येचि गुंतीचें कारण ॥ सर्व
था जाण कळेना ॥ ८ ॥ हें पुसों जावें देवापाशीं ॥ तेणें विशद सांगीतलें सांख्यासी ॥ आतां आपुली गुंती आपणापाशीं ॥ तेंचि
आह्मांसी कळेना ॥ ९ ॥ येचि अर्थीं श्रीकृष्ण ॥ पंचविसावे अध्यायीं जाण ॥ सगुणनिर्गुणविभागें पूर्ण ॥ गोड निरूपण सांगेल
॥ ६१० ॥ ते सुरसरसाळ मधुरकथा ॥ जेथ श्रीकृष्णाऐसा वक्ता ॥ उद्धव शिरोमणी[1] श्रोता ॥ अनुपमस्वादुता ते ठायीं॥११॥ त्या स्वा
दाचें गोडपण ॥ सांगावया समर्थ श्रीकृष्ण ॥ सेव्य श्रोता अतिसज्ञान ॥ निजभक्त जाण उद्धवा ॥ १२॥ ते देवभक्तसंवादगोडी ॥ वे
दशास्त्रें न जोडे जोडी[2]॥ आलोडितां[3] ग्रंथकोडी ॥ ते निजगोडी नातुडे[4]॥१३॥ आतुडावया ते निजगोडी ॥ जैं भावार्थें जोडे जोडी॥ भावा
र्थाचे निजआवडीं ॥ जिव्हारीची गोडी देवो भक्तां ॥ १४ ॥ एवं भावार्थापरतें कांहीं ॥ देवासि आवडतें नाहीं ॥ तो भावो नाहीं ज्यां
चे ठायीं ॥ ते मूर्ख पाही बालिश ॥ १५॥ त्या बाळकांचा धन्य भावो ॥ खापरें मांडूनि ह्मणती देवो ॥ तेथही प्रकटे देवाधिदेवो ॥ ध
रिल्या निःसंदेहो विश्वास ॥ १६॥ बाळकें दूध मागावयासाठीं ॥ भावार्थें लागला देवापाठीं ॥ कां क्षीराब्धि[5] करूनि वाटी ॥ उपमन्या
वोंठीं लाविली ॥ १७ ॥ एवं भाविकू देवाचा लहणा[6] ॥ देवो भाविकांचा आंदणा ॥ भावेंवीण देवो जाणा ॥ कधीं कोणा न भेटे॥१८॥
यालागीं जेथ भावार्थ ॥ तेथचि जोडे सुख स्वार्थ ॥ भावार्थ तेथ परमार्थ ॥ सांग साद्यंत सांपडे ॥ १९ ॥ ऐसा वाढविल्या भावार्थ॥
तेणें जोडे निर्गुण निजस्वार्थ ॥ तेंचि अर्थींचा वृत्तांत ॥ पुढिल्या अध्यायांत हरि सांगे ॥ २० ॥ ते कथेचें गोडपण ॥ अमृतास विसर
वी जाण ॥ ऐसें रसाळ निरूपण ॥ सादरें श्रीकृष्ण सांगेल ॥ २१ ॥ तें श्रीकृष्णकथापीयूख ॥ श्रोत्याचें पावे श्रवणमुख ॥ एका जना
र्दनीं अतिसुख ॥ सकौतुक व्याख्यान ॥ २२ ॥ श्रीभागवत अत्यादरें ॥ श्रीकृष्णकथा सविस्तरें ॥ अहेर विस्तारिले साजिरे ॥ परमार्थ
अळंकारें साळंकृत ॥ २३ ॥ तेणें संत सज्जन सोयरे ॥ गौरवीन श्रवणादरें ॥ एका जनार्दनकृपाकरें ॥ आविष्करें[7] सामर्थ्य ॥ २४ ॥
गौरविले सोयरे सज्जन ॥ ह्मणाल उपेक्षिले इतर जन ॥ जो श्रीभागवतीं सावधान ॥ तो परमार्थें जाण गौरवे ॥ २५॥ भावार्था
सारिखें गौरवण[2] ॥ एका जनार्दन जाणे जाण ॥ एका जनार्दना शरण ॥ आपण्या आपण गौरवी ॥ ६२६ ॥ ॥ इति श्रीभा
गवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीकायां प्रकृतिपुरुषसांख्ययोगो नाम चतुर्विंशतितमोऽध्यायः ॥ २४ ॥
॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ मूळ श्लोक ॥ २९ ॥ ओंव्या ६२६ एकूण ६५५ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

---

१ उत्तम अधिकारी. २ लाभ. ३ अवलोकन केलें असतां. ४ प्राप्त होत नाहीं. ५ क्षीरसमुद्र. ६ स्वाधीन, आवडता. ७ प्रकट केलें. २ मोठेपणा देणें.

# अध्याय २५ वा.


श्रीकृष्ण.
उत्धव.
तमोगुण.
सत्वगुण.
रजोगुण.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ओंनमो देव निर्गुण ॥ ह्मणों पाहे तंव न देखे गुण ॥ गुणेवीण निर्गुणपण ॥ सर्वथा जाण घडेना ॥ १ ॥ सर्वथा
न घडे निर्गुणपण ॥ तरी घडोंनेदिशी सगुणपण ॥ नातळशी गुणागुण ॥ अगुणाचा पूर्ण गुरुराया ॥ २ ॥ अगुणाचाचि परी तूं गुणी
॥ करिसी निर्गुणगुणां झाडणी ॥ पंचभूतांपासूनी ॥ सोडविता जनीं जनार्दन ॥ ३ ॥ ज्याचेनि जनांसि अर्दन[1]॥ ज्याचेनि लिंगदेहामर्दन
॥ जो जीवासि जीवें मारी पूर्ण ॥ तो कृपाळु जनार्दन घडे केवीं ॥ ४ ॥ जनार्दनाचें कृपाळूपण ॥ सर्वथा नेणती जन ॥ नेणावया
हेंचि कारण ॥ जे देहाभिमान न सांडिती ॥ ५ ॥ जननी[2]जठरीं जन्म जाण ॥ त्या जन्मास्तव ह्मणती जन ॥ त्या जनजन्मा करी मर्दन ॥
यालागीं जनार्दन नाम त्यासी ॥ ६ ॥ मरण मारूनि वाढवी जिणें ॥ जीव मारूनि जीववणें ॥ हेंही नांदवी विदेहपणें ॥ ऐशी जनार्दनें
कृपा कीजे ॥ ७ ॥ निजभावार्थें परिपूर्ण ॥ एकाकी देखूनियां दीन ॥ कृपा करी जनार्दन ॥ कृपाळु पूर्ण दीनाचा ॥ ८ ॥ जे जे भावना भावी
जन ॥ ते ते पुरवी जनार्दन ॥ जो मागे परम समाधान ॥ त्याचा देहाभिमान निर्दळी[3] ॥ ९ ॥ हो कां जनार्दना समोर ॥ कैं आला होता
अहंकार ॥ मा तेणें घेऊनियां शस्त्र ॥ करी शतचूर निजांगें ॥ १० ॥ जेवीं सूर्याचेनि उजियेडें ॥ अंधारेंसी रात्रि उडे ॥ तेवीं जनार्दन
नामापुढें ॥ अहंकार बापुडें उरे जेवीं ॥ ११ ॥ ऐकतां गुरुनामाचा गजरू ॥ समूळ विरे अहंकारू ॥ येथ दुःखदायक संसारू ॥ कैसेनि
धीरू धरील ॥ १२ ॥ ज्याचें नाम स्मरतां आवडीं ॥ संसारबांदवडी फोडी ॥ जीवाचे जीवबंध सोडी ॥ नामाची जोडी लाजवी मोक्षा
॥ १३ ॥ निजमोक्षाहीवरतें ॥ ज्याचें नाम करी सरतें ॥ त्याच्या कृपाळुपणातें ॥ केवीं म्यां येथें सांगावें ॥ १४ ॥ नामप्रतापा न करवे
सीमा[4] ॥ त्या सद्गुरूचा निजमहिमा ॥ कैशापरी आकळे आह्मां ॥ काय निरुपमा उपमावें ॥ १५ ॥ अगाध कीर्ति गुरूची गहन ॥ गुण
गणितां अनंतगुण ॥ काय घ्यावें त्याचें आपण ॥ नित्य निर्गुण निजांगें ॥ १६ ॥ धांव घेऊनि त्यापें जावों ॥ तंव त्या नाहीं गांव ठावो ॥
त्याचे प्राप्तीसि नचले उपावो[5] ॥ एक सद्भावावांचूनी ॥ १७ ॥ सद्भावें स्मरतां नामासी ॥ गुरु प्रकटे स्मरणापाशीं ॥ जेवीं सागरू सैंधव[6]
वासी ॥ ये भेटीसी निजांगें ॥ १८ ॥ सागरा देतां आलिंगन ॥ जेवीं सैंधव होय जीवन ॥ तेवीं वंदितां सद्गुरुचरण ॥ मीतूंपण हारपे
॥ १९ ॥ सद्गुरुकृपा झालिया पूर्ण ॥ जनचि होय जनार्दन ॥ तेव्हां जन वन विजन ॥ भिन्नभिन्न भासेना ॥ २० ॥ जन तेंचि जनार्दन ॥
जनार्दनचि सकळ जन ॥ हेंचि उप[7]निषत्सार पूर्ण ॥ हे निजखूण जनार्दनीं ॥ २१ ॥ येणेंचि अभिन्नार्थें येथ ॥ सांख्य बोलिला भगवंत ॥
उत्पत्तिस्थितिप्रळयांत ॥ वस्तु[8] सदोदित संपूर्ण ॥ २२ ॥ सांख्य ऐकोनियां उद्धवो ॥ विचारी आपुला अभिप्रावो ॥ संसार वाढवी जो

---

१ नाश. २ आईच्या पोटांत. ३ नाहींसा करितो. ४ मर्यादा. ५ उपाय. ६ मीठास. ७ उपनिषदाचें सार. ८ ब्रह्म.

अहंभावो ॥ तो अवश्य पहाहो सांडावा ॥ २३ ॥ अहंकार जडला चित्ता ॥ तो सांडितां नवचे सर्वथा ॥ हें पुसों जरी श्रीकृष्णनाथा ॥
तेणें सांख्य या अर्था निरूपिलें ॥ २४ ॥ सकळप्राणीचा अभिप्रावो ॥ सांख्य अनुवादला[1] देवो ॥ अवश्य सांडावा अहंभावो ॥ हेंचि
पहाहो दृढ केलें ॥ २५ ॥ माझेनि पराक्रमें तत्त्वतां ॥ माझें मीपण नवचे सर्वथा ॥ लाजिरवाणें कृष्णनाथा ॥ किती आतां पुसावें ॥ २६ ॥
ऐशी उद्धवाची चिंता ॥ कळूंसरली श्रीकृष्णनाथा ॥ बाप कृपाळु निजभक्तां ॥ जेणें निवारे अहंता तें निजवर्म सांगे ॥ २७ ॥ आजि
उद्धवाचें भाग्य पूर्ण ॥ जगीं उद्धवचि धन्यधन्य ॥ ज्यासि सदा संतुष्ट श्रीकृष्ण ॥ न करितां प्रश्न निजगुह्य सांगे ॥ २८ ॥ बाळक काय
भूक सांगे ॥ मग माता स्तन देऊं लागे ॥ ते कळवळ्याचे पांगें ॥ धांवोनि निजांगें स्तनपाना लावी ॥ २९ ॥ त्याहूनि अति आगळा ॥
कृष्णीं उद्धवकळवळा ॥ तो स्वभक्तांची भजनकळा ॥ जाणोनि जिव्हाळा पोखित ॥ ३० ॥ बाळक नेणे आपुली चिंता ॥ परी माता
प्रवर्त्तें त्याच्या हिता ॥ तेवीं उद्धवाचे निजस्वार्था ॥ श्रीकृष्णनाथा कळवळा ॥ ३१ ॥ त्या उद्धवाचें जें जें न्यून ॥ तें तें करावया परिपूर्ण ॥
प्रवर्तलासे श्रीकृष्ण ॥ तो निजनिर्गुण उपदेशी ॥ ३२ ॥ पंचविसावे अध्यायीं जाण ॥ सांगोनि गुणजयोलक्षण ॥ लक्ष्य विलक्ष्य निज
निर्गुण ॥ हेंचि निरूपण निजनिष्ठा ॥ ३३ ॥ प्रकृतिपुरुषविवेक ॥ झालियांही बुद्धिपूर्वक ॥ जंव गुणजयो नाहीं निष्टंक ॥ तंव बाधी सुख
दुःख अहंभावो[2] ॥ ३४ ॥ तिहीं गुणास्तव देह झाला ॥ हेंही गुणजयो नवचे केला ॥ मूळ उच्छेदू[3] आपुला ॥ न करवे वहिला कोणासी
॥ ३५ ॥ दांडा जन्मला वृक्षजातीसी ॥ तो मिळोनियां कुऱ्हाडीसी ॥ समूळ छेदवी वृक्षांसी ॥ तेवीं विवेकासी सत्वगुण ॥ ३६ ॥ विवेका
मीनल्या[4] सत्वगुण ॥ समूळ उच्छेदी तिनी गुण ॥ सहजे प्रकटे निजनिर्गुण ॥ तेह्वां गुणच्छेदन तें मिथ्या ॥ ३७ ॥ समूळ मिथ्या तिनी गुण ॥
नित्य सत्य निजनिर्गुण ॥ येचि अर्थींचें निरूपण ॥ स्वमुखें श्रीकृष्ण सांगत ॥ ३८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ गुणानामस
मिश्राणां पुमान्येन यथा भवेत् ॥ तन्मे पुरुषवर्येदमुपधारय शंसतः ॥ १ ॥ टीका ॥ ॥ ज्याचेनि चरणें पवित्र क्षिती ॥ नामें उद्धरे त्रिजगती ॥
ज्याची ऐकतां गुणकीर्ती ॥ क्षयो[5] पावती महापापें ॥ ३९ ॥ ज्याचें मृदु मधुर अविट नाम ॥ उच्चारितां निववी परम ॥ तो उद्धवासि
पुरुषोत्तम ॥ आवडीं परम बोलत ॥ ४० ॥ सत्व रज तम तिनी गुण ॥ न मिसळतां भिन्नभिन्न ॥ पुरुषामाजी एकेक गुण ॥ उपजवी
चिह्न तें ऐका ॥ ४१ ॥ निःसंदेह[6] सावधान ॥ निर्विकल्प[7] करूनि मन ॥ ऐकतां माझें वचन ॥ पुरुषोत्तम पूर्ण होइजे स्वयें ॥ ४२ ॥ माझे
स्वरूपीं सद्भावता ॥ ते पुरुषाची उत्तमावस्था ॥ माझे वचनीं विश्वासता ॥ पुरुषोत्तमता घर रिघे ॥ ४३ ॥ ऐशी उत्तमा अतिउत्तम ॥

---

[1] बोलिला. [2] अहंकार. [3] नाहींसा करूं. [4] मिळाल्यास. [5] नाश. [6] निःसंशय. [7] निर्वृत्तिक.

निर्गुण पदवी निरुपम ॥ तुज मी अर्पितसें पुरुषोत्तम ॥ माझें वचन परम विश्वासल्या ॥ ४४ ॥ भक्तिभावार्थें परम श्रेष्ठ ॥ वचनविश्वासीं अतिवरिष्ठ ॥ यालागीं उद्धवासि पुरुषश्रेष्ठ ॥ स्वमुखें वैकुंठ संबोधी ॥ ४५ ॥ संसारीं योनि अनेग ॥ त्यांमाजी मनुष्यत्व अति चांग ॥ हेंही अविकळ अव्यंग ॥ संपूर्ण सांग निर्दुष्ट ॥ ४६ ॥ सकळदेहांमाजी जाण ॥ असे पुरुषदेह प्राधान्य ॥ त्याहीमाजी विवेकसंपन्न ॥ वेदशास्त्रज्ञ मुमुक्षू ॥ ४७ ॥ वेदशास्त्रविवेकसंपन्न ॥ त्याहीमाजी ज्या माझें भजन ॥ भजत्यांमाजी अनन्यशरण ॥ सर्वस्वें जाण मजलागीं ॥ ४८ ॥ सर्वस्वें अनन्यशरण ॥ तेथ माझी कृपा परिपूर्ण ॥ माझे रुपें माझें ज्ञान ॥ पावोनि संपन्न मद्भजनीं ॥ ४९ ॥ येहींगुणीं विचारितां लोक ॥ आथिला दिसे उद्धव एक ॥ त्यालागीं यदुनायक ॥ पुरुषवर्याभिषेक वचनें करी ॥ ५० ॥ ऐसे संबोधूनि[1] उद्धवासी ॥ त्रिगुण गुण स्वभावांसी ॥ सांगतां प्रथम सत्वासी ॥ हृषीकेशी उपपादी ॥ ५१ ॥ उदंड सत्वाचीं लक्षणें ॥ त्यांत पंधरा बोलिलीं श्रीकृष्णें ॥ तेंचि ऐका कोणकोणें ॥ निजनिरूपणें हरि सांगे ॥ ५२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ शमो दमस्तितिक्षेक्षा तपः सत्यं दया स्मृतिः ॥ तुष्टिस्त्यागोऽस्पृहा श्रद्धा ह्रीर्दयादिः स्वनिर्वृतिः ॥ २ ॥ ॥ टीका ॥ ॥ आपुली जे चित्तवृत्ती ॥ सांडूनि बाह्य स्फूर्ती ॥ अखंड राखणें आत्मस्थिती ॥ शम निश्चितीं त्या नांव ॥ ५३ ॥ बाह्यइंद्रियांची चडफड ॥ शमेंसि करावा गळा जोड ॥ निग्रहणें विषयचाड ॥ दमाचें कोड या नांव ॥ ५४ ॥ जेणें हरिखें साहणें सुख ॥ त्याचिवृत्तीं साहणें दुःख ॥ तितिक्षा या नांव देख ॥ शुद्धसत्वात्मक उद्धवा ॥ ५५ ॥ मी कोण कैंचा किमात्मक[2] ॥ निष्कर्म कीं कर्मबद्धक ॥ करणें निजात्मविवेक[3] ॥ ईक्षा परिपाक या नांव ॥ ५६ ॥ जागृतिस्वप्नसुषुप्ती आंत ॥ भगवत्प्राप्तीलागीं चित्त ॥ झुरणीमाजी पडे नित्य ॥ तप निश्चित या नांव ॥ ५७ ॥ आवडीं जेवीं नेघवे विख ॥ तेवीं प्राणांतें न बोले लटिक ॥ साचचि बोलणें निश्शंक ॥ हें सत्य देख सात्विका ॥ ५८ ॥ भूतांवरी कठिणपण ॥ जो स्वप्नीं न देखे आपण ॥ भूतदया ते संपूर्ण ॥ उद्धवा जाण निश्चित ॥ ५९ ॥ माझा मुख्य निजस्वार्थ[4] कोण ॥ मी काय करितों कर्माचरण ॥ ऐसें जें पूर्वानुस्मरण ॥ स्मृति जाण या नांव ॥ ६० ॥ न करितां अति आटाटी ॥ यथालाभें सुखी पोटीं ॥ या नांव गा सुखसंतुष्टी ॥ जाण जगजेठी उद्धवा ॥ ६१ ॥ जे मिळाले जीविकाभाग ॥ त्यांतही सत्पात्रीं दानयोग ॥ विषयममता सांडणें सांग ॥ त्या नांव त्याग उद्धवा ॥ ६२ ॥ अर्थ स्वार्थीं इच्छा चढे ॥ अर्थ जोडतां अधिक वाढे ॥ ते इच्छा सांडणें निजनिवाडें ॥ निस्पृहता घडे तेठायीं ॥ ६३ ॥ जेथ निस्पृहा मूळ सांग ॥ त्याचि नांव दृढ वैराग्य ॥ हें परमार्थाचें निजभाग्य ॥ येणें श्रीरंग सांपडे ॥ ६४ ॥ जो गुरुवाक्यविश्वासी ॥ सबाह्य विकला सर्वस्वेंसी ॥ तोचि

---

१ बोध करून. २ किंरूप. ३ आपला आत्मविचार. ४ आपला अर्थ.

भावार्थ द्विजदेवांसी ॥ श्रद्धा त्यापाशीं समूळ नांदे ॥ ६५ ॥ नरदेहीं[1] लाभे परब्रह्म ॥ तदर्थ[2] न करूनि सत्कर्म ॥ विषयार्थ करी धर्माधर्म ॥
ते लज्जा परम अतिनिंद्य ॥ ६६ ॥ जेणें दुःखी होइजे आपणें ॥ तें पुढिलासि नाहीं करणें ॥ दुःख नेदूनि[3] सुख देणें ॥ हे दया म्यां श्रीकृष्णें
वंदिजे ॥ ६७ ॥ पुढिलासि नेदूनि दुःख ॥ स्वयें भूतमात्रीं देणें सुख ॥ हेचि दया पारमार्थिक ॥ दुसरेंनि देख यालागीं सांगे ॥ ६८ ॥
खातां नावडेपुढें पेंडी जैसी ॥ तैसें गौण देखोनि विषयांसी ॥ जो विनटला ब्रह्मसुखासी ॥ स्वनिवृत्ति त्यासि बोलिजे ॥ ६९ ॥ रंक बैसल्या
पालखीसी ॥ उपेक्षी पूर्वील सुडक्यासी ॥ तेवीं उपेक्षूनि विषयांसी ॥ जो ब्रह्मसुखासी पकडला ॥ ७० ॥ कणाची वाढी भुसापाशीं ॥
कण निडारे भुसेंसी ॥ तो कण यावया हातासी ॥ सांडिती भुसासी पांखडूनी ॥ ७१ ॥ तेवीं ब्रह्मसुखाचिये पाडें ॥ नरदेहाचा पांगरा
पडे ॥ तें ब्रह्मसुख जैं हाता चढे ॥ तैं देहींचें नावडे विषयसुख ॥ ७२ ॥ तेवीं सांडूनि[4] विषयप्रीति ॥ ज्यासि ब्रह्मसुखीं सुखप्राप्ती ॥ याचि
नांव स्वनिवृत्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ७३ ॥ या पंधरा लक्षणांची स्थिती ॥ वर्ते तो शुद्ध सत्वमूर्ती ॥ शोधितसत्वाची सत्ववृत्ती ॥
आदिशब्दें श्रीपती सांगत ॥ ७४ ॥ सर्वभूतीं अकृत्रिमता[5] ॥ देखे भगवद्भावें तत्त्वतां ॥ या नांव शोधितसत्वता ॥ गुणावस्थाछेदक ॥ ७५ ॥
ऐशियापरी सत्वगुण ॥ सात्विकापाशीं वर्ते पूर्ण ॥ आतां रजाचें[6] लक्षण ॥ स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ७६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ काम ईहा मदस्तृष्णा
स्तंभ आशीर्भिदा सुखम् ॥ मदोत्साहो यशःप्रीतिर्हास्यं वीर्यं बलोद्यमः ॥ ३ ॥ ॥ टीका ॥ ॥ काम ह्मणिजे विषयशोषू ॥ जेवीं इंधनीं[7]
वाढे हुताशु[8] ॥ तेवीं पुरवितां कामाभिलाषू ॥ कामआसोसू पैं वाढे ॥ ७७ ॥ या नांव काम जाण ॥ कामक्रिया ते ईहा पूर्ण ॥ झाले
विद्येचा दर्प गहन ॥ मदाचें लक्षण या नांव ॥ ७८ ॥ झालिया अर्थप्राप्ती ॥ वासनेसि नव्हे तृप्ती ॥ चढती वाढती आसक्ती ॥ तृष्णा निश्चितीं
या नांव ॥ ७९ ॥ अतिगर्वें जे स्तब्धता ॥ कोणा दृष्टीं नाणीं सर्वथा ॥ या नांव स्तब्धावस्था ॥ जाण तत्त्वतां उद्धवा ॥ ८० ॥ अर्थ
प्राप्तीकारणें ॥ इष्टदेवता प्रार्थणें ॥ प्रापंचिक सुख मागणें ॥ आशा ह्मणणें या नांव ॥ ८१ ॥ भिदा ह्मणिजे भेद जाण ॥ स्फुरद्रूप प्रपंच
भान ॥ माझें तुझें प्रपंचवचन ॥ भिदालक्षण या नांव ॥ ८२ ॥ राजससुखाचा नवल माग ॥ विषयसुखभोग जो सांग ॥ तेंचि सुख मानिती
चांग ॥ सुखप्रयोग या नांव ॥ ८३ ॥ रणीं उत्साह शूरासी ॥ कां पुत्रोत्साह नरासी ॥ विवाहोत्साह सुहृदांसी ॥ महोत्साह त्यासी
बोलिजे ॥ ८४ ॥ शास्त्रविवादीं जयो घेणें ॥ कां युद्धीं शूर पराभवणें ॥ तेणें ख्याति वाढणें ॥ यश मिरवणें या नांव ॥ ८५ ॥ बंदिजना
हातीं कीर्ती ॥ स्वयें वाखाणवी[9] दिगंतीं ॥ या नांव यशप्राप्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ८६ ॥ ऐकोनि वचनोक्ति छंदबद्ध ॥ उपहासी अति

---

[1] मनुष्यदेहांत. [2] ब्रह्माकरितां. [3] न देतां. [4] टाकून. [5] निष्कपटपणा. [6] रजोगुणाचें. [7] लाकडांनीं. [8] अग्नि. [9] सिद्ध होतात.

विनोद ॥ तेथ राजसा हास्य विशद ॥ जाण प्रसिद्ध उद्धवा ॥ ८७ ॥ वीर्य ह्मणिजे केवळ ॥ बलाढ्यता अतिप्रबळ ॥ दाखवणें शारीरबळ या नांव शीळ वीर्याचें ॥ ८८ ॥ राजबळें उद्यम[1] व्यवहार ॥ अंग दाटावया जो व्यापार ॥ न्याय सांडूनि स्वार्थ फार ॥ बलोद्यमप्रकार या नांव ॥ ८९ ॥ हीं पंधराही लक्षणें ॥ ज्यापें नांदती संपूर्णें ॥ तो राजस वोळखणें ॥ जीवें प्राणें निश्चित ॥ ९० ॥ केवळ अविवेकसंपत्ती ॥ तामसाची तमोवृत्ती ॥ सोळा लक्षणें त्याची स्थिती ॥ ऐक तुजप्रती सांगेन ॥ ९१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ क्रोधो लोभोऽनृतं हिंसा याञ्चा दंभः क्लमः कलिः ॥ शोकमोहौ विषादार्त्ती निद्राशा भीरनुद्यमः ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ क्रोध कामाची अपूर्णावस्था ॥ लोभ ह्मणिजे अतिकृपणता ॥ अनृत ह्मणिजे असत्यता ॥ हिंसा ते तत्त्वतां परपीडा[2] ॥ ९२ ॥ याञ्चा ह्मणिजे लोलंगता ॥ दंभ ह्मणिजे अतिमान्यता ॥ क्लमनामें अति आयासता ॥ व्यर्थ कलहता कलि जाण ॥ ९३ ॥ शोक ह्मणिजे हाहाकारू ॥ मोह ह्मणिजे भ्रमाचा पूरू ॥ विषाद ह्मणिजे दुःखसंचारू ॥ अभ्यंतरू[3] जेणें पोळे ॥ ९४ ॥ आर्ति ह्मणिजे अतिसंताप ॥ निंदा ह्मणिजे असदारोपं[4] ॥ आशा ह्मणिजे अतिलोलुप्य ॥ महाभयकंपभीशब्दीं ॥ ९५ ॥ ऐक निद्रेचें निजवर्म ॥ जें आळसाचें निजधामें[5] ॥ जाड्यता सोलींव परम ॥ ते निद्रा निःसीम तामसी ॥ ९६ ॥ सांडूनियां सर्व कर्म ॥ स्तब्धता राहे परम ॥ या नांव अनुद्यम ॥ सुखावलें तम तेठायीं वसे ॥ ९७ ॥ या तमोगुणाच्या सोळा कळा ॥ ज्याचे अंगीं बाणती सकळा ॥ तो तमोरात्रींचा चंद्र काळा ॥ अविवेकआंधळा तामसू ॥ ९८ ॥ सत्व रजतमोगुण ॥ यांचे वोळखीलागीं जाण ॥ केलें भिन्नभिन्न निरूपण ॥ आतां मिश्रलक्षण तें ऐक ॥ ९९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सत्वस्य रजसश्चैतास्तमसश्चानुपूर्वशः ॥ वृत्तयो वर्णितप्रायाः सन्निपातमथो श्टणु ॥ ५ ॥ ॥ टीका ॥ ॥ सांगीतली त्रिगुण स्थिती ॥ त्या एकाच्या अनंत वृत्ती ॥ त्याही अनंतप्राय होती ॥ जीवासि गुणगुंती येथेंचि पडे ॥ १०० ॥ मस्तकीं केश चिकटले होती ॥ ते ज्याचे त्यानुगवती ॥ तेवीं त्रिगुणांची गुणगुंती ॥ जीवाहातीं उगवेना ॥ १ ॥ मिळोनि सख्या मायबहिणी ॥ हातीं घेऊनि तेल फणी ॥ उगविती चिकटल्या केशश्रेणी ॥ तेवीं त्रिगुणांची वेणी जीवासी ॥ २ ॥ त्रिगुणांची विभागवृत्ती ॥ जीवसामर्थ्यें जरी होती ॥ तरी शुद्धसत्वीं करूनि वस्ती ॥ गुणातीतीं[6] प्रवेशता ॥ ३ ॥ ऐसा निजगुणां उगवो ॥ जीवाचेनि नोहे निर्वाहो ॥ यालागीं गुरुचरणीं सद्भावो ॥ सभाग्य पहाहो राखिती ॥ ४ ॥ जे सभाग्य भाग्यवंत जनीं ॥ ज्यांसि सद्गुरु सखी जननी ॥ विवेक वैराग्य घेऊनि फणी ॥ जो त्रिगुणांची वेणी उगवितू ॥ ५ ॥ ज्यांची उगविली गुणगुंती ॥ पुढती गुंती पडे मागुती ॥ यालागीं तो महामती ॥ मुंडूनि सांडिती संन्यासी ॥ ६ ॥ एका

---

[1] व्यापार. [2] लोकास दुःख. [3] मन. [4] खोटा आरोप. [5] स्थान. [6] निर्गुणांत.

ची नवल गती ॥ उद्भट वैराग्याची स्थिती ॥ गुंती उगवाया न रिघती ॥ मुळीचि मुंडिती समूळ ॥ ७ ॥ विवेकफणीचेनि मेळें ॥ वो
ढितां वैराग्यासी बळें ॥ जो अशक्त भावबळें ॥ तो मध्येंचि पळे उठूनी ॥ ८ ॥ अशक्तें पळतां देखोनि दूरी ॥ एकें लपालीं मोहआंधारीं ॥
एकें गुंती राखोनि शिरीं ॥ गुंतीमाझारीं रिघाले ॥ ९ ॥ एकें अत्यंत करंटीं ॥ नव्हेचि गुरुमाउली भेटी ॥ ऐशीं संसारीं पोरें पोरटीं ॥
गुणदुःखकोटी भोगिती ॥ ११० ॥ द्विपरार्धायु विधाता ॥ त्याचेनि नोहे गुणभागता ॥ मग इतरांची कोण कथा ॥ गुण तत्वतां निवडा
वया ॥ ११ ॥ ऐशिया ज्या त्रिगुणवृत्ती ॥ मजही निःशेष न निवडती ॥ यालागीं ध्वनितप्राय पदोक्ती ॥ देव श्लोकार्थीं बोलिला
॥ १२ ॥ मागिल्या तीं श्लोकार्थीं ॥ सांगीतल्या त्रिगुणस्थिती ॥ त्रिगुणांची मिश्रित[1] गती ॥ सन्निपातवृत्ती ते ऐका ॥ १३ ॥ ॥ श्लोक ॥
सन्निपातस्त्वहमिति ममेत्युद्धव या मतिः ॥ व्यवहारः सन्निपातो मनोमात्रेंद्रियासुभिः ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ गुणसन्निपातप्रकारू ॥ ए
कचि जो कां अहंकारू ॥ तो गुणसंगें त्रिप्रकारू ॥ ऐक विचारू तयांचा ॥ १४ ॥ वर्णाश्रमविहित विलास ॥ वेदाज्ञा पाळणें अवश्य ॥
मी आत्मा जाण चिदंश ॥ हा अहंविलास[2] सात्विक ॥ १५ ॥ मी स्वधर्मकर्मकर्ता ॥ मी स्वर्गादिसुखभोक्ता ॥ मज पावती नानावस्था ॥
या नांव अवस्था राजस ॥ १६ ॥ मी देहधारी सुभट[3] नर ॥ मीचि कर्ता शत्रुसंहार ॥ मी सर्वार्थीं अतिदुर्धर ॥ हा अहंकार तामस
॥ १७ ॥ गुणानुसारें ममता जाण ॥ त्रिविधरूपें स्फुरे स्फुरण ॥ तेचि अर्थींचें निरूपण ॥ विशद श्रीकृष्ण सांगत ॥ १८ ॥ माझे हृद
यींचा भगवंत ॥ तोचि सर्वभूतीं हृदयस्थ ॥ भूतें माझींच समस्त ॥ हे ममता शोधितसत्वाची ॥ १९ ॥ भक्त संत साधु सज्जन ॥ तेचि
माझे सुहृज्जन ॥ ऐशी जे ममता पूर्ण ॥ उद्धवा जाण सत्वस्थ ॥ १२० ॥ जीवाहून परती ॥ सद्गुरुचरणीं अतिप्रीती ॥ ऐशी ममतेची
जे जाती ॥ ते जाण निश्चितीं सात्विक ॥ २१ ॥ ज्या देवाची उपासकर्ता[4] ॥ शैवी वैष्णवी दीक्षितता ॥ देवीं धर्मीं पूर्ण ममता ॥ ते जाण
सात्विकता सत्वस्थ ॥ २२ ॥ शैवी वैष्णवी धर्ममता ॥ दंभरहित निष्कामता ॥ ते ते सात्विक ममता ॥ ऐक अवस्था राजसाची ॥ २३ ॥
निवृत्तिमार्ग मानी लटिक ॥ सत्य साचार लौकिक ॥ लोकेषणेची[5] ममता देख ॥ ते आवश्यक राजसी ॥ २४ ॥ प्रवृत्तिशास्त्रीं आवडी ॥
लौकिकाची अति गोडी ॥ नामरूपाची उभवी गुढी ॥ हे ममता रोकडी राजस ॥ २५ ॥ स्त्रीपुत्रें माझीं आवश्यक ॥ शरीरसंबंधी आप्त
लोक ॥ द्रव्याची ममता निष्टंक[6] ॥ हे बुद्धि वोळख राजस ॥ २६ ॥ ज्या देवांची करितां भक्ती ॥ नामरूप जोडे संपत्ती ॥ तीं तीं दैवतें
आवडतीं ॥ हे ममता निश्चितीं राजस ॥ २७ ॥ काम्यकर्मीं आवडी देख ॥ आप्त मानी सकामकर्मक ॥ सत्य स्वर्गादि विषयसुख ॥

---

१ मिसळलेली. २ अहंकाराचा प्रकार. ३ योद्धा. ४ भक्ति. ५ लोकलज्जेची. ६ निश्चयानें.

हे ममता निष्टंक राजस ॥ २८ ॥ हे रजोगुणाची ममता ॥ तुज म्यां सांगीतली तत्त्वतां ॥ तमोगुणाची जे अवस्था ॥ ऐक व्यवस्था सांगेन
॥ २९ ॥ आपुल्या देहासि जो हूंतूं करी ॥ कां पूर्वापूर्व पूर्वजांचा वैरी ॥ त्यांच्या लेंकरांसी वैर धरी ॥ हे बुद्धि निष्ठुरी तामस ॥१३०॥
पुढें लेंकुरांचे लेंकुरीं ॥ वृत्तिभूमिजीविकेवरी ॥ आडवा येईल स्वगोत्री ॥ त्यासी वैर धरी तामस ॥ ३१ ॥ ऐसे पूर्वापर माझे वैरी ॥ मी
निर्दाळिन[1] संसारीं ॥ यालागीं रिघे अभिचारीं ॥ ते ममता खरी तामस ॥ ३२ ॥ अभिचारिकी जे मंत्रज्ञ ॥ ते मानी माझे स्वजन ॥ शाकिनीडांकिनीउपासन ॥ हे ममता संपूर्ण तामसी ॥ ३३ ॥ असो बहुसाल व्युत्पत्ती ॥ एकेकगुणीं अनंतशक्ती ॥ हे तिन्ही जेथ मिश्र
होती ॥ सन्निपातवृत्ती या नांव ॥३४॥ कफ वात आणि पित्त ॥ तिन्ही एकत्र जेथ होत ॥ तेथ उपजे सन्निपात ॥ तेवीं सन्निपात येथ
त्रिगुणांचा ॥३५ ॥ संकल्पविकल्पात्मक मन ॥ पंच विषय पंच प्राण ॥ दशेंद्रियीं व्यवहार संपूर्ण ॥ तेथ उपजे त्रिगुण सन्निपात ॥३६॥
तेंचि सन्निपातनिरूपण ॥ त्रिगुणांचें मिश्र[2] लक्षण ॥ स्वयें सांगताहे श्रीकृष्ण ॥ मिश्रगुणसन्निपातू ॥ ३७॥ ॥ श्लोक ॥ ॥ धर्मे चार्थे
च कामे च यदासौ परिनिष्ठितः ॥ गुणानां सन्निकर्षोयं श्रद्धारतिधनावहः ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ पुरुषाच्या ठायीं क्रिया कर्म ॥ क्षणें स्वधर्म क्षणें काम ॥ क्षणें वाढवी अर्थोद्यम[3] ॥ हा संक्रम[4] त्रिगुणांचा ॥ ३८ ॥ गुणसंक्रमण करील काय ॥ त्रिगुणीं धर्म त्रिविध होय ॥
कामही त्रिविध होऊनि ठाय ॥ अर्थस्वार्थनिर्वाह निगुर्णात्मक ॥ ३९॥ येथ कर्मासि दोष नाहीं ॥ दोष कर्त्याचे बुद्धीच्या ठायीं ॥ तो
जे कल्पना करील कांहीं ॥ तें फळ पाही स्वयें भोगी ॥ १४० ॥ सोनें वंद्य सोनेंपणें ॥ त्याचें स्वयें घडविल्या सुणें ॥ वंद्य तेंचि निंद्य करणें ॥
तेंवीं स्वकर्म दूषणें गुणबुद्धी ॥ ४१ ॥ भूमि सहजें शुद्ध आहे ॥ जें पेरिजे तें पीक होये ॥ तेवीं स्वकर्म शुद्ध स्वयें ॥ फळभोगु लाहे गुणवृत्ती
॥ ४२ ॥ वाचा सहज सरळ गोमटी[5] ॥ रामनामें जोडे ब्रह्मपुष्टी ॥ वृथा जाय करितां चावटी ॥ भोगी निंदेपाठी महापाप ॥ ४३ ॥ तेवीं स्वधर्म श्रद्धायुक्त ॥ पुरुषास करी विरक्त ॥ तेथ त्रिगुणांचा सन्निपात ॥ श्रद्धा छळित तें ऐक ॥ ४४ ॥ स्वधर्मकर्मीं श्रद्धा जोडे ॥ क्षणेकें लागे
विरक्तीकडे ॥ क्षणें भोगफळाशा वाढे ॥ क्षणेक पडे ममतासंधीं ॥ ४५ ॥ तैशीच कामाचिही रती[6] ॥ क्षणेक निष्कामीं अतिप्रीति ॥ क्षणें
स्त्रीभोगआसक्ती ॥ क्षणें कामरती परद्वारीं ॥ ४६ ॥ याचिपरी धनाची जोडी ॥ क्षणेक द्रव्याशा सोडी ॥ क्षणेक अर्थाची अतिगोडी ॥
क्षणेक आसुडी[7] परद्रव्य ॥४७॥ त्रिविध धर्म त्रिविध कर्म ॥ त्रिविधरूपें धनागम ॥ या गुणवृत्तीस्तव स्वधर्म ॥ सांडूनि अकर्म करी प्राणी
॥ ४८ ॥ एवं धर्मअर्थकामाआंत ॥ गुणसन्निपात अनंत ॥ फोडूनि सांगतां येथ ॥ वाढेल ग्रंथ अनिवार ॥४९॥ यालागीं गुणसन्निपात ॥

---

[1] नाहींसे करीन. [2] मिसळलेलें. [3] अर्थाविषयीं उद्योग. [4] प्राप्ति. [5] मधुर. [6] प्रीति. [7] हरण करितो.

सांगीतला संकलित ॥ तेंचि अर्थीं श्रीकृष्णनाथ ॥ असे सांगत संक्षेपें ॥ १५० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ प्रवृत्तिलक्षणे निष्ठा पुमान्यर्हि गृहाश्रमे ॥
स्वधर्मे चानुतिष्ठेत गुणानां समितिर्हि सा ॥ ८ ॥ ॥ टीका ॥ ॥ पुरुषासि जो गृहाश्रम ॥ तो जाणावा केवळ काम ॥ तेथ नित्य नैमित्तिक
कर्म ॥ हा स्वधर्म चित्तशुद्धी ॥ ५१ ॥ गृहाश्रमींही पंचसून ॥ यालागीं तमोगुण प्रधान॥ ॥ गृहीं स्त्रीभोग पावे जाण ॥ रजोगुण या हेतू
॥ ५२ ॥ नित्य नैमित्त्य स्वधर्म ॥ हें गृहस्थाचें निज कर्म ॥ हें चित्तशुद्धीचें निजवर्म ॥ सत्व सुगम या हेतू ॥ ५३ ॥ गृहाश्रमप्रवृत्ति जाण ॥
सदा मिश्रित तिनी गुण ॥ गुणीं गुणवंत करून ॥ कर्माचरण करविती ॥ ५४ ॥ न रंगता तेणें रंगें ॥ स्फटिक तद्रूप भासों लागे ॥ तेवीं
गुणात्मा गुणसंगें ॥ वर्तों लागे गुणकर्मीं ॥ ५५ ॥ जेवीं कां कसवटी आपण ॥ कसूनि दावी सुवर्णवर्ण ॥ तेवीं पुरुषाची क्रिया जाण ॥
दावी गुणलक्षण विभाग ॥ ५६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पुरुषं सत्वसंयुक्तमनुमीयाच्छमादिभिः ॥ कामादिभी रजोयुक्तं क्रोधाद्यैस्तमसा
युतम् ॥ ॥ टीका ॥ ॥ इंद्रियनिग्रहो यथोचित ॥ जो शमदमीं सदा क्रीडत ॥ शांति वसे जया आंत ॥ तो जाण निश्चित सात्विक ॥ ५७ ॥
जो सदा फळकामें कामुक ॥ वांछी संसारभोगसुख ॥ द्रव्यार्थी[1] अतिदांभिक ॥ रजोगुणी लोक तो जाण ॥ ५८ ॥ ज्यासि स्वधर्मीं नाहीं
रती ॥ आवडे अधर्मप्रवृत्ती ॥ क्रोधलोभें गिळिली स्फूर्ती ॥ तो जाण निश्चितीं तामसू ॥ ५९ ॥ एवं देखोनि कर्माचरण ॥ लक्षिजे पु
रुषलक्षण ॥ या नांव गा अनुमान ॥ विवेकसंपन्न जाणती ॥ १६० ॥ सामान्यतां तिन्ही गुण ॥ सांगीतलें निरूपण ॥ हें नकळे ह्मणेल
मन ॥ गुणवृत्ति भिन्न अवधारी ॥ ६१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदा भजति मां भक्त्या निरपेक्षः स्वकर्मभिः ॥ तं सत्वप्रकृतिं विद्यात्पुरुषं स्त्रि
यमेव च ॥ १० ॥ ॥ टीका ॥ ॥ स्वकर्मीं वांछित फळ ॥ तेंचि मायेचें दृढ पडळ ॥ ते फळाशा सांडोनि केवळ ॥ ते भजनशीळ मद्रूपीं
॥ ६२ ॥ करूनि फळाशेचें शून्य ॥ स्वधर्मे करिती माझें भजन ॥ पुरुष अथवा स्त्रिया जाण ॥ ते सत्वसंपन्न[2] निश्चित ॥ ६३ ॥ देहावय
वलिंगदर्शन ॥ तेणें स्त्रीपुरुषनामाभिधान ॥ परि आत्मा आत्मीं नाहीं जाण ॥ जीवत्व समान स्त्रीपुरुषीं ॥ ६४ ॥ चित्तवृत्तिक्रियाचरण ॥
त्या नांव गा कर्म जाण ॥ तेथ निरपेक्ष तें माझें भजन ॥ स्वधर्म संपूर्ण या नांव ॥ ६५ ॥ ऐशिया स्वधर्मवृत्ती ॥ जेथ प्रकटे माझी
भक्ती ॥ ते ते सात्विक प्रकृति ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ६६ ॥ ॥ आशंका ॥ ॥ कर्म करितां फळाशा वाढे ॥ तो फळभोग भोगणें
पडे ॥ स्वकर्मे भक्ति केवीं घडे ॥ कर्म तें कुडें अत्यंत ॥ ६७ ॥ कर्म करितां फळ बाधक ॥ न करितां प्रत्यवाय[3] नरक ॥ कर्में कर्मबद्ध लो
क ॥ केले देख संसारीं ॥ ६८ ॥ जीव होता जो स्वतंत्र ॥ तो कर्में केला परतंत्र ॥ एवढें कर्माचें चरित्र ॥ अति विचित्र बाधक ॥ ६९ ॥

---

[1] धनाचो इच्छा करणारा. [2] सत्वगुणयुक्त. [3] प्रायश्चित्त.

स्वकर्में भगवद्भक्ती ॥ ह्मणशी घडे कैशा रीतीं ॥ तेचि अर्थींची उपपत्ती ॥ स्वयें श्रीपती सांगत ॥ १७० ॥ सर्प धांवोनि धरिल्या तोंडीं ॥
तो सर्वांगीं घाली आढी ॥ तेणें धाकें जो सोडी ॥ तरी तो विभांडी महाविखें ॥ ७१ ॥ ते सर्पबाधेची सांकडी ॥ निवारी मंत्रवादी गा
रुडी ॥ तेवीं कर्मीं कर्मबाधा गाढी ॥ निवारी रोकडी गुरुरावो ॥ ७२ ॥ रिघतां सद्गुरूसि शरण ॥ कर्म करवी ब्रह्मार्पण ॥ हेंचि निरपेक्ष[1]
लक्षण ॥ उद्धवा जाण निश्चित ॥ ७३ ॥ ब्रह्मकर्माचें प्रकाशक ॥ कर्म तितुकें ब्रह्मात्मक ॥ हेंचि मदर्पणं[2] चोख ॥ माझें भजन देख या
रीतीं ॥ ७४ ॥ सर्वेंद्रियीं ज्ञानस्फूर्ती ॥ ते ब्रह्मींची ब्रह्मशक्ती ॥ ऐसेनि निश्चयें कर्मस्थिती ॥ स्वकर्मभक्ती या नांव ॥ ७५ ॥ ऐसेनि स्व
कर्में स्वाभाविक ॥ जे मज भजती भाविक ॥ ते ते शुद्ध सात्विक लोक ॥ जाण निश्चित उद्धवा ॥ ७६ ॥ स्वधर्म सर्वथा निष्फळ ॥ ह्म
णती ते मूर्ख केवळ ॥ स्वकर्म निरसी चित्तमळ ॥ कर्म समूळ निर्दळी ॥ ७७ ॥ एवढी स्वधर्माची जोडी ॥ सांडूनि वांछिती विषयगो
डी ॥ तें तें राजसें बापुडीं ॥ केवळ वेडीं विषयार्थीं ॥ ७८ ॥ विषयफळ वांछितां देख ॥ देह धरणें आवश्यक ॥ देहसंभवं[3] दुःखदायक ॥
स्वर्गनरकफळ भोगी ॥ ७९ ॥ यापरी जनीं दुःखदाती ॥ राजसतामसप्रकृती ॥ ऐक त्या दोनी गुणवृत्ती ॥ विशद[4] तुजप्रती सांगेन
॥ १८० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदा आशिष आशास्य मां भजेत स्वकर्मभिः ॥ तं रजःप्रकृतिं विद्याद्धिंसामाशास्य तामसम् ॥ ११ ॥ ॥
जो कां आचरोनि स्वधर्म ॥ वांछि नानाफळकाम ॥ तें तें जाण काम्य कर्म ॥ राजस धर्म या नांव ॥ ८१ ॥ जो अभ्यंतरीं[5] अतिस
काम ॥ तो जें जें आचरे कर्मधर्म ॥ तें तें अवघेंचि सकाम ॥ फळसंभ्रम निजहेतू ॥ ८२ ॥ स्वरूपीं काम्य कर्म नाहीं ॥ कामना काम्य
करी पाही ॥ सोनें स्वभावें असे ठायीं ॥ लेणें उपायीं स्वयें कीजे ॥ ८३ ॥ स्वकर्म स्वभावें पवित्र जाण ॥ स्वधर्म माझें शुद्ध भजन ॥
तेथ कामनाफळ कामून ॥ काम्य आपण स्वयें कीजे ॥ ८४ ॥ फळकामें जें माझें यजनं[6] ॥ तें केवळ फळाचेंचि भजन ॥ सकामें जें स्व
धर्माचरण ॥ ते प्रकृति जाण राजस ॥ ८५ ॥ ऐसऐशिये प्रकृतीचा विलास ॥ स्त्री अथवा हो कां पुरुष ॥ तें तें जाण पां राजस ॥ ऐक
तामस गुणवृत्ती ॥ ८६ ॥ क्रोधयुक्त अंतःकरण ॥ तेणेंसी ज्याचें स्वधर्माचरण ॥ फळ वांछी सकाम मन ॥ ते प्रकृति जाण तामसी
॥ ८७ ॥ जेथें द्वेषें बांधलें घर ॥ ते ठायीं क्रोध अनिवार ॥ ते भूतमात्रीं निष्ठुर ॥ ज्याचि प्रकृति क्रूर सर्वदा ॥ ८८ ॥ ऐशिया स्वभा
वावरी ॥ नर अथवा हो कां नारी ॥ ते ते तामस संसारी ॥ निजनिर्धारीं उद्धवा ॥ ८९ ॥ जीवस्वरूपें चैतन्य पहाहो ॥ त्यासि मी भजक
ह्मणे देवो ॥ जीवासि कां सेवकभावो ॥ सेव्य देवो कैसेनी ॥ १९० ॥ येच अर्थींचें निरूपण ॥ कृष्ण सांगताहे आपण ॥ सेव्य[7]सेवक

---

१ कामनारहित. २ मला अर्पण करणें. ३ देहाचें जन्म. ४ स्पष्ट. ५ मनांत. ६ पूजा. ७ सेव्य ईश्वर–सेवक जीव.

लक्षण ॥ मायागुणसंबंधें ॥ ९१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सत्वं रजस्तम इति गुणा जीवस्य नैव मे ॥ चित्तजा यैस्तु भूतानां सज्जमानो निबध्यते ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ बांधोनि नाणितां आया ॥ जेवीं देहाधीन असे छाया ॥ तेवीं भगवंताधीन माया ॥ नातळोनियां वर्तवी ॥ ९२ ॥ माया वर्तविता निवर्त्तविता[1] ॥ स्वामी भगवंत तत्त्वतां ॥ यालागीं मायाअध्यक्षता ॥ त्यासीचि सर्वथा वेद बोले ॥ ९३ ॥ सूर्य अंधारातें नाशी ॥ परी तो संमुख न ये त्यापाशीं ॥ तेवीं मायानियंता[2] हृषीकेशी ॥ परी माया देवासी सुटक नव्हे ॥ ९४ ॥ माझें जें देखणेंपण ॥ तेंचि मायेचें मुख्य लक्षण ॥ मजपाशीं माया जाण ॥ गुणाभिमानेंसी नाहीं ॥ ९५ ॥ मायाबिंबित चैतन्य ॥ त्यासि बोलिजे जीवपण ॥ त्या जीवासि त्रिगुणीं बांधोन ॥ देहाभिमान दृढ केला ॥ ९६ ॥ जीवासि लागतां देहाभिमान ॥ तो झाला मायाधीन ॥ मायानियंता नारायण ॥ तो स्वामी जाण जीवाचा ॥ ९७ ॥ जीव गुणाभिमानें बद्धक ॥ यालागीं झाला तो सेवक ॥ आत्मा गुणातीत[3] चोख ॥ बंधमोचक[4] जीवाचा ॥ ९८ ॥ या परी सेव्यसेवकभावो ॥ विभाग दावोनियां पहाहो ॥ त्रिगुणगुणांचा अन्वयो ॥ विशद[5] देवो स्वयें सांगे ॥ ९९ ॥ गुण तिन्ही समसमान ॥ त्यांमाजी क्षोभोनियां जाण ॥ जो जो वाढे अधिक गुण ॥ तें तें लक्षण हरि सांगे ॥ २०० ॥ ब्रह्म निर्मळत्वें प्रसिद्ध ॥ कर्म शोधकत्वें अतिशुद्ध ॥ येथ कर्मीं उपजे कर्मबाध ॥ तो चित्तसंबंध गुणक्षोभें ॥ १ ॥ कर्मब्रह्मीं दोष नाहीं ॥ दोष चित्तवृत्तीच्या ठायीं ॥ तोही गुणक्षोभें पाही ॥ घाली अपायीं पुरुषातें ॥ २ ॥ येचि अर्थीचें निरूपण ॥ सांगीतलें मिश्रलक्षण ॥ आतां वाढल्या एकेक गुण ॥ गुणलक्षण तें ऐक ॥ ३ ॥ जो गुण वाढे अति उन्नतीं ॥ इतर त्यातळीं वर्त्तती ॥ ते काळींची पुरुषस्थिती ॥ उद्धवाप्रती हरि सांगे ॥ ४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदेतरौ जयेत्सत्वं भास्वरं विशदं शिवम् ॥ तदा सुखेन युज्येत धर्मज्ञानादिभिः पुमान् ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ ॥ समूळ फळाशा त्यागूनी ॥ निर्विकल्प[6] निरभिमानी ॥ जो लागे स्वधर्माचरणीं ॥ तैं रजतम दोनी जिणे सत्व ॥ ५ ॥ जैं भाग्याचें भरण उघडे ॥ तैं हरिकथाश्रवण घडे ॥ मुखीं हरिनामकीर्ति आवडे ॥ तेणें सत्व वाढे अतिशुद्ध ॥ ६ ॥ कां देवें जोडिल्या सत्संगती ॥ श्रवणीं श्रवण लांचावती ॥ वाचा लांचावे नामकीर्ती ॥ अतिप्रीतीं अहर्निशीं ॥ ७ ॥ ऐसऐशिया अनुवृत्ती ॥ रज तम दोनी क्षीण होती ॥ सत्व वाढे अनुद्वेगवृत्तीं[7] ॥ त्या सत्वाची स्थिती समूळ ऐक ॥ ८ ॥ भासरत्वें[8] प्रकाश बहळ ॥ विशदत्वें अतिनिर्मळ ॥ शिव ह्मणिजे शांत सरळ ॥ हें सत्वाचें केवळ स्वरूप मुख्य ॥ ९ ॥ हे सत्वाची सत्ववृत्ती ॥ आतुडे[9] ज्या साधकाहातीं ॥ ते काळींची पुरुषस्थिती ॥ ऐक तुजप्रती सांगेन ॥ २१० ॥ जें विवेकाचें तारूं आतुडे ॥ वैराग्याचें निजगुज जोडे ॥ सर्वेंद्रियीं प्रकाश

---

१ नाहींसो करणारा. २ मायेस स्वाधीन ठेवणारा. ३ गुणांपलीकडे. ४ जन्ममरणांपासून सोडविणारा. ५ स्पष्ट. ६ वासनारहित. ७ उद्वेगशून्यवर्तनानें. ८ तेजोरूपानें. ९ मिळते.

उघडे ॥ शीग चढे स्वधर्माची ॥ ११ ॥ ते काळीं जनअधर्मता ॥ गर्व अभिमान असत्यता ॥ बलात्कारेंही शिकवितां ॥ न करी सर्वथा अधर्म ॥ १२ ॥ निकट असतां दुःखसाधन ॥ सात्विक सदा सुखसंपन्न ॥ बलात्कारें क्षोभवितां मन ॥ सात्विक जाण क्षोभेना ॥ १३ ॥ ऐशिया निजसत्वदृष्टी ॥ सुख सुखा येतां भेटी ॥ त्यासि स्वानंदें कोंदे सृष्टी ॥ शुद्ध सत्वपुष्टी या नांव ॥ १४ ॥ ऐसें विशद[1] सत्व जयापार्शीं ॥ शम दम सेविती तयासी ॥ वैराग्य लागे पायांसी ॥ शुद्ध सत्वराशी ते उद्धवा ॥ १५ ॥ तैसेंचि सत्व तम जिणोन ॥ जैं वाढे गा रजोगुण ॥ तैं राजसाचें लक्षण ॥ ऐक संपूर्ण हरि सांगे ॥ १६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदा जयेत्तमः सत्वं रजः संगं भिदा बलम् ॥ तदा दुःखेन युज्येत कर्मणा यशसा श्रिया ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ रजोवृद्धीचें कारण ॥ देहीं उपजे ज्ञानाभिमान ॥ पदोपदीं देखे दोषगुण ॥ वांछी सन्मान प्रतिष्ठा ॥ १७ ॥ नवल रजोगुणाची ख्याती ॥ ज्ञातेपणें कामासक्ती ॥ नाना भोग वांछी चित्तीं ॥ तेणें रजाची प्राप्ती अनिवार ॥ १८ ॥ ऐसेनि रजोगुण वाढोनि वाढी ॥ सत्वतमांतें तळीं पाडी ॥ त्या रजाची स्वरूपता मोडी ॥ ऐक निरवडी सांगेन ॥ १९ ॥ श्लोक त्रैपदीं प्रबळ ॥ रजसंगभिदाबळ ॥ बोलिला रजोगुण केवळ ॥ तेंचि विवळ हरि सांगे ॥ २२० ॥ संग ह्मणिजे देहाभिमान ॥ देह ह्मणिजे मीमाझेंपण[2] ॥ बळ ह्मणिजे काम गहन ॥ आग्रहो पूर्ण वृत्तीचा ॥ २१ ॥ देहाभिमानें दुःख उठी ॥ भेदें भय लागे पाठीं ॥ त्या नश्वरदेहाचिया पुष्टी ॥ काम्यकामाठी कर्माची माडी ॥ २२ ॥ ज्या कर्माचेनि कैवाडें ॥ यश श्री उदंड जोडे ॥ तें तें कर्म वाढवी पुढें ॥ हें रजोगुणें घडे आचरण ॥ २३ ॥ मी एक पवित्र त्रिजगतीं ॥ माझीच उत्तम कर्मस्थिती ॥ प्रवृत्ति मान्यता आसक्ती ॥ ते जाणावी स्थिती राजस ॥ २४ ॥ रजाचें बळ उद्भट ॥ कर्म आदरी अचाट ॥ वाढवी कर्मकचाट ॥ तो जाण श्रेष्ठ राजस ॥ २५ ॥ बाहेर दिसे सात्विकस्थिती ॥ अंतरीं कर्मवासना द्रव्यासक्ती ॥ ज्यासि प्रिया आवडे चित्तीं ॥ तो जाण निश्चितीं राजसू ॥ २६ ॥ तेव्हां सत्व रज दोनी गुण ॥ जिणोनि तम वाढे पूर्ण ॥ तेकाळीं पुरुषलक्षण ॥ स्वयें नारायण सांगत ॥ २७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदा जयेद्रजः सत्त्वं तमोगूढं लयं जडम् ॥ युज्येत शोकमोहाभ्यां निद्रया हिंसयाशया ॥ १५ ॥ टीका ॥ ॥ रज सत्व करूनि गूढ ॥ जैं तमोगुण होय रूढ ॥ तैं तो पुरुषातें सदृढ ॥ करी जडमूढ अतिस्तब्ध ॥ २८ ॥ विश्वासूनि वाडेंकोडें[3] ॥ जैं परद्रव्य बुडवणें पडे ॥ कां परदारागमन[4] घडे ॥ तैं तेणें वाढे तमोगुण ॥ २९ ॥ स्वमुखें परापवाद[5] बोलणें ॥ स्वयें साधुनिंदा करणें ॥ संतसज्जनां द्वेषणें ॥ तें तमाचें ठाणें अनिवार ॥ २३० ॥ धुईचेनि आलेपणें ॥ पडे सूर्यासि झांकणें ॥ तेवीं विवेकाचें जिणें ॥ तमोगुणें ग्रासिजे ॥ ३१ ॥ सत्वगुणें प्रकाशक ॥ रज

---

१ स्वच्छ. २ अहंममत्वानें. ३ अनेक हिकमतीनें. ४ परस्त्रीगमन. ५ दुसऱ्याचा उणेपणा.

प्रवृत्ति प्रवर्तक ॥ दोनीतें गिळूनि देख ॥ तमाचें आधिक्य अधर्मे वाढे ॥ ३२ ॥ करितां पूज्याचें हेळण ॥ साधूचे देखतां दोषगुण ॥ तेणें खवळला तमोगुण ॥ त्याचें स्वरूप पूर्ण तें ऐक ॥ ३३ ॥ तमोगुण वाढल्या प्रौढ ॥ स्फूर्तिमात्र होय मूढ ॥ लयो उपजवोनि दृढ ॥ करी जड जीवातें ॥ ३४ ॥ कार्याकार्यविवेकज्ञान ॥ ते स्फूर्ति अंध होय पूर्ण ॥ या नांव गा मूढपण ॥ ऐक चिह्न लयाचें ॥ ३५ ॥ जागृतीमाजी असतां चित्त ॥ अर्थ स्वार्थ परमार्थ ॥ कांहीं स्मरेना कृत्याकृत्य ॥ लयो निश्चित या नांव ॥ ३६ ॥ समस्ताही इंद्रियवृत्ती ॥ अनुद्यमें स्तब्धगती ॥ निःशेष लोपे ज्ञानशक्ती ॥ जडत्वप्राप्ती या नांव ॥ ३७ ॥ मूढत्वें पावे शोकदुःख ॥ जडत्वें मिथ्या मोह देख ॥ मोहास्तव होय घातक ॥ अतिविवेक अधर्मी ॥ ३८ ॥ ऐक लयाचें कौतुक ॥ अहोरात्र निद्रा अधिक ॥ निद्रेवेगळें ब्रह्मसुख ॥ नावडे देख तामसा ॥ ३९ ॥ पूर्ण वाढल्या तमोगुण ॥ ऐसें होय पुरुषलक्षण ॥ वाढल्या सत्वादि गुण ॥ फळ कोण तें हरि सांगे ॥ २४० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यदा चित्तं प्रसीदत इंद्रियाणां च निर्वृतिः ॥ देहेऽभयं मनोऽसंगं तत्सत्वं विद्धि मत्पदम् ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ वाढलिया सत्वगुण ॥ चित्त सदा सुप्रसन्न ॥ कामक्रोधलोभांचें स्फुरण ॥ सर्वथा जाण स्फुरेना ॥ ४१ ॥ चित्त वणवणी विषयालागीं ॥ तें उदास होय विषयभोगीं ॥ विषय आदळतांही अंगीं ॥ तैं विषयसंगीं विगुंतेना ॥ ४२ ॥ जेवीं जळामाजी जळस्थ ॥ पद्मिणीपत्र जळीं अलिप्त ॥ तेवीं विषयामाजी चित्त ॥ विषयातीत मद्बोधें ॥ ४३ ॥ सदा मरणभय देहासी ॥ तें मरण आलिया देहापाशीं ॥ भय नुपजे सात्विकासी ॥ भावें मत्पदासी विनटले ॥ ४४ ॥ जंववरी भासे मीतूंपण ॥ तंववरी अवश्य बाधी मरण ॥ सात्विक मत्पदीं अभिन्न ॥ यालागीं मरणभय नाहीं ॥ ४५ ॥ सात्विक मत्पदीं अनन्यशरण ॥ यालागीं बाधीना जन्ममरण ॥ या स्थितीं वर्तवी सत्वगुण ॥ आतां ऐक लक्षण रजाचें ॥ ४६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विकुर्वन् क्रियया चाधीरनिर्वृत्तिश्च चेतसाम् ॥ गात्रास्वास्थ्यं मनो भ्रांतं रज एतैर्निशामय ॥ १७ ॥ ॥ टीका ॥ ॥ खवळलिया रजोगुण ॥ विषयचिंता अतिदारुण ॥ कर्मेंद्रियीं क्रियाभरण ॥ नानापरीचें जाण उपपादी ॥ ४७ ॥ शरीर असतांही स्वस्थ ॥ मन चिंतातुर अतिभ्रांत ॥ वाढवितां विषयस्वार्थ ॥ दुःखी होत सर्वदा ॥ ४८ ॥ असतां पुत्रवित्तसंपत्ती ॥ अधिक स्वार्थ वाढवी चित्तीं ॥ राजसाची चित्तवृत्ती ॥ न मनी निवृत्ती क्षणार्धें ॥ ४९ ॥ नसतां विकाराचें कारण ॥ चित्तीं विकार चिंती आपण ॥ हेंचि राजसाचें लक्षण ॥ मुख्यत्वें जाण उद्धवा ॥ २५० ॥ रात्री नोहे पैं प्रबळ ॥ ना दिवस नव्हे सोज्ज्वळ ॥ जैसी सांजवेळीं सांजवेळ ॥ तैसा केवळ रजोगुण ॥ ५१ ॥ सत्वरजांची उणखूण ॥ तुज दाविली वोळखण ॥ आतां ऐक तमोगुण ॥ जड

---

१ करणें कोणतें व न करणें कोणतें याच्या विचाराचें ज्ञान. २ इंद्रियव्यापार. ३ एकनिष्ठपणानें शरण. ४ पापपुण्यादिक.

लक्षण तयाचें ॥ ५२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सीदच्चित्तं प्रलीयेत चेतसो ग्रहणे क्षमम् ॥ मनो नष्टं तमो ग्लानिस्तमस्तदुपधारय ॥ १८ ॥ ॥
टीका ॥ ॥ चित्तीं चिंता अतिगहन ॥ ते महामोहीं होय निमग्न ॥ कोणेंही अर्थींचें ज्ञान ॥ हृदयीं जाण स्फुरेना ॥ ५३ ॥ सुषुप्तीवेगळें[1]
अज्ञान ॥ सदा पळे देखोनि ज्ञान ॥ तेथ नवल कैसें झालें जाण ॥ त्या ज्ञानातें अज्ञान गिळूनि टाकी ॥ ५४ ॥ जागाचि परी निजेला
दिसे ॥ कर्म करी स्फुरण नसे ॥ जेवीं कां आभाळांतिले अंवसे ॥ रात्रीं चाले जैसें आंधळें ॥ ५५ ॥ सकळशरीराचा गोळा ॥ होय
आळसाचा मोदळा ॥ हा तमोग्लानीचा[2] सोहळा ॥ पडळ ये डोळां चित्तवृत्ती ॥ ५६ ॥ संकल्पविकल्पाची ख्याती ॥ उपजवी सदा
मनोवृत्ती ॥ त्या मनाची जड होय स्थिती ॥ संकल्पस्फूर्तीं[3] स्फुरेना ॥ ५७ ॥ आणिकही नवलस्थिती ॥ चित्तासि नाठवे चित्तस्फूर्ती ॥
एवढी वाढे तमाची ख्याती ॥ मनोवृत्तीविनाशक ॥ ५८ ॥ यापरी तमाचें बळ होय ॥ तैं मनातें अज्ञान खाय ॥ ते काळीं मन नष्टप्राय
॥ मूर्च्छित राहे मूढत्वें ॥ ५९ ॥ मनाहूनि दोष जैं नाशते ॥ तैं महादुःख कोण भोगितें ॥ यालागीं तमाचेनि ऐक्यमतें ॥ मन उरे तेथें
जडमूढ ॥ २६० ॥ यापरी जे वर्तती गती ॥ तेचि अत्यंत दुःखदाती ॥ या नांव गा तमाची स्थिती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ६१ ॥
वाढवितां गुणवृत्ती ॥ कोणें गुणें कोण वाढती ॥ येचि अर्थीं[illegible] उपपत्ती ॥ स्वयें श्रीपती सांगत ॥ ६२ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ एधमाने
गुणे सत्वे देवानां बलमेधते ॥ असुराणां च रजसि तमस्युद्धव रक्षसाम् ॥ १९ ॥ ॥ टीका ॥ ॥ दैवी आसुरी राक्षसी स्थिती ॥ हे
त्रिगुण गुणांची संपत्ती ॥ जे जे ब्रह्मांडीं इंद्रियवृत्ती ॥ तेचि स्थिती पिंडींही ॥ ६३ ॥ ब्रह्मांडीं सकळ देव ॥ महापुरुषाचे अवयव ॥
पिंडींही[4] तेचि स्वयमेव ॥ वर्तती सर्व निजऐक्यें ॥ ६४ ॥ उचित स्वधर्मशास्त्रस्थिती ॥ निवृत्तिकर्मीं[5] जे प्रवृत्ती ॥ ऐशी जेथ इंद्रियवृत्ती ॥
ते दैवी संपत्ती सत्वस्थ ॥ ६५ ॥ कामाभिलाष दृढ चित्तीं ॥ आणि स्वधर्मीं तरी वर्तती ॥ ऐशी जे इंद्रियस्थिती ॥ ते आसुरी संपत्ती राजसी
॥ ६६ ॥ सलोभमोहें क्रोध चित्तीं ॥ सदा अधर्मीं प्रवृत्ती ॥ ऐशी जे इंद्रियस्थिती ॥ ते राक्षसी संपत्ती तामसी ॥ ६७ ॥ क्षणें सकाम
क्षणें निष्काम ॥ ऐसा जेथ वाढे स्वधर्म ॥ तेथ देवां असुरां परम ॥ होय संग्राम वृत्तीसी ॥ ६८ ॥ चित्तीं वाढवूनि मोहभ्रम ॥
अधर्मचि मानी स्वधर्म ॥ तैं राक्षसाचा पराक्रम ॥ देवासुरां परम निर्दाळी ॥ ६९ ॥ सकामनिष्काममोहभ्रमेंसी ॥ वृत्ती वर्ते गा जया
पाशीं ॥ तेथ देवां असुरां राक्षसांसीं ॥ कलहो अहर्निशीं अनिवार ॥ २७० ॥ क्षणेक रति परमार्थीं ॥ क्षणेक रति अर्थस्वार्थीं ॥ क्षणेक
होय अनर्थीं ॥ परदारारती परद्रव्यें ॥ ७१ ॥ ऐशिये गा चित्तवृत्तीं ॥ कदा नुपजे निजशांती ॥ मा परमार्थाची प्राप्ती ॥ कैशा रीतीं

---

१ गाढझोंपेवांचून. २ अज्ञानाचा व विषादाचा होण्याचा. ३ स्फुरण. ४ देहांतहि. ५ निष्कामकर्मीं.

होईल ॥ ७२ ॥ साधक सर्वदा पुसती ॥ कोण बाधा असे चित्तवृत्तीं ॥ ते बाधकत्वाची स्थिती ॥ विशद तुजप्रती सांगीतली ॥ ७३ ॥
एकचि गुण जैं पुरता जोडे ॥ तैं एकविध वृत्ती वाढे ॥ हें तंव सर्वथा नघडे ॥ गुण गुणासी भिडे उपमर्दें ॥ ७४ ॥ एकचि न जोडे गुणावस्था ॥ यालागीं नव्हे एकविधता ॥ तेणें अनिवार भवव्यथा[1] ॥ बाधी भूतां गुणक्षोभें ॥ ७५ ॥ तम अधर्माकडे वाढे ॥ रजोगुण
देहकर्माकडे ॥ सत्वगुणासी वाढी नघडे ॥ मुक्तता जोडे कैसेनी ॥ ७६ ॥ रजतमउभयसंधीं ॥ सत्व अडकलें दोहींमधीं ॥ तैं वाढों न
शके त्रिशुद्धीं ॥ नैराश्यवृद्धी सत्वगुणें ॥ ७७ ॥ त्रिगुण गुणांची त्रिपुटी ॥ आपण कल्पी आपल्या पोटीं ॥ तेंचि भवभय होऊनियां उठी ॥
लागे पाठीं बाधकत्वें ॥ ७८ ॥ सत्वें देवांसि प्रबळ बळ ॥ रजोगुणें दैत्य प्रबळ ॥ तमोगुणें केवळ ॥ अतुर्बळ राक्षसां ॥ ७९ ॥ हे गुणवृत्तींची व्यवस्था ॥ समूळ सांगीतली कथा ॥ त्रिगुणांच्या तीन अवस्था ॥ ऐक आतां सांगेन ॥ २८० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सत्वाज्जागरणं विद्याद्रजसा स्वप्नमादिशेत् ॥ प्रस्वापं तमसा जंतोस्तुरीयं त्रिषु संततम् ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ सत्वगुणाचिये स्थिती ॥ नातळे
स्वप्न आणि सुषुप्ती ॥ जीवीं सदा नांदे जे जागृती ॥ इंद्रियप्रवृत्ती सावध ॥ ८१ ॥ रजोगुणाचेनि आधिक्यें ॥ चित्तवृत्तीतें स्वप्न जिंके ॥ जागृति सुषुप्ति दूरीं ठाके ॥ बैसला देखे स्वप्नची ॥ ८२ ॥ तमोगुण वाढल्या वाढी ॥ जागृति स्वप्न दूरीं दवडी ॥ मग सुषुप्ति अति
गाढी ॥ आदळे रोकडी जीवा अंगीं ॥ ८३ ॥ त्यासि सभे बैसल्या पाहे ॥ बोलत बोलतां डुलकी जाये ॥ जेवित जेवितांही पाहे ॥
झोंपीं जाये कडकडां ॥ ८४ ॥ क्षणां जागृति क्षणां सुषुप्ती ॥ क्षणैक स्वप्नाची प्रतीती ॥ हे त्रिगुणांची मिश्रित वृत्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ८५ ॥ जागृति स्वप्न सुषुप्ती ॥ तिहीं अवस्थांतें प्रकाशिती ॥ यालागीं ते चौथी ॥ तुरीय ह्मणती सज्ञान[2] ॥ ८६ ॥ जे जागृतीतें जागवित ॥ जे स्वप्नीं स्वप्नातें नांदवित ॥ जे सुषुप्तीतें निजवित ॥ त्यातें तुरीय[3] ह्मणत उद्धवा ॥ ८७ ॥ जे तिहीं अवस्था आंत ॥
असोनि नव्हे अवस्थाभूत ॥ जे निर्गुण निजनित्य ॥ त्यातें ह्मणत तुरीय ॥ ८८ ॥ जेवीं पुत्राचेंनि जाहलेपणें ॥ पुरुषें पिता नांव पावणें ॥
तेवीं तिहीं अवस्थागुणें ॥ तुरीय ह्मणणें वस्तूसी ॥ ८९ ॥ वस्तूवरी अवस्था भासे ॥ भासली अवस्था सवेंचि नासे ॥ त्या नाशामाजी
वस्तु न नासे ॥ उरे अविनाशें तुरीय ॥ २९० ॥ तुरीय त्रिकाळीं सतत ॥ यापरी जाणावें एथ ॥ आतां गुणवृत्तिभूमिकाप्राप्त ॥ तो
ही वृत्तांत हरि सांगे ॥ ९१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ उपर्युपरि गच्छंति सत्वेन ब्राह्मणा जनाः तमसाऽधोऽध आमुख्याद्रजसांऽतरचारिणः ॥ २१ ॥
॥ टीका ॥ ॥ सत्वगुणाचें आयतन ॥ मुख्यत्वें ब्राह्मण[4] जाण ॥ ते न करूनि ब्रह्मार्पण ॥ स्वधर्माचरण जे करिती ॥ ९२ ॥ त्यांसि स्वध

---

[1] जन्ममरणबाधा. [2] ज्ञानीजन. [3] चवथी. [4] ज्यांनीं ब्रह्म जाणलें ते.

मांच्या कर्मशक्तीं ॥ ऊर्ध्वलोकीं होय गती ॥ लोकलोकांतरप्राप्ती ॥ ब्राह्मण पावती तें ऐक ॥ ९३ ॥ स्वर्गलोक महर्लोक ॥ क्रमूनि पावती जनलोक ॥ उल्लंघोनियां तपोलोक ॥ पावती सात्विक सत्यलोक पैं ॥ ९४ ॥ वाढलिया रजोगुण ॥ शूद्रादिचांडाळपण ॥ पुढती जन्म पुढती मरण ॥ अविश्रम जाण भोगवी ॥ ९५ ॥ वाढलिया तमोगुण ॥ पश्वादियोनि पावोन ॥ दंश मशक वृक्ष पाषाण ॥ योनि संपूर्ण भोगवी ॥ ९६ ॥ प्राण्यासि अंतकाळीं जाण ॥ देहांतीं जो वाढे गुण ॥ त्या मरणाचें फळ कोण ॥ तेंही श्रीकृष्ण स्वयें सांगे ॥ ९७ ॥ अनन्य करितां माझी भक्ती ॥ भक्तांसि अंतीं कोण गती ॥ तेहीविखींची उपपत्ती ॥ श्लोकांतीं हरि सांगे ॥ ९८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सत्त्वे प्रलीनाः स्वर्यांति नरलोकं रजोलयाः ॥ तमोलयास्तु निरयं यांति मामेव निर्गुणाः ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥ संसारीं मुख्यत्वें त्रिगुण ॥ तेथ वाढोनियां सत्वगुण ॥ ज्यासि प्राप्त होय मरण ॥ तो स्वर्गभोगी जाण दिव्यदेह पावे ॥ ९९ ॥ सत्वें निमाल्या सात्विक ॥ ते पावती स्वर्गलोक ॥ रजोगुणें निमाल्या देख ॥ त्या मनुष्यलोक मानवी ॥ ३०० ॥ अंतीं वाढोनियां तमाधिक्य ॥ तमोगुणें निमाल्या देख ॥ ते भोगिती महानरक ॥ दुःखदायक दारुण ॥ १ ॥ सप्रेम करितां माझी भक्ती ॥ माझिया भक्तांसि देहांतीं ॥ हृदयीं प्रकटे माझी मूर्ती ॥ घवघविती निजतेजें ॥ २ ॥ शंखचक्रगदादिसंपूर्ण ॥ पीतांबर[illegible] श्रीकृष्ण ॥ ध्यानीं धरूनि पावे मरण ॥ तो वैकुंठीं जाण मी होयें ॥ ३ ॥ सर्वभूतीं मी आत्मा पूर्ण ॥ ऐसें ज्याचें अखंड भजन ॥ ते जितांचि तिन्ही गुण ॥ जिणोनि निर्गुण पावती ॥ ४ ॥ त्यांचे देहासि दैवें[3] आल्या मरण ॥ मजवेगळें नाहीं स्थान ॥ ते निजानंदें परिपूर्ण ॥ निजनिर्गुण स्वयें होती ॥ ५ ॥ माझें स्वरूप निजनिर्गुण ॥ अथवा वैकुंठींचें सगुण ॥ दोन्ही एकचि निश्चयें जाण ॥ सगुणीं निर्गुण समसाम्य ॥ ६ ॥ स्वर्ग नरक मनुष्यलोक ॥ प्राप्ति पावले निर्गुण चोख ॥ त्यांच्या साधनाचें कौतुक ॥ स्वयें यदुनायक सांगत ॥ ७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मदर्पणं निष्फलं वा सात्विकं निजकर्म तत् ॥ राजसं फलसंकल्पं हिंसाप्रायादि तामसम् ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ सकळ कर्मक्रियाचरण ॥ संकल्पेंवीण आपण ॥ सहजें होय ब्रह्मार्पण ॥ हें निर्गुण साधन शोधितसत्वें ॥ ८ ॥ वर्णाश्रमधर्म सकळ ॥ आचरे परी न वांछी फळ ॥ माझे भक्तीचें प्रेम प्रबळ ॥ हें कर्म केवळ सात्विक ॥ ९ ॥ माझें भजन हाचि स्वधर्म ॥ याचि नांव गा निज[4]कर्म ॥ ऐसें ज्यासि कळे वर्म[5] ॥ सात्विक कर्म या नांव ॥ ३१० ॥ स्वधर्म आचरोनि सकळ ॥ इंद्रादिदेवां यजनशीळ ॥ जो वांछी इहा[6]मुत्र फळ ॥ हें कर्म केवळ राजस ॥ ११ ॥ जे कर्मीं प्रकट हिंसा घडे ॥ कां आँभिचारिक[7] करणें पडे ॥ स्वरूपें जें कर्म कुडें ॥ तें जाण धडफुडें तामस ॥ १२ ॥ जेथ दांभिक कर्माचारू ॥ जेथ साधूंसि अति

---

१ चतुष्पादजनवरांचा जन्म. २ व्याख्यान. ३ नशीबानें. ४ कर्तव्यकर्म. ५ खूण. ६ या लोकीं व परलोकीं. ७ शत्रुमारणादिक.

मत्सरू ॥ जेथ निंदेचा प्रबळ भरू ॥ तो कर्मादरू तामस ॥ १३ ॥ आतां त्रिगुण आणि निर्गुण ॥ यांचें चतुर्विध लक्षण ॥ या श्लोकीं श्रीकृष्ण ॥ स्वमुखें आपण सांगत ॥ १४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कैवल्यं सात्विकं ज्ञानं रजो वैकल्पिकं च यत् ॥ प्राकृतं तामसं ज्ञानं मन्निष्ठं निर्गुणं स्मृतम् ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ देहीं असोनि देहातीत ॥ भूतीं भूतात्मा भगवंत ॥ भूतां सबाह्य सभराभरित ॥ हें ज्ञान निश्चित सात्विक ॥ १५ ॥ भिन्न खाणी भिन्नाकार ॥ भिन्न नांवें भिन्न व्यापार ॥ तेथ वस्तु देखे अभिन्नाकार ॥ हें ज्ञान साचार सात्विक ॥ १६ ॥ करूनि वेदशास्त्रपठन ॥ निर्धारितां निजज्ञान ॥ सर्वेंचि कल्पी आपण ॥ विकल्प पूर्ण रजाचे ॥ १७ ॥ करून वार्तिकांतव्युत्पत्ती ॥ अद्वैतनिश्चयो[1] नाहीं चित्तीं ॥ आपण विकल्पी आपुल्या युक्ती ॥ तें ज्ञान निश्चितीं राजस ॥ १८ ॥ करूनि वेदशास्त्रश्रवण ॥ होय शिश्नोदरपरायण ॥ इंद्रियार्थीं श्रद्धा पूर्ण ॥ तो केवळ जाण राजस ॥ १९ ॥ ऐक निश्चयो नाहीं चित्तीं ॥ विकल्प उपजती नेणों किती ॥ हे रजोगुणाची ज्ञानवृत्ती ॥ ऐक निश्चितीं तमोज्ञान ॥ ३२० ॥ महामोहो गिळी ज्ञानस्फूर्ती ॥ मी जड अंध मानी निश्चितीं ॥ नश्वरपदार्थीं[2] आसक्ती ॥ तें ज्ञान निश्चितीं तामस ॥ २१ ॥ आहार निद्रा भय मैथुन ॥ केवळ पशुप्राय जें ज्ञान ॥ तें निश्चयें तामस जाण ॥ ऐक निर्गुणविभाग ॥ २२ ॥ कार्य कर्ता आणि कारण ॥ त्रिपुटी त्रिगुणेंसि करूनि शून्य ॥ केवळ जें चैतन्यघन ॥ तें निर्गुण ज्ञान उद्धवा ॥ २३ ॥ सत्वाचेनि निजउल्हासें ॥ सर्वेंद्रियीं ज्ञान प्रकाशे ॥ तें ज्ञानचि मानी वायसें ॥ मी ज्ञानरूपें असें अनादि[3] ॥ २४ ॥ सिंधुजळें सरिता वाहती ॥ त्या आलिया सिंधूप्रती ॥ तेणें उल्हासेना अपांपती[4] ॥ तेवीं ज्ञानस्फूर्ती श्लाघेना ॥ २५ ॥ रजोगुण आलिया सकाम ॥ त्यासि क्षोभूं नशके काम ॥ म्हणे माझेनि चाले काम्य कर्म ॥ शेखीं मी निष्काम निजांगें ॥ २६ ॥ हो कां काम्यकर्मांचा सोहळा ॥ जेवीं सूर्या न बाधी उन्हाळा ॥ तेवीं काम्यकर्मीं मी जिव्हाळा ॥ माझेनि सोज्ज्वळा काम सवेग ॥ २७ ॥ तमोगुणाच्या झडाडा ॥ पडिला महामोहाचा वेढा ॥ न करितां मोहाचा निझाडा ॥ मोहनिर्णय गाढा आपण पैं जाणे ॥ २८ ॥ सूर्यो न दिसे जिकडे ॥ अंधारू व्यापी तिकडे ॥ तेवीं स्वरूपनिष्ठेपुढें ॥ न बाधी सांकडें[5] मोहाचें ॥ २९ ॥ अंगीं आदळतां तिन्ही गुण ॥ जो गजबजीना आपण ॥ ते निष्ठा निजनिर्गुण ॥ उद्धवा जाण निश्चित ॥ ३० ॥ अज्ञानाच्या अवसरीं ॥ ज्ञानाची चाड न धरी ॥ प्रवर्ततां कामाचारीं ॥ निष्कामाचा न करी पांगडा ॥ ३१ ॥ आदळतां मोहाचीं झटें ॥ ज्याचा बोध कदा न पालटे ॥ त्रिगुणीं निर्गुणत्व राहाटे ॥ माझिया निष्ठें मद्भक्त ॥ ३२ ॥ त्रिगुणांचा त्रिविध वास ॥ निर्गुण निजरहिवास ॥ येचि अर्थीं हृषीकेश ॥ विशद विलास सांगत ॥ ३३ ॥

---

[1] एक निश्चय. [2] नाशिवंतवस्तूचे ठिकाणीं. [3] सर्वांच्या पूर्वींचा. [4] समुद्र. [5] संकट.

॥ श्लोक ॥ ॥ वनं तु सात्विको वासो ग्रामो राजस उच्यते ॥ तामसं द्यूतसदनं मन्निकेतं तु निर्गुणम् ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ पवित्र
आणि तीर्थभूत ॥ विजन वन एकांत ॥ ऐशिये वस्तीं सुखावे चित्त ॥ तो वास निश्चित सात्विक ॥ ३४ ॥ वस्ती व्यवहारीं व्यापारीं ॥
कां सदा सन्मानें राजद्वारीं ॥ विवाहमंडपामाझारीं ॥ ज्यासि प्रीति भारी वस्तीसी ॥ ३५ ॥ ज्यासि आवडे धनसंपदा ॥ निकटवासें
वस्ती प्रमदा[1] ॥ जो नगरीं ग्रामीं वसे सदा ॥ हे वस्ती संपदा राजस ॥ ३६ ॥ जेथ सन्मान वांछी चित्त ॥ सदा क्षोभें विषयासक्त ॥
ऐसऐशी वस्ती जेथ ॥ ते जाण निश्चित राजस ॥ ३७ ॥ जेथ साधुनिंदा जोडे ॥ जेथ गुणदोषीं दृष्टि वाढे ॥ ऐशिया ठायीं वस्ती आवडे ॥
तें तामसाचें गाढें निवासस्थान ॥ ३८ ॥ जेथ कलहाचें कारण ॥ जेथ अविवेकी होय मन ॥ वेश्या द्यूत मद्यसदन ॥ हें निवासस्थान
तामस ॥ ३९ ॥ देवालयीं घवघविती ॥ देखोनि माझी निजमूर्ती ॥ साचार सुखावे चित्तवृत्ती ॥ ते निर्गुण वस्ती उद्धवा ॥ ३४० ॥
अभेद भक्तांचें निजमंदिर ॥ तें मज निर्गुणाचें निजघर ॥ तेथ ज्याची निजवृत्ती स्थिर ॥ ते वस्ती साचार निर्गुण ॥ ४१ ॥ निर्गुणासि
घरठावो ॥ हें बोलणें ह्मणसी वावो ॥ जेथ उपजे ब्रह्मसद्भावो[2] ॥ ते वस्ती पहाहो निर्गुण ॥ ४२ ॥ विषयातीत[3] निजस्थिती ॥ सुखें सुखरूप
राहे वृत्ती ॥ ते निगुर्णांची निजवस्ती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ४३ ॥ सांडूनि आकाराचें ज्ञान ॥ निराकारीं सुखसंपन्न ॥ वृत्ति
स्थिरावे परिपूर्ण ॥ ते वस्ती निर्गुण जनीं विजनीं ॥ ४४ ॥ त्रिगुणसंगें त्रिविध कर्ता ॥ निर्गुणलक्षणीं लक्षिजे चौथा ॥ चतुर्विध कर्त्यांची
व्यवस्था ऐक आतां सांगेन ॥ ४५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सात्विकः कारकोऽसंगी रागांधो राजसः स्मृतः ॥ तामसः स्मृतिविभ्रष्टो निर्गुणो
मदपाश्रयः ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ॥ कांटेनि कांटा फेडितां ॥ जेवीं निवारे निजव्यथा ॥ तेवीं संगें संगातें छेदितां ॥ सात्विकता असंगी
॥ ४६ ॥ सद्गुरुचरणसत्संगें ॥ सकळ संग छेदी विरागें ॥ सात्विक कर्ता निजांगें ॥ विषयसंगें असंगी ॥ ४७ ॥ फळाभिलाषेच्या
चित्तीं गांठी ॥ तेणें अंध झाली विवेकदृष्टी ॥ राजस कर्ता फळाशेसाठीं ॥ अतिदुःखकोटी स्वयें सोशी ॥ ४८ ॥ निःशेष हारपे विवेकज्ञान
॥ स्मृति सैराळ[4] घे रान ॥ नाठवे कार्य कारण ॥ ऐसा कर्ता जाण तामस ॥ ४९ ॥ अनन्यभावें हरीसि शरण ॥ कर्मचाळक
श्रीनारायण ॥ कदा न धरी कर्माभिमान ॥ हा कर्ता निर्गुण निश्चयें ॥ ३५० ॥ त्रिगुणाची श्रद्धा त्रिविध ॥ निर्गुणाची श्रद्धा शुद्ध ॥
येच अर्थीचें विशद ॥ स्वयें गोविंद सांगत ॥ ५१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सात्विक्याध्यात्मिकी श्रद्धा कर्मश्रद्धा तु राजसी ॥ तामस्यधर्मे
या श्रद्धा मत्सेवायां तु निर्गुणा ॥ २७ ॥ ॥ टीका ॥ ॥ देह इंद्रिय चेतना प्राण ॥ येणेंसि स्फुरे जें मीपण ॥ तेथ विवेक करूनियां

---

[1] स्त्री. [2] ब्रह्माचा असणेंपणा. [3] विषय सोडलेली. [4] मनास वाटेल तिकडे.

पूर्ण ॥ आपुलें मीपण आपण पाहे ॥ ५२ ॥ देह नव्हें मी जडमूढत्वें ॥ इंद्रियें नव्हें मी एकदेशित्वें ॥ प्राण नव्हें मी चपळत्वें ॥ मन चं
चळत्वें कदा मी नव्हें ॥ ५३ ॥ चित्त नव्हें मी चिंतकत्वें ॥ बुद्धि नव्हें मी बोधकत्वें ॥ अहं नव्हें मी बाधकत्वें ॥ तो मी यथार्थत्वें अना
दिसिद्ध ॥ ५४ ॥ एवं मीपणाचें निजसार ॥ विवंचूंजाणे बुद्धिचतुर ॥ ते अध्यात्मश्रद्धा उदार ॥ सात्विक नर सदा वाहती ॥ ५५ ॥ जें
जें मी नव्हें ह्मणत जाये ॥ तें मी देखल्या मीचि आहें ॥ माझ्या मीपणाचे वंदिल्या पाये ॥ मीचि मी ठायें कोंदोनी ॥ ५६ ॥ हे आ
ध्यात्मिकी शुद्ध श्रद्धा ॥ सात्विकापाशीं वसे सदा ॥ आतां राजसाची श्रद्धा ॥ ऐक प्रबुद्धा सांगेन ॥ ५७ ॥ मी एक येथें वर्णाश्रमी ॥
मी एक येथें आश्रमधर्मी ॥ मी एक येथें कर्ता कर्मी ॥ हें मनोधर्मीं दृढ मानी ॥ ५८ ॥ येणें भावार्थें कर्मतत्परू ॥ कुशमृत्तिकेचा अ
त्यादरू ॥ अतिशयें वाढवी शौचाचारू ॥ विधिनिषेधीं थोरू आवर्त भंवे ॥ ५९ ॥ दोषदृष्टीच्या रंगणीं ॥ मिरवती गुणदोषांच्या श्रेणी ॥
पवित्रपणाच्या अभिमानीं ॥ ब्रह्म्यासि न मनी शुचित्वें ॥ ३६० ॥ देहाभिमान घेऊनि खांदा ॥ सत्य मानणें कर्मबाधा ॥ ते हे राज
साची कर्मश्रद्धा ॥ जाण प्रबुद्धा उद्धवा ॥ ६१ ॥ अधिक अविवेक वाढे ॥ जेणें अकर्म अंगीं घडे ॥ अधर्माची जोडी जोडे ॥ हे श्र
द्धा आवडे तामसी ॥ ६२ ॥ जेथ अपेयाचें पान ॥ स्वेच्छा अ[illegible]भक्षण ॥ अगम्यादि घडे गमन ॥ हे श्रद्धा संपूर्ण तामसी ॥ ६३ ॥
अधर्म तोचि मानी धर्म ॥ हें तामसी श्रद्धेचें कर्म ॥ आतां निर्गुण श्रद्धा परम ॥ उत्तमोत्तम ते ऐक ॥ ६४ ॥ सर्वभूतीं भगवंत ॥ ऐ
शिये श्रद्धे श्रद्धावंत ॥ अनन्यभावें भूतां भजत ॥ तो भजनभावार्थ निर्गुण ॥ ६५ ॥ स्त्री पुत्र वित्त जीवित ॥ मजलागीं कुरवंडीं क
रित ॥ अनन्यभावें जे मज भजत ॥ ते श्रद्धा निश्चित निर्गुण ॥ ६६ ॥ चारी पुरुषार्थ त्यागिती ॥ उपेक्षूनि चारी मुक्ती ॥ ऐक्यभावें
मज भजती ॥ ते श्रद्धासंपत्ती निर्गुण ॥ ६७ ॥ निष्काम नामस्मरण ॥ निर्लोभ हरिकीर्तन ॥ भावार्थें जें जें भजन ॥ ते श्रद्धा निर्गुण
उद्धवा ॥ ६८ ॥ त्रिगुणांचा त्रिविध आहारू ॥ स्वयें सांगे शारंगधरू ॥ निर्गुण आहाराचा प्रकारू ॥ सखोल विचारू हरि सांगे ॥ ६९ ॥
॥ श्लोक ॥ ॥ पथ्यं पूतमनायस्तमाहार्यं सात्विकं स्मृतम् ॥ राजसं चेंद्रियप्रेष्ठं तामसं चार्तिदाशुचि ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ ॥ पवित्र आ
णि अळुवार ॥ सत्ववृद्धीसि हितकर ॥ अप्रयासीं प्राप्ति साचार ॥ सात्विक आहार या नांव ॥ ३७० ॥ अल्पाहार या नांव पथ्य ॥ प
वित्र ह्मणिजे धर्मार्जित ॥ तेंही अप्रयासानें प्राप्त ॥ तो जाण निश्चित सात्विकाहार ॥ ७१ ॥ गोड खरपूस आंबट ॥ तिळींव घोळींव
तिखट ॥ चिरींव चोळींव तुरट ॥ वळींव वळिवट आळिलें ॥ ७२ ॥ रसीं रसांतर मिळणी ॥ पह्नीं कालवणीं शिखरिणी ॥ कुडकुडनि

पुंससमानी ॥ आहारभरणी राजस ॥ ७३ ॥ नानापरीच्या आवडी ॥ सडिवा सोलिवा परवडी ॥ रसनांसुखाची[1] अतिगोडी ॥ तो आहार निरवडी राजस ॥ ७४ ॥ नानापरीचे आयास ॥ करूनि अतिप्रयास ॥ आहार सेविती राजस ॥ ऐक तामस भोजन ॥ ७५ ॥ सेवितां दुर्गंधि उन्मादक[2] ॥ परिपाकें करी मूर्ख ॥ अशुचि आणि दुःखदायक ॥ हा आहार देख तामस ॥ ७६ ॥ भगवंताचा भुक्तप्रसाद ॥ साधुसज्जनांचें शेष शुद्ध ॥ हा निर्गुण आहार प्रसिद्ध ॥ चकारें गोविंद बोलिला ॥ ७७ ॥ ग्रासोग्रासीं गोविंद ॥ येणें स्मरणें अन्न शुद्ध ॥ हा निर्गुण आहार प्रसिद्ध ॥ चकारें गोविंद बोलिला ॥ ७८ ॥ अन्न ब्रह्म अहंच ब्रह्म ॥ पंक्तीकर तोही ब्रह्म ॥ ऐसा ज्याचा भोजनानुक्रम ॥ तो आहार परम निर्गुणत्वें ॥ ७९ ॥ त्रिगुणांचें त्रिविध सुख ॥ निर्गुण सुख अलोलिक ॥ त्याही सुखांचा परिपाक ॥ यदुनायक स्वयें सांगे ॥ ३८० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सात्विकं सुखमात्मोत्थं विषयोत्थं तु राजसम् ॥ तामसं मोहदैन्योत्थं निर्गुणं मदपाश्रयम् ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ सांडूनि विषयसुखाची स्फूर्ती ॥ आत्मसुखें सुखावे चित्तवृत्ती ॥ ऐशिया निजसुखाची प्राप्ती ॥ तें सुख निश्चितीं सात्विक ॥ ८१ ॥ गंगापूर भरे उन्नतीं[3] ॥ तेणें अमर्याद वोत भरती ॥ तेवीं आत्मसुखाचिये प्राप्ती ॥ इंद्रियां तृप्ती स्वानंदें ॥ ८२ ॥ नानाविषयांचें कोड ॥ इंद्रियांचा अतिधुमाड ॥ विषयसुख लागे गोड ॥ तें सुख सदृढ राजस ॥ ८३ ॥ अतिनिंद्य आणि उन्मादी ॥ तेंचि सुख आवडे बुद्धी ॥ तामस सुखाची हे शुद्धी ॥ जाण त्रिशुद्धी उद्धवा ॥ ८४ ॥ हृदयीं प्रकटल्या माझी मूर्ती ॥ विसरे संसाराची स्फूर्ती ॥ त्यावरी जे होय सुखप्राप्ती ॥ तें सुख निश्चितीं निर्गुण ॥ ८५ ॥ सर्वभूतीं वसे भगवंत ॥ तोचि मी हा तात्त्विकार्थ ॥ ऐसेनि मदैक्यें सुख प्राप्त ॥ तें निजसुखार्थ निर्गुण ॥ ८६ ॥ देखिल्या निजात्मसुखस्वरूप ॥ स्वयें होइजे सुखरूप ॥ हे निर्गुणसुखाचे निजदीप ॥ झडल्या पुण्य पाप पाविजे ॥ ८७ ॥ आपण सुखरूप सर्वांगीं ॥ सुखस्वरूप स्वयें भोगी ॥ हे निर्गुणस्वरूपाची मागी ॥ भक्ती अंतरंगीं भोगिजे ॥ ८८ ॥ कल्पांताचें पूर्ण भरितें ॥ उरों नेदी नदीनदांतें ॥ तेवीं निर्गुण सुख येथें ॥ देहेंद्रियांतें उरोंनेदी ॥ ८९ ॥ जेवीं मृगजळीं जळ नाहीं ॥ तेवीं परब्रह्माच्या ठायीं ॥ प्रपंच स्पर्शिलाचि नाहीं ॥ तें सुख निर्वाहीं निर्गुण ॥ ३९० ॥ ज्या सुखाची मर्यादा ॥ करितां न करवे कदा ॥ सुखें सुखस्वरूप होइजे सदा ॥ हे सुखसंपदा निर्गुण ॥ ९१ ॥ त्रिगुण आणि निर्गुण ॥ याचें दाविलें भेदलक्षण ॥ आतां त्याचें उपसंहरण[4] ॥ ग्रंथांतीं जाण हरि करी ॥ ९२ ॥ ॥ श्लोक ॥ द्रव्यं देशः फलं कालो ज्ञानं कर्म च कारकः ॥ श्रद्धावस्थाकृतिर्निष्ठा त्रैगुण्यः सर्व एव हि ॥ ३० ॥ ॥ टीका ॥ ॥ द्रव्यशब्दें आहार त्रिविध ॥ देशशब्दें वनग्रामभेद ॥ फळशब्दें सुखउद्बोध ॥ सत्वसंबंध

---

१ जिह्वासुखाची. २ मद करणारा. ३ पुष्कळ. ४ शेवट.

विभागें ॥ ९३ ॥ काळशब्दें भगवद्भजन ॥ कैवल्यनिष्ठा या नांव ज्ञान ॥ कर्म ह्मणिजे मदर्पण ॥ कर्ता तो जाण असंगी ॥ ९४ ॥ श्रद्धाशब्दें आध्यात्मिकी[1] ॥ अवस्थाशब्दें जागरणादिकी ॥ आकृतिशब्दें उपरिलोकीं ॥ देवतादिकीं क्रीडन ॥ ९५ ॥ जो गुण वाढे देहांतीं ॥ जेणें गुणें होय अंतःस्थिती ॥ त्या नांव निष्ठा ह्मणती ॥ जाण निश्चितीं उद्धवा ॥ ९६ ॥ भिन्न भिन्न भाग अनेक ॥ किती सांगूं एकेक ॥ अवघें जग त्रिगुणात्मक[2] ॥ जाण निश्शंक निजभक्ता ॥ ९७ ॥ संसार समस्त त्रिगुण ॥ यामाजी मी अवघा निर्गुण ॥ हे तुज कळावया निजखूण ॥ गुणनिरूपण म्यां केलें ॥ ९८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सर्वे गुणमया भावाः पुरुषाव्यक्तधिष्ठिताः ॥ दृष्टं श्रुतमनुध्यातं बुद्ध्या वा पुरुषर्षभ ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ ॥ देखिजे अथवा ऐकिजे ॥ कां मनें जें जें चिंतिजे ॥ तें तें अवघेंचि जाणिजे ॥ मायागुणकाजें त्रिगुणात्मक ॥ ९९ ॥ करावया त्रिगुणांचें मर्दन ॥ प्रकृतिनियंता[3] पुरुष भिन्न ॥ तो सर्वदा सर्वांगें निर्गुण ॥ वर्तवी गुण निजसत्ता ॥ ४०० ॥ पुरुषावेगळें समस्त ॥ प्रकृतिकार्य मिथ्याभूत ॥ त्यातें बोलिजे गुणातीत ॥ जाण निश्चित उद्धवा ॥ १ ॥ नरदेह पावोनियां येथ ॥ जे न साधिती गुणातीत ॥ ते नाडले हातोहात ॥ निजस्वार्थ बुडाला ॥ २ ॥ तैसी नव्हे तुझी मती ॥ विनटलासि भगवद्भक्ती ॥ तेव्हांचि तूं गुणातीतीं ॥ जाण निश्चितीं जडलासी ॥ ३ ॥ हरिभक्तांमध्यें वरिष्ठ [illegible]लागीं निजमुखें वैकुंठ ॥ उद्धवासि ह्मणे पुरुषश्रेष्ठ ॥ भाग्यें उत्कृष्ट तूं एक ॥ ४ ॥ त्रिगुणगुणीं सविस्तारू ॥ दृढ वाढला संसारतरू ॥ त्या[illegible] छेदाचा कवण प्रकारू ॥ तो सारंगधरू सांगत ॥ ५ ॥ ॥ श्लोक ॥ एताः संसृतयः पुंसो गुणकर्मनिबंधनाः ॥ येनेमे निर्जिताः सौम्य गुणा जीवेन चित्तजाः ॥ भक्तियोगेन मन्निष्ठो मद्भावाय प्रपद्यते ॥ ३२ ॥ ॥ टीका ॥ ॥ सत्वादि तिन्ही गुण एथ ॥ केवळ आणि मिश्रित ॥ पुरुषातें संसारी करीत ॥ गुणकर्मीं निश्चित बांधोनी ॥ ६ ॥ त्रिगुणकर्मास्तव जाण ॥ जीवासि झालें दृढ बंधन ॥ जेवीं घटामाजील जीवनें[4] ॥ दावी आडकणेपण रविबिंबा ॥ ७ ॥ घटीं भरल्या समळ जळ ॥ त्यामाजी रवि दिसे समळ ॥ घटींचें डोलतांचि जळ ॥ कांपे चळचळ रविबिंब ॥ ८ ॥ तेवीं त्रिगुणांचें कर्माचरण ॥ शुद्धासि आणी जीवपण ॥ तें छेदावया जीवबंधन ॥ भगवद्भजन साधावें ॥ ९ ॥ जिणावया जीवबंधन ॥ रिघावें सद्गुरूसि शरण ॥ तेथ मद्भावें करितां भजन ॥ वाढे सत्वगुण अतिशुद्ध ॥ ४१० ॥ पायीं जडली लोहाची बेडी ॥ ते लोहेंचि लोहार तोडी ॥ तेवीं सत्वगुणाचिया वोढी ॥ त्रिगुणांतें तोडी गुरुरावो ॥ ११ ॥ तेथ प्रवेशावया गुणातीतीं ॥ अवश्य करावी गुरुभक्ती ॥ जे गुरुभजनीं विश्वासती ॥ त्यांसि चौरी[5] मुक्ती आंदण्या ॥ १२ ॥ ज्यासि गुरुचरणीं भगवद्भावो ॥ त्याचे सवेंसि ये ब्रह्मसद्भावो ॥ तेथ ब्रह्मसद्भावेंसि पहाहो ॥

---

१ आत्मसंबंधी. २ सत्वरजतमांनीं युक्त. ३ माया उत्पन्न करणारा. ४ उदक. ५ सायुज्यता, सालोक्यता, सामीप्यता, सार्ष्टिता.

मी देवाधिदेवो सबाह्य[1] तिष्ठें ॥ १३ ॥ जो गुरुचरणीं अनन्यशरण ॥ तो सहजें होय ब्रह्मसंपन्न ॥ गुरुरूपें करितां माझें भजन ॥ ब्रह्मसमाधान मद्भक्ता ॥ १४ ॥ उद्धवा ऐसें माझें भजन ॥ समूळ जाणशी तूं संपूर्ण ॥ यालागीं सौम्य हें विशेषण ॥ स्वमुखें श्रीकृष्ण संबोधी ॥ १५ ॥ भाग्यें नरदेह पावल्या जाण ॥ अवश्य करावें माझें भजन ॥ येचि अर्थीचें निरूपण ॥ स्वमुखें श्रीकृष्ण सांगत ॥ १६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तस्माद्देहमिमं लब्ध्वा ज्ञानविज्ञानसंभवम् ॥ गुणसंगं विनिर्धूय मां भजंतु विचक्षणाः ॥ ३३ ॥ ॥ टीका ॥ ॥ ज्या नरदेहाकारणें ॥ अमर उत्कंठित मनें ॥ त्या देहाचेन जाहलेपणें ॥ ज्ञान पावणें निष्टंकें[2] ॥ १७ ॥ नरदेह पावल्या जाण ॥ आपणचि नव्हे ब्रह्मज्ञान ॥ तेथें करावें माझें भजन ॥ देहाभिमान सांडूनी ॥ १८ ॥ करितां माझें अनन्यभजन ॥ सहजें वाढे सत्वगुण ॥ सत्वगुणास्तव जाण ॥ उपजे ज्ञान विवेक ॥ १९ ॥ विवेकज्ञानाचिये वृत्ती ॥ रज तम दोनी झडती ॥ शोधितसत्वाचिये स्थिती ॥ अभेदभक्ती उल्हासे ॥ ४२० ॥ करितां माझें अभेदभजन ॥ होय स्वानंदाचें स्वादन ॥ त्या नांव बोलिजे विज्ञान ॥ तेथ तिनी गुण मुख्यत्वें ॥ २१ ॥ नरदेह जोडलिया हातीं ॥ प्राण्यासि एवढी प्राप्ती ॥ यालागीं मनुष्यदेहीं भक्ती ॥ अवश्य समस्तीं करावी ॥ २२ ॥ हें भागवतींचें अतिगुह्य ज्ञान ॥ मुख्यत्वेंसी अतिप्राधान्य ॥ भावें करितां माझें भजन [illegible]या शूद्रजन उद्धरती ॥ २३ ॥ नरदेह जोडल्या जाण ॥ माझी भक्ति करिती विचक्षण ॥ भजनें जिणोनि गुणागुण ॥ ब्रह्म परिपूर्ण स्वयें होती ॥ २४ ॥ पूर्ण ब्रह्माचिया प्राप्ती ॥ निरपेक्ष माझी भक्ती ॥ तोचि भजनभाव श्रीपती ॥ पुनः पुनः श्लोकार्थी दृढ दावी ॥ २५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ निःसंगो मां भजेद्विद्वानप्रमत्तो जितेंद्रियः ॥ रजस्तमश्चाभिजयेत्सत्त्वसंसेवया मुनिः ॥ ३४ ॥ सत्वं चाभिजयेद्युक्तो नैरपेक्ष्येण शांतधीः ॥ ॥ टीका ॥ ॥ करूनि विषयांची विरक्ती[3] ॥ हृदयीं नापेक्षावी मुक्ती ॥ ऐशी निरपेक्ष माझी भक्ती ॥ वाढल्या प्रीतीं करावी ॥ २६ ॥ ऐसें करितां माझें भजन ॥ विस्मरणासि ये मरण ॥ सर्वेंद्रियीं सावधपण ॥ सहजें जाण ठसावे ॥ २७ ॥ तेणें अनिवार सत्वशुद्धी ॥ सर्वभूतीं भगवद्बुद्धी ॥ दृढ वाढे गा त्रिशुद्धी ॥ हे भजनसिद्धी साधकां ॥ २८ ॥ तेव्हां रज तम दोनी गुण ॥ निःशेष जाती हारपोन ॥ शुद्धसत्वाचें स्फुरण ॥ तेणें स्वानंद पूर्ण साधकां ॥ २९ ॥ केवळ उरल्या सत्वगुण ॥ साधकां ऐसें स्फुरे स्फुरण ॥ जगामाजी एक पावन ॥ धन्यधन्य मी होयें ॥ ४३० ॥ मी पावलों शुद्ध बोध ॥ मज प्रकटला परमानंद ॥ ऐसा सुखाचा जो स्फुंद[4] ॥ तो सत्वबोध साधकां ॥ ३१ ॥ ऐसा उरला जो सत्वगुण ॥ तो निवारावया साधन कोण ॥ मी स्वयें सुखस्वरूप आपण ॥ मज सुखाचें स्फुरण तें वाया ॥ ३२ ॥ गूळ गुळा गोडपणें पांगे ॥ कीं दुधा दूध गोड लागे ॥

---

[1] आंत बाहेर. [2] निश्चयानें. [3] त्याग. [4] सद्गदितपणा.

तैसा सुखरूप मी सर्वांगें ॥ वृथा सुखभोगें कां फुंजें ॥ ३३ ॥ ऐशिया साधकीं स्फूर्तीं स्फुरे ॥ तंव सत्वगुण स्वरूपीं विरे ॥ तेव्हां सुखाचाहि
फुंज सरे ॥ सहजें सुख उरे निजशांती ॥ ३४ ॥ ऐसे निवारल्या तिनी गुण ॥ केवळ उरे निर्गुण ॥ तेचि अर्थीचें निरूपण ॥ विशद श्री
कृष्ण सांगत ॥ ३५ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ संपद्यते गुणैर्मुक्तो जीवो जीवं विहाय माम् ॥ ३५ ॥ जीवो जीवविनिर्मुक्तो गुणैश्चाशयसंभवैः
॥ ॥ टीका ॥ ॥ वाढल्या सत्वगुणाचा हरिख ॥ त्यातें निर्दळी शुद्ध सत्वविवेक ॥ पाठीं विवेकेंसि सत्व देख ॥ हारपे निःशेख[1] निजात्म
रूपीं ॥ ३६ ॥ ऐसे निमाल्या तिनी गुण ॥ निमेकार्य कर्म कारण ॥ लिंगदेह नाशे संपूर्ण ॥ जीवासि जीवपण मिथ्या होय ॥ ३७ ॥
तेव्हां कार्य कर्म कर्ता ॥ भोग्य भोग आणि भोक्ता ॥ ज्ञान ज्ञेय[2] मी एक ज्ञाता ॥ याची वार्ता असेना ॥ ३८ ॥ ऐसें हारपल्या जीव
पण ॥ स्वयें सहजें निर्गुण ॥ होऊनि ठाके ब्रह्म पूर्ण ॥ अहंसोहंपण सांडूनी ॥ ३९ ॥ यापरी मद्भक्त जाण ॥ ब्रह्म होती परिपूर्ण ॥ तेंचि
जाहलेपणाचें लक्षण ॥ श्लोकार्धें श्रीकृष्ण सांगत ॥ ४४० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ मयैव ब्रह्मणा पूर्णो न बहिर्नांतरश्चरेत् ॥ ३६ ॥ ॥ इति
श्रीभागवते महा० एकादशस्कंधे पंचविंशोध्यायः ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रपंच एक पूर्वीं होता ॥ हे समूळ मिथ्या वार्ता ॥ पुढें होईल
मागुता ॥ हेंही सर्वथा असेना ॥ ४१ ॥ जैसें आंत बाहेरी [illegible] ॥ नेणें साखरेचें अंग ॥ तैसें सबाह्याभ्यंतर चांग ॥ ब्रह्म निर्व्यंग
निजानंदें ॥ ४२ ॥ ऐसें पावल्या ब्रह्म परिपूर्ण ॥ साधकांसि [illegible]मरण ॥ प्रारब्धें देह उरल्या जाण ॥ देहाभिमान बाधीना ॥ ४३ ॥
बाह्य न देखे दृश्य दर्शन ॥ अंतरीं नाहीं विषयस्फुरण ॥ देहींचें न देखे देहपण ॥ जीवन्मुक्तलक्षण या नांव ॥ ४४ ॥ बाह्य देखे दृश्य
प्रतीती ॥ अंतरीं विषयांची आसक्ती ॥ या नांव अज्ञानाची स्थिती ॥ अविद्याशक्ती बाधक ॥ ४५ ॥ तें निरसावया अविद्याबंधन ॥
अवश्य करावें माझें भजन ॥ हें जाणोनि साधुसज्जन ॥ भक्तीसि प्राण विकिला ॥ ४६ ॥ माझिये भक्तीपरती ॥ आणिक नाहीं उत्तम
गती ॥ तेंही भजन अभेदयुक्तीं ॥ तैं चारी मुक्ती कामाऱ्याँ[3] ॥ ४७ ॥ हृदयीं विषयाची विरक्ती ॥ वरी अभेदभावें माझी भक्ती ॥ तें भ
जन अनन्यप्रीतीं ॥ त्याचा मी श्रीपती आज्ञांधार[4] ॥ ४८ ॥ भक्तिनामाचा इत्यर्थ ॥ माझे स्वरूपीं निजभावार्थ ॥ येणेंचि लाभे परमा
र्थ ॥ सुफळ शास्त्रार्थ या नांव ॥ ४९ ॥ माझिये भक्तीचेनि नांवें ॥ पशु पक्षी उद्धरावे ॥ मा मानवी भजनभावें ॥ म्यां अवश्य न्यावें
निजधामा ॥ ४५० ॥ यालागीं सांडोनि व्युत्पत्ती ॥ जाणतीं नेणतीं गा समस्तीं ॥ भावें करावी भगवद्भक्ती ॥ तैं निजात्मप्राप्ती अना
यासें ॥ ५१ ॥ भावें करितां माझें भजन ॥ स्वयें निर्दळती तिन्ही गुण ॥ सहजें प्रकटे निजनिर्गुण ॥ हें सत्य जाण श्रीकृष्ण बोलिला ॥ ५२ ॥

---

१ संपूर्ण. २ जाणण्याला योग्य. ३ दासी. ४ आज्ञा पालन करणारा.

जेथ उगवली गुणगुंती ॥ तेथ प्रकटे निजशांती ॥ हेंचि ये अध्यायीं श्रीपती ॥ उद्धवाप्रती बोलिला ॥ ५३ ॥ यालागीं जेथ भगवद्भक्ती ॥ तेथ गुणजयो लाभे वृत्ती ॥ सहजें प्रकटे निजशांती ॥ निजात्म[1]प्राप्ती स्वतःसिद्ध ॥ ५४ ॥ ते निजभक्ति माझी जननी[2] ॥ ज्या पैंठा केलों जनार्दनीं ॥ एका जनार्दनचरणीं ॥ मिळोनि मिळणीं भजतची ॥ ५५ ॥ पुढिले अध्यायीं कथा गहन ॥ ऐलउर्वशीउपाख्यान ॥ ज्या अध्यायाचें करितां पठण ॥ अगम्यागमनदोष हरती ॥ ५६ ॥ ज्या पुरूरव्याची विरक्ती ॥ स्वमुखें वर्णी श्रीपती ॥ वैराग्यें निजात्मप्राप्ती ॥ सभाग्य पावती वैराग्य ॥ ५७ ॥ त्या वैराग्याचें निरूपण ॥ अतिगोड निरूपी श्रीकृष्ण ॥ श्रोतां कृपा करावी पूर्ण ॥ द्यावें अव[3]धान कथेसी ॥ ५८ ॥ जे कथेचेनि अवधानें ॥ दुरित दोष होती दहनें ॥ ब्रह्मीं ब्रह्मत्व पावणें ॥ होऊनि ठाकणें चिन्मात्र ॥ ५९ ॥ एवढ्या निरूपणाची गोडी ॥ पुढिले अध्यायीं आहे फुडी ॥ एका जनार्दनकृपा गाढी ॥ परापा[4]रथडीप्रापक ॥ ४६० ॥ भावें धरितां जनार्दनचरण ॥ बाधूं न शके बाधकपण ॥ एका जनार्दना शरण ॥ रसाळ निरूपण पुढें आहे ॥ ६१ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे गुणनिर्गुणनिरूपणं नाम पंचविंशोध्यायः ॥ २५ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ मूळश्लोक ॥ ३६ ॥ ॥ ओंव्या ॥ ४६१ ॥ ॥ एवंसंख्या ॥ ४९७ ॥

॥ ❀ ॥ ॥ ❀ ॥ ॥ ❀ ॥

---

[1] ईश्वरप्राप्ति. [2] आई. [3] लक्ष. [4] अलीकडील व पलीकडील तीराला पोंचविणा

# अध्याय २६ वा.


उद्धव.
श्रीकृष्ण.
ऐलराजा.
उर्वशी.
पुरुरवाराजा.
उर्वशी

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ओंनमो देव जगन्मोहन ॥ मोहिनी मोहना आद्यकारण ॥ कार्यकारणातीत चिद्घन ॥ जय जनार्दन सद्गुरू ॥ १ ॥ जगासि पडे माया मोहन ॥ तें तूं निर्दळिसी ज्ञानघन ॥ जगीं जगद्रूप जनार्दन ॥ कृपाळु पूर्ण दीनाचा ॥ २ ॥ दीनासि देवमाया स्त्रीरूपें ॥ भुलवी हावभावखटाटोपें ॥ ते स्त्री मोहादिमोहकरूपें ॥ जनार्दनरुपें निर्दळिली ॥ ३ ॥ तेथ वैराग्य वाढे संपूर्ण ॥ तेथ जनार्दनाची रुपा पूर्ण ॥ वैराग्य तेथ ब्रह्मज्ञान ॥ सहजें जाण ठसांवे ॥ ४ ॥ जीव सहजें ब्रह्मचि आहे ॥ तो मायागुणें जीवत्व वाहे ॥ जेवीं भद्रीं निजेलेनि रायें ॥ तो स्वप्नींचें लाहे रंकत्व ॥ ५ ॥ त्यासि राजपदा यावया जाण ॥ सेवक करिती थापटण ॥ जेवीं वैराग्य निर्दळी त्रिगुण ॥ जीवा ब्रह्मपण स्वयंभची ॥ ६ ॥ ऐसें स्वयंभ जोडल्या ब्रह्म पूर्ण ॥ तेव्हां स्त्री पुरुष हें मिथ्या ज्ञान ॥ मृषा दृश्याचें दृश्यभान ॥ भोग्यभोक्तेपण असेना ॥ ७ ॥ एवं साधकासि देवमाया ॥ स्त्रीरूपें ये भुलवावया ॥ तेथ स्मरतां भावें गुरुराया ॥ जाय विलया स्त्रीबाधू ॥ ८ ॥ सद्गुरूचें नाम एक ॥ निवारी बाधा महादोख ॥ वैराग्य उपजवी अलोलिक ॥ तेणें होय निजसुख साधकां ॥ ९ ॥ निर्विशेष निजसुखदाता ॥ आम्हां सद्गुरूचि तत्त्वतां ॥ त्याचे चरणीं ठेवितां माथा ॥ सुखसंपन्नता साधकां ॥ १० ॥ संत साधकांची निज माउली ॥ शांति निजसुखाची साउली ॥ जनार्दनकृपेच्या पाउलीं[3] ॥ कथा चालिली यथार्थ ॥ ११ ॥ हाता आलिया निजनिर्गुण ॥ साधक होती सुखसंपन्न ॥ तदर्थ करावें माझें भजन ॥ हें बोलिला श्रीकृष्ण पंचविसावा ॥ १२ ॥ भावें करितां भगवद्भजन ॥ देव दारारूपें[4] करिती विघ्न ॥ तें निर्दळावया जाण ॥ माझें नामस्मरण करावें ॥ १३ ॥ अच्युत हें स्मरतां नाम ॥ प्रतापें निर्दळी कर्माकर्म ॥ सकळ पातकें करी भस्म ॥ दाटुगें नाम हरीचें ॥ १४ ॥ नामें होइजे विरक्त ॥ नामें निर्मळ होय चित्त ॥ नामें साधे गुणातीत ॥ नामें निर्मुक्त भवपाश ॥ १५ ॥ नामीं लोलिंगत चित्त ॥ भवभय रिघों न शके तेथ ॥ नामीं विश्वास ऐसा जेथ ॥ भगवंत तेथ तुष्टला ॥ १६ ॥ दुष्टसंगें विषयासक्त ॥ जरी झाला लोलिंगत ॥ अनुताप उपजलिया तेथ ॥ होय विरक्त क्षणार्धें ॥ १७ ॥ महादोषासि प्रायश्चित्त ॥ केवळ अनुताप निश्चित ॥ अनुतापेंवीण प्रायश्चित्त ॥ तो जाण एथ विटंबू ॥ १८ ॥ अनुतापाएवढा सखा ॥ जगीं आणिक नाहीं लोका ॥ धडाडिल्या अनुताप देखा ॥ सकळपातकां निर्दळी ॥ १९ ॥ अनुतापा चढलिया हात ॥ क्षणार्धें वारी विरक्त ॥ येचि अर्थीं ऐलँगीत ॥ हरि सांगत उद्धवा ॥ २० ॥ सव्विसाव्या अध्यायीं येथ ॥ विषयासक्त ज्याचें चित्त ॥ त्यासि व्हावया विरक्त ॥ ऐलगीतप्रस्तावो ॥ २१ ॥

॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ मल्लक्षणमिमं कायं लब्ध्वा मद्धर्म आस्थितः ॥ आनंदं परमात्मानमात्मस्थं समुपैति माम् ॥ १ ॥ टीका ॥

---

१ नाश करिशी. २ प्राप्तहोई. ३ पायीं. ४ स्त्रीरूपें. ५ वैराग्य. ६ नाश करी. ७ ऐलनामकराजाचें गीत.

ब्रह्म लक्षिजे परिपूर्ण ॥ हेंचि कायेचें[1] मुख्य लक्षण ॥ तें हें मानवी शरीर जाण ॥ परम पावन तिहीं लोकीं ॥ २२ ॥ मनुष्यदेहीं अधर्म ॥ करितां नातुडे परमब्रह्म ॥ तेथ करावे भागवतधर्म ॥ जे कां परम पावन ॥ २३ ॥ भागवतधर्में करितां भक्ती ॥ निर्मळ होय चित्तवृत्ती ॥ जीव तोचि ब्रह्म निश्चितीं ॥ ऐशी शुद्ध स्फूर्ती ठसावे ॥ २४ ॥ ठसावल्या ब्रह्मस्फूर्ती ॥ होय स्वानंदाची अवाप्ती ॥ तेणें परमानंदीं लीन होती ॥ हे शुद्धप्राप्ती पैं माझी ॥ २५ ॥ माझिये प्राप्तीचें लक्षण ॥ देहीं असतां वर्तमान ॥ सर्वथा नाहीं विषयस्फुरण ॥ तेंचि निरूपण हरि सांगे ॥ २६॥ ॥ श्लोक ॥ ॥ गुणमय्या जीवयोन्या विमुक्तो ज्ञाननिष्ठया ॥ गुणेषु मायामात्रेषु दृश्यमानेष्ववस्तुतः ॥ वर्तमानोऽपि न पुमान् युज्यतेऽवस्तुभिर्गुणैः ॥२ ॥ ॥ टीका ॥ ॥ जे मूळ अज्ञानाची खाणी ॥ जे संसारप्रवाहाची श्रेणी[2] ॥ जे तिहीं गुणांची जननी ॥ माया राणी अनादी ॥ २७॥ मायागुणयोगें पहाहो ॥ सोळाकळांचा संभवो ॥ तो वासनात्मक लिंगदेहो ॥ जीवासि पहाहो दृढ[3] झाला ॥ २८ ॥ ज्या लिंगदेहाचिये प्राप्ती ॥ भोगी नाना सुखदुःखसंपत्ती ॥ पडे स्वर्ग नरक आवर्त्तीं[4] ॥ मिथ्यामरणपंक्ती स्वयें सोशी ॥ २९ ॥ वंध्यापुत्राचा घराचार ॥ तैसा जीवासि संसार ॥ देहाभिमानें केला थोर ॥ अपरंपार अनिवार्य ॥ ३० ॥ तेथ गुरुवाक्यें ज्ञानानुभव ॥ पाहतां मायेचा स्वभाव ॥ लिंगदेह झाला वाव ॥ जीवा जीवभाव तो मिथ्या ॥ ३१ ॥ जेवीं उगवलिया गभस्ती[5] ॥ अंधारेंसि हारपे राती ॥ तेवीं गुरुवाक्यें ज्ञानप्राप्ती ॥ मायेची स्थिती मावळे ॥ ३२ ॥ एवं नासल्या गुणविकार ॥ जीवन्मुक्त होती नर ॥ जेवीं कां कुलाल[6]चक्र ॥ भंवे साचार पूर्वभ्रमणें ॥ ३३ ॥ तेवीं प्रारब्धशेषवृत्तीं ॥ ज्ञाते निजदेहीं वर्तती ॥ वर्ततांही देहस्थिती ॥ देहअहंकृती असेना ॥ ३४ ॥ जेवीं कां छाया आपुली ॥ कोणी गांजिली ना पूजिली ॥ परी कळवळयाची न ये भुली ॥ तेवीं देहींची चाली सज्ञाना ॥ ३५ ॥ तो देहाचेनि दैवमेळें ॥ जरी विषयांमाजी लोळे ॥ परी विकाराचेनि विटाळें ॥ वृत्ति न मैळे अणुमात्र॥३६॥ त्यासि विषयाचें दर्शन ॥ समूळत्वें मिथ्या जाण ॥ करितां मृगजळाचें पान ॥ करा वोलेपण बाधीना ॥३७॥ गगनकमळांचा[7] आमोद ॥ जैं भ्रमर सेवी सुगंध ॥ तैं सज्ञाना विषयसंबंध ॥ निजांगीं बाध लागता ॥ ३८ ॥ असो अतर्क्य[8] मुक्तांची स्थिती ॥ परी मुमुक्षांलागीं श्रीपती ॥ नियमाची यथानिगुती ॥ निजात्मप्राप्तीलागीं सांगे ॥ ३९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ संगं न कुर्यादसतां शिश्नोदरतृपां क्वचित् ॥ तस्यानुगस्तमस्यंधे पतत्यंधानुगोऽधवत् ॥३ ॥ ॥ टीका ॥ ॥ शिश्नोदरार्थ आसक्त ॥ स्वधर्मत्यागें अधर्मरत ॥ ऐसे जे विषयासक्त ॥ ते जाण निश्चित असाधू ॥ ४० ॥ ऐसे जे असाधु जन ॥ त्यांची सर्वथा आपण ॥ संगती न करावी जाण ॥ कायावाचामनपूर्वक॥४१॥

---

[1] देहाचें.
[2] पंक्ति.
[3] बळकट.
[4] भोंवऱ्यांत.
[5] सूर्य.
[6] कुंभाराचें चाक.
[7] आकाशकमलांचा.
[8] तर्क करण्यास अशक्य.

वोढाळाचे संगतीं पाहे ॥ क्षणभरी गेलिया धर्मगाये ॥ त्या क्षणासाठीं पाहे ॥ लोढणें वाहे निरंतर ॥ ४२ ॥ यालागीं दुर्जनाची संगती ॥ क्षणार्धें पाडी अनर्थीं ॥ मुमुक्षीं ऐशियाप्रती ॥ अणुमात्र वस्ती नवचावें ॥ ४३ ॥ लोहाराची आंगिठी जैसी ॥ सहजें पोळी भलत्यासी ॥ दुर्जनाची संगति तैशी ॥ पाडी अपभ्रंशीं भाविकां ॥ ४४ ॥ अवचटें असाधुसंगती ॥ जोडल्या वाढे विषयासक्ती ॥ तेणें उठी अधर्मरीती ॥ विवेकस्फूर्तिघातक ॥ ४५ ॥ वाढल्या विषयासक्ती ॥ अंध होय ज्ञानस्फूर्ती ॥ आपण आपली न देखे गती ॥ जेवीं आंधळी राती आंवसेची ॥ ४६ ॥ जेवीं अंधें अंध धरिल्या हातीं ॥ दोघां पतन महागर्तीं[1] ॥ तेवीं अविवेकांचिया[2] स्थितीं ॥ अंधतमा[3] जाती विषयांध ॥ ४७ ॥ कुसंगाचा जो सांगात ॥ तेणें वोढवे नरकपात ॥ अनुताप सोडविता तेथ ॥ तें ऐलगीत हरी सांगे ॥ ४८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ऐलः सम्राडिमां गाथामगायत बृहच्छ्रवाः ॥ उर्वशीविरहान्मुह्यन्निर्विण्णः शोकसंयमे ॥ ४ ॥ ॥ टीका ॥ ॥ समुद्रवलयांकित क्षिती[4] ॥ सकळ रायांचा राजपती ॥ पुरूरवा चक्रवर्ती ॥ ज्याची ख्याती पुराणीं ॥ ४९ ॥ तेज प्रभाव महाशौर्य ॥ उचित दान गांभीर्य ॥ महिमा महंती अतिवीर्य ॥ धर्म धैर्य पुरूरवा ॥ ५० ॥ राजधर्मांचिया नीती ॥ स्वधर्में प्रतिपाळी क्षिती ॥ ब्राह्मण तितुका ब्रह्ममूर्ती ॥ हा भाव निश्चितीं रायाचा ॥ ५१ ॥ प्राणांतेंही आपण ॥ न करी ब्राह्मणहेळणें[5] ॥ गायीलागीं वेंची प्राण ॥ करी संरक्षण दीनाचें ॥ ५२ ॥ ऐसा धार्मिक ऐल चक्रवर्ती ॥ तोही उर्वशीचे आसक्तीं ॥ भुलोनि ठेला भूपती[6] ॥ निजात्मगती विसरला ॥ ५३ ॥ तेणें अनुतापें गाइली गाथा ॥ ते तुज मी सांगेन आतां ॥ परीस त्याची पूर्वकथा ॥ कामासक्तता ते ऐक ॥ ५४ ॥ विसरोनि निजमहत्त्वासी ॥ अतिदीन झाला वेश्येसी ॥ कामपिसें लावी मनुष्यासी ॥ तें ऐलइतिहासीं हरि सांगे ॥ ५५ ॥ ऐल उर्वशीकामासक्ती ॥ सवेंचि अनुतापें विरक्ती ॥ हे कथा बोलिली वेदोक्ती ॥ तेचि यदुपती स्वयें सांगे ॥ ५६ ॥ उर्वशीपुरूरव्यांचा संबंधू ॥ नवमस्कंधीं असे विशदू ॥ तेणें जाणोनियां गोविंदू ॥ एथ कथा अनुवादू न करीच ॥ ५७ ॥ ॥ पूर्वकथासंबंधः ॥ ॥ उर्वशी स्वर्गा भूषण ॥ नारायणें धाडिली आपण ॥ तो उर्वशीसि गर्व पूर्ण ॥ श्रेष्ठपण मानूनी ॥ ५८ ॥ तया गर्वाचिये स्थिती ॥ ताल चुकवी नृत्यगती ॥ तेणें ब्रह्मशापाची प्राप्ती ॥ तुज मानवी भोगिती भूतळीं ॥ ५९ ॥ उच्छाप मागतां तिसी ॥ ब्रह्मा सांगे तियेपाशीं ॥ नग्न देखिल्या पुरूरव्यासी ॥ स्वर्गा येसी निमेषमात्रें ॥ ६० ॥ ऐशा लाहोनि[7] शापासी ॥ भूतळा आली उर्वशी ॥ देखोनि तिचिया स्वरूपासी ॥ पुरूरवा तिसी भूलला ॥ ६१ ॥ विसरोनि आपुली महंती ॥ वश्य झाला वेश्येप्रती ॥ रूपा भुलला भूपती ॥ विचारस्फूर्ती विसरला ॥ ६२ ॥ नग्न देखिलिया रायासी ॥

---

१ मोठ्या खळग्यांत. २ अज्ञानाच्या. ३ अंधतमनामकनरकास. ४ पृथिवी. ५ अवज्ञा. ६ पृथिवीपति. ७ प्राप्त होऊन.

सांडूनि जावें उर्वशी ॥ ऐशी भाक देऊनि तिशी ॥ निजभोगासी आणिली ॥ ६३ ॥ तिणें आपुलिया उच्छापासी ॥ आणिलें दोघां एडक्यांसी[1] ॥ पुत्रस्नेहें पाळावें त्यांसी ॥ ते विखीं भाकेसी दीधलें रायें ॥६४॥ ते उर्वशी कामप्राप्ती ॥ अतिशयें वाढली कामासक्ती ॥ नेणे उदयास्तदिवसराती ॥ ऐशा अमित तिथी लोटल्या ॥ ६५ ॥ ऐसा भोगितां उर्वशीसंगें काम ॥ विसरला स्वधर्मकर्म ॥ विसरला नित्य नेम ॥ कामसंभ्रम वाढला ॥ ६६ ॥ तेथ मेषरूपें दोघेजण ॥ झाले अश्विनीकुमार आपण ॥ उर्वशीभोगक्षयाकारण ॥ पहावया जाण इंद्रें ठेविलें ॥ ६७ ॥ पुरूरव्याच्या भोगप्राप्ती ॥ उर्वशी न्यावया स्वर्गाप्रती ॥ दोनी एडके[2] चोर नेती ॥ मध्यरातीं मेमात ॥ ६८ ॥ ऐकोनि मेषांच्या शब्दासी ॥ दुःखें हडबडली उर्वशी ॥ रागें निर्भर्त्सी रायासी ॥ नपुंसक होसी तूं एक ॥ ६९ ॥ वृथा वल्गसी पुरुषबळें ॥ चोरें नेलीं माझीं बाळें ॥ जळो तुझें तोंड काळें ॥ ह्मणोनि कपाळें ते पिटी ॥ ७० ॥ ऐकोनि स्त्रियेचा शोक थोरू ॥ शस्त्र घेऊनि सत्वरू[3] ॥ धांवतां फिटला[4] पीतांबरू ॥ तें नृपवरू[5] समजेना ॥ ७१ ॥ पराभवूनि ते चोर ॥ मेष आणितां सत्वर ॥ विद्युल्लता झळकली थोर ॥ तंव नग्न शरीर रायाचें ॥ ७२ ॥ नग्न देखोनि रायासी ॥ सांडूनि निघाली उर्वशी ॥ तिचेनि वियोगें मानसीं ॥ अतिशोकासी पावला ॥७३॥

॥ श्लोक ॥ ॥ त्यक्त्वात्मानं व्रजंतीं तां नग्न उन्मत्तवन्नृपः ॥ विलपन्नन्वगाज्जाये घोरे तिष्ठेति विक्लवः ॥५॥ ॥ टीका॥ ॥ पृथ्वीपरिपालनीं वरिष्ठ ॥ स्वधर्मीं धार्मिक श्रेष्ठ ॥ शत्रुदमनीं अतिसुभट[6] ॥ प्रतापें उद्भट महावीर ॥ ७४ ॥ जाणे वेदशास्त्रविवेक ॥ ज्यासि वंदिती सकळ लोक ॥ तोही वेश्येचा अतिरंक ॥ झाला देख निजांगें ॥ ७५ ॥ सुरां असुरां न खालवी मान ॥ जो अल्पही न साहे अपमान ॥ तो वेश्येलागीं झाला दीन ॥ निजसन्मान विसरोनी ॥ ७६ ॥ उर्वशी जातां देखोनि दिठीं ॥ नग्न उन्मत्त उठाउठीं ॥ रडत पडत लागे पाठी ॥ स्फुंदतां पोटीं श्वास न रिघे ॥ ७७ ॥ डोळेभरी पाहूंदे दिठीं ॥ सांगेन जीवींच्या[7] गुह्य गोष्टी ॥ प्राण रिघों पाहे उठाउठी ॥ क्षणभर भेटी न देतां ॥ ७८ ॥ आपुल्या पूर्वजांची आण ॥ कदा नुल्लंघीं तुझें वचन ॥ सत्य मानी हें प्रमाण ॥ तुज काय कारण रुसावया ॥ ७९ ॥ तुज चालतां लवलाहीं ॥ झणीं खडे रुततील पायीं ॥ तुज जाणें कोणे ठायीं ॥ तरी सवें मीही येईन ॥ ८० ॥ जाऊं नको उभी राहे ॥ परतोनि मजकडे पाहे ॥ ह्मणोनि धरूं धांवे पाये ॥ तंव ते जाये उपेक्षुनी ॥ ८१ ॥ ज्यासि राजे मुकुटमणी ॥ सदा येती लोटांगणीं ॥ तो लागे वेश्येचे चरणीं ॥ बाप करणी कामाची ॥ ८२ ॥ तुझी मज अतिकळवळ ॥ तुजलागीं चित्त माझें कोमळ ॥ तूं कठिण झालीस केवळ ॥ कोप प्रबळ कां धरिला ॥ ८३ ॥ यापरी रायाचें चित्त ॥ विरहातुर शोकाकुलित ॥ अतिशयें ग्लानियुक्त ॥

---

१ मेंढ्यांस. २ मेंढे. ३ लवकर. ४ सुटला. ५ राजास. ६ महायोद्ध. ७ मनांतल्या.

ग्लानि सांगत श्रीकृष्ण ॥ ८४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कामानतृप्तोऽनुजुषन् क्षुल्लकान्वर्षयामिनीः ॥ न वेद यांतीर्नायांतीरुर्वश्याकृष्टचेतनः ॥ ६ ॥ ॥ टीका ॥ ॥ उर्वशीकामीं कामासक्त[1] ॥ एकाग्र झालें रायाचें चित्त ॥ नेणे सूर्याचें गतागत ॥ केला भ्रांत कंदर्पें[2] ॥ ८५ ॥ भोगिलीचि कामिनी ॥ भोगितांही अनुदिनीं[3] ॥ अधिक प्रेम वाढलें मनीं ॥ ऐसा तिजलागूनी आसक्त ॥ ८६ ॥ भोगितां उर्वशीकामासी ॥ नेणे दिवसमासवर्षांसी ॥ व्ययो[4] झाला आयुष्यासी ॥ हेंही त्यासी स्मरेना ॥ ८७ ॥ जेवीं अग्निमाजी घृत पडे ॥ तंव तंव ज्वाळा अधिक वाढे ॥ तेवीं कांता भोगितां वाडेंकोडें ॥ काम पुढें थोरावे ॥ ८८ ॥ विचारितां स्त्री कामासी ॥ अतितुच्छत्व दिसे त्यासी ॥ तोही भोगितां अहर्निशीं ॥ विरक्ति रायासी नुपजेची ॥ ८९ ॥ प्रीति गुंतली उर्वशीसी ॥ अतिग्लानी करितां तिसी ॥ परतोनि नयेचि रायापाशीं ॥ निघे वेगेंसी सांडूनी ॥ ९० ॥ उर्वशी न देखूनि पुढें ॥ राजा विरहें मूर्च्छित पडे ॥ पाहोंधांवे इकडे तिकडे ॥ आक्रोशें रडे अतिदुःखी ॥ ९१ ॥ अटणें[5] करितां दाहोदिशीं ॥ अवचटें आला कुरुक्षेत्रासी ॥ तंव अंतरिक्ष उर्वशी ॥ देखे दृष्टीसी नृपनाथ ॥ ९२ ॥ देखोनि ह्मणे धांव पाव ॥ मजलागीं दे कां वेगीं खेव ॥ येरी ह्मणे मूढभाव ॥ सांडी सर्व विषयांधा ॥ ९३ ॥ आह्मां स्त्रियांची आसक्ती ॥ कदाधड नव्हे गा भूपती ॥ सदा स्त्रियांची दुष्ट जाती ॥ जाण निश्चिती महाराजा ॥ ९४ ॥ विशेषें आह्मी स्वैरिणी[6] ॥ स्वेच्छा परपुरुषगामिनी ॥ आमुचा विश्वास मनीं ॥ ह्मणी न मानी नृपनाथा ॥ ९५ ॥ आह्मां प्रमदांच्या संगतीं ॥ राया ठकले नेणों किती ॥ आतां सांडूनि आमची आसक्ती ॥ होयी परमार्थीं आसक्त ॥ ९६ ॥ बहुकाळ भोगितां माझ्याशीं भोग ॥ अद्यापि नुपजे तुज विराग ॥ कामासक्ति सांडूनि सांग ॥ साधी चांग निजस्वार्थ ॥ ९७ ॥ राजा ग्लानी करी अनेग ॥ एकवेळ निजांगें अंग ॥ मज देई अंगसंग ॥ सुखसंभोग भामिनी ॥ ९८ ॥ निलाग देखोनि ग्लानीसी ॥ कृपेनें द्रवली उर्वशी ॥ मग ते आपुल्या पूर्ववृत्तांतासी ॥ रायापाशीं निवेदी ॥ ९९ ॥ मी स्वर्गांगना अतिसुरूप ॥ मज घडला ब्रह्मशाप ॥ तूं महाराजा पुण्य पुरुष ॥ संगें निःशाप मी झालें ॥ १०० ॥ तुझेनि संगें मी निर्धूत ॥ शाप निस्तरलें समस्त ॥ मज तुज संग न घडे एथ ॥ मी असें जात स्वर्गासी ॥ १ ॥ ऐकोनि उर्वशीचें वचन ॥ राजा विरहें करी रुदन ॥ तेव्हां कळवळलें तिचें मन ॥ त्या उपाय पूर्ण दाविला ॥ २ ॥ प्रार्थूनियां गंधर्वांसी ॥ अग्निस्थाली[7] दीधली रायासी ॥ यावरी करूनि यागासी ॥ मज पावसी महाराजा ॥ ३ ॥ उर्वशिवियोगें व्यथाभूत ॥ अग्निस्थाली उपेक्षूनि[8] तेथ ॥ राजा निजमंदिरा येत ॥ शोकाकुलित अतिदुःखी ॥ ४ ॥ उर्वशीची व्यथा रायासी ॥ स्वप्नीं देखिलें तियेसी ॥ त्वरेनें पाहूं आला स्थालीसी ॥ तंव देखे अश्वत्थासी शमीगर्भा ॥ ५ ॥

---

[1] विषयासक्त. [2] मदनानें. [3] रोजच्या रोज. [4] नाश. [5] फिरणें. [6] स्वच्छंद गमन करणाऱ्या. [7] अग्निपात्र. [8] टाकून.

त्याच्या अरणी करूनि देख ॥ यज्ञाग्नि पाडिला चोख ॥ यजूनि[1] पावला उर्वशीलोक ॥ कामसुखभोगेच्छा ॥ ६ ॥ भोग भोगितां उर्व
शीसी ॥ विरक्ति उपजली रायासी ॥ तो जें बोलिला अनुतापेंसी ॥ तें एक तुजसी सांगेन ॥ ७ ॥ अठरा श्लोकांचें निरूपण ॥ राजा
बोलिला आपण ॥ आठ श्लोकीं अनुताप पूर्ण ॥ तेंचि श्रीकृष्ण स्वयें सांगे ॥ ८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ऐल उवाच ॥ अहो मे मोहविस्तारः
कामकश्मलचेतसः ॥ देव्या गृहीतकंठस्य नायुःखंडा इमे स्मृताः ॥ ७ ॥ ॥ टीका ॥ ॥ ऐलगीतेचा अनुताप ॥ नाशी अगम्यागमनपाप ॥
करी श्रोत्यांसि निष्पाप[2] ॥ साधकां कंदर्प[3] बाधीना ॥ ९ ॥ जेवीं मदगज[4] गजीसंगीं ॥ नाना आपत्ति स्वयें भोगी ॥ तेवीं उर्वशीच्या संभो
गीं ॥ झाला विरागी पुरूरवा ॥ ११० ॥ जो उर्वशीलागीं अनुरक्त ॥ तोचि तिसी झाला विरक्त ॥ तेणें वैराग्यें अनुताप युक्त ॥ स्वयें
बोलत ऐलरावो ॥ ११ ॥ माझ्या मोहाचा विषयविस्तार ॥ कामासक्त कामातुर ॥ कुश्चित कंदर्पाचें घर ॥ म्यांचि सार सेविलें ॥ १२ ॥
उर्वशीकामें अति आसक्त ॥ कामातुर झालें चित्त ॥ तेणें म्यां जोडिला अनर्थ ॥ थितें केलें व्यर्थ आयुष्य ॥ १३ ॥ उर्वशी कंठसँलग्न
शस्त्र ॥ आयुष्यछेदनीं सतेजधार ॥ छेदिलें आयुष्य अपार ॥ तें मी पामर स्मरेना ॥ १४ ॥ कांताआलिंगन विषवल्ली ॥ म्यां कंठीं
घातली सकामभुलीं ॥ तिणें आयुष्याची होळी केली ॥ विवेक समूळीं गिळिला ॥ १५ ॥ कामिनीकाम आलिंगनीं ॥ कंठीं पेटविला
दावाग्नी[5] ॥ तो धडाडिला अयुष्यवनीं ॥ विवेकअवनीं जाळित ॥ १६ ॥ नरदेहीं उत्तमोत्तम ॥ अमूल्य आयुष्य केलें भस्म ॥ जळोजळो
माझें कर्म ॥ निंद्य अधर्म तो एक ॥ १७ ॥ नरदेहींच्या आयुष्यपुष्टी ॥ साधक रिघाले वैकुंठीं ॥ ज्ञाते ब्रह्म झाले उठाउठीं ॥ तें म्यां का
मासाठीं नाशिलें ॥ १८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ नाहं वेदाभिनिर्मुक्तः सूर्यो वाऽभ्युदितोऽमुया ॥ मुषितो वर्षपूगानां बताहानि गतान्युत ॥ ८ ॥
॥ टीका ॥ ॥ नरदेहाचें आयुष्य क्षण ॥ न मिळे देतां कोटी सुवर्ण ॥ तें म्यां नाशिलें संपूर्ण ॥ आपण्या आपण नाडिलें ॥ १९ ॥ साधूं
चिया निजस्वार्था ॥ साधूनि द्यावया उगवे सविता[6] ॥ निमेषोन्मेषें परमार्था ॥ साधक तत्त्वतां साधिती ॥ १२० ॥ तोचि सविता सका
मासी ॥ आयुष्य हरी अहर्निशीं ॥ हें न कळे ज्याचें त्यासी ॥ नरकपातासी निजमूळ ॥ २१ ॥ पुढिलांची गोठी ते कायसी ॥ मीच
नाडलों उर्वशीसी ॥ र्‍हास झाला आयुष्यासी ॥ हे हानि कोणासी सांगावी ॥ २२ ॥ जनाचिया हितासि वहिला ॥ सूर्यो अनुदिनीं उग
वला ॥ तें मी नेणेंचि दादुला ॥ उर्वशीकामें भुलला उन्मत्त ॥ २३ ॥ सूर्याचा उदयो अस्तमान ॥ वर्षेंही लोटल्या नाहीं ज्ञान ॥ करितां
उर्वशीचें अधरपान[7] ॥ तेणें मदें संपूर्ण मातलों ॥ २४ ॥ मद्यमदु उतरे दिनांतीं ॥ धनमदु जाय निर्धनास्थितीं ॥ तारुण्यमद जाय क्षीण

---

१ यजन करून. २ पापरहित. ३ मदन. ४ उन्मत्तहत्ती. ५ वणवा. ६ सूर्य. ७ ओष्ठचुंबन. ८ रणकाळीं.

शक्ती ॥ स्त्रीमदप्राप्ती कदा नुतरे ॥ २५ ॥ नरदेहाची आयुष्यकथा ॥ पुढती दुर्लभ नलगे हाता ॥ जळो हे उर्वशी देवकांता ॥ इणेंचि
तत्त्वतां नागविलें ॥ २६ ॥ मी निर्भय रक्षिता सर्वांसी ॥ त्या मज नागविलें उर्वशीं ॥ हे लाज सांगों कोणापाशीं ॥ उकसाबुकसीं रेंफुंदत
॥ २७ ॥ माझ्या निजहिताचा चोरू ॥ हे उर्वशी जीवें मारूं ॥ सर्वेंचि उपजला विचारू ॥ तेथ मीचि पामरू अविवेकी ॥ २८ ॥ मग
ह्मणे कटकटा ॥ सृष्टीमाजी मी करंटा ॥ आयुष्य नाशिलें कामचेष्टा ॥ अपाव मोठा मज झाला ॥ २९ ॥ मग आक्रंदे अतिगर्जोनी ॥
कामें नागविलें आयुष्य हरोनी ॥ याहीहोनि अधिक हानी ॥ पाहतां ये जनीं असेना ॥ १३० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अहो मे आत्मसंमो
हो येनात्मा योषितां कृतः ॥ क्रीडाम्रृगश्चक्रवर्ती नरदेवशिखामणिः ॥९ ॥ ॥ टीका ॥ ॥ राजे मुकुटांचे प्रतापी पूर्ण ॥ माझ्या चरणा
येती शरण ॥ तो मी वेश्येचे धरीं चरण ॥ हें निर्लज्जपण म्यां केलें ॥ ३१ ॥ मज पुरूरव्याचे आज्ञेकरीं ॥ राजे नाचती चराचरीं ॥ तो
मी वेश्येचे आज्ञेवरी ॥ श्वानाचेपरीं वर्त्तलों ॥ ३२ ॥ जैसें वानर गारुड्याचें ॥ तैसा स्त्रियेचेनि छंदें नाचें ॥ माझ्या चक्रवर्तीपणाचें ॥
अतिनिंद्य सांचें फळ झालें ॥ ३३ ॥ सकळ राजे मज देती सन्मान ॥ भूपति सदा वंदिती चरण ॥ तो मी झालों स्त्रियेअधीन ॥ हीन दीन
अति रंक ॥ ३४ ॥ राखतां स्त्रियेचा रसरंगप्रेम ॥ पायां पडणें हें अनुचित कर्म ॥ ह्मणती ते जळो जन सकाम ॥ हेचि धाडी परम कामाची
॥ ३५ ॥ वलयांकित मी चक्रवर्ती ॥ तोही योषिता घातलों आंवर्तीं ॥ त्याचि आवर्ताची स्थिती ॥ स्वमुखें भूपती अनुवादे ॥ ३६ ॥
॥ श्लोक ॥ ॥ सपरिच्छदमात्मानं हित्वा तृणमिवेश्वरम् ॥ यांतीं स्त्रियं चान्वगमं नग्न उन्मत्तवद्रुदन् ॥१० ॥ ॥ टीका ॥ ॥ केवळ साकार
मायाभ्रम ॥ यालागीं प्रमदा स्त्रीचें नाम ॥ संगें ठकिले उत्तमोत्तम ॥ स्त्रीसंभ्रम वाढवितां ॥ ३७ ॥ प्रमदा अंबरें अलंकार ॥ हें मायेचें
सोलींव सार ॥ एथ भुलले थोरथोर ॥ मीही पामर स्त्रीसंगें ॥ ३८ ॥ माझीच मज करणी ॥ दिसतसे दैन्यवाणी ॥ उर्वशी वेश्या काम
चारिणी ॥ जे बहुजनीं भोगिली ॥ ३९ ॥ ऐशिये कामासक्तता ॥ मी सर्वस्वें भुललों आतां ॥ ते भुललेपणाची कथा अनुतापतां स्वयें
बोले ॥ १४० ॥ धर्मपत्नीसि भोगितां काम ॥ सहसा नासेना स्वधर्म ॥ मज वोढवलेंसें दुष्ट कर्म ॥ वेश्येसि परम भुललों ॥ ४१ ॥
परदारा अभिलाषिती ॥ ते अवश्य नरका जाती ॥ मा स्वदाराकामासक्ती ॥ तेथही अधोगती सोडीना ॥ ४२ ॥ स्त्रियां भुलविले हरि
हरँ ॥ स्त्रियां भुलविले ऋषीश्वर ॥ स्त्रियां भुलविले थोरथोर ॥ मीही किंकर स्त्रियां केलों ॥ ४३ ॥ राज्य आणि राजवैभव ॥ वेश्येअधीन
केलें सर्व ॥ याहूनि केलें अपूर्व ॥ तीलागीं जीव अर्पिला ॥ ४४ ॥ मी राजवर्यमुकुटमणी ॥ तो दास झालों तिचे चरणीं ॥ बाप कंदर्पाचि

---

१ कंठदाटून. २ कुतऱ्यांप्रमाणें. ३ भोंवऱ्यांत. ४ एकाएकीं. ५ नष्टहोईना. ६ विष्णु. ७ शंकर. ८ चाकर.

करणी ॥ केलों कामिनीअधीन ॥ ४५॥ ऐशिया मज राजेश्वरातें ॥ वेश्येनें हाणोनि लातें ॥ उपेक्षूनियां तृणवतें ॥ निघाली निश्चितें
सांडोनी ॥ ४६ ॥ तीस जातां देखोनि पुढें ॥ मी नागवा धांवें लवडसवडें ॥ लाज सांडोनियां रडें ॥ तरी ते मजकडे पाहेना ॥ ४७ ॥
जेवीं कां लागलें महद्भूत ॥ नातरी पिशाच जैसें उन्मत्त ॥ तेवीं नागवा धांवें रडत ॥ तरी तिचें चित्त द्रवेना ॥ ४८ ॥ तरी रडत पडत
अडखळत ॥ मी निर्लज्ज तीमागें धांवत ॥ माझे मोहाचा अति अनर्थ ॥ अपमानत्रस्त मज झाला ॥ ४९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ कुतस्त
स्यानुभावः स्यात्तेज ईशित्वमेव वा ॥ योन्वगच्छं स्त्रियं यांतीं खरवत्पादताडितः ॥ ११ ॥ ॥ टीका ॥ ॥ मी महत्त्वें [1]राजराजेश्वरू ॥ ऐसा
गर्व होता दुर्धरू ॥ तो मी वेश्येचा [2]अनुचरू ॥ झालों किंकरू निजांगें ॥ १५० ॥ एवढाही मी राजेश्वरू ॥ मागें धांवें होऊनि किंकरू ॥
तरी ते न करी [3]अंगीकारू ॥ जेवीं वोसंडी खरू खरी जैशी ॥ ५१ ॥ जेवीं [4]खरी देखोनियां [5]खरू ॥ धांवोनि करी अत्यादरू ॥ येरी उपे
क्षूनि करी मारू ॥ अतिनिष्ठुरू लातांचा ॥ ५२ ॥ तिच्या लाता लागतां माथां ॥ खरू निघेना मागुता ॥ त्या खराऐशी मूर्खता ॥ माझे
अंगीं सर्वथा बाणली ॥ ५३ ॥ स्त्री उदास कामदृष्टीं ॥ मी आसक्त लागें पाठीं ॥ माझ्या समर्थपणाची गोठी ॥ सांगतां पोटीं मी लाजें
॥ ५४ ॥ ऐसें स्त्रीकाम ज्याचें मन ॥ त्याचे योगयाग अनुष्ठान ॥ अवघेंचि वृथा जाण ॥ तेंचि निरूपण निरूपी ॥ ५५ ॥ ॥ श्लोक ॥
किं विद्यया किं तपसा किं त्यागेन श्रुतेन वा ॥ किं विविक्तेन मौनेन स्त्रीभिर्यस्य मनो हृतम् ॥ १२ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्त्रीकाममय ज्याचें
मन ॥ त्याची वृथा विद्या वृथा श्रवण ॥ वृथा तप वृथा ध्यान ॥ [6]त्यांग मुंडण तें वृथा ॥ ५६ ॥ वृथा एकांतसेवन ॥ वृथा जाण त्या
गाचें मौन ॥ राखेमाजी केलें हवन ॥ तैसें अनुष्ठान स्त्रीकाम ॥ ५७ ॥ कामासक्त ज्याचें चित्त ॥ त्याचे सकळही नेम व्यर्थ ॥ आपुलें
पूर्ववृत्त निंदित ॥ अनुतापयुक्त नृप बोले ॥ ५८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ स्वार्थस्याकोविदं धिङ्मां मूर्खं पंडितमानिनम् ॥ योऽहमीश्वरतां
प्राप्य स्त्रीभिर्गोखरवज्जितः ॥ १३ ॥ ॥ टीका ॥ ॥ चहूंपुरुषार्थांचें अधिष्ठान ॥ नरदेह परम पावन ॥ जेणें देहें करितां भजन ॥ ब्रह्म
सनातन पाविजे ॥ ५९ ॥ नरदेहींचा क्षणक्षण ॥ समूळ निर्दळी जन्ममरण ॥ भावें करितां हरिस्मरण ॥ महापापें जाण निर्दळती
॥ १६० ॥ त्या नरदेहाची लाहोनि प्राप्ती ॥ [7]नरवर्य झालों चक्रवर्ती ॥ त्या माझी जळो जळो स्थिती ॥ जे वेश्येप्रती भुललों ॥ ६१ ॥
मानी श्रेष्ठ मी सज्ञान ॥ परी अज्ञानांहूनि अज्ञान ॥ नेणेंचि निजस्वार्थसाधन ॥ वेश्येअधीन मी झालों ॥ ६२ ॥ लाभोनि नरदेहनिर्धा
न ॥ म्यां देहीं धरिला ज्ञानाभिमान ॥ न करींच [9]निजें स्वार्थसाधन ॥ हें मूर्खपण पैं माझें ॥ ६३ ॥ जैसा गायीमागें कामयुक्त ॥ धांवतां

---

[1] सर्वराजांचा राजा. [2] पाठीमागून गमन करणारा. [3] स्वीकार. [4] गाढविण. [5] गाढव. [6] [illegible]ान. [7] राजश्रेष्ठ. [8] ठेवा. [9] आपलें.

बैल न मानी अनर्थ ॥ कां खरीमागें[1] खर धांवत ॥ तैसा कामासक्त मी निर्लज्ज ॥ ६४॥ खरी खरास हाणी लाताडें ॥ तरी तो धसे पुढें पुढें ॥ तैसाचि मीही वेश्येकडे ॥ कामकैवाडें[2] भूललों ॥ ६५ ॥ कामभोगांतीं विरक्ती ॥ ऐसें मूर्ख विवेकी बोलती ॥ ते अधःपातीं घालिती ॥ हे मज प्रतीती[3] स्वयें झाली ॥ ६६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ सेवतो वर्षपूगान्मे उर्वश्या अधरासवम् ॥ न तृप्यत्यात्मभूः कामो वन्हिराहुतिभिर्यथा ॥ १४ ॥ ॥ टीका ॥ ॥ सत्ययुगींचें आयुष्य माझें ॥ ऐश्वर्य सार्वभौमराजे ॥ उर्वशी सर्वमंडणकाजें ॥ सर्वभोगसमाजें भोगितां ॥ ६७ ॥ भोगितां लोटल्या वर्षकोटी ॥ परी विरक्तीची नाठवे गोठी ॥ मा वैराग्य भोगाशेवटीं ॥ हे मिथ्या चावटी मूर्खांची ॥ ६८ ॥ स्त्रियेचें ह्मणती अधरामृत ॥ तेही मूर्ख गा निश्चित ॥ तें उन्माद[4] मद्यें[5] यथार्थ ॥ अधिकें चित्तभ्रामक ॥ ६९ ॥ वनिता अधर[6]पानगोडी ॥ त्यापुढें सकळ मद्यें बापुडीं ॥ तत्काळ अनर्थी[7] पाडी ॥ निजस्वार्थकोडीनाशक ॥ १७० ॥ घालितां कोटि घृताहुती ॥ अग्नीसि कदा नव्हे तृप्ती ॥ तेवीं वनिताकामासक्ती ॥ कदा विरक्ती[8] उपजेना ॥ ७१ ॥ ऐसा आठश्लोकीं अनुताप ॥ स्वयें बोलोनियां नृप ॥ हृदयीं उपजला विवेकदीप ॥ जेणें झांके कंदर्प[9] तें स्मरलें ॥ ७२ ॥ सकामासि विषय त्यागितां ॥ वासना न त्यागे सर्वथा ॥ कां आदरें विषय भोगितां ॥ विरक्ति सर्वथा उपजेना ॥ ७३ ॥ ऐशिये अर्थींचा उपावो ॥ विचारोनि बोले रावो ॥ कामत्यागाचा अभिप्रावो ॥ साचार पहाहो संबोधी ॥ ७४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ पुंश्चल्यापहृतं चित्तं को न्वन्यो मोचितुं प्रभुः ॥ आत्मारामेश्वरमृते भगवंतमधोक्षजम् ॥ १५ ॥ ॥ टीका ॥ ॥ पुरुष स्त्री सदा अनुराग ॥ परी सहसा न करवे प्रसंग ॥ त्यासि पुंश्चलीचा घडल्या संग ॥ ते बाधी निर्लाग[10] हावभावीं ॥ ७५ ॥ पुंश्चलीचे कटाक्षगुण ॥ तेंचि पुरुषासि दृढ बंधन ॥ स्त्रीकामबंधन सोडवी कोण ॥ एकानारायणा वांचूनी ॥ ७६ ॥ कामिनी कामापासूनि निर्मुक्त ॥ कर्ता ईश्वर समर्थ ॥ जो कां आत्माराम भगवंत ॥ तोचि निश्चित सोडविता ॥ ७७ ॥ मायागुणें कामसंचार ॥ अविद्या वाढवी साचार ॥ मायानियंता जो ईश्वर ॥ तो कामैकर[11] निवारी ॥ ७८ ॥ स्वस्वरूपीं रमण आराम ॥ ऐसा जो कां आत्माराम ॥ तो निवारी सकळ काम ॥ करवी भ्रम निजात्मता ॥ ७९ ॥ जो भोग भोगूनि अभोक्ता ॥ त्या शरण रिघाल्या अनंता ॥ बाधूं न शके विषयावस्था ॥ स्त्रीसंगीं सोडविता तो एक ॥ १८० ॥ जो निवारी अधोगती ॥ तो अधोक्षज असतां भक्तपती ॥ शरण रिघाल्या तया निश्चितीं ॥ कामासक्ती निवारे ॥ ८१॥ राजा कामासक्तीं अतित्रासला ॥ बाह्यविषयां विषयीं उदास झाला ॥ त्याचा वासनाकाम जो उरला ॥ तो न वचे त्यागिला त्याचेनी ॥८२ ॥ सर्वभावेंसि संपूर्ण ॥ हरीसि रिघालिया[12] शरण ॥ सकळकामांचें निर्द

---

१ गाढवीमागें. २ विषयेच्छेनें. ३ अनुभव. ४ उन्मत्त करणारें. ५ दारू. ६ स्त्रियेचें चुंबनाची गोडी. ७ वैराग्य. ८ नष्ट होय. ९ मदन. १० अत्यंत. ११ मदनवेग. १२ गेल्यावर.

ळण ॥ सहजें जाण स्वयें होय ॥ ८३ ॥ एकाचा मतवाद निश्चितीं ॥ करितां श्रुतिवाक्यव्युत्पत्ती ॥ यजितां इंद्रादिदेवांप्रती ॥ कामनिवृत्ती हृदयस्थ ॥ ८४ ॥ ऐसें बोलती जे सज्ञान ॥ ते सर्वथा गा अज्ञान ॥ हरीसि न रिघतां शरण ॥ कामसंचरण शमेना ॥८५॥ इंद्रादिदेव कामासक्तीं ॥ विटंबले नेणों किती ॥ त्यांचेनि भजनें कामनिवृत्ती ॥ जे ह्मणती ते अतिमूर्ख ॥८६॥ ॥ श्लोक ॥ ॥ बोधितस्यापि देव्या मे सूक्तवाक्येन दुर्मतेः ॥ मनोगतो महामोहो नापयात्यजितात्मनः ॥ १६ ॥ ॥ टीका ॥ ॥ काम्यकर्मीं होईल सुख ॥ हें बोलणें समूळ लटिकं ॥ काम्यकर्मीं अधिक दुःख ॥ हें नेणती मूर्ख सकाम ॥ ८७ ॥ प्रत्यक्ष म्यां याग करून ॥ इंद्रादिदेवांतें यजून ॥ उर्वशीसंभोगा लाधूंन ॥ अतिदुःखी जाण मी झालों ॥ ८८ ॥ नारायणऊरूसीं जन्मली ॥ यालागीं उर्वशी नांव पावली ॥ त्यों मज श्रुतिवाक्यें बोधिली ॥ निष्काम बोली अतिशुद्ध ॥८९॥ ऐकतां श्रुतिनिष्कामबोली ॥ माझी न वचेच सकामभुली ॥ जंव गोविंदें कृपा नाहीं केली ॥ तंव कामाची चाली खुंटेना ॥ १९० ॥ भावें हरीसि रिघाल्या शरण ॥ हृदयीं प्रकटे नारायण ॥ तेव्हां सर्वकाम सहजें जाण ॥ जाती पळोन हृदयस्थ ॥ ९१ ॥ उर्वशीकामसंगें जाण ॥ थोर कष्टलों मी आपण ॥ असो तिचा अपराध कोण ॥ मी हरीचें स्मरण विसरलों ॥ ९२ ॥ जरी मी करितों हरीचें स्मरण ॥ तरी काम बापुडें बाधी कोण ॥ मजमाजी असतां आठवण ॥ तेथ तुच्छ जाण उर्वशी ॥ ९३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ किमेतया नोऽपकृतं रज्ज्वा वा सर्पचेतसः ॥ रज्जुस्वरूपाविदुषो योऽहं यदजितेंद्रियः ॥१७॥ ॥ टीका ॥ ॥ मूढमतीचा प्रबोध ॥ मानी उर्वशीचा अपराध ॥ विवेकें पाहतां शुद्ध ॥ मीच मतिमंद सकाम ॥ ९४ ॥ उर्वशी देखतां दृष्टीं ॥ मी कामासक्त झालों पोटीं ॥ माझिये लंपटते साठीं ॥ मज म्यां शेवटीं नाडिलें ॥९५॥ जेवीं सांजवेळे पडिला दोरू ॥ भेडां सर्प भासे थोरू ॥ जंव नाहीं केला निर्धारू ॥ तंव महा अजगरू भयानक ॥ ९६॥ तेणें सर्पभयें लवडसवडीं ॥ पळों जातां पैं तांतडी ॥ दुपावुलीं पडली आडी ॥ त्याची कल्पना नाडी तयासी ॥ ९७ ॥ तेवीं माझिये कामभ्रांतीं ॥ उर्वशी सुंदर युवती ॥ एथ माझिया कामासक्ती ॥ सुरतरतीं भूललों ॥ ९८ ॥ यापरी मी अविवेकात्मा ॥ भुललों उर्वशीच्या कामा ॥ तीवरी कोपणें जें आह्मा ॥ हेंचि अधर्मा मूळ ॥ ९९ ॥ दृष्टीं देखतां कामिनी ॥ कामासक्ता ते अतिरमणी ॥ विवेकिया पहिणघाणी ॥ नरकमाथणी ते कांता ॥ २०० ॥ जेवीं सूकरा विष्ठेची प्रीती ॥ सकामा कामिनीची रती ॥ विवेकी देखोनि थुंकिती ॥ तेंचि श्लोकार्थीं नृप बोले ॥ १ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ क्वायं मलीमसः कायो दौर्गंध्याद्यात्मको शुचिः ॥ क्व गुणाः सौमनस्याद्या ह्यध्यासोऽविद्यया कृतः॥१८॥ ॥ टीका ॥ ॥ स्त्री पुरुष नामाभिधान॥

---

१ आग्रह. २ खोटें. ३ प्राप्त होऊन. ४ नारायणाच्या मांडीपासून. ५ त्या उर्वशी. ६ विचारशून्य. ७ भित्र्यास. ८ स्त्री. ९ विषय सुखास.

केवळ देहासीचि जाण ॥ ते स्त्रीदेहीं पाहतां गुण ॥ मलिनपण अत्यंत॥२॥ जे नीच नव्या विटाळाची खाणी ॥ जे रजस्वलेची प्रवाह न्हाणी ॥ जे कां दुर्गंधाची पोहणी ॥ जे उतली चिडाणी विष्ठेची ॥ ३ ॥ जे कां दोषाचें जन्मस्थान ॥ जे विकल्पाचें आयतन[1] ॥ जे महा दुःखाचें भाजन[2] ॥ अधःपतन[3] जिचेनी ॥ ४ ॥ जे वाढवी अतिउद्वेग ॥ जिचेनि मनासि लागे क्षयरोग ॥ जिची बाधक अंगसंग ॥ अति निलाग निंद्यत्वें ॥ ५ ॥ जेवीं नीचाचा काठपरा[4] ॥ गळां अडकल्या मांजरा ॥ तें रिघोनि शुचिया घरा ॥ नानारसपात्रां विटाळी ॥ ६ ॥ तेवीं कामिनीची संगती ॥ गळां पडली न निघे मागुती ॥ कामिनीकामकामासक्तीं ॥ नेणों किती विटंबिले ॥ ७ ॥ तें मांजर जेथें घाली मुख ॥ तेथ कांठपरा रोधी देख ॥ तेवीं स्त्रीसंगें अतिदुःख ॥ मानिती सुख सकाम ॥ ८ ॥ मृगजळीं कमळ मनोहर ॥ तैसें अंगनावदन[5] सुंदर ॥ सस्मित चोरु सुकुमार ॥ सकाम नर वानिती ॥ ९ ॥ अंगनावदनाची निजस्थिती ॥ निखळशेंबुडाची तेथ वस्ती ॥ तें मुख चंद्रेंसि उपमिती ॥ जेवीं अमृत ह्मणती विखातें ॥ १० ॥ वनिताअधरीं झरे लाळ ॥ ते ह्मणती अधरामृत केवळ ॥ बाप अविद्येचें बळ ॥ भुलले सकळ सुरासुर ॥ ११ ॥ स्त्रीपुरुषीं आत्मा एक ॥ स्त्रीरूप तेथ आविद्यक ॥ मिथ्या स्त्रीकामी भुलले लोक ॥ बाप कवतिक मायेचें ॥ १२ ॥ आत्मा भोक्ता ह्मणावा स्त्रीसंभोगीं ॥ तंव तो नित्यमुक्त असंगी ॥ देह भोक्ता ह्मणावा स्त्रीसंयोगी ॥ तंव देहाचे अंगीं जडत्व ॥ १३ ॥ तेथ विषय भोगासि कारण ॥ मुख्यत्वें देहाभिमान ॥ त्या देहाभिमानासि जाण ॥ बहुत जाण विभागी[6] ॥ १४ ॥ ॥ श्लोक ॥ पित्रोः किं स्वं नु भार्यायाः स्वामिनोऽग्नेः श्वगृध्रयोः ॥ किमात्मनः किं सुहृदामिति यो नावसीयते ॥ १९ ॥ ॥ ठीका ॥ ॥ गर्भधारण पोषण ॥ स्वयें श्रमोनियां आपण ॥ माता करी परिपालन ॥ तो हा देह जाण मातेचा ॥ १५ ॥ एकलेपणें माता ॥ स्वप्नीं न देखे पुत्र कथा ॥ जो निजवीर्यनिक्षेपिता[7] ॥ तो हा देहो तत्त्वतां पित्याचा ॥ १६ ॥ जे अग्निब्राह्मण साक्षि करूनी ॥ भार्या आणिली भाक[8] देवोनी ॥ जे जीवित्व समर्पोनी ॥ सेवेलागोनी विनटली ॥ १७ ॥ जीसि याचेनि सुखशृंगार ॥ जीसि याचेनि ऐहिक[9] पर ॥ ऐसा सूक्ष्म करितां विचार ॥ देहो साचार स्त्रियेचा ॥ १८ ॥ या देहाचीं आवश्यकें ॥ सुहृद बंधू जे कां सखे ॥ देहाचेनि सुखावती सुखें ॥ देह एके पांखें[10] त्यांचाही ॥ १९ ॥ स्वयें घेऊनियां वेतन ॥ देहो विकिला आपण ॥ आज्ञेवीण न वचे क्षण ॥ देहो जाण स्वामीचा ॥ २० ॥ श्वानसृगालगिधांचें खाजें[11] ॥ तरी देहो त्यांचा ह्मणिजे ॥ जीवास्तव देहीं कर्म निपजे ॥ यालागीं देह बोलिजे जीवाचा ॥ २१ ॥ पिता माता स्त्रीपुत्र स्वजन ॥ देहाचें अवश्य करिती दहन ॥ यालागीं देह अग्नीचा पूर्ण ॥ विचक्षण बोलती ॥ २२ ॥ यापरी देहाचे जाण ॥

---

१ स्थान. २ पात्र. ३ नरकवास. ४ मडक्याचा कांठ वगैरे. ५ स्त्रीचें तोंड. ६ वांटेकरी. ७ आपलें बीजरूपवीर्य सेचन करणारा. ८ शपथ. ९ या लोकचीं सुखें. १० पक्षीं. ११ भक्ष्य.

विभागी असती आठ जण ॥ तेथ मी भोक्ता हा अभिमान ॥ तो केवळ जाण मूर्खत्वें ॥ २३ ॥ ॥ एथ एक मी विशिष्ट भोक्ता ॥ माझा देह ऐशी ममता ॥ हेचि जाण तत्त्वतां ॥ अधःपाता नेतसे ॥ २४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तेऽस्मिन्कलेवरेऽमेध्ये तुच्छनिष्ठे विषज्जते ॥ अहो सुभद्रं सुनसं सुस्मितं च मुखं स्त्रियः ॥ २० ॥ ॥ टीका ॥ ॥ देहो तितुका अशौचंकर ॥ त्यांत स्त्रीदेह अति अपवित्र ॥ केवळ विटाळाचें पात्र ॥ निरंतर द्रवरूपें ॥ २५ ॥ स्वयें भोक्ता अतिकुश्चित ॥ ऐसे अविवेकी कामासक्त ॥ कामिनीकामीं लोलंगत ॥ ते मूर्ख वानीत स्त्रियांतें ॥ २६ ॥ अहो हे सुंदर सुरेख ॥ चंद्रवदन अतिसुमुख ॥ सरळ शोभे नासिक ॥ सुभग देख सुकुमार ॥ २७ ॥ ऐशिये सुंदर स्त्रियेतें ॥ पावलों आह्मी सभाग्य ऐथें ॥ ऐसे कामासक्तचित्तें ॥ भुललीं भ्रांतें प्रमदांसी ॥ २८ ॥ स्त्रीदेहाचे विवंचनें ॥ विवंचितां वोकारा ये मनें ॥ जळो स्त्रियेचें निंद्य जिणें ॥ मूर्खीं रमणें तेठायीं ॥ २९ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ त्वङ्मांसरुधिरस्नायुमेदोमज्जाऽस्थिसंहतौ ॥ विण्मूत्रपूये रमतां कृमीणां कियदंतरम् ॥ २१ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्त्रीदेहाचा उभारा ॥ केवळ अस्थीचा पांजरा ॥ त्याचें आवरण तें स्नायु शिरा ॥ बांधोनि खरा दृढ केला ॥ २३० ॥ तेथ रुधिरमांसाचें कालवण ॥ करूनि पांजरा लिंपिला पूर्ण ॥ अस्थीवरील जें वेष्टण ॥ मज्जा ह्मणती त्यानांव ॥ ३१ ॥ अस्थिमाजील सुबद्ध ॥ त्या नांव बोलिजे मेंदू ॥ वरी चर्म मढिलें सुबद्ध ॥ त्वचा शुद्ध ती नांव ॥ ३२ ॥ त्या देहामाजी सांठवण ॥ विष्ठा मूत्र परिपूर्ण ॥ ते स्त्रीदेहीं ज्याचें रमण ॥ ते कृमि जाण नररूपें ॥ ३३ ॥ विष्ठेमाजी कृमि चरती ॥ तैशी स्त्रीदेहीं ज्या आसक्ती ॥ तेही कृमिप्राय निश्चितीं ॥ संदेह ये अर्थीं असेना ॥ ३४ ॥ वनितादेह यापरी एथ ॥ विचारितां अतिकुश्चित ॥ तो वस्त्रालंकारीं शोभित ॥ करूनि आसक्त नर होती ॥ ३५ ॥ घंटा पारधी पाश पसरी ॥ त्यावरी तो मृगातें धरी ॥ पुरुष स्त्रियेतें श्रृंगारी ॥ त्या पाशाभीतरीं स्वयें अडके ॥ ३६ ॥ यालागीं स्त्रियांची संगती ॥ कदा न करावी विरक्तीं ॥ गृहस्थीं सांडावी आसक्ती ॥ येचि अर्थीं नृप बोले ॥ ३७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अथापि नोपसज्जेत स्त्रीषु स्त्रैणेषु चार्थवित् ॥ विषयेंद्रियसंयोगान्मनः क्षुभ्यति नान्यथा ॥ २२ ॥ ॥ टीका ॥ ॥ स्त्रीदेह शोभनीय असता ॥ तरी वस्त्रेंवीण शोभता ॥ तो अतिनिंद्य कुश्चितता ॥ उघड सर्वथा शोभेना ॥ ३८ ॥ यालागीं वस्त्राभरणीं ॥ देह गुंडिती कामिनी ॥ जेवीं मैंद ब्राह्मणपणीं ॥ विश्वासनी घातक ॥ ३९ ॥ तैशी स्त्रियांची संगती ॥ सेवा लावी नानायुक्तीं ॥ शेखीं संगें पाडी अधःपातीं ॥ तेथ विरक्तीं न वचावें ॥ २४० ॥ जरी स्त्रियेची विरक्तस्थिती ॥ तरी साधकीं न करावी संगती ॥ अग्निसंगें घृतें द्रवती ॥ तेवीं विकारे वृत्ती स्त्रीसंगें ॥ ४१ ॥ अमृत ह्मणोनि खातां विख ॥ अवश्य मरण आणी देख ॥

---

१ नरकास. २ अपवित्र. ३ मिश्रण. ४ हाडावरील. ५ किडे. ६ किड्यासारखे. ७ सुंदर. ८ फसविणारे.

स्त्री मानूनि सात्विक ॥ सेवितां दुःख भोगवी ॥ ४२ ॥ अग्निमाजी घृताची वस्ती ॥ जरी बहुकाळ निर्वांहती ॥ तरी स्त्रीसंगें परमार्थी ॥
निजांत्मस्थिती पावते ॥ ४३ ॥ घृत वेंचल्या वर्षें झालीं साठी ॥ तरी अग्निसंगें द्रव उपजे घटीं ॥ तेवीं प्रमदासंगपरिपाठी ॥ वार्धकींही
उठी अतिकामू ॥ ४४ ॥ जरी कापुर अग्नि आंत ॥ नांदोलाहतां न पोळत ॥ तेवीं स्त्रीसंगें परमार्थ ॥ पावते समस्त परब्रह्म ॥ ४५ ॥ अ
ग्निपोळा धरितां हातीं ॥ तैशी स्त्रियांची संगती ॥ संगें वाढवी आसक्ती ॥ पाडी अनर्थी पुरुषातें ॥ ४६ ॥ स्त्रियेपरीस स्त्रैण ॥ संगति मी
नलिया जाण ॥ कोटि अनर्थांचें भाजनं[3] ॥ अधःपतन तत्संगें ॥ ४७ ॥ तैशी स्त्रैणेंसि झाल्या भेटी ॥ ब्रह्मानंद स्त्रीसुखाच्या पोटीं ॥ ऐशा
विरक्तां प्रबोधी गोठी ॥ करी उठाउठी स्त्रीकाम ॥ ४८ ॥ तेथ स्वदारा[4] आणि परदारा ॥ या करूंनेदी विचारा ॥ प्रवर्तवी स्वेच्छाचारा ॥
स्त्रैण खरा अतिघाती ॥ ४९ ॥ स्त्रैण जेथें प्रवेशला ॥ तेथ अनाचार वोलिंगला ॥ अधर्म सर्वांगीं फुलला ॥ बाधकत्वें फळला अनर्थ
फळीं ॥ २५० ॥ यालागीं जो परमार्थी ॥ तेणें स्त्रैणाची संगती ॥ सर्वथा न धरावी हातीं ॥ पाडी अनर्थी तो संग ॥ ५१ ॥ मुख्य स्त्रै
णचि वाळिला आहे ॥ तेथें स्त्रीसंग कोठें राहे ॥ हे संगतीचि पाहें ॥ सेव्य नोहे परमार्था ॥ ५२ ॥ यालागीं साधकीं आपण ॥ स्त्रीनिरी
क्षण संभाषण ॥ सर्वथा न करावें जाण ॥ एकांतशीलन न कधीं व्हावें ॥ ५३ ॥ ह्मणशी विवेकी जो आहे ॥ त्यासि संग करी काये ॥
स्त्रीसंगास्तव अपाये ॥ सोशिले पाहे सुज्ञानीं ॥ ५४ ॥ पराशरासि अर्धघडी ॥ नावेसि मीनली नावांडी ॥ ते अर्धघटिकेसाठीं रोकडी ॥
अंगीं परवडी वाजली ॥ ५५ ॥ ऋष्यशृंग अतितापसी ॥ तोही वश झाला वेश्येसी ॥ इतरांची गोठी कायसी ॥ मुख्य महादेवासी
भुलविलें ॥ ५६ ॥ विषयइंद्रियांचे संगती ॥ अवश्य क्षोभे चित्तवृत्ती ॥ तेथ सज्ञानही बाधिजती ॥ मा कोण गती अज्ञाना ॥ ५७ ॥
हेही असो उपपत्ती ॥ न साहे स्त्रियांची संगती ॥ कामक्षोभ एकांतीं ॥ तेंचि विशदार्थीं बोले ॥ ५८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अदृष्टादश्रुताद्भा
वान्न भाव उपजायते ॥ असंप्रयुंजतः प्राणान् शाम्यति स्तिमितं मनः ॥ २३ ॥ ॥ टीका ॥ ॥ जें देखिलें ऐकिलें नाहीं ॥ ऐशिया विष
याचे ठायीं ॥ पुरुषाचें मन पाही ॥ सर्वथा कहीं क्षोभेना ॥ ५९ ॥ जे पूर्वभुक्तविषय असतो ॥ तेचि स्मरण झालिया चित्तीं ॥ कामउ
द्रेकें क्षोभे वृत्ती ॥ नसतां संगती स्त्रियेची ॥ २६० ॥ एवं पूर्वापर विषयासक्ती ॥ पुरुषासि बाधक निश्चितीं ॥ तो बैसल्याही एकांतीं ॥
वासनासंस्कारें वृत्ती सकाम क्षोभे ॥ ६१ ॥ पूर्वदिवशींचीं पक्वान्नें ॥ जीं ठेविलीं अतियत्नें ॥ तीं न करितांही रांधणें ॥ पहांटे भक्षणें
स्वयें जेवीं ॥ ६२ ॥ तेवीं वासनासंस्थित काम ॥ पुरुषास करी सकाम ॥ काम क्षोभें पाडी भ्रम ॥ कर्माकर्म स्मरेना ॥ ६३ ॥ एवं

---

१ आत्मरूप. २ स्त्रीलंपट. ३ पात्र, जागा. ४ आपली स्त्री. ५ नावाड्याची कन्या. ६ दोषांत सांपडतात. ७ स्पष्ट होण्या करितां. ८ तयार.

वासना कामसंगती ॥ बाधक होय परमार्थीं ॥ यालागीं साधकीं समस्तीं ॥ स्त्रीकामासक्ती त्यागावी ॥ ६४ ॥ मनीं क्षोभल्या कामासक्ती
॥ साधकीं तेथें करावी युक्ती ॥ आवराव्या बाह्य[1] इंद्रियवृत्ती ॥ तैं मनासि शांती हळूहळू होय ॥ ६५ ॥ कर्मेंद्रियीं राखण ॥ दृढ
वैराग्य ठेविलिया जाण ॥ मनीं क्षोभल्या काम पूर्ण ॥ आपल्या आपण उपशमे ॥ ६६ ॥ जेणें पडिजे अनर्थीं ॥ ते त्यागावी संगती॥
संगत्यागाची निजस्थिती ॥ दृढ श्लोकार्थीं नृपं[2] बोले ॥ ६७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तस्मात्संगो न कर्तव्यः स्त्रीषु स्त्रैणेषु चेंद्रियैः ॥ विदुषां चाप्यविश्रब्धः
षड्वर्गः किमु मादृशाम् ॥ २४ ॥ ॥ टीका ॥ ॥ जेथ सज्ञाना उठी छळ ॥ सकाम भुलवी तत्काळ ॥ ऐसा स्त्रीसंग अनर्थशीळ
॥ त्याहूनि प्रबळ स्त्रैणाचा ॥ ६८ ॥ यालागीं कर्मेंद्रियांचे स्थितीं ॥ स्त्री आणि स्त्रैणाची संगती ॥ घडोंनेदावी परमार्थीं ॥ जे निजस्वार्थीं
साधक ॥ ६९ ॥ जरी विषयीं क्षोभेल मन ॥ तरी इंद्रियें आवरावीं आपण ॥ तरी मनींचा विषयो जाण ॥ मनींचि आपण
स्वयें विरे ॥ २७० ॥ निकट विषय स्त्रीसंगती ॥ मन क्षोभे विषयासक्ती ॥ क्षणार्ध स्त्रीसंगप्राप्ती ॥ पडले अनर्थीं सज्ञान ॥ ७१ ॥ स्त्रीदर्शनें
कामासक्त ॥ देवेंद्र झाला भगांकित[3] ॥ चंद्र कळंकिया[4] एथ ॥ केला निश्चित गुरुपत्न्या[5] ॥ ७२ ॥ सौभरी तपस्वी तपयुक्त ॥ तो
मत्स्यमैथुनास्तव एथ ॥ करूनि सांडिला कामासक्त ॥ संग अनर्थभूत स्त्रियांचा ॥ ७३ ॥ निजकन्येचिया संगतीं ॥ ब्रह्मा भुलला कामासक्ती
॥ इतरांची कोण गती ॥ संग अनर्थीं[6] स्त्रियांचा ॥ ७४ ॥ कामिनीसंग अतिदारुण ॥ शिवासि झालें लिंगपतन ॥ प्रमदासंगें सज्ञान
॥ ठकले जाण महायोगी ॥ ७५ ॥ नारदें विनोददृष्टी[7] ॥ कृष्णपत्नी मागीतल्यासाठीं ॥ तो नारदी केला गंगातटीं ॥ तेथ जन्मले पोटीं
साठी पुत्र ॥ ७६ ॥ कौतुकें स्त्रियांप्रति जातां ॥ सज्ञान पावे बाधकता ॥ मा मजसारिख्या मूर्खांची कथा ॥ कोण वार्ता तेठायीं ॥ ७७ ॥
क्षणार्ध स्त्रियांची संगती ॥ सज्ञान ठकले ऐशा रीतीं ॥ जे स्त्रीसंगा विश्वासती ॥ ते दुःखी होती मजऐसे ॥ ७८ ॥ यालागीं विश्वासतां
स्त्रीसंगासी ॥ इंद्रियषड्वर्ग[8] ठकी सर्वांसी ॥ एथ आवरूनि इंद्रियांसी ॥ सर्वथा स्त्रियांसी त्यागावें ॥ ७९ ॥ त्यागूनि स्त्रियांची संगती ॥
उपरमूनि इंद्रियवृत्ती ॥ राजा पावला परमशांती ॥ तेंचि श्रीपती स्वयें सांगे ॥ २८० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ श्रीभगवानुवाच ॥ ॥ एवं प्रगायन्नरदेवदेवः
स उर्वशी लोकमथो विहाय ॥ आत्मानमात्मन्यवगम्य मां वै उपारमज्ज्ञानविधूतमोहः ॥ २५ ॥ ॥ टीका ॥ ॥ जो उर्वशीस्वर्गभोग
पावोनी ॥ ज्यासि देव मानिती श्रेष्ठपणीं ॥ जो सकळराजचूडामणी[9] ॥ ज्यासि येती लोटांगणीं भूपाळ ॥ ८१ ॥ ऐसा पुरूरवा
चक्रवर्ती ॥ लाहोनि उर्वशीभोगप्राप्ती ॥ स्वर्गभोगीं पावला विरक्ती ॥ सभाग्य नृपती तो एक ॥ ८२ ॥ अप्राप्तविषयें योगी ॥ बहुत

---

[1] बाहेरील विषयावरची. [2] पुरूरवाराजा. [3] हजार छिद्रांनींयुक्त. [4] कलंकयुक्त. [5] तारेमुळें. [6] अनर्थ कारण. [7] थट्टेनें. [8] इंद्रियांचे काम, क्रोध इत्यादि सहाधर्म. [9] सर्व राजांत श्रेष्ठ.

देखिले विरागी ॥ परी प्राप्तस्वर्गांगना भोगीं ॥ धन्य विरागी पुरूरवा ॥ ८३ ॥ पुरूरव्या ऐशी विरक्ती ॥ नाहीं देखिली आणिकाप्रती ॥ धन्य पुरूरवा त्रिजगतीं ॥ स्वमुखें श्रीपती वाखाणी ॥ ८४ ॥ तेणें अनुतापाच्या अनुवृत्तीं ॥ निंदोनियां निजात्मस्थिती ॥ क्षाळिली कामिनीकामासक्ती ॥ धुतला निश्चितीं महामोहो ॥ ८५ ॥ अनुताप आंगिठी अभंग ॥ वैराग्य पुढें देऊनि चांग ॥ विवेकें दमितां सांग ॥ काममोहाचे डाग क्षाळिले तेणें ॥ ८६ ॥ जेवीं सोनें पुटीं पडे ॥ तुक तुटे वानीं चढे ॥ तेवीं निजात्मप्राप्तिनिवाडें ॥ वृत्ति वाडेंकोडें ॥ क्षाळिली ॥ ८७ ॥ ऐशिये अतिशुद्धनिजवृत्तीं ॥ विवेकवैराग्यसंपत्ती ॥ पूर्ण अनुतापाचे स्थितीं ॥ माझी कृपाप्राप्ती पावला ॥ ८८ ॥ माझिया कृपेवीण कांहीं ॥ कदा अनुताप नुपजे देहीं ॥ शुद्ध अनुताप ज्याच्याठायीं ॥ ते माझी कृपा पाही परिपूर्ण ॥ ८९ ॥ माझी कृपा झालिया जाण ॥ जीव होय ब्रह्म पूर्ण ॥ निःशेष गेला मानाभिमान ॥ मीतूंपण भासेना ॥ २९० ॥ तेथ कार्य कर्म आणि कर्ता ॥ भोग्य भोग आणि भोक्ता ॥ दृश्य दर्शन द्रष्टृता ॥ त्रिपुटी सर्वथा असेना ॥ ९१ ॥ त्रिगुण त्रिपुटीचें कारण ॥ मूळभूत निज अज्ञान ॥ तें सद्गुरुकृपेस्तव जाण ॥ गेलें हरपोन मिथ्यात्वें ॥ ९२ ॥ जेवीं दोराचें सापपण ॥ निर्धारितां[1] हारपे पूर्ण ॥ तेवीं गुणेंसि अविद्या जाण ॥ जाय हारपोन गुरुकृपें ॥ ९३ ॥ सद्गुरुबोधें पाहतां जाण ॥ दिसेना द्वैताचें भान ॥ तेथ उर्वशी भोगी कोण ॥ राजा स्वानंदें पूर्ण निवाला ॥ ॥ ९४ ॥ राजा निवाला ब्रह्मरसीं ॥ मग सांडूनियां उर्वशी ॥ त्यजोनियां स्वर्गलोकासी ॥ निजबोधेंसी निघाला ॥ ९५ ॥ इतर ज्ञाते स्त्रिया त्यागिती ॥ परी त्यागेना कामासक्ती ॥ तैसी नव्हे रायाची स्थिती ॥ परमार्थविरक्ती पावला ॥ ९६ ॥ जे परमार्थविरक्तीचे पोटीं ॥ कामिनीकामवार्ता[2] नुठी ॥ ब्रह्मानंदें कोंदली सृष्टी ॥ स्वानंदपुष्टीं निवाला ॥ ९७ ॥ ऐसा सुखरूपें सहज ॥ मी होऊनि पावला मज ॥ जिणोनि कल्पना कामकाज ॥ नाचत भोज स्वानंदें ॥ ९८ ॥ ऐसा निश्चयेंसि निश्चित ॥ माझें निजस्वरूप झाला प्राप्त ॥ तेणें हा इतिहास एथ ॥ निजसुखार्थ गायिला ॥ ९९ ॥ अनुताप आवडीं इतिहास ॥ गातां प्रकटे पूर्ण परेश ॥ तेथ सहजें अविद्येचा नाश ॥ निजसुखें क्षितीश निवाला ॥ ३०० ॥ येवढी पावावया निजप्राप्ती ॥ त्यागावी कामिनीकामासक्ती ॥ मुख्यत्वें धरावी सत्संगती[3] ॥ हेंचि उद्धवाप्रती हरि सांगे ॥ १ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ ततो दुःसंगमुत्सृज्य सत्सु सज्जेत बुद्धिमान् ॥ संत एतस्य छिंदंति मनोव्यासंगमुक्तिभिः ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ॥ अवश्य त्यागावी दुःसंगता ॥ तो दुःसंग कोण ह्मणशी आतां ॥ तरी स्त्री आणि स्त्रैणावरता[4] ॥ दुःसंग सर्वथा असेना ॥ २ ॥ जो मानीना वेदशास्त्रार्था ॥ जो अविश्वासी परमार्था ॥ ज्यामाजी अतिविकल्पता ॥ तोही तत्त्वतां दुःसंग ॥ ३ ॥ जो

---

[1] निश्चयात्मक ज्ञान होतांच. [2] स्त्रीविषयाची गोष्ट. [3] साधूंची संगति. [4] स्त्री लंपटापेक्षां.

बोल बोले अतिविरक्त ॥ हृदयीं आसक्त कामरत ॥ कामरोधें द्वेषा येत ॥ तोही निश्चित दुःसंग ॥ ४ ॥ कां स्वधर्मकर्म विनीतता ॥ बाह्य दावी सात्विकता ॥ हृदयीं दोषदर्शी संतां ॥ हे दुःसंगता अतिदुष्ट ॥ ५ ॥ जो मुखें न बोले आपण ॥ परी देखे साधूंचे दोषगुण ॥ तेंचि सबाह्य दावी उपलक्षण ॥ तो अतिकठिण दुःसंग ॥ ६ ॥ मुख्य आपली जे सकामता ॥ तोचि दुःसंग सर्वथा ॥ तो काम समूळ त्यागितां ॥ दुःसंगता त्यागिली ॥ ७ ॥ कामकल्पनेचा जो मेरू ॥ तोचि दुःसंग दुर्धरू ॥ ते कामकल्पना त्यागी जो नरू ॥ त्यासि संसारू सुखरूप ॥ ८ ॥ कामकल्पना त्यागावया जाण ॥ मुख्य सत्संगचि कारण ॥ संतांचे वंदितां श्रीचरण ॥ कल्पना काम जाण उपमर्दे ॥ ९ ॥ संग सर्वथा बाधक ॥ ह्मणशी त्यजावा निःशेख ॥ तरी सत्संग न धरितां देख ॥ केवीं साधक सुटतील ॥ ३१० ॥ सत्संगेंविण जें साधन ॥ तेंचि साधकां दृढ बंधन ॥ सत्संगेंविण त्याग जाण ॥ तें संपूर्ण पाखंड ॥ ११ ॥ चित्तविषयांचा संबंध ॥ गांठी बैसल्या सुबद्ध ॥ त्यांचा करावया छेद ॥ विवेकें विशद निजसाधू ॥ १२ ॥ संतांच्या सहज गोठी ॥ त्याचि उपदेशांच्या कोटी ॥ देहात्मता जीवगांठी ॥ बोलासाठीं छेदिती ॥ १३ ॥ भावें धरिल्या सत्संगती ॥ साधकां भवपाशनिर्मुक्ती[1] ॥ यालागीं अवश्य बुद्धिमंतीं ॥ करावी संगती संतांची ॥ १४ ॥ त्या संतलक्षणाची स्थिती ॥ अतिसाक्षेपें श्रीपती ॥ आदरें सांगे उद्धवाप्रती ॥ यथानिगुती निजबोधें ॥ १५ ॥

॥ श्लोक ॥ ॥ संतोनपेक्षा मच्चित्ताःप्रशांताः समदर्शनाः ॥ निर्ममा निरहंकारा निर्द्वंद्वा निष्परिग्रहाः ॥ २७ ॥

॥ टीका ॥ ॥ साधूंचे अमितगुण ॥ त्यांत मुख्यत्वें अष्टलक्षण ॥ निवडूनि सांगे श्रीकृष्ण ॥ ते कोण अवधारी[3] ॥ १६ ॥ प्राप्ताप्राप्तलाभावस्था ॥ बाधूं नशकें साधूंच्या चित्ता ॥ चित्ता रतलें भगवंता ॥ निरपेक्षता या नांव ॥ १७ ॥ पैल विषयो मज व्हावा ॥ ऐसा आठव नाठवे जीवा ॥ हा साधूचा निरपेक्ष ठेवा ॥ जाण उद्धवा गुण पहिला ॥ १८ ॥ चित्तें चिंतावें चैतन्य ॥ याचि नांवें मच्चित्तपण ॥ याचिनांवें निरपेक्ष पूर्ण ॥ इतर चिंतन भवबंधू ॥ १९ ॥ निरपेक्ष व्हावया एथ ॥ जागृतिस्वप्नसुषुप्ती आंत ॥ चिन्मात्रीं जडलें चित्त ॥ या नांव मच्चित्त उद्धवा ॥ ३२० ॥ देह झालिया लक्ष्मीयुक्त ॥ अथवा होकां आपद्युक्त ॥ चित्त परमानंदीं निश्चित ॥ या नांव मच्चित्त उद्धवा ॥ २१ ॥ कामलोभादिदोषरहित ॥ परमानंदीं जडलें चित्त ॥ शांतिसुखवासें वसे तेथ ॥ यालागीं प्रशांत बोलिजे त्यासी ॥ २२ ॥ जरी प्राणांत केला अपकार ॥ तरी दुष्ट न ह्मणे हा नर ॥ अपकाऱ्या करी उपकार ॥ प्रशांति[illegible]कार या नांव ॥ २३ ॥ जरी ठकूनि सर्वस्व नेलें ॥ तरी क्षोभेना दोषबळें ॥ तें जाण ब्रह्मार्पण झालें ॥ येणें अंगा आलें प्रशांतत्व ॥ २४ ॥ ब्रह्मभावेंचि तत्वतां ॥ विश्वासणें सर्वभूतां ॥ कदा

---

१ संसार बंधापासून मुक्त होण्यास. २ कोठें भागवतपुस्तकांत ( मणताः ) असा पाठ आहे. ६ एक.

विकल्प नुपजे चित्ता ॥ हे प्रशांतता गुण तिजा ॥ २५ ॥ ऐसा हा प्रशांततागुण ॥ अंगीं बाणावया हेंचि कारण ॥ जगीं देखे समदर्शन ॥ ब्रह्म परिपूर्ण समसाम्यें ॥ २६ ॥ जग पाहतां दिसे विषम ॥ विषमीं देखे सम ब्रह्म ॥ तोचि समदर्शी परम ॥ हा गुण निरुपम पैं चौथा ॥ २७ ॥ हे समदृष्टी यावया हाता ॥ भावें भजोनि भगवंता ॥ निःशेष त्यजिली अहंममता ॥ हेही कथा अवधारी ॥ २८ ॥ धरितां देहाचा अभिमान ॥ ते अहंता वाढवी मीपण ॥ मीपणें ममता जाण ॥ वाढे संपूर्ण देहसंबंध्यां ॥ २९ ॥ जे वाढली अहंममता ॥ ते वर्तवी महादुःखावर्तां[1] ॥ तिची निवारावया निजव्यथा ॥ सद्भावें माथा गुरुचरणीं ॥ ३३० ॥ गुरुकृपा झालिया पूर्ण ॥ माझे देहींचें मीपण ॥ तें उकलोनि दावितां जाण ॥ जग संपूर्ण मी एक ॥ ३१ ॥ जें जें सान थोर दिसे दृष्टीं ॥ तें तें अवघें मीचि सृष्टीं ॥ माझ्या मीपणाची निजपुष्टी ॥ घोंटीत उठी त्रैलोक्य ॥ ३२ ॥ ऐसा मीपणें मी परिपूर्ण ॥ तेथ मी ह्मणावया ह्मणतें कोण ॥ निःशेष निमालें मी तूंपण ॥ निरभिमान या नांव ॥ ३३ ॥ ऐसें माझें मीपण पाहतां ॥ समूळ हारपली ममता ॥ हें माझें ह्मणावया पुरता ॥ ठाव रिता नुरेची ॥ ३४ ॥ तेथ मीपणें मी माझें ॥ नुरेचि तूंपणेंसि तुझें ॥ ऐसे परब्रह्माचेनि निजें ॥ झाले सहजें निर्मम ॥ ३५ ॥ निर्मम निरभिमान ॥ तें हें उद्धवा गा संपूर्ण ॥ पांचवें सहावें लक्षण ॥ संतांचें जाण निज गुह्य ॥ ३६ ॥ ऐसे निर्मम निरहंकार ॥ जे होऊनि ठेले साचार ॥ त्यांसि द्वंद्वदुःखडोंगर ॥ अणुमात्र न बाधी ॥ ३७ ॥ देह अदृष्टाचा वांटा ॥ लागतां सुखदुःखांच्या झटा ॥ तो ब्रह्मसुखाचे चोहटा ॥ देहाचा द्रष्टा होऊनि असे ॥ ३८ ॥ माझे मीपणाबाहिरें ॥ जैं ममतास्पद[2] दुजें नुरे ॥ तैं तेथ ममता पूर्ण स्फुरे ॥ ते म्यां चिन्मात्रें घोंटिली ॥ ३९ ॥ देहासि पदवी आली थोरी ॥ तो श्लाघेना जीवाभीतरी ॥ देह घोळसितां नरकद्वारीं ॥ तो अणुभरी कुंथेना ॥ ३४० ॥ देह व्याघ्रमुखीं सांपडे ॥ तेणें दुःखें तो न सांकडे[3] ॥ देह पालखीमाजी चढे ॥ तैं वाडेंकोडें श्लाघेना ॥ ४१ ॥ छाया विष्ठेवरी पडे ॥ कां पालखीमाजी चढे ॥ तेणें पुरुषा सुखदुःख न जोडे ॥ मुक्तासि तेणें पाडें देहभोग ॥ ४२ ॥ त्याचे दृष्टीखालीं एकाएक ॥ दुःखपणा मुके दुःख ॥ सुखपणा विसरे सुख ॥ निर्द्वंद्व देख याहेतू ॥ ४३ ॥ जो निर्मम[4] निरभिमान ॥ त्यासि नाहीं भेदभान ॥ अभेदीं मिथ्या द्वंद्वबंधन ॥ हा सातवा गुण निर्द्वंद्व[5] ॥ ४४ ॥ जो निर्द्वंद्व निरभिमान पहाहो ॥ त्यासि मिथ्या समूळ निजदेहो ॥ तेथ देहसंबंधें परिग्रहो ॥ उरावया ठावो मग कैंचा ॥ ४५ ॥ स्वजनधनस्त्रीपुत्रांसी ॥ नांदोनि तो नातळे[6] त्यांसी ॥ स्वप्नघरवात[7] जागृता जैशी ॥ तैसा साधूसी संसारु ॥ ४६ ॥ एवं परिग्रही असोन ॥ साधु अपरिग्रही पूर्ण ॥ हें आठवें मुख्य लक्षण ॥ अतर्क्य जाण जगासी ॥ ४७ ॥ साधु परिग्रही

---

[1] मोठ्या दुःखरूपभोंवऱ्यांत. [2] ममतेचें ठिकाण. [3] क्लेश पावे. [4] ममतारहित. [5] शीत उष्ण इत्यादि दुःखरहित. [6] आसक्त होत नाहीं. [7] स्वप्नांतील व्यवहार.

दिसती ॥ परी ते परिग्रही नसती ॥ हेचि संतांची पावावया स्थिती ॥ त्यांची निजभक्ती करावी ॥ ४८ ॥ हें साधूचें अष्टलक्षण ॥ तें
ब्रह्मीचें अष्टांग जाण ॥ कीं अष्ट महासिद्धि निर्गुण ॥ ते हे अष्टगुण साधूचे ॥ ४९ ॥ चैतन्यसरोवरींचें कमळ ॥ विकासलें अष्टदळ ॥
तें हें संतलक्षण केवळ ॥ स्वानंदशीळ साधूसी ॥ ३५० ॥ ऐसे हे अष्ट महागुण ॥ सकळभूषणां भूषण ॥ ज्याचे अंगीं बाणले पूर्ण ॥ ते
साधु सज्जन अतिशुद्ध ॥ ५१ ॥ इतरसंगाचिये प्राप्ती ॥ संग बाधक निवर्ती ॥ तैशी नव्हे सत्संगती ॥ संगें छेदी आसक्ती देहसंगा
॥ ५२ ॥ तेथ उपदेश नलगे कांहीं ॥ देही[1] करी विदेही ॥ तेंचि सातश्लोकीं पाही ॥ संताची नवाई[2] हरि सांगे ॥ ५३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥
तेषु नित्यं महाभाग महाभागेषु मत्कथाः ॥ संभवंति हिता नृणां जुषतां प्रपुनंत्यघम् ॥ २८ ॥ ॥ टीका ॥ ॥ इंद्रपदादिब्रह्मसदन ॥ ये
प्राप्ती नांव भाग्य गहन[3] ॥ तेही सत्संगासमान ॥ कोट्यंशें जाण तुकेना[4] ॥ ५४ ॥ ऐशी जे कां सत्संगती ॥ सभाग्य भाग्याचे पावती ॥
भगवद्भावें साधु वर्तती ॥ माझी कथाकीर्तिअनुवादें ॥ ५५ ॥ जे कथा अवचटें कानीं ॥ पडतां कलिमलाची धुणी ॥ करूनि सांडी
तत्क्षणीं ॥ जे गंगेहूनी पवित्र ॥ ५६ ॥ जेथ माझी निजकथा गाती ॥ तीर्थें तेथें पवित्र होती ॥ ऐशिया भगवत्कथाकीर्ती ॥ साधु
गर्जती सर्वदा ॥ ५७ ॥ स्वयें आपण भागीरथी ॥ सर्वदा ऐसें जीवीं[5] चिंती ॥ कोणी साधु ये जैं मजप्रती ॥ तैं माझीं पापें जाती निःशेष
॥ ५८ ॥ पार्वतीचा द्वेष मनीं ॥ तें बद्ध पाप मजलागुनी ॥ तेंही झडे संतचरणीं ॥ सकळ पापा धुणी सत्संगें ॥ ५९ ॥ कां ज्याचे
मुखीं हरिनामकीर्ती ॥ त्याचे पाय जैं मजमाजी येती ॥ तैं सकळ पापें माझीं जाती ॥ ऐसें भागीरथी स्वयें बोले ॥ ३६० ॥ ऐसी
संतांची संगती ॥ सदा वांछी भागीरथी ॥ अवचटें[6] गेलिया संतांप्रती ॥ पापें पळती प्राण्यांचीं ॥ ६१ ॥ ते संतमुखींची माझी कथा ॥
जैं अत्यादरें ऐके श्रोता ॥ तैं त्याचें निजभाग्य तत्त्वतां ॥ मजही सर्वथा न वर्णवे ॥ ६२ ॥ माझे कथेची अति आवडी ॥ नित्य नूतन
नवी गोडी ॥ सादरें ऐकतां पापकोडी ॥ जाळोनि राखोडी उरवीना ॥ ६३ ॥ माझी कथा माझें नाम ॥ सकळ पातकां करी भस्म ॥
हेंच चित्तशुद्धीचें वर्म ॥ अतिसुगम उद्धवा ॥ ६४ ॥ नानायोग याग[7] वेदाध्ययन ॥ करितां पवित्र नव्हे मन ॥ तें करितां हरिकथाश्रवण
॥ होय अंतःकरण पुनीत ॥ ६५ ॥ अबद्ध[8] पढतां वेद ॥ दोष बाधी जी सुबद्ध ॥ नाम पढतां अबद्ध ॥ ते होती शुद्ध परमार्थें ॥ ६६ ॥
नानायोग याग वेदाध्ययन ॥ तेथ अधिकारी द्विज संपूर्ण ॥ कथाश्रवणें चारी वर्ण ॥ होती पावन उद्धवा ॥ ६७ ॥ ऐसा लाभ कथा
श्रवणीं ॥ तरी कां नाइकीजे सकळजनीं ॥ तें भाग्य भगवत्कृपेवांचूनी ॥ सर्वथा कोणी लाहेना ॥ ६८ ॥ भगवत्कृपा पावले सांग ॥

---

[1] जीवास. [2] प्रौढि, वर्णन. [3] अतिमोठें. [4] बरोबर होत नाहीं. [5] मनांत. [6] सहज. [7] यज्ञ. [8] अशुद्ध, अनन्वित.

त्यांसि कथाकीर्तनीं अनुराग ॥ तेचि निजभाग्यें महाभाग ॥ स्वमुखें श्रीरंग बोलिला ॥ ६९ ॥ जगातें पवित्र करिती ॥ माझी जाण
नामकीर्ती ॥ ऐसा कळवळोनि श्रीपती ॥ उद्धवाप्रती बोलिला ॥ ३७० ऐशी भगवत्कृपेची प्राप्ती ॥ केवीं आतुडे[1] आपुले हातीं ॥ तेचि
अर्थीं श्रीपती ॥ विशद श्लोकार्थीं सांगत ॥ ७१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ तां शृण्वंति गायंति ह्यनुमोदंति चादृताः ॥ मत्पराः श्रद्दधानाश्च
भक्तिं विंदंति ते मयि ॥ २९ ॥ ॥ टीका ॥ ॥ आपुलिया गृहकार्यार्थां ॥ विषयव्यापारीं जातजातां ॥ कानीं पडली हरिकथा ॥ स्वभा
वतां प्रसंगें ॥ ७२ ॥ कृष्णकीर्तिकथनाक्षरें ॥ रिघतांचि कर्णद्वारें[2] ॥ भीतरील पाप एकसरें ॥ निघे बाहिरें गजबजोनी ॥ ७३ ॥ जेवीं
पंचाननाची[3] आरोळी ॥ करी मदगजां रांगोळी ॥ तेवीं हरिकथेच्या मेळीं ॥ करी रंवदळी महापापा ॥ ७४ ॥ ऐसा निघाल्या पापाचा
केरू ॥ कथेसि उपजे अत्यादरू ॥ कथावधानीं धरितां धीरू ॥ हर्षें निर्भरू मन होय ॥ ७५ ॥ जंवजंव कथारहस्य जोडे ॥ तंव तंव अ
नुमोदनीं प्रीति वाढे ॥ वाढले प्रीतीचेनि पाडें ॥ ते कथा कैवाडें स्वयें गाय ॥ ७६ ॥ फेडूनि लाजेचें बिरडें ॥ गातां हरिकीर्तिगुणपवाडे ॥
न पाहे तो कर्माकडे ॥ न सांकडे सुहृदांसी ॥ ७७ ॥ निजभावें भगवत्कथा गातां ॥ स्वयंभ उपजे सादरता ॥ तेणें अत्यादरें हरिकथा ॥
होय सांगता अतिश्रद्धा ॥ ७८ ॥ जंव जंव कथा सांगे निवाडें ॥ तंव तंव श्रद्धा अधिक वाढे ॥ प्रेमाचा पूर चढे ॥ त्यामाजी बुडे निज
श्रद्धा ॥ ७९ ॥ कथा कीर्तन अनुकीर्ती ॥ वाढत्या श्रद्धेचिये प्रीतीं ॥ बाधूं न शके विषयासक्ती ॥ तेणें मत्पर[4] स्थिती साधकां ॥ ३८० ॥
न करितां भगवद्भजन ॥ वेदाध्ययन यज्ञ दान ॥ येणेंचि आह्मीं जाऊं तरोन ॥ ह्मणती ते जन महामूढ ॥ ८१ ॥ एथ मुख्यत्वें भगव
द्भक्ती ॥ हा विश्वास धरितां चित्तीं ॥ भगवत्पर झाली वृत्ती ॥ सर्वभूतीं मद्भाव ॥ ८२ ॥ ऐसा भाव धरोनि हृदयीं ॥ माझे भक्तीवेगळें
कांहीं ॥ सर्वथा स्वयें करणें नाहीं ॥ मत्पर पाही या रीतीं ॥ ८३ ॥ ऐशिया मत्पर वृत्ती ॥ सावधान निजस्थिती ॥ भक्तां उपजे चौथी
भक्ती ॥ तेंचि श्रीपती स्वयें सांगें ॥ ८४ ॥ तेथ नकरितां आठवण ॥ अखंड होय हरीचें स्मरण ॥ क्रियामात्र भगवद्भजन ॥ सहजें जाण
सर्वदा ॥ ८५ ॥ जें जें दृष्टीं देखे आपण ॥ थोर अथवा सूक्ष्म सान ॥ तें तें हरिरूप संपूर्ण ॥ सहजें भजन अहेतुक ॥ ८६ ॥ जें जें
वाचा वदे वचन ॥ तें तें होय हरीचें स्तवन ॥ स्तव्य स्तविता उणखूण ॥ हेंही आठवण विसरोनी ॥ ८७ ॥ शब्दीं शब्दातें शब्दवितां ॥
ते शब्दरूपें हरीची कथा ॥ शब्द द्योतक ज्या शब्दार्था ॥ ते अर्थग्राहकता[5] हरीची ॥ ८८ ॥ यापरी शब्दश्रवण ॥ श्रवणीं श्रवण होतां
जाण ॥ तो शब्दार्थ संपूर्ण ॥ होय ब्रह्मार्पण श्रवणेंसी ॥ ८९ ॥ गंधघ्राणां[6] होतां भेटी ॥ भोक्तेपणें हरीचि उठी ॥ तो घ्रेय[7] घ्राता[8] घ्राण

---

१ येते. २ कानांत. ३ सिंहाची. ४ माझ्या ठिकाणीं तल्लीन अशी. ५ अर्थग्रहण करण्याचीशक्ति. ६ गंधविषय व घ्राणेंद्रिय या उभयांची. ७ वास घेण्याचा पदार्थ. ८ वास घेणारा.

त्रिपुटी ॥ स्वयें घोंटी चिद्‌त्वें ॥ ३९० ॥ रस रसना रसत्व बोध ॥ तेथ निजभोक्ता गोविंद ॥ तो भोग्य भोक्ता भोजनसंबंध ॥ करी परमानंद निजबोधें ॥ ९१ ॥ शीत उष्ण मृदु कठिण ॥ निजांगीं लागतां जाण ॥ तें अंगेंचि होय आपण ॥ मृदु कठिण मिथ्यात्वें ॥ ९२ ॥ करांची जे कर्तव्यता ॥ तीतें चालवी अकर्ता ॥ यालागीं घेतां देतां ॥ अकर्तात्मता हरिभजन ॥ ९३ ॥ निश्चळ निजरूपावरी ॥ चपळ पाउलांच्या हारी ॥ चालवी जैश्या लहरी ॥ सूर्यकरीं[1] मृगजळाच्या ॥ ९४ ॥ जागृतिस्वप्नसुषुप्तीं ॥ चिन्मात्रीं[2] जडली वृत्ती ॥ चित्त चित्त्वाची विसरे स्फूर्ती ॥ या नांव मद्भक्ती उद्धवा ॥ ९५ ॥ हे माझी आवडती भक्ती ॥ इचें नांव ह्मणिजेत चौथी ॥ हें भाग्य आतुडे ज्याचे हातीं ॥ तैं चारी मुक्ती निजदासी ॥ ९६ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ भक्तिं लब्धवतः साधोः किमन्यवदशिष्यते ॥ मय्यनंतगुणे ब्रह्मण्यानंदानुभवात्मनि ॥ ३० ॥ ॥ टीका ॥ ॥ अत्यंत माझी पढियंती ॥ ते हे जाण चौथी भक्ती ॥ निजभाग्यें लाधल्या हातीं ॥ चारी मुक्ती तृणप्राय ॥ ९७ ॥ निरपेक्ष जेथ माझी भक्ती ॥ तेथ पायां लागती चारी मुक्ती ॥ त्यांतें भक्त न धरिती हातीं ॥ एथवरी प्रीती मद्भजनीं ॥ ९८ ॥ माझिया निजभजनप्रीतीं ॥ स्वप्नींही बद्धता नेणिजे भक्ती ॥ बद्धतेवीण मिथ्या मुक्ती ॥ जाणोनि नघेती निजभक्त ॥ ९९ ॥ जेथ बद्धता समूळ कुडी ॥ तेथ मुक्ति कायशी बापुडी ॥ माझिया निजभजनआवडीं ॥ स्वानंदकोडी मद्भक्तां ॥ ४०० ॥ निरपेक्ष निजप्रीती ॥ भावें करितां अनन्यभक्ती ॥ भक्तांसि स्वानंदाची प्राप्ती ॥ भजनस्थितीमाझारीं ॥ १ ॥ जेवीं गर्भासि वर्तवी गुर्विणी[3] ॥ कां तरुणपणेंसि तरुणी ॥ तेवीं स्वानंदाच्या पूर्णपणीं ॥ माझे निजभजनीं मद्भक्त ॥ २ ॥ तेथ सगुण अथवा निर्गुण ॥ उभयरूपें ब्रह्म पूर्ण ॥ तेथ भावें करितां भजन ॥ ब्रह्मसंपन्न मद्भक्त ॥ ३ ॥ भावें करितां माझी भक्ती ॥ भाविकां कोण पां अप्राप्ती ॥ विवेकवैराग्यज्ञानसंपत्ती ॥ पायां लागती मद्भक्तां ॥ ४ ॥ माझे निजभजनें तुटे भेद ॥ स्वयेंचि तेथें प्रकटे अभेद बोध ॥ तेणें वोसंडे परमानंद ॥ स्वानंदकंद स्वयंभ ॥ ५ ॥ माझे स्वस्वरूपा नाहीं अंत ॥ यालागीं नावें मी अनंत ॥ बाप भक्तभाव समर्थ ॥ तेणें मी अनंत आकळिलों[4] ॥ ६ ॥ ऐसें ज्याचें प्रेम गोड ॥ त्याचे सेवेचें मज कोड ॥ त्याचें सोशीं मी सांकड ॥ निचाडा चाड मज त्याची ॥ ७ ॥ देव सप्रेमें भुलला ॥ ह्मणे मी त्याचाचि अंकिला ॥ जीवें भावें तया विकिला ॥ मी त्याचा जाहलों तिहीं लोकीं ॥ ८ ॥ एथवरी भक्ता माझी प्राप्ती ॥ अवचटें झाल्या सत्संगती ॥ मा सद्भावें जे साधु सेविती ॥ त्यांची निजगती न बोलवे ॥ ९ ॥ ऐसा संतमहिमा वानितां ॥ धणी न पुरे श्रीकृष्णनाथा ॥ तोचि संतमहिमा मागुता ॥ होय वानिता चौश्लोकीं ॥ ४१० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ यथोपश्रयमाणस्य भगवंतं विभावसुम् ॥

---

[1] सूर्यकिरणानें. [2] ज्ञानस्वरूपांत. [3] गर्भिणी. [4] स्वाधीन झालों.

शीतं भयं तमोऽप्येति साधून् संसेवतस्तथा ॥ ३१ ॥ ॥ टीका ॥ ॥ जेवीं वैश्वानर[१] तेजोमूर्ती ॥ त्याची सेवा जे करूं जाणती ॥ त्यांचें
शीततमभयनिवृत्ती ॥ जो करी निश्चितीं उद्धवा ॥ ११ ॥ शीत निवारी सन्निधी ॥ तम निवारी तेजोवृद्धी ॥ भय निवारी भगवद्बुद्धी ॥
जेवीं त्रिशुद्धी विभावसू ॥ १२ ॥ तैशीच जाण सत्संगती ॥ संगें त्रिविधताप निवारिती ॥ तेचि अर्थींची निजयुक्ती ॥ ऐक उपपत्ती
उद्धवा ॥ १३ ॥ शीत ह्मणिजे द्वंद्वबाधू ॥ तो समूळ निवारिती साधू ॥ तम ह्मणिजे अज्ञानांधू ॥ त्यासि करिती प्रबोधू[२] निजज्ञानें ॥ १४ ॥
भयांमाजी श्रेष्ठ मरण ॥ तें निवारिती साधुविचक्षण ॥ दूर करिती जन्ममरण ॥ कृपाळु पूर्ण दीनांचे ॥ १५ ॥ अग्निसमान ह्मणणें
साधू ॥ हाही बोल अति अबद्धू ॥ अग्नीहूनि अधिक साधू ॥ तोचि प्रबोधू हरी सांगे ॥ १६ ॥ अग्नीपाशीं प्रबळ धूम[३] ॥ साधु निष्क्रोध
निर्धूम ॥ अग्नि पोळी अधमोत्तम ॥ साधु सर्वसम सुखदाते ॥ १७ ॥ साधूंची धन्यधन्य संगती ॥ संगें जडजाड्य तोडिती ॥ कर्मांचें
कर्मठत्व मोडिती ॥ बुडत्या तारिती निजसंगें ॥ १८ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ निमज्ज्योन्मज्जतां घोरे भवाब्धौ परमायनम् ॥ संतो ब्रह्मविदः
शांता नौर्दृढेवाप्सु मज्जताम् ॥ ३२ ॥ ॥ टीका ॥ ॥ प्रतिक्षणीं अधिक वृद्धी ॥ अमर्याद वाढी भवाब्धी ॥ तेथ उबगल्या त्रिशुद्धी ॥ अ
धर्मबुद्धी जनासी ॥ १९ ॥ अधर्में निमज्जन[४] नरकांत ॥ स्वधर्में उन्मज्जन[५] स्वर्गांत ॥ ऐसे भोगिती आवर्त[६] ॥ स्वर्गनरकांत संसारी
॥ ४२० ॥ यापरी संसारीजन ॥ पावती उन्मज्जन निमज्जन ॥ त्यांसि तरावया भवाब्धि जाण ॥ साधु सज्जन दृढ नावँ[७] ॥ २१ ॥ पड
त्या जळार्णवामाझारी ॥ जेवीं अच्छिद्र नाव तारी ॥ तेवीं बुडतां भवसागरीं ॥ सुखरूपें तारी सज्जननाव ॥ २२ ॥ कामक्रोधरहित
शांती ॥ हेचि नावेची अच्छिद्र स्थिती ॥ ब्रह्मज्ञानें सपुरती ॥ सुखरूप निश्चितीं याहेतू ॥ २३ ॥ कामक्रोधादिसावजांसी ॥ बळें घ्यावया
आविसासी ॥ कदा न पवे नावेपाशीं ॥ संगें सकळांसी तारक ॥ २४ ॥ नवल ये नावेची स्थिती ॥ जुनी नव्हे[८] कल्पांतीं ॥ बुडवूं नेणें
धारावर्तीं[९] ॥ तारक निश्चितीं निजसंगें ॥ २५ ॥ परी ये नावेची नवलगती ॥ वरी चढले ते बुडती ॥ तळीं राहिले ते तरती ॥ जाण
निश्चितीं उद्धवा ॥ २६ ॥ दीनांचा कळवळा पहाहो ॥ हाचि मुख्यत्वें तरणोपावो ॥ त्या कळवळ्याचा अभिप्रावो ॥ स्वयें देवो सांगत
॥ २७ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अन्नं हि प्राणिनां प्राण आर्तानां शरणं त्वहम् ॥ धर्मो वित्तं नृणां प्रेत्य संतोऽर्वाग्बिभ्यतो रणम् ॥ ३३ ॥ ॥
टीका ॥ ॥ जेवीं अन्नेंवीण प्राण ॥ सर्वथा न वांचती जाण ॥ प्राण्यांचें प्राणपोषण ॥ करावया सामर्थ्य पूर्ण अन्नीं नांदे ॥ २८ ॥
जोडली धर्माची संपत्ती ॥ ते इहलोकीं होय रक्षिती ॥ तेवीं धर्मधन देहांतीं ॥ उत्तमगतीदायक ॥ २९ ॥ संसारीं पीडिले दारुण ॥

---

१ अग्नि. २ प्रकाश. ३ धूर. ४ बुडणें. ५ वर येणें. ६ फेरे. ७ नौका. ८ होत नाहीं. ९ वेगानें वाहणाऱ्या प्रवाहांत व भोंवऱ्यांत.

त्रिविधतापें तापले पूर्ण ॥ ऐशिया शरणागतां शरण्यं[1] ॥ मी नारायण रक्षिता ॥ ४३० ॥ माझें करितां नामस्मरण ॥ सहजें निवारे जन्ममरण ॥ त्या मज रिघालिया शरण ॥ बाधी दुःख कोण बापुडें ॥३१॥ दुःखभय न पावतां आधीं ॥ जिहीं साधु सेविले सद्बुद्धीं ॥ त्यांसि भवभयाची आधिव्याधी ॥ जाण त्रिशुद्धी बाधीना ॥ ३२ ॥ प्राणियांसि होतां पतन ॥ भाग्यें भेटल्या सज्जन ॥ निजरूपेनें अधोगमन ॥ जन्ममरण छेदितू ॥ ३३ ॥ संसार तरावया जाण ॥ सत्संगतीचि प्रमाण ॥ त्यांचे भावें धरितां चरण ॥ दीनोद्धरण त्यांचेनी ॥ ३४ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ संतो दिशंति चक्षूंषि बहिरर्कः[2] समुत्थितः ॥ देवता बांधवाः संतः संत आत्माऽहमेव च ॥ ३४ ॥ ॥ टीका ॥ जेवीं आंधारेंसि सगळी राती ॥ निजतेजें निरसी गभस्ती ॥ सत्संगसूर्यप्राप्ती ॥ अविद्येची निश्चितीं निरसी निशा ॥ ३५ ॥ बाह्य उगवल्या गभस्ती ॥ चोरभयाची होय निवृत्ती ॥ तेवीं जोडल्या सत्संगती ॥ भवभय कल्पांतीं असेना ॥ ३६ ॥ बाह्यसूर्योदयकाळीं ॥ पक्षी सांडिती आंविसाळीं ॥ सत्संगसूर्याचे मेळीं ॥ देहाचीं आंविसाळीं सांडिती जीव ॥ ३७ ॥ बाह्यसूर्याच्या किरणीं ॥ हर्षें विकासे कमळणी ॥ सत्संगसूर्याचे मिळणीं ॥ निर्विकल्पकमळणी विकासे ॥ ३८ ॥ सूर्य उगवलिया गगनीं ॥ चक्रवाकें मिळती मिळणीं[3] ॥ तेवीं सत्संग पावोनी ॥ जीवं[4] शिवं[5] दोनीं एकवटती ॥ ३९ ॥ बाह्यसूर्याचे पहांटेसी ॥ पांथिकं[6] चालती स्वग्रामासी ॥ सत्संगसूर्याचे प्रकाशीं ॥ मुमुक्षु निजधामासी पावती ॥ ४४० ॥ बाह्यसूर्याचे उदयस्थितीं ॥ कर्मांची चाले कर्मगती ॥ सत्संगसूर्याचे संगतीं ॥ निष्कर्मप्रवृत्ती प्रवर्ते ॥ ४१ ॥ सूर्यबिंबाचे उदयं[7]संधीं ॥ अर्घ्यदानादि जे वेदविधी ॥ सत्संगसूर्याचे संबंधीं ॥ दीजे देहबुद्धी तिलांजळी ॥ ४२ ॥ सूर्यउदयाचिया प्राप्ती ॥ याज्ञिक होमातें हविर्ती[8] ॥ तेवीं सत्संगसूर्यस्थिती ॥ अहंता हविती ज्ञानाग्नीं ॥ ४३ ॥ सूर्य उगवूनि आकाशीं ॥ जगाची जडनिद्रा निरसी ॥ संत उगवूनि चिदाकाशीं ॥ जीवां चित्प्रकाशीं[9] प्रबोधी ॥ ४४ ॥ होकां साधु सूर्यासमान ॥ हें बोलणें निर्लिंग[10] हीन ॥ सूर्यो पावे अस्तमान ॥ साधु प्रकाशमान सर्वदा ॥ ४५ ॥ सूर्यासि आच्छादी आभाळ ॥ साधु सदा जनीं निर्मळ ॥ सूर्यासि सदा भ्रमणकाळ ॥ साधु अचंचळ भ्रमणरहित ॥ ४६ ॥ ग्रहणकाळाचा लवलाहो ॥ पावतां सूर्यातें ग्रासी राहो ॥ साधु ग्रहांचा पुसोनि ठावो ॥ स्वानंदें पहाहो नांदती ॥ ४७ ॥ धुई दाटतां प्रबळ ॥ तेणें आच्छादे रविमंडळ ॥ तम धूम मोहपडळ ॥ साधूंसि अळुमाळ बाधीना ॥ ४८ ॥ सूर्य निजकिरणें सर्वांतें तावी ॥ साधु निजांगें जग निववी ॥ सूर्य सर्वांतें क्षयो दावी ॥ साधू अक्षयी करी बोधें ॥४९॥ सूर्यों साह्य झालिया दृष्टी ॥ दृश्याकारें उघडे सृष्टी ॥ सत्संग साह्य झालिया सृष्टीं ॥ चिन्मात्रसृष्टी ठसावे ॥५०॥

---

[1] रक्षण करणारा. [2] सूर्य. [3] एक ठिकाणीं. [4] अविद्यासहित आत्मा. [5] अविद्यारहित आत्मा. [6] वाटसरू. [7] उदयाच्या वेळेस. [8] हवन करितात. [9] ज्ञानरूपप्रकाशानें [10] अगदीं.

विवेकें विचारितां देख ॥ सूर्याहूनि साधु अधिक ॥ साधु धरातळीं[1] ज्ञानार्क[2] ॥ भवाब्धितारक निजसंगियां ॥ ५१ ॥ पृथ्वीतळीं देवता साधू ॥ साधु दीनांचे सखे बंधू ॥ साधुरूपें मी परमानंदू ॥ जाण प्रसिद्ध परमात्मा ॥ ५२ ॥ देवां दीजे बळिदान ॥ तेव्हां देव होती प्रसन्न ॥ कृपातारक निजसज्जन ॥ दयाळु पूर्ण दीनांचे ॥ ५३ ॥ सुहृद सखे सगोत्र बंधू ॥ द्रव्यलोभें भजनसंबंधू ॥ निर्लोभें कृपाळु साधू ॥ सखे बंधू दीनांचे ॥ ५४ ॥ संत केवळ कृपेचे दीप ॥ संत ते माझें निज स्वरूप ॥ यालागीं सत्संगें फिटे पाप ॥ होती निष्पाप साधक ॥ ५५ ॥ निष्पाप करूनि साधकांसी ॥ ब्रह्मसरूपता देती त्यांसी ॥ ऐसें कृपाळुत्व साधूंपाशीं ॥ जाण निश्चयेंसी उद्धवा ॥ ५६ ॥ मी निर्गुणत्वें ब्रह्म पूर्ण ॥ साधू चालतें बोलतें ब्रह्म जाण ॥ तयांसि रिघालिया[3] शरण ॥ जन्ममरण बाधेना ॥ ५७ ॥ साधूंसि सद्भावें शरण ॥ रिघाल्या नासे जन्ममरण ॥ साधु शरणागतां शरण्य ॥ सत्य जाण उद्धवा ॥ ५८ ॥ भावें धरिलिया सत्संगती ॥ संसारिया होय मुक्ती ॥ हें प्रतिज्ञापूर्वक श्रीपती ॥ उद्धवाप्रती बोलिला ॥ ५९ ॥ सद्भावेंसि सत्संगती ॥ धरितां घरां[4] ये ब्रह्मस्थिती ॥ हें निजवर्म उद्धवाप्रती ॥ देवें अध्यायांतीं निरूपिलें ॥ ४६० ॥ परम विरक्तीचें कारण ॥ तें हें पुरूरवाप्रकरण[5] ॥ उपसंहारें श्रीकृष्ण ॥ अध्यायांतीं जाण संपवी ॥ ६१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ वैतसेनस्ततोऽप्येवमुर्वश्या लोकनिस्पृहः ॥ मुक्तसंगो महीमेतामात्मारामश्चचार ह ॥ ३५ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते म० एकादशस्कंधे ऐलगीतं नाम षड्विंशोऽध्यायः ॥ २६ ॥ ॥ टीका ॥ ॥ पूर्वीं सूर्यवंश प्रसिद्ध ॥ तेथ सोमवंशाचा संबंध ॥ वैतसेन श्लोकींचें पद ॥ लावूनि गोविंद बोलिला ॥ ६२ ॥ उमावनीं[6] अतिएकांत ॥ तेथ उमा आणि उमाकांत[7] ॥ विगतवासेंसि[8] क्रीडत ॥ स्वानंदयुक्त स्वलीला ॥ ६३ ॥ तेथ शिवाचे दर्शनासी ॥ अवचटें आले सप्तऋषी ॥ लज्जा उपजली पार्वतीसी ॥ तिणें त्या वनासी शापिलें ॥ ६४ ॥ जो पुरुष या वनाआंत ॥ येईल तो होईल स्त्रीरूप एथ ॥ ऐसा शाप क्रोधयुक्त ॥ वदली निश्चित जगदंबा ॥ ६५ ॥ तेथ राजा सुद्युम्न सूर्यवंशी ॥ नेणोनियां शापप्रभावासी ॥ पारधी[9] आला त्या वनासी ॥ सकळसेनेंसी सन्नद्ध ॥ ६६ ॥ रिघतांचि त्या वनाआंत ॥ पुरुषत्व पालटलें तेथ ॥ बाप शापाचें सामर्थ्य ॥ झाले समस्त स्त्रीरूप ॥ ६७ ॥ तेथ पुरुषत्वाची आठवण ॥ निःशेष विसरलें मन ॥ आपण पूर्वीं होतों कोण ॥ हेंही संपूर्ण विसरले ॥ ६८ ॥ अश्व झाले अश्विनी ॥ हस्ती झाले हस्तिणी ॥ पुरुष झालीं कामिनी ॥ तत्क्षणीं त्या वनांत ॥ ६९ ॥ तेथ पुरुषकामें कामासक्ती ॥ अनेक अनेकां पुरुषांप्रती ॥ स्त्रिया गेलिया त्या समस्ती ॥ अति कामरती संभोगा ॥ ४७० ॥ राजा सुद्युम्न झाला नारी ॥ अतिसुकुमार सुंदरी ॥ तो[10] सोमपुत्र बुधातें वरी ॥ अतिप्रीतीकरीं भाळोनि ॥ ७१ ॥

---

१ पृथ्वीवर. २ ज्ञानरूप सूर्य. ३ गेल्यास. ४ आपोआप. ५ पुरूरव्याचें आख्यान. ६ पार्वतीच्या क्रीडास्थानांत. ७ शंकर. ८ नग्न. ९ शिकारीस. १० सुद्युम्न.

बुधें सुद्युम्न देखोनि नारी ॥ तो भुलला स्त्री कामेंकरीं ॥ एवं अतिप्रीतीं परस्परीं ॥ येरयेरांवरी भाळलीं ॥ ७२ ॥ बुध महाराज चूडामणी ॥ तो सुद्युम्नातें स्त्रीत्वें पर्णी ॥ केली पटाची निजराणी ॥ बाप करणी कर्माची ॥ ७३ ॥ सुद्युम्न बुधवीर्येंकरीं ॥ पुरूरवा जन्मे त्याचे उदरीं ॥ एवं सूर्यवंशामाझारीं ॥ सोमवंश यापरी संचरला ॥ ७४ ॥ हे सोमवंशींची आद्यकथा ॥ एथूनि सोमवंश वाढता ॥ श्रीकृष्ण बोलिला ध्वनितार्था ॥ तेचि म्यां कथा उपलपिली[1] ॥ ७५ ॥ सुद्युम्न झाला बुधाची नारी ॥ मागें सूर्यवंशामाझारी ॥ नाहीं राज्यासि अधिकारी ॥ संकट भारी वोढवलें ॥ ७६ ॥ ते सूर्यवंशीचा कुळगुरू ॥ वसिष्ठ महायोगीश्वरू ॥ तेणें करूनि अत्यादरू ॥ गौरीहरू प्रार्थिलीं ॥ ७७ ॥ प्रसन्न करूनि पार्वतीसी ॥ मागे सुद्युम्नाच्या उच्छापासी ॥ येरी सांगे महादेवासी ॥ तुह्मी वसिष्ठासी बुझवावें[2] ॥ ७८ ॥ जें भवानीचें शापवचन ॥ कदा अन्यथा नव्हे जाण ॥ धरावया वसिष्ठाचें मन ॥ नवल विंदान शिवें केलें ॥ ७९ ॥ शुक्लपक्षीं सुद्युम्नासी ॥ पुरुषत्व प्राप्त होईल त्यासी ॥ कृष्णपक्षीं बुधापाशीं ॥ स्त्रीभावेंसी वर्त्तेल ॥ ४८० ॥ पक्ष[3] पुरुष पक्ष नारी ॥ ऐशिया उच्छापाची परी ॥ शिवें करूनि कृपेंकरीं ॥ केला अधिकारी निजराज्या ॥ ८१ ॥ पुरुषत्व पावल्या सुद्युम्नासी ॥ तें पुरुषत्व नावडे त्यासी ॥ स्त्रीसंभोगें बुधापाशीं ॥ अतिप्रीतीसी लाधला ॥ ८२ ॥ स्वर्गअप्सरा आलिया पाशीं ॥ त्याही नावडती सुद्युम्नासी ॥ त्याहूनि प्रीति बुधापाशीं ॥ स्त्रीभावेंसी अनिवार ॥ ८३ ॥ बुधासि स्वर्गांगना ॥ संभोगीं न येती मना ॥ ऐशी अतिप्रीति सुद्युम्ना ॥ स्त्रीभोगें जाणा विगुंतली ॥ ८४ ॥ पुरुषीं पुरुषत्वाची रीती ॥ भोगूं जाणें मी श्रीपती ॥ इतर बापुडीं तें किती ॥ स्त्रीदेहासक्ती भुललीं ॥ ८५ ॥ स्त्रीदेहीं जो आत्मा असे ॥ तो भोगिजे म्यां हृषीकेशें ॥ इतरांसि स्त्रीदेहींचें पिसें[4] ॥ विषयावेशें भुलोनी ॥ ८६ ॥ असो हें सांगावें किती ॥ कामीं निष्कामतेची रती ॥ ते मी जाणें रमापती ॥ कां जाणती निजानुभवी ॥ ८७ ॥ स्त्रीदेहीं अतिआसक्ती ॥ त्याचि नांवें कामासक्ती ॥ त्या स्त्रीकामाची निजनिवृत्ती ॥ जाण निश्चितीं सत्संगें ॥ ८८ ॥ वसिष्ठाचिये सत्संगतीं ॥ झाली स्त्रीभावाची निवृत्ती ॥ सुद्युम्न पावला पुरुषत्वप्राप्ती ॥ धन्य त्रिजगतीं सत्संग ॥ ८९ ॥ पुरुषत्व पावोनि सुद्युम्न ॥ निजनगरा येतां जाण ॥ स्त्रीभावें[5] नष्टलें सैन्य ॥ एकला आपण स्वयें आला ॥ ४९० ॥ एवं निःशेष विगतसैन्य ॥ यालागीं नांवें वीतसेन ॥ त्या वीतसेनाचा[6] पुत्र जाण ॥ वैतसेन पुरूरवा ॥ ९१ ॥ तेणें निजात्मता अतिविरक्ती ॥ सांडूनि स्वर्गभोगसंपत्ती ॥ त्यजूनि उर्वशीकामासक्ती ॥ आत्मारामस्थिती पावला ॥ ९२ ॥ आत्माराम निजस्थितीं ॥ मिथ्यादेहसंगसंगती ॥ निजात्मबोधें त्रिजगतीं ॥ स्वानंदें नृपती विचरत ॥ ९३ ॥ जेथें जेथें पाउल उठी ॥ तेथें होती

---

[1] उपपादन केली. [2] समजवावें. [3] पंधरा दिवस. [4] वेड. [5] स्त्रीपणामुळें. [6] सुद्युम्नाचा.

सुखाच्या कोटी ॥ स्वानंदें कोंदली सृष्टी ॥ ब्रह्मदृष्टीं विचरतू ॥ ९४ ॥ ब्रह्मीं विचरतां ब्रह्मपणें ॥ ब्रह्मरूप झालें जिणें ॥ विसरला जिंणें मरणें ॥ पूर्णपणें परिपूर्ण ॥ ९५ ॥ हें उर्वशीपुरूरवोपाख्यान ॥ जो स्वयें ऐके सावधान ॥ तैं दोष जाती अगम्यागमन ॥ विरक्ति संपूर्ण साधकां ॥ ९६ ॥ यापरी वैराग्ययुक्तीं ॥ राजा पावला ब्रह्मप्राप्ती ॥ वैराग्य उपजे सत्संगतीं ॥ सत्संगें विरक्ती मद्भजनें ॥ ९७॥ मद्भावें करितां माझी भक्ती ॥ साधकां उपजे विरक्ती ॥ ऐसें बोलिला श्रीपती ॥ तें उद्धवें चित्तीं दृढ धरिलें ॥ ९८ ॥ ते भजनक्रियेचा प्रश्न ॥ पुढिले अध्यायीं जाण ॥ उद्धव पुसेल आपण ॥ जेणें श्रीकृष्ण संतोषे ॥ ९९ ॥ उद्धव पुसेल गोड गोठी ॥ जेणें श्रीकृष्ण सुखावे पोटीं ॥ तेणें स्वानंदें निजपुष्टी ॥ भजनहातवटी सांगेल ॥ ५०० ॥ उपासनाकांडरहस्य पूर्ण ॥ मुख्य क्रियायोगनिरूपण ॥ समूळ आगमलक्षण ॥ स्वमुखें श्रीकृष्ण सांगेल ॥ १ ॥ ते कथेसी अवधान ॥ श्रोतां द्यावें सावधान ॥ एका तुष्टला जनार्दन ॥ स्वानंदघन निजबोधें ॥ ५०२ ॥ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीकायां ऐलगीतोपाख्यानं नाम षड्विंशोऽध्यायः ॥ २६ ॥ ॥ अध्याय ॥ २६ ॥ ॥ ओंव्या ॥ ५०२ ॥ ॥ मूळश्लोक ॥ ३५ ॥ एवंसंख्या ॥ ५३७ ॥ ॥ ॥छ॥ ॥छ॥

---

१ जन्म. २ ज्या स्त्रीचे ठिकाणीं गमन करूंनये अशा स्त्रीचे ठिकाणीं गमन करणें इत्यादि.

```
[OrderDescription]
,CREATED=20.02.20 12:51
,TRANSFERRED=2020/02/20 at 14:07:36
,PAGES=145
,TYPE=STD
,NAME=S0002856
,Book Name=154
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF
,FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF
,FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF
,FILE15=00000015.TIF
,FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
```

```
FILE22=00000022.TIF
,FILE23=00000023.TIF
,FILE24=00000024.TIF
,FILE25=00000025.TIF
,FILE26=00000026.TIF
,FILE27=00000027.TIF
,FILE28=00000028.TIF
,FILE29=00000029.TIF
,FILE30=00000030.TIF
,FILE31=00000031.TIF
,FILE32=00000032.TIF
,FILE33=00000033.TIF
,FILE34=00000034.TIF
,FILE35=00000035.TIF
,FILE36=00000036.TIF
,FILE37=00000037.TIF
,FILE38=00000038.TIF
,FILE39=00000039.TIF
,FILE40=00000040.TIF
,FILE41=00000041.TIF
,FILE42=00000042.TIF
,FILE43=00000043.TIF
,FILE44=00000044.TIF
,FILE45=00000045.TIF
,FILE46=00000046.TIF
,FILE47=00000047.TIF
,FILE48=00000048.TIF
,FILE49=00000049.TIF
,FILE50=00000050.TIF
,FILE51=00000051.TIF
```

```
FILE52=00000052.TIF
,FILE53=00000053.TIF
,FILE54=00000054.TIF
,FILE55=00000055.TIF
,FILE56=00000056.TIF
,FILE57=00000057.TIF
,FILE58=00000058.TIF
,FILE59=00000059.TIF
,FILE60=00000060.TIF
,FILE61=00000061.TIF
,FILE62=00000062.TIF
,FILE63=00000063.TIF
,FILE64=00000064.TIF
,FILE65=00000065.TIF
,FILE66=00000066.TIF
,FILE67=00000067.TIF
,FILE68=00000068.TIF
,FILE69=00000069.TIF
,FILE70=00000070.TIF
,FILE71=00000071.TIF
,FILE72=00000072.TIF
,FILE73=00000073.TIF
,FILE74=00000074.TIF
,FILE75=00000075.TIF
,FILE76=00000076.TIF
,FILE77=00000077.TIF
,FILE78=00000078.TIF
,FILE79=00000079.TIF
,FILE80=00000080.TIF
,FILE81=00000081.TIF
```

```
FILE82=00000082.TIF
,FILE83=00000083.TIF
,FILE84=00000084.TIF
,FILE85=00000085.TIF
,FILE86=00000086.TIF
,FILE87=00000087.TIF
,FILE88=00000088.TIF
,FILE89=00000089.TIF
,FILE90=00000090.TIF
,FILE91=00000091.TIF
,FILE92=00000092.TIF
,FILE93=00000093.TIF
,FILE94=00000094.TIF
,FILE95=00000095.TIF
,FILE96=00000096.TIF
,FILE97=00000097.TIF
,FILE98=00000098.TIF
,FILE99=00000099.TIF
,FILE100=00000100.TIF
,FILE101=00000101.TIF
,FILE102=00000102.TIF
,FILE103=00000103.TIF
,FILE104=00000104.TIF
,FILE105=00000105.TIF
,FILE106=00000106.TIF
,FILE107=00000107.TIF
,FILE108=00000108.TIF
,FILE109=00000109.TIF
,FILE110=00000110.TIF
,FILE111=00000111.TIF
```

```
FILE112=00000112.TIF
,FILE113=00000113.TIF
,FILE114=00000114.TIF
,FILE115=00000115.TIF
,FILE116=00000116.TIF
,FILE117=00000117.TIF
,FILE118=00000118.TIF
,FILE119=00000119.TIF
,FILE120=00000120.TIF
,FILE121=00000121.TIF
,FILE122=00000122.TIF
,FILE123=00000123.TIF
,FILE124=00000124.TIF
,FILE125=00000125.TIF
,FILE126=00000126.TIF
,FILE127=00000127.TIF
,FILE128=00000128.TIF
,FILE129=00000129.TIF
,FILE130=00000130.TIF
,FILE131=00000131.TIF
,FILE132=00000132.TIF
,FILE133=00000133.TIF
,FILE134=00000134.TIF
,FILE135=00000135.TIF
,FILE136=00000136.TIF
,FILE137=00000137.TIF
,FILE138=00000138.TIF
,FILE139=00000139.TIF
,FILE140=00000140.TIF
,FILE141=00000141.TIF
```

```
FILE142=00000142.TIF
,FILE143=00000143.TIF
,FILE144=00000144.TIF
,FILE145=00000145.TIF
,
```